भारतीय
संस्कृतिकोश

Y73(P15):1k 8414
155M2J·3
Joshi, Mahadev Shastri,
skriti Kosha

8414

Y73(P15):1k
155M2J.3

S.J.V.J. PRATISHTHAN
LIBRARY
Jangamawadimath, Varanasi
Acc. No. 3

SHRI JAGADGURU VISHWARADHYA JNANAMANDIR
(LIBRARY)
JANGAMAWADIMATH, VARANASI

Please return this volume on or before the date last stamped
Overdue volume will be charged 1/- per day.

भारतीय संस्कृतिकोश

–तिसरा खंड–

गाहडवाल ते तंत्रशास्त्र

संपादक :

पं. महादेवशास्त्री जोशी

सहसंपादक

तर्कतीर्थ सौ. पद्मजा होडारकर एम्. ए.

भारतीय संस्कृतिकोश मंडळ
४१०, शनिवार पेठ, पुणे ३०.

प्रकाशक :
शं. मं. होडारकर
कार्यवाह, भारतीय संस्कृति कोशमंडळ
४१०, शनिवार पेठ,
पुणे ४११०३०

❑

प्रथमावृत्ती : शके १८९६
(३१ ऑगस्ट १९७४)

पुनर्मुद्रण : इ. स. १९८७; १९९३.

❑

© भा. सं. कोशमंडळ
४१०, शनिवार पेठ
पुणे ४११०३०.

Y73(P15):1k
155M2J.3

❑

मुद्रक :
श. हे. गुर्जर
आयुर्विद्या मुद्रणालय
९९२ सदाशिव पेठ
पुणे ४११०३०

S.J.V.J. PRATISHTHAN
LIBRARY
Jangamawadimath, Varanasi
Acc. No. 3

❑

फोटो प्रोसेसिंग
ब. शं. दाते.
कलाप्रतिमा पुणे - ३०

SRI JAGADGURU VISHWARADHYA
JNANA SIMHASAN JNANAMANDAL
LIBRARY
Jangamwadi Math, Varanasi
ACC No. 8414

❑

वितरक :
अनमोल प्रकाशन
६८३, बुधवारपेठ
अप्पा बळवंत चौक
पुणे ४११००२

मूल्य : दोनशे पन्नास रुपये

प्रस्तावना

भारतीय संस्कृती कोशाचा हा खंड गेले काही महिने दुर्मिळ झाला होता. ती उणीव पुनर्मुद्रणाने आज भरून निघत आहे. कोशाचा संकल्प, योजना आणि व्याप्ती या विषयी प्रथम खंडाच्या प्रस्तावनेत सविस्तर लिहिलेच आहे. म्हणून त्याची पुनरुक्ती इथे टाळीत आहे.

मात्र काहीं गोष्टींचा खुलासा दुसऱ्या, तिसऱ्या, चौथ्या, पाचव्या, सहाव्या, सातव्या व आठव्या खंडांच्या प्रस्तावनेत केला आहे. तोच इथे पुन्हा उद्धृत करणे आवश्यक आहे.

शुद्धलेखन : मराठी साहित्य महामंडळाने शुद्धलेखनाचे नवे नियम केले व त्यांना महाराष्ट्र राज्य सरकारने मान्यता दिली. त्या नियमांना अनुसरुन या तिसऱ्या खंडाचे मुद्रण केले आहे.

जाती-जमातींची माहिती - गेल्या शतकात व चालू शतकाच्या प्रारंभी अनेक पाश्चात्त्य व भारतीय संशोधकांनी भारतातील, बहुसंख्य जाती- जमातींचे संशोधन करून मोठमोठे ग्रंथ लिहून ठेवले आहेत. अशा अनेक ग्रंथांचा उपयोग करून आम्ही विविध जाती- जमातींची माहिती संकलित केली आहे व तिचा योग्य तो उपयोग केला आहे. पण त्यातील बरीच माहिती आता जुनी झाली आहे. कालमानाप्रमाणे बहुतेक जाती-जमातींच्या व्यवसायात, राहणीत व चालीरितीत पुष्कळ फरक पडले असणे शक्य आहे. पण त्याची प्रत्यक्ष पाहणी करून त्यांच्याविषयी अद्यावत माहिती मिळवणे आम्हाला शक्य झाले नाही. अर्थात प्रत्येक गोष्टीची समक्ष पाहणी करुन एखादा ज्ञानकोश निर्माण करणे शक्यच नसते. संपादकाला उपलब्ध ग्रंथांच्या आधारेच आपला कार्यभाग साधावा लागतो: आम्हीही तेच आणि तसेच केले. मात्र अलिकडे भारतीय व पाश्चिमात्त्य संशोधकांनी काही जाती जमातींची प्रत्यक्ष पाहणी करून नवे ग्रंथ लिहिले आहेत. त्यांचा आम्ही शक्य तेवढा उपयोग करून घेतला आहे.

भारतातील अनेक जिल्ह्यांचे जिल्हानामे (गॅझेटिअर्स) यांचा शक्य तेवढा उपयोग केलेला आहे.

गेले काहीं वर्षे भारतीय संस्कृती कोशाचा तिसरा, चौथा, पाचवा, सहावा, सातवा व आठवा हे खंड दुर्मिळ झाले होते. ग्राहकांना पुरा संच मिळत नव्हता. हे दुर्मिळ खंड पुनर्मुद्रित करावयाचे तर त्यासाठी लागणारी मदत मिळवण्यासाठी माजी कार्यवाह व संपादक पं. महादेवशास्त्री जोशींना अनेक उदार दात्यांकडे याचना करण्यासाठी भ्रमन्ती करावी लागली असती. पण त्यांच्या उतारवयामुळे व शारिरीक दुर्बलतेमुळे त्यांना हे काम सर्वथैव अशक्य होते. त्यांची ही परिस्थिती लक्षात घेऊन "अनमोल प्रकाशन"चे श्री पद्माकर नांदुरकर व कलाप्रतिमा पुणे या संस्थेचे श्री ब. शं. दाते हे त्यांचे मित्र कोशाचे हे खंडित झालेले काम पुढे चालविण्यासाठी त्यांच्या मदतीला आले आणि त्यांनी सर्व आर्थिक जबाबदारी उचलण्याचे ठरवून खंड तिसरा, चवथा, पाचवा, सहावा, सातवा व आठवा पुनर्मुद्रित करण्याचे काम तडीस नेले. याच क्रमाने उर्वरीत सर्व खंड संपतील तसे तसे पुनर्मुद्रित करण्याचा मनोदय त्यांनी शास्त्रीबुवांकडे व्यक्त केला होता. त्यानुसार शास्त्रीबुवांच्या डिसेंबर १९९२ मधील दुःखद निधनानंतरही त्यांनी आपले आश्वासन पाळले व हा खंड पुनर्मुद्रित झाला. त्यांच्या या उदार सहाय्याबद्दल मी कोश मंडळातर्फे त्यांचे हार्दिक आभार मानतो.

त्याचप्रमाणे आयुर्विद्या मुद्रणालय या संस्थेचे मालक व सहकारी यांनी छपाईची जबाबदारी घेतली व ती वेळेत व सुबक रित्या पार पाडली. त्यांच्या या सहाय्याबद्दल मी कोशमंडळातर्फे त्यांचेही हार्दिक आभार मानतो. वरील सद्गृहस्थांच्या या सहकार्यामुळे आता ग्राहकांना कोशाचा समग्र संच उपलब्ध होऊ शकेल.

पुणे
भाद्रपद, शुद्ध चतुर्थी
शके १९१५
सप्टेंबर १९९३

सर्वांचा नम्र
शं. मं. होडारकर
कार्यवाह
भा. सं. कोशमंडळ

संदर्भ ग्रंथ संक्षेप

अँ. इं. — Anthropology In India, Aiyyar Ratanam, 1961

अं. भा. — अंधःकारयुगीन भारत, काशीप्रसाद जायस्वाल, १९५७

अ. अ. — अभिधान अनुशीलन, विद्याभूषण विभु, १९५८

अॅ. अँ. रा. — Annals and Antiquities of Rajasthan, J. Tod

अ. उ. सा. — अवधी और उसका साहित्य, त्रिलोकीनारायण दीक्षित, १९५४

अ. प. — अष्टछापपरिचय, धीरेन्द्र वर्मा, १९४७

अभि. रा. — अभिधानराजेन्द्रः, विजयराजेंद्रसूरीश्वरजी

अ. वु. टें. चं. — Early Wooden Temples of Chamba, Herman Goetz, 1955

अ. सा. — अपभ्रंश साहित्य, हरिवंश कोछड, १९५६

अ. सि. — Atharvavedic Civilization, V. W. Karambelkar, 1956

अ. हा म. — असा हा महाराष्ट्र, माधव गडकरी, १९६५

आ. अ. आ. लि. — Aspects of Early Assamese Literature, Editor – B. Kakti, 1953

आ. इ. — आयुर्वेद का इतिहास, कविराज सुरमचंद्र, १९५२

आ. का. गो. — आजचा व कालचा गोमंतक, अ. का. प्रियोळकर

आॅ. मु. इं. — Observations on the Mussulmauns of India – Mrs. Meer Hassan Ali, 1917

आ. र. — आनंदयात्री रवींद्रनाथ, बा. भ. बोरकर, १९६४

आ. सं. — आर्यसंस्कृति, बलदेव उपाध्याय, १९५३

आ. सं. मू. — आर्य संस्कृतिके मूलाधार, बलदेव उपाध्याय

इं. आ. — Indian Architecture, O. C. Gangoly, 1954

इं. आ. (इ.) — Indian Architecture (Islamic Period), Percy Brown

इं. आ. (बु. हिं.) — Indian Architecture (Buddhist And Hindu), Percy Brown

इं. आ. हिं. — Indo Aryan and Hindi, Sunitikumar Chatterjee

इं. इ. — Indian Inheritance, Bharatiya Vidya Bhavan, 1957

इं. गॅ. इं. — Imperial Gazetteer of India

इं. बु. इ. — The Indian Buddhist Iconography, Benoytosh Bhattacharya, 1958

इं. फो. लो. — Indian Folk-Lore, Calcutta

इं. वे. क. सू. — India of Vedic Kalpasutras, Ram Gopal, 1959

इं. सा. — Indian Sadhus, G. S. Ghurye, 1953

इं. सा. काँ. सो. — Indian Science Congress Souvenir, 1955

इं. स्ट. पा. प्रे. — Indian Studies Past And Present

इति. सह. — इतिहासातील सहली, य. न. केळकर, १९५१

उ. कों. प्रा. इ. — उत्तर कोंकणचा प्राचीन इतिहास, पु. वा. जोशी

उ. प्र. बौ. वि. — उत्तर प्रदेश में बौद्ध धर्म का विकास, नलिनाक्ष दत्त, कृष्णदत्त वाजपेयी, १९५६

उ. प्र. लो. नृ. — उत्तर प्रदेश में लोकनृत्य, भगवती शरण सिंह

उ. भा. सं. प. — उत्तरी भारत की संत–परंपरा, परशुराम चतुर्वेदी, १९५२

उ. मॉ. बा. — Upanishadas and Modern Biology, A. K. Patwardhan, 1957

उ. यो. द. — उमेश योगदर्शन, उमेशचंद्रजी, अनु. –प्रभाकर रानडे, १९५९

ऋ. द. — ऋग्वेद् दर्शन, रामचंद्र गोविंद कोलंगडे, १९५४

ऋ. ब्र. क. — ऋग्वेदीय ब्रह्मकर्मसमुच्चय

ए. इं. – मजु. — Ancient India, R. C. Majumdar, 1960

ए. इं. सा. इं. हि. क. — Ancient India and South Indian History and Culture, S. K. Aiyangar, 1941

एन्सा. मुंडा. — Encyclopaedia Mundarica, Haufman, 1950

एन्सा. रि. ए. — Encyclopaedia of Religion and Ethics, James Hastings, 1955

एन्सा. हिं. आ. — Encyclopaedia of

Hindu Architecture, Prasannakumar Acharya, 1946
ए. सि. ए. हिं. — The Educational System of the Ancient Hindus, S. K. Das, 1930
ए. से. ए. इं. — Ethnic Settlement In Ancient India, Sashi-Bhusan Chaudhuri, 1955
ए. हो. रा. — एक होता राजा, संपा.- सरोजिनी बाबर, १९६४
ओ. नि. सं. — ओझा निबंध संग्रह, गौरीशंकर हीराचंद ओझा, १९५४
ओ. स्मृ. ग्रं. — ओझा स्मृतिग्रंथ
ओ. हिं. रि. — Os Hindus Repalica Portuguesa, Antonio Noronha
क. को. प्र. — कथाकोषप्रकरण, संपा.- जिनविजयमुनि, १९४९
क. कौ. — कविता कौमुदी, रामनरेश त्रिपाठी, १९४६
कॅ. डि. — Kanarese Dynasties, Fleet
क. द. — Karnatak Darshana, R. S. Hukkerikar, 1955
क. ध. फे. नॉं. बि. — On The Karmā Dharmā Festival Of North Bihar And Its Munda Analogues – S. C. Mitra [Journal of the Department of Letters Vol. IV Calcutta Uni. Press] 1921
क. ब्र. — The Cult Of Brahma, Tarapada Bhattacharyya, 1957
क. म. — Customs Of Mankind, Lilian Eichler
क. स. सा. — कथा-सरित्सागर (हिंदी रूपांतर) संपा. – विष्णु प्रभाकर, १९५९
क. हि. वा. पु. — Cultural History From The Vayu Purana, Devendrakumar Pati, 1946
क. हे. इं. — The Cultural Heritage of India, The Rama–Krishna Mission Institute of Culture, Calcutta
का. ए. सां. अ. — कादंबरी: एक सांस्कृतिक अध्ययन, वासुदेवशरण अग्रवाल, १९५८
का. ट्रा. स. इं. — Castes And Tribes Of Southern India, Thurston
का. दे. सं. — काश्मीर : देश व संस्कृति, शिवदानसिंह चौहान, १९५०
की. पॉं. — The Keys Of Power, J. Abbot, 1932
कृ. क. — कृत्यकल्पतरुः, लक्ष्मीधरभट्ट, १९४८
कृ. जि. ब्र. श. — कृषक जीवनसंबंधी ब्रजभाषा शब्दावली, अम्बाप्रसाद 'सुमन' १९६०.
कै. सा. द. — कैरली साहित्य दर्शन, रत्नमयीदेवी दीक्षित, १९५६
को. इ. भू. — कोकणचा इतिहास व भूगोल, काणे
को. पे. ब. — Como Se Perdeu Bacaim, P. Pissurlencar
क्रि. स्ट. ले. उ. — A Critical Study of the Later Upanishadas, S. G. Desai
खं. वै. — खंड्हरोंका वैभव, मुनिकांतिसागर
गॅझे. बाँ. प्रे. — Gagetteer, Bombay Presidency
ग. लो. – गढवाली लोकगीत, गोविंद चातक, १९५६
गां. गा. — गांवगाडा, त्रिं. ना. आत्रे, १९५९
गा. दै. — गाजती दैवते, पं. महादेवशास्त्री जोशी, १९५९
गॉ. नॉ. बु. — The Gods Of Northern Buddhism
गा. पं. ३ — गाथापंचक, गाथा तिसरी, संपा.-प्रको. त्र्यं. ह. आवटे, १९०९
गी. ए. अ. — गीता एक अध्ययन, चिं. त्र्यं. केंघे, १९६०
गु. ग्रं. को. — गुरुग्रंथकोश, वीरसिंघ,
गु. सा. इ. — गुप्त साम्राज्यका इतिहास, वासुदेव उपाध्याय, १९३९
गों. गों. ब. — गोंयकारांची गोंयाभायली वसणूक, वा. र. वर्दे वालावलीकर ऊर्फ शणै गोंयबाब
गो. च. प. — श्रीगुरु गोरक्षनाथ चरित्र आणि परंपरा, रा. चिं. ढेरे, १९५९
गो. प्र. च. — गोविंद प्रभु चरित्र, वि. भि. कोलते
गो. फॅ. फि. — Goa Facts and Figures, A. K. Priyolkar
गो. बं. इ. — गोर बंजारे लोकांचा इतिहास, बळीराम हिरामण पाटील, १९३६
ग्रे. टें. तं. — The Great Temple At Tanjore, J. M. Somasundarm, 1935
ग्रे. वि. इं. — Great Women of India, Swami Madhavananda, 1953
ग्लो. गु. दे. — Glory That Was Gurjara Desa, K. M. Munshi, 1954
ग्लॉ. स्मृ. लि. — Glossary of Smriti Literature, S. C. Banerji, 1953
ग्लि. हि. क. गो. — Glimpses of History and Culture of Goa, G. Moraes
चं. उ. रा. — चंदेल और उमका राजत्वकाल, केशवचंद्र मिश्र, १९५५
चं. उ. रा. का. — चंदेल और उनका राजत्वकाल, केशवचंद्र मिश्र, १९५५
च. इ. इं — Churches In India, P. Thomas, 1964
चै. म. ब्र. सा. — चैतन्य मत और ब्रज साहित्य, मीतल प्रभुदयाल, १९६२
ज. का. ध. प्र. — जगातील कांहीं धर्म-

प्रवर्तक, भा. चिं. लेले, १९३६

ज. स्मा. ग्रं. — बिहार जयंति स्मारक ग्रंथ, शिवपूजन सहाय, १९४२

जॉ. ए. मे. इ. — Studies in the Geography of Ancient And Medieval India, D. C. Sirkar, 1960

जा. का. भा. सं — जातक-कालीन भारतीय संस्कृति, पंडित मोहनलाल महतो 'वियोगी', १९५८

जा. मा. — जातकमार्गोपदेशिका, य. के. प्रधान, १९४९

जु. वा. न. सं. — जुने वाङमय नवे संशोधन, पंडित आवळीकर, १९६४

जे. एन्. बा. व्हॉ. — J. N. Banerjee Volume, Calcutta University, 1960

जै. इ. — The Jain Iconography, B. C. Bhattacharya

जै. क. — Jain Community – A Social Survey, V. A. Sangve, 1959

जै. ध. — जैनधर्म, कैलाशचंद्र शास्त्री, १९५५

जै. भ. पृ. — जैन भक्तिकाव्य की पृष्ठभूमि, प्रेमसागर जैन, १९६३

जै. व्र. वि. सं. — जैन व्रत–विधान-संग्रह, बारेलाल जैन राजवैद्य, १९५२

ज. सं. सं. — जैन संप्रदाय आणि संस्कृति, शां. भा. देव, १९६३

जैं. सा. इ. — जैन साहित्य और इतिहास, नाथूराम प्रेमी, १९५६

जै. सि. भा. — जैन सिद्धांत भास्कर, त्रैमासिक, प्रका. जैन–सिद्धान्त–भवन, आरा (बिहार)

टॉ. टॅ. — Totem and Taboo, Sigmund Freud, 1960

टा. सा. क. वि. — टागोर:साहित्य-कला-विचार, संपा.– अ. के. भागवत, १९६१

ट्रा. आ. मि. इं. — The Tribal Art of Middle India, Verrier Elwin

ट्रा. ए. इं. — Tribes in Ancient India, Editor – Bimal Churn Law, 1943

ट्रा. का. सें. प्रॉ. इं. — Tribes and Castes of Central Provinces of India, R. V. Russel, Rai Bahadur Hiralal

ट्रा. के. — Tribes of Kerala, A. A. D. Luiz, 1962

ट्रा. डे. इं. — Tribal Demography in India, C. B. Mamoria, 1957

डि. इ. — Dictionary of Islam T. P. Hughes, 1935

डि. सा. इं. म्यु. म्यु — A Dictionary of South Indian Music and Musicians, P. Sambamoorthy, 1959

डि. सिं. — A Dictionary of Symbols, J. E. Cirlot, 1938

डे. हिं. इ. — The Development Of Hindu Iconography, Jitendra Nath Banarjee, 1956

तं. फि. ऑ. सी. — Tantra : Their Philosophy Occult and Secrets, D. N. Bose

त. सा. सं. — तमिळ साहित्य और संस्कृति, अवधनंदन, १९५८

तां. बौ. सा. सा. — तांत्रिक बौद्धसाधना और साहित्य, नागेंद्रनाथ उपाध्याय, १९३९

तां. वा. शा. दृ. — तांत्रिक वाङमय में शाक्त दृष्टि, गोपीनाथ कविराज, १९६३

ती. म. — तीर्थरूप महाराष्ट्र, पं. महादेवशास्त्री जोशी, १९५६

द. सं. इ. — दत्तसंप्रदायाचा इतिहास, रा. चिं. ढेरे, १९६४

दा. चं. — दानचंद्रिका

डु. ऑ. गु. — Dublas Of Gujarat P. G. Shah, 1958

दे. ऋ. ब्रा. प. ग्रं. — देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण परिचयग्रंथ, वि. सि. चित्राव, १९४४

द्र. गॉ. मॉ. हिं. — Dravidiyan Gods in Modern Hinduism, W. T. Elmore.

ध. गा. है. — धरती गाती है, देवेंद्र सत्यार्थी, १९४८

ध. तं. शि. — धन्वन्तरितन्त्रशिक्षा, कन्हैयालाल मिश्र, १९५३

ध. वि. स्व. — धर्मविवादस्वरूप, के. ल. दप्तरी, १९३४

ध. शा. मं. — धर्मशास्त्रमंथन, महादेवशास्त्री दिवेकर, १९३३

ध. शा. वि. — धर्मशास्त्रविचार, पां. वा. काणे

ध. सिं. — धर्मसिंधु

न. च. प. — नरसिंह सरस्वती चरित्र आणि परंपरा, रा. चिं. ढेरे, १९५८

ना. प्र. प. — नागरी प्रचारिणी पत्रिका, नागरी प्रचारिणी सभा, काशी

ना. सं. — नाथ-संप्रदाय, हजारीप्रसाद द्विवेदी, १९५०

ना. सि. बा. — नाथ सिद्धों की बानियाँ, संपा.– हजारीप्रसाद द्विवेदी, १९५८

नि. सिं. — निर्णयसिंधु

ने. नॉ. इं. — Natives of Northern India, W. Crooke, 1907

नै. प. — नैषध परिशीलन, चंडिकाप्रसाद शुक्ल, १९६०

न्या. को. — न्यायकोश, भीमाचार्य झळकीकर, १९२८

न्यू इं. ऍ. — New Indian Antiquary, Ed. –Katre, Gode Bombay,

पं. का. सं. — पंडितराज–काव्य–संग्रहः, संपा.– आर्येंद्र शर्मा, १९५८

पं. जी. सा. — पंजाब जीवन और

साहित्य, मनसराम शर्मा, १९६१
पं. ज्यो. — पंचांगांतील ज्योतिःशास्त्र, त्र्यं. गो. ढवळे, १९५८
प. भा. — पतंजलीकालीन भारत, प्रभुदयाळ अग्निहोत्री, १९६२
पा. चा. ध. — पार्श्वनाथा .. चातुर्याम धर्म, धर्मानंद कोसंबी, १९४९
पा. भा. — पाणिनिकालीन भारतवर्ष, वासुदेवशरण अग्रवाल, १९५५
पा. सा. इं. — पालि साहित्यका इतिहास, भरतसिंह उपाध्याय, १९५१
पॉ. सा. ए. हिं. — The Positive Sciences of the Ancient Hindus, Brajendranath Seal, 1958
पी. के. गो. को. — P. K. Gode Commemoration Volume, Ed.–Hariyappa, Patkar, 1960
पी. स. म. — Peeps into Saraswati Mahal, Gopalan, 1953
पु. इं. — The Purana Index, V. R. Ramchandra Dikshitar
पु. चिं. — पुरुषार्थ चिंतामणि
पु. त. नि. — पुरातत्त्व निबंधावली, राहुल सांकृत्यायन, १९३७
पु. त. मी. — पुराणतत्त्वमीमांसा, श्रीकृष्णमणि त्रिपाठी, १९६१
पू. प. सं. म. — पूर्व और पश्चिम की संत महिलाएँ, स्वामी घनानंद, १९६२
पू. म. भा. — पूर्व–मध्यकालीन भारत, वासुदेव उपाध्याय, १९५३
पे. पु. — पेरिय पुराण
पो. वी. हिं. सि. — Position of Women in Hindu civilization, A. S. Altekar, 1956
प्रा. ऐ. श. — प्राचीन ऐतिहासिक शस्त्र, माणिकराव, १९३१
प्रा. च. को. — प्राचीन चरित्रकोश, सि. वि. चित्राव, १९३२
प्रा. भा. क. — प्राचीन भारतीय कला, रा. शं. वाळिंबे, १९५९
प्रा. भा. प्र. — प्राचीन भारतके प्रसाधन, अत्रिदेव विद्यालंकार, १९५८
प्रा. भा. म. — प्राचीन भारतीय मनोरंजन, मन्मथ राय, १९५७
प्रा. भा. लो. — प्राचीन भारतीय लोकधर्म, वासुदेवशरण अग्रवाल, १९६४
प्रा. भा. वि. — प्राचीन भारतीय विद्यापीठे, ना. गो. तवकर, १९५०
प्रा. भा. वि. वि. — प्राचीन भारतीय विचार और विभूतियाँ, मुकर्जी, १९५८
प्रा. भा. शा. प. — प्राचीन भारतीय शासन पद्धती, अ.स. आळतेकर, १९५९
प्रा. भा. शि. प. — प्राचीन भारतीय शिक्षणपद्धती, अ. स. आळतेकर
प्रा. भा. सां. — प्राचीन भारत की सांग्रामिकता, पं. रामदीन पांडेय, १९५७
प्रा. भा. सां. कें. — प्राचीन भारत के सांस्कृतिक केंद्र, सुखवीरसिंह गहलोत, १९५९
प्रा. म. — प्राचीन महाराष्ट्र, श्री. व्यं. केतकर, १९६३
प्रा. म. सं. — प्राचीन मराठी संतकवी, ज. र. आजगांवकर, १९५७
प्रा. यु. वि. — प्राचीन युद्धविद्या, कृ. वि. वझे, १९३४
प्रा. सा. — प्राचीन साहित्य, रवींद्रनाथ ठाकूर, अनु.– रा. ब. आठवले, १९४४
प्रा. सा. इ. — प्राकृत साहित्यका इतिहास, जगदीशचंद्र जैन, १९६१
प्रि. कॅ. गो. — As Primitive Capitais de Goa – P. Pissurlencar
फि. र. टा. — Philosophy of Ravindranath Tagore, Radhakrishnan, 1961
फो. चो. टें. — Four Chola Temples, S. B. Balasubrahmanyam, 1964
फो. डा. इं. — Folk Dance of India, Projesh Baneriji, 1959
फो. डा. म. — Folk Dance of Maharashtra– A. G. Agarkar 1950
फो. लो. नॉ. इं. — Folk Lore of Northern India
फो. सॉं. छ. — Folk Songs of Chathisgarh, V. Elwin
फ्रॉ. हि. प्री. ने. — From History to Prehistory at Nevase, S. B. Deo, 1960
बं. उ. सा. — बंगला और उसका साहित्य, हंसकुमार तिवारी
बं. सा. क. — बंगला साहित्य की कथा, सुकुमार सेन, १९५७
बं. सा. सं. इ. — बंगला साहित्यका संक्षिप्त इतिहास, सत्येन्द्र, १९६१
बॅ. आ. क. — Background of Assamese Culture, R. M. Nath
बाँ. ब. र. — बाँसरी बज रही, जगदीश त्रिगुणायत, १९५७
बॉ. बे. क्रा. — Bomday Beggers and Criers
बि. पे. ला. — Bihar Peasant Life, G. A. Grierson, 1926
बुं. सं. इ. — बुंदेलखंडका संक्षिप्त इतिहास, गोरेलाल तिवारी, १९३३
बु. भा. स. — बुद्धकालीन भारतीय समाज, ना. गो. कालेलकर, १९३६
बे. फु. आ. रा. — बेलाफुले आधी रात, देवेंद्र सत्यार्थी, १९४८
बो. हि. को. — Bosquejo Historico das Comunidades, Filipe Nery Xevier
बौ. ध. बि. — बौद्ध धर्म और विहार, हवलदार त्रिपाठी, १९६०
बौ. प. व. — बौद्ध धर्म के २५०० वर्ष, आजकल, डिसें. १९५६
ब्र. कृ. मा. भ. — ब्रजभाषा के कृष्णकाव्य में माधुर्य भक्ति, रूपनारायण, १९६२

ब्र. ख. तु. अ. — ब्रजभाषा और खड़ीबोली का तुलनात्मक अध्ययन, कैलाशचंद भाटिया, १९६२

ब्रा. जा. प्रं. — भारतीय ब्राह्मण–जातिप्रदीपिका, इंद्रदेव नारायणसिंह, १९५८

ब्रा. भि. वि. — ब्राह्मणांतील भिन्नशाखीय विवाह, पं. महादेवशास्त्री दिवेकर, १९४५

भं. ज्ञा. इ. — भंडारी ज्ञातीचा इतिहास

भ. अ. को. — भरतखंडाचा अर्वाचीन कोश, र. भा. गोडबोले, १८८१

भ. क. — भक्तीचा कल्पवृक्ष, भा. पं. बहिरट, १९५६

भ. ना. — भरतमुनीचे नाट्यशास्त्र, गोदावरी केतकर, १९६३

भा. अ. प्र. — भारतीय अस्पृश्यतेचा प्रश्न, वि. रा. शिंदे, १९३३

भा. आ. — भारत के आदिवासी, जनक अरविंद, १९५७

भा. इ. रू. — भारतीय इतिहासकी रूपरेखा, जयचंद्र विद्यालंकार, १९३३

भा. कौ. — Bharat Kaumudi, Radhakumud Mukarjee, 1945

भा. जा. भे. — भारतवर्ष में जातिभेद, क्षितिमोहन सेन, १९५२

भा. तॅ. वि. — भारतीय तत्त्वविद्या, पं. सुखलालजी संघवी; १९६०

भा. द. — भारतीय दर्शन, (१) पं. बलदेव उपाध्याय, १९५७, (२) उमेश मिश्र, १९५७

भा. द. सं. — भारतीय दर्शन संग्रह, द. वा. जोग, १९५८

भा. ना. सा. — भारतीय नाट्य साहित्य, संपा.– नगेंद्र

भा. प. क. — भारतीय कला के पदचिन्ह, जगदीश गुप्त, १९६१

भा. प्र. वि. — भारतीय प्रतीकविद्या, जनार्दन मिश्र, १९५९

भा. भा. स. — भारतका भाषा सर्वेक्षण, लेखक–जॉर्ज ग्रियर्सन, अनुवादक – उदयनारायण तिवारी, १९५९

भा. म. द. — भारतीय मत दर्पण, राजेंद्रनाथ पंडित, १९०९

भा. लो. नृ. — भारत के लोकनृत्य, लक्ष्मी नारायण गर्ग, १९६१

भा. वा. — भारतीय वास्तुशास्त्र, द्विजेंद्रनाथ शुक्ल, १९५५

भा. व्य. को. — भारतीय व्यवहार कोश, वि. दि. नरवणे, १९६१

भा. सं. — भागवत संप्रदाय, बलदेव उपाध्याय, १९५४

भा. सं. जै. यो. — भारतीय संस्कृति में जैन धर्म का योगदान, हिरालाल जैन, १९६२

भा. सं. म. — भारत के संत महात्मा, रामलाल, १९५७

भा. सा. — भारत सावित्री, वासुदेवशरण अग्रवाल, १९५७

भा. सा. सां. रे. — भारतीय साहित्य की सांस्कृतिक रेखाएं, परशुराम चतुर्वेदी, १९५५

भो. क. का. — भोजपुरी के कवी और काव्य, दुर्गाशंकर प्रसाद सिंह, १९५८

मं. म. — मंत्रमहोदधि

मं. मू. मो. — मंगल मूर्ती मोरया, रा. चिं. ढेरे, १९५८

म. क. — मनोरम कश्मीर, मनोहरकृष्ण दर, १९५८

म. क. च. — महाराष्ट्रीय कविचरित्र, ज. र. आजगावकर

म. क. शि. — महाभारत, कथाभाग आणि शिक्षण, ज. स. करंदीकर, १९५८

म. का. स. — मराठेकालीन समाजदर्शन, शं. ना. जोशी, १९६०

म. गॉ. — Mother Goddess, S. K. Dixit

म. च. को. — मध्ययुगीन चरित्रकोश, सि. वि. चित्राव, १९३७

म. चा. दै. — महाराष्ट्राची चार दैवते, ग. ह. खरे, १९५८

म. ज. अ. ग्रं. — मध्यभारत जनपदीय अभिनंदन ग्रंथ, सत्यदेव विद्यालंकार, १९५४

म. जि. ना. — महाराष्ट्रातील जिल्हे, नाशिक, महाराष्ट्र सरकार, १९६२

म. जि. रत्ना. — महाराष्ट्राचे जिल्हे, रत्नागिरी, महाराष्ट्र सरकार

म. जी. — महाराष्ट्र–जीवन, संपादक–गंगाधर बाळकृष्ण सरदार, १९६०

म. दे. भा. — मध्यदेशीया भाषा, हरिहरनिवास द्विवेदी, १९५६

म. ध. प्र. — महाराष्ट्र धर्माचे प्रणेते, प्रकाशन विभाग, भारत सरकार, १९५८

म. प. — महाराष्ट्र परिचय, प्रसाद प्रकाशन, १९५४

म. भा. इ. — मध्य भारत का इतिहास, द्विवेदी, १९५६

म. भा. उ. — महाभारताचा उपसंहार, चिं. वि. वैद्य, १९२१

म. म. वा. — महानुभावीय मराठी वाङ्मय, य. खु देशपांडे, १९६०

म. मा. — मल्लारी मार्तंड, शं. रा. देवळे, १९६०

म. मा. म. म. — मराठी माणसे मराठी मने, प्र. के. अत्रे, १९५६

म. रि. — मराठी रिसायत, गो. स. सरदेसाई, १९२७

मॅ. रि. — Magic and Religion, J. G. Frazer, 1944

म. लो. उ. — मराठी लोकसंस्कृतीचे उपासक, रा. चिं. ढेरे, १९६५

म. लो. त. — मराठी लोककला–तमाशा, रामदेव व्हटकर, १९५९

म. लो. सं. — मराठी लोकांची संस्कृति इरावती कर्वे, १९५१

म. लो. सा. ३ — महाराष्ट्र लोकसाहित्य माला, पुष्प ३, महाराष्ट्र लोकसाहित्य समिति, १९५९

म. लो. सा. ४ — महाराष्ट्र लोकसाहित्य माला, पुष्प ४, महाराष्ट्र लोकसाहित्य समिति, १९६०

म. वा. इ. — मराठी वाङ्मयाचा इतिहास, ल. रा. पांगारकर, १९३५

म. व्यु. को. — मराठी व्युत्पत्तिकोश, कृ. पां. कुलकर्णी, १९४६

म. श. को. — महाराष्ट्रीय शब्दकोश, संपा.– य. रा. दाते, १९३५

म. स. द. — मराठेकालीन समाजदर्शन, शं. वा. जोशी, १९६०

म. सा. — महाराष्ट्र सारस्वत, वि. ल. भावे, १९५१

म. सा. पु. — महाराष्ट्राची सामाजिक पुनर्घटना, रा. शं. वाळिंबे, १९६२

भ. सा. सि. — मराठी साहित्याचे सिंहावलोकन, द. के. केळकर, १९६३

म. हिं. क. — मध्यकालीन हिंदी कवयित्रियाँ, सावित्री सिन्हा, १९५३

म. ज्ञा. को. — महाराष्ट्रीय ज्ञानकोश, श्री. व्यं. केतकर

मा. पु. सां. अ. — मार्कंडेय पुराण–एक सांस्कृतिक अध्ययन, वासुदेवशरण अग्रवाल

मि. टी. ह. क. — Mystic Teachings Of the Haridasas Of Karnatak, A. P. Karamarkar, 1939

मि. ने. इं. — Miths of the North east Frontier Of India, Verrier Elwin, 1958

मि. मि. वे. लि. — The Miraculous and Mysterious In Vedie Literature, B. A. Parab, 1952

मु. इं. — Obeservations on the Mussulmauns of India, Mrs. Meer Hassan Ali, 1917

मुं. इ. जा. — मुंबई इलाख्यांतील जाती, गो. मं. कालेलकर, १९२८

मु. का. भा. — मुगलकालीन भारत, आशीर्वादीलाल श्रीवास्तव, १९५९

मु. पू. म. — मुसलमान पूर्व महाराष्ट्र, वा. कृ. भावे, १९४६

मु. रि. — मुसलमानी रियासत, गो. स. सरदेसाई, १९२७

मू. वि. — मूर्तिविज्ञान, ग. ह. खरे

मै. श. गु. अ. ग्रं. — मैथिलीशरण गुप्त अभिनंदन ग्रंथ, संपा.– वासुदेवशरण अग्रवाल, १९५६

मों. जि. गॅझे – Monghyr District Gazetteer, P. C. Roy Choudhury, 1960

म्यु. इं. — The Music of India, Herbert, A. Popley, 1921

यं. चिं. — यंत्रचिंतामणि

य. ब्र. स. — यजुर्वेदीय ब्रह्मकर्मसमुच्चय

यो. सो. च. — योगसोपान पूर्वचतुष्क, ह. ना. घमंडे, १९५१

रा. जा. — राजस्थानकी जातियां, १९५४

रा. जि. — राजमाता जिजाबाई, मा. सां. कन्नमवार, १९६३

रा. पिं. सा. — राजस्थान का पिङ्गल साहित्य, मोतीलाल मेनारिया, १९५८

रा. भ. शा. — रामभक्तिशाखा, रामनिरंजन पांडेय, १९६०

रा. भा. औ. सा. — राजस्थानी भाषा और साहित्य, मोतीलाल मेनारिया, १९५२

रा. भा. सा. — राजस्थानी भाषा और साहित्य, मोतीलाल मेनारिया, १९५२

रा. रा. उ. ऱ्हा. — राजपूत राज्यांचा उदय व ऱ्हास, ह. वा. देशपांडे, १९३८

रा. ले. सं. — राजवाडे लेखसंग्रह, संपा.– लक्ष्मणशास्त्री जोशी, १९५८

रा. लो. नृ. — राजस्थानी लोकनृत्य, देवीलाल सामर, १९५७

रा. शि. — राजा शिवछत्रपती, ब. मो पुरंदरे, १९६५

रा. सं.१ — रामदासी संशोधन, प्रथमखंड, शं. श्री. देव, १९३३

रा. सं. सि. सौ. — राधावल्लभ संप्रदाय सिद्धांत और साहित्य, विजयेंद्र स्नातक, १९५८

रा. सा. म. उ. — रामभक्ति साहित्य में मधुर उपासना, भुवनेश्वरनाथ मिश्र 'माधव', १९५७

रि. आ. क. गो. — The Report Of the Archialogical Committee for Goa, Daman & Div, 1963

रि. इं. — The Religions of India, A. P. Karmarkar, 1950

रि. ए. ना. जो. — Report On Excavations at Nasik and Jorwe, Deo.– Sankalia, 1955

रि. से. सा. इं. — Religious Sects Of South India

रे. क. इं. — Races and Cultures of India, D. N. Majumdar, 1958

ल. वि. सो. — लग्नविधि आणि सोहळे, ना. के. आलोनी, १९०४

लो. ध. ना. प. — लोकधर्मी नाट्यपरंपरा, श्याम परमार, १९५९

लो. ना. प. — लोकनाट्याची परंपरा, संपा.– वि. कृ. जोशी, १९६१

लो. सा. रू. — लोकसाहित्याची रूपरेखा, दुर्गा भागवत, १९५६

लो. सा. ले. — लोकसाहित्याचे लेणे, मालतीबाई दांडेकर, १९५२

लौ. दं. — लौकिक दंतकथा, गो. मं. कालेलकर, १९३४

लौ. नी. — लौहित्य और नीलाचल, हेम बरुआ, १९६१

वा. नृ. का. — वाकाटक नृपती आणि त्यांचा काल, वा. वि. मिराशी, १९५७

वा. पु. स्ट. — Vamana Purana–A Study, Vasudeosaran Agrawal, 1964

वा. रा. को. — वाल्मिकी रामायण कोश, रामकुमार राय, १९६५

वि. ज. स्मृ ग्र. — स्वामी विवेकानंद

जन्मशताब्दि स्मृतिग्रंथ, संपा.--रा. चिं. ढेरे, १९६३

वि. ती. क. --- विविध तीर्थकल्प, जिनप्रभसूरि, सिंधी जैन ग्रंथमाला, ग्रंथांक १०, १९३४

वि. मुं. रा. प. --- विशाल मुंबई राज्य परिचय, १९६०

वि. स. र. --- विज्ञानप्रणीत समाजरचना, पु. ग: सहस्रबुद्धे

वि. स्मृ. ग्रं. --- विक्रम स्मृति ग्रंथ, १९४५

वे. इं. --- Vedic Index of Names and Subjects, Macdonell and Keith, 1954

वै. ध. --- वैष्णव धर्म, परशुराम चतुर्वेदी

वै. नि. --- वैदिक निबंध, ना. गो. चापेकर

वै. वि. भा. प. --- वैज्ञानिक विकास की भारतीय परंपरा, सत्यप्रकाश, १९५४

वै. शां. अ. --- वैदिक शांकर अद्वैतमतवाद, द. वा. जोग, १९५४

वै. शै. म. व. --- The Vaishnva Sects, The Shaiva Sects and Mother Worship, Swami Tattvananda

वै. सं. वि. --- वैदिक संस्कृतीचा विकास, लक्ष्मणशास्त्री जोशी, १९५१

वै. सा. --- वैदिक साहित्य, पं. रामगोविंद त्रिवेदी, १९६०

वै. सा. सं. --- वैदिक साहित्य और संस्कृति, बलदेव उपाध्याय, १९५८

व्या. ज्ञा. को. --- व्यायाम ज्ञानकोश

व्र. चं. --- व्रतचन्द्रिका, गौरीशंकर उपाध्याय, १९५२

व्र. ति. नि. --- व्रततिथिनिर्णय, श्रीनेमिचंद्र शास्त्री, १९५६

व्र. प. --- व्रतपरिचय, हनुमान शर्मा, १९५७

श. क. --- शब्दकल्पद्रुम, राजा राधाकांत देव

शां. क. --- शांतिकमलाकर

शी. गु. --- शीखांचे गुरू, र. ल. उपासनी, १९५३

शी. लो. सं. इ. --- शीख लोकांचा संक्षिप्त इतिहास, ईश्वरसिंघ ठाकूर, १९६३

शी. स्फू. इ. --- शीखांचा स्फूर्तिदायक इतिहास, शं. पु. जोशी, १९३९

शृं. हा. --- शृंगार–हाट, संपा.– मोतीचंद्र, अग्रवाल, १९५९

श्री. सां. वि. वि. १ --- श्री सांप्रदायिक विविध विषय भाग १, संपा.– शंकर श्रीकृष्ण देव

श्रौ. को. --- श्रौतकोश, वैदिक संशोधन मंडळ, १९५८

सं. कौ. --- संस्कार कौस्तुभ, वेंकटाचार्य गजेन्द्रगडकर, १९१४

सं. चा. अ. --- संस्कृति के चार अध्याय, रामधारीसिंह दिनकर, १९५६

सं. मि. --- संशोधकाचा मित्र, गणेश हरी खरे, १९३१

सं. मु. --- संशोधन मुक्तावलि, वासुदेव विष्णु मिराशी

सं. शा. --- संगीत शास्त्र, के. वासुदेव शास्त्री, १९५८

सं. शा. क. इ. --- संगीत शास्त्रकार व कलावंत यांचा इतिहास, लक्ष्मण दत्तात्रेय जोशी, १९३५

सं. स. --- संत समागम, भ. श्री. पंडित, १९६२

सं. स. सं. --- संतमतका सरभंग संप्रदाय, धर्मेंद्र ब्रह्मचारी शास्त्री, १९५९

सं. सा. इ. --- संस्कृत साहित्यका इतिहास, ए. बी. कीथ, अनुवादक–मंगलदेव शास्त्री, १९६०

सं. सा. सो. इ. --- संस्कृत साहित्याचा सोपपत्तिक इतिहास, वि. वा. करंबेळकर, १९५४

स. दे. प्रा. अ. इ. --- श्रीसप्तकोटेश्वर देवस्थानचा प्राचीन व अर्वाचीन इतिहास, वि. सु. सरदेसाई

स. भा. प्र. व. --- सचित्र भारत प्रवास वर्णन, बाळासाहेब घोरपडे, १९१२

स. सो. पा. --- सहा सोनेरी पाने, वि. दा. सावरकर, १९५६

स. स्मा. ग्रं. --- सरदेसाई स्मारक ग्रंथ, संपा.– श्री. रा. टिकेकर, १९३८

सा. इं. इ. गॉ. गॉ. --- South Indian Images of Gods and Goddesses

सा. इं. फे. --- South Indain Festivities, P. V. Jagadisa Ayyar, 1921

सा. इं. (म. आं.) --- South India (Madras and Andhra Prdesh), Publications Division, 1957

सा. भू. --- सारस्वत भूषण, ग. रा. शर्मा

सा. मु. मा. --- सार्थ मुहूर्तमार्तंड, गो. ना. दातार, १९५१

सा. र. मा. --- सारस्वत रत्नमाला, संपा.– ग. रा. शर्मा, १९१०

सिं. क. --- Sindhi Culture, V. T. Thakur, 1958

सि. इ. --- सिख–इतिहास, ठाकूर देशराज, १९५४

सि. सा. --- सिद्ध साहित्य, धर्मवीर भारती, १९५५

सु. वि. को. --- सुलभ विश्वकोश, य. रा. दाते, चिं. ग. कर्वे

सू. पू. ब्र. भा. सा. --- सूरपूर्व ब्रजभाषा और उसका साहित्य, शिवप्रसाद सिंह, १९५८

सू. सा. श. --- सूरसागर शब्दावली, निर्मला सक्सेना, १९६२

सू. सं. --- सूफी संप्रदाय, तत्त्वज्ञान आणि कार्य, सेतुमाधवराव पगडी, १९५३

सू. सा. --- सूरसाहित्य, हजारीप्रसाद द्विवेदी, १९५६

से. इं. --- Census of India

सो. इं. ट्रॅ. --- Sources of Indian Tradition, W. T. Bary, 1958

सो. क. स. सा. --- The Ocean of Story – Tawney's Translation of Somadeva's Katha Sarit Sagar, N. M. Penzer, 1924

स्कू. से. जं. लि. —Schools and Sects in Jain Literature, Amulyachandra Sen, 1931

स्के. सि. गो. — Sketch of the City of Goa, J. N. Fonseca

स्ट. इं. क. हि. — Studies In Indian Cultural History, P. K. Gode, 1961

स्ट. ए. पु. इं. — Studies in Epics and Puranas of India, A. D. Pusalkar, 1955

स्ट. ओ. फो. —A. Study of Orissan Folk Lore, Kunjbihari Das, 1953

स्ट. जॉं. ए. मे. इं. — Studics in the Geogaphy of Ancient and Medieval India, D. C. Sircar, 1960

स्ट. वा. वि. — A Study On Vastuvidya, Tarapada Bhattacharyya, 1947

स्ले. ए. इं. — Slavery in Ancient India, Dev Raj Chanana, 1960

ह. च. सां. अ. — हर्षचरित – एक सांस्कृतिक अध्ययन, वासुदेवशरण अग्रवाल, १९५३

ह. वि. च. — हरि विक्रम चरित, वा. न. उपाध्ये, १९००

हें. सा. इं. इ. — A Handbook of South Indian Images, T. N. Srinivasan, 1954

हिं. क. को. — हिंदी कथाकोष, हिंदुस्तानी एकेडमी इलाहावाद, १९५४

हिं. क. भ. तु. अ. — हिंदी और कन्नड में भक्ति–आंदोलन का तुलनात्मक अध्ययन, हिरण्मय, १९५९

हिं. जै. भ. क. — हिंदी जैन भक्तिकाव्य और कवि, प्रेमसागर जैन, १९६४

हिं. ध. त. — हिंदु धर्माची तत्त्वे, चिं. वि. वैद्य, १९३१

हिं. नी. वि. — हिंदी में नीतिकाव्य का विकास, रामसरूप, १९६२

हिं. प. मी. — हिंदू परिवार मीमांसा, हरिदत्त वेदालंकार, १९५५

हिं. बं. वै. क. — १६ वी शतीके हिंदी और बंगाली वैष्णव कवि, रत्नकुमारी, १९५६

हिं. म. क. प. — हिंदी महाकाव्ये, कथा आणि परिचय, शि. शं. आपटे, १९६३

हिं. म. कृ. — हिंदी और मलयालम में कृष्णभक्तिकाव्य, नायर के. भास्करन्, १९६०

हिं. रा. तं. — हिंदु राज्य–तंत्र, काशीप्रसाद जायस्वाल, १९५२

हिं. वि. को. — हिंदी विश्वकोश, नागरी प्रचारिणी सभा

हिं. व्य. शा. — हिंदु–व्यवहारधर्म–शास्त्र, का. न. केळकर, बाळूताई खरे, १९३२

हिं. सं. — हिंदु संस्कार, राजबलि पांडेय, १९५७

हिं. स. — हिंदू सभ्यता, राधाकुमुद मुकर्जी, १९५८

हिं. स. र. — हिंदूंची समाजरचना, इरावतीबाई कर्वे, १९६४

हिं. सा. आ. — हिंदी साहित्य का आदिकाल, हजारीप्रसाद द्विवेदी

हिं. सा. को. — हिंदी साहित्य कोश, संपा. – धीरेंद्र वर्मा, १९५९

हिं. सा. बि. — हिंदी साहित्य और बिहार, संपा.–शिवपूजन सहाय, १९६०

हिं. सा. बृ. इ. — हिंदी साहित्यका बृहत् इतिहास, संपा.– राजबली पांडेय

हिं. हॉ. से. — Hindu Holidays and Ceremonials, B. A. Gupte, 1916

हि. इं. म. हे. — A Short History of Indian Materialism and Hedonism, D. Shastri, 1957

हि. इं. लॉ. — History of Indian Logic, S. C. Vidyabhushan

हि. ओ. — History Of Orissa, Harekrishna Mehtab, 1960

हि. ओ. लि. — History, Of Oriya Literature, Mayadhar Mansinha, 1962

हि. ओ. ले. — The History of Orissa and its Lessons, Nirmal Kumar Basu.

हि. क. इं. पी. — History and Culture of The Indian People, Bharatiya Vidya Bhavan

हि. गा. डि. — The History of The Gahadaval Dynasty, Niyogi, 1959

हि. जॉं. ए. इं. — Historical Geography Of Ancient India, Bimal Churn Law, 1954

हि. जै. मो — History of Jain Monachism, S. B. Deo, 1956

हि. डि. गो. — Historia de Goa, Padre G. N. Saldnha

हि. द. — हिमालय दर्शन, शं. स. दाते, १९५१

हि. बें लँ. लि. — History Of Bengali Language And Literature, Dinesh Chandra Sen, 1954

हि. रि. गो. — Historia Religion de Goa, Braganca Pereira

व्हि. गॉं. सा. इं. —The Village Gods of South India, Henry Whitehead, 1921

संदर्भ ग्रंथ सूची

अष्टछाप परिचय — धीरेन्द्र वर्मा, १९४७
आचारेन्दु — त्र्यंवक माटे, १९०९
आर्यसंस्कृति — बलदेव उपाध्याय, १९५३
एकावळी — श्री. ना. बनहट्टी, १९५१
कवि-श्रीमाला — गंगाधर मेहेर, १९६२
कहाण्या — सचित्र कहाण्या, संपा. – ज. शं. मेढेकर, १९५६
कुमाऊँ — राहुल सांकृत्यायन, १९५९
केरळ — पं. महादेवशास्त्री जोशी, १९६०
खंडोबा — रा. चिं. ढेरे, १९६१
गीताप्रवचनें — विनोबा भावे
गीतारहस्य — गीतारहस्य अथवा कर्मयोग शास्त्र, लो. वा. गं. टिळक, १९५६
गुजरात — पं. महादेवशास्त्री जोशी, १९६२
गोकर्ण-धोम-महाबळेश्वर यात्रा — गोविंद चिमणाजी भाटे, १९४४
गोकुळच्या गौळणी — पं. महादेवशास्त्री जोशी, १९४९
गोसावी व त्यांचा संप्रदाय — पृथ्वीगीर हरिगीर गोसावी, १९२६
दि ग्रासियाज — The Grasias, P. C. Dave, 1960
घरचा ज्योतिषी — कृष्णराव गोपाळ टोकेकर, १९४९
चंद वरदायी — चंद वरदायी और उनका काव्य, विनित बिहारी त्रिवेदी, १९५२
चंद्रपुरची महाकाली — वि. वा. जोशी, १९६०
चक्रध्वज — Chakra Dhvaja, V. S. Agrawala, 1964
चार्वाक–इतिहास आणि तत्त्वज्ञान — सदाशिव आठवले, १९५८
चित्तपावन समाज चित्र — संपा. – शं. ना. जोशी, १९४०
चित्पावन — ना. गो. चापेकर, १९३८
जडवाद — जडवाद अर्थात् अनीश्वरवाद, लक्ष्मणशास्त्री जोशी, १९४१
जयचंबल — विष्णुदत्त मिश्र 'तरंगी', १९६०
जागृत जगन्नाथ — आनन्द यात्री, १९६०
जातकमार्गोपदेशिका — य. के. प्रधान, १९४९
जीवनलीला — काका कालेलकर, १९५८
जैनधर्मामृत — पं. हीरालाल जैन, १९६०
ज्योतिर्लिंग — भार्गव आत्माराम मुळे, १९४९
ज्योतिर्विलास — शं. बा. दीक्षित, १९४८
ज्योतिर्वैभव — त्र्यं गो. ढवळे, १९५६
ज्योतिषरत्नमाला — श्रीपतिभट्ट, संपादक, मु. ग. पानसे, १९५७
तमिळनाडू — पं. महादेवशास्त्री जोशी, १९६०
त्रिचूर गॅझेटियर — Kerala District Gazetteers, Trichur, A. S. Menon, 1962
त्रिस्थलीवर्णन — शं. ग. गोचिडे
दासोपंताची पासोडी — संपा.– न. शे. पोहनेरकर
दि चमार्स — The Chamars, W. Brigs, 1920
दि चोळाज — The Cholas, Neelkantha Shastri, 1955
दि वारलीज — The Warlis, K. J. Save, 1945
धम्मपद – संपा.–भिक्षु धर्मरक्षित, १९५३
नवद्वीप — श्री चैतन्यलीलाधाम नवद्वीप आनंदयात्री, १९६१
नवनाथ कथासार — प्रका. बा. ल. पाठक, १९६३
नवनीत — संपा.– अ. का. प्रियोळकर, १९५७
नवा हिंदुधर्म — महादेवशास्त्री दिवेकर, १९४२
नक्षत्रलोक — पं. महादेवशास्त्री जोशी, १९५७
नृपनिर्माता चाणक्य — रा. चिं. ढेरे, १९६०
पर्वतीय संस्कृती — मासिक, जुलै १९६०
पारिजात — प्रायश्चितपारिजात
पूजातत्त्व — गोपीनाथ कविराज, १९५८
पूना गॅझे. — Gagetteer of The Bombay Presidency, Poona District, 1884
बदलापूर — आमचा गाव बदलापूर, ना. गो. चापेकर
बारावे ज्योतिर्लिंग — आनंदी यात्री, १९६०
बालबोध ज्योतिष — य. के. प्रधान,
बुद्धदेव — गोपीनाथ तळवलकर, १९५६
बुद्धिस्ट इंडिया — Buddhist India, T. W. Rhys Davids, 1959
बृहज्जातक — श्रीवराहमिहिराचार्यकृत सार्थ बृहज्जातक, संपा.–दे. अ. देशपांडे, १९५६
ब्रज और ब्रजयात्रा — संपा. गोविंददास, रा. ना. अग्रवाल, १९५९
भक्ति का विकास — मुंशीराम शर्मा, १९५८

भारतीय चित्रकला की कहानी -- भगवतशरण उपाध्याय, १९५५

भारतीय वाङमय -- संपा.–नगेंद्र, १९५८

भूदानगंगा — विनोबा भावे

मंगलमूर्ती श्रीगणेश -- पु. रा. बेहेरे, १९५९

मंत्रशास्त्र -- श्री योगेश्वरानंदतीर्थ, जगद्गुरु श्री शंकराचार्य, १९५७

मध्यदेश -- धीरेंद्र वर्मा, १९५५

मऱ्हाटी संस्कृति — शं. बा. जोशी, १९५२

महावीर चक्रधर — रा. चिं. ढेरे, १९५८

मुद्रा — Mudra, E. Dale Saunders, 1960

मैथिली लोकगीत -- राम इकवालसिंह राकेश, १९३९

योगसंग्राम — शेख महंमद बाबा, संपा.– वा. सी. बेंद्रे, १९५९

रत्ना. गॅझेटीअर — Maharashtra State Gazetteers, Ratnagiri District, Government of Maharashtra 1962

राजस्थान — पं. महादेवशास्त्री जोशी, १९६३

रामकथा -- कामिल बुल्के, १९६२

रूपसौंदर्य -- म. ग. पातकर, १९६३

लघुरत्न परीक्षा -- म. ल. खांबेटे, १९४१

लोकायत — Lokayata, Devi Prasad Chattopadhyay, 1959

वीरकाव्य -- उदयनारायण तिवारी, १९४९

वेधसाधने आणि वेधशाळा -- मो. ना. गोखले, १९५९

व्रतराज -- विश्वनाथ शर्मा, १९५३

शंकराचार्य -- बलदेव उपाध्याय, १९५०

शिवलिंगोपासना -- स. कृ. फडके, १९५४

शिवाजी व शिवकाल — यदुनाथ सरकार, अनु. –वि. स. नाकसकर

श्री. गुप्ते महाराज यांचे चरित्र — द. म. खेर, १९६०

श्रीचंद्राचार्य — सीताराम चतुर्वेदी, १९५३

श्री चक्रधर चरित्र -- वि. भि. कोलते, १९५२

श्री जपजी साहेब -- न. वि. गाडगीळ

श्री रामदासांची कविता खंड १ -- शं. श्री. देव, १९०९

श्री विद्यार्णवतंत्र — Iconography of Sri Vidyarnava Tantra, S. Srikantha Sastri

संक्षिप्त गुरुचरित्र -- वि. द. रिसबुड १९५९

समर्थ चरित्र -- न. र. फाटक, १९५१

सह्याद्रि — स. आ. जोगळेकर, १९५२

सुश्लोक गोविन्द -- रा. चिं. श्रीखंडे, १९५४

सूर्यकुल — शं. ना. हरीप, १९५२

स्पर्शास्पर्श —श्री. दा. सातवळेकर, १९२५

हिंदी सगुणकाव्य की सांस्कृतिक भूमिका -- रामनरेश वर्मा, १९६३

हिंदुत्व -- रामदास गौड, १९३९

स्थूल शुद्धिपत्र

पान	स्तंभ	ओळ	अशुद्ध	शुद्ध
५४	२	शीर्षक	गुजराती लोकसाहृत्य	गुजराती लोकसाहित्य
५६	२	शीर्षक	गुजरिया न	गुर्जरिया नृत्य
८१	१	२९	तद्विज्ञानाथ	तद्विज्ञानार्थं
१८१	२	शीर्षक	गोल-गाघडो	गोल-गाघेडो
२१४	१	शीर्षक	गौराग	गौरांग
२३३	१	२२	तां. वा. शा. द.	तां. वा. शा. दृ.
२८२	२	८	वातीत	वावतीत
३१५	१	१७	तां. वा. शा. द.	तां. वा. शा. दृ.
३२९	२	२१	तीन का	तीन कार्ये
३४६	१	शीर्षक	चर्मंकट्टूवाद्य...	चर्मंकट्टुवाद्य....
३५४	१	शीर्षक	चांद वाघेल	चांद बोघले
३५५	१	शीर्षक	चाद्रमास	चांद्रमास
४७७	१	११	अ. ऊ. सा.	अ. उ. सा.
४९७	२	शीर्षक	छादोग्य...	छांदोग्य...
५१५	२	४०	अघमर्ष-अ	अघमर्षण
५६७	२	५ ते २७	या ओळींच्या जागी पुढील मजकूर वाचावा——	

जसवंतसिंह जोधपूरचा राजा. (गजसिंह राजाचा भाऊ.) हा मोगलांचा प्रमुख सरदार होता. इ. स. १६५७ मध्ये शहाजहान बादशहा आजारी पडल्यावर त्याच्या मुलांत भांडणे सुरू झाली. शहाजहानाच्या आज्ञेने जसवंतसिंह दारा शुकोहच्या बाजूने औरंगजेबावर चालून गेला; पण त्यात त्याचा पराजय झाला. पुढे औरंगजेब गादीवर आल्यानंतर जयसिंहाने त्याच्याविषयी औरंगजेबाकडे रदवदली केली. नंतर बादशहाने त्याला आपल्या चाकरीत घेतले. त्यानंतर त्याला मोठमोठ्या जबाबदारीच्या जागाही औरंगजेबाने दिल्या. शाहिस्तेखानाच्या शिवाजीमहाराजांवरील मोहिमेतही जसवंतसिंह होता. काही काळ त्याने गुजरातचा सुभेदार म्हणूनही काम केले. त्यानंतर त्याला काबूल प्रांतातल्या कामगिरीवर धाडण्यात आले. इ. स. १६७८ मध्ये तो तिकडेच मरण पावला. त्याच्या मृत्यूनंतर औरंगजेबाने जोधपूरचे राज्य खालसा केले व जसवंतसिंहाच्या मुलाला मुसलमान करण्याचा घाट घातला. त्यावरूनच औरंगजेब व दुर्गादास राठोड प्रभृती राजपूत सरदार यांच्यामध्ये युद्ध झाले. हे युद्ध औरंगजेबाच्या मृत्यूपर्यंत थांबले नाही.

७२८	२	शीर्षक	टागीनाथ	टांगीनाथ

भारतीय संस्कृतिकोश

खंड तिसरा

गाहडवाल इ. स. च्या १२ व्या शतकात कनोजवर राज्य करणारा एक वंश. ११ व्या शतकाच्या उत्तरार्धात कलचुरी वंशातील यशःकर्ण हा कनोजवर राज्य करीत असताना त्याच्या अनेक सामंतांनी बंडे करून साम्राज्याचे तुकडे केले. प्रत्येक तुकडयाचे एकेक स्वतंत्र राज्य बनले. गाहडवाल वंशाचे राज्य हे त्यापैकीच एक होय.

गाहडवाल वंशातील पहिला ज्ञात पुरुष यशोविग्रह हा कलचुरी वंशातील लक्ष्मीकर्णाचा सरदार असावा. त्याचा पुत्र महीचंद्र याने यशःकर्णाच्या वेळी उ. प्रदेशातील वाराणसी–अयोध्या या भागावर आपली सत्ता स्थापली होती. त्याचा पुत्र चंद्रदेव याने कनोज जिंकले व इ. स. १०८९ च्या सुमारास दिल्लीपर्यंत आपल्या राज्याचा विस्तार केला. पांचाल व उत्तर कोसल हे प्रदेशही त्याने आपल्या सत्तेखाली आणले. त्याने इ. स. ११०३ पर्यंत राज्य केले.

त्याच्यानंतर त्याचा पुत्र मदनपाल हा राजा झाला. त्याच्या राजवटीत मुसलमानांनी कनोज जिंकले व राजालाही कैद केले. त्याचा पुत्र गोविंदचंद्र याने आपल्या बापाला सोडवून आणले. इ. स. १११४ मध्ये गोविंदचंद्र सिंहासनावर बसला. तो पराक्रमी व कर्तबगार होता. पाल, सेन, गंग, काकतीय, कलचुरी, चालुक्य, चंदेल, इ. अनेक राजांशी त्याने संघर्ष केले. त्याची सत्ता कनोजपासून बिहारमधील दिनापूरपर्यंत आणि वाराणसी-कानपूरपासून उत्तरेस हिमालयापर्यंत पसरली होती. त्याने दशार्णही (माळवा) जिंकला होता, असे म्हणतात. सीमेवरील प्रबळ राजांशी गोविंदचंद्राने मैत्रीचे संबंध ठेवले होते. त्याने सोने, चांदी व तांबे या धातूंची कलचुरी पद्धतीची नाणी बनवली होती. तो विद्या व कला यांचा भोक्ता व आश्रयदाता होता. त्याने इ. स. ११५४ पर्यंत राज्य केले. त्याचा पुत्र विजयचंद्र हाही बापासारखाच गुणग्राही होता. त्याने सुमारे १५ वर्षे राज्य केले.

त्याचा पुत्र जयचंद्र हा इ. स. ११७० मध्ये गादीवर बसला. त्याने २४ वर्षे राज्य केले. त्याची सत्ता अंतर्वेदी, प्रयाग, वाराणसी आणि गया इथपर्यंतच्या सर्व प्रदेशांवर पसरली होती. तोही विद्या-कलांचा पुरस्कर्ता होता. नैषधचरित्रकार श्रीहर्ष त्याच्याच दरबारात होता, असे म्हणतात. त्याचे सेनादल प्रचंड होते. त्या काळी तोच सर्वांत संपन्न राजा होता. त्याने अनेक मुसलमानी आक्रमणे परतवून लावली. शेवटी इ. स. ११९३ मध्ये चंदवाड येथे जयचंद्राचे मुहंमद घोरीशी युद्ध झाले आणि त्यात जयचंद्र मारला गेला. तो गाहडवाल वंशातील शेवटचा थोर पुरुष मानला जातो. पृथ्वीराज चव्हाण हा त्याचा प्रतिस्पर्धी होता. त्यामुळेच त्याचे नाव इतिहासात फार गाजले. याची कन्या संयोगिता हिचे पृथ्वीराजाने अपहरण केले, अशी कथा प्रसिद्ध आहे; पण तिला इतिहासात आधार सापडत नाही. या दोन घराण्यांच्या परस्पर वैरामुळे हिंदू सत्ता दुर्बळ झाली आणि मुसलमानी आक्रमकांना भारतात रान मोकळे मिळाले, हे मात्र सत्य होय.

जयचंद्रानंतर कनोजचे साम्राज्य ढासळले; पण कनोज, अयोध्या, इ. नगरे तेवढी सुरक्षित राहिली. काही काळ तिथे गाहडवालांचे राज्यही चालू राहिले. पुढे इल्तुमिश याने गाहडवालांचा सर्व प्रदेश जिंकून त्यांची सत्ता पूर्णपणे नष्ट केली.

या वंशाचे राजे मुख्यतः विष्णुभक्त होते. त्यांच्या सर्व आलेखांच्या आरंभी लक्ष्मीला वंदन केलेले असते. तथापि ते शिवादी इतर देवतांचीही उपासना करीत. ते स्वतःला परममाहेश्वर म्हणवीत. त्यांनी इतर धर्मांनाही उदारपणे वागविले. गोविंदचंद्राच्या दोन राण्या बौद्धधर्मी होत्या. या राजांनी अनेक मंदिरे बांधली होती; पण मुसलमानांनी त्यांतली बरीच नष्ट केली.

सांप्रत राजस्थानमधील जोधपूर, बिकानेर, इ. संस्थानांतील राठोड राजे स्वतःला जयचंद्राचे वंशज मानतात, पण इतिहासज्ञांना ती गोष्ट मान्य नाही. [हि. गा. डि.; हि. क. इं. पी. भाग ५; ओ. नि. सं.]

गिडबिडकी एक जात. ही मुख्यत्वे महाराष्ट्र व कर्नाटक या प्रदेशात आढळते. हे लोक डमरू वाजवून भिक्षा मागत हिंडतात. डमरूच्या गिडबिडी या नावावरून

यांना गिडबिडकी हे नाव मिळाले आहे. पिंगळा नामक पक्ष्याचा शब्द ऐकून भविष्य सागतात, म्हणून यांना पिंगळे असेही म्हणतात. बुडबुडकी, कुडबुडे, जोशी, डोशगर, डवरी अशी यांना अन्यही नावे आहेत. हे घोटयापर्यंत लांब अंगरखा घालून डोक्याला पट्टा गुंडाळतात. यांच्या खांद्यावरून व कमरेवरून अनेक कपडे खाली लोंबत असतात. हे दोघातिघांच्या समुदायाने गाणी म्हणत हिंडतात. यांची गाणी राधा-कृष्ण व पुराणातील इतर थोर व्यक्ती यांच्याबद्दल असतात.

या जातीत प्रवेश करताना काही मंत्र पाठ करावे लागतात. पंच पालवी हे यांचे देऊळ आहे. यांच्या चालीरीती सामान्यतः मराठ्यांप्रमाणे असतात. [मुं. इ. जा.; वाँ. बे. का.]

गिद्धा

पंजाबमधील स्त्रियांचे एक नृत्य. सामान्यपणे हे नृत्य विवाहप्रसंगी केले जाते. हे स्वतंत्र नृत्य नसून भांगडा नृत्याचाच एक प्रकार आहे. यात स्त्रिया ढोल व घडा या वाद्यांच्या साथीवर वर्तुळाकार नाचतात. मुख्य स्त्री वर्तुळात मध्यभागी उभी राहून 'बोली' गाते आणि ती शेवटच्या चरणावर येताच एकदम सर्व स्त्रिया 'गिद्धा गिद्धा' म्हणत टाळी वाजवून सम पकडतात. टाळी स्वतःच्या हातांनी वाजवायची, त्याचप्रमाणे शेजारच्या दुसऱ्या स्त्रीच्या हातावरही वाजवायची असते. तसे करताना तळव्याला तळवा आणि बोटाला बोट मिळवण्याची अट असते. नृत्यातली वाद्येही स्त्रियाच वाजवतात. घडा हे वाद्य तर त्या अतिशय तयारीने वाजवतात. या नृत्याचे एक गाणे असे–



गिद्धा नृत्य

गिद्धा गिद्धा करे मेलने गिद्धा पऊ बथेरा ।
लोक घरां तो जुड़के आ गए, ला बड्ढा ला ढेरा ।
झाती मार के वेख उतां नूं, भरया पया बनेरा ।
तेंनु धुप्प लग दी, सडे कालजा मेरा ।

आवशीस सुरू झालेले हे नृत्य उत्तररात्रीपर्यंत चालते. [भा. लो. नृ.; अजंता– जाने. १९५५]

गिद्धौर

प्राचीन काळचा गृध्रकूट पर्वत. हा बिहारमध्ये आहे. तिथे जटायू नामक गृध्रपक्षी राहत असे; म्हणून त्याला गृध्रकूट हे नाव मिळाले. या ठिकाणी बौद्ध स्तूप आणि विहार होते, असे तिथे सापडलेल्या भग्नावशेषांवरून कळते. समुद्रगुप्ताच्या साम्राज्याचा तो एक भाग होता. इ. स ७ व्या शतकानंतर तिथे किरातवंशी बहेलिया राजांचे राज्य सुरू झाले. त्यांची राजधानी गृध्रावती ही होती. या वंशातील हरेवा नामक राजाचा एक गढ होता; त्याचे अवशेष या पर्वतावर सापडले आहेत. हरेवाचा नातू निगोरिया हा १३ व्या शतकाच्या उत्तरार्धात तिथे राज्य करीत होता. त्याचे राज्य बरेच मोठे होते. तो शिव आणि दुर्गा यांचा भक्त होता.

त्या काळात मुसलमानी सत्ता बंगालपर्यंत पसरली होती; तरी हे राज्य स्वतंत्र होते. पण निगोरियाच्या जुलमी कारभारामुळे प्रजेत असंतोष माजला आणि त्यामुळे चंदेल वंशातील राजा वीर विक्रमवर्मा याला हे राज्य सहज जिंकता आले.

वीर विक्रमवर्मा इ. स. १२९८ मध्ये मरण पावला. त्यानंतर १६ व्या शतकाच्या अखेरपर्यंत चंदेलांची सार्वभौम सत्ता गिद्धौरवर चालू होती. अकबराचा सरदार मानसिंह याने पूरणसिंहाचा पराभव करून हे राज्य मोगल साम्राज्यात समाविष्ट केले. औरंगजेबानंतर ते पुन्हा स्वतंत्र झाले आणि इ. स. १७६५ मध्ये पुनश्च परतंत्र होऊन इंग्रजांच्या ताब्यात गेले. [चं. उ. रा.]

गिधिया

एक जात. यांची वस्ती उ. प्रदेशात आढळते. बघारिया जातीची ही एक पोटजात असावी. हे अथपाहारिया या क्षत्रिय वंशातील असून मूळचे गुजरातचे रहिवासी होत. पक्षी पकडणे हा यांचा व्यवसाय आहे. यांची जातपंचायत असते. सध्या हे शेतीही करू लागले आहेत. [म. ज्ञा. कों.]

गिधेश्वर

बिहारमधील जमुईच्या दक्षिणेस असलेले एक प्राचीन ठिकाण. रामायणात वर्णिलेली जटायु-रावणांची लढाई इथे झाली, असे सांगतात. जटायू इथे मरण पावला; म्हणून या स्थानाला गिधेश्वर नाव मिळाले, असा उल्लेख आढळतो; पण हे विसंगत वाटते. या ठिकाणी शिवाचे एक मंदिर असून प्रतिवर्षी शिवरात्रीस व माघ पौर्णिमेस इथे मोठी यात्रा भरते.] मों. जि, गॅझे.]

गिरनार (सं. गिरिनगर. प्रा. गिरिनार) सौराष्ट्रातील एक पर्वतशिखर. याची उंची ३६६६ फूट आहे. कालगतीने गिरनारचे रंगरूप जसे बदलून टाकले; तशीच त्याची नावेही बदलली. प्राचीन काळी या शिखराला ऊर्ज्जयंत अथवा रैवतक पर्वत, प्रभास पर्वत, वस्त्रापथ क्षेत्र, इ. नावे होती. हिंदू, जैन, इस्लाम अशा निरनिराळ्या संस्कृति-प्रवाहांचा संगम गिरनारवर झालेला आढळतो.

सम्राट अशोकाच्या पूर्वीपासून गिरनारचे उल्लेख आढळतात. जैनांचा प्रथम तीर्थंकर ऋषभदेव यानेही या पर्वताचा उल्लेख केला आहे. यादव वीरांनी जेव्हा मथुरा सोडून द्वारका वसवली, तेव्हा गिरनार ही त्यांची लीलाभूमी होती. स्कंदपुराणाच्या प्रभास खंडात गिरनारचें वर्णन पुढीलप्रमाणे आहे—

एकदा शिव-पार्वती कैलासावर बसली असता ब्रह्मादी देव तिथे आले. 'तू दैत्यांवर कृपा करतोस, हे ठीक नव्हे,' अशी विष्णूने शिवापुढे तक्रार केली. त्यावर शिव म्हणाला. 'मी आशुतोष आहे. जो निष्ठेने माझी भक्ती करतो, त्याला मी प्रसन्न होतो; मग तो देव असो वा दैत्य असो ! तुम्हांला ही गोष्ट मान्य नसेल, तर मी इथून निघून जातो.'

मग शिव कैलासाहून निघाला; तो गिरनार पर्वतावर गेला. तेव्हा सर्व देवही पार्वतीसह शिवाला शोधीत शोधीत गिरनारवर गेले. तिथे शिव आपली वस्त्रे उतरून ठेऊन गुप्तरूपाने राहत होता. तो प्रकट व्हावा म्हणून पार्वतीने एक शिवभक्तीचे गीत गाइले. शिवाने प्रसन्न होऊन पार्वतीला दर्शन दिले. पार्वती म्हणाली. 'चला आपण कैलासाला जाऊ.' शिव बोलला. 'सर्व देव इथे राहत असतील, तर मी कैलासाला येईन.' त्यानंतर पार्वतीसह सर्व देव अंशरूपाने गिरनारवर राहिले व शिव-पार्वती आपल्या मूळ रूपाने कैलासावर गेली. या पर्वताच्या एका शिखरावर विष्णू राहिला व दुसऱ्या शिखरावर पार्वती अंबारूपात राहिली. शिवाने इथे वस्त्रे उतरली म्हणून या क्षेत्राचे नाव वस्त्रापथ क्षेत्र पडले.



गिरनार पर्वताचा पायथा

श्रीकृष्णाच्या काळातील या पर्वतावरील महत्त्वाची घटना म्हणजे सुभद्राहरण ही होय. अर्जुनाने या पर्वतावरील यात्रेचा प्रसंग साधून सुभद्रेचे हरण केले होते.

वाङ्मयीन उल्लेखांप्रमाणेच शिलालेखातही गिरनारचे उल्लेख आढळतात. येथील अशोकाच्या शिलालेखात अशोकाच्या प्रसिद्ध १४ धर्माज्ञा कोरलेल्या आहेत. दुसऱ्या एका शिलालेखात रुद्रदामनाने (इ. स. १५० चा सुमार) इथले सुदर्शन तळे दुरुस्त केल्याचा उल्लेख असून, तिसऱ्यात या तळ्याची पुन्हा दुरुस्ती स्कंदगुप्ताच्या राजवटीत (इ. स. ४५६ चा सुमार) झाल्याचा उल्लेख आहे. हे तळे मुळात चंद्रगुप्त मौर्याने बांधले होते.

शाक्त, दत्त आणि जैन हे तीन धर्मसंप्रदाय गिरनारशी निगडित आहेत. धार्मिक यात्रेकरूंत बहुसंख्या जैनांची असते. कारण पालिताणा येथील शत्रुंजय पर्वताची यात्रा सुफळ होण्यासाठी जैनांनी गिरनार चढायलाच हवा, असे जैन धर्मशास्त्र सांगते. जैनांचा २२ वा तीर्थंकर नेमिनाथ याचे निर्वाण गिरनार पर्वतावर झाले, अशी जैनपुराणात कथा आहे.

गिरनारची एकूण २१ शिखरे आहेत; पण त्यांतली पाच यात्रेसाठी प्रसिद्ध आहेत. अंबा, गोरख, नेमिनाथ, गुरू व कालिका अशी त्यांची नावे आहेत. शिखराला इथे टूक म्हणतात. गिरनारच्या अर्ध्या चढणीवर पहिली टूक भेटते ती अंबादेवीची. तिथे तिचे प्रशस्त मंदिर आहे. कैलासासारखे गिरिशिखर सोडून ती इथल्या शिखरावर राहायला आली त्यामुळेच या स्थानाला बाव्वन्न शक्तिपीठांपैकी एका पीठाचा मान मिळाला. गुजरातमधील कित्येक कुटुंबे लग्न झाल्यावर वधू-वरांना देवीच्या पायावर घालण्यासाठी आवर्जून इथे आणतात.



दत्तपादुका – गिरनार

दुसरे गोरखशिखर. हे सर्वात उंच आहे. ही गौरखनाथाची तपोभूमी मानलेली आहे. कोण्या अज्ञात काळी त्याने पेटवलेल्या धुनीची जागा आजही तिथे दाखवितात.

गुरुशिखर ही दत्तात्रेयाची तपोभूमी आहे. त्याच्या पादुकाही

इथे आहेत. याच शिखरावर निरंजन रघुनाथ, किनाराम अघोरी, नारायणमहाराज जालवणकर, इ. दत्तोपासकांना दत्तसाक्षात्कार झाला, अशा कथा आहेत. दत्तप्रबोधग्रंथात वामनबुवांनी याचे वर्णन पुढीलप्रमाणे केले आहे –



गुरुशिखराकडे जाणारा रस्ता – गिरनार

एका शृंगावरी गोरक्षनाथ ।
दुसरे शृंगावरी हिंगळजा देवी वसत ।।
तिसरे शृंगावरी स्वयें अवधूत ।
विश्रांति घेत हिंडतो ।।
नवनाथ चौऱ्यांशी सिद्ध ।
येथे वसती गा प्रसिद्ध ।।
दत्त अविनाश तूं स्वतां सिद्ध ।
अद्वय अभेद सर्वातीत ।।
हिंदु आणि मुसलमान ।
यासाठीं रूपे दोन ।।
दत्त दातार अभिमान ।
द्वय स्थान शोभविलें ।।

गुरू व गोरख या दोन शिखरांच्या मध्ये नेमिनाथशिखर आहे. हे जैनांचे पवित्र स्थान आहे. हे शिखर चढायला दुर्गम आहे. इथले नेमिनाथाचे मंदिर संपन्न आहे. नेमिनाथाची मूर्ती शाळिग्राम शिळेची आहे. कृष्णाप्रमाणे याही मूर्तीच्या हातात पांचजन्य असतो. यावरून वैष्णव संप्रदायाशी नेमिनाथाचे काही नाते सूचित होते.

नेमिनाथाचे हे मंदिर प्रथम लाकडी होते. नंतर जयसिंह सिद्धराजाच्या एका जैन मंत्र्याने ते दगडी बांधले. त्याचा सभामंडप बाव्वीस स्तंभांवर आधारलेला असून चांगला प्रशस्त आहे.



जैन मंदिर – गिरनार

कलिका शिखरावर एका काळी अघोरी लोकांचा अड्डा होता, असे सांगतात. इथे ' रा ' खेंगार आणि चूडासमा राजपूत या राजांचे भव्य प्रासाद होते. आज ते भग्न स्थितीत आहेत.

या पर्वतावर गोमुखी, हनुमानधारा, कमंडलू ही तीन कुंडे असून, पायथ्याशी दामोदर कुंड आहे. या कुंडात हाडे विरघळतात, अशी आख्यायिका असल्यामुळे त्या भागातले हिंदू लोक आपल्या नातेवाइकांच्या अस्थी इथे आणून टाकतात. गिरनारवर भैरवजप नावाचा एक मोठा खडक आहे. या खडकावरून उडी घेतल्यास पुनर्जन्म चांगल्या कुळात मिळतो, अशी समजूत आहे. म्हणून जुन्या काळी कित्येक भाविक लोक या खडकावरून उडी घेऊन देहत्याग करीत. सांप्रत ही गोष्ट कायद्याने बंद केलेली आहे.

गिरनारला जाण्यासाठी जुनागडला उतरावे लागते. तिथून पर्वताच्या पायथ्यापर्यंत वाहने येतात. पर्वताची एकूण चढण कठीणच आहे. पायी चढण्याची शक्ती नसेल, त्याच्यासाठी इथे डोल्या मिळतात. पायथ्याशी जैनांच्या धर्मशाळाही आहेत. गिरनारचे माहात्म्य पुराणकालापासून तो आजतागायत टिकून आहे. कृष्णाच्या काळी इथे रैवतकमह नावाची यात्रा भरे; तशीच ती आजही भरते. कार्तिक शु. एकादशीला ही यात्रा भवनाथाच्या मंदिरापासून गिरनारच्या परिक्रमेला निघते आणि पौर्णिमेच्या दिवशी ती परिक्रमा संपविते. [म. ज्ञा॰को.; गुजरात; जै. घ.; जै. सि. भा.; स. भा. प्र. व.; न. च. प.]

गिरिअम्म (इ. स. १७५० चा सुमार) एक कन्नड कवयित्री. हेळवनकट्टे या गावच्या रंगनाथाची ही भक्त होती. हिचे मूळ गाव हरिहरजवळील कोमारनहळ्ळी हे होय. हिने चंद्रहासकथा, सीताकल्याण, उद्दालककथा, इ. आख्यानकाव्ये रचली असून, काही फुटकळ कविताही तिच्या नावावर आहे. तिची काव्यरचना कर्नाटकात लोकप्रिय आहे. [म. च. को.]

गिरिज बाभ्रव्य एक वैदिक आचार्य. सत्रातील यज्ञीय पशूचे अवयव सर्व ऋत्विजांनी कसकसे वाटून घ्यावे, याची माहिती याला एका गंधर्वापासून मिळाली व ती याने सर्वांना सांगितली (ऐ. ब्रा. ७.१). त्याच्या पूर्वी ही माहिती देवभाग या पुरुषाला होती; पण त्याने ती मरेपर्यंत कोणाला सांगितली नाही. [प्रा. च. को.]

गिरिजामाता मराठवाड्यातील एक देवीक्षेत्र. वेरूळची लेणी ज्या डोंगरात कोरली आहेत, त्या डोंगराच्या माथ्यावर एक डोंगर असून त्यावर गिरिजामातेचे देऊळ आहे. देवळाच्या आजूबाजूच्या परिसराला म्हैसमाळ असे नाव आहे. ही गिरिजामाता जागृत असून नवसाला पावते, अशी समजूत आहे. प्रतिवर्षी माघ पौर्णिमेस इथे यात्रा भरते. स्थान उंचावर असल्याने थंड हवेसाठीही लोक इथे येऊन राहतात. [पुरुषार्थ – डिसें. १९६३]

गिरितनयाव्रत एक व्रत. प्रत्येक महिन्यात निरनिराळ्या नावांनी व फुलांनी गौरीची पूजा करणे, हा या व्रताचा विधी आहे. भाद्रपद किंवा मार्गशीर्ष शु. तृतीयेस व्रतारंभ करतात. व्रतावधी एक वर्ष.

गिरिधर (इ. स. चे १७ वे शतक) एक मराठी कवी. हा समर्थशिष्या वेणाबाई हिचा प्रशिष्य होय. याचा जन्म इ. स. १६५३ चा असावा, असे अनुमान आहे. गिरिधर मूळ मिरज–तासगावचा राहणारा; परंतु पुढे तो गुरूंच्या आज्ञेवरून बीड जवळच्या ईट गावी जाऊन राहिला. सांप्रत तिथेच त्याचा मठ आहे. त्याला एक कन्या होती. बीड येथे आज जे दोन मठ आहेत, त्यांपैकी एक या कन्येच्या वंशजांचा असून, दुसरा त्याच्या भावाच्या वंशजांचा आहे. इ. स. १७२९ या वर्षी वैशाख शु. अष्टमीला शुक्रवारी गिरिधरस्वामी बीड मुक्कामी समाधिस्थ झाले. बीड येथे गावाबाहेर नदीच्या काठी गिरिधर व त्याच्या मागाहून आलेले मठपती यांच्या समाध्या आहेत.

याचा सर्व काल श्रीगुरू व श्रीराम यांच्या नामजपात गेला. याचे एकंदर ४० ग्रंथ उपलब्ध आहेत. त्याशिवाय अभंग, पदे अशीही वरीच कविता मिळते. याच्या एकंदर कवितेची संख्या सुमारे २४००० आहे.

समर्थप्रताप हा गिरिधरस्वामीचा सुप्रसिद्ध ओवीबद्ध ग्रंथ होय. या ग्रंथात रामदासाचे चरित्र वर्णिले आहे. हा ग्रंथ ऐतिहासिक दृष्ट्या फारच मोलाचा आहे. कारण रामदासचरित्रावर या ग्रंथाइतका जुना व विस्तृत ग्रंथ आज तरी उपलब्ध नाही. शिवाय गिरिधरस्वामीला रामदासाचा प्रत्यक्ष सहवास लाभला होता. त्यामुळे या ग्रंथाला एक आगळे महत्व लाभले आहे. ग्रंथकर्त्याची धारणा अशी–

> समर्थ देवें जें जें केलें ।
> ते कोण्हीं नसेल ऐकिलें देखिलें ।
> भक्ति ज्ञान वैराग्य गाजलें ।
> न भूतो न भविष्यति ॥

(स. प्र. १९.५२)

हा ग्रंथ २१ समासांचा असून त्याची ओवीसंख्या १३३२ इतकी आहे. समर्थचरित्रातल्या अनेक महत्त्वाच्या गोष्टी यात आलेल्या आहेत. अफझलखानाच्या वधाची प्रेरणा शिवछत्रपतीला रामदासांकडून मिळाली, असे गिरिधर म्हणतो.

समर्थ कसे दिसत, कसे चालत, कसे पाहत, काय खात, इ. तपशीलवार माहिती गिरिधरस्वामीने दिली आहे. [म. वा. इ.; समर्थप्रताप; म. सा. सिं.]

गिरिधर कविराय (इ. स. चे १८ वे शतक) एक हिंदी कवी. याच्या जीवनासंबंधी काही माहिती उपलब्ध नाही. शिवसिंह सेंगरच्या मतानुसार याचा जन्म इ. स. १७१३ मध्ये झाला. नावावरून हा भाट असावा व त्याचे काव्य अवधीत असल्यामुळे तो अवध प्रदेशातला असावा, असे अनुमान करतात. याने अनेक कुंडलिया रचल्या आहेत. कुंडलिया हा सहा पंक्तींचा एक छंद आहे. याच्याबद्दल एक कथा प्रचलित आहे, ती अशी–

गिरिधराच्या शेजारी एक सुतार राहत होता. त्याने एक पलंग तयार केला. त्या पलंगाच्या पायांना त्याने पंखे बसविले होते. माणूस पलंगावर आडवा झाला, की ते पंखे आपोआप फिरू लागत. तो पलंग त्याने राजाला दिला. तेव्हा राजाने त्याला आणखी काही तसले पलंग करायला सांगितले. सुताराचे व गिरिधराचे वाकडे होते. म्हणून त्याने गिरिधराच्या अंगणातील बोरीचे झाड त्यासाठी राजाकडे मागितले. गिरिधराने ते झाड न तोडण्याविषयी राजाला पुष्कळ विनवले; पण त्याचा काही उपयोग झाला नाही. तेव्हा गिरिधर सपत्नीक त्या

राज्यातून बाहेर पडला आणि देशभर भ्रमंती करू लागला. याच काळात त्या पतिपत्नींनी कुंडलियांची रचना केली. ज्या कुंडलियात सांई शब्द आलेला आहे, ती रचना त्याच्या पत्नीची आहे. याची सुमारे पावणेपाचशे पद्यरचना आहे. तिच्यापैकी बऱ्याचशा कुंडलिया असून, बाकीचे दोहे, सोरठ, कवित्त व छप्पय आहेत.

उत्तर भारतातील हिंदी जनतेत याच्या कुंडलियांचा बराच प्रचार आहे. याचे कारण त्याच्या काव्यात दैनंदिन जीवनातील महत्त्वाच्या गोष्टींचे सरळ व साध्या भाषेत वर्णन केलेले असते, हे होय.

झाल्या गेल्या गोष्टी विसरून माणसाने भविष्यकाळ सुधारण्याचा प्रयत्न करणे हे उचित आहे, असे त्याने पुढील पद्यात सांगितले आहे–

बीती ताहि बिसारि दे, आगे की सुधि लेइ ।
जो बनि आवै सहज में, ताही में चित देई ।
ताहि में चित देइ, बात जोई बनि आवै ।
दुर्जन हंसै न कोइ, चित में खता न पावै ।
कह गिरिधर कविराय, यहैं करु मन परतीती ।
आगे को सुख समुझि, होई बीती से बीती ।

काव्यगुणांच्या दृष्टीने मात्र याचे काव्य फारसे सरस नाही. [हिं. सा. को.; हिं. नी. वि.; दक्षिण भारत– नोव्हेंबर १९५८]

गिरिमह याला गिरियज्ञ असेही नाव आहे. संस्कृतीच्या आदिम अवस्थेत निरनिराळे जनसमुदाय गोपालनावर आपली उपजीविका करीत. त्यापुढच्या कालात मग कृषिकर्माचा प्रारंभ आणि विकास झाला. कृषक व गोपालक लोक आपापल्या जीवनव्यवसायाला धरून काही सण-उत्सव साजरे करीत. गोपालक गिरियज्ञ करीत व शेतकरी सीतायज्ञ करीत (हरिवंश २. १६. ९). त्यापैकी गिरिमहाचे वर्णन भागवत पुराण व हरिवंश यांमध्ये गोवर्धनोद्धाराच्या प्रसंगाने आले आहे (भाग. पु. १०.२४; हरिवंश २.१५). गिरिमह हा पर्वतपूजेचा अथवा पर्वतावरील एखाद्या देवतेच्या पूजेचा उत्सव असे. त्यासाठी ग्रामवस्तीतले लोक नटून-थटून पूजासामग्री व विविध भोज्य पदार्थ घेऊन जवळच्या पर्वतावर जात. मग तिथल्या देवतेची पूजा करून महानैवेद्य करीत. त्या निमित्ताने गिरिदेवतेला माणिक-मोती जडवलेले आंगरखेही चढवीत.

अर्जुन तीर्थयात्रा करीत द्वारकेला पोचल्यावर तिथे यादवांनी केलेल्या रैवतक पर्वताच्या महोत्सवात तो सामील झाला होता व तिथूनच त्याने सुभद्रेचे हरण केले होते (म. भा. आदि. २११. १२). आश्वमेधिक पर्वातही रैवतक पर्वताच्या महाचे तपशीलवार वर्णन आले आहे. पाहा–गोवर्धन. [प्रा. भा. लो.]

गिरिराज एक कवी. त्यागराजाचा आजा. तिरुवारूर येथे याचा जन्म झाला. तेलुगू व संस्कृत या भाषांवर याचे प्रभुत्व होते. वेदान्त व भक्ती या विषयांवर तेलुगू भाषेत याची काव्यरचना आहे. तंजाऊरच्या दरबारात याला मानाचे स्थान होते. [डि. सा. इं. म्यु. म्यु.]

गिरिविंध्य मिर्जापूर जिल्ह्यात विंध्याचल पर्वतावर असलेले विंध्यवासिनी देवीचे मंदिर. या मंदिराच्या आसपास देवीच्या इतर अवतारांचीही मंदिरे आढळतात. [अ. अ.]

गिरिव्रज पाटण्यापासून ६२ मैलांवर असलेले एक ठिकाण व मगध देशाची प्राचीन राजधानी. उपरिचरवसू याने या नगराची स्थापना केल्याने या नगराला वसुमती असेही म्हणतात. बुद्धकाळात या शहराला राजगृह असे नाव मिळाले. बार्हद्रथ राजकुलाची राजधानी इथे असल्याने महाभारतात बार्हद्रथपूर म्हणून या स्थानाचा उल्लेख मिळतो. बौद्ध ग्रंथातून कुशाग्रपुरी असेही नाव आढळते. कृष्ण, अर्जुन व भीम हे जरासंधाला मारण्यासाठी ब्राह्मणवेष धारण करून या नगरात आले होते असे भागवत पुराणात सांगितले आहे (१०. ७०. २४; ७२. १६). गौतम बुद्ध वर्षावासासाठी इथे आल्याचा उल्लेख मिळतो.

चिनी प्रवासी फाहियान याच्या मते राजगृहाच्या दक्षिणेस पाऊण मैलावर असलेल्या पाच टेकड्यांमध्ये हे स्थान आहे. रामायणातही तसाच उल्लेख मिळतो. त्या पाच टेकड्यांची नावे अशी–(१) पैहार (वैभार) (२) वराल (विपुलगिरी) (३) वृषभ (रान) (४) ऋषि (उदय) व (५) चैत्यक (सोनागिरी). वैभार टेकडीवर बौद्धांची पहिली संगीती (धर्मपरिषद) भरली होती. या ठिकाणी अनेक उन्हाळी व कुंडे आहेत. [म. ज्ञा. को.; हिं. ध.; पु. इं.; हिं. वि. को.]

गिरीश अय्यर एक प्रसिद्ध गायक. पट्टणम् सुब्रह्मण्य अय्यर याचा हा समकालीन होता. राग, तान आणि पल्लवी या गानप्रकारांत हा अत्यंत प्रवीण होता. याच्या काही कृती प्रसिद्ध आहेत. [डि. सा. इं. म्यु. म्यु.]

गिर्नारा ब्राह्मण ब्राह्मणांची एक पोटजात. यांची वस्ती सौराष्ट्रात आढळते. यांच्यांतही पाच

पोटभेद आढळतात. हे गिरनार पर्वतावर येणाऱ्या यात्रेकरूंचे पौरोहित्य करतात. [मुं. इ. जा.]

गिऱ्हा पाण्यात पडून अगर खून होऊन मेलेला मनुष्य भूत होतो, अशी कोकणात समजूत आहे. या भुताला गिऱ्हा म्हणतात. [चित्पावन]

गींदड राजस्थानातले एक लोकनृत्य. होळीच्या पूर्वी पंधरा दिवस राजस्थानी लोक हे नृत्य सुरू करतात व होळीपौर्णिमेला ते संपवितात. नृत्यभूमीच्या मध्यावर एक माणूस नगारा वाजवीत उभा राहतो व चार मात्रांचा ठेका धरतो. मग नाचणारे लोक आपल्या गळ्यात एकेक डंका अडकवून त्याच्या भोवती फेर धरतात. नाचता नाचता डंक्याला डंका भिडविणे हे या नाचातले वैशिष्ट्य होय. रात्रीच्या वेळी हे नृत्य चालते. त्याच्या जोडीला लोकगीतेही गायिली जातात. या नृत्यात बायका भाग घेत नाहीत. [भा. लो. नृ.; लोककला त्रै.]



गींदड नृत्य

गीतगोविंद संस्कृतमधील एक सरस कृष्णकाव्य. या काव्याचा कर्ता जयदेव हा बंगाल्यात इ. स. च्या ११ व्या शतकात होऊन गेला. हे काव्य गेय अशा रागतालबद्ध संगीतात आहे. त्याचे चोवीस प्रबंध अथवा अष्टपद्या आहेत. त्यांची विभागणी बारा सर्गांत केलेली असली, तरी ती विषम आहे. प्रत्येक प्रबंधाच्या आधी व नंतर वेगवेगळ्या वृत्तात अनेक सुरस श्लोक रचलेले असून, प्रबंध व श्लोक यांच्या परस्पर सन्निकर्षाने गीतगोविंदाला मनोहम सौंदर्य प्राप्त झाले आहे. श्रीकृष्णाच्या शृंगारलीला वर्णन करण्यासाठी गेय चालीची पद्ये रचण्याची ही अभिनव कल्पना जयदेवानेच प्रथम काढली, असे म्हणायला हरकत नाही. जयदेवाचे हे एक वैशिष्ट्य ठरले आहे.

गीतगोविंद काव्याचा विषय राधा-कृष्णांचा परस्परानुराग, विरह व मीलन हा आहे. कवीने यात संभोग-विप्रलंभात्मक शृंगार वर्णिला असला, तरी शृंगाराबरोबरच कवीचे भक्तियुक्त अंतःकरणही तिथे दृग्गोचर होते.



गीतगोविंद-मदनाचे शरसंधान – राजस्थानी शैली

श्रीकृष्ण हा याचा नायक व राधा ही नायिका होय. तिसरी एक आहे ती तिची सखी. ती त्या दोघांत मध्यस्थाचे काम करते. नायक-नायिकांच्या अवस्था व निरोप एकमेकांस निवेदन करणे व त्यांचे मीलन घडवून आणणे, हे तिचे काम आहे. साहित्यशास्त्रज्ञांनी वर्णिलेले नायिकांचे अभिसारिका, वासकसज्जा, विप्रलब्धा, इ. सर्व प्रकार जयदेवाने प्रस्तुत काव्यात मोठ्या खुबीने आणले आहेत.

जयदेवाने आपले हे काव्य सहृदयास्वाद्य केले आहे. विविध प्रकारची कर्णमधुर यमके, अनुप्रास, इ. शब्दालंकारांची त्यात सहज परखण केलेली आहे. उपमा, रूपके, उत्प्रेक्षा, श्लेष, इ. अर्थालंकारही जागोजाग आहेत. अनुप्रासाचे एक उदाहरण असे—

> उन्मीलन्मधुगन्धलुब्धमधुपव्याधूतचूताङ्कुर-
> क्रीडत्कोकिलकाकलीकलकलैरुद्गीर्णकर्णज्वराः ।।
> नीयन्ते पथिकैः कथं कथमपि ध्यानावधानक्षण-
> प्राप्तप्राणसमागमरसोल्लासैरमी वासराः ।।
>
> (गी. गो. १.९)

अर्थ– वसंत ऋतु सुरू झाला आहे. आंब्याला मोहोर आला आहे. भ्रमर त्या आम्रमंजरीवर लुब्ध होऊन त्यांच्यावर बसले

आहेत. त्या मंजिऱ्या त्यामुळे हालत आहेत. त्याच फांदीवर कोकिळ बसले आहेत. त्यांचा कुहूकुहू असा मधुर रव चालू आहे. त्याच आम्र वृक्षाच्या तळी बसलेल्या विरही पथिकांच्या कानाला तो कोकिळरव जणू झोंबत आहे. कारण त्यामुळच त्या पथिकांना आपल्या प्रियेची आठवण होत आहे. त्या चिंतनात त्याना प्राणप्रियेच्या समागमाचे क्षणैक का होईना सुख मिळते. तेवढ्याच सुखावर ते आपले विरहावस्थेचे दिवस कसेबसे कंठीत आहेत.

निश्चयालंकाराचे एक उदाहरण असे–

> हृदि बिसलताहारो नायं भुजङ्गमनायकः
> कुवलयदलश्रेणी कण्ठे न सा गरलद्युतिः ।।
> मलयजरजो नेदं भस्म प्रियारहिते मयि ।
> प्रहर न हरभ्रान्त्याऽनङ्ग क्रुधा किमु धावसि ।।
> (गी. गो. ३.३)

अर्थ–हे मदना, माझ्या गळ्यात दिसतो तो कमलतंतूचा हार आहे, तो काही सर्प नव्हे. माझ्या गळ्यात आहे ती कमलपत्रांची माळ, ती काही विषाची निळी कांती नव्हे. माझ्या अंगावर दिसते ती शुभ्रचंद्रनाची उटी, ते काही भस्म नव्हे. तेव्हा हे अनंगा, मी शंकर आहे, असे समजून प्रियाविरही अशा मजवर विनाकारण चाल करून येऊन प्रहार करू नकोस.

पुढील श्लोकात उपेंद्रवज्रा वृत्त वापरले असून ते नाव श्लेषात दडवले आहे–

> स्मरातुरां दैवतवैद्यहृद्य त्वदङ्गसङ्गामृतमात्रसाध्याम् ।
> विमुक्तबाधां कुरुषे न राधामुपेन्द्र वज्रादपि दारुणोऽसि ।।
> (गी. गो. ४.१०.४)

अर्थ– हे अश्विनीकुमारतुल्य सुंदर उपेंद्रा, मी कामातुर आहे. हा माझा विकार केवळ तुझ्या अंगसंगरूपी अमृतानेच दूर होणार आहे. या राधेची ही मदनव्यथा तू नष्ट करणार नसशील, तर तू वज्राहूनही कठोर आहेस (असे मी म्हणेन).

मम्मट, विश्वनाथ, अप्पय्य-दीक्षित, इ. साहित्यशास्त्रज्ञ विविध अलकारांच्या उदाहरणांसाठी गीतगोविंदातील श्लोकं उद्धृत करतात. यावरून गीतगोविंद हे काव्य त्याच्या निर्मितीपासूनच विद्वन्मान्य व लोकप्रिय झाले होते, असे म्हणता येते. काही शतकांपूर्वी केरळात ‘अष्टपदी आट्टम्’ नावाची एक नृत्यकला प्रचलित होती. ते नृत्य गीतगोविंदाच्या आधारेच बसवलेले होते. चैतन्यसंप्रदायात या ग्रंथाला उपासनेचा ग्रंथ या दृष्टीनेही महत्त्व आहे.

पाश्चात्य व पौरस्त्य पंडित गीतगोविंदाबद्दल अत्यंत आदरानें बोलतात. रोमेश चंद्र दत्त, चिं. वि. वैद्य, डॉ. कीथ हे विद्वान गीतगोविंदाची सर्वोत्तम काव्यात गणना करतात. रवींद्रनाथ ठाकूर आपल्या लहानपणच्या आठवणीत त्याच्याविषयी लिहितात, ते असे–

‘गीतगोविंदाचे शब्दसौष्ठव व गीतमाधुर्य या दोन्हीमुळे या काव्याची माझ्या अंतरंगावर इतकी आश्चर्यकारक व मधुर चित्रे उमटली, की माझ्या खास उपयोगासाठी सबंध गीतगोविंदाची एक प्रत स्वतः लिहून घेतल्यावाचून मला चैन पडले नाही.’

बोपदेवशिष्य भीष्माचार्य या महानुभावपंडिताची ‘महाराष्ट्र सुबोधिनी’ नामक टीका, तुकाब्रह्मानंदाची ‘प्राकृत समश्लोकी’, महेश्वरभट्ट सुखटणकराची गद्य टीका, तिच्या आधारे सखाराम कवीने ग्रथित केलेली पद्य टीका, चेतोहरदेवकृत समश्लोकी, वसंतविहारकृत गीतगोविंद, अनंततनयाचे गद्यरूपांतर, डॉ. रा. चिं. श्रीखंडे यांचे ‘सुश्लोक गोविंद’ व राजा बढे यांची ‘शृंगारश्रीरंग’ ही समश्लोकी, हे गीतगोविंदाचे मराठी अवतार होत.

गीतवाद्यनृत्य

गायन, वादन व नृत्य या कला भारतात वैदिक कालाइतक्या प्राचीन आहेत. ऋग्वेदातील ऋचा एका विशिष्ट पद्धतीने गात असत, त्याला छंदोगान असे नाव होते. उदात्त, अनुदात्त व स्वरित या तीन स्वरांत हे छंदोगान करीत. सामगायन ही त्याच्या पुढची पायरी होय. सामगानात ऋग्वेदातील ऋचा सप्त स्वरांत गायिल्या जाऊ लागल्या व संगीतातील स्वरमंडल तयार झाले. त्यानंतर सामवेदाला ऋग्वेदाइतकेच महत्त्व प्राप्त झाले. सामगायक हाच दान देण्यासाठी सत्पात्र ब्राह्मण होय, असे मत्स्य पुराणाने सांगितले. भगवद्गीतेनेही ‘वेदानां सामवेदोऽस्मि’ असे म्हणून सामवेदाला अग्रस्थान दिले. सामवेद म्हणजे ऋचांचे गायन असल्यामुळे सामगायकाला गानप्रक्रियेचा सांगोपांग अभ्यास करावा लागत असे. तांड्यमहाब्राह्मणात सामगानाचे बरेच विवेचन आले आहे.

यज्ञप्रक्रियेत वीणावादन आणि गायन या दोन गोष्टींना फार महत्त्व होते. ब्राह्मणग्रंथ, श्रौतसूत्रे व गृह्यसूत्रे यात वीणागाथी म्हणजे वीणा वाजवून गाथा गाणारा हा शब्द अनेक वेळा आला आहे. गायनाबरोबर वाद्यवादन व नृत्त यांचाही उल्लेख यज्ञाच्या अनुषंगाने आढळतो. यजमानपत्नीच्या गायनाचा आणि वीणावादनाचाही यज्ञविधीत निर्देश आहे. वीणावादन हे यज्ञक्रियेचे एक आवश्यक अंग मानले जात असे.

गवामयन सत्राच्या शेवटी मार्जालीय धिष्ण्याभोवती दासी फेर धरून नाचतात व गातात, असा उल्लेख तैत्तिरीय संहितेत आहे (७. ५. १०. ३२). अश्वमेध यज्ञात गायन ही एक आवश्यक बाब मानलेली आहे.

संगीतकलेचे माहात्म्य वैदिक वाङ्मयात आणि पुराणांत अनेक ठिकाणी वर्णिले आहे. 'इमे वै लोका: स्वरसामान:'— हे सर्व लोक म्हणजे स्वरयुक्त सामे होत, असे ऐतरेय ब्राह्मणात म्हटले आहे (१८.५). संगीत व नृत्य यांच्या योगाने शंकर संतुष्ट होतो, असे रागरत्नाकरात सांगितले आहे —

> न कैलासे न वैकुण्ठे वसत: शिवमाधवौ ।
> यत्र गायन्ति तद्भक्तास्तिष्ठतस्तत्र सन्निधौ ।।

अर्थ — शिव आणि विष्णू हे कैलासावर किंवा वैकुंठात राहत नाहीत; तर जिथे त्यांचे भक्त गायन करीत असतात, तिथेच त्यांच्याजवळ ते राहतात.

त्वरेने शोक नष्ट करणारी विद्या असे संगीताचे वर्णन संगीतचिंतामणी या ग्रंथात केले आहे. संगीतविद्येचे विवरण करणाऱ्या ग्रंथाला गांधर्ववेद असे नाव असून, तो एक उपवेदही मानलेला आहे.

धर्मसूत्रांत व स्मृतिग्रंथांत गायन व नृत्य या कलांवर फार कडक आक्षेप घेतलेले आहेत हे खरे; पण हे आक्षेप बहुंशी हलक्या प्रतीच्या लौकिक गायनाविरुद्ध आणि उदरभरणासाठी कलेचा वापर करणाऱ्या धंदेवाईक कलावंतांविरुद्ध होते. धार्मिक क्रिया, व्रते, उत्सव, यज्ञविधी यांमध्ये गायनाचे महत्त्व धर्मसूत्रांना व स्मृतींनाही मान्य होते.

प्राचीन काळी गर्वोन्मत्त झालेल्या बाणासुराने तांडवनृत्य करून शंकराला संतुष्ट केले, असा उल्लेख शिव पुराणात आहे. महाशिवरात्रीच्या रात्री नृत्य व गायन करून एका नर्तकीने शंकराला प्रसन्न केले आणि पुढच्या जन्मी त्या संगीतसाधनेच्या पुण्याने ती गंधर्वराजाची कन्या झाली, अशी कथा स्कंद पुराणाच्या काशीखंडात आहे.

कोणत्याही महत्त्वाच्या उत्सवाची परिपूर्ती नृत्य, गायन आणि वादन यांच्याशिवाय प्राचीन काळीही होत नसे. यज्ञविधीत यज्ञगाथांचे जे महत्त्व, तेच उत्सवात नृत्यगायनाचे. निरनिराळ्या पुराणांत याविषयी अनेक उल्लेख आहेत. शंकर व पार्वती यांच्या मंगल विवाहानंतर झालेल्या महोत्सवात गंधर्वपतींनी गायन केले आणि वादकांनी विविध वाद्ये वाजविली, असे वर्णन ब्रह्मवैवर्त पुराणात आले आहे.

उत्सव आणि समाज (संमेलने) हे प्रकार राष्ट्रवर्धन म्हणजे राष्ट्राची उन्नती करणारे आहेत, असे रामायणात म्हटले आहे (अयोध्याकाण्ड ६७.१५). अशा उत्सवांत व यात्रांमध्ये गायन, वादन व नृत्य यांना धार्मिक विधीच्या बरोबरीने स्थान दिलेले होते. मत्स्य पुराणात वाद्यांचा ध्वनी आणि संगीतातील स्वर यांना मंगल म्हटले आहे. पराशराचा आश्रम नृत्य व गीत यांनी अलंकृत आहे, असे पराशरस्मृतीत सांगितले आहे. यक्षादी मुमुक्षू लोक या आश्रमात येऊन नृत्य व गीत यांच्या योगाने ईश्वराची आराधना करतात, असे सायणाचार्यांनी त्यावर भाष्य केले आहे.

देवपूजेच्या वेळी व पूजा झाल्यानंतर गायन, वादन व नर्तन करावे, असे स्मृती व पुराणे सांगतात. नृत्य, गीत, वाद्य हे देवाचे राजोपचार मानलेले आहेत. बहुतेक सर्व व्रतांमध्येही या कलांचा संबंध असतो. कौमुदीद्वादशीव्रताच्या वेळी रात्री जागरण करून नृत्य, वादन व गायन करणारा भक्त भवसागर तरून जातो, असे हेमाद्रीने व्रतखंडात सांगितले आहे. नृत्यवादित्रकुशल मनुष्य ब्रह्मलोकात जातो, त्याच्यावर कल्पवृक्षाच्या फुलांची वृष्टी होते, त्याला दिव्य आभरणे मिळतात, स्त्रिया नेहमी त्याची सेवा करतात आणि सुखनिद्रा पूर्ण झाल्यावर वीणेच्या झंकाराने त्याला जाग येते, असे चित्र कारीषाग्निव्रताचे पुण्य वर्णिताना पद्म पुराणाने रंगविले आहे.

> देवताग्रे द्विजाग्रे च यो नित्यं नृत्यमाचरेत् ।
> विनोदयति तं स्वर्गे नित्यमप्सरसां गण: ।।
> (विष्णुधर्मोत्तर पुराण)

अर्थ — देवतेच्या व ब्राह्मणाच्या पुढे जो नित्य नृत्य करतो, तो स्वर्गात गेल्यावर अप्सरांचा समुदाय त्याचे मनोरंजन करतो.

पुराणांनी निरनिराळ्या देवतांचा नृत्य, गायन व वादन या कलांशी संबंध जोडून दिला आहे. लिंग पुराणात नर्तकी व वीणावादिनी या स्वरूपात रतीचे ध्यान वर्णिले आहे. देवी पुराणाने रुद्राला नर्तक म्हटले आहे. बौद्धांच्या धार्मिक वाङ्मयात संगीतादी ललित कलांचा निषेध केलेला असला, तरी धार्मिक संस्कारांत त्यांचे पावित्र्य मान्य केले आहे. बुद्धाचे महानिर्वाण झाल्यानंतर त्याचे शरीर ठेवलेल्या सालवनात, गंध, माला व सर्व वाद्ये घेऊन कुसिनारा नगरातील मल्ल गेले आणि त्यांनी नृत्य-गीत-वाद्यांनी बुद्धाच्या शरीराचा सत्कार केला, असे वर्णन आहे.

अशा प्रकारे नृत्य, गीत व वादन या कलांना समाजात पावित्र्य व मानमान्यता प्राप्त झाली. पण त्याच समाजात कलावंतांविषयी मात्र तिरस्काराची भावना निर्माण झाली, ही गोष्ट आश्चर्यकारक वाटते. याची कारणे काय असतील, ती शोधणे उद्बोधक ठरेल. गृह्यसूत्रे, धर्मसूत्रे व स्मृती यांमध्ये ब्रह्मचाऱ्याला नृत्य, गीत व वादन या कला वर्ज्य सांगितल्या आहेत. विद्याभ्यासात व्यत्यय येऊ नये व त्याचे लक्ष अभ्यासाव्यतिरिक्त इतर गोष्टीत जाऊ नये, या दृष्टीने हा नियम योग्य होता, असे म्हटले पाहिजे. ब्रह्मचाऱ्याप्रमाणेच बौद्ध भिक्षूंनाही या कला वर्ज्य सांगितल्या आहेत.

देवलस्मृतीने संगीताच्या जोडीला वास्तुविद्या, शिल्प, लेखन

आणि कारागिरीची कामे, याही गोष्टी निषिद्ध मानलेल्या आहेत. प्रोषितभर्तृक स्त्रियांना प्रसाधन, नृत्त, गीत, समाज व उत्सव यांत भाग घेण्याचा निषेध होता. संन्याशालाही नट नाट्य यांचे दर्शन निषिद्ध होते.

ब्रह्मचारी, संन्यासी व प्रोषितभर्तृका यांच्या बाबतीतील या निषेधाचे कारण समजण्याजोगे आहे. पण स्मृतिग्रंथांत काही वेळा गृहस्थालाही नृत्य, गायन व वादन या कला निषिद्ध मानलेल्या आहेत. गृहस्थाच्या बाबतीत या सर्व गोष्टींवर निर्बंध का घातले गेले याचे स्पष्टीकरण पुढीलप्रमाणे देता येईल—

स्मृतिग्रंथांना संयत अशा गृहस्थजीवनाचा आदर्श लोकांपुढे ठेवायचा होता. नृत्यगीतादी कलांच्या सेवनात थोडासा अतिरेक झाला, तरी त्यामुळे जीवनाचा तोल बिघडेल, अशी भीती त्यांना वाटली असावी. म्हणून अतिरेक तेवढा टाळा, असे सांगण्याच्या ऐवजी त्यांनी 'मूले कुठारः' या न्यायाचा अवलंब केला असावा.

व्यावसायिक गायक, नट किंवा नर्तक उपजीविकेसाठी आपल्या कलेवरच अवलंबून असतो. त्यामुळे साहजिकच त्याला आपला सारा वेळ कलेच्या व्यासंगात व प्रदर्शनात घालवावा लागतो. त्यातूनच त्याच्या जीवनात एक प्रकारचा स्वच्छंदपणा आलेला दिसतो. शुचिर्भूत जीवनाची कदर बाळगणाऱ्या समाजाला कलावंताचे हे स्वच्छंदी जीवन मानवत नाही. त्यामुळेच अशा या रूढीवादी प्रतिष्ठित लोकांचे प्रतिनिधित्व करणाऱ्या धर्मशास्त्रकारांना व्यावसायिक कलावंत हीन दर्जाचा किंबहुना तिरस्कारार्ह वाटला आणि त्याच्यावर बहिष्कार घालून त्यांनी त्याला प्रतिष्ठित समाजाच्या जवळपास येण्याचीही बंदी केली. म्हणूनच पतित, उन्मत्त व वेश्या यांच्याबरोबरच नर्तकाशीही मैत्री करू नये, असे विष्णुस्मृतीत सांगितले आहे. नट, विट, गायक, परिहासक व चारुवाक हे पाच लोक कलियुगात निषिद्ध असून, त्यांच्याकडून कोणत्याही प्रकारचे धन घेणारा पतित ठरतो व प्राजापत्य प्रायश्चित्ताशिवाय तो शुद्ध होत नाही, असे मार्कंडेय पुराणात म्हटले आहे.

शिल्पाचा उपयोग पोटासाठी योग्य नाही; तो पैसा डागळलेला असतो, असे नारदस्मृती सांगते. कारू आणि कुशीलव यांना साक्षीला बोलावू नये, असे मनुस्मृतीत सांगितले आहे. शिल्पकार व कारागीर यांना स्मृतींनी शूद्र लेखले आहे, त्यामुळे समाजात त्यांच्याविषयी अनादराची भावना निर्माण झाली. त्यांना जेवायला बोलावू नये व श्राद्धकर्मात ते बहिष्कृत मानावे, असेही स्मृतींनी सांगून ठेवले. या कलावंतांवर, शिल्पकारांवर व कारागीरांवर स्मृतींचा एवढा रोष का झाला, त्याचे कारण मुख्यतः ते शिल्पकार व कारागीर प्रतिलोम संततीचे किंवा संकरज होते हे असावे, असा कयास आहे.

अंगिरससंहिता (१·३), यमसंहिता (श्लोक ५४), अत्रिसंहिता (श्लोक १६८, १९५) यांनी तर नट, कारुक व शिल्पी यांना अंत्यजच ठरवले आहे.

संकर जातीत जन्मलेल्या व्यावसायिक कलावंतांचा, शिल्पकारांचा व कारागिरांचा धर्मसूत्रांनी व स्मृतींनी असा अधिक्षेप केला असला, तरी त्यांच्या कलांचे महत्त्व मात्र मुळीच कमी झाले नाही. कौटिलीय अर्थशास्त्रात नट, नर्तक, गायक, वादक, कुशीलव, नर्तकी, गायनाप्रेक्षा, प्रेक्षाकृत्योत्सव, इ. शब्द अनेकवार आलेले आहेत. त्यावरून अर्थशास्त्राच्या काळी संगीत, नृत्य व नाट्य या कलांचा समाजात खूप प्रसार झाला होता, असे दिसते. यज्ञविधी, व्रते, धार्मिक विधी, देवतार्चन व उत्सव एवढे मर्यादित क्षेत्र सोडून संगीतादी ललितकलांनी समाजाच्या व्यावहारिक जीवनात या काळात प्रवेश करून घेतला.

भरतमुनीच्या नाट्यशास्त्रात सर्व ललितकलांचा गौरव केलेला आहे. नाट्याला तर त्यांनी पंचम वेद असेच म्हटले आहे. ज्यांचे दर्शन नाट्यात घडत नाही, अशा कला जगात नाहीत व अशी शिल्पेही अस्तित्वात नाहीत, असे नाट्यशास्त्रात म्हटले आहे (१·११६). भरताच्या पुढचा काल वात्स्यायनाचा होय. त्या कालातील सुसंस्कृत समाजाचे चित्र वात्स्यायनाच्या कामसूत्रांत पाहायला मिळते. समृद्ध व प्रतिष्ठित नागर-जीवनाचा प्रकर्ष या समाजात झालेला दिसतो. संगीत, नृत्य, चित्र, इ. अनेक ललितकलांची मोठ्या तन्मयतेने जोपासना करून ऐहिक जीवन सौंदर्यपूर्ण करण्यासाठी सदैव धडपडणाऱ्या नागरिकाचे हृद्य चित्र कामसूत्रात आढळते. कालिदासाच्या व त्या पुढच्या काळातील संस्कृत कवींच्या नाटकात अशाच तऱ्हेचे नागरिकांचे चित्रण आढळते.

सुसंस्कृत, प्रतिष्ठित, कलापारंगत व रसिक वेश्येला वात्स्यायनाने वर्णिलेल्या समाजात फार मान होता. कुलीन स्त्रीलाही कलाज्ञानाचा निश्चित फायदा आहे. तसेच राजकन्या जर कलावती असेल, तर पतीला हजार बायका असल्या तरी ती त्याला मुठीत ठेवू शकेल, असे वात्स्यायन म्हणतो.

एखाद्या सामान्य कुटुंबातील स्त्रीला कला अवगत असल्या, तर पतिनिधनासारखे संकट कोसळले असताही ती दुसऱ्या देशात जाऊन कलाज्ञानाच्या जोरावर सुखाने कालक्रमण करू शकते. कलांमध्ये प्रवीण असलेल्या पुरुषालाही अनेक गोष्टींचा लाभ होतो. अपरिचित स्त्रियांचेही चित्त तो जिंकून घेतो. एवंच, कला आत्मसात केल्या म्हणजेच खरे सौभाग्य प्राप्त होते व कलांमुळेच व्यक्तिजीवन समृद्ध होते, असे वात्स्यायनाने म्हटले आहे (का. सू. १.३). [प्रा. भा. क.]

गीता हा शब्द भगवद्गीता या शब्दाचा संक्षेप आहे. भगवद्गीता म्हणजे भगवंताने गायिलेली, असा त्याचा अर्थ होतो. गीतेच्या पुढील सुप्रसिद्ध ध्यानश्लोकात तिचे स्वरूप वर्णिले आहे, ते असे–

पार्थाय प्रतिबोधितां भगवता नारायणेन स्वयं
व्यासेन ग्रथितां पुराणमुनिना मध्ये महाभारतम् ।
अद्वैतामृतवर्षिणीं भगवतीमष्टादशाध्यायिनीम्
अम्ब त्वामनुसन्दधामि भगवद्गीते भवद्वेषिणीम् ।।

अर्थ– स्वतः भगवान नारायणाने पार्थाला उपदेशिलेली, प्राचीन मुनी व्यास यांनी महाभारतात ग्रथित केलेली, अद्वैत ज्ञानरूपी अमृताचा वर्षाव करणारी, संसाराचा तिरस्कार करणारी व अठरा अध्याय असलेली, अशी ही भगवद्गीता आहे. हे अंबे भगवद्गीते, मी तुझे अनुसंधान करीत आहे.

गीता ही महाभारताच्या भीष्मपर्वात ग्रथित आहे. या १८ अध्यायाच्या लहानशा ग्रंथात भारताच्या धार्मिक, सांस्कृतिक व सामाजिक इतिहासाचे सार सामावले आहे. 'आता भारतीं कमळ परागु । गीताख्यु प्रसंगु' = महाभारत हे कमळ मानले, तर गीता हा त्यातला पराग आहे, असे ज्ञानेश्वर म्हणतात (ज्ञाने. १.५०). भारताच्या इतिहासात जे जे नवनवे विचारप्रवाह वाहिले, जे जे धार्मिक किंवा तात्त्विक संप्रदाय निर्माण झाले, त्या सर्वांना गीतेतूनच पोषण मिळाले आहे. म्हणूनच भारतीय संस्कृतीचा एक प्रातिनिधिक ग्रंथ या नात्याने बहुतेक विचारवंत गीतेलाच मान्यता देतात.

गीतेविषयी आचार्य विनोबा म्हणतात–

'जीवनाच्या विकासाला आवश्यक असलेला प्रायः प्रत्येक विचार गीतेत येऊन गेला आहे. म्हणूनच गीता हा धर्मज्ञानाचा कोष आहे, असे अनुभवी पुरुषांनी यथार्थपणे म्हटले आहे.'

डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन् म्हणतात–

'भगवद्गीता हा तात्त्विक प्रबंध नसून तो एक धार्मिक ग्रंथ आहे. त्यात सत्याचे सम्यक् दर्शन घडते. इतकेच नव्हे; तर मानवधर्माचे त्रिकालबाधित स्वरूपही कळते.'

भगवद्गीतेला एवढी मोठी मान्यता मिळाल्यावर रामगीता, शिवगीता, गुरुगीता, हंसगीता, इ. सुमारे २०० अनुकरणात्मक गीता लिहिल्या गेल्या. पण त्यांपैकी एकीलाही भगवद्गीतेइतकी मान्यता मिळू शकली नाही. गीता म्हटले की, भगवद्गीतेचाच बोध होतो.

गीतेला उपनिषद असे समजतात. गीतेच्या अध्यायसमाप्तिसूचक वाक्यात 'भगवद्गीतासु उपनिषत्सु' असे स्पष्ट म्हटलेलेच आहे. इथे उपनिषत्सु असे बहुवचन आहे. त्यावरून सर्व उपनिषदांचे सार या ग्रंथात साठविले आहे, असे सूचित होते.

गीतेत अध्यायसमाप्तिसूचक वाक्य येते, ते असे– 'इति श्रीमद्भगवद्गीतासूपनिषत्सु ब्रह्मविद्यायां योगशास्त्रे श्रीकृष्णार्जुनसंवादे . . . अध्यायः' त्यावरून गीता ही ब्रह्मविद्या, योगशास्त्र व कृष्णार्जुनसंवाद असल्याचे स्पष्ट होते. ब्रह्मविद्या म्हणजे ब्रह्माची विद्या किंवा ज्ञान होय. गीतेने ब्रह्म शब्दाची व्याख्या 'अक्षरं ब्रह्म परमं' = ब्रह्म हे अक्षर म्हणजे नाश न पावणारे अर्थात अंतिम सत्य होय, अशी दिली आहे. 'योगशास्त्रे' यातला योग शब्द युज् = जोडणे, या धातूपासून बनला आहे. जोडणे हा सामान्य अर्थ झाला. पण गीतेला विशेष अर्थाने योग शब्द अपेक्षित आहे. मनाच्या ज्या अवस्थेत जीवाचा स्वरूपाशी म्हणजेच ब्रह्माशी संबंध येतो, तिला गीतेने समत्व असे म्हटले असून, समत्व म्हणजेच योग असे सांगितले आहे. हे समत्व ज्या साधनांनी मिळवता येते, त्यांनाही गीतेत कर्मयोग, भक्तियोग, ज्ञानयोग, इ. योग शब्दानेच उल्लेखिले आहे.

अशा प्रकारे गीता ही ब्रह्मविद्या व योगशास्त्र असली, तरी त्या दोहोंचे सलग आणि स्वतंत्र विवेचन गीतेत आढळत नाही. ते विषय कृष्णार्जुनांच्या संवादातूनच त्या त्या प्रसंगी विवेचिले आहेत. म्हणून अध्यायसमाप्तीत 'कृष्णार्जुनसंवादे' असे जे एक पद आहे, ते महत्त्वाचे आहे.

गीता व महाभारत– आजच्या स्वरूपात महाभारताच्या कथानकाशी गीतेचा संबंध केवळ पहिल्या अध्यायापुरताच दिसतो. त्यानंतर कुरुक्षेत्रावरील रणवाद्ये व युद्धकल्लोळ बाजूला पडतात व कृष्ण आणि अर्जुन यांच्यामध्ये तात्त्विक चर्चा सुरू होते. त्यामुळे युद्धाच्या घाईगर्दीत ही अध्यात्मचर्चा कितपत सयुक्तिक अथवा संभाव्य आहे, असा प्रश्न अनेकांच्या मनात उत्पन्न झाला आहे. ही सारी चर्चा होईपर्यंत युद्ध थांबले होते काय, असाही सवाल त्यांच्यापुढे उभा राहतो व गीता ही महाभारतासारख्या महाकाव्यात व्यासांनी घातली असेल, ही गोष्ट कित्येकांना मान्य होत नाही. महाभारत हे अनेक शतके रचले जात असावे, असे आधुनिक संशोधकांनी ठरविले आहे. त्यात गीता ही फार उशीरा घातली गेली असावी, असे पुष्कळांना वाटते. श्री. गार्बे हा जर्मन संशोधक वरील मत व्यक्त करणाऱ्यांमध्ये प्रमुख आहे.

पण आजच्या स्वरूपातील महाभारताकडे पाहिले, तर गीता हा त्याचा अविभाज्य घटक असल्याचे स्पष्ट दिसते. आदिपर्वात दिलेल्या महाभारताच्या विषयानुक्रमणिकेत गीतेचा उल्लेख आहेच. पण इतर पर्वांतूनही अनेक ठिकाणी तो आहे. अनुगीता ही मूळ गीतेला अनुसरूनच लिहिल्याचे स्पष्टपणे दिसून येते. गीतेला महाभारतापासून वेगळी काढल्यास त्या महान ग्रंथातील फार मोठा भाग प्रक्षिप्त मानावा लागेल. अर्थात महाभारताच्या

आजच्या स्वरूपात तरी गीतेचे स्थान अविचल आहे. मात्र रणांगणावर संपूर्ण गीता श्लोकबद्ध स्वरूपाने सांगितली गेली, असा याचा अर्थ नव्हे. कृष्णार्जुनांमध्ये युद्धाविषयीची नैतिक चर्चा व तदनुषंगाने प्राप्त होणारी धर्म, अध्यात्म यांची चर्चा चालली असता धर्मयुद्धाच्या नियमांप्रमाणे काही काळ युद्ध थांबणे अशक्य नव्हते. भीष्मपर्वाच्या ४१ व्या अध्यायात तसे ते थांबले असल्याचे स्पष्टच सांगितले आहे.

वरील विवेचनावरून महाभारतात गीतेचे स्थान निश्चित होत असले, तरी त्याच्या *जय* आणि *भारत* या नावांपैकी कोणत्या नावाच्या ग्रंथात गीतेचा अंतर्भाव झाला असावा, हे सांगणे मात्र कठीण आहे. पण गीतेचे अनेकांनी अनेक ठिकाणी जे उल्लेख केले आहेत, त्यांवरून तिची प्राचीनता मात्र निस्संशय सिद्ध होते. अष्टाध्यायीत वासुदेव आणि अर्जुन यांचा जो एकत्र उल्लेख येतो, त्यावरून पाणिनीला गीता माहित असल्याचे कळते. गौडपादांच्या कारिकांत काही ठिकाणी गीतेतल्यासारखी पद्यरचनाच नव्हे; तर विचारसरणीही आढळते (गी. का. २.६; २.३६; ४.७; ४.३१). कालिदासानेही रघुवंशाच्या दहाव्या सर्गात एका ठिकाणी गीतेचे अनुकरण केल्यासारखे दिसते. उदा०—

> अनवाप्तमवाप्तव्यं न ते किञ्चन विद्यते ।
> लोकानुग्रह एवैको हेतुस्ते जन्मकर्मणोः ॥
>
> (रघु. १०.३१)

अर्थ—तुला न मिळालेले अथवा मिळवायचे असे काहीही नाही. (तेव्हा) लोकांवर अनुग्रह करणे, एवढे एकच तुझ्या जन्म घेण्याचे व कर्मे करण्याचे कारण आहे.

वरील श्लोकाशी गीतेतला 'न मे पार्थास्ति कर्तव्यम्' (गीता ३.२२) हा श्लोक ताडून पाहावा.

त्याच्याही पूर्वी भासाने आपल्या कर्णभार नाटकात 'हतोऽपि लभते स्वर्गं जित्वापि लभते यशः' (१.१२) हा जो श्लोकार्ध लिहिला आहे, तो 'हतो वा प्राप्स्यसि स्वर्गं जित्वा वा भोक्ष्यसे महीम् (गीता २.३७) या श्लोकाची जवळ जवळ नक्कलच आहे.

मनुस्मृती व भगवद्गीता यांत तर अनेक साम्यस्थळे आढळतात. उदा०—

> तस्य सोऽहर्निशस्यान्ते प्रसुप्तः प्रतिबुध्यते ।
> प्रतिबुद्धश्च सृजति मनः सदसदात्मकम् ॥
>
> (मनु. १.७४)
>
> सहस्रयुगपर्यन्तमहर्यद्ब्रह्मणो विदुः ।
> रात्रिं युगसहस्रान्तां तेऽहोरात्रविदो जनाः ॥
>
> (गीता ८.१७)

मनु. ३.७५–७६ = गीता ३.१०; मनु. ३.११८ = गीता ३.१३; मनु. १२.९१ = गीता ६.२९, ही साम्यस्थळेही अवलोकनीय आहेत.

निरुक्ताची रचना सनपूर्व ८ व्या शतकात झाली, असे म्हणतात. त्याच्या शेवटच्या अध्यायात (१४.४) गीतेतला 'सहस्रयुगपर्यन्तम्' (८.१७) हा श्लोक जसाच्या तसा घेतला आहे. या सर्वांहून अधिक महत्त्वाचा उल्लेख आढळतो, तो बौधायन गृह्यसूत्रात. तिथे 'यथाह भगवान्' असे म्हणून 'पत्रं पुष्पं फलं तोयम्' हा गीतेच्या नवव्या अध्यायातला श्लोक जसाच्या तसा घेतला आहे (गृ. शेषसूत्र २.२२.९). यावरून गीतेचे प्राचीनत्व तर संशयातीत ठरतेच; शिवाय प्राचीन काळापासून गीता हा एक प्रमाणग्रंथ मानला जात होता, हेही स्पष्ट होते.

महाभारतात गीता का आली, हाही प्रश्न विचारणीय आहे. पुष्कळांना वाटते, की गीता ही महाभारताच्या त्या कथासंदर्भात विसंगत आहे. यावर लो. टिळकांचे मत असे, की गीतेचा निवृत्तिपर अर्थ लावला गेल्यानेच गीता ही महाभारतात विसंगत वाटू लागली. परंतु गीतेत कर्मयोगशास्त्राचे विवेचन आहे, हे मर्म ध्यानात आले म्हणजे ही विसंगती आपोआप दूर होईल. अर्जुनाच्या मनातील युद्धनिवृत्तीचे किल्मिष दूर करण्यासाठी भगवंताने त्याला कर्मयोगाचा उपदेश करणे स्वाभाविकच दिसते.

तसे पाहिल्यास पूर्ण विचाराने युद्धाचा निर्णय घेऊनच अर्जुन कुरुक्षेत्रावर आला होता, ही गोष्टही स्पष्ट आहे. त्याच्या क्षात्रधर्माला साजेसाच तो निर्णय होता. पण प्रत्यक्ष रणांगणात भीष्मद्रोणांसारखे पूजनीय गुरुजन युद्धासाठी उभे ठाकलेले पाहून किंचित काल तो भावनेच्या आहारी गेला व किंकर्तव्यविमूढ झाला. त्याने भगवंताशी केलेला सारा युक्तिवाद आपल्या मोहरूपी भावनेच्या समर्थनासाठीच होता. पण भगवंताला निश्चितपणे वाटत होते, की अर्जुन मोहामुळे जे करू इच्छित नाही, ते त्याला प्रकृतिपरवश होऊन करावेच लागेल. भगवंताने गीतेत त्याला ही गोष्ट वारंवार बजावली आहे. अर्जुनाचा मोह दूर करण्यासाठीच भगवंताने त्याला स्वकर्तव्य करण्याचा उपदेश केला आहे. अर्जुनाची मोहनिवृत्ती हेच गीतेचे साध्य होते, हे यावरून उघड दिसते. अर्जुनानेही शेवटी 'नष्टो मोहः' अशा शब्दात त्याबद्दल कबुली दिलीच आहे. तात्पर्य अर्जुनाला निमित्त करून जगातील प्रत्येक माणसाला हरघडी होणारा मोह नष्ट व्हावा, या हेतूने भगवान गीता सांगायला प्रवृत्त झाला, असे म्हटले पाहिजे. ज्ञानेश्वरांनी तसे म्हटलेच आहे—

> तैसें अर्जुनाचेनि व्याजें । गीता प्रकाशूनि श्रीराजें ।
> संसारायेवढें थोर ओझें । फेडिलें जगाचें ।।
>
> (ज्ञा. १८.१४७०)

भाष्ये व टीका – गीतेचे महत्त्व प्राचीन काळापासून तो आजतागायत अबाधित आहे. भारतातल्याच नव्हे; तर सर्व देशांतल्या विचारवंतांना तिच्याविषयी आदर आणि आस्था वाटत आली आहे. भारतात उपनिषदे व ब्रह्मसूत्रे या दोहोंच्या बरोबरीने गीतेला प्रामाण्य मिळाले आहे. निरनिराळ्या दार्शनिकांनी आपापल्या दर्शनाचे श्रेष्ठत्व आणि प्रामाण्य सिद्ध करण्यासाठी गीतेवर भाष्ये आणि टीका लिहून आपले दर्शन हे भगवन्मान्य असल्याचे प्रतिपादिले आहे. गीतेवर वेळोवेळी अशी अनेक भाष्ये निर्माण झाली आहेत व अजूनही त्यात खंड पडलेला नाही.

सांप्रतच्या उपलब्ध भाष्यांत शंकराचार्यांचे भाष्य प्राचीन आहे. त्या भाष्यातील उल्लेखांवरून शंकराचार्यांच्याही अगोदर गीतेवर काही टीका झाल्या होत्या, असे अनुमान करता येते. शंकराचार्यांनी आपले अद्वैतात्मक तत्त्वज्ञान ब्रह्मसूत्रे व उपनिषदे यांच्या भाष्यांप्रमाणेच गीतेच्याही आधारे प्रतिपादिले आहे.

शंकराचार्यांच्या नंतर गीतेवर एकामागून एक टीका लिहिल्या जाऊ लागल्या. यांपैकी बहुतेक टीका व भाष्ये विशिष्ट संप्रदायाची आहेत. आचार्यांच्या मागून रामानुज, मध्वाचार्य, वल्लभाचार्य व निंबार्क हे चार मोठे मतस्थापक होऊन गेले व त्यांनी आपापल्या मताप्रमाणे गीतेचा अर्थ लावून भाष्ये लिहिली. याखेरीज श्रीधर, मधुसूदन, शंकरानंद, इ. कित्येक लहानमोठे गीतेचे टीकाकार झाले व त्यांनी वरील कोण्यातरी आचार्यांच्या भाष्याला अनुसरूनच आपली टीका सजविली.

भगवद्‌गीतेचे मराठी अवतारही बरेच आहेत. त्या सर्वांत ज्ञानेश्वरी हा अत्यंत प्राचीन अवतार होय. ज्ञानेश्वरीची योग्यता स्वतंत्र ग्रंथाएवढी मानतात. त्यांनी ‘ भाष्यकारांतें वाट पुसतु ’ भगवंताचा भावार्थ मराठीत आणला. इतकेच नव्हे; तर त्या मूळ भावार्थरत्नाला सुंदर अलंकारांच्या कोंदणात जडवून अधिक ठसठशीत केले. ज्ञानेश्वरानंतर वामनपंडित, दासोपंत, तुकाराम, मोरेश्वर अशा अनेक कवींनी आपापल्यापरी गीतेला मराठी साज चढविला आहे.

रामचरितमानसकर्ता तुलसीदास व हरिवल्लभदास या दोघांनी हिंदी भाषेत-छंदोबद्ध गीताटीका लिहिल्याचे उल्लेख आढळतात. भारतातील सर्व भाषांमध्ये गीतेची भाषांतरे झालेली असून गीतेवर अनेक ग्रंथही लिहिले गेले आहेत.

इंग्रजीत व इतर पाश्चात्य भाषांतही गीतेची अनेक भाषांतरे झाली आहेत व त्यांतील काही पद्यबद्धही आहेत. श्री. आर्नोल्ड यांनी केलेले भाषांतर फार प्रसिद्ध आहे. पाश्चात्य विद्वानांचा संस्कृत भाषेशी संबंध येताच गीतेशीही त्यांचा संपर्क आला. ते गीतेचेही अध्ययन करू लागले.

पाश्चात्यांच्या संपर्कानंतर भारतातही नवीन दृष्टिकोनातून गीतेचा अभ्यास होऊ लागला व तद्विषयक अनेक ग्रंथही निर्माण झाले. या सर्वांत प्रथम उल्लेख करायचा, तो लो. टिळक यांच्या गीतारहस्याचा. त्यांनी निष्काम कर्माच्या सिद्धान्ताला महत्त्व देऊन तशा प्रकारचे कर्म साक्षात मोक्षसाधक आहे, असे गीतेच्या आधारेच प्रतिपादिले. म. गांधींनीही गीतेवर बरेच लिहिले आहे व त्यातून अनासक्तियोग प्रतिपादिला आहे. योगी अरविंद घोष, डॉ. राधाकृष्णन्, डॉ. बेलवलकर, आचार्य विनोबा, श्री. ज. स. करंदीकर, पं. सातवळेकर, इ. अनेक भारतीय तत्त्वज्ञांनी ग्रंथलेखन करून गीतार्थाचे नवे नवे पैलू अभ्यासकांना दाखवून दिले आहेत.

गीता आणि उपनिषदे – गीतेमधील ब्रह्मविद्या ही उपनिषदांच्या आधारेच प्रतिपादिलेली आहे. उपनिषदातील कित्येक श्लोक जसेच्या तसे किंवा थोडयाफार फरकाने गीतेत घेतलेले आहेत. दुसऱ्या अध्यायातील आत्म्याचे वर्णन, आठव्या अध्यायातील अक्षरब्रह्माचे विवेचन व तेराव्या अध्यायातील ज्ञेयाचा विचार बहुतांशी उपनिषदांमधूनच घेतलेला आहे. ‘आश्चर्यवत् पश्यति, ’ (गीता २.२९) या श्लोकाचे कठोपनिषदातील ‘ आश्चर्यो वक्ता ’ या श्लोकाशी असलेले साम्य उघड आहे. ‘ न जायते म्रियते ’ (गीता २.२०) हा संपूर्ण श्लोकही कठोपनिषदातूनच घेतलेला दिसतो. ‘ बहिरन्तश्चभूतानाम् ’ (गीता १३.१५) इ. ज्ञेय ब्रह्माचे वर्णन ‘ तदन्तरस्य सर्वस्य तदु सर्वस्यास्य बाह्यतः ’ (ईश. ५) या ईशोपनिषदातील वर्णनाशी मिळते–जुळते आहे. गीतेतील कर्मयोगाच्या विवेचनालाही ‘कुर्वन्नेवेह कर्माणि ’ या ईशोपनिषदातल्या वाक्याचाच आधार असावा. गीतेच्या ब्रह्मविद्येवर मुंडकोपनिषदाचाही बराच प्रभाव दिसतो. यज्ञयागादी कर्मकांडाकडे पाहण्याची मुंडकाची व गीतेची दृष्टी सारखीच आहे.

ते तं भुक्त्वा स्वर्गलोकं विशालं
क्षीणे पुण्ये मर्त्यलोकं विशन्ति

(गी॰ ९.२१)

अर्थ – ते (यज्ञकर्ते) विशाल अशा स्वर्गलोकाचा उपभोग घेऊन पुण्याचा क्षय झाला असता (परत) मृत्युलोकात प्रवेश करतात.

ही गीतेतील कल्पना ‘ प्लवा ह्येते अदृढा यज्ञरूपाः (मुंडक. १.२.७) = हे यज्ञरूप प्लव (नौका) अस्थिर (बुडविणारे) आहेत, इ. मुंडकातील वर्णनाशी मिळती-जुळती आहे. १४ व्या अध्यायातील ‘ मम योनिर्महद्‌ब्रह्म ’ = (अव्यक्त मूळ प्रकृती) हेच माझे (सृष्टीचे) उत्पत्तिस्थान होय, इ. कल्पनेचे मूळही मुंडकातच आढळते.

पण गीतेच्या विवेचनावर सर्वांत अधिक प्रभाव कोणाचा असेल, तर तो श्वेताश्वताराचा. गीतेच्या १३ व्या अध्यायातील 'सर्वत: पाणिपादं' इ. वर्णन श्वेताश्वतरातूनच घेतले आहे. त्याचप्रमाणे अविद्या किंवा अज्ञान यांना गीतेने माया असे म्हटले, तेही श्वेताश्वतराला धरूनच. त्या आधीच्या उपनिषदांत मायेची कल्पना होती; पण त्यांनी प्रत्यक्ष माया शब्द वापरलेला नव्हता.

मायां तु प्रकृतिं विद्यान्मायिनं तु महेश्वरम् ।
(श्वेताश्व. ४.१०)

अर्थ – माया ही प्रकृती असे जाणावे व त्या मायेचा अधिष्ठाता तो महेश्वर समजावा.

असे म्हणून सांख्य व वेदान्त यांची सांगड घालण्याचा प्रयत्न श्वेताश्वतरान केला व त्याचाच विस्तार गीतेत झाला आहे. गीतेतल्या ध्यानयोगाचे बीजही श्वेताश्वतरातच आहे. 'समं कायशीरोग्रीवं' (गीता ६.१३) इ. गीतेतील वर्णन 'त्रिरुन्नतं स्थाप्य समं शरीरम्' (श्वेताश्व २.८) इ. श्वेताश्वतरातील वर्णनाशी जुळणारेच आहे. गीता पद्यबद्ध असल्यामुळे तिला छांदोग्य, बृहदारण्यक, इ. गद्य उपनिषदातून जसेच्या तसे उतारे घेणे शक्य नव्हते. पण त्या उपनिषदातील ब्रह्मविद्येशी गीतेच्या ब्रह्मविद्येचे साम्य सहज दिसण्यासारखे आहे. उदा०– 'नासतो विद्यते भाव:' (गीता २.१६) या कल्पनेचे मूळ छांदोग्यात, तर 'मात्रास्पर्शास्तु कौन्तेय' (गीता २.१४) या कल्पनेचे बीज बृहदारण्यकात आढळते. म्हणूनच गीताध्यानात पुढील श्लोक घातलेला आहे—

सर्वोपनिषदो गावो दोग्धा गोपालनन्दन: ।
पार्थो वत्स: सुधीर्भोक्ता दुग्धं गीतामृतं महत् ॥

अर्थ– सर्व उपनिषदे धेनुरूपी असून नंदपुत्र श्रीकृष्ण हा त्यांची धार काढणारा आहे. पार्थ हा त्या गायींचे वत्स असून, गीतारूपी अमृत हे त्या गायींचे विपुल दूध होय. आणि (गीतापठनाची इच्छा करणारा) सुबुद्ध वाचक हा त्या गीतारूपी अमृताचा भोक्ता होय.

मात्र गीतेने उपनिषदांतल्या सर्व कल्पना जशाच्या तशा घेतल्या नाहीत. तिने यज्ञकल्पनेला व्यापक अर्थ देऊन कर्मकांडाची ज्ञानयोगाशी सांगड घातली. तसेच सांख्य, योग, इ. जे दार्शनिक विचार गीतेच्या काळात प्रचलित होते, त्यांचाही तिने उत्कृष्ट समन्वय केला.

गीतेची विभागणी – परंपरेप्रमाणे वेदाचे कर्म, उपासना व ज्ञान असे त्रिकांडात्मक विभाग केलेले आहेत. कर्मकांडात ब्राह्मणग्रंथातील यज्ञयागादी कर्मांचा अंतर्भाव होतो. आरण्यके व उपनिषदे यांच्यांतील प्रतीकोपासनेच्या विचारांना उपासनाकांड म्हटले जाते आणि उपनिषदांमधील शुद्ध तात्त्विक विचारांना ज्ञानकांड असे नाव दिले जाते. बऱ्याच सांप्रदायिक टीकाकारांनी वेदाप्रमाणेच गीतेचेही तीन कांडांत विभाजन करून पहिले ६ अध्याय कर्मकांडाचे, पुढचे ७ ते १२ अध्याय उपासनाकांडाचे व त्यापुढचे १३ ते १८ अध्याय ज्ञानकांडाचे ठरविले आहेत. गीतेत कर्म, उपासना व ज्ञान या तीन्ही गोष्टींचा विचार झाला असला, तरी त्यांची अशी अध्यायवार विभागणी मात्र मूळ गीतेच्या प्रतिपादनात आढळत नाही.

उपनिषदांतील ब्रह्मविद्या अधिक लोकाभिमुख करण्याचा गीतेचा प्रयत्न होता. त्यासाठी त्याला आवश्यक असलेले योगशास्त्र गीतेत विचाराने व व्यावहारिक दृष्टिकोनातून विवेचिले आहे. त्याबरोबरच तिने वैदिक कर्मकांडाची कर्मयोगाशी सांगड घालून वर्णाश्रमविहित कर्म ज्ञानकांडातील ब्रह्मविद्येला उपकारकच असल्याचे परोपरींनी सांगितले आहे.

गीतेच्या काळी प्रचलित असलेल्या तात्त्विक विचारांत सांख्य व योग या दर्शनांची प्रामुख्याने गणना केली पाहिजे. त्या वेळी ही दर्शने कोणत्या स्वरूपात प्रचलित होती, हे सांगणे कठीण आहे. सांख्यदर्शनाचा आद्य प्रणेता कपिलमुनी असल्याचे प्रसिद्ध आहे. सांख्यवाङमयात त्याचा उल्लेख मुनी किंवा आदिसिद्ध असा केलेला आढळतो. गीतेतही 'सिद्धानां कपिलो मुनि:' (११. २६) असा उल्लेख आला आहे. या उल्लेखावरून सांख्यप्रवर्तक कपिलमुनी गीतेला परिचित असावा, असे वाटते. मात्र गीतेने कपिलाला इतके महत्त्व दिले आहे, त्यावरून त्याचे मूळ सांख्यशास्त्र निरीश्वर असावे, असे वाटत नाही. एक अंतिम निर्गुण पुरुष किंवा ईश्वर कापिल सांख्यांना संमत असावा, असे मानायला पुष्कळ आधार आहे. भागवत पुराणाच्या तिसऱ्या स्कंधात कपिल-देवहूतींचा जो संवाद आहे, त्यातले तत्त्वज्ञानही सेश्वरच आहे.

गीतेच्या काळी योगदर्शनही आजच्या स्वरूपात उपलब्ध नव्हते. योगविषयक विचार मात्र वेदकालापासूनच प्रचलित असल्याचे दिसते. कठ आणि श्वेताश्वतर या उपनिषदांत योगाचे वर्णन आहे आणि त्याचे अधिक विवेचन गीतेच्या ५ व्या व ६ व्या अध्यायात आले आहे. गीतेने पूर्वीच्या योगविषयक विचारांना संघटित स्वरूप देऊन पतंजलीच्या योगदर्शनाची पूर्वपीठिका तयार केली, असे म्हटले पाहिजे.

भागवत धर्म किंवा पांचरात्र तत्त्वज्ञान यांचा तर गीतेने पायाच घातला, असे म्हटले पाहिजे. भागवत धर्माच्या अनेक संहिता तसेच शांडिल्य व नारद यांची भक्तिसूत्रे गीतेतील भक्तिविवेचनावरच आधारलेली आहेत. डॉ॰ प. कृ. गोडे यांनी गीता व नारदभक्तिसूत्रे यांचा तौलनिक अभ्यास करून नारदभक्तिसूत्रे गीतेला अनुसरूनच लिहिली असल्याचे दाखविले

आहे. यावरून आजचा भागवत संप्रदाय गीतेच्या काळी प्रचारात नव्हता, असे ठरते. तथापि असे असले; तरी भक्तिकल्पना गीतेने अगदी नव्यानेच सांगितली असे मात्र म्हणता येणार नाही. भारतात भक्तिमार्ग वेदकालापासूनच चालू होता व ऋग्वेदातही भक्तिसंप्रदायाची बीजे आढळतात, हे प्रा. ह. दा. वेलणकर यांनी दाखवून दिले आहे. पण असे असले तरी वेद व उपनिषदे यांमध्ये आढळणाऱ्या तुरळक भक्तिकल्पनांना गीतेने विशाल तत्त्वज्ञानाचे स्वरूप दिले व सर्व जातींच्या व सर्व धर्मांच्या समस्त लोकांसाठी हा भक्तिमार्ग खुला असल्याचे उदारपणे उद्घोषित केले.

सांख्ययोगादी द्वैती विचारांचा अद्वैत वेदान्ताशी केलेला समन्वय हेच गीतेतल्या ब्रह्मविद्येचे वैशिष्ट्य होय. गीतेच्या तत्त्वज्ञानाने वेदान्तविचाराला मोठीच चालना मिळाली. वेदान्त दर्शनात उपनिषदे व ब्रह्मसूत्रे यांच्या जोडीने गीतेला स्थान मिळाले, याचे कारण हेच होय.

एकंदरीत पाहता गीतेने आपल्या काळात प्रचलित असलेल्या भिन्न भिन्न विचारप्रवाहांना एका विशाल आणि सर्वस्पर्शी तत्त्वज्ञानात सामावून घेतले, असे डॉ. केंघे म्हणतात, ते सर्वथा उपपन्न वाटते.

पुढील काळात गीतेने अनेक नव्या नव्या विचारांना चालना दिली, असेही दिसून येईल. गीतेमधून निरनिराळ्या सांप्रदायिक आचार्यांनी व आधुनिक विद्वानांनीही भिन्न भिन्न व परस्परविरोधी अर्थ काढल्यामुळे एकाच ग्रंथातून हे सर्व अर्थ कसे निघू शकतात, असा अनेकांना प्रश्न पडतो. त्यामुळे गीतेत विसंगत व परस्परविरोधी तत्त्वविचारांची गल्लत झाली आहे, असे काही टीकाकार म्हणतात; तर अन्य काही टीकाकार गीतेत अनंत अर्थ साठविला असल्याकारणाने प्रत्येकाला आपल्या स्वभावानुरूप व अधिकारानुरूप मार्गदर्शन करण्याचे सामर्थ्य गीतेत आहे, असे म्हणतात. श्रीज्ञानेश्वर या दुसऱ्या मताचे आहेत. 'हे नित्यनूतन देखिजे । गीतातत्त्व ' असे ते म्हणतात. आचार्य विनोबा यांनीही ज्ञानेश्वरांच्या वरील मताला पुष्टी दिली आहे. या ग्रंथाची थोरवी वर्णन करताना लोकमान्य टिळक आपल्या गीतारहस्याच्या प्रारंभीच पुढील परिच्छेद लिहितात–

'श्रीमद्भगवद्गीता हा आमच्या धर्मग्रंथांपैकी एक अत्यंत तेजस्वी व निर्मल हिरा आहे. पिंडब्रह्मांडज्ञानपूर्वक आत्मविद्येची गूढ व पवित्र तत्त्वे थोडक्यात पण असंदिग्ध रीतीने सांगून, त्यांच्या आधारे मनुष्यमात्रास आपल्या आध्यात्मिक पूर्णावस्थेची म्हणजे परम पुरुषार्थाची ओळख करून देणारा आणि त्याबरोबरच भक्तीची ज्ञानाशी व अखेर या दोहोंचीही शास्त्रतः प्राप्त होणाऱ्या व्यवहारांशी सोपपत्तिक व सुंदर जोड घालून संसारात भांबावून गेलेल्या मनास शांत आणि विशेषतः निष्काम कर्तव्याचरणास प्रवृत्त करणारा, यासारखा दुसरा बालबोध ग्रंथ संस्कृतातच काय, पण जगातील इतर वाङ्मयातही सापडणे दुर्मिळ होय.'

गीतासंक्षेप – गीतेमध्ये सर्व विषय श्रीकृष्ण आणि अर्जुन यांच्या संवादातून प्रतिपादिले आहेत. निरनिराळ्या अध्यायांत जे विवेचन आले आहे, ते समजावे म्हणून प्रत्येक अध्यायाचा गोषवारा पुढे दिला आहे ––

अध्याय पहिला – गीतेचा प्रारंभ धृतराष्ट्राने संजयाला विचारलेल्या प्रश्नापासून झालेला आहे. संजयाला श्रीकृष्णाने दिव्य दृष्टी दिली होती. त्यामुळे रणांगणावर घडणाऱ्या गोष्टी तो घरबसल्या पाहू शकत होता. म्हणूनच धृतराष्ट्राने त्याला विचारले, की 'कुरुक्षेत्रावरच्या युद्धात माझ्या मुलांनी व पांडवांनी काय केले ? ' त्यावर संजय धृतराष्ट्राला युद्धाच्या गोष्टी सांगू लागला –

हे धृतराष्ट्रा, दुर्योधनाने व्यूहबद्ध असे पांडवसैन्य पाहिले आणि द्रोणाचार्यांच्याकडे जाऊन त्याला म्हटले. 'आचार्य, द्रुपदपुत्राने व्यूह रचून उभी केलेली पांडवसेना तुम्ही पाहा. या सेनेत भीमार्जुनांसारखे अनेक शूर पुरुष आहेत. आपल्या सैन्यातही तुम्ही, भीष्म, कर्ण, इ. महायोद्धे आहातच. भीष्माचार्यांनी रक्षिलेले कौरवसैन्य पांडवसैन्याचा समाचार घेण्यास समर्थ आहे. तथापि, तुम्ही सर्वांनी आपापल्या व्यूहाच्या प्रवेशद्वारात जागरूकपणे उभे राहून भीष्माचार्यांची बाजू संभाळावी.'

एवढ्यात दुर्योधनाला हर्ष वाटावा म्हणून भीष्माचार्यांनी सिंहनाद करून शंख वाजवला. त्यासरशी उभय सैन्यातील अनेक वीरांनी आपापले शंख फुंकले.

हे राजा, मग कौरवपक्षीय सैनिक व्यवस्थेने उभे राहिले आहेत, असे पाहून अर्जुनाने श्रीकृष्णाला म्हटले. 'हे अच्युता, तू माझा रथ उभय सैन्यांच्या मध्यभागी नेऊन उभा कर.' लगेच श्रीकृष्णाने तसे केले. अर्जुनाने मग सर्व कौरवसैन्यावर एकदा नजर टाकली. त्या दृष्टिक्षेपात त्याला दिसले, की आपलेच वाडवडील, पुतण्ये, नातू आणि सगेसोयरे आपल्याविरुद्ध युद्धासाठी उभे ठाकले आहेत. त्या वडिलधाऱ्या व नात्यागोत्यातल्या मंडळींना पाहून अर्जुनाच्या मनात अनुकंपा उत्पन्न झाली आणि तो श्रीकृष्णाला म्हणाला.

'देवा, हे आप्तस्वजन युद्धासाठीं उभे राहिलेले पाहून माझी गात्रे गळून जात आहेत, धनुष्य हातातून खाली पडत आहे आणि मन जणू भ्रमू लागले आहे. हे केशवा, ही सारी निमित्ते मला विपरीत दिसतात. या स्वजनांना युद्धात मारून माझे काही

हित होईल, असे मला वाटत नाही. मला विजय नको, राज्य नको आणि सुखेही नकोत. कौरवांना ठार मारून आम्हांला काय आनंद होणार आहे बरे ? आम्ही केवळ पापाचे मात्र धनी होऊ. हे जनार्दना, हे युद्ध म्हणजे कुलक्षयाचे साधन आहे. कुलक्षयाचा भयंकर परिणाम कौरवांना दिसत नसला; तरी त्या पापापासून आपण परावृत्त व्हावे, अशी जाणीव माझ्या मनाला झाल्याशिवाय कशी राहील ! कुलक्षयाने कुलधर्म नष्ट होतात आणि कुलावर अधर्माचा पगडा बसतो. मग कुलस्त्रिया बिघडतात आणि वर्णसंकरही होतो. ते सारे कुलच नरकाचे धनी होते. तेव्हा एवढे मोठे पाप करण्यापेक्षा मला निःशस्त्र स्थितीत कौरवांकडून मरण आले तरी ते अधिक कल्याणकारक होईल.'

असे म्हणून अर्जुन शोकग्रस्त होत्साता धनुष्यबाण टाकून देऊन रथातील मागच्या बैठकीच्या जागेवर मटकन बसला. येणेप्रमाणे अर्जुनविषादयोग नावाचा हा प्रथमाध्याय समाप्त झाला.

अध्याय दुसरा – अर्जुनाची अशी विषण्ण अवस्था पाहून श्रीकृष्ण त्याला म्हणाला. 'या विषम प्रसंगी तुला हे मलिन विचार कुठून आठवले ? अर्जुना, तुझ्यासारख्या पुरुषाला हे क्लैब्य शोभत नाही. तू हे हृदयदौर्बल्य टाकून झटकन ऊठ.'

त्यावर अर्जुनाने पुनश्च प्रतिवाद सुरू केला. 'भीष्म–द्रोणासारख्या गुरुजनांना मी कसे बरे मारावे ? त्यांना मारायच्या ऐवजी मी भिक्षा मागून निर्वाह करीन; पण या गुरुजनांचा वध करून त्यांच्या रक्ताने माखलेले भोग भोगणे मला नको. शिवाय युद्धात कोणाचा जय–पराजय होईल, हे तरी कसे कळणार ? देवा, अशा एका धर्मसंकटात मी सापडलो आहे. माझे चित्त धर्मसंमूढ झाले आहे. म्हणून हे देवा, मी तुला शरण आलो आहे. तू माझा गुरू. मी तुझा शिष्य. म्हणून तू मला निश्चित कल्याणकारक असेल तो मार्ग सांग.'

त्यावर श्रीकृष्ण अर्जुनाला बोलला–

हे अर्जुना, जे अशोच्य आहेत, त्यांचा तू शोक करीत आहेस. जे शहाणे असतात, ते मेलेले व जिवंत या दोघांच्या विषयीही शोक करीत नाहीत. कारण जे नश्वर आहे, ते चिरकाल टिकत नाही आणि जे शाश्वत आहे ते कधीही नाश पावत नाही. सदसतातला हा भेद ज्ञानी पुरुष जाणतात. आत्मतत्त्व हे अविनाशी आहे. आत्मा कोणाला मारीत नाही व आत्म्यालाही कोणी मारीत नाही. तो शरीराबरोबर जन्मत नाही व शरीराचा नाश झाला असता मरत नाही.

स्वधर्माच्या दृष्टीने विचार केला तरी तू युद्धाला भिणे योग्य नव्हे. अशा प्रकारचे हे धर्मयुद्ध म्हणजे उघडलेले स्वर्गद्वारच होय. हे धर्मयुद्ध तू नाकारशील, तर तुला स्वधर्मत्यागाचे पाप लागेल. तुझी अपकीर्तीही होईल. अर्जुना, लक्षात ठेव. तू या युद्धात मेलास तर स्वर्गाला जाशील; विजयी झालास तर पृथ्वीचा उपभोग घेशील. म्हणून मनाचा दृढनिश्चय करून उभा राहा. अर्जुना, ही तुला मी सांख्यबुद्धी (ज्ञानयोग) सांगितली.

आता योगबुद्धी (कर्मयोग) ऐक. या योगबुद्धीने तू युक्त झालास, की कर्मबंधातून मुक्त होशील. या मार्गात टाकलेले एखादेही पाऊल उपकारक ठरते. या कर्मयोगाचे अल्पसे आचरणही मोठ्या भयापासून रक्षण करते.

कर्मण्येवाधिकारस्ते मा फलेषु कदाचन ।
मा कर्मफलहेतुर्भूर्मा ते सङ्गोऽस्त्वकर्मणि ॥
(गीता २.४७)

अर्थ– कर्मापुरताच तुला अधिकार आहे. कर्मफलाच्या ठिकाणी तो मुळीच नाही. तू कर्माच्या फलावर दृष्टी ठेवू नकोस; (पण त्याबरोबरच) कर्मच न करण्याचा आग्रहही धरू नकोस.

समत्वबुद्धीने तू कर्तव्यकर्माचे आचरण कर. कर्माच्या ठिकाणी समत्वबुद्धिरूप कौशल्य आणणे यालाच (कर्म) योग म्हणतात. अर्जुना, निरनिराळ्या व्यामोहवाक्यांनी अस्थिर झालेली तुझी बुद्धी जेव्हा समाधीत स्थित होईल तेव्हाच तुला (कर्म) योग प्राप्त होईल. स्थितप्रज्ञता ही फार महत्त्वाची गोष्ट आहे.'

त्यावर अर्जुनाने प्रश्न केला की, 'ज्याची बुद्धी स्थिर झाली, म्हणजेच जो स्थितप्रज्ञ झाला, अशा पुरुषाला कोणत्या लक्षणांवरून ओळखावे ?' भगवंताने त्याचे उत्तर दिले, ते असे–

स्थितप्रज्ञ हा आत्म्याच्या ठिकाणी संतुष्ट असतो. तो दुःखांना उबगत नाही आणि सुखाची अभिलाषा धरीत नाही. तो शुभाशुभ प्राप्त झाले तरी अशुभाचा द्वेष आणि शुभाचे अभिनंदन करीत नाही. तो कासवाप्रमाणे आपली इंद्रिये विषयापासून आवरून घेतो. त्याने आपले मन ताब्यात ठेवून इंद्रियांचा विषयाशी असलेला संबंध तोडून टाकलेला असतो.

अर्जुना, या अवस्थेलाच ब्राह्मी स्थिती म्हणतात. ही स्थिती तुला प्राप्त झाली म्हणजे तू मोहातून मुक्त होशील. इतकेच नव्हे; तर अंतकालीही या मोहरहित अवस्थेत राहून ब्रह्मनिर्वाणाला (मोक्षाला) प्राप्त होशील.

इथे सांख्ययोग नावाचा दुसरा अध्याय समाप्त झाला. याचे विवरण आचार्य विनोबा यांनी पुढीलप्रमाणे केले आहे–

दुसऱ्या अध्यायात (१) आत्म्याची अमरता व अखंडता (२) देहाची क्षुद्रता व (३) स्वधर्माची अबाध्यता हे तीन महासिद्धांत मांडले आहेत. यातील स्वधर्माचा सिद्धांत कर्तव्यरूप व बाकीचे दोन ज्ञातव्यरूप आहेत. स्वधर्म माणसाला

निसर्गतःच प्राप्त होतो. तो शोधावा लागत नाही. माणसाला आई शोधावी लागते का? नाही. ती आगाऊच सिद्ध असते. तीच स्थिती स्वधर्माची आहे. माणसाला या जगात स्वधर्माशिवाय दुसरा कोणताही आश्रय नाही. स्वधर्माला टाळू पाहणे म्हणजे 'स्व'लाच टाळू पाहण्यासारखे आत्मघातकीपणाचे आहे. हा जीवनाचा एक मूलभूत सिद्धांत आहे.

पण स्वधर्मनिष्ठा एकाकी पुरी पडत नाही. म्हणून तिच्यासाठी दुसरे दोन सिद्धांत जागृत ठेवावे लागतात. मी मरतुकडा देह नव्हे; देह केवळ वरचा क्षुद्र पापुद्रा आहे, हा एक सिद्धांत. आणि मी कधीही न मरणारा, अखंड आणि व्यापक आत्मा आहे, हा दुसरा सिद्धांत. हे तीन्ही सिद्धांत अमलात आणण्याची जी हातोटी किंवा युक्ती तिलाच योग म्हणतात.

कर्म करणाऱ्यांची दुहेरी वृत्ती असते. आम्ही कर्म केले, तर त्या कर्माचे फळ आम्ही अवश्य चाखणार, आमचा तो अधिकार आहे, ही एक वृत्ती. आणि उलट पक्षी आम्हांला फळ चाखायला मिळणार नसेल, तर आम्ही कार्य करीतच नाही, ही दुसरी वृत्ती. गीता तिसरीच वृत्ती सांगते. ती म्हणते, 'कर्म तर कराच; पण फळाचा अधिकार राखू नका.' कर्म करणाऱ्याला फळाचा अधिकार आहे; पण तो तुमचा अधिकार स्वेच्छेने सोडून द्या.

त्यावर अर्जुन म्हणतो, की 'देवा, फलत्यागरूप योग ज्याच्या जीवनात मुरला आहे अशा पुरुषाची लक्षणे मला सांग.' त्यासाठी भगवंताने अठरा श्लोकांत स्थितप्रज्ञाचे गंभीर आणि उदात्त चरित्र वर्णिले आहे. स्थितप्रज्ञ हा गीतेचा आदर्श आहे. तो शब्दही गीतेचा स्वतंत्र आहे. स्थितप्रज्ञ म्हणजे स्थिर बुद्धीचा मनुष्य; हे तर त्याचे नावच सांगत आहे. पण संयमाशिवाय बुद्धी कशी स्थिर व्हायची? बुद्धि आत्मनिष्ठ आणि अंतर्बाह्य इंद्रिये बुद्धीच्या हातात, हा संयमाचा अर्थ आहे. तो सोपा नाही. त्यासाठी महान प्रयत्न पाहिजे. ज्ञानही पाहिजे. पण इतकेही करून तो सर्वदा नीट साधेलच, असे नाही. पण तरीही साधकाने निराश होता कामा नये. त्याने आपली साधकाची सर्व युक्ती वापरून ती कमी पडेल, तिथे भक्तीची जोड द्यावी. ही फार मोलाची सूचना देवाने इथे मोजक्या शब्दात दिली आहे.

इथे सांख्ययोग नामक दुसरा अध्याय समाप्त झाला.

अध्याय तिसरा—श्रीकृष्णाने दुसऱ्या अध्यायात अर्जुनाला म्हटले होते, की 'दूरेण ह्यवरं कर्म बुद्धियोगाद्धनञ्जय = हे धनंजया, बुद्धियोगापेक्षा कर्म हे कनिष्ठ प्रतीचे आहे.' या वाक्याचा अर्जुनाच्या मनावर थोडा विपरीत परिणाम झाला. तो म्हणाला, की 'देवा, असे उलटसुलट बोलून मला गोंधळात का टाकतोस? कर्मापेक्षा जर बुद्धी श्रेष्ठ, असे तुला वाटते तर अशा भयावह कर्मात मला का पाडतोस?'

अर्जुनाची ही शंका निरसन करणे अगत्याचे आहे, असे जाणून श्रीकृष्ण म्हणतो—

ज्ञानयोग आणि कर्मयोग अशा दोन निष्ठा मी पूर्वीच सांगितल्या आहेत. या उभय निष्ठांपैकी तुला कोणती सुकर व श्रेयस्कर, ते आता सांगतो. मनुष्याला कर्म सोडणे कधीच शक्य नाही. कर्मावाचून मनुष्यप्राणी क्षणभरही राहू शकत नाही; पण ते अनासक्त चित्ताने करायला हवे. यालाच कर्मयोग म्हणतात. कर्म बंधनकारक असते हे खरे; पण, ते जर यज्ञार्थ केले तर ते बंधनकारक होत नाही. यज्ञ हा मनुष्याच्या जन्माबरोबरच उत्पन्न झालेला आहे. परमेश्वराने उत्पन्न केलेले हे सृष्टिचक्र यज्ञार्थ कर्मे करून माणसाने पुढे चालवले पाहिजे. तसे जो न करील, त्याचे जीवन व्यर्थ होय. केवळ आत्मरत व्यक्तीला कोणतेही कर्म करण्याची आवश्यकता नसते; पण ती अवस्था प्राप्त होईपर्यंत शक्य तितक्या अनासक्त वृत्तीने कर्म करणेच योग्य ठरते.

कर्मणैव हि संसिद्धिमास्थिता जनकादयः ।
लोकसङ्ग्रहमेवापि सम्पश्यन् कर्तुमर्हसि ।
(गी. ३. २०)

अर्थ—जनकादी स्थितप्रज्ञ पुरुष कर्मयोगानेच सिद्धी मिळवते झाले. शिवाय लोकसंग्रहाकडे दृष्टी ठेवूनही तुला कर्मयोगाचे आचरण करणे उचित आहे.

यद्यदाचरति श्रेष्ठस्तत्तदेवेतरो जनः ।
स यत्प्रमाणं कुरुते लोकस्तदनुवर्तते ।।
(गी. ३. २१)

अर्थ—श्रेष्ठ पुरुष जसे आचरण करतो, त्याचप्रमाणे सामान्य जन वागतात व श्रेष्ठ पुरुष जो धर्म प्रमाणभूत मानतो, त्याला अनुसरून सामान्य लोक आपले वर्तन ठेवतात.

अर्जुना, आता माझीच गोष्ट पाहा ना. मला या जगात काहीही कर्तव्य नाही किंवा काहीही मिळवायचे नाही. पण तरीही मी लोकसंग्रहाच्या उद्देशाने कर्म करीतच असतो. वस्तुतः कर्म हे प्रकृतीकडूनच घडत असते. माणूस अहंकारामुळे स्वतःला त्या कर्माचा कर्ता समजतो. पण तत्त्वज्ञ पुरुष मात्र प्रकृतीच्या सत्त्व-रज-तमादी गुणांचा आपल्यातच कर्मरूपी खेळ चालला आहे, असे जाणून त्याविषयी अनासक्त राहतो.

कर्माची ही आसक्ती नष्ट कशी व्हायची? त्याला उत्तम उपाय म्हणजे सर्व कर्मे ईश्वरावर सोपवणे, हा होय. पण कर्माची आसक्ती सोडायच्या ऐवजी कर्मच सोडू म्हटले, तर त्याचा मात्र काही उपयोग होत नाही. कारण सर्व प्राणिमात्र प्रकृतीच्या वळणावर जायचे हा सृष्टीचा नियमच आहे. अशा

स्थितीत कर्म न करण्याचा आग्रह व्यर्थ होय. म्हणून ज्याने त्याने आपला स्वधर्म लक्षात घेऊन अनासक्त चित्ताने प्राप्त कर्म करीत राहावे, हेच उत्तम.

श्रेयान्स्वधर्मो विगुणः परधर्मात्स्वनुष्ठितात् ।
स्वधर्मे निधनं श्रेयः परधर्मो भयावहः ।।
(गी. ३.३५)

अर्थ – सुखाने (किंवा हौसेने) आचरता येणाऱ्या परधर्मापेक्षा गुणाने उणा (आचरण्यास कठीण वाटणारा) स्वधर्मच श्रेयस्कर होय. मनुष्याने यावज्जीव स्वधर्मातच राहून मरणे बरे. परधर्माचे आचरण भयावह (आत्मोन्नतीला घातक) असते.

कर्मयोगात फलत्याग हा महत्त्वाचा आहे. कर्मयोगी फलाचा त्याग करून अनंत पट फल मिळवितो. सरासरी मनुष्य व कर्मयोगी या दोघांची कर्मे सारखीच; पण कर्मयोगी फलासक्ती सोडून कर्मातच रमतो, ही मुख्य गोष्ट आहे. निष्काम कर्मयोगात अद्‌भुत सामर्थ्य आहे. त्या कर्मामुळे व्यक्तीचे व समाजाचेही परम कल्याण होते. या दोन फलांशिवाय चित्तशुद्धीचेही आणखी एक मोठे फल त्याला मिळते. कर्म हे चित्तशुद्धीचे साधन आहे. शिवाय कर्मयोगी हा समाजाचा आदर्श होतो. समाजात आधी जन्मलेले, मागाहून जन्मलेले असा भेद तर आहेच; त्यामुळे आधी जन्मलेल्यांनी मागाहून जन्मलेल्यांना धडा घालून देणे आवश्यक ठरते. हाच लोकसंग्रह होय. कर्मयोगी स्वयंतृप्त असतो, पण तरीही तो कर्म केल्याशिवाय राहत नाही. कर्मयोगी तृप्त होऊन जर कर्म सोडील, तर दुसरे अतृप्त असूनही कर्मे सोडतील. तेव्हा लोकांचा हा बुद्धिभेद टाळण्यासाठी कर्मयोग्याला स्वधर्म करीत राहावेच लागते.

भगवंताचे हे कर्मयोगाचे विवेचन ऐकून अर्जुनाच्या मनात प्रश्न आला, की कर्मयोग जर इतका श्रेष्ठ आहे, तर माणसे त्याच्यापासून चळतात का ? त्यावर श्रीकृष्ण अर्जुनाला उत्तर देतो, ते असे–

हे अर्जुना, रजोगुणातून उत्पन्न झालेले काम व क्रोध हे मनुष्याला कर्तव्य विसरण्याचे पाप करायला प्रवृत्त करतात. तेव्हा तू त्या दोघांना आपले वैरी समज. धुराने जसा अग्नी आणि धुळीने जसा आरसा आच्छादिला जातो, त्याचप्रमाणे कामाने ज्ञान आच्छादिले जाते. हे अर्जुना, काम हा ज्ञानाचा नित्य शत्रू होय. तो इंद्रिये, मन व बुद्धी यांच्या ठिकाणी ठाण मांडून ज्ञानाला आच्छादून टाकतो व देहाचा स्वामी जो जीवात्मा त्याला मोह पाडतो. म्हणून हे अर्जुना, तू या कामरूपी दुर्दमनीय अशा शत्रूचा निःपात कर.

इथे कर्मयोग नामक तिसरा अध्याय समाप्त झाला.

अध्याय चौथा– भगवान अर्जुनाला म्हणतो, मी हा त्रिकालाबाधित कर्मयोग पूर्वी विवस्वानाला सांगितला होता. तोच आता तू माझा सखा व भक्त आहेस, म्हणून तुला सांगितला. त्यावर अर्जुनाचा प्रश्न. 'देवा, प्राचीन काळी जन्मलेल्या विवस्वानाला सांप्रत जन्मलेल्या तू योगाचा उपदेश केलास, हे मी कसे खरे मानावे ?' अर्जुनाची ही शंका देवाने पुढीलप्रमाणे दूर केली. 'हे अर्जुना, माझे आजवर अनेक जन्म झाले आहेत. मी जरी जन्म–मृत्युरहित असलो, तरी स्वतःच्या प्रकृतीचे अधिष्ठान करून मी या दृश्य सृष्टीत वारंवार जन्म घेत असतो.

यदा यदा हि धर्मस्य ग्लानिर्भवति भारत ।
अभ्युत्थानमधर्मस्य तदाऽऽत्मानं सृजाम्यहम् ।।
परित्राणाय साधूनां विनाशाय च दुष्कृताम् ।
धर्मसंस्थापनार्थाय सम्भवामि युगे युगे ।।
(गी. ४. ७–८)

अर्थ– हे अर्जुना, ज्या ज्या वेळी धर्म क्षीण होतो आणि अधर्म बळावतो, त्या त्या वेळी मी स्वतः या सृष्टीत प्रगट होतो. सज्जनांच्या संरक्षणाकरिता, दुर्जनांच्या संहाराकरिता आणि धर्मसंस्थापनेसाठी मी युगायुगात उत्पन्न होतो.

हे अर्जुना, जो कोणी माझे हे दिव्य जन्म-कर्म तत्त्वतः जाणतो, तो मलाच प्राप्त होतो. आजवर असे अनेक ज्ञानपूत लोक मला येऊन मिळाले आहेत. माझे भक्त ज्या ज्या भावनेने मजकडे येतात, तिला अनुरूप असे फल मी त्याना देतो.

गुण-कर्मांना अनुसरून चातुर्वर्ण्याची रचनाही मीच केली आहे; पण मी हे सर्व करूनही अकर्ता आहे. या स्वरूपात जो मला पाहतो, तो कर्मांनी बद्ध होत नाही. माणसाने हे माझे अकर्तेपण जाणले पाहिजे. त्याच्या अनुषंगानेच कर्म, विकर्म आणि अकर्म यांचे स्वरूपही जाणून घेतले पाहिजे. कर्माचे तात्त्विक स्वरूप खरोखरच जाणायला कठीण आहे. जो मनुष्य तात्त्विक दृष्टीने कर्मात अकर्म आणि अकर्मात कर्म पाहतो, तोच खरा बुद्धिमान होय. कर्मफलाविषयीची आसक्ती टाकून जो नित्य तृप्त होत्साता कर्मामध्ये प्रवृत्त होतो, तो काहीच करीत नाही, असे समजावे. अशा स्थितीत त्याची जी केवळ शारीरिक कर्मे होतात, त्यांचा त्याला दोष लागत नाही. जो द्वंद्वातीत झाला, तो कर्म करूनही कर्मातून सुटला, असे समजावे. केवळ यज्ञासाठी जो समत्वबुद्धीने कर्म आचरतो, त्याचे ते कर्म निःशेष लय पावते. सर्व यज्ञांचा विस्तार वेदातून झाला आहे आणि सर्व यज्ञ कर्मानेच सिद्ध होणारे आहेत. हे ज्ञान तुला झाले, म्हणंजे तू मुक्त होशील. यज्ञांचे विविध प्रकार आहेत. पण त्या सर्वांत ज्ञानयज्ञ श्रेष्ठ आहे. कारण सर्व कर्म अखेर ज्ञानातच परिसमाप्त होत असते. ज्ञानाने मोहाचा नाश होतो आणि आत्मौपम्य बुद्धी जागृत होते. ज्ञान ही पापांतून तारून नेणारी

नौकाच होय. दुसऱ्या शब्दांत सांगायचे, तर ज्ञान हा अग्नी असून तो सर्व कर्मांना लाकडाप्रमाणे भस्मसात करतो.

न हि ज्ञानेन सदृशं पवित्रमिह विद्यते ।
तत्स्वयं योगसंसिद्धः कालेनात्मनि विन्दति ।।
(गी. ४.३८)

अर्थ — ज्ञानासारखी पवित्र वस्तू या जगात दुसरी कोणतीही नाही. जो योगबुद्धीने पूर्ण सिद्ध बनला, त्याच्या अंतःकरणात हे ज्ञान योग्य वेळी उदित होते.

जो श्रद्धावान आणि जितेंद्रिय असतो, तोच ज्ञानाचा अधिकारी होतो. हे आत्मज्ञान ज्याला होते, त्याला आत्यंतिक चित्तशांती प्राप्त होते. ज्ञानाच्या द्वारे ज्याने आपले संशय छेदून टाकले आणि ज्याने आत्म्यावर अधिकार मिळविला, अशा पुरुषाला कर्मे बद्ध करू शकत नाहीत.

इथे ज्ञानकर्मसंन्यासयोग नामक चौथा अध्याय समाप्त झाला. यावर आचार्य विनोबा पुढील विवेचन करतात—

कर्म, विकर्म व अकर्म हे तीन शब्द चौथ्या अध्यायात महत्त्वाचे आहेत. कर्म म्हणजे बाहेरचे स्वधर्माचरणरूप स्थूल कर्म. या बाह्य कर्मात चित्त ओतणे, म्हणजे विकर्म अर्थात् विशेष कर्म. कर्माला विकर्माची ज्योत लागल्यावर कर्म हे अकर्म होते. याचा अर्थ त्या कर्माचा बोजा वाटत नाही, करून अकर्तेपण प्राप्त होते. मग त्यात पापपुण्य काही राहत नाही. हे कर्माचे अकर्म कसे होते ? ही कलाकोणाजवळ पाहायला मिळेल ? भगवान् म्हणतो, की, त्यासाठी तू संतांकडे जा. सारखी सेवाकर्मे करूनही अत्यंत शांत कसे राहावे, बाहेरच्या कर्मांचा जोर असताही हृदयात अखंड संगीताची सतार कशी लावावी, हे तिथे गेल्याने कळेल.

अध्याय पाचवा—— चौथ्या अध्यायात आलेल्या विवेचनात भगवंताने ज्ञानाचे महत्त्व आणि त्यात कर्मांची समाप्ती या गोष्टी सांगितल्या. त्यामुळे अर्जुनाच्या मनातला संशय अधिकच बळावला. त्याने संन्यास व कर्मयोग यात निश्चित श्रेयस्कर काय असा प्रश्न केला. त्याच्या उत्तरादाखल श्रीकृष्ण म्हणतो—

अर्जुना, संन्यास व कर्मयोग हे दोन्ही मार्ग मोक्षदायक खरे; पण त्यातूनही कर्मसंन्यासापेक्षा कर्मयोग अधिक चांगला आहे. तसे पाहिले, तर सांख्य आणि योग यांच्यांत वेगळेपण नाही. एकाचे सम्यक आचरण केले, की दोहोंचेही फळ लाभते. जे स्थान सांख्यांना (ज्ञाननिष्ठ संन्यासमार्गी) मिळते, तेच योग्यांनाही प्राप्त होते. पण कर्मसंन्यास हा योगावाचून प्राप्त करून घेणे कठीण आहे.

ज्याने कर्मयोग उत्तम साधला, ज्याने इंद्रिये जिंकली व ज्याला सर्वात्मभाव प्राप्त झाला, तो कर्मे करूनही त्यांनी लिप्त होत नाही. कारण योगयुक्त पुरुष आपण काही करतो, असे मानीतच नाही. त्याची अशी धारणा असते, की इंद्रिये ही इंद्रियांच्या विषयात लागलेली आहेत. योगी लोक तन, मन, बुद्धी किंवा इंद्रिये यांच्याद्वारे आसक्ती टाकून जे कार्य करतात, ते केवळ आत्मशुद्धीसाठी असते.

कर्मफलाचा त्याग करायचा, तर कर्माची प्रेरणाच कशी होणार ? अशी आशंका घेऊन पुढे भगवान सांगतो. जितेंद्रिय असा जीवात्मा सर्व कर्मांचा मनाने संन्यास करून स्वतःकडे कोणत्याही कर्माचे कर्तृत्व घेत नाही. आत्मा हा वस्तुतः अकर्ताच असतो. सृष्टीतले सर्व व्यवहार प्रकृतीच करीत असते.

परमेश्वरही त्या भानगडीत पडत नाही. ती सर्व सत्ता प्रकृतीच्याच हाती असते. मी पुण्य केले किंवा माझ्या हातून पाप घडले, इ. भावना जीव अज्ञानामुळे स्वतःकडे लावून घेतो आणि स्वतःला पुण्यवान किंवा पापी समजतो. पण जे कोणी सात्त्विक वृत्तीचें मुमुक्षू असतात, त्यांची बुद्धी सदाचरणाने शुद्ध व निर्मल झाल्याने त्यांना ज्ञानाने परमात्मस्वरूपाची स्पष्ट कल्पना येते. मग ते परमेश्वराच्या उपासनेकडे वळतात, तिच्यात तल्लीन होतात आणि जन्ममरणाच्या फेऱ्यातून कायमचे सुटतात. मग त्यांची दृष्टीही सर्वत्र सम होते. ज्यांचे मन असे समत्वबुद्धीत स्थिर झाले, तें ब्रह्मतत्त्वातच विलीन झाले, याविषयी शंका नको.

भूतमात्राविषयी जशी समत्वबुद्धी धारण करायची तशीच ती प्रिय-अप्रिय अशा विषयासंबंधीही धरली पाहिजे. इंद्रिये व विषय यांच्या संयोगापासून लाभणाऱ्या बाह्यसुखाविषयीची आसक्तीही नष्ट झाली पाहिजे.

जितेंद्रिय व आत्मज्ञानसंपन्न अशा यतींना मोक्ष सदैव सन्निधच असतो. जो मुनी बाह्यविषयांना बाहेरच ठेवून, दृष्टी भ्रूमध्यात स्थिर करून प्राणापानांना सम करतो, तसेच वासना, क्रोध आणि भय यांच्यापासून अलिप्त राहतो, तो सार्वकाल मुक्तच असतो. यज्ञ व तप यांच्या फलांचा भोक्ता, आब्रह्मभुवनांचा प्रभू आणि सर्व भूतांचा सखा मीच आहे. अशा मला जो जाणतो, त्याला अक्षय्य शांती लाभते.

इथे संन्यासयोग नावाचा पाचवा अध्याय समाप्त झाला. या अध्यायावर आचार्य विनोबा विवेचन करतात, ते असे—

पाचव्या अध्यायात संन्याशांच्या दोन तऱ्हांची तुलना केली आहे. एक चोवीस तास कर्म करूनही काहीच करीत नाही व दुसरा क्षणभरही कर्म न करून सर्व करतो. ही संन्यासाची कल्पना फारच पवित्र व भव्य आहे. कर्मयोगी श्रेष्ठ की कर्मसंन्यासी श्रेष्ठ ? सर्व करूनही काही न करणे आणि काही न करता सर्व करणे दोन्ही योगच. परंतु तुलनेसाठी एकाला योग म्हटले व दुसऱ्याला संन्यास म्हटले. म्हणून भगवान सांगतो, की संन्यास व योग यांच्या ठिकाणी जो एकरूपता

पाहील, तोच खरे रहस्य समजला. ज्ञानी संन्यासी व ज्ञानी कर्मयोगी दोघे एकाच सिंहासनावर बसणारे आहेत. शब्द निराळे, परंतु अर्थ एकच. पण तरीही देव म्हणतो, की संन्यासापेक्षा कर्मयोगच श्रेष्ठ. देव इथे साधकाच्या दृष्टीने बोलतो. मुळीच कर्म न करता सर्व कर्म करण्याची तऱ्हा सिद्धालाच शक्य आहे; साधकाला नाही. साधकाला कर्मयोग हा मार्गही आहे व मुक्कामही आहे. परंतु *संन्यास* हा मुक्कामावरच आहे; मार्गात नाही. म्हणून *संन्यासापेक्षा* कर्मयोग साधकाच्या दृष्टीने श्रेष्ठ आहे. *पूर्णरूपात* दोहोंची किमत सारखीच. कर्मयोग साधनही आहे व निष्ठाही आहे. परंतु संन्यास मात्र निष्ठाच आहे. *निष्ठा* म्हणजे अंतिम अवस्था !

अध्याय सहावा — भगवान म्हणतो. 'अर्जुना, फलाचा अभिलाष न धरता जो शास्त्रविहित कर्म करतो, तो संन्यासी व तोच योगी होय. बाह्यवेष हे संन्यासाचे लक्षण नव्हे; तर वासनात्याग हेच खरे संन्यासाचे लक्षण आहे. योगसिद्धी संपादन करू इच्छिणाऱ्या साधकाला कर्म हे सिद्धिप्राप्तीचे साधन असते; तर योगारूढ पुरुषाला आपली समत्वबुद्धी स्थिर राखण्यासाठी शांती हे साधन होते. जेव्हा एखादा पुरुष कर्मांवरील आसक्ती सोडून संपूर्ण वासनांचाही संन्यास करतो, तेव्हा तो *योगारूढ झाला*, असे म्हणतात. ही स्थिती ज्याची त्यानेच प्राप्त करून घ्यायची असते.

उद्धरेदात्मनात्मानं नात्मानमवसादयेत् ।
आत्मैव ह्यात्मनो बन्धुरात्मैव रिपुरात्मनः ।।

(गी. ६. ५)

अर्थ — मनुष्याने स्वतःच स्वतःचा उद्धार करावा. त्याने आत्म्याला खचू देऊ नये. कारण (बुद्धीचा सदुपयोग केल्यास) आत्मा हाच आपला बंधू (मित्र) व (बुद्धीचा दुरुपयोग केल्यास) आत्मा हाच आपला शत्रू होतो.

ज्याने मनोजय साधला व जो निर्विकार झाला, त्याची बुद्धी शीतोष्णादी द्वंद्वांच्या ठायी समत्वरूप होते. तो मग दगड व सोने समान लेखणारा बनतो.

यानंतर साधकाची बुद्धी अशा रीतीने आत्मनिष्ठ होण्यासाठी त्याने जो ध्यानयोग आचरायचा, त्याचे वर्णन भगवान पुढीलप्रमाणे करतो.

साधकाने शुद्ध स्थळी, स्थिरासनावर बसून मन व इंद्रिये यांचे बाह्य व्यापार बंद ठेवून चित्तशुद्धीसाठी योगाभ्यास करावा. आसनावर निश्चल बसून पाठीचा कणा, मान व डोके एका रेषेत निश्चल ठेवून व दृष्टी नासाग्र करून निर्भयपणे मन माझ्या ध्यानाकडे लावावे. याप्रमाणे ध्यानाने ज्याचे मन स्वाधीन झाले, असा योगी मोक्षाचे अनन्य साधन अशी परमशांती अनुभवितो. अर्जुना, आहार-विहार यथाप्रमाण असतील, तरच साधकाला हा योग साधतो; अन्यथा नाही. याप्रमाणे बाह्य विषयापासून आवरलेले चित्त जेव्हा आत्मस्वरूपातच स्थिर होते, तेव्हा तो पूर्ण निरिच्छ असा योगी झाला, असे म्हणतात. मग त्याच्या मनाची स्थिती निर्वात स्थळी ठेवलेल्या दिव्यासारखी निश्चल होते.

या योगाभ्यासाने पुढील गोष्टी सिद्ध होतात. विषयापासून परावृत्त झालेले मन आत्मध्यानात निश्चल होते. आत्मस्वरूपाचे ज्ञान होऊन आत्मानंद अनुभवाला येऊ लागतो. अतींद्रिय अशा आत्यंतिक सुखाचा लाभ होऊन साधक मग त्या सुखापासून विचलित होत नाही. या स्थितीहून दुसरा कोणताही लाभ मोठा नाही, अशी त्याची खात्री होते आणि कसलाही प्रसंग गुदरला, तरी त्याच्या मनाची लवमात्र चलबिचल होत नाही.'

ध्यानयोगाचे विवेचन करताना आचार्य विनोबांनी पुढीलप्रमाणे आपले विचार मांडले आहेत—

ध्यानयोगात तीन प्रमुख गोष्टी आहेत—(१) चित्ताची एकाग्रता (२) चित्ताच्या एकाग्रतेस उपयुक्त अशी जीवनाची परिमितता आणि (३) साम्यदशा किंवा समदृष्टी. या तीन गोष्टी असल्याशिवाय खरी साधना होणार नाही. चित्ताची एकाग्रता म्हणजे चंचलतेवर अंकुश. जीवनाची परिमितता म्हणजे सर्व क्रियांचा मोजकेपणा. समदृष्टी म्हणजे विश्वाकडे पाहण्याची उदार दृष्टी. या तीन गोष्टींनी ध्यानयोग बनतो. या तीन साधनांनाही साधने आहेत, ती म्हणजे अभ्यास व वैराग्य.

कोणत्याही कामात चित्ताची एकाग्रता अवश्य लागते. व्यवहार असो वा परमार्थ; त्यात यश मिळविणे कठीण आहे. ही एकाग्रता कशी करायची ? भगवान सांगतो. 'आत्म्यात मन रोवून.' बाहेरचा अपरंपार संसार मनात भरलेला असतो. तो बंद केल्याशिवाय एकाग्रता अशक्य. एकाग्रतेसाठी क्षुद्र विषयातून चित्त बाजूला काढले पाहिजे, बाह्य वस्तूंचे चिंतनच सुटले पाहिजे.

चित्ताची एकाग्रता होण्यास साहाय्यक अशी दुसरी गोष्ट म्हणजे जीवनाची परिमितता. नियमित आचरणालाच जीवनाची परिमितता म्हणतात.

तिसरी गोष्ट समदृष्टी होणे. समदृष्टी म्हणजेच शुभदृष्टी. शुभदृष्टी आल्याशिवाय चित्त एकाग्र होणारच नाही. सारे शुभ व पवित्र आहे, हे विश्व मंगल आहे, कारण परमेश्वर ते संभाळीत आहे, असा विश्वास धरणे, म्हणजेच शुभदृष्टी धरणे होय. हा एकाग्रतेचा उत्तम उपाय आहे. त्याने आपोआप चित्त शांत होते."

श्रीकृष्णाच्या मुखाने ध्यानयोगाचे वर्णन ऐकून अर्जुनाला एक शंका उत्पन्न झाली. तो श्रीकृष्णाला विचारतो. ' देवा, एखादा पुरुष सश्रद्ध असूनही प्रयत्नात ढिला पडला आणि योगापासून चलित झाला, तर त्याची गती काय होते ? तो ' इतो भ्रष्टस्ततो भ्रष्टः ' असा तर होत नाही ना ? त्यावर भगवान उत्तर देतो—

अर्जुना, योगभ्रष्ट पुरुषाचा इह पर कुठेच नाश होत नाही. सत्कर्माचरण करणारा मनुष्य दुर्गतीला कधीच जात नाही. एखादा साधक इहजन्मी योगभ्रष्ट झाला, तर मेल्यानंतर तो स्वर्गाला जातो आणि पुढे श्रीमंत व शुचिष्मंत अशांच्या अथवा योग्यांच्या कुलात जन्म घेतो. तिथे त्याला पूर्वजन्मातल्या संस्कारांचा लाभ होतो आणि पुनश्च तो योगसिद्धीसाठी प्रयत्न करू लागतो. अशा अनेक जन्मांच्या प्रयत्नातून तो योगसिद्धी मिळवितो व परमपदाला प्राप्त होतो.

इथे ध्यानयोग नावाचा सहावा अध्याय समाप्त झाला.

अध्याय सातवा — भगवान म्हणतो. अर्जुना, आता मी तुला विज्ञानासह ज्ञान सांगणार आहे. म्हणजेच या समस्त सृष्टिप्रपंचासह परमात्म्याचे ज्ञान सांगणार आहे. परमेश्वराचे ज्ञान होण्याला सृष्टीचेही ज्ञान होणे आवश्यक आहे. सर्व सृष्टी ब्रह्मरूपच आहे, असे अन्वयज्ञान म्हणजेच विज्ञान होय.

परमेश्वराच्या मूलप्रकृतीपासून त्याच्याच इच्छेने सर्व सृष्टी निर्माण झाली. भगवान म्हणतो — सर्व सृष्टीचा उगम आणि प्रलयही मीच आहे.

मत्तः परतरं नान्यत्किञ्चिदस्ति धनञ्जय ।
मयि सर्वमिदं प्रोतं सूत्रे मणिगणा इव ॥
(गी. ७.७)

अर्थ — हे अर्जुना, माझ्याहून तत्त्वतः वेगळे असे (या ब्रह्मांडात) दुसरे काहीच नाही. एका दोऱ्यात जसे अनेक मणी ओवावे, तसे हे सर्व जग (जगातील चराचर वस्तू) माझ्या ठायी ओवलेले आहे.

सात्त्विक, राजस, तामस या सर्व वस्तूंची व गुणांची उत्पत्ती माझ्यापासूनच आहे; पण मी मात्र त्यात नाही. हे सर्व जग आणि त्यातील सर्व पदार्थ सत्त्व, रज, तम या त्रिगुणांच्याच कमीअधिक मिश्रणाने निर्माण झाले आहेत. त्यामुळेच सृष्टीत वैचित्र्यही निर्माण झाले आहे. या वैचित्र्याला पाहून सर्व जग मोहित होते आणि त्रिगुणांचा खेळ चालविणारा पण त्रिगुणातीत असा जो मी त्याचे स्वरूप मात्र कोणाला आकलनच होत नाही. ही माझी माया जाणणे आणि ती तरून जाणे अत्यंत दुर्घट आहे. या बाबतीत जे कोणी मला शरण येतात, तेच ही मायानदी तरून जातात.

पण मला शरण येणारे माझे भक्तही सगळे सारखेच नसतात. त्यांचेही आर्त, अर्थार्थी, जिज्ञासू व ज्ञानी असे चार प्रकार आहेत. त्यातले पहिले तीन हे सकाम भक्त असल्याने ते माझ्या आधिदैवत स्वरूपाची आराधना करून आपली कामना तृप्त करून घेतात व तेवढ्यातच संतोष मानतात. चौथा ज्ञानी भक्त तेवढाच खरा भक्त समजायचा. कारण तो माझ्या सर्वव्यापक स्वरूपाचे ज्ञान करून घेऊन सर्व सृष्टीच वासुदेवमय आहे, असे समजतो.

पण असा भक्त विरळाच आढळायचा. बाकीचे भक्त हे कामनांच्या मागे लागून त्यांच्या पूर्तीसाठी विविध देवतांची उपासना करतात. त्यांच्या त्या कामनाही त्या त्या देवतांच्या द्वारे मीच पुरवतो. त्या बुद्धिहीनांना माझ्या अव्यक्त व अविनाशी स्वरूपाची कल्पनाच नसते. पण जे ज्ञानी पुण्यवान असतात, ते मात्र चराचर सृष्टीचा कर्ता एक परमेश्वरच आहे, तोच सर्व देवांचाही देव आहे, असे जाणून माझी भक्ती करतात. मग मृत्यूसमयीही ते व्यथित न होता, माझेच चिंतन करून मलाच येऊन मिळतात.

इथे ' ज्ञान-विज्ञानयोग ' नामक सातवा अध्याय समाप्त झाला.

अध्याय आठवा — या अध्यायाच्या प्रारंभी अर्जुनाने भगवंताला काही प्रश्न केले आहेत, ते असे — ब्रह्म म्हणजे काय ? अध्यात्म म्हणजे काय ? कर्म म्हणजे काय ? अधिभूत आणि अधिदैव म्हणजे काय ? हे मधुसूदना, अधियज्ञ म्हणतात, तो या देहात कोणत्या रूपाने असतो ? आणि मरणसमयी तुला कसे जाणायचे ?

या प्रश्नांच्या उत्तरादाखल भगवान पुढील व्याख्यान करीत आहे. श्रेष्ठ व अविनाशी तत्त्व ते ब्रह्म. त्या ब्रह्माचा सोपाधिक चिदंश (हिरण्यगर्भ) ते अध्यात्म. यालाच आत्मतत्त्व असेही म्हणतात. सृष्टीची निर्मिती करणारा हिरण्यगर्भाचा जो व्यापार, ते कर्म. देहादिक पांचभौतिक जे सृष्ट पदार्थ त्यांना अधिभूत म्हणायचे. शरीरातील दशेंद्रियांच्या देवतांचा नियामक तो अधिदैवत आणि देहातच असणारा यज्ञफलभोक्ता जो मी तो अधियज्ञ होय. अर्जुना, जो ध्यानधारणादी योगाभ्यासाने परमेश्वराचे चिंतन करतो, तो अंतकाली त्या दिव्य पुरुषाला जाऊन मिळतो. आपल्या शरीरातील नवद्वारांचे संयमन करून, हृत्कमलात मनाचा निरोध करून व प्राणवायूला आपल्या मस्तकात खेचून धरून जो योगी प्रणवाचा उच्चार करीत देहत्याग करतो, तो परमगतीला जातो. मग त्याला जन्ममरणाच्या फेऱ्यात सापडावे लागत नाही. ब्रह्मभुवनापर्यंत गेलेल्या लोकांना पुनर्जन्म आहे; पण परमात्म-

पदाला पोचलेल्यांना पुनरावृत्ती नाही. ते त्या परमोच्च स्थानातून ब्रह्मदेवाच्या दिवसाबरोबर होणारा सृष्टीचा उदय आणि ब्रह्मदेवाच्या रात्रीबरोबर होणारा सृष्टीचा अस्त तटस्थपणे आणि कौतुकाने पाहत असतात.

हे अर्जुना, योगी लोक योगाभ्यासाच्या सामर्थ्याने मोक्षाला जाऊ शकतात; पण त्यांच्याही प्राणोत्क्रमणाला कालाची अनुकूलता लागते. अग्नी प्रज्वलित असणे, दिवस, शुक्लपक्ष आणि उत्तरायणाचे सहा महिने हा काल योग्याला प्राणत्यागासाठी अनुकूल होय. या कालात मृत्यू पावलेले योगी ब्रह्मपदाला जातात. धूर, रात्र, कृष्णपक्ष व दक्षिणायनाचे सहा महिने अशा कालात मरण पावलेला योगी चंद्रलोकाला जाऊन तिथून परत मृत्युलोकात जन्माला येतो. या दोन शुक्ल-कृष्ण गती होत. यांनाच देवयान व पितृयाण असेही म्हणतात. पण ईश्वरभक्ताला या सामान्य नियमाचे बंधन नाही. ज्याची वृत्ती ईश्वरनिष्ठ बनली, अशा भक्ताला या देहात राहूनही ईश्वराशी ऐक्य साधता येते. भक्ताला दोन्ही मार्ग सारखेच. तो कुठल्याही मार्गाने गेला तरी पुनर्जन्माच्या फेऱ्यात सापडत नाही.

इथे अक्षरब्रह्मयोग नावाचा आठवा अध्याय समाप्त झाला.

अध्याय नववा – भगवान म्हणतो. हे अर्जुना, आतापर्यंत जे ज्ञान मी तुला सांगितले, त्याहून गुह्य असे एक ज्ञान मी आता सांगतो. हे ज्ञान म्हणजे एक श्रेष्ठ विद्या असून ती गुह्यांत गुह्य आहे. ही विद्या कठीण आहे; पण एकदा ती हस्तगत झाली म्हणजे तिचे आचरण सुलभ आणि सुखदायक होते. ही राजविद्या म्हणजे भक्तिमार्ग होय. या मार्गाला श्रद्धेचा आधार आवश्यक आहे.

ईश्वराच्या अव्यक्त प्रकृतीपासूनच जगाचा सर्व पसारा निर्माण झाला आहे. या दृष्टीने सर्व सृष्टी परमात्मतत्त्वात समाविष्ट आहे; पण ते परमात्मतत्त्व मात्र सृष्टीत संपूर्णतया समाविष्ट होणारे नाही. व्याप्य-व्यापक दृष्टीने हा विचार झाला. स्वरूपविचाराच्या दृष्टीने माझ्या स्वरूपात भूतांचा समावेश होत असला, तरी भूतसृष्टी पाहिल्याने माझ्या स्वरूपाची कल्पना येऊ शकत नाही. वायू जसा आकाशाच्या पोटात असतो, त्याप्रमाणे भूते माझ्या अव्यक्त प्रकृतीच्या अंतर्गत आहेत. ज्या मूळ प्रकृतीपासून भूतांची उत्पत्ती झाली, त्या मूळ प्रकृतीत ती भूते कल्पान्ताच्या वेळी लीन होतात व नव्या कल्पाला प्रारंभ झाला, की पुनश्च उत्पन्न होतात. हा क्रम एकसारखा चालूच राहतो; मात्र त्यात माझा म्हणजे परमेश्वराचा कोणताही हेतू गुंतून राहिलेला नसतो. या सर्व घडामोडींविषयी मी उदासीनच असतो.

पण गंमत अशी होते, की अश्रद्ध व अज्ञानी लोक माझे हे अव्यक्त व जगाच्या पलिकडचे स्वरूप जाणत नाहीत आणि त्यामुळे माझ्या भक्तीला मुकतात. मी अवतार धारण केल्यावेळी मनुष्यदेहाचा आश्रय करतो; पण त्या अज्ञानी जनांना माझ्या या स्वरूपाची ही ओळख न पटल्याने ते माझी अवज्ञा करतात. अशा दोन्ही प्रकारांनी माझ्याविषयी अवहेलना केल्यामुळे व माझ्या उपदेशाचा तिरस्कार केल्यामुळे ते आत्मकल्याणाच्या मार्गाला मुकतात.

काही दैवी प्रकृतीचे भक्त मात्र परमेश्वराचे शाश्वत स्वरूप ओळखून आत्मवृत्तीला अनुसरून विविध प्रकारांनी त्याची उपासना करतात. भक्तिमार्गी भजन करतात, कर्मयोगी यजन करतात, तर ज्ञानमार्गी ज्ञानयज्ञाने त्याची उपासना करतात. कोणत्याही प्रकारे उपासना केली, तरी जोवर ती उपासना परमात्म्याचीच आहे आणि उपास्य दैवत हे त्याचेच प्रतीक असल्याची भावना जागृत आहे, तोवर ती उपासना परमात्म्यालाच पावते. हे तत्त्व न जाणता प्रतीक हेच मुख्य मानून केलेली उपासना विधिहीन ठरते.

ईश्वरभक्तांत आणखीही एका कारणामुळे भेद उत्पन्न होतो. कोणाची भक्ती सकाम असते, तर कोणाची निष्काम ! सकाम भक्त सोमयागासारखे यज्ञ श्रद्धापूर्वक करतात; पण त्यात स्वर्गाची कामना असते. मृत्यूनंतर ते स्वर्गाला जातात, हे खरे; पण पुण्यक्षयानंतर त्यांना परत मृत्युलोकी यावे लागते. त्यामुळे त्यांचे जन्ममरणाचे फेरे चुकत नाहीत. निष्काम भक्तांना मात्र कशाचीच कामना नसते. त्यामुळे ते माझ्याच स्वरूपाला येऊन मिळतात.

अनन्याश्चिन्तयन्तो मां ये जनाः पर्युपासते ।
तेषां नित्याभियुक्तानां योगक्षेमं वहाम्यहम् ।।
(गी. ९.२२)

अर्थ – जे अनन्य भक्त माझे चिंतन करून माझी उपासना करतात, त्या ध्यानपरायण भक्तांच्या योगक्षेमाची काळजी मी वाहतो.

जे अन्य भक्त आहेत, त्यांनी माझी पूजा विशिष्ट विधीनेच केली पाहिजे, असे नाही. भक्तीने अर्पण केलेले पत्र, पुष्प, फल, उदक यांपैकी काहीही मला पुरते. तेवढ्यानेच मी संतुष्ट होतो. किंबहुना माझ्यासाठी म्हणून त्याला वेगळे काही करायचीच गरज नसते. म्हणून अर्जुना,

यत् करोषि यदश्नासि यज्जुहोषि ददासि यत् ।
यत्तपस्यसि कौन्तेय तत्कुरुष्व मदर्पणम् ।।
(गीः ९.२७)

अर्थ– हे अर्जुना, तू जे करतोस, जे भोगतोस, जे हवन करतोस, जे दान देतोस, जे तप आचरतोस, ते सर्व तू मला अर्पण कर.

या विवेचनाचे स्पष्टीकरण आचार्य विनोबा पुढीलप्रमाणे करतात –

परमेश्वरापुढे किती राशी ओतल्यात याला महत्त्व नाही. मापाचा, आकाराचा, किंमतीचा मुद्दा नाही. मुद्दा भावनेचा आहे. किती काय अर्पण केलेत, यापेक्षा कसे अर्पण केलेत, हा मुद्दा आहे. वस्तू मोठी असली म्हणजे तिचा उपयोग मोठाच असतो असे नाही. वस्तूत तेज काय आहे, सामर्थ्य काय आहे, हे पाहायचे असते. जीवनात किती क्रिया केल्या, त्याचे महत्त्व नाही. परंतु ईश्वरार्पण बुद्धीने एकच क्रिया केली, तरी ती भरपूर अनुभव देईल. एका पवित्र क्षणात एखाद्या वेळी इतका अनुभव मिळतो, की तेवढा बारा-बारा वर्षांतही मिळणार नाही.

सारांश तुमची साधी कर्मे, साध्याच क्रिया असतील त्या परमेश्वराला द्या; म्हणजे जीवनात सामर्थ्य येईल. मोक्ष हातास चढेल. कर्म करायचे आणि त्याचे फळ न टाकता ते ईश्वराला अर्पण करायचे, असा हा राजयोग कर्मयोगाच्याही पुढे पाऊल टाकतो. कर्मयोग म्हणतो, 'कर्म करा व फळ टाका. फळाची आशा धरू नका.' इथे कर्मयोग संपला. राजयोग म्हणतो, कर्माची फळे टाकू नकोस. सर्व कर्मे देवाला वाहा. ती फुले आहेत, ती त्या मूर्तीवर वाहा. एकीकडून कर्म, दुसरीकडून भक्ती, असा मेळ करून जीवन सुंदर करीत चल. फळाचा त्याग नको करू. कर्मयोगात तोडलेले फळ राजयोगात जोडले जाते. पेरले आणि फेकून दिले यात फरक आहे. पेरलेले थोडेही अनंत पटींनी भरभरून मिळाले. फेकलेले वाया गेले. ईश्वराला जे कर्म अर्पण केले, ते पेरले गेले, असे समजा. त्यामुळे जीवनात अपार आनंद भरेल. अपार पवित्रता येईल.

त्यापुढे भगवान आपल्याला अनन्यभक्तीचा विषय अधिक स्पष्ट करून सांगतो.

अर्जुना भक्तिमार्गात वर्णाश्रमाचा निर्बंध नाही. स्त्री असो पुरुष असो, पुण्ययोनी असो वा पापयोनी असो, कोणीही असो, तो परमात्म्याची भक्ती करू शकतो. दुराचारी मनुष्यदेखील पश्चात्ताप पावून भक्तिमार्गाला लागला आणि सर्व भार मजवर टाकून मला भजू लागला, तर तोही साधू झाला, असे समज. तो भक्तिमार्गाने पुढे येत येत कालान्तराने परमेश्वरालाच जाऊन मिळणार, यात शंका नाही.

इथे राजविद्याराजगुह्ययोग नावाचा नववा अध्याय समाप्त झाला.

अध्याय दहावा – भगवान या अध्यायात अर्जुनाला आपला विभूतिविस्तार सांगणार आहे. पण तत्पूर्वी तो अर्जुनाची उत्कंठा वाढविण्यासाठी आपले महत्त्व सांगत आहे–

अर्जुना, सर्व महर्षींचे व देवांचेही आदिकारण मीच आहे. मला मात्र कोणतेही आदिकारण नाही. मी सर्व भूतांच्या आधी असून बीजापासून वृक्षाचा विस्तार व्हावा, तसा या सृष्टीचा विस्तार मजपासूनच झाला आहे. इतकेच नव्हे; तर प्राणिमात्रातील बुद्धी, ज्ञान, इ. भावना व तप, ज्ञान; इ. सत्कर्मे यांचाही उगम माझ्यापासूनच आहे. पूर्वी भूतसृष्टीच्या प्रारंभकाली प्रकट झालेले भृग्वादी सात महर्षी, त्याचप्रमाणे चार मनू या माझ्या विभूती असून त्यांच्यापासूनच ही भूतसृष्टी उत्पन्न झाली. हे माझे आदिकारणत्व ध्यानी घेऊन जे भक्त माझी उपासना करतात, त्यांना आत्मज्ञानाला उपयुक्त अशी बुद्धी मीच देतो. त्या बुद्धीने ते माझे सत्यस्वरूप जाणतात आणि माझ्या स्वरूपाला येऊन मिळतात.

यावर अर्जुनाने श्रीकृष्णाला प्रश्न केला– भूलोकातील तुझ्या दिव्य विभूती कोणत्या ? त्या मी कशा ओळखाव्या व कोणत्या गुणांवरून तुझे अस्तित्व मला अनुमानिता येईल, ते सर्व तू मला खुलासेवार सांगशील का ?

त्यावर श्रीकृष्ण प्रसन्न होऊन अर्जुनाला आपला विभूतियोग सांगू लागला–

हे पार्था, बारा आदित्यांतला विष्णू मी, वेदांतला सामवेद मी, रुद्रांतला शंकर मी, महर्षींतला भृगू मी, स्थावरांतला हिमालय मी, वृक्षांतला अश्वत्थ मी, वृष्णीतला वासुदेव मी, एवंच सर्वभूतमात्रांचे बीज मीच आहे.

यद्यद्विभूतिमत्सत्त्वं श्रीमदूर्जितमेव वा ।
तत्तदेवावगच्छ त्वं मम तेजोंशसम्भवम् ।।
(गी. १०.४१)

अर्थ– या जगात जो जो प्राणी किंवा पदार्थ ऐश्वर्य, तेज व बळ यांनी संपन्न असेल, तो तो प्राणी किंवा पदार्थ माझ्या तेजाच्या अंशापासून उत्पन्न झाला आहे, असे तू समज.

अर्जुना, हे कितीही विस्तारपूर्वक सांगितले व तू जाणलेस, तरी त्याचा तुला फारसा उपयोग नाही. तू एवढेच लक्षात ठेव, की हे अखिल जगत मी माझ्या दैवी शक्तीच्या एका अंशाने धारण करून राहिलो आहे.

आचार्य विनोबांनी सृष्टीतल्या या परमेश्वराचे दर्शन घेण्याची एक बाळबोध रीत सांगितली आहे, ती अशी–

ही अपार सृष्टी म्हणजे ईश्वराचे पुस्तक आहे. या पुस्तकात सर्वत्र सुंदर अक्षरांनी परमेश्वर लिहिलेला आहे. पण तो आपल्याला दिसत नाही. ईश्वराचे दर्शन होण्यात एक मोठे विघ्न असते. साधे जवळचे ईश्वरस्वरूप मनुष्याला पटत नाही व दूरचे प्रखर स्वरूप पचत नाही. मातेच्या ठिकाणी ईश्वर पाहा म्हटले, तर तो म्हणतो, ईश्वर इतका का साधा आणि सोपा आहे ? पण प्रखर परमात्मा प्रकट झाला, तर तो तुला झेपेल का ?

ईश्वर जर सर्व सामर्थ्यानिशी समोर येऊन उभा राहिला तर तो पचणार नाही आणि आईच्या सौम्य रूपाने उभा राहिला, तर तो पटत नाही, हे लक्षण करंटेपणाचे आहे. या मनःस्थितीचा त्याग केला पाहिजे. सृष्टीच्या पुस्तकातला ठळक परमात्मा प्रथम वाचावा आणि सूक्ष्म व गुंतागुंतीचा नंतर वाचावा.

इथें विभूतियोग नामक दहावा अध्याय समाप्त झाला.

अध्याय अकरावा– सृष्टीचे स्वरूप, ईश्वराचा सृष्टीशी संबंध, सृष्ट वस्तूंत ईश्वराच्या विभूती व ईश्वराचे सर्वव्यापकत्व, यांसंबंधीचे ज्ञान–विज्ञान अर्जुनाला झाले. त्यामुळे त्याचा मोहही दूर झाला. तथापि त्याला परमेश्वराचे विराट स्वरूप प्रत्यक्ष पहावे, अशी इच्छा झाली आणि त्याने देवाला म्हटले–

‘ हे श्रीकृष्णा, तुझे परमेश्वरी स्वरूप मी पाहू इच्छितो. मला त्याचे दर्शन घडव. ’

त्यावर भगवंताने अर्जुनाला दिव्यदृष्टी दिली आणि त्याच्यापुढे विराट विश्वरूप प्रकट केले. त्यासरशी सर्वत्र सहस्र सूर्यांचा प्रकाश पसरला. श्रीकृष्णाच्या त्या मानवी देहात अर्जुनाला सगळे देव, भूतमात्रांचे समूह, सर्व ऋषी, इ. सारे विश्व दिसू लागले. तो म्हणाला, ‘ हे विश्वरूपा, अनेक हात, उदरे, मुखे व नेत्र यांनी युक्त व सर्वत्र भरलेल्या असंख्य स्वरूपांत मी तुला पाहत आहे. या तुझ्या विश्वरूपाचा आदि–मध्य–अंत मला काहीच कळत नाही. हे श्रीकृष्णा, द्युलोक आणि पृथ्वी यांच्यामधले अंतर आणि दशदिशा तू एकटचानेच व्यापल्या आहेस. देवसमूह तुझ्याच विराट स्वरूपात प्रविष्ट होत आहे. सिद्धांचे संघ ‘ जगाचे कल्याण असो ’ म्हणून तुझेच स्तवन करीत आहेत. रुद्र, आदित्य, वसू, इ. सारे सारे विस्मयचकित होऊन तुझ्याकडेच पाहत राहिले आहेत. देवा असा हा उग्ररूप तू कोण आहेस, मला सांग बरे.’

त्यावर भगवान म्हणतो, ‘ मी लोकांचा संहार करणारा महाकाल आहे. भीष्म–द्रोणादिकांना मी कसे मारू, असा तुला विचार पडला होता. पण ही तुझी चिंता आणि कर्ण–जयद्रथांच्या विषयी मी यांचा वध करीन, हा तुझा अहंकार या दोन्ही गोष्टी व्यर्थ आहेत. माझ्या इच्छेविरुद्ध तू भीष्म–द्रोणांचा मृत्यू टाळू शकणार नाहीस आणि कर्ण–जयद्रथांना मारूही शकणार नाहीस. तेव्हा तू शंका आणि अहंता दोन्ही गोष्टी सोडून दे. लक्षात ठेव, की कर्ता करविता मी परमेश्वर आहे आणि तू केवळ निमित्तमात्र आहेस. म्हणून तुला सांगतो, की तू अहंकाराला दूर ठेवून प्राप्त कर्तव्य करणे, एवढ्या एकाच दृष्टीने युद्धाला सिद्ध हो आणि विजय मिळव.

ते ऐकून अर्जुन म्हणतो— हे देवा, आता हे तुझे रूप आवर. मला हे पाहवत नाही. माझ्या दृष्टीला तेवढे सामर्थ्य नाही. हे सर्वात्मन्, मी तुला मागून पुढून सगळीकडून नमस्कार करतो. तुझा हा महिमा मला कळलाच नाही. मी तुला गैरसमजुतीने मित्र समजलो आणि ‘ हे श्रीकृष्णा, हे यादवा, ’ असे उद्धटपणे बोललो. अनेकदा तुझी थट्टामस्करीही केली. त्याबद्दल तू मला क्षमा कर. देवाधिदेवा, आता तू माझ्यापुढे पूर्वीच्या चतुर्भुज रूपात प्रकट हो.

अर्जुनाची ती भयग्रस्त अवस्था पाहून भगवान त्याला म्हणतो– अर्जुना, अशा प्रकारचे माझे विराट रूप तुझ्यावाचून मी कोणालाच दाखवले नाही. हे रूप वेद, यज्ञ, अध्ययन, इ. साधनांनी कोणालाही दिसणे शक्य नाही. जो कोणी माझा अनन्यभक्त असेल, तोच तात्त्विक दृष्टीने माझे हे स्वरूप जाणू शकेल. म्हणून तुला सांगतो––

मत्कर्मकृन्मत्परमो मद्भक्तः सङ्गवर्जितः ।
निर्वैरः सर्वभूतेषु यः स मामेति पाण्डव ।।
(गी. ११. ५५)

अर्थ – हे अर्जुना, जो माझा भक्त माझ्या संतोषासाठीच सर्व कर्मे करतो, जो केवळ मत्परायण असतो, जो आसक्तीचा त्याग करतो, जो प्राणिमात्राविषयी निर्वैर होतो, तोच (माझा श्रेष्ठ भक्त) मत्पदाला येऊन पोचतो.

इथे विश्वरूपदर्शन नावाचा अकरावा अध्याय समाप्त झाला.

अध्याय बारावा – मागच्या अध्यायातील शेवटच्या श्लोकात ज्या भक्तांचे महत्त्व भगवंताने सांगितले, ते भक्त सगुणोपासक का निर्गुणोपासक ही आशंका आता अर्जुनाच्या मनात उत्पन्न झाली आणि त्याने सगुणोपासक आणि निर्गुणोपासक यात श्रेष्ठ कोण, असा प्रश्न भगवंताला विचारला. त्यावर भगवान उत्तर देतो.

जे माझ्या ठायी मन स्थिर करून श्रद्धायुक्त अंतःकरणाने माझ्या ध्यान–भजनात निरंतर गढून जातात आणि जे माझ्या सगुणस्वरूपाची सतत उपासना करतात, ते मला सर्वश्रेष्ठ योगी (युक्ततम) वाटतात.

सगुण–निर्गुण या उपासनांत श्रेष्ठ–कनिष्ठ असा भाव नाही. पण निर्गुणोपासना ही सगुणोपासनेपेक्षा कठिण आहे, हे मात्र लक्षात ठेव. देहधारी प्राण्याला अव्यक्त ब्रह्माची प्राप्ती मोठ्या कष्टानेच होत असते. हे जाणून निर्गुण परब्रह्माच्या अव्यक्त उपासनेच्या नादी न लागता काही भक्त ईश्वरी संदेशानुरूप कर्मे करीत राहतात आणि केल्या कर्मांची फळे परमेश्वराला समर्पून मोकळे होतात. त्यांना कर्तृत्वाचा अहंकारही नसतो आणि फलाची आसक्तीही नसते. म्हणून अशा भक्तांच्या

उद्धारासाठी मी धाव घेत असतो. त्यांना भवचक्रातून सोडवून मोक्षाप्रत पोचवणे, हे माझे काम असते.

हा सगुण-निर्गुणाचा विचार विनोबांनी पुढीलप्रमाणे विशद करून सांगितला आहे—

सगुण भक्त इंद्रियांच्या द्वारे परमेश्वराची सेवा करतो; तर निर्गुण भक्त मनाने विश्वाचे हित चिंतितो. पहिला बाह्यसेवेत मग्न दिसतो, पण आतून चिंतन करतो; तर दुसरा प्रत्यक्ष सेवा करताना दिसत नाही, पण आतून त्याची महासेवा चालते. दोघेही बाहेरून निराळे दिसत असले, तरी आतून एकच असतात.

दोहोंत सगुणभक्ती जास्त सुलभ आहे. सगुणभक्तियोगात प्रत्यक्ष इंद्रियांना राबवता येते. त्याला इंद्रियेही साधनरूप होतात. डोळ्यांनी हरिरूप पाहावे, कानांनी हरिकथा ऐकावी, जिभेने हरिनाम उच्चारावे, पायांनी तीर्थयात्रा कराव्या, हातांनी सेवा करावी, अशा तऱ्हेने तो सर्व इंद्रिये परमेश्वराला वाहतो. त्याची ती इंद्रिये भोगासाठी राहत नाहीत.

निर्गुणोपासकाची दृष्टी याहून वेगळी असते. त्याला इंद्रिये विघ्नरूप वाटतात. तो त्यांना संयमात ठेवतो, कोंडतो, त्यांचा आहार तोडतो. त्यांच्यावर पहारा ठेवतो. सगुणोपासकाला असे करावे लागत नाही. निर्गुण हे ज्ञानमय आहे; पण ते कठिण आहे. सगुण त्या मानाने सोपे. ते प्रेममय, भावनामय आहे. तिथे भक्त जास्त सुरक्षित आहे.

पण सगुणाला निर्गुणाची मदत पाहिजे. केव्हा तरी साधकाने व्यक्तीतून, आकारातून बाहेर जायला शिकले पाहिजे. गंगा हिमालयातून शंकराच्या जटाजूटात आली, पण तिथेच राहिली नाही. तो जटाजूट सोडून ती दरी–खोरी पार करून सपाट मैदानावर आली, तेव्हा ती विश्वजनांच्या उपयोगी पडली. तसेच निर्गुण–सगुणांच्या बाबतीत समजावे. स्फूर्तीचा झरा प्रथम सगुणातून निर्माण होतो हे खरे; पण शेवटी परिपूर्णता निर्गुणात झाली पाहिजे. एतावता सगुण–निर्गुण ही परस्पर विरुद्ध नसून परस्पर पूरक आहेत. एकमेकांस एकमेकांमुळे शोभा आहे.

सगुण-निर्गुणाचा हा विचार सांगून झाल्यावर भगवान अर्जुनाला सांगतो, की तू माझ्या ठिकाणी आपली मन-बुद्धी स्थिर कर.

अर्जुना, मी तुला माझ्या ठिकाणी चित्त एकाग्र कर, असे सांगितले खरे; पण ती गोष्ट सहजसाध्य नाही. तेव्हा त्यासाठी तू योगाचा अभ्यास कर. योगाभ्यास जमत नसेल, तर सर्व कर्मे मला अर्पण कर. तेही शक्य नसेल, तर सर्व कर्मांच्या फलांचा त्याग कर. कारण अभ्यासाहून ज्ञान, त्याहून ध्यान व त्याहूनही कर्मफलत्याग श्रेष्ठ होय. कर्मफलत्यागामुळे चित्ताला निरंतर शांती लाभते.

अर्जुना, कशा प्रकारचा माझा भक्त मला प्रिय होतो, ते आता मी तुला सांगतो. जो निःस्पृह आहे; जो शुची, दक्ष व अनासक्त आहे; जो सुखसंवेदक वस्तू प्राप्त झाली असता हर्षित होत नाही व जो दुःखदायक गोष्टींचा तिटकारा करीत नाही, जो कशाचाही शोक करीत नाही अथवा कसल्याही सुखाची आकांक्षा बाळगीत नाही, तो भक्त मला प्रिय असतो.

समः शत्रौ च मित्रे च तथा मानापमानयोः ॥
शीतोष्णसुखदुःखेषु समः सङ्गविवर्जितः ॥
तुल्यनिन्दास्तुतिर्मौनी सन्तुष्टो येन केनचित् ।
अनिकेतः स्थिरमतिर्भक्तिमान्मे प्रियो नरः ॥
(गी. १२. १८–१९)

अर्थ– शत्रू व मित्र, मान व अपमान, या दोहोंविषयी समवृत्ती ठेवणारा, थंडी-ऊन, सुख-दुःख ही समान लेखणारा, अनासक्त, निंदा–स्तुतीविषयी सारखाच उदासीन, वाक्संयमी, मिळेल त्यात संतोष मानणारा, गृहादिकांची आसक्ती नसणारा, स्थिरबुद्धीचा व भक्तिमान असा मनुष्य मला प्रिय आहे.

इथे भक्तियोग नावाचा बारावा अध्याय समाप्त झाला.

अध्याय तेरावा–या अध्यायाची मागील अध्यायाशी संगती लावणे जरा कठीण जाते. त्यासाठी प्रकृति-पुरुषांच्या व क्षेत्र-क्षेत्रज्ञांच्या जिज्ञासेचा एक श्लोक काही प्रतीत अधिक घातलेला आढळतो; पण मूळ गीतेत तो असेल, असे वाटत नाही. भगवान स्वतः होऊनच तत्त्वविचाराला प्रवृत्त झाला आहे आणि अर्जुनासाठी क्षेत्र-क्षेत्रज्ञ, ज्ञान-ज्ञेय, प्रकृति-पुरुष, इ. कल्पनांचे विवेचन करीत आहे.

अर्जुना, या शरीराला क्षेत्र म्हणतात आणि या क्षेत्राला जो जाणतो, त्याला क्षेत्रज्ञ म्हणतात. सर्व क्षेत्रात वास करणारा क्षेत्रज्ञ (द्रष्टा) तो मीच आहे. पृथिव्यादी पंचमहाभूते, अहंकार, बुद्धी, अव्यक्त, प्रकृती, इंद्रिये, विषय, इच्छा, द्वेष, सुख, दुःख, देहातील इंद्रियांची जुळणी, प्राणशक्ती व धारणाशक्ती, इ. घटक व त्यांचे विकार यांनी तयार होणारे हे जे क्षेत्र ते मी तुला थोडक्यात सांगितले.

आता ज्ञान म्हणजे काय, ते सांगतो. अमानित्व, अदंभित्व, अहिंसा, क्षमा, आत्मानात्मविचार सतत मनात जागृत ठेवणे, तत्त्वज्ञानाच्या विषयांचे परिशीलन करणे, इ. गुणांना ज्ञान (ज्ञानप्राप्तीची साधने किंवा ज्ञानाची लक्षणे) म्हणतात. याच्या उलट ते अज्ञान होय.

जे सर्वश्रेष्ठ ब्रह्म तेच ज्ञेय असून, ते अनादी व विश्वव्यापक आहे. या ब्रह्मात सर्व इंद्रियांचे गुण भासमान होत असूनही ते

इंद्रियरहित आहे, अलिप्त असूनही सृष्टीचे अधिष्ठान व गुणातीत असूनही गुणांचा भोग घेणारे आहे. ते आत-बाहेर सर्वत्र आहे. हे ब्रह्म सर्वत्र अखंड असूनही सर्व प्राण्यांच्या रूपात विभागल्यासारखे दिसते. ते स्वतः ज्ञानरूप आहे व तेच ज्ञानाने प्राप्त करून घेण्याचे प्राप्यही आहे. सर्वांच्या बुद्धीत त्याचेच अधिष्ठान आहे. हे क्षेत्र, त्याचे ज्ञान आणि ज्ञेय ब्रह्म यांचा परस्पराशी संबंध ज्याला कळला, तो भक्त परमेश्वरी स्वरूपाला प्राप्त होतो.

प्रकृती आणि पुरुष हेही अनादी आहेत, असे तू जाण. प्रकृतीपासून विकाररूपाने ही सृष्टी उत्पन्न होते. त्या विकारात आविर्भूत होणारे सत्त्व, रज, तम हे गुण प्रकृतीपासूनच उद्‌भवतात. पुरुष हा प्रकृतीच्या उपाधीत सापडल्याने सुख-दुःखांचा उपभोग घेण्याला निमित्तमात्र. कारण होतो. त्यामुळेच तो बऱ्या-वाईट योनीत जन्म घेत घेत त्या देहात आलेला असतो. वस्तुतः तो प्रकृतीहून वेगळा, तिच्याहून श्रेष्ठ, तिचा साक्षी आणि परमात्मा असाच आहे.

अशा रीतीने या क्षेत्रज्ञाला आणि गुणासह प्रकृतीला जो जाणतो, त्याला पुनर्जन्म घ्यावा लागत नाही. या क्षेत्रज्ञाला कोणी ध्यानयोगाने, कोणी सांख्ययोगाने, तर कोणी कर्मयोगाने पाहतात. ज्याला सर्वभूतीं ईश्वर सारखाच दिसतो, तो मोक्षाला जातो. अतिविरलपणामुळे सर्व वस्तूंत असणारे आकाश जसे (त्या त्या वस्तूच्या गुणदोषाने) लिप्त होत नाही, एकच सूर्यगोल जसा सर्व सूर्यमालेला प्रकाश देतो, तसा हा क्षेत्रज्ञ आत्मा सर्व क्षेत्राला ज्ञानरूपी प्रकाश व चैतन्य देतो. येणेप्रमाणे क्षेत्र व क्षेत्रज्ञ या दोहोतला भेद व प्रकृतीच्या तावडीतून क्षेत्रज्ञाची मुक्ती होण्याची रीत मी तुला सांगितली.

इथे क्षेत्रक्षेत्रज्ञविभागयोग नावाचा तेरावा अध्याय समाप्त झाला.

अध्याय चौदावा– या अध्यायात गुणत्रयाचे विवेचन हा एकच सलग विषय आहे. भगवान म्हणतो. ‘हे अर्जुना, सत्त्व, रज व तम हे तीन गुण प्रकृतीपासून उत्पन्न होतात व ते देहात्म्याला देहात बद्ध करून ठेवतात. या तीन गुणांत सत्त्वगुण निर्मल, निरामय व प्रकाशक आहे. पण तोही प्रकृतीचाच विकार असल्यामुळे ज्ञानाची व सुखाची लालसा या रूपाने जीवात्म्याला बंध उत्पन्न करतो. रजोगुण हा सर्व वासनांचे व आसक्तींचे मूळ आहे. सर्व काम्य कर्मांचे बीज रजोगुणातच साठविले आहे. तो जीवात्म्याला सकाम कर्मांच्या आवडीने बांधून घालतो. तिसरा तमोगुण हा अज्ञानजन्य आहे. तो सर्वांना भुरळ पाडतो. प्रमाद, आळस आणि निद्रा या तीन विकारांनी तो जीवात्म्याला बंधक होतो. सात्त्विक आचरणाचे लोक मृत्यूनंतर देवलोकात जातात, राजस आचरणाचे लोक मनुष्यलोकातच राहतात व तामस गुणाचे लोक अधोगतीला जातात.’

या त्रिगुणांचे आणि त्यातून सुटण्याच्या उपायांचे विवेचन आचार्य विनोबा यांनी केले आहे, ते पुढीलप्रमाणे–

प्रथम तमोगुण पाहू. याचा मुख्य परिणाम म्हणजे आळस. त्यातूनच पुढे झोप व प्रमाद. आळसाला संधी मिळू नये, यासाठी दक्ष राहिले पाहिजे. एवढा मोठा नळ राजा. पण पाय धुताना जरा त्याचा पाय कोरडा राहिला, तर म्हणे तिथून कली आत शिरला. आळसात अनंत दुःखे आहेत. तो जर आपण काढू शकलो, तर बरीचशी दुःखे दूर करता येतील. आळस जिंकण्याचा उपाय म्हणजे शरीरश्रम. तो अमलात आणला नाही, तर रोगाच्या किंवा अन्य कोणत्या तरी रूपाने शिक्षा भोगणे सुटत नाही. जो उपाय आळसावर तोच झोपेवर. देह सारखा वापरला गेला, तर झोप चांगली येईल. सुंदर झोप लागावी, असे वाटत असेल, तर शरीर थकून गेले पाहिजे. पुष्कळ वेळ झोपेतच गेला, की पुढची गोष्ट जी प्रमाद ती सहजच घडते. झोपेने आळस व आळसातून विस्मरण उद्‌भवते. विस्मरण ही परमार्थाचा नाश करणारी वस्तू आहे.

रजोगुण ही तमोगुणाचीच दुसरी बाजू. जिथे एक आहे, तिथे दुसरा असायचाच. रजोगुणाचे प्रधान लक्षण म्हणजे नाना प्रकारची कार्ये करण्याचा हव्यास. अचाट कर्मांची अपार आसक्ती. त्यामुळे मग वासनाविकार बळावतात. माणसात स्थिरता राहत नाही. रजोगुणाला फळ तात्काळ हवे असते. म्हणून फलाला जरा अडथळा आला, तरी मनुष्य हाती घेतलेले काम सोडून देतो. एका ठिकाणी स्थिरपणे काम करण्याची त्याला सवयच नसते. गीतेतील कर्मयोग हा रजोगुणावर तोडगा आहे. कर्मयोग म्हणजे चित्त एकाग्र करून स्वधर्माचे आचरण. मनुष्य एकदा स्वधर्मात मग्न झाला, की रजोगुण फिका पडतो.

आता उरला सत्त्वगुण. याच्याशी फार जपून वागले पाहिजे. रज-तमांचा संपूर्ण उच्छेद करायचा तर सत्त्वगुणाला संपूर्ण ठार न मारता, नुसते घायाळ करायचे. म्हणजेच त्याच्यापासून आत्म्याला अलग करायचे. याचे कारण असे, की सत्त्वगुण प्रकाशमय असला, तरी त्याचाही अभिमान जडतो. तो अभिमान आत्म्याला शुद्ध स्वरूपापासून खाली पाडतो. सत्त्वगुण जिंकायचा म्हणजे सत्त्वगुणाची कर्मे सातत्याने करीत राहायचे. तो स्वभावच बनवायचा. सत्त्वगुणामुळे मिळणारे फल ईश्वरार्पण करून आसक्ती जिंकायची. जीवनात सत्वगुण स्थिर केला म्हणजे कधी सिद्धीच्या रूपाने तर कधी कीर्तीच्या रूपाने फळ पुढे उभे राहते; पण ते फळही तुच्छ लेखायला हवे. माणसाने सत्त्वगुण स्थिर केला, अहंकार जिंकला, फलासक्तीही सोडली, तरी जोवर हा

देह चिकटलेला आहे, तोवर अधूनमधून रज-तमांचे हल्ले येतच राहणार. म्हणून सतत जागृत राहिले पाहिजे. त्याला उपाय एकच. तो म्हणजे भगवंताची जिव्हाळ्याने व कळकळीने भक्ती करणे. शेवटी त्या परमेश्वराची कृपा पाहिजे आणि जिव्हाळ्याच्या भक्तीने त्या कृपेला आपण पात्र झाले पाहिजे.

भगवान म्हणतो, हे तीन गुण व त्यांचे परिणाम मी तुला सांगितले. माणसाने या गुणांच्या पलिकडे गेले पाहिजे. अर्थात गुणातीत झाले पाहिजे. गुणातीताची लक्षणे अशी--(१) सुख-दुःख समान मानणे (२) सोने व ढेकूळ समान मानणे (३) कोणतीही वस्तू प्रिय वा अप्रिय न मानणे आणि (४) निंदास्तुतीची क्षिती न बाळगणे. या स्थितीलाच निर्द्वंद्वावस्था म्हणतात.

मां च योऽव्यभिचारेण भक्तियोगेन सेवते ।
स गुणान् समतीत्यैतान् ब्रह्मभूयाय कल्पते ॥
(गी. १४. २६)

अर्थ–जो माझी अव्यभिचारीपणे भक्ती करतो, तो गुणातीत होऊन म्हणजेच त्रिगुणांच्या पैलपार जाऊन ब्रह्मरूप होण्याला पात्र होतो.

इथे गुणत्रयविभागयोग नामक चौदावा अध्याय समाप्त झाला.

अध्याय पंधरावा – मागच्या अध्यायात प्रकृति-पुरुष व त्रिगुण यांचा विचार सांगितला. आता या अध्यायात परमेश्वराचे सर्वश्रेष्ठ असे पुरुषोत्तमस्वरूप सांगायचे आहे. ते सांगण्यासाठी भगवान एका रूपकाचा आश्रय करून बोलत आहे. हे अर्जुना, हा संसार (सृष्टी) म्हणजे एक अश्वत्थवृक्ष आहे. पण या वृक्षाचे वैलक्षण्य हे, की त्याची मुळे वर आणि शाखा खाली आहेत. हा वृक्ष ब्रह्माच्या दृष्टीने अनित्य असूनही तो कधी निर्माण झाला, हे सांगता येत नाही. प्रवाहरूपाने अखंड चालू असल्यामुळे तो अव्यय वाटतो. दुसऱ्या दृष्टीने पाहिले, तर याच्या शाखा खालून वरही पसरत गेलेल्या आहेत. ब्रह्माच्या दृष्टीने संसाराचा पसारा खालच्या दर्जाचा हे खरे; पण यातूनच खाली अधोगतीला व वर ब्रह्मलोकालाही जाता येते. या ज्या शाखा पसरल्या आहेत, त्यांना त्रिगुण हे कारणीभूत आहेत. विषय हे त्या शाखांना फुटलेले अंकुर आहेत.

मनुष्यलोकाच्या आगेमागे दृष्टी न पोचवता केवळ मनुष्यलोकापुरतेच पाहू लागल्यास या संसारवृक्षाचे आदि-मध्य-अंत कळत नाहीत. त्याचा मुख्य आधार कोण याचाही उलगडा होत नाही. मनुष्यमात्र तेवढा या वृक्षाच्या फांद्यांत आणि मुळांत अडकून पडला आहे. या जाळ्यातून सुटायचे असल्यास अनासक्तिरूप धारदार शस्त्राने हा वृक्ष तोडायला हवा. तो तोडून मग त्याच्या मुळाचा शोध लावायचा. हे मूळ एकदा सापडले म्हणजे ब्रह्मपदच ते. ते शाश्वत आहे, स्वयंप्रकाशित आहे. तिथे एकदा पोचल्यावर पुनश्च परत येण्याची भाषाच राहत नाही.

ज्या परमात्म्याशी ऐक्य होणे, म्हणजेच मोक्षप्राप्ती, त्या परमात्म्याचा अविनाशी अंश म्हणजे हा जीवात्मा होय. तो मनुष्यलोकात जन्माला आला आहे. त्यामुळेच तो प्रकृतीत वास करणाऱ्या मनासह सहा इंद्रियांना आपल्याकडे आकर्षून घेतो. यामुळे प्रकृतीच्या जड अंशाशी त्या जीवरूप चिदंशाची गट्टी जमते.

त्या जडांशातून मोकळा झाल्यावाचून जीवाला सायुज्यमुक्ती मिळत नाही. असा हा जीवात्मा शरीरात येऊन त्रिगुणांच्या तावडीत सापडत असता किंवा तदन्वित विषयांचा उपभोग घेत असता किंवा एक देह सोडून दुसरा देह धारण करण्यासाठी उत्क्रमण करीत असता, तो अन्य जनांना दिसत नाही; पण ज्यांना ज्ञानदृष्टी लाभली, ते मात्र त्याला पाहू शकतात.

अर्जुना, परब्रह्म हे स्वयंप्रकाश आहे, हे मी तुला सांगितले. सूर्य, चंद्र आणि अग्नी यांच्या ठिकाणी जो प्रकाश आहे तो माझाच म्हणजे परब्रह्माचा आहे, असे समज. मी पृथ्वीत प्रवेश करून भूतांचे धारण करतो. मी वैश्वानर होऊन प्राण्यांच्या देहात प्रवेश करतो आणि जठरात जाऊन प्राण्याने खाल्लेल्या चतुर्विध अन्नाचे पचन करतो.

सर्वस्य चाहं हृदि सन्निविष्टो मत्तः स्मृतिर्ज्ञानमपोहनं च ।
वेदैश्च सर्वैरहमेव वेद्यो वेदान्तकृद्वेदविदेव चाहम् ॥
(गी. १५. १५)

अर्थ–मी सर्व प्राण्यांच्या बुद्धीत प्रवेश करून राहिलो आहे आणि म्हणूनच पूर्वीच्या ज्ञानाचे स्मरण, नव्या ज्ञानाची संप्राप्ती आणि तर्क या गोष्टी माझ्यामुळेच मनुष्यांना प्राप्त होतात. सर्व वेदांना मीच ज्ञेय आहे. मीच वेदान्ताचे उगमस्थान आहे आणि वेदांचे तत्त्व जाणणाराही मीच आहे.

या सृष्टीत क्षर व अक्षर (चंचल व स्थिर) असे दोन प्रकारचे (परमेश्वराचे) आविर्भाव प्रत्ययास येतात. सर्व भूतसृष्टी हा क्षरविभाग असून, या संसाररूपी अश्वत्थवृक्षाचे मूळबीज असलेला कूटस्थ (हिरण्यगर्भ) हा अक्षरविभाग आहे; पण ज्याला परमात्मा म्हणतात, तो उत्तमपुरुष या दोहोंहून वेगळाच आहे. तो सर्वांचा प्रभू असून त्रैलोक्याचे धारण करणारा आहे. आणि अर्जुना, तो पुरुषोत्तम मी आहे. जो ज्ञानी पुरुष मज पुरुषोत्तमाला जाणतो व जाणून भजतो, तोच माझा खरा भक्त होय.

क्षराक्षर व पुरुषोत्तम यांचे ज्ञान झाल्याने मनुष्य कृतार्थ होतो. अर्जुना, ज्या अर्थी हे गुह्यतम शास्त्र तू माझ्या मुखाने ऐकलेस, त्या अर्थी तू धन्य झालास.

आचार्य विनोबा या अध्यायातील विषयाचा समारोप पुढील-प्रमाणे करतात–

सर्व सृष्टीत तीन पुरुष उभे आहेत. एकाच पुरुषोत्तमाने ही तीन्ही रूपे घेतली आहेत. तीन्ही मिळून एकच पुरुष. केवळ अद्वैत ! गीतेने इथे आपणास परमोच्च शिखरावर आणून सोडले. कर्म, भक्ती, ज्ञान, जीव-शिवसृष्टी एकरूपच झाली. ज्ञानदेवांचा तो अमृतानुभवातला आवडता दृष्टांत असा–

देव देऊळ परिवारू । कीजे कोरून डोंगरू ।
तैसा भक्तीचा वेव्हारू । कां न होआवा ।।

एकच दगड पोखरला. दगडाचेच मंदिर. त्या मंदिरात दगडाचाच देव. देवासमान दगडाचाच एक भक्त. त्याच्याजवळ दगडाचीच कोरलेली फुले. इथे एकच अखंड दगड सर्व रूपांनी नटलेला. मग भक्तीच्या व्यवहारातही तसे का होऊ नये ? ज्ञान, कर्म व भक्ती तीन्ही मिळून एक विशाल जीवनप्रवाह करायला हवा. असा हा परिपूर्ण पुरुषोत्तमयोग आहे.

इथे पुरुषोत्तमयोग नावाचा पंधरावा अध्याय समाप्त झाला.

अध्याय सोळावा – या अध्यायात भगवान अर्जुनाला दैवी आणि आसुरी या संपत्तींचा विभाग सांगणार आहे. तो म्हणतो.

हे अर्जुना, निर्भयता, सात्त्विक वृत्ती, दान, सत्य, दया, तेज, निरहंकारित्व, इ. दैवी संपत्तीचे गुण आहेत. दंभ, दर्प, उद्धटपणा, अज्ञान, इ. आसुरी संपत्तीचे दुर्गुण आहेत. दैवी गुणांची संपत्ती ही मोक्षाला कारणीभूत होते व आसुरी दुर्गुणांची संपत्ती बंधनात टाकते. आसुरी लोकांना प्रवृत्ती व निवृत्ती यांच्यांतला भेदच समजत नाही. त्यांच्या अंगी शुचिर्भूतपणा व सदाचार आढळत नाही. सत्यापासून ते दूर असतात. त्यांना वाटते, की या जगाला काही अढळ असा पायाच नाही. इथे धर्म व ईश्वर या नावाची काही चीजच नाही. ही सकल सृष्टी स्वतःच्या कामोपभोगासाठीच आहे, असे हे आसुरी लोक मानतात. या वृत्तीने ते स्वतःचा तर नाश करून घेतातच; शिवाय आपल्याबरोबर दुसऱ्या लोकांनाही धोका देतात. आसुरी लोक हे देहात्मवादी असतात व देहाचे कोडकौतुक करण्यासाठीच त्यांची सारी धडपड असते. असे हे लोक अर्जुना, शेवटी नरकातच जायचे. जन्मोजन्मी ते आसुरी योनीतच जन्म घेतात आणि त्यांची अधिकाधिक अधोगतीच होत जाते. हा नरक आणि ही अधोगती यांचे द्वार कोणते ?

त्रिविधं नरकस्येदं द्वारं नाशनमात्मनः ।
कामः क्रोधस्तथा लोभस्तस्मादेतत्त्रयं त्यजेत् ।।

(गी. १६.२१)

अर्थ – काम, क्रोध व लोभ असे हे त्रिविध नरकद्वार आहे. हे काम, क्रोध, लोभ आत्म्याचा घात करणारे आहेत. म्हणून त्या तिघांचा त्याग करावा.

इथे दैवासुरसंपद्विभागयोग नामक सोळावा अध्याय समाप्त झाला.

अध्याय सतरावा – मागील अध्यायात निःश्रेयससाधक अशा पुरुषाने कोणते सद्गुण अंगी बाणवावे व कोणते दुर्गुण टाळावे, याचे विवेचन केले. प्रस्तुत अध्यायात श्रद्धेचा विचार सांगण्यासाठी भगवान प्रवृत्त झाला आहे. तो म्हणतो.

मनुष्यमात्राला श्रद्धा ही स्वाभाविकच असते; पण सात्त्विक, राजस आणि तामस असे तिचे तीन प्रकार असतात. मनुष्यप्राणी हा श्रद्धामयच आहे. पण ज्याची त्याची श्रद्धा ज्याच्या त्याच्या स्वभावानुरूप बनते. कोणी देवांची आराधना शास्त्रोक्त पद्धतीनें करणारे दिसतील. कोणी यक्ष-राक्षसांच्या उपासनेला लागलेले दिसतील; तर कोणी भुताखेतांची पूजा करणारे आढळतील. या त्यांच्या आचारावरून त्यांची श्रद्धा कोणत्या स्वरूपाची आहे, ते सहज कळून येते.

श्रद्धा जशी त्रिविध त्याप्रमाणेच माणसाचा आहार, त्याचा यज्ञ, त्याचे दान, त्याचे तप या गोष्टीही सात्त्विक, राजस व तामस अशा त्रिविध असतात. मनुष्याने आपला स्वभाव सात्त्विक होण्यासाठी राजस व तामस आहार वर्ज्य केला पाहिजे. दान, तप, यज्ञ या गोष्टीही निष्कामबुद्धीने आचरून सात्त्विक केल्या पाहिजेत. मनुष्याला अखेर सात्त्विकतेच्याही पलिकडे जायचे आहे. त्रिगुणातीत व्हायचे आहे. माणसाने आपले सर्व जीवन ईश्वरमय केले, तरच ती त्रिगुणातीत अवस्था प्राप्त होऊ शकते. त्यासाठी एक गोष्ट करण्याची सवय प्रथमपासूनच मनाला लावून घेतली पाहिजे. ब्रह्मार्पणबुद्धीने सर्व कर्मे करणे, ही ती सवय होय. याच हेतूने 'ॐ तत्सत्' असा ब्रह्माचा त्रिविध निर्देश वेदात सांगितला आहे.

तस्मादोमित्युदाहृत्य यज्ञदानतपःक्रियाः ।
प्रवर्तन्ते विधानोक्ताः सततं ब्रह्मवादिनाम् ।।

(गी. १७.२४)

अर्थ– म्हणून ब्रह्मवादी लोकांच्या यज्ञ, दान, तप, इ. क्रिया (हे काम ब्रह्मस्वरूपच आहे असे मानून) नेहमी ॐ असा प्रणवोच्चार करून विधीला अनुसरूनच होत असतात.

'ॐ तत्सत्' याचा श्रद्धापूर्वक विनियोग केल्यास कर्मातील व्यंग दूर होऊन ते कर्म मोक्षसाधक होते; पण अशी श्रद्धा न बाळगता अश्रद्धेने (आसुरीवृत्तीने) कितीही यज्ञ, दान, तप हे मार्ग आचरले, तरी ते 'असत्' म्हणजे बंधनकारकच होतात. कोणतेही कर्म फलप्रद होण्याला श्रद्धा आवश्यक आहे; पण ती श्रद्धा सात्त्विक असायला हवी व ते कर्मही सद्भाव, साधुभाव या कोटीतले असायला हवे.

या 'ॐ तत्सत्' निर्देशाचे आध्यात्मिक रहस्य आचार्य विनोबा पुढीलप्रमाणे सांगतात–

'ॐ तत्सत्' हा समर्पणाचा मंत्र आहे. या मंत्राने सारे कर्म ईश्वरार्पण करावे, असे गीतेचे सांगणे आहे. सेवाकर्म संपूर्णपणे सेवामय होणे कठीण. परार्थात स्वार्थ येऊनच जातो. केवळ परार्थ संभवतच नाही. म्हणून दिवसेंदिवस अधिक निष्काम, अधिक निःस्वार्थ सेवा हातून व्हावी, असे इच्छीत जावे. परमेश्वराला क्रियाजात अर्पीत गेल्याने स्वार्थ, परार्थ व परमार्थ एकरूप होतील. प्रथम मी-तुम्ही निराळे आहो, ते एक करायचे. तुम्ही व मी मिळून आम्ही झालो. आता आम्ही व तो यांना एक करायचे. प्रथम या सृष्टीशी माझा मेळ घालायचा व मग परमात्म्याशी घालायचा, हे 'ॐ तत्सत्' या मंत्राने सुचविले आहे. ॐ म्हणजे होय. परमेश्वर आहे, अशी श्रद्धा. तत् म्हणजे तो सृष्टीपासून अलिप्त आहे, याची जाणीव व सत् म्हणजे तो परमेश्वर शुभ आहे, मंगल आहे ही भावना मनात आणून त्याचे मांगल्य सृष्टीत अनुभविणे. अशा प्रकारे 'ॐ तत्सत्' हे वैदिक नाव घेऊन गीतेने सर्व क्रिया ईश्वरार्पण करायला शिकविले आहे.

इथे श्रद्धात्रयविभागयोग नामक सतरावा अध्याय समाप्त झाला.

अध्याय अठरावा – हा गीतेचा कलशाध्याय होय, असे ज्ञानेश्वर म्हणतात. इतरही टीकाकारांनी तो तसाच म्हणजे उपसंहारात्मक मानलेला आहे व बहुतांशी तो तसा आहेही. इथे प्रारंभीच अर्जुन भगवंताला प्रश्न करतो–

'हे श्रीकृष्णा, संन्यास व त्याग यांचे तत्त्व काय, ते मला वेगवेगळे वर्णन करून सांग.' त्यावर भगवान त्याला सविस्तर उत्तर द्यायला प्रवृत्त झाला आहे. तो म्हणतो–

काम्य कर्मांचा जो न्यास म्हणजे त्याग त्याला संन्यास म्हणतात आणि हातून घडणाऱ्या कर्मांच्या फलाचा त्याग करणे, म्हणजेच कर्मफलांचा अभिलाष न धरता ती ईश्वरार्पण करणे, याला त्याग म्हणतात. फलाची आशा धरली, की कर्म हे बंधनकारक होते. निर्लेप कर्माला फलाशेचे वावडे आहे. 'कर्मणा बध्यते जन्तुः' = कर्माने प्राणिमात्र बांधला जातो, या श्रुतिवचनाचा मर्यादित अर्थ न ओळखता कित्येकजण यज्ञ, दान व तप ही कर्मे कर्त्याला पावनकारक, समाजाला अभ्युदयकारक आणि अज्ञ जनांना मार्गदर्शक आहेत, हे विसरून त्यांचाही त्यागच करा, असे म्हणतात. पण हे त्यांचे मत साफ चुकीचे आहे. यज्ञ, दान व तप ही कर्मे आसक्ती टाकून अगत्य करावी. कर्माच्या स्वरूपात काहीच दोष नाही. दोष आहे तो फलाची आशा व कर्तृत्वाचा अहंकार यांत.

कर्मफलाचा त्याग न केला तर कर्माचे इष्टानिष्ट अथवा मिश्रफल कार्यकर्त्याला चिकटते. पण कर्मफलाचा त्याग करणाऱ्याला ते मुळीच चिकटत नाही.

अर्जुना, सर्व कर्मांच्या निष्पत्तीला कारणीभूत अशी पाच तत्त्वे सांख्यतत्त्वज्ञानात सांगितली आहेत. शरीर, प्राणशक्ती, ज्ञानेंद्रिये, कर्मेंद्रियांच्या हालचाली आणि इंद्रियांच्या ठायी वास करणाऱ्या प्रेरक देवता (दैव) ही ती पाच तत्त्वे होत. मनुष्यप्राणी जे कायिक, वाचिक वा मानसिक भले-बुरे कर्म आरंभितो, ते हातून घडण्याला ही पाच तत्त्वे कारणीभूत होतात.

हे कर्म सात्त्विक, राजस व तामस अशा रूपांनी त्रिविध बनते. कर्मच काय, पण त्याच्या अनुषंगाने ज्ञान, कर्ता, बुद्धी, धृती, सुख ही सर्वच वरीलप्रमाणे त्रिविध आहेत. त्रिगुणांच्या जाळ्यातून सुटली आहे अशी एकही वस्तू या जगात सोडाच; पण देवलोकातही नाही.

या त्रिगुणांच्याच कमी-अधिक मिश्रणाने ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य आणि शूद्र असे चार वर्ण समाजात निर्माण झाले आणि त्यांच्या या गुणांना अनुसरूनच त्यांना वर्णविहित कर्मे वेगवेगळी विभागून दिली. ही वर्णविहित कर्मे प्रत्येकाने ईश्वरी आज्ञा व परमेश्वराची उपासना अशा समजुतीने पार पाडावी.

स्वे स्वे कर्मण्यभिरतः संसिद्धिं लभते नरः ।
स्वकर्मनिरतः सिद्धिं यथा विन्दति तच्छृणु ॥
यतः प्रवृत्तिर्भूतानां येन सर्वमिदं ततम् ।
स्वकर्मणा तमभ्यर्च्य सिद्धिं विन्दति मानवः ॥
श्रेयान्स्वधर्मो विगुणः परधर्मात्स्वनुष्ठितात् ।
स्वभावनियतं कर्म कुर्वन्नाप्नोति किल्बिषम् ॥
(गी. १८. ४५–४७)

अर्थ – आपापल्या स्वाभाविक अशा वर्णधर्मात तत्पर व दक्ष असलेला मनुष्य सम्यक सिद्धी प्राप्त करून घेतो. अशा स्वकर्मनिष्ठ माणसाला सिद्धी कशी प्राप्त होते, ते ऐक. ज्या परमात्म्यापासून भूतमात्रांची उत्पत्ती झाली आणि ज्या परमात्म्याने हे सर्व जग व्यापले आहे, त्या परमात्म्याची आपल्याच कर्तव्याने उपासना केल्याने मानवाला सिद्धी प्राप्त होते. विगुण (भासणारा देखील) स्वधर्म सुखाने आचरता येणाऱ्या परधर्मापेक्षा श्रेयस्कर होय. स्वभावसिद्ध असे प्राप्त कर्म करणाराला पाप लागत नाही.

प्रत्येक कर्मात काही ना काही दोष असतोच. यास्तव जे प्राप्त कर्तव्य असेल, ते अनासक्त बुद्धीने करावे. म्हणजे त्यापासून नैष्कर्म्य बुद्धी प्राप्त होते. अर्जुना, ब्रह्मप्राप्ती करून घेण्याचे ध्यान, ज्ञान, भक्ती, कर्म असे अनेक मार्ग आहेत. पण तू मात्र माझ्याप्रीत्यर्थ सर्व नियत कर्मे करणारा हो. जी कोणती कर्मे

तुला करायची असतील, ती सगळी मनाने मला अर्पण कर आणि बुद्धियोगाचा आश्रय करून तुझे चित्त सतत माझ्या ठिकाणी ठेव. असे केल्याने तुझ्यावर माझा कृपाप्रसाद होईल आणि त्याने तू सर्व संकटे तरून जाशील.

पण अहंकाराला बळी पडून हे माझे बोलणे न ऐकशील, तर मात्र तुझा घात होईल. पार्था, ज्या अहंकाराचा आश्रय करून 'मी लढणार नाही' असे तू म्हणतोस, तो तुझा निर्धार खोटा ठरणार आहे. कारण तुझी क्षात्रस्वभावाची प्रकृतीच तुला हे युद्ध करायला लावील. प्रकृतीच्या अशा परवशतेतून निसटण्याकरिता प्रकृतीहून श्रेष्ठ व तिच्यावर सत्ता चालविणारा जो ईश्वर त्याला शरण जाणे, हाच एक उपाय आहे. यास्तव तू त्या परमेश्वराला अनन्यभावाने शरण जा.

हे गुह्यांत गुह्यतर असे ज्ञान मी तुला सांगितले. त्याचा सांगोपांग विचार करून जसे तुझ्या इच्छेस येईल तसे कर. सरतेशेवटी आणखी एक गुह्यत्तम असे वचन मी तुला सांगतो. कारण तू माझा आवडता भक्त आहेस. तू माझ्या ठिकाणी चित्ताचा लय कर आणि सर्वभावे माझीच उपासना करणारा हो. म्हणजे तू मलाच येऊन मिळशील. हे मी तुला प्रतिज्ञापूर्वक सांगतो– .

सर्वधर्मान् परित्यज्य मामेकं शरणं व्रज ।
अहं त्वा सर्वपापेभ्यो मोक्षयिष्यामि मा शुचः ॥

(गी. १८.६६)

अर्थ – हे अर्जुना, सर्व धर्म (अर्थात उपाय) टाकून देऊन तू मलाच अनन्य शरण ये. मी तुला तुझ्या सर्व पातकांपासून मुक्त करीन. माझे हे आश्वासन (लक्षात घेऊन) तू (युद्धमूलक पापाच्या भीतीने होणारा) आपला शोक सोडून दे.

अर्जुना, हे परमगुह्य असे (गीतारूपी) तत्त्वज्ञान मी तुला सांगितले. तू ते एकाग्र चित्ताने ऐकलेस ना? हे ऐकून तुझा अज्ञानमूलक मोह पूर्ण नष्ट झाला ना?

त्यावर अर्जुन भगवंताला अत्यंत मोकळ्या मनाने उत्तर देत आहे. तो म्हणतो. 'भगवंता, तुझ्या कृपाप्रसादाने मला माझ्या कर्तव्याचे स्मरण झाले व माझ्या मनातला मोह पार नाहीसा झाला. माझे सर्व संशय आता नष्ट झाले असून, तू जे कार्य करण्याबद्दल मला सांगितलेस, ते कार्य मी तुझ्या सांगण्याप्रमाणे करीन.'

हा सगळा कृष्णार्जुनसंवाद धृतराष्ट्राला सांगून झाल्यावर संजय आपल्या बोलण्याचा उपसंहार करीत आहे. तो म्हणतो–

यत्र योगेश्वरः कृष्णो यत्र पार्थो धनुर्धरः ।
तत्र श्रीर्विजयो भूतिर्ध्रुवा नीतिर्मतिर्मम ॥

(गी. १८.७८)

अर्थ–(हे राजा धृतराष्ट्रा,) ज्या पक्षाला कृष्णासारखा योगेश्वर आणि अर्जुनासारखा रणपंडित योद्धा आहे, त्याच पक्षाला राज्यलक्ष्मी, विजय, ऐश्वर्य आणि शाश्वत नीती (मोक्ष) हे चारही पुरुषार्थ लाभणार, असे माझी बुद्धी मला सांगते.

इथे गीतेचा मोक्षसंन्यासयोग नामक अठरावा अध्याय समाप्त झाला.

गीतेतील अध्यायांमध्ये आलेल्या विषयांचे परीक्षण केले असता गीता म्हणजे कर्म, भक्ती आणि ज्ञान या तीन निष्ठा सांगणारा सुसूत्र असा अलौकिक ग्रंथ आहे, ही गोष्ट निर्विवाद सिद्ध होते. पाहा– कर्मयोगशास्त्र; कर्मविपाक. [गीतारहस्य; गी. ए. अ.; गीताप्रवचने; भगवद्गीता– राधाकृष्णन]

गीतार्णव

दासोपंताने लिहिलेली गीतेवरची मराठी ओवीबद्ध टीका. या ग्रंथाची ओवीसंख्या सव्वा लक्ष असून, गीतेतल्या प्रत्येक पदावर यात विवरण आहे, हे हिचे वैशिष्ट्यच होय. एका अठराव्या अध्यायावरच अठरा हजार ओव्या लिहिलेल्या आहेत. त्यामुळे या ग्रंथाचे अर्णव हे नाव सार्थ ठरते. 'मी हा ग्रंथ कोणत्याहि भाष्याच्या आधारे लिहिला नाही, तर केवळ स्वानुभवाने लिहिला आहे,' असे दासोपंताने सांगितले आहे.

न पाहे श्रोतयाचे वदन । न करी भाष्याधारे विवरण ।
स्वानुभवे हे मनन । म्हणौनि संपादी ।
आइकैल तेणे आयिकावे । मानैल तेणें घ्यावें ।
नावडे तेणे नेघावें । दोन्ही श्रवणीं ।।

या ग्रंथातील एक, दोन, बारा व तेरा या अध्यायांतील काही भाग महाराष्ट्रकाव्यग्रंथमालेत छापला आहे.

मराठी ही सामान्यजनांची भाषा असल्यामुळे तिला शास्त्रीय विचार पेलणार नाहीत, असे तत्कालीन संस्कृत विद्वानांना वाटत असे. पण दासोपंताला तसे वाटले नाही. संस्कृतचा इतका अभिमान बरा नव्हे, अशा अर्थाने तो म्हणतो–

यया संस्कृताचा अभिमानु । तेणेंचि नाशिला हा जनु ।
प्राकृत म्हणौन दूषिती । तेंचि यया ज्ञाना वंचिती ।
भाषाचि केवळ भजती । ते मूर्ख कीं ना ।
हाती देता नवरत्नें । मऱ्हाटे बोले ने घेणे ।
आतां हानी तया कारणे । ते दूरि नसते ।।
संस्कृतें बोलिलें सेवणें । तेंचि सांडावें प्राकृत वचनें ।
ऐसिया मूर्खा मुंडणे । किती आतां ।।

गीतार्णवात विषयाची मांडणी करताना दासोपंताने कौरवपांडवांवर अध्यात्माचे रूपक बसवून वेदान्त विषयाची सविस्तर मांडणी केलेली आहे. प्रत्येक श्लोकातून हे आध्यात्मिक रूपक

खेळविलेले असल्याने विवेचनाचा विस्तार फार झाला आहे. असे असले, तरी त्याने वुद्धिवाद कुठेही सोडलेला नाही–

स्वानुभवचि येथिचे प्रमाण । स्वानुभव हेंचि साधन
अन्यथा शास्त्रश्रवण । तैसें हे नव्हे ॥
प्रत्यक्षा दृश्या कारणे । कायिसी ती आप्तवचनें ।
अश्वतें अश्व आने । रूपें न घडे ॥
क्षुधा लागली की नाहीं । हें कवणा पुसणें कायी ।
गुडघा ते नव्हे डोई । प्रत्यक्ष जो ॥

दासोपंताने आपल्या काव्यात अनेक शब्दचित्रे व प्रसंगवर्णने रेखाटली आहेत. त्यातले हे पुराणिकाचे शब्दचित्र पाहण्याजोगे आहे–

नानावर्णा पुष्पमाळा । तिया घालुनिया गळा ।
बुका सर्वांगी उधळला । श्रोत्री गंधराजु ॥
वाम दक्षिण भागीं ग्रंथ । वेष्टणी दिसती सुशोभित ।
मध्यें पुंस्तक घवघवीत । विचित्र पानें ॥

युद्धाचा प्रसंगही दासोपंत वाचकांपुढे आपल्या अमोघ वाणीने मूर्तिमंत उभा करतो. उदा०–

प्रसंगु निवे युद्धाचा । तरि आवेशु आणि वीराचा ।
रोषावेशु तेंथिचा । संपादूनि दावी ॥
भूजा दंड पिटितु । मागे पुढे अवलोकितु ।
‘ घ्या घ्या ’ कारे गर्जतु । मुद्रा दावी ॥

असा हा गीतार्णव म्हणजे मराठी भाषेचा अमोल ठेवाच होय. पाहा– दासोपंत. [दासोपंताची पासोडी; प्रा. म. सं.; म. वा. इ.; म. सा.]

गीतिरामायण

असमिया भाषेतील एक सुप्रसिद्ध रामकाव्य. हे दुर्गावर कायस्थ या कवीनें रचले आहे. या काव्याची रचना वहुतांशी माधव कंदलीच्या रामायणासारखीच आहे. अर्थात त्यात दुर्गावराने कालानुरूप काही फेरबदलही केले आहेत. या काव्याचे प्रमुख वैशिष्टय म्हणजे यांतील राम-सीता वगैरे व्यक्तिरेखा दैवी नमून, पूर्णपणे मानवी आहेत. सामान्य मानवासारखेच विचार आणि विकार कवीने त्यांच्या ठायीही दाखवले आहेत. त्यामुळेच तत्कालीन लोकसमाजाला हे काव्य अत्यंत प्रिय झाले. दुर्गावराच्या या रामायणाची अपार लोकप्रियता पाहून डॉ. काकती त्याला वाल्मीकिरामायणाचे ‘ लोकसंस्करण ’ म्हणतात.

आपले काव्य लोकांच्या अंतःकरणाला भिडावे, यासाठी कवीने वाल्मीकीच्या रामायणातील निवडक प्रसंगांचा स्वतःला हवा तसा संकोच-विकास केला आहे. अरण्यकांडात करुणरसाला अधिक अवसर असल्याने तिथले प्रसंग कवीने रसानुकूल शब्दात रेखाटले आहेत.

दंडकारण्यात वास करणारी सीता आपल्या अलौकिक शक्तीने तिथेच अयोध्येची निर्मिती करते आणि त्या अयोध्येत राम-लक्ष्मणांसह मदनचतुर्दशीच्या महोत्सवात रंगून जाते, अशी एक मनोहर कल्पना दुर्गावराने या काव्यात रंगवली आहे.

रावणाने सीतेला पळवून नेल्यानंतर तिच्या वियोगाने व्यथित झालेल्या रामाचे मानवी मनोभूमिकेला धरून वर्णन करण्याच्या भरात कवीने रामाला फार खालच्या पातळीवर आणले आहे. राम लक्ष्मणाला म्हणतो–

‘ लक्ष्मणा, हे काय झाले ? माझी उपेक्षा करून सीता निघून की रे गेली ! तृणशय्येवर शयन करणाऱ्या आणि वल्कलें परिधान करणाऱ्या पतीची संगत करण्यात काय अर्थ ? असा विचार करून तिने माझा त्याग केला असला पाहिजे. मला सोडून ती कुठे गेली कोणास ठाऊक ? लक्ष्मणा, तुझ्यासारखाच मीही आता एकाकी झालो. खरोखर, स्त्रीजात चंचल असते म्हणतात, तेच खरे ! समृद्धीच्या काळातच ती पतीला साथ देते आणि विपत्तीच्या काळात त्याला सोडून जाते. आता मी तिचे मन जाणले. जनकाची कन्या असूनही तिने आपल्या पतीला असा धोका दिला, या विचाराने मला संताप येतो आहे. आता मी कसा जगेन ? मुद्दामच तिने मला मृगाच्या पाठीमागे धाडले आणि रुसून-फुगून तुलाही माझ्यामागे पाठवले. मी तिचे कपटी मन ओळखू शकलो नाही. खरोखर स्त्री-जातीची ही कपट-किमया कोणाला कळली आहे ! ’

हे गीतिरामायण ओझा पाली गीतांच्या परंपरेतले आहे. या परंपरेत एक प्रमुख गायक असतो. तो मुख्य कथागीत गातो आणि बाकीचे त्याचे साथीदार पालुपद घोळवून म्हणतात. आसामात ही गायनपद्धती फार प्राचीन समजली जाते. [मै. श. गु. अ. ग्रं.]

गुंजवायाचा नाच

कोकणातील एक नृत्य. नृत्य करणारे लोक अर्धवर्तुळाकार उभे राहतात व तरापी वाजवणारा त्यांच्या समोर उभा राहतो. नाचणारे गुडघे टेकून नाचताना जमिनीवरील एखादी वस्तू उचलून डोक्यावर ठेवीत असल्याचा अभिनय करतात. [भा. लो. नृ.]

गुंजा

एक प्राचीन समरवाद्य. सैनिकांच्या प्रयाणाच्या वेळी गुंजा नावाचे वाद्य वाजवीत असत असा हर्षचरितात उल्लेख आहे. हे वाद्य हातानें वाजवायचे असे. [का. ए. सां. अ.]

गुंडम राऊळ चक्रधराचा गुरू. गोविंदप्रभू पाहा.

गुंडरिपा चौऱ्यायंशी सिद्धांपैकी पंचावन्नावा सिद्ध. याला गोरूहपा असेंही नाव आहे. हा जातीने फासेपारधी असून, डिसू नगरचा राहणारा होता. हा लीलापाचा शिष्य असून, हालिपांचा गुरू होता. चर्यागीतीमध्ये याच्या काही गीती सापडतात. त्यावरून हा हिंदी कवी होता, असे कळते. [म. च. को.; पु. त. नि.]



गुंडरिपा

गुगळी ब्राह्मण द्वारकेत आढळणारी ब्राह्मणांची एक पोटजात. यांच्याविषयी दंतकथा आहे, ती अशी — द्वारकेत वसाहत करण्याच्या कामी एक पिशाच त्यांना प्रतिबंध करू लागला. तेव्हा गुग्गुळ जाळून त्यांनी त्याला पिटाळून लावले आणि म्हणून त्यांना गुगळी ब्राह्मण हे नाव मिळाले. हे तिथल्या देवस्थानाचे पुजारी आहेत. [मुं. इ. जा.]

गुग्गा लोकसमुदायाचा एक देव. याला गूगा किंवा गोगा असेही म्हणतात. पंजाब व उ. प्रदेश या भागांत याची प्रसिद्धी आहे. गुग्गाचा जन्म पंजाबमधे झाला, असे सांगतात. त्याला जाहिरपीर असेही नाव आहे. पण श्री. हरिकिशन कौल यांच्या मते त्याचे खरे नाव जहरियापीर असे आहे. पाळण्यात खेळताना त्याने एका सापाचे डोके चोखले होते. त्याच्याविषयीच्या एका आख्यायिकेत त्याचे नाव मंडलीक होते, असे सांगितले आहे. ती आख्यायिका अशी —

वृंदावनाजवळ गढदंडेर येथे देवीचंद चौहान नावाचा राजा राज्य करीत होता. त्याला बरेच दिवस पुत्रसंतान नव्हते. पुढे गोरखनाथाच्या कृपेने त्याला एक पुत्र झाला. त्याचे नाव त्याने मंडलीक असें ठेवले. तो सात वर्षांचा झाला, तेव्हा राजाने त्याला गादीवर बसविले. पुढे गौडबंगालच्या सुर्जिला नामक राजकन्येशी त्याचे लग्न ठरविले. पण वासुकी नागाला त्या राजकन्येची अभिलाषा होती. म्हणून त्याने त्या लग्नात विघ्न आणले. पुढे मंडलीकाचे वासुकी नागाशी युद्ध झाले. त्यात वासुकीचा पराभव झाला. मग मंडलीकाने सुर्जिलाशी लग्न केले. त्यानंतर मंडलीक बारा वर्षे सासुरवाडीसच राहिला.

इकडे गझनीच्या मुहंमदाला मदतीस बोलावून मंडलीकाच्या मावसभावांनी त्याच्या राज्यावर हल्ला चढविला. त्या वेळी गुग्गाच्या अर्थात मंडलीकाच्या गुगेरी नावाच्या बहिणीने मोठा पराक्रम करून तो हल्ला परतविला. नंतर गुग्गा सासुरवाडीहून परत आला व राज्य करू लागला. पुढे त्याने मुसलमानांशी तेरा लढाया केल्या. तेराव्या लढाईत तो भाद्रपद वद्य नवमीस कामी आला.

गुग्गा मरण पावला, ही गोष्ट लोकांत प्रसिद्ध झाली; तरी त्याची पत्नी सुर्जिला हिला ती मान्य होईना. ती म्हणे, माझा पती मला रोज रात्री येऊन भेटतो. पण गुगेरीला ती गोष्ट पटेना. तिने एका रात्री पाळत ठेवली. मध्यरात्री तिला खरोखरच गुग्गा दिसला. तो घोड्यावरून खाली उतरल्यावर ती घोड्याच्या गळ्याला धरून बसली. गुग्गा सुर्जिलाकडून परत आला आणि घोड्यावर स्वार झाला. थोड्या वेळाने त्याला कळले, की आपली बहीण घोड्याच्या गळ्याला बिलगून राहिली आहे. तेव्हा गुग्गाने तिला म्हटले ‘ आज तू मला पाहिलेस. यापुढे मी परत येणार नाही. ’

या कथेला कोणताही ऐतिहासिक आधार नाही. गुग्गाच्या चरित्रावर डोगरी भाषेत लांबलचक पोवाडा रचला गेला आहे. तो गाऊन लोकांना स्फूर्ती देणारे शाहीर पंजाब व उ. प्रदेश या भागात बरेच आहेत. त्या प्रदेशात गुग्गा पीराची उपासना करणारा एक संप्रदायच निर्माण झाला आहे. विक्रम संवताप्रमाणे भाद्रपद वद्य नवमी या तिथीला गुग्गानवमी असे म्हणतात. या दिवशी त्याच्या नावाने जागोजाग यात्रा भरतात.

गोगाजी हा पृथ्वीराज चौहान याच्या वंशात होऊन गेला, असा इतिहासात दाखला मिळतो. तो राजस्थानात इतका लोकप्रिय आहे, की त्याच्या नावाने एक म्हणच पडली आहे — गाँव-गाँव गोगो ने, गाँव-गाँव खेजडी, म्हणजे प्रत्येक शमी वृक्षाच्या खाली गोगाजीचे लहानसे स्थान असायचेच. हा राजस्थानातील पाच प्रसिद्ध वीरांपैकी एक होय. सर्पदेवतेच्या रूपात याची पूजा केवळ राजस्थानातच नव्हे; तर उ. प्रदेश, हिमाचल प्रदेश, पंजाब इ. प्रदेशींतही केली जाते.

या व्यक्तीसंबंधी इतिहासज्ञांची अनेक मते आहेत. कोणी त्याला पृथ्वीराज चौहानाचा समकालीन मानतात; तर कोणाच्या मते तो इ. स. च्या १४ व्या शतकात झाला व फीरूजशाह तुघलुक याच्याशी लढताना मरण पावला. परंतु नवीन ऐतिहासिक माहितीच्या आधारे आता असे निश्चित झाले आहे, की तो गजनीच्या महमुदाशी लढताना मारला गेला. जिथे त्याचा मृत्यू झाला ते स्थान गोगा-मेडी या नावाने प्रसिद्ध आहे. दर वर्षी भाद्रपद मासात या ठिकाणी गोगाजीच्या नावाने एक यात्रा जमते. जो माणूस ही यात्रा करतो त्याला सर्पदंशाची भीती उरत नाही अशी लोकधारणा आहे. राजस्थानातील ददरेवा ही त्याची जन्मभूमी होय.

राजस्थानात भाद्रपद वद्य नवमीला गोगा नवमी म्हणतात. त्या दिवशी गोगाचा सर्वत्र उत्सव होतो. त्या उत्सवासाठी कुंभार लोक गोगाची एक मातीची मूर्ती तयार करतात व वाजतगाजत तिची मिरवणूक ब्राह्मणाच्या घरी नेतात. तिथे त्या मूर्तीची पूजा करविल्यावर तिला घोडयावर बसवून तिची मिरवणूक काढतात. तिथले लोक या मूर्तीला जानवी व घारगे हे पदार्थ अर्पण करतात.

गुजर लोक गोगा चौहान याला आपला पूर्वज मानतात. पण कन्हैयालाल मुनशी यांच्या मते तो इ. स. च्या ११ व्या शतकात घोघागढाचा राजा होता. [हिं. सा. बृ. इ.; एन्सा. रि. ए.; मरुभारती, जुलै, १९६१]

गुग्गुळ (१) धनगरांच्या नृत्याचा एक प्रकार. ते लोक चितारलेली मडकी घेऊन ढोलांच्या साथीवर नाचतात. देवासमोर किंवा पाटील–कुलकर्ण्यांच्या लग्नाच्या वेळी धनगर हे नृत्य करतात. [म. लो. त.]

(२) रेड्डी, पुरवंत व वीरबाहू ही ज्यांची कुलदेवता आहे, अशा लोकांचा एक धार्मिक विधी. घरात विवाहादी मंगल कार्य झाल्यानंतर हे लोक धगधगत्या निखाऱ्यांवरून चालत जातात, त्याला गुग्गुळ असे नाव आहे.

लिंगायत लोकांच्या लग्नात गुग्गुळ हा प्रमुख विधी आहे. पण त्याचे स्वरूप मात्र थोडे निराळे आहे. मातीचे दोन माठ घेऊन त्यांची बुडे फोडतात व ते पालथे ठेवून त्यांत राख भरतात. नंतर तेलात बुडविलेल्या चिंध्या दोन काडयांना गुंडाळून ते काकडे त्यात रोवतात. मग त्या काकडयांवर गुलाल, बुक्का उधळतात आणि त्यांना गंध लावून व माळा घालून ते पेटवितात. मग ते दोन माठ हातांत किंवा डोक्यावर घेऊन दोन जंगम किंवा आप्त वाजत गाजत गावाबाहेर नदीवर किंवा विहिरीवर जातात. त्यांच्याबरोबर पुष्कळ लोक असतात. तिथे गेल्यावर कुटुंबप्रमुख जंगमाला नारळ व दक्षिणा देतो. मग काकडे विझवून ते माठ फोडून टाकतात. जमलेल्या मंडळींना पानसुपारी वाटतात. सर्व लोक वाजंत्री न वाजविता मुकाटयाने घरी येतात. पूर्वी वीरभद्राला नवस केलेला असला तरच हा विधी करीत; पण आता बहुतेक लिंगायतांच्या लग्नात हा एक आवश्यक संस्कार मानला जातो.

गुग्गुळ जाळणे शैव साधकांचा एक अघोरी विधी. शिवपूजेच्या वेळी शैव साधक डोक्याच्या अर्ध्या भागावर गुग्गुळ जाळीत आणि त्यामुळे त्यांच्या डोक्यावरची चामडी व मांस जळून जाई व तिथले हाड दिसू लागे.

शैव संप्रदायात नवीन भरती झालेल्या अनुयायांच्या डोक्यावर असा गुग्गुळ जाळून महाकालाला प्रसन्न करीत असत, असे बाणभट्टाने लिहिले आहे. [ह. च. सां. अ.]

गुजर एक जात. यांच्या पूर्वजांना गुर्जर असे नाव होते. गुर्जरांचा इतिहास स्पष्टपणे ज्ञात नाही. सर्वसाधारणपणे असे मानतात, की इ. स. च्या ५ व्या शतकाच्या अखेरीस भारतावर हूण लोकांनी आक्रमण केले, त्या वेळी त्यांच्या बरोबर ज्या अनेक परकीय टोळ्या भारतात आल्या, त्यांत गुर्जर लोकांची एक टोळी होती. या लोकांनी पंजाबपासून राजस्थानातील जोधपूरपर्यंत अनेक ठिकाणी वसाहती स्थापन केल्या. पंजाबमध्ये गुजरात, गुजरणवाला, गुर्जरखान, इ. त्यांची अनेक ठिकाणे आहेत. पूर्वीच्या ग्वाल्हेर संस्थानातील एका जिल्ह्याचे नावही गुर्जरगढ असे आहे. अरवली पर्वताच्या पश्चिमेला त्यांची मुख्य वसाहत होती.

प्राचीन काळी युरोप व आशिया यांच्या सरहद्दीवर खर्गर लोक राहत होते. तेच श्वेत हूणांच्या बरोबर भारतात आले. हे खर्गर म्हणजेच गुर्जर असे भांडारकर, स्मिथ, इ. इतिहासकारांचे मत आहे. मात्र चिं. वि. वैद्य, मुन्शी व ओझा यांच्या मताने गुर्जर लोक आर्य वंशाचे आहेत. प्राचीन काळी गुर्जर नावाचा एक प्रदेश होता. त्यात जोधपूर, जयपूर, अलवर व मेवाडचा उत्तरभाग यांचा समावेश होत असे. त्या देशातील लोकांना गुर्जर हे नाव मिळाले. हे गुर्जर लोक आणि खर्गर यांच्यांत साम्य नाही. शिवाय खर्गर लोक आपला देश सोडून बाहेर गेल्याचा पुरावा कोठेच उपलब्ध नाही. यावरून गुर्जर हे परकीय नसून मूळचे भारतीयच आहेत, असे या विद्वानांचे म्हणणे आहे. आजमितीस पश्चिम व उत्तर भारतात जे गुजर लोक आढळतात, ते यांचेच वंशज असे मानले जाते.

पूर्वीच्या चंबा संस्थानातील ब्रह्मपूर राज्यात राठी, राणा व

ठाकूर नावाचे लोक आहेत, ते गुर्जरांचेच वंशज असले पाहिजेत, असे श्री. गोएट्झ यांचे मत आहे.



गुजर स्त्री व पुरुष

गुजर ही एक पशुपालक जात असून, पंजाब, बुंदेलखंड, हिमाचल प्रदेश, राजस्थान, गुजरात, उ. प्रदेश आणि काश्मीर या प्रदेशांत यांची मोठी वस्ती आहे. गुजर गुरे पाळतात व शेती करतात. दुसऱ्यांची गुरे पळविण्याविषयीही यांची प्रसिद्धी आहे. गुजरांमध्ये हिंदू व मुसलमान असे दोन भेद आहेत. बरेचसे गुजर शीखही झाले आहेत.

जाट, गुजर व अहीर या जाती एकाच वंशापासून निघाल्या असाव्या, असे इबेट्सन सांगतो. कारण या तीन्ही जातीत इतिहासकाळापासून रोटीव्यवहार होतो. गुजरांतील बरागी, चंदेल, चव्हाण, तोमर, इ. आडनावांवरून यांचा राजपुतांशी संबंध असावा, असे वाटते.

गोपालन हा गुजरांचा प्रमुख व्यवसाय आहे. हिमाचल प्रदेश, टेहरी गढ़वाल व जौनसार बावर यांतील डोंगरांवर गुजर लोक आपले म्हशींचे कळप घेऊन हिंडताना दिसतात. जिथे जिथे हिरवीगार कुरणे असतील, तिथे तिथे ते आपले कळप घेऊन जातात. तिथले गवत संपले, की तिथून दुसरीकडे हालतात.

पंजाबात बडगुजर व भट्टीगुजर अशा गुजरांच्या दोन प्रमुख पोटजाती आहेत. श्रीकृष्ण आपल्याच कुळीत जन्मला, असे बडगुजर लोक सांगतात. उ. प्रदेशाच्या पश्चिम भागातील गुजर हे शिव आणि शक्ती यांचे उपासक आहेत. याशिवाय ते शीतलाभवानी, चामार या देवतांना व प्यारेजी आणि बाबा सभाराम या साधूंना भजतात. पंजाबमधील मुसलमान गुजर हिंदूंच्या काही चालीरीती पाळतात व शुभ कार्यासाठी ब्राह्मणांकडून मुहूर्त काढून घेतात. ते गाझीमिया, मदारसाहेब, इ. मुसलमान संतांना भजतात. पंजाबमधील काही गुजर टक्कल, त्वचारोग व इतरही काही रोग चमत्काराने बरे करतात, असे सांगतात. ही विद्या त्यांच्याकडे परंपरेने चालत आली आहे.

अयोध्या, मीरत या भागातील गुजर मुसलमान असून, तैमूरलंगाच्या स्वारीच्या वेळी ते बाटले, असे कळते. ते सुन्नी पंथाचे आहेत. ते होळी व नागपंचमी हे हिंदूंचे सण पाळतात आणि दर शुक्रवारी पितरांच्या नावे अन्नदान करतात.

मध्य प्रदेशातील गुजर हे उत्तम शेतकरी आहेत. त्यांच्या लेख, मुंडल व जादम अशा तीन पोटजाती आहेत. लेख हे जेवताना डोक्यावर पागोटे ठेवतात आणि जादम स्वतःला यादववंशी समजतात. सोहागपूरकडील लिल्होरिया गुजर आपली उत्पत्ती श्रीकृष्णाच्या कपाळावरील घर्मबिंदूंपासून झाली, असे सांगतात व आपण प्रथम मुरली वाजविल्याने आपल्याला मुरेलिया असे दुसरे नाव मिळाले, असेही सांगतात.

मध्य प्रदेशात गुजरांचे अनेक गट आहेत. त्यांची नावे राजपूत घराण्यांच्या नावांवरून पडली आहेत. एका गटात लग्नसंबंध होत नाही. लग्नमंडपात नांगराची चार जोखडे ठेवून एक चौकोन तयार करतात व त्यात तांब्याचे पात्र पाण्याने भरून ठेवतात. वधू-वरांनी त्या पात्राला सात फेऱ्या घालणे, एवढाच यांचा लग्नविधी असतो.



गुजर स्त्रिया – काश्मीर

यांच्या प्रत्येक घरात कुलदेवीसाठी एक ओटा असतो. कुटुंबातील लोक तिची पूजा करतात, तेव्हा तिथे कोणीही परका इसम येता कामा नये, असा त्यांचा नियम आहे. कुटुंबातील अविवाहित मुलगा वारल्यास त्याची सोने, तांबे किंवा पितळ याची प्रतिमा करून ठेवतात आणि माघ मासातील सोमवारी व शुक्रवारी तिची पूजा करतात.

प्रत्येक गुजराचा एक गुरू असतो. तो दोन किंवा तीन वर्षांनी एकदा शिष्याला भेटायला येतो व काहीतरी दक्षिणा घेऊन निघून जातो. गुरू न करणाऱ्याला नुग्रा (निगुऱ्या) म्हणतात आणि सकाळी त्याचे दर्शन होणे अशुभ मानतात. अविवाहित आणि सांथीत मेलेले लोक यांची प्रेते पुरतात; इतरांची जाळतात. नंतर जातीच्या लोकांना जेवण घालतात. [हिं. वि. को.; रे. क. इं.; ट्रा. का. सें. प्रॉ. इं.; ग्लो. गु. दे.; एन्सा. रि. ए.; म. ज्ञा. को.; वि. मुं. रा. प.]



गुजरात कच्छ, सौराष्ट्र (काठेवाड) व गुजरात हे प्रदेश मिळून सध्याचे गुजरात राज्य बनले आहे. याच्या वायव्येस पाकिस्तान, उत्तरेस व ईशान्येस राजस्थान, पूर्वेस माळवा व धुळे जिल्हा (महाराष्ट्र), दक्षिणेस ठाणे जिल्हा (महाराष्ट्र) आणि पश्चिमेस सिंधुसागर (अरबी समुद्र) आहे. याचे क्षेत्रफळ ७२,१३७ चौ. मैल असून, इ. स. १९६१ च्या गणनेप्रमाणे याची लोकसंख्या २ कोटी, ६ लक्षांहून अधिक आहे.

नैसर्गिक विभाग – या प्रदेशाचे तीन नैसर्गिक विभाग पडतात, ते असे–

(१) किनाऱ्याजवळचा सखल प्रदेश. हा रेती व लवणे यांनी व्यापलेला आहे. दक्षिणेकडील भागात दलदल पसरलेली आहे. या भागात गवत चांगले वाढते आणि ऊस व कापूस ही पिकेही भरघोस येतात. गुजरातला सुमारे एक हजार मैल लांब समुद्र किनारा लाभला आहे. त्यात अनेक चांगली बंदरे आहेत. प्राचीन काळी या बंदरांतून दूरदेशांशी मोठा व्यापार चालत असे.

(२) हा विभाग मैदानी प्रदेशाचा आहे. हा दक्षिणेकडे सुरतेजवळ फक्त १५ मैल रुंद आहे; पण उत्तरेकडे हळूहळू त्याची रुंदी वाढत जाते. हा सपाट भूभाग साबरमती, मही, बनास, सरस्वती, नर्मदा व तापी या नद्यांमुळे फार सुपीक बनला आहे. शिवाय मच्छू, भादर, शेत्रुंजी, दमणगंगा या लहान नद्यांनीही त्याला समृद्ध केले आहे.

(३) अरवली, विंध्य, सातपुडा व सह्याद्री यांच्या रांगा या भागात येतात. या पर्वतांच्या कुशीतून वाहणारे असंख्य जलौघ गुजरातमधील नद्यांना जलप्रदान करतात. या भागात विपुल झाडी आणि अनेक दुर्गम गिरिशिखरे आहेत.

गुजरातची, विशेषतः मधल्या मैदानी प्रदेशाची हवा विषम आहे, पर्वतराजीतली हवा थंड आहे आणि किनारपट्टी समशीतोष्ण आहे. गुजरातमध्ये सर्वसाधारणपणे ७५ ते १२५ सें. मी. पाऊस पडतो. हा प्रदेश कृषिप्रधान असून, गहू, तांदूळ, ज्वारी

बाजरी व कापूस ही इथली मुख्य पिके होत. खनिज संपत्ती या प्रदेशात विपुल प्रमाणात सापडते. आता खनिज तेलाचाही शोध लागला असून, विहिरीतून तेल बाहेर काढण्याचे काम सुरू आहे.

गुर्जरांना आसरा देणारी भूमी म्हणून हिला पूर्वी गुर्जरत्रा असे म्हणत. गुजरात हे त्याचेच रूपांतर होय. अल् बिरूनीने या शब्दाची व्युत्पत्ती गुज्र + आत अशी दिली आहे. आत हा अरबी भाषेतील बहुवचनी प्रत्यय आहे. त्यावरून बहुसंख्य गुज्र किंवा गुर्जर लोकांचे वसतिस्थान म्हणून या प्रदेशाला गुजरात हे नामाभिधान प्राप्त झाले असावे. गुर्जरराष्ट्र या शब्दावरूनही हे नाव बनले असणे संभवनीय आहे.

प्राचीन काळी जो प्रदेश गुर्जर देश या नावाने ओळखला जात होता, तो सर्व सध्याच्या गुजरात राज्यात समाविष्ट झालेला नाही. पूर्वी अबू पर्वत आणि श्रीमाल (भिन्नमाळ) नगरी ही गुर्जर देशात होती. इ. स. च्या ७ व्या शतकात सरस्वती नदीपासून उत्तरेस जोधपूरच्याही पलिकडे गुर्जर देश पसरलेला होता. मही नदीचे खोरे, रतलामचा काही भाग, पंचमहाल, बडोदा, खेडा हे जिल्हे या सर्व प्रदेशाला मालव हे नाव होते. खेडाचे मूळ नाव खेटक होय. अहमदाबाद जिल्ह्याचा काही भाग आशापल्ली या नावाने ज्ञात होता. त्याच्या उत्तरेस आर्नत देश असून, त्याची राजधानी आनंदपूर (वडनगर) येथे होती. सौराष्ट्र व कच्छ ही नावे पूर्वीचीच कायम आहेत.

या प्रदेशातील उत्खननात जे प्राचीन अवशेष सापडले आहेत, त्यावरून असे कळते, की पुराणाश्मयुगात मही, सावरमती, नर्मदा या नद्यांच्या काठी मानवाची वस्ती होती. सुमारे अडीच लक्ष वर्षांपूर्वीची हत्यारे तिथे सापडली आहेत. मात्र त्यानंतरच्या दीर्घ काळातील मनुष्यवस्तीच्या खुणा गुजरातमध्ये आढळत नाहीत. मध्य अश्मयुगातील लहान लहान दगडी आयुधे (Micro Liths) आणि मानवी अस्थिपंजर या भागात अनेक ठिकाणी आढळले असले, तरी त्यांचा काळ निश्चित झालेला नाही. नवाश्मयुगातील आयुधे गुजरातच्या किनारी भागात मुळीच नाहीत; मात्र सौराष्ट्रात अमरेलीजवळ ती सापडली आहेत. हडप्पा वगैरे ठिकाणी मातीची भांडी वगैरे सिंधुसंस्कृतीचे जे अवशेष सापडले आहेत, तसेच अवशेष गुजरातमध्ये लोथल येथेही सापडले आहेत. त्यावरून सिंधुसंस्कृती सिंधपासून काठेवाडपर्यंतच्या भागात पसरलेली असावी, असे वाटते.



गुजराती गोपालक

सनपूर्व पहिल्या शतकातील प्रसिद्ध नगर आनर्तपूर (आनंदपूर) या शहराचे अवशेष गुजरातेत सापडले आहेत. त्या काळी तिथले रहिवासी बरेच प्रगत होते, असे दिसते. त्यांची घरे उत्तम प्रकारे बांधलेली होती. विश्वामित्रीच्या काठीही असेच एक प्राचीन नगर सापडले आहे.

इ. स. च्या प्रारंभी भारताचा रोमशी फार मोठा व्यापार चालत असे. त्या काळातील रोमन नाणी व मातीची भांडी गुजरात प्रदेशात विपुल सापडली आहेत.

प्राचीन काळ – वैदिक आर्यांनी उत्तर भारतात वसाहती स्थापन करण्यापूर्वीच गुजरातमध्ये कुश नामक एका जमातीने वस्ती केली होती. हे कुश लोक समर्थ, साहसी व व्यवहारकुशल होते. आजच्या द्वारकेचे प्राचीन नाव कुशस्थली असे असून, ती नगरी याच कुशांनी वसवली होती.

ऋग्वेदात ज्यांच्याबद्दल पुष्कळ निंदाव्यंजक उल्लेख आहेत, ते पणी लोक म्हणजे याच कुशांची संतती होय, असा काही पंडितांचा तर्क आहे. पणी लोक पश्चिम किनाऱ्यावरील बंदरातून समुद्रमार्गे परदेशाशी व्यापार करीत. ते नौकानयनात कुशल होते. वणिग्वृत्ती हा गुजरातचा आत्मा आहे आणि वणिक् हा शब्द पणी या शब्दावरूनच बनला आहे. म्हणजे गुजरात-सौराष्ट्रांतील व्यापारी उलाढालींची परंपरा फार प्राचीन आहे, असे म्हणावे लागते.

त्यानंतर शर्यातीच्या कुलगोत्राचे आर्य लोक या प्रदेशात येऊन वसले. त्यांनी या प्रदेशाला आनर्त हे नाव दिले. आनर्ताच्या चतुःसीमा निश्चित सांगता येत नसल्या, तरी महाभारत, भागवत, बृहत्संहिता, इ. ग्रंथांत या राज्याचा उल्लेख मात्र मिळतो.

शर्यातीची मुलगी सुकन्या ही च्यवनाची पत्नी होय. च्यवन हा भृगुकुलोत्पन्न होता. सध्याचे भडोच म्हणजे प्राचीन भृगुकच्छ होय. तिथे भृगूंचे वास्तव्य असले पाहिजे. या कुळातील उशना किंवा शुक्राचार्य हा असुरांचा पुरोहित होता. त्याच्याच पौरोहित्याने बळिराजाने भृगुकच्छ येथे आपला यज्ञ आरंभिला होता. बळी हा एक ऐतिहासिक पुरुष होता. असीरियामधून जी असुरांची टोळी समुद्रमार्गे येऊन भारताच्या पश्चिम किनाऱ्यावर उतरली, तिचा तो नेता होता. भार्गवांचे पाठबळ मिळवून त्याने इथे एक प्रबळ राज्य स्थापले.

भृगुकुल हे एक प्राचीन ऋषिकुल होते. विद्या, सत्ता, इ. अनेक क्षेत्रांत त्यांनी आपले नाव गाजविले. जमदग्नीचा पुत्र परशुराम हा भार्गवच होता. त्याने सहस्रार्जुनाचा वध करून गुजरातमध्ये आर्यसंस्कृतीचे एक नवे केंद्र स्थापले.

सहस्रार्जुन हा हैहय वंशातला एक महापराक्रमी राजा होता. हैहय लोक शूर व उत्साही असले, तरी जरा अनगड व आडदांडच होते. त्यांच्या एका शाखेचे राज्य माहिष्मती (महेश्वर) येथे होते. त्यांनीच पुढे गुजरात देश जिंकून त्याला अनूपदेश हे नाव दिले. सहस्रार्जुनाने त्या राज्याचे साम्राज्य बनवले. त्याने सौराष्ट्र आपल्या सत्तेखाली आणले व पश्चिम सागरावरही प्रभुत्व मिळवले. पंजाबापासून लंकेपर्यंत त्याचा दरारा बसला होता. पण पुढे तो सत्तामदाने इतका उन्मत्त झाला, की जमदग्नीसारख्या तपोधनाचा शिरच्छेद करायलाही त्याचा हात कचरला नाही. त्यामुळेच तो भार्गवरामाच्या परशूला बळी पडला. परशुरामाने माहिष्मती नगरीचा विध्वंस करून अनूपदेशही पादाक्रांत केला. भृगुकुलातील मार्कंडेयाने तापी तीरावर आपला आश्रम उभारला. श्रीकृष्णाने द्वारकेला नवे राज्य स्थापले आणि अशा प्रकारे अनूपदेश हा आर्यावर्ताचा एक भाग बनला.

प्राचीन इतिहास – त्यानंतरच्या अनेक शतकांचा काळ हा अंधकारमय आहे. सनपूर्व ५०० च्या सुमारास या प्रदेशात यौधेयांची अनेक गणराज्ये निर्माण झाली. हा मानवगण पाणिनीच्या काळातच उदय पावला असावा. हे लोक प्रथम पूर्व पंजाबात सतलजच्या तीरावर वसलेले होते. तिथून ते मुलतानमार्गे सिंध व सौराष्ट्र या प्रदेशांत आले. या गणाला पाणिनीने आयुधजीवी संघ म्हणजे शस्त्रांच्या साहाय्याने उपजीविका करणारा गण असे म्हटले आहे. हे यौधेय म्हणजे उशीनर राजाचे वंशज होत, असे हरिवंश पुराणात म्हटले आहे. या लोकांत व्यापारी साहस आणि व्यवहारी बुद्धी ही दोन्ही होती. अनेक युद्धांतही त्यांनी विजय मिळवले होते. पण पुढे शक महाक्षत्रप रुद्रदामन याच्या पुढे मात्र त्यांना हार खावी लागली.

सनपूर्व ४ थ्या व ३ ऱ्या शतकात मौर्यांची सत्ता या प्रदेशावर होती आणि गिरनार हे त्याचे मुख्य ठिकाण होते, असे गिरनार पर्वतावरील शिलालेखांवरून कळते. संप्रती या सम्राटानंतर मौर्यांची सत्ता तिथून लुप्त झाली व बॅक्ट्रियन ग्रीकांची सत्ता सुरू झाली. त्यांची नाणी तिथे सापडली आहेत. त्यानंतरचा सुमारे एका शतकाचा इतिहास अज्ञात आहे.

इ. स. च्या पहिल्या शतकात शक क्षत्रप नहपान याने डांगपासून सौराष्ट्रापर्यंतचा प्रदेश पादाक्रांत केला होता. त्या वंशातला रुद्रदामन हा महापराक्रमी होता. त्याने अपरांत व सौराष्ट्र यांवर सत्ता स्थापली होती. गिरनारवर त्याचेही शिलालेख आहेत. आनर्त व सौराष्ट्र या प्रदेशांवर त्याचे सुभेदार होते. त्यानंतर शंभर–दीडशे वर्षे द. गुजरातवर आभीरांनी राज्य केले. हे इ. स. च्या १ ल्या शतकापासून सौराष्ट्राचे रहिवासी होते.

मैत्रक राजवंश –– इ. स. च्या ५ व्या शतकात गुजरात हा गुप्तसाम्राज्याचा एक भाग होता. स्कंदगुप्ताचा राजप्रतिनिधी पर्णदत्त हा गिरिनगर येथून सौराष्ट्राचा कारभार करीत होता. स्कंदगुप्ताच्या मृत्यूनंतर पर्णदत्ताचा एक सेनाधिकारी भट्टार्क मैत्रक याने वलभी (सौराष्ट्र) येथे स्वतंत्र राज्य स्थापले. मात्र तो गुप्तांचा मांडलिकच राहिला (इ. स. ५५९–६७). मैत्रक वंशातील ६ वा राजा गुहसेन संपूर्णपणे स्वतंत्र राज्य करू लागला होता. ७ व्या शतकाच्या प्रारंभी माळव्यावर मैत्रकांची सत्ता प्रस्थापित झाली होती आणि पूर्वेकडे विंध्य व दक्षिणेकडे सह्यपर्वतापर्यंत त्यांच्या राज्याचा विस्तार झाला होता. त्यांचे राज्य इ. स. ७६६ पर्यंत चालू होते.

गुर्जर प्रतीहार–– ज्या गुर्जर लोकांवरून गुजरात हे नाव या प्रदेशाला मिळाले, त्यांच्यांतील प्रतीहार घराण्याचे राज्य हरिचंद्र नामक पुरुषाने इ. स. ५५० च्या सुमारास राजपुतान्यात स्थापन केले. त्या वेळी हा प्रदेश गुर्जर या नावाने ओळखला जात होता. सरस्वती नदी ही त्याची दक्षिण सीमा असून उत्तरेकडे तो जोधपूरपर्यंत पसरला होता. पुढे हे गुर्जर प्रतीहार लोक पूर्वेस माळव्यात व दक्षिणेस लाट देशापर्यंत पसरले व तिथे त्यांनी नवी राज्ये स्थापली. लाट देशावर या गुर्जरांचे राज्य इ. स. ५८० पासून ७३५ पर्यंत चालू होते. त्यांची राजधानी नांदीपूर ही होती.

चालुक्यांची सत्ता –– इ. स. च्या ७ व्या शतकात चालुक्य राजा पुलिकेशी याने लाट, मालव आणि गुर्जर देश जिंकले होते, असे ऐहोळ येथील शिलालेखावरून कळते. त्याच्या वंशातील जयसिंह वर्मा याने इ. स. ६९३ पर्यंत नवसारी येथे राज्य केले. ८ व्या शतकात काही काळ खेटक मंडळापर्यंतचा (खेडा) प्रदेश चालुक्यांच्या साम्राज्यात होता. पण लवकरच या प्रदेशावर अरबांचे आक्रमण आले आणि त्यांनी कच्छ, सौराष्ट्र, गुजरात हे सर्व प्रदेश पादाक्रांत केले. या अरबांच्या आक्रमणाला उज्जैनच्या प्रतीहारांनी यशस्वी रीतीने तोंड दिले. त्यांनी लाट देशावरही सत्ता स्थापली. परंतु इ. स. ७५० च्या सुमारास राष्ट्रकूट राजा दंतिदुर्ग याने प्रतीहारांचा पराभव करून लाट, खेटक व मालव हे प्रदेश जिंकले. उज्जैनच्या वत्सराजाने इ. स. ७८० च्या सुमारास गुर्जर देशावर पुन्हा आपली सत्ता प्रस्थापित केली. ९ व्या शतकात सर्व गुर्जरदेश मिहिरभोज

याच्या साम्राज्याचा एक भाग बनला.

गुर्जर साम्राज्याचा अंत — त्यानंतर १० व्या शतकात राष्ट्रकूटांनी ज्या दोन स्वाऱ्या केल्या (इ. स. ९१५ व ९४०) त्यांमुळे गुर्जर साम्राज्याचे तुकडे झाले. राष्ट्रकूट राजा कृष्ण (तिसरा) याने गुर्जर देश जिंकला. त्याचा प्रतिनिधी म्हणून परमार राजा शियाक (दुसरा) याने सरस्वती नदीच्या दक्षिणेकडील सर्व गुजरात प्रदेश व्यापला. हे परमार घराणे गुर्जर देशातले असून, ९ व्या शतकात प्रतीहारांचे मांडलिक होते. धार ही शियाकची राजधानी होती. त्याचा पुत्र वाक्पती मुंज याने उत्तर गुजरातमध्ये साम्राज्य स्थापले. त्याने लाट देशही जिंकला होता. तो केवळ पराक्रमीच नव्हता, तर कवी आणि कवींचा आश्रयदाताही होता. कर्नाटकाधिपती तैलप याने त्याला इ. स. ९९६ साली पकडून ठार मारले.

चौलुक्य सोळंकी—प्रतीहारांची सत्ता नष्ट झाल्यावर गुर्जर देशात चौलुक्य वंशातील मूळराज सोळंकी यानेही अणहिलवाड येथे स्वतंत्र राज्य स्थापले. त्यापूर्वी सुमारे दोनशे वर्षे तिथे चावडा (चाप) घराण्याचे राज्य होते. त्या घराण्यातील शेवटचा राजा मूळराजाचा मामा होता. मूळराज विद्याकलांचा भोक्ता व दानशूर होता. त्यानेच सोमनाथाची प्रतिष्ठापना केली. त्याचे राज्य सारस्वत मंडळ या नावाने ओळखले जात होते. या वंशातील राजा भीम याच्या वेळी गजनीचा सुलतान महमूद याने सोमनाथवर स्वारी केली. या वंशात सिद्धराज जयसिंह व कुमारपाल हे दोन थोर पुरुष होऊन गेले. त्यांनी प्रस्थापित केलेले साम्राज्य म्हणजेच सध्याचा गुजरात प्रदेश होय. त्या वेळेपासून गुजरातची भाषा, संस्कृती व व्यक्तित्व ही वेगळी झाली. कुमारपालाच्या वेळी गुर्जरभूमीची दक्षिण सीमा दमणगंगा नदी होती (इ. स. ११७४). पुढे मुसलमानांनी अणहिलवाड जिंकले, त्या वेळी या प्रदेशाला गुजरात हे नाव प्राप्त झालले होते.

वाघेल घराणे — इ. स. १२४१ साली सोळंकी वंशातील भीमदेव मरण पावल्यावर गुजरातेत वाघेल घराण्याची सत्ता सुरू झाली. सोळंकी राजा कुमारपाल याने आपला मावसभाऊ अरुणराज याला वाघेर वगैरे गावांची जहागीर दिली होती. त्याचा पुत्र लवणप्रसाद हा भीमदेवाचा प्रधान होता. तोच पुढे अणहिलवाडचा राजा झाला. त्याचा पुत्र वीरधवल याच्या राजवटीत वस्तुपाल व तेजपाल या दोन जैन मंत्र्यांनी गिरनार व अबू या पर्वतांवर अनेक जैन मंदिरे बांधली. या राजांनी १३ व्या शतकाच्या अखेरपर्यंत गुजरातचे संरक्षण केले. पणं कर्णदेवाच्या राजवटीत अलाउद्दीन खिलजीने गुजरात जिंकले, ते हापासून गजरादवर मुसलमानी अंमल सुरू झाला.

मुसलमानी अंमलाचे तीन कालखंड पडतात, ते असे—(१) दिल्लीच्या सुलतानांचा अंमल (इ. स. १२९९ – १३९६). (२) स्वतंत्र सुलतानांचा अंमल (१३९७ – १५७२) व (३) मोगल बादशहांचा अंमल (१५७३–१७५८).

पहिल्या कालखंडात गुजरातवर दिल्लीची सत्ता पूर्णपणे प्रस्थापित झाली नव्हती. बराचसा भाग राजपूत राजांच्या ताब्यात होता. दिल्लीच्या सुलतानांचे सुभेदारही त्यांची सत्ता विशेषशी मानीत नव्हते. शेवटी तर मुजफ्फरखान याने इ. स. १३९६ पासून गुजरातेत स्वतंत्र राज्यच सुरू केले. इ. स. १५७२ त अकबर बादशहाने गुजरात जिंकले, तोवर तिथे स्वतंत्र सुलतानांचे राज्य चालू होते. त्या काळात मुसलमानांनी गुजरातेतील अनेक शहरे लुटली, खेडी जाळली, किल्ले जमीनदोस्त केले, मंदिरे उद्ध्वस्त केली आणि हिंदूंना अतोनात छळले व कित्येकांना जबरदस्तीने बाटविले. त्या धर्मच्छळाच्या काळात स्वधर्मरक्षणासाठी असंख्य हिंदू वीर पुरुषांनी व स्त्रियांनी आत्मबलिदान केले.

याच कालखंडात म्हणजे इ. स. १५०० नंतर पोर्तुगीज लोकांनी गुजरातच्या किनाऱ्यावरील दीव, दमण वगैरे ठिकाणे काबीज केली. पुढे बहादूरशहाने त्यांच्या मदतीने हुमायूनाच्या फौजेचा पराभव करून आपले राज्य परत मिळवले. पुढे पोर्तुगीजांनी बहादूरशहाला कपटाने समुद्रात बुडवून ठार मारले.

या दोनतीनशे वर्षांच्या सुलतानी अंमलात लढाई व धामधूम यांच्या वाचून दहा वर्षे सुद्धा शांततेची गेली नाहीत. या वेळचे कित्येक सुलतान कर्तबगार होते खरे; पण त्यांचा सर्व पराक्रम हिंदूंवर जुलूम करण्यातच दिसून आला. अकबराने गुजरात जिंकल्यानंतर मात्र तिथे काहीशी शांतता नांदू लागली. राजा तोडरमल्ल याने त्या सर्व प्रांतांची पाहणी करून जमाबंदी ठरवली. अज़ीज कोका नामक सुभेदाराने दीर्घ काळपर्यंत तिथे चांगला कारभार केला. त्यानंतर तिथे अनेक सुभेदार येऊन गेले. त्यांत मोगल राजघराण्यातील पुरुषही होते. जहांगीर बादशहाच्या कारकीर्दीत इंग्रजांनी गुजरातेत प्रवेश केला. (इ. स. १६०८). त्याना सुरतेत वखार घालण्याची परवानगी मिळाली. ओरंगजेबाच्या कारकीर्दीत मराठ्यांनी गुजरातवर अनेक स्वाऱ्या केल्या. पुढे पेशव्यांनी तिथे चौथाई वसूल करण्याचा प्रघात पाडला. शेवटी इ. स. १७५८ साली गायकवाडांनी अहमदाबाद जिंकून गुजरात प्रदेश मराठी राज्याला जोडला.

मराठी सत्ता लोप पावल्यावर गुजरात प्रदेश इंग्रजांच्या ताब्यात गेला. बडोदा व सौराष्ट्रातील अनेक संस्थाने इंग्रजांच्या कृपेने स्वायत्त राहिली होती. इ. स. १९४७ साली भारताला

स्वातंत्र्य मिळाल्यानंतर ही सर्व संस्थाने भारतीय गणराज्यात विलीन झाली. सौराष्ट्रातील सर्व संस्थानांचे एक स्वतंत्र राज्य १९४८ साली अस्तित्वात आले आणि १९५६ मध्ये ते राज्य द्वैभाषिक मुंबई राज्यात समाविष्ट केले गेले. त्यानंतर राज्यपुनर्रचना होऊन १९६० साली सध्याचे गुजरात हे घटक राज्य निर्माण झाले.

अहमदाबाद – ही या राज्याची राजधानी आहे. हे शहर साबरमती नदीच्या तीरावर वसलेले आहे. पूर्वी या जागी कर्णावती नगरी होती. ती ११ व्या शतकात चालुक्य वंशातील कर्णदेव याने वसवली होती. गुजरातचा स्वतंत्र सुलतान अहमदशहा याचा साबरमतीच्या तीरावर तळ पडला असताना एक विलक्षण दृश्य त्याला दिसले व तो स्तिमित झाला. तिथले ससे त्याच्या शिकारी कुत्र्यांना भिऊन पळून गेले नाहीत; तर उलट त्यांच्याशी झुंज देण्यासाठी ठामपणे उभे राहिले. ते पाहून त्याला वाटले, की या अलौकिक भूमीवर आपण वास्तव्य करावे; म्हणजे आपण निर्भय होऊ. म्हणून मग त्याने नवीन नगर वसवले आणि त्याला स्वतःचे नाव दिले. तिथे त्याने जी जुम्मा (जामी) मशीद बांधली, ती या नगरातील सर्वश्रेष्ठ स्थापत्यरचना समजली जाते. त्या मशिदीवर दोन मनोरे अशा खुबीने उभारले होते, की सामान्य माणसाने एक हालवला तरी दुसरा आपोआप डोलू लागावा. पण त्यांचा वरील भाग इ. स. १८१८ सालाच्या भूकंपात पडून गेला. असाच आणखी एक मनोरा एक-तोडानी मशिदीवर उभा आहे. तो ६० फूट उंच असून, सहज हालवता येतो.



जुम्मा मशीद—अहमदाबाद

इथली सिद्दी सैय्यदची मशीद आहे सामान्यच; पण तिच्या भिंतीत प्रकाश व हवा आत जाण्यासाठी ज्या दोन दगडी जाळ्या बसवल्या आहेत, त्यांत वेलीच्या पानाफुलांचे अप्रतिम कोरीव काम केलेले आढळते. इतिहासकाळापासून अहमदाबादची ख्याती आहे, ती वास्तुकलेसाठी. इथली वास्तुकला मुख्यतः मशिदींच्या रूपाने साकार झाली आहे. हे सारे स्थापत्य इस्लामी असले, तरी त्यावर हिंदू स्थापत्याचा लक्षात येण्याजोगा ठसा दिसतो. हे शहर इमारती आणि उद्याने यांमुळे अत्यंत सुंदर दिसत असे. म्हणून ते शहाजहान व जहांगीर बादशहांना फार प्रिय होते. त्यांनी मुमताजमहाल व नूरजहान या आपल्या प्रियतम बेगमांसह इथे अनेक वर्षे विलाससौख्य उपभोगले. १६ व्या शतकात ते हिंदुस्थानातील सर्वांत सुंदर शहर गणले जात होते. कांकरिया तलावामुळे अहमदाबादची शोभा खूपच वाढली आहे. या तलावाने ७६ एकर भूभाग व्यापला आहे. जवळच्या टेकडीवर एक विस्तीर्ण बगीचा आहे. हा बगीचा व तलाव सुलतान कुत्बुद्दीन याने इ. स. १४५१ साली निर्माण केला. या शहराभोवती सात मैल घेराचा एक कोट असून, भद्र नावाचा एक आंतरकोटही आहे. इंग्रजांना हिंदुस्थानशी व्यापार करण्याची सनद मिळाली, ती याच ठिकाणी. इथूनच म. गांधींनी आपली दांडीयात्रा सुरू केली. इथल्या साबरमती



झुलते मनोरे—जुम्मा मशीद—अहमदाबाद

आश्रमातूनच गांधीजींनी काही वर्षे भारतीय स्वातंत्र्य-संग्रामाची सूत्रे हालवली. भारतातील प्रमुख औद्योगिक शहरांमध्ये अहमदाबादची गणना होते. तिथे अनेक कापडगिरण्या आहेत.

बडोदे – ही गायकवाडांची राजधानी होती. याचे मूळ नाव वटोदर असे होते. गुजराती लोक त्याला वडोदरा म्हणतात. त्याचाच मराठी अपभ्रंश बडोदा होय. अहमदाबाद ही गुजरातची राज्यकारभाराची राजधानी आहे, तर बडोदा ही त्याची सांस्कृतिक राजधानी आहे. इथले लक्ष्मीनिवास, मकरपुरा व नजरबाग हे तीन राजवाडे, सुरसागर नावाचा विस्तीर्ण तलाव आणि विश्वामित्रीच्या तीरावर पसरलेले उद्यान ही स्थळे अत्यंत प्रेक्षणीय आहेत. बडोद्याचे ग्रंथालय हे श्रीमंत सयाजीरावांच्या वेळी फार नामांकित होते.

सुरत – तापी नदीच्या तीरावरील हे बंदर ऐतिहासिक आणि व्यापारी दृष्टीने फार महत्त्वाचे ठरले आहे. पोर्तुगीज, इंग्रज, डच व फ्रेंच या सर्वांनी इथे आपल्या वखारी उघडल्या होत्या. त्यांचे अवशेष अजूनही तिथे दिसतात. सांप्रतही हे एक प्रमुख व्यापारी व औद्योगिक केंद्र आहे. इथली रेशमी व जरीची कलाकुसर प्रसिद्ध आहे.



जाळीदार नक्षी – सिद्दी सैय्यद मशीद – अहमदाबाद

याशिवाय गुजरातेत राजकोट, भावनगर, जामनगर, पोरबंदर, जुनागड, खंबायत, भडोच, बार्डोली, इ. अनेक प्रसिद्ध शहरे व प्रेक्षणीय स्थळे आहेत.

तीर्थक्षेत्रे – या प्रदेशात अनेक पुण्यक्षेत्रे आहेत. द्वारका, सोमनाथ, डाकोर, शत्रुंजय, गिरनार, पालिताणा, पावागड व मोढेरा ही स्थाने अखिल भारतात पवित्र मानली जातात आणि लक्षावधी लोक या स्थळांची यात्रा करतात. त्याव्यतिरिक्त डभोई, चाणोद, कुरताळी; सिद्धपूर, रुद्रमहालय, अंबाजी, अबू पर्वतावरील जैन मंदिरे, बहुचराजी, आशापुरी, बीलेश्वर, कीलेश्वर, खेडब्रह्मा, शामळाजी, नारायण सरोवर, कोटेश्वर, इ. असंख्य तीर्थस्थाने गुजरातेत जागोजागी आहेत. त्यांत शैव, शाक्त, वैष्णव, सौर, बौद्ध व जैन या सर्व पंथांच्या मंदिरांचा समावेश होतो. प्रभास, द्वारका व पिंडारक या तीर्थांचा महाभारतात उल्लेख आहे. प. भारतातील बहुतेक सर्व तीर्थस्थानांचा उल्लेख स्कंद पुराणात आढळतो. बलसाडजवळचे पारडी हे गाव पं. सातवळेकरांच्या स्वाध्यायमंडळामुळे आधुनिक पुण्यक्षेत्रच ठरले आहे. तिथे मोठमोठे यज्ञ होतात, वेदावरील ग्रंथ प्रकाशित होतात व इतर अनेक ज्ञानसत्रेही चालतात.

अहमदाबादहून भावनगरकडे जायला लागले, की वाटेत लोथल नावाचे एक स्थान आहे. त्या ठिकाणी भूगर्भातील एक प्राचीन नगर उत्खनन करून वर काढलेले आहे. हे नगर सिंधुसंस्कृतीच्या विस्ताराचाच एक भाग आहे, असे समजतात.

खंबायत हे प्राचीन काळी एक प्रसिद्ध बंदर होते. पण आता त्याचे नाव गाजते आहे, ते तिथे सापडलेल्या विपुल खनिज तेलामुळे. भडोच जिल्ह्यातील अंकलेश्वर येथेही तेलाचा मोठा साठा सापडला आहे. या तेलामुळे गुजरातचे औद्योगिक वैभव वाढणार आहे.

धर्म आणि पंथ – गुजरातमध्ये असलेल्या हिंदू समाजांत ३०० हून अधिक जाती आहेत. केवळ ब्राह्मणांतच ८४ जाती आहेत, असे म्हणतात. राजपुतांतही चुडासमा, जेठवा, झाला, जाडेजा, गोहिल, वाघेला, चोहाण, सोळंकी, राठोड, भाटी, यादव, इ. असंख्य जाती व उपजाती आढळतात. वाणिया, लुहाणा व भाटिया या प्रमुख वैश्य म्हणजे व्यापारी जाती आहेत. कुणबी, काछिया, खमार, माळी, सतवारा या शेती करणाऱ्या मुख्य जाती होत. याशिवाय भिल्ल, कोळी, दुबळा घोडिया, गोंड, काथोडी, नायकडा, पारधी, रबारी, भरवाड, बाबरिया, अहीर इ. अनेक आदिवासी जमाती या प्रदेशात वास्तव्य करून आहेत.

या सर्व हिंदू लोकांची विभागणी नाना पंथांत झाली आहे. प्राचीन काळी शाकद्वीपातील (इराण) मग नामक सूर्यपूजक ब्राह्मण भारताच्या पश्चिम किनाऱ्यावर येऊन उतरले. त्यांनीच पश्चिम भारतात सूर्यपूजा प्रचलित केली. सौराष्ट्रातील भोजांनी आपल्या कन्या देऊन त्यांना इथे स्थायिक होण्यास मदत केली. लवकरच ते हिंदूंच्या समाजव्यवस्थेत शाकद्वीपी ब्राह्मण म्हणून स्थिरपद झाले. इ. स. च्या १२ व्या शतकापर्यंत भारतात सूर्योपासना प्रचलित होती. गुर्जर देशात कितीतरी सूर्यमंदिरे जागोजागी उभारली गेली होती. त्यांतली बहुतेक आता भग्नावस्थेत आढळतात. सूर्यपूजा ही मुख्यत्वे पापमोचनासाठी केली

जाई. सौर संप्रदायाचे विशिष्ट नेमधर्मही होते. त्यांचे काही अवशेष गुजरातेत सांप्रतही दिसून येतात. तिथे कित्येक लोक सूर्यदर्शन झाल्यावाचून अन्नग्रहण करीत नाहीत. सौराष्ट्रात चातुर्मासात सूर्यव्रत करतात. राणादे ही सूर्याची पट्टराणी होय. गुजरात-राजस्थानमधील लोकांना तिच्याविषयी फार भक्ती आहे. गुजरातेतल्या नागर ब्राह्मणांच्या वधू लग्नाआधी सात दिवस सूर्याची पूजा करतात. तिथे सूर्याचे नाव घेऊन शपथ वाहण्याचीही चाल आहे.

शैव संप्रदायही गुजरातेत प्राचीन काळापासून प्रचलित आहे. मैत्रक राजे शिवाचे भक्त होते. लकुलीशाच्या पाशुपतपंथाचा प्रसार या भागात बराच झाला. लाटमंडळातील कायावरोहण (कारवाण) हेच लकुलीशाचे जन्मस्थान होय. त्याच्या गर्ग नामक शिष्याने गुजरातेत त्याची अनेक मठमंदिरे उभारली. इ. स. च्या ११ व्या शतकात सोळंकी राजवटीत लकुलीशाच्या उपासनेचे जणू पुनरुज्जीवन झाले आणि गुजरातभर त्या पंथाचे मठ उभे झाले. जयसिंह सिद्धराज हा त्या पंथाचा अनुयायी होता. त्याने या पंथाच्या प्रसाराला बराच हातभार लावला. त्यामुळे गुजरातेत हा पंथ राजमान्य व लोकमान्यही झाला.

गुर्जर–सौराष्ट्रात आणखी एक पंथ वावरतो, त्याचे नाव स्वामी नारायणपंथ असे आहे. नारायण म्हणजे द्वारकाधीश कृष्ण. या पंथात त्याचीच उपासना केली जाते. भडोचपासून कच्छपर्यंत अनेक ठिकाणी त्याची मंदिरे आहेत. हा पंथ सर्व जाती–जमातींना खुला आहे. तिथला गवंडी समाज याच पंथाचा आहे. गुजरातेत वल्लभ संप्रदायही क्वचित आढळतो.

भालण नामक गुजराती कवीने भागवताची प्रेरणा घेऊन गुजरातेत कृष्णभक्तीचे युग सुरू केले. पुढे मीरा, नरसी, दयाराम, इ. कवींच्या भावमधुर पदांमुळे सारा गुजरात प्रदेश कृष्णमय बनला. या कृष्णभक्तीमुळे गुजरातचे वातावरण फार बदलले. मध्यंतरी काही काळ जैन व शैव यांच्यांत वैर उत्पन्न झाले होते, ते या वैष्णव पंथाने मिटवले.

गुजरातेतील राजपुतांत शैव आणि वैष्णव यांच्याप्रमाणे शक्तीचेही उपासक आहेत. तिथे प्रत्येक कुलाची वेगळी कुलदेवी असते. जाडेजांच्या आशापुरी देवीचे मुख्य मंदिर कच्छमध्ये आहे. झाला राजपुतांच्या शक्तिदेवीचे देऊळ हळवद येथे आहे. गोहिलांच्या खोडियार देवीचे देऊळ राजपरा नामक खेडेगावी आहे. जेठवा राजपुतांची विंध्यवासिनी सांप्रत पोरबंदरजवळ छाया नावाच्या गावी आहे. परमारांच्या मांडवरी देवीचे स्थान मुळी या गावात आहे.

अशा या असंघटित हिंदू समाजावर इ. स. च्या १२ व्या शतकाच्या अखेरीस जे परचक्र आले, त्यामुळे तिथली हिंदू राजसत्ता नष्ट झाली. त्यानंतर चारपाचशे वर्षे गुजरातेत मुसलमानी सत्ता नांदली. पण त्या कालखंडात या परधर्मी संस्कृतीला गुजरातच्या सामाजिक जीवनात फारसे स्थान मिळाले नाही. तिथला व्यापार श्रेष्ठी व महाजन यांच्या हाती होता. गावकीचे अधिकार पंचायतीकडे होते. नैतिक अधिकार जातीजातींकडे होता. सर्व जातींवर ब्राह्मणांचे वर्चस्व होते. या ब्राह्मणांनी परसंस्कारांना आपल्या सामाजिक जीवनापासून अलग ठेवण्याची पराकाष्ठा केली.

बौद्ध धर्म— सौराष्ट्रात बौद्ध धर्माचे लोण सम्राट अशोकाने पोचविले आणि मिलिंदाने त्याचा प्रसार केला. मिलिंद (मेनांडर) हा ग्रीक राजपुरुष शिकंदराच्या सेनाधिकाऱ्यांपैकी एक होता. भारतात आल्यावर तो बौद्ध झाला. त्याने हीनयानी पंथाचा प्रसार केला. सौराष्ट्रात धर्मप्रचारासाठी एक भिक्षुसंघ कायमचे वास्तव्य करून राहिला होता. वलभी, आनंदपूर, व भडोच येथे त्या संघाने पाठशाळा चालविल्या होत्या. इ. स. च्या ६ व्या शतकात वलभीच्या मैत्रक वंशातील पहिला ध्रुवसेन हा एक प्रभावशाली राजा होऊन गेला. तो स्वतः वैष्णव होता. पण त्याच्या कारकीर्दीत बौद्ध धर्माचा खूप बोलबाला झाला. मात्र त्या वेळी हीनयान पंथ मागे पडून महायान पंथाचा उत्कर्ष सुरू झाला होता. सिंहलद्वीपातून इथे आलेल्या बौद्ध भिक्षूंनी अनेक ग्रामे व नगरे वसविली. जुनागड, तळाजा, साना वगैरे ठिकाणी मैत्रकांच्या काळातील बौद्ध लेण्यांचे आणि विहारांचे अवशेष आजही दिसतात. पुढे मैत्रकांचे वैभव लुप्त झाल्यावर तिथला बौद्ध धर्मही अस्तंगत झाला. गुजरातेतून बौद्धांना बाहेर घालवण्याचे बरेचसे श्रेय जैनांना आहे.

जैन धर्म – सनपूर्व चौथ्या शतकातच जैन धर्माने गुर्जर–सौराष्ट्रात प्रवेश केला होता. मगधात अवर्षण पडले असताना भद्रबाहू नावाचा जैन आचार्य दक्षिणेत उतरला, त्याच वेळी जैनांची एक शाखा पश्चिमेकडे वळली आणि तिने गुजरातेत वसाहत केली. इ. स. च्या ५ व्या शतकापर्यंत त्या लोकांनी या प्रदेशात चांगलाच जम बसविला होता. पुढे वलभी येथे त्यांनी एक विद्यापीठ स्थापले. जैनांच्या धार्मिक चळवळीचे ते एक मोठे केंद्र बनले.

दहाव्या शतकात गुजरातवर सोळंकी वंशाचे राज्य सुरू झाले. त्या काळात जैन धर्माचा खूप उत्कर्ष झाला. पहिला भीमदेव सोळंकी याचा सेनापती विमलशाह हा जैन होता. त्याने अनेक जैनमंदिरे निर्माण केली. नंतरचा त्या वंशातला धुरंधर पुरुष जयसिंह सिद्धराज हा शैव असला, तरी त्याचे बरेच मंत्री जैन होते. त्याच्या साम्राज्यस्थापनेच्या प्रयत्नात या जैन मंत्र्यांनी त्याला मनोभावे मदत केली. त्या काळातील

प्रसिद्ध जैन आचार्य हेमचंद्रसूरी याला जयसिंहाचा आश्रय लाभला होता.

पारशी धर्म– गुजरातमध्ये पारश्यांची वस्ती बरीच आहे. भडोच, नवसारी, अंकलेश्वर, बिलिमोरा, गणदेवी ही शहरे विशेषकरून पारश्यांची आहेत. हे लोक इ. स. च्या ८ व्या शतकात भारतात आले व गुजरातेत स्थायिक झाले. १३ व्या शतकाच्या अखेरीस अलाउद्दीन खिलजीच्या स्वारीमुळे त्यांना संजाणाच्या पूर्वेकडील डोंगरात पळावे लागले. त्यानंतरच्या अस्थिर परिस्थितीत त्यांच्या धर्माला अवकळा आली. त्यांच्या आचार-विचारात शैथिल्य आले. आपला इतिहासही ते विसरले. काहींनी इस्लामचा स्वीकार केला, तर काही लोक हिंदू पद्धतीने वागू लागले. पुढे इ. स. च्या १५ व्या शतकात इराणमधून काही नवे पारशी गुजरातमध्ये आले. त्यांनी तिथल्या पथभ्रष्ट पारश्यांना त्यांच्या धर्माची शिकवण देऊन पुनश्च आपल्या धर्माचे माहात्म्य वाढविले. ब्रिटिश राजवटीत पारशी समाजाची बरीच उन्नती झाली. खेड्यांतील काही पारशी शेती करीत असले, तरी दारूचा व्यापार हा त्यांचा मुख्य व्यवसाय होता. इतर उद्योगधंद्यांतही या लोकांनी खूप प्रगती केली. सरकारी कारभारात त्यांना बरीच अधिकारपदे मिळाली होती.

मुसलमान – गुजरातेत मुसलमानांची संख्या बरीच आहे; पण त्यांत परदेशातून आलेले मूळचे मुसलमान थोडेच असून, मुसलमानी अमलात जे हिंदू बाटवले गेले, त्यांचेच वंशज अधिक आहेत. मूळच्या मुसलमानांचे सैयद, शेख, मोगल व पठाण असे चार मुख्य वर्ग आहेत. बाटलेले हिंदू धर्माने मुसलमान असले, तरी संस्कारांनी गुजरातीच राहिले आहेत. ते गुजरातीच भाषा बोलतात. त्यांच्यांत हिंदूंविषयी तिरस्काराची भावना नाही वा धार्मिक कडवेपणाही नाही. बोहरी, दाऊदी, खोजा, मेमण हे मुख्यतः व्यापारी पेशाचे आहेत. खेड्यांतील बरेच मुसलमान शेती व कारागिरी करतात.

लोकांची राहणी– भारतातील बहुतेक औद्योगिक क्षेत्रे व व्यापारधंदे यांवर गुजराती लोकांचे वर्चस्व आहे. त्यांच्यांतील लखपतींची संख्या शेकड्यांनी नव्हे; तर सहस्रांनी मोजावी लागेल. पण हे लोक लक्ष्मीचे भक्त असले; तरी तिचे गुलाम नाहीत. त्यांना उपभोगाची आवड आहे, देण्याघेण्यात गोडी आहे, कीर्तीची लालसा आहे, दानात आनंद आहे आणि जीवनात रस आहे. शेजारधर्माला हे लोक चांगले आहेत.

गुजराती भोज्यपदार्थात आले, मिरची, ओली हळद, पुदिना, हे पदार्थ मुख्यत्वे असतात. गुजराती लोक अळवाच्या पानाला पात्रा म्हणतात. ती त्यांची आवडती वस्तू आहे. अळवाच्या पानाच्या खमंग व चुरचुरीत वड्या त्यांना फार आवडतात. पाहुण्याला दूध, तूप व मिठाई खाऊ घालणे, निदानपक्षी भजिया व दूधपुरी एवढे तरी त्याला वाढणे या गोष्टीला गुजराती गृहिणी चुकायची नाही.

शुभ्र धोतर, लांब कोट व डोक्याला टोपी हाच गुजराती लोकांचा शिष्टसंमत प्रादेशिक पेहराव आहे. त्यांचा धोतराचा कासोटा मात्र उजव्या बाजूने खोचलेला असतो. पन्नास साठ वर्षांपूर्वी गुजराती पुरुष जी पगडी वापरीत ती २० ते २५ वार लांबीचे तलम सुती कापड घेऊन बांधलेली असे. कपाळाच्या वर घड्या, माथ्यावर मध्यभागी उंचवटा व उजव्या कोपऱ्यात एक लहान टोक अशी त्या पगडीची रचना असे. फेंटो किंवा साफो म्हणजे आयत्या वेळी बांधलेले पागोटे होय. जुन्या काळी अंगात अंगरखे, जाकीट व जामो घालून वर उपट्टो (उपरणे) घेण्याची पद्धत होती. गुजराती स्त्रिया पदर डाव्या खांद्यावरून न घेता उजव्या खांद्यावरून घेतात.

नागर ललना पाचवारी पातळ विकच्छ नेसतात. ग्रामीण स्त्रिया कासोट्याचे नेसण नेसतात; पण ते मुंबईच्या कोळणींहून वेगळे असते. पूर्वी घागरो, काचोळी व ओढणी वापरीत. पायांत पोकळ पण जाडजूड वाळे, हातांत चुडी म्हणजे सोन्याच्या किंवा हस्तीदंती बांगड्या, गळ्यात हांसडी, दानिया, कंठी, चंद्रहार, झलमर, सांकलिया, इ. अलंकार, लोलिमा, झाल, थोलिमा, इ. कर्णभूषणे, छाक हा केसात घालायचा अलंकार व बुट्टी म्हणजे कुडी हे गुजराती बायकांचे अलंकार होत.

सर्वसाधारणपणे ज्या प्रदेशात गुजराती भाषा बोलली जाते, त्याला गुजरात म्हणतात. मात्र कच्छमध्ये कच्छी व सौराष्ट्रात काठियावाडी या बोली प्रचलित आहेत. उत्तरेकडील भागात गुजराती भाषेवर राजस्थानी भाषेचा प्रभाव दिसून येतो.

ग्रामोद्योग – गुजरातच्या ग्रामीण भागातील कारागिरी फार प्रसिद्ध आहे. सुरतेचे जरीकाम, कच्छमधील जडावाचे काम, पाटण येथील अगेट (गोमेद) चे अलंकार, संखेडाचे लाखकाम, पालनपूर येथील सुगंधी पदार्थ आणि निरनिराळ्या ठिकाणचे लाकडावरील कोरीव काम ही विशेष उल्लेखनीय आहेत.

गुर्जर शिल्पकला – गुजरातेतील शिल्पाचे कालदृष्टीने चार विभाग पाडता येतात–(१) प्राचीन काळ (२) पूर्व मध्यकाळ (इ. स. ५००–१०००), (३) मध्ययुग (इ. स. १०००–१३००) व (४) उत्तर–मध्यकाळ (इ. स. १३००–१७००).

प्राचीन कालातील लेणी आणि विहार दूरदूरच्या पहाडांमध्ये खोदलेले आहेत. गिरनार, तळाजा, साना, गोप व धानक येथील लेणी विशेष प्रसिद्ध आहेत. गुजरातमध्ये सापडलेले स्तूप विटांचे बांधलेले आहेत. त्यातील जुनागडजवळ, बोरिआ येथे एक आणि सोपाराजवळ एक असे दोन स्तूप विशेष उल्लेखनीय

आहेत. दुसऱ्या कालखंडातील मंदिरे मुख्यत: सौराष्ट्रात आढळतात. त्यातील गोप येथील मंदिर सर्वात जुने व चांगले आहे. सोळंकी आणि वाघेला या राजांनी गुजरातेत बरीच सुंदर मंदिरे बांधली होती. त्यातील बहुतेक पुढील काळात उद्ध्वस्त झाली. त्यांच्या अवशेषावरून त्या काळातील शिल्पकला किती प्रगत होती, ते कळून येते. सिद्धपूरचे रुद्रमहालय, मोढेराचे सूर्यमंदिर व घुमली (सौराष्ट्र) येथील नवलखा मंदिर ही शिल्पकलेची उत्कृष्ट उदाहरणे आहेत: अबू व शत्रुंजय पर्वतांवरील जैनमंदिरे याच काळातली आहेत. दिलवाडा येथील शुभ्र संगमरवरी पाषाणातले नाजूक कोरीव काम अप्रतिम आहे. तारंगा पर्वतावरील अजितनाथाचे मंदिर तर अत्यंत भव्य आहे.

मुसलमानी अमलातील शिल्पकला मुख्यत: मशिदी, राजवाडे व मनोरे यांच्या रूपाने उभी झाली आहे. अहमदाबाद, पाटण, धोलका, खंबायत, भडोच, चांपानेर, जुनागड या शहरात अशी अनेक स्मारके आढळतात. गुजरातमधील सुसंस्कृत, कल्पक व कुशल कारागिरांनी मुस्लिम सत्ताधीशांच्या आदेशाप्रमाणे ही शिल्पे घडविली असल्यामुळे त्यांत हिंदू आणि इस्लामी शिल्पकलांचा सुरेख संगम झालेला आहे. त्यातूनच गुजरातची वेगळी अशी शिल्पशैली निर्माण झाली.

सोळंकी वंशाच्या पूर्वकाळात गुजरातमध्ये मूर्तिकलेची एक वेगळी परंपरा होती, असे दिसते. त्या परंपरेतील काही मूर्ती उपलब्ध झाल्या आहेत. त्यांत भडोच जिल्ह्यातील कावी येथे सापडलेली कुबेराची मूर्ती, कठलाल येथे सापडलेली त्रिमूर्ती, कारवाणजवळ सापडलेली लकुलीशाची मूर्ती, भिन्नमाळ येथील यक्षमूर्ती या विशेष उल्लेखनीय आहेत. इ. स. च्या १५ व्या शतकात पाटणचा सूत्रधार मंडन याने शिल्पशास्त्रावर अनेक संस्कृत ग्रंथ लिहिले असून, त्यांत विविध प्रकारच्या मूर्तींची वर्णने आहेत. मानवरूपातल्या गरुडावर आरूढ झालेल्या आठ, दहा, बारा, चौदा, सोळा किंवा वीस हात असलेल्या विष्णूची मूर्ती हे पश्चिम भारतीय शिल्पाचे एक वैशिष्ट्य होय. पाषाण मूर्तींप्रमाणेच गुजरातमध्ये अनेक सुंदर धातुमूर्तीही सापडल्या असून, त्या बौद्ध व जैन आहेत.

गुजरातेत अनेक तलाव आहेत. त्यातले बहुतेक सर्व मानवनिर्मित असून, काही थोडेच नैसर्गिक आहेत. अहमदाबाद येथील कांकरिया, बडोद्याचा सूरसागर, पाटण येथील सहस्रलिंग, कच्छमधील नारायण सरोवर, विरमगावचे मानसर, इ. तलावांचे बांधकाम फार प्रेक्षणीय आहे. त्यातील अनेक तलाव भिन्न काळी भिन्न भिन्न राज्यकर्त्यांच्या आज्ञेने बांधले गेले. तलावांप्रमाणेच या प्रदेशात असंख्य विहिरीही बांधलेल्या असून, त्यांची रचनाही कलात्मक आहे.

गुजरातमधली गरबा, रास इ. नृत्य प्रसिद्ध आहेत.

गुजराती चित्रशैली – सुमारे ५० वर्षांपूर्वी गुजरात हा एक कलाविन्मुख प्रदेश मानला जात होता. चित्रकलेच्या विचारात गुजरातचे कोणी नावही घेत नव्हते. पण इ. स. १९१० नंतर ही परिस्थिती बदलली. गुजरातमधल्या जैन ग्रंथभांडारातून कल्पसूत्रे व कालककथा यांच्या हस्तलिखित प्रती उपलब्ध झाल्या. त्या हस्तलिखित पुस्तकांवर पानोपानी रंगीत चित्रे होती. अजंटयाच्या चित्रकारीनंतर नजीकच्या काळातील चित्रकलेचे ते नमुने होते. या पोथ्या सुरवातीच्या काळात ताडपत्रावर व नंतरच्या काळात कागदावर लिहिलेल्या आहेत. अर्थात चित्रेही तशीच आहेत.



रासनृत्य – गुजरात

ही सारी चित्रे पाहिल्यानंतर इ. स. १२ ते १५ या शतकातल्या एका वेगळ्या चित्रशैलीची ओळख पटते. त्या तीन-चार शतकांच्या काळात त्या चित्रांचे स्वरूप, पात्रनिर्मिती आणि रेषांची लय, यांच्यामध्ये लवमात्रही फरक झालेला नाही. त्वरित गतीने चितारलेली ही चित्रे आपल्या रूढिबद्ध आकृती आणि विशिष्ट रंग यांनी भारतातल्या अन्य चित्रशैलींपेक्षा अगदी वेगळी दिसतात. तत्कालीन लोकजीवन समजण्याच्या दृष्टीने त्यांचा विशेष उपयोग आहे.

या चित्रांत चेहऱ्याचा सगळा भाग न दाखवता पाऊण भाग दाखवतात. त्यामुळे चित्रगत व्यक्तीचा एक डोळा चेहऱ्याच्या बाहेर जातो. नाक अणकुचीदार असते. भृकुटी धनुष्याकार दिसतात. रमणीच्या केशपाशाची एक मोठी लड कानाजवळून गालापर्यंत कुरळी होऊन येते. स्त्री-पुरुष कानांत कुंडले धारण करतात.

ही चित्रे मुख्यत्वे जैन पोथ्यांवर असल्यामुळे या चित्रशैलीला जैन चित्रशैली असे मानण्याचा प्रघात पडला होता.–पण श्री. नानालाल चमनलाल मेहता यांनी या चित्रकलेचा बारकाईने

अभ्यास करून असे घोषित केले, की या चित्रशैलीला जैन चित्रशैली न म्हणता गुजराती चित्रशैली असे म्हटले पाहिजे.



भरत आणि बाहुबली यांचे द्वंद्वयुद्ध – गुजराती शैली

तेव्हापासून लाल पृष्ठभूमीवर अंकित अशा दीड डोळ्यांच्या व अणकुचीदार नाकांच्या व्यक्ती असलेल्या चित्रांना गुजराती चित्रशैली असे अभिधान प्राप्त झाले.

वसंतविलास व बालगोपालस्तुती या दोन पोथ्यांवर गुजराती चित्रशैलीचे बरेच नमुने आढळतात. त्याचप्रमाणे गीतगोविंद, दुर्गासप्तशती, रतिरहस्य या पोथ्याही सचित्र आहेत. त्यांवरील चित्रांवरून १५ व्या शतकातील गुजराती लोकांच्या रसिकतेचा प्रत्यय येतो. त्यानंतरच्या काळातील राग-रागियांची किंवा भागवत पुराणातील विषयांची चित्रे मारवाड व गुजरात यांच्या सरहद्दीवरच्या प्रदेशात भरपूर उपलब्ध आहेत. प्रस्तुत चित्रांचे कलाकार हे लोकजीवनाचा व्यापक अनुभव घेतलेले कलावंत होते, असे दिसते. पण या शैलीची परंपरा सतराव्या शतकानंतर हळूहळू खंडित झाली. तिच्यात साचेबंदपणा आला. रंगामध्ये भडकपणा आला. व्यक्तिरेखेपेक्षा कथाकथनाला प्राधान्य आले. चेहऱ्याच्या बाहेर जाणारा मीननयन लुप्त होऊन त्या जागी चेहऱ्याच्या एका बाजूवर एकच डोळा दाखवणे, म्हणजे चेहरा पाऊण न दाखवता अर्धा दाखवणे या गोष्टी रूढ झाल्या.

अशा चित्रांची मोठी संख्या गुजरातमध्ये उपलब्ध झाली असली; तरी १३ व्या शतकानंतर या शैलीची चित्रे राजस्थान, नेपाळ, बंगाल, ओडिसा, आसाम व ब्रह्मदेश या ठिकाणीही मिळतात. म्हणून कलासमीक्षकांना असे मानावे लागले, की अशा जातीची सर्वांत प्राचीन चित्रे जिथे मिळतात, तो पश्चिम भारत हाच या सर्वत्र प्रसार पावलेल्या चित्रकलेचे केन्द्रस्थान असला पाहिजे. या चित्रशैलीला डॉ. आनंदकुमारस्वामी यांनी ' दक्षिणी राजस्थानी ' असे नाव दिले आहे. तिबेटी इतिहासकार तारानाथ यांनी आपल्या इतिहासग्रंथात शृंगधर नावाचा एक चित्रकार पश्चिम भारतात होऊन गेल्याचा उल्लेख केला आहे. त्या शृंगधराने ज्या एका चित्रशैलीचा प्रसार केला तिचाच पुढे विस्तार झाला, असे तारानाथ म्हणतात.

गुजराती शैलीच्या चित्रांनी राजपूत शैलीला जन्म दिला, असे कलासमीक्षक म्हणतात. पर्वत, नदी, वृक्ष, मेघ, क्षितिज, इत्यादींच्या आलेखनात राजपूत शैलीने जे सौंदर्य ओतले आहे, ते तिला गुजराती शैलीवरूनच प्राप्त झाले. अकबराच्या चित्रशाळेत गुजरातचे सुमारे सात चित्रकार होते व त्यात केशव, माधव व भीम हे विशेष प्रसिद्ध होते, असे श्री. वाचस्पती गैरोला म्हणतात.



वस्त्रहरण – गुजराती लोकशैली

गुजरात–सौराष्ट्रात जी भित्तिचित्रे आढळतात, ती तिथल्या हौशी कलावंतांनी काढलेली आहेत. त्या प्रकाराला शिलावत

चित्रशैली असे नाव पडले आहे. शिलावत म्हणजे पाषाणाच्या पृष्ठभागावरील चित्र होय. राजवाडे, देवालये व मोठमोठ्या हवेल्या यांच्या प्रवेशद्वारावर, मोठ्या वास्तूच्या प्रमुख दालनात व अंतःपुरात या शिलावत पद्धतीची चित्रे आढळतात. ही चित्रे पुराणांतील कथाप्रसंगांची असतात. अशी चित्रे व ती काढणारा कलाकार दृष्टीस पडणे, हे जुन्या काळी शुभसूचक मानले जात होते. त्यामुळे इमारतीच्या दर्शनी भागावर अशी चित्रे काढून घेण्याची पद्धती पश्चिम भारतात रूढ झाली. अगदी खेड्यापाड्यातील इमारतीवरसुद्धा पुण्यश्लोक नृपतींची व साधुसंतांची चित्रे काढली जाऊ लागली.

कच्छमधील शिलावत चित्रकार विशेष प्रसिद्ध होते. तिथल्या एका कलावंत कुटुंबाने सतत तीन पिढ्या जामनगरमध्ये चित्रे काढण्याचे काम केले. जामनगरच्या राजवाड्यात आजही ती चित्रे सापडतात. या चित्रात कृष्णलीला व चितळच्या लढाईतील धाडसी वीरांची चित्रे प्रामुख्याने आढळतात. तिकडील मध्यमवर्गीयांच्या घरांतसुद्धा अशी भित्तिचित्रे आढळतात. यावरून ही चित्रकला त्या भागात किती लोकप्रिय झाली होती, हे दिसून येते.

चालू पिढीतील नव्या कलाकारांना शिलावत चित्रशैलीचे सामर्थ्य व परिणाम यांची जाणीव झाली आहे. ते त्या कलाशैलीचे पुनरुज्जीवन करण्याचा प्रयत्न करीत आहेत. लाठी येथील तरुण राजकुमार श्री मंगलसिंघजी हे स्वतः निपुण चित्रकार असून, या नव्या शिलावत पद्धतीचे आश्रयदाते आहेत. दुसरे एक चित्रकार श्री. ब्रिजलाल भगत यांनी कित्येक नामांकित चित्रे काढली आहेत. गुजरातमधील काही बुद्धिमान तरुणांनी श्री. खोदीदार परमार यांच्या नेतृत्वाखाली वरील सुप्रसिद्ध कलावंतांकडून स्फूर्ती घेऊन आपला कलासंबंध पूर्वपरंपरेशी जोडण्याचा प्रयत्न चालू केला आहे.

आचार्य रविशंकर रावळ हे गुजरातमधील आंतरराष्ट्रीय कीर्तीचे चित्रकार व लेखक आहेत. त्यानी पाश्चात्य देशातही खूप प्रवास केला असून, भारतीय चित्रकलेचा संदेश परदेशापर्यंत पोचविला आहे. तरुण गुजराती चित्रकारांचा एक निष्ठावान अनुयायी वर्ग त्यांनी निर्माण केला असून, ते तरुण चित्रकारही सांप्रत कीर्ती मिळवीत आहेत.

अजंटा, बदामी व बाघगुंफा येथील चित्रकला, तसेच मोगल व राजपूत शैली यांच्या मधल्या चित्रपरंपरा आता अधिकाधिक स्पष्ट होत आहेत. त्यामध्ये गुजरात व दक्षिण राजस्थान येथील चित्रशैलीने एक छोटीशी पायवाट निर्माण केलेली असून, ती वेरूळच्या कलाकेंद्रापर्यंत जाऊन पोचते. वेरूळच्या कैलासमंदिराच्या छतावर अणकुचीदार नाकाची व दीड डोळ्याची जी चित्रे अंकित आहेत, त्यांचा संबंध गुजराती शैलीशीच जोडावा लागेल. [गुजरात; ग्लो. गु. दे.; वि. मुं. रा. प.; मु. रि.; इं. सा. कॉ. सा.; त्रिपथगा – नोव्हें. १९६२; रविशंकर एम्. रावळ – फोक लोअर, जून १९६२]

गुजराती भाषा व साहित्य

गुजरात प्रदेशात गुजराती भाषा बोलणारे सुमारे १ कोटी ६ लाख लोक आहेत. इ. स. च्या नवव्या-दहाव्या शतकात शौरसेनी ही भाषा. गुजरातपासून बंगालपर्यंतच्या सगळ्या प्रदेशात काव्यक्षम अशी मोठी भाषा होती. तिच्यातूनच गुजराती निर्माण झाली. त्यामुळे शौरसेनी आणि गुजराती यांचा संबंध मायलेकींसारखा आहे. त्याबरोबरच प्राकृत व संस्कृत यांच्याशीही गुजरातीचे नाते असल्यामुळे त्या भाषेत तत्सम व तद्भव शब्दांचा पुष्कळच भरणा आहे.

गुजरात प्रदेशाला विस्तृत समुद्रकिनारा असल्यामुळे पुरातन कालापासून इथे अरब व इतर दर्यावर्दी यांचा बराच पायरव होता. गुजरातेतले व्यापारीही अरबस्तान, आफ्रिका, इ. देशांशी व्यापार करीत होते. अशा या व्यापारी संबंधातून बरेच परकी शब्द गुजरातीत आले आहेत. प. किनाऱ्यावर दीव व दमण या ठिकाणी कित्येक शतके पोर्तुगीजांच्या वसाहती होत्या. त्यामुळे पोर्तुगीज भाषेतूनही गुजरातीत पुष्कळ शब्द घुसले आहेत. मराठी व कन्नड या भाषेतूनही तिने काही उचल केली आहे.

गुजराती लिपी देवनागरीचेच एक वेगळे रूप आहे. पण तिने नागरीची शिरोरेखा झुगारून दिली असून, काही अक्षरांच्या आकृत्याही बदलल्या आहेत. त्यांच्या उच्चारात विवृत अॅ आणि ऑ यांचा प्रयोग चांगल्या प्रकारे होतो. लेखनात विशिष्ट चिह्नांनी तो दाखवीत नाहीत; पण बोलताना त्यांचा उपयोग आवर्जून करतात. ‘बैठो’, ‘छे’, ‘कोयल’ इ. शब्दांत विवृत अॅ आणि ऑ दिसतात. गुजरातीत कंठ्य ‘ह्’ च्या नंतर औरस्थ ‘ह’चा प्रयोग कधी कधी होताना दिसतो. उदा० ब्राह्मण, आह्वान, इथे ‘ह’ ध्वनी छातीतून काढतात. काही तद्भव शब्दांतही ‘ह’ ध्वनी अल्पमात्रेने कानावर पडतो. उदा० अमे, तमे, ज्योर, त्यारे इ. शब्द. या उच्चारणाला ‘ह’ श्रुती म्हणतात. याच प्रकारे काही शब्दांत ‘य’ ध्वनीही ऐकू येतो. उदा० आंसला-आंस्य लावला-लाव्य, दोरडूला-दोयडू. याला ‘य’ श्रुती म्हणतात. कोमल चंद्रबिंदू (ँ) चा लिहिण्यात उपयोग करीत नाहीत; पण उच्चारणात तो व्यवस्थित उच्चारतात. गुजरातीत कुठे कुठे च, छ, ज, झ चे उच्चारण प्राकृतमधून आले आहे. पण साहित्यिक भाषेत त्यांचा शुद्ध तालव्य उच्चार होतो. ‘झ’चे उच्चारण मराठीत ‘झ’ होते;

हिंदीत 'ग्य' होते; तर गुजरातीत 'ग्न' होते. गुजरातीत विभक्तिप्रत्यय शब्दाच्या बरोबरीनेच लागतो. संस्कृताप्रमाणे लिंगेही तीन आहेत. सामान्यतः ओकारान्त शब्द पुंलिंगी, ईकारान्त शब्द स्त्रीलिंगी आणि उकारान्त नपुंसकलिंगी असतात. वचने दोनच आहेत. 'ओ' लावला, की एकवचनाचे अनेकवचन बनते.

गुजराती भाषेला तिथल्या जुन्या कवींनी गुजराती न म्हणता प्राकृत किंवा अपभ्रंश असेच म्हटले आहे. उपलब्ध माहितीप्रमाणे महाकवी प्रेमानंद यानेच तिला पहिल्याप्रथम गुजराती असे नाव दिले. 'बांधु नागदमण गुजराती भाषा' असे त्याचे वाक्य आहे. इ. स. च्या १० व्या शतकापासून तो आजतागायत या भाषेचा विकासक्रम सुस्पष्ट दिसतो. या भाषेत प्रत्येक शतकाच्या भाषेचे नमुने उपलब्ध आहेत. गेल्या हजार वर्षांचा तिचा इतिहास पुढील प्रकारे विभागून दाखवता येतो—

(१) गौर्जर अपभ्रंश (अथवा प्राचीन गुजराती)— इ. स. ११ व्या शतकापासून १४ व्या शतकाच्या पूर्वार्धापर्यंत.

(२) गुर्जर भाषा (अथवा मध्यकालीन गुजराती)— १४ व्या शतकाच्या उत्तरार्धापासून १९ व्या शतकाच्या मध्यापर्यंत.

(३) अर्वाचीन गुजराती — इ. स. १८५० ते चालू काळापर्यंत.

गौर्जर अपभ्रंश — या काळाला जुन्या गुजरातीचा काळ असे म्हणता येईल. सांप्रतच्या शुद्ध गुजरातीची बीजे याच काळात पेरली गेली. या काळातले साहित्य पुराणे व महाकाव्ये यांच्यावर आधारलेले आहे. त्याचबरोबर धर्मकथा, प्रेमकथा व साहसकथा अशा स्वरूपातही बरेच साहित्य उपलब्ध आहे. या कथा काही अंशी धार्मिक व नैतिक स्वरूपाच्या आहेत. या कथासमूहात तरंगलोला ही कथा श्रेष्ठ दर्जाची ठरते. हिचा जनक पदलिप्ताचार्य नावाचा एक जैन आचार्य होता. ही कथा सुरवातीस शृंगारिक व अंती वैराग्यशील झाली आहे.

इ. स. ७४६ पासून १२९८ पर्यंत गुजरातवर राजपुतांची सत्ता होती. त्या काळात ब्राह्मण व जैन पंडित संस्कृत भाषेत ग्रंथरचना करीत. पण १० व्या शतकाच्या सुमारास भाट व चारण यांनी रासो नामक एक राजस्तुतिपर असा काव्यप्रकार प्रचारात आणला. हे रासग्रंथ म्हणजे व्रज, मारवाडी व इतर भाषा यांची सरमिसळ खिचडीच होती. सुरवातीस उच्चवर्गीय पंडितांनी या रासांकडे दुर्लक्ष केले; पण हां हां म्हणता तो काव्यप्रकार लोकप्रिय झाल्यामुळे पुढे उच्चवर्गीय पंडितही संस्कृत व प्राकृत अशा उभय भाषांत रासग्रंथ रचू लागले.

हे राससाहित्य विदग्ध, चतुर व रसाळ असले, तरी त्याला जनजीवनाचा स्पर्श नव्हता. कारण ज्यांनी ते रचले ते लोक जनतेपासून फार दूर होते; पण इ. स. १२९८ साली अलाउद्दीन खिलजीने गुजरातचा पाडाव केला आणि त्यामुळे चालुक्यांच्या कृपाछत्राखाली आरामात कालक्रमणा करणाऱ्या पंडितांना व कवींना पळता भुई थोडी झाली. ते राजधानीचा त्याग करून खड्यापाड्यांच्या आश्रयाला आले.

या कालात त्यांना सामान्य जनतेची खरी ओळख झाली. लोकांच्या आकांक्षा, भावना व श्रद्धा त्यांना समजून आल्या. मग पूर्वीच्या कल्पितापेक्षा सांप्रतच्या वास्तवातच त्यांना खुमासदार काव्यविषय मिळू लागले आणि त्यांच्या या वेगळ्या अनुभूतीतून गुजराती साहित्याची नवप्रभात उगवली.

रास, फागू, बारमासी, प्रबंध, इ. साहित्यप्रकार याच कालखंडाची संतती होय. रास म्हणजे गानयोग्य काव्यप्रबंध. त्याची रचना आटोपशीर व भावनाप्रधान असते. शालिभद्रसूरिकृत भरतेश्वर-बाहुबली हा रास सर्वांत प्राचीन समजला जातो. हा जैन रास आहे. त्यात त्या दोघा राजपुत्रांचा परस्पर युद्धप्रसंग, बाहुबलीला झालेले वैराग्य व अखेर त्याला झालेली केवलज्ञानाची प्राप्ती हे विषय वर्णिले आहेत. विजयसेनकृत रेवंतगिरिरास, विनयचंद्रकृत नेमिनाथचतुष्पादिका, जिनधरकृत कंछूलीरास, गौतमरास, पंचपांडवचरित्ररास, मुंजरास, इ. रास निर्माण करण्यांत जैन कवींनी खरोखर विक्रम केला आहे. आपल्या धर्माच्या प्रसारासाठी त्यांनी हा रासोद्योग जिवाच्या तळमळीने केला. म्हणून या कालखंडाला समीक्षकांनी रासयुग असेच नाव दिले आहे.

फागुकाव्ये म्हणजे फाल्गुन महिन्यात गायची गीते. त्या गीतांतून वसंतोत्सवाचे आणि त्यात विहार करणाऱ्या नरनारींचे विलासमय वर्णन असते. नायक-नायिकेचा शृंगार हा त्यातला मुख्य विषय आणि निसर्गवर्णन हा आनुषंगिक विषय होय. स्थूलिभद्रफागू ही फागुकाव्यातली पहिली कृती मानतात. मात्र त्या काव्यातला वर्ण्य ऋतू वसंत नसून वर्षा आहे. याच्या कथेचा सारांश असा—

स्थूलिभद्र नावाचा एक जैन साधू असतो. तो चातुर्मासासाठी पाटलिपुत्र नगरात येतो. तिथे त्याची पूर्वाश्रमीची प्रेयसी राहत असते. ती असते एक वारयोषिता. तिचे नाव कोषा. स्थूलिभद्र अजाणता तिच्या दारी भिक्षेसाठी जातो. त्याला पाहताच तिचा जीव उत्कंठित होतो. त्याच्यासह विलासात घालवलेल्या मधुमती रात्री तिला आठवतात. मग तिला वाटते, की पुन्हा एकदा तसेच घडावे. म्हणून मग ती गणिका स्थूलिभद्राला नाना प्रकारची प्रलोभने दाखवून त्याला अनंगाच्या राज्यात ओढायचा प्रयत्न करते. पण स्थूलिभद्राचा मनःसंयम ढळत नाही.

ही एक वानगी झाली. अशी अनेक फागुकाव्ये आहेत. नेमिनाथफागू, जंबुस्वामीफागू अशी त्यांची नावे आहेत. फागुकाव्येसुद्धा मुख्यत्वे जैनांनीच रचली आहेत. या सर्व काव्यांचा मुकुटमणी शोभेल, असे फागुकाव्य म्हणजे वसतविलास ! त्याला त्या युगातले सर्वश्रेष्ठ काव्य समजतात. पण इतक्या त्या सुंदर काव्याचा कवी मात्र अज्ञात आहे.

बारमासी म्हणजे वर्षाच्या मासचक्राचे नायिकेच्या विरहातुर भावनेतून केलेले चित्रण होय. ही एक नायिका पाहा—

तिचा प्रियकर परदेशी गेलेला आहे. प्रत्येक मासात ती त्याच्या प्रतीक्षेसाठी नेत्रांच्या पणत्या करून बसते. तिला वाटते, की तो चैत्रात येईल. चैत्र गेला, तर वैशाखात उगवेल...पण तो येत नाही. वर्षाच्या शेवटच्या महिन्यात तो येतो आणि उभयतांच्या उपासाचे पारणे फिटते.

बारमासी हा एक ऋतुगीताचाच प्रकार आहे. दयाराम, दलपतराम, नर्मदाशंकर वगैरे उत्तर युगातल्या कवींनीही बारमासीचा प्रकार हाताळला आहे.

प्रबंध म्हणजे ऐतिहासिक आणि चरित्रात्मक आख्यानकाव्य. गुजराती भाषेत असे अनेक प्रबंध आहेत. पण त्या सर्वांत ओजस्वी आणि वीररसाने भरलेला ग्रंथ म्हणजे कान्हडदे प्रबंध. याचा कर्ता झालोरचा पद्मनाथ नावाचा कोणी राजकवी आहे. इ. स. १४५६ साली त्याने ही वीरगाथा रचून गुजराती शारदेला एक रत्नजडित अलंकार वहाल केला. श्री. साकरलाल याज्ञिक यांच्या लेखानुसार त्या काव्याचा सारांश असा—

करण वाघेला नावाचा एक पुरुष इ. स. १२९३ साली गुजरातच्या गादीवर आला. माधव नावाचा त्याचा मुख्य मंत्री होता. त्याने आपल्या राजाशी दगाबाजी करून दिल्लीच्या अलाउद्दीन खिलजीला गुजरातेवर स्वारी करण्यासाठी बोलावून आणले. अलाउद्दिनाचा सरदार अलफखान गुजरातवर चालून आला, त्या वेळी झालोर येथे कान्हडदे (कृष्णदेव) नावाचा राजा राज्य करीत होता. तो आपल्या राज्यातून मुसलमानी सैन्याला मार्ग देईना. त्यामुळे अलफखानाला मोडासाच्या रस्त्यांने वळसा घेऊन जावे लागले. अलफखानाने त्या मोहिमेत गुजरातेतली अनेक शहरे विध्वंसिली. सगळीकडे हलकल्लोळ माजवून शेवटी अलफखान झालोरकडे वळला. पण कान्हडदे सावध होता. त्याने अलफखानाच्या हल्ल्याला निकराने तोंड देऊन त्या मुसलमान सरदाराला यथेच्छ खडे चारले. अलफखान शेवटी पळून गेला. अलाउद्दीन खिलजीने तो दंश मनात ठेवला. काही वर्षांनंतर अलाउद्दीन खिलजी स्वतःच मोठे सैन्य घेऊन झालोर गडावर धाविन्नला. त्याने प्रथम किल्ला वेढला. पण तेवढयाने काम भागेना. गडावरचा बंदोबस्त पक्का होता. गडाच्या तटात अलाउद्दिनाचे बोटही शिरकेना. पण शेवटी फंदफितुरी त्याच्या कामी आली. एक देशद्रोही त्याच्या गळाला अडकला. त्यामुळे अलाउद्दिनाचे कार्य साधले. कान्हडदे आणि अलाउद्दीन यांच्यामध्ये झालेल्या रणधुमाळीत झालोरगडाचा पाडाव झाला. कान्हडदे तर लढता लढता मेलाच; शिवाय त्याचा पुत्र वीरमदे हाही कामी आला. अलाउद्दीन विजयाचा जल्लोष करीत गडाची वाट चढू लागला. गडावर कान्हडदेची राणी होती. तिने तो बाका प्रसंग ओळखला. आता आपल्या अब्रूवर घाला येणार हे जाणून त्या साध्वीने जोहार केला व आपली अब्रू राखली.

कान्हडदे प्रबंध हे एक अतुलनीय वीरकाव्य आहे. ते वाचताना, ऐकताना गुजराती माणसाची काया शहारते, थरारते. जयसिंह सिद्धराजाच्या वेळचे एक पराक्रमी युग काळाच्या ओघात लुप्त होऊ घातले होते; पण या कविश्रेष्ठाने ते या काव्याच्या रूपाने चिरंजीव करून ठेवले आहे. जयसिंहाने गुजरातच्या भूमीत जे पराक्रमाचे, पुरुषार्थाचे बीजारोपण केले होते, त्याला या काव्याच्या रूपाने भरघोस फळ धरले. गुजरातवर चालून आलेल्या परकीय आक्रमकांविरुद्ध छातीचा कोट करून ते वीरपुरुष लढले. त्यांनी त्या भूमीवर अक्षरशः रक्ताचा सडा शिंपला. ते युद्ध परिणामी त्यांना महागच पडले; पण त्यातूनच पुढच्या अनेक पिढयांना चैतन्याचे स्फुरण देणारे हे वीरकाव्य जन्माला आले.

गुर्जर भाषा — इथून पुढे गुजराती साहित्यात भक्तियुग अवतीर्ण होते. नरसी मेहता, मीरा, अखो, प्रेमानंद, सामळभट, दयाराम हे या युगाचे उद्गाते होत. नरसी हा गुजराती भक्तकवींचा मुकुटमणी आहे. त्याचा काल इ.स. १४१४ ते १४८० हा निश्चित केला गेला आहे. तो सौराष्ट्राचा सुपुत्र आहे. तळाजा हे त्याचे जन्मगाव. केवळ गुजरातेतच नव्हे; तर पश्चिम राजस्थानातही त्याच्याविषयीचा भक्तिभाव जागृत आहे. शामळदासनो विवाह, हार, हुंडी, मामेरू, राससहस्रपदी, शृंगारमाला, असे त्याचे विपुल काव्यसाहित्य आहे. गुजराती आख्यानकाव्यांचा तो जनकच म्हटला पाहिजे. त्याची कित्येक आध्यात्मिक पदे आजही गुजरातेत प्रातःस्मरणासारखी म्हटली जातात. त्यांना प्रभातिया अशी संज्ञा आहे.

शृंगार व भक्ती असे नरसीच्या कवितेचे दोन मुख्य रस आहेत. त्याचा शृंगारही शेवटी भक्तिरसात विलीन होतो. कृष्ण व राधा यांच्या शृंगाराची कित्येक पद्ये जयदेवाच्या पद्धतीवर त्याने रचली आहेत, त्यातला एक नमुना असा——

कुंजसमीपे आवीया कुंवरीने तेडी कुमार
एकान्तस्थाने रची शय्या मळी करी रे विहार ।

भूधरे भीडी हृदेशुं चुंबन लीधुं गाल
रसीओ ते रस प्रीते पीडा कंद्रप रस रसाळ ।।

अर्थ – राधा-कृष्ण कुंजात आली. राधेने एकांत स्थळी शय्या रचली. दोघांनी मिळून विहार केला. राधेचे स्तन कृष्णाच्या हृदयाला भिडले. त्याने तिच्या गालांची चुंबने घेतली. कृष्ण रसिक होता. तो त्या शृंगाररसाने संतुष्ट झाला. राधेला ती मदनपीडा रसाळ वाटली.

नरसीनंतरचा काळ येतो मीराबाईचा. तिची पदे व्रज, राजस्थानी व गुजराती अशा तीन्ही भाषांत आढळतात. तिची मातृभाषा राजस्थानी; पण बराच काल द्वारकेत वास्तव्य केल्यामुळे तिला गुजरातीही चांगले येत होते. तिची किती तरी पद्ये गुजरातीत आहेत.

मीरेनंतर नाव घेण्याजोगा गुजराती कवी म्हणजे अखो भगत. याने पंचीकरण, गुरु-शिष्यसंवाद, अखेगीता, इ. अनेक ग्रंथ रचले आहेत. याचे फुटकळ काव्यही पुष्कळच आहे. हा कवी दंभ, मिथ्याचार, भोंदूगिरी या दुर्गुणांचा वैरी आहे. जिथे जिथे तसले काही त्याला दिसते, तिथे तिथे त्याच्या पाठीत आसुडाचा फटका मारल्याशिवाय तो पुढे जातच नाही.

या कालात भालण, भीम, वच्छराज, वस्तो, तुळशी, इ. अनेक कवी होऊन गेले आणि त्यांनी आपापल्या परी गुजराती भाषेला नटविले, सजविले.

वरील अनेक कवींनी गुजराती भाषेची सेवा केली, हे खरे; पण गुजरातीला उच्च साहित्यिक भाषेचा दर्जा मिळवून दिला, तो प्रेमानंद या कवीने. गुजरातीत चांगले वाङ्मय निर्माण केल्याशिवाय पागोटे घालणार नाही, अशी त्याची प्रतिज्ञा होती आणि त्याने ती पुरी केली. गहन अर्थाच्या अभिव्यक्तीला संस्कृताइतकीच गुजराती भाषा ही समर्थ ठरू शकते, हे त्याने पटवून दिले. याच्या नावावर सुमारे ५० काव्यग्रंथ आहेत. त्यांतली बरीचशी काव्ये ही रामायण-महाभारतातली आख्यानेच आहेत. त्याने निर्मिलेली पौराणिक पात्रे त्याच्या काळातली गुजराती माणसेच वाटतात. वसुदेव-देवकी, कृष्ण-यशोदा, इ. सर्वांना त्याने गुजराती बनवून टाकले आहे.

नरसी मेहत्याच्या चरित्रातील तीन-चार प्रसंगांवर त्याने इतकी उत्कृष्ट काव्ये रचली, की ती आजतागायत गुजरातेतील आबालवृद्धांच्या तोंडी आहेत. सामळदासनो विवाह, कुंवरबाईनू मामेरू, नरसिंह मेहेतानी हुंडी ही ती काव्ये होत.

ज्या वाहनातून नरसी मेहता व त्याचे संवगडी यांनी द्वारकेची यात्रा केली, त्या यात्रेचे वर्णन प्रेमानंदाने पुढीलप्रमाणे केले आहे –

जुनी न्हेल ने धुसरी वांकी, सांगी सोटा भांगीजी,
कोना तळवाते कोनी पीजणिये, बळद आण्या बे भागीजी
व्हलनी पूंठे कोथलो बांध्यो मांहि भर्यां वाजित्रंजी,
गांठडी एक गोपीचंदननी, तुलसी काष्ठ पवित्रजी,
बळहीणा बळदो शुं हिंडे, ठेले वैष्णव साथजी,
सोर पाडे ना ढाळ चढावे, जे जे वैकुंठ नाथजी,
एक बळद गळियो थई बेसे आखळो ताणीजाय जी
पड्याने पुंछ ग्रही उठाडे, कौतुक कोटीथाय जी
सालेसाल जूजवां दीसे, रथ तणां बहुवक्रजी
सांगीनो बहु शब्द जो उठे, चूचवे छे बहुचक्रजी
चडे बेसेने वळी उतरे, ले रामकृष्णनु नामजी
मध्यान्हे मेहेताजी आठ्या जो ना मळयूं उनागामजी,

अर्थ – त्यांची गाडी जुनी होती. जू तर मोडले होतेच; शिवाय साटीच्या काठ्याही मोडल्या होत्या. चाकाची धाव दुसऱ्या चाकाची, तर बाकीचा भाग तिसऱ्याच चाकाचा. बैल उसने. गाडीतले सामान म्हणजे एका पोत्यात निरनिराळी वाद्ये, तर दुसऱ्या पोत्यात गोपीचंदन व तुळशीची काष्ठे. गाडीचे बैल मरतुकडे असल्यामुळे ते एकसारखे दमत. मग आत बसलेले वैष्णवजन खाली उतरून ती गाडी पुढे ढकलीत. रस्ता चढणीचा असला म्हणजे ते सर्वजण पाठीमागून गाडी ढकलीत व आरडा ओरडा करून बैलांना हाकीत. अशा रीतीने गाडी एकदा चढ चढून गेली, म्हणजे मग सर्वजण द्वारकाधीशाचा जयजयकार करीत. कधी गाडीचा एक बैल बसकण घेई, तर दुसरा तसाच पुढे चाले. मग ते बसलेल्या बैलाला शेपटी पिळून उठवीत. अशा प्रकारचे अनेक कष्ट त्यांना प्रवासात होत. गाडीची चाके कुरकुरत. साटी विचित्र आवाज करी. पण हे वैष्णवजन गाडीत चढत, उतरत, पुन्हा चढत व अशा रीतीने रामकृष्णहरीचा जयघोष करीत आपला मार्ग क्रमीत. मध्यान्हीच्या सुमाराला हे सगळे एखाद्या मुक्कामाला उतरले म्हणजे नरसी मेहेत्याचे दर्शन घ्यायला सारे गाव लोटत असे.

नलाख्यान, उखाहरण व दशमस्कंध ही प्रेमानंदाची काव्ये गुजरातेत सर्वत्र वाचली व ऐकली जातात. प्रेमानंद हा रससिद्ध कवीश्वर आहे. गुजरातच्या सुसंस्कृत अशा कौटुंबिक जीवनाचा तो भाष्यकार आहे.

सामळभट हा त्याच काळातला आणखी एक प्रसिद्ध कवी होय. संस्कृत, हिंदी, फारसी, इ. भाषा तो उत्तम जाणत होता. त्याच्या नावावर एकूण सव्वीस काव्ये आहेत. त्यातली पद्मावती, रावण-मंदोदरीसंवाद, उद्यमकर्मसंवाद, मदनमोहना, रखीदासनी चरित्र, इ. आख्यानकाव्ये फार प्रसिद्ध आहेत. त्याच्या काव्यात जागोजाग सुभाषिते व नीतिवचने आढळतात. उदा०

पोटामुळे माणसाला कोणकोणते अनर्थ सोसावे लागतात, हे सांगताना तो म्हणतो—

पेट करावे वेठ, पेट वाजा वडवावे
पेट उपडावे भार, पेट गुण सौना गावे
पेट भमे परदेश, पेट थी पाप करे छे
पेट करे छे जार, पेट थी सत्य हरे छे।

अर्थ – पोट वेठ करायला लावते. ते वाजा वाजवायला लावते. ते बोजा उचलायला लावते. ते शेकडो लोकांचे गुणगान करायला लावते. ते परदेशी भ्रमायला लावते. पोटामुळेच पाप होते, व्यभिचार घडतो व सत्य पसार होते.

सामळभट या कवीचे विचार तत्कालीन समाजाच्या फार पुढे गेलेले होते. त्याचे अनुकरण करणारा कोणी कवी आढळत नाही. अखो, प्रेमानंद व सामळभट यांनी गुजराती भाषा लोकप्रिय केली व तिचे क्षेत्रही व्यापक केले.

यानंतर आणखी एक तोलामोलाचा कवी भेटतो, तो म्हणजे दयाराम हा होय. नरसी, प्रेमानंद व दयाराम ही गुजराती काव्याची त्रिमूर्ती होय. दयाराम हा मध्ययुगातला शेवटचा गुर्जरकवी आहे. तो वल्लभसंप्रदायी होता. तो प्रणयकवी म्हणून प्रसिद्ध आहे. गुर्जर साहित्यकार त्याला इंग्रज कवी बायरन याच्या पंक्तीला बसवतात. दयारामाने श्रीकृष्णाच्या बासरीला उद्देशून एक भावकविता लिहिली आहे. ही कविता म्हणजे गुजराती साहित्याचा एक रसालंकार आहे. पण त्याहूनही दयाराम हा गुजराती जनतेचा कंठमणी कशाने झाला असेल, तर तो त्याच्या गर्व्यांनी. त्याला गर्बीसम्राट असेच म्हणतात. त्या गर्व्यांत त्याने राधाकृष्णांना लक्षून शृंगाररसाची निर्झरिणी वाहवली आहे. 'माधुर्यी मधुरता। शृंगारी सुरेखता' हे त्याच्या गर्व्यांचे शोभन लक्षण आहे. त्याच्या राधा–कृष्णविषयक शृंगारकाव्याचा एक नमुना असा—

रमीशुं रातडी रे, आवनो अलबेलाजी घेर।
कहे जोमाते नर गाय एक खोवाणी छे आज।
जाऊ शुं शोधवांरे बांध जो पाणी पहेली पाज।
सासरी आं थकी रे मारो आवास छे एकांत
राखीश दीवडो रे माणीशुं मनमानी मोज

अर्थ – प्रियकरा, तू माझ्या घरी ये म्हणजे आपण दोघे रात्री प्रेमात तल्लीन होऊ. (हे कृष्णा), तू तुझ्या आईला सांग, की माझी गाय चुकली आहे व मी तिच्या शोधाला जातो. अशा रीतीने थाप मारून तू माझ्याकडे ये. माझी निजायची खोली अगदी एका बाजूला व स्वतंत्र आहे. तुला मार्ग कळावा, म्हणून मी त्या खोलीत दिवा जळत ठेवते. तू आलास म्हणजे मग आपण मनसोक्त सुख उपभोगू.

दयारामाची कविता विपुल आहे. गीतामाहात्म्य, रसिकवल्लभ, अजामिळाख्यान, प्रेमरसगीता, नरसिंह मेहतानी हुंडी, उखाहरण, इ. ग्रंथ त्याच्या नावावर आहेत. त्याच्या एकंदर काव्याचे धार्मिक, नैतिक व शृंगारिक असे तीन विभाग पडतात. नैतिक व शृंगारिक काव्यापेक्षा त्याची धार्मिक काव्ये संख्येने अधिक आहेत. नरसी मेहत्याच्या रूपाने गुजरातेत ज्या भक्तियुगाचा प्रादुर्भाव झाला, त्या युगाचा अंतिम कवी दयाराम होय.

अर्वाचीन गुजराती – दयारामाच्या काळातच भारतात इंग्रज स्थिरपद झाले. ही राजवट नवे वारे घेऊन आली होती. युरोपीय साहित्याच्या द्वारे भारतात एका नव्या विचारप्रधान संस्कृतीचा उदय होऊ लागला होता. आता देवांचे युग संपून मानवांचे युग सुरू झाले होते. नवे लेखक, नवे कवी नव्या विचारांची उपायने घेऊन पुढे सरसावत होते. त्यामागचे भक्तियुग दयारामांच्या मृत्यूने संपत होते आणि नर्मदाशंकर यांच्या रूपाने एक नवे युग अवतरत होते. इ. स. १८१८ सालच्या खडकीच्या लढाईनंतर गुजरात ब्रिटिशांच्या सत्तेखाली गेला. या सत्तेने गुजरातच्या मुलखात शांतता व सुरक्षितता प्रस्थापित केली. गुजराती तरुण इंग्रजी शाळा व कॉलेजे यांतून शिक्षण घेऊन पुढे येऊ लागले. त्या शिक्षणाने त्यांची दृष्टी फाकली. या नव्या युरोपीय संस्कृतीने त्यांचे डोळे दिपवले. त्या ज्ञानाच्या झगमगाटात आपल्या धर्मातल्या व समाजातल्या कित्येक गोष्टी त्यांना हिडिस दिसू लागल्या. आपला समाज विज्ञानाधिष्ठित व्हावा व समाजात आमूलाग्र सुधारणा व्हावी, म्हणून कित्येक तरुण देशात नव्या सांस्कृतिक संस्था उभारण्याचा प्रयत्न करू लागले.

सुधारणांच्या या पहिल्या अवस्थेत युरोपियन संस्कृतीशी संबंध आलेला दलपतराम हा पहिला कवी होय. त्याला कवीश्वर अशी उपाधी लाभली. त्याने वेनचरित्र हे एक दीर्घकाव्य लिहून विधवाविवाहाचा पुरस्कार केला. श्री. फोरबस् या गोऱ्या साहेबाने गुजरात व्हर्नाक्युलर सोसायटीत सेक्रेटरी म्हणून त्याची नेमणूक केली. दलपतराम व त्याच्या बरोबरीचे अन्य काही सुधारक कवी हे समाजातल्या अनिष्ट चालींचा निषेध, सुधारणांची तरफदारी व शिक्षणप्रसाराला उत्तेजन एवढ्याच माफक गोष्टी करू शकले. यापुढचे पाऊल त्यांना उचलता आले नाही. ती कामगिरी नर्मदाशंकर कवीला उचलावी लागली. त्याने पाश्चिमात्य संस्कृतीची निश्चित मूल्ये कोणती, ते स्वतःच्या बुद्धीने ठरवून त्यांवर भर दिला. नर्मदाने मुख्य गोष्ट कोणती केली असेल, तर ती म्हणजे मानवी स्वातंत्र्याविषयी प्रेम आणि मानवी आत्म्याविषयी आदरभाव दाख

विष्याची. सुधारणा वेगवान झाली पाहिजे अशा मताचा तो होता. एक हिंमतबाज माणूस व गुजरातच्या नवजीवनाचे एक प्रतीक म्हणून गुजरात देश त्याच्याकडे पाहतो. गुजरातच्या भूमीचे आणि निसर्गाचे त्याने अनेक पवाडे गायिले आणि मानवी स्वातंत्र्याचेही मुक्त कंठाने गुणगान केले आहे.

અ	આ	ઇ	ઈ	ઉ	ઊ	ઋ	ૠ	ઌ	એ	ઐ	ઓ	ઔ
अ	आ	इ	ई	उ	ऊ	ऋ	ॠ	ऌ	ए	ऐ	ओ	औ

ં	ઃ	ક	ખ	ગ	ઘ	ઙ	ચ	છ	જ	ઝ	ઞ	ટ	ઠ
अनुस्वार	विसर्ग	क	ख	ग	घ	ङ	च	छ	ज	झ	ञ	ट	ठ

ડ	ઢ	ણ	ત	થ	દ	ધ	ન	પ	ફ	બ	ભ	મ	ય	ર
ड	ढ	ण	त	थ	द	ध	न	प	फ	ब	भ	म	य	र

લ	વ	શ	ષ	સ	હ	ળ	ક્ષ	જ્ઞ
ल	व	श	ष	स	ह	ळ	क्ष	ज्ञ

गुजराती लिपी—श्री. नरवणे यांच्या भारतीय व्यवहारकोशावरून

इ. स. १८५७ साली मुंबई विद्यापीठाची स्थापना झाली. या विद्यापीठात येणारे तरुण युरोपचा इतिहास, तत्त्वज्ञान व साहित्य यांचे अध्ययन करीत. संस्कृतातले धार्मिक ग्रंथ व काव्य-नाटकादी साहित्य त्यांना युरोपीय पंडित शिकवीत. त्यामुळे त्यांच्या मनांत राष्ट्रीयत्वाची भावना जागृत झाली. पाश्चात्य संस्कृतीच्या भपक्याने दिपून न जाता हे विद्यापीठातले विद्यार्थी भारतीय परंपरेलाच अधिक चिकटले. १९ व्या शतकात युरोपमध्ये मानवतावादाची एक नवी हवा पसरली. या मानवतावादाशी हे तरुण विद्यार्थी तादात्म्य पावले. त्यांचे लेखन तशा पद्धतीने सुरू झाले. या नव्या लेखकात नरसिंहराय दिवेटिया यांचे नाव प्रामुख्याने घेतले जाते. विशाल वाचन, स्पष्ट विचार व प्रामाणिक मतप्रदर्शन हे दिवेटियांचे विशेष गुण होत. ते त्यांच्या जमान्यातले अतिरथी साहित्यिक होते.

वर्ड्स्वर्थचे निसर्गवादी अनुयायीही गुजरातेत बरेच निर्माण झाले. कलापी हा त्या संप्रदायातला लोकप्रिय कवी होय. त्याची सर्व काव्ये 'कलापीनो केकारव' या नावाने प्रसिद्ध झाली आहेत. गुजराती जनता त्याला प्रेमाचा कवी म्हणून ओळखते. कलापीने गुर्जर रसिकांना भारून टाकले. दलपतराम व झवेरचंद मेघाणी यांच्याखेरीज दुसऱ्या कोणत्याही अर्वाचीन कवीला कलापीच्या इतकी लोकप्रियता मिळाली नाही. कलापी हा गज़ला लिहिण्यात मोठे पटाईत होता. आपनी यादी नामक त्याच्या गज़लाचा एक नमुना असा —

ज्यां ज्यां नझर मारी ठरे यादी भरी त्यां आपनी
आंसू महीं ए आंखथी यादी झरे छे आपनी
माशुकोना गालनी लाली महीं लाली अने
ज्यां ज्यां चमन ज्यां ज्यां गुलो त्यां त्यां निशानी आपनी
तारा उपर तारा तणां झूमी रह्यां जे झूमखां
ते याद आपे आंखने गेबी कचेरी आपनी
भूली जवाती छो बधी लाखो किताबो सामटी
जोयुं न जोयुं छों बने जो एक यादी आपनी

अर्थ — जिथे जिथे माझी दृष्टी जाते, तिथे तिथे मला तुमचे स्मरण होते. डोळ्यांतून अश्रू गळत असते, तर त्यांतूनही तुमचेच स्मरण झिरपले असते. माशुकाच्या गालाच्या लालीतही मला तुमच्याच स्मरणाची लाली दिसते. जिथे जिथे उद्याने आणि फुले आहेत, तिथे तिथे सर्वत्र मला तुमच्या स्मरणाच्या खुणा दिसतात. नभोवितानात तारकांचे अनेक पुंज पाहताना माझ्या डोळ्यांना तुमच्या भव्य, दिव्य दरबाराचे स्मरण होते. आतापर्यंत वाचलेली आणि अभ्यासलेली पुस्तके विसरली गेली तरी चालतील; पण तुमचे स्मरण मात्र कायम राहायला हवे.

ACC No. 84114

याच काळातले आणखी एक प्रथितयश कवी म्हणजे मणिशंकरभट्ट अर्थात कांत हे होत. या कवीने सात खंडकाव्ये लिहिली आहेत.

गोवर्धनराम त्रिपाठी हा एकोणिसाव्या शतकाच्या अखेरचा मोठा गद्यलेखक मानला जातो. सरस्वतीचंद्र ही त्याची चार खंडांत विस्तारलेली कादंबरी होय. ती पुरी करायला त्याला चौदा वर्षे लागली. या कादंबरीसारखी कादंबरी गुजराती साहित्यात अद्याप निर्माण झालेली नाही. तिचे थोडक्यात कथानक श्री. साकरलाल याज्ञिक यांनी सांगितले आहे, ते असे——

सरस्वतीचंद्र हा या कादंबरीचा नायक. तो तरुण आहे, सुशिक्षित आहे, तसाच धनकनकसंपन्नही आहे. कुमुदसुंदरी नावाच्या एका लावण्यवती सुशील कन्येशी त्याची सोयरीक ठरते; पण काही कारणामुळे सरस्वतीचंद्र गृहत्याग करून पळून जातो. ते लग्न फिस्कटते. कुमुदसुंदरी प्रमादधन नावाच्या एका असंस्कृत तरुणाला माळ घालते. त्यानंतर तिला जगरहाटीचे नाना प्रकारचे अनुभव येतात. पुढे तिचा पती मरतो आणि नंतर ती सुंदरगिरी नावाच्या एका पर्वतावर जाते. तिथल्या आश्रमात तिला सरस्वतीचंद्र भेटतो. तिथे ती दोघेही आजन्म देशसेवेचे व्रत घेऊन राहतात. कुमुदसुंदरीबरोबर आपण राहतो, म्हणून लोकांनी आपली कूट खाऊ नये, यासाठी सरस्वतीचंद्र, तिची धाकटी बहीण कुसुमसुंदरी हिच्याशी लग्न करतो.

ही केवळ कादंबरीच नव्हे; तर एका मानसशास्त्रज्ञाने रचलेला विश्वकोशच आहे, असा तिच्याविषयीचा अभिप्राय श्री. उमाशंकर जोशी हे व्यक्त करतात. गुजरातेत त्रिपाठीचे अनुकरण बरेच झाले.

याच काळातील आणखी एक मोठा कवी म्हणजे नंदलाल. याने मुक्तछंदात अनेक प्रासादिक भावकाव्ये लिहिली. हा अद्भुतरम्यतावादी कवी होता. नरसी व मीरा यांच्या नंतर गुजराती भावकवीचे नाव सांगायचे, तर ते नंदलालाचेच सांगावे लागेल.

पंडिती वळणाच्या भारदस्त गद्यानंतर श्री. कन्हैयालाल मुन्शी हे आपली प्रसन्न व रसाळ लेखणी घेऊन पुढे आले. त्यांनी ऐतिहासिक कादंबऱ्या लिहिल्या आहेत. त्यांच्या कादंबऱ्यांचा आवांका फार मोठा असतो. त्यांनी आपल्या कादंबऱ्यांतून अनेक तेजस्वी पात्रांची मालिकाच निर्माण केली आहे. मुन्शी हे नाटककारही आहेत. विशेषतः प्रहसने लिहिण्यात त्यांचा हातखंडा आहे. ते वर्तमानकाळापेक्षा प्राचीन व मध्ययुगीन कालातच विशेष रमतात.

इ. स. १९१४ साली म. गांधी विलायतेहून भारतात आले व अहमदाबादेत राहिले. त्यांनी तिथे नवजीवन नावाचे एक गुजराती साप्ताहिक सुरू केले. या साप्ताहिकात म. गांधींनी बरेच लेखन केले. या कालखंडाला गुजराती साहित्यातले गांधीयुग म्हणतात. सत्याचे प्रयोग, हिंद स्वराज्य, द. आफ्रिकेतील सत्याग्रहाचा इतिहास, आरोग्याची गुरुकिल्ली ही पुस्तके म. गांधींनी गुजरातीतच लिहिली.

मोट हाकणाऱ्या माणसालासुद्धा जे समजू शकेल, तेच खरे साहित्य, असे गांधीजींचे मत होते. ही कसोटी त्यांच्या लिखाणालाही लावता येते. पंडितयुगातले शब्दपांडित्य आणि वाक्यरचनेचा बोजडपणा त्यांच्या लिखाणात औषधालाही आढळणार नाही. त्यांची दृष्टी गुजरात किंवा गुजराती वाचक यांच्यापुरतीच मर्यादित नव्हती. सबंध भारत किंवा सगळे जगच डोळ्यांपुढे ठेवून ते लिहीत. त्यांची शैली साधी आहे खरी; पण तिच्यात त्यांच्या हृदयाची श्रीमंती भरून ओसंडते. प्रेम, दया, सचोटी आणि दृढनिश्चय या गुणांचा त्यांच्या वाङ्मयात ढळढळीत साक्षात्कार घडतो.

गांधीजींनी लिहिलेल्या लहान मोठ्या लेखांची संख्याही हजारोंनी मोजावी लागेल. लेखांपेक्षाही त्यांच्या पत्रांची संख्या फार मोठी आहे. या पत्रांतून त्यांच्या निर्मळ अंतःकरणाचा साक्षात्कार ठायी ठायी घडतो. इ. स. १९२० सालानंतर गुजरातेत निर्माण झालेल्या सर्व लहान मोठ्या लेखकांवर गांधीजींची स्पष्ट अस्पष्ट अशी छाप आहे. गांधीजींच्या सहकाऱ्यांनीही गुजराती भाषेची बहुमोल सेवा केली आहे. श्री. काकासाहेब कालेलकर हे त्यांपैकी एक होत. गुजराती भाषेचे ते एक शैलीकार लेखक समजले जातात. त्यांची मातृभाषा मराठी असली, तरी त्यांनी गुजरातीवर मातृभाषेइतकेच प्रेम केले. त्यांची लेखनशैली स्वतंत्र आहे, भारदस्त आहे. पांडित्याचा थोडा वास असूनही तिला अपूर्व रमणीयत्व लाभले आहे. जीवनाला मध्यवर्ती कल्पून त्यांनी धर्म, साहित्य, कला, शिक्षण, राजकारण, इ. अनेक प्रश्नांवर आपले प्रगल्भ विचार मांडले आहेत. निसर्गवर्णनाची त्यांनी एक नवीनच घाटणी निर्माण केली. प्रवास हा त्यांच्या जीवनाचा स्थायी भाव बनला आहे. या प्रवासामुळे त्यांची दृष्टी व्यापक व बुद्धी सूक्ष्म-तरल झाली आहे. हिमालयनो प्रवास, स्मरणयात्रा, लोकमाता, जीवननो आनंद, इ. त्यांची पुस्तके रसिकाला एका निराळ्याच रसभूमीत विहार करायला नेतात.

श्री. किशोरीलाल मश्रूवाला हेही गांधीयुगातलेच एक लेखक होत. शुद्ध आणि सरळ भाषेत त्यांनी लेखन केले आहे. राम अने कृष्ण, बुद्ध अने महावीर, इ. त्यांची पुस्तके स्वतंत्र दृष्टिकोनातून लिहिलेली आहेत.

श्री. महादेवभाई देसाई हे तर गांधीजींचे उजवे हातच.

गांधीजींच्या बरोबर तुरुंगात असताना त्यांनी लिहिलेल्या डायऱ्यांचे बरेच भाग प्रसिद्ध झाले आहेत. याच काळात धूमकेतू हे लेखक पुढे आले. त्यांचा जमाना असहकारितेचा होता. दलित–पीडित असे लोक व हरिजन यांना त्या काळी साहित्यात मानाची जागा मिळू लागली होती. त्याच वातावरणात धूमकेतूंची प्रतिभा बहरली. त्यांनी ग्रामीण जीवनावर, विशेषतः अस्पृश्यांच्या जीवनावर एकाहून एक सरस अशा कित्येक लघुकथा लिहिल्या. त्यांच्याच तोलामोलाचे दुसरे लेखक म्हणजे रामनारायण पाठक हे होत. द्विरेफनी वातो या नावाने त्यांचे तीन कथासंग्रह प्रसिद्ध आहेत.

१९३० साली गांधीजींचा सुप्रसिद्ध मिठाचा सत्याग्रह झाला. त्या काळात गांधीजींच्या प्रभावात वाढलेल्या अनेक कवींनी स्वातंत्र्य व विश्वबंधुत्व यांची गाणी मुक्तकंठाने गायिली. पुरोगामित्व हा वाद गुजराती साहित्यात पुढे लौकरच प्रवेशला. त्या काळात गिरणी कामगारांची पिळणूक आणि वेश्यांचे अधःपतित जीवन हे विषय काव्यक्षेत्रात महत्त्वाचे ठरले. पण १९४० साल उजाडते न उजाडते तोच हे पुरोगामित्व स्वयमेव अस्तंगत झाले. पुरोगामी कवी आणि लेखक जणू उपरती झाल्याप्रमाणे पुनश्च निर्मळ सौंदर्यवादाकडे वळले.

हा काळ गुजराती साहित्याचा वसंत ऋतू ठरला. रमणलाल देसाई, चुनिलाल शहा, गुणवंत राय, पन्नालाल हे कादंबरीकार; ब्रोकर, पेटलीकर वगैरे कथाकार; चंद्रवदनासारखा नाटककार; ज्योतींद्र दवेसारखा विनोदी लेखक; दुर्गेश चंदावरकर, दलाल यांसारखे एकांकिकालेखक; पाठक, विजयराय वैद्य, विष्णुप्रसाद त्रिवेदी, आनंदराय रावळ, यांसारखे टीकाकार; चंद्रवदन, स्नेहरश्मी, मनसुखलाल, माणेक, देशलजी, परमार, इ. कवी हे सर्व १९४० नंतरचे थोर साहित्यिक होत.

त्यांच्याच जोडीने श्री. झवेरचंद मेघाणी यांचाही उल्लेख करायला हवा. त्यांनी कथा, कादंबऱ्या, नाटके, काव्ये असे सर्व प्रकारचे साहित्य निर्मिले. पण त्यांची ख्याती गायिली जाते, ती सौराष्ट्राच्या लोकसाहित्याचे उद्धारक म्हणून. सोरठी प्रेमगाथा आणि वीरगाथा यांचे पाच संग्रह सौराष्ट्रनी रसधार या नावाने त्यांनी प्रकाशित केले आहेत. सोरठी संतांच्या कथाही त्यांनी गोळा करून प्रकाशित केल्या आहेत. ते ग्रामजनांत रमले, रंगले व त्यांच्या सुख-दुःखांनी द्रवले. लोकजीवन व लोकसाहित्य यांचा उपासक असलेल्या या राष्ट्रीय कवीला गुजराती साहित्यात मानाचे स्थान मिळाले आहे.

सांप्रत ज्यांचे नाव साहित्यक्षेत्रात विशेषत्वाने ऐकू येते, ते उमाशंकर जोशी हे होत. ते हृदयाने कवी व बुद्धीने तत्त्वज्ञ आहेत. गंगोत्री, निशीथ, आतिथ्य, इ. त्यांचे कवितासंग्रह प्रसिद्ध आहेत. त्यांनी काही नाटकेही लिहिली आहेत.

१९४७ साली भारत स्वतंत्र झाला. जे चिरवांछित ते पूर्ण झाले. खरे म्हणजे त्या नंतर निर्माण झालेले साहित्य प्रेरक, स्फूर्तिप्रद व आत्मविश्वासपूर्ण असायला हवे होते. पण सर्व देशात घडले ते त्याच्या उलट. विफलता, भग्नता, क्षुद्रता, इ. साहित्यदोषांनी लेखकांच्या हृदयात नवे ठाणे वसविले. विशेषतः तरुणवर्गात ही लागण अधिक झाली. गुजरातही या साथीतून सुटला नाही. पण हा विफलतावाद गुजरातेतून आता हळूहळू ओसरू लागेल, अशी चिन्हे दिसत आहेत. कारण श्री. राजेंद्र शहा, श्री. निरंजन भगत, अशांसारखे उत्साहमूर्ती कवी आता गुजरातच्या साहित्यात चमकू लागले आहेत. [गुजरात; म. ज्ञा. को.; वि. मुं. रा. प.]

गुजराती रंगभूमी

बाराव्या शतकात सिद्धराजाच्या कारकीर्दीत गुजरातमध्ये विविध साहित्यप्रकारांचा उत्कर्ष होऊ लागला. हेमचंद्र हा त्याच्या आश्रयाला असलेला महान संस्कृत पंडित होय. त्याने आणि त्याच्या शिष्यवर्गाने सुमारे ६०० नाटके लिहिल्याचा उल्लेख आढळतो. ही सगळी नाटके संस्कृतात होती, हे जरी खरे असले; तरी त्यावरून त्या काळात गुजरातमध्ये नाट्य प्रचारात होते व लोकप्रियही होते, हे कळून येते. पण पुढे मुसलमानी आक्रमणानंतर तिथल्या अनेक विद्या–कला ऱ्हास पावल्या आणि त्याबरोबरच नाट्याचाही ऱ्हास झाला. जी काही नाट्यकला शिल्लक राहिली, ती मंदिरसंस्थेच्या अनुषंगाने.

अंबाजी व बहुचराजी या गुजरातच्या प्रमुख देवता होत. त्यांच्या वार्षिक जत्रा होत व त्या प्रसंगी नाटके केली जात. ही नाटके करण्याचे काम नायक नावाच्या एका वर्गाने वृत्ती म्हणून स्वीकारले. त्यांना भवाई असे म्हणत. हे लोक गावोगावी जाऊनही आपले छोटे छोटे नाट्यप्रयोग करीत. त्यांची ही नाटके विनोदी प्रहसनात्मक असत. त्यांची रचना सामान्यतः एकांकिकेसारखी असे. सामान्य जनता त्या नाटकावर खूष असे.

आधुनिक गुजराती नाटकाचा उदय झाला, तो इ. स. १८५० च्या सुमारास. श्री. नीलकंठ यांनी भवाईंच्या सुमारे तीस मूळ एकांकिकांचे संकलन करून त्यांचे पुस्तक प्रसिद्ध केले. त्यांपैकी एका कथानकाच्या आधारावर त्यांनीच राईनो पर्वत नावाचे एक नाटक लिहिले. या नाटकाविषयी आजही गुजरातेत आदर दर्शविला जातो. १८५१ साली दलपतराय या लेखकाने लक्ष्मी नावाचे एक नाटक लिहिले. ते ॲरिस्टॉफॅनिसच्या प्लूटस या नाटकाचे रूपांतर होते. त्यानंतर दहा वर्षांनी श्री दवे यांनी जयकुमारीविजय नावाचे एक नाटक लिहिले.

नाटक रंगभूमीच्या दृष्टीने मोठेसे चांगले नव्हते. पण भवाईंच्या नाटकांतल्या अश्लीलतेला आळा घालावा, या उद्देशाने आपण हा प्रयत्न केल्याचे त्यांनी प्रस्तावनेत लिहिले आहे. हे नाटक प्रेमप्रधान असून, त्याच्यातल्या नायक–नायिका अनेक विघ्नांतून पार होऊन अखेर विवाहबद्ध होतात, असे त्यात दाखवले आहे. पुढे १८६५ साली एक पारशी विद्वान नानाभाई राणिना यांनी शेक्सपियरच्या कॉमेडी ऑफ् एरर्सचे रूपांतर ज्योडियो भाईयो या नावाने केले. त्यानंतर श्री. ठक्कर यांनी लेडो मॅकवेथच्या आधारावर वसुंधरा नावाचे नाटक रचले.

इ. स. १८६८ ते १८८६ या काळात नर्मदाशंकर यांनी सहा नाटके लिहून बहुमोल नाट्यसेवा केली. त्यांची नाटके रंगभूमीवरही गाजली. त्या कालातील आणखी काही नाटककार म्हणजे काबराजी नानाभाई, रुस्तुमजी राणिना, एदलजी खोरे, रणछोडजी, बंदेखुदा, खुर्शीदजी, बोमनजी काबराजी, शंकर बापूजी त्रिलोकेकर, नासेरवानजी, जहांगीर खंबाटा, बाघजी आशाराम, डाह्याभाई ढोलसाजी, नथुराम सुंदरजी, मूळशंकर मुलाणी, इ. होत. हे लोक गुजराती रंगभूमीच्या प्रारंभकाळातले प्रसिद्ध नाटककार समजले जातात. दौलतराम, कृपाराम पंड्या, मणिलाल नानूभाई द्विवेदी आणि मणिशंकर रतनजी भट्ट हेही नामवंत नाटककार म्हणून गुजराती रंगभूमीवर चमकले.

गुजराती रंगभूमीवर ज्या दुसऱ्या एका गटातील नाटककारांनी आपला ठसा उमटविला, त्यांत छोटालाल शर्मा, फुलचंद शहा, हरिहर दिवाण, विजयाशंकर कालिदास, नारायण, वासंती ठक्कर, नरसिंह विभाकर, इ. नाटककारांची गणना होते. या नाटककारांनी विविध सामाजिक प्रश्नांवर नाटके लिहून ती रसिकांना सादर केली. शायद हा गज़लकार कवी वयाच्या पंचविसाव्या वर्षी संसारनौका हे नाटक लिहून प्रसिद्धीस आला. मणिलाल त्रिभुवनदास याने तर शंभराच्या वर नाटके लिहिली आहेत. त्यांतली त्याची राधा–माणिक, संसारलीला, हंसकुमारी व मनोरमा ही नाटके बरीच गाजली. बुद्धदेव, शृंगीऋषी व सूर्यकुमारी ही तीन नाटके लिहून रासकवी रघुनाथ ब्रह्मभट्ट यांनी कीर्ती मिळवली. प्रभुलाल द्विवेदी हे एक यशस्वी नाटककार होत. त्यांच्या अरुणोदय नाटकाने १९२१ साली रंगभूमीला वळण देण्याचा प्रयत्न केला. त्या नाटकाचे लागोपाठ चारशे प्रयोग झाले. श्री. कन्हैयालाल मुन्शी यांनीही पौराणिक, ऐतिहासिक व सामाजिक त्रिषयांवर अनेक नाटके लिहिली आहेत. मुन्शींची नाटके उच्च साहित्यात गणली जातात. तंत्र आणि निर्मितिमूल्य यांवर त्यांचा कटाक्ष असतो. त्यांच्या नाटकांनी गुजराती रंगभूमीला खूप प्रोत्साहन मिळाले. देसाई यांचे सर्वोदय हे नाटक कमालीचे यशस्वी झाले. त्याचे लागोपाठ २५० प्रयोग झाले. सुवर्णयुग हे त्यांचे दुसरे नाटक होय. ही दोन्ही नाटके करमुक्त आहेत. चंद्रवदन मेहता हे रंगभूमीचे एक श्रेष्ठ भक्त होत. त्यांनी अनेक स्वतंत्र नाटके लिहिली आहेत. ते एक कुशल नट आणि दिग्दर्शकही मानले जातात. गुजराती रंगभूमी संकटात सापडली, तेव्हा तिला जगविण्याचे महत्कार्य चंद्रवदन यांनीच केले. कोणत्याही चळवळीच्या विकासाला समोवतीचे वातावरण पोपक असावे लागते. गुजराती रंगभूमीला अशा प्रकारचे वातावरण सुरवातीस मुंबई शहरात मिळाले. त्या काळी मुंबई शहर हेच गुजराती रंगभूमीचे प्रमुख केंद्र ठरले.

गुजराती रंगभूमी पहिल्याप्रथम उदयाला आणली, ती हौशी नटांनी व नाटककारांनी. हे लोक दिवसभर नोकरीधंदा करून फुरसतीच्या वेळी नाटके बसवण्याचा उद्योग करीत. त्या लोकांना मुंवईतील सुशिक्षित व प्रतिष्ठित नागरिकांचे पाठबळ असे. मुंवईत स्थापन झालेल्या गुजराती नाट्यसंस्थेच्या सल्लागार मंडळात महर्षी दादाभाई नौरोजी हे एक सभासद होते, हे लक्षात ठेवण्याजोगे आहे. गुजराती रंगभूमी स्थापन करण्यात पारशी लोकांनी पुढाकार घेतला. काही महाराष्ट्रीय नाट्यप्रेमी मंडळीही त्यांच्या मदतीला होती. श्री. विनायक जगन्नाथ शंकर शेट व डॉ. भाऊ दाजी लाड यांची नावे या संबंधात सांगता येतील. नासेरवानजी, खुर्शीदजी बालीवाला, कावसजी पालनजी, पेस्तनजी, जमशेटजी, जहांगीर खंबाटा, सोराबजी, रतनशा असे अनेक नामवंत नट या पारशी मंडळीतून निर्माण झाले.

हळूहळू हौशी नाट्यसंघांतून नियमितपणे नाटके करणाऱ्या धंदेवाईक नाटकमंडळ्या निर्माण होऊ लागल्या. त्यांपैकी गुजराती नाटक मंडळी ही पहिली नाट्यसंस्था होय. ती इ. स. १८५२ साली स्थापन झाली. तिचे कार्य सतत १५ वर्षे जोमाने चालले. याच काळात आणखी २० नाट्यसंस्था जन्माला आल्या, पण त्यांपैकी बऱ्याच अल्पजीवी ठरल्या. १८६०–६१ या सालात श्री. नाझीर यांनी एल्फिन्स्टन ड्रॅमॅटिक क्लब ही हौशी नाट्यसंस्था स्थापन केली व तिच्यातूनच पुढे एल्फिन्स्टन नाटक मंडळी सुरू झाली. १८६७–६८ या सालात व्हिक्टोरिया नाटक मंडळी व १८७१ साली आल्फ्रेड नाटक मंडळी जन्माला आली. यांशिवाय झोराष्ट्रियन नाटक मंडळी, पारशी रिपन थिएट्रिकल कंपनी, मुंबई नाटक मंडळी अशा अन्य काही नाट्यसंस्थांनीही गुजराती रंगभूमीच्या विकासाला खूप मदत केली.

सौराष्ट्रातील ब्राह्मण समाजातून अनेक नट व नाटककार जन्माला आले. त्यांनी नाट्यसंस्थाही निर्माण केल्या. गुजरातेतील नायक, भोजक, गंधर्व, मारवाडी, इ. समाजातूनही नट आणि वादक पुढे आले.

पुढे एक काळ असा आला, की गुजराती नाटक मंडळ्यांनी

आपली नजर उर्दू नाटकांकडे वळवली. अल्पावधीतच त्यांनी अनेक उर्दू नाटके रंगभूमीवर आणली व ती यशस्वी केली. बालीवाला नाटक मंडळीने तर उर्दू नाटके घेऊन इंग्लंड व ब्रह्मदेश यांचाही दौरा केला. शेक्सपिअरच्या कित्येक नाटकांचे उर्दू रूपांतर करण्यात आले. काही पारशी नाटककारांनी फिरदौसीचा शाहनामा आणि अरेबियन नाईट्स् यांमधल्या कथाप्रसंगांवर नाटके लिहिली.

नाटक उत्तेजक मंडळी या नावाची नवी नाट्यसंस्था इ. स. १८७४–७५ साली अस्तित्वात आली. तिने रणछोडभाई यांचे हरिश्चंद्र हे नाटक पुनश्च रंगभूमीवर आणले व त्याचे सुमारे शंभर प्रयोग केले. हरिश्चंद्राप्रमाणेच नल-दमयंती हे त्या मंडळीचे नाटकही लोकप्रिय ठरले. याच नाट्यसंस्थेने नर्मदाशंकर यांची द्रौपदीदर्शन, सीताहरण, सोरशाकुंतल व बाळकृष्णविजय ही चार नाटके रंगभूमीवर आणली.

इ. स. १८७५ साली काही गुजराती मंडळींनी मुंबई-गुजराती नाटक मंडळी नावाची संस्था स्थापन केली. दयाशंकर वासनजी हे त्या काळचे एक लोकप्रिय नट त्या मंडळीचे भागीदार झाले व त्यांच्या दिग्दर्शनाखाली अनेक गुजराती नाटके रंगभूमीवर आली.

१८७८ साली मोरवी येथे मोरवी आर्य सुबोध नाटक मंडळी जन्माला आली. मुळजी आश्रम हे त्या मंडळीचे प्रवर्तक होत. ते नट आणि दिग्दर्शक म्हणूनही प्रसिद्ध होते. त्यांनी श्री. वाघजी यांचे त्रिविक्रम हे नाटक सतत पाच वर्षे चालवले. चंद्रहास या नाटकानेही त्यांना मोठी कीर्ती मिळवून दिली. १८८९ साली अहमदाबाद शहरात देशी नाटक समाज या नावाची संस्था स्थापन झाली. तिनेही बरीच वर्षे यशस्वीपणे नाट्यसेवा केली. १८८९ ते १९०६ या कालात सौराष्ट्रामध्येही अनेक नाटक मंडळ्या निघाल्या व त्यांनी गुजराती रंगभूमीची परंपरा पुष्कळ वर्षे सातत्याने चालवली. १९१२ पासून पुढच्या दहा वर्षांच्या काळात आर्य नीतिदर्शक नाटक समाज, आर्य नाट्यसमाज, सरस्वती नाटक समाज व लक्ष्मीकांत नाटकसमाज या नाट्यसंस्था जन्मल्या व वाढल्या. श्री. प्रभुलाल द्विवेदी यांचे वडिलोने वांके हे नाटक आर्य नीतिदर्शक मंडळी करीत असे. त्या नाटकाने समस्त गुजरातचे मन आकर्षित केले होते.

गुजरातने अनेक श्रेष्ठ दर्जाचे नट निर्माण केले आहेत. अमृत केशव नायक हा गुजरातमधला, पण उर्दू रंगभूमीवरचा श्रेष्ठ नट समजला जातो. तो कुशल दिग्दर्शकही होता. त्याने निर्माण केलेल्या नाट्यतंत्राचा ठसा आजही गुजराती रंगभूमीवर दिसतो. बापूलाल नायक हाही एक अव्वल दर्जाचा नट व. दिग्दर्शक होता. मोहनलाल लालजी याचेही नाव प्रसिद्ध आहे जयशंकर हे सौभाग्यसुंदरी या नाटकात सुंदरीची भूमिका इतकी अप्रतिम वठवीत, की त्यावरून त्यांना जयशंकर सुंदरी असेच नाव पडले. त्यांच्या स्त्रीभूमिकेतील अभिनयात अप्रतिम सौंदर्य असे.

१९३५ सालच्या सुमारास बोलपटांचे युग अवतरले आणि नाट्यकलेला उतरती कळा लागली. धंदेवाईक नाटकमंडळ्या एकामागून एक कोसळून पडल्या. रंगभूमी भग्न आणि विषण्ण झाली. पण हेही दिवस हळूहळू बदलू लागले. नाटक मंडळ्यांच्या जागी हौशी नाट्यसंघ निर्माण होऊ लागले. या हौशी नाट्यसंघांना श्री. कन्हैयालाल मुन्शी, चंद्रवदन मेहता, रमणलाल देसाई, इ. समर्थ नाटककारांचे सहकार्य मिळाले. त्यातूनच पुढे १९४७–४८ साली गुजराती नाट्य विद्या मंदिराची स्थापना झाली. त्यातूनच एक ‘ नटमंडल ’ निर्माण झाले. निरनिराळ्या शहरातून नवे नवे नाटकसंघ निर्माण होऊ लागले व त्यांत स्त्री-पुरुष कलावंतांनी हौसेने भाग घेतला.

सांप्रत अभिनय व दिग्दर्शन या क्षेत्रात श्री. प्रताप ओझा या कलावंताचे नाव गाजत आहे. श्री. मृणालिनी साराभाई या आपली दर्पण नामक नाटकसंस्था उत्साहाने चालवीत आहेतः श्री. तरेसी उद्देशी, चंद्रवदन भट्ट, वापालाल रावळ, इ. कुशल नाटककार व दिग्दर्शक गुजराती रंगभूमीला नित्य नवजीवन देत राहिले आहेत.

काही वर्षांपूर्वी गुजरातने आपल्या रंगभूमीची शताब्दी साजरी केली. त्या वेळी भवाईपासून तो अत्याधुनिक नाटकापर्यंत सर्व नाट्यप्रकार त्या उत्सवात दाखवले गेले. [भा. ना. सा.; अनवरं आगेवान– युगप्रभात, जुलै १९६४; गुजराती ड्रामा –डी. जी. व्यास, मार्च ऑफ इंडिया, जून १९५७]

गुजराती लोकसाहित्य

गुजराती लोकसाहित्य हे कथा गाथा, पवाडे, नृत्यगीते, म्हणी, इ. प्रकारांनी समृद्ध आहे. श्री. झवेरचंद मेघाणी यांनी या साहित्याचा मोठा संग्रह केला आहे, त्याचे नाव रढियाळी रात असे आहे. या संग्रहातून ब्रिटिशांच्या आगमनापूर्वीचे गुजरातेतले लोकजीवन किती आणि कशा प्रकारे समृद्ध होते, त्याची कल्पना येते.

गुजराती लोकगीतांचा केंद्रबिंदु मुख्यत्वे स्त्री हा आहे. स्त्रीचे गृहजीवन, प्रेम, वात्सल्य, विरह, मान, उपालंभ, इ. प्रकारची कितीतरी लोकगीते गुजरातेत गायली जातात. सासू-सून व नणंद-भावजय यांच्या संबंधांची गीतेही बरीच आहेत. गुजराती विवाहगीताचा एक नमुना असा–

एक ते राज द्वारिका मां रमतां
बेनी बा दादे ते हसी ने बोलावीगां

कां कां रे घेड़ी तमायी देहज दूबली
आँखलड़ी रे जले भरी
नथी नथी रे दादा देहज मारी दूबली
नथी रे आँखलड़ी जले भरी
एक ऊँचो ते वर नो जोशो रे दादा
ऊँचो ते नत्य नेवां भांगशे
एक नीचो ते वर नो जोशो रे दादा
नीचो ते नत्य ठेवे आवशे
एक धोलो ते वर नो जोशो रे दादा
धोलो ते आप बखाणशे
एक कालो ते वर नो जोशों रे दादा
कालो ते कुटुम्ब लजावशे
एक कहेड़े पातलीयो ने मुखरे शामलीयो
ते मारी सैयरे बखाणीयो
एक पाणी भरती ते पाणीयारीए वखाण्यो
भलो रे बखाण्यो मारी भाभीए

अर्थ – एक दिवस द्वारकेत खेळणाऱ्या लाडक्या कन्येला दादाजीने हसत हसत जवळ बोलावले. 'मुली तू अशी वाळलीस, रोडलीस का? तुझ्या डोळ्यात पाणी का येते?' त्यावर मुलगी उत्तर देते. 'नाही दादा, मी वाळले नाही. माझ्या डोळ्यात पाणी नाही. माझ्यासाठी तुम्ही उंच असा वर पाहू नका. तो छप्पर तोडील. ठेंगू वर बघू नका. त्याला लोक जाता येता ठुकरावतील. गोरा वर पाहू नका. तो आपलेच रूप वाखाणीत राहील. काळा वर पाहू नका. तो साऱ्या कुटुंबाला लाज लावील. असा एक वर आहे. त्याचे मुख सावळे आहे. कंबर पातळ आहे. माझ्यां सख्यांनी त्याचे वर्णन केले आहे. पनिहारिणींनी त्याचे वर्णन केले आहे. माझ्या वहिनीलाही तो फार आवडला आहे. (तो वर माझ्यासाठी आणा.)

विवाहगीतात वधू-वर हे राम-सीता तरी असतात किंवा कृष्ण-रुक्मिणी तरी असतात. राम-सीतेच्या संबंधी एक विवाहगीत मोठे मजेदार आहे. त्याचा आशय पुढीलप्रमाणे—

लवंगीच्या काठीने रामाने सीतेला मारले. त्याउलट पुष्पगुच्छाने रामाला ताडन करून सीता म्हणाली, 'हे रामा! तुझ्या असल्या वागण्याने मला राग येईल आणि मी दुसऱ्याच्या घरी दळण दळायला जाईन.' राम म्हणाला, 'तू दळायला गेलीस, तर तिथे येऊन मी तुझे जाते बनेन.' सीता म्हणाली, 'मी कांडायला जाईन.' राम म्हणाला, 'तर मग मी मुसळ बनेन.' सीता म्हणाली, 'मी मासोळी बनून पाण्यात जाईन.' राम म्हणाला, 'तर मग मी जलाची लहर होईन.' सीता म्हणाली, 'मी आकाशात बिजली बनेन.' राम म्हणाला, 'तर मग मी मेघ होईन.' सीता म्हणाली, 'तू जर अशा रीतीने मला छळायला लागलास, तर मी जळून भस्म होईन.' राम म्हणाला, 'तसे झाले तर मी ते भस्म अंगाला फासून जोगी बनेन'.

गुजराती लोकगीतात विरहभावनेला फार मोठे स्थान मिळाले आहे. शेकडो विरहगीते गुजरातच्या कुशीत जन्म पावली आहेत. विरहाविषयी पुढील काठियावाडी सोरठे वाचनीय आहेत—

कापड फाटिऊँ होय पने ताणो लई ने तुनिएँ
काळज फाटियाँ होय ई कोई काले संधाये नही

अर्थ – वस्त्र फाटले, तर ते धागा घेऊन शिवता येते किंवा त्याला रफू करता येतो. पण काळीज फाटले, तर ते मात्र कशाही प्रकारे सांवले जात नाही.

दीर्घ विरह भोगल्यानंतर एक काठियावाडी स्त्री निराश होऊन पुढील आकांक्षा व्यक्त करते—

त्रवेणी ने तीर अमे सागवन सरजा नहीं
नही तो आवतड़ो अहीर दातण करवा देवरो

अर्थ – त्रिवेणीच्या तीरावर ईश्वराने मला सागवान का नाही बनवले? तसे झाले असते, तर अहीर (माझा प्रियकर) तिथे आला असता आणि मी त्याला माझी काडी दातवण करायला दिली असती.

गुजरातच्या ऋतुगीतांत एक वर्षागीत आहे. पावसाळा सुरू झाला, की कोळणी व हरिजन स्त्रिया ते गात पर्जन्यराजाचे स्वागत करीत मिरवणूक काढतात. त्या वेळचे एक गीत असे—

मेवली आरे, तुं झाझरो वरस
झाझरो वरस के भीज रे गोरांदेनी कांचली
ए कांचली ए रे के नवलेरी भात
नवलेरी भात बीबा पडे सबालावना
एनी टीलडीए रे सोनाना वरख
सोनाना रे वरख के तेज झरे अमरत चांदनी
एनी ओळणीए के चुवे जो रंग
चुवे जो रंग के भाले पडे रंग सेरडा

अर्थ – पावसा पावसा, जोरात पड. खूप खूप पड. गोऱ्या सुंदरींच्या चोळया भिजवून टाक. त्यांच्या चोळयांवर सुंदर नक्षीकाम आहे. ते सव्वा लाख मोलाचे आहे. गोरीच्या टिकलीवर सोन्याचा वर्ख आहे. तिची चमक चंद्रासारखी आहे. जर तिच्या कमरपट्टयातून रंग ठिपकले, तर ते रंग तिच्या गालांवर चढव.

शरद ऋतू सुरू झाला, नवरात्राचा घट वसला, की गुजरातमध्ये गरबा गीते गायिली जातात. खेडचा-पाडयांतल्या,

आळीआळीतल्या बायका एकत्र जमून राधा-कृष्णविषयक गरबागीते गाऊ लागतात—

नंदजी के घेरे नवलख दूजे
वलोणाँ नी वेणूँ वाजे रे लोल
माता यशोदा, तुमारा कान्ह ने
महिड़ा वलोंववा मेलों रे लाल
अमारा कान्ह तो पारणीये पोढ्या
महिड़ा नी बात शूं जाने रें लोल
साते समदरियानी गोली रें कीधी
मेरू नो कीधो खायो रे लाल
एक कोर कालों कान्हजी घुमावे
एक कोर राधा गोरी रे लोल

अर्थ—नंदजीच्या घरी नवलाख गायी दूध देत आहेत. दही घुसळण्याचा आवाज येत आहे. राधा म्हणते, यशोदाबाई तुझ्या कृष्णाला दूध घुसळण्यासाठी पाठवून दे. यशोदा म्हणते, माझा कृष्ण झोपाळयावर बसला आहे. दही घुसळण्याची गोष्ट त्याला काय होय ! त्यावर कवी म्हणतो, साता समुद्राचा डेरा बनवला. नवनागांची दोरी बनवली. चंद्राची चुंवळ बनवली. दोरीचे एक टोक ओढतो आहे, काळा सावळा कृष्ण. दुसरे टोक ओढते आहे, गोरी राधा.

गुजरातेत नळसरोवराच्या काठावर पठार नावाची एक जात वसली आहे. या जातीत अनेक प्रकारची लोकगीते आहेत. त्यांत पतिपत्नींचा शृंगार आहे, कलह आहे आणि एकमेकांना वाक्ताडनही आहे. त्यांच्या प्रदेशातून रोड नावाची एक नदी वाहते. त्यांच्या लोकगीतांतून तिचे माता म्हणून वर्णन आले आहे. त्या नदीच्या काठी तांदूळ चांगला पिकतो. त्याचेही वर्णन त्यांच्या गीतांतून आढळते. चूंदडी (चुनडी) हा अनेक जाती-जमातींच्या लोकगीतांचा एक लोकप्रिय विषय आहे. एका विवाहगीतात एक सुवासिनी स्त्री सांगते——

मारी चपटी माँ आवे ऐवी चूंदडी रे
मारी हारे हवासोनी चूंदडी रे

अर्थ—माझ्या चिमटीत मावेल अशी तुझी (पातळ, हलकी) साडी आहे. माझ्याजवळ अशा शेकडो (बहुमोली) साड्या आहेत.

अबवाणी नावाचा एक गीतप्रकार गुजरातमध्ये आहे. अबवाणी म्हणजे आयत्या वेळची गाणी. ही श्रमगीते असतात. ही तोकडी असतात, पण त्यांना लय असते. एकाने त्याचा तुकडा म्हणायचा व बाकीच्यांनी हईसा म्हणून एका सुरात त्याला प्रतिसाद द्यायचा. ही गीते चुटकेवजा पण असंबद्ध असतात. श्रम हलके करण्यासाठी ती म्हटली जातात. उदा०

चोर भंडारी— हईसा मालम लुच्चो— हईसा
बाई खजुरने— हईसा लखावे ढरीओ— हईसा
भाईना घेरे— हईसा दरीओ डोलै— हईसा

अर्थ— कोठावळा चोर आहे, हईसा. स्वयंपाकी लुच्चा आहे, हईसा. खजूर खातो, हईसा. दगडांची नोंद करतो, हईसा. भावाच्या घरी, हईसा. समुद्र डोलतो, हईसा.

अबवाणीतील पुष्कळशी गीते ही कोळी–नावाड्यांनी रचली आहेत. काही गीतांमधून नागपंचमीसारख्या मोठमोठ्या कथा सांगितल्या आहेत. कथागीतांत सोनबाईच्या बलिदानाची कथा विशेष प्रसिद्ध आहे. सोनबाई ही सात भावांची धाकटी बहीण असते. ते तिला आपल्या बायकांजवळ ठेवून समुद्रमार्गे व्यापारासाठी परदेशी जातात. पाठीमागून सोनबाईच्या भावजया तिचा खूप छळ करतात. त्या छळाला कंटाळून ती समुद्रात जीव देते. पाठोपाठ भावांचे गलबत किनाऱ्याला लागते. पण त्या आधीच समुद्राने तिला पोटात घेतलेले असते.

द. गुजरातेत लोकगीतांचा भरणा जास्त आहे. भिन्न-जाती-जमातींची स्वभाववैशिष्टचे सांगणाऱ्या म्हणीही पुष्कळ आहेत. [बे. फु. आ. रा.; पृ. पु.; फो. लो.— जाने-फेब्रु. १९६१]

गुजरिया न उ. प्रदेशातले एक नृत्य. यामध्ये नृत्य करणारी स्त्री डोक्यावर पाच पाच मातीचे घडे ठेवून नाचते. या नृत्याला मटुकिया नाच असेही म्हणतात. नृत्याच्या वेळी सर्वांत वरच्या घागरीवर तेवता चौमुखी दिवा किंवा पाण्याचे मडके ठेवतात. गरबा नृत्याशी याचे बरेच साम्य आढळते. [कृ. जी. ब्र. श.]

गुडदान एक दान. साठ पल या प्रमाणात गूळ घेऊन तो ब्राह्मणाला संकल्पपूर्वक दान देतात. दान देताना पुढील मंत्र म्हणतात—

गुडमिक्षुरसोद्भूतं मन्त्राणां प्रणवो यथा ।
दानेनानेन मे तस्य परा लक्ष्मीः स्थिरा गृहे ।।

अर्थ—मंत्रामध्ये जसा प्रणव, तसा (गोड पदार्थांत) उसाच्या रसापासून झालेला गूळ हा आहे. त्याच्या दानाने माझ्या घरी श्रेष्ठ लक्ष्मी स्थिर राहो.

गुळाबरोबरच मीठही द्यावे असेही सांगितले आहे. [व्र. प.]

गुडधेनुदान एक दान. हे माघ किंवा चैत्र मासाच्या शुद्ध तृतीयेस करतात. याचा विधी असा— शेणाने सारवलेल्या भूमीवर दर्भ अंथरतात व त्यावर कृष्णाजिन पसरतात. चार भार गूळ घेऊन त्याची वत्सासह धेनू बनवितात.

त्यांच्या कानांच्या जागी शिंपा, पायांच्या जागी उसाची कांडी, डोळ्यांच्या जागी मुक्ताफळे, शेपटीच्या जागी रेशमी वस्त्र, इ. बसवितात व तिची पूजा करून तिचे दान देतात. फल– सर्वपापनाश. [श. क.; मत्स्य पु.]

गुडहार शैवपंथी संन्यासी. हे लोक केलका नावाचे वस्त्र वापरतात. यांच्या एका कानात गोल कडे व दुसऱ्या कानात तांब्याचा ताक्ली नावाचा लहानसा पत्रा असतो. भिक्षा मागत असताना हे लोक धूप जाळीत हिंडतात. यांच्यापैकी एखादा संन्यासी मृत झाला असता दुसऱ्या संन्याश्याला त्याच्या चीजवस्तू घेण्याचा अधिकार असतो. [वै. शै. म. व.]

गुडाचलदान एक दान. याचा विधी असा– दहा भार गूळ घेऊन त्याचा पर्वत रचतात. तेवढे परिमाण घेणे शक्य नसल्यास पाच किंवा तीन भार घेतात. या पर्वताला मेरू समजून त्याच्या चार बाजूंना प्रत्येकी अडीच भार परिमाण गुळाचे पर्वत उभे करतात. मेरू पर्वतावर मध्यभागी कल्पतरू व त्याच्या आजूबाजूला मंदार, पारिजात, हरिचंदन व संतान हे सुवर्णवृक्ष उभे करतात. चारी दिशांना रौप्य शिखरे करून त्यांवर रत्ने जडवतात. त्याचप्रमाणे चार दिशांना ब्रह्मा, विष्णू, रुद्र व सूर्य यांच्या सुवर्णप्रतिमा, तसेच अनेक मुनी व पक्षी यांच्या सुवर्णप्रतिमा करून ठेवतात. नंतर आचार्य व ऋत्विज होमहवन करतात. मग हा पर्वत दान देऊन ब्राह्मणभोजन घालतात. फल– सर्वपापक्षय, गौरीलोकप्राप्ती व सप्तद्वीपांचे आधिपत्य. [दा. चं.]

गुडाळ एक जात. हे लोक आंध्रातल्या गंजम व विजगापट्टम् या जिल्ह्यात आढळतात. यांचा मूळ व्यवसाय औषधी वनस्पती गोळा करून त्या विकणे, हा होता. परंतु अलिकडे हे बुरुडाचा व मच्छीमारीचा व्यवसाय करतात.

यांच्यांत अनेक शाखा आहेत. एक्कल ही यांची प्रमुख देवता आहे. हे मृतांना पुरतात. [का. ट्रा. स. इं.]

गुडिगार द. कानडा जिल्ह्यातील एक जात. हे चंदनी लाकडावर कोरीव काम करतात व चित्रे रंगवितात. हे लोक मूळचे गोव्याचे असून पोर्तुगीजांच्या छळामुळे या प्रदेशात पळून आले. त्यांची मूळची बोली कोकणी होती. गुडी=मंदिर या शब्दावरून ते आपल्या नावाची व्युत्पत्ती सांगतात. गोव्यातील मंदिरात कोरीव काम करून व चित्रे रंगवून मंदिरे सुशोभित करण्याचे काम यांच्याकडे होते. मुळात हे क्षत्रिय होते; पण परशुरामाच्या भयाने त्यांनी हा व्यवसाय पत्करला, असे म्हणतात. हस्तिदंतावर कोरीव काम करण्यातही हे निष्णात आहेत. म्हैसूरमधील गुडिगार चंदनी पेट्या, मेजे, कपाटे यांवर भरगच्च वेलबुट्टीदार नक्षीकाम करतात व त्यात एखादा पौराणिक प्रसंग चितारतात. उडिपी येथील गुडिगार मोठमोठे लाकडी बैल, रेडे, मानवी आकृती व बाहुल्या करून विकतात. काही गुडिगार शेतीही करतात.

विवाहप्रथा – लग्न ठरविण्यापूर्वी पत्रिका पाहतात. पत्रिका नसल्यास देवळात जाऊन देवाचा कौल घेतात. लग्नाच्या दिवशी वरपक्षाकडील लोक कापड, चोळी व काळी पोत घेऊन वधूगृही जायला निघतात. वाटेत वधूपक्षाकडील लोक त्यांचे स्वागत करतात. प्रत्येक पक्षाकडे नारळ, तांदूळ व आरसा असतो. दोन्ही पक्षातील सुवासिनी एकमेकींना कुंकू लावतात व परस्परांवर अक्षता टाकतात. वधूगृही पोचल्यावर वराची आई किंवा बहीण वधूच्या गळ्यात काळी पोत बांधते. मग वधूची आई वराच्या हातात एक कलश देते व ब्राह्मण पुरोहित वधूच्या हातात विड्याचे पान व नारळ देतो. नंतर वधूचे आईबाप त्यावर पाण्याची धार ओततात. मग होम होतो. यांच्यांत विधवाविवाह निषिद्ध आहे.

देवधर्म– हे लोक शैवपंथी असून, मुलांचा उपनयन संस्कार करतात. नागेश, रवळनाथ, लक्ष्मीनारायण, शांतादुर्गा, कावेरी व कामाक्षी ही यांची कुलदैवते आहेत.

हे मृतांना जाळतात किंवा पुरतात. [कां. ट्रा. स. इं.]

गुडिय ओडिसातील एक जात. हे लोक मेवामिठाई करून विकतात. गुड म्हणजे गूळ या शब्दापासून यांना गुडिय हे नाव मिळाले आहे. यांच्यापैकी काही लोक शेती करतात. त्यांना कोलाट, होलोदिय किंवा बोलासी गुडिय अशी निरनिराळ्या भागात निरनिराळी नावे आहेत. हे आपल्या जातिप्रमुखाला सासुमल्लो असे म्हणतात. त्याच्या हाताखाली बेहर व भोल्लोवय असे दोन अधिकारी असतात. गुडिय लोक चैतन्यमताचे वैष्णव आहेत. विष्णूशिवाय ते ग्रामदेवतांनाही भजतात. आपल्या संप्रदायाची चिन्हे ते कसोशीने धारण करतात. बहिर्दिशेस जाताना हे लोक वेगळे वस्त्र नेसतात. त्यामुळे त्यांचे नेहमीचे कपडे विटाळत नाहीत. [का. ट्रा. स. इं.]

गुढीपाडवा चैत्र शु. प्रतिपदेस हे नाव आहे. या तिथीला वर्षप्रतिपदा असेही म्हणतात. शालिवाहन शकाचे वर्ष या दिवसापासून सुरू होते. द. भारतात व भारताच्या इतर भागात नूतन वर्षारंभ चैत्र प्रतिपदेसच होतो. या दिवशी

काही धार्मिक विधीही सांगितले आहेत. त्यात ब्रह्मपूजा हा महत्त्वाचा विधी असतो. त्याचा इतिहास ब्रह्मपुराणात व तिथून घेऊन व्रतराजात सांगितला आहे, तो असा–

चैत्रे मासि जगद् ब्रह्मा ससर्ज प्रथमेऽहनि ।
शुक्लपक्षे समग्रं तु तदा सूर्योदये सति ।।
प्रवर्तयामास तथा कालस्य गणनामपि ।
तत्र कार्या महाशान्तिः सर्वकल्मषनाशिनी ।।
सर्वोत्पातप्रशमिनी कलिदुःस्वप्ननाशिनी ।

अर्थ – ब्रह्मदेवाने चैत्र शु. प्रतिपदेच्या सकाळी समस्त जग निर्माण करून कालगणनाही सुरू केली. त्या तिथीला सर्व उत्पात, सर्व पापे व कलिकृत दुःस्वप्ने यांचा नाश करणारी महाशांती करावी.

ब्रह्मदेवाची पूजा झाल्यानंतर विपळे, पळे, घटिका, प्रहर, इ. सर्व कालविभागांची, दक्षकन्यांची व विष्णूची पूजा करावी. यविष्ठ नावाच्या अग्नीमध्ये हवन करावे. ब्राह्मणभोजन घालावे व आप्तेष्टांना देणग्या द्याव्या. ज्या वारी वर्ष-प्रतिपदा येते त्या वाराच्या अधिपतीची पूजा करावी, असे आणखी एक विधान भविष्य पुराणात सांगितले आहे. या दिवसाचा लौकिक विधी असा –

घरातली सर्व माणसे तैलाभ्यंग करून उष्णोदकाने स्नान करतात. नंतर कडुलिंबाची पाने भक्षण करतात. कळकाच्या काठीच्या टोकाला रेशमी वस्त्र बांधून त्यावर चांदीचे किंवा पितळेचे मांडे पालथे घालून त्यांला कडुलिंबाचे टाळे व फुलांची माळ बांधून दारात तो ध्वज अर्थात गुढी उभारतात. गुढी उभारण्याचा पाडवा म्हणूनच याला गुढीपाडवा असे म्हणतात. दुपारी मिष्टान्नाचे भोजन करतात. उपाध्याकडून नूतन वर्षाचे पंचांग अर्थात वर्षफल श्रवण करतात. या पंचाग श्रवणाचे फल सांगितले आहे, ते असे –



गुढी

तिथेश्च श्रीकरं प्रोक्तं वारादायुष्यवर्धनम् ।
नक्षत्राद्धरते पापं योगाद्रोगनिवारणम् ।।
करणा च्चिन्तितं कार्यं पञ्चाङ्गफलमुत्तमम् ।
एतेषां श्रवणान्नित्यं गङ्गास्नानफलं लभेत् ।।

अर्थ – तिथीच्या श्रवणाने लक्ष्मी लाभते. वाराच्या श्रवणाने आयुष्य वाढते. नक्षत्रश्रवणाने पापनाश होतो. योगश्रवणाने रोग जातो. करणश्रवणाने चिंतिले कार्य साधते. असे हे पंचांग-श्रवणाचे उत्तम फल आहे. त्याच्या नित्यश्रवणाने गंगास्नानाचे फल मिळते.

या तिथीला युगादितिथी असेही म्हणतात. या दिवशी शक्य असेल तर पाणपोयी घालावी. निदान उदकुंभाचे तरी दान करावे असे सांगितले आहे. हा दिवस इष्ट, मित्र व कुटुंबातील मंडळी यांच्यासह आनंदात घालविल्याने वर्षभर सुख लाभते, असे याचे फल आहे.

चैत्र हा अधिकमास असता, काहींच्या मते अधिकमासाच्या शुद्ध प्रतिपदेस वर्षारंभाची धार्मिक कृत्ये करावी; तर काहींच्या मते ती शुद्ध किंवा निज चैत्राच्या प्रतिपदेस करावी, असा मत-भेद आहे. याविषयी धर्मसिंधूने निर्णय दिला आहे, तो असा –

अभ्यंगस्नानादी कृत्ये अधिक मासाच्या शुद्ध प्रतिपदेसच करावी; पण गुढी उभारणे, कडुलिंबाची पाने खाणे, पंचांग श्रवण करणे या गोष्टी शुद्ध चैत्राच्या प्रतिपदेस कराव्या.

गुढीपाडवा हा साडेतीन शुभमुहूर्तांपैकी एक मानला आहे. पाहा – वर्षारंभ, पंचांग.

गुण

मनोधर्म, पदार्थाचा धर्म, अंतःस्थधर्म, विद्या, कला, सत्य, शौर्य, इ. धर्म यांना गुण अशी संज्ञा आहे. हा शब्द सांख्य, न्याय, वेदान्त, साहित्य, इ. शास्त्रांत येतो.

त्रिगुण – सांख्यांनी तीन गुण मानलेले आहेत. त्यांच्या मते प्रकृती ही सृष्टीतल्या सर्व घडामोडींचे एकमेव आदिकारण आहे. सत्त्व, रज व तम हे तीन गुण या प्रकृतीचेच आहेत. जगातील सर्व वस्तूंचे वर्गीकरण त्रिगुणांच्या आधारे करता येते, असे सांख्य म्हणतात. काही पदार्थ विशिष्ट गुणांचे असतात; तर काही पदार्थांत त्रिगुणांचे कमीअधिक प्रमाणात मिश्रण असते. त्यांतला सत्त्वगुण हा ज्ञानप्रकाशमय असतो, रजोगुण हा प्रीतिस्वरूप असतो व तमोगुण हा अज्ञानजन्य व प्राणिमात्रांना भुरळ पाडणारा असतो (गीता पाहा).

त्रिगुणांचे वर्गीकरण करताना सांख्यांच्या समोर प्रामुख्याने नैतिक दृष्टिकोन होता. सत्त्व, रज व तम या नावांवरूनही ते स्पष्ट होते.

दुसरा दृष्टिकोन माणसाच्या सुखदुःखाशी निगडित आहे

यांत सत्त्व हा सुखात्मक, रज हा दुःखात्मक व तम हा विषादात्मक मानलेला आहे. याला मानसशास्त्रीय दृष्टिकोन म्हणता येईल.

सांख्यकारिकेत म्हटले आहे, की सत्त्व हा ऊर्ध्वगामी व प्रकाशक, रज हा प्रेरक व तम हा जड व सर्व बाजूंनी आवरण घालणारा आहे.

चौव्वीस गुण – न्यायदर्शनात गुणांची संख्या चौव्वीस सांगितली असून, त्यांची नावे पुढीलप्रमाणे आहेत– रूप, रस, गंध, स्पर्श, संख्या, परिमिती, पृथक्त्व, संयोग, विभाग, परत्व, अपरत्व, बुद्धी, सुख, दुःख, इच्छा, द्वेष, यत्न, गुरुत्व, द्रवत्व स्नेह, संस्कार, अदृष्ट (पापपुण्यद्वयात्मक) व शब्द.

षड्गुण – सहा राजकीय गुणांचा मनूने उल्लेख केला आहे, तो असा–

सन्धि च विग्रहं चैव यानमासनमेव च ।
द्वैधीभावं संश्रयं च षड्गुणांश्चिन्तयेत्सदा ।।

(मनु. ७·१६०)

अर्थ – संधी, विग्रह, यान, आसन, द्वैधीभाव व संश्रय या षड्गुणांचे राजाने सतत चिंतन करावे.

कौटिल्याने (अर्थशास्त्र ७.१) या सहा गुणांचे विवरण पुढीलप्रमाणे केले आहे–

संधी – शेजारचा राजा अधिक प्रबळ असेल, तर त्याच्याशी मैत्रीचा तह करून वागणे.

विग्रह – शेजारचा राजा दुर्बळ असेल, तर त्याच्याशी भांडण उकरून काढून त्याच्यावर वर्चस्व प्रस्थापित करणे.

यान – स्वतःची पूर्ण तयारी असेल, तर शेजारच्या राजावर आक्रमण करणे.

आसन – शेजारचा राजा फारसा प्रभावी नसेल, तर त्याच्याविषयी उदासीन राहणे.

द्वैधीभाव – नेहमी दुटप्पी वृत्तीने वागणे.

संश्रय – स्वतः दुर्बळ असल्यास प्रबळाच्या आश्रयाने राहणे व वेळोवेळी त्याची मदत घेणे.

काव्यगुण – विशिष्ट शब्दरचना, सोपे शब्द, सुटसुटीत समास, इ. ज्या गोष्टींमुळे काव्यसौंदर्यात भर पडते, त्या गोष्टींना काव्याचे गुण असे म्हणतात. या गुणांच्या संख्येविषयी मतभेद आहेत. काहींच्या मते काव्यगुण चौव्वीस आहेत; तर काहींच्या मते ते फक्त तीनच आहेत. परंतु दहा ही गुणसंख्या बहुमान्य आहे. हे दहा काव्यगुण पुढीलप्रमाणे –

श्लेष – शब्दरचनेत शिथिलता नसणे, चरणातली बहुतेक अक्षरे अल्पप्राण असणे, जोडाक्षरे व कठोर वर्ण यांचा अभाव असणे, अशा रचनेला श्लेषगुणयुक्त म्हणतात. दुव्यात दुवे अडकवून बनलेली साखळी ही जशी सलग वस्तू वाटते, त्याप्रमाणे साखळीसारखी अखंड व घट्ट अशी काव्यरचना श्लेष या संज्ञेला पात्र होते.

प्रसाद – विद्वानांचे विशेष साहाय्य न घेता, ज्याचा अर्थ समजतो व ज्यात शब्दार्थांचा सहज संयोग असतो, अशा काव्याला प्रसादगुणयुक्त म्हणतात. साधी, सुबोध व अर्थवाहक शब्दरचना प्रसादगुण निर्माण करते.

समता – मृदू किंवा कठोर वर्णपद्धती, जी श्लोकाच्या अथवा कडव्याच्या आरंभी स्वीकारली असेल, तीच पद्धत सर्वत्र कायम ठेवणे, म्हणजे समता होय.

माधुर्य – ज्याच्या योगाने अंतःकरणाला आल्हाद उत्पन्न होईल, ते काव्य माधुर्यगुणयुक्त मानतात. शब्द व अर्थ या दोहोंचाही माधुर्य हा गुण आहे.

सौकुमार्य – काव्यातली बहुतेक अक्षरे मृदुवर्णाची असण याला सौकुमार्य म्हणतात.

अर्थव्यक्ती – काव्यातला अर्थ त्यातल्या पदांनीच पूर्ण व्यक्त होणे, त्यासाठी एखादे पद अध्याहृत घ्यावे न लागणे, याला अर्थव्यक्ती म्हणतात.

उदारता – निरनिराळ्या विशेषणांनी व विविध अलंकारांनी काव्यविषयाचे गुण वृद्धिंगत करणे, याला उदारता असे म्हणतात.

ओज – कवी स्वतःचे मत निश्चितपणे कोणाचीही भीडमीड न ठेवता सांगतो, त्या ठिकाणी त्याचे काव्य ओज या गुणाला पात्र होते.

कांती – काव्यातला आशय प्रौढ शब्दांनी व्यक्त करून त्याला अलौकिक शोभा आणणे व काव्यगत रस उद्दीपित करणे, याला कांती असे म्हणतात.

समाधी – मानवी भावनांचा व गुणांचा मानवेतर सजीव निर्जीव वस्तूंवर आरोप केल्यामुळे काव्याला जी शोभा येते, तिला समाधी म्हणतात.

छत्तीस गुण – जातकात वधू-वरांच्या पत्रिका जुळविताना छत्तीस गुण पाहतात. वर्णाचा १, वश्याचे २, तारांचे ३, योनीचे ४, ग्रहांचे ५, गणांचे ६, कूटाचे ७ व नाडीचे ८ मिळून हे छत्तीस गुण होतात.

गुणकली एक रागिणी. हिला गुणकरी असेही म्हणतात. ही मालव रागाची भार्या मानलेली आहे. हिची जाती ओडव–षाडव, वादी षड्ज व संवादी पंचम आहे. या रागात निषाद वर्ज्य असून, आरोहात मध्यम वर्ज्य आहे. बाकी सर्व स्वर शुद्ध आहेत. काही गायक मध्यम वर्ज्य करून निषाद

लावतात व आलापात आरोहाच्या वेळी ऋषभ वर्ज्य करतात. त्यामुळे याच्यावरची भूपाची छाया कमी होते. मुख्य अंग रे ग ध प सा. आरोह रे ग ध प सा. अवरोह–सा ध प प ग रे ग म ग रे सा रे ध सा. गानसमय दिवसाचा पहिला प्रहर. [श्रीमंत आबासाहेब मुजुमदार, पुणे २]

गुणधर (इ. स. चे १ ले शतक) एक जैन आचार्य. याने नागहस्ती व आर्यमिक्षू या दोन शिष्यांसाठी कसायपाहुड हा सिद्धांतग्रंथ लिहिला. यात पंधरा महाधिकार आहेत. यावर जयधवल नावाची टीका उपलब्ध आहे. या टीकेची श्लोकसंख्या साठ हजार असून, त्यातील पहिले वीस हजार श्लोक वीरसेनाने रचले व उरलेले जिनसेनाने रचले असे सांगतात. [जै. ध.; जै. सा. इ.]

गुणभद्र (१) (इ. स. ४२० ते ४७९) एक बौद्ध भाषांतरकार. याने रत्नकरंडक, सुखावतीव्यूह व लंकावतार या ग्रंथांची चिनी भाषेत भाषांतरे केली आहेत.

(२) (इ. स. ८१५ चा सुमार) एक जैन लेखक. हा व याचा गुरू जिनसेन या दोघांनी मिळून त्रिषष्टिलक्षणमहापुराण अथवा महापुराण हा ग्रंथ लिहिला. याचे आदिपुराण व उत्तरपुराण असे दोन भाग असून त्यांपैकी आदिपुराणातील पाच प्रकरणे व संपूर्ण उत्तरपुराण गुणभद्राने लिहिले आहे. उत्तरपुराण हे रामकथापर काव्य आहे. याशिवाय याने 'आत्मानुशासन' या नावाचे एक नीतिपर काव्य व मुनिसुव्रत या तीर्थंकराचे चरित्रही लिहिले आहे.

जिनदत्तचरित नावाचे गुणभद्राचे आणखी एक काव्य असून, ते प्रसिद्धही झाले आहे. या काव्याचे ९ सर्ग व ९३८ श्लोक आहेत. हे काव्य शृंगारप्रधान आहे. [जै. सा. इ.; सं. सा. इ.]

गुणरत्न (इ. स. १३६३ ते १४३९) एक जैन ग्रंथकार. हा श्वेतांबर पंथी होता. याने सद्दर्शनसमस्या या ग्रंथावर सद्दर्शनसमुच्चयवृत्ती अथवा तर्करहस्यदीपिका या नावाची टीका लिहिली आहे. क्रियारत्नसमस्या नावाचा आणखीही एक ग्रंथ् याने लिहिला आहे.

याने आपल्या सद्दर्शनसमुच्चयात धर्मकीर्ती, यज्ञाकर, इ. बौद्ध तत्त्वज्ञान्यांचा तसेच अक्षपाद, वात्स्यायन, वाचस्पती या बौद्धेतर पंडितांचा उल्लेख केला असून, प्रमाणवार्तिक, तत्त्वसंग्रह, न्यायबिंदू, इ. बौद्ध ग्रंथांचाही निर्देश केला आहे. [म. च. को.; हि. इं. लॉ.]

गुणल मरी द. भारतातील एक ग्रामदेवता. ही सात बहिणींपैकी एक आहे.

गुणवर्म कर्नाटकातील एक जैन साहित्यकार. याने पुष्पदंत पुराण रचले आहे. हा ग्रंथ ऐतिहासिक असूनही भावस्पर्शी आहे. यात कवीचे भाषाविषयक पांडित्य दिसून येते. आपल्या पाल्हाळिक शैलीने याने वर्ण्य विषय सजविला आहे. [जै. सि. भा.– डिसें. १९५४]

गुणवर्मा (इ. स. चे ५ वे शतक) एक बौद्ध आचार्य. हा काश्मीरमधला एक राजपुत्र होता. याने थोड्याच अवधीत बौद्ध साहित्याचा उत्तम अभ्यास केला. वयाच्या ३० व्या वर्षी राज्य मिळण्याची संधी आली असता तो मोह टाकून याने संन्यास घेतला. आत्मबोध प्राप्त झाल्यानंतर लंकेत जाऊन याने बौद्ध धर्माचा प्रचार केला. पुढे इ. स. ४३१ मध्ये चीनच्या सम्राटाच्या निमंत्रणावरून तो चीनमध्ये गेला. तिथल्या वास्तव्यात त्याने ११ संस्कृत ग्रंथांचा चिनी भाषेत अनुवाद केला. चीनमध्येच त्याने देह ठेवला.

गुणविष्णू (इ. स. च्या १२ व्या शतकाचा उत्तरार्ध) एक वैदिक आचार्य. हा मिथिलेचा रहिवासी होता. याची साममंत्रावरील टीका प्रसिद्ध आहे. छांदोग्यमंत्रभाष्य हा याचा ग्रंथ विख्यात आहे. याशिवाय मंत्र-ब्राह्मणभाष्य व पारस्करगृह्यभाष्य हे दोन ग्रंथही याचे असावेत, असे समजतात.

गुणशीला विद्यापीठ (सनपूर्व ६ वे शतक) हे विद्यापीठ बिहारमधील राजगृह नगरीत होते. इथे वाङ्मय व इतर शास्त्रे शिकविली जात. युद्धकलेचे शिक्षण हा या विद्यापीठाचा विशेष होता. इथे दोन प्रकारे शिक्षण दिले जाई. ग्रंथावरून विषय पाठ करवून घेणे व त्यावर प्रश्नोपप्रश्न विचारून वादविवाद करणे, हा एक प्रकार. त्यामुळे विद्यार्थी वादकुशल बनत. युद्धकलेसारखे काही विषय प्रात्यक्षिकांच्या द्वारे शिकविणे, हा दुसरा प्रकार. श्रेणिक बिंबिसाराचा मुलगा मेहा किंवा मेघा याचे शिक्षण गुणशीला विद्यापीठात झाले. तो इथे ७२ विद्या शिकला, असे सांगितलेले आहे.

या विद्यापीठात दाखल झालेल्या स्त्रियांच्या नावांवरून इथे मुलामुलींना सहशिक्षण मिळत असावे, असे वाटते. भूपया नावाच्या स्त्रीने आपला सर्व अभ्यासक्रम इथेच पुरा केला व तोही मुलांच्या बरोबरीने असे सांगतात. दुसरी स्त्री म्हणजे बिंबिसाराची पत्नी राणी नंदा ही होय. महावीराने तिला यांच

विद्यापीठात प्रवेश देवविला होता. ज्या अर्थी इथे प्रौढ व तरुण स्त्रियांना प्रवेश मिळे, त्या अर्थी इथे स्त्रीशिक्षिकाही असल्या पाहिजेत, असे वाटते.

इथल्या एकंदर शिक्षणाचे पुरुषांकरिता ७२ व स्त्रियांकरिता ६४ भाग करण्यात आले होते. या दोन्ही भागांत सामान्यत: सारखेपणा होता. पण काही विषय केवळ पुरुषांना व काही केवळ स्त्रियांनाच शिकवण्याजोगे असल्याने त्या बाबतीत थोडा फरक केला जाई. [प्रा. भा. वि.]

गुणस्थान आत्म्याच्या गुणांचा क्रमवार विकास ज्या स्थानी होतो, त्या स्थानाला जैन धर्मात गुणस्थान म्हणतात. संपूर्ण कर्मांपासून आत्म्याची सुटका होऊन त्याला जी मुक्तावस्था प्राप्त होते, त्या अवस्थेला जैनांनी निर्वाण म्हटले आहे. कर्मबंधन हे आत्म्याच्या भावनेवर अवलंबून असते. भावना म्हणजे विचार. आत्मा जसजसे चांगले विचार मनात आणील, तसतसे त्याचे सद्‌गुण वाढतात व वाईट विचार मनात आणील, तसतशी त्याच्या असद्‌गुणांची वाढ होते. गुणस्थानामुळे आत्म्याच्या ठायी काय भाव आहे, हे समजते व आत्म्याची योग्यता कोणती, हेही समजते. अशी गुणस्थाने चौदा आहेत, ती अशी–

(१) मिथ्यादृष्टी (२) सासादनसम्यग्दृष्टी (३) सम्यग्मिथ्यादृष्टी (४) असंयतसम्यग्दृष्टी (५) देशसंयत (६) प्रमत्तसंयत (७) अप्रमत्तसंयत (८) अपूर्वकरणसंयत (९) अनिवृत्तिकरणसंयत (१०) सूक्ष्मसांपरायसंमत (११) उपशांतकषायसंयत (१२) क्षीणकषायसंयत (१३) सयोगकेवल (१४) अयोगकेवल.

जैनधर्मात गुणस्थानांना फार महत्त्व आहे. जो अंतिम गुणस्थानावर आरूढ होतो, तो निर्वाण (मोक्ष) पदावर आरूढ होतो, असे सांगितले आहे. ही चौदा गुणस्थाने म्हणजे मोक्षमंदिराच्या चौदा पायऱ्याच होत. [जैनधर्मामृत; जै. ध.; हिं. वि. को.]

गुणाढ्य बृहत्कथा नावाच्या ग्रंथाचा कर्ता. प्रतिष्ठान (पैठण) येथे याचा जन्म झाला आणि हा सातवाहन राजाचा प्रधान होता, अशी आख्यायिका आहे. अजूनपर्यंत याचे प्रमाणभूत चरित्र उपलब्ध झालेले नाही. उपलब्ध आहे, ती फक्त एक आख्यायिका. ती कथासरित्सागराच्या कथापीठलंबकात पुढीलप्रमाणे दिलेली आहे—

पैठणात सोमशर्मा नावाचा एक ब्राह्मण होता. त्याला श्रुतार्था नावाची एक मुलगी होती. सोमशर्मा वारल्यावर तिच्या भावांनी तिचा सांभाळ केला. वयात आल्यावर कीर्तिसेन नावाच्या एका नागाशी तिने गांधर्व विवाह केला. त्या दंपतीला जो मुलगा झाला, तोच हा गुणाढ्य. श्रुतार्था लवकरच वारली आणि गुणाढ्य पोरका झाला. नंतर त्याने दक्षिणापथात जाऊन संस्कृत व प्राकृत भाषांचे सांगोपांग अध्ययन केले. मग तो परत पैठणला आला. तिथे सातवाहनाच्या दरबारात त्याला राजाश्रय मिळाला.

सातवाहन अविद्य होता. एक दिवस त्याच्या सुविद्य राणीने त्याबद्दल त्याचा उपहास केला. त्यामुळे त्याला व्याकरण शिकावेसे वाटले. गुणाढ्याच्या बरोबरच शर्मवर्मा नावाचा आणखी एक पंडित सातवाहनाच्या दरबारी होता. आपल्याला किती दिवसांत विद्या प्राप्त होईल, असा राजाने गुणाढ्याला प्रश्न विचारला, तेव्हा तो म्हणाला. ‘ सहा वर्षे लागतील.’ पण शर्मवर्म्याने लगेच शेखी मिरवून राजाला सांगितले, की ‘ मी सहा महिन्यांत शिकवीन.’ अर्थात् गुणाढ्याला हे पटले नाही. त्याने पैज मारली, की ‘ सहा महिन्यांत राजाला व्याकरणादी विद्या प्राप्त झाल्या तर मी संस्कृत-प्राकृत भाषा उच्चारण्याचेच सोडून देईन. ’

शर्मवर्म्याने चंडिकेची आराधना करून वर मिळविला व सहा महिन्यांत राजाला विद्वान केले. गुणाढ्य हरला व दरबारात त्याची अप्रतिष्ठा झाली. मग प्रतिज्ञेप्रमाणे त्याने संस्कृत-प्राकृत भाषा बोलणे सोडून दिले. तिथले अपमानित वास्तव्यही त्याला असह्य झाले. म्हणून तो पैठण सोडून विंध्यारण्यात गेला. तिथे त्याने पैशाची भाषेचा अभ्यास केला.

काणभूती नावाचा एक पिशाच त्याला तिथे भेटला. वररुचीने सांगितलेल्या सात विद्याधरांच्या कथा त्याला अवगत होत्या. त्या त्याने गुणाढ्याला सांगितल्या. खूप कष्ट घेऊन त्याने त्या कथा सात भागांत लिहून काढल्या. एकेक भाग लक्ष श्लोकांचा झाला. या सात विभागांत एक कथासूत्र त्याने कायम ठेवले होते व सर्वांची मिळून एक ‘ बृहत्कथा ’ बनवली होती. विद्याधर रक्ताला स्पर्श करीत नाहीत, हे गुणाढ्याला ठाऊक होते. गुणाढ्याला वाटले, की विद्याधर आपल्या कथा चोरून नेतील. म्हणून त्याने स्वत:च्या रक्ताने ते समग्र लेखन केले.

पुढे तो कथांचे ते बाड घेऊन पैठणास आला. आपण स्वत: नगराबाहेर बसून आपल्या शिष्यांच्या हाती त्याने तो ग्रंथ सातवाहन राजाकडे पाठवला. पण विद्यामदामुळे राजाने त्या ग्रंथाचा व त्या शिष्यांचाही अवमान केला. गुणाढ्याला या गोष्टीचे दुःख झाले व त्या भरात त्याने आपला ग्रंथ अग्नीला समर्पण करायचे ठरविले. त्यासाठी त्याने एक मोठी शेकोटी पेटवली. ग्रंथाचे एकेक पान मोठ्याने वाचावे व ते अग्नीत टाकावे, असा क्रम त्याने सुरू केला. रानातले सगळे पशुपक्षी

आपले खाणेपिणे विसरून ती बृहत्कथा ऐकायला तिथे जमा झाले.

इकडे सातवाहनाला एक विकार जडला. वैद्यांनी प्रकृती तपासून राजाला सांगितले, की सुकलेले पण ताजे पशुमांस मिळेल, तर हा विकार नाहीसा होईल. तशा पशुमांसाच्या शोधात असता त्याला एक अद्भुत गोष्ट कळली. ‘गुणाढ्य आपला ग्रंथ जाळीत बसला आहे व पशुपक्षी ती कथा ऐकण्यासाठी अन्नपाणी वर्ज्य करून तिथे बसले आहेत आणि त्यामुळे जिवंतपणीच त्यांचे मांस सुकून गेले आहे.’

ते ऐकताच राजा चपापला व आपण गुणाढ्याचा व त्याच्या ग्रंथाचा अवमान केल्याचे त्याच्या लक्षात आले. मग लगबगीने राजा गुणाढ्यापाशी आला. तिथले ते दृश्य पाहून तो स्तिमितच झाला. मग गुणाढ्याला शरण जाऊन त्याने ते काव्यदहन थांबविले. गुणाढ्याने उरलेली शेवटची नरवाहन दत्ताची कथा राजाच्या स्वाधीन केली व तिथेच देह सोडला.

कंबोजमध्ये उपलब्ध झालेल्या शिलालेखाच्या आधारे डॉ. कीथने गुणाढ्याचा काळ सनपूर्व ६ वे शतक हा मानला आहे. गुणाढ्याचा संबंध सातवाहनांशी लावला जातो व सातवाहनांचा काळ सनपूर्व २ रे किंवा ३ रे शतक हा मानला जातो. कादंबरी, दशकुमारचरित, उदयनकथा व पंचतंत्र या ग्रंथांचे मूळ बृहत्कथेत आहे. यावरून असे म्हणता येते, की गुणाढ्याचा काल सनपूर्व ३ रे अथवा ४ थे शतक हा असावा.

गुणाढ्याच्या स्थलाविषयी लिहितांना डॉ. मिराशी यांनी, सांप्रतचे पैठण ही गुणाढ्याची जन्मभूमी नसून, वर्धा जिल्ह्यातील हिंगणघाट तहसिलीतली सुप्रतिष्ठ नामक नगरी ही असावी, असे प्रतिपादिले आहे (स्टडीज् इन इंडॉलॉजी).

सातवाहन राजाने व दरबारातल्या ब्राह्मण पंडितांनी बृहत्कथेचा अपमान केला, याची कारणमीमांसा श्री. राजारामशास्त्री भागवत यांनी पुढीलप्रमाणे केली आहे– गुणाढ्याने ज्या भाषेत ग्रंथ लिहिला, ती भाषा याज्ञिकांची नव्हती. ज्या देशात बृहत्कथा रचली गेली, तो देशही विंध्याद्रीच्या दक्षिणेस अर्थात आर्यावर्ताच्या बाहेरचा होता. शिवाय त्या ग्रंथात यज्ञविद्येचा उपहास करणाऱ्या विद्याधर, पिशाच, इत्यादिकांच्या कथा होत्या. तेव्हा पहिल्याने ब्राह्मणांनी त्या ग्रंथाचा अनादर केला असला, तर त्यात नवल नाही. शेकडो वर्षे गेल्यावर दहाव्या शतकाच्या आसपास सोमदेव व क्षेमेंद्र यांनी बृहत्कथेला संस्कृत रूप दिले, तेव्हा ब्राह्मणांना तिचे महत्त्व कळले. पाहा– कथासरित्सागर.
[लो. सा. रू.; हिं. वि. को.; म. ज्ञा. को.; सं. सा. इ.]

गुणावा एक जैन क्षेत्र. गया–पाटणा रेल्वेमार्गावरील नवादा स्टेशनापासून हे दीड मैल अंतरावर आहे. महावीराचा पहिला गणधर गौतमस्वामी याचे हे निर्वाणस्थान होय. [जै. ध.]

गुणावाप्तिव्रत एक व्रत. व्रतावधी एक वर्ष. फाल्गुन शु. प्रतिपदेला व्रताचा प्रारंभ करतात. शिव ही या व्रताची देवता आहे. आदित्य, अग्नी, वरुण व चंद्र या देवतांच्या एकेका मूर्तीची रोज क्रमाने वर्षभर पूजा करतात. चार दिवस रोज निरनिराळी द्रव्ये मिसळलेल्या जलाने स्नान करतात. गहू, तीळ, सातू इ. धान्यांचे हवन करतात. कर्त्याने दूध पिऊन राहणे, हा या व्रताचा विशेष आहे.

गुपचुप तोबा मुलांचा एक बैठा खेळ. प्रथम मुले गोलाकार बसतात. त्यांची तोंडे वर्तुळाच्या आतल्या बाजूला असतात. मुलांपैकी एखादा राज्य घेतो किंवा चोर बनतो. तो आपल्या हातात रुमालाचा पीळ घालून केलेला तोबा घेतो व तो तोबा आपल्या पाठीमागे लपवीत, बसलेल्या मुलांभोवती फिरतो व फिरता फिरता एखाद्या मुलाच्या पाठीशी तो तोबा गुपचूप ठेवून आपले फिरणे चालू ठेवतो. तोबा आपल्या पाठीशी ठेवला आहे किंवा काय ते मागे वळून पाहायचे नसते किंवा हाताने चाचपडायचेही नसते. ते अंदाजाने जाणायचे असते. चोराने एखाद्या मुलाच्या मागे तोबा ठेवल्यावर तो पुन्हा त्या मुलाच्या मागे येईपर्यंत जर त्या मुलाला आपल्यामागे तोबा ठेवल्याचे समजले नाही, तर चोर त्याच्या मागे येताच तोबा उचलून त्याच्या पाठीत मारतो. मार बसताच तो मुलगा जागेवरून उठून मुलांभोवती फिरून आपल्या जागेवर येऊन बसतो. जागेवर बसेपर्यंत चोर त्याला मारीतच राहतो. पण मागे तोबा ठेवल्याचे त्या मुलाला कळले, तर तो तोबा उचलून तो चोरामागे धावतो व चोर त्याच्या जागी जाऊन बसेपर्यंत त्याला मारतो. मग तोबा हातात असणारा मुलगा चोर होतो व खेळ चालू राहतो.
[व्या. ज्ञा. को.]

गुपाल कवी (इ. स. चे १९ वे शतक) एक हिंदी कवी. जुगराज राय या कवीच्या कुळात गुपाल कवीचा जन्म झाला. याच्या बापाचे नाव प्रवीणराय असे होते. याचे वास्तव्य वृंदावनात होते.

दंपतिवाक्यविलास हे याचे प्रसिद्ध काव्य होय. इ. स. १८७५ मध्ये याने त्याची रचना केली. हे काव्य पति-पत्नींच्या संवादरूपात लिहिलेले आहे. पती पैसा मिळविण्यासाठी परदेशी जायला उत्सुक आहे. परदेशी जाऊन आपण कोणता व्यव-

साय करणार, ते तो पत्नीला सांगतो. त्यावर ती त्या व्यवसायातील दोष दाखवते. पती अनेक व्यवसायांच्या गुणांचे वर्णन करतो; तर पत्नी त्याचे म्हणणे खोडून काढते. अशा प्रकारे वाक्यविलासात बराच काळ निघून जातो व ती दोघे दांपत्यसुखाचा अनुभव घेतात.

या काव्यात २१ प्रबंध आहेत. विप्ररोजगार या प्रबंधात वेदान्ती, वैयाकरण, ज्योतिषी, पुरोहित इत्यादींच्या व्यवसायाबरोबरच भडवा, वेश्या, यांच्या धंद्याचेही गुणदोष वर्णिले आहेत. बाल्य, यौवन, वार्धक्य, नवविधा भक्ती, निर्गुण उपासना, खजिनदार, फौजदार, चपरासी, सोनार, सराफ, हलवाई, माळी, शिंपी, इ. अनेक विषयांवर व व्यावसायिकांवर त्याने आपले विचार सांगितले आहेत. यावरून त्याच्या सूक्ष्म निरीक्षणाची कल्पना येऊ शकते. यातील एक नमुना असा–

सब ही की या में षोटी कहनी परति बात,
कहें चुरवार वैर बधैं तन छीजियैं ।
गारी गरा दें कैं बहु कोसत रहत लोंग,
मामले में जाइ कें बिगारि काम दीजियै ।
जाहर भए में यहु बिगरत हाल या तें,
कहत "गुपाल" मेरी बात हि पतीजियें ।
भूषैं रहि जीजियें कि बिस लाइ पीजियें,
पैं भूलि रुजगार चुगली को नहिं कीजियै ।

अर्थ – चुगलीच्या व्यापारात सगळ्यांनाच खोटे बोलावे लागते. चुगलखोराच्या सांगण्यानुसार वैर करून लोक आपले शरीर क्षीण करून घेतात. लोक चुगलखोराला तऱ्हेतऱ्हेच्या शिव्या देतात. चहाडखोराच्या शब्दावर विश्वास ठेवून आपले काम बिघडवून टाकतात. चुगली उघड झाली, की सगळाच मामला बिघडतो. गुपाल म्हणतो, माझ्या म्हणण्यावर विश्वास ठेवा. उपाशी पोटी राहा अथवा विष आणून प्या, पण चुकूनही चहाडीचा व्यापार करू नका.

हे काव्य व्रजभाषेत लिहिलेले आहे. कवीला अनुप्रासाची विशेष आवड दिसते. बहुतेक सर्व काव्य कवित्त, सवैया व दोहा या छंदांत ग्रथित आहे. विषय, भाव व भाषा या तीन्ही दृष्टींनी पाहता हे एक सुंदर नीतिकाव्य ठरते. [हिं. नी. वि.]

गुप्त प्रयाग

एक तीर्थ. पश्चिम रेल्वेच्या खिजडिया–वेरावळ लोहमार्गावर तलाला नावाचे एक स्टेशन आहे. तिथून देलवाड्यापर्यंत एक छोटा रेल्वेमार्ग जातो. देलवाड्याहून गुप्तप्रयागला जाणारी पक्की सडक आहे. इथे माधवाचे मंदिर असून, गंगा, यमुना व सरस्वती यांच्या नावांची कुंडे आहेत. स्कंद पुराणात याचे माहात्म्य सांगितले आहे. [कल्याण-तीर्थांक]

गुप्त राजवंश

इ. स. ३०० च्या सुमारास मगध देशातील गंगेच्या काठच्या प्रदेशावर श्रीगुप्त नावाचा राजा राज्य करीत होता. तो व त्याचा पुत्र घटोत्कच यांची सत्ता पाटलीपुत्र नगरीच्या भोवतालच्या प्रदेशावर होती. बंगालचा काही भागही त्यांच्या राज्यात असावा. त्या दोघांनाही महाराज ही पदवी होती; पण त्यांच्याविषयी फारशी माहिती उपलब्ध नाही.

चंद्रगुप्त (१ ला)–चौथ्या शतकाच्या प्रारंभी घटोत्कचाचा पुत्र चंद्रगुप्त हा राजा झाला. त्याने प्रयागपर्यंत राज्यविस्तार करून महाराजाधिराज ही पदवी धारण केली. लिच्छवी वंशातील कुमारदेवी नामक राजकन्येशी त्याचा विवाह झाला. या संबंधामुळे त्याचे सामर्थ्य बरेच वाढले. चंद्रगुप्त हा इ. स. ३१९ किंवा ३२० या वर्षी सिंहासनावर बसला आणि तेव्हापासून गुप्त शक ही कालगणना त्याने सुरू केली, असे मानले जाते. त्याच्या नाण्यावर एका बाजूला चंद्रगुप्त व कुमारदेवी यांचे चित्र कोरलेले असून, दुसऱ्या बाजूला सिंहारूढ शक्तिदेवीचे चित्र असे.



चंद्रगुप्त १ ला, याची सुवर्ण-मुद्रा

गुप्त राजे स्वतःला चंद्रवंशी क्षत्रिय मानीत होते. नाग व लिच्छवी या क्षत्रिय घराण्यांशी आणि वाकाटक या ब्राह्मण घराण्याशी त्यांचा विवाहसंबंध झाला होता. यावरून असे दिसते, की त्या वेळची इतर राजघराणीही त्यांना क्षत्रियच मानीत होती.

समुद्रगुप्त – चंद्रगुप्त इ. स. ३४० च्या सुमारास मरण पावला व त्याचा पुत्र समुद्रगुप्त सिंहासनावर बसला. हा या वंशातील सर्वश्रेष्ठ पुरुष होय. त्या वेळी आर्यावर्तात अर्जुनायन, मालव, यौधेय, लिच्छवी, इ. गणराज्ये आणि अयोध्या, मथुरा, कोशांबी, विदिशा, पद्मावती इ. राज्ये नांदत होती. मगधात

मौखरींचेही एक लहानसे राज्य होते. समुद्रगुप्ताने ही सर्व राज्ये व गणराज्ये जिंकून आपले साम्राज्य स्थापले. दक्षिणेतही त्याने कांचीपर्यंत दिग्विजय केला. पण पराभूत राजांना राज्यभ्रष्ट न करता त्याने त्यांना फक्त आपल्या अंकित ठेवले. यावरून असे दिसून येते, की समुद्रगुप्त केवळ पराक्रमी व कुशल सेनापतीच नव्हता; तर धोरणी व मुत्सद्दीही होता. या दिग्विजयानंतर त्याने अश्वमेध यज्ञ करून त्यानिमित्त नवीन सुवर्णमुद्रा पाडली.


समुद्रगुप्त

समुद्रगुप्ताची शासनव्यवस्था उत्तम होती. तो कवी, कलाकार आणि विद्वान यांचा आश्रयदाता होताच; शिवाय स्वतःही कवी, विद्वान आणि संगीतज्ञ होता. गरुडवाहन विष्णू हे त्याचे उपास्य दैवत असले; तरी तो इतर धर्मांच्या अनुयायांनाही साहाय्य करीत असे. सिंहलद्वीपाच्या राजाला त्याने बुद्धगयेजवळ एक बौद्ध विहार बांधण्याची परवानगी दिली होती. समुद्रगुप्ताच्या पदरी अनेक विद्वान होते, त्यांत वसुबंधू हा बौद्ध पंडितही होता.

चंद्रगुप्त (२ रा)– समुद्रगुप्तानंतर त्याचा पुत्र चंद्रगुप्त (इ. स. ३८०–४१३) याने गुप्तसाम्राज्याचा अधिकच विस्तार केला. माळवा आणि सुराष्ट्र या प्रदेशावर शक क्षत्रपांचे राज्य होते ते त्याने जिंकले आणि आपल्या साम्राज्याची सीमा पश्चिम समुद्राला नेऊन भिडवली. त्यामुळे त्याचा पाश्चिमात्य देशांशीही संबंध येऊ लागला. दिल्ली येथील कुतुबमिनाराजवळच्या लोहस्तंभावरील संस्कृत आलेखावरून कळते, की पूर्वेकडील वंग आणि पश्चिमेकडील सिंध हे प्रदेश त्याने आपल्या साम्राज्यात आणले होते. बाह्लिक (बल्ख) देशही त्याने जिंकला होता असे त्यात म्हटले आहे. त्याने विक्रमादित्य ही पदवी धारण केली होती. ध्रुवदेवी आणि कुबेरनागा नामक त्याच्या दोन राण्या होत्या. कुबेरनागा ही नागवंशातली होती. तिची कन्या प्रभावती गुप्ता हिचा वाकाटक राजा रुद्रसेन याच्याशी विवाह झाला होता.

प. भारतात त्या वेळी शक राजांची चांदीची नाणी प्रचलित होती. तशीच चांदीची नाणी चंद्रगुप्ताने सुरू केली. त्यांच्या एका बाजूवर राजचिह्न गरुड व दुसऱ्या बाजूवर 'परम भागवत महाराजाधिराज चंद्रगुप्त' हे शब्द कोरलेले आहेत. शकांचा पराभव केल्यानंतर विक्रमादित्याने उज्जयिनी येथे दुसरी राजधानी स्थापन केली. कारण ती नगरी साम्राज्याच्या केंद्रस्थानी होती व तिथून राज्यकारभार चालविणे सोपे होते. त्याने श्रीविक्रम, अजितविक्रम, सिंहविक्रम अशाही अन्य अनेक पदव्या धारण केल्या होत्या.


चंद्रगुप्त विक्रमादित्य – जयंती स्मारक ग्रंथावरून

चंद्रगुप्त हाही पित्याप्रमाणेच महापराक्रमी योद्धा आ विद्याप्रेमी होता. त्याच्या आश्रयाला अनेक कवी हो

कविकुलगुरू कालिदास त्याच्याच पदरी राजकवी होता, असे मानले जाते.

कुमारगुप्त (१ ला) – चंद्रगुप्तानंतर त्याचा पुत्र कुमारगुप्त गादीवर आला. याच्या दीर्घ राजवटीत (इ.स.४१३ –४५५) सबंध साम्राज्यात शांतता, सुव्यवस्था आणि समृद्धी नांदली. त्याला मोठी युद्धे करावी लागली नाहीत. कुमारगुप्ताने अश्वमेध यज्ञ करून महेंद्रादित्य ही पदवी धारण केली. त्याच्या राणीचे नाव अनंतदेवी होते.

स्कंदगुप्त – कुमारगुप्ताचा पुत्र स्कंदगुप्त हा त्याच्या पराक्रमामुळे अत्यंत लोकप्रिय झाला होता. त्याच्या कारकीर्दीत (इ.स.४५५–४६७) भारतावर हूणांचे भयावह आक्रमण आले. ते लोक अत्यंत क्रूर होते. ते जिथे जात तिथे समूळ विध्वंस करीत. पण स्कंदगुप्ताने विलक्षण धैर्याने त्यांचा पराभव केला. हूण लोक पुढे सुमारे पन्नास वर्षे आपली नजर गुप्त साम्राज्याकडे वळवू शकले नाहीत. स्कंदगुप्ताची ही कामगिरी इतिहासात अतुलनीय आहे आणि म्हणूनच त्याने घेतलेली विक्रमादित्य ही पदवी त्याला साजून दिसते.

स्कंदगुप्तानंतर त्याचा सावत्र भाऊ पुरुगुप्त याने काही वर्षे राज्य केले. नंतर स्कंदगुप्ताचा पुत्र कुमारगुप्त (२ रा) याने इ.स. ४७७ पर्यंत राज्य केले: त्यानंतर पुरुगुप्ताचा पुत्र बुधगुप्त याने इ. स. ४९५ किंवा ५०० पर्यंत राज्य केले असावे. या कालावधीत गुप्त साम्राज्यातील शांतता व सुबत्ता कोणत्याही प्रकारे कमी झाली नव्हती. मात्र मालव व उ. वंगाल या प्रदेशांचे प्रशासक स्वतःला महाराज ही पदवी घेऊन काहीसे स्वतंत्रपणे राज्य करू लागले होते. सुराष्ट्रातही मैत्रक भटार्क याने वलभी येथे आपले राज्य स्थापले होते. तथापि हे राजे स्वतःला गुप्तांचे सामंतच मानीत होते.



चंद्रगुप्त २ रा याची सुवर्ण मुद्रा

बुधगुप्तानंतर सुमारे पन्नास वर्षांनी अंतर्गत यादवी, सामंतांचा विद्रोह आणि परकीय आक्रमणे यांमुळे गुप्त साम्राज्य नष्ट झाले. बुधगुप्तानंतर त्याचा भाऊ नरसिंहगुप्त, त्याचा पुत्र कुमारगुप्त (३ रा) व त्याचा पुत्र विष्णुगुप्त यांनी इ.स. ५५० पर्यंत राज्य केले. तथापि इ.स. ५०७ व ५१० मधील आलेखांवरून असे कळते, की वैन्यगुप्त व भानुगुप्त नामक दोन राजेही त्या काळात होऊन गेले. भानुगुप्तानेही हूणांशी युद्ध केले होते, असे दिसते. हूणांचा राजा तोरमाण याने काश्मीर, पंजाब, राजपुताना, मालव व उ. प्रदेशाचा काही भाग एवढ्या विस्तृत प्रदेशावर आपली सत्ता प्रस्थापित केली होती. त्याचा पुत्र मिहिरकुल हा महापराक्रमी, पण क्रूर होता. साकल (सियालकोट–पंजाब) ही त्याची राजधानी होती. त्याच सुमारास मालव देशात यशोधर्मा नावाचा महापराक्रमी राजा उदयास आला होता. त्याने इ. स. ५३० च्या सुमारास मिहिरकुलाचा पराभव केला व गुप्त साम्राज्याचा बराच भाग जिंकून घेतला. मिहिरकुलाने त्यानंतर मगधावर स्वारी केली; पण गुप्त सम्राट नरसिंह बालादित्य याने त्याचा पराभव करून त्याला कैद केले. या नरसिंह गुप्ताची खरी सत्ता मगध व उ. वंग एवढ्याच प्रदेशावर असावी. हूण व यशोधर्मा यांनी गुप्त साम्राज्य नष्ट केले आणि इ.स. ५५० नंतर गुप्तराजांची सत्ता मगधावरही शिल्लक राहिली नाही. विष्णुगुप्तानंतरचा गुप्त घराण्याचा इतिहास तर अज्ञातच आहे.

सुवर्णयुग – गुप्त वंशाने सुमारे दोनशे वर्षे अत्यंत वैभवशाली राज्य केले. या कालखंडाला सुवर्णयुग म्हणतात. समुद्रगुप्त व चंद्रगुप्त यांनी साम्राज्यस्थापनेसाठी अनेक युद्धे केली, तरी राज्यातली शांतता व समृद्धी भंग पावली नाही. त्यानंतरच्या काळात तर देशाचे वैभव खूपच वाढले. चंद्रगुप्त (२ रा) याच्या वेळी भारतात आलेला चिनी प्रवासी फाहियान याने गुप्त साम्राज्याचे अत्यंत बहारदार वर्णन केले आहे. त्या वेळची शासनव्यवस्था अतिशय संघटित, कार्यक्षम व उदार होती. प्रजेवरचा करभार सुसह्य होता. व्यापाराची भरभराट होती. त्यामुळे लोक संपन्न व सुखी होते. त्या काळात अनेक विद्यांचा व कलांचा विकास झाला. त्याचप्रमाणे तत्त्वज्ञान, ललित साहित्य व शास्त्रीय वाङ्मय यांचीही वाढ झाली.

गुप्त राजवंशाची एकछत्री सत्ता सबंध भारतावर दीर्घ काल चालू होती. असे सुसंघटित आणि विशाल साम्राज्य त्यानंतर पुन्हा कोणताही राजा स्थापन करू शकला नाही. सम्राट अशोक मौर्य याच्या प्रभावामुळे भारतात बौद्ध धर्माचा विलक्षण प्रसार झाला होता. त्या प्रमाणात वैदिक धर्म निस्तेज बनला होता. अशा या तेजोहीन हिंदुधर्माला पुनश्च सतेज व प्रभावी बनवण्याचे महत्कार्य गुप्त राजांनी केले. गुप्त राजे वैदिक संस्कृती व हिंदू धर्म यांचे अभिमानी होते. ते स्वतःला परम-

भागवत म्हणत. त्यांनी अश्वमेध यज्ञाची लोपलेली परंपरा पुनश्च सुरू केली. गुप्त काळात अनेक शैव-वैष्णव मंदिरे निर्माण झाली. गुप्त सम्राटांनी बौद्ध व जैन या धर्मांनाही प्रचारस्वातंत्र्य दिले व त्या कामी त्यांना साहाय्यही केले.



गुप्त वंशाचे राज्य (—— सीमारेषा)

गुप्तपूर्व काळात प्राकृत भाषेला विशेष मान होता. त्या काळातील बहुतेक शिलालेख त्या भाषेत लिहिलेले आढळतात. ती प्रथा बदलून गुप्त राजांनी संस्कृत भाषेला राजभाषेचे स्थान दिले. गुप्तकालात अनेक संस्कृत काव्ये व तत्त्वज्ञानविषयक ग्रंथ निर्माण झाले. चंद्रगुप्त विक्रमादित्याचा दरबार महाकवी कालिदासादी नवरत्नांनी भूषित झालेला होता.

गुप्तकाळात भारतीय कलांचा परमोत्कर्ष झाला. शिल्पकलेच्या क्षेत्रात स्तूप व लेणी यांची जुनी परंपरा आणि स्तंभावरील कलाकुसर यांचा सुरेख संगम झालेला दिसतो. अजंटा-वेरूळ येथील लेणी व सारनाथ येथील धमेख स्तूप ही गुप्तकालीन शिल्पाची सुंदर उदाहरणे होत. प्राचीन पद्धतीची सपाट छपराची मंदिरे व त्याभोवती अनेक स्तंभी सभामंडप ही गुप्तकाळाच्या प्रारंभीची स्थापत्यरचना होती. सांची येथे अशा प्रकारचे एक लहानसे मंदिर आहे. त्यानंतर शिखरयुक्त मंदिरे उभारली जाऊ लागली. भितरगाव व देवगड येथे अशी मंदिरे दिसतात.

मूर्तिकलेचा तर गुप्तयुगात विशेषच विकास झाला. सारनाथ येथील बुद्धप्रतिमा आणि देवगड येथील शिव, विष्णू, इ. देवतांच्या मूर्ती म्हणजे शुद्ध भारतीय मूर्तिकलेचे उत्कृष्ट नमुने आहेत. या मूर्तीमध्ये आढळणारे शरीरसौष्ठव आणि मुखावरील दैवी प्रसन्नता अत्यंत खुलून दिसते. त्या वेळचे कोरीव कामही अत्यंत सुबक व सुंदर आहे. धातूच्या मूर्ती घडविण्याच्या कामीही तत्कालीन कलाकार कुशल होते. इ. स. ६ व्या शतकाच्या अखेरीस नालंदा येथे ८० फूट उंचीची तांब्याची बुद्धमूर्ती उभी करण्यात आली होती. सुलतानगंज येथे साडेसात फूट उंचीची बुद्धाची कांस्यमूर्ती सापडली आहे. तीही गुप्तकालीनच आहे. दिल्लीच्या कुतुबमिनाराजवळ जो लोहस्तंभ उभा आहे, तो म्हणजे धातुकामातील एक महदाश्चर्यच होय.

अजंटा आणि बाघ येथील लेण्यांमध्ये जी सुंदर भित्तिचित्रे सापडली आहेत, ती गुप्तकालीन चित्रकलेची उत्कृष्ट उदाहरणे

ठरतात. त्यांत भारतीय चित्रकलेचा संपूर्ण विकास झालेला दिसून येतो. हजार वर्षांपेक्षा अधिक काल ती चांगल्या स्थितीत टिकून राहिली आहेत. अनेक परकीय कलातज्ज्ञांनी त्या चित्रांची मुक्तकंठाने प्रशंसा केली आहे.

तो काळ वाच्यार्थानेही सुवर्णयुगच होता. कारण त्या वेळी भारतात सुवर्णाची विपुलता होती. गुप्तकालीन सुवर्णमुद्रा या त्या सुवर्णयुगाचे प्रतीकच होत. इंद्रध्वज, धनुर्धर, कृतान्त, परशू, लिच्छवी, व्याघ्र, गांधर्व, ललित, अश्वमेध, इ. त्या मुद्रांची नावें असून, त्यांची घडणही भिन्न प्रकारची आहे. एका मुद्रेवर चंद्रगुप्त व कुमारदेवी यांच्या विवाहाचे दृश्य आहे, तर दुसरीवर समुद्रगुप्त वीणा वाजवीत असलेला दाखविला आहे.



समुद्रगुप्ताच्या सुवर्णमुद्रा

अशा प्रकारे भारताच्या इतिहासात गुप्तकाळ हा सर्व दृष्टींनी अद्वितीय ठरला आहे. [गु. सा. इ.; ए. इं.–मजु.; आकाशवाणी विविधा १९५९]

गुप्त शक एक राजकीय कालगणना. अल्‌बिरूनीने हर्षसंवत १४८८ = विक्रमसंवत् १०८८ = शक ९५३ = गुप्त किंवा वलभी शक ७१२ असे समीकरण दिले आहे. गुप्त शकाचा आरंभ चैत्रादी विक्रम संवताची ३७६ वर्षे किंवा शालिवाहन शकाची २४१ वर्षे गेल्यावर म्हणजे इ. स. ३१९ मध्ये झाला असला पाहिजे. काठेवाडातील एका शिलालेखात हिजरी ६६२ = विक्रम १३२० = वलभी ९४५ = सिंह १५१ आषाढ वद्य १३ रवि असा काल दिला आहे. येथ विक्रम १३२० हा कार्तिकादी असल्यामुळे चैत्रादी विक्रम १३२१ असा धरावा लागतो. या हिशेबाने विक्रमसंवत ३७६ या वर्षी गुप्त किंवा वलभी शक सुरू होतो. या शकाचे महिने पौर्णिमांत असून, शकारंभ चैत्र शुद्ध प्रतिपदेस होतो. या शकाचा प्रसार नेपाळ ते काठेवाड एवढ्या मोठ्या प्रदेशात असतानाही कालांतराने तो लोप पावला.

या कालगणनेचा प्रारंभ नेमका कोणत्या राजाने केला, हे समजत नाही. तथापि गुप्त वंशातील पहिले दोन राजे गुप्त व व घटोत्कच यांच्या नावांमागे नुसते महाराज असे बिरुद आहे. घटोत्कचाचा पहिला मुलगा प्रथम चंद्रगुप्त याच्या नावामागे मात्र महाराजाधिराज हे उपपद आहे. पहिल्या चंद्रगुप्ताचा नातू दुसरा चंद्रगुप्त याच्या कारकीर्दीतला ‘गुप्तशकानुवर्तमान-संवत्सरे एकषष्ठे’ असे वाक्य असलेला एक लेख सापडला आहे. त्यावरून असे अनुमान करता येते, की या कालाचा आरंभ बहुधा पहिला चंद्रगुप्त राज्यावर आला त्या वर्षापासून होत असावा.

सुरवातीपासून या कालाचा तीन प्रकारांनी निर्देश केलेला आढळतो. एक प्रकार वर आलेला आहे. दुसरा प्रकार संवत, संवत्सरे, वर्षे हे शब्द किंवा त्यांचे संक्षेप उपयोगात आणून वर्षसंख्या पुढे दिली जाते. तिसऱ्या प्रकारात एखाद्या गुप्तवंशी राजाचे नाव देऊन त्याच्यापुढे ‘राजसंवत्सरे’ अशासारखे शब्द घातलेले असतात आणि पुढे राज्याभिषेक–वर्षाचा उल्लेख न करता केवळ गुप्तकालाचा उल्लेख असतो.

गुप्तांच्या नंतर काठेवाडात वलभींचे राज्य उदयास आले. या राज्याचा अस्त झाल्यावर तेथील लोक गुप्त शकास वलभी शक असे नाव देऊन तो वापरू लागले असणे शक्य आहे. कारण ज्याच्यामध्ये गुप्त शकाच्या ऐवजी वलभी शक हे नाव घातले आहे, असा काठेवाडातील सर्वात जुना लेख म्हणजे वलभी शक ५७४ मधील ऊना गाव येथे मिळालेले एक दानपत्र हा होय. पाहा — गुप्त राजवंश. [गु. सा. इ.; म. ज्ञा. को.; सं. मि.; सु. वि. को.]

गुप्ती एक जैन कल्पना. मोक्षासाठीं आस्रवांचा रोध करणे म्हणजे संवर होय. गुप्ती ही संवराची पहिली पायरी होय. काया-वाचा-मन यांच्यावर नियंत्रण ठेवणे, इंद्रियांना विषयसुखापासून पराङ्मुख करणे, याला गुप्ती म्हणतात. गुप्तीच्या द्वारे आत्म्याचे रक्षण होते, भोगादी पापप्रवृत्ती थांबतात व ध्यानादी पुण्यप्रवृत्ती वाढीस लागतात. कायगुप्ती, वचनगुप्ती व मनोगुप्ती असे गुप्तीचे तीन भेद आहेत. [तत्वार्थसूत्र ९. २ व ४]

गुप्ते, गजानन महाराज (१८९२ ते १९४५ इ. स.) महाराष्ट्रातील एक संत. विदर्भातील यवतमाळ येथे यांचा जन्म झाला. यांच्या वडिलांचे नाव मुरलीधर व आईचे लक्ष्मीबाई असे होते. वयाच्या तिसऱ्या वर्षी देवी आल्यामुळे यांचा एक पाय अधू झाला. लहानपणी आई-वडील वारल्यामुळे यांची मावशी बाळूबाई हिने यांचा प्रतिपाळ केला. 'बी' कवी हे यांचे बंधू होत.

पुढे महाराजांनी हरिहरस्वामी, नंगेबोवा, तेली महाराज, गुलाबराव महाराज, इ. साधुसंतांच्या सहवासात काही काळ घालवला. ते ध्यान लावून बसले, की न कळत त्यांच्या हातून चमत्कार होत असत.



गजानन महाराज

महाराज ब्रह्मचारी होते. त्यांची वृत्ती सदैव आनंदी असून त्यांचा स्वभाव विनोदी होता. त्यांचा पोषाख अतिशय स्वच्छ आणि आकर्षक असे. आपल्या पत्राखाली ते केरसुणी अशी सही करीत. मुमुक्षूच्या अंतःकरणातील मळ काढून टाकून त्याला जीव-शिवाच्या ऐक्याचा अनुभव आणून देणे, या अभिप्रायाने त्यांनी हे नाव घेतले असावे.

सर्व वस्तूंत परमात्मा पाहा, आपली वर्तणूक शुद्ध ठेवा, परमेश्वराची प्रार्थना करा, 'सोऽहं रूपे जाणिजे आत्मराजा' असा ते उपदेश करीत. साधकाने ध्यानयोगाचा अभ्यास केल्यास सोऽहम् या मंत्राच्या सामर्थ्याने याच जन्मी तो पूर्णत्वाला पोचेल, असे ते सांगत. स्वतः त्यांची सद्गुरूवर अत्यंत निष्ठा होती. त्यांनी अनेक साधकांवर अनुग्रह केला आहे.

गजानन महाराजांनी नासिक येथे देह ठेवला. तिथे गोदावरीकाठी त्यांच्या समाधीवर चबुतरा बांधलेला असून, त्यावर महाराजांच्या पादुकांची स्थापना केलेली आहे. [श्री. गुप्ते महाराज यांचे चरित्र]

गुप्तेश्वर काही काही देवालयांत देवाची मूर्ती किंवा त्याचे एखादे प्रतीकही ठेवलेले नसते. काही विशिष्ट परिस्थितीमुळे असे घडते. गुप्तेश्वर किंवा गैबीनाथ ही नावे ही गोष्ट सुचवितात. अशा वेळी भक्तजन मंदिराच्या गाभाऱ्यातील देवमूर्तीच्या स्थानाचे दर्शन घेतात. [अ. अ.]

गुमट्टी आंध्र प्रदेशातील एक वाद्य. खेडेगावातून बालनागम्माची कथा गाताना ताल धरण्यासाठी या वाद्याचा वापर करतात. हे वाद्य मातीचे असून, त्याचा आकार गोल घड्याप्रमाणे असतो. याच्या तळाला दोन इंच व्यासाचे एक छिद्र असते. एका लोखंडी कड्यावर कातडे ताणून ते कडे या छिद्रावर ठेवतात. या कड्यास दहा छिद्रे असतात. या छिद्रातून दोरीचे धागे ओवून घड्याच्या तोंडावर बसवलेल्या दुसऱ्या कड्यास बांधलेले असतात. या धाग्यांमुळे ढोलाचे तोंड चांगले ताणले जाते. हे वाद्य आडवे धरून वाजवतात. घड्याचा आतील भाग मोकळा असल्याने तो ध्वनियंत्राचे काम करतो व त्यामुळे आवाज घुमतो. या वाद्याचे तोंड उजव्या बाजूस ठेवतात. पाहा – घुमट. [डि. सा. इं. म्यु. म्यु.]



गुमट्टी

गुमडी गौरी द. भारतातील एक देवी. सुवासिनी स्त्रिया अखंड सौभाग्यासाठी हिचे व्रत करतात. या व्रतात भोपळ्याचे दान द्यायचे असते. [का. ट्रा. स. इं.]

गुमान द्विज (इ. स. १८ वे शतक) एक हिंदी कवी. पित्याचे नाव गोपाळमुनी. महोबा येथे त्रिपाठी कुलात याचा जन्म झाला. इ. स. १७८१ मध्ये या कवीने श्रीकृष्ण चंद्रिका नावाचा ग्रंथ लिहिला. त्यात याने भागवताच्या प्रथम, तृतीय व दशम या स्कंधातील कथांचे भाषांतर केले आहे. छंदाटवी या ग्रंथात याने छंद:शास्त्राची माहिती दिलेली आहे. [हिं. सा. को. २]

गुमान मिश्र (इ. स. १८ वे शतक) एक हिंदी कवी. साँडी येथे राहणारा मिश्र ब्राह्मण. हा हिंदी व संस्कृत भाषा यांचा चांगला जाणकार व साहित्यशास्त्रातला पंडित होता. हा काही काल दिल्लीच्या बादशहाकडे राहिला होता. तिथून पुढे हा पिहानीला आला. याने नैषध काव्याचा हिंदीत अनुवाद केला आहे. याशिवाय अलंकारदर्पण व गुलाल चंद्रोदय असे याचे दोन ग्रंथ उपलब्ध आहेत. याच्या काव्यरचनेपैकी एक श्लोक असा—

न्हाती जहाँ सुनयना नित बावली में
छूटे उरोजतल कुंकुम नीर ही में ।
श्रीखंडचित्र दृग अंजन संग साजै
मानौ त्रिबेनि नितहीं घरही बिराजै ॥

भावार्थ— जिथे सुंदर स्त्रिया नेहमी विहिरीत स्नान करतात व त्या वेळी त्यांच्या वक्ष:स्थळांवरचे केशर पाण्यात उतरतें. स्त्रियांचा गोरा रंग, त्यांच्या डोळ्यातील काळे काजळ आणि केशराचा रंग हे सर्व पाण्यात एकत्र मिसळले, की घरातच रोज त्रिवेणीसंगम झाल्यासारखे वाटते.

गुरखा नेपाळ प्रदेशातील एक प्रमुख जात. गंडकी नदीच्या पूर्वेस त्रिशूलगंगा व मत्स्यगंगा या नद्यांच्या दुआबातील भागात गुरखा नावाचा जिल्हा आहे. या जिल्ह्यात राहणाऱ्या लोकांना गुरखा किंवा गोरखा असे म्हणतात. गुरखा याचा अर्थ गो-रक्षक असा होतो व त्यावरून मुळात गोपालक लोकांना गुरखा हे नाव पडले असावे. कित्येकांच्या मते नेपाळात गोरखनाथ नावाचा एक साधू होऊन गेला, त्याच्या नावावरून गुरखा हे नाव रूढ झाले आहे.

गुरखा लोक स्वत:ला राजपूत वंशाचे म्हणवितात. मुसलमानांनी ज्या वेळी चितोडवर स्वाऱ्या केल्या, त्या वेळी कित्येक राजपुतांनी आत्मरक्षणासाठी नेपाळच्या डोंगराळ भागाचा आश्रय केला व पुढे तिथेच राज्य स्थापले. याशिवाय खश, गुरंग, मंगर, इ. जातींचाही समावेश गुरखा लोकांतच होतो. आजच्या गुरखा पलटणीत याच जातीच्या लोकांचा विशेष भरणा आहे.

गुरखा लोक अंगाने सडपातळ व सुरेख असतात. त्यांना नीटनेटकेपणा आवडतो. हे लोक निळा पायजमा, निळे कुडते व निळे शिरस्त्राण घालून, कमरेभोवती निळा कमरबंद गुंडाळतात व त्यात एक सुरा खोचून ठेवतात. या सुऱ्यास कुकरी असे म्हणतात. श्रीमंत लोक आपल्यां कपड्यांना आतील बाजूस बकऱ्याचे केस लावून घेतात व डोक्याला चित्रविचित्र कापडाच्या तुकड्यांची टोपी घालतात. अधिकारी लोकांच्या टोप्यांना कलाबतूची फीत लावलेली असते.



गुरखा

बकऱ्यांचे व रेड्यांचे मांस गुरखे आवडीने खातात; पण गोमांस खात नाहीत. यांना शिकारीचाही नाद आहे. रानडुकरे व ससे यांची ते शिकार करतात. रानडुकरे पाळून त्यांना धष्टपुष्ट करणे व मग त्यांना मारून खाणे, अशी पद्धत श्रीमंत गुरख्यांत आढळते.

नेपाळ हा प्रदेश डोंगराळ असल्यामुळे इथे फारशी शेती होत नाही. तथापि डोंगराच्या उतरणीवर वाफे त्यार करून गुरखे तिथे थोडीफार शेती करतात. पशुपालन हाही यांचा

एक धंदा आहे. लोकरीचे कपडे तयार करणे, मजुरी करणे व गिर्यारोहणासाठी आलेल्यांची ओझी वाहून त्यांना मार्गदर्शन करणे, हे यांचे अन्य व्यवसाय होत. परंतु हे लोक सैनिक पेशासाठीच सर्वत्र प्रसिद्ध आहेत.

यांच्यांत निसर्गपूजा प्रचलित आहे. नद्या, पर्वत यांची पूजा करून त्यांना नैवेद्य दाखविल्याशिवाय ते भोजन करीत नाहीत. यांचे पुरोहित ब्राह्मण असतात. कित्येकदा स्थानिक लामांनाही पौरोहित्यासाठी बोलावतात. दसरा हा यांचा मोठा सण असतो. नेपाळमध्ये इंद्राची, पशुपतीची, देवी-कुमाराची, अशा अनेक जत्रा भरतात.

ब्रचलादेवी ही गुरख्यांची प्रमुख देवता आहे. नेपाळचा शिवदेव वर्मा नावाचा एक राजा होता. तो शिवरात्रीच्या दिवशी कापडाचे एक टोक पशुपतिनाथाच्या मंदिराला आणि दुसरे टोक राजवाड्याला बांधीत असे. त्यामुळे ब्रचला देवीशी गूढ संबंध प्रस्थापित होतो, अशी त्याची समजूत होती. ब्रचला ही फोड्यांची (देवींची) देवी म्हणून प्रसिद्ध आहे. इ. स. १८०० साली राजा रणबहादुराच्या प्रेयसीला देवी आल्या. ती बरी व्हावी म्हणून राजाने देवीला नवस केला. ती बरी झाली; पण तिचा चेहरा मात्र विद्रूप झाला. त्या गोष्टीचे तिला दुःख झाले व तिने आत्महत्या केली. ते पाहून राजा उद्विग्न झाला व त्याने देवीचे मंदिर तर उद्ध्वस्त केलेच; शिवाय तिला औषधोपचार करणाऱ्या वैद्यांनाही ठार मारले.

काही गुरखे शिव आणि विष्णू यांचेही भक्त आहेत. त्यांच्या बहुतेक शहरात दोन्हीही देवांची मंदिरे असतात. काठमांडू शहरात महादेव आणि शंभुनाथ यांच्या मंदिराबरोबर जगन्नाथ आणि नारायण यांचीही मंदिरे आहेत. यांचा धर्म हिंदू व बौद्ध असा संमिश्र स्वरूपाचा आहे. इथल्या बौद्ध धर्मावर हिंदू धर्माचा प्रभाव आहे. काही बौद्ध मंदिरात हिंदू देवतांच्याही मूर्ती असतात व बुद्धाच्या मूर्तीबरोबर त्यांचीही पूजा केली जाते.

या लोकांमध्ये जातीयतेची बंधने फारशी कडक नाहीत. प्रत्येक जण स्वतःचा स्वयंपाक स्वतः करीत असला, तरी भोजन मात्र सर्वजण मिळून करतात.

गुरखा लोकांत बहुपत्नीकत्वाची चाल आढळून येते. आपल्या बायकांवर यांचा करडा अंमल असतो. यांच्यांत विधवाविवाह निषिद्ध आहे. पाहा– नेपाळ. [म. ज्ञा. को.; हिं वि. को.; नेपाळ]

गुरप्पैया (इ. स. १६७८) विजापूर जिल्ह्यातील एक कानडी संत. गुरप्पैया हा महाशिवालय (नाशाळ) व भृंगवल्ली या दोन खेड्यांचा कुलकर्णी होता. तो शेतीही करी. एकदा त्याला त्याच्या शेतात एक साधुपुरुष तपश्चर्या करीत असलेला दिसला. गुरप्पैयाने त्याला नमस्कार केला व साधूने त्याला संततीप्राप्तीचा आशीर्वाद दिला. त्यावर गुरप्पैयाने त्याला संसारपाशातून मुक्त होण्याचाही उपाय विचारला. तेव्हा त्याने त्याला ‘रामतारकमंत्र’ दिला. गुरप्पैयाच्या विनंतीवरू साधूने त्याला आपली आराधना सांगितली, ती अशी––

प्रतिवर्षी मार्गशीर्ष शु. तृतीयेस दुपारी एक मातीची नवी बिंदगी (कळशी) आणावी. ती जमिनीत यथाविधी पुरावी. मग तिची पूजा करावी. पूजेनंतर ब्राह्मणमंडळींनी त्या बिंदगीत पाणी ओतावे. बिंदगीच्या पूजेचा हा समारंभ आजही त्या गावी होतो.

गुरूच्या आशीर्वादाप्रमाणे गुरप्पैयाला एक मुलगा झाला. त्यानंतर गुरप्पैया पूर्ण विरक्त बनला व भृंगवल्लीच्या वनात ध्यानधारणा करू लागला. समाधिसमयी त्याने संकण्णा नाम आपल्या शिष्यास आपला संप्रदाय पुढे चालवण्यास सांगितले भीमाशंकर असे त्याचे नाव ठेवले. [ना. ब. जोशी – इंद्रायणी एप्रिल १९६३]

गुरव महाराष्ट्र व कर्नाटक या प्रदेशातील एक जात. आपल्या मूळपुरुषाने शिवपूजेत अनास्था दाखवल्यामुळे महादेवाने त्याला शाप दिला व उच्च वर्णापासून च्युत केले, असे हे सांगतात. एका ऋषीपासून गुरवांची उत्पत्ती झाल्याचे शिवपुराणावरून समजते. वेतन घेऊन पूजा करणारे ब्राह्मण हे हव्यकव्याला निषिद्ध असल्याचे स्मृतिकारांनी ठरविले व त्यामुळे गुरव हे त्या निषिद्धांत आले आणि पु त्यांची एक स्वतंत्र जातच बनली असा तर्क आहे. उपनयनादी संस्कार व सामान्य आचारविचार यांमध्ये सुसंस्कृत गुरव ब्राह्मण यांत फारसा फरक आढळून येत नाही. श्रीशिवगंगापीठाच्या शंकराचार्यांनी इ. स. १९१२ साली गुरव हे ब्राह्मण आहेत, असा आपला अभिप्राय दिला आहे.

यांच्यांत अनेक पोटभेद आहेत. लिंगायत, जानवे घालणारे आणि लिंग व जानवें दोन्ही धारण करणारे असे हे धर्मपर भेद होतात. याशिवाय जैन गुरवही आहेत. मात्र ते जैन तीर्थंकरांना भजत नाहीत. यांच्यांत कुळे व गोत्रेही आहेत.

पूजेसाठी नेमून दिलेल्या शेतावर व दक्षिणादी उत्पन्नाव यांना आपली उपजीविका करावी लागते. खेड्यापाड्याती गुरव बेल, फुले व द्रोण–पत्रावळी तयार करून विकतात काही ठिकाणी वाजंत्र्याचाही धंदा करतात.

पूर्वी यांच्यांत जातपंचायत होती; पण आता ती नष्ट झाली आहे. [मुं. इ. ज्ञा.; म. ज्ञा. को.; म. जि. रत्ना.]

गुरुकुल या शब्दाचा वाच्यार्थ गुरूचा परिवार अथवा गुरुवंश असा आहे. पण पुढे शिक्षणसंस्था या अर्थाने हा शब्द रूढ झाला. गुरुकुलात शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना गुरूच्या सांनिध्यात राहावे लागे. उपनयनानंतरच गुरुकुलात प्रवेश मिळे. शिक्षणाची कालमर्यादा साधारणपणे १२ वर्षांची असे. गुरुकुलात वेद–वेदांगे व शास्त्रे शिकविली जात. त्याचबरोबर विद्यार्थ्यांच्या मन-बुद्धीवरही शुभ संस्कार केले जात. शिक्षण समाप्त झाल्यावर मग शिष्याला गृहस्थाश्रम स्वीकारण्याची अनुज्ञा मिळे.

गुरुकुलाची द्वारे गरीब, श्रीमंत या सर्वांना मोकळी असत. त्रैवर्णिकांशिवाय इतर विद्यार्थ्यांना मात्र तिथे प्रवेश मिळत नसे. एकलव्य हा निषाद म्हणून त्याला द्रोणाचार्यांनी विद्या-शिकविण्याचे नाकारले होते. सूतपुत्र म्हणून कर्णालाही गुरुगृह सोडून जावे लागले होते.

भारतात गुरुकुलांचा इतिहास बराच प्राचीन आहे. गुरुकुलांप्रमाणेच निरनिराळ्या ऋषींचे विद्याश्रम असल्याचेही उल्लेख मिळतात. याच गुरुकुलांची विकसित रूपे म्हणजे तक्षशिला, नालंदा, विक्रमशिला, इ. विद्यापीठे होत.

गुरुकुलांचा चरितार्थ चालविणे, हे त्या वेळचे राजे आपले कर्तव्य मानीत. प्रसेनजित राजाने ब्राह्मणांना आश्रमखर्चासाठी काही गावे आंदण दिल्याचे उल्लेख मिळतात. कित्येक राजे विद्यार्थ्यांच्या शिक्षणासाठी अग्रहार स्थापीत व त्या अग्रहारात गुरु-शिष्यांना एकत्र राहण्याची व त्यांच्या योगक्षेमाचीही सोय करीत (अग्रहार पाहा).

गुरुकुल्यतीर्थ नर्मदेच्या तीरावरचे एक तीर्थ. बळिराजाने इथे अश्वमेध केल्याचे स्कंद पुराणात सांगितले आहे (१.१.१८.१५३). हे भृगुकच्छ असावे.

गुरुक्कल त्रिवांकुरामधील एक जात. हिला कुरुक्कल असेही नाव आहे. मुळात हे क्षत्रिय असून, पांडच देशात राहत होते. तिथून ते पोट्टिस येथील कुपक्कर कुलाच्या आश्रयाला आले. त्या काळी कुपक्कर कुलाचा धार्मिक व इतर बाबतीतही मोठा अधिकार होता. त्यांनी गुरुक्कलांना क्विलॉनच्या दक्षिणेकडे राहणाऱ्या अंबलवासी कुटुंबांत पौरोहित्य करण्याची परवानगी दिली.

केरलोत्पत्ती या ग्रंथात सांगितले आहे, की त्रिवेंद्रमच्या पद्मनाभमंदिरात झाडलोट वगैरे करण्याचे काम यांच्याकडे होते. पण उमयम्म राणीच्या कारकीर्दीत मंदिरातील एका उत्सवाचे निमंत्रण एका गुरुक्कलाने तिला उशिरा दिले आणि त्यामुळे त्यांचा हा हक्क काढून घेण्यात आला. द. त्रिवांकुरमधील काही मंदिरांत मात्र त्यांचा हा हक्क कायम आहे आणि काही मंदिरांत ते पुरोहित म्हणूनही नेमलेले आहेत. यांच्यापैकी काही लोक शेतीही करतात.

गुरुक्कल हे स्मार्त असून, ओणम हा त्यांचा मुख्य सण असतो. यांच्या स्त्रियांचा पोषाख नंपूतिरी स्त्रियांप्रमाणे असतो.

विवाहप्रथा – या लोकांत ताळिकेट्टुकल्याणम व संबंधम असे दोन्ही विवाहप्रकार प्रचलित आहेत. आपल्या जातीतल्या स्त्रियांशी किंवा मारान अथवा वाट्टी नायर स्त्रियांशी गुरुक्कल पुरुष हे संबंधम करतात. सात ते अकरा वर्षांच्या वयोमर्यादेत मुलीला ताळी बांधण्याचा समारंभ करतात. लग्नाच्या दिवशी नवरा मुलगा तलवार व ताडपत्र घेऊन मिरवत वधूगृही जातो. वराने वधूच्या गळ्यात ताळी बांधल्यावर त्या दोघांना स्नान घालतात. वाधियर लोक त्यांचे पौरोहित्य करतात.

मर्तिकप्रथा – मृतांना जाळतात. तिसऱ्या, पाचव्या किंवा सातव्या दिवशी अस्थिसंचयन करतात. सुतक अकरा दिवस पाळतात. मृताच्या दहनाच्या जागी दगडी स्मारके उभारतात व दरवर्षी त्यांची पूजा करतात. [का. ट्रा. स. इं.]

गुरुग्रंथ शीखांचा धर्मग्रंथ. हा ग्रंथ गुरुमुखी लिपीत छापलेला असून, त्याचे वर्गीकरण ७ अध्यायात केलेले आहे. गुरु नानकाने उच्चारलेल्या मूलमंत्राने या ग्रंथाची सुरुवात झालेली आहे. तो मूलमंत्र असा —

ओं सतिनामु करता पुरखु निरभउ
निरवैरु अकाल मूरति अजूनी सैभं गुरप्रसादि ।।

या श्लोकात ‘वाहि गुरू ’चे स्वरूप स्पष्ट करण्याचा प्रयत्न केलेला आहे. शीख लोक ब्रह्म या शब्दासाठी ‘ वाहि गुरू ’ या शब्दांचा प्रयोग करतात. सर्वशक्तिमान् ब्रह्म हेच अखेरचे सत्य आहे; कारण ते कालातीत आहे, असे ते समजतात. हे ब्रह्म ज्ञानगम्य नाही. वाणीही तिथे अवरुद्ध होते. अखेर अनुभूतीला शरण जाऊनच त्या ब्रह्माची प्राप्ती करून घ्यावी लागते. या अनुभूतीचे साधन म्हणजे गुरूला शरण जाणे, हे होय. ‘ गुरुमुखि नादं गुरुमुखि वेदं ’ असा हा साधनप्राप्तीचा मार्ग आहे. हा मार्ग सांगत असतानाच प्रस्तुत ग्रंथात नाममाहात्म्यही सांगितले आहे. अशा रीतीने ब्रह्म, सृष्टी, जीवात्मा, साध्य, अवरोधशक्ती, इ. अनेक विषयांचे विवरण करून ग्रंथ समाप्त केला आहे. पाहा – आदिग्रंथ. [श्री गुरुग्रंथसाहिब : एक परिचय – डॉ. धर्मपाल मैनी; गु. ग्रं. को.]

गुरुचरित्र दत्तसंप्रदायाचा उपासना ग्रंथ. हा ग्रंथ सरस्वती गंगाधराने लिहिला आहे. या ग्रंथातील शब्दाशब्दाला मंत्राची योग्यता आहे, असे मानले जाते. या ग्रंथाचा रचनाकाल इ. स. १५३५ हा मानतात. प्रस्तुत ग्रंथाचे ५२ अध्याय असून ओवीसंख्या ७४९१ आहे. पहिला अध्याय मंगलाचरण, २ ते ९ दत्तावतारचरित्र, ५ ते १० श्रीपाद श्रीवल्लभ यांचे चरित्र, ११ ते ५१ श्रीनरसिंह सरस्वतींचे चरित्र आणि बावन्नावा अध्याय अवतरणिका असा या ग्रंथाचा विस्तार आहे. अवतरणिकेचा अध्याय नंतर जोडला गेला असून, मूळ गुरुचरित्र ५१ अध्यायांचेच होते, असे अभ्यासकांचे मत आहे.

गुरुभक्ती आणि प्रसाद हे या ग्रंथाचे दोन प्रमुख विशेष होत. दोन दत्तावतारांच्या चरित्रांशिवाय प्रसंगाप्रसंगाने ब्राह्मणांचा आचारधर्म, सतीधर्म, गुरुभक्ती, व्रते, तीर्थे, इ. अनेक विषय सरस्वती गंगाधराने यात त्या वेळच्या महाराष्ट्री भाषेत लिहिले आहेत. सरस्वती गंगाधर हा कानडी ब्राह्मण होता व त्याची मातृभाषा कानडीच होती. त्यामुळे त्यात कानडी भाषेतील काही लकबी, अशुद्ध वाक्यप्रयोग वगैरे सापडतात. ग्रंथकार स्वतःच म्हणतो–

नकळे ग्रंथप्रकार । नेणे शास्त्रांचा विचार ।
भाषा न ये महाराष्ट्र । म्हणोनि विनवी तुम्हासी ।
ग्रंथ कराल उदास । वांकुडा कृष्ण दिसे ऊंस ।
अमृत निघे त्याचा रस । दृष्टी द्यावी तयांवरी ।

गुरुचरित्रात वेदान्ताला फारसा वाव नाही किंवा क्रियाशून्य भक्तीलाही महत्त्व नाही. तसेच मानवी संसाराला तुच्छ लेखून मोक्षाच्या मागे लागण्याचा उपदेशही या ग्रंथात नाही. वेदप्रतिपादित मार्गाप्रमाणे ऐहिक जीवनाचा यथाशास्त्र उपभोग घेऊन त्या द्वारेच मोक्ष मिळवावा, असे त्याचे एकंदर धोरण आहे.

या संसारी जन्मोनिया । संतुष्टावे सकल इंद्रिया
मग पावे धर्मकाया । तरीच तरे भवार्णव

गुरूशिवाय म्हणजेच योग्य मार्गदर्शकाशिवाय मानवाला आपले अंतिम ध्येय साध्य करून घेता येणार नाही, अशी स्पष्ट जाणीव देऊन, शेवटी गुरूच्या आज्ञेनेच हा ग्रंथ लिहिला असल्याचे लेखकाने सांगितले आहे.

पूर्वापार आमुचे वंशी । गुरु प्रसन्न अहर्निशी ।
निरोप देती माते परियेसी । चरित्र आपुले विस्तारी ।।

या ग्रंथाचे दुसरे एक अपूर्वत्व असे– त्या काळी मुसलमानी राजसत्तेचा सर्वत्र दबदबा होता. भाषा व संस्कृती यांवरही त्या सत्तेचा प्रभाव पडला होता. पण असे असताही, हा ग्रंथ शुद्ध मराठी भाषेत, एकही यावनी शब्द न स्वीकारता लिहिलेला आहे. इतकेच नाही; तर, न वंदिजे म्लेच्छासी, अशी या ग्रंथाची शिकवण आहे. वाङ्मयीन दृष्टचा या ग्रंथाचे मूल्यमापन करताना श्री. ज. स. करंदीकर म्हणतात–

श्रीगुरुचरित्र हा ग्रंथ श्रीधरकवीच्या शिवलीलामृतापेक्षाही सरस आहे. श्रीधराच्या वर्णनात नव्या कल्पना व कवित्वस्फूर्ती अल्पांशाने आढळते. श्रीधरस्वामीच्या शिवलीलामृताशीच गुरुचरित्राची तुलना करण्याचे कारण असे की, त्या दोहोत दहाबारा कथा सारख्याच आहेत. तेव्हा एकाच प्रसंगाचे वर्णन ते दोघे कोणत्या पद्धतीने करतात, याची तुलना चांगली करता येते. उदा० गणपतीने रावणास फसवून त्याने दिलेले शिवलिंग भूमीवर ठेवल्याचा प्रसंग घ्या किंवा शबरीने चिताभस्म मिळविण्यासाठी आपला देह जाळून घेतल्याचा प्रसंग घ्या; या प्रसंगांचे गुरुचरित्रातील वर्णन अत्यंत हृदयंगम असेच वाटेल व त्यापुढे श्रीधरस्वामीचे वर्णन फिके पडेल.

देह हा अशाश्वत असल्यामुळे तो सुदृढ आहे, तोवर कर्मांनी चित्तशुद्धी साधीत राहिले पाहिजे, असे या ग्रंथाचे सांगणे आहे. याच्या ३७ व ३८ या दोन अध्यायांत ब्राह्मणाचा आचारधर्म विस्तारपूर्वक सांगितला आहे.

धर्म-अर्थ-काम-मोक्ष । त्यासी साध्य होती प्रत्यक्ष ।
महानंद उभयपक्ष । पुत्रपौत्री नांदती ।

असे शेवटी श्रवणफल सांगून ग्रंथ समाप्त केला आहे. पाहा– नरसिंह सरस्वती; श्रीपाद श्रीवल्लभ. [द. सं. इ.; संक्षिप्त गुरुचरित्र– वि. द. रिसबूड; गुरुचरित्र]

गुरुतल्पग गुरू म्हणजे पिता, आचार्य किंवा उपाध्याय. त्याचे तल्प म्हणजे शय्या. म्हणजे पर्यायाने त्याची भार्या. तिच्याशी जो जारकर्म करतो, त्याला गुरुतल्पग असे म्हटलेले आहे. अशा पुरुषाला धर्मशास्त्राने महापापी मानलेले आहे. [श. क.]

गुरुदक्षिणा विद्यासमाप्तीनंतर गुरूला शिष्याकडून जी दक्षिणा दिली जाते, तिला गुरुदक्षिणा म्हणतात. प्राचीन काळी ब्राह्मणांची आणि क्षत्रियांची मुले ऋषींच्या आश्रमात शिकण्यासाठी राहत आणि विद्याध्ययन समाप्त झाल्यावर गुरूला यथाशक्ती दक्षिणा देऊन मग तिथून निघून गृहस्थाश्रम स्वीकारीत.

विद्यागुरुप्रमाणेच प्रत्येक पंथाचेही वेगवेगळे गुरू असतात. आणि जन्म, दीक्षा, लग्न, मृत्यू, इ. प्रसंगी ते शिष्याकडून दक्षिणा घेतात. पाहा– गुरुशिष्य.

गुरुदासजी

एक कवी. हा मल्लेकुलोत्पन्न क्षत्रिय होता. हा गुरू अमरदासाचा पुतण्या असून, गुरू अर्जुनदेवाचा मामा होता. इ. स. १५७९ त याने गुरू रामदासांकडून चरणामृत घेऊन शीखधर्म स्वीकारला. याने पुष्कळ पद्यरचना केली असून, त्यात वृत्तज्ञान, व्याकरणज्ञान, शब्दव्युत्पत्तीचे ज्ञान आणि व्यावहारिक ज्ञान यांची विशेषता प्रत्ययाला येते.

याला संस्कृत, अरबी, पंजाबी, इ. भाषा अवगत होत्या. गुरू अर्जुनदेवाने संपादित केलेल्या ग्रंथांचे लेखनही यानेच केले. इ. स. १६३९ मध्ये हा गोइंदवाल गावी निधन पावला. [गु. ग्रं. को.]

गुरुदासी

ओडिसा प्रदेशातील एक जात. हे लोक वैष्णवपंथी आहेत. शेती, मासेमारी, माळीपणा, इ. त्यांचे व्यवसाय आहेत. हे वैष्णव असले तरी इतर प्रदेशातील वैष्णव लोक यांना मानीत नाहीत.

गुरुदीखिआ

शीख पंथातील दीक्षाविधी. या वेळी दीक्षिताला कडे, केस, कंगवा, कच्छ व कृपाण असे पाच ककार धारण करायला लावून अमृतप्राशन करवितात आणि सिंघ ही पदवी देतात. प्रत्येक शीखाला आयुष्यातून एकदा ही दीक्षा घ्यावीच लागते. याशिवाय चार महापातकांचा अपराध सिद्ध झाल्यास अपराध्याला दंड करून पुनश्च ही दीक्षा देतात.

प्रथमदीक्षाप्रसंगी म्हणजे इ. स. १६९९ साली गुरू गोविंदसिंघाने लोखंडी पात्रात भरून ठेवलेल्या थंड पाण्यात दुधारी तलवार फिरवून अमृत तयार केले होते. सांप्रत मात्र साखरेच्या पाकात तासभर तलवार फिरवून गुरुग्रंथातील नित्योपासनेचे पाच पाठ म्हटल्याने अमृत सिद्ध झाल्याचे मानतात. दीक्षा घेणाऱ्याने पाच वेळा ते अमृत प्राशन करावे, दीक्षा देणाऱ्याने ते घेणाऱ्याच्या मस्तकावर शिंपडावे आणि डोळ्यांना लावावे, असा हा विधी आहे. हा विधी चालू असताना दीक्षा घेणाऱ्याने 'वाहि गुरुजी का खालसा । वाहि गुरुजी की फते'= मी परमेश्वराचा खालसा (शिष्य) आहे; गुरूचा विजय असो, असा दीक्षामंत्र म्हणायचा असतो. अमृतदीक्षा घेतलेले सर्व शीख परस्परांना अभिवादन करताना यांच मंत्राचा उच्चार करतात. दीक्षाधारी नसलेल्या पुरुषांना आणि सर्व स्त्रियांना अभिवादन करताना मात्र 'सत् श्री अकाल' असे म्हणण्याचा प्रघात आहे. 'सत् श्री अकाल' ही शीखांची रणगर्जनाही आहे. दैनंदिन उपासनेचा कार्यक्रम संपवताना आणि विशेष आनंदाच्या प्रसंगी एकाने 'बोले सो निहाल' अशी उंच गर्जना करायची आणि त्याच्या उत्तरादाखल इतर सर्वांनी त्याहून उंच स्वरात 'सत् श्री अकाल' ही गर्जना करायची, अशी पद्धत आहे. [गु. ग्रं. को.]

गुरुद्वादशी

आश्विन वद्य द्वादशीस गुरुद्वादशी असे म्हणतात. दत्तात्रेयाचे एक अवतार श्रीपाद श्रीवल्लभ यांची ही पुण्यतिथी होय.

> आश्विन वद्य द्वादशीसी । नक्षत्र मृगराज परियेसी ।
> श्रीगुरु बैसले निजानंदेसी । अदृश्य झाले गंगेंत ।
>
> (गुरुचरित्र)

या दिवशी दत्तक्षेत्रांमध्ये विशेषतः नरसोबाच्या वाडीस दीपोत्सव, गुरुचरित्राची पारायणे, संतर्पणे वगैरे कार्यक्रम होतात. पाहा– श्रीपाद श्रीवल्लभ [द. सं. इ.].

गुरुद्वारा

शीख पंथाचे उपासनामंदिर. गुरुद्वाऱ्याला परमात्म्याच्या निवासस्थानाचा दरवाजा असे समजतात. उपासनेने प्रभूच्या महालाचा दरवाजा उघडतो, अशा धारणेने शीख लोक उपासनामंदिरालाच प्रभूचा दरवाजा समजून तिथे प्रार्थना करतात. 'द्वार'च्या ऐवजी 'द्वारा' असा पुल्लिंगी शब्दप्रयोग पंजाबी भाषेत रूढ आहे. पूर्वी अशा स्थानाला धर्मसाल हा शब्द होता; पण तो शब्द वापरातून गेला व त्याऐवजी गुरुद्वारा हा शब्द रूढ झाला.



गुरुद्वारा – कपुर्थळा

गुरुद्वाऱ्यात कोणतीही देवमूर्ती नसते. तिथे फक्त गुरुग्रंथाची स्थापना केलेली असते. जपजीसाहेब, सुखमनिसाहेब, आसादीवारचे कीर्तन, जापसाहेब, आनंदसाहेब हे गुरुद्वाऱ्यातील पहाटेचे नित्यपाठ असतात. त्यानंतर अर्जुनदेवाच्या सुखमनीमधील प्रार्थना होते. ही प्रार्थना झाल्यावर दहा गुरु, पाच पुत्र, पंच प्यारे इत्यादींचे स्मरण करून अखेर प्रसाद दिला जातो.

उघडया डोक्याने गुरुद्वाऱ्यात प्रवेश करावयचा नाही, असा कडक निर्बंध आहे. कमीत कमी रुमाल तरी डोक्यावर असावाच लागतो.

हिंदूंच्या चारी धामांप्रमाणे शीखांचीही चार धर्मपीठे आहेत. पूर्वेस पाटणा हे गुरू गोविंदसिंघाचे जन्मस्थान, पश्चिमेस अमृतसरचे श्री अकाल तख्त, उत्तरेस आनंदपूर व दक्षिणेस नांदेड ही ती चार धर्मपीठे होत. या चारी ठिकाणी गुरुद्वारे आहेत. याशिवाय अन्यही काही धर्मपीठे आहेत. [गु. ग्रं. को.]

गुरुपरब गुरू नानकाच्या नावाने साजरा केला जाणारा शीखांचा एक सण. हा कार्तिक महिन्यात येतो. या सणात ग्रंथसाहिबाचे संपूर्ण वाचन हा प्रमुख विधी असतो. सणाच्या आधी दोन रात्री ग्रंथवाचनाला प्रारंभ करतात व सणाच्या दिवशी ते पूर्ण करतात. या विधीला अखंडपंथ असे म्हणतात. या दिवशी ग्रंथसाहिबाची मिरवणूकही काढतात. मिरवणुकीत पाच शीख नंग्या तलवारी घेऊन पुढे चालतात. [मार्च ऑफ इंडिया, सप्टें. १९५७]

गुरु-पुष्यमुद्रा गुरुवारी पुष्य नक्षत्र आले असता त्या दिवशी सोने विकत घेऊन केलेल्या अंगठीला हे नाव आहे. प्रत्येक गुरु-पुष्ययोगावर सव्वा मासा, अशा प्रकारे २७ गुरु-पुष्ययोगांवर तितके सोने विकत घेऊन मग त्याची अंगठी करतात. मग शुभ दिनी पुण्याहवाचन, वरुणपूजा, गुरूच्या सुवर्णमूर्तीची पूजा, पीतवस्त्रसमर्पण, दहीभाताचे बलिदान, गुरुमंत्राने तुपाचे हवन, इ. गोष्टी झाल्यावर ती अंगठी आचार्यांच्या हस्ते ग्रहण करून बोटात घालतात. २७ ब्राह्मणांना भोजन घालतात. ही अंगठी धनलाभ घडविते व सर्व कार्यात यश देते, असे सांगितले आहे. [व्रतराज],

गुरुपौर्णिमा आषाढ पूर्णिमेस गुरुपौर्णिमा असे म्हणतात. या दिवशी व्यासपूजा करण्याची प्रथा आहे. व्यासमहर्षी हे शंकराचार्यांच्या रूपाने पुन्हा अवतीर्ण झाले, अशी भाविकांची श्रद्धा आहे. तेव्हा संन्यासीलोक त्या दिवशी व्यासपूजा म्हणून शंकराचार्यांची पूजा करतात. शिष्यही त्या दिवशी आपल्या गुरूची पूजा करतात. या पूजेचा विधी असा —

स्नानादी नित्यकर्मे आटोपून ‘गुरुपरम्परासिद्धयर्थं व्यासपूजां करिष्ये’ असा संकल्प करतात. एक धूतवस्त्र पुढे आंथरून त्यावर, पूर्वेकडून पश्चिमेकडे व उत्तरेकडून दक्षिणेकडे अशा, गंधाने बारा रेषा काढतात. तेच व्यासपीठ होय. मग, ब्रह्मा परापरशक्ती, व्यास, शुकदेव, गौडपाद, गोविंदस्वामी व शंकराचार्य यांचे त्या व्यासपीठावर आवाहन करून त्यांची षोडशोपचार पूजा करतात. याच दिवशी दीक्षागुरू व मातापिता यांचीही पूजा करण्याची प्रथा आहे.

तमिळ प्रदेशात ही व्यासपूजा ज्येष्ठ पौर्णिमेस करतात. कुंभकोणम व शृंगेरी ही द. भारतातली शंकराचार्यांची प्रसिद्ध पीठे आहेत. या ठिकाणी व्यासपूजेचा महोत्सव होतो. गुरुपरंपरेत व्यासांना सर्वश्रेष्ठ गुरू मानलेले आहे. सर्व ज्ञानांचा उगम व्यासापासून होतो, अशी भारतीयांची धारणा आहे. [व्र. प.]

गुरुप्रतिपदा फाल्गुन कृष्ण प्रतिपदेला गुरुप्रतिपदा म्हणतात. दक्षिणेत आणि महाराष्ट्रात – विशेषत: गाणगापूरला या दिवशी गुरुपूजन (दत्तात्रेय पूजा) करण्याची प्रथा आहे.

गुरुमंत्र गुरु = बृहस्पती याचा एक मंत्र. वैदिक मंत्रांव्यतिरिक्त बृहस्पतीचा आणखी एक अष्टाक्षरी मंत्र ‘बृंबृहस्पतये नमः’ असा आहे. याचा ऋषी ब्रह्मा, छंद अनुष्टुभ, देवता गुरू व बीज बृं आहे. याचे ८० हजार पुरश्चरण करतात. त्यानंतर चरू व घृत यांचे हवन करतात. एवढे केल्याने मंत्र सिद्ध होतो. मग इष्टसिद्धीसाठी त्याचा प्रयोग करतात. वस्त्रालंकारप्राप्तीसाठी तीन दिवस १२० जप व घृतमिश्रित हरिद्राकुंकुमाचे हवन करतात. शत्रू, रोग, कलह, इ. अनिष्ट गोष्टींचा नाश होण्यासाठी पिंपळाच्या समिधांचे हवन करतात. [मं. म.]

गुरुमुखी एक लिपी. हिला पंजाबी लिपी असेही म्हणतात. पंजाबी जनतेत पूर्वी लंडा नावाची एक महाजनी लिपी प्रचलित होती. या लिपीत स्वरचिन्हे नव्हती. अद्यापही कुठे कुठे ती नाहीत. शीख लोकांचे धर्मग्रंथ पूर्वी याच लिपीत लिहिले जात असत, असे सांगतात. पण आवश्यक स्वरचिह्नांच्या अभावी ते धर्मग्रंथ शुद्ध रीतीने वाचता येत नसत. ही अडचण दूर करण्याकरिता गुरू अंगदाने धर्मग्रंथांच्या शुद्ध लेखनासाठी नागरीप्रमाणे एक स्वरचिह्नयुक्त लिपी तयार केली. या लिपीत काश्मीरची शारदा, कांगडाची टाकरी अथवा ठाकुरी, मध्य प्रदेशाची नागरी, इ. लिप्यांतून चौतीस वर्ण घेतलेले आहेत. इ या वर्णांत थोडा फेरफार करून पस्तीस वर्णांची ही लिपी बनवली आहे. पाचवा गुरू अर्जुनदेव याने या लिपीत आदिग्रंथाचे लेखन केले व तिला शिखांची धार्मिक लिपी बनविले. ही लिपी गुरूच्या मुखातून निघाली म्हणून हिला पुढे गुरुमुखी असे नाव दिले गेले.

या लिपीत तीन स्वर व बत्तीस व्यंजने आहेत. मूळ स्वरांना मात्रा जोडून अन्य स्वर बनवितात. उड़ा, आया, इड़ी, इह्रा, इ. त्यांची नावे आहेत. या वर्णमालेत संयुक्त अक्षरे नाहीत; परंतु संयुक्त ध्वनी मात्र आहेत. उदा० सरिता → स्त्रिता. या लिपीत अंत्य अ चा प्राय: लोप होतो. उदा० पाप → पाप्, पुन → पुन्.

ਅ	ਆ	ਇ	ਈ	ਉ	ਊ	ਏ	ਐ	ਓ	ਔ					
अ	आ	इ	ई	उ	ऊ	ए	ऐ	ओ	औ	अनुस्वार	चंद्र	विसर्ग		
ਕ	ਖ	ਗ	ਘ	ਙ	ਚ	ਛ	ਜ	ਜ਼	ਝ	ਞ	ਟ	ਠ	ਡ	ਢ
क	ख	ग	घ	ङ	च	छ	ज	ज़	झ	ञ	ट	ठ	ड़	ढ
ਣ	ਤ	ਥ	ਦ	ਧ	ਨ	ਪ	ਫ	ਬ	ਭ	ਮ	ਯ	ਰ	ਲ	ਵ
ण	त	थ	द	ध	न	प	फ	ब	भ़	म	य़	र	ल	व
ਸ਼	ਸ	ਹ	ਲ਼	ਗ਼	ਖ਼	ਫ਼								
श	स	ह	ऴ	ग़	ख़	फ़								

गुरुमुखी – श्री. नरवणे यांच्या भारतीय व्यवहारकोशावरून

शब्दाच्या प्रारंभी सघोष महाप्राण वर्ण आल्यास त्याचा उच्चार मात्र अघोष अल्पप्राणाप्रमाणे होऊन त्यावर पुरेसा जोर येतो. उदा० भगवान शब्दाचा उच्चार पहग्वान असा होतो. संयुक्त वर्णातल्या दोन वर्णांचा उच्चार स्वतंत्र रीत्या केला जातो. उदा० प्रलय → पर्लय; प्रताप → पर्ताप; कृष्ण → किर्संन. [हिं. वि. को.; सु. वि. को.; भा. व्य. को.]

गुरुवायूर केरळातील चौघाट तालुक्यातले एक क्षेत्र. इथे श्रीगुरुवायुरप्पाचे मंदिर आहे. या मंदिराविषयी व आतील मूर्तीविषयी ज्या कथा प्रचलित आहेत, त्यांवरून या स्थानाचा इतिहास मिळतो, तो असा–

भगवान कृष्णाने अवतारसमाप्तीपूर्वी उद्धवाच्या हाती बृहस्पतीकडे निरोप पाठविला, की 'द्वारका समुद्रात बुडण्यापूर्वी माझ्या माता-पित्यांच्या दैनिक पूजेतली बालविष्णूची मूर्ती सुरक्षित स्थळी प्रस्थापित करावी.' तो मिळताच बृहस्पती ती मूर्ती ताब्यात घेण्यासाठी त्वरेने द्वारकेत आला; पण तेवढ्यात द्वारका समुद्रात बुडाली होती. मग बृहस्पतीने आपला शिष्य वायू याच्या साहाय्याने ती मूर्ती समुद्रातून बाहेर काढली. नंतर तिच्या प्रतिष्ठापनेसाठी जागा शोधीत असता त्याला एक सरोवर दिसले. त्या सरोवराच्या तीरी शिव-पार्वती त्याच बालविष्णूच्या मूर्तीची प्रतीक्षा करीत थांबले होते. बृहस्पती तिथे येताच शिवाने त्याला व वायूला त्याच जागी मूर्तिस्थापना करण्यास सांगितले. बृहस्पतीने तसे केले. अशा प्रकारे गुरू आणि वायू यांनी मिळून त्या मूर्तीची स्थापना केल्याने सदरहू स्थानाला गुरुवायूर हे नाव मिळाले.

आद्य शंकराचार्य काही दिवस या स्थानी राहिले होते. इथल्या पूजापद्धतीत त्यांनी काही सुधारणा केल्या आहेत.

सतराव्या शतकात केरळामध्ये जी भक्तीची लाट उसळली तिचे केंद्रस्थान गुरुवायूर हेच होते. पून्तानम, मेलपुत्तूर, बिल्वमंगलम व मानवेदन हे चार संत इथेच होऊन गेले. केरळवासी हिंदू दरवर्षी इथे यात्रेला येतात, ते या संतांच्या पुण्यस्मरणासाठी.

गुरुवायूर या स्थानाला असा प्राचीन इतिहास असला, तरी आठव्या शतकापर्यंत ते अज्ञातच होते. ज्ञात झाल्यावरही त्याला कुरुवायूर असे म्हणत. गुरुवायूर हे नाव त्याला मेलपुत्तूरने दिले. इथे येऊन सेवा करणाऱ्या पीडितांच्या रोगव्याधी दूर होतात, अशी समजूत आहे. [कल्याण–तीर्थांक; से. सें.; त्रिचूर गॅझे.]

गुरुवार सप्ताहातला पाचवा वार. याला दत्ताचा वार मानतात. या दिवशी दत्ताचे उपासक दत्तदर्शन, उपास, इ. करतात. दत्तक्षेत्रांतून या वारी रात्रौ दत्ताची पालखी निघते. कुंडलीत गुरू हा ग्रह अनिष्ट आला तर या दिवशी गुरूचा जप, गुरूसाठी दान, इ. गोष्टी करतात. गुरुवार हा शुभ कृत्यांना उक्त मानलेला आहे. या दिवशी क्षौर निषिद्ध आहे. नवा मंत्र घेणे असल्यास तो गुरुवारी घेतात. काशीत बृहस्पतीश्वर महादेव नावाचा एक देव आहे. गुरुवारी तिथले लोक त्याची पूजा

करतात. मुसलमान लोकही हा वार शुभ मानतात. या वारी रात्री जे मूल जन्मते त्याला ते भाग्यवान समजतात व त्याला 'जुमान राती सय्यद' असे म्हणतात. [की. पॉ.; ब्र. चं.]

गुरुव्रत

अनुराधा नक्षत्र गुरुवारी येईल, त्या दिवशी हे व्रत करतात. यात गु च्या सुवर्णमूर्तीची पूजा व नक्त भोजन सांगितले आहे. असे सात वारीं करतात. [हि. ध.]

गुरुशांती

गुरू हा ग्रह अशुभ स्थानी आला असता ही शांती करण्यास सांगितले आहे. हिचा विधी असा– अनुराधा नक्षत्रावर गुरूची पूजा. सात दिवस नक्त भोजन. सुवर्णपात्रात गुरुमूर्तीची स्थापना व पूजा. मग प्रार्थना. प्रार्थनेचा मंत्र असा –

धर्मशास्त्रार्थतत्त्वज्ञ ज्ञानविज्ञानपारग ।
विबुधार्तिहराचिन्त्य देवाचार्य नमोऽस्तु ते ।।

अर्थ – धर्मशास्त्र आणि तत्त्वज्ञान जाणणाऱ्या, ज्ञानविज्ञानात पारंगत, देवांची पीडा दूर करणाऱ्या व अचिंत्य अशा हे देवाचार्य गुरो, तुला नमस्कार असो.

मग अश्वत्थसमिधा, घृत आणि तिल यांनी होम करून ब्राह्मणभोजन घालतात. पाहा– बृहस्पतिशांती. [शां. क.]

गुरु-शिष्य

गुरू म्हणजे वेदशास्त्रांचे अध्यापन करणारा, या अर्थी पाणिनीने आचार्य, प्रवक्ता, श्रोत्रिय व अध्यापक असे चार प्रकारचे गुरू सांगितले आहेत. उपनीत बटूला वेदाचे अध्यापन करणारा तो आचार्य; ब्राह्मणे, श्रौतसूत्रे व वेदांगे यांचे सार्थ अध्यापन करणारा तो प्रवक्ता; शिष्यांना वेदांची संथा देणारा तो श्रोत्रिय व कृत अर्थात वैज्ञानिक वा लौकिक साहित्याचे अध्यापन करणारा तो अध्यापक होय.

भारतीय शिक्षणपद्धतीत गुरूला असाधारण महत्त्व दिलेले आहे. गुरू हा शिष्याचा आध्यात्मिक पिता मानला गेला आहे. ही आध्यात्मिक पितृत्वाची कल्पना अथर्ववेद, सूत्रे, स्मृतिग्रंथ या सर्व ठिकाणी आढळते. त्यामुळे आई–बापापेक्षांही गुरूला अधिक मान दिला जात असे. अज्ञानांधकारातून ज्ञानाच्या प्रकाशात नेणारा म्हणून त्याचे महत्त्व विशेष मानले जाई. गुरूवाचून विद्येत प्राविण्य मिळणे शक्य नाही, अशी भारतीय शिक्षणपद्धतीची धारणा आहे. ही धारणा समाजात इतकी दृढमूल होती, की एकलव्याला जेव्हा द्रोणाने शिष्य म्हणून स्वीकारण्याचे नाकारले तेव्हा त्याने द्रोणाची मृण्मयमूर्ती करून तिच्या सान्निध्यात धनुर्विद्या प्राप्त करून घेतली (म. भा. आदि. १३२).

बौद्ध धर्मातही गुरूचे महत्त्व असाधारण होते. संघात आलेल्या नवभिक्षूने दहा वर्षे सतत गुरुसान्निध्यात राहून अध्ययन केले पाहिजे, असा बुद्धाचा उपदेश होता. बौद्ध भिक्षू त्याप्रमाणे वागत, असे इत्सिंगच्या प्रवासवृत्तावरून कळून येते.

प्राचीन काळी लेखनकला अस्तित्वात नव्हती. त्यामुळे वेदादी विद्या गुरुमुखावाचून शिकणे अशक्य असे. लेखनकला अवगत झाल्यावरही कैक शतके तिचा वेदाध्ययनाच्या कामी उपयोग करून घेतला गेला नाही. वैदिक स्वर व उच्चार यांची स्पष्टता गुरुमुखाने जशी कळत असे, तशी ती पुस्तकावरून कळत नसे. म्हणूनच गुरुसन्निध अध्ययनाला भारतीय शिक्षणपद्धतीत विशेष महत्त्व आले. शिवाय त्या काळी पुस्तके ताडपत्रावर लिहिली जात आणि ती दुर्मिळ, महाग व लवकर फाटणारी असत. म्हणूनही ग्रंथापेक्षा गुरूचेच माहात्म्य कायम राहिले.

प्राचीन काळचे गुरू आपल्या अधिकाराला साजेल, असेच वर्तन ठेवीत. ते स्वतःही रोज स्वाध्याय करून अध्ययन ताजे राखीत. त्या काळी ब्रह्मयज्ञात वेदवेदांगांच्या अध्ययनाची रोज थोडी थोडी उजळणी करण्याची पद्धत होती. बहुतेक गुरु गृहस्थाश्रमीच असत. काही थोडे वानप्रस्थ व त्याहूनही थोडे संन्यासी असत. गृहस्थाश्रमी गुरूला अध्यापनाबद्दल काय मिळकत होत असे, ते कळायला काही साधन नाही. शिक्षकांना निर्वेध मासिक वेतन देणाऱ्या शिक्षणसंस्था इ. स. च्या ८ व्या व ९ व्या शतकापर्यंत अस्तित्वात नव्हत्या. त्यापूर्वी शेकडा ९० शिक्षकांना विद्यार्थ्यांकडून शक्त्यनुसार मिळणाऱ्या गुरुदक्षिणेवरच निर्वाह करावा लागे.

इ. स. च्या ११ व्या व १२ व्या शतकातले काही कोरीव लेख नाडमध्ये मिळाले आहेत. त्यांवरून कळते, की तिथल्या एका संस्कृत महाविद्यालयात व्याकरण, मीमांसा, इ. विषयांच्या अध्यापकांना ३६० कळम भात व वेदान्ताच्या अध्यापकाला ४८० कळम भात मिळे. त्याच वेळी १५० कळम भात एवढे कुलकर्ण्याचे वार्षिक उत्पन्न असे. त्यावरून सामान्यतः कुलकर्ण्यापेक्षा अध्यापकाला २॥ ते ३ पट वेतन मिळे, असे दिसून येते.

शिष्याचे दोन प्रकार असत. एक आचार्यभाग (शुल्क) देऊन शिकणारा व दुसरा धर्मशिष्य म्हणजे गुरुगृही कामधंदा करून शिकणारा. याशिवाय विशिष्ट गुरुदक्षिणेचा गुरूकडे करार करून शिकणारेही काही शिष्य असत. असा करार करून मग विद्यार्थ्याला शिक्षण देणाऱ्या गुरूला भृतकाध्यापक म्हणत. अशा अध्यापकाची धर्मशास्त्रांनी निंदाच केलेली आहे. विद्यार्थी सद्वर्तनी असला आणि त्याच्याकडून गुरुदक्षिणा मिळण्याची शक्यता नसली, तरी गुरूने त्याला शिकविले पाहिजे, असा

धर्मशास्त्रकारांचा कटाक्ष असे. कालिदासाने याच गोष्टीचा अनुवाद पुढील श्लोकार्धात केला आहे—

यस्यागमः केवलजीविकायै तं ज्ञानपण्यं वणिजं वदन्ति ।
(मालविकाग्निमित्र १)

अर्थ– जो आपली विद्या केवळ उपजीविकेसाठीच विकतो, त्याला ज्ञानविक्रेता वाणी, असे म्हणतात.

गुरूने दक्षिणेबद्दल आगाऊ करार करू नये आणि त्याने गरीब विद्यार्थ्यांना विनाशुल्क शिकवावे, असा समाजाचा कटाक्ष असे. प्रत्येक विद्यार्थ्याने आपल्या ऐपतीप्रमाणे भरपूर गुरुदक्षिणा द्यावी, तसेच गरीब विद्यार्थ्यांनीही शिक्षण संपल्यावर भिक्षा मागून किंवा आपल्या हिंमतीवर पैसे मिळवून गुरूच्या उपकाराची फेड करावी, असाही सामाजिक संकेत असे. कौत्साने आपला गुरू वरतंतू याला दक्षिणा देण्यासाठी रघुराजाकडे १४ कोटी सुवर्णनाणी मागितली होती, अशी कथा रघुवंशाच्या ५ व्या सर्गात सांगितली आहे. उत्तंकाने आपल्या गुरुपत्नीला देण्यासाठी पोष्य राजाच्या राणीची अमूल्य कुंडले मागितली आणि ती त्या राजाने उत्तंकाला दिली, अशी कथा महाभारतात आली आहे (आदि. ३). या गोष्टीवरून गुरू गुरुदक्षिणेसाठी जे मागेल ते त्याला दिले पाहिजे, असा शिष्टसंकेत असल्याचे कळते.

कित्येकदा शिष्य आपल्या गुरूला किती व काय दक्षिणा देऊ, असे विचारीत असे. मग गुरू त्याला आपली इच्छा सांगत असे. या बाबतीत कृष्ण व सांदीपनी या गुरु-शिष्यांचे उदाहरण प्रसिद्ध आहे. सांदीपनीने कृष्णाकडे मागितले की, 'समुद्रात बुडालेला माझा पुत्र गुरुदक्षिणा म्हणून मला परत आणून दे.'

गुरूने स्वतःला जेवढे येत असेल तेवढे सगळे विद्यार्थ्याला शिकविले पाहिजे, अशी समाजाची धारणा असे. विद्यार्थ्याला सगळे शिकवल्यावर आपले श्रेष्ठत्व जाईल, या भीतीने जर गुरूने अध्यापनात काही दडवले, लपवले, तर ते निंद्य समजले जाई. 'शिष्यादिच्छेत् पराजयम्' असे सुभाषित आहे. शिष्य आपल्याहून अधिक ज्ञानसंपन्न व्हावा व त्याने ज्ञानाच्या बाबतीत आपला पराभव करावा, असे श्रेष्ठ गुरू अपेक्षीत असत. गुरूच्या अंतःकरणाचे औदार्य बुद्धाच्या एका गोष्टीत सांगितले आहे, ते असे–

बोधी प्राप्त होण्यापूर्वी गौतम हा आळारकलाम नामक एका गुरूकडे ब्रह्मचारी म्हणून राहिला होता. जेव्हा गौतमाचे अध्ययन संपले, तेव्हा गुरूने त्याला म्हटले. 'मला तुझ्यासारखा गुणी शिष्य भेटला, ही केवढ्या आनंदाची गोष्ट! मला ज्या काही विद्या अवगत होत्या, त्या सर्वांत तू आता पारंगत झाला आहेस. मला येते ते सर्व आता तुलाही येते. आम्हा दोघांमध्ये आता काहीच फरक उरला नाही. म्हणून आपण दोघे मिळून आपल्याकडील पाचशे शिष्यांच्या अध्यापनाची व्यवस्था करू या.'

गुरुगृही शिष्याला गुरूच्या संसारातले पडेल ते काम करावे लागे. प्राचीन कालापासून ही गोष्ट चालत आलेली होती, हे गोपथब्राह्मणावरून कळून येते (१.१.१–८). धौम्याच्या आश्रमात आरुणी, उपमन्यू व बेद या तीन शिष्यांनी अत्यंत कष्टाची कामे केली, अशी कथा आहे (म. भा. आदि. ३). कृष्णानेही सांदीपनीच्या आश्रमात देह झिजवला, असे भागवतावरून कळते. पण गुरुकार्य करताना विद्यार्थी मृत्यू पावला, तर गुरूला त्याबद्दल कठीण प्रायश्चित्त घ्यावे लागे (बौ. ध. सू. २१. २७).

गुरूने शिष्यावर पुत्रवत् प्रेम करावे, असे सर्व शास्त्रकार एकमताने सांगतात. पण नाठाळ विद्यार्थ्यांना वठणीवर आणण्याच्या कामी छडीचा किंवा हाताचा प्रयोग करावा किंवा नाही या बाबतीत मात्र शास्त्रकारांत मतभेद आहेत. गौतम म्हणतो, की शक्यतो विद्यार्थ्यांवर छडीचा प्रयोग करू नये. पण नाइलाजच झाला तर बारीक छडीने पाठीवरच थोडासा मार द्यावा (बौ. ध. सू. १.२.४८–५०). आपस्तंब म्हणतो, की शिष्य नाठाळपणा करू लागला तर, गुरूने त्याला थंड पाण्याच्या स्नानाची, उपवासाची किंवा आश्रमत्यागाची शिक्षा द्यावी; पण शारीरिक दंड देऊ नये (आप. ध. सू. १. २. ८. ३०). जातकात याविषयी एक कथा आहे, ती अशी–

वाराणसीचा राजपुत्र गुरूच्या आश्रमात असता त्याने अनेकवार एका म्हातारीच्या तिळांची चोरी केली. तेव्हा गुरूने त्याला छडीने पाठीवर मार दिला (तिलमुठ्ठी जातक).

यावरून विद्यार्थ्याच्या हिताच्या दृष्टीने जरूर पडेल तेव्हा गुरू किंवा आचार्य हे न्यायनिष्ठुर होत आणि प्रसंगी राजपुत्रांनाही देहदंड देण्यास कचरत नसत, असे दिसून येते.

शिष्याने गुरुगृही कसे वागावे, याबद्दल मनूने पुढील गोष्टी सांगितल्या आहेत.

गुरूपुढे हात जोडून उभे राहावे. गुरूने बैस म्हटल्यानंतर बसावे. गुरूच्या तुलनेने शिष्याचा अन्न, वस्त्र व वेष निकृष्ट असावे. रात्री गुरू झोपल्यानंतर शिष्याने झोपावे व सुप्रभाती गुरूच्या आधी उठावे. गुरूच्या आज्ञेत राहावे. गुरूसमोर उच्चासनावर बसू नये. गुरूचे नाव उच्चारू नये. गुरूच्या चालण्याबोलण्याची नक्कल करू नये. गुरूची निंदा कोणी करीत असेल तर कान झाकून घ्यावे किंवा तिथून निघून जावे, इत्यादी (मनु. २.१९२–२००).

शिष्याला शिस्त लावून सद्‌गुणी बनवायचे तर गुरूलाही संयमाने व नीतीने वागावे लागे. अशा गुरूला शिष्यांनी सर्वभावे मान द्यावा हे ठीकच होते; पण गुरूचे वर्तन जर सदोष असेल व गुरू जर प्रमाद करीत असेल, तर विवेकी शिष्याने काय करावे, याबद्दल बौधायन सांगतो –

> **प्रमादानाचार्यस्य बुद्धिपूर्वकं वा नियमातिक्रमं**
> **रहसि बोधयेत् ।**
>
> (बौ. ध. सू. १. २. ६. १३)

अर्थ – (शिष्याने) आचार्याचे प्रमाद व त्याचे नियमातिक्रमण या गोष्टींविषयी त्याला बुद्धिपूर्वक एकांतात जाणीव द्यावी.

काही शास्त्रकारांनी उच्छृंखल गुरूची आज्ञा मानू नये असेही सांगितले आहे. शिष्याने जशी आपली मर्यादा सांभाळून वागायचे तसेच गुरूनेही आपल्या गुरुत्वाला हीनत्व आणता कामा नये, असा धर्मशास्त्रकारांचा उभयविध कटाक्ष आहे.

इ. स. च्या ५ व्या शतकापर्यंत भारतात सार्वजनिक शिक्षणसंस्था निर्माण झाल्या नव्हत्या. त्यापुढेही बरेचसे विद्यार्थी गुरुगृहीच राहून खासगी रीतीने शिक्षण घेत. त्यामुळे गुरुशिष्यांमध्ये जिव्हाळ्याचे संबंध निर्माण होत व ते जन्मभर टिकत. काही शिष्य तर आपल्या पित्याचे नाव न लावता गुरूच्या नावावरून स्वतःची ओळख सांगत.

पुष्कळ विद्यार्थी शिक्षण संपवून गृहस्थाश्रम स्वीकारल्यावरही अधूनमधून गुरूला भेटायला जात व त्या वेळी गुरूला काही उपायनही देत. गुरूही शिष्याला काही प्रतिभेट देऊन त्याची संभावना करीत. या भेटीत शिष्याचे विद्याध्ययन जागृत आहे का विसरले याची गुरूकडून चौकशी होई. काही वेळा गुरूही शिष्याच्या घरी जात असे. जातकात याबद्दल एक गोष्ट, आहे ती अशी–

स्नातक होऊन आश्रमातून परत गेलेल्या एका विद्यार्थ्यांच्या घरी त्याचा गुरू त्याला भेटायला गेला. भेटीत त्याने शिष्याला अध्ययनाबद्दल विचारले. त्यावर शिष्य म्हणाला, ‘विवाह होईपर्यंत माझे अध्ययन चोख होते; पण पुढे संसारात पडल्यावर शिकलेल्यापैकी बरेचसे विसरले. पण मी पुनश्च त्याची उजळणी करून ते जागृत ठेवीन’ (अनभिरती जातक).

गुरुशिष्यांचे असे दळणवळण परस्परांस कसे उपकारक होत असे, ते या गोष्टीवरून कळून येईल.

बहुतेक शिष्य गुरुगृहीच राहत असल्याने पुष्कळदा त्यातला एखादा चांगला शिष्य पुढे गुरूचा जावईही होई. वाराणसीच्या एका गुरूने आपल्या सर्वांत प्रामाणिक अशा शिष्याला आपली मुलगी दिली होती, असे जातकावरून कळते. तक्षशिलेच्या कित्येक आचार्यकुलांत शिष्यांपैकी एखाद्याला जावई करण्या चालच पडली होती. ही चाल इतकी दृढमूल झाली होती, की शिष्याच्या मनात नसले, तरी त्याला गुरुकन्येशी लग्न कर भाग पडत असे. खरे म्हणजे गुरुकन्या ही शिष्याची गुरुभगि होत असल्यामुळे त्या दोघांच्या विवाहाला धर्मशास्त्रा मान्यता नाही. तरीपण असे विवाह अधूनमधून घडत असत हे वरील कथेवरून कळून येते. पाहा– ब्रह्मचारी, छात्र [प्रा. भा. शि. प.]

गुरु–शुक्रांचे अस्त

गुरू व शुक्र यांचे अस्त असता म्हण ते ग्रह आकाशात दिसेनासे होता तेव्हापासून पुनश्च ते दिसू लागेपर्यंत, उपनयनादी संस्कार गृहारंभ, गृहप्रवेश, व्रतोद्यापने, इ. गोष्टी करू नयेत असे ध शास्त्रात सांगितले आहे.

गुरुसिंघसभा

इ. स. १८७३ मध्ये अमृतसर येथे ही स स्थापन झाली. हिचा उद्देश शीख समाजात अनिष्ट प्रथा मोडून विशुद्ध शीख धर्माचा प्रचार करणे, हा आ इ. स. १८७९ साली लाहोर येथे अशीच दुसरी सभा स्था झाली. या सभेने खालसा गॅझेट नामक एक वृत्तपत्रही का आता अशा सभा सर्वत्र निर्माण झाल्या आहेत व त्यां विधीही ठरलेले आहेत. या सभांच्या द्वारे धार्मिक व सामाजि उन्नतीचे कार्य चालवले जाते. त्यांनी अनेक गुरुद्वारेही स्था केले आहेत. [गु. ग्रं. को.]

गुरू

(१) आचार्य, उपाध्याय, ज्येष्ठ, श्रेष्ठ, उपदेशक, गुरू शब्दाचे अनेक अर्थ आहेत. गुरूच्या काही व्या सांगितल्या आहेत, त्या अशा– ‘गिरत्यज्ञानमिति’ = अज्ञान करतो, तो. ‘गृणाति धर्ममिति’= धर्माचा उपदेश करतो, ‘गीर्यते इति’ = ज्याचे स्तवन केले जाते, तो. मनूने गु लक्षण सांगितले आहे, ते असे—

> **निषेकादीनि कर्माणि यः करोति यथाविधि ।**
> **सम्भावयति चान्नेन स विप्रो गुरुरुच्यते ।।**
>
> (मनु. २.१४

अर्थ – निषेक, (गर्भाधान), पुंसवन, जातकर्म, उपनयन, कर्मे यथाविधि करणारा (अर्थात पिता) व अन्नदानाने पाल पोषण करणारा विप्र, गुरू म्हटला जातो.

याज्ञवल्क्यानेही या मनुवचनाला अनुमोदन दिले आ देवलस्मृतीत अकरा गुरू सांगितले आहेत, ते असे—

आचार्यश्च पिता ज्येष्ठो भ्राता चैव महीपतिः ।
मातुलः श्वशुरस्त्राता मातामहपितामहौ ।
वर्णज्येष्ठः पितृव्यश्च पुंस्येते गुरवो मताः ।।

अर्थ – आचार्य, पिता, थोरला बंधू, राजा, मामा, सासरा, रक्षणकर्ता, आईचा बाप, बापाचा बाप, वर्णाने ज्येष्ठ व चुलता हे पुरुषाचे (अकरा) गुरू मानलेले आहेत.

नामचिंतामणीत गुरूचे पुढील बारा प्रकार सांगितले आहेत–

(१) **धातुवादी गुरू** – शिष्याकडून तीर्थाटन व नाना प्रकारची साधने करवून शेवटी ज्ञानोपदेश करणारा.

(२) **चंदनगुरू** – चंदन वृक्ष जसा जवळच्या सामान्य वृक्षांनाही सुवासिक बनवतो, त्याप्रमाणे आपल्या केवळ सान्निध्याने शिष्याला तारून नेणारा.

(३) **विचारगुरू** – शिष्याला सारासार विवेक शिकवून पिपीलिकामार्गाने आत्मसाक्षात्कार घडविणारा.

(४) **अनुग्रहगुरू** – केवळ कृपानुग्रहाने शिष्याला ज्ञान देणारा.

(५) **परीसगुरू** – परीस जसा स्पर्शमात्रे लोहाला सुवर्ण बनवतो, त्याप्रमाणे केवळ करस्पर्शाने साधकाला दिव्य ज्ञान देणारा.

(६) **कच्छपगुरू** – कासवी जशी केवळ दृष्टिमात्रे पिलांचे पोषण करते, तद्वत शिष्याचा केवळ कृपालोकनाने उद्धार करणारा.

(७) **चंद्रगुरू** – चंद्र उगवताच चंद्रकांत मण्याला पाझर फुटतो, त्याप्रमाणे केवळ अंतःकरणातल्या दयाद्रवाने शिष्याला तारणारा.

(८) **दर्पणगुरू** – आरशात स्वतःचे मुख दिसते, त्याप्रमाणे केवळ आत्मदर्शनाने शिष्याला ब्रह्मज्ञान घडविणारा.

(९) **छायानिधी गुरू** – छायानिधी नावाचा एक मोठा पक्षी आकाशात फिरत असतो. त्याची सावली ज्याच्यावर पडते, तो राजा होतो, अशी समजूत आहे. त्याप्रमाणे साधकावर केवळ सावली धरून त्याला स्वानंदसाम्राज्याचा अधिपती करणारा.

(१०) **नादनिधी गुरू** – नादनिधी या नावाचा एक मणी आहे. ज्या धातूचा या मण्याला स्पर्श होतो, ती धातू जिथल्या तिथे सुवर्ण बनते, अशी समजूत आहे. त्याप्रमाणे मुमुक्षूची करुणवाणी कानी पडताच त्याला तिथल्या तिथे दिव्यज्ञान देणारा.

(११) **क्रौंच गुरू** – क्रौंच पक्षिणी आपली पिले समुद्रतीरी ठेवून दूरदेशी चारा आणायला जाते. या संचारात ती वारंवार आकाशाकडे डोळे करून पिलांचे स्मरण करते. त्यायोगे ठेवल्या जागी तिची पिले पुष्ट होतात, अशी समजूत आहे. तद्वत शिष्याची आठवण करून त्याला स्वस्थानी आत्मानंदाचा उपभोग देणारा.

(१२) **सूर्यकांत गुरू** – सूर्याच्या किरणस्पर्शाने सूर्यकांत मण्यामध्ये अग्नी उत्पन्न होतो. तद्वत आपली दृष्टी जिकडे वळेल, तिकडच्या साधकांना विदेहत्व देणारा.

पिच्छिला तंत्रात दीक्षागुरू व शिक्षागुरू असे गुरूचे दोन भेद सांगितले आहेत. पूर्वपरंपरेने प्राप्त झालेल्या मंत्राची दीक्षा देणारे ते दीक्षागुरू होत. समाधी, ध्यान, धारणा, जप, स्तव, कवच, पुरश्चरण, महापुरश्चरण आणि साधनेचे निरनिराळे विधी व योग या गोष्टी शिकवणारे ते शिक्षागुरू होत.

कुलागमात गुरूचे सहा प्रकार सांगितले आहेत, ते असे—

(१) **प्रेरक** – साधकाच्या मनात दीक्षेची प्रेरणा देणारा.

(२) **सूचक** – साधना व दीक्षा यांचे प्रकार वर्णन करणारा.

(३) **वाचक** – साधनांचे वर्णन करणारा.

(४) **दर्शक** – साधना व दीक्षा यातील योग्यायोग्यता सांगणारा.

(५) **बोधक** – साधना आणि दीक्षा यांचे तात्त्विक विवेचन करणारा.

(६) **शिक्षक** – साधना शिकविणारा, दीक्षा देणारा.

या सर्व गुरूंमध्ये बोधकगुरू हा सर्वश्रेष्ठ होय.

रामदासांनीही मंत्रगुरू, यंत्रगुरू, वस्तादगुरू असे सतरा गुरू सांगितले आहेत आणि या सर्वांत ब्रह्मज्ञान देणारा सद्गुरू हा सर्वश्रेष्ठ असल्याचे म्हटले आहे (दास. ५. २. ६६–६८).

आगमसारात गुरू शब्दातल्या तीन वर्णांचा अर्थ पुढीलप्रमाणे सांगितला आहे –

गकारः सिद्धिदः प्रोक्तो रेफः पापस्य हारकः ।
उकारो विष्णुरव्यक्तस्त्रितयात्मा गुरुः परः ।।

अर्थ– गुरू शब्दातला गकार हा सिद्धी देणारा, रकार हा पापहारक व उकार हा अव्यक्त विष्णू आहे. एवंच गुरू हा वरील तीन्ही गोष्टींचा समावेश असलेला असा व श्रेष्ठ आहे.

गुरू शब्दाचा इतिहास– गुरू हा शब्द वैदिक सूत्रग्रंथापासून आढळू लागतो. शिष्याने गुरूच्या सन्निध राहून उत्सर्जनोपाकर्मादी कर्मे करावी व गुरूच्या आज्ञेनेच समावर्तन करावे, अशी विधाने पारस्कर, बौधायन, इ. गृह्यसूत्रांत आढळतात. शिष्याने गुरुगृही राहून अध्ययन करणे, ही प्रथा सूत्रकालात पूर्णपणे रूढ झाली होती. तशा प्रकारची गुरुकुलेही त्या काळात बरीच निर्माण झाली होती. उत्तंक, कृष्ण, बलराम, इ. विद्यार्थी अशा गुरुगृहातच गुरुसेवा करून विद्या मिळवते झाले, असे पुराणांतरी सांगितले आहे. अध्ययनसमाप्तीनंतर शिष्याने गुरूला दक्षिणा द्यावी, असाही प्रघात होता. नारायणोपनिषदात

शिष्याने गुरूजवळ कसे वागावे व कोणते नियम पाळावे, ते सांगितले आहे. गुरू कसा असावा, याबद्दल मनू, याज्ञवल्क्य, इ. स्मृतिकारांनी बरेच विवेचन केले आहे. या विवेचनाचे सार तंत्रसारातल्या पुढील श्लोकाने सांगता येईल.

> शान्तो दान्तः कुलीनश्च विनीतः शुद्धवेषवान् ।
> शुद्धाचारः सुप्रतिष्ठः शुचिर्दक्षः सुबुद्धिमान् ॥
> अध्यात्मध्याननिष्ठश्च मन्त्रतन्त्रविशारदः ।
> निग्रहानुग्रहे शक्तो गुरुरित्यभिधीयते ॥

अर्थ – शांत, इंद्रियदमन करणारा, कुलीन, विनीत, शुद्ध वेष व शुद्ध आचार असलेला, प्रतिष्ठित, शुची, दक्ष, चांगल्या बुद्धीचा, अध्यात्म व ध्यान यांच्या ठिकाणी निष्ठा असलेला, मंत्र–तंत्र जाणणारा आणि कृपा व शासन दोन्ही करू शकणारा, असा पुरुष गुरू म्हटला जातो.

सूत्रकालापूर्वीच्या मंत्रकालात मात्र गुरुकल्पना विकसित झालेली दिसत नाही. मंत्र स्वयंस्फूर्तीने तयार होत किंवा अनुकरणाने बनत. पण त्यांच्या वाढीसाठी त्यांचे पद्धतशीर शिक्षण देणारा वर्ग त्या काळी अस्तित्वात असलेला दिसत नाही. मंत्रांच्या संहितीकरणाच्या कालात त्यांचे अध्ययन, अध्यापन, स्वाध्याय आणि विनियोग यांचे शिक्षण देणाऱ्या गुरुसंस्थेची आवश्यकता उत्पन्न झाली. हळूहळू यज्ञकर्म विस्तृत व जटिल होऊ लागले आणि त्या विद्येत प्रावीण्य मिळविण्यासाठी विशेष अभ्यासाची गरज निर्माण झाली. त्यामुळेही जाणत्या आचार्यांच्या भोवती शिष्यवर्ग जमा होऊ लागला. संहितीकरणाच्या कालातल्या अशा अनेक आचार्यांची नावे आज उपलब्ध आहेत. अंगिरस, गर्ग, अत्री, बृहस्पती, वसिष्ठ, हे तत्कालीन प्रमुख आचार्य होत. यज्ञातला होता, अध्वर्यू व सामगायक यांच्या कर्मांचे शिक्षण हे त्या त्या गुरूकडे शिष्यांना मिळत असावे. यज्ञसंस्था भरभराटीत होती त्या काळात, यज्ञातील कर्माविषयी वादाचे अनेक प्रसंग येत. त्यामुळे त्या त्या कर्माचे शिक्षण त्याच्या कारणांच्या मीमांसेसह देणे व घेणे आवश्यक होई. त्यामुळे त्रैविद्यांच्या आचार्यपरंपरेतूनच पुढे वेदांगे निर्माण झाली व त्याच परंपरेतून नंतर भारतीय दर्शनांचे शिक्षण देणारा एक वर्ग निघाला. अशा दार्शनिक गुरूंची परंपरा आजपर्यंत अविच्छिन्न चालत आलेली दिसते.

श्रौतकर्माविषयी ज्यांच्या मनात अनास्था किंवा अश्रद्धा निर्माण झाली, तो वर्ग आरण्यकांचा होय. या वर्गात अध्यात्मविषयांची जोपासना होऊ लागली आणि ते विषय परंपरेने उपदेशिणारे गुरूही उत्पन्न होऊ लागले. या गुरूंत जनक व याज्ञवल्क्य यांची नावे मुख्यत्वे सांगता येतील. अध्यात्मज्ञानासंबंधीच्या अशा प्रकारच्या गुरु-शिष्यपरंपरा ब्राह्मणकालातही होत्या, हे शतपथ ब्राह्मण, जैमिनीय उपनिषद्ब्राह्मण यांती परंपरांवरून दिसून येते. अंशु-धानंजय्य, अग्निभू-काश्यप, आम वास्य-शांडिल्यायन अशा वैदिक संहितांच्या पुढील काळातल ८२ गुरु-शिष्यपरंपरा ज्ञानकोशाच्या बुद्धपूर्वजग या ग्रंथा (पृ. ४३७–४१) दिलेल्या आहेत.

या आरण्यकांच्या वर्गानेच पूर्वमीमांसेखेरीज अन्य दर्शनां जोपासना व वाढ केली. त्यामुळे विशिष्ट दर्शनांचे विशि आचार्य निर्माण झाले. मात्र श्रौत्यांचा आचार्यवर्ग व आरण्य कांचा आचार्यवर्ग हे त्या काळात एकमेकांपासून अगदी पृथ नव्हते. उदा० याज्ञवल्क्य व जैमिनी यांची नावे दोहीकडे येता याचा परिणाम ज्ञानाचा विकास होण्याच्या दृष्टीने चांग झाला. मीमांसा हे शास्त्र जरी श्रौतपरंपरेतले असले, तरी आरण्यकपरंपरेत योजिले गेले. जव्हा श्रौतसंस्था वंद पडल तेव्हा वेदांगे व दर्शने मिळून होणारा शास्त्रसमुच्चय हा शा म्हणवल्या जाणाऱ्या मंडळींनी जागृत ठेवला, तर श्र ज्ञानाची परंपरा केवळ श्रौती व वेदपाठक याच लोकां हाती राहिली.

षड्दर्शनांचे सूत्रग्रंथ तयार झाले आणि त्यानंतर भार मोक्षासाठी विशिष्ट मार्गाचा आग्रह धरणारे अनेक संप्र उत्पन्न झाले. सर्व प्रकारचे तत्त्वज्ञान हे केवळ मोक्षाचे सा याच नात्याने शिकविले जाऊ लागले. शास्त्रांचे ज्ञान देणा गुरुवर्ग शिष्याला मोक्ष मिळवून देण्याची ईर्षा बाळगू लाग प्रस्थानत्रयीवर निरनिराळ्या प्रकारची भाष्ये होऊन नि निराळे पारमार्थिक संप्रदाय त्यांच्याशी जोडले गेले. अ परिस्थितीत गुरूचे महत्त्व भलतेच वाढले. जे संस्कृत ग्रंथ दे भाषांत अनुवादित होऊ लागले, त्यांतूनही गुरूचे मह सांगणारे प्रक्षिप्त भाग येऊ लागले.

मध्यकालीन धर्मसाधनेत, विशेषतः मुसलमानी आक्रम नंतरच्या धार्मिक संप्रदायांत तर गुरूला असाधारण महत्त्व प्रा झाले. तांत्रिक युगाचा हा अवशिष्ट प्रभाव असावा. जैन, बौ शैव, शाक्त, वैष्णव, या सर्व धर्मसंप्रदायांत जेव्हा गुह्यसा शिरली, तेव्हा गुरूची प्रतिष्ठा पराकोटीला गेली. कारण गु साधना ही रहस्यमय होती व अज्ञानी साधकाला गुरूच्या म दर्शनावाचून त्या साधनेत प्रवेश मिळणेच अशक्य होते.

निर्गुणसंप्रदाय व नाथसंप्रदाय यांच्यापूर्वी बौद्ध सिद्धां संप्रदाय प्रचलित होता. बौद्ध सिद्धांनी अनेक प्रकारे गुरुमहि वाढविला. तिंलोपा हा सिद्ध म्हणतो. ‘परमतत्त्व हे म पंडितांनाही अगम्य, अगोचर असून, गुरुकृपेवाचून ते प्रा होणारच नाही. तथता (परमार्थ सत्य) ही केवळ गुरूच्या उ देशानेच हृदयात प्रविष्ट होऊ शकते; अन्यथा नाही.’ सर

हा दुसरा सिद्ध म्हणतो. 'परम गुह्य असे सत्य केवळ गुरुवचनामुळेच स्पष्टपणे प्रतिभासित होते.'

बौद्ध सिद्धांच्या साहित्यातली ही प्रवृत्ती प्रारंभीच्या बौद्ध धर्मात नव्हती. बुद्धाला कोणीतरी एकदा प्रश्न विचारला. 'तुमचा गुरू कोण?' त्यावर बुद्धाने उत्तर दिले. 'माझा कोणीही गुरू नाही. मी स्वतःच्या अभिज्ञानाने सर्व काही प्राप्त करून घेतले आहे.' पण गुह्यसमाजतंत्रात प्रत्येक तथागताचा गुरू म्हणून एकेक वज्राचार्य मानला गेला. गुह्यसमाजी सांगतात–'प्रत्येक तथागत आपल्या वज्राचार्याची गुरू म्हणून पूजा करीत असे.' वज्रयानपंथाच्या अद्वयवज्र या ग्रंथात गुरूला दूती म्हटले आहे. ही दूती प्रज्ञा व उपाय या दोन प्रेमिकांची मध्यस्थ होऊन, त्या दोघांचे मीलन घडवून आणते. गुरूचे असे वाढलेले हे माहात्म्य त्यानंतरच्या नाथपरंपरेत व वैष्णवपरंपरेतही अबाधित राहिले.

नाथपंथात गुरूला ईश्वराहूनही श्रेष्ठ दर्जाचे स्थान आहे. नाथयोग्यांनी शिवाला आदिगुरू मानले असून, विष्णुरूपी मत्स्येंद्र याला त्याचा पहिला शिष्य ठरवले आहे. नाथपंथात पितृवंश न सांगता गुरुवंश सांगण्याचा प्रघात आहे (ज्ञाने. १८. १७५८). ज्ञानेश्वर मी 'विठ्ठलपंताचा' असे कुठेच सांगत नाहीत; पण 'ज्ञानदेवो म्हणे। निवृत्तीचा' असे मात्र वारंवार सांगतात. नाथ असोत, सिध्द असोत वा निर्गुनिया सिध्द असोत; सर्वांनीच गुरूची आवश्यकता अपरिहार्यपणे मानलेली आहे. जो निगुरा (गुरुहीन) असतो, त्याला ब्रह्मज्ञान कधीही होऊ शकत नाही, असे सर्वांचेच सांगणे आहे.

परमार्थात गुरूचे महत्त्व खरे म्हणजे उपनिषदांच्या कालापासूनच मान्य केले गेले आहे. गुरूवाचून ज्ञान मिळत नाही, असे छांदोग्य म्हणते (६.१४.२). मुंडकाचाही असाच आशय आहे.

तद्विज्ञानार्थं स गुरुमेवाभिगच्छेत् समित्पाणिः
श्रोत्रियं ब्रह्मनिष्ठम्।

(मुंडक. १.२.१२).

अर्थ–परब्रह्म जाणण्यासाठी शिष्याने समिधा हाती घेऊन श्रोत्रिय व ब्रह्मनिष्ठ गुरूलाच शरण जावे.

पांडित्य किंवा तीक्ष्ण बुद्धी यांच्या जोरावर आध्यात्मिक ज्ञान प्राप्त होत नाही; जो ब्रह्मात्मैक्य पदवीवर आरूढ झाला आहे, अशा गुरूच्या उपदेशानेच ते मिळते असे कठोपनिषद सांगते (१. २. ८).

ज्ञान मिळवण्यासाठी गुरूचा शोध घ्यावा लागतो आणि त्याची सेवाही करावी लागते. मात्र गुरूचा शोध करताना किंवा गुरू म्हणून एखाद्याचा स्वीकार करताना खूप काळजी घेतली पाहिजे. पुष्कळसे गुरू म्हणवणारे लोक भोंदू असतात आणि ते शिष्याला नादी लावून फशी पाडतात. 'ऐसे गुरु अडक्याचे तीन। मिळाले तरी त्यजावे ॥' असे समर्थ रामदासांनी त्यांच्याबद्दल म्हटले आहे (दास. ५.२.२१).

खऱ्या सद्गुरूचा सच्छिष्यावर जो प्रभाव पडतो, तो आश्चर्यजनक असतो. श्रीरामकृष्ण परमहंसांनी आपले सर्व आध्यात्मिक धन विवेकानंदांना केवळ त्यांच्या मस्तकावर हात ठेवून दिले. निवृत्तिनाथाने मस्तकी हस्त ठेवला आणि ज्ञानेश्वर गीतार्थाचे प्रवक्ते झाले. या गोष्टी तर्काने आणि बुद्धीने जाणण्याजोग्या नाहीत. या अंधकारमय जगात जो दिव्य प्रकाश झिरपत असतो, तो अशा गुरूंच्या द्वारेच होय.

पिता हा पुत्राला केवळ जन्म देतो, तर गुरू त्याची जन्ममरणातून सुटका करतो. म्हणून पित्यापेक्षाही गुरूला श्रेष्ठ मानले आहे. सद्गुरूला कोणाचाही दृष्टान्त देता येत नाही, असे शंकराचार्य म्हणतात. ब्रह्मांडपुराणात गुरूचे महत्त्व सांगताना म्हटले आहे–

मनुष्यचर्मणा बद्धः साक्षात्परशिवः स्वयम्।
सच्छिष्यानुग्रहार्थाय गूढं पर्यटति क्षितौ ॥
अत्रिनेत्रः शिवः साक्षादचतुर्बाहुरच्युतः।
अचतुर्वदनो ब्रह्मा श्रीगुरुः कथितः प्रिये ॥

अर्थ–माणसाच्या कातडीत बांधलेला (मनुष्यदेहधारी) गुरू हा साक्षात परमशिव होय. तो सच्छिशिष्यांवर अनुग्रह करण्यासाठी पृथ्वीवर भ्रमण करीत असतो. हे प्रिये, श्रीगुरू हा त्रिनेत्र नसलेला शिव, चतुर्भुज नसलेला विष्णू व चतुर्मुख नसलेला ब्रह्मा म्हटला आहे.

देवीभागवतातला पुढील श्लोक तर प्रातःस्मरणात पठणपाठणाच्या वेळी व पुराणप्रवचनाच्या प्रारंभी आवर्जून म्हटला जातो–

गुरुर्ब्रह्मा गुरुर्विष्णुर्गुरुर्देवो महेश्वरः।
गुरुः साक्षात् परब्रह्म तस्मै श्रीगुरवे नमः ॥

अर्थ–गुरू हा ब्रह्मा, विष्णू व महेश्वर आहे. तो साक्षात परब्रह्म आहे. त्या श्रीगुरूला नमस्कार असो.

गुरुसंस्थेविषयी प्रा. श्री. म. माटे यांनी जे विवेचन केले आहे, त्याचा सारांश असा–

आधुनिक काळात गुरूंची हेटाळणी होत असलेली कानी येते. पण ती करणाऱ्यांनी व तिची चव घेणाऱ्यांनी या कामी थोडा विवेक करायला हवा. गुरुसंस्था ही मुळात वाईट नाही, असे संतवाङ्मयावरून दिसते. प्रस्थापित संस्थेचा पुष्कळदा दुरुपयोग होतो हे खरे; पण त्यावरून ती संस्थाच वाईट असते, असे मात्र ठरत नाही.

गुरू ही पूर्वी एक पारमार्थिक संस्था होती आणि अजूनही आहे. जे कोणी परमार्थविचारात पडतात, त्यांना गुरू हवाच हवा, असे चांगल्या चांगल्या संतांनी प्रतिपादिलेले आहे. किंबहुना कोणी केवढाही जरी संत असला आणि त्याला जर गुरूपदेश झालेला नसला, तर तो कच्चाच राहिलेला आहे, असे समजतात. म्हणजे परमार्थात गुरू करणे किंवा न करणे असा विकल्प असूच शकत नाही.

थेट ज्ञानेश्वरांपासून तो रामदासांपर्यंत प्रत्येक संताने गुरुसंस्थेची महती किती गायिली आहे, ते त्यांच्या वाङ्मयावरून व आत्मचरित्रावरून दिसते. तिथे त्यांनी गुरूविषयीचे स्वतःचे अनुभव असंदिग्ध आणि लखलखीत शब्दात सांगितले आहेत. समाजातील अव्वल दर्जाच्या माणसाचे आत्मकथन जर प्रमाण मानायचे नसेल, तर समाजात प्रामाण्याला आश्रय तरी कुठे उरणार ? हा बालयोगी लोकांची वंचना करील, नम्र होऊन अनंताला कोंडणारा तो एकनाथ खोटे बोलत असेल, ते देहूचे भोळे ध्यान असत्याच्या कर्दमात उतरेल, दऱ्याखोऱ्यातून रामनामाची गर्जना घुमवणारा तो कडक प्रवृत्तीचा रामदासही असत्यच बोलत असेल, असे कशावरून आणि का म्हणायचे ?

गुरुकृपा झाल्यावाचून कोणालाही परमेश्वराची प्राप्ती होत नाही व कोणालाही परमार्थाचे खरे ज्ञान होत नाही, हा मोक्षमार्गातला शाश्वतचा व अबाधित सिद्धान्त आहे. नामदेवाने याबाबतीत आपला अनुभव निवेदिला आहे, तो असा— मला वाटत होते, की आपल्याला परमेश्वर भेटला आहे. मग आता गुरूची आवश्यकताच कुठे उरली ? पण हे माझे अज्ञान होते. गुरू केल्यावरच मला याचा उत्तम प्रत्यय आला. आता मला कोणाचे भय नाही. जन्म–मरणाचेही भय नाही.

नामदेव भोळा असेल; पण त्याची ही वचने मात्र भोळ्या भावाची आहेत, असे मानणे कठीण आहे. ज्ञानेश्वरांना निवृत्तिनाथाने गुरूपदेश दिल्यावर 'धवळले जगदाकार' असा त्यांना अनुभव आला. त्या अनुभवाने सर्वांगी बहरून ज्ञानेश्वर म्हणतात–

माझा गुरू केवढा उदार आहे पाहा. याने आपल्या मानसमंदिरातील दिव्याने माझ्या मंदिरात नवाच दीप लावला. अद्वैताचा असा काही चमत्कारिक मेळ याने बसविला, की त्यात सारे द्वैत गडप होऊन गेले. माझ्या गुरूने हे सारे एका शब्दमात्राने घडवून आणले. गुरूसारखा पाठीराखा भेटला असताना इतरांची लेखा कोण करील ! राजाची राणी कोरान्न काय म्हणून मागेल! खरोखर मी ज्ञानेश्वर तुम्हाला सांगतो, की मी तरलो हो तरलो ! आणि हे सारे गुरूच्या कृपेने झाले.

रामदासांनी तर स्वच्छच सांगितले आहे– 'सद्गुरूवाचून कधीही ज्ञान होणार नाही. तुम्ही चौदा विद्यांचा जरी अभ्यास केला आणि ऋद्धी–सिद्धी जरी तुम्हाला वश झाल्या, तरी सद्गुरुकृपेवाचून तुमचे खरे हित होणार नाही. ज्याला मोक्ष हवा असेल, त्याने सद्गुरू करायलाच हवा. सद्गुरू न करता मोक्ष पावेल, हे कल्पान्तीही घडणार नाही.

गुरुसंस्था ही परमार्थविचारात एक आवश्यक बाब क आहे, हे कळावे म्हणून वरील थोर संतांच्या साक्षी दिल्या भोंदू गुरूंविषयी खुशाल तिरस्कार करावा. ते काम तुकारा आणि रामदास यांनीही बऱ्याच कडक शब्दात केलेले आहे [हिं. सा. को.; श्री. गु. यो.; श्री मंत्रशास्त्र; पी. ए राव–– इंडियन फिलॉसॉफी अँड कल्चर, डिसें. १९३१]

(२) सूर्यकुलातला पाचवा ग्रह. याला बृहस्पती, ई जीव, इ. अन्यही नावे आहेत. हा ग्रह रात्रीच्या आकाशा तेजस्वी व पीतवर्णी दिसतो. सरासरीने गुरूची तेजस्वि व्याधाच्या पाचपट भरते. सूर्याभोवती अर्थात बारा राशीं भ्रमण करायला त्याला सरासरी बारा वर्षे लागतात. म्ह सामान्यतः तो एका राशीत एक वर्ष राहतो. साठ वर्ष सामान्यतः राशिचक्रातून गुरूच्या पाच प्रदक्षिणा होतात. म्ह मोठ्या कालावधीचा निर्देश करायला सोयिस्कर अशी बार्हस्प कालगणना भारतात एका काळी प्रचलित होती. आज तिचे अवशेष पंचांगातील प्रभव-विभवादी वर्षनामांव पाहायला मिळतात.



गुरूची मूर्ती

गुरूचे सूर्यापासू सरासरी अंतर ४८ कोटी मैल आहे. सेकंदाला सुमारे मैलांच्या वेगाने सू भोवती फिरत अस त्याच्या पृष्ठभाग क्षेत्रफळ पृथ्वी क्षेत्रफळाच्या सुम १२० पट आणि आक सुमारे १३०० पट आ आकाराने तो सर्व ग्रहांपेक्षा मो आहे. इतकेच न तर बाकीचे सर्व एकत्रित केले, तरी सर्वांहूनही तो मो आहे. पृथ्वीला चंद्र तसे गुरूला ११ उपग्रह आहेत.

जातकशास्त्रात गुरूचे वर्णन आढळते ते पुढीलप्रमाणे—

गुरू हा शुभ व सौम्य ग्रह आहे. तो ज्ञान, कीर्ती व भाग्य देणारा आहे. कुंडलीत तो जन्मलग्नापासून दुसरा, पाचवा, सातवा, नववा व अकरावा असल्यास अनेक प्रकारची शुभफले देतो, असे फलज्योतिषात सांगितले आहे. याची नऊ, पाच, सात या स्थानांवर पूर्ण दृष्टी असते. गुरूच्या जप-हवनासाठी ऋग्वेदातील ज्या मंत्राचा विनियोग करतात, तो मंत्र पुढीलप्रमाणे—

बृहस्पते अति यदर्यो अर्हाद् द्युमद् विभाति क्रतुमज्जनेषु ।
यद्दीदयच्छवस ऋतप्रजा त तदस्मासु द्रविणं धेहि चित्रम् ।।
(ऋ. २.२३.१५)

अर्थ– हे बृहस्पते, ज्या ऐश्वर्याला देवभक्त मानवच पात्र होतो, जे देदीप्यमान आहे, जे प्रज्ञा व बल यांनी युक्त असल्यामुळेच लोकात अतिशय तेजस्वी दिसते आणि जे आपल्या अंगीच्या प्रभावाने प्रकाशित होते, ते अद्भुत ऐश्वर्य हे सत्यधर्माचे रक्षण करणाऱ्या देवा, आम्हाला देण्याची तू कृपा कर.

हेमाद्रीने गुरूचे मूर्तिध्यान सांगितले आहे, ते असे—

तप्तजाम्बूनदाकारो द्विभुजश्च बृहस्पतिः ।
पुस्तकं चाक्षमालाञ्च करयोस्तस्य कारयेत् ।
सर्वाभरणयुक्तश्च तथा पीताम्बरो गुरुः ।।
(च. व. चिं.)

अर्थ– तप्त सुवर्णाच्या कांतीचा, द्विभुज, पुस्तक व माला धारण करणारा, सर्वाभरणांनी युक्त व पीतवस्त्र नेसलेला असा गुरू बनवावा.

गुरुग्रहाच्या कथा भारतीय वाङ्मयात विशेषशा नाहीत. जागतिक वाङ्मयात त्या विपुल आहेत. पाहा – बृहस्पती; ग्रह.
[सूर्यकुल; ऋ. ब्र. क.;]

•

गुर्जर–प्रतीहार

प्राचीन काळी अरवली पर्वताच्या पश्चिमेस, जोधपूरच्या आसपास गुर्जर लोकांची मुख्य वसाहत होती, म्हणून त्या प्रदेशाला गुर्जरत्रा असे म्हणत असत. त्यालाच पुढे राजपुताना हे नाव मिळाले. त्या गुर्जर लोकांपैकी हरिचंद्र नामक ब्राह्मण पुरुषाने त्या प्रदेशात एक लहानसे राज्य इ. स. च्या ६ व्या शतकात स्थापन केले. त्याची भद्रा नावाची राणी क्षत्रिय कुळातली होती. तिची मुले स्वतःला प्रतीहार म्हणवीत. म्हणून पुढे तो राजवंश गुर्जर–प्रतीहार या जोड नावाने प्रख्यात झाला. त्यांची राजधानी मांडव्यपूर (जोधपूरजवळचे मंडोर) येथे होती. इ. स. च्या ७ व्या शतकात ती भिल्लमाळ येथे होती, असे युआन च्वांग सांगतो. या वंशातील राजांनी बारा पिढ्यांपर्यंत (सुमारे ३५० वर्षे) त्या प्रदेशावर राज्य केले.

याच वंशाच्या एका शाखेने लाट देशात राज्य स्थापले होते. हरिचंद्राचा पुत्र दद्द हा त्याचा संस्थापक असावा. त्याची राजधानी भरूचजवळ नांदीपुरी (नंदवाळ) येथे होती. त्या राजघराण्यातील आठ राजांनी इ. स. ५८०. ते ७३५ पर्यंत तिथे राज्य केले. उत्तरेस मही नदीपासून तापी नदीच्या दक्षिण तीरापर्यंत आणि पूर्वेस संगमखोत (संखेडा) पासून खंबायतच्या आखातापर्यंत त्यांचे राज्य पसरलेले असावे.

हरिचंद्रांच्या वंशातील काही लोक माळव्यात जाऊन स्थायिक झाले आणि त्यांनी अवंती येथे आपली सत्ता स्थापली. प्रतीहारांच्या या दोन्ही शाखा आपली उत्पत्ती ईक्ष्वाकुवंशातील लक्ष्मणापासून झाली असे मानतात. अवंतीचे प्रतीहार घराणे इ. स. च्या ८ व्या शतकाच्या पूर्वार्धात ख्यातनाम झाले. त्यावेळी भारतावर अरबांचे जे उत्पाती आक्रमण आले होते, ते या घराण्यातील नागभट राजाने मोडून काढून उ. भारताचे संरक्षण केले. अरबांनी जिंकलेली अनेक लहान राज्ये त्याने परत जिंकून घेतली आणि नांदीपूर व जोधपूर येथील गुर्जर प्रतीहारांच्या राज्यावर प्रभुत्व मिळविले. लाट देशात चाहमान राजे नागभटाचे सामंत म्हणून राज्य करू लागले. जोधपूरचे राज्य मात्र हरिचंद्राच्या वंशाकडेच राहिले. त्या घराण्यातील शीलुक हा बहुधा शेवटचाच स्वतंत्र राजा असावा. इ. स. च्या ८ व्या शतकाच्या उत्तरार्धात ते राज्य निष्प्रभ झाले, असे दिसते.

अवंतीच्या प्रतीहार घराण्यातील नागभट (प्रथम) याचा काळ निश्चित झालेला नाही. पण तो इ. स. ७३० च्या सुमारास गादीवर आला असावा आणि त्याने इ. स. ७५६ पर्यंत राज्य केले असावे, असे इतिहासकारांचे अनुमान आहे. त्याच्यानंतर त्याच्या भावाचे पुत्र कक्कुक व देवराज यांनी राज्य केले. त्यांच्याविषयीही फारशी माहिती उपलब्ध नाही. देवराजाचा पुत्र वत्सराज हा इ. स. ७७८ च्या सुमारास गादीवर आला. तो अत्यंत पराक्रमी होता. त्याने प. भारतात आपली सत्ता बळकट केली आणि उ. भारताचाही बराच प्रदेश जिंकून प्रतीहारसाम्राज्याचा पाया घातला. त्याने बंगालच्या धर्मपालाचाही एकदा पराभव केला होता, असे म्हणतात. कनोजचा राजा इंद्रायुध हा त्याचा मांडलिक झाला होता; पण नंतर ते नगर धर्मपालाने जिंकले. शेवटी राष्ट्रकूट राजा ध्रुव याने वत्सराज आणि धर्मपाल या दोघांनाही पराभूत केले. प्रतीहार, पाल व राष्ट्रकूट यांच्या मधील स्पर्धा सुमारे दोन शतके चालू राहिली.

वत्सराजाची सत्ता मध्य राजस्थानात शिल्लक उरली असावी.

इ. स. ७९२ च्या सुमारास त्याचा पुत्र नागभट (द्वितीय) राजा झाला. त्याने आपल्या पराक्रमाने आंध्र, कलिंग, विदर्भ, सिंध, हे देश जिंकले आणि कनोजवर स्वारी करून चक्रायुधाचा पराभव केला. बंगालच्या धर्मपालालाही त्याने पराभूत केले आणि नंतर आनर्त, मालव, किरात, तुरुष्क, वत्स व मत्स्य या प्रदेशांवरही आपले स्वामित्व स्थापले. अशा प्रकारे त्याने पुन्हा एकदा प्रतीहारांचे प्रबळ राज्य निर्माण केले. पण इ. स. ८०७ च्या सुमारास राष्ट्रकूट राजा गोविंद (तृतीय) याने त्याचा पराभव केला. तो साम्राज्यविस्तार करू शकला नसला, तरी त्याची सत्ता मात्र कोणत्याही प्रकारे क्षीण झाली नाही. त्याने इ. स. ८३३ पर्यंत राजस्थान व गुर्जर देश या भागांवर राज्य केले. आपल्या राजवटीच्या शेवटी त्याने आपली राजधानी कनोज येथे नेली असावी. नागभट (द्वितीय) वैदिक धर्माचा अभिमानी होता. त्याने शेवटी गंगेत जलसमाधी घेतली असे प्रभावकचरित या जैन ग्रंथांत म्हटले आहे. वत्सराजाप्रमाणेच नागभट याचे व्यक्तिमत्व प्रभावी असून, दोघेही कुशल सेनानायक होते. त्यांनी प्रतीहार साम्राज्याचा मजबूत पाया घातला यात संशय नाही.

नागभटानंतर त्याचा पुत्र रामभद्र याने सुमारे ३ वर्षें राज्य केले. पण त्या काळात प्रतीहारांचे सामर्थ्य कमी पडले आणि बंगालच्या देवपालाने त्या राज्यावर आक्रमण केले. रामभद्राचा पुत्र भोज यालाही देवपाल जिवंत असेपर्यंत साम्राज्यविस्तार करता आला नाही. रामभद्राच्या वेळी प्रतीहारांच्या हातून कनोज नगरी गेली असावी. भोजराजाने ती पुन्हा जिंकून घेतली. त्याच वेळी कालंजरही त्याच्या हाती आले. पण पुढे देवपालाने त्याचा पराभव केला आणि त्याने इ. स. ८५० च्या सुमारास दक्षिणेकडे स्वारी केली, तेव्हा राष्ट्रकूट राजा ध्रुव यानेही त्याला पराभूत केले. कलचुरी कोक्कल्ल याच्या पुढेही त्याला एकदा नमावे लागले. जोधपूरच्या प्रतीहार राजानेही भोजाची सत्ता त्या वेळी झुगारून दिली होती, असे दिसते.

इ. स. ८५५ मध्ये देवपाल मरण पावल्यानंतर भोजाने माळवा जिंकला आणि बंगालवरही स्वारी केली. त्या वेळी त्याला चेदी व गुहिलोत राजांनी साहाय्य केले. राष्ट्रकूट राजा कृष्ण (द्वितीय) याचाही भोज राजाने पराभव केला आणि गुजरात व सौराष्ट्र यांवर आपली सत्ता स्थापली. उत्तरेस पंजाबपासून अवधपर्यंतचा प्रदेश त्याच्या सत्तेखाली आला. कलचुरी व चंदेल राजांनीही त्याचे प्रभुत्व मान्य केले. अशा प्रकारे त्याने प्रतीहारांचे विशाल साम्राज्य प्रस्थापित केले. भोज हा एक पराक्रमी योद्धा होता, तसाच समर्थ सम्राटही होता. तो भगवतीचा उपासक होता. ई. स. ८८५ च्या सुमारास तो मरण पावला. प्रभास व मिहिर अशी त्याची आणखी दोन नावे होती.

भोजाचा पुत्र महेंद्रपाल याने मगधाचा व उ. बंगाल बराच भाग प्रतीहार साम्राज्याला जोडला. १० व्या शतका प्रारंभी हे साम्राज्य हिमालयापासून विंध्य पर्वतापर्यंत आ पूर्व समुद्रापासून पश्चिम समुद्रापर्यंत पसरलेले होते. पंजाब काही भाग मात्र काश्मीरच्या शंकरवर्म्याने घेतला होता.

महेंद्रपाळानंतर त्याचा पुत्र भोज (द्वितीय) सिंहासना बसला; पण महेंद्रपालाची दुसरी राणी महीदेवी किंवा महादे हिचा पुत्र महीपाल यानेही राज्यावर हक्क सांगितल्या त्यांच्यांत यादवी सुरू झाली. भोजाला चेदिराज कोक्क देवाचा पाठिंबा होता; पण सर्व गुर्जर देश महीपाला बाजूला होता. चौहान, गोहिल, परमार, चालुक्य व चं या सर्व राजांनी त्याला साहाय्य केल्यामुळे महीपाल यश झाला आणि इ. स. ९१२ च्या सुमारास सिंहासनावर बस त्याचे राज्य वैभवशाली ठरले; पण इ. स. ९१५ च्या सुमा राष्ट्रकूट राजा इंद्र (तृतीय) याने कनोजवर स्वारी क महीपालाचा पराभव केला आणि ती नगरी उद्ध्वस्त के पण महीपालाने पुन्हा बळ बांधून आपली सत्ता प्रस्था केली ब साम्राज्याचा बराच भाग मिळवला. या कामी त्यां सामंतांनीं त्याला पुष्कळ साहाय्य केले. पण ते साम्रा एकदा दुबळे झाले ते झालेच. महीपाल इ. स. ९४२ सुमारास मरण पावला. त्यानंतर चंदेल, कलचुरी, चाहम परमार, गुहिल, चौलुक्य, तोमर, इ. सर्व मांडलिक राजे स्व झाले. इ. स. ९५० पासून सुमारे ७५ वर्षे प्रतीहार राज कनोजच्या आसपासच्या प्रदेशावर राज्य केले. इ. स. १० च्या सुमारास राज्य करणारा त्रिलोचनपाल हाच त्या वं तील शेवटचा राजा होय. इ. स. ९९१ मध्ये गजनी सबुक्तिगीन याने भारतावर स्वारी केली. त्या वेळी काबू शाही राजा जयपाल याने सर्व हिंदू राजांचे संघटन क सबुक्तिगीनाला प्रतिकार केला. त्या प्रसंगी कनोजच्या रा नेही आपले प्रचंड सैन्य जयपालाच्या मदतीला अफगा स्तानात पाठवले होते; पण त्या संग्रामात हिंदूंचा परा झाला. पुढे गजनीचा सुलतान महमूद याने केलेल्या आक्र णाच्या वेळी जयपालाचा पुत्र आनंदपाल याने सर्व राजांची एकजूट करण्याचा प्रयत्न केला असता तत्का कनोजचा राजा राज्यपाल यानेही त्याच्या मदतीला आ सैन्य पाठवले. पण तेव्हाही हिंदूंचा पराजयच झाला. महमु त्यानंतर कनोजवर दोनदा स्वारी करून ते नगर उद् केले (इ. स. १०१९).

प्रतीहारांचे साम्राज्य सुमारे एक शतक वैभवाच्या शिख वर तळपले. गुप्त साम्राज्याप्रमाणेच प्रतीहारांच्या साम्रा

तह्री उ. भारताचे राजकीय संघटन झाले होते आणि सुखसमृद्धीही नांदली होती. प्रतीहारांनी सुमारे तीन शतके मुसलमानी आक्रमणांचा जो यशस्वी प्रतिकार केला, त्यामुळे त्यांचा इतिहास उज्ज्वल झाला आहे. अरब इतिहासकारांनी प्रतीहारांचे हे श्रेय मान्य केले असून, त्यांच्या सामर्थ्याची आणि वैभवाची मुक्तकंठाने प्रशंसा केली आहे. [ए. इं.– मजु; हि. क. इं. पी. भाग ४; वि. मुं. रा. प.]

गुर्जर शिवव्यास

(इ. स. चे १४ वे शतक) महानुभाव पंथातील एक भाष्यकार. गुर्जर शिवव्यास हा कवीश्वर आम्नायातील अचल मुरारी याचा शिष्य होय. याचे पूर्वाश्रमीचे नाव शिवपाळ असे असून तो चक्रधराच्या गुजराती वंशातील सहावा पुरुष होता. याच्या वडिलांचे नाव धर्मपाळ असे होते. शिवपाळ हा गुजरातेतून पैठण येथे आला. येताना त्याने आपल्यावरोबर आपला पुतण्या संगपाळ यालाही आणले होते.

शिवपाळाचा वंशवृक्ष श्री. य. खु. देशपांडे यांनी खालीलप्रमाणे दिला आहे–



चक्रधराच्या पश्चात त्याचे शिष्य त्याच्या तत्त्वज्ञानाचे व शिकवणीचे निबंधन करण्यात व्यग्र होते. गुर्जर शिवव्यास आणि सिद्धान्त हरिव्यास या दोघांनी मिळून चक्रधरोक्त सूत्रांतील लक्षण, आचार व विचार या तीन प्रकरणांतील तीन्ही स्थळांची बांधणी इ. स. १४०३ च्या सुमारास पुरी केली. ही तीन स्थळे म्हणजे सूत्रपाठावरील तीन भाष्येच होत. ही भाष्ये त्या पंथात सर्वमान्य झाली आहेत.

या भाष्याची थोडी कल्पना यावी म्हणून 'महाराष्ट्री असावे' या चक्रधरोक्त सूत्रावरील स्थळकाराच्या भाष्यातून काही भाग पुढे दिला आहे–

महंतराष्ट्र म्हणोनि महाराष्ट्र । महंत म्हणजे थोर ।... एके देशींचीं मनुष्यें राजसें, एके देशींचीं मनुष्यें तामसें ।... महाराष्ट्र सात्त्विक । तेथचे जडचेतन पदार्थ तेहि सात्त्विक । तेथ असतां शारीर मानसिक कव्हणीचि उपद्रव नुपजति । आणिकें देशीं शारीर मानसिक उपद्रव उपजला असे, तो महाराष्ट्री असतां शमे । तेथचां अन्नोदकीं शमे । तेथचां औषधी शमे । तेथचा वारा झडि पाऊस तोहि सात्त्विक । तेणें सकळ उपद्रव शमेंति । महंत भणिजे निर्दोष । आणिक एक देश निर्दोष होति परि सगुण नव्हेति । महाराष्ट्र निर्दोष आणि सगुण । तेथ असतां अनाचार करावें याची बुद्धि नुपजे । आणि उपनली तर करूं ल्हाईजे । आपण अनाचार न करी, आणिकांसि करूं नेदिति ते महाराष्ट्र । धर्म सिद्धि जाए ते महाराष्ट्र (आचारस्थळ).

या स्थळ नामक ग्रंथात प्रथम लक्षण, आचार, विचार व या तीन्ही विभागांतील सूत्रे सांगून त्यावर जे भाष्य केले आहे, त्याला भाष्य, लापणिका, इ. नावे आहेत. [म. वा. इ.; म. सा.; म. म. वा.]

गुर्जरी

एक रागिणी. हिचा भैरव रागाशी संबंध आहे. हनुमन्मते ही मेघरागाची स्त्री आहे. हिचा वादी धैवत व संवादी ऋषभ आहे. ऋषभ, गंभीर, कोमल धैवत, दोन मध्यम याप्रमाणे हिच्यात स्वर लागतात. तीव्र मध्यम विशेषत्वाने लावतात व कोमल मध्यम क्वचित लावतात. हिला पंचम वर्ज्य असतो. आरोह– नि सा म ग म ध नि सा. अवरोह– निं ध म म रे सा. गानसमय दिवसाचा पहिला प्रहर. संगीतदर्पणात हिचे ध्यान पुढीलप्रमाणे सांगितले आहे–

श्यामा सुकेशी मलयद्रुमाणां
मृदूल्लसत्पल्लवतल्पयाता ।।
श्रुतेः स्वराणां दधती विभागं
तन्त्रीमुखाद्दक्षिणगुर्जरीयम् ।।

अर्थ – ही दक्षिणी गुर्जरी रागिणी वर्णाने सावळी, सुकेशी, चंदन वृक्षांच्या मऊ लुसलुशीत पल्लवांवरून चालणारी व तंत्री मुखातून श्रुती व स्वर यांचा विभाग दाखवणारी अशी आहे.

सोमेश्वराने ही षाडव जातीची व पंचमवर्ज्य असल्याचे सांगितले आहे. कोणत्या तरी कारणाने गाण्याच्या वेळी रागात विकार झाला असता त्याचे प्रायश्चित्त म्हणून ही रागिणी गायिली जाते, असेही कळते. हिला व्यवहारात गुजरी असे म्हणतात. गुर्जरदेशीयांना ही प्रिय असल्यामुळे हिला हे नाव मिळाले आहे. ही ग्रीष्म ऋतूत भैरव रागाच्या जोडीने गायिली जाते. [श्री. आबासाहेब मुजुमदार, पुणे]

गुर्रा राजस्थानातली एक जात. हे लोक मांबियो जातीच्या लोकांचे पौरोहित्य करतात व त्यांच्या विवाहप्रसंगी वरातीपुढे मशाली घेऊन चालतात. पूर्वकाळी आपण ब्राह्मण होतो, असे हे सांगतात व ब्रह्मपुत्र गर्ग याच्यापासून आपली उत्पत्ती मानतात.


गुर्रा स्त्री-पुरुष

विवाहप्रथा – वधू-वरांनी एकमेकासह चार पावले टाकली, की त्यांच्या विवाहविधीतला मुख्य भाग पूर्ण होतो. विवाहातले बाकीचे विधी इतर हिंदूंसारखेच असतात. या प्रसंगी वधू-वरांपैकी एकाचा भाचा पौरोहित्य करतो.

यांच्यांत विष्णूची उपासना प्रचलित आहे. मालनमाता ही यांची कुलदेवी होय. हे शनीला व मारुतीला भजतात.

हे मृताला जाळतात अगर पुरतात. [रा. जा.]

गुर्वष्टमी व्रत माद्र. शु. अष्टमीस गुरुवार आला असता गुरूच्या सुवर्णमूर्तीची पूजा करणे असा याचा विधी आहे. [हे. व्र.]

गुलगुलिआ एक भटकी जमात. यांची वस्ती छोटा नागपूर भागात आढळते. हे आपली उत्पत्ती खारीपासून झाल्याचे सांगतात व खारीला आपले प्रमुख दैवत मानतात. [क. ध. फे. नॉ. बि.]

गुलाबदासी पंथ याचा प्रवर्तक गुलाबदास नावाचा एक साधू होता. हा प्रथम उदासी मताचा होता; पण कुसूर येथील हीरादास नामक सत्पुरुषाच्या सांगण्यावरून याने उदासीमताचा त्याग केला. याच्या पंथाचा मुख्य उद्देश आनंद उपभोगणे हा आहे. या पंथाचे लोक सुंदर वस्त्रालंकार वापरून ऐश्वर्य भोगीत राहतात. हे ईश्वराविष विशेषशी आस्था बाळगीत नाहीत; पण सत्याला मा मानतात. या पंथाचे अनुयायी पंजाबाच्या लाहोर, जालंधर अमृतसर, फिरोजपूर, अंबाला व करनाल या भागात प्रामुख्या आढळतात. [उ. भा. सं. प.]

गुलाबराव महाराज (१८८१ ते १९१५ इ. स.) ए तत्त्वज्ञ, संत व कवी. विदर्भाती अमरावती जवळच्या माधान या गावी यांचा जन्म झाल यांच्या आईचे नांव अलोका व पित्याचे गोंदूजी असे हो लहानपणीच देवी येऊन यांना अंधत्व आले. वयाच्या चौद वर्षी आई; स्वर्गवासी झाली. त्यामुळे यांचे बालपण आजो गेले. पुढे काही दिवसांनी ते माधान मुक्कामी परत आले. ति सितारामजी भुयार या नावाचे त्यांचे शेजारी होते. त्यांच मुलीशी महाराजांचा विवाह झाला. तिचे नाव मनकर्णि असे होते.


गुलाबराव महाराज

महाराजांच्या मूळ पुरुषाचे नाव उदेसिंग होते. इ. स. १ व्या शतकाच्या अखेरीस लखनौ सुभ्यातील जुनेरगड ये राहत होते. ते सूर्यवंशी क्षत्रिय होते. गुलाबराव महाराज हे उ सिंगापासून २० वे पुरुष होत. यांच्या जातीत रहाट वापर

नाहीत. कांस्यपात्रात जेवत नाहीत व पुनर्विवाह करीत नाहीत. मुलाच्या लग्नाच्या वेळीच त्याचे उपनयन करतात. त्रैवर्णिकांपैकी कोणताही वर्ण संस्कारलोपाने शूद्र होतो, असे शास्त्रवचन आहे. ते प्रमाण मानून महाराज स्वत:ला शूद्र म्हणवून घेत.

बालपणापासूनच त्यांची प्रज्ञा ही ऋतंभरा असल्याचे स्पष्ट दिसू लागले. सूक्ष्म, दूरस्थ व अलौकिक अशा सर्व विषयांत त्यांची गती होती. ते शंकराचार्यांप्रमाणे उपजत दिव्यज्ञानी, सिद्धयोगी व निष्ठावंत भक्त होते. त्यांच्या समोर लक्ष्मणभट जोशी नावाचे गृहस्थ होते. त्यांच्याकडून त्यांनी शिवलीलामृताचा ११ वा अध्याय, व्यंकटेश स्तोत्र, मंगलाष्टके इ. गोष्टी ऐकूनच पाठ केल्या. ते एका काजीकडून कुराणातील कलमे शिकले. रामराव मास्तरांनी त्यांना तोंडी हिशेब व पाढे शिकवले. महाराजांची पाठशक्ती अद्‌भुत होती.

शब्दरूपावली, लघुव्याकरण हे ग्रंथ मुखोद्‌गत करून त्यांनी संस्कृत भाषेत प्रवेश मिळवला. थोड्याच कालात ते संस्कृत पंडित बनले. ज्ञानार्जनासाठी ग्रंथ विकत घेण्याचाही त्यांना छंद होता. एकेक पैसा जमा करून त्यांनी बरीच मोठी ग्रंथसंपदा जवळ केली होती.

गुलाबराव महाराजांच्या ठिकाणी बालपणापासूनच भविष्यकथनाची एक अतर्क्य शक्ती होती. महाराजांचा मामा बाजीराव याने जनाबाई नामक स्त्रीबरोबर द्वितीय विवाह केला. ही जनाबाई विधवा होणार असे भाकीत त्यांनी आपल्या आजीजवळ वर्तवले व अखेरीस ते खरे ठरले. आपले आजोबा विहिरीत पडून अथवा सर्पदंशाने मरतील, हेही त्यांचे भविष्य खरे झाले. अशा रीतीने वयाच्या सहाव्या वर्षापासूनच त्यांच्या अतींद्रिय ज्ञानाचा लोकांना साक्षात्कार घडू लागला. एखाद्या वेळी भजनप्रसंगी ते आपल्या सवंगड्यांना बुक्का म्हणून माती कपाळाला लावायला सांगत. लोकांनी तसे करताच त्या मातीला बुक्क्याचा वास येऊ लागे. योगसाधनेत त्यांनी बालपणातच समाधीपर्यंत मजल गाठली होती. एकदा त्यांनी चाळीस तोळे सोमल खाल्ला; पण थोडेसे तूप प्राशन करून त्यांनी ते विष पचवून टाकले.

ते भोजनप्रसंगी गंध हातावर घेऊन चोहोकडे शिंपडीत आणि मग जेवायला सुरवात करीत. कधी कधी जेवताना एकदम दोन्ही हात पुढे करीत. 'असे का करतोस' म्हणून विचारले तर सांगत, 'बाई, एक सुंदर लेकरू आले होते. त्याला चार हात होते, त्याच्या डोक्यावर मुकुट, कपाळाला केशरी गंध आणि कानात कुंडले होती.' ताटात काय काय वाढले आहे याची चौकशी करून आपल्या मनाशीच म्हणत, 'काय रे गड्या, ही भाजी, हे वरण खातोस का?' पुन्हा चुलतीला म्हणत, 'माझा सोबती जेवतो म्हणतो; तू भाजी वाढ.' किंवा 'माझा सोबती भाजी खात नाही म्हणतो; तू भाजी काढून घे.'

तीर्थयात्रेसाठी ते नासिक, त्र्यंबकेश्वर, आळंदी, जगन्नाथपुरी, इ. ठिकाणी हिंडले. प्रवासात अनेक संत–सज्जनांच्या व संस्थांच्या भेटी घेणे हा त्यांचा कार्यक्रम असे. गोंदवलेकर महाराजांची भेट त्यांना अशा प्रवासातच घडली. त्याचप्रमाणे काशी येथील कैवल्यधाम विद्यापीठाचे अधिपती व जगन्नाथपुरीचे श्रीशंकराचार्य यांच्याही भेटी झाल्या. एकदा रॉयल एशियाटिक सोसायटी या प्रसिद्ध ग्रंथसंग्रहालयाची मुंबईची शाखा पाहायला गेले असता तिथे संस्कृत हस्तलिखित ग्रंथांच्या नोंदबुकातून क्रमवार एकेका ग्रंथाचे नाव वाचून घेऊन अमुक ग्रंथ अमक्याने लिहिला, हा जैनांचा आहे, तो बौद्धांचा आहे, अमका न्यायशास्त्राचा आहे, तमका वैशेषिकांचा आहे, हे सर्व महाराजांनी बिनचूक सांगितले. नंतर नोंदबुक तयार करणाऱ्याने त्यात कशा चुका केल्या आहेत, तेही दाखवून दिले.

महाराजांची वृत्ती विदेही होती; तरी त्यांना भजन-पूजनाची आवड होती. शास्त्रमर्यादांचे पालन करण्याविषयी त्यांचा कटाक्ष असे. रात्री जागणे, अभंग-पदे वगैरे म्हणणे, एकदम उठून वाटेल तिकडे जाणे, दोन्ही गुडघ्यांत मान घालून बसणे, मान व हात वरचेवर फिरविणे, वारंवार थुंकणे, कारण नसता उगीच मोठ्याने ओरडणे, अशा त्यांच्या विचित्र लीला चालत. त्यामुळे महाराज वेडे आहेत, असे सामान्य जनांना वाटे.

महाराजांचे कवित्व सरस, भावनोद्दीपक व तत्त्वविवेचक असूनही सहजस्फूर्त होते. हे कवित्व कधी ओवी छंदात, कधी अभंगवाणीत, तर कधी गोपीगीतांच्या स्वरूपात प्रकट होई. त्यातील विचार चिकित्सक बुद्धीचाही ठाव घेणारे असत. एका दमात आठआठशे ओव्या रचून ते म्हणून दाखवीत. पत्नीचा वियोग झाल्यानंतरच्या आपल्या मन:स्थितीचे चित्र त्यांनी पत्नीप्रेमपराग या शीर्षकाखाली रचलेल्या आर्यांत रेखाटले आहे. त्यातील दोन आर्या अशा––

मनकर्णिके प्रिये ग तुजवाचुनि फार जीव तळमळतो ।
मज दीन चातकावर केव्हा न कळे दयाजलद वळतो ।।
मजविण आन न जाणे ऐसी तव बुद्धि फार सरला गे ।
अवचित परि मज कैसे फसवुनि परपुरुष राम वरला गे ।।

निरनिराळ्या भजनाच्या कार्यक्रमातून राधाविलास, शुकगणिका, उपमन्यू, इ. सुंदर आख्याने त्यांनी निर्माण केली.

महाराजांचे वाङ्मय. ऐहिक व पारमार्थिक अशा उभय विषयांवर आहे. खरा धर्म कोणता, तो कोणापासून समजून घ्यावा, सर्व धर्मांत हिंदू धर्म श्रेष्ठ कसा, हे अनेक ग्रंथांच्या द्वारे त्यांनी सुलभ व बिनतोड रीतीने प्रतिपादिले आहे. महाराजांचे

ग्रंथ म्हणजे तो एक ज्ञानकोशच आहे. शंकराचार्यांचे केवलाद्वैत, मध्वाचार्यांचे द्वैत, निंबार्कांचे द्वैताद्वैत व रामानुजांचे विशिष्टाद्वैत, या सर्वांचे सामंजस्य त्यांच्या ग्रंथांत पाहायला सापडते. कर्म, भक्ती, ज्ञान, योग व वैराग्य यांचेही एकसमयावच्छेदेकरून दर्शन घडते.

पत्रव्यवहार भाग १ व २, व्यवहारधर्मबोध, अलौकिक व्याख्यानमाला, भागवतरहस्य खंड १ ला व २ रा, संप्रदाय सुरतरू भाग १ ला व २ रा, अशी त्यांची वाङ्मयसंपदा आहे.

भागवतरहस्य हा ग्रंथ का लिहिला हे सांगताना महाराज म्हणतात——

या प्रियलीलामहोत्सव ग्रंथी । कथा मात्र भागवती ।
येरव्ही विवेचन केले निजमती ।
श्रुति स्मृति शांकरमती न विरोध ज्याचा ॥
शांकरमता विरोध न येतां ।
आणि भक्ति उपयोगी तत्त्वतां ।
ऐसिया ही परमोक्ता । प्रमाण घेतले ॥
यास्तव आपुलिया ऊहा । यथामति शोधुनिया हा ।
मांडिला वेदान्त भक्तीचा महा । समन्वयोद्यम् ॥

भागवतावरील हा ग्रंथ म्हणजे एक मधुर असे भक्तिभाष्य आहे. हा ग्रंथ गुरु-शिष्य संवादरूपाने विस्तारला आहे.

महाराजांचा व्यवहारधर्मबोध हा ग्रंथ अनेक दृष्टींनी अपूर्व आहे. आजच्या चिकित्सक लोकांपुढे उपस्थित होणाऱ्या शेकडो बिकट प्रश्नांची उत्तरे सप्रमाण व अधिकारयुक्त वाणीने त्यांनी त्यात दिली आहेत. या ग्रंथात सुमारे एक हजार प्रश्न विचारलेले आहेत व त्यांची उत्तरे दिलेली आहेत. प्रश्नही त्यांचेच, उत्तरेही त्यांचीच असा हा मामला आहे. त्यांतल्या प्रश्नांची विविधता ध्यानी घेता महाराजांची खोल, व्यापक व सर्वस्पर्शी बुद्धिमत्ता कळून येते. प्रश्नोत्तराचे काही नमुने असे——

प्रश्न —— वेदान्त प्रयत्नवाद शिकवितो की प्रारब्धवाद ?

उत्तर —— कपाळावर हात देऊन बसणाऱ्यास दैववाद शिकवितो आणि निधड्या छातीच्या माणसाला 'आत्मा नित्य आहे' म्हणून प्रयत्नवाद शिकवितो.

प्रश्न —— धर्मशास्त्र व नीतिशास्त्र कसे शिकावे ?

उत्तर —— धर्मशास्त्र अंतःस्फूर्तीचे असल्यामुळे गुरु-शास्त्रांपासून शिकावे आणि नीतिशास्त्र अनेक लहान-सहानसुद्धा अनुभव गोळा करून शिकावे. भीष्मांनी महाभारतात धर्माला म्हटले आहे, की हे सर्वच मी काही वेदाच्या आधाराने सांगत आहे, असे तू समजू नकोस. शहाण्यांच्या अनुभवांतून गोळा केलेले हे मधू आहे असे समज.

प्रश्न —— सुधारणेचा मोठा दोष आपणाला कोणता वाटतो?

उत्तर —— सुधारणेत मला मुळीच दोष वाटत नाही, सुधार कातच दोष वाटतो. जे गाणे माणसाला यावयाचे ते सवनीकेने (ग्रामोफोन) विकत घेतले आहे. माणसांची शक्ती यंत्राने घेतल्यामुळे व्यायामरहि अशी रोगी माणसे झाली आहेत; आणि हे असे चालले तर यंत्र फोडून टाकण्याबद्दल कायदा होवो ! म्हणून धर्माचे अवलंबन करून सुधारणेतील सार निवडून घे. ब्रह्मज्ञान व भगवद्भक्तीवाचून इतर बाबतींत 'अति सर्वत्र वर्जयेत्' या म्हणीचा उपयोग कर.

महाराजांनी समयोपदेश ग्रंथात नास्तिकांच्या काही प्रश्नांन दिलेली उत्तरे पुढीलप्रमाणे आहेत——

पुष्कळ नास्तिक असे म्हणतात, की पुनर्जन्म आहे कशावरून मेल्यावर आत्मा नाहीसा होतो, हे त्यांचे म्हणणे त्यांनाच घातु आहे. कारण त्यांना विचारावे, की जर पुनर्जन्म नाही तर तरी जन्म कसा आला ? आत्मा नव्हता व त्या अभावापासू त्याला हा जन्म आला, असे जर म्हणाल, तर मेल्यावरही तुमच्या मते नाहीसा होतो, मग त्या अभावापासून तो पुन्हा जन्माला येऊ नये ? आत्मा पूर्वी होता असे मानल्यास अमर सिद्धच झाले. पूर्वी आत्मा नव्हता व तो आता उत्पन्न झा असे मानल्यास देहाकरिता तशी वीर्यशोणित सामुग्री पाहि मुळातच काही नाही तर त्याची उत्पत्ती कशी व्हावी ? देहा कारण पूर्वी होते म्हणून देह उत्पन्न झाला. त्याप्रमाणे जी उत्पन्न होण्याला कारण होते असे म्हणशील, तर दोन नि निराळ्या वस्तू उत्पन्न होण्याला दोघांनाही स्वतंत्र सामुग्र पाहिजेत. पण येथे तर दोघांनाही अभाव ही एकच सामु आहे. म्हणजे आम्ही जसे भाव अमर धरतो त्याप्रमा नास्तिकही अभाव अमर धरतातच. आत्म्याचे ज्ञान व देहा जडपणा यांचा मनाला संसर्ग आहे. आत्मा हा ज्ञान आहे मनाला काही ज्ञान होत नाही. कारण मनाला ज्ञा होते म्हटल्यास क्रोधाचे ज्ञान शांतीला झाले' पाहिजे. पण त होत नाही. क्रोधाचे व शांतीचे ज्ञान एकालाच होते. याप्रमा पुनर्जन्म दोघांनाही कबूल आहे.

नास्तिकांच्या दुसऱ्या एका प्रश्नाला दिलेले उत्तर असे—

पुष्कळ नास्तिक म्हणतात, की जर पुनर्जन्म आहे तर माग जन्माची स्मृती का राहत नाही. ? स्मृती असल्याशिवाय ज कसा ठरवावा ? हा त्यांचा हेतू अगदी पुचाट आहे. हेतू इत प्रबल असावा. की त्याने तीच गोष्ट सिद्ध झाली पाहि दुसरी होऊ नये. बाळपणी आपण काय केले आहे हे माहि

नाही, गर्भातली आपणास स्मृती नाही. किंबहुना काल आपण काय केले, हे सुद्धा आठवत नाही. तर यावरून असे म्हणता येईल काय, की आपण बालपणी नव्हतो व कालही नव्हतो. संस्कार लीन राहतात. पण ते उद्‌भूत करता येत नाहीत. कारण आपले अज्ञान फार भयंकर आहे. स्मृतीच्या अभावावरून पुनर्जन्म खोडता येत नाही. तुम्हांस स्मृती नाही ही परमेश्वराची मोठी कृपाच आहे. कारण कर्मांने कोणाचा संबंध कसा जुळेल हे सांगता येत नाही. आपल्याला स्मृती कशाची राहते ? ज्याची आसक्ती फार राहते, त्याचीच स्मृती राहू शकते. गाडीत बसताना आपण कितीकांचे तोंड पाहतो. पण स्मृती सर्वांची राहत नाही. ज्याचा विशेष संबंध आला असेल त्याचे तोंड ध्यानात राहते. पुनर्जन्माचीही गोष्ट तशीच आहे. एका आईच्या पोटी दोन जुळी मुले होतात, पण त्यांपैकी एक गणितशास्त्रात चांगला, तर दुसरा व्याकरणशास्त्रात चांगला दिसतो. याचे कारण पूर्वी त्यांना या विषयाचे ठिकाणी जास्त आसक्ती असावी, असे अनुमान निघते. मागल्या जन्माकडे कमी अनुसंधान असल्यामुळे व या देहावरच जास्त अनुसंधान असल्यामुळे स्मृती राहत नाही. अनुसंधान ठेवल्यास आठवू शकतील; म्हणून या जन्मात जे जे संस्कार दृढ करून घेऊ, ते आठवल्यावाचून राहणार नाहीत.

महाराजांची भक्तिसाधना मधुरा भक्तीची होती. ते स्वतःला ज्ञानेश्वरकन्या व कृष्णपत्नी असे म्हणवून घेत. म्हणून ते सदैव स्त्रीवेषातच राहत व मंगळसूत्र, वेणी, कुंकू वगैरे सौभाग्यालंकारही धारण करीत. शिवाय आपण गोपी आहो अशी भावना करून भागवताच्या दशम स्कंधातील २२ व्या अध्यायात वर्णन केल्याप्रमाणे कात्यायनीव्रत व करीत श्रीकृष्णाच्या रासक्रीडेचा आनंद उपभोगीत. होमहवनादी सर्व व्रतेही करीत. त्यांचे आरचण श्रौत परंपरेला धरून व अत्यंत शुद्ध असे होते. सांख्य, वेदान्त, योग, इ. विषयांचे ज्ञानदान त्यांनी आयुष्यभर सुढाळपणे केले. संस्कृतप्रमाणेच हिंदी, इंग्रजी इ. भाषाही त्यांना चांगल्या अवगत होत्या. बालपणीच अंधत्व आले असता ते इतक्या भाषा कसे शिकले व इंग्रजीसारख्या परकी भाषेतील विविध तत्त्वज्ञान त्यांनी कसे आत्मसात् केले, ते एक आश्चर्यच होय. त्यांच्या कालार्यंत जगात जे ज्ञान-विज्ञान प्रकट झाले होते, त्या सर्व ज्ञान-विज्ञानांवर ते अधिकारवाणीने बोलत आणि त्यातल्या उणीवा, हेत्वाभास, इ. वैगुण्येही दाखवून देत.

श्री. ना. गो. चापेकर महाराजांच्याबद्दल लिहितात, ते असे—

श्री गुलाबराव महाराज ही एक या शतकातील अद्वितीय, जन्मसिद्ध विभूती होऊन गेली. जन्मांध असून कोणत्याही ग्रंथाचे लौकिकरीत्या अध्ययन झाले नसताना, किंबहुना तसे होणे अशक्य असताना श्रीशंकराच्या मस्तकातून प्रकट होणाऱ्या गंगेप्रमाणे यांच्या मुखातून निघणाऱ्या ज्ञानगंगेचा प्रवाह अस्खलित, आश्चर्यजनक व जगदुद्धारक आहे ! या गंगेत अनेक पौर्वात्य व पाश्चिमात्य विविध शास्त्रांचे आजतागायत सोपपत्तिक विवेचन आले असून हिंदु आर्यधर्माचे व आर्यसंस्कृतीचे उज्ज्वलत्व प्रस्थापित करण्याच्या कामी ते योजण्यात आले आहे. आणि यातच इतर पूर्वीच्या संतांहून श्री. गुलाबराव महाराजांचे वैशिष्टय व्यक्त होते.'

गुलाबराव महाराजांच्या विषयी महाराष्ट्रातल्या अनेक विद्वानांनी अत्यंत आदराने लिहिले आहे व त्यांच्या अलौकिक ज्ञानाची मुक्तकंठाने प्रशंसा केली आहे. [श्री गुलाबराव महाराज ले. मिलिंद]

गुलामगिरी

प्राचीन काळी ग्रीस, रोम, इजिप्त वगैरे देशांत जशी गुलामगिरी चालू होती, तशी ती भारतात होती किंवा नाही, हा एक विवाद्य प्रश्न आहे. त्या देशांच्या इतिहासातील वर्णनांवरून कळते, की सुस्थितीत असलेले हजारो स्त्री-पुरुष युद्धात जिंकले गेले, की ते गुलाम बनायचे, त्यांतील अशक्त पुरुषांची कत्तल व्हायची आणि सुंदर स्त्रिया उपभोगासाठी ठेवल्या जायच्या. त्या काळी स्त्री-पुरुषांना कदन्नावर ठेवून राबवण्याचीही प्रथा होती. तसे करताना त्यांचा अमानुष छळही केला जाई. भारतात तशा प्रकारची गुलामगिरी नव्हती या गोष्टीचे ग्रीक लोकांना फार आश्चर्य वाटले आहे आणि त्यांनी आपल्या ग्रंथांत ही गोष्ट नमूद करून ठेवली आहे.

तथापि या देशात गुलामगिरी मुळीच नव्हती, असे मात्र म्हणता येणार नाही. इ. स. च्या १९ व्या शतकात प्राचीन भारतीय संस्कृतीचा आणि वाङ्मयाचा अभ्यास करून परकीय पंडितांनी या प्रथेविषयी जी मते व्यक्त केली आहेत, ती काहीशी परस्परविरोधी आहेत. काहींच्या मते श्रीमंत लोकांच्या जवळ गुलाम असत व त्यांचा फार छळ केला जाई. उलट दुसऱ्या काहींच्या मते गुलाम फारसे नसत आणि जे असत त्यांना प्रेमाने वागविले जाई. लेखन, वाचन, हस्तव्यवसाय, इ. कला शिकण्यास त्यांना उत्तेजन दिले जाई. एक गोष्ट मात्र सर्वांनी मान्य केली आहे, की हिंदुस्थानात गुलामगिरी असली, तरी तिचे स्वरूप युरोप व अमेरिका या देशातील गुलामगिरीसारखे भेसूर व अमानुष नव्हते.

ख्रिस्तपूर्व काळ – सनपूर्व २५०० च्या सुमारास भारतात नांदत असलेल्या सिंधुसंस्कृतीत गुलामगिरी चालू असावी, असे अनुमान पुरातत्त्वपंडितांनी काढले आहे. मात्र त्या काळातील

वाङ्मयीन पुरावा मुळीच उपलब्ध नसल्यामुळे त्या गुलामगिरीचे स्वरूप कसे होते, ते सांगता येत नाही.

आर्य लोक भारतात आल्यानंतर त्यांनी इथल्या मूळच्या म्हणजे अनार्य लोकांचा पराभव करून त्यांना रानावनात पिटाळून लावले. जे हाती सापडले ते आर्यांचे दास बनले. या सर्व अनार्यांना आर्य लोक दस्यू म्हणत. त्यांच्याविषयी वैदिक वाङ्मयात अनेक उल्लेख आहेत. त्यांवरून असे दिसते, की आर्य लोक जित लोकांवर सत्ता गाजवीत होते व त्यांच्याकडून सेवाचाकरीही करून घेत होते. हे दास कृष्णवर्णी होते. त्यांचा वंश वेगळा होता. त्या वंशातील सर्वच लोकांना आर्य लोक आपले शत्रू मानीत, त्यांचा उच्छेद करण्याचा प्रयत्न करीत, त्यांच्या संपत्तीचे अपहरण करीत, हाती सापडलेल्या दस्यूंचा विक्रय करीत आणि घोडे, हत्ती, गायी, इ. पशूंप्रमाणे त्यांचे दानही करीत.

अशा प्रकारे वैदिक काळातली गुलामगिरी वांशिक भेदावर आधारलेली होती. पुढे रामायण-महाभारताच्या काळात हा वांशिक भेद उरला नाही. मात्र पूर्वीप्रमाणेच दासांवर मालकांची पूर्ण सत्ता चालत असून, त्यांची सर्व मालमत्ता, एवढेच नव्हे, तर त्यांच्या बायका-मुलांवरही मालक सत्ता गाजवीत. त्या काळी दासीपुत्र, क्रीतदास, युद्धदास, द्यूतदास, असे अनेक दासप्रकार होते. पांडव द्यूतात हरल्यामुळे ते कौरवांचे द्यूतदास झाले; त्याप्रमाणे त्यांची पत्नी द्रौपदीही दासी झाली. तिची भरसभेत विटंबना होत असता भीष्मासारख्या महाजनांनीही त्या गोष्टीला विरोध केला नाही. यावरून समाजात दासांना कसलेही संरक्षण किंवा अधिकारही नव्हते, असे दिसते. बौद्ध वाङ्मयातही दासांचे असेच वर्णन आढळते. बौद्ध काळातही गुलामांची विक्री केली जात असे. पुढे मगधाचे साम्राज्य प्रस्थापित झाल्यानंतर आर्थिक परिस्थिती पुष्कळच बदलली आणि त्यामुळे दासांच्या स्थितीतही बदल झाला. त्यांना कायद्याचे संरक्षण मिळू लागले, स्वातंत्र्य मिळण्याचा संभव निर्माण झाला, त्यांच्या कामाच्या मर्यादा ठरल्या व मालकाची सत्ताही त्या मानाने मर्यादित झाली.

हिंदुधर्मशास्त्राने दासप्रथेला मान्यता दिली आहे. मनुस्मृतीत (८.४१५). युद्धकैदी, पोटासाठी आपणहून दास झालेले, दासीच्या पोटी जन्मलेले, विकत घेतलेले, दान दिलेले, वारशाने झालेले व शिक्षा म्हणून दास्यात पडलेले, असे दासांचे सात प्रकार सांगितले आहेत. दासाना स्वतःची मालमत्ता ठेवता येत नसे आणि दास मनुष्य धन्याने मुक्त केला तरी स्वतंत्र होऊ शकत नसे; कारण दास्य हे जन्मजात असते असेही मनूने सांगितले आहे. शूद्र हे कायमचे दास असल्याचा स्मृतिशास्त्रातील एक प्रस्थापित सिध्दान्त होता. त्याचा उगम ऋग्वेदातील पुरुषसूक्तात सापडतो. समाजपुरुषाच्या पायापासून शूद्र जन्मला असे त्यात म्हटले आहे. नारदस्मृतीत दासांचे १५ प्रकार दिले आहेत. दास व सेवक यात फरक हा, की धन्याचे मलमूत्र टाकणे, रस्ते झाडणे, इ. घाणेरडी कामे दासाला करावी लागत व ती सेवकाला करावी लागत नसत. काही प्रकारचे दास नुकसानभरपाई देऊन किंवा बदली मनुष्य देऊन स्वतःची मुक्तता करू शकत. त्या प्रसंगी धन्याने पाण्याने भरलेले पात्र घेऊन ते दासाच्या खांद्यावरून टाकून फोडावे व त्याच्या मस्तकावर पाणी शिंपडावे आणि 'तू मुक्त झाला आहेस' असे म्हणावे, असे सांगितल आहे. उच्च जातीचा मनुष्य कनिष्ठ जातीच्या व्यक्तीचा गुलाम होऊ शकत नसे आणि चोरांनी पकडून नेलेला किंवा जबरदस्तीने दास म्हणून ठेवलेला मनुष्य कायद्याने गुलाम मानला जात नसे. दासीच्या पुत्राला औरस पुत्राप्रमाणेच वारसाहक्क मिळत असे.

कौटिल्याच्या अर्थशास्त्रात दासकल्प या नावाचा एक स्वतंत्र भाग असून, त्यात त्याने या संस्थेचे सांगोपांग विवेचन केले आहे. आमरण दास व नियतकालिक दास हे दासांचे मुख्य वर्ग असून, ध्वज–आहृत, उदरदास, गृहजात, क्रीत, लब्ध, दाय-आगत, दंडप्रणीत, आहितक (गहाण ठेवलेले) व आत्मविक्रयी असे दासांचे नऊ भेद सांगितले आहेत. दासांना कोणते हक्क आंहेत, त्यांनी गुन्हा केल्यास त्यांना शिक्षा काय द्यावी, त्यांचे स्वातंत्र्याचा हक्क केव्हा नष्ट होतो, त्यांचे अपहरण करणाऱ्याला काय शासन द्यावे, त्यांना कायद्याने किती संरक्षण द्यावे व त्यांना कोणती कामे सांगावी, इ. नियम त्यात दिले आहेत.

पूर्वी शूद्र व अतिशूद्र हे त्रैवर्णिक हिंदूंचे दास मानले जात. वरिष्ठ जातीच्या लोकांची सेवा करणे, हाच त्यांचा धर्म ठरला होता. समाजात त्यांचा दर्जा अत्यंत हीन होता. तथापि ते गुलाम होते असे मात्र वाटत नाही. कारण आर्थिक व सामाजिक परिस्थितीमुळे ते दास असले, तरी त्यांच्या देहावर धन्याची संपूर्ण सत्ता नसे. त्यांचा क्रयविक्रयही होत नसे.

मध्ययुग–मुसलमानी देशात गुलामगिरी मोठ्या प्रमाणात चालू होती आणि मुसलमान लोक हिंदुस्थानात आल्यावरही त्यांच्यात ही प्रथा चालू राहिली होती असे दिसते. अल्पवयी मुलगा किंवा पुत्र या अर्थी गुलाम हा शब्द कुराणात वापरलेला आढळतो (सुरा. ३.४२). आधुनिक मुसलमान गुलाम हा शब्द दास या अर्थी वापरतात. नबाब, अमीर, उमराव व धनिक लोकांच्या कुटुंबांत अनेक स्त्री-पुरुष गुलाम आढळत. घरातील अनेक प्रकारची कामे त्यांना करावी लागत. जनानखान्यातली कामे मुख्यत्वे तेच करीत. मालक गुलामांशी फार

दयेने वागत व त्यांच्या खाण्यापिण्याचीही काळजी घेत. त्यांना माणुसकीने वागविले जात असे, त्यामुळे पुष्कळदा मालकाने मुक्त केल्यावरही गुलाम त्याला सोडून जायला तयार नसत. गुलाम स्त्रियांच्या अंगावर अनेक भारी अलंकार घालण्याची चाल होती. मालकिणीच्या संपत्तीचे प्रदर्शन करण्याची ती एक रीत होती. गुलामांची सर्व चीजवस्तू मालकाचीच संपत्ती असल्यामुळे त्यात काही नुकसानही नसे. ते गुलामांचे लग्न लावून देत, त्यांच्या मुलांचे प्रेमाने पालन करीत व त्या मुलांना शिक्षणही देत. स्वतःच्या कर्तबगारीने उच्च पदापर्यंत चढण्याची संधी अशा गुलामांना मिळत असे. गुलामांनी सेनानायक म्हणून पराक्रम गाजवला, इतकेच नव्हे; तर काही गुलाम सुलतानही बनले, अशी उदाहरणे भारताच्या इतिहासात आहेत (गुलाम घराणे पाहा).

अशा प्रकारची गुलामगिरी भारतात ब्रिटिशांचे राज्य येईपर्यंत चालू होती. ब्रिटिश सरकारने ती हळूहळू बंद केली. इ. स. १८११ मध्ये परदेशातून आणलेले गुलाम विकण्यास मनाई करण्यात आली. इ. स. १८४३ मध्ये त्याही प्रकारची गुलामी कायदेशीर मानू नये, असे ठरले आणि १८६० साली कोणालाही गुलाम म्हणून विकणे वा विकत घेणे हा गुन्हा ठरवण्यात आला.

गुलामगिरीचा उगम – मनुष्य जेव्हा जंगलात शिकार करून उदरनिर्वाह करीत असे, त्या वेळी गुलामगिरी निर्माण होण्याला अवकाशच नव्हता. कारण त्या काळी प्रत्येक मनुष्य स्वतःपुरतेच अन्न मिळवीत असे. गुलामांच्या श्रमांमुळे अधिक अन्न मिळणे शक्य नव्हते आणि शिकारीसाठी रानात भटकताना ते पळून जाणेही शक्य होते.

त्या पुढच्या काळात काही जमाती मासेमारी व शेती या कामासाठी गुलामांचा उपयोग करू लागल्या. त्यापुढे शेती मोठ्या प्रमाणात सुरू झाली, तेव्हा गुलामांचा खरा उपयोग होऊ लागला. लढाईत जिंकलेल्या माणसांना कसलेच स्वातंत्र्य नसते. त्यांना ठार मारण्यापेक्षा जेत्याची सेवा करण्यासाठी राबवणे व त्यांच्या श्रमाचा उपयोग उत्पादनासाठी करणे, हे अधिक फायदेशीर ठरते. या आर्थिक जाणिवेतूनच पुढे गुलामगिरी दृढमूल झाली. अशा गुलामांना निर्दयतेने वागवणे साहजिक असे. कारण ते पूर्वीचे शत्रू असत. शेतात राबणाऱ्या गुलामापेक्षा घरात काम करणाऱ्या गुलामाचे जीवन अधिक सुखाचे असे. कारण घरात काम कमी असे व तिथले वातावरण काही अंशी माया–ममतेचे असे.

गुलामगिरीचे परिणाम – गुलामगिरीचा एक महत्त्वाचा सामाजिक परिणाम असा झाला, की त्यामुळे कित्येक मानवी समूहांना सतत श्रम करण्याची सवय व शिस्त लागली. गुलामी जीवनात आळसाला वा प्रलोभनाला स्थान नसते. तिथे श्रमांची सक्तीच असते. त्यामुळे जे दुबळे होते, ते अशा भारी श्रमांना टिकले नाहीत. जे टिकले त्यांनीच पुढे आपला वंश वाढवला. त्यांची कष्टाची सवय पुढील पिढ्यात उतरली आणि औद्योगिक विकाससाठी ती उपयुक्त ठरली.

गुलामगिरीचा दुसरा सामाजिक परिणाम झाला, तो असा की केवळ श्रमजीवी आणि केवळ उपभोगी असे दोन वर्ग तिच्यामुळे निर्माण झाले. गुलामांच्या श्रमांमुळे मालकवर्गाला धनसंचय करणे शक्य झाले आणि त्याचबरोबर स्वतः श्रम करणे कमीपणाचे वाटू लागले.

गुलामगिरीमुळे केवळ गुलामांचा छळ व नाश होतो असे नाही, तर मालकवर्गाचाही नैतिक अधःपात होतो. गुलामी हा मानवतेला काळिमा आहे. या पद्धतीमुळे मनुष्य पराकोटीच्या हीन अवस्थेला जातो. त्याच्या लैंगिक अनीतीला तर सीमाच राहत नाही. स्त्री गुलाम म्हणजे मालकाच्या विषयोपभोगाचे हुकमी साधनच असते. त्याकारणाने मध्ययुगात श्वेत गुलामांचा व्यापार फारच बोकाळला.

पूर्वी काही ठिकाणी अशी प्रथा होती, की एखादा गुलाम पळून गेला आणि त्याने देवालयात आश्रय घेऊन स्वतःला देवसेवेला वाहून घेतले, तर त्याचा धनी त्याच्यावर सत्ता सांगू शकत नसे. पण ही प्रथा सर्वत्र नसावी. धर्मसत्ता धनिक वर्गाच्या हाती गेल्यानंतर धर्माने गुलामगिरीला मान्यता दिली. एवढेच नव्हे; तर काही धर्मपंडितांनी असे प्रतिपादले, की दास्य ही एक ईश्वरप्रणीत अशीच व्यवस्था आहे.

मानवाचा सांस्कृतिक विकास झाल्यानंतर गुलामगिरी वाढली, असे दिसून येते. मागसलेल्या जमातींपेक्षा सुधारलेला समाज गुलामांना जास्त निर्दयतेने वागवतो, असाही अनुभव आहे. [म. ज्ञा. को.; ऑ. मु. इं.; एन्सा. रि. ए.; स्ले. ए. इं.]

गुलाम घराणे

दिल्लीच्या तख्तावरून भारतात राज्य करणारा पहिला मुसलमानी राजवंश. मलिक कुत्बुद्दीन ऐबक हा या घराण्यातील पहिला सुलतान होय. इ. स. च्या १२ व्या शतकाच्या उत्तरार्धात शिहाबुद्दीन मुहंमद घोरी याने भारतावर अनेक स्वाऱ्या करून पृथ्वीराज चौहान, जयचंद्र गाहडवाल, इ. प्रबळ हिंदू राजांचा पराभव केला आणि कनोज, वाराणसी, इ. नगरे उद्‌ध्वस्त करून अपार संपत्ती लुटून नेली. मुहंमद घोरीने स्वाऱ्या केल्या; पण त्याने भारतात राज्य स्थापले नव्हते. इ. स. ११९३ साली त्याने आपला आवडता गुलाम व सेनापती कुत्बुद्दीन ऐबक याला भारतातील जित

राजांवर वचक ठेवण्यासाठी नेमले. दिल्ली येथे आपली सत्ता स्थापली, ती या कुतुबुद्दीन ऐबकने. पण १२०५ पर्यंत तो केवळ मुहंमद घोरीचा सेनापती म्हणूनच सर्व हालचाली करीत होता. इ. स. १२०६ साली गझनीला परत जात असता मुहंमद घोरीचा वाटेत खूनझाला. त्या नंतर मात्र ऐबकने गझनीशी संबंध तोडून टाकून भारतात स्वतःचे राज्य सुरू केले. तो कुशल सेनानी, न्यायी व शांतताप्रिय होता, असे म्हणतात. पण हिंदूंवर मात्र त्याची सदैव वक्रदृष्टीच होती.

ऐबक इ. स. १२१० मध्ये मरण पावला आणि त्याचा मुलगा आराम हा गादींवर बसला. पण तो राज्यकारभाराला नालायक असल्यामुळे सर्वत्र अंदाधुंदी सुरू झाली. कवाच नामक त्याच्या सरदाराने मुलतान, लाहोर, भटिंडा ही शहरे काबीज केली; तर बंगालमधील लखनावती येथे अली मर्दान हा स्वतंत्र झाला. रणथंमोर व ग्वाल्हेर येथील हिंदू राजांनीही आपले स्वातंत्र्य पुकारले. तेव्हा ऐबकचा जावई इल्तुमिश पुढे आला. त्याने आरामचा पराभव करून दिल्लीचे तख्त जिंकले. इल्तुमिश हा मूळचा थोर घराण्यातील असून बुद्धिमान व देखणा होता. त्याच्या भावांनी त्याला गुलाम म्हणून विकले आणि त्याच्या पहिल्या धन्याने त्याला उत्तम शिक्षण देऊन ऐबकला विकले. इल्तुमिश हा ऐबकला प्रिय झाला व त्याने आपली मुलगीही त्याला दिली. सुलतानपद प्राप्त होताच इल्तुमिशने प्रथम लाहोर व त्याच्या आसपासचा प्रदेश जिंकून घेतला. नंतर बंगाल व बिहार हे प्रांतही त्याने आपल्या राज्यात सामील केले (इ. स. १२२९). इ. स. १२२६ मध्ये त्याने राजस्थानावर स्वारी केली; पण त्याला तिथे फारसे यश आले नाही. प्रतीहार, चौहान, गुहिलोत, चंदेल, चालुक्य, इ. राजांनी त्याला बराच प्रतिकार केला. ग्वाल्हेरचा किल्ला त्याने १२३१ साली जिंकला. १२३४–३५ साली माळव्यावर स्वारी करून त्याने बरीच लूट मिळविली. बगदादच्या खलीफाकडून १२२९ साली त्याला बादशाही वस्त्रे मिळाली. अशी त्याची एकंदर कारकीर्द झाली. भारतात मुसलमानी साम्राज्याचा पाया घालण्याचे श्रेय इल्तुमिशकडे जाते. यानेच प्रथमतः अरबी नाणी इथे सुरू केली आणि नंतर टंका हे रुपयाच्या किंमतीचे चांदीचे नाणे पाडले.



कुत्बुद्दीन ऐबक

इल्तुमिशच्या नंतर त्याच्या मुलांमध्ये यादवी सुरू झाली. इल्तुमिशची इच्छा होती, की आपली मुलगी रझिया हिला राज्य मिळावे. कारण ती पराक्रमी व राजकारणी होती आणि त्याचे मुलगे नालायक आणि व्यसनी होते. पण इल्तुमिशच्या पश्चात त्याच्या सरदारांनी रझियाला डावलून त्याचा पुत्र फीरूज यालाच गादीवर बसवले. त्याने आपली आई शाह तुर्कान हिला सर्व सत्ता बहाल केली. पण ती बाई जुलमी निघाली. तिच्या कारभारामुळे सर्व सरदार खवळून उठले आणि त्यांनी दिल्लीवर स्वारी केली. त्यांना तोंड देण्यासाठी फीरूज बाहेर पडला असता इकडे रझियाने उठाव केला. मग सर्व सरदारांनी तिलाच गादीवर बसवले. तिचा कारभार चांगला होता, तरी स्त्रीने राज्य करावे, ही कल्पनाच अनेक सरदारांना पसंत पडली नाही. त्यामुळे त्यांनी तिच्याविरुद्ध बंड केले. पण तिने ते चातुर्याने मोडून काढले. ती पुरुषवेष धारण करून उघडपणे हिंडत असे व दरबारातही बसत असे. जुन्या दरबारी लोकांना डावलून तिने स्वतःला प्रिय असे नवे अधिकारी नेमले. जलालुद्दीन याकूत नामक एका हबशी गुलामावर तिचे फार प्रेम होते. त्याला तिने आपला मुख्य कारभारी (अमिरी अखुर) नेमले. त्यामुळे अनेक तुर्की सरदार मनात नाराज झाले. पण राजधानीत ती फार लोकप्रिय होती. तिला राजधानीच्या बाहेर काढून दूर नेण्यासाठी लाहोरच्या सुभेदाराने बंड केले. पण तिने ते तात्काळ मोडले. लवकरच भटिंडचाचा सुभेदार मलिक अल्तूनिया यानेही उठाव केला. रझिया त्याचा मोड करण्यासाठी स्वारीवर गेली, तेव्हा मात्र सर्व बंडखोर सरदार तिच्या विरुद्ध उठले आणि याकूतचा खून करून त्यांनी तिला कैद केले. नंतर इल्तुमिशचा तिसरा मुलगा मुइझुद्दीन बहराम हा गादीवर बसला (इ. स. १२४०). इकडे अल्तूनिया याने रझियाला वश करून तिच्याशी लग्न लावले आणि दिल्लीकडे आपला मोर्चा वळवला. पण त्यांचा पराभव होऊन ती दोघेही मारली गेली (इ. स. १२४०). बहराम हा क्रूर व कपटी होता. त्याने अनेकांना कपटाने ठार मारल्यामुळे त्याच्याविरुद्ध कट झाले आणि इ. स. १२४२ मध्ये त्याच्या सरदारांनी त्यालाही पकडून ठार मारले.

त्यानंतर बहरामचा पुतण्या अलाउद्दीन मसूद हा गादीवर आला. तोही नालायकच होता. त्याचा वजीरच सत्ता गाजवी. पुढे सरदारांनी वजीराला ठार मारले व मसूदला कैदेत टाकून त्याचा चुलता नासिरुद्दीन महमूद याला सुलतानपद बहाल केले

(इ.स.१२४६). तो इल्तुमिशचा पुत्र होता. त्याची राहणी साधी होती. तो कुराण लिहून त्यावर स्वतःचा खर्च चालवी. त्याच्या कारकीर्दीत खरी सत्ता बल्बन या तुर्की सरदाराच्या हाती राहिली. इ. स. १२६५ साली महमूद मरण पावल्यानंतर बल्बन हाच सुलतान झाला.

बल्बन हा एका तुर्की सरदाराचा मुलगा; पण लहानपणीच तो गुलाम झाला होता. इल्तुमिशनेच त्याला विकत घेतले होते. पुढे तो स्वपराक्रमाने सुलतान झाला. त्याने विद्येला उत्तेजन दिले व मद्यपानाविरुद्ध कायदे करून त्यांची कडकपणे अंमलबजावणी केली. मात्र तो अत्यंत क्रूर होता. बंडे मोडताना त्याने भयंकर कत्तली केल्या. तो हिंदूंचा पक्का द्वेष्टा होता.

इल्तुमिशनंतर जी अंदाधुंदी माजली होती, ती बल्बनने नष्ट केली आणि राज्याचा उत्तम बंदोबस्तही केला. त्याच्या वेळी मंगोल जमातीने भारतावर अनेक स्वाऱ्या केल्या; पण बल्बनने त्यांना यशस्वीपणे तोंड दिले. राज्यविस्तार करण्यापेक्षा आपली सत्ता स्थिर करण्याकडेच त्याने अधिक लक्ष दिले. राजाच्या अंगी दैवी सामर्थ्य असते असे तो मानीत होता आणि स्वतःच्या दैवी सामर्थ्याचे वारंवार खोटे प्रदर्शन करीत होता. त्याने आपले सैन्य पुष्कळ वाढवले आणि मजबूत केले. त्यामुळे बंगालपासून पंजाबपर्यंत सर्वत्र आपला वचक ठेवणे त्याला शक्य झाले. त्याच्या कारकीर्दीच्या शेवटी बंगालमध्ये तुघ्रिलखानाने केलेले बंड त्याने स्वतः मोडले.

बल्बनच्या मृत्यूनंतर त्याचा नातू कैकूबाद याला तख्तावर बसवण्यात आले; पण खरी सत्ता निजामुद्दीन नामक एका कोतवालाच्या हातीच राहिली. व्यसने आणि विलास यात कैकूबाद दंग राहिल्यामुळे निजामुद्दीनचे फावले. त्याने कपटकारस्थाने करून अनेक सरदारांना नष्ट केले. पण तोही शेवटी, कपटानेच मारला गेला. त्यानंतर १२८९ साली जलालुद्दीन खिलजी याने कैकूबादला ठार मारून त्याचा मुलगा शमसुद्दीन याला गादीवर बसवले. नंतर त्यालाही नाहीसा करून १२९० साली जलालुद्दीन स्वतःच सुलतान झाला. अशा तऱ्हेने गुलाम घराण्याचा अंत झाला. [म. ज्ञा. को.; हि. क. इं. पी.]

गुलाल हे एक तांबड्या रंगाचे आणि मृदू असे चूर्ण असते. जत्रा वगैरे महोत्सवात एकमेकांच्या अंगावर उडविण्यासाठी याचा उपयोग करतात. मंगलकार्यातही गुलाल वापरतात. तांदुळाच्या अगर शिरगोळ्याच्या भुकटीला तांबडा रंग देऊन गुलाल बनवतात. कधी कधी शाडूच्या मातीपासूनही तो तयार करतात.

गुलालसाहब (१६९३–१७५९ इ. स.) एक संत व कवी. उ. भारतात गाजीपूर जिल्ह्यातील भुरकुडा नामक गावी एका क्षत्रिय कुलात याचा जन्म झाला. हा मोठा जमीनदार होता. बुलाकीराम नावाच्या, त्याच्या शेतावर काम करणाऱ्या एका शेतकऱ्याने त्याला अध्यात्म मार्गाला लावले, असे म्हणतात. हा बुलाकीराम म्हणजेच सुप्रसिद्ध संत बुल्ला होय.

गुलालसाहब की बानी, हा याचा प्रसिद्ध ग्रंथ होय. याशिवाय महात्माओं की बानी, ज्ञानगुष्टी, रामसहस्रनाम इ. अन्य काही ग्रंथही याने रचले आहेत. [हि. सा. को. २; भा. सं. म.]

गुसाईं गुसाईं, गोसाईं, गोस्वामी, गोसावी, संन्यासी, दसनामी, बैरागी ही सामान्यतः एकाच पंथाची नावे आहेत. पण बंगालमध्ये वैष्णव मठाच्या मुख्याला गुसाईं किंवा गोसाईं असे म्हणतात. पाहा– गोसावी.

गुहक एक संकर जात. ब्राह्मण स्त्री व श्वपच पुरुष यांच्या संततीला हे नाव असल्याचे सूतसंहितेत सांगितले आहे

गुहदेव (इ. स. ८ वे किंवा ९ वे शतक) देवराज यज्व्याच्या निघंटुभाष्यावरून गुहदेव हा तैत्तिरीय संहितेचा भाष्यकार होता, असे कळते. रामानुजाचार्याने वेदार्थसंग्रहात आपला शिष्य म्हणून याचा उल्लेख केला आहे.

सगुण ब्रह्म हाच उपनिषदांचा प्रतिपाद्य विषय आहे, असा याचा सिद्धान्त आहे. ईश्वरप्राप्तीसाठी कर्माचीही आवश्यकता असल्याचे हा प्रतिपादितो. [शंकराचार्य- बलदेव उपाध्याय]

गुहादेवता पुष्कळ देवतांचे वास्तव्य गुहांमध्ये असते. हरिद्वार येथील काली, अन्नपूर्णा व सूर्यनारायण या देवता गुहामंदिरात आहेत. कुमाऊ प्रदेश तर गुहामंदिरांनी समृद्ध आहे. मिर्झापूर जिल्ह्यातली अष्टभुजा देवी व महाराष्ट्रातली सप्तश्रृंगी देवी या गुहादेवताच होत. [फो. लो. नॉ. इं.]

गुहावासी वैवस्वत मन्वंतराच्या वाराहकल्पात झालेला शिवाचा एक अवतार. याचे स्थान हिमालयाच्या महोत्तुंग शिखरावर आहे. उतथ्य, वामदेव, महायोग व महाबल या नावाचे त्याला चार पुत्र झाले. [हिं. क. को.]

गुहिलोत राजवंश भारताच्या मध्ययुगीन इतिहासात मेवाडमधील गुहिलोत वंशाचे स्थान

असाधारण आहे. त्यामुळे या वंशासंबंधी अनेक लोककथा व लोकगाथा राजस्थानात प्रचलित आहेत. टॉडच्या मते राजपुतांच्या ३६ कुळांमध्ये हे घराणे सर्वश्रेष्ठ होय. गुहिलोत हा गुहिलपुत्र या संस्कृत शब्दाचा अपभ्रंश असावा. गुहिलाचे वंशज असा त्याचा अर्थ होतो. हे लोक स्वतःला सूर्यवंशी क्षत्रिय मानतात. रघुवंशातील शेवटचा राजा सुमित्र याच्याशी या वंशाचा संबंध जोडण्यात येतो.

अतपूर येथे इ. स. ९७७ चा एक शिलालेख सापडला आहे, त्यात या वंशातील २० राजांची नामावळी आढळते. त्यातला पहिला गुहदत्त आणि शेवटचा शक्तिकुमार होय. गुहदत्त इ. स. च्या ६ व्या शतकात होऊन गेला असावा. लोककथांवरून असे दिसते, की या वंशाचा मूळ पुरुष गुह हा वलभी वंशातील शेवटचा राजा शीलादित्य याचा पुत्र होता. शीलादित्य युद्धात मरण पावला, तेव्हां त्याची राणी पुष्पावती गरोदर असून, ती माहेरी म्हणजे परमारांची राजधानी चंद्रावती येथे होती. वलभीला परत जात असताना ती वाटेत एका गुहेत प्रसूत झाली. म्हणूनच तिला झालेल्या पुत्राचे नाव गुहिल किंवा गुहादित्य ठेवण्यात आले. त्याने ईडरच्या भिल्लांचे राज्य जिंकून त्याचा विस्तार केला. पण या कथेत ऐतिहासिक सत्य नसावे. कारण शीलादित्य इ. स. ७६६ पर्यंत गादीवर होता.

बाप्पा रावळ याने हा वंश सुरू केला, असे भाट-चारणांच्या काव्यांवरून कळते. पण त्याचे नाव कोणत्याही वंशावळीत आढळत नाही. तो इ. स. च्या ८ व्या शतकात होऊन गेला आणि त्यापूर्वी सुमारे दोनशे वर्षे गुहिलोतांचे राज्य मेवाडमध्ये चालू होते. यावरून बाप्पाला या वंशाचा मूळ पुरुष मानता येत नाही. बाप्पा हे विशेषनाम नसून, एका राजाचे उपनाम असावे. काहींच्या मते कालभोज हे बाप्पाचे खरे नाव होते, तर काहींच्या मते ते खोम्माण किंवा खुम्माण होते.

इ. स. ७२५ व ७३८ च्या दरम्यान मेवाडवर अरबांनी आक्रमण केले, त्याचा बाप्पा रावळ (खुम्माण) याने यशस्वी प्रतिकार केला आणि चितोडगड जिंकून, तिथे आपली सत्ता स्थापली.

गुहिलोत वंशातील नंतरचे राजे प्रतीहारांचे सामंत होते; पण इ. स. च्या १० व्या शतकात केव्हातरी मेवाडचा राजा भर्तृपट्ट याने प्रतीहारांची सत्ता झिडकारून महाराजाधिराज ही पदवी धारण केली. त्याच्या वेळचा (इ. स. ९४३) एक शिलालेख उदेपूरजवळ आहार (आघाट) या गावी उपलब्ध झाला आहे. त्या काळापासून ती मेवाडची राजधानी असावी. तत्पूर्वी नागह्रद ही राजधानी होती. भर्तृपट्टाचा पुत्र अल्लट हा पराक्रमी होता. त्याने प्रतीहार राजा देवपाल याला युद्धात ठार मारले. त्याच्या नंतर नरवाहन, शालिवाहन व शक्तिकुमार यांनी इ. स. च्या १० व्या शतकाच्या अखेरपर्यंत तिथे राज्य केले. पण शक्तिकुमाराच्या कारकीर्दीत परमार राजा मुंज याने मेवाडवर स्वारी करून आघाट नगर उद्ध्वस्त केले.

शक्तिकुमारानंतर त्याचा पुत्र अंबाप्रसाद गादीवर आला. शाकंभरीचा चाहमान राजा वाक्पती (२ रा) याने मेवाडवर स्वारी करून अंबाप्रसादाला ठार मारले.

अशा प्रकारे इ. स. च्या ६ व्या शतकापासून ११ व्या शतकापर्यंत गुहिलोत वंशातील सुमारे २० राजांनी राजस्थाना राज्य केले. त्यांनी विद्या व कला यांचा पुरस्कार क राज्याचे वैभव वाढवले. त्यानंतरच्या दोन शतकांचा इतिहा फारसा उपलब्ध नाही. बाराव्या शतकात चौलुक्य रा कुमारपाल याने चितोडगड जिंकला होता (इ. स. ११५१) पण गुहिल राजा सामंतसिंह याने तो परत घेतला (इ. ११७१). त्यानंतर नड्डुलचा चाहमान राजा कीर्तिपा याने चितोडगड जिंकून घेतला. इ. स. ११८२ च्या सुमारा कुमारसिंह गुहिल याने तो परत मिळवला आणि आघाट के आपली गादी स्थापली.

याच कालखंडात गुहिलोत वंशाच्या रावळ व राणा अ दोन शाखा झाल्या. मेवाडचे आधिपत्य रावळ शाखेकडे राहि आणि राणा शाखेने शिसोदा येथे वेगळे राज्य सुरू केले. इ. च्या १३ व्या शतकात जैत्रसिंह नावाचा पराक्रमी राजा राव शाखेत होऊन गेला. त्याच्या कारकीर्दीत सुलतान इल्तुमि याने मेवाडवर स्वारी करून नागह्रद हे नगर उद्ध्वस्त के पण गुजरातचा वाघेला राजा वीरधवल हा जैत्रसिंहाच्या म तीला धावून आल्यामुळे इल्तुमिशला परत जावे लागले. नंत जैत्रसिंहाने पुन्हा बळ बांधले आणि रणथंभोरच्या चाहमा राजावर स्वारी केली. गुजरातवरही त्याने आक्रमण केले; प त्यामुळे एक गोष्ट वाईट झाली ती ही, की मुसलमानांना प्रति कार करणाऱ्या हिंदू राजांचेच सामर्थ्य कमी झाले. याच्या कारकीर्दीत चितोड ही गुहिलांची राजधानी झाली. जैत्रसिंहा नातू समरसिंह (इ. स. १२७३–१३०१) याने आपली सत्त बळकट करून अबू पर्वतापर्यंत राज्यविस्तार केला. इ. स. १२८५ च्या सुमारास बल्बनच्या सैन्याने गुजरातवर स्वारी केली. त्या वेळी समरसिंहाने वाघेला राजाला मदत केल्यामु मुसलमानांना हार खावी लागली. पण पुढे अलाउद्दीना सेनापती उलघखान याच्या स्वारीपुढे मात्र वाघेला राजाल नमते घ्यावे लागले.

इ. स. १३०१ च्या सुमारास समरसिंहाचा पुत्र रत्नसिंह हा गादीवर आला. १३०३ साली अलाउद्दीन खिलजीने मेवाडवर

स्वारी करून चितोडगडाला वेढा दिला. रत्नसिंह शरण गेला; पण शिसोदिया घराण्यातील लक्ष्मणसिंह त्या वेळी चितोडगडावर होता. त्याने निकराने गड लढवला. त्या युद्धात लक्ष्मणसिंह तर धारातीर्थी पडलाच; शिवाय त्याचे सात पुत्र आणि हजारो राजपूत वीरही मारले गेले. अशा प्रकारे मेवाडच्या रावळ शाखेचा अंत झाला. पुढे शिसोदिया घराण्यातील एका पराक्रमी पुरुषाने मेवाडवर सत्ता प्रस्थापित केली. (शिसोदिया राजवंश पाहा)

गुहिल घराण्याची एक शाखा उदयपूरच्या ईशान्य भागात राज्य करीत होती व तिची राजधानी धवगर्ता (सांप्रतचे धोड जि. जहाजपूर) येथे होती. इ. स. च्या ८ व्या शतकात धनिक नावाचा राजा तिथे राज्य करीत होता. त्याचा पुत्र आउक व नातू कृष्ण यांनीही त्या शतकाच्या उत्तरार्धात तिथे राज्य केले. कृष्ण राजाने प्रतीहार वत्सराज याचे मांडलिकत्व स्वीकारले होते. कृष्णाचा पुत्र शंकरगण याने गौड नृपती धर्मपाल याच्या सेनापतीचा पराभव करून कनोज जिंकले व ते सम्राट नागभट याला वहाल केले.

शंकरगणाचा पुत्र हर्ष हाही प्रतीहारांचा मांडलिक होता. त्याने भोजराजास पूर्व पंजाब पादाक्रांत करण्यास मदत केली होती. मात्र कलचुरी वंशातील पहिला कोकल्ल याच्यापुढे त्याला हार खावी लागली. कलचुरी कर्णाच्या वाराणसी येथील ताम्रपटात वर्णिलेला चित्रकूट-भूपाल म्हणजे हा गुहिल राजा हर्षच असावा आणि चितोड ही त्याची राजधानी असावी, असे अनुमान आहे. त्याचा पुत्र गुहिल (दुसरा) याने प्रतीहार भोज किंवा महेंद्रपाल याला गौड प्रांतावरील स्वारीत मदत केली. त्याची काही रुप्याची नाणी उपलब्ध झाली आहेत. त्याचा पुत्र भट्ट हा प्रतीहार वंशातील पहिल्या महीपालाचा समकालीन होता (इ.स. च्या १० व्या शतकाचा पूर्वार्ध). सम्राटाच्याआज्ञेवरून त्याने राष्ट्रकूट राजा इंद्र (तिसरा) याच्याविरुद्ध चंदेल हर्षाला मदत केली. भट्टाचा पुत्र बालादित्य हा या घराण्यातील शेवटचा ज्ञात राजा होय. जयपूरमधील चात्सू गावी त्याने एक विष्णुमंदिर बांधले होते. तिथे त्याच्या वेळचा एक शिलालेखही सापडला आहे. त्यावरूनच मुख्यतः बालादित्याच्या पूर्वजांचा इतिहास कळतो. त्याच्या वंशजांचा इतिहास मात्र उपलब्ध नाही. [म. ज्ञा. को.; हि. क. इं. पी.; ए. इं. मजु.; रा. रा. उ. ऱ्हा.]

गुह्यक एक अतिमानवी योनी. या शब्दाची व्याख्या अशी— ‘गुहति, निधिं धनविशेषं रक्षतीति’— निधि म्हणजे धनविशेष, त्याचे रक्षण करतो तो (श. क.). व्याडीनेही असेच म्हटले आहे—

निधिं रक्षन्ति ये यक्षास्ते स्युर्गुह्यकसंज्ञकाः ।

अर्थ – जे यक्ष निधीचे रक्षण करतात, त्यांना गुह्यक अशी संज्ञा आहे.

ब्रह्मवैवर्त पुराणात यांच्या उत्पत्तीची कथा पुढीलप्रमाणे सांगितली आहे –

आविर्बभूव कृष्णस्य गुह्यदेशात् ततः परम् ।
पिङ्गलश्च पुमानेकः पिङ्गलैश्च गणैः सह ।
आविर्भूता यतो गुह्यात् तेन ते गुह्यकाः स्मृताः ।।
(ब्रह्मखंड ५.६०)

अर्थ – नंतर कृष्णाच्या गुह्यभागापासून एक पिंगट वर्णाचा पुरुष तशाच वर्णाच्या गणांसह उत्पन्न झाला. गुह्यदेशापासून ते सगळे उत्पन्न झाले, म्हणून त्यांना गुह्यक ही संज्ञा मिळाली.

ही व्युत्पत्ती नामसादृश्यावरून निर्माण झालेली दिसते.

हे कुबेराचे अनुयायी आहेत. हिमालयाच्या एका दरीत यांचे वास्तव्य आहे (भाग. पु. १. ९. ३; ४. ५. ५६). पिशाच लोकाच्या वर आणि गंधर्व लोकाच्या खाली गुह्यकांचा प्रदेश मानलेला आहे. हे शिवभक्त असून, स्वभावाने क्रूर आहेत (मत्स्य पु. १७९.९–११). म्हणूनच यांना राक्षस असेही म्हटलेले आढळते. गुह्यकांना जादूविद्या अवगत असते. कुबेराला गुह्यकांचा अधिपती मानलेले आहे; पण मार्कंडेय पुराणात सूर्याचा पुत्र रेवंत याला गुह्यकांचा राजा म्हटले आहे. पाहा— अतिमानवी योनी. [पु. इं.; डे. हिं. इं.]

गुह्यकद्वादशी एक व्रत. कोणत्याही द्वादशीला अक्षता व तीळ यांनी गुह्यकांची पूजा करणे व ब्राह्मणाला सुवर्णदान देणे, असा याचा विधी आहे. फल— सर्वपापनाश व लक्ष्मीप्राप्ती. [हि. ध.]

गुह्यकाली कालीचे एक रूप. पाहा— काली.

गुह्यकाली उपनिषद एक नव्य उपनिषद. हे महाकाल संहितेशी संबंधित असल्याचे सांगितले आहे. यात कालीची महती सांगितली आहे ती अशी –

कालीपासून सर्व जग निर्माण होते व तिच्यातच ते विलीन होते. शरीरातील प्राणशक्ती ही कालीच आहे. काली हीच विविध रूपे धारण करते. तिचे स्वरूप वेदांनाही अगम्य आहे. कालीचे ध्यान केल्याने साधकाला कैवल्य प्राप्त होते. हे उपनिषद शिवाने पार्वतीला सांगितले आहे. [सी. ग. देसाई]

गुह्यत्रय कायगुह्य, वागुह्य व मनोगुह्य अशी तीन गुह्ये बौद्ध धर्मातील मंत्रयान संप्रदायात सांगितली आहेत. हे एकमेवाद्वितीय अशा परब्रह्माकडे जाणारे तीन मार्ग आहेत. ही तीन्ही गुह्ये तुल्यबळ असून परब्रह्मस्वरूपाची अभेद्य अशी तीन रूपे आहेत. ती वस्तुमात्रात सर्वत्र भरून राहिलेली आहेत. [मुद्रा]

गुह्यलिंगे मत्स्य पुराणात पुढील आठ शिवलिंगे ही गुह्यलिंगे म्हणून सांगितली आहेत– हरिश्चंद्र, आम्रातक, जलेश्वर, श्रीपर्वतेश्वर, महालय, कृमिचंडेश्वर, केदार व महाभैरव. ही लिंगे अविमुक्त क्षेत्रात (काशी) आहेत. [डे. हिं. इ.]

गुह्यषोढान्यास उपनिषद हे गुह्यषोढा नामक देवीच्या उपासनेचे उपनिषद आहे. परात्परतरा, परातीतरूपा, काली, कला, परातीता व पूर्णा या सहा कलांनी युक्त, ती षोढा होय. तिचीच तांत्रिक पूजा या उपनिषदात वर्णिलेली आहे. [सी. ग. देसाई]

गुह्यसमाजतंत्र बौद्धधर्मातील वज्रयान पंथाचा प्रमाणभूत ग्रंथ. याला तथागतगुह्यक असेही म्हणतात. बौद्ध धर्मात शक्तितत्त्वाचा समावेश झाला, तो या ग्रंथाच्या द्वारे. या ग्रंथात सामान्य व उत्तम अशा दोन प्रकारच्या सिद्धी सांगितल्या आहेत, त्या अशा –

> अन्तर्धानादयः सिद्धयः सामान्या इति कीर्तिताः ।
> सिद्धिरुत्तममित्याहुर्बुद्धा बुद्धत्वसाधनम् ॥

(गुह्यसमाजतंत्र पृ. १६२)

अर्थ–अंतर्धान, अणिमा, लघिमा, इ. सिद्धी सामान्य आहेत. बुद्धत्वसिद्धी ही उत्तमसिद्धी आहे, असे बुद्ध म्हणतात.

शरीराला कष्ट देणारे नियम व आचार योग्य नाहीत, असे या तंत्रात सांगितले आहे–

> सर्वकामोपभोगैश्च सेव्यमानैर्यथेच्छतः ।
> अनेन खलु योगेन लघुबुद्धत्वमाप्नुयात् ॥
> दुष्करैर्नियमैस्तीव्रैः सेव्यमानो न सिद्धयति ।
> सर्वकामोपभोगैस्तु सेवयंश्चाशु सिद्धयति ॥

(गुह्यसमाजतंत्र पृ. २७)

अर्थ – आपल्या इच्छेला अनुसरून सर्व कामोपभोगांचे सेवन करावे हाच योग होय. याने लघुबुद्धत्व प्राप्त होते. दुष्कर व कठोर नियमांचे आचरण करणाऱ्याला सिद्धी प्राप्त होत नाहीत. (याउलट) सर्व कामोपभोगांचे सेवन करीत असता तात्काळ सिद्धी मिळते.

हीनयान व महायान या दोन्ही पंथांच्या मते बुद्धत्वाची प्राप्ती ही अनेक जन्मांनी घडणारी गोष्ट होती. पण गुह्यसमाज तंत्राने ती याच जन्मात स्वेच्छेने विषयसुखे भोगीत असताना प्राप्त होते, असे सांगितले.

या तंत्राच्या प्रथम पटलात शक्तितत्त्वाची महती वर्णिलेली आहे. बुद्ध, अनेकबुद्ध, ध्यानीबुद्ध व बोधिसत्त्व हे त्यांच्या त्यांच्या शक्तींनी आवृत असल्याचे सांगितले आहे. त्याच प्रकारे प्रत्ये साधकालाही एकेका शक्तीची आवश्यकता प्रतिपादिली आहे साधकाला पवित्र ग्रंथांचे पठण, मंडलनिर्माण, त्रिरत्नपूजा, इ गोष्टी करण्याची गरज नाही. तसेच कोणताही सामाजि नियम व मर्यादा पाळण्याचीही गरज नाही, असे हा ग्रं सांगतो. योगी कोणत्याही सामाजिक मर्यादेचे उल्लंघन क शकतो; कारण त्याला शून्यतेचा साक्षात्कार झालेला असतो त्याच्या दृष्टीने हा संसार म्हणजे नाटक आहे आणि त्या कोणताही वास्तव अर्थ नाही.

बौद्ध पंथात प्रत्येकबुद्ध व बोधिसत्त्व यांच्याप्रमाणे ध्यानी बुद्धांची कल्पना केलेली आहे. या ध्यानीबुद्धांचे व्यवस्थि विवेचन सर्वप्रथम याच ग्रंथात मिळते. वज्रधर आणि व सत्त्व हे परस्परमिश्रित झाले आहेत. ते त्या ठिकाणी परमो देवतेच्या रूपात विराजमान आहेत. पुढच्या काळात वज्र हा श्रेष्ठ देव ठरला आणि वज्रसत्त्व हा सहावा ध्यानीबु झाला. म्हणूनच या ग्रंथाचा आरंभ ‘ॐ नमः श्रीवज्रसत्त्वाय असा केलेला आहे.

योग व अनुत्तरयोग यांचे वर्णन करणारा हा ग्रंथ आहे अनुत्तरयोग म्हणजे ज्याच्या पलिकडे काही नाही, असा स श्रेष्ठ योग होय (अनुत्तर पाहा). सर्व तथागतांची, तसेच दृश्य जगताची उत्पत्ती ज्या तथागतगुह्यापासून म्हणजे अज्ञेय सद्‌वस्तूपासून झाली, त्याचे स्पष्टीकरण करणे व प्राप्त करून घेण्याचा मार्ग दाखविणे, हा या ग्रंथाचा मुख्य हे आहे. गुह्य किंवा वज्र याची ओळख करून घेण्याचे नवे साध मार्ग दाखविणारा मूळ ग्रंथ म्हणूनही याला महत्त्व आहे. तथागतगुह्य हे इतके गहन व सूक्ष्म आहे, की सर्व गुह्यांचेही गु असेच त्याचे वर्णन करावे लागते. नागार्जुनाची शून्यता कि वसुबंधूची विज्ञप्तिमात्रता म्हणजेच तथागतगुह्य होय. शब्द स्पर्श, रूप, रस, गंध यांनी युक्त अशा या जगात शाश्वत टि णारी गोष्ट म्हणजे सद्‌वस्तू किंवा वज्र हीच आहे.

बोधिसत्त्वाने काया-वाचा-मनाचा इतका विकास कर घ्यावा, की इहलोकातील कोणत्याही व्यवहारांचा त्याच्याव बरावाईट परिणाम होऊ नये. मनाच्या अशा विकसित अवस्थे चित्तवज्र असे नाव आहे. या पायरीवर पोचल्यानंतर तो

बोधिचित्त यांच्यांत काहीच भेद राहत नाही. बोधिचित्ताविषयीची या ग्रंथातली कल्पना महायानी बौद्धांच्या बोधिचर्यावतार या कल्पनेहून भिन्न आहे. या ग्रंथातील बोधिचित्त किंवा बोधिवज्र या शब्दांचा अर्थ सद्‌वस्तू व जग यांचे ऐक्य अर्थात अद्वयभाव असा आहे.

प्रस्तुत ग्रंथ इ. स. च्या सहाव्या शतकात तयार झाला असावा, असे डॉ. पां. वा. काणे म्हणतात; तर रामनरेश वर्मा हे याची निर्मिती इ. स. च्या ३ ऱ्या शतकात झाली असावी, असे म्हणतात. वज्रयान पंथाच्या आधी शैव-शाक्त पंथात गुह्यसाधना अनेक रूपांनी प्रचलित होती; पण वज्रयानपंथात गुह्यसाधना आणली ती असंग या बौद्ध पंडिताने, असे सांगतात. पाहा– वज्रयान. [तां. बौ. सा. सा.; हि. क. इं. पी.; हिंदी सगुणकाव्य की सांस्कृतिक भूमिका]

गुह्यसाधना तांत्रिक पंथाच्या उदयकाळी परंपरागत साधनांहून अगदी भिन्न अशा काही धर्मसाधना सुरू झाल्या. त्यात मैथुनक्रियेला महत्त्वाचे स्थान असल्यामुळे त्या गुप्त रीतीने केल्या जात. या साधना प्रकट केल्या, तर त्या निष्फळ ठरतात, असे सर्व तांत्रिक ग्रंथांत प्रतिपादिले आहे. म्हणून त्यांना गुह्यसाधना हे नाव मिळाले. साधकाव्यतिरिक्त इतरांना कळू नये या हेतूने त्यातील तत्त्वांचे विवेचन प्रतीकांच्या भाषेत केलेले असते. या भाषेला गुह्यवाणी म्हणतात. संतांनी तांत्रिक विधींचा निषेध केला असला, तरी गुह्यवाणीचा मात्र उपयोग केला आहे. प्रज्ञोपाय युगनद्ध या नावाची बौद्धांची गुह्यसाधना आहे. तीत चित्तशुद्धीसाठी हठयोगसाधना सांगितली आहे. त्यात डोंबी, चांडाली, इ. स्त्रियांशी मुद्रा या नात्याने साक्षात समागम वर्णित असून, तो श्वासनिरोधपूर्वक करावा, असे सांगितले आहे. [हिं. सा. को.]

गूजरगौड राजस्थानातील ब्राह्मणांची एक जात. हे लोक गौतम महर्षींपासून आपली उत्पत्ती सांगतात. मारवाडातले गौरई हे यांचे मूळ गाव होय. हे गाव गुजरातला लागून आहे, म्हणून यांना गूजरगौड असे नाव पडले. हे प्रामुख्यान शैव आहेत. [रा. जा.]

गूडल विजगापट्टण व गंजम जिल्ह्यातील एक तेलुगू जात. हे लोक टोपल्या विणतात व मासे मारतात. पूर्वी हे औषधी वनस्पती गोळा करून विकीत असत. हे एक्कलदेवता नामक देवीला भजतात.

यांच्यामध्ये मामेबहिणीशी लग्न करण्याची पद्धत आहे. मुलीचे लग्न बहुधा ती वयात येण्यापूर्वी होते. वरपक्ष वधूच्या आईबापांना सात रुपये व वधूला कापड एवढे शुल्क देतो. लग्नात ब्राह्मण पौरोहित्य करतो. जेवणावळ व वधूच्या गळयात सथमानम (ताळी) बांधणे, हा लग्नातील मुख्य विधी असतो. यांच्यात विधवेला तीनदा पुर्नविवाह करता येतो.

हे मृतांना जाळतात व तिसऱ्या दिवशी दहनाच्या जागी भात व पाणी ठेवतात. [का. ट्रा. स. इं.]



गूजरगौड

गूढविद्या गूढ, गहन, अद्‌भुत अशा गोष्टींविषयी आचार, विचार, विधी व नियम यांच्या समुदायाला गूढविद्या, असे म्हणतात. गूढविद्येत जादू व सर्व प्रकारचे चमत्कार यांचा समावेश होतो. निसर्गातील अद्‌भुत घटनांसंबंधींचे ज्ञान सांगण्याचा अधिकार या शास्त्राचा आहे, असे काहीजण म्हणतात. परंतु त्यांच्या अशा अतिरंजित विधानामुळे व आग्रहामुळे त्या विद्येचे शास्त्रीय मूल्य कमी होऊ लागले आहे. मात्र या शब्दाला इतका विशाल अर्थ आहे, असे लोक मानीत नाहीत. सामान्यपणे जादूटोणा, किमया, ग्रहज्योतिष व ब्रह्म-

विद्या यांना गूढविद्या या नावाने ओळखले जाते. अलिकडे गूढविद्येतील अनेक गोष्टींचे शास्त्रीय संशोधन सुरू झाले आहे. त्यामुळे त्या गोष्टी आता पूर्वीइतक्या गूढ राहिलेल्या नाहीत. किमयेच्या जागी रसायनशास्त्र व ग्रहज्योतिषाच्या जागी खगोलशास्त्र आता प्रस्थापित झाले आहे.

मानसशास्त्राच्या सखोल अभ्यासामुळे अनेक गूढ मानसिक घटनांवर प्रकाश पडू लागला आहे. त्या गूढ मानसिक घटनांना आता शास्त्रीय रूप प्राप्त झाले आहे. परंतु गूढविद्येतल्या अनेक गोष्टींचा उलगडा शास्त्रज्ञांना अजून करता आलेला नाही. मनोविज्ञानातले अनेक कूटप्रश्न व निसर्गातील अनेक विचित्र घटना यांची सुसंगत उपपत्ती शास्त्रज्ञांना अद्यापि सांगता आलेली नाही.

गूढविद्येचे अभिमानी लोक असा दावा करतात, की निसर्गातल्या सर्व गहन घडामोडींसंबंधी एक पूर्ण शास्त्र सिद्ध झालेले असून, ते शास्त्र अतिमानुष अशा व्यक्तींच्या ठायी परिपूर्ण असते. काही असामान्य बुद्धीच्या मानवांनाही ते शास्त्र सहजपणे प्राप्त होऊ शकते.

प्राचीन काळापासून गुप्तज्ञान व अद्‌भुत सामर्थ्य धारण करणाऱ्यांच्या कथा जगभर प्रचलित आहेत. पूर्वी जादूगार, मांत्रिक व किमयागार हे सर्व गूढविद्येचे उपासक मानले जात होते. पण पूर्वी या लोकांची झेप फार उंच नसे. मर्यादित क्षेत्रातच ते आपला प्रभाव पाडण्याची अपेक्षा बाळगीत. पण त्यांचे आधुनिक अवतार मात्र जगातल्या सर्व घडामोडींवर आपले वर्चस्व सांगू लागले आहेत. जगावर प्रभुत्व प्राप्त झालेल्या काही व्यक्ती विद्यमान आहेत व त्यांच्या अधिकारपरत्वे श्रेणी आहेत, असे ते सांगतात.

गूढविद्येचा अभिमान बाळगणाऱ्यांची अशी श्रद्धा असते, की जगातल्या अद्‌भुत घटनांचे ज्ञान शास्त्रज्ञांना भौतिक प्रयोगातून हळूहळू होऊ शकेल. पण तेच ज्ञान भिन्न मार्गांनी प्राप्त करून घेतलेले अलौकिक सामर्थ्यवान पुरुष या जगात आहेत. ते आपल्या ज्ञानेंद्रियांची शक्ती वाढवून विश्वातल्या समस्त घटनांचे ज्ञान मिळवू शकतात व केव्हा केव्हा नवीन ज्ञानेंद्रियेही निर्माण करू शकतात.

या शास्त्रात संशोधन करण्याची साधने सामान्य माणसाला ज्ञात व उपलब्ध नसल्यामुळे अंतर्ज्ञानाचे हे शास्त्र गूढ राहिले आहे. वैज्ञानिक मनुष्य आपल्या इंद्रियांची अपूर्णता भरून काढण्यासाठी अनेक नाजूक यंत्रांचे साहाय्य घेऊन प्रयोग करीत असतो. याच्या उलट अंतर्ज्ञानी पुरुष आपल्या मानसिक सामर्थ्याने आपल्या ज्ञानेंद्रियांची कार्यक्षमता अनेक पटींनी वाढवून निसर्गाचा व मनोव्यापारांचा अभ्यास करू शकतो. एक गोष्ट मात्र मान्य करायला हवी, की मनुष्याला आपल्या मानसिक शक्तींची पोच व अचूकता इतकी वाढवता येते, की तिच्याशी तुलना करता सध्याची सूक्ष्म विज्ञानोपकरणेही थिटी वाटावी.

तत्त्वज्ञानाच्या क्षेत्रात जे स्थान गूढवादाचे तेच विज्ञानाच्या क्षेत्रात गूढविद्येचे आहे. या गूढविद्येचा धर्माशी व नीतीशी कसलाही संबंध नाही, हे त्या विद्येवरच्या ग्रंथांत मान्य केलेले आहे. मानवी दृष्टीच्या मर्यादेपलिकडच्या वस्तू अंतर्दृष्टीने पाहणे व मानवी श्रुतीच्या पलिकडील आवाज यंत्राचे साहाय्य न घेता ऐकू शकणे, असे काही चमत्कार क्वचित प्रसंगी घडलेले दिसतात. पण अशा मुद्दाम केलेल्या प्रयोगांना बहुतांशी अपयशच आलेले आहे. पृथ्वीवर अंतर्दृष्टी उपयोगी पडते, तशी अंतरिक्षातही ती उपयोगी पडण्याची शक्यता आहे, असे शास्त्रज्ञ मान्य करतात. मात्र तशी अंतर्दृष्टी कोणापाशी असेल असे ते मानीत नाहीत. गूढविद्येचे अभिमानी मात्र ती गोष् सिद्ध मानतात.

पौर्वात्य देशातील साहित्य व लोककथा, त्याचप्रमाणे पाश्चा देशातील प्राचीन व मध्ययुगीन ग्रंथ यांचे संशोधन कर गूढविद्येला अभिप्रेत असलेल्या मानसिक सामर्थ्याचा अभ्या करण्यास सांप्रत खूपच वाव आहे. अलिकडे तीव्र भावनावश अंगी असलेल्या व्यक्तींमध्ये काही विशेष सामर्थ्य असल्या आढळून आले आहे. पौर्वात्य देशांच्या इतिहासात अशा प्रकारची अनेक उदाहरणे आढळतात. त्यांचे पद्धतशीर संशो करणे, हे एक मोठेच कार्य आधुनिक वैज्ञानिकांच्यासमोर उ आहे. पाश्चात्य शास्त्रज्ञ आता भारतीय अंतर्ज्ञानाचा व आत्म ज्ञानाचा कुतूहलाने विचार करू लागले आहेत. त्यांच्या प्रयत्नां या शास्त्राचा किती विकास होईल, ते आज सांगता येणे शक नाही. गूढविद्यावाद्यांना एवढे श्रेय निश्चित द्यायला हवे, त्यांनी त्या शास्त्राच्या अमर्याद सामर्थ्याविषयी जो अतिरि प्रचार केला, त्यामुळेच वैज्ञानिकांचे लक्ष तिकडे आकृष्ट झा व त्यांनी त्या क्षेत्रात संशोधन सुरू केले. [एन्सा. रि. ए.]

गूदडपंथ

या पंथाची मुख्य गादी अवध प्रदेशातील बाराबं जिल्ह्यातल्या कोटवा या गावात आहे. को एका जगजीवन नामक साधूने या पंथाची स्थापना केली. सर्वसंगपरित्यागी होता; पण सांप्रत त्या गादीवर गृहस्थ बसत असल्याचे कळते. या पंथाची दीक्षा देताना गुरू शिष्या हातात काळा दोरा बांधतो. हे लोक शिव, विष्णू व विष्णू अवतार यांना भजतात. या पंथाचे स्वतंत्र असे दोहा व भजनी वाङ्मय आहे. हे लोक आपल्या महंताच्या नावापु साहब शब्द लावून त्यला संबोधतात. [भा. म. द.]

गृत्समद एक वैदिक ऋषी व सूक्तद्रष्टा. हा आंगिरस-कुलातल्या शुनहोत्राचा औरस व शुनकाचा दत्तक पुत्र होता (सर्वानुक्रमणी). गृत्स = प्राण व मद=अपान होय. त्याच्या ठिकाणी प्राणापानांचा समुच्चय होता, म्हणून त्याचे नाव गृत्समद असे पडले (ऐ. आ. २. २. १).

गृत्समद व त्याच्या कुलातले लोक यांच्या नावावर ऋग्वेदाचे दुसरे मंडल आहे. गृत्समदाचा उल्लेख ऋग्वेदात चार ठिकाणी आला आहे (१. ९. ८; २. ४. ९; ३. ९. ८ व ४. १. १८) व त्या सर्व ठिकाणी सदर उल्लेख बहुवचनी आहे.

दुसऱ्या मंडलातल्या बाराव्या सूक्ताचे पालुपद ‘स जनास इन्द्रः’= लोकहो, तो इंद्र होय, असे आहे. या सूक्ताच्या मागे तीन आख्यायिका आहेत, त्या अशा—

(१) तपःप्रभावाने गृत्समदाला एकदा इंद्रस्वरूप प्राप्त झाले. तेव्हा धुनी व चुमुरी हे दोघे इंद्रशत्रू त्याच्यावर धावून गेले. तेव्हा आपण इंद्र नाही हे त्यांना पटवण्यासाठी गृत्समदाने वरील सूक्त म्हटले.

(२) इंद्रादी देव वैन्याच्या यज्ञाला गेले होते. गृत्समदही तिथे होता. त्या वेळी दैत्यांनी अचानक यज्ञमंडपावर धाड घातली. ते पाहून इंद्र गृत्समदाचे रूप घेऊन तिथून पळाला. पळालेला गृत्समद आतही आहे, असे दिसल्यावर दैत्यांनी गृत्समदाला वेढले. त्या वेळी त्याने वरील सूक्त म्हणून आपण इंद्र नसल्याचे दैत्यांना पटविले.

(३) एकदा गृत्समदाच्या घरी इंद्र आला असता असुरांचा त्या घरावर हल्ला झाला. तेव्हा इंद्राने गृत्समदाचे रूप घेऊन तिथून पोबारा केला. गृत्समद मात्र दैत्यांच्या तावडीत सापडला. त्या वेळी त्याने वरील सूक्त म्हणून स्वतःचे प्राण वाचविले.

आचार्य विनोबा भावे यांनी गृत्समदावर एक लेख लिहिला असून, गृत्समद हा ज्ञानी, भक्त, कवी, गणिती, विज्ञानवेत्ता, कृषिसंशोधक व सराईत विणकर होता, असे म्हटले आहे. समुद्राच्या वाफेपासून पर्जन्य निर्माण होतो, हे गृत्समदाने पहिल्यांदा सांगितले, हे त्याच्या वैज्ञानिक दृष्टीचे उदाहरण होय (ऋ. २.२४.४). गृत्समद हा विदर्भवासी होता, असे विनोबांचे मत आहे. त्या प्रदेशात कापसाची पहिली लागवड त्यानेच केली. सूत कातणे व विणणे यांचे दृष्टान्त मुख्यत्वे गृत्समदाच्याच सूक्तांतून आढळतात. पुढील ऋचा ही या गोष्टीचे उदाहरण म्हणून सांगता येईल——

साध्वपांसि सनता न उक्षिते ।
उषासानक्ता वय्येव रण्विते ।।

(ऋ. २. ३. ६)

अर्थ – या यौवनाढच अशा रात्र व उषा पक्ष्याप्रमाण रमणीय असून एकमेकींशी संलग्न आहेत. त्या कालरूप पसरलेल्या धाग्याचे सतत वस्त्र विणीत आहेत.

विनोबांच्या मते गणितातल्या गुणाकाराचा शोध लावणारा ऋषीही गृत्समदच होय. त्याने पुढील ऋचेत जणू ‘बें एके बे, बे दुणे चार’ असा दोनाचा पाढाच रचला आहे—

आ द्वाभ्यां हरिभ्यामिन्द्र याह्या
चतुर्भिरा षड्भिर्हूयमानः ।
आष्टाभिर्दशभिः सोमपेय
मयं सुतः सुमख मा मृधस्कः ।।

(ऋ. २. १८. ४)

अर्थ – हे इंद्रा, तुला आम्ही बोलावीत आहो. तर तू (रथाला) दोन घोडे जोडून ये, चार जोडून ये, सहा जोडून ये अथवा वाटल्यास आठ किंवा दहासुद्धा जोडून ये. हे परमपवित्र देवा, हा सोमरस गाळला आहे, त्याचा तू अह्वेर करू नको.

चंद्रकिरणांचा गर्भाच्या वाढीवर होणारा परिणामही त्याने सांगितला आहे. गृत्समदाच्या चरित्रात त्याचा जीवनविषयक उदात्त दृष्टिकोन ठायी ठायी दिसून येतो. तो म्हणतो–

पर ऋणा सावीरध मत्कृतानि ।
माहं राजन्नन्यकृतेन भोजम् ।।

(ऋ. २. २८. ९)

अर्थ – हे वरुणा, मी केलेली (एकंदर) ऋणे तू माझ्या हातून फिटतील असे कर व दुसऱ्याने केलेल्या श्रमावर मी उपजीविका करावी, असा प्रसंग मजवर आणू नको.

गृत्समद हा प्रयोगशील ऋषी होता. ‘प्राये प्राये जिगीवांसः स्याम’= जीवनाच्या सर्व क्षेत्रांत आम्ही विजयी होऊ, अशी त्याची महत्त्वाकांक्षा होती.

त्याच्या सूक्तांतून कितीतरी ओजस्वी अशा ऋचा काढून दाखविता येतील. दिव्य विभूती ज्या ज्याकडे पाहतात, ते ते सर्व मंगलमय होते, असे हा सांगतो (ऋ. २. २३. १९). शत्रूशी लढतानाही मन उदार ठेवावे, असा तो उपदेश करतो (ऋ. २.२६.२). त्याला अनंत प्रकाशाची तहान आहे. त्याला शंभर वर्षे आयुष्य हवे, पण ते कशासाठी; तर विवेकदृष्टीने जगाकडे पाहण्यासाठी (ऋ. २.२७.१०). सत्यधर्मरूप नदीचा ओघ फोफावू दे, अशी तो आकांक्षा धरतो (ऋ. २.२८.५). सेवाकर्मात आपल्याला श्रम वाटू नयेत किंवा तंद्राही येऊ नये, अशी त्याची प्रार्थना आहे (ऋ.२.३०.७). त्याने जे ईश्वराचे वर्णन केले आहे, ते उदार व प्रसन्न आहे—

यो भोजनं च दयसे च वर्धन
मार्द्रादा शुष्कं मधुमद् दुदोहिथ ।

स शेवधिं नि दधिषे विवस्वति
विश्वस्यैक ईशिषे सास्युक्थ्यः ।।
यः पुष्पिणीश्च प्रस्वश्च धर्मणा
ऽधि दाने व्यवनीरधारयः
यश्चासमा अजनो दिद्युतो दिव
उरुरूर्वाँ अभितः सास्युक्थ्यः ।।
(ऋ. २.१३.६–७).

अर्थ – हे ईश्वरा, जो तू आम्हांला अन्न आणि समृद्धी देऊन आमचा उत्कर्ष करतोस, ओल्या जमिनीतून सुके, परंतु मधुर धान्य उत्पन्न करण्याची करामत करून दाखवितोस आणि आपल्या ईश्वरी संपत्तीचा ठेवा सूर्यमंडळात ठेवून देतोस, असा फक्त तूच या सर्व विश्वाचा अधिपती आहेस. तेव्हा हे ईश्वरा, तुझेच स्तवन प्रथम केले पाहिजे. ज्याने आपल्या सृष्टिनियमाच्या योगाने फुलांनी व फळांनी डवरलेले वृक्ष आणि जोराने वाहणारे प्रवाह जमिनीत निरनिराळ्या ठिकाणी निर्माण केले, ज्यांच्या तेजाला उपमाच नाही, अशा विद्युल्लता ज्याने आकाशात निर्माण केल्या, जो स्वतः इतका विस्तीर्ण, की विस्तीर्ण अशा सागरांनाही ज्याचा वेढा आहे, असा तूच एक स्तवन करण्यास योग्य आहेस.

हे झाले गृत्समदाचे वैदिक चरित्र. त्याचे पौराणिक चरित्र याहून वेगळे आहे. गणेश पुराणात याची जन्मकथा दिली आहे, ती अशी–

रुक्मांगद नावाचा एक राजपुत्र शिकारीस गेला असता वाचक्नवी ऋषीच्या आश्रमात पोचला. तिथे मुकुंदा नावाची त्या ऋषीची कन्या होती. रुक्मांगदाला पाहून मुकुंदेच्या मनात कामभाव जागृत झाला. आपल्या कामपूर्तीसाठी ती रुक्मांगदाशी लगट करू लागली; पण रुक्मांगदाने तिला झिडकारून लावले. त्यामुळे मुकुंदेला राग आला व तिने रुक्मांगदाला शाप दिला, की 'तुला कुष्ठरोग होईल.' तो शाप खरा ठरला. रुक्मांगद ते कोड घालविण्यासाठी चिंतामणिक्षेत्रात तपश्चर्येला गेला. इकडे मुकुंदा रुक्मांगदासाठी तळमळू लागली. तिची ही अवस्था इंद्राला समजली. तो रुक्मांगदाचे रूप घेऊन तिच्याकडे आला व त्याने तिची कामना पूर्ण केली. पुढे इंद्र–मुकुंदा यांच्या संबंधातून गृत्समद जन्माला आला. तो मोठा झाला आणि वेदशास्त्रात पारंगतही झाला.

एके दिवशी मगधराजाच्या घरी श्राद्धासाठी अनेक ऋषी जमले होते. त्यांत गृत्समदही होता. तिथे अत्रीशी त्याचा वाद झाला. अत्रीने तू 'औरस पुत्र नसून जारज आहेस' म्हणून सर्व ऋषीमंडळीसमक्ष त्याचा तिरस्कार केला. गृत्समदाला ते शब्द झोंवले. तो आश्रमात परत आला आणि मुकुंदेली म्हणाला 'माझा बाप कोण ते सांग; नाही तर मी तुला भस्म करीन.' त्यावर मुकुंदेने भीत भीत सर्व हकीगत त्याला सांगितली. ऐकून गृत्समद अत्यंत दुःखी झाला. त्याने अरण्यात जा गणेशाची उग्र आराधना केली. गणेश त्याला प्रसन्न झाला. 'मला ब्राह्मणापेक्षाही श्रेष्ठ असा ब्रह्मवेत्ता कर,' असा त्या गणेशाकडे वर मागितला. गणेशाने त्याला ब्राह्मण्य दिले मंत्रद्रष्टाही केले.

या कथेचा निष्कर्ष लोकनायक अणे यांनी सांगितला आ तो असा---

गृत्समद हा वर्णसंकरातून जन्मलेला अतएव व्रात्य हो मगधराजांच्या घरी ऋषींनी त्याचा अपमान केला, त्या त्याची संकरजातीच कारणीभूत होती. व्रात्य असूनही ब्राह्म म्हणून त्या वेळच्या समाजाकडून त्याने मान्यता मिळवली, त्याचे वैशिष्ट्यच होय. आपल्या (अनार्य) ज्ञातीच्या लोकां आर्यांत समावेश व्हावा, यासाठी खटपट करणारा हा पूर्वकाली सुधारक होता व त्याचे कार्य यशस्वी होण्यापूर्वी त्याला आ कडून बराच त्रास झाला असावा.

गृत्समदाने ज्या पुष्पकक्षेत्रात तपश्चर्या केली, तिथेच प्राप्तीनंतर त्याने वरदविनायकाची स्थापना केली. गृत्समद गाणपत्य संप्रदायाचा प्रवर्तक मानला जातो. [म. ज्ञा. को मंगलमूर्ती श्रीगणेश; आजकल–डिसें. १९५५; हिं. क. को

गृध्र गिधाडाचे संस्कृत नाव. एक मृतमांसभक्षक पक्षी. पक्ष्याने स्पर्श केला असता माणसाला सहा महिन्यां आत मृत्यू येतो, अशी समजूत आहे. कित्येक पिशाच गृ मुख असतात, असेही सांगितले आहे. [क. हि. वा. पु.]

गृध्रकूट (१). राजगृह किंवा गिरिव्रज या स्थानाभो असलेल्या पाच टेकड्यांपैकी एक. याला गृध्र म्हणण्याचे कारण त्या काळी या गिरिशिखराचा आ गृध्रासारखा असावा. गृध्रकूट या नावाची दुसरी उपपत्ती अ

बुद्धाचा प्रिय शिष्य आनंद हा तिथल्या एका गुहेत ब ध्यान करीत असता माराने गिधाडाचे रूप घेऊन त्या भिवविण्याचा प्रयत्न केला. त्या वेळी बुद्धाने आपल्या अद् सामर्थ्याने गुहेच्या खडकाला भेग पाडून त्या भेगेतून आ हात आनंदाच्या खांद्यावर ठेवला व त्याला 'भिऊ नको म्हटले. या कथेची साक्ष म्हणून गृध्राचे पदचिह्न व खडका भेग आजही तिथे दिसते.

देवदत्त हा बुद्धाचा शत्रू होता. बुद्ध या पर्वताच्या पाय जात असता देवदत्ताने या पर्वतावरची एक शिला त्या

RR
Y73(P15):1k
155M2J.3

वर लोटून दिली; पण बुद्ध थोडक्यात वचावला. गौतम बुद्धाला हा पर्वत अत्यंत प्रिय होता. जेव्हा तो राजगृहात असे, तेव्हा वर्षाकालात गृध्रकूटाच्या एका गुहेत राहत असे. फाहियानने म्हटले आहे, की बुद्ध ज्या गुहेत निवास करीत असे, ती गुहा पर्वतशिखरापासून एका मैलावर होती. युआन च्वांगने या गुहेला इंदसिलागुहा असे म्हटले आहे.



गृध्रकूट पर्वत

गृध्रकूटाच्या डोंगरात आजही दोन गुहा दिसतात. त्यांपैकी एका गुहेत सात बुद्ध व आठवा मैत्रेय यांच्या मूर्ती स्थापित होत्या. त्या सांप्रत नालंदा येथील संग्रहात ठेवलेल्या आहेत. गुहांच्या बाहेर दोन प्राचीन दगडी भिंती अवशेषरूपाने दिसतात. त्यांच्या जवळच एक दगडी जिना आहे. तो चढून वर गेल्यावर वरच्या अंगाला काही छोटी बौद्ध मंदिरे आहेत. या गोष्टीवरून या क्षेत्राचे प्राचीनत्व सिद्ध होते. इ. स. च्या दुसऱ्या किंवा तिसऱ्या शतकातल्या बौद्ध शिल्पात गृध्रकूटावरच्या गुहांचे चित्र खोदलेले आढळते. पाहा– गिद्धौर. [हिं. ध.; हिं. वि. को.]

(२) सरस्वती व शुद्धा या नद्यांच्या संगमाजवळचे स्थान. इथे परशुरामाने रक्ताने माखलेला आपला हात धुवून स्वच्छ केला (नीलमतपुराण).

(३) गये जवळची एक टेकडी. इथे अनेक ऋषींनी तप केले. या ठिकाणी पितरांसाठी पिंडदान करावे; असे सांगितले आहे. या क्षेत्राची यात्रा केल्याने शिवलोक मिळतो, असे वायू पुराण सांगते.

गृध्रवट (१) गयेजवळच्या गृध्रकूटावरील एक वटवृक्ष. सांप्रत तो अस्तित्वात नाही; पण अग्नी पुराण व पद्म पुराण यांत त्याचे उल्लेख आहेत. यात्रेकरू तिथे जाऊन भस्मस्नान करीत.

(२) शूकरक्षेत्राजवळचे एक स्थान. तिथे एका गृध्राचे मानवात रूपांतर झाले, अशी कथा वराह पुराणात आहे.

गृह मानवाचे कौटुंबिक निवासस्थान. मानव रानटी अवस्थेत भटकत होता, तेव्हा तो निवाऱ्यासाठी डोंगरातील नैसर्गिक गुहांचा आसरा घेत असे. कालांतराने तो सुधारू लागला आणि जंगलातच झाडाझुडपांचे खोपट बांधून त्यात राहू लागला. पुढे कुटुंब, समाज या कल्पनांचा उदय झाल्यानंतर प्रत्येक कुटुंबासाठी स्वतंत्र निवासस्थानाची आवश्यकता भासू लागली. तेव्हा कुडाच्या भिंती व गवताचे छप्पर असलेल्या झोपड्या बांधण्यास सुरवात झाली. शेती करण्यासाठी मनुष्य स्थायिक झाल्यानंतर त्याने दगड, माती, विटा यांची पक्की घरे बांधायला प्रारंभ केला. त्यानंतर निर्माण झालेली घडीव पाषाणाची भव्य गृहे, हे मनुष्याच्या सुधारलेपणाचे व वैभवाचे द्योतक होय. त्यातील कलात्मक शिल्प हे त्याच्या सांस्कृतिक विकासाचे लक्षण ठरते. मनुष्याच्या निवासस्थानाच्या स्वरूपावरून त्याच्या सांस्कृतिक प्रगतीची कल्पना करता येते. तसेच त्याच्या स्वच्छतेच्या कल्पना, त्याची सामाजिक रचना, इत्यादी विषयीही अनुमान बांधता येते.

प्राचीन गृहरचना – प्राचीन काळातील गृहांविषयी माहिती मिळविण्याची तीन साधने सांप्रत उपलब्ध आहेत, ती अशी – (१) ठिकठिकाणी केलेल्या उत्खननांमुळे सापडलेले प्राचीन नगरांचे अवशेष (२) प्राचीन वाङ्मयातील वर्णने व (३) प्राचीन देवालये व स्तूप यांवरील शिल्पे वा चित्रे.



स्नानगृह – मोहेंजोदडो

भारतातील सर्वांत प्राचीन संस्कृतीचे अवशेष हडप्पा, मोहेंजोदडो, कालिबंगाँ, लोथल, रोजडी, इ. ठिकाणी सापडले आहेत. हिला सिंधुसंस्कृती असे नाव आहे. हिचा प्रसार बलुचिस्ताना-

पासून दिल्ली (रुपड) पर्यंत आणि पंजाबापासून सौराष्ट्रापर्यंतच्या विस्तृत क्षेत्रात झाला होता. सनपूर्व ३,००० ते २,००० हा या संस्कृतीचा काळ मानला जातो. वरील ठिकाणी जे अवशेष सापडले आहेत, त्यांत सुबद्ध नगररचना स्पष्टपणे दिसून येते. तिथले रस्ते सरळ व एकमेकांना काटकोनात छेदणारे आहेत. त्या रस्त्यांच्या दुतर्फा लहानमोठी एक किंवा दोन मजली घरे होती, असे कळते. काही घरे कच्च्या विटांची; तर काही भाजलेल्या विटांची होती. मोठ्या घरांत मध्यभागी चौक व भोवती खोल्या बांधण्याची पद्धत होती. प्रत्येक घरांत एक स्नानगृह व विटांनी बांधलेली विहीर असे. सांडपाण्यासाठी खापराची किंवा विटांनी बांधलेली गटारेही होती.

वैदिक आर्यांची गृहरचना सिंधुसंस्कृतीच्या गृहरचनेहून भिन्न होती. आर्यांच्या आगमनापूर्वी भारतात असुर, दानव, द्रविड व नाग लोक वसलेले होते आणि ते विटांचे बांधकाम करीत असत. ते दगडांचाही उपयोग करीत असावेत. आर्यांनी जी भक्कम पुरे उद्ध्वस्त केली, ती असुरांची किंवा द्रविडांची होती आणि हडप्पा, मोहेंजोदडो, इ. ठिकाणी सापडतात ते त्यांचेच अवशेष होत, असे काही विद्वानांचे मत आहे.

वैदिक आर्यांचे वास्तुशास्त्र धर्माशी निगडित होते. वास्तुरचना हा एक धार्मिक विधी मानला जात असे. वास्तू या शब्दाचा अर्थ प्रारंभी घर बांधण्याची जागा असा होता; पण कालांतराने राहण्याचे घर असाही अर्थ त्याला प्राप्त झाला. वैदिक लोक घर बांधण्यापूर्वी वास्तोष्पती या देवतेची प्रार्थना करीत. गृहप्रवेशाच्या वेळी अग्नी, सोम, इ. देवतांना आवाहन करीत. अशा प्रकारचे विधी आजही करतात. वास्तुरचनेतील मोजमापांचे काही उल्लेख ऋग्वेदात आहेत; त्यावरून त्या काळी वास्तुविद्या बरीच विकसित झाली होती, असे वाटते. अगस्त्य या वैदिक ऋषीला वास्तुविद्येचा गुरू मानतात.



गृहमुख

घरे बांधण्यासाठी कोणते सामान वापरले जात असे, त्या उल्लेख मात्र ऋग्वेदात आढळत नाही. परंतु इतर वर्णनाव त्या कामी मुख्यतः लाकडाचा उपयोग करीत, असे वाटते. व प्रशस्त घरांची वर्णने ऋग्वेदात आहेत. वैदिक आर्यां घरांची रचना कलापूर्ण होती, असेही अनुमान करता येते. रचनेत द्वारांना विशेष महत्त्व होते. त्यांचीही पूजा करण्या प्रथा होती. अनेक भक्कम द्वारे असलेले घर चांगले, त्यांची कल्पना होती. घरात अनेक स्तंभ असणे, या गोष्टीला महत्त्व होते.

वैदिक वाङ्मयात घर या अर्थी गृह, आयतन, हर्म्य, दुरो इ. अनेक शब्द आहेत. चारी बाजूंना भिंती आणि एका बाजू द्वार अशी त्या घरांची रचना असावी. घरात अनेक खो असाव्यात. अथर्ववेदावरून तत्कालीन गृहरचनेचे स्वरूप क ते असे—

चांगलीशी जागा पाहून तिथे चार खांब उभे करी त्यांवर आडवे खांब टाकून मध्ये बांबू व त्यांवर गवताचे छ बांधीत. घराला चार, सहा, आठ किंवा दहा बाजू अ हविर्धान, अग्निशाला, अंतःपुर, सदस् असे घराचे भाग अ (अथर्व.३.१२; ९.३; ९.२०).

वास्तुशास्त्र – राजप्रासाद, भवन, इ. वास्तूंचाही नि वैदिक वाङ्मयात आढळतो. वेद व ब्राह्मणे या ग्रंथांत वा शास्त्राचे काही नियम आढळत असले, तरी वास्तुविद्या वेळी पूर्णपणे विकसित झाली नव्हती. पुढे गृह्यसूत्रांत ति विषयी जे अनेक नियम दिलेले आहेत, त्यांतून खरे वास्तुशा जन्माला आले. घरासाठी चांगली जागा कशी निवडा तिची परीक्षा कशी करावी, पाया कसा घालावा, खो किती वँ कशा बांधाव्या, दरवाजे कोणत्या दिशांना अस घरबांधणीसाठी शुभ काल कोणता, गृहप्रवेश करताना को विधी करावे, कोणते मंत्र म्हणावे, घराभोवती कोणते लावावे, इ. गोष्टी त्यांत सांगितल्या आहेत. घराच्या म भागी रोवलेल्या स्तंभाला त्या काळी विशेष महत्त्व असे. ति सर्व गृहविधी करण्यात येत. त्या स्तंभावर सबंध घराचे अवलंबून असे, म्हणून त्याची पूजाही करीत. घराचे द कोणत्या दिशेला असावे’ यालाही महत्त्व होते. दार पू ठेवले, तर कीर्ती वा शक्ती यांचा लाभ, उत्तरेकडे ठेवल्या संतती व पशुधन यांचा लाभ, दक्षिणेकडे ठेवले तर चांगल्यां गोष्टींचा लाभ आणि पश्चिमेला ठेवल्यास हा होते, असे सांगितले आहे.

शुल्बसूत्रांत विटांसंबंधी माहिती आहे. यज्ञासाठी

बांधायला विटांचा उपयोग करीत, त्यावरून घरांसाठीही विटा वापरीत असावे, असे अनुमान करायला हरकत नाही.

रामायणात नगरे, कोट व राजप्रासाद यांची जी वर्णने आहेत, त्यांवरून असे दिसते, की त्या काळी वास्तुशास्त्राची खूप प्रगती झाली होती. मय हा असुरांचा आणि विश्वकर्मा हा देवांचा वास्तुशास्त्रज्ञ होता. गृहांचे भिन्न भिन्न प्रकार असून, त्यांना चतुःशाल, पद्म, स्वस्तिक, वर्धमान अशी नावे होती. राजगृहांचेही प्रासाद, विमान, हर्म्य आणि सौध असे प्रकार होते. प्रासाद म्हणजे सात, आठ किंवा अधिक मजली राजवाडे होत. ज्यांच्या माथ्यावर शिखर असे, अशा राजवाडयांना विमान म्हणतात. सौध म्हणजे शुभ्र रंग दिलेला राजवाडा. राजवाडयांच्या द्वारावर तोरणे बांधण्याची प्रथा होती. भिंतींमध्ये सुंदर गवाक्षे ठेवलेली असत आणि त्यात जाळी बसवलेली असे.

धार्मिक शिल्पकामात सभा (यज्ञमंडप), यज्ञवेदी, देवायतन व चैत्य ही उल्लेखनीय असून ती विटांची बांधलेली असत. गृहे व राजवाडे बांधण्यासाठी काय वापरीत ते समजत नाही; कारण काव्यगत वर्णनात सोने, चांदी, स्फटिक, रत्ने यांचाच उल्लेख आहे. पाषाणाचा उपयोग बांधकामासाठी करीत होते, की नाही ते निश्चित सांगता येत नाही.


राजसभा

महाभारतात अशाच प्रकारची वर्णने आहेत. मात्र ही वर्णने राजे व श्रीमंत लोक यांच्या निवासस्थानांचीच आहेत. त्या काळी सामान्य माणसे गवताच्या झोपडयातच राहत होती. या झोपडया चतुःशाल वर्गातील असून, त्यांची रचना शास्त्रीय पद्धतीने केलेली असे. अशा प्रकारच्या घरांचे उल्लेख महाभारतात पुष्कळ आहेत. जातककथांमध्येही अशा झोपडयांचे वर्णन आढळते. त्यांच्या भिंती बांबूच्या किंवा कुडाच्या केलेल्या असून, त्यांवर शेण व चिखल यांचे लिंपण केलेले असे. अशा झोपडयांचे अवशेष उत्खननात सापडले आहेत. त्या काळात स्तंभ, दारे, भिंती व पायाभरणी यांसाठी लाकडाचा उपयोग विपुल प्रमाणात करीत. विटांचा उपयोग भव्य गृहांसाठी केला जात असे. एकंदरीत जातककथांतील वर्णने रामायण व महाभारत यांतील गृहरचनेच्या वर्णनांना पुष्टीच देतात, असे म्हटले पाहिजे.


सांची–शिल्पातील पर्णकुटी

पालि वाङ्मयात आणि कौटिलीय अर्थशास्त्रात ख्रिस्तपूर्वकाळातील वास्तुरचनेविषयी पुष्कळ माहिती मिळते. त्या वेळी वास्तुशास्त्र पूर्ण प्रगत झाले होते आणि शिल्पकाम अधिक कलात्मक होऊ लागले होते. बांधकामात पाषाणाचा उपयोग अधिक प्रमाणात सुरू झाला होता. स्तंभ, धरणे, तळघरे, दुर्ग, इ. पाषाणांचे बांधीत. बौद्ध लोक खडकांत विहार व गुहा खोदीत; त्याचप्रमाणे दगडी घरे बांधून त्यांतही वसती करीत. सामान्य माणसाचे घर कुडाचेच असे.


गवाक्ष

त्यानंतरच्या काळातील शिल्पात त्या वेळच्या घरांची चित्रे दिसून येतात. ती घरे विटांची असून, त्यात लाकडी खांब व तुळयी यांवरच सारी भिस्त असे. घरांच्या मध्यभागी चौक

असावे, असे दिसते. चौकाभोवती भिन्न आकाराचे स्तंभ असावे घरांच्या खिडक्या साध्याच असत; पण सज्जांचे स्तंभ मात्र पशुपक्ष्यांच्या आकृतींनी सुशोभित केलेले असत.

काही घरे माळवदाची किंवा सपाट गच्चीची असत; पण भव्य प्रासादांवर उंच, अर्धवर्तुळाकार लाकडी छपरे घालीत व



भरहुत–शिल्पातील प्रासाद–चित्र

त्यांच्या दोन्ही टोकांवर कमलाकार मखर बसवीत. अजंटा येथील चित्रांवरून आणि वाङ्मयातील वर्णनावरून असे दिसते, की घरांना रंग लावून त्यावर चित्रे व नक्षी काढणे आणि लाकडी भागांवर नक्षी कोरणे त्या वेळी प्रचलित होते.

मध्ययुगीन गृहरचना– मध्ययुगातील गृहरचनेविषयी विशेष माहिती उपलब्ध नाही. इ. स. च्या ७ व्या शतकापर्यंत भारतात सुवर्णयुग होते. त्या काळात सर्वत्र समृद्धी होती व लोक



चौकांचे घर– मध्ययुग

संपन्न होते. त्यामुळे त्यांची निवासस्थानेही वैभवशाली होती. त्यांची रचना व सजावट प्राचीन परंपरेला अनुसरून केलेली असे. त्यानंतर मात्र लोकसंख्येतील वाढ आणि संपत्तीतील घट यांमुळे वास्तुरचनेत गुष्कळच वदल झाला असावा. तोरणे, कळस, शिखरे, जाळीदार गवाक्षे यांनी युक्त अशा भवनांच्या जागी लहान-मोठे वाडे बांधण्याची प्रथा सुरू झाली असावी. त्यांच्या रचनेत शिल्पकला व सजावट यांपेक्षा मजबुती व उपयुक्तता यांकडे अधिक लक्ष दिले जात असावे. धन्याच्या ऐपतीप्रमाणे वाड्यात एक ते चार चौक असतील, दोन ते पाच मजले असतील, उत्तम लाकडाचे खांव व तुळया, भक्कम दारे व खिडक्या असतील, भाजलेल्या विटांच्या भिंतींवर उत्कृष्ट गिलावा करून आणि त्यावर रंग देऊन देवादिकांची चित्रे काढीत असतील·

मुसलमानी अमलातील अमीर–उमराव आणि पेशवाईतील सरदार-सावकार यांचे जुने वाडे अजूनही काही ठिकाणी पाहायला मिळतात. ते साधे, पण सर्व सुखसोयींनी युक्त असतात. त्यावरून मध्ययुगातील धनिक वर्गाच्या वास्तुरचनेची सामान्यपणे कल्पना करता येते. त्या काळातील सामान्य लोक मात्र दाटीवाटीने बांधलेल्या लहान घरात राहत असावे. काशी गया, मथुरा, दिल्ली, इ. शहरांतील जुन्या वसतीतली घरे म्हणजे मध्ययुगीन गृहरचनेचे निकृष्ट स्वरूप होय. ती घरे कशी तरी बांधलेली व वेढब आहेत. त्यांच्या रचनेत ना शिस्त ना शिल्प. त्यातली काही उंच, तर काही बसकी. त्यात हवा व उजेड यांसाठी पुरेशा खिडक्या नसतात. मधले बोळ अरुंद, वेडेवाकडे व गलिच्छ असतात. त्यांचे बांधकाम मात्र भक्कम असते. मातीच्या जाड जाड भिंती इतक्या कठीण असतात, की त्या सहज फोडता येत नाहीत. त्यांवर गिलावाही चांगला व टिकाऊ असतो.



सांडपाण्याची पेवे– नवासे

ग्रामीण भागातील वास्तुरचनेत मात्र त्या काळी फारसा बदल झाला नसावा. प्राचीन काळी खेडेगावातील लोक कुडाच्या भिंती व गवती छपरे असलेल्या घरांत राहत होते. ती घरे

प्रशस्त आणि सर्व सुखसोयींनी युक्त अशी असत. ती बांधण्यासाठी उत्तम लाकूडसामान वापरले जात असे. प्रत्येक कुटुंबाचे मोठे स्वतंत्र घर असे. धान्यासाठी कोठारे व गुरांसाठी गोठे असत. पाण्यासाठी विहीर वा तळे घरापासून जवळच असे. प्रत्येक घराभोवती विस्तीर्ण परसू असून, त्यात फुलझाडे, वेली व भाजीपाला लावण्याची पद्धत होती. अशाच प्रकारची घरे मध्ययुगातील खेडोपाडी असावी. कारण त्या काळातील शेतकरी सधन होता. ब्राह्मणवर्ग आणि सरकारी अधिकारी वा मानकरी यांची घरे मात्र वेगळ्या प्रकारची होती. विटा किंवा दगड व माती यांच्या भिंती आणि कौलारू छपरे असे त्यांचे बाह्य रूप होतें. आतील रचना वरीलप्रमाणेच असे.

अर्वाचीन गृहरचना – इ. स. १८०० नंतर भारतात परकीय सत्ता सुरू झाली आणि त्याचे वैभव पूर्णपणे नष्ट झाले. खेडोपाडी दैन्य व दारिद्र पसरले. शेतकरी निर्धन झाला. त्यामुळे त्याच्या निवासस्थानाचे रूपही पालटले. जिथे एक कुटुंब वास्तव्य करीत असे, तिथेच त्यानंतर अनेक कुटुंबे राहू लागली. प्रत्येक कुटुंबाची स्वयंपाकासाठी खोली वेगळी असते; पण पुढे निजण्या–बसण्यासाठी सामायिक पडवी असते. पडवीच्या खाली गुरांचा गोठा असतो. हवा आणि प्रकाश यांचे दुर्भिक्ष. सांडपाणी व गुरांचे मलमूत्र घराशेजारीच साचून राहायचे. अशा प्रकारे खेडेगावातले सर्व वातावरणच आरोग्याला विघातक ठरले. पाण्याचीही बहुतेक ठिकाणी कमतरताच असायची.

इंग्रजांचे राज्य सुरू होऊन नवीन ज्ञानाचा प्रसार झाल्यापासून शहरांचे स्वरूप मात्र खूपच पालटले. प्रत्येक शहरात आता आधुनिक पद्धतीची नवी वसाहत निर्माण झाली आहे. विरळ वस्ती, दूर दूर बांधलेले सुंदर बंगले, भोवती सुरेख बगिचा, सरळ व रुंद रस्ते यांमुळे अशा शहरांचे सौंदर्य वाढले आहे. पण त्याबरोबरच उद्योगधंद्यांच्या विकासामुळे काही शहरांची लोकसंख्याही अतिशय वाढली आहे. खेड्यातील बरेच लोक मोलमजुरीसाठी शहरांकडे धाव घेत आहेत आणि त्यांच्यासाठी ज्या वसाहती निर्माण झाल्या आहेत, त्या अत्यंत गलिच्छ व कोंदट आहेत. अशा प्रकारे नागरी गृहरचनेत नवीन समस्या निर्माण होत असून, घरबांधणीच्या सर्व सामानाची टंचाई असल्यामुळे त्या समस्या फारच बिकट झाल्या आहेत. [स्ट. वा. वि.; वे. इं.; वै. सा. सं.; इं. वे. क. सू.]

गृहदान दगड–मातीचे घर बांधून त्यात प्रपंचाला लागणारे अन्न-वस्त्र-पात्रादी साहित्य भरून ते घरच सुवर्ण दक्षिणेसह सपत्नीक ब्राह्मणाला दान द्यावे, असे सांगितले आहे. याचा विधी सांगितला आहे तो असा—

दानाच्या दिवशी सकाळी स्नानादी कृत्ये आटपून सपत्नीक ब्राह्मणाला मंगल वाद्यांच्या गजरात बोलावून आणतात. मग त्या दंपतीला उत्तरेकडे तोंड करून मंचकावर बसवतात. वस्त्रालंकारांनी त्यांची पूजा करतात. मग गृहाचे दानोदक ब्राह्मणाच्या हातावर सोडताना पुढील श्लोक म्हणतात—

इदं गृहं गृहाण त्वं सर्वोपस्करसंयुतम् ।
तव विप्र प्रसादेन मम सन्तु मनोरथाः ।।
गृहं मम विभूत्यर्थं गृहाण त्वं द्विजोत्तम ।
प्रीयतां मे जगद्योनिर्वास्तुरूपी जनार्दनः ।।

अर्थ – हे ब्राह्मणा, सर्व साधनसामुग्रीने युक्त असे हे घर तू ग्रहण कर. तुझ्या कृपेने माझे मनोरथ पूर्ण होवोत. (हे) माझे घर हे द्विजश्रेष्ठा, तू मला दैवी ऐश्वर्य प्राप्त होण्यासाठीं ग्रहण कर. (या दानाने) जगाचा उत्पत्तिकर्ता वास्तुरूपी जनार्दन मजवर प्रसन्न होवो.

मग दान घेणारा ब्राह्मण घरातल्या धारणखांबाला किंवा घराच्या उंबऱ्याला स्पर्श करून दानाचा स्वीकार करतो. दानफल– शंभरकोटी कल्पांपर्यंत ब्रह्मलोकात निवास. [दा. चं.]

गृहदेवी जरा पाहा.

गृहपंचमी एक व्रत. कोणत्याही पंचमीस ब्रह्याची पूजा आणि जाते, उखळ, वरवंटा, स्वयंपाकाचे भांडे व पाण्याचे भांडे यांचे दान करणे असा या व्रताचा विधी आहे. [हि. ध.]

गृहपती ऋग्वेदात व तदुत्तरकालीन ग्रंथांत घरमालकाला गृहपती असे म्हणत. विवाहाच्या वेळी नवदंपतीने प्रज्वलित केलेल्या अग्नीला गार्हपत्य असे नाव होते. कारण गृहपती हा त्या अग्नीशी संबद्ध असे. पाणिनीने 'गृहपतिना संयुक्तः' अशी त्याची फोड केली आहे. प्राचीन काळी पतिपत्नी मिळून वैवाहिक अग्नीची परिचर्या करीत. गृहपती हा आपल्या घरात सर्वाधिकारी असे. त्याच्यानंतर त्याचा ज्येष्ठ पुत्र गृहपती होत असे. ही गोष्ट पुढील उदाहरणावरून स्पष्ट होईल–

गर्ग कुलातल्या गृहपतीला गार्ग्य असे म्हणत. त्याच्याहून लहान असलेल्या कुटुंबातल्या पुरुषांना गार्ग्यायण म्हणत. गार्ग्य व गार्ग्यायण या दोन उपाधींच्या भिन्नत्वाचे मूल्य सामाजिक होते. प्रत्येक कुलाला त्याच्या भाऊबंदांत किंवा ज्ञातिपंचायतीत काही सत्ता प्राप्त असे. गार्ग्याच्या जीवनकालात कुलाची पगडी त्याच्या मुस्तकी असे व तोच त्या कुलाचा प्रतिनिधी मानला जात असे. त्याच्या मृत्यूनंतर त्याचा पुत्र (गार्ग्यायण) हा गार्ग्य

बनत असे. या परिवर्तनाच्या वेळी त्याचे भाऊबंद एकत्र जमून गार्ग्यायणाच्या डोक्याला पगडी बांधीत व गार्ग्य म्हणून त्याचा अधिकार प्रस्थापित करीत.

पतीसह अग्नीची परिचर्या करणाऱ्या स्त्रीलाच पत्नी अशी संज्ञा होती हे, 'पत्युर्नो यज्ञसंयोगे' या पाणिनीच्या सूत्रावरून कळते (अष्टा. ४.१.३३). [पा. भा.]

गृहप्रवेश

नवीन घर बांधल्यावर त्यात राहायला जाण्यापूर्वी मुहूर्त पाहावा लागतो. अनेक स्मृतिकारांनी याबद्दल आपली मते दिली आहेत. प्रतिपदा, षष्ठी व एकादशी या नंदा नामक तिथी असताना दक्षिणद्वाराने घरात प्रवेश करावा. भद्रा नामक द्वितीया, सप्तमी व द्वादशी या तिथींना पश्चिमद्वाराने प्रवेश करावा आणि पंचमी, दशमी व पूर्णिमा या पूर्णा नामक तिथी असताना पूर्वद्वाराने करावा, असे बृहस्पतीने सांगितले आहे.

शुक्र पृष्ठभागी करून आणि सूर्य वामभागी करून गृहप्रवेश करावा, असे वसिष्ठ सांगतो. पताका, तोरणे, फुलांच्या माळा यांनी नवीन घर सजवावे आणि अग्रभागी उदकपूर्ण कुंभ घेतलेले ब्राह्मण व सुवासिनी ठेवून यजमानाने शांतिमंत्रांच्या घोषात गृहप्रवेश करावा, असे वसिष्ठाने सांगितले आहे. बुध, गुरू व शुक्र या वारी गृहप्रवेश केला असता ते घर संपत्ती व पुत्र यांचा लाभ करून देणारे होते आणि पुष्य, धनिष्ठा, मृग, शततारका, रोहिणी व तीन उत्तरा या नक्षत्रांवर पूर्णचंद्र असता गृहप्रवेश शुभदायक होतो, असे रत्नकोशाने सांगितले आहे.

माघ, फाल्गुन, वैशाख आणि ज्येष्ठ या महिन्यांत गृहप्रवेश शुभ होय, असे नारदाने म्हटले आहे. तसेच वास्तुशांती करून व ब्राह्मणभोजन घालून मगच गृहप्रवेश करावा, असेही नारदाने सांगितले आहे. पाहा– वास्तुशांती [नि. सिं.]

गृहप्रवेशनीय होम

विवाहानंतर गृहप्रवेशाच्या वेळी हा होम करायचा असतो. विवाहाच्या चौथ्या दिवशी वराने हा होम स्वगृही करावा असे सांगितले आहे. म्हणूनच याला चातुर्थीन्हिक अशी संज्ञा आहे. पण सांप्रत हा होम विवाहहोमानंतर त्याच वेळी उरकून घेतात. या वेळी वधूला वराच्या उजव्या हाताला बैलाच्या चामड्यावर बसवावी, असे सांगितले आहे. पण हल्ली त्याऐवजी लोकरीच्याच आसनावर बसवतात.

सूर्यासावित्री ही या होमाची प्रधान देवता आहे. तिला उद्देशून अग्नीत चार आज्याहुती देतात. मग 'समञ्जन्तु विश्वे देवा:' या मंत्राने वर दधिप्राशन करतो व पत्नीलाही ते प्राशन करायला देतो. दधिप्राशन न केल्यास हवन करून उरलेल्या तुपा बोट बुडवून ते स्वत:च्या व पत्नीच्या हृदयाला लावतो. याव हृदयांजन अशी संज्ञा आहे. मग वर होम समाप्त करतो. त्यानं पुत्रवती स्त्रिया नवदांपत्याला औक्षण करतात. [ऋ. व्र. क

गृहमेध

वास्तोष्पती ही एक ऋग्वेदकालीन देवता होतं गृह्यसूत्रांच्या कालापासून ती गृहमेध या नावा ओळखली जाऊ लागली. या देवतेची उपासनादी कर्मे यां गृहमेधीय किंवा गृहमेध्य म्हणू लागले. [पा. भा.]

गृहस्थाश्रम

चार आश्रमांपैकी दुसरा आश्रम. गृहस् शब्दाची व्याख्या अशी–'गृहेषु दारेषु तिष्ठ अभिरमते इति = गृह म्हणजे पत्नी, तिच्या ठिकाणी राह म्हणजे तिच्यासह रमतो, तो गृहस्थ होय (श. क.).

वेदांचे अध्ययन समाप्त करून गुरूच्या आज्ञेने समाव करावे व सवर्ण आणि सुलक्षणी कन्येचे पाणिग्रहण करून गृ स्थाश्रम स्वीकारावा, असे मनूने सांगितले आहे (३.२व४

गरुड पुराणात गृहस्थाचे दोन प्रकार सांगितलेले आहेत, पुढीलप्रमाणे–

> उदासीन: साधकश्च गृहस्थो द्विविधो भवेत् ।
> कुटुम्बभरणे युक्त: साधकोऽसौ गृही भवेत् ॥
> ऋणानि त्रीण्यपाकृत्य त्यक्त्वा भार्याधनादिकम् ।
> एकाकी विचरेद् यस्तु उदासीन: स मौक्षिक: ॥
>
> (गरुड पु. ४

अर्थ–उदासीन व साधक असा दोन प्रकारचा गृहस्थ असतं कुटुंबपोषणात जो निरत, तो साधक समजावा व ऋण फेडून भार्या, धन, इ. गोष्टींचा त्याग करून जो मोक्षा इच्छेने एकाकी विचरण करतो, तो उदासीन समजावा.

वैखानस गृह्यसूत्रात गृहस्थाचे चार प्रकार सांगितले आहे ते पुढीलप्रमाणे—

गृहस्थाश्चतुर्विधा वार्तावृत्ति: शालीनवृत्तिर्यायावरो घोर चारिकश्चेति ।

अर्थ–वार्तावृत्ती, शालीनवृत्ती, यायावर व घोराचारिक अ चार प्रकारचे गृहस्थ असतात.

(१) **वार्तावृत्ती**–शेती, पशुपालन व व्यापार हे व्यव करून उपजीविका करणारा.

(२) **शालीनवृत्ती**–नियमयुक्त राहून पाकयज्ञ, दर्शपू मास, चातुर्मास्य, पशुबंध व सोमयाग हे यज्ञ करणारा.

(३) **यायावर**–षट्कर्मनिरत राहून श्रौतस्मार्त अग्नी परिचर्या करणारा, हविर्यज्ञ तसेच सोमयाग करणारा, यज्ञ

पौरोहित्य करणारा व अतिथि–अभ्यागतांना भोजन घालणारा.

(४) **घोराचारिक** – कठोर नियमांचे पालन करणारा, यजन, अध्ययन व दान ही तीन कर्मे करणारा; पण याजन, अध्यापन व प्रतिग्रह न करणारा. सांजसकाळ अग्निहोत्र होम करणारा, उंच्छवृत्तीने जगणारा, मार्गशीर्ष व ज्येष्ठ महिन्यात असिधाराव्रत करणारा व वनौषधींनी अग्निपरिचर्या करणारा.

महाभारताच्या अनुशासनपर्वात उत्तम गृहस्थधर्माचे लक्षण सांगितले आहे. ते असे–

अहिंसा सत्यवचनं सर्वभूतानुकम्पनम् ।
शमो दानं यथाशक्ति गार्हस्थ्यो धर्म उत्तमः ।।
परदारेष्वसंसर्गो न्यासस्त्रीपरिरक्षणम् ।
अदत्तादानविरमो मधुमांसस्य वर्जनम् ।।
एष पञ्चविधो धर्मो बहुशाखः सुखोदयः ।

(अनु. १४१. २५–२७)

अर्थ – अहिंसा, सत्यवचन, प्राणिमात्रावर दया, शम व यथाशक्ति दान हा गृहस्थाचा उत्तम धर्म होय. परस्त्रीशी संसर्ग न ठेवणे, दुसऱ्याची ठेव व स्त्री यांचे रक्षण करणे, न दिलेली वस्तू न घेणे, मद्य न पिणे व मांस न खाणे, असा हा गृहस्थाचा पंचविध धर्म आहे. याला अनेक शाखा आहेत आणि हा सुखकारक आहे.

शौच, दंतधावन, स्नान, गृह्याग्नीची उपासना, पंचमहायज्ञ, वेदादिपठण, राजाश्रय, उपजीविका, धान्यसंग्रह, धनसंचय, आपद्धर्म, वृद्धसेवा, इ. गृहस्थधर्माची तपशीलवार चर्चा धर्मशास्त्राच्या अनेक ग्रंथांत केलेली आहे.

वैदिक युगात पंचमहायज्ञ करणे, हे गृहस्थाचे प्रधान कर्तव्य समजले जात होते (श. ब्रा. ११.५.६.१). सर्व धर्मग्रंथांत या पंचमहायज्ञाचे विस्तृत वर्णन आहे.

गृहस्थाश्रमात अतिथिसेवेला फारच प्राधान्य दिलेले आहे. भोजनकाली दारात येणाऱ्या ब्राह्मणापासून चांडालापर्यंत कोणत्याही जातीच्या मनुष्याला अतिथी मानावे व त्याची भोजनादी परिचर्या करावी, असे स्मृतींनी व धर्मसूत्रांनी सांगितले आहे. यालाच अतिथियज्ञ म्हणतात. या यज्ञाचा पंचमहायज्ञांत समावेश होतो.

या अतिथियज्ञाच्या मुळाशी प्रामुख्याने भूतदयेचा भाव आहे. प्राचीन काळी दळणवळणाची साधने विशेषशी चांगली नव्हती. यात्रा सुगम व निराबाध नव्हती. यात्रिकांचा मुक्काम व्हायचा, त्या ठिकाणी भोजनादी वस्तूंची विक्रय-व्यवस्थाही नव्हती. अशा वेळी थकला भागला प्रवासी दुपारी व तीन्हीसांजा एखाद्या गृहस्थाच्या दारी जाऊन उभा राही. त्याला गोळाभर अन्न देऊन तृप्त करणे व जरूर तर ओसरीवर आसरा देणे, या गोष्टी गृहस्थाला कर्तव्य ठरत. याविषयी मनूने म्हटले आहे, ते असे –

तृणानि भूमिरुदकं वाक्चतुर्थी च सूनृता ।
एतान्यपि सतां गेहे नोच्छिद्यन्ते कदाचन ।।

(मनु. ३. १०१)

अर्थ – चटई, भूमी, उदक व चौथी गोड वाणी एवढ्या गोष्टी तरी सज्जन गृहस्थांच्या घरी कधीही नाकारल्या जात नाहीत.

त्याचबरोबर विद्याध्ययन करणारा ब्रह्मचारी व सर्वसंगपरित्यागी असा संन्यासी यांनाही गृहस्थाने अन्नोदक द्यावे, असे मनूने सांगितले आहे –

यथा वायुं समाश्रित्य सर्वे जीवन्ति जन्तवः ।।
तथा गृहस्थमाश्रित्य वर्तन्ते सर्व आश्रमाः ।।

(मनु. ३. ७७)

अर्थ – ज्याप्रमाणे (प्राण) वायूच्या आश्रयाने सर्व प्राणी जगतात, त्याप्रमाणे गृहस्थाचा आश्रय करून (इतर) सर्व आश्रम (ब्रह्मचर्य, वानप्रस्थ व संन्यास) जगतात.

म्हणूनच गृहस्थाश्रम हा समाजाला प्राणभूत आश्रम मानला गेला व त्याला ज्येष्ठ आश्रम अशी पदवी मिळाली. गृहस्थाने शेषभोजी व्हावे, असे सांगितले आहे, ते यासाठीच ! अतिथी व भिक्षान्नावर जगणारा इतर वर्ग यांना भोजन दिल्यानंतर मग स्वतः भोजन करणे, याला शेषभोजन म्हटले आहे (अथर्व. ९. ६. ३८; श. ब्रा. २. १. ४. २). मनूच्या मते अतिथीला अन्न देण्यापूर्वी स्वतः भोजन करणाऱ्या गृहस्थाचे शरीर कुत्रे आणि गिधाडे खातात (३. ११५).

या व्यवस्थेच्या मुळाशी त्यागपूर्वक भोग हे आदर्शभूत तत्त्व आहे. केवळ स्वतःसाठीच शिजवणे व स्वतःच खाणे, हे शास्त्रकारांच्या दृष्टीने पाप आहे. मनू म्हणतो –

अघं स केवलं भुङ्क्ते यः पचत्यात्मकारणात् ।
यज्ञशिष्टाशनं ह्येतत्सतामन्नं विधीयते ।।

(मनु. ३. ११८)

अर्थ – जो केवळ स्वतःकरताच अन्न शिजवून ते जेवतो, तो केवळ पापच खातो. यज्ञ करून शेष राहिलेले अन्न खाणे, हेच सज्जनांचे अन्न होय.

दुसऱ्यांना अन्न घालणे, एवढेच केवळ गृहस्थाचे कर्तव्य नसून त्यांचे पालन-पोषण करणे, हेही त्याच्या कर्तव्यांत गणले गेले आहे. गृहस्थ दरिद्री असला, तरी त्याने पुढील व्यक्तींचे पालन-पोषण केले पाहिजे, असे दक्ष स्मृतीत म्हटले आहे–

माता पिता गुरुर्भार्या प्रजा दीनः समाश्रितः ।
अभ्यागतोऽतिथिश्चाग्निः पोष्यवर्ग उदाहृतः ।।

(दक्ष. २. ३२)

अर्थ – माता, पिता, गुरू, पत्नी, संतती, दीन, आश्रित, अभ्यागत (पाहुणा), अतिथी आणि अग्नी हा (गृहस्थाचा) पोष्यवर्ग सांगितला आहे.

गृहस्थ जर धनवान असला, तर त्याने पित्याच्या व मातेच्याही कुलातले निर्धन, असहाय्य व शरणागत यांचे पालनपोषण करणे उचित आहे. अशा पोष्यवर्गाच्या पालनाने गृहस्थाला स्वर्ग मिळतो व हे लोक दुःखी राहिल्याने तो नरकात जातो, असे धर्मशास्त्र सांगते.

संसार करायचा आणि पोष्यवर्गाचे पालन करायचे, तर त्यासाठी गृहस्थाला धनाची जोड करून देणारी वृत्ती आवश्यक आहे. धनार्जनासाठी गृहस्थाने कोणत्या वृत्तीचे अवलंबन करावे, याविषयी शास्त्रकारांनी बरेच विवेचन केले आहे. मनूच्या मते (४.५–६) गृहस्थाच्या उपजीविका सात प्रकारच्या असू शकतात – ऋत, अमृत, मृत, प्रमृत, सत्यानृत व श्ववृत्ती या त्या सात वृत्ती होत –

(१) **ऋत** – शिल-उंच्छ वृत्तींनी जगणे. शेतमालकाकडून एकेक कणीस मागून आणणे, तसेच त्याने शेत कापून नेल्यावर त्या शेतातले कण गोळा करून आणणे व अशा प्रकारे उपजीविका करणे.

(२) **अमृत** – अयाचित मिळेल त्यावर जगणे.

(३) **मृत** – भिक्षा मागून खाणे.

(४) **प्रमृत** – शेतीवर जगणे.

(५व६) **सत्यानृत** – व्यापारावर जगणे.

(७) **श्ववृत्ती** – सेवा करून जगणे. सेवा ही मनूने ब्राह्मणासाठी त्याज्य मानली आहे.

गृहस्थाची उपजीविका अन्य व्यक्तींना व प्राण्यांना कष्ट न देणारी किंवा कमी कष्ट देणारी आणि निंद्य कर्मांनी रहित अशी असावी, असा शास्त्रकारांचा उपदेश आहे.

वर सांगितलेल्या कर्तव्यांशिवाय माता, पिता व गुरू यांची सेवा, पत्नीच्या ठिकाणी ऋतुगमन व संतोष, घराविषयी प्रेम, श्रद्धापूर्वक यजन, विहिरी, तलाव, इ. समाजोपयोगी गोष्टी निर्माण करणे व ऋणत्रयातून मुक्त होणे, हीही गृहस्थाची कर्तव्ये आहेत.

पति व पत्नी अर्थात गृहस्थ व गृहिणी हे दोन गृहस्थाश्रमाचे मुख्य घटक होत. त्यांचे परस्पर व अन्यांशी वर्तन कसे असावे, याविषयी शास्त्रकारांनी व स्मृतिकारांनी विवेचन केले आहे. गृहस्थ पुरुषाची कर्तव्ये वर सांगितली. गृहिणीची कर्तव्ये मनूने पुढीलप्रमाणे सांगितली आहेत–

सदा प्रहृष्टया भाव्यं गृहकार्ये च दक्षया।
सुसंस्कृतोपस्करया व्यये चामुक्तहस्तया ।।
यस्मै दद्यात्पिता त्वेनां भ्राता वाऽनुमते पितुः।
तं शुश्रूषेत जीवन्तं संस्थितं च न लङ्घयेत् ।।
(मनु. ५.१५०–५१)

अर्थ – गृहिणीने सदा हसतमुख राहावे. गृहकार्यात दक्ष असावे. घर, दार व घरातील उपकरणे यांची स्वच्छता राखावी आणि हात राखून खर्च करावा. पित्याने अथवा त्याच्या अनुमतीने भावाने ज्याच्याशी लग्न लावून दिले असेल, त्या पुरुषाची तिने जिवंतपणी परिचर्या करावी आणि तो मेल्यावर त्याची श्राद्धादी कृत्ये खंडित करू नयेत.

गृहिणीने पतीला देव मानून त्याची सेवाशुश्रूषा करावी व सर्वभावे पातिव्रत्य आचरावे असा शास्त्रकारांचा आशय आहे. जी स्त्री घरात दासीप्रमाणे राबते, जी पतीला रमविण्याच्या कामी वेश्येसमान कुशल असते, जी परिवाराचे पालनपोषण करण्यात मातृवात्सल्य दाखवते व विपत्ती आल्यास तिच्यातून बाहेर पडण्यासाठी पतीशी योग्य विचारविनिमय करून त्याला सर्वभावे साथसोबत देते, ती पतिव्रता होय, असे पद्म पुराणात सांगितले आहे (सृष्टिखंड ४५.५७).

या कर्तव्यांच्या मोबदल्यात तिला कुटुंबव्यवस्थेत काही अधिकार व सुखसोयीही शास्त्रकारांनी मिळवून दिल्या आहेत. पत्नीला पतीच्या घरी राहण्याचा व पतीकडून पालनपोषण करून घेण्याचा अधिकार आहे. विज्ञानेश्वराने तर इथवर सांगितले आहे, की पत्नी जरी व्यभिचारिणी असली, तरी पतीने तिला घरात ठेवले पाहिजे व अन्नवस्त्रही दिले पाहिजे (याज्ञ. १.७०–७२ वरील भाष्य). शिष्य, गुरू व चांडालादी जाती यांच्याशी व्यभिचार करणाऱ्या, तसेच पतीचा घात करण्यास प्रवृत्त झालेल्या स्त्रीला मात्र घरातून घालवून देणे योग्य होय.

दांपत्यजीवनात रतिसुख व आनंद यांचा अधिकार दोघांनाही सारखाच मानलेला आहे. ऋतुकाली नियमितपणे भार्यासंग करणे, हे गृहस्थाचे कर्तव्य मानले आहे व अशा वेळी पतीला झिडकारण्याचा पत्नीला अधिकार नाही. जो तीन वर्षेपर्यंत ऋतुकाली भार्येशी गमन करीत नाही, त्याला भ्रूणहत्येचे पाप लागते, असे शास्त्रकारांनी सांगितले आहे. गृहस्थाश्रमात पतिपत्नींची जीवने परस्परात मिसळून जावी, त्यांनी अंतःकरणपूर्वक कर्तव्यात आणि सुखदुःखात परस्परांना सोबत करावी, अशीच शास्त्रकारांची अपेक्षा आहे. मनूने याविषयी दोन श्लोक लिहिले आहेत, ते असे–

अन्योन्यस्याव्यभीचारो भवेदामरणान्तिकः।
एष धर्मः समासेन ज्ञेयः स्त्रीपुंसयोः परः ।।

तथा नित्यं यतेयातां स्त्रीपुंसौ तु कृतक्रियौ ।
यथा नाभिचरेतां तौ वियुक्तावितरेतरम् ।।
(मनु. ९.१०१–१०२)

अर्थ – पती व पत्नी यांचा (धर्मार्थकाम या पुरुषार्थांच्या बाबतीत) आमरण परस्पर अव्यभिचार असावा, हाच संक्षेपत: स्त्री-पुरुषांचा श्रेष्ठ धर्म होय. विवाह झाल्यानंतर स्त्री-पुरुषांनी परस्परव्यभिचार व वियोग न होईल अशा रीतीने वागावे व आपली कर्तव्ये आचरावी. (अर्थात परस्परांच्या व्यवहारात सामंजस्य, सहकार्य व प्रेम असावे.)

दांपत्यजीवनात स्त्री-पुरुषांचे अधिकार कोणते व कर्तव्ये कोणती यांविषयी धर्मशास्त्रकारांनी विविध प्रसंगी तपशीलवार विवेचन केले आहे. त्याबरोबरच गार्हस्थ्य जीवनाचे सामाजिक व नैतिक स्वरूप काय आहे, हेही सांगितले आहे. सर्व धर्मशास्त्रकारांनी पतिपत्नींची अभिन्नता व त्यांचे मानसिक ऐक्य यांना महत्त्व दिले आहे. गृहस्थाच्या कौटुंबिक जीवनात सुखशांती निर्माण व्हावी आणि संसार हा प्रेममय, सुखमय व आनंदमय व्हावा, अशा दृष्टीनेच एकंदरीत विवेचन केलेले आहे.

गृहस्थाश्रमात विषयसुखांच्या उपभोगाला अवकाश आहे; पण विषयोपभोग हे मात्र गृहस्थाश्रमाचे उद्दिष्ट नव्हे. देवऋण, ऋषिऋण व पितृऋण या तीन ऋणांतून मुक्त होण्यासाठी गृहस्थाश्रम स्वीकारायचा असतो. ही तीन ऋणे फेडल्यावरच मनुष्य मोक्षाचा अधिकारी होतो, अन्यथा त्याला नरकात जावे लागते, असे मनूचे वचन आहे (६·३५). गृहस्थाश्रम हे एक सामाजिक कर्तव्य आहे. ते एक पवित्र धार्मिक बंधन आहे. त्याची उपेक्षा करणाऱ्याला हिंदू धर्माने मुक्तीचा अथवा संन्यासाचा अधिकार दिलेला नाही. पाहा – आश्रम, ऋणत्रय; पंचमहायज्ञ. [हि. ध.; हिं. प. मी.; हिं. सा. बृ. इ.; म. ज्ञा. को.]

गृहारंभ मार्गशीर्ष, फाल्गुन, वैशाख, माघ, श्रावण व कार्तिक हे मास; तीन उत्तरा, मृग, रोहिणी, पुष्य, अनुराधा, हस्त, चित्रा, स्वाती, धनिष्ठा, शततारका व रेवती, ही नक्षत्रे; रवी व मंगळ सोडून अन्य वार आणि २, ३, ५, ७, १०, ११, १३ व १५ या तिथी गृहारंभास म्हणजे नवीन घर बांधणीचा प्रारंभ करण्यास शुभ होत. [नि. सिं.]

गृह्यसूत्रे वेदांच्या अर्थज्ञानास उपयोगी अशा वेदांगांची रचनाही प्राचीन काळीच झालेली आहे. या वेदांगांमध्ये कल्पसूत्रांचा समावेश होतो. निरनिराळ्या वेदशाखांची निरनिराळी कल्पसूत्रे रचली गेली. सनपूर्व ७ वे शतक ते सनपूर्व २ रे शतक हा या सूत्रग्रंथांच्या रचनेचा काळ मानला जातो. या कल्पसूत्रांचे श्रौत, गृह्य आणि धर्म असे तीन भाग पडतात. सध्या उपलब्ध असलेली गृह्यसूत्रे पुढीलप्रमाणे आहेत – आश्वलायन, कौषीतकी व शांखायन ही ऋग्वेदाची; बौधायन, अग्निवेश्य, भारद्वाज, आपस्तंब, सत्याषाढ, वैखानस, मानव आणि वाराह ही कृष्णयजुर्वेदाची; पारस्कर हे शुक्लयजुर्वेदाचे; गोभिल, खादिर व जैमिनीय ही सामवेदाची आणि कौशिक हे अथर्ववेदाचे.

गृह्यसूत्रे या नावावरूनच या ग्रंथात गृह्य म्हणजे घरगुती धार्मिक कर्मे यांची माहिती सूत्ररूपाने दिली आहे, ही गोष्ट समजते. विवाहानंतर घरामध्ये स्थापन केल्या जाणाऱ्या अग्नीला गृह्याग्नी असें नाव आहे. या अग्नीवर केले जाणारे जे संस्कार त्यांना गृह्यसंस्कार असे म्हटले असून, या संस्कारांची तपशीलवार माहिती गृह्यसूत्रांमध्ये दिलेली असते. निरनिराळ्या गृह्यसूत्रांत या संस्कारांची संख्या कमीअधिक आहे. गृह्यसूत्रांमध्ये कुटुंबसंस्थेला मोठे स्थान दिलेले आढळते. कुटुंबातील कर्त्या पुरुषाची कर्तव्ये कोणती, यासंबंधीही गृह्यसूत्रकारांनी विवेचन केले आहे.

गृह्यसूत्रांमध्ये सांगितलेल्या विधींचे उल्लेख साक्षात श्रुतींमध्ये म्हणजे वेदांमध्ये आढळत नाहीत. वेदांमध्ये सांगितलेल्या यज्ञयागांचे विवेचन श्रौतसूत्रांत केले आहे. कल्पसूत्रांच्या रचनेमध्ये गृह्यसूत्रांचा रचनाकाल श्रौतसूत्रांच्या रचनेनंतरचा आहे. काही वेदशाखांचे श्रौत व गृह्यसूत्रकार एकच आहेत. 'श्रौतकर्म सांगितले; आता गृह्यकर्म सांगतो,' असे आश्वलायनाने गृह्यसूत्राच्या आरंभी म्हटले आहे. श्रौतयज्ञात आढळणारे नित्यहोम, दर्शपौर्णमासयाग, इ. विधी गृह्यसूत्रांमध्येही आले आहेत. तथापि गृह्यसूत्रांमध्ये अशा प्रकारच्या यज्ञांव्यतिरिक्त असा पुष्कळच वेगळा भाग आलेला आहे.

बहुतेक सर्व गृह्यसूत्रांमध्ये सोळा संस्कारांची माहिती आहे. या संस्कारांचे विवेचन करण्यास काही सूत्रकारांनी विवाहसंस्कारापासून, तर काहींनी उपनयनापासून आरंभ केलेला आहे. सर्व संस्कारांमध्ये विवाहसंस्कारास अधिक प्राधान्य दिलेले आहे. विवाहाच्या आठ प्रकारांचा उल्लेख आश्वलायन गृह्यसूत्रातच आढळतो. अन्य सूत्रकारांची यासंबंधी वेगवेगळी मते आहेत. वैवाहिक अग्नीचेच गृह्याग्नीत रूपांतर होत असल्यामुळे गृह्यकर्मांमध्ये विवाहास अधिक प्राधान्य दिलेले आढळते. गर्भाधान, पुंसवन, सीमंतोन्नयन, जातकर्म, उपनयन, इ. संस्कारांचे वर्णनही बऱ्याच तपशीलाने गृह्यसूत्रांत आढळते.

याशिवाय सात पाकयज्ञसंस्थांचे विधानही या सूत्रांत सांगितले आहे. पाकयज्ञांपैकी काही अग्नीच्या साहाय्याने होत असतात; तर काही श्राद्ध, पिंडदान या स्वरूपाचे असतात. हे

पाकयज्ञ वर्षातील निरनिराळ्या ऋतूंमध्ये करायचे असतात. पशुधनाची वाढ व्हावी, म्हणून शूलगव हा संस्कार सांगितला आहे. पितरांना संतुष्ट करण्यासाठी अष्टका, मासिक श्राद्ध, यांसारखेही संस्कार यात येत असतात.

गृहस्थाने रोज करायच्या पाच महायज्ञांचे विवेचन गृह्यसूत्रांमध्ये येत असते. अतिथीचा सत्कार म्हणजे *अतिथियज्ञ* हा पंचमहायज्ञांपैकीच एक होय. यालाच मनुष्ययज्ञ असे म्हटले आहे. अतिथी कोण, त्याचा सत्कार कसा करावा, कोणता अतिथी श्रेष्ठ, इत्यादी विषयांसंबंधी पुष्कळ माहिती गृह्यसूत्रांत आढळते. विद्याध्ययन करून घरी परत आलेला विद्यार्थी, यज्ञात नियुक्त केलेला ऋत्विज, एखादा श्रेष्ठ अधिकारी पुरुष आणि विवाहार्थं उपस्थित झालेला वर हे सर्वश्रेष्ठ अभ्यागत होत. मधुपर्कविधीने पूजा करून त्यांचा सत्कार करायचा असतो. अतिथीचा सत्कार केला नाही, तर पुण्यक्षय होतो, असे म्हटले आहे.

सर्वं सुकृतमादत्ते ब्राह्मणोऽनर्चितो वसन्।

(शांखा. गृ. सू. २. १७)

अर्थ—अतिथी म्हणून घरी आलेल्या ब्राह्मणाचा सत्कार केला नाही, तर तो (गृहस्थाचे) सर्व पुण्य हरण करतो.

गृह्यसूत्रांमध्ये कौटुंबिक आचारांप्रमाणे सामाजिक आचारांचाही विचार केलेला आहे. ब्राह्मण, क्षत्रिय आणि वैश्य या त्रैवर्णिकांचाच प्रामुख्याने उल्लेख प्राचीन वैदिक वाङ्मयामध्ये येतो. त्रैवर्णिकांसाठीच वेदांमध्ये यज्ञयाग सांगितलेले दिसतात. याच यज्ञयागांचे विधिविधान श्रौतसूत्रांमध्ये आलेले असते. परंतु गृह्यसूत्रांमध्ये ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य आणि शूद्र या चारही वर्णांचे आचार, त्यांची कर्तव्ये, त्यांचे अधिकार, इ. विषयांचा विचार केलेला दिसतो. यावरून गृह्यसूत्रांच्या काळात समाजाची चातुर्वर्ण्याधिष्ठित रचना सिद्ध झाली असावी, असे दिसते.

गृह्यसूत्रांमध्ये आलेल्या धार्मिक कृत्यांचे मूल स्वरूप पाहू गेले असता त्यातील काही चालीरीती इंडो-आर्यन किंवा इंडो-युरोपियन लोकांच्या चालीरीतींशी समान असाव्या, असे दिसते. आर्य लोकांचा आर्येतरांशी संबंध येण्याच्या आधीपासूनच भिन्नभिन्न गृह्यकर्मे प्रचलित असावी आणि परस्परांचा संपर्क आल्यानंतर हे विधी अधिक गुंतागुंतीचे बनले असावे. गृह्यसूत्रांमध्ये आलेल्या कित्येक विधींना ब्राह्मणग्रंथांत आधार मिळत नसल्यामुळे आणि हे विधी बरेच प्राचीन असल्याचे दिसत असल्यामुळे गृह्यसूत्रे ही ब्राह्मणग्रंथांच्या अगोदर रचली गेली असावी, असे काही विद्वानांचे मत आहे.

प्राचीन लोकांचे धार्मिक विधी कसे होते, त्यांच्या चालीरीती कशा होत्या, समाजधारणेसंबंधी त्यांची भूमिका काय होती, इ. अनेक विषयांचे सम्यग्दर्शन गृह्यसूत्रांच्या अध्ययनाने घडू शकते. पाहा– कल्पसूत्रे. [विद्याधरशास्त्री भिडे]

गृह्याग्नी गृहस्थाच्या घरात सतत जागृत असलेल्या अग्नीला गृहचाग्नी असे म्हणतात. विवाहाच्या वेळी विधिपूर्वक अग्नीची स्थापना करून त्यावर विवाहहोम करतात. नंतर गृहप्रवेशाच्या वेळी तो अग्नी घरात आणून त्याची स्थापना करतात. या अग्नीची नित्य धारणा व उपासना करायची असते. हा अग्नी एखाद्या वेळी विझला, तर प्रायश्चित्त करून त्याची पुन्हा स्थापना करतात. अशा वेळी हा अग्नी वैश्याच्या किंवा नित्य यज्ञ करणाऱ्याच्या घरातून आणावा अथवा मंथन करून उत्पन्न करावा, असे सांगितले आहे.

या अग्नीवर रोज सकाळ संध्याकाळ होम करायचा असतो. यजमान घरी नसेल, तेव्हा ते काम यजमानपत्नीही करते. गृह्याग्नी विझू न देणे, हे सर्व कुटुंबियांचे कर्तव्य असते. अग्नी विझल्यास त्या दिवशी यजमानाला व पत्नीला उपवास करावा लागतो.

गृहचाग्नीत हवन करण्याची द्रव्ये श्रौत-हवनीय द्रव्येच असतात. फरक एवढाच, की गृहचाग्नीत सोमाचे व पशूचे हवन करीत नाहीत. या अग्नीला मुखाने वारा घालू नये, प्रज्वलित व निर्धूम अग्नीतच आहुती द्याव्या आणि गृह्याग्नी पलंगाखाली ठेवू नये किंवा त्यावर पाय शेकू नयेत, असे सांगितले आहे.

या अग्नीला औपासन, आवसथ्य, औपसद, वैवाहिक, स्मार्त व शालाग्नी अशी अन्यही नावे आहेत. पाहा– औपासन होम [क. हे. इं.; हि. ध.]

गेट्टुवाद्यम् द. भारतातले एक तंतुवाद्य. हे मैफलीच्या वेळी दुय्यम वाद्य म्हणून वाजवितात. याची लांबी साधारणत: दोन फूट असते. दोन्ही हातात एक एक लहानशी काठी घेऊन त्याने याच्या तारा छेडतात. या वाद्याच्या स्वर रचनेने तयार झालेला तालबद्ध मिलाफ आनंददायक असतो.

मैसूर राज्यात हलेअलूर येथील देवळाच्या प्रवेशद्वारात गेट्टुवाद्यम् वाजवणारा एक पुतळा आहे. [डि. सा. इं. म्यु. म्यु.]

गेडीदडा गुजरातेत प्रचलित असलेला एक खेळ. होळीच्या सुमारास रात्री चांदण्यात हा खेळ खेळतात. खेळाच्या प्रारंभी एक कापडी चेंडू मध्यावर ठेवतात. नंत दोन्ही पक्षांचे संघनायक त्या ठिकाणी येतात. खेळताना प्रत्ये खेळाडू आपल्या हातातील वेळूच्या दांडक्याने चेंडू विरुद्ध पक्ष कडे टोलवण्याचा प्रयत्न करतो. चेंडू सीमापार झाल्यास त संघाला एक डाव मिळाला, असे समजले जाते. [व्या. ज्ञा. को.

गेयचरित्रम् तमिळ भाषेतील संगीतबद्ध कथा. एक पुरुष त्यातली पदे गातो व मधून मधून त्यावर भाष्य करतो. गेयचरित्रम्मध्ये अंक, दृश्य, इ. निरनिराळे भेद असत नाहीत. ते संगीत नाटक नसते; पण त्यात काही सुधारणा करून त्याचे संगीत नाटक बनवता येते. त्रेसष्ट शैव संतांच्या जीवनावर आधारलेले पेरियपुराणम् हे गेयचरित्रम्चे उत्तम उदाहरण आहे. [डि. सा. इं. म्यु. म्यु.]

गेयनाटकम् तमिळ भाषेतले जुने संगीत नाटक. यात सर्व कलांचे उत्तम मिश्रण झालेले असते. हे नाटक म्हणजे एक जलसाच असतो. यातील संगीत केवळ नाटकाच्या सजावटीसाठी नसते; तर ते नाटकाचे एक अविभाज्य अंग म्हणूनच असते. द. भारतात अशी काही गेय नाटके व त्याचप्रमाणे संगीतबद्ध चरित्रे लिहिली गेली आहेत.

त्यागराजाचे पाचअंकी प्रल्हादभक्तिविजयम् हे मोठे नाटक व नौकाचरितम् हे छोटे नाटक, गोपाळकृष्ण भारतीचे नंदनारचरितम्, अरुणाचल कविरायाचे रामनाटकम्, इ. नाटके ही गेयनाटकम् या प्रकाराची उदाहरणे आहेत. गेयनाटकम्साठी उत्तम वाद्यवृंदाची आवश्यकता असते. गेयनाटकम्चा प्रयोग पाहायला जाण्याआधी प्रेक्षकांनी त्यातील साहित्य व संगीत यांची माहिती करून घेतलेली असल्यास त्यातील आनंद अधिक रुचीने चाखता येतो; पण कथा माहीत नसली तरीसुद्धा त्यातील संगीत प्रेक्षकांना आनंद देते. [डि. सा. इं. म्यु. म्यु.]

गैरनृत्य राजस्थानातील भिल्लांचे एक नृत्य. हे नृत्य विशेषेकरून पुरुषांचे असते. नृत्य करताना नाचणारे हातात छडी व तीर–कमठा घेऊन वीररसाचा अभिनय करतात. होळीच्या दिवशी रात्री गावाच्या चव्हाट्यावर हे नृत्य होते. या नृत्याला तबला, नगारे, थाळ्या, यांचीही साथ घेतात. नर्तक उत्तम पोषाख करून फेर धरून नाचतात. [भा. लो. नृ.; रा. लो. नृ.]

गोंगा गारो लोकांचा एक देव. याच्यासंबंधी एक कथा प्रचलित आहे, ती अशी–

सात उन्हाळे व सात हिवाळे कळा सोसणाऱ्या मातेच्या उदरी गोंगा जन्मला. लहानपणी तो देवांबरोबर खेळत असे. गारो लोकांना कपडे असावे व त्यांना विणकाम यावे, म्हणून तो आपल्या दोन बायकांसह अरण्यात गेला. तिथे त्याच्या एका पत्नीला एका तळ्यात एक मोठे पांढरे शुभ्र झाड दिसले. ते कापसाचे झाड होते. गोंगाने खूप प्रयत्न करूनही ते त्याला उपटता येईना. मग त्याने वायुदेव 'बलवा'ची मदत मागितली; परंतु ती तो देईना. कारण बलवाची नजर गोंगाच्या बायकांवर होती. त्यांचा एकदाच उपभोग घ्यायला मिळावा, या अटीवर बलवा त्याला मदत द्यायला तयार होता. अखेर गारोंच्या कल्याणासाठी गोंगाने बलवाची ती अट मानली व त्याच्या मदतीने त्या झाडाच्या फांद्या शेतात आणून लावल्या. कापूस पिकल्यावर गोंगाने त्याची वस्त्रे विणली व लोकांनाही विणकाम शिकवले. परंतु कालांतराने लोक हे उपकार विसरले व गोंगाने आपल्या पत्नीचा उपभोग बलवास घेऊ दिला म्हणून त्याच्यावर चिडले. त्यांनी त्याला निघून जायला सांगितल्याने तो स्वर्गात राहायला गेला.

गोंगा दयाळू असल्यानेच कापूस पिकतो, अशी गारोंची समजूत आहे. गोंगाला हाकलून दिल्यामुळे आपण गरीब झालो, असे ते मानतात. [सु. का. जोशी– चित्रमयजगत, नोव्हें. १९६४]

गोंटी द. भारतातील माल जातीची एक देवता. हिच्या उत्पत्तीविषयी दंतकथा आहे, ती अशी–

गोंटी ही शूद्र जातीची मुलगी होती. तिचा एका माडिगाशी अनैतिक संबंध आला. पुढे तो उघडकीस आल्याने तिचे भाऊ तिला ठार मारायला निघाले. गोंटी घाबरली व तिने जाराच्या घराचा आश्रय घेतला. त्या वेळी तो घरात नव्हता. काही वेळाने त्याचा भाऊ त्या ठिकाणी आला. वस्तुत: घडलेल्या घटनेने तो गोंटीचा दीर ठरत होता. पण त्याला पाहून ती भ्याली व तिथून पळाली. पुढे तिने एका शेताचा आश्रय घेतला. तिथे माल लोकांशी तिची गाठ पडली. त्या वेळी तिने घडलेली सर्व हकीकत त्यांना सांगितली. तेव्हा त्या लोकांनी प्रथम तिला गवताच्या गंजीत लपविले व रात्री गावात आणून एका घराच्या तुळईवर बसवले. दुसऱ्या दिवशी तिचा शोध घेण्यास तिचे नातेवाईक आले असता गोंटी एकाएकी तिथून नाहीशी झाली. त्या दिवसापासून देवता म्हणून माल लोक तिला भजू लागले.

आजमितीस माल लोक अवर्षण पडले असता गावाच्या सीमेवर तिची मूर्ती बसवून तिची पूजा करतात. हिची वार्षिक जत्रा पावसाळ्याच्या प्रारंभी असते. त्या वेळी तिची मातीची मूर्ती करून बसवतात. माडिगांनी तिला पाहू नये, म्हणून ती झाकून ठेवतात. मग धान्याच्या एका उखळीत वाळलेले गवत ठेवून पावसाची वाट पाहतात. पाऊस पडू लागला, की गोंटीचे आगमन झाले, असे समजतात. त्यानंतर गवताच्या एका ढिगाऱ्यावर दुधाचे भांडे ठेवून ते गवत पेटवतात. त्या वेळी स्त्रिया गोंटीला उद्देशून गाणी म्हणतात व दूध उतू गेल्यावर सर्वजण

मोठ्याने हाकाटी करतात. दंतकथेत वर्णन केल्याप्रमाणे ती घटना व्यक्त व्हावी म्हणून तिची मूर्ती एका टोपलीत घालून ती एकाच्या हातून दुसऱ्याच्या हाती याप्रमाणे प्रत्येकाच्या हातून फिरवतात व शेवटी गवताच्या गंजीत लपवतात. [द्र. गाँ. माँ. हिं.]

गोंड भारतातील एक मोठी आदिवासी जमात. ओडिसा, मध्य प्रदेश, महाराष्ट्र आणि आंध्र या राज्यांत यांची सुमारे तीस लाख वस्ती आहे. महाराष्ट्रात हे विदर्भ आणि मराठवाड्यातील नांदेड जिल्हा या भागात राहतात. मध्य प्रदेशात विंध्य व गोदावरी यांच्या मधल्या भागाला गोंडवन असे नाव आहे. तिथे गोंडांची पुष्कळच वस्ती आहे. आपण त्यांना गोंड म्हणत असलो, तरी ते लोक स्वतःला कोइटोर म्हणवून घेतात.

गोंड लोकांची पुरातन माहिती मिळत नाही. राजपुतांनी प्रथम गोंडांना आपल्या सत्तेखाली आणून त्यांना हिंदू धर्मात घेतले असे कळते. राजपुतांनी त्यांच्याशी, विशेषतः त्यांच्या टोळीप्रमुखांशी रोटीबेटीव्यवहार सुरू केला. .या संबंधातून निर्माण झालेली प्रजा स्वतःला राजपूत किंवा राजगोंड असे म्हणवू लागली. या राजगोंडांनी इ. स. च्या १३ ते १७ या शतकांत मध्य प्रदेशात अनेक राज्ये स्थापली. त्यांतील सर्वांत उत्तरेकडील राज्यांच्या राजधान्या मंडल आणि गढ (अर्वाचीन जबलपूर) या होत्या; तर बाकीच्या राज्यांच्या राजधान्या देवगड, खेरळा व चांदा या होत्या.



गोंड राजांचा राजवाडा– रामनगर



माडिया गोंड स्त्रिया – धान्य कांडताना

बौद्ध आणि ब्राह्मण यांच्या संघर्षात मध्य भारतातील हिंदू राज्यांचा नाश झाला. त्या परिस्थितीचा फायदा घेऊन गोंडांनी तिथे आपली राज्यें स्थापली. काही काळ ही राज्ये टिकली; पण पुढे पुष्कळांचा मुसलमानी सत्तेपुढे निभाव लागला नाह मुसलमानांनी त्यांना इस्लाम धर्म स्वीकारण्याची सक्ती केल देवगढचा गोंड राजा बख्त बुलंद हा इस्लाम धर्म स्वीकारणा पहिला गोंड राजा होय. शेजारच्या राजांविरुद्ध लढण्यासा आपल्याला दिल्लीच्या बादशहाची मदत मिळावी, म्हणून त्य हे धर्मांतर केले. हा राजा राज्यकारभारात फार कुशल हो आपल्या राजवटीत हिंदू आणि मुसलमान या दोघांनाही त्य समानतेने वागविले, असे कळते.

या इतिहासावरून गोंडांचे दोन वर्ग आहेत, हे कळून ये ज्यांनी आपला मूळ धर्म जतन करून ठेवला आहे, असे गोंड एक वर्ग आणि ज्यांनी हिंदू किंवा इस्लाम धर्म स्वीकारला गोंड हा दुसरा वर्ग. बंगालमध्ये, तसेच मध्य प्रदेशा

सरगुजा व कोरिया या भागात वसलेले आणि उदेपूरमध्ये असलेले गोंड राजे स्वतःला राजपूत किंवा क्षत्रिय मानीत असत.

गोंडांच्या अनेक शाखा आहेत आणि वेगवेगळ्या प्रदेशात राहणाऱ्या गोंडांची नावेही वेगवेगळी आहेत. बस्तर व चांदा जिल्ह्यांत राहणाऱ्या गोंडांना माडिया गोंड म्हणतात. हे जंगली व जवळजवळ अर्धनग्न असतात. ते आंघोळही सहसा करीत नाहीत. शेंडी ठेवून वाकीच्या डोक्याचा गोटा करतात. एका कानात जवळजवळ पंधरा लहान लहान वलये घालतात. कमरेला चंची व सुरा अडकवतात. खांद्यावर कुऱ्हाड किंवा धनुष्यबाण घेऊन फिरतात. माडिया स्त्रिया एक कटिवस्त्र गुंडाळतात व कधी कधी त्या एखादे उत्तरीयही अंगावर घेतात. त्यांच्या कानांत पितळेची लहान वलये असतात. गळयात पांढऱ्या मण्यांच्या माळा आणि लोखंडी व पितळी वलये अडकवलेली लोखंडी तार असते. त्या आपल्या तोंडावर व नितंबांवरही गोंदून घेतात. माडियांत बिसनहॉर्नं माडिया असाही एक भेद आहे.

साखरपुडा झाल्यावर दोन वर्षांनी लग्न करतात. विवाह सुखकारक होईल का नाही, ते शकुन पाहून ठरवतात. शकुनाची पद्धत अशी—पाण्याने भरलेल्या एका पितळी भांड्यात तांदळाचे दोन दाणे वेगवेगळे टाकतात. ते एकत्र आले, तर विवाह सुखाचा होईल व ते एकत्र आले नाहीत, तर दुःखाचा होईल, असे मानतात. कन्याशुल्क चौदा रुपये घेतात. बस्तरमध्ये नवरामुलगा वधूला नेण्यासाठी आला, की ती शेजाऱ्याच्या घराच्या माळ्यावर जाऊन लपते. तिथून खाली आणून नवरामुलगा तिला आपल्या घरी घेऊन जातो.



बिसनहॉर्नं माडिया युवती



माडिया गोंड युवती

गोंड स्त्री प्रसूत झाली, की एक महिनाभर घराबाहेर पडत नाही. तिला मोठी मुलगी नसल्यास बाळंतपणात तिचा स्वयंपाक तिलाच करावा लागतो. गोंड लोकात अविवाहित तरुण–तरुणींसाठी सामुदायिक शयनगृहे असतात.

छिंदवाड्यातील जंगली गोंड अनेक देवतांना भजतात. फरशी पेण किंवा दुल्हादेव हा त्यांचा प्रमुख देव होय. प्रत्येक घरात त्याची एक वेदी असते. झाडाला मारलेली फरशी हे त्याचे प्रतीक असते. याशिवाय ते नुरमा, गंगड (=बुद्ध), रायेताळ, बडियाताळ, बडादेव, इ.. देवतांनाही भजतात.

खैरगडमधील गोंडांचे राजगोंड, धुरगोंड व गैतियागोंड असे तीन भेद आहेत. त्यांपैकी राजगोंड व धुरगोंड हे हिंदू असून ते बडादेव, दुल्हादेव, देवी, सूर्य, चंद्र, इ. देवतांना भजतात. दरवर्षी चैत्र महिन्यात देवीची व दुल्हादेवाची जत्रा भरवतात.

खैरगडमधील गोंडांत एकूण अकरा गोत्रे आहेत. परधानांकडे

या गोत्रांची नोंद असते. यांच्यांत सगोत्र विवाह होत नाही. धुरगोंड आणि राजगोंड हे गैतियागोंडांची मुलगी घरात आणतात, पण आपली मुलगी त्यांच्या घरी देत नाहीत.

पंचायतीत दहा रुपये भरल्यावर स्त्रीला घटस्फोट मिळतो व ती आपल्या प्रियकराकडे जायला मोकळी होते. खैरगडमधील गोंडांची पंचायत असून, तिच्यामार्फत शेताचे किंवा इतर तंटे सोडवले जातात. पंचायतीत फक्त मोठी माणसे भाग घेतात. महत्त्वाचे तंटे सोडविण्यासाठी गावच्या पाटलाला बोलावतात.



गोंड पुरुष

झासपूर येथील गोंडांच्या सहा पोटजाती आहेत, त्या पुढीलप्रमाणे–

(१) महाराज गोंड– राज्यकर्त्यांच्या वर्गांतले गोंड.

(२) राजगोंड– राजांचे सरदार किंवा दिवाण.

(३) पाच्छासी गोंड– हे महाराजांचे अनुयायी होत.

(४) बडी गोंड– हे मिश्र संबंधातून निर्माण झालेले आहेत. गोंदणे हा यांचा मुख्य व्यवसाय आहे.

(५) थुकेल गोंड– कोण्या एका काळी काही गोंड दिल्लीवर चाल करून गेले होते. ते पराभूत होऊन परत आल्यावर उच्च गोंड त्यांच्यावर थुंकले. म्हणून त्यांना हे नाव पडले. हे गुरे पाळतात व गोंदण्याचा व्यवसाय करतात.

(६) डोखर गोंड–हे आपला पराभव झाल्यावर विजेत्यांच्या पाया पडले, म्हणून त्यांना हे नाव मिळाले. गुरे पाळणे, दळायची जाती बनविणे व गोंदणे हे यांचे व्यवसाय होत.

पहिल्या तीन पोटजाती स्वत:ला उच्च मानतात. शेवटच्या तीन वर्गांतील गोंडांना उच्च जातीचे गोंड अस्पृश्य मानतात. या सर्व जातींच्या गोंड स्त्रिया वक्षःस्थळावर, दंडांवर, पायांवर, गुडघ्यांवर व मनगटांवर गोंदून घेतात. गोंदण्याचे वय आठ वर्षांच्या पुढे असते.

या सहाही वर्गांच्या गोंडांची गोत्रे विविध पशुपक्ष्यांवरून आणि जलचरांवरून पडलेली आहेत.

गोंडांच्या वरील सहाही वर्गांतील लोक बडा देवाला भजतात. त्याचा पूजाविधी पुढीलप्रमाणे असतो– सर्व लोक रानात जातात. तिथे एक व्यासपीठ उभारून त्यावर कापड अंथरतात. त्याच्यावर पाण्याने भरलेले मडके ठेवतात. देवाचा पुजारी दोन लोखंडी सुजा म्हणजे बारीक बाण आणून त्या मडक्यातल्या पाण्याने धुतो व ते बाण अंगात येणाऱ्या काही पुरुषांच्या हातात देतो. बाण हाती येताच ते पुरुष घुमू लागतात. मग त्यांच्या अंगावर पाच शेर तूप आणि बारा शेर दूध ओततात. त्यांना पाच बकऱ्यांचा बळी देतात. पूजेसाठी जमलेला प्रत्येक गोंड एखादा बकरा, कोंबडा किंवा नारळ घेऊन आलेला असतो. नंतर पुजारी पाच बकऱ्यांच्या शिरांचे मांस व भात शिजवतो आणि बडा देवाचा प्रसाद म्हणून सर्व पुरुषांना ते वाटतो. स्त्रियांना हा प्रसाद देत नाहीत. उरलेल्या पशूंचे मांस बाकीचे लोक शिजवतात. जेवण झाल्यावर पुजारी ते बाण धुवून पुढच्या वर्षासाठी एका ढोलीत ठेवून देतो.



अलंकृत गोंड युवती

सर्वसाधारणपणे गोंड हे रंगाने काळे व ठेंगू असतात. त्यांच्या बायका रूपाने सामान्यच असतात. त्या पायात काशाचे वाळे, हातात लाखेच्या बांगड्या व गळ्यात मण्यांच्या माळा

घालतात. रानातली लाकडे तोडणे व मोलमजुरी करणे हे गोंडांचे प्रमुख व्यवसाय होत.

काही गोंडांत राक्षसविवाह प्रचारात आहे. एखाद्या तरुणाला लग्न करायची इच्छा झाली, की तो आसपासच्या खेड्यात आपल्याला योग्य अशा तरुणीचा शोध करतो. तशी ती आढळल्यावर ती जिथे कामाला असेल, तिथे आपल्या मित्रांसह जाऊन तिला करस्पर्श करतो. काही वेळा या प्रसंगी दोन्ही बाजूंत थोडी झटापटही होते. पण त्याचा उपयोग होत नाही. कारण एकदा करस्पर्श झाला, की त्या दोघांचा विवाह झालाच पाहिजे, असा नियम आहे.

मांडलामधील गोंडांत देवगोंड, सूर्यवंशी राजगोंड व रावणवंशी असे पोटभेद आहेत. यांच्यापैकी गरीब लोक अंगात बंडी घालतात व धोतर नेसतात. श्रीमंत लोक लांब बाह्यांचा सदरा, कोट व धोतर असे कपडे वापरतात. सर्व पुरुष पगडी घालतात. स्त्रिया लुगडे नेसतात. हे लोक मुख्यत: शेती करतात. शिकारीचीही त्यांना आवड आहे. यांचे विवाह हिंदू पद्धतीने होतात. लग्नात पुरोहित असतो.

नागपूर भागातील गोंड इतर गोंडासारखेच आहेत. मात्र त्यांचे उत्सव आणि जत्रा इतरांपेक्षा वेगळ्या आहेत. चैत्र महिन्यात त्यांची मातादेवीची जत्रा भरते. एका झाडाखाली मांडव घालून मातादेवीचे प्रतीक म्हणून काही दगड ठेवतात. तिला पीत वस्त्रे, सूत, बांगड्या व फण्या देतात. याच जत्रेत मातादेवीचा भाऊ भीमसेन याला नारळ वाहून बकराही बळी देतात. मंगळवार व शुक्रवार हे देवीचे आणि भीमसेनाचे खास दिवस मानतात.

आषाढात संजरी बिद्री नामक भीमसेनाचा उत्सव होतो. त्या वेळी त्याला गुलाल आणि नारळ वाहतात. या उत्सवासाठी मालगुजार सर्व प्रकारचे धान्य पुरवतो. ते धान्य प्रथम भीमसेनाला अर्पण करून नंतर त्यातले थोडे थोडे द्रोणात घालून त्येक शेतकऱ्याला देतात. शेतकरी आपल्या बियाण्यात ते धान्य मसळून ते पेरतात. या उत्सवात बलिदान नसते. प्रत्येकाने बरोर आणलेले धान्य एकत्र करून त्याचा स्वयंपाक करतात. या त्सवानंतर पेरणीला सुरवात होते व नृत्याचा मोसम सुरू होतो.

श्रावण–अमावास्येला गोंडांचा जिरोती नामक सण असतो. या दिवशी वडा देवाची पूजा, गोडाचे जेवण, मद्यप्राशन आणि चगाणे होते. या सणातला मुख्य नाच म्हणजे दंडा लडाना होय. त्यात कित्येक पुरुष हातात दंडुके घेऊन लढण्याचा भिनय करतात. त्यांच्या एका हातात दंडा व दुसऱ्या हातात रसा असतो. लढताना प्रत्येकजण तो आरसा दुसऱ्याला खवतो.

शिमगा हा यांचा महत्त्वाचा सण आहे. तो ते फाल्गुन–पौर्णिमेलाच करतात असे नाही; तर सर्वांच्या सोयीने एक दिवस ठरवून त्या दिवशी करतात. शिमग्यात नाचगाणे व मद्यपान यांना ऊत येतो.



गोंडांचा पुरोहित

याशिवाय गोंडांच्या इपलानिया, उहिका, धुरवा, असकाला, काकोडिया, सराठिया, सीराम, इ. अनेक पोटजाती आहेत. त्यांचे परस्परांत रोटीबेटी व्यवहार होतात.

गोंडांची मूळ भाषा गोंडी खरी; पण सांप्रत निम्मे लोक ती विसरले आहेत. ते मध्य प्रदेशात हिंदी, विदर्भात मराठी आणि आंध्रात तेलुगू बोलतात. बाकीच्या सुमारे पंधरा लाख गोंडांची गोंडी हीच मातृभाषा आहे. तिचे तेलुगू व कन्नड भाषांशी थोडेबहुत साम्य आहे. तिला लिपी मात्र नाही.

गोंडी भाषेत लोकसाहित्य विपुल आहे. त्यातील लोककथांचे प्रामुख्याने तीन भाग पडतात. पहिला भाग सृष्टीच्या उत्पत्तीसंबंधीचा. यात देवदेवतांच्या उत्पत्तीच्या कथाही येतात. दुसरा

भाग रामायण, महाभारत व पुराणे यातील कथांचा. पण त्यांचे स्वरूप मात्र मूळ कथांपेक्षा अगदी निराळे आहे. प्रधान किंवा परधान हे गोंडांचे भाट होत. त्यांनी वरील कथांचा गोंड समाजात प्रसार केला. गोंडी लोककथांचा तिसरा प्रकार गोंड समाजाची उत्पत्ती व विस्तार यांसंबंधीचा आहे. गोंड लोक उत्पन्न कसे झाले, त्याबद्दल अनेक कथा आहेत. त्यांतली एक कथा पुढीलप्रमाणे–

कंकालकाली नामक एका मुलीचा एका ऋषीशी संबंध आला व तिला बाव्वीस मुले झाली. पण कंकालकालीने आपल्या त्या मुलांचा त्याग केला. त्याच वेळी शंकरपार्वती नंदीवर बसून जगाचा फेरफटका करायला निघाली होती. त्या मुलांच्या रडण्याचा आवाज ऐकून पार्वती नंदीवरून खाली उतरली. तिने त्या मुलांना आपल्याबरोबर घरी आणले व त्यांचे संगोपन केले. पण मुलांनी महादेवाशी कृतघ्नपणा केला. तेव्हा रागावून त्याने मुलांना एका विहिरीत कोंडून ठेवले. कित्येक वर्षे विहीरीत खितपत पडल्यावर पहाडिक पारलिंगो नावाच्या एका तापसाच्या विनंतीवरून महादेवाने त्यांची सुटका केली. विहिरीतून प्रथम चार माणसांचा, मग पाचांचा, मग सहांचा व शेवटी सातांचा असे गट बाहेर पडले.



गोंड माता–बालक

हेच गोंडांचे मूळ पुरुष होत. हे पुरुष निरनिराळ्या ठिकाणी स्थायिक झाले. पुढे त्यांच्या वंशाचा विस्तार होऊन त्यांची शेकडो पाडी म्हणजे घराणी निर्माण झाली.

गोंड लोकांत कथांप्रमाणे गीतेही विपुल प्रमाणात त्यांच्या नृत्यगीताचा एक नमुना पुढीलप्रमाणे––

रेलाँ रेलाँ आँड नावारे ।
नावारे च्याते मरका मरा
मरका मरा वारून वातारे। आली शृंगार डोले
रेलाँ रेलाँ......
नावारे च्याते लिंबू मरा । लिंबू मरा वारून
आली शृंगार डोले वाता । रेलाँ रेलाँ......
नावारे च्याते शितीमरा । रेंगा मरा वारून
आली शृंगार डोले वाता । रेलाँ रेलाँ......
नावारे जानी मंता । हौशा । तुरं हिद मंता

अर्थ – अहाहा, किती सुंदर माझी ही बाग. प्रियक बागेतले हे आंब्याचे झाड बघ. याला किती सुंदर बहा आहे. फळांनी नुसते लहडून जाऊन ते वाऱ्यावर डोल तसेच हे लिंबाचे झाड बघ. भरपूर पिवळ्याधमक ते कसे विनम्र झाले आहे आणि हे शेवंतीचे झाड सुगंधी फुलांनी मंद मंद वाऱ्याशी खेळत आहे. आ यौवनही असेच आहे, नाही का ? पण प्रियकरा, वेळी कुठे आहेस ?



गोंडांची भिंतीवरची चित्रकारी

गोंडांच्या स्त्रीसौंदर्याबद्दल काय कल्पना आहेत, एका गीतावरून समजून येते. त्यातील आशय पुढील

खारीच्या शेपटीप्रमाणे असलेले भरगच्च केस, शेपटीप्रमाणे असलेल्या बारीक भुवया, देवळाच्या प्रमाणे असलेले भव्य कपाळ, लिंबाची आठवण वक्षःस्थळ, गांधीलमाशीच्या कमरेप्रमाणे असलेली जिभेप्रमाणे मऊ आणि अंड्याच्या सालपटाप्रमाणे

ायांच्या टाचा, अशा नैसर्गिक सौंदर्याने नटून मी जेव्हा ल्लारशाच्या बाजारात खरेदी करायला जाते, तेव्हा तरुणांच्या जरा माझ्याकडे वळल्यावाचून कशा राहतील !

निरनिराळ्या ठिकाणी राहणाऱ्या गोंडांच्या मर्तिकप्रथेतही ोडाबहुत फरक आढळतो. खैरगडमधील गोंड प्रेते जाळीत सले, तरी ते अविवाहित स्त्रीपुरुषांची प्रेते पुरतात. प्रेताचे ोके दक्षिणेला व पाय उत्तरेला करून प्रेत पुरतात. झासपुर धील गोंडांत प्रेते पुरण्याची प्रथा आहे. प्रेत पुरताना त्याच्या जारी थोडे भात आणि कापूस ठेवतात. गावातील सर्व गोंड यताच्या घरी मूठमूठ तांदूळ आणून देतात. त्याच दिवशी रातील गाडगी–मडकी बाहेर फेकतात. तिसऱ्या दिवशी ावातील सर्व लोक मयताच्या घरी जमतात व नदीवर नानासाठी जातात. मग एकजण कुंभाराकडे जाऊन मातीची ांडी घेऊन त्या कुटुंबाला देतो. दहाव्या दिवशी नदीवर स्नान गावजेवण होते.

माडिया गोंडांत एखाद्या घरी मृत्यू झाला, की ढोल वाजवून ावाला त्याची सूचना देतात. मग सर्वजण मयताच्या घरी जमतात. त्या वेळी गाय कापतात, गावजेवण घालतात व दारू ाटतात. मयत व्यक्ती वयात आलेली असल्यास तिला महुवा ृक्षाला दोऱ्यांनी उभी टांगून जाळतात व तिची रक्षा रस्त्याच्या कडेला पुरतात. लहान मुले व स्त्रिया यांची प्रेते ुरतात.

मांडलामधील गोंड अविवाहितांना व स्त्रियांना, तसेच साथीच्या रोगाने मेलेल्यांना पुरतात. यांपैकी एखादी महत्त्वाची यक्ती असल्यास तिच्यासाठी रस्त्याच्या कडेला एक खांब रतात. मग त्या रस्त्यावरून जाणारे लोक त्या खांबाशेजारी एक दगड टाकतात. अशा दगडांचा पुढे एक ढीग जमतो. त्याला धुरी असे म्हणतात.



गोंडांचे उंच व अवजड जाते

काही गोंड घरात मृत्यू झाल्यावर पाचव्या दिवशी नदीच्या काठी जाऊन मृताच्या आत्म्याला हाक मारतात व नदीतला मासा पकडून खातात. त्यामुळे मृतात्मा पुन्हा आपल्याच घरी जन्माला येतो, अशी त्यांची समजूत आहे. [से. इं. १९३१; इं. स्ट. पा. प्रे.; म. ज्ञा. को.; लोककला त्रै.; महाराष्ट्र लोक-साहित्यमाला, पुष्प ४; महाराष्ट्र टाइम्स, २२ जुलै, १९६३]

गोंदण सुईने कसला तरी द्रव शरीरात टोचून देवतांच्या आकृती किंवा काही चिह्ने कायमची कोरणे, याला गोंदण असे म्हणतात. गोंदण्यासाठी स्त्रीचे दूध वापरतात. ते न मिळाले, तर कारल्याचा रस काढून तो गोडच्या तेलाच्या कोरडच्या काजळात खलून त्याचे मिश्रण वापरतात. या मिश्रणात सुईचे टोक बुडवून ज्या भागावर गोंदायचे असेल, त्या ठिकाणी सुईच्या टोकाने टोचून टोचून गोंदतात. गोंदण्याची क्रिया पूर्ण झाल्यावर तिथे एरंडेल व हळदीच्या मिश्रणाचा लेप लावतात. अलिकडे गोंदण्याचे रासायनिक मिश्रणही मिळते व यंत्राच्या साहृयाने ते शरीरावर गोंदता येते. हे गोंदण करणारे फिरस्ते कारागीर असतात.



स्तनावरचें गोंदण

उत्तर ध्रुवाजवळच्या प्रदेशापासून दक्षिणेकडील न्यूझिलंड पर्यंतच्या सर्व देशांतल्या मूळच्या वन्य लोकात गोंदण्याची प्रथा आढळते. आर्यांमध्ये ही चाल नसावी. कारण वैदिक वाङ्मयात तिचा उल्लेख आढळत नाही. प्राचीन संस्कृत वाङ्मयातही गोंदण आढळत नाही. द्रविड लोकांमध्ये गोंदण्याची चाल पूर्वापार असली, तरी मलबारमधील नायर लोकांना मात्र त्याची फारशी आवड नाही.

गोंदण निश्चित केव्हा सुरू झाले, हे आज तरी सांगता येत नाही. प्राचीन काळी निरनिराळ्या वन्य जमातीत भुताखेतांपासून स्वतःचे रक्षण व्हावे म्हणून कपाळावर, हातावर व अन्य अवयवांवर सांकेतिक चिह्ने काढण्याचा प्रघात होता. यातूनच गोंदण्याची पद्धती सुरू झाली असावी. गोंदणासंबंधी

एक कथा प्रसिद्ध आहे, ती अशी–

एकदा लक्ष्मी विष्णूला म्हणाली, 'तुम्ही वरचेवर मला सोडून बाहेर जाता, तेव्हा मला एकटीला भीती वाटते.' यावर विष्णूने आपली आयुधे लक्ष्मीच्या हातावर दाबली व त्यांची चिन्हे तिथे उमटवून तिला म्हटले. 'ही चिन्हे यापुढे तुझे भयापासून रक्षण करतील.'

काही मानववंशशास्त्रज्ञांच्या मते जंगली लोकांत देवपूजा, लग्न किंवा इतर समारंभ या प्रसंगी रक्ताभिषेकाचा जो विधी होता, त्याचा गोंदण हा अवशेष असावा. फ्रेझर या मानववंशशास्त्रज्ञाचे मत याहून वेगळे आहे. तो म्हणतो, की स्त्रियांना मारहाण करून त्यांच्या अंगची सहनशक्ती पाहण्याचा जो प्रकार होता, त्याचाच हा अवशेष असावा.



गोंदण– पायावर सांकेतिक चिन्हे

आदिवासी जमातीतील स्त्रियांची अशी समजूत असते, की गोंदण हे मृताबरोबर परलोकात जाते. गोंदणाशिवाय जर स्त्री मरण पावली, तर स्वर्गात तिचे पितर तिला ओळखणार नाहीत. स्वर्गात गेल्यानंतर पृथ्वीवर राहिल्याची खूण म्हणून परमेश्वर तिला गोंदण दाखवायला सांगतो. जर ते गोंदण नसेल, तर ब्रह्मदेव तिला भुताखेताच्या रूपाने परत जन्म घ्यायला लावतो, किंवा काट्यावरून फरफटत ओढीत न्यायला लावतो. मग त्यायोगे तिच्या अंगावर गोंदणासारख्या खुणा उठतात.

राजपुतान्यातील भिल्ल लोकांत गोंदण्याची प्रथा नाही. बंगालमधील किसानांत जर एखाद्या स्त्रीने गोंदून घेतले, तर तिला जातीबाहेर टाकतात. आसाममधील नागा टोळ्यांत गोंदणे हे मानचिह्न समजतात आणि गोंदल्याशिवाय कोणाही तरुणाला लग्न करता येत नाही.

आदिवासींच्या निरनिराळ्या टोळ्यांत गोंदणाचे निरनि
प्रकार आढळतात. कोणी आडव्या व तिरप्या रेषांनी गोंद



गोंदण– काही प्रतीके

तर कोणी विशिष्ट चिह्ने वा आकृत्या गोंदतात. कपा
त्रिकोणाकृती, छातीवर मोर अथवा मत्स्य, इ. ठरावि
यवांवर ठराविक आकृत्या गोंदल्या जातात. सामान्यतः
णात राममंत्र, ओंकार, हनुमानाचे चित्र, तुळशीवृंदावन,
देवाची पिंड, शंखचक्रादी चिह्ने, इ. दिसतात.

प्राचीन भारतात शिक्षेचा एक प्रकार म्हणूनही गोंद



छातीवरचे गोंदण

पद्धत होती. एखाद्या गुन्हेगार माणसाच्या कपाळावर गोंद
त्याची गाढवावरून धिंड काढीत. [का. ट्रा. स. इं.; मह
टाइम्स, २३ फेब्रु. १९६४].

गोंदवलेकर महाराज (१८४४–१९१३ इ. स.) एक महाराष्ट्रीय सत्पुरुष. यांचे मूळ नाव गणपत रावजी घुगरदरे असे होते. हे वसिष्ठ गोत्री शुक्ल यजुर्वेदी देशस्थ ब्राह्मण होते. सातारा जिल्ह्यातील गोंदवले ही यांची जन्मभूमी होय. बालपणापासून हे वृत्तीने खोडकर होते. ते एकपाठीही होते. वयाच्या पाचव्या वर्षीच त्यांच्या बुद्धीची झेप समजण्याचा प्रसंग आला.

एके दिवशी त्यांचे आजोबा त्यांना म्हणाले. 'तुला हंडा भरून मोहरा दिल्या, तर तू काय करशील ?' त्यावर त्यांनी लगेच उत्तर दिले. 'आंधळे, पांगळे, रोगी, गरीब व भिकारी यांना मी त्या सगळ्या वाटून टाकीन.' त्यावर आजोबा पुनः म्हणाले. 'तुला राजा केले, तर काय करशील ?' महाराज उत्तरले. 'माझ्या राज्यात भिकारी राहू देणार नाही. मी माझ्या दारात अन्नछत्र घालीन.'



गोंदवलेकर महाराज

पुढे इ. स १८७६ व १८९६ साली पडलेल्या दुष्काळाच्या वेळी महाराजांच्या या बोलांचे प्रत्यंतर आले. या दोन्ही प्रसंगी महाराजांनी हजारो लोकांना अनेक महिने काम व अन्न दिले.

वयाच्या नवव्या वर्षीच गुरुशोधासाठी त्यांनी गृहत्याग केला होता. परंतु वडिलांनी समजूत काढून कोल्हापुराहून त्यांना घरी परत आणले आणि त्यांचा विवाह केला. हा त्यांचा प्रथम विवाह होय. यानंतर काही दिवस घरी राहून ते पुनश्च गुरुशोधार्थ बाहेर पडले. या प्रवासात अक्कलकोटचे स्वामी, माणिकप्रभू, इ. सत्पुरुषांच्या त्यांना भेटी झाल्या. अयोध्या, काशी, इ. यात्राही त्यांनी केल्या. अखेर तुकाराम महाराज येहळीकर यांची व त्यांची गाठ पडली. महाराजांनी त्यांचेच शिष्यत्व पत्करले. अनुग्रहानंतर या गुरूंनी महाराजांचे ब्रह्मचैतन्य असे नाव ठेवले. नंतर महाराज तपःसाधनेसाठी हिमालयात गेले.

या वेळेपासून त्यांच्या जीवनाशी अनेक चमत्कारकथा निगडित झाल्या आहेत. मृत्यूची वाहूल देणे, एका वेळी अनेक ठिकाणी प्रकट होणे, तिखटाचे लाडू खाणे, अंगार गिळणे, अशा प्रकारच्या त्या कथा आहेत.



महाराजांच्या द्वितीय पत्नी

त्यानंतर महाराजांनी पुनश्च संसार सुरू केला. या काळात त्यांना एक मुलगाही झाला होता, पण तो बालपणीच वारला. महाराजांचे मन प्रपंचात रमलेले पाहून त्यांच्या आईला समाधान झाले. पुढे काही कालाने त्यांची पत्नी सरस्वती ही मरण पावली. नंतर आईच्या आग्रहाने त्यांनी पुनश्च द्वितीय विवाह केला. मात्र ही त्यांची पत्नी जन्मांध होती. त्यांनी तिचे नावही सरस्वतीच ठेवले. तिला दोन मुलगे व एक मुलगी झाली. पण ती सर्व अपत्येही बालपणीच वारली.

गोंदवलेकरांनी एकूण तीन वेळा भारतयात्रा केली. त्यांनी साऱ्या आयुष्यभर रामदासी संप्रदायाचा व रामभक्तीचा प्रसार केला. अनेक ठिकाणी राममंदिरेही उभारली. आनंदसागर, ब्रह्मानंद व डॉ. कुर्तकोटी (स्वामी) हे यांचे प्रमुख शिष्य होत.

महाराजांनी स्वतः एकही ग्रंथ लिहिला नाही. तथापि आयुष्यभर ज्या तत्वज्ञानाचा त्यांनी प्रसार केला, ते तत्त्वज्ञान पुढीलप्रमाणे सांगता येईल –

जीविताचे कोडे उकलण्याची शक्ती फक्त माणसाच्या ठायी आहे. म्हणून मनुष्यप्राणी सर्व प्राण्यांमध्ये श्रेष्ठ आहे. जोपर्यंत हे कोडे उकलत नाही, तोपर्यंत जीवितकार्य संपले, असें समज नये. अज्ञानापासून उत्पन्न होणाऱ्या भ्रमामुळे माणूस आपल्या जीवनसाफल्याकडे लक्ष देत नाही. जीवनतत्त्व हे सूक्ष्म आहे, त्याची उत्पत्ती परमात्म्यापासून आहे, म्हणून परमात्मस्वरूपाचे ज्ञान झाले, की जीविताचे कोडे सुटते आणि ते कोडे सुटले, की जीवन संपन्न व आनंदमय बनते. प्रपंच हा सर्वस्वी सत्य नाही; तसा तो असत्यही नाही. प्रपंच कोणालाही टाकणे शक्य नाही. सामान्य माणसाने प्रपंच टाकला तर त्यामध्ये त्याचे अकल्याणच आहे. उलट संसार अशा रीतीने करावा, की स्वतः ब्रह्मरूप बनण्याचे तो साधन बनेल.

महाराज भजनास उभे राहिले असता तत्कालिक स्फूर्तीने अभंग रचीत. त्यांतील एक अभंग असा—

अहो मंदिरवासी जन । तुम्ही ऐकावे वचन ।।
आल्या अतिथा अन्न द्यावे । राम नाम दृढ घ्यावे।।
पूजा करावी त्रिकाळ । अंगी वैराग्याचे बळ ।।
नम्र व्हावे सर्वभूता । परनारी राहो माता ।।
भाव ठेवा रामापाशी । कोणा मागू नका काही ।।
दास म्हणे गुरुपुत्र । तोचि होईल जीवन्मुक्त ।।
जीवन्मुक्त नाही भेद । हाचि माझा आशीर्वाद ।।

महाराजांनी परमार्थपर अशी दहा स्फुट प्रकरणे लिहिली असून, ती सर्व ओवीबद्ध आहेत. त्यांची भाषा साधी व रचना सुलभ आहे. [श्री. गोंदवलेकर महाराज यांचे चरित्र आणि वाङ्मय– के. व्ही. बेलसरे]

गोंधळ

देवीची स्तुती व पूजा करण्याचा एक प्रकार. महाराष्ट्रातील कित्येक कुलांतला एक कुलधर्म. घरातील मंगलकार्य निर्विघ्नपणे पार पाडल्याबद्दल अंबाबाई, भवानी, रेणुका यांसारख्या कुलदेवींच्या उपकारस्मरणाचा हा विधी असतो. हा प्रकार देशस्थ ब्राह्मणांत व मराठ्यांत प्रचलित आहे. याला 'गोंधळ घालणे' असे म्हणतात. गोंधळी जातीचे लोक गोंधळ घालण्याचे हे काम करतात.

गोंधळ घालण्यात चार व्यक्ती भाग घेतात. गीत आणि कथा यांच्या साहाय्याने निरूपण करणारा असतो, तो मुख्य गोंधळी होय. त्याला नाईक म्हणतात. निरूपणात मध्येच विनोदी प्रश्न विचारून निरूपणाला गती देणारा एक असतो, तो त्याचा साहाय्यक होय. आणखी दोघे असतात, ते संबळ व तुणतुणे वाजवून गोंधळाला साथ करतात.


गोंधळ

गोंधळाची मांडणी करताना गोंधळी एका पाटावर नवे वस्त्र अंथरून त्यावर तांदळाचा चौक करतो. चौकाच्या चार कोपऱ्यांवर चार व मध्ये एक याप्रमाणे खोबऱ्याच्या वाट्या, त्यांच्या शेजारी सुपाऱ्या, खारका, हळकुंडे व केळी या वस्तू मांडतो. चौकाच्या मध्ये कलशाची स्थापना करून त्यावर विड्याची किंवा आंब्याची पाने ठेवून, त्यावर एक नारळ ठेवतो. म यजमान देवीची स्थापना व पूजा करतो. चौकाच्या पाटापु पाच पात्या ठेवून त्य पात्यांवर थोडा भा घालून वर कणकीच एक एक दिवा ठेवतो. पाटाभोवती उसाचे अथवा शाळूच्य ताटांचे तिकाटणे उ करतो. त्या ल कडकण्या टांगतो मधोमध घटमा बांधून ती कलशावरील नारळावर सोडतो. गोंधळाला दिवटी व बुधली आवश्यक असते. या दोन्ही वस्तू गोंधळी आपल्या घरून घेऊन येतो.

नाईक गोंधळाला प्रारंभ करताना प्रथम गण म्हणतो, नंत जगदंबेचे स्तवन करतो आणि मग अनेक देवदेवतांना गोंधळासाठी पाचारण करतो. हे पाचारणगीत पुढीलप्रमाणे असते-

मोरेश्वरा गणा गोंधळा ये,
तेहत्तीस कोटी देवा गोंधळा ये
वाईच्या गणपति गोंधळा ये
कृष्णा कोयना गोंधळा ये
कोल्हापूर लक्ष्मी गोंधळा ये
तुळजापुरची भवानी गोंधळा ये
जुन्नरचे शिवाबाई गोंधळा ये
साती समींद्रा गोंधळा ये
नवलाख तारांगण गोंधळा ये
धरतरी माते गोंधळा ये
आगाशी पिता गोंधळा ये
भक्तांच्या गणा गोंधळा ये
राहिले साहिले गोंधळा ये
आपल्या भक्ता प्रसन्न झाले ।।

त्यानंतर नाईक पूर्वरंग व उत्तररंग अशा दोन विभाग अनुक्रमे देवीची प्रशंसा व एखादे लोककथात्मक संगीत आख्या सांगतो. शेवटी देवीची आरती होते व गोंधळ संपतो.

गोंधळ्याच्या अंगात मलमलीचा अंगरखा, गळ्यात कवड्यांच्या माळा व डोक्यावर कंगणीदार पगडी असते.

रेणुकामाहात्म्यात गोंधळाच्या उगमाबद्दल एक कथा आहे, ती अशी–

परशुरामाने बेरासुर नावाच्या दैत्याचा वध करून त्याचे शिर तोडले. त्या शिराच्या ब्रह्मरंध्रात त्याच्याच शिरांचे तंतू ओवले आणि ते खांद्यावर घेऊन ‘ तितृण तितृण ’ असा ध्वनी काढीत तो रेणुकेजवळ आला. बेरासुराच्या धडाचे चौंडके आणि शिराचे तुणतुणे वाजवून परशुरामाने जे हे पहिले मातृवंदन केले, त्यातूनच गोंधळाची प्रथा उगम पावली.

रेणुका आणि तुळजाभवानी यांच्या उपासनेत गोंधळाला प्राधान्य केव्हा मिळाले, ते मात्र निश्चित सांगणे कठीण आहे. तुळजाभवानीची प्राचीनता सनपूर्व १००० वर्षांच्याही पलिकडची आहे आणि रेणुका तर त्याहूनही प्राचीन आहे. गोंधळाचा संबंध तुळजाभवानीच्याही आधी रेणुकेशी असल्याचे कळते.

यादवकालीन मराठी वाङ्मयात गोंधळाचे जे उल्लेख येतात, त्यांवरून असे दिसते, की गोंधळाचा संबंध मुळात भूतमाता नावाच्या एका देवतेशी असावा आणि नंतर ती भूतमाता महाराष्ट्रात लोकप्रिय असलेल्या रेणुकेत समाविष्ट झाली असावी. वरंगळच्या गणपती काकतीयाचा गजसेनाप्रमुख जायण याने इ. स. १२४० मध्ये रचलेल्या नृत्यरत्नावलीत सांगितले आहे, की कल्याणीचा चालुक्य राजा सोमेश्वर (३ रा) याने आपल्या राजधानीत भूतमातामहोत्सवाच्या प्रसंगी गोंधळाचा कार्यक्रम केला होता.

भूतमातामहोत्सवाची विविध वर्णने निरनिराळ्या पुराणांत मिळतात. दैवी आपत्ती टळावी व चांगली संतती मिळावी, यासाठी पुराणकाळी भूतमातेचा उत्सव करीत. वैशाख वद्य प्रतिपदा ते अमावास्या असा एक पंधरवडा हा उत्सव चाले. या काळात रोज रात्री नाटके आणि लळिते यांचे प्रयोग होत असत, अशी माहिती स्कंद पुराणाच्या प्रभासखंडांत सापडते. ज्ञानेश्वरीत गोंदळी हा शब्द पिशाच किंवा भूत या अर्थाने आलेला आहे (ज्ञाने. १३.१००९). दासोपंतांच्या गीतार्णवातील एका ओवीतही गोंदळी आणि भूते यांचे साहचर्य स्पष्टपणे दिसते–

भूतांचा गोंदळी पडिलें । तें माणूस नव्हे आपुलें ।
तैसे पापाअधीन आलें । जीर्णें होईल ।।

आद्य महानुभाव वाङ्मयात दृष्टान्ताच्या रूपाने गोंधळाचे अनेक उल्लेख आले आहेत. त्यात सर्वशक्तींचा मेळ, योगिनी चक्राचा गोंदळ, चक्रगोंदळ असे शब्द आढळतात. त्यावरून स्पष्ट होते, की गोंधळ हा उपासनाप्रकार भूतमातेशी संबंधित होता. भूतवेष परिधान करून भूतचेष्टांचे अनुकरण करणे, अशा प्रकारचे नृत्य गोंधळ या प्रकारात होत असे, असे अनेक ग्रंथांतील उल्लेखांवरून दिसून येते. संगीतरत्नाकर, संगीतसमयसार, नृत्यरत्नावली, इ. नृत्यविषयक ग्रंथांत गोंधळाचा उल्लेख ‘गोंडली नृत्य’ या नावाने येतो. गौंडली, गुंडली, गोंडली, कुंडली असे त्याचे अनेक नामपर्याय आढळतात. अमलिकाग्राममाहात्म्य (माहूरक्षेत्र वर्णन) नावाच्या संस्कृत ग्रंथात या गोंडली नृत्याचे वर्णन आले आहे, ते असे––

कवड्यांच्या माळा घालून आणि दिवटी घेऊन गोंधळ घालावा. ज्या ठिकाणी गोंधळ घालायचा, त्या ठिकाणच्या सर्व मंडळींना निमंत्रणे करावी. गोंधळाला दिवटी, कवड्यांची माळ, मातृवाद्य, ताळ, शंखवाद्य, मृदंग, चिपळी, वीणा, चंडक, मुरज, इ. वाद्यांची जरुरी असते. गोंडली वृंदाचे उत्तम, मध्यम व कनिष्ठ असे तीन भेद असतात. उत्तमवृंदात ४ मुख्य गायक, ८ समगायक, ८ नर्तक, ४ वांशिक, ४ मार्दंगिक आणि ४ तालधारी अशी ३२ माणसे असतात. मध्यम वृंदात १६ व कनिष्ठ वृंदात ८ अशी माणसांची संख्या असते. नृत्य कसे करावे, दिवट्या कोणी घ्याव्या, वाद्ये कोणीकोणती घ्यावी याबद्दलही निश्चित संकेत ठरलेले आहेत. [रा. चिं. ढेरे– मनोहर, नोव्हें. १९६३]

गोंधळी एक जात. महाराष्ट्र, मध्य प्रदेश व आंध्र या प्रदेशांत या जातीची विशेष वस्ती आहे. गुजरात राज्याखेरीज इतर सर्वत्र हे लोक विखुरलेले आहेत. माहूर व तुळजापूर ही आपली मूलस्थाने असल्याचे हे लोक सांगतात. अंबाबाई व भवानीदेवी यांचे हे सेवेकरी असल्यामुळे यांना बहुजनसमाजात विशेष मान मिळतो. हे लोक गोंधळ करून व भवानीच्या नावावर भिक्षा मागून आपली उपजीविका करतात. मराठी सत्तेच्या काळात या लोकांनी पोवाडे गाऊन लोकांमध्ये देशाभिमान जागृत केला, असेही सांगतात. महाराष्ट्रराज्यात मराठे, कुंभार, कदमराय, रेणुकाराय, ब्राह्मण व अकरमासे अशा यांच्या पोटजाती आहेत. संस्कार व रीतीरिवाज या बाबतीत हे लोक मराठे कुणब्यांप्रमाणे वागतात. डोकेफोड, सक्तमुके, जवळ, पंचांगे, अशी यांची कुळनामे आहेत.

लग्नाच्या वेळी वराच्या गळ्यात यांच्या जातीतील पाच विवाहित लोक कवड्यांची एक माळ घालतात, हाच गोंधळी होण्याचा विधी समजला जातो. कोणी कोणी नवसासाठीही गोंधळी होतात. स्वतःची जात न सोडताही त्याला ही दीक्षा घेता येते.

गोंधळी लोक गोंधळात जे वाङ्मय उपयोजितात ते लोकवाङ्मयाच्या श्रेणीतील आहे. कथा व कथगीते हे त्यांचे घटक आहेत. मीठ-मिरचीचे भांडण, कोल्ह्याचे लगीन, इ. आख्याने व

मांगीणीचे शीर वगैरे कथा या महत्त्वाच्या असतात. ‘एक होता राजा’ या ग्रंथात गोंधळ्यांची काही गाणी संकलित केलेली आहेत. लोकधर्माच्या आणि लोकसाहित्याच्या घडणीत गोंधळ्यांचे कार्य मोठे आहे. [से. इं. १९११, मुंबई; मुं. इ. जा.]

गोएरा आसामातील गारो लोकांचा पर्जन्यदेव. या देवाविषयी त्यांच्यांत प्रचलित असलेली कथा अशी–

एकदा एका सुस्वरूप गारो कन्येने आपल्या आतेभावाशी लग्न केले. कालांतराने ती गरोदर राहिली; पण प्रसूतीच्या वेळी मूल अडले. सात हिवाळे व सात उन्हाळे गर्भ वाढल्यावर गर्भाने आतून बोकड बळी देण्याची मागणी केली. ती कबूल केल्यावर सात दिवस व सात रात्री मातेला कष्ट देऊन एक तेजस्वी बालक जन्मला. त्याचे नाव गोएरा ठेवण्यात आले. जन्मल्यापासूनच तो सैराट वागू लागला. बळी देण्यासाठी कबूल केलेला बोकड आणावा, म्हणून मुलाचे तीन मामा बाहेर पडले; पण त्यांना राक्षसाने खाऊन टाकले. हे ऐकून गोएरा संतापला आणि राक्षसाला मारण्यासाठी हाती धनुष्य-बाण घेऊन बाहेर पडला. रानात राक्षसाला गाठून त्याने त्याच्याशी सात हिवाळे व सात उन्हाळे युद्ध केले व राक्षसाला मारले. पण एवढे करूनही गोएराचा संताप कमी होईना आणि त्याचे लोकांशी जमेना म्हणून तो मग स्वर्गातच राह्यला गेला.

गोएरा अमर असून, तो पाऊस पडताना विजा चमकण्यासाठी व मेघगर्जना होण्यासाठी आपला बाण सोडतो, असे गारो मानतात. [सु. का. जोशी– चित्रमयजगत, नोव्हेंबर १९६४]

गोकर्ण (१) एक क्षेत्र. हे कारवार आणि अंकोला या दोन बंदरांच्या मध्ये तदडी बंदराच्या उत्तरेस सुमारे सहा मैलांवर समुद्रकाठी आहे. इथल्या महाबळेश्वराच्या मंदिरातील लिंग हे शिवाचे आत्मलिंग असल्यामुळे, पुरातन कालापासून त्याची प्रसिद्धी आहे. गोकर्णाची गणना भास्करक्षेत्रात होते. रामायण, महाभारत, भागवत पुराण, इ. ग्रंथांतून या क्षेत्राचे नामोल्लेख आढळतात. अनेकांनी इथे तपःसाधना केली आहे. रावणाने इथे तप केले. अहल्येशी जारकर्म आचरून मर्गांकित झालेल्या इंद्राने आपले पाप धुवून टाकण्यासाठी इथे अनुष्ठान केले. बलराम तीर्थयात्रा करीत असता इथे आला होता. नारद, सनत्कुमार, प्रल्हाद, शंकराचार्य, इ. महनीय विभूती या क्षेत्रात येऊन गेल्या होत्या.

गोकर्णक्षेत्राची निर्मिती कशी झाली, त्याबद्दल कथा सांगितली आहे, ती अशी–

रावणाच्या मातेने रावणाला सांगितले, की ‘कैलासाला जा आणि महादेवाकडून त्याचे आत्मलिंग मागून आण.’ राव त्यासाठी हिमालयात गेला व तिथे त्याने उग्र तप आचरले. म महादेव त्याला प्रसन्न झाला. रावणाच्या मागणीप्रमाणे त्यानं स्वतःचे हृदय चिरून त्यातून आत्मलिंग काढले व ते रावणा दिले. रावण ते घेऊन लंकेला जायला निघाला. महादेवां आपले आत्मलिंग रावणाला दिल्यामुळे त्रिभुवनात हाहाका उडाला. ते लिंग लंकेत जाऊ नये म्हणून देवांनी मनसुब रचला. त्यांनी त्या कामी गणपतीची योजना केली. गणप त्या कामगिरीवर निघाला. रावण लिंग घेऊन गोकर्णा पोचला, तेव्हा सूर्यास्ताचा समय झाला होता. आता संध्यावंदन करून वरुणाला अर्घ्य द्यायचे तर आत्मलि कोणाच्या तरी हाती देणे आवश्यक होते. हीच वेळ साधू गजानन बटुवेषाने तिथे आला. त्याला पाहून राव म्हणाला, ‘थोडा वेळ एवढे लिंग सांभाळ!’ बटू म्हणाल ‘संभाळीन; पण जड झाले तर खाली ठेवीन.’ रावण त्याव म्हणाला. ‘लिंग खाली ठेवण्याआधी मला तीन हाका मार बटूने ते मान्य केले. रावण जलाशयावर गेला. पण त्याने आच मनाला सुरवात केली, तो पहिली हाक आली. अघमर्षण होते तो दुसरी आणि अर्घ्य ओंजळीत घेणार तोच तिसरीही हा आली. रावण पळत जाऊन पाहतो, तर बटूने ते आत्मलि जमिनीवर ठेवलेले. रावण मग आपल्या वीस हातांनी ते उप लागला. त्याचे कपचे निघाले; पण लिंग मात्र जाग्याव हालले नाही. अखेर रावण थकला. त्याने रागाच्या भरा



गोकर्ण–महाबळेश्वर–मंदिर

बटूच्या मस्तकी एक ठोसा मारला. पण ते लिंग मात्र तिथेच कायमचे प्रतिष्ठित झाले.

गोकर्ण या नावाच्या मागेही एक कथा आहे, ती अशी–

ब्रह्मदेवाने महादेवाला सृष्टी निर्माण करण्यास सांगितले. परंतु बरेच दिवस झाले, तरी महादेवाने ते काम केले नाही. म्हणून मग ब्रह्मदेवाने स्वतःच पृथ्वी निर्माण केली. या गोष्टीचा शिवाला राग आला व तो पाण्यातून वर येऊन पृथ्वीला धक्के मारू लागला. पृथ्वीने गायीचे रूप धारण करून शिवाला विनंती केली, की ‘ मला धक्के मारून माझा छेद करू नको; तर माझ्या कानातून बाहेर पड.’ त्याप्रमाणे शिव त्या गायीच्या कानातून प्रकट झाला. ज्या ठिकाणी ही घटना घडली त्या स्थानाला गोकर्ण असे म्हणू लागले.

गोकर्णाच्या उत्तर, पूर्व व दक्षिण या तीन्ही बाजूंना लंबवर्तुळाकार टेकडयांची रांग आहे. त्याच्या पश्चिम बाजूस समुद्र आहे. समुद्राच्या बाजूने गावाकडे नजर टाकली म्हणजे गावाचा आकार गायीच्या कानासारखा दिसतो. म्हणून या गावाला गोकर्ण म्हणू लागले असावे, अशीही एक व्युत्पत्ती सांगतात.

स्कंद पुराणातील ब्रह्मोत्तर खंडात (२. ८१–८४) गोकर्णमाहात्म्य सांगितले आहे, ते असे–

> शृणु राजन् महाभाग क्षेत्रमन्यत् प्रतिष्ठितम् ।।
> महापातकसंहारि गोकर्णाख्यं मनोहरम् ।
> यत्र स्थितिर्न पापानां महद्भ्यो महतामपि ।।
> स्मृतो ह्यशेषपापघ्नो यत्र सन्निहितः शिवः ।
> यथा कैलासशिखरे यथा मन्दारमूर्धनि ।।
> निवासो निश्चितः शम्भोस्तथा गोकर्णमण्डले ।

अर्थ– हे महाभाग राजा, ऐक. गोकर्ण नावाचे सुंदर व महापातकांचा नाश करणारे एक क्षेत्र प्रसिद्ध आहे. त्या ठिकाणी मोठ्यांत मोठे पापही शिल्लक राहू शकत नाही. कारण, तिथे पापांचा संहार करणारा शिवच प्रत्यक्ष वास करीत असतो. ज्याप्रमाणे कैलास व मंदार या पर्वतांवर शिवाचा सतत वास असतो, त्याचप्रमाणे तो गोकर्ण क्षेत्रातही असतो.

याशिवाय शिव पुराण (अध्याय ७), वायू पुराण (अ. २३ व ७७) इ. ठिकाणीही या क्षेत्राची महती सांगितली आहे.

गोकर्णाबद्दलचा पहिला ऐतिहासिक व विश्वसनीय उल्लेख इ. स. च्या ८ व्या शतकाच्या मध्यातला आहे. दुसऱ्या कदंब राजघराण्याचा प्रस्थापक मयूरवर्मा याने गोकर्णाच्या राजकुमारास आपली बहीण दिली, असे त्यात सांगितले आहे. इ. स. १५०८ साली विजयनगरच्या कृष्णराय या सम्राटाने गोकर्णाची यात्रा करून तिथे आपली सुवर्णतुला केली, असे एका पोर्तुगीज लेखकाने लिहून ठेवले आहे. इ. स. १६६५ मध्ये छत्रपती शिवाजीमहाराजही गोकर्ण क्षेत्री गेले होते, असा उल्लेख आहे.

इथल्या महाबळेश्वराच्या मंदिरातील आत्मलिंग भूमिगत आहे. पिंडीच्या मध्यभागी एका खळग्यात आंगुळभर लांब आणि तितकेच उंच असे हे आत्मलिंग आहे. बाकीचा विस्तार भूमिगत असल्याचे सांगतात. चाळीस वर्षांच्या मुदतीने इथे ‘ अष्टबंध महोत्सव ’ होतो. त्या वेळी वरची पिंडी काढून त्या जागी नवी बसवली जाते. पिंडी काढली, की आत्मलिंगाचा वराचसा भाग दिसतो व त्यावर रावणाच्या बोटाचे ठसेही दिसतात, असे सांगतात. प्रत्येक अमावास्येला व सोमप्रदोषाच्या रात्री इथे दिवाळीप्रमाणे रोषणाई करतात. या मंदिराची रचना द्राविड पद्धतीची आहे. याचे शिखर साधारणपणे ६० फूट उंचीचे आहे. सभामंडप ६० × ४० फूट इतका आहे. सभोवती अग्रशाळा आहेत. देवासमोरच्या चंद्रशाळेचे बांधकाम अर्धवटच पडलेले आहे. हे मंदिर जक्कणाचार्य नावाच्या वास्तुशास्त्रज्ञाने बांधल्याचे सांगतात.



कोटितीर्थ

याशिवाय या क्षेत्रात गणपती व ताम्रगौरी यांची मंदिरे असून, कोटितीर्थ नावाचे एक मोठे कुंडही आहे. ज्या डोंगराच्या पायथ्याला गोकर्ण वसले आहे, त्या शतशृंग डोंगरावरही अनेक ऋषि-मुनींची तपःस्थाने आहेत. [ती. म. भाग २; गोकर्णधोम-महाबळेश्वर यात्रा; हिं. क. को.]

(२) वैवस्वत मन्वंतराच्या सातव्या वाराह कल्पातील शिवाचा अवतार. काश्यप, उशना, च्यवन व बृहस्पती हे त्याचे चार पुत्र होत. [प्रा. च. को.]

गोकर्णेश्वर

हे स्थान ओडिसातल्या कटक जिल्ह्यातील जजपूर विभागामध्ये आहे. इथे गोकर्णेश्वराचे एक लहानसे मंदिर ब्राह्मणी नदीच्या तीरावर आहे. हे देवालय ओडिसातल्या अत्यंत प्राचीन देवालयांपैकी एक आहे. इथून नजीकच एका वटवृक्षातळी विष्णूची सहा फूट उंचीची मूर्ती आहे. [हि. जॉ. ए. इं.]

गोकुल (जन्म १७७८ इ. स.) एक पंडित. मिथिला देशातल्या मगरौणी गावात याचा जन्म झाला. दीधितिविद्योत, न्यायसिद्धान्ततत्त्व, पदवाक्यरत्नाकर, मासमीमांसा, मिथ्यात्वनिरुक्ती, रश्मीचक्र, रसमहार्णव, लाघवगौरवरहस्य व शिवशतक असे याचे नऊ ग्रंथ उपलब्ध आहेत. [श. क.]

गोकुलनाथ (जन्म इ. स. १७६३) एक हिंदी ग्रंथकार. हा काशीत राहत होता. हिंदीचा प्रसिद्ध कवी रघुनाथ बंदीजन याचा हा पुत्र होय. काशीनरेश उदितनारायणसिंह याच्या आदेशानुसार गोकुलनाथाने महाभारत व हरिवंश या ग्रंथांचा पद्यमय सुरस हिंदी अनुवाद केला. या कामी त्याला गोपीनाथ व मणिदेव या कवींनी साहाय्य केले. या अनुवादात विविध छंद योजलेले असून, त्याची भाषा सरळ व सरस आहे.

याशिवाय गोकुलनाथाने चेतचंद्रिका, राधानखशिख, नामरत्नमाला (कोश), सीतारामगुणार्णव, राधाकृष्णविलास, अमरकोष (भाषा) व कविमुखमंडल हे ग्रंथ रचले आहेत. या ग्रंथांवरून त्याच्या बहुमुखी प्रतिभेची साक्ष पटते. यांपैकी चेतचंद्रिका व कविमुखमंडल हे अलंकारग्रंथ असून, सीतारामगुणार्णव हा अध्यात्मरामायणाचा अनुवाद आहे. [हिं. सा. को.]

गोकुलप्रसाद बृज (जन्म इ. स. १८२०) एक हिंदी ग्रंथकार. बलरामपूर येथे याचा जन्म झाला. याच्या पित्याचे नाव माईलाल असे होते. गोकुलप्रसादाला हिंदी, फारसी व संस्कृत या भाषांचे चांगले ज्ञान होते. त्याचप्रमाणे त्याला नेपाळी, पंजाबी व द्राविड भाषाही अवगत होत्या. अध्ययन पूर्ण झाल्यावर याने बलरामपूरच्या राजाची नोकरी धरली. याचे कवित्व पाहून राजाने त्याला दरबारात बोलावले व आपल्या खाजगी पत्रव्यवहाराचे काम त्याच्याकडे दिले. या कालात त्याने पुष्कळ काव्यरचना केली.

याने अष्टयामप्रकाश, दूतीदर्पण, दिग्विजयभूषण, नीतिरत्नाकर, चित्रकलाधर, पंचदेवपंचक, नीतिमार्तण्ड, सुतोपदेश, वामविनोद, गद्दीप्रकाश, कृष्णदत्तभूषण, अचलप्रकाश, इ. एकवीस ग्रंथ लिहिले आहेत. [हिं. सा. को.]

गोकुळ उत्तर प्रदेशातल्या मथुरा जिल्ह्यातील एक गाव. व्रजमंडलातील अनेक क्षेत्रांपैकी हे एक आहे. श्रीकृष्णाला जन्मत:च गोकुळात नेले गेले आणि तेव्हापासून गोकुळाचा महिमा वाढला. गोकुळ हे गोपांचे गाव होते. नंद गोप हा तिथला प्रमुख होता. त्याच्याच घरी श्रीकृष्ण लहानाचा मोठा झाला. पूतनावध, यमलार्जुनउद्धार, इ. बाललीला श्रीकृष्णाने गोकुळातच केल्या. भागवत पुराणाच्या दशमस्कंधात गोकुळ, गोप, गोपी आणि गोधन यांचे रम्य वर्णन आहे.

सर्व वैष्णव संप्रदायांत गोकुळाला फार मोठा मान आहे. गोकुळ म्हणजे प्रियधाम असेच समस्त वैष्णव संतांनी मानले आहे. श्रीकृष्णाला मथुरेत न्यायला आलेला अक्रूर गोकुळात प्रविष्ट होताच भक्तिप्रेमाने विव्हल होऊन तिथल्या धुळीत लोळला (भाग. पु. १०. ३८. २६). उद्धव गोकुळात आला असता त्याला वाटले, की इथल्या ओषधी–वनस्पतींपैकीच आपणही एक बनावे (भाग. पु. १०. ४७. ६२).

बहुतेक वैष्णव संतांनी गोकुळाचे माहात्म्य वर्णिले आहे. 'गोकुळीच्या सुखा अंतपार नाही देखा' असेच सकल संतांचे सांगणे आहे.

एकनाथमहाराज गोकुळीच्या राज्याबद्दल अभंग लिहितात–

धन्य भाग्य गोकुळीचे राज्य ।
जेथे क्रीडा केली यादवराजे ।।
काय ते वानूं सुख आनंदु ।
सुख संतोष गोकुळीं परमानंदु ।।
एकाजनार्दनीं जगाचें जीवन ।
मूर्ति पाहतां दिसे सगुण निर्गुण ।।

(एक. गाथा २९६)

सूरदास या परम भागवताने गोकुळाला पुढील पद्याच्या द्वारे धन्य धन्य म्हटले आहे–

धनि ब्रज कृष्ण जहाँ वपुधारी ।
धनि यशुमति ब्रह्महि अवतारी ।
धन्य नंद धनि धनि गोपाला ।
धन्य धन्य गोकुल की बाला ।।

अर्थ– जिथे देहधारी कृष्ण लीला करतो, ते व्रज धन्य होय. ब्रह्माचा अवतार श्रीकृष्ण, यशोदा, नंद, गोपाल व गोकुळातल्या बाला (गोपी) सारे सारे धन्य होय.

गोकुळ हे वल्लभसंप्रदायाचे एक प्रमुख केंद्र आहे. सांप्रत इथे या संप्रदायाच्या २४ हवेल्या आहेत. त्या हवेल्यांचा प्राचीन भक्त व आचार्य यांच्याशी संबंध होता. औरंगजेबाच्या काळापर्यंत वल्लभसंप्रदायाचे सर्व पूज्य ठाकूर इथे राहत होते आणि दूरदूरच्या कृष्णभक्तांना गोकुळाकडे आकर्षीत होते.

गोकुळातील वर्तमान दर्शनीय स्थलांत वल्लभाचार्यांची बैठक, गोकुलनाथाची बैठक, गोविंदघाट, वल्लभघाट, गोकुलनाथाचे मंदिर, व्रजराजाचे मंदिर, इ. स्थळे प्रसिद्ध आहेत. रमणरेती व ब्रह्मांडतीर्थ ही गोकुळातली पवित्र तीर्थे होत. पाहा– व्रजमंडल. [हिं. सा. को.; ब्रज और ब्रजयात्रा]

गोकुळाष्टमी श्रावण कृ. अष्टमी. कृष्णजयंती पाहा.

गोकुळाष्टमी नवरात्र कित्येक देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण-समाजात गोकुळाष्टमीचे नवरात्र असते. श्रावण वद्य प्रतिपदेला ते सुरू होते व नवमीला पारणे झाल्यावर संपते. या नवरात्रात भागवतसप्ताहाचे विशेष महत्त्व आहे. या अवधीत संपूर्ण भागवत वाचणे न जमल्यास निदान त्याचा दशमस्कंध तरी वाचतात किंवा श्रवण करतात. याशिवाय अखंड नामसप्ताह, कीर्तन व मंडारा हेही कार्यक्रम या दिवसांत असतात. लक्ष्मी–नारायण, गोपाळकृष्ण, मुरलीधर, विठ्ठल, इ. देवांच्या मंदिरात हे नवरात्र साजरे होते. शेवटी गोपाळकाला होतो. [दे. ऋ. ब्रा. प. ग्रं.]

गोखले, गोपाळ कृष्ण (१८६६–१९१५ इ. स.) थोर हिंदी राजकीय पुढारी. यांना म. गांधी आपले गुरू मानीत. यांची बुद्धिमत्ता व स्मरणशक्ती अतिशय तीव्र होती. ते वयाच्या १९ व्या वर्षी पदवीधर झाले आणि लगेच डेक्कन एज्युकेशन सोसायटीत प्राध्यापकाचे काम करू लागले. ते गणित, इंग्रजी, इतिहास व अर्थशास्त्र हे विषय शिकवीत असत. इंग्रजी भाषेवर त्यांचे विलक्षण प्रभुत्व होते.



श्री. गोपाळ कृष्ण गोखले

इ. स. १८८७ पासून ते सार्वजनिक सभेचे काम करू लागले. इ. स. १८९५ साली पुण्यास भरलेल्या राष्ट्रीय सभेचे ते चिटणीस होते. इ. स. १८९६ मध्ये वेल्बी कमिशनपुढे त्यांनी भारतातर्फे जी साक्ष दिली, त्या साक्षीत त्यांची विशाल बुद्धिमत्ता, सखोल ज्ञान, हजरजबाबीपणा, इ. गुण प्रकर्षाने चमकले. इ. स. १८९९ ते १९०२ या काळात त्यांनी मुंबई कायदे कौन्सिलात काम केले. त्यानंतर फिरोजशहा मेथा यांनी वरिष्ठ कायदे कौन्सिलातील आपली जागा गोखल्यांना दिली. तिथे त्यांनी सतत ११।१२ वर्षे काम केले. कायदे कौन्सिलातील त्यांची भाषणे खूपच गाजली.

इ. स. १९०५ साली वाराणसी येथे भरलेल्या राष्ट्रीय सभेचे ते अध्यक्ष होते. त्याच वर्षी त्यांनी सर्व्हंटस ऑफ इंडिया सोसायटीची (हिंद सेवक समाज) स्थापना केली. शिक्षणप्रसार, दलितांची सेवा व उद्धार, दुष्काळनिवारण, हिंदु–मुसलमानांचे ऐक्य, इ. कार्ये करणे हे हिंद सेवक समाजाचे उद्दिष्ट आहे.

न्या. रानडे यांनी सुरू केलेली सनदशीर चळवळच गोखले यांनी पुढे चालवली. रानड्यांची राष्ट्रीय पुनरुत्थानाची कल्पना गोखल्यांनी आकाराला आणली. त्यांच्या मवाळ राजकीय धोरणावर लो. टिळक नेहमी जहाल टीका करीत. पण गोखले यांनी आपला सनदशीर मार्ग कधीही सोडला नाही. [म. प.; सो. इं. ट्रं.]

गोचरफल गो = नक्षत्रे किंवा ग्रह, चर = संचार. यावरून सूर्यादी नवग्रहांच्या संचाराने अर्थात दैनंदिन भ्रमणाने जे फळ मिळते, त्याला जातकशास्त्रात गोचरफल असे म्हटले आहे. याविषयी मुहूर्तमार्तण्डाचा श्लोक असा –

स्वर्क्षाच्चन्द्रखलास्त्रिखारिषु शुभाः सप्ताद्य गोऽब्जः पुन
श्चापुत्राद्व्ययधर्ममृत्युषु कविः स्वास्तत्रिकोणे गुरुः ।।
सौम्यो व्यन्त्यसमेऽखिला भवगताः शुक्ले नवेषुद्विगश्चन्द्रः ।
... ...

अर्थ – जन्मराशीपासून चंद्र व पापग्रह ३, १०, ६ या स्थानी असता शुभ जाणावे. चंद्र ७, १ या स्थानी; शुक्र १, २, ३, ४, ५, ८, ९, १२ या स्थानी; गुरु २, ७, ९, ५ या स्थानी; व बुध २, ४, ६, ८, १०, या स्थानी शुभ होय. ११ या स्थानी सर्व ग्रह व शुक्ल पक्षातील ९, ५, २ या स्थानी चंद्र शुभ समजावा.

गोचर भ्रमणाने राशीत आलेला ग्रह कोणत्या काळी इष्टानिष्ट फळ देतो ते पुढे दिले आहे–

रवी— राशीत आल्यापासून पहिले १० दिवस
चंद्र— ,, ,, शेवटच्या ३ घटींत
मंगळ— ,, ,, पहिले १५ दिवस.
बुध— ,, ,, सगळे दिवस.
गुरू— ,, ,, मध्यकाळात.
शुक्र— ,, ,, मध्य काळांत
शनी— ,, ,, शेवटच्या ६ महिन्यांत.

राहू—केतूंच्या फळाबद्दल विशिष्ट काळ सांगितलेला नाही.

गोचर फलादेश — गोचरभ्रमणाने कोणता ग्रह कोणत्या स्थानी आला असता कोणते शुभाशुभ फळ देतो, त्याचे कोष्टक

ग्रह	रवि	चंद्र	मंगळ	बुध	गुरु	शुक्र	शनि	राहु	केतु
१ ला	स्था. ना	अन्नला.	शत्रुभय	बंधन	भय	शत्रुना	भय	हानि	रोग
२ रा	भय	धनना	धनना.	धनला	धनला	धनला	धनना	धनना	वैर
३ रा	श्रीः	सुख	धनला.	शत्रुभय	क्लेशकर	सौख्य	ऐश्वर्य	धनला	सुख
४ था	मानभं.	रोग	शत्रुभय	पशुला	धनला	धनला	शत्रुभ	वैर	भय
५ वा	दैन्य	कार्यना.	धनला	सुख	सुख	पुत्रला	पीडा	शोक	सुख
६ वा	विजय	धनला	धनला	स्था. ला	शोक	शत्रुभ	धनला	श्रीः	धनला
७ वा	मार्ग	स्त्रीलाभ	द्रव्यना	पीडा	राजमा	शोक	दोप	कलह.	गमन
८ वा	पीडा	रोग	शत्रुभय	धनला	मृ.स.पी	धनला	पीडा	मृत्यु	रोग
९ वा	सुकृतना	राजभय	शत्रुपी	पीडा	सौख्य	वस्त्रला	धर्मक्षय	दुरित	पाप
१० वा	सिद्धि	सौख्य	शोक	सौख्य	दैन्य	दुःख	दौर्मन	वैर	शोक
११ वा	धनला	धनला	धनला	धनला	धनला	धनला	धनला	सुख	कीर्ति
१२ वा	द्रव्यना	धनक्षय	धनक्षय	धनना	पीडा	धनला	धनना	शोक	शत्रुभ

श्री. य. के. प्रधान यांच्या बालबोध ज्योतिष या पुस्तकावरून

गोचर्म गायीचे कातडे. विशिष्ट कर्मासाठी विशिष्ट चर्मांची आसने सांगितली आहेत, त्यांत स्तंभनकासाठी गोचर्माचे आसन सांगितले आहे (समयाचारतंत्र २). गोचर्माचे दान दिल्याने स्वर्गाची प्राप्ती होते, असे मिताक्षरेच्या आचाराध्यायात सांगितले आहे.

गोटुल कित्येक आदिवासी जमातींतल्या तरुण मुलामुलींचे सामुदायिक शयनगृह. गिटिओर, घुमकुरिया, जोंकरपा, धनगर, बासा, मोरुंग, रंगबंग अशी याची जमातीपरत्वे भिन्न भिन्न नावे आहेत.

मुंडांच्या खेड्यातील सर्व अविवाहित तरुण रात्रीच्या वेळी एका स्वतंत्र झोपडीत झोपतात; तर अविवाहित तरुण मुली एखाद्या अपत्यहीन दांपत्याच्या किंवा विधवा स्त्रीच्या घरात झोपतात.

उरांव तरुण आपल्या खेड्याच्या सरहद्दीवर बांधलेल्या धुमकुरियात झोपतात. मुलींसाठी त्यांचे वेगळे शयनगृह असते. एखाद्या वेळी असे निराळे गृह उपलब्ध नसल्यास, गावातील विधवांच्या घरांत मुलींना झोपण्यासाठी पाठवतात.

छत्तीसगडमधील गोंडांच्या खेड्यांतून एक मोठे घर बांधलेले असते. रात्रीच्या वेळी गावातील तरुण मुले व मुली तिथे जमतात, नाचतात, गातात व दमल्यावर तिथेच झोपतात. काही गावांत मुलांसाठी व मुलींसाठी वेगवेगळी शयनगृहे असतात.

मेमींच्या काही खेड्यांत मुलामुलींसाठी एकच शयनगृह असते. बस्तरमधील मुडिया आणि माडिया गोंडांचे गोटुल गावाबाहेर असते. तिथे मुले व मुली जमून खेळतात, गातात व नृत्य करतात. मुडिया लोकात मुलामुलींसाठी एकच गोटुल असते. या खेड्यांत निरनिराळ्या गोत्रांतील लोक राहतात. त्यामुळे गोटुलात राहणाऱ्या मुलामुलींच्या मैत्रीची परिणती विवाहात झाली, तरी हरकत नसते. बस्तरमधील नारायणपूर आणि कोंडगाव येथील मुडियांच्या गोटुलसंस्था फार प्रगत आहेत.

उरांवांच्या धुमकुरियात लहान मुले मोठ्या मुलांची सेवाचाकरी करतात. ती त्यांचे हातपाय चेपतात व केसही विंचरतात. गोंडांच्या गोटुलात जिथे मुले व मुली एकत्र असतात, तिथे हेच काम मुली करतात. संध्याकाळी जेवण झाल्यावर मुली गोटुलात येतात. तिथे आल्यावर त्या प्रथम गोटुलप्रमुखाला अभिवादन करतात. नंतर प्रत्येक मुलगी एकेका मुलाचे हातपाय चेपते.

बस्तरमधील मुडिया गोटुलप्रमुखाला सरदार आणि त्यातील विशेष समारंभांच्या व्यवस्थापकाला कोटवार अशी नावे आहेत. याशिवाय गोटुलात इतरही अधिकारी असतात.

नारायणपूरच्या गोटुलातील प्रमुख अधिकाऱ्यांना सलाउ, बैधर, सिलदर व कोटवार अशी नावे आहेत. सलाउ हा गोटुलप्रमुख असून, गोटुलातील सर्व घटनांना तो जबाबदार असतो. गोटुलाची स्वच्छता व शेकोटीसाठी मुलामुलींकडून लाकडे गोळा करून घेणे, ही कामे बैधराची असतात. सिलदराने मुलामुलींना गोटुलातील कार्यक्रमांची माहिती द्यायची असते, त्यांची हजेरी ठेवायची असते व त्यांच्या वर्तणुकीची सलाउला

माहिती पुरवायची असते. गोंटुलाचे काही काम निघाल्यास कोटवार त्यातील मुलामुलींना बोलावून आणण्याचे काम करतो.

या सलाउला काही विशेष सवलती असतात. गोटुलातील एखाद्या मुलीवर त्याला प्रेम करता येते व तसे उघड सांगताही येते. गोटुलातील दुसऱ्या मुलाला मग तिच्यावर प्रेम करता येत नाही. सलाउच्या प्रेयसीलाही इतर मुलींपेक्षा जास्त सवलती मिळतात. सलाउचे लग्न झाले, की त्याला गोटुलातून बाहेर पडावे लागते. मग नव्या सलाउची निवड होते. ही निवड एकमताने करतात. गोटुलातील व्यक्तीचे एकदा लग्न झाले, की तिला गोटुलात प्रवेश मिळत नाही. विधवा व विधुर यांना मात्र त्यांची इच्छा असल्यास गोटुलात प्रवेश मिळतो. गोटुलातील मुलाचे किंवा मुलीचे लग्न झाल्यावर त्या नव्या दांपत्याला गोटुलात एक रात्र घालवावी लागते व नंतरच त्यांचे लग्न पूर्ण झाले, असे समजतात.

मुडियांच्या गोटुलावर त्या जमातीची काही सत्ता नसते. पण गावाला काही मदत लागल्यास गोटुलप्रमुखाच्या संमतीने काही थोडया मोबदल्यावर गोटुलातील मुले गावकऱ्यांना मदत करतात.

सर्वसाधारणपणे वन्य जमातींची शयनगृहे जंगलात असतात किंवा गावापासून दूर तरी असतात. त्यामुळे ती प्रवासी लोकांच्या दृष्टीस पडत नाहीत. उराँवांची शयनगृहे मात्र गावाच्या मध्यभागी किंवा ग्रामप्रमुखाच्या घराशेजारी असतात. ही शयनगृहे चारी बाजूंनी बंद असून, आत जाण्यासाठी त्यांना फक्त एक लहान वाट ठेवलेली असते आणि तिच्यातून सरपटतच आत जावे लागते. गोटुलात सर्वत्र अंधार असतो.

गोटुलसंस्था ही त्या जमातीची शिक्षणसंस्थाच असते. जीवनावश्यक अशा सर्व गोष्टींचे शिक्षण गोटुलात दिले जाते. शेतीची निरनिराळी कामे, शिकार, मध गोळा करणे, इ. व्यवसायांचे शिक्षण त्यांना गोटुलातच मिळते. हे शिक्षण नृत्यातील निरनिराळ्या हालचालींच्या व हावभावांच्या द्वारे दिले जाते; तर जमातीची शिस्त, सामाजिक न्याय, परोपकार व पापपुण्याच्या कल्पना या गोष्टी निरनिराळ्या कथा, आख्याने व दंतकथा सांगून त्यांच्या मनावर बिंबवल्या जातात.

पण प्रस्तुत शयनगृहात दिले जाणारे महत्त्वाचे शिक्षण म्हणजे लैंगिक शिक्षण होय. नृत्यातील हावभावांच्या द्वारे, गोष्टीतील वर्णनाच्या रूपाने किंवा काही वेळा प्रत्यक्ष कृतीने त्याचे धडे दिले जातात.

मुडियांच्या मोठ्या गावात अनेक गोटुले असतात. तिथल्या तरुणांची मुलींना आपल्याकडे आकृष्ट करून घेण्यासाठी स्पर्धा चालते. त्यांपैकी ज्या गोटुलातील तरुण आकर्षक व हरहुन्नरी असतात, त्या गोटुलाकडे स्वाभाविकच मुली आकृष्ट होतात.

गोटुलात राहणाऱ्या मुलांचे वय साधारणपणे पंधरा वर्षांच्या पुढे असते. आणि वयोमानानुसार त्यांचे गट पाडलेले असतात.

उराँवांचे धुमकुरिया म्हणजे एक मोठी चौकोनी खोली असते. खोलीच्या भिंती मातीच्या असून, वर कौलांचे किंवा केंबळी छप्पर असते. त्यात ताडपत्र्या पसरून आणि गवताचा भारा उशाला घेऊन मुले झोपतात. शयनगृहाला लागूनच गावाचे नृत्यांगण असते.

उराँव मुले साधारणपणे अकरा बारा वर्षांची झाली, की शयनगृहात झोपायला जाऊ लागतात. दर तिसऱ्या वर्षी पौष पौर्णिमेला मुलांची शयनगृहात भरती करतात. शयनगृहावर एक प्रमुख अधिकारी असतो, त्याला धंगर महतो असे म्हणतात. तो सर्व मुलांवर देखरेख ठेवतो. त्याला दुसरा एक मदतनीस असतो. आसपासचे सभ्य पुरुष व वृद्ध स्त्रिया एकत्र जमून या अधिकाऱ्यांची निवड करतात. गावातील जत्रेच्या आणि नृत्यांच्या वेळी मुलांनी आकर्षक वेशभूषा केली आहे किंवा नाही; फुलांनी, पिसांनी शरीर सजवले आहे किंवा नाही यावर तो मदतनीस देखरेख ठेवतो. मुलांनी गैरवर्तन केल्यास प्रमुख अधिकारी त्यांना चाबकाने फोडून काढतो. धुमकुरियात काही अडचण उद्भवल्यास तो ग्रामप्रमुखांचा सल्ला घेतो.

शयनगृहात नवीन मुले भरती झाल्यावर पंधरा दिवसांनी जुनी मुले चंडीची पूजा करतात व बकरा मारून खातात. त्याच रात्री नवीन भरती झालेली मुले विवस्त्र अवस्थेत रानात जातात आणि झऱ्याचे पाणी घेऊन येतात. शयनगृहाची स्वच्छता ठेवणे, रानातून फळे गोळा करून आणणे, मोठ्या मुलांचे हातपाय रगडणे व गावात कोणाच्या घरी लग्नकार्य निघाल्यास त्या घरच्या पाहुण्यांचे हातपाय चेपणे, इ. कामे त्यांना करावी लागतात.

गुरांवर एखादा रोग आल्यास, तो आणणाऱ्या भुताखेताला पळवून लावण्याचे कामही या शयनगृहातील मुलांनाच करावे लागते. गुरांत रोगाची साथ सुरू झाली, की एका रात्री सर्व गावकरी आपल्या घरापुढे एक दोन मातीची भांडी ठेवून रात्री लवकर झोपी जातात. मध्यरात्री शयनगृहातील सर्व तरुण नग्न होऊन गावातील गोवाऱ्याबरोबर बाहेर पडतात, गुरांसारखे हंबरत गुराख्याचा पाठलाग करीत धावतात आणि त्या वेळी घरापुढे ठेवलेली मातीची भांडी फोडतात.

धुमकुरियातल्या मुली दरवर्षी श्रावण महिन्यात जमिनीवर वाळू पसरून तिच्यात जव पेरतात. रोज रात्री त्या पेरलेल्या धान्याला पाणी घालतात आणि करमा उत्सवापर्यंत रात्री गाणी गात अंकुर उगवण्याची वाट बघत बसतात. उत्सवाच्या दिवशी

ते अंकुरलेले जव गावातल्या तरुणांना वाटतात. मार्गशीर्ष महिन्यात सर्व मुली डोक्यावर खाद्यपदार्थांचे घडे घेऊन ढोलाच्या साथीवर नाचत नाचत गावात फिरतात. बारा वर्षांनी एकदा या मुली गावातील इतर सुवासिनींबरोबर शिकारीला जातात.

आदिवासी समाजात ही सामुदायिक शयनगृहे निर्माण झाली, त्या मागची काही संभाव्य कारणे संशोधकांनी दिली आहेत, ती अशी—

सर्वसाधारणपणे भटक्या आणि शिकारी लोकांत ही पद्धत आहे. जंगली श्वापदांपासून आणि इतर टोळ्यांपासून स्त्रियांचे आणि गुरांचे रक्षण करण्यासाठी निष्णात धनुर्धरांना व शिकाऱ्यांना एकत्र ठेवण्याची गरज त्या समाजात निर्माण झाली असावी व पुढे त्यातूनच गावातील सर्व तरुण मुलामुलींना रात्रीच्या वेळी एकत्र ठेवण्याची कल्पना सुचली असावी. दुसरे कारण असे संभवते, की आदिवासी लोकांच्या झोपड्या फार लहान असतात. तिथेच एका बाजूला त्यांचे पाळीव पशू असतात. आईबाप व लहान मुले एवढीच माणसे त्या झोपडीत कशीबशी झोपू शकतात. मग मोठ्या मुलांनी कुठे झोपायचे, हा प्रश्न निर्माण होतो. अशा स्थितीत त्यांची सोय करण्यासाठी सामुदायिक शयनगृहांची कल्पना निघाली असावी. [एन्सा. मुं.; रे. क. इं.; इं. फो. लो. १९५९]

गोटुवाद्यम् द. भारतातील एक तंतुवाद्य. तमिळमध्ये कोडु याचा अर्थ काठी असा आहे. कोडु+वाद्यम्= कोट्टुवाद्यम् म्हणजे काठीने वाजवायचे वाद्य. त्याचेच पुढे गोटुवाद्यम् असे रूपांतर झाले.

गोटुवाद्यम्मध्ये पाच तारा वाजविण्याच्या व तीन तारा तालाच्या मिळून आठ तारा असतात. रुद्रवीणेप्रमाणे गोटुवाद्याला पडदे नसतात. लाकडाचा एक गोल व जाड तुकडा डाव्या हातात घेऊन तो तारांवर मागेपुढे फिरवतात व उजव्या हाताच्या बोटांनी किंवा तारेच्या नखीने तारा छेडतात. या वाद्यातून चार सप्तकांचे स्वर स्पष्ट काढता येतात.



गोटुवाद्यम्

या वाद्यावर द्रुतलय वाजविणे कठिण जाते. त्यामुळे या विलंबित संगीतच वाजवितात. या वाद्याला महानाटक वी असेही म्हणतात. गेय नाटकम् व नृत्य नाटकम् यांत या साथ असते. [डि. सा. इं. म्यु. म्यु.]

गोट्या लहान मुलांच्या खेळाचे एक साधन. यांना लखोट असेही म्हणतात. या गोट्या किंवा लखोट काचेच्या, दगडाच्या किंवा लाखेच्या बनविलेल्या असता गल्लीत किंवा वदीत गोटी टाकून किंवा दुसऱ्याच्या गोटी अट्टीने नेम मारून दहा अंक करायचे म्हणजे डाव होतो. अंक मोजण्याचे वाक्प्रचारही गमतीचे असतात. उदा. १=एक काजा, २=दुन्ने बाजा इत्यादी. कधीकधी दहाच्या पुढे म्हणतात ते असे – ११ = अकरंखेचे, १२ = वारं बेटे, १३ खाडी इत्यादी.

दुसऱ्याच्या गोट्या जिंकण्याच्या खेळास वदीचा खेळ म्हणतात. [सु. वि. को.]

गोडगुल द. भारतातील एक जात. हिला ओड्डु मेडर अ म्हणतात. हे लोक ओरिया भाषा बोलतात. बांबूच्या टोपल्या, रोवळ्या, सुपे, इ. वस्तू बनवितात. सामाजिक दर्जा निकृष्ट मानला जातो. त्याबद्दलची एक आहे, ती अशी––

देवाने गोडगुल लोकांना आपल्या पूजेसाठी सुपे, परा वगैरे वस्तू बनवायला सांगितल्या. या वस्तू तयार दिल्यावर ते एका लग्नाच्या जेवणावळीला गेले. तिथे मांस खाल्ले व दारूही घेतली. देवांना हे समजल्यावर गोडगुलांना ते निषिद्ध पदार्थ ओकायला लावले आणि पुढे वेतकाम करून उपजीविका करायला सांगितले.

विवाहप्रथा–मामेबहिणीशीच लग्न केले पाहिजे, असा लोकांत नियम आहे. मामाने आपली मुलगी द्यायची ना ल्यास तिला पळवून नेऊन वराला तिच्याशी लग्न कराय अधिकार असतो. याबद्दल त्याला जातपंचायतीने ठरवलेला भरावा लागतो. दंडाची काही रक्कम वधूच्या मातापि मिळते व उरलेली जातीच्या जेवणावळीत खर्च केली मामाला मुलगी नसल्यास आतेबहिणीशी लग्न करता लग्नाच्या आधी सहा महिने हळदीसमारंभ करतात. या वरपक्षाकडून वधूपक्षाला सहा रुपये मिळतात.

लग्नाच्या दिवशी वराचे आईबाप वधूच्या घरी जात वधूच्या आईवडिलांना नऊ रुपये व कापड देतात. म

मंडळी वधूसह वरगृही जातात. तिथे वधू-वरांना हळदीच्या पाण्याने स्नान घालतात आणि पुरोहित त्यांना जानवे घालायला देतो. त्यानंतर वधू–वर सात कवड्या घेऊन खेळतात. मग मुडू आकुल नामक होम होतो. या वेळी वधू–वरांसमोर एक दीपगर्भ घट ठेवतात. घटाच्या तोंडावर तीन प्रकारची पाने ठेवतात. त्या घटावर वधू–वर व त्यांचे पुरोहित आपले हात ठेवतात. मग मोठी माणसे जातीच्या लोकांना उद्देशून मोठ्याने सांगतात, की ही दोघे आता नवरा–बायको झाली आहेत. मग वधू-वरांनी एकमेकांवर अक्षता टाकल्यावर लग्न पुरे होते. दुसऱ्या दिवशी सकाळी वरपक्षाचे लोक गावातील नदीच्या तीरावर जातात. तिथे जातीचे सर्व लोक जमलेले असतात. त्यांना पानसुपारी, चिरूट व गूळपाणी देतात. विवाहसोहळा पुरा झाल्यावर पुरोहित वधू-वरांची जानवी काढून घेतो. [का. ट्रा. स. इं.]

गोडी राजस्थानातले एक नृत्य. यात तीन चार स्त्रिया भाग घेतात. हे नृत्य विवाहाच्या वेळी करतात. समाजातील सर्व थरांत हे नृत्य प्रचलित आहे. [रा. लो. नृ.]

गोड्ड द. कानडा जिल्ह्यातील एक लहानशी जात. हे शेतीवर जगतात. यांची मातृभाषा तुळू असून, यांच्यांत मातृसत्ताक वारसापद्धती चालते.

गोतम एक वैदिक ऋषी. रहूगणाचा पुत्र. ऋग्वेदात याची बरीच सूक्ते आहेत (१.७४–९३; ९.३१; ९.६७ इ.) याच्याविषयी पुढील दोन आख्यायिका प्रसिद्ध आहेत–

सरस्वतीच्या तीरावर वास्तव्य करीत असता विदेघमाथवाच्या मुखातून वैश्वानर अग्नी पृथ्वीवर पडला व सर्व जाळीत जाळीत तो पूर्व दिशेकडे जाऊ लागला. विदेघमाथव आपला पुरोहित गोतम याच्यासह त्याचा पाठलाग करीत निघाला. जाता जाता अग्नी सदानीरा नदीच्या तीरावर पोचला. पण त्याला त्या नदीच्या पलिकडे जाता येईना. मग विदेघमाथवाने अग्नीला विचारले, की ‘मी आता कुठे वास्तव्य करू ?’ त्यावर अग्नीने उत्तर दिले, की ‘या नदीच्या पूर्वेस तू राहा.’ विदेघ सदानीरेच्या पूर्वेस राहू लागला म्हणून त्या देशाला विदेह असे नाव पडले (श. ब्रा. १.४.१.१०.).

या कथानकाला ऐतिहासिक महत्त्व आहे. वैश्वानर अग्नी हा यागानुष्ठान किंवा वैदिक धर्म याचा प्रतिनिधी होय. त्याचे प्रथम स्थान सरस्वती मंडल हे होते. तिथून त्या अग्नीचा अर्थात यज्ञप्रधान आर्यसंस्कृतीचा पूर्वदिशेकडे विस्तार झाला. हे संस्कृतिविस्ताराचे काम विदेघमाथव आणि त्याचा पुरोहित गोतम यांनी केले, असे यावरून सूचित होते.

शतपथात गोतमाला विदेहराजा जनक व ऋषी याज्ञवल्क्य यांचा समकालीन मानले आहे (श. ब्रा. ११.४.३.२०). अथर्ववेदातही गोतमाचा दोन वेळा उल्लेख येतो (४.२९.६; १८.३ १६). या निर्देशांच्या आधारावर निश्चितपणे म्हणता येते, की भारताच्या पूर्वभागात आर्यधर्माचा विस्तार करणारा गोतम ऋषी हा एक तत्कालीन पूज्य पुरुष होता.

दुसरी आख्यायिका अशी – गोतमाला एकदा तहान लागून त्याचा जीव व्याकुळ झाला. पाण्यासाठी हिंडत असता त्याला एक विहीर दिसली. पण तिच्यातले पाणी फार खोल होते. त्या वेळी त्याने मरुतांचा धावा केला आणि मरुतांनी आपल्या अद्‌भुत शक्तीने विहिरीतले पाणी वर आणून गोतमाची तृषा शांत केली.

वामदेव व नोधा हे गोतमाचे पुत्र होत. ‘कृणुष्व पाजः’ हे रक्षोघ्न अग्नीचे सूक्त (ऋ. ४.४) गोतमाकडून वामदेवाला प्राप्त झाले (ऋ. ४.४.११).

प्रत्येक मंगल कार्यात म्हटला जाणारा पुढील स्वस्तिमंत्र गोतमाचाच आहे–

स्वस्ति न इन्द्रो वृद्धश्रवाः
स्वस्ति नः पूषा विश्ववेदाः।
स्वस्ति नस्तार्क्ष्यो अरिष्टनेमिः
स्वस्ति नो बृहस्पतिर्दधातु ॥

(ऋ. १.८९.६)

अर्थ – ज्याचा महिमा अतिशय वृद्धिगत झाला आहे असा इंद्र, सर्वज्ञ पूषा, ज्याच्या रथाच्या धावेला कुठेही निर्बंध नाही, असा तार्क्ष्य व बृहस्पती आम्हांस क्षेम अर्पण करो.

याचा अंगिरसाशी वारंवार संबंध येतो. ‘सत्कृत्ये व भक्ती यांच्या योगाने अंगिरसाने प्रथम अग्नी तयार केला, असे हा सांगतो (ऋ. १.८३-४). याची गौतम व भद्र नावाची सामे आहेत. या सामांनीच त्याला थोर पदवी लाभली (तां. ब्रा. १३.१२.६–८; १२.३.१४). गोतम हा एका स्तोमाचा कर्ता आहे. हा सप्तर्षींपैकी एक आहे. [ऋ. द.; वै. सा. सं.]

गोत्रचाटाविधी काही सारस्वत ब्राह्मणांमध्ये प्रचलित असलेला एक विवाहविषयक विधी. यात वरपक्षाकडील मंडळी वधूकडे भोजनासाठी जातात. त्या वेळी वधू त्या सर्वांना ओवाळते. तेव्हा प्रत्येकजण ओवाळणी म्हणून तिच्या तबकात काही पैसे किंवा दागिने घालतो. त्यानंतर वधू पहिल्या पानापासून शेवटपर्यंत तुपाची धार सोडीत जाते व त्या वेळी ती धार न तुटेल अशी दक्षताही घेते. [नवल–जून, १९५५]

गोत्रजदर्शन गुजरातेत लग्नाच्या वेळी वधू-वरांकडून गोत्रदेवतांचे म्हणजे कुलदेवतांचे पूजन करवितात. त्याला गोत्रजदर्शन असे नाव आहे. [ल. वि. सो.]

गोत्र-प्रवर ऋग्वेदात गोत्र शब्द अनेकदा आलेला आहे. तिथे या शब्दाचे गायीचा गोठा, गायींचा कळप, मेघ, पर्वतश्रेणी, पर्वतशिखर, किल्ला, इ. अनेक अर्थ होतात. काही ठिकाणी गोत्र शब्दाचा समूह असा अर्थही घेतलेला दिसतो. छांदोग्योपनिषदात कुटुंब या अर्थी गोत्र शब्द आलेला आहे (४.४.१). यावरूनच त्याचा पुढे एकाच वंशातले लोक असा अर्थ केला गेला. गो = भूमी व त्र = संरक्षक, यावरून भूमिसंरक्षक वर्ग असाही कोणी गोत्र शब्दाचा अर्थ करतात. त्यावरून आपल्या भूमीच्या बाहेरची म्हणजे दुसऱ्या गोत्रातील मुलगी करणे किंवा पळवून आणणे, हाच पुरुषार्थ होय, अशा कल्पनेमुळे गोत्राबाहेर लग्न करण्याची प्रथा रूढ झाली असावी. बौधायनाने गोत्र शब्दाचा खुलासा दिला आहे, तो असा–

> विश्वामित्रो जमदग्निर्भरद्वाजोऽथ गौतमः ।
> अत्रिर्वसिष्ठः कश्यप इत्येते सप्त ऋषयः ।।
> तेषां सप्तर्षीणामगस्त्याष्टमानां यदपत्यं तद् गोत्रमुच्यते ।
> गोत्राणां तु सहस्राणि प्रयुतान्यर्बुदानि च ।।

अर्थ – विश्वामित्र, जमदग्नी, भरद्वाज, गौतम, अत्री, वसिष्ठ व कश्यप हे सात व आठवा अगस्त्य या ऋषींच्या अपत्यांना गोत्र असे नाव आहे. अशी गोत्रे हजार, लाख, कोटचवधी आहेत.

या मूळ आठ ऋषींना गोत्रकृत्, गोत्रकार, वृद्ध, स्थविर किंवा वंश्य असे म्हटलेले आहे. पुन्हा या प्रत्येक ऋषीच्या वंशात काही विशेष कर्तबगार पुरुष निपजले आणि त्यांच्या नावावरूनही त्या वंशाचे नाव प्रसिद्ध झाले. मग त्या पुरुषांची गणना मूळ गोत्रातच; पण स्वतंत्र गोत्रकर्ता म्हणून होऊ लागली. उदा० अंगिरस गोत्रात उत्पन्न झालेल्या कपी व बोध यांच्या नावावरून नवीन गोत्रे सुरू झाली. क्वचित पिता अज्ञात असेल, तर मातेच्या नावानेही गोत्र प्रसिद्ध होत असे. अशा रीतीने एका मूळ गोत्रात पुढे पुढे अनेक कीर्तिमान गोत्रकार उत्पन्न झाले. मग त्यांना गोत्रगण असे म्हणू लागले. अशा प्रकारे मूळ आठ गोत्रे व प्रत्येकाच्या अंतर्गत उत्पन्न झालेल्या गोत्रगणांची सूची प्राचीन काळी तयार करण्यात आली. बौधायन श्रौतसूत्राच्या शेवटी अशी एक मोठी सूची दिलेली आहे, तिला महाप्रवरकांड असे नाव आहे.

जेव्हा एखाद्याला एकाच पुरुषापासून आपला अखंडित वंशवृक्ष सांगता येतो, तेव्हा तो त्या गोत्रातील आहे, असे समजतात. जेव्हा एखादा पुरुष आपण जमदग्नी गोत्राचा असल्या सांगतो, तेव्हा त्याला मूळ जमदग्नीपासून आपली अखंडि वंशपरंपरा सांगता येते, असा त्याचा अर्थ होतो. मूळ आ पुरुषांची जी अपत्ये त्यांना गोत्र आणि बाकीच्यांना गोत्रावयव असे म्हणतात. गौण अर्थाने गोत्र शब्द कुटुंबातील एखाद शूर, विद्वान किंवा श्रीमंत पुरुषाला लावतात आणि नंत त्याच्या वंशजांना त्या पुरुषावरून नाव मिळते. याला लौकि गोत्र असे नाव असून, ते क्षत्रियांमध्ये असते. या गोत्रांचे गणा विभाग केलेले असून, गणांचे पुन्हा पक्ष नामक विभाग असतात. उदा० वसिष्ठ गणाचे उपमन्यू, पराशर, कुंडिन आणि वसिष्ठ असे चार पक्ष आहेत. त्याचेही पुन्हा असंख्य पोटविभाग आहे

ब्रह्मविद्येचे पाठ देताना आचार्य शिष्यांना गोत्रनामां म्हणजे भारद्वाज, गार्ग्य, आश्वलायन, भार्गव, कात्यायन, इ नावांनी हाक मारीत असत, असे उपनिषदांवरून दिसते. याव रून ब्राह्मणे व उपनिषदे यांच्या काळात गोत्रपद्धती दृढमू झाल्याचे समजते. मात्र त्या काळी गोत्राचा संबंध विवाहा जोडलेला नसून, तो यज्ञ किंवा अध्ययन यांच्यापुरताच मर्यादित होता.

पण पुढे सूत्रकाळात गोत्राला अनेक बाबतीत महत्त्व प्रा झाले. उदा०–

(१) सगोत्रात म्हणजे समान गोत्रात लग्नसंबंध निषि मानला जाऊ लागला.

(२) बेवारशी माणसाच्या संपत्तीचा वारसा त्याच्या जवळच्या सगोत्राकडे जावा, असे ठरले.

(३) श्राद्धाचे ब्राह्मण शक्यतो यजमानाच्या गोत्राचे नसावे असा निर्णय देण्यात आला.

(४) प्रेताला उदक देताना त्याच्या गोत्राचा उच्चार करावा, असे ठरले.

(५) चौलकर्मात गोत्राच्या आणि कुटुंबाच्या रूढीप्रमा शेंडी ठेवावी असे ठरले.

(६) संध्या करताना स्वतःचे गोत्र, प्रवर, वेदशाखा व सूत्र यांचा उच्चार करावा, असे सांगितले गेले.

(७) श्रौतकर्मात यजमानाचे गोत्र व प्रवर यांचा उच्चार करावा, असे सांगितले गेले.

धर्मशास्त्रग्रंथ व पुराणे यांच्या गोत्रकल्पनेत मात्र फरक दिसतो. धर्मशास्त्रात ऋषींची म्हणजे पर्यायाने ब्राह्मणांची अपत्ये म्हणजे गोत्र होत, असे सांगितले आहे; तर पुराणांत क्षत्रिय राजे गोत्रकार होते व त्या क्षत्रिय गोत्रकार राजांच्या वंशात पुढे ब्राह्मण समाविष्ट झाले, असे म्हटले आहे. श्रीकृष्ण व पांडव ज्या सोमवंशांत जन्मले, त्याच्या एका शाखेत पुढे मधु

यद्दू, वृष्णी, इ. थोर पुरुष झाले. वृष्णीच्या नामावरून वृष्णी गोत्र उत्पन्न झाले. ‘क्षत्रियवैश्यौ तु पुरोहितगोत्रप्रवरौ’ = क्षत्रिय व वैश्य हे पुरोहिताच्या गोत्रप्रवराचे मानावे, हे धर्मशास्त्रातील वचन अलिकडचे आहे. त्याचा अर्थ क्षत्रियवैश्यांनी नेहमीच पुरोहिताचे गोत्र स्वीकारावे, असा नसून, ज्या वेळी त्यांना स्वतःच्या गोत्राचे विस्मरण होते, त्या वेळी त्यांनी पुरोहिताचे गोत्रप्रवर स्वीकारावे, असा आहे.

पूर्वी बटूचे उपनयन झाल्यावर तो गुरुगृही अध्ययनासाठी राहत असे. हल्लीचे पदवीधर जसे आपल्या विद्यापीठाची पदवी धारण करतात, त्याप्रमाणे पूर्वीचे स्नातक अध्ययनानंतर गुरुगोत्रे स्वीकारून, मी अमक्या तमक्या गुरूचा शिष्य आहे, असे सांगत. सांप्रत एका गोत्रातील लोक म्हणजे एका वंशातील लोक अशी समजूत आहे ती खरी नाही, हे यावरून कळून येईल.

प्रवरकल्पना – प्राचीन काळापासून प्रवराची कल्पना गोत्रकल्पनेशी निगडित झालेली आहे. प्रवर म्हणजे गोत्रांचेही पूर्वज होत. ते एक, दोन, तीन वा पाच असतात. एखाद्या गोत्राचे तीन प्रवर असले तर ते प्रपितामह, पितामह व पिता असे असतात, असे मानलेले आहे. तैत्तिरीय संहितेत प्रवरांचा उल्लेख आहे. त्यावरून असे दिसते, की त्या वेळचे आचार्य श्रौतकर्म करण्याच्या कोणत्यातरी संप्रदायात समाविष्ट होते. प्रवर शब्दातील वृ धातूचा अर्थ निवडणे, स्वीकारणे असा आहे. प्रवराला आर्षेय किंवा आर्ष असेही नाव आहे. आर्षेयवरण म्हणजे जे कर्मसंप्रदाय त्या वेळी होते, त्यांपैकी एकाचा स्वीकार करणे होय. त्यावरून प्रवर हा शब्द संप्रदाय–प्रवर्तक ऋषींच्या नावाचा वाचक असून ते संप्रदाय श्रौतकर्मासंबंधीचे होते, हे उघड आहे. गोत्र हा जसा विद्यावाचक शब्द आहे, तसा प्रवर हा कर्मसंप्रदायवाचक आहे. ‘ऋषिभिः आर्षेयं प्रवृणीते’ अशी वचने श्रौतसूत्रांत येतात, त्यावरून वरील अर्थाला बळकटी येते.

सूत्रकारांनी विशिष्ट गोत्रांचे विशिष्ट प्रवरऋषी सांगितलेले आहेत. उदा० पराशर गोत्राचे वसिष्ठ, शाक्त्य व पाराशर्य; कुंडिन गोत्राचे वसिष्ठ, मैत्रावरुण व कौंडिन्य आणि उपमन्यू गोत्राचे वसिष्ठ, भरद्वसू व इंद्रप्रमद हे प्रवर होत.

मंत्रद्रष्टच्या तीन ऋषींचे आवाहन करायचे असल्यामुळे प्रवर ऋषींची संख्या मर्यादित झाली आहे. असे एकूण प्रवर ४९ मानले आहेत.

एकार्षेया विशः वात्सप्रेति होता ।

(आपः श्रौ. सू. २४. १०. १६)

अर्थ – वैश्यांना वात्सप्र हा एकच प्रवर आहे.

बौधायनाच्या मते मात्र वैश्यांना भालंदन, वात्सप्र व मांक्तिल हे तीन प्रवर आहेत.

काही गोत्रांच्या प्रवरांविषयी सूत्रकारांत मतभेद आहेत. बौधायन सांगतो, की लौगाक्षी हे दिवसा वासिष्ठ आणि रात्री काश्यप असतात. त्यामुळे दिवसा व रात्री त्यांचे प्रवर बदलतात.

प्रवरांचा संबंध गृह्यकृत्यांशी जोडलेला असला, तरी मुख्यतः त्यांचा संबंध दर्श व पूर्णमास या इष्टींशी येतो. सामिधेनी ऋचांचे पठण झाल्यावर होता यजमानाच्या प्रवरांचा उच्चार करतो. हे प्रवर प्रपितामह, पितामह, पिता या क्रमाने उच्चारले जातात. त्यानंतर आज्याच्या आघार आहुती दिल्यावर अध्वर्यू पुन्हा एकदा यजमानाचे प्रवर व्युत्क्रमाने उच्चारतो.

प्रवरांचा गृह्यकृत्यांशी संबंध सांगता येतो, तो पुढीलप्रमाणे–

(१) वधूच्या व वराच्या पित्याचे प्रवर समान असता कामा नयेत.

(२) उपनयनाच्या वेळी बटूच्या प्रवरांच्या संख्येइतक्या त्याच्या मेखलेला गाठी माराव्या.

(३) चौलकर्मात शिखा ठेवताना मुलाच्या प्रवरांचा विचार करावा.

प्रवरसूत्रांत वेगवेगळ्या गोत्रांच्या प्रवरांची यादी दिलेली आहे. क्षत्रिय आणि वैश्य यांच्या प्रवरांचाही त्यात उल्लेख आहे. बौधायन, आपस्तंब, सत्याषाढ (हिरण्यकेशी), मानव व कात्यायन ही प्रवरसूत्रे छापलेली आहेत.

प्रवर म्हणजे त्या कुळातील पूर्वज ही कल्पना चूक असावी. प्रवर हे पिता, पुत्र व नातू यांची नामे दर्शवितात, असा समज आहे; पण तो बरोबर नाही. कुंडिन गोत्राचे प्रवर वसिष्ठ, मित्रावरुण व कुंडिन असे आहेत. यांच्यापैकी मित्रावरुण हा वसिंष्ठाच्याही पूर्वकाळचा आहे, असे प्राचीन वाङ्मयातच सांगितलेले आहे; तेव्हा तो त्याचा मुलगा होऊ शकणार नाही. भारद्वाज गोत्राचे प्रवर भारद्वाज, बृहस्पती व अंगिरस हे होत. यातील बृहस्पती व अंगिरस हे पितापुत्र नसून, भाऊ-भाऊ होते, असे ऐतरेय ब्राह्मणात म्हटले आहे. एका गौतम गणात उचथ्य, वामदेव, रहूगण व बृहदुक्थ अशा चार शाखा आहेत. या चारही गोत्रांचा पहिला प्रवर अंगिरस, दुसरा क्रमाने उचथ्य, वामदेव, रहूगण व बृहदुक्थ व तिसरा पुन्हा एकच म्हणजे गौतम आहे. चौघांचा पिता एकच असणे, यात काही वावगे नाही; पण चौघांचा मुलगाही एकच होता, हे म्हणणे कोणालाही पटणार नाही.

यावरून गोत्र व प्रवर यांनी रक्तसंबंध दर्शविला जातो हे खरे नसल्याचे कळून येईल. प्रवर हे कुलातील पूर्वज नसून, निरनिराळ्या वैदिक शाखांचे अध्वर्यू असावे. मुलगा दत्तक गेला म्हणजे त्याच्या गोत्राबद्दल जे नियम पाळायचे असतात

ते पाहिले, तर प्रवर हे रक्तसंबंधाचे नसून विद्येसंबंधीचे होते, असेच दिसते.

विवाहसंबंध – गोत्र व प्रवर यांचा मुख्यत्वे लग्न ठरविताना विचार केला जातो. सगोत्र विवाह म्हणजे एकाच गोत्रातील व्यक्तींचा विवाह धर्मशास्त्राने निषिद्ध मानलेला आहे. 'सगोत्राय दुहितरं न प्रयच्छेत् = समान गोत्रातील पुरुषाला कन्या देऊ नये,' असे आपस्तंब म्हणतो. सगोत्र विवाह केल्यास ती स्त्री चांडाळी व तिचा पुत्र चांडाळ होतो, असे काही स्मृतिकारांचे म्हणणे आहे. सगोत्र स्त्रीशी विवाह करणे, हे गुरुतल्पगमनाइतके वाईट कृत्य आहे, असे धर्मशास्त्रकारांचे मत आहे. त्याचप्रमाणे 'असमानप्रवरैर्विवाहः = ज्या कुलांचे प्रवर समान नाहीत त्या कुलात विवाह व्हावा,' असे गौतमसूत्रात म्हटले आहे.

सगोत्र विवाह का करू नये, याचे कारण ते पुढीलप्रमाणे देतात — वधू व वर या दोघांचे गोत्र एकच म्हणजे शांडिल्य असल्यास त्याचा अर्थ असा होतो, की या दोघांची कुळे सध्या कितीही दूरची असली, तरी शांडिल्य हा या दोघांचा एकच पूर्वज होता. आणि ज्या दोन व्यक्तींचे पूर्वज एकच आहेत, त्यांचा परस्पर लग्नसंबंध हा त्यांच्या प्रजेच्या दृष्टीने अगदी घातुक आहे.

सगोत्राप्रमाणेच आणखीही काही गोत्रांचे आपसात विवाह निषिद्ध मानलेले आहेत. जामदग्न्य व वत्स, बाभ्रव्य व कौशिक, वसिष्ठ व कौंडिन्य, इ. गोत्रांचे परस्परांशी पटत नाही. याचे कारण त्या दोन्ही गोत्रांचे सर्व प्रवर समान असतात किंवा एखादा तरी प्रवर समान असतो. आणि प्रवर याचा रूढ अर्थ गोत्रकाराचेही पूर्वज असा असल्यामुळे, जी सगोत्रांची अडचण तीच सप्रवरांचीही होते.

सगोत्र, सप्रवर व सपिंड विवाहाचा हा जो निषेध सांगितला आहे, त्याच्या मुळाशी पुढील तीन कल्पना गृहीत धरलेल्या आहेत —

(१) गोत्राचे नाव रक्तसंबंधामुळेच मिळालेले असते.

(२) प्रत्येक कुलाचे जे प्रवर सांगितलेले आहेत, ते त्या कुळातील पूर्वजच होत.

(३) कितीही पूर्वीच्या काळी दोन व्यक्तींचे पूर्वज एक होते असे ठरले, तर त्यांचा विवाह होणे, प्रजेच्या दृष्टीने घातुक आहे.

ऐतिहासिक आणि शास्त्रीय पद्धतीने या गृहीत गोष्टींचा विचार केला असता असे दिसून येईल, की या तीन्ही गोष्टी असिद्ध आहेत आणि त्यामुळे त्यांचा निषेध मानण्याचे कारण नाही.

वेदकाळी सगोत्र विवाहाचा निषेध नव्हता; कारण त्या काळात गोत्रे व प्रवर हीच निश्चित झालेली नव्हती. ब्राह्म काळात प्रथमच ती निश्चित झाली. समाज लहान अस तेव्हा व्यक्तीचे एकच नाव उल्लेखाला पुरेसे असते. पण समा मोठा होऊन व्यवहार वाढला, म्हणजे निश्चितीसाठी कुलनां देण्याची चाल पडते. अशीच परिस्थिती ब्राह्मणकाळी निर्मा होऊन गोत्रनामे प्रचारात आली. गोत्रे ही आडनावाप्रमाणे असून आडनावाप्रमाणेच तीही निवासस्थान, धंदा, अध्यय पद्धती, शाखा, धार्मिक मते, काही विशेष कर्तबगारी, इत्या वरून बनलेली असतात. गांधार, खांडव, गोदायन, सैंध पांचाल, इ. गोत्रनामे देशावरून पडलेली आहेत. फडणीस, जो कुलकर्णी, पुणेकर, इ. उपनामे व्यवसाय किंवा निवासस्थ यांवरून पडलेली आहेत. त्यामुळे फडणीस असे नाव असले दोन्ही कुळांत रक्तसंबंध असेल, असे आपण मानीत ना काही वेळा तर त्यांची जातही भिन्न असते. गोत्रांचीही स्थिती आहे.

पूर्वी गोत्रे बदलता येत असत, असे शुनःशेप हा अंगि गणातून विश्वामित्र गणात गेला, त्यावरून कळते. भारद्वाजा वंशज शौनहोत्र हा भृगुकुळात गेला व त्याने शौनक हे नव नाव धारण केले, अशीही कथा आहे.

क्षत्रिय, वैश्य वगैरे जातींतील गोत्रे ही कुलगुरूंची आहेत, हे कित्येक ठिकाणी स्पष्टपणे दिसून येते. तेव्हा गोत्र हे रक्तसंबंध दाखविते, असे म्हणणेच शक्य नाही.

गोत्रातील लोकांनी आपसात विवाह करू नयेत हा आव नियम आठ ऋषींच्या वेळी अस्तित्वात नव्हता. कारण कश्य वसिष्ठ व अगस्त्य हे मरीचीचे वंशज असून, काश्यप व वसि यांमध्ये विवाह होतात. आरंभीच्या शास्त्रकारांचीही सगो विवाहाकडे पाहण्याची दृष्टी सौम्य होती. सूत्रकाळी चांद्राय किंवा कृच्छ्र प्रायश्चित्त केले, की सगोत्र विवाहाचा दोष असे. मनूने सगोत्र विवाह नसावा, असे सांगितले असले, तो करणाऱ्याला नुसते प्रायश्चित्तही त्याने सांगितलेले नाही याज्ञवल्क्य, नारद, पराशर व बृहस्पती या स्मृतिकारांनी सगोत्र विवाह निषिद्ध मानलेला आहे. पण तज्जन्य पुत्र त्यांना त्याज्य वाटत नाती. यम, बृहद्यम व व्यास हे उत्त कालीन स्मृतिकार मात्र त्या सगोत्र स्त्रीला चांडाली व तिच पुत्राला चांडाल असे समजतात.

गेल्या शंभर वर्षांत जीवशास्त्राच्या दृष्टीने या विषया बराच अभ्यास झाला आहे. या शास्त्राचे या बाबतीतले पुढीलप्रमाणे आहे —

व्यक्तीमध्ये काही गुण असतात व काही दोषही असता अगदी जवळच्या रक्तात जर विवाह झाला, तर अंगी असले

गुण प्रकर्षाने प्रगट होतात हा फायदा आहे; पण त्याबरोबर दोषही प्रबळ होतात, हा त्यातला तोटा होय. तेव्हा अगदी जवळच्या रक्तसंबंधात विवाह करू नये, हे इष्ट आहे. पण सगोत्र व सपिंड विवाहाला मुळीच हरकत नाही.

जैनांची गोत्रकल्पना – हिंदूंप्रमाणे जैनांनीही गोत्रकल्पना स्वीकारलेली आहे. त्यांच्या काही गोत्रांची नावे यक्ष, तीर्थंकराचे पिते, कुलधर, चक्रवर्ती, वलदेव, वासुदेव आणि रुद्र यांच्या नावांवरून पडलेली आहेत.

जैन कल्पसूत्रात चौव्वीस तीर्थंकरांच्या कुलांचा व गोत्रांचा उल्लेख आला आहे. मुळात सात गोत्रे होती, असे स्थानांगसूत्रात सांगितले आहे. काश्यप, गोतम, वत्स, कुत्स, कौशिक, मंडप व वसिष्ठ ही त्यांची नावे होत. या प्रत्येक गोत्राचे पुन्हा सात भेद आहेत, ते असे—

काश्यप – काश्यप, शांडिल्य, गोल, वाल, मुंज, पर्वत व वरिस कृष्ण.

गोतम – गोतम, गर्ग, भारद्वाज, अंगिरस, सर्कराभ, भाष्कराभ व उदन्नाभ.

वत्स – वत्स, अंगिय, भित्तिय, सामलिण, सेलवेअ, अस्थिसेन व वायुकृष्ण.

कुत्स – कुत्स, मोद्गलायन, पिंगतण, कोडिन्न, मलिक, हरित व सोमक.

कौशिक – कौशिक, कात्यायन, सालंकायन. गोलिकायन, परिकंकायन, अगतया व लोहित्य.

मंडप – मंडप, आरिष्ठ, समंत, मेला, ऐलापत्य, कंतेल व खामण.

वसिष्ठ – वासिष्ठ, उजायन, जारुकृष्ण, वयाघ्रापत्य, कौंडिन्य, सत्ती व पारासर.

यांपैकी काही गोत्रे प्रसिद्ध असून, त्या गोत्रांतील व्यक्तींचा उल्लेख कल्पसूत्रातील स्थविरावली व जंबूद्वीपपन्नतिसूत्र यांत आलेला आहे. जंबूद्वीपपन्नतिसूत्रात २८ नक्षत्रांच्या भिन्न भिन्न गोत्रांचा निर्देश आला आहे. उदा० अभिजित् – मोद्गल्यायन, श्रवण — सांख्यायन, घनिष्ठा — अग्रभाव, इत्यादी.

आवश्यकनिर्युक्तीच्या ३८१ व्या गाथेत सांगितले आहे, की चौव्वीस तीर्थंकरांपैकी मुनिसुव्रत व अरिष्टनेमी हे गोतम गोत्राचे होते व बाकीचे सर्व काश्यप गोत्राचे होते. बारा चक्रवर्ती हे काश्यप गोत्राचे होते.

डॉ. ए. एन्. उपाध्ये यांनी, आपल्या एका लेखात गोत्र, प्रवर, सूत्र व शाखा यांचे एक कोष्टक दिले आहे, ते असे—

गोत्र	प्रवर	सूत्र	शाखा
अमिततेज	वृषभ	कुंभ	पर्याय
हरिकेतू	शंभू	शतधनू	पर्याय समास
सूर्यमित्र	आत्मभू	देवशर्म	,,
श्रीधर	स्वयंप्रभ	धनदेव	अक्षर

याप्रमाणे १३९ गोत्रांचे प्रवर, सूत्र आणि शाखा यांचा निर्देश डॉ. उपाध्ये यांनी केला आहे. [नवा हिंदुधर्म; वि. स. र.; पा. भा.; श्रौतकोश; हि. ध.; हिं. स.; म. ज्ञा. को.; अगरचंद नाहटा– जै. सि. भा., जून, १९५३; डॉ. ए. एंन्.उपाध्ये– जै. सि. भा., डिसें. १९३६]

गोत्ररक्षक देवी पिशाचांच्या त्रासापासून लोकांचे संरक्षण करण्यासाठी देवांनी प्रत्येक गोत्राची एकेक रक्षक देवी निर्माण केली, अशी कथा स्कंद पुराणात आहे. या देवींची नावे अशी – श्रीमाता, तारणी, आशापुरी, गोत्रपा, इच्छार्तिनाशिनी, पिप्पली व विकारवशा. [चित्पावन]

गोत्रव्रत एक व्रत. श्रावण वद्य चतुर्थीला स्त्रिया हे व्रत करतात. या चतुर्थीला बेलचौथ असेही म्हणतात. व्रताचा विधी असा– एकवर्णी सवत्स धेनूची पूजा, 'तुझे सत्य माझी भक्ती,' असे वाक्य गाईच्या कानात उच्चारणे, कथाश्रवण व नंतर भोजन. या दिवशी गोरसाचा कोणताही पदार्थ खात नाहीत. त्याचप्रमाणे सुरीने किंवा कात्रीने कापलेले पदार्थही खात नाहीत. फल– पुत्रप्राप्ती व सौभाग्यवृद्धी.

गोत्रिरात्रिव्रत एक काम्य व्रत. स्त्री व पुरुष दोघांनाही हे करता येते. या व्रताचा प्रारंभ भाद्र. शु. त्रयोदशीस करतात. त्या दिवसापासून तीन रात्री म्हणजे तीन दिवस पूजादी विधी करून, चौथ्या दिवशी त्याची समाप्ती करतात. गोमाता ही या व्रताची मुख्य देवता असून, लक्ष्मीसह विष्णू ही गौण देवता आहे. याचा विधी असा—

व्रतारंभाच्या दिवशी स्नानादी विधी आटोपून या व्रताचा संकल्प करतात. त्या वेळी पुढील मंत्र म्हणतात—

> गोत्रिरात्रव्रतस्यास्योपवासकरणे मम ।
> शरणं भव देवि त्वं नमस्ते धेनुरूपिणि.।।
> प्रसीदतु महादेवो लक्ष्मीनारायणः प्रभुः ।

अर्थ– हे धेनुरूपिणी देवी, तुला नमस्कार असो. गोत्रिरात्रव्रताचा उपवास करण्याच्या कामी तू माझी रक्षणकर्ती हो.

महान देव असा लक्ष्मी-नारायण प्रभु, (मजवर) प्रसन्न होवो.

मग सोने, रुपे किंवा माती यांपैकी एखाद्या द्रव्याची लक्ष्मीनारायणाची प्रतिमा करतात. ती गोठ्यात किंवा अन्य पवित्र जागी अष्टदलावरच्या ताम्र कलशावर स्थापतात. मग पूजा करून अर्घ्य देतात. अर्घ्याचा मंत्र असा—

लक्ष्मीकान्त जगन्नाथ गोत्रिरात्रव्रतं मम।
परिपूर्णं कुरुष्वेदं गृहाणार्घ्यं नमोस्तु ते ।।

अर्थ – हे जगन्नाथा लक्ष्मीपते, माझे गोत्रिरात्रव्रत परिपूर्ण कर. हे अर्घ्य ग्रहण कर. तुला नमस्कार असो.

रात्री गायीच्या पुढे जागरण करतात. तीन दिवस उपवास, तुपाचा दिवा अहोरात्र तेवत ठेवणे व गायीला यवांचा चारा घालून त्यातले जे दाणे गोमयातून पडतील, ते गोळा करून त्याने व्रताची पारणा करणे, या गोष्टी या व्रतात विशेष आहेत.

समाप्तीच्या दिवशी ब्राह्मणदंपतीची पूजा, हविष्यान्नाने भरलेल्या तीन कुंभांचे दान व गायीचे दान करतात. गायीच्या मस्तकावर तुरा लावून व तिच्या गळ्यात घंटा बांधून वाजत गाजत त्या गायीला आचार्यांच्या घरी पोचवतात. फल– संतानप्राप्ती व मनोरथपूर्ती. या व्रताची कथा अशी—

सूर्यकुलात दिलीप नावाचा राजा होता. सुदक्षिणा नावाची त्याची भार्या होती. तिच्या पोटी पुत्रसंतान नव्हते. त्यामुळे राजा–राणी कष्टी असत. मग एक दिवस दिलीप आपल्या राणीसह वसिष्ठाच्या आश्रमात गेला. त्याने वसिष्ठाला संततिप्राप्तीचा उपाय विचारला. वसिष्ठाने त्याला आपल्या आश्रमातल्या नंदिनी धेनूची सेवा करायला सांगितले. मग राजा तिची सकाळ–संध्याकाळ सेवा करू लागला. तिला चारायला रानात नेऊ लागला. पुढे एके दिवशी नंदिनीने दिलीपाची सत्त्वपरीक्षा पाहायचे ठरवले. एकाएकी एक सिंह तिथे प्रकट झाला व त्याने गायीवर झडप घातली. दिलीपाने त्याला मारण्याचा प्रयत्न केला; पण तो व्यर्थ ठरला. दिलीप गायीला वाचवण्यासाठी त्या सिंहाला म्हणाला. 'हे सिंहा, तू मला खा; पण गायीला सोड.' असे म्हणून त्याने सिंहापुढे आपला देह लोटून दिला. त्या क्षणी सिंह गुप्त झाला व नंदिनी मनुष्यवाणीने दिलीपाला म्हणाली. 'हे राजा, सिंह निर्माण करून मीच तुझ्या भक्तीची परीक्षा पाहिली. तू परीक्षेत उतरलास. तुला हवा तो वर माग.' मग दिलीपाने पुत्रप्राप्तीचा वर मागितला. त्या वराने दिलीपाला रघू हा पुत्र झाला. तेव्हापासून हे व्रत प्रसिद्ध झाले.

हीच कथा रघुवंशाच्या दुसऱ्या सर्गात दिलेली आहे.

या व्रताचे उद्यापन असे– मध्यान्ही स्नान, देवपितृतर्पण, रात्री सवत्स धेनूसह लक्ष्मीनारायणाची पूजा, वेळूची चार पात्रे सौभाग्य द्रव्याने भरून त्यांचे दान, रात्री जागरण, दुस दिवशी प्रातःकाळी हवन, ब्राह्मणभोजन, आशीर्वादग्रहण व्रतसमाप्ती. [व्रतराज]

गोदान ब्रह्मचाऱ्याने आचरायचे एक व्रत. याला केशा संस्कार असेही म्हणतात. काहींच्या मते १६ संस्का रांमध्ये याचा समावेश होतो. या संस्कारात ब्रह्मचाऱ्याने दा मिशीसहित केशवपन करायचे असते. त्रैवर्णिकांसाठी हा संस्का असून त्याचा वर्णभेदाने कालभेदही सांगितला आहे.–

केशान्तः षोडशे वर्षे ब्राह्मणस्य विधीयते।
राजन्यबन्धोर्द्वाविंशे वैश्यस्य द्व्यधिके ततः ।।

(मनु. २. ६५

अर्थ– ब्राह्मणाचा गोदान संस्कार १६ व्या वर्षी, क्षत्रिया २२ व्या वर्षी आणि वैश्याचा २४ व्या वर्षी केला जातो.

गृह्याग्नीवरच हा संस्कार करायचा असतो. विशेष म्ह यामध्ये प्रधानयाग नसतो. चूडाकर्माला आवश्यक तिथ्यादी मुहूर्तावर चूडाकर्माप्रमाणेच हा संस्कार करता आचार्य आज्यभागापर्यंत अग्निमुखाचे कृत्य करतो. 'अदितिः श्मश्रूणि वपतु' असा ऊह करून शीत व उष्ण जल ब्रह्मचाऱ्याच्या मुखाच्या डावीकडील केसापासून आरंभ क प्रदक्षिणाकार केसांना तीन वेळा पाणी लावतो. नंतर उजव्या डाव्या श्मश्रुभागावर कानाजवळ दर्भाची पवित्रे सात के केसांसह छेदून ते केस गोमयात टाकले जातात. मग नापिता बोलावून 'वप्ता वपसि' इ. ऊह करून प्रैष देतात. ना शीतोष्ण उदक केसांना लावून उजवीकडून डावीकडे असे त्या वपन करतो. या वेळी शिखा न ठेवता संपूर्ण वपन करावे, सूत्रांमध्ये सांगितले आहे. शिखा ठेवून वपन करण्याचाही वि आहे. वपन न करता केवळ अग्निकार्य केल्याने गोदान के सारखे होते, असेही एक मत आहे.

वपन झाल्यानंतर ब्रह्मचाऱ्याला स्नान घालतात. आचार्य होमशेष समाप्त करतो. त्यानंतर बटू मौन गुरूपुढे उभा राहून उरलेला दिवस घालवतो. सूर्यास्तानं संध्यावंदन झाल्यावर मौन सोडतो. या संस्कारात गुरूला दक्षि म्हणून गाय (एक किंवा दोन) दान द्यायची असते. त्यानं दुसऱ्या दिवशी गुरू 'गोदानव्रतमाचर' अशी ब्रह्मचाऱ्या आज्ञा करतो. त्यानंतर एक वर्षपर्यंत केस व दाढीमिशा धार करून ब्रह्मचारी ब्रह्मचर्य पाळतो.

केशान्त किंवा गोदान या संस्कारासंबंधी श्री. राजब पांडेय यांनी जे विवेचन केले आहे, त्याचा सारांश असा—

गोदानव्रत हे प्रारंभी महानाम्न्यादी चार वैदिक व्रतांम

होते. पहिली तीन व्रते स्वाध्यायाशी संबंधित होती. स्वाध्यायच लुप्त झाल्यावर ती तीन्ही लुप्त झाली व केशान्त संस्कार त्यांच्यापासून वेगळा बनला. स्वतंत्र संस्काराच्या रूपाने केशान्ताचे अस्तित्व वेदारंभ संस्कारापेक्षा प्राचीन आहे. गृह्य सूत्रात चूडाकरणाबरोबरच केशान्ताचेही वर्णन आहे (आश्व. गृ. सू. १.१८; पार. गृ. सू. २. १. ३). पण तिथे वेदारंभाचा उल्लेख नाही.

यावरून शंका येईल, की वैदिक व्रतांबरोबरच केशान्त संस्कारही लुप्त का झाला नाही ? त्याचे कारण असे, की पहिली तीन व्रते वैदिक स्वाध्यायावर अवलंबून होती. पण केशान्त व्रत ब्रह्मचाऱ्याच्या शरीराशी आणि लौकिक व्यवहाराशी संबंधित असल्यामुळे ते टिकून राहिले.

केशान्त संस्कारात ब्रह्मचाऱ्याच्या दाढीमिशांचे पहिल्या प्रथम वपन होत असे. हा संस्कार १६ व्या वर्षी करीत. तो ब्रह्मचाऱ्याने यौवनात पदार्पण केल्याचाही सूचक असे. त्या वयोवस्थेत ब्रह्मचाऱ्याच्या मुखावर दाढीमिशा दिसू लागत. त्याच्या अंतरात पौरुषाची चेतनाही त्याच काळात उदय पावत असे. अशा वेळी त्याच्या यौवनसुलभ अपप्रवृत्तींच्या नियमनासाठी हे व्रत किंवा संस्कार केला जाई. या संस्काराच्या निमित्ताने ब्रह्मचाऱ्याला पुन्हा एकदा ब्रह्मचारी व्रताचे आवश्यक स्मरण दिले जाई. त्यापुढे निदान एक वर्ष तरी ब्रह्मचाऱ्याने कठोर संयमाने वागावे, अशी गुरुजनांजी अपेक्षा असे. एक वर्ष अशाप्रकारे संयमाने वागल्यास पुढच्या यौवनकालात त्याच्या हातून प्रमाद होणार नाहीत, अशीही कल्पना असे.

मध्ययुगात हिंदुधर्मामध्ये ज्या काही भ्रांत कल्पना शिरल्या त्यांतच केशान्त हा संस्कार ब्रह्मचर्यसमाप्तिसूचक मानला जाऊ लागला. हळूहळू समाजात बालविवाह प्रचलित झाले. सोळाव्या वर्षाच्या सुमारासच मुलांची लग्ने होऊ लागली; त्यामुळेच केशान्ताला ब्रह्मचर्यसमाप्तीचे सूचकत्व प्राप्त झाले. बालविवाहाचे समर्थन करणारे धर्मशास्त्री सांगू लागले, की सोळाव्या वर्षी मुलाच्या ब्रह्मचर्याची समाप्ती करणे, ही गोष्ट कोणत्याही प्रकारे अशास्त्रीय नाही. मुलाचे उपनयन जर पाचव्या वर्षी केले, तर सोळाव्या वर्षापर्यंत त्याला वेदांच्या अध्ययनासाठी बारा वर्षांचा अवधी मिळतोच (जै. गृ. सू. १ १८. वर श्रीनिवासाची टीका).

पण खऱ्या अर्थाने पाहू गेल्यास केशान्त संस्काराचा व ब्रह्मचर्यसमाप्तीचा काही संबंध नाही. ब्रह्मचर्यसमाप्तीचा समावर्तन नामक स्वतंत्र संस्कार आहेच. विद्यार्थ्याचे अध्ययन पुरे होण्यापूर्वीच त्याच्या विवाहाला अनुमती देण्याच्या विचाराने जाणूनबजून समावर्तन व केशान्त या दोन संस्कारांत गल्लत केलेली दिसते. क्षौरकर्म हे दोन्ही संस्कारांत समान असल्याने सामान्य जनात हा समज दृढ झाला व सोळाव्या वर्षी केशान्त संस्कार केला, की विवाहाला आडकाठी उरत नाही, असे लोक समजू लागले. पाहा—चूडाकर्म, समावर्तन [हिं. सं.; सं. कौ.]

गोदावरी भारतातील एक पवित्र नदी. हिचा उगम महाराष्ट्रात त्र्यंबकेश्वराजवळच्या ब्रह्मगिरीवर झाला आहे. हिला गौतमी गंगा असेही म्हणतात. हिच्या नावाशी गौतमाचा संबंध कसा आला, ती कथा अशी —

ब्रह्मगिरीच्या परिसरात गौतम ऋषीचा आश्रम होता. एकदा दक्षिण देशात अवर्षणामुळे दुष्काळ पडला. तेव्हा जवळपासचे सर्व ऋषी-मुनी गौतमाच्या आश्रयाला आले. कारण गौतमाची भातशेती उत्तम पिकत होती व त्याच्या आश्रमप्रदेशात दुष्काळ नव्हता.

याच वेळी कैलासावर पार्वतीच्या मनात गंगेविषयी विकल्प उत्पन्न झाला. गंगा गुप्तरूपाने शंकराच्या जटेत वास्तव्य करते, हे तिला बरे वाटेना. तिने गणपतीला आपले हे दुःख निवेदन केले. मग पार्वती, जया नावाची तिची दासी व गणपती यांनी मिळून एक मसलत ठरवली. जयेने गोरूप घेऊन गौतम ऋषीच्या शेतात जावे आणि त्याने हाकलण्याचा प्रयत्न करताच प्राणत्याग करावा असे ठरले. त्यायोगे ऋषीला गोहत्येचे पाप लागणार होते. त्याच्या निष्कृतीसाठी मग त्याला गंगा भूतलावर आणावी लागणार होती. त्या कामी मग गणपतीने पुढाकार घ्यायचा होता. त्यासाठी गणपती ब्राह्मणरूपाने गौतमाच्या आश्रमात येऊन राहिला. तिथे गणेशपंडित या नावाने लोक त्याला ओळखू लागले.

ठरल्याप्रमाणे जया गाईचे रूप घेऊन गौतमाच्या शेतात येऊन शेत खाऊ लागली. गौतमाने तिला हाकलण्यासाठी तिच्यावर हातातला दर्भ फेकला आणि गाईने तत्काळ प्राण सोडला. गौतमाला गोहत्येचे पातक लागल्यामुळे तो विषण्ण झाला. तेव्हा गणेशपंडितप्रभृती ऋषींनी त्याला सांगितले, की 'शंकराच्या मस्तकावरील गंगा तू भूतलावर आणशील तर तुझे पातक नष्ट होईल.'

त्याप्रमाणे गौतमाने तप करून शंकराला प्रसन्न करून घेतले व त्याच्या जटेत असलेली गंगा मागितली. शंकराने गौतमाची ती मागणी मान्य केली व आपल्या जटेतून गंगेला ब्रह्मगिरीवर खाली सोडले. कृतयुगाची दोन लक्ष वर्षे पुरी झाल्यावर मांधाता राजा राज्य करीत असता, कूर्मावतार चालू असता व बृहस्पती सिंह राशीत गेला असता माघ शु दशमीस मध्यान्हकाली ही गंगा ब्रह्मगिरीवर उतरली.

गौतमाने आणली म्हणून लोक हिला गौतमी गंगा असे म्हणू लागले. गंगेचा प्रवाह अंगावरून गेल्यामुळे गाय (गो) जिवंत झाली. म्हणून या नदीला गोदावरी असेही नाव मिळाले.

सांप्रत एका औदुंबरवृक्षाखाली एका खोलशा कुंडात, पाऊलसुद्धा बुडणार नाही इतक्या प्रमाणात, ही मूळ गंगा इथे दिसते. हीच पुढे गिरिगर्भातून प्रवास करून ब्रह्मगिरीच्या पूर्व भागी प्रकटली आहे. त्या गंगाद्वारावर गायमुख बांधलेले आहे. त्याच्या वरच्या बाजूला गंगेची मूर्ती स्थापून तिच्यावर लहानसे मंदिरही उभारलेले आहे.

ब्रह्मवैवर्त पुराणात हिच्या उत्पत्तीची दुसरी एक कथा दिली आहे, ती अशी–

एकदा एक ब्राह्मण स्त्री तीर्थयात्रेला चालली होती. ती फार सुंदर होती. एका निर्जन उद्यानात तिला पाहून यम काममोहित झाला आणि त्याने तिच्यावर बलात्कार केला. त्या समागमातून एक सुवर्णकांतीचा पुत्र जन्माला आला. त्याला घेऊन ती आपल्या घरी गेली. आपल्या पतीला तिने घडलेला वृत्तांत सांगितला. तेव्हा त्याला संताप आला व त्याने तिचा त्याग केला. त्या स्त्रीने पुढे तपश्चर्या केली आणि ती गोदावरी नदी झाली.

हिची लांबी ९०० मैल असून, सुमारे १,१५,००० चौरस मैल क्षेत्रफळाचा प्रदेश ती आपल्या पाण्याने भिजवते. महाराष्ट्र, आंध्र व म्हैसूर, या तीन राज्यांतून ती वाहते. गोदावरीला धारणा, कादवा, प्रवरा, मुळा, वर्धा, वैनगंगा, प्राणहिता, इंद्रावती आणि शबरी या नद्या येऊन मिळतात. शबरीसगमानंतर ती भद्राचलम्ला पोचते. तिथून पुढे पूर्वघाटातून वाहताना ती उंच उंच डोंगरांमधून आपला मार्ग काढते व एका लहानशा खिंडीतून घाटाखाली उतरते. पुढे सपाटीच्या प्रदेशात आल्यावर तिचे पात्र रुंद होत जाते. राजमहेंद्री येथे तिच्यावर दीड मैल लांबीचा मोठा पूल बांधलेला आहे. राजमहेंद्रीपासून पांच मैलांवर धवलेश्वरम् येथे गोदावरीचे पात्र चार मैल रुंद झाले आहे. इथे तिचे गौतमी गोदावरी व वसिष्ठ गोदावरी या नावांनी दोन प्रवाह होतात. त्या दोन प्रवाहांच्या मध्यभागी कितीतरी बेटे व अंतर्वेदीसारखे प्रदेश निर्माण झाले आहेत. धवलेश्वरम् येथे गोदावरीवर धरण बांधलेले असून तिथून अनेक कालवे काढलेले आहेत. या कालव्यांतून वाहतूकही होत असते. पुढे काही मैल गेल्यावर गोदावरीचा आणखी एक प्रवाह वेगळा होतो. त्याला वैनतेय असे म्हणतात.

वनवासी रामचंद्राने गोदावरीच्या तीरावर पंचवटी येथे निवास केला होता; वाल्मीकीला रामायण लिहिण्याची स्फूर्ती हिच्याच तीरावर झाली. महाभारतात हिचा सप्त गोदावरी असा उल्लेख केलेला असून, तिच्या तीरावर दशाश्वमेधिक, गोवर्धन, सावित्री, विदर्भ, मार्कंडेय व किष्किंधा हीं तीर्थे असल्याचे सांगितले आहे. ब्रह्म पुराणातही हिच्या तीरावरील सुमारे १०० तीर्थांचे वर्णन आले आहे. त्यांपैकी त्र्यंबक, कुशावर्त, जनस्थान, गोवर्धन, प्रवरासंगम व निवासपूर ही तीर्थे विशेष पुण्यप्रद मानलेली आहेत.

गोदावरीच्या वसिष्ठा, वैनतेय आणि गौतमी या तीन प्रवाहांमध्ये अमलापुर हे बेट आहे. तिथे यात्रेकरू फक्त रविवारीच स्नान करतात. तिथल्या शिवमंदिरातील शिवलिंग गरुडाने नर्मदेतून आणले, असे पुराणात सांगितले आहे.

धवलेश्वरम् हे नर्मदेवरचे एक सुप्रसिद्ध तीर्थ होय. माघ महिन्यात इथे यात्रा भरते. इथे जवळच एक टेकडी असून, तिच्यावर नारदमुनींचे वास्तव्य होते, असे सांगतात. इथे रामसीतेच्या पावलांचे ठसे एका खडकावर उमटलेले दाखवतात.

भद्राचलम् हेही रामचंद्राच्या निवासाने पुनीत झालेले गोदावरीच्या तीरावरचे एक क्षेत्र आहे. इथून बाव्वीस मैलांवर रामचंद्राची पर्णकुटी होती व तिथूनच रावणाने सीतेला हरण केले, असे स्थानिक लोक सांगतात.

नासिक व पैठण ही गोदावरीची दोन महत्त्वाची क्षेत्रे होत. गोदावरी ही जशी दक्षिण गंगा तशी तिच्या तीरावर वसलेली प्रतिष्ठाननगरी ही दक्षिण काशी समजली जात असे.

गोदावरी ही ब्रह्मा-विष्णु-महेशात्मक असल्याचे मानले आहे. सर्व नद्यांमध्ये ही वृद्ध व श्रेष्ठ असून, तिच्या केवळ स्मरणाने सर्व पापांचा नाश होतो. रामचंद्राने पंचवटीच्या वास्तव्यात गोदावरीचा महिमा जाणून तिच्या तीरावर पितृश्राद्ध केले.

सिंहस्थ पर्वणीत गोदावरीचे स्नान हे विशेष पुण्यप्रद असल्याचे ब्रह्मांड पुराण सांगते–

तीर्थानि नद्यश्च तथा समुद्राः ।
क्षेत्राण्यरण्यानि तथाश्रमाश्च ॥
वसन्ति सर्वाणि च वर्षमेकम् ।
गोदातटे सिंहगते सुरेज्ये ॥

अर्थ – बृहस्पती सिंह राशीत गेला असता एक वर्षभर सर्व तीर्थे, नद्या, समुद्र, क्षेत्रे, अरण्ये व आश्रम गोदेच्या ठिकाणी निवास करतात.

स्कंद पुराणात म्हटले आहे–

षष्टिर्वर्षसहस्राणि भागीरथ्यवगाहनम् ।
सकृद् गोदावरीस्नानं सिंहस्थे च बृहस्पतौ ॥

अर्थ – साठ हजार वर्षे भागीरथीचे स्नान केल्याने जे फल मिळेल ते सिंहस्थ पर्वणीत म्हणजे सिंह राशीत गुरू आला असता गोदावरीचे एकदाच स्नान केल्याने मिळते.

दर बारा वर्षांनी ज्या वेळी सिंहस्थ पर्वणी येते, त्या वेळी गोदावरीच्या तीरावरील नासिक क्षेत्री मोठी यात्रा भरते. ही यात्रा वर्षभर चालू असते.



गोदातट — नासिक

आरोग्यदृष्ट्याही गोदावरीचे जल उपकारक असल्याचे सांगितले आहे. पित्त व रक्त यांचे आजार, तसेच कुष्ठरोग यांचा गोदावरीच्या जलाने नाश होतो; शिवाय ते पथ्यकर असून भूकही वाढविते, असे राजनिघंटात सांगितले आहे. [श. क.; अ. अ.; भा. वा.; जीवनलीला; पद्मिनी सेनागुप्ता – मार्च ऑफ इंडिया, नोव्हें-डिसें. १९५४; एन्सा. रि. ए.; हि. जॉ. ए. इं.; त्रिस्थलीवर्णन —शं. ग. गोचिडे]

गोद्रुम द्वीप बंगालमधील नवद्वीपाच्या परिसरातले एक पुण्य क्षेत्र. इथे एक मोठा अश्वत्थवृक्ष आहे. तो गौरांगाचे लीलास्थल मानला जातो. या द्वीपातच गौडीय मठसंस्थापक श्रीभक्तिविनोद ठाकुर यांचे समाधिमंदिर आहे. [नवद्वीप]

गोधन (१) गायी, बैल व वासरे या सर्वांचा गोधन शब्दात समावेश होतो. गोधन हे वैदिक आर्यांच्या संपत्तीचे एक घटक होते. ऋग्वेदातील दानस्तुतीत गुरांच्या मोठाल्या कळपांचे उल्लेख आहेत. गोधन वाढावे म्हणून देवतांच्या केलेल्या प्रार्थनाही ऋग्वेदात आढळतात. त्या काळी सर्व वस्तूंची किंमत गायींवरून ठरविली जात असे. गोत्र हा शब्द गाय आणि गोठा यांच्यावरूनही व्युत्पादिला जातो. वैदिक आर्यांच्या गृह, यज्ञ इ. संस्थांशी गोधनाचा घनिष्ठ संबंध आहे. पूर्वी माणसे गोठ्यात गुरांजवळच आपला संसार मांडीत. त्यांच्या कथाचर्चाही तिथेच होत. म्हणूनच त्यांना गोष्ठी असे नाव मिळाले वैदिक आर्यांना गोपालन व गोवर्धन हे श्रेष्ठ कर्तव्य वाटे. त्यामुळेच गोपूजा आर्यांमध्ये रूढ झाली व ती आजतागायत टिकून राहिली आहे.

यज्ञातली सामान्य दक्षिणा म्हणजे गाय होय. तिला वरा असे म्हणत. चार वर्षांची गर्भिणी गाय दक्षिणेसाठी महत्त्वाची मानीत. मोठाल्या यज्ञांतून शेकडो हजारो गायी दक्षिणा देण्याबद्दल सांगितले आहे. राजेही स्वतःच्या खिल्लारातून हजारो गायी ब्राह्मणांना दक्षिणा म्हणून देत. गुरे हरवली किंवा चोरीस गेली, तर ती परत मिळविण्यासाठी वेदात एक विशिष्ट याग सांगितला आहे. प्रजाकामाप्रमाणेच पशुकामही त्या काळी महत्त्वाचा मानीत. प्रायश्चित्त करताना गायी दान देत. लग्नात वराला द्यायचा हुंडाही गायींच्याच रूपाने देत. रामचंद्राला विवाहप्रसंगी जनकराजाकडून दहा हजार गायी मिळाल्याचे वर्णन आहे. संपत्तीची मोजदादही गोधनावरूनच केली जात असे. १ गोकुल = १००० गायी, असे कोष्टक असे. ज्याच्याजवळ अधिक गोकुले तो अधिक श्रीमंत मानला जात असे. श्रीमंत माणसाला गोपती म्हणत. गाय हे धन ठरल्यामुळे त्याचा अपहार होणे व त्यासाठी लढाया होणे, या गोष्टीही प्राचीन काळापासून चालत आल्या आहेत. पणींनी इंद्राच्या गायी चोरल्या होत्या व कौरवांनी विराटाच्या गोधनाचा अपहार केला होता, अशा कथा ऋग्वेदात व महाभारतात आहेत.

कौटिल्याच्या अर्थशास्त्रात गोधनासंबंधी सविस्तर विवेचन आले आहे. त्या काळी राजांच्या खिल्लारावर एक गोअध्यक्ष नेमलेला असे. त्याच्या हाताखाली गोपालक, दोहक, मंथक, लब्धक (जंगली श्वापदांपासून गुरांचे रक्षण करणारा शिकारी) असे आणखी काही सेवक असत. वत्स, वत्सतर, दम्य (नांगराला जुंपण्याजोगे), वहिन (गाडीला जुंपण्याजोगे), वृष (स्वारीला योग्य) व सांड अशा सहा प्रकारांनी बैलांचे वर्गीकरण करीत. सांडाला खच्ची करून त्याचा मेहनती बैल बनवीत. वासरांच्या पाठीवर खुणेसाठी डाग देत व त्यांचे कानही छेदीत. त्यामुळे हरवलेल्या जनावरांचा शोध करणे सुलभ होई. प्रत्येक जनावराचे वर्णन असलेली यादी ठेवली जाई. गुरांसाठी गावालगत सार्वजनिक कुरणे असत. त्यांना पाणी पिण्यासाठी गावाजवळ तळीही बांधीत. दानशूर धार्मिक गृहस्थ गोधनासाठी तळी, गोठणी व इतर सोयी करून देत. गोवंशात सुप्रजा निर्माण व्हावी, म्हणून वृषोत्सर्ग हा धार्मिक आचार सूत्रकारांनी रूढ केला होता. वृषोत्सर्गात बैल सोडला जाई, तो कुठेही चरून वळू बने व प्रजननासाठी उपयोगी पडे. पाहा— गाय. [एकता; श्रावण शके १८८०; वै. वि. भा. प.]

(२) एक व्रत. हे मुख्यत्वे भोजपुरी प्रदेशात करतात. कार्तिक शु. प्रतिपदा ही या व्रताची तिथी होय. या दिवशी शेणाची मानवाकृती बनवून तिच्या छातीवर एक वीट ठेवतात. या प्रतिमेला गोधन असे म्हणतात. मग स्त्रिया एक काटेरी झुडूप व एका भांड्यात चणे घेऊन घरातील सर्व माणसे मरून जावोत, असा शाप देतात. नंतर मुसळ घेऊन ती शेणाची प्रतिमा कुटतात व जी माणसे मरावी म्हणून शाप दिलेला असतो, ती जिवंत व्हावी म्हणून प्रार्थना करतात.

या व्रताचा प्रमुख उद्देश भाऊ व बहीण यांचे प्रेम वृद्धिंगत व्हावे, हा आहे. [हिं. सा. बृ. इ.]

गोधूम गहू या धान्याचे संस्कृत नाव. ऋग्वेदात यवांचा उल्लेख आहे; पण गोधूमांचा नाही. वैदिक आर्यांना गव्हाची शेती करण्याचे माहित होते की काय, हे निश्चितपणे कळत नाही. नंतरच्या यजुर्वेदादी संहितांत मात्र गव्हाचे उल्लेख आढळतात. कौटिल्याच्या काळापर्यंत गहू चांगलाच लोकप्रिय झालेला दिसतो. चरकाने म्हटले आहे, की गव्हाने शरीरपोषण चांगले होते, दीर्घायुष्य मिळते व शरीरातील मोडलेली हाडेही सांधली जातात. सुश्रुतानेही गव्हाच्या पौष्टिकपणाचे वर्णन केलेले आहे.

गव्हाची उत्पत्ती कृतयुगातल्या नवमी तिथीला विष्णू, दुर्गा, कुबेर, वरुण आणि वनस्पती या पाच देवतांकडून झाली. म्हणून या पाच देवतांची पूजा करून त्यांना गव्हाच्या अन्नाचा नैवेद्य अर्पण करावा, असे सांगितले आहे. [हि. ध.; क. हि. वा. पु.]

गोधूमपुंजिका एक प्राचीन खेळ. गव्हाचे छोटे छोटे पुंज घालून त्यांपैकी एखाद्यात रुपया किंवा पैसे लपवून ठेवीत. मग खेळ सुरू करीत. जो खेळाडू द्रव्य असलेला पुंज शोधून काढील, त्याला ते द्रव्य मिळे. मग तेवढी रक्कम इतर खेळाडूंकडून वसूल केली जाई. [प्रा. भा. म.]

गोप (१). गो + प = गायींचा पालक. हा मूळचा शब्द विशिष्ट लोकांचा वाचक असावा. नाग (नग = पर्वत, त्यावर वास्तव्य करणारे) हे जसे डोंगरी लोक, तसे गोप म्हणजे सपाट प्रदेशातले गोपालक असावे. सांस्कृतिक इतिहासात गोपांचा गुराखीपणा हा नागांच्या नंतरचा आहे. गोप हे स्थायिक लोक नसून भटक्ये होते, हे त्यांच्या वसाहतींना व्रज म्हणत, त्यावरून कळण्यासारखे आहे. (व्रज = गमन करणे, हिंडणे, चालणे.)

स्मृतींनी गोप ही शूद्रजात मानली आहे. गोपस्त्रियांनी काढ-लेले कर्ज गोप पुरुषांनी फेडले पाहिजे, असे याज्ञवल्क्य सांगतो. कारण गोपांचा धंदा व फायदा गोपस्त्रियांवर अवलंबून असतो, असे त्याचे मत आहे.

श्रीकृष्ण हा गोपांचा प्रमुख देव होय. गोप शब्दाचा अथवा कृष्णाचा ज्यांच्याशी संबंध आहे अशी स्थले म्हणजे गोपपूर, गोमंतक, गोवर्धन, कृष्णा नदी, कान्हेरी, कन्नड, कान्हदेश इ. होत.

प्राचीन काळी गोप हे केवळ वर्गवाचक नाव नसून ते राष्ट्-वाचकही असावे, असे दिसते. हरिवंश व महाभारत यांत गोप-राष्ट्राचा उल्लेख आढळतो. गोपराष्ट्र हा शब्द शालिवाहनाच्या सहाव्या शतकाच्या पहिल्या पादातील ताम्रपटातही दिसतो. गोप शब्दाचे संबंधी शब्द भारतीय भाषांत अनेक आढळता भंडारा जिल्ह्यात गावंड जातीचे लोक आहेत, तसेच गोव्यात कोकणात गावडे आहेत. हे जातिवाचक शब्द आणि गौडा पाटील या अर्थाचा शब्दही गोपांशी संबंधित असावे. गुज अहीर, गोलाल, गवळी, गोपाळ इ. नावांच्या जाती पुष्क आहेत. अशा काही जाती जर एकमेकांशी संबंधित कि जवळीक धरून राहत असल्या, तर त्यांचे राष्ट्र होणे शक्य आ राष्ट्राची पुन्हा जातही होऊ शकते. या क्रिया गोप जातं अनेकदा झाल्या असाव्या. गोपांचे रक्त निरनिराळ्या ठिकां स्थानिक जातीत मिसळले असावे आणि स्थानिक जातीं त्यांच्यांत मिसळले असावे.

काही विद्वानांच्या मते गोप हे वैश्य होते; पण त्यां आपल्या बैलांचे खच्चीकरण सुरू केल्याने ते बहिष्कृत झाले तेव्हापासून भटक्ये बनले. आज देखील पुष्कळसे गोप आप पूर्वजांप्रमाणे भटक्ये जीवन जगतात. त्यांना गोपाल अहे म्हणतात. मध्य प्रदेश व पश्चिम बंगाल या प्रदेशांतल्या पठा वरील कुरणात ते आपली गुरे चारतात. गुरांच्या कळपां बर ते बायका–मुले आणि सगळा संसारच घेऊन हिंडता गोरसाची विक्री हा त्यांचा व्यवसाय होय. त्यांची घरे बांबू हातऱ्यांची असतात. ती त्यांना उखडून नेऊन दुसरीकडे उ रता येतात.

हल्ली काही गोपांनी भटक्या जीवनाचा त्याग केला आ ते आपली खेडी वसवून स्थिर जीवन जगण्याच्या प्रयत्नात आहे गोपालनाबरोबरच ते आता शेतीही करू लागले आहेत. अजूनही गोरसाची विक्री हाच त्यांचा मुख्य व्यवसाय आहे.

बिहारच्या सिंगभूम जिल्ह्यात यांची वस्ती मोठ्या प्रमा आहे. ओडिसा व छोटा नागपूर या प्रदेशांतही ते थोड्या प्रमाणात आढळतात. त्या भागात ही एक सुखवस्तू जात

सगळेच गोप एका वंशाचे नाहीत. त्यांच्यांत मथुरा

नाथाचा एक पोटभेद आहे. हे लोक स्वतःला शुद्ध गोप म्हणवितात व मथुरेची यात्रा करतात. सर्व गोपांत हे सुस्वरूप असून वर्णाने निमगोरे असतात. त्यांचे अवयव रेखीव असतात. मगध गोप हे त्यांच्याहून वेगळे असून, ते ओबडधोबड व कृष्णवर्णी आहेत. त्यांचे हातपाय मोठे असतात. हे गोप सिंगभूममधील कोलांमध्ये मिसळले, तर त्यांना वेगळे काढणे कठीण जाईल. त्यामुळे त्यांच्यांत वर्णसंकर झाला आहे की काय, अशी संशोधकांना शंका येते. प्रत्येक कोल खेड्यात थोडे तरी गोप असतातच. ते कोलांची गुरे राखतात. त्यामुळे कोलांपेक्षा त्यांचे स्थान खालच्या दर्जाचे झाले आहे.

बिहारमधल्या गोपांना सद्‌गोप असे म्हणतात. यांनी सांप्रत शेतीचा व्यवसाय पत्करला आहे. सद्‌गोप हे स्वतःला इतर गोपांमध्ये श्रेष्ठ समजतात व स्वतःची योग्यता ब्राह्मणाप्रमाणे मानतात. त्यांच्यांत कर्णवेध, जावळ व उपनयन हे तीन संस्कार मात्र आढळत नाहीत. त्यांच्यांतली विवाहप्रथा पुढीलप्रमाणे आहे—

लग्नापूर्वी तीन दिवस वराला हळद लावतात. वराच्या स्नानासाठी गावातील मुलींकडून पाणी आणवतात. एका तबकात दैनंदिन उपयोगाच्या २२ वस्तू ठेवून, त्या तबकाचा वराच्या कपाळाला स्पर्श करवून, त्या त्याला अर्पण करतात. वराच्या मनगटाला दूर्वा बांधतात.

वधूगृही जाताना वराची आई त्याला प्रश्न करते. ‘ बाळ, तू कुठे निघालास ? ’ वर तिला उत्तर देतो. ‘ आई, तुला एक दासी आणण्यासाठी जातो. ’ नवरामुलगा वधूगृही प्रवेश करतो, तेव्हा गावचा न्हावी त्याचे स्वागत करून त्याच्यावर साखर व अक्षता टाकतो. मग वराला घराच्या अंतर्भागात नेतात. वधूला एका मोठ्या परातीत बसवून बाहेर आणतात व वराभोवती सात वेळा फिरवितात. मग वधू–वर एकमेकांना पाहतात. या विधीला शुभदृष्टी म्हणतात. मग त्या दोघांचे लग्न लागते. कन्यादानाच्या वेळी वधू-वरे पुष्पमालांची अदलाबदल करतात. नवरामुलगा वधूच्या कपाळी सिंदूरतिलक लावतो. एवढ्याने विवाहसमारंभ समाप्त होतो. मग नवरामुलगा बायकांच्या दालनात प्रवेश करतो. तिथे जमलेल्या बायका त्याची मनसोक्त थट्टा–मस्करी करतात. त्यावेळी जमलेल्या बायका जी गाणी म्हणतात ती बरीचशी अश्लील असतात.

गोपांचे धार्मिक उत्सव मुख्यत्वे कृष्णविषयकच असतात. फाल्गुनात ते डोलजत्रा हा उत्सव करतात. या उत्सवात कृष्णमूर्तीला हिंदोळ्यावर बसवून झोके देतात. गुरांनाही न्हाऊ घालून नटवतात. पुरुषमंडळी टोळ्या करून कृष्णाच्या बाललीलांवरची गाणी गात रस्त्याने हिंडतात. होळीचा सण ते कृष्णाने केलेल्या पूतनावधाचे स्मारक म्हणून साजरा करतात. [इं. स्ट. पा. प्रे., १९६०; हि. ध.; पु. इं.]

(२) (इं. स. चे १८ वे शतक) एक हिंदी कवी. याने अलंकारशास्त्रावर एकूण तीन ग्रंथ लिहिले असून, रामअलंकार, रामचंद्रभूषण व रामचंद्राभरण अशी त्यांची नावे आहेत. रामअलंकार या ग्रंथात याने स्वतःविषयी जी माहिती दिली आहे, त्यावरून तो ओरछानरेश पृथ्वीसिंह याचा आश्रित होता, असे कळते. हा आपल्या प्रथम पूर्वजाचे नाव नंदनाथ दीक्षित असे सांगतो. नंदनाथाच्या वंशातील जदुनाथ कवीचा हा मधला मुलगा होय. [हिं. सा. को.]

गोपगीते

गोपसंस्कृतीत निर्माण झालेल्या किंवा गोपजीवनावर लिहिल्या गेलेल्या गीतांना गोपगीते असे म्हणतात. आपल्या संस्कृतीचे अनेक लालित्यपूर्ण आविष्कार गोपसंस्कृतीतून निर्माण झालेले आहेत. श्रीकृष्ण देहुडाचरणी उभा राहून आपली बासरी वाजवीत आहे, त्या स्वराला भुलून गायी लुब्ध झाल्या आहेत, नद्या वाहायच्या थांबल्या आहेत, वारा वाहणे विसरला आहे, अशी वर्णने कृष्णाच्या बाललीलेच्या प्रसंगाने केलेली आढळतात.

गोपजीवनातील शृंगारिक भाग राधाकृष्णगीतांच्या रूपाने वैष्णव संप्रदायात दाखल झालेला आहे. रासक्रीडेची गाणी किंवा गोपीगीते ही मुळात गोपगीते असली, तरी वैष्णव संप्रदायात आल्यानंतर ती कृत्रिम व नाटकी बनली आणि त्यामुळे आता त्यांचा मूळ गोपजीवनाशी कसलाही संबंध उरलेला नाही.

भारतीय लोकसाहित्यावर गोपसाहित्याचा विशेष प्रभाव आहे. धनगर आणि गवळी यांच्यापाशी ते बरेच आढळते. छत्तिसगढी अहीरांची गीतसंपदा मोठी आहे. आदिवासी व नागर लोक यांच्या अभिरुचींचा संयोग करण्याचे कार्य या अहीरांनी केले आहे. गौरीपूजेचा सण व त्याची गीते अहीरांकडूनच आदिवासी लोकात गेली. करमपूजा व त्याची गीते यांचाही फैलाव अहीरांमुळेच आदिवासीत झाला. ददरिया हा गीतप्रकार अहीरांनीच आदिवासींकडून नागर लोकांकडे पोचवला. आदिवासींना कित्येक पौराणिक कथा व म्हणी अहीरांनीच दिल्या.

महाराष्ट्रातही विठोबा, मल्लारी, इ. देवतांची कथागीते धनगरांकडे विशेषत्वाने आढळतात. तेलंगणात तर धनगरांची खास पुराणेही आहेत. धनगरांची अथवा चरवाहांची वाणी प्रासादिक असते. ‘ शृंगारी सुरेखता ’ हा तिचा विशेष असतो. तिला अश्लीलतेचे वावडे नसते.

गोपालनाला सार्वत्रिक महत्त्व आहे. जिथे शेती आहे, तिथे गाई-बैलांचे कौतुक असायचेच. उ. भारत, मध्य प्रदेश, बिहार, ओडिसा, महाराष्ट्र, इ. प्रदेशांत दिवाळीत गायिली जाणारी जी गाणी आहेत, ती गोपसंस्कृतीतूनच निर्माण झालेली आहेत. महाराष्ट्रात दिवाळीच्या वेळी गुराखी गोठ्यागोठ्यांतून गुरांना ओवाळतात व गाणी म्हणत फिरतात. या गाण्यांत एक गाणे बोहळण (बहुळा) गायीचे असते. या गाण्याच्या काही ओळी अशा—

माझी बोहळण गाय बरी, दुध करून देती परी ।
माझ्या बोहळण गाईचं ओठ, जसं रखुमाईचं गोठ ।
माझ्या बोहळण गाईचं कान, जसं नागईल पान ।
माझ्या बोहळया गाईचं डोळं, जस लोणियाचं गोळं ।

गायी-वासरांच्या अशा पुष्कळशा गीतांत कृष्ण-गोपींचा संबंध मुळीच आढळत नाही. तिथे माणूस व गुरे-वासरे यांच्यामधले पाल्य-पालकत्व तेवढे दिसते.

गुजर जातीचे लोक जी गाणी म्हणतात ती याहून वेगळ्या धर्तीची आहेत. त्यांत गायीवासरांच्या वात्सल्यापेक्षा प्रणय व शृंगार यांचेच प्रामुख्याने दर्शन घडते. सौराष्ट्रातल्या भरवाडी *लोकांतही अशी खूप गाणी आहेत. त्यांच्या गीताचा एक नमुना असा—*

बरवाला गामनो भरवाडियो, ओली टींबलानी भरवाडी
असोरण भरवाडी रे रंगमां लेवाणी जाय
भरवाढयने ओढवा घाबळो रे, एनी सांगर लटकती जाय
असोरण भरवाडी रे रंगमां लेवाणी जाय
भरवाडयने पेरण कुबलां रे, एना हुलरहिचोला खाय
असोरण भरवाडी रे रंगमां लेवाणी जाय
भरवाडयनी आंख्यमां सोयरो रे, एनां नेणां झबकता जाय
असोरण भरवाडी रे रंगमां लेवाणी जाय
काली अटलसनु कापडुं रे, एना काच झबकता जाय
असोरण भरवाडी रे रंगमां लेवाणी जाय

अर्थ–भरवाडी बरवला गावचा. भरवाडीण टींबला गावची. यौवनाने रसरसलेल्या चंचल भरवाडणीला घेऊन तो प्रीतीने रंगून चालतो आहे. भरवाडणीने कांबळे पांघरले आहे. त्या कांबळयाच्या दशा खाली लोंबताहेत. तिने पैरण घातली आहे. तिची झालर हालते आहे. भरवाडणीने डोळयात काजळ घातले आहे. तिचे डोळे चमकताहेत. काळ्या साटणीचे वस्त्र ती नेसली आहे. त्याची भिंगे चमकताहेत.

कित्येक गोपगीतांची गोपजीवनापासून फारकत झालेलीही आढळते. काही गीते मूलतः गोपांची असतात; पण पुढे ती सार्वजनिक बनून त्यांची वाढही झालेली दिसते. 'चल मोहन रंग' या पालुपदाचे एक तेलुगू गीत याचे उदाहरण म्हणून सांगता येईल. हे गीत मूळचे धनगरांचे. प्रथम त्याची चारच कडवी होती; पण ते इतर जातीत लोकप्रिय होऊन तेलंगणात सर्वत्र पसरले, तेव्हा त्याची कडवी छत्तिसांपर्यंत वाढली. हे एक प्रेमगीत असून त्याचा मराठी अनुवाद पुढीलप्रमाणे—

चल मोहना, रंगा (श्रीरंगा) चल.

प्रियकरा, प्रीतीने हृदय जणू थरथरते आहे. माझ्या शेजारी चांदण्या रात्री तू असावेस म्हणून मी तुला बोलावले. तुला कोणी नाही, मलाही कोणी नाही. आपण दोघे नदीच्या काठी एक झोपडे बांधून राहू.

चल, मोहना, रंगा चल.

नदीला पूर आला आहे. पण आपल्या दोघांची मनमिळणी झाली तर आपण जाईचा ताफा पाण्यावर सोडू आणि नदी तरून जाऊ. डोळयांत काजळ घालून, कमरेवर कळशी घेऊन मी आले आहे.

चल, मोहना, रंगा चला.

जिथे माणसे दिसणार नाहीत, जिथे देवताच फिरतात, तिथे नदीत क्रीडा करण्यास चल.

या गीताचेच पडसाद 'चल गे साळू, पळूनि जाऊ' या आगरी गीतात दिसतात. अशी गीते भारतात सर्वत्र आहेत.
[लो. सा. रू.]

गोपथ ब्राह्मण अथर्ववेदाचा एक ब्राह्मणग्रंथ. अथर्ववेदाचे हे एकच ब्राह्मण आहे. अथर्ववेदाच्या अनेक शाखांपैकी 'शं नो देवी' या मंत्राने आरंभ होणाऱ्या संहितेचे हे ब्राह्मण असावे. कारण त्या मंत्राने अथर्ववेदाचा आरंभ होत असल्याचे यात सांगितले आहे (१.२९).

गोपथ "ब्राह्मणाचे पूर्वगोपथ व उत्तरगोपथ असे दोन खंड असून, पहिल्यात पाच व दुसऱ्यात सहा अध्याय वा प्रपाठक आहेत. या अध्यायांचे पुन्हा कंडिकांत विभाजन केलेले आहे. पहिल्या खंडात अथर्ववेदी ब्रह्म्याची बरीच प्रशंसा केलेली आहे. दुसऱ्या खंडात यज्ञप्रक्रियेचे विवरण आहे. यातील काही भाग ऐतरेय, शतपथ व पंचविंश या ब्राह्मणांतून घेतलेला आहे.

गोपथ ब्राह्मणाचा काल बराच अलीकडील असावा, असे यातील गर्भाधानापासून उपनयनापर्यंतचे संस्कार, पाकयज्ञ, दशावतार व व्यास यांच्या निर्देशांवरून वाटते. इतर संहितांना जशी ब्राह्मणे आहेत, तसे अथर्ववेदालाही एखादे हवे या हेतूने बऱ्याच अर्वाचीन कालात या ग्रंथाची रचना झाली असावी, असे दिसते.

या ब्राह्मणग्रंथाचा कर्ता गोपथ ऋषी आहे. अथर्ववेदाच्या

ऋषींच्या नामावलीत गोपथाचे नाव येते. गोपथ ब्राह्मणात कुरु-पंचाल व अंग-मगध या देशांचा उल्लेख आहे. यावरून गोपथ हा मध्यदेशाचा रहिवासी असावा, असे वाटते.

भाषाशास्त्राच्या दृष्टीने या ब्राह्मणात दिलेल्या काही व्युत्पत्ती महत्त्वाच्या आहेत. [वै. सा. सं; वै. सा.; म. ज्ञा. को.]

गोपदत्रिरात्र एक व्रत. व्रतारंभ भाद्र. शु. तृतीयेस किंवा चतुर्थीस करतात. हे व्रत सूर्योदयाच्या वेळी करायचे असते. व्रताचा विधी असा–

गायी व लक्ष्मीनारायण यांची तीन दिवस पूजा, गायीच्या शिंगांना व शेपटीला दही व तूप लावणे व उपवास. ‘माता रुद्राणाम्’ (ऋ. ८.१०१.१५) या मंत्राने गायींची पूजा. भाद्रपदात व्रतारंभ करता न आल्यास तो कार्तिकात केला तरी चालतो. [हि. ध.]

गोपद्मव्रत चातुर्मासात करायचे एक व्रत. स्त्री व पुरुष दोघांनाही हे व्रत करता येत असले, तरी प्रघात मात्र स्त्रियानीच करायचा आहे. व्रत घेतल्यापासून दर चातुर्मासात पाच वर्षेपर्यंत ते करायचे असते. याचा विधी असा—

प्रथम गोठा झाडून तिथली जमीन गोमयाने सारवतात. मग तिच्यावर रांगोळीने ३३ गोपद्मे अर्थात गायीची पावले काढतात. गोठा उपलब्ध नसेल, तर देवापुढे किंवा तुळशीपुढे गोपद्मे काढतात. मग तुपाचा दिवा लावून त्या गोपद्मांची पूजा करतात. ३३ अर्घ्ये, तितक्याच प्रदक्षिणा व तितकेच नमस्कार हे या व्रतातले आवश्यक विधी आहेत.

फल – सर्व दुःखांचा उपशम, सौभाग्यवृद्धी व संतानवृद्धी. या व्रताची कथा अशी–

स्वर्गलोकी पाच सभा बसल्या होत्या. अप्सरांचे नृत्य चालू होते. एवढ्यात साथीदाराच्या तंबोऱ्याच्या तारा तुटल्या. मृदंगाचे पुडे फुटले. तेव्हा सभेचा हुकूम झाला, की पृथ्वीवर कोणी वाणवशावाचून असेल त्याच्या पाठीचे कातडे काढून तंबोऱ्याला तारा व मृदंगाला पुडे बसवा.

ही वार्ता कृष्णाला कळली. त्याला वाटले, की आपली बहीण सुभद्रा हिने आजवर काही वाणवसा केला नाही, तेव्हा तिच्यावर हे संकट येणार. मग लगबगीने कृष्ण सुभद्रेजवळ आला व त्याने सुभद्रेकडून गोपद्माचे व्रत करवून घेतले. पाठोपाठ देवदूत पृथ्वीवर आले. ते सुभद्रेकडे येतात, तर तिने व्रत केलेले त्यांना दिसले. ते तिथून निघाले. वाटेत त्यांना एक हत्तीण दिसली. त्यांनी तिच्या पाठीचे कातडे काढल व त्या कातडयाची तंबोऱ्याला तार लावली व मृदंगाला पुडे बसवले. नंतर देवांची सभा चालू झाली.

या व्रताचे उद्यापन पुढीलप्रमाणे करतात—

लक्ष्मीनारायणाची सुवर्णप्रतिमा करून तिची पूजा, रात्री जागरण व कथाश्रवण, दुसऱ्या दिवशी तीळ, तूप व पिंपळाच्या समिधा यांचे हवन, प्रतिमादान, गोदान, पाच दंपतीना भोजन, ब्राह्मणभोजन, आशीर्वादग्रहण आणि व्रतसमाप्ती.

या व्रतात पहिल्या वर्षी, व्रतसमाप्तीच्या दिवशी घारगे किंवा अनरसे, दुसऱ्या वर्षी शेवया, शेवखंडे किंवा खीर, तिसऱ्या वर्षी गुळपापडीचे लाडू अथवा मांडे, चवथ्या वर्षी पुरी किंवा गोड भात व पाचव्या वर्षी खीर किंवा तुपात तळलेले घारगे, यांचे वायन देतात.

आषाढ शु. दशमीस किंवा एकादशीस या व्रताचा प्रारंभ करायचा असतो. ती तिथी न साधल्यास आषाढ पूर्णिमा व तीही न साधल्यास जन्माष्टमी या तिथीला व्रतारंभ करतात. [व्रतराज.; हि. ध.]

गोपसखा सख्यभक्तीचा एक प्रकार. यात स्वतःची गोपरूपाने व श्रीकृष्णाची गोपसख्याच्या रूपाने कल्पना करतात. गोप हे श्रीकृष्णाचे सवंगडी असून, त्यांचे तीन प्रकार मानलेले आहेत—

(१) कृष्णाहून वयाने मोठे; पण गोचारण व तत्संबंधी क्रीडाविनोद यात त्याला मित्रभावाने साथ देणारे. हे गोपीकृष्णांच्या निकुंजलीलेत सहभागी होत नाहीत.

(२) श्रीकृष्णाहून वयाने लहान; पण गोकुळातल्या गल्लीबोळातून चेंडूफळीचा खेळ व दह्यादुधाची चोरी यात श्रीकृष्णाची संगत करणारे. यांचाही गोपी-कृष्णांच्या शृंगारक्रीडेत संबंध नसतो.

(३) श्रीकृष्णाचे समवय, समशील व समव्यसन असे मित्र. हे श्रीकृष्णाचे अंतरंग मित्र असतात आणि त्याच्या प्रत्येक लीलेत त्याला साथ देतात. त्यांना राधा-कृष्णांच्या अनुरागाचा परिचय असतो, त्याचप्रमाणे गोपीकृष्णांच्या दानलीलेतही ते सहभागी होत असतात.

सखाभक्तांची काही नावे विष्णू व भागवत या पुराणांत दिली आहेत. पद्म व ब्रह्मवैवर्त या पुराणांत तर त्यांची लांबलचक यादीच मिळते. गौडीय वैष्णव संप्रदायाच्या साहित्यात त्यांची नावे आणि त्यांचे वर्गीकरणही आढळते. पुष्टिमार्गीय साहित्यात श्रीकृष्णाच्या अंतरंगमित्रांची नावे अष्टसखा या उपाधीने दिलेली आढळतात. पाहा– अष्टसखा [हिं. सा. को.]

गोपा कोकणातल्या ब्राह्मणांमधला गर्भाधानाच्या दिवशीचा एक विधी. त्या दिवशी संध्याकाळी नारळाला कुंची व गळेसरी घालून त्याचा कृत्रिम मुलगा बनवतात. त्याला गोपा असे म्हणतात. नंतर पत्नी तो गोपा पतीच्या हातात देत म्हणते, ‘तुम्ही घ्या रामाला, मी जाते कामाला.’ त्यावर पती तिला म्हणतो, ‘तू घे मुलाला, मी जातो कचेरीला.’

कुणब्यांतही ही चाल आढळते. परंतु ते लग्नातच हा विधी उरकतात. काही ठिकाणी बारशाच्या दिवशी मुलाला पाळण्यात घालण्यापूर्वी हा विधी करतात. त्यावेळी पिवळ्या फडक्यात एक वरवंटा गुंडाळून त्याचा गोपा बनवतात आणि नंतर स्त्रिया त्याला पाळण्याच्या खालून वरून फिरवतात. हा विधी करण्यामागे हेतू असा, की जमलेल्या लोकांपैकी एखाद्याची दृष्ट पाळण्यात घालायच्या मुलाला बाधू नये आणि दृष्ट पडायचीच तर प्रथम ती त्या गोप्यावर पडावी. [बदलापूर]

गोपाल एक गवळी जात. पाहा– गोप.

गोपाल अय्यर पल्लवी (इ. स. चे १९ वे शतक) द. भारतातील एक संगीताचार्य. हा पच्चिमिरियम् आदियप्पय्य याचा शिष्य असून तंजाऊरच्या दरबारात संस्थानविद्वान होता. याच्या अनेक कृती व तानवर्ण प्रसिद्ध आहेत. दक्षिणेतील गायक व वादक याच्या कृतींना फार मान देतात. [डि. सा. इं. म्यु. म्यु.]

गोपालअष्टाक्षरी मंत्र हा मंत्र पुढीलप्रमाणे आहे – ‘क्लीं गोवल्लभाय स्वाहा।’ याचे आठ लक्ष पुरश्चरण करून मग हा इष्टसिद्धीसाठी उपयोजितात. हा मंत्र संपत्तिप्रद मानलेला आहे. [मं. म.]

गोपालकृष्ण भारती (१८२०–१८९६ इ. स) द. भारतातील एक कवी व संगीतशास्त्रज्ञ. याचा जन्म तंजाऊर जिल्ह्यातल्या मुडिकोंडान या ठिकाणी झाला. हा भारद्वाजगोत्री तेलुगू ब्राह्मण होता. याला सरस्वतीचा साक्षात आशीर्वाद मिळाला होता, असे म्हणतात. गोविंदयतीजवळ याने वेदाध्ययन केले व अनेक भाषांवर प्रभुत्व मिळविले. रामदास या संगीताचार्याकडे तो हिंदुस्थानी संगीत शिकला. हा योगी तसाच नैष्ठिक ब्रह्मचारी होता. याने आपले सर्व आयुष्य व बुद्धिवैभव संगीताच्या व्यासंगात खर्च केले. हमीरकल्याणी, बेहाग, इ. काही राग याने स्वतंत्रपणे रचले आहेत. याची निरनिराळ्या रागांतली कीर्तने प्रसिद्ध आहेत. त्यागराजानंतर अप्रसिद्ध रागात कीर्तने रचणारा हाच दुसरा कवी होय. त्याचे नंदनारचरितम् हे संगीत नाटक प्रसिद्ध आहे. तमिळ प्रदेशात आजही त्याचे प्रयोग होतात. याशिवाय याने तिरुनीलकंठनायनारचरितम्, इयरपगईनायनारचरितम् व कारैक्कालअम्मैयारचरितम्, इ. काही लहान नाटकेही लिहिली आहेत. विवाहप्रसंगी म्हणण्यासाठी त्याने अनेक गीते रचली आहेत. आपल्या आयुष्याच्या शेवटी त्याने जवळचा सर्व पैसा चिदंबरम् व मायावरम् या देवस्थानांसाठी खर्च केला. [डि. सा. इं. म्यु. म्यु.]

गोपालचंद्र मिश्र (इ. स. चे १७ वे शतक) एक हिंदी कवी. याचा जन्म छत्तीसगढ जिल्ह्यात झाला. याच्या बापाचे नाव गंगाराम आणि मुलाचे नाव माखनचं असे होते.

हैहयवंशी राजा राजसिंह याच्या दरबारात याला मोठा मान होता. राजसिंहाने याला आपला दिवाण नेमले हो असेही सांगतात. राजाच्या इच्छेवरून याने खूब तमाशा नावा काव्य रचले. याशिवाय याचे पुढील ग्रंथही प्रसिद्ध आहेत- (१) जैमिनी अश्वमेध (२) भवितचिंतामणी (३) रा प्रताप (४) छन्दविलास (५) सुदामाचरित्र.

याचा मुलगा माखनचंद्र हाही एक कवी म्हणून प्रसि होता. रामप्रताप या काव्याचा अर्धा भाग गोपालचंद्राने उरलेला अर्धा बापाच्या आज्ञेनुसार माखनचंद्राने पूर्ण के [म. च. को.; क. कौ.]

गोपाल चानक एक हिंदी कवी. गोपाल चानक आ त्याचा पुत्र माखनलाल हे दोघे रतनपूर राजाचे प्रधान होते. या दोघांनी निरनिराळ्या विषयांवर ग्रं लेखन केले आहे. मात्र माखनलालने आपल्या पित्याचा राखण्यासाठी एकाही ग्रंथावर स्वतःचे नाव येऊ दिले नाही पण भाषावैचित्र्यामुळे त्या दोघांची रचना वेगळी काढता उपलब्ध असलेले गोपाल चानकाचे ग्रंथ पुढीलप्रमाणे आहेत-

(१)वीरशतक (२) कीर्तिशतक (३) पुण्यशतक (कर्मशतक (५) विनोदशतक व (६) शृंगारशतक. या विनोदशतकात राधा-कृष्णांची प्रेमक्रीडा वर्णित असून, शृं शतकात नायिकाभेदांचे वर्णन आहे. [हिं. नी. वि.]

गोपाल द्वादशाक्षरी मंत्र हा मंत्र पुढीलप्रमाणे आ ‘श्रीं ह्रीं क्लीं कृष्णाय गो न्दाय स्वाहा.’ याचे बारा लक्ष पुरश्चरण करतात व मग

सिद्धीसाठी त्याचा प्रयोग करतात. स्त्रीवशीकरणासाठी याचा उपयोग सांगितला आहे. [मं. म.]

गोपाल नायक (१२९५–१३१५ इ. स.) अलाउद्दिनाच्या दरबारातील एक गायक व कवी. हा मूळचा देवगिरीचा होता. अलाउद्दिनाचा सेनापती मलिक काफूर याने दक्षिणेच्या स्वारीनंतर याला दिल्लीला नेले.

कदंबकम् रागातील तालवर्णम् व ग्रहस्वरप्रबंधम् या रचनांचा हा कर्ता आहे. दाक्षिणात्य संगीताचा हा मोठा विद्वान होता, असे वेंकट मखी हा संगीतशास्त्रज्ञ सांगतो. याचे संगीतातले नैपुण्य पाहून अमीर खुस्रव हा पर्शियन संगीतज्ञ थक्क झाला होता. असे सांगतात, की अमीर खुस्रवने गोपाळ नायकाचे संगीत ओळीने सात दिवस लपून बसून ऐकले व आठव्या दिवशी हुबेहूब त्याच्यासारखे गाऊन सर्वांना थक्क केले. पुढे अमीर खुस्रव आणि गोपाळ नायक हे मित्र बनले. [डि. सा. इं. म्यु. म्यु.; सू. पू. न्न. भा. सा.].

गोपालपूर्वतापिनी एक वैष्णव नव्य उपनिषद. हे अथर्ववेदाशी संबंधित आहे. ब्रह्मा व ऋषिगण यांचे संभाषण, ब्रह्मा व नारायण यांचे संभाषण आणि गोपी व दुर्वास यांचा संवाद असे याचे तीन भाग आहेत.

यात कृष्ण हेच परब्रह्म आहे, असे ब्रह्मदेव ऋषींना सांगतो. कृष्णाच्या ज्ञानाने व साक्षात्काराने परम तत्त्व कळते. 'क्लीं कृष्णाय गोविन्दाय गोपीजनवल्लभाय स्वाहा,' हा प्रस्तुत उपनिषदातला पंचपदमंत्र असून, त्या पाच पदांत पंचमहाभूते समाविष्ट झाली आहेत. पंचपदब्रह्माची प्राप्ती या मंत्राच्या जपाने होते.

प्रस्तुत उपनिषदात तांत्रिक पूजेची रीत सविस्तर दिलेली आहे. गोपालयंत्राचे विस्तृत वर्णन हा या उपनिषदाचा एक विशेष आहे. पंचपदगोपालमंत्राची स्तुती याच्या दुसऱ्या भागात विस्ताराने केलेली आहे. तिचा सारांश असा—

वृंदावनातील कल्पवृक्षाच्या मुळाशी गोविंदाचे निवासस्थान आहे. त्याच्या भोवती मरुतांचा गण आहे. तो विश्वात्मा, विश्वरूप व सच्चिदानंद असून, गोपींचा वल्लभ आहे. त्याचे डोळे कमलासारखे असून, तो कमलापती आहे. पार्थाचा सारथी तोच आहे. मुरली वाजवून तो स्वतःचे मनोरंजन करतो. तोच सगुण आणि तोच निर्गुणही आहे.

गोपालकृष्णाची भक्ती हीच खरी पूजा असली, तरी सगुणब्रह्माच्या उपासनेची पुढे निर्गुणब्रह्माच्या उपासनेत परिणती व्हावी, अशी या उपनिषदाची धारणा आहे. [सु. ग. देसाई]

गोपालभट्ट (इ. स. चे १६ वे शतक) महाप्रभू चैतन्याच्या प्रमुख शिष्यांपैकी हा एक होता, असे सांगतात. गोपाळभट्टाने आपल्या सर्वस्वाचा त्याग केला व वृंदावनात जाऊन भक्तिमार्ग धरला. याच्या पूजेत एक शाळिग्राम होता. एक दिवस या शाळिग्रामातूनच वैशाखी पौर्णिमेच्या दिवशी भगवंताची मूर्ती प्रकट झाली, अशी एक आख्यायिका सांगतात. याच मूर्तीची त्याने तिथल्या मंदिरात प्रतिष्ठा केली. गोपाळभट्टाने भगवदभक्तिविलास व हरिभक्तिविलास असे दोन ग्रंथ रचल्याची माहिती मिळते. [भा. सं.; म. ना.]

गोपालमंत्र हा दशाक्षरी मंत्र गोपीजनवल्लभाय स्वाहा, असा आहे. एक लक्ष पुरश्चरण करून हा मंत्र सिद्ध करतात. मग निरनिराळ्या हेतूंसाठी निरनिराळ्या पद्धतीने त्याचा प्रयोग करतात. ज्वरशांती हवी असेल, तर गुळवेलीच्या समिधांचे हवन; दोन मित्रांत द्वेष उत्पन्न व्हावा, अशी इच्छा असेल, तर गोमयाच्या गोळ्यांचे हवन; शत्रुनाशासाठी निंबाच्या बियांचे तेल काढून त्यात बिब्याच्या समिधा भिजवून त्यांचे हवन; विद्यासिद्धीसाठी पळसाच्या फुलांचे हवन; वशीकरणासाठी घृतमिश्रित तांदूळ व श्वेतपुष्पे यांचे हवन; विवाह होण्यासाठी अयुतसंख्येने मंत्रजप व मनोरथपूर्तीसाठी बिल्वफलांचे हवन, अशी या मंत्राची अनेक विधाने सांगितली आहेत. [मं. म.]

गोपालसुंदरीमंत्र हा मंत्र पुढीलप्रमाणे आहे— 'ह्रीं श्रीं क्लीं कृष्णाय कएईल ह्रीं गोविंदाय हसकहल ह्रीं गोपीजनवल्लभाय सकल ह्रीं स्वाहा !' या मंत्राची साधना केल्याने सुखोपभोग व मोक्ष यांची प्राप्ती होते, असे सांगितले आहे. [मं. म.]

गोपालोत्तरतापिनी एक नव्य वैष्णव उपनिषद. यात गोपी व दुर्वास यांच्या संवादातून पारमार्थिक सत्ये विशद केलेली आहेत. दुर्वास गोपींना सांगतो—

अयोध्या– मथुरादी सात पुऱ्या पवित्र आहेत. त्यांतही मथुरा ही मूर्तिमंत ब्रह्मच होय. मथुरेभोवती बारा वने असून, त्यांत अष्टवसू, एकादशरुद्र, द्वादशादित्य, सप्तर्षी, सप्तविनायक व अष्टलिंगे आहेत.

प्रणवरूपी एकाक्षरापासूनच जगताची उत्पत्ती झाली आहे. प्रणवाची चौथी अर्धमात्रा म्हणजे श्रीकृष्ण असून, रुक्मिणी ही त्याची आदिशक्ती आहे. ब्रह्मवेत्ते तिलाच प्रकृती मानतात. तिचेच दुसरे रूप म्हणजे राधा होय. श्रीकृष्ण हा अंतरात्मा,

आहे आणि तोच परब्रह्महीआहे. हे रहस्य नारायणाने ब्रह्मदेवाला, त्याने सनकादी मुनींना, त्यांनी नारदाला, त्याने दुर्वासाला व त्याने गोपींना सांगितले. गोपालविद्येची ही परंपरा होय. [सी. ग. देसाई]

गोपाष्टमी कार्तिक शु. अष्टमीचे नाव. या दिवशी गायीची पूजा, गायीला प्रदक्षिणा व तिच्या मागून वनात जाणे, या गोष्टी केल्याने इष्टकामना सिद्ध होतात, असे सांगितले आहे. [कूर्म पुराण]

गोपाळ खानदेशात आढळणारी एक पशुपालक जात. कुणबी, धनगर, वंजारी, इ. जातींच्या मिश्रणाने ही जात बनल्याचे सांगतात. अजूनही हे कुणब्यांना आपल्या जातीत घेतात.

हे लोक गावोगाव कसरतीचे खेळ करून भिक्षा मागतात. महारांचे पौरोहित्य यांच्याकडेच असते; पण हे त्यांच्याकडे जेवत मात्र नाहीत; फक्त त्यांचे कोरान्न स्वीकारतात. हे लोक बकऱ्याच्या केसाचे हार गळयात घालतात, नृत्य करतात व गाणी गातात. यांच्या डोक्यावर मोराची पिसे लावलेली निमुळती टोपी असते; अंगात कुडते असते.

यांच्यांत अनेक पोटभेद व कुळे आहेत. यांच्या लग्नासाठी ब्राह्मण पुरोहित लागतो. इतर विधी मात्र जातीतील जाणतेच चालवतात. तुळजा, खंडोबा, मरीआई, म्हसोबा हे यांचे देव होत. हे मृताला पुरतात व त्याचे महालय श्राद्ध करतात. [मुं. इ. जा.; बॉं. बे. क्रा.]

गोपाळनाथ (इ. स. चे १८ वे शतक) एक नाथसंप्रदायी संत कवी. मराठवाडयाच्या परिसरात सलाबतपूर नावाचे एक गाव आहे. या गावात गोविंद नाइक धोलप या नावाचा एक धनाढ्य सावकार राहत असे. हाच गोपाळनाथाचा बाप होय. आनंदीबाई हे याच्या आईचे नाव. हा शुक्लयजुर्वेदी कौंडिण्यगोत्री होता. गोपाळाच्या आठव्या वर्षी गोविंद नाइक कीर्तन करीत असता स्वर्गवासी झाला. त्यानंतर आईच्या आग्रहामुळे ही मायलेकरे काशीयात्रेस निघाली. पण गोपाळनाथ रामटेक येथे आल्यावर तिथेच थांबला व तप करू लागला. नंतर याला रंगनाथमहाराजांचा अनुग्रह मिळाला. अनुग्रहानंतर याने भारतभर संचार करून ठिकठिकाणी ३६० मठांची स्थापना केली. गोपाळनाथाचा शिष्यपरिवार फार मोठा आहे. त्यांत सर्व जातीचे व सर्व धर्मांचे लोक आहेत. शाहीर हैबती, शेख सुलतान, माहूरचे विष्णुदास, पुण्याचे गंगानाथ व परमहंस हे याचे प्रसिद्ध शिष्य होत.

गोपाळनाथाची संप्रदायपरंपरा अशी – श्री आदिनाथ → ब्रह्मदेव → दत्तात्रेय → चांदबोधले (चंद्रभट) → जनार्दन → एकनाथ → नित्यानंद (गावबा) → कृष्णानंद → मुरारनाथ → रंगनाथ व → गोपाळनाथ.

गोपाळनाथाने इ. स. १७६६ मध्ये श्रावण अमावास्ये त्रिपुटी येथे जिवंत समाधी घेतली. त्याची पुण्यतिथी श्रावण अष्टमी ते भाद्रपद शु. द्वितीया अशी दहा दिवस चालते. या समाधीतून पाण्याचा ओलावा निरंतर झिरपत असतो, हा मो साक्षात्कार समजतात.

गोपाळनाथाने वेदान्तशिरोमणी व समाधिबोध असे दो ग्रंथ लिहिले. वेदान्तशिरोमणी हा ग्रंथ इ. स. १७७६ म लिहिला. यात १८ किरात (अध्याय) असून त्याची ओ संख्या ९२०९ इतकी आहे. या ग्रंथात मायानिरास, जी स्वरूप, ब्रह्मप्राप्तीचा मार्ग, इ. विषय आलेले आहेत. प काही अभंगही उपलब्ध असून त्यात मुख्यत्वे कृष्णलीला व आहे.



गोपाळनाथ

वर दिलेले गोपाळनाथाचे तत्कालीन चित्र त्याच पंरेतील कऱ्हाडच्या मठात आहे. [गो. च. प.; पुरुषा सत्पुरुषांक, जून– जुलै, १९६४]

गोपाळनाथ गोसावी (इ. स. चे १७ वे शतक) एक मराठी संत. परुळे गावी याचा जन्म झाला. हा गौडसारस्वत ब्राह्मण होता. दैववशात एका साथीत त्याची आई सोडून बाकीची सर्व माणसे निवर्तली. त्यामुळे ही मायलेकरे मळगावी नातेवाईकाकडे आश्रयास आली. तिथे काही काळ घालविल्यावर हे दोघेजण पंढरीच्या वारीस गेले. तिथे गोपाळनाथाला बोधलेबुवा या भगवद्भक्ताचा सहवास घडला. गोपाळनाथाने त्याचे शिष्यत्व पत्करले. गुरूच्या सान्निध्यातच गोपाळनाथ लिहिण्यावाचण्यास शिकला. याची बुद्धी चलाख व वृत्ती परमार्थप्रवण होती. हा दरदिवशी प्रथम गुरूसाठी भिक्षा मागून आणी व नंतर स्वतःसाठी व आईसाठी भिक्षा मागे. अशा रीतीने बारा वर्षे गुरूची सेवा केल्यावर गुरूने प्रसन्न होऊन त्याला पांडुरंगाचे दर्शन घडविले.

नंतर काही दिवसांनी बोधलेबुवाने गोपाळनाथास आज्ञा केली, की 'तुम्ही आपल्या गावी जाऊन प्रपंच करा व जडमूढांच्या उद्धाराच्या कार्यास लागा.' तदनुसार गोपाळनाथ आपल्या मातेसह गावी येण्यास निघाला. परतीच्या वाटेवर त्याने अनेक चमत्कार केले. सावंतवाडीस आल्यावर पर्जन्यकाल नसताही नाममाहात्म्याच्या प्रभावाने त्याने तिथे पाऊस पाडला व तिथल्या दुष्काळाचे निवारण केले. त्यामुळे सावंतवाडीच्या महाराजांनी त्याला काही जमीन दिली.

गोपाळनाथाने पांडुरंगमाहात्म्य, प्रकाशबोध, बालक्रीडा, इ. ग्रंथसंपदा निर्माण केली आहे. शिवाय त्याची भूपाळचा, अभंग, इ. फुटकळ रचनाही बरीच आहे. प्रकाशबोध हा वेदान्तपर ग्रंथ असून, त्याची ओवीसंख्या २०२ आहे. पांडुरंगमाहात्म्यात स्त्रीधर्म, कर्मकांडाचा निषेध, तीर्थयात्रा, इ. अनेक विषय आहेत. जपतपासंबंधी गोपाळनाथ लिहितो—

नाही स्वरूपाची ओळखण।
आणि डोळे झांकुनी करिती ध्यान ।।
तें ध्यानचि झालें नागवण।
रोकडी हानी आयुष्यासी ।।
हाता आलें नाहीं निजमन।
वरपांग करिती ध्यान ।।
तें ध्यानचि झालें विघ्न।
होय नागवण स्वहितासी ।।

वयाच्या ८० व्या वर्षी गोपाळनाथ समाधिस्थ झाला, असे सांगतात. त्याची समाधी मळगावी आहे. दरवर्षी त्याच्या पुण्यतिथिनिमित्ताने तिथे उत्सव होतो. ज्ञानोबा–तुकारामांप्रमाणे याचीही पालखी दरवर्षी पंढरपुरास जात असते. [सा. र. मा.]

गोपाळ पंडित (इ. स. चे १३ वे शतक) एक महानुभाव कवी. हा पैठणजवळ वाडेगाव येथे राहत होता. याच्या वडिलांचे नाव चक्रपाणी होते. हा सात महिन्यांचाच जन्मला. त्यामुळे त्याचे डोळेच उघडेनात. ते उघडावे म्हणून त्याच्या आईने त्याला चक्रधराच्या स्वाधीन केले. नंतर त्याला दृष्टी प्राप्त झाली. चक्रधराने याचे नाव पारमांडल्य असे ठेवले. नंतर देवनगर येथे रामदेवराव जाधव यांची वाकटी वहीण कामाई देवी हिचा पुराणिक व खजिनदार म्हणून याने काम केले. याने एकूण सहा ग्रंथ लिहिले आहेत. त्यांपैकी चौपद्या व सुभाषितअंताक्षरी हे दोन पद्यात्मक व बाकीचे चार गद्यात्मक आहेत. [म. च. को.]

गोपाळबाबा (मृत्यू १८५३ इ. स.) एक मराठी संतकवी. हा देशस्थ वाजसनेयी ब्राह्मण असून, सातारा जिल्ह्यातील टेंमू या गावचा रहिवासी होता. याची समाधी कऱ्हाड येथे आहे. याने वेदान्तदीपिका नावाचा ओवीबद्ध ग्रंथ लिहिला आहे. याची काही पदेही आहेत. [भ. अ. को.]

गोपिराजबाबा (१८८०–१९६३ इ. स.) एक महानुभाव सत्पुरुष. याचा जन्म पंजाबातील झेलम जिल्ह्यात कर्साल गावी झाला. याचे मूळ नाव हारुमराय असे होते. इ. स. १८९२ साली त्याने संन्यासदीक्षा घेतली. नंतर श्रीक्षेत्र ऋद्धिपूर येथील गोपीराजमंदिर या संस्थानच्या गादीवर त्याची स्थापना झाली. त्यामुळे त्याला गोपिराजबाबा म्हणू लागले.

गोपिराजाने इ. स. १९२७ साली ऋद्धिपूर येथे एक ग्रंथसंग्रहालय स्थापले व तिथे अत्यंत दुर्मिळ ग्रंथांचा संचय केला. बहुतेक प्राचीन महानुभावीय ग्रंथांचे प्रकाशन याने केले आहे.

महाराष्ट्रात श्रीरामपूर येथे हा मरण पावला. [साहित्यसहकार, मे १९६४]

गोपी 'गोपस्य स्त्री' = गोपाची स्त्री ती गोपी, असा या शब्दाचा वाच्यार्थ आहे. पण मुख्यत्वे गोकुळातल्या गोपस्त्रियांना हा शब्द लावतात. भागवत, हरिवंश, विष्णू, पद्म, ब्रह्मवैवर्त, इ. पुराणांतून गोकुळातल्या गोपींचे वर्णन आढळते. गोपालकृष्ण हा गोपींचा परम उपास्य होय. असे वाटते, की गोप जातीत प्रचलित असलेल्या गोपी–कृष्णविषयक कथा व तशाच प्रकारची गीते इ. स. ६ व्या शतकापर्यंत संपूर्ण भारतात प्रचलित व लोकप्रिय झाली होती. हळूहळू त्या कथागीतांना पुराणकारांनी आपापल्या पुराणांत समाविष्ट करून

भक्तिमार्गांच्या प्रचारासाठी त्यांचा उपयोग करून घेतला.

कृष्णभक्ती ही पहिल्या प्रथम दक्षिणेत उगम पावली. तिथल्या आळवार संतांनी गोपी–कृष्णांच्या लीलांवर अनेक सरस मनोहर पद्ये निर्माण केली. आंडाळ या आळवार स्त्रीच्या तिरुप्पावै नामक काव्यसंग्रहात गोप, गोपी आणि गोकुळ यांची वर्णने आढळतात. गाथासप्तशती हा प्राकृत गाथासंग्रह इ. स. च्या ३ ऱ्या शतकातला मानला जातो. काव्यग्रंथांत सर्वप्रथम या ग्रंथातच गोपी-कृष्णविषयक गाथा आढळतात. त्यांतील मीलन, विरह, इ. प्रसंग सर्वथा लौकिक आहेत. त्यांत कोणत्याही प्रकारची प्रतीकात्मकता किंवा पारमार्थिकता नाही. उदा०–

मुहमारुएण तं कह्न गोरअं राहिआएँ अवणेन्तो।
एताणँ वल्लवीणं अण्णाण वि गोरअं हरसि ।।

अर्थ – कृष्णा, संध्याकाळी परतणाऱ्या गाईंच्या पावलामुळे उडालेले धुळीचे कण राधेच्या डोळ्यात गेले. ते गोरज काढण्यासाठी तू तिच्या डोळ्यात फुंकर घालतोस आणि गवळणींची व इतर स्त्रियांचीही गौरता हरण करतोस.

णच्चणसलाहणणिहेण पासपरिसंठिआ णिउण गोवी।
सरिसगे विआणँ चुम्बइ कवोलपडिमागअं कण्हम् ।।
(गा. स. २.१४)

अर्थ – नाचण्याच्या श्रमांमुळे गोपींना घाम आला होता. त्यांच्या ओल्या गालांवर कृष्णाच्या प्रतिमा उमटल्या होत्या. एक निपुण गोपी मागे (प्रेक्षकांच्या घोळक्यात) उभी होती. नर्तिकांच्या कौशल्याची स्तुती त्यांच्या कानांत सांगण्याच्या निमित्ताने ती पुढे झाली व त्यांच्या गालावर उमटलेल्या कृष्णाच्या प्रतिबिंबांच्या चुंबनांचे श्रेय तिला (अनेक वेळा) मिळाले.

गाथासप्तशतीत आढळणारे गोपी–कृष्णांचे लौकिक व शृंगारिक प्रेमच पुढे १२ व्या शतकात निर्माण झालेल्या जयदेवाच्या गीतगोविंद या काव्यातही आढळते. उदा०—

अथ कथमपि यामिनीं निनीय स्मरशरजर्जरितापि सा प्रभाते ।।
अनुनयवचनं वदन्तमग्रे प्रणतमपि प्रियमाह साभ्यसूयम् ।।
(गी. गो. ८.१)

अर्थ – नंतर कामबाणांनी जर्जर झालेल्या त्या गोपीने कशीबशी ती रात्र घालवली. प्रभातकाळी तिचा प्रियकर पुढे येऊन नम्र होऊनही अनुनयवचन बोलू लागला असता ती असूया धरून त्याला म्हणाली.

वरील श्लोकाच्या वाच्यार्थावरूनच ही गोपी कृष्णाकडे कामभावनेने पाहणारी होती, हे स्पष्ट कळते. विद्यापतीची गोपीही जयदेवाच्या या गोपीहून भिन्न नाही. उदा०—

एक शयन सखि सूतल रे आएल बलमु निशि मोर।
जानल कतिखन तेजि गेल रे बिछुरल चकेवा जोर ।।

अर्थ – रात्री प्रियतम आला. आम्ही दोघे एका शय्येव झोपलों होतो; (पण) तो केव्हा उठून निघून गेला को जाणे! (त्यामुळे) चक्रवाकमिथुन वियुक्त झाले.

लोकसाहित्यात गोपींचा जो रांगडा पण गहिरा प्रणयभा प्रकट झाला होता, तोच जयदेव, विद्यापती, इ. कवींच्या काव्या रसमधुर होऊन अनेक पैलूंनी प्रकाशित झालेला दिसतो.

मध्ययुगात कृष्णभक्तिसंप्रदायांनी पुराणांच्या आधारा गोपी–कृष्णांची प्रेमाख्याने अध्यात्मरंगाने रंगवली आणि त्यां भक्तीचे स्वरूप दिले. पुढे गोपीभाव आणि राधाभाव यांच्य गंभीर व रहस्यपूर्ण व्याख्या होऊ लागल्या. हरिवंशात स्पष्ट सांगितले नाही, पण तिथे ध्वनित होते, की गोकुळातली गो गोपी ही मंडळी स्वर्गातली देवमंडळी असून, ती कृष्णावतारा साहाय्य करण्यासाठी भूतलावर अवतरली आहे. भागवता गोपींना देवस्त्रियाच म्हटले आहे (१०·१·२३); पण भा वतातल्या गोपी या लौकिक प्रणयिनी या स्वरूपातच चि केलेल्या आहेत.

पद्म व ब्रह्मवैवर्त या पुराणांत गोलोकाची कल्पना केले असून, त्यातही एक अलौकिक वृंदावन आहे. या वृंदाव परमानंदरूप परब्रह्म श्रीकृष्ण गोपींसह नित्य क्रीडारत असल्या सांगितले आहे. ब्रह्मवैवर्तात म्हटले आहे, की श्रीकृष्णाने व्रजात अवतीर्ण होण्याच्या पूर्वी राधेला व गोलोकातल्या गोप-गोपींना गोकुळात जन्म घेण्याची आज्ञा दिली. मग स्व तल्या देव-देवींनीही व्रजात जन्म घेण्यासाठी गोप-गोपींची धारण केली (६.६३.६९). दंडकारण्यात कृष्णभक्त असे राहत होते. त्यांनी सौंदर्य व माधुर्य यांचा आस्वाद घेण्या व्रजात गोपींचा जन्म घेतला, असे पद्म पुराणात म्हटले आहे

काही पुराणांनी 'गोप्यस्तु श्रुतयो ज्ञेयाः'= गोपी या सा श्रुती आहेत, असे सांगितले आहे व सूरदासाने त्याला दु दिला आहे. याविषयी सूरदास एक कथा सांगतो, ती अशी-

कृष्णाच्या सगुण स्वरूपाच्या दर्शनाची इच्छा करणा श्रुतींना ब्रह्मदेवाने नित्य वृंदावनात नेऊन गोपी–कृष्णांची णीय क्रीडा दाखवली. तेव्हा श्रुतींनी आपल्यालाही गोपी प्राप्त व्हावे, असे कृष्णाजवळ वरदान मागितले. मग श्रीकृ श्रुतींना म्हणाला. 'मी जेव्हा भरतखंडातल्या मथुरामंड गोपवेष धारण करून अवतीर्ण होईन, तेव्हा तुम्ही गोपी तिथे जन्म घ्याल व माझ्यावर प्रेम कराल!'

निंबार्कांच्या हंससंप्रदायात कृष्णब्रह्माची ऐश्वर्य व मा अशी द्विविध शक्ती सांगितली आहे. रमा किंवा लक्ष्मी

भू ही त्याची ऐश्वर्यशक्ती असून, गोपी ही माधुर्यशक्ती आहे. गोपींच्या विषयी विस्तृत विवेचन चैतन्य संप्रदायात आणि वल्लभ संप्रदायात आढळते. चैतन्यमतानुसार गोपी या श्रीकृष्णाच्या ल्हादिनी शक्ती आहेत. त्या प्रकट व अप्रकट अशा स्वरूपात कृष्णाच्या भोवती सदैव राहतात. कृष्णाप्रमाणेच गोपींनाही प्रकट व अप्रकट असे उभयविध शरीर आहे.

उज्ज्वल नीलमणीच्या कृष्णवल्लभा या अध्यायात गोपींचे स्वकीया व परकीया असे दोन भेद कल्पिले आहेत. रुक्मिणी, सत्यभामा, इ. कृष्णस्त्रिया स्वकीया आहेत तर कृष्णाच्या प्रेयसी गोपी या परकीया आहेत. पण हे त्यांचे परकीयात्व लौकिक दृष्टीनेच आहे. वस्तुतः त्या सर्व स्वकीयाच आहेत. कारण त्यांनी स्वतःचे तन, मन, प्राण सर्व काही कृष्णार्पण केलेले आहे. ज्या गोपी नित्यकालासाठी नित्यवृन्दावनात श्रीकृष्णाच्या परिसरात राहतात, त्यांना नित्यप्रिया म्हटलेले आहे. या गोपी म्हणजे कृष्णाच्या एकान्त भक्तांचे जीवात्मेच होत. ते गोपीरूप धारण करून कृष्णलीलेचे अभिन्न अंग बनले आहेत. अशा या नित्यप्रिया गोपींना प्राचीना असेही म्हटले आहे. कारण अत्यंत दीर्घ साधना करून भक्तजीवांनी हा गोपीदेह मिळविलेला असतो. नित्यप्रिया गोपींच्या अंशाने श्रीकृष्णाच्या संतोषासाठी ज्या गोपी जन्म घेतात, त्यांना देवी असे नाव आहे. जेव्हा श्रीकृष्ण देवयोनीत अंशावतार धारण करतो, तेव्हा या देवी गोपी त्याच्या भोवती जमतात. नित्यप्रिया गोपींमध्ये आठ प्रधान गोपी आहेत. त्यांना यूथेश्वरी असे म्हणतात. राधा व चंद्रावली या प्रमुख यूथेश्वरी होत. त्यांतही राधा ही सर्वश्रेष्ठ मानलेली आहे. राधेच्या पाच प्रकारच्या अष्टसख्या आहेत, त्या अशा--

(१) **सखी**– कुसुमिका, विद्या, इ.
(२) **नित्यसखी**– कस्तूरिका, मणिमंजरिका, इ.
(३) **प्राणसखी**– शशिमुखी, वासंती, इ.
(४) **प्रियसखी**– कुरंगाक्षी, मदनालसा, इ.
(५) **परमश्रेष्ठ सखी**– ललिता, विशाखा, इ.

या अष्टसख्या सर्व गोपींत अग्रगण्य होत. यांतल्या प्रत्येक गोपीला एकेक सेविका असते. तिला मंजरी म्हणतात. यांची नावे रूपमंजरी, जीवमंजरी, अनंगमंजरी, इ. आहेत.

वल्लभ संप्रदायाच्या ग्रंथांत गोलोकातल्या नित्य रासाचे वर्णन केलेले असून गोपींना कृष्णाच्या परमानंद स्वरूपाचा विस्तार करणाऱ्या सामर्थ्यशक्ती मानलेले आहे. त्यांची उत्पत्तीही कृष्णब्रह्माच्या आनंदरूप देहातूनच मानलेली आहे. राधा ही सर्व गोपींची स्वामिनी असून, ती पूर्णानंदाची सिद्धशक्ती आहे. वल्लभ संप्रदायातही गोपींचे स्वकीया व परकीया असे भेद कल्पिले आहेत. मात्र त्यांची नावे अन्यपूर्वा व अनन्यपूर्वा अशी सांगितली आहेत. अन्यपूर्वा गोपी या विवाहित असतात व त्या आपल्या लौकिक पतीचा संबंध तोडून जारभावाने कृष्णप्राप्तीची आकांक्षा धरतात. त्यांना त्या कामी लोक, वेद व कुल या तीन्ही मर्यादांचे उल्लंघन करावे लागते. अनन्यपूर्वा गोपी या कुमारिका असतात व कृष्णाला पतिरूपाने प्राप्त करून घेण्यासाठी त्या साधना करतात.

या दोन प्रकारच्या गोपींव्यतिरिक्त वल्लभ संप्रदायाने सामान्या गोपी नावाचा एक प्रकार कल्पिला आहे. या गोपी यशोदेप्रमाणे बालकृष्णावर वात्सल्यप्रेम करीत राहतात. चैतन्य मतात स्वकीया–परकीया व्यतिरिक्त साधारणी नावाचा एक प्रकार आहे. अशा गोपी कुब्जेप्रमाणे केवळ कामतृप्तीसाठी श्रीकृष्णावर प्रेम करीत असतात. [श. क.; हिं. सा. को.]

गोपीचंद एक भिक्षेकरी जात. हे लोक भगवी वस्त्रे परिधान करतात व तंतुवाद्य वाजवून गोपीचंद राजाच्या स्तुतिपर गाणी गातात. [बाँ. बे. क्रा.]

गोपीचंदन द्वारकेकडे आढळणारी एक प्रकारची पांढरी माती. ‘गोप्यः नाम विष्णुपत्न्यः तासां चन्दनं आल्हादकम् = जे गोपींना अर्थात कृष्णस्त्रियांना आनंद देते ते गोपीचंदन होय,’ अशी याची व्याख्या आहे. गोपीचंदनाला विष्णुचंदन असेही म्हणतात. पूर्वी चंदन उगाळून त्यात केशर मिसळून त्याची उटी अंगाला लावण्याची प्रथा होती. उपनिषदात गोपीचंदनाचा गौरव केलेला आढळतो. गंगोदकाने जशी माणसांची पापे नष्ट होतात, त्याप्रमाणे गोपीचंदनाचा लेप लावल्याने पापे नष्ट होऊन मुक्ती मिळते, असे सांगितले आहे. चारही वर्णांना गोपीचंदन उक्त आहे. विष्णुगायत्री–मंत्र म्हणत अनामिकेने हे चंदन कपाळावर लावतात. त्याचप्रमाणे शंख, चक्र, गदा, पद्म यांचे ठसे गोपीचंदनाने अंगावर उठवण्याची प्रथा वैष्णव लोकांत आहे. त्यायोगे सर्व तीर्थांच्या स्नानाचे फळ मिळते, असे पद्म पुराणात सांगितले आहे. अंतकाळी ज्याच्या अंगावर अशा प्रकारच्या मुद्रा असतील तो विष्णुलोकी जातो, असे वैष्णव पुराणांत सांगितले आहे. [क्रि. स्ट. ले. उ.]

गोपीचंदनोपनिषद हे वासुदेवाने नारदाला सांगितले. यात गोपीचंदनाचा ऊर्ध्वपुंड्र कसा लावावा, ते विस्ताराने सांगितले आहे. गोपी विहार करीत असताना त्यांच्या धुवून निघालेल्या कुंकवाशी मिसळलेले चंदन ते गोपीचंदन होय, असे यात सांगितले आहे. दुसरी आध्यात्मिक व्याख्या प्रस्तुत उपनिषदात दिली आहे, ती अशी –

श्रीकृष्णाख्यं परं ब्रह्म गोपिकाः श्रुतयोऽभवन् ।
एतत्सम्भोग्यसम्भूतं चन्दनं गोपिचन्दनम् ॥

अर्थ– श्रीकृष्ण हे परब्रह्म आहे. गोपिका या श्रुती आहेत. कृष्ण व गोपी यांच्या संभोगातून उत्पन्न झालेले (आल्हादक सुख) ते गोपीचन्दन होय.

गोपीचंदनाचा तिलक लावल्याने मृत्यूवर विजय मिळविता येतो आणि मोक्षही साधतो, असे या उपनिषदात सांगितले आहे. [सी. ग. देसाई]

गोपीनाथ (१५०१ ते १५५३ इ. स.) वल्लभाचार्यांचा-ज्येष्ठ पुत्र. याचा जन्म प्रयागक्षेत्री झाला. वल्लभाचार्यांच्या पश्चात हा पुष्टिसंप्रदायाचा प्रमुख आचार्य बनला. पुष्टिसंप्रदायाच्या गादीवर असतानाही तो सदैव तीर्थयात्रा करीत हिंडे व त्या काळात गादीचा सर्व कारभार आपला धाकटा भाऊ विठ्ठल याजवर सोपवी.

गोपीनाथाने गुजरात, काठेवाड, इ. प्रदेशांत पुष्टिसंप्रदायाचा प्रचार केला. साधनदीपिका या नावाचा त्याचा एक संस्कृत ग्रंथ उपलब्ध असून, त्यात पुष्टिमार्गी पूजाविधी सांगितला आहे. [हिं. सा. को. २]

गोपीनाथ मौनी (इ. स. चे १७ वे शतक) एक नैयायिक. हा महाराष्ट्रीय असून, राजा जयसिंहाच्या कारकीर्दीत वाराणसी येथे होऊन गेला. शब्दालोकरहस्य, तर्कभाषाटीका व पदार्थविवेकटीका हे ग्रंथ याच्या नावावर आहेत. [म. च. को.]

गोपीभाव भक्तीची एक श्रेष्ठ अवस्था. 'तदर्पिताखिलाचारता तद्विस्मरणे परमव्याकुलता'= श्रीकृष्णाच्या चरणकमली आपले समस्त आचार, व्यवहार व धर्म यांचे संपूर्ण समर्पण करणे आणि त्याच्या विरहात परमव्याकुल होणे, ही दोन गोपीभावाची परिचायक लक्षणे आहेत (नारदभक्तिसूत्र).

भक्तिशास्त्रात व्रजगोपिका या भक्तिप्रेमाच्या धवल पताकाच मानल्या आहेत. त्यांच्या उत्कट प्रेमाच्या चित्रणात भक्तांनी आणि कवींनी आपली असमर्थताच व्यक्त केली आहे. या बाबतीत कबीराचे एक उदाहरण सांगतात. काही भक्तभाविक 'कबीर, कबीर' म्हणून त्याच्यामागे जाऊ लागले, तेव्हा कबीर त्यांच्याकडे वळून म्हणाला–

कबीर, कबीर क्या कहे, जा जमुना के तीर।
एक एक गोपि के प्रेम में, बह गये लाख कबीर ॥

अर्थ – 'कबीर कबीर' काय करीत बसला! यमुने तीरावर जा. (तिथे तुम्हाला दिसेल, की) एका एका गोपी प्रेमात लाख कबीर वाहून गेले आहेत.

भागवत पुराणात गोपींच्या भगवत्प्रेमाचे सरस वर्णन पा यला मिळते. गृहशृंखला ही तोडायला सर्वात कठीण मानले आहे. ती तोडण्यासाठी तीव्र अशा विवेक–वैराग्याची ग असते. पण यापैकी कोणतीही साधना न करता केवळ प्रेमाच जोरावर व्रजगोपिकांनी गृहशृंखला तोडली व त्यावरोब लोकलाजही सोडली. लौकिक नात्याची सारी बंधने तोडून कृष्णप्रेमासाठी उन्मुक्त झाल्या. ते पाहून भगवान श्रीकृ स्वमुखाने गोपींना म्हणतो–

न पारयेऽहं निरवद्यसंयुजा
स्वसाधुकृत्यं विबुधायुषापि वः ।
या माऽभजन्दुर्जरगेहशृङ्खलाः
संवृश्च्य तद्वः प्रतियातु साधुना ॥
(भाग. पु. १०.३२.

अर्थ– गोपींनो, तुम्ही दुर्जर गृहशृंखला तोडून माझे केले आहे. तुमचे प्रेम दोषरहित आहे. त्यात स्वार्थाचा नाही. मला देवांचे आयुष्य लाभले, तरीही मी तुमच्या प्रेमऋणातून मुक्त होऊ शकणार नाही. म्हणून हे गोपींनो, स्वतः तुमच्या औदार्याने मला ऋणमुक्त करा.

भक्तिमार्गात गोपीभावाचे पुढील चार गुण महत्त्वाचे आहेत. गोपींच्या कृष्णमय जीवनाचा विचार करून ठरवलेले आहेत. ते गुण असे —

(१) श्रीकृष्णचरणी संपत्तीचे व स्वत्वाचे संपूर्ण समर्प

(२) क्षणभराच्या वियोगाने किंवा विस्मृतीनेही व्याकुळ होणे.

(३) श्रीकृष्णाच्या यशोगौरवाचे पूर्ण ज्ञान. आणि

(४) श्रीकृष्णाच्या सुखात स्वतःचे सुख मानणे व तो दित झाल्याने स्वतः आनंदित होणे.

या चार गुणांचा प्रकर्ष ज्या प्रेमात दिसतो, ते भगव गोपीभावाशी तुल्य समजावे.

वल्लभाचार्यांच्या पुष्टिमार्गात गोपीभावाला विशेष मह दिलेले आहे. पुष्टिमार्गात गोपीभाव हा सर्वोच्च भक्ति मानलेला आहे. राधावल्लभीय व सखी संप्रदाय या दोन्ही दायांत राधाकृष्णांचे अद्वैत मानले असून, राधेच्या सख्यां त्याच अद्वैतात समाविष्ट करून घेतले आहे. म्हणूनच भक्त गोपींचा सखीभाव आपल्याला प्राप्त व्हावा, अशी आ बाळगतात. ते गोपींच्या स्वरूपाचे ध्यान करता करता गो सारखेच आचरण करू लागतात. त्यांची सर्वांत मोठी आ

ही असते, की कोणत्याही प्रकारे आपल्याला युगलमूर्तींच्या (राधा-कृष्ण) सान्निध्यात राहून त्यांची परिचर्या करण्याचा अवसर प्राप्त व्हावा. [श. क.; हिं. सा. को.; भा. सं.]

गोपीभास्कर (१५९६–१६७८ इ. स.) एक मराठी कवी. अहमदनगर येथील सुबोपंत देशपांडे याचा हा पुत्र होय. लहानपणीच मुरारमल्ल विद्वांस या गुरूच्या चरणी याला अर्पण करण्यात आले. गुरूकडून दीक्षा घेतल्यावर याने अनेक ग्रंथ लिहिले. त्यांपैकी सिध्दान्तराजभद्र, आचारमहाभाष्य, विद्यासागरभाष्य आणि भगवद्‌गीताटीका हे प्रमुख होत. याशिवाय शुकदेवचरित्र हा ओवीबद्ध ग्रंथही याच्या नावावर आहे. [म. वा. इ.; म. म. वा.]

गोपीयंत्र तुणतुण्यासारखे एक वाद्य. तुणतुण्यात बांबूचा एक लहान तुकडा एका उभट गोल लाकडी भांडयाच्या एका बाजूला तिरपा अडकवितात. परंतु गोपीयंत्रात बांबूचा काही भाग उभा अर्धा चिरून त्याच्या दोन फांका लाकडी मापाला अथवा नळकांडयाला बाहेरून समोरासमोर खिळयाने पक्क्या बसवितात. बांबूचा न चिरलेला जो थोडा भाग असतो, त्याला एक भोक पाडून त्यात एक लहान खुंटी बसवितात. त्या खुंटीला तारेचे एक टोक पिळवून बसवलेले असते आणि तिचे दुसरे टोक मापाच्या तोंडावर बसवलेल्या चामडयाच्या मध्यात अडकवलेले असते. खुंटी कमी अधिक पिळून तारेतून इष्ट स्वर काढता येतो. एका जाड लाकडी कांडीने तारेवर प्रहार करून हे वाद्य वाजवले जाते. छोटा नागपूर व बंगाल या प्रांतांतले भिक्षेकरी लोक गाण्याच्या साथीसाठी याचा उपयोग करतात. [श्री. आवासाहेब मुजुमदार– केसरी, ७ एप्रिल १९६३]



गोपीयंत्र

गोपुच्छभ्रामण लहान मुलांच्या मनातील भीती दूर करण्यासाठी गाईचे शेपूट त्यांच्या अंगावरून फिरवणे, याला गोपुच्छभ्रामण असे म्हणतात. अशी चाल यादव समाजात होती (विष्णू पु. ५.५.१२). आजही काही ठिकाणी ही चाल दिसते.

गोपुर ‘पुरद्वारं तु गोपुरम्’= नगरद्वाराला गोपुर म्हणावे, असे अमरकोश सांगतो. गोपुर हा द्रविड शिल्पाचा एक प्रकार आहे. द. भारतात मंदिरांच्या प्राकाराभोवती उंच भिंती असून, त्यांच्या प्रवेशद्वारांवर शिखरासारखे उंच शिल्पकाम केलेले असते, त्याला गोपुर म्हणतात. त्याला अनेक मजले असून, त्यावर पुष्कळ नक्षीकाम केलेले असते. गोपुरांचे पहिले दोन मजले बहुधा सरळ व दगडी असतात. त्यावरचे बांधकाम विटांचे असून, प्रत्येक मजला क्रमाने लहान होत गेलेला असतो. अगदी वरच्या टोकाची रुंदी पहिल्या मजल्याच्या रुंदीच्या साधारणपणे निम्मी असते. त्याच्यावर एक अर्धवर्तुळाकार व लांबट असे छप्पर असते. मंदिराच्या विमानाप्रमाणे हे शिल्पकाम चौरस नसते; तर त्याची एक बाजू जास्त लांब असते. त्यामुळे वरचे छप्पर घुमटाकार न होता, ते चैत्यगृहावरील लांबट छपरासारखे दिसते. शिरोभागाला दोही अंगी दोन अंतर्वक्र शृंगे असणे, हे शैव मंदिरांच्या गोपुराचे लक्षण समजले जाते. ती शृंगे हे नंदीच्या मस्तकाचे प्रतीक होय.



गोपुर – तिनेवेल्ली

कांजीवरम् येथील कैलासनाथमंदिर आणि पट्टदकल येथील विरूपाक्ष मंदिर यांच्या प्रवेशद्वारावर जी गोपुरे आहेत, ती गोपुरशिल्पाचे प्राथमिक स्वरूप दाखवतात. इ. स. च्या १२ व्या व १३ व्या शतकांत पांडय वंशाच्या काळात गोपुरशिल्पाचा खूप विकास झाला. चिदंबरम् येथील मंदिराच्या पूर्वद्वारावरील गोपुर इ. स. १२५० च्या सुमारास सुंदर पांडय या राजाने बांधले आहे. त्याच्या पहिल्या मजल्याची लांबी ९० फूट व रुंदी ६० फूट असून, दोन मजल्यांची उंची ३५ फूट आणि वरच्या ५ मजल्यांची उंची १०० फूट आहे. याच्या रचनेत चोळशिल्पपरंपरेतील सौंदर्य दिसून येते. मात्र यातील नक्षीकाम अधिक कलापूर्ण आहे. वरचे मजले स्तंभ, कोनाडे व महिरपी यांनी सुशोभित केलेले आहेत.

गोपुरांचा दुसरा एक प्रकार आहे; त्यात वरच्या मजल्यांच्या उतरत्या बाजू सरळ न सून फुगीर असतात आणि त्यावर विपुल

नक्षीकाम आणि असंख्य मूर्ती कोरलेल्या असतात.

वेदांतील गोमतीपुर या शब्दावरून गोपुर हा शब्द आला असावा, असा तर्क आहे. द्वार किंवा त्यावरील उंच शिल्पकाम असा त्याचा अर्थ आहे. देवालये व राजप्रासाद अशा दोन्हींच्या दारांवर गोपुरे असत असे मानसार ग्रंथावरून कळते. देवालयाच्या प्राकारात अनेक प्रांगणे असतील तेव्हा प्रत्येक प्रांगणासमोर एक गोपुर असते. पहिल्याला द्वारशोभा, दुसऱ्याला द्वारशाला, तिसऱ्याला द्वारप्रासाद, चौथ्याला द्वारहर्म्य आणि पाचव्याला महागोपुर अशी नावे आहेत.

गोपुरांना सातपासून सोळापर्यंत मजले असतात. त्यांचे श्रीभोग, श्रीविशाल, विष्णुकान्त, इन्द्रकान्त, ब्रह्मकान्त, स्कन्दकान्त, इ. दहा वर्ग आहेत. शिखराचा आकार, घुमटाचा आकार, पडव्या आणि मनोरे यांची संख्या यांतील भिन्नतेमुळे हे वर्ग पडले आहेत. मानसारात गोपुरांच्या पाच मजल्यांच्या रचनेचे विस्तृत वर्णन केलेले आहे. त्यावरील नक्षीकाम व कंगोरे कसे असावे तेही तिथे सांगितले आहे.

द. भारतातील बहुतेक देवालयांच्या प्रवेशद्वारांवर गोपुरे आहेत. मुख्य मंदिरांच्या शिखरापेक्षाही गोपुरेच अधिक उंच, भव्य आणि सुंदर दिसतात. मदुरा येथील मीनाक्षीच्या मंदिराभोवती नऊ भव्य गोपुरे आहेत. पायऱ्या-पायऱ्यांनी उंच व निमुळते होत जाऊन आकाशाला भिडणारे हे प्रचंड व रेखीव शिल्पकाम आणि त्यातील सुरेख शिल्पाकृती पाहून मन स्तिमित होते. जंबुकेश्वर, चिदंबरम्, तिरुअण्णामलै, तिरुवल्लुर, कांचीपुरम्, श्रीरंगम्, कुंभकोणम्, त्रिचनापल्ली, इ. स्थळांतली गोपु प्रसिद्ध आहेत. कुंभकोणम् येथील सारंगपाणीच्या मंदिरा गोपुर बारामजली आहे. त्रिचनापल्ली येथील श्रीरंगाच्या लयात लहानमोठी अशी एकवीस गोपुरे आहेत. महारा श्री. परशुरामभाऊ पटवर्धन यांनी तासगाव येथे गण मंदिराच्या प्राकारावर असेच एक गोपुर बांधले आहे. पु संगमावरील शिवमंदिरालाही एक उंच गोपुर होते. [इ. (बु. हि.); एन्सा. हि. आ.; सु. वि. कां.]



गोपुर– गंदिकोट



गोपुर– अरुणाचलमंदिर–तिरुअण्णामलै

गोपुररक्षित आयुर्वेदाचा एक आचार्य, दिवोदास ध रीचा शिष्य व सुश्रुताचा समकालीन. एका शल्यतंत्राची रचना केल्याचा उल्लेख मिळतो. [आ.

गोप्रतार अवध प्रदेशामधील फैजाबाद जिल्ह्यातील म्हणून प्रसिद्ध असलेले ठिकाण. इथे स्वतःच्या पार्थिव देहाचा त्याग केल्याचे सांगतात.

गोप्रदान शृंगारून व पूजा करून गाय दान देणे, गोप्रदान म्हणतात. व्रत, पूजा, इ. कृत्यांच्या त्या कृत्यांची सांगता होण्यासाठी गोप्रदान करावे,

सांगितले आहे. हे दान देताना पुढील प्रार्थनामंत्र म्हणतात–

यज्ञसाधनभूता या विश्वस्यान्नप्रदायिनी ।
विश्वरूपधरो देव: प्रीयतामनया गवा ।।

('विश्वस्याघौघनाशिनी' असाही पाठभेद आहे.)

अर्थ – जी यज्ञाला साधनीभूत, विश्वाला अन्न देणारी अशी ही गाय, तिच्या दानाच्या योगाने विश्वरूप धारण करणारा देव प्रसन्न होवो.

मग गायीच्या सर्वांगाला स्पर्श करून ती नियोजित ब्राह्मणाला दान देतात. सांप्रत सव्वा रुपया किंवा पंचवीस पैसे निष्क्रय द्रव्य हा गोप्रदानाचा पर्याय मानतात. गोप्रदान हे महादानापैकी एक आहे. रोगी आसन्नमरण झाला असता त्याच्या पारलौकिक सुखासाठी गोप्रदान करावे, असे सांगितले आहे. और्ध्वदेहिक कृत्यातही गोप्रदान करतात.

मानवगृह्यसूत्रात षष्ठीकल्पाचा विधी सांगितलेला असून, त्यातही गाय दान द्यायची असते. पुराणांत गुडधेनू, कार्पासधेनू, इ. कृत्रिम गायींचे दानही सांगितले आहे. [दा. चं.]

गोप्रसवशांती दुष्ट तिथिनक्षत्रादी योगावर मूल जन्मले असता त्यामुळे उत्पन्न होणाऱ्या अरिष्टांच्या निवारणासाठी गोप्रसवशांती करतात. हिचा विधी असा–

प्रथम गणपतिपूजन, संकल्प व आचार्यवरण. मग विशिष्ट जागी मोहऱ्या टाकून व पंचगव्याने त्या जागेचे प्रोक्षण करून आचार्य ती जागा गोमयाने सारवतो. नंतर त्या जागी रांगोळीने कमळ काढून त्यावर भात पसरतो, त्यावर एक सूप ठेवतो. व त्या सुपात तांबडे वस्त्र आंथरून त्यावर तीळ पसरतो.

मग मुलाला रक्तवस्त्राने आच्छादून त्या सुपात पूर्वेकडे डोके करून ठेवतात. आणि सुपासह मुलाला सूत्रवेष्टण करून, ते सूप गायीच्या मुखाजवळ नेऊन गायीला हुंगायला लावतात. तिने त्या मुलाला हुंगले, की त्या मुलाचा जन्म गायीपासून झाला असे समजतात. मग त्या मुलाला पंचगव्याने स्नान घालतात. आचार्य ते मूल स्वत:च्या हाती घेऊन त्याच्या मातेला देतो. माता त्याला गायीच्या तोंडाजवळ नेऊन तिच्या पुच्छाकडे जाते व तिथे ते मूल पित्याच्या हाती देते. नंतर आचार्य पित्याच्या हातून त्याला घेऊन ते पुनश्च मातेकडे देतो. मग नव्या वस्त्रावर त्याला निजवून आई-बाप त्या मुलाचे मुखावलोकन करतात. नंतर त्याला पंचगव्याने प्रोक्षण व आपोहिष्ठादी मंत्रांनी अभिषेक करतात. बाप त्या मुलाला दोन्ही हातांनी उचलून त्याच्या मस्तकाचे अवघ्राण करतो. मग ती गाय ब्राह्मणाला दान देतो.

त्यानंतर आचार्य गोमुखप्रसवशांतीचा होम करतो. यक्ष्मा, विष्णू व आदित्यादी नवग्रह या प्रस्तुत शांतीच्या प्रधान देवता होत. त्यांना उद्देशून दही, मध व आज्य या द्रव्यांनी हवन करतात. नंतर धान्यराशीवर कलश स्थापून त्यावर विष्णू, वरुण व यक्ष्मा यांच्या प्रतिमा ठेवतात व त्यांची पूजा करतात. प्रतिमांची उत्तरपूजा झाल्यावर त्या आचार्याला दान देतात. कर्मसांगतेसाठी दहा किंवा तीन ब्राह्मणांना भोजन घालतात (ऋ. ब्र. क.)

अनेक दुष्टयोगजननशांतींत गोप्रसवशांती प्रथम केली जाते. गायीला मंगलांची माता मानली आहे. म्हणून दुष्टयोगावर जन्मलेले मूल गोप्रसवशांतीच्या रूपाने गायीच्या मुखातून पुनश्च जन्माला घालतात. त्यामुळे त्याच्या सर्व अशुभांचे निवारण होईल, अशी श्रद्धा या विधीच्या मुळाशी असते.

गोफ महाराष्ट्रातील एक लोकनृत्य. या नृत्यात चार, सहा किंवा आठ जोडया भाग घेतात. नृत्य करणारे लोक कृष्णाचा गोपवेष करतात. तबला व झांज यांच्या साथीवर हे नृत्य होते.

नृत्यात जितक्या व्यक्ती भाग घेणार असतील, तितक्या रंगीबेरंगी कापडाच्या पट्ट्या एकत्र करून, त्यांच्या एका टोकाला गाठ मारतात. ती गाठ मांडवाच्या वाशाला अडकवतात. मग त्यातील एक पट्टी व एक टिपरी प्रत्येक व्यक्ती आपल्या डाव्या-उजव्या हातात घेते. मग एका लयीत प्रत्येक व्यक्ती दुसरीच्या टिपरीवर आघात करते. अशा रीतीने फेर धरून नृत्याला सुरवात होते. नंतर नर्तकांच्या मागेपुढे होण्यातून आणि स्थानबदलातून त्या पट्ट्यांचा गोफ विणला जाऊ लागतो.

गोफ पुरेसा विणला गेल्यावर नृत्याला उलट गती देतात. त्यामुळे विणलेला गोफ हळूहळू सुटत जातो. गोफ पुरता सुटला, की नृत्य थांबते. या नृत्याचे एक गाणे पुढीलप्रमाणे–

पहा पहा लागला झगडा हो ।
त्याचा हिरोनि घेतला आम्ही पगडा हो ।
पहा पहा लागला झगडा हो ।

हे नृत्य कलापूर्ण व प्रेक्षणीय असते. शिमग्यात किंवा जन्माष्टमीच्या उत्सवात हे नृत्य करतात. कोकणात व गोमंतकात याचा विशेष प्रचार आहे. [व्या. ज्ञा. को.; फो. डा. म.]

गोफण पाखरे वगैरे उडविण्यासाठी वापरण्यात येणारे एक साधन. प्राचीन काळापासून हे प्रचारात असल्याचे कळते. महाभारतात चक्राश्म व भृशुण्ड्यू असे दोन शब्द आलेले आहेत (आदि. २२७. २५). त्यावर नीलकंठ चतुर्धर या टीकाकाराने पुढील खुलासा केला आहे –

चक्राश्मसंज्ञं यस्य भ्रमिबलेन महान्तोऽपि पाषाणा
अतिदूरे क्षिप्यन्ते तत्काष्ठमयं यन्त्रम् ॥
भृशुण्डी चर्मरज्जुमयं यन्त्रं पाषाणक्षेपणमेव ॥

अर्थ–चक्राश्म म्हणजे मोठे दगड अतिदूर फेकण्याचे लाकडी यंत्र आणि भृशुंडी म्हणजे दगड फेकण्याकरिता कातडे व दोऱ्या यांनी बनविलेले साधन होय.

सुश्रुतसंहितेत हा शब्द गोफणा या रूपात आला आहे. कौटिल्याच्या अर्थशास्त्रात ‘यन्त्रगोष्पणमुष्टिपाषाणरोचनीदृषदश्चायुधानि’ अशी आयुधांची नावे आली आहेत. त्यांपैकी यंत्रपाषाण, गोष्पणपाषाण व मुष्टिपाषाण, यांचा अर्थ यंत्राने फेकण्याचे मोठे दगड, गोफणीने फेकायचे लहान खडे आणि हातांनी फेकण्याचे खडे असा आहे.



गोफण

हाताने फेकायच्या अस्त्रांमध्ये गोफण हे सर्वात प्राचीन अस्त्र आहे. अश्मयुगातील गोफणीचे दगड उपलब्ध आहेत. गोफणीचे दोन प्रकार आहेत. एक चामड्याच्या पट्ट्याला दोन दोऱ्या बांधलेली व दुसरी काठीच्या डेलक्याला बांधलेली. भिल्ल, गोंड वगैरे आदिवासी जमाती आजही गोफणीचा उपयोग करतात. [स्ट. इं. क. हि.]

गोब्बी आंध्रप्रदेशातील एक लोकनृत्य. यात बायका फेर धरून व टाळ्या वाजवून नाचतात. कुम्मी नृत्यासारखेच हे एक समूह नृत्य आहे.

या नृत्याच्या वेळी जी गीते म्हणतात, त्यांना गोब्बी पाटलू असे नाव आहे. लग्नप्रसंगी, भजनाच्या वेळी किंवा संक्रांतीच्या सणात हे नृत्य करतात. लग्नात नवऱ्या मुलीने या नृत्यात भाग घेतला नाही, तर तिला मुका मुलगा होतो, अशी समजूत आहे. [डि. सा. इं. म्यु. म्यु.]

गोभिल एक गोत्रकार व सूत्रकार ऋषी. हा कश्यपकुलोत्पन्न असून, वत्समित्राचा शिष्य व प्रसिद्ध आचार्य होता. गोभिल गृह्यसूत्र, गोभिल गृह्यकारिका, गोभिल परिशिष्ट, इ. ग्रंथ याने रचले आहेत. हेमाद्रीने गोभिलाला राणायनी व कौथमी या शाखांचा गोत्रकार मानले आहे. [हिं. क. को.]

गोभिल गृह्यसूत्र याचा कर्ता गोभिल ऋषी होय. या गृह्यसूत्राचे चार प्रपाठक आहेत. कात्यायनाने या ग्रंथावर कर्मप्रदीप नावाचे परिशिष्ट लिहिले आहे. सामवेदाच्या कौथुम व राणायन शाखेचे लोक हे गृह्यसूत्र मानतात. मंत्रब्राह्मण नामक ग्रंथ तयार झाल्यानंतर त्याच्या आधारे हे गृह्यसूत्र रचले गेले आहे. खादिर गृह्यसूत्र हे गोभिल गृह्यसूत्राची संक्षिप्त आवृत्ती आहे. [हिंदुत्व; इं. वे. क. सू.]

गोभिलस्मृती हिच्यात तीन प्रपाठक असून, त्यांत श्राद्धकर्म, नित्यकर्म, संस्कार, इ. चे निरूपण आहे. ही स्मृती गोभिल गृह्यसूत्राच्या स्पष्टीकरणार्थ लिहिलेली आहे. तिचा आरंभ व शेवट यांवरून तिचे नाव कर्मप्रदीप असावे, असे वाटते.

गोमटेश्वर याला गोमटस्वामी व बाहुबली अशी अन्य नावे आहेत. कार्कल, श्रवणबेळगोळ आणि येण्णूर येथे याच्या भव्य मूर्ती आहेत. **पाहा–** कार्कल, बाहुबली, येण्णूर, श्रवणबेळगोळ.

गोमंत (१) एक पर्वत. सह्याद्रीच्या विवराच्या ठिकाणी उभा असलेला पर्वत, असे त्याचे वर्णन हरिवंशात दिले आहे (९५.६३.९६). करवीरपुरापासून हा पर्वत ३ तं दिवसांच्या वाटेवर आहे, असेही सांगितले आहे. जरासंधाच्या भीतीने पळत सुटलेला श्रीकृष्ण बलरामासह या पर्वतावर आ असता, जरासंध तो पर्वत जाळण्यास प्रवृत्त झाला होता. राम कृष्ण जरासंधाच्या वेढ्यातून निसटले व खालच्या मैदानात आले आणि तिथून त्यांनी गुप्तपणे द्वारकेस प्रयाण केले. गोमं पर्वताच्या शिखराला प्रवर्षण असे नाव होते (पु. इं.). पर्वतावर गोमती नावाची देवी वास्तव्य करते, असे देवी भागवतात सांगितले आहे (७.३०.५७).

(२) मगध देशाच्या राजधानीच्या जवळचा एक पर्व गिरिव्रज नामक पर्वतराजीपैकी ती एक टेकडी असावी, अ दिसते. या पर्वतावर गाईंची खिल्लारे होती. म्हणून या गोरम पर्वत असेही म्हणत. सांप्रत याला भाटानीका पहा असे म्हणतात व तो राजगृहापासून पाच-सहा मैलांवर आहे [ए. से. ए. इं.]

गोमंतक गोवा किंवा गोमंतक हा प्रदेश भारताच्या पश्चि किनाऱ्यावरील कोकणपट्टीचा दक्षिणेकडील भा होय. उत्तरेस सावंतवाडी व वेंगुर्ला पेटा, पूर्वेस बेळगाव जिल्ह

दक्षिणेस कारवार जिल्हा व पश्चिमेस समुद्र अशा याच्या चतुःसीमा आहेत. पण पोर्तुगीजांच्या आगमनापूर्वी गोमंतकाचा क्षेत्रविस्तार याहून मोठा होता व वेळोवेळी त्याच्या सीमाही बदलत होत्या. सर्वसाधारणपणे मालवणपासून गंगावळी नदीपर्यंतचा (किंवा गोकर्णापर्यंतचा) प्रदेश गोवा किंवा गोमंतक या नावाने ओळखला जात असे. त्याच्या मध्यभागी असलेल्या बेटास गोवा बेट म्हणत; आजही गोवा बेट किंवा तिसवाडी म्हणतात. तसेच या प्रदेशाच्या गोवा बेटावरील राजधानीच्या शहरासही पूर्वी गोवा, गांवे किंवा गोवापुरी असे म्हणत.

नद्या व डोंगर— मांडवी व अघनाशिनी (जुवारी) या दोन गोव्यातल्या मोठ्या नद्या होत. मांडवी ही गोव्याच्या ईशान्य कोपऱ्यात भीमगडावर उगम पावते व आग्वाद किल्ल्याजवळ समुद्राला मिळते. हिच्या मुखाशी दुसरा एक किल्ला आहे, त्याला रेईजमागुश असे पोर्तुगीज नाव आहे. जुवारी नदी हेमाड बारसे व अष्टाग्रहार या भागात उगम पावते व मुरगावच्या आखातात समुद्रप्रवेश करते. गोव्यातून वाहणारी तिसरी मोठी नदी म्हणजे तेरेखोलची खाडी ही होय. ही मणेरीजवळ उगम पावते व तेरेखोल किल्ल्यापाशी समुद्राला मिळते. या नद्यांच्या काठी नारळी-पोफळींच्या बागा आहेत.



गोमंतकाचा नकाशा

सह्याद्रीचे फाटे असलले असे अनेक डोंगर गोमंतकात आहेत. त्यांतला गोमंतकाच्या पूर्व सीमेवरचा सोंसोगड हा डोंगर प्रसिद्ध आहे. त्याच्या उत्तरेस सत्तरी महालात वाघेरीचा डोंगर असून, मोर्लेगड हा तिसरा डोंगर त्याच्या जवळच आहे. बोरीचा सिध्दनाथ व पारोडे येथील चंद्रनाथ हे सपाटीवरचे डोंगर असून ते सृष्टिसौंदर्याने नटलेले आहेत.

गोमंतक व कोकण— दमणगंगा नदीपासून गंगावळी नदीपर्यंतचा प्रदेश पूर्वीपासून कोकण या नावाने ओळखला जातो. त्याचे कुंडलिका नदीमुळे जे दोन भाग होतात त्यांतल्या उत्तर भागाला उत्तर कोकण व दक्षिण भागाला दक्षिण कोकण म्हणत. उत्तर कोकणात १४०० व दक्षिण कोकणात ९०० गावांचा समावेश होई. उत्तर कोकणात शूर्पारक (नालासोपारे) व दक्षिण कोकणात गोवा ही दोन शहरे प्रसिद्ध व भरभराटलेली

होती. काही वेळा उत्तर कोकण व दक्षिण कोकण हे दोन प्रदेश अनुक्रमे शूर्पारक व गोमंतक या नावांनी ओळखले जात. राजवटी बदलत, त्याप्रमाणे या दक्षिण कोकणाचा विस्तार कमीजास्त होत असे.

गोमंतकाची भूमी परशुरामाने तप करण्यासाठी निर्माण केली, अशी कथा आहे. पण अशीच दंतकथा चिपळूण व शूर्पारक यांच्याबद्दलही सांगितली जाते. इतकेच नव्हे; तर केरळ प्रदेशही परशुरामानेच निर्माण केल्याची आख्यायिका आहे. गोव्यात त्याने सारस्वत ब्राह्मणांची ९६ कुळे त्रिहोत्रपुराहून आणली, तशी केरळात नंपूतिरी ब्राह्मणांची ६४ कुळे आणली, असा उल्लेख आढळतो. याचा अर्थ एवढाच की पश्चिम घाट व समुद्र यांच्यामधील कोकण व मलबार या भूपट्टीत परशुरामाने आर्यांची पहिली वसाहत केली. परशुरामाने समुद्र हटवून नासिकपासून कन्याकुमारीपर्यंतची भूमी निर्माण केली, असे सह्याद्रिखंडातही सांगितले आहे. भूगर्भशास्त्राच्या दृष्टीने पाहणी केल्यावर असे दिसून आले आहे, की दक्षिण पठाराच्या मानाने कोकण व मलबार ही भूमी अर्वाचीन असून, ती काही भूगर्भस्थ घडामोडींमुळे समुद्रातून वर आली आहे.

गोवे परशुरामाने वसवले ही गोष्ट आता दंतकथाच मानली पाहिजे. कारण गोव्यात परशुरामपूर्व अर्थात आर्यपूर्व वस्ती होती आणि ही वस्तीसुद्धा भारतातील मूळ लोकांची नसून, पूर्वेकडून भारतात आलेल्या ऑस्ट्रिक लोकांची होती, असा सिद्धांत आता संशोधकांनी मांडला आहे. आर्यांचे अन्न गहू व जव होते, अशी वेदांची साक्ष आहे. आणि तांदूळ, पानसुपारी, नारळ, केळी, हळद, भोपळा वगैरे पदार्थ या ऑस्ट्रिक किंवा प्रोटो–ऑस्ट्रोलॉईड लोकांनी भारतात आणले व नंतर आर्यांनी त्यांचा स्वीकार केला, असे डॉ. सुनीतिकुमार चतर्जी सांगतात. श्रीमती इरावती कर्वे व आचार्य सेन यांनीही या विधानाला पाठिंबा दिला आहे. ऑस्ट्रिक लोकांप्रमाणेच नाग, द्रविड वगैरे समाजही तिथे नांदत होते व त्यांना शेती माहीत होती; तसेच ग्रामसंस्थांच्या रूपाने त्यांनी समाजाची विशिष्ट रचना केली होती असे दिसते.

गोव्यात येणारे पहिले आर्य हे सारस्वत ब्राह्मणच की काय याबद्दलही अलीकडे संशोधकांत संदेह उत्पन्न झाला आहे. कारण महाराष्ट्र (गोमंतक धरून) आणि कर्नाटक येथे आर्यांची पहिली वसाहत झाली ती उत्तरेकडील यादव व आभीर यांनी केली, असा सिद्धान्त श्री. शं. बा. जोशी यांनी मांडला आहे. सारस्वतांप्रमाणेच आभीर व यादव हेही सौराष्ट्रातून जलमार्गे कोकणात आले व नंतर घाटमाथ्यावर गेले; विंध्याद्री ओलांडून खाली दक्षिणेत आले नाहीत, असेही सुचविण्यात आले आहे. हे आभीर व यादव म्हणजेच सांप्रतचे क्षत्रिय मराठे होत. या संबंधात अधिक संशोधन व्हायचे आहे.

गोमंतक व गोवा या शब्दांची व्युत्पत्ती – गोमंतक हा शब्द सनपूर्व तीन शतके तरी प्रचारात आहे. महाभारताच्या भीष्मपर्वात (अध्याय ९) गोमन्तः या शब्दाने ज्या प्रदेशाचा उल्लेख सापडतो तो आजचा गोमंतकच होय.

श्री. वर्दे वालावलीकर ऊर्फ शणै गोंयबाब यांनी गो (गाई) + मन्त (युक्त) + क (लघुत्व व ममत्व दर्शक प्रत्यय) अशी त्याची व्युत्पत्ती सुचविली होती, ती आता सर्वमान्य झाली आहे. आज गोमंतकात गोधनाचा तुटवडा असला, तरी पुरातन काळी गोव्यात गुरांची खिल्लारे होती. फेर्नांव लॉपिश द कास्तान्येद याने इ. स. १६६६ साली लिहिलेल्या इतिहासात गोमंतकात गायी, म्हशी विपुल प्रमाणात आढळतात, असा उल्लेख आहे.

गोमंतक या शब्दाप्रमाणेच गोवा हा शब्दही प्राचीन आहे. इजिप्तचे राजे टॉलेमी (सनपूर्व चौथे ते पहिले शतक) यांच्या काळात टॉलेमायुस या नावाने प्रसिद्ध झालेल्या भूवर्णनपर ग्रंथात, गोवा शहराचा उल्लेख Gouba या नावाने केलेला आढळतो. गौबा म्हणजेच गोवा होय. गोमंतक या शब्दाचा अपभ्रंश गोवा असा पोर्तुगीजांनी केला, हा समज खरा नाही. पोर्तुगीजांच्या पूर्वी इ. स. ११२९ व ११६२ या सालांतल्या दोन कानडी शिलालेखांत गोमंतकाचा गोवे या नावानेच उल्लेख केलेला आहे. विजयनगरच्या दुसऱ्या हरिहररायाच्या इ. स. १३९१ मधील ताम्रपटात 'गोवाभिधां कोकणराजधानीम्'= गोवा नावाच्या कोकणातल्या राजधानीला, असा प्रयोग आढळतो.

प्राचीन इतिहास – इ. सनापूर्वीचा गोमंतकाचा इतिहास उपलब्ध नाही. सनपूर्व तिसऱ्या व दुसऱ्या शतकांत कोकणप्रांत मौर्य साम्राज्याखाली नांदत होता, इतकी निश्चित माहिती मिळते. मौर्यांची सत्ता कमजोर झाली, तेव्हा म्हणजे सनपूर्व १ ल्या शतकात महाराष्ट्राप्रमाणेच दक्षिण कोकणावर सातवाहन किंवा आंध्रभृत्य यांचा अंमल सुरू झाला. या वंशातील तेविसावा राजा पुलुमायी आंध्र याच्या वेळी पश्चिम भारतावर शक-यवनादी क्षत्रप टोळ्यांनी आक्रमण केले आणि गोमंतक क्षत्रप राजांच्या अमलाखाली गेला. क्षत्रप वंशाच्या उतरत्या काळात कोकणातील त्याचे सेनापती प्रबळ झाले व त्यांनी गोमंतकावर आपली स्वतंत्र राजवट इ. स. च्या दुसऱ्या शतकात सुरू केली. ही राजवट आभीरांची होय.

इ. स. च्या दुसऱ्या शतकापासून चौथ्या शतकाच्या मध्यापर्यंतचा गोव्याचा इतिहास अंधारात आहे. चौथ्या शतकातील दोन ताम्रपट शिरोडे (अंत्रुज महाल) येथे मिळाले असून, ते

संस्कृत भाषेत व ब्राह्मी लिपीत आहेत. गोव्याच्या इतिहासाशी संलग्न असलेले व गोव्यात उपलब्ध झालेले हे पहिले लिखित पुरावे होत. चंद्रपूर राजधानीतून गोमंत देशाचा राजा देवराज याच्या आज्ञेने गोविंदस्वामी व इंद्रस्वामी या दोन ब्राह्मणांना काही भूमी दान दिल्याचा उल्लेख या ताम्रपटात आहे. चंद्रपूर म्हणजे आजचे सासष्टी तालुक्यातील चांदर हे स्पष्ट आहे. परंतु देवराज कोण आणि चांदरला त्या वेळी कोणते राजघराणे राज्य करीत होते, याची माहिती उपलब्ध नाही.

इ. स. च्या चौथ्या शतकात गोव्यावर वनवासीच्या कदंबांची सत्ता चालू झाली, असे प्रो. मोराईस म्हणतात. तेव्हापासून इ. स. च्या दहाव्या शतकापर्यंत गोमंतकावर वनवासी कदंब, चालुक्य, राष्ट्रकूट, शिलाहार यांच्या राजवटी होऊन गेल्या. वनवासी कदंबांचे प्रतिनिधी म्हणून प्रारंभी जयसिंह व खराग हे चालुक्यवंशी सरदार कदंबांच्या उत्तरेकडील राज्याचा कारभार पाहत होते. नंतर इ. स. च्या ६ व्या शतकाच्या मध्यास चालुक्यांनी बदामी येथे स्वतंत्र राज्य स्थापले. त्या घराण्यातील कीर्तिवर्मा याने कदंबांचा पराभव करून गोमंतकावर सत्ता स्थापली. इ. स. ७५३ पर्यंत गोमंतकावर चालुक्यांचेच राज्य होते. त्या वर्षी दंतिदुर्ग याने चालुक्य राजा दुसरा कीर्तिवर्मा याचा पराभव करून राष्ट्रकूट राजवटीचा प्रारंभ केला.

राष्ट्रकूटांची सत्ता कोंकणात इ. स. च्या १० व्या शतकाच्या अखेरपर्यंत होती. त्या काळातच गोमंतकावर शिलाहारांची सत्ता सुरू झाली. पण ते राष्ट्रकूटांचे मांडलिक म्हणूनच गोमंतकाचे राज्य करीत होते.

इ. स. च्या अकराव्या शतकाच्या सुरवातीपर्यंत शिलाहारांची माहिती मिळते. त्यानंतर गोव्यावर गोमंतकातील कदंब शाखेचे राज्य सुरू झाले. वनवासी कदंबांचे राज्य नष्ट झाल्यावर त्यांची एक शाखा चंद्रपूर (चांदर) येथे कसाबसा जीव धरून होती. हे घराणे प्रथम चालुक्यांचे मांडलिक म्हणून नांदले. दुसऱ्या गुहल्लदेवाने (इ. स. ९८०–१००५) गोमंतकातील कदंब राजवंशाची स्थापना केली.

कदंबांचा काल हा गोव्याच्या भरभराटीचा काल होय. या राजवंशातील पहिल्या जयकेशीने (इ. स. १०५०–८०) चांदरहून आपली राजधानी गोपकपट्टण (आजचे थोरले गोवे) येथे नेली. गोपकपट्टण हे गाव अघनाशिनी (आगशी) नदीवरचे एक बंदर होते. याच नगराला गोवापुरी असेही म्हणत. या बंदरातूनच गोव्याचा परदेशांशी व्यापार चाले. कित्येक अरब व्यापारीही व्यापारासाठी गोव्यात येऊन ठाण मांडून बसले होते. अशाच एका सदन नावाच्या अरब व्यापाऱ्याकडे जयकेशीने आपला कारभार सोपविला. या सदनने गोपकपट्टण हे पहिल्या दर्जाचे शहर बनवले. रस्ते, गटारे, रुग्णालये वगैरे सोयी त्याने केल्या. बंदराचा भाग वाढविला. त्यामुळे परप्रांतांतून व परदेशांहूनही माल घेऊन जहाजे इथे येऊ लागली. या काळातल्या शिलालेखांतून गोपकपट्टण शहरातील इमारती, बागा, संपन्न बाजार, गजबजलेले रस्ते, रस्त्यांतून वावरणाऱ्या पंडितांच्या पालख्या, यांची वर्णने सापडतात. सदन याच्या व्यवस्थेमुळे गोपकपट्टणाची एवढी भरभराट झाली, की त्याची तुलना इंद्रपुरीशी करण्यात येऊं लागली.

याच जयकेशीने पश्चिम समुद्रावर पहिले प्रबळ आरमार स्थापन केले. याही कामी सदनने त्याला साहाय्य केले. जयकेशीने आपली सत्ता आरमाराच्या व सैन्याच्या साहाय्याने पुष्कळ वाढविली. हा राजा विद्येचा भोक्ता होता. त्यामुळे त्याच्या राज्यात पंडितांचा मानसन्मान होई व विद्यार्थ्यांनाही साहाय्य मिळे. हा जयकेशी पुढे इतका प्रबळ झाला, की चालुक्यांनी आपली राजकन्या मैलाल महादेवी जयकेशीला देऊन त्याच्याशी नाते जोडले.

या वंशात पुढेही अनेक पराक्रमी राजे झाले; पण इ. स. १२१२ साली यादव राजांनी कदंबांना जिंकले व आपले मांडलिक बनविले. इ. स. १२७७ मधील एका शिलालेखात रामदेवराव यादव यास कदंबरायस्थापनाचार्य असे म्हटले आहे. यादवांनी गोपकपट्टण राजधानी लुटली किंवा नष्ट केली, म्हणून कामदेव कदंबाने आपली राजधानी पुन्हा चंद्रपुरास नेल्याचा उल्लेख सापडतो. यादवांनी गोमंतकावर १०१ वर्षे राज्य केले.

इ. स. १३१४ मध्ये देवगिरीच्या यादवांचे राज्य मुसलमानांनी बुडविले, तेव्हा गोव्यावरील यादवांची राजसत्ता नष्ट झाली. मुसलमानांनी नंतर गोमंतकात येऊन कदंब वंशही नष्ट केला व गोमंतकावर आपला अंमल स्थापला. या काळात मुसलमानांनी हिंदूंची काही देवळे नष्ट केली. तो काळ बेबंदशाहीचा ठरला.

पुढे इ. स. १३६६ मध्ये विजयनगरच्या माधव मंत्र्याने गोमंतकावर स्वारी करून मुसलमानांना तिथून हाकलून लावले व हिंदू धर्मावरील संकट टाळले. मुसलमानांनी नष्ट केलेले सप्तकोटीश्वराचे देवालय माधवाने पुन्हा बांधले. विजयनगरची गोव्यावरची सत्ता सुमारे १०० वर्षे चालू राहिली. हा काळही जयकेशीच्या काळाप्रमाणेच गोव्याच्या भरभराटीचा काळ होय. पुढे बहामनी राज्याच्या महमूद गवान या सरदाराने इ. स. १४६९ साली गोव्यावर स्वारी केली आणि विजयनगरची गोव्यावरील सत्ता नष्ट केली.

थोड्याच दिवसांनी बहामनी राज्याचे तुकडे पडले व एक बहामनी सरदार युसफ आदिलशहा याने विजापूर शहरात

स्वतंत्र राज्याची स्थापना केली. त्याने गोव्यातील बहामनी सुभेदारास आपली अधिसत्ता मान्य करायला लावले व अशा प्रकारे इ. स. १४८९ साली गोमंतक आदिलशाहीत समाविष्ट झाले.

युसफ आदिलशहा महंमद गवानच्या स्वारीच्या वेळी गोव्यात आला होता. त्या वेळी त्याला हा प्रदेश फार आवडला होता. आदिलशाहीच्या स्थापनेनंतर तो हवापालटासाठी अनेक वेळा गोव्यात येऊन राहत होता. येथेच आपल्या राज्याची स्थापना करावी म्हणून त्याने गोवा शहरात (आजच्या जुन्या गोव्यात) मशिदी, राजवाडे वगैरे इमारती बांधल्या. आजचे सचिवालय हा त्यानेच बांधलेला एक राजवाडा होय.

मुसलमानांच्या पहिल्या राजवटीत गोपकपट्टणचे महत्त्व कमी झाले व आजचे जुने गोवे हे राजधानीचे शहर बनले. कारण अघनाशिनी नदीचे पात्र उथळ झाल्यामुळे गोपकपट्टण हे बंदर म्हणून निरुपयोगी होऊ लागले होते. म्हणून मांडवीच्या तीरावर गोवे हे नवे शहर वसविण्यात आले. विजयनगरच्या राजाने काबीज केले ते हेच शहर होय. माधवाने याच ठिकाणच्या गोमंचला तीर्थाचा जीर्णोद्धार करून त्याला माधवतीर्थ असे नाव दिल्याची आख्यायिका आहे. विजयनगरच्या शंभर वर्षांच्या कारकीर्दीत या गोवा शहराला मोठेच महत्त्व आले. विजयनगरचा परदेशांशी होणारा व्यापार याच बंदरातून होऊ लागला. पुढे आदिलशाही राजवटीत व नंतर पोर्तुगीजांच्या काळात या शहराचे वैभव उत्तरोत्तर वाढत गेले. त्याची लोकसंख्या सहा लाखांपर्यंत वाढली व जगातल्या श्रीमंत शहरांत त्याची गणना होऊ लागली.



व्हाईसरॉयची कमान — जुने गोवे

अर्वाचीन इतिहास— गोव्यावरचे विजापूरकरांचे राज्य १६ फेब्रुवारी १५१० पर्यंतच टिकले. १७ फेब्रुवारी या दिवशी पोर्तुगीज सरदार आफोंस द आल्बुकेर्क याने विजयनगरचा सरदार तिमोजा किंवा तिमय्या याच्या मदतीने गोव्यावर समुद्रमार्गे स्वारी केली व विशेष लढाई न होताच गोवा शहर आल्बुकेर्कच्या हाती पडले. मुसलमानांच्या तडाक्यातून गोमंतक सोडवावा व विजयनगरच्या हिंदू राज्याप्रमाणे जोडावा, या हेतूने तिमोजाने आल्बुकेर्कला गोव्यावर स्वारी करायची कल्पना दिली होती. पोर्तुगीज हे व्यापारी असल्यामुळे ते आपण केलेल्या मदतीचा योग्य तो मोबदला घेऊन बाजूला होतील, असे त्याला वाटले होते. पण पोर्तुगीजांनी गोवे घेताच तिथे राज्यकारभार करायचे ठरवले व तिमोजाला हात चोळीत बसावे लागले. पोर्तुगीजांनी गोवा घेतले, तरी विजापूरकरांनी त्यांची थोड्याच दिवसात तिथून हकालपट्टी केली. पण आल्बुकेर्कने नव्या दमाने गोव्यावर स्वारी करून २५ नोव्हेंबर १५१० या दिवशी गोवा पुनश्च ताब्यात घेतले.



आल्बुकेर्क

त्यानंतर विजापूरकरांनी गोवा परत घेण्याचे अनेक प्रयत्न केले. इ. स. १५७० मध्ये अली आदिलशहाने दहा हजार सैन्यानिशी गोव्याला वेढा दिला. हा वेढा दहा महिने चालू होता. पण त्याचा काही उपयोग झाला नाही.

मराठ्यांची नवी सत्ता उदयाला आली तेव्हा पोर्तुगीजांशी त्यांचा संघर्ष होणे अटळ होते; पण मोगल व विजापूरकर यांच्याशी लढा चालू असताना पोर्तुगीजांशी तिसऱ्या आघाडीवर लढणे शहाणपणाचे नव्हे, या विचाराने छत्रपती शिवाजीने पोर्तुगीजांशी लढाईचे प्रसंग येऊ दिले नाहीत. तसेच पोर्तुगीजां

नीही शिवाजीशी संघर्ष वाढेल, असे काही केले नाही. विजापूरच्या गादीचे सेवक असलेली सरदेसाई वगैरे मंडळी शिवाजीशी लढत व नंतर पोर्तुगीजांचा आसरा घेत. त्यासाठी शिवाजीने इ. स. १६६८ साली बारदेस प्रांतावर स्वारी केली होती; पण उभयतांत तह होऊन ते प्रकरण सामोपचाराने मिटवले गेले.

इ. स. १६७५ साली शिवाजीने फोंडे येथील मर्दनगड किल्ला विजापूरकरांकडून काबीज केला, त्या वेळी पोर्तुगीजांनी विजापूरकरांना मदत केली. हे कृत्य शिवाजीला पसंत पडले नव्हते. दमणच्या लोकांकडून रामनगरचा राजा चौथाई वसूल करीत होता. रामनगर शिवाजीने जिंकून घेतल्यावर शिवाजीने पोर्तुगीजांकडे चौथाई मागितली. पण त्यांनी दोन वर्षे टोलवाटोलवी चालवली. तेव्हा प्रथम शिवाजीने आपला वकील फिरंग्यांकडे पाठवला व त्याचाही उपयोग होत नाही, असे दिसताच गोव्यावर स्वारी करायचे ठरवले. पण तेवढ्यात शिवाजीचा अंत झाला आणि पोर्तुगीजांवरचे ते संकट टळले.

संभाजीच्या कारकीर्दीत पोर्तुगीजांचे संभाजीशी प्रथम नरमाईचे धोरण होते. पण इ. स. १६८३ साली पोर्तुगीजांनी फोंडे येथील मराठ्यांच्या मर्दनगडावर हल्ला केला. ही गोष्ट कळताच संभाजी चिडला व पोर्तुगीजांना कायमचा धडा शिकवावा म्हणून तो फोंड्यास आला. त्याने फोंड्याहून तर पोर्तुगीजांना हाकललेच; शिवाय साष्टी व बारदेस हे पोर्तुगीजांच्या ताब्यातले प्रांतही काबीज करून गोवा शहरास वेढा घातला. पोर्तुगीज त्या वेळी संभाजीला शरण येण्याच्या बेतात आले होते. काँदि द आल्वोर या गव्हर्नरने सेंट झेवियरच्या थडग्यावर आपला राजदंड फेकूनही दिला होता. पण एवढ्यात संभाजीच्या पाठीवर मोंगलांचे सैन्य कोंकणात आले, तेव्हा गोव्याची स्वारी अर्धवट टाकून संभाजीला परत फिरावे लागले. अशा प्रकारे पोर्तुगीजांना मराठ्यांच्या हातून आणखी एकदा जीवदान मिळाले.

त्यानंतर पोर्तुगीजांना घालवून देण्याचा आणखी एक प्रयत्न पहिल्या बाजीरावाने इ. स. १७३९ साली केला. त्याच वर्षाच्या सुरवातीला चिमाजीअप्पाने वसईवर स्वारी केली. त्या लढाईत पोर्तुगीजांना गोव्याहून कुमक मिळत होती, ती तोडावी म्हणून पेशव्यांनी व्यंकटराव घोरपड व दादाजीराव भावे नरगुंदकर यांना गोव्यावर रवाना केले. त्यांनी सासष्टी ताबडतोब जिंकून घेतली. मराठ्यांच्या आज्ञेवरून सावंतवाडीच्या भोसल्यांनी बारदेस प्रांतही जिंकला. परंतु दादाजीराव भावे हा पोर्तुगीजांना फितुर झाला व त्याने त्यांच्याशी अत्यंत सौम्य असा तह करून तिथून माघार घेतली.

अठराव्या शतकाच्या मध्यापर्यंत पोर्तुगीजांच्या हाती फक्त गोवा, सासष्टी व बारदेस हे तीनच तालुके होते. पुढे सौंदेकर (विजापूरकरांचे मांडलिक) यांच्या ताब्यातले अंत्रुज, जांबावली, पंचमहाल, काणकोण हे भाग त्यांनी मिळवले. पुढे पेडणे, मतग्राम व सत्तरी हे तालुके सावंतवाडकर भोसले यांच्याकडून बळकावले. आणि अशा प्रकारे सांप्रत जो प्रदेश गोवा म्हणून ओळखला जातो, तो सगळा आपल्या ताब्यात आणला.

स्थानिक उठाव व राण्यांचे स्वातंत्र्यप्रयत्न– पोर्तुगीज सत्तेविरुद्ध गोव्यात जे स्थानिक उठाव झाले, त्यांतील पहिला प्रयत्न कास्तु नावाच्या ख्रिस्ती पाद्र्याने इ. स. १६५४ च्या सुमारास केला. पोर्तुगीजांना गोव्यातून घालवून गोवा आदिलशाही राज्यास जोडण्याच्या हेतूने हा कट रचण्यात आला होता. परंतु तो शिजण्यापूर्वीच उघडकीस आल्यामुळे बारगळला.

पिंटोंचे बंड या नावाने झालेला प्रयत्न इ. स. १७८७ साली अधिक मोठ्या प्रमाणावर झाला. या काळात युरोपियन धर्मोपदेशकांचीच सत्ता गोव्यावर प्रबळ झाली होती. त्यांच्या विरुद्ध हिंदूंतच नव्हे; तर ख्रिश्चन जनतेतही तीव्र असंतोष माजला होता. काही धार्मिक कारणावरून दोन देशी पाद्र्यांचा सरकार व युरोपियन धर्माधिकारी यांच्याशी संघर्ष उडाला व गोव्यातून पोर्तुगीजांस हाकलून देण्याचा हा कट रचण्यात आला. त्यासाठी काँतू व गोंसाल्वीस या दोन पाद्र्यांनी पोर्तुगालला जाऊन तिथल्या ज्या गोमंतकीयांस अनुकूल करून घेतले, त्यांत आबाद फारीय नावाचा एक विद्वान गोमंतकीय पाद्रीही होता. पण एका ख्रिस्ती इसमाने सरकारात चुगली केल्यामुळे हा कट बारगळला व पोर्तुगीज सरकारने या कटात सामील असलेल्या ४७ लोकांना अटक करून क्रूर शिक्षा दिल्या. शिक्षा झालेल्यांत १७ पाद्री व ७ सेनाधिकारी होते. पोर्तुगालातील गोमंतकीयांसही शिक्षा देण्यात आल्या. आबाद फारिय फ्रान्सला पळून गेला. पुढे तिथेच त्याने मेस्मेरिझम शास्त्राचा शोध लावला.

यानंतर झालेले उठाव राण्यांची बंडे या नावाने प्रसिद्ध आहेत. सत्तरी हा गोमंतकातील महाल सावंतवाडकर भोसल्यांकडे होता; तरी त्यावर खरी सत्ता राण्यांचीच होती. सत्रोजी राणे नावाचा राजपूत क्षत्रिय गोव्यात येऊन त्याने सत्तरी महाल वसविला होता व आधी मोगल, मग मराठे व पुढे भोसले यांची सार्वभौम सत्ता मान्य करून तो आपली ही जहागीर सांभाळून राहिला होता.

इ. स. १७४६ मध्ये पोर्तुगीजांनी सत्तरी काबीज केल्यावर राण्यांचे हक्क व स्वातंत्र्य हळूहळू कमी करण्यास प्रारंभ केला. तेव्हा सत्तरीतील राणे घराण्यांनी पोर्तुगीजांविरुद्ध उठाव करण्यास सुरवात केली. त्यांना त्यांच्या रयतेचीही साथ होती.

इ. स. १८२२ पर्यंतच्या साठ वर्षांत राण्यांनी पोर्तुगीजांविरुद्ध एकूण चौदा वेळा असे सशस्त्र उठाव केले. इ. स. १८५२ साली झालेला उठाव हा जवळजवळ गोमंतकव्यापी होता व पोर्तुगीजांना त्याचा फार मोठा फटका बसला. दिपाजी राणे याच्या नेतृत्वाखाली ते क्रांतियुद्ध सुरू झाले होते. त्यात पोर्तुगीज सत्तेला कंटाळलेली सत्तरीतील रयत व देसाई, गांवकर वगैरे वतनदारही दिपाजीला मिळाले व त्यांनी पोर्तुगीजांची सत्ता खिळखिळी केली. साडेतीन वर्षे दिपाजीचा हा संग्राम चालू होता. शेवटी सरकार कंटाळले व दिपाजी राण्याशी त्याने सन्मानपूर्वक तह करून ते प्रकरण शमवले.

यानंतर काही धामधुमी झाल्या; पण मोठ्या प्रमाणावर आणखी एक बंड झाले, ते इ. स. १८९५ साली. या सुमारास आफ्रिकेतल्या पोर्तुगीज वसाहतीत नीग्रोंचे बंड सुरू झाले होते. ते शमविण्यासाठी गोव्यातून गोमंतकीय सैनिकांना तिकडे पाठवायचा हुकूम सुटला. शिपायांना वाटले, की परदेशगमनामुळे आपण धर्मभ्रष्ट होऊ. म्हणून त्यांनी आपणास आफ्रिकेला न पाठविण्याची सरकारला विनंती केली. पण सरकारने ती न मानल्यामुळे त्या शिपायांनीच बंडाचा झेंडा फडकावला. दादा राण्याने त्यांचे प्रमुखत्व स्वीकारले. सत्तरीच्या रयतेने नेहेमीप्रमाणे त्याही बंडाचा पाठपुरावा केला. दादा राण्यानें आग्वादचा किल्ला घेऊन पणजीवर मोर्चे रोखले. सरकारनें लोकांना दहशत बसवण्याचे खूप प्रयत्न केले. पण त्यांचा उपयोग झाला नाही. शेवटी संकेश्वर पीठाच्या शंकराचार्यांना पोर्तुगीज सरकारने गोव्यात बोलावून आणले व त्यांच्या मध्यस्थीने हे बंड शमवले. पण नंतर तीन वर्षांनी काहीतरी खुसपट काढून दादा राणे व त्याचे साथीदार यांना सरकारने लष्करी कोर्टापुढे उभे करून शिक्षा देवविल्या आणि त्याना आफ्रिका व तिमोर येथे हद्दपार केले.

ख्रिस्तीकरण व धार्मिक छळ — भारतात प्रथम ख्रिस्ती धर्माचा प्रसार सेंट थॉमस याने केला. इ. स. ५२ या वर्षी तो भारताच्या पश्चिम किनाऱ्यावर मालिआंकुरा (Maliankura) येथे उतरला. त्याने केरळमध्ये अनेकांचे धर्मांतर घडवून आणले. या भारतातील मूळ ख्रिस्त्यांना सीरियन ख्रिश्चन असे म्हणतात. काहींच्या मते सेंट थॉमसच्या पूर्वी सेंट बार्थोलोम्यू हा याच कामासाठी भारतात आला होता. सेंट थॉमसनंतर चौदाशे वर्षांनी पोर्तुगीज लोक धर्मप्रसारासाठी भारतात आले. भारतातील मसाल्याचे पदार्थ युरोपात नेणे हाही त्यांचा एक उद्देश होता. इ. स. १४९८ साली वास्को–द–गामा कालिकत बंदरात उतरला, तेव्हा एका अरबाने त्याला प्रश्न केला, की ‘तुम्ही इथे कशासाठी आला आहा ?’ गामाने त्याला उत्तर दिले. ‘आम्ही मसाल्याचे पदार्थ व ख्रिस्ती लोक यांच्या शोधार्थ आलो आहो.’ याचा अर्थ स्पष्ट आहे. भारतात पूर्वीच ख्रिश्चन झालेले लोक आहेत, याची गामाला माहिती होती व त्यांच्या साहाय्याने भारतात ख्रिश्चन धर्म वाढवावा अशी त्याची इच्छा होती. त्यापूर्वी चाळीस वर्षे पोप निकोलस यांनी पोर्तुगालच्या राजाला पुढील आदेश दिला होता– ‘तुम्ही हिंदुस्थानात धर्मप्रसाराकरिता जा. तिथे तुम्हाला ख्रिस्ती लोक भेटतील. त्यांच्या मदतीने धर्मप्रसार करा. तिथे तुम्ही राज्य कमावलेत, तर ते तुमचे होईल.’

२५ नोव्हेंबर १५१० साली आफोंस द आल्बुकेर्क याने गोवा शहर काबीज केले, तो दिवस संत कॅथेरिन हिचा होता. तिच्या कृपेने आपला जय झाला अशा श्रद्धेने आल्बुकेर्कने तिचे एक लहानसे प्रार्थनामंदिर गोवा शहरात उभारले व गोव्यात ख्रिस्ती धर्माची मुहूर्तमेढ रोवली. आल्बुकेर्कने गोवा शहर घेतल्यावर प्रथम मुसलमान शिपायांची कत्तल केली व त्यांच्या विधवा स्त्रियांना ख्रिस्ती करून पोर्तुगीज शिपायांशी त्यांची लग्ने लावून दिली. हे काम आल्बुकेर्कबरोबर आलेल्या डोमिनिकन पंथाच्या पाद्र्यांनी केले. पुढे फ्रान्सीस्कन पाद्रीही गोव्यात आले व त्या दोन्ही पंथांच्या पाद्र्यांनी मिळून गोव्यात हळूहळू ख्रिस्तीकरणास प्रारंभ केला. विहिरीत पाव टाकणे, घरात हाडे टाकणे वगैरे सामान्य प्रकारांनीही त्या वेळी धर्म बुडाला असे हिंदू लोक समजत. त्यामुळे या पाद्र्यांना हिंदूचे ख्रिस्तीकरण सुलभ गेले. त्याशिवाय ख्रिस्ती झालेल्यांना त्यांच्या हिंदू बांधवांच्या इस्टेटी दिल्या जातील असेही प्रलोभन दाखविण्यात आले होते. इ. स. १५३८ साली बिशपची गादी गोव्यात स्थापन करण्यात आली व इ. स. १५४० मध्ये पाखंडी लोकांची देवळे नष्ट करावी, असा पोर्तुगालचा बादशहा तिसरा जुवांव याने हुकूम पाठविला. तदनुसार गोवा बेटातली सर्व देवळे मोडून टाकण्यात आली. त्यानंतर तिथल्या काही देवळांवर ख्रिस्ती प्रार्थनामंदिरे उभारण्यात आली. ख्रिश्चन धर्माचे शिक्षण देणारे सेंट पॉल कॉलेजही काढण्यात आले. इ. स. १५४२ साली सेंट फ्रान्सिस झेवियर या जेसुईट धर्मोपदेशकाचे गोव्यात आगमन झाल्यावर ख्रिस्तीकरणाच्या कार्याला अधिक चालना मिळाली. जेसुईट पंथातील पाद्री हे धर्मप्रसाराच्या कामी अत्यंत कडवे होते. पाखंडी (अर्थात हिंदू) लोकांची देवळे मोडणे हा त्यांचा आवडता छंद होता. जेसुईटांच्या हाती सासष्टी प्रांताचे ख्रिस्तीकरणाचे काम सोपविण्यात आले होते. त्यांनी अनेकांचे जबरीने धर्मांतर केले आणि त्या कामी अनेकांचा छळही केला. रायतूरचा किल्लेदार दियोगु रुद्रीगिश याने तर एका रात्रीत सासष्टीतील २८० देवळांचा विध्वंस केला.

इ. स. १५६० साली गोव्यात इन्क्विझिशनची स्थापना झाली. तेव्हापासून तर गोमंतकीय जनतेच्या छळाला पारावारच उरला नाही. ब्राह्मणांनी व सुवर्णकारांनी आपल्या इस्टेटी ख्रिस्त्यांना विकून गोवे सोडून जावे (इ.स.१५६०), इतर सर्व हिंदूंनी गोव्यातून निघून जावे (१५६३), हिंदूंनी आपले धर्मग्रंथ नष्ट करावे (१५६७), नवख्रिस्ती प्रार्थनेस उपस्थित न राहिले तर त्यांना शारीरिक शिक्षा करावी (इ.स.१५६७), ख्रिस्त्यांनी ख्रिस्तीतरांशी संबंध ठेवू नयेत, हिंदूंनी आपले धार्मिक संस्कार करू नयेत, ग्रामसंस्थांतून हिंदूंना हाकलून द्यावे (इ. स. १५७३), हिंदूंनी कोणतेही वाहन वापरू नये (इ.स.१५७४), गोवा सोडून गेलेले हिंदू परत गोव्यात आल्यास त्यांना देहांत शिक्षा द्यावी, असे एकामागून एक हुकूम काढण्यात आले व त्यांची अंमलबजावणीही कडकपणे होऊ लागली.

इ. स. च्या १७ व्या शतकात यापेक्षाही अधिक कहर झाला. पोर्तुगीज मुलुखात राहणाऱ्या सर्व नागरिकांनी पोर्तुगीज भाषाच बोलली पाहिजे, भाविणी व कलावंतिणी यांना कोणी आश्रय देऊ नये, शेंडी राखणाऱ्यांनी वर्षाला आठ रुपये कर भरावा, ख्रिस्त्यांनीच नव्हे तर हिंदूनीही ख्रिस्ती मंदिरांतील प्रार्थनांना हजर राहिलेच पाहिजे, पोर्तुगीज न जाणणाऱ्या ख्रिस्त्यांची लग्ने करू नयेत, असे आणखी जुलमी हुकूम निघाले व ते न मानणाऱ्या लोकांचा हृदयविदारक छळ सुरू झाला. इतकेच नव्हे तर जे ख्रिस्ती व्हायला तयार नसत, अशांना जिवंत जाळण्याचेही प्रकार घडले.

पोर्तुगीजांनी हा सारा धार्मिक जुलूम केला, तो त्यांच्या ताब्यात असलेल्या गोवा, बारदेस व सासष्टी या तीनच तालुक्यांत. या तालुक्यांतील देवस्थाने नष्ट केल्यावर व लोकांवर हद्दपारीचे हुकूम लादल्यावर हिंदू लोक आपापले देव घेऊन तिथून परागंदा झाले. त्यातील काही शेजारच्या आदिलशाही राज्यात व काही मराठ्यांच्या राज्यात गेले. तिथे त्यांनी आपली देवस्थाने नव्याने उभारली. अंत्रुज व मतग्राम या महालातील आजची देवस्थाने ती हीच होत. काही लोक कारवार, मंगळूर, उडुपी, अंकोला वगैरे उत्तर व दक्षिण कानडा जिल्ह्यातील ठिकाणी जाऊन स्थायिक झाले. काही दक्षिण व उत्तर कोकणात गेले. काहींनी तर थेट कोच्चिनची वाट धरली. कोच्चिनमध्ये सांप्रत मोठ्या प्रमाणावर गोमंतकीयांची वस्ती आहे व त्यांचे तिरुमल देवस्व संस्थान नावाचे एक समृद्ध देवस्थान आहे.

इ. स. १९१० साली पोर्तुगालमध्ये राज्यक्रांती होऊन रिपब्लिकची स्थापना झाली. त्यानंतर पोर्तुगीज साम्राज्यातील नागरिकांना धार्मिक स्वातंत्र्य मिळाले. या वेळेपर्यंत कॅथॉलिक हा राजधर्म होता; पण पोर्तुगीज रिपब्लिक हे निधर्मी असल्याचे जाहीर करण्यात आले व तेव्हापासून गोमंतकातील हिंदूंच्या उत्कर्षाचा काळ सुरू झाला. हिंदूनी रिपब्लिकचे मनःपूर्वक स्वागत केले. १९२८ साली तर ख्रिस्ती झालेल्या, पण हिंदूंच्या चालीरीती न सोडलेल्या अशा सुमारे दहा हजार गावड्यांचे शुद्धीकरण करून त्यांना परत हिंदुधर्मात घेण्यात आले. या शुद्धीकरणात श्री विनायक महाराज मसूरकर यांचा पुढाकार होता व गोव्यातल्या सुशिक्षित लोकांचे सहकार्य होते.

इ. स. १९२६ साली डॉ. सालाझार पोर्तुगालच्या मंत्रिमंडळात आला व १९३१ साली तो सर्वाधिकारी बनला. तेव्हा पुन्हा गाडे उलटले. सालाझारने पुनश्च ख्रिस्ती धर्म हा गोव्याचा राजधर्म बनवला. त्यामुळे प्रत्यक्षपणे हिंदूंचा छळ झाला नाही हे खरे; पण राजकारणावर पुनश्च चर्चची पकड बसली. मात्र इन्क्विझिशनच्या काळात जो धर्मच्छळ झाला, त्याची पुनरावृत्ती इ. स. १८१२ नंतरच्या सुधारलेल्या काळात कधीही होऊ शकली नाही.

पोर्तुगीजांनी चालविलेल्या या ख्रिस्तीकरणाला एक धार्मिक व दुसरे राजकीय अशी दोन कारणे होती. पोर्तुगीज राजे हे पक्के कॅथॉलिक होते व ख्रिस्ती धर्माचा प्रसार करण्याचे कार्य परमेश्वराने आपल्या हाती सोपविले आहे, अशी त्यांची भावना होती. म्हणूनच आल्बुकेर्कच्या सागरी सफरीत त्याच्याबरोबर पाद्र्यांचाही एक तांडा पोर्तुगालच्या बादशहाने भारताकडे पाठविला होता. दुसरे म्हणजे परमुलुखात आपली राजकीय सत्ता स्थिर करायची, तर तिथली प्रजा स्वधर्माची व स्वसंस्कृतीची असली पाहिजे, असे पोर्तुगीजांना वाटत होते. म्हणून गोव्यातील हिंदूंना ख्रिस्ती करूनच पोर्तुगीज थांबले नाहीत; तर त्यांची स्थानिक भूमीत रुजलेली मुळेच उखडून काढण्याचे धोरण त्यांनी स्वीकारले. म्हणूनच त्यांची भाषा नष्ट करणे, त्यांचे धर्मग्रंथ जाळणे, पौर्वात्य पद्धतीच्या वेषभूषेस फाटा द्यायला लावणे, पौर्वात्य चालीरीती नष्ट करणे, वगैरे उपायांचा त्यांनी अवलंब केला. या धोरणास आत्मसातीकरणाचे (assimilation) धोरण म्हटले जाते. सर्व दृष्टींनी जित व जेते यांच्यामधील भेद नष्ट करून जितांना जेत्यांची संस्कृती दिली, की त्यामुळे जेत्यांचे राज्य यावच्चंद्रदिवाकरौ कायम राहील, असा पोर्तुगीजांचा समज होता. पण त्यांचे हे धोरण अंशतःच यशस्वी झाले आणि अलिकडच्या काळात तर ते पूर्णपणे फसले. गोमंतकात इतकी धार्मिक दडपशाही होऊनही कॅथॉलिकांची संख्या फक्त एक तृतीयांशच आहे आणि पोर्तुगीज जाणणाऱ्यांची संख्या तर फक्त दीड टक्काच आहे.

अलिकडचा स्वातंत्र्यलढा-- डॉ. सालाझार पोर्तुगालचा हुकुमशहा बनल्यापासून पोर्तुगालप्रमाणे गोव्यातही त्याने नागरिक

स्वातंत्र्याचा संकोच करून टाकला. सालाझारने प्रथमच वसाहतीचा कायदा पास करून वसाहतीत पोर्तुगीज, पोर्तुगीजसदृश व देशी असे नागरिकांचे तीन भेद केले. तेव्हा त्या वेळेपर्यंत पोर्तुगीजांना पाठिंबा देणाऱ्या गोव्यातल्या कॅथॉलिकांना सरकारचे पहिल्याप्रथम वैषम्य वाटले. इ. स. १९३७ सालापासून तर गोमंतकीय जनतेचे सामुदायिक जीवनच संपुष्टात आले.

इ. स. १९४६ च्या जूनच्या सुरवातीस डॉ. राममनोहर लोहिया हे समाजवादी पुढारी गोव्यात विश्रांतीसाठी गेले होते. तेव्हा त्यांना गोव्यातली ही जाचक परिस्थिती दिसून आली. त्या गोष्टीची चीड येऊन त्यांनी गोव्यातला सभाबंदीचा कायदा मोडायचे ठरवले आणि १८ जून रोजी मडगावला सभा भरवून त्यांनी तो मोडलाही. या सभेस सुमारे दहा हजार जनसमुदाय हजर होता. ही सभा घेण्यापूर्वी डॉ. लोहियांनी गोमंतकातील अनेक राष्ट्रवादी तरुणांच्या गाठीभेटी घेतल्या होत्या व नागरिक स्वातंत्र्याच्या प्राप्तीसाठी पद्धतशीर लढाच उभारण्याचे ठरविले होते. पण त्या सभेत भाषण करण्यापूर्वीच डॉ. लोहिया यांना पकडण्यात आले. ते पाहून जमाव क्षुब्ध झाला. मग पोलिसांनी लाठीमार करून ती सभा उधळून लावली. त्यानंतर सभा, मोर्चे, मिरवणुका असे प्रकार गोमंतकभर सुरू झाले व त्याबरोबर पोर्तुगीजांच्या दडपशाहीने थैमान घातले.

अशा प्रकारे गोव्यात चळवळ चालू झाली खरी; पण तिच्यामागे सूत्रसंचालन करणारी एखादी संघटना नव्हती. ती संघटना लोंढा येथे १८ ऑगस्ट १९४६ रोजी गोमंतकीय पुढाऱ्यांच्या सभेत ‘ नॅशनल काँग्रेस (गोवा)’ याच नावाने स्थापन करण्यात आली व पुढला सर्व लढा शेवटपर्यंत या संघटनेच्या मार्फत चालला. त्यानंतर गोवा सरकारने अधिक कडक धोरण स्वीकारले व नॅशनल काँग्रेसच्या अनेक पुढाऱ्यांना पकडून गोव्यातून हद्दपार केले.

इ. स. १९४७ मध्ये भारत स्वतंत्र झाला व पं. नेहरू यांच्या प्रमुखत्वाखाली काँग्रेसचे मंत्रिमंडळ देशाचा कारभार करू लागले. गोव्यात भारतसरकारची कॉन्सुलेटही उघडण्यात आली. भारतीय संसदेत गोव्याच्या मुक्तीबद्दलचे प्रश्नही विचारले जाऊ लागले. त्यांना गोवा–भारत अखंड असल्याची उत्तरे देण्यात येऊ लागली. त्यामुळे पोर्तुगालचा क्षोभ वाढू लागला.

इ. स. १९५३ मध्ये गोव्याच्या स्वातंत्र्यचळवळीला पुन्हा एकदा जोर चढला. या चळवळीची सूत्रे नॅ. काँग्रेसच्या हाती होती. अहिंसक मार्गांनी गोवा मुक्त करणे, हे नॅशनल काँग्रेसने आपले अधिकृत उद्दिष्ट ठरविले होते. पण त्याशिवाय आझाद गोमंतक दल नावाची दहशतवादाचा अवलंब करणारी संघटनाही गुप्तपणे स्वातंत्र्याच्याच उद्देशाने कार्य करीत होती.

नगरहवेली हा पोर्तुगीजशासित प्रदेश शस्त्रबळाने मुक्त क ण्यात आझाद गोमंतक दलाचाच पुढाकार होता.

इ. स. १९४९ सालापासून नॅशनल काँग्रेसचे कार्य गोव्या चालू होते, परंतु तिचे मुख्य कार्यालय मात्र गोव्याबाहेर हो इ. स. १९५४ साली नॅ. काँग्रेसने सत्याग्रहाचा मार्ग अवलंबण्या ठरविले व १५ ऑगस्ट रोजी त्याचा प्रारंभही केला.

त्यानंतर एका वर्षाने १५ ऑगस्ट १९५५ याच दिव फार मोठ्या प्रमाणावर गोमंतकप्रवेशाचा दुसरा मो सत्याग्रह झाला. या काळात भारत–पोर्तुगालमधील राज संबंध तुटले होते व गोवा–भारत सरहद्द बंद झाली हो अशा वेळी गोवा–भारत एक आहे, आणि पोर्तुगीजांची गो वरील सत्ता आम्ही मानीत नाही, हे दाखवण्यासाठी भार तील सर्व राज्यांतील हजारो नागरिकांनी गोव्यात प्रवेश कर अशी योजना आखण्यात आली. सुमारे पाच हजार सत्याग्र या सत्याग्रहमोहिमेत भाग घेतला. पुणे येथे त्यासाठी विमोचन समितीची स्थापना करण्यात आली होती. हा क पूर्व सत्याग्रह पाहाण्यासाठी जगातील वृत्तपत्रांचे वार्ताहर सरहद्दीवर गोळा झाले होते. या प्रचंड सत्याग्रहाने तात्का लाभ काही झाला नसला, तरी गोव्याचा प्रश्न जगा वेशीवर टांगला गेला, एवढी गोष्ट खरी.

त्यानंतर पाच वर्षे गोव्याचा संग्राम थोडाफार प्रमा चालूच होता. दहशतवादी चळवळीने या वेळी विशेष केला होता. आझाद गोमंतक दल व गोवा लिबरेशन या दोन संघटनांनी हे कार्य गोव्यात चालविले होते. काही पोर्तुगीजांचीही आहुती पडली आणि पोर्तुगीजां गोळ्यांना काही स्वातंत्र्यसैनिकही बळी पडले.

शेवटी १९६१ साल उजाडले. या सालात पोर्तुगाल व यांचे संबंध तणातणीचे होत गेले. गोवा पोलिसांनी भारता साबरमती बोटीवर गोळी झाडण्याची आगळीक केली, भारतसरकारला गोव्यावर लष्करी कारवाई करायचा नि घेणे भाग पडले. डिसेंबरच्या १७ तारखेस मध्यरात्री भारत सेना उत्तर, दक्षिण व पूर्व अशा तीन दिशांनी गोव्यात घु समुद्रमार्गे नौदलाने मुरगाव बंदरात प्रवेश केला आणि दि. रोजी लढाईला उभेही न राहता पोर्तुगीज कमांडरने शरणा पत्करली. गोव्याच्या गव्हर्नर जनरलने दि. १९ रोजी शरणागती भारतीय सेनापतीच्या हवाली केल्यावर गोव्या ही विजयमोहीम पूर्ण झाली. या वस्तुस्थितीवर २० डि रोजी संसदेने शिक्कामोर्तब केले आणि अशा रीतीने गो मुक्त होऊन भारताशी एकजीव बनला.

गोमंतकाची लोकसंख्या – गोमंतकाची लोकसंख्या इ.

१९६१ च्या शिरगणतीनुसार एकूण ५, ९५, ६६९ असून त्यातील ३, ५५, ६१५ हिंदू, २, ८८, ३४४ कॅथॉलिक ख्रिश्चन व ११, ५२९ मुसलमान आहेत. या शिरगणतीत बौद्ध १८, इतर धर्मांचे ९ व निधर्मी ३ एवढे लोक आढळले. स्थूल मानाने हे प्रमाण हिंदू ६० टक्के, कॅथॉलिक ३८ टक्के व इतर २ टक्के इतके पडते.

गोव्याचा प्रदेश दाट लोकसंख्येचा असून, त्या दृष्टीने भारतात त्याचा दुसरा किंवा तिसरा क्रमांक लागतो. दर चौरस मैलास ४५५ इतके लोकवस्तीचे प्रमाण गोव्यात पडते.

गोमंतकाची भाषा व शिक्षण – वांशिक, सामाजिक, ऐतिहासिक वगैरे दृष्टींनी गोमंतक हा पहिल्यापासून जसा महाराष्ट्राचा एक घटक होता, तसा तो भाषिक दृष्टीनेही होता. संस्कृत भाषेची अपभ्रंश, महाराष्ट्री, वगैरे प्राकृत रूपे होऊन ज्या भूभागात मराठी बनली, त्या भागात गोमंतकाचाही अंतर्भाव होत होता. मराठी भाषा निर्माण होऊन तिच्यातून जी ग्रंथरचना होत गेली, तिची गोमंतकाला ओळख होती. ज्ञानेश्वर, नामदेव आणि मग तुकाराम, एकनाथ, मुक्तेश्वर यांच्या ग्रंथांचे वाचन त्या त्या काळात गोमंतकात होत होते. पोर्तगीजपूर्वकाळी या भागात मराठी ग्रंथरचनाही होत होती. शके १२२२ तील (इ. स. १३००) जुन्या कानडी लिपीतील पण मराठी भाषेत लिहिलेला खांडोळे येथील शिलालेख, शके १२२४ (इ. स. १३०२) मधील देवनागरी लिपीतला व मराठी भाषेतील वेळूस(सत्तरी)चा शिलालेख, शके १२३५ (इ. स. १३१३)देवनागरी लिपीत व मराठी भाषेत लिहिलेला वांदोडे येथील शिलालेख हे सांप्रत उपलब्ध झाले आहेत. यावरून गोमंतकात किमान साडेसहाशे वर्षांपूर्वी म्हणजे ज्ञानेश्वरकाली मराठी भाषा प्रचलित होती, असे दिसून येते.

मात्र लिखित भाषेचे स्वरूपच बोलीभाषेत उपयोगात येत नव्हते. गोमंतक प्रांत महाराष्ट्राच्या केंद्रस्थानापासून दूर व महाराष्ट्र-कर्नाटकाच्या सीमारेषेवर असल्यामुळे बोली व लिखित भाषा यांमध्ये अंतर राहिले. महाराष्ट्रात उत्क्रांत होत गेलेले मराठीचे ग्रांथिक स्वरूप गोमंतकाने वेळोवेळी मान्य केले; परंतु बोलीत फारसा फरक न पडल्यामुळे तिचे जुने स्वरूप फारसे बदलले नाही. म्हणूनच ज्ञानेश्वरीसारख्या जुन्या मराठी ग्रंथात आजच्या गोमंतकी बोलीतील शब्द बऱ्याच प्रमाणात आढळतात. गोमंतकीयांच्या या बोलीला कोकणी असे नाव पोर्तुगीज मिशनरी व लेखक यांनी दिले.

गोमंतकाची मराठी भाषा व कोकणी बोली नष्ट करण्याचे प्रयत्न पोर्तुगीजांनी आपल्या राजवटीतील पहिल्या दोन शतकांत मोठ्या प्रमाणावर केले. सैतानाच्या हवाली झालेल्या या देशातील लोकांच्या पाखंडमतखंडनार्थ लोकांच्या ताब्यातील ग्रंथ एकत्र करून ते जाळण्यात येत. हे ग्रंथ गोव्याबाहेरील संतांनी लिहिलेले, तसेच गोव्यातही निर्माण झालेले होते.

मातृभाषेत मोफत शिक्षण देणे हे सुधारलेल्या राष्ट्रात सरकारचे कर्तव्य समजले जाते. परंतु आर्थिकदृष्ट्या असमर्थ अशा राष्ट्रात किमान् प्राथमिक शिक्षण तरी मुलांच्या मातृभाषेत दिले जातेच. पोर्तुगीज राजवटीत मुलांना प्राथमिक शिक्षण सक्तीचे व मोफत केलेले होते; पण ते पोर्तुगीज भाषेत दिले जात होते. त्यामुळे जनता त्याचा फायदा घेऊ शकत नव्हती. दीड टक्का इतक्या लोकसंख्येतच या पोर्तुगीज शिक्षणाचा प्रसार झाला. अधिकांश ख्रिश्चन लोकांनीच या शिक्षणाचा फायदा घेतला आणि त्यांतली *उच्चवर्गीय* कुटुंबे तर घरीदारी पोर्तुगीज भाषाच बोलू लागली.

इ. स. १९१० सालापर्यंत हिंदू जनता पोर्तुगीज शिक्षणाच्या वाटेला गेली नाही. त्यांनी मराठी भाषेतून खासगी रीतीने आपल्या मुलांना शिक्षण दिले. महाराष्ट्रात शाळाखाते सुरू होण्यापूर्वी ज्या पद्धतीने मुलांचे शिक्षण होई, त्याच पद्धतीचे हे शिक्षण असे. इ. स. १८८० नंतर मात्र महाराष्ट्रातल्या प्रमाणेच गोव्यात मराठी शाळा सुरू झाल्या. या शाळा महाराष्ट्रातून शिक्षण घेऊन आलेल्या शिक्षकांनीच चालविल्या होत्या. महाराष्ट्रातील क्रमिक पुस्तकेच या शाळांत लावली जात. त्यांना सरकारी मदत नसे. उलट त्यांच्याकडे सरकार वक्र दृष्टीनेच पाहत असे. सालाझारशाहीत तर या शाळांना भारतीय राष्ट्रवाद शिकविण्याचे अड्डे असे समजून, त्यांच्यावर करडी नजर ठेवली जाई. अशा सुमारे चारशे शाळा खासगी प्रयत्नांनी इ. स. १९६१ पर्यंत गोमंतकात चालू होत्या. या खासगी शिक्षणामुळेच गोमंतकात साक्षरतेचे प्रमाण बरेच वाढले. इतर भारताशी तुलना करता ते कमी तर पडणार नाहीच; उलट अधिकच भरेल. इ. स. १९६१ च्या शिरगणतीनुसार गोव्यातील साक्षरतेचे प्रमाण शे. ३३ इतके होते.

सांप्रत गोमंतकात प्राथमिक, माध्यमिक व उच्च शिक्षण घेणाऱ्या एकूण विद्यार्थ्यांची संख्या १, ३२,००० च्या घरात आहे व साक्षरतेचे प्रमाण शे. ३३ वरून शे. ४५ पर्यंत गेले आहे.

ग्रामसंस्था – भारतात इतरत्र दृष्टीस न पडणारी अशी एक वैशिष्ट्यपूर्ण संस्था गोमंतकात आहे, ती म्हणजे ग्रामसंस्था (comunidade किंवा community) ही होय. गावाभोवतालच्या जमिनी गावकऱ्यांच्या सामुदायिक मालकीच्या असाव्या, त्या सर्वांनी सामुदायिकपणे कसाव्या, त्यातील उत्पन्न सर्वांनी विभागून घ्यावे, गावगाडा चालविण्यासाठी गावकऱ्यांतून पंचमंडळी निवडावी, तिनेच गावाची व्यवस्था राखावी,

गावातला न्यायनिवाडा करावा, गावाच्या उत्कर्षाच्या योजना आखून त्या पार पाडाव्या व सर्व प्रकारे गाव स्वयंक्षम होईल असे करावे, अशी या ग्रामसंस्थांमागची कल्पना होती. पोर्तुगीजांनी या ग्रामसंस्थांच्या रचनेत पुष्कळ बदल केले व त्यांना सहकारी शेतकी सोसायटयांचे स्वरूप दिले. आज गोव्यातील लागवडीखाली असलेल्या जमिनीपैकी दोन तृतीयांश जमीन ग्रामसंस्थांच्या सामुदायिक मालकीची असून, एक तृतीयांश वैयक्तिक मालकीची आहे.

ग्रामसंस्थांची ही पद्धत आर्यांच्या तेथील वसाहतीपूर्वी गोव्यात वास्तव्य करणाऱ्या द्रविड किंवा ऑस्ट्रोलॉईड लोकांची होती, असे काही विद्वानांचे मत असून, याच पद्धतीची ग्रामरचना आसामातील लोकांत होती व हे लोकही ऑस्ट्रोलॉईड वंशाचे होते, असे सांगितले जाते.

प्रथम जे कोणी गोमंतकात वसाहतीकरता आले, त्यांनी जंगल तोडून जमीन शेतीयोग्य केली व त्यातील काही भागात वस्ती केली. या शेतीयोग्य जमिनीच्या कसानुसार तिचे तीन प्रकार करण्यात आले–(१) भाताच्या पिकाखालील पहिल्या प्रतीची जमीन (२) आंब्याच्या, सुपारीच्या व नारळीच्या बागा तयार करण्यासाठी मधल्या प्रतीची जमीन व (३) नाचणी, उडीद वगैरे वरकस पिके देणारी निकृष्ट प्रतीची जमीन. या जमिनी गावकऱ्यांनी सामुदायिकपणे कसायच्या असत. पहिल्या प्रतीच्या जमिनीतून आलेल्या उत्पन्नाचा काही ठराविक हिस्सा गावच्या देवस्थानासाठी राखून ठेवीत. दुसऱ्या प्रकारच्या जमिनीचे तीन भाग करून एक गावाच्या व देवस्थानाच्या सेवेकऱ्यांसाठी, दुसरा सार्वजनिक कार्यासाठी व तिसरा कुरणे, स्मशान वगैरेंसाठी राखून ठेवायचा, अशी पद्धत असे.

गावाची लोकसंख्या वाढू लागली, तशी अधिक जमीन लागवडीखाली आणणे जरूर भासू लागले. अशा वेळी बाहेरच्या लोकांना गावात आणून त्यांच्याकडून कामे करून घेण्यात येऊ लागली. त्यामुळे गावात दोन वर्ग निर्माण झाले. ज्यांनी मूळ गाव वसविला ते गावकार व ज्यांना नंतर गावात आणण्यात आले ते जणकार अशी त्यांची नावे पडली. या दोन्ही वर्गांना ग्रामसंस्थेत हक्क असत व ते वंशपरंपरा चालू राहत. गावातील तंटेबखेडे सोडविणे, देवस्थानांची व्यवस्था पाहणे व एकूण गावाचे गावपण करणे यासाठी सर्व गावकऱ्यांची एक ग्रामसभा असे. ग्रामसभेतून पंचांची निवड केली जाई व ही पंचमंडळी गावाचा कारभार करी.

याशिवाय लोहार, सुतार, न्हावी, धोबी, महार, चांभार वगैरे बलुतेदार गावात असत. त्यांना वर सांगितलेली दुसऱ्या प्रतीची जमीन तोडून दिलेली असे व त्यांच्याकडून गावाची ती ती कामे मोफत करून घेण्यात येत.

गावातले पंच गावाचा कारभार करीत. प्रत्येक गावाने आपला एकेक प्रतिनिधी निवडून दिल्यानंतर जे एक प्रतिनिधि- मंडळ तयार होई, ते महालाचा कारभार करी. त्यांच्या प्रमुखाने प्रत्येक गावाचा सरकारी खंड वसूल करायचा व सरकारी खजिन्यात त्याचा भरणा करायचा, अशी पद्धत असे. या खंडामुळे सरकारकडून त्यांना संरक्षण मिळे. शत्रूच्या हल्ल्या- पासून गावाचे रक्षण करणे इतकाच राजसंस्थेचा मर्यादित उपयोग गावाला होत असे. त्यामुळे मध्यवर्ती सत्ता कोणाची आहे, याची गावच्या लोकांना चिंता करायचे कारण नसे.

पोर्तुगीजांच्या आगमनापर्यंत कित्येक शतके ग्रामसंस्थांचा कारभार वरीलप्रमाणे अव्याहत चालू होता. पण पोर्तुगी- जांनी त्या कारभारात ढवळाढवळ करून त्यांचे मूळ स्वरू पार बदलून टाकले. ग्रामसंस्था या जणू शेतकी सहकारी संस्था बनल्या. गावकऱ्यांचा हक्क हा विभागात (शेअर) रूपांत पावला. हे विभाग व्यापारी कंपन्यांच्या शेअर्सप्रमाणे विक्री काढता येऊ लागले. त्यामुळे मूळ गावकऱ्यांचा व त्यांच्या गावांचा संबंध सुटला व ज्याच्या हाती विभाग, तो त्या ग्राम- संस्थेचा सभासद असा प्रकार झाला.

मुक्तीनंतर या ग्रामसंस्थांवरील सरकारी अंकुश कमी करा व त्याचे जुने स्वरूप त्यांना पुनश्च मिळवून देण्यात यावे, अ प्रयत्न चालू आहेत. विशेषतः नव्या ग्रामपंचायती व या जु ग्रामसंस्था यांची सांगड घालण्याच्या दिशेने विचार होत आहे

धर्मपंथ, उपासना व देवदेवता – परशुरामाने गोमंतकात वसाहत केली, ही दंतकथा खरी असो वा नसो; आर्यवं गोमंतकात आली तेव्हाच वैदिक धर्माचा या भागात प्रवे झाला. त्यापूर्वी गोमंतकात द्रविड वंशाचे लोक राहत हो आणि त्याहीपूर्वी ऑस्ट्रोलॉइड लोक राहत होते. या लोकां जो काही धर्म होता, त्यात लिंगपूजा प्रचलित होती. गोमंतक नागेश, मंगेश, रामनाथ, इ. जे सारस्वत ब्राह्मणांचे कुलदे आहेत, ते सारस्वतांनी त्रिहोत्रपुराहून येताना आपल्या बरो आणले, अशी रूढ समजूत आहे. परंतु या लिंगदेवतांपैकी का देवता तरी गोमंतकात पूर्वीच अस्तित्वात होत्या, अशी न उपपत्ती पुढे येत आहे. नाग जातीचे लोक एके काळी गुजरा पासून मलबारपर्यंतच्या किनारपट्टीत राहत होते. गोमंतक नाग लोकांशी संबंधित अशा अनेक गोष्टी सापडतात. शि लेखांवर नागचिन्हे आहेत, नागझरी या नावाचे अनेक आहेत व वाठाराचे वा वाड्याचे रक्षक नाग असतात; त्यां मारू नये, अशी समजूत प्रचलित आहे. हा समज व कोक प्रचलित असलेली नागपूजा ही गोमंतकातील नागांच्या प्रा

अस्तित्वाची खूण होय. नागेश हे या नागजमातीचे दैवत असणे शक्य आहे.

सन पूर्व तिसऱ्या शतकात अशोकाने बौद्धधर्माच्या प्रसारासाठी महाराष्ट्र, प्रतिष्ठान (पैठण) व अपरान्त (कोकण) या तीन देशांत बौद्ध धर्मोपदेशक पाठविले होते, असा पुरावा मिळतो. गोमंतकात रिवण, लामगाव हरवळे, लोटली, आके, हरमल, इ. ठिकाणी बौद्ध धर्माच्या हीनयान पंथाचे विहार आढळतात. यावरून गोमंतकात हीनयान पंथाचा प्रसार झाला होता, असे दिसते. हीनयानांप्रमाणेच महायान पंथाचीही एक बुद्धमूर्ती फादर हेरास याला इ. स. १९३० साली कोलवाळ येथे सापडली असून, ती सांचीच्या चैत्यातील मूर्तीसारखी आहे, असे म्हणतात. ती मूर्ती इ. स. च्या दुसऱ्या किंवा तिसऱ्या शतकातली असावी. तसेच हरवळे येथील विहारातील शिलालेखाच्या ब्राह्मी लिपीच्या वळणावरून तो विहारही पहिल्या शतकातील असावा, असे प्रा. पिसुर्लेकर यांचे अनुमान आहे.

खुद्द बुद्धाच्या पुण्ण नावाच्या एका शिष्याने गोमंतकात बौद्ध धर्माचा पहिल्या प्रथम प्रसार केला, असा बौद्ध ग्रंथांत दाखला सापडतो. हा पुण्ण शूर्पारकाच्या एका व्यापाऱ्याचा पुत्र होता. पुण्णाला किंवा त्यानंतर अशोकाने पाठविलेल्या बौद्ध धर्मोपदेशकांना गोमंतकात किती यश आले, याची मात्र काही माहिती मिळत नाही.

जैन मताचा प्रवेश गोमंतकात फारसा झाला नाही. गोमंतकावर राज्य करणाऱ्या काही राजांनी जैनधर्म स्वीकारला होता. परंतु त्यांनी जनतेत त्या धर्माचा प्रसार केला नाही. जैनांची कोणतीही खूण आज गोमंतकात शिल्लक नाही.

भारतात नाथ पंथाचा उदय झाल्यावर त्याचे लोण गोमंतकापर्यंत पोचले होते. गोमंतकात रवळनाथ नावाचा एक ग्रामदेव आढळतो. हा नाथपंथातला राहुलनाथ असावा, असे डॉ. व्यं. मं. कैंकिणी म्हणतात. रवळनाथाशिवाय मच्छिंद्रनाथ, नागनाथ, रामनाथ, भवनाथ, सिद्धनाथ, भूतनाथ, चंद्रनाथ, कुवलनाथ, मल्लिनाथ या गोमंतकातल्या देवता नाथपंथीय आहेत, असाही त्यांचा दावा आहे. खुद्द सारस्वत ब्राह्मणांचा मंगेश हा देव नाथपंथीय असून, त्याचे पूर्वीचे नाव मंजुनाथ होते, असेही डॉ. कैंकिणी म्हणतात.

माशेल या गावात मल्लिनाथाचे देवालय आहे. ही देवता मात्र निश्चितपणे नाथपंथीय आहे. मल्लिनाथ हा शब्द मच्छिंद्रनाथ या शब्दावरून आला असून मच्छिंद्रनाथ म्हणूनच या देवतेला त्याचे उपासक भजतात. इथे नवनाथभक्तिसाराचे पारायण होते व अंगात संचार झालेली व्यक्ती आपण मच्छिंद्रनाथ असल्याचे सांगते. या मल्लिनाथाचे त्याच गावातील रवळनाथ या देवतेशी सख्य असल्याची कथा आहे. यावरून रवळनाथ हा नाथपंथातील राहुलनाथ असणे शक्य वाटते.



कुवलनाथ

गोमंतकातील सारस्वत ब्राह्मणांत स्मार्त व वैष्णव असे दोन भेद आहेत. आद्य शंकराचार्यांच्या काळापूर्वी सारस्वत ब्राह्मणांत हा भेद नव्हता. शंकराचार्यांनी स्थापलेल्या पीठाचे एक जगद्गुरू विवरणानंद सरस्वती यांनी सारस्वत ब्राह्मणांना स्मार्त मताची दीक्षा दिली. पुढे सारस्वत ब्राह्मणांसाठी कुशस्थळी या गावी स्मार्त धर्मपीठाची स्थापना झाली. पोर्तुगीजांच्या बाटवाबाटवीनंतर सध्याच्या कवळे गावी इ. स. १६०० च्या सुमारास या मठाची पुन:प्रतिष्ठा झाली. या मठाचे अनुयायी असलेले सारस्वत हे स्मार्त होत.

इ. स. च्या १३ व्या शतकात मध्वाचार्यांनी द्वैतमत प्रस्थापित केले. ते गोव्यात गेले होते व इषुपात म्हणजे बाणावली या गावी त्यांचा मुक्काम पडला होता. या मुक्कामात त्यांनी द्वैतमतावर प्रवचने केली व त्यांच्या प्रभावाने सारस्वत ब्राह्मणांपैकी निम्म्या लोकांनी द्वैतमताचा स्वीकार केला. या माध्व संप्रदायाच्या सारस्वतांना वैष्णव म्हटले जाते. माध्व संप्रदायाचे मूळ पीठ उडुपी येथे असून, त्याची एक गौड शाखा गोव्यातील पर्तगाळ या गावी स्थापन झाली. इथे मध्वाचार्यांचा आणखी एक मठ असून, वैष्णव मताच्या या मठाला गोकर्णपर्तगाळ मठ, असे म्हणतात.

गाणपत्य, शाक्त, महानुभाव वगैरे उपासना गोमंतकात आढळत नाहीत. वारकरी संप्रदायाचा मोठ्या प्रमाणावर प्रसार नसला, तरी बहुजनसमाजात त्याचे अस्तित्व दिसते.

गोमंतकात कुलदेवता, ग्रामदेवता व उपास्य देवता अशी तीन प्रकारची दैवते आहेत. सारस्वत, कऱ्हाडे व दैवज्ञ यांच्याच कुलदेवता आहेत. इतर समाजांच्या खास अशा कुलदेवता नाहीत. सारस्वत ब्राह्मणांनी आपल्याबरोबर मंगेश, शांतादुर्गा, नागेश, रामनाथ, महालक्ष्मी, म्हाळसा, सप्तकोटीश्वर, दामोदर, इ. देवता गोव्यात आणल्या. या देवता विशिष्ट कुलांच्या देवता असून, त्या पूर्वी सासष्टीत व गोवा बेटातील गावात स्थापलेल्या होत्या. पुढे बाटवाबाटवीच्या काळात ही देवस्थाने पोर्तुगीजांनी उद्ध्वस्त केल्यावर या देवतांचे शेजारच्या भतग्राम व फोंडे महालात स्थलांतर करण्यात आले. आज कवळे, मंगेश, म्हार्दोळ, रामनाथी, नागेशी, वांदोडे, माशेल, नारवे, जांवावली, इ. गावांत या देवतांची सुंदर मंदिरे बांधलेली आढळतात. ही मंदिरे फक्त दोन-तीनशे वर्षांपूर्वीच बांधण्यात आली असल्यामुळे, त्यांचे शिल्प हे अलिकडचे शिल्प आहे.



वेताळमूर्ती– केरी

गोमंतकातील स्थानदैवतांमध्ये अनेक दैवतांचा समावेश होत असला, तरी त्यांतील मुख्य देवता भूमिदेवता ही होय. सांतेरी, भूमिका, माउली, रोहिण, भगवती, भवानी अशा निरनिराळ्या नावांनी गोमंतकासह दक्षिण कोकणात ती ओळखली जाते. बहुतेक प्रत्येक गावात तिचे देऊळ असते. भूमिदेवता ही भूमीचे प्रतीक असून, तिची पूजा अनार्यांकडून आर्यांनी घेतलेली आहे, याबद्दल आता शंका राहिलेली नाही. दुर्गा ही अनेक गावांतून ग्रामदेवता म्हणून भजली जाते. शांतादुर्गा, नवदुर्गा, अजादुर्गा वगैरे विविध रूपांनी ती ओळखली जाते. याशिवाय काही गावांतून भूमिदेवतेशिवाय रवळनाथ, भैरव, वेताळ, इ. देवताही ग्रामदेवता म्हणून उपासिल्या जातात.



कालीमूर्ती– धारवांदिवडे

गोमंतकात काही उपास्य देवताही आल्या आहेत. दत्तोपासना गोमंतकात गेल्या पन्नास वर्षांतच सुरू झाली असून, साखळी येथे एक सुंदर दत्तमंदिर बांधण्यात आले आहे. हे देवस्थान फा जागृत असल्याची प्रसिद्धी आहे. विठ्ठलाची उपासना गोमंत-कात कि मा पाचशे वर्षांइत तरी जुनी आ साखळी येथी विठ्ठलमंदिर जु तर आहेच; प त्यातली मूर्ती ह पंढपूरच्या मंदि तून गोमंतका आल्याची आख्या यिका आहे. प्रसिद्ध राणे घ ण्याचे हे उपा दैवत होय. ग पती हे म राष्ट्रात उपा दैवत समज जाते; पण गोमं कात त्याचे कु दैवतात रूपांतर झाले आहे. खांडोळे येथील गणपती स सारस्वत, काही दैवज्ञ आणि वैश्य यांचे कुलदैवत आहे. मा हे देशावर उपास्य दैवत समजले जाते. प्रत्येक गावात मारु मंदिर असतेच. परंतु गोमंतकात मारुतिमंदिरे क्वचि आहेत. सार्वजनिक शिवालयांचाही अभावच आहे. दैवज्ञ ब्रा समाजात घराण्याच्या कुलदेवता वेगवेगळ्या आहेत; परंतु समाजाची मिळून कासारपाल येथील कालिकादेवी ही उपा देवता आहे. धारबांदिवडे येथेही एक कालीचे मंदिर यशिवाय गोमंतकात अपवादात्मक अशा काही देवता आहे की ज्यांची कधी उपासना होत होती, की काय असा प्र पडतो. उदा० सत्तरीमध्ये करमळी येथे ब्रह्मदेवाचे एक दे आहे. त्यातली मूर्ती कारागिरीच्या दृष्टीने अप्रतिम ब्रह्मदेवाची देवळे भारतात फारशी नाहीत. परशुरामाचे देवालय काणकोण महालात आहे; परंतु त्याची पूजा चालू नाही.

तांबडे सुर्ल येथे रानात एक शिवालय आहे, त्याचा स्वतंत्र अपवाद करावा लागेल. अलिकडेच ते सापडले हेमाडपंती बांधणीचे हे मंदिर इ. स. च्या १३ व्या शतका असावे, असा अंदाज आहे.

गोव्यात जिथे जिथे देवस्थाने आहेत, तिथे तिथे निरंकाराची एक देवळी असते. काणकोण महालात तर निरंकाराचे देवालयच आहे. या देवळयांमधून निरंकाराचे नावाने एक दगड ठेवलेला असतो. रावबहादुर चव्हाण यांच्या मते ही जैन देवता होती व तिचे पुढे हिंदूकरण झाले. पण इतर संशोधकांच्या मते निरंकार किंवा निराकार ही आदिवासींची देवता असून, ती गोमंतकातील सारस्वतांनी इतर अनार्य देवतांप्रमाणेच आपल्या दैवतवर्गात सामावून घेतली.

गोमंतकातील या देवस्थानांतून नवरात्र, दसरा, काला व जत्रा हे उत्सव मोठ्या प्रमाणावर होत असतात. याशिवाय देवस्थानाच्या परंपरेप्रमाणे इतर उत्सव होतात, ते वेगळे. जत्रेच्या वेळी मराठी नाटके होत असतात व पंचक्रोशीतून हजारो माणसे या जत्रांसाठी जमत असतात. काही देवस्थानातून रथोत्सव व देवाचा जलविहार हे कार्यक्रमही होतात. जलविहाराच्या वाहनाला सांगड असे म्हणतात.

गोमंतकातील प्रमुख देवस्थाने– पोर्तुगीजपूर्व काळात गोव्यामध्ये सर्वत्र ग्रामसंस्थांचे जाळे होते. त्यांच्यामार्फत गावोगावी देवालये बांधण्यात आली होती. पोर्तुगीजांनी धर्मच्छळ सुरू केला आणि या साऱ्या देवस्थानांची वाताहात झाली. त्याच वेळी जुन्या काबिजादीतील त्या त्या देवतेच्या भक्तांनी आणि महाजनांनी आपापली दैवते घेऊन नव्या काबिजादीत स्थलांतर केले. त्यामुळे त्यांचे मूळचे अग्रहार, इनामे, दानपत्रे, नेमणुका, इ. आर्थिक बाबी नष्ट झाल्या व त्यांना नव्या जागी नवी मांडामांड करावी लागली. यापैकी कित्येक देवस्थाने त्या त्या देवाच्या भक्तांनी लवकरच भरभराटीस आणली. त्यापैकी काही प्रमुख देवस्थाने पुढे दिल्याप्रमाणे आहेत.

श्रीसप्तकोटीश्वर– सारस्वत ब्राह्मणांच्या देवतांपैकी सप्तकोटीश्वर या देवतेला राजदैवत म्हणून मान मिळाला होता. गोमंतकातल्या कदंबांनी आपले उपास्य दैवत म्हणून सप्तकोटीश्वराचा स्वीकार केला होता. सप्तकोटीश्वराचे देवालय पूर्वी दीपवती (आजचे दिवाडी) या बेटावर होते. इ. स. च्या चौदाव्या शतकातील मुसलमानांच्या पहिल्या टोळधाडीत ते भग्न झाले. पंधराव्या शतकात विजयनगरच्या कारकीर्दीत माधव मंत्री याने ते पुन्हा बांधले. पोर्तुगीजांनी त्याची पुन्हा धूळधाण उडवली. याच वेळी त्याला भतग्रामातील नारवे या गावी नेण्यात आले व तिथे त्याचे मंदिर बांधण्यात आले. इ. स. १६६७–६८ साली शिवाजी महाराज गोव्याच्या मोहिमेवर असताना डिचोली येथे त्यांचा मुक्काम होता. सोमवारी शिवदर्शन घेण्याचा त्यांचा नियम असे. त्याप्रमाणे जवळपास कुठें शिवमंदिर आहे का, याची चौकशी केल्यावर, नारवे येथे सप्तकोटीश्वराचे मंदिर असल्याचे त्यांना कळले. तिथे गर्भागारात पूजा चालू असताना बाहेर लव्हाळयांनी शाकारलेल्या छपरातून एक लव्हाळा खाली पडला. तीच परमेश्वरी आज्ञा समजून शिवाजी महाराजांनी त्या मंदिराच्या जीर्णोद्धाराची कारभाऱ्यांना आज्ञा दिली. थोडयाच काळात ते काम पुरे झाले. मंदिराच्या महाद्वारावर 'श्री सप्तकोटीश शके १५९० किलकाब्दे कार्तिक कृष्ण पंचम्यां सोमे श्री शिवराज्ञा देवालयस्य प्रारंभः' अशी अक्षरे कोरलेला शिलालेख दिसतो. या ठिकाणी महाशिवरात्रीस मोठा उत्सव होतो.

विठ्ठलवाडी व दत्तवाडी– साखळी येथे ही दोन मोठी सार्वजनिक देवस्थाने आहेत. विठ्ठल हे इथल्या राण्यांचे कुलदैवत असून, चैत्र महिन्यात शुद्ध दशमी ते पौर्णिमा असा सहा दिवस त्याचा महोत्सव होतो. साखळीला या देवस्थानामुळे दुसरे पंढरपूर असे म्हणतात; तर दत्तदेवस्थानामुळे त्याला दुसरी नृसिंहवाडी असे म्हणतात. साखळीजवळच हरवळे या गावी मोठा धबधबा आहे. त्याच्या खाली बनलेल्या डोहाला भीमकुंड असे नाव आहे. महाशिवरात्रीस इथे मोठी स्नानयात्रा भरते.

श्रीकालिका देवी– कासारपाल येथे कालिकादेवीचे सुंदर मंदिर असून, तिथले बरेच उत्सव प्रेक्षणीय होतात. गोमंतकातल्या समस्त दैवज्ञब्राह्मणांचे हे कुलदैवत आहे. कासारपाली जवळच शिरगाव नावाचे गाव असून तिथल्या देवीला लइराई असे म्हणतात. वैशाखमासी तिची मोठी जत्रा भरते. हिच्या भक्तांना धोंड असे म्हणतात. हे धोंड या जत्रेला आवर्जून येतात व जळत्या निखाऱ्यांवरून चालत जातात.

श्रीमल्लिकार्जुन– काणकोण गावी मल्लिकार्जुनाचे मंदिर आहे. हे मूळचे द्रविड वंशाच्या हबू लोकांचे देवायल होते. तूर्त त्याचे महाजन (हक्कदार भजक) मराठे व सारस्वत आहेत.



शांतादुर्गा मंदिर – कवळे

श्री दामोदर– जांबावली येथील दामोदराचे मंदिर हेही

गोमंतकातले एक सुप्रसिद्ध देवस्थान आहे. हे पोर्तुगीजपूर्व कालात मडगाव शहरी होते. तिथून हा देव जांबावली गावी नेण्यात आला. दामोदराचे भक्त सर्व जातीजमातीत आहेत.

गोमंतकातील सर्वांत प्रेक्षणीय आणि समृद्ध अशी देवस्थाने अंत्रुज महालात (फोंडे) आहेत. ही सर्व देवस्थाने सारस्वत ब्राह्मणांतल्या भिन्न भिन्न कुलांची कुलदैवते आहेत.

श्री शांतादुर्गा– हे देवस्थान कवळे येथे असून, ही देवी कौशिक गोत्री सारस्वत ब्राह्मणांची कुलदेवता आहे. ही मूळ केळोशी येथे होती. तिथून तिला कवळे क्षेत्री आणण्यात आले. श्री. बाजीराव पेशवे यांनी कवळे हा गाव या देवीला इनाम दिला होता. शांतादुर्गेचा घुमट (घुड) प्रसिद्ध आहे.

श्री मंगेश–स्मार्त–वैष्णव अशा उभय संप्रदायी कित्येक गौड सारस्वतांचा हा कुलदेव आहे. प्रियोळगावी याचे स्थान असून, त्या वाड्याला मंगेशी असे म्हणतात. हा देव मुळात कुशस्थळी (कुठ्ठाळ) या गावी होता. इथला दीपस्तंभ उंच आणि विशेष प्रसिद्ध आहे. याच्या सभोवती प्रशस्त अग्रशाळा असून, समोर विस्तीर्ण तलाव आहेत.



मंगेशाचे मंदिर

श्री म्हाळसा– ही पूर्वी सासष्टीत वेर्णे या गावच्या डोंगरावर होती. पोर्तुगीजांनी तिथले तिचे मंदिर पाडल्यानंतर ती तिथून म्हार्दोळ या गावी आली. म्हार्दोळ हे मंगेशाच्या जवळच आहे. हिचे देवालय भव्य आणि प्रशस्त आहे. गोमंतकातल्या कित्येक जातींची म्हाळसा ही कुलदेवता आहे. इथे माघमासी जत्रा भरते व ती कित्येक दिवस चालते. शिरोडे येथील कामाक्षीचे मंदिरही प्रसिद्ध असून तीही अनेकांची कुलदेवता आहे.

श्री महालक्ष्मी– हिचे देवालय मूळ कोलवे या गावी होते. ते बाटवाबाटवीच्या काळात बांदिवडे गावी आणण्यात आले. कवळे व मंगेशी येथील महाजनांचे हे पालवी (उप) दैवत आहे. या गावात नागेशाचेही देवस्थान आहे. कौशिकगोत्री सरदेसाई व प्रियोळकर हे याचे महाजन आहेत. इथला तलाव प्रसिद्ध आहे.



महालसेची मूर्ती – म्हार्दोळ

श्री रामनाथ– हे देवस्थान मूळचे लोटली गावचे; पण सांप्र ते कवळे गावाजवळ उभारण्यात आले आहे.

याशिवाय वेर्लिंगचा नरसिंह, म्हापसे येथील मारुती, क मळी येथील ब्रह्मा, अशी कितीतरी लहान मोठी देवस्थाने गोमंतकात नांदत आहेत. या देवस्थानांतली स्वच्छता आणि टापटीप डोळ्यात भरण्यासारखी असते.

ख्रिस्ती मंदिरे—इ. स. १५१० साली आल्बुकेर्कने गोवा शहर घेतले, त्याच वेळी कॅथॉलिक पाद्र्यांनीही त्याचा ताबा घेतला आणि धर्मांतराच्या कामास हळूहळू प्रारंभ केला. कॅथॉलिक हा ख्रिश्चन धर्माचा एक पंथ किंवा संप्रदाय होता आणि इतर पंथांपेक्षा तो अधिक कर्मठ होता. या पंथाच्या द्वारे हिंदूंचे धर्मांतर घडवून आणणे व कॅथॉलिक पंथीयात शिस्त निर्माण कर यासाठी काही सोसायट्या किंवा मंडळे निर्माण झाली होती. डोमिनिकन, फ्रान्सिस्कन, जेसुईट, ऑगस्टीन ही यांपैकी काही सोसायट्यांची नावे होत. या सोसायट्यांनी धर्मांतरासाठी पुढीलप्रमाणे गोव्याचा प्रदेश आपापसात वाटून घेतला होता- बारदेस-फ्रान्सिस्कन, गोवा बेट-डोमिनिकन व सासष्टी-जेसुईट. या सर्वांनी आपले काम इतके कठोरपणे बजावले, की फार थोडे हिंदू या भागात शिल्लक राहिले.

पोर्तुगीजांनी धर्मांतराबरोबरच गोव्यात सर्वत्र ख्रिस्तमंदिरे बांधण्याचाही उपक्रम केला. काही ठिकाणी हिंदूंची देवालये मोडून त्याच जागी त्यांनी चर्चीसच्या वास्तू उभारल्या, तर काही चर्चीस नवीन जागी बांधली. आज गोमंतकात जी हिंदूंची देवालये आहेत, त्यांच्या मानाने ही ख्रिस्तमंदिरे भव्य आहेत. सासष्टी, बारदेस व गोवा या तिन्ही तालुक्यांतल्या प्रत्येक गावी इ. स. च्या १६ व्या शतकात ख्रिस्तमंदिरे उभारण्यात आली व उद्ध्वस्त केलेल्या देवालयांच्या जमिनी त्यांच्या चरितार्थासाठी लावून देण्यात आल्या. या मंदिरांपैकी सर्वांत मोठी मंदिरे गोवा शहरात बांधण्यात आली होती. इ. स. १७५९ साली गोवा शहरात पटकीची साथ आल्यामुळे गोव्याची राजधानी आजच्या पणजी या जागी हालविण्याचे काम सुरू झाले व नंतर गोवा शहर हळूहळू नामशेष होत जाऊन, सांप्रत ते झाडझाडोऱ्याने व माडांच्या रायांनी भरून गेलेले आहे. पोर्तुगीजांनी बांधलेल्या येथील वास्तूंपैकी फार थोड्या वास्तू चांगल्या स्थितीत आहेत. त्यांच्यापैकी काहींची माहिती अशी—

बोंजेझुसचा कॉन्वेंट ही जुन्या गोवा शहरातील प्रसिद्ध वास्तू असून, तिच्यातच सेंट फ्रान्सिस झेवियरचे शव ठेवण्यात आले आहे. या मंदिराचे होली साक्रामेंट व सेंट झेवियरचा टोंब असे दोन भाग आहेत. इ. स. १६०५ साली हा कॉन्वेंट बांधण्यात आला व १६५५ मध्ये सेंट झेवियरच्या शवपेटीसाठी चॅपेल बांधण्यात आले. इथल्या भिंतींवर सेंट झेवियरच्या जीवनातील कित्येक प्रसंग चित्रित केलेले असून ती चित्रे किमान चारशे वर्षांपूर्वीची आहेत. गोथिक शिल्पशैलीची गोव्यातील ही एकुलती एक वास्तू होय. पोप पायस बारावा, याने या कान्वेंटला इ. स. १९४६ साली बाझीलिकाचा दर्जा दिला.



बों जेझुस चर्च – जुने गोवे

पॅट्रिआर्कल (Se Patriaral) किंवा कॅथेड्रल ऑफ गोवा ही इमारत बोंजेझुसच्या मंदिरापेक्षा अधिक भव्य असून अधिक जुनी आहे. आल्बुकेर्कने गोवा शहर घेतले तो दिवस सेंट कॅथेरिनचा होता, म्हणून तिच्या नावे १५१० मध्येच त्याने प्रथम एक छोटे चॅपेल बांधले व नंतर वरील इमारत उभी करण्यात आली. या कॅथेड्रलमध्ये १४ आल्टर्स (वेदी) असून गोव्यातील सर्वांत मोठी घंटाही याच इमारतीत आहे. सेंट ख्रिस्तोफर, येशू ख्रिस्तावरील खटला, सेंट कॅथरिनच्या जीवनातील प्रसंग, इ. अनेक विषयांवरील चित्रे याही कॅथेड्रलमध्ये आहेत. याच वास्तूत काही काळ इन्क्विझिशनचे कोर्ट भरत असे.

सेंट फ्रान्सीस ऑफ आसीसीचा कॉन्वेंट हा कॅथेड्रलच्या मागच्या बाजूला लागून आहे. इ. स. १५१७ साली फ्रान्सीस्कनांनी तो बांधला. त्याला जोडून असलेले चर्च १५३० साली बांधण्यात आले. कॉन्वेंटचा दर्शनी भाग पोर्तुगीज बादशहा मानुएल याच्या कालातील शिल्पकृतीचा उत्कृष्ट नमुना आहे. या कॉन्वेंटमध्ये जुन्या गोव्यात पोर्तुगीजांनी भ्रष्ट केलेल्या हिंदूंच्या दगडी मूर्तींचे अवशेष ठेवण्यात आले होते. स्वातंत्र्यानंतर आता या कॉन्वेंटचे रूपांतर म्युझियममध्ये करण्याचे ठरले असून तिथे गोमंतकातील मूर्ती, शिलालेख, इ. चा संग्रह करण्यात येत आहे.

सेंट कॅजेटनचा कॉन्वेंट हा रोममधील सेंट पीटर बाझीलिकाच्या धर्तीवर व कोरिंथियन शैलीने बांधण्यात आला आहे. त्याला तळघर असून, गोव्यात निधन पावलेल्या व्हाईसरॉयांचे देह पोर्तुगालला नेण्यासाठी त्यात ठेवण्यात येत.

सेंट मोनिकाचा कॉन्वेंट ही गोवा शहरातील सर्वांत उंच इमारत होय. ती आधीच उंचवटयावर बांधलेली आहे. तिला तीन मजले असून, सर्वांत वरच्या गॅलरीतून भोवतालचा बराच मोठा भाग दृष्टिपथात येतो. या कॉन्वेंटला तट व बुरूज होते, ते आता कोसळले आहेत. याच्या भिंतींवर बायबलमधील प्रसंगांची उठावाची रंगीत चित्रे आहेत.

सेंट पॉल कॉलेजचा फक्त दर्शनी भाग आज शिल्लक आहे. हे कॉलेज जेसुईटांनी बांधले होते. पूर्वेकडील ख्रिस्ती धर्मशिक्षणाचे हे आद्यपीठ होते. भारतातील पहिला छापखाना या कॉलेजमध्ये इ. स. १५५६ साली उभारण्यात आला होता व इथूनच इ. स. १५५७ साली पहिला मुद्रित ग्रंथ बाहेर पडला.

गोमंतकीयांची साहित्यसेवा — मराठी भाषेच्या जन्मकाळापासून इतर महाराष्ट्राप्रमाणेच गोमंतकातही तिची उपासना चालू आहे. इ. स. च्या बाराव्या-तेराव्या शतकात महानुभाव व मुकुंदराज — ज्ञानेश्वर यांनी ग्रंथरचना केली, तेव्हापासून महाराष्ट्रातील संतवाङ्मयाचा गोमंतकातही प्रसार झाला होता, असे निःसंदिग्धपणे म्हणता येते. कारण इ. स. च्या

१५ व्या शतकात लिहिलेली कृष्णदास शामा या गोमंतकीय लेखकाची भागवताच्या दशमस्कंधावरील टीका अलीकडेच सापडली असून, भागवत पुराणातील अनेक आख्यानेही उपलब्ध झाली आहेत. कृष्णदास शामा हाच गोमंतकाचा ज्ञात असा पहिला मराठी ग्रंथकार होय. त्याच्या काव्यावर त्याच्या काळापूर्वी होऊन गेलेल्या मराठी संतांचा प्रभाव स्पष्टपणे दिसतो. याशिवाय विष्णुदासनामा, निवृत्तिदेव, ज्ञानदेव नावाच्या काही गोमंतकीय ग्रंथकारांचे साहित्यही प्रा. पिसुर्लेकर यांना पोर्तुगालमध्ये अलिकडेच उपलब्ध झाले आहे.

इ. स. च्या सोळाव्या शतकाचा उत्तरार्ध व सतराव्या शतकाचा पूर्वार्ध हा गोमंतकातील मिशनरी मराठी साहित्याचा काळ होय. नवख्रिस्ती लोकांना ख्रिस्ती धर्मतत्त्वे समजावून सांगण्यासाठी ग्रंथांची गरज होती. पुढे त्यांच्या हस्तलिखित नकला करण्यात फार वेळ जाऊ लागला. म्हणून पुस्तके छापण्याचीही गरज उत्पन्न झाली. इ. स. १५५६ साली गोव्यात पोर्तुगालहून पहिला छापखाना आणण्यात आला आणि मराठीत व कोंकणीत लिहिलेली पुस्तके त्या छापखान्यात छापली जाऊ लागली. ख्रिस्ती झालेल्या हिंदूंना मराठीतून रामायण, महाभारत, पुराणे व संतसाहित्य वाचण्याची सवय होती. त्यामुळे केवळ पाद्रीमुखातून धर्मतत्त्वांचे श्रवण केल्याने त्यांचे समाधान होईना. म्हणून मग हिंदू पुराणांच्या धर्तीवर ख्रिस्ती पुराणे रचण्याचा उद्योग काही मिशनऱ्यांनी सुरू केला. त्यासाठी त्यांनी मराठी भाषेचा व्यासंग केला आणि मराठीत ख्रिस्ती धर्मावर ग्रंथरचनाही केली. अशा ग्रंथांपैकी सर्वोत्कृष्ट ग्रंथ म्हणजे फादर स्टीफन्स याचा क्रिस्तपुराण हा ग्रंथ होय.

काव्यदृष्ट्या हा ग्रंथ विद्वानांनी वाखाणला असून, फादर स्टीफन्सच्या मराठी व्यासंगाचेही कौतुक केले आहे. एतिएँ द ला क्रुवा या फ्रेंच पाद्र्याचा पीटर पुराण हा ग्रंथही काव्यदृष्ट्या सरस आहे. सेंट पीटरचे चरित्र त्यात वर्णिले असून त्याबरोबरच हिंदू देवदेवतांची निंदानालस्तीही केलेली आहे. इ. स. १६२९ साली तो छापला गेला. सांतु आंतोनीची जीवित्वकथा हा ग्रंथ पोर्तुगीज पाद्री आंतोनियू द साल्दांज्य याने इ. स. १६५९ साली लिहिला. सेंट अँथनीच्या जीवनाची कथा त्यात सांगितली आहे. इ. स. १६६० साली हा छापखाना बंद पडल्यावर मात्र गोव्यातील मिशनऱ्यांनी लिहिलेले मराठी साहित्य उपलब्ध नाही.

मिशनऱ्यांची ही साहित्यसेवा चालू असतानाच पोर्तुगीज अंमलाखालील गोमंतकात मराठी भाषेवर सरकारी बंधने लागू होत होती. हिंदूंचे ग्रंथ नवख्रिस्त्यांच्या हाती पडू नयेत म्हणून मराठी ग्रंथांची होळी केली जात होती. हिंदूंनी हे ग्रंथ आपल्या घरांतून बाळगू नयेत, अशी फर्माने सुटत होती. परंतु गोमंतकाच्या इतर भागात, म्हणजे मराठी मुलखात मात्र मराठीची उपासना चालूच होती. गोमंतकातील या काळातले एक नामवंत कवी म्हणजे शंकर नायक करंडे उर्फ नायकस्वामी हे होत. सतराव्या शतकाच्या मध्यास त्यांनी शिवगीतेवर शिवदर्पण नावाची टीका लिहिली. त्यांची इतर ग्रंथरचना व पद्यरचनाही उपलब्ध आहे.

अठराव्या शतकातील श्रेष्ठ लेखक महेश्वरशास्त्री सुखटणकर हे होत. त्यांची संस्कृत रचना बरीच असून, त्यांनी अध्यात्मपर मराठी काव्यनिर्मितीही केली आहे. अमरकोशावरील अमरविवेक ही टीका, जयदेवाच्या गीतगोविंद काव्याचे विवरण, सिद्धान्तचंद्रिकेचे पद्यमय भाषांतर, श्रीशंकराचार्यांच्या वाक्सुधेचे विवेचनात्मक पानपात्रचपक, अशी त्यांची ग्रंथरचना उपलब्ध आहे. त्यांचेच चिरंजीव शिवरामशास्त्री उर्फ सोमभट सुखटणकर यांचेही काही ग्रंथ प्रसिद्ध आहेत. नायकस्वामींचे प्रशिष्य व्यंकट यांची ग्रंथरचनाही बरीच आहे. इ. स. च्या अठराव्या शतकाच्या अखेरीस सोहिरोबानाथ आंबिये हे कवी होऊन गेले. त्यांनी सिद्धान्तसंहिता, अद्वयानंद पूर्णेश्वरी, इ. ग्रंथ लिहिले असून, भक्तिपर पद्यरचनाही केली आहे. त्यांची पदे कोकणात अजूनही आवडीने गायली जातात. विठ्ठलक केरीकर हेही याच काळातले. यांनी शुकरंभासंवाद, कबीरक वामनचरित्र इ. काव्ये लिहिली असून, त्यांची इतर सु कविताही बरीच आहे.

इ. स. च्या १९ व्या शतकात अनेक लेखक गोमंतकात साहित्यनिर्मिती करीत होते. परंतु या सर्वांत डोंगरी येथील कृष्ण जगन्नाथ भट्ट बांदकर याचा उल्लेख आवर्जून केला पाहिजे. त्यांची पद्यरचना अत्यंत रसाळ आहे. विशेष म्हणजे मराठी संगीत नाटकाचे ते जनक समजले जातात. संगीत आख्याने रचून ती डोंगरी येथील रामनवमीच्या उत्सवात राममंदिरा समोरील मंडपात ते सादर करीत. इ. स. १८८० च्या सुमारास अण्णासाहेब किर्लोस्कर नोकरीनिमित्त गोमंतकात गेल्या वेळी ते या नाटकास हजर होते. त्यांना ती नाटके आवडली व ती त्यानी महाराष्ट्रात करून दाखवावी अशी त्यांनी कृष्ण भटजींना विनंती केली. त्यावर अशी नाटके स्वतः अण्णासाहेबांनीच लिहावी, अशी इच्छा व्यक्त करून त्यांनी अण्णासाहेबांना रामाचा प्रसाद दिला. ही आख्यायिका गोमंतकात सुप्रसिद्ध आहे.

विसाव्या शतकाच्या सुरवातीस श्री. रामचंद्र वा. करंडे यांनी सत्संग मासिकाच्या द्वारे व श्री. रामचंद्र पांडुरंग तथा दादा वैद्य यांनी प्राचीप्रभा, विद्याप्रसार इ. विविध नियतकालिकांच्या द्वारे समाजजागृतिपर विपुल लेखन केले. दोघेही व्यवसायाने वैद्य

होते, परंतु दोघांनीही काव्यरचना केली व साहित्याच्या द्वारे समाजसुधारणेचे खूप प्रयत्न केले. धर्मानंद कोसंबी या सुप्रसिद्ध बौद्ध पंडितांनी बौद्ध धर्म व तत्त्वज्ञान यांवर विपुल ग्रंथरचना केली असून, भगवान बुद्ध, बौद्ध धर्म व संघ, पार्श्वनाथाचा चातुर्याम धर्म, इ. त्यांचे ग्रंथ प्रसिद्ध आहेत. रामकृष्ण कृ. कामत चंदगडकर हे संतवाङ्मयाचे अभ्यासक होते. एकनाथी भागवताची संशोधित आवृत्ती त्यांनी प्रसिद्ध केली असून, नामचिंतामणि हा त्यांचा आध्यात्मिक ग्रंथ प्रसिद्ध आहे. शांबाराव सरदेसाई हे वैचारिक निबंधकार व स्फुट लेखक म्हणून प्रसिद्ध आहेत. यशवंतराव सरदेसाई हे कवी व मार्मिक लेखक म्हणून महाराष्ट्रात ओळखले जात. दत्तात्रेय व्यंकटेश पै हे हिंदू साप्ताहिकाचे संपादक म्हणून महाराष्ट्रास परिचित आहेत. प्रा. पांडुरंग सखाराम पिसुर्लेकर हे गोमंतकातील एक इतिहाससंशोधक म्हणून भारतभर प्रसिद्ध आहेत. मराठे व पोर्तुगीज यांच्या कालखंडावर त्यांनी पोर्तुगीजमध्येच मुख्यत: लिखाण केले असले, तरी मराठीतही त्यांचे काही लेखन आहे.

गोमंतकाच्या आधुनिक मराठी साहित्याचा कालखंड इ. स. १९३० पासून सुरू होतो. या वर्षी मडगांव येथे महाराष्ट्र साहित्य संमेलनाचे १५ वे अधिवेशन भरले आणि तेव्हापासून गोमंतकात साहित्य सेवेला बहर आला. श्री. दा. अ. कारे, लक्ष्मणराव सरदेसाई, बा. भ. बोरकर, जयवंतराव सरदेसाई व सां घ. कंटक हे साहित्यिक याच काळात उदयाला आले. श्री. बा. द. सातोस्कर हे कथालेखक, कादंबरीकार व पत्रकार म्हणून प्रसिद्ध आहेत. 'गोमंतक' हे मुक्तीनंतर गोमंतकात निघालेले पहिले दैनिक त्यांच्याच संपादकत्वाखाली प्रसिद्ध होत असते. श्री. शंकर रामाणी हे बोरकरांनंतर पुढे आलेले मराठी कवी होत. इ. स. १९३० नंतर गोमंतकातून अनेक कथालेखक प्रसिद्धीस आले.

गोमंतकाबाहेर पुण्या-मुंबईत जाऊन जे गोमंतकीय लेखक स्थायिक झाले, त्यांनी केलेली साहित्यसेवा ही गोमंतकाच्या नावे जमा करायला हरकत नाही. इ. स. च्या १९ व्या शतकात जी गोमंतकीय मंडळी मुंबईला गेली त्यांच्यांपैकी गोविंद नारायण माडगावकर हे एक विपुल लेखन करणारे लेखक होऊन गेले. माधव चंद्रोबा व अनंत चंद्रोबा या डुकले बंधूंनी सर्वसंग्रह हे मासिक आठ वर्षे (इ. स. १८६०–६८) चालवून प्राचीन मराठी कवींची कविता मुद्रित करण्याचा पहिला प्रयत्न केला. विष्णुपंत माडगावकर यांनी ज्ञानेश्वरीचे संशोधन करून 'ज्ञानदेवी' ही संशोधित आवृत्ती प्रसिद्ध केली. विसाव्या शतकाच्या पूर्वार्धात दत्तात्रय तुकाराम पणशीकर, मेघदूत आणि अमरकोश यांचे टीककार वासुदेवशास्त्री पळशीकर व प्रा. वेलिंगकर यांचे लेखनकार्य मुंबईलाच झाले. धर्मानंद कोसंबी यांनीही गोव्याबाहेर पडूनच लेखनकार्य केले. प्रा. अ. का. प्रियोळकर हे मराठी भाषा व साहित्य यांचे संशोधक असून, मुक्तेश्वराच्या महाभारताची संशोधित आवृत्ती त्यांनी प्रसिद्ध केली आहे. पुरुषोत्तम मंगेश लाड हे कवी, टीकाकार व संतवाङ्मयाचे अभ्यासक म्हणून प्रसिद्ध होते. मो. ग. रांगणेकर हे कादंबरीकार, नाटककार व पत्रकार म्हणून सुपरिचित आहेत. विनायक सदाशिव सुखटणकर यांनी कथालेखक व बालसाहित्याचे लेखक म्हणून नाव मिळविले आहे. पं. महादेवशास्त्री जोशी यांची प्रथम दर्जाच्या कथालेखकांत गणना होते. याशिवाय त्यांनी बालसाहित्य व कुमारसाहित्य विपुल लिहिले आहे. प्रस्तुत भारतीय संस्कृतिकोशाचे ते प्रमुख संपादक आहेत. श्री. चंद्रकांत काकोडकर हे कादंबरीकार म्हणून प्रसिद्ध आहेत.

कोकणी साहित्य – कोकणी ही गोमंतकाची बोली होय. या बोलीतून इ. स. च्या १६ व्या शतकापासून तुरळक अशी साहित्यनिर्मिती झाली आहे. कोकणी ही मराठीची बोली की स्वतंत्र भाषा याबद्दल संशोधकांत वाद आहे. ग्रियर्सन, डॉ. भांडारकर, मर्फी, जॉन बीम्स, रॉबर्ट कस्ट, फादर मॅंफे, प्रा. प्रियोळकर वगैरेंच्या मते कोकणी ही मराठीचीच एक बोली आहे. सर फिलिप नेरी पीरिश यांनी मराठी व कोकणी यांत फार थोडा फरक असल्याचे शंभर वर्षांपूर्वी सांगून ठेवले आहे. या उलट रेव्ह. विल्सन, डॉ. कत्रे, प्रो. सालेतोर, इ. विद्वानांनी कोकणी ही मराठीहून स्वतंत्र भाषा असल्याचे सांगितले आहे. हा वाद गेली काही वर्षे गोव्यात व गोव्याबाहेरही चालू आहे. त्याला एक राजकीय बाजू आहे व त्यामुळेच तो हिरीरीने लढविण्यात येत आहे.

इ. स. च्या सोळाव्या व सतराव्या शतकांत गोमंतकात युरोपियन मिशनऱ्यांनी कोकणीतून काही ख्रिस्ती धार्मिक पुस्तके व कोकणीची व्याकरणे लिहिली. कोकणीत झालेली ही पहिली ग्रंथरचना होय. धर्मप्रसारासाठी मिशनऱ्यांना स्थानिक भाषेचा व बोलीचा अभ्यास करणे भाग होते. म्हणूनच त्यांनी कोकणीतून ख्रिस्ती धर्मग्रंथांची रचना केली होती; परंतु या ग्रंथांची संख्या मराठीच्या मानाने फारच कमी आहे. इ. स. १६३२ साली 'क्रिस्तावांच्या दौत्रीनीचो अर्थु' हा पाद्री दियोगु द रिबेयरु यांचा कोकणी ग्रंथ छापला गेला. हा गुरुशिष्यसंवादात्मक असून, गद्यात लिहिलेला आहे. कोकणीतील पहिला शब्दकोश चोडणचा लौरेंसु आल्वारिस व त्याचा मुलगा सिमाव आल्वारिस यांनी इ. स. १६९५ मध्ये तयार केला. इ. स. १८७३ साली इनासियु शावियेर द सौज रुद्रीगिश याने कोकणी–पोर्तुगीज शब्दकोश लिहिला.

अशी काही तुरळक पुस्तके सोडली, तर कोकणीत नाव घेण्यासारखी पुस्तके निर्माण झाली नाहीत. विसाव्या शतकाच्या सुरुवातीपासून गोमंतकीय ख्रिस्ती लेखकांनी कथा-साहित्यात मात्र खूप भर घातली आहे. ज्यांना दीर्घकथा म्हणता येईल अशा कथांची शेकडो पुस्तके ख्रिस्ती लेखकांनी लिहिली आहेत. ही सर्व रोमनलिपीत लिहिली गेली. मुख्यतः मुंबईतील गोमंतकीय लेखकांनीच ती लिहिली आहेत. त्यांचा वाचकवर्ग म्हणजे रोमन लिपीची अक्षरओळख झालेला ख्रिश्चन बहुजन-समाज होय. हा वर्ग मराठीपासून दूर तर आहेच; पण इंग्रजी किंवा पोर्तुगीज शिक्षणाचा लाभही त्याला झालेला नाही. त्यामुळे मनोविनोदनासाठी त्याला या रोमन लिपीतील कोकणी कथासाहित्यावर अवलंबून राहावे लागते. या वाङ्मयप्रकाराला ‘ रोमांस ’ असे नाव आहे.

कोकणी ही गोमंतकाची मातृभाषा असल्याचा दावा शंभर वर्षांपूर्वी कुंज्य रिव्हार यांनी Eusaio Historico sobe a liugua Concanim या कोकणीवरील प्रबंधात्मक लेखाच्या द्वारे मांडला. कोकणीची खरी चळवळ मुख्यतः श्री. वामन रघुनाथ वर्दे वालावलीकर उर्फ शणै गोंयबाब यांच्या प्रेरणेने सुमारे चाळीस-पन्नास वर्षांपूर्वी सुरू झाली. ते स्वतः चांगले मराठी लेखक होते; परंतु इ. स. १९२० नंतर त्यांनी आपले सर्व लिखाण कोकणीतूनच केले. गोंयकारांची गोंयाभायली वसणूक हा त्यांचा संशोधनपर ग्रंथ व गोमंतोपनिषदचे दोन खंड ही त्यांची पुस्तके मौलिक समजली जातात. त्यांनी ‘ कोकणीची व्याकरणी बांदावळ ’ हे कोकणीचे व्याकरण लिहिले असून, मोलिएरच्या काही फार्सांचे अनुवादही केले आहेत. त्यांची ही सर्व पुस्तके देवनागरी लिपीत आहेत. वालावलकरांकडून कोकणी लेखनाची स्फूर्ती अनेकांनी घेतली; परंतु गेल्या पंचवीस-तीस वर्षात जे कोकणी साहित्य निर्माण झाले, ते मात्र सामान्य प्रतीचेच आहे.

गोमंतकाचे संगीत — श्री. मलबाराव सरदेसाई हे गोमंतकातले एक संगीताचे मर्मज्ञ आहेत. गोमंतकातल्या संगीताविषयी त्यांनी जे विचार व्यक्त केले आहेत, ते असे—

भारताच्या इतर प्रदेशांपेक्षा तुलनेने गोमंतकात संगीताची आवड-जाणकारी अधिक दिसते. गोमंतकीय माणसाला लय आणि स्वर यांची थोडीबहुत ओळख स्वभावतःच असते. ख्रिस्ती समाजही याला अपवाद नाही. आजही संगीतकलेत उभ्या भारतात गोमंतक अग्रेसर आहे. गोमंतकीय संगीताचा एक विशेष बाज होता व तो हिंदुस्थानी संगीताहून निराळा होता, असे आजच्या त्यांच्या अवशेषांवरून वाटते. पुढे हे निराळेपण कायम राहिले नाही आणि गोमंतकाचे संगीत हिंदुस्थानी संगीतात मिसळून गेले, असा तर्क करता येतो. सुरेलपणा आणि विशिष्ट लयकारी हा गोमंतकीय संगीताचा आत्मा होय.

या संगीताची काही वृत्ते निराळी आहेत. काही रागांची नावेही विचित्र आढळतात. काही रागनामे अपभ्रंशात्मक दिसतात. विचित्र मात्रासंख्यांचे ताल गायन-वादनात उपयोजिले जातात. लयकारीला विशेष प्राधान्य दिले जाते. जुन्या काही हस्तलिखित वह्या आढळल्या, त्यात ख्याल, चिजा, वृत्ते, पदे, भजने वगैरे जुने संगीत लिहिलेले आहे. त्यावर स्वरलेखन (notaition) नाही. त्यावरून या वह्या स्वरलेखनपद्धती सुरू होण्यापूर्वीच्या असाव्या. या वह्यांत कामोद रागाला कामवोद हे नाव दिलेले आहे. शंकराभरणाला शेंकाभरण व सोहनीला सोणी म्हटले आहे. जेताश्री राग आहे आणि त्याच्या जोडीला दुसरा दैत्याश्री आहे. यमनाला यमुना म्हटले आहे. पावक, कल्याणमोहन, कल्याणकानडा हे त्या वह्यांत आढळणारे अप्रसिद्ध राग होत. कंदंव, दस्तक, सवाई पदे, जखणी, अशी काही न ऐकलेली वृत्तनामे या वह्यांतून दिसतात. त्या वृत्तांना धमार, सवारी, टप्पा, झूमरा, होरी, तिलवाडा हे ताल विशेषत्वाने लावलेले मिळतात. गोमंतकातल्या गायक-गायिका जयदेवाच्या अष्टपद्या व निरनिराळ्या कवींची पदे सुंदर रागदारीत व वरील मोठ्या तालात गात असत.

भाषा, दळणवळण, व्यापार, इ. गोष्टींत गोमंतकाचा मुंबई-पुण्याशी व त्याद्वारे हिंदुस्थानी संगीताशी विशेष संबंध आल्यामुळे गोमंतक हा दक्षिणेतला असूनही तिथे हिंदुस्थानी संगीतच रूढ झाले. गोमंतकीयांचा एक विशेष असा, की त्यांनी कोणत्याही घराण्याचे वा बाजाचे संगीत स्वीकारले, तरी ते त्यात लयकारी आणि सुरेलपणा यांचे निराळेपण निश्चित दाखवतात. कै. लक्ष्मणराव अर्थात खाप्रूजी पर्वतकर हे तर ताल आणि लय या शास्त्रातले ऋषीच होते. त्यांच्याइतका लयीशी तादात्म्य पावलेला व तालशास्त्राचे सूक्ष्मातिसूक्ष्म गणित जाणणारा असा ‘ लयभास्कर ’ अलिकडच्या काळात तरी उभ्या भारतात दुसरा कोणी झाला नाही.

गोमंतकीय संगीताची उत्पत्ती व वाढ मुख्यत्वे तिथल्या देवस्थानांच्या परिसरात झाली. गोमंतकातल्या उत्कृष्ट गायक-गायिका, नट-नर्तिका व वादनकार ही मंडळी बहुतांशी या देवस्थानांच्या परिसरातच निर्माण झाली व मुंबईसारख्या ठिकाणी जाऊन प्रसिद्धी पावली. गोमंतकीय संगीतात पुरुषांपेक्षा स्त्रियांनीच आघाडी मारली आहे. गोमंतकीय कलाकारांनी गृहत्याग, देशत्याग आणि प्रामुख्याने सांगायचे तर गृहस्थाश्रमाचाही त्याग करून व अनेक खडतर त्रास सोसून संगीताची उपासना केली आहे. याला स्त्रियाही अपवाद नाहीत.

गोमंतकीय संगीत हिंदुस्थानी संगीतात मिसळून गेल्यावरही

स्वररचनेचे चातुर्य व ताल-लयीचे काठिण्य ही वैशिष्ट्ये त्यात अजून उरली आहेत, असे दिसून येईल. आणखीही भेद सांगायचा तर गोमंतकाच्या जुन्या काविजादी व नव्या काविजादी यांतील संगीतातही काही अंशी फरक जाणवेल. नवीन काबिजादीत कोणत्याही देवस्थानाच्या उत्सवाला महारांकडून वाजवल्या जाणाऱ्या ढोलाला महत्त्व असते. याउलट जुन्या काबिजादीत पंचवाद्यमेळाला महत्त्व दिले जाते. नव्या काविजादीत उत्सवप्रसंगी आधी गायकाचे गाणे व नंतर हरिदासाचे कीर्तन होत असते, तर जुन्या काविजादीत याच्या उलट होते.

गोमंतकाचे खानदानी संगीत हिंदुस्थानी संगीतामध्ये मिश्र झाल्यावरही पृथगात्म राहिलेले इथले संगीताचे अवशेष म्हणजे काला, जागर, धाला, पंचवाद्य, चौघडा, घुमटवाद्य, इ. होत. हे प्रकार गोमंतकाबाहेर न गेल्यामुळे निर्भेळ राहिले व आज त्यावरूनच गोमंतकीय संगीताच्या वेगळेपणाची कल्पना येते.

काला— हा सामान्यपणे नाट्यप्रकारच म्हणायचा. यातले गायन विशिष्ट स्वररचनेचे असते व ते स्वर गोमंतकाबाहेर ऐकू येत नाहीत. ही स्वररचना मनोवेधक असून, त्यातली लय गुंतागुंतीची असते. काल्याची सुरवात गानविरहित वादनाने होते. या वादनाला धुमाळ म्हणतात. हे वादन सवारी, धमार, झूला अशा अनवट तालात होते व ते भारदस्त आणि दर्जेदार असते. त्यातल्या मात्रा जरी आठच असल्या, तरी त्या मोजण्यात अनागत बांधणी असून, ती बोलांतही तशीच असते. सवारी, दीपचंदी या तालांशिवाय हिंदुस्थानी संगीतात मात्रा मोजताना अनागत जागा घेत नाहीत. विचित्र स्वररचनेतील विशिष्ट तालपद्धती आणि संथ लय, हे काल्यातल्या वादनाचे वैशिष्ट्य समजायला हवे. सवारी, दीपचंदी, ध्रुपद, इ. तालही प्रचारातल्या त्या नावाच्या तालाप्रमाणे नसून थोडे भिन्न असतात व त्यांचे ठेकेही निराळे असतात. यातील दीपचंदी ही दक्षिणी यतितालासारखी बोलरचना असून, ती सात मात्रांनी वाजवली जाते. प्रचलित दीपचंदी चौदा मात्रांनी वाजवतात. कारण त्याची अनागती सात मात्रांना अवघड असते.

काल्यात झूला नावाचा जो ताल वाजवतात, तो हिंदुस्थानी किंवा दक्षिणी तालग्रंथात आढळत नाही. ओडिसामधल्या नृत्यात तो आढळतो; पण ओडिसातल्या झूला तालात व गोमंतकातल्या त्याच तालात फरक आहे. हा फरक बोलरचनेत आहे, तसा वजनातही आहे. दस्तक नावाचे वर उल्लेखिलेले वृत्त काल्यात पुष्कळ वेळा येते. ते दोन प्रकारांनी गातात आणि त्याचे वादनप्रकारही दोन असतात.

गवळणकाला— हा काल्याचाच एक फार जुना प्रकार आहे. नाटिकेसारखाच तो कलाप्रकार असतो. हा काला म्हणजे सांगोपांग संगीताची मेजवानीच असते. सर्व जातींचे गीतप्रकार त्यात येतात. भारदस्त खानदानी संगीत आणि नवसंगीत यांचा तो संगमच असतो. अनेक प्रकारची नृत्ये आणि गीते त्यात असतात. या काल्यात पुष्कळदा पात्रांचे संवाद गाण्यातूनच होत असतात व प्रत्येक पात्राच्या गाण्याच्या चाली निराळ्या असतात.

गोपाळकाला— हा गोमंतकाचा आणखी एक नाट्यप्रकार असून, त्यात निवडक रागदारीत व विचित्र ताललयीत आध्यात्मिक कूटांचे सवाल-जवाब होतात. कृष्ण, बलराम व त्यांचे सवंगडी यांच्या क्रीडांवर हा प्रकार आधारलेला असतो. यातले संगीत भजनी बाजाचे असते.

हे तिन्ही काले जाणीवपूर्वक पाहिले तर असे दिसून येईल, की त्यातील गीत-वाद्य-नृत्य पहिल्यातले दुसऱ्यात नाही व दुसऱ्यातले तिसऱ्यात नाही. संगीतात असे हे भिन्नत्व ठेवून समाजातील निरनिराळ्या आवडीच्या माणसांना आपापली आवड पुरवून घेता यावी, अशी त्यांची बंदिशी ठेवलेली असते. या काल्यांच्या वेळाही भिन्न असतात. पहिला काला रात्री, गोपाळकाला प्रभातकाळी व गवळणकाला ऐन दुपारी होतो.

जागर— हे एक लोकनाट्य आहे. त्याचे दोन प्रकार आहेत. पहिला प्रकार जुन्या काळापासून चालत आलेला आहे. हा प्रकार पेरणी नावाच्या जातीचे कलाकार करतात. काही देवस्थानांतून जागर हा प्रतिवार्षिक असतो. यातले गायन व ढोलकवादन वैशिष्ट्यपूर्ण असते. जागराचा दुसरा प्रकार गोमंतकातले नवहिंदू करीत असतात. याच्या साथीला घुमट व म्हांदळे ही मातीची वाद्ये असतात. यातील घुमट हे आदिवासी कलाकारांनी निर्मिलेले मृत्तिकेचे वाद्य होय. घोरपडीच्या चामड्याने फार सोप्या पद्धतीने हे मढवलेले असते. घुमटाला गोमंतकीय कलाविदांनी समेळ नावाच्या दुसऱ्या एका लाकडी वाद्याची जोड देऊन एक अवनद्ध वाद्याचा साज बनवला आणि त्यावर पखवाज व तबला यांच्या बाजांचे कठीण शास्त्र चढवून टाकले. यात अर्धमात्रा, पावमात्रा, चक्रपरानी, यासारखे अनागत लयीचे प्रकार, बोलभाषेची नवी रचना करून प्रचारात आणले आहेत. या प्रकाराला सुंवारी (किंवा सवारी) असे नाव आहे. जुन्या कलाशास्त्रज्ञांनी सुवारीवरचे हे शास्त्रालंकार थेट ग्रामीण जनतेपर्यंत नेऊन त्यांच्याही हातांत आणि हृदयात बसवले.

धाला—या नावाचा एक नृत्योत्सव गोमंतकातील ग्रामीण स्त्रियांकडून पौष महिन्यात साजरा होत असतो. यात स्त्रिया समोरासमोर दोन रांगा करून उभ्या राहतात व मागे पुढे होत गीते गातात. या गीतांच्या चालींची स्वररचना, शब्दप्रयोगात दाखविले जाणारे लयीचे वैचित्र्य आणि जातींचे मिश्रीकरण

अनोखे असते. त्यावरून गोमंतकातील ग्रामीण स्त्रियांनाही लय आणि स्वर यांची उपजत देणगी असल्याचे कळून येते.

पंचवाद्य—हा गोमंतकातील वादनाचा आणखी एक प्रकार होय. या पंचवाद्यात ढोल, ढोलके, ताशा, सूर व सनई ही वाद्ये असतात. पंचवाद्यमेळातील भिन्न भिन्न वाद्ये अप्रतिम कौशल्याने वाजविणारे शास्त्रनिपुण कलाकार गोमंतकात होऊन गेले आहेत. प्रसंगानुसार पंचवाद्यांची पद्धतीही बदलती असते. मंगलप्रसंगाचा वादनप्रकार निराळा; तर रथोत्सवाचा त्याहून निराळा. शिमग्याच्या वादनात तर किती तरी भिन्न प्रकार असतात. ढोलाचे वादन हे एक निराळेच शास्त्र आहे. ते केवळ लयींवरच आधारलेले असते. त्यातल्या लयींच्या विविध प्रकारांनी विविध रस उत्पन्न करता येतात, हे या वादनाचे वैशिष्टय आहे.

गोमंतकात आरत्याही संगीत पद्धतीवर म्हटल्या जातात व त्यातले वादन सवारी, धमार, दीपचंदी अशा भारदस्त तालात केले जाते. यात दीपचंदीला विशेष स्थान असते. आरती गाण्यातील एक पद्धत विचित्र वजनाची, कठीण व गुंतागुंतीची असते. ही गोमंतकाची स्वतंत्र पद्धती म्हणावी लागेल. घुमट वाद्याच्या साथीवरही आरत्या गायिल्या जातात.

गोमंतकात भजनाची प्रथाही फार जुनी आहे. निरनिराळ्या देवस्थानांतून व कित्येक गावांतून भजने आणि भजनी सप्ताहही चालतात. जुन्या काळातली भजनी पद्धती मोठ्या मात्रासंख्यांच्या तालावर आधारलेली व रंगदारीची होती. सांप्रत जी भजने चालतात, त्यांची पद्धत मात्र नवीन आहे. ही वारकरी संप्रदायाच्या दिंडी बाजाची पद्धती असली, तरी तिच्यातही गोमंतकीयांनी आपले वेगळेपण निर्माण केले आहे. गोमंतकात दिंडी पद्धतीच्या भजनाला त्रितालाच्या अंगाने ताल व काल ठेवून गाण्याची पद्धत स्वीकारलेली आढळेल.



पालखीपुढील देवदासींचे नृत्य

गोमंतकात पालखीपुढे देवदासींचे नृत्य होत असते. या नृत्याच्या वादनाची ताल-ठेका पद्धती विशिष्ट असून, ती शास्त्रशुद्ध आहे. या पद्धतीचा वादनप्रकार गोमंतकाबाहेर सहसा आढळणार नाही.

मांडो, दखनी आणि जोती हे गोमंतकीय ख्रिस्त्यांचे आवडते गीतप्रकार आहेत. मांडोच्या संगीताची स्वररचना व त्याचे चलन पाहता त्यावर गोमंतकीय हिंदू संगीताचा प्रभाव दिसून येतो. मांडो ही पूर्वीची साधीभोळी लोकगीते; पण अलिकडे त्यावर पाश्चात्य संगीताचे योग्य संस्कार होऊन त्यांना त्यांच्या उच्च संगीतात स्थान मिळाले आहे. पाश्चात्य पद्धतीच्या वाद्यवादनात गोमंतकीय ख्रिश्चन आघाडीवर आहेत. चांगले वादक म्हणून त्यांनी जगभर नाव मिळवले आहे. त्यांना चर्चच्या शाळांतूनच संगीताचे शिक्षण दिले जाते.

पोर्तुगीजांनी गोमंतकाच्या काही भागावर ४५० वर्षे राज्य केले. त्यांची राज्यपद्धती धार्मिक व जातीय भेद वाढविणारी होती. पाश्चात्य संगीताशिवाय त्यांनी दुसऱ्या संगीताकडे ढुंकूनही पाहिले नाही. त्यामुळे गोमंतकातील संगीताला राजाश्रय कधीच लाभला नाही. संगीत शिकण्याच्या व ते जोपासण्याच्या सोयीही गोमंतकात उपलब्ध नव्हत्या. त्यामुळे गोमंतकातले संगीतज्ञ गोव्यात न राहता, आपल्या कलेची वाढ करण्यासाठी व योगक्षेमासाठीही गोव्याबाहेर जात. त्याचा परिणाम अ झाला, की हे जुने, जाणते आणि परंपरेचे कलाकार बाहेर गेल्यामुळे गोमंतकाचे प्रादेशिक संगीत ऱ्हास पावले. सांप्रत जे काही अवशेषरूपाने उरले आहे, ते तरी आता स्वातंत्र्याच्या काळात जाणीवपूर्वक जोपासले आणि वाढवले गेले पाहिजे असे वाटते. कारण तो गोमंतकाचा अतएव भारताचा ए दर्जेदार असा सांस्कृतिक वारसा आहे.

नाट्य—गोमंतकात नाट्याची परंपराही फार जुनी आहे भारतातल्या इतर ठिकाणांच्या प्रमाणेच गोमंतकात नाट्य हे नवविधा भक्तीचा एक प्रकार म्हणून समजण्यात येई. त्यामुळे गोमंतकात नाट्यकला ही मंदिराच्या आश्रयाने जन्म पावली आणि विकसित होत गेली. गोमंतकात देवस्थानांतील उत्स वांच्या निमित्ताने नाटके होत, असा दीडशे वर्षापूर्वीचा दाखला सापडला आहे. या नाटकांचे वर्णन मिळत नाही; पण ती दक्षि कोकणातल्या दशावतारी खेळांप्रमाणे किंवा उत्तर व दक्षि कानड्यातील भागवत मेळ्यांप्रमाणे असावी, असा अंदाज आहे

उत्सवप्रसंगी ही जी नाटके होत, त्यांना बांधेसूदपणा आ देण्याचा पहिला प्रयत्न डोंगरी येथील कृष्ण जगन्नाथ भट्ट बां कर यांनी इ. स. १८७० च्या सुमारास केला. कैकेयी–मंथर शुकरंभा संवाद वगैरे पौराणिक आख्यानांना त्यांनी नाट्य दिले व संवादांना साक्या, दिंड्या व पदे यांची जोड देऊन

रंजकता आणली. पुढे अशा प्रकारची नाटके लिहिण्याची परंपराच सुरू झाली. त्यातूनच शांतादुर्गा प्रासादिक कळंगूटकर संगीत नाटक मंडळी, त्यातूनच निघालेली गोवा संगीत मंडळी, विजयदुर्गा प्रासादिक नाटक मंडळी, वगैरे व्यावसायिक नाटचसंस्थाही उत्पन्न झाल्या. एक खास स्त्रियांचीच नाटक मंडळीही स्थापन झाली.

सांप्रतही गोव्यातील देवस्थानांतून उत्सवी नाटके शेकड्यांनी होत असतात. विशेष म्हणजे गोमंतकातल्या बहुजनसमाजात सामाजिक नाटकांपेक्षा पौराणिक व ऐतिहासिक नाटकांचीच अधिक आवड आहे. या उत्सवी नाटकांतूनच पुढे श्रेष्ठ गोमंतकीय नट निर्माण झाले व ते मराठी रंगभूमीवर आपापल्या वैशिष्टचांनी तळपले. गोव्यात वर्षाकाठी हौशी व उत्सवी नाटकांचें हजार-पाचशे तरी प्रयोग होत असतात. अशिक्षित अशा बहुजनसमाजाला सुद्धा मराठी नाटकांची अमाप गोडी आहे. बाहेरून धंदेवाईक नाटककंपन्या आल्या म्हणजे त्यांना तर अलोट गर्दी होते. परंतु आधुनिक तंत्राचा अवलंब करून नवी नाटके सादर करण्याचे प्रयत्न मात्र अजून गोमंतकात सुरू झाले नाहीत. यापुढे ही उणीव नष्ट करण्याचे प्रयत्न झाले पाहिजेत. आकादेमीय द मूझिक या पोर्तुगीज राजवटीतील संगीत अकादमीचे स्वरूप बदलून तिला संगीत–नाटक अकादमीचे स्वरूप देण्याचे आता सरकारने ठरवले आहे. ही संस्था गोव्यात नाटचकलेला उर्जितावस्था आणील, आशी आशा आहे.

गोमंतकातल्या ख्रिश्चन समाजातील पांढरपेशा वर्गात मात्र नाटच ही चीजच आस्तित्वात नाही. पोर्तुगीज ही मातृभाषा मानल्यामुळे आणि पोर्तुगीज नाटके गोमंतकात होऊ शकत नसल्यामुळे नाटके करणे सोडाच; पण नाटक हे करमणुकीचे एक महत्त्वाचे साधन आहे, याची देखील या समाजाला कल्पना नाही.

ख्रिश्चन बहुजनसमाजात मात्र तियात्र (तियात्र = थिएटर = रंगभूमी) हा नाटकाचा एक फार्सवजा प्रकार अतिशय लोकप्रिय आहे. तमाशातील वगाप्रमाणे फार्सिकल व तितकाच उथळ असा हा प्रकार असतो. ही तियात्रे कोकणीतून होत असतात. ती उत्सवी असतात, तशीच ती व्यावसायिक मंडळयाही करतात. यात दोन प्रवेशांमध्ये कथानकाशी संबंध नसलेली अशी गाणी म्हटली जातात. तियात्र लिहिणारे, ती दिग्दर्शित करणारे व त्यात कामे करणारे कलाकार ख्रिश्चन समाजात खूप आहेत. पण त्यांना योग्य ते अभिनयाचे शिक्षण अजून मिळाले नाही. कारण या लोककलेकडे ख्रिस्ती उच्चभ्रू समाजाचे लक्ष अजून वेधलेले नाही.

वास्तुशिल्पकला— फार जुन्या काळची शिल्पे गोव्यात आढळत नाहीत. जुन्यांत जुनी शिल्पे गोमंतकात उपलब्ध आहेत ती हरवळे, आके, रिवण वगैरे ठिकाणची लेणी ही होत. परंतु ही लेणी म्हणजे शिल्पकलेचे नमुने म्हणता येणार नाहीत. केवळ निवाऱ्यासाठी म्हणून ती खोदण्यात आली आहेत.

त्यानंतर यादवकालातले (इ. स. १००० ते १३००) एकुलते एक शिल्प गोमंतकात उपलब्ध आहे, ते म्हणजे तांबडे सुर्ले येथील शिवमंदिर होय. दगडावर दगड रचून व चुन्याचा उपयोग न करता ते बांधलेले आहे. यादवशिल्प हे सहसा कोकणात किंवा दक्षिण महाराष्ट्रात आढळत नाही. गोमंतकात हे देवालय केव्हा व कोणी बांधले याची निश्चित माहिती मिळत नाही.

कदंब राजांच्या दोन राजधान्या चंद्रपूर व गोपकपट्टण येथे होऊन गेल्या. या दोन्ही ठिकाणच्या उत्खननात दगडी मूर्ती, धातूंच्या वस्तू व नाणी सापडली आहेत. पद्धतशीर उत्खनन केले, तर दोन्ही ठिकाणी वास्तुशिल्पेही आढळण्याचा संभव आहे. चांदर (चंद्रपूर) येथे काही वर्षांपूर्वी झालेल्या उत्खननात जे अवशेष सापडले, त्यांवरून तशी शक्यता वाटते.

विजयनगरच्या शिल्पशैलीचा गोमंतकातील देवालयांच्या बांधणीवर पडलेला प्रभाव आजहीस्पष्ट दिसतो. या शिल्पपद्धतीत बाहेर देवडी (सोंडिया), त्याच्या आत सहा किंवा अधिक खांबावर उभारलेला भोगमंडप (चौक), त्याच्यामागे गाभारा व गाभाऱ्याभोवती प्रदक्षिणामार्ग (सरवळी), अशी या देवालयांची रचना असते. देवालय कौलांनी शाकारलेले असते. त्याला आतून बाहेरून लाल कावेचा पक्का रंग दिलेला असतो. त्यात पिंपळपानाची नक्षी कोरलेली असते. आतून वा बाहेरून उठावाच्या मूर्ती वा नक्षी यांचा मात्र अभाव असतो. गोव्यातील नव्या काबिजादी, मालवण – वेंगुर्ला हा भाग व खाली गोकर्ण व उतर कानडा एवढचा प्रदेशात देवालयांची ही ठराविक शैली आढळते. ही देवालये किमान पाच ते सहा शतकापूर्वीची म्हणजेच विजयनगरकालीन आहेत. गोवा बेट, बारदेस व साष्टी या तालुक्यांत जी देवळे पोर्तुगीजांनी मोडली, ती याच शिल्पशैलीची असावी. घरातील व देवालयातील जमीन घोटून फरशीसारखी करण्याची कर्नाटकी पद्धत याच वेळी गोव्यात आली असावी.

मुसलमानांच्या अल्प वास्तव्यामुळे गोव्यात मुसलमानी शिल्प फारसे उभे झाले नाही. तरी सुद्धा युसफ आदिलशहाकडे पंधराव्या शतकात गोव्याचा कबजा आला, तेव्हा गोवा शहर ही आदिलशाहीची राजधानी करावी म्हणून त्याने शहरात राजवाडा, अनेक इमारती व मशिदी बांधल्या. पोर्तुगीजांनी या सर्व इमारती नष्ट करून टाकल्या व काही मशिदींच्या जागी चर्चीस उभारली. दोनशे वर्षे पोर्तुगीजांनी सचिवालय म्हणून

ज्याचा उपयोग केला, तो त्यांचा राजवाडा अजून चांगल्या स्थितीत आहे. आदिलखानाचा राजवाडा (Palacio de *Idalcao*) म्हणूनच तो ओळखला जातो.

मुसलमानी शैलीचा थोडासा प्रभाव दिसून येतो, तो नव्या काबिजादीतील मंगेश, शांतादुर्गा इ. देवालयांच्या बाबतीत. ही देवालये जुन्या विजयनगर शिल्पशैलीने न बांधता एका नव्या शैलीने बांधण्यात आली. काही देवालयांतल्या भिंती मशिदीप्रमाणे साध्या असतात आणि मंदिरावर कळस दिसतात; तर काही देवस्थानांत लॅटिन शैलीचाही आढळ होतो. यांची भोगमंडप, देवडी, गर्भागार ही आतली रचना मात्र यादवकालीन आहे. म्हाळसा मंदिर किंवा सानईवेरे येथील मंदिर हे अपवाद सोडले, तर महिरपी किंवा लांकडी अथवा शिलेवरील कोरीव काम मात्र क्वचितच आढळते.


कोरीव लांकडी खांब—सावई वेरे

या सर्वांहून गोमंतकाच्या वास्तुशिल्पावर अधिक प्रभाव पडला आहे तो पोर्तुगीजांच्या बरोबर गोव्यात आलेल्या लॅटिन शैलीचा. पोर्तुगीजांनी गोव्यावर इतर कोणत्याही बाबतीत प्रभाव पाडला नाही; पण वास्तुशिल्प व नगररचना ही मात्र पोर्तुगीजांची गोव्याला खास देणगी आहे, असे म्हटले पाहिजे. गोव्यातील शहरांतून हिंडल्यावर 'ही शहरे लॅटिन देशांप्रमाणे दिसतात,' असे उद्‌गार जग हिंडून आलेले प्रवासी काढतात, त्याचे कारण हेच.

पोर्तुगीजांनी बांधलेली ख्रिस्तमंदिरे युरोपातील गोथिक व कोरिंथियन या शैलींचा आश्रय करून बांधली आहेत. मात्र ती संपूर्णपणे वरील शैलींची नाहीत. इ. स. च्या १५–१६ व्या शतकात पोर्तुगालमध्ये एक नवी वास्तुशैली निर्माण झाली, तिला मॅन्युएलिन शैली असे म्हणतात. याच शैलीचा वापर गोव्यातील ख्रिस्तमंदिरांच्या रचनेत करण्यात आला आहे. अंतर्गत भागातील रंगीत चित्रे, आल्टर (वेदी), समंनची जागा, सजावट व रंग, या सर्व गोष्टी रोममधील ख्रिस्तमंदिरांच्या अनुकरणाने गोव्यात आल्या आहेत.

गोव्यातील घरांवरही वर उल्लेखिलेल्या लॅटिन शैलीची छाप दिसून येते. पूर्वी श्रीमंतांचे चौकाचे वाडे महाराष्ट्रातल्या पद्धतीप्रमाणे असत. जितके चौक अधिक तितकी श्रीमंती व सत्ता अधिक, असे समजले जात असे. साखळी, डिचोली या बाजारपेठांच्या शहरांत संरक्षणाच्या दृष्टीने घराला घर लागून असे. चौकांची घरे किंवा या बाजारपेठा म्हणजे जवळजवळ किल्लेच असत. परंतु पोर्तुगीजांच्या आगमनानंतर त्यांच्या गृहरचनेचे गोव्यात अनुकरण झाले व चौकांची घरे कमी कमी होत गेली. येथील ख्रिश्चन लोकांच्या गृहरचनेवर तर पोर्तुगीज शैलीचा बराच प्रभाव पडला.

एक सर्वसाधारण समज असा आहे, की आज गोवा म्हणून ओळखला जाणारा सर्व प्रदेश चारशे वर्षांहून अधिक काळ पोर्तुगीजांच्या ताब्यात होता. पण तो बरोबर नाही. इ. स. १५१० साली आलबुकेर्क याने जिंकले ते गोवा बेट. पुढे इ. स. १५४३ मध्ये बारदेस व साष्टी हे भाग त्याला जोडले गेले. या तीन तालुक्यांच्या प्रदेशाला जुन्या काबिजादी म्हणतात. पोर्तुगीजांनी धर्माच्या नावाखाली प्रजेचा अमानुष छळ केला, तो या एवढ्याच भागात. आजच्या गोव्याचा दक्षिणभाग म्हणजे फोंडे, सांगे, केपे, काणकोण हे तालुके इ. स. १७६३ च्या सुमारास पोर्तुगीजांच्या अमलाखाली गेले. भतग्राम, सत्तरी, पेडणे हे तालुके सावंतवाडीकरांनी इ. स. १७८८ मध्ये पोर्तुगीजांना दिले. हा सात तालुक्यांचा प्रदेश नव्या काबिजादी म्हणून ओळखला जातो. त्यातील रहिवाशांना धार्मिक वा सामाजिक छळ अल्प प्रमाणातच सोसावा लागला. जुन्या व नव्या काबिजादींतील लोकांचे ऐतिहासिक अनुभवही वेगळे आहेत. जुन्या काबिजादींवर आपल्या संस्कृतीचा पगडा बसवण्यात पोर्तुगीज यशस्वी झाले; पण नव्या काबिजादींवर ते प्रभाव पाडू शकले नाहीत. त्यामुळे नव्या काबिजादीतील लोकांची संस्कृती व राहाणी शेजारच्या भारतीय प्रदेशातील लोकांच्या संस्कृतीसारखीच राहिली. ते पोर्तुगीजांच्या सत्तेखाली राहूनही तन-मनाने भारतीयच राहिले. त्या दृष्टीने पाहता टीचभर गोवाप्रदेश हाही सांस्कृतिक दृष्ट्या एकजिनसी नाही हे स्पष्ट आहे. अवघे तीन किंवा चार तालुके वगळल्यास गोव्याची संस्कृती व भारतीय संस्कृती यांत काही भिन्नत्व किंवा खास वेगळेपण दाखवता येणार नाही. [बा. द. सातोस्कर. आधार ग्रंथ—को. इ. मू.; इं. आ. हिं.; म. लो. सं.; भा. सं.—सेन; गिल. हि. क. गो.; मऱ्हाटी संस्कृति;

कांही मराठी लेख– शणै गोंयबाब; रि. आ. क. गो.; जे. बी. बी. आर. ए. एस्.; कॅ. डि.; प्रि. कॅ. गो.; कदंबकुल– जी. मोराईश; गों. गों. व.; स्के. सि. गो.; शिवाजी व शिवकाल; स. स्मा. ग्रं; को. पे. ब.; हि. रि. गो.; हि. डि. गो.; गोमंतक परिचय– बा. वा. सावर्डेकर; आ. का. गो.; सा. मू.; ओ. हिं. रि.; म. गॉ.; उ. कों. प्रा. इ.; डॉ. कैंकिणी यांचे स्वागताध्यक्षीय भाषण– गोमंतक मराठी साहित्य संमेलन, कारवार १९५४; बो. हि. को.; वा. वा. का. वाघ– दूध सागर, दीपावली विशेषांक, १९५९; स. दे. प्रा. अ. इ.; कोकणाख्यान; सत्संग, वर्ष ५१ अंक २; ऑल इंडिया सारस्वत, जुलै १९१४; दूधसागर, २६ जाने. १९५५ विशेषांक; गो. फॅ. फि.]

गोमती (१) उ. भारतातील एक पवित्र नदी. हिच्या नावाची एक व्युत्पत्ती पुढीलप्रमाणे आहे–' बहवो गावो जलानि सन्त्यस्यामिति '= जिथे उदंड पाणी आहे, अशी भूमी (श. क.).

ऋग्वेदाच्या १० व्या मंडलातील सिंधू नदीच्या वर्णनात गोमतीचा उल्लेख आहे. यावरून गोमती नदी ही सिंधू नदीला मिळणारी नदी असल्याचे निश्चित होते (ऋ. १०.७५.६). सिंधूला पश्चिमेकडून मिळणारी जी गोमल नदी, तीच ही नदी असावी. सरस्वती नदीच्या जवळून वाहणारी एक नदी असा पद्म पुराणात (१. ३२) व द्वारकेजवळची एक नदी म्हणून स्कंद पुराणात (७. ४. ४. ९७–९८) हिचा उल्लेख आहे. याच नदीच्या तीरी यज्ञवराह उत्पन्न झाला (पु. इं.).

(२) गोमंत पर्वतावरील एक देवता (मत्स्य पु. १३. २८).

गोमतीवाल ब्राह्मण गुजरातेत आढळणारी ब्राह्मणांची एक पोटजात. पूर्वी गोमती नगरीत राहत असल्याने यांना हे नाव मिळाले. भिक्षा मागून हे आपली उपजीविका चालवतात. [मुं. इ. जा.]

गोमती विद्या एक गोस्तोत्र. गोवध केला असता प्रायश्चित्त म्हणून एक महिनाभर पंचगव्य प्राशन, गोठ्यात वसती व गोमती विद्येचा पाठ करावा, असे प्रायश्चित्तविवेकात सांगितले आहे. [हि. ध.]

गोमय गाईचे शेण. पंचगव्यात गोमय हे एक घटक आहे. आपल्या संस्कृतीत गोमय हे पवित्र मानलेले आहे. भूमिशुद्धीसाठी मुख्यत्वे गोमयाचे सारवण करतात. जेवल्यानंतर तिथली जागा शुद्ध करण्यासाठी तिच्यावर शेण सारवतात. घराची पडवी व अंगण शेणाने सारवून, त्यावर रांगोळ्या घालण्याची पद्धत आहे. गोमय पाण्यात कालवून प्याल्याने देहशुद्धी होते असे बहुतेक सर्व लोक मानतात. गाईचे शेण वाळवून त्याच्या शेणी अग्निहोत्र किंवा होम याच्यासाठी वापरतात. गोमयाच्या माहात्म्याची एक कथा आहे, ती अशी–

गाईंनी स्वतःला श्रेष्ठत्व मिळवण्यासाठी शतसहस्र वर्षे तप केले. त्या तपाने ब्रह्मदेव प्रसन्न झाला. तेव्हा गाईंनी त्याच्याकडे वर मागितला, की देव–मनुष्य आत्मशुद्धीसाठी आमच्या गोमयाने स्नान करोत. ब्रह्मदेवाने त्यांना तथास्तु म्हटले.

महाभारताच्या दानधर्म प्रकरणात दुसरी एक कथा आहे ती अशी–

गाईंनी लक्ष्मीला सांगितले, की तू आमच्या विष्ठेत आणि मूत्रात वास्तव्य कर. लक्ष्मीने ती गोष्ट मान्य केली.

कृच्छ्रसांतपन प्रायश्चित्तात गोमयभक्षणाचा विधी सांगितला आहे. गाय ही सर्वतीर्थात्मक मानल्याने तिच्या शेणाची यमुना नदीच्या ठिकाणी कल्पना केलेली आहे. विविध स्नानांत गोमयस्नानही सांगितले आहे. गाईचे शेण अंगाला सारवून हे स्नान करतात. काही क्षुद्र देवतांच्या मूर्तीही शेणाच्या करतात. बलिप्रतिपदेच्या दिवशी कोकणात काही ठिकाणी फातलागौर या नावाने गोमयाची ओबडधोबड मूर्ती करण्याची चाल आहे. पाहा– गोमूत्र. [श. क.]

गोमयादी सप्तमी चैत्र शु. सप्तमीचे नाव. या दिवसापासून प्रत्येक महिन्यातल्या शु. सप्तमीस एक वर्षपर्यंत सूर्यपूजा करतात. त्या दिवशी गोमय, यावक दूध किंवा गळलेली पाने भक्षण करून राहतात. [हि. ध.]

गोमुख (१) मंदिरातील देवाच्या अभिषेकाचे पाणी बाहेर सोडण्यासाठी पन्हळी बांधून ती बाहेर आणण्याची व तिच्या तोंडाला गायमुखाचा आकार देण्याची पद्धती आहे. या बांधकामाला गोमुख म्हणतात.

(२) एक सुषिर वाद्य. याला गाईच्या मुखाचा आकार दिलेला असतो. कौटिल्याचे अर्थशास्त्र व महाकाव्ये यांत या वाद्याचे उल्लेख येतात. हे वाद्य युद्धाच्या वेळी वाजवीत असत. देवाच्या मिरवणुकीत व आरतीच्या वेळी वाजवल्या जाणाऱ्या शिंगालाही गोमुख असे नाव आहे. ' शृङ्गं गोमुखमीरितम् ' (राजव्यवहारकोश).

(३) जैन दैवतशास्त्रातला एक यक्ष. आदिनाथाचा सेवक. याचे वर्णन पुढीलप्रमाणे–

चतुर्भुजः सुवर्णाभो गोमुखो वृषवाहनः ।

वरदानपरः सम्यक् धर्मचक्रं च मस्तके ।।
(प्रतिष्ठासारोद्धार)

अर्थ – चार हात, सुवर्णकांती, बैलाचे तोंड, वृषभवाहन व वरदमुद्रा धारण करणारा असा गोमुख यक्ष असतो. याच्या मस्तकावर धर्मचक्र असते.

आदिनाथाच्या शिल्पात हा बहुधा आढळतो. याच्या स्वतंत्र मूर्ती फारशा नाहीत.

गोमुखासन एक योगासन. याची क्रिया योगशास्त्रावरील ग्रंथांत सांगितली आहे, ती अशी–

सव्ये दक्षिणगुल्फं तु पृष्ठपार्श्वे नियोजयेत् ।
दक्षिणेऽपि तथा सव्यं गोमुखं गोमुखाकृतिः ।।

अर्थ– डावा पाय वाकवून उजव्या कुल्ल्याच्या खाली ठेवून व उजवा पाय डाव्या पायावर नेऊन डाव्या कुल्ल्याच्या खाली ठेवून ताठ बसावे. मग दोन्ही हात पाठीमागे वळवून एकमेकात अडकवून घ्यावे. उजवा हात वर उचलून व कोपरापासून वळवून डोक्याला टेकवीत पाठीकडे न्यावा आणि डावा हात खाली घेऊन त्याने उजवा हात पकडावा. असे केल्याने गोमुखासारखी आकृती दिसते.



गोमुखासन – पृष्ठभाग

या आसनाच्या अभ्यासाने काखेतील मांसयुक्त गाठ बरी होते, श्वासरोग नष्ट होतो, पाठदुखी व निर्बलता दूर होते. पित्तामुळे होणारी जळजळ शांत होण्यासाठी हे आसन अत्यंत उपयुक्त आहे. [उ. यो. द.]

गोमुखी जप करताना माळ बाहेर दिसू नये म्हणून ए गोमुखाकार पिशवी केलेली असते. तिच्या मान्ने-च्या भागात हात घालून मुखाच्या भागात माळ धरतात. या पिशवीला गोमुखी असे नाव आहे. गोमुखीची निर्मिती पुढील कारणासाठी झाली आहे.

वस्त्रेणाऽऽच्छाद्य तु करं दक्षिणं यः सदा जपेत् ।
तस्य स्यात्सफलं जप्यं तद्धीनमफलं स्मृतम् ।।

अर्थ– जो मनुष्य वस्त्राने उजवा (माळ धरलेला) हात आच्छादून जप करील, त्याचा मंत्र सफल होईल व तसे न करील त्याला जपाचे फल मिळणार नाही.

वरील शास्त्रार्थ लक्षात घेऊन कोण्या बुद्धिमान पुरुषाने गोमुखी या पिशवीची निर्मिती केली व ती वस्तू जपकर्मात रूढ झाली. [आचारेन्दु]

गोमूत्र पंचगव्यातले एक घटक. भूमिशुद्धीसाठी तिच्या गोमूत्र शिंपडतात. आयुर्वेदातही गोमूत्राला फा महत्त्व दिलेले आहे. ते कटू, तिक्त, उष्ण, लघू, पित्तक दीपन, पवित्र व बुद्धिप्रद मानलेले आहे. गाय ही सर्वतीर्था असल्याने तिचे मूत्र हे नर्मदा नदीच्या ठिकाणी कल्पिले आ पाहा– गोमय. [श. क.]

गोमूत्रकृच्छ्र एक प्रायश्चित्त. याचा विधी प्रायश्चित्त या ग्रंथात सांगितलेला आहे, तो असा–

आतृप्तेश्चारयित्वा गां गोधूमान् यवमिश्रितान्।
तान् गोमयोत्थान् सङ्गृह्य पिबेद् गोमूत्रयावकम् ॥

अर्थ– गाईला यवमिश्रित गहू पोटभर खायला घाल आणि ते तिच्या शेणात पडले, की गोळा करून गोमू घालून प्यावे.

गोमेद एक मणी. रत्नशास्त्रात गोमेदाचे विवरण फा कमी आहे. याचा रंग पिवळसर तांबूस व धू पांढरा असतो. युक्तिकल्पतरूत याचे वर्णन आहे ते असे–

गुरुप्रभाढ्यः सितवर्णरूपः ।
स्निग्धो मृदुर्वाऽतिमहापुराणः ।।
स्वच्छस्तु गोमेदमणिर्धृतोऽयं ।
करोति लक्ष्मीं धनधान्यवृद्धिम् ।।

अर्थ – ज्याचे तेज मोठे आहे असा, शुभ्र वर्णाचा, स्नि मृदू, फार जुना व स्वच्छ असा गोमेदमणी धारण केला अस तो लक्ष्मीची व धनधान्याची वृद्धी करतो.

हिमालयात किंवा समुद्रात या मण्याची उत्पत्ती होते. शुभ्

रक्त, पीत व नील अशा रंगभेदाने तो अनुक्रमे ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य व शूद्र समजला जातो. गोमेद हा राहूला प्रिय असलेला मणी आहे.

गोमेध

(१) एक यज्ञविशेष. यात गायीची हिंसा असते. या यज्ञाचा प्रयोग अजयागाप्रमाणेच असतो. याने यजमानाला व गायीला स्वर्ग मिळतो, असे सांगितले आहे. आपस्तंबाने कलियुगात या यागाचा निषेध सांगितला आहे.



गोमेध यक्ष – अंबिकेसह

अथर्ववेदातली १०.९ – १० ही दोन सूक्ते गोमेधविषयक आहेत. पं. सातवळेकर यांनी या सूक्तांचा अर्थ वेगळा लावून जे प्रतिपादन केले आहे, ते असे— या दोन्ही सूक्तांत गोवध, गोमांसभक्षण किंवा गायींच्या अवयवांचे हवन यांचा काहीही संबंध नाही. गोमेधात गायीचे हवन विहित नसून गायीचे दान विहित आहे. ज्याप्रमाणे सर्वमेधात सर्वस्वाचे दान द्यायचे असते, त्याचप्रमाणे गोमेधात विद्वान ब्राह्मणाला गायीचे दान करायचे असते.

> स तांल्लोकानाप्नोति ये दिव्या ये च पार्थिवाः।
> हिरण्यज्योतिषं कृत्वा यो ददाति शतौदनाम् ॥
>
> (अथर्व. १०.९.६)

अर्थ – जो यजमान शतौदन गायीला सुवर्णालंकारांनी सजवून तिचे दान देतो, त्याला पार्थिव व दिव्य लोकांची प्राप्ती होते.

प्रत्येक मेधात संगम, संवर्धन व समर्पण हे तीन भाग असतात. त्या दृष्टीने गायीचा उत्तम वळूशी संबंध आणून व तिच्या खाण्यापिण्याची योग्य ती व्यवस्था करून तिचे गुण म्हणजे तिचे दूध देण्याचे सामर्थ्य वाढविणे व नंतर गुरुकुलात शिकविणाऱ्या एखाद्या सत्पात्र ब्राह्मणाला ती दान देणे, या तीन गोष्टी गोमेधात विहित आहेत.

(२) जैन दैवतसमूहातला एक यक्ष. नेमिनाथाचा सेवक. याचे वर्णन पुढीलप्रमाणे—

> तत्तीर्थजन्मा त्रिवदनः श्यामवर्णः पुरुषवाहनो
> बीजपूरपरशुचक्रसंयुक्तदक्षिणकरत्रयो
> नकुलत्रिशूलशक्तिसहितवामकरत्रय
> एवंविधो गोमेधः।
>
> (नेमिनाथचरित)

अर्थ – नेमिनाथाच्या तीर्थातून जन्मलेला सावळा, माणसावर आरूढ, त्रिमुख, षड्भुज; मातुलिंग, परशू, चक्र, नकुल, त्रिशूल व शक्ती अनुक्रमे उजव्या व डाव्या तीन हातात धारण करणारा (दिगंबरमते घण, कुऱ्हाड, दंड, फल, वज्र आणि वरदमुद्रा धारण करणारा).

याच्या पुष्कळ मूर्ती आढळतात. याचे कुबेराशी बरेच साम्य दिसते. नरवाहन आणि पुष्पयान ही या यक्षाची आणखी दोन नावे आहेत, ती मुळात कुबेराचीच आहेत. [जै. इ.]

गोयंद

जबलपुराकडची एक छोटी जात. ठग जातीतील गुन्हेगार लोकांची माहिती देऊन माफीचे साक्षीदार बनलेले ठगांचेच हे वंशज असल्याचे सांगतात. यांना गोरंद असेही म्हणतात. हे लोक भटके आहेत.

या जातीत मुसलमान लोकही आढळतात. ते स्वतःला दख्खनी मुसलमान म्हणवतात व ती मानाची पदवी समजतात.

हे हातमोजे–पायमोजे बनवणे, दोऱ्या विणणे, तंबू तयार करणे, इ. व्यवसाय करतात. [ट्रा. का. सें. प्रॉ. इं.]

गोरखनाथ

एक नाथसिद्ध. याला गोरक्षनाथ असेही म्हणतात. नवनाथकथासाराच्या ९ व्या अध्यायात गोरक्षनाथाची जन्मकथा दिली आहे, ती अशी –

एकदा मच्छिंद्रनाथ यात्रेच्या निमित्ताने बंगालमधील चंद्रगिरी या गावी गेला असता भिक्षेसाठी एका ब्राह्मणाच्या घरी पोचला. त्या ब्राह्मणाच्या सरस्वती नामक पत्नीला मूल नव्हते. तिचे ते दुःख जाणून मच्छिंद्रनाथाने तिला पुत्रप्राप्तीसाठी विभूती मंत्रून दिली व ती खायला सांगितले. पण सरस्वतीला त्या गोष्टीचा विश्वास न वाटून तिने ती विभूती उकिरड्यावर टाकून दिली. पुढे बारा वर्षांनी मच्छिंद्रनाथ पुनश्च त्या ब्राह्मणीकडे येऊन मुलाची चौकशी करू लागला. तेव्हा तिने आपण ती विभूती उकिरड्यावर टाकल्याचे सांगितले. मग

मच्छिंद्रनाथ त्या उकिरड्याकडे गेला व तो उकरून त्याने त्यातून एका मुलाला बाहेर काढले. तो मुलगा बारा वर्षेपर्यंत *गोबरात (राखेचा ढीग) वाढला;* म्हणून त्याचे त्याने गोरक्ष असे नाव ठेवले.


गोरखनाथ – कल्याणवरून

डॉ. मोहनसिंग यांच्या मते गोरखनाथ हा एका हिंदू विधवेचा अवैध पुत्र असावा. समाजाच्या खालच्या थरात जन्म घेऊन स्वपराक्रमाने धार्मिक क्रांती करणारा महापुरुष, असे त्यांनी त्याचे वर्णन केले आहे. गोरक्षसिद्धान्तसंग्रहात त्याला 'ईश्वरा संतान' (बेवारशी) म्हटले आहे, ते याच अर्थाने होय. मतिरत्नाकर या महानुभावांच्या ग्रंथात त्याचा जन्म शूद्रकुळात झाल्याचे म्हटले आहे–

आणि गोरक्ष जन्मला शूद्र कुळीं ।
तो मच्छिंद्राचा शिष्य नाथ ओळी ।
तो जन्मला शिरकमळीं । हे असत्य ।।

डॉ. द्विवेदी त्याला ब्राह्मण कुलातला मानतात. दक्षिणेत स्थायिक झालेल्या काश्मीरी ब्राह्मण पंडिताच्या कुळात गोरक्षनाथाचा जन्म झाला असावा, असे श्री. रा. चिं. ढेरे यांचे मत आहे.

पंडिती परंपरेचा वारसा लाभल्याने त्याचे दार्शनिक अध्ययन बरेच झाले होते. ज्ञानेश्वरांनी त्याला 'विषयविध्वंसैकवीर' असे म्हटले आहे. यावरून त्याचे प्रखर वैराग्य सूचित होते. त्याचा देह अत्यंत कांतिमान होता. विवेकमार्गावरून च्युत होणाऱ्या आपल्या (मच्छिंद्रनाथ) गुरूचा उद्धार करून शिष्यपरंपरेत त्याने आपले लोकोत्तर शिष्यत्व प्रस्थापित (मच्छिंद्रनाथ पाहा.)

गोरक्षनाथाच्या स्थलनिश्चितीविषयी निश्चित पुरावे सापडले नाहीत. डॉ. सिंग त्याला पंजाबचा मानतात; तर ढेरे गोदातीरावरील चंद्रगिरीचा मानतात. श्री. ढेरे गोरक्षनाथाचा काळ इ. स. १०५० ते ११५० हा मानला

शिष्यपरिवार – गोरखनाथाचा संचार भारतात सर्वत्र भारताच्या प्रत्येक प्रदेशात त्याच्या नावाची काहीतरी आढळतेच. प्रत्येक प्रदेशाला गोरक्षनाथ हा आपलासा अशी त्याला अखिल भारतीय कीर्ती व भक्ती लाभली त्याचा शिष्यपरिवारही फार मोठा होता. महाराष्ट्रातील नाथ व गहिनीनाथ, उज्जयिनीचा भर्तृहरी, बंगालचा आणि जिच्या निमित्ताने गोरक्षोपनिषद सांगितले गेले विमलादेवी ही याची प्रमुख शिष्यमंडळी होय. यांपैकी व गोपीचंद हे दोघे राजे होते. गोरक्षनाथाच्या राज्यत्याग करून ते जोगी बनले.

ग्रंथसंभार – गोरखनाथाने संस्कृतात ग्रंथलेखन केले तरी त्याने लोकभाषांचा आवर्जून पुरस्कार केला आहे. नावावर बराच मोठा ग्रंथसंभार आहे. त्या ग्रंथांवरून विशाल प्रज्ञेची काहीशी कल्पना येऊ शकते. संस्कृतात, व अन्य भाषांतही याचे ग्रंथ आहेत. अमनस्व, अमरौघ, गोरक्षपद्धती, गोरक्षसंहिता, योगमार्तंड हे त्याचे होत. योगमार्तंड हा १८८ श्लोकांचा ग्रंथ आहे. यात सर्व अंगाचा स्थूल परामर्ष घेतलेला आहे. याशिवाय कल्प, अवधूतगीता, गोरक्षगीता, इ. संस्कृत ग्रंथ गोरक्षनाथा नावावर आहेत. गोरखबानी या ग्रंथात डॉ. पीतांबर थ्वाल यांनी गोरक्षनाथाची हिंदी रचना संग्रहीत केली त्यांनी त्या संग्रहाच्या प्रस्तावनेत गोरक्षनाथाच्या असलेल्या चाळीस लहानमोठ्या ग्रंथांचा उल्लेख केला गोरखबोध या ग्रंथांत गोरक्षनाथाचे तत्त्वज्ञान ग्रथित आहे. सूत्रमय विचार व गुरु–शिष्यसंवादात्मक मांडणी, या ग्रंथाचे स्वरूप आहे.

गोरखनाथाचे कार्य – परमेश्वरप्राप्ती ही देश, काल, वंश, जाती या सर्व भेदांच्या पलिकडे आहे, हे आपल्या आचरणाने सिद्ध केले. हिंदु-मुस्लिम ऐक्याचा प्रथम यानेच घातला. याच्या शिष्यमंडळात हिंदू आणि या दोन्ही जातीचे लोक होते. बाबा रतन हाजी हा प्रमुख मुस्लिम अनुयायी होय. आजही नाथसंप्रदायाच्या शाखेत मुसलमानांचाच विशेष भरणा आहे.

गोरक्षनाथाला स्त्री-शूद्रांच्या उद्धाराची तळमळ

विमलादेवी व मयनामती अशा त्याच्या दोन शिष्या होत्या. बंगालमधील हडिपा (जालंदरनाथ) या अंत्यजाला नाथसंप्रदायाने आपल्यात घेतले, हा गोरक्षनाथाच्या विचारांचाच प्रभाव, असे म्हटले पाहिजे.

लोकभाषांचे उन्नयन करण्यास गोरक्षनाथानेच सुरुवात केली. अखिल भारतीय पातळीवरून हिंदीचा अवलंब करणाराही गोरक्षनाथ हाच पहिला पुरुष होय. नंतर त्याच्याकडूनच प्रेरणा घेऊन अनेक साधु-संतांनी लोकभाषांच्या पुरस्काराचे व्रत स्वीकारले.

गोरक्षसिद्धान्तसंग्रहात वर्णाश्रमाविरुद्ध अत्यंत कठोर विचार व्यक्त झालेले आहेत. त्यामुळेच वर्णभ्रष्टांना नाथसंप्रदाय म्हणजे एक उदार आश्रयस्थान बनले होते. शब्दप्रामाण्याऐवजी आत्मानुभूतीचे प्रामाण्य गोरक्षनाथाने विशेष मानले. पुढे कबीर, नानक, इ. संतांनी आत्मानुभूतीला महत्त्व दिले, ती प्रेरणा गोरक्षनाथाचीच होय.

एवंच हिंदु-मुस्लिम ऐक्याचा प्रथम प्रणेता, विवेकापासून दुरावलेल्या भारतीय आचारपरंपरेचा उद्धारकर्ता, स्त्री-शूद्रांचा त्राता, लोकभाषांचा पुरस्कर्ता व शब्दप्रामाण्याचा निषेधक इतक्या नात्यांनी गोरखनाथाचा गौरव करावा लागतो. [गो. च. प.; म. ज्ञा. को.; नवनाथकथासार; ना. सं.]

गोरखोदिया एक मुसलमान जमात. या लोकांची वस्ती मुख्यत्वे गुजरातमध्ये आढळते. हे लोक सुन्नी पंथाचे आहेत. थडगी खोदणे, हा यांचा प्रमुख व्यवसाय आहे.

गोरज मुहूर्त याला गोधूली असेही म्हणतात. हा सूर्यास्तसमयीचा एक शुभ मुहूर्त मानलेला आहे. याचे लक्षण पुढील प्रमाणे–

पिण्डीभूते दिनकृति हेमन्ततौं
स्यादर्धास्ते तपसमये गोधूलिः ।
सम्पूर्णास्ते जलधरमालाकाले
त्रेधा योज्या सकलशुभे कार्यादौ ।।

अर्थ – हेमंत ऋतूत (मार्गशीर्ष ते फाल्गुन) सूर्य पिंडाकार (सुखदृश्य) झाला असता, तपकाली (चैत्र ते आषाढ) सूर्यबिंबाचा अर्धास्त झाल्यावर व वर्षाकाळी (श्रावण ते कार्तिक) सूर्यबिंबाचा संपूर्ण अस्त झाल्यावर एक घटका गोधूलिकाल समजावा. हे तीन्ही प्रकारचे गोधूली मुहूर्त शुभ कार्यांना प्रशस्त आहेत.

'रवेरर्धास्तात्परपूर्वतोऽर्धघटिकम्' = सूर्याचा अर्धास्त होतो त्याच्या आधीची अर्धी व पुढची अर्धी मिळून एक घटका गोधूल मुहूर्त समजावा, असे त्याचे सामान्य लक्षण मुहूर्तमार्तंडात (श्लोक ६६) दिले आहे.

रानात चरायला गेलेले गोधन सूर्यास्तसमयी परत येते, त्या वेळी त्यांच्या खुरांनी धुरळा उडतो, म्हणून त्या वेळच्या या मुहूर्ताला हे नाव दिलेले आहे. हा मुहूर्त त्रैवर्णिकांहून इतरांच्या विवाहाला अधिक शुभकर मानलेला आहे. या मुहूर्ताच्या वेळी अन्य तिथी, नक्षत्र, लग्न, इ. योग विचारात घेण्याची गरज नसते.

गोर राजे बंगालचे प्राचीन राजे गोर वंशी होते. प्राचीन बखरींतून यांचा निर्देश अजमेरचे गोर म्हणून आढळतो. अजमेरवर चौहान घराण्याची सत्ता येण्यापूर्वी बहुधा हेच अजमेरचे राजे असावे व चौहानांनी त्यांना पदभ्रष्ट करून त्यांचे राज्य जिंकले असावे.

पृथ्वीराज चौहानाची मुसलमानांशी जी युद्धे झाली, त्यांत गोरांनी फार मोठा पराक्रम गाजविला आहे. राजस्थानी भाटांच्या कवनांतून गोरांच्या पराक्रमाचा गौरव आढळतो. गोरांच्या एका सेनापतीने नंतर मध्यभारतात एक लहानसे राज्य स्थापन केले. हे राज्य सातशे वर्षे टिकले असे दिसते. इ. स. १८०९ साली ग्वाल्हेरच्या शिंद्यांनी गोरांचा पराभव करून ते राज्य जिंकले.

राधिकादास हा गोरांचा शेवटचा राजा होय. तो कृष्णभक्त असून, कवीही होता. राधा-कृष्णांच्या प्रेमावर याने अनेक कवने रचली आहेत.

गोरांची पाच कुले होती– (१) ओंताहरी, (२) सिलिघल, (३) तूर, (४) दुसेना व (५) बोदानू. [अॅ. अॅ. रा.]

गोरक्षासन एक योगासन. गोरक्षमुनीने हे साध्य केले होते, म्हणून याला हे नाव मिळाले आहे. सर्वसाधारण स्त्री-पुरुषांना हे आसन दुःसाध्य आहे. याची प्रक्रिया अशी–

जानूर्वोरन्तरे पादौ उत्तानाव्यक्तसंस्थितौ ।
गुल्फौ चाच्छाद्य हस्ताभ्यामुत्तानाभ्यां प्रयत्नतः ।।
कण्ठसङ्कोचनं कृत्वा नासाग्रमवलोकयेत् ।
गोरक्षासनमित्याहुर्योगिनां सिद्धिकारणम् ।।

अर्थ– दोन्ही पायांचे तळवे अशा प्रकारे उताणे आणावे, की दोन्ही टाचा पुढे येतील. मग दोन्ही घोटे गुदाच्या दोन्ही बाजूंस घ्यावे. दोन्ही हात मागून घेऊन उताण्या हातांनी दोन्ही घोटे झाकावे. मग कंठसंकोच (जालंधरबंध) करावा. दृष्टी नासाग्री लावावी. याला गोरक्षासन म्हणतात. हे योग्यांना अनेक सिद्धी देणारे आहे, असे सांगितले आहे.

या आसनाच्या भिन्न अवस्थांपैकी शेवटच्या अवस्थेचे चित्र खाली दिले आहे. याच्या अभ्यासामुळे वीर्य परिपुष्ट व सशक्त बनते. पुत्रप्राप्तीसाठी स्त्री-पुरुषांनी हे आसन अवश्य केले पाहिजे. सर्व शरीराचे सांधे मऊ व लवचीक होणे, पायांची सूज ओसरणे, इ. अन्य लाभही या आसनाने होतात. [उ. यो. द.]



गोरक्षासन – पृष्ठभाग

गोरा कुंभार

(१२६७–१३१७ इ. स.) एक मराठी संत. हा तेरढोकीचा राहणारा होता. ज्ञानेश्वरादी संतमंडळीत हा सर्वात वडील होता. म्हणून सगळे संत याला गोरोबाकाका म्हणत. मडकी घडविण्यासाठी माती आणावी, ती मऊ करण्यासाठी तीत नाचावे, नाचताना विठ्ठलनामाचा गजर करावा व त्या आनंदात निमग्न राहावे, असा त्याचा नित्यक्रम होता.

गोरोबाची कथा प्रसिद्ध आहे, ती अशी—

गोरोबाला संती व रामी अशा दोन स्त्रिया होत्या. एकदा गोरोबा चिखल तुडवीत असता तो भजनानंदात इतका तल्लीन झाला, की चिखलात रांगत आलेले स्वतःचे पोरही त्याने नकळत तुडवले. पाणवठ्यावरून परत आल्यानंतर संती मुलाचा शोध घेऊ लागली, तो तिला मूल मेलेले दिसले. त्यावर पुत्रविरहाने दुःखी झालेली संती सहज म्हणाली, की 'जळो हे तुमचे भजन.' ते ऐकताच गोरा तिला मारायला धावला. त्यावर संती म्हणाली, की माझ्या अंगाला हात लावाल, तर तुम्हांला तुमच्या विठोबाची आण आहे. गोरोबाने त्या दिवसापासून तिला स्पर्श करण्याचे सोडून दिले. मूल मेल्याने गोरोबाचे वंशखंडन झाले होते. संतीला त्या गोष्टीचे दुःख होते. म्हणून मग तिने आपल्या रामी नावाच्या धाकट्या बहिणीशी त्या लग्न करायला लावले. लग्नसमारंभ आटोपल्यावर मुली वापाने गोरोबाला विनंती केली की, तुम्ही दोन्ही बायकां समानपणे वागवावे; तुम्हांला विठूची आण आहे.

त्यामुळे गोरोबाने संतीप्रमाणेच रामीच्याही अंगाला स्प करायचे सोडून दिले. मग एके रात्री गोरोबा झोपेत असता दोघी बहिणींनी त्याचे दोन्ही हात आपल्या अंगावर घेत जागा झाल्यावर गोरोबाला वाटले, की आपल्याकडून विठू आण मोडली. म्हणून त्याने लगेच आपले दोन्ही हात तोडू घेतले. पुढे पंढरीस नामदेवाच्या कीर्तनप्रसंगी टाळी वाजवण्या प्रयत्न करीत असता गोरोबाला पुनश्च दोन्ही हात फुटले व मेलेले मूलही संतीपुढे रांगत आले.

ज्ञानेश्वरमंडळात गोरोबाचा एवढा अधिकार होता, की ना देव परमार्थात कच्चा की पक्का हे ठरवण्याच्या कामी त्या शब्द प्रमाण मानला गेला. गोरोबानेही आपले अनुभवां थापटणे चालवून योग्य तो निवाडा दिला.

'परब्रह्म म्हातारा निवाला अंतरी' या मुक्ताबाईच्या क नावरून गोरोबाची योग्यता केवढी मोठी होती, ते कळून ये

गोरोबाचे सुमारे ४३ अभंग सर्वसंग्रहगाथा या ग्रंथात दिले आहेत. त्या अभंगांतून सूरदास, कबीरदास, इ. उत्तरकां संतांचेही उल्लेख आढळतात, त्यावरून हे सर्वच अभंग गोरो असतील, असे म्हणवत नाही. त्यापैकी २१ अभंगांत गोरो चरित्र असून, त्यात त्याची खूपच स्तुती केलेली आहे. गोरोबाच्या अभंगांपैकी एक अभंग असा—

ब्रह्म मूर्तिमंत जगी अवतरले ।
उद्धरावया आले दीन जना ।।
ब्रह्मादिक ज्याचे वंदिती पायवणी ।
नाम घेता वदनी दोष जाती ।।
हो का दुराचारी विषयी आसक्त ।
संतकृपे त्वरित उद्धरती ।।
अखंडित गोरा त्याची वाट पाहे ।
निशिदिनी ध्याये संतसंग ।।

तेरढोकी हे गोरोबाचे गाव पंढरपुरापासून ५०।६० मैलां आहे. तिथेच त्याची समाधीही आहे. गोरोबाच्या घराची आ व जिथे त्याने मूल तुडविले ती जागाही तिथे दाखवता [म. सा.; प्रा. म. सं.; म. च. को.]

गोरिल देव

कुमाऊँ प्रदेशातील एक ग्रामदेव. हा उ आहे. या देवाला वीस हात असून, त्याचे वा घोडा आहे. याच्या उत्पत्तीविषयीची कथा सांगतात, ती अ

चंपावती येथे झालूराय नावाचा राजा होता. त्याच्या सातही राण्या निपुत्रिक होत्या. तो एक दिवस शिकारीला रानात गेला. तिथे त्याला तहान लागली. त्याने सेवकांना पाणी आणायला पाठवले. सेवक पाण्यासाठी गेले तेव्हा त्यांना चांदीचा व सोन्याचा असे दोन झरे दिसले. ते पाणी भरून घेणार, तो जवळच्या एका मंदिरातील देवीच्या तोंडून 'पाणी घेऊ नका' असे शब्द आले. सेवकांनी परत येऊन ती गोष्ट राजाला सांगितली. राजा संतापून त्या मंदिराचा नाश करण्यासाठी निघाला. पण त्या ठिकाणी येताच त्याला त्या देवीचे मानवी रूप दिसले. राजा राग विसरून तिच्या रूपावर लुब्ध झाला. त्याने तिला राजवाड्यात आणले व तिच्याशी विवाह केला. तिच्या उदरी जो पुत्र जन्मला, तोच हा गोरिल होय. [आजकल – जुलै १९५८]

गोरेयापूजा उराँव आदिवासींचा एक पूजोत्सव. हा कार्तिक पौर्णिमेस करतात. गोरेयाच्या पूजेसाठी तांदूळ, दारू, शेंदूर व कोंबडीचे पिल्लू हे साहित्य आवश्यक असते. प्रथम बायका घर, आंगण व गोठा सारवतात. मग घरातला सर्वांत मोठा माणूस स्नान करून गोठ्यातल्या गुरांची पूजा करतो. मग गोरेया देवाचे प्रतीक म्हणून गारन या झाडाची फांदी रोवतो व तिची पूजा करतो. मग बलिदान करून देवाला नैवेद्य दाखवतो. नंतर गुरांची डोकी शेंदुराने रंगवतो. हा उत्सव गुरांच्या अभिवृद्धीसाठी असतो. [फो. लो.– फेब्रु. १९६४]

गोरोचन एक पिवळ्या रंगाचे द्रव्य. हे गोमूत्रापासून किंवा गाईच्या ओकण्यापासून बनवितात. हे गाईच्या कवटीतही तयार होते. चित्रे व औषधे यांत याचा उपयोग होतो. गायत्रीच्या चोव्वीस अक्षरांची ज्या चोव्वीस पदार्थांशी तुलना केली आहे, त्यात गोरोचन हा एक आहे. स्त्रियांना मोह घालणे व वाजीकरण यांत गोरोचनाचा उपयोग सांगितला आहे.

पार्वतीचा वधूशृंगार करताना प्रसाधिकांनी तिच्या अंगावर गोरोचनाने पत्ररचना रेखाटली, असे कालिदास सांगतो (कु. सं. ७.१५). मंत्रविद्येत भूर्जपत्रावर मंत्र किंवा यंत्र लिहिण्याच्या कामी गोरोचनाच्या द्रवाचा उपयोग करतात.

गोलक ब्राह्मण विधवा व ब्राह्मण पुरुष यांच्या संबंधातून उत्पन्न झालेल्या संततीला हे नाव आहे. 'मृते भर्तरि गोलकः' = भर्ता मृत झाल्यानंतर होणाऱ्या संततीस गोलक म्हणावे, असे अमरकोशातही सांगितले आहे. गोलक प्रजा सवर्ण, अनुलोम व प्रतिलोम यांहून भिन्न समजावी, असे मिताक्षरा या टीकाग्रंथात म्हटले आहे. [हि. ध.]

गोलकी मठ जवलपुराजवळ तेवर नावाचे एक गाव आहे. ही पूर्वी त्रिपुरी नावाची कलचुरी राजांची राजधानी होती. तिच्याजवळ नर्मदेच्या काठी एका लहानशा टेकडीवर ६४ योगिनींचे मंदिर आहे. तिथे जवळ शैवाचार्यांचा एक मठ आहे. गोलाकार टेकडीवर असल्यामुळे याला गोलकी मठ असे नाव मिळाले आहे. मत्तमयूर वंशाच्या आचार्यांनी या मठाची स्थापना केली. गोलकी मठाचे आचार्य व कलचुरी राजे यांचा गुरु-शिष्यसंबंध होता. आंध्र प्रदेशातील गुंतूर जिल्ह्यातील मलकापुरम् या गावी शके ११८३ (इ. स. १२६१) चा एक लेख सापडला आहे. त्यात गोलकी मठाचे आचार्य हे कलचुरी राजांचे गुरू असल्याचा उल्लेख मिळतो. कलचुरींच्या ताम्रपटांतही तसे उल्लेख सापडतात.

इ. स. १२१० च्या सुमारास चंदेलनृपती त्रैलोक्यमल्ल याने कलचुरींचा पाडाव करून त्यांचे राज्य हस्तगत केले. त्यामुळे गोलकी मठालाही उतरती कळा लागली. त्यानंतर या मठाचे आचार्य दक्षिणेत आंध्र, तमिळनाड, इ. प्रदेशात गेले व तिथे त्यानी आपले मठ स्थापले. कुडाप्पा, कर्नूल, गुंतूर, इ. जिल्ह्यांत गोलकी मठाच्या शाखा असल्याचे उल्लेख दक्षिणेतील अनेक कोरीव लेखांत सापडतात.

गोलकी मठाच्या सोमशंभू नामक आचार्याने सर्व शैवागमांचे विवरण करणारा 'सोमशंभूपद्धति' नामक ग्रंथ लिहिला आहे, असे मलकापुरम्च्या स्तंभलेखात म्हटले आहे. सायणमाधवाच्या सर्वदर्शनसंग्रहात शैवदर्शनांची माहिती देत असताना सोमशंभूचे काही श्लोक उद्धृत केलेले आहेत, ते याच ग्रंथातून घेतले असावे.

गोलकी मठाच्या आचार्यांनी मध्ययुगात धर्म, तत्त्वज्ञान, राजकारण, इ. क्षेत्रांत महनीय कामगिरी केल्याचे कळते. [डॉ. वा. वि. मिराशी – नवभारत, जाने. १९५५]

गोल-गाधडो गुजरातमधल्या जेस्सावडा तालुक्यातील भिल्ल लोकांचा एक उत्सव. यात मुलामुलींना आपल्या जोडीदाराची निवड करण्याची मुभा असते. होळीच्या दिवशी हा उत्सव करतात. त्याची पद्धत अशी–

तरुण–तरुणी एका खांबाभोवती एकत्र येतात. या खांबाच्या डोक्यावर नारळ व गूळ बांधून ठेवलेला असतो. नृत्यासाठी ते दोन वर्तुळे करतात. आतले वर्तुळ स्त्रियांचे व बाहेरचे पुरुषांचे असते. पुरुष स्त्रियांचे वर्तुळ तोडून खांबावर चढण्याचा प्रयत्न करतात. स्त्रिया त्यांना तसे करू देत नाहीत. [illegible]

तरुण वर्तुळ तोडून खांबावर चढण्याचा प्रयत्न करू लागला, तर सर्व स्त्रिया त्याला खाली ओढून केरसुणीच्या दांडक्याने झोडपतात. हा सगळा प्रतिकार मोडून एखाद्या तरुणाने खांबावरचा नारळ व गूळ हस्तगत केला, तर तिथे जमलेल्या तरुणींपैकी आवडेल ती तरुणी वधू म्हणून निवडण्याचा त्याला हक्क मिळतो. अशा प्रकारे पराक्रमी तरुणाची पत्नी होण्याचा मान मिळाल्याबद्दल त्या तरुणीलाही अभिमान वाटतो व ती त्याचा कधीही त्याग करीत नाही. [रे. क. इं.]

गोला

एक जात. हे लोक गुजरात, सौराष्ट्र व राजस्थान या प्रदेशांत आढळतात. बंगाल, बिहार व ओडिसा या प्रदेशातही काही प्रमाणात यांची वस्ती आहे. हे दरोगा, खवास, चाकर, चेला, वजीर, इ. नावांनीही प्रसिद्ध आहेत. यांच्या स्त्रियांना डावडी, माणस, वडारण, दरोगण असे म्हणतात. हे राजपूतांशी आपला संबंध सांगतात व आपल्या नावापुढे राणा हा शब्द लावतात. भात भरडणे व तांदूळ कांडणे हा यांचा परंपरागत व्यवसाय आहे.



गोला पुरुष

हे आते–मामे–मावस बहिणीशी लग्न करीत नाहीत औदीच्य, रायकवाल, मेवाड अथवा श्रीमाळी ब्राह्मण हे गोलांचे पौरोहित्य करतात.

सुरत येथील गोलांचे नवापुरा व बेगमपुरा असे दो प्रमुख पोटभेद आहेत. या पोटभेदांचेही आणखी सात पोटभे आहेत. यांची जातपंचायत असून, सर्वांची मिळून एक मध्यवर्ती पंचायतही असते. तिच्यात २२ पटेल व २२ मोहोळदार यांचा समावेश असतो. अंत्यविधीला न जाणे, ठरलेला हुंडा न देणे, इ. सामान्य जातिनियमांच्या भंगाबद्दल पोटजातीच्या पंचायती निवाडा देतात व लग्न मोडणे, मद्यपान, मांसाशन, अनैतिक संबंध यांसारख्या गुन्ह्यांविरुद्ध मध्यवर्ती पंचायत निवाडा देते. दंडाच्या रकमेतून ज्ञातिभोजन घातले जाते. पूर्वी राजपूत लोक दास म्हणून यांना आपल्याकडे ठेवीत.

हे खोडियार देवतेला भजतात. मृतांना जाळतात व श्राद्ध करतात. [मुं. इ. जा.; म. ज्ञा. को.]

गोला गोकर्णनाथ

एक पुण्यक्षेत्र. ईशान्य रेल्वेमार्गावरील लखीमपूर शहरापासून २२ मैलांवर हे आहे. याला उत्तर गोकर्णक्षेत्र असेही म्हणतात. इथे महाशिवरात्रीस व चैत्राच्या शुक्लपक्षात मोठी यात्रा भरते.

इथे एक विशाल सरोवर असून, त्याच्या जवळच गोकर्णना महादेवाचे एक मंदिर आहे. वराह पुराणात याची कथा दि आहे, ती अशी—

एकदा शंकर मृगरूपाने इथे हिंडत होता. त्याला तीन शिं होती. ब्रह्मा आणि विष्णू त्याला शोधण्यासाठी इथे आले. मृ रूपधारी शंकराला त्यांनी ओळखले व त्याची शिंगे पकडली; पण तेवढ्यात शिव अंतर्धान पावला आणि तीन शिंगे तेवढी देवांच्या हाती राहिली. त्यांतील एक शिंग इथे, दुसरे भाग पूर जिल्ह्यातील शृंगेश्वरी येथे आणि तिसरे स्वर्गात स्थाप करण्यात आले. [कल्याण–तीर्थांक]

गोल्ल

एक जात. गोल, गोलर, गोलकर, गोल्लम अशा अन्य नावांनी ही जात ओळखली जाते. या जातीचं वस्ती मुख्यत्वे तमिळनाड, आंध्र, मध्यप्रदेश व मैसूर या भागां आहे. ही जात एका ठिकाणी स्थायिक राहत नाही. हे लो श्रीकृष्णापासून आपला वंश प्रचलित झाल्याचे सांगतात. गोल्ल हे गोपाल या संस्कृत शब्दाचे अपभ्रष्ट रूप आहे, असे त्यां मत आहे. हे स्वत:ला कोनानुलू किंवा कोनार्लू म्हणवितात.

माडगोले प्रदेशाच्या आसपास गोल्ल लोकांचे राज्य हो व त्यांनी तिथे किल्ले बांधले होते, असे विजगापट्टम्

गॅझेटिअरमध्ये लिहिले आहे. थेवसीयडू नावाचे गोल्ल हे वर्षप्रतिपदेला या राजांची नामावळी सांगत व त्यांच्या पराभवाची रंगीत चित्रे दाखवीत गावोगाव हिंडतात.


गोल्ल जादूगार

गोल्ल लोकांच्या एर्रा किंवा येर्रा, आल किंवा मेकल, पूजा किंवा पुनी, गंगेड्डू, गौड, कर्ण, पाकनाटी, इ. अनेक शाखा आहेत. यांच्यापैकी पूजागोल्ल हे ययातीच्या वंशाशी आपला संबंध जोडतात. गोल्लांपैकी काही लोक जादूगारही आहेत.

गायी, म्हशी व मेंढ्या पाळणे व त्यांची खरेदी विक्री करणे, हा यांचा प्रमुख व्यवसाय आहे. त्याचबरोबर हे दूध, दही, तूप, इ. पदार्थही विकतात. शनिवार, रविवार व सोमवार या दिवशी दुधाची विक्री करीत नाहीत. त्याचबरोबर वरील दिवशी मीठ, विस्तव व पाणी याही वस्तू कोणाला देत नाहीत.

हे लोक कन्नडसारखीच गोलरी, होलीय किंवा कोमटी या नावाची भाषा बोलतात. इतरांशी व्यवहार करताना हिंदी बोलतात.

देव-देवता– महादेव हे यांचे कुलदैवत व होलरिया ही इष्ट देवता आहे. ही देवता यांच्या गुरांचे सर्व रोगांपासून व रानटी जनावरांपासून रक्षण करते. तिला दर पाच किंवा दहा वर्षांनी वाढत्या संख्येने बोकड बळी द्यावे लागतात. कुटुंबप्रमुख मयत झाला म्हणजे त्याचा वारसदार दोन बोकडांपासून बळी द्यायला सुरुवात करतो.

होलरिया ही देवता हेलीय नावाच्या चांभार जातीची असावी व त्यामुळे होलीय जातीशी गोल्लांचा काही संबंध असावा, असे अनुमान निघते. गोल्ल व होलीय यांची कुलनामेही एकच असतात, यावरून वरील अनुमानाला पुष्टी मिळते.

विवाहप्रथा– या जातीत भावा-वहिणींच्या मुला-मुलींचे लग्न होते; पण दोन वहिणींच्या मुला-मुलींचे लग्न होत नाही. लग्ने मोठ्या वयात होतात. श्रावण, भाद्रपद व पौष या महिन्यांत लग्ने करीत नाहीत. विवाहहोमाचे कुंड गोमयाचे करतात व त्याच्या भोवती वधू-वरांना पाच प्रदक्षिणा घालायला लावतात. नवरा मुलगा घोड्यावर बसून लग्नमंडपात प्रवेश करतो व तिथे त्याला त्याची भावी सासू कपभर दूध देते. नंतर वर आणि वधू बोहल्यावर एकत्र बसतात. तिथे त्यांना नऊ उठाबशा काढायला लावतात व त्यानंतर बोहल्याभोवती नऊ प्रदक्षिणा घालायला लावतात. मग नवरा मुलगा वधूच्या पाया पडतो व वधूला घरात नेतो. तिथे त्यांचे एका पात्रात भोजन होते. वधूच्या घरी तीन दिवस मुक्काम करून नंतर सर्व मंडळी वराच्या घरी जातात. तिथेही वरीलप्रमाणेच सर्व विधी होतात. या नंतर त्यांचे न्हावी वधू-वरांना कडेवर घेऊन नाचतात. या नाचात दोन्ही पक्षांचे लोक सामील होतात. यांच्या धार्मिक विधींना ब्राह्मण पुरोहित लागतो.

मैसूरातील गोल्ल– यांचे ऊरू (खेड्यातील) व काडू (जंगलातील) असे दोन वर्ग आहेत. यांचा परस्पर रोटी-बेटी व्यवहार होत नाही. काडू गोल्लांची लग्ने गावाबाहेर छप्पर उभारून त्यात लावतात. लग्नसमारंभ पाच दिवस चालतो. लग्न होऊन नवरी आपल्या सासरी निघाल्यावर तिचा बाप एक कुत्रा तिच्या बरोबर देतो.

प्रसूतिप्रथा– काडू गोल्ल जातीच्या स्त्रीला प्रसूतिवेदना सुरू झाल्या, की गावाबाहेर पर्णकुटीत तिची रवानगी करतात. तिथे तिला सुईणीशिवाय इतर कुणाचीही मदत नसते. प्रसूतीनंतर तीन महिने ती तिथे एकटी राहते. तशा अवस्थेत जर कोणी तिला स्पर्श केला, तर त्यालाही तीन महिने गावाबाहेर राहावे लागते. झोपडीशेजारी तिच्यासाठी अन्न ठेवले जाते. हळूहळू ती स्त्री स्वतःच आपली झोपडी हालवीत हालवीत गावाजवळ आणते. परंतु या कामी तिला कोणीही मदत करीत नाही. ९० व्या दिवशी ग्रामप्रमुख त्या स्त्रीला झोपडीबाहेर यायला सांगतो. मग धोबी तिचे कपडे धुतो. नंतर तिला धूतवस्त्रे नेसायला लावून नंजप्पाच्या मंदिरात दर्शनाला नेतात.

जंगली गोल्ल स्त्रीकडून व्यभिचार घडल्यास तिला पुढीलप्रमाणे प्रायश्चित्त देतात– दोन फूट खोल खड्डा खणतात. त्या खड्ड्यात व्यभिचारिणी स्त्रीला उभी करतात. तिच्या भोवती काटे अंथरतात व तिला त्यांवर बसायला लावतात. मग तिच्या डोक्यावर जात्याची तळी ठेवतात. नंतर गाईचे शेण पाण्यात कालवून तिला प्यायला देतात. यानंतर जातीची माणसे तिला उपदेश करतात आणि मग ती शुद्ध झाली; असे समजतात.

घरातील सगळ्यात थोरल्या सुनेने बहिर्दिशेसाठी पाण्याचा वापर करायचा नाही, अशी प्रथा आहे. ही प्रथा तिने मोडली, तर आपल्या घराची भरभराट होणार नाही, अशी त्यांची समजूत आहे.

गोल्ल लोक तीन दिवस गंगापूजेचा मोठा उत्सव करतात. या वेळी जमिनीवर नऊ प्रकारचे मुग्गू (रांगोळ्या) काढतात. त्यासाठी पाच रंग वापरतात. त्यात कमलपुष्पे, सिंहासन व गंगा यांची चित्रे असतात. गंगेच्या डोक्याजवळ एक बांबूची पेटी व शेजारी एक पितळी घागर ठेवतात. तिला शिवाचे प्रतीक मानतात. तिथेच अन्नाचा एक ढीग ठेवतात. हा ढीग विडयाच्या पानांनी झाकतात व त्यात एक काठी रोवतात.

मर्तिकप्रथा– शिजविलेल्या भाताचे पात्र प्रेताच्या अंगावर ठेवून मग ते स्मशानात नेतात. तिथे त्या पात्रातील भात होलीय जातीचे लोक भक्षण करतात. मस्तक दक्षिणेकडे करून प्रेताचे दहन करतात. काही ठिकाणी मस्तक उत्तरेकडे करण्याची चाल आहे. मृत्यूच्या तिसऱ्या दिवशी जंगमाकडून विभूती आणवतात व ती अंगाला लावून शुद्ध होतात. [म. ज्ञा. को.; मुं. इ. जा.; ट्रा. का. से. प्राँ. इं.; बाँ. बे. क्रा.; का. ट्रा. स. इं.]

गोवत्सद्वादशी आश्विन वद्य द्वादशी. या तिथीला वसुबारस असेही म्हणतात. या दिवशी जे व्रत करतात त्यात सौभाग्यवती स्त्रिया एकभुक्त राहून सकाळी अथवा सायंकाळी सवत्स गायीची पूजा करतात व पुढील मंत्राने तिची प्रार्थना करतात–

ततः सर्वमये देवि सर्वदेवैरलङ्कृते ।
मातर्ममाभिलषितं सफलं कुरु नन्दिनि ।।

अर्थ – हे सर्वात्मिक व सर्व देवांनी अलंकृत अशा नंदिनी माते, तू माझे मनोरथ सफल कर.

या दिवशी तेलातुपात तळलेले पदार्थ आणि गाईचे दूध, तूप व ताक खात नाहीत. उडदाचे वडे, भात व गोडधोडाचे पदार्थ करून ते गायीला खाऊ घालतात. उत्तर प्रदेशात या व्रताला बछवाँछ असे म्हणतात.

समुद्रमंथनातून पाच कामधेनू उत्पन्न झाल्या, अशी कथा आहे. त्यांतल्या नंदा नावाच्या धेनूला उद्देशून हे व्रत आहे. या व्रताची कथा अशी–

एक म्हातारी होती. तिची एक सून होती. त्यांच्या घरात गुरे होती. गव्हाळी मुगाळी वासरे होती. एक दिवस सासू शेतावर गेली. तिने जाताना सुनेला सांगितले, की गव्हाळे मुगाळे शिजवून ठेव. तिला सांगायचे होते, की गहू-मूग शिजवून ठेव. पण सुनेने भलताच अर्थ घेतला आणि गोठ्यातील गव्हाळी मुगाळी वासरे मारून त्यांचे मांस शिजवले. म्हातारी घरी आल्यावर सुनेने पाने मांडली. पानातील मांस बघून म्हातारी घाबरून गेली. तेव्हा सुनेने घडलेला सारा प्रकार तिला सांगितला. त्यामुळे सासू देवापुढे धरणे धरून बसली आणि देवाला विनवू लागली. ‘ देवा देवा ! कोपू नको. सून अजाण आहे. तिचा अपराध पोटात घाल. माझी वासरे जिवंत कर. ’ देवाने त्या म्हातारीचा निर्धार पाहिला आणि सायंकाळी गायी रानातून घरी परत येण्यापूर्वी वासरे जिवंत केली. म्हातारीने मग गायी-वासरांची पूजा केली. त्यांना गोड-धोडाचा नैवेद्य दाखवून मग ती जेवली. [नि. सिं.; हि. व.]

गोवर्धन (१) व्रजमंडलातला एक पर्वत. याची व्याख्या अशी – ‘ गाः वर्धयति कोमलतृणपत्रादिदानेन इति ’ = कोमल तृण, पत्रे, इ. च्या दानाने गायींना वाढवितो (पुष्ट करतो) तो (श. क.). याला गिरिराज व अन्नकूट अशी दुसरीही नावे आहेत. हा पर्वत मथुरेच्या पश्चिमेस पंधरा मैलांवर असून, याची उंची १०० फूट व लांबी ४ ते ५ मैल आहे. ही पर्वतश्रेणी ईशान्य ते नैर्ऋत्य अशी पसरली आहे. याच्या उत्पत्तीच्या काही कथा अशा –

(१) या पर्वताची निर्मिती द्रोणाचलापासून झाली.

(२) गोवर्धन म्हणजे हिमालयाचाच एक तुकडा होय. हनुमंताने दक्षिण सागराच्या सेतुबंधासाठी तो हिमालयातून आणला. पण हनुमान तिथे पोचण्यापूर्वीच सेतुबंधाचे काम पुरे झाल्यामुळे त्याने हा पर्वत इथे ठेवला.

(३) पुलस्त्य ऋषी हा पर्वत घेऊन वाराणसीला निघाला होता. त्याला याने अट घातली, की ‘ तू मला जिथे ठेवशील तिथेच मी घट्ट होईन. ’ मार्गात पुलस्त्य ऋषीला लघुशंका लागली व त्याने हा पर्वत खाली ठेवला आणि तो तिथेच दृढ झाला (गर्गसंहिता-गिरिराजखंड).

कृष्णाच्या कालात नंदव्रजातले लोक इंद्रमह नावाचा उत्सव करीत व त्या उत्सवात इंद्राची पूजा करीत. पण कृष्णाने या उत्सवाला मोडता घालून त्याऐवजी गोवर्धन पर्वताचा उत्सव सुरू केला. या गोष्टीचा इंद्राला विलक्षण क्रोध आला. त्याने मुसळधार पर्जन्यवृष्टी करून सगळ्या गोकुळाला झोडपून काढायचे ठरवले. अशा वेळी श्रीकृष्णाने सतत सात दिवस आपल्या करांगुलीवर गोवर्धन पर्वत उचलून धरला व त्याच्या खाली गोवत्सांसह गोकुळातल्या समस्त जनांचे संरक्षण केले (भाग. पु. १०.२४).

गोवर्धन पर्वत व्रजातल्या सर्व वनांचा अधिनायक व श्रीकृष्णाचा अंशरूप आहे, असे कौशिकोपनिषदात म्हटले आहे.

Digitization by eGangotri and Sarayū Trust. Funding by MoE-IKS

'गिरिवर श्यामकी अनुहारी' असे सूरदासाचेही वचन आहे.

गोवर्धनमाहात्म्यात त्याच्याविषयी एक श्लोक आहे, तो असा–

गोवर्धनं गिरिवरं लोकानभयदायकम् ।
तस्य दर्शनमात्रेण मुक्तिभागी भवेन्नरः ॥

अर्थ– गिरिश्रेष्ठ गोवर्धन हा लोकांना अभय देणारा आहे. त्याच्या दर्शनमात्रे मनुष्य मोक्षाचा अधिकारी होतो.

इंद्राच्या शापामुळे गोवर्धन पर्वत रोज तिळातिळाने कमी होतो व तो ज्या दिवशी पूर्ण नष्ट होईल, त्या दिवशी पृथ्वीवर कलीचे साम्राज्य प्रस्थापित होईल, अशी आख्यायिका आहे. दुसरी आख्यायिका अशी, की यमुनेचे पाणी जसजसे कमी होते, तसतशी गोवर्धन पर्वताची उंचीही कमी होत जाते.

गोवर्धन पर्वतावर श्रीनाथजीचे एक मंदिर असून, हा श्रीनाथ वल्लभ संप्रदायाचे उपास्य दैवत आहे. पर्वताच्या मध्यावर वसलेले गोवर्धन हे गाव सांप्रत छोटेसे नगरच बनले आहे. इथे मानसीगंगा नावाचे एक मोठे कुंड आहे. दिवाळीच्या दिवसांत या कुंडात दीपदान करतात. भरतपूरच्या महाराजाने मानसी गंगेला पक्के घाट बांधले आहेत. इथल्या दीपदानाची प्रथाही त्यानेच सुरू केली. भरतपूरच्या राजांनी इथे अनेक छत्र्याही बांधल्या आहेत. या छत्र्या म्हणजे शिल्पकला व चित्रकला यांचा संगमच होय.



श्रीनाथजी–गोवर्धन पर्वत

गोवर्धनावर प्रतिवर्षी दोन मोठे उत्सव होतात. एक गोवर्धनपूजेचा व दुसरा अन्नकूटाचा. हे दोन्ही उत्सव कार्तिक मासात होतात. इथल्या अन्नकूटाचे मनोरम वर्णन अष्टछाप कवींच्या साहित्यात आढळते. कार्तिक मासात गोवर्धनाची परिक्रमा करण्याचीही पद्धत आहे. हिचा मार्ग १२ मैलांचा असून हिला दंडवती परिक्रमा म्हणतात. गोवर्धनाच्या समीपवर्ती स्थलात सूरदासाची साधनाभूमी परसोली, राधाकुंड व कृष्णकुंड नावाचे दोन तलाव आणि गोविंदस्वामीची कदमखंडी ही स्थळे येतात. जतपुऱ्यात गोवर्धन गिरिराजाचे सर्वोच्च शिखर आहे. हेच श्रीनाथजीचे आविर्भावस्थल होय. पाहा–इंद्रयाग. [ब्र. ब्र. या.; म. ज्ञा. को.; धर्मयुग, ८ नोव्हेंबर १९६४]

(२) (इ. स. चे १६ वे शतक) एक नैयायिक. याने केशवमिश्राच्या तर्कभाषा नामक ग्रंथावर तर्कभाषाप्रकाश या नावाची टीका लिहिली आहे.

(३) पुराणसर्वस्व नावाच्या ग्रंथाचा कर्ता. हा ग्रंथ संस्कृत भाषेत आहे. हा गोवर्धन बंगालच्या सत्यखानाचा आश्रित होता. महाभारताचा टीकाकार अर्जुनमिश्र आणि हा गोवर्धन हे समकालीन होते. [इंडियन कल्चर, जुलै १९३५]

(४) एक गाव. हे नासिकजवळ गोदावरी नदीच्या काठी आहे. दाशरथी रामाने हे वसविले, असे ब्रह्म पुराणात म्हटले आहे (९१.१). योगिनीतंत्रात या शहराच्या निर्मितीची कथा आहे, ती अशी—

केशी राक्षसाचे शरीर जळाल्यावर त्याची रक्षा जमा होऊन जी टेकडी निर्माण झाली, तिथेच हे गोवर्धनपुर वसले आहे.

भरद्वाज ऋषीचा जन्म या नगरात झाला, असे वायू पुराणावरून समजते (४५.११३).

इथे आंध्रभृत्य राजांच्या प्रतिनिधींचे वास्तव्य असे. नानासाहेब पेशवे वारल्यानंतर त्यांची पत्नी गोपिकाबाई हिने आपले उर्वरित आयुष्य इथेच घालवले. तिने बांधलेला वाडा व घाट अद्यापही इथे आहेत. इथे काही कालापूर्वी जे उत्खनन झाले, त्यात अश्मयुगीन मानवाचे अवशेष सापडले आहेत. [हि. ध.; महाराष्ट्र–परिचय; गँझे. बाँ. प्रे.]

गोवर्धनपूजा मथुरेकडील लोक बलिप्रतिपदेच्या दिवशी सकाळी गोवर्धन पर्वताची पूजा करतात. ते ज्यांना शक्य नसेल ते गोवर्धनाची प्रतिकृती करून त्याची पूजा करतात. धर्मसिंधूत त्या दिवशी 'आ गावो अग्मन्' या मंत्राने होम करण्याविषयी सांगितले आहे. पाहा– अन्नकूट. [हि. ध.]

गोवर्धन ब्राह्मण हे महाराष्ट्रात सर्वत्र आढळतात. यांना महाराष्ट्रातले पहिले ब्राह्मण समजतात. हे मूळचे उत्तरेकडील राहणारे; पण क्षत्रिय राजांबरोबर विंध्य पर्वत ओलांडून दक्षिणेत आले व इकडेच वसले. राजपुरोहित म्हणून पूर्वकाळापासून त्यांनी मान मिळविला आहे. सर्वप्रथम

यांची वसाहत झाली ती नासिकच्या परिसरात. त्या काळी त्या प्रदेशाला गोवर्धन म्हणत. त्या प्रदेशात वसले म्हणून त्यांनाही हेच नाव पडले. तिथून पुढे हे उत्तर कोकणात उतरले. तेव्हापासून गेली २३०० वर्षे हे अपरांतात अष्टाधिकारी आहेत. ऋक्, यजुस् आणि साम अशा तीन्ही वेदांचे लोक या समाजात आहेत. यांना संन्यास घ्यायचा झाला, तर तो जगन्नाथपुरीस जाऊन घ्यावा लागतो. [म. ज्ञा. को.; ब्रा. मि. वि.]

गोवर्धनाचार्य (१०७५–११२५ इ. स.) एक कवी. हा बंगालचा राजा लक्ष्मणसेन याच्या पदरी होता. याच्या बापाचे नाव नीलांबर असून, उदयन व बलभद्र असे त्याचे दोन शिष्य होते.

गीतगोविंदात जयदेवाने याची स्तुती केली आहे. याचा आर्यासप्तशती नावाचा एक शृंगारिक ग्रंथ असून, त्यात ७५६ आर्या आहेत. [म. ज्ञा. को.; हिं. क. को.]

गोवायाचा नाच कोकणातले एक नृत्य. यात प्रारंभी स्त्री-पुरुषांची एक जोडी हातात हात घालून नाचते. नंतर एकामागून एक अशा अनेक जोडचा त्यात सामील होतात. त्यामुळे एक लांब साखळी बनते. या नृत्याला तरापी या वाद्याची साथ असते. गोवाय म्हणजे गुंफणे किंवा साखळी बनवणे होय. [भा. लो. नृ.]

गोवारी एक जात. अहीर व गोंड यांच्यापासून बनलेली ही मिश्र जात असल्याचे सांगतात. या लोकांची वस्ती मुख्यत्वे विदर्भात आढळते. यांना घारे असेही म्हणतात. यांच्यांत गायगोवारी, हुंगामारिया, इ. पोटजाती आढळतात. त्यांपैकी गायगोवारींना श्रेष्ठ मानतात. पशुपक्षी, झाडे व इतर खाद्य पदार्थ यांवरून यांची कुलनामे बनलेली आहेत. गुरे चारणे व शेतकी हे यांचे प्रमुख व्यवसाय होत.

यांच्यांत गोंदण्याची चाल आहे. पुरुष आपल्या कपाळावर एक उभी रेष व स्त्रिया उजव्या हाताच्या कोपराखाली नागमोडी रेषा गोंदवून घेतात. बायकांच्या या गोंदण्याला सीतेचा हात म्हणतात.

कोडे कोडेवान हा यांचा प्रमुख देव आहे. विवाह, उत्सव, इ. प्रसंगी त्याची पूजा करतात. यांच्यांत जातपंचायत आहे. तिच्या प्रमुखाला शेंडया म्हणतात. [म. ज्ञा. को.]

गोविंददास (१) (इ. स. चे १६ वे शतक) एक चैतन्य संप्रदायी संत. हा बंगालमधल्या बरद्वान जिल्ह्यातील कांचनगडचा रहिवासी असून, जातीने लोहार होता. इ. स. १५०८ मध्ये संसाराला त्रासून तो घराबाहेर पडला आणि चैतन्यदेवाजवळ नोकर म्हणून राहिला. चैतन्याच्या दक्षिणेतील प्रवासाच्या वेळी हा त्याच्याबरोबर होता. त्या प्रवासातली हकीगत त्याने मोठ्या मार्मिक भाषेत लिहून ठेवली असून, तिच्यामुळे चैतन्याच्या जीवनावर बराच प्रकाश पडतो. त्याची शैली साधी व सरळ आहे. निसर्गाचे वर्णन तो सुरेख करतो. [हि. बें. लँ. लि.]

(२) (इ. स. चे १६ वे व १७ वे शतक) एक बंगाली कवी. हा चितागाँग जिल्ह्यातील देवग्रामचा रहिवासी असून, अत्रिगोत्री ब्राह्मण होता. बंगालीतले सर्वप्रथम काव्य याने रचले असून, विद्यासुंदर असे त्या काव्याचे नाव आहे. याशिवाय याने प्रेमविलास, भक्तिरत्नाकर, भक्तमाल, इ. ग्रंथही लिहिले आहेत. मुसलमानी संस्कृतीच्या प्रभावामुळे तत्कालीन इतर कवींच्या रचनेत जी ग्राम्यता आढळते, ती याच्या काव्यात मुळीच आढळत नाही. याची रचना संस्कृतप्रचुर व कलापूर्ण आहे. हा धार्मिक प्रवृत्तीचा कवी असून, याने वेदान्ताचाही अभ्यास केला होता. [हि. बें. लँ लि.]

गोविंददास कविराज एक बंगाली कवी. याने व्रजबुली भाषेत राधाकृष्णांच्या प्रीतीवर रसाळ गीते रचली आहेत. त्याच्या काव्यातील या रसमाधुर्यामुळेच त्याला बंगालच्या प्रथम श्रेणीच्या कवीत स्थान प्राप्त झाले आहे.

हा प्रथम शाक्त होता, असे म्हणतात. पण एका वैष्णव संताने त्याला जिवावरच्या दुखण्यातून रोगमुक्त केल्यामुळे तो वैष्णव बनला. पुढे त्याने श्रीनिवास आचार्य या प्रसिद्ध संताचे शिष्यत्व पत्करले. [हि. बें. लँ. लि.]

गोविंद दीक्षितर (इ. स. १५५४–१६२६) एक संगीतज्ञ आणि कवी. हा तंजाऊरच्या अच्युत आणि रघुनाथ या दोन नायक राजांच्या पदरी प्रधान होता. याला अय्यन असे दुसरेही एक नाव होते. हा कर्नाटकी ब्राह्मण होता. कावेरीच्या तीरावरील पट्टीश्वरम् हे याचे मूळ गाव होय. याच्या बायकोचे नाव नागंबा असे होते. त्या नागंबेचा याचा एक पुतळा पट्टीश्वरम्च्या देवळात आज पाहावयास मिळतो.

याने हरिवंशसारचरित्रम् नावाचा एक संस्कृत ग्रंथ दहा विभागांत लिहिला आहे. या ग्रंथावर त्याचा सन्मित्र अप्पय्य दीक्षित याने टीका लिहिली आहे. याने काही पदेही रचली

असून, ती संगीतसुधानिधी या ग्रंथात संकलित केलेली आहेत. याशिवाय त्याने वेदान्त, धर्म, शिल्प, संगीत, इ. शास्त्रांवरही ग्रंथरचना केली आहे.

याने चोव्वीस पडद्यांची वीणा तयार केली असून, तिला तंजोर वीणा असे म्हणतात. गोविंद दीक्षितर हा धार्मिक व परोपकारी ब्राह्मण होता. त्याने आपल्या या वृत्तीला अनुसरून अनेक यज्ञ केले, दाने दिली, तलाव खोदले, तिरुवायूर येथे संस्कृत विद्यालय काढले आणि कुंभकोणम् येथील महामखम् तलावाभोवती षोडश लिंगांची स्थापना केली. याने तंजाऊर येथे बांधलेला एकादशी अग्रहार आजही प्रसिद्ध आहे. चूडामणीने त्याला अद्वैत विद्याचार्य असे म्हटले आहे. [सं. शा.; डि. सा. इं. म्यु. म्यु.; म. च. को.]

गोविंदद्वादशी फाल्गुन शुद्ध द्वादशी. या दिवशी करायच्या व्रताचा विधी असा– एक वर्ष प्रत्येक महिन्याच्या शुद्ध द्वादशीला गाईंना अन्न देणे व स्वतः दूध, दही किंवा तूप यांनी मिश्रित अन्न मातीच्या भांड्यातून खाणे. या व्रतात मीठ वर्ज्य असते. या दिवशी पुष्य नक्षत्र असल्यास विशेष फल मानले आहे. [हि. ध.]

गोविंदनाथ महाराज (इ. स. चे १८ वे व १९ वे शतक) एक नाथपंथी सत्पुरुष. पेशवेदरबारातील सरदार देवांचा हा मुलगा. त्रिपुटीच्या गोपाळनाथांनी भगवतीला मांस-मदिरेचा नैवेद्य दाखविला, अशी पेशव्यांकडे तक्रार आली व त्या तक्रारीची चौकशी करण्यासाठी पेशव्यांनी देवांना त्रिपुटीला पाठवले. त्यांच्याबरोबर गोविंदनाथही गेला. देवांचे आगमन झालेले पाहून गोपाळनाथांनी देवीच्या पुढ्यातल्या मांस-मदिरेवर तीर्थ शिंपडले. तत्क्षणी त्या मांस-मदिरेचे दूध व जास्वंदीची फुले यांत रूपांतर झाले. गोविंदनाथाने हा चमत्कार पाहिला आणि त्याने गोपाळनाथाचा अनुग्रह घेतला.

नंतर गोविंदनाथाला घेऊन गोपाळनाथ त्रिस्थळी यात्रेला गेले. देवांनी आपल्या वडील मुलाला काशीक्षेत्री पाठवून गोविंदनाथाचे मन वळविण्याचा प्रयत्न केला; पण गोपाळनाथांनी सांगितले, की 'गोविंदनाथ प्रत्यक्ष विष्णूचा अंश आहे व तो नाथसंप्रदायाचा प्रचार करणार आहे.'

पुढे गोविंदनाथ अकोल्याजवळ भूस्सर येथे स्थायिक झाला. तिथे राहून त्याने नाथपंथाचा प्रसार केला. पुढे तो तपश्चर्येसाठी वऱ्हाणपुरला तापीतटाकी आला. तिथे त्याने स्वानंदी नावाचा ग्रंथ लिहिला. शिवाय ५०० अभंगही रचले. [पुरुषार्थ, मे १९६४]

गोविंद न्यायवागीश (इ. स. चे १७ वे शतक) एक श्रेष्ठ नैयायिक. याचा जन्म वासुदेव सार्वभौमाच्या कुलात झाला. रेवीच्या राघव नामक राजाचा हा आश्रित होता. याने आपल्या बापाचे नाव न्यायवाचस्पती असे दिले आहे. याने न्यायसंक्षेप, पदार्थखंडनव्याख्या व समासवाद हे तीन ग्रंथ लिहिले आहेत. [म. च. को.]

गोविंदपाद हा गौडपादाचार्यांचा शिष्य असून, शंकराचार्यांचा गुरू होता. याच्याविषयी विशेष माहिती उपलब्ध नाही. हा नर्मदातटनिवासी होता, एवढे शांकरदिग्विजयावरून कळते. हा महायोगी असून, अद्वैत संप्रदायाचा एक प्रमुख आचार्य होता. हा पतंजलीचा अवतार असल्याचीही आख्यायिका आहे. याने रसहृदयतंत्र नावाचा एक ग्रंथ लिहिला आहे. याची आणखीही काही ग्रंथरचना असावी; पण ती उपलब्ध नाही. [हिंदुत्व; शंकराचार्य]

गोविंद प्रभू (इ. स. ११८७ ते १२८७) महानुभाव पंथाचा संस्थापक चक्रधर याचा हा गुरू होय. ऋद्धपूरजवळ काटसर गावी अनंत नायक नावाच्या काण्व ब्राह्मणाच्या पोटी याचा जन्म झाला. याच्या आईचे नाव नेमाइसा. या दांपत्याची मुले जगत नसत. गोविंद प्रभू हा त्यांचा शेवटचा मुलगा. तो तरी जिवंत राहावा, म्हणून त्यांनी त्याचे नाव गुंडो असे ठेवले. पुढे मोठेपणी गुंडम प्रभू, गुंडम राऊळ गोविंद प्रभू, चिद्घन या नावांनी तो महानुभावी लोकांत प्रसिद्धी पावला.

लहानपणीच त्याच्या मातापित्यांचा मृत्यू झाला. त्यानंतर गुंडोच्या मामाने व मावशीने त्याचे पालन केले. गुंडो हा तल्लख बुद्धीचा होता. बालपणापासूनच त्याच्या बुद्धीची चमक दिसू लागली होती.

'गोसावियांसि दीसें ये तें आणिका मांसे नैये: गोसावियांसि मासें ये तें आणिका वरीखा नैयें:,' असे त्याच्याबद्दल त्याच्या चरित्रात म्हटले आहे. त्याला बुद्धीबरोबरच विरक्तीही लहानपणीच लाभली होती. तारुण्यातच द्वारकेला जाऊन त्याने संन्यास स्वीकारला व नंतर चांगदेव राऊळाकडून शक्तिस्वीकार केला. मग तो ऋद्धपूरला परत येऊन जीवोद्धरणाचे कार्य करीत राहिला.

महानुभावी लोक गोविंद प्रभूला ईश्वरी अवतार समजतात. त्याचे चरित्र अनेक चमत्कारांनी भरलेले आहे. एखाद्या घराला आग लागणार असली, तर किंवा कोणी मरणार असेल, तर त्या गोष्टींची सूचना गोविंद प्रभू आधीच देत असे. याशिवाय

मेलेल्यांना उठविणे, पर्जन्य बोलावणे, दुरून गाईचे दूध काढणे, मुक्याला वाचा देणे, इ. नानाविध चमत्कार त्याने केल्याचे त्याच्या चरित्रात सांगितले आहे.

गोविंद प्रभूची काही स्वभाववैशिट्ये उल्लेखनीय आहेत. 'आवो मेली जाय' ही शिवी त्याच्या तोंडी नेहमी असायची. एखादी गोष्ट मनासारखी झाली म्हणजे 'ऐया माझाः आता हो ए म्हणे' हा आनंदोद्‌गार त्याच्या मुखातून बाहेर पडायचा. इतरांना उगीच वेडावून दाखवणे, हातवारे करणे वगैरे सवयीही त्याला होत्या.

तो आमरण नैष्ठिक ब्रह्मचारी राहिला. सर्वांभूती समभाव हे त्याच्या आचरणाचे वैशिष्टय होते. म्हणूनच तो कोणत्याही जातीच्या घरी भोजन करी. अनाथ स्त्रियांना तर त्याचा फार मोठा आधार वाटे. त्याला उपजत विनोदबुद्धी होती. त्यामुळे आपल्या परिवारातील भक्त जनांना नावे ठेवणे त्याला फार आवडे.

महानुभावांच्या पंचकृष्णांपैकी हा एक मानला जातो. चक्रधराने महानुभाव संप्रदाय स्थापून त्याचा जो प्रचार केला, तो याने पाहिला व चक्रधरानंतर १३–१४ वर्षांनी आपला देह ठेवला. [म. च. को.; गो. प्र. च.]

गोविंदराज (इ. स. चे ११ वे शतक) एक धर्मशास्त्रकार. हा भट्टमाधवाचा मुलगा व नारायणाचा नातू होय. याने गंगातीरी वास्तव्य करून मनुस्मृतीचा अभ्यास केला आणि तीवर टीका लिहिली. ही टीका फार प्रसिद्ध असून, कुल्लूकाने तिचा वेळोवेळी उल्लेख केला आहे. याची बहुतेक धर्मशास्त्रविषयक मते मेधातिथीच्या मतांशी मिळतीजुळती आहेत. स्मृतिमंजरी हा याचा आणखी एक प्रसिद्ध ग्रंथ असून, त्याला धर्मशास्त्राचे आगर मानले जाते. [म. च. को.]

गोविंदरामायण हिंदी भाषेतील एक काव्य. शीखांचा दहावा गुरू गोविंदसिंघ याने हे रचले. हे काव्य स्वतंत्र नसून शीखांच्या दशमग्रंथांत अंतर्भूत आहे.

या रामायणाची रचना प्रामुख्याने वाल्मीकिरामायण, तुलसीदासाचे रामचरितमानस व केशवदासाची रामचंद्रिका या काव्यांवर आधारित आहे. गोविंदरामायणाच्या रचनेत अनेकविध छंदांचा वापर केलेला असून, त्यांतले काही छंद फार जुने आहेत.

राम हाच गोविंदरामायणाचा कथाविषय असला, तरी कवीने काव्यारंभी रघू, अज, इ. राजांची कथाही निवेदिली आहे. [भा. सा. सं. रे.]

गोविंदलीलामृत कृष्णदास कविराज याने लिहिलेले एक संस्कृत महाकाव्य. याचे २३ सर्ग असून, श्लोकसंख्या २५११ इतकी आहे. या काव्यात राधाकृष्णांच्या अष्टकालिक लीलांचे सूक्ष्मपणे वर्णन केलेले आहे. [सं. सा. इ.]

गोविंदशयन व्रत आषाढ शु. एकादशीला या व्रताचा प्रारंभ करतात. हे व्रत चार महिने करायचे असते. यात विष्णूची मूर्ती शय्येवर निजविली जाते. या तिथीपासून चार महिने (चातुर्मास्य) उपनयनादी संस्कार नूतनगृहप्रवेश, इ. मंगलकार्ये बंद ठेवतात. [हि. ध.]

गोविंद सामय्य एक तेलुगू कवी व भाषातज्ञ. चित्तूर जिल्ह्यातील कार्वेटनगर येथे हा वेंकट पेरुमाळ राजाच्या वेळी संस्थानविद्वान होता. हा नृत्यकलेतही पारंगत होता. याने पंचरत्नवर्ण नावाचे नामांकित नृत्यप्रकार रचले आहेत. याशिवाय याची काही पदे व जावळीही उपलब्ध आहेत. [डि. सा. इं. म्यु. म्यु.]

गोविंदसिंघ (१६६६ ते १७०८ इ. स.) शिखांचा दहावा व अखेरचा गुरू. याला भारताचा संतसैनिक अशी संज्ञा आहे. गुरू तेगबहादर हे याचे वडील व गुजरी ही माता होय. बिहार प्रांतातील पाटणा शहर ही गोविंदसिंघाची जन्मभूमी आहे. बालपणापासूनच याची बुद्धी तल्लख होती. सातव्या वर्षापासून याने निरनिराळ्या भाषांचे अध्ययन सुरू करून थोड्याच दिवसांत कित्येक पौराणिक ग्रंथ आत्मसात केले. वयाच्या सातव्या वर्षीच गोविंदसिंघाचे लग्न झाले. पुढे अवघ्या दोनच वर्षांनी औरंगजेबाने याच्या वडिलांचा वध केला. त्यामुळे शिखांचे गुरुपद आपोआप याच्याकडे आले.



गुरू गोविंदसिंघ

राष्ट्रीयत्व या एकाच ध्येयाने प्रेरित झालेला सुसंघटित, एकरसी व एकजिनसी असा समाज त्याला निर्माण करायचा होता. त्याच गोष्टीला त्याने प्राधान्य दिले. त्यासाठी त्याने धर्मदीक्षेचा एक नवाच प्रकार सुरू केला. खंडेदाअमृत (तलवारीच्या धारेचे पाणी) हे त्याचे नाव होय. ही दीक्षा घेतलेल्या शिखांना खालसा (परमेश्वराचे खास शिष्य) हे नाव देऊन त्या सर्वांना सिंघ हे उपनाम व पंच ककार धारण करायला लावले. केस, कंगवा, कच्छ (चड्डी), कडे (लोखंडी) आणि कृपाण हे ते पंच ककार होत.

गोविंदसिंघाच्या शिष्यांपैकी काही लोक त्याला ईश्वराचा अवतार मानीत. ही गोष्ट शीख धर्माच्या विरुद्ध होती. म्हणून गोविंदसिंघाने स्पष्ट शब्दात त्या प्रवृत्तीचा निषेध केला.

जो हमको परमेसर ऊचऱ्हे । त सब नरककुंडमे पऱ्हे ।।
माको दास तवानका जानो । यामें भेदना रंच पछानो
मैं हो परम पुरखखो दासा । देखन आयो जगत–तमाशा ।।
(विचित्र नाटक ६. २२. ३)

अर्थ– जे मला परमेश्वर म्हणतील ते सगळे नरककुंडात पडतील. मला त्याचा दासच समजा व यात मुळीच संशय बाळगू नका. मी प्रभूचा केवळ दासच असून, या जगाचा खेळ पाहण्यासाठी आलो आहे.

खालसापंथात सत्य आणि शुद्धता यांच्या जोडीने शौर्यालाही मानाचे स्थान दिले गेले आहे. त्यामुळे खालसा लोक कर्तव्यकठोर बनले. समाजाच्या खालच्या थरातले न्हावी, भंगी, इ. लोकही गोविंदसिंघाच्या प्रेरणेने कडवे योद्धे बनले. त्यांनी गोविंदसिंघाच्या नेतृत्वाखाली दिल्लीच्या मोगल सत्तेविरुद्ध चौदा लढाया लढून दाखविल्या. त्यातील बारा लढायांत त्यांनी बादशाही सेनेचा पराभव केला.

खालसा पंथाची निर्मिती करण्यात स्वार्थशून्य व अभिनव असे एक राष्ट्र उभे करणे, हा गोविंदसिंघाचा उद्देश होता. परंतु या उद्योगात शिवालिक पहाडातील हिंदू राजे व दिल्लीश्वर मोगल यांनी त्याला कडाडून प्रतिरोध केला. मोगलांच्या अफाट शत्रुबळाशी गोविंदसिंघाचा मुकाबला चालू होता. बाराव्या लढाईनंतर त्याला आनंदपुर हे ठिकाण सोडून व सतलज नदी पार करून खाली दक्षिणेत माळव्यात उतरावे लागले. त्याचे दोन पुत्र चमकीरच्या लढाईत मारले गेले. आणि गंगू नामक नोकराने केलेल्या विश्वासघातापायी दुसरी दोन धाकटी मुले, जोरावरसिंघ व फतेसिंघ, सरहिंद सुभेदाराच्या हुकमाने भिंतीत चिणून मारली गेली.

औरंगजेब वारल्यानंतर त्याचा मुलगा बहादुरशहा याची बाजू गोविंदसिंघाने उचलून धरली व त्याला दिल्लीची गादी मिळवून दिली. यास्तव बहादुरशहाने इ. स. १७०७ मध्ये जुलैच्या २३ तारखेस मोठा दरबार भरवून गोविंदसिंघाचा मोठा सन्मान केला. याच वेळी दक्षिणेत बहादुरशहाचा धाकटा भाऊ कामबक्ष याने बंड केले. ते बंड मोडण्यासाठी गोविंदसिंघास बरोबर घेऊन बहादुरशहा दक्षिणेत आला. नांदेड येथे त्याचा मुक्काम असताना तहाच्या वाटाघाटी पुऱ्या होण्याच्या आतच सरहिंद नबाबाच्या एका हस्तकाने अचानक हल्ला करून गोविंदसिंघाला ठार मारले. इ. स. १७०८ मध्ये ऑक्टोबरच्या ७ तारखेस त्याचा अशा प्रकारे अंत झाला.

गोविंदसिंघ हा अष्टपैलू विद्वान होता. त्याची लेखनपद्धती जोरदार व ओघवती होती. कमरेला तलवार लटकावून, हाताशी धनुष्यबाण तयार ठेवून, आपल्या सैनिकांना रणादेश देत असताना रणभूमीवरच तो काव्य रचीत असे. उत्तर हिंदुस्थानात त्या वेळी चालू असणाऱ्या फारसी, पंजाबी व व्रज या तीन्ही भाषांत तो काव्ये करी. एकेश्वरी मताचा सिद्धान्त आणि श्रद्धा यांचे प्रतिपादन करणारी व परमेश्वराच्या स्तुतीची अनेक कवने त्याने लिहिली आहेत. त्याने बरेच धार्मिक वाङ्मय अनुवादित केले आणि 'विचित्र नाटक' नामक आत्मचरित्रही लिहिले आहे. 'दशमग्रंथ' या नावाचे, मोठ्या आकाराची सुमारे तेराशे पृष्ठे भरतील एवढे त्याचे वाङ्मय आहे. करतार व करीम, मंदिर आणि मस्जिद, पूजा व नमाज यांतला फरक केवळ बाह्य असून, या सर्वांची आंतरिक धारणा एकच आहे, हे त्याच्या खालील पद्यावरून सहज समजून येते –

देहुरा मसीद सोइ, पूजा औ निवाज ओई ।
मानस सबै एक, पै अनेक को भ्रमाउ है ।।
देवता अदेव जच्छ गंधर्व तुरक हिंदू ।
न्यारे न्यारे देसन के भेस को प्रमाउ हैं ।।
एकै नैम, एकै कान, एकै दह, एकै बान ।
खाक बाद आतश औ आब को रलाउ है ।।
अलख अभेख सोइ पुराण औ कुरान ओई ।
एकही सरूप सबै एकही बनाउ हैं ।।

अर्थ – जे मंदिर तीच मशीद होय. पूजा म्हणजेच नमाज होय. मन हे सर्वत्र एकच आहे. पण त्यावरील संस्कार मात्र भिन्न आहेत. देव, राक्षस, यक्ष, गंधर्व, मुसलमान व हिंदू हे वरवर निरनिराळे असले, तरी तो त्यांच्या त्यांच्या देशातील वेषाचा परिणाम आहे. सर्वांचे नयन, सर्वांचे कान, सर्वांचे देह, सर्वांची वाणी हे सर्व एकच आहे. पृथ्वी, वायू, अग्नी, जल, इ. पंचमहाभूतांचा हा मेळ आहे. जो हिंदूंचा अलक्ष्य तोच मुसलमानांचा अभेख आहे. जे पुराण तेच कुराण आहे. सर्वांचे स्वरूप एकच असून, सर्व निर्मिती एकच आहे.

गोविंदसिंघाच्या कर्तृत्वाचे सार थोडक्यात पुढीलप्रमाणे सांगता येईल – त्याने शीखांमध्ये राजकीय जागृती निर्माण केली. राष्ट्रीयत्वाच्या दृढ बंधनाने त्यांना एकत्र बांधले. सामान्य शेतकरी-कामकऱ्यांच्या वर्गातून स्वधर्म व स्वदेश यांच्यासाठी सर्वस्व अर्पण करणाऱ्या अगणित वीरांची परंपरा त्याने निर्माण केली. पाहा – खालसा. [शी. स्फू. इ.; सि. इ.; शी. गु.; भारती; उ. भा. सं. प.; शी. लो. सं. इ.]

गोविंदस्वामी (१५०५–१५८५ इ. स.) पुष्टिसंप्रदायातील एक संत व अष्टछाप कवींपैकी एक. भरतपूर राज्यातील आंतरीगाव हे याचे जन्मठिकाण होय. हा जातीने सनाढ्य ब्राह्मण होता. याच्या घराण्याबद्दल फारशी माहिती उपलब्ध नाही. पण तो विवाहित असून, त्याला एक मुलगी होती, एवढी माहिती मिळते. काही दिवसांनी याला संसाराविषयी उपरती झाली व म्हणून तो भजन-कीर्तनात कालक्रमणा करू लागला.

गोविंदस्वामीचे लौकिक शिक्षण फारसे झालेले नव्हते; पण त्याने संगीतशास्त्राचा सखोल अभ्यास केला होता. उत्तम गायक व कवी म्हणूनही त्याची सर्वत्र ख्याती होती. तानसेन हा गायक गोविंदस्वामीकडे गायनकलेचे धडे घेण्यासाठी येत असल्याची माहिती उपलब्ध झाली आहे. विठ्ठलनाथ या आपल्या गुरूच्या निधनाची वार्ता ऐकून याने शोकाच्या भरात आत्महत्या केली, असे सांगतात.

विठ्ठलनाथाचे शिष्यत्व पत्करल्यावर गोविंदस्वामी पुष्टिसंप्रदायाचा अनुयायी बनला व गोविंदस्वामीचा गोविंददास बनला. नंतर गोविंददासाने आपले उर्वरित आयुष्य गोवर्धन येथे नाथजीच्या सेवेत वेचले. आजही गोवर्धननजिक गोविंददासाचा निवास म्हणून एक जागा दाखवतात.

गोविंदस्वामीचा कोणताही ग्रंथ उपलब्ध नाही. कीर्तनाच्या प्रसंगी केलेली स्फुट काव्ये हीच त्याची काव्यसंपदा होय. अशा तऱ्हेची ६०० पदे उपलब्ध झाली आहेत. परंतु त्यांतील काहीच पदे पुष्टिसंप्रदायात विशेष प्रसिद्ध आहेत. श्रीकृष्णाच्या बाललीला व शृंगारलीला वर्णन करणे, हे त्याच्या काव्याचे विषय होत. त्याच्या काव्याचा एक नमुना असा–

प्रातसमय उठि जसोमिति, दधिमंथन कीन्हो ।
प्रेम सहित नवनीत लै, सुत के मुख दीन्हो ।।
औंटि दूध धैया कियो, हरि रुचिसों लीन्हो ।
मधु मेवा पकवान लै, हरि आगे कीन्हो ।।
इहि विधिवित क्रीडा करें, जननी सुख पावै ।
'गोविंद' प्रभु आनंद सो, आनंद में धावै ।।

भावार्थ – प्रात:काळी उठून यशोदेने दधिमंथन केले. त्यातला लोण्याचा गोळा काढून अत्यंत प्रेमाने मुलाच्या मुखवटीत घातला. कृष्णाच्या आवडीप्रमाणे दूध आटवले व मधुर मेवा-मिठाईसह ते त्याच्या पुढे ठेवले. अशा प्रकारे कृष्ण रोज क्रीडा करी व ती पाहून यशोदेला सुख होई. कवी गोविंद म्हणतो, प्रभूला असे आनंदी पाहून मन आनंदाने धावू लागते.

त्याची रचना भावपूर्ण व लालित्यमय अशी आहे. [भा. सं.; हिं. सा. को. २; अ. प.]

गोविंदानंद (१) एक वेदान्ताचार्य. याला गोविंद असेही म्हणतात. शंकराचार्यांच्या शारीरभाष्यावर याने रत्नप्रभा नावाची एक टीका लिहिली आहे. त्या ग्रंथात याने आपली गुरुपरंपरा शिवराम गोपाळ → सरस्वती → गोविंदानंद, अशी दिली आहे.

(२) (इ. स. १५००–१५४०) एक धर्मशास्त्रज्ञ. बंगालमधील बाग्री या गावी राहणाऱ्या गणपतिभट्टाचा हा पुत्र होय. हा आपणास कवी कंकणाचार्य म्हणत असे. हा वैष्णव असावा.

याने धर्मशास्त्रावर बरेच ग्रंथ लिहिले आहेत. त्यांपैकी दानकौमुदी, शुद्धिकौमुदी, श्राद्धकौमुदी व वर्षकृत्यकौमुदी हे चार ग्रंथ छापले गेले आहेत. वर्षकृत्यकौमुदीत तिथिनिर्णय, व्रत, उत्सव, इ. विषयांचे विवरण आहे. शुद्धिदीपिका नामक ग्रंथावर अर्थकौमुदी आणि शूलपाणीच्या प्रायश्चित्तविवेकावर तत्त्वार्थकौमुदी अशा दोन टीकाही याने लिहिल्या आहेत. [म. च. को.; हिंदुत्व]

गोविंदामात्य पोलुरी (इ. स. चे १७ वे शतक) एक तेलुगू कवी. हा चित्तूर प्रांतातील कत्तमर्ही येथील राहणारा होता. याने रागतालचिंतामणी नावाचा ग्रंथ लिहिला आहे. हा ग्रंथ तेलूगू भाषेत असून त्यामध्ये नादाची उत्पत्ती, नाट्यवेद, दृश्यवेद, श्राव्यवेद, देशी रागांची उत्पत्ती, ७ स्वर, २२ श्रुती, ३ ग्राम, १४ मूर्च्छना, २० मेल राग, नव्य राग, इ. विषयांसंबंधी विस्तृत चर्चा केलेली आहे. [डि. सा. इं. म्यु. म्यु.]

गोव्रातिक एक प्राचीन पंथ. या पंथाचे लोक आपल्या डोक्याला बैलाची शिंगे व पाठीमागे शेपूट लावून गुरांच्या कळपात त्यांच्याबरोबर गवत खात हिंडत. यांना गम्यागम्य, भक्ष्याभक्ष्य, इ. विधिनिषेध नसत, असे मत्स्यपुराणात सांगितले आहे. [प्रा. भा. लो.]

गोशतदान वस्त्रालंकारांनी विभूषित अशा शंभर गायींचे दान. याचा विधी असा–

प्रथम त्रिशूलधारी शिवाची सुवर्णप्रतिमा करून तिची सोळा शेर मिठाच्या राशीवर स्थापना करतात. त्या मूर्तीजवळ शंभर गायी उभ्या करतात. तेवढ्या गायी मिळणे किंवा दान देणे अशक्य असल्यास एक गाय-बैल व शंभर गायींसाठी शंभर रौप्य मुद्रा त्या शिवमूर्तीच्या भोवती ठेवतात. मग शिवाची व त्या गायी-बैलांची पूजा करतात. त्यांना पुष्पांजली वाहताना पुढील मंत्र म्हणतात –

गावो ममाग्रतः सन्तु गावो मे सन्तु पृष्ठतः ।
गावः शिरसि मे नित्यं गवां मध्ये वसाम्यहम् ॥
यस्मात्त्वं वृषरूपेण धर्म एव सनातनः ।
अष्टमूर्तिरधिष्ठानमतः पाहि सनातन ॥

अर्थ– गायी माझ्या पुढे राहोत. गायी माझ्या मागे राहोत. गायी माझ्या शिरोभागी नित्य राहोत. मी गायींच्या मध्ये राहीन. (हे वृषभा) तू वृषभरूपाने सनातन धर्मच आहेस. तू अष्टमूर्ती शिवाचे अधिष्ठान आहेस. म्हणून हे सनातना, तू माझे रक्षण कर.

मग मिठाच्या राशीसह त्या सर्व वस्तूंचे ब्राह्मणांना दान देतात. एवढा सर्व पूजाविधी करणे शक्य नसल्यास गोशतदानाचा संकल्प करून गोशतमूल्य अर्थात शंभर रौप्यमुद्रा निरनिराळ्या ब्राह्मणांना दान देतात व कर्म समाप्त करतात. [व्रतराज]

गोशांती गोठ्यातील गाई-बैलांना व्याधी उत्पन्न झाली असता तिच्या निवारणासाठी शांती करावी, असे सांगितले आहे. या शांतीचा विधी असा–

गोठ्यात वेदी तयार करून तिच्यावर देवता स्थापना करतात. देवतांच्या पुढे पूर्णकुंभ ठेवतात. त्या देवतांना मत्स्य, मांस, तिळाचे पिंड, इ. पदार्थ अर्पण करतात. नंतर रुई, औदुंबर, इ. समिधांनी देवतांचे हवन करतात. रुद्राची पूजा करून त्याची स्तुती करतात. मग जलाचे अभिमंत्रण करून त्याने गायी-वासरांना प्रोक्षण करतात. [शां. क.]

गोशाल महावीराचा एक प्रतिस्पर्धी. पाहा– मंखली गोशाल.

गोषूक्ती काण्वायन कण्वकुलातला एक सूक्तद्रष्टा. ऋग्वेदाच्या ८ व्या मंडलातील १३ व १४ ही सूक्ते याच्या नावावर आहेत. याने त्यात सृष्टीचा कर्ता व नियंता या नात्यांनी इंद्राची प्रशंसा केली आहे. इंद्राने वल नामक असुराला ठार मारले, सर्वत्र वावरणाऱ्या अधार्मिक जमातींचा नायनाट केला, नमुचो राक्षसाचे मस्तक उडवले व गुहेत दडवलेल्या धेनू अंगिरा ऋषींसाठी वर आणल्या, अशी कथाबीजे वरील सूक्तात आली आहेत. त्याची नक्षत्रविषयक एक ऋचा अशी –

इन्द्रेण रोचना दिवो दृळ्हानि दृंहितानि च ।
स्थिराणि न पराणुदे ॥

(ऋ. ८. १४. ९)

अर्थ– ही जी आकाशात तेजस्वी व ठसठशीत नक्षत्रे खच्चून भरलेली दिसतात, ती आपापल्या जागी इंद्रानेच स्थिर केली आहेत. ती कोणालाही हालवता येणार नाहीत.

गोष्ठाष्टमी कार्तिक शु. अष्टमीचे नाव. हिला गोपाष्टमी असेही म्हणतात. या व्रताविषयी पद्म पुराणात सांगितले आहे, ते असे–

शुक्लाष्टमी कार्तिके तु स्मृता गोपाष्टमी बुधैः ।
तद्दिने वासुदेवोऽभूद् गोपः पूर्वं तु वत्सपः ॥

अर्थ– विद्वान लोक कार्तिक शु. अष्टमीला गोपाष्टमी असे म्हणतात. त्या दिवसापासून कृष्ण हा गोप अर्थात गाई चारणारा बनला. त्यापूर्वी तो वासरे चारीत होता.

या दिवशी गाईंची पूजा करतात. त्यांना चारा घालून प्रदक्षिणा घालतात. मनकामना पूर्ण व्हाव्या अशी इच्छा असल्यास गाईच्या मागोमाग रानात जातात. [श. क.; हि. ध.]

गोष्ठीश्राद्ध एक श्राद्ध. श्राद्धाविषयी चर्चा होत असताना एकाएकी स्फूर्ती होऊन केलेले श्राद्ध किंवा तीर्थाच्या ठिकाणी विद्वानांनी एकत्र मिळून केलेले श्राद्ध, म्हणजे गोष्ठीश्राद्ध होय. [हि. ध.]

गोष्ठीसभा प्राचीन भारतातील आधुनिक क्लबासारख एक सभा. प्राचीन काळी गोष्ठी हे लोकांचे मनोरंजनाचे एक साधन होते. शंकराने गोष्ठीची व्याख्या दिली आहे, ती अशी– ‘समानविद्यावित्तशीलबुद्धिवयसामनुरूपैरालापैरेकत्रासनबन्धो गोष्ठी ’=विद्या, संपत्ती, शील, बुद्धी व वय यांत समान असलेले लोक एकत्र जमून ज्या गप्पागोष्ठी करतात, त्या प्रकाराला गोष्ठी असे नाव आहे. वात्स्यायनाने गोष्ठींचे चांगला व वाईट असे दोन प्रकार सांगितले आहे. वाईट गोष्ठींत जुगार व परहिंसात्मक प्रकार चालतात. चांगल्या गोष्ठींत खेळ आणि बुद्धिप्रधान मनोरंजन यांना प्राधान्य असते.

गोष्ठींचे पदगोष्ठी, जल्पगोष्ठी, काव्यगोष्ठी, गीतगोष्ठी,

नृत्यगोष्ठी, वाद्यगोष्ठी, वीणागोष्ठी, इ. प्रकार सांगितले आहेत. प्राचीन काळी गीत, वाद्य, चित्र, इ. कला, काव्य व कथा असे गोष्ठींचे विषय असत. यांपैकी पदगोष्ठी व काव्यगोष्ठी यांमध्ये काव्यप्रबंधांची रचना चाले. जल्पगोष्ठीत आख्यान, आख्यायिका, इतिहास-पुराणातील गोष्टी सांगितल्या जात; त्याचप्रमाणे साहित्य, कला, नृत्य, गीत, इ. विषयांवर वाद-विवाद होत. सामान्यपणे असल्या बैठकी गणिकेच्या किंवा श्रीमंत नागरिकांच्या घरी किंवा सभामंडपात भरत. सभेच्या अध्यक्षाला गोष्ठीपती असे म्हणत. गुणी कलाकार व साहित्य-सेवक यांना अशा सभांतून पारितोषिके दिली जात. [प्रा. भा. म.; ह. च. सां. अ.]

गोसव सोमयागाचा एक प्रकार. ज्या यज्ञांमध्ये यजमानाला अभिषेक केला जातो, त्यांना सव असे म्हटले आहे. गोसवामध्ये यजमानास गाईच्या दुधाने अभिषेक करायचा असतो. गोसव हा एकाह असून त्याचे अनुष्ठान उक्थ्य या सोमयागाप्रमाणे होत असते. गोसवामध्ये काही विशेष गोष्टी सांगितल्या आहेत, त्या अशा –

यज्ञांतील माध्यंदिनसवनामध्ये कण्वरथन्तर आणि वृहद् ही दोन सामे गाइलीच पाहिजेत, असे तैत्तिरीय ब्राह्मणात सांगितले आहे (२. ७. ६). वृहत्साम गाइले जात असता यजमानाला आहवनीयाग्नीच्या दक्षिणेस बसवून त्याला गाईच्या धारोष्ण दुधाने अभिषेक करायला सांगितले आहे. या यज्ञात जी पंधरा स्तोत्रे म्हणजेच सामे गाईली जातात, त्या सर्वांमध्ये षट्त्रिंशत्स्तोम असला पाहिजे, असे तांडय ब्राह्मणात सांगितले आहे (१९. १३. १०). षट्त्रिंशत्स्तोम याला पशुस्तोम असे म्हटले असल्यामुळे गोसवाचे पशुसमृद्धी हे एक फल असावे, असे दिसते. गोसवाने यजमानाला स्वराज्यप्राप्ती होते, असे म्हटले आहे. या यज्ञात दहा हजार गायी दक्षिणा म्हणून द्यायच्या असतात. या यज्ञात गाईच्या हननाचा विधी कुठेही सांगितलेला दिसत नाही. न कळत ब्रह्महत्या घडली असता प्रायश्चित्त म्हणून गोसव करावा, असे मनूने सांगितले आहे –

यजेत वाश्वमेधेन स्वर्जिता गोसवेन वा ।
अभिजिद्विश्वजिद्भ्यां वा त्रिवृताग्निष्टुतापि वा ॥
(मनु. ११.७४)

अर्थ–(ब्रह्महत्या घडली असता) अश्वमेध करावा किंवा स्वर्जित, गोसव, अभिजित, विश्वजित किंवा त्रिवृदग्निष्टोम यांपैकी एखादा सोमयाग करावा.

गोसव केल्यानंतर एक वर्षभर किंवा निदान बारा दिवस तरी गाईप्रमाणे वागावे, गाय जे भक्षण करील ते भक्षण करावे व गाईप्रमाणे स्वच्छंद आचरण करावे, असे सांगितले आहे.

गोसहस्र एक महादान. दाता प्रथम तीन किंवा एक दिवस केवळ दुधावर राहतो. त्यानंतर लोकपालांचे आवाहन, पुण्याहवाचन, होम, इ. कृत्ये केल्यावर एक बैल एका वेदीवर उभा करतात आणि त्याला सुवासिक उटणी लावतात. हजारांतल्या दहा गायी निवडून त्यांच्या अंगावर झुली आणि शिंगांना व खुरांना सोन्याच्या टोप्या घालतात. मग मंडपात आणून त्यांची पूजा करतात. नंदिकेश्वराची एक सुवर्णप्रतिमा करून तिलाही शृंगारतात. मग दहा गायींच्या मधे त्या प्रतिमेची स्थापना करतात. त्यानंतर सर्वौषधींनी युक्त अशा जलाने दाता स्नान करतो आणि दोन गायींसह नंदिकेश्वराची प्रतिमा आचार्याला दान देतो. नंतर प्रत्येक पुरोहिताला एकेक आणि इतर निमंत्रित ब्राह्मणांना पात्र, दहा अशा संख्येने अन्य गायी दान देतो. त्यानंतर दाता पुनश्च एक दिवस दुधावर राहतो. दानफल– शिवलोकप्राप्ती व पितरांचा उद्धार. [हि. ध.]

गोसाईदास (१६७०–१७७६ इ. स.) एक हिंदी भक्त-कवी. याच्या वडिलांचे नाव ब्रह्मानंद व आईचे सुमित्रादेवी होते. गोसाईदासाच्या लहानपणीच त्याचे वडील वारले. यामुळे उदरनिर्वाहासाठी त्याला आपले गाव सोडावे लागले. जगजीवन नामक साधूच्या सहवासामुळे हा भक्तिमार्गी बनला व कविताही करू लागला. शब्दावली, दोहावली व कहरा या नावांची याची काव्ये प्रसिद्ध आहेत. [उ. भा. सं. प.]

गोसावी गोसावी, गोसाई, गुसाई, गोस्वामी ही सर्व नावे गोस्वामिन् या संस्कृत शब्दावरून निघाली आहेत. गोस्वामी या शब्दाचे दोन अर्थ सांगितले आहेत– (१) गो = गोधन, त्याचा मालक व (२) गो = इंद्रिये, त्यांचा स्वामी, अर्थात जितेंद्रिय मनुष्य. गोसावी हा शब्द इथे दुसऱ्या अर्थाने घेतलेला आहे. गोसावी हा एक यतींचा वर्ग असून, भारतात त्यांची संख्या बरीच मोठी आहे. महाराष्ट्र, मध्य प्रदेश, राजस्थान, आसाम व बंगाल या भागांत त्यांची वस्ती बरीच आहे. शैवपंथी आणि वैष्णवपंथी असे यांचे दोन प्रमुख वर्ग आहेत.

गोसावी ही संस्था बरीच प्राचीन आहे. गोसाव्यांची परंपरा वैदिक काळापर्यंत मागे जाते. गोस्वामी हा शब्द वैदिक वाङ्मयात अनेक वेळा आलेला आहे. मात्र तिथे गोस्वामी शब्दाचा अर्थ पुष्कळ गाई जवळ असणारा, असा आहे.

पंचविंश ब्राह्मणात सांगितले आहे, की इंद्राने वृहद्गिरी

आणखी दोन यती यांचे रक्षण करून त्यांना ब्राह्मण, क्षत्रिय व वैश्य यांच्या विद्या शिकवल्या.

ब्रह्मदेवाची पत्नी सुरभी ही गोरूप धारण करून धर्माची सेवा करीत होती. गिरी, पर्वत व अरण्य अशी तिच्या पुत्रांची नावे होती, असे हरिवंश सांगतो.

गोसाव्यांचा आणि अग्नी, गो, रुद्र, सविता, नारायण इ. वैदिक देवता, तसेच मंत्रतंत्र आणि औषधी यांचा अत्यंत निकट संबंध आहे. या संबंधातच त्यांच्या प्राचीन इतिहासाचा धागा सापडतो.

अंगिरस हे आर्यांचे पहिले ऋत्विज होते. ते स्मृतिकार व ज्योतिषी होते. या अंगिरसांनीच अथर्ववेदाचा बराच मोठा भाग निर्माण केला. अंगिरसकुल, भृगुकुल, यतिकुल व गिरी, पुरी व दसनाम गोसावी यांचा धागादोरा असल्याचे कळून येते.

यती ही आर्यांतील एक प्राचीन जमात होती. हे लोक यज्ञधर्मी होते. यांच्यापैकी अग्नितापस हा सूक्तद्रष्टा असून, दत्ततापस हा सर्पसत्रातील होत्यांपैकी एक होता. ऋग्वेदकाली यती व मुनी यांचा ओढा आत्मज्ञानाकडे नसून तो वैद्यकशास्त्राकडे होता, असे दिसते.



गोसावी

प्राचीन काली यती व संन्यास यांचा अपरिहार्य संबंध मुळीच नव्हता. तो पुढे जोडला गेला. यती, परिव्राजक, श्रमण तापस व संन्यासी हे सर्वच शब्द पुढे संन्यासी या शब्दाचे वाचक बनले.

गोसाव्यांच्या पूर्वपरंपरेत वसिष्ठ, शक्ती, पराशर, व्यास, भरद्वाज, गौतम, भृगू, गर्ग, जनक, शुक, इ. नावे येतात. यांच्यापैकी बहुतेक विवाहित अर्थात गृहस्थ होते.

दक्षप्रजापती व शंकर हेही गृहस्थच होते. दक्षप्रजापतीचे उपनाव पर्वत असे असून, तो महातपस्वी होता. त्याची पत्नी असिक्नी हीसुद्धा महातपस्विनी होती. दक्षाचे पुत्र प्रजावृद्धीसाठी तप करीत असता ‘ॐ नमो नारायणाय पुरुषाय महात्मने विशुद्धसत्त्वधीष्णाय महाहंसाय धीमही’ हा मंत्र जपत होते. गोसावी समाज आजही नारायणाची पूजा करीत असून, याच मंत्राचा जप करीत असतो. या दक्षपुत्रांना नारदाने दोन वेळा निवृत्तिमार्गाकडे वळविले. तेव्हा त्यांनी नारदाला ‘तू आजन्म संन्यासी राहशील,’ असा शाप दिला. पुढे ते नारदाला म्हणाले, की आम्हा गृहस्थ साधूंचे तू एकवेळ अप्रिय केलेस ते आम्ही सोसले; पण पुन्हा तू आमचे अकल्याण केलेस, हे योग्य केले नाहीस. योगिराज दत्तात्रेय याला पत्नी होती व निमी नावाचा पुत्रही होता, असे महाभारतात सांगितले आहे. यावरून गृहस्थ साधूंची परंपरा अत्यंत प्राचीन आहे, हे कळून येईल.

महाभारताच्या काळातही विरक्त लोकांत गृहस्थ साधू व संन्यासी असे भेद होतेच. त्या वेळच्या संन्याशांचे कुटीचक, बहूदक, हंस व परमहंस असे चार प्रकार होते. कुटीचक हे गावाच्या जवळच पर्णकुटी उभारून राहत. ते शिखा ठेवीत व जानवेही घालीत. त्यांच्यापैकी काही आपल्या मुलाच्या घरीही राहत. ते वेदाभ्यास करीत. मनूने या कुटीचकांना कर्मयोगी असेच म्हटले आहे. धन–दारांविषयी पूर्ण वैराग्य प्राप्त झाले नसेल, तर कुटीचकच राहावे, असा त्या वेळचा निर्बंध होता.

सिद्ध तापसांचेही स्वैरी व दारविहारी असे दोन प्रकार होते. स्वैरी हे मुंडण करून भगवी वस्त्रे धारण करीत व स्वैर संचार करीत. दारविहारी घर करून राहत. दोघेही त्रिकाल स्नानसंध्या व होमहवन करीत. दारविहारी तापसांनी इंद्रियमदन करून फक्त स्वस्त्रीच्या ठिकाणी रत व्हावे, असा नियम होता. दारविहारी या शब्दावरूनच हल्लीचा घरबारी हा शब्द निघाला असावा.

रामायणकाळीही अनेक तापसी होते व त्यांतले काही गृहस्थही होते. त्या काळातील तापसांचे मुंडी, दंडी व परिव्राजक असे भेद होते.

बौद्ध ग्रंथांत ब्राह्मण यतींचे मुंडशावक, जटीलक, तेदंडिक (त्रिदंडी) व देवधामिक असे भेद दिलेले आहेत.

शिकंदराने भारतावर स्वारी केली, त्या वेळी पंजाबमध्ये गोसाव्यांचे एक लहानसे राज्य होते. तक्षशिलेजवळ काही नग्न साधू राहत होते व त्यांच्यापैकी कल्याण नावाचा एक साधू शिकंदराबरोबर इराणात गेला होता, अशी आख्यायिका मिळते.

मेगॅस्थेनीसने इथल्या यतिमुनींविषयी लिहून ठेवले आहे, ते

असे– भारत देशात संन्यासी लोकांना फार मान आहे. हे सर्व ब्राह्मण आहेत. त्यांच्यापैकी कित्येक नग्न असतात व ते अरण्यात राहतात. कित्येक जटा वाढवून नगराजवळ राहतात व प्रवचने करतात. कित्येक घरेदारे करून राहतात. हे लोकांचे पौरोहित्य करतात, भविष्य सांगतात व धर्मार्थ औषधेही देतात. त्यांच्यापैकी कित्येक हठयोगी आहेत.

इतिहासकार स्ट्रॅबो संन्यासी लोकांविषयी लिहितो, ते असे– जे नग्न संन्यासी असतात, ते गिरिकंदरात राहतात व घरबारी असलेले गावात राहतात. यांची दाढी लांब असते व डोक्यावरील केसही वाढलेले असतात. ते रेशमी फेटा बांधतात. नग्न साधूंचे इंद्रियमदन प्रशंसनीय असून, तरुण स्त्रिया निःशंकपणे त्यांच्या संनिध राहू शकतात. हे सर्व संन्यासी ब्राह्मण आहेत.

शंकराचार्यांच्या काळी जे गोसावी त्यांचे अनुयायी झाले, त्यांना स्त्रीपुत्रादी परिवार होता. कल्हणाने राजतरंगिणीत सांगितले आहे, की आचार्यांनंतर शंभर-दीडशे वर्षांनी वैदिक यतींचा पुत्रकलत्रादी परिवार वाढू लागला.

गोसाव्यांत तीर्थ, आश्रम, वन, अरण्य, गिरी, पर्वत, सागर, सरस्वती, भारती व पुरी अशी दहा उपनामे आहेत. ही नावे कशी पडली, ते मठाम्नायात सांगितले आहे–

त्रिवेणीसङ्गमे तीर्थे तत्त्वमस्यादिलक्षणे ।
स्नायात्तत्त्वार्थभावेन तीर्थनामा स उच्यते ॥

अर्थ – 'तत्त्वमसि' या महावाक्यात तीन पदे आहेत. ते जणू त्रिवेणी संगमाचे तीर्थ. त्यात तत्त्वार्थभावाने जो स्नान करतो (तल्लीन होतो), त्याला तीर्थ म्हणतात.

आश्रमग्रहणे प्रौढ आशापाशविवर्जितः ।
यातायातविनिर्मुक्त एष आश्रम उच्यते ॥

अर्थ – आसक्ती नष्ट झालेला, प्रौढ, यातायातीपासून मुक्त आणि आश्रमात राहणारा जो (गोसावी) त्याला आश्रम असे म्हणतात.

अरण्ये संस्थितो नित्यमानन्दे नन्दने वने ।
त्यक्त्वा सर्वमिदं विश्वमरण्यः परिकीर्त्यते ॥

अर्थ – सर्व जगाचा त्याग करून जो अरण्यात अर्थात नित्यानंदयुक्त नंदनवनात राहतो, त्याला अरण्य अशी संज्ञा आहे.

सुरम्ये निर्झरस्थाने वने वासं करोति यः ।
आशाबन्धविनिर्मुक्तो वननामा स उच्यते ॥

अर्थ – आशाविरहित होऊन वनात रम्य अशा झऱ्याच्या काठी जो वास करतो, त्याला वन असे म्हणतात.

वासो गिरिवने नित्यं गीताध्ययनतत्परः ।
गम्भीराचलबुद्धिश्च गिरिनामा स उच्यते ॥

अर्थ – गिरिकंदरात नित्य वास करणारा, गीतेचे अध्ययन करण्यात तत्पर, गंभीर आणि जो स्थिरबुद्धी असतो, त्याला गिरी म्हणतात.

वसन्पर्वतमूलेषु प्रौढं ज्ञानं बिभर्ति यः ।
सारासारं विजानाति पर्वतः परिकीर्त्यते ॥

अर्थ – पर्वताच्या पायथ्याशी राहणारा, श्रेष्ठ ज्ञानी, सारासार विवेक जाणणारा, तो पर्वत होय.

तत्त्वसागरगम्भीरो ज्ञानरत्नपरिग्रहः ।
मर्यादां नैव लङ्घेत सागरः परिकीर्त्यते ॥

अर्थ –सागराप्रमाणे तत्त्वज्ञानात गंभीर, ज्ञानरत्नांचा साठ, धर्ममर्यादा न ओलांडणारा, तो सागर म्हटला जातो.

स्वरज्ञानरतो नित्यं स्वरवादी कवीश्वरः ।
संसारसागरासारहन्ताऽसौ हि सरस्वती ॥

अर्थ – नित्य स्वरज्ञानात निरत, स्वरवादी (स्वरज्ञाना निपुण), कवीश्वर व संसारसागराच्या धाराप्रवाहाचे हन करणारा, तो सरस्वती होय.

विद्याभारेण सम्पूर्णः सर्वभारं परित्यजन् ।
दुःखभारं न जानाति भारती परिकीर्त्यते ॥

अर्थ – संसारातील सर्व भार टाकून देऊन फक्त विद्ये भार वाळगणारा व ज्याला दुःखाचा भार माहीत नाही, अ यती भारती म्हटला जातो.

ज्ञानतत्त्वेन सम्पूर्णः पूर्णतत्त्वपदे स्थितः ।
परब्रह्मरतो नित्यं पुरीनामा स उच्यते ॥

अर्थ – ज्ञानतत्त्वाने परिपूर्ण, पूर्णतत्त्वपदी राहणारा आ नेहमी परब्रह्मात रममाण होणारा, तो पुरीसंज्ञक होय.

वरील दहा नावे शंकराचार्यांच्या पूर्वी हिंदुसमाजात उप किंवा कुळनामे म्हणून रूढ होती, असे गोस्वामी पृथ्वी हरिगीर यांनी दाखवून दिले आहे.

गोसावी लोकांनी वैदिक धर्माच्या प्रसारासाठी खूप परि केले आहेत. गोसावी हे मुख्यतः शंकराचार्यांच्या अद्वैतमता अनुयायी आहेत. पण पुढील काळात त्यांच्यापैकी काही वैष्ण जैन व शीख बनले आहेत. ब्रह्मगिरी, गोविंदगिरी, माधवगि व कुसुमगिरी यांनी आसामात महापुरुषीय संप्रदाय ना वैष्णव संप्रदाय स्थापन केला. माधवेंद्रपुरी व ईश्वरपुरी बंगालमधील वैष्णव संप्रदायाचे आद्य प्रवर्तक होत.

क्षत्रिय गोसावी – इतिहासात यांचीही एक परंपरा आ शिकंदर व चंद्रगुप्त यांच्या काळी भारतात गोसाव्यांची लह लहान राज्ये होती. त्यानंतरच्या काळात काश्मीरच्या संधिम नामक राजाच्या दरबारात बरेच गोसावी होते, असे रा तरंगिणीत सांगितले आहे. त्यानंतरचा उल्लेख इ. स. ३०० सुमारास राज्य करणाऱ्या परिव्राजक ब्राह्मण राजांचा आ

हे परिव्राजक ब्राह्मण म्हणजे गोसावी राजेच होत. यांची राज्ये पंजाबात झज्झर व बुंदेलखंडात चिचोटी किंवा झिझोटी, शिवणी, दाहल, इ. ठिकाणी होती. दाहल हे नाव चेदी देशाला होते. विदर्भातही वाकाटकांचे राज्य चालू असताना त्रिपुर येथे परिव्राजक ब्राह्मण राजे राज्य करीत होते व ते गुप्त राजांचे मांडलिक होते. या घराण्याचा मूळ पुरुष दामोदर हा असून, त्याच्यानंतर प्रभंजन, देवाढ्य, हस्तिन, इ. राजे गादीवर आले.

चितोड येथील गुहिल वंशातला बाप्पा रावळ हा शैव यती होता, असे डॉ. देवदत्त भांडारकर यांनी शिलालेखांच्या आधारे दाखवले आहे. तो हारीतमुनी या गोसाव्याचा शिष्य होता. बाप्पा रावळपासून आजतागायत गोसावी व राजपूत यांचे गुरु-शिष्यांचे नाते अव्याहत चालू आहे. राजपुतांचे कुलदैवत असलेल्या एकलिंगजीचे पुजारीही गोसावीच आहेत. गोसावी अनेकदा राजपुतांच्या बाजूने शत्रूशी लढले असून, त्यांनी मोठा पराक्रमही गाजविला आहे. दिल्लीचा पृथ्वीराज चौहाण, कनोजचा जयचंद व महोबाचे चंदेल राजे, यांच्या सैन्यात गोसावी सैनिक बरेच होते.

औरंगजेबाच्या कारकीर्दीत जेव्हा गोसाव्यांना फार त्रास होऊ लागला, तेव्हा ते जिवावर उदार होऊन औरंगजेबाशी लढले, असा इतिहास आहे. महादजी शिंद्यांच्या सैन्यातही बरेच गोसावी होते. मराठ्यांच्या बहुतेक लढायांतून गोसावी हे मराठ्यांच्या बाजूने लढले आहेत.

पंथ– सांप्रत गोसावी वर्गात अनेक जातींच्या लोकांचा भरणा आहे. याचे कारण ज्याला इच्छा असेल, त्याला दीक्षा घेऊन गोसावी पंथात शिरता येते. दीक्षेचा विधी असा– दीक्षार्थी माणसाला आदल्या दिवशी उपोषण करायला लावतात. दुसऱ्या दिवशी त्याचे मुंडन करतात. मग त्याला स्नान घालून त्याच्या सर्वांगाला भस्म फासतात व त्याला नवीन नाव देतात. मग तो तात्पुरता गोसावी बनतो. पुढे एक-दोन वर्षे या उमेदवारीच्या स्थितीत राहून तो त्या पंथातील आचार–विचारांची ओळख करून घेतो. नंतर गुरू त्याच्या कानात ॐ सोहम् हा मंत्र मोठ्याने उच्चारतो. त्यानंतर तो पक्का गोसावी बनतो. मग गुरू त्याला प्रसाद देतो. नवदीक्षित गोसाव्याने पंथाशी एकनिष्ठ राहावे, म्हणून त्याला मीठ खायला देतात. नंतर त्याला भगवी वस्त्रे देतात. जमलेल्या लोकांना जेवण घालतात व विरजाहोम करतात.

आजन्म ब्रह्मचर्य पाळणे, भुकेल्यांना अन्न देणे, भिक्षेवर निर्वाह करणे आणि तीर्थयात्रा करणे, हे गोसावी संप्रदायाचे प्रमुख आचार आहेत. गोसावी लोक देहदंडही फार सोसतात. सूर्याच्या कडक उन्हात पंचाग्निसाधन करणे, कडाक्याच्या थंडीत उघड्या जागी उघड्या अंगाने बसणे, एका पायावर किंवा हात वर करून अनेक दिवस उभे राहणे, अशा देहदंडनात्मक गोष्टी ते आचरतात. ते जटाही वाढवतात. काही गोसावी गांजा ओढतात व अफूही खातात.

गोसाव्यांचे शैव व वैष्णव असे दोन वर्ग आहेत. दसनामी हे शैव असून ते आपल्या नावापुढे रामानंदतीर्थ, सहजानंदभारती, आनंदगिरी, विद्यारण्य, राम-आश्रम अशी आपल्या वर्गाची नावे लावतात. शैव पंथाच्या गोसाव्यांचे मठधारी आणि घरबारी असे दोन भेद आहेत. यापैकी बरेच गोसावी काशी व हरद्वार येथे मठ करून राहतात. घरबारी हे गृहस्थाश्रमी असतात. ते व्यापार वगैरे व्यवसाय करतात. काशीत शिवरात्रीच्या दिवशी या पंथाचा दीक्षाविधी असतो.

आसाम आणि बंगालमध्ये वैष्णव गोसावी बरेच आहेत. गुरुपूजा हे त्यांचे वैशिष्ट्य आहे.

गोसाव्यात बैरागी नावाचा एक पोटभेद आहे. बैरागी हे कपाळावर गंधाच्या किंवा गेरूच्या दोन उभ्या रेषा ओढतात आणि गळ्यात तुळशीच्या माळा घालतात. मुळात गोसावी व बैरागी यांचे वैर नव्हते; पण अकबराच्या कारकीर्दीत ते सुरू झाले. इ. स. १७६० मध्ये हरद्वार येथे कुंभमेळा भरला असता, आधी गंगेत स्नान कोणी करावे, यावरून भांडण उद्भवले व गोसावी आणि बैरागी यांच्यांत युद्ध होऊन अठरा हजार बैरागी त्यात मारले गेले.

गोसाव्यात दंडी हा एक उपपंथ आहे. ज्याला संन्यासी व्हायचे असेल, त्याला दंडी म्हणून एक तप (बारा वर्षे) उमेदवारी करावी लागते. त्याला नेहमी हातात एक दंड बाळगावा लागतो व झोपताना तो जवळच जमिनीत पुरावा लागतो. या दंडाला भगवे वस्त्र गुंडाळलेले असते.

गोसाव्यांचा रावणवंशी नामक आणखी एक उपपंथ आहे. हे गोसावी हातात केसांची कंकणे घालतात, कंबरेला केसांचा दोर गुंडाळतात व डोक्यावरचे केस लांब वाढवतात. हे फक्त संध्याकाळी भिक्षा मागतात.

मध्य प्रदेशातले गोसावी शेती व व्यापार हे व्यवसाय करतात. बरेचजण धर्मगुरूही आहेत. हे लोक नारायण व शंकर यांचे उपासक आहेत. यांचे विवाह भावरे पद्धतीने होतात. विदर्भात ते पुराणोक्त व इतरत्र वैदिक पद्धतीने होतात. राजस्थानात, विशेषतः उदेपूर येथे राहणारे गोसावी जसे शूर होते, तसे श्रीमंतही होते. भारतातील धनाढ्य लोकांत व्यापारी गोसाव्यांची गणना होते.

गोसाव्यांत सात मठ व बाव्वन्न मठ्या आहेत. पूर्वीच्या गोत्र-प्रवरांचा विसर पडल्याने आता त्यांच्यांत मठी हीच

गोत्रासारखी मानली जाते. एकाच मठीच्या घराण्यात लग्नसंबंध करीत नाहीत.

उत्तर भारतातील गोसाव्यांचे आचारनियम दसनामधर्म नामक पुस्तकात ग्रथित केलेले आहेत. शंकराचार्यांनी स्थापन केलेल्या चार मठांच्या नेमधर्माप्रमाणे वागावे, असे त्यात सांगितले आहे. शंकराचार्यांनी आपल्या गोसावी अनुयायांचे निरंजनी, निर्वाणी, सनातनी अथवा जुना, अटल, अमान, अग्नी व आनंद असे सात आखाडे केले आहेत. आखाड्याच्या सरदाराला महंत असे म्हणतात.

सांप्रत भारतात बहुतेक सर्व राज्यांत गोसाव्यांचे मठ वा मठ्या आहेत. पुष्कळ मठांना जमिनी इनाम मिळालेल्या आहेत. जमिनीच्या उत्पन्नाचा विनियोग करण्याचा अधिकार महंताकडे असतो. मठातील सर्वांना अन्नवस्त्र पुरवणे व पाहुण्यांना भोजन–निवास देणे, ही जबाबदारी महंतावर असते. महंत आपल्या मागे आपल्या एखाद्या चेल्याला वारस नेमतो.

ज्या गोसाव्यांनी हिमालयातील बद्रिनाथाची किंवा दुसऱ्या एखाद्या तीर्थाची यात्रा केलेली असेल, ते हातात लोखंड, पितळ, किंवा तांबे यांची कडी घालतात. त्या कड्यांवर देवाची आकृती कोरलेली असते. बलुचिस्थानातील हिंगलाज देवीला जाऊन आलेले गोसावी गळ्यात लहान पांढऱ्या मण्यांची माळ घालतात आणि रामेश्वराची यात्रा करून आलेले हातात शिंपल्यांचे वलय घालतात. गोसावी लोकांपैकी काही नग्नावस्थेत राहतात व पर्वकाळी मिरवणुकीने नदीवर स्नानाला जातात.

गोसाव्यांचे भिक्षेसंबंधीचे नियम ठरलेले आहेत. ते अलख अशी घोषणा करून फक्त अर्धे मिनिट भिक्षेसाठी उभे राहतात व तेवढ्या अवधीत भिक्षा न मिळाल्यास निघून जातात. काही गोसावी फक्त पाच घरीच भिक्षा मागतात.

गोसावी नर्मदापरिक्रमा करतात, त्या वेळी ते नर्मदेच्या पाण्यात गुडघ्यापेक्षा अधिक खोल जात नाहीत. तसेच तिच्या पाण्याने भांडीकुंडी धूत नाहीत. प्रवासात नर्मदेला मिळणारी नदी किंवा ओढा एकदा ओलांडल्यावर पुन्हा तो ओलांडीत नाहीत.

गोसाव्यांच्या पंथात स्त्रियाही दीक्षा घेऊन दाखल होतात. दीक्षेच्या वेळी स्त्रियांचे वपन केले जाते. मग त्या अंगाला भस्म लावून भगवी वस्त्रे धारण करतात. पण गुरूच्या परवानगीने त्यांना केस वाढविण्याचीही सवलत मिळते. या संन्यासिनींना पूर्ण ब्रह्मचर्य पाळून स्वतंत्र मठात राहावे लागते.

मृतकप्रथा– गोसावी मेल्यावर त्याला भगव्या रंगाचे कपडे घालतात. तो वैष्णव असेल, तर त्याच्या डोक्यावर तुळशी व शैव असेल तर बेल ठेवून बसलेल्या स्थितीत त्याला पुरतात. त्याच्याखाली पीठ व कडधान्य पसरतात. त्याच्याशेजा भिक्षेची झोळी, एक भोपळा व दंड या वस्तू ठेवतात. प्रेत कु नये, म्हणून त्याच्याभोवती मीठ घालतात. गोसावी लो मृताबद्दल कधीही शोक करीत नाहीत. पाहा – दसनाम [ट्रा. का. सें. प्रा. इं.; एन्सा. रि. ए.; बाँ. बे. क्रा.; गोसा व त्यांचा संप्रदाय– गोस्वामी पृथ्वीगीर हरिगीर]

गोसावीनंदन

(१६५०–१७०० इ. स.) एक मराठी कव याचे मूळ नाव वासुदेव असे होते. याचे पू बीड येथे राहत होते. पुढे हे घराणे सिंदखेडास आले. रेणु ही या घराण्याची देवता होय. गोसावीनंदनाची कुलपरं पुढीलप्रमाणे दिलेली आढळून येते – मुरारी पंडित→ विना पंडित → गोसावी पंडित → वासुदेव ऊर्फ गोसावीनंदन.

गोसावीनंदनाचा ज्ञानमोदक हा ग्रंथ प्रसिद्ध आहे. या ग्रंथा २२ प्रकरणे असून, त्याची ओवीसंख्या १२८४ इतकी आ या ग्रंथात गणेशगीतेच्या आधारे पंचीकरणाचा आणि आ त्मिक साधनांचा विचार केलेला आहे. गणेश व गोसावीनं यांच्या संवादातून प्रस्तुत ग्रंथाचा विस्तार केलेला आ गोसावीनंदनाच्या या ग्रंथावर ज्ञानेश्वरी आणि दासबोध दोन्ही ग्रंथांचा प्रभाव स्पष्ट दिसतो.

गोसावीनंदनाची गणेशभक्ती आणि उच्च आध्या अनुभूती यांचे दर्शन त्याच्या स्फुट काव्यातही झाले त्याचा एक अभंग पुढीलप्रमाणे –

एकपणे एक देवा एकदंता । तुझी एकात्मता अनेकत्वीं ॥
तुजमाजी सर्व देवा लंबोदरा । सुखाच्या सागरा गणराया ॥
तुझी होतां भेटी नुरे भेदाभेद । अखंड स्वानंद पूर्ण दाटे ॥
गोसावीनंदन ध्यातो तुझे पाय । ध्यातां ध्यान ध्येय विसर

याने रचलेली अष्टके लहान मुलांनाही पाठ करता इतकी सरळ व साधी आहेत. [म. च. को.; वि. ज. स्मृ.

गोस्वामी, गोकुलनाथ

(१५५२ ते १६४१ इ. स.) वैष्णव आचार्य, कवी व मत रक. हा विठ्ठलनाथाचा पुत्र व वल्लभाचार्यांचा नातू विठ्ठलनाथाच्या सातही पुत्रांची सात पीठे होती. गोकुलना अनुयायांना भडूची वैष्णव असे म्हणतात. हे गोकुलना पीठालाच मानतात व भजतात. यासंबंधी एक कथा प्र आहे, ती अशी –

गोकुलनाथाचा जन्म झाला, तेव्हा त्याचा बाप श्रीना पूजा करीत होता. पुत्रजन्माच्या वार्तेने त्याच्या पूजेत आला. तेव्हा रागावून त्याने म्हटले, की याच्यामुळे पूजे

पडला; तेव्हा याचे अनुयायी भगवंताच्या मूर्तिपूजेला वंचित होतील.

गोकुलनाथ पुष्टिसंप्रदायाचा मोठा प्रचारक होता. याची प्रवचने रसाळ व विद्वत्तापूर्ण असत. आपल्या प्रवचनांत तो अनेक भक्तांची चरित्रे सांगत असे. हीच चरित्रे पुढे हरिरायाने लिहून काढली. ‘ चौरासी ’ आणि ‘ दो सौ बावन वैष्णवोंकी वार्ता ’ या नावांनी ती प्रसिद्ध आहेत. गोकुलनाथाचे आणखीही काही ग्रंथ आहेत, त्यांत त्याचे वचनामृत प्रसिद्ध आहे. जातीचा विचार न करता केवळ भक्तिश्रद्धा पाहून हा कोणालाही दीक्षा देत असे. [हिं. सा. को.; हिं. क. को.]

गोहिल राजपूत

एक प्रख्यात राजपूत वंश. या वंशाचे लोक आपण मूळ सूर्यवंशी असल्याचे सांगतात. गोहिलांची प्रथम वसाहत मारवाडातील लूणी नदीजवळील खेरगढ या ठिकाणी होती. हा प्रदेश त्यांनी भिल्ल राजा खेखो याच्याकडून जिंकून घेतला होता. इथे त्यांच्या वीस पिढ्या नांदल्या. पुढे राठोडांनी त्यांना तिथून हाकलले. म्हणून ते इ. स. च्या १२ व्या शतकात सौराष्ट्रात आले व पेरुमगढ येथे वसाहत करून राहिले. पुढे तिथेही त्यांच्यावर गंडांतर आले.

त्यांची एक शाखा इ. स. १२९० साली गुजरातेत गेली. या शाखेचा नेता सेजाक नावाचा होता. या सेजाकने आपली मुलगी सोरटच्या चूडासमा रा ’ कवात याच्या मुलाला दिली. त्या सोयरीकसंबंधामुळे त्याला काही गावे इनाम मिळाली. सेजाकाला राणोजी, सारंगजी आणि शहाजी असे तीन पुत्र होते. सेजाकच्या मागून राणोजी बापाच्या गादीवर बसला. त्याला जुनागडचा रा’ याने उमराळा तालुका दिला. राणोजीनंतर त्याचा मुलगा मोखराजी गादीवर आला व त्याने परिमबेट जिंकून काठियावाडच्या दक्षिण भागात आपली सत्ता स्थापन केली. मोगलांनी गुजरात-काठियावाड जिंकल्यावर काही काळ गोहिलांची इथली सत्ता नाहीशी झाली होती; परंतु मोगलांच्या अवनतीच्या काळात त्यांनी आपला गेलेला सर्व प्रदेश परत मिळविला. मोखराजीचा धाकटा मुलगा सेमरसिंगजी याने गुजरातमध्ये राजपिपला येथे राज्य स्थापन केले.

गोहिलांची दुसरी शाखा बग्वा येथे जाऊन स्थायिक झाली. या शाखेच्या प्रमुखाने नंदननगर अथवा नंडोदे येथील राजाच्या कन्येशी लग्न केले. कालांतराने त्याला नंडोदेचे राज्यही मिळाले. बग्वाचे हे राज्य बरीच वर्षे विद्यमान होते.

गोहिलांची तिसरी शाखा सिहोरला गेली व तिने भावनगर येथे आपले राज्य स्थापले. या शाखेच्या काही लोकांनी नंतर गोगो येथेही आपले एक स्वतंत्र राज्य वसविले व त्या प्रदेशाला गोहिलवाड असे नाव दिले.

गोहिलांनी सागरी व्यापारात बरीच संपत्ती संपादन केली होती, असे म्हणतात. [वि. मुं. रा. प.; अँ. अँ. रा.]

गौड

(१) एक देश व नगरी. बंगालमधील माल्दह(माल्डा) शहराजवळ गौड नगरीचे अवशेष सापडले आहेत. पुराणांत या नगरीचा उल्लेख आढळतो. इ. स. च्या १२ व्या शतकाच्या अखेरीस बंगालवर मुसलमानांची सत्ता प्रस्थापित झाली, तेव्हापासून अनेक शतके त्यांची राजधानी या नगरीत होती. मात्र त्या काळात तिचे नाव लखनौती असे होते. सेन वंशातील लक्ष्मणसेन (इ. स. ११८९–१२०६) राजाच्या नावावरून लक्ष्मणवती हे नाव तिला मिळाले असावे आणि लखनौती हा त्याचा अपभ्रंश असावा. या नगरीची स्थापना इ. स. च्या ८ व्या शतकात पाल वंशाच्या राजवटीत झाली असावी. इ. स. च्या १६ व्या शतकाच्या अखेरीपर्यंत तिथे अनेक भव्य इमारती होत्या आणि लोकसंख्याही पुष्कळ होती. पण १७ व्या शतकाच्या अखेरीस ती नगरी उद्ध्वस्त झाली.

सध्याचा मुर्शिदाबाद जिल्हा व माल्डा जिल्ह्याचा दक्षिण भाग एवढा प्रदेश प्रथम गौड या नावाने ओळखला जात होता. बाणाच्या हर्षचरितात शशांक राजाला गौडाधिपती म्हटले आहे. भविष्य पुराणात पौंड्रदेशाचे सात भाग पाडून त्यांपैकी एकाला गौड देश हे नाव दिलेले आहे. हा देश पद्मा नदी आणि वर्धमान (वरद्वान) प्रांत यांच्यामध्ये होता. शक्तिसंगमतंत्रात या देशाचा विस्तार सांगितला आहे, तो असा–

वङ्गदेशं समारभ्य भुवनेशान्तगं शिवे ।
गौडदेशः समाख्यातः सर्वविद्याविशारदः ॥

अर्थ – वंगदेशापासून भुवनेश्वरापर्यंत गौड देश सांगितला आहे. हा देश सर्व विद्यांत विशारद आहे.

यावरून बंगालचा पूर्व भाग वंग आणि पश्चिम भाग गौड अशी विभागणी केलेली दिसते. म्हणूनच काही मुस्लीम इतिहासकारांनी या देशाला गौडबंगाल हे नाव दिले आहे.

गुड (गूळ) या शब्दापासून गौड या नावाची व्युत्पत्ती सांगतात. ज्या प्रदेशात गुळाचे विपुल उत्पादन होत असे, तो गौड देश होय.

इ. स. च्या ४ थ्या व ५ व्या शतकांत गौड देश गुप्त साम्राज्याचा एक भाग होता. पण ६ व्या शतकात तो स्वतंत्र झाला. त्या वेळच्या काही राजांची नावे जयनाग, धर्मादित्य, गोपचंद्र, इ. ज्ञात आहेत. त्या काळात गौड राजांचे नौदल प्रबळ होते, असे अनुमान शिलालेखांच्या आधारे काढता येते. ७ व्या शतकात शशांक राजाची सत्ता बंगाल, बिहार व

ओडिसा या प्रदेशांवर होती.

गौड देशाच्या अनेकविध कीर्तीमुळे सबंध पूर्व भारतालाच पुढे गौड हे नाव मिळाले. दंडीच्या काव्यादर्शात संस्कृत काव्याच्या एका शैलीला गौडी किंवा प्राच्य असे नाव दिलेले आहे. पूर्व भारतातील तत्कालीन प्रचलित लिपीलाही गौड लिपीच म्हणत. सर्व उत्तर भारताला गौड देश म्हणण्याचीही एक जुनी प्रथा आहे. द. भारतातील पंचविध ब्राह्मणांना पंचद्रविड म्हणतात, त्याचप्रमाणे उ. भारतातील पंचविध ब्राह्मणांना पंचगौड म्हणतात. माळव्याचा भोज राजा (इ. स. चे ११ वे शतक) हा गौड देश (उ. भारत) आणि दक्षिणापथ यांवर राज्य करीत होता, असे एका काव्यात म्हटले आहे.

पाणिनीने गौडांचा उल्लेख केलेला आहे. त्यानंतर अर्थशास्त्र, कामसूत्र, राजतरंगिणी, इ. ग्रंथांतही त्यांचा उल्लेख आहे. राजशेखर आपल्या काव्यमीमांसा या ग्रंथात म्हणतो, की गौडदेशीय लोक उत्तम संस्कृत बोलत, पण प्राकृत मात्र त्यांना येत नसे. [जॉ. ए. मे. इं.; ट्रा. ए. इं.]

(२) कर्नाटकांतील एक जात. हे लोक शेती व गोपालन करतात. त्यांना हालवक्लुमक्कलू असे दुसरे नाव आहे. यांच्यांत जातीच्या व्यवस्थेसाठी व नियंत्रणासाठी प्रत्येक गावात ग्राम गौड आणि वट्टू किंवा गट्टू गौड नावाचे दोन अधिकारी असतात. आठ किंवा नऊ गावांवर मागने गौड नामक अधिकारी असतो. आणि अशा नऊ मागने गौडांवर कट्टेमनेयव नावाचा आणखी एक अधिकारी असतो. या जातीचे अठरा पोट विभाग आहेत, त्यांना बळी म्हणतात. वंगार, नंदर, मलार, साळू, कब्रू, गोली, इ. त्यांची नावे आहेत. वेंकटस्वामी ही यांची कुलदेवता होय.

विवाहप्रथा – *गौडांत मुलामुलींची लग्ने ती वयात आल्यावर होतात. विवाह धारे पद्धतीने होतो. वधू–वर आपल्या ओंजळीत पाच विड्याची पाने, एक सुपारी व चार आणे ठेवतात. त्यांवर पाण्याची धार पडल्यावर नवरा मुलगा वधूच्या गळ्यात ताळी बांधतो.*

मर्तिकप्रथा – हे लोक मृताला जाळतात. तिसऱ्या दिवशी त्याच्या रक्षेची मानवी आकृती बनवतात व तिचे दोन खंड करून ते पुरतात. त्यांवर मातीचा ढीग रचतात. मृताच्या घरात जमिनीवर दोन पाट मांडून त्यावर कापड पसरतात. एकावर दुधाचे भांडे व दुसऱ्यावर दिवा, तांदूळ, नारळ, भोपळा, इ. वस्तू ठेवतात. मृताचे नातेवाईक त्या पाटांभोवती तीन प्रदक्षिणा घालतात आणि त्या वस्तू फडक्यात गुंडाळून वरील मातीच्या ढिगाकडे जातात. त्या ढिगासमोर केळीच्या तीन पानांवर भात, वरण वगैरे पदार्थ वाढतात. ढिगाभोवती चार खांब उभे करून त्यांवर कापड ताणून बांधतात. सोळाव्या दिवशी केळीची सोळा पाने एका ओळीत. सतरावे बाजूला मांडतात. त्यांवर द्रोणात घालून कोंबडीचे मांस, ताडी, भाकरी, इ. पदार्थ ठेवतात. नंतर तिथे जमलेले लोक पितरांना विनंती करतात, की नवीन मृतात्म्याला त्यांनी आपल्यांत घ्यावे. मग बाजूला मांडलेले पान सोळा पानांच्या ओळीत ठेवतात. हा सपिंडीसारखाच एक प्रकार आहे. हे लोक वर्षातून एकदा महालयश्राद्ध करतात. [का. ट्रा. स. इं.]

गौड नृत्य

बस्तर प्रदेशातील माडिया लोकांचे एक नृत्य. गौड नावाच्या वन्य गाईवरून या नृत्याला हे नाव पडले आहे. नृत्यसमयी माडिया लोक गायीची शिंगे, मोरपिसे व कोंबड्याचे पंख या सर्वांपासून बनविलेली टोपी डोक्यावर ठेवतात. डोक्याच्या पुढील बाजूस नर्तकाचा चेहरा झाकून जाईल अशा तऱ्हेने तिला कपड्यांची झालर लावलेली असते आणि मागील बाजूस कापडाचे शेंपूट लोंबते सोडलेले असते. या शिरोभूषणावर माडिया लोकांचे विलक्षण प्रेम असून, प्रत्येक घराण्यात ते परंपरेने आढळते. नर्तक स्त्रियांची वेषभूषा पुरुषांसारखी नसते. त्या तांब्याचा मुकुट व मण्यांच्या माळा घालून नृत्यासाठी नटतात. पुरुष मंडळी फेर धरून नाचतात आणि बैलांच्या टकरीचा अभिनय करतात. स्त्रियांच्या हाती कित्येकदा काठ्या असतात आणि गाईम्हशींचा कळप हाकीत असल्याचा त्या अभिनय करतात. [ए. हो. रा.]



गौड नृत्यात ढोल वाजवणारा माडिया

गौडपादाचार्य

(इ. स. चे ८ वे शतक) एक आचार्य. श्रीमच्छंकराचार्यांचे हे परम गुरू म्हणजे शंकराचार्यांचे गुरू गोविंदपादाचार्य यांचे गुरू होत. श्रीराम-

कृष्ण सोमयाजींनी आपल्या गुरुपरंपराचरित्र या संस्कृत ग्रंथात यांचे चरित्र दिले आहे, ते असे ––

महाराष्ट्रातील सांगली जिल्ह्यात विट्यापासून काही अंतरावर शुक्राचार्यांचा डोंगर म्हणून एक स्थान आहे. तिथे भूपाळ नामक एक खेडेगाव आहे. तिथे विष्णुदेव नावाचा एक विद्वान ब्राह्मण व त्याची पत्नी गुणवती हे दांपत्य राहत होते. त्यांच्या पोटी शुक्राचार्यांच्या कृपेने जे अपत्य झाले, तेच शुकदत्त उर्फ गौडपादाचार्य होत. शुकदत्त लहानपणीच विरक्त झाला व घर सोडून शुकाश्रमात गेला. तिथे अन्नपाणी वर्ज्य करून तो तपश्चर्येस बसला. पुढे त्याला दृष्टान्त झाला, की 'तू वंगदेशात जिष्णुदेव नावाच्या सिद्ध पुरुषाकडे जा.' शुकदत्त त्याप्रमाणे वंगदेशात गेला. जिष्णुदेवाने त्याला आपल्याजवळ ठेवून घेतले व त्याला रहस्यासह सांप्रदायिक मंत्र शिकवला. त्याची उपासनापद्धतीही सांगितली.

शुकदत्त हा फार दुरून पायी चालत गौड देशात आला, म्हणून गुरूने त्याचे नाव गौडपाद असे ठेवले.



गौडपादाचार्य–कांची

हा शुकाचा शिष्य म्हणून प्रसिद्ध आहे. पण हा शुक कोण, ते मात्र समजत नाही. व्यासपुत्र शुक असणे हे कालदृष्ट्या संभवनीय नाही. कदाचित व्यासपुत्र शुक व हा शुक यांच्यामधील परंपरा नष्ट झाल्यामुळे शुकानंतर एकदम याचे नाव येत असावे. गुरुपरंपरा म्हणताना 'व्यासं शुकं गौडपादं महान्तम्' असेच म्हणतात.

अद्वैत सिद्धान्ताचे प्रतिपादन करणाऱ्या प्राचीन आचार्यांत गौडपादांचेच नाव प्रामुख्याने आढळते. वेदान्तातील मायावाद प्रथम शंकराचार्यांनी प्रतिपादिला, अशी लोकांत समजूत आहे; पण वास्तविक तो गौडपादाचार्यांनी प्रथम सांगितला. ब्रह्माशी जीवाचा सबंध सांगताना यांनी कल्पनावादाचा अंगीकार केला आहे. तर पुढील ग्रंथकारांनी आभासवाद, प्रतिबिंबवाद किंवा अवच्छेदवाद यांपैकी काहीतरी स्वीकारले आहे. गौडपादांनी मांडूक्योपनिषदावर कारिका लिहिल्या असून, त्यांत आपले सर्व तत्त्वज्ञान मांडले आहे. अद्वैतवादाप्रमाणेच गौडपादाचार्य अजातवादाचेही समर्थक आहेत. आत्मा हा अमर आहे; त्यामुळे त्याला जन्ममृत्यू या उपाधी लागत नाहीत, हा त्यांचा निष्कर्ष आहे. त्यांनी या संबंधात श्लोक लिहिला आहे तो असा–

> **अजातस्यैव भावस्य जातिमिच्छन्ति वादिनः ।**
> **अजातो ह्यमृतो भावो मर्त्यतां कथमेष्यति ।।**
> **न भवत्यमृतं मर्त्यं न मर्त्यममृतं तथा ।**
> **प्रकृतेरन्यथाभावो न कथंचिद् भविष्यति ।।**
>
> (मां. का. ३०. २०–२१)

अर्थ – द्वैतवादी लोक अजन्मा अशा आत्म्याच्या जन्माची इच्छा करतात (आत्मा जन्मतो असे मानतात). जी वस्तू अजात व अमर आहे, ती मर्त्य कशी होईल ? अमर वस्तू कधी मर्त्य होत नाही व मर्त्य वस्तू कधी अमर होत नाही. प्रकृतीचा विपरीत भाव कधीही होत नाही.

मांडूक्यकारिका या ग्रंथाशिवाय अनुगीताभाष्य, उत्तरगीताभाष्य, चिदानंदकेलिविलास (देवीमाहात्म्यटीका), सांख्यकारिकाभाष्य, इ. ग्रंथ गौडपादाचार्यांचे म्हणून सांगितले जातात. [म. च. को.; शंकराचार्य; हिंदुत्व; म. ज्ञा. को.; द. रा. देवधर– पुरुषार्थ, मार्च १९६४]

गौड ब्राह्मण

गौड देशात राहणारे ब्राह्मण. उ. भारतातील पंचगौड ब्राह्मणांपैकी एक विभाग. भारताच्या अनेक भागात हे लोक वसलेले आहेत. हे भिन्न भिन्न व्यवसाय करतात.

गालव ऋषी हा यांचा मूळ पुरुष असल्याचे सांगतात. यांच्या अनेक उपजाती आहेत. त्यातील केवलगौड, आदिगौड, शुक्लवालश्रीगौड, गूजरगौड, हरियानागौड, कीर्तनीयागौड, जुगाडगौड, कैयालगौड, धरमगौड, सिद्धगौड, इ. उपजाती प्रसिद्ध आहेत. दधीचीचा पुत्र पिप्पलायन याच्या बारा मुलांपासून गौड जातीची बारा गोत्रे प्रचलित झाली, असे म्हणतात.

मारवाडमध्ये वसलेल्या गौड ब्राह्मणांना मारवाडी ब्राह्मण म्हणतात. ते वैष्णव पंथाचे असून, शुक्लयजुर्वेदाच्या वाजसनेयी शाखेला अनुसरणारे आहेत. पाहा– सारस्वत, पंचगौड. [म. ज्ञा. को.; ब्रा. जा. प्र.]

गौडमल्लार

हिंदुस्थानी संगीतातला एक राग. याची जाती संपूर्ण असून, वादी मध्यम व संवादी षड्ज आहे. या रागात निषाद दोन लागतात व बाकीचे स्वर शुद्ध असतात. रागाचे मुख्य अंग– रे ग म प म ध नि प म ग रे ग रे सा. आरोह– सा रे ग भ ग म प ध नि सां. अवरोह– सा ध

नि प म ग रे ग रे सा. गानसमय– वर्षाऋतू. हा राग शृंगाररसाचा आहे. [श्री. आवासाहेब मुजुमदार, पुणे]

गौडसारंग हिंदुस्थानी संगीतातला एक राग. यांची जाती षाडव संपूर्ण असून, वादी गंधार व संवादी धैवत आहे. या रागात मध्यम दोन प्रकारचा लागतो व बाकीचे सर्व स्वर शुद्ध लागतात. मुख्य अंग– सा ग रे म ग प रे सा. आरोह– नि सा ग रे म ग प म ध म प सा. अवरोह– सा नि ध प म प म ग म ग रे म ग प रे सा. या रागाचा रस शृंगार मानलेला असून, गानसमय दिवसाचा तिसरा प्रहर आहे. [श्री. आवासाहेब मुजुमदार, पुणे]

गौडीय वैष्णव संप्रदाय चैतन्य संप्रदाय पाहा.

गौडो ओडिसातील गंजम जिल्ह्यात वसलेली एक पशुपालक जात. कृष्णाच्या यदुकुलापासून आपली उत्पत्ती झाल्याचे हे सांगतात. यांच्यापैकी बरेच लोक आता शेती करू लागले आहेत. यांचे अपोटो, बेहर, दोंगायतो, सोल्लोखोंडिय, इ. चौदा पोटभेद आहेत. या सर्वांत सोल्लोखोंडिय हे श्रेष्ठ समजले जातात. ते शेती करतात; तसेच गाई, म्हशी, शेळ्या व मेंढ्या पाळतात. काहीजण बैलगाड्यांतून माणसांची वा सामानाची वाहतूक करतात. यांची मोइरो (मोर) नागसिरो (नाग) इ. गोत्र आाहेत. यांची जातपंचायत असते. पंचायतीचे प्रमुखत्व वंशपरंपरेने चालते. प्रमुखाला महांकुडो म्हणतात.

देवधर्म – यांच्यांतले बरेच लोक परमार्थी म्हणजे चैतन्याचे अनुयायी असून, ते जगन्नाथ स्वामीला भजतात. यांच्या अनेक ग्रामदेवता आहेत. कार्तिक मासातील गुरुवारी हे लक्ष्मीची पूजा करतात. धान्याने भरलेली टोपली हे लक्ष्मीचे प्रतीक मानतात.

विवाहप्रथा – यांच्यांत बालविवाह रूढ आहे. वयात यण्यापूर्वी मुलीचे लग्न न झाल्यास प्रथम शाडी वृक्षाशी किंवा बाणाशी तिचे लग्न लावतात.

मृतकप्रथा – हे मृतांना जाळतात; लहान मुलांना मात्र पुरतात. मृताच्या राखेची आकृती करून तिला अन्न अर्पण करतात. मृताचे एक हाड घराजवळ पुरून, त्याला बारा दिवस अन्न अर्पण करतात. दर वर्षी संक्रातीच्या दिवशी पितृश्राद्ध करतात. [का. ट्रा. स. इं.]

गौतम (१) सप्तर्षींपैकी एक. दीर्घतमा व प्रद्वेषी यांचा पुत्र. याचा बाप अंगिरसकुलातील असून, तो बृहस्पतीच्या शापाने जन्मतःच अंध झाला होता (ऋ. १.१४७). काही ठिकाणी दीर्घतमा, यानेच गौतम असे नाव धारण केलेले दिसते (बृ. दे. ३.१२३). गौतमाला औशीनरी नामक शूद्र स्त्रीपासून कक्षीवानादी पुत्र झाले. सनत्कुमाराकडून हा ब्रह्मविद्या शिकला. त्यानेच गौतमाला हंस व परमहंस यांचे ध्यान कसे करावे, ते शिकविले. याला ब्रह्मर्षी म्हटले आहे. ब्रह्मदेवाची मानसकन्या अहल्या ही याची स्त्री होय. तिच्यापासून याला शतानंद नावाचा पुत्र झाला. याच्या नावावरूनच गोदावरीला गौतमी असे नाव पडले (दे. भा. ११.९). अन्नाचा दुष्काळ पडला म्हणून वृषादर्भी राजा दान करीत असता ज्या सात ऋषींनी ते घेण्याचे नाकारले, त्यात गौतमही होता. याने आपली कन्या आपल्या उत्तंक नामक शिष्याला दिली होती.

गौतमाचा आश्रम पारियात्र (विंध्य) पर्वताजवळ होता. त्याने तिथे ६० हजार वर्षे तप केले. त्यानंतर यम तिथे येऊन त्याला भेटला. गौतमाने यमाला पितृऋण कसे फेडावे, याविषयी प्रश्न विचारला. त्यावर यमाने 'सत्य, धर्म, तप व शुचित्व यांचा अवलंब करून मातापितरांची सेवा करावी म्हणजे पवित्र लोकाची प्राप्ती होते, असे त्याला सांगितले (म. भा. शांति. १२९). गौतमाने बारा वर्षांचा दुष्काळ पडला असता ऋषींना भोजन देऊन वाचविले (नारद पु. २.७३).

हा अंगिरसकुलातील एक ऋषी व प्रवर आहे. वैवस्वत मन्वंतरातला हा एक व्यासही आहे. त्र्यंबकेश्वराचा अवतार याच्यासाठीच झाला. [प्रा. च. को.]

(२) न्यायसूत्रांचा कर्ता. सनपूर्व सहाव्या शतकात मिथिला नगरीमध्ये याचा जन्म झाला. स्थूल जगतातल्या तत्त्वांचा विचार करून याने त्यांच्या ज्ञानासाठी प्रमाणांचे निरूपण केले. याच्या न्यायसूत्रात प्रमाण–प्रमेयादी सोळा पदार्थ सांगितले असून, त्यांचा उपयोग वादी–प्रतिवादींच्या द्वारे सिद्धान्तनिर्णय करण्यासाठी होतो. [प्रा. च. को.]

(३) एक परिव्राजक. हा एका वेळी अन्नाचे फक्त आठ घास खात असे. शेवटी योगमार्गाने त्याने मोक्ष मिळवला. [क्रि. स्ट. ले. उ.]

(४) चौदाव्या द्वापरात झालेला भगवंताचा एक अवतार. याला चार पुत्र होते. [पु. इं.]

(५) एक धर्मशास्त्रकार. हा सामवेदाच्या राणायनीय शाखेचा होता.

(६) एकत, द्वित आणि त्रित यांचा पिता.

(७) पूषा नामक सूर्याबरोबर फिरणारा एक ऋषी. [भाग. पु. १२.११.३९]

(८) अत्रिकुलातील एक ब्रह्मर्षी.

(९) ब्रह्मदेवाचा पुत्र. [वायू पु. २.४४.३८]

गौतम धर्मसूत्र गौतमाने रचलेले एक धर्मसूत्र. त्याने या धर्मसूत्रातील कृच्छ्रप्रायश्चित्तासंबंधीचे प्रकरण सामविधान ब्राह्मणातून घेतलेले आहे.

गौतम धर्मसूत्र हे सामवेदाचे असून त्यात २८ अध्याय आहेत. धर्माचे मूलाधार, ग्रंथाचा अर्थ लावण्या संबंधीचे नियम, चार वर्णांच्या उपनयनाचा काल, ब्राह्मणाच्या व्यवसाया संबंधीचे नियम, आपद्धर्म, संस्कार, न्याय, शिक्षा, साक्षीदार यांचा विचार, ब्राह्मण आणि इतर जाती यांच्याकडील अन्नग्रहणात वर्ज्यावर्ज्य, स्त्रियांची कर्तव्ये, नियोग, प्रायश्चित्त न घेणाऱ्या पापी मनुष्याचा त्याग, उपपातकांची गुप्त प्रायश्चित्ते, पुत्रांचे बारा प्रकार, वारसाहक्क, दायविभाग, स्त्री-धन, इ. विषय या धर्मसूत्रात चर्चिले आहे.

हे धर्मसूत्र पूर्णपणे गद्य असून, त्याची भाषा पाणिनीच्या संस्कृतासारखी आहे. या धर्मसूत्रात संहिता, ब्राह्मण, पुराणे व वेदांगे यामधील बरेच उल्लेख आहेत. या शिवाय तैत्तिरीय आरण्यकातील पंचवीस उतारे व कित्येक मते यात आलेली आहेत.

बौधायन धर्मसूत्रात गौतम धर्मसूत्राचा प्रथम उल्लेख आढळतो. तसेच वसिष्ठ धर्मशास्त्र, अपरार्क, तंत्रवार्तिक, शांकरभाष्य, इ. ग्रंथांतही गौतम धर्मसूत्रातील बरेच उतारे घेतले आहेत. इ. स. पूर्व ६०० ते ४०० हा या धर्मसूत्राचा काळ होय. गौतम धर्मसूत्रावर हरदत्ताने मिताक्षरा नामक टीका व मस्करी आणि असहाय यांनी भाष्ये लिहिली आहेत. [हि. ध.; प्रा. च. को.; वै. सा.]

गौतम बुद्ध (सनपूर्व ५६३ – ४८३) गौतमबुद्धाच्या जन्मकाळी मगध साम्राज्याचा प्रतापसूर्य चारी दिशांना तळपत होता. राजगृह ही त्याची राजधानी होती. गंगेच्या उत्तरेस लिच्छवींचे प्रबल गणराज्य होते. वैशाली ही त्याची राजधानी होती. गंगेच्या वायव्येस कोसलांचे राज्य होते. त्याची मूळ राजधानी अयोध्या उजाड झाली होती व नवीन राजधानी श्रावस्ती भरभराटीस आली होती. कोसल देशाच्या पूर्वेस रोहिणी नावाची नदी वाहत होती. या नदीच्या दोन तीरांवर समोरासमोर शाक्य व कोलिय या दोन कुलांची स्वतंत्र गणराज्ये होती. शाक्य हे क्षत्रियकुल होते. त्याची राजधानी कपिलवस्तू ही होती. शुद्धोदन नावाचा एक पुरुष शाक्यांचा प्रमुख होता.

रोहिणी नदीला शाक्य व कोलिय या दोघांनी मिळून एक धरण बांधले होते. त्या धरणाचे पाणी दोन्ही राज्ये आपल्या शेतीसाठी वापरीत. त्यातूनच कित्येकदा संघर्ष व युद्धे निर्माण होत. या कटकटी कायमच्या मिटाव्या म्हणून कोलिय राजान शाक्यराजा शुद्धोदन याला आपल्या दोन कन्या देऊन, दोन्ही राज्यांत दृढ प्रेमसंबंध निर्माण केला होता. महामाया व महाप्रजापती अशी त्या दोन कन्यांची नावे होती. या दोघी अनुक्रमे मायादेवी व गौतमी या नावांनीही ओळखल्या जात.

या विवाहानंतर बऱ्याच वर्षांनी शुद्धोदनाच्या दोन राण्यांपैकी मोठी राणी महामाया ही गर्भवती झाली. तिचे दिवस भरल्यावर तिला प्रसूतीसाठी देवदह नगरीत म्हणजेच तिच्या माहेरी पाठवण्यात आले. तिचा प्रवास सुखकर व्हावा, म्हणून शुद्धोदनाने दोन्ही नगरींमधला रस्ता दुरुस्त केला व तो लतापल्लवांनी सुशोभितही केला. महामाया पालखीत बसून माहेरी जाताना वाटेत लुंबिनी नामक एका उपवनात थोडा वेळ विसावली. तेदढ्यात तिला प्रसूतिवेदना सुरू झाल्या. तिने आधारासाठी तिथल्या सालवृक्षाची फांदी पकडली आणि त्याच वृक्षातळी एका पुत्ररत्नाला जन्म दिला. प्रसूतीनंतर महामायेला परत कपिलवस्तूला आणण्यात आले. जन्माच्या पाचव्या दिवशी त्या बालकाचे व्यावहारिक नाव सिद्धार्थ व राशिनाम गौतम असे ठेवण्यात आले. गौतमाच्या सातव्या दिवशी त्याची माता महामाया निवर्तली. पुढे त्याचे सगळे पालनपोषण त्याची मावशी व सावत्र आई महाप्रजापती हिने केले.



गौतम बुद्धाचा जन्म – गांधारशैली

गौतम हा जन्मतःच महापुरुषलक्षणांनी युक्त होता. त्याचा जन्मोत्सव चालू असता असित नावाचा एक मुनी राजवाड्यात आला. त्याने गौतमाचे भविष्य शुद्धोदनाला सांगितले, ते असे– "हे राजा, हा मुलगा जगाला अपूर्व धर्मज्ञान देईल. पण मी मात्र त्याचे ते धर्मवैभव पाहायला जगणार नाही. युगायुगांतून क्वचित असे एखादे नररत्न जन्माला येते. त्याच्या दर्शनाने मी कृतार्थ झालो."

गौतमाचे प्राथमिक शिक्षण विश्वामित्र नामक एका गुरूकडे झाले. राम, धज, लक्खण, इ. आठ गुरूंनी व उदीच्य प्रदेशाच्या सब्बमित्र नामक कुलीन ब्राह्मणाने गौतमाला भाषा, व्याकरण आणि वेदांगे यांचे अध्यापन केले (मिलिंदपन्ह ६.६.३).

गौतम आपल्या बुद्धिमत्तेने अनेक विद्याकलांमध्ये पारंगत झाला. शारीरिक शिक्षणाच्या बाबतीतही तो उदासीन राहिला नाही. धनुर्विद्येत तर तो अर्जुनासारखा निपुण बनला. शाक्य युवकांच्या धनुर्विद्येतल्या चढाओढीत त्याने सर्वांचा पराभव करून आपले श्रेष्ठ धनुर्धारित्व सिद्ध केले. त्या विजयाचा जणू पुरस्कार म्हणून कोलिय राजकुमारी यशोधरा त्याला मिळाली. वयाच्या सोळाव्या वर्षी गौतमाचा यशोधरेशी विवाह झाला.

गौतमाने धनुर्विद्येच्या स्पर्धेत ज्या तरुणांना पराभूत केले, त्यांत गौतमाचा देवदत्त नामक एक दूरचा भाऊ होता. आपला पराजय तो कधीही विसरू शकला नाही. पुढच्या आयुष्यात तो गौतमाचा सर्वांत मोठा शत्रू बनला.

विवाह झाल्यानंतर शुद्धोदन राजाने गौतमाला तीन ऋतूंत सुखावह होतील, असे तीन वाडे बांधून दिले. गौतम परमार्थाकडे वळणार आहे, हे भविष्य शुद्धोदनाला पूर्वीच कळून चुकले होते. ते घडू नये म्हणून तो त्याला विलासी जीवनाची गोडी लावण्याचा आटोकाट प्रयत्न करीत होता. त्या राजप्रासादात गौतमाभोवती त्याने पृथ्वीवरची सर्व सुखे आणून उभी केली. त्याला रिझवण्यासाठी त्याने सुंदर नृत्यांगना नियुक्त केल्या. त्याच्या डोळ्यांना सुंदरच दृश्ये दिसावी, त्याच्या कानांना सुस्वर शब्दच ऐकू यावे, अशी सारी व्यवस्था त्याने केली. गौतम जे जे मागेल, ते ते शुद्धोदनाने त्याला पुरविले. गौतम जणू यशोधरेसह स्वर्गीय उद्यानात विहार करू लागला.

पण त्याचे हे सुख फार दिवस टिकले नाही. जगातल्या रोगराई, दारिद्र्य आणि मृत्यू या गोष्टी त्याने स्वतःच्या डोळ्यांनी पाहाव्या, असा जणू ईश्वरी संकेतच होता. एके दिवशी अचानक त्याचे मन अस्वस्थ झाले. त्याला वाटले, की आपल्या महालाच्या बाहेर जे अफाट जग पसरलेले आहे, ते आपण एकदा पाहावे. त्याने आपली ही इच्छा राजाला कळवली. राजाने मोठ्या कष्टानेच तिला मान्यता दिली. गौतमाच्या नगरसंचाराच्या वेळी त्याला रोगी, पंगू, म्हातारे, असे लोक दिसता कामा नयेत, असा त्याने हुकूम सोडला. अधिकाऱ्यांनी त्याप्रमाणे सर्व व्यवस्था केली. प्रजाजनांनी आपल्या युवराजाच्या सन्मानार्थ सारे नगर शृंगारले.


गौतम बुद्ध – अमरावती,
(६ वे शतक)

ठरल्या वेळी गौतम रथात बसून नगरसंचाराला निघाला. त्यासरशी सर्वत्र त्याचा जयजयकार सुरू झाला. पौरजनांच्या त्या उत्कट आनंदाने गौतमाचे मन बहरून गेले. आजूबाजूला आणि मागपुढे पाहत असता त्याच्या दृष्टीला सौंदर्य आणि मांगल्यच प्रतीत झाले. तो आपल्याशीच म्हणाला. 'किती सुंदर जग आहे हे!' पण हा त्याचा आनंद क्षणिकच ठरला; कारण तेवढ्यात एक म्हातारा भिकारी अचानक त्याच्यापुढे आला. त्याच्या सर्वांगावर सुरकुत्या होत्या. तो जीर्णशीर्ण झाला होता. तो केविलवाण्या स्वरात गौतमाकडे याचना करू लागला. गौतमाने छन्न नावाच्या आपल्या सारथ्याला विचारले. 'हा माणूस असा चमत्कारिक का दिसतो?' छन्न म्हणाला. 'युवराज, हे म्हातारपण आहे. याच्या शेवटी मृत्यू.' गौतम चरकला. त्याला वाटले, जग दिसते तितके सुंदर नाही आणि सुखीही नाही. पुढे त्याला आजार, दुःख, मृत्यू याही सर्व गोष्टी थोड्याच काळात दिसून आल्या. गौतमाच्या मनावर त्यांचा फार परिणाम झाला. विचार करता रोग, वार्धक्य आणि मृत्यू या गोष्टी कोणालाही टाळता येत नाहीत, याची त्याला खात्री पटली. त्यामुळे संसाराविषयीची त्याची सारी आसक्ती पार मावळली. तो आपल्याशीच म्हणाला. 'जरा आणि मरण या दोन दुःखांनी मानवजात ग्रस्त झालेली आहे. या दुःखांतून तिची सुटका झाली पाहिजे आणि त्यासाठी आपण स्वतः प्रयत्न केला पाहिजे.'

गौतमाने सोळाव्या वर्षापासून एकोणतिसाव्या वर्षापर्यंत

सर्वांगसुंदर वैवाहिक जीवन उपभोगले. एकोणतिसाव्या वर्षी त्याला एक मुलगा झाला. ती वार्ता समजताच त्याच्या तोंडून उद्गार निघाला. 'बंधनाचा जन्म झाला!' मुलाचे नाव काय ठेवावे, असा विचार चालू असता गौतमाने राहुल नाव ठेवा, असे सांगितले. राहुल याचा अर्थ शृंखला असा होतो. पण ही शृंखला पायात अधिक घट्ट बसण्यापूर्वीच तो संसार सोडून जाणार होता. त्याने तात्काळ आपल्या निष्क्रमणाचा दिवस निश्चित केला. ती रात्र आषाढी पौर्णिमेची होती. मध्यरात्री सगळीकडे सामसूम झाले असता गौतम यशोधरेच्या महालात आला. ती राहुलाला कुशीत घेऊन गाढ झोपली होती. सभोवती सुगंधी तेलाचे दिवे मंदपणे पाजळत होते. यशोधरेच्या मुखमंडलावर अवर्णनीय असा आनंद पसरला होता. ते दृश्य अत्यंत मनोवेधक होते. त्यामुळे क्षणभर गौतमाचे मन मोहरले. त्याला तिथून हालूच नये असे वाटले. पण त्याने थोडयाच वेळात स्वतःला सावरले. तो म्हणाला. 'मला आता माझ्या निश्चयापासून ढळता येणार नाही. काहीही झाले तरी मला आता हे मायापाश तोडून बाहेर पडलेच पाहिजे.'



गौतम आपला सारथी व घोडा यांना निरोप देत आहे. (बोरोबुदूर– जावा)

गृहत्याग – लगेच तो माघारा वळला. त्याने छन्नाला जवळ बोलावून त्याला आपला आवडता कंथक घोडा बाहेर काढायला सांगितले. छन्नाने त्याची आज्ञा पाळली. गौतम राजवाडयातून बाहेर आला व घोडयावर बसला. घोडा चालू झाला. घोडयाच्या मागून छन्नही निघाला. त्यांनी नगराची वेस ओलांडली. रात्रभर ते दोघेही चालत राहिले.

सूर्योदयाच्या सुमारास गौतमाच्या राज्याची हद्द संपली. तिला लागूनच अनोमा नदी वाहत होती. गौतम ती नदी ओलांडून पलिकडे गेला आणि थांबला. आता त्याचा पाठलाग होण्याची शक्यता फार कमी होती. त्याने आपले रेशमी कपडे आणि अलंकार उतरवून ते छन्नाला देऊन टाकले. छन्नाला त्या गोष्टीचे अत्यंत दुःख झाले. तो डोळयात अश्रू आणून गौतमाला म्हणाला. 'महाराज, तुम्ही असे करू नका. घरी परत चला. तुमचे आईवडील आणि तुमची राणी यांना तुमच्या या गृहत्यागाने फार दुःख होईल. तुम्ही त्यांच्या दुःखाचा काहीच विचार करणार नाही काय?' त्यावर गौतम सांत्वनपूर्वक छन्नाला म्हणाला. 'अरे, मी साऱ्या जगाचेच दुःख नष्ट करण्यासाठी निघालो आहे. तसे झाले म्हणजे माझ्या घरच्या माणसांचेही दुःख आपोआप नष्ट होईल.'

छन्नाचा निरुपाय झाला. तो कंथक घोडयाला घेऊन राजधानीला परत फिरला. त्याची पाठ फिरताच गौतमाने आपले रेशमासारखे सुंदर, तुकतुकीत केस आपल्या तलवारीने कापून टाकले आणि साधे पीतवस्त्र परिधान केले. नंतर तो ज्ञानप्राप्तीसाठी गुरूच्या शोधार्थ निघाला.

गौतमाचा हा गृहत्याग महाभिनिष्क्रमण या नावाने बौद्ध वाङ्मयात प्रसिद्ध आहे. तसे पाहिले, तर तरुणपणी बुद्धाचा गृहत्याग ही गोष्ट त्या काळात मोठीशी अलौकिक नव्हती.

ऐन तारुण्यात संन्यास घेऊन ज्ञानप्राप्तीसाठी जगभर भटकणाऱ्या कित्येक पुरुषांच्या कथा आपल्याला ब्राह्मणकालीन व उपनिषत्कालीन वाङ्मयात आढळतात. 'यदहरेव विरजेत् तदहरेव प्रव्रजेद् गृहाद्वा वनाद्वा' = ज्या दिवशी वैराग्य उत्पन्न होईल, त्याच दिवशी संन्यास ग्रहण करावा, मग तो वानप्रस्थातून असो वा गृहस्थाश्रमातून असो, अशी तत्कालीन विचारधारा होती. याज्ञवल्क्यानेही हाच विचार बृहदारण्यकात पुढील शब्दांत सांगितला आहे –

ज्ञानी व बुद्धिमान पुरुष संतानाची इच्छा धरीत नाहीत. आत्मा हेच ज्यांचे घर झाले, त्यांना संततीचे काय होय ! ते संतानाची कामना, धनार्जनासाठी उद्योग व सांसारिक सुखांचा हव्यास सोडतात आणि तपस्वी बनून बाहेर पडतात.

गौतमाच्या काळात असे कित्येक संन्याशी गुरूकडून ज्ञान मिळवून गुरूंच्या मतानुसार आपली संघटना किंवा संप्रदाय निर्माण करीत. असे ६३ संन्याशीसमाज किंवा संप्रदाय त्या काळात भारताच्या पूर्वभागात वावरत होते. गौतमाचेही वैराग्य त्यांच्याच जातीचे होते. म्हणून त्यानेही तोच मार्ग पत्करला.

सुरवातीस काही काळ गौतम अनुपिय नामक एका आम्रकुंजात राहिला. नंतर त्याने राजगृह नगरीला जायचे ठरवले. वाटेत त्याला भिक्षा मागून अन्न मिळवावे लागे. ते कदन्न त्याच्या पोटात काही केल्या उतरत नसे. पण तो स्वतःची निर्भर्त्सना करीत ते तसले अन्नही पोटात ढकली.

राजगृहाजवळच आलार कालाम नामक एक संन्याशी राहत होता. त्या काळातला तो एक सुप्रसिद्ध ज्ञानी पुरुष होता. त्याचे तीनशे शिष्य होते. गौतम त्याला शरण गेला व त्याच्यापाशी राहिला. त्याने गौतमाला नास्तिकवाद शिकविला. थोड्याच काळात गौतमाने आलार कालामाचे सर्व ज्ञान आत्मसात केले. त्यामुळे तो गौतमावर प्रसन्न होऊन त्याला म्हणाला. 'आता तू आणि मी सारख्या अधिकाराचे झालो. मित्रा, ये. तू आणि मी मिळून आपल्या समस्त शिष्यांना मार्गदर्शन करू.'

गुरूने दिलेला हा सन्मान फार मोठा होता; पण त्याच्याकडून गौतमाला जे ज्ञान मिळाले, त्याने गौतमाचे समाधान झाले नव्हते. सर्वोच्च सत्य आणि सर्वोच्च शांती याबद्दलची त्याची आकांक्षा त्या ज्ञानाने लवमात्रही पूर्ण झाली नव्हती. गौतमाने आलार कालामाला सोडले व तो उद्रक नामक दुसऱ्या एका गुरूकडे गेला. त्यानेही आपले तत्त्वज्ञान गौतमाला शिकवले. पण तिथेही त्याच्या आत्म्याला संतोष मिळाला नाही. गौतमाने त्याही गुरूला सोडले.

तिथून तो गयेजवळच्या उरुवेला नामक अरण्यात गेला. तिथे एक निर्मल जलप्रवाह वाहत होता. तिथे चारी बाजूंना हिरवीगार शेते आणि कुरणे होती. गौतमाने त्या सुंदर एकांत स्थळी वास्तव्य करून योगसाधनेला प्रारंभ केला. सहा वर्षे त्याने योगसाधनेत घालवली. तिथे जवळच पाच तपस्वी ब्राह्मण तप करीत होते. कौंडिण्य हा त्या तपस्व्यांचा पुढारी होता. त्या ब्राह्मणांना गौतमाच्या ठिकाणी काही अलौकिकत्व आढळले आणि ते गौतमाची सेवाचाकरी करून त्याला मदत करू लागले.



गौतम बुद्ध– गांधार शैली

हळूहळू गौतमाने आपली योगसाधना अधिक उग्र, अधिक कठोर बनवली. त्याने आपला आहार अत्यंत कमी केला. दिवसाचे दिवस तो ध्यान धरून बसू लागला. हळूहळू त्याचे शरीर वाळत चालले. त्याच्या सुंदर देहाला अस्थिपंजराचे स्वरूप आले. अखेर एक दिवस तो मूर्च्छित पडला.

त्या मूर्च्छेतून सावध झाल्यावर तो विचार करू लागला. 'छे: ! हे ठीक नव्हे ! सहा वर्षे मी कठोर तपश्चर्येत घालवली; पण अजून जे हवे ते सापडले नाही. शरीराचे असे हाल करून ते सापडेल, असेही वाटत नाही. मला हा मार्ग बदलला पाहिजे. याहून निराळे काहीतरी साधन शोधले पाहिजे. असे दुबळे होऊन किंवा शरीर झिजवून परमज्ञान प्राप्त होणार नाही. आपल्याला यापुढे काहीतरी खाल्लेच पाहिजे.'

या बदललेल्या विचारानुसार गौतम देहधारणेपुरती खिचडी खाऊ लागला. हे पाहून ते पाच तपस्वी ब्राह्मण गौतमावर नाखूष झाले. गौतम आपल्या उग्र साधनेने परमसत्याचे ज्ञान मिळवील व ते ज्ञान त्याच्याकडून आपल्याला मिळेल, या आशेवर ते गौतमाची सेवा करीत होते. गौतमाचा विचार बदलताच त्यांना वाटले, की हा आता सुखाला लालचावला. म्हणून ते त्याला सोडून वाराणसीजवळच्या ऋषिपत्तनात निघून गेले.



तपःकृश गौतम बुद्ध (गांधार शैली)

बोधिप्राप्ती– त्यानंतर वैशाख मासाची पूर्णिमा उगवली. त्या दिवशी गौतम एका वृक्षाखाली बसला असता सुजाता नावाची एक राजकन्या धुण्णा नामक दासीसह वृक्षपूजा करण्यासाठी तिथे आली. नैवेद्य म्हणून तिने एका सुवर्णपात्रात खीर आणली होती. वृक्षाखाली बसलेल्या गौतमाला वृक्षदेवता समजून तिने ती खीर त्याला समर्पिली. गौतम ते खिरीचे मांडे घेऊन नेरंजरा नदीच्या तीरी आला. त्याने प्रथम नदीत स्नान केले व मग ती मिष्ट खीर सेवन केली. तसे करताना त्याने संकल्प केला, की यापुढे सात आठवडे काहीही खायचे नाही.

नंतर तो एका अश्वत्थ वृक्षाखाली बसला. सोत्थिय नावाच्या एका गवतवाल्याने त्याला गवताच्या आठ पेंडचा दिल्या. गौतमाने वृक्षातळी त्या पेंढ्यांचे आसन बनवले. त्यावर बसताना त्याने मनाशी निर्धार केला–

माझी त्वचा सुको, माझी हाडे गळून पडोत, शरीरातले सगळे रक्त-मांस सुकून जावो, काय वाटेल ते या देहाचे होवो; पण मला परमज्ञान प्राप्त होईपर्यंत मी या आसनावरून रतिमात्रही हालणार नाही.

आणि गौतमाने आपली समाधी लावली. तो हळूहळू बोधीच्या जवळ जवळ जाऊ लागला. ज्यासाठी सहा वर्षे त्याने एवढा अट्टाहास केला, तो साक्षात्काराचा क्षण आता अगदी नजिक येऊन ठेपला. पण आताच त्याला एका मोठ्या दिव्यातून पार व्हायचे होते. देवांचा शत्रू जो मार तो बुद्धाची समाधी भंग करण्यासाठी तिथे चंग बांधून आला. प्रथम त्याने मोठे वादळ निर्माण केले. मग भोवतालचे जंगल पेटवून दिले. त्यानंतर अक्राळविक्राळ राक्षस गौतमावर घातले; पण या कोणत्याही संकटाने गौतमाची शांती ढळली नाही. गौतम भीतीने बघत नाही, असे पाहिल्यावर माराने त्याच्यावर मोहनास्त्र टाकले. फुलासारख्या नाजूक, चंद्रासारख्या सुरेख आणि विजेसारख्या लवलवत्या, अशा अप्सरा त्याच्यापुढे येऊन नृत्य व हावभाव करू लागल्या. पण तरीही गौतमाचे चित्त अविचल राहिले. शेवटी माराने यशोधरेची मूर्ती आणून गौतमापुढे उभी केली. 'नाथ, आपण आपल्या या दासीला कसे हो विसरला !' असे म्हणून ती गौतमाची काकुळती करू लागली. पण तरीही गौतमाचा निर्धार अभंगच राहिला. शेवटी मार थकला. या धर्मात्म्यापुढे आपले काही चालणार नाही, अशी खात्री होऊन माराने तिथून काढता पाय घेतला.

दुसऱ्या दिवशी अरुणोदयाच्या वेळी गौतमाला सर्वश्रेष्ठ धर्मतत्त्वाचा साक्षात्कार झाला. त्याला सम्यक्संबोधी (परमज्ञान) प्राप्त झाली. त्याच्या अंतरात दिव्य तेज पसरले. कृतार्थतेचा एक अपूर्व आनंद त्याला लाभला. त्या क्षणी त्याला समजून चुकले, की जगाच्या सर्व दुःखांच्या मुळाशी एकच गोष्ट आहे आणि ती म्हणजे तृष्णा ! या तृष्णेला उद्देशून तो म्हणाला—

अनेकजातिसंसारं सन्धाविस्सं अनिब्बिसं ।
गहकारकं गवेसन्तो दुक्खा जाति पुनप्पुनं ।।
गहकारक ! दिट्ठोसि पुन गेहं न काहसि ।
सब्बा ते फासुका भग्गा गहकूटं विसाङ्खतं ।
विसङ्खारंगतं चित्तं तण्हानं खयमज्झगा ।।

(धम्मपद ११.८–९)

अर्थ – कधीही न थांबता अनेक जन्मपर्यंत मी संसारात दौडत राहिलो. (हे देहरूपी) गृह निर्माण करणाऱ्या व्यक्तीला (तृष्णा) शोधीत शोधीत पुनःपुन्हा दुःखमय जन्मात पडत राहिलो. हे गृहकारण तृष्णे, तू आता मला दिसलीस. यापुढे तू घर बनवू शकणार नाहींस. तुझे सगळे दुवे तुटून पडले

आहेत. घराचे शिखर कोसळून पडले आहे. आता माझे चित्त संस्काररहित झाले. मला अर्हत्त्व प्राप्त झाले.

त्यानंतर गौतम त्या आनंदाचा अनुभव घेत सात दिवस तसाच बसून राहिला. या धर्मतत्त्वाच्या साक्षात्कारामुळे गौतम हा बुद्ध झाला. सातव्या दिवशी तपुस्स व भल्लिक नावाचे दोन व्यापारी तिकडून जात होते. त्यांनी बुद्धाची ती अलौकिक मूर्ती पाहून त्याला रोटी आणि मध या वस्तूंचे भोजन दिले. ते साष्टांग प्रणिपात करून बुद्धाला म्हणाले. ‘महाराज, शिष्य म्हणून आमचा स्वीकार करा.’ बुद्धाने त्यांची विनंती मान्य केली. ते दोघे व्यापारी बुद्धाचे पहिले शिष्य बनले.

बुद्धाचे साधक जीवन आता समाप्त झाले होते. मग तो स्वतःला झालेले श्रेष्ठ ज्ञान मेघवृष्टीने इतरांस देण्यासाठी तिथून निघाला. त्याला वाटले, की आपले हे श्रेष्ठ ज्ञान प्रथम आलार कालाम व उद्रक या आपल्या गुरूंनाच द्यावे; ते विद्वान, दोषरहित अतएव हे ज्ञान ग्रहण करण्यास सत्पात्र आहेत. आपल्या पूर्वगुरूंना जणू तो ज्ञानाची गुरुदक्षिणाच द्यायला निघाला होता; पण दुर्दैवाने ते दोघेही गुरू जगातून निघून गेले होते. मग बुद्धाला नेरंजरा नदीच्या काठी आपली सेवा करणाऱ्या त्या पाच ब्राह्मण तपस्व्यांची आठवण झाली. वाराणसीजवळच्या ऋषिपत्तनात ते राहत आहेत, हे त्याला कळले. म्हणून त्याने गया प्रदेश सोडून वाराणसीचा मार्ग धरला. ज्यांनी आपल्यावर अविश्वास दर्शविला, त्यांनाच तो आता आपले परमज्ञान उपदेशिणार होता. बुद्ध तिथे पोचताच त्या पाचही ब्राह्मणांनी बुद्धाचे सादर आतिथ्य केले आणि मग बुद्धाने त्या पाचांना आपले पहिले धर्मप्रवचन दिले —


माराच्या सेनेचा गौतमावर हल्ला (बोरोबुदूर–जावा)

‘साधूंनो, असे जवळ या. मी तुम्हांला धर्मज्ञान सांगणार आहे. मी उपदेशिलेल्या मार्गाने जाऊन तुम्ही समस्त दुःखांचा शेवट करा. मला चार आर्य सत्यांची प्रचीती झाली आहे. दुःख, दुःखसमुदय, दुःखनिरोध व निरोध-गामिनीप्रतिपद् अशी ती चार आर्य सत्ये आहेत. त्यांच्या सम्यग्ज्ञानानेच संबोधी प्राप्त होते. ही सत्ये प्राप्त करून घेण्याचा मार्ग आठ तत्त्वांचा बनलेला आहे. सम्यग्दृष्टी, सम्यक्संकल्प, सम्यग्वाक्, सम्यक्कर्म, सम्यगाजीव, सम्यग्व्यायाम, सम्यक्स्मृती व सम्यक्समाधी ही ती आठ तत्त्वे होत. ही सर्व मिळून उदात्त अष्टांग मार्ग बनतो. कठोर व्रते, तपे आणि विषयांचे अतिरिक्त सेवन ही दोन्ही टोके टाळली पाहिजेत. माझा मार्ग या दोहोंच्या मधून जाणारा मध्यम मार्ग आहे. हाच निर्वाणप्राप्तीचा खरा मार्ग होय. हे जग दुःखमय आहे. वासनेमुळे दुःख निर्माण होते. दुःखाचा नाश करायचा असेल, तर वासनेचा परिहार केला पाहिजे. अष्टांगिक मार्गानेच तो होऊ शकेल.’

बुद्धाचे हे पहिले धर्मप्रवचन होय. या प्रवचनाच्या द्वारे त्याने धर्मचक्राला एक वेगळी गती दिली. बौद्ध वाङ्मयात या घटनेला धर्मचक्रप्रवर्तन असे उदात्त नाव आहे.

कौंडिण्यादी त्या पाच ब्राह्मणांनी बुद्धाचा तो उपदेश ग्रहण केला. ते बुद्धाचे शिष्य बनले. त्या पाचांनी मिळून मग बौद्ध संघाची स्थापना केली. हळूहळू बुद्धाच्या अनुयायांची संख्या वाढू लागली. बोधिप्राप्तीनंतर पाच महिन्यांनी बुद्धाच्या शिष्यांची संख्या साठ झाली. मग त्या सर्व शिष्यांना एकत्रित करून बुद्धाने त्याना आदेश दिला —

शिष्यहो, आता तुम्ही एकत्र राहण्याचे कारण नाही. तुम्हांला

माझा धर्ममार्ग नीट समजला आहे. सर्वत्र संचार करून तुम्ही तो 'बहुजनहिताय, बहुजनसुखाय' सर्वांना समजावून सांगा.



गौतम बुद्धाचे धर्मचक्रप्रवर्तन

एका ठिकाणी दोघे जाऊ नका. स्वतःचे वर्तन पवित्र ठेवून या नव्या धर्माच्या सिद्धांतांचा प्रचार करा.

त्यानंतर बुद्ध उरुवेला ग्रामी परत आला. उरुवेला हा ब्राह्मणांचा बालेकिल्ला होता. तिथे एक हजार जटाधारी मुनी राहत होते. महाविद्वान कश्यप हा त्यांचा पुढारी होता. बुद्धाने गयाशीर्ष पर्वतावर जाऊन त्यांच्यापुढे धर्मप्रवचन केले, त्याच्या प्रभावाने कश्यपासह ते एक हजार जटाधारी मुनी बुद्धाला सर्वभावे शरण गेले. त्यानंतर बुद्ध आपल्या नव्या शिष्यांसह राजगृहाबाहेरच्या यष्टिवनात पोचला. तिथला बिंबिसार नामक राजा अनेक ब्राह्मण व नागरिक यांच्यासह बुद्धदर्शनाला आला. त्यानेही बुद्धाचे शिष्यत्व पत्करले व गुरुदक्षिणा म्हणून नगराजवळचे वेळुवन बुद्धाला समर्पित केले. राजगृहातच सारीपुत्त व मोग्गलान नावाचे आणखी दोन शिष्य बुद्धाला मिळाले. ते परिव्राजक संजयाचे अनुयायी होते. मगधातल्या अनेक कुलीन व प्रतिष्ठित युवकांनी बौद्ध धर्माची दीक्षा घेतली आणि ते भिक्षू बनून धर्मप्रचारासाठी बाहेर पडले. या घटनेने मगधात विलक्षण खळबळ माजली. लोक म्हणू लागले, की 'हा बैरागी गौतम आयांना निपुत्रिक व स्त्रियांना विधवा करायला निघाला आहे. याच्यामुळे कुटुंबेच्या कुटुंबे नष्ट होत आहेत.' बुद्धाच्या कानावर ही गोष्ट गेली, तेव्हा तो म्हणाला. 'केवळ सत्याच्या शक्तीचा साक्षात्कार झाल्यामुळेच लोक माझे शिष्य बनत आहेत.' त्यानंतर काही कालाने शुद्धोदन राजाकडून गौतमाला बोलावणे आले.

शुद्धोदनाचे निमंत्रण स्वीकारून बुद्ध आपल्या शिष्यपरिवारासह कपिलवस्तूला गेला. नगराबाहेरच्या न्यग्रोधकुंजात त्याने आपला पडाव टाकला. शुद्धोदनाने तिथे जाऊन आपल्या पुत्राची भेट घेतली. शुद्धोदन आला, भेटला; पण बुद्धशिष्यांच्या भोजनाची व्यवस्था करायला विसरला. त्यामुळे दुसऱ्या दिवशी गौतम बुद्धाला आपल्या शिष्यांसह नगरात भिक्षा मागायला जावे लागले. शुद्धोदनाला ती गोष्ट आवडली नाही. क्षत्रियकुलात जन्मलेल्या पुरुषाने भिक्षा मागणे, हे लज्जास्पद होय, असे त्याने बुद्धाला म्हटले. त्यावर बुद्ध त्याला म्हणाला.

'हे राजा, तुझे कुल हे राजकुल आहे. माझे कुल हे बौद्धकुल आहे आणि ते सदैव भिक्षावृत्तीवरच निर्भर आहे.' असे म्हणून बुद्धाने शुद्धोदनाला उपदेश करण्यासाठी पुढील गाथा म्हटली—

धम्मं चरे सुचरितं न तं दुच्चरितं चरे।
धम्मचारी सुखं सेति अस्मिं लोके परम्हि च ॥
(धम्मपद १३.३)



गौतम बुद्धाचा कपिलवस्तूत सत्कार

अर्थ — सुचरित धर्माचे आचरण करावे. दुराचरण करू नये.

धर्माचरण करणारा पुरुष इहपर दोन्ही स्थळी सुखपूर्वक राहतो.

त्या उपदेशाचा शुद्धोदनावर चांगला परिणाम झाला. त्याने बुद्धाला शिष्यपरिवारासह राजवाड्यात नेऊन मिष्टान्नाचे भोजन घातले. भोजन झाल्यावर राणीवशातल्या सर्व स्त्रिया बुद्धाच्या दर्शनाला आल्या. आली नाही ती एकटी त्याची धर्मपत्नी यशोधरा ! आपला पती आपल्याला न कळवता गृहत्याग करून निघून गेला, आपल्याला त्याने कायमचे विरहदु:ख भोगायला लावले, या गोष्टींचे शल्य तिच्या हृदयात सलत होते. बुद्धाला ती गोष्ट जाणवली. मग तो स्वत: उठून यशोधरेच्या महालात गेला. पतीचे दर्शन होताच यशोधरेचे प्रेमळ अंत:करण विरघळले. ती अश्रू ढाळीत पतीच्या चरणावर पडली. बुद्धाने तिचे सांत्वन करून तिला धर्मोपदेश केला. नंतर यशोधरेने राहुलाला आपल्या पतीच्या पुढे उभे केले. याच वेळी राहुलाने प्रथम आपल्या पित्याला पाहिले. बुद्ध हा भिक्षेसाठीच राजवाड्यात गला होता. म्हणून त्याने आपल्या पत्नीजवळ बौद्ध संघासाठी आपल्या पुत्राचीच भिक्षा मागितली. पती सर्वसंगपरित्यागी झाल्यावर पुत्र हाच केवळ यशोधरेला जीवनाचा आधार उरला होता. पण पतीची इच्छा मोडणे सती स्त्रीला उचित नव्हे, या भावनेने तिने राहुलाला पतीच्या स्वाधीन केले. मात्र बुद्धाने राहुलाला त्याच वेळी दीक्षा दिली नाही.

बुद्धाचा नंद नावाचा एक सावत्र भाऊ होता. तोही बुद्धाच्या उपदेशानुसार भिक्षू बनून बौद्ध संघात दाखल झाला. शुद्धोदन राजाच्या कुलातले राज्याधिकारी ठरणारे गौतम, नंद आणि राहुल हे, तीन्ही कुलपुत्र भिक्षू बनल्यामुळे गादीला कोणी वारस उरला नाही. या गोष्टीचे शुद्धोदनाला परम दु:ख झाले. बुद्धाला आपल्या पित्याचे हे मर्मग्राही दु:ख पाहवले नाही. त्याने त्याच दिवशी एक नियम करून टाकला. ‘आई-बापांच्या अनुमतीवाचून कोण्याही तरुणाला बौद्ध संघात दाखल करून घेऊ नये.’

त्यानंतर आनंद नावाचा आणखी एक शिष्य बुद्धाला मिळाला. तोही शाक्य कुलातच जन्मला होता. बापाने बंदी केली असताही आनंदाने गुप्तपणे बुद्धाचे दर्शन घेतले व बुद्धाने त्याला दीक्षा देऊन संघात दाखल केले. तो बुद्धाचा पट्टशिष्य ठरला. बुद्ध आपले सगळे मनोगत केवळ आनंदालाच सांगे. बौद्ध संघात त्याचा अधिकार फार मोठा होता.

त्यानंतर उपाली नावाचा एक नापित, अनिरुद्ध नावाचा एक महापंडित आणि अनाथपिंडिक नावाचा एक श्रेष्ठी असे आणखी काही बुद्धाचे शिष्य बनले. अनाथपिंडिकाने जेतवन नावाचे उद्यान विकत घेऊन ते बुद्धाला समर्पित केले. त्या उद्यानात त्याने बुद्धासाठी एक विहारही निर्माण केला (चुल्लवग्ग ६. ४).

त्यानंतर बुद्ध श्रावस्ती नगरीत प्राप्त झाला. तिथे पूर्णवर्धन नामक एक धनी व्यापारी राहत होता. त्याच्या पत्नीचे नाव विशाखा. ती विदुषी होती. तिची बुद्धावर श्रद्धा होती; पण तिचा पती निर्ग्रंथाविषयी पूज्यभाव बाळगीत होता. विशाखेने हळूहळू आपल्या पतीचे मतपरिवर्तन केले आणि त्याच्यासह ती बुद्धाची शिष्या बनली. पुढे काही कालाने सत्तावीस करोड सुवर्णमुद्रा खर्च करून तिने पूर्वाराम नावाचा विहार बनविला आणि तो भिक्षुसंघाला समर्पित केला.

त्यानंतर तत्कालीन सुप्रसिद्ध वैद्य जीवक हा बौद्ध संघात दाखल झाला. तो बालरोगांच्या चिकित्सेत विशेष निपुण होता. पुढे तो बौद्ध संघाचाही वैद्य बनला. एकदा गौतमबुद्ध बद्धकोष्ठाने आजारी असता जीवकाने उपचार करून बुद्धाची ती व्यथा दूर केली.

बुद्धाचे वर्षावास– महावंसो, ललितविस्तर व पाली जातक ग्रंथ यांमध्ये बुद्धाच्या श्रावस्तीगमनानंतरचा वृत्तांत मिळत नाही. त्याच्या निर्वाणापूर्वीच्या काही दिवसांचा वृत्तांत महापरिनिर्वाणसुत्तात सापडतो. मधल्या घटनांची माहिती बौद्ध साहित्यांतून कणकण गोळा करून मिळवावी लागते. श्री. ऱ्हिस डेव्हीसने तशी ती गोळा करून एक सूची तयार केली आहे; तिच्यावरून या मधल्या काळातील बुद्ध जीवनाचा परिचय होऊ शकतो, तो असा –

गौतमाला बोधी प्राप्त झाल्यानंतर पाचव्या वर्षा ऋतूत वर्षावासासाठी तो वैशालीत गेला व तिथल्या महावन कुंजात राहिला. तिथून पुढे दोन वेळा तो कपिलवस्तूला गेला. पहिल्या वेळी रोहिणी नदीच्या पाण्यावरून शाक्य-कोलिय लोकांत निर्माण झालेला संघर्ष मिटविण्यासाठी आणि त्यानंतर शुद्धोदनाचा मृत्यू झाला, तेव्हा त्याची अंत्यक्रिया करण्यासाठी. ती अंत्यक्रिया करून तो परत वैशालीला गेला. त्याच्या पाठोपाठ त्याची सावत्र माता महाप्रजापती, पत्नी यशोधरा आणि शाक्य-कोलिय कुलातल्या अनेक महिला मठीय जीवनाचा अंगीकार करण्यासाठी त्याच्या मागोमाग गेल्या.

गौतमबुद्ध स्त्रियांना आपल्या संघात सामील करून घेण्याच्या विरुद्ध होता. पण त्याचा पट्टशिष्य आनंद याने या बाबतीत आग्रह धरला आणि बुद्धाने त्या गोष्टीला नाखुषीनेच मान्यता दिली. मग त्याने संघातल्या भिक्षुणींचा एक पृथक संघ स्थापन केला आणि त्यांच्यासाठी वेगळे नियमही निर्माण केले. एवढे करूनही त्याने आनंदाला म्हटले. ‘आनंदा, जर स्त्रिया बौद्ध संघात सामील झाल्या नसत्या, तर माझा विशुद्ध धर्म चिरस्थायी

झाला असता. पण आता तो फक्त पाचशे वर्षेच चालेल' (महापरिनिर्वाणसुत्त ५. २३).

पुढे वैशालीहून बुद्ध कौशांबीला गेला. तिथल्या मुकुल पर्वतावर त्याने सहावा वर्षा ऋतू घालवला. सातव्या वर्षाऋतूसाठी तो श्रावस्तीत गेला. त्या कालात बुद्धावर एक नैतिक संकट कोसळले. त्याचे विरोधक असलेल्या काही आचार्यांनी चिंचा नावाच्या एका स्त्रीला गर्भवतीचे सोंग देऊन बुद्धापुढे आणले. या स्त्रीशी तू व्यभिचार केला आहेस, असा त्यांनी बुद्धावर आरोप केला. पण हे कपटकारस्थान लौकरच उघड झाले आणि बुद्धाचे चारित्र्य निष्कलंक ठरले.

आठवा वर्षा ऋतू बुद्धाने भर्ग देशातल्या मकर पर्वतावर घालवला, नववा कौशांबीच्या घोषिताराम नामक विहारामध्ये व्यतीत केला, दहाव्यासाठी तो पुनश्च श्रावस्तीला गेला. तिथे भारद्वाज नावांचा एक कर्मठ ब्राह्मण होता. तो शेती करून आपला गृहस्थाश्रम चालवीत असे. एके दिवशी बुद्ध त्याच्या घरी भिक्षा मागायला गेला असता तो बुद्धाला अद्वातद्वा बोलला —

“ए मुंड्या, माझ्या दारातून चालता हो. आम्ही निढळाचा घाम गाळून शेतात अन्न पिकवावे आणि ते तू आयते खायला मागावेस याची तुला लाज वाटायला पाहिजे.”

त्यावर गौतम बुद्धाने शांतपणे त्या ब्राह्मणाला उत्तर दिले.

“महाराज, मीही एक शेतकरीच आहे.”

“कुठे आहे तुझे शेत ? कुठे आहेत तुझे बैल ?”

“भ्रांत झालेल्या माणसांची अंतःकरणे हे माझे शेत. प्रज्ञा हा माझा नांगर. शक्ती ही माझी बैलजोडी. आस्था हे बीज. मी प्रज्ञेचा नांगर फिरवून अज्ञानाचे तणकाटे काढून टाकतो आणि आस्थेची पेरणी करतो. या शेतकामातून मी निर्वाणाचे भरघोस पीक काढतो.”

गौतम बुद्धाच्या या भाषणाने भारद्वाजाला त्याची योग्यता कळून चुकली आणि तो बुद्धाला शरण गेला.

बारावा वर्षाऋतू त्याने वेरंजा या गावी घालवला. त्यानंतर त्याने तक्षशिलेजवळच्या सोरेय्य नामक स्थानापर्यंत एक प्रदीर्घ यात्रा केली. तिथून तो सांकाश्य, कनौज, प्रयाग, वाराणसी ही स्थळे करीत फिरून वैशालीला आला आणि तिथल्या कूटागारभवनात राहिला. तेरा ते सोळा हे वर्षाऋतू त्याने श्रावस्तीत घालवले. या काळात त्याने आपला पुत्र राहुल याला त्याच्या विसाव्या वर्षी संघात दाखल करून घेतले.

सतरावा विश्रामकाल राजगृहात व अठरावा चालिकेत व्यतीत झाला. गौतम बुद्ध चालिकेत असताना कुप्रसिद्ध दरवडेखोर अंगुलिमाल याला बुद्धाने उपदेश करून सन्मार्गावर आणले. अंगुलिमाल आपली दरोडेखोरी सोडून संघात दाखल झाला. बुद्ध जेतवनात असताना आणखी एक घटना घडली. बुद्धाच्या विरोधकांनी सुंदरी नावाच्या एका भिक्षुणीची हत्या करून तिचे प्रेत विहाराजवळ आणून टाकले व तिची हत्या बुद्धाच्या माथी मारली; पण विरोधकांचे तेही कृष्णकारस्थान फसले.

ही वीस वर्षे गौतम बुद्धाने भ्रमण आणि वर्षावास या दोन्ही प्रकारांनी धर्मप्रचार करण्यात सार्थकी लावली. त्यानंतरच्या काळात बुद्धाला आणखी एक प्रबल शत्रू निर्माण झाला; तो म्हणजे त्याचा दूरचा भाऊ देवदत्त हा होय. तो बुद्धाच्या संघात काही स्वार्थी हेतू मनात ठेवून दाखल झाला होता. बुद्धाला डावलून संघाचे पुढारीपण त्याला स्वतः बळकावयाचे होते. गौतम बुद्धाच्या वयाला ७२ वे वर्ष लागले असे पाहून त्याने संघात पुढील ठराव आणला. 'गौतम बुद्ध आता म्हातारा झाला असल्यामुळे त्याने निवृत्त होऊन त्या जागी आपल्याला नेमावे.'



अजातशत्रू गौतम बुद्धाला शरण येतो.

देवदत्त काय जातीचा मनुष्य आहे, हे बुद्धाला पूर्णपणे ठाऊक होते. म्हणून त्याने देवदत्ताचा तो प्रस्ताव झिडकारून लावला. त्यामुळे देवदत्त सूडाला पेटला. त्याने बौद्ध संघात असंतोष निर्माण करण्याचा प्रयत्न सुरू केला. बौद्ध संघात नव्यानेच दाखल झालेल्या ५०० व्रजवासी भिक्षूंना फोडून त्याने आपला स्वतःचा एक नवा संघ स्थापला. मगधराजा बिंबिसार हा बुद्धाचा शिष्य आणि बौद्ध धर्माचा संरक्षक होता. अजातशत्रू हा त्याचा पुत्र होय. देवदत्ताने अजातशत्रूला आपल्या कटात

ओढले आणि त्याच्याकरवी बिंबिसाराची हत्या करवली. मग अजातशत्रूकडून बुद्धावर तीन वेळा मारेकरी घातले. पण जे मारेकरी म्हणून गेले ते बुद्धाच्या तेजाने दिपून त्याचे शिष्य बनले. परहस्ते केलेले हे प्रयत्न फसलेले पाहून देवदत्त अधिकच चिडला. एके दिवशी बुद्ध रस्त्याने जात असता देवदत्ताने त्याच्यावर डोंगरावरची एक शिळा लोटून दिली. पण त्याही अपघातातून बुद्ध बचावला. पुढे त्याने एक माजलेला हत्ती बुद्धावर सोडला. बुद्ध त्या वेळी नगरात भिक्षेसाठी आला होता. तो मदांध हत्ती रस्त्यात धुमाकूळ घालीत बुद्धाच्या रोखाने निघाला. सगळे लोक आरडत ओरडत पळत सुटले. पण बुद्ध पर्वतासारखा निश्चल राहिला. तो हत्ती बुद्धाकडे आला मात्र, त्याचा सारा मद एकाएकी शांत झाला. त्याने नम्र होऊन आपली सोंड बुद्धाच्या पायावर टेकवली. बुद्धावरचे हे प्राणसंकट टळल्याबद्दल सर्वांनाच आनंद झाला. अशा रीतीने देवदत्ताचे सारे घातकी उपाय निष्फळ ठरले आणि तो बुद्धसूर्याच्या तेजापुढे सर्वार्थी हतप्रभ झाला. देवदत्ताने बुद्धशत्रू बनवलेला अजातशत्रूही शेवटी बुद्धाला शरण आला.

त्यानंतर बुद्धाने आपल्या आनंद नामक शिष्यासह अंबलठ्ठिका, नालंदा, पाटलिग्राम, कोटिग्राम, नदिका, वैशाली, इ. स्थलांची यात्रा केली. वैशालीत अंबपाली नावाची एक नर्तकी होती. ती एके दिवशी बुद्धाला शरण आली. तिने बुद्धाचे उत्तम आतिथ्य करून आपली अंबपालीवन नामक आमराई बुद्धाला समर्पित केली. वैशालीहून गौतम बुद्ध वेळुव नामक एका निकटवर्ती ग्रामात प्राप्त झाला. तिथे काही काल विश्रांती घेत असता तो आजारी पडला. त्या वेळी त्याने भविष्यवाणी उच्चारली. ‘आजपासून तीन महिन्यानंतर तथागत बुद्धाचा देहान्त होईल!’ त्या आजारातून बरा झाल्यानंतर गौतम तिथून निघाला आणि फिरत फिरत पावापुरीला गेला. तिथे त्याने चुंड नामक एका लोहाराच्या आम्रकुंजात मुक्काम ठेवला. त्या लोहाराने बुद्धाला भात व कुकुरमुत्ता नामक पदार्थ यांचे भोजन घातले. ते भोजन बुद्धाला बाधले. तिथून कुशीनाराला जाताना वाटेत त्याला अतिसार सुरू झाला. कुशीनाराजवळच्या वृक्षकुंजात त्याने आपला अंतिम विश्राम केला. आनंदाने बुद्धासाठी दोन साल वृक्षांच्या मध्ये एक शय्या अंथरली. बुद्ध तिच्यावर आडवा झाला. त्याने उत्तरेकडे डोके करून दक्षिण कुक्षीवर शयन केले आणि एका पायावर दुसरा पाय ठेवला. बुद्धाची ती मृत्युशय्या होती. त्याचा अंतकाळ हळूहळू जवळ येऊ लागला. आनंदाला आपल्या गुरूची ती अवस्था बघवेना. तो खाली मान घालून अश्रू ढाळू लागला. बुद्धाने त्याची ती दशा पाहून त्याला म्हटले -

‘आनंदा, रडू नको. शोक आवर. व्यक्ती कितीही प्रियतम असली, तरी तिचाही केव्हातरी वियोग व्हायचाच. जगातल्या समस्त वस्तूंचा हाच निश्चित शेवट आहे. तू अनेक वर्षे माझी उत्तम सेवाचाकरी केलीस. तुझे जीवन सत्कृत्याने भरलेले आहे. तू निर्वाणाचा खराखुरा अधिकारी आहेस.’

त्यावर आनंदाने बुद्धाला विचारले.

“ भगवन्, बौद्ध संघासाठी तुमचा अंतिम संदेश काय ?”

त्यावर गौतम बुद्धाने जे अंतिम उत्तर दिले, ते त्याच्या महात्मतेला साजेसेच आहे. तो म्हणाला.

“ यापुढे तथागत संघाचे नेतृत्व करू शकणार नाही आणि संघानेही तथागतावर अवलंबून राहू नये. आनंदा, तू सत्याला शरण जा. कोणताही बाहेरचा आश्रय स्वीकारू नको. सत्याचाच आश्रय घे आणि त्याच्याच प्रकाशात पुढे जा. तसेच स्वतः व्यतिरिक्त दुसऱ्या कोणालाही आपला आश्रित बनवण्याचा विचार करू नको. ”

“ भगवन्, तथागतांच्या अवशेषांचे आम्ही काय करावे ?”

“ आनंदा, तथागताच्या अवशेषांचा सन्मान करण्यासाठी



बुद्धाचे महापरिनिर्वाण – अजंटा

तुम्ही तुमचे कर्तव्य सोडू नका. तुम्ही स्वतःच्या कर्तव्यात निमग्न राहा. तुम्हाला एखाद्या विनयासंबंधी अथवा मी केलेल्या उपदेशासंबंधी काही शंका असल्या, तर आताच विचारून घ्या. मागाहून तुम्हाला न विचारल्याबद्दल दुःख व्हायला नको. ”

पण भिक्षूंपैकी कोणीही तोंड उघडले नाही. सारेच मूक आणि स्तब्ध राहिले. त्यावर बुद्धाने आपल्या जीवनातले अंतिम शब्द उच्चारले ते हे –

“ भिक्षूंनो, मला एकच गोष्ट तुम्हांला सांगायची आहे. सर्व वस्तू निरनिराळ्या द्रव्याच्या संयोगाने बनल्या असून, त्या नाश पावणाऱ्या आहेत. म्हणून प्रत्येकाने सावधानपणे आपापले कर्तव्य करून निर्वाण प्राप्त करून घ्यावे. ”

आणि त्यानंतर बुद्धाचे ते महान जीवन कायमचे शांत झाले. गौतम बुद्धाने निर्वाण मिळविले !

बुद्धमूर्तिध्यान – भागवत धर्मातील अवतारकल्पनेत बुद्धाला दशावतारांपैकी नववा अवतार मानले आहे. त्याच्या विषयी सुभाषितरत्नभांडागारात एक श्लोक दिला आहे, तो असा —

बद्ध्वा पद्मासनं यो नयनयुगमिदं न्यस्य नासाग्रदेशे
धृत्वा मूर्तौ च शान्तौ समरसमिलितौ चन्द्रसूर्याख्यवातौ ।
पश्यन्नन्तर्विशुद्धं किमपि च परमं ज्योतिराकारहीनं
सौख्याम्भोधौ निमग्नः स दिशतु भवतां ज्ञानबोधं बुधोऽयम् ॥

अर्थ– जो पद्मासनावर बसला आहे, ज्याची दृष्टी नासाग्रावर स्थिर झाली आहे, जो सामरस्याने एकत्र मिळालेले चंद्रसूर्य नावाचे शांत असे वायू आपल्या देहाच्या ठिकाणी धारण करीत आहे, जो निराकार व विशुद्ध असे कोणते तरी परम तेज आपल्या अंतःकरणात पाहत राहिला आहे व जो (सदैव) सौख्यसागरात निमग्न आहे, असा हा बुद्ध तुम्हांला ज्ञानबोध देवो.

स्वभावविशेष व कार्य– बोधिप्राप्तीनंतर बुद्धाने सतत पंचेचाळीस वर्षे अविच्छिन्न धर्मप्रचार केला. त्याचे कार्यक्षेत्र मुख्यत्वे भारताचा पूर्व भाग हेच राहिले. तो धर्मप्रचार कसा करी आणि त्याची दिनचर्या कशी असे, त्याविषयी बुद्धघोषाने तपशीलवार विवरण दिले आहे –

बुद्ध प्रातःकाळी उठे. कोणालाही कष्ट किंवा तसदी न देता आपले स्नानादी विधी पार पाडी. मग एकांत स्थली बसून काही चिंतन करी. भिक्षेचा समय होताच शरीरावर तीन वस्त्रे धारण करून आणि हातात भिक्षापात्र घेऊन कधी एकटा तर कधी शिष्यपरिवारासह भिक्षेला निघे. पुष्कळदा एखादा भाविक पुरुष बुद्धाच्या हातातले भिक्षापात्र काढून घेऊन त्याला आपल्या घरी भोजनासाठी नेई. भोजन झाल्यावर बुद्ध त्या घरच्या लोकांसाठी धर्मप्रवचन करी. मग आपल्या कक्षात वामकुक्षीसाठी जात असता दारात उभा राहून भिक्षुसमुदायाला उपदेश करी. वामकुक्षीनंतर थोडा वेळ स्वस्थ बसून लोकांच्या भल्याचे चिंतन करी. संध्याकाळी गावातले लोक त्याचा उपदेश ऐकायला येत. त्याच्या निवासस्थानापुढे सभाच भरे. मग बुद्ध त्या सभेला उद्देशून भाषण करी. त्यानंतर एकांतात तो आपल्या शिष्यांच्या किंवा जिज्ञासूंच्या अवघड प्रश्नांना उत्तरे देई. प्रहर रात्रीपर्यंत असा वार्तालाप चाले. मग तो उठून आपल्या कक्षाच्या बाहेर येई आणि काही काल चंक्रमण (शतपावली) करी. नंतर शांतपणे शय्येवर पडून निद्रा घेई.



गौतम बुद्धाचा अंत्यसंस्कार

बुद्ध भाषण करू लागला, की थोड्याच वेळात श्रोत्यांच्या मनावर त्याचा प्रभाव पडे. तो ज्या भाषेत उपदेश करी, ती भाषा संस्कृत नव्हती, तर तत्कालीन पूर्व भारतात प्रचलित असलेली पाली भाषेशी मिळतीजुळती अशी कोणती तरी होती. आपल्या प्रत्येक शिष्याला मातृभाषेत ज्ञान मिळवण्याची परवानगी त्याने दिली होती.

पाली भाषेत बुद्धाचे जे उपदेश आढळतात, त्यांची शैली उपनिषदांच्या शैलीसारखी आहे. त्याच्या उपदेशात भावनांचे उत्तेजन नसे, की कल्पनेची भरारी नसे. आपल्या सिद्धान्ताला धरून तो साध्या शब्दांत बोले. जणू शिकवल्याप्रमाणे सारे सांगे. त्याने मानवी व्यवहाराचे बारीक निरीक्षण केले होते. त्यामुळे त्याच्या भाषणात प्रपंचातील नित्य अनुभवातलेच उपमा-दृष्टांत येत. कधी कधी तो आपले विवेचन परिणामकारक करण्यासाठी एखादी अनुरूप कथाही सांगे. त्यामुळे श्रोत्यांच्या मनावर त्याच्या भाषणांचा उत्कृष्ट परिणाम होई. बुद्धाने जणू आपल्याला दुःखमुक्त होण्याचे अमृतरसायनच दिले, असे लोकांना वाटे. वादविवादाच्या प्रसंगी तो प्रथम आपल्या विरोधकांच्या सिद्धांतांचे जास्तीत जास्त स्पष्टीकरण

करून घेई. प्रतिपक्षाशी वाद करतानाही त्याचा संयम सुटत नसे. पाप्यांतल्या पापी मनुष्यालाही त्याच्या शब्दांनी दिलासा मिळे. तो म्हणे.

"दोषी मनुष्याला आपल्या दोषांची योग्य जाणीव होऊन खरा पश्चात्ताप झाला, तर त्यांचाही भविष्यकाल उज्ज्वल होईल. त्यालाही आत्मोद्धाराचा मार्ग सापडेल."

दूरदूरच्या ठिकाणांहून अनेक भिक्षू त्याच्या दर्शनाला येत. अशा वेळी अत्यंत जिव्हाळ्याने तो पहिला प्रश्न विचारी—

"भिक्षो, प्रकृती ठीक आहेना ? वाटेत तुझे खाण्या-पिण्याचे हाल तर झाले नाहीत ना ? तू थकला नाहीस ना ?"

बुद्धाला आपल्याविषयी कोणी आत्यंतिक प्रशंसा केलेली आवडत नसे. अशा वेळी तो बोलणाऱ्याला प्रतिप्रश्न करून त्याची चूक त्याला समजावून देई. एके दिवशी बुद्धाचा प्रिय शिष्य सारीपुत्त त्याला म्हणाला.

"भगवन, माझ्या दृष्टीने आपणाहून श्रेष्ठ असा ज्ञानी आज हयात नाही, आजवर कधी झाला नाही आणि यापुढेही कधी होणार नाही."

"ठीक आहे सारीपुत्ता. तुला पूर्वयुगात होऊन गेलेल्या सर्व बुद्धांविषयी माहिती असेलच."

"नाही भगवन, मला तशी माहिती नाही."

"हरकत नाही. अतीत बुद्धांविषयी नसेल; पण भावी बुद्धांविषयी तरी तू निश्चित जाणत असशील."

"नाही भगवन, मी तेही जाणत नाही."

"नसू दे ! कमीत कमी तू मला तरी निश्चितपणे जाणत असशील आणि माझ्या बुद्धीत तुझा पूर्णपणे प्रवेश झालेला असेल."

"नाही. ही गोष्ट मी अजून करू शकलो नाही."

"मग सारीपुत्ता, माझ्याविषयी आत्यंतिक मोठेपणाचे शब्द तू का बरे बोलतोस ? असे करणे उचित नव्हे."(महापरिनिर्वाणसुत्त १. ६१).

बुद्धाची निंदा करणारे आणि त्याच्या उपदेशाची रळी उडवणारे कित्येक लोक त्याला भेटले. पण त्यामुळे त्याची मनःशांती लवमात्र ढळली नाही. तो आपल्या शिष्यांना नेहमी सांगे.

"भिक्षूंनो, जर कोणी माझ्या सिद्धान्तांविरुद्ध बोलू लागला, किंवा जर कोणी संघाची निंदानालस्ती करू लागला, तर तुम्ही त्याचा द्वेष करता कामा नये. निंदा-स्तुतीविषयी तुम्ही समभावनाच धरली पाहिजे."

आपल्या उदार चरिताने, शुद्ध तर्काधिष्ठित उपदेशाने व मानवमात्राविषयीच्या असीम कळवळ्याने गौतम बुद्ध हजारो लोकांच्या आदराला पात्र झाला. त्याच्या शिष्यसमुदायात समाजाच्या सर्व थरातले लोक होते. बिंबिसार हा राजा, वस्स कार हा राज्यमंत्री, अनाथपिंडिक हा व्यापारी, कश्यप हा कट्ट वैदिक ब्राह्मण, अंबपाली ही गणिका, विशाखा ही धनिक स्त्री उपाली हा नापित, चुंड हा लोहार, अंगुलिमाल हा दरवडेखो असा हा बुद्धाचा शिष्यवर्ग पाहिला, की त्याच्या सार्वजनि गुरुत्वाची साक्ष पटते.

बुद्धकालीन परिस्थिती—बुद्धाने भारताच्या धार्मिक जीवनात जी वैचारिक क्रांती केली, तिचे रहस्य तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी उकलून दाखविले आहे. त्याचा सारांश असा-

बुद्धाच्या काळी भारत देश हा अशांत व अस्वस्थ होता. लहा लहान राज्ये व राजहीन भिन्न भिन्न गणसंस्था असे तत्काली समाजसंस्थेचे राजकीय स्वरूप होते. सार्वभौम सत्तेचा अभा असल्यामुळे निरनिराळ्या राज्यांत सदैव संघर्ष माजलेले असत एकमेकांच्या विरुद्ध कारस्थाने करण्यात तत्कालीन छोटी-मोठ राज्ये गुंतलेली असत. गणसंस्थांतही गटबाजी चालत अ नागरसंस्कृतीत जातिभेद व वर्णसंस्था त्या काळी दृढमूल झाले होती. ब्राह्मण्याचा आदर्श श्रेष्ठ होता, पण ब्राह्मणांचा प्रत्य वर्तनक्रम मात्र आदर्शाला हीनपणा आणणारा होता. तपस्वी भिक्षू, बैरागी यांचे संघ देशभर हिंडत होते; पण त्यांच्यांत वैमत्ये फार होती. सदैव युद्धे आणि वैरे धुमसत राहिल्या बुद्धाच्या आधीच 'सर्वं अनित्यं,' 'सर्वं क्षणिकं,' 'सर्वं दुःखं' ह दाहक अनुभव लोकांना पटू लागला होता.

गौतम बुद्धाने हे सर्व पाहिले व अनुभवले. समाजात शु नीतीची स्थापना झाल्याशिवाय त्याची या दुर्धर दुरवस्थे मुक्तता होणार नाही, असा त्याला साक्षात्कार झाला. त्यामु त्याने शुद्ध व शाश्वत अशा नीतितत्त्वांनाच आपल्या धर्मा प्राधान्य दिले.

विश्वचिंतन, आत्मचिंतन व साध्य-साधनांचे चिंतन अ बुद्धकालीन वैचारिक संग्रामाचे तीन भाग पडतात. पहिल दोहोंविषयी त्याने असा निर्णय घेतला, की विश्व वा आत् यांच्याविषयी अंतिम निश्चय सापडणे शक्य नाही. त्यासंबं शिष्यांनी त्याला प्रश्न विचारले असता बुद्धाने मौन ध आहे. वच्छगोत्ताने त्याविषयी आग्रह धरला असता गौत बुद्धाने म्हटले. 'विश्व व आत्मा यांच्या संबंधी ज्या तत्त्व चालतात, त्यांची मी उपेक्षा करतो. कारण ते विचार म्हण गोंधळात टाकणारे जंगल आहे. ते बुद्धीचे बंधन आहे. त्यांच मुळे दुःख, संभ्रम, निराशा आणि ताप याच गोष्टी पदर पडतात.'

विश्व व आत्मा यांच्या सिद्धान्तांविषयी बुद्धाने निश्चि उत्तर दिलेले नसले, तरी तद्विषयक विचार करण्याचे मा

त्याने टाळले नाही. जीवनाच्या तत्त्वज्ञानावर त्याचा मुख्य भर होता आणि विश्व व आत्मा यांच्याबद्दलचे विचार हे जीवनाच्या तत्त्वज्ञानाशी निगडित झालेले असल्यामुळे साध्य-साधनांचा विचार करताना त्यांची त्याला दखल घ्यावीच लागली. पण अंतिम सत्य काय आहे, यापेक्षा मनुष्याचे अंतिम ध्येय काय आहे, हा प्रश्न हाती घेऊन त्याने तो तडीस नेला; वस्तुमीमांसेपेक्षा मूल्यमीमांसा महत्त्वाची मानून कर्माकर्मविचारालाच जीवनात प्राधान्य दिले.

निश्चित, प्रत्यक्षसिद्ध व नित्य अनुभवाला येणाऱ्या अशा तथ्यांवर आपली विचारसरणी उभी करण्याचा पहिला प्रयत्न बुद्धाने केला. शुद्ध चारित्र्य व संयमात्मक जीवन यांच्या समर्थनासाठी जीवित दुःखमय आहे, या सार्वभौम नित्य प्रतीतीचा त्याने आधार घेतला. इंद्रियांच्या सुखांच्या पाठीमागे लागणारी माणसे अनंत दुःखांना बळी पडतात, हे नित्य अनुभवाला येणारे सत्य बुद्धाने उद्घोषित केले. संयम व त्याग यांची गरज केवळ परलोकासाठीच नव्हे, तर इहलोकातील जीवन यशस्वी करण्यासाठीसुद्धा आहे आणि त्या दोन साधनांनी इहलोकीच परमार्थ अनुभविता येतो, याची ग्वाही त्याने दिली. याउलट त्रिकालज्ञान, चमत्कार करण्याची शक्ती, देवतासाक्षात्कार, गूढवाद यांच्या योगाने धार्मिक श्रेष्ठत्व मिळवण्याची कल्पना बुद्धाला कधीही शिवली नाही. योगसामर्थ्यालाही त्याने दुय्यम स्थान दिले आणि बाह्य कर्मकांडाचेही धर्ममार्गातून उच्चाटण केले. आत्मशुद्धी करणाऱ्या नैतिक आचरणावरच त्याने मुख्य भर दिला आणि तोच धर्म मानला.

कामोपभोगांना महत्त्व देणारा वैदिक कर्ममार्ग आणि देहदंडनाचे उग्र व भयंकर तप सांगणारा योगमार्ग हे दोन्ही आत्यंतिक मार्ग मानसिक अधःपाताला कारण होतात, हे जाणून बुद्धाने अष्टांगयुक्त मध्यममार्ग जगाला दाखवून दिला.

शुद्ध नीती व शुद्ध चित्त हाच प्रत्यक्ष सद्धर्म होय, असे बुद्धाने प्रतिपादिले आहे. सद्धर्माला स्वयंसिद्ध मूल्य मानणे, ही गोष्ट मानवी इतिहासात बुद्धानेच प्रथम केली. बुद्धाच्या या धर्माचे रहस्य पुढीलप्रमाणे सांगता येईल—

कार्यकारणभाव जाणणारी स्थिर बुद्धी हे सद्धर्माचे अधिष्ठान होय. प्रमादरहित, निरलस व स्वस्थ असे चित्त प्रज्ञाशाली होऊ शकते. प्रसन्न चित्ताच्या योगानेच अधर्मावर विजय मिळवता येतो. जेव्हा बुद्धिमान मनुष्य अप्रमादाच्या साधनाने प्रमादाला जिंकून घेतो, तेव्हा तो मनुष्य प्रज्ञाशाली व शोकरहित होतो. चित्त प्रसन्न नसेल, तर प्रज्ञा प्राप्त होत नाही. राग, द्वेष व मोह हे चित्ताचे मल होत. ते नष्ट करणे, म्हणजेच चित्त प्रसन्न करणे होय. सारासार विचार म्हणजेच सम्यक्संकल्प होय. त्याच्या योगाने मध्यममार्ग साधता येतो. मध्यममार्ग म्हणजेच खरा शुद्धमार्ग होय. अविज्ञानाश, अभिज्ञान किंवा संबोध हेच निर्वाण होय.'

दृष्टी, अभिज्ञा, स्मृती, चक्षू, प्रज्ञा, इ. शब्दांनी ज्ञानाचा महिमा बुद्धाने वारंवार प्रतिपादिला आहे. नीतिशास्त्राचा हाच खरा पाया होय. बुद्धाला प्रत्यक्षसिद्ध व अनुभवाश्रित विचारावर धर्मसंस्थापना करायची होती. त्यासाठी त्याने सम्यक् संबोधाची प्रशंसा सर्वत्र केलेली आढळते.

बौद्ध धर्माच्या पूर्वीचे धर्म विशिष्ट समाजापुरतेच किंवा राष्ट्रापुरतेच मर्यादित होते. सर्व मानवांना व्यापू व पूनीत करू अशी प्रेरणा त्यांच्यांत नव्हती. म्हणून विश्वव्यापी धर्म ही संज्ञा सर्वप्रथम बुद्धाच्या धर्मालाच लागू पडते. जगाच्या इतिहासात विश्व व्यापण्यासाठी दिग्विजय करायला निघालेला पहिला धर्म हा बुद्धाचाच धर्म होय. त्यासाठी बुद्धाने उत्तम संघटना तयार केली. ख्रिश्चन धर्माने पुष्कळ बाबतीत धर्मसंघटनेचे तंत्र बौद्ध धर्मापासूनच उचलले, असे म्हणता येते. बुद्ध, धर्म व संघ हे बौद्ध धर्माच्या संघटनेचे तीन मुख्य अंश होत. मानवी इतिहासातले पहिले थोर मानवी चरित्र म्हणजे बुद्धचरित्र होय. राष्ट्राच्या ध्यानात भरणारे व राष्ट्रीय मनात शतकानुशतके घुमून राहणारे पहिले उच्चतम व्यक्तित्व बुद्धाच्याच रूपाने प्रथम अवतीर्ण झाले. पुढे बुद्ध ही व्यक्ती केंद्रस्थानी कल्पून त्याच्या भोवती धर्म, संघ आणि वाङ्मय या गोष्टी संघटित झाल्या. धार्मिक विचारांच्या प्रचारासाठी आवश्यक ती दीक्षा घेतलेला व शिस्तीत वाढलेला भिक्षुसंघ बौद्ध धर्माने संघटित केला. या संघात सर्वसंगपरित्याग करून मुक्त झालेल्या भिक्षूंचाच समावेश होत असे. हे भिक्षू इतर धर्म-संप्रदायांचा विरोध न करता जनांना बुद्धाचा धर्ममार्ग दाखवीत. ते मर्यादित क्षेत्रातही धर्मोपदेश करीत आणि देशोदेशी हिंडूनही धर्मस्थापनेचे कार्य करीत. मनुष्यमात्राचे कल्याण ही मूलभूत भावना त्यांच्या ठिकाणी होती. सामाजिक उच्चनीचत्वाची भावना त्यांनी पूर्णपणे विसर्जित केली होती. सामान्य जनांच्या जिव्हाळ्याने आणि कल्याणभावनेने बुद्धाचा हा संघ सर्वत्र संचार करीत असे.

पाहा— बौद्ध दर्शन, बौद्ध धर्म. [धम्मपद; प्रा. भा. वि. वि.; बुद्धदेव; बुद्धिस्ट इंडिया; अमेरिकन लेक्चर्स—डॉ. ऱ्हिस डेव्हिस.; वै. सं. वि.]

गौतम संघदेव (इ. स. चे ४ थे शतक) एक बौद्ध आचार्य. हा चीनला गेला होता. याने चिनी भाषेचा अभ्यास करून कित्येक संस्कृत ग्रंथांची त्या भाषेत रूपांतरे केली. दक्षिण चीनमध्ये असताना याच्या सन्मानार्थ तेथील

राजाने एक विहार बांधून दिला. त्या विहारातही त्याने संस्कृत ग्रंथांच्या भाषांतराचेच काम चालू ठेवले.

गौतमी गौतम बुद्धाची सावत्र माता. बुद्धाची आई मायादेवी हिची ही धाकटी बहीण होय. बुद्धाच्या जन्मानंतर अवघ्या सातच दिवसात मायादेवी मरण पावली. त्यामुळे सिद्धार्थाचे पालनपोषण गौतमीलाच करावे लागले. सिद्धार्थ बुद्ध झाल्यावर त्याने आपल्या जीवनात ज्या लोकोत्तर गुणांचा प्रत्यय दाखवला, त्यांचे बीजारोपण गौतमीनेच त्याच्या बालपणी केले होते. बुद्धाने धर्मस्थापना केल्यानंतर त्याच्या तत्त्वज्ञानाने प्रभावित होऊन तिने ५०० शाक्य महिलांसह बौद्ध धर्माची दीक्षा घेतली. बुद्धाच्या नव्या धर्माच्या प्रचारासाठी तिने आपले संपूर्ण जीवन वाहिले. थेरीगाथेत बुद्धाला उद्देशून ती म्हणते —

जेव्हा तू लहान होतास, तेव्हा तुझे बोबडे बोल ऐकून माझे कान तृप्त होत व डोळे आनंदाने भरून येत. परंतु आज तुझे ज्ञानयुक्त भाषण ऐकून माझे हृदय जे उचंबळून येते, त्याच्याशी त्या आनंदाची तुलना करणे केवळ अशक्य आहे.

बुद्धाने अखेरपावेतो तिला जन्मदात्रीपेक्षाही प्रेमाने आणि आदराने वागविले. [पू. प. सं. म.]

गौतमीपुत्र सातकर्णी सातवाहन राजवंश पाहा.

गौतमी बलश्री सातवाहन राजवंश पाहा.

गौर कैलासाच्या उत्तरेकडील एक पर्वत. हा पर्वत सुवर्णाचा आहे, अशी समजूत आहे. या पर्वतावर अनेक हरताल वृक्ष असून त्याच्या पायथ्याशी बिंदू नामक सरोवर आहे. भगीरथाने याच सरोवराच्या काठी तपश्चर्या केली होती व इंद्राने इथेच अनेक यज्ञ केले होते, असे वायू, ब्रह्मांड व मत्स्य या पुराणांत सांगितले आहे. [पु. इं.]

गौरा छत्तीसगढातल्या राबत जातीच्या स्त्रियांचा एक सण. या सणात गौरा-गौरीची मृण्मय मूर्ती स्थापन करून कार्तिक शु. एकादशीपासून पौर्णिमेपर्यंत त्यांची पूजा-अर्चा करतात. या देवतांची प्रार्थना करताना पुढील गीत म्हणतात—

एक पतरी रैनी झैनी राय रतन दुर्गादेवी
जागो गवरी जागो गौरा जागो सहर के लोक

गौरा–गौरी म्हणजे उमा-महेश्वर होत. [हिं. सा. बृ. इ.]

गौराग प्रभू चैतन्य महाप्रभू पाहा.

गौरिवीती एक सूक्तद्रष्टा. ऋग्वेदाच्या १० व्या मंडल तील ७३ व ७४ ही सूक्ते व आणखी का फुटकळ ऋचा याच्या नावावर आहेत. याने आपल्या सूक्तां इंद्र व मरुत यांची प्रशंसा केली आहे. याने केलेले इंद्रवर्णन उप निषत्कालातील परमात्म्याच्या वर्णनाशी जुळणारे आहे (ऋ. १०. ७३. १०).

विभिंदुकीयांनी केलेल्या सत्रात हा प्रस्तोता होता (जै. ब्रा. २. २३३). याला शक्तीचा पुत्र म्हटले आहे. त्यावरून हा व पराशर एकच असावा, असे वाटते. याचे एक सामही प्रसिद्ध आहे. ऋषभ याज्ञतुराचा हा पुरोहित होता (श. ब्रा. १३. ५. ४. १५). [प्रा. च. को.]

गौरी (१) शिवपरिवारातील एक देवी. कनौजला हिंचे पीठ आहे. हिची कथा अशी–

एकदा असुरांच्या त्रासाला कंटाळून सर्व स्त्रिया महालक्ष्मी गौरीकडे गेल्या आणि त्यांनी आपले सौभाग्य अक्षय्य करण्या विषयी तिची प्रार्थना केली. त्याला अनुसरून गौरीने असुरांचा संहार केला व शरण आलेल्या स्त्रियांच्या पतींना व पृथ्वीवरील प्राण्यांना सुखी केले. महालक्ष्मीच्या कृपाप्रसादाने आपल्या सौभाग्य प्राप्त झाले, म्हणून तेव्हापासून सर्व स्त्रिया महालक्ष्मी गौरीचे पूजन करू लागल्या.

महाराष्ट्रात भाद्रपद मासाच्या शुक्ल पक्षात गौरीपूजन कर तात. या गौरींना ज्येष्ठा गौरी म्हणतात. हे व्रत तीन दिव चालते. अनुराधा नक्षत्रावर गौरींचे आवाहन, ज्येष्ठा नक्षत्र वर पूजन आणि मूळ नक्षत्रावर विसर्जन होते. कोणी धातूं लक्ष्मीची प्रतिमा करून पूजतात, कोणी ती मातीची बनवतात, कोणी कागदावर देवीचे चित्र काढून त्याची पूजा करतात, त कोणी नदीकाठचे पाच लहान खडे आणून त्यांची गौरी म्हणू पूजा करतात.

महाराष्ट्रातील बहुजनसमाजात मात्र गौरी पूजण्याची निरा ळीच तऱ्हा आहे. ते लोक मातीची नवीन पाच लहान मडकी आणून त्यांत हळदीने रंगविलेला दोरा, पाच खोबऱ्याच्या वाट्या व खारका घालून त्यांची उतरंड रचतात आणि त्यांच्या वर गौरीचा मातीचा मुखवटा बसवतात. गौरीच्या अशा दो प्रतिमा तयार करून मग त्यांची पूजा करतात. तिसऱ्या दिव ती मडकी उतरून त्यांतील दोरे व खारीक-खोबरे काढू घेतात. मग त्या खारीक-खोबऱ्याचे तुकडे त्या दोऱ्यात बांधू घरातील सुवासिनी व मुले तो दोरा गळ्यात बांधतात. पु एखादा चांगला दिवस पाहून ते दोरे काढतात व ते दुधादह्या भिजवून शेतात पुरतात. काही ठिकाणी घरातील कुमारिका

सुवासिक फुले येणाऱ्या एखाद्या वनस्पतीची मूठभर रोप उपटून त्यांच्याच गौरी बनवतात व त्यांना मिरवीत घरी आणतात. घराच्या दारात त्यांच्यावरून तांदूळ व पाणी ओवाळून टाकतात. नंतर त्या गौरी घरातील प्रत्येक खोलीत नेतात. एकेका खोलीत प्रवेश केल्यावर गौरी हातात घेतलेल्या कुमारिकेला घराची मालकीण ‘गौरी, गौरी कुठे आलात? ’ आणि ‘तुम्हाला इथे काय दिसते?’ हे दोन प्रश्न विचारते. मग ती त्या प्रश्नाच्या निमित्ताने घराच्या ऐश्वर्याचे वर्णन करते. घराची मालकीण मग गौरींना सोन्याच्या पायांनी या व कायमच्या राहा, असे सांगते. त्या रात्री रोपट्यांच्या त्या जुडग्यांना स्त्रीचा आकार देतात आणि वर मुखवटा बसवतात.

दुसऱ्या दिवशी गौरींची पूजा करून त्याना मोदकांचा नैवेद्य दाखवतात. नंतर प्रत्येक सुवासिनी आपल्या उंचीच्या सोळापट लांब दोरा घेऊन त्याचा गुंडा करून गौरींपुढे ठेवते व त्याची पूजा करते. रात्री घरातील स्त्रिया व मुली जागरण करतात. तिसऱ्या दिवशी गौरींची पूजा करतात व सुताच्या गुंड्याला सोळा गाठी देऊन त्याचीही पूजा करतात. तो गुंडा मग हळदीने रंगवून त्यातला दोरा घरातल्या सुवासिनी आपल्या गळ्याभोवती बांधतात. तो नवीन पीक येईपर्यंत गळ्यात ठेवतात. आश्विन वद्य अष्टमीला तो गळ्यातून काढून त्याची पूजा करतात. या दोऱ्याला महालक्ष्मी असे समजतात.

तिसऱ्या दिवशी गौरींचे नदीत विसर्जन करतात व परत येताना नदीतील थोडी वाळू घरी आणून ती सर्व घरभर व परसातल्या झाडांवर टाकतात. त्यायोगे घरात समृद्धी नांदते व झाडाझुडपांचे कीटकांपासून संरक्षण होते, अशी समजूत आहे.

कोकणातील शेतकरीवर्गात गौरीचा सण महत्त्वाचा असतो. ते लोक तेरड्याची रोपे एकत्र बांधून त्यांची प्रतिमा बनवतात व त्यावर मातीचा मुखवटा चढवतात. नंतर त्या मूर्तीला साडी नेसवून दागदागिन्यांनी सजवतात.

द. भारतात भाद्रपद शु. तृतीयेला गौरीचा सण सुरू होतो व तो बरेच दिवस चालतो. प्रत्येक गावात गौरीची एक पिठाची प्रतिमा करतात व तिला मखरात बसवून पूजतात. तिची रस्त्यातून मिरवणूकही काढतात.

गौरीच्या व्रताची कथा अशी – एक ब्राह्मण होता. तो फार गरीब होता. त्यामुळे त्याला भाद्रपदातील गौरी पूजता येईनात, म्हणून त्याला फार वाईट वाटले व तो एका तळ्याजवळ जीव देण्यासाठी गेला. तिथे त्याला एक म्हातारी भेटली. तिने त्याला जीव देण्याच्या बेतापासून परावृत्त केले व त्याच्याबरोबर ती त्याच्या घरी आली. तिच्यासाठी स्वयंपाक करावा, म्हणून ब्राह्मणाची पत्नी घरात काही धान्य आहे का, ते पाहू लागली. तर तिला भांड्यांत विपुल धान्य भरलेले दिसले. हा सगळा म्हातारीने केलेला चमत्कार होता.

दुसऱ्या दिवशी म्हातारीने ब्राह्मणाकडे दूध मागितले. पण घरात दूध नव्हते. तेव्हा तिने ब्राह्मणाला गोठ्यात खुंटे पुरून त्यांना दावी अडकवून ठेवायला सांगितले. संध्याकाळी जितके खुंट पुरले होते, तितक्या गायीम्हशींची नांवे घेऊन त्यांना हाक मारायला सांगितले. त्याप्रमाणे हाक मारताच गायीम्हशी आल्या व मग ब्राह्मणाने त्यांचे दूध काढले.

मग म्हातारी जायला निघाली, तेव्हा ब्राह्मण तिला पोचवायला तळ्यापर्यंत गेला. म्हातारीने त्याला तिथली थोडी वाळ दिली व ती घरातील मालमत्तेवर टाकायला सांगितली. त्यायोगे तुझे ऐश्वर्य कायम राहील, असेही ती म्हणाली. जाताना दरसाल गौरीची पूजा करण्याबद्दल तिने ब्राह्मणाला आदेश दिला.

महाराष्ट्रात चैत्रमासातही गौरीची पूजा व त्यानिमित्त हळदीकुंकवाचा समारंभ होत असतो. या गौरीला मखरात न बसवता दोल्हाऱ्यात बसवतात. चैत्र शु. प्रतिपदेपासून अक्षय्यतृतीयेपर्यंत तिची पूजा चालते.

गौरी ही शिवाची चिच्छक्ती असून, आध्यात्मिक दृष्टीने तिला शिवरूप आत्म्याची बह्माकार वृत्तीच मानलेले आहे. [श. क.; रत्ना. गॅझे.; सा. इं. फे.; शिवलिंगोपासना]

(२) एक तांत्रिक देवता. ही चतुर्भुज असून, हिच्या हातांत आरसा, अंजनशलाका, पाश व अंकुश असतात. [श्रीविद्यार्णवतंत्र]

(३) जैन दैवतसमूहातील एक यक्षिणी. श्रेयांसनाथाची सेविका. हिचे वर्णन असे – हरिणवाहना (श्वेतांबरमते सिंहवाहना), चार हातांत मुद्गर, कमल, कलश आणि वरद मुद्रा धारण करणारी (श्वेतांबरमते वरदमुद्रा, मुद्गर, कलश व अंकुश धारण करणारी). ही यक्षिणी तशीच विद्यादेवीही आहे. पुराणातील शिवभार्या गौरीशी हिचे बरेच साम्य दिसते. [जै. इ.]

(४) बौद्धांच्या वज्रयान पंथातील आठ लोकप्रिय देवता गौरी या नावाने ओळखल्या जातात. यांची वर्णने साधनमाला व निष्पन्नयोगावली या ग्रंथांत आढळतात. या देवता अत्यंत भेसूर असून, मुंडमाला धारण करणाऱ्या आहेत. त्यांची नावे अशी– १. गौवी– गौरवर्ण. अंकुश हे हिचे चिन्ह. २. चौरी– पीतवर्ण. पाश हे चिन्ह. ३. वेताली– रक्तवर्ण. साखळी हे चिन्ह. ४. घस्मरी – हरितवर्ण. घंटा हे चिन्ह. ५. पुक्काशी – नीलवर्ण बोधिचित्तघट हे चिन्ह. ६. शबरी – श्वेतवर्ण. मेरुपर्वत हे चिन्ह. ७. चंडाली – नीलवर्ण. वन्हिकुंड हे चिन्ह. ८. डोंबी- विश्ववर्ण (मिश्र). पताका हे चिन्ह.

या सर्व देवता द्विभुज आहेत. त्यांच्या एका हातात चिन्ह व दुसऱ्या हाताची तर्जनीमुद्रा असते. [इं. बु. इ.]

(५) एक रागिणी. जाती संपूर्ण (वक्ररूपी). या रागात ऋषभ व धैवत कोमल लागतात व बाकी सर्व स्वर शुद्ध लागतात. मुख्य अंग – रे म प नी ध प म प म ग रे सा. आरोह– सा रे ग रे ग ग म प म प ध नि सा. अवरोह – सा नि ध म प ध म प म रे ग रे ग रे नि सा नि सा. हिचे ध्यान असे–

श्यामा मदोन्मत्तकलेवरा वरा
विभाति तन्त्री करयोः सुगायका ।
नितान्तयत्तानविभूषिता गति–
र्गीतस्य गौरी रसिका दिनान्तरे ॥
(संगीत पारिजात)

अर्थ – सावळी, मदाने जिची काया उन्मत्त झाली आहे अशी, श्रेष्ठ, जिच्या हाती एक उत्तम वीणा आहे, जी श्रेष्ठ गायिका आहे, जिच्या गीतांची गती अमित तानांनी विभूषित आहे, अशी रसिक गौरी रागिणी संध्यासमयी गायिली जाते.

ही पार्वतीची रागिणी असल्यामुळे हिला गौरी असे नाव मिळाले आहे. [श्री. आबासाहेब मुजुमदार, पुणे]

गौरीकांत सार्वभौम (इ. स. चे १८ वे शतक) बंगालमधील एक नैयायिक. भावार्थदीपिका, तर्कभाषाटीका, सद्युक्तिमुक्तावली, आनंदलहरीतरी, विदग्धमुखमंडनटीका व विवादार्णवभंजन असे याचे ग्रंथ आहेत. [म. च. को.]

गौरीकालम् द. भारतात प्रचलित असलेले तुतारीसारखे एक वाद्य. हे सुषिर वाद्य असून, दक्षिणेतल्या देवस्थानांत पूजा, उत्सव, इ. प्रसंगी वाजवले जाते. हे वाद्य पितळेचे असते. [डि. सा. इं. म्यु. म्यु.]



गौरीकालम्

गौरीगणेशचतुर्थी एक काम्य व्रत. कोणत्याही चतुर्थीला हे करतात. या दिवशी गौरी आणि गणपती यांची पूजा करतात. फल – सौभाग्य व यश यांची प्राप्ती. [हि. ध.]

गौरीचतुर्थी एक व्रत. माघ शु. चतुर्थीला सर्वांनी, विशेषतः स्त्रियांनी, कुंदपुष्पे वाहून गौरीची पूजा करावे व विद्वान ब्राह्मणांचा सन्मान करणे, असा याचा विधी आहे. फल – संतती व सौभाग्य यांची प्राप्ती. [हि. ध.]

गौरीतप स्त्रियांचे एक व्रत. हे मार्ग० अमावास्येला करतात. यात मध्यरात्री मंदिरात जाऊन शिव-पार्वतीचे पूजा करायची असते. व्रतावधी १६ वर्षे. नंतर मार्ग० पूर्णिमेला उद्यापन करतात. याला महाव्रत असेही म्हणतात. फल – पुत्रप्राप्ती. [हि. ध.]

गौरीतांडव नटराजाच्या आनंदतांडवाचे दुसरे नाव. या नृत्याच्या समयी पार्वती प्रेक्षक होती, म्हणून याला गौरीतांडव असे म्हणतात. [डि. सा. इं. म्यु. म्यु.]

गौरीतीज एक सिंधी सण. सिंधी पंचांगाप्रमाणे वर्षाच्या दुसऱ्या महिन्यात हा येतो. या दिवशी सकाळी सुवासिनी स्त्रिया शिव-पार्वतीची पूजा करतात व दिवसभर उपोषण करतात. फल – सौभाग्य प्राप्ती. [सिं. क.]

गौरीतृतीया एक व्रत. चैत्र शु., भाद्र. शु. किंवा माघ शु. तृतीयेस गौरी आणि शिव यांची पूजा. हे व्रत द. भारतात प्रचलित आहे. फल – संतती व सौभाग्य यांची प्राप्ती. [हि. ध.]

गौरीनृत्य राजस्थानातील एक नृत्य. हे सुमारे चाळीस दिवस चालते. भाद्रपद मासातल्या गौरींच्या सणात व विवाहसमारंभाच्या प्रसंगी हे नृत्य करतात. या नृत्यप्रसंगी नववधू दोन बाहुल्यांना साड्या नेसवतात व शिवाला पगडी घालतात. याशिवाय घरच्या यजमानाला देखील पगडी घालून सव्वा रुपया व नारळ भेट देण्याची पद्धत आहे. ग्रामीण लोक नर्तकांना लाडू व धान्य देतात.

नाचणारे प्रथम गणेशाला वंद करून नंतर फेर धरतात. या वेळी वर्तुळाच्या मध्यभागी एक त्रिशूळ रोवतात. त्यांच्या भोवती गायक उभे राहतात. नर्तक डावीकडून उजवीकडे

नाचत जातात. या नर्तकांत शिव–पार्वती, एक संचालक व एक सूत्रधार असतो. नृत्याला ढोल व थाळचा यांची साथ असते.

या नृत्याशी शिव व भस्मासुर यांची कथा संबंधित आहे. दोन बाहुल्यांपैकी एकीला पार्वती व दुसरीला भगवान विष्णूचे मोहिनीरूप समजतात.

हे नृत्य सामाजिक व धार्मिक अशा मिश्र रूपाचे आहे. त्यातील गीतात नीतीचा उपदेश असतो. नृत्याचाच एक भाग म्हणून सोंगेही आणतात. त्यांतल्या शिवाच्या सोंगाची वस्त्रे लाल असतात. त्याच्या हातात एक लाकूड असते व तेही लाल कपड्यानी गुंडाळलेले असते. नाचतेवेळी शिव आपल्या मिशांवर ताव देत असतो. अशावेळी कोणीतरी सिंहाचे सोंग आणतो व त्यातून रौद्र रसाचा प्रकर्ष दाखवतो. [भा. लो. नृ.]

गौरीविवाह एक व्रत. चैत्र शु. तृतीया, चतुर्थी किंवा पंचमी या तिथीस गौरी व शिव यांच्या मूर्ती करून त्यांचा विवाहसमारंभ करणे, असा याचा विधी आहे. मूर्ती करण्यासाठी सोने रुपे, रत्ने, चंदन, इ. पदार्थ वापरतात. फल–उत्तम पतीची प्राप्ती. [हि. ध.]

गौरीव्रत याचे विविध प्रकार आहेत. त्यांतील काही पुढीलप्रमाणे—

(१) व्रत करणाऱ्या व्यक्तीने आषाढ मासापासून चार महिने दूध, दही, तूप व उसाचा रस या पदार्थांचे सेवन करू नये आणि या पदार्थांनी भरलेली पात्रे, 'माझ्यावर गौरी संतुष्ट होवो' असे उच्चारून दान द्यावी.

(२) व्रत कर्त्या स्त्रिया मीठ नेहमीच वर्ज्य करतात. वैशाख, भाद्र. व माघ या महिन्यांच्या शु. तृतीयेस उपवास करतात.

(३) ज्येष्ठ शु. चतुर्थीस, उमेच्या जन्मदिवशी, तिची पूजा, फल–सौभाग्य व संतती यांची प्राप्ती. [हि. ध.]

गौरीशिखर एक क्षेत्र. हे क्षेत्र काश्मीरजवळ आहे. इथे उमेने शिवाच्या प्राप्तीसाठी तप केले, असे नीलमत पुराणात सांगितले आहे. या तपाच्या प्रभावाने तिचे काळे (नील) मुख गौरवर्णाचे झाले. श्राद्धादी विधींसाठी हे ठिकाण पवित्र मानले जाते. [हि. ध.]

गौरीहरदान मकर संक्रातीच्या दिवशी गुळाची गौरीप्रतिमा व लोण्याची हरप्रतिमा करून त्या प्रतिमांना वस्त्रे नेसवतात. मग गौरी ही हराला आलिंगन देत आहे, अशी कल्पना करून त्या प्रतिमांचे दान करतात. दानमंत्र असा—

गुडगौरीसमाश्लिष्टं नवनीतमयं हरम् ।
ददामि वस्त्रसंयुक्तं दम्पत्योः सुखवर्धनम् ॥

अर्थ – गुळाची गौरी व लोण्याचा हर ही दोघे सवस्त्र व परस्परालिंगनयुक्त अशी करून मी त्यांचे दान करतो. हे दान दंपतीचे सुख वाढविणारे असते. [व्रतराज]

गौरीहरपूजा महाराष्ट्रात ब्राह्मणांच्या घरी लग्नाच्या आधी वधूच्या हस्ते गौरीहर पूजण्याची चाल आहे. देवदेवक बसल्यानंतर वधूपक्षाकडील स्त्रिया वराला रुखवत घालायला गेल्या, की इकडे वधू गौरीहरापुढे बसून त्याची पूजा करते. या गौरीहराची स्थापना पुढीलप्रमाणे करतात—

भिंतीचा चौकोन चुन्याने सारवतात. त्यावर हळदीने चंद्र–सूर्य, शिव–पार्वती, आंब्याचे झाड व स्वस्तिक या आकृती रेखाटतात. त्या चौकोनाखाली जमिनीवर पाटा ठेवतात. पाटाच्या चारी कोपऱ्यांना चुन्याने व कुंकवाने रंगवलेल्या रंगीत बोळक्यांची उतरंड रचतात. एकावर एक तीन बोळकी व वर कळस अशा त्या उतरंडी असतात. त्या उतरंडीना कच्चे सूत वेढतात. याला गौरीहर सुतवणे, असे म्हणतात. कित्येक कुटुंबात गौरीहर मामाकडून येतो व त्याबरोबरच वधूवस्त्रही असते. गौरीहरांच्या बोळक्यांबद्दल कुंभाराला सव्वा रुपया देतात.



गौरीहरपूजा

पाटावर मध्यभागी तांदुळाच्या राशीवर गौरीहरांच्या प्रतिमा ठेवतात. या प्रतिमा त्या दोघांनी परस्परांना आलिंगन दिले आहे, अशा अवस्थेतील कराव्या व त्या चांदीच्या असाव्या, असे संस्कारकौस्तुभात सांगितले आहे. पण सांप्रत तांदुळाच्या पुंजीवर रुईचे किंवा धोतऱ्याचे पान मांडून त्यावर गौरीची पितळेची मूर्ती बसवतात. त्या मूर्तीच्या पुढे एका मातीच्या बैठकीवर रोवळीत लामणदिवा ठेवतात व त्या रोवळीभोवती

रेशमी चोळी गुंडाळतात. या दिव्याची वात नवऱ्या मुलीच्या उंचीइतके कच्चे सूत घेऊन त्याची करतात. याला शकुनदिवा म्हणतात. गौरीहराजवळ एका सुपलीत सौभाग्यवायन ठेवतात. या वायनात तांदूळ, हळदकुंकू, हिरव्या बांगडचा, सोन्याचा मणी ओवलेला काळ्या पोतीचा सर, खण, नारळ, फणी, आरशी व करंडा इतक्या वस्तू असतात. हे वाण गौरीहराची चित्रकारी करणाऱ्या सुवासिनीला देतात. नवऱ्या मुलाकडूनही असेच वाण येते, ते नवऱ्या मुलीच्या आईला देतात.

प्रथम वधूची आई गौरीहराची पूजा करते. मग नवरी मुलगी वधूवस्त्र नेसून पायात वेढी-विरवल्या घालून व गळचात रेशमी दोऱ्यात ओवलेले मंगळसूत्र घालून गौरीहरापुढे बसते. या गौरीहराचा पूजामंत्र संस्कारकौस्तुभात दिला आहे, तो असा––

गौरीहर महेशान सर्वमङ्गलदायक ।
पूजां गृहाण देवेश सर्वदा मङ्गलं कुरु ॥

अर्थ – हे सकल मंगल देणाऱ्या गौरीयुक्त महेश्वरा, (मी केलेल्या या) पूजेचे ग्रहण कर व हे देवेशा, (माझे) सर्वकाळ मंगल कर.

गौरीहराची पूजा झाल्यावर नवरी मुलगी पुढील मराठी मंत्र म्हणून देवीवर अक्षता वाहत राहते––

गौरी गौरी सौभाग्य दे, दारी प्राणी येईल
त्याला आयुष्य दे.

नवऱ्या मुलीला गौरीहरापुढूनच लग्नमंडपात नेतात व वरासमोर उभी करतात. नवरी मुलगी लग्नमंडपात गेली, की लग्न लागेपर्यंत तिची आई गौरीहरापुढे बसते व गौरीवर अक्षता टाकीत राहते. तिच्याजवळ दूध व साखर हे जिन्नस ठेवलेले असतात. बाहेर मुलीचे लग्न लागले, की ती दुधात साखर टाकते.

[सं. कौ.; बदलापूर]

गौळणी

मराठी संतवाङ्मयातला एक प्रकार. बालक्रीडा, *गाऱ्हाणी, काला, मुरली, विराण्या असे त्यांचे पोट*विभाग आहेत. संतवाङ्मयाच्या भव्य प्रासादात गौळणीवाङ्मय हे एक शृंगारलेले दालन आहे. त्यात शृंगाराच्या नाना परी आहेत. प्रेमभावनेने रतिरूप घेतले, की तोच शृंगाराचा स्थायीभाव बनतो. मराठी संतांनी आळवलेला, खेळवलेला जो गोपी–कृष्णविषयक शृंगार तो भक्तिरसाचाच एक पर्याय आहे.

नंदकुमार श्रीकृष्ण हा मदनाहून सुंदर होता. गोकुळातल्या गोपी त्याच्या सौंदर्याला व माधुर्याला भुलल्या व त्याच्यावर जीवेभावे आसक्त झाल्या. अभिलाषा व आसक्ती बाळगून त्या श्रीहरीजवळ आल्या हे खरे; पण श्रीहरीने दर्शन, स्पर्शन, संभाषण व रासरस या मधुर साधनांनी त्यांचे विकार जाळून टाकले व त्यांचा कामच निष्काम करून टाकला. ज्ञानेश्वरांनी एवढा सगळा अर्थ पुढील एकाच ओवीत सांगून टाकला आहे––

पाहें पां वालभाचेनि व्याजे । तिया व्रजांगनांचीं निजे ।
मज मीनलिया काय माझे । स्वरूप नव्हती ? ॥

कृष्ण, यशोदा, राधा, गोपी, गोप आणि गोकुळ-वृंदावन यांची वर्णने या गौळणीवाङ्मयात आहेत. यशोदेचे वात्सल्य, राधेचा अनुराग, गोपींचे अत्युत्कट प्रेम, गोपगड्यांची कृष्णनिष्ठा, बालकृष्णाचे अलौकिक पराक्रम, त्याच्या खोड्या आणि गोपींना रस विण्याचे त्यांचे चातुर्य, इ. गुण विशेषांनी हे वाङ्मय शृं ररसाचा उत्कृष्ट परिपाक ठरले आहे. ते विवि रंगच्छटांनी न लेले आहे. त्या प्रणय, क्रो विलास, विर सुख, वेदना इ सारे काही आहे रांगणारा, दुडुदुडू धावणारा, गौळणींच्या घरी दहीदूध चो णारा, गोपींच्या वात्रट खोडचा करणारा, मुरली वाजव गाई वळवणारा, रासक्रीडा करणारा अशी एकाच कृष्णा अनेक नयनमनोहर रूपे या वाङ्मयात पाहायला मिळ आक्रस्ताळी, कांगावखोर, साधीभोळी, रमणी, मानिनी, का अशी गोपींचीही नानाविध स्वरूपे यात दृष्टीस पडतात.



गौळणी – जयपूर लोकशैली

नामदेवाची या विषयावरची पद्यरचना सर्वांपेक्षा प्रसाद आहे. तुकोबाच्या पदांतून दिसणाऱ्या गौळणी चतुर, ठसके व प्रगल्भ दिसतात. एकनाथांच्या गौळणी सकृद्दर्शनी लौ आणि कामप्रेरित दिसल्या, तरी त्यांच्या अंतरंगात पर भरलेला दिसतो. ज्ञानेश्वरांच्या विराण्या गहन अर्थाने भरले असतात. निळोबांच्या गौळणींना तर मराठी भाषेतील निषदेच समजतात.

बालक्रीडा म्हणजे कृष्णाने गोकुळात बालरूपाने दाखवि मनोहर लीला होय. यशोदा दधिमंथन करीत असता कुठून कृष्ण धावत येतो व तिची रवी धरून ठेवतो. त्या वेळी आलेल्या राधेला यशोदा कृष्णाचा खट्याळपणा पुढील सांगते––

करूं देईना भज दूध तूप बाई
मथितां दधि तो धरी रवी ठायीं ठायीं
हट्टें हा कदापि नुमजें समजाविल्यास काईं
समजावुनि यातें तुझ्या घरास नेईं नेईं
राधे हा मुकुंद कडिये उचलोनि घेईं घेईं
रडताना राहिना करूं यास गत काई काई ।।

(ए. गा. १०३)

कृष्णाच्या बालक्रीडेतूनच गाऱ्हाणी हा काव्यप्रकार उगम पावला आहे. कृष्ण आणि त्याचे सवंगडी यांच्या खोडयांनी गौळणी हैराण होऊन जातात. कृष्णाला पकडून शासन करण्याचे त्यांचे बेत विफल ठरतात. मग त्या यशोदेकडे दाद मागण्यास येतात व तिला कृष्णाची गाऱ्हाणी सांगतात. एकनाथांनी अशा गौळणींचे एक गाऱ्हाणे पुढीलप्रमाणे वर्णिले आहे—

गौळणी सांगति गाऱ्हाणी, रात्री आला चक्रपाणी।
खाउनि दही दूध लोणी, फोडिलीं अवघीं विरजणीं।
हा गे बाई कोणासि आवरेना ।।१।।
यशोदे बाळ तुझा तान्हा, कोठवरी सोसूं मी धिंगाणा ।।धृ०।।
दुसरी आली धावत, याने बाई काय केली मात।
मुखाशी मुख चुंबन देत, गळ्यामधी हात घालीत।
धरूं जाता सापडेना ।।२।।
तिसरी आली धावुनी, म्हणे गे बाई काय केली करणी।
पतिची दाढी माझी वेणी, दोहोंसी गांठ देउनी।
गांठ बाई कोणा सुटेना ।।३।।
मिळोनि अवघ्या गौळणी, येती नंदाच्या अंगणीं।
जातो आम्ही गोकुळ सोडुनि, आमुच्या सुना घेउनी।
हे बाई आम्हांसि पहावेना ।।४।।
ऐशी ऐकतां गाऱ्हाणीं, यशोदे-नयनीं आले पाणी
'कृष्णा! खोड दे टाकुनी,' एका जनार्दनीं चरणीं
प्रेम तया आवरेना ।।५।।

कृष्ण थोडा मोठा होताच नंद त्याला गायी राखण्यासाठी रानात पाठवितो. त्याच्या समागमे गोकुळातले अन्य गोपबालकही असतात. कृष्ण संवगडयांसंगे गायीवासरे चारताना मुरली वाजवून स्वतःची व इतरांची करमणूक करतो. त्या मुरलीने स्थिरचराला वेड लागते. सारा आसमंत स्वरांनी भरून धुंद होतो. मुरलीचा स्वर ऐकून गोकुळातल्या गौळणींनाही कृष्णाचा वेध लागतो. त्या अस्वस्थ होतात. त्यांच्या हातून गृहकार्यात प्रमाद घडू लागतात. मग त्या एकमेकींना हाका मारून कृष्णसहवासासाठी वनात जायला निघतात. अशा प्रसंगी एका गौळणीची काय अवस्था होते, ते एकनाथांनी पुढील पद्यात वर्णिले आहे—

नंदनंदन मुरलीवाला, याच्या मुरलीचा वेध लागला ।।
प्रपंच धंदा नाठवे काही, मुरलीचा नाद भरला हृदयी ।।
पतिसुताचा विसर पडला, याच्या मुरलीचा छंद लागला ।।
स्थावर जंगम विसरुनि गेले, भेदभाव हरपला ।।
समाधि उन्मनी तुच्छ वाटती,
मुरली नाद ऐकता मना विश्रांती ।।
एका जनार्दनीं मुरलीचा नाद, ऐकता होती त्या सद्गद ।।

दुपारच्या वेळी कृष्णासह सगळे गोप आपापल्या शिदोऱ्या सोडून दहीभात व इतर खाद्यपदार्थ यांचा काला करतात. श्रीकृष्ण तो काला सगळ्यांना वाटून देतो आणि मग सर्वजण आनंदाने भोजन करतात. कित्येकदा संवगडी आपल्या पानातला घास कृष्णाच्या मुखी घालतात. काल्याचे हे सुख भोगण्यासाठी गौळणी एकमेकींना बोलावून थव्याथव्याने यमुनेच्या वाळवंटात जमतात. हा काला आणि गोपाळांचे विविध खेळ यांच्याविषयी तुकोबांनी एक पद लिहिले आहे, ते असे—

चला बाई पांडुरंग पाहू वाळवंटी
मांडियेला काला, भवती गोपाळांची दाटी ।।
आनंदे कवळ देती एका मुखी एक
न म्हणती सान थोर अवघीं सकळिक ।।
हमामा हुंबरी पावा वाजविती मोहरी
घेतलासे फेर माजी घालुनियां हरी ।।
लुब्धल्या नारी नर, अवघ्या पशुपती
विसरली देहभाव शंका नाही चित्ती ।।
पुष्पांचा वरुषाव जाली आरतियांची दाटी
तुळशी गुंफोनिया माळा घालिति कंठी ।।
यादवांचा राणा गोपी मनोहर कान्हा
तुका म्हणे सुख वाटे देखोनिया मना ।।

ज्ञानेश्वरादी संतांच्या अनेक काव्यांपैकी विराणी नावाचा एक भावमधुर काव्यप्रकार आहे. विराणी म्हणजे विरहिणी, प्रियकराच्या दर्शनसमागमसुखाला पारखी झालेली, पण त्यासाठी जीव झुरविणारी प्रेमळ प्रिया. श्रीकृष्ण गोकुळातून मथुरेला निघून गेल्यावर सर्व गोपी विरहिणी बनतात. त्यांची अवस्था शोचनीय होते. त्यांना कशातच रस वाटेनासा होतो. त्यांना श्रीकृष्णाचा निदिध्यास लागतो. त्यांतल्या काही गौळणी विरहव्यथेने उन्मत्त बनतात; तर काही 'मला कृष्ण भेटवा हो' म्हणून मैत्रिणींची आळवणी करतात. ज्ञानेश्वराने अशा एका विरहिणीचे चित्र पुढील पद्यात रेखाटले आहे——

घनु वाजे घुण घुणा, वारा वाजे रुण रुणा
भवतारक हा कान्हा वेगी भेटवा का ।।

चांद वो चांदणे, चांपे वो चंदनु
देवकीनंदनेविण नावडे वो ।।धृ।।
चंदनाची चोळी, माझे सर्वांग पोळी
कान्हो वनमाळी वेगी भेटवा कां ।।
सुमनाची सेज, शीतळ वो निकी
वोले आगीसारिखी वेगी विझवा कां ।।
तुम्ही गातसा सुस्वरे, ऐको नेदावी उत्तरे
कोकिळे वर्जावे तुम्ही बाइयांनो ।।
दर्पणी पाहता, रूप न दिसे आपुले
बापरखुमादेवीवर विठ्ठले मज ऐसे केले ।।

गोपींच्या प्रेमाची ही अलौकिकता पाहून संतांच्या प्रतिमेला उमाळा आला आणि त्यांनी ही गौळणींची पदे रचली. गौळणींसाठी वाग्विलास करताना सकल संतांना धन्यताच वाटली आहे. [गोकुळच्या गौळणी]

ग्रंथ लिखित वा मुद्रित पुस्तकाला ग्रंथ असे म्हणतात. पण या शब्दाचे निरनिराळ्या कोशांत वेगवेगळे अर्थ सांगितले आहेत, ते असे– (१) 'एकार्थको वाक्यसन्दर्भः यथा महाभारतरामायणादि ' = एका विशिष्ट अर्थाने (उद्देशाने) निर्माण केलेला वाक्यसंदर्भ म्हणजे ग्रंथ होय. उदा० महाभारत, रामायण इत्यादी. (२) समग्र वर्णसमूह. (३) शास्त्र. (४) 'द्वात्रिंशद्वर्णमितानुष्टुप्छन्दस्कः श्लोको ग्रन्थ इति छन्द:शास्त्रज्ञा आहुः' = बत्तीस वर्ण असलेला अनुष्टुभ छंदातला श्लोक, याला छन्द:शास्त्रज्ञ ग्रंथ असे म्हणतात. (वाच.; न्या. को.)

ग्रंथ शब्दाची एक कलमवार व्याख्या अलिकडे मान्य झालेली आहे, ती अशी– (१) ग्रंथ हा हस्तलिखित वा मुद्रित असला पाहिजे. (२) तो पुरेसा दीर्घ असला पाहिजे. चार–दोन वाक्ये लिहिली किंवा कोरली म्हणजे तो ग्रंथ होऊ शकत नाही. (३) ग्रंथातील लेखन हे व्यष्टीसाठी नसून समष्टीसाठी असले पाहिजे. (४) हे मुद्रण वा लेखन हलक्या पण टिकाऊ वस्तूवर असले पाहिजे. आणि (५) ते एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी नेता–आणता आले पाहिजे.

विचारसंक्रमणाचे माध्यम म्हणून भाषा निर्माण झाली. भाषेतून वाङ्मय उत्पन्न झाले. लिपीचा शोध लागल्यावर वाङ्मय हे लिपिबद्ध होऊ लागले. धातूचे पत्रे, झाडाच्या साली व पाने, मातीच्या विटा, बांबूच्या कामट्या, इ. वस्तूंचा पृष्ठभाग लेखनासाठी वापरण्यात येऊ लागला. पुढे पापिरसचे पापुद्रे, जनावरांची कातडी आणि त्यानंतर कागद या वस्तू लेखनासाठी उपलब्ध झाल्या. या विविध वस्तूंच्या पृष्ठभागांना योग्य ठरतील अशी छिन्नी, दाभण, पक्ष्यांची पिसे, बोरूचे टाक, इ. साधने लेखणीच्या जागी उपयोजिली जाऊ लागली. काजळाची किंवा दुसऱ्या कोणत्या तरी पदार्थाची शाई वापरली जाऊ लागली.

भारतात भूर्जपत्रावर लिहिलेले ग्रंथ अधिक जुने, का सुमेरिया, बाबिलोनिया व असीरिया या देशांत मातीच्या विटांवर लिहिलेले ग्रंथ अधिक जुने याबद्दल वाद आहे. पाश्चात्य विद्वानांच्या मते मेसापोटेमियामधील विटांवरचे ग्रंथ व ईजिप्तमधील पापिरसवरचे ग्रंथ सर्वात प्राचीन आहेत. कालिदासादी कवींच्या वाङ्मयात कमलपत्रे, भूर्जपत्रे, ताडपत्रे वगैरेंचा लेखनासाठी उपयोग केल्याचे उल्लेख आहेत. पण ३००० वर्षांपूर्वीच्या विटांवरील ग्रंथांप्रमाणे त्या काळातले ताडपत्री व भूर्जपत्री ग्रंथ मात्र उपलब्ध नाहीत.

विटांवरील ग्रंथ – इ. स. च्या १९ व्या शतकात युरोपियन संशोधकांनी प्राचीन संस्कृतीच्या शोधासाठी आशियामायनरमध्ये उत्खनन केले. त्यात सनपूर्व ७ व्या शतकातील असीरियन राजा असुर-अवनि-पाल (असुरबनिपाल) याच्या राजवाड्याच्या आवारात असलेले एक विटांवरील ग्रंथांचे ग्रंथालय सापडले. अलेक्झांड्रियाच्या टॉलेमी राजांच्या ग्रंथालयातही अनेक विटा सापडल्या. निनेव्हे वगैरे ठिकाणीही विटांचे ग्रंथ मिळाले.

मेसापोटेमियाचा प्रदेश म्हणजे टायग्रीस व युफ्रेटिस या नद्यांनी बनविलेले खोरे होय. या सबंध प्रदेशात कठीण दगड उपलब्ध नसल्यामुळे मातीच्या विटांचा उपयोग करण्यात येऊ लागला. या विटा सुमारे पाच इंच लांबीच्या असत. त्या ओल्या असतानाच त्यांच्यावर दाभणासारख्या टोकदार साधनाने (stylus) अक्षरे कोरून लिहीत. विटांच्या सहाही पृष्ठभागांवर लेखन केले जाई. टोकदार शस्त्रांचा उपयोग केल्यामुळे त्या लिपीला जे एक विशिष्ट वळण मिळाले, त्याला अनुसरून तिला क्युनेफॉर्म (Cuneiform) लिपी असे नाव दिले गेले. प्रथम ओल्या विटांवर लेखन पूर्ण करीत व मग त्या विटा भट्टीत भाजीत किंवा उन्हात वाळवीत. विटांच्या प्रत्येक पृष्ठभागावर आजच्या आपल्या पृष्ठांकांप्रमाणे क्रमांक टाकीत. जेव्हा ग्रंथ एका विटेवर पूर्ण न होता त्यासाठी अनेक विटा लागत, तेव्हा विटांवर वेगळे क्रमांक टाकीत. जवळ जवळ ख्रिस्तजन्मापर्यंत विटांवरील ग्रंथलेखनाची ही प्रथा चालू होती.

पापिरसचा उपयोग – पापिरसवरचे ग्रंथलेखनही इतकेच प्राचीन आहे. पापिरस (Papyrus) या शब्दावरूनच आजचा पेपर हा शब्द आलेला आहे. ईजिप्तमध्ये नाईल नदीच्या परिसरात पापिरस नावाची लव्हाळ्याच्या जातीची एक वनस्पती उगवत असे. तिच्या खोडाचे ५–६ इंच लांबीचे तुकडे करीत व ते अशा कौशल्याने कापीत, की त्यांच्या गराचा कागद

सारखा पातळ तुकडा तयार व्हावा. मग हे तुकडे एकाला एक चिकटवीत.

ग्रीसमध्ये जुन्या काळी लाकडी फळ्यांना मेणाचा थर देऊन त्यांवर लेखन करीत. पण नंतर इजिप्तमधून पापिरसची आयात करून त्यावर ग्रंथरचना होऊ लागली. विविध कला व शास्त्रे यांवर प्राचीन ग्रीक विद्वानांनी भारताप्रमाणेच फार मोठी ग्रंथरचना केली आहे. होमरच्या काळात ग्रीसमध्ये पापिरसचा उपयोग केला जात असावा. प्लेटो व ॲरिस्टॉटल यांच्या काळी तर तो निश्चितच होत होता. याचा एक पुरावा म्हणजे प्राचीन ग्रीक भाषेत ग्रंथ या अर्थी बिब्लियॉन (Biblion) हा शब्द प्रचलित होता आणि तो Byblos म्हणजे पापिरस या शब्दावरून आला आहे.

अलेक्झांडरच्या वेळी .ग्रीक संस्कृती व कला यांना बहर आला होता. पूर्वेकडील भारतापर्यंतचे देश व आफ्रिकेतला मिसर देश, यांवर अलेक्झांडरने स्वाऱ्या केल्या. या स्वाऱ्यांत त्याने एक विशेष गोष्ट ही केली, की जित देशांतील विद्वानांना ग्रीसला नेले. पुढे या विद्वानांच्या मार्फतच ग्रीकेतर संस्कृतींची ग्रीसला ओळख झाली. भारतीय, मिसरी व इतर देशांतील ग्रंथांची ग्रीकमध्ये भाषांतरे झाली. ग्रीक संस्कृतीचा परिणाम इतर देशांवरही होऊ लागला. खुद्द ग्रीसमध्ये विद्याकलांची बरीच वाढ झाली. ग्रीक साम्राज्यात अलेक्झांड्रिया व पर्गामम (pergamum) ही दोन शहरे विद्यांची माहेरघरे म्हणून समजली जाऊ लागली. अलेक्झांड्रियातील ग्रंथालय त्या वेळी अत्यंत नावाजलेले होते. या ग्रंथालयात सर्व जगातल्या ग्रंथांच्या प्रती असाव्यात म्हणून टॉलेमी राजांनी खास प्रयत्न केले. त्यांनी नकलनवीसांचा एक ताफाच ग्रंथालयात नोकरीला ठेवला.

रोमने ग्रीस जिंकल्यावर पाश्चात्य जगातील संस्कृतीचे केंद्र बदलले व ते रोमला गेले. रोमन सम्राट व सरदार हे विद्याकलांचे चाहते होते आणि ग्रीसप्रमाणे रोमन साम्राज्यातही विद्वानांचा एक मोठा वर्ग होता. रोमन लोकांनी ग्रीक साम्राज्यातील मिळाले तेवढे ग्रंथ रोममध्ये नेले आणि त्यांची लॅटिनमध्ये भाषांतरे व लिप्यंतरेही केली.

पण सिसरोच्या काळापासून रोमन साम्राज्यात एक नवी घटना घडली. त्यामुळे ग्रंथ स्वस्त झाले व ग्रंथविक्रीची आजच्यासारखी दुकानेही निघाली. रोमन साम्राज्यात सरदारांच्या पदरी गुलाम बाळगण्याची प्रथा होती. या गुलामांकडून ग्रंथांच्या नकला करण्याचे काम करून घेण्यात येऊ लागले. एकाने ग्रंथातला मजकूर सांगायचा व तीस तीस गुलामांनी तो लिहून काढायचा. या पद्धतीने एका वेळी एका ग्रंथाच्या तीस प्रती तयार होऊ लागल्या. या प्रती विकण्यासाठी दुकाने उघडण्यात आली. ही पुस्तके भरमसाट किंमतीला विकली जाऊ नयेत, म्हणून सरकारने कायदेही केले.

याचा परिणाम असा झाला, की श्रीमंतांप्रमाणे मध्यम वर्गीयांनाही स्वतःच्या गृहग्रंथालयासाठी पुस्तके विकत घेता येऊ लागली. ग्रंथ ही पूर्वी सरदार-दरकदारांची प्रतिष्ठेची बाब होती. पण क्रयविक्रयाची सोय झाल्यामुळे सामान्य लोकांनाही ग्रंथांचा लाभ होऊ लागला.

कातड्याचा उपयोग— पापिरस टिकाऊ नाही, ही गोष्ट त्याच वेळी लोकांच्या लक्षात येऊन चुकली होती व ग्रंथांसाठी टिकाऊ अशा वस्तूचा शोध चालू झाला होता. त्या दृष्टीने जनावरांच्या कातड्यांचा उपयोग कितपत करता येईल, त्याचे प्रयोग सुरू झाले. ग्रंथलेखनासाठी कातड्यांचा उपयोग फार पुरातन काळापासून करण्यात येत होता. इजिप्तमध्ये सनपूर्व २४ व्या शतकात कातड्यांवर केलेल्या लिखाणाचा नमुना सापडला आहे. आशियामायनरमधील ज्यू लोकांनाही कातड्याचा हा उपयोग माहीत होता. १९४७ मध्ये मृत समुद्राचे उत्खनन झाले, तेव्हा मातीच्या रांजणात ठेवलेले कातड्याच्या सुरळ्यांचे ग्रंथ सापडले. हे ग्रंथ ख्रिस्तकालीन असावे, असा तज्ञांचा अभिप्राय आहे. परंतु कातडे ही वस्तू पापिरसापेक्षा महाग असल्यामुळे तिचा सर्रास उपयोग होऊ शकत नसे. फक्त टिकाऊ ग्रंथांसाठीच कातडे वापरले जाई.

पण इ. स.च्या पहिल्या शतकात कातड्याचा उपयोग सर्रास करणे भाग पडले. अलेक्झांड्रिया व पर्गामम ही दोन शहरे विद्या—कलांच्या क्षेत्रात एकमेकांशी स्पर्धा करीत. पर्गामचा राजा दुसरा युमीनिस (Eumenes II) याला अलेक्झांड्रियाच्या ग्रंथालयापेक्षा अधिक मोठे ग्रंथालय आपल्या राज्यात असावे, असे वाटे. पण त्याची ही महत्त्वाकांक्षा मुळातच उखडून टाकावी, म्हणून अलेक्झांड्रियाच्या पाचव्या टॉलेमीने पापिरसची निर्यातच बंद करून टाकली. पर्गाममध्ये पापिरसचा तुटवडा पडल्यामुळे ग्रंथांच्या नकला करण्याचे कामच बंद पडले. यावर उपाय म्हणून पर्गामच्या राजाने कातड्याचा उपयोग ग्रंथलेखनासाठी मोठ्या प्रमाणावर सुरू केला.

ग्रंथलेखनासाठी पापिरसऐवजी कातडी वापरण्यास सुरवात झाली, तेव्हा त्याचे पुष्कळच फायदे दिसून आले. पापिरसच्या उभ्या तंतूंमुळे लिहिणे थोडे अडचणीचे वाटे. पण कातड्यावर सुरेख लिहिता येऊ लागले. पापिरसवर एकाच बाजूने लिहावे लागे. कातड्यावर दोन्ही बाजूंनी लिहिण्याची सोय झाली. पण यापेक्षा कातड्याच्या उपयोगामुळे ग्रंथाच्या इतिहासात एक फार महत्त्वाचा बदल झाला, तो त्याच्या आकारात. पापि-

रसच्या गुंडाळ्या करून ठेवीत. हीच पद्धत काही काळ कातड्याच्या बाबतीतही अवलंबिण्यात आली. पण कातड्यावर दोन्ही बाजूंनी लिहिण्याची सोय झाली, पापिरसपेक्षा कातड्याचा आकार मोठा असे, म्हणून पुढे त्याच्या घड्या घालून लिहिण्याची पद्धत सुरू झाली. एक घडी, दोन घड्या, तीन घड्या, याप्रमाणे घड्या घालून मोठ्या कातड्याची फोलिओ (दुपत्री), क्वार्टो (चतुष्पत्री), ऑक्टाव्हो (अष्टपत्री) अशी अधिकाधिक लहान आकाराची पाने तयार होऊ लागली. ही दुमडलेली कातडी डाव्या बाजूने किंवा माथ्याच्या बाजूने शिवून त्याला जाड पुठ्ठा चिकटवून आजच्या पुस्तकाच्या स्वरूपात त्यांचे ग्रंथ तयार होऊ लागले.

बांधीव ग्रंथाला (Codex) त्या काळात बायबल (ग्रीकमध्ये Biblion) म्हणत. याचे कारण म्हणजे बायबल लिहिण्यासाठी फक्त व्हेलमचा (वासराचे कातडे) उपयोग करण्याची पद्धत होती व त्याची बांधणीही (Codex) करण्याची रीत होती, हे होय. ख्रिस्ती धर्मग्रंथ किंवा बायबल लिहिण्यासाठी पापिरसचा कधीही उपयोग करण्यात आला नाही.

मध्ययुगीन काळात व्हेलमवरील ग्रंथांचा फार प्रसार झाला. मात्र व्हेलम आता फक्त धर्मग्रंथांसाठीच न वापरता इतर ग्रंथांसाठीही वापरण्यात येऊ लागले. इ. स. च्या १२ व्या शतकात यूरोपमधील अनेक शहरांत विद्यापीठे स्थापन झाली व विद्यार्थ्यांना शिकविण्यासाठी ग्रीक व लॅटिन भाषांतील ग्रंथांच्या नकलांची गरज भासू लागली. तेव्हा प्रत्येक विद्यापीठाने स्टेशनर नावाच्या अधिकाऱ्याची नेमणूक करून त्याच्याकडून ग्रंथांच्या नकला करण्याचे काम चालू केले.

इ. स. च्या१४ व्या शतकात यूरोपात अनेक देशी भाषांचा उदय झाला. ख्रिस्तपूर्व काळातील विद्याव्यासंग पुन्हा सुरू झाला. देशी भाषांत काव्ये, नाटके वगैरे सारस्वत निर्माण होऊ लागले. दांते, पेट्रार्क, बोकॅशियो, चॉसर वगैरे लेखकांच्या ग्रंथांच्या नकला होऊ लागल्या. देशी भाषात बायबलची भाषांतरेही होऊ लागली.

प्राचीन लिपी– हिएरोग्लिफिक (*Hieroglyphic*) म्हणजे धर्मग्रंथासाठी उपयोगात येणारी व डेमॉटिक (*Dem-otic*) म्हणजे व्यापारी अशा दोन लिप्या मिसर देशात प्रचलित होत्या. त्यांपैकी हिएरोग्लिफिक लिपीने पापिरसवर एकाच बाजूने ग्रंथलेखन करीत व त्याची आपल्याकडे एका काळीं प्रचलित असलेल्या जन्मपत्रिकांप्रमाणे गुंडाळी करून, ती मातीच्या रांजणात ठेवून देत. अशा प्रकारच्या सन पूर्व अडीच हजार वर्षांपूर्वीच्या पापिरसच्या सुरळ्या उपलब्ध झाल्या आहेत. सुमारे साडेचार हजार वर्षांपूर्वीचे हे ग्रंथ आजतागायत सुरक्षित राहिले, त्याची कारणे दोन– (१) पापिरसचे रांजण कैक शतके रेतीखाली पडून राहिले व या प्रदेशात पावसाचा अभाव असल्यामुळे जमिनीत पाणी मुरले नाही आणि ते जसेच्या तसे टिकू शकलें. (२) मिसरचे फॅरो राजे किंवा राजघराण्यातील माणसे मेली, म्हणजे त्यांची शवपेटी पिरॅमिडमधल्या दालनात ठेवून देताना त्यांना परलोकात लागणाऱ्या वस्तू व मंत्रतंत्र लिहिलेले पापिरसचे तुकडे त्या पेटीत किंवा तिच्याशेजारी ठेवून देत, त्यामुळे ते सुरक्षित राहिले. चार ते पाच हजार वर्षांपूर्वीच्या 'ममीज्' आणि त्यांच्या शेजारी ठेवलेली ही मंत्रांची पुस्तके आता कितीतरी सापडली आहेत. या सर्व मंत्रग्रंथांना युरोपियन संशोधकांनी 'मृतांचे ग्रंथ' (The book of the dead) असे नाव दिले आहे. पिरॅमिडशिवाय इतरत्र सापडलेल्या ग्रंथांत लोककथा व शास्त्रीय ज्ञान यांचे लेखन उपलब्ध झाले आहे.

सनपूर्व चौथ्या शतकात अलेक्झॉंडरने मिसरवर स्वारी करून फॅरोंचे राज्य नष्ट केले आणि तिथे टॉलेमींचे राज्य सुरू झाले. तेव्हापासून हिएरोग्लिफिक लिपीतील पापिरसवरील हे ग्रंथ पृथ्वीच्या पोटात दडून राहिले होते, ते इ. स. च्या १९ व्या शतकात झालेल्या उत्खननात बाहेर आले. हे ग्रंथ संशोधकांनी शोधून काढले खरे; पण ते वाचता येईनात. अखेरीस जीन फ्रांसुआ शांपॉलियाँ (Jean Francois Champollion) व सर थॉमस यंग यांनी अलेक्झांड्रियाजवळच्या रोझेटा शिलाखंडावरील लिपी वाचण्यात यश मिळविले, तेव्हा या पापिरसवरील ग्रंथांच्या लिपीचाही उलगडा झाला.

भारतात लिपीचा उपयोग केव्हापासून केला जाऊ लागला, त्याविषयी निश्चित माहिती मिळालेली नाही. ऋग्वेदात लेखनकलेचा उल्लेख आहे. त्यावरून ऋग्वेदरचनाकाली आर्यांना लिपीचे ज्ञान होते, असा अंदाज करता येतो. पण वेदवाङ्मय त्याच्या रचनाकाळात व त्यानंतर कित्येक शतके लिपिबद्ध झाले नव्हते. वेद व वेदांगे पठित रूपातच मागच्या पिढीकडून पुढल्या पिढीकडे जात असत. ऋषिमुनी वेदांवर चर्चा करणारे ग्रंथ निर्माण करीत व ते यज्ञप्रसंगी जमलेल्या विद्वान श्रोतृसमुदायासमोर म्हणून दाखवीत. त्यानंतर त्यांवर चर्चा होई. अशा रीतीने उपनिषदे, आरण्यके, ब्राह्मणे, वगैरेंची निर्मिती झाली.

भारतात पंजाब व गुजरात या प्रदेशांत सनपूर्व ३००० वर्षांच्या पूर्वी जी एक संस्कृती नांदत होती, तिला सिंधु-संस्कृती असे म्हणतात. या संस्कृतीत नांदणाऱ्या लोकांना लिपी माहीत असावी, असा संशोधकांचा तर्क आहे. कारण मोहेंजोदडो व हडप्पा येथे जे उत्खनन झाले, त्यात उपलब्ध झालेल्या अव-

कोषात लिखाण कोरलेले आढळून आले आहे. पण ही लिपी मात्र अजून वाचता आली नाही. ती खरोखरीच लिपी आहे, की इतर कसल्या खुणा आहेत, याचाही पत्ता लागलेला नाही.

पाणिनीच्या अष्टाध्यायीत (सनपूर्व ६००) लिपी, लिपीकार हे शब्द आढळतात. त्यामुळे पाणिनीच्या काली लेखनकला प्रचलित होती, असे दिसते. अलेक्झांडरच्या काळात भारतात आलेल्या निर्याकस या गृहस्थाने भारतात लेखनासाठी कागद वापरला जात असे, असे म्हटले आहे. अर्थातच सनपूर्व चौथ्या शतकात भारतात ग्रंथलेखन होत असले पाहिजे. पण या ग्रंथलेखनासाठी कागदाचा उपयोग फारसा केला जात असावा, असे मात्र वाटत नाही. आणि कागदाचा उपयोग क्वचित कुठे होत असलाच, तर तो कागद चीनमधून आणला जात असावा, असे दिसते. या काळातली ग्रंथलेखनाची साधने म्हणजे भूर्जपत्रे व ताडपत्रे हीच होत. लाकडांच्या फळ्यांचाही उपयोग केला जात असल्याचे उल्लेख आढळले आहेत. कोणते लेखन करण्यासाठी कोणती साधने वापरावी याचे विवेचन कौटिलीय अर्थशास्त्रात केलेले आहे. त्यावरून कौटिल्याच्या काळात (सनपूर्व ३००) भूर्जपत्रे व ताडपत्रे हीच मुख्यत: ग्रंथलेखनाची साधने होती, हे स्पष्ट होते. प्राचीन साहित्यात शाईचेही उल्लेख आहेत. 'दीपज्वाला–समुद्भुतकज्जलेन मषी भवेत्' =दिव्याच्या ज्योतीवर जी काजळी धरते तिच्यापासून शाई होते, असे म्हटले आहे.



महाभारताची ताडपत्रावरील हस्तलिखित प्रत

ग्रंथलेखन– बुद्धाच्या कालात ग्रंथलेखन मोठ्या प्रमाणात सुरू झाले. बौद्ध भिक्षूंच्या अभ्यासासाठी विहारांतून ग्रंथसंग्रहही होऊ लागला. नालंदासारख्या कित्येक विद्यापीठांतून प्रचंड ग्रंथालये स्थापन झाली व त्यांत लाखो ग्रंथांचा संग्रह होऊ लागला (ग्रंथालये पाहा). हे सर्व ग्रंथ भूर्जपत्रे व ताडपत्रे यांच्यावर लिहिलेले होते. इ. स. ४०० मध्ये फाहियान हा चिनी पंडित भारतात आला, तेव्हा त्याने बौद्धधर्मविषयक चारशे ग्रंथ नकलून चीनमध्ये नेले. इ. स. ६७१ साली इत्सिगनेही तेच केले. पुढे नालंदा, विक्रमशीला, गुणशीला, इ. विद्यापीठांचा मुसलमानांनी विध्वंस केला, तेव्हा हजारो पोथ्या घेऊन बौद्ध भिक्षू नेपाळात पळून गेले. तिथे भूर्जपत्रे व ताडपत्रे यांवर लिहिलेले हे प्राचीन ग्रंथ अजूनही उपलब्ध आहेत. भारतात मात्र फार जुने ग्रंथ उपलब्ध नाहीत. जुन्यांतले जुने ग्रंथ भारतात उपलब्ध झाले आहेत, ते इ. स. च्या ११ व्या शतकातले. काश्मीरमध्ये इ. स. १०८९ साली लिहिलेले शतपथ ब्राह्मणाचे हस्तलिखित हाच भारतात उपलब्ध झालेला पहिला ग्रंथ होय.

बौद्धांनंतर जैनांनीही ग्रंथलेखनाचा मोठाच उद्योग केला. पंडित हेमचंद्र व राजा कुमारपाल यांनी ग्रंथलेखनाला फार उत्तेजन दिले. त्यामुळे साऱ्या गुजरातेत ताडपत्रावर हजारो ग्रंथांच्या नकला झाल्या. जैन मंदिरांत व राजग्रंथालयांत त्यांचे संग्रह होऊ लागले. नकला शुद्ध व मुळाबरहुकूम व्हाव्या, म्हणून चांगल्या नकलनवीसांना भरपूर द्रव्य देण्यात येऊ लागले. त्यासाठी विद्वान पंडितांची योजना नकलनवीस म्हणून होऊ लागली व नकला करणे, हा केवळ उपजीविकेचा धंदा नसून प्रतिष्ठित व्यवसाय आहे, अशीही कल्पना रूढ झाली. लेखक कसा असावा, याबद्दलचे संकेतही या काळात ठरून गेले –

सर्वदेशाक्षराभिज्ञः सर्वभाषाविशारदः ।
लेखकः कथितो राज्ञः सर्वाधिकरणेषु वै ॥
मेधावी वाक्पटुर्धीरो लघुहस्तो जितेन्द्रियः ।
पदशास्त्रपरिज्ञाता एष लेखक उच्यते ॥

अर्थ – सर्व देशांतली अक्षरे (लिपी) जाणणारा आणि सर्वभाषाविशारद असा लेखक राजाच्या सर्व लेखनकार्यावरचा अधिकारी असावा, असे सांगितले आहे. बुद्धिमान, बोलण्यात चतुर, धैर्यशाली, हलक्या हाताचा, जितेंद्रिय, पदशास्त्र जाणणारा असा लेखक असावा, असे म्हटले जाते.

यादृशं पुस्तकं दृष्टं तादृशं लिखितं मया ।
यदि शुद्धमशुद्धं वा मम दोषो न विद्यते ॥

अर्थ – जसे पुस्तक होते तसे मी लिहिले. त्याच्या शुद्धाशुद्धतेबद्दल मी दोषी नाही.

असे म्हणून उडवाउडवी करणाऱ्या नकलनवीसापेक्षा हे

संपूर्ण पुस्तक मी सावधानपणाने लिहिले आहे, असे आत्मविश्वासपूर्वक सांगणाऱ्या नकलनवीसांना चांगला राजाश्रय मिळू लागला.

ग्रंथविभाग – वेगवेगळ्या ग्रंथांचा प्रकरणविभाग किंवा विषयविभाग वेगवेगळ्या नावांनी केलेला असतो. ऋग्वेदाचे अष्टक, अध्याय, वर्ग; काही संहितांचे प्रपाठक, अनुवाक, पंचिका; उपनिषदांचे वल्ली; भागवताचे स्कंध; रामायणाचे सर्ग; महाभारताचे पर्व; विष्णू पुराणाचे अंश; कोशांचे कांड, वर्ग अशी त्यांची विभागनामे आढळतात. यांशिवाय इतरहि ग्रंथांचे लहरी, अध्याय, उच्छ्वास, उल्लास, पाद, स्तबक, इ. नावांनी विभाग केलेले असतात.


स
१
॥

स्तस्मै विष्णवे प्रभविष्णवे ॥ १ ॥ नमः
समस्तभूतानामादिभूताय भूभृ
ते ॥ अनेकरूपरूपाय विष्णवे प्रभ
विष्णवे ॥ २ ॥ वैशंपायन उवा
च ॥ श्रुत्वा धर्मानशेषेण पावना

विष्णु सहस्रनामाच्या हस्तलिखित प्रतीतील एक पान

ग्रंथचित्रण – ग्रंथांमध्ये आकृत्या, चित्रे वगैरे घालून ग्रंथ सजविण्याच्या कलेला ग्रंथचित्रण असे म्हणतात. भारत व इराण या देशात या कलेची वाढ फार प्राचीन काळापासून होत आलेली आहे. फारसी भाषेत लिहिलेल्या शाहनाम्याच्या अनेक प्रती फार सुंदर चित्रांनी विभूषित केलेल्या असून, भारतातील अनेक किताबखान्यांतून त्या आढळतात. तसेच महाभारत, रामायण व भागवत, विशेषतः भगवद्गीता, यांच्या अनेक पोथ्या प्रत्येक अध्यायात प्रारंभी सुंदर चित्रे काढून सजविलेल्या दृष्टीस पडतात. या चित्रांचा विशेष हा आहे, की त्यातील रंग अनेक वर्षांनंतरही अगदी ताजे असल्यासारखे दिसतात. मध्ययुगात गुजरात व राजस्थान येथील जैन आचार्यांनी लिहिलेले कित्येक ग्रंथ असे चित्रित केलेले आहेत. त्यांवर कित्येकदा पानागणिक अनेकरंगी चित्रे आढळतात व त्यात एखाद्या तीर्थंकराच्या किंवा आचार्यांच्या जीवनातील प्रसंग चित्रित केलेले असतात. बीकानेर, जोधपूर, इ. ठिकाणच्या ग्रंथालयांत असे शेकडो सचित्र जैन ग्रंथ सुरक्षित ठेवलेले आहेत.

कागदाचा वापर –– इ. स. च्या १५ व्या शतकात यूरोपमध्ये कागद आणि मुद्रण या दोन्ही गोष्टी आल्या. त्यामुळे ग्रंथांच्या क्षेत्रात क्रांतिकारक बदल झाला. कागद व छापखाना या दोहोंचाही शोध यापूर्वी कितीतरी काळ चीनमध्ये लागला होता. कागदाची माहिती प्रथम चीनमधून अरब व्यापाऱ्यांनी यूरोपमध्ये नेली. त्यांच्याच मार्फत ती भारतातही आली. कापसाच्या चिंध्यांचा लगदा करायचा व चाळणीवर त्याचा पातळ थर घालून कागद बनवायचा अशी ही कृती होती. यूरोपात कागदाची कृती माहीत झाल्यानंतर अनेक ठिकाणी कागदाचे कारखाने निघाले व व्हेलमच्या जागी कागद वापरला जाऊ लागला.

मुद्रणकला— याच सुमारास जर्मनीमध्ये मेंज या गावी गटेनबर्ग याने आधुनिक मुद्रणकलेचा शोध लावला. वास्तविक हा शोध कागदाप्रमाणेच चीनमध्ये कितीतरी शतके पूर्वीच लागला होता. पश्चिमेकडील एका डोंगरात बौद्धधर्म विषयक पुस्तके एका गुहेत बंदिस्त करून ठेवली असावी, अशा अंदाजाने इ. स. १९०७ साली ती गुहा उघडण्यात आली. तेव्हा तीत

हजार सुरळ्यांचे मुद्रित ग्रंथ तिथे सापडले. यांपैकी काही ग्रंथांवर मुद्रणकाळ छापण्यात आला होता. अशांपैकी ही रकसूत्र नावाच्या ग्रंथावर ११ मे ८६८ हा मुद्रणकाळ छापण्यात आला असून जगातील सर्वांत जुना ज्ञात असा हाच मुद्रित ग्रंथ समजला जातो. वाँग चिएह नावाच्या चिनी माणसाने तो छापल्याचा त्याच्यावर उल्लेख आहे. या सर्व ग्रंथांचा अभ्यास करून चीनमध्ये इ. स. च्या सहाव्या शतकापासून तरी मुद्रणाची कला माहीत झाली असावी, असे तज्ज्ञांना वाटते.

हे मुद्रित ग्रंथ लाकडाचे ठोकळे कोरून छापलेले आहेत. या पद्धतीला शिलोग्राफी (xilography) असे नाव देण्यात आले आहे. पण या पद्धतीने ग्रंथ छापला म्हणजे तो ठोकळा निरुपयोगी ठरे आणि नव्या ग्रंथासाठी नवे ठोकळे कोरावे लागत. म्हणून एकेका अक्षराला एकेक ठोकळा तयार करण्याची कल्पना निघाली. इ. स.च्या अकराव्या शतकात पी शेंग या चिनी माणसाने मातीचे ठोकळे तयार केले. पुढे लाकूड व धातू यांचा उपयोग अक्षरांचे ठोकळे किंवा खिळे (Type) करण्यासाठी होऊ लागला. अशा प्रकारे इ. स. च्या १२ व्या शतकात चीनमध्ये मुद्रणकला सुस्थिर झाली.



एका सचित्र जैन पोथीचे पान

जपान हा चीनचा शेजारी असल्यामुळे चीनमधील ठोकळा-छाप-पद्धतीचे जपानने अनुकरण केले. इ. स. ७७० पूर्वी जपानमध्ये एका प्रार्थनेच्या २० लक्ष प्रती ठोकळा-पद्धतीने छापल्याचा उल्लेख सापडतो.

पण चीनमधील या मुद्रणकलेचा आधुनिक मुद्रणकलेच्या प्रसाराशी संबंध पोचत नाही. जगात आज सर्वत्र जी मुद्रणकला पसरली आहे, तिचे श्रेय युरोपातील संशोधकांना दिले पाहिजे. जोहान गटेनबर्ग नावाच्या गृहस्थाने इ. स. १४३९ साली जर्मनीतील मेंज गावी धातूंच्या खिळ्यांच्या छपाईचा (Typography) शोध लावला.

पण गटेनबर्ग हा आधुनिक मुद्रणकलेचा संशोधक नसून हॉलंडमधील हार्लेम गावचा लॉरेन्स कॉस्टर हाच त्या कलेचा पहिला संशोधक होय, असेही एक मत आहे. त्याने इ. स. १४४१ मध्ये ‘आमच्या मुक्तीचा आदर्श’ हे पुस्तक छापले व हेच जगातले पहिले मुद्रित पुस्तक होय, असा दावा सांगितला जातो. लॉरेन्स कॉस्टर हाच मुद्रणकलेचा जनक असे ठरवून इ. स. १९४० साली अमेरिकेने मुद्रणकलेच्या शोधाची चतुःशताब्दी साजरी केली, तर यूरोपने हाच समारंभ इ. स. १९५६ साली पार पाडला.

इ. स. १४५६ ते १५०० या काळात यूरोपखंडातील सर्व शहरांत आणि नंतर अमेरिकेत छापखान्यांचा प्रसार झाला. या अवधीत विविध पुस्तकांच्या ४० हजार प्रती छापल्या गेल्या. मुद्रणाच्या या शोधामुळे बांधीव ग्रंथ म्हणजे बायबल किंवा ख्रिस्ती ग्रंथ ही कल्पना नष्ट झाली. अर्थातच सुरवातीला छापील पुस्तकांतील बहुसंख्य पुस्तके बायबल व त्यावरील भाष्ये यांचीच असत. इतकेच नव्हे; तर हस्तलिखित ग्रंथांप्रमाणेच ही मुद्रित पुस्तकेही हुबेहूब तशीच दिसत. किंबहुना अमुक मुद्रित व अमुक हस्तलिखित हे सांगणे सुद्धा पुष्कळ वेळा कठीण होई. फरक इतकाच, की मुद्रित पुस्तकांच्या शेवटी कोलोफोन (colophone) असे. कोलोफोन म्हणजे मुद्रकाचे

व मुद्रणसंस्थेचे नाव होय. आपल्याकडे पोथ्यांच्या शेवटी अमुक तमुक गृहस्थाच्या आज्ञेवरून अमुक तमुक गृहस्थाने हा ग्रंथ लिहून म्हणजे नकलून काढला, असा उल्लेख असतो, त्यालाही कोलोफोनोच म्हटले पाहिजे. मुद्रणकलेच्या शोधाचा मोठाच फायदा झाला, तो म्हणजे पुस्तकांच्या किंमती कमी झाल्या आणि देशी भाषांतील ग्रंथांना मुद्रणाच्या शोधाने फारच उत्तेजन मिळाले.

इ. स. १४५६ ते १५०० या काळात मुद्रित झालेल्या ग्रंथांना आद्यमुद्रिते किंवा दोलामुद्रिते (Incunabulae) असे म्हणतात. इन्क्युनाबुला म्हणजे पाळण्यातले पुस्तक. हा काळ म्हणजे मुद्रणकलेचा बाल्यकाळ किंवा पाळण्यातला काळ होय. या काळात छापण्यात आलेली फार थोडी पुस्तके जगात उपलब्ध आहेत. त्यामुळे ही आद्यमुद्रित पुस्तके संग्रहात असणे, म्हणजे मोठें प्रतिष्ठेचे व अभिमानाचे लक्षण समजले जाते. मोठमोठी ग्रंथालये व ग्रंथवेड्या व्यक्ती आपापल्या संग्रहासाठी मिळेल तिथून वाटेल तेवढ्या किंमतीला हे ग्रंथ विकत घेतात. जितका ग्रंथ जुना आणि त्याच्या जितक्या कमी प्रती उपलब्ध, तितके त्याचे मोल अधिक. असे ग्रंथ पैदा करून ते विकण्याचा धंदा करणारे लोक आहेत. अस्सल ग्रंथांच्या नकला करून गिऱ्हाईकांच्या गळ्यात बांधणारेही लोक आहेत. ग्रंथ जुना, अस्सल की नक्कल हे ठरविण्याचे शास्त्रही आता परिणत अवस्थेला पोचले आहे.

युरोप-अमेरिकेत मुद्रणकला सुरू झाल्यावर सुमारे १०० वर्षांनी ती पूर्वेकडे आली. इ. स. १५५६ साली पोर्तुगीजांनी गोमंतकात आणलेला छापखाना हा पूर्वेकडील पहिला छापखाना होय. आशिया-आफ्रिका खंडांत धर्मप्रसार करण्यासाठी पोर्तुगीज मिशनऱ्यांना बायबल व ख्रिस्ती धर्मावरील इतर ग्रंथांची गरज लागे. पण त्या वेळी दळणवळणाची साधने सुलभ नसल्यामुळे युरोपातून जरूर तितके ग्रंथ येत नसत. म्हणून इथियोपियात छापखाना काढण्याचे ठरविण्यात आले. त्याप्रमाणे छापखाना जहाजावर चढला. पण पश्चिम समुद्रात वादळ झाल्यामुळे ते गलबत पूर्वेकडे हाकारून गोव्याकडे नेण्यात आले. अशा प्रकारे केवळ यदृच्छेने भारतात आधुनिक मुद्रणकला आली. पुढे हा छापखाना गोवे शहरातील जेसुईट मिशनऱ्यांच्या मठात सुरू करण्यात आला. या छापखान्यातून सेंट फ्रान्सिस झेवियर याने लिहिलेले दौत्रीन क्रिस्तां हे पुस्तक इ. स. १५५७ साली छापण्यात आले. भारतात आणि अर्थातच आशियात छापले गेलेले हे पहिले पुस्तक होय. या पुस्तकाची एकही प्रत आज जगात उपलब्ध नाही. याच छापखान्यात छापलेला व न्यूयॉर्क पब्लिक लायब्ररीत ज्याची एकुलती एक प्रत उपलब्ध आहे असा ग्रंथ म्हणजे काँपेंडिओ एस्पिरीच्युअल डे फे ख्रिस्तां (Compendio Espiritual de fe christam) हा होय.

गोवे शहरातला हा छापखाना इ. स. १५७३ साली बंद पडला. या मुदतीत फारशी पुस्तके छापण्यात आली नाहीत. नंतर गोव्यातील रायतूर या गावच्या एका ख्रिश्चन पाठशाळेत इ. स. १६१५ साली पुन्हा छापखाना सुरू झाला व फादर स्टीफन्सचे सुप्रसिद्ध मराठी क्रिस्तपुराण तिथे इ. स. १६१६ साली छापण्यात आले. या ग्रंथाची लिपी रोमन व भाषा मराठी होती. इ. स. १६६० साली हाही छापखाना बंद पडला. इ. स. १६१६ ते १६६० या मुदतीत ४५ ग्रंथ तिथे छापले गेले. त्यात पोर्तुगीज, कोकणी व मराठी (रोमन लिपीतील) ग्रंथ होते.

इ. स. १६६० मध्ये गोव्यात कुप्रसिद्ध इन्क्विझिशन ही संस्था आली आणि पूर्वीचे सरकारी धोरण बदलले. धर्मप्रसारासाठी पूर्वी पोर्तुगीज धर्मोपदेशक स्थानिक लोकांची भाषा शिकत व त्यांच्या भाषेतून धर्मप्रचार करीत. त्याचसाठी त्यांना देशी भाषांतील ग्रंथांची गरज होती. इन्क्विझिशन आल्यानंतर जुलमाने ख्रिस्तीकरण होऊ लागले. जनतेच्या भाषांवर बंदी आली. या बदलत्या धोरणाचा परिणाम म्हणून रायतूरचा छापखाना बंद करण्यात आला असावा.

भारतात पुढील १०० वर्षे निरनिराळ्या ठिकाणी मुद्रणाचे प्रयत्न झाले. पण ते किरकोळ होते. भारतात मुद्रणालय निर्माण करून देशी भाषांत ग्रंथरचनेचा प्रचंड प्रयत्न झाला तो बंगालमध्ये. श्रीरामपूरच्या डॅनिश मिशनमध्ये इ. स. च्या १८ व्या शतकाच्या अखेरीस डॉ. कॅरे नावाच्या मिशनऱ्याने बहुतेक देशी भाषांचे खिळे पाडून ग्रंथ निर्माण केले. इ. स. १८०५ साली त्याने मराठी भाषेचे व्याकरण देवनागरी लिपी वापरून तयार केले. हे व्याकरण हा मराठी भाषेतील देवनागरी लिपी वापरून तयार झालेला पहिला ग्रंथ होय.

भारतात मुद्रणकला बाल्यावस्थेत असताना युरोप-अमेरिकेत मात्र तिचा झपाट्याने विकास होत होता. ग्रंथ लिहून घेणे, ते छापणे, विकणे वगैरे कामे पूर्वी छापखान्याचे मालक करीत. पण इ. स. च्या १६ व्या शतकात ग्रंथनिर्मितीच्या क्षेत्रात वेगवेगळे पोटधंदे निर्माण झाले. फाऊंड्री, कागदकारखाने, मुद्रण व ग्रंथप्रकाशन असे संबंधित अनेक व्यवसाय सुरू झाले. त्यामुळे ग्रंथनिर्मिती मोठ्या प्रमाणात होऊ लागली. सोळाव्या शतकात ग्रंथनिर्मिती वाढली तशी मागणीही वाढू लागली. शाळा, विद्यापीठे व खासगी संग्रह यांच्याकडून ही मागणी येऊ लागली. वाचनाची सवय वाढली, त्यामुळे इ. स. च्या १६ व्या शतकात ५ लाख २० हजार पुस्तके छापण्यात आली. १७ व्या शतकात १२ लाख ५० हजार, १८ व्या शतकात २० लाख, तर एको-

णिसाव्या शतकात ८० लाख पुस्तके निर्माण झाली. विसाव्या शतकात तर मुद्रणव्यवसायात सर्वांगीण क्रांती झाली आहे. खिळे पाडण्याची व ते जुळविण्याची मोनोटाईप, लिनोटाईप, इंटरटाईप, यांसारखी यंत्रे निघाली आहेत. तासी पन्नास-पन्नास हजार प्रती छापू शकणारी छपाईची यंत्रे निर्माण झाली आहेत. फोटोग्राव्हयूरसारखे शोध लागले आहेत. रंगीत छपाई, बांधणी या तांत्रिक क्षेत्रातही सुलभता आली आहे. त्यामुळे या शतकात ग्रंथनिर्मिती प्रचंड प्रमाणावर वाढत आहे, वाढणार आहे. रेडियो, टेलिव्हिजन वगैरेंच्या शोधांमुळे ग्रंथवाचनाकडे दुर्लक्ष होईल, असा एक समज होता; पण तो चुकीचा असल्याचे सिद्ध झाले आहे. सुधारलेल्या देशांत शिक्षित जनतेशी ग्रंथवाचकांचे प्रमाण काय पडते, याची पाहणी करण्यात आली. त्यावरून असे आढळून आले, की जर्मनी, कॅनडा, ऑस्ट्रेलिया वगैरे देशात ३० ते ४५ टक्के असे हे प्रमाण पडते; तर अमेरिकेत ६० टक्के पडते. अमेरिकेत जवळजवळ ९९ टक्के साक्षरतेचे प्रमाण आहे. आणि रेडियो–टेलिव्हिजनचा वापर अमेरिकेत सर्वांत जास्त होतो हे लक्षात घेतले, तर तिथे आजही ग्रंथ वाचणाऱ्यांची संख्या केवढी मोठी आहे, याची कल्पना करता येते. भारतासारख्या कमी साक्षरतेच्या देशात आज ग्रंथांपेक्षा रेडियो–टेलिव्हिजनची गरज लोकशिक्षणासाठी अधिक आहे. साक्षरता जसजशी वाढेल, तसतसे ग्रंथवाचनाचे प्रमाणही वाढेल असाच निष्कर्ष यावरून काढता येतो. रेडियो–टेलिव्हिजनला ग्रंथांची लोकप्रियता कमी करणे शक्य नाही. कारण ग्रंथ हा माणसाचा मित्र व गुरू अशी कामगिरी बजावतो व ग्रंथगत ज्ञान हे ग्रंथाच्या व वाचकाच्या आयुष्याइतके असते, म्हणूनच ग्रंथाची लोकप्रिता कितीही नवीन शोध लागले, तरी कमी होण्याची शक्यता नाही. पाहा–पुस्तक.

[वा. द. सातोस्कर]

ग्रंथसाहिब आदिग्रंथ. गुरुग्रंथ पाहा.

ग्रंथालये अभ्यास, संशोधन, संदर्भ वा सर्वसाधारण वाचन या सर्व गोष्टींसाठी सर्वांना उपयुक्त व्हावा म्हणून एकत्र केलेला हस्तलिखित वा मुद्रित ग्रंथांचा संग्रह म्हणजे ग्रंथालय, अशी त्या शब्दाची व्याख्या केलेली आहे. पण या व्याख्येतही कालमानाप्रमाणे बदल झाला आहे. ग्रंथांप्रमाणेच चित्र, शिल्प, इ. कलाकृती, गाण्यांच्या ध्वनिमुद्रिका, जुन्या ग्रंथांच्या मायक्रोफिल्म्स्, फोटोस्टॅट प्रती, वृत्तपत्रांची मायक्रोकार्ड्स्, जुने ऐतिहासिक कागदपत्र, नकाशे, पत्रके, छायाचित्रे, ताम्रपट, शिलालेख, प्राचीन नाणी, तिकिटे वगैरेंचाही संग्रह आधुनिक ग्रंथालयात केला जातो. त्या दृष्टीने आता ग्रंथालय शब्दाची व्याख्या अधिक व्यापक झाली आहे. कारण या सर्व वस्तू म्हणजे माणसानें संपादन केलेला व भावी पिढ्यांसाठी ठेवलेला वारसा होय. ग्रंथांप्रमाणेच या वस्तूंमुळेही जिज्ञासूला ज्ञानप्राप्ती होत असते आणि म्हणूनच याही वस्तूंचा संग्रह ग्रंथालयातच केला जातो. अशा आधुनिक ग्रंथालयाचे उत्कृष्ट उदाहरण म्हणजे अमेरिकेतील लायब्ररी ऑफ् काँग्रेस हे ग्रंथालय होय.

ज्या काळात लिपीचा शोध लागला नव्हता, तेव्हा शास्त्र व काव्य हे व्यक्तीला मुखोद्‌गत करावे लागे. प्रत्येक विद्वान हा त्या वेळी चालते बोलते ग्रंथालयच असे. पण लिपीचा शोध लागून ग्रंथलेखनास सुरवात झाली, त्याच वेळी ग्रंथांचा संग्रह करण्याचीही कल्पना माणसाला स्फुरली. त्यामुळे हळूहळू पाठांतर कमी होऊ लागले व ग्रंथांचा संग्रह वाढू लागला. पण त्या प्राचीन काळी ग्रंथसंग्रह करणे हे आजच्याप्रमाणे सुलभ नव्हते. ग्रंथांच्या नकला करून घेऊन त्यांचा संग्रह करावा लागे. एकट्या-दुकट्याचे हे काम नव्हते. शिवाय या ग्रंथांचा उपयोग केवळ वाचनापेक्षा शिकवण्यासाठी अध्यापकांना अधिक होत असे, म्हणून मंदिरे वा पाठशाला यांत असे संग्रह करण्याची प्रथा सुरू झाली.

लेखनकलेचा शोध सुमेरिया व मिसर या देशांत प्रथम लागला. त्यामुळे जगातली पहिली ग्रंथालयेही या देशांतच निर्माण झाली. सुमेरियन, बाबिलोनियन व असीरियन या संस्कृती आजच्या मेसापोटेमियात नांदून गेल्या. इथल्या ग्रंथालयांतील ग्रंथ विटांवर लिहिलेले असत (ग्रंथ पाहा). या ग्रंथालयाला लिखित इष्टकागृह (लिहिलेल्या विटांचे घर) असे नाव होते. ग्रंथालयावर देखरेख करण्यासाठी एक स्वतंत्र गुरू असे. त्याला 'लिहिलेल्या विटांचा अधिपती' असे म्हणत. देवदेवतांच्या प्रार्थना, काव्ये, धार्मिक ग्रंथ, पौराणिक कथा, गणित व ज्योतिष या सर्व विषयांवरचा संग्रह सुमेरियन व पुढे असीरियन ग्रंथालयांत केलेला होता. ख्रिस्तपूर्व १७०० वर्षीपूर्वी शुक्रग्रहाचे जे वेध घेतले गेले होते, त्यांची माहिती एका इष्टकाग्रंथात दिलेली सापडली. हम्मुराबी या राजाने निर्माण केलेले कायदे इथे विटांवर लिहिलेले आढळले आहेत. लिखित अशी जगातील कायद्याची पहिली संहिता हीच होय.

असीरियन लोकांचा असुर-अवनि पाल हा राजा ख्रिस्तपूर्व ७ व्या शतकात होऊन गेला. त्याने निनेव्हे येथे एका मंदिराजवळ एक मोठे ग्रंथालय उभारले होते. त्यात त्याने सुमेरियन भाषेतील हजारो इष्टकाग्रंथ जमवले होते. त्या ग्रंथांचे वर्गीकरण करण्यात येऊन त्यांची सूचीही तयार केली होती. हे ग्रंथ वाचण्यासाठी बाहेरही दिले जात. हे मुक्तद्वार ग्रंथालय होते. त्या

दृष्टीने हे जगातील पहिले सार्वजनिक ग्रंथालय समजावे लागेल. इ. स. १८५० साली ऑस्टिन लेयर्ड (Austin Layard) या संशोधकानें निनेव्हेचे उत्खनन केले, तेव्हा हे ग्रंथालय त्याला सापडले. दहा हजार इष्टिकाग्रंथ त्याला तिथे मिळाले. त्यातलें बरेच ग्रंथ आता ब्रिटिश म्युझियममध्ये ठेवण्यात आले आहेत.

सुमेरियन ग्रंथालयाइतकीच जुनी ग्रंथालये प्राचीन ईजिप्त देशात होती. फरक इतकाच, की सुमेरियन ग्रंथालयांत विटांचे ग्रंथ होते, तर मिसरी ग्रंथालयांत पापिरसचे होते. एडफू, मेंडस, मेम्फीस, हेलियोपोलिस, इ. ठिकाणी ही ग्रंथालये होती. मिसर देशात ग्रंथांचे महत्त्व फार मानीत. आत्म्याचे रुग्णालय, विचारांचे औषध, मानसिक दवाखाना अशा तऱ्हेची नावे त्या ग्रंथालयांना दिलेली होती. ग्रंथालय किंवा पापिरसचे घर ही वस्तुस्थितिदर्शक नावे अनेक ग्रंथालयांना दिली जात.

ख्रिस्तपूर्व तेराव्या शतकात होऊन गेलेला रॅमिसिस (दुसरा) याने ईजिप्तमध्ये आत्म्याचे इस्पितळ या नावाने एक ग्रंथालय उभारले. त्याही पूर्वी खाफ्रा नावाच्या फॅरो राजाने एक ग्रंथालय स्थापले होते, असा उल्लेख मिळतो. या ग्रंथालयातील फार थोडे ग्रंथ आता उपलब्ध आहेत. कारण पापिरस ही वस्तू विटांइतकी टिकाऊ नसल्यामुळे व इराणने मिसरवर केलेल्या आक्रमणामुळे ईजिप्तमधील बऱ्याच ग्रंथालयांचा नाश झाला.

या भागातील ज्या ग्रंथालयाची विशेष माहिती उपलब्ध झाली आहे, ते ग्रंथालय अलेक्झांड्रियाचे म्युझियम या नावाने ओळखले जाते. हे ग्रंथालय ईजिप्तमध्ये स्थायिक झालेला ग्रीक राजा टॉलेमी (पहिला) याने सनपूर्व २९० या वर्षी स्थापन केले. त्याचा मुलगा फिलाडेल्फस याने व तिसऱ्या टॉलेमीने या ग्रंथालयाची प्रचंड प्रमाणावर वाढ केली.

या ग्रंथालयात सुमारे सात लाख ग्रंथ होते, असे सांगतात. विशेष गोष्ट ही, की या प्रचंड ग्रंथालयाचे शास्त्रीय दृष्टिकोनातून १२० वर्गांत वर्गीकरण व सूचीही तयार करण्यात आली होती. या सूचीच्याही काही विटा उपलब्ध झाल्या आहेत.

अलेक्झांड्रियाचे ग्रंथालय असे भरभराटीत असतानाच पर्गामम या दुसऱ्या ग्रीक शहरातल्या ग्रंथालयाचीही वाढ होत होती. विद्याप्रसाराच्या व कलाक्रीडांच्या बाबतीत ह्या दोन्ही शहरांची एकमेकांशी स्पर्धा चालू असे. अलेक्झांड्रियाचे हे संपन्न ग्रंथालय सनपूर्व ४८ व्या वर्षी सीझरच्या स्वारीत बेचिराख झाले. पुढे अँटनीने या अन्यायाचे परिमार्जन म्हणून क्लिओपाट्राला पर्गाममचे ग्रंथालय प्रेमभेट म्हणून देऊन टाकले. हे ग्रंथालय ईजिप्तमध्ये हलविण्यात आले, त्या वेळी त्यात दोन लाख ग्रंथ होते, असे प्लिनीने लिहून ठेवले आहे. इ. स. १८७६ ते ८६ या काळात जर्मन संशोधक अलेक्झांडर कोंज याने त्याचे उत्खनन केले, तेव्हा ग्रंथालयाची ४ मोठी दालने सुस्थितीत सापडली. इ. स. ३९१ मध्ये ख्रिश्चन धर्मवेड्यांनी पर्गाममच्या ग्रंथालयाचा नाश केला व उरलेले अवशेष खलिफा उमर याने नष्ट करून टाकले.

ग्रीक साम्राज्याच्या अस्तानंतर रोम शहर भरभराटीला आले. रोमन लोक शूर सैनिक होते तसे विद्येचेही भोक्ते होते. ग्रीसमधील ग्रंथसंग्रह त्यांनी रोममध्ये आणले. ग्रीक ग्रंथांची त्यांनी लॅटिनमध्ये भाषांतरे केली आणि रोमन सम्राटांनी सार्वजनिक ग्रंथालयेही उभारली. रोममधले पहिले सार्वजनिक ग्रंथालय असिनिस पोलिमो या सम्राटाने स्थापन केले. ऑगस्टसने दोन ग्रंथालये निर्माण केली. सीझरने तर कितीतरी ग्रंथालये स्थापली. इ. स. ३०० या वर्षी रोममध्ये २८ सार्वजनिक ग्रंथालये होती, असा उल्लेख सापडतो. कॉन्स्टँटिनोपल शहरात थिओडोशियसच्या कारकीर्दीत तिथल्या ग्रंथालयात लाखावर ग्रंथ होते व त्यात ख्रिस्ती धर्मग्रंथांचा भरणा अधिक होता. रोमवर रानटी टोळ्यांनी जे हल्ले केले, त्यांत रोमन संस्कृतीची ही ग्रंथालयरूपी भूषणे नष्ट झाली. त्यानंतर पुढे यूरोपमध्ये अंधारयुगच सुरू झाले. यूरोपात पुनरुज्जीवनाचा (Renaissance) काळ सुरू झाला, तेव्हा यूरोपियनांना ग्रंथालयांचा नव्याने विकास करावा लागला.

युरोपमध्ये अंधारयुग चालू होते, तेव्हा अरब लोक उन्नत संस्कृतीच्या दिशेने वाटचाल करीत होते. त्यांनी उत्तर आफ्रिका व दक्षिण यूरोप पादाक्रांत केला आणि आपल्या राजकीय वर्चस्वाबरोबरच त्यांनी त्या देशात सुधारणाही नेल्या. अरब लोक ज्ञानप्रेमी होते. भारताशी त्यांचा संबंध होता. भारतातील ज्ञान–विज्ञानाचे लोण त्यांनी आपल्या स्वतःच्या देशात तर नेलेच; पण यूरोपपर्यंतही ते पोचविले. ग्रंथांचा व ग्रंथकारांचा त्यांना लोभ होता. दमास्कस, बगदाद, कैरो वगैरे शहरांत त्यांनी मोठी ग्रंथालये उभारली. स्पेनमध्ये कार्दोव्हा येथे त्यांनी एक बादशाही ग्रंथालय सुरू केले. अभ्यासकांना या ग्रंथालयात कागद, लेखण्या व शाई मोफत पुरविण्यात येत असे. यूरोपमधली जनता जेव्हा अशिक्षित होती, तेव्हा अरब सत्तेखालील स्पेनमध्ये मोठ्या प्रमाणावर साक्षरता होती आणि कार्दोव्हा येथील ग्रंथालय भरभराटीत होते.

इ. स. च्या १० व्या शतकापासून पुढे युरोपात विद्यापीठे स्थापन होऊ लागली. इटली, फ्रान्स, स्पेन, जर्मनी, ऑस्ट्रिया, पोलंड, डेन्मार्क, स्वीडन, स्कॉटलंड वगैरे देशांतून दहा ते तेरा या शतकांच्या काळात सुमारे ३०–४० विद्यापीठे स्थापन झाली. मग तिथल्या विद्यार्थ्यांच्या अभ्यासासाठी विविध विषयांवर ग्रंथही लिहिले जाऊ लागले. मुद्रणकलेचा शोध अजून लागाव

होता. अर्थातच विद्यार्थ्यांना पुस्तकांचा पुरवठा करण्याकरता नकला काढण्याची जबाबदारी विद्यापीठांवर येऊन पडली. ही विद्यापीठसंलग्न ग्रंथालये म्हणजे यूरोपमधील ज्ञानसाठे समजण्यात येत व त्यांचे महत्त्व असाधारण मानले जाई. इ. स. १३३८ च्या सुमारास पॅरिसमधल्या सोर्बोन विद्यापीठात १८०० ग्रंथ असल्याचा उल्लेख सापडतो. नाव्हारे विद्यापीठात खर्चवेच वजा जाता शिल्लक राहिलेल्या रकमेचा विनियोग ग्रंथालयातील ग्रंथ वाढविण्याच्या कामी करण्यात येई.

मध्ययुगीन यूरोपातील ही विद्यापीठीय ग्रंथालये आज फार समृद्ध झाली आहेत. पण त्यानंतर जी सार्वजनिक ग्रंथालये स्थापन झाली, त्यांनी तर सांप्रत अतिप्रचंड रूप धारण केले आहे. या ग्रंथालयांचा योगक्षेम त्या त्या देशांचे सरकार चालवीत असते आणि आपल्या देशाचे राष्ट्रीय ग्रंथालय हे राष्ट्राचे भूषण ठरावे, असा प्रयत्न करते. म्हणूनच पाश्चात्य देशांत अशा ग्रंथालयांचा व्याप प्रचंड प्रमाणात वाढला आहे. लंडनच्या ब्रिटिश म्युझियममध्ये ४५ लक्षांवर ग्रंथ आहेत. तर मास्कोच्या लेनिन ग्रंथालयात ५० लक्षांवर ग्रंथ आहेत. अमेरिकेतील वॉशिंग्टन शहरात जगातले सर्वांत मोठे ग्रंथालय आहे. अमेरिकेच्या या लायब्ररी ऑफ काँग्रेसमध्ये ९० लक्ष ग्रंथ असून, ग्रामोफोन तवकड्या व मायक्रोफिल्म अशासारख्या ज्या वस्तू आहेत त्या जमेस धरल्या, तर एकूण ३ कोटींचा हा संग्रह आहे. यात वाचनाची दालने २० वर असून, पुस्तकांच्या कप्प्यांची लांबी ४०४ मैल आहे. ३६ एकरांचे क्षेत्र या ग्रंथालयाच्या इमारतींनी व्यापलेले आहे.

भारतीय ग्रंथालये — भारतातील जुन्यांत जुने ग्रंथालय नालंदा येथील विद्यापीठाचे होय. नालंदा, तक्षशीला, उदंतपुरी, विक्रमशीला, गुणशीला, जागद्दल, काशी, इ. फार मोठी विद्यापीठे भारतात होती. या एकेका विद्यापीठात हजारो विद्यार्थी शिक्षण घेत. या विद्यापीठांमध्ये प्रचंड ग्रंथसंग्रह असे.व त्या ग्रंथांच्या साहाय्याने विद्यार्थ्यांना शिक्षण दिले जाई.

नालंदा विद्यापीठाच्या ग्रंथालयासंबंधी खूप माहिती मिळते. त्या विद्यापीठाचा काळ इ. स. ४०० ते १२०० हा होय. बिहारमधील आजच्या पाटणा शहराच्या नैर्ऋत्येस ४० मैलांवर हे विद्यापीठ वसले होते. इ. स. च्या चौथ्या शतकात फाहियान व सातव्या शतकात युआन च्वांग या चिनी प्रवाशांनी या विद्यापीठाला भेट दिली होती. इत्सिंग हा चिनी पंडित तर बौद्ध धर्म व इतर अनेक शास्त्रे यांचा अभ्यास करण्यासाठी नालंदा विद्यापीठात दहा वर्षे राहिला होता. नालंदा विद्यापीठातील ग्रंथालयाचे नाव धर्मगंज असे असून, रत्नसागर, रत्नोदधी व रत्नरंजक या नावाच्या तीन इमारतींत तिथला ग्रंथसंग्रह ठेवलेला होता. त्यांतील एक इमारत नऊ मजली होती व दुसऱ्या दोन सहा मजली होत्या. यावरून या ग्रंथालयाच्या विस्ताराची कल्पना करता येईल. आजच्या प्रचंड ग्रंथनिर्मितीच्या काळातही भारतात एवढे मोठे ग्रंथालय नाही. नालंदा विद्यापीठातील दहा हजार भिक्षू या ग्रंथालयाचा उपयोग करीत. इत्सिंगने त्यांतील चारशे संस्कृत ग्रंथांच्या नकला व काहींची चिनीत भाषांतरे करून चीनला नेली. या ग्रंथालयात त्या काळातील ज्ञानावर लिहिलेले सर्व प्रकारचे ग्रंथ होते; परंतु बौद्ध वाङमयाच्या संग्रहावर विशेष भर होता.

इ. स. च्या आठव्या शतकात नालंदाजवळच विक्रमशीला नावाचे नवे विद्यापीठ नालंदातील काही आचार्यांनी स्थापन केले. त्यामुळे नालंदाचे महत्त्व हळूहळू कमी होत गेले. पुढे हूण राजा मिहिरकुल याच्या हल्ल्यामुळे ते आणखी क्षीण झाले आणि शेवटी बख्त्यार खिलजीने या विद्यापीठाचा पुरता नाश केला.

नालंदाप्रमाणेच विक्रमशीला, उदंतपुरी व जागद्दल या विद्यापीठांतही प्रचंड ग्रंथसंग्रह होता, अशी माहिती उपलब्ध झाली आहे. इ. स. ११९९ च्या सुमारास बख्त्यार खिलजीने याही विद्यापीठांचा नाश केला. या विद्यापीठांवर मुसलमानांची धाड आली, तेव्हा त्यांतील ग्रंथ वाचवण्याची शक्य तेवढी पराकाष्ठा करण्यात आली. अनेक बौद्ध भिक्षूंनी हाती लागले ते ग्रंथ घेऊन तिबेटात व नेपाळात पलायन केले. नेपाळातील नेवार लोकांनी या ग्रंथांचा चांगला सांभाळ केला. पुढे तिथेही गुरख्यांनी या ग्रंथसंग्रहावर धाड घातली. तरीसुद्धा इ. स. च्या १५ व्या शतकापूर्वीचे ताडपत्रांवरील ग्रंथ आता नेपाळात उपलब्ध झाले आहेत.

वरील विद्यापीठे ही बौद्धधर्मीय आचार्यांनी चालविली होती; तरी त्यांत फक्त बौद्धधर्मीयच ग्रंथ होते असे नव्हे. जैन व हिंदू धर्मातील कोश, व्याकरणे, गणित, ज्योतिःशास्त्र, काव्ये, पुराणे वगैरे सर्व प्रकारच्या ग्रंथांचा संग्रह तिथे केलेला होता.

या बौद्ध विद्यापीठांशिवाय भारतात हिंदू व जैन विद्यापीठेही बरीच होती व तिथेही ग्रंथालये नांदत होती. अयोध्या (सनपूर्व १ ते ६ त्रे शतक), गुणशीला (सनपूर्व ६ वे शतक), वलभी (इ. स. ४५० ते ७७५), इ. जैन विद्यापीठे व कुंडिनपूर (सनपूर्व ६ वे शतक), कांची (सनपूर्व २ रे शतक ते इ. स. चे १३ वे शतक), मदुरा (सनपूर्व ५ वे शतक), तिरुमुक्कुडल मंदिर (इ. स. चे ११ वे शतक), इ. हिंदू विद्यापीठेही भारतात नांदत होती. या विद्यापीठांत मोठेमोठे ग्रंथसंग्रह होते यात शंका नाही. परंतु त्यांची माहिती मात्र फारशी मिळत नाही.

जैन ग्रंथांचा संग्रह वलभी विद्यापीठात मोठ्या प्रमाणावर

करण्यात आला होता. अलाउद्दिनच्या गुजरातवरील स्वारीच्या वेळी तिथले बरेच ग्रंथ तिथून जेसलमीरला नेण्यात आले.

भारतात या विद्यापीठांच्या ग्रंथालयांशिवाय विद्याप्रेमी अशा काही राजांनीही ग्रंथसंग्रह केले होते. राजा कुमारपाल याने जैन ग्रंथ लिहिण्यास उत्तेजन देऊन त्यांचा संग्रहही केला होता. राजस्थानातील प्रत्येक राजाच्या किल्ल्यात पोथीखाना असे व त्यात उत्कृष्ट ग्रंथांच्या प्रतींची भर घालण्याचा त्यांचा सतत प्रयत्न असे. बीकानेरचा राजा अनूपसिंह औरंगजेबाबरोबर दक्षिणेच्या स्वारीवर आला होता. त्या वेळी त्याने खूप परिश्रम घेऊन दक्षिणेतील संस्कृत ग्रंथ संपादन केले. अनूप संस्कृत ग्रंथालय या नावाने हा ग्रंथसंग्रह आजही प्रसिद्ध आहे. पाटणा शहरात खुदाबक्ष किताबखाना हे ग्रंथालय आहे. त्यात फारसी व अरबी हस्तलिखितांचा जगातील सर्वांत मोठा संग्रह आहे.

चाळीसगावच्या दक्षिणेस पाटणा या गावी एक वैशिष्ट्यपूर्ण ग्रंथालय होते. सुप्रसिद्ध ज्योतिर्गणिती भास्कराचार्य याचा नातू चंगदेव याने हे ग्रंथालय स्थापन केले होते. देवगिरीच्या यादवांचे मांडलिक निकुंभ राजे यांचा या ग्रंथालयाला आश्रय होता. त्यात फक्त भास्कराचार्य व त्याचे वंशज यांनी लिहिलेले ग्रंथ व त्यांवरील इतरांच्या टीका या ग्रंथांचा संग्रह केलेला होता.

दक्षिण भारतातही राजेरजवाडयांनी स्थापन केलेली बरीच ग्रंथालये होती व आजही आहेत. त्यांतील तंजाऊरच्या सरस्वती महाल ग्रंथालयाची फार प्रसिद्धी आहे. हे ग्रंथालय नायक राजांनी इ. स. च्या सोळाव्या शतकात स्थापन केले. इ. स. १६७५ ते १८५० पर्यंत तंजाऊरचे राज्य मराठयांच्या ताब्यात होते. या मराठी राजांनी सरस्वती महालाची फार वाढ केली. तंजाऊरचा शेवटचा राजा सरफोजी हा विद्याव्यासंगी होता. त्याने या ग्रंथालयाची प्रगती करण्यासाठी फार प्रयत्न केले. सरस्वती महालातल्या ताडपत्रांवरील व कागदांवरील हस्तलिखितांचा संग्रह सांप्रत सुमारे २७ हजार असून, त्यांत संस्कृत, मराठी, तमिळ, तेलुगू वगैरे भाषांतील दुर्मिळ ग्रंथ आहेत. मराठी हस्तलिखित ग्रंथांचा जुन्यांत जुना असा संग्रह महाराष्ट्राच्याबाहेर पाहायला मिळतो, तो सरस्वतीमहाल या ग्रंथालयात. म्हैसूर व त्रिवांकुर येथेही फार चांगला ग्रंथसंग्रह आहे.

महाराष्ट्रात जुने ग्रंथसंग्रह आढळतात, ते महानुभाव महंतांच्या मठांत. ज्ञानेश्वरीपूर्वी जे मराठी गद्य लिखाण लिहिण्यात आले, ते सगळे महानुभावांनी लिहिलेले होते. हे ग्रंथ गुप्त लिपीत लिहिण्यात आले होते व महानुभाव पंथाबाहेरील लोकांना ते वाचता येत नसत. या गुप्त लिप्यांना ‘सकळी’, ‘सुंदरी’ अशी नावे होती. अशा तऱ्हेचा फार मोठा प्राचीन ग्रंथसंग्रह असेल, अशी थोडचा कालापूर्वी लोकांना कल्पनाही नव्हती. चाळीस वर्षांपूर्वी या ग्रंथांच्या लिपीचे कोडे महानुभावेतर विद्वानांना उलगडले, तेव्हा या ग्रंथांची महाराष्ट्राला माहिती झाली.

यादवकाळापासून इ.स.च्या सतराव्या शतकाच्या अखेरीपर्यंत महाराष्ट्रात राजकीय धामधूम चालू होती. त्यामुळे कोणत्याही राजवंशाने नाव घेण्याजोगी ग्रंथालये स्थापली नाहीत. पेशव्यांच्या काळात लढाया चालू होत्या व राजकीय स्वास्थ्य नव्हते, तरी पेशव्यांनी मात्र ग्रंथसंग्रह करण्याकडे बरेच लक्ष दिले. पेशव्यांच्या कारभाराच्या अठरा खात्यांत पुस्तकशाळा हे एक खाते होते व या खात्यामार्फत नवे ग्रंथ पैदा करून व ते नकलून सरकारी ग्रंथालयात भरणा केले जात. नकला करण्याच्या कामावर सुंदर अक्षर असलेले व शुद्ध लिहिणारे नकलनवीस नेमले जात. लांबलांबच्या ठिकाणाहून पत्रव्यवहाराने ग्रंथ खरेदी करण्यात येत. आपले वजन खर्च करून पेशव्यांनी स्वतः आणलेले ग्रंथ या खात्यामार्फत नकलून घेतले जात व मूळ ग्रंथ मालकांना परत केले जात. पहिले बाजीराव पेशवे हे मोठे विद्याव्यासंगी होते. ते फुरसतीचा वेळ ग्रंथवाचनात खर्च करीत. स्वारीवर असतानाही फुरसतीच्या वेळी वाचण्यासाठी ते आपल्याबरोबर ग्रंथ घेऊन जात. स्वारीत पुस्तकशाळेसाठी ग्रंथ गोळाही करीत. या कामी त्यांना पिलाजी जाधवाची फार मदत असे. त्यांच्या मागे नानासाहेब यांनीही ग्रंथसंग्रहाचे कार्य पुढे चालू ठेवले. महाराष्ट्रातूनच नव्हे; तर उत्तर हिंदुस्थानातूनही त्यांनी महत्त्वाचे ग्रंथ पैदा करून आपली पुस्तकशाळा समृद्ध केली. पेशव्यांच्या काही स्त्रिया या साक्षर व सुशिक्षित होत्या. त्यांनी या पुस्तकशाळेचा आपल्या वाचनासाठी बराच उपयोग करून घेतला.

इंग्रजी राजवट सुरू झाल्यावर भारतात मुद्रणकलेचा प्रवेश झाला व इ. स. च्या १९ व्या शतकाच्या प्रारंभापासून सर्व भारतीय भाषांतून ग्रंथ मुद्रित होऊ लागले. या मुद्रित ग्रंथांचा व जुन्या हस्तलिखितांचा संग्रह करण्याचा प्रयत्न विद्याव्यासंगी ब्रिटिश अधिकाऱ्यांनी सुरुवातीपासूनच केला. ब्रिटिशांच्या राजवटीतील इंग्रज विद्वानांनी स्थापन केलेले मुंबई इलाख्यातले पहिले ग्रंथालय म्हणजे रॉयल एशियाटिक सोसायटीचे होय. इ. स. १८०५ साली त्याची स्थापना करण्यात आली. भारतातील मोठ्या ग्रंथालयांपैकी हे एक ग्रंथालय आहे. आज त्याचा ग्रंथसंग्रह सुमारे अडीच तीन लाखांच्या घरात आहे, असे समजते. या ग्रंथालयाला मुंबई सरकारने इ. स. १९३७ साली नेमलेल्या फैजी समितीच्या शिफारशीनुसार मध्यवर्ती ग्रंथालयाचा दर्जा देण्यात आलेला आहे. त्याला कॉपीराइट लायब्ररीचा एक विभागही जोडण्यात आलेला आहे.

दिल्ली येथे असलेली इंपीरियल लायब्ररी हे ग्रंथालयही बरेच मोठे होते. ते अलिकडे कलकत्त्याला नेण्यात आले असून, नॅशनल लायब्ररी असे त्याचे नामांतर करण्यात आले आहे. भारताचे हे राष्ट्रीय ग्रंथालय होय. भारतात छापल्या जाणाऱ्या प्रत्येक भाषेतील प्रत्येक ग्रंथाचा संग्रह या ग्रंथालयात केला जातो. अलिकडे दरवर्षी या सर्व ग्रंथांचा आढावा पुस्तकरूपाने घेण्यात येतो. बडोद्याची सेंट्रल लायब्ररी हे भारतातील आणखी एक मोठे ग्रंथालय होय. श्रीमंत सयाजीराव महाराजांनी त्याची स्थापना केली व ते मुक्तद्वार ग्रंथालय बनविले. बडोदे राज्यातील प्रजाजनांकरता खेड्यापाड्यांतून त्यांनी ग्रंथालयांची स्थापना केली आणि फिरती ग्रंथालयेही चालविली. यूरोपियन अधिकारी आणून या सेंट्रल लायब्ररीसाठी त्यांनी स्वतंत्र वर्गीकरणपद्धती तयार केली. ग्रंथालयांचा जाणीवपूर्वक प्रसार करणारे हे एकमेव संस्थानिक होते.

इ. स. च्या १९ व्या शतकात विद्याव्यासंगी इंग्रज अधिकाऱ्यांनी महाराष्ट्राच्या जिल्ह्याच्या गावांतून नेटिव्ह जनरल लायब्ऱ्या स्थापन केल्या. या ग्रंथालयात मुख्यत: इंग्रजी ग्रंथच ठेवले जात. इ. स. १८४० मध्ये नासिक येथे पहिले सार्वजनिक ग्रंथालय किंवा नेटिव्ह जनरल लायब्ररी स्थापन करण्यात आली. इंग्रजांचे अनुकरण नंतर एतद्देशीय पुढाऱ्यांनीही केले. इ. स. १८४८ मध्ये श्री. गोपाळ हरी देशमुख यांच्या पुढाकाराने पुण्यातले नगर वाचन मंदिर आणि इ. स. १८५२ मध्ये साताऱ्यात व्हिक्टोरिया ग्रंथालय यांची स्थापना झाली.

केवळ मराठी ग्रंथांचा संग्रह करणारे पहिले ग्रंथालय इ. स. १८९५ मध्ये ठाणे येथे निघाले. त्यानंतर पाच वर्षांनी मुंबईचे मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालय स्थापन झाले. या दोन ग्रंथालयांत व पुण्याच्या नगर वाचन मंदिरात मराठीतील बऱ्याच जुन्या ग्रंथांचा व नियतकालिकांचा संग्रह केलेला आहे.

सुधारलेल्या देशांत सार्वजनिक ग्रंथालये ही मोफत असतात व ती सरकारमार्फत चालवली जातात. देशातील सर्व सार्वजनिक ग्रंथालयांचा खर्च सरकार करते. अशा तऱ्हेचे सार्वजनिक ग्रंथालयांचे जाळे मुंबई प्रांतात स्थापन करावे, असे इ. स. १९३७ साली नेमलेल्या ग्रंथालय चौकशी समितीच्या शिफारशीनुसार मुंबई सरकारने ठरवले आणि १९४७ पासून स्वतंत्र ग्रंथालय खाते मुंबई राज्यात सुरू झाले. मुंबईत मध्यवर्ती ग्रंथालय, पुणे येथे प्रादेशिक ग्रंथालय, जिल्ह्याच्या प्रत्येक शहरात जिल्हा ग्रंथालय व तालुक्यांच्या गावांत तालुका ग्रंथालये अशा तऱ्हेची ही एक उतरंड रचण्यात आली असून, या सर्व ग्रंथालयांना सरकारमार्फत वार्षिक अनुदान मिळते. ही सर्व ग्रंथालये जनतेसाठी मुक्तद्वार आहेत. ग्रामग्रंथालयांची योजना अजून समाधानकारकपणे अंमलात आलेली नाही.

ग्रंथालयशास्त्र – ग्रंथालयात ग्रंथांचा संग्रह केला जातो, तेव्हा त्या संग्रहात काही शिस्त असावी लागते. केवळ ग्रंथांचा संग्रह म्हणजे ग्रंथालय नव्हे. हवे ते पुस्तक हव्या त्या वेळी चटकन मिळावे, अशी काही योजना ग्रंथांचा संग्रह करताना करावी लागते. ही योजना करण्याचे शास्त्र म्हणजे ग्रंथालयशास्त्र होय. नालंदा विद्यापीठाच्या प्राचीन ग्रंथालयात देखील अशी काही शिस्त होती, असे दिसते. असुर-अवनिपालाचे ग्रंथालय आणि अलेक्झांड्रिया म्यूझियम येथे ग्रंथांचे वर्गीकरण व सूचीकरण केले गेले होते, याचे पुरावे उपलब्ध झाले आहेत. ग्रंथांचे वर्गीकरण आणि सूचीकरण हे ग्रंथालयशास्त्रात दोन महत्त्वाचे विषय मानले जातात आणि या विषयाची आता स्वतंत्र शास्त्रे बनली आहेत.

ग्रंथवर्गीकरणशास्त्र म्हणजे ग्रंथांचे विषयवारीने वर्ग पाडण्याचे शास्त्र होय. हे वर्ग कसे पाडावे, याबद्दल अनेक तज्ज्ञांनी वर्गीकरणाच्या अनेक पद्धती सुचविलेल्या आहेत. तत्त्वज्ञांनी ज्ञानाचे वर्गीकरण करण्याच्या ज्या अनेक पद्धती सुचविलेल्या होत्या, त्यांचेच आधार घेऊन ग्रंथालयशास्त्रज्ञांनी ग्रंथवर्गीकरणाच्या योजना तयार केल्या आहेत.

या पद्धतींपैकी मेलविल ड्युईची दशांश पद्धती (Decimal Classification) ही अत्यंत लोकप्रिय झाली असून, तिचा सर्व जगभर प्रसार झालेला आहे. डॉ. ड्युई या अमेरिकन ग्रंथपालाने ही पद्धती इ. स. १८७६ मध्ये बसविली आणि तिचा सोपेपणा पाहून अमेरिकेत तिचा लौकरच सर्व ग्रंथालयांत वापर होऊ लागला. गेल्या नव्वद वर्षांत जगातल्या नव्वद टक्के ग्रंथालयांत आज या दशांश पद्धतीचा अवलंब करण्यात येत आहे. डॉ. ड्युईंचा एक मौलिक शोध म्हणजे ग्रंथांना देण्यांच्या अंकांना त्याने दशांश चिन्हाची देणगी दिली. त्यामुळे वेगवेगळ्या काळी प्रसिद्ध झालेले एकाच विषयावरील ग्रंथ एकत्र मिळण्याची सोय झाली.

डॉ. रंगनाथन हे भारतातील पहिले ग्रंथालयशास्त्रज्ञ होत. त्यांना ड्युईची वर्गीकरणपद्धती समाधानकारक वाटली नाही. त्यांनी आपली स्वतःची वेगळी पद्धती शोधून काढली आहे. एकूण ज्ञानसंग्रहाचे फक्त ९ विभागांत ड्युईने विभाजन केले होते, ते डॉ. रंगनाथन यांना अशास्त्रीय वाटले. म्हणून त्यांनी स्वतःची द्विबिंदू वर्गीकरणपद्धती शोधून काढली. या पद्धतीत वर्गांक व त्याचा विभाग यांच्या निदर्शनासाठी फक्त अंकच वापरलेले नसून, अंकाबरोबरच रोमन अक्षरांचाही उपयोग केलेला आहे. विरामचिन्हांचा वापर त्यांनी खूप मोठ्या प्रमाणात केला आहे. कालविभागांना महत्त्व देऊन मानवाने संपादन

केलेल्या ज्ञानात कसकशी भर पडत गेली, हे चिकित्सक वाचकाला कळावे, अशी सोय त्यांनी केली आहे. ग्रंथ हे एकाच विषयावर लिहिले जात नसून अनेक विषयांचे मिश्रण त्यात असते. कोणकोणत्या विषयांचा परामर्श ग्रंथकाराने घेतला आहे व त्यांत प्राधान्य कोणत्या विषयाला आहे, हे ग्रंथाला दिलेल्या वर्गांकावरून कळावे, अशी व्यवस्था ग्रंथवर्गीकरणात पहिल्या प्रथम डॉ. रंगनाथन यांनी केली.

ग्रंथालयशास्त्रांतर्गत दुसरा महत्त्वाचा विषय म्हणजे तालिकीकरण किंवा सूचीकरण (Cataloginig) हा होय. ग्रंथांची सूची केलेली असल्याशिवाय मोठ्या ग्रंथालयातील ग्रंथाचा शोध लागणे अशक्यप्राय असते. अलेक्झांड्रिया म्युझियममधील ग्रंथांची सूची करण्यात आलेली होती. भारतातील प्राचीन काळच्या ग्रंथालयांत ग्रंथांची सूची केली गेली होती, की नाही याचा उल्लेख कुठे सापडत नाही. परंतु वर्गीकरण व सूचीकरण केल्याशिवाय कोणतेच ग्रंथालय हे ग्रंथालय या नावाला पात्र होत नाही. तो केवळ ग्रंथांचा साठा होतो, हे लक्षात घेतले, तर प्राचीन भारतीय ग्रंथालयांत देखील वर्गीकरणाची व सूचीकरणाची काही तरी व्यवस्था केलेली असणे शक्य आहे, असे गृहीत धरावे लागते. भारतीय तत्त्वज्ञांनीही ज्ञानाचे वर्गीकरण सूक्ष्मपणे केले होते, असे दिसते. वेद, उपनिषदे, गीता, इ. ग्रंथांत ज्ञानाच्या शाखांचे परिगणन करण्यात आले आहे. आधिभौतिक, आधिदैविक व आध्यात्मिक अशा तीन प्रमुख शाखांत ज्ञानाचा समावेश होतो, असे गीता सांगते. गौतम, कणाद, कपिल इ. दार्शनिकांनी तत्त्वांचे वा पदार्थांचे वर्गीकरण केले आहे. कौटिल्याने आपल्या अर्थशास्त्रात समस्त विद्यांचे वर्गीकरण केले आहे. या वर्गीकरणाचा उपयोग करून सूचीकरणाची काही तरी व्यवस्था भारतीय ग्रंथालयांत केलेली असणे शक्य आहे.

सूचीकरणाची ही पद्धती म्हणजे प्रत्येक वर्गातील ग्रंथांची यादी करणे होय. ग्रंथाची गरज लागली म्हणजे आपल्यास हव्या त्या विषयाची यादी चाळून त्या ग्रंथाचा शोध घ्यायचा असतो. परंतु या पद्धतीमुळेही मोठ्या ग्रंथालयांतील ग्रंथ शोधून काढायला वेळ लागू लागला, तेव्हा प्रपत्रपद्धती सुरू झाली. प्रत्येक ग्रंथाचा विषय, ग्रंथकार व ग्रंथनाम यांना प्राधान्य देऊन ३"×५" आकाराच्या तीन पत्रिका तयार करायच्या व त्या अनुक्रमाने पत्रिकापेटीत रचून ठेवायच्या, ही ती पद्धती होय. जगातील बहुतेक सर्व ग्रंथालयांत ही पद्धती आता प्रचलित आहे. या पद्धतीमुळे हव्या त्या ग्रंथाचा अतिशय थोड्या वेळात पत्ता लागतो.

ग्रंथालयव्यवस्था, "ग्रंथालयसंघटना व संदर्भसाहाय्य हे ग्रंथालयशास्त्रात अंतर्भूत होणारे आणखी तीन विषय होत. ग्रंथालयांसाठी पुस्तके कशी पैदा करावी, त्यांचे स्थान कसे ठरवावे, वाचकांना शास्त्रीय पद्धतीने ती कशी द्यावी, परत कशी मागवावी, मासिकांची व्यवस्था कशी ठेवावी, वाचकांचा व ग्रंथालयसेवकांचा वेळ कसा वाचवावा, वाचकांना मार्गदर्शन कसे करावे, ग्रंथालयाचे हिशेब कसे ठेवावे, ग्रंथांची मोजणी कशी करावी, ग्रंथालयातील ग्रंथसंग्रहाचा विषयाच्या दृष्टीने तोल कसा सांभाळावा, वगैरे विषय ग्रंथालयव्यवस्थेच्या शास्त्रात अंतर्भूत होतात.

ग्रंथालयसंघटना म्हणजे नवीन ग्रंथालय स्थापन करताना ज्या गोष्टी कराव्या लागतात, त्या गोष्टींचे शास्त्र होय. ग्रंथालयाच्या इमारतबांधणीपासून कपाटादिकांची मागणी व रचना आणि खर्चाच्या अंदाजपत्रकापासून ग्रंथांच्या अंदाजपत्रकांपर्यंतचे विषय या गोष्टींचा यात समावेश होतो.

संदर्भसाहाय्य हा विषय ग्रंथालयशास्त्रात अलिकडेच समाविष्ट झाला आहे. वाचकांना त्यांनी प्रत्यक्ष पुस्तक न हाताळता सर्व प्रकारची माहिती ग्रंथालयसेवकांनी कशी पुरवावी, हे ग्रंथालयशास्त्राच्या या शाखेत सांगितले जाते. तातडीचे संदर्भसाहाय्य व दीर्घ मुदतीचे संदर्भसाहाय्य असे या संदर्भसाहाय्याचे दोन प्रकार आहेत. संदर्भग्रंथ हाताळून ज्या प्रश्नांची उत्तरे तावडतोब मिळतात, ते तातडीचे संदर्भसाहाय्य व ज्या प्रश्नांची उत्तरे मिळवण्यासाठी अनेक ग्रंथ हाताळावे लागतात किंवा जाणकार व्यक्तींकडून माहिती गोळा करावी लागते व त्यामुळे या गोष्टीला काही दिवस लागतात, त्याला दीर्घ मुदतीचे संदर्भसाहाय्य म्हटले जाते. [श्री. बा. द. सातोस्कर]

ग्रंथी (१) वस्त्रादिकांची गाठ, फुगीर भाग, सांधा, कांडे, पैशाची पिशवी, कपट, दुर्बोध भाग, इ. ग्रंथी शब्दाचे अर्थ रूढ आहेत.

अध्यात्मशास्त्रात जीवाला जी तीन सूक्ष्म बंधने असतात, त्यांना ग्रंथी म्हटले आहे. ही बंधने विज्ञानमय कोशाच्या अंतर्गत असतात. रुद्रग्रंथी, विष्णुग्रंथी व ब्रह्मग्रंथी अशी त्यांची नावे आहेत. तम, रज व सत्त्व असे अनुक्रमे त्यांचे गुण असतात. तात्पर्याने सांगायचे तर अविद्यारूप संसारबंधन किंवा वासनासमूह म्हणजे ग्रंथी होय. या ग्रंथीचा भेद केल्याने आत्म्याला शांती व आनंद यांचा लाभ होतो. ‘ अतितीव्ररागद्वेषपरिणामविदारणे ’= अत्यंत तीव्र अशा रागद्वेषांच्या परिणामाचे विदारण म्हणजे ग्रंथिभेद होय, असे जैन मानतात.

ग्रंथी म्हणजे वस्त्रगाठ किंवा दोन टोकांची गाठ या अर्थाने कित्येक आचारांत तिचा उपयोग केला जातो. यज्ञोपवीताल

ब्रह्मगाठ दिलेली असते. विवाहपूर्व वाङ्‌निश्चयाच्या वेळी वधू-वरांचे पालक परस्परांच्या उत्तरीय वस्त्रात हळकुंडे ठेवून त्यांची गाठ बांधतात. खुद्द विवाहबंधनाला ग्रंथीच म्हटले आहे. गृहप्रवेशाच्या वेळी वधू-वरांच्या पदरांना गाठ मारतात. ही गाठ लक्ष्मीपूजन झाल्यानंतर सोडतात. शिखा ही मोकळी न सोडता तिची ग्रंथी बांधावी, असे सांगितले आहे. स्मरणासाठी कशाला तरी गाठ बांधून ठेवणे, असा संकेत आहे. ब्रह्मयज्ञ, जप, भोजन या प्रसंगी ग्रंथियुक्त पवित्रक घालावे, असे सांगितले आहे. घरात प्रसूती व्हायची असताना तिला अडथळा होऊ नये, म्हणून सगळ्या गाठी सोडवून ठेवण्याची प्रथा काही ठिकाणी आहे.

(२) तंत्रवाङ्‌मयात विशुद्ध चैतन्याच्या आवरणाला ग्रंथी म्हणतात. तांत्रिक योगसाहित्यात मायेपासून शक्तीपर्यंत एकूण १२ ग्रंथींची माहिती दिली आहे. माया, पाशव, ब्रह्मा, विष्णू, रुद्र, ईश्वर, सदाशिव व कारणदेहस्थित ५ ग्रंथी मिळून त्या १२ होतात. इंधिका, दीपिका, बैंदव, नाद व शक्ती या पाच अतिसूक्ष्म ग्रंथी आहेत. याही परमचैतन्याच्या आवरणरूपच आहेत. पहिली माया ही ग्रंथी म्हणजे आनंदेंद्रिय होय. देहोत्पत्तीचे तीच कारण आहे. दुसऱ्या पाशव ग्रंथीचे स्थान कंद हे आहे. पाशबद्ध जीवांचे बाळरूप अथवा प्रारंभिक रूप हीच असते. ब्रह्मादी ग्रंथी या पशुसृष्टीचे कारण असल्याने त्यांचे कार्य निरोधनरूप असते. [तां. वा. शा. द.]

ग्रंथ उत्सव सुंदरवनातील उरांव आदिवासींचा उत्सव. याला ग्रामपूजेचा उत्सव असेही म्हणतात. हा उत्सव वर्षातून दोन वेळा होतो. याचा पूर्वार्ध मार्गशीर्ष पौर्णिमेला करतात. रोगराई निर्माण करणाऱ्या देवदेवतांना या वेळी कोंबड्याचा बळी देतात व काही अद्‌भुत धार्मिक विधी करून गाव बंद करतात. गाव बंद करणे म्हणजे बाहेरच्या माणसांना गावात प्रवेश न देणे व गावातल्या माणसांनाही गावाबाहेर जायला बंदी करणे होय. उत्सवाचा उत्तरार्ध वैशाख मासाच्या प्रारंभी होतो. या वेळी भगत गावातले देवतास्थल सारवून स्वच्छ करून त्या जागेची पूजा करतो. या पूजेसाठी डाळ, फुले, मिठाई, इ. पदार्थ आवश्यक असतात. या प्रसंगी चार कोंबड्यांचा बळी देतात. या कोंबड्यांपैकी एकं कोंबडा काळा व एक पांढरा असावा लागतो. [फो. लो., फेब्रु. १९६४]

ग्रह (१) याच्या व्याख्या पुढीलप्रमाणे सांगितल्या आहेत– 'गृह्णाति गतिविशेषान् इति ' किंवा 'गृह्णाति फलदातृत्वेन जीवान् इति ' = विशिष्ट गतींचे ग्रहण करणारे किंवा शुभाशुभ फल देण्याच्या रूपाने जीवांचे ग्रहण करणारे (जीवांना पकडणारे) ते ग्रह होत.

सूर्य, चंद्र, मंगळ, बुध, गुरू, शुक्र, शनी, राहू व केतू असे नऊ ग्रह मानलेले आहेत. यांपैकी सूर्य हा तारा असूनही तो ग्रह मानला गेला आहे: चंद्र हा पृथ्वीचा उपग्रह आहे. राहू व केतू हे दोन दृश्य ग्रह नसून, ते पृथ्वी व चंद्र यांच्या कक्षांचे संपातबिंदू आहेत. युरेनस, नेपच्यून व प्लूटो अशा तीन नव्या ग्रहांचा शोध लागल्यामुळे अर्वाचीन जातकशास्त्रात त्यांना अनुक्रमे प्रजापती, वरुण व इंद्र अशी नावे देऊन त्यांची शुभाशुभ फले संशोधिली आहेत.

ऋग्वेदात ग्रहांचा उल्लेख कसा व कुठे येतो, याविषयी श्री. रा. वि. पटवर्धन यांनी जे विवेचन केले आहे, त्याचा सारांश असा– ऋक्संहितेत रवी, चंद्र व पंचग्रह यांचा उल्लेख आढळतो. पंचग्रहांचा उल्लेख पुढील ऋचेत आढळतो–

अमी ये पञ्चोक्षणो मध्ये तस्थुर्महो दिवः ।
देवत्रा नु प्रवाच्यं सध्रीचीना नि वावृतुः ॥

(ऋ. १. १०५.१०)

अर्थ – आपला प्रकाश बाहेर विखुरणारे हे जे पांच प्रबल वृषभ आकाशामध्ये विराजमान झाले आहेत, ते माझी स्तुती श्रवण करीत दिव्य समुदायात फिरत असतात.

हे पाच ग्रह म्हणजे रवि-चन्द्रांव्यतिरिक्त भौमादी ग्रह होत. यांपैकी बृहस्पतीचा उल्लेख असलेला मंत्र असा–

बृहस्पतिः प्रथमं जायमानो
महो ज्योतिषः परमे व्योमन् ॥

(ऋ. ४. ५०.४)

अर्थ– बृहस्पती हा महान ग्रह जेव्हा प्रथम उदय पावतो, तेव्हा तो अत्युच्च आकाशात (एखाद्या नक्षत्राजवळच) उदय पावतो.

सुप्रभाती व सायंकाळी उगवणाऱ्या शुक्राचे फार बहारीचे वर्णन ऋग्वेदाच्या १० व्या मंडलातल्या १२३ व्या सूक्तात आले आहे.

मंगळाचे प्राचीन नाव अंगारक असून, अंगिरा ऋषीच मंगळ ग्रहाच्या रूपाने आकाशात वास्तव्य करू लागल्याची आख्यायिका रूढ आहे (ऋ. १०. ९२. १५).

बुध ग्रहाचा स्पष्ट उल्लेख आढळत नाही; पण सोमवल्लीच्या रसाला उद्देशून जो सोम्य शब्द येतो, तो बुधाचा वाचक मानता येण्यासारखा आहे (ऋ. ३. ३३. ५; १०. १०५).

वैरूप या शब्दाने शनीचा बोध होऊ शकतो (ऋ. १०. १४. ५). विरूप किंवा वैरूप हे शनीचे प्राचीन नाव असावे.

यमराजाच्या वैरूपगणातला श्रेष्ठ तो शनी असावा; कारण यम हा जसा विवस्वानाचा पुत्र, तसाच शनीही आहे, हे साम्य इथे अर्थपूर्ण ठरेल. देवनक्षत्रे व यमनक्षत्रे असे नक्षत्रांचे दोन विभाग आहेत. यमनक्षत्रांचा विभाग अनुराधेपासून सुरू होतो व अपभरणीमध्ये समाप्त होतो. अपभरणी (भरणी) हे यमाचे स्थान असल्यामुळे त्याचा बंधू शनैश्चर याचे स्थान अनुराधेमध्ये असणे, हे ओघानेच येते.

ग्रहांचे शुभाशुभत्व पुढीलप्रमाणे— शुभग्रह– सूर्य, गुरू, बुध, शुक्र व चंद्र. अशुभग्रह– शनी, मंगळ, राहू व केतू. ग्रहांची लिंगे पुढीलप्रमाणे— सूर्य, मंगळ व गुरू– पुरुष. चंद्र, शुक्र व राहू– स्त्री. शनी, बुध व केतू– नपुंसक. ग्रहांचे रंग पुढीलप्रमाणे– शुक्र व चंद्र– पांढरा. गुरू– पिवळा. मंगळ व सूर्य – तांबडा. बुध – हिरवा. शनी – काळा. राहू व केतू – धुरकट.

ग्रहांची निदर्शक रत्ने अशी— सूर्य– माणिक, चंद्र– मोती मंगळ– प्रवाळ, बुध– पाचू, गुरू– पुष्पराग, शुक्र– हिरा, शनी– नील, राहू– गोमेद, केतू– लसण्या. त्या त्या ग्रहांची पीडा सुरू झाली असता; ती ती रत्ने धारण करावी, असे सांगितले आहे.

ग्रहांचे देहविभाग असे— सूर्य– अस्थी, चंद्र– रक्त, मंगळ– मज्जा, बुध– त्वचा, गुरू– वसा, शुक्र– रेत, शनी– स्नायू.

ग्रहांच्या देवता अशा— सूर्य– अग्नी, चंद्र– जल, मंगळ– स्कंद, बुध– केशव, गुरू– इंद्र, शुक्र– इंद्राणी, शनी– ब्रह्मा.

ग्रहांच्या दिशा अशा– सूर्य– पूर्व, चंद्र– वायव्य, मंगळ– दक्षिण, बुध– उत्तर, गुरू– ईशान्य,. शुक्र– आग्नेयी, शनी– पश्चिम. राहू–नैर्ऋत्य– ग्रह आपापल्या दिशेस बलवान असतात, असे सांगितले आहे.

ग्रहांचे वर्ण असे— गुरू व शुक्र– ब्राह्मण, सूर्य व मंगळ– क्षत्रिय, चंद्र व बुध– वैश्य, शनी– अत्यंज.

ग्रहांचे गुण असे— सूर्य, चंद्र व गुरू– सत्त्व, बुध व शुक्र,– रज, मंगळ, राहू, केतू व शनी– तम.

ग्रहांचे कालांश असे— सूर्य– अयन, चंद्र– क्षण, मंगळ– दिवस, बुध– ऋतू, गुरू– मास, शुक्र– पक्ष, शनी–वर्ष.

ग्रहांचे रस असे— सूर्य– तिखट, चंद्र– खारट, मंगळ– कडू, बुध– मिश्र, गुरू– मधुर, शुक्र– आम्ल, शनी– तुरट.

ग्रहांचे धातू असे— सूर्य– तांबे, चंद्र– मणी, मंगळ– सुवर्ण, बुध– मिश्र, गुरू– रुपे, शुक्र– मोती, शनी– लोह, राहू– शिसे, केतू– कांसे.

ग्रहांची दृष्टी– आपण असलेल्या स्थानांपासून पुढील स्थानांवर ग्रह पुढीलप्रमाणे दृष्टी ठेवतात— तृतीय व दशम शनीची पूर्ण व इतरांची १/४ दृष्टी. नवम व पंचम गुरूची पूर्ण व इतरांची १/२ दृष्टी. चतुर्थ व अष्टम मंगळाची पूर्ण व इतरांची ३/४ दृष्टी. सप्तमस्थानी सर्व ग्रहांची पूर्ण दृष्टी.

ग्रह आपसात एकमेकांचे मित्र, सम व शत्रू असतात, त्याचे कोष्टक असे—

ग्रह	मित्र	सम	शत्रू
सूर्य	चंद्र, मंगळ, गुरू	बुध	शनी,शुक्र,राहू
चंद्र	सूर्य, बुध	मंगळ,गुरू,शुक्र,शनी	राहू
मंगळ	गुरू, चंद्र, सूर्य	शुक्र, शनी	बुध, राहू
बुध	सूर्य, शुक्र, राहू	मंगळ, गुरू, शनी	चंद्र
गुरू	सूर्य, चंद्र, मंगळ	शनी, राहू	बुध, शुक्र
शुक्र	बुध, शनी, राहू	मंगळ, गुरू	सूर्य, चंद्र
शनी	शुक्र, बुध, राहू	गुरू	सूर्य,चंद्र,मंगळ
राहू	शनी, बुध, शुक्र	गुरू	सूर्य, चंद्र,मंगळ
केतू	"	"	"

ग्रहांचे स्थानबल व दिशाबल असे– कोणताही ग्रह आपल्या उच्च राशीत, मित्रक्षेत्री, मूल त्रिकोण राशीत, स्वतःच्या नवांशी व स्वक्षेत्री स्थानबली असतो. जो ग्रह ज्या स्थानी बलिष्ठ असतो, तो ग्रह त्या स्थानापासून सप्तमस्थानी निर्बल होतो.

ग्रहांचे कालबल असे– सूर्य, चंद्र व शुक्र– दिवसा बलवान. चंद्र, मंगळ व शनी– रात्री बलवान. बुध– दिवसा व रात्री सम. क्रूरग्रह– कृष्णपक्षी बलवान व सौम्यग्रह– शुक्लपक्षी बलवान. वर्ष, मास, दिवस आणि होरा यांचे स्वामी आपापल्या कालावधीत बलिष्ठ असतात.

ग्रहांची तत्त्वे अशी–

सूर्य, मंगळ– अग्नी; शुक्र, चंद्र– जल; बुध– भू; गुरू– आकाश; शनी– वायू.

कोणता ग्रह बलवान असता काय करावे, त्याचा विचार असा—

सूर्य – राजदर्शन, चंद्र – सर्व कार्ये, मंगळ – युद्ध, बुध – शास्त्राध्ययन, गुरू – विवाह, शुक्र – यात्रा, शनी – दीक्षा, यज्ञ. जो ग्रह बलवान असता, जे कृत्य करावे असे सांगितले आहे, ते त्या ग्रहाच्या वारीही करावे.

ग्रहपीडानिवारण – ग्रहांची पीडा चालू झाली असता तिचे निरसन होण्यासाठी पुढील गोष्टी कराव्या असे सांगितले आहे– सूर्य व मंगळ – शांती, विष्णुसहस्रनामाचा पाठ व त्या ग्रहांच्या मंत्रांचा जप. गुरू व शुक्र – शांती, गुरुचरित्रपारायण व ग्रह-

मंत्रांचा जप. शनी – शनिवारी शनिमाहात्म्यवाचन व शनीची तैलाभिषेकपूर्वक पूजा, मंत्रजप. बुध – सोमवारी व बुधवारी बुधमंत्राचा जप. राहू व केतू – मंत्रजप, मांगाला दान देणे. [सा. मु. मा.; बालबोध ज्योतिष; घरचा ज्योतिषी; मु. चिं.]

(२) यज्ञात देवतांना समर्पण करण्यासाठी विशिष्ट पात्रांत भरून ठेवलेला सोमरस.

ग्रहण पृथ्वी व चंद्र हे अपारदर्शक व परप्रकाशित गोल आकाशात सूर्याभोवती फिरत असताना पौर्णिमेला सूर्य व चंद्र यांच्यामध्ये पृथ्वी येते. ज्या पौर्णिमेस हे तीन्ही गोल एकाच सरळ रेषेत येतात, त्या वेळी पृथ्वीची छाया चंद्रावर पडते आणि चंद्राला ग्रहण लागते. पृथ्वीच्या दोन छाया असतात. ज्या भागात सूर्यकिरण मुळीच प्रवेश करीत नाहीत, त्याला घनछाया म्हणतात. तिच्याभोवती उपछाया असते. त्या उपछायेत काही सूर्यकिरण पोचत असल्यामुळे ती छाया विरळ असते. प्रथम चंद्र या विरळ छायेत प्रवेश करतो; तेव्हा चंद्रबिंब अंधुक दिसू लागते. ते घनछायेत प्रवेश करते, तेव्हा खंडग्रास ग्रहण होते. संपूर्ण बिंब घनछायेत गेले, की खग्रास ग्रहण होते. त्या वेळी चंद्रबिंब काळसर तांबुस दिसते. घनछायेतून चंद्र बाहेर पडला, की ग्रहण सुटले, असे म्हणतात.



चंद्रग्रहण

अमावास्येस पृथ्वी व सूर्य यांच्यामध्ये चंद्र येतो. तीन्ही गोल जेव्हा एकाच सरळ रेषेत असतात, तेव्हा चंद्राची छाया पृथ्वीच्या काही भागावर पडते आणि तिथे सूर्य दिसेनासा होतो. याला सूर्यग्रहण म्हणतात. संपूर्ण सूर्यबिंब झाकले जाते, तेव्हा ते खग्रास ग्रहण होते. चंद्राच्याही घनछाया व विरळ छाया असतात. पृथ्वीच्या ज्या भागावर विरळ छाया पडते, तिथे सूर्याचा काही भाग दिसत असतो, म्हणून त्याला खंडग्रास ग्रहण म्हणतात. चंद्र पृथ्वीपासून फार दूर असल्यास त्याची दाट छाया पृथ्वीपर्यंत पोचत नाही. तथापि चंद्र आड आल्यामुळे सूर्याचा मधला भाग झाकला जातो आणि कडेचा गोल भाग तेजस्वी दिसतो. अशा ग्रहणाला कंकणाकृती ग्रहण म्हणतात.



खग्रास व खंडग्रास सूर्यग्रहण

चंद्रामुळे सूर्याची पश्चिमेकडील कडा ज्या क्षणी झाकली जाते, त्या क्षणाला ग्रहणाचा स्पर्शकाल म्हणतात. पूर्वेकडे चंद्र बाजूला जाऊन ग्रहण सुटते, त्या क्षणाला मोक्षकाल म्हणतात. खग्रास ग्रहण फारतर आठ मिनिटे आणि कंकणाकृती ग्रहण फार तर दहा मिनिटे दिसते. चंद्रग्रहणाचा स्पर्श चंद्र बिंबाच्या पूर्वेकडून आणि मोक्ष पश्चिमेकडून होतो. पृथ्वीची छाया चंद्रबिंबापेक्षा खूपच मोठी असल्यामुळे चंद्राला कंकणाकृती ग्रहण कधीही लागत नाही आणि चंद्रगहण दीर्घकाल दिसू शकते.

पृथ्वी सूर्याभोवती फिरते तो मार्ग म्हणजे पृथ्वीकक्षा आणि पृथ्वीभोवती चंद्र फिरतो तो मार्ग म्हणजे चंद्रकक्षा एका पातळीत नसून त्यांच्यामध्ये सुमारे ५$\frac{१}{८}$ अंशाचा कोन झालेला आहे. त्यामुळे प्रत्येक पौर्णिमेला व अमावास्येला सूर्य, चंद्र व पृथ्वी एकाच सरळ रेषेत येत नाहीत व ग्रहणे लागत नाहीत. या दोन कक्षा ज्या बिंदूत एकमेकींना छेदतात, त्या बिंदूंना राहू व केतू ही नावे दिलेली आहेत.

एकच सूर्यग्रहण पृथ्वीच्या निरनिराळ्या भागांतून पाहिले असता भिन्न प्रकारचे दिसते. काही ठिकाणी ते खग्रास वा कंकणाकृती दिसते, तर काही ठिकाणी खंडग्रास दिसते. चंद्रग्रहण मात्र पृथ्वीवर जिथे जिथे चंद्र दिसतो, तिथे तिथे सारखेच दिसते.

ग्रहणांच्या काळाचे एक चक्र आहे. १८ सौर वर्षे आणि ११ दिवस एवढ्या काळात जी ग्रहणे ज्या क्रमाने होतात, तीच बहुधा त्याच क्रमाने पुढे तेवढ्या काळात होतात. एका चक्रात बहुधा ७० ग्रहणे होतात; त्यांत ४२ सूर्याची व २८ चंद्राची असतात. त्यांतली सुमारे सात सूर्यग्रहणे व १८ चंद्रग्रहणे एका स्थळी दिसू शकतात. एका वर्षात ४ सूर्यग्रहणे व ३ चंद्रग्रहणे किंवा ५ सूर्यग्रहणे व २ चंद्रग्रहणे होणे शक्य असते. एका वर्षात होणाऱ्या ग्रहणांची किमान संख्या २ असते.

सूर्यग्रहण सुरू झाल्यावर थोडा वेळ प्रकाश फारसा कमी झालेला दिसत नाही. काजळ लावलेल्या काचेतून पाहिले, तर मात्र सूर्यबिंबाचा थोडा भाग काळा दिसतो. मग उष्णतामान हळूहळू कमी होत जाते. सूर्यप्रकाशाचा रंगही बदलतो. संपूर्ण सूर्यबिंब दिसेनासे झाल्यानंतर मात्र विलक्षण दृश्य दिसू लागते.

त्या वेळी काळ्या बिंबापासून लाल ज्वाला निघताना दिसतात. त्यांना तेज:शृंगे म्हणतात. त्यांच्या भोवती एक तेजोवलयही पसरलेले दिसते. त्या प्रभामंडळातून निघणारे व पताकांसारखे फडकणारे तेजाचे पट्टे सर्व बाजूंना पसरतात. काही तारे व शुक्र, गुरू, मंगळ, इ. ग्रह दिवस असतानाही दिसू लागतात. हा देखावा अगदी थोडा वेळ दिसून एकदम नाहीसा होतो. मात्र खंडग्रास-ग्रहणाचे दृश्य खग्रास ग्रहणाइतके चमत्कृतिजनक नसते.

सूर्यग्रहणाच्या मानाने चंद्रग्रहणाच्या वेळी आकाशात विशेष बदल होत नाही. जसजशी ग्रहणाची छाया वाढत जाते, तसतसे अधिकाधिक तारे दिसू लागतात इतकेच. पूर्ण ग्रास झाल्यावर सर्व आकाश अमावास्येच्या रात्रीप्रमाणे ताऱ्यांनी भरलेले दिसते. चंद्रावर पृथ्वीची जी छाया पडते, ती गोल असते; त्यावरून पृथ्वी गोलाकार आहे, हे सिद्ध झाले आहे. चंद्राचे पृथ्वीपासून अंतर निश्चित ठरवण्यासाठी चंद्रग्रहणाचा उपयोग झाला आहे.

वैदिक कल्पना – ऋग्वेदात सूर्यग्रहणाचा उल्लेख मिळतो. अत्रिगोत्रातील ऋषींना सूर्यग्रहणांचे ज्ञान होते, असे दिसते –

यं वै सूर्यं स्वर्भानुस्तमसा विध्यदासुरः ।
अत्रयस्तमन्वविन्दन्नह्यान्ये अशक्नुवन् ।।
(ऋ. ५. ४०. ९)

अर्थ – आसुरी शक्तीच्या स्वर्भानूने सूर्याला अंधकाराने पीडित केले होते, त्या सूर्याला अत्री ऋषींनीच शोधून परत आणले. इतर कोणाला तसे करता आले नाही.

स्वर्भानूने अंधारात बुडवलेल्या सूर्याचा शोध अत्री ऋषींनी लावला, असे दुसऱ्याही एका ऋचेत म्हटले आहे (ऋ. ५. ४०. ६). यावरून त्या काळी ग्रहणाविषयीची शास्त्रीय कल्पना असावी, असे वाटते.

पुराणातील कल्पना – या वैदिक स्वर्भानूलाच पुराणात राहू म्हटले आहे. तोच सूर्यचंद्रांना ग्रहण लावतो, असे समजतात.

देव-दैत्यांनी समुद्रमंथन केले, त्यातून अमृत निघाले. त्या अमृतासाठी देव-दैत्यांत कलह सुरू झाला. तेव्हा विष्णू मोहिनी-रूपाने तिथे प्रकट झाला. मोहिनीने देव-दैत्यांच्या दोन स्वतंत्र पंक्ती बसवल्या. ती प्रथम देवांच्या पंक्तीत अमृत वाढू लागली. राहू हा दैत्यांच्या पंक्तीत होता. त्याला वाटले, की देवांच्या पंक्तीत सर्व अमृत संपून जाईल व आपण फसले जाऊ. म्हणून तो मोहिनीची नजर चुकवून देवांच्या पंक्तीत सूर्य-चंद्रांच्या शेजारी येऊन बसला. मोहिनीने त्याच्या हातावर अमृत घातले आणि तो ते प्राशन करीत असता सूर्य-चंद्रांनी ती गोष्ट मोहिनीच्या निदर्शनास आणली. तावडतोब मोहिनीने सुदर्शन चक्र फेकून राहूचे शिर उडवले. पण अमृताच्या स्पर्शाने ते शिर अमर झाले होते. सूर्य-चंद्रांनी आपली चहाडी केली हा दंश मनात धरून तो शिरोरूप राहू त्या दिवसापासून पर्वप्रसंगी सूर्य-चंद्रांना ग्रासायला धावत असतो. हा राहू चंद्र-सूर्यांना ग्रासू लागला, की त्या घटनेला ग्रहण म्हणतात (भाग. पु. ८. ९).

भारतीय युद्धाच्या वेळी एका महिन्यात दोन ग्रहणे झाली होती. तत्कालीन लोकांनी ती घटना उत्पातसूचक मानली. पुढे ज्योतिःशास्त्राचा विकास होऊन त्यावर अनेक ग्रंथ निर्माण झाले. बृहत्संहितेवरून असे दिसते, की चंद्र व पृथ्वी यांच्यामुळे ग्रहणे लागतात, ही गोष्ट वराहमिहिराच्याही आधी अनेक शतके ज्योतिर्विदांना ज्ञात झाली होती. ग्रहणांवरून चंद्र-सूर्यांच्या गती साधल्या, असे आर्यभट व ब्रह्मगुप्त यांनी लिहिले आहे.

लौकिक कल्पना – प्राचीन काळी मनुष्याला निसर्गाची प्रत्येक घटना म्हणजे एक गूढ कोडेच वाटे. जगातल्या सर्व घटना परमेश्वराच्या कृपेमुळे वा कोपामुळे घडतात, अशी त्यांची समजूत होती. साहजिकच भर दिवसा सूर्य दिसेनासा झाला किंवा पौर्णिमेच्या रात्री चंद्र निस्तेज झाला, तर प्राचीन काळच्या लोकांना भय वाटे. एखादा राक्षस सूर्य-चंद्रांना गिळीत असावा, असे ते मानीत व त्या राक्षसाला पिटाळून लावण्यासाठी आरडाओरड करीत किंवा काठ्या घेऊन धावत. अलिकडेही रानटी लोक त्या राक्षसाला प्रसन्न करून चंद्र-सूर्यांची सुटका करण्यासाठी वाद्ये वाजवतात. कुत्रा किंवा दुसरा एखादा पशू सूर्य-चंद्रांना गिळतो, म्हणून ग्रहण लागते, या कल्पनेने काही लोक ग्रहणाच्या वेळी घंटा वाजवून त्या पशूला पळवून लावण्याचा प्रयत्न करतात. तोडा लोकांच्या मते चंद्रावर एक ससा असून, एक नाग त्याला खाण्याचा प्रयत्न करतो आणि त्यामुळे ग्रहण लागते. म्हणून त्या नागाला हुसकवण्यासाठी ते बंदुकीचे बार काढतात. मुंड लोकांची कल्पना अशी, की सूर्य व चंद्र हे दानवाकडून कर्ज काढतात आणि ते फेडता न आल्यामुळे तो धनको दानव त्यांना तुरुंगात कोंडतो आणि म्हणून ग्रहण लागते. ते ग्रहण सुटावे, म्हणून मुंड लोक तांदूळ, तांब्या-पितळेची भांडी, लोखंडी हत्यारे, इ. वस्तू घरांच्या अंगणात टाकतात. त्या वस्तू धनकोला देऊन चंद्र-सूर्यांनी आपले कर्ज फेडावे व स्वतःची सुटका करून घ्यावी, अशी त्यांची अपेक्षा असते.

धार्मिक समजुती – प्राचीन भारतीय ज्योतिर्विदांना ग्रहणासंबंधी सम्यग्ज्ञान असले, तरी सामान्य जनांचा त्याच्यावर विश्वास नव्हता. राहू हा राक्षस चंद्र-सूर्यांना गिळतो म्हणून ग्रहणे लागतात, या पुराणातील कथेवरच त्यांची दृढ श्रद्धा होती. त्या संकटातून चंद्रसूर्यांची मुक्तता व्हावी आणि ग्रहणामुळे मानवावर जी आपत्ती येण्याचा संभव असतो ती टळावी, अशा उभयविध हेतूने धार्मिक प्रवृत्तीचे लोक स्नान, उपासतापास, जप, दानधर्म, इ. गोष्टी करू लागले.

ग्रहण लागताच सर्व वर्णांच्या मनुष्यांना सुतक लागते म्हणून त्यांनी प्रथम स्नान करावे, असे सांगितले आहे. ग्रहणापूर्वी शिजवलेले अन्न ग्रहण लागल्यानंतर अशुद्ध होते, म्हणून ते त्याज्य होय. ग्रहणाच्या वेळी जो स्नान करीत नाही त्याला पुढील सात जन्मी कुष्ठरोग जडतो व त्याच्या नशिबी दुःख येते. ग्रहणकाली थंड पाण्याने स्नान करणे चांगले. गंगा किंवा गोदावरी या नद्यांत किंवा प्रयाग क्षेत्री स्नान करणे सर्वांत पुण्यकारक होय. ग्रहण लागताना स्नान, पर्वकाली होम, पूजा व श्राद्ध, मोक्षकाली दानधर्म आणि ग्रहण सुटल्यावर पुन्हा स्नान, असे ग्रहणातले आचार आहेत. पुराणे व धर्मशास्त्रे यांत निरनिराळ्या महिन्यात होणाऱ्या ग्रहणांच्या पावित्र्याची तुलना केली आहे. त्याचप्रमाणे भिन्न तीर्थांत केलेल्या स्नानांच्या फलांतही फरक सांगितला आहे. चंद्रग्रहणाच्या वेळी गोदावरीत स्नान करावे आणि सूर्यग्रहणाच्या वेळी नर्मदेत स्नान करावे, असे म्हणतात. ग्रहणकाली कुरुक्षेत्री स्नान करणे फारच पुण्यकारक मानले आहे.

स्नान, दान वा श्राद्ध रात्री करू नये, असा सर्वसामान्य नियम आहे; पण ग्रहणकाळी रात्र असतानाही या गोष्टी करता येतात. जप, मंत्रोपदेश, इ. साठी ग्रहणकाल अत्यंत योग्य मानला आहे. ग्रहणकालात भोजन करायचे नसते. ग्रहण सुटण्यापूर्वीच सूर्य किंवा चंद्र अस्त पावले, तर ग्रहण सुटल्यानंतर स्नान करावे; पण पुन्हा त्यांचा उदय होऊन शुद्ध बिंब दिसेपर्यंत भोजन करू नये, असे शास्त्रवचन आहे. चंद्रग्रहण सुरू होण्यापूर्वी तीन प्रहर (नऊ तास) आणि सूर्यग्रहणापूर्वी चार प्रहर (बारा तास) भोजन करू नये, असाही नियम आहे. मात्र हा नियम मुले, स्त्रिया, दुर्बल, रुग्ण व वृद्ध यांना लागू नाही. ग्रहणापूर्वीच्या या तीन किंवा चार प्रहरांच्या कालावधीला वेध म्हणतात. ग्रहणामुळे, केवळ अन्नच नव्हे; तर जल व इतर वस्तूही अशुद्ध होतात. पण घरातल्या अशा सर्व वस्तूंचा त्याग करणे अशक्य असल्यामुळे ग्रहणकालात त्या वस्तूंवर तुळशीपत्र ठेवतात. तसे केल्याने त्या वस्तू शुद्ध राहतात, अशी समजूत आहे. जन्मनक्षत्री ग्रहण लागल्यास त्या माणसावर संकट येते व ते टाळण्यासाठी त्याने शांती करावी, असेही सांगितले आहे.

ग्रहणकाळी केलेल्या दानाचे माहात्म्य फार आहे, असे धर्मशास्त्र सांगते. सुवर्णदान, भूमिदान, गोदान, वस्त्रदान, इ. दाने ग्रहणाच्या वेळी केली, तर ती अक्षय्य फल देतात, असे म्हटले आहे. गेल्या हजार दीड हजार वर्षातले अनेक राजांचे शेकडो ताम्रपट उपलब्ध झाले आहेत. त्यांत ग्रहणाच्या वेळी त्या त्या राजांनी भूमिदान केल्याचे उल्लेख आढळतात.

आजमितीस ग्रहणाविषयी शास्त्रीय माहिती पुष्कळांना झालेली असली, तरी ग्रहणकालीन स्नान-दान-धर्मावर लोकांची अजून श्रद्धा आहे. त्यामुळे अजूनही ग्रहणपर्वात पुण्यक्षेत्री किंवा समुद्रावर स्नानासाठी भाविकांची अलोट गर्दी होते. अशा वेळी ब्राह्मण पाण्यात उभे राहून गायत्री मंत्राचा जप करतात.

ग्रहणकाळात महाराष्ट्रामध्ये मांग लोक ‘दे दान, सुटे गिराण’ असे ओरडत गावातून हिंडतात. त्यावेळी भाविक लोक, पैसा दोन पैसे घरातील मुलांवरून ओवाळून त्यांना देतात, जुनी वस्त्रेही देतात. आकाशात ढग आले, तर ग्रहण लागलेले अथवा सुटलेले दिसत नाही. कोकणातले लोक अशा वेळी परातीत पाणी घालून त्यात मुसळ उभे करतात. ग्रहण चालू असेपर्यंत ते मुसळ उभे राहते व ग्रहण सुटताच आडवे पडते, अशी त्यांची समजूत असते. ग्रहणकालात गाय वीत असली, तर तिला प्रदक्षिणा केल्याने पृथ्वीप्रदक्षिणेचे पुण्य लागते, असे समजतात. एखाद्या झाडाला फळ धरत नसले, तर या काळात त्याच्यावर मुसळाने प्रहार करतात. गर्भिणी स्त्रियांना ग्रहण पाहू देत नाहीत; तसेच चाकू, कात्री, सुई, इ. वस्तूंनाही स्पर्श करू देत नाहीत. हिमाचल प्रदेशात ग्रहणकाळी सर्पदेवतेची पूजा करतात. उ. भारतात त्या काळात फळझाडावर मेंढ्याची शिंगे बांधतात. [ज्योतिर्विलास; ज्योतिर्वैभव; एन्सा. रि. ए.; एन्सा. मुंडा.; हि. घ.]

ग्रहणजननशांती

सूर्य-चंद्रग्रहणांच्या वेळी प्रसूती झाली असता ती गोष्ट माता व अपत्य यांना अनिष्ट असते; अतएव त्याबद्दल शांती करावी, असे सांगितले आहे. प्रारंभी गोमुखप्रसवाचा विधी करून नंतर प्रस्तुत शांतीचा संकल्प करायचा असतो. या शांतीत ग्रहण ज्या नक्षत्री असेल त्या नक्षत्राची देवता, सूर्य किंवा चंद्र आणि राहू या प्रधान देवता असतात. नक्षत्रदेवता व सूर्य यांची सुवर्णप्रतिमा व चंद्रग्रहण असेल, तर चंद्राची रौप्य प्रतिमा आणि राहूची शिशाची प्रतिमा करतात. एका स्वच्छ वस्त्रावर या देवतांची स्थापना व पूजा करतात. सूर्यासाठी रुईच्या समिधा, आज्य, चरू व तिल यांचे, चंद्रासाठी पळसाच्या समिधा, आज्य, चरू व तिल यांचे, राहूसाठी दूर्वा व आज्य यांचे आणि नक्षत्रदेवतेसाठी पाण्यात उगवलेल्या वृक्षाच्या समिधा व आज्य यांचे हवन करतात. हवनसंख्या १०८ असते. मग बलिदान करतात. नंतर यजमान, बालक व माता यांना अभिषेक करून शांतिकर्म समाप्त करतात. [पारिजात]

ग्रहणमंत्रदीक्षा

राम, गोपाल, इ. आगम मंत्रांची दीक्षा ग्रहणाच्या वेळी किंवा ग्रहणदिवसापासून पुढे

सात दिवसपर्यंत केव्हाही घ्यावी, असे शिवार्चनचंद्रिकेत सांगितले आहे. मंत्रदीक्षा घेण्यास सूर्यग्रहणासारखे दुसरे पर्व नाही. त्या वेळी अन्य कोणतेही शुभयोग पाहण्याची गरज नसते, असे रत्नसागरात सांगितले आहे. योगिनीतंत्रात चंद्रग्रहणी मंत्र-दीक्षेचा निषेध केलेला आहे. [नि. सि.]

ग्रहणव्रत एक काम्य व्रत. या व्रताचा विधी असा— दिवसाच्या पूर्वभागात ग्रहण पडत असता आदल्या दिवशी ब्राह्मीचे सेवन करणे, दुसऱ्या दिवशी ग्रहणकालात सुवर्णशलाका, कुशमूल किंवा दूर्वांकुर मधात बुडवून जिभेवर ऐं हा वर्ण लिहिणे व त्याचा जप करणे, संकल्पित जप पुरा झाल्यावर आज्याहुतींनी हवन करणे व गायीच्या दुधाच्या खिरीत हुतशेष आज्य मिसळून 'प्राणाय स्वाहा' इ. मंत्रांनी त्या खिरीच्या पाच प्राणाहुती घेणे. विशेषेकरून हे व्रत विद्यार्थ्यांनी करायचे असते. व्रताचे फल — बुद्धीचा विकास व शास्त्रज्ञानाची वृद्धी.

या व्रताचा दुसरा प्रकार असा— ग्रहणकाली सुवर्णाचा सर्प बनवून तो तिलपूर्ण ताम्रपात्रात ठेवून श्रोत्रिय ब्राह्मणाला दान देणे. दानमंत्र असा—

तमोमय महाभीम सोमसूर्यविमर्दन ।
हेमनागप्रदानेन मम शान्तिप्रदो भव ।।

अर्थ— हे अंधकाररूप, महाभयंकर व सोम-सूर्यांचे मर्दन करणाऱ्या (राहो,) सुवर्णनागाच्या दानाने (तू) मला शांतिप्रद हो;

जन्मनक्षत्र किंवा जन्मराशी यांच्यावर ग्रहण झाले असता त्या नक्षत्राच्या वा राशीच्या मनुष्याला पीडा होत असते. ती पीडा शमावी म्हणून हे व्रत करतात. [व्र. प.]

ग्रहणश्राद्ध ग्रहणकाली करायच्या श्राद्धाला ग्रहणश्राद्ध म्हणतात. हे श्राद्ध अन्नाने न करता आमान्नाने किंवा हिरण्याने करावे, असे शातातपस्मृतीत सांगितले आहे. आशौच असले तरीही ग्रहणात स्नान व श्राद्ध करावे; कारण ग्रहणमुक्तीपर्यंत कर्त्याला शुद्धता असते, असे वृद्धवसिष्ठाचे वचन आहे. ग्रहणश्राद्धाला रात्रीचा निषेध नाही. ग्रहणात केलेले श्राद्ध चंद्रतारका आहेत तोवर शिल्लक राहते, असे विष्णुस्मृती सांगते व श्राद्धकर्त्याला पृथ्वीदानाचे फल मिळते, असे ऋष्यशृंग सांगतो. [नि. सि.]

ग्रहणस्नान ग्रहणाच्या स्पर्शकाली व ग्रहण सुटल्यावर स्नान करावे, असे हेमाद्रीचे वचन आहे. ग्रहण सुटल्यानंतर जो मुक्तिस्नान करीत नाही, तो दुसऱ्या ग्रहणापर्यंत सुतकी राहती, असे भार्गवार्चनदीपिकेत सांगितले आहे. हे स्नान अमंत्रक करायचे असते.

चंद्र-सूर्यग्रहणकली गंगेत किंवा इतर महानद्यांच्या ठिकाणी यथाविधी स्नान करावे, असे महाभारतात सांगितले आहे. मासपरत्वे विशिष्ट नद्या स्नानाला प्रशस्त मानल्या आहेत, त्या अशा — कार्तिकात गंगा–यमुनासंगम, मार्गशीर्षात देविका, पौषात नर्मदा, माघात सन्निहिता, फाल्गुनात वारुणा, चैत्रात सरस्वती, वैशाखात चंद्रभागा, ज्येष्ठात कौशिकी, आषाढात तापी, श्रावणात सिंधू, भाद्रपदात गंडकी व आश्विनात शरय किंवा नर्मदा. [नि. सि.]

ग्रहपरिवृत्तिसंवत्सर नव्वद वर्षांचे कालचक्र. याचा आरंभ कलियुग ३०७९ (सनपूर्व २४) पासून झाला, असे समजतात. वर्तमान कलियुगवर्षांतून १८ वजा करून बाकीस ९० नी भागले असता जी संख्या राहते, ती या कालाच्या चालू वर्षाची निदर्शक असते. त्याचप्रमाणे चालू शतकात ११ मिळवून येणाऱ्या संख्येला ९० नी भागले, तर तो आकडाही चालू वर्षाचा निदर्शक समजतात. या संवत्सराचा दक्षिणेत मदुरा जिल्ह्यात प्रचार आहे. [सं. मि.; सु. वि. को.]

ग्रहमातृका एक बौद्ध देवता. ही त्रिमुख व षड्भुज असून सहस्रदलकमलावर वज्रासनात बसलेली असते. हिच्या दोन हातांची धर्मचक्रमुद्रा असून, डाव्या हातांत कमळ व धनुष्य असते आणि उजव्या हातांत वज्र व बाण असतो. [इं. बु. इ.]

ग्रहयज्ञ ग्रहांना उद्देशून केलेला यज्ञ तो ग्रहयज्ञ होय. हा यज्ञ शांतिक व पौष्टिक असा उभयविध असतो. शांतिकर्माच्या अंगभूत असलेला ग्रहयज्ञ अधिक मास, गुरुशुक्रांचा अस्त, इ. वर्ज्यकालातही करतात. पौष्टिक कर्मांत मात्र कालशुद्धी पाहूनच तो करावा लागतो.

नित्य, नैमित्तिक व काम्य असे ग्रहयज्ञाचे तीन प्रकार आहेत. ग्रहणाच्या वेळी ग्रहयज्ञ करतात, तो नित्य होय. उपनयन, विवाह इ. कर्मांच्या वेळी ग्रहांची शांती व्हावी, म्हणून जो करतात तो नैमित्तिक समजावा. जननशांती व व्रतोद्यापने या कर्मांतही ग्रहयज्ञ अंगभूत म्हणून करावा लागतोच. आपत्ती नष्ट व्हावी किंवा एखाद्या कार्याची सिद्धी व्हावी, म्हणून स्वतंत्रपणे ग्रहयज्ञ करतात, तो काम्य होय. ग्रहयज्ञ नद्यांच्या संगमावर करावा, असे सांगितले आहे. याचा विधी मत्स्य पुराणात सांगितला आहे (२३९). हे अनुष्ठान बरेच दिवस चालणारे असते. यात कुंडमंडपतंत्र करतात.

या ग्रहयज्ञासाठी दोन हात लांबी, रुंदी आणि खोली असलेले कुंड तयार करतात. मग सर्वतोभद्र मंडलावर ग्रहांचे व देवतांचे आवाहन-पूजन करून त्यावर धान्यराशी पसरतात व त्यावर ग्रहांचे आवाहन करतात. या ग्रहयज्ञात अयुत, लक्ष किंवा कोटी आहुती द्याव्या, असे सांगितले आहे. यात शेवटी पूर्णाहुती व बलिदान करतात. ऋत्विज व आचार्य यांच्यासह यजमान एक वर्षपर्यंत दीक्षा घेऊन राहतो.

कर्नाच्या अंगभूत असलेल्या ग्रहयज्ञासाठी कुंडमंडपतंत्र करीत नाहीत. एक हात लांबी रुंदीचे स्थंडिल करून त्यावरच होम करतात. यात यजमान प्रथम आचार्यवरण करतो. मग आचार्य अग्निमख करतो. सर्वतोभद्र मंडलावर देवतांची पीठे मांडून त्यावर ग्रहांची स्थापना करतो. मध्यभागी सूर्य पीठ व अष्टदिशांना आठ ग्रहांची पीठे असतात. पीठांचे आकारही वेगवेगळे करायचे असतात. ग्रह हे त्यांच्या अधिदेवता व प्रत्यधिदेवता यांच्यासह मांडायचे असतात. ग्रहाच्या उजव्या बाजूला मांडायच्या देवतेला अधिदेवता व डाव्या बाजूला मांडायच्या देवतेला प्रत्यधिदेवता म्हणतात. या विषयीचे कोष्टक असे–

ग्रह	पीठ	प्रतिमा	दिशा	अधि–प्रत्यधिदेवता
सूर्य	वर्तुळ	ताम्र	मध्यभागी	त्र्यंबक व अग्नी
चंद्र	चतुरस्र	स्फटिक	आग्नेयी	गौरी व आप
मंगळ	त्रिकोण	रक्तचंदन	दक्षिण	स्कंद व भूमी
बुध	बाणाकार	सुवर्ण	ईशान्य	विष्णू व नारायण
गुरू	लंबचौकोन	सुवर्ण	उत्तर	ब्रह्मा व इंद्र
शुक्र	पंचकोन	रौप्य	पूर्व	इंद्र व इंद्राणी
शनी	धनुषाकार	लोह	पश्चिम	यम व प्रजापती
राहू	शूर्पाकार	शिसे	नैर्ऋत्य	काल व सर्प
केतू	ध्वजाकार	कांसे	वायव्य	चित्रगुप्त व ब्रह्मा

सर्व ग्रहांच्या प्रतिमा सुवर्णाच्या कराव्या किंवा ते शक्य नसेल, तर अक्षतापुंजावरच ग्रहांचे आवाहन करावे, असे सांगितले आहे. ग्रहांची तोंडे निरनिराळ्या दिशेकडे न करता पूर्वेकडेच करावी, असाही एक विकल्प पक्ष आहे. काही ठिकाणी सुपारीवरही ग्रहांचे आवाहन करण्याची प्रथा आहे.

ग्रहस्थापना झाल्यावर गणपती, दुर्गा, वायू, आकाश, अश्विनौ, वास्तोष्पती व क्षेत्रपती अशा सात देवतांचे आवाहन करायचे असते. या देवतांना ऋतुसंरक्षक देवता म्हणतात. मग पूर्वादी आठ दिशांना इंद्रादी आठ लोकपालांचे आवाहन करतात. ग्रहपीठाच्या ईशान्येस वरुणासाठी एक कलश स्थापतात. ऋत्विज त्या कलशाला स्पर्श करून पवमानमंत्र म्हणतात. मग अन्वाधानापासून पुढचे सर्व कर्म करून प्रधानयागाच्या वेळी समिधा, चरू व तूप यांच्या आहुती देतात. आहुतींची संख्या शक्यतेनुसार २८, १०८ किंवा त्याहून कमीअधिक असते. नवग्रहांच्या समिधा, गंध, धूप, बली व दक्षिणा यांचे कोष्टक असे–

ग्रह	गंध	धूप	बली	समिधा	दक्षिणा
सूर्य	रक्तचंदन	भद्रमुस्ता	गूळभात	रुई	धेनू
चंद्र	श्वेतचंदन	मोरतुरा	घृतपायस	पळस	शंख
मंगळ	कुंकुम	दशांग	यावक	खैर	बैल
बुध	सरल	राळ	क्षीरान्न	आघाडा	सोने
गुरू	मिश्रित	बिल्वफल	दहीभात	पिंपळ	वस्त्र
शुक्र	श्वेतचंदन	चीड	तूपभात	औदुंबर	घोडा
शनी	कस्तूरी	कालागुरू	कृसर	शमी	काळी गाय
राहू	पद्मकाष्ठ	जटामांसी	बोकडमांस	दूर्वा	लोह
केतू	पद्मकाष्ठ	मधूक	चित्रौदन	दर्भ	बोकड

प्रधान देवतांसाठी बलिदान झाल्यावर क्षेत्रपाल देवतेसाठी उडीद घातलेल्या भाताचा बली करतात व तो रस्त्यावर किंवा चौकात नेऊन ठेवतात. संस्काराच्या निमित्ताने ग्रहयज्ञ केला असल्यास बलिदान करीत नाहीत. मग पूर्णाहुती व स्थापित देवतांची उत्तरपूजा करतात. पूर्वी स्थापलेल्या कलशातील पाण्याने यजमान व त्याचे कुटुंबीय यांना अभिषेक करतात. मग यजमान ग्रहपीठ आचार्याला दान देतो व ऋत्विजांना दक्षिणा देऊन कर्मसांगतेसाठी ब्राह्मणभोजन घालतो. [हि. ध.; ध. सिं.; विद्याधरशास्त्री भिडे; ऋ. ब्र. क.]

ग्रहविप्र एक जात. हिला गणक असेही म्हणतात. आसाम, बंगाल, इ. प्रदेशांत या जातीची वस्ती आहे. बंगालमधील गणकांपेक्षा आसामी गणक आपणांस श्रेष्ठ समजतात. आसामी गणकांनीच आपणास श्रेष्ठत्वदर्शक 'ग्रहविप्र' हे नवीन नाव घेतले आहे. बंगालमधील या लोकांना आचारजी अथवा दैवज्ञ ब्राह्मण असे म्हणतात. पाहा– दैवज्ञ ब्राह्मण [म. ज्ञा. को.]

ग्राम

(१) घरांच्या समूहाला ग्राम (गाव) असे नाव आहे. भरताने ग्रामाची व्याख्या दिली आहे, ती अशी— ‘विप्रादिवर्णप्राया प्राकारपरिखादिरहिता बहुजनवसतिः’ = ब्राह्मणादी वर्ण ज्यात प्रामुख्याने असतात अशी आणि तटबंदी व खंदक यांनी रहित जी पुष्कळ लोकांची वस्ती, तिला ग्राम म्हणावे. नवपाषाण युगापासून (सनपूर्व ८००० वर्षे) गावे अस्तित्वात असल्याचे कळते.

ग्राम म्हणजे खेडेगाव व नगर म्हणजे शहर होय. वैदिक वाङ्मयात ग्राम शब्द अनेकदा आला आहे. वैदिक काळातील सर्व वस्ती गावांतच होती. गावांना जोडणारे रस्तेही त्या लोकांनी बांधलेले होते. त्या काळातले गाव स्वयंपूर्ण होते. गावात राहणारे लोक गावाला लागणारे अन्नधान्य स्वतः शेती करून पिकवीत आणि दूधदुभत्यासाठी गायीही बाळगीत. ते मेंढ्या पाळीत व त्यांच्या लोकरीपासून कांबळी बनवीत. तसेच कापसाची लागवड करून ते त्याची सुंदर तलम वस्त्रे विणीत. रथ व घरात लागणारे लाकडी सामान सुतार बनवीत. लोखंडी नांगर व त्याचे फाळ लोहार तयार करीत. कुंभार गाडगीमडकी घडवीत. पाणी व मद्य ठेवण्यासाठी काही लोक अजिनाचे बुदले बनवीत. या कारूंशिवाय गावात न्हावी व वैद्यही असत.



वेदकालीन ग्रामाचे मित्र

गावाच्या सीमा दर्शविणारे दगड किंवा खंदक यांचा गावात अंतर्भाव होत असे. त्याचप्रमाणे गावाशी संबद्ध असलेले अरण्यही गावाचेच एक अंग मानले जात असे.

प्राचीन काळी सर्व जमीन राजाच्या मालकीची मानली जाई. एखाद्या वेळी राजा एखाद्या माणसावर खूष होऊन एखाद्या गावासंबंधीचे स्वतःचे अधिकार त्याला देत असे (तै. सं. २. १. १. २; मै. सं. २. १. ९). पण त्या गावाची संपूर्ण मालकी त्या माणसाकडे जाणे, ही कल्पना नंतरच्या काळातील म्हणजे शतपथ ब्राह्मणातील (७·१·१·८) आहे.

राजकीय दृष्टीने किंवा कायद्याच्या दृष्टीने प्राचीन का ग्राम हा मूळ घटक मानलेला नव्हता. गावातील लोकांचा संबं राजाशी किंवा त्याच्या वतीने अधिकार चालवणाऱ्या माणसा असे. गावातील लोक राजाला आपल्या उत्पन्नाचा काही भा कर म्हणून देत असत. गावाच्या प्रमुखाला ग्रामणी असे ना होते. ही जागा फार मानाची समजली जाई. राजा आपल्या मर्जीतल्या माणसाची त्या जागेवर नेमणूक करी.

कौटिल्याच्या काळातील गावे मोठी होती. दोन गावांतील अंतर एक ते दोन कोस असे. एका गावात शंभरापासून पाचशे-पर्यंत कुटुंबे राहत असत. गावात शेती करणाऱ्या लोकांची वस्ती जास्त असे. सर्वांची शेते एकमेकांना लागून असत. शेतीला पाणीपुरवठा नदी, तलाव, विहिरी, इ. जलाशयांतून होत असे.

गावातील सुखसोयी प्रामुख्याने राजा निर्माण करीत असे; पण काही गावात लोकच ते काम करीत. गावातील लोकां-साठी सरोवरे, विहिरी, राजमार्ग, बागबगीचे, इ. गोष्टी सर-कार निर्माण करीत असे किंवा गावकऱ्यांना त्यासाठी आर्थिक मदत देत असे.

जेव्हा एखादे गाव नव्याने वसवायचे असे, त्या वेळी त्या कोणकोणत्या सुखसोयी निर्माण करायच्या ते राजा प्रथम ठर-वून देत असे. गावाची सीमा नदी, टेकडी, अरण्य, सरोवर कि तलाव यांवरून निश्चित केली जात असे. गावाच्या बाहेर बाजूला शबर, पुलिंद, चांडाळ, इ. लोकांची वस्ती असे.

शेतकऱ्यांची वस्ती त्यांच्या शेताजवळच असे. आणि शेती साहाय्यक अशा सु लोहार, गवळी, भा इ. लोकांची व शेतकऱ्यापासू थोड्या अंतराव एकत्र असे. शेतक व व्यापारी परस्प च्या सोयी पाह असत. व्यापारी लो व्यापारात फार न घेत नसत. शेती व्यापार यातून जा पैसे मिळाल्यास शे करी व व्यापारी गावातील समाजासाठी मंदिरे, धर्मशाळा पाणपोया, तलाव, विहिरी, इ. निर्माण करीत. त्याचप्रमा आपल्या मिळकतीचा काही भाग ते दानधर्मातही वेचीत.



प्राचीन ग्रामीण जीवनाचे एक दृश्य

गावाचे जीवन सदैव पवित्र, संतुलित व संयत राहावे, यासंबंधी विशेष खबरदारी घेतली जात असे. गृहस्थजीवनाची रमणीयता ज्यायोगे भंग पावेल व लोकांच्या मनात विरक्तीचा उदय होईल, असे कोणतेही कृत्य गावात केले जाणार नाही, याची दक्षता घेतली जाई. कौटिल्याने संन्यासी व साधू यांच्या गावातील निवासावर निर्बंध घातले होते. त्यांना गावात एक-दोन दिवस राहण्याची परवानगी दिलेली होती. पण त्याचबरोबर लोकांनी त्यांच्या निकट सहवासात फार काळ राहू नये, असाही कौटिल्याचा आदेश होता. गावात नाटक, तमाशा, इ. खेळ मधूनमधून करायला त्याने तशा प्रकारच्या मंडळ्यांना परवानगी दिलेली होती. पण गावात त्यांचे कायम अड्डे निर्माण व्हावे, याला मात्र त्याचा सक्त विरोध होता. ज्या वेळी शेतकरी शेतीच्या कामात गुंतलेला असेल, त्यावेळी त्यांनी आपले खेळ करून त्यांच्या कामात व्यत्यय आणू नये, असाही त्याचा निर्बंध होता.

प्रत्येक गावात गायींना चरण्यासाठी एक कुरण व गोठा असे. त्याचप्रमाणे प्रत्येक गावात दोन मोठे तलाव व अनेक विहिरी असल्याच पाहिजेत, असा नियम होता. ज्या गावात नदी नसेल, त्या गावात पाट काढून पाणी खेळवलेले असे.

प्रत्येक गावात यज्ञशाळा, मठ व मंदिरे असत. तिथे रोज संध्याकाळी धार्मिक चर्चा किंवा कथापुराणे चालत. गावाच्या चारी बाजूंना खंदक खणलेले असून ते पाण्याने भरलेले असत. पाणी स्वच्छ राहावे, म्हणून त्यात जलचर प्राणी सोडलेले असत व कमलिनी लावलेल्या असत.

गावातील कृषियोग्य भूमी शेतकऱ्यांना त्यांच्या कुटुंबियांच्या संख्येच्या प्रमाणात वाटून देण्यात येत असे. शेतकऱ्यांना बी-बियाणे, पशू व आर्थिक साहाय्य सरकार देत असे. शेतकऱ्यांच्या व इतरही गावकऱ्यांच्या आरोग्यरक्षणासाठी गावात चिकित्सागृहे असत. गावात शिक्षणाचाही विशेष प्रचार होता. ब्राह्मण, क्षत्रिय व वैश्य यांना शिक्षण अपरिहार्य ठरवलेले होते. त्या वेळचे शिक्षण हे गुरुकुलात किंवा आचार्यकुलात होत असे.

पतंजलीच्या काळी एका गावात अनेक जातीचे लोक राहत होते, असे दिसते. ज्या गावात एकाच जातीचे किंवा वर्णाचे लोक प्रामुख्याने राहत असत त्या गावातही लोहार, कुंभार, सुतार, न्हावी व धोबी या पाच कारूंचा निवास असे. गावाच्या सीमेला लागून चंडालादी लोकांची घरे असत. ज्या जातीच्या लोकांची गावात अधिक वस्ती असे, त्या जातीवरून त्या गावाला नाव मिळत असे.

गावाच्या चारी बाजूंना अरण्य असे. आंबा, वड, शिरीष, इ. वृक्षांच्या राया गावाच्या भोवती लावलेल्या असत. नदी, पर्वत, वन, इ. वरून गावाच्या सीमा निश्चित करीत व सीमेची निदर्शक अशी काही चिन्हे सीमेवर बसवीत.



अमरावती शिल्पातील ग्रामचित्र

पाण्यासाठी गावातल्या विहिरीजवळ गुरांना पाणी पिण्यासाठी हौद बांधीत, त्यांना निपान असे नाव होते. वाटसरूंसाठी पाणपोया घातलेल्या असत. विहिरी वेळोवेळी साफ केल्या जात. हे काम करणाऱ्यांना उदगाह असे नाव होते.

गावाच्या चारी बाजूंना जी जमीन असे, तिचे सीत्या, गोचर व ऊषर असे भाग केलेले असत. सीत्या जमिनीत धान्य पेरीत व गोचर भूमीत पशू चारीत. ऊषर म्हणजे नापिक जमीन होय.

मानसार या ग्रंथात ग्रामाचा वास्तुशास्त्राच्या दृष्टिकोणातून विचार केलेला आहे. गाव निर्माण करण्यापूर्वी भूमीच्या शुभाशुभतेचा विचार करीत असत. जलाची जवळीक, भूमीची सुपीकता, इ. गोष्टींचा विचार करून गावाची रचना करीत. गावात साधारणपणे एकमेकांना छेदणारे दोन हमरस्ते असत. एक पूर्व-पश्चिम जाणारा व दुसरा दक्षिण-उत्तर जाणारा. यांपैकी पहिल्या रस्त्याला राजपथ व दुसऱ्याला वामन असे नाव होते. या रस्त्यांच्या दोन्ही बाजूंना घरे बांधीत:

मानसार ग्रंथात गावांचे त्यांच्या आकारावरून आठ वर्ग पाडलेले आहेत, ते असे — दंडक, सर्वतोभद्र, नंद्यावर्त, पद्मक, स्वस्तिक, प्रस्तर, कार्मुक व चतुर्मुख. त्यांचा तपशील असा–

दंडक ग्राम– या ग्रामाची रचना सरळ चौकोनी असते. याच्याभोवती खंदक व तटबंदी असते. उत्तर-दक्षिण व

पूर्वपश्चिम जाणाऱ्या सडकांमुळे या गावाचे २४ भाग होतात. गावात शंकराचे व विष्णूचे देवालय असते.



दंडक ग्राम (भारतीय वास्तुशास्त्र – डॉ. शुक्ल)

सर्वतोभद्र ग्राम– याची रचना चौरस असते. आणि चारी दिशांना गावातून बाहेर जाण्याकरता दरवाजे असतात. याच्या सभोवतीही खंदक व तटबंदी असते. गावाचे मुख्य चार भाग असतात. गावाच्या मध्यभागी ब्रह्मदेवाचे मंदिर किंवा सार्वजनिक सभागृह असते. गावात तळी खोदलेली असतात. गावातील वस्ती जात्यनुसार पृथक असते.

नंद्यावर्त ग्राम – हे एक सोयिस्कर व सुंदर असे गोलाकार किंवा चौकोनी गाव असते. याच्या भोवतीही खंदक व तटबंदी असते. गावाचे पंचवीस भाग असतात. सुतार, लोहार, धोबी, इ. लोकांच्या व्यवसायानुसार वेगवेगळ्या आळ्या असतात. सोयिस्कर जागी सार्वजनिक देवालये, तलाव व बागा असतात.

पद्मक ग्राम – याचा आकार कमलदलासारखा असतो. गावाच्या मध्यभागी सार्वजनिक सभागृह असते. गावाच्या खंदकाला व तटबंदीलाही कमलदलाचा आकार असतो. जातीनुसार गावात वेगवेगळ्या वस्त्या असतात.

स्वस्तिक ग्राम– याची रचना स्वस्तिकाकार असते. दक्षिणोत्तर व पूर्व-पश्चिम सडकांमुळे गावाचे मुख्य चार भाग पडतात. राजाचा प्रासाद, मंत्र्यांची व इतर अधिकाऱ्यांची घरे वेगवेगळ्या विभागात असतात. गुजरातची प्राचीन राजधानी अनहिलपट्टण ही या प्रकारची होती.

प्रस्तर ग्राम–याचा आकार चौकोनी असतो. यात भविष्यकाळी होणाऱ्या विस्तारासाठी व्यवस्था केलेली असते.

कार्मुक ग्राम– याचा आकार धनुष्यासारखा असतो. याचे एकंदर सतरा भाग असतात. गावातील बहुतेक वस्ती व्यापारी लोकांची असते. गावात प्रमुख ठिकाणी दुकाने, गुदामे आणि शिपायांची घरे असतात.

चतुर्मुख ग्राम– याचा आकार चौकोनी असतो. चौकोनाच्या चारी बाजूंच्या मध्यभागापासून मुख्य चार रस्ते निघतात. गावाच्या मध्यभागी ब्राह्मण व पुरोहित राहतात. मुख्य देवालय तिथेच असते.

त्या काळी गावाच्या साधारणपणे एक तृतीयांश भाग लोकवस्ती असे व उरलेला भाग कुरणे व शेती यांनी व्यापलेला असे. प्रत्येक ग्रामाभोवती दगडांची किंवा विटांची भिंत असे. त्याच्या बाहेर एक रुंद व खोल खंदक असे. तट



सर्वतोभद्र ग्राम (भारतीय वास्तुशास्त्र – डॉ. शुक्ल)

आत सभोवार असा एक रस्ता असे. चारी बाजूंच्या मध्यभागी चार दरवाजे व त्यांना जोडणारे रस्ते असत. हे रस्ते एकमेकांना जिथे मिळत, त्या चौकात एक देवालय असे. मुख्य रस्त्यावरील तळमजल्यात दुकाने असत. बाजूच्या रस्त्यावर एकाच बाजूला शाळा, महाविद्यालये, अतिथिगृहे, ग्रंथालये, इ. सार्वजनिक इमारती असत. सर्व घरे एकाच प्रकारची व विरळ बांधलेली असत. एका भागात साधारणपणे एकाच जातीचे व समान व्यवसायी लोक राहत. पाण्याचे हौद व तळी जागोजागी असत. आणि पाण्याचा निचरा व्हावा, अशी व्यवस्था केलेली असे.



नंद्यावर्त ग्राम (भारतीय वास्तुशास्त्र – डॉ. शुक्ल)



पद्मक ग्राम (भारतीय वास्तुशास्त्र – डॉ. शुक्ल)

शुक्रनीतिसारात ग्रामाबद्दल पुढील माहिती दिलेली आहे– त्या काळात ग्रामाचा विस्तार एक कोसपर्यंत असे आणि त्याचा वसूल एक हजार रौप्य कर्ष इतका असे (शुक्रनीति. १.१९३). ज्या गावाच्या आसपास भरपूर पाणी, गवत, सरपण, कुशग्रास, फुले वगैरे आहेत, ज्या गावात उद्योगी व समृद्ध लोक राहतात आणि ज्या गावात चोरांना सहजपणे प्रवेश करता येत नाही, ते आदर्श ग्राम होय, असे बौधायन धर्मसूत्रात सांगितले आहे (२. ३. ५८ – ६०).

शुक्रनीतिसारात सहा ग्रामाधिकाऱ्यांची नावे दिली आहेत, ती अशी–(१) साहसाधिपती– भांडणे, मारामाऱ्या, जबरदस्ती अशा गोष्टींसंबंधी न्यायनिवाडा करणारा क्षत्रिय. (२) ग्रामनेत्र किंवा ग्रामप्रमुख– हा ब्राह्मण असे. (३) भागहार– सारा गोळा करणारा क्षत्रिय. (४) लेखक– हा कायस्थ असे. (५) शुल्कग्राह – जकातकारकून. हा वैश्य असे. (६) प्रतीहार– रखवालदार. हा शूद्र असे.

गावाचा कारभार पाहण्यासाठी ग्रामसभा असे. गावातील शिक्षण, पाणीपुरवठा, गुन्हेगारांचा बंदोबस्त, देवालयांची व देवाच्या पूजेअर्चेची व्यवस्था, इ. कामे त्या सभेकडे असत. गावातील सुतार, कुंभार, नापित, इ. कारागिरांना त्यांच्या कामाचा मोबदला धान्यच्या रूपात देण्याची पद्धत होती.

प्रत्येक कुटुंबाला ग्रामव्यवस्थेत हातभार लावावा लागे. सभागृहांची दुरुस्ती, देवालयांची व्यवस्था, यज्ञकर्मे, गरीबांना साहाय्य, इ. कामांत कोणी काय करायचे, ते ठरवून दिले जात असे. दुष्काळ, दरोडा, इ. सामूहिक संकटाच्या वेळी गावातील लोक होमहवन करीत व संरक्षक दलही उभारीत. या कामी प्रत्येक कुटुंबाने मदत केलीच पाहिजे, असा दंडक होता. त्यात कोणी चुकारपणा केला, तर त्याचे सर्वस्व हरण करून त्याला गावातून हाकलून देत (स्मृतिचं. २. २२२–२३). ग्रामव्यवस्थेच्या नियमांचे उल्लंघन करणाऱ्याचा निषेध करून त्याच्यावर बहिष्कार घालण्याचा निर्णय कुलश्रेणिगणाध्यक्षांनी करावा व त्याला राजाने मान्यता द्यावी, अशी प्रथा होती. अशा प्रकारे त्या काळात ग्रामव्यवस्था स्वयंपूर्ण होती. केंद्रसत्ता त्यात हस्तक्षेप करीत नसे. केवळ सारावसुली, संरक्षण, इ. विषयांत तेवढा राजा अधिकार चालवीत असे. आजच्या ग्रामपंचायतींच्या कल्पनेचा उगम यातून झालेला असावा.

सांप्रत भारतात सुमारे सात लाख खेडी आहेत. त्यांपैकी महाराष्ट्रातील तीन प्रकारच्या खेड्यांची माहिती डॉ. इरावती

कर्वे यांनी एका लेखात दिली आहे, तिचा सारांश असा —

पहिला प्रकार म्हणजे दक्खनच्या पठारावर वसलेली खेडी.



स्वस्तिक ग्राम (भारतीय वास्तुशास्त्र – डॉ. शुक्ल)

या खेड्यांच्या सभोवती काळी भुसभुशीत अशी जमीन असते आणि ती लागवडीखाली असते. अशा या दूरवर पसरलेल्या शेतजमिनीत मधेच कुठे तरी अनेक घराचा एक पुंजका असतो. एका खेड्याच्या मालकीची शेते दुसऱ्या खेड्याच्या शेतांत मिसळून गेलेली असतात. कधी त्यांच्यामध्ये एखादी टेकडी, ओढा किंवा रस्ता असतो आणि तीच त्या गावाची नैसर्गिक सीमा असते.

दुसऱ्या प्रकारची खेडी प. किनाऱ्यावर म्हणजे कोकणात आहेत. ही खेडी रस्त्याच्या दोन्ही बाजूंना ऐसपैस पसरलेली असतात. प्रत्येक घराभोवती आवार असते आणि त्यात नारळाची झाडे व इतर फळझाडे लावलेली असतात. या आवाराभोवती कुंपण असते. अशी खेडी एकमेकांत मिसळलेली असतात. काही वेळा खाजण ही त्यांच्यामधील सीमा बनते.

तिसऱ्या प्रकारची खेडी सातपुडा पर्वताच्या रांगांमध्ये सापडतात. या रांगांमध्ये उंच खोरी आहेत. या प्रदेशातील मुख्य वस्ती भिल्लांची आहे. इथल्या खेड्यांतील घरे अगदी विरळ असतात. एकाच घराण्यातील लोक गावातील झोपड्यात वेगवेगळ्या ठिकाणी राहतात. तिथली जमीनही त्यांच्याच मालकीची असते. घरांचा दुसरा पुंजका घरांच्या एका पुंजक्यापासून एक–दोन फर्लांगावर असतो.

महाराष्ट्रात पुष्कळदा एखाद्या गावाच्या नावापुढे गाव हा शब्द लावतात, तर दक्षिणेत ऊर हा शब्द जोडतात. महाराष्ट्रात प्रत्येक गावात मुख्य वस्तीपासून थोड्या अंतरावर आणखी एक लहान वस्ती असते, तिला वाडी म्हणतात. ती वाडी गावाचीच असते. आंध्र प्रदेशात वाडीला पल्ली अथवा गुडा म्हणतात. वाडीत राहणारे लोक आपल्या गावाला कसबा किंवा पेठ म्हणतात. कसबा म्हणजे कसबी किंवा कारागीर लोक राहतात तो भाग किंवा ज्या ठिकाणी बाजार किंवा दुकाने असतात तो भाग होय. वाडी ही काही वेळा एका विवक्षित जमातीच्या वस्तीची असते. काही वेळा ती गावापेक्षाही मोठी असते. सातारा जिल्ह्याच्या पूर्वेस मुख्य गावापासून थोड्या अंतरावर बनगरवाड्या आहेत. बनगरवाड्यांप्रमाणेच रामोशी



प्रस्तर ग्राम (भारतीय वास्तुशास्त्र – डॉ. शुक्ल)

वाड्याही असतात. काही वेळा वाड्या जातिवाचक नावानेही ओळखल्या जातात. उदा॰ शिंदेवाडी, कामतवाडी, ब्राह्मण-

वाडी इत्यादी. काही वेळा गावाच्या आसपास मुबलक जागा असते तिथे वस्ती वाढत जाते. त्या वस्तीतील लोकांच्या चालीरीती भिन्न असल्यास मूळ गावाची दोन वेगवेगळ्या वस्त्यांमध्ये विभागणी होते आणि नवीन खेडी निर्माण होतात. विशेषेकरून आदिवासी प्रदेशात अशी नवीन खेडी जन्माला येतात.


कार्मुक ग्राम (भारतीय वास्तुशास्त्र – डॉ. शुक्ल)

एक गाव हे अनेक घरांचे मिळून बनलेले असते. पण एकच घर असलेली काही खेडी गुजरातेत आहेत. आंध्र प्रदेशात सवर आदिवासी एकच मोठे घर बांधतात व त्यात पुष्कळ कुटुंबे राहतात. एखाद्या गावाला ज्या इसमाने ते गाव वसवले असेल, त्याचे नाव मिळते. उत्तर आंध्रमध्ये मामिडी या नावाची अनेक खेडी आहेत. एका खेड्याचे नाव वंताळ मामिडी असून तिथले लोक वंताळ टोळीतील आहेत. महाराष्ट्रातही एकाच गोत्राच्या लोकांची वस्ती असलेली खेडी आहेत. उदा० कोकणात 'अठोम मावे' आणि 'अठोम दांडे' अशी दोन गावे असून पुणे जिल्ह्यात दभडेरे तळेगाव आणि दाभाडे तळेगाव अशी दोन गावे आहेत. समोवती घरे आणि मध्यभागी रिकामी जागा असलेली गावे भारतात अनेक ठिकाणी आहेत. घरांच्या अशा व्यवस्थेमुळे गावकऱ्यांना चोरा-दरोडेखोरांपासून आपला बचाव करणे सुलभ जाते. उत्तर गुजरातमध्ये अशी खेडी विशेषेकरून आढळतात.

भारतातील बहुतेक सर्व गावांत वेगवेगळ्या पोटवस्त्या आढळतात. जातिभेद, अस्पृश्यता व व्यवसाय अशी या पोटवस्त्या असण्याची कारणे आहेत. भारतातील लोकांचे एक वैशिष्ट्य असे, की प्रत्येक जमात स्वतःचा गट करून इतरांपासून अलग राहते. त्यामुळे भारतातील खेडेगावात मिश्र वस्ती आढळत नाही. [वे. इं.; श: क.; वै. सा. सं.; गां. गा.; प. भा.; हि. घ.; एन्सा. हिं. आ.]

(२) स्वरांच्या समूहाला ग्राम अशी संज्ञा आहे. षड्जग्राम मध्यमग्राम व गांधारग्राम असे ग्रामाचे तीन प्रकार आहेत. शुद्ध सात स्वरांच्या क्रमवार समूहाला म्हणजे स र ग म प ध न किंवा व्युत्क्रमाला म्हणजे न ध प म ग र स यांना षड्जग्राम असे म्हणतात. मध्यमग्रामाची सुरवात म प ध न स र ग अशी होते किंवा त्याचा शेवट ग र स न ध प म असा मध्यमाने होतो. भरतमुनीने आपल्या नाट्यशास्त्रात याच दोन ग्रामांचा उल्लेख केला आहे. गांधारग्रामाचा निर्देश संगीतरत्नाकरात असून हा स्वर्गलोकात गायला जातो, असे सांगितले आहे. मृच्छकटिक व पंचतंत्र या ग्रंथांत तीन ग्रामांचा उल्लेख आहे. [आ. सं.]

ग्रामजोशी

जुन्या ग्रामव्यवस्थेतला एक धार्मिक अधिकारी. गावात पंचांग सांगणे, लग्न लावणे, अंत्यसंस्काराचे पौरोहित्य करणे, तसेच विशिष्ट तिथींची कृत्ये आणि पर्वकृत्ये, इ. प्रसंगी उपाध्येपण करणे, हा ग्रामजोशाचा अधिकार असतो. देवाचा नैवेद्य, देवापुढील उत्पन्न, यात्रांचे उत्पन्न व नवसाचे द्रव्य ही ग्रामजोशाची मिळकत असते. काही ठिकाणी त्याच्याकडे ग्रामदेवतेची पूजा-अर्चाही असते. शकुन-प्रश्न पाहणे, गावकऱ्यांची पत्रे लिहिणे, इतरांच्या घरी ब्राह्मणभोजनाचा स्वयंपाक करणे, इ. कामेही तोच करतो. कुणब्याकडून त्याला धान्याच्या शेकडा एक या प्रमाणात पेंढ्या मिळतात. शिवाय पंचांग सांगण्याचे धान्य, नैमित्तिकाचा शिधा व इतर दक्षिणाहि त्याला मिळते. ग्रामजोशाचे जोसपण हे वंशपरंपरागत चालते. [गां. गा.]

ग्रामणी

गावाचा नेता. याची व्याख्या अशी– 'ग्रामं संवसथं तत्रत्यान् जनान् नयति दोषगुणविचारादिभिः परिचालयति प्रेरयति वा'= गावातील लोकांना गुणदोषविचारादी गोष्टींनी चालवतो किंवा त्यांना प्रेरणा देतो, तो ग्रामणी होय (मेदिनी). हे पद आनुवंशिक परंपरेने मिळत असे; मात्र वारस अयोग्य असेल तर त्याच कुलातील दुसऱ्या व्यक्तीला ग्रामणी म्हणून नेमण्याचा सरकारला अधिकार होता. ग्रामणी बहुधा क्षत्रिय वर्गातला असे व तो ग्राम सेनेचा नायक असे. वैदिक काळी तो शासन आणि संरक्षण या दोन्ही बाबतीत ग्रामाचा प्रमुख असे. याला ग्रामिक, ग्रामकूट, ग्रामाधिपती, ग्रामनेत्र व पट्टकील (पाटील)


ग्रामणी – सनपूर्व २०० च्या सुमाराची प्रतिमा–काश्मीर

अशीही नावे होती. गावाच्या संरक्षणासाठी त्याला नेहमी जागरूक राहावे लागे. या बाबतीत गावकऱ्यांनी त्याला सह- कार्य न दिल्यास त्यांना दंड करण्याचा अधिकारही त्याला असे. सरकारी करांची वसुली करणे हे ग्रामणीचे दुसरे मह- त्वाचे कार्य होय. ग्रामपंचायतीच्या मदतीने तो हे काम पार पाडीत असे. तो ग्रामपंचायतीचा पदसिद्ध अध्यक्ष होता. ऋग्वेदात ग्रामणीचा उल्लेख आहे (१०.६२.११). [हिं. स.; हि. घ; श. क.; प्रा. भा. शा. प.]

ग्रामणेय एक प्राचीन भटकी जमात. प्राचीन भारतात लूट-मार करून उपजीविका करणाऱ्या काही जाती होत्या, त्यांना पूगग्रामणेय असे म्हणत. महाभारतात या जातीचा उल्लेख आहे, तो असा–

सिन्धुकूलाश्रिता ये च ग्रामणेया महाबलाः ।

(सभा. २९.८)

अर्थ– सिंधू नदीच्या तीरावर जे ग्रामणेय लोक राहत होते, ते महापराक्रमी होते.

सिंधूच्या किनाऱ्यावर आजही अशा काही जाती आहेत. *त्यांच्यांतील एखाद्या प्रसिद्ध पुरुषाच्या नावावरून त्या टोळ्यांना युसुफजाई, ईसाखेल,* इ. नावे मिळाली आहेत. [भा. सा.]

ग्रामदेवता गावाच्या देवता त्या ग्रामदेवता होत. भारतातली ग्रामवस्ती पुरातन आहे. ती वैदिक आर्यांच्याही पूर्वीची आहे. वैदिकांच्या पूर्वी भारतात अनेक मानवसमूह आले आणि इथे ग्रामवस्ती मांडून स्थायिक झाले. केवळ शिकार किंवा केवळ पशुपालन या दोन्ही अवस्थांतून ते पुढे गेले होते व त्यांना शेतीचा शोध लागला होता. अशा ग्रामवस्तीतल्या लोकांच्या आराध्य देवतांना ग्रामदेवता ही संज्ञा प्राप्त झाली आदिवासींपासून सवर्ण हिंदूंपर्यंत सर्व जातीजमाती ग्रामदेवतांची पूजा व त्यासाठी बलिदान करताना दिसतात. ग्रामदेवतांची क्वचित मंदिरे व क्वचित स्थाने असतात. मंदिरे छोटी आणि सामान्य असतात. त्यावर विशेषतः खालच्या जातींचा अधिकार चालतो. काही ग्रामदेवतांच्या स्थानांवर पूर्वास्पृश्य जातीही अधिकार चालवतात.



ग्रामदेवतेचे देऊळ

ग्रामदेवतांना हीन जातींच्या वस्तीत, अहीरांच्या झोपडीत, अस्पृश्यांच्या समुदायात, निषादांच्या पल्लीत, लोहार-सुतारांच्या कर्मशाळेत, संकर जातीच्या सहवासात व कोष्टयांच्या घरात राहणे आवडते, असे स्मृतिपुराणसमुच्चय या ग्रंथात म्हटले आहे. त्यामुळेच ग्रामदेवतांचे उत्सव निघाले म्हणजे त्या प्रसंगी धोबी, सुतार, कुंभार, लोहार, मांडिगा, इ. जातींना काही विशेष मान व अधिकार दिलेले असतात.

ग्रामदेवता म्हणजे ग्रामाच्या संरक्षक देवता होत. त्यांची नामे व रूपे विविध असली, तरी त्या मुख्यत्वे स्त्री–देवता आहेत. तंत्रग्रंथात त्यांच्याविषयी पुढील श्लोक आहे––

कालकर्मवशाज्जाताः कल्पिता बुद्धियोगतः ।
स्वदेशभाषानामाद्यैरर्च्यन्ते ग्रामदेवताः ॥

अर्थ–काल व कर्म या दोन तत्त्वांच्या आधारे व बुद्धीचा आश्रय करून ग्रामदेवतांची कल्पना केलेली आहे. त्या त्या देशाच्या भाषा, नामे इ. प्रकारांनी त्यांची पूजा केली जाते.

दक्षिणेतील ग्रामदेवतांची काही नावे पुढीलप्रमाणे आहेत– कोर्लपति अंकम्म, अंकलम्म, अंगरम्म, कालियम्म, मरियम्म, मुत्तयालम्म, पोन्नम्म, यल्लम्म, पिडारी, पेच्ची, गंगम्म, चाउदम्म (चामुंडा), दुर्गम्म (दुर्गा), नुकलम्म, परदेसम्म, नेरलम्म, पोलेरम्म, हुलिअम्म, बिसल मरी, मल्लम्म, सोमालम्म, भगवती, भद्रकाली, सांतेरी, भूमिका, जाखाई, जोखाई (यक्षिणी),



पोलेरम्म

यमाई, पावणाई, रेणुका, इत्यादी. वेताळ, कत्तन्देवर, पोट्टुराजू, आकारी, निरंकारी, सिद्ध, इ. काही पुरुषदेव ग्रामदेवतांच्या मंडलात दिसत असले, तरी ते स्त्री देवतांच्या अंकित किंवा त्यांचे सेवक असतात.

असे म्हणतात, की कृषीचा प्रारंभ प्रथम स्त्रीनेच केला. भूमीच्या उदरात पहिले बीज तिनेच पेरले. ते बीज अंकुररूपाने तरारून वर आल्यानंतर तिने धरित्रीची स्वतःशी अर्थात स्त्रीजातीशी तुलना केली. स्त्री ही आपल्या गर्भाशयात बीजनिषेक घेऊन त्याला अपत्यरूपाने जन्म देते, त्याप्रमाणे पृथ्वीही बीज आपल्या पोटात घेऊन त्याचा हिरवा अंकूर बाहेर काढते. तोच अंकुर वाढतो व फलद्रूप होतो. अशा प्रकारे फुलणारी, फळणारी, प्रसवणारी धरित्री स्त्रीला स्त्रीरूपिणीच वाटली असल्यास त्यात नवल नाही.

धरित्री म्हणजेच काळी–काली अर्थात जगदंबा होय. ग्रामदेवतेची सर्व रूपे तिचीच होत. धरित्री ही निर्माण करते, पसाभर पेरले तर पायलीभर देते, हे तिचे निर्माणसामर्थ्य; तसेच ती कोपली तर पिकावर रोग घालते, सगळ्यांची धूळधाण करते, प्रसंगी महामारीसारखे वाखे उत्पन्न करून मानवजातीचाही धुव्वा उडवते, हे तिचे संहारक सामर्थ्य. त्यामुळे ग्रामदेवतेची सौम्य व उग्र अशी दोन्ही प्रकारची रूपे निर्माण झाली.



हुलिअम्म



विसल मरी

काल आणि कर्म ही दोन तत्त्वे या देवतांच्या उत्पत्तीच्या मुळाशी असतात. त्यातच माणसाच्या बुद्धीची भर पडते आणि भिन्न देशात भिन्न नावांनी ग्रामदेवता निर्माण होतात व त्या ग्रामीण जनांना आराध्य ठरतात. पुढे त्यांतल्या काही देवताना ऊर्जित काळ येतो. त्या कुठल्यातरी पौराणिक किंवा तांत्रिक संप्रदायात प्रथम प्रवेश मिळवतात. तिथून व्रत–विधानात शिरतात. पुढे त्यांतल्या काही इष्टदेवता, कुलदेवता म्हणून उच्चवर्णीयांच्या देवघरातही जाऊन बसतात. उदा०—जेजुरीचा खंडोबा हा मूलतः द्राविड आदिवासींचा देव; पण आज तो ब्राह्मणादी अनेक जातींचे कुलदैवत बनला आहे. मदुरेच्या मीनाक्षीला ग्रामदेवता म्हणायला आज कोण धजेल? पण पुरातनकाळी ती मीनाचीअम्म या नावाची एक ग्रामदेवताच होती. तिचा पती सुंदरेश्वर हाही छोक्कलिंगम् नावाचा एक ग्रामदेवच होता. शैवांनी या दोघांना मूळ स्थितीतून वर आणले व मदुरेला भारतातले एक प्रमुख यात्रास्थान बनवले.

दक्षिणेतल्या कित्येक सुप्रसिद्ध शैव-वैष्णव मंदिरांत आदिवासी किंवा पूर्वास्पृश्य जातींना काही विशेष अधिकार असतात. याचा अर्थ असा होतो, की त्या क्षेत्रातल्या देवता या तिथल्या मूळ रहिवाश्यांच्या होत्या. पुढे उच्च वर्णीयांनी त्या त्यांच्यापासून हिरावून घेतल्या व त्या क्षेत्रात मूळ लोकांना नाममात्र अधिकार ठेवून त्या देवतांचे रूपांतर केले.

ग्रामदेवतांची स्थाने गावाबाहेर किंवा गावाच्या कोपऱ्यात कुठेतरी असतात. कुठे तिच्या नावाने एखादा चौथराच असतो. पण त्यावर मूर्ती असतेच असे नाही. कुठे ग्रामदेवतेची चिकण-

मातीची मूर्ती असते किंवा तिचे प्रतीक म्हणून पाषाणाचे एक किंवा अनेक स्तंभ उभे केलेले असतात. कधी तिच्या नावाने एखाद्या दगडी फरशीवर स्त्रीची ओबडधोबड मूर्ती कोरलेली असते. कुठे पितळेचे किंवा मातीचे भांडे पाण्याने भरतात व त्यात कडुलिंबाच्या फांद्या खोचतात आणि तेच ग्रामदेवतेचे प्रतीक मानतात. कधी सात भगिनीं (सप्तमातृका) साठी सात पितळेची भांडी एकावर एक रचून ठेवतात व वरच्या भांड्यात कडुलिंबाचे टाळे खोचतात. ग्रामदेवता क्वचित एखाद्या वृक्षातळी असते, क्वचित तिची दगडी घुमटी असते तर क्वचित तिच्यावर डहाळ्यांचा लहानसा मांडव असतो. कुठेकुठे तिच्या भोवती दगडांचा गडगा रचून तिचे स्थान मर्यादित करतात. पुष्कळदा तिच्या मूर्ती केवळ उत्सवापुरत्याच बनवतात. हे काम गावातल्या कुंभाराकडे असते.



ग्रामदेवतेची घुमटी

ग्रामदेवतांचे पुजारी सामान्यतः शूद्र असतात. कोण्या प्राचीन काळी या देवतांचे पुजारीपण बायकांच्याकडे असावे. अजूनही त्याचे अवशेष कुठे कुठे दिसतात. बऱ्याच ठिकाणी ग्रामदेवतेची पूजा-बलिदानादी कृत्ये करताना पुरुष पुजारी आपल्या कमरेभोवती लुगडे वेढतो. ही त्या प्राचीन स्त्रीपौरोहित्याची साक्ष असावी. ग्रामदेवतांच्या उपासनेत कोणत्याही नैतिक तत्त्वाचे अधिष्ठान नसते किंवा कसलेही आध्यात्मिक किंवा पारलौकिक उद्दिष्ट नसते. ग्रामदेवतेची उपासना ही भक्तीतून निघालेली नसून भयातून उगम पावलेली आहे. ग्रामदेवतेचा कोप भयानक असतो व त्यामुळेच देवी, तापसरी, महामारी, इ. जीवघेणे रोग उत्पन्न होतात, अशी ग्रामवासी जनांची धारणा असते. म्हणून तसले काही विघ्न गावावर येऊ नये, यासाठीच तिची पूजा किंवा वार्षिक जत्रा केली जाते. वार्षिक जत्रेत तिला कोंबडी, बकरी किंवा रेडा बळी देतात. करवीराची फुले, रुईची फुले, जास्वंदीची फुले, कडुलिंबाच्या डहाळ्या, ताडी, माडी,



ग्रामदेवतेला रेड्याचा बळी

मद्य, भांग, गांजा, तंबाकू, रक्ताने कालविलेला भात, हे ग्रामदेवतांचे आवडते पूजोपचार असतात. एका काळी कित्येक आदिवासी जमातींत ग्रामदेवतांना नरबळी देण्याचीही प्रथा होती. देवीपुढे माणसाचे मुंडके तोडून ते तिच्या मांडवाला टांगून ठेवीत. सांप्रत ग्रामदेवतांच्या मांडवाला नारळ टांगतात, ते पूर्वीच्या नररुंडांचे प्रतिनिधी समजावे, असे ग्रामदेवताप्रतिष्ठा या ग्रंथात म्हटले आहे.

उत्तर भारतातले बहुतेक ग्रामदेव मात्र पुरुष आहेत. राजालाखन, द्वारगुसाई, भूमिया, जठेरा, गनसाम, दातनदेव, राजाचंडोल, काशीबाबा, गंगानाथ, सेंदुबीर, अशी त्यांची नावे आहेत. या प्रत्येक देवाच्या मागे कथा आणि संकेत आहेत. बऱ्याच ठिकाणी दुष्ट दुर्जन मेल्यानंतर ग्रामदेव बनलेले दिसतात. ग्रामस्थ लोक त्यांचे पूजा-उत्सव करतात, ते त्यांनी गावाला त्रास देऊ नये म्हणून. पुरुष देवतांत दक्षिणेतल्या वेताळाचे स्थान बरेच वरचे आहे. वेताळ हा मुख्यत्वे महाराष्ट्र-कर्नाटकात आढळतो. तो सर्व भुतावळीचा नायक आहे. त्याच्या नावाने गावाच्या बाहेर दोन तीन हात उंचीचा एखादा दगड पुरलेला असतो. त्याच्या भोवती एक दगडी कुंपणही असते. वेताळाचाच द्राविड अवतार म्हणजे अय्यनार किंवा शास्ता होय. दक्षिणेत याचा विलक्षण दरारा आहे. याच्याही नावाचा प्रत्येक गावात एखादा दगड असतोच. उत्तर भारतात विजयसेन नावाचा जो ग्रामदेव आहे



भिल्लांचा ग्रामदेवं

त्याचे वेताळाशी साधर्म्य आहे. बहिरोबा किंवा भैरोबा हा महाराष्ट्रातला प्रमुख ग्रामदेव होय. बहुधा प्रत्येक गावी त्याचे देऊळ असते. कोकणात भैरोबाइतकाच रवळनाथाचाही मान असतो.

जिथे गाव तिथे ग्रामदेवता ही असतेच. ग्रामजनांचे तिच्या वाचून चालायचेच नाही. गावात साथ का येते, गुरेढोरे पटापट का मरतात, शेतातल्या पिकांवर कीड, तांबेरा, वाखा का पडतो या गोष्टींचे शास्त्रीय कारण त्यांना माहीत नसते. ते मानतात, की हा दैवी कोप आहे. आणि तो शमविण्यासाठी ग्रामदेवतेला शरण जाणे, हे एकच साधन त्यांच्या हाती असते. तेवढे ते करतात व तिच्यावर भरिभार ठेवतात.

सर्व ग्रामदैवते ही तामस असून, त्यांची उपासना केल्याने माणसेही तमोगुणी होतील आणि भुताखेतांचे पूजक अंती भूतयोनीलाच जातील, असा श्रीकृष्णाने व सकल संतानी जनांना धोक्याचा इशारा दिलेला आहे. तथापि ग्रामजनांनी ही दैवते वाजती गाजती ठेवली आहेत. या दैवतांचा त्यांच्या जगण्यामरण्याशीच संबंध असल्यामुळे ग्रामजनांना ती सोडता येत नाहीत. [गा. दै.; रि. इं.; व्हि. गॉ. सा. इं.]

ग्रामपंचायत गावाचा कारभार पाहणारी लोकायत्त संस्था. ही संस्था पुरातन कालापासून भारतात प्रचलित आहे. आर्यांत ग्रामपंचायत होती, तशीच द्रविडांतही होती.

भारतातील ग्रामीण जनता पुरातन काळापासून सुसंघटित असल्याचे दिसते. गावातील पंचायतीमार्फत ती आपले सर्व प्रश्न सोडवीत असे. गावावर पहारा बसवणे, गावाची सफाई करणे, रस्ते तयार करणे, त्यांवर पाणी शिंपडणे, औषधालये स्थापणे, गावातील मंदिरे, तलाव व जंगले यांची व्यवस्था ठेवणे, इ. कामे पंचायतीकडे असत. गावकऱ्यांच्या मनोरंजनासाठी संगीताचे कार्यक्रम व उत्सव घडवून आणणे हेही ग्रामपंचायतीचेच काम असे. ग्रामपंचायतीत लहान लहान उपसमित्याही असत. ग्रामपंचायतीत चौकीदार, पुरोहित, शिक्षक, ज्योतिषी, सुतार, लोहार, कुंभार, धोबी, न्हावी, वैद्य व पटवारी इतक्या लोकांचा समावेश असे.

ग्रामपंचायती म्हणजे स्थानिक स्वराज्येच होती. गावातील तंटे व भांडणे मिटविणे हे ग्रामपंचायतीचे सर्वात महत्त्वाचे कार्य होय. गंभीर अपराधांची प्रकरणे तिच्या अधिकार कक्षेत येत नव्हती. पण दिवाणी प्रकरणांत मात्र तिला पुष्कळ अधिकार राजाकडून मिळालेले होते. भूमिकर वसूल करण्याचा अधिकारही ग्रामपंचायतीकडे होता. एक स्थायी निधी स्थापन करून, ग्रामस्थांना अडीअडचणीला कर्जे देण्याची व्यवस्थाही पंचायती करीत असत. सांस्कृतिक, धार्मिक व साहित्यिक कार्यासाठीही ग्रामपंचायती मदत करीत.

या सर्व कार्यासाठी ग्रामपंचायतींना केंद्र सरकारकडून आर्थिक मदत मिळत असे. स्वत: कर बसवण्याचा अधिकारही ग्रामपंचायतीकडे होता. याशिवाय उदार धनिकांकडून द्रव्यसाहाय्य मिळे ते निराळेच.

या लोकायत्त ग्रामसंस्था वेदकाळापासून पेशवाईअखेरपर्यंत जशाच्या तशा टिकून होत्या. भारतीय लोकशाहीची बीजे या ग्रामपंचायतीत दिसून येतात, असे म्हटले जाते. पण डॉ. पु. ग. सहस्रबुद्धे यांना हे म्हणणे मान्य नाही. त्यांच्या म्हणण्याचा आशय पुढीलप्रमाणे आहे –

लोकसत्ता ही मानवाच्या पृथगात्मतेतून व त्याच्या व्यक्तिमत्त्वातून निर्माण झालेली शासनपद्धती आहे. अहंकाराच्या या प्रबल स्फुरणातून फार मोठे सामर्थ्य निर्माण होत असते. पण अशा तऱ्हेचे सामर्थ्य ग्रामपंचायतींच्या हजारो वर्षांच्या संस्कारानेही ग्रामीण जनतेत मुळीच निर्माण झाले नव्हते. इ. स. च्या ११ व्या शतकापासून भारतावर मुसलमानांची आक्रमणे सुरू झाली. सबंध द. भारत पंधरा-वीस वर्षांत मुसलमानांनी पायतळी घातला. त्यांनी संपत्ती लुटून नेली, स्त्रिया भ्रष्ट केल्या, मंदिरे पाडली व मूर्तीही फोडल्या. पण या अन्यायाचा प्रतिकार करण्याचे सामर्थ्य ग्रामपंचायतींनी एकदाही प्रकट केले नाही. आपला देश व आपला धर्म यांच्या रक्षणासाठी आम्ही प्राणपणाने लढू ही वृत्ती ग्रामपंचायतीतून ग्रामीण जनतेत निर्माण झाली नव्हती, असेच म्हटले पाहिजे. पाहा – ग्रामणी, ग्रामसभा. [इं. इ.; मु. का. भा.; प्रा. भा. शा. प.; भा. लो.]

ग्रामयाजक गावातील सर्व जातीच्या लोकांचा पुरोहित. याला अब्राह्मण मानलेले असून, त्याला दिलेले दान निष्फल होते, असेही सांगितले आहे–

व्यर्थं तु पतिते दानं ब्राह्मणे तस्करे तथा ।
गुरौ चानृतिके पापे कृतघ्ने ग्रामयाजके ।।
(म. भा. वन. १९९.७)

अर्थ– पतित ब्राह्मण, चोर, पापी, असत्य भाषण करणारा गुरु, कृतघ्न व ग्रामयाजक, यांना दिलेले दान व्यर्थ होते.

गावातील ग्रामदेवतेची पूजा करण्याचा अधिकार याच्याकडे असतो. सांप्रत यालाच गुरव म्हणतात. [सु. वि. को.]

ग्रामसभा प्राचीनकाळापासून राज्याच्या शासनव्यवस्थेत ग्रामसभेला फार महत्त्वाचे स्थान आहे. पूर्वी नगरांची संख्या अगदी कमी असून, बहुतेक सर्व लोक ग्राम निवा-

सीच होते. दळणवळणाची साधनेही त्या काळी चांगली नव्हती. त्यामुळे प्रत्येक ग्रामाची वेगळी, स्वयंपूर्ण शासनव्यवस्था असे. ग्रामाच्या प्रमुखाला ग्रामणी हे नाव होते. तो ग्रामसभेच्या विचारान गावाचा कारभार चालवी. गावातील सर्व सद्गृहस्थ ग्रामसभेचे सदस्य असत. ग्रामसभेची कार्यकारी समिती म्हणजेच ग्रामपंचायत ही गावाचा कारभार पाहत असे. मध्यभारतात तिला पंचमंडली व बिहारमध्ये ग्रामजनपद म्हणत. या समितीत पाच समासद असल्यामुळे तिला ग्रामपंचायत हे नाव मिळाले.

ग्रामव्यवस्थेची सर्व जबाबदारी ग्रामसभा व ग्रामपंचायत यांच्यावर असे. केंद्रिय शासनाधिकारी ग्रामशासन–संस्थेवर नियंत्रण ठेवीत. पण ग्रामसभेला विस्तृत अधिकार दिलेले असत. ग्रामाचे रक्षण, राज्यकराची वसुली, स्वतःचे कर बसवणे, ग्रामस्थांची भांडणे मिटवणे, सार्वजनिक हिताच्या योजना हाती घेऊन त्या पार पाडणे, दुष्काळ व इतर संकटांचे निवारण करणे, पाठशाळा, अनाथालये, इ. स्थापन करणे, देवालयांच्या द्वारा विविध धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमांची व्यवस्था करणे, इ. कार्ये ग्रामसभेच्या कक्षेत होती. ग्रामस्थांची भौतिक, नैतिक, आर्थिक व धार्मिक उन्नती यांचे श्रेय प्रामुख्याने ग्रामसभेला होते. पाहा – ग्रामपंचायत. [प्रा. मा. शा. प.]

ग्रावा यज्ञात सोम कुटण्यासाठी वापरण्यात येणारा दगड. हे अनेक असतात. एक मोठा सपाट पाट्यासारखा व बाकीचे चार वरवंट्यासारखे खाली रुंद व वरती निमुळते होत गेलेले असतात.

ग्रासिया एक जात. हे लोक गुजरात व राजस्थान या प्रदेशात आहेत. हे स्वतःला राजपूत मानतात. यांच्याविषयी एक कथा आहे, ती अशी–

इ. स. च्या १४ व्या शतकाच्या उत्तरार्धात जालौरचा चौहान राजा कानडदेव हा तुर्कांकडून पराभूत झाला व डोंगरी प्रदेशात आश्रयाला गेला. तिथल्या भिल्लांना जिंकून तिथे त्याने आपले राज्य सुरू केले. पुढे त्याचा पुत्र ग्रास (तृण) खाऊन निर्वाह करू लागला, म्हणून त्याच्या वंशजांना ग्रासिया हे नाव मिळाले.

राजपुतांचा भिल्ल स्त्रियांशी संबंध येऊन जी प्रजा निर्माण झाली, तीच ही जात असावी. तिथल्या राजांकडून यांना थोडीशी जमीन ' ग्रास ' म्हणून (निर्वाहासाठी) मिळाली होती, त्यावरून त्यांना ग्रासिया हे नाव पडले असावे, असेही म्हणतात. हे लोक डोंगराच्या उतारावर झुम् पद्धतीने शेती करतात आणि तिथेच शेताच्या कडेला लहानसे कुडाचे घर बांधून त्यात राहतात. यांच्या घरावर गवताचे छप्पर असते. भिंतीला तांबडी माती फासून तीवर चुन्याने माणसांच्या व पशूंच्या आकृती काढलेल्या असतात. हे मातीच्या भांड्यांत अन्न शिजवतात आणि पळसाच्या पानावर जेवतात. यांचे मुख्य अन्न मका असून, त्याचे पीठ ताकात शिजवून हे खातात. सणासुदीला गहू किंवा मांस-मच्छर आणतात. आवश्यकतेनुसार रानातील कंदमुळेही खातात. यांच्यांत तंबाखूचे व दारूचे व्यसन पुष्कळ प्रमाणात आहे.

हे लोक उंच व मजबूत असतात. पुरुष नेहमी सशस्त्र असतात. धनुष्यबाण, सुरा, तलवार, बंदूक, यांपैकी काहीतरी प्रत्येकाजवळ असतेच. पुरुष हातापायांत चांदीची कडी व कर्णभूषणे घालतात; तर स्त्रिया अंगभर दागिने घासतात. त्यांना रंगीबेरंगी कपड्यांची फार हौस असते. डोक्यावर त्या ओढणी घेतात. तोंडावर व हातापायांवर गोंदवून घेण्याचीही त्यांना हौस असते. पुरुषांनाही गोंदण आवडते. या लोकांना स्नानाची व स्वच्छतेची आवड असते. अखत्रिज (अक्षय्य तृतीया) या दिवशी सर्व गावकरी मिळून रानात जातात व शिकार करतात.



ग्रासिया युवक

या जातीची २५–३० गोत्रे आहेत. त्यांना गोय म्हणतात. भिल्ल व राजपूत यांच्यांतील अनेक गोत्रे यांनी घेतली आहेत. या गोयांचे आपसात लग्नसंबंध होतात. यांची एकत्र कुटुंबे मोठी असतात व त्यांत स्त्रियांना पुरुषांच्या बरोबरीने स्थान असते. मात्र यांच्यांत मुलींना वारसा हक्क नसतो.

विवाहप्रथा – या लोकांत बालविवाह कधीच रूढ नव्हता.

सामान्यपणे मुलगा १८ ते २४ वर्षांचा आणि मुलगी १४ ते १८ वर्षांची झाली, की ते त्यांची लग्ने करतात. लग्नाचा विधी असा काहीच नसतो. मुलगा किंवा मुलगी स्वतःचा जोडीदार निवडून पति-पत्नी प्रमाणे राहू लागली, की त्यांचे लग्न झाले असे समजायचे. मुलाच्या बापाने वधू पित्याला देज देण्याची प्रथा आहे. कधी कधी आपली वधू पसंत केल्यावर ती रानात गुरे चारायला गेली असता मुलगा तिला स्पर्श करतो. नंतर वर किंवा त्याचे आईवडील मुलीच्या आईबापांना ही गोष्ट कळवतात. मग गावच्या पंचासमक्ष देणेघेणे निश्चित करून मुहूर्त ठरवतात. मग वरपिता वधूपित्याला बारा वासरे व वस्त्र देतो.



दागिन्यांनी सजलेली ग्रासिया युवती

अलिकडे मात्र यांच्यांत हिंदू पद्धतीने विवाह करण्याची प्रथा सुरू झाली आहे. वधू-वरांचे आईवडील प्रथम विचारपूस करून लग्न ठरवतात आणि वाङनिश्चय करतात. लग्नाच्यां वेळी एका मंडपात एक हिरवा बांबू व आंब्याची फांदी ठेवून जवळच एका दगडावर निखारे ठेवतात. मग त्यावर गूळ, गव्हाचे पीठ व तूप टाकून वधू-वर त्याला सात प्रदक्षिणा घालतात. या विधीला ब्राह्मणाची आवश्यकता नसते. दोघे एकत्र राहायला लागल्यानंतर एका वर्षाने किंवा मुले झाल्यानंतरही हा विधी केला तरी चालतो. एखाद्या विवाहित स्त्रीच्या पतीला द्रव्य देऊन तिच्याशी अन्य पुरुष लग्न करू शकतो. यांच्यांत घटस्फोट मान्य आहे.

सण व उत्सव – दसरा, दिवाळी, होळी, रक्षाबंधन, अखत्रिज व गणगौर हे यांचे मुख्य सण आहेत. होळीच्या दिवशी नाचाचा मोठा कार्यक्रम असतो. त्यात तरुण मुली डोक्यावर गव्हाची रोपे घेऊन नाचतात. पुरुष चंग नावाचे वाद्य वाजवीत जे नृत्य करतात, त्याला चंगनृत्य म्हणतात. या नृत्यात स्त्रिया भाग घेत नाहीत; तर पुरुषांच्या मागे राहून फक्त गाणी गातात. पुरुषांची गीते शृंगारमय असतात.

आजारी मनुष्य बरा झाला किंवा नवीन मूल जन्माला आले, की गणगौर हा सण साजरा करतात. फाल्गुन वद्य पंचमी ते चैत्र पौर्णिमा या कालावधीत तो चालतो. त्यासाठी शिव-पार्वतींच्या मूर्ती खास तयार करून त्यांची पूजा करतात. त्या वेळी नाचगाण्याला बहर येतो. त्यात वालर नावाचे स्त्री-पुरुषांचे सामुदायिक नृत्य असते. गेरनृत्यात फक्त पुरुष हाती छड्या घेऊन नाचतात.

सर्व सणांच्या प्रसंगी गावोगावी जत्रा भरतात. त्यांत स्त्री-पुरुष एकत्र नाचतात. ग्रासियांचे परंपरागत असे नृत्यप्रकार आहेत. यांचे नृत्य लयबद्ध असते. ढोल व बासरी यांची त्याला साथ असते. जत्रेत लहान लहान संवादाचे विनोदी कार्यक्रमही होतात.

ग्रासियांची भाषा भिल्ली भाषेसारखीच आहे. तीत मारवाडीचे थोडेसे मिश्रण झालेले आहे. या लोकांना गाण्यांची फार आवड असून, प्रत्येक धार्मिक व सामाजिक समारंभाला साजेशी गाणी त्यांच्या भाषेत रचलेली आहेत. जत्रेच्या वेळी होणाऱ्या स्त्री-पुरुषांच्या नृत्यातली गीते भक्तिपर असतात, तर होळीच्या सणाची गाणी अश्लील असतात.



ग्रासिया स्त्री – जत्रेसाठी सजताना

देवधर्म – हे लोक चामुंडा व भैरव यांचे उपासक आहेत.

शिवाय ते शिव, कालिका, गणपती, हनुमान, धर्मराज, इंद्र, शेषनाग, शीतलामाता, घोडादेव आणि भुमिया या देवांनाही भजतात. वैशाखी पौर्णिमेला चामुंडा देवीपुढे बकरा बळी देतात.

ग्रासिया लोकांचा भुताखेतांवर खूप विश्वास असून, ते त्यांचीही पूजा करतात. भुतांना वीर म्हणतात. वीरांच्या कोपामुळे असाध्य रोग होतात, अशी त्यांची समजूत आहे. वीराने एखाद्या मनुष्याला पछाडले, तर भोप (पुरोहित) त्या मनुष्याला बरा करू शकतो. या जातीचा सर्व कारभार जातपंचायत पाहते. पंचांना सर्व तंटे सोडवण्याचा अधिकार असतो.



होळीनृत्यातील नर्तिका

प्रसूतिप्रथा – ग्रासिया लोक मुलगा जन्माला आला, की पितळेची किंवा काशाची थाळी वाजवून आणि मुलगी जन्मली, की सूप वाजवून ती गोष्ट जाहीर करतात. मुलाच्या पहिल्या होळीच्या वेळी गावातील सर्व लोक ढोल वाजवीत त्याच्या घरी येतात. मग मुलाचे आईबाप दोन रुपये, तीन नारळ व एक शेर गूळ, देऊन त्यांचा सत्कार करतात. त्याच वेळी गावच्या कुंभाराला एक साफा व अन्य वस्त्रेही देतात.



मृताचे स्मारक

मर्तिकप्रथा – हे लोक प्रेत जाळतात; पण देवी किंवा कुष्ठरोग यामुळे मनुष्य मेला, तर त्याला पुरतात. भोप व भुव (चेटुक करणारा) यांनाही पुरतात. प्रेत स्मशानात नेण्यापूर्वी त्याला नवे कपडे घालतात आणि स्मशानात गेल्यावर त्याला स्नान घालून त्याच्या तोंडात चांदीचे नाणे ठेवतात. तिसऱ्या किंवा पाचव्या दिवशी पुरुष क्षौर करतात. बाराव्या दिवशी जे ज्ञातिभोजन घालतात, त्याला मेर म्हणतात. मेर झाल्याशिवाय मयताचे कुटुंब शुद्ध होत नाही व त्याच्या कुटुंबातील मुलांची लग्नेही होत नाहीत. एका वर्षानंतर मृताचे स्मारक म्हणून हातभर उंचीचा एक दगड उभा करून त्यावर सूर म्हणजे मनुष्याची आकृती कोरतात. यांच्यांत श्राद्ध करण्याची चाल नाही. [रा.जा.; लोककला. त्रै.; संयुक्तराजस्थान, डिसें. १९५७; दि ग्रासियाज]

ग्रैवेयकवासी देव

एक देवसमूह. सुदर्शन, सुप्रतिबद्ध, मनोरम, सर्वतोभद्र, सुविशाल, सुमनस, सौमनस्य, प्रीतीकर, आदित्य अशी त्यांची अन्यही नावे आहेत. [ह. वि. च.]

ग्वालियरी भाषा

इ. स. च्या ११ व्या शतकात ज्या अपभ्रंश भाषा प्रचलित होत्या, त्यांतून हिंदीचा आणि अन्य प्रादेशिक भाषांचा उगम झाला. १३ व्या शतकापर्यंत हिंदी भाषा अपभ्रंश भाषेच्या प्रभावातून मुक्त झाली नव्हती. नंतरच्या तीन शतकांतील हिंदी भाषा ही संस्कृतप्रचुरच राहिली व त्या भाषेत विपुल साहित्यही निर्माण झाले. याच हिंदी रूपाला 'ग्वालियरी भाषा' हे नाव मिळाले आहे. या भाषेचा प्रसार गुजरातेत, महाराष्ट्रात व द. भारतातही झाला होता. उत्तर भारताची तर ती काव्यभाषाच मानली गेली होती. पण ग्वाल्हेर हे तिचे केंद्रस्थान असल्यामुळे तिला हिंदीऐवजी ग्वालियरी हेच नाव मिळाले. ब्रजमंडल वा ब्रजभाषा ही नावे त्या वेळी प्रचलित नव्हती. १३ व्या शतकात व पुढेही काही शतके ग्वालियरी भाषेचा प्रदेश हा मध्यदेश म्हणून प्रसिद्ध होता आणि त्यात विकसित झालेल्या हिंदीला 'देशीभाषा', 'भाषा', 'मध्यदेशकी बोली', 'मध्यदेशीया' किंवा 'ग्वालियरी भाषा' अशी नावे होती. संस्कृत, प्राकृत, अपभ्रंश आणि नंतर अरबी व फारसी या भाषांतून अनेक शब्द या ग्वालियरी भाषेने घेतले. पुष्टिमार्गी अष्टछाप कवींनीही याच भाषेत काव्यरचना केली. विष्णुदास, मानसिंह, बैजू, तानसेन, रामदास, इ. कवींची पदे ग्वालियरी भाषेतच रचलेली आहेत.

प्रतीहार, परमार, चंदेल, बुंदेल, कछवाहा, चौहान, इ. राजवंशांची परंपरा ग्वाल्हेरच्या तोमर राजवंशाला लाभली होती. त्यामुळे तोमर राजांच्या काळात ग्वाल्हेर हे साहित्य, संगीत व कला यांचे सांस्कृतिक केंद्र बनले. आणि म्हणूनच त्या वेळच्या प्रचलित हिंदी भाषेला ग्वालियरी हे नाव मिळाले. नामादासाची भक्तमाला इ. स. १५८५ च्या सुमारास रचलेली आहे. ही रचना ग्वालियरी भाषेतलीच आहे. याच भाषेला पुढच्या काळात ब्रजभाषा म्हणू लागले. ब्रजभाषा हे नाव प्रादेशिक नसून सांप्रदायिक आहे, असे मानले जाते. ग्वालियरी भाषेत ब्रजवासी कृष्णाच्या भक्तीची काव्ये निर्माण होऊ लागल्यानंतर तिला ब्रजभाषा हे नाव मिळाले, असे म्हणतात. [म. दे. भा.]

ग्वाल्हेर मध्य प्रदेशातले एक मोठे शहर. याला लागूनच सुमारे ३०० फूट उंचीचा एक डोंगर असून, त्यावर एक प्राचीन दुर्ग आहे. साहित्यात व शिलालेखात गोपगिरी, गोपाद्री, गोपाचल इ. नावांनी या दुर्गाचा उल्लेख आढळतो. 'गोपाल' शब्दापासून 'ग्वाल' शब्द आला व त्यावरून ग्वालियर हे नाव रूढ झाले, असे म्हणतात. ग्वालियरलाच ग्वाल्हेर असे म्हणतात.

ही नगरी व हा दुर्ग केव्हा आणि कोणी निर्माण केला, ते माहीत नाही. मात्र त्यासंबंधी एक दंतकथा प्रचलित आहे, ती अशी–



ग्वाल्हेरचा किल्ला

या डोंगरापासून जवळच कुंतलपूर (कोतवाल) नावाचे एक नगर होते. तिथला राजा सूरजसेन याला कुष्ठरोग जडला होता. एकदा तो या डोंगरावर शिकारीला गेला असताना तहानेने व्याकुळ झाला. तिथे त्याला एक साधू भेटला. त्या साधूने राजाला एक तळे दाखवले. त्या तळ्याचे पाणी पिताच राजाचा कुष्ठरोग दूर झाला. राजाने मग त्या साधूची काहीतरी सेवा करण्याची इच्छा दर्शविली. त्यावर साधूने त्याला सांगितले, की 'हे तळे विस्तीर्ण कर.' राजाने तसे केले व त्याच्याजवळच एक दुर्गही बांधला. त्या साधूचे नाव होते ग्वालिप. त्याच्या स्मृतीसाठी राजाने दुर्गाला ग्वालियर हे नाव दिले. साधूने त्या तळ्याला सूरजकुंड असे नाव ठेवले. तो राजाला म्हणाला. 'जोपर्यंत इथल्या राजाचे वंशज आपल्या नावाच्या अंती पाल शब्द लावतील, तोपर्यंतच त्यांची सत्ता टिकेल.' ती त्याची भविष्यवाणी खरी ठरली. त्या वंशातील ८३ वा राजा तेजकरण याने आपल्या नावापुढे पाल शब्द लावला नाही, त्यामुळे तोच शेवटचा राजा ठरला.



जैन तीर्थंकरांच्या मूर्ती

इतिहास – इ. स. च्या ६ व्या शतकात इथे गुप्तांचे राज्य होते. पुढे हा दुर्ग मिहिरकुलाच्या ताब्यात गेला. त्याच्या वेळी निर्माण झालेले एक सूर्यमंदिर या डोंगरावर असून, तिथल्या शिलालेखात या दुर्गाचा उल्लेख आहे. दुर्गातील चतुर्भुज मंदिरावर इ. स. ८७५ व ८७६ सालातले दोन शिलालेख आहेत. त्या शिलालेखांवरून असे कळते, की तो दुर्ग प्रतीहार वंशातील राजा मिहिर भोज याच्या राज्यात होता. १० व्या शतकात तिथे चंदेल राजा वंग यांची सत्ता होती. इ. स. ९७७ च्या सुमारास कछवाहा वंशातील वज्रदामन नामक राजाने तो दुर्ग सर केला व तिथे आपले स्वतंत्र राज्य स्थापले. ते राज्य सुमारे दोन शतके चालू राहिले. त्या काळात कछवाहा राजांनी विद्या-कलांना खूप प्रोत्साहन दिले. ग्वाल्हेरच्या दुर्गावर असलेली अनेक मंदिरे त्याच काळात निर्माण झाली आहेत.

त्यानंतर काही काळ तिथे प्रतीहारांच्या दुसऱ्या शाखांचे राज्य झाले. पण इ. स. १२३२ साली इल्तुमिश याने हा दुर्ग जिंकून राजपुतांचा संहार केला. तेव्हापासून इ. स. १३९८ पर्यंत हा किल्ला मुसलमानांच्याच ताब्यात होता. त्या वर्षी तैमूरलंगाने दिल्लीवर स्वारी करून सुलतान महमूदाचा पराभव केला. त्यामुळे उत्तरेत फार गोंधळ माजला. त्या गोंधळाचा फायदा घेऊन तोमर वंशातील वीरसिंहदेव याने ग्वाल्हेरचा किल्ला जिंकला व तिथे आपले राज्य स्थापले. तोमर वंशाचे राज्य तिथे १००–१२५ वर्षे नांदले. त्या वंशातल्या डोंगरसिंहाची राजवट अत्यंत वैभवशाली झाली. ग्वाल्हेरच्या किल्ल्याच्या पहाडावर जैन तीर्थंकरांच्या ज्या विशाल मूर्ती खोदलेल्या आहेत, त्या याच काळातल्या होत. राजा मानसिंह (इ. स. १४८७–१५१६) हा या तोमर राजपूत वंशातला सर्वश्रेष्ठ राजा ठरला. त्याने आपल्या राज्याचे सामर्थ्य आणि वैभव कळसाला पोचवले. स्थापत्य, शिल्प आणि संगीत या कलांचा तो भोक्ता व पुरस्कर्ता होता. त्याच्या कारकिर्दीत या कला त्या राज्यात नावारूपाला चढल्या.

मानसिंहाच्या मृत्यूनंतर हा किल्ला इब्राहिम लोदीच्या व त्यानंतर मोगलांच्या ताब्यात गेला. त्या काळात तिथल्या मंदिरांचा व मूर्तींचा बराच नाश झाला. हुमायून परागंदा झाला, तेव्हा शेरशहा सूर याने हा किल्ला जिंकून घेतला होता. नंतर इ. स. १५५९ मध्ये तो अकबराने घेतला व तेव्हापासून सुमारे दोनशे वर्षे त्यावर मोगलांची सत्ता राहिली. त्या काळात या दुर्गाचा उपयोग मुख्यतः बंदिखाना म्हणूनच केला गेला. तिथे अनेक राजपुत्रांनी बंदिवास भोगला आहे. औरंगजेबाचा भाऊ मुराद बक्ष इथेच बंदिवासात मरण पावला. शिखांचा गुरू तेजबहादुर यालाही इथेच कैदेत ठेवले होते; पण तो तिथून निसटला.

इ. स. १७५४ साली मराठ्यांनी हा किल्ला जिंकला आणि १७७७ मध्ये पेशव्यांनी तो महादजी शिंदे याच्या ताब्यात दिला. इ. स. १७८० मध्ये मेजर पोफम याने हा किल्ला जिंकून तो गोहदचा राजा छत्रपतिसिंह याच्या हवाली केला. पण दोन वर्षांनी तो पुनश्च शिंद्यांनी जिंकून आपल्या अधिकारात आणला. इ. स. १८५७ साली हा किल्ला भारतीय क्रांतिवीरांनी हस्तगत केला होता. पण १८५८ मध्ये तो इंग्रजांनी परत घेतला. त्याच वेळी झाशीची राणी लक्ष्मीबाई तिथे लढाईत मरण पावली. इ. स. १८८६ साली ब्रिटिश सरकारने हा किल्ला शिंद्यांना दिला.

थोरले बाजीराव पेशवे यांचा हुजऱ्या राणोजी शिंदे याने स्वपराक्रमाने माळव्यात राज्य स्थापले. महादजीने त्याचा विस्तार केला. इ. स. १८१० मध्ये ग्वाल्हेर ही त्याची राज-धानी झाली. इ. स. च्या १९ व्या शतकाच्या उत्तरार्धात शिंदे घराण्यातील जे राजे गादीवर आले, त्यांनी या संस्थानाची खू प्रगती केली. इ. स. १९३६ मध्ये लोकांना तिथल्या राजसत्ते अधिकार मिळाले. हे एक प्रगतिशील संस्थान होते. ते पुढे स्वखुशीने भारतीय संघराज्यात विलीन झाले. त्याचा विस्तार चंबळपासून विदिशेपर्यंत आणि झाशीपासून राजस्थानपर्यंत होता.



हत्तीदरवाजा

शिल्प – ग्वाल्हेरचा किल्ला अत्यंत मजबूत म्हणून प्रसि आहे. त्याच्यावर जाण्याचे दोन मार्ग आहेत. पूर्वेकडील मा सात दरवाजे होते, त्यांतले आता पाच उरले आहेत. ह दरवाजा हा सर्वांत वरचा व मुख्य दरवाजा होय. किल्ल्या पश्चिमेकडील रस्त्याला दोनच दरवाजे आहेत.



मानमंदिर

या किल्ल्यावर सहा राजवाडे आहेत. त्यांतला मानसिंहाच प्रासाद (मानमंदिर) सर्वांत सुंदर आहे. त्यावर सहा सुंदर घुमट आणि तीन सुरेख मिनार असून, त्याच्या भिंतींवर मनोहर रंगीत पाषाणचित्रे आहेत. दुसरा महत्त्वाचा प्रासाद गुजरीमहाल हा होय. मानसिंहाची प्रियतम राणी मृगनयना हिच्यासाठी हा महाल बांधला गेला. मृगनयना ही गुजर जातीची असून अत्यंत रूपवती आणि बलवती होती. तिच्या इच्छेवरून राजाने तिच्या राई या गावातले पाणी नळाने गुजरीमहालात नेण्याची व्यवस्था केली होती.


गुजरीमहाल

या दुर्गावर अनेक मंदिरे आहेत. त्यांतील ग्वालियामंदिर, चतुर्भुजमंदिर, सासबहूंची दोन मंदिरे, मातादेवीचे मंदिर, जैनमंदिर व तेलीका मंदिर ही विशेष प्रेक्षणीय आहेत. ग्वालियामंदिर हे ग्वालिप साधूचे स्मारक आहे. चतुर्भुजमंदिर हे इ. स. च्या ९ व्या शतकातले असून, पाषाणात खोदलेले आहे. त्यात चतुर्भुज विष्णूची मूर्ती आहे. सास-बहूचे मंदिर शिल्पकलेच्या दृष्टीने अप्रतिम आहे. तिथल्या एका शिलालेखावरून कळते, की हे मंदिर कछवाहा राजा महीपालयाने इ. स. १०९३ साली बांधले. हे विष्णूचे मंदिर असून, त्याच्या प्रवेशद्वारावर ब्रह्म-विष्णू-महेश यांच्या मूर्ती आहेत. या मंदिरावर अनेक देवतांच्या मूर्ती आणि सुंदर नक्षी कोरलेली आहे. हे स्थापत्य राजपूत शैलीचे आहे.


सासबहूमंदिर


तेली का मंदिर

तेली का मंदिर गंगोला तलावाच्या पश्चिमेस आहे. किल्ल्यावरील वास्तूंमध्ये हे मंदिर सर्वांत उंच आहे. हे इ. स. च्या ९ व्या शतकात बांधले गेले. हे विष्णुमंदिर असून, याचे शिखर द्रविड शैलीचे आहे. इतर शिल्पकाम इंडो–आर्यन शैलीचे दिसते. या मंदिराचे मूळ नाव तेलंगणमंदिर असावे. यातील नक्षीकाम व कलाकुसर सास–बहूच्या मंदिरातील नक्षीकामापेक्षा उच्च श्रेणीची वाटते.


सूर्यमंदिर

सूर्यकुंडाच्या पश्चिमेला एक शिवाचे व एक सूर्याचे अशी दोन आधुनिक मंदिरे आहेत. एका शिलालेखावरून कळते, की

प्रस्तुत सूर्यमंदिराच्या जागी एक जुने सूर्यमंदिर होते आणि त्यावरूनच त्या तळ्याला सूर्यकुंड हे नाव मिळाले. या दुर्गावर अनेक तलाव आणि विहिरी आहेत. दुर्गाच्या दर्शनी पहाडावर अनेक मूर्ती खोदलेल्या आहेत. त्यांतील जैन तीर्थंकरांच्या मूर्ती प्रचंड असून, त्यांवरचे कोरीव कामही सुंदर आहे. उरवाही दरीतील आदिनाथाची मूर्ती सुमारे ५७ फूट उंच आहे.

सांस्कृतिक महत्त्व – सम्राट हर्षाची राजधानी कनोज येथे असली, तरी ग्वाल्हेर हे त्याच्या साम्राज्यातील एक मोठे सांस्कृतिक केंद्र होते. चंदेलांच्या राज्यात कालंजर व ग्वाल्हेर ही दोन ठिकाणे विशेष प्रसिद्ध होती. कालंजरला राजकीय महत्त्व होते, तर ग्वाल्हेर हे संगीत व काव्य यांच्यासाठी प्रख्यात होते. इ. स. च्या १५ व्या शतकात तोमर वंशाच्या राजवटीत ग्वाल्हेर हे साहित्य, संगीत व शिल्पादी कलांचे केंद्र बनले. तानसेन या प्रख्यात गायकामुळेही ग्वाल्हेर नगराच्या कीर्तीत भर पडली. ग्वाल्हेर शहरात त्याची समाधी आहे. [म. ज्ञा. को.; वि. स्मृ. ग्रं.; म. ज. अ. ग्रं.; इलस्. वीकली, ६ मार्च १९६०; म. दे. मा.]

घंटा एक वाद्य. घंटा म्हणजे काशाचा किंवा पितळचा एक ओतीव पेला असून त्याला वरच्या बाजूला हातात धरण्यासाठी किंवा टांगण्यासाठी एक कडी असते. पेल्याच्या मध्यभागी भोक पाडून त्यात दोरीने किंवा तारेने धातूची लोळी दसविलेली असते. ही लोळी पेल्यावर आपटली की, त्यातून नाद निघतो. कांस्यताल, ताल, घटिका, जयघंटिका, क्षुद्रघंट व क्रम असे घंटेचे भेद आहेत. या सर्व घंटांचा देवमंदिरात उपयोग करतात.

देवालयाच्या पुढच्या भागात एक किंवा अनेक घंटा टांगलेल्या असतात. देवदर्शनाला येणाऱ्या प्रत्येक माणसाने देवळात प्रवेश करताना त्या घंटेचा नाद करून देवाला आपल्या आगमनाची वर्दी द्यायची असते. त्या वेळी म्हणायचा मंत्र असा–

आगमार्थं तु देवानां गमनार्थं तु रक्षसाम् ।
कुरु घण्टे रवं तत्र देवताह्वानलक्षणम् ॥

अर्थ– हे घंटे, देवांच्या आगमनासाठी आणि राक्षसांच्या पलायनासाठी तू देवतांना बोलावणारा असा तुझा नाद कर.

देवपूजेतही प्रारंभी घंटेची पूजा करून पूजेमध्ये काही उपचारांच्या वेळी घंटेचा नाद करायचा असतो. यासंबंधीचा श्लोक असा–

पञ्चलोहमयी घण्टा रुद्रस्याल्हादकारिणी ।
स्नाने धूपे च दीपे च घण्टादेर्नादमाचरेत् ॥

(आह्निकसार)

अर्थ– पंचलोहांची घंटा रुद्राला प्रिय असून अभिषेक, धूप, दीप व नीरांजन करताना घंटानाद करावा.



देवालयातली घंटा

घंटा ही कित्येक देवतांचे आयुधही असते. जेव्हा घंटेवर वज्र असते, तेव्हा तिला वज्रघंटा असे म्हणतात. वज्रघंटा हे भौतिक व आध्यात्मिक विश्वांच्या एकतेचे प्रतीक मानतात. शाक्त पंथात वज्र हे पुरुष तत्त्वाचे व घंटा हे स्त्रीतत्त्वाचे चिन्ह मानले जाते.



वज्रघंटा

ज्या घंटेवर स्तूपाची आकृती बनवलेली असते, तिला स्तूपघंटा म्हणतात. बौद्ध मूर्तिकलेत अशा घंटेचा आढळ होतो.

स्कंद पुराणातल्या ब्रह्म-नारदसंवादात घंटेचे माहात्म्य सांगितले आहे, ते असे–

स्नानार्चनक्रियाकाले घण्टानादं करोति यः।
पुरतो वासुदेवस्य तस्य पुण्यफलं शृणु ॥
वर्षकोटिसहस्राणि वर्षकोटिशतानि च।
वसते देवलोके तु अप्सरोगणसेवितः ॥

अर्थ – कृष्णाच्या अभिषेकाच्या व पूजेच्या वेळी जो घंटा वाजवितो, त्याचे पुण्यफल ऐक. तो सहस्रकोटी व शतकोटी वर्षे अप्सरागणांनी सेवित असा देवलोकात वास करतो.

काही वेळा घंटेवर गरुड, हनुमान, चक्र किंवा सर्प यांची आकृती असते. गरुडाकृतियुक्त घंटा जिथे असेल, तिथे सा अग्नी व वीज यांचे भय राहत नाही, असे मानतात. गरुडघं

विष्णूला प्रिय असल्याचे सांगितले आहे (हरिभक्ति विलास ६). घंटानाद हा सर्व देवतांना प्रसन्न करतो आणि असुरादिकांना पळवून लावतो, अशीही समजूत आहे.

देवालयांप्रमाणे ख्रिस्त्यांच्या चर्चवरही घंटा असतात. फार मोठ्या घंटा पोर्तुगीजांनी प्रथम भारतात आणल्या. मराठ्यांनी पोर्तुगीजांच्या ताब्यातली वसई वगैरे ठाणी घेतली, तेव्हा त्यांना त्यांच्या काही घंटाही मिळाल्या. त्यांपैकी काही घंटा अद्यापि हिंदूंच्या देवळात टांगलेल्या दिसतात. नाशिकच्या रामेश्वर मंदिरातील नारोशंकरी घंटा व भीमाशंकर येथील मंदिरापुढची घंटा या त्यांपैकीच होत.

रावातंत्रात घंटेला नादोत्पत्ती असे म्हटलेआहे–



स्तूप घंटा

या घण्टा चञ्चलापाङ्गि सिद्धिसूत्रस्वरूपिणी ।
नित्या श्रीकमलाबीजरूपिणी सिद्धिदायिनी ।।

अर्थ– हे सुंदरी, जी घंटा आहे, ती सिद्धिसूत्रस्वरूप आहे. ती नित्य आहे. तीच श्री आहे, कमला आहे, सिद्धी देणारी आहे आणि (सर्व मंत्र व सृष्टी यांचे) बीज आहे.

पृथ्वी व आकाश यांच्या मधल्या अंतराळाचे घंटा हे प्रतीक मानलेले आहे. घंटानादाने सर्जनाचे सामर्थ्य ध्वनित केले जाते. [श. क.; सु. वि. को.; डि. सा. इं. म्यु. म्यु.; भा. प्र. वि.; डि. सि.]

घंटाकर्ण एक शैव गण. याची कथा अशी– शापप्रभावाने हा मनुष्ययोनीत जन्मला. याने विक्रम राजाच्या दरबारातील पंडितांना जिकण्यासाठी शिवाची आराधना केली. शिव प्रसन्न होऊन म्हणाला, की 'तू सर्वांना जिंकशील, पण कालिदासाला जिंकू शकणार नाहीस.' तो शिवावर रुष्ट झाला व त्याने शिवाचे नाव न घेण्याची प्रतिज्ञा केली. पुढे याने कालिदासाला वादाचे आव्हान दिले. त्यावर कालिदास म्हणाला, की 'तू शिवाचे एक स्तोत्र रचशील, तर मी माझा पराभव मान्य करीन.' घंटाकर्णाने तसे एक स्तोत्र रचले; पण त्यात शिवाचे नाव मात्र घातले नाही. पण तेवढ्यानेच कालिदासाने आपला पराभव मान्य केला. मग शिवाने प्रसन्न होऊन घंटाकर्णाला आपल्या परिवारात स्थान दिले.

याच्या कथेचा दुसरा पर्याय हरिवंशात दिलेला आहे, तो असा– हा शिवभक्त व विष्णुद्वेष्टा होता. विष्णूचे नाव आपल्या कानावर पडू नये, म्हणून याने आपल्या कानात घंटा अडकवली होती. यामुळेच त्याला लोक घंटाकर्ण म्हणू लागले.

वंगालमध्ये घंटाकर्ण हा देव बनला आहे. रोगराई व साथी येऊ नयेत, म्हणून या देवाची तिथे पूजा करतात. त्याचा पूजाविधी असा––

काजळाने काळे केलेले एक मडके घेतात. त्यावर गोमयाचा लेप देतात. त्या लेपावर काही कवड्या बसवतात. नंतर त्या मडक्याची घंटाकर्ण म्हणून पूजा करतात. पूजा करताना पुढील मंत्र म्हणतात—

घण्टाकर्ण महावीर सर्वव्याधिविनाशन ।
विस्फोटकभये प्राप्ते रक्ष रक्ष महाबल ।।

अर्थ – हे घंटाकर्णा, महावीरा आणि सर्व व्याधींचा नाश करण्यास समर्थ अशा बलसंपन्न देवा, स्फोटक (फोड्या, देवी) रोगाचे भय प्राप्त झाले असता तू आमचे रक्षण कर.

या पूजेसाठी ब्राह्मणाची आवश्यकता नसते. घरातील वृद्ध स्त्रीच ही पूजा सांगते. पूजा संपल्यानंतर काही मुले काठीने ते मडके फोडून टाकतात. घंटाकर्णाच्या पूजेसाठी लागणारे साहित्य भिक्षा मागून जमवायचे असते. [फो. लो. नॉ. इं.; हिं. क. को.; क. ले. गॉ. ओ.]

घंटाकर्ण शिवाचार्य वीरशैवांचा एक आचार्य. महर्षी व्यासांनी याच्याकडून दीक्षा घेऊन व्यासेश्वर नामक शिवलिंग स्थापले, असे वीरशैव मानतात. याने गौतमेंद्र राजाला मोक्ष दिला व अखेर रामनाथलिंगात स्वतःला विलीन केले. [वी. शै. र.]

घंटातरंग एक वाद्य. व्रजमंडलात हे वरातीच्या वेळी वाजवतात. यात एक उंच खांब उभा केलेला असून त्याला काही आडव्या पट्ट्या लावलेल्या असतात. दोन पट्ट्यांच्या मधे एक घंटा किंवा थाळी बांधलेली असते. प्रत्येक बाजूला पाच पाच घंटा असतात. हे वाद्य दोन मोगऱ्यांच्या साह्याने एकदम वाजवतात. [कृ. जी. व्र. श.]

घंटापाणी एक बोधिसत्त्व. वज्रसत्त्व या सहाव्या ध्यानीबुद्धाचा पुत्र. याचा वर्ण गौर असून घंटा हे याचे अभिज्ञानचिन्ह आहे. [इं. बु. इ.]

घंटेश्वर एक देव. हा घंटाकर्ण इत्यादी शैव गणांचा स्वामी. आहे. याच्या विषयी काही माहिती ब्रह्मवैवर्त पुरा-

णातील. एका श्लोकात आढळते, तो श्लोक असा—

मङ्गलस्य प्रिया मेधा तस्यां घण्टेश्वरो महान् ।
व्रणदाता च तेजस्वी विष्णुतुल्यो बभूव ह ॥

अर्थ – मंगलनामक पुरुषाची प्रिय भार्या मेधा. तिच्या ठिकाणी घंटेश्वर नामक महान पुत्र उत्पन्न झाला. तो व्रण उत्पन्न करणारा, तेजस्वी व विष्णुतुल्य असा बनला.



घंटातरंग



घ· च्या रूपाचा विकासक्रम

घ एक वर्ण. आजच्या स्थितीतील घ वर्ण मुख्य पाच अवस्थांतून गेलेला आहे. पहिली अवस्था अशोकाच्या गिरनार येथील सनपूर्व तिसऱ्या शतकातील लेखात आढळते. दुसरी अवस्था इ. स. च्या दुसऱ्या शतकातील क्षत्रप राजा रुद्रदामन याच्या गिरनार येथील लेखात, तिसरी इ. स. ८३७ मधल्या प्रतीहार वाडलच्या जोधपूर येथील लेखात, चवथी इ. स. च्या ११ व्या शतकातील परमार राजा उदयादित्य याच्या उदेपूर येथील लेखात व पाचवी त्याच शतकातील उज्जयिनीच्या शिलालेखात दृष्टीस पडते. दुसऱ्या अवस्थेतील घ मोडी प च्या सारखा दिसतो. या घ ला शेवटच्या अवस्थेला पोचण्यास उजवीकडून डावीकडे थोडे वर्तुळाकार फिरावे लागले व या काळात त्याला काना फुटत चालला, असे अनुमान निघते. आजचा घ इ. स. १२०८ मधील परमार राजा धारावर्ष याच्या वेळच्या ओडिया लेखात स्पष्ट ओळखू येतो. कामधेनुतंत्रात याचे स्वरूप सांगितले आहे, ते असे—

घकारं चञ्चलापाङ्गि चतुष्कोणात्मकं सदा ।
पञ्चदेवमयं वर्णमरुणादित्यसन्निभम् ॥

अर्थ – हे चंचलनयने, घकार हा चतुष्कोणात्मक असून पंचदेवमय आहे. अरुण आणि आदित्य यांच्याप्रमाणे याची कांती आहे.

याचे ध्यान स्त्रीरूपात पुढीलप्रमाणे सांगितले आहे–

मालतीपुष्पवर्णाभां षड्भुजां रक्तलोचनाम् ।
शुक्लाम्बरपरीधानां शुक्लमाल्यविभूषिताम् ॥
सदा स्मेरमुखीं रम्यां लोचनत्रयराजिताम् ।
एवं ध्यात्वा घकारं तु तन्मन्त्रं दशधा जपेत् ॥

अर्थ – मालतीपुष्पाप्रमाणे वर्ण असलेल्या, षड्भुज, रक्तलोचन, श्वेत वस्त्रे परिधान केलेल्या, पांढऱ्या फुलांची माळा गळयात घातलेल्या, नेहमी हसतमुख, सुंदर, त्रिनेत्रांनी विराजित, अशा घकाराचे ध्यान करून त्याचा मंत्र दहा वेळा जपावा.

कंठ हे याचे उच्चारणस्थान आहे. [श. क.; म. ज्ञा. को.]

घटकर्पर विक्रमादित्याच्या दरबारातील नवरत्नांपैकी एक कवी. याचे घटकर्पर या नावाचेच एक काव्य असून, त्यावर अभिनवगुप्त, चतुर्भुजपुत्र कमलाकर, घनश्यामपुत्र कुशलकवी, गोवर्धन, ताराचंद्र, विंध्येश्वरीप्रसाद, वैद्यनाथ इत्यादींच्या टीका आहेत. हे काव्य केवळ २२ श्लोकांचे व यमकबद्ध असून, त्यात एक विरहिणी वर्षाऋतूच्या आरंभी आपल्या प्रियकराला संदेश पाठवीत असल्याचे वर्णन आहे. प्रस्तुत काव्याचे जर्मन भाषेत भाषांतर झाले आहे. [म. ज्ञा. को.]

घटम् द. भारतातील एक उपतालवाद्य. हे फार प्राचीन वाद्य आहे. मातीत लोखंडाचे कण मिसळून त्याचा बनवलेला हा एक घडाच असतो. याचे तोंड बारीक असून, ते

चामड्याने मढवलेले असते. घटम्‌ची स्वरपट्टी (Pitch) ते बनवीत असतानाच ठरवितात. द. भारतातील पनरुती आणि मानमदुरै या ठिकाणी ही वाद्ये विशेष चांगली तयार होतात.

हे वाद्य दोन्ही हातांचे तळवे, मनगटे, दहा बोटे व नखे यांच्या साहाय्याने वाजवतात. [डि. सा. इं. म्यु. म्यु.]

घटस्फोट

(१) विवाहविच्छेद. हिंदुधर्मशास्त्रात विवाह हा एक संस्कार असून, त्या संस्काराने निर्माण झालेले पति-पत्नींचे नाते यावज्जीव टिकणारे असल्याचे मानले आहे. त्यामुळे मध्ययुगात जे धर्मशास्त्राचे ग्रंथ निर्माण झाले, त्यांनी विवाहविच्छेदाला मान्यता दिलेली नाही. वेदकालापासून पुरुषाला एक पत्नी जिवंत असताना दुसऱ्या स्त्रीशी विवाह करता येत असे. पण त्यामुळे त्याचा पहिला विवाह मोडत नसे किंवा त्या पूर्वपत्नीला दुसरे लग्नही करता येत नसे. पतीने पत्नीचा त्याग केला, तरी ती पुन्हा लग्न करू शकत नसे.

मात्र सनपूर्व काळात धर्मशास्त्राने काही विशिष्ट परिस्थितीत घटस्फोट व पुनर्विवाह करायला परवानगी दिली होती, असे दिसते. त्या काळात हिंदू समाजाच्या सर्व वर्गांत मधून मधून घटस्फोट व पुनर्विवाह होत असत. ब्राह्मण स्त्रीचा पती प्रवासाला जाऊन परत आला नाही, तर तिने पाच वर्षेपर्यंत त्याची वाट पाहावी आणि मग तो मृत झाला असे मानून दुसरे लग्न करावे, हे त्या वेळी शास्त्र संमत होते. कौटिल्याने ही मुदत कमी करून ती फक्त दहा मासांची सांगितली आहे. मात्र असा पुनर्विवाह करण्यापूर्वी त्या स्त्रीने धर्माधिकाऱ्यांची अनुमती घेणे आवश्यक आहे, असे तो म्हणतो. त्याच्या अर्थशास्त्रात विवाहविच्छेदासंबंधी सविस्तर विवेचन आले आहे. त्याने त्याविषयी काही नियमही सांगितले आहेत. मात्र ते आसुर, गांधर्व व पैशाच या पद्धतीच्या विवाहांनाच लागू होतात. विवाहाचे वरील प्रकार खालच्या वर्णांत विशेष प्रचलित असले, तरी ब्राह्मण व क्षत्रिय वर्णांत ते नव्हतेच, असे मात्र नाही. त्यामुळे उच्च वर्णांच्या लोकांतही घटस्फोट रूढ असावा, असे अनुमान करता येते.

इतर कोणीही न सांगितलेले असे घटस्फोटाचे एक कारण कौटिल्याने सांगितले आहे, ते असे –

अमोक्ष्या भर्तुरकामस्य द्विषती भार्या ।
भार्यायाश्च भर्ता । परस्परं द्वेषान्मोक्षः ।
अमोक्षो धर्मविवाहानाम् ।

अर्थ – पत्नीच केवळ पतीचा द्वेष करील, तर त्याच्या इच्छेविरुद्ध तिला पतीपासून विवाहविच्छेद मिळू नये. तसेच स्त्रीच्या इच्छेविरुद्ध पतीलाही तो मिळू नये. पती व पत्नी परस्परांचा द्वेष करीत असतील, तर त्यांनी घटस्फोट घ्यावा. पण ज्यांचा विवाह धार्मिक पद्धतीने झाला आहे, त्यांना घटस्फोट घेता येत नाही.

याच्यापुढे कौटिल्य म्हणतो, की स्त्रीपासून भय प्राप्त होईल, म्हणून जर पती सोडचिठी मागेल, तर त्याच्यापासून स्त्रीला जे काही स्त्रीधन मिळाले असेल, ते तिला मिळावे. उलट पुरुषापासून संकट येईल, या भीतीने स्त्री त्याला सोडू पाहील, तर मात्र तिचे स्त्रीधन तिला मिळू नये.

प्राचीन काळी झालेल्या घटस्फोटांची उदाहरणे वैदिक वाङ्मयात आढळत नाहीत. पण बौद्ध साहित्यात तसे काही उल्लेख सापडतात. त्यावरून असे कळते, की उच्च वर्णांत घटस्फोट फारसा प्रचलित नव्हता.

सनपूर्व ५ व्या शतकात भारतात जी वैराग्यवृत्ती मान्यता पावली, ती इ. स. च्या चौथ्या-पाचव्या शतकात स्थिर झाली. त्यामुळे विवाहबंधन तोडून स्त्रीने दुसरा पती वरणे, हे विषयलंपटतेचे निदर्शक ठरले. म्हणून त्या काळात घटस्फोटाचा तीव्र निषेध केला गेला. पती आपल्या पत्नीशी निर्दयपणे वागत असला किंवा तो वेडा झाला असला, तरीही तिला त्याच्यापासून घटस्फोट मिळेनासा झाला. कनिष्ठ मानलेल्या जातिजमातींत मात्र घटस्फोटाची चाल सर्रास चालू राहिली. इ. स. च्या १७ व्या शतकात लिहिलेल्या शूद्रकमलाकर नामक ग्रंथात शूद्रांना घटस्फोटाची परवानगी दिली आहे.

भारतातील खेडोपाडी वसलेल्या अनेक जातींचा कारभार त्यांच्या त्यांच्या पंचायतीकडे असे. त्या पंचायतींना धार्मिक व सामाजिक बाबतीत निर्णय करण्याचाही अधिकार होता. त्यांला अनुसरून जातीच्या रूढीप्रमाणे जातपंचायतीकडून काडीमोड करून घेण्याची चाल अनेक प्रांतांत होती व आहे. अशा प्रकारे काडीमोड मिळविणे कनिष्ठ जातींच्या लोकांना फारसे कठिण पडत नाही. पंचांच्या समक्ष गवताची काडी मोडणे एवढाच विधी त्यासाठी करावा लागतो. त्यावरूनच काडीमोड हे नाव रूढ झाले आहे. ग्रामपंचायतीचा हा अधिकार मुंबईच्या वरिष्ठ न्यायालयाने प्रथम मान्य केला होता. हिंदू कायद्यात अनेक जुन्या रूढींना मान्यता दिलेली होती. पतीने स्त्रीचा त्याग केल्यामुळे तिने दुसरे लग्न केले, तर ते कायदेशीर ठरत असे. व्यभिचारामुळे घटस्फोट देणे योग्य मानले जात असे. पण क्षुल्लक कारणांवरून जात-पंचायतीने दिलेली काडीमोड मात्र कायदेशीर ठरत नसे. परस्पर संमतीवाचून पतीने किंवा पत्नीने मिळवलेला घटस्फोटही कायद्याला मान्य नव्हता. अर्थात तशी सर्वच प्रकरणे न्यायालयात जात नसल्यामुळे काडीमोडीची चाल समाजात दृढमूल होऊन राहिली होती. चालू शतकात अनेक समाज-

सुधारणा झाल्या आणि उच्च वर्गातील स्त्रियांनाही घटस्फोट मिळावा, अशी तीव्र जाणीव समाजात उत्पन्न झाली. त्याचे फळ म्हणून स्वराज्यप्राप्तीनंतर सर्व हिंदू समाजाला लागू पडेल असा घटस्फोटाच्या कायदा झाला आहे. निर्दयपणा, वेडेपणा, सांसर्गिक रोग, धर्मांतर, व्यभिचार, पाच वर्षे विभक्त जीवन, नपुंसकत्व, इ. कारणांमुळे विवाहविच्छेद करण्याची सोय त्या कायद्यात केलेली आहे.

काही उच्च जातींत घटस्फोट रूढ नसल्यामुळे त्या जाती आपल्याला श्रेष्ठ मानीत. एकनिष्ठा, शाश्वती आणि तज्जन्य सुख या बाबतींत त्यांना श्रेष्ठ मानता येईल. पण स्त्री-पुरुषांचा स्वाभिमान, कामलोलुपता, व्यसने, इ. कारणांमुळे परिस्थिती बदलते आणि पति-पत्नींना एकमेकांचा सहवास दुःसह होतो. जन्मपत्रिकेतील गुण, गोत्रप्रवर, कुलशील, आर्थिक परिस्थिती, आरोग्य, इ. सर्व गोष्टी पाहून विवाह जमवला, तरीही तो संबंध शेवटपर्यंत सुखावह राहीलच अशी खात्री नसते. असे असल्यामुळे प्रत्येक विवाहसंबंध आमरण कायम टिकलाच पाहिजे अशी सक्ती करणे सर्वथा अयोग्य होय. अपत्यांच्या सुखाचा विचार केला तरीही घटस्फोटाला मान्यता देणे योग्य ठरते. कारण कित्येक वेळा पति-पत्नींचे संबंध इतके विकोपाला गेलेले असतात किंवा व्यसनामुळे पुरुष इतका राक्षसी वृत्तीचा बनलेला असतो, की अपत्यांच्या हितासाठीच त्या पति-पत्नींना विभक्त होणे आवश्यक ठरते.

घटस्फोटाचा पश्चिमेकडील इतिहास पाहिला तर असे दिसते, की घटस्फोटाला कायद्याने परवानगी दिल्यामुळे त्याचे प्रमाण वाढत नाही किंवा तो सोपा केल्यामुळे गृहसंस्थेचा नाशही होत नाही. उलट घटस्फोटामुळे गृहसंस्थेतील बजवज नाहीशी होऊन तिला गांभीर्य व स्थिरता प्राप्त होते, असे हॅवलॉक एलिस, वेस्टर मार्क, इ. शास्त्रज्ञांचे मत आहे.

ख्रिस्ती धर्माने विवाह हा एक पवित्र संस्कार मानलेला असून, त्याचा विच्छेद करणे हे धर्मशास्त्राला प्रारंभी मान्य नव्हते. रोमन कॅथॉलिक चर्चला अजूनही विवाहाचा विच्छेद करणे योग्य वाटत नाही. तथापि व्यभिचार, निर्दयता, क्लैब्य, धर्मांतर, इ. कारणांमुळे घटस्फोट देणे-घेणे आता अपरिहार्य मानले जाते. ख्रिस्ती धर्माचे जे अनेक उपपंथ आहेत, त्यांनी मात्र घटस्फोटाला पहिल्यापासूनच मान्यता दिलेली आहे.

मुसलमान लोकांत काडीमोडीची चाल आहे. इस्लामचा या प्रथेला विरोध नाही; पण ती ईश्वराला पसंत नाही, असे कुराणात सांगितले आहे. घटस्फोट घेतल्यानंतर तीन महिने थांबून मगच तो पक्का झाला, असे मुसलमान मानतात. तोपर्यंत पति-पत्नींना सलोखा करण्यास सवड ठेवलेली असते. विवाहविच्छेद झालेल्या पति-पत्नींचा पुनश्च सलोखा व्हावा, लग्नबंधन तुटू नये, हाच त्यातील हेतू आहे. धर्मशास्त्राची आडकाठी नसली, तरी त्यांच्या समाजात काडीमोडीचे प्रसंग फारसे येत नाहीत. [म. ज्ञा. को.; हि. ध.; ध. शा. वि.; हिं. व्य. शा.; पो. वी. हिं. सि.; वि. स. र.]

(२) पतित माणसाशी संबंध तोडण्याचा एक विधी. महापातकाने पतित झालेला माणूस प्रायश्चित घ्यायला नकार देईल, तर एखाद्या निंद्य तिथीला संध्याकाळी त्याचे सपिंड व बांधव एकत्र जमून एखाद्या दासीकडून एक अशुद्ध पाण्याचा घट आणवितात व तो दर्भावर पालथा करून फोडतात. मग त्या विधीचा कर्ता त्या पतित माणसाचे नाव घेऊन 'अमुमनुदकं करोमि' = या पापी माणसाला मी यापुढे उदक देणार नाही, असे म्हणतो व मग तो पतित मनुष्य जिवंत असतानाच त्याचे क्रियाकर्मांतर करतो. मग त्याचे सपिंड एक दिवस आशौच पाळतात व त्यानंतर त्या पतित माणसाशी कोणत्याही प्रकारचा संबंध ठेवीत नाहीत.

पुढे अशा माणसाला पश्चात्ताप झाल्यास त्याच्यावर शुद्ध पाण्याने भरलेल्या घटातील पाण्याचा अभिषेक करावा, तो घट पतिताला द्यावा, त्याच्यासह सर्वांनी त्यातले पाणी प्राशन करावे, आज्यहोम करावा व त्याचे जातकर्मापासून उपनयनापर्यंतचे संस्कार करून, मग त्याच्याशी अन्नोदक व्यवहार सुरू करावा, असेही सांगितले आहे. [हि. ध.]

घटिकापात्र एक कालमापक पात्र. वराहमिहिराने याची कृती सांगितली आहे, ती अशी—सहा अंगुळे त्रिज्येचे व ६० पळे (२४० तोळे) पाणी मावेल, असे एक अर्धगोल ताम्रपात्र करून त्याला तळाशी, ४ अंगुळे लांबीची व ३⅓ मासे भाराची सोन्याची सुई जाईल एवढे छिद्र पाडावे, म्हणजे घटिकापात्र तयार होते.

हे घटिकापात्र पाण्यात तरंगत ठेवतात व ते भरून खाली बुडले म्हणजे एक घटिका झाली, असे समजतात. अहोरात्राच्या (२४ तासांच्या) ६० घटिका मानलेल्या आहेत. याचा अर्थ ६० वेळा घटिकापात्र बुडले, म्हणजे एक अहोरात्र होते असा होतो.

वराहमिहिराच्या पूर्वी एका मडक्याला छिद्र पाडून काल मोजीत. घट = मडके, त्यावरून घटिका हा शब्द बनला आहे. लग्न व मुंज या शुभ कार्यांत मुहूर्त साधण्यासाठी सूर्योदयाच्या वेळी घटिकापात्र पाण्यात घालतात. इष्ट घटिकांच्या संख्येने पात्र बुडाले, की मुहूर्ताची वेळ झाली, असे समजतात. या घटिकायंत्राच्या स्थापनेचा विधी असा—

गणपतिपूजन करून स्थापनेच्या जागी धान्यराशी घालतात. तीवर पाण्याने भरलेले पातेले ठेवतात व त्याची पूजा करतात. मग त्यात घटिकापात्र तरंगत ठेवतात. त्या वेळी पुढील मंत्राने त्याची प्रार्थना करतात—

मुख्यं त्वमसि यन्त्राणां ब्रह्मणा निर्मितं पुरा।
भवभावाय दम्पत्योः कालसाधनकारणम् ॥

अर्थ—हे घटियंत्रा, तू यंत्रांत मुख्य यंत्र आहेस. तुला ब्रह्म्याने निर्माण केले आहे. तू कालसाधनाला कारणीभूत आहेस. तू दंपतीच्या कल्याणाला कारणीभूत हो.

विवाहाच्या वेळीच घटिकापात्र वापरावे, असे धर्मसिंधूत सांगितले आहे. पण उपनयनातही ते वापरण्याचा प्रघात आहे. [ऋ. ब्र. क.; पं. ज्यो. शा.]

घटोत्कच लेणी खानदेशात पाचोऱ्यापासून १६ मैलांवर जिंजाळ गावाजवळील एका डोंगरात ही लेणी आहेत. यांत एक मोठा विहार असून, त्याला वीस खांब आहेत. त्यांतले काही खांब सोळाकोनी असून, त्यांवर सुंदर नक्षी कोरलेली आहे. गाभाऱ्यात भिंतींवर व खांबांवरही अनेक बुद्धमूर्ती आहेत.

एका भिंतीवर अश्मक राजाच्या वेळचा एक शिलालेख आहे. वाकाटक राजा हरिषेण याचा मंत्री वराहदेव याने ही लेणी इ. स. च्या ५ व्या शतकात खोदवली असे मो. गं. दीक्षित म्हणतात. [म. ज्ञा. को.; वि. मुं. रा. प.]

घडशी एक जात. हे लोक महाराष्ट्रात सर्वत्र आढळतात. वाजंत्री वाजवणे, हा यांचा मुख्य धंदा आहे. ते आपल्या उत्पत्तीची कथा सांगतात, ती अशी—राम व सीता यांच्या विवाहाच्या प्रसंगी वाजंत्री मिळाले नाहीत, तेव्हा रामाने चंदनाचे तीन पुतळे करून त्यांच्यांत प्राण घातला. मग एकाला संबळ, दुसऱ्याला सूर व तिसऱ्याला सनई दिली. हे तिघे घडशांचे मूळ पुरुष होत.

यांच्यांत दोन पोटभेद आहेत. यांच्यांत आते-मामे बहिणीशी लग्ने होतात. खंडोबा, बहिरोबा, मारुती ही यांची दैवते होत. [मुं. इ. जा.].

घडस एक द्विमुखी वाद्य. याची उजवी बाजू चामड्याने मढवितात व डावी बाजू दोरीने बांधतात. डाव्या हाताच्या तर्जनीने ती दोरी दाबून धरतात. चामड्याची बाजू हाताने व डावी बाजू बोटाने वाजवतात; त्या वेळी हाताला मेण लावतात. उजव्या हाताच्या घर्षणाने या वाद्यातून 'घों' कार उत्पन्न होतो. याला डिंडिम असे दुसरे नाव आहे. [स. शा.]

घन एक वेदविकृती. घनपाठ अत्री मुनीने तयार केला, अशी आख्यायिका आहे. घनपाठाची पद्धत अशी—

पहिले व दुसरे पद म्हणून त्यांचा उलटा क्रम म्हणतात. नंतर पुन्हा पहिले, दुसरे व तिसरे ही पदे म्हणून त्यांचा उलटा क्रम म्हणतात व ही तीन पदे पुन्हा सुलटच्या क्रमाने म्हणतात.

मूळ अर्थी ऋचा—

यज्ञेन यज्ञमयजन्त देवास्तानि धर्माणि प्रथमान्यासन् ॥

(ऋ. १०. ९०. १६)

वरील ऋचेचा घनपाठ असा—

यज्ञेन यज्ञं यज्ञं यज्ञेन यज्ञेन यज्ञमयजन्त
१ २ २ १ १ २ ३
अयजन्त यज्ञं यज्ञेन यज्ञेन यज्ञमयजन्त।
३ २ १ १ २ ३
यज्ञमयजन्त अयजन्त यज्ञं यज्ञमयजन्त देवाः
२ ३ ३ २ २ ३ ४
दवा अयजन्त यज्ञं यज्ञमयजन्त देवाः।
४ ३ २ २ ३ ४
अयजन्त देवा देवा अयजन्त अयजन्त देवास्तानि
३ ४ ४ ३ ३ ४ ५
तानि देवा अयजन्त अयजन्त देवास्तानि।
५ ४ ३ ३ ४ ५
देवास्तानि तानि देवा देवास्तानि धर्माणि
४ ५ ५ ४ ४ ५ ६
धर्माणि तानि देवा देवास्तानि धर्माणि।
६ ५ ४ ४ ५ ६
तानि धर्माणि धर्माणि तानि तानि धर्माणि
५ ६ ६ ५ ५ ६
प्रथमानि प्रथमानि धर्माणि तानि तानि
७ ७ ६ ५ ५
धर्माणि प्रथमानि धर्माणि प्रथमानि प्रथमानि
६ ७ ६ ७ ७
धर्माणि धर्माणि प्रथमान्यासन् आसन् प्रथमानि
६ ६ ७ ८ ८ ७
धर्माणि धर्माणि प्रथमान्यासन् प्रथमान्यासन्
६ ६ ७ ८ ७ ८
आसन् प्रथमानि प्रथमान्यासन्। आसन्नित्यासन्
८ ७ ७ ८ ८ ८

वरील घनपाठामध्ये जे आकडे दाखविले आहेत, ते मूळ ऋचेतील पदांचे आहेत. त्यावरून ऋचेतील प्रत्येक पद कसे व किती वेळा आवृत्त होते, त्याची नीट कल्पना येऊ शकेल.

संपूर्ण ऋक्संहितेचा असा घनपाठ मुखोद्गत म्हणणाऱ्या वैदिकाला घनपाठी असे म्हणतात. घनपारायण करायला कित्येक महिने लागतात. ते काम श्रमाचे तर आहेच; शिवाय त्याला धारणाशक्तीही फार तीव्र असावी लागते. मागच्या पिढीत घनपाठी विद्वान बरेच होते. सांप्रत वेदाध्ययनाविषयीच अनास्था

झाल्याने पुढील पिढीत घनपाठी दुर्मिळच ठरणार आहे. पाहा – वेदविकृती. [वे. मू. भालचन्द्रभट्ट करंबेळकर]

घनश्यामदास (इ. स. चे १६ वे किंवा १७ वे शतक) एक बंगाली कवी. हा विश्वनाथ चक्रवर्तीचा शिष्य होता. याने लिहिलेली भगवद्गीतेवरची टीका वैष्णव संप्रदायात प्रमाण मानली जाते. याने नरोत्तमविलास व भक्तिरत्नाकर नावाचे दोन ग्रंथ लिहिले आहेत. भक्तिरत्नाकरात याने तिकडील वैष्णव कवी व पर्वें यांचे वर्णन केले आहे. [म. च. को.]

घनानंद (इ. स. चे १७ वे किंवा १८ वे शतक) एक हिंदी महाकवी. हा जातीचा कायस्थ ब्राह्मण होता. याचे वास्तव्य दिल्लीत असे. हा बहादुरशहाच्या पदरी कारकून होता. गानविद्या व काव्यरचना यांत हा निष्णात होता. याला पुढे दिल्ली सोडून मथुरेला जाण्याची इच्छा झाली. सुजान नावाची त्याची एक प्रेयसी होती. तिला त्याने आपल्याबरोबर मथुरेला येण्याची विनंती केली; पण तिने त्या गोष्टीस नकार दिला. त्यामुळे दुःखी मनाने हा एकटाच मथुरेला गेला. तिथे नादिरशहाच्या सैनिकांकडून तो मारला गेला, असे सांगतात. पण या आख्यायिकेला ऐतिहासिक आधार मिळत नाही. कारण नादिरशहाने इ. स. १७३९ साली फक्त दिल्लीवर स्वारी केली होती; तो मथुरेवर चाल करून गेला नाही. मथुरेवर अब्दालीने मात्र दोन स्वाऱ्या केल्या होत्या. कदाचित त्या स्वाऱ्यांच्या वेळी झालेल्या कत्तलीत घनानंद मारला गेला असावा. (इ. स. १७६०). याचा जन्म व मृत्यू केव्हा झाला, यासंबंधी विद्वानांत मतभेद आहेत.


घनानंद

याचा सुजानशतक नावाचा काव्यसंग्रह प्रसिद्ध आहे. त्यात प्रेम, विरह आणि भक्ती यांचा मनोज्ञ संगम आहे. सवैया, छप्पय, दोहे, इ. रचनाप्रकार याने हाताळले आहेत. याच्या काव्याचा एक नमुना असा—

बैरी बियोग की हूकनि जारत कूकि उठै
अचकाँ अधरातक ।
बेधत प्रान बिना ही कमान सुबान से बोल
सों कान व्है घातक ।
सोचनि ही पचियै बचियै कित डोलत
तब लाएं यहा तक ।
वे घन आनंद जाय छत उत पैंडें परयौ
इत पातकी चातक ॥१॥

अर्थ – हा वैरी चातक अर्ध्या रात्री ‘ प्रियकर कुठे ? प्रियकर कुठे ? ’ असे सारखे ओरडू लागतो आणि मला वियोगाच्या वेदनांनी जाळायला लागतो. त्याचे शब्द बाणासारखे आहेत आणि ते धनुष्याशिवायच सुटतात. ते घातकी बनून कानातून शिरून हृदयाचा वेध घेतात. सर्वांत दुःख असे वाटते, की तो माझ्याकडे टक लावून मलाच अनुलक्षून फेऱ्या मारतो आहे. याच्यापासून स्वतःला वाचवावे तरी कसे ’. याच अडचणीत मी पडले आहे. तो आनंदाचा घन (मेघ) परदेशात जाऊन छाया करतो आहे आणि त्याचा हा लाडका दुष्ट चातक माझ्या मागे लागला आहे.

घनानंदकवित्त, सुजानहितप्रबंध, प्रीतिपावस, रस–केलिवल्ली, वृंदावन सत, प्रेमपत्रिका, इश्कलता हे घनानंदाचे प्रसिद्ध ग्रंथ होत. [हिं. सा. को. २; महाकवी घनानंद]

घबाड मुहूर्त एक शुभ मुहूर्त. हा मुहूर्त ठरविण्याचा प्रकार असा – सूर्यनक्षत्रापासून दिवसनक्षत्रापर्यंत जी नक्षत्रे येतील, ती मोजून त्यांची तिप्पट करावी. त्या आकड्यात त्या दिवशीची तिथी मिळवावी व त्या बेरजेला नवानी भागावे. बाकी तीन उरल्यास तो घबाड मुहूर्त समजावा. या मुहूर्तावर कार्य आरंभल्यास ते सफल होऊन मोठा लाभ होतो, असे सांगितले आहे. [मु. चिं.]

घरट्टदान एक दान. आपल्या घरात सर्व धान्यांची समृद्धी असावी, या हेतूने संक्रांतीच्या दिवशी घरट्टाचे (भात भरडण्याचे जाते) दान करतात. त्या वेळी पुढील मंत्र म्हणतात——

शालिगोधूमसंयुक्तं घरट्टं धान्यपेषणम् ।
ददामि सर्वसस्यानां समृद्धिकरमुत्तमम् ॥

अर्थ – सर्व धान्यांची समृद्धी करणाऱ्या व उत्तम अशा धान्य दळण्याच्या जात्याचे साळी व गहू या धान्यांसह मी दान करतो.

घरभरवणी वधूच्या गृहप्रवेशाच्या वेळचा एक विधी. सावंतवाडीकडील सारस्वत ब्राह्मणांत काही वर्षांपूर्वी हा विधी होता. वरात मंडपाच्या दारात आली, की वराकडील कुणबीण वधू–वरांचे पाय धुवी, त्यांच्यावरून पिठाची मुठली ओवाळून टाकी व त्यांच्या समोर पिठाचे दिवे पेटवून ठेवी.

नंतर तिथेच वधूच्या पदरातील लग्नओटी उतरून तिची पुन्हा ओटी भरीत, तिच्या हातात लामणदिवा देत व कुणबीण तिचा हात धरून परटाने घातलेल्या पायघड्यांवरून तिला घरात नेई. पायघड्यांवरून चालताना वधू ओटीतील तांदूळ पेरीत जाई व दाराच्या उंबरठ्यावर ठेवलेले तांदळांनी भरलेले माप लाथाडून गृहप्रवेश करी.

वधूच्या या प्रथम गृहप्रवेशाला घरभरवणी असे नाव आहे. महाराष्ट्रात इतरही अनेक जातींत गृहप्रवेशाच्या वेळी वधूने धान्याचे माप लाथाडून आत जायचे, अशी चाल आहे. [नवल, जून १९५५]

घर्मतापस एक सूक्तद्रष्टा. ऋग्वेदाच्या १० व्या मंडलातले ११४वे सूक्त याच्या नावावर आहे. या सूक्तात त्याने विश्वेदेवांची स्तुती केली आहे. सुपर्ण = परमात्मा हा एकच आहे, पण क्रांतदर्शी कवी आपल्या वाणीने त्याला अनेक प्रकारचा कल्पितात, असे हा सांगतो (ऋ. १०.११४.५). याचें हे समग्र सूक्त अत्यंत काव्यमय असून, ते काही अंशी गूढगुंजनात्मक आहे. [प्रा. च. को.]

घसियारी नृत्य उ. प्रदेशाच्या कुमाऊं भागातील स्त्रियांचे एक नृत्य. कुमाऊंच्या पहाडी प्रदेशातील मुली गुरांसाठी गवत कापून आणण्याकरिता गटागटाने दूर रानात जातात. या वेळी त्या मधून मधून श्रमपरिहारासाठी जे नृत्य करतात, त्याला घसियारी नृत्य असे नाव आहे. या नृत्यात गवत कापण्याच्या सर्व क्रियांचा क्रमवार अभिनय केला जातो. या नृत्यातल्या सर्व हालचाली तालबद्ध असतात. अंगोपांगांची नयनरम्य सुंदर भावाभिव्यक्ती आणि स्फूर्तिदायक संगीत ही या नृत्याची वैशिष्टये होत. [उ. प्र. लो. नृ.; भा. लो. नृ.]

घांची गुजरातमधील एक तेली जात. हे नाव घाणी या शब्दापासून बनले असावे. यांची आडनावे राजपूत लोकांसारखी असतात. हे आपल्याला गुजरातच्या मोढेरा भागातील वाण्यांचे वंशज म्हणवितात. यांचा मुख्य व्यवसाय तेल गाळण्याचा असला, तरी यांच्यातले काही लोक धान्य व भाजीपाला विकतात; तर काही शेतीही करतात. यांच्यांत सहा पोटविभाग असून, त्यांपैकी मोघ व सिंघपुरी हे श्रेष्ठ समजले जातात. या पोटजातीत परस्पर विवाहसंबंध होत नाहीत. मोघ व सिंघपुरी सोडून इतर पोटजाती मांसाहारी आहेत. हे लोक स्वामीनारायण व रामानंदी या पंथांचे अनुयायी आहेत. यांच्यांतील काही लोकांनी अलिकडे शीख पंथ स्वीकारला आहे. [म. ज्ञा. को.]

घागर फुंकणे एक धार्मिक नृत्यप्रकार. आश्विन शु. अष्टमीच्या दिवशी चित्पावन ब्राह्मणांत मुखवट्याची महालक्ष्मी करतात. या प्रसंगी सुवासिनी स्त्रियांनी घागर फुंकून नृत्य करावे, असे सांगितले आहे. या प्रसंगी स्त्रिया पदर बांधतात व दोन्ही हातांनी घागर उचलून तिच्यात फुंकर घालून नाद घुमवतात. या वेळी काही स्त्रियांच्या अंगात देवीचा संचार होतो, असा समज आहे. अशा संचार झालेल्या स्त्रीला महालक्ष्मीपुढे बसवून भाविक स्त्रिया तिला आपल्या संसारातल्या अडचणींविषयी प्रश्न विचारतात. ती घुमणारी स्त्रीही त्या प्रश्नांना यथामति उत्तरे देते.

घाघ (जन्म १६९६ इ. स.) उ. भारतातील एक लोककवी. याच्या जन्मस्थानाबद्दल निश्चित माहिती मिळत नाही. तथापि हा जातीने दुबे (ब्राह्मण) असून, कनोजमध्ये राहणारा होता, असे मानतात.

श्री. देवनारायण द्विवेदी यांनी घाघ व भड्डर ही दोन्ही नांवे एकाच व्यक्तीची आहेत, असे सांगितले असून, भड्डराच्या जन्माविषयी पुढील आख्यायिका दिली आहे—

याची माता गौळण व पिता ब्राह्मण ज्योतिषी होता. त्या ज्योतिषाला एकदा एक शुभ मुहूर्त दिसला. त्या मुहूर्तावर जर एखादी स्त्री गर्भधारणा करील, तर त्या गर्भापासून एक त्रिकालदर्शी विद्वान बालक जन्माला येईल, असे त्याला वाटले. त्या मुहूर्ताचा लाभ घेण्यासाठी तो ज्योतिषी घरी आपल्या पत्नीकडे यायला निघाला, पण तो वाटेत असतानाच मुहूर्ताची वेळ झाली. आता काय करावे, अशी त्याला चिंता पडली. एवढ्यात त्याला समोरून एक गौळण येताना दिसली. त्याने तिला सर्व हकीकत समजावून सांगितली व तिच्याजवळ आपले मनोगत प्रकट केले. ती तयार झाली व तिने त्याचा गर्भ धारण केला. पुढे यथाकाल तिला पुत्रप्राप्ती झाली. तिने मुलाचे नाव भड्डर असे ठेवले.

भड्डराला जन्म देणारी स्त्री एका राणीवशात कामाला होती. भड्डर चार–पाच वर्षांचा असताना राजाच्या राणीला

एक मुलगा झाला. हा मुलगा दुर्दैवी असून, राजावरही आपत्ती आणणारा ठरेल, असे ज्योतिष्यांनी त्याचे भविष्य वर्तवले. ते ऐकून राजाने त्या मुलाला गावाबाहेर नेऊन टाकण्याची आज्ञा दिली. सेवकांनी तसें केले. पण त्याच वेळी भड्डराने सूतिकागृहातील भिंतीवर 'हा बालक मोठा भाग्यवान असून, कोणीही त्याचे वाकडे करू शकणार नाही,' असे लिहून ठेवले. राजाला ही गोष्ट समजताच त्या लेखाची शहानिशा करण्यासाठी त्याने त्या परित्यक्त मुलाच्या शोधार्थ दूत पाठविले. तेव्हा मुलाच्या डोक्यावर एका नागाने फणा धरलेली असून, त्याच्या फणेवर असलेल्या मधाच्या पोळ्यातून मुलाच्या तोंडात थेंब थेंब मध गळत आहे, असे दृश्य सेवकांना दिसले. दूतांनी परत येऊन राजाला ही गोष्ट सांगितली, तेव्हा राजाने मुलाला घरी आणवले व भड्डरचा मोठा सन्मान केला. नंतर राजाने अशुभ भविष्य वर्तविणाऱ्या त्या सर्व ज्योतिष्यांना देहांताची शिक्षा फर्मावली. तेव्हा भड्डराने सांगितले, की ज्योतिष्यांना मुलाच्या जन्माची वेळ बरोबर सांगितली गेली नाही आणि त्यामुळे त्यांचे भविष्य चुकले. तेव्हा मग राजाने त्यांची शिक्षा रद्द केली.

भड्डर किंवा घाघ हा अकबराचा समकालीन होता. तो अकबराच्या दरबारात होता व अकबराच्या सांगण्यावरून त्याने एक गाव वसवले व त्याला 'अकबराबाद सराय घाघ' असे नाव दिले. हे गाव आजही अस्तित्वात असून, त्याला सराय घाघ किंवा चौधरी घाघ असे म्हणतात.

घाघाची सून फार हुशार होती. तीही कविता करी आणि घाघाचे म्हणणे नेहमी खोडून काढी.

जलाशयात स्नान करताना आपला मृत्यू आहे, हे घाघाला माहीत होते. म्हणून तो जलाशयावर कधी जात नसे. पण एक दिवस मित्रांनी त्याला बळेच ओढून तलावात स्नान करण्यासाठी नेले आणि तो बुडून मरण पावला. बुडताना तो म्हणाला–

जानत रहा घाघ निर्बुद्धि । आवै काल बिनासै बुद्धि ॥

अर्थ – अडाणी घाघला माहीत होते, की विनाशकाल आला असता बुद्धी विपरीत होते.

घाघाच्या अनेक उक्ती प्रसिद्ध आहेत. त्यांवरून त्याला कृषी, ज्योतिष व नीती यांचे चांगले ज्ञान होते, हे कळून येते. त्याने लोकांच्या भाषेत आपल्या उक्तींची रचना केली व त्यांच्या ज्ञानात भर घातली. त्याच्या रचनेत साहित्यिक सौष्ठव नसले, तरी अनुभवाच्या दृष्टीने त्याच्या उक्तींना फार महत्त्व आहे. उ. प्रदेश व बिहार या प्रदेशांतील ग्रामीण निरक्षर शेतकरी त्याच्या शेतीविषयक वचनांच्या आधारेच आपली शेतीची कामे करतात. पाऊसपाणी, ऋतुमान, धान्य पेरणे, धान्याची कापणी करणे, पिकाला खत देणें, इ. गोष्टींबाबत त्याची अनेक वचनें प्रसिद्ध आहेत. ती दोहा, चौपाई, इ. छंदांत आहेत.

शेतीसंबंधी त्याच्या काही उक्ती पुढीलप्रमाणे–

उत्तम खेती जो हर गहा । मध्यम खेती जो संग रहा ॥
जो पूछेसि हरवाहा कहाँ । बीज बूडिगे तिनके वहाँ ॥

अर्थ – जो स्वत: नांगर चालवतो, त्याची शेती उत्तम; जो नांगऱ्याबरोबर राहतो, त्याची मध्यम; आणि जो नांगऱ्या कुठे आहें, त्याची चौकशी करीत फिरतो, त्याने पेरले तेवढेसुद्धा धान्य त्याला परत मिळणे कठीण होईल.

भादोंकी छठ चाँदनी जो अनुराधा होय ।
उबड़ खाबड़ बोय दे अन्न घनेरा होय ॥

अर्थ – भाद्रपद शु. षष्ठीला जर अनुराधा नक्षत्र असेल, तर त्या दिवशी ओबड धोबड जमिनीतही बी पेरल्यास त्याचे भरपूर पीक येईल.

सावन सुक्र न दिसै निहचै पडै अकाल ।

अर्थ – श्रावण महिन्यात शुक्राचे दर्शन झाले नाही, तर दुष्काळ पडेल, हे निश्चित समजावे.

ग्रहण, शकुन-अपशकुन, यात्रा, दिक्शूल, महागाई, दुर्भिक्ष, बैलाची पारख, इ. विषयांवरही त्याची वचने आहेत.

असमिया व ओडिया भाषेतील डाक नामक लोककवी व घाघ या व्यक्ती एकच होत, असे श्री. रामनरेश त्रिपाठी यांनी म्हटले आहे. [हिं. सा. को., २; हिं. नी. वि.; घाघ और भड्डरीकी कहावते; भो. क. का.]

घाट नदीच्या पात्रात उतरणे सुलभ जावे आणि स्नानसंध्या, धुणेपाणी, धर्मकृत्ये, इ. गोष्टी करणे सोयीचे व्हावे म्हणून नदीवर ज्या दगडी पायऱ्या, बुरुज व फरस बांधतात, त्या बांधणीला घाट म्हणतात. गंगा, यमुना, कृष्णा, गोदा, इ. नद्यांना पुण्यक्षेत्रांत घाट बांधलेले आहेत. नदीवर घाट बांधणे, हे पुण्यकर्म समजले गेले आहे. पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर हिने अनेक ठिकाणी घाट बांधल्याचे कळते. कित्येक ठिकाणी घाटांवर मंदिरे व ओवऱ्याही असतात. कित्येक जुन्या घाटांवर शिलालेखही आढळतात.

घाडी कर्नाटकातील एक जात. देवीला अर्पण केलेल्या पशूला मारणे व भविष्य सांगणे, हे यांचे मुख्य धंदे आहेत. यांच्यांत सोडचिठ्ठीची रूढी नाही. व्यंकोबा हा यांचा कुलदेव होय. [मुं. इ. जा.]

घाणकदान एक दान. संक्रांतीच्या दिवशी उखळात कांडण्यासाठी धान्याचा एक घाणा घालतात व तो कांडून आणि त्यातील कोंडा पाखडून ते धान्य दान देतात. याचा मंत्र असा—

उलूखलस्थितं धान्यं मुसलाहतिनिस्तुषम् ।
ददामि प्रीतिदं भानोर्धान्यराशिविवर्धनम् ।।

अर्थ— उखळात घातलेले व मुसळाने कांडून कोंडारहित केलेलें धान्य, मी सूर्याच्या प्रीतीसाठी दान देतो. यामुळे माझ्या घरात धान्यसमृद्धी होवो.

घाणा भरणे लग्न किंवा मुंज या संस्काराच्या पूर्वी देवदेवक बसविण्याची महाराष्ट्रात चाल आहे. त्यापूर्वी घाणा भरणे नावाचा एक विधी असतो. गव्हांनी भरलेल्या दोन रोवळ्यांत दोन नारळ ठेवतात. मग खण व आंब्याचे टाळे बांधलेली दोन मुसळे त्यांत उभी धरतात. मग त्या रोवळ्या संस्कार्य वटू किंवा वधू-वरांपैकी जे कोणी असेल ते, यजमान व यजमानपत्नी यांच्या समोर ठेवतात. संस्कार्यासह यजमानदंपतीला पाच सवाष्णी मिळून आरती ओवाळतात. मग त्या सवाष्णी रोवळीतले गहू मुसळांनी कांडतात. या वेळी ज्या ओव्या म्हणतात, त्यांपैकी काही ओव्या अशा—

घाणा भरियेला । विडा ठेवियेला
आदीं नमियेला । गणराज ।। १ ।।
घाणा भरियेला साचा । जोगेश्वरी मातेचा
मोठा भार तो गोताचा । गणराज ।। २ ।।
आम्हा घरी कारणी । गणराज पुराणी ।
मांडव दणाणी । चारी दिवस ।। ३ ।।
आम्हा घरी तुम्ही देवे । गणराज गणपती ।
मांडवी राहावे । पाच दिवस ।। ४ ।।

नंतर एक सवाष्ण, खणाने बांधलेल्या जात्यावर मूठभर धान्य दळते. यानंतर संस्कार्याला व यजमानदंपतीला तेल लावतात.

धारापुरी मुंबईपासून सहा-सात मैल अंतरावर समुद्रात एका लहानशा बेटावर हे गाव आहे. याचे प्राचीन नाव श्रीपुरी होते. ही कोकणातील मौर्य वंशाची राजधानी असावी. त्यानंतर चालुक्य, राष्ट्रकूट, यादव व मुसलमान यांनी तिथे क्रमाने सत्ता गाजवली. इ. स. च्या १६ व्या शतकाच्या पूर्वार्धात हे बेट पोर्तुगीजांच्या ताब्यात गेले होते. शिवछत्रपतींच्या काळी ते मराठ्यांनी जिंकले व इ. स. १७७४ मध्ये त्यावर इंग्रजांची सत्ता प्रस्थापित झाली.

या बेटावरील डोंगरात पाच लेणी खोदलेली आहेत. इ. स. चे ३ रे शतक ते ७ वे शतक या कालखंडात ही लेणी निर्माण झाली असावी. इथले शिल्पकाम शैव संप्रदायाचे आहे.



लेण्यांचे प्रवेशद्वार — धारापुरी

त्यात अनेक निवडक शिवकथा साकार झालेल्या दिसतात. त्यांतील शिवपार्वतीविवाह, गंगावतरण, तांडवनृत्य, अंधकासुरवध, इ. दृश्ये फार रम्य असून ती शिवाचे संक्षिप्त जीवन दृष्टीपुढे उभे करतात.

मुख्य लेण्यात एक भव्य दालन असून, त्याच्या मध्यभागी ११ हात उंचीची एक त्रिमुखी मूर्ती आहे. तिची तीन्ही मुखे अत्यंत सुरेख असून, त्यांच्या मुकुटावरील कलाकुसर प्रेक्षणीय आहे. ही मूर्ती ब्रह्मा—विष्णु—महेशांची आहे, अशी सर्वसाधारण कल्पना आहे. पण स्टेला क्रॅमरिश यांच्या मते ही तीन्ही



त्रिमुखी मूर्ती — धारापुरी

मुखे एका महेशाचीच असून, त्यांत त्याची अघोर, तत्पुरुष व वामदेव ही रूपे दाखवली आहेत. आणि जितेंद्रनाथ बानर्जी यांच्या मते या त्रिमूर्तीचे मधले मुख स्त्रीचे म्हणजे उमेचे आहे. ओठांची मुंडप, डोळ्यात दिसणारी स्त्रीसुलभ लज्जा, जमिनीकडे वळलेली दृष्टी, मोत्यांच्या जाळीत बांधलेली केशरचना, यामुळे हे मुख बाकीच्या दोहोंपेक्षा वेगळे वाटते खरे!



अर्धनारीश्वर शिल्प – घारापुरी

प्राचीन ग्रंथांत रुद्र-शिवाच्या दोन रूपांचा उल्लेख आढळतो. त्यातले एक घोर व दुसरे शिव किंवा सौम्य आहे. या दोन

रूपांच्या मध्ये शिवशक्ती उमा अशी ही त्रिमूर्ती घडवलेली आहे, असे दिसते. जगातील अत्यंत भव्य अशा पाच-सात शिल्पकलाकृतींत या मूर्तीची गणना केली जाते. कारागिराच्या कल्पनेची अतिशय उंच भरारी या शिल्पात दिसून येते.

त्रिमूर्तीच्या पूर्वेकडील भिंतीत अर्धनारीश्वराची एक सुरेख मूर्ती कोरलेली आहे. त्या मूर्तीचा डावा भाग स्त्रीचा व उजवा भाग पुरुषाकृती दिसतो; मुखावर मात्र स्त्री वा पुरुष कोणाचाच भाव नसून, ते परब्रह्माचे प्रतीक भासते.

कैलास पर्वतावर शिव-पार्वती बसलेली असून, रावण आपल्या वीस भुजांनी तो पर्वत हालवीत आहे, असे दृश्य एका लेण्यात दिसते. इथे इंद्र, ब्रह्मा आणि विष्णू यांच्याही मूर्ती आढळतात. काही लेण्यांच्या दालनाला प्रचंड स्तंभ असून, त्यांवर लहान लहान आकृती कोरलेल्या आहेत. प्रत्येक दालनात द्वारपालांच्या भव्य मूर्ती दिसतात. एका गुहेत बुद्धाच्या स्तूपासारखी आकृती आहे, तिला धर्माचा डेरा म्हणतात.

बेटाच्या दक्षिण बाजूला पूर्वी एक मोठा दगडी हत्ती होता; तो आता मुंबईत राणीच्या बागेत आणून ठेवलेला आहे. त्या हत्तीवरून या स्थानाला 'एलेफंटा' हे नाव पडले. पोर्तुगीजांच्या राजवटीत घारापुरीच्या शिल्पाची अतिशय नासधूस झाली. [सु. वि. को.; स. भा. प्र. व; मार्ग, सप्टें. १९६०]

घास देणे महाराष्ट्रातील लग्नसोहळ्यातला एक लौकिक विधी. लग्नाच्या दिवशी नवरी मुलगी वराच्या शेजारी जेवायला बसते आणि उखाण्यात नवऱ्याचे नाव गुंफून त्याला जिलबीचा किंवा लाडवाचा घास देते. मग वरही तसाच वधूला घास भरवतो. हा एक कौतुकाचा प्रकार आहे. [ल. वि. सो.]

घासी ओडिसा व मध्य प्रदेश या भागांतील एक द्रविड जमात. घास (गवत) कापणे हा या लोकांचा व्यवसाय असल्यामुळे त्यांना घासिया हे नाव मिळाले. यांच्यापैकी काही लोक शेती, मजुरी, झाडलोट, इ. कामे करतात, काही लोक गावाच्या सणासमारंभात वाद्ये वाजवतात, तर काही विणण्याच्या मागांना लागणाऱ्या फण्या व कुंचे तयार करतात.

यांच्या उडिया, डिंगकुचिया, डोलवोहा, नगारची, इ. अनेक पोटजाती आहेत. उडिया कातडी स्वच्छ करतात, डिंगकुचिया बैलांना खच्ची करतात, डोलवोहा डोल्या वाहतात व नगारची नगारा वाजवतात. यांच्यापैकी काही लोक मोतद्दाराचे काम करतात व स्वतःला इतर पोटजातींपेक्षा उच्च मानतात. पशुपक्षी, झाडे व निर्जीव वस्तू यांच्यावरून यांच्या कुलांची नावे पडलेली आहेत.



घासी वादक

विवाहप्रथा– स्वकुलात लग्नसंबंध करीत नाहीत; पण आते-मामे भावंडांत करतात. यांच्यांतले कबीरपंथी मात्र लग्नाच्या कामी जातिभेद मानीत नाहीत. एखाद्या पुरुषाने जातीतल्या मुलीला पळवून नेले, तर त्या दोघांना एकत्र आणून उंबराच्या फांदीसमोर उभे करतात व त्यांच्यावर काही स्त्रिया हळदीचे पाणी शिंपडतात. एवढे केले म्हणणे त्यांचा विवाह झाला असे समजतात. पण रूढ पद्धतीने विहाह ठरला असेल, तेव्हां वधू-वरांनी एकमेकांचा हात धरून विवाहस्तंभाभोवती सात प्रदक्षिणा घालणे, हा लग्नातला मुख्य विधी असतो. लग्नानंतर सर्व मंडळी वरगृही जातात. तिथे एक कोंबडा किंवा बोकड मारून त्याचे मुंडके घराच्या दरवाज्यासमोर जमिनीत पुरतात. त्याच्या रक्ताचा टिळा वधू-वरांच्या कपाळी लावल्यावर ती दोघे गृहप्रवेश करतात.

प्रसूतिप्रथा– मूल जन्मल्यावर सहाव्या दिवशी त्याचे नाव ठेवतात. बालघातक देवतांनी मुलाला इजा करू नये, म्हणून मूल पाच कवड्यांना विकत देण्याचा एक विधीही करतात.

देवधर्म– हे दुल्हादेवाला भजतात. दर तीन वर्षांनी गोंडांच्या बडा देवाला एक पांढरा बकरा बळी देतात. दसऱ्याच्या दिवशी देवाला नारळ व मद्य अर्पण करतात. करमा हा यांचा मुख्य सण होय. हा भाद्रपदात येतो. त्या दिवशी सर्व स्त्री-पुरुष दारू पितात व नृत्य करतात.

घासींचा पोषाख माडिया गोंडासारखा असतो. घासी स्त्रिया शरीराच्या निरनिराळ्या भागावर गोंदून घेतात. त्या चोळी घालीत नाहीत.

परजातीतील इसमाला आपल्या जातीत घेताना त्याच्या डोक्याला मूत्र लावतात व त्याचे क्षौर करतात. मग सोने

किंवा चांदी बुडवलेले पाणी त्याला प्यायला देतात व गोमयात तुळस आणि दूर्वा मिसळून ते त्याला खायला देतात. एखाद्याला प्रायश्चित देऊन जातीत घ्यायचे असेल, तर पुरुषाचे क्षौर करतात व बायकांची बट कापतात.

हे लोक कायस्थांची नोकरी करीत नाहीत व त्यांच्या हातचे अन्नही खात नाहीत.

मृतकप्रथा–हे लोक प्रेते जाळतात किंवा पुरतात. दहन केल्या सरास जलाशयात टाकतात. मृत्यूनंतर तीन दिवस पाणी व डाळ-भात द्रोणात घालून मृतात्म्यासाठी बाहेर ठेवतात. [ट्रा. का. सें. प्रॉ. इं.]

घासीदास

(१७७०–१८५० इ. स.) एक पंथप्रवर्तक. हा मध्य प्रदेशातील बिलासपूर जिल्ह्यातल्या गिरोद गावी राहणारा होता. सत्तनामी संप्रदायाची छत्तिसगढी शाखा याने चालू केली, असे सांगतात. याचे पहिले नाव घासीराम असे होते. हा जातीचा चांभार असूनही शेती करीत असे. एकदा हा आपल्या भावासह जगन्नाथपुरीच्या यात्रेला निघाला; पण शारंगडापर्यंत पोचल्यावर अचानक ‘सत्तनाम’ ‘सत्तनाम’ करीत परत फिरला. तिथून पुढे तो गिरोद गावाजवळच्या जंगलात एका टेकडीवर विरक्त वृत्तीने राहू लागला. तो सारा दिवस तिथे ध्यानचिंतनात निमग्न राही. हळूहळू त्याच्याभोवती लोक जमा होऊ लागले व संत म्हणून त्याला मजूही लागले. आपल्या चर्मकार जातीविषयी त्याच्या मनात आस्था होती. तो आपल्या जातभाईंच्या उन्नतीसाठी आयुष्यभर प्रयत्नशील राहिला. तो आजूबाजूच्या गावांतून हिंडे व सद्वर्तनाचा उपदेश करून आपल्या जातभाईंना प्रभावित करी. त्यामुळे थोड्याच काळात तो चर्मकार जातीचा आवडता पुढारी बनला.

घासीदासाला ८० वर्षांचे आयुष्य लाभले. त्याच्या मागून त्याचा पुत्र बालकदास हा छत्तिसगढी शाखेचा उत्तराधिकारी बनला. छत्तीसगढी शाखेचे सत्तनामी हे पुष्कळसे चांभारच आहेत.

गिरोद गावाजवळच्या टेकडीवर ज्या तेंदुवृक्षाखाली घासीदास बसत असे, तो वृक्ष आजही तिथे दाखवितात. त्या जागी आता अनक सत्तनामी मंदिरे निर्माण झाली आहेत. प्रतिवर्षी अनेक सत्तनामी लोक त्या स्थळाची यात्रा करण्यासाठी येतात. [उ. भा. सं. प.]

घिरथ

पंजाबातील एक जात. यांची वस्ती विशेषत: कांगडा व होशियारपूर जिल्ह्यांत डोंगराळ भागात आढळते. शेती हा यांचा प्रमुख व्यवसाय आहे. भाट, चांग व घिरथ हे एकच असून, त्यांच्यांत रोटीव्यवहारही चालतो. [म. ज्ञा. को.]

घिसाडी

एक जात. घिसणे या धातूपासून हा शब्द व्युत्पादितात. हे लोक महाराष्ट्र व कर्नाटक या प्रदेशात आढळतात. यांची वस्ती स्थायिक नसते. आपण गुजरातेतून आलो असे हे लोक सांगतात. यांच्या भाषेतही गुजराती भाषेचे मिश्रण आहे. यांची काही बिऱ्हाडे एका मेळाने गावानजीक पालात उतरतात. प्रत्येक बिऱ्हाडात काही गाढवे, कुत्री, कोंबडया व एखादी म्हैस असते.



घिसाडी

हे लोक नांगराचे फाळ, कुदळी, फावडी, खुरपी, धावा, इ. लोखंडी वस्तू करतात. त्यांच्या बायका त्यांना या कामात मदत करतात व तयार केलेल्या जिनसा बाजारात व घरोघर विकायला नेतात.

यांच्यांत आते-मामे बहिणीशी लग्ने होतात. यांच्यांत सोडचिठ्ठी रूढ नाही.

हे लोक वारकरी व कबीर पंथाचे अनुयायी आहेत. बहिरी, बालाजी, कालम्मा, अंबाई, इ. देवतांना हे भजतात.

विवाहित मृतांना जाळतात व अविवाहित मृतांना पुरतात. [मुं. इ. जा.; गां. गा.; म. ज्ञा. को.;]

घुंगरू

हे पोकळ असून, त्यांत आवाज येण्यासाठी एक लहानसा खडा घातलेला असतो. हे पितळेचे बनवलेले असते. याचा आकार बोराएवढा असून याला वरच्या बाजूला कडी बसवलेली असते.

जाड कापडी पट्टा घेऊन त्याला छिद्रे पाडतात व त्यांत घुंगरू ओवतात. कथक नृत्याच्या वेळी तालासाठी नर्तक-नर्तिका

हा पट्टा पायात बांधतात. तमाशात नाच करणाऱ्या स्त्रीच्या पायातही घुंगरू असतात. नृत्याप्रमाणे नामसंकीर्तनाच्या प्रसंगीही पायात घुंगरू बांधण्याची क्वचित चाल आहे. ‘मी पायात घुंगरू बांधून देवापुढे नाचते,’ असे मीरेने स्वतःचे वर्णन केले आहे. नृत्य करणारी स्त्री जेव्हा प्रथम पायात घुंगरू बांधते, तेव्हा धार्मिक समारंभ केला जातो.

तमिळनाडमध्ये पोंगळ (संक्रांत) सणाच्या वेळी गायीच्या पायांना घुंगरू बांधतात. त्याचप्रमाणे रात्री-अपरात्री जंगलातून पायी प्रवास करताना प्रवासी आपल्या हातातील काठीलाही घुंगरू बांधतात. त्यांच्या आवाजाने सरपटणारे प्राणी दूर होतात, अशी समजूत आहे.

पंजाबातली एक महिला म्हणते—

जे तैं मेरी चाल वेखनी मेरी जुत्ती नूँ लुआ दे घुंगरू

अर्थ – हे प्रियतमा, जर तुला माझी चाल पाहायची असेल तर माझ्या पादत्राणाला घुंगरू लावून दे.

त्यावर तिचा पती तिला म्हणतो–

जुत्ती लैदूं घुंगरुयां वाली भमां मेरी जिंद बिकजे

अर्थ– मी तुला घुंगरू जडवलेली पादत्राणे आणून देईन. मग माझा जीव विकावा लागला, तरी हरकत नाही.

तंजाऊरचे पट्टी कृष्ण भागवतर यानी प्रथम घुंगरू बांधण्यास सुरवात केली आणि ते स्वतःच्या सुराशी जुळणारे घुंगरू वापरीत, असे सांगतात.

घंटातरंगासारखेच घुंगुरू नावाचे एक वाद्य उ. भारतात वापरले जाते. ते आकाराने लहान असून, त्यात अनेक समांतर दोऱ्यांना घुंगरू बांधलेले असतात. बोटाच्या आघाताने हे वाद्य वाजवतात. पाहा– किंकिणी. [डि. सा. इं. म्यु. म्यु.; म. ज्ञा. को.; वे. फू. आ. रा.]



पायातले घुंगरू

घुघती नृत्य

हिमाचल प्रदेशातील एक नृत्य. घुघती नावाचा पहाडी पक्षी दाणे खाल्ल्यावर आनंदाने नाचतो, त्यावरून या नृत्याला हे नाव मिळाले असावे. या नृत्यात नर्तक किंवा नर्तिका वर्तुळात उभे राहून नाचतात. नाचताना ते पक्ष्याप्रमाणे स्वतःभोवती गिरक्याही घेतात. नृत्याच्या वेळी ढोलाच्या साथीवर गीतेही गातात. [भा. लो. नृ.]



घुघती नृत्य

घुमट

(१) एक शिल्पप्रकार. एखाद्या वास्तूच्या शिरोभागी जे अर्धगोलाकार किंवा अंडाकृती बांधकाम केलेले असते, त्याला घुमट म्हणतात. हिंदू शिल्पात शिखराला जे स्थान आहे, तेच मुसलमानी शिल्पात घुमटाला आहे. बहुतेक सर्व मशिदींच्या शिरोभागी घुमट बांधलेला असतो. दिल्लीच्या गुलाम घराण्यातील इल्तुमिश याने स्वतःचा मुलगा नसिरुद्दीन मुहंमद याची कबर इ. स. १२३१ साली बांधली; तिच्यावर लहानसा घुमट आहे. इ. स. १२३५ साली इल्तुमिशची कबर बांधण्यात आली, तिचे छप्परही घुमटाकृती असावे. सांप्रत ते कोसळून पडले असून, त्याचे जे अवशेष सापडले आहेत, ते घुमटाचे भाग वाटतात. त्यानंतर इ. स. १३०५ मध्ये बांधलेल्या अलाइ दरवाजा या इमारतीवर एक सुंदर घुमट आढ

ळतो. घियासुद्दीन तुघलुकची कबर (इ. स. १३२५) एखाद्या गढीसारखी असून, तिच्यावर ५५ फूट परिघाचा उंच घुमट आहे. त्याचा आकार तार्तर पद्धतीचा आहे. त्यानंतरच्या इंडो-इस्लामी शिल्पात असेच घुमट आढळतात. त्या घुमटावर हिंदू मंदिरावरील आमलकासारखा कळस असतो.

इ. स. च्या १५ व्या शतकात सैय्यद व लोदी या सुलतानांच्या राजवटीत अनेक भव्य मशिदी बांधल्या गेल्या. त्यांतील काही मशिदींवर ५४ फूट उंचीचें घुमट असून, घुमटांच्या बाजूस स्तंभ-तोरणे आहेत. इ. स. १५१८ साली शिकंदर लोदीची कबर बांधली गेली. तिच्यावरचा घुमट दुहेरी अर्थात एकाच्या आत एक असा आहे व त्या दोन घुमटांत थोडे अंतर ठेवलेले आहे. दुहेरी घुमट बांधण्यांचे कारण असे असावे—मशीद अधिक भव्य दिसावी म्हणून घुमटाची उंची वाढवण्यात आली; पण त्यामुळे दालनाची लांबी-रुंदी व छताची उंची यांचा मेळ बसेना. म्हणून आतल्या बाजूस आणखी एक लहान घुमट बांधण्याची ही कल्पना निघाली. त्यानंतरचे बहुतेक सर्व मोठे घुमट अशाच दुहेरी भिंतींचें आहेत.



घुमटांचे विविध प्रकार

शहाजहान बादशहाने आग्रा येथे बांधलेला ताजमहाल आपल्या रचनासौंदर्यामुळे विश्वविख्यात झाला आहे. त्याच्या शिरोभागी विराजमान झालेल्या प्रचंड संगमरवरी घुमटामुळे तर त्याच्या सौंदर्यावर कळसच चढला आहे. हा घुमट हेरेदार म्हणजे पूर्णगोलाकृती असून, त्याचा शिरोभाग पालथ्या कमळाच्या आकाराचा आहे. घुमटाचा हा प्रकार पर्शियन परंपरेतला आहे, असे मानतात. या घुमटाच्या आत दुसरा लहान घुमट असून, दोन्ही घुमटांच्या भिंतींमध्ये बरीच मोकळी जागा ठेवलेली आहे.

विजापूर येथे महंमद आदिलशाहाने बांधलेला गोलघुमट त्याच्या विशिष्ट रचनेमुळे जगप्रसिद्ध झाला आहे. ही इमारत भव्य असून, तिचा खालचा मुख्य भाग आणि वरचा घुमट यांचे आकारमान प्रमाणबद्ध आहे. त्यामुळेच ती इमारत सुरेख दिसते. तिच्या प्रत्येक कोपऱ्यावर एकेक मनोरा आहे. मुख्य इमारतीच्या वरच्या कडेला सुंदर गलथा (कंगोरा) असून त्याच्यावर लहान लहान कमानी आणि त्यांच्यावर नक्षीदार कठडा आहे. या नाजूक बांधणीमुळे त्या घुमटाला फारच शोभा आली आहे. खालची इमारत व घुमट यांची जिथे जोडणी झाली आहे, ती रेषा सुंदर पर्णाकृती नक्षीकामाने झाकलेली आहे.

गोलघुमटाचा अंतर्भाग म्हणजे एक भव्य दिवाणखाना आहे. त्याच्या भिंतींत उंच कमानी आहेत. त्यांच्यावर जो एक गोल सज्जा बांधलेला आहे, तोच घुमटाचा आधार आहे. हा घुमट दुहेरी नाही; पण त्याची भिंतच १० फूट जाडीची आहे. त्याचा बाहेरचा व्यास १४४ फूट आहे व जमिनीपासून उंची २०० फुटांहून अधिक आहे. या घुमटाच्या आत भिंतीजवळ उभे राहून शब्द उच्चारला, तर त्याचे सुमारे १० प्रतिध्वनी ऐकू येतात. इतकेच नव्हे; तर एकाने भिंतीला मनगटी घड्याळ टेकवल आणि दुसऱ्याने समोरच्या भिंतीला कान लावला, तर त्याला घड्याळाची टिकटिक स्पष्ट ऐकू येते.



घियासुद्दीनची कबर



गोल घुमट

घुमटांचे विविध प्रकार चित्रात दाखवले आहेत, त्यांची नावे पुढीलप्रमाणे—

(१) येरुशलेम (२) कैसरीय, अनातोलिया (३) समरकंद (४) व (५) नसिरुद्दीन मुहंमदची कबर, दिल्ली (६) अलाई दरवाजा, दिल्ली (७) घियासुद्दीन तुघलुकची कबर, दिल्ली (८) महंमदशहा सैयदची कबर, दिल्ली, (९) लोदी सुलतानांच्या कबरी, दिल्ली (१०) रुक्ने आलमची कबर, मुलतान (११) जामी मशीद, जौनपूर (१२) होशंगची कबर, मांडू (१३) चामी मशीद, गुलबर्गा (१४) विजापुरी घुमट (१५) हुमायुनची कबर, दिल्ली (१६) खान खानाची कबर, दिल्ली (१७) ताजमहाल (१८) सफदर जंगची कबर, दिल्ली.

इ. स. ११२ साली निर्माण झालेला एक प्रचंड व सुंदर घुमट रोम येथे आढळतो. त्याचप्रमाणे इराणमध्ये इ. स. च्या ४ थ्या किंवा ५ व्या शतकातले काही घुमट पाहायला मिळतात. ही शिल्परचना भारताने पाश्चिमात्य देशांकडून घेतली आहे, असे म्हणतात; पण ते सयुक्तिक वाटत नाही. हिंदूंच्या मंदिरशिल्पात घुमट आढळत नाही हे खरे; पण हा शिल्पप्रकार भारतात अत्यंत प्राचीन काळापासून अस्तित्वात आहे, असे म्हटले पाहिजे. बौद्धांचे बहुतेक सर्व स्तूप अर्धगोलाकृती म्हणजे घुमटाच्या आकाराचेच आहेत. बुद्धपूर्व काळातील काही गुहा आतून गोलाकृती असून, त्यावरूनच घुमटाकृती स्तूपाची कल्पना उगम पावली असावी, असे वाटते. वैदिक काळी आर्य लोक आपल्या पर्णकुटीचे छप्पर अर्धगोलाकार बांधीत असावे आणि त्याचे अनुकरण त्यांनी पाषाणाच्या गुहा खोदताना केले असावे, असेही म्हणतात. तसे असेल, तर या शिल्पप्रकाराचा उगम वैदिक काळातच झाला होता असे मानले पाहिजे. पाहा – कलश. [इं. आ. (इ.); इं. आ.]

(२) एक चर्मवाद्य. हे मातीच्या घड्यासारखे असते. घड्याच्या बुडाला काठ बनवतात व घोरपडीच्या कातड्याने ते बूड मढवतात. हे वाद्य आडवे घेऊन किंवा गळ्यात घालून वाजवतात. वाजवणाराचा उजवा हात घुमटाच्या चामड्यावर व डावा त्याच्या तोंडावर असतो. गोमंतकात व कर्नाटकाच्या काही भागात याचा प्रचार आहे. सुंवारी नावाचा एक कठिण ताल घुमटावर वाजवतात. जागर व शिमगानृत्यातही घुमटाची साथ असते. पाहा– गोमंतक.



घुमट वाद्य

घुमली सौराष्ट्रातील जामनगरच्या दक्षिणेस ५२ मैलांवर असलेले एक प्राचीन ठिकाण. महाभारतातील जयद्रथाचे वंशज म्हणवणारे जेठवा लोक इ. स. च्या ७ व्या शतकात सिंधमधून कच्छमार्गे सौराष्ट्रात आले व त्यांपैकी सलकुमार नावाच्या राजाने इथे आपली राजधानी स्थापली. तिचे मूळ नाव भूभ्रतपल्ली असे होते. नंतरच्या काळात प्रथम भुमली व नंतर घुमली असा त्याचा अपभ्रंश झाला.

बर्डा डोंगराच्या ईशान्य टोकाजवळ एका दरीत ही नगरी उद्ध्वस्त स्थितीत दिसते. येथील नवलाख व इतर मंदिरे इ, स च्या १२ व्या शतकापूर्वीची आहेत. त्यांच्या शिल्पावर चालुक्य व ब्राह्मण शिल्पकलेचा प्रभाव दिसून येतो. रचना व नक्षीकाम या दोन्ही दृष्टींनी नवलाख मंदिर अप्रतिम आहे. याच्या बाहेरील भिंतींवर देव, मानव व पशु – पक्षी यांच्या आकृती कोरलेल्या आहेत. त्यातील वाद्यांच्या शिल्पांवरून त्या काळातील वाद्यांची कल्पना येते. मंदिरातल्या स्तंभांवरची नक्षी फार सुंदर आहे. तिच्यावरून अशा नक्षीकामाच्या पद्धतीला घुमली पद्धत असे तिकडे नाव पडले आहे.

सिंधमधून आलेल्या आक्रमक टोळयांनी ही नगरी दोनदा लुटल्याचे सांगतात. इ. स. १३१३ मध्ये तर या नगरीचा नाशच झाला. [हरकांत शुक्ल– इलस. वीकली, २२ जुलै १९५६]

घुमूरा नृत्य ओडिसामध्ये घुमूरा नावाचे एक वाद्य आहे. हे वाद्य वाजवून करायच्या नृत्याला घुमूरा नृत्य असे नाव पडले आहे. प्रथम नर्तक एका वर्तुळात किंवा अर्धवर्तुळात उभे राहतात. वर्तुळाच्या मध्यभागी त्यांचा नायक उभा राहतो. तो आपल्या हाताला मोरपीस बांधतो. प्रथम घुमूरा वाद्यावर एक तोडा वाजविला जातो. मग त्याला धरून नर्तक नाचू लागतात. हे नृत्य चालू असता पौराणिक आख्याने गायली जातात. नर्तक रंगीबेरंगी पोशाख करतात. पोशाखातली मुख्य वस्तू साफा ही असते. नर्तक हा साफा विचित्र पद्धतीने बांधतात. [भा. लो. नृ.]

घुरिया नृत्य करमा नृत्याचा एक प्रकार. पिकांची कापणी झाल्यावर फुरसतीच्या वेळी मध्य प्रदेशात अनेक ठिकाणी हे नृत्य होते. या नृत्यात पुरुष व स्त्रिया दोघेही भाग घेतात व त्यांची संख्या साधारणपणे २० ते २४ पर्यंत असते. नृत्याच्या वेळी पुरुष धोतर, रंगीत फेटा, मण्या–शिंपल्याचे दागिने, इ. वस्तू वापरतात; तर स्त्रिया विशिष्ट तऱ्हेचे हातमागाचे कपडे व मण्यांच्या माळा घालतात. या नृत्याला ढोल, टिमकी, तुतारी, तंतुवाद्य, इ. वाद्यांची साथ असते. [ए. हो. रा.]



घुमूरा नर्तक

घुश्मेश्वर शिवाचा बारावा अवतार. देवशैलाजवळ घुश्मा (घृष्णा) नामक स्त्रीच्या रक्षणासाठी हा अवतार झाला. व्याघ्रेश्वर हे याचे उपलिंग होय. पाहा – घृष्णेश्वर. [प्रा. च. को.]

घूमर राजस्थानातील स्त्रियांचे एक सामूहिक नृत्य. राजस्थानी समाजाच्या वेगवेगळ्या थरांत हे वेगवेगळ्या रूपांनी प्रचलित आहे. होळी, गणगौर, दिवाळी, इ. उत्सवांत आणि लग्नासारख्या मंगल समारंभात राजस्थानी स्त्रिया हे नृत्य करणे करतात. इष्ट देवतेचा कृपाप्रसाद मागणे आणि मनोरंजन करणे असा त्याचा उभयविध हेतू असतो. इतिहासकाळात राजस्थानातील राणीवशातल्या स्त्रियाही घूमर नाचून आपले उत्सव साजरे करीत, असे कळते.

घागरा हा राजस्थानी महिलांचा फार पुरातन कालापासूनचा पेहराव आहे. हा घागरा चुणीदार, पायघोळ आणि कलाकुसरीचा असतो. घागरावालीने आपल्याभोवती गिरकी घेतली, की तिचा घागराही वाऱ्याने फुलून वाटोळा फिरतो. ज्या नृत्यात अशा प्रकारे स्त्रीचा घागरा घुमतो, त्यालाच पुढे घूमर असे नाव मिळाले.



घूमर नृत्य

हे नृत्य करताना स्त्रिया गोल करून उभ्या राहतात आणि एका अंगाला झुकून टाळी वाजवीत नाचतात. कधी त्या हातात टिपऱ्या किंवा लाकडी तलवारी घेऊनही नाचतात. नृत्याच्या वेळी त्या गीतेही गातात.

घूमराची दोन-तीन रूपे आहेत. एक प्रकार म्हणजे गोलाकार उभे राहून नृत्य करणे व दुसरा प्रकार म्हणजे दोन स्त्रियांनी समोरासमोर उभे राहून व एकमेकींच्या खांद्यावर हात ठेवून गिरक्या घेणे. तिसरा प्रकार स्वतःभोवती गिरक्या घेण्याचा असतो. गिरक्या घेणे हे या तीन्ही प्रकारांचे वैशिष्ट्य आहे. या नृत्याची बरीच गीतेही आहेत. त्यातले एक गीत असे–

भर लावो रे पाणी सागर रो
पाणी जाउँ तो म्हारे काँकर भागे।
हाँ रे म्हारे आँगण हौद खुदावो रे॥
श्यामजी री बावडी रो खारो खारो पाणी।
हाँ रे म्हारे पिछोला रो पाणी अमृतवाणी रे॥

अर्थ–(एक स्त्री आपल्या वल्लभाला सांगते) फत्तेसागराचे पाणी भरून आण आणि अंगणात हौद खणून त्यात ते भरून टाक. श्यामजीच्या विहिरीचे पाणी खारवणी आहे. माझ्या पिछोला तलावाचे पाणी अमृतासारखे आहे.

घूमर नृत्य हे गुजरातमधल्या गरबा नृत्याशी जुळते आहे. मात्र प्रदेशपरत्वे त्याच्या छटा भिन्न भिन्न असतात. उदयपुराकडील घूमरात संगीताला प्राधान्य असते, तर जोधपुराकडील घूमरात कलात्मक अभिनयाला महत्त्व असते.

घूमर नृत्याला हजारो वर्षांचा इतिहास आहे. महाभारतकाळात मत्स्य आणि पांचाल या देशांत फरद नृत्य नावाचा एक मनोरंजक नृत्यप्रकार होता. त्याचा अवशेष आजही फड या नावाने अलवार, मेवाड इ. भागांत आढळतो. हे फरद नृत्य मूळ दरद संस्कृतीतून उगम पावले होते आणि आजूबाजूंच्या प्रदेशांत त्याचा प्रसार झाला होता; पण पुढे अरवली व विंध्य या पर्वतांच्या मध्यभागी प्रचलित असलेल्या गंधर्व नृत्याने या फरद नृत्याला मागे टाकले. कालांतराने या फरद नृत्याने गघूरा या दुसऱ्या एका नृत्यप्रकाराला आपल्यात सामावून घेऊन पुनश्च लोकजीवनात स्थान मिळविले. पण गघूराही फार काळ टिकले नाही. गुर्जरांनी घूमर नावाच्या दुसऱ्याच एका ढंगदार नृत्याचा आविष्कार करून गघूराचे माहात्म्य कमी केले. शाक्त पंथाने घूमराला मान्यता दिली आणि दुर्गेच्या पूजोत्सवात ते या नृत्याचे आयोजन करू लागले. इ. स. च्या दहाव्या शतकापर्यंत घूमर नृत्याची चांगली चलती होती; पण पुढे त्याची लोकप्रियता ओसरली. पुढे चालुक्य राजांच्या कारकिर्दीत पुनश्च त्याला उर्जितावस्था लाभली आणि आजतागायत ती काही अंशी टिकून आहे. घूमरचीच दुसरी एक शाखा आहे, तिला मछली असे म्हणतात. [राजस्थान; वरदा – जाने. १९५८; भा. लो. नृ.]

घूमरा राजस्थानातील भिल्लांचे एक नृत्य. केवळ पुरुषांचे नृत्य व स्त्री-पुरुषांचे संमिश्र नृत्य असे याचे दोन प्रकार आहेत. यात नर्तक गोलाकार उभे राहतात आणि मंद गतीने पदसंचालन करतात. या नृत्याची लय संथ असते. नाचताना गाणीही म्हटली जातात. संमिश्र नृत्याच्या वेळी पुरुष प्रथम गीताची ओळ सांगतात व नंतर स्त्रिया तिचा अनुवाद करतात. सामाजिक व धार्मिक अशा कित्येक प्रसंगी हे नृत्य होते. [भा. लो. नृ.]

घृत ‘पक्वनवनीतम्’= कढवलेले लोणी म्हणजे घृत होय (श. क.). आज्यम्, हविः, सर्पिः अशी याची अन्यही नावे आहेत. याचा अन्न म्हणून व यज्ञात आहुती म्हणूनही उपयोग होतो. औषधासाठीही हे सर्वत्र वापरले जाते. पातळ तुपाला आज्य आणि घट्ट तुपाला घृत म्हणतात. आज्य देवांना व घृत मनुष्यांना आवडते, असे म्हटले आहे (ऐ. ब्रा. १.३).

'तेजो वा एतत्पशूनां यद् घृतम्'= घृत हे पशूंचे तेज होय (ऐ. ब्रा. ८. २०) व 'एतद्वा अग्नेः प्रियं धाम यद् घृतम्'= घृत हे अग्नीचे प्रिय स्थान (आवडते) आहे (तै. ब्रा. १. १. ९. ६.), असे घृताविषयी वैदिक साहित्यात अनेक उल्लेख आढळतात. घृताचे पौष्टिकपण लक्षात घेऊन 'आयुरेव घृतम्'= तूप हे आयुष्यच (आयुष्यवर्धक) आहे, असेही म्हटले आहे.

गाईचे तूप शिवलिंगावर शिंपडल्यास सोने चोरल्याच्या दोषातून मुक्तता होते, अशी समजूत आहे. पाहा – आज्य. [वे. इं.; हि. ध.; म. श. को.; क्रि. स्ट. ले. उ.]

घृतकंबलदान हे व्रत माघातील कोणत्याही अष्टमीस वा चतुर्दशीस करतात. पांढऱ्या किंवा काळ्या गाईचे घट्ट झालेले तूप शिवलिंगावर माखणे व त्याचे दान देणे, याला घृतकंबलदान असे म्हणतात. या दानाचा विधी असा–

प्रथम संकल्प करून शिवाची पूजा करतात व शिवलिंगावर तूप थापतात. नंतर तीळ, मोहऱ्या, बेलाची पाने, या वस्तू देवाला वाहतात. शेवटी 'शिवाय नमः' या मंत्राचा यथाशक्ति जप करतात. मग ते माखलेले तूप दान देतात. रात्री जागरण करतात. प्रातःकाळी स्नान झाल्यावर पुनश्च शंकराची पूजा करून शिवभक्तांना भोजन घालतात व स्वतः भोजन करून व्रतसमाप्ती करतात. फल – दारिद्र्यनाश, सुखोपभोगांची प्राप्ती व शिवलोकाची प्राप्ती. [व्रतराज]

घृतप्राश एक पापनाशक विधी. यात संकल्पपूर्वक तूप प्राशन करायचे असते. यामुळे अन्न, तेल, फळे व फुले यांतील किडे मारल्याचे पातक नष्ट होते. [पु. इं.]

घृतभाजन एक व्रत. पौर्णिमेच्या दिवशी शिवलिंगपूजा, ब्राह्मणांना तूप व मध यांनी युक्त असे भोजन व तिळातांदळाचे दान असा याचा विधी आहे. फल – सुखसमृद्धीची प्राप्ती. [हि. ध.]

घृतस्नपन एक व्रत. विषुवदिनी, ग्रहणाच्या वेळी किंवा पौषातल्या पवित्र दिवशी शिवलिंगावर रात्रभर तुपाची सतत धार धरणे, तसेच गीत-नृत्यांनी रात्र जागवणे, असा याचा विधी आहे. फल – शिवलोकप्राप्ती. [हि. ध.]

घृतस्नान एक व्रत. मकर संक्रांतीच्या दिवशी एक प्रस्थभर घृताने विष्णूला स्नान घालणे आणि नंतर ते घृत व एक गाय ब्राह्मणाला दान देणे, असा याचा विधी आहे. फल – पापनाश व सूर्यलोकाची प्राप्ती. [व्रतराज]

घृताचलदान घृताचल म्हणजे तुपाचा पर्वत होय. घृतकुंभावर भाताने भरलेले भांडे ठेवून त्याला शुभ्र वस्त्र गुंडाळतात. त्याच्या शेजारी ऊस ठेवतात. मग त्या घृतकुंभाची पूजा करून तो दान देतात. दानमंत्र असा–

यच्च तेजोमयं ब्रह्म घृते नित्यं प्रतिष्ठितम् ।
घृतपर्वतरूपेण तस्मान्नः पाहि भूधर ।।

अर्थ – तेजोरूप ब्रह्म जे घृताच्या ठिकाणी नित्य प्रतिष्ठित आहे, त्या घृताचे पर्वतरूपान मी दान करीत आहे. हे पर्वता, तू माझे रक्षण कर.

हे दान सूर्योदयापूर्वी द्यावे, असे सांगितले आहे. [दा. चं.]

घृष्णेश्वर औरंगाबादपासून १८ मैलांवर वेरूळ गावाजवळ महिषाद्रीच्या पायथ्याशी इलागंगा नदीच्या तीरावर घृष्णेश्वराचे भव्य व सुंदर मंदिर आहे. हे देवस्थान बारा ज्योतिर्लिंगांपैकी एक आहे. याच्या निर्मितीची कथा पद्म पुराणात दिली आहे, ती अशी—

सुधर्मा नावाचा एक ब्राह्मण होता. त्याची पत्नी सुदेहा ही पतिव्रता होती; पण तिला मूल होत नव्हते. म्हणून तिने पतीला आपल्या भावाच्या घृष्णा नामक मुलीशी दुसरे लग्न करण्याची विनंती केली. पत्नीच्या आग्रहास्तव आणि पुत्रप्राप्तीच्या इच्छेने सुधर्म्याने तिच्याशी विवाह केला.

घृष्णा परम शिवभक्त होती. ती रोज १०१ पार्थिव शिवलिंगांची पूजा करून एका तळ्यात त्यांचे विसर्जन करीत असे. शिवकृपेने तिला पुत्र झाला. पण त्यामुळे सुदेहा मत्सराने जळू लागली. एक दिवस तिने त्या मुलाला मारून त्याच्या देहाचे तुकडे केले व ते तळ्यात टाकून दिले.

घृष्णा शिवलिंगार्चन करीत असता तिला पुत्राच्या हत्येची वार्ता कळली; पण ती लवमात्र विचलित झाली नाही. नित्याप्रमाणे तिने पूजा पुरी केली व तळ्यावर जाऊन शिवलिंगांचे विसर्जन केले. तिथून ती परत फिरणार, एवढ्यात तिचा पुत्र जिवंत होऊन तळ्यातून बाहेर आला. त्याच वेळी शंकर तिथे प्रकट झाला आणि त्याने घृष्णेला वर मागण्यास सांगितले. घृष्णेने शंकराला त्या क्षेत्रात कायमचे वास्तव्य करण्याची विनंती केली. तेव्हापासून ज्योतिर्लिंगाच्या रूपाने शिव तिथे वास करू लागला आणि त्याला घृष्णेश्वर हे नाव मिळाले.

याविषयी दुसरी एक कथा आहे, ती अशी—

एकदा शिव-पार्वती सारीपाट खेळत असता त्यात शिवाचा

पराभव झाला आणि तो विमनस्क होऊन काम्यवनात निघून गेला. त्याच्या विरहाने व्याकुळ झालेली उमाही नंतर तिकडे गेली आणि भिल्लिणीचे रूप घेऊन शिवासमोर नृत्य करू लागली. शिव तिच्यावर भाळला, पण त्याला वश होण्यापूर्वी तिने आपल्या दोन अटी सांगितल्या. पहिली अट ही, की त्याने उमेवरील राग सोडावा आणि दुसरी अट ही, की आपल्यासह काम्यवनातच कायम राहावे. शिवाने त्या अटी मान्य करून तिला जवळ घेतले. तात्काळ त्या भिल्लिणीच्या जागी उमा प्रकट झाली. तिला पाहून शिव आश्चर्यचकित झाला. उमा नृत्य करून शिणली होती व तिला तहानही लागली होती. तिची ती तृषा शमवण्यासाठी शिवाने भूमीत त्रिशूळ खुपसून पाताळातील भोगावतीचे जळ वर आणले. तेच सांप्रतचे शिवालय तीर्थ होय. पुढे एके दिवशी कपाळी केशरतिलक लावण्यासाठी उमेने डाव्या हातावर केशर घेऊन ते उजव्या हाताच्या अंगुलीने चोळण्यास प्रारंभ केला. तसे करताना त्यातून एक शिवलिंग निर्माण झाले; तेच घुसृणेश्वर या नावाने प्रसिद्ध होते. घृष्णेश्वर हे त्याचेच रूपांतर आहे.

घृष्णेश्वराचे मंदिर दक्षिणाभिमुख असून, ते लालसर जांभ्या घोटीव दगडांचे आहे. गाभाऱ्यात काळ्या पाषाणाचे शिवलिंग आहे. मंदिराचे शिखर अत्यंत सुंदर असून, त्यावरील मूर्ती व नक्षीकाम प्रेक्षणीय आहे. मंदिराच्या छतावर आणि मंडपातील खांबांवर सुरेख चित्रे आणि नाजूक आकृती कोरलेल्या आहेत. त्यात पशु-पक्षी, वनस्पती, वादक, नर्तक, फुगड्या खेळणाऱ्या युवती, धनुर्धारी शिकारी, इ. चित्रे आहेत. मंदिराभोवती प्रशस्त प्रांगण असून, त्याच्या भोवती उंच कोट बांधलेला आहे.



घृष्णेश्वरमंदिर

मंदिरापासून जवळच उत्तम प्रकारे बांधलेले एक विस्तीर्ण तळे आहे. त्याला शिवालयतीर्थ म्हणतात. या तळ्यात स्नान केल्यामुळे प्राचीन काळी एल नामक राजाचा कुष्ठरोग गेला, अशी कथा आहे.

वेरूळचे कैलास लेणे निर्माण करणाऱ्या राष्ट्रकूट वंशातील कृष्णराजानेच घृष्णेश्वराचे मंदिरही बांधले. पुढे वेरूळ गावाचे पाटील मालोजी भोसले यांनी त्या मंदिराचा व शिवालयतीर्थाचा जीर्णोद्धार केला (इ. स. १५९९). पुढे औरंगजेबाने आपल्या स्वारीत ते मंदिर पाडून टाकले. सध्याचे मंदिर मल्हारराव होळकरांची पत्नी गौतमाबाई हिने इ. स. १७३० साली बांधले, असे तिथल्या शिलालेखावरून कळते. शिवालयतीर्थ अहिल्याबाई होळकर हिने इ. स. १७६९ मध्ये पुनश्च बांधले.

प्रतिवर्षी शिवरात्रीच्या दिवशी इथे मोठी यात्रा जमते. त्या वेळी घृष्णेश्वराची उत्सवमूर्ती पालखीत ठेवून वाजत गाजत शिवालयतीर्थावर स्नानासाठी आणतात. [पुरुषार्थ, देवताविशेषांक, जून-जुलै १९६३; बारावे ज्योतिर्लिंग]

घेर नृत्य

भिल्लांचे एक नृत्य. हे स्त्रीपुरुषांचे मिश्र नृत्य असते. यात नर्तक हातांत हात घालून व टाळ्या वाजवून नाचतात. नृत्यात भाग घेणाऱ्या स्त्रियांना घेरणिया व पुरुषांना घेरिये म्हणतात. त्यांच्या हातांत वेताच्या काठ्या व तलवारी असतात. या नृत्याला ढोल, मंजिरी, मुरली, इ. वाद्यांची साथ असते. [भा. लो. नृ.; संयुक्त राजस्थान, मार्च १९५७]

घेरिया नृत्य

गुजरातमध्ये नवरात्रात होणारे एक नृत्य. त्यासाठी खेड्यातील २० – २५ तरुणांचा एक मेळा (घेर) गावोगावी हिंडतो. हे तरुण स्त्रीवेष करतात, व कमरेला घुंगरू बांधून टिपऱ्यांनी ताल देत नाचतात.

त्यांच्या प्रमुखाला कवियो म्हणतात. कोट, धोतर, फेटा व हातात मोरपिसांचा गुच्छ अशी त्याची वेषभूषा असते. तो नृत्याचे गाणे सांगतो व बाकीचे ते म्हणतात. नर्तकांपैकी एकाच्या अंगाला व तोंडाला काळा रंग लावलेला असतो. त्याचा पोषाखही भडक असतो. त्याला चट म्हणतात. तो विदूषकासारख्या गमती करतो. एका माणसाजवळ उंच बांबू असतो, त्या बांबूला आडवी दांडी असते व तिच्यावर पांढरा कपडा असतो. या

बांबूला बगळी म्हणतात. ती मेळयाच्या संरक्षणासाठी म्हणून बरोबर घेतात. एका बांबूला घोडयाचे मुख लावून एकजण त्यावर स्वार होतो. त्याला घोडीवाला म्हणतात. तोही विदुषकी चाळे करतो. या नृत्यात निरनिराळया देवतांचे स्तवन असते. गावातले धनिक लोक या नृत्यमेळयाला जेवण घालतात व कपडेही देतात. गावातल्या स्त्रिया कवियोच्या हातातील मोरपिसाला आरती ओवाळतात. [दु. ऑ. गु.; सुरत गॅझे.]

घोडा एक युद्धोपयोगी व वाहनोपयोगी माणसाळलेला पशू. ऋग्वेदकालापासून घोडा हा माणसाला उपयुक्त ठरला असल्याचे कळून येते. सुंदर, तरतरीत, बलवान, वेगवान, आणि उमदा असल्यामुळे वैदिक आर्यांना गायीइतकाच तोही प्रिय वाटत होता. वसु नामक देवांनी घोडयाला सूर्यापासून उत्पन्न केले (ऋ. १. १६३. २). वायूने त्याला रथाला जोडले, गंधर्वाने त्याचा लगाम धरला व इंद्र प्रथम त्यावर आरूढ झाला, असेही वर्णन ऋग्वेदात आढळते. वैदिक काळी विशिष्ट उत्सवप्रसंगी घोडयाला सोन्या-रुप्याच्या दागिन्यांनी सजवून मिरवणुकीच्या अग्रभागी चालवीत. आजमितीसही कित्येक ठिकाणी ती प्रथा चालू आहे. कित्येक जातीत लग्नाच्या वेळी वरघोडा मिरवला जातो.



घोडा

ऋग्वेदात कित्येक ठिकाणी घोडदौडीचेही उल्लेख आढळतात (५: ३७.७; ६.२४.६). घोडदौडीला ऋग्वेदात आजी म्हटले आहे. त्या काळी घोडयांच्या शर्यती लावीत व शर्यत जिंकणाऱ्याला पारितोषकेही देत (ऋ. १.८१.३; १.११६.१५). इंद्राला घोडयांच्या शर्यतीची आवड असल्याचे त्याला दिलेल्या आजिकृत व आजिपती या विशेषणांवरून कळते (ऋ. ८.५३. ६. व १४) वाजपेय, राजसूय इ. यज्ञांच्या प्रसंगी औपचारिक रूपाने घोडदौड करण्याची प्रथा होती.

ऋग्वेदकाळी घोडे दुर्मिळ नव्हते; पण त्यांची किंमत मात्र पुष्कळ असे. घोडा किंवा घोडी ही त्या काळी दानयोग्य वस्तू होती. ऋग्वेदातल्या दानस्तुतीच्या सूक्तांत अश्वदानाचे उल्लेख मिळतात. घोडयापेक्षा घोडी अधिक चपळ असल्यामुळे त्या काळी रथासाठी घोडी अधिक पसंत करीत. गाडीलाही पुष्कळदा घोडीच जुंपीत. वैदिक आर्य युद्धप्रसंगी घोडे जुंपलेला रथ वापरीत हे कळते; पण ते घोडयावर स्वार होत असल्याचे उल्लेख मात्र आढळत नाहीत. युद्धाशिवाय इतर वेळी मात्र घोडयांचा स्वारीसाठी उपयोग करीत (ऋ. ५.६१.१३). त्यांच्या पाठीवर ओझीही लादीत. घोडे चरायला सोडताना त्यांचे पाय बांधण्याची चाल होती. घोडयांची पागा, त्यांचा खुराक, त्यांचे स्नान, इ. ची व्यवस्था पाहण्यासाठी अश्वपाल नेमीत. घोडयांचे लगाम, चाबूक, इ. उपकरणांचे वर्णन ऋग्वेदात आढळते.

भारताच्या वायव्य सरहद्दीवरील कांबोज, गांधार, वाल्हीक, वनायू, आरट्ट, सिंधुदेश, पारसीक या देशांतले घोडे उत्तम प्रतीचे मानले जात (म. भा. सभा. ५३; उद्योग. ८६; द्रोण. १२५). कौटिल्याच्या अर्थशास्त्रातही असेच म्हटले आहे.

पुराणात घोडा ब्रह्मदेवाच्या पायापासून उत्पन्न झाल्याचे सांगितले आहे. घोडयांच्या तबेल्यांचे आणि घोडयावर स्वार होऊन हिंडण्यांचे उल्लेख पुराणांतरी पुष्कळ आहेत. त्रेता युगात चक्रवर्ती सम्राटाच्या निवडक रत्नांपैकी घोडा हे एक रत्न मानले जात होते. अश्वमेध यज्ञात घोडा बळी दिला जात असे. त्याआधी त्याला दिग्विजय करण्यासाठी सोडीत व त्याची विजययात्रा पुरी झाल्यावर मग त्याचा याग करीत. राम व युधिष्ठिर यांनी केलेले अश्वमेध रामायण-महाभारतात प्रसिद्ध आहेत.

घोडयाचे सामरिक महत्त्व ओळखून कौटिल्याने अश्वशाला, घोडयांचा खुराक, त्यांचे आरोग्य, त्यांची उपज, वर्गीकरण, शिक्षण, इ. गोष्टींविषयी तपशीलवार वर्णन केले आहे.

बाणाच्या हर्षचरितातही घोडयाविषयी बरीच माहिती मिळते. त्या काळी राजाला खास प्रिय असे काही घोडे असत. त्यांना वल्लभतुरंग किंवा राजवल्लभ म्हटले जाई. लाल, सावळा, शुभ्र, तित्तिरकल्माष (तित्तिर पक्ष्याच्या पंखासारखा) असे घोडयांच्या रंगाचे उल्लेख मिळतात. घोडयाचे हृदय, पाठ, मुख आणि दोन्ही कुशी या ठिकाणी भोवरा असला म्हणजे

त्याला पंचकल्याणी म्हणत व तो शुभलक्षणी समजत.

भारताच्या सांस्कृतिक व राजकीय इतिहासात काही घोडे प्रसिद्ध आहेत. त्यांपैकी उच्चैःश्रवा हा सर्वांत पहिला होय. तो समुद्रमंथनातून निघाला आणि इंद्राचे वाहन बनला. श्रीकृष्णाच्या रथाला जे चार घोडे जोडले जात, त्यांची नावे शैव्य, सुग्रीव, मेघपुष्प आणि बलाहक अशी होती. ऐतिहासिक काळात गौतम बुद्धाचा कंथक, चालुक्य विक्रमादित्याचा चित्रकंठ, राणाप्रतापाचा चेतक, छत्रपती शिवाजी महाराजांची कल्याणी घोडी आणि राणी लक्ष्मीबाईचा घोडा, इ. घोडे प्रसिद्ध आहेत. भारतीय सम्राटांच्या उत्थान–पतनात घोड्यांचे स्थान केवढे महत्त्वपूर्ण होते, ते इतिहासाच्या अभ्यासकाला समजून येण्यासारखे आहे. भारतीय चतुरंगदळात घोडदळ हे एक महत्त्वाचे अंग असे. मौर्य सम्राटांनी आपले घोडदळ उत्तम संघटित केले होते. हूणांनी भारतात अनेक ठिकाणी विजय मिळविले, त्याचेही बरेचसे श्रेय घोडा या प्राण्याला आहे. राजपुतांच्या अबलख वारूंनी आणि मराठ्यांच्या भीमथडी–गंगथडी तट्टांनी इतिहासात भीमपराक्रम केला आहे.



घोडे – विविध अवस्थाने

लौकिक समजुती – सामान्यपणे वारा, प्रकाश व समुद्राच्या लाटांवरील फेस यांचे घोडा हे प्रतीक मानलेले आहे. ग्रहमालिकेत प्लूटो व नेपचून यांच्याशी घोड्याचे साहचर्य मानतात. शनीच्या कृपेसाठी घोड्याच्या नालाची पूजा करावी, असे सांगितले आहे. घोड्याला दिव्यदृष्टी असते, अशा जागतिक कथा आहेत. त्यामुळेंच तो आपल्या मालकाला आगामी संकटाची सूचना देतो, असेही समजतात. स्वप्नात होणारे घोड्याचे दर्शन हे इंग्लंड व जर्मनी या देशांत मृत्युसूचक मानतात. घोड्याचे मान हालवणे व जमिनीवर पाय आपटणे हे मालकाचे भाग्य सुचवते; पण त्याने खुराने माती उकरली तर ते संकटसूचक होय. मुसलमान लोक घोडा विकत घेतात, तेव्हा त्याच्या कपाळावर अंडे फोडतात. हिंदू मनुष्य घोडा विकत घेतो तेव्हा तो त्याचे पाय धुतो, त्याला भाकरी देतो व त्याचा पायगुण चांगला ठरण्यासाठी त्याच्या कपाळाला सोने व हळद लावतो. मुलांना भुताखेतांची बाधा होऊ नये, म्हणून घोड्याच्या शेपटीचा केस ताइतात घालून, तो मुलांच्या गळ्यात बांधतात. घोडा हे कित्येक ग्रामदेवतांचे वाहन असते. भाविक लोक मातीचे घोडे करून ते त्या देवतांना वाहतात. **पाहा** – अश्वमेध. [ऋ. द.; क. हि. वा. पु.; की. पॉ.; डि. सि.; प्रा. भा. म.; वे. इं.]

घोडा–घोडा लहान मुलांचा एक खेळ. खेळणारा मुलगा एक काठी दोन पायांच्या मधे तिरकी धरून पळतो. पळताना डाव्या हाताने काठीचे टोक धरून व उजव्या हातात लहानसा चाबूक घेऊन काठीच्या मागील भागावर मारीत राहतो. कधी कधी दोन मुले हा खेळ खेळतात. पुढचा मुलगा होतो घोडा व मागचा होतो घोडेवाला. मागचा मुलगा पुढच्याच्या गळ्यात किंवा छातीला दोरी बांधून ती आपल्या हाती धरतो व दोरीचे दुसरे टोक चाबकासारखे वापरून घोड्याला पिटाळतो.

घोडा-चेंडू कोकणातला एक खेळ. १५ ते २० खेळाडू मिळून हा खेळ खेळतात. त्यासाठी एक वर्तुळ काढतात. वर्तुळात ४–५ जण ओळीने एकापुढे एक असे उभे राहून पुढच्याची कंबर धरतात. पुढचा मनुष्य घोड्याचे तोंड व मागचा घोड्याचे शेपूट बनतो. घोडा वर्तुळात फिरत राहतो. बाकीचे खेळाडूव र्तुळाच्या बाहेर सारख्या अंतरावर उभे राहून घोड्याच्या शेपटीला चेंडू मारण्याचा प्रयत्न करतात. घोड्याचे तोंड बनलेला मनुष्य तो चेंडू अडवून शेपटीचा बचाव करण्याचा प्रयत्न करतो. चेंडू शेपटीला लागला, तर घोडा बाद होतो व पुन्हाखेळ चालू होतो. [रत्ना. गॅझे.]

घोडाजत्रा नेपाळातील लोकांचा एक सण. नेवार लोक चैत्र कृष्ण चतुर्दशीस आणि गुरखा लोक वैशाख शुद्ध प्रतिपदेस हा सण पाळतात. या दिवशी लोक आपली घरे व अंगणे झाडून स्वच्छ करतात आणि घरातील आपले हातमाग व कलाकुसरीचे जिन्नस यांचे प्रदर्शन मांडतात. या सणाचा व घोड्यांचा काय संबंध आहे, ते सांगणे कठीण आहे. पण वृद्ध नेवार सांगतात, की प्राचीन काळी या दिवशी घरातील भुतेखेते दूर घालवण्यासाठी अश्वप्रतीकाचा उपयोग करीत; त्यावरून

या सणाला हे नाव पडले असावे. सांप्रतही या दिवशी गुरखे लोक घोडयांच्या शर्यती लावतात. कुस्त्या, उडया, बलमापन, इ. खेळ व कवायतीही करतात.

घोडापाणी एक बैठा खेळ. दोन मुले समोरासमोर बसतात. एकजण आपल्या डाव्या हाताची मूठ जमिनीवर टेकवून अंगठा उभा करतो. या अंगठयाला म्हणायचे घोडा. दुसरा गडी त्या घोडयाला पाणी घालतो, म्हणजे आपल्या दोन्ही हातांचे तळवे जुळवून ते त्या घोडयावर धरून घासतो व मागेपुढे करतो. घोडेवाला गडी अधूनमधून 'नीट पाणी घाल' असे म्हणून त्याच्या हातावर चापटया मारतो. पाणी घालणाऱ्याने चापटी चुकवली, की त्याला घोडेवाला व्हायला मिळते व दुसऱ्याला पाणी घालावे लागते.

घोरकोलाहल वाराहकल्पातील विष्णूचा बारावा व शेवटचा अवतार (वायू पु. ९७. ९६).

घोरी शिहाबुद्दीन मुहंमद गज़नी व हेरात यांच्यामध्ये घूर नावाचा प्रदेश आहे. तिथला सुलतान घियासुद्दीन मुहंमद याने इ. स. ११७३ साली घुझ तुर्कांचा पराभव करून गज़नीचे राज्य जिंकले आणि आपला भाऊ शिहाबुद्दीन मुहंमद याला तिथे सुभेदार नेमले. याला मुइझुद्दीन मुहंमद साम असे दुसरे नाव होते. भारताच्या इतिहासात मात्र हा मुहंमद घोरी याच नावाने प्रसिद्ध आहे. गज़नीच्या सुलतान महमूदाप्रमाणेच यानेही भारतावर अनेक स्वाऱ्या केल्या. त्यांपैकी पहिल्या काही स्वाऱ्या त्याने गोमल खिंडीतून केल्या. इ. स. ११७५ साली त्याने मुलतान घेतले व ११७८ साली सिंध व राजस्थान यांमधले वाळवंट पार करून तो अबू पर्वतापर्यंत येऊन भिडला. पण त्या मोहिमेत त्याच्या सैन्याची दुर्दशा झाली. गुजरातचा राजा मूळराज (दुसरा) याने त्याचा पराभव केला. मुहंमद घोरीचे पुष्कळ सैन्य मारले गेले आणि त्याला पळता भुई थोडी झाली.

त्या वेळी लाहोर येथे गज़नीच्या यामिनी वंशातील खुश्रव मलिक हा राज्य करीत होता. तो खोकर नामक टोळीवाल्यांना जम्मूचा राजा चक्रदेव याच्याविरुद्ध मदत करीत असे. त्याचा बंदोबस्त करण्यासाठी चक्रदेवाने मुहंमद घोरीची मदत मागितली. ती संधी साधून घोरीने भारतावर पुन्हा स्वारी केली. इ. स. ११७८ त त्याने पेशावर घेतले. इ. स. ११८१ मध्ये तो लाहोरवर चाल करून आला, पण खुश्रवाने त्याच्यांशी तह करून वेळ मारून नेली. इ. स. ११८५ साली मुहंमदाने पुन्हा पंजाबवर स्वारी करून सियालकोटचा किल्ला जिंकला आणि इ. स. ११८६ साली लाहोरही काबीज करून त्याने प. पंजाबवर आपली सत्ता प्रस्थापित केली.


मुहंमद घोरी

त्यानंतर मुहंमद घोरी पंजाबमधून पृथ्वीराज चौहानाच्या राज्यावर आक्रमण करू लागला. त्याने तबरहिंद (सिरहिंद) चा गड जिंकून तिथे मलिक झियाबुद्दीन याची नेमणूक केली. आपल्या राज्यात घुसून लुटालूट, जाळपोळ व अत्याचार करणाऱ्या मुसलमानांचा समाचार घेण्यासाठी पृथ्वीराजाने मोठे सैन्य जमा केले. त्या कामी अनेक राजपूत राजे त्याच्या मदतीला आले. मुहंमद घोरीला ही वार्ता कळताच तो स्वतःच पृथ्वीराजावर चालून आला. दिल्लीपासून ८० मैल आणि थानेश्वरापासून १४ मैल अंतरावर तराई नामक ठिकाणी दोन्ही सैन्यांची गाठ पडली आणि उभयतांचे घनघोर युद्ध झाले (इ. स. ११९१). त्या युद्धात मुहंमद घोरीचा दारुण पराभव झाला व त्याचे बरेचसे सैन्य कापले गेले. नंतर पृथ्वीराजाने तबरहिंदवर स्वारी केली. तो गड जिंकायला त्याला १३ महिने लागले. पण अखेरीस त्याने पंजाबात चौहानांची सत्ता पुनश्च प्रस्थापित केली.

पण मुहंमद स्वस्थ बसला नाही. आपल्या पराभवाचा सूड उगवण्यासाठी त्यान पुन्हा प्रचंड सैन्य जमा करून पंजाबवर स्वारी केली व तबरहिंद जिंकले. पृथ्वीराजाची व त्याची पुन्हा तराईच्या मैदानावरच गाठ पडली. त्या लढाईत मुहंमद घोरीने पृथ्वीराजाचा प्रचंड पराभव केला आणि त्याला कैदही केले (इ. स. ११९२). मग हान्सी, सुर्सुती, कुहराम व सामान ही ठिकाणे जिंकून तो अजमेरवर आला. तिथे त्याने अनेक मंदिरे पाडली व त्यांवर मशिदी बांधल्या. पुढे त्याने पृथ्वीराजाला ठार मारले आणि दिल्लीवरही स्वारी केली. नंतर आपला गुलाम कुत्बुद्दीन ऐबक याला कुहराम व सामान येथे सुभेदार नेमून तो गज़नीला परत गेला. कुत्बुद्दीन ऐबक याने लवकरच तिथे, दिल्ली व अजमेर येथील चौहान राजांचा नाश करून तिथे आपली सत्ता दृढ केली.

इ. स. ११९३ मध्ये मुहंमद घोरीने गाहडवालांच्या राज्या-

वर स्वारी केली. जयचंद राजाने प्रचंड सेना जमा करून यमुनेच्या तीरावर चंदवड येथे त्याला गाठले; पण त्या युद्धातही मुहंमद घोरीचाच जय झाला. त्याने हिंदू सैन्याची निर्दयपणे कत्तल केली, देवालये व नगरे उद्ध्वस्त केली आणि या देशातून अगणित संपत्ती लुटून नेली.

इ. स. ११९५ साली मुइझुद्दीन याने पुन्हा भारतावर स्वारी करून बयान व ग्वाल्हेर ही राज्ये जिंकली. पुढे इ. स. १२०२ मध्ये घियासुद्दीन मरण पावला आणि मुइझुद्दीनला घुरचे सुलतानपद मिळाले. पण त्याच सुमारास इकडे खोकर वगैरे टोळ्यांनी बंडाळी करून मुलतान व लाहोर या भागात धुमाकूळ सुरू केला. कुत्बुद्दीन ऐबक हा त्यांचा बंदोबस्त करू शकला नाही. म्हणून मुइझुद्दीन इ. स. १२०५ साली परत इकडे आला. अवघ्या एका वर्षात त्याने सर्व बंडाळी मोडून काढली. इ. स. १२०६ च्या मार्चमध्ये तो गज़नीला परत जायला निघाला. पण वाटेत सिंधूच्या तीरावर दम्यक येथे त्याचा खून झाला.

गज़नीच्या महमूदाप्रमाणेच मुहंमद घोरीने भारतावर अनेक स्वाऱ्या करून भयंकर कत्तली केल्या आणि अपार संपत्ती इथून लुटून नेली. त्याने अनेक राजांचा पराभव करून त्यांची राज्ये जिंकली. त्याने हिंदुस्थानात मुसलमानी सत्तेचा पाया घातला आणि त्याच पायावर कुत्बुद्दीन ऐबकने पुढे आपले राज्य निर्माण केले. [हि. क. इं. पी.]

घोलिक एक जात. व्याध पुरुष आणि गारुडी स्त्रीयांच्यापासून झालेल्या संततीला हे नाव आहे. मराठीत या जातीला उंदीरमारू असे म्हणतात. [हि. ध.]

घोष एक जात. हे लोक मथुरा-वृंदावन या भागात राहतात. यांना घोषवास, गोपवास, गोकुळ अशीही अन्य नावे आहेत. हे दुधाचा धंदा करतात. घोष म्हणजे गौळवाडा. गौळवाड्यामधे होणाऱ्या उत्सवाचा उल्लेख महाभारतात घोषयात्रा या नावाने केला आहे. [ए. से. ए. इं.]

घोषशांती संकट किंवा रोग यांच्या निवारणासाठी व्रतादी उपायांप्रमाणे ही शांती करतात. वेदातील सूक्ते किंवा मंत्र यांचा मोठ्याने घोष करणे हा या शांतीतला प्रधान विधी होय (महार्णवकर्मविपाक).[हि. ध.]

घोषा एक सूक्तद्रष्टी. हिच्या नावावर ऋग्वेदाच्या दहाव्या मंडलातील ३९ व ४० ही दोन सूक्ते आहेत. ही कक्षीवानाची मुलगी. होती. लहानपणीच अंगावर कुष्ठ रोग उपटल्यामुळे तिला बापाच्या घरी अविवाहित स्थितीत ६० वर्षांपर्यंतचा काळ काढावा लागला. पुढे अश्विंच्या कृपेने हिचे कोड बरे झाले (ऋ. १०.३९) व त्यानंतर तिचा विवाहही झाला (ऋ. १.११७.७). बृहद्देवतेत हिची कथा आहे (७.४३. ४८). त्या कथेत तिच्या नवऱ्याचे नाव आढळत नाही; पण तिला घोष व सुहस्त्य नावाचे दोन पुत्र झाल्याचे कळते. घोषा ही जिज्ञासू स्त्री होती. तिने ज्ञानप्राप्तीसाठी अश्विंची प्रार्थना केली आहे. [प्रा. च. को.]

घोषिताश्रम एक बौद्ध मठ. घोषित नावाच्या एका सावकाराने हा बांधला, म्हणून याला हे नाव मिळाले. कौशांबीच्या आग्नेयीला हा आश्रम आहे. बुद्धाच्या निर्वाणानंतर त्याचा शिष्य आनंद याचे हे निवासस्थान होते. या आश्रमाला सारीपुत्त, महाकच्छायन, उपवाण, इ. बौद्ध पंडितांनी भेटी दिल्याचा उल्लेख मिळतो. इथे हीनयानी आचार्य राहत होते, असे फाहियान सांगतो. अशोकाने या आश्रमाच्या जवळच २०० फूट उंचीचा एक स्तूप बांधला आहे. [हि. जॉ. ए. इं.]

घोसी गवळ्यांची एक जात. या जातीत हिंदूंप्रमाणे मुसलमानही आहेत. यांच्यांतील बहुतेक लोक मूळचे अहीर होते. यांची वस्ती मुख्यत्वे उ. प्रदेशात आहे. यांच्यांत लिलार, चोपार, गड्डी गुजर, इ. पोटजाती आढळतात. हे लोक गोरसाचा व्यवसाय करतात. मुसलमानी घोसींच्या चालीरीती बहुधा हिंदूंच्या प्रमाणेच आहेत. घोसी मुसलमान सुन्नी पंथाचे आहेत. पंचपीर, गोरख, इमामसाहेब, भैरव, इ. त्यांच्या देवता आहेत. मध्य प्रदेशातील मुसलमानी घोसींचे हवेलिया व बिरछेया असे दोन वर्ग आहेत. [म. ज्ञा. को.]



घोसी स्त्री .

ङ क वर्गातील पाचवे व्यंजन. या वर्णाला आजचे स्वरूप प्राप्त होण्यापूर्वी तीन अवस्थांतून जावे लागले आहे.

बुद्धगया येथील स्तंभावर पहिल्या अवस्थेतील ङ दिसतो. यातील ङ चौकोनी कंसासारखा आहे. राजा यशोधर्माच्या वेळच्या



ङ च्या रूपाचा विकासक्रम

मंदसोर येथील लेखात (इ.स. ५३२) 'ङ्शो' या जोडाक्षरात दुसऱ्या अवस्थेतील ङ आहे. ङ वर्णाची दिसणारी तिसरी अवस्था उदयादित्याच्या वेळच्या (इ. स. चे ११ वे शतक) उज्जैनच्या लेखात पाहायला मिळते.

कामधेनुतंत्रात याचे स्वरूप सांगितले आहे, ते असे–

ङ्कारं परमेशानि ! स्वयं परमकुण्डली ।
सर्वदेवमयं वर्णं त्रिगुणं लोललोचने ।
पञ्चप्राणमयं वर्णं ङ्कारं प्रणमाम्यहम् ।।

अर्थ – हे पार्वती, ङ हा वर्ण स्वतः कुंडलाकार, सर्वदेवमय व त्रिगुण आहे. हे चंचललोचने, पंचप्राणमय अशा या ङ्काराला मी नमस्कार करतो.

चंग डफासारखे एक चर्मवाद्य. लाकडी वलयाला चामडे मढवून हे वाद्य बनवितात. हे डाव्या हातात धरून उजव्या हाताच्या तळव्याने वाजवतात. व्रजमंडलात ख्याल गाताना चंग वाजवण्याची प्रथा आहे. तालाचे बोल या वाद्यावर अत्यंत आकर्षक वाटतात. चंगाहून लहान असलेल्या तशाच प्रकारच्या वाद्याला चंगडी म्हणतात. चंगडीला घुंगरू व चकत्या लावतात. [सू. सा. श.; परंपरा – लोकगीत, १९५७]

चंगर एक भटकी जमात. हे लोक मुख्यत्वे मुसलमान असून पंजाबात त्यांची मुख्य वसाहत आहे. हे कामासाठी गावोगाव भटकतात. पीक काढणे, टोपल्या बनवणे, गाड्या हाकणे, इ. कामे हे करतात. काश्मीरातही यांची तुरळक वस्ती आहे. [म. ज्ञा. को.]

चंड (१) मुंडांच्या जोडीने उल्लेखिली जाणारी एक आर्येतर असुर जमात. या शब्दाच्या अनुषंगाने अनेक शब्द प्रचारात आले आहेत. चंडांना कण्हेरीची फुले आवडत, त्यावरून कण्हेरीला चंडात असे नाव पडले. चंडस्त्रिया पूर्वी कण्हेरींच्या पाना–फुलांनी आपले अंग झाकीत, त्यावरून परकराला किंवा लहंग्याला चंडातक म्हणू लागले. चंड लोक उंदीर खात असत, म्हणून उंदराचे चंडू असे एक नाव निर्माण झाले. चंडांची वीणा चंडालिका म्हणून प्रसिद्धी पावली. चंडांचे वंशज तेच चंडाल किंवा चांडाळ होत. पाहा– चांडाळ [रा. ले. सं.]

(२) एक दैत्यविशेष. हा शुंभासुराचा सेनापती होता. याला चामुंडेने ठार मारले.

चंडनायिका दुर्गाच्या अष्टशक्तींपैकी एक. ही नीलवर्ण आणि षोडशभुजा असून विविध आयुधे धारण करणारी आहे. [श. क.]

चंडमातंगिनी एक तांत्रिक देवता. कृष्ण वस्त्र नेसणारी, मौक्तिकमाला व कुंडले धारण करणारी व वीणाधारिणी असे हिचे वर्णन आहे. [श्रीविद्यार्णवतंत्र]

चंडरोषण बौद्धांचा एक देव. अक्षोभ्य या ध्यानी बुद्धापासून हा उत्पन्न झाला. याला अचल असेही नाव आहे. चंद्रमहारोषण तंत्रात याचे माहात्म्य सांगितले आहे. लाल डोळे व लांब सुळे यामुळे हा भयानक दिसतो. पीतवर्ण, एकमुख, द्विभुज, रत्नखचित मुकुट व नररुंडमाला धारण करणारा, व्याघ्रचर्म नेसणारा, शुभ्र यज्ञोपवीत धारण करणारा, वज्र किंवा खड्ग आणि तर्जनीपाश धारण करणारा, डाव्या पायाने भूमिस्पर्श करणारा असे याचे वर्णन आहे. मस्तकावर अक्षोभ्याची मूर्ती हे याचे अभिज्ञानचिन्ह होय. याची स्त्रीरूपिणी शक्ती याच्याशी आलिंगनावस्थेत असते. याची मूर्ती लपविलेली व पूजा गुप्त असते. [इं. बु. इ.]



चंडरोषण

चंडा (१) दुर्गेच्या अष्टशक्तींपैकी एक. ही गौरवर्ण व षोडशभुजा आहे. [श. क.]

(२) जैनांची शासन देवता. [श. क]

(३) जैन समूहातली यक्षिणी. (दिगंबरमते गांधारी.) वासुपूज्याची सेविका. हिचे वर्णन असे–

तथोत्पन्ना श्यामवर्णा चण्डनामाश्ववाहना।
दक्षिणौ वरदशक्तिधारणौ दधती भुजौ।
पाणी पुष्पगदायुक्तौ बिभ्रती दक्षिणेतरौ।

(वासुपूज्यचरित)

अर्थ – श्यामवर्णा, अश्वारूढ (दिगंबरमते मकरवाहना), उजव्या दोन हातांत वरदमुद्रा व माला आणि डाव्या दोन हातांत पुष्प व मुद्गर धारण करणारी (दिगंबर मते मुद्गर, दोन फुले व वरदमुद्रा धारण करणारी) अशी ही चंडा आहे. हिला प्रचंडा असेही म्हणतात. [जै. इ.]

चंडाग्नी पवननिरोध केल्यानंतर चंडाग्नी प्रज्वलित करण्याच्या प्रक्रियेचे वज्रयोगात वर्णन आहे. हा चंडाग्नी प्रज्वलित झाल्यावर समस्त क्लेश व वासना यांचे भस्म करतो. नाथसिद्धांनी यालाच ब्रह्माग्नी असे म्हटले आहे. हा अग्नी प्रज्वलित करण्यासाठी नवइंद्रियद्वारांचा पवनबंध करून दशमद्वार (ब्रह्मरंध्र) उद्घाटित करावे लागते, असे गोरखवानीत सांगितले आहे. [सि. सा.; हिं. सा. को.]



चंडातक नेसलेला पुरुष

चंडातक प्राचीन काळातले एक वस्त्र. हे स्त्री व पुरुष दोघेही वापरीत. याला अर्धोरुक असेही दुसरे नाव आहे. त्यावरून चंडातक हे अर्ध्या मांड्या झाकल्या जातील इतक्या लांबीचे असल्याचे कळते. अमरावतीच्या शिल्पात चंडातक नेसलेली व कमलावर बसलेली श्रीमूर्ती दिसते. हर्षचरितात चंडातकावर फुले काढीत असल्याचा उल्लेख मिळतो; पण अमरावतीच्या शिल्पात त्यावर फुले नसून समान अंतरावर काढलेल्या समांतर रेषा आहेत. अजंटा येथील चित्रकलेतही चंडातक परिधान केलेली स्त्री–पुरुषांची चित्रे दिसतात. हे वस्त्रनाम चंड या शब्दावरून आलेले आहे. (चंड पाहा)

चंडातकाला दहर असे यज्ञसंस्थेतले नाव आहे. तिथे याचा अर्थ अंतर्वसन (चड्डी) असा दिलेला आहे. वाजपेय यज्ञात यजमानपत्नीला यज्ञयूपाच्या माथ्यापर्यंत जाण्यासाठी उंच उंच पायऱ्या चढून जावे लागे. त्या वेळी स्त्रियांनी विकच्छ नेसण्याची पद्धत होती. त्यामुळे पायऱ्या चढून जात असताना तिच्या मांड्या दिसू नयेत म्हणून यजमानपत्नीला हे वस्त्र दिले जात असे. [पो. वी. हिं. सि.]

चंडाल एक जात. पाहा – चांडाळ.

चंडालिका वज्रयान पंथात मुद्रा या नात्याने पूजिली जाणारी चंडाली किंवा डोंबी स्त्री. पादताडितकम् या भाणात हिलाच मुद्रित योषा असे म्हटले असून, तिच्या साधनेचाही उल्लेख केला आहे. [शृं. हा.]

चंडाली एक वायुरूप प्रकृतिशक्ती. बौद्ध तंत्रातली देवता. 'प्रकृतिप्रभास्वररूपिणी चण्डाली' = प्रकृतीची प्रभा व स्वर या रूपांची चंडाली ही शक्ती आहे (श. क.). ही नाभीत प्रवाहित होते, असे सांगितले आहे. [तां. बौ. सा. सा.]

चंडिका दुर्गेच्या अष्टशक्तींपैकी एक. हिला चंडी असेही म्हणतात. हिचे पीठ अमरकंटक क्षेत्रात आहे (दे. भा. ७. ३०. ७३). रावणाच्या लंकेची रखवाली हीच करीत होती. हिला राजपुराची अधिष्ठात्री देवता असे म्हटले आहे. एका वृषलीपतीने तत्त्वज्ञ जडभरताला हिच्या पुढे बळी देण्यासाठी पकडून नेले होते; पण हिने त्याचा बळी घेतला नाही (भाग. पु. ५. ६. १२–१३). हिच्या देवालयाला चंडिकागृह असे म्हणतात. ही एक मातृदेवताही आहे. शोण व गंगा यांच्यामध्ये चंडिकावन नामक चंडिकेचे प्राचीन स्थान होते. [पु. इं.; ह. च. सां. अ.]

चंडिकानवमी एक काम्य व्रत. हे वैशाखाच्या उभय पक्षांतल्या नवमीला करतात. प्रातःस्नान, रक्तवस्त्र नेसून चंडिकेची पूजा, पुष्पांजलिसमर्पण व उपवास असा याचा विधी आहे. फल – दिव्य स्वरूपाची प्राप्ती व देवलोकी सन्मानाचा लाभ. [व्र. प.]

चंडीदास (इ.स.चे १४ वे किंवा १५ वे शतक) बंगालमधील एक वैष्णव संत व कवी. बीरभूम जिल्ह्यात

छटना या गावी याचा जन्म झाला. हा लहानपणीच नन्नुरा या गावी गेला. तिथे त्याला बाशुलीदेवीचे पुजारीपण मिळाले.

तरुणपणी चंडीदास एक दिवस बाजारातून परतत असता एका पाणवठ्यावर कपडे धूत असलेली रामी नावाची एक तरुण धोबीण त्याला दिसली. रामीचे तारुण्य व सौंदर्य सकृद्दर्शनीच त्याच्या मनात भरले. तो तिच्याकडे टक लावून पाहत राहिला. रामीही त्याला पाहून मोहित झाली. त्याच क्षणी त्या दोघांचे प्रेम जमले. मग ती दोघे वारंवार एकत्र येऊ लागली, जवळीक करू लागली.

रामीच्या वियोगाने व तिच्या दर्शनाने चंडीदासाची काय अवस्था होत असे, तिचे वर्णन त्यानेच एका पद्यात केले आहे—

तुमा बिना मोर सकल आँधार
देखिले जुडाय आंखि
ये दिने ना देखि ओ चाँद बदन
मरमे मरिया थाकि ।।
ओ रूपमाधुरी पासरिते नारि
कि दिये करिब बश
तुमिसे तंत्र तुमिसे मंत्र
तुमि उपासना रस ।।
भेबे देख मने ए तिन भुवने
के आछे आमार आर
बाशुली आदेशे कहे चंडिदासे
धोपानिचरण सार ।।

अर्थ — हे धोबिकन्ये रामी, तुझ्यावाचून मला सर्वत्र अंधार होतो. तू दिसलीस, तरच माझे डोळे निवतात. ज्या दिवशी मला तुझे चंद्रवदन दिसत नाही, त्या दिवशी माझे मन फार व्याकुळ होते. मला तुझ्या रूपमाधुरीचे प्राशन करता येत नाही. मी काय बरे करू? तूच माझे तंत्र आणि तूच माझा मंत्र. माझे आराध्य दैवतही तूच. जरा विचार कर. तुझ्याशिवाय माझे या त्रैलोक्यात कोण आहे बरे! बाशुलीच्या आदेशाने चंडीदास म्हणतो, की या धोबिणीचे पाय हेच माझे सर्वस्व आहे.

चंडीदासाच्या प्रेरणेने रामीही काव्य करीत असे. ती स्वतःला राधा आणि चंडीदासाला कृष्ण समजे. तिने पुढील पद्यात चंडीदासाचे श्रीकृष्ण समजूनच वर्णन केले आहे—

कुटिल कुंतल कत सुनिर्मल
श्रीमुखमंडल शोभा ।
हेरि हय मने ए दुई नयने
निमेष दिया छे केबा ।।

अर्थ — तुझे कुरळे केस आणि निर्मळ मुखमंडल यांची शोभा टक लावून पाहतांना डोळ्याची उघडझाप होते, तीसुद्धा मोठी अडचण वाटते.

चंडीदासाचे हे रामीवरचे प्रेम गावातल्या ब्राह्मणांना अनैतिक वाटले. त्यांनी एके दिवशी चंडीदासाला समाजातून बहिष्कृत केले. नकुल नावाचा चंडीदासाचा एक भाऊ होता. त्याला या गोष्टीचे दुःख झाले. त्याने चंडीदासाला पुनश्च जातीत घेण्याविषयी ब्रह्मवृंदाला गळ घातली. ब्राह्मण त्याला म्हणाले, की 'चंडीदासाला रामीचा संबंध तोडून टाकायला लाव.' नकुलाने मोठ्या मिनतवारीने चंडीदासाचे त्या बातीत मन वळवले. त्याने ब्रह्मवृंदांपुढे उभे राहून रामीशी संबंध न ठेवण्याची प्रतिज्ञा उच्चारली.

ही गोष्ट रामीच्या कानी गेली. त्यामुळे तिचे अंतःकरण दुखावले. ती लोकलज्जेची तमा न बाळगता चंडीदासापुढे येऊन उभी राहिली. तिला पाहताच चंडीदासाचे प्रेम पुनश्च उचंबळून आले आणि त्याने सर्व लोकांसमक्ष तिला जवळ घेतले. चंडीदास त्यामुळे कायमचा जातिबहिष्कृत झाला.

चंडीदासाला अपघाती मरण आले. तो आपल्या मित्राच्या घरी गेला असता एकाएकी घराचे छप्पर त्याच्या अंगावर कोसळलें व त्यातच त्याचा अंत झाला.

चंडीदास सहजिया संप्रदायाचा होता. पण त्याच्या काळी त्या संप्रदायाला विकृत स्वरूप आले होते. त्याला त्या गोष्टीचे फार वाईट वाटे. तो म्हणतो——

सहज सहज सबाइ कहय
सहज जानिबे के ।
तिमिर अंधकार जे हे याछे पार
सहज जाने से थे ।

अर्थ— सहज सहज असे तर सगळेच म्हणतात. पण सहज काय, ते कोणीच जाणले नाही. जो मोहरूपी अंधकार तरून जातो, त्यालाच सहज म्हणजे काय ते समजते.

चंडीदासाने बरीच कविता रचिली आहे. राधा–कृष्णांच्या प्रेमलीलांचे वर्णन हा त्याच्या काव्याचा प्रमुख विषय आहे. त्याच्या काव्यात पूर्वराग, दौत्य, अभिसार, मीलन, संभोग माधुर्य, इ. सर्व भाव ठळकपणे व्यक्त झाले आहेत. चंडीदासाचे सारे काव्य स्वयंस्फूर्त असून, बंगाली वाङ्मयात ते अजरामर झाले आहे.

चंडीदास दोन असल्याचे सांप्रत आढळून आले आहे. त्यापैकी चैतन्यपूर्व चंडीदासाला बडू चंडीदास व चैतन्योत्तर चंडीदासाला दीन चंडीदास म्हणतात. प्रस्तुत चंडीदास हा ब चंडीदास होय. नन्नुरा गावी पडक्या स्थितीत असलेले त्याचे घर अद्यापि दाखवतात. [सू. सा.; सं. स.; बं. उ. सा.; बं. सा. सं. इ.; हि. बें. लैं. लि.]

चंडीवोंगा मुंडांच्या खेड्यांचा रक्षक. हा पिशाच देव आहे. मदनचंडो असे याचे दुसरे नाव आहे. [एन्सा. मुं.]

चंडीमंगल बंगाली भाषेतील काव्यसंग्रह. यात चंडीदेवीचे स्तवन असते. चंडीमंगलाची रचना कोणत्याही एकाच कवीची नसून, त्यात अनेक कवींची गीते संकलित केलेली आहेत. या काव्याचा रचनाकाल इ. स. चे १५ वे किंवा १६ वे शतक मानला जातो. यातील द्विज जनार्दन कवीने रचलेल्या गीतांत ज्या व्रतकथा आलेल्या आहेत, त्या आजही बंगालमध्ये रूढ आहेत. चंडीमगलकाव्याची मूळ कथा अशी—

एकदा लोमश मुनी समुद्रतीरी तपश्चर्या करीत असताना त्याला इंद्रपुत्र नीलांबराने विचारले. ‘ मुनिवर, या थंडीपावसात असे उघड्यावर तप करण्यापेक्षा एखादी झोपडी का बांधीत नाही ? त्यावर लोमश म्हणाला. ‘या नश्वर जीवनासाठी घर कशाला ?’ नीलांबराने पुन: पुसले. ‘आपले वय किती ?’ लोमश म्हणाला. ‘ ते सांगणे कठीण आहे. तरी पण असे समज, की जेव्हा एक इंद्र मरतो, तेव्हा माझ्या अंगावरील एक केस गळून पडतो. जेव्हा हे माझे सगळे केस झडतील, तेव्हा माझा मृत्यू होईल.’ नीलांबराने म्हटले. ‘ इतक्या दिवसांनंतरही आपण मरणारच; मग अमर तरी कोण आहे ? ’ लोमशाने उत्तर दिले. ‘ अमर आहे एकमेव शिव !’

ते ऐकून नीलांबर शिवभक्तीच्या मार्गाला लागला. एके दिवशी तो शिवपूजा करीत असता फुलातल्या एका किड्याने शिवाला दंश केला. त्यामुळे शिव संतापला आणि त्याने नीलांबराला शाप दिला, की ‘ तू पृथ्वीवर जन्म घेशील. ’

पुढे नीलांबर एका व्याधाच्या घरी जन्माला आला. त्याचे नाव कालकेतू असे ठेवले गेले. या कालकेतूचे फुल्लरा नामक तरुणीशी लग्न झाले. दोघेही कष्ट करून जगत होते. तो शिकार करी आणि ती त्या शिकारीची विक्री करी. कालकेतूच्या या शिकारीमुळे सर्व पशू भयभीत झाले व चंडीला शरण गेले. चंडीने त्यांना अभय दिले.

मग एके दिवशी कालकेतू सबंध जंगलभर फिरला, तरी त्याला शिकार मिळाली नाही. निराश होऊन परत फिरताना वाटेत त्याला एक सोनेरी घोरपड सापडली. तिला त्याने जिवंत पकडून आणले व घराच्या एका खांबाला बांधून ठेवले. त्यावेळी फुल्लरा घरात नव्हती. म्हणून तो तिला शोधायला घराबाहेर पडला. इतक्यात त्या सोनेरी घोरपडीचे एका सुंदर तरुणीत रूपांतर झाले. एवढ्यात फुल्लरा घरी आली व त्या तरुणीला पाहून स्तंभित झाली. तिने विचारले, ‘ मुली, तू कोण आहेस?’ तरुणीने उत्तर दिले. ‘ मी एक दुर्दैवी स्त्री आहे. माझा नवरा म्हातारा आहे आणि त्यात पुन्हा एक मला सवत आहे त्या दोघांच्या काचाने मी वैतागले आणि घर सोडून पळून आले. ’ त्यावर फुल्लरा तिला म्हणाली. ‘ स्त्रीला नवऱ्याच्या घराशिवाय दुसरे घर नाही. तू तुझ्या घरी जा.’ पण ती ऐकेना एवढ्यात कालकेतू आला आणि तो प्रकार पाहून गोंधळात पडला. त्याने तिला खूप समजावले; पण ती मुळीच ऐकेना. कालकेतूला पेच पडला. शिकार तर मिळत नाही आणि या दोन बायकांचा सांभाळ कसा व्हायचा ? एवढ्यात चंडीमाता प्रसन्न झाली आणि तिने कालकेतूला एक अंगठी दिली. त्या अंगठीच्या साह्याने कालकेतू राजा झाला.

मग त्याने समोवतालची जंगले तोडून नवे राज्य वसवले. त्या राज्यात भांडदत्त नावाचा एक दुर्जन मनुष्य राहत होता. त्याला कालकेतूने राज्याबाहेर घालवले. त्याने दुसऱ्या एका राजाला मदतीला बोलावून कालकेतूवर स्वारी केली. त्या युद्धात कालकेतू कैदी झाला. पण चंडीदेवीच्या कृपेने कैदेतून मुक्त झाला.

चंडीमंगलकाव्याचा सर्वप्रसिद्ध कवी म्हणजे कविकंकण मुकुंदराम चक्रवर्ती हा होय. त्याच्या अगोदर माधवाचार्यांनीही चंडीमंगलात काही भर घातली होती. पण भाषा, कवित्वशक्ती आणि व्यक्तिवर्णन या गुणांत मुकुंदराम सर्वांच्या वरचढ ठरला. त्याची वर्णनशैली वास्तववादी असून, त्याच्या पंक्तीपंक्तीतून सोळाव्या शतकातल्या बंगालचे यथार्थ चित्रण आढळते. [बं. उ. सा.]

चंडीमंत्रविधान ‘ ऐं ह्रीं क्लीं चामुण्डायै विच्चे ’ हा नवाक्षरी मंत्र चंडीमंत्र म्हणून सांगितला आहे. या मंत्राचे ऋषी– ब्रह्मा, विष्णू, महेश्वर. छंद– गायत्र्युष्णिगनुष्टुभ्. देवता– महाकाली, महालक्ष्मी, महासरस्वती. शक्ती– नंदा, शाकंभरी, भीमा. बीजे– रक्तदंतिका; दुर्गा, भ्रामरी. तत्त्वे– अग्नी, वायू, सूर्य व फले– ऋगयजु:सामोक्त आणि सर्व कामनांची सिद्धी.

वरील मंत्राचा इष्टफलप्राप्तीसाठी जप करावा, असे सांगितले आहे. त्याचा विधी असा—

प्रथम संकल्प करतात. मग मातृका, सारस्वत, मातृगणान्वित, नंदजादी, ब्रह्माख्य, महालक्ष्म्यादी मूलाक्षर, मूलाक्षरविलोम, मंत्रव्याप्ती, षडंग व दशन्यासोक्त फलद हे अकरा न्यास करतात. पीठावर यंत्र काढून त्यावर परिवारदेवतांसह चंडीची स्थापना करतात. मग वरील मंत्राचा जप करतात. हा जप चार लक्ष करावा, असे सांगितले आहे. जप पूर्ण झाल्यावर त्याच्या दशांश संख्येने पायसान्नाचे हवन करतात. एवढे

केल्यावर मंत्र सिद्ध होतो व तो जपकर्त्याला इष्ट फल देतो. [मं. म.]

चंडीविधान

चंडी हे दुर्गेचे एक नाव आहे. मार्कंडेय पुराणात चंडीदेवीचे माहात्म्य सांगितले असून, त्यात तिच्या अवतारांचे व पराक्रमांचे विस्ताराने वर्णन केले आहे. त्यातील सुमारे सातशे श्लोक एकत्र घेऊन सप्तशती नावाचा एक ग्रंथ देवीच्या उपासनेसाठी निराळा काढलेला आहे. सुख, लाभ, जय, इ. अनेक कामनांच्या पूर्तीसाठी या सप्तशतीचा पाठ करावा, असे सांगितले आहे. हा पाठ विशेषत: आश्विनातील नवरात्रात करतात. काही घराण्यांत तसा कुलाचारही असतो. पाठ केल्यानंतर हवनही करायचे असते. या सगळ्याला मिळून चंडीविधान असे म्हणतात.

नऊ दिवस रोज सप्तशतीचा पाठ व त्याच्या दशांशाने हवन करतात, त्याला नवचंडी म्हणतात. शंभर पाठ व हवनादी कर्मे करणे याला शतचंडी, सहस्रपाठांना सहस्रचंडी व लक्ष पाठांना लक्षचंडी अशी नावे आहेत. पाठांची संख्या वाढविल्याने अनुष्ठानाचे स्वरूपही मोठे होते. 'अधिकस्य अधिकं फलम्' या न्यायाने फलही मोठे मिळते.

नवचंडी – यजमान संकल्पपूर्वक अनुष्ठानास आरंभ करतो. त्यासाठी ऋत्विजांचे वरण करतो. ऋत्विज न्यासादी विधी करतात. एका वेदीवर सर्वतोभद्रमंडल काढून त्यावर ब्रह्मादी मंडलदेवतांचे आवाहन– पूजन करतात. मंडलावर धान्यराशी पसरून त्यावर एक कलश स्थापतात. त्यावर पूर्णपात्र ठेवून त्यात देवीचे महायंत्र काढतात. त्या यंत्रावर परिवारदेवतांसह देवीची अष्टभुज व सिंहारूढ अशी सुवर्णप्रतिमा बसवतात. मग तिची यथाविधी पूजा करतात. अनुष्ठानाच्या अंगभूत म्हणून नऊ दिवस एका कुमारीची पूजा करतात किंवा पहिल्या दिवशी एक, दुसऱ्या दिवशी दोन अशा वाढत्या क्रमाने कुमारींची पूजा करतात.

पहिल्या दिवशी देवतास्थापना, पूजन वगैरे कृत्ये झाल्यावर पाठासाठी वरलेले ब्राह्मण मातृकान्यास, षडंगन्यास, इ. न्यास करून सप्तशतीचा पाठ आरंभतात. प्रत्येक अध्याय समाप्त झाल्यावर थोडा वेळ थांबावे व श्लोकांचा अर्थ जाणून घेऊन रस, भाव आणि स्वर यांनी युक्त असे सप्तशतीचे वाचन करावे, असे सांगितले आहे. नऊ पाठ झाले म्हणजे शेवटच्या दिवशी हवन करतात. या हवनाचा विधी असा—

प्रथम अग्निस्थापना करतात अग्नीच्या ईशान्येस ग्रहमंडलावर नवग्रह आणि महाकाली, महालक्ष्मी व महासरस्वती या देवतांचे आवाहन – पूजन करतात. प्रधानयागापर्यंतचे कर्म नेहमीच्या अग्निमुखाप्रमाणे करतात. मग सप्तशतीच्या प्रत्येक श्लोकाने हवन करतात. हवनाला पायस, तिल, बेलफळ, गुग्गुळ, इ. अनेक द्रव्ये घेण्याची रूढी आहे. हवनानंतर प्रायश्चित्तहोमापर्यंत सर्व कृत्ये करून मग बलिदान करतात. उडीद मिसळलेल्या भातात काकडा पेटवून ठेवून त्याचा स्थापित देवता व क्षेत्रपाल यांच्यासाठी बळी देतात. मग पूर्णाहुती झाल्यावर विधिपूर्वक वसोर्धारा करतात. मग होमाच्या दशांशाइतके दुधाने किंवा पाण्याने तर्पण करतात. हे तर्पण यजमान स्वत: किंवा ब्राह्मणद्वारा करतो. मग आचार्यासह ऋत्विजांना दक्षिणा देतो. ऋत्विज यजमानाला व त्याच्या कुटुंबियांना अभिषेक करतात. यजमान पीठदेवतांची उत्तरपूजा करून त्यांचे विसर्जन करतो. मग देवीची पंचोपचार पूजा करून तिला महाबळी अर्पण करतो. यजमान क्षत्रिय असेल, तर त्याने घोडा, रेडा, मेंढा किंवा बोकड यांपैकी एकाद्या पशूचा बळी द्यावा, असे सांगितले आहे. या बळीचे अभिमंत्रण पुढील मंत्राने करतात-

पशुस्त्वं बलिरूपेण मम भाग्यादुपस्थित:।
प्रणमामि तत: सर्वरूपिणं बलिरूपिणम् ॥
चण्डिकाप्रीतिदानेन दातुरापद्विनाशनम् ।
चामुण्डाबलिरूपाय बले तुभ्यं नमोऽस्तु ते ॥

अर्थ– माझ्या भाग्याने तू पशू बली म्हणून उपस्थित आहेस. बलिस्वरूपी त्या पशूस मी नमस्कार करतो. हे दान चंडिकेला आवडते असल्यामुळे दात्याची आपत्ती नाहिशी होते. हे बली, चामुंडेच्या बलिस्वरूपी तुला माझा नमस्कार असो.

यजमान ब्राह्मण असेल, तर त्याने पशूच्या जागी कोहळा बळी द्यावा, असे सांगितले आहे. हे सर्व अनुष्ठान संपल्यावर ब्राह्मणभोजन घालतात व विधानाची सांगता करतात. हे अनुष्ठान कुंडमंडपतंत्राने केल्यास त्याला अधिक भव्यता येते.

शतचंडी – या विधानात सप्तशतीची शंभर पारायणे करतात. त्यासाठी सोळा स्तंभांनी युक्त असा मंडप तयार करतात. मंडपाच्या तिसऱ्या भागात भाजलेल्या विटांची एक हात उंचीची अष्टकोनी वेदी तयार करतात. तिच्यावर पंचरंगी मंडप करतात. वर क्षुद्र घंटिकांनी युक्त असे पंचरंगी छत करतात. वेदीवर अष्टादशभुजा देवीची सुवर्णमूर्ती स्थापतात. पाठाच्या आधी नवार्णवमंत्राचा शंभर शंभर जप करतात. अशा प्रकारे केलेल्या पाठाला संपुटित पाठ असे म्हणतात. पहिल्या दिवशी एक, दुसऱ्या दिवशी दोन, तिसऱ्या दिवशी तीन व चौथ्या दिवशी चार अशा चढत्या क्रमाने दहा ब्राह्मणांनी पाठ केले म्हणजे शंभर चंडीपाठ पुरे होतात. ते पुरे झाल्यावर पाचव्या दिवशी दशांश हवन करतात. बाकीचे बलिदान, पीठदेवतापूजन, इ. सर्व विधी नवचंडीप्रमाणे करतात.

सहस्रचंडी – राज्यनाश, महाउत्पात, महाभय, महामारी, शत्रुभय, रोगभय, इ. संकटांचा निरास होण्यासाठी सहस्रचंडीचे विधान करतात. यात सप्तशतीचे एक हजार पाठ करायचे असतात. त्यासाठी शंभर ब्राह्मण बोलावतात. वीस हात लांब-रुंद मंडप करतात. सर्वायुधयुक्त व अष्टादशभुज अशी देवीची सुवर्णमूर्ती स्थापतात. बाकीचा विधी नवचंडीप्रमाणे करतात.

अशा प्रकारे यथाशक्ति चंडीविधान करणारा साधक धनधान्य, कीर्ती, पुत्रपौत्र व आरोग्य यांनी समृद्ध होऊन दीर्घायुषी होतो. चंडीविधान चालू असता ब्राह्मणद्वारा जयंती मंत्राचा किंवा नवाक्षरी मंत्राचा जप करावा, असे सांगितले आहे. हे दोन्ही मंत्र अनुक्रमे असे––

जयन्ती मङ्गला काली भद्रकाली कपालिनी ।
दुर्गा शिवा क्षमा धात्री स्वाहा स्वधा नमोऽस्तु ते ॥१॥
ॐ दुर्गे दुर्गे रक्षिणि स्वाहा ॥२॥

हवनाच्या वेळी या दोन्ही मंत्रांनीही हवन करावे, असे सांगितले आहे (तिथितत्त्व). [विद्याधरशास्त्री भिडे; मं. म.; नि. सिं.]

चंडेश

शिवगणातला प्रमुख व शिवाचाच अंशरूप असा एक गण. शिवाच्या कठोर प्रकृतीतून याची उत्पत्ती झाल्याचे व कृतादी चार युगांत याची चार भिन्न रूपे असल्याचे काश्यपशिल्पात सांगितले आहे.


चंडेश – तिरुवोट्टियुर

उच्चासनावर उजवा पाय दुमडून व डावा खाली सोडून बसलेल्या अशा याच्या मूर्ती दक्षिणेतल्या शैव मंदिरांत आढळतात. याच्या उजव्या हाती कुऱ्हाड असते. पेरिय पुराणात याला आदिदास म्हटले आहे. पितृद्रोही म्हणून शंकराचार्य याचा उल्लेख करतात. या दोषाच्या मागे एक कथा आहे, ती अशी–

चंडेश हा शिवाचा परमभक्त होता. एकदा याने शिवाच्या अभिषेकासाठी दुधाच्या घागरी भरून आणल्या. पण त्याच्या बापाला ती गोष्ट न आवडून त्याने त्या घागरी लवंडून टाकल्या. चंडेशाला त्या गोष्टीचा भयंकर संताप आला आणि त्या भरात त्याने आपल्या कुऱ्हाडीने बापाचे दोन्ही पाय तोडून टाकले.

दक्षिणेत चंडेशाला शिवमंदिराचा रखवालदार समजतात. देवस्थानात आलेल्या प्रत्येक यात्रेकरूने बाहेर जाताना त्याला दखल देऊन बाहेर पडायचे असते. यात्रेकरू त्याच्यापुढे उभे राहून टाळी वाजवतात व आपण या मंदिरातली कोणतीही वस्तू उचलली नाही, असे सूचित करतात. [सा. इं. इ. गॉं. गॉं.]

चंडेशानुग्रहमूर्ती

शिवमूर्तीचा एक प्रकार. चंडेशावर अनुग्रह करण्यासाठी शिवाने हे रूप धारण केले. दक्षिणेत गंगैकोंडचोळपुरम् येथे याची एक सुरेख मूर्ती आढळते, तिचे वर्णन असे– सुखासनावर बसलेला, डावा पाय पादपीठावर, चतुर्भुज, वरच्या दोन हातात परशू व हरिण, खालच्या दोन हातांनी चंडेशाच्या जटाजूटाभोवती तो पुष्पहार गुंडाळीत आहे. चंडेश पादपीठाजवळ हात जोडून बसलेला आहे. शिवाच्या डाव्या बाजूला पार्वती उजवा पाय दुमडून व डावा खाली सोडून बसली आहे. दोघांचीही मुद्रा सौम्य आहे. [सा. इं. इ. गॉं. गॉं.; डे. हिं. इ.]


चंडेशानुग्रहमूर्ती

चंडेश्वर

(इ. स. चे १४ वे शतक) एक प्राचीन धर्मशास्त्रकार. याचे सलग चरित्र कुठेही उपलब्ध नाही. त्याच्या ग्रंथावरून त्याच्या विषयीची जी थोडी माहिती मिळते, ती अशी–

हा वीरेश्वराचा पुत्र होता. कर्मादित्य, देवादित्य, वीरेश्वर, व चंडेश्वर असा याचा वंशक्रम लागतो. तिरहूतच्या हरिसिंहदेव राजाचे मंत्रिपद याच्या घरात तीन पिढ्या चालत आले होते. त्यामुळे हाही त्याच दरबारात मंत्री म्हणून नेमला गेला. हा युद्धमंत्री असताना याने नेपाळ जिंकला. हा आपल्याला महाराजा-

विराज म्हणवून घेत असे. इ. स. १३१४ च्या सुमारास यान वाग्वती नदीच्या तीरावर आपली सुवर्णतुला केली. युद्धमंत्र्या प्रमाणेच याने न्यायधीशाचेही काम केले होते. हा विद्वान होता. मिझरुमिश्र, वर्धमान, वाचस्पतिमिश्र, रघुनंदन, इ. बंगाली ग्रंथकारांनीयाच्या ग्रंथातले उतारे जागोजाग दिले आहेत.

स्मृतिरत्नाकर नामक एक मोठा ग्रंथ याने लिहिला असून, तो कृत्य, दान, व्यवहार, शुद्धी, पूजा, विवाद आणि गृहस्थ अशा सात भागांत विभागला आहे. कृत्यरत्नाकरात धार्मिक कृत्यांची, दानरत्नाकारात दानांची, व्यवहाररत्नाकरात दायभाग, न्याय, इ. विषयांची, शुद्धिरत्नाकरात आशौचाविषयीची, पूजारत्नाकरात पूजाविधीसंबंधीची, विवादरत्नाकरात निरनिराळ्या न्यायनियमांची व गृहस्थरत्नाकरात गृहस्थधर्मांची माहिती त्याने दिली आहे. या ग्रंथाशिवाय दानवाक्यावली, शिववाक्यावली, शैवमानसोल्लास व राजनीतिरत्नाकर असे आणखी चार ग्रंथ त्याने लिहिले आहेत. राजाची व्याख्या, त्याचे अधिकार, सैन्य, खजिना, सेनापती, न्यायव्यवस्था, शत्रू, हेरखाते अशा राज्यकारभारविषयक सर्व गोष्टींचा विचार त्याने राजनीतिरत्नाकरात केला आहे. ब्रिटिश राजकर्त्यांनी त्याच्या न्यायसिद्धान्ताचा बराच उपयोग करून घेतला होता. [म. च. को.; हि. ध.]

चंडेश्वरम्म द. भारतातील ग्रामदेवता. सात बहिणींपैकी एक. हिची जत्रा होते, त्या वेळी हिचे भक्त जळत्या निखाऱ्यांवरून चालत जातात.

चंदगवज्ज एक जैन व्रत. उपवासादी उपायांनी शरीर शुद्ध करून समाधिस्थिती प्राप्त करून घेणे, असा याचा हेतू असतो. क्षुधा व तृषा असह्य झाल्यामुळे समाधिभंग होत असेल, तर या व्रतात अन्नग्रहण करण्याची परवानगी असते. [हि. जै. मो.]

चंदन (१) एक सुगंधी वृक्ष. याला गंधसार व मलयज अशी अन्यही नावे आहेत. म्हैसूर, कूर्ग, द. महाराष्ट्र, आंध्र, कर्नाटक, नीलगिरी या भागांत चंदनाची झाडे नैसर्गिक रीत्या उगवतात. चंदनाची लागवडही केली जाते. मलयगिरीवरचे चंदन विशेष प्रसिद्ध मानलेले आहे. काव्यात तसे उल्लेख अनेक ठिकाणी आढळतात. हे झाड नेहमी हिरवे असते व तांबडया किंवा खडकाळ जमिनीत वाढते. याच्या खोडाचे गंध उगाळतात व ते देवपूजेत एक उपचार म्हणून उपयोजितात. पुराणांत व संस्कृत काव्यांत चंदनाचे उल्लेख ठायीठायी आढळतात. संस्कृत ग्रंथकारांनी त्याच्या रंगावरून पांढरे, तांबडे व पिवळे अशा त्याच्या तीन जाती मानलेल्या आहेत. तांबडया चंदनाला रक्तचंदन म्हणतात. त्याच्या बाहुल्या बनवून त्या विक्रीला ठेवलेल्या असतात. रक्तचंदनाचा औषधी उपयोगही सांगितलेला आहे. चंदनवृक्षापासून तेल व अत्तर काढतात. म्हैसूरमध्ये चंदनी तेल तयार होते. शरीराला शीतलता यावी, म्हणून कपाळी चंदनाचा तिलक लावतात व मस्तकाला त्याचा लेप देतात. बाणभट्टाने शुभ्रचंदनाच्या तिलकाचा उल्लेख केला आहे. विरहिणी स्त्रिया आपला विरहदाह शांत करण्यासाठी शरीराला चंदनाचा लेप लावीत, असे उल्लेख काव्यात सापडतात. चंदनाच्या सुगंधाचा व शीतलतेचा उपभोग घेण्यासाठी सर्प त्याच्या भोवती वेटोळे घालून बसतात, अशीही जनश्रुती आहे. चंदनाची प्रशंसा करणारे अनेक सुभाषिते संस्कृतात आढळतात. उदा०–

> यद्यपि चन्दनविटपी विधिना फलकुसुमवर्जितो विहितः।
> निजवपुषैव परेषां तथापि सन्तापमपहरति ।।

अर्थ – विधात्याने चंदनवृक्ष फल-पुष्पविरहित असा निर्माण केला; तरीही तो स्वतःच्या शरीरानेच लोकांचा ताप दूर करतो.

> अयि मलयज महिमाऽयं कस्य गिरामस्तु विषयस्ते।
> उद्गिरतो यद्गरलं फणिनः पुष्णासि परिमलोद्गारैः॥

अर्थ – हे चंदनवृक्षा, हा तुझा महिमा कोणाच्या वाणीचा विषय असेल ? (तो वर्णन करायला कोणाची वाणी समर्थ ठरेल !) कारण तू गरल ओकणाऱ्या सर्पांनाही परिमलाच्या उद्गारांनी परिपुष्ट करतोस.

ऐने अकबरीत सांगितले आहे, की चीनमधून चंदनाची आयात होत असे. [सू. सा. श.]

(२) एक कवी (इ. स. चे १८ वे शतक). हा शहाजहांपुर जिल्ह्यातल्या नाहिलपुवायाँ या गावचा रहिवासी बंदीजन होता. याला संस्कृत, हिंदी व फारसी या तीन्ही भाषा अवगत होत्या. हा केशरीसिंह या राजाचा आश्रित होता. याचे बारा शिष्य होते व ते सगळे कवी होते. याने बाव्वन ग्रंथ रचले, असे सांगतात. पण त्यांतले आठच उपलब्ध आहेत, त्यांची नावे अशी– (१) कृष्णकाव्य (२) केशरीप्रकाश (३) राधाजीको नखशिख (४) प्राग्यविलास (५) काव्याभरण (६) रसकल्लोल (७) तत्त्वसंज्ञा व (८) पीतमवीरविलास. दिवाणेसंदल ही त्याची फारसी रचनाही प्रसिद्ध आहे. [हिं. सा. को. २]

चंदनधेनू एक दान. चंदनाने विलेपित अशा धेनूचे दान करणे. याविषयीचा श्लोक असा–

> पतिपुत्रवती नारी म्रियते भर्तुरग्रतः।

चन्दनेनाङ्कितां धेनुं तस्याः स्वर्गाय कल्पयेत् ।।

अर्थ – सौभाग्यवती व पुत्रवती स्त्री पतीच्या पूर्वी मयत झाल्यास तिच्यासाठी चंदनांकित धेनूचे दान करावे. ती धेनू त्या स्त्रीला स्वर्ग मिळवून देईल.

वृषोत्सर्गाच्या ऐवजी पतीच्या आधी मृत झालेल्या स्त्रीसाठी हे विधान सांगितले आहे. कारण पिता जीवित असता पुत्राने वृषोत्सर्ग करायचा नसतो. [श. क.]

चंदनबाला ही धार्मिक विचारांची महिला महावीराच्या समकालीन होती. पुढे महावीराची ती पहिली शिष्या बनली व जैन भिक्षुणीसंघाची अध्यक्ष झाली. जैन धर्मात हिला फार मान आहे. पाहा– महावीर.

चंदनवाले चंदनाचा व्यापार करणाऱ्यांची एक जात. हे लोक मुळात रायचूर–मद्रासकडचे आहेत. पण गेल्या कित्येक पिढ्या ते मिरज येथे येऊन स्थायिक झाले आहेत. मिरजेत त्यांची सुमारे तीनशे घरे आहेत. हे घरात तेलुगू आणि बाहेर मराठी भाषा बोलतात.

हे लोक लिलावाने चंदनाची झाडे घेतात आणि प्रांतोप्रांती हिंडून त्यांचा व्यापार करतात. बायका-मुले, एक बैलगाडी व दोन-चार शिकारी कुत्रे एवढा लवाजमा घेऊन ते फिरतीला जातात. यांच्या बायका कुंकू व मणिमंगळसूत्र विकतात. त्यामुळे यांना कुंकूवाले असेही नाव पडले आहे.

वर्षातील अकरा महिने असे प्रवासात घालवून भाद्रपद महिन्यात ते मिरजेला जमतात. भाद्रपद पौर्णिमेच्या नंतर येणाऱ्या पहिल्या शुक्रवारी त्यांच्या मरगुवाई देवीची यात्रा भरते. त्या दिवशी सर्वजण उपास करतात. मध्यरात्री देवीला पाच प्रदक्षिणा घालून नमस्कार करतात आणि बकऱ्यांचा बळी देतात.

जे लोक यात्रेला येत नाहीत, त्यांच्याकडून वर्गणी घेतात. त्यांच्या जातपंचायतीने कोणाला दंड वगैरे केला असल्यास ती रक्कम आणि यात्रेला न येणाऱ्यांची वर्गणी अशी सर्व रक्कम जातीतल्या गरीबांच्या लग्नकार्यासाठी व एखाद्याला धंद्यासाठी पैशाची गरज असल्यास त्यासाठी कामी लावतात.

चंदनवाले लोकांची भारतात अनेक ठिकाणी मिळून तेहेतीस केंद्रे आहेत. त्यांपैकी मिरज हे महत्त्वाचे मानले जाते. [स्वराज्य, ८ नोव्हें. १९५८]

चंदनषष्ठीव्रत एक जैन व्रत. भाद्रपद कृष्ण षष्ठी ही व्रततिथी. या दिवशी प्रोषधोपवास, चंद्रप्रभ भगवानाची पूजा व रात्री जागरण विहित आहे. उभे राहून पंचपरमेष्ठीचे ध्यान करीत रात्र घालवावी, याचे असे विशेष विधान आहे. हे नैशिक (रात्रीचे) व्रत आहे. हे व्रत सहा वर्षे करायचे असते. व्रताची कथा अशी–

उज्जयिनी नगरीत जिनदत्त नावाचा एक श्रेष्ठी होता. त्याने आपली पत्नी चंदना व पुत्र ईश्वरचंद्र यांच्यासह हे व्रत केले व त्याच्या प्रभावाने त्या श्रेष्ठीला स्वर्ग आणि मोक्ष मिळाले. [जैं. व्र. वि. सं.; व्र. ति. नि.]

चंदबरदाई (११४८–११९१ इ. स.) पृथ्वीराज चौहानाचा परममित्र, राजकवी आणि सरदार. हा जातीने भाट (राव) होता. चंदाचे पूर्वज पंजाबात राहणारे होते. अजमेरच्या चौहान वंशाकडे त्यांचे यजमानपण होते. चंदाच्या बापाचे नाव राव वेण असे होते. चंद हा जालपा देवीचा भक्त होता. या देवीनेच त्याला बरदाई ही पदवी दिली अशी आख्यायिका आहे.



चंदबरदाई

चंद जन्माने पंजाबातला असला, तरी त्याचे बहुतेक आयुष्य दिल्ली व अजमेर येथे पृथ्वीराजाच्या सहवासातच गेले. चंद व पृथ्वीराज हे दोघेही एकाच तिथीला जन्म व मृत्यू पावले, अशी आख्यायिका सांगतात.

चंदाची दोन लग्ने झाली होती. त्याच्या पहिल्या स्त्रीचे नाव कमला किंवा मेवा आणि दुसरीचे गौरी किंवा राजोरा असे होते. दहा मुलगे व एक मुलगी अशी त्याला अकरा अपत्ये झाली, असे सांगतात. पण श्री. नानूराम भाट (चंदाच्या वंशातील चालू शतकातले एक ग्रहस्थ) यांच्या मते त्याला चारच मुलगे होते. त्यांपैकी एक मुलगा मुसलमान झाला. दुसऱ्याचा पत्ता लागत नाही. तिसऱ्याचे वंशज अंभोर येथे जाऊन वसले आणि चौथ्याचा वंश नागोर येथे वास्तव्याला आला, असे श्री. नानूराम सांगतात.

त्याच्या सर्व मुलांत जल्ल हा गुणश्रेष्ठ होता. शिहाबुद्दीन घोरीने पृथ्वीराजाला कैद करून गज़नीला नेले, तेव्हा त्याला सोडवून आणण्याच्या हेतूने चंदही तिकडे गेला. जाताना त्याने जल्लाला सांगितले, की ‘माझ्या हातून अपुरा राहिलेला पृथ्वीराजरासो हा ग्रंथ तू पुरा कर’.

चंद हा पृथ्वीराजाचा जीवश्चकंठश्च मित्र होता. तो बऱ्यावाईट सर्व प्रसंगांत पृथ्वीराजाबरोबर राहिला. पृथ्वीराजासारखाच तोही शूर आणि धनुर्धर होता. तो प्रत्यक्ष रणधुमाळीतही भाग घेत असे आणि वीररसाची कवने गाऊन पृथ्वीराजाच्या सैनिकांना स्फूर्ती देत असे. सहा भाषा, व्याकरण, काव्य, छंद, ज्योतिष, वैद्यक, संगीत, इ. विद्या त्याला अवगत होत्या. तो पृथ्वीराजाच्या दरबाराचे भूषण आणि कवींचा कंठमणी होता.

पृथ्वीराजरासो हे त्याने लिहिलेले महान प्रबंधकाव्य होय. ते काही अंशी ऐतिहासिक व काही अंशी काल्पनिक असून, डिंगल भाषेत ते रचलेले आहे. सम्राट पृथ्वीराजाच्या लोकविश्रुत चरित्राचे यशोगान करणे, हा या काव्याचा उद्देश आहे. *या काव्याची कथा संक्षेपात अशी –*

अनंगपाल नावाचा राजा दिल्लीवर राज्य करीत होता. कमला आणि सुंदरी या त्याच्या दोन कन्या. त्यांपैकी कमला त्याने अजमेर येथील चौहान वंशातील सोमेश्वराला दिली व सुंदरी कनौजच्या विजयपालाला दिली. कमलेचा मुलगा पृथ्वीराज व सुंदरीचा मुलगा जयचंद होय.

अनंगपालाने गादीला वारस म्हणून पृथ्वीराजाला दत्तक घेतले. त्यामुळे पृथ्वीराज दिल्लीश्वर बनला. पण त्याच गोष्टीने त्याचा मावसभाऊ जयचंद पृथ्वीराजाचा तीव्र द्वेष करू लागला. पृथ्वीराज हा महाधनुर्धर होता. त्याने राणा भीमदेवाचा पराभव करून त्याच्या कन्येशी विवाह केला. त्यामुळे भीमदेवही त्याचा प्रतिस्पर्धी बनला. शशिव्रता नावाच्या एका सुंदर मुलीचा विवाह जयचंदाच्या पुतण्याशी ठरला होता; पण तिचे मन पृथ्वीराजावर जडले होते. पृथ्वीराजाला हे समजले व त्याने जयचंदाच्या सैन्याचा धुव्वा उडवून शशिव्रतेला पळवून आणले आणि तिच्याशी लग्न लावले.

संयोगितेच्या बाबतीतही तशीच गोष्ट घडली. संयोगिता ही जयचंदाची रूपमती कन्या. ती वयात आल्यावर जयचंदाने तिचे स्वयंवर मांडले आणि पृथ्वीराजाला वगळून इतर सर्व राजांना आणि सरदारांना निमंत्रण दिले. त्या प्रसंगी जयचंदाने याहून आणखी एक अपकृत्य केले. पृथ्वीराजाचा अपमान करण्यासाठी त्याने त्याचा पुतळा बनवून तो द्वारपालासारखा स्वयंवरमंडपाच्या दाराशी उभा केला. पृथ्वीराजाला निमंत्रण न दिल्यामुळे संयोगिता अत्यंत कष्टी झाली. तो स्वयंवराला आला असता, तर ती त्यालाच वरणार होती. पृथ्वीराजाला तिचे हे मनोगत कळले. त्याने निमंत्रण नसताही स्वयंवराला जाण्याचे ठरवले. आपला मित्र चंदबरदाई याला घेऊन निवडक सैन्यासह तो कनोजला गेला.

ठरल्या वेळी संयोगिता हाती वरमाला घेऊन स्वयंवरमंडपात आली आणि तिने तडक पुढे जाऊन पृथ्वीराजाच्या पुतळ्यालाच माळ घातली. जयचंद त्यामुळे खवळला. त्याने संयोगितेला एका वाड्यात कोंडून ठेवले. कनोजला आल्यावर पृथ्वीराजाला हे वर्तमान समजले. त्याने धाडस करून त्या प्रासादात प्रवेश केला आणि संयोगितेशी गांधर्व विवाह केला. तिची तिथून सुटका करून तो तिच्यासह बाहेर आला व घोड्यावर स्वार होऊन संयोगितेसह दिल्लीच्या रस्त्याला लागला. जयचंदाने त्याचा पाठलाग [illegible]ग; पण संयोगिता त्याच्या हाती लागली नाही.

पुढे संयोगिता ही पृथ्वीराजाची सर्वांत लाडकी राणी ठरली. तो तिच्यासह विलासात निमग्न राहू लागला. त्यामुळे त्याचे राज्यकारभाराकडे दुर्लक्ष होऊ लागले. पृथ्वीराज हा विषयविलासात धुंद आहे आणि आपल्या कर्तव्याला पराङ्मुख बनला आहे, ही वार्ता गज़नीच्या शिहाबुद्दीन घोरीला समजली. पृथ्वीराजाचा शेवट करायचा, तर हीच संधी नामी आहे, असे समजून त्याने लगेच दिल्लीवर चाल केली. पृथ्वीराज या अनपेक्षित धक्क्याने खडबडून उठला; पण रणांगणांवर शिहाबुद्दिनाच्या पुढे त्याचा टिकाव लागला नाही.

शिहाबुद्दिनाने पृथ्वीराजाला कैद करून गज़नीला नेले, तिथे त्याचे डोळे काढले आणि त्याला बंदीत टाकले. या घटनेने संयोगितेचे सारे मनोरथ भग्न झाले आणि तिने इतर राण्यांसह अग्निप्रवेश केला. पृथ्वीराज बंदिवासात पश्चात्ताप करीत दिवस कंठू लागला.

आपल्या मित्राला पकडून गज़नीला नेण्यात आले, या घटनेने त्याचा जिवलग मित्र चंद हा अस्वस्थ झाला. तो पृथ्वीराजाच्या

मुक्ततेसाठी मजल दरमजल करीत गझनीला पोचला. त्याने प्रथम शिहाबुद्दिनाची मर्जी संपादन केली. त्यानंतर त्याच्या अनुज्ञेने पृथ्वीराजाची भेट घेतली. त्या भेटीत शिहाबुद्दिनाच्या वधाचे एक कारस्थान दोघांनी मिळून निश्चित केले. पृथ्वीराज हा शब्दवेधी धनुर्धर होता. त्याचे ते कसब शिहाबुद्दिनाने एकदा पाहावे, अशी चंदाने त्याला गळ घातली. शिहाबुद्दीन त्या आग्रहाला बळी पडला. त्याने त्यासाठी एक स्वतंत्र दरबार भरवला. त्या दरबारात अंध पृथ्वीराजाला आणण्यात आले. शिहाबुद्दिनाने सात लोखंडी तवे एका ठिकाणी टांगले होते. एकेका तव्यातून आवाज निघताच त्या अनुरोधाने पृथ्वीराज बाण सोडी व तो तवा विंधी. हे चालू असता चंदवरदाईने मोठ्या खुबीने शिहाबुद्दीन कुठे बसला आहे, किती उंचीवर बसला आहे, ते पृथ्वीराजाला सांगितले. त्यासरशी पृथ्वीराजाच्या धनुष्यापासून बाण सुटला व तो शिहाबुद्दिनाचे मस्तक तोडून पुढे गेला. त्याबरोबर दरबारात एकच हलकल्लोळ उडाला. चंद आणि पृथ्वीराज यांनी एकमेकांना घट्ट मिठी मारली. आता आपली दोघांची धडगत नाही, असे त्यांना समजले आणि त्यांनी एकमेकांच्या छातीत खंजीर खुपसून एकमेकांचा अंत केला.

पृथ्वीराजरासो हे वीररसाने धगधगणारे महाकाव्य आहे. स्वामिनिष्ठा, धर्मनिष्ठा, स्वाभिमान, धर्मरक्षणासाठी बलिदान, निर्भयता, इ. राष्ट्रीय नैतिक गुण या काव्यात झळाळून दिसतात. त्यातले काही नमुने असे –

मुहंमद घोरीच्या स्वारीचे वृत्त दिल्लीला पोचले. पृथ्वीराज त्याच्याशी सामना देण्यासाठी सैन्य सज्ज करून निघाला. त्याने पानिपत पार करून सतलज नदी ओलांडली. चंदवरदाई त्याच्या बरोबर होताच. पृथ्वीराजाने त्याला सांगितले. 'चंद, तू कांगडा किल्ल्यात जा आणि तिथल्या हमीर राजाला आपल्या साहाय्यासाठी बोलावून आण.' चंद गेला आणि हमीरला भेटला. पण हमीर पृथ्वीराजाला साहाय्य देण्यास तयार होईना. तो म्हणाला. 'मुहंमद घोरीशी युद्ध करण विफल आहे. पृथ्वीराजाला म्हणावे, की भलत्या भरीला पडू नको. खा, पी, मजा कर आणि जीवनातली सारी सुखे उपभोग.' त्यावर चंद त्याला म्हणाला –

चन्द कहै हमीर अनष षत्री क्यों आवै ।
जबहि समर सम्पजै, तबहि अम्बर सिर लावै ।
जहां रुध्यों तहां मरै, घाट अवघट न विचारै ।
जस लज्जा गल बंधि, स्वामि ध्रम्मह उच्चारै ॥

अर्थ – क्षत्रियाने मलिन अथवा निराश होऊ नये. जेव्हा क्षत्रिय युद्धासाठी कंबर कसतो, तेव्हा तो आकाशाला स्वतः पुढे शिर झुकवायला लावतो. तो सुघड-अवघड याचा विचार करीत नाही. जिथे मार्ग अवरुद्ध होतो, तिथे स्वामिनिष्ठा जागृत ठेवून तो खंबीरपणे उभा राहतो. यश किंवा अपयश जे मिळेल ते हाराप्रमाणे गळ्यात घालून तो धारातीर्थी मरण पत्करतो; पण पाठ दाखवून परत फिरत नाही.

तरीही हमीर चंदाला बधेना. तो इकडच्या तिकडच्या फालतू गोष्टी पुढे करून आपले कर्तव्य टाळू लागला. स्वामिविषयक धर्माला पराङ्मुख होऊ लागला. तेव्हा चंद त्याला म्हणाला –

सोइ जो सूर सा ध्रम, जुग्ग सा ध्रम्म, न पुज्जे ।
दया दान दम तिथ्थ, सबै सा ध्रम मनि रझ्जै ॥
सामि ध्रम्म वर मुगति, नरक वर तिथ्थ निवासौ ।
सुनि हमीर सा ध्रम, करै सुरपुर नर बासौ ।
सा ध्रम्म मुकति बन्धै रवन, सामि ध्रम्म जस मुगति वर ।
अब कित्ति कित्ति करतार कर, नरक चूक झुझ्झोति नर ॥
(छं. ६९३)

अर्थ – जो स्वामिधर्म पाळतो, तोच खरा शूर होय. या युगात स्वामिधर्माची बरोबरी करणारा दुसरा कोणताही धर्म नाही. दया, दान, दम, तीर्थं या सर्वांना मागे टाकून स्वामिधर्म पुढे जातो. स्वामिधर्माच्या आचरणाने मोक्ष आणि तो न आचरल्याने नरक ठेवलेला आहे. हे हमीर, तू ऐकून ठेव. स्वामिधर्मानुयायी मनुष्य देवलोकात वास्तव्य करतो. तो मोक्षाचा आनंद दृढ करतो. यश आणि मोक्ष ही स्वामिधर्माच्या अंतर्गत असतात. जय-पराजय दैवाधीन असले, तरी मनुष्याला नरकवासातून स्वतःला बचावता येईल. आणि त्याचा एकमेव उपाय म्हणजे लढता लढता मरणे.

चंदवरदाई हा पृथ्वीराजाबरोबर रणांगणात उतरून शत्रूशी उसण्याघाई झुंजत असे. त्याने आपल्या एका युद्धप्रसंगाचे वर्णन केले आहे, ते असे –

लरत चन्द वरदाइ, करत अच्छरि विरदावलि ।
झरत कुसुम नयनग, धरत गरईस मुण्डावलि ।
करत धाव कविराव, पिसुन परि वथ्थ पछारत ।
भरत पत्र कालिका, भूत बेताल उकारत ॥
जहं तहं ढरंत गज वाज नर, लोह लपटि पावक लहर ।
सुष वाह वाह प्रथिराज कहि, कटक भट्ट किन्नौकहर ।
(छं. १८९९)

अर्थ – चंदबरदाई युद्ध करीत होता. स्वर्गातल्या अप्सरा त्याची बिरुदे गात होत्या. आकाशातून पुष्पवर्षाव होत होता. खड्गाच्या घावाने तुटून पडणाऱ्या नरमुंडांच्या माला शिव आपल्या कंठात घालीत होता. चंदबरदाई वारावर वार करीत होता. शत्रूला चारी बाजूंनी पछाडीत होता. कालीदेवी शत्रूच्या

रक्ताने आपले कपाळ भरून घेत होती. भूतवेताळगण चीत्कार करीत होते. आगीचे लोळ उत्पन्न करणाऱ्या खड्गधारेने जिकडे तिकडे हत्ती, घोडे आणि मनुष्य जमिनीवर मृत, अर्धमृत होऊन पडले होते. चंदबरदाईने शत्रुसेनेत कहर करून सोडला आणि त्याचे घमसान युद्ध पाहून पृथ्वीराजही ' वाह ! वाह ! ' करून उठला.

चंदबरदाईने आपल्या या काव्याच्या द्वारे भारताच्या सुपुत्रांना वीरतेचा अमर संदेश देऊन ठेवला आहे. पाहा — पृथ्वीराज. [वीरकाव्य; क. कौ.; हिं. सा. बृ. इ.; चंद वरदायी; हिं. म. क. प.]

चंदला परमेश्वरी देवीचे एक रूप. हिचे स्थान सन्नती क्षेत्रात आहे. हे क्षेत्र गुलबर्गा जिल्ह्यात नालवार स्टेशनापासून बारा मैलांवर आहे. इथले देवीचे मंदिर चक्राकार असून, सभोवती दाट अरण्य आहे. देवालयाच्या तळघरात देवीची मूर्ती आहे. मूर्तीची उंची तीन फूट आहे. ही वालुकामय असून तुळजापुरच्या भवानीची प्रतिकृती वाटते. गावाच्या पश्चिमेला सोमेश्वराचे देवालय असून, त्यामागे भीमा नदीचा डोह आहे. या देवीची माहिती स्कंद पुराण व मार्कंडेय पुराण यांत आढळते. यावरून या स्थानाच्या प्राचीनतेची कल्पना येते. देवीची ५२ शक्तिपीठे सांगितली असून, ५२ वे शक्तिपीठ कर्नाटकात अज्ञात स्थळी असल्याचा उल्लेख आहे. ते अज्ञात शक्तिपीठ चंदला परमेश्वरीचे सन्नती क्षेत्र हेच असावे. इथे चैत्र वद्य पंचमीस मोठा रथोत्सव होतो. नवरात्राचाही उत्सव असतो.

कल्याणच्या चालुक्यांची ही कुलदेवता होती असे म्हणतात. गाणगापुरच्या पुजारीवर्गाचीही हीच कुलदेवता आहे. [श्री. भीमाशंकर देशपांडे – पुरुषार्थ, जून–जुलै, १९६३]

चंद वंश कुमाऊं पाहा.

चंदवार एक जैन क्षेत्र. हे आग्रा जिल्ह्यात फिरोजाबादजवळ आहे. याला चंद्रपाठ असेही म्हणतात. इ. स. ९९५ साली चंद्रपाल पल्लीवाल या नावाचा एक दिगंबर जैन राजा या ठिकाणी राज्य करीत होता. त्याच्या नावावरूनच या नगराला चंदवार असे नाव पडले आहे. या राजाचा दिवाण रामसिंह हारुल किंवा लंबकांचुक अर्थात लमेचू हा जैन होता. याने चंदवारमध्ये जैन मंदिर उभारून त्यात कित्येक जिनमूर्ती प्रतिष्ठित केल्या. याच ठिकाणी कविवर धनपाल याने इ. स. १३९७ साली बाहुबलिचरित्राची रचना केली. चंदवार नगर १५ व्या शतकापर्यंत वैभवात होते. त्यानंतर मुसलमानांच्या आक्रमणामुळे ते नष्ट–भ्रष्ट झाले. सांप्रत त्याचे भग्नावशेष कित्येक मैल विखुरलेले दिसतात. मध्ययुगात हे स्थान जैनांचे एक मोठे केंद्र होते. [जै. सि. भा. १३]

चंदा बंजारी स्त्रियांचा एक दागिना. हा दागिना म्हणजे साधारण सहा इंच लांबीची एक काडी असते. लग्नाच्या वेळी नवरामुलगा ही काडी सौभाग्यालंकार म्हणून वधूला देतो. तेव्हापासून नवरी ती काडी आपल्या डोक्यात ठेवते व त्यावरून पदर घेते. मात्र वैधव्य आले असता हा अलंकार वापरीत नाहीत. [गो. बं. इ.]

चंदेरी एक जैन क्षेत्र. मध्य प्रदेशात बेतवा नदीच्या किनाऱ्यावर हे शहर वसले असून, त्याला लागूनच एक किल्ला आहे. ललितपुराहून हे ठिकाण २० मैलांवर आहे. चंदेलवं राजपुतांनी हे नगर वसवले असावे आणि म्हणून त्याला चं गिरी-चंदेरी असे नाव पडले असावे, असें म्हणतात. याच्यापा ९ मैलांवर बूढी चंदेरी नावाचे दुसरे गाव आहे. ही दोन् ठिकाणे जैनांची यात्रास्थानें आहेत. इथल्या एका जैन मंदिरा चोव्वीस वेदी असून, त्यांवर चोव्वीस तीर्थंकरांच्या मूर्ती स्थापि आहेत. अशी चोवीसी अन्यत्र कुठेही नाही, असे म्हणतात. बू चंदेरीमध्येही अनेक जैन मंदिरे भग्नावस्थेत आढळतात. इथ आजूबाजूच्या पहाडांत तीर्थंकरांच्या मूर्ती खोदलेल्या दिसता [जै. ध.; जै. सि. भा. १०]

चंदेल राजवंश सध्या जो प्रदेश बुंदेलखंड या नावा ओळखला जातो, तो पूर्वी जेजाकभुक्ती नावाने प्रसिद्ध होता. इ. स. च्या ८ व्या शतकात खर्जूरवाह (खजुराहो) येथे एका चंद्रवंशी क्षत्रिय कुलाचे राज्य होते. ह कुलाचा मूळ पुरुष चंद्रात्रेय हा इ. स. ७४० च्या सुमार होऊन गेला. एका शिलालेखात या कुलाला चंद्रेलान्वय (= चं व इला यांची संतती) म्हटले आहे. त्यावरूनच पुढे त्या चंदेल हे नाव मिळाले असावे. हे नाव चंद्रात्रेय या गोत्राव आले असावे, असे श्री. वैद्यांचे मत आहे.

पृथ्वीराजरासो या काव्यातील महोबाखंडात चंदेल वंशा उत्पत्ती सांगितली आहे, ती अशी–

काशीचा गहिरवार राजा इंद्रजित याचा हेमराज ना पुरोहित होता. त्याची कन्या हेमवती १६ व्या वर्षी वि झाली. एकदा ती रात्रीच्या वेळी नदीत स्नान करीत अ चंद्र तिच्या रूपावर भाळला आणि पृथ्वीवर अवतरला. त्या पासून तिला एक पुत्र झाला. त्याचे नाव चंद्रवर्मा असे ठेव

आले. तोच या वंशाचा मूळ पुरुष होय. चंद्राच्या आदेशाप्रमाणे मातेच्या पापक्षालनासाठी त्याने भांड नामक यज्ञ केला. ज्या ठिकाणी त्याने महोत्सव साजरा केला, ते महोत्सवनगर म्हणजेच सांप्रतचे महोबा होय.


७०
८०
30
30
२०
२०
७०
८०
कांगडा
थानेश्वर
चन्देल साम्राज्य
दिल्ली
यमुना
गंगा
प्रतिहार
मथुरा
राजपूताना
कनौज
जौनपूर
अरवली
चंबळ
ग्वालियर
प्रयाग
वाराणसी
महोबा
कलिंजर
पाल वंश
खजुराहो
उज्जैन
विंध्य पर्वत
चालुक्य
सोमनाथ
नर्मदा
ताप्ती
महानदी
देवगिरी

सीमा रेषा – – –

वरील कथेवर उ. प्रदेशातील लोकांची दृढ श्रद्धा असली, तरी तिला ऐतिहासिक आधार नाही. इ. स. च्या ८ व्या शतकातील चंदेलवंशी राजांचा इतिहास उपलब्ध नाही. त्या शतकाच्या पूर्वार्धात नन्नुक राजा झाला, तोपर्यंत चंदेलांचे स्वतंत्र राज्य होते. इ. स. ८३२ साली कनोजचा प्रतीहार राजा नागभट्ट (दुसरा) याने नन्नुकाचा पराभव केला, तेव्हापासून चंदेल राजे प्रतीहारांचे मांडलिक झाले. तथापि नन्नुकाने स्वपराक्रमाने अनेक राजांना जिंकून आपल्या अंकित केले होते. त्याचा पुत्र वाक्पती (इ. स. ८४५–६०) आणि वाक्पतीचा पुत्र जयशक्ती (इ. स. ८६०–८०) यांनी आपल्या वंशाची कीर्ती वाढवली आणि राज्यविस्तारही केला. जयशक्तीचे:दुसरे नाव जेजाक असे होते. त्यावरूनच चंदेलांच्या राज्याला जेजाकभुक्ती हे नाव मिळाले. जयशक्तीचा धाकटा भाऊ विजयशक्ती हा त्यानंतर राजा झाला. त्याने राष्ट्रकूटांच्या प्रदेशावर स्वारी करून जय मिळवला होता. त्याचा पुत्र राहिल याने वसवलेले एक गाव महोवाजवळच आहे. तिथे राहिल्यसागर नावाचा एक तलाव आहे. राहिलाचा पुत्र हर्षदेव याने इ. स. ९२५ पर्यंत राज्य केले. त्याने प्रतीहार राजा महीपाल याला राष्ट्रकूटांकडून कनोजचे राज्य परत घेण्यास मदत केली होती. त्यानंतर प्रतीहारांची सत्ता दुबळी झाल्यामुळे चंदेल राजांना आपले साम्राज्य स्थापण्याची संधी प्राप्त झाली. हर्षदेवाचा पुत्र यशोवर्मन (इ. स. ९२५–५०) याने कालंजर येथील किल्ला जिंकला आणि यमुनेपासून माळव्यापर्यंत व काश्मीरपासून वंगालपर्यंत आपले प्रभुत्व प्रस्थापित केले. तो प्रतीहारांचे स्वामित्व मानी खरा; पण ते नावापुरतेच. यशोवर्मन हा पराक्रमी योद्धा होता, त्याचप्रमाणे लोकप्रिय शासकही होता. त्याचे लक्षवर्मन असे दुसरे नाव होते. त्याने खजुराहो येथे एक विष्णुमंदिर बांधले, ते लक्ष्मणमंदिर म्हणून प्रसिद्ध आहे.

यशोवर्मनचा पुत्र धंगदेव हा चंदेल वंशातील पहिला सम्राट होय. त्याने कनोजच्या प्रतीहारांचे स्वामित्व झुगारून दिले, ग्वाल्हेरचा किल्ला जिंकला, यमुनेच्या पलिकडे दूरपर्यंत प्रतीहारांच्या राज्यावर आक्रमण केले आणि पूर्वेस वाराणसीपर्यंत

मजल मारली. अंग, वंग, कोसल, कुंतल, इ. राज्यांवर स्वाऱ्या करून त्यानेही दिग्विजय केला आणि महाराजाधिराज ही पदवी धारण केली. तो व त्याचे वंशज स्वतःला कालंजराधिपती म्हणत. मुसलमानी आक्रमणाचा प्रतिकार करण्यासाठी जयपालाने अनेक हिंदू राजांची संघटना बांधली होती, त्यात धंग राजाही सामील झाला होता. त्याचा प्रभास नावाचा अमात्य अत्यंत पराक्रमी व बुद्धिमान होता. धंगदेवाच्या यशाचा मोठा वाटा त्याच्याकडे जातो.

धंगदेवाने इ. स. ९५० पासून १००२ पर्यंत राज्य केले. तो कलांचा पुरस्कर्ता होता. खजुराहो येथील अनेक सुंदर मंदिरे त्याच्याच राजवटीत निर्माण झाली. इ. स. १००२ च्या सुमारास वयाच्या शंभराव्या वर्षी त्याने आपला पुत्र गंडदेव याला राज्य दिले. त्यानंतर थोड्याच दिवसात प्रयाग येथे धंगराजाचे निधन झाले. गंडदेवानंतर त्याचा पुत्र विद्याधर हा सम्राट झाला. त्याच्या कारकीर्दीत गज़नीचा सुलतान महमूद यानें जेजाकभुक्तीवर दोन स्वाऱ्या केल्या (इ.स. १०१९ व १०२२). त्यावेळी चंदेलांनी 'दग्धभू' धोरणाचा अवलंब केल्यामुळे महमुदाला फारसा लाभ झाला नाही.

विद्याधराच्या वेळी चंदेल वंशाचे राज्य अत्यंत वैभवशाली होते. त्याचे सेनादल प्रचंड व सुसंघटित होते. पण त्याचा उपयोग मात्र शेजारच्या हिंदू राजांशीच लढण्यासाठी झाला. विद्याधराने परमार भोजाचा पराभव केला. त्याच्या नंतर त्याचा पुत्र विजयपाल (इ. स. १०४०–५०), त्याचा पुत्र देववर्मन (इ. स. १०५०–१०६०) व त्याचा भाऊ कीर्तिवर्मन (इ. स. १०६०–११००) यांनी राज्य केले. विजयपालाने कलचुरी राजा गांगेयदेव याचा पराभव केला होता; पण कलचुरी कर्णाने कीर्तिवर्मनचा पराभव करून त्याचे राज्यही जिंकले. चंदेलांचा एक सामंत गोपाल नावाचा होता. त्याने कीर्तिवर्मनचे राज्य त्याला परत मिळवून दिले. पुढे पंजाबचा सुभेदार महमूद यानेही कीर्तिवर्मनचा पराभव करून कालंजर लुटले. कीर्तिवर्मनच्या नंतर सल्लक्षणवर्मन, जयवर्मन व पृथ्वीवर्मन यांनी आपले साम्राज्य संभाळले. पृथ्वीवर्मनचा पुत्र मदनवर्मन हा महापराक्रमी होता. त्याने आपल्या दीर्घ राजवटीत (इ. स. ११२९–११६५) साम्राज्यविस्तार करून चंदेलांचे वैभव वाढवले. माळवा व गुजरात या प्रदेशांवरही त्याने आक्रमण केले. विंध्यपर्वत आणि यमुना व बेतवा या नद्या, अशा त्याच्या साम्राज्याच्या सीमा होत्या. त्याने कलचुरी राजाचा पराभव केला; पण चौलुक्य सिद्धराज याच्यापुढे मात्र त्याला हार खावी लागली.

मदनवर्मनचा नातू परमर्दिदेव हा इ. स. ११६५ मध्ये सिहासनावर बसला. तो पराक्रमी असून, त्याने बरीच वर्षे आपले साम्राज्य संभाळले. विदिशेच्या भोवतालचा प्रदेश चौलुक्य राजाने जिंकला होता, तो परमर्दिदेवाने परत मिळवला. पण इ. स. ११८२ साली पृथ्वीराज चौहान याने त्याचा प्रचंड पराभव करून त्याचे सर्व राज्य पादाक्रांत केले आणि राजधानी महोबा जिंकून तिथे आपला सेनापती नेमला. पुढे परमर्दिदेवाने आपले राज्य त्याच्याकडून परत मिळविले. पुनश्च इ. स. १२०२ मध्ये कुत्बुद्दीन ऐबक याने कालंजरचा किल्ला व महोबा नगर जिंकले.

परमर्दिदेव लवकरच मरण पावला. तो अत्यंत दानशूर, विद्वानांचा आश्रयदाता व दयाळू होता. तो स्वतः कवी व संस्कृत भाषेचा पंडित होता. त्याच्यासंबंधी अनेक लोककथा निर्माण झाली आहेत. त्यावरून कळते, की तो लोकप्रिय होता.

परमर्दिदेवाचा पुत्र त्रैलोक्यवर्मन याने प्रबळ सेना उभी करून इ. स. १२०५ मध्ये मुसलमानी सैन्याचा पराभव केला व कालंजरसकट सर्व प्रदेश परत जिंकून घेतला. इल्तुमिशच्या वेळी मुसलमानांनी पुन्हा कालंजरवर हल्ला केला होता; पण तो अयशस्वी ठरला. त्रैलोक्यवर्मन याने सुमारे ५० वर्षे राज्य केले. त्याचा पुत्र वीरवर्मन इ. स. १२५४ च्या सुमारास गादीवर बसला. त्याने चंदेलांचे राज्य सुरक्षित ठेवले. त्याच्यानंतर भोजवर्मन व हम्मीरवर्मन यांनी इ. स. १३०८ पर्यंत राज्य केले पुढील वर्षी अलाउद्दीन खिलजीने त्या राज्याचा बराच भाग जिंकला. वीरवर्मन (दुसरा) इ. स. १३१५ पर्यंत बुंदेलखंडावर राज्य करीत होता.

अंतर्गत यादवी आणि मुसलमानांची विध्वंसक आक्रमणे यांमुळे भारताची राजकीय दुर्दशा झालेली असताना चंदेल राजे आपले विशाल साम्राज्य सुमारे ३०० वर्षे संभाळू शकले याचे कारण त्यांची उत्तम शासनव्यवस्था आणि प्रबळ सेना-सामर्थ्य हे होय. त्यांचे धार्मिक धोरणही उदार होते. बौद्ध, जैन, शैव, वैष्णव, इ. सर्व धर्म–पंथ त्यांच्या राज्यात सुखाने नांदत होते. प्रतीहारांच्या नंतर परकीय सत्तेशी दीर्घकाळ यशस्वीपणे मुकाबला करणारा राजवंश म्हणून उ. भारताच्या इतिहासात चंदेल वंशाला मानाचे स्थान आहे. [चं. उ. का.; हि. क. इं. पी.]

चंद्र (१) 'चदि आल्हादने' या आल्हादक अर्थाच्या धातूवरून हा शब्द बनला आहे. जातकशास्त्रात चंद्राला ग्रह मानतात; पण तो पृथ्वीचा उपग्रह आहे. याचा व्यास २१६० मैल असून, तो पृथ्वीपासून २,३९,००० मैलांवर आहे.

तो पृथ्वीभोवती फिरत असतो. २७ दिवस, ७ तास, ४३ मिनिटे व १४ सेकंद एवढ्या कालात तो आपली पृथ्वीप्रदक्षिणा पुरी करतो. चंद्राची एकच बाजू आपल्याला नेहमी दिसते. शुद्ध प्रतिपदेपासून पौर्णिमेपर्यंत त्याच्या कला वाढत जातात आणि पौर्णिमेपासून अमावास्येपर्यंत त्या दिवसेदिवस क्षीण होत जातात.

चंद्र हा स्वयंप्रकाशी नाही. सूर्याचा प्रकाश त्याच्यावर पडतो व तोच परावर्तित होऊन पृथ्वीवर येतो. त्यालाच चांदणे म्हणतात. 'सूर्यस्येव हि चन्द्रमसो रश्मयः'= चंद्राचे किरण हे खऱ्या अर्थाने सूर्याचेच किरण असतात, असे शतपथात म्हटले आहे (९.४.१.९). सूर्य आणि चंद्र जेव्हा पृथ्वीच्या एकाच दिशेला असतात, तेव्हा अमावास्या घडते. 'चन्द्रमा वा अमावास्यायामादित्यमनुप्रविशति'= अमावास्येच्या दिवशी चंद्र हा सूर्यामध्ये प्रविष्ट होतो असे म्हटले आहे (ऐ. ब्रा. ८.२८). जेव्हा पृथ्वीच्या एका बाजूला सूर्य आणि दुसऱ्या बाजूला चंद्र अशी स्थिती येते, तेव्हा पौर्णिमा घडते.

पृथ्वी वायुरूप अवस्थेतून घनरूप अवस्थेत येत असता सूर्याच्या आकर्षणामुळे तिला एकदा मोठी भरती आली. ती भरती पृथ्वीला अनावर झाल्यामुळे तिचा एक मोठा तुकडा तिच्यापासून विलग झाला आणि तो तिच्याभोवती फिरत राहिला, अशी चंद्राची ज्योतिःशास्त्रीय जन्मकथा आहे (सूर्यकुल पृ. १०८–९). चंद्राच्या उत्पत्तीविषयी अलिकडच्या संशोधनातून काही नव्या उपपत्तीही पुढे येत आहेत.

चंद्राच्या वैदिक व पौराणिक उत्पत्तिकथा अशा–

'चंद्रमा मनसो जातः' = चंद्र हा (विराट् पुरुषाच्या) मनापासून उत्पन्न झाला (ऋ. १०.९०.१३).

इंद्राने वृत्रावर वज्रप्रहार केला, तेव्हा वृत्राने इंद्राला प्रार्थिले, की 'तू मला अमर कर'. तेव्हा इंद्राने वृत्राच्या सोममय भागाला आकाशातला चंद्र बनवले (श. ब्रा. १.६.३.१७).

चंद्र हा आपापासून जन्मला असून तो अम्मय (उदकमय) आहे, 'अपां पुष्पमसि' = हे चंद्रा तू आपांचे फूल आहेस (तां. ब्रा. १. ६. ८). 'अम्मयश्चन्द्रमाः स्मृतः' = चंद्रमा हा उदकमय आहे (वायू पु. २७.४८).

'शीतरश्मिः समुत्पन्नः कृत्तिकासु निशाकरः' = चंद्र हा निशाकर कृत्तिका नक्षत्रांच्या ठिकाणी उत्पन्न झाला (ब्रह्मांड पु. ३. २४. १३०).

देव-दैत्यांनी केलेल्या समुद्रमंथनातून चंद्र उत्पन्न झाला (म. भा. आदि. ६४).

ब्रह्मदेवाने अत्री ऋषीला प्रजा उत्पन्न करण्याची आज्ञा केली. तो तपश्चर्येला बसून तेजाचे ध्यान करू लागला. त्या ध्यानप्रसंगी त्याच्या डोळ्यांतून अश्रू निघाले. ते अश्रू दिशांनी प्राशन केले. त्यामुळे त्या गर्भवती झाल्या. पण त्यांना आपापले गर्भ पेलेनात, म्हणून त्यांनी त्यांचा त्याग केला. ब्रह्मदेवाने दिशांचे गळलेले गर्भ एकत्र करून त्या सर्वांचा मिळून एक सुंदर बालक निर्माण केला, तोच चंद्र होय. त्याच्या तेजापासून पृथ्वीवरील ओषधी – वनस्पती निर्माण झाल्या. चंद्राने यज्ञ करून अपार ऐश्वर्य मिळविले. त्याच्यापासून पुढे सोमवंश सुरू झाला (पद्म पु. सृष्टि खंड १२).

मुंड आदिवासीत चंद्राच्या उत्पत्तीची कथा आहे, ती अशी–

मुंडांच्या भूमीवर एकदा अग्निप्रलय ओढवला. मग मुंडांचे देव आणि पूर्वंज समुद्रावर गेले व त्यांनी समुद्रमंथन आरंभले. त्यातून चंद्र व त्याची प्रेयसी चंद्रभागा ही दोघे उत्पन्न झाली. मुंडांचे देव व पूर्वंज त्या दोघांना पकडण्यासाठी धावले. चंद्र निसटून आकाशात गेला; पण चंद्रभागा त्यांच्या हातात सापडली. तिला कोणी घ्यावे याबद्दल त्यांच्यांत कलह सुरू झाला. तिने नाचून गाऊन त्यांना भुलविले आणि तीही आकाशात उडून गली. तिथून तिने मुंडांना सांगितले. 'तुम्ही चांदण्या रात्री माझ्यासारखे गा आणि नाचा. ते नृत्य तुमची विघ्ने दूर करील' (लो. सा. रू.).

चंद्रावर कलंक आहे आणि चंद्र कृष्णपक्षात क्षीण होत जातो, याविषयी पुढील कथा प्रचलित आहे–

प्रजापतीला ३३ कन्या होत्या. त्या त्याने सोमराजाला दिल्या. पण सोम त्यांपैकी एकट्या रोहिणीलाच जवळ करू लागला. त्यामुळे इतरांना मत्सर वाटून त्या गाऱ्हाणे सांगण्यासाठी आपल्या बापाकडे गेल्या. सोमही त्यांच्या मागून प्रजापतीकडे जाऊन त्यांना परत मागू लागला. प्रजापती म्हणाला. 'सर्वांशी समभावाने वागेन अशी शपथ घे'. चंद्राने तशी शपथ घेतली. प्रजापतीने त्याला कन्या परत दिल्या. तरीही त्याची रोहिणीविषयीची आसक्ती कायमच राहिली. त्यामुळे त्याला यक्ष्मा (क्षयरोग) झाला (तै. सं. २.३.५).

या कथेचा पौराणिक पर्याय असा–

अश्विन्यादी सत्तावीस नक्षत्रे या दक्षप्रजापतीच्या कन्या होत. त्या त्याने चंद्राला दिल्या. पण चंद्र एकट्या रोहिणीशीच सलगी करू लागला. तेव्हा बाकीच्यांनी दक्षाकडे त्याबद्दल तक्रार केली. दक्षाने चंद्राला बजावले, की तू सर्व स्त्रियांशी समानत्वाने वाग.' पण चंद्राने ती गोष्ट ऐकली नाही. त्यामुळे दक्षाला राग आला व त्याने चंद्राला शाप दिला, की तू क्षयी हो. मग चंद्राने शरण जाऊन दक्षाकडे उःशाप मागितला. दक्षाने त्याला उःशाप दिला, की तू १५ दिवस क्षीण होशील आणि १५ दिवस पुन्हा

वाढशील (पद्म पु. स्वर्गखंड; म. भा. शल्य. ३९).

बृहस्पतीची पत्नी तारा हिच्याविषयी अभिलाषा धरल्याने बृहस्पतीने चंद्राला क्षयी व कलंकित होण्याचा शाप दिला (हरिवंश १. २५).

चंद्राच्या कलंकाविषयी एक लोककथा अशी—

इंद्र अहल्येशी जारकर्म करायला प्रवृत्त झाला. त्या वेळी अंधार व्हावा, म्हणून त्याने चंद्राला लवकर अस्ताला जाण्यास सांगितले. चंद्राने तसे केले. त्या पापाबद्दल गौतमाने शाप देऊन चंद्राला कलंकित केले.

कलंकविषयक अन्य काही कल्पना अशा—

शिवाने त्रिशूल फेकून गणपतीचे मस्तक उडविले, ते चंद्राच्या रथात पडले. त्या शिराचे साकळलेले रक्त चंद्राला चिकटले. यशोदेने कृष्णावरून खापर ओवाळून ते चंद्रावर फेकले. नळराजाच्या घोड्याचा खूर चंद्राला लागला. आकाशापासून विभक्त होताना पृथ्वीने आकाशाला वारुळातील माती भेट म्हणून दिली आणि ती चंद्राला चिकटली. हरिणाने पारध्यापासून वाचविण्यासाठी चंद्राकडे आसरा मागितला; पण चंद्राने तो न दिल्याने हरिणाने त्याला लाथ मारली (लो. सा. रू.).

चंद्रावरचा कलंक हा ससा असल्याचीही एक कल्पना आहे व ती वैदिक वाङ्मयातही आढळते—

एष वै शशो य एषोऽन्तश्चन्द्रमसि ।

(जै. ब्रा. ३१)

अर्थ – चंद्राच्या ठिकाणी हा ससा (दिसत) आहे.

चंद्रावरचा कलंक हरिणासारखा दिसतो. म्हणून चंद्रावर हरिण आहे, असेही समजतात. चंद्राचे वाहन म्हणूनही हरिणाचीच योजना केलेली असते. मात्र पुराणांत चंद्राच्या रथाला दहा शुभ्र घोडे जोडले जातात, असे म्हटले आहे. (वायू पु. ५.५३–५४; ब्रह्मांड पु. पूर्व भाग २३.५६–५७).

चंद्र

समुद्राला भरती-ओहोटी येते, ती चंद्रामुळेच होय. याविषयी विष्णू पुराणात एक श्लोक आहे, तो असा—

न न्यूना नातिरिक्ताश्च वर्धन्त्यापो ह्रसन्ति च ।
उदयास्तमयेष्विन्दोः पक्षयोः शुक्लकृष्णयोः ।।

अर्थ—समुद्रातले पाणी वास्तविक कमी किंवा अधिक काहीच होत नाही. पण शुक्लकृष्ण पक्षांत चंद्राच्या उदयास्तांमुळे समुद्राला भरती व ओहोटी येऊन त्याचे पाणी वाढलेले व घटलेले दिसते.

चंद्राच्या आकर्षणामुळे समुद्राचे पाणी ओढले जाते, हे भरतीचे शास्त्रीय कारण आहे. अमावस्या व पौर्णिमा या दिवशी उधानाची भरती येते, कारण त्या वेळी आकर्षणाचा जोर अधिक असतो.

वैदिक परंपरेत सूर्य व चंद्र दोन्ही पुरुष आहेत; पण बिहार व ओडिसा येथील लोककथांत चंद्राला स्त्री मानले आहे. कलंक, क्षय-वृद्धी व सूर्यप्रकाशात निस्तेज होणे, या तीन कारणांवरून चंद्राला स्त्री मानले असावे. संहिता व ब्राह्मणे यांत चंद्रकथांचा आढळ होत नाही. पुराणे व लोकसमाज यांत मात्र चंद्रकथा व त्याच आहेत. चंद्र हा गर्भाच्या शिवणी शिवतो, असा उल्लेख ऋग्वेदात एके ठिकाणी आहे (२.३२.४). त्यावरून चंद्राचा व स्त्रीच्या गर्भधारणेचा काही आंतरिक संबंध असल्याची जाणीव त्या काळच्या संशोधकांना झाली असावी, असे वाटते.



चंद्र ग्रह

जातकशास्त्रातही चंद्र स्त्रीप्रकृतीच मानला आहे. हा सौम्य ग्रह असून, कर्कराशीचा स्वामी आहे. वृषभ ही याची उच्च राशी असून, वृश्चिक ही नीच राशी आहे. चंद्राच्या जप-होमासाठी विनियोग होत असलेला मंत्र असा—

आ प्यायस्व समेतु ते विश्वतः सोम वृष्ण्यम् ।
भवा वाजस्य सङ्गथे ।।

(ऋ. १.९१.१६)

अर्थ – हे सोमा, तू प्रवृद्ध हो. तुझ्या शौर्यभराचा प्रवा

चहूकडून चालू होवो. जिथे अनेक सत्त्व–पराक्रम एकवटले असतील, तिथे तुझा वास असो.

चंद्रमूर्ती कशी करावी, याविषयी हेमाद्रीने पुढील श्लोक लिहिले आहेत––

चन्द्रः श्वेतवपुः कार्यः श्वेताम्बरधरः प्रभुः ।
चतुर्बाहुर्महातेजाः सर्वाभरणभूषितः ॥
कुमुदे च सिते कार्ये तस्य देवस्य हस्तयोः ।
कान्तिर्मूर्तिमती कार्या तस्य पार्श्वे तु दक्षिणे ॥
वामे शोभा तथा कार्या रूपेणाप्रतिमा भुवि ।

अर्थ – चंद्र हा शुभ्र वर्णाचा, श्वेतांबरधारी, चतुर्भुज, महातेजस्वी व सर्वाभरणांनी युक्त असा करावा. त्या देवाच्या दोन्ही हातांत पांढरी कुमुदे असावी. त्याच्या उजव्या अंगाला कांती व डाव्या अंगाला शोभा अशा दोन अत्यंत रूपमती स्त्रिया असाव्या.

जैन मूर्तिकलेत चंद्र हा दहा घोड्यांच्या रथात बसणारा, वायव्येचा स्वामी व अमृतकुंभ धारण करणारा असा करावा, असे सांगितले आहे (जै. इ.).

चंद्राच्या कला – ‘षोडशकलो वै चन्द्रमाः’ = चंद्राच्या सोळा कला आहेत, असे मानलेले आहे (षड्विंश ब्रा.) कामशास्त्रात या सोळा कलांची नावे सांगितली आहेत, ती अशी–

पूषा यशा सुमनसा रतिः प्राप्तिस्तथा धृतिः ।
ऋद्धिः सौम्या मरीचिश्च तथा चैवांशुमालिनी ।
अङ्गिरा शशिनी चेति छाया सम्पूर्णमण्डला ।
तुष्टिश्चैवामृता चेति कलाः सोमस्य षोडश ॥

रुद्रयामलतंत्रात चंद्राच्या कलांची नावे वेगळी दिली आहेत, ती अशी––

अमृता मानदा पूषा पुष्टिस्तुष्टी रतिर्धृतिः ।
शशिनी चन्द्रिका कान्तिर्ज्योत्स्ना श्रीः प्रीतिरङ्गदा ।
पूर्णा पूर्णामृता कामदायिन्यः शशिनः कलाः ।

नाथसंप्रदायातही चंद्रकलांची नावे दिलेली आढळतात, ती अशी—

उल्लोला, कल्लोलिनी, उच्चलंती, उन्मादिनी, तरंगिणी, शोषिणी, लंपटा, प्रवृत्ती, लहरी, लोला, लेलिहाना, प्रसरती, प्रवाहा, सौम्या, प्रसन्ना व प्लवंती. त्याची एक सतरावी कला आहे, तिला अमृतकला म्हणतात.

चंद्रविषयक संकेत –– भाऊ नसलेली स्त्री यमद्वितीयेच्या दिवशी बंधू या नात्याने चंद्राला ओवाळते. चंद्राचा गर्भाशी संबंध मानलेला आहे. प्रसूती सुलभ होण्यासाठी चंद्रकिरणांची मदत होते व अवस–पुनव या तिथी गर्भिणीला त्रासदायक असल्याचे मानतात. चंद्रकिरणांतून अमृत स्रवते. चंद्राच्या ठिकाणी रोगनिवारक शक्ती असते. आश्विन पौर्णिमेस सुईत दोरा ओवला असता, तसेच चंद्राकडे वारंवार पाहिले असता दृष्टी तीक्ष्ण होते व कोजागरीच्या रात्री चांदण्यात दूध ठेवून ते प्याल्याने चंद्रामृत प्याल्याचे श्रेय मिळते, असे समजतात. गणेशचतुर्थीच्या दिवशी चंद्रदर्शन निषिद्ध मानतात. वद्य पक्षात चंद्राची एकेक कला देव प्राशन करतात व शेवटची कला दर्शाच्या दिवशी औषधींना मिळते, असे सांगितले आहे. कृष्णगतीने इहलोक सोडून जाणारा योगी चंद्रलोकी जाऊन पुण्यक्षय झाल्यावर फिरून मर्त्य लोकी जन्म घेतो, असे गीता सांगते (८.२५).



चंद्राच्या कला

चंद्रगौरव – चंद्र हा शीघ्रगती अतएव चंचल असल्यामुळे जातकशास्त्रात तो चंचल मनाचा प्रतिनिधी ठरला आहे. चंद्राला वैदिक काळापासूनच प्रतीकात्मकता लाभलेली आहे. ‘सोमो वै चन्द्रमाः’ = सोमरस म्हणजे चंद्रमा होय (श. ब्रा. १२.१.१.२); ‘चन्द्रमा पुनरसुः’ = चंद्रमा म्हणजे प्राण होय (तै. ब्रा. २.५.७.३); ‘मनश्चन्द्रमाः’ = चंद्रमा म्हणजे मन होय (जै. उ. ३.२.६); ‘प्रजापतिर्वै चन्द्रमाः’ = चंद्रमा म्हणजे प्रजापती होय (श. ब्रा. ६.१.३.१६); ‘रात्रिर्वै चन्द्रमाः’ = चंद्रमा म्हणजे रात्र होय (श. ब्रा. १२.४.४.७); ‘चन्द्रमा मनुष्यलोकः’ = चंद्रमा मनुष्यलोक होय (जै. उ. ३.१३.१२); ‘अन्नमु वै चन्द्रमाः’ = चंद्रमा म्हणजे अन्न होय (जै. उ. १.३.४). अशा प्रकारे चंद्र हा चराचर सृष्टीतल्या आणि अंतःशरीरातल्या अनेक वस्तूंचा प्रतीकभूत मानला गेला आहे. साहित्यशास्त्रात तो रमणींच्या मुखाचे उपमान ठरला आहे. शीतल, सौम्य आणि सुंदर असल्याने तो कामीजनांना प्रिय झालेला आहे. शिवाच्या जटेत स्थान मिळाल्याने त्याचे महत्त्व अधिकच वाढले आहे. त्याच्या दर्शनाने कुमुदिनी प्रफुल्लित होते, असे म्हणतात. शरत्कालीन चंद्राची शोभा वर्णिताना तर कवींची अहमहमिकाच लागते. चंद्राचे माहात्म्य सांगताना एक कवी म्हणतो––

लालयन्तमरविन्दवनानि क्षालयन्तमभितो भुवनानि ।
पालयन्तमथ कोककुलानि ज्योतिषां पतिमहं महयामि ।।

अर्थ – कमलवनांचे लालन करणाऱ्या, त्रिभुवनाला सर्व बाजूंनी (आपल्या चंद्रिकेने) न्हाऊ घालणाऱ्या, चक्रवाक-कुलांचे पालन करणाऱ्या व ज्योतींचा पती असलेल्या (चंद्राला) मी नमस्कार करतो.

काव्यात चंद्रकोर, अर्धचंद्र आणि पूर्णचंद्र अशा चंद्राच्या भिन्न अवस्थांचे मनोहर वर्णन आढळते. पाहा– चंद्रपूजा [लो. सा. रू.; वे. इं.; पु. इं.]

(२) प्लक्षद्वीपातील सात पर्वतांपैकी एक. त्याचा समुद्राला स्पर्श झालेला आहे. अश्विनौ देवांनी अमृत तयार करण्यासाठी इथल्या औषधी वनस्पती गोळा केल्या होत्या. [पु. इं.]

चंद्रकल्याणक एक जैन व्रत. हे व्रत २५ दिवसांत पुरे होते. पहिले ५ दिवस उपवास, दुसरे ५ दिवस कांजीभोजन, तिसरे ५ दिवस एक भोजन, चौथे ५ दिवस रुक्ष भोजन व पाचवे ५ दिवस मुनिवृत्तीने भोजन, असा याचा विधी आहे. [जै. व्र. वि. सं.]

चंद्रकांत (१) एक राग. हा राग कल्याण थाटातून निघतो. याच्या आरोहात मध्यम वर्ज्य असून, अवरोहात सातही स्वर लागतात. याची जाती षाडव संपूर्ण असून, वादी गांधार व संवादी निषाद आहे. गायनसमय– रात्रीचा पहिला प्रहर. याचे स्वरूप काही अंशी शुद्ध कल्याण रागासारखे भासते.

(२) उत्तरकुरूमधला कुलपर्वत. इंद्र आपले पंख कापील, या भीतीने हा समुद्रात शिरला. [पु. इं.]

(३) एक मणी. याचा परिणाम शीत असतो. चंद्रकिरणांत हा मणी पाझरतो, अशी समजूत आहे. [हि. घ.]

चंद्रकीर्ती (इ. स. चे ६ वे शतक) एक बौद्ध आचार्य. हा दक्षिण भारताचा रहिवासी होता. भिक्षू बनल्यावर याने बुद्धपालित अथवा भावविवेक या बौद्ध आचार्यांकडे नागार्जुनाच्या समस्त ग्रंथांचे, तसेच पिटकग्रंथांचेही अध्ययन केले. पुढे हा नालंदा विद्यापीठात आचार्य झाला. हा बौद्धांच्या माध्यमिक संप्रदायाचा पुरस्कर्ता होता. याने लिहिलेले ग्रंथ असे– (१) माध्यमिकावतार – या ग्रंथात याने शून्यवाद विशद केला आहे. (२) प्रसन्नपदा– नागार्जुनाच्या माध्यमिका कारिकांवरील टीका. (३) चतुःशतकटीका– नागार्जुनाचा शिष्य आचार्य देव यांच्या ग्रंथावरील टीका. [पू. म. भा.; गु. सा. इ.]

चंद्रकूट कामरूप (आसाम) देशातला एक पर्वत. हा वायुगिरीच्या पूर्वेस आहे. प्रत्येक अमावास्येला चंद्र याच्या भोवती प्रदक्षिणा करतो, अशी तिथल्या लोकांची समजूत आहे. या पर्वताच्या पूर्वभागी चंद्रकुंड नावाचे सरोवर आहे. या कुंडात स्नान केल्याने, या पर्वतावर आरोहण केल्याने व इथे इंद्रपूजा केल्याने पापनाश होतो आणि संतती व संपत्ती अविच्छिन्न होते, असे सांगितले आहे. [कालिका पु. ८१]

चंद्रकूप एक तीर्थ. कुरुक्षेत्रातील ब्रह्मसरोवरातल्या द्वीपावर हा एक कूप आहे. कुरुक्षेत्रातल्या चार पवित्र कूपांत याची गणना होते. इथे एक मंदिर आहे. असे सांगतात, की भारतीय युद्धानंतर युधिष्ठिराने या ठिकाणी एक विजयस्तंभ उभारला होता. [कल्याण–तीर्थांक]

चंद्रगुप्त (१) (शासनकाल सनपूर्व ३२४ ते ३००) मौर्य वंशाचा संस्थापक. याच्या कुळाची निश्चित माहिती उपलब्ध नाही. मगधाच्या नंद राजाची मुरा नामक एक दासी होती, तिचा हा पुत्र होता, अशी कथा संस्कृत साहित्यात आहे. मुरेचा पुत्र म्हणून मौर्य हे नाव चंद्रगुप्ताच्या वंशाला मिळाले, असे म्हणतात. पण ही केवळ दंतकथा आहे. चंद्रगुप्त हा दासीपुत्र नसून अस्सल क्षत्रिय होता, असे पुराव्याने सिद्ध झाले आहे. गौतम बुद्धाच्या काळापासून मोरिया नामक एक क्षत्रिय कुळ पिप्पलिवन येथे राहत होते आणि त्या कुळात चंद्रगुप्त जन्मला, असा बौद्ध साहित्यात उल्लेख आहे. त्याचा पिता मोरिया कुळाचा प्रमुख होता, पण तो एका लढाईत मारला गेला. त्यानंतर त्याची पत्नी पाटलिपुत्राजवळच्या एका खेडेगावात जाऊन राहिली. तिथे चंद्रगुप्ताचा जन्म झाला. एका गोपालाने त्याला वाढविले. तो आपल्या सवंगड्यांचा पुढारी बनून खेळत असताना आर्य चाणक्याने त्याला पाहिले. चाणक्याला तो आवडला. मगधाच्या नंद राजाने चाणक्याचा घोर अपमान केला होता आणि चाणक्याला त्याचा सूड घ्यावयाचा होता. या मुलाचा त्या कामी आपल्याला चांगला उपयोग होईल, असे हेरून त्याने चंद्रगुप्ताला जवळ केले. त्याला घेऊन चाणक्य तक्षशिला नगरीस गेला आणि तिथे त्याने त्याला सर्व विद्या व कला शिकवून तरबेज बनवले.

त्यानंतर चाणक्य व चंद्रगुप्त यांनी मोठी सेना जमा करून ग्रीक सैन्याचा पराभव केला. त्यामुळे चंद्रगुप्त पंजाब आणि सिंध या प्रदेशांचा राजा झाला (सनपूर्व ३२४). त्या वेळचा नंद राजा जुलमी, विलासी व नालायक होता. तथापि त्याचे सेनाबळ व द्रव्यबळ प्रचंड होते. चंद्रगुप्ताला त्याच्याशी अनेक

घनघोर संग्राम करावे लागले. शेवटी त्या संग्रामात चंद्रगुप्त विजयी झाला व नंद वंशाचा नाश करून मगधाच्या सिंहासनावर बसला (सनपूर्व ३२२). पुढे लवकरच त्याने सिंधू नदीपासून गंगेच्या मुखापर्यंत विशाल साम्राज्य स्थापले.

शिकंदराचा एक बलाढ्य सेनापती सेल्युकस हा शिकंदरानंतर त्याच्या आशियातील राज्याचा स्वामी झाला होता. त्याने लवकरच पंजाबवर स्वारी केली. तो सनपूर्व ३०५ च्या सुमारास सिंधू नदीपर्यंत चालून आला. चंद्रगुप्ताने तिथे त्याची गाठ घेऊन त्याचा सपशेल पराभव केला. मग सेल्युकसने अरिया, अर्कोसिया व परोपनिसदै हे पंजाबातले प्रांत चंद्रगुप्ताला देऊन त्याच्याशी तह केला. हेरात, कंदाहार व काबूल या त्या प्रांतांच्या राजधान्या होत्या. पुढे चंद्रगुप्ताने सेल्युकसच्या कन्येशी विवाह केला आणि त्याला ५०० हत्ती भेट म्हणून दिले, असे म्हणतात.

चंद्रगुप्ताच्या त्यानंतरच्या जीवनाविषयी फारशी माहिती उपलब्ध नाही. पण त्याने पुढेही अनेक युद्धे करून साम्राज्यविस्तार केला असावा. जैन साहित्यावरून समजते, की त्याने शेवटी जैन धर्म स्वीकारला आणि आपला पुत्र बिंदुसार याला राज्य देऊन तो भद्रबाहूसह द. भारतात गेला. तिथे चंद्रगिरी नामक डोंगरावर (श्रवण बेळगोळ) त्याने १२ वर्षे तप केले आणि शेवटी जैन प्रथेनुसार सल्लेखना करून देहत्याग केला. त्या ठिकाणी सापडलेल्या शिलालेखांच्या आधारामुळे ही गोष्ट आता अनेक पंडितांनी मान्य केली आहे.

चंद्रगुप्ताचे साम्राज्य उत्तरेकडील हेरातपासून दक्षिणेकडे मदुरेपर्यंत पसरले होते. सौराष्ट्र व शूर्पारक (ठाणे जिल्हा) हे प्रदेशही त्याच्या साम्राज्यात होते. आपल्या साम्राज्याचे अनेक भाग पाडून चंद्रगुप्ताने तिथे आपले प्रतिनिधी नेमले होते. तो स्वतः केवळ मगधावर व त्याच्या भोवतालच्या प्रदेशावर राज्य करीत असे. पण त्याचे प्रांतिक राज्यकारभारावर पूर्ण लक्ष असे. त्याची शासनव्यवस्था अत्यंत सुसूत्र व संघटित होती. त्याने निरनिराळ्या राज्यांना जोडणारे राजमार्ग तयार केले होते. पाणीपुरवठ्यासाठी तलावही बांधले होते. त्याच्या सर्व साम्राज्यात शांतता व समृद्धी नांदत होती. [हि. क. इं. पी.; जै. ध.]

(२) गुप्त राजवंश पाहा.

चंद्रगोमी (इ. स. ७०० चा सुमार) एक बौद्ध पंडित. चांद्र व्याकरणाचा कर्ता. हा उत्तर बंगालमधल्या एका क्षत्रिय कुलात जन्मला होता. हा स्थिरमती या बौद्ध आचार्याचा पट्टशिष्य होता. याने द. भारत व लंका यांची यात्रा केली होती. लंकेहून परत येताना याने द. भारतात पतंजलीचे महाभाष्य पाहिले. त्यात त्याला काही चुका आढळल्या. म्हणून त्याने स्वतःचे चांद्र व्याकरण रचले. महाभाष्यानंतरच्या काळात संस्कृत भाषेत जे जे फरक झाले होते, ते ते सर्व लक्षात घेऊन त्याने सूत्रे व वार्तिके यांत सुधारणा केली.

नालंदा विद्यापीठातील चंद्रकीर्ती हा बौद्ध पंडित याचा समकालीन होता.

चंद्रगोमी हा कवी व नाटककारही होता. याची लोकानंद व शिष्यलेखा नामक दोन संस्कृत नाटके आहेत. त्याच्या काव्यांपैकी शिष्यलिखधर्मकाव्य नामक एक काव्य उपलब्ध असून, त्यात बौद्ध धर्माची तत्त्वे ग्रथित केलेली आहेत. लहानमोठे सुमारे ६० बौद्धधर्मविषयक ग्रंथ याने संस्कृत भाषेत लिहिल्याचें कळते. याच्या अनेक संस्कृत ग्रंथांचे तिबेटी भाषेत अनुवाद झाले असून, ते ग्रंथ तिबेटात आवडीने अभ्यासिले जातात. [म. ज्ञा. को.; म. च. को.; गु. सा. इ.; ज. स्मा. ग्रं.]

चंद्रतीर्थ कन्याकुमारीजवळील एक श्राद्धयोग्य तीर्थ. इथे पौर्णिमेस स्नान केल्याने चंद्रलोकाची प्राप्ती होते, असे सांगितले आहे. [पु. इं.]

चंद्रद्वीप हे उत्तरकुरूच्या दक्षिणेस असून, त्याचा परिघ १००० योजने असल्याचे सांगितले आहे. याच्या मध्यभागी एक पर्वत असून, त्यातून चंद्रावती नदी उगम पावते. इथे देवांसह चंद्र वास्तव्य करतो, असे म्हटले आहे. [पु. इं.]

डॉ. वासुदेवशरण अग्रवाल यांच्या मते चंद्रद्वीप हा विंध्य पर्वताचाच एक भाग असावा. सीतेच्या वनवासाने खिन्न झालेला जनक राजा वैखानस वृत्ती धारण करून इथे काही काल राहिला होता, असा भवभूतीने उल्लेख केला आहे (उत्तररामचरित ४).

चंद्रनक्षत्रव्रत चैत्र पौर्णिमेस सोमवार आला असता हे व्रत करतात. यात चंद्राची पूजा, चंद्राच्या रौप्यमूर्तीचे दान व तूप आणि तीळ यांचे हवन करायचे असते. फल – चंद्रलोकप्राप्ती [हि. ध.]

चंद्रनाथ हे बंगालमधील चितगांग जिल्ह्यातील एक पर्वतशिखर आहे. सतीचा उजवा हात या ठिकाणी गळून पडल्यामुळे हे एक शक्तिपीठ बनले आहे. इथे चंद्रनाथ व शंभुनाथ यांची मंदिरे आहेत. जवळच सीताकुंड, व्यासकुंड, सूर्यकुंड, ब्रह्मकुंड, शिवकुंड ही कुंडे आहेत. बंगालच्या सर्व भागांतून या ठिकाणी यात्रेकरू जातात. [हि. जॉ. ए. इं.]

चंद्रपिरै एक वाद्य. चंद्रकोरीच्या आकाराच्या एका वलयावर पातळ चामडे ताणून बसवतात व मूठ असलेल्या एका दांडयाला ते वलय अडकवतात. वादक हे वाद्य आपल्या कपाळावर बांधतो आणि एका काठीने ते वाजवतो. ग्रामदेवतांच्या मंदिरांतून या वाद्याचा उपयोग करतात. [डि. सा. इं. म्यु. म्यु.]

चंद्रपुरी एक जैन क्षेत्र. सारनाथपासून नऊ मैलांवर चंद्रवटी नावाचे जे गाव आहे, तीच मूळ चंद्रपुरी असावी, असे म्हणतात. इथे चंद्रप्रभ या तीर्थंकराचा जन्म झाला. या ठिकाणी गंगेच्या उभय तीरांवर दिगंबर व श्वेतांबर या दोन्ही संप्रदायांची मंदिरे आहेत. [जै. ध.]

चंद्रपूजा प्रत्येक महिन्याच्या शुद्ध द्वितीयेस चंद्रदर्शन शुभकारक मानले आहे. त्या वेळी चंद्राला नमस्कार करून त्याला वस्त्राची दशी वाहतात. चंद्रपूजेने संतती, संपत्ती व गोधन वाढते. म्हणून काही लोक चंद्रदर्शनानंतर लगेच सोन्याचांदीच्या नाण्यांचे दर्शन घेतात. बौद्ध भिक्षू चंद्रदर्शनाच्या दिवशी मुंडन करतात व विशिष्ट धर्मकृत्ये करतात. पौर्णिमेच्या दिवशी ते गृहस्थाच्या घरी भोजन करतात व रात्री धर्मप्रवचन करतात. संकष्ट चतुर्थीला गणपतीबरोबरच चंद्राचीही पूजा करतात. कोजागरीच्या रात्री चंद्राला दुधाचा नैवेद्य दाखवतात. कर्नाटकात कुंवार मुली माघ शुद्ध अष्टमीस अथवा दशमीपासून पौर्णिमेपर्यंत अंगणात चुन्याने चंद्रप्रतिमा काढून तिची पूजा करतात. गुजरातेत फाल्गुन वद्य चतुर्थीस उपोषण करून चंद्रदर्शन होईपर्यंत उभे राहतात व ते झाल्यावर उपास सोडतात. या व्रताला 'उभी चोथ' म्हणतात. कुंवार मुली पौष शुद्ध चतुर्थीस चंद्राचे व्रत करतात. या व्रतात मुली उघडयावर स्वयंपाक करतात, भाकरीला भोक पाडून त्यातून चंद्रदर्शन घेतात व मग भावांची परवानगी घेऊन भोजन करतात. कार्तिक शुद्ध प्रतिपदेस चंद्र रोहिणी नक्षत्रात असता चंद्राची पूजा करून त्याला अर्घ्य द्यावे, असे सांगितले आहे [फो. लो. नॉ. इं.; हि. ध.]

चंद्रपूर या शहराला सांप्रत चांदा म्हणतात. हे वर्धा-बल्लारशा लोहमार्गावर आहे. या शहराभोवती भक्कम तट असून, त्याच्या प्रत्येक दरवाजावर गोंड राजांचे राजचिन्ह आहे. तिथे अचलेश्वर व दशमुखी दुर्गादेवी यांची मंदिरे आहेत. तिथून सुमारे तीन मैलांवर महाकालीचे मंदिर आहे. हे स्थान पुरातन आहे. चंद्रपूरची ही महाकाली गोंडवनाची आराध्यदेवता होती. हिच्याविषयी कथा सांगतात, ती अशी—

कृतयुगात कृतध्वज नावाच्या राजाने लोकपूर नावाचे नगर वसवले. तेच नंतरचे चंद्रपूर होय. त्याचा पुत्र सुनंद गादीवर बसल्यानंतर एका रात्री महाकाली या ठिकाणी प्रगट झाली. या देवीला भूतनाथ नावाचा सुंदर पुत्र होता. तो देवस्त्रियांना मोहित करू लागला. त्याचे हे निंद्य कृत्य देवीला न आवडून तिने त्याचे मस्तक तोडले व ते एका ठिकाणी पुरून तिथे गायीच्या खुरासारखी मोहोर बसवली. त्या स्थळाला पुढे अचलेश्वर असे नाव पडले.



महाकालीचे मंदिर– चंद्रपूर

द्वापरयुगात चंद्रहास नावाचा एक राजा झाला. कौतलपुर ही त्याची राजधानी होती. एके दिवशी तो अरण्यात फिरत असता अचलेश्वराच्या प्रदेशात आला. त्याला ते स्थान आवडले व तिथे त्याने आपली नवी राजधानी वसवली. चंद्रहासाने वसवली म्हणून तिला चंद्रपूर असे नाव पडले.



चंद्रपूरची महाकाली

इ. स. च्या ४ थ्या शतकापासून १२ व्या शतकापर्यंत वाकाटक राजे इथे राज्य करीत होते. पुढे तिथे गोंडांचे राज्य सुरू झाले. गोंडांच्या कालात या स्थानाला विशेष महत्त्व आले व चंद्रपूर हे एक क्षेत्र ठरले. गोंड राजा वीरशहा याची कन्या देवगडचा राजा दुर्गपाल याला दिली होती. ती मोठी बाणेदार होती. दुर्गपालाने तिचा एकदा अपमान केला, तेव्हा माहेरी येऊन तिने आपल्या बापाला देवगडावर स्वारी करायला लावले.

त्या लढाईत दुर्गपाल मारला गेला. वीरशहाने त्याचे शिर महाकालीला अर्पण केले. वीरशहाची राणी हिराई हिने नंतर महाकालीचे नवे भव्य मंदिर बांधले आणि त्यावर एक दगडी शिर तयार करून बसविले. तेव्हापासून इथे चैत्र पौर्णिमेस देवीचा महोत्सव सुरू झाला.

अचलेश्वराचे मंदिर बल्लारपूरचा बल्लाळशहा याने बांधले. शहरामोवतीचा तटही यानेच उभारला. या नगरात गोंड राजांच्या बऱ्याच छत्र्या आहेत. वीरशहाची समाधीही आहे. नगराबाहेर काही जुन्या भव्य मूर्ती दिसतात. [चंद्रपूरची महाकाली– वि. वा. जोशी; म. प.]

चंद्रप्रभ (१) जैनांचा आठवा तीर्थंकर. महासेन व लक्ष्मणा यांचा पुत्र. जन्मस्थान– चंद्रपुरी. जन्मनक्षत्र– अनुराधा. लांच्छन– चंद्र. ज्ञानवृक्ष– नागकेसर. मोक्षस्थान– पारसनाथ पर्वत. यक्ष-यक्षिणी– विजय-भृकुटी किंवा ज्वालामालिनी. चवरीधर– दानवीर्य.

चंद्रप्रभ गर्भात असता त्याच्या आईला चंद्रप्राशन करण्याचे डोहाळे लागले. तेव्हा पाण्याच्या थाळीत चंद्राचें प्रतिबिंब पाडून ते पाणी तिला प्यायला देण्यात आले. त्यामुळे तिला चंद्रासारखा कांतिमान पुत्र झाला व त्याचे नाव चंद्रप्रभ ठेवले गेले. उ. भारतात याच्या सुरेख मूर्ती आढळतात. [जै. इ.]



चंद्रप्रभ बोधिसत्व

(२) एक बोधिसत्व. निष्पन्नयोगावली या ग्रंथात याचे वर्णन मिळते. याचा वर्ण शुभ्र असून, डाव्या हातात पद्मस्थ चंद्रमंडल व उजवा हात वरदमुद्रेत आहे. पद्मस्थ चंद्रमंडल हेच याचे बोधचिन्ह आहे. [इं. बु. इ.]

(३) कैलासाच्या वायव्येकडील एक पर्वत. इथे स्वच्छोदा नदी, स्वच्छोद सरोवर व चैत्ररथवन आहे. यक्षाधिपती मणिभद्र याचे हे निवासस्थान होय. [पु. इं.]

चंद्रवल विवाह, यात्रा, इ. गोष्टींसाठी चंद्रवल पाहण्याची पद्धत आहे. याचे दोन प्रकार आहेत—

पापान्तः पापयुग्द्यूने पापाच्चन्द्रः शुभोऽप्यसन् ।
शुभांशे चाधिमित्रांशे गुरुदृष्टोऽशुभोऽपि सन् ।।

अर्थ – चंद्र दोन पापग्रहांच्या मध्ये असता किंवा पापग्रहाने युक्त असता किंवा कोणत्याही पापग्रहापासून सातवा असता तो शुभ असला तरी अशुभ समजावा आणि शुभग्रहाच्या नवांशी किंवा मित्राच्या नवांशी किंवा गुरूने दृष्ट असता अशुभ असला, तरी शुभ जाणावा.

चंद्रबलाचा दुसरा प्रकार असा—

सितासितादौ सद्दुष्टे चन्द्रे पक्षौ शुभावुभौ ।
व्यत्यासे चाशुभौ प्रोक्तौ सङ्कटेऽब्जबलं त्विदम् ।।

अर्थ–शुक्ल पक्षाच्या आरंभी चंद्र शुभ असला, तर त्या सर्व पक्षात चंद्रबल आहे व कृष्णपक्षाच्या आरंभी चंद्र अशुभ असला तर त्या पक्षातही चंद्रवल आहे, असे जाणावे. याच्या उलट असता चंद्रवल नाही, असे समजावे. अडचणीच्या प्रसंगी हेही चंद्रबल घ्यावे.

ज्या दिवशी चंद्रवल नसेल, त्या दिवशी यात्राविवाहादी गोष्टी वर्ज्य कराव्यात, असे सांगितले आहे. [मु. चिं.]

चंद्रभागा काश्मीरातील एक नदी. सांप्रत हिला चिनाब म्हणतात. हिच्या उत्पत्तीची कथा कालिका पुराणात दिली आहे, ती अशी—

काश्मीरात चंद्रभाग नावाचा एक पर्वत होता. त्याच्या शिखरावर एकदा देवसभा भरली असता ब्रह्मदेवाच्या आज्ञेवरून शीता नामक एक नदी निर्माण झाली. त्या नदीत सर्व देवांनी चंद्राला स्नान घातले. त्यामुळे तिचे पाणी अमृतमय झाले. ते पाणी बृहल्लोहित नावाच्या एका सरोवरात पडले.

ब्रह्मदेवाने त्या जलाकडे पाहिल्यावर त्यातून एक कन्या निर्माण झाली. ब्रह्मदेवाने तिचे नाव चंद्रभागा ठेवले. सागराने तिचा पत्नी म्हणून स्वीकार केला. सरोवरातल्या त्या जलाला चंद्रभाग पर्वताने मग वाट करून दिली. चंद्रभाग पर्वतातून निघाल्यामुळे त्या नदीला चंद्रभागा असे नाव मिळाले.

ही झाली कथा. पण वस्तुस्थिती अशी आहे, की या नदीचे दोन निरनिराळे प्रवाह हिमालयात उगम पावतात. एकाचे नाव चंद्रा व दुसऱ्याचे भागा. हे दोन प्रवाह तंडी येथे एकत्र मिळाल्यावर त्या संयुक्त प्रवाहाला चंद्रभागा असे म्हणतात. ऋग्वेदात उल्लेखिलेली असिक्नी नदी ती हीच होय. भारतातील दहा मोठ्या नद्यांपैकी ही एक आहे, असे मिलिंदपन्ह या ग्रंथात सांगितले आहे. वैशाखात या नदीचे स्नान महापुण्यकारक आहे,

असे देवीपुराण सांगते.

चंद्रभागा नावाच्या आणखीही काही नद्या आहेत. त्यांपैकी एक नर्मदेच्या खालच्या अंगाने वाहते, दुसरी तापीला व तिसरी साबरमतीला मिळते. महाराष्ट्रात पंढरपुरी भीमेलाही चंद्रभागा म्हणतात. कारण तिथे भीमेच्या प्रवाहाला चंद्रकोरीसारखा बाक आलेला आहे. [हि. ध.; हि. जॉ. ए. इं.; श. क.]

चंद्रभान ब्रह्मन

(१६६२ इ. स.) उर्दू भाषेचा सर्वप्रथम शायर. अरबी, फारसी व संस्कृत या तीन्ही भाषांचा हा पंडित होता. याच्या विद्वत्तेची कीर्ती दारा शिकोहच्या कानी गेली व पुढे शहाजहानचा प्रधान मंत्री अल्लावी अफजलखाँ याच्याशी त्याची मैत्री जमली.

चंद्रभानने काही उपनिषदांचा फारसीत अनुवाद केला आहे. संस्कृत ग्रंथांचा फारसीत अनुवाद करण्याच्या कामी त्याने दारा शिकोहलाही मदत केली. राजदरबारातून त्याला जहागिरी व वीस हजारांची मनसबदारी मिळाली व शाहकलम आणि रायरायन या दोन उपाधीही प्राप्त झाल्या. दारा शिकोहच्या मृत्यूनंतर याने एक विलापकाव्य लिहिले. पुढे हा काशीत गेला व तिथल्या मणिकर्णिका घाटावर एक पर्णकुटी बांधून राहू लागला. शेवटी एक दिवस तो गंगेत स्नानासाठी म्हणून उतरला, तो वर आलाच नाही. [नवनीत]

चंद्ररोहिणीशयनव्रत

एक काम्य व्रत. पौर्णिमेला जेव्हा सोमवार किंवा रोहिणी नक्षत्र असेल, त्या दिवशी हे व्रत करतात. हे व्रत पुरुषांना विहित आहे. त्या दिवशी पंचगव्य व मोहरीचा कल्क अंगाला लावून स्नान करतात आणि 'आ त्यायस्व...' या मंत्राचा ८०० वेळा जप करतात. नंतर रोहिणीदेवीची पूजा करून त्या रात्री भूमीवर शयन करतात. दुसऱ्या दिवशी सकाळी हवन करून सुवर्णसहित जलकुंभाचे दान करतात. त्या दिवशी गोमूत्रप्राशन व हविष्यान्नाचे भोजन करतात. वर्षभर हे व्रत केल्यावर चंद्र व रोहिणी यांची संयुक्त सुवर्णप्रतिमा करून तिचे दान देतात. फल– चंद्रलोकप्राप्ती. [कृ. क. त.].

चंद्रवत

शैवपंथी भिक्षेकऱ्यांची एक जात. काशी व पाटणा या नगरांत यांची बरीच वस्ती आहे. शेळ्या, मेंढ्या, गाढवे, कुत्री व माकडे यांचे कळप घेऊन हे फिरतात. हे घरबारी (गृहस्थ) असतात. [वै. शै. म. व.]

चंद्रवंश

सोमवंश पाहा.

चंद्रव्रत

एक काम्य व्रत. याचे पुढील पर्याय आहेत – (१) दर अमावास्येस सूर्य व चंद्र यांच्या मूर्ती कमळावर ठेवून त्यांची पूजा. असे एक वर्षभर करणे. (२) मार्ग. पौर्णिमेस प्रारंभ करून प्रत्येक पौर्णिमेस उपवास व चंद्राची पूजा. असे एक वर्ष करणे (३) पंधरा वर्षेपर्यंत प्रत्येक पौर्णिमेस नक्त भोजन. व (४) चांद्रायण व्रत करून सुवर्णाच्या चंद्रमूर्तीचे दान. फल– सुख व शांती यांचा लाभ. [हि. ध.]

चंद्रशांती

सोमवारी चित्रा नक्षत्र असता चंद्रशांती करावी, असे सांगितले आहे. तिचा विधी असा – कांस्यपात्रात रुप्याची चंद्रमूर्ती स्थापून श्वेतवस्त्र व श्वेतपुष्पे यांनी तिची प्रदोषकाळी पूजा करतात. सात वेळा अशी पूजा झाल्यावर मग तिल, घृत व पळसाच्या समिधा यांचे हवन करतात. चंद्राला दहीभाताचा नैवेद्य दाखवतात. पुढील मंत्राने चंद्राची प्रार्थना करतात –

महादेवप्रियोऽसि त्वं पुष्पगोक्षीरपाण्डुर ।
सोम सौम्यो भवास्माकं सर्वदा ते नमो नमः ।

अर्थ – हे चंद्रा, तू महादेवाचा आवडता व फुले आणि गायीचे दूध यांच्या सारखा शुभ्रवर्ण आहेस. तू आमच्यासाठी सर्वकाल सौम्य हो. तुला नमस्कार असो.

मग ब्राह्मणभोजन घालून कर्माची सांगता करतात. [शां. क.]

चंद्रशेखरमूर्ती

शिवाच्या जटेत जेव्हा चंद्रकोर असते, तेव्हा त्याला चंद्रशेखर म्हणतात. चंद्रशेखराच्या तीन प्रकारच्या मूर्ती उपलब्ध आहेत – केवल चंद्रशेखर, उमासहित चंद्रशेखर व आलिंगनचंद्रशेखर. पहिल्या शिल्पात शिव एकटाच असतो, दुसऱ्यात त्याच्या शेजारी उमा असते व तिसऱ्यात त्याने उमेला आलिंगन दिलेले असते. या तीन्ही प्रकारच्या मूर्ती द. भारतात आढळतात.

चंद्रशेखर चतुर्भुज असून, त्याच्या एका हाती परशु, दुसऱ्या हाती मृग, तिसरा हात अभयमुद्रेत व चौथा वरदमुद्रेत असतो.



उमासहित चंद्रशेखर

तंजाऊरच्या बृहदीश्वर मंदिरातील चंद्रशेखरमूर्ती अप्रतिम असून, चोल शिल्पकलेचा तो उत्कृष्ट नमुना आहे. त्याच्या तीन हातांत परशू, मृग व टंक असून, चौथ्या हाताने तो उमेला जवळ करीत आहे. उमेच्या उजव्या हाताची विस्मय-मुद्रा असून, डावा हात कटीवर विसावलेला आहे. खिंचिग (ओडिसा) यथील केवल चंद्रशेखर हा भारतीय शिल्पकलेचा उत्कृष्ट आविष्कार समजला जातो. त्यात शंकर आभंगमुद्रेत (किंचित वाकलेला) असून, त्याच्या उजव्या हाती माला व डाव्या हाती त्रिशूल आहे. त्याचा जटामुकुट व अलंकार हे नाजूकपणे कोरलेले आहेत. मूर्तीचा बांधा सुडौल असून, मुखावरील भाव प्रसन्न आहे.



शिव चंद्रशेखर – खिंचिग

चंद्रशेखरमूर्तीचे काव्यगत वर्णन असे–

स पातु वो यस्य जटाकलापे ।
स्थितः शशाङ्कः स्फुटहारगौरः ।
नीलोत्पलानामिव नालपुञ्जे ।
निद्रायमाणः शरदीव हंसः ।।

अर्थ– ज्याच्या जटाकलापात शुभ्र हाराप्रमाणे गौर असा चंद्र स्थित आहे, तो चंद्रशेखर शिव तुमचे रक्षण करो. नीलकमलांच्या नालसमूहात शरद्‌काली हंस झोपी जावा, तसा शिवाच्या केशकलापात चंद्र दिसतो.

महाराष्ट्रात सातारा जिल्ह्यातील आटपाडी येथे व देहरादून जवळच्या लाखामळ या गावीही चंद्रशेखरमूर्ती आढळतात. [मू. वि.; डे. हिं. इ.]

चंद्रषष्ठी भाद्रपद कृष्ण षष्ठीचे नाव. या दिवशी करायच्या व्रतात स्त्रिया उपवास करतात व चंद्रोदयाच्या वेळी त्याला अर्घ्य देतात. फल – पुत्रप्राप्ती [हिं. ध.]

चंद्रसखी (इ. स. चे १६ वे शतक) एक भक्त कवयित्री. हिच्याविषयी विशेष काही माहिती मिळत नाही. ती राजस्थानातली कुठली तरी असावी. हिची पदे रागकल्पद्रुम या ग्रंथात आढळतात. असे वाटते, की ती कृष्णाच्या बालरूपाची उपासक असावी. कारण तिच्या बहुतेक पदांच्या अंतिम पंक्तीत ‘चंदसखी भज बालकृष्ण छबि’ असे म्हटलेले असते. कदाचित ही मीराबाईची भक्त असावी. कारण हिच्या अनेक पदांची भाषा मीरेच्या भाषेशी मिळतीजुळती आहे. उदा० –

जावा दे गुमानीडा कृष्ण म्हारे डेरे काम छे ।
इत गोकुल उत मथुरा नगरी
जमुना किनारे म्हारो गाम छे
म्हारे अंगन तुलसीको बिरवा
सांवरी सखी म्हारो नाम छे
जानी नही तो पूंछ लीजियो
कुंजद्रुमन म्हारो धाम छे
चंदसखी भज बालकृष्ण छबि
श्रीराधा म्हारो नाम छे ।।

अर्थ– कृष्णा, मला मुकाटचाने जाऊ दे. मला घरी काम आहे. इकडे गोकुळ, तिकडे मथुरा आणि यमुनेच्या किनारी माझा गाव आहे. माझ्या अंगणात तुळशीचा रोपा आहे. सावरी सखी हे माझे नाव आहे. तुला ठाऊक नसेल, तर विचारून घे. कुंजवृक्षामध्ये माझे घर आहे. चंद्रसखी बालकृष्णाच्या छबीला भजते. श्रीराधा हे माझे नाव आहे.

राजस्थान, व्रजमंडल व त्याच्या आसपासच्या प्रदेशात हिची पदे अत्यंत लोकप्रिय झालेली आहेत. एखाद्या विशेष प्रसंगी ग्रामीण स्त्रिया एकत्र जमल्या, की त्या मोठ्या आवडीने चंद्रसखीची गाणी म्हणतात. पुष्कळ संगीतज्ञ व गवई हिची भजने आदराने गातात. [हिं. ब. वै. क.; श्री. मनोहर शर्मा– संयुक्त राजस्थान, डिसें. १९५७; चं. उ. का.]

चंद्रसूर्यसंगम नाथपंथातली एक प्रमुख साधना. चर्यापदात चंद्र व सूर्य यांना प्रज्ञा व उपाय यांचे प्रतीक मानले आहे. चंद्र – सूर्य या दोघांचे अद्वैत साधणे हे सिद्धसंप्रदायाचे साध्य मानले आहे.

मूलाधारस्थित रविरूपी कुंडलिनी शक्तीला जागृत करून व ऊर्ध्वभागी असलेल्या चंद्ररूपी शिवात तिला लीन करून, त्या दोघांचे अद्वैत करायचे असते. त्या मीलनातून मग अमृत स्रवू लागते. ते अमृत दशम द्वाराच्या योगाने प्राशन केले जाते, असे नाथपंथी मानतात. [सि. सा.]

चंद्रात्मज रुद्र (इ. स. चे १८ वे शतक) एक मराठी कवी. याने महाभारतावर मराठी कविता लिहिली आहे. याच्या स्थळकाळासंबंधी निश्चित माहिती नाही. हा कवी बहुतेक ठिकाणी चंद्रात्मज असा स्वतःचा उल्लेख करतो. उद्योगपर्वात मात्र त्याने स्वतःचे नाव चंद्रात्मज रुद्र असे सांगितले आहे.

देशिकचरित्रातील एका ओवीवरून चंद्रात्मज रुद्र हा अगाध लीला करणारा मुनी म्हणून प्रसिद्ध होता, एवढे कळते.

याने सबंध महाभारतावर मराठी कविता लिहिली, की एक दोन पर्वांवरच लिहिली, याबद्दल निश्चित माहिती उपलब्ध नाही. चंद्रावळी नामक १०३ श्लोकांचे प्रकरण, गोकर्णमाहात्म्य व श्रीखंड्याचे चरित्र ही काव्ये त्याच्या नावावर आहेत. त्याची काही पदेही उपलब्ध आहेत, त्यांतले एक पद असे—

भवांबुधितारक गुरुवर हो ।
भासत दुस्तर हो ॥ ध्रु. ॥
ममता व (र्ति) मोहजल (जे) ।
खोल भयंकर हो ॥ १ ॥
मीपण लाटा कामादिक जे ।
जांचिती जळचर हो ॥ २ ॥
चंद्रात्मज प्रभु व्यंकटराजे ।
पार करि पर हो ॥ ३ ॥

याने मराठीप्रमाणे कन्नडमध्येही काव्यरचना केली आहे. [नवभारत, सप्टें. १९६०]

चंद्रावती (इ. स. चे १६ वे शतक) एक बंगाली कवयित्री. हिच्या बापाचे नाव वंशीदास असे असून, तो मनसामंगल काव्याचा कर्ता होता. चंद्रावती लहानपणी ज्या पाठशाळेत शिकत होती, तिथेच जयचंद्र नावाचा एक ब्राह्मण-पुत्रही शिकत होता. त्या दोघांचे हळूहळू प्रेम जमले. उभयतांचा विवाहही होणार होता. पण एवढ्यात जयचंद्राने इस्लामधर्म स्वीकारला आणि ते लग्न रहित झाले. त्यामुळे चंद्रावती लग्न न करता कुमारीच राहिली. पुढे काही कालाने जयचंद्राला पश्चाताप झाला आणि त्याने पत्र लिहून चंद्रावतीच्या भेटीची अनुमती मागितली. पण तिने ती दिली नाही. एक दिवस चंद्रावती शिवमंदिरात बसली असता जयचंद्र तिथे आला. त्याला पाहून तिने मंदिराचा दरवाजा बंद करून घेतला. जयचंद्राचा आक्रोश ऐकूनही तिने दार उघडले नाही. जयचंद्र त्यामुळे निराश झाला आणि त्याने जवळच्या फुलेश्वरी नदीत उडी घेऊन देहत्याग केला. या दुर्घटनेचा चंद्रावतीच्या मनावरही खोल परिणाम झाला. एक दिवस शिवाची प्रार्थना करत करताच ती मूर्च्छित झाली आणि लगोलग गतप्राण झाली. चंद्रावतीची ही शोकांतिका बंगालमध्ये लोकविश्रुत आहे.

चंद्रावतीने रामायणावर क्रमबद्ध गीते लिहायला प्रारंभ केला होता. तिच्या मृत्यूने तिची ही रामायणगीते सीतावनवासापर्यंत येऊन स्थगित झाली. या रामायणाची भाषा प्रवाही आणि नादमधुर अशी आहे. याच्यात काही चरित्रे अशी आढळतात, की जी वाल्मिकी किंवा कृत्तिवास यांच्या रामायणात नाहीत. प्राचीन वंग साहित्यात चंद्रावतीच्या या रामायणकाव्याचे स्थान महत्त्वपूर्ण आहे. आजही मैमनसिंह जिल्ह्यातल्या स्त्रिया विवाहादी मंगलप्रसंगी चंद्रावतीची ही रामायणगीते गातात. [प्रबोधकुमार मजुमदार — अजन्ता, डिसें. १९५४]

चंद्रावळ एक गोपी व राधेची सखी. ही चंद्रभानूची कन्या असून, राधेप्रमाणे कृष्णाला नित्य प्रिय होती. उज्वलनीलमणी या ग्रंथात हिचा उल्लेख आहे, तो असा -

राधाचन्द्रावलीमुख्याः प्रोक्ता नित्यप्रिया व्रजे ।
कृष्णवन्नित्यसौन्दर्यवैदग्ध्यादिगुणाश्रयाः ॥

अर्थ – राधा-चंद्रावली प्रभृती व्रजातल्या गोपी कृष्णाला नित्यप्रिय होत्या व कृष्णाप्रमाणेच नित्यसौंदर्य-वैदग्ध्यादी गुणांनी युक्त होत्या.

ब्रह्मवैवर्त व पद्म या पुराणांत चंद्रावली ही राधेची सखी म्हणून वर्णिली आहे. राधाकृष्णांच्या निकुंजलीलेत ती त्यांना साहाय्य करते व त्यांचे दर्शनसुख अनुभवते, असे तिथे सांगितले आहे. कृष्णभक्तीच्या सर्व संप्रदायांत चंद्रावलीच्या चरित्राला स्थान मिळाले आहे.

काही ठिकाणी चंद्रावलीचे खंडिता नायिकेच्या रूपातही चित्रण केलेले आढळते. कृष्ण तिला भेटण्याचे आश्वासन देतो; पण दुसऱ्याच एका गोपीशी रममाण होऊन तिला विसरतो. सकाळी तो भेटल्यावर त्याला घरात न घेता ती दार बंद करून बसते. पण लीलाविहारी कृष्ण तिचा अनुनय करून तिच्या जवळ जातो, तेव्हा तिला अभूतपूर्व सुख होते.

बुंदेलखंड, राजस्थान व कुरुप्रदेश या भागांत चंद्रावलीच्या संबंधीची काही गीते प्रचारात आहेत. या गीतांची कथा संक्षेपात अशी –

चंद्रावली नावाची एक मुलगी होती. एक दिवस तिच्या गावाजवळ मोगलांनी डेरे-राहुटच्या ठोकल्या. चंद्रावली त्या बाजूला पाणी भरायला गेली असता एका मोगल सरदाराने तिला पाहिले व पकडून आपल्या तंबूत नेले. तिला सोडविण्याकरिता तिचे वडील व भाऊ तिथे गेले; पण त्यांचे काही चालले नाही. तेव्हा चंद्रावलीने तंबूला आग लावली व त्या आगीत

स्वत:ला जाळून घेतले. राजस्थानात प्रचलित असलेल्या पुढील लोकगीतात वरील आशय व्यक्त झाला आहे--

सात सैयां कै झूमखै चंदा पाणी नै जाय,
फौज आई हाडाराव की ज्यां मै मुगल पठाण ॥१॥
तम्बू तणै डोरी तणै तणंगो सारो समान,
फौज बैठी हाडाराव की ज्यां मै मुगल पठाण ॥२॥
थे घर आवो ए सहियो आपकै भारै घरनै पधार।
या चँदरावल म्हारै चित चढी यां नें जाण न घां ॥३॥

भारतातल्या अनेक प्रदेशात थोडया-फार फरकाने अशी गीते प्रचलित आहेत. बुंदेलखंडात चंद्रावलीच्या एवजी मथुरावली हे नाव प्रचलित आहे.

काही ठिकाणी चंद्रावली ही विवाहित असल्याचे सांगितले आहे. मोगलांच्या तावडीत सापडल्यानंतर आपल्या पतीची तसेच सासर-माहेराची प्रतिष्ठा राखण्यासाठी व स्वतःचे शील निष्कलंक ठेवण्यासाठी ती आपला देह अग्नीला समर्पित करते. त्यामुळे या कथेला साहजिकच कारुण्य प्राप्त झाले आहे. गीतात काही ठिकाणी मोगलांच्या ऐवजी तुरुक असा शब्द योजलेला आहे.

राजस्थानात श्रावण महिन्यात झोपाळयावर बसून स्त्रिया चंद्रावळीची गीते गातात. माळव्यात चंद्रावळ नामक आणखी एक गीत दिवाळीच्या दुसऱ्या दिवशी गातात. इथे चंद्रावली ही एक गुजरी असून, तिने कृष्णाला आपल्या घरी बोलावलेले असते. त्याप्रमाणे कृष्ण तिच्या घरी येतो आणि दीर्घकाळपर्यंत तिच्याशी रममाण होतो. पण त्या अवधीत गोशाळेत तिची प्रतीक्षा करणारा तिचा पती गोरधन हा गायींच्या खुराने तुडवला गेल्यामुळे मरण पावतो. त्याच्या स्मृतीसाठी ही चंद्रावळ गायली जाते.

कोकणातल्या कुणबी स्त्रिया नागपंचमीच्या नाचात जिची गाणी गातात, ती चंद्रावळ सुपली घेऊन खेळ मांडणारी एक किशोरी आहे. कृष्ण तिची खोडी काढतो व मग दोघांचा जो संवाद होतो, तो पुढीलप्रमाणे –

सोन्याची शिंपली मोत्यांनी गुंफली
धाकटी चंद्रावळी ती खेळाया गुंतली
खेळाया गुंतली ती कृष्णानी देखीली
कृष्णानी देखीली पालव धरीला
सोड कृष्णा पालव मी वैताग घेईन
वैताग घेईन मी भोंवात जाईन
भोंवात जाईन मी नागीन होईन
तूं होशी नागीन तर मी होईन गारुडी
गारुडी होईन मी झाडावर चढीन
फांद्यावर बशीन मी झोका एक घेईन
वैताग घेईन मी मळचात जाईन
मळचात जाईन मी कमळ होईन
तू होशी कमळ तर मी होईन माळी
माळी मी होईन मी कमळ वेचीन

अशा प्रकारे चंद्रावळीने राधेच्या खालोखाल पुराणात व लोकसाहित्यात स्वत:ला स्थान मिळवले आहे. [हिं. सा. को.]

चंपक एक पुष्पवृक्ष. याची फुले सुवर्णकांतीची असल्यामुळे याला सोनचाफा असेही म्हणतात. 'पुष्पेषु चम्पा' = फुलांत फूल चाफ्याचे, अशी याची प्रसिद्धी आहे. याच्या उत्पत्तीची कथा अशी–

शिवाने तृतीय नेत्रातल्या ज्वालेने कामदेवाला भस्म केले, त्या वेळी त्याच्या धनुष्याचे तुकडे होऊन ते इतस्ततः विखुरले व त्या त्या जागी एकेक पुष्पवृक्ष निर्माण झाला. कामदेवाच्या धनुष्याची मूठ रुक्ममण्याची होती. ती जिथे पडली तिथे चंपकवृक्ष उगवला.

चैत्र महिन्यात चाफा फुलतो आणि आपल्या तीव्र सुगंधाने आसमंत दरवळून सोडतो. चाफ्याविषयी दोन कविसंकेत आहेत– (१) पद्मिनी स्त्रियांच्या स्मिताने चाफा फुलतो व (२) चाफ्याच्या फुलावर भुंगा बसत नाही. सुभाषितरत्नभांडागारात चाफ्याच्या प्रशंसेचे अनेक श्लोक दिलेले आहेत. त्यातला एक श्लोक असा–

साधारणतरुबुद्ध्या न मया बद्धस्तवालवालोऽपि ।
लज्जयसि मामिदानीं चम्पक भुवनाधिवासिभिः कुसुमैः ॥

अर्थ– हे चंपकवृक्षा, तू एक सामान्य वृक्ष आहेस अशा बुद्धीने मी तुझ्या मुळात आळेही बांधले नाही (मग तुला खतपाणी घालणे दूरच); पण आता तू (तुझ्या) त्रिभुवनाला सुवासित करणाऱ्या फुलांनी मला लाजवीत आहेस.

चाफ्याच्या उत्पत्तीविषयी बंगालमध्ये एक कारुण्यपूर्ण लोककथा आहे, ती अशी–

एक होता राजा. त्याला चार राण्या होत्या. त्यातली पट्टराणी गर्भवती झाली. त्यामुळे इतर राण्या तिचा द्वेष करू लागल्या. प्रसूतीच्या वेळी ती मूर्च्छित झाली असता बाकीच्या राण्यांनी तिला झालेला मुलगा बागेत पुरून टाकला आणि त्याच्या जागी एक दगड आणून ठेवला. त्यांनी राजाला सांगितले, की पट्टराणीला दगड झाला. अशा प्रकारे सात वेळा घडले. तिचे सात मुलगे बागेत गाडले गेले. आठव्या वेळेला मुलगी झाली. तिचीही दशा त्या राण्यांनी तीच केली. त्यामुळे राजा दु:खी झाला. पट्टराणी त्याला अप्रिय वाटली आणि त्याने तिला

वाड्यातून बाहेर काढून एका झोपडीत ठेवून दिले.

पुढे मुले पुरलेल्या जागी सात चाफ्याची रोपे उगवून आली. मुलीला पुरले होते, तिथे पारुल नामक वृक्षाचा रोपा उगवला. रोपे वाढली आणि त्यांना फुलेही आली. मुलांची आई फुले तोडायला आली, की ती झाडं आपोआप खाली वाकत आणि तिला फुले तोडू देत. पण इतर तीन राण्या फुलें तोडायला आल्या, की ती उंच जात आणि त्यांना फुले मिळत नसत.

राजाला ती गोष्ट समजली. त्याला मोठे आश्चर्य वाटले. तो त्या झाडांजवळ आला तेव्हा त्यांनी मनुष्यवाणीने राजाला तीन राण्यांचे क्रूर कपट सांगितले. राजाने मग ती झाडे उपटून तिथले खड्डे उकरले. त्यातून सात पुत्र आणि एक कन्या बाहेर निघाली. ती गोजिरी, गोंडस मुले पाहून राजाला परमानंद झाला. त्याने ती मुले राजवाड्यात आणली. नावडती झालेल्या पट्टराणीला वाड्यात घेतले आणि बाकीच्या तीन राण्यांना वाड्यांतून घालवून दिले. [श्री. मनोहरलाल वर्मा — अजन्ता, डिसें. १९५८; सू. सा. श.]

चंपकचतुर्दशी ज्येष्ठ शु. चतुर्दशीचे नाव. या दिवशी करायच्या व्रतात चाफ्याच्या फुलांनी शिवाची पूजा करावी, पायसाचा नैवेद्य दाखवावा व नक्तभोजन करावे, असे सांगितले आहे. व्रताचे फल— शिवलोकप्राप्ती (उत्तर कामाख्यातंत्र ११). [हि. घ.]

चंपकद्वादशी ज्येष्ठ शु. द्वादशीचे नाव. या दिवशी चंपक पुष्पांनी गोविंदाची पूजा करावी असे सांगितले आहे. फल — विष्णुलोकप्राप्ती. [हि. घ.]

चंपकवन गयेजवळचे एक क्षेत्र. हे बिहारमधले चंपारण्य सुद्धा असू शकेल. विकंक व मणिशैल या दोन पर्वतांच्या मध्यभागी हे आहे. देव, दानव, गंधर्व व किन्नर यांचे हें निवासस्थान असून, कश्यप ऋषीचा आश्रमही याच वनात होता, असे वायू पुराणात सांगितले आहे. वाल्मीकीचा आश्रमही इथेच होता, असे सांगतात. वल्लभाचार्यांचा जन्म चंपकवनात झाला, असे त्यांच्या चरित्रा वरून कळते. [पु. इं.; क. हि. वा. पु.]

चंपा (१) बिहारमधील भागलपुराच्या पश्चिमेस चार मैलांवर असलेली एक प्राचीन नगरी. ही लोमपाद राजाची राजधानी होती, असे रामायणावरून कळते. पूर्वी तिचे नाव मालिनी असे होते; परंतु पुढे चंप राजाच्या नावावरून तिला चंपापुरी हे नाव प्राप्त झाले. तिथल्या चंपक वृक्षाच्या विपुलतेमुळेही हे नाव पडले असावे. दुर्योधनाने कर्णाला अंग देशाचे राज्य दिले, त्याची हीच राजधानी होती; म्हणून तिला कर्णपुरी हे नाव मिळाले.

जैन औपपत्तिकसूत्रामध्ये या नगरीचे वर्णन आले असून, त्यात तिला पृथ्वीवरील स्वर्ग म्हटले आहे. १२ वा तीर्थंकर वासुपूज्य याचे हे जन्मस्थान होय. त्याला केवलज्ञान व निर्वाणही इथेच प्राप्त झाले. महावीराची शिष्या चंदनबालाही इथेच जन्मली. करकंडू नामक राजाने इथल्या तलावात पार्श्वनाथाच्या मूर्तीची स्थापना केली. श्रेणिक राजाचा पुत्र कुणिक याने राजगृहाचा त्याग करून चंपा येथे आपली राजधानी स्थापली. मंखली गोशाल व जमाली हे चंपापुरीला वारंवार जात असत. [हि. जा. ए. इं.; श. क.; वि. तीं. क.]

(२) एक नदी. ही भागलपुराच्या जवळून वाहते. हिचे पूर्वी मालिनी नदी असे नाव होते. कालिदासाने शाकुंतलात हिचा उल्लेख केला आहे. कण्वाचा आश्रम मालिनीच्या तीरावरच होता. ही एक पवित्र नदी आहे, असे पद्म पुराणात सांगितले आहे.

(३) कंबुज (कंबोडिया) च्या पूर्वेला असलेले एक प्राचीन हिंदू राज्य. पाहा— भारत बृहत्तर.

(४) वासुपूज्य या तीर्थंकराची शासनदेवी. हिला प्रवरा असेही नाव आहे. ही श्यामवर्ण, अश्वारूढ, चतुर्भुज असून शक्ती, पुष्प, गदा व वरदमुद्रा धारण करणारी आहे. [अभि. रा.]

चंपाषष्ठी मार्गशीर्ष शु. षष्ठीला चंपाषष्ठी म्हणतात. भाद्रपद शु. षष्ठीला मंगळवार, विशाखा नक्षत्र व वैधृति योग असेल, तर तिलाही हेच नाव आहे. दुसऱ्या प्रकारची ही षष्ठी सुमारे तीस वर्षांनी एकदा येते. त्या दिवशी उपवास, सूर्याची पूजा व विश्वेश्वराचे किंवा निदान कोणत्याही शिवलिंगाचे दर्शन करावे, असे सांगितले आहे. या दिवशी सूर्योदयाच्या वेळी सूर्याला अर्घ्य देतात, त्याचा मंत्र असा—

कालात्मा सर्वभूतात्मा वेदात्मा विश्वतोमुखः।
जन्ममृत्युजरारोगसंसारभयनाशनः ॥

अर्थ — (सूर्य हा) काळ, सर्वभूते व वेद यांचा आत्मा आहे. तो विश्वतोमुख असून, जन्म, मृत्यू, जरा, रोग व संसारभय यांचा नाश करणारा आहे.

मार्गशीर्ष शु. षष्ठी या तिथीची देवता खंडोबा किंवा मल्लारी ही आहे. या दिवशी महाराष्ट्रात जेजुरी येथे खंडोबाचा उत्सव होत असतो. मणि—मल्ल या दोन दैत्यांचा पराभव करून

खंडोबाने लोकांना संकटमुक्त केले. या घटनेचे स्मारक म्हणून हा उत्सव करतात. मार्ग॰ शु. प्रतिपदेपासून हा उत्सव सुरू होतो. याला खंडोबाचे नवरात्र असेही म्हणतात. खंडोबा हे ज्यांचे कुलदैवत असते, अशांच्या घरीही हे नवरात्र बसते. यात कुलाचाराप्रमाणे घटस्थापना, नंदादीप, खंडोबाची पूजा, मल्लारी माहात्म्याचा पाठ, एकभुक्त राहणे, शिवलिंगाचे दर्शन, ब्राह्मण, सुवासिनी व वाघ्या–मुरळी यांना भोजन, भंडार (हळद) उधळणे, इ. गोष्टी करतात. कुत्रा हे खंडोबाचे वाहन असल्यामुळे त्यालाही खाऊ घालतात. षष्ठीच्या दिवशी खंडोबाला महानैवेद्य करतात. या महानैवेद्यात कांदे व वांगी आवश्यक असतात. भरीत-रोडगाही करावा लागतो. मग खंडोबाची तळी भरतात, आरती करतात व ब्राह्मणभोजन घालून नवरात्र उठवितात. पाहा– खंडोबा, स्कंदषष्ठी.

चंपूवाङ्मय चंपू शब्दाची व्याख्या अशी– 'गद्यपद्यमयं काव्यं चम्पूरित्यमिधीयते' (साहित्यदर्पण). या गद्यपद्यात्मक मिश्रणाचा विषयविभाग असा दिसतो, की भावनात्मक विषय पद्यात आणि वर्णनात्मक विषय गद्यात असावे. संगीतात जशी गीत व वाद्य ही परस्पर पूरक असतात, तद्वत चंपूग्रंथात गद्य-पद्याचा परस्पर पूरक संबंध असावा, असे रामायणचंपूत भोजाने म्हटले आहे–

गद्यानुबन्धरसमिश्रितपद्यसूक्तिः ।
हृद्यापि वाद्यकलया कलितेव गीतिः ॥

अर्थ – वाद्यकलेने युक्त असे गीत ज्याप्रमाणे हृद्य होते, त्याप्रमाणे गद्यानुबंधाने युक्त असा सरस पद्यबंध (चंपूकाव्यात) हृद्य होतो.

पण चंपूकारानी हा संकेत यथार्थपणे पाळलेला नाही. चंपूकाव्याविषयी रसिकांच्या मनात विशेष अभिरुची निर्माण होऊ शकली नाही, याचे हेच मुख्य कारण असावे. असे असले, तरी संस्कृत साहित्यात चंपूकाव्याची रचना मात्र विपुल प्रमाणात झालेली दिसते. दंडीच्या काव्यादर्शात चंपूची व्याख्या दिलेली आहे. पण दंडीच्या पूर्वीचे चंपूवाङ्मय आज तरी उपलब्ध नाही. सर्व चंपूग्रंथ इ. स. च्या ९ व्या शतकानंतरचे आहेत. ब्राह्मणे, महाभारतातील काही भाग, जातकमाला, हरिषेणादी कवींच्या शिलाप्रशस्ती, या गोष्टी गद्यपद्यमय आहेत. त्यातूनच पुढे चंपूकाव्याची उत्क्रांती झाली, असे मानावे लागते.

सर्व चंपूकाव्यांत नलचंपू हा पहिला ग्रंथ असून, त्रिविक्रम हा त्याचा कर्ता आहे. या काव्यात कवीने गद्य व पद्य यांचा समतोल साधला असून, त्यात काव्यगुणांचाही प्रकर्ष दाखवला आहे. नलचंपूत समग्र नलचरित्र वर्णिलेले आहे. त्रिविक्रमाने आपल्या या ग्रंथाला दमयंतीकथा असे नाव दिले आहे. तो संस्कृत साहित्यातला सर्वश्रेष्ठ असा श्लेषकवी होता. त्याच्या श्लेषरचनेचे उत्कृष्ट उदाहरण म्हणून पुढील श्लोक सांगता येईल–

भवन्ति फाल्गुने मासे वृक्षशाखा विपल्लवाः ।
जायन्ते न तु लोकस्य कदापि च विपल्लवाः ॥

अर्थ – (या आर्यावर्तात) फाल्गुन महिना लागला, की वृक्षशाखांची पानगळ सुरू होते. पण तिथे राहणाऱ्या लोकांना मात्र लहानशासुद्धा आपत्ती (विपद्+लवाः) कधी प्राप्त होत नाहीत.

याच काळातला (इ. स. चे १० वे शतक) आणखी एक सुप्रसिद्ध चंपू म्हणजे सोमप्रभसूरीचा यशस्तिलकचंपू हा होय. याचे आठ आश्वास आहेत. पहिल्या पाच आश्वासांत अवंतिराज यशोधर याने जैनधर्माचा स्वीकार केल्याची कथा आहे. शेवटच्या तीन आश्वासांत जैन धर्माच्या सिद्धान्ताचे विस्तृत विवरण आहे. बाणभट्टाच्या कादंबरीचा आदर्श पुढे ठेवून कवीने हा ग्रंथ लिहिला आहे. जीवंधरचंपू नावाचा आणखी एक चंपूग्रंथ जैन कवी हरिश्चंद्र याने रचला आहे. उत्तरपुराणात आलेले जीवंधरचरित्र या चंपूत विस्ताराने कथन केलेले आहे.

चंपूरामायण हा भोजाचा प्रसिद्ध ग्रंथ होय. या ग्रंथात कवीने गद्यपद्यात्मक रचनेचे अनेक चमत्कार दाखविले आहेत. काव्यदृष्ट्या हा ग्रंथ सरस व सुंदर आहे. यातली सुंदरकांडापर्यंतची सहा कांडे भोजकृत असून, अंतिम युद्धकांड लक्ष्मणसूरीचे आहे. उत्तरकांड कोण्या व्यंकट नावाच्या पंडिताने लिहिले असल्याचे सांगतात; पण ते अद्यापि प्रकाशित नाही.

चंपूरामायण हे वाल्मीकिरामायणावरच आधारलेले आहे. कवी म्हणतो, की भगीरथाने भूमीवर आणलेल्या गंगेच्या उदकाने ज्याप्रमाणे लोक पितरांचे तर्पण करतात, त्याप्रमाणे वाल्मीकिवर्णित रामचरित्राच्या द्वारेच रसिकांच्या कर्णांचे तर्पण करण्याचा मी प्रयत्न करीत आहे. कित्येक ठिकाणी तो भाव आणि प्रसंग यांच्या वर्णनात वाल्मीकीवरही ताण करतो. उदा॰ रामाच्या हृदयाचे औदार्य आणि त्याचे सापत्नमातेविषयीचे प्रेम वर्णन करणारा पुढील श्लोक पाहण्यासारखा आहे. रामाने १४ वर्षे वनवास करावा आणि भरताला अयोध्येचे राज्य मिळावे, हा उभयविध हट्ट कैकेयीने पुरा करून घेतल्यानंतर वनवासाला निघण्यापूर्वी राम तिला भेटायला जातो आणि म्हणतो–

वनभुवि तनुमात्रत्राणमाज्ञापितं मे
सकलभुवनभारः स्थापितो वत्समूर्ध्न ।

तदिह सुकरतायामावयोस्तर्कितायां
मयि पतति गरीयानम्ब ते पक्षपातः ।।

(अयोध्या. २५)

अर्थ – हे माते, अरण्यात केवळ स्वतःचे देहरक्षण एवढेच कार्य तू माझ्यासाठी नेमून दिलेस आणि सकल पृथ्वीच्या पालनाचा भार लहानग्या भरताच्या मस्तकावर ठेवलास. या दोहोंत कोणती गोष्ट अधिक सुकर याचा विचार करीत असता, हे आई, तू भरतापेक्षा माझ्या ठिकाणीच पक्षपात केलास, (मलाच सोपे काम दिलेस) असे म्हणावे लागते.

ऋतुवर्णने आणि संध्यावर्णनेही कित्येक ठिकाणी सहजपणे कवीची चमत्कृती दाखवून जातात. उदा०–

यत्र कान्ता न पश्यन्ति क्लान्ता विरहवह्निना ।
निशावसानवेलां च वेलां च व्यसनाम्बुधेः ।।

(अरण्य. १४)

भावार्थ असा– हिवाळ्यातली रात्र दीर्घ असते व विरहिणीला ती केव्हा संपेल असे होऊन जाते. त्याचप्रमाणे तिला वाटते, की आपल्या विरहदुःखरूपी समुद्राचा किनारा तरी किती लांब असेल कोण जाणे !

अनंतभट्टाचा भारतचंपू काव्यदृष्टचा अत्यंत रमणीय आहे. हा कवी इ. स. च्या ११ व्या किंवा १२ शतकात झाला असावा आणि तो दाक्षिणात्य असावा, असे म्हणतात. याच्या ग्रंथाचे बारा स्तबक असून, त्यांत समग्र महाभारताचा कथाभाग सारांशरूपाने आलेला आहे. सुरवातीला हस्तिनापुराचे वर्णन करताना त्याने उन्हाळ्यातल्या प्रदीर्घ दिवसांविषयी कल्पना मांडली आहे, ती अशी–

ग्रीष्मेषु शीतकरकान्तकृतोदरासु
यद्गोपुराग्रिमदरीषु पयागतस्य ।
विश्राम्यतो हरिहयस्य विलम्बनेषु
चिह्नं तदीयदिनसन्ततिदीर्घभावः ।।

(चंपूभारत १.४)

अर्थ – हस्तिनापुरातली गोपुरे चंद्रकांत मण्यांची बनवलेली असल्यामुळे, ती अतिशीतल आहेत. ग्रीष्मऋतूत सूर्याचे घोडे जेव्हा त्या विशाल गोपुरांच्या मधून आपला मार्ग क्रमू लागतात, तेव्हा त्यांना आपला तप्तदेह शीतल करण्याची इच्छा उत्पन्न होते आणि म्हणून ते थोडा वेळ तिथे थांबून विसावा घेतात. त्यामुळे त्यांच्या निर्धारित मुक्कामापर्यंत अर्थात अस्ताचलापर्यंत पोचायला त्यांना अधिक वेळ लागतो. ग्रीष्मऋतूतले दिवस अधिकाधिक लांब होत जातात, ते यामुळे.

चंपूभारताच्या अनुप्रासात्मक रचनेचे कौशल्य पुढील श्लोकात दिसून येते. हा श्लोक किरातवेषधारी शंकर व अर्जुन यांचे इंद्रकील पर्वतावर जे युद्ध झाले, त्याला अनुलक्षून आहे–

अथ भिल्लमल्लकुरुवल्लभावुभौ
परिफुल्लभल्लकुलशल्यपल्लवैः ।
स्थगितावलोकसरणिं दिवौकसां
समरं भयङ्करजवं वितेनतुः ।।

(चंपूभारत ४. ८३)

अर्थ – त्यानंतर शबरमुख्य शंकर व कुरुश्रेष्ठ अर्जुन हे दोघे अत्यंत वेगाने युद्ध करू लागले. त्या दोघांनी विलक्षण प्रकाशमान अशा भल्लनामक स्थूल बाणांच्या अग्ररूपी पल्लवांनी आकाशसंचारी देवांचा दृष्टिमार्ग रुद्ध केला (आकाश आच्छादून टाकले).

कृष्णशिष्टाईचा प्रसंग वर्णन करणाऱ्या चंपूभारताच्या आठव्या स्तबकातील गद्याचा एक नमुना असा–

तदनु निखिलमहरारम्भकृत्यमवसाय्य बालातपेन बलाह इव घुसृणमसृणितेन पटीरपङ्केन चर्चितकलेवरः पङ्केरुह ङ्किनीभिरञ्चललिखितराजहंसराजिभिरवकृष्यमाणेनेव पीता म्बरभागेन परिचुम्बितप्रपदपल्लवो निजोदरान्तरानवकाश बहिर्निर्गतैर्जगदण्डशिशुभिरिव मुक्ताफलैः प्रत्युप्तमेखलाभू भागो वर्षाहेमन्तसमययोरप्यविनश्वरं लक्ष्मीलीलाकमल श्लोकितुमागतेन दिनमणिबिम्बेनेव कौस्तुभेन देदीप्यमानभु न्तरो दनुजपरिषदुत्पातरक्तपरिवेषेणेव पद्मरागकेयूरेण परिम तभुजदण्डो निर्गत्य सुयोधनदुर्वासिताया नगरभुवः स परिहर्तुमिव द्वारि सविनयमुपागतेन दारुकेण संयोजितम पादुकः किञ्चिदवनमितपूर्वकायेण विदुरेण वितीर्यमाणहस्ता लम्बो गुरुकृपप्रमुखैर्ब्रह्मसङ्घैः प्रतिपाद्यमानां जयाशिषं शिर प्रतिगृह्णानः कुशलप्रश्नकोरकितमोदाभ्यां कुरुराजदेवव्रता सदनाभिगमनाय सम्प्रार्थ्यमानश्चिरतरावसरं प्रतिपालयता क्षौहिणीपतीनामञ्जलिकमलवनालिमवलोकनेन सम्भावयमा मुकुन्दो बन्दिवृन्दपरिपठ्यमानकंसादिविजयबिरुदावलिप्रबन्ध बन्धुरेण मङ्गलकुसुमगन्धसरूपदन्धीकृतपुष्पंधयझङ्कारसहच वादित्रघोषेण मेघगर्जमुन्मिषन्तीभिः सौदामिनीभिरिव कन वेत्रलताभिराकुलीकृतेन महता राजपथेन सुयोधनादिभिश् र्भिरध्यासितपूर्वं सभामण्डपं शनैः शनैरवजगाहे ॥

अर्थ– त्यानंतर भगवान श्रीकृष्णाने समस्त प्रातःकृत्ये समा केली. शरीरावर कुंकुमयुक्त चंदनाची उटी लावली. ते चं कृष्णाच्या शरीरावर असे भासत होते, की जणू बालसूर्या प्रकाश सावळ्या मेघावर पडत राहिला आहे. त्याच्या पीता बराचा पुढचा भाग त्याच्या चरणपल्लवावर पडला होता. ते पाहून असे वाटे, की पीतांबराच्या पदरावर चित्रित कें राजहंस जणू त्या चरणांना कमळे समजून त्यांच्याजवळ जा

साठी उत्कंठित होत आहेत आणि म्हणूनच जणू श्रीकृष्ण तो पीतांबर वर उचलून धरीत आहे. त्याच्या मेखलेच्या मध्यभागी मोत्ये जडवलेली होती. त्यांना पाहून असे वाटे, की भगवंताच्या उदरात स्थान न मिळाल्यामुळे बाहेर पडलेली ती छोटी छोटी (शिशुरूप) ब्रह्मांडेच आहेत. कृष्णाच्या हृदयभागावर कौस्तुभ मणी तळपत होता. तो पाहून असे वाटे, की सूर्य (प्रतिकूल अशा) दोन्ही ऋतूंतही प्रफुल्लित राहणाऱ्या लक्ष्मीच्या लीलाकमलाचे अभिनंदन करायलाच तिथे आला आहे. भगवंताच्या भुजदंडात केयूर नामक अलंकार होता आणि तो पद्मरागमण्याचा बनवलेला होता. त्याला पाहून असे वाटे, की जणू राक्षससमुदायासाठी तो उत्पाताचा अपशकुनच आहे. मग दारुकाने नम्रपणे महाद्वारात येऊन श्रीकृष्णाच्या पायात रत्नजडित पादुका चढवल्या. त्या पाहून असे वाटले, की दुर्योधनाच्या कारकीर्दीत वास्तव्याला अयोग्य बनवलेल्या हस्तिनापुराच्या भूमीच्या स्पर्शापासून तो दारुक जणू श्रीकृष्णाला बचावू पाहत आहे. शरीराचा ऊर्ध्वभाग किंचित झुकवून विदुराने श्रीकृष्णाचा हात धरला होता. श्रीकृष्ण शिर झुकवून द्रोण, कृप, इ. ब्राह्मणवर्गाकडून दिले जाणारे जयाशीर्वाद ग्रहण करीत होता. कुशलप्रश्न विचारल्यामुळे हर्षित झालेलें भीष्म-धृतराष्ट्र श्रीकृष्णाला अंतर्भवनात चलण्यासाठी आग्रह करीत होते. श्रीकृष्णाला प्रणाम करण्यासाठी मस्तकावर हात टेकवून खडे राहिलेल्या सेनानायकांना भगवंताने केवळ दर्शनमात्रे कृतार्थ केले. मग ज्यावर बंदिगण भगवंताच्या कंसवधादी कृत्यांची विरुदावली गात उभे राहिले होते, ज्यावर मंगलासाठी विखरून टाकलेल्या पुष्पराशींच्या सुगंधाने आंधळे झालेल्या भ्रमरांचा गुंजारव वीणामृदंगादी वाद्यांच्या ध्वनीत मिसळत होता, मेघरहित आकाशात चमकणाऱ्या विद्युल्लतेप्रमाणे दिसणाऱ्या वेत्रलतांनी जो भरून राहिला आहे, अशा त्या विशाल राजमार्गावरून भगवान हळूहळू त्या सभाभवनामध्ये प्रविष्ट झाला, की ज्या ठिकाणी दुर्योधन, दुःशासन, कर्ण व शकुनी हे आधीपासूनच येऊन वसले होते.

वेंकटाध्वरीचा विश्वगुणादर्शचंपू हा इ. स. च्या १७ व्या शतकात निर्माण झाला. चंपूवाङ्मयातला हा एक नवा प्रकार आहे. विश्वावसू व कृशानू हे दोघे गंधर्व विमानातून विश्वदर्शनाला निघतात. भारतवर्षावरून त्यांचे भ्रमण चालू असताना ते खाली दिसणाऱ्या निसर्ग, देश, लोक, त्यांचे आचार, इ. गोष्टींबद्दल चर्चा करतात. कृशानू त्या सर्व गोष्टींकडे दोषदृष्टीने पाहतो; तर विश्वावसू त्या सर्व गोष्टींचे गुण सांगतो. त्या संवादातून भारतातील अनेक गोष्टींच्या बऱ्यावाईट दोन्ही बाजू दाखवण्याचा त्यात प्रयत्न केलेला दिसतो.

उ. भारतापेक्षा द. भारतात चंपूकाव्ये अधिक प्रमाणात निर्माण झाली व तिथे त्यांचे कोडकौतुकही झाल. तेलुगू व मलयाळम् या भाषांतही चंपूकाव्ये रचली गेली आहेत व अजूनही ती लोकप्रिय राहिली आहेत. तिरुमलांबा या कवियित्रीचा वरदांबिकापरिणय, नीलकंठ दीक्षिताचा नीलकंठविजय, समरपुंगव दीक्षिताचा यात्राप्रबंध, असे आणखीही काही चंपूग्रंथ दक्षिणेत निर्माण झाले आहेत. कवी कर्णपूर याचा आनंदवृंदावनचंपू, रघुनाथदासाचा मुक्ताचरित्रचंपू व जीवगोस्वामीचा गोपालचंपू हे वैष्णवनिर्मित चंपू होत. या चंपूंतून कृष्णचरित्राबरोबरच वैष्णवसिद्धांतांचेही प्रतिपादन केलेले आहे. इ. स. च्या १७ व्या शतकानंतर निर्माण झालेल्या चंपूंमध्ये आनंदकंदचंपू व चित्रचंपू हे प्रमुख होत. बरेचसे चंपू मुद्रित झालेले असले, तरी अजूनही बरेच अमुद्रितच राहिलेले आहेत.
[सं. सा. इ.; सं. सा. सो. इ.; चं. रा.; चं. भा.]

चंबळ एक नदी. पाहा – चर्मण्वती.

चंबा हिमालय आणि शिवालिक पर्वत यांच्यामध्ये, रावी व चंद्रभागा यांच्या खोऱ्यात हा प्रदेश आहे. चंबा नामक नगरी साल व रावी यांच्या संगमावर वसलेली आहे. हा प्रदेश दुर्गम, जंगलमय, पण अत्यंत रमणीय आहे. इथे सापडलेले शिलालेख आणि इथल्या राजांची वंशावळी यावरून कळते की या प्रदेशावर इ. स. च्या ६ व्या शतकात मूशण वंशाची सत्ता चालत होती. चंबा नगरीपासून सुमारे २५ मैलांवर असलेले ब्रह्मौर म्हणजेच पूर्वीचे ब्रह्मपूर, येथे त्या वंशातील अजितवर्मा हा राजा इ. स. ७५० च्या सुमारास राज्य करीत होता. त्याच्या नंतर सुवर्णवर्मा आणि लक्ष्मीवर्मा या दोघांनी राज्य केले. लक्ष्मीवर्मनच्या राजवटीत कीर लोकांनी त्याला ठार


चंबामधील स्थानिक शैलीचे मंदिर

मारून हा प्रदेश बळकावला होता. पण लक्ष्मीवर्म्याचा पुत्र भूशणवर्मा याने कीरांचा पराभव करून आपले राज्य परत मिळवले. त्याच्यामागून हंसवर्मा, सारवर्मा, सेनवर्मा आणि सज्जनवर्मा हे क्रमाने सिंहासनावर बसले. सज्जनवर्मा याने चंपका (चंबा) नगरी वसवून तिथे आपली राजधानी नेली, असे डॉ. व्होगेलचे मत आहे. हे राजे कनोजच्या प्रतीहारांचे मांडलिक होते.

इ. स. च्या १० व्या शतकाच्या पूर्वार्धात साहिल्लवर्मा हा चंबा येथे राज्य करीत होता. चंपा नगरी त्याने वसवली असेही एक मत आहे. तो पराक्रमी असून, त्याने कीर, दुर्गर, त्रिगर्त, कुलूत, इ. देशांच्या राजांचा पराभव केला होता आणि तुर्की आक्रमकांचाही त्याने पूर्ण पराजय केला होता, असे तिथल्या शिलालेखांवरून कळते. नंतर त्याने साहसांक, निःशंकमल्ल व मटमटसिंह या पदव्या धारण केल्या. सूर्यग्रहणाच्या वेळी सूर्यदेवतेला हत्तीचे दान करून त्याने करिवर्ष अशीही एक पदवी घेतली. त्याच्या नंतर युगाकरवर्मा, विदग्धवर्मा, दोदकवर्मा, सालवाहन, सोमवर्मा आणि आसट यांनी सुमारे १०० वर्षे तिथे राज्य केले.

इ. स. च्या ५ व्या किंवा ६ व्या शतकात हूणांबरोबर काही गुर्जर लोकही भारतात आले, असे म्हणतात. वर्मन घराणे हे या गुर्जरांपैकीच असावे. इ. स. च्या ७ व्या व ८ व्या शतकात त्यांनी हिंदू संस्कृती स्वीकारली. इ. स. च्या १० व्या शतकापर्यंत गुर्जरांची मूळ परंपरा नष्ट झाली. पुढे वरिष्ठ वर्गाचे लोक क्षत्रियांशी एकरूप होऊन स्वतःला राजपूत म्हणू लागले; तर खालच्या वर्गाचे लोक तिथल्या आदिवासी डोंगरी जमातींत मिसळून गेले. आता ते राणा, राठी, इ. नावांनी ओळखले जातात. या लोकांत मूळ गुर्जर लोकांच्या काही चालीरीती अजूनही आढळतात.



लक्षणादेवीचे मंदिर – ब्रह्मौर

या प्रदेशात इ. स. च्या ८ व्या शतकात बांधलेली लाकडी मंदिरे अजून सुरक्षित आहेत आणि ती अत्यंत प्रेक्षणीय आहेत. ही मंदिरे राजा मेरुवर्मा याने बांधली आणि त्यांत मूर्ती स्थापल्या, असे म्हणतात. ब्रह्मौर येथील लक्षणादेवीचे मंदिर आणि उदैपूर येथील मर्कुलादेवीचे मंदिर ही विशेष प्रसिद्ध आहेत. लक्षणादेवीचे मंदिर बरेच जुने असून, त्याच्या दर्शनी भागावर व गाभाऱ्याच्या प्रवेशद्वारावर सुबक नक्षीकाम कोरलेले दिसते. त्यात महिषासुरमर्दिनीची अष्टधातूची मूर्ती आहे. शक्तिदेवी व मर्कुलादेवी यांची मंदिरे काष्ठमय आहेत. त्यांवरील कोरीव कामही अप्रतिम आहे. मर्कुलादेवीच्या मंदिरात रामायण व महाभारत यांतील प्रसंग, शिव-पार्वती, विष्णू, नवग्रह व लोकपाल यांच्या मूर्ती व चित्रे कोरलेली आढळतात. वरील तीन्ही मंदिरांची छपरे त्रिकोणी व खूप उंच आहेत.



लक्षणादेवी

ब्रह्मौरच्या मध्यभागी मणिमहेशाचे पाषाणी मंदिर असून, त्याला उंच शिखर आहे. तिथे नंदीची पितळी आकृती असून, त्यावर मे वर्मनचा आलेख आढळतो. तसेच तिथे नरसिंहाचे देऊळ, चौऱ्यायंशी सिद्धांच्या समाध्या, गणेशमूर्ती आणि एक सुरेख शिवलिंगही आहे.

चंबामधील शिल्पकामात उत्तर गुप्तशैलीचे दर्शन हो त्याचप्रमाणे स्थानिक कलाकारांची एक वेगळी शैलीही दिस मर्कुलादेवीच्या मंदिरावर काश्मीरी कलाशैलीची छाप दिस चंबा नगरीत जी प्राचीन मंदिरे आहेत, त्यांतले लक्ष्मीनार यणाचे मंदिर सर्वांत मोठे असून, त्यात विष्णूची भव्य व सुं संगमरवरी मूर्ती आहे. विविध अलंकार व रत्नभूषणे यांनी



मर्कुलादेवीचे मंदिर – उदैपूर



लक्ष्मीनारायण मंदिर – चंबा

सजवलेली असते. हे मंदिर राजा साहिल्लवर्मा याने निर्माण केले. चंद्रगुप्त व त्रिमुख ही दोन्ही शिवमंदिरे त्याच राजाने बांधली. श्रीहरिरायाचे मंदिर इ. स. च्या ११ व्या शतकात लक्ष्मणवर्मा नामक राजकुमाराने बांधले, असे तिथल्या ताम्रपटावरून कळते. एक मंदिर चंपेश्वरीचे आहे. साहिल्लवर्माची कन्या चंपावती हिच्यावरून या मंदिराला हे नाव मिळाले आहे. चंबा हे नावही चंपा नावावरूनच आलेले आहे.

चंबा येथे रावी नदीच्या तीरावर एक रंगमहाल आहे; तो चंबानरेश उमेरसिंह (इ. स. १७४८–६४) याने बांधला. त्यातील भित्तिचित्रांत पहाडी शैलीची कोमलता, रमणीयता, सजीवता व कलात्मकता या गोष्टी दिसून येतात. रामायण, भागवत, दुर्गासप्तशती यांतील प्रसंग हे त्या चित्रकारीचे विषय होत.

इ. स. च्या ११ व्या शतकापासून चंबा राज्याचा इतिहास फारसा ज्ञात नाही. ते पूर्वी एक लहानसे संस्थान होते. आता ते हिमाचल प्रदेशाचा एक भाग बनले आहे. याच्या पश्चिमेस काश्मीर, पूर्वेस लडाख व लाहूल आणि दक्षिणेस कांगडा व गुरुदासपूर हे जिल्हे आहेत. या क्षेत्रातील काही भागाची उंची २००० फूट; तर काही भागाची २१,००० फूट आहे. १०,००० फूट उंचीपर्यंत मनुष्यवस्ती आढळते. या जिल्ह्यात चंबा, भरमौर, चुराह, भटियात व पांगी हे तालुके आहेत. [हि. क. इं. पी.; अ. बु. टॅ. चं.; धर्मयुग– २१ नोव्हें. १९५४, १८ जाने. १९५९]

चंबियाली भाषा व साहित्य

चंबा प्रदेशाचे क्षेत्रफळ अवघे ३००० चौरस मैल असले, तरी या प्रदेशात सहा बोली बोलल्या जातात. चुराही, पंगवाली, चंबालाहुली, भटयाली, भरमौरी किंवा गद्दी आणि चंबियाली अशी त्यांची नावे आहेत. यांतली लाहुली सोडल्यास बाकीच्या सर्व बोली मोन्ख्मेर या भाषेशी संबंधित आहेत. चंबियाली सोडल्यास अन्य कोणत्याही बोलीला लिपी नाही. जुन्या काळात चंबियाली ही राजभाषा होती व ती टाँकरी लिपीत लिहिली जात होती. ही लिपी सिंधू नदीपासून यमुना नदीपर्यंतच्या समस्त पहाडी भागात वापरली जात होती. टाँकरी लिपी ही शारदा लिपीतून उगम पावली असल्याचे मानतात. कोण्या एका काळी चंबा प्रदेशात ब्राह्मी व खरोष्ठी या दोन्ही लिपींचा जोडीने वापर होत असे. कांगडा जिल्ह्यात पठियार व कहीआरा या दोन गावी इसवी सनापूर्वीचे दोन शिलालेख उपलब्ध झाले आहेत. त्यांत एकच मजकूर ब्राह्मी व खरोष्ठी या दोन्ही लिपींत लिहिलेला आढळतो.

चंबियाली बोलीभाषेत लोककथा, वाक्प्रचार, पवाडे, ऋतुगीते, श्रमगीते, प्रेमगीते, मेलागीते, धार्मिकगीते, संस्कारगीते, इ. अनक प्रकारचे मौखिक साहित्य प्रचलित आहे. डॉ. हचिन्सन

याने चंबियाली साहित्याचा बराच संग्रह केला आहे. त्याने टांकरी लिपीचा टाईप तयार करवला व त्या लिपीचा एक छापखानाही सियालकोट येथे उभारला. या छापखान्यातून मंगलसमाचार या नावाने त्याने अनेक पुस्तके प्रसिद्ध केली आहेत. चंबियाली लोकगीतातील एक ऋतुगीत असे–

गड़क चमक भाइया मेघा हो
बरह चमियालां दे देसां हो
कीहां गड़कां कीहां चमकां हो
सुरग भरोरा तारे हो ।
कुथवे दा आई काली बादली हो ।
कुथवे दा बरसिया मेघा हो
छाती दी आई काली बादली हो
नेणां दा बरसिया मेघा हो ।

अर्थ – बंधू मेघा, गरज आणि चमक. चंबाच्या धरतीवर वर्षाव कर. (मेघ म्हणतो) 'मी कसा गर्जू ? कसा चमकू ? आकाश तर तारकांनी चमचम करीत आहे.' (प्रश्न–) 'अहो, काळा मेघ कुठून आला ? अहो, काळा मेघ कुठला बरसून गेला ?' (उत्तर–) 'काळा मेघ वक्षःस्थळाचा भरून आला. अहो डोळ्यातला मेघ बरसून गेला.'

सर्वश्री दौलतराम, गुप्त, देवेंद्र सत्यार्थी, मैथिलीप्रसाद भारद्वाज, रनधावा, राहुल सांकृत्यायन, अमरसिंह रणपतिया, इ. लेखकांनी चंबियाली लोकसाहित्यावर विपुल लेखन केले आहे. [हिं. सा. बृ. इ. १६; ध. गा. है.]

च नागरी वर्णमालेतील सहावा वर्ण. तालू हे याचे उच्चारणस्थान आहे. या वर्णाच्या तीन विकासावस्था दिसतात. पहिली अशोकाच्या गिरनार येथील लेखात, दुसरी इ. स. च्या पहिल्या किंवा दुसऱ्या शतकातील मथुरेच्या लेखात आणि तिसरी इ. स. च्या अकराव्या शतकातल्या उज्जयिनीच्या लेखात दिसून येते. पण हा च आणि सांप्रतचा च यांमध्ये बराच फरक आहे (म. ज्ञा. को.)



च च्या रूपाचा विकासक्रम

वर्णोद्धारतंत्र नामक ग्रंथात या वर्णाच्या स्त्रीरूपातील ध्यानाचे वर्णन केलेले आहे, ते पुढीलप्रमाणे–

तुषारकुन्दपुष्पाभां नानालङ्कारभूषिताम् ।
सदा षोडशवर्षीयां वराभयकरां पराम् ॥
शुक्लवस्त्रावृतकटिं शुक्लवस्त्रोत्तरीयिणीम् ।
वरदां शोभनां रम्यामष्टबाहुसमन्विताम् ॥
एवं ध्यात्वा चकारं तु तन्मन्त्रं दशधा जपेत् ।

(श. क.)

अर्थ– तुषार किंवा कुंद यांच्या कांतीच्या, विविधालंकारभूषित, सोळा वर्षांच्या, सदैव वरद आणि अभय या मुद्रा दर्शविणाऱ्या, श्रेष्ठ, पांढरे वस्त्र नेसलेल्या, पांढरे वस्त्र उत्तरीय म्हणून धारण करणाऱ्या, वर देणाऱ्या, सुंदर व अष्टभुज अशा चकारात्मक देवतेचे ध्यान करून तिचा मंत्र दहा वेळा जपावा.

चकमा एक जात. हे लोक बंगालमधील चितगाव व आराकान या प्रदेशात राहतात. आजच्या भागलपूर प्रदेशात प्राचीन काळी चंपानगर नावाचे राज्य होते व तिथे शाक्यमोंग नामक राजा राज्य करीत होता. या राजाच्या नावावरून चकमा शब्द व्युत्पादितात. चकमांचे बंगाली लोकांशी पुष्कळ बाबतीत साम्य आहे. त्यांची मूळ भाषा ब्रह्मी होती; पण सांप्रत ते बंगाली बोलतात.

चकमा लोक लहान लहान गट करून राहतात. त्यांच्यातल्या श्रीमंतांची घरे बंगाली पद्धतीची आणि विटांनी बांधलेली असतात; तर गरीबांची झोपडीवजा असतात. चकमा पुरुष बंगाली पद्धतीची वेषभूषा करतात; पण स्त्रिया मात्र घोटघापर्यंत येणारा निळ्या रंगाचा घागरा घालतात. या घागऱ्याला एक रुंद व लाल किनार असते. त्या वक्षःस्थळाभोवती कशिदा काढलेली एक रेशमी कापडाची पट्टी बांधतात. कानात व नाकात बंगाली पद्धतीचे दागिने, गळ्यात चांदीचा पट्टा व पायात चांदीचे वाळे घालतात.

विवाहप्रथा – मुलगा लग्नाचा झाल्यावर त्याचा बाप वधूच्या शोधार्थ निघतो. योग्य वधू आढळताच तो वधूपित्याकडे जाऊन मुलीला मागणी घालतो. वधूपित्याची संमती असली, तर मग गावपंचायत बोलावून वधूशुल्क निश्चित केले जाते. वधूच्या घरी लग्न होते. वधू-वरांना दोन लाकडी चौरंगावर बसवून त्यांच्यापुढे एका थाळीत भात, अंडी आणि मिष्टान्ने ठेवतात. त्यानंतर दोघांची लग्नगाठ बांधतात व जमलेले लोक त्यांच्या भोवती कच्च्या सुताचे वेढे देतात. दुसऱ्या दिवशी जमलेल्या मंडळींना भोजन दिल्यावर वधूपिता वधू-वरांना गृहस्थनीती समजावून देतो. एवढे झाले, की लग्न समाप्त होते.

इ. स. च्या १८ व्या शतकात बऱ्याच चकमांनी मुसलमानी धर्म स्वीकारला होता; पण पुढे त्यांना उपरती होऊन ते पुनश्च

हिंदू झाले. नंतर कालिंदी राणी नावाच्या त्यांच्यांतल्या एका महत्त्वाकांक्षी स्त्रीने त्यांना बौद्ध धर्माची दीक्षा घेण्यास भाग पाडले. सांप्रतचे चकमा हे धर्माने बौद्ध असले, तरी त्यांच्या आचारात प्रामुख्याने हिंदू संस्कारच आढळतात. कालिंदी राणीने चकमा स्त्रियांना पडदा पाळण्यास लावल्याने आज तिथल्या स्त्रिया पडदानशीन बनल्या आहेत. [से. इं. १९३१]

चकरेटी व्रजमंडलात प्रचलित असलेलें एक लोकनृत्य. यात नर्तक (किंवा नर्तकी) आपले दोन्ही हात पुढे घेऊन एकत्र गुंफतो आणि कंबर कुंभाराच्या चाकासारखी हालवीत गोल गोल नाचतो. कुंभार ज्या दांडचाने चाक हालवतो, त्याला चकरेटी म्हणतात. इथे नर्तक आपले हात त्या दांडचासारखेच हालवीत असल्याने या नृत्याला चकरेटी असे नाव पडलें असावे. [कृ. जी. ब्र. श.]

चकवे कोकणी लोकगीतांचा एक प्रकार. सामान्यपणे हे चकवे कोळी-भंडारी लोक गातात. चकव्याचे तीन प्रकार आहेत, त्यांची माहिती अशी–

पहिल्या प्रकारच्या चकव्यात नाखव्याचे आपल्या होडीवरचे प्रेम व खवळत्या समुद्रात होडी लोटूनही ती लीलया परतीराला नेण्याचे त्याचे धाडस या गोष्टी व्यक्त होतात. नावाडी हा प्रियकर आणि होडी ही प्रिया, असे एक रूपक या गीतात वापरलेले असते.

चकव्याच्या दुसऱ्या प्रकारात 'पांगाऱ्याचे होडके, त्यात बसले बोडके' अशासारखे उपहासात्मक चकवे येतात. हे चकवे कोकणी स्त्री-पुरुष रानावनातून हिंडताना म्हणतात.

चकव्याचा तिसरा प्रकार म्हणजे तरुण-तरुणींची रानातील प्रेमगीते होत. हे चकवे ओवीप्रमाणे दोन-तीन ओळींचेच असतात. उदा० –

जाय बाये जाय परमळु फाय
मी तुजी जाय तू माजा मोगरा
चल जाउ दोंगरा दोघाय जणां
दोंगरासुन येतांना जाली रात
केगदीच्या फुलात पेटयली वात

चकवा हे नाव चक्रवाकावरून आले असावे. मैथिली, भोजपुरी, छत्तिसगढी, इ. गीतांत आढळणाऱ्या चकवा शब्दाचा उगम चक्रवाकावरूनच झालेला आहे. चक्रवाक पक्ष्यांचे जोडपे दिवसभर तळ्यात विहार करीत असते. रात्र पडली, की त्यांना दिसेनासे होते. त्या दोघांच्या मधे कमळाचे एखादे पानही आड आले, तरी त्यांना एकमेकांना शोधून काढता येत नाही. मग ती नर-मादी विरहदुःखाने रात्रभर ओरडत राहतात. त्यांच्या या आत्यंतिक विरहदुःखावरून सामान्यपणे प्रेमविरहाच्या लोकगीतांना चकवे म्हणायची चाल पडली आहे.

छत्तीसगढ, छोटा नागपूर, इ. प्रदेशांतील वाटसरूंच्या मुखी असलेल्या चकई गीतांची रचनाही चकव्यासारखीच असते. पाहा– चक्रवाक. [लो. सा. रू.; म. प.]

चक्कीलियर एक जात. हिला चक्कीलियन असेही नाव आहे. या लोकांची वस्ती तमिळनाडमध्ये आहे. हे लोक चपला, बूट, मोटा, इ. चामडचाच्या वस्तू तयार करतात. यांचा सामाजिक दर्जा परैयांसारखा मानला जातो. हे तेलुगू व कन्नड या भाषा बोलतात, त्यावरून ते मुळात आंध्र-कर्नाटकाचे रहिवासी असावे असे वाटते. हत्यारे पाजळण्यासाठी यांच्याजवळ एक चाक किंवा चक्की असते. त्यावरून यांना हे नाव पडले असावे. बंगालमधील शक्की जातीशीही यांचा संबंध असणे शक्य आहे.

अवरम् नावाचे एक झुडुप त्या भागात आहे. त्याची साल यांना कातडी कमावण्यास उपयोगी पडते, म्हणून हे लोक त्या झुडपाला पूज्य मानतात व लग्नात वधूच्या गळचात बांधायची ताळी आधी त्या झुडपाच्या फांदीला बांधतात.

यांच्या बायका सुंदर व सुडौल असल्याची प्रसिद्धी आहे. त्या पद्मिनीवर्गातल्या समजल्या जातात. पूर्वी शाक्त पंथाचे लोक मुद्रा म्हणून त्यांना आपल्या साधनेत ग्रहण करीत, असे सांगतात. यांच्यांत गोंदून घेण्याची चाल आहे.

विवाहप्रथा – मुलीचे लग्न ती वयात आल्यानंतर होते. लग्नाला तिच्या मामाची संमती आवश्यक असते. वधूपेक्षा वर वयाने लहान असला, तरी चालतो. मुलगी प्रथम ऋतुमती झाली, की दूर एक झोपडी उभारून तिला तिच्यात ठेवतात. ती स्नान करून घरात आली, की झोपडी जाळून टाकतात.

चक्कीलियर लोकांना डुकराचे व गायीचे सुद्धा मास चालते. यांना मद्यपानाचे व्यसन जबरदस्त असते. हे भुताखेतांची पूजा करतात. मदुराईवीरन्, मरीअम्म, द्रौपदी, गंगम्म, इ. देवतांनाही भजतात. गंगम्माचा उत्सव सार्वजनिक पद्धतीने करतात. त्याच्या खर्चासाठी फासेपारध्याचे सोंग घेऊन नऊ दिवस भिक्षा मागतात. मग नदीतीरी अश्वत्थवृक्षाखाली गंगम्माचा घट बसवून दहा दिवस त्याची पूजाअर्चा करतात. शेवटच्या दिवशी कोंबडचा-बकऱ्याचे बलिदान करतात. [का. ट्रा. स. इं.; मदुरा गॅझे.]

चक्के म्हैसूर राज्यातील एक धार्मिक नृत्य. यात नर्तक कासाळू नावाचे वाद्य वाजवीत आणि रामायण–महाभारतातील कथागीते गात नाचतात. याला जाडे कोलाट्टम् असेही म्हणतात. [भा. लो. नृ.]

चक्कै आट्टम् तमिळनाडमधील एक धार्मिक नृत्य. नर्तक रंगीत कपडे घालतात व झालरीचे गळपट्टे वापरतात. ते आपल्या एका हातात दोन किंवा चार टिपऱ्या धरतात व नाचताना त्यांचा लयीत आवाज काढतात. या वेळी ते मुरुगण किंवा मुथुमरिअम्म या देवतांची स्तोत्रे गातात. हे नृत्य फक्त तिरुचिरापल्ली व नागपट्टिनम् या दोनच जिल्ह्यांत होते. [मोहन खोकर– मार्च ऑफ इंडिया, सप्टें. १९६२]

चक्र स्वतःभोवती फिरणारी वाटोळी गतिमान वस्तू म्हणजे चक्र होय. रथाचे वा गाडीचे चाक या अर्थी चक्र शब्द ऋग्वेदात अनेकदा आला आहे (ऋ. १. १३० ९; ४. १. ३). चक्राचा शोध वैदिक काळापूर्वीच लागलेला होता. त्या शोधाचा उपयोग करून घेऊनच वैदिकांनी पुढे आपले रथ बनवले. अगदी प्रारंभी चाके एकसंध लाकडाची करीत; त्यांना आरे नसत. चाकांमध्ये आस बसवीत, तोही चाकाबरोबर फिरत राही. असली चाके नवाश्मयुगात मेसापोटेमिया व ईजिप्त या देशांत वाहनासाठी उपयोगात आणीत. आरे असलेले चाक युरोपमध्ये ख्रिस्तपूर्व २७०० च्या सुमारास बनले, असे सांगतात. पण भारतात हे आरे असलेले चक्र सुमारे ७ हजार वर्षांपूर्वी बनले असल्याचे कळून येते. ऋग्वेदात द्वादशार (बारा आऱ्यांचे) चक्राचा उल्लेख आढळतो (ऋ. १. १६४. ४८)



रथचक्र

चक्राच्या शोधामुळे मानवाला थोडी शक्ती वापरून अधिक कार्य करणे शक्य झाले. चक्र ही यंत्रयुगाची आधारभूत वस्तू आहे. नाभी (तुंबा) व आर (आरे) असे चक्राचे दोन मुख्य भाग वैदिकांनी मानले आहेत (ऋ. ८. ४१. ६). ऋग्वेदकाळी चक्राच्या भक्कमपणावर विशेष भर दिला जात असे (ऋ. ६. ५४. ३). रथाला बहुधा दोनच चाके असत. केव्हा केव्हा दोहोंहून अधिक चक्रांच्या रथाचेही वर्णन आढळते– .

त्रिवन्धुरेण त्रिवृता रथेन त्रिचक्रेण सुवृता यातमर्वाक्।
(ऋ. १. ११८. २)

अर्थ – हे अश्विहो, तीन वंधुरांनी युक्त (त्रिवक्र), त्रिकोणाकृती व तीन चाके असलेल्या सुंदर रथात बसून इकडे या.

सूर्याचा संबंध चक्राशी जोडलेला असून, सूर्य आपल्या एकचक्र रथातून गगनमार्ग आक्रमतो, अशी कल्पना आहे. वैदिक आर्य यज्ञसमारंभात सूर्यप्रतिनिधी म्हणूनच चक्राचा उपयोग करीत. सूर्यरूपी चक्र व पृथ्वीवरून चालणारे चक्र यांचा संबंध दाखवणारा एक विधी ब्राह्मणग्रंथात आढळतो. त्या प्रसंगी रथचक्र फिरवताना मंत्र म्हणतात, तो सूर्याचाच असतो. कारण सूर्य हाच कालचक्राचा प्रवर्तक आहे. कालचक्राचा साक्षात्कार पहिल्याप्रथम दीर्घतमा ऋषीला झाला. तो म्हणतो–

द्वादशारं नहि तज्जराय
वर्वर्ति चक्रं परि द्यामृतस्य ।
(ऋ. १. १६४. ११)

अर्थ – या चक्राला बारा आरे आहेत व ते कधीही न झिजता आकाशमंडलात निरंतर भ्रमण करीत असते.

पृथ्वी चक्राकार भ्रमत असते. सूर्यही चक्राकार असून तो आकाशगंगारूपी चक्रात फिरत असतो. कल्पामागून कल्प येतात. मन्वंतरांपुढे मन्वंतरे चालू राहतात. प्रभवापासून सुरू झालेले संवत्सरचक्र क्षय संवत्सरापर्यंत येऊन पुनश्च प्रभवाला मिळते व नवे चक्र सुरू करते. फाल्गुन चैत्राशी हातमिळवणी करतो आणि मासचक्र चालू राहते. शिशिर वसंताला आलिंगन देऊन ऋतुचक्र अबाधित ठेवतो. दिवस रात्रीला स्पर्श करतो. रात्र दिवसाला पालव लावते आणि मोठ्या चक्रांतली लहान चक्रे फिरत राहतात.

गुरुपत्नीसाठी कुंडले मिळवायला गेलेल्या उत्तंकाला पाताळात एक फिरते चक्र दिसले, अशी कथा महाभारतात आहे. त्या चक्राविषयी आश्चर्य वाटून, परत आल्यावर उत्तंकाने गुरूला प्रश्न विचारला. गुरूने त्याचे स्पष्टीकरण सांगितले, ते असे– उत्तंका, ते चक्र म्हणजे वर्षचक्र होय. त्याचे तीनशे आरे

आरे म्हणजे वर्षाचे तीनशे साठ दिवस. त्याचे चोवीस पुठ्ठे म्हणजे वर्षाचे तेवढे शुक्ल, कृष्ण पक्ष. आणि ते सदैव फिरते ठेवणारे सहा कुमार म्हणजे वसंतादी षड्ऋतू होत.

सूर्यातूनच विष्णू या देवतेची उत्क्रांती झाली आहे. त्याची साक्ष म्हणजे विष्णूच्या हातातले चक्र होय. या चक्राला सुदर्शन चक्र असे म्हणतात. ते जसे विष्णूचे आयुध आहे, तसेच विष्णूचा अवतार जो कृष्ण त्याचेही आयुध आहे. मोहिनीरूपधारी विष्णूने या सुदर्शन चक्राच्या साहाय्याने राहूचे मस्तक उडवले व तेच चक्र फेकून कृष्णाने शिशुपालाचे मस्तक उडवले, अशा कथा महाभारतात आहेत (आदि. १९. सभा. ४५)

विष्णूच्या किंवा कृष्णाच्या मंदिरात त्याच्या भक्तांनी चक्राची स्थापना करावी, असे सांगितले आहे–

द्वादशारं तु षट्कोणं वलयत्रयसंयुतम्।
(हरिभक्तिविलास ४)

अर्थ–(विष्णुमंदिरात स्थापले जाणारे) चक्र बारा आऱ्यांचे, षट्कोनी व तीन वलयांनी युक्त असे असावे.

दक्षिणेतल्या वैष्णव मंदिरात चक्र हे स्वतंत्र देवतेच्या रूपाने पुजले जाते. (चक्रपेरुमल पाहा)

कुलालचक्र –कुंभाराचे चाक. याचा आविष्कार ईजिप्तमध्ये सनपूर्व ३००० वर्षांच्या सुमारास झाला, असे मानतात. या चाकाच्या मध्यभागावर चिकणमातीचा गोळा ठेवून हे शीघ्र गतीने फिरवतात. मग कुंभार त्या मातीच्या गोळ्याला हवा तो आकार देऊन लहान–मोठी गाडगीमडकी घडवितो. ईजिप्तमध्ये देवतांची देणगी म्हणून या चाकाचा गौरव करतात. त्याला 'प्टा' या देवतेचे प्रतीक समजतात. चीन व भारत या देशांतही हे एक धार्मिक चिन्ह मानलेले आहे. भारतात ते सृष्ट्युत्पत्तीचे प्रतीक समजतात. विधात्यावर कुंभाराची व विश्वचक्रावर कुंभाराच्या चाकाची कल्पना केलेली आढते.


कुलाल चक्र

धर्मचक्र – चक्र हे भारतात पूर्णतेचे प्रतीक ठरले आहे. उपनिषत्काळी ते गूढ शक्तींचे निदर्शक मानीत. भगवान बुद्धाला संबोधी प्राप्त झाल्यानंतर सारनाथ येथे त्याने आपल्या शिष्यांपुढे पहिले प्रवचन केले, त्या घटनेला बौद्ध साहित्यात धर्मचक्र-प्रवर्तन असे म्हणतात. हे धर्मचक्र अखंड गतिमान राहावे म्हणून सम्राट अशोकाने भगीरथ प्रयत्न केले. सारनाथ येथील अशोक स्तंभावर जे चक्र आहे, ते या धर्मचक्राचेच प्रतीक होय. (चक्रध्वज पाहा) ते बुद्धाने प्रकट केलेल्या चार आर्यसत्यांचे निदर्शक ठरले आहे. तिबेटी बौद्धांत प्रार्थनेची चक्रे बनवतात. ती जितक्या वेळा हाताने फिरवावी, तितक्या वेळा बुद्धाचा जप किंवा प्रार्थना केल्याचे श्रेय मिळते, अशी त्यांची समजूत आहे. चक्र हे सामुद्रिक शास्त्रातले एक शुभचिन्ह आहे. ते हातापायावर असणे भाग्याचे व अधिकारदर्शक समजतात. बुद्धाच्या पायावर जी पासष्ट चिन्हे होती, त्यांत चक्र हे एक होते.


धर्मचक्र

राजचक्र –– सम्राटाला चक्रवर्ती अशी संज्ञा आहे. प्राचीन काळापासून चक्र हे सार्वभौम राजाचे चिन्ह मानलेले आहे. चक्र म्हणजे राजमंडल; त्याचा स्वामी तो चक्रवर्ती. इराण व इतर काही देश यांच्या प्राचीन इतिहासातही चक्र व साम्राज्य यांचा संबंध जोडलेला आहे. याविषयी बौद्ध कल्पना अशी––


प्राचीन भारतीय मुद्रांवरील चक्रे

चक्रवर्तीच्या राज्याभिषेकाच्या समयी एक सोनेरी चक्र आकाशातून खाली उतरते. चक्रवर्ती सम्राटाच्या राजद्वारात ते चक्र स्थिर होते. त्याचा मृत्युकाल समीप आला, की ते आडवे पडते. तो निवर्तला, की ते अदृश्य होते. पुढे त्याचा वारस सिंहासनावर बसला आणि जर तो राजनीतीला जागणारा असला, तर तेच चक्र पुनश्च महाद्वारात प्रकट होते.



प्राचीन भारतीय मुद्रांवरील चक्रे

प्राचीन काळी भिन्न मुद्रांवर विविध प्रकारची चक्रे अंकित करण्याची प्रथा होती.

सहस्रार चक्र – याची कल्पना सूर्याचे किरण सहस्र असतात, या कल्पनेतून निघाली आहे. बुद्धाचे महानिर्वाण झाले, त्या वेळी त्याच्या मृतदेहाजवळ सहस्रार चक्र प्रकट झाले होते, असा उल्लेख बौद्ध वाङ्मयात आढळतो.

षट्चक्र – योगशास्त्रात षट्चक्रांचा नामनिर्देश व त्यांचे विशद वर्णन आढळते. मूलाधार, स्वाधिष्ठान, मणिपूर, अनाहत, आज्ञा व सहस्रार अशी त्यांची नावे आहेत. ही चक्रे समवेदक स्नायुमंडलात भिन्न भिन्न ठिकाणी असतात. या षट्चक्रांचा भेद करून अमृतत्व मिळविणे किंवा ब्रह्मभावाला प्राप्त होणे, हाच कुंडलिनीयोगाचा मुख्य उद्देश असतो.



प्राचीन भारतीय मुद्रांवरील चक्रे

कर्मचक्र – चक्र हे कर्माचेही प्रतीक मानलेले आहे. 'याप्रमाणे (जगाच्या धारणार्थ) सुरू केलेले चक्र (कर्माचे अथवा यज्ञाचे रहाटगाडगे) या जगात जो पुढे चालवीत नाही, त्याचे आयुष्य पापरूप होय' असे गीतेत (३.१६) म्हटले आहे.

जीवनाच्या उच्चनीच दशेला चक्रनेमिक्रम म्हणतात. चक्रनेमिक्रम म्हणजे वरचे आरे खाली येणे व खालचे वर जाणे होय. कालिदास म्हणतो 'नीचैर्गच्छत्युपरि च दशा चक्रनेमिक्रमेण '= मनुष्याची दशा चक्रनेमिक्रमाने खाली-वर होत असते (उत्तरमेघ ४९).

तांत्रिक चक्र – तंत्रवाङ्मयात श्रीचक्राची विशेष प्रसिद्धी आहे. तंत्रमार्गी लोक आदिशक्तीचे प्रतीक या रूपाने श्रीचक्राची उपासना करतात. तांत्रिक लोक मानवदेहात आणि बाह्य विश्वात अनेक प्रकारची चक्रे असल्याचे सांगतात. मायाचक्र, योगचक्र, तालुचक्र, दीप्तिचक्र, शांतचक्र, आनंदचक्र, स्थितिचक्र, संहारचक्र, भासाचक्र, शिवचक्र, ब्रह्मचक्र, महासुखचक्र, निर्वाणचक्र, इ. बत्तीस चक्रे त्यांनी मानलेली आहेत.

जैनांचे सिद्धचक्र प्रसिद्ध आहे. म. गांधींनी भर देऊन चालू केलेले चरख्याचे चक्र म्हणजे विसाव्या शतकातले धर्मचक्रप्रवर्तनच मानले जाते. काही राजकीय पंथांनीही चक्र हे आपले अभिज्ञान-चिन्ह बनवले आहे. शाश्वत गती आणि संरक्षण ही दोन्ही तत्त्वे चक्रातून सूचित होतात. चक्राचा वाटोळा आकार हा कधीही न संपणारी परंपरा दाखवतो. त्याच्या संपूर्ण वेढ्यावरून संरक्षणाची कल्पना निघाली आहे. या कल्पनेला जादूटोणा व भूतविद्या यात फार महत्त्व मिळाले. स्त्रीच्या हातातले कंकण व बालकाच्या हातापायातले कडीवाळे हे चक्ररूपच असून, त्या वस्तू स्त्रियांचे आणि मुलांचे भुताखेतांपासून संरक्षण व्हावे, या हेतूनेच प्रथम वापरल्या गेल्या. संसार हेही एक चक्रच आहे. त्यातून मुक्त व्हायचे असेल, तर सुवर्णचक्र करून त्याचे दान द्यावे, असे मत्स्य पुराणात सांगितले आहे. चक्रप्रतीकावरचा लोक विश्वास हाच या सर्व विधींच्या मुळाशी स्पष्ट दिसतो.

आयुधचक्र – शुक्रनीती व नीतिप्रकाशिका या ग्रंथांत चक्र या आयुधाचे वर्णन आढळते. चक्र ही वाटोळी तबकडी असून तिचा घेरा दहा हात असतो व तिला मध्ये भोक असते, असे तिथे म्हटले आहे. अग्नी पुराणातही चक्राची माहिती व त्याचे उपयोग सांगितले आहेत. हे आयुधचक्र कसे बनवावे, याविषयी श्लोक आहे, तो असा—

चक्रं षड्हस्तपरिधि क्षुरप्रान्तं सुनाभियुक् ।
त्रिहस्तदण्डं त्रिशिखं लोहदन्तं सपाशकम् ॥

अर्थ – चक्राचा परिघ सहा हातांचा असावा. त्याला बाहेरच्या बाजूस वस्तऱ्यासारखी धार असावी. त्याची नाभी चांगली असावी. तिच्यात तीन हात लांब दांडा बसवावा. चक्राच्या पात्याच्या तीन शिखा असाव्या. त्याला लोखंडाचे दाते करावे. ते फिरवण्यासाठी पाश असावा.

पाशाच्या योगाने चक्र गरगर फिरवून ते फेकतात. त्याचा

दांडा हातात राहतो आणि फेकलेले चक्र गरगर फिरत जाऊन शत्रूला कापून टाकते.

आयुधरूपी चक्राचे पुढील सहा उपयोग अग्नी पुराणात सांगितले आहेत—

छेदनं भेदनं पातो भ्रमणं शयनं तथा ।
विकर्तनं कर्तनञ्च चक्रकर्मेदमेव च ॥

अर्थ – कापणे, फोडणे, पाडणे, फिरवणे, लोळविणे, करवतणे व तुकडा पाडणे असे चक्राचे षड्विध कर्म आहे.

चक्र फिरवायला व ते वापरायला शक्ती आणि युक्ती दोन्ही लागतात. श्रीकृष्ण हा चक्र फेकण्यात निष्णात होता. महाभारतातल्या वीर पुरुषांत श्रीकृष्णाशिवाय दुसरा कोणीही चक्रधारी आढळत नाही.



शिखांचे चक्र

असुरांमध्ये मुंड हा चक्रधारी होता. त्याचे देवीशी युद्ध झाले आणि त्यात त्याने देवीवर अनेक चक्रे फेकली होती (मार्कं. पु. ८७). सांप्रत चक्र हे युद्धात वापरले जात नाही. पंजाबामध्ये शीख लोकांत चक्राचे प्रयोग क्वचित पाहायला मिळतात. [तां. वा. शा. द.; पु. इं.; गॉ. नॉ. बु.; ऋ. द.; व्या. ज्ञा. को.; वै.वि. भा. पं.; वे. इं.; प्रा. यु. वि; क. हि. वा. पु.; प्रा. भा. सां.; हि. ध.]

चक्रतीर्थ या नावाची तीर्थे भारतात अनेक आहेत—(१) कुरुक्षेत्रात– इथे भीष्मार्जुनयुद्धप्रसंगी श्रीकृष्ण चक्र उगारून भीष्मावर धावला होता. (२) माहूर गावाच्याजवळ (३) सेतुबंधाच्या खालच्या बाजूस. (४) काश्मीरात. (५) नासिक क्षेत्रात. (६) मथुरेजवळ. (७) सरस्वतीच्या तीरावर. (८) द्वारकेत. याशिवाय इतरही अनेक ठिकाणी या नावाची तीर्थे व कुंडे आढळतात.

चक्रधर (११९४–१२७४ इ. स.) महानुभाव पंथाचा संस्थापक. याची जन्मकथा अशी – विशाळदेव नावाचा भरवसच्या (भरुच) राजाचा एक प्रधान होता. त्याच्या पत्नीचे नाव माल्हाइसा होते. या दांपत्याला श्री दत्तात्रेयाच्या कृपेने एक मुलगा झाला. त्याचे नाव हरिपाळदेव असे ठेवण्यात आले. त्याने आपल्या विद्यार्थिदशेत वेद, पुराणे, राजकारण लढाई, इ. विद्याकलांचे अध्ययन केले. वयात आल्यावर त्याचे, कमळाइसा नावाच्या एका मुलीशी लग्न झाले. पुढे त्याला जुगाराचे व्यसन जडले. तो जुवेबाजांच्या अड्ड्यावर जाऊन दररोज द्यूत खेळू लागला.

कालांतराने एक दिवस त्याची प्रकृती एकाएकी बिघडली व त्याला मृत्यू आला. पण त्याचे प्रेत स्मशानात नेले असता एक चमत्कार घडला. ईश्वराने हरिपाळदेवाच्या मृत शरीरात प्रवेश केला. त्यामुळे हरिपाळदेव जिवंत झाला व उठून बसला. इश्वराने घेतलेला हा अवतार सर्वस्वी नवीन नसून, चांगदेव राऊळ यांचाच हा पुनरावतार होता.

आपला मुलगा जिवंत झाला, या गोष्टीचा विशाळदेवाला अपरिमित आनंद झाला. हरिपाळदेवाचे शरीर पूर्वीचे होते; पण जीवात्मा मात्र पूर्वीचा नव्हता. ईश्वराने त्याच्या देहात प्रवेश केल्यावर त्याचे सर्व देहधर्म व जीवधर्मही स्वीकारले. पूर्वीच्या हरिपाळदेवाप्रमाणे त्यानेही संसार सुरू केला. त्याचे पूर्वीचे द्यूताचे व्यसनही चालूच राहिले.

एके दिवशी हरिपाळ द्यूतात पूर्णपणे हरला. जवळचे सारे धन संपल्यावर तो उधारीने खेळू लागला. त्यातही त्याला फटका बसला. जुवेबाजांना त्याने अंगावरचे सर्व दागिने काढून दिले व उरलेले पैसे घरून आणून देतो, असे सांगितले. घरी येऊन तो कमळाइसेकडे तिचे दागिने मागू लागला; पण तिने ते देण्याचे नाकारले. त्यामुळे हरिपाळाचे मन खिन्न झाले. ते राजविलासात किंवा कशातच रमेनासे झाले. खऱ्या सुखाच्या शोधासाठी त्याचे मन तडफडू लागले. अखेर एके दिवशी त्याने गृहत्यागाचा निर्णय घेतला. नागपूरजवळ असलेल्या रामटेकच्या यात्रेच्या निमित्ताने तो घराबाहेर पडला. रामटेक हे यादव राजांच्या मुलखात होते व यादवराजांचे आणि भरुचच्या राजांचे वैर होते. अशा परिस्थितीत हरिपाळाने रामटेकला यात्रेसाठी जावे, ही गोष्ट विशाळदेवाला धोक्याची वाटली. म्हणून बापाच्या इच्छेनुसार काही सैनिक व घोडेस्वार एवढा लवाजमा बरोबर घेऊन हरिपाळ त्या यात्रेला निघाला. वाटेत

देऊळवाडा येथील मुक्कामात सैनिकांचा डोळा चुकवून त्याने एका वस्त्रानिशी पुढे प्रयाण केले.

गुरुलाभ – हरिपाळ रामटेकला न जाता रितपूर (रिद्धपूर)ला गेला. त्याला तिथे गोविंदप्रभू हा विरागी पुरुष भेटला. दोघांची दृष्टादृष्ट होताच गोविंदप्रभू मनाशी म्हणाला, की 'हा माझा आहे.' नंतर त्याने स्वतःच्या मुखातील सेंगुळे बुडध्याचा (मक्याचे कणीस) उष्टा प्रसाद हरिपाळाकडे फकला. हरिपाळाने तो वरच्या वर झेलून सेवन केला. मग त्याने गोविंदप्रभूचे शिष्यत्व पत्करून त्याच्याकडून शक्ति स्वीकार केला. त्याच वेळी गोविंदप्रभूने हरिपाळाचे चक्रधर असे नाव ठेवले.

त्यानंतर चक्रधर तिथून निघाला आणि सालबर्डीच्या डोंगरावर आला. तिथे त्याने बारा वर्षे तप केले. त्या तपातून त्याला ज्ञान झाले, की सत्य, अहिंसा, समता या तीन तत्त्वांनीच मानवजातीचे कल्याण होईल. मग याच तीन तत्त्वांच्या प्रसारासाठी त्याने आपले उर्वरित आयुष्य वेचायचे ठरवले.

चक्रधर सालबर्डीहून निघाला व फिरता फिरता नागपूर जिल्ह्यातील काटोल गावाजवळ असणाऱ्या कांतीनगरला गेला. तिथे त्याने उधळीनाथ नावाच्या एका साधूकडून वयस्तंभनी म्हणजे चिरतारुण्याची विद्या मिळवली. पुढे तो आंध्र प्रदेशातील एका गावात पोचला. तिथे रात्री तहान लागली म्हणून तो तुंगभद्रेवर गेला असता पाय घसरून नदीत पडला व वाहत वाहत वरंगळला पोचला. तिथे आपले विकाऊ घोडे घेऊन काही हेडाऊ (सौदागर) आले होते. सहजगत्या चक्रधर त्यांच्याकडे गेला. त्याने घोड्यांच्या अनेक जातींचे वर्णन त्या हेडाऊंना ऐकवले. त्यांतल्या एका व्यापाऱ्याला चक्रधर आवडला. तो त्याला म्हणाला. 'महाराज, मला एक सुंदर मुलगी आहे, तिचा आपण स्वीकार करावा.'

चक्रधराने त्याची ही विनंती मान्य केली. मग त्याने आपल्या मुलीचे चक्रधराशी लग्न लावून दिले. त्याच्या या पत्नीचे नाव हंसांबा असे होते. तिच्याबरोबर चक्रधराने काही काळ संसार केला; पण थोड्याच काळात त्याची मूळ वृत्ती उफाळून आली व त्याने गृहत्याग केला. फिरत फिरत तो भंडारा येथे गेला. तिथे त्याला नीलभट भांडारकर नावाचा एक शिष्य मिळाला. हाच त्याचा पहिला शिष्य होय. दुसरा शिष्य रामदरणा. तो अळजपूर येथे भेटला. या रामदरण्याच्या उमादेवी नावाच्या कन्येशी चक्रधराने तिसरा विवाह केल्याची हकीगत काही ठिकाणी मिळते. पण तिला सबळ पुरावा नाही. अळजपुराहून निघाल्यावर चक्रधर वडनेर येथे गेला. तिथे रामदेव विद्यावंत याला त्याने दर्शन दिले. रामदेव त्याचा शिष्य बनला. वडनेरहून चक्रधर मेहेकरला आला. तिथे बोणाबाई नावाची एक विरक्त स्त्री त्याला भेटली. तिच्यासह तो पैठणला सिंहस्थ यात्रेला निघाला. त्या बाईने चक्रधराला अंगी-टोपऱ्याचा संस्कार केला. पैठणला नागुबाई नावाची स्त्री चक्रधराची शिष्या झाली. हीच पुढे नागांबिका किंवा बाइसा या नावाने प्रसिद्ध झाली.

पुढे चक्रधराने पैठण येथे संन्यास स्वीकारला आणि जीवोद्धाराच्या कार्याला प्रारंभ केला. त्याने साऱ्या महाराष्ट्रभर भ्रमण केले व अधिकारी व्यक्तींना त्यांच्या पात्रतेनुसार प्रेम किंवा ज्ञान दिले. जे प्रेमाला किंवा ज्ञानदानाला पात्र नव्हते, त्यांच्याकडून त्याने अनेक पुण्यकृत्ये करवून घेतली. क्षुद्र देवतांच्या नादी लागलेल्यांना त्यांच्यापासून सोडवून परमेश्वरसेवेला लावले.

चक्रधराला उच्चनीच भेद मान्य नव्हता. मांगाच्या घरी अन्न भक्षून त्याने आपली ही समता प्रकट केली. सोवळ्याओवळ्याच्या कल्पनेवरही त्याचा विश्वास नव्हता. उपासतापास, व्रते, इ. गोष्टींनी देव मिळत नाही; तर त्यासाठी अहिंसक वृत्तीने वागायला हवे, सर्वांविषयी प्रेम बाळगायला हवे, असे तो सांगत असे. त्याने स्त्रीजातीला उद्धाराची वाट मोकळी करून दिली आणि शूद्रांनाही ज्ञानाचा अधिकार असल्याचे सांगितले. त्याने संस्कृत भाषा बाजूला सारून मराठी भाषेला प्राधान्य दिले. या आणि अशाच लोकविरुद्ध गोष्टींनी तत्कालीन धर्मपंडितांचे पित्त खवळले. महादेव यादवाच्या दरबारातील राजपुरोहित महदाश्रम व ब्रह्मसानू हे दोघे पंडित त्याच्या जिवावर उठले. त्या दोघांनी चक्रधरावर विषप्रयोग करण्याचे ठरवले. आपल्या शिष्यांच्या हस्ते त्यांनी विषाने माखलेली सुपारीची खांडे त्याला खायला दिली. परंतु चक्रधरावर त्याचा काही परिणाम झाला नाही.

हेमाद्री पंडित हा रामदेवराव यादवाचा प्रधान होता. तोही चक्रधरावर जळत होता. त्याने एके दिवशी चक्रधराला पकडून पैठणला आणले व त्याच्यावर व्यभिचाराचा आरोप ठेवून त्याला रामदेवरावापुढे उभे केले. रामदेवरावाने त्याला शिरच्छेदाची शिक्षा फर्मावली व हेमाद्रीनें ती शिक्षा चांडाळाच्या हस्ते लगेच अमलात आणली. अशा तऱ्हेने एक अलौकिक जीवन समाप्त झाले !

चक्रधरस्वामी त्या वेळी चांगदेव राऊळ या नावानेच प्रसिद्ध होता. मौनदेव, नग्नदेव व गोमटदेव अशी त्याची अन्य नावेही होती. मात्र ती क्वचित वापरली जात. किंबहुना ती त्याची विशेषणेच होती. मौन, नग्नावस्था व सुंदर शरीर यांची ती निदर्शक आहेत.

चक्रधराचा परिवार– चक्रधराने आपल्या मताच्या प्रसारा-

साठी आपल्याभोवती अनेक शिष्य जमवले. हे सारे शिष्य व्युत्पन्न पंडित होते. त्याला भेटलेल्या व्यक्तींपैकी रामदेव विद्यावंत उर्फ दासोस ही महत्त्वाची व्यक्ती होय. हा मोठा विद्वान असून, तो नागदेवाचार्य, त्याची आई आबाइसा, बहिण उमाइसा वगैरेंचा पूर्वाश्रमीचा गुरू होता. त्याने चक्रधराचे शिष्यत्व स्वीकारले व त्याच्यामुळेच पुढे नागदेवाचार्य हा पट्टशिष्य चक्रदेवाला लाभला. चक्रधराच्या मृत्यूनंतर त्याच्या तत्त्वज्ञानाचा सर्वांत अधिक प्रसार या नागदेवाचार्यानेच केला. नागदेवाच्या मागून त्याची आई आबाइसा आणि चुलत वहीण महदाइसा यांनीही चक्रधराचे शिष्यत्व पत्करले. यांतल्या महदाइसेवर चक्रधराची विशेष कृपा होती. बाइसा ही त्याची दुसरी शिष्या होय. चक्रधराच्या पूजेची, त्याच्या उपहाराची व मठांची व्यवस्था हीच पाहत असे.

म्हाइंभट या नावाचा चक्रधराचा आणखी एक शिष्य होता. याने चक्रधराच्या लीळाचरित्राची पोथी तयार केली. म्हाइंभटाच्या योग्यतेविषयी चक्रधराला आदर होता. 'बाइः ब्राह्मणु कैसा नीका असेः' असे चक्रधर त्याच्या विषयी म्हणत असे. याशिवाय छर्दोबा, सारंगपंडित, डांगरेश, इ. अनेक शिष्य चक्रधराच्या परिवारात प्रविष्ट होऊन पंथकार्याला लागले होते.

चक्रधराचे जीवन ही एक अखंड यात्रा होती. एखाद्या देवळात, मठात, जैन मंदिरात किंवा गुंफेत तो उतरत असे. त्याने एखाद्याच्या घरी मुक्काम केल्याची उदाहरणे फारच थोडी आहेत.

चक्रधराची दिनचर्या– प्रातःकाळी प्रातर्विधी आटपून तो शिष्यांना निरूपण करी. कधी कधी निरूपणाच्या ऐवजी तो चिंतन करीत बसे. चक्रधर नित्य स्नान करीच असे नाही. तो दर आठ दिवसांनी क्षौर व दर चार दिवसांनी स्नान करीत असे, असे उल्लेख लीळाचरित्रात आढळतात. बाइसा ही त्याची शिष्या त्याची नित्य पूजा करी. पूजेनंतर चक्रधर भक्तजनांवरोबर फिरायला जाई. फिरून परत आल्यावर पुन्हा त्याची पूजा होई. मग तो भोजन करून वामकुक्षी घेई. वामकुक्षीनंतर सर्व भक्तांसमोर पुन्हा निरूपणाचा कार्यक्रम होत असे. त्यानंतर सायंकाळचा पूजावसर होई. हा पूजावसर विशेष समारंभाचा असे. या वेळी चक्रधराच्या शरीरावर फुलांचे अलंकार घातले जात. भास्करभट्ट बोरीकराने चक्रधराच्या या पूजेचे वर्णन केले आहे, ते असे–

> ते जैसे तारांगण गुंफीलेः की शुद्ध ओघ गंगेसि आले ।
> तैसे झुळंबुके मीर्वलेः कर्णयोगुळी ।।
> आनंदवेषाची सारवळेः तैसे हातसरे पढीहासले
> शांभव वेषाचे सरळेः तैसी शोभे कंठीमाळा
> प्रकृतु वेषाचे बहिवटेः तैसी अंगदे मीर्वली घनवटे
> श्रीमुकुटी पूजाबंध गोमटेः ते जैसे बह्मतेज ।।
> कैवल्य देयावया दोसेः तैसा श्रीकरी फुलांचा झला दीसे ।

मग धूपार्ती, मंगळार्ती, इ. कार्यक्रम होत. त्यानंतर त्याचे रात्रिभोजन होई. त्यानंतर पुन्हा निरूपण होई. पण ते फक्त बाइसा व भटोबास यांच्या पुरतेच मर्यादित असे.

स्वभावविशेष– मठातील शिस्त आणि आज्ञापालन या बाबतीत चक्रधर कठोरपणाने वागे. एरवी मात्र त्याचे अंतःकरण सदैव कोमल होते. त्याची ही कोमलता मानवापुरतीच मर्यादित नव्हती, तर तिच्यात सर्व प्राणिमात्राचा समावेश होता. आपल्या चालण्याने मुंगी देखील चिरडू नये, असे तो सांगे. लहान मुलांशी तो चटकन समरस होई. मोठ्या माणसांबरोबर तो नाना प्रकारचे खेळ खेळे. विरक्ती, निःस्पृहता, वक्तृत्व, इ. अनेक सद्गुण त्याच्या अंगी वसत होते.

शिक्षण– चक्रधराला मराठी, गुजराती आणि संस्कृत या तीन भाषा चांगल्या अवगत होत्या. संस्कृत भाषेवरील त्याच्या प्रभुत्वामुळे त्याच्या मराठी भाषेला डौलदारपणा आला होता. शंकराचार्य व रामानुजाचार्य या दोघांच्याही मतांशी त्याचा चांगला परिचय होता. तंत्रग्रंथांशीही त्याचा परिचय असावा. आपल्या तत्त्वज्ञानातील देवतांच्या मळाची कल्पना त्याने अभिनव गुप्ताच्या तंत्रालोक या ग्रंथावरूनच घेतली असावी, असे वाटते. त्याला ज्योतिषशास्त्राची व आकाशातील नक्षत्रांचीही माहिती होती. त्याबरोबरच नाव हाकणे, औत वाहणे, शस्त्र फेकणे, इ. कलाही त्याला अवगत होत्या. त्याचे शिष्य तर त्याला सर्वज्ञच म्हणत.

चक्रधराने स्वतः कोणताही ग्रंथ लिहिला नाही; पण त्याने वेळोवेळी केलेल्या उपदेशांचे त्याच्या शिष्यांनी ग्रथन केले आहे. त्याचेच सूत्रपाठ, दृष्टान्तपाठ, इ. ग्रंथ तयार झाले आहेत.

तत्त्वज्ञान– चक्रधराचे तत्त्वज्ञान समजण्यासाठी त्याने गृहीत धरलेले मुख्य पदार्थ लक्षात घेतले पाहिजेत. शंकराचार्यांनी ब्रह्म हा एकच पदार्थ नित्य मानला, तर चक्रधराने जीव, देवता, प्रपंच आणि परमेश्वर हे चार पदार्थ नित्य मानले आहेत. हे चारही पदार्थ स्वतंत्र असून अनाद्यनंत आहेत व त्यांचे कधीच ऐक्य होत नाही, असे तो मानतो. यावरून चक्रधराचे तत्त्वज्ञान द्वैती आहे, हे कळते. मनुष्याला या चार पदार्थांचे यथार्थ ज्ञान करून देण्यासाठी ईश्वर मनुष्यावतार घेतो असे तो सांगतो. हे अवतार तीन प्रकारचे आहेत– (१) गर्भावतार – इतर जीवाप्रमाणेच मातेच्या उदरी जन्म घेणे, (२) पतितावतार–एखाद्याच्या मृत शरीरात प्रवेश करणे (चक्रधर हा पतितावतार

आहे) व (३) दवडण्याचा अवतार– मातेच्या उदरात आलेल्या एखाद्या जीवाला तिथून घालवून देऊन आपण ते स्थान स्वीकारणे.

परमेश्वराने कोणत्याही रीतीने अवतार घेतला, तरी त्याचे शरीर मायेने व्याप्त असते. म्हणून त्या शरीराला मायापुर म्हणतात. अशा मायापुरधारी परमेश्वराचे तीन प्रकार आहेत– (१) अवरदृश्यावतार (२) परदृश्यावतार व (३) उभयदृश्यावतार. अवरदृश्यावताराने फक्त अवरशक्तीचा, परदृश्यावताराने केवळ परशक्तीचा व उभयदृश्यावताराने अवर व पर या दोन्ही शक्तींचा स्वीकार केलेला असतो. असा उभयदृश्यावतारी मनुष्यच जीवोद्धरणाचे कार्य करू शकतो.

ईश्वरी आनंद प्राप्त करून घेणे, हेच जीवाचे साध्य आहे. त्याचे ज्ञान व भक्ती असे दोन मार्ग आहेत. ज्ञानमार्ग हा महानुभावपंथीयांच्या दृष्टीने बहिर्यागमार्ग व भक्तिमार्ग हा अंतर्यागमार्ग होय. ज्ञानमार्गाने जीव ब्रह्मस्वरूपात पावन होतो, तर भक्तिमार्गाने तो ईश्वरस्वरूपात पावन होतो. अर्थात ज्ञानमार्गापेक्षा भक्तिमार्ग हाच श्रेष्ठ होय. 'ज्ञानादेव तु कैवल्यम्' म्हणून शंकराचार्यांनी ज्ञानालाच महत्त्व दिले, तर मध्व व रामानुज यांनी भक्तीला प्राधान्य दिले. पण चक्रधराच्या तत्त्वज्ञानात या दोहोंचाही समन्वय झालेला आहे. शंकराचार्यांचा मायावाद चक्रधराला मान्य नाही; पण माया ही स्वतंत्र व सर्वश्रेष्ठ अशी देवता मानून तिला त्याने आपल्या तत्त्वज्ञानात समाविष्ट केले आहे. फरक इतकाच, की शंकराचार्य मायेला अनिर्वचनीय मानतात, तर चक्रधर तिला सत्य व भावरूप मानतो.

चक्रधराने मोक्षप्राप्तीसाठी वैदिक मार्गाचा त्याग करण्याचा उपदेश केला व परमेश्वरप्राप्तीचा अधिकार सर्व वर्णांतील स्त्री-पुरुषांना सारखाच आहे, असे सांगितले. त्यामुळे त्याने स्थापन केलेल्या पंथात ब्राह्मणक्षत्रियांबरोबरच शूद्रातिशूद्र सर्व स्त्रीपुरुषांना मुक्त प्रवेश मिळाला. चक्रधराचे हे महत्त्वाचे कार्य होय. पाहा– चांगदेवराऊळ, महानुभाव संप्रदाय. [श्री चक्रधर चरित्र, वि. भि. कोलते; महावीर चक्रधर, रा. चिं. ढेरे; सु. वि. को.; म. च. को.; म. जी.]

चक्रध्वज चक्रयुक्त स्तंभाला प्राचीन काळी चक्रध्वज किंवा चक्रस्तंभ असे म्हणत. सारनाथ येथील अशोकस्तंभ हा एक चक्रध्वजच आहे; कारण त्याच्या शिरोभागी चक्र आहे. त्याची उंची सुमारे ५० फूट असून, त्याचे भाग पुढीलप्रमाणे आहेत—

(१) **चौथरा**– एक ओबडधोबड दगड. लांबी, रुंदी व उंची ८, ६ व १।। फूट. स्तंभाचा काही भाग त्यात पुरलेला आहे.

(२) **स्तंभयष्टी**– ही ३७ फूट उंच असून, वर निमुळती आहे.

(३) **पूर्णघट**– (पद्मकोश) पालथे कमळ व कमळाच्या लांब पाकळ्या. उंची २ फूट.

(४) **चक्रवाल किंवा दिङ्मंडल** – गोलपीठ. याच्या चार दिशांना चार चक्रे असून, दोन चक्रांच्या मध्ये सिंह, हत्ती, बैल व घोडा हे प्राणी आहेत.

(५) **सिंहचौकडी**– चार सिंह पाठीला पाठ लावून चार दिशांना तोंडे करून चार दिशांना बसलेले आहेत.

(६) **महाचक्र**– हे सर्वांत वर आहे. उंची २ फूट. सांप्रत हे महाचक्र भग्न झाले आहे.



अशोकस्तंभ — सारनाथ

शिल्पकलेच्या दृष्टीने हा चक्रध्वज अत्यंत प्रेक्षणीय आहे. याचा पृष्ठभाग गुळगुळीत व चकचकीत आहे. त्यात आरशातल्याप्रमाणे स्वच्छ प्रतिबिंब दिसते. त्याच्या भिन्न भागांची सुसंवादिता, त्यांची समरचना, त्यावरचे सुबक कोरीव काम व कलाकाराच्या प्रतिभेतून स्फुरलेले वास्तव आणि आदर्श यांचे सुंदर मीलन, यांमुळे त्या स्तंभाच्या सौंदर्याला अमरत्व प्राप्त झाले आहे. त्याच्या भव्यतेत कोणतीतरी दिव्य कल्पना साकार झाली आहे, असे वाटते. व्हिंसें स्मिथ म्हणतो, की सर्व जगात अतुलनीय अशी ही शिल्पकृती आहे. भारतीय सौंदर्यशास्त्रात रूप व आशय या दोहोंनाही महत्त्व असते. ही दोन्ही तत्त्वे या चक्रध्वजाच्या शिल्पात सुव्यक्त दिसतात. त्याचे रूप तर अलौकिक आहेच; शिवाय तो स्तंभ भारतीय संस्कृतीचे एक उच्चतम प्रतीकही ठरला आहे.

सांची येथे उभारला गेलेला स्तंभ म्हणजे सारनाथाच्या चक्रध्वजाचीच प्रतिकृती होय. सांचीच्या स्तूपांवर अनेक ठिकाणी चक्रध्वजाच्या उठावदार आकृती दिसतात. त्यावरून त्या काळी चक्रध्वजाची उपासना करणार एक पंथच निर्माण झाला होता, असे वाटते (चक्रपूजा पाहा).

स्तंभ शब्दाला स्कंभ, थंब, यष्टी, ध्वज, स्थूणा, इ. अन्यही नावे प्राचीन वाङमयात आढळतात. स्कंभ हे नाव ऋग्वेदात आले आहे–

दिवः स्कम्भः समृतः पाति नाकम्

(ऋ ४. १३. ५)

अर्थ– हा सूर्य आकाशाचा धिरा (स्कंभ) होऊन त्याला वर सावरून धरतो.

चक्रध्वजातील स्तंभाचे मूळ रूप वैदिकांच्या यज्ञीय यूपात दिसून येते. यूप हा केवळ साधा खांब नसून, अशोकस्तंभाप्रमाणे त्यालाही विशिष्ट आकार असतो. उंच यज्ञयूपांना अध्वरकेतू म्हणत. ते यशोवैभवासाठी उभारले जात. कालिदासाने या गोष्टीचा उल्लेख केला आहे–

वङ्गानुत्खाय तरसा नेता नौसाधनोद्यतान् ।
निचखान जयस्तम्भान्गङ्गास्रोतोन्तरेषु सः ।।

(रघु. ४.३६)

अर्थ – आपल्या नौदलाच्या जोरावर युद्धाला उभे ठाकलेल्या वंगदेशीय राजांचा निःपात करून विजयी सेनेचा नायक असलेल्या त्या रघुराजाने गंगाप्रवाहातील बेटात जयस्तंभ उभारले.

अध्वरकेतू किंवा जयस्तंभ उभारण्याची ही परंपरा दोन हजार वर्षांपेक्षाही प्राचीन आहे. तिच्यातूनच पुढे अशोकनिर्मित चक्रध्वजाचा उदय झाला. पुढे लाकडाच्या जागी पाषाणाचे स्तंभ उभारले जाऊ लागले.

सारनाथ येथील चक्रध्वजाच्या अंडफलकावर जे चार पशू आहेत, त्यांचा उल्लेख केवळ बौद्ध साहित्यातच आहे असे नव्हे; तर तो वैदिक साहित्यातही आहे. ऋग्वेदात इंद्राला महाहस्ती व सिंह म्हटले आहे (८. ८१. १; १. १७४.३). सिंह व हत्ती हे दोन पशू सामर्थ्याचे प्रतीक आहेत. बैल व घोडा हे यज्ञीय पशू होत. इंद्राला गोपती व अश्वपती म्हटले आहे (ऋ. १. १०१.४). या चार पशूंमधूनच पुढे पुराणकालात गजानन, नृसिंह, नंदी व हयग्रीव हे देव उगम पावले. त्यांपैकी हत्ती व सिंह हे देवलोकाचे प्रतीक असून, बैल व घोडा हे मनुष्य लोकाचे प्रतीक आहेत.

संपूर्ण विश्वाची उभारणी चतुष्टयाच्याच तत्त्वावर झालेली आहे. पुराणात पृथ्वीला चतुर्दल भूपद्म म्हटले आहे. पृथ्वीवर चार द्वीप, चार महापर्वत, चार वने, चार नद्या, चार सरोवरे व चार पशू असल्याचे चतुष्टयात्मक वर्णन पुराणात आढळते. चक्रध्वजाच्या अंडफलकावरील चार चक्रे ही या चतुष्टयाची प्रतीके आहेत. त्या ठिकाणचे चार सिंहही चतुष्टयतत्त्वच दाखवतात. त्यांच्या शक्तीचे केंद्र महाचक्राच्या मध्यात आहे.

अथर्ववेदाच्या एका सूक्तात जगत्कारणाला स्कंभ म्हणूनं गौरवले आहे.

स्कम्भे लोकाः स्कम्भे तपः स्कम्भेऽध्यृतमाहितम् ।

(अथर्व. १०. ७. २९)

अर्थ– स्कंभात लोक राहतात. त्याच्यात तप राहते. त्याच्या आधारानेच ऋतही (परमात्मा) राहते.



चक्रध्वजपूजा– सांची

अथर्ववेदाच्या वरील सूक्तातून चक्रस्तंभाची कल्पना उगम पावली, असे म्हणता येते. त्यावरील महाचक्र म्हणजे सर्व विश्वाचे जन्मस्थान होय. ऋग्वेदात विश्वचक्राचा किंवा काल-चक्राचा उल्लेख केला आहे (१. १६४). त्यालाच कालांतराने संसारचक्र, भवचक्र, धर्मचक्र इ. नावे प्राप्त झाली.

बुद्धाचा धर्म हा चार आर्य सत्यांवर आधारलेला धर्म होय. त्या धर्माचे प्रतीक म्हणजेच सारनाथ येथील अशोकनिर्मित चक्रध्वज होय.

चक्राचे मध्यबिंदू व परिघ असे दोन भाग असतात. मध्यबिंदूच्या ठिकाणी स्थिरता व एकता असते; तर परिघात गती व विविधता असते. चक्र म्हणजे या दोहोंचा सुसंवाद होय. लयबद्ध वर्तुळगती हे चक्राचे प्रमुख वैशिष्ट्य आहे. [चक्रध्वज]

चक्रपाणी मुनी (इ. स. चे १६ वे शतक) एक महानुभाव संत. याचा निश्चित काल मिळत नाही. हा स्वतःला कृष्णसुत म्हणवीत असेः मराठी व हिंदी या दोन्ही भाषांत याची ग्रंथरचना आहे. याचे हिंदीत सात 'तिस्से' आहेत. भरवसमालिका व प्रसादमालिका हे याचें मराठी ग्रंथ होत. भरवसमालिकेतील याचा एक श्लोक असा –

नागारी विभुर्वाणती हरिखतां श्रीराज राजापरा ॥
संसारार्णव सागरा सुरइशा माधुर्य गीराधिरा ॥
जंबुद्वीपसुक्षत्र राजतपरा श्रीपंडिता गोचरा ॥
छंदः शास्त्रविचारसारनिकरा श्रीचक्र शक्तीधरा ॥

याला एळंबकार असेही म्हणत. [म. म. वा.]

चक्रपाणी व्यास (इ. स. चे १६ वे शतक) एक महानुभाव आचार्य. याचे पूर्वाश्रमीचे नाव चाल्हण पंडित असे होते. हा राजस्थानातला रहिवासी व सारस्वत ब्राह्मण होता. दैववशात याची विदर्भातल्या संतराज वर्धनस्थ (बिडकर) या महानुभाव संताशी गाठ पडली व याने संतराजाकडून महानुभाव पंथाची दीक्षा घेतली. त्यानंतर याने चक्रपाणी व्यास हे नाव धारण केले. हा व्युत्पन्न पंडित होता. याने संस्कृत, हिंदी व मराठी या भाषांत ग्रंथरचना केली आहे. समुदायसूत्रपाठ हा याचा संस्कृत ग्रंथ आहे. पाठांच्या लापिका, सरवळे, दृष्टान्तस्थळ, नित्यदिनी, लीलास्तोत्र हे याचे मराठी ग्रंथ होत. याच्या नित्यदिनीमधला चक्रधराच्या वर्णनाचा एक उतारा असा–

संमार्जनादि कृत सारुनि रंगमाळा।
नागांबिका स्नुत संमार्जन कृत्यशुद्धा ॥
सवै सुराज भुवनीं उजळीं प्रदीपु।
पद्मासनीं परिकरे प्रभुरावो बैसे ॥
आडा सुभाळ फळकी वर कस्तुरीचा।
सर्वांगि रेखित सुभौरि सुकर्दमांची ॥
श्रीशेखरीं मुकुटमाल विराजमाणें।
श्रीकंठ मंडित सुवर्ण विचित्र माळा ॥

याने महानुभाव पंथाची बिडकर शाखा स्थापन केली. ह ऋद्धपुरी राहत असे व तिथेच याने देह ठेवला. [म. म. वा.]

चक्रपुरुष चक्रपेरुमल पाहा.

चक्रपूजा चक्र हे अनेक देवतांच्या हातातले एक आयु आहे. पुढे स्वतंत्र दैवत म्हणून त्याची पूजा सु झाली. चक्रपूजेची प्रथा शाक्तांनी सुरू केली, असे म्हणतात. शाक्तांच्या चक्रपूजेचा विधी असा–

समसंख्याक स्त्री-पुरुष गुप्तपणे रात्री एकत्र जमत. म चक्रासारखे एक देवीयंत्र त्या ठिकाणी तयार करून त्याची पू करीत. त्या नंतर त्या यंत्राजवळ एक मोठे पात्र ठेवीत. मग पू साठी जमलेल्या स्त्रिया आपापली चोळी काढून त्या पात्रा घालीत. त्यानंतर पुरुष त्या चोळ्यांपैकी इच्छेला येईल त एकेक चोळी उचलीत. ज्या स्त्रीची ती चोळी असेल, ती स्त्री मग त्या पुरुषाशी त्या रात्री रममाण होई. देवीची उपा सना या स्वरूपातच ही पूजा व ही क्रीडा चाले. सांप्रत हे प्रका लुप्त झाले आहेत.



देवीयंत्र — चक्रपूजा

ही चक्रपूजा पुढे शाक्तांकडून बौद्धांनी उचलली. बौद्धां चक्रपूजा करणारा एक संप्रदायच निर्माण झाला. चक्रपूजेच या उत्सवाला बौद्ध लोक चक्रमह असे म्हणत. सांची येथील एका स्तूपाच्या कठड्यात एक चक्रस्तंभ कोरलेला आहे. त्याच एक स्त्री व एक पुरुष हात जोडून चक्राला प्रदक्षिणा घाल

आहेत, असे दृश्य आहे. भरहूत येथील प्रसेनजितस्तंभावरही चक्रपूजेचे दृश्य अंकित आहे. बुद्धगया, अमरावती, मथुरा, इ. ठिकाणच्या शिल्पांतही अनेक ठिकाणी चक्रध्वजाचा आढळ होतो. यावरून बुद्धोत्तर काळात चक्रपूजेला बरेच महत्त्व मिळाले असल्याचे कळते. बौद्ध धर्माच्या उत्तर काळात या चक्रपूजेला चीनाचार असे नाव पडले होते व त्या पूजाविधीत अनेक अनैतिक गोष्टी चालू झाल्या होत्या.

बौद्धांप्रमाणेच जैनांतही चक्रपूजा प्राचीन काळापासून प्रचलित होती. कंकालीटीला येथील जैन स्तूपात ज्या शिल्पकृती सापडल्या आहेत, त्यांत चक्रदेवतेचीही एक मूर्ती आहे. जैन शिल्पात अनेक जागी चक्र, स्तंभचक्रपट्ट व चक्ररूप आयागपट्ट, असे चक्रांकित कलाप्रकार आढळतात.

महाराष्ट्रातल्या नासिक, धुळे व जळगाव या जिल्ह्यांत कुलधर्म या नात्याने आजही चक्रपूजा प्रचलित आहे. लाड व वंजारी या जातींत मुला-मुलींचे लग्न होते, त्या वेळी कुलाचार म्हणून चक्रपूजा करण्याची चाल आहे. चक्रपूजेचे शुभ व अशुभ असे दोन प्रकार आहेत. घरात एखाद्याचा मृत्यू झाल्यानंतर त्याचे क्रियाकर्मांतर आटपल्यावर जी चक्रपूजा करतात, ती अशुभ होय. आश्विन–कार्तिक मासात कुलाचार म्हणून केली जाणारी चक्रपूजा, ही शुभ होय.



चक्रपूजा – भरहूत

या पूजेसाठी तांदुळाचे चक्र तयार करतात. हे चक्र शुभ पूजेत लाल तांदुळाचे व अशुभ पूजेत शुभ्र तांदुळाचे बनवितात. यालाच नवार्णयंत्र असेही म्हणतात. चक्राच्या पूर्वेस गणपती, दक्षिणेस कंटक, पश्चिमेस नवदुर्गा व उत्तरेस मारुती अशा देवता स्थापतात. या देवता अनुक्रमे तांदूळ, मीठ, चण्याची डाळ व उडीद यांच्या करतात. चक्राच्या मध्यत्रिकोणात शेंदूराने ॐ काढतात व त्याला चक्राची मुख्य देवता समजतात. मग त्या चक्राची पूजा करतात. चक्रात मध्यभागी एक व बाजूला दहा असे अकरा दिवे लावतात. दिव्यांच्या वाती देवकापसाच्या करतात. प्रत्येक दिव्याजवळ विड्याची पाने, साधी पोळी, पुरणाची पोळी, पुरी, सांजोरी, करंजी, उडदाचा वडा, खीर, दिवा, केळे, लिंबू, खारीक, बदाम व सुपारी हे पदार्थ ठेवतात.



चक्रस्तंभ – अमरावती

पूजेच्या दिवशी घरातल्या मुख्य पुरुषाने व त्याच्या पत्नीने उपास करायचा असतो. त्या दिवशीचा स्वयंपाक सोवळ्याने करावा लागतो. उष्टे–खरकटे पदार्थ टाकण्यासाठी स्वतंत्र खड्डा खणतात व त्याला समुद्र म्हणतात. त्या दिवशी भाताला मोती आणि हरभऱ्यांना मनुका म्हणायचे असते. त्या दिवशी घराची दारे, जाळ्या व खिडक्या अशा प्रकारे बंद करून घेतात, की दिव्याचा प्रकाश अंशमात्रही बाहेर जाऊ नये.

आरती झाल्यावर पूजेसाठी जमलेले सर्व गोत्रज चक्रातल्या दिव्यांच्या प्रकाशात बसून भोजन करतात. सर्वांचे भोजन झाल्यावर विड्याच्या पानाने दिव्यांच्या ज्योती विझवतात. नंतर चक्रावरचे पदार्थ गोळा करून एका भांड्यात भरून ठेवतात. मग पुरुष आपल्या शेंडीने व बायका आपल्या वेणीने चक्राचे तांदूळ गोळा करतात. मग ते एका भांड्यात भरून त्याचा महादेव बनवतात. नंतर त्या महादेवाची पूजा करून नारळ फोडतात.

भांड्यात गोळा करून झाकून ठेवलेले अन्नपदार्थ दुसऱ्या दिवशी स्नान केल्यावर गोत्रजांनी भक्षण करायचे असतात. गोत्रजांमधले मतभेद, कलह वगैरे मिटविण्यासाठी त्या सर्वांनी एकत्र जमून चक्रपूजा करावी, असे सांगितले आहे. [चक्रध्वज; रि. इं.; हि. ध.; श्री. दत्तात्रेय काशिनाथ जोशी, धुळे]

चक्रपेरुमल विष्णूच्या सुदर्शनचक्राचें दक्षिणेतील नाव. तिकडच्या वैष्णव मंदिरांत याची स्वतंत्र देवता या स्वरूपात पूजा होते. सुदर्शनचक्राच्या मध्यभागी त्याला सर्व बाजूंनी चिकटलेली अशी त्याची मूर्ती असते. शिलपसार ग्रंथात चक्रपेरुमलाची मूर्ती कशी करावी, त्याचे वर्णन दिले आहे.



चक्रपेरुमल – तिरुपती

सुदर्शनचक्र तेजाळ. त्यातून अग्निज्वाळा. आत देवमूर्ती. सोळा हात. त्यात शंख, चक्र, गदा, इ. अनेक आयुधे. त्रिनेत्र. पाय पसरलेले.

कुंभकोणम् येथील चक्रपाणिमंदिर याच देवतेचे आहे. चक्रपेरुमल ही दक्षिणेतल्या वैष्णवांची एक उपास्य देवता आहे.

शिल्पशास्त्रात अशा देवतेला चक्रपुरुष म्हणतात. विष्णूच्या काही मूर्तींच्या मागे चक्रपुरुष व गदादेवी यांच्या मूर्ती असून, विष्णूचे हात त्यांच्या मस्तकावर ठेवलेले दिसतात. विष्णुधर्मोत्तर पुराणात (३.८५.१३) चक्रपुरुषाचे वर्णन आहे, ते असे –

पुरुषाकृती, गोल डोळे, पोटाचें दोंद, हातात चवरी, अंगावर अनेक अलंकार, विष्णूवर दृष्टी असा चक्रपुरुष करावा व विष्णूचा डावा हात त्याच्या मस्तकावर ठेवलेला असावा. पाहा – आयुधपुरुष. [डे. हिं. इ.; सा. इं. इ. गॉ. गॉं.]

चक्रवर्ती याला सार्वभौम किंवा सम्राट असेही म्हणतात. ‘चक्रवर्ती सार्वभौमः’ (अमर). याच्या दोन व्याख्या दिल्या आहेत, त्या अशा – (१) ‘चक्रं पद्माकारशुभचिह्नं करे वर्तते यस्य’ = चक्र अर्थात कमलाच्या आकाराचे शुभ चिन्ह ज्याच्या हातावर आहे, असा पुरुष. (२) ‘चक्रं पृथ्वीचक्रं तेन वर्तते इति’ = चक्र म्हणजे पृथ्वीचक्र (समुद्रवलयांकित पृथ्वी) त्यात राहणारा, किंवा ते चालविणारा पुरुष (श. क.).

चक्र म्हणजे विश्वचक्र आणि वर्ती म्हणजे ते चालविणारा, सूर्यगोल किंवा चक्रधारी विष्णू असेही याचे अर्थ सांगितले आहेत. ऋग्वेदात वृत् चा अर्थ फिरणे व वर्तयचा फिरविणे, असा आढळतो. महाकाव्यात वर्ती याचा अर्थ करणारा, चालविणारा असा दिसून येतो.

ऋग्वेदात इंद्राला चक्रवर्ती या अर्थानेच विश्वविजेता म्हटले आहे––

मरुत्वन्तं वृषभं वावृधानमकवारिं दिव्यं शासमिन्द्रम्।
विश्वासाहमवसे नतनायोग्रं सहोदामिह तं हुवेम ॥

(ऋ. ३.४७.५)

अर्थ–मरुतांसह येणारा, वीर्यवान, वृद्धिगत, मोठमोठ्या शत्रूंची खोड जिरवणारा, दिव्य सत्ताधारी, विश्वविजेता, भीषण व (भक्तांना) बल अर्पण करणारा, असा जो इंद्र त्याने आम्हांवर नूतन अनुग्रह करावे, म्हणून आम्ही त्याला बोलावीत आहे.

दुसऱ्या एका ठिकाणी चक्र हे इंद्राच्या शक्तीचे प्रतीक असल्याचे सूचित केले आहे. त्यावरूनच त्याच्या सार्वभौम शक्तीचाही बोध होतो. इंद्राच्या या उदाहरणावरूनच पुढे चक्रवर्ती म्हणजेच सार्वभौम सत्ता धारण करणारा असा अर्थ प्रचलित झाला, असे वाटते. वेदकाळापासूनच समस्त पृथ्वीचे राज्य जिंकण्याची मनीषा तत्कालीन अनेक राज्यकर्त्यांत असलेली आढळते. राज्याभिषेक होताच कित्येक राजे दिग्विजययात्रा करीत व अष्ट दिशांच्या राजांना जिंकून मग अश्वमेध यज्ञ करीत.

चक्रवर्ती हा शब्द मैत्रायणी उपनिषदात प्रथम आढळतो. तिथे हरिश्चंद्र, अंबरीष, ययाती, भरत, इ. महाधनुर्धर राजे चक्रवर्ती असल्याचा उल्लेख केला आहे. रामायणात चक्रवर्ती शब्द नाही. महाभारतात तो आहे; पण मुख्य कथानकात तो कोणाही पुरुषाला तो लावलेला नाही. उपाख्यानात मात्र भरत, मांधाता, मरुत्त, इ. राजांना चक्रवर्ती म्हटलेले आढळते. मांधाता या चक्रवर्तीबद्दल पुढील पुराणगाथा प्रसिद्ध आहे–

यावत्सूर्यं उदयति यावच्च प्रतितिष्ठति।
सर्वं तद्यौवनाश्वस्य मान्धातुः क्षेत्रमुच्यते॥

अर्थ – जेवढ्या भागावर सूर्य उगवतो आणि जेवढ्या भागावर तो प्रतिष्ठा पावतो, तेवढे सगळे क्षेत्र युवनाश्वपुत्र

मांधात्याचे असल्याचे सांगितले जाते.

चक्रवर्ती अर्थात सर्व पृथ्वीचा राजा होणे किंवा असणे, या कल्पनेला भारतात प्राचीन काळापासून महत्त्व दिलेले आहे. चक्रवर्तीचे क्षेत्र केवढे, हे सांगत असता चाणक्य म्हणतो—

देश: पृथिवी । तस्यां हिमवत्समुद्रान्तरमुदीचीनं
योजनसहस्त्रपरिमाणमतिर्यक् चक्रवर्त्तिक्षेत्रम् ।

(अर्थशास्त्र पृ. ३३८)

अर्थ – देश म्हणजे पृथ्वी (भारत देश). तिच्यात हिमालयापासून समुद्रापर्यंत सरळ उत्तर–दक्षिण एक हजार योजने (४ कोस = १ योजन) एवढे चक्रवर्तीचे क्षेत्र होय.

पौराणिक वाङमयापैकी विष्णू पुराण व भागवत पुराण यांमध्ये चक्रवर्ती राजांविषयी अनेक उल्लेख येतात (विष्णू पु.१. १३. ४६; भाग. पु.४. १५. १६). मत्स्य पुराणात चक्रवर्ती राजाजवळ सात रत्ने असतात, असे सांगितले आहे. तो श्लोक असा–

चक्रं रथो मणिर्भार्या निधिरश्वो गजस्तथा ।
प्रोक्तानि सर्वरत्नानि पूर्वं स्वायम्भुवेऽन्तरे ॥

(मत्स्य पु १४१. ६३)

अर्थ– चक्र, रथ, मणी, भार्या, कोश, अश्व व गज ही (चक्रवर्तीची) सात रत्ने पूर्वी स्वायंभुव मन्वंतरात सांगितली आहेत.

चक्रवर्तीच्या पायावर चक्र व मत्स्य आणि हातावर शंख व पद्म ही लक्षणे असतात. ते आजानुबाहू, तालहस्त, वृषस्कंध, इ. सामुद्रिक शुभ लक्षणांनी युक्त असतात. ते विष्णूचे अंशरूप असतात व यज्ञ, दान, तप, सत्य, इ. गुणांनी युक्त असून, वर्णाश्रम विभागाने प्रजेचे पालन करतात, असे त्यांचे वर्णन मत्स्य पुराणात (१४१) दिले आहे.

बौद्ध वाङमयातही चक्रवर्तिपदाचे महत्त्व मानलेले आहे. दीघनिकायाच्या लक्खणसुत्तात असे म्हटले आहे, की राजपुत्र सिद्धार्थ हा जर बुद्ध झाला नसता, तर तो चक्रवर्ती झाला असता. पाली बौद्ध वाङमयात चक्रवर्ती व बुद्ध या समान योग्यतेच्या उपाधी मानलेल्या आहेत. बुद्धत्व हे मानवाने आध्यात्मिक क्षेत्रात मिळवलेल्या सर्वोच्च पदाचे निदर्शक असून, चक्रवर्तित्व हे भौतिक श्रेष्ठ सामर्थ्याचे निदर्शक आहे. दोघेही लोककल्याणासाठी आणि जगात शांतीची स्थापना करण्यासाठी प्रयत्न करतात. पहिला निवृत्तिमार्गाने; तर दुसरा प्रवृत्तिमार्गाने लोकहित साधतो.

बौद्ध धर्मात सक्क (इंद्र) हा इंद्राचा सच्चा भक्त असल्याचे सांगितले आहे. इंद्र हा आपल्या चक्राला गतिमान होण्यास प्रेरणा देतो, या वर्णनावरून त्याच धर्तीवर बौद्धांनी बुद्धाच्या धर्मचक्रप्रवर्तनाची कल्पना केली. बौद्धांच्या चक्रवर्तिवर्णनात वैदिक इंद्राच्या सामर्थ्याचे बरेच अंश मिसळले आहेत.



चक्रवर्ती – जगय्यपेट येथील स्तूपावरील शिल्प

जैन वाङमयात चक्रवर्तिपदाचा पुष्कळच विचार केलेला आहे. चक्रवर्तीची जैन व्याख्या अशी–‘चक्रेण रत्नभूतेन प्रहरणविशेषेण वर्तितुं शीलमस्य’ = चक्र म्हणजे रत्ननिर्मित आयुधविशेष. ते वागवणे हे ज्याचे शील आहे, तो चक्रवर्ती होय. जैनांनी पुढील बारा चक्रवर्ती सांगितले आहेत–

भरत, सगर, मघवा, सनत्कुमार, शांती, कुंथू, अर, सुभूम, महापद्म, हरिषेण, जय व ब्रह्मदत्त (अभि. रा.). हे चक्रवर्ती तीर्थंकरांचे समकालीन मानलेले आहेत. पाहा–सम्राट, साम्राज्य. [म. ज्ञा. को.; वि. स्मृ. ग्रं.]

चक्रवर्ती सहदेव (इ. स. चे १८ वे शतक) एक बंगाली कवी. धर्मठाकुर पंथावर बंगालीत जी काव्ये रचली गेली, त्यांत याचे काव्य सर्वश्रेष्ठ आहे. याच्या काव्यावर बौद्ध मताचा बराच प्रभाव आहे. बौद्ध व हिंदू देवतांचे संग्राम, ब्राह्मणवर्ण व धर्मठाकुर पंथ यांचे वैर, इ. विषय या काव्यात आहेत. बंगालमधील तत्कालीन समाजस्थितीचें ओझरते दर्शन या काव्याच्या द्वारे घडते. [हि. बें. लॅं. लि.]

चक्रवा वाळंतीण अडली, तर काशाच्या ताटात पांढरी धूळ पसरून त्यावर उभ्या आडव्या सात रेघा ओढून

चक्र व चक्रव्यूह काढतात, त्याला चक्रवा असे म्हणतात. नंतर त्या ताटात पाणी ओतून ते अडलेल्या बाईला प्यायाला देतात.

चक्रवाक एक पक्षी. कोक, चक्र, रथांग ही याची पर्याय नावे आहेत. हिंदीत याला चकवा म्हणतात.

चक्रवाक म्हणजे हंसाची छोटी प्रतिमा होय. याच्या डोक्याचा रंग पिवळसर आणि छातीचा व पाठीचा नारिंगी असतो. नर चक्रवाकाच्या गळयावर, पोपटाच्या गळयावर असतो त्याप्रमाणे काळा पट्टा असतो.

यजुर्वेदातील अश्वमेधीय बळींच्या यादीत याचे नाव आलेले आहे. अथर्ववेदात वैवाहिक प्रेमाचे व विश्वासाचे द्योतक म्हणून याचा उल्लेख आढळतो. वाल्मीकिरामायण, रघुवंश, कुमारसंभव, इ. काव्यांवरून असे दिसते, की हा पक्षी भारतवर्षात सर्वत्र आहे. पण पक्षिशास्त्रज्ञांच्या मते हा पक्षी फक्त सिंध, बलुचिस्तान, पंजाब, नेपाळ, मध्य प्रदेश व गुजरात या प्रदेशातच आढळतो.

शरद् ऋतूच्या आरंभी हे पक्षी मानससरोवरातून खाली येतात. वाल्मीकिरामायणात यांच्या शरत्कालीन आगमनाचे आणि वर्षाकालीन निर्गमनाचे अनेक उल्लेख मिळतात–

सम्प्रस्थिता मानसवासलुब्धाः ।
प्रियान्विताः सम्प्रति चक्रवाकाः ॥

अर्थ – सांप्रत (वर्षाऋतूच्या आरंभी) मानससरोवरातल्या वास्तव्याला लोभावलेले चक्रवाक आपल्या माद्यांसह (तिकडे) जायला निघाले.

कमळे व केशर हे यांचे खाद्यपदार्थ असल्याचे कालिदासाने सांगितले आहे. चक्रवाक पक्ष्यांसंबंधी कविसमज असा आहे, की हे पक्षी (नर–मादी) दिवसा जोडीने राहतात व रात्र पडली की स्वाभाविकपणेच वियुक्त होतात. एक कवी म्हणतो––

त्यज चक्रवाकि शोकं बधान धैर्यं सहस्व समयममुम् ।
अयमेव वासरमणिर्हरिष्यते शापमूर्च्छां ते ॥

अर्थ– हे चक्रवाकी, शोक सोडून दे. धैर्य धर. या काळापुरते दुःख सहन कर. (ज्या सूर्याने अस्तंगत होऊन तुला वियोग घडवला) तोच सूर्य सकाळी उदय पावून तुझे दुःख दूर करील. [सतीश मिश्र – अजंता, जाने. १९५५]

चक्रव्यूह रणभूमीवरील सैन्याची चक्राकार रचना. शत्रूचा हल्ला कोणत्याही बाजूने आला, तरी त्याला तोंड देता यावे, या हेतूने असा व्यूह रचतात. यात मध्यभागातून सगळीकडे सुलभ रीतीने सैन्य व सामग्री पाठवता येते. या व्यूहाचे वर्णन एका श्लोकात केले आहे, तो पुढीलप्रमाणे –

अष्टारं वर्तुलाकारं व्यूहचक्रं त्रिनाडिकम् ।
दण्डचतुष्टयं बाह्ये कर्तव्यं च चतुर्दिशम् ॥

अर्थ – चक्रव्यूह हा गोलाकार असावा, त्याला आठ आरे, तीन नाडया असाव्या, तसेच बाहेरच्या बाजूला त्याला चा दिशांना चार दंड करावे.

चक्रव्यूहाचा आणखी एक प्रकार असतो, त्यात सैन्याच्या आठ कुंडलाकार ओळी उभ्या केलेल्या असतात व आत शिरयला एकच मार्ग ठेवलेला असतो.



चक्रव्यूह

चक्रव्यूहात शिरून तो फोडणे व त्यातून यशस्वीपणे ब पडणे, ही विद्या पांडवांपैकी फक्त अर्जुनाला अवगत हो अर्जुनपुत्र अभिमन्यूला चक्रव्यूहात प्रवेश कसा करायचा ए माहीत होते; पण त्यातून बाहेर पडण्याची युक्ती तो नव्हता. त्यामुळे तो चक्रव्यूहात शिरून लढत असता दुःशा पुत्राच्या गदाप्रहाराने गतप्राण झाला. [प्रा. यु. वि.; भा. सां.]

चक्रांकित संप्रदाय उ. भारतातील एक धर्मपंथ. शठ नावाच्या एका कंजर जातीच्या षाने हा पंथ स्थापला. शठकोप हा बुरुडकाम करीत एकदा याने ब्राह्मणांकडे धर्मोपदेश मागितला; पण त्यांनी देण्याचे नाकारले. त्यामुळे इर्षेला पेटून याने मोठ्या क धर्मज्ञान संपादले व स्वतःचा वेगळा धर्मपंथ निर्माण केला.

या पंथाचे लोक तप्तमुद्रा धारण करतात, कपा

त्रिशूलाकृती गंध लावून गळयात तुळशीच्या माळा घालतात व भजन–कीर्तनाने जीवाला मुक्ती मिळते, असे मानतात. ईश्वरवाचक नावापुढे दास हा शब्द जोडून हे आपल्या मुलांचे नाव ठेवतात.

चक्रासन एक योगासन. याची प्रक्रिया अशी – जमिनीवर उताणे झोपतात. दोन्ही पाय दुमडून नितंबाजवळ आणतात. दोन्ही पायांतले अंतर चार ते सहा अंगुळे ठेवतात. दोन्ही हात कोपरात दुमडून डोक्याजवळ घेतात. मग पूरक करून कमरेपासून डोक्यापर्यंतचा भाग जमिनीपासून वर उचलतात. डोके शक्य तितके पाठीमागे वळवतात. अशा प्रकारे शरीर चक्रासारखे गोलाकार करतात. या आसनाचा काल हळूहळू वाढवीत नेतात. याच्या अभ्यासाने तारुण्य दीर्घकाल टिकून राहते. [उ. यो. द.]



चक्रासन

चक्री एक जात. उशनसमते शूद्र पुरुष व वैश्य स्त्री यांची संतती. हे लोक तेल, पेंड व मीठ विकून आपला उदरनिर्वाह करतात, असे सांगितले आहे. [हि. ध.]

चक्रेश्वरी एक जैन देवता. ही ऋषभनाथाची शासनदेवता असल्यामुळे हिला जैन शिल्पकलेत फार मानाचे स्थान मिळाले आहे. हिचे वर्णन असे –

वामे चक्रेश्वरी देवी स्थाप्या द्वादशषड्भुजा।
धत्ते हस्तद्वये वज्रे चक्राणि च तथाष्टसु ।।
एकेन बीजपूरं तु वरदा कमलासना ।
चतुर्भुजाऽथवा चक्रं द्वयोर्गरुडवाहना ।।

अर्थ – आठ चक्रे, दोन वज्रे, मातुलिंग आणि वरदमुद्रा धारण करणारी (श्वेतांबर मते वरदमुद्रा, वाण, चक्र, पाश, धनुष्य, वज्र, चक्र आणि अंकुश धारण करणारी), गरुडवाहना, कमलासना, अष्टादशभुजा किंवा चतुर्भुजा अशी चक्रेश्वरी देवी ऋषभनाथाच्या वामभागी स्थापन करावी.

देवगढच्या शिल्पात हिची मूर्ती आहे. इतर अनेक ठिकाणीही हिच्या स्वतंत्र मूर्ती आढळतात. हिचे डावे-उजवे दोन्ही हात कोपरापासून उभे करून त्यात चक्रे दाखविलेली असतात. हिच्या मुकुमटाच्या मागच्या अंगालाही चक्र असते.



चक्रेश्वरी

गरुड आणि चक्र या चिन्हांमुळे हिचा हिंदू पुराणांतल्या लक्ष्मीशी संबंध जोडण्यात येतो. लक्ष्मीचेच हे किंचित बदललेले रूप आहे, असे सांगितले जाते. [जै. इ.; श. क.; भा. सं. जै. यो.]

चटगाव एक शक्तिपीठ. हे पूर्व बंगालमध्ये आहे. चंद्रनाथ नावाचे पर्वत शिखर इथेच आहे. पाहा – चंद्रनाथ. [कल्याण तीर्थांक]

चटी मुंड जमातीतील जननाशौचनिष्कृतीचा एक विधी. मुंडा स्त्री प्रसूत झाली, की तिला स्वैपाकाच्या भांड्यांना अगर चुलीला शिवू देत नाहीत. या काळात तिचा नवराही अस्पर्श्यच मानला जातो.

प्रसूतीनंतर पाचव्या किंवा आठव्या दिवशी चटीच्या म्हणजे शुद्धीच्या विधीला प्रारंभ होतो. त्या दिवशी सकाळी पाहुणे मंडळी येतात. न्हावी येऊन पुरुषांची हजामत करतात व नखे काढतात. स्त्रियाही आपली नखे काढून घेतात. मग न्हावी त्यांच्या पायाभोवती एक जाड रेषा काढतो. त्याला नर्त म्हणतात. बाळंतिणीची नखे काढून तिच्याही पायाभोवती नर्त काढले जाते. मग मुलाचे थोडे जावळ कापून, त्यातले काही केस एका जलपूर्ण द्रोणात ठेवतात. शेवटी त्या मुलाच्या नावाने सर्वजण भात पेरतात.

नंतर मुलाच्या टाळूला तेल लावतात व त्यातलेच उरलेले तेल इतर मंडळी आपल्या तोंडाला आणि डोक्याला लावतात. पुरुष तिथून निघून गेल्यावर काही स्त्रिया बाळंतिणीचे कपडे राखेत शिजवतात. मग बाळंतिणीसह सर्व स्त्रिया नदीवर अथवा तळ्यावर कपडे धुण्यासाठी जातात. त्या वेळी बाळंतीण एक मृत्तिकाघट शिरावर ठेवते व मानेला हिसडा देऊन तो खाली पाडते व फोडते. मग बाळंतिणीची चटई जाळून टाकतात.

मुलाचे जावळ काढून ते एका द्रोणात भरतात व तो द्रोण पाण्यात सोडतात. तो सोडताना ‘ सात समुंदर गंगाते सेनोम् !’ किंवा ‘ अठरा समुंदर गंगाते सेनोम् ’ असे म्हणतात. याचा अर्थ ‘ द्रोणा, तू गंगेतून सात किंवा अठरा समुद्रांत जा, ’ असा आहे. हे केस अशा रीतीने गंगेत सोडल्याने ते दूरवर वाहत जाऊन एखाद्या मुंडा मुलीच्या जावळाशी मिळतात व पुढे त्यांचा विवाह होतो, अशी समजूत आहे. मुंडांच्या विवाहगीतांतून ही समजूत आजही ऐकायला मिळते.

मग बाळंतिणीला दारात एका पाटावर उभी करतात. त्या वेळी प्रत्येक स्त्री तिचे पाय धुते व प्रसूतीच्या धोक्यातूनं ती सुखरूप पार पडल्याबद्दल तिचे अभिनंदन करते. यानंतर हिरची गिडी म्हणजे पंचगव्य शिंपडण्याचा विधी होतो. हे पंचगव्य म्हणजे भाताची दारू किंवा हळद आणि पाणी यांचे मिश्रण असते. हे मिश्रण एका पितळेच्या भांड्यात ठेवतात व त्यात एक पैसा टाकून तुळशीच्या पानाने ते सर्व घरात विटाळ झालेल्या वस्तूंवर, बाळंतिणीच्या अंगावर व ती प्रसूत झालेल्य जागेवर शिंपडतात.

यानंतर मुलाला हळदीचे पाणी लावून आंघोळ घालतात. बाळंतिणीचा नवरा तिला नवी साडी अर्पण करतो व म्हणतो. *‘तुझा पुनर्जन्म झाला म्हणून तुला मी हा सुताचा धागा अर्पण करतो.’ नवजात बालक मुलगा असेल, तर आंघोळीहून येताना आई ओले केस न पिळता घरात येते व निथळत्या केसांचे थोडे पाणी मुलाच्या व थोडे स्वतःच्या तोंडात घालते. या वेळी ती प्रार्थना करते, की ‘माझा मुलगा मोठेपणी लढाईत अगर शिकारीत मरण पावला, तर माझ्या सारख्याच प्रेमळ हातांनी त्याची अंतिम तृष्णा भागवली जावी.’* मग ती आपल्या उजव्या हाताच्या तळव्यावर आपल्या स्तनातले थोडे दूध पिळून घेते व त्यातले अर्धे स्वतःच्या आणि अर्धे मुलाच्या मुखात घालते. नवजात बालक मुलगी असेल, तर हा विधी करीत नाहीत. [एन्सा. मुं.]

चट्टा नाच ब्रजमंडलात प्रचलित असलेले एक नृत्य. यात आठ, दहा किंवा बारा या संख्येने नर्तक फेर धरून उभे राहतात. दोन्ही हातांत एक एक टिपरी घेऊन ती आपल्या शेजारच्या नर्तकाच्या – एकदा याच्या तर एकदा त्याच्या– टिपरीवर वाजवीत गोल गोल फिरत नाचतात. हे नृ बहुशः वरातीच्या वेळी अगर काली देवीच्या रथयात्रेच्या प्रसंगी करतात. [कृ. जी. ब्र. श.]

चडार एक जात. हे लोक मध्य प्रदेशातील सागर, दमोह, जबलपूर व नरसिंगपूर या जिल्ह्यांत आढळतात. चिरकार या संस्कृत शब्दापासून चडार शब्दाची व्युत्प सांगतात.

परमेसुरिया आणि अभिया असे यांचे दोन पोटभेद आहेत. परमेसुरिया हे विष्णुपूजक व अभिया हे देवीपूजक आहेत. याशिवाय यांचे घाना, कासिया, गोइया, गुजारिया, मोलि, इ. एकोणचाळीस वर्ग आहेत.

विवाहप्रथा– विवाहप्रसंगी हे लोक आपल्या देवकाचा प्रा किंवा झाड यांची पूजा करतात. अविवाहित मुलीचा जा तील पुरुषाशी अनैतिक संबंध आल्यास तिचा विवाह विध विवाह पद्धतीने करतात. हीन जातीच्या पुरुषाशी सं आल्यास तिला जातिबहिष्कृत करतात. [म. ज्ञा. को.]

चतुरसिंह (इ. स. चे १९ वे शतक) एक राजस्था कवी. याचा जन्म मेवाडातील करजाली ग झाला. याने राजस्थानी आणि ब्रज या भाषांमध्ये बरीच का रचना केली आहे. नीतीचा उपदेश करणे, हा याच्या काव्या प्रमुख उद्देश आहे. मेवाडमध्ये मीरेच्या खालोखाल हाच क लोकप्रिय आहे. [श्री. मदनमोहन शर्मा– अजंता, मे १९५

चतुर्थ दिगंबर जैनांतला एक प्रमुख पंथ. चतुर्थांची व मुख्यत्वे दक्षिण महाराष्ट्र व कर्नाटक या प्रदेशांत आहे चतुर्थ शब्दाच्या अनेक व्युत्पत्त्या सांगितल्या आहेत. त्यां क्षत्रिय शब्दापासून अपभ्रंश होत होत चतुर्थ शब्द बनला, व्युत्पत्ती बहुमान्य आहे.

चतुर्थ हे मुख्यत्वे शेतकरी असून, ते खेड्यात राह जैनांतला हा एकच वर्ग शेतीचा धंदा करणारा आहे. यां मुख्य धर्मगुरू मिरजजवळच्या नांदणी या गावी राहतो. ति त्याचा मठ आहे. चतुर्थ लोक व्यावहारिक व धार्मिक बाब नांदणीच्या मठाचा अधिकार मानतात.

धारवाड जिल्ह्यात चतुर्थांच्या खेड्यांचे चार वर्ग के असून, त्या प्रत्येकावर सरसंगमी नावाचा एक स्वामिप्रति नेमलेला असतो. जातीच्या सभेत तो सामाजिक प्रश्नांचे नि

देतो आणि दारू पिणे, जोडे विकणे, इ. अपराधांबद्दल अपराध्यांना दंड करतो. तो दंडाचा पैसा मठ व शिक्षणसंस्था यांच्या कामी खर्च केला जातो. [जै. क.; म. ज्ञा. को.]

चतुर्थी उभय पक्षांतली चौथी तिथी. हिला चंद्राच्या चतुर्थ कलेची क्रिया असे म्हटले आहे. चतुर्थीच्या दिवशी मंगळवार असल्यास त्या दिवशी केलेले दान–पुण्य अक्षय्य होते, असे भविष्य पुराणात सांगितले आहे. गणेश चतुर्थी, गौरी चतुर्थी, नाग चतुर्थी, कुंड चतुर्थी, बहुला चतुर्थी, संकष्ट चतुर्थी, विनायकी चतुर्थी अशी सुमारे २५ चतुर्थीव्रते सांगितली आहेत. भविष्य पुराणात शिवा, शांता व सुखा अशा तीन चतुर्थी सांगितल्या आहेत. त्या अनुक्रमे भाद्रपद चतुर्थी, माघ चतुर्थी व अंगारकी चतुर्थी या होत. उ. भारतातल्या स्त्रिया कार्तिक चतुर्थी (करवाँ चौथ), माघ चतुर्थी (तिलकुट्टी चौथ) आणि वैशाख व भाद्रपद मासाच्या चतुर्थी पुण्यप्रद मानून त्या दिवशी व्रत करतात व त्या त्या व्रताची कहाणी ऐकतात.

सर्वच पुराणांनी चतुर्थीचे महत्त्व वर्णिले आहे. अन्य सर्व व्रते केली, पण चतुर्थीचें एखादे अल्पसेही व्रत केले नाही, तर इतर व्रते फलद्रूप होत नाहीत, असे म्हटले आहे.

व्रत व उपवास यांच्यासाठी चतुर्थी घ्यायची ती तृतीयायुक्त घ्यावी, असे ब्रह्मवैवर्त पुराणात सांगितले आहे. हेमाद्रीने चतुर्थीच्या प्रदोषकाली अनध्याय करावा, असे सांगितले आहे. त्यानेच चतुर्थीचे रूपविधान सांगितले आहे, ते असे–

नीलोत्पलदलाभासा चतुर्थी मूषकस्थिता ।
परशुं बिभ्रती पात्रं पीतवस्त्रादिसंयुता ॥

अर्थ – चतुर्थी ही नीलकमलाच्या पत्रासारख्या कांतीची, मूषकवाहना, परशू व पात्र धारण करणारी व पीतवस्त्र, पीतपुष्प, इ. पिवळ्या वस्तूंनी युक्त अशी करावी.

चतुर्थीकर्म विवाहसंस्काराची परिपूर्ती, त्या संस्काराने बद्ध झालेल्या वधू-वरांचा समागम झाल्याने व्हायची असते. सूत्रकालात हा समागम विवाह झाल्यापासून चौथ्या रात्री घडवून आणीत. म्हणूनच त्या विधीला चतुर्थीकर्म असे नाव पडले आहे. या दिवशी वधू-वरांनी दिवसा अग्नी, वायू, चंद्र व सूर्य यांना आहुती द्याव्या व रात्री एका शय्येवर शयन करावे, असे काठक व शांखायन या गृह्यत्रसूांत सांगितले आहे.

दिवसा देवतांना आहुती दिल्यानंतर पतीने पत्नीला अग्नीच्या पश्चिम बाजूस पूर्वेकडे तोंड करून बसवावे आणि तिच्या मस्तकावर आज्याहुतींचा अवशिष्ट भाग व्याहृतिमंत्रांनी ओतावा, असे आप. गृह्यसूत्रात सांगितले आहे (३. ८. १०). प्रत्येक आज्याहुतीच्या शेवटी उरलेला थेंब एका लाकडी पात्रात ओतावा आणि हे अवशिष्ट आज्य पत्नीच्या सर्व अंगाला लावून तिला स्नान घालावे, असे सामवेदाच्या गृह्यसूत्रात सांगितले आहे. काही गृह्यसूत्रांमध्ये चतुर्थीकर्मातल्या समागमासंबंधीचे कामोद्दीपक वर्णन दिले आहे.

वाणभट्टाने आपल्या हर्षचरितात श्रीमंत कुलात होणाऱ्या चतुर्थीकर्माचे वर्णन दिले आहे, ते असे – हर्षाच्या चतुर्थीकर्मासाठी वासगृह तयार केले होते. त्याच्या द्वारावर एका अंगाने रती आणि दुसऱ्या अंगाने प्रीती या कामदेवाच्या दोन स्त्रियांची चित्रे काढली होती. एका भिंतीवर रक्ताशोकाचे चित्र काढून त्याच्याखाली कामदेव शरसंधान करीत असल्याचे चित्र निर्माण केले होते. त्या वासगृहात मंगलदीप तेवत होते. त्याच्याजवळ शुभ्र चादर अंथरलेला पलंग होता. त्याच्यावर डोक्याच्या मागाकडे उशी ठेवलेली होती. पलंगाच्या एका अंगाला सोन्याची झारी ठेवलेली होती व दुसऱ्या अंगाला हस्तिदंताचा डबा हाती धरणारी एक सुवर्णपुतळी उभी केलेली होती. डोक्याच्या अंगाला पाण्याने भरलेला चांदीचा निद्राकलश ठेवलेला होता.

चतुर्दंडी प्रकाशिका संगीतशास्त्रावरील एक प्रसिद्ध ग्रंथ. हा वेंकटमखी याने तंजाऊरचा राजा विजयराघव नायक याच्या अनुज्ञेने इ. स. १६३५ मध्ये लिहिला. प्रामुख्याने हा कर्नाटकसंगीतावरचा ग्रंथ आहे. यात वीणा, श्रुती, स्वर, मेल, राग, आलाप, ठाय, गीत, प्रबंध व ताल या विषयांवर सांगोपांग विवरण केलेले आहे. ७२ मेलकर्ता हे या ग्रंथाचे वैशिष्ट्य होय. त्याच्यापूर्वी १९ मेल प्रचलित होते. त्यांना याने कल्पितमेलकर्ता असे नाव दिले असून, उर्वरित ५३ मेलांचे कल्प्यमान व कल्पिष्यमाण असे वर्गीकरण केले आहे. वेंकटमखीचे हे वर्गीकरण दक्षिणेतल्या बहुतेक संगीततज्ज्ञांना मान्य आहे. [डि. सा. इं. म्यु. म्यु.]

चतुर्दशीजागरण एक काम्य व्रत. कार्तिक शु. चतुर्दशीला आज्य आणि तत्सम द्रव्ये यांनी शिवलिंगाला स्नान, शिवाची पूजा व जागरण असा याचा विधी आहे. व्रतावधी– पाच किंवा बारा वर्षे. फल– देवांना मिळणाऱ्या सर्व सुखांची व मोक्षाची प्राप्ती. [हि. ध.]

चतुर्दशीव्रते अग्नी पुराण, हेमाद्रीचा व्रतखंड, कृत्यकल्पतरू, इ. ग्रंथांत सुमारे तीस चतुर्दशीव्रतांची माहिती दिली आहे. भाद्रपदातील अनंतचतुर्दशी, मार्गशीर्षातील

गौरीचतुर्दशी, माघातील रटंतीचतुर्दशी, चैत्रातील मदनचतुर्दशी, इ. त्यांपैकी काही होत. चतुर्दशीस शिवव्रत कर्तव्य असता ती तिथी पूर्वविद्धा घ्यावी, असे सांगितले आहे. हेमाद्रीने चतुर्दशीचे ध्यान सांगितले आहे, ते असे–

अब्जस्था पाटलाभासा पलपात्रसुराभृता ।
नीलकण्ठेन्द्रगोपाभलोचनेयं चतुर्दशी ।।

अर्थ– चतुर्दशी ही कमळात बसलेली, श्वेत-रक्त कांतीची, मद्य व मांस यांचे पात्र धारण करणारी, नीलकंठ व इंद्रगोप किड्याप्रमाणे जिचे डोळे (लाल) आहेत, अशी आहे.

जैनांचेही एक चतुर्दशीव्रत आहे. त्याचा विधी असा– आषाढ शु. चतुर्दशीला व्रताचा प्रारंभ करतात. प्रत्येक मासाच्या प्रत्येक त्रयोदशीला एकभुक्त राहून चतुर्दशीला उपवास आणि पौर्णिमेला पारणा करतात. चतुर्दशीच्या दिवशी 'ओं ऱ्हीं अनन्तनाथाय नमः' या मंत्राचा त्रिकाल जप करतात. चौदा वर्षे व्रत केल्यावर त्याचे उद्यापन करतात. फल – स्वर्ग व मोक्ष यांची प्राप्ती. [जै. व्र. वि. सं.]

चतुर्दश्यष्टमी एक व्रत. दोन्ही पक्षांतील चतुर्दशीला व अष्टमीला शिवाची पूजा व नक्तभोजन करणे, असा याचा विधी आहे. व्रतावधी- एक वर्ष. [हि. ध.]

चतुर्धातू धातू = तत्त्व. बौद्ध लोक पृथ्वी, आप, तेज व वायू असे चारच धातू मानतात. त्यांच्या मते आकाश हे तत्त्व नव्हे. [अभिधम्मत्थसंग्रह]

चतुर्भुजदास (१) (१५३०–१५८५ इ. स.) अष्टछाप कवींपैकी एक. कुंभनदासाचा पुत्र. गोवर्धनाजवळच्या जमुनावतौ नामक गावी याचा जन्म झाला. हा जातीचा खत्री होता. याने १० व्या वर्षी पुष्टिमार्गाची दीक्षा घेतली. लहानपणापासूनच याला कवितेची आवड निर्माण झाली होती. याने काही स्फुट पदे रचली आहेत. याच्या कवितेत भक्तिभाव व मधुर शृंगार यांच्या छटा दिसतात. कृष्णजन्मापासून, गोपींना त्याचा विरह झाला तिथपर्यंतचा कालखंड त्याने आपल्या कवितेसाठी निवडला आहे. चतुर्भुजकीर्तन संग्रह, कीर्तनावली व दानलीला या नावांनी त्याचे तीन पद्यसंग्रह सांप्रत प्रकाशित झाले आहेत. याच्या कवितेचा एक नमुना असा–

भूलि दधिकौ मंथन करिवौं ।। ध्रु. ।।
देखत रसिक नंदनंदनकौ । डगमगे पग धरियौं ।
रह गई चितै चित्र जैसे । एक टक, नैन निमेष न धरियौ।
चतुर्भुज प्रभु गिरिधरन जनाथी नहीं । मैं मन मानिक हरियौ।
(अष्टछाप परिचय)

अर्थ – नंदनंदन श्रीकृष्ण जवळ आला असता गोपी दधिमंथन विसरली. तिचे पाय डगमगू लागले. चित्रासारखी ती स्तब्ध झाली. तिच्या डोळ्यांना टक पडले. चतुर्भुजदास म्हणतो, की नंदनंदनाने तिचे मनरूपी माणिक हरण केले, ते तिला कळलेही नाही.

कुंभनदासाचे चतुर्भुजदासावर विशेष प्रेम होते. कारण तो बापाची आज्ञा पाळण्यात तत्पर असे. घरची शेतीवाडी व नावजीची कीर्तनसेवा या दोन्ही कार्यांत तो कुंभनदासाला मदत करी. तो विठ्ठलनाथाचा विशेष कृपापात्र असा शिष्य होता. विठ्ठलनाथाने जेव्हा अष्टछाप संस्थेची स्थापना केली, तेव्हा तिच्यात त्याने चतुर्भुजदासालाही दाखल करून घेतले.

चतुर्भुजदासाने अनासक्तपणे गृहस्थाश्रम चालवला. त्याची पहिली पत्नी निर्वतल्यावर त्याने विठ्ठलनाथाच्या आग्रहावरून एका सजातीय विधवेशी पुनर्विवाह केला होता. त्या काळात ही गोष्ट अत्यंत धैर्याची होती, यात शंका नाही.

विठ्ठलनाथाचे देहावसान झाल्याचे कळताच चतुर्भुजदास आपल्या गावाहून गोवर्धनावर गेला. गुरूच्या मृत्यूचे दुःख त्याला इतके असह्य झाले; की त्यानेही रुद्रकुंडाजवळच्या चिंचेच्या झाडाखाली बसून आपल्या भौतिक शरीराचा त्याग केला. [अष्टछाप परिचय; हिं. सा. को.; व्र. कृ. मा. भ.]

(२) (इ. स.चे १६ वे शतक) राधावल्लभ संप्रदायातला एक प्रसिद्ध पुरुष. हा जबलपूरजवळच्या गढा नामक गावचा रहिवासी होता. याची कथा नाभाजीने आपल्या भक्तमाल ग्रंथात दिली आहे. याने व्रजभाषेत १२ ग्रंथ लिहिले असून, ते द्वादशयश या नावाने प्रसिद्ध आहेत. द्वादशयशावर याने स्वतः संस्कृतभाषेत टीकाही लिहिली आहे. [हिं. सा. को.]

चतुर्मेध अश्वमेध, पुरुषमेध, सर्वमेध व पितृमेध हे चार यज्ञ करणाऱ्याला किंवा वरील चार यज्ञांसाठी आवश्यक ते मंत्र जाणणाऱ्याला चतुर्मेध असे नाव आहे. [श्रौ. स्मृ. लि.]

चतुर्युगव्रत प्रत्येक मासाच्या पहिल्या चार दिवशी अनुक्रमे कृत, त्रेता, द्वापर व कली या युगांची पूजा एक वर्षभर करणे व त्या दिवसांत दुधावर राहणे, असा याचा विधी आहे. व्रतावधी– एक वर्ष. फल – आरोग्य व दीर्घायुष्य यांचा लाभ. [हि. ध.]

चतुर्विंशतिमत

एक धर्मशास्त्रग्रंथ. यात ५२५ अध्याय आहेत. मनू, याज्ञवल्क्य, अत्री, विष्णू, वसिष्ठ, इ. चोव्वीस धर्मशास्त्रज्ञांच्या उपदेशाचे सार यात असल्यामुळे या ग्रंथाला चतुर्विंशतिमत असे नाव दिलेले आहे. या ग्रंथात विषय आले आहेत, ते असे —

वर्णाश्रमांची कर्तव्ये, शौच, आचमन, इ. आन्हिके, गायत्री-जप, पंचमहायज्ञ, उपजीविकेची साधने, पातके व प्रायश्चित्ते, श्राद्ध, आशौच इत्यादी.

या ग्रंथातला एक महत्त्वाचा श्लोक असा —

यन्नास्ति वेदे न च यत्पुराणे
रामायणे भारतसङ्गरे वा ।
मन्वादिशास्त्रेषु च यन्नवोक्तं
तन्नास्ति नास्तीति न तेन कार्यम् ॥

अर्थ — वेद किंवा पुराणे, रामायण किंवा महाभारत, तसेच मन्वादिशास्त्रे यात जे आढळत नाही, ते अस्तित्वातच नाही, असे मानावे व ते कर्म करू नये.

चतुर्वेदोपनिषद

याला महोपनिषद असेही दुसरे नाव आहे. यात प्रारंभी सकल सृष्टीची उत्पत्ती नारायणापासून झाल्याचे सांगितले आहे, ते असे — त्या आदिनारायणाच्या कपाळावरून धर्मविंदू ओघळले. त्यातून जलाची उत्पत्ती झाली. त्यातून ब्रह्मदेव निर्माण झाला. त्याने पूर्वेकडे तोंड करून ध्यान केले, तेव्हा ऋग्वेद व गायत्री छंद; तो पश्चिमाभिमुख झाला, तेव्हा यजुर्वेद व त्रिष्टुभ छंद; उत्तराभिमुख झाला, तेव्हा सामवेद व जगती छंद व दक्षिणाभिमुख झाला तेव्हा अथर्ववेद व अनुष्टुभ छंद यांची उत्पत्ती झाली.

पुढच्या भागात हरी या देवतेचे सहस्राक्ष व सहस्रहस्त असे वर्णन असून, त्या सर्वव्यापी विश्वपुरुषाचा आविष्कार म्हणजेच हे जगत होय, असे सांगितले आहे. त्यापुढे हृदयकमलातील प्रकाशमान ज्योतीचे वर्णन असून, त्या ज्योतीचे ब्रह्मा, ईशान व परमेश्वर यांच्याशी एकरूपत्व सांगितले आहे. [डॉ. सी. ग. देसाई]

चतुर्व्यूह

चार भगवद्रूपांचा व्यूह म्हणजे चतुर्व्यूह होय. वासुदेव, संकर्षण, अनिरुद्ध व प्रद्युम्न असे भगवंताचे चार व्यूह महासन कुमारसंहितेत सांगितले आहेत.

वासुदेव म्हणजे श्रीकृष्ण. त्याच्या मनातून शुक्लवर्ण शांतीसह संकर्षणाची उत्पत्ती झाली. शांतीच्या वामांगातून रक्तवर्ण श्रीदेवी जन्मली. तिचा पुत्र प्रद्युम्न होय. श्रीदेवीपासून पीतसरस्वती जन्मली आणि तिच्यासह अनिरुद्धाचा जन्म झाला. संकर्षण, प्रद्युम्न आणि अनिरुद्ध ही शिव, ब्रह्मा आणि विष्णू यांची पर्यायनामे होत. वासुदेव म्हणजे परमात्मा, संकर्षण म्हणजे जीवात्मा, प्रद्युम्न म्हणजे मन व अनिरुद्ध म्हणजे अहंकार होय, असेही सांगितले आहे. या चारी विभूती म्हणजे नारायणाच्याच मूर्ती होत. त्यांचे तपशीलवार वर्णन असे —

(१) वासुदेव — हा अजन्मा, नित्य, निष्कल व गुणातीत आहे. तो एकमेवाद्वितीय असून वाङ्मनसातीत आहे. तो सत्–असत्, दूर-निकट, इ. द्वंद्वांच्या पलिकडे आहे. शुद्ध सत्ता हेच त्याचे स्वरूप. ज्ञानी लोक त्याच्या या निर्गुण स्वरूपाला शुक्ल असे म्हणतात.

(२) संकर्षण — याचे दुसरे नाव शेष असे आहे. याची मूर्ती तामस आहे. याला जीव असे म्हणतात. ही मूर्ती म्हणजे वासुदेवाची आत्माभिव्यक्तीच आहे. पंचभूतांच्या संघातापासून जे शरीर बनते, त्या शरीराला चालना देणारा जीव संकर्षण या नावाने ओळखला जातो.

(३) प्रद्युम्न — हा सत्त्वगुणी असून प्रजांचे पालन करणारा आहे. सर्व भूतांच्या ठिकाणी जे मन आहे, ते याचेच रूप होय. याला सनत्कुमार असेही म्हणतात.

(४) अनिरुद्ध — हा रजोगुणी असून सृष्टीची रचना करणारा आहे. समस्त स्थावर-जंगमसृष्टी अनिरुद्धापासूनच जन्म घेते.

या व्यूहांची तीन कार्ये असतात, ती अशी — (१) सृष्टि–स्थिति–प्रलय, (२) संसारी जीवांचे रक्षण व (३) भक्तांना त्यांच्या मोक्षमार्गात साहाय्य करणे.

संकर्षण, प्रद्युम्न व अनिरुद्ध यांना विष्णूचे अवतार मानले आहे. संकर्षण व्यष्टिरूप जीवांचा साक्षी व त्यांना प्रकृतीपासून पृथक करणारा आहे. प्रद्युम्न सर्वांच्या मनाचा निरीक्षक व सर्वांना धर्मकार्यांचे शिक्षण देणारा आहे. अनिरुद्ध संसाराचा रक्षक व जीवांना ज्ञानाच्या चरमसीमेपर्यंत नेऊन पोचवणारा आहे.

काही चतुर्व्यूहांतल्या प्रत्येक व्यूहापासून उपव्यूहांची सृष्टी होत असते, ती अशी — वासुदेवापासून केशव, नारायण व माधव. संकर्षणापासून गोविंद, विष्णू व मधुसूदन. प्रद्युम्नापासून त्रिविक्रम, वामन व श्रीधर. अनिरुद्धापासून हृषीकेश, पद्मनाभ व दामोदर. या बारा उपव्यूहांना प्रत्येक मासाच्या अधिष्ठात्री देवता मानले आहे. हे बारा राशीत संक्रांत होणाऱ्या सूर्याच्या बारा रूपांचे प्रतिनिधी आहेत.

व्यूहवादाचा उपक्रम महाभारतातील नारायणीय धर्माच्या विवेचनाच्या अनुषंगाने झाला आहे. गीतेत (७. ४. ५). वासुदेव–कृष्णाच्या अष्टधा प्रकृतीच्या वर्णनात मन, बुद्धी, जीव व अहंकार यांची चर्चा असली, तरी तिथे व्यूहवाद अभिप्रेत असावा,

असे वाटत नाही. भांडारकरांच्या मते जीव, मन आणि अहंकार यांना संकर्षण, प्रद्युम्न व अनिरुद्ध यांचे प्रतिनिधी मानण्याची कल्पना गीतेनंतरची असावी. पतंजलीने आपल्या भाष्यात 'जनार्दनस्त्वात्मचतुर्थ एव = स्वतःला धरून चौथा असलेला (वासुदेव) तोच जनार्दन आहे, असे म्हटले आहे. पतंजलीचा हा उल्लेख चतुर्व्यूहांना अनुलक्षून असावा. चतुर्व्यूहाच्या उपासनेचा व पूजेचा उल्लेख कौटिल्याने केला आहे. महाभारताच्या प्रारंभिक भागात संकर्षण हा वासुदेव कृष्णाचा मोठा भाऊ मानलेला आहे. पण शांतिपर्वातल्या नारायणीय धर्मात मात्र संकर्षण व वासुदेव यांना जीवात्मा व परमात्मा मानून त्यांचे अद्वैत सांगितले आहे–

ज्ञेयः स एव राजेन्द्र जीवः सङ्कर्षणः प्रभुः ।
(म. भा. शांति. ३३९.४०).

अर्थ – हे राजेंद्रा, संकर्षण म्हणजे जीव असून तोच वासुदेव परमात्मा होय.

पांचरात्रमतात नारायणाच्या सहा दिव्य गुणांची चर्चा केलेली आहे. ज्ञान, शक्ती, ऐश्वर्य, बल, वीर्य व तेज हे ते सहा गुण होत. या सहा गुणांतल्या दोन दोन गुणांच्या प्राधान्याने तीन गुणांची सृष्टी होत असते. संकर्षणाच्या ठिकाणी ज्ञान व बल यांचे, प्रद्युम्नाच्या ठिकाणी ऐश्वर्य व वीर्य यांचे आणि अनिरुद्धाच्या ठिकाणी शक्ती व तेज यांचे प्राधान्य असते. असे असूनही या चारी व्यूहांत सामान्यरूपाने सहाही गुण विद्यमान असतात (अहिर्बुध्न्य संहिता ५.१७.६०). [वैष्णवधर्म; भक्तिका विकास; मा. पु. सां. अ.]

चतुःशरण

एक जैन विधान. श्रावकाने अर्हंत, सिद्ध, साधू व जिनधर्म यांना शरण जावे असे सांगितले आहे. या शरणगमनाचे चार श्लोक पुढीलप्रमाणे–

क्षीणरागादिदोषौघाः सर्वज्ञा विश्वपूजिताः ।
यथार्थवादिनोऽर्हन्तः शरण्याः शरणं मम ॥ १ ॥
ध्यानाग्निदग्धकर्माणः सर्वज्ञाः सर्वदर्शिनः ।
अनन्तसुखवीर्येद्धाः सिद्धाश्च शरणं मम ॥ २ ॥
ज्ञानदर्शनचारित्रयुताः स्वपरतारकाः ।
जगत्पूज्याः साधवश्च भवन्तु शरणं मम ॥ ३ ॥
संसारदुःखसंहर्ता कर्ता मोक्षसुखस्य च ।
जिनप्रणीतधर्मश्च सदैव शरणं मम ॥ ४ ॥

अर्थ– ज्यांचे रागादी दोषसमुदाय क्षीण झाले आहेत व जे सर्वज्ञ, विश्वपूजित आणि यथार्थवादी आहेत असे शरणागतांचे रक्षक अर्हंत माझे रक्षणकर्ते होवोत. ध्यानाग्नीने ज्यांची कर्मे दग्ध झाली आहेत असे, सर्वज्ञ, सर्वदर्शी आणि अनंत सुखे व वीर्यें यांनी दीप्त असे सिद्ध माझे रक्षणकर्ते होवोत. ज्ञानदर्श व चारित्र्य यांनी युक्त, स्व-परांचे तारक व जगत्पूज्य असे साधू माझे रक्षणकर्ते होवोत. संसारदुःख हरण करणारा व मोक्षसुख देणारा असा जिनप्रणीत धर्म माझा रक्षणकर्ता होवो.

चतुःशरणाने श्रावकाला मोठ्या गुणांची प्राप्ती होते [अभि. रा.]

चतुश्चक्र

शत्रुनाशासाठी करायची एक इष्टी. हिचा विं असा– पूर्णिमेच्या दिवशी अग्नी, सरस्वती, अग्नि-षोम व इंद्र यांसाठी इष्टी करणे, यामध्ये इंद्रासाठी सान्नाय्य हवी करणे, पूर्णिमेपासून अमावास्येपर्यंत यजमानाने व्रतस्थ राहणे, अमावास्येच्या दिवशी अग्नी, सरस्वती, इंद्र व मित्रा-वरुण या चार देवतांसाठी इष्टी करणे, यामध्ये मित्रावरुणांसाठी आमिक्षेचा याग करणे व अमावास्येपासून पूर्णिमेपर्यंत व्रतस्थ राहून पूर्णिमेला व्रातपतीष्टी करणे.

हा एक काम्य दर्शपूर्णमासयागच आहे. यात चार देव असल्यामुळे याला चतुश्चक्र असे म्हटले आहे (बौ. श्रौ. सू.). [विद्याधरशास्त्री भिडे]

चतुःश्लोकी भागवत

भागवत पुराणाच्या दुसऱ्या स्कं तील ९ व्या अध्यायाचे ३२ ते ३ चार श्लोक चतुःश्लोकी भागवत या नावाने ओळखले जात ३० व ३१ हे दोन श्लोक उपक्रमासाठी असून ३६ वा श्लो उपसंहारासाठी आहे. हे चतुःश्लोकी भागवत प्रथम भगवं ब्रह्मदेवाला सांगितले व ते पुढे नारद, व्यास, शुक अशा प परेने परीक्षितापर्यंत पोचले. या चार श्लोकांत संपूर्ण भाग पुराणाचे सार आले आहे, असे समजतात. वैष्णव भक्तां नित्यपाठात हे समाविष्ट आहे. हे समग्र भागवत असे-

ज्ञानं परमगुह्यं मे यद्विज्ञानसमन्वितम् ।
सरहस्यं तदङ्गं च गृहाण गदितं मया ॥ ३०॥
यावानहं यथाभावो यद्रूपगुणकर्मकः ।
तथैव तत्त्वविज्ञानमस्तु ते मदनुग्रहात् ॥ ३१॥
अहमेवासमेवाग्रे नान्यद्यत् सदसत्परम् ।
पश्चादहं तदेतच्च योऽत्रशिष्येत सोऽस्म्यहम् ॥ ३२
ऋतेऽर्थं यत्प्रतीयेत न प्रतीयेत चात्मनि ।
तद्विद्यादात्मनो मायां यथा भासो यथा तमः ॥ ३३
यथा महान्ति भूतानि भूतेषूच्चावचेष्वनु ।
प्रविष्टान्यप्रविष्टानि तथा तेषु न तेष्वहम् ॥ ३४
एतावदेव जिज्ञास्यं तत्त्वजिज्ञासुनात्मनः ।
अन्वयव्यतिरेकाभ्यां यत्स्यात् सर्वत्र सर्वदा ॥ ३५

एतन्मतं समातिष्ठ परमेण समाधिना ।
भवान्कल्पविकल्पेषु न विमुह्यति कर्हिचित् ।। ३६ ।।

अर्थ– (भगवान म्हणाला. हे ब्रह्मदेवा) माझे अत्यंत गुह्यज्ञान मी तुला सांगतो व त्याबरोबरच अनुभव, ज्ञान, भक्तियोग आणि त्यांच्या प्राप्तीची अंगभूत साधनेही सांगतो. तू त्यांचे ग्रहण कर. माझे स्वरूप कसे आहे, माझी सत्ता केवढी आहे, माझी रूपे, गुण आणि कर्मे कोणत्या प्रकारची आहेत, याविषयीचे निश्चित असे यथार्थ ज्ञान माझ्या कृपेने तुला प्राप्त होवो. सर्वांच्या आरंभी केवळ मीच होतो. व्यक्त किंवा अव्यक्त यांच्या पलिकडे माझ्याशिवाय दुसरे काहीच नव्हते. सृष्टी उत्पन्न झाल्यावरही जे हे सर्व आहे, ते मीच आहे. सृष्टीचा लय झाल्यावर जे अवशिष्ट राहील, तेही मीच. अशा रीतीने मी अनादी व अनंत असून, माझ्याशिवाय दुसरे कुठेही, केव्हाही व काहीही नाही. वस्तुस्थिती असेल त्याहून ती निराळी भासणे, हा प्रकार भ्रमात अनुभवाला येतो किंवा राहू (तमः) आकाशात असूनही त्याचे दर्शन होत नाही, त्याप्रमाणे आत्मस्वरूपाच्या ठिकाणी नसलेल्या गोष्टींचा प्रत्यय येणे आणि असलेल्या गोष्टींचा प्रत्यय न येणे, हा प्रकार ज्यामुळे घडतो, त्याला आत्म्याची माया असे जाणावे. पृथिव्यादी महाभूते लहानमोठ्या प्राण्यांच्या ठिकाणी प्रविष्ट झालेली दिसली, तरी वस्तुतः ती तशी (प्रविष्ट) नाहीत. त्याप्रमाणे मीही (परमात्मा) सर्व प्राण्यांमध्ये ओतप्रोत दिसलो, तरी त्यांत (प्राण्यांमध्ये) मी मागाहून प्रवेश केला, असे होत नाही. (याचा भावार्थ– मी तर विश्वाचे मूळ कारणच आहे. तेव्हा माझा प्रवेश विश्वात झाला, असे म्हणण्यात स्वारस्य काय ?) अन्वय आणि व्यतिरेक या दोन्ही संबंधांनी ज्याचे अस्तित्व सर्व काळी आणि सर्व ठिकाणी निश्चित ठरेल, तेच आत्मस्वरूप होय. तेच ज्ञान करून घेण्यास योग्य आहे. हे ब्रह्मदेवा, चित्तएकाग्र करून तू हा उपदेश ग्रहण कर व त्याप्रमाणे वाग; म्हणजे तुला महाकल्पात अथवा दैनिक प्रलयरूप विकल्पात कधीही मोह होणार नाही.

नाथांनी याविषयी हजारावर ओव्या रचल्या आहेत.

चतुष्कोण चतुष्कोण हे भारतीय शिल्पातील एक अत्यंत आवश्यक व परिपूर्ण असे रूप आहे, असे स्टेला क्रामरिशने म्हटले आहे. चतुष्कोणाचा उगम वर्तुळापासून होतो. बाहेर पसरणारी शक्ती केंद्रबिंदूपासून निघून वतुळाचे रूप धारण करते व चतुष्कोणाच्या रूपात तिला स्थिरता प्राप्त होते. चतुष्कोण हा नियमबद्धता, परिपूर्ण जीवन व मृत्यूनंतरची परिपूर्णता यांचे प्रतीक मानलेला आहे. [भा. प्र. वि.]

चतुःसन श्रीहरीचा एक अवतार. याने पूर्वकल्पात लुप्त झालेले आत्मज्ञान ब्रह्मदेवाला सांगितले. [पु. इं.]

चतुःसंप्रदाय रामानुजांचा विशिष्टाद्वैतवाद, मध्वाचार्यांचा द्वैतवाद, विष्णुस्वामींचा विशुद्धाद्वैतवाद आणि निंबार्कांचा द्वैताद्वैतवाद या चारी संप्रदायांना मिळून चतुःसंप्रदाय असे म्हणतात.

श्री, ब्रह्म, रुद्र आणि सनकादी चार कुमारांचा संघ, या चार देवतांना चतुःसंप्रदायाचे प्रवर्तक मानले आहे. या चारी देवता वैदिक साहित्यात व पुराण साहित्यातही आढळतात. पण त्यांनी वरील संप्रदाय स्थापन केल्याचे उल्लेख मात्र मिळत नाहीत. चतुःसंप्रदायांशी या चार देवतांची नावे निगडित करण्याचा प्रथम प्रयत्न पद्म पुराणाने केलेला दिसतो.

सम्प्रदायविहीना ये मन्त्रास्ते निष्फला मताः ।
अतः कलौ भविष्यन्ति चत्वारः सम्प्रदायिनः ।।
श्रीब्रह्मरुद्रसनकवैष्णवाः क्षितिपावनाः ।
चत्वारस्ते कलौ देवि सम्प्रदायप्रवर्तकाः ।।

अर्थ – हे देवी, संप्रदायविहीन मंत्र हे निष्फल असतात. म्हणून कलियुगात चार संप्रदायप्रवर्तक होतील. श्री, ब्रह्म, रुद्र व सनक हे चार पुण्यवान पुरुष कलियुगात संप्रदायप्रवर्तक आहेत.

मात्र पद्म पुराणातील हे दोन श्लोक सांप्रत पद्म पुराणाच्या कोणत्याही प्रतीत आढळत नाहीत. यावरून वरील संप्रदायांचे प्रवर्तकत्व केवळ लोकांची श्रद्धा बळकट करण्यासाठी वरील चार देवतांच्याकडे दिलेले दिसते. त्याला कोणताही ऐतिहासिक आधार नाही. [रा. सं. सि. सा.]

चपेटी भाद्र. शु. षष्ठीचे नाव. हिला चापडाषष्ठी व मंथानषष्ठी असेही म्हणतात. या दिवशी संततीच्या प्राप्तीसाठी जलाजवळ षष्ठीदेवीची पूजा करतात. [श. क.]

चॅपेल लहान चर्च किंवा मोठ्या चर्चला जोडलेली प्रार्थनेची लहान खोली. यात फक्त प्रार्थनेची वेदी असते. एखादे घर, शाळा, कॉलेज वा अन्य संस्था यातील ख्रिस्ती पूजास्थानालाही चॅपेल म्हणतात. [एन्सा. रि.]

चमत्कार सृष्टीच्या ज्ञात, निसर्गसिद्ध अथवा अनुभवसिद्ध नियमांच्या विरुद्ध घडलेली गोष्ट म्हणजे चमत्कार होय. ज्ञानेश्वरांनी रेड्यामुखे वेद वदवला, तुकाराम सदेह वैकुंठाला गेले, नरसिंह सरस्वती एकाच वेळी अनेक शिष्यांच्या घरी दिवाळीच्या फराळासाठी गेले, शंकराचार्यांनी

तोंड भाजू न देता तप्त धातुरस प्राशन केला, इ. गोष्टी चमत्काराच्या सदरात मोडतात. मांत्रिक लोकही काही चमत्कार करून दाखवतात. साधु-संत व मांत्रिक यांनी केलेल्या चमत्कारांच्या कथा जगभर सांगितल्या जातात व सामान्य जनांचा त्या कथांवर व तशा काही दृष्ट व श्रुत चमत्कारांवर प्रगाढ विश्वास असतो.

काही देवस्थानांतही चमत्कार घडत असल्याच्या गोष्टी कानांवर येतात. अशा देवस्थानांना जागृत देवस्थाने असे म्हणतात. विशिष्ट प्रसंगी देवतांच्या मूर्ती हालतात, रडतात, हसतात, बोलतात, असेही साक्षात्कार घडत असल्याचे अनेक लोक सांगतात. त्या प्रकारच्या कथाही पुराणात व लोकसाहित्यात आढळतात. प्रत्येक काळात, देशात व धर्मात चमत्कार-कथा हटकून आढळतात. कित्येक चमत्कार ऐतिहासिक दाखले या स्वरूपातही सांगितले जातात. पण बारकाईनें पाहता त्यातील शेकडा ९० टक्के गोष्टी खोटया किंवा भ्रममूलक ठरतात. आपला स्वार्थ साधण्यासाठी कित्येक लोक हातचलाखी किंवा जादूगिरी करतात व तो ईश्वरी चमत्कार असे सांगून भाविक लोकांना फसवतात. जो चमत्कार करील तोच संत, अशी सामान्य समजूत असल्यामुळे, संतांची थोरवी सिद्ध करण्यासाठी त्यांचे भगतगण चमत्कारांच्या अनेक खोटया–नाटया गोष्टी प्रसृत करतात व लोकांना आपल्या जाळयात ओढतात.

जगात जे थोर धर्मसंस्थापक होऊन गेले, त्यांना मात्र चमत्कार मान्य नव्हते, असे दिसते. बुद्धाच्या एका शिष्याने चमत्कार करून भिक्षापात्र निर्माण केले, ते बुद्धाने फोडून टाकले आणि आपल्या शिष्यांना निक्षून सांगितले, की त्यांनी कधीही चमत्कार करता कामा नयेत. झरतुष्ट्र, ख्रिस्त, मुहंमद यांनाही चमत्कार मंजूर नव्हते. पण असे असले, तरी या सर्व धर्मसंस्थापकांच्या नावावर त्यांच्या शिष्यांनी अनेक चमत्कारकथा निर्माण करून त्या प्रसृत केल्या आहेत.

मात्र एवढी गोष्ट खरी, की सर्वमान्य ग्रंथांतील पुराव्यांचा योग्य व सूक्ष्म विचार केल्याअंती, चमत्कार नावाची काही गोष्ट या जगात आहे, हे मान्य करावे लागते. गिबनसारख्या चिकित्सक व नास्तिक ग्रंथकारानेसुद्धा ही गोष्ट मान्य केली आहे. चमत्कार का व कसे घडतात, याविषयी श्री. चिं. वि. वैद्य यांनी जे विवेचन केले आहे, त्याचा सारांश असा—

साधु-सत्पुरुषांकडून जे चमत्कार घडतात, ते श्रुतिसिद्धतेसाठी ज्ञानपूर्वक घडतात आणि क्वचित त्यांची चित्तवृत्ती परमेश्वराशी तादात्म्य पावते, त्या वेळी सहजपणे घडतात. मात्र ही गोष्ट मान्य केली, तरी जादूटोणा, जारणमारण, भूतपिशाचांच्या लीला, इ. गोष्टी मात्र निखालस खोटया म्हटल्या पाहिजेत. देवांच्या मूर्तींतही चमत्कार करण्याचे सामर्थ्य नसते. ते सामर्थ्य असते मानवाच्या ठिकाणी वसत असलेल्या आत्यंतिक श्रद्धेत. चमत्कारांचे सामर्थ्य साधुसंतांच्या ठिकाणी असते; पण तेही प्रसंगवशातच प्रकट होते. सिद्धपुरुषही जाणीवपूर्वक किंवा प्रतिज्ञापूर्वक हवे तेव्हा चमत्कार करू शकत नाहीत.

परमेश्वराने आपल्या अतर्क्य शक्तीने सृष्टी उत्पन्न केली असून, ती त्याच्याच सत्तेने चालते व त्याच्याच इच्छेने लयाला जाते. हा सिद्धान्त सर्व धर्मांना मान्य आहे. परमेश्वर न्यायी व दयाळू आहे. त्याच्या इच्छेने भक्त व धर्म यांच्या रक्षणासाठी कधी कधी चमत्कार घडतात व प्रसंगविशेषी सृष्टीचे नियमही बदलतात.

मनुष्याचे निरपराधित्व सिद्ध करण्यासाठी त्याच्या हातावर तप्त लोह ठेवण्याची प्रथा पूर्वी होती. याला अग्निदिव्य म्हणत. ते तप्त लोह हातावर घेणारा मनुष्य खराखुरा निरपराधी असला, तर त्याचा हात भाजत नाही, असा अनेकांचा अनुभव आहे. याचा अर्थ असा लावावा लागतो, की परमेश्वराच्या इच्छेने तो हात व ते तप्त लोह यांत भेदच उरत नाही. मग जळण्याची क्रिया होईलच कशी ? मायिक जगाच्या दृष्टीने हा चमत्कार ठरतो; पण वस्तुतः तो चमत्कार नव्हेच! प्रसंगविशेषी जेव्हा जीवात्म्याचे परमात्म्याशी तादात्म्य होते, त्या वेळी वस्तूच्या ठिकाणी तद्विरुद्ध गुणधर्मही भासमान होणे शक्य असते. चमत्काराचा एखादा नियम असेल, तर तो हाच.

चमत्कारांची वरील उपपत्ती भौतिक शास्त्रान्वयेही मान्य होण्याजोगी आहे. हळूहळू विश्वातल्या मूलतत्त्वांची संख्या कमी कमी होत जाऊन सर्व पदार्थांचे मूलतत्त्व एकच असल्याने सिद्ध होईल, असे आता शास्त्रज्ञ मानू लागले आहेत. किंबहुना इलेक्ट्रॉन हे विश्वाचे एकच मूल कारण असल्याचे आता प्रत्ययास येत आहे. उष्णता, प्रकाश, विद्युत, चुंबकत्व ही सर्व गतीचीच भिन्न रूपे असून, त्या सर्वांचे मूल शक्तितत्त्व एकच आहे, असेही आता सिद्ध झाले आहे. ज्याप्रमाणे विद्युच्छक्तीच्या साहाय्याने अनेक असाध्य गोष्टी साध्य झालेल्या दिसतात, त्याप्रमाणे भक्ति-श्रद्धेने साध्य होणाऱ्या ईश्वरतादात्म्यामुळेही अशक्य गोष्टी शक्य होऊ शकतील.

चमत्कार घडतात, ही गोष्टच जडवादी भौतिक शास्त्रांना मान्य नसते. नास्तिक पंडितांना चमत्कार घडणे शक्य वाटत असले, तरी ते दैवी सामर्थ्याने घडतात, हे त्यांना मान्य नसते. पण चमत्कार हा निसर्गाचाच खेळ असतो, असे ते मानतात. पण अलिकडे मात्र भौतिक शास्त्रज्ञांचीही चमत्कारांवर थोडी श्रद्धा बसू लागली आहे, असे दिसते. सर्वच भौतिक घटनांची उकल जडवादाने करता येत नाही किंवा ईश्वरी प्रेरणा अथवा दैवी

शक्ती यांचा प्रभाव अनेकदा मान्य करणेच भाग पडते, असे ते आता मानू लागले आहेत. रोगनिवारणाच्या बाबतीत या गोष्टीचा प्रत्यय पुष्कळदा येतो. केवळ ईश्वरावरच्या श्रद्धेने किंवा दुर्दम्य आत्मविश्वासाने असाध्य रोगही बरे झाल्याची अनेक उदाहरणे पाहायला मिळतात. [एन्सा. रि. ए.; हिं. घ. त.]

चमस यज्ञात सोमरस ठेवण्यासाठी तयार केलेले लाकडी पात्र. हे औदुंबर, वड, पिंपळ, इ. झाडांच्या लाकडापासून बनवतात. याची लांबी दहा अंगुळे व रुंदी चार अंगुळे असते. दांड्याची लांबी सहा अंगुळे असावी, असे कात्यायन म्हणतो.

चमस अनेक असतात. त्यांत सोमरस भरून त्याचा याग करतात आणि अवशिष्ट सोमाचे प्राशन करतात. होता व अध्वर्यू हे प्रमुख ऋत्विज असल्याने प्रत्येक चमसातील सोमाचा अंशभाग त्यांना मिळतो. [वे. इं.]



चमस

चमू एक यज्ञपात्र. सोमरस पिळून काढल्यावर तो यात ओतला जातो. सोमरस काढताना जे खोलगट पात्र ती वनस्पती दाबण्यासाठी वापरतात, त्यालाही चमू म्हणतात. शतपथ ब्राह्मणात हा शब्द दगडात खोदलेला द्रोण किंवा विटांनी बांधलेली टाकी अशा अर्थी वापरलेला आहे. (१३. ८. २. १). [वे. इं.]

चमेली एक मातीचे तालवाद्य. याची रचना चिलमीसारखी असते. म्हणजे हे तोंडाच्या बाजूला मोठे व खालच्या बाजूला लहान होत गेलेले असते. याच्या मोठ्या भागाला म्हौंडा आणि लहान भागाला पछेटी म्हणतात. म्हौंड्यावर कातडे ताणून बसवलेले असते. या कातड्याला पुडी म्हणतात. या पुडीचा व्यास २४ अंगुळे किंवा १० इंच असतो. या पुडीवर काठीचा आघात करून हे वाद्य वाजवतात. वाजवताना पछेटीवर असलेल्या छिद्रावर वादक आपली करंगळी अधून मधून दाबतो व त्यामुळे वाद्याच्या घुमावात कमीजास्त बदल होतो. [कृ. जी. ब्र. श.]

चयन सोमयागाच्या साहचर्याने होणारा एक विधिविशेष. विशिष्ट लांबी-रुंदीच्या विटांचे व विशिष्ट आकारांचे असे एकावर एक पाच थर रचून केलेल्या ओटयाला चयन किंवा चिती म्हणतात. चयनाचे अनेक आकार असले, तरी प्राय: सर्वत्र श्येनचितीचाच प्रचार आहे. ही चिती बहिरी ससाण्याच्या आकाराची असल्यामुळे हिला श्येनचिती म्हणतात. चितीवर अग्नीची स्थापना करून त्यावरच सोमाचे, पशूंच्या अंगांचे वगैरे हवन होत असते. पाहा – अग्निचयन. [म. ज्ञा. को.]



चयन – श्येनचिती

चरक (१) यजुर्वेदाच्या काही प्राचीन शाखांना सामान्यत: चरक असे नाव आहे. चरकशाखांत कठ, अह्वरक कठ, प्राच्य कठ, कपिष्ठल कठ, चारायणीय, वारायणीय, इ. भेद आहेत. शतपथ ब्राह्मणात कृष्ण यजुर्वेदाच्या सदस्यांना चरक म्हटले आहे. वाजसनेयी संहितेच्या एका खिलात चरक हे नाव निंदाव्यंजक अर्थाने आलेले आहे. तिथे पुरुषमेधप्रसंगी द्यायच्या बळींच्या यादीत चरकाचार्य हा दुष्कृताचा बळी म्हणून सांगितला आहे.

(२) चरक हा विद्यार्थ्यांचाही एक प्रकार होता. अनेक शिक्षित लोक गृहस्थाश्रम स्वीकारल्यानंतरही ज्ञानसाधना चालू ठेवीत. त्यासाठी ते निरनिराळ्या ठिकाणी जाऊन विशेष विद्वान लोकांकडून ज्ञान मिळवीत. ज्ञानलालसा धरून देशोदेशी संचार करणाऱ्या या विद्वानांना चरक असे म्हणत. हेच लोक देशात ज्ञानप्रसार करीत.

पाणिनीने चरकांचा उल्लेख केला आहे. चरकाला हितकारी अशा अर्थी चारकीण या शब्दाचा तो प्रयोग करतो. वैशंपाय-

नाला आणि आलंबी, पलंग, कमल, ऋचाभ, आरुणी, तंडी, श्यामायन, कठ व कलापी या त्याच्या प्रमुख नऊ शिष्यांना चरक असे म्हटलेले आहे. हे शिष्य निरनिराळ्या ठिकाणी जाऊन आपल्या शाखांचा विकास करीत व नव्या चरणांची स्थापनाही करीत. आणखीही काही चरक विद्वानांचा उल्लेख वैदिक वाङ्मयात आढळतो. भुज्यू लाह्यायनीने आपण चरक होऊन मद्र देशात संचार करीत होतो, असे याज्ञवल्क्याला सांगितले होते (बृहदा. ३.३.१). कुरुपंचाल देशातील उद्दालक आरुणी उत्तरेला जातो, उदीच्य विद्वानांना शास्त्रार्थासाठी पाचारण करतो आणि त्यांचा आचार्य जो शौनक त्याच्यापुढे नतमस्तक होतो, असे शतपथ ब्राह्मणात सांगितले आहे (११.४.१.२४). तक्षशिला विद्यापीठातील विद्यार्थी अध्ययनसमाप्तीनंतर देशाची व लोकांची माहिती करून घेण्यासाठी देशभर फिरत व त्यांना 'चारिकं चरन्ता' असे म्हणत, असे सोनक जातकात सांगितले आहे (५.२४७). पाणिनीही शब्दसंपत्तीच्या शोधार्थ देशभर खूप फिरला होता व त्याने या बाबतीत विद्वानांशी चर्चा केली होती, असे युआन च्वांगने लिहून ठेवले आहे. पाणिनीचे हे चरकरूपच होय. [म. ज्ञा. को.; पा. भा.; प. भा.; वे. इं.; हिं. स.]

(३) एक आयुर्वेदाचार्य. हा कनिष्क राजाचा राजवैद्य होता, असे चिनी ग्रंथावरून कळते. याने आयुर्वेदावर ग्रंथ लिहिला आहे, त्याला चरकसंहिता असे म्हणतात. चरक हा पंजाबातील एक वैदिक चरण होता. वैद्य चरक त्या संप्रदायातला असावा. अग्निवेश हा चरकाचा गुरू होता. चरकाला शेषाचा अवतार मानलेले आहे. त्याबद्धलची कथा भावप्रकाशात दिली आहे, ती अशी—

विष्णूने मत्स्यावतार घेऊन वेदांचा उद्धार केला, त्या वेळी शेषाला सांग वेद प्राप्त झाला. त्यातच अथर्ववेदांतर्गत आयुर्वेदही त्याला मिळाला. एकदा शेष पृथ्वीवर गुप्तचर बनून आला असता त्याने भूतलावर अनेक व्याधिग्रस्त लोक पाहिले. त्या गोष्टीचे त्याला फार दुःख झाले. त्यांचा रोगोपशम कसा होईल, याचा तो विचार करू लागला. पुढे त्या कार्यासाठी त्याने पृथ्वीवर एका मुनीच्या पोटी जन्म घेतला. चर म्हणून तो पृथ्वीवर आला होता, म्हणून चरक या नावाने तो प्रसिद्ध झाला. आत्रेयाच्या अग्निवेशादी शिष्यांच्या तंत्रावर संस्कार करून चरकाने आपली संहिता लिहिली.

चरकसंहितेत एकूण आठ स्थाने आहेत, ती अशी—

सूत्रस्थान — यात औषधिविज्ञान, आहार, पथ्यापथ्य, विशिष्ट रोग, वैद्य व वैदू, शारीर व मानस चिकित्सा, इ. विषय आले आहेत.

निदानस्थान — यात प्रमुख आठ रोगांविषयी माहिती आहे.

विमानस्थान — यात रुची व शरीरसंवर्धन हे विषय आहेत.

शारीरस्थान — यात शरीराचे वर्णन केलेले आहे.

इंद्रियस्थान — यात रोगचिकित्सेचे विवेचन आले आहे.

चिकित्सास्थान — यात रोगहारक अशा विशिष्ट उपाययोजना सांगितलेल्या आहेत.

कल्पस्थान व सिद्धिस्थान — यांत सामान्य उपाययोजनांची माहिती आहे.

सांप्रत जी चरकसंहिता उपलब्ध आहे, ती दृढबल पांचनदाने संस्कारलेली आवृत्ती आहे. दृढबल हा इ. स. च्या ६ व्या शतकापूर्वी होऊन गेला. चरकसंहितेत त्याने सुश्रुताच्या शल्यक्रियेसंबंधीच्या माहितीची भर घातली. प्रस्तुत चरकसंहितेचा अरबी भाषेत अनुवाद झालेला आहे. [भा. इ. रू.; हिं. क. को.; म. ज्ञा. को.]

चरकपूजा

बंगालमधील एक व्रत. त्यासाठी गावातील शंकराच्या देवळासमोर एक खांब पुरून त्याला दुसरा आडवा खांब बांधतात. आडव्या खांबाच्या टोकाला एक चक्र किंवा आकडा बांधलेला असतो. या बांधावळीला चरक म्हणतात. हा शब्द चक्र शब्दापासून बनला असावा.

चरकपूजेला बंगाली हिंदूंच्या धार्मिक जीवनात महत्त्वाचे स्थान आहे. हे पूजाव्रत चैत्र मासाच्या शेवटी ७ ते १० दिवस किंवा महिनाभरही चालू असते. यात हरगौरी व वर उल्लेखिलेला चरक यांची पूजा करतात. हे व्रत धारण करणारे लोक भगवी वस्त्रे पांघरून, जटा-दाढी वाढवून व अंगाला राख फासून नाचत, गात गावोगाव भटकतात. पूजेच्या काळात ते व्रतस्थ राहतात. त्यातले काही लोक चरकाला बांधलेला गळ आपल्या पाठीत घुसवून लोंबकळत राहतात. महाराष्ट्रात खंडोबाच्या पुढे गळ घेण्याची पद्धत होती, तसाच हा प्रकार आहे. याशिवाय विस्तवावरून चालणे, जीभ कापून घेणे, असेही प्रकार व्रतधारी लोकांच्याकडून केले जातात.

बहुधा कनिष्ठ जातींचे लोकच चरकपूजेत भाग घेतात. गरिबीमुळे ते गांजलेले असतात. व्रतकालात ते बैरागी बनून गावोगाव हिंडतात आणि त्या वेळी त्यांना थोडीबहुत कमाई होते.

उग्र देवतांना प्रसन्न करण्यासाठी प्रसंगी स्वतःचे शिर कापणे किंवा आपले हात, पाय, जीभ, इ. अवयव कापून देवाला अर्पण करणे, अशा अघोरी प्रथा प्राचीन काळी सर्वत्र चालू होत्या. इ. स. च्या १९ व्या शतकाच्या मध्यापर्यंत या प्रथा कमीअधिक प्रमाणात चालत होत्या. पुढे इ. स. १८६३ साली इंग्रज सरकारने अशा आत्मघातकी प्रकारांना कायद्याने बंदी घातली.

त्यामुळे शहरातले हे प्रकार बंद पडले, तरी खेडोपाडी त्यांचे अस्तित्व थोड्याफार प्रमाणात शिल्लक राहिलेले अद्यापि दिसून येते.

चरकपूजेच्या दिवशी लोक होळी पेटवतात, तिच्या निखाऱ्यांवरून चालतात व खिळ्यांवर झोपतात. काही ठिकाणी शंकराला लपविण्याचाही खेळ होतो. पूजेच्या आदल्या रात्री अकल्पित जागी शिवाला लपवणे व मग त्याला शोधून काढून देवळात आणणे, अशा प्रकारचा तो खेळ असतो. [एन्. बी. रॉय – जर्नल ऑफ दी विश्वभारती स्टडी सर्कल, नोव्हें. १९५९]

चरकब्राह्मण मध्य प्रदेशातली एक जात. हे यजुर्वेदाच्या चरक शाखेचे ब्राह्मण होत. यजुर्वेदात शुक्ल-कृष्ण हे भेद निर्माण होण्यापूर्वीची ही वैशंपायनदत्त शाखा आहे. हे ब्राह्मण मानवसूत्राच्या आधारे आपली धर्मकृत्ये करतात. यांच्यांत मामेवहिणीशी लग्न होत नाही. हुंड्याचीही चाल नाही. [ब्रा. भि. वि.]

चरखा कापूस, लोकर किंवा रेशीम कातून त्याचा धागा बनवण्याचे यंत्र. यात एक मोठे व एक लहान अशी दोन चक्रे असतात. मोठ्या चक्राच्या साहाय्याने कापसाच्या पेळूपासून सूत वनवतात व ते सूत लहान चक्राला जोडलेल्या चातीवर गुंडाळतात. हे यंत्र अगदी साधे, चालवायला सोपे व उचलून न्यायला हलके असते. टकळीपेक्षा चरख्यावर सूत अधिक प्रमाणात निघते.



चरखा

चरखा हे गांधीवादाचे एक प्रतीक मानलेले आहे. गांधीजींची चरख्यावर अढळ श्रद्धा होती. त्यांनी आयुष्यभर अखंड सूत्रयज्ञ चालवला. ते म्हणत, की चरखाच भारताला वाचवील, कारण त्यात हिंमत आहे व ताकद आहे. अहिंसक प्रतिकाराचे ते एक प्रभावी साधन आहे. (गांधीवाद पाहा)

संतसाहित्यात शरीराच्या सर्व व्यापारांसाठी चरख्याचे रूपक वापरलेले आहे –

जो चरखा जरि जाय बढ़ैया ना मरे।
मैं कातौं सूत हजार चरखुला जनि जरे ।

(कबीर-बीजक २२७)

अर्थ – चरखारूपी शरीर जरी जळून गेले, तरी त्याचा निर्माता सुतार मरत नाही. या चरख्याचे रहस्य समजले, की जन्ममरणाचा फेरा चुकतो.

चरख्यासंबंधी एक कूट प्रसिद्ध आहे, ते असे –

एकु पुरस, बहुत गुनभरौ।
लेटौ जागै, सोवै खड़ौ ।।
उलटे है कै, डारै बेला।
जे देखौ, करता के खेल ।।

अर्थ – एक पुरुष (पुल्लिंगी वस्तू) आहे, त्याच्यावर एक दोरी आहे. आडवा पडूनही तो जागा आहे व उभा राहून झोपतो आहे; उलटा होऊन बेल टाकतो आहे. हा त्या कर्त्याचा (परमेश्वर) खेळ आहे.

चरख्याविषयी एक पंजाबी उखाणा आहे, तो असा –

सदा तीमियाँ दा संग करदा, जती फेर वी पूरा;
पवन समान चाल है उसदी, पैर न पुट्टदा सूरा ।
सारे जग नूं लीड देवे, आपों रैंहदा नंगा;
पंज सिर उसदे वेखो भाई, हथ्या इक्को चंगा ।।

अर्थ – असा एक पुरुष आहे, की जो सदैव स्त्रियांच्या संगतीत राहूनही पूर्ण ब्रह्मचारी आहे. तो वाऱ्यासारखा भिरभिरतो; पण वहाद्दर असा, की पायसुद्धा उचलीत नाही. सगळ्या जगाला वस्त्रे पुरवतो, पण स्वतः मात्र नंगाच राहतो. हे भाई ! तुला त्याचे पाच सर (शिर) दिसतील; पण त्याचा हात (दस्ता) मात्र एकच आहे.

चरख्यावरची लोकगीते भारतात सर्वत्र आणि सर्व भाषांत आहेत. कोंड आदिवासीत चरख्याविषयी एक दंपतीगीत आहे, ते असे –

देहाने सांजामान ड्रोयें। एम्बाइ गाडीगीते साँजा ड्रोयें ।
राजाली नुटका एस्पीने । साँजा सिण्डा टाटाना ।
देहाने सांजा माने कोपा। एम्बाई गाडीगीते संजा कोपा ।
राजेंजू ओस्कीमानेंजू । सांजा सिण्डा टाटाना।
ओ राजाली, ओ राजाली । नेगी नूटका गिम्मूला ।

अर्थ – चरखा फार सुंदर आहे. कोणी बनवला हा सुंदर चरखा ? सुंदर वस्त्र नेसून राणी सूत कातीत आहे. फार सुंदर

चरखा आहे. कोणी बनवला हा सुंदर चरखा ? सुंदर वस्त्र नेसून राजा वस्त्र विणीत आहे. अग राणी ! अग राणी ! तू सूत चांगले कात.

ग्रामललनांच्या अंतरात चरख्याविषयी नितांत प्रेम आढळते. त्यांच्या गीतातून पतीकडे मागणी असते, की मला सोन्याचा चरखा आणून दे. [हिं. सा. को.; भूदान गंगा; घ. गा. है; कृ. जी. ब्र. श.]

चरजू एक मुसलमान संगीतज्ञ. याला नायक ही पदवी होती. याने काही नवीन राग प्रचारात आणले. त्यांपैकी मल्लार रागाचा एक प्रकार चरजूचा मल्लार या नावाने प्रसिद्ध आहे. [सं. शा. क. इ.]

चरण (१) वैदिक विद्यापीठ. चरणात वेदाच्या एकेका शाखेचे अध्ययन होत असे व चरणाच्या संस्थापकाच्या नावावरून तिला नाव मिळत असे. वेदांच्या शाखांना व शाखांचे अध्ययन करणाऱ्या छात्रांनाही चरण असेच म्हणत. प्रथम एखादा ऋषी आपल्या प्रतिभेने वेदाच्या एखाद्या शाखेचे विवरण करी व हे विवेचन त्या चरणाला पायाभूत ठरे. मग त्या शाखेचे अध्ययन करण्यासाठी छात्र एकत्र जमत असत. उदा० तित्तिरी ऋषीने तैत्तिरीय शाखेचे प्रवचन केले व त्या शाखेचे अध्ययन करणाऱ्या छात्रांना तैत्तिरीय असे नाव मिळाले. प्रत्येक चरणाच्या अंतर्गत जेवढे साहित्य निर्माण होई, तेवढे सगळे त्या चरणाच्या नावावर प्रसारित होई. चरणात इतिहास व पुराणे यांचेही अध्ययन व अध्यापन होत असे. पराशरपुत्र वेदव्यासाच्या चरणात इतिहास व पुराणे यांच्या अध्ययनाला प्रथम सुरवात झाली. याचा परिणाम असा झाला, की पुराणग्रंथांचे कर्तृत्व वेदव्यासाकडे आले आणि मूळ पुराणसंहिता चार हजार श्लोकांची होती, ती वाढत जाऊन चार लक्ष श्लोकांची झाली.

वैदिक वाङ्मयाचे अध्ययन-अध्यापन करणाऱ्या अशा या चरणसंस्था भारतात सर्वत्र पसरलेल्या होत्या. पतंजलीच्या काळी भारताच्या पूर्वभागात, उत्तरभागात व मध्यभागात प्रत्येकी तीन चरण प्रसिद्ध होते. त्यांपैकी बह्वृच, कठ, कालाप, मोद व पैप्पलाद हे चरण अत्यंत लोकप्रिय होते. अनेक गावांत काठक व कालापक ग्रंथ शिकवले जात. यावरून त्या काळातील वैदिक अध्ययनाची लोकप्रियता व व्यापकता कळून येते. प्रत्येक चरणाची स्वतंत्र अध्ययनपद्धती होती. त्याचप्रमाणे त्याचे स्वतंत्र नियम, सिद्धान्त व आम्नायही होते. या चरणांचे धर्म व आम्नाय यांना बाह्वृच्य, काठक, कालापक, मोदक व पैप्पलादक असे म्हणत. याप्रमाणेच छंदोग, औक्थिक, याज्ञिक, नट, इत्यादींचेही स्वतंत्र आम्नाय होते. आर्थिक व्यवहारासाठी चरणांची स्वत:ची नाणीही असत.

प्रारंभी प्रत्येक चरणाचे केंद्रस्थान एक आचार्य एवढेच असे. नंतर त्याच्या शिष्यांच्या द्वारे त्याचा अनेक ठिकाणी विस्तार होई. जिथे जिथे त्या आचार्यांचे शिष्य-प्रशिष्य जात, तिथे तिथे ते मूळ आचार्यांच्या चरणावरूनच ओळखले जात.

या सर्व चरणांची अंतर्गत व्यवस्था संघपद्धतीवर आधारलेली होती व त्यांना काठक संघ, शाकल संघ अशी नावे होती. त्या काळात संघशासन हा सर्व सार्वजनिक संस्थांचा आदर्श होता.

एकाच चरणातील छात्रांना सब्रह्मचारी असे म्हणत. प्रत्येक विद्यार्थ्यांच्या चरणाला सामाजिक महत्त्वही होते. राजाकडून दिल्या जाणाऱ्या दानपत्रात ज्याला दान द्यायचे, त्या व्यक्तीचे नाव व गोत्र यांबरोबर त्याच्या चरणाचाही निर्देश केला जात असे. कित्येक ताम्रपटांतही ब्राह्मणाच्या नावाच्या पुढे त्याच्या चरणाचे नावही लिहिलेले आढळते. स्त्रियांनाही चरणात प्रवेश मिळत असे. कठ चरणातील स्त्रीला कठी म्हणत. या स्त्रियांपैकी विशेष मानसन्मान मिळालेल्या स्त्रीला पूज्यमान कठी व अग्रमान मिळणाऱ्या स्त्रीला कठवृंदारिका असे संबोधीत.

एखाद्या प्रसिद्ध चरणाचा सदस्य असलेल्या विद्वानाला समाजात फार मान मिळत असे. काही लोक स्वत:ला अधिक प्रतिष्ठित समजून दुसऱ्या चरणाच्या सदस्यांना कमी लेखीत.

गुरु-शिष्यांच्या अनेक परंपरांनी अनेक पिढ्या जी ज्ञानसाधना केली, तिचे रक्षण करण्याचे काम या चरणसंस्थांनी केले. चरणांच्या ज्ञानसाधनेचे मूर्तरूप म्हणजे त्यांचे वाङ्मय होय. या सर्व वाङ्मयात सर्वांत विशाल व गंभीर असे साहित्य म्हणजे ब्राह्मणग्रंथ होत. वैदिक मंत्रांच्या अध्यात्म, अधिदैवत, अधिभूत व अधियज्ञ अशा अर्थांचा निश्चित ऊहापोह फक्त ब्राह्मणग्रंथांतच आढळतो. इंद्र, अग्नी, यज्ञ, प्राण, अमृत, छंद इ. अनेक शब्दांचे वेगवेगळ्या क्षेत्रांतील अर्थ ब्राह्मणग्रंथांत दिलेले आहेत. पाणिनीच्या कालापर्यंत चरणसंस्थांमध्ये ज्या वाङ्मयाची निर्मिती झाली, त्यात चार प्रकारचे ग्रंथ प्रमुख होते– (१) वैदिक छंद किंवा शाखा (२) ब्राह्मणग्रंथ (३) कल्पसूत्रे व (४) धर्मसूत्रे.

याशिवाय काही चरणसंस्थांनी भिक्षुसूत्र, नटसूत्र, वगैरे ग्रं रचून नवे विषय हाताळले. धर्मसूत्रांच्या अवस्थेप्रत पोचे ज्ञानाचे दोन विभाग दृग्गोचर होऊ लागले होते. एका बाजूला वैदिक व यज्ञीय विषय होते, तर दुसऱ्या बाजूला लौकिक विषय होते. त्यातूनच पुढे एका बाजूला यास्क व पाणिनी आ दुसऱ्या बाजूला बुद्ध व महावीर अथवा बृहस्पती व मं गोशाल यांसारखे स्वतंत्र विचारवंत पुरुष निर्माण झाले. त्यां

काही महत्त्वाचे साहित्य चरणांच्या बाहेरही निर्माण झाले. यास्काचे निरुक्त व पाणिनीची अष्टाध्यायी ही त्यांची स्वतंत्र रचना होती व त्या ग्रंथांवर कोण्याही एका चरणाचा सर्वाधिकार नव्हता. सर्व चरणांच्या परिषदा त्याचे अध्ययन करीत असत. प्रत्येक चरणाची एकेक परिषद म्हणजे विद्वत्सभा असे. मंत्रांचे उच्चारण, व्याकरणासंबंधीचे नियम आणि आपल्या शाखेचे पाठादी विषय निश्चित करणे, हे या परिषदेचे काम असे. [पा. भा.; प. भा.; हिं. स.; म. भा. इ.; जा. का. भा. सं.]

(२) एखाद्या छंदाच्या प्रधान यतीवर समाप्त होणाऱ्या पूर्ण पंक्तीला चरण असे म्हणतात. चरणालाच पद किंवा पाद असेही नाव आहे. सामान्यतः छंदाची कल्पना चतुष्पादरूपात केलेली दिसते. त्यामुळे बहुतेक छंदांत चार चरण असतात. त्रिपाद गायत्री, त्रिपाद अनुष्टुभ् हे छंद तीन चरणांचे आहेत; तर षट्पद आणि मिलिंदपाद हे छंद सहा चरणांचे आहेत.

ज्या छंदात सर्व चरण समान आहेत, त्याला सम; ज्याचे दोनांपेक्षा अधिक चरण समान नाहीत त्याला विषम; आणि ज्याचे एक व तीन आणि दोन व चार हे चरण समान आहेत, त्याला अर्धसम असे नाव आहे. [हिं. सा. को.]

चरणदास (इ. स. १७०३ ते १७८२) एक राजस्थानी संतकवी. याचा जन्म मेवात (राजस्थान) मधील डेहरा गावी, एका ठूसर वैश्य कुळात झाला. पण कोणी याला ब्राह्मणकुलोत्पन्न मानतात. याचे मूळ नाव रणजितसिंह होते. याला लहानपणीच वैराग्य प्राप्त झाले. वयाच्या १९ व्या वर्षीच याने शुकदेव नामक गुरूकडून शब्दमार्गाचा उपदेश घेतला. मुजफ्फरनगरजवळ शूकरताल या गावी सुखदेवदास नावाचा एक प्रसिद्ध साधुपुरुष होता. तोच हा शुकदेव होय असे कळते. त्याने याचे चरणदास असे नाव ठेवले. त्यानंतर सतत १२ वर्षे चरणदासाने तपःसाधना केली. त्यानंतर भारतभर संचार करून तो लोकांना उपदेश करू लागला.

याने बरीच काव्यरचना केली आहे. याचे व्रजचरित्र, अष्टांगयोगवर्णन, भक्तिपदार्थवर्णन, ब्रह्मज्ञानसागर, धर्मजहाजवर्णन, ज्ञानस्वरोदय, शब्द व भक्तिसागर हे ग्रंथ प्रसिद्ध आहेत. योग, ज्ञान, भक्ती, कर्म व कृष्णचरित्राचा दिव्य संदेश हे चरणदासाच्या काव्यातले मुख्य विषय होत. भागवताच्या ११ व्या स्कंधापासून याला कवित्वस्फूर्ती मिळाली.

मृत्युसमयी याचे ५२ शिष्य होते, असे म्हणतात. त्यांच्या ५२ शाखा सांप्रत भिन्न भिन्न ठिकाणी चालू आहेत. सहजोबाई व दयाबाई नावाच्या याच्या दोन शिष्या प्रसिद्ध आहेत.

याच्या काव्यरचनेचा एक नमुना पुढीलप्रमाणे आहे–

मैं मिरगा गुरू पारधी, शब्द लगायो बान ।
चरणदास घायल गिरे, तन मन बींधे प्रान ।।
सत गुरू मेरा सूरमा, करै शब्द की चोट ।
मारै गोला प्रेमका, ढहै भरम का कोट ।।

अर्थ – मी मृग असून गुरू पारधी आहे. त्याने शब्दरूपी शरसंधान करून चरणदासाला घायाळ केले व त्याचे तन, मन, प्राण विंधून टाकले. सद्गुरू माझा सूरमा आहे. त्याने शब्दाचा घाव घातला, प्रेमाचा तोफगोळा मारला आणि भ्रमाचा कोट ढासळून टाकला.



चरणदास

दुसऱ्या एका ठिकाणी तो म्हणंतो–

जा धनकूं ठग ना लगै धारी सकैं न लूट ।
चोर चुराय सकैं नही गाठ गिरैं नहिं छूट ।।

अर्थ – ईश्वराचे नाव हे असे एकच धन आहे, की ते ठकांना लुबाडता येत नाही, लुटारूंना लुटता येत नाही, चोरांना चोरता येत नाही, की कनवठीचे गळून पडत नाही.

याने योगसाधनेवर विशेष भर दिला आहे. [हिं. सा. को. २; भा. सं. म.; रा. भा. सा.]

चरणदासी पंथ चरणदास नामक संताने इ. स. १७३३ साली या वैष्णव पंथाची स्थापना दिल्ली येथे केली. राधाकृष्ण हे या पंथाचे उपास्यदैवत आहे. भागवत

व भगवद्‌गीता हे पंथाचे प्रमाण ग्रंथ होत. श्रीकृष्ण हाच उत्पत्ति-स्थिति-लयांना कारण असून, तो पदार्थरूपाने साकार झाला आहे, असे हे मानतात. काही लोकांच्या मते हा एक योग-संप्रदाय आहे. कारण चरणदास योगसाधनेला प्राधान्य देत असे. त्याने एके ठिकाणी स्पष्ट सांगितले आहे–

योगयुक्ति, हरिभक्ति करि ब्रह्मज्ञान दृढकरि गह्यो।
आतम तत्त्व विचारि कैं, अजपामें सनि मन रह्यो ।।

अर्थ –मी योगयुक्तीने हरिभक्ती केली, तेव्हा मला ब्रह्मज्ञानाचा दृढ अनुभव प्राप्त झाला. मी आत्मतत्त्वासंबंधी विचार केल्यावर माझे मन अजपाजपामध्ये स्थिर झाले.

चरणदासी पंथाचे विरक्त व संसारी असे दोन्ही प्रकारचे अनुयायी आहेत. जे विरक्त असतात ते बहुधा पीत वस्त्र धारण करतात, कपाळी गोपीचंदनाचा टिळा लावतात व गळयात तुळशीची माळ घालतात. त्यांच्या हातात नेहमी जपमाळ असते. ते लहानशी, टोकदार टोपी घालून वर पिवळा साफाही बांधतात. ते भिक्षा मागून उपजीविका करतात.

चरणदासाच्या गुरूचे नाव शुकदेव होते, त्यावरून या पंथाला शुकसंप्रदाय असेही नाव आहे. या पंथाचे अनुयायी आपल्या गुरूला साक्षात ईश्वर मानून त्याची भक्ती व पूजा करतात.

प्रस्तुत पंथाचा प्रसार मुख्यत: दिल्ली प्रांत, उ. प्रदेश, पंजाब व राजस्थान या भागांत आहे. दिल्ली येथे त्यांचा मुख्य मठ व चरणदासाची समाधी आहे. इतर आठ-दहा ठिकाणीही त्यांचे मठ असून, बहादुरपूरचा मठ सर्वांत मोठा व प्रसिद्ध आहे. [उ. भा. सं. प.; इ. सा.; वै. सौ. म. व.]

चरणप्रसाधन

अळिता किंवा मेंदी लावून पावले रंगवण्याची प्रथा भारतात पुरातन कालापासून आहे. विशेषत: स्त्रियांना चरणप्रसाधनाची आवड असते. या गोष्टीला चरकाने पादाभ्यंग म्हटले आहे–

खरत्वं स्तब्धता रौक्ष्यं श्रमः सुप्तिश्च पादयोः
सद्य एवोपशाम्यन्ति पादाभ्यङ्गनिषेवणात् ।।
जायते सौकुमार्यं च बलं स्थैर्यं च पादयोः ।
दृष्टिः प्रसादं लभते मारुतश्चोपशाम्यति ।।

(चरक सू. अ. ५. ९०–९१)

अर्थ– पादाभ्यंग केल्यामुळे खरखरीतपणा, स्तब्धता (स्पर्शज्ञान न होणे), रुक्षता, श्रम, सूज, इ. पायांचे दोष ताबडतोब शमन पावतात व पायांना सौकुमार्य, बल व स्थैर्य या गोष्टी प्राप्त होतात. दृष्टी प्रसन्न होते व वातविकार शमतो.

सोमेश्वराच्या मानसोल्लासात पाय सुंदर बनवण्यासाठी भिन्न भिन्न अभ्यंग (विलेपने) सांगितले आहेत, ते पुढीलप्रमाणे– पायांना लोणी, दही, तेल, दूध, ताक, चंदन व शतधौत घृत हे पदार्थ लावून पाय चोळावे. वसंत ऋतूत तूप, दही किंवा शीतल दूध यांनी; ग्रीष्म ऋतूत बोरीची पाने वाटून व त्यात कांजी व लोणी मिसळून त्या मिश्रणाने; वर्षाऋतूत वसा (चरबी) व ताक यांनी; शरद् ऋतूत चंदनाच्या पाण्याने व हेमंत आणि शिशिर या ऋतूत तेलाने पायांना मर्दन करावे. मग कोमट पाण्याने पाय धुवून मसूर, यव व हळद दळून तयार केलेल्या चूर्णाने पायांना लेप द्यावा. थोड्या वेळानंतर पुनश्च गरम पाण्याने पाय धुवून टाकावे.

पायांना अळिता लावण्यात वरील आरोग्यकारक गुण आहेत की नाही, ते सागणे कठीण आहे; पण अळिता लावण्याने पायांचे सौंदर्य वाढते, हे मात्र नक्की. अळिता लावून केलेल्या चरणप्रसाधनाविषयी कालिदासाने पुढील श्लोक लिहिला आहे–

पत्युः शिरश्चन्द्रकलामनेन स्पृशेति सख्या परिहासपूर्वम् ॥
सा रञ्जयित्वा चरणौ कृताशीर्माल्येन तां निर्वचनं जघान ॥

(कु. सं. ७.१९)

अर्थ– सखीने पार्वतीचे चरण अळित्याने रंगवले व तिला थट्टेने आशीर्वाद दिला, की तू या (रंगवलेल्या) पायांनी शंकराच्या जटेत असलेल्या चंद्राला स्पर्श कर. यावर काही न बोलता पार्वतीने फुलांच्या माळेने सखीला ताडन केले.

सौभाग्यवती स्त्रीने मंगल चिन्ह म्हणून पायांना अळिता किंवा मेंदी लावावी, अशी समजूत आहे. सांप्रत बंगाल, बिहार, इ. भारताच्या पूर्व भागात बायका अळिता लावतात, तर गु रात, राजस्थान, इ. पश्चिम भागात मेंदी लावतात. अळि व मेंदी दोन्ही शीत आहेत. मेंदी रक्तशोधक व अळिता स्तं मानलेला आहे. दोहोंचाही आरक्तवर्ण स्त्रियांच्या को पावलांना फार शोभा देतो. पाहा– मेंदी. [प्रा. भा. प्र.]



चरणप्रसाधन

चरणव्यूह शौनककृत वेदविषयक पुस्तिका. चरणव्यूहाचे चार भाग असून, प्रत्येक भागात एकेका वेदाची माहिती आहे. यात ऋग्वेदाच्या आश्वलायनी, शांखायनी, शाकल, बाष्कल व मांडूकेय अशा पाच शाखा दिल्या आहेत. या पाचही शाखांच्या संहितांत प्रत्येकी १० मंडले व ६४ अध्याय आहेत. पण त्यांतील ऋचांच्या संख्येत मात्र फरक आहे.

चरणव्यूहात चार वेदांचा नामनिर्देश करून पुढे 'तत्र ऋग्वेदस्याष्टौ स्थानानि भवन्ति'= ऋग्वेदाची आठ स्थाने आहेत, असे म्हटले आहे. स्थान म्हणजे भेद होय. चर्चा, श्रावक, चर्चक, श्रवणीयपार, क्रमपार, क्रमपद, क्रमजटा आणि क्रमदंड हे ते आठ भेद होत. यांपैकी पहिल्या चार वेदाध्ययन करणाऱ्यांच्या संज्ञा आहेत. चर्चा = टाळू आणि ओठ यांच्या साहाय्याने दुसऱ्याला ऐकू जाण्यासारखे अध्ययन. श्रावक = श्रोता किंवा अध्यापक. चर्चक = अध्ययन करणारा. श्रवणीयपार = श्रवणीय म्हणजे ऐकण्यास योग्य असा वेद आणि त्याचा पार म्हणजे समाप्ती.

क्रमपारादी पुढच्या चार पदांनी चार पारायणे सुचविली आहेत, असे भाष्यकार म्हणतात. मध्ये विक्षेप होऊ न देता संहितेचे अध्ययन करणे याला पारायण म्हणतात. या पारायणाचे प्रकृतिरूप व विकृतिरूप असे दोन भेद आहेत. संहितेतील मंत्रांचे पठण, मंत्रांच्या पदांचे पठण व दोन पदे जोडून त्यांचे पठण, याला प्रकृतिरूप पारायण म्हणतात. विकृतिरूप पारायणाचे जटा, माला, शिखा, रेखा, ध्वज, दंड, रथ व घन असे आठ भेद आहेत.

यजुर्वेदाचे ८६ भेद सांगितलेले असून, त्यांपैकी चरक, आह्वरक, कठ, प्राच्यकठ, कपिष्ठलकठ, इ. बारा प्रमुख आहेत. वाजसनेयी संहितेचे जाबाल, बहुधेय, काण्व, माध्यंदिन, कापाल, पौंड्रवत्स, आवटिक, पाराशर्य, वैधेय, वैनेय इ. सतरा भेद आहेत.

तैत्तिरीय संहितेचें औखेय व खांडिकेय असे दोन भेद आहेत. त्यांपैकी खांडिकेयांचे आपस्तंबी, सत्याषाढी, बौधायनी, हिरण्यकेशी व औधीयी असे पुन्हा पाच भेद आहेत.

सामवेदाचे हजार भेद किंवा शाखा होत्या असे सांगतात. पण अनध्यायाच्या दिवशी लोकांनी अध्ययन केल्यामुळे इंद्राने आपल्या वज्राने त्यांपैकी पुष्कळ शाखांचा नाश केला. त्यातून आसुरायणीया, वासुरायणीया, प्रांजलऋग्वेदविध, प्राचीनयोग्या व राणायणीया या शाखा तेवढ्या शिल्लक राहिल्या आहेत. राणायणीयांचे पुन्हा राणायणीय, शाट्यायणीय, सात्यमुग्र, खल्व, इ. नऊ भेद आहेत. त्यांपैकी कौथुमी, राणायणीय व जैमिनी या तीनच शाखा सांप्रत विद्यमान आहेत.

अथर्ववेदाचे पैप्पल, दान्त, पदान्त, स्तौत, औत, ब्रह्मदायश, शौनकी, वेददर्शी व चरणविद्य असे नऊ भेद आहेत. नक्षत्रकल्प, विधानकल्प, विधिविधानकल्प, संहिताकल्प व शांतिकल्प अशा पाच कल्पांनी अथर्ववेदाचे अध्ययन करतात.

नर्मदेच्या दक्षिणेला यजुर्वेदाची आपस्तंबी, ऋग्वेदाची आश्वलायनी, सामवेदाची राणायणी व अथर्ववेदाची पिप्पल या चार शाखा असून, त्या शाखांचे अध्ययन करणाऱ्यांत परस्पर यज्ञ व विवाहसंबंध होतो. नर्मदेच्या उत्तरेला चार वेदांच्या माध्यंदिनी, सांख्यायनी, कौथुमी व शौनकी या चार शाखा प्रचारात असून, त्यांचाही परस्परसंबंध विहित आहे. सह्याद्रिशिखरापासून कृष्णा, तुंगभद्रा व गोदावरी यांच्या तीरी आंध्र देशापर्यंत शाकल व आश्वलायन या दोन शाखा आहेत. याचप्रमाणे इतर वेदशाखांचा प्रसारही भारतात कुठेकुठे आहे, तेही चरणव्यूहात सांगितले आहे.

शेवटी फलश्रुतिखंडाने चरणव्यूहाची समाप्ती केली आहे. गर्भिणीला हा ग्रंथ ऐकवला असता, तिला पुत्रसंतती होईल, अशा प्रकारची फले या खंडात वर्णिली आहेत.

चरणव्यूह या ग्रंथावर श्री. ना. गो. चापेकर यांनी पुढीलप्रमाणे आक्षेप घेतले आहेत —

हा ग्रंथ शौनकाचा आहे, असे मानले जाते. पण ग्रंथाच्या शेवटी शौनकाला नमन केलेले असल्यामुळे हा ग्रंथ शौनककृत नसावा, असे वाटते. शिवाय हा ग्रंथ शौनकाचाच आहे, असे मानण्यास योग्य कारणही दिसत नाही. एखाद्या वैदिक ब्राह्मणाने हे लिखाण केलेले असावे.

या ग्रंथाच्या रचनेत विस्कळितपणा आहे. ऋग्वेदाचीं चर्चा, श्रावक, इ. जी आठ स्थाने सांगितलेली आहेत, त्यांपैकी पहिली चार स्थाने व दुसरी चार स्थाने यांचा काही संबंध दिसत नाही.

त्याचप्रमाणे 'युगान्तरे अन्तर्हितान् वेदान्' या वचनावरून रोज नवीन मंत्र रचून देवतांचे आवाहन करण्यात येत असे, ते बंद झाले, असे कळते. तथापि व्यासांच्या काळापर्यंत रचलेले मंत्र लोकांच्या पाठामध्ये असणे संभवनीय आहे. अर्थात ते एका व्यक्तीच्या पाठात होते असे नसून, निरनिराळ्या माणसांकडे निरनिराळे मंत्र होते, म्हणजे ते निरनिराळ्या लोकांच्या पाठात होते किंवा लिखित रूपाने त्यांच्या जवळ होते, असे समजणे अधिक सयुक्तिक होईल. या कारणाने युगान्तरी रचलेले काही मंत्र काही माणसांना ज्ञात असतील, तर अन्य मंत्र दुसऱ्या कित्येकांना अवगत असतील. हेच शाखाभेदाचे कारण संभवते. परंतु हा संभव मनात न आणता वैदिक समाज एकजिनसी होता आणि गुरुपरंपरेने वेदाध्ययन केले जात होते, अस

समज उत्पन्न झाला आणि त्यातूनच गुरुपरंपरा सिद्ध करण्याची घडपड सुरू झाली. पण या घडपडीत इतकी विसंगती आहे, की तिच्यावर विश्वास ठेवणे शक्य नाही. शिवाय गुरुपरंपरा जर अखंड मानली, तर शाखाभेद असिद्ध होतो.

अगदी प्रारंभापासून विचार केला, तर व्यासांनी एका वेदराशीचे चार विभाग केले, असे बहुतेकजण आजपर्यंत सांगत आले आहेत. पण वेदाची एक रास होती, म्हणजे काय होते ? व्यासांना सर्व वेद मुखोद्‌गत होते व त्यांचे त्यांनी चार भाग केले, असे मानले, तरी ते कोणत्या तत्त्वाला अनुसरून केले, त्याची माहिती कोणी देत नाही. शिवाय, ते जर एका माणसाचे कृत्य होते, तर तेच मंत्र चारही वेदात का यावे, याचेही स्पष्टीकरण कोणी करीत नाही. सारांश, व्यासांनी एका वेदाचे चार वेद करून आपल्या चार शिष्यांना एकेक वेद पढवला, ही कथा कपोलकल्पित आहे.

चरणव्यूहकार व भाष्यकार महीदास हे नितांत विश्वसनीय ग्रंथकार आहेत, असे समजणे कठीण आहे. [म. ज्ञा. को.; ना. गो. चापेकर – पुरुषार्थ, सप्टें. १९६३]

चरणानुयोग जैनांच्या दिगंबर संप्रदायातल्या आगम परंपरेत जे साहित्य निर्माण झाले, ते चार अनुयोगांमध्ये विभाजित केलेले आहे. चरणानुयोग हा त्यांतलाच एक विभाग होय. चरण शब्दाच्या व्याख्या अशा—

'चर्यंते मुमुक्षुभिरासेव्यते इति चरणम् ।' = मुमुक्षू जनांकडून जे आचरिले जाते किंवा सेवन केले जाते, ते चरण होय. अथवा, 'चर्यंते गम्यते प्राप्यते भवोदधेः परं कूलमनेनेति चरणम्' = ज्याच्या योगाने भवसमुद्राच्या पैलतीराला प्राप्त होता येते, अशा प्रकारचे जे आचरण ते चरण होय (अभि. रा.).

मुनी व गृहस्थ यांनी जे आचार व नियम पाळायचे, तद्विषयक ग्रंथांचा समावेश चरणानुयोग साहित्यात होतो. चरणानुयोग म्हणजे जैन आचारधर्माचे प्रतिपादन होय. द्वादशांग आगमांच्या अंतर्गत पहिल्या आचारांगात मुनिधर्माचे व सातव्या उपासकाध्ययन या अंगात गृहस्थांच्या आचाराचे वर्णन केलेले आहे. आगमोत्तर कालात मुनी व गृहस्थ यांच्या आचारधर्मावर अनेक ग्रंथ लिहिले गेले आहेत.

सर्वप्रथम कुंदकुंदाचार्यांच्या ग्रंथात मुनी व श्रावक यांच्या आचारांचे विशद निरूपण मिळते. त्याच्या प्रवचनसाराचा तिसरा श्रुतस्कंध हा मुनीच्या आचारासंबंधी आहे. त्यात पंचाहात्तर गाथा असून, श्रमणलक्षण, प्रव्रज्या, उपस्थापनात्मक दीक्षा, अठ्ठावीस मूलगुण, छेदस्वरूप, उत्सर्ग–अपवाद मार्गनिरूपण, ज्ञानसाधना, शुभोपयोग, संयमविरोधी प्रवृत्तींचा निषेध, व मोक्षसाधना या गोष्टींचे विवेचन केलेले आहे.

कुंदकुंदाचार्याने ज्ञान, दर्शन व चारित्र्य यांना नियम म्हट असून, त्या तीहींच्या स्वरूपाचे विवेचन त्याने आपल्या नियम सार या ग्रंथात केले आहे. त्यापुढे त्याने सहा आवश्यकां वर्णन करून आवश्यकांच्या द्वारेच श्रामण्य गुणांची पूर्ती हो असे सांगितले आहे (गाथा १४७.४८).

मोक्षप्राप्ती हा धर्माचरणाचा मुख्य उद्देश असल्यामुळे सम्यक दर्शन, ज्ञान आणि चारित्र असा मोक्षाचा त्रिविध मा असल्यामुळे कुंदकुंदाचार्याने वरील तीन गोष्टींचे प्रतिपाद आपल्या पाहुड ग्रंथात केले आहे. जिनागम सूत्रांच्या आ श्रमणांनी परमार्थाची साधना करावी, असे तो आप पाहुड ग्रंथात सांगतो (गाथा १) चरित्रपाहुडात त्याने ज्ञा व दर्शन यांच्या संयोगाने चारित्र उत्पन्न होत असल्याचे सांगि तले आहें. बोधपाहुडात त्याने चैत्यगृह, वंदनीय, प्रतिमा, द बिंब, जिनमुद्रा, ज्ञान, देव, तीर्थ, अर्हत् व प्रव्रज्या या तत्त्वांच्या खऱ्या स्वरूपांचे निरूपण केले आहे. भावपाहुडात त्या म्हटले आहे. 'केवळ मुनिवेष धारण करण्याने किंवा व्रते आचरल्याने किंबहुना शास्त्रज्ञान प्राप्त करून घेण्यानेही कल्याण होऊ शकत नाही. त्यासाठी परिणामामध्ये शुद्धी पाहिजे आणि रागद्वेषादी कषायभाव सुटले पाहिजेत' (५६–५९). लिंगपाहुडात त्याने श्रमणत्वाला दूषित कर काही प्रवृत्तींची निंदा केली आहे. नाचणे, गाणे, संचय कलह, वाद किंवा द्यूत यांत अनुरक्त होणे, इ. गोष्टी मुनीला वर्ज्य ठरवल्या आहेत (गाथा ४–२०). शीलपाहु त्याने शीलावर विशेष भर दिला आहे. 'शील नसेल, विशाल ज्ञानाची प्राप्तीही निष्फल आहे. शीलरूपी स्नान करणारे लोकच सिद्धालयाकडे जाऊ शकतात' (३७–३८).

रयणसार या ग्रंथात त्याने श्रावक व मुनी यांच्या आचा वर्णन केले आहे. तिथे त्याने ७० गुण व ४४ दोष यांचा नि केला आहे. दान व पूजा ही गृहस्थासाठी आणि ध्यान स्वाध्याय ही मुनीसाठी आवश्यक असल्याचे तो सांगतो (११). दिगंबर संप्रदायात वट्टेरस्वामीकृत मूलाचार हा मुनिधर्माच्या बाबतीत सर्वोपरी प्रमाण मानला जातो. ग्रंथात एकूण १२४३ गाथा आहेत. समग्र ग्रंथात मुनीच्या गुणांचे विशदीकरण केलेले आहे. भगवती-आराधना हा एक ग्रंथ मुनीच्या आचारांचे कथन करणारा आहे. हा सामान्यतः इ. स. च्या पहिल्या काही शतकांत निर्माण झा असावा. एक मत असे आहे, की हा ग्रंथ यापनीय संप्रदा असून, त्यात दिगंबर संप्रदायाचे अचेलकत्व, त्याच

श्वेतांबर संप्रदायाची स्त्रीमुक्ती मान्य केलेली आहे. या ग्रंथात दर्शन, ज्ञान, चारित्र व तप या चार आराधनांचे विस्तृत वर्णन आहे. श्वेतांबर संप्रदायात हरिभद्रसूरीचा पंचवस्तुक हा ग्रंथ मुनीचे आचारधर्म सांगणारा आहे. मुनिदीक्षा, यतिदिनकृत्य, गच्छाचार, अनुज्ञा व सल्लेखना या पाच वस्तूंवर पाच प्रकरणे (अधिकार) त्या ग्रंथात लिहिलेली आहेत. नेमिचंद्रसूरीच्या प्रवचनसारोद्धारात सुमारे १६०० गाथा असून, त्यात वंदन, प्रतिक्रमण, प्रत्याख्यान, कायोत्सर्ग, महाव्रत, परीषह, इ. अनेक विषयांचे वर्णन आहे. जैन कर्मकांड समजण्याच्या दृष्टीने हा ग्रंथ फार महत्त्वाचा आहे. प्रशमरतिप्रकरण हा उमास्वातीचा ग्रंथ संस्कृत भाषेत व पद्यरूपात आहे. त्यात जैन तत्त्वज्ञान, कर्मसिद्धांत, साधू व गृहस्थ यांचे आचार, वारा भावना, दशधर्म, इ. गोष्टींचे सुबोध वर्णन केलेले आहे.

अमृतचंद्रसूरीचा पुरुषार्थसिध्दचुपाय हा ग्रंथही महत्त्वपूर्ण आहे. यातल्या २२६ संस्कृत पद्यांत रत्नत्रयाचे व्याख्यान केलेले आहे. या ग्रंथात हिंसा व अहिंसा यांच्या स्वरूपाचे सूक्ष्म विवेचन आहे, तसे अन्यत्र कुठे सापडत नाही. वीरनंदीकृत आचारसार हा सुमारे १०० संस्कृत श्लोकांचा ग्रंथ आहे. त्यात मूलगुण, सामाचार, दर्शनाचार, ज्ञानाचार, इ. गोष्टींचे निरूपण आहे. पाहा– श्रावकाचार. [भा. सं. जै. यो.]

चरितपुथी असमिया भाषेत आसाममधील वैष्णव कवींनी इ. स. च्या १७ व्या शतकात जी संतचरित्रे लिहिली, त्यांना चरितपुथी असे म्हणतात. घरगुती बोलचालीच्या गद्यभाषेत ती लिहिलेली आहेत. त्यावरून आसामातील तत्कालीन धार्मिक, आचार व सामाजिक चालीरीती कोणत्या प्रकारच्या होत्या, ते कळून येते. देवपूजेतील प्रार्थनेनंतर चरितपुथीतल्या काही उताऱ्यांचा पाठ करण्याची प्रथा अद्यापि आसामात चालू आहे. [आ. अ. आ. लि.]

चरित्रशुद्धिव्रत एक जैन व्रत. यात १०४२ उपवास करायचे असतात. सहा वर्षांत हे व्रत पुरे होते. एक दिवस उपवास, एक दिवस पारणा अशा क्रमाने हे व्रत पुरे करतात. या कामी २०८४ दिवस लागतात. [व्र. ति. नि.]

चरुप्राशन गुजरातमधील श्रीगौड ब्राह्मणांच्या लग्नातली एक चाल. लग्नाच्या दुसऱ्या दिवशी बोहोल्यावर अग्नी प्रज्वलित करतात. या अग्नीवर पुरोहित एका मृत्तिकापात्रात भात शिजवतो व वराकडून त्याचा होम करवितो. नंतर वधूची आई उरलेल्या भातात तूप व गूळ घालून त्याचे पाच घास वधूला खायला देते. [ल. वि. सो.]

चरुस्थाली भात शिजविण्याचे एक पात्र. ऋग्वेद व अथर्ववेद यांत चरुस्थालीचे उल्लेख आहेत (ऋ. ७.१०४.२; अथर्व. ७.४.४). हे पात्र लोहाचे किंवा पंचरस धातूचे बनवीत (श. ब्रा. १३.३.४.२). त्याच्यावर झाकण असे व विस्तवावर टांगण्यासाठी त्याला कड्याही केलेल्या असत. [वे. इं.]

चरू चरुस्थालीत शिजवलेल्या पदार्थाला चरू म्हणतात. याच्या दोन व्याख्या दिल्या आहेत, त्या अशा–(१) ‘चरन्ति भक्षयन्ति देवा इमम् ’ = अग्न्यादी देव ज्याचे चरण अर्थात भक्षण करतात, तो पदार्थ. (२) ‘चरति होमादिकमस्मात् ’ = ज्याच्यामुळे होमादी कृत्ये चालतात, तो पदार्थ.

चरू हा एक महत्त्वाचा हवनीय पदार्थ आहे. चरू प्राय: तांदुळाचा शिजवीत असले, तरी प्रसंगविशेषी यव, व्रीवार, सावे, गवताचे बी, राळे, इ. अनेक द्रव्यांचे चरू शिजविण्यास सांगितले आहे. काही यागांतला चरू दुधात, तर काही यागांतला तुपात शिजवायचा असतो. उदा० ‘अग्नये रसवतेऽजक्षीरे चरुं निर्वपेत् । ’ = रसवान् अग्नीसाठी शेळीच्या दुधात चरू शिजवावा, असे सांगितले आहे (तै. सं. २.२.४). चरू पाण्यात शिजवण्यापेक्षा दुधात किंवा तुपात शिजविणे, हे कौशल्याचे काम असते. चरू उतू जाऊ न देता शिजवावा लागतो. तो उतू गेल्यास प्रायश्चित्त करावे लागते. चरूसाठी तांदूळ तयार करण्याचे काम यजमानपत्नी करते; पण तो शिजवण्याच्या कामात तिचा संबंध नसतो. ते काम अध्वर्यु किंवा नियोजित ऋत्विजच करतो. चरू शिजल्यानंतर तो दुसऱ्या पात्रात ओतून घेतात व मग त्याच्या आहुती देतात. [विद्याधरशास्त्री भिडे]

चर्च या शब्दाचा मूळ अर्थ प्रभूचे निवासस्थान असा आहे. पण कालांतराने त्याला प्रार्थनासभा, धार्मिक व्यवसाय (पौरोहित्य), येशू ख्रिस्तावर संपूर्ण श्रद्धा, ख्रिस्ती समाज, ख्रिस्ती उपासनामंदिर, असे अनेक अर्थ प्राप्त झाले आहेत.

ख्रिस्ती समाज किंवा मंडळ याचे दोन प्रकार आहेत–

सार्वत्रिक मंडळी किंवा ख्रिस्ती महामंडळ– पिता, पुत्र आणि पवित्र आत्मा या त्रयीवर श्रद्धा ठेवून स्वत:ला ख्रिस्ताचे अनुयायी म्हणविणाऱ्या, पृथ्वीवरील सर्व लोकांचा संघ.

स्थानिक मंडळी – शुद्धाचरण व ख्रिस्ताच्या राज्याचा विस्तार हे हेतू मनात बाळगून विधिपूर्वक स्थापन झालेला आणि सामुदायिक उपासनेसाठी एकत्र जमणारा, येशू ख्रिस्तावर

संपूर्ण विश्वास ठेवणाऱ्या लोकांचा स्थानिक संघ.

ख्रिस्ती मंडळाची स्थापना येशूने केली नाही; तर त्याच्या मृत्यूनंतर ते सहजगत्या निर्माण झाले. प्रारंभी रोमन साम्राज्यात ख्रिस्ती लोकांचा छळ होत असे; त्यामुळे त्या वेळचे ख्रिस्तानुयायी गुप्तपणे कुठेतरी जमून प्रार्थना व चर्चा करीत. हीच मूळची ख्रिस्ती मंडळे होत. येशूने प्रभूचे राज्य पृथ्वीवर येणार असल्याची कल्पना प्रसृत केली होती. त्या दिव्य कल्पनेशी ख्रिस्तानुयायांचा जीवनक्रम सुसंगत असावा, असा उपदेश येशूच्या शिष्यांनी सुरू केला. येशू हा देवदूत आहे आणि त्याचे पुनरुत्थान झाले असून, तो देवाचे राज्य पृथ्वीवर आणणार आहे अशी श्रद्धा हाच या मंडळाचा पाया होय. चर्चवर देवदूताचे अधिराज्य असून, तो चर्चच्या सर्व सदस्यांच्या अंतर्यामी वास करतो, अशी ख्रिस्तानुयायांची भावना आहे. ईश्वराच्या आगामी राज्यासाठी प्रार्थना करणे, त्याबद्दल आनंद दर्शविणे व त्यासाठी समाजात प्रेमबंधन निर्माण करणे, हे ख्रिस्ती महामंडळाचे आध्यामिक स्वरूप आहे. या मंडळाच्या ग्रीक चर्च, रोमन कॅथॉलिक चर्च, प्रॉटेस्टंट चर्च, अँग्लिकन चर्च, मेथॉडिस्ट चर्च, सिरियन चर्च, इ. अनेक शाखा आहेत.



सेंट पॉल चर्च – कलकत्ता

ख्रिस्ती लोक जिथे प्रार्थना, उपासना व धार्मिक विधी करतात, ती इमारत हे ख्रिस्ती मंडळाचे लौकिक किंवा भौतिक रूप होय. ख्रिस्त्यांच्या पूर्वी यहुदी लोकांची सिनेगॉग नामक प्रार्थनामंदिरे होती. तिथेच ख्रिस्ती लोक प्रथम प्रार्थना करीत. इ. स. च्या ४ थ्या शतकात रोमन साम्राज्यात ख्रिस्ती धर्म प्रस्थापित झाला. त्यानंतर तिथे सामुदायिक प्रार्थनेसाठी पूर्वीच्या रोमन मंदिरांच्या धर्तीवर नवी ख्रिस्ती मंदिरे बांधण्यास प्रारंभ झाला. इ. स. च्या १ ल्या शतकात ब्रिटनमध्ये एक साधे चर्च उभारले गेले होते, असे म्हणतात. तेच सर्वांत जुने चर्च असावे. रोमन साम्राज्याच्या बाहेरील प्रदेशातही त्या सुमारास काही चर्चे निर्माण झाली होती, असे कळते.

इ. स. च्या १ ल्या शतकात सेंट थॉमस हा भारताच्या मलबार किनाऱ्यावर उतरला आणि त्याने केरळ प्रदेशात सात चर्चे बांधली. त्यांपैकी पालूर येथील चर्च विशेष महत्त्वाचे आहे. त्या ठिकाणच्या अनेक नंपूतिरी ब्राह्मणांनी ख्रिस्ती धर्म स्वीकारला आणि आपले शिवमंदिरच चर्च म्हणून प्रार्थनेसाठी वापरणे सुरू केले. कालांतराने ते मंदिर पाडून तिथे चर्च उभारले गेले. पण त्यात मूळच्या मंदिराचे अवशेष (शिवलिंग, अभिषेकपात्र, इ.) अद्याप जपून ठेवलेले आहेत. हे चर्च अनेक वेळा उद्ध्वस्त झाले व तितक्याच वेळा पुन्हा बांधले गेले. सेंट थॉमसने उभारलेल्या चर्चपैकी एकही आता अस्तित्वात नाही.

भारतातली प्रारंभीची ख्रिस्ती प्रार्थनामंदिरे हिंदू देवालयांच्या धर्तीवर उभारली जात. पण पुढे इ. स. च्या ४ थ्या शतकात जे सिरियन ख्रिस्ती लोक भारतात आले, त्यांनी सिरियन पद्धतीची ख्रिस्ती मंदिरे बांधण्यास प्रारंभ केला. तथापि त्यांनीही देवालयाभोवती असणारी भिंत, प्रवेशद्वारावरील कोट्टुपुर (नगारखाना), इ. शिल्पप्रकार चर्चच्या रचनेत वापरले. पुढे इ. स. च्या १६ व्या शतकात पोर्तुगीज चर्चच्या बांधणीत आमूलाग्र बदल केला. त्यांनी गोथि



सेंट थॉमस चर्च – पालूर

बरोकी पद्धतीची नवी चर्चे बांधली व जुनी पाडून तीही पुन्हा बांधली. कोच्चिन येथे इ. स. १५१० साली अशा धर्तीचे पहिले चर्च बांधले गेले; ते अजूनही शाबूत आहे. गोमंतकात पोर्तुगीजांची सत्ता प्रस्थापित झाल्यानंतर त्यांनी तिथली शेकडो हिंदू मंदिरे नष्ट करून त्या जागी चर्चे उभारली. (गोमंतक पाहा)

तमिळनाडमध्ये मैलापूर येथे सेंट थॉमसची समाधी आहे. तिथल्या चर्चचे वर्णन मार्को पोलोने लिहून ठेवले आहे. मात्र आता त्याचे भग्नावशेषच तिथे सापडतात. सांप्रत तिथे एक गोथिक पद्धतीचे कॅथेड्रल बांधण्यात आले आहे. त्याला सेंट थॉमस कॅथेड्रल म्हणतात.

इ. स. १६८० साली हिंदुस्थानातले पहिले प्रॉटेस्टंट चर्च मद्रासमध्ये उभारले गेले, त्याला सेंट मेरीचे चर्च म्हणतात. इ. स. १७०९ मध्ये कलकत्त्यात एक चर्च बांधले गेले होते; पण इ. स. १७३७ च्या वादळात ते पडले व त्याचा उरलेला भाग सुजाउद्दौल्याने नष्ट केला. मुंबईत ख्रिस्तीमंदिर प्रथम बांधले गेले ते इ. स. १७१८ साली. मद्रास येथील सेंट जॉर्ज कॅथेड्रल, लंडनच्या सेंट गिलगिज कॅथेड्रलच्या धर्तीवर बांधले आहे. इ. स. १८१५ मध्ये ते पूर्ण झाले. इ. स. १८४७ साली कलकत्ता येथे सेंट पॉल कॅथेड्रलची भव्य वास्तू उभारली गेली. तीत कलाकुसरीचे काम बरेच केलेले आहे. हे अँग्लिकन चर्चचे मोठे धर्मपीठ आहे. येथील धर्मगुरू ब्रह्मदेश, पाकिस्तान व सीलोन या देशांतील अँग्लिकन चर्चचेही प्रमुख आहेत.



सेंट थॉमस कॅथेड्रल – मैलापूर



अँग्लिकन कॅथेड्रल – मुंबई

इ. स. च्या १९ व्या शतकात युरोप-अमेरिकेतून असंख्य मिशनरी लोक भारतात आले आणि त्यांनी खेडोपाडी लहान चर्चे व शहरातून मोठी कॅथेड्रले बांधली. त्यांतील काही इमारती अत्यंत भव्य व सुंदर आहेत.

चर्चचे बाह्य रूप व आतली सजावट पाहून भक्तांना परमेश्वराची थोरवी आणि विशालता प्रतीत व्हावी, अशी त्याची रचना असते. चर्चची इमारत बहुधा पश्चिमाभिमुख असते. तिचे दोन भाग असतात. धर्मगुरू प्रवचनासाठी उभा राहतो, ती वेदी एका भागात असते व दुसरा भाग चर्चच्या सदस्यांसाठी असतो. धर्मगुरू नेहमी पूर्वेकडे तोंड करून उभा राहतो. कॅथॉलिक पंथाचा हाय मास हा समारंभ किंवा प्रॉटेस्टंट पंथाचे साधे धर्मग्रंथवाचन यांसारखे विविध प्रकारचे धार्मिक कार्यक्रम चर्चमध्ये केले जातात. सर्व ख्रिस्ती पंथांचे लोक साप्ताहिक सामुदायिक प्रार्थना चर्चमध्ये करतात. कॅथॉलिक पंथाच्या मंदिरांत क्रुसावर खिळवलेल्या येशूच्या प्रतिमा किंवा संतांच्या मूर्ती किंवा संतांची चित्रे आढळतात; पण त्यांची पूजा करण्याची मात्र प्रथा नाही.

ख्रिस्ती लोकांचे दीक्षाविधी आणि विवाह हे दोन प्रमुख संस्कार चर्चमध्येच केले जातात. आपला अंत्यविधी चर्चमध्ये

व्हावा आणि आपल्याला तिथेच कायमचा विसावा लाभावा, अशीही पुष्कळांची इच्छा असते. पण ते शक्य नसल्यामुळे प्रेत प्रथम चर्चमध्ये नेऊन तिथे अंत्यसंस्कार करतात आणि नंतर ते दफनभूमीत नेऊन पुरतात. चर्चच्या आवारात पुरले जाण्याचा मान काही श्रेष्ठ व्यक्तींनाच मिळतो.

युकॅरिस्टचा (ख्रिस्तप्रसाद) विधीही चर्चमध्ये केला जातो. रोटी व मद्य यांच्या रूपाने येशू ख्रिस्त प्रकट होतो, ही कल्पना त्या विधीच्या मुळाशी आहे.

चर्च हे ख्रिस्ती समाजाच्या धार्मिक व सांस्कृतिक जीवनाचे केंद्र असते. धार्मिक विधींप्रमाणेच तिथे सणसमारंभही साजरे करतात. त्यासाठी तिथे गीत वाद्यांची व्यवस्था केलेली असते. सणाच्या दिवशी पताका, फुगे, झुंबरे, दिवे वगैरे लावून चर्च सजवले जाते.

प्रत्येक चर्चमध्ये एक स्थायिक धर्मगुरू व त्याचा एक मदतनीस असतो. मोठ्या चर्चमध्ये यांच्याशिवाय उपधर्मगुरू व कारकून असतात. चर्चच्या सदस्यांपैकी प्रत्येकाचा दीक्षाविधी, विवाहसंस्कार व अंत्यविधी यांची नोंद करून ठेवणे, हे काम तिथल्या कारकुनांचे असते. मुलांना धार्मिक शिक्षण देण्याचे कामही चर्चमध्येच केले जाते. बहुतेक चर्चे ख्रिस्ती मुलांसाठी *प्राथमिक शाळा* चालवतात. संपन्न चर्चच्या द्वारा विद्यालये व महाविद्यालयेही चालविली जातात.

कॅथॉलिक लोकांना यात्रा करण्याची फार आवड असते. भारतातील अनेक ख्रिस्ती मंदिरे ही त्यांची तीर्थस्थाने बनली असून, दूरदूरचे हजारो ख्रिस्ती लोक निरनिराळ्या संतांच्या उत्सवप्रसंगी त्या त्या स्थळी दर्शनाला जातात. भारतात ख्रिस्तमाता मेरी हिची अनेक प्रसिद्ध मंदिरे आहेत. त्यातले तंजाऊर जिल्ह्यातील वैलंकन्नीचे चर्च अतिविख्यात आहे. कारण तिथे वास्तव्य केल्याने असाध्य रोग बरे होतात, अशी ख्रिस्तीजनांची श्रद्धा आहे. केवळ ख्रिस्तीच नव्हेत; तर भाविक हिंदु व मुसलमानही नवस फेडण्यासाठी तिथे जाऊन दानधर्म करतात. [एन्सा. रि.; च. इ. इं.]



सेंट पॉल कॅथेड्रल – कलकत्ता



सेंट मेरीचे मंदिर – वैलंकन्नी

चर्चरी (१) एक प्राचीन नृत्य. सावित्री व्रताच्या वेळी ३२ तरुणी मिळून हे नृत्य करतात, असे कर्पूरमंजरी या नाटकात सांगितले आहे.

(२) एक मध्ययुगीन नृत्यगीत. हे उ. प्रदेशात वसंतोत्सवाच्या वेळी गायले जात असे. या गीताची लोकप्रियता लक्षात घेऊन जिनदत्तसूरी नावाच्या जैन कवीने त्याच्या धर्तीवर काही गीते रचली होती. कबीर आपल्या गीतात चाँचर शब्दाचा प्रयोग करतो, तो शब्द चर्चरीचाच अपभ्रंश असावा. कालिदास व श्रीहर्ष यांनीही चर्चरीचा उल्लेख केला आहे (विक्र. ४) चर्चरी हे नृत्यगीत शृंगारप्रधान असल्याने तत्कालीन लोकांना ते अत्यंत प्रिय होते. [हिं. सा. को.]

(३) कर्नाटक संगीतातल्या १०८ शास्त्रीय तालांपैकी एक ताल. [डि. सा. इं. म्यु. म्यु.]

चार्चिका एक देवी. उ. प्रदेशात ही छाछीदेवी या नावाने प्रसिद्ध आहे. लखनौ शहरात हिचे मंदिर आहे. बलुचिस्तानात समुद्रकिनाऱ्यापासून सुमारे २० मैलांवर अघोरा, हिंगुला किंवा हिंगोला नावाची एक नदी असून, जवळच हिंगुला नावाचा पर्वत आहे. चर्चिकेला या हिंगुला पर्वताची अधिष्ठात्री

देवता मानतात. हिची पूजा काशीमध्ये होत असल्याचाही उल्लेख मिळतो. परमार वंशातील नरवर्मदेव याच्या भिलसा येथील लेखात चर्चिकादेवीची स्तुती आहे. त्यावरून ती परमार वंशाची कुलदेवता असल्याचे कळते. तिच्यासाठी नरवर्मदेवाने मंदिर बांधल्याचा उल्लेखही त्या लेखात सापडतो. [प्रा. भा. लो. ध; का. ए. सां. अ.; वा पु. स्ट.]

चर्पटनाथ (इ. स. चे ११ वे शतक.) एक नाथसिद्ध. नवनाथ कथासारातील याचे चरित्र असे–

पार्वतीच्या लग्नप्रसंगी देव-दानव एकत्र जमले होते. त्या वेळी पार्वतीचे रूपसौंदर्य पाहून ब्रह्मदेव काममोहित झाला व त्याचे वीर्य स्खलन पावले. ब्रह्मदेवाला त्याबद्दल लज्जा उत्पन्न झाली. त्याने ते वीर्य पायाखाली दावले. त्यामुळे त्याचे दोन भाग झाले. एका भागापासून वालखिल्य ऋषी निर्माण झाले व दुसऱ्या भागातून पिप्पलायन नारायणाचा अवतार असलेला चर्पटनाथ जन्मला. सत्यश्रवा व त्याची पत्नी चंद्रा या ब्राह्मण-दंपतीने पुढे त्याचे पालनपोषण केले.

चर्पटनाथाला चारण जातीचा मानतात. श्री. राहुल सांकृत्यायन यांनी त्याला गोरखनाथाचा शिष्य मानले आहे. हजारीप्रसाद द्विवेदी मात्र त्याला गोरखनाथाचा उत्तरकालीन मानतात. तिबेटी परंपरेत हा मीनपाचा गुरू समजला जातो. मीनचेतसात यालाच कर्पटीनाथ असे म्हटले आहे.

चर्पटनाथ हा जोगी असूनही त्याने 'वेषाचा जोगी' होण्याचा निषेध केला आहे आणि 'आत्म्याचा जोगी' होण्यास सांगितले आहे. बाह्याचाराचे अवडंबर माजविणाऱ्या अन्य संप्रदायांची व्यर्थता दाखवताना तो म्हणतो—

इक सेति पटा, इक नीलि पटा ।
इक तिलक जनेऊ लंबि जटा ।।
इक फीए एक मोनी एक कानिफटा ।
जब आवैगी कालि घटा ।।

अर्थ – जेव्हा कालाचा मेघ मस्तकावर डवरून येईल, तेव्हा श्वेत वा नीलवस्त्र, लांब जटा, तिलक अथवा जानवे, कोणाचे भ्रमण, कोणाचे मौन, तसेच कोणाचे कानफाटेपण यांपैकी काहीही उपयोगी पडणार नाही.

परमेश्वरासंबंधी बोलताना तो म्हणतो–

चरपट कहे दुनियाका भेव । ये क्युं पाथर ये क्युं देव ।।
पूजि प भाठा सब जग नाठा । निज तत्त रेगा न्यारा ।।
जोति सरुपि संगही ठाडा । ताका भरम न बोरा ।।
मन नहीं मुंडा, मुंडे केस । केस मुंडा था केसा उपदे ।।
मूंडे नही मन मरद अभमान । बोले चरपट तत्वज्ञान ।।

अर्थ– चर्पट म्हणतो, हा दगड का आणि हा देव का ? दगडाची पूजा करता करता सारे जग थकून गेले, पण त्या परमेश्वराला कोणी समजू शकले नाही. ज्योतिस्वरूप परमेश्वर जवळ असूनही त्याचे रहस्य कोणी ओळखू शकत नाही. डोक्यावरील केस वरचेवर उगवतात, तर मग ते काढण्यात काय अर्थ आहे ? यासाठी आधी अहंकाराने भारलेल्या मनाचे मुंडन केले पाहिजे असे चर्पटाचे तत्त्वज्ञान आहे.

चर्पटनाथाच्या नावावर तीन ग्रंथ उपलब्ध आहेत–(१) चर्पटशतक (२) चर्पटसबदी व (३) चर्पटरसायन. त्यांपैकी पहिले दोन ग्रंथ पद्यमय असून, त्यांचे स्वरूप सारखेच आहे. चर्पटरसायन हा रसायन विद्येचा ग्रंथ असून, तो गद्यपद्यात्मक आहे. संस्कृत चर्पटपंजरी हीही याचीच रचना आहे, असे मानले जाते. [हिं. वि. को.; गो. च. प.; ना. सि. बा.; म. च. को.]

चर्म चामड्याचे संस्कृत नाव. चामड्यापासून बनणाऱ्या अनेक वस्तूंचे उल्लेख वेदकालापासून सापडतात. ऋग्वेदात पखालीचा उल्लेख आहे (१.८५.५). त्या काळी बैलाच्या चामड्यापासून धनुष्याची दोरी, लगाम, इ. वस्तू बनवीत. सोम गाळतेवेळी ज्या फलकावर तो ठेवून दगडाने दाबीत, त्या फलकावर बैलाचे चामडे अंथरीत (ऋ. १०. ९४. ९). ऋग्वेदकाली कातडे कमावण्याची कलाही ज्ञात होती. ते काम करणाऱ्याला चर्मन् म्हणत (ऋ. ८. ५. ३८). कातडी कमावण्याच्या कलेचा उल्लेख ऐतरेय ब्राह्मणातही आहे (५. ३२). पाणिनीच्या अष्टाध्यायीतही चामड्यांच्या कित्येक वस्तूंचा उल्लेख आढळतो. नध्री = नाड (३. २. १८२) व वस्त्र म्हणून उपयोजिले जाणारे चर्म (५. १. १५) यांचा उल्लेख पाणिनी करतो. पूर्णपणे चामड्याची बनलेली वस्तू या अर्थाने पाणिनी सार्वचर्मीण असा शब्द वापरतो. विहीरीतून पाणी काढण्याची मोट ही सार्वचर्मीण मानलेली आहे. मोट, नाड, कोश (तलवार वगैरेंचे म्यान), क्षदी (आवरण), पादत्राण, इ. वस्तूंचा उल्लेख पतंजली करतो (५. १. १५; ५. १. २). रथ चालवणारा सारथी ज्या भागात बसत असे, तो भाग चामड्याने मढविला जाई. अशा रथाला चार्मण म्हणत.

व्यवहारात चामडे ही विटाळाची वस्तू मानलेली आहे. चामड्याला सोवळ्याने शिवत नाहीत असे असले, तरी काही चामडी आपल्या संस्कृतीत पवित्र मानलेली आहेत. व्याघ्रचर्म व मृगचर्म ही अशा पवित्र चर्मांपैकी होत. ही दोन्ही चर्मे जपतपासाठी आसने म्हणून वापरतात. व्याघ्रचर्म व ओले गजचर्म शिव पांघरतो, असे सांगितले आहे. सूत्रकालात लग्न लागल्यानंतर वधूला बैलाच्या कातड्यावर बसवण्याची पद्धत होती.

पूर्वी उपनयनाच्या वेळी बटूला मृगचर्म पाघरायला देत असत. त्याऐवजी सांप्रत मुंजीत बटूच्या गळयात यज्ञोवीताच्या बरोबर मृगचर्माचा तुकडा बांधतात. यज्ञात दीक्षित यजमानाला मृगचर्म पांघरायला देतात.

चर्मकट्टूवाद्यनृत्य तिरुपतीच्या देवस्थानात होणारे एक नृत्य. प्रथम ढोलवाले व बारा सनईवाले समोरासमोर रांगेत उभे राहून वाजवायला सुरुवात करतात. मग सुमारे ५० ते ६० शुभ्रवेषधारी नर्तक सहा सहांच्या रांगा करून वादकांच्या मध्यभागी उभे राहतात. मग संथ लयीत त्यांचा पदन्यास सुरू होतो. लयीची दुप्पट तिप्पट करून नृत्यात रंग भरला जातो. विष्णूच्या दहा अवतारांचे वर्णन असलेले एक गीत या नृत्याच्या वेळी म्हटले जाते. हे गीत विविध रागांत आणि विविध तालांत म्हणतात. नर्तकाला या विविध राग–तालांची पूर्ण माहिती असावी लागते. हे नृत्य कुचिपुडी संप्रदायातले आहे. पाहा– कुचिपुडी नृत्य.

चर्मकार एक संकर जाती. धीवरापासून चांडालीच्या ठिकाणी उत्पन्न झालेल्या संततीला चर्मकार म्हणावे, असे पराशर पद्धतीत सांगितले आहे. पाहा– चांभार.

चर्मण्वती एक मोठी नदी. मध्य प्रदेशातील महूजवळच्या पारियात्र (जानापाव) या डोंगरातून हिचा उगम होतो. ही माळवा व राजस्थान यांतून वाहत येऊन इटावा शहरापासून २५ मैलांवर यमुनेला मिळते. यमुनेला मिळेपर्यंतचा हिचा प्रवासमार्ग ६५० मैलांचा आहे. हिला चर्मण्वती असे नाव मिळाले, त्यामागची कथा अशी–

रंतिदेव नावाचा एक राजा होता. त्याने या नदीच्या काठी इतके अगणित यज्ञ केले, की त्यात हनन झालेल्या पशूंच्या चर्मांचे डोंगर उभे झाले.

> चर्मणां पर्वतो जातो विन्ध्याचलसमः पुनः ।
> मेघाम्बुप्लावनाज्जाता नदी चर्मण्वती शुभा ।।
> (दे भा. १.१८.५८)

अर्थ– (रंतिदेवाच्या यज्ञांमुळे) विंध्याचलाएवढा चर्मांचा पर्वत निर्माण झाला. पुढे त्यावर पाऊस पडल्यानंतर त्यातून जो रक्ताचा प्रवाह सुरू झाला, त्याचीच चर्मण्वती नदी बनली.

प्राचीन इतिहास– लाखो वर्षांपूर्वी पामीरचे पठार आणि विंध्यपर्वत यांच्यामध्ये महासागर पसरलेला होता. त्याच्या उत्तरेला अंगार महाद्वीप आणि दक्षिणेला गोंडवन महाद्वीप हे भूभाग होते. भूगर्भशास्त्रज्ञ त्या काळाला वरुणयुग म्हणतात. तेव्हा विंध्यपर्वतावर उगम पावलेली चर्मण्वती नदी त्या महासागराला मिळत होती. हिमालय पर्वत सागरातून वर आल्यानंतरही काही काळ विंध्यपर्वताच्या उत्तरेस समुद्र होता व हिमालयात उगम पावलेल्या नद्या त्या समुद्राला मिळत होत्या. यावरून असे म्हणता येते, की चर्मण्वती ही उत्तर भारतातील सर्वांत प्राचीन नदी होय. पण त्या काळी तिचे नाव काय होते, ते मात्र कळत नाही. शोणभद्र नदीही त्या काळी होती. कालांतराने विंध्याचलाच्या उत्तरेकडील समुद्र कोरडा झाला व तिथे उ. भारताचा भूभाग निर्माण झाला. मग चर्मण्वती नदी त्या प्रदेशातून वाहत जाऊन यमुनेला मिळाली.

चर्मण्वतीच्या खोऱ्यात एक आर्यपूर्व संस्कृती नांदत होती. त्या प्रदेशातील उत्खननात प्राचीन संस्कृतीचे जे अवशेष सापडले आहेत, ते सिंधुसंस्कृतीच्या अवशेषांशी मिळते-जुळते आहेत. ही संस्कृती असुर किंवा भारशिव द्रविड या लोकांची होती.

महाभारतकाळी दक्षिण पांचालावर द्रुपदाचे राज्य होते व ते चर्मण्वती नदीपर्यंत पसरले होते (म. भा. वन. ८२). चर्मण्वतीवर पितरांचे श्राद्ध करावे, असे सांगितले आहे.

सांप्रत हिला चंबळ म्हणतात. हिच्यावर राजस्थानात चौरासी गढ या किल्ल्याजवळ धरण बांधले आहे. या धरणामुळे निर्माण झालेला गांधीसागर आजवरच्या मानवनिर्मित जलाशयांत मोठा आहे. [म. भा. इ.; सु. वि. को.; जयचंद्र]

चर्या अमरकोशात या शब्दाचा अर्थ 'पथे स्थितिः'= मार्गावर राहणे, नियमांचा परित्याग न करणे, असा सांगितला आहे. महायानी बौद्धांच्या साधनेत या शब्दाला ए विशेष अर्थ प्राप्त झाला आहे तो असा–

महायानी लोकांच्या धर्ममार्गात बोधिचित्त उत्पन्न करण्यासाठी सहा पारमितांची साधना करावी लागते. या सम प्रणालीला ते चर्या असे म्हणतात. जो साधक चर्यासंपन्न होतो त्याला अनुत्तर संबोधी प्राप्त होते. मग तो पुरुष लोक आणि लोकरक्षक होतो. महायानी लोकांच्या दीक्षा, अभिषे मंडल, आवेश, इ. गोष्टी चर्येच्या अंतर्गत येतात. पाहा– बोधिचित्त. [हिं. सा. को.]

चर्यागीते सहजिया बौद्ध सिद्धांनी आपल्या संप्रदाया उपदेश करण्यासाठी किंवा त्याचे तत्त्वज्ञान सां ण्यासाठी जी छोटी छोटी गीते रचली आहेत, त्यांना चर्या असे म्हणतात. ही गीते पयार (पादाकुलक) छंदात असून, आठ ते सोळा ओळींची असतात. जुन्या हस्तलिखितात प्र गीताच्या वर त्याचा रागही सांगितलेला असतो. श्री. हरप्र

शास्त्री यांनी चर्यागीतांच्या अशा १८ रागांचा निर्देश केला आहे. चर्यागीतांचे दोन नमुने असे—

राग भैरवी

काअ णावड़ि खण्टि मण केडुआल ।
सद्‌गुरू वअणे धर पतवाल ॥ ध्रु. ॥
चीँअ थिर करि धुहुरे नाही ।
अन उपाये पार ण जाई ॥ ध्रु ॥
नौवाही नौका टागुअ गुणे ।
मेलि मेल सहजें जाउ ण आणें ॥ ध्रु ॥
वाट अभअ खाण्टबि वलआ ।
भव उलोळें षअबि बोलिआ ॥ ध्रु ॥
कुल लइ खरें सोन्ते उजाअ ।
सरह भणइ गणें पमाएँ ॥ ध्रु ॥

राग देशाख

नगर बारिहिरें डोम्बि तोहोरि कुड़िया,
छइछोइ याइ सो बाह्म नाड़िआ ॥ ध्रु. ॥
आलो डोम्बि तोए सम करिबे म साङ्ग,
निघिण काण्ह कापालि जोइ लाग ॥ ध्रु. ॥
एकसो पदमा चौषटी पाखुड़ी,
तहिँ चड़ि नाचअ डोम्बी बापुड़ी ॥ ध्रु. ॥
हालो डोम्बि तो पुछमि सदभावे,
अइससि जासि डोम्बि काहरि नावँ ॥ ध्रु. ॥
तान्ति विकणअ डोम्बी अवर ना चङ्गता,
तोहोर अन्तरे छाड़िनड़ एट्टा ॥ ध्रु. ॥
तु लो डोम्बी हाउँ कपाली,
तोहोर अन्तरे मोए घलिलि होड़ेरि माली ॥ ध्रु. ॥
सरवर भञ्जीअ डोम्बी खाअ मोलाण,
मारमि डोम्बी लेमि पराण ॥ ध्रु. ॥

सहजसंप्रदायी बौद्धांना, विशेषतः बंगाली बौद्धांना, परम तत्त्वाच्या प्राप्तीसाठी कठोर तप, इंद्रियनिग्रह, यम-नियम या गोष्टींची आवश्यकता मान्य नव्हती. धर्माचार, संस्कार, इ. गोष्टींचा ते तिरस्कार करीत. मन व इंद्रिये यांना त्यांच्या स्वाभाविक प्रवृत्तीनुसार मोकळे सोडणे व त्यांच्या वैषयिक आकांक्षा तृप्त करणे, हाच सहजमार्ग असून, याने अनायास परमतत्त्वाची प्राप्ती होते, असा त्यांचा दावा होता. हेच त्यांचे तत्त्वज्ञान त्यांच्या चर्यागीतातून प्रकट झाले आहे.

बोधिचित्ताचा उत्पाद हे सहजिया बौद्धांचे साध्य होते. बोधिचित्त म्हणजे चित्ताची जाग्रत् अवस्था होय. तिच्या प्राप्तीसाठी त्यांनी मुक्त लैंगिक व्यवहाराचा स्वीकार केला. स्त्री-पुरुषांच्या मद्य-मैथुनादी व्यवहारांना पूर्ण स्वातंत्र्य दिले. यम-नियमांची सोंगें-ढोंगे टाकायला लावून माणसाला सहज-स्वाभाविक जीवनाच्या मार्गावर आणले पाहिजे, असे त्यांचे मत होते. पण या मताचा प्रचार ते उघडपणे करू शकत नव्हते. तसे त्यानी केले असते, तर त्यांना समाजाचा प्रखर विरोध झाला असता. त्यांचे अस्तित्वच धोक्यात आले असते. म्हणून त्यांनी जुन्या मार्गांनी आपल्या तत्त्वांचा प्रचार सुरू केला. त्यासाठी त्यांनी जी गीते रचली, तीही कूटात्मक भाषेत रचली. या त्यांच्या कूट भाषेला संधाभाषा असे नाव आहे. गीतांचा वाच्यार्थ वेगळा आणि त्याच्या खाली लपवलेला गूढार्थ वेगळा असे त्यांचे स्वरूप आहे.

बंगालच्याच नव्हे; तर त्याच्या शेजारच्याही प्रांतातील धार्मिक साहित्यावर आशय आणि स्वरूप अशा दोन्ही दृष्टींनी या चर्यागीतांची छाप पडली आहे. बंगालचे वैष्णव साहित्य व बाउल साहित्य, तसेच उ. प्रदेशातल्या सूफी संतकवींचे काव्य, यांवर चर्यागीतांचा परिणाम विशेषच दिसून येतो. या चर्यागीतांतल्या कित्येक मार्मिक पंक्ती आज म्हणींच्या स्वरूपात बंगाली लोकांच्या तोंडी बसल्या आहेत.

चर्यागीतांची रचना इ. स. च्या १० ते १२ या शतकांच्या मधली आहे. या कालाला बंगाली साहित्याच्या इतिहास–लेखकांनी हिंदू-बौद्धकाल असे म्हटले आहे. या काळातले एकमात्र प्रामाणिक साहित्य चर्यागीते हेच होय. चर्यागीतांतून तत्कालीन हिंदू व बौद्ध या दोन संस्कृतींचा मेळ कसा जमला होता, ते कळून येते. बंगालचा भूगोल, तिथल्या सामाजिक रूढी, धार्मिक क्रियाकलाप, लोकांच्या आशाआकांक्षा, इ. गोष्टींचे दर्शन या चर्यागीतांच्या द्वारे होते. [भारतीय वाङमय; सं. ना. अ.; हिं. सा. को.; पु. त. नि.]

चलणी जैन साध्वीने कटिबंधाखाली वापरावयाचे वस्त्र. हे वस्त्र एकसंध असून, त्याला कुठेही शिवण असता कामा नये, असा नियम आहे. या वस्त्राने घोटचापर्यंतचा भाग झाकला जातो. [हि. जै. मो.]

चलनबत्ती आसाम प्रदेशातील काही जातींत गांधर्वपद्धतीने लग्ने होतात. त्या वेळी नवरा मुलगा प्रथम नवरीला जो नजराणा पाठवतो, त्याला चलनबत्ती असे म्हणतात. त्यानंतर नवरा-नवरी एकमेकांना माळा घालतात. या लग्नात समंत्रक असा कोणताच विधी नसतो. [ल. वि. सो.]

चलॉलिंगे शिवाची चलॉलिंगे पुढीलप्रमाणे आहेत—(१) पार्थिवलिंग– काही शिवोपासक रोज वाळूचे किंवा

मातीचे लिंग तयार करून त्याची पूजा करतात व पूजा झाल्यावर ते विसर्जित करतात. याला क्षणिकलिंग असेही म्हणतात. (२) चलपाषाणलिंग वा बाणलिंग– हे लिंग देव्हाऱ्यात ठेवतात. (३) वीरशैवांचे लिंग– प्राचीन पाशुपत व अर्वाचीन वीरशैव लोक हे लिंग गळ्यात किंवा दंडावर धारण करतात. (४) तांत्रिक पूजेतले लिंग– तंत्रमार्गी लोक योनि-लिंगाच्या आकृती किंवा यंत्रे पूजतात. फल– दीर्घायुष्य व सौभाग्य यांचीं प्राप्ती.

चर्लिंगांचे मृण्मय, लोहज (धातुनिर्मित), रत्नज, दारुज (काष्ठनिर्मित), शैलज व क्षणिक असेही सहा प्रकार सांगितलेले आहेत. [शिवलिंगोपासना]

चलालम्म द. भारतातील एक क्षुद्र देवता. ताक– दूध विघडवणे किंवा ते चांगले ठेवणे, या गोष्टी हिच्या हाती असतात. [व्हि. गाँ. सा. इं.]

चवरी एक राजत्वनिदर्शक किंवा अधिकारनिदर्शक वस्तू. चमर नामक मृगाच्या शेपटीच्या केसापासून चवरी बनवतात. याक नावाच्या, रानबैलाच्या शेपटीच्या केसांचीही चवरी बनवली जाते. चवरीची मूठ सोने, चांदी किंवा हस्तिदंत यांची असते. छत्र आणि चामर (चवरी) ही पुरातन कालापासून भारतीय राजांची मानचिन्हे मानलेली आहेत. 'चामरं श्रीकरं दिव्यं राज्यशोभाकरं परम्' = चामर हे लक्ष्मीप्रद, दिव्य व श्रेष्ठ असे राज्याला शोभा देणारे साधन होय, असे त्याच्याबद्दल म्हटले आहे. केवळ भारतातलेच नव्हेत, तर आशिया खंडातील बहुतेक राजे छत्र – चामरे धारण करीत. कालिदासाने रघुराजाचा जन्मप्रसंग वर्णन करताना दिलीपाच्या छत्र–चामरांचा उल्लेख केला आहे (रघु. ३.१६). देवाची किंवा एखाद्या श्रेष्ठ पुरुषाची पालखी निघते, तेव्हा त्यांच्यावर चवऱ्या वारल्या जातात. चवरी वापरण्याचा अधिकार फक्त राजांना असे, म्हणून बौद्ध भिक्षूंनी चवरी वापरू नये, अशी बुद्धाची आज्ञा होती (विनयग्रंथ भा. ३). [क. स. सा.; हिं. ध.]



चामरधारिणी

चवाठा चार रस्ते एकत्र येतात, त्या जागेला चवाठा असे म्हणतात. प्राचीन व मध्ययुगीन ग्रामजीवनात चवाठ्याला सांस्कृतिक महत्त्व होते. चवाठ्याचे हे महत्त्व जागतिक आहे. पाश्चात्य देशात आत्महत्या केलेल्या व देहान्त शिक्षा दिलेल्या माणसांना चवाठ्यावर पुरण्यात येत असे. ट्यूटन लोक गुन्हेगारांना चवाठ्यावरच सुळी देत. भारतात भूतबाधा व दुष्टबाधा दूर करण्यासाठी केलेले उतारे चवाठ्यावर नेऊन टाकतात. भुते गाडायची तीही चवाठ्यावरच गाडतात.

गुजरातेत भरवाड लोकांच्या विवाहसमारंभात हिजड्यांकडून कणकेचे चार पिंड चवाठ्यावर टाकले जातात. गुजरातेतच बलिप्रतिपदेच्या दिवशी घर झाडून तो केरकचरा चवाठ्यावर टाकतात. एखाद्या गावात देवीची साथ आली, तर देवी आलेल्या माणसाच्या खपल्या चवाठ्यावर नेऊन टाकतात. तसे केल्याने देवी रस्त्यावरून जाणाऱ्या माणसाबरोबर दुसऱ्या गावात जातात, असा समज आहे. कित्येक ठिकाणी शिमग्यात चवाठ्यावर होळी पेटवण्याची चाल आहे. याज्ञिक कृत्यासाठी सात ठिकाणची पवित्र माती आणण्यास सांगितले आहे, त्यात चवाठ्यावरच्या मातीचाही निर्देश आहे. चवाठ्यावरून पुढे जाताना प्रदक्षिणिक म्हणजे त्याला उजवे ठेवून डाव्या अंगाने जावे, असे मनू म्हणतो (४.३९). [क. स. सा.; डि. सि.]

चविट्टू केरळातील एक नृत्यनाट्य. हे मुख्यत्वे वीररसप्रधान असते. प्राचीन केरळच्या लढाऊ वृत्तीशी याचा घनिष्ट संबंध आहे. चविट्टू याचा अर्थ पदन्यास असा आहे. विविध तालांना अनुसरून या नृत्यात अठरा प्रकारचे पदन्यास असतात. या नृत्यनाट्यात नर्तकांचा रंगभूमीवर प्रवेश, त्यांचे हालणे, चालणे, इ. सर्व क्रिया तालबद्ध असतात. जेव्हा रंगभूमीवरचा सेनापती किंवा नायक गाऊ लागतो, तेव्हा अन्य पात्रे उभी राहून विशिष्ट तालमेलात पदन्यास करतात. ही कला आत्मसात करणे कष्टसाध्य असते.

चविट्टूतला अभिनय आणि पुष्कळसे पदविन्यास हे कथकळीशी मिळते–जुळते आहेत. पण या दोन नृत्यांतला मुख्य भेद हा, की कथकळीतील पात्र मूकपणे अभिनय करतात, तर चविट्टूतली पात्रे गाऊन अभिनय करतात.

चविट्टू नाट्यांचा अभ्यास कलरीमध्ये चालतो. कलरी ही केरळातील एक युद्धकलेचे शिक्षण देणारी संस्था आहे. म्हणूनच चविट्टू नृत्यनाट्याच्या उत्तररंगात एखादे युद्धनृत्य हमखास असते. या नृत्याचे नेपथ्य सुंदर व आकर्षक असते. पात्रांच्या वेषभूषेवर पाश्चात्य वेषभूषेची छाप असते. यातला मुकुट, कवच, उष्णीष, मोजे, इ. वीरवेष रोमन पद्धतीचा असतो.

केरळात चविट्टू नाटकांचा प्रारंभ इ. स. च्या १६ व्या शतकात झाला. पोर्तुगीजांच्या बरोबरच ही कला केरळात आली, असे म्हणतात. कारल्समान हे चविट्टूचे पहिले आख्यान होय. हे सुमारे चारशे वर्षांइतके जुने आहे. तमिळमिश्रित मलयाळम्‌मध्ये ते लिहिलेले आहे. याचे पाच भाग आहेत. हे आख्यान नाटच-रूपाने रंगभूमीवर सादर करायचे, तर त्याला पंधरा दिवस लागतात व लहानमोठ्या शंभर पात्रांची त्या कामी जरूरी असते. हे आख्यान भारतीय नसून विदेशीय आहे. त्याचा कर्ता कोणीतरी चेचुताचम् (येशूदास) असल्याचे कळते. भाव आणि कला या दोन्ही दृष्टींनी हे आख्यान श्रेष्ठ आहे. चविट्टूचा प्रसार कोंडगल्लूर, कोच्चिन, इ. समुद्रकिनाऱ्यावरच्या शहरातल्या ख्रिस्ती लोकांत विशेष आहे.

चविट्टू नाटचाचे साहित्य अद्यापि ग्रंथरूपाने उपलब्ध नाही. ऐतिहासिक व वायबलाशी संबंधित अशा काही चविट्टू आख्यानांच्या हस्तलिखित प्रती उपलब्ध होतात. जुन्या चविट्टूत बदलत्या कालमानाप्रमाणे अनेक परिवर्तने झाली आहेत. सांप्रत त्यांचे प्रयोग आधुनिक नाटकांच्या धर्तीवर होऊ लागल्यामुळे त्यांच्या मूळ रचनेत आणि चालू प्रयोगात जमीन–अस्मानाचे अंतर पडले आहे.

चविट्टूचे अध्ययन-अध्यापन भारतीय गुरुकुलपद्धतीप्रमाणे चालते. प्रारंभी एक दिवा पाजळून त्याच्या समोर क्रॉस आणि अष्ट मांगल्यांची थाळी भरून ठेवतात. मग सारा शिष्यवर्ग गुरुचरणांना प्रणाम करून चविट्टूचे पाठ घेऊ लागतो. हे गुरुवंदन प्रत्येक दिवशी होत असते. चविट्टूचे शिक्षण विद्यार्थ्यांना विनाशुल्क दिले जाते. विद्यार्थी ज्या दिवशी पहिल्या प्रथम रंगभूमीवर प्रवेश करतो, त्या दिवशी रंगभूमीवरच प्रेक्षकांच्या समोर तो आपल्या गुरूला यथाशक्ति दक्षिणा देतो.

अशा प्रकारे या नाटचात पौर्वात्य आणि पाश्चात्य अशा दोन्ही संस्कृतींचा समन्वय झालेला आहे.

सांप्रत मात्र चविट्टूची परिस्थिती शोचनीयच आहे. ती कला दिवसेदिवस ऱ्हास पावत आहे. [कु. सर्बाना मनक्किल – युगप्रभात, १ फेब्रु. १९५९]

चषक मद्याच्या पानपात्राला चषक असे नाव आहे. 'चषकोऽस्त्री पानपात्रम्' (अमर). युक्तिकल्पतरूत चषक कोणासाठी, कोणत्या वस्तूचा बनवावा, ते सांगितले आहे. सोने, रुपे, स्फटिक व काच यांचा चषक राजे लोकांसाठी करावा. तो पिणाऱ्याच्या मुठी इतका उंच आणि सहा, आठ किंवा दहा कोनांचा असावा. त्याला विविध रंगांची रत्ने जडवलेली असावी. मातीचा किंवा फळाचा चषक सर्वसामान्य लोकांसाठी उपयुक्त मानतात.

मूर्तिकलेत चषक हे एक उपकरण आहे. ते मुख्यत्वे देवीच्या हातात असते. त्या त्या देवतेच्या स्वभावधर्माप्रमाणे चषकात अमृत, मद्य किंवा रक्त असते. [श. क.; इं. बु. इ.]

चषाल यज्ञयूपाच्या माथ्यावर बसवलेले वीतभर लांबीचे लाकडी टोपण. हे खोलगट असते. चषाल हा गव्हाच्या पिठापासून तयार करतात, असाही उल्लेख शतपथ ब्राह्मणात आलेला आहे (५. २. १. ६). पाहा– यूप. [ऋ. द.; वे. इं.]

चस एक जात. हे लोक ओडिसात आढळतात. हे मूळ आदिवासींपैकी असावे. गोत व वर्ग असे यांचे दोन भाग आहेत. गोतांपेक्षा वर्गांची संख्या अधिक आहे. एकाच वर्गातील स्त्री-पुरुषांचे परस्परांशी लग्न होत नाही. गोतांची नावे देवकांवरून पडलेली असून, वर्गांची नावे प्रदेशांवरून पडली आहेत. उदा० बच्चा (वासरू), नाग, हस्ती, हरिण, महुमाच्छी (मधमाशी), दीप, पिटमुंडिया, हुलवुल, सिंगिया, गिरिंगिया, दुमनिया, इत्यादी.

विवाहप्रथा – मुलीचे लग्न वयात येण्यापूर्वी झाले पाहिजे, असा त्यांच्यांत दंडक आहे. नवरा लवकर न मिळाल्यास तिचे लग्न प्रथम फुलाबरोबर, बाणावरोबर किंवा जातीतल्या एखाद्या पुरुषाबरोबर लावतात. योग्य वर सापडताच त्याच्याशी तिचा पुनर्विवाह करतात.

देवधर्म – हे ग्रामसिरी नावाच्या देवाला भजतात. सणाच्या दिवशी शेतीच्या अवजारांना पशुबळी देतात. धार्मिक समारंभासाठी ब्राह्मण पुरोहिताला बोलावतात.

यांना काळ्या वस्तूंचा तिटकारा असतो. हे पादत्राणे वापरीत नाहीत व घोड्यावरही बसत नाहीत. मासे खातात; पण गाईचे, डुकराचे किंवा कोंवडीचे मास खात नाहीत. यांच्यांत अविवाहित मृतांना पुरतात व विवाहित मृतांना जाळतात. [ट्रा. का. सें. प्रॉ. इं.]

चळपतदार मुसलमान भिक्षेकऱ्यांचा एक पंथ. हे लोक मटक्ये फकीर असतात. सय्यद अहमद कबीर नावाच्या एका साधुपुरुषाच्या चाळीस चेल्यांनी स्वतःचे प्रत्येकी चाळीस चेले निर्माण केले आणि त्यांतून हा पंथ वाढला. खेडेगावातले अडाणी लोक यांच्या नादी लागतात व पिशाचादी बाधांवर त्यांच्याकडून उपचार करून घेतात. हे लोक पिवळसर रंगाचे कपडे वापरतात व डफ वाजवून गाणी गातात. [मु. इं.]

चक्षुर्व्रत चैत्र शु. द्वितीयेस अश्विनीकुमारांची पूजा करणे व त्या दिवशी दही आणि तूप खाऊन राहणे, असा याचा विधी आहे. व्रतावधी एक वर्ष किंवा बारा वर्षे. फल– डोळयांचे आरोग्य व राज्य यांचा लाभ. [हि. ध.]

चांग भारताच्या ईशान्य प्रदेशातील एक जमात. या जमातीत चाँगफो, शार, उंग, इ. पाच गोत्रे असून, त्यांचे एकमेकांत विवाहसंबंध होतात. ही सर्व गोत्रे समान दर्जाची असली, तरी चाँगफो गोत्राचे लोक स्वत:ला इतर गोत्रांहून श्रेष्ठ समजतात. उंगगोत्रीय लोक सर्व चांग गोत्रांचे पौरोहित्य करतात. पण हे काम त्यांच्यांत कमी दर्जाचे मानले जाते. एखाद्याने नवीन खेडे वसविले, तर तो त्या खेड्याचा राजा बनतो. त्या राजाबरोबर उंग गोत्रातील एका माणसाला त्या खेडेगावात राहायला जावे लागते.

चांग माणूस सामान्यपणे लालसर काळा असतो. त्याचे नाक सरळ व डोळे बारीक असतात. त्याचा बांधा सुदृढ व कंबर बारीक असते. पोटऱ्या लहान असतात.

चांगांची घरे बांबू व लाकडी खांब यांची असतात. ती सामान्यत: एकाच पद्धतीची असतात. त्यांच्यांतल्या श्रीमंतांना व लढवय्या लोकांना आपल्या घराला नक्षीचे खांब वापरण्याची परवानगी असते. त्यांच्या घरात बसण्यासाठी ओटे केलेले असतात.

शेती हा त्यांचा व्यवसाय आहे. हे भात आणि कडधान्ये मुठीने पेरतात. भाला, कोयता, धनुष्य व ढाल ही त्यांची हत्यारे असतात.

मृतकप्रथा – चांग लोक मृतांना पुरतात किंवा मचाणावर नुसते ठेवून देतात. प्रेताची विल्हेवाट कशी लावायची, हे मयताच्या कुटुंबातील माणसांच्या इच्छेवर अवलंबून असते. एखादी व्यक्ती वजनदार आणि कुटुंबियांना प्रिय असली, तर तिचे प्रेत घराच्या आवारातच पुरतात. वाईट रोगाने मेलेल्याचे प्रेत गावाबाहेर दूर नेऊन झाडाच्या फांद्यांवर मचाण बांधून त्यावर ठेवतात. मचाणावर ठेवलेली प्रेते एका वर्षानंतर खाली आणतात. नंतर त्यांची हाडे काळजीपूर्वक पुरतात. प्रेताची कवटी मडक्यात घालून एखाद्या गुप्त ठिकाणी पुरतात. श्रीमंतांची आणि योद्धयांची प्रेते आरास केलेल्या शवपेटीत घालून पुरतात. गरिबांची प्रेते वस्त्रात गुंडाळून पुरतात. प्रेताच्या खड्डयावर एक लहानसा आडोसा उभारतात व तो वर्षभर ठेवतात.

चांग लोकांचा स्वर्ग पाताळात असतो. मृत मनुष्याचा आत्मा मोठा कष्टप्रद प्रवास करून स्वर्गात जातो, तिथे त्याला नवजीवन प्राप्त होते व त्यामुळे तो पुनश्च पृथ्वीवर परतत नाही, अशी त्यांची समजूत आहे. [से. इं. १९३१]

चांगदेव एक योगी पुरुष. पाहा – चांगा वटेश्वर.

चांगदेवराऊळ (इ. स. चे १२ वे शतक) एक योगी. याचा जन्म महाराष्ट्रात फलटण या गावी झाला. तिथे जनकनायक नावाचा एक कऱ्हाडा ब्राह्मण राहत होता. जनकाइसा हे त्याच्या बायकोचे नाव होते. बरेच दिवस जनकाइसेच्या उदरी पुत्रसंतान न निपजल्यामुळे जनकनायकाने दुसरे लग्न केले. पण त्या दुसऱ्या बायकोलाही मुलगा झाला नाही. जनकाइसेचे माहेर चाकण इथे होते. तिच्या माहेरच्या लोकांनी तिला मुलगा व्हावा, म्हणून चक्रपाणीला नवस केला व जनकनायकानेही पुत्रप्राप्तीसाठी चांगदेवाला नवस केला. हा चांगदेव कोण त्याचा उलगडा होत नाही. त्यानंतर काही दिवसांनी जनकाइसेला मुलगा झाला. ती चांगदेवाची कृपा असे समजून बापाने त्या मुलाचे नाव चांगदेव ठेवले. जनकाइसेच्या माहेरचे लोक मात्र त्याला चक्रपाणी असे म्हणू लागले.

वयात आल्यावर चांगदेवाचे कमळबहना उर्फ कमळाइसा हिच्याशी लग्न झाले. लग्नानंतर थोड्याच दिवसांत चांगदेवाचे आईवडील वारले. जनकनायकाच्या वर्षश्राद्धाच्या रात्री कमळाइसेने त्याला संभोगसुखासाठी आग्रह केला. चांगदेवाने ती गोष्ट त्या दिवशी निषिद्ध असल्याचे सांगून तिची समजूत घालण्याचा प्रयत्न केला. पण ती ऐकेना. त्यामुळे त्याला वैराग्य प्राप्त झाले. पुढे एकदा एकादशीच्या दिवशीही कमळाइसेने चांगदेवाला त्याच गोष्टीचा आग्रह केला आणि त्याला तिची कामना पूर्ण करावी लागली. पण त्यामुळे त्याचे वैराग्य अधिकच तीव्र झाले. काही दिवसांनी तो माहूरच्या यात्रेला गेला. तिथल्या मेरुवाळा तलावात स्नान करून दत्तदर्शनास निघाला असता वाटेत त्याला दत्तात्रेयाने व्याघ्ररूपात दर्शन दिले. त्यावेळी चांगदेवाने दत्तापासून उभयशक्तींचा स्वीकार केला. त्यातील परशक्ती त्याने आच्छादली व अवरशक्ती प्रगट केली. म्हणून महानुभाव परंपरेत चांगदेवाला अवर दृश्यावतारी असे म्हणतात.

माहूरला बरेच दिवस राहिल्यानंतर चांगदेव तिथून द्वारकेला गेला. तिथे गोमती नदीच्या तीरावरील एका गुंफेत त्याने मुक्काम ठेवला. उजव्या हातात खराटा व डाव्या हातात सूप घेऊन तो रोज द्वारकेतले रस्ते झाडून काढी. त्याच्या दर्शनाला येणाऱ्या लोकांच्या डोक्यावर तो सूप किंवा खराटा मारीत असे. त्यामुळे त्या लोकांना देवतांच्या विद्या प्राप्त होत असत.

अशा बाव्वन्न पुरुषांना त्याने विद्यादान केले, असे सांगतात. गुंडम राऊळ ऊर्फ गोविंद प्रभू व उधळीनाथ हे त्याचे प्रमुख शिष्य होते.

चांगदेवराऊळ बरेच दिवस द्वारकेत राहूनच जीवोद्धरणाचे कार्य करीत होता. म्हणूनच त्याला द्वारावतीचा चांगदेव असे नाव पडले. फलटण सोडल्यापासून त्याने ब्रह्मचर्य स्वीकारले होते. तो स्वतःला परमेश्वरावतार मानीत असल्यामुळे त्याचे वर्तन रूढ धार्मिक नियमांच्या बाहेरचे होते. 'शूद्राचा घरी आरोगणा करीति : तैसेचि अंत्येजाचा घरी क्रीडा करीति :' असा त्याचा सर्वत्र बोभाटा झाला होता. त्याच्या अंगी योगसामर्थ्यही होते. त्याचा उपयोग त्याने एका प्रसंगी कसा केला, ती कथा अशी —

काउरळी या गावची कामाख्या नावाची एक हठयोगिनी एकदा चांगदेवावर आसक्त झाली. चांगदेव तिला दाद देईना व तीही तिथून हालेना. ती चांगदेवाच्या गुंफेपाशी सात दिवस धरणे धरून बसली. चांगदेवाला तिचे हे करणे असह्य झाले. त्याने तिच्यापासून स्वतःची सुटका करून घेण्यासाठी देहत्याग करून आपला अवतार संपवला आणि त्याच वेळी भरवस (भडोच) येथे स्मशानात आणलेल्या हरिपाळदेवाच्या मृत शरीरात प्रवेश केला. महानुभाव पंथाचा संस्थापक चक्रधर हा चांगदेवाचाच अवतार होता असे समजतात. पाहा—चक्रधर. [गो. च. प.; श्री चक्रधर चरित्र]

चांगा मुधेश (इ. स. च्या १६ व्या शतकाचा पूर्वार्ध) एक सिद्धपुरुष. नारायणडोह इथे मुधोपंत कुलकर्णी नामक यजुर्वेदी ब्राह्मण राहत होता. त्याच्या पत्नीचे नाव रुक्मिणी होते. मुधोजीपंताकडे त्या गावचे कुळकर्णपण होते. या ब्राह्मण जोडप्यास पुत्र नव्हता, म्हणून त्याने चांगदेवाची आराधना सुरू केली. पुढे चांगदेवाच्या कृपेने त्यांना पुत्र झाला. त्यांनी त्या पुत्राचे नाव चांगदेव असेच ठेवले. वयाच्या पाचव्या वर्षी चांगदेवाची मुंज झाली. नंतर थोड्याच कालात चांगदेवाने चार वेद, सहा शास्त्रे, चौदा विद्या यांचे अध्ययन केले. यथाकाळी त्याचे लग्न झाले. पुढे थोड्याच कालात त्याचे वडील मरण पावले व त्याच्या आईने सहगमन केले. मग पितृऋणातून मुक्त होण्यासाठी चांगदेवाने गयेला जाऊन मुधोपंतांचे वर्षश्राद्ध केले. नंतर आपले कुळकर्णपणही सोडून तो मुक्त झाला.

चांगदेव गयेहून निघाला तो थेट पंढरपुरी गेला. तिथे त्याने विठ्ठलाची आराधना सुरू केली. विठ्ठलाने त्याच्यावर अनुग्रह केला व पूजेसाठी त्याला एक मूर्ती दिली. ती मूर्ती घेऊन चांगदेव नारायणडोहास आला व नंतर तिथून नगर जिल्ह्यातील पुणतांबे या गावी जाऊन तिथेच कायम राहिला.

त्याने अनेक चमत्कार केले, असे सांगतात. त्यांतला एक चमत्कार असा—

बिदरच्या बादशहाची राणी सर्पदंशाने मरण पावली. चांगदेवाला हे कळले, तेव्हा त्याने बादशहास सांगितले, की 'तू पंढरपूरचे विठ्ठलमंदिर बांधून दिलेस, तर तुझी पत्नी जिवंत होईल.' बादशहाने तसे मंदिर बांधून दिले व त्याची पत्नी जिवंत झाली. त्यानंतर थोड्याच कालात चांगदेवाने आपला देह ठेवला.

> चवदाशे वर्षांचे चरित्र हे केले ।
> शरीर गुप्त झाले वटेश्वरी ।।
> अयोनिसंभव पुन्हा जन्म ।
> ऐसे अनुसंधान पुढे असे ।।

(चांगदेवचरित्र ४. ४४–४५)

या उल्लेखावरून शामजी गोसाव्याने चांगा मुधेशाला चांगा वटेश्वराचाच अवतार मानले आहे, असे दिसते. त्याने तशी परंपराही दिली आहे. [म. च. को.]

चांगा वटेश्वर (समाधिकाल इ. स. १३२५) एक महाराष्ट्रीय हठयोगी. खानदेशात एदलाबाद जवळ चांगदेव नावाच्या गावी याचा जन्म झाला. या गावाला पूर्वी सुंदरपूर म्हणत असत. सांप्रत तिथे चांगदेवाचे देऊळ आहे. गोदावरीतीरी पुणतांबे या गावी याची समाधी आहे.

काही जण वटेश्वराला चांगदेवाचा पहिला गुरू मानतात; तर काही जण वटेश्वर हे त्याचे उपास्य दैवत असल्याचे सांगतात. आपल्या तत्त्वसार या ग्रंथाच्या उपसंहारात चांगदेव म्हणतो—

> इति गुरुशिष्यसंवादे । तत्त्वसारप्रबंधे ।
> कथिलें वटेश्वरप्रसादें । योगरहस्य हें ।।

(तत्त्वसार ओ. ८६३–६४)

याशिवाय त्याने आपल्या अभंगांतही वटेश्वरसुत चांगा अवधूत अशी आपली मुद्रा वापरली आहे. यावरून वटेश्वर हा चांगदेवाचा गुरू ठरतो. नामदेवाने सोपानदेवाच्या नमनाचे अभंग लिहिताना वटेश्वराला स्वतंत्र नमन केले आहे. यावरूनही चांगदेव व वटेश्वर या दोन भिन्न व्यक्ती आहेत, हेच सूचित होते.

चांगदेव हा मोठा हठयोगी होता. एकदा ज्ञानेश्वरांची कीर्ती त्याच्या कानी आली. त्यावर ज्ञानेश्वरांना पत्र लिहावे, असे त्याला वाटले; पण मायन्याच्या जागी तीर्थरूप लिहावे की

चिरंजीव लिहावे, याचा त्याला निर्णय होईना. अखेर त्याने कोरेच पत्र पाठवून दिले. ते मुक्ताबाईच्या हाती आले. ती म्हणाली. 'चौदाशे वर्षे जगूनही चांगदेव अजून कोराच.' मग ज्ञानेश्वरांनी त्या कोऱ्या पत्राला उत्तर म्हणून पासष्ट ओव्या लिहून त्याला पाठवल्या. हाच ग्रंथ चांगदेवपासष्टी या नावाने प्रसिद्ध आहे.

पुढे चांगदेव वाघावर बसून व हाती सापाचा आसूड घेऊन ज्ञानेश्वरांना भेटण्यासाठी आळंदीस गेला. तिथे ज्ञानेश्वरांच्या आज्ञेप्रमाणे भिंत चालण्याचा चमत्कार त्याने पाहिला व तो हतगर्व होऊन ज्ञानेश्वरांना शरण गेला. मग ज्ञानेश्वरांनी त्याला मुक्ताबाईकडून उपदेश देवविला. इथून पुढे त्याचे ज्ञानी भक्तात रूपांतर झाले.

चांगदेवाचे अभंग पाहता त्याचा ओढा रूपके योजून चमत्कृती निर्माण करण्याकडे आहे, असे दिसते. शब्दकुसरीतही तो तरबेज आहे. उदा —

नोवरीचे पोटी नोवरा जन्मला ।
सोहळा जाहला काय सांगो ।
नोवऱ्यानें नोवरी देखिलीच नाही ।
सोहळा होतो सांगो काई ।

अशी अनेक चमत्कृतिपूर्ण कूटे चांगदेवाने रचली आहेत.

याशिवाय तत्त्वसार नावाचा एक ग्रंथ त्याच्या नावावर आहे. त्याच्या ओव्या १०३६ असल्याचे कळते; पण त्यांपैकी ४०५ च उपलब्ध आहेत. त्यांत प्रथम त्याने पद, पिंड, रूप व रूपातीत यांच्याविषयी विवरण करून, नंतर निर्गुण भक्तीचे विवरण केले आहे. निर्गुण भक्तीचे लक्षण सांगताना चांगदेव म्हणतो —

जे पाप पुण्यापूर्वी । जन्ममरणाते हारवी ।
महाबोधु चेववी । आत्मस्वरूपे ।।
जे दुसरेपणा हाणी । स्वर्ग संसारा धुणी ।
जे सविता निर्वाणी । स्वयं शिव ।।

निर्गुण भक्तीचे स्वरूप सांगताना मनपवन, षट्चक्रे, कुंडलिनी, लयलक्षयोग, समाधी, पंचभूते, शून्य, वज्रासन, इ. हठयोगसाधनांची माहिती त्याने दिली आहे. या विवेचनातला विशेष म्हणजे पुढील विचार होय —

जन्हि शरीरसाधना कीजैल । परि नाशिवंत जाईल ।
वरी जन्माते सुचिल । दुःख मूळ ।।

पुढे निर्वाण व सिद्धयोग यांचे प्रतिपादन करून ब्रह्मविवरण करताना त्याने 'तत्त्वमसि'ची फोड केली आहे.

या ग्रंथाची रचना इ. स. १३१२ मध्ये हरिश्चंद्रगडावर (जि. नगर) झाली, असे कळते.

हा दर शंभर वर्षांनी योग सामर्थ्याने जुना देह टाकून नव देह धारण करीत असे, असे सांगतात. अशी याची चौदा समाधि-स्थळे व चौदा नावे आढळतात. चांगा वटेश्वर, चक्रपाणी ही त्यांपैकीच काही नावे आहेत. [म. सा.; म. वा. इ.; म. च. को.; चांगदेवपासष्टी; गो च. प.]

चांडकपूजा ओडिसामध्ये प्रचलित असलेला एक पूजाविधी. ही शिव-गौरींची पूजा असते. सर्व भक्त एक जमून एका तळ्याच्या काठी जातात. या तळ्यात एक खांब पुरलेला असतो. त्याला चांडकाचे झाड असे म्हणतात. तिथे गेल्यावर सर्व भक्त तारकेश्वरी असा मोठा गजर करून तो खांब बाहेर काढतात. नंतर तो जवळच्याच मैदानात पुरतात. तिथे भक्तगण नाना प्रकारची दिव्ये करतात. अंगात सुया खुपसून घेणे, काटयांवरून अगर विस्तवावरून चालणे, इ. प्रकार त्यांत असतात. शेवटी कोणाला तरी एकाला जखमी करून त्याच्या पोटाला दोरी बांधतात व तारकेश्वरीच्या नावाचा घो करून त्याला खांबाच्या वरच्या टोकावर चढवतात. या वेळी त्याला असह्य अशा वेदना होत असूनही तो निरनिराळ्या देवतांचा नामजप करीत शांत राहतो. इतर लोक त्या खांबा भोवती प्रदक्षिणा घालतात व अल्पावकाशाने त्याला खाली उतरवितात.

शिव-पार्वती प्रसन्न व्हावी, हा या पूजेमागचा हेतू असतो. बंगालमध्येही अशाच प्रकारचा एक विधी प्रचलित आहे. [ओ. फो.]

चांडाल एका हीन किंवा तुच्छ मानलेल्या जातीचे नाव. मुळात ही एक आदिवासी जमात असावी. वेदोत्तर कालात तिला संकर जाती मानले गेले. गौतम, वसिष्ठ, बौधायन, मनू, इ. धर्मशास्त्रकारांनी ब्राह्मण स्त्री व शूद्र पुरुष यांच्या संबंधातून झालेल्या संततीला चांडाल म्हटले आहे. अर्थात ही प्रतिलोम जाती ठरते. व्यासमते चांडाल तीन प्रकारचे असून, जन्मचांडाल, कर्मचांडाल व ग्रामचांडाल अशी त्यांची नावे आहेत. ब्राह्मण स्त्री व शूद्र पुरुष यांच्या संबंधातून निर्माण झालेली संतती, अविवाहित किंवा सगोत्र स्त्रीपासून झालेली संतती व संन्याशाने गृहस्थाश्रम स्वीकारल्यावर त्याला झालेली संतती हे जन्मचांडाल होत. नास्तिक, चहाडखोर, कृतघ्न, दीर्घ-द्वेषी, क्रियाहीन, अधार्मिक व निर्दय हे कर्मचांडाल होत. परीट, चांभार, नट, बुरुड, इ. १६ जाती या ग्रामचांडाल होत.

चांडालांची कामे, त्यांची राहणी, इ. गोष्टींविषयी मनूने जो आदेश दिला आहे (मनु. १०.५१–५६) तो असा—

चांडालांची घरे गावाबाहेर असावी. कुत्रे व गाढवे हे त्यांचे धन असावे. त्यांनी प्रेतावरची वस्त्रे वापरावी. लोखंडाचे दागिने घालावे. त्यांची भांडी इतरांनी वापरू नयेत. त्यांनी बेवारशी प्रेते वाहून न्यावी. राजाची आज्ञा झाल्यास अपराध्याला वधदंड देण्याचे काम करावे. वध्याची वस्त्रे, भूषणे, शय्या या वस्तू स्वतःसाठी घ्याव्या. रात्री गावात प्रवेश करू नये. सकाळी ग्रामसफाई करावी इत्यादी.

चांडालांचा स्पर्श झाला असता सचैल स्नान करावे लागते; पण विष्णुमंदिरात पूजेसाठी जात असता देवळाजवळ चांडालस्पर्श झाल्यास स्नानाची गरज नाही, असे आचारपद्धती या ग्रंथात सांगितले आहे. चांडालांना गावात प्रवेश करताना तशी वर्दी द्यावी लागे, असे फाहियान सांगतो. पूर्वी चांडालाची छाया अपवित्र मानीत नसत; पण मध्ययुगात तशी कल्पना रूढ झाली.

ऐतिहासिक विचार — बृहदारण्यकात म्हटले आहे, की आत्मज्ञानी पुरुष बापाला बाप, आईला आई, देवाला देव म्हणून ओळखत नाही, त्याचप्रमाणे चांडालाला चांडाल म्हणूनही ओळखत नाही. आत्मज्ञानाच्या त्या अत्युच्च अवस्थेत चांडालत्वही शिल्लक उरत नाही, असा त्याचा अर्थ होतो. यावरून सामान्य लोकांच्या व्यवहारात चांडाल हा दूर ठेवला जाणारा वर्ग असल्याचे सूचित होते. उपनिषत्कालात चांडाल, पुक्कस, इ. जाती तिरस्करणीय मानल्या जात होत्या; पण मध्ययुगातल्याप्रमाणे त्या अस्पृश्य व बहिष्कृत होत्या, असा स्पष्ट उल्लेख सांपडत नाही, असे म्हणून वि. रा. शिंदे पुढे लिहितात —

उपनिषदांच्या काळात आर्यांचे तीनच वर्ण होते आणि हल्लीचा जातिभेद नव्हता. हे वर्ण केवळ जन्मावरच अवलंबून नसून, कर्मावरून आणि ज्ञानावरूनही क्वचित घडत असत. या तीन वर्णांच्या बाहेरचा मोठा जो आर्येतर समाज, त्यातील काही जाती आर्यांच्या स्वाधीन होऊन त्यांची परिचर्या करून राहत. त्यांचा शूद्र नावाचा चौथा वर्ण पुढे बनवण्यात आला. या चौथ्या वर्णांत समाविष्ट न झालेल्या चांडाल, पौल्कस, इ. तिरस्करणीय जाती वर्णबाह्य अशाच राहत होत्या. यांनाच पुढे अप्रयतशूद्र अशी संज्ञा मिळून, पुढे बुद्धोदयकाली किंवा त्याच्या आगेमागे आपस्तंबसूत्राच्या काळी त्यांना हल्लीची अस्पृश्यता प्राप्त झाली असावी.

बौद्धकालीन समाजस्थितीचे ज्ञान होण्याच्या दृष्टीने जातककथा फार उपयुक्त ठरतात. जातकात चांडाल जातीचे उल्लेख बरेच आहेत. धर्मशास्त्रकर्त्यांना हीन जातीच्या लोकांबद्दल घृणा वाटत असे आणि त्यामुळे त्या जातींवर कडक निर्बंध काढून त्यांनी त्यांचे हीनत्व अधिक दृढ करण्याचा प्रयत्न केला. असे करण्यासाठी त्यांनी चांडालाचे स्वरूप शक्य तितके विकृत केले. धर्मशास्त्रातील चांडाल जातीचे विवेचन आणि जातकातील त्यांच्या विषयीचा सामाजिक व्यवहार यात फारसा फरक नाही. चांडालांचा निकृष्ट दर्जा व्यक्त करणारी जातकातली काही उदाहरणे अशी —

(१) एक ब्राह्मण परिव्राजक एकदा मुखप्रक्षालनासाठी नदीत उतरला असता एक दंतशोधनी (दात स्वच्छ करण्याची काडी) वाहत येऊन त्याच्या जटेत अडकली. ती अपवित्र वस्तू कुठून आली ते पाहण्यासाठी तो प्रवाहाच्या विरुद्ध दिशेने निघाला. थोडे वर गेल्यावर त्याला एक चांडाल दिसला. त्यानेच ती दंतशोधनी नदीत टाकल्याचे त्या ब्राह्मणाला कळले. त्यावर ब्राह्मण त्याला म्हणाला. 'अरे नीच चांडाला, तू आपल्या राहण्याचे ठिकाण इथून आणखी खालच्या ठिकाणी ने.'

(२) एका ब्राह्मण युवकाला वाराणसी नगरीत प्रवेश करताच एक चांडाल भेटला. त्याच्या अंगावरून येणारा वारा आपल्याला लागू नये म्हणून तो ब्राह्मण युवक त्याला म्हणाला. 'अरे नष्ट चांडाला, मजकडे वाहत येणाऱ्या वाऱ्याच्या झुळकीतून आधी दूर हो.'

(३) एक चांडाल वाराणसीला जायला निघाला होता. वाटेत त्याला एका श्रेष्ठीची तरुण कन्या दिसली. चांडाल तिच्या सौंदर्याने मोहित होऊन तिच्याकडे पाहत उभा राहिला. तरुणीने आपल्या सखीला विचारले, की 'हा कोण?' सखी म्हणाली, की 'हा चांडाल आहे.' त्यासरशी 'मी पाहू नये ते पाहिले' म्हणून त्या तरुणीने आपले डोळे सुगंधी पाण्याने धुतले. हा प्रकार होताच तरुणीच्या रखवालदाराने त्या चांडालाला लाथाबुक्क्यांनी मारले.

चांडाल ओळखावा कसा याचे वर्णन मातंगजातकात दिले आहे, ते असे — चांडाल तांबडे वस्त्र नेसतो, वर पट्टा बांधतो; त्याचे पांघरायचे वस्त्र धुळीने भरलेले असते. त्याच्या हातात मृत्तिकापात्र असते, इत्यादी.

बाह्य वेषाप्रमाणेच भाषाभिन्नत्वामुळेही चांडाल जाती ओळखता येत असे. आर्य लोकांपासून दूर व स्वतंत्र वास्तव्य करावे लागत असल्यामुळे आर्य भाषा बोलणाऱ्या लोकांशी संबंध येऊनही त्यांची स्वतःची मूळ भाषा नष्ट होऊ शकली नाही. याविषयी चित्तसंभूतजातकात कथा आहे, ती अशी —

दोन चांडाल ब्राह्मणवेष परिधान करून तक्षशिलेला गेले व तिथे अध्ययन करू लागले. पुढे एके दिवशी त्यांच्यापैकी एकाचा चेहरा दिव्याने भाजला. त्या वेदनेने तो व्याकुळ झाला आणि आपल्या वेषांतराचे भान न राहून चांडाल भाषेत आपल्या सोबत्याशी बोलू लागला.

चांडालाने स्पर्शिलेले अन्न किंवा चांडालाचे उच्छिष्ट अन्न

भक्षण करणाऱ्या ब्राह्मणाला जातकांच्या काळात जातिबहिष्कृत करण्यात येई, असे मातंगजातकावरून कळते.

सांप्रतही या जातीचे लोक भारताच्या पूर्व भागात पुष्कळ आहेत. ओडिसा व मद्रास या प्रदेशांत त्यांची गणना वर्गीकृत जमातीत केलेली आहे. पाहा– अस्पृश्यता. [हि. ध.; वे. इं.; भा. अ. प्र.; बु. भा. स.]

चांदखेडी एक जैन क्षेत्र. हे कोटा संस्थानातील खानपूर नामक प्राचीन नगरीजवळ आहे. इथे भूगर्भात खोदलेले एक अतिविशाल जैनमंदिर असून, त्यात मोठमोठ्या जिनमूर्ती आहेत. या सर्व मूर्तींची एकूण संख्या ५७७ आहे. मंदिराच्या एका दालनात अखंड दगडाचा, १० फूट उंच असा एक कीर्तिस्तंभ असून, त्याच्या चहूबाजूंवर दिगंबर जिनमूर्ती व शिलालेख कोरलेले आहेत. [जै. ध.]

चांदणी केदार हिंदुस्थानी संगीतातला एक राग. हा राग कल्याणथाटातून निघतो. या रागाच्या आरोहात ऋषभ व गांधार असत्प्राय आहेत. अवरोहात गांधार असल्याने याची जाती ओडव–षाडव आहे. वादी मध्यम व संवादी षड्ज आहे. यात तीव्र मध्यमाचा प्रयोग शुद्ध केदार रागापेक्षा जास्त होतो. कोमल निषाद स्वर अवरोहात धैवता-संगती केव्हा केव्हा घेण्यात येतो. या रागात हमीर मिसळलेला दिसतो. हा राग यावनिक व आधुनिक आहे. हा एक केदाराचा प्रकार आहे. रात्रीचा पहिला प्रहर हा या रागाचा गानसमय मानतात. [सु. वि. को.]

चादनगाव राजस्थानातले एक जैन क्षेत्र. हे अतिशयक्षेत्र म्हणून प्रसिद्ध आहे. इथे एक प्राचीन जैन मंदिर असून, त्यात अनेक उत्तुंग जिनमूर्ती आहेत. इथे काही शिलालेखही आहेत. [जैं. सि. भा. भाग ४, मार्च १९३८]

चांद बाधेल (इ. स. चे १६ वे शतक) एक महाराष्ट्रीय संत. याला चंद्रभट असेही म्हणत. नाथांचा चरित्रकार कृष्णदास जगदानंद याने चांद बोधल्याचे चंद्रशेखर हे पर्याय नाम दिले आहे (प्रतिष्ठान चरित्र १.२८). शेख महंमद नामक एका मुसलमान संताचा योगसंग्राम नावाचा एक ग्रंथ आहे. या ग्रंथात त्याने एकनाथांचे गुरू जनार्दनस्वामी यांची गुरुपरंपरा दिली आहे, ती अशी–

ॐ नमोजी सद्‌गुरु चांद बोधले । त्यांनी जानोपंता अंगिकारिलें ।
जानोबानें एका उपदेशिलें । दास्यत्वगुणें ।।

शेख महंमदाच्या परंपरेतील माहितीप्रमाणे चांद बोधले हा शेख महंमदाच्या पित्याचा शिष्य होता. शेख महंमदाचा पिता राजे महंमद कादरी हा सूफींच्या एका उपपंथातला होता. या सूफी संबंधामुळे चांद बोधल्याचे सांप्रदायिक नाव सैयद चांदसाहेब कादरी असे दिलेले आढळते. एकनाथ महाराजांना दत्तात्रेयाने मलंगवेषात भेट दिली, अशी कथा आहे. या कथेचे रहस्य ही परंपरा पाहता सहजपणे उलगडते. यावरून जनार्दनस्वामींचा गुरू दत्तात्रेय नसून चांद बोधले आहे, हे निश्चित होते. पुण्याच्या गंगनाथ मठपरंपरेतही जनार्दनस्वामींच्या गुरूचे नाव चांद बोधले असेच सांगितलेले आहे.

चांद बोधले हा गृहस्थ असून विरक्तपणे वागणारा होता, असे महीपती सांगतो (भक्तलीलामृत १४. २५–२९).

नासिक-त्र्यंबकेश्वराजवळील चांदगिरी हे याच्या वास्तव्याचे ठिकाण आहे, असे एकनाथांनी आपल्या चतुःश्लोकी भागवता-वरील टीकेत म्हटले आहे—

गोदावरी उत्तरतिरी । चौ योजनीं चंद्रगिरी ॥
तो अति दीर्घ चंद्रगिरी । तळी चंद्रावती नगरी ॥

जनार्दनस्वामी अहमदनगरहून दौलताबादला राहाव गेल्यावर त्यांची व चांद बोधल्याची नित्य भेट होऊ लाग



चांद बोधले यांची समाधी– दौलताबाद

चांद बोधले मृत झाल्यावर जनार्दनस्वामींनी दौलता किल्ल्याच्या समोरच त्याची दरगेवजा समाधी बांधली.

धुळ्याच्या सत्कार्योत्तेजक सभेच्या संग्रहात चांद बोधल्या कविता म्हणून तीन अभंग आहेत. त्यातील पहिला कालियामर्दनप्रसंगी कृष्ण यमुनेच्या डोहात उडी घाल त्यावरचे रूपक आहे. त्याचा काही भाग असा—

डोहो अखंड सदोदित । निजसंतांचा एकांत । डोहो होऊनि खेळ
तेथे चांद बोधले जीवन्मुक्त । डोहो हो

यानंतरचे पुढील दोन अभंग सद्‌गुरुप्रसाद किंवा सद्‌गुरुमहिमा या संबंधीचे आहेत. [न. च. प.; योगसंग्राम; एकनाथांची गुरुपरंपरा – इंद्रायणी, जून १९६३]

चांद भाट चंदबरदाई पाहा.

चांदलो गुजरातेतील मेश्री वैश्य लोकांत प्रचलित असलेला एक लग्नविधी. लग्न ठरल्यावर वधू-वरांचे वडील एकमेकांना आणि वधू-वरांना काही दक्षिणा देतात आणि जमलेल्या लोकांना नारळ व पैसे वाटतात. [ल. वि. सो.]

चांदवड नासिक जिल्ह्यातील एक गाव. हे डोंगरात वसलेले असून, इथे रेणुका देवीचे प्राचीन स्थान आहे. रेणुकेच्या मंदिराजवळ रेणुकातीर्थ नामक तळे आहे. पर्वतावर कालिकेचे देऊळ असून, त्याच्या जवळ कालिकातीर्थ आहे.

यादवांचे चंद्रपूर हेच असावे. शेजारच्या डोंगरावर चंद्रेश्वराचे मंदिर आहे आणि जवळच एक किल्ला आहे. या गावात अहल्याबाई होळकर हिने बांधलेला एक अत्यंत प्रेक्षणीय रंगमहाल आहे.

क्षेत्रमाहात्म्यात याला चंद्रवट असे नाव दिलेले आहे. प्राचीन जैन साहित्यात या गावाला चंद्रादित्यपुरी म्हटले आहे. हे नगर यादववंशातील पन्नार राजाने इ. स. च्या ९ व्या किंवा १० व्या शतकात वसवले, असे म्हणतात. इथल्या डोंगरात जैन लेणी आहेत, त्यांतील तीन्ही बाजूंच्या भिंतींवर तीर्थंकरांच्या आणि इतर दैवतांच्या मूर्ती असून, भोव्रती सुंदर कोरीव काम दृष्टीस पडते. [म. प.; स. मा. प्र. व.; म. जि. ना.; खं. वै.]

चाद्रमास चंद्र एकदा दिसू लागल्यापासून पुनश्च एका रात्री पूर्ण दिसेनासा होईपर्यंत सुमारे ३० दिवस जातात व तेवढ्या कालास चांद्रमास म्हणतात. गौण व मुख्य असे याचे दोन भेद आहेत. कृष्णप्रतिपदेपासून सुरू होऊन पौर्णिमेस संपणारा तो गौण व शुक्लप्रतिपदेपासून सुरू होऊन अमावास्येस संपणारा तो मुख्य होय. पहिला नर्मदेच्या उत्तरेस व दुसरा नर्मदेच्या दक्षिणेस प्रचलित आहे.

जगात सर्वप्रथम चांद्रमासच प्रचारात आला. इतर मास हे मागाहूनचे आहेत. अष्टकादी श्राद्धे, वारुणीस्नान, जन्मतिथिकृत्य, तिथ्युपवास, दुर्गापूजादी उत्सव या गोष्टी गौण मासाला धरून करतात व वार्षिक श्राद्ध, चांद्रायणादी व्रते, दाने, गृहादिप्रतिष्ठा ही तिथ्युक्त कर्मे मुख्य चांद्रमास धरून करतात. चैत्रादी फाल्गुनान्त मासनामे नक्षत्रावरून पडलेली आहेत. पौर्णिमेस जे नक्षत्र असेल, त्यावरून त्या मासाचे नाव ठरते. उदा० चित्रा नक्षत्रावरून चैत्र, विशाखेवरून वैशाख इत्यादी. पाहा– सौरमास. [श. क.; जा. मा.]

चांद्ररामायण या रामायणात ७५००० श्लोक असल्याचे कळते. रैवत मन्वंतराच्या बत्तिसाव्या त्रेतायुगात हा ग्रंथ रचला गेला, असे सांगतात. हनुमान व चंद्र यांच्या संवादातून हा ग्रंथ विस्तारला आहे. [हिंदुत्व]

चांद्रवर्ष चैत्र शुक्ल प्रतिपदेपासून फाल्गुन अमावास्या अखेरपर्यंतच्या काळाला चांद्रवर्ष म्हणतात. दोन चांद्रपक्षांचा एक चांद्रमास होतो व बारा महिन्यांचे एक चांद्रवर्ष होते. सूर्यसिद्धांताप्रमाणे एका चांद्रवर्षात ३५४ दिवस २२ घटिका १ पळ व २४ विपळे असतात. पाहा– सौरवर्ष.

चांद्रव्रत एक काम्यव्रत. मार्ग० शु. प्रतिपदेस मूळ नक्षत्र असेल त्या दिवशी याचा आरंभ करतात. यात चंद्राच्या मूर्तीची पूजा करायची असते. पूजेच्या वेळी त्याच्या निरनिराळ्या अवयवांवर नक्षत्रांचा न्यास करतात. फल – आरोग्य व चंद्रलोक यांची प्राप्ती. [हि. ध.]

चांद्रसेनीय कायस्थ प्रभू महाराष्ट्रातील एक प्रमुख जात. अयोध्या हे सगळ्या कायस्थांचे मूलस्थान मानले जाते. हैहय वंशातील सहस्रार्जुनाचा एक वंशज चंद्रसेन हा अयोध्येत राज्य करीत होता. त्याचे वंशज ते चांद्रसेनीय कायस्थ होत. यांच्याविषयी स्कंद पुराणात एक आख्यायिका आहे, ती अशी–

परशुरामाने हैहयांशी अनेक संग्राम केले. त्यांपैकी एका संग्रामात चंद्रसेन राजा मारला गेला. तेव्हा त्याची गर्भवती राणी आश्रयार्थ दाल्भ्य ऋषीच्या आश्रमात गेली. दाल्भ्य ऋषीच्या विनंतीवरून परशुरामाने चंद्रसेनाच्या भावी पुत्राला जीवदान दिले; पण अशी अट घातली, की त्या मुलाने क्षत्रियवृत्ती चालवू नये. पुढे चंद्रसेनाच्या पत्नीला जो मुलगा झाला तो त्याच आश्रमात वाढला आणि लेखनवृत्तीने आपली उपजीविका करू लागला. त्या राजपुत्राच्या वंशजांना पुढे चांद्रसेनीय कायस्थ हे नाव मिळाले.

पण वरील कथा व नावाची व्युत्पत्ती असंभवनीय वाटते. प्रबोधनकार ठाकरे यांच्या मते चांद्रसेनीय हा शब्द अपभ्रंशाने प्रचारात आला आहे. या ज्ञातीचे आद्य पूर्वज काश्मीरातील चिनाब (चंद्रा) नदीच्या खोऱ्यातून काय देशात म्हणजे

अयोध्या प्रांतात जाऊन वसले. तिथे ते चांद्रश्रेणीय या नावाने प्रसिद्ध होते. काय देशात दीर्घ काळ वास्तव्य झाल्यामुळे त्यांना कायस्थ ही उपाधी साहजिकच प्राप्त झाली. कालांतराने त्यांचे चांद्रसेनीय कायस्थ असे नाव रूढ झाले.

इतिहास–सनपूर्व ४ थ्या शतकात नंद राजांच्या जुलुमामुळे कायस्थांनी अयोध्या प्रांत सोडला व ते माळवा, गुजरात, खानदेश, इ. प्रदेशांत जाऊन वसले. इ. स. च्या १० व्या शतकात माळवा व गुजरात या भागांतील कायस्थ समुद्रमार्गाने कोकणात येऊन तिथे स्थायिक झाले, असे म्हणतात. त्या वेळी कोकणात शिलाहारांचे राज्य होते. त्यांनी अनेक चांद्रसेनीय कायस्थांना मुलकी अधिकारपदे दिल्याचे दाखले आहेत. जमीन महसुलाचा हिशेब, पडीक भागातील वसाहती, दस्तऐवजांची नोंद, इ. कामावर देखरेख करण्याचे काम त्यांच्याकडे असे.

ही कामे करणाऱ्या कायस्थांनाच पुढे देशमुख हे उपनाव मिळाले. या ज्ञातीतील काही पुरुषांनी त्या काळात उच्च अधिकारपदे मिळवली होती व त्यांच्या हाती बरीच राजकीय सत्ताही आली होती. शिलाहार राजांच्या अनेक शिलालेखांत वेलजी प्रभू, अनंतराय प्रभू, लक्ष्मण प्रभू, इ. नावे आढळतात; ती चांद्रसेनीय कायस्थ प्रभूंचीच आहेत. चांद्रसेनीय कायस्थांचे काही समूह पुढे कर्नाटकात गेले व तिथे त्यांनी वसाहतीही केल्या. त्यांच्या काही कुळात गोर्डलिंग, मार्डलिंग ही दैवते पूजिली जातात, ती त्यांच्या कर्नाटकीय वास्तव्याची सूचक आहेत. विजयनगरच्या साम्राज्यात या ज्ञातीच्या अनेक पुरुषांनी पराक्रम केले. मल्लारी किंवा खंडेराव हे महाराजा वीरबुक्क याचे दैवत होते. तेच पुढे चांद्रसेनीय कायस्थांनी आपलेही कुलदैवत मानले, असे दिसते.

इ. स. १३०५ मध्ये मुसलमानांनी माळव्यातील मांडवगड किल्ला जिंकल्यामुळे तिथले आणखी बरेच कायस्थ लोक खंबायतवरून समुद्रमार्गे कोकणात आले. काही मंडळी सातपुड्याच्या डोंगरातून खाली उतरून व नर्मदा नदी पार करून मावळात आली. राजस्थानातूनही काही कुटुंबे त्याच वेळी महाराष्ट्रात आली, असे दिसते. चितोडगडावरील जयस्तंभावर श्रीपत प्रभू हे नाव कोरलेले आहे; तो श्रीपत प्रभू सातारच्या चिटणिसांचा पूर्वज असल्याचे सांगतात.

कोकणप्रदेश बहामनी राजांच्या ताब्यात गेल्यानंतर त्यांनी तेथील देशमुख व देशपांडे या घराण्यांकडेच त्या भागाचा कारभार पूर्ववत चालू ठेवला. खुद्द बहामनी राज्यातही या ज्ञातीचे लोक मोठमोठ्या अधिकारपदांवर चढले. मुरारबाजी, बाजी प्रभू देशपांडे, प्रयागजी अनंत फणसे यांचे पूर्वज बेदर, विजापूर, इ. मुसलमानी दरबारांत उमराव होते. दुर्गादेवीच्या दुष्काळानंतर महाराष्ट्राच्या काही भागात पुन्हा वसाह स्थापून तिथल्या जमिनी लागवडीस आणण्याची कामगि कोकणातील देशमुख व देशपांडे या मंडळींनी केली.

पुढे शिवाजी महाराजांनी जेव्हा स्वराज्यस्थापनेचे का आरंभले, तेव्हा दादाजी नरसू देशपांडे, बाजी प्रभू देशपां मुरारबाजी नाडकर, विश्वासराव नानाजी दिघे, बाळा आवजी, दादाजी रघुनाथ, खंडो बल्लाळ चिटणीस, कृष्णा दादाजी, विश्वनाथ आबाजी, निळकंठ येसाजी वगैरे पराक्र राजनिष्ठ व मुत्सद्दी पुरुष या ज्ञातीतूनच त्यांना मिळा पेशव्यांच्या दरबारातही गोविंद खंडेराव, सखाराम हरी गु नीळकंठ रामचंद्र वगैरे कर्तबगार मंडळी अधिकारपदाव होती. इ. स. च्या १८ व्या शतकाच्या उत्तरार्धात या ज्ञातीती बरेच लोक बडोदे, नागपूर, धार, इ. भागांत गेले व ति त्यांपैकी पुष्कळजण उच्चपदाला चढले. कृष्णाजी अनंत स सद व मल्हार रामराव हे चांद्रसेनीय कायस्थच होते. त्यां लिहून ठेवलेल्या माहितीवरूनच पुढच्या लोकांना शिवाजी म राजांचा सुसंगत इतिहास लिहिणे शक्य झाले.

व्यवसाय–पूर्वी कायस्थ हे लेखक, गणक व करवसुली क णारे अधिकारी म्हणून प्रसिद्ध होते. ते राजाच्या विश्वासात असत. शासनाच्या आठ प्रमुख अंगांत कायस्थांची ग केली जात असे. मध्ययुगात राज्यकारभार व रणांगण दोन्ही क्षेत्रांत कायस्थांनी भरीव कर्तबगारी दाखवली. रा प्रधान, रणदिवे, दळवी (दलपती), चौबळ (चतुर्बल), चित्रे, जयवंत, इ. त्यांच्या उपनावांवरून त्यांचे इतिहासा स्थान कळून येते.

हे लोक मूळपासूनच ‘असिजीवी, मसिजीवी’ म्ह शस्त्र व लेखणी यांच्यावर उपजीविका करणारे म्हणून प्र होते. त्यामुळे मध्ययुगातील राजकारणात त्यांना प्रभुत्व प्र व्हायला वेळ लागला नाही. शिलाहारांच्या राजवटीत प्र नावाचे अधिकारी असत. हा हुद्दा ब्राह्मण, कायस्थ, पाताणे सर्वांनाच मिळत असे. पण जेव्हा तो कायस्थांना मिळा तेव्हा त्यांच्या ऐश्वर्याची परिसीमा झाली. प्रभुपणाचा अ कार प्राप्त झालेले हे सर्व चांद्रसेनीय कायस्थ पुढे स्वतःला प्र म्हणवू लागले. कालांतराने ते त्यांचे ज्ञातिवाचक नावच ब

शिवकालात व पेशवाईत चांद्रसेनीय कायस्थांवर अ ग्रामण्ये उभारण्यात आली होती. ते शूद्र असून, त्यांना वे क्ताचा अधिकार नाही, असा आरोप त्यांच्यावर कर आला. पण काशीचा प्रसिद्ध पंडित गागाभट्ट याने आप कायस्थधर्मदीप या प्रबंधात कायस्थांचे क्षत्रियत्व निःसंदिग मान्य करून वरील ग्रामण्यांचे मूळच रद्दबातल करून टा

सांप्रत हे लोक शेती, सावकारी, व्यापार, कारकुनी, इ. व्यवसाय करतात.

देवधर्म – हे लोक देवींचे उपासक आहेत. कायस्थांच्या देवांत एकवीरा देवीचा टाक असतो. विंध्यवासिनी देवी ही अयोध्या प्रांतात वास्तव्य करणाऱ्या कायस्थांची कुलदेवता होती. महाराष्ट्रातील काही कायस्थ भागवत संप्रदायाचे अनुयायी आहेत. काही घराण्यात अन्नपूर्णा, भवानी, गणपती, खंडोबा, महादेव यांचीही उपासना चालते.

विवाहप्रथा – यांच्यांत सगोत्र विवाह करीत नाहीत. मामेबहिणीशी लग्न होते. लग्नात वाङ्‌निश्चय, तेलवण, उष्टी हळद, गौरीहरपूजा, मधुपर्क, कन्यादान व सप्तपदी हे सर्व विधी असतात. मंगलाष्टकांच्या वेळी वधू-वरांच्या मस्तकांवर दोन तलवारी आडव्या धरतात.

प्रसूतिप्रथा – यांच्यात मूल जन्मल्यावर त्याला कोऱ्या सुपात ठेवून, नाळ कापण्यापूर्वी त्याचे औक्षण करतात. ६ व्या दिवशी सटवाईची पूजा करतात. त्या वेळी मुलाचा बाप सोवळे नेसून पाटा पुजतो. त्या प्रसंगी बकऱ्याचे मांस शिजवून जातीतल्या लोकांना ते प्रसाद म्हणून वाटतात. सुईणीला सटवी मानून तिला प्रथम जेऊ घालतात. ब्राह्मणाला शिधा व दक्षिणा देतात. दारावर व घरात जिवतीची चित्रे काढून त्यांना गूळ, तूप व पिवळे फडके लावतात.

बारशाच्या दिवशी बाळंतीण स्नान करून बाळासह अंगणात जाते व सहाणेवर रक्तचंदनाचा सूर्य काढून त्याची पूजा करते. सूर्याला बाळ दाखवून त्याच्यावर अक्षता टाकते व प्रार्थना करते, की 'बाळ तेजस्वी होऊ दे.' त्या दिवशी जिवतीपूजनही करतात. १५ व्या दिवशी बाळंतीण ग्रामदेवतेचे दर्शन घेते. हे क्षत्रिय असल्यामुळे त्रैवर्णिकांप्रमाणेच यांचे सर्व संस्कार होतात.

सणसमारंभ – यांचे बहुतेक सर्व सण ब्राह्मणांच्याप्रमाणेच असतात. गौरी, नवरात्र, रामनवमी हे सण विशेष थाटाने साजरे केले जातात. गौरी आणायच्या वेळी आंगण सारवून, रांगोळी घालून वर पाट ठेवतात व त्यावर सुपात तेरडा, आघाडा, दूर्वा या वनस्पती मांडतात. त्यांनाच गौरी समजतात. गौरींची पावले रांगोळीने काढतात. रात्री गौरींची पूजा बांधतात. त्यासाठी वर उल्लेखिलेली रोपे एकत्र बांधून तांब्यात ठेवतात व त्यावर गौरीचा मुखवटा लावून त्यांना साडी नेसवतात. गौरींना कापडाचे हात लावतात. दुसऱ्या दिवशी गौरींसाठी पुरणपोळी, घावन, सोळा भाज्या, शेवयांची खीर या पदार्थांचा महानैवेद्य करतात. आणि सायंकाळी एखाद्या नदीत किंवा जलाशयात गौरींचे विसर्जन करतात.

नवरात्रात कुलदेवतेसाठी घटस्थापना करतात. नंदादीप लावतात. घटावर रोज एक माळ चढवतात. चौथ्या माळेपासून आठव्या माळेपर्यंत कोणत्याही दिवशी ५, ७ किंवा ९ कुमारिकांची अथवा सवाष्णींची पूजा करतात. त्यांचे पाय दूधपाण्याने धुवून, त्यांना हळदकुंकू, गुलालबुक्का व चंदनाची उटी लावतात आणि सुकामेवा, फळे व केशरी दूध देतात. साळीच्या लाह्यांनी त्यांची ओटी भरतात. मग त्यांची आरती करून त्यांच्या पाया पडतात. कायस्थ प्रभू हे शक्तीचे उपासक असल्यामुळे हा त्यांचा सर्वांत मोठा उत्सव असतो. देवीने महिषासुराला मारले, त्याचे स्मारक म्हणून अष्टमीच्या दिवशी देवीला बकऱ्याच्या मांसाचा नैवेद्य दाखवतात. हा त्यांचा कुलधर्म असतो. सांप्रत बकऱ्याऐवजी कोहळा कापण्याची चाल आली आहे.

मर्तिकप्रथा – हे लोक मृतांना जाळतात. सुवासिनी स्त्री मरण पावली, तर तिला हिरवे लुगडे नेसवून व सौभाग्यालंकार घालून तिची ओटी भरतात. मृत्युस्थानी जमीन सारवून १२ दिवस दिवा लावून ठेवतात. सर्वजण स्नान केल्यावर दिव्याला नमस्कार करून मग अन्नग्रहण करतात. [म. ज्ञा. को.; मुं. इ. जा.; ल. वि. सो.; श्री. मा. द्वा. कारखानीस व श्री. प्र. ल. सासवडकर–कायस्थ प्रभु समाचार, ऑगस्ट १९६३; श्रीमती पद्मावती खारकर; श्री. प्रबोधनकार ठाकरे]

चांद्रायण

एक व्रत. याच्या दोन व्युत्पत्ती दिल्या आहेत, त्या अशा– (१) 'चान्द्रस्य चन्द्रलोकस्य अयनं प्राप्तिर्यस्मात्' = ज्याच्या योगाने चंद्रलोकाची प्राप्ती होते ते. (२) 'चन्द्रः अमृतानन्दमयपुरुषः अयनं आश्रयः अधिष्टातृदेवो यस्य' = अमृतमय आणि आनंदमय पुरुष असा चंद्र ज्याचा आश्रय किंवा अधिष्ठाता आहे, असे व्रत (श. क.).

चंद्राच्या वृद्धि-क्षयाप्रमाणे ज्या व्रतात अन्न वाढविले व कमी केले जाते, त्याला चांद्रायण असे नाव आहे. यवमध्य व पिपीलकामध्य असे याचे दोन मुख्य भेद आहेत.

यवमध्य – शुक्ल प्रतिपदेपासून पौर्णिमेपर्यंत रोज कोंबडीच्या अंड्याएवढा एकेक घास वाढवीत जाणे, म्हणजे प्रतिपदेला एक घास, द्वितीयेला दोन अशा प्रकारे घास वाढवीत पौर्णिमेला पंधरा आणि कृष्ण प्रतिपदेपासून रोज एकेक घास कमी करीत अमावास्येला उपास करणे.

पिपीलिकामध्य – कृष्ण पक्षातील प्रतिपदेला आरंभ करून अमावास्येपर्यंत एकेक घास वाढवीत नेणे व शुद्ध प्रतिपदेपासून एकेक घास कमी करीत पौर्णिमेला उपवास करणे.

याशिवाय यतिचांद्रायण व शिशुचांद्रायण असेही याचे

उपभेद आहेत. यात रोज आठ घास खाण्याची सवलत असते.

चांद्रायण हे प्रायश्चित्त म्हणूनही आचरतात. कांदा, लसूण, इ. निषिद्ध पदार्थ खाणे, सगोत्र स्त्रीशी समागम करणे, मामाच्या किंवा आतेच्या मुलीशी लग्न करणे, इ. पातकांच्या क्षालनासाठी हे प्रायश्चित्त म्हणून सांगितले आहे. प्रायश्चित्त कर्तव्य असता प्रथम क्षौर व आदल्या दिवशी उपवास करायचा असतो. त्याशिवाय अर्घ्यप्रदान, घृताचे हवन, अन्नाची शुद्धी व चंद्राची पूजा असेही विधी यात असतात. जे अन्न घ्यायचे, ते एकाच प्रकारचे घेतात. 'ॐ नमः स्वाहा' या मंत्राने ते ग्रहण करतात.

महापातकांच्या क्षालनासाठी चांद्रायण कर्तव्य असते, तेव्हा त्याच्या जोडीला कृच्छ्र प्रायश्चित्त करावे, असे सांगितले आहे. हे व्रत एक वर्षभर केले असता मृत्यूनंतर चंद्रलोकाची प्राप्ती होते, असे मनू सांगतो (११. २२१). कृच्छ्र व्रतात जे नियम पाळायच असतात, तेच चांद्रायण व्रताचेही नियम आहेत. चंद्रायण व्रतात क्षौर मात्र वैकल्पिक आहे. [हि. घ.]

चांभार कातड्याचे काम करणारी व पादत्राणे बनवणारी एक जात. या लोकांना मोची, चमार, चमगार व समगार अशीही नावे आहेत. हे मूळचे बिहार व उ. प्रदेश या भागातले. पण सांप्रत त्यांची वस्ती सर्व भारतभर आहे. चर्मकार या संस्कृत शब्दापासून चमार, चांभार हे शब्द आले आहेत. वैदिक वाङ्मयात चर्मकारांचे व चामड्याचे उल्लेख आहेत. वैदिक काळी त्यांना चर्मम्न किंवा चर्मम्ल असे म्हणत. मनूने चामड्याचे काम करणाऱ्याला कारवार असे नाव दिले असून, निषाद पुरुष व वैदेही स्त्री यांच्यापासून त्याची उत्पत्ती मानली आहे. काहीजण चांभार हे चांडाल स्त्री व कोळी पुरुष यांची संतती असे समजतात.

चांभारांच्या उत्पत्तीविषयी काही आख्यायिका आहेत, त्यांपैकी एक अशी –

एका ब्राह्मण कुटुंबात चार भाऊ होते. ते शेती करून राहत. एक दिवस त्यांची एक गाय मरून पडली; पण तिला उचलायलाच कोणी मिळेना. तेव्हा मोठ्या तिघा भावांनी धाकट्या भावाला सांगितले की, 'तू त्या गाईला रानात नेऊन टाक आणि मग अंघोळ कर; म्हणजे आम्ही तुला परत आमच्यांत घेऊ.' धाकट्या भावाने त्याप्रमाणे केले; पण तो परत आल्यावर मोठ्या भावांनी त्याला आपल्यात घ्यायचे नाकारून म्हटले. 'यापुढे तू चांभाराचे काम कर आणि त्या बदल्यात आम्ही तुझा सांभाळ करू.' त्याचे वंशज तेच चांभार होत.

वैदिक आणि बुद्धपूर्व कालात चर्मकाराचा धंदा हलका मानला जात नसे. वाजसनेयी संहितेत पुरुषमेधप्रकरणात म्हणजे चर्मकार हा योग्य बळी म्हणून सांगितला आहे.



जटिया चांभार

चांभारात असंख्य पोटजाती असून त्यांपैकी जटिया, जैस्वार, घारिया, चौधरिया, बुंदेला, चामर, दोहर, कुरिल, कोरी किंवा कोली, अहिरबार, घुसिया किंवा झुसिया, इ. प्रमुख होत. अहिरवार मुलीला जोड्यावर कलाबतूचे करता आल्याशिवाय तिचे लग्न होत नाही. जैस्वार हे द्वाराचा व्यवसाय करतात व फक्त डोक्यावरून ओझे नेतात. लोक कातडी कमावतात व त्यापासून चपला, जोडे, वगैरे बनवतात. काही शेतमजुरीही करतात. छत्तीसगड त्याच्या आसपासच्या प्रदेशातील चांभारांनी स्वत:ला वस्था प्राप्त करून घेतली आहे. मध्य प्रदेशातील चांभार चामड्याला स्पर्शही करीत नाहीत, हे विशेष ते शेती करतात. चांभारस्त्रिया काही ठिकाणी काम करतात. इतर भागांतील चांभार मात्र हीन उरले आहेत.

विवाहप्रथा – सर्वसाधारणपणे चांभार आपल्या लग्न करतात. सतनामी चांभार हे दुसऱ्या चांभारांशी

संबंध करीत नाहीत. पण सुरजवंशी, गहरवार, राठोड, हे दुसऱ्या पोटजातींशीही विवाहसंबंध करतात. यांच्यांत गोत्रे आणि देवके असून, एकाच गोत्रात किंवा देवकात लग्ने होत नाहीत. कन्याशुल्क म्हणून वीस, तीस किंवा काही वेळा शंभर रुपये दिले जातात. यांच्यांत एकापेक्षा अधिक बायका करण्याची चाल होती, त्याचप्रमाणे रखेल्या ठेवण्याचीही पद्धत होती. हे मुलामुलीचे लग्न अगदी लहान वयात ठरवतात व साधारण आठव्या वर्षी विवाहसमारंभ करतात. मुलगी वयात आल्यावर मग ती नवऱ्याच्या घरी नांदायला जाते. तोपर्यंत ती माहेरीच राहते.


जैस्वार चांभार

मुलगी पळवून आणून लग्न करण्याच्या विधीचे काही अवशेष यांच्यांत अजून दिसतात. उदा० नवरामुलगा घोड्यावर बसून येतो. त्याच्या हातात तलवार असते, वरातीत फक्त पुरुष असतात आणि ती वरात वधूच्या गावाबाहेर थांबते व वधूगृही दारात दोन्ही पक्षांची लुटुपुटीची लढाई होते, इत्यादी. लग्नमंडपात एक खांब उभारलेला असतो. त्याच्या भोवती सात फेरे घालणे, हा लग्नातील मुख्य विधी असतो. बिहारमध्ये मैथिली ब्राह्मण यांचे पौरोहित्य करतात. बंगालमध्ये मात्र ब्राह्मण त्यांच्या पौरोहित्याला जात नाहीत.

प्रसूतिप्रथा – मूल जन्माला आल्यावर स्त्रिया सोहरगीते गायला सुरवात करतात आणि सहा दिवस होईपर्यंत जवळजवळ अखंडितपणे ती गातात. मुलाला भुताखेतांची बाधा होऊ नये, म्हणून मूल जन्मल्यावर तवा वाजवून आवाज करतात. सहाव्या दिवशी किंवा नामकरणाच्या दिवशी सर्दी होऊ नये, म्हणून मुलाच्या पोटावर लोखंडी सळईने डाग देतात.

छत्तीसगडमधील चांभार सुडौल बांध्याचे व उजळ वर्णाचे असतात. कानडी जिल्ह्यातील चांभारस्त्रिया फार सुंदर असतात. पद्मिनी वर्गातील नायिका त्यांच्यांत सापडतात, असे रसेलने म्हटले आहे. मध्यप्रदेशातील चांभार स्त्रिया आणि द. भारतातील माडिगा व चक्कीलियन स्त्रिया पूर्वी शाक्त उपासनेत मुद्रा म्हणून स्वीकारल्या जात.

चांभारांची पंचायत असून जातीवर तिचा फार वचक असतो. पंचायतप्रमुखाला चौधरी, सरपंच, प्रधान, इ. नावे असून, तो तहहयात व वंशपरंपरेने पंचायतीचा प्रमुख असतो. जेव्हा तो नव्याने पंचायतीची सूत्रे हाती घेतो, तेव्हा त्याला पगडी घालण्याचा एक समारंभ करतात. त्या वेळी होम करतात व जेवणावळ घालतात. मग त्याला पांढरी पगडी, सव्वा रुपया व नारळ भेट देतात. या प्रसंगी जमलेले लोक खूप दारू पितात. जातीतील भांडणांचे व चोरी, व्यभिचार, जातीचे नियम मोडणे, यांसारख्या गुन्ह्यांचे निवाडे पंचायत करते.


चांभारांचा विवाहस्तंभ

सण-उत्सव – नागपंचमी, दिवाळी, होळी, इ. सण चांभार

पाळतात. *नागपंचमीच्या* दिवशी हे नागाची पूजा करतात व घरामोवती एक रेघ काढतात. ही रेघ ओलांडून नाग व साप घरात येणार नाहीत, अशी त्यांची समजूत असते. होळीच्या दिवसात ते अश्लील गीते गातात व स्वैरपणे वागतात. दिवाळीच्या दिवशी ते सर्व जुने दिवे टाकून नवे घेतात. या दिवशी रात्री कुटुंबातील मृतात्मे घरी येतात, अशी त्यांची समजूत आहे. त्यासाठी ते रात्रभर जागत बसतात. दुसऱ्या दिवशी सकाळी गृहिणी घरातला सगळा केरकचरा व जुने कपडे शेणाच्या ढिगावर नेऊन टाकते. यांच्यांत गोवर्धनदिवाळी नावाचा आणखी एक सण असतो. त्या दिवशी ते गोमयाची कृष्णप्रतिमा करून तिच्या भोवती गोमयाचेच छोटे ढीग पर्वत म्हणून उभे करतात. पर्वतावर झाडे म्हणून कापूस लावलेल्या गवताच्या काड्या लावतात आणि गुरे व गुराखी म्हणून शेणाच्या आकृती स्थापन करतात. या दिवशी गोपाळांना बोलावून त्यांची पूजा करतात व त्यांना जेवणही घालतात.

देवधर्म – या लोकांत भूतपूजा प्रचलित आहे. दगड-धोंडे, वृक्ष-वेली व पशु-पक्षी यांच्यांत भुतेखेते वास करतात अशा समजुतीने हे लोक त्यांची पूजा करतात व देवके म्हणूनही त्यांना पूज्य मानतात. वेताळ, चुडेल, गयाल, मसान, इ. भुतांचे *यांना विशेष भय* वाटते. काही चांभार सर्पपूजक असतात. मरी, *शितळा, मसनी, आग्वानी* या देवी रोगराई उत्पन्न करतात, म्हणून त्यांची पूजा करून त्यांना अनेक पदार्थ अर्पण केले जातात. याशिवाय चोरदेव, जिलैया, मरेली, जवली देवी, भूमिया, भैरव, गणपती, हनुमान, इ. दैवतांनाही हे लोक भजतात. त्यांची लहान देवळे गावात किंवा गावाच्या सीमेवर आढळतात. हेमराज, नट बाबा, पांच पीर, काळू वीर, गोरखनाथ, गूगा पीर, हर्दौल, इ. संतांना चांभार जातीत फार मान असतो. त्यांच्या समाध्या आता तीर्थक्षेत्रे बनली आहेत.



जवली देवीचे देऊळ

काही चांभार कबीरपंथाचे, काही नानक पंथाचे, तर काही सतनामी पंथाचे अनुयायी आहेत. याशिवाय ते अनेक साधू व



शिवनारायणी चांभार महंत

वैरागी यांना भजतात. काही शीख चांभारांना रामदास असे म्हणतात. काही लोक रामानुजाचा शिष्य रामानंद याचे अनुयायी आहेत. रैदास किंवा रविदास नामक रामानंदाचा एक चांभार पट्टशिष्य होता. अनेक चांभार याचे अनुयायी असून, ते स्वतःला रैदासी म्हणवतात. त्याचप्रमाणे काही चांभार दादूपंथी व शिवनारायणपंथीही आहेत. हिंदूंप्रमाणेच शीख, मुसलमान, जैन व बौद्ध धर्माचेही चांभार आहेत.

पूर्वी सतनामी चांभाराचे लग्न झाले, की तीन वर्षांच्या आत किंवा पहिल्या मुलाच्या जन्मानंतर सतलोक नामक एक समारंभ करीत. हा विधी केल्याशिवाय त्या दंपतीला सतनामी पंथाचे अनुयायित्व मिळत नसे. या सतलोक समारंभाचा विधी असा –

गावातील पुरुष या समारंभासाठी एक दिवस मुक्रर करतात. त्या दिवशी दीक्षार्थी पुरुषाच्या घरी मेजवानी होते आणि संध्याकाळपासून मध्यरात्रीपर्यंत नाचगाणे चालते. या

वेळी त्या माणसाची पत्नी एका खोलीत एकटीच पडून राहते. मध्यरात्री तिचा नवरा तिच्या खोलीत जातो आणि आपण कोणत्या माणसाला गुरू करावे, हे तिला विचारतो. मग ती एखाद्या पुरुषाचे नाव सांगते. नवरा मग त्या माणसाला नमस्कार करतो. तो पुरुष मग आत जाऊन तिच्याशी एकांत करतो. दुसऱ्या दिवशी सकाळी तो गुरू त्या दांपत्याच्या गळ्यात लाकडी मण्यांची माळ बांधतो.

पण ही प्रथा सांप्रत नष्ट झाली आहे, असे सांगतात.

जुन्या काळी यांची वस्ती गावाच्या बाहेर असे. बारा बलुतेदारांपैकी चांभार हा एक बलुतेदार मानलेला आहे.

मर्तिकप्रथा – हे लोक मृतांना जाळतात किंवा पुरतात व श्राद्ध करतात. दहाव्या दिवशी ज्ञातिभोजन असते. मृतात्मा घरात फिरतो म्हणून काही चांभार, ज्या घरात मृत्यू झाला असेल ते घर सोडतात. [ट्रा. का..सें. प्रॉ. इं.; एन्सा. रि. ए.; मुं. इ. जा.; वे. इं.; म. ज्ञा.को.; दि चमार्स – ब्रिग्ज]

चांभारलेंणी नाशिक जिल्ह्यात म्हसरूळ या गावाजवळ, सहाशे फूट उंच असलेल्या एका टेकडीमध्ये ही लेणी खोदलेली आहेत. ही इ. स. च्या ११ व्या किंवा १२ व्या शतकात जैन शिल्पकारांनी खोदली असावी. या लेण्यांना गजपंथी जैनलेणी असे म्हणतात व जैन लोक ती पवित्र मानतात.

या लेण्यांतील एका गुहेच्या द्वारावर एक सिंहासनाधिष्ठित जिनमूर्ती असून, आत बुद्धाची मूर्ती आहे. याशिवाय तिथे पार्श्वनाथ व अंबा यांच्याही मूर्ती आहेत. दुसऱ्या एका गुहेत व्याघ्रारूढ अंबिकेची मूर्ती आहे. अशा चार गुहा तिथे आहेत. पाहा – गजपंथगिरी. [म. ज्ञा.को.; म. जि. ना.]

चाइन एक जात. पश्चिम बंगाल व बिहार या भागांत यांची वस्ती आहे. मासेमारी हा यांचा प्रमुख व्यवसाय होय. यांचे पौरोहित्य मैथिली ब्राह्मण करतात. कोलियाबाबा हा यांचा प्रमुख देव आहे. [से. इं. १९५१]

चाऊही एक चिनी प्रवासी. हा श्रीदेव हे नाव धारण करून भारतात आला व महाबोधी संघारामात आणि नालंदा विद्यापीठात संस्कृत शिकला. तिथेच त्याने महायानसूत्रांचे अध्ययन केले. यानंतर तो दाववनसंघारामात गेला. तिथे विनयपिटक, व्याकरणशास्त्र, इत्यादींचे अध्ययन केल्यावर त्याने चिनी भाषेत भारताचा तत्कालीन इतिहास लिहिला. हा भारतातच मरण पावला. [सु. वि. को.]

चाक्यार केरळातील एक जात. श्लाघ्यवाक्यकार अर्थात प्रशंसनीय वाणीचा या संस्कृत शब्दावरून या जातीला हे नाव मिळाले असावे. हे लोक आपणांस पौराणिक सूतांचे वंशज मानतात.

रामायण, महाभारत आणि भास व कालिदास यांची नाटके, यांतील नवरसपूर्ण व संघर्षयुक्त असे प्रसंग निवडून हे लोक त्यांची मल्याळम् भाषेत आख्याने तयार करतात. या आख्यानांना प्रबंधकुत्तू असे म्हणतात. देवस्थानांत या प्रबंधकुत्तूचें प्रयोग करणे, हा या जातीचा व्यवसाय आहे. प्रयोगाच्या वेळी चाक्यार देवापुढे उभा राहतो आणि गाऊन व नाचून आख्यान सांगतो. नंबियार पुरुष त्याला मृदंगाची साथ करतो. केरळात या प्रबंधकुत्तूला खूप महत्त्व आहे.

चाक्यार मुली जातीतील पुरुषाशी विवाह करतात; पण चाक्यार पुरुष मात्र नंबियार स्त्रीशी संबंधम् करू शकतो. पाहा – कथकळि. [म. ज्ञा. को.; का. ट्रा. स. इं.; केरळ]

चाचरी उत्तर प्रदेशातील स्त्री-पुरुषांचे सामुदायिक नृत्य. फेर धरून व एकमेकांच्या हातात हात घालून हे नृत्य करतात. याला लहान ढोल व दुतारी वाद्य यांची साथ असते. यातील नर्तकांची चित्रविचित्र रंगांची वेशभूषा फार आकर्षक असते. पर्वताच्या पायथ्याशी चांदण्याच्या प्रकाशात रात्रभर हे नृत्य चालते. [भा. लो. नृ.; उ. प्र. लो. नृ.]

चाटला एक मुसलमान जात. यांची वस्ती उत्तर गुजरातमध्ये आढळते. हे मोलमजुरी करून पोट भरतात. यांना आपल्या धर्माबद्दल काहीच माहिती नाही. मनुष्य मेल्यावर पीर होतो, अशी यांची समजूत आहे. हे लोक मृताला उभे पुरतात. दरवर्षी पूर्वजांच्या थडग्याजवळ ज्ञातिभोजन घालण्याची चाल यांच्यांत आहे. [मुं. इ. जा.]

चाटसू एक जैनक्षेत्र. हे जयपूरपासून पंचवीस मैलांवर आहे. इथे एक प्राचीन जैनमंदिर असून, त्यात इ. स. १२५९ ते १६२३ या काळात निर्माण केलेल्या तीर्थंकरांच्या विशालकाय मूर्ती आहेत. इथून जवळ असलेल्या शिवडूंगरी नामक पर्वतावरही एक जैनमंदिर आहे. या जैनमंदिरातले दोन स्तंभ जयपूर संग्रहालयात ठेवलेले असून, त्यांतील एका संगमरवरी स्तंभावर भद्रबाहूसह ९५ जैन मूर्ती कोरलेल्या आहेत. या स्तंभावरच्या लेखांवरून कळते, की सदरहू स्तंभ इ. स. १६४९ मध्ये महाराजा जयसिंहाच्या कारकीर्दीत चंपावती नगरीजवळ असणाऱ्या डूंगरी या ठिकाणी असलेल्या नेमिनाथमंदिरात

उभारलेला होता. [जै. सि. भा. भाग ४, मार्च १९३८]

चाटू विठ्ठलनाथ (इ. स. चे १६ वे शतक) एक कन्नड कवी. याला नित्यात्मशुक असेही म्हणतात. याने इ.स. च्या १६ व्या शतकाच्या पूर्वार्धात भागवताचा कन्नड भाषेत अनुवाद केला. हा अनुवाद षट्पदी वृत्तात आहे. या ग्रंथात हरिगुणस्तुती, हरिपदांबुजशरण, जनसंकीर्तनस्तुती, हरिपदानतभक्ती, इ. विषय आले आहेत. कवीने साध्या पण सुंदर शैलीत कृष्णभक्तीचे वर्णन केले आहे. या भागवत पुराणाचा दहावा अध्याय कर्नाटकात इतका लोकप्रिय झाला, की त्याच्या आधारावर वेंकट आर्य नामक माध्व ब्राह्मणाने कृष्णलीलाभ्युदय नावाचा ग्रंथ लिहिला. [हिं. क. भ. तुं. अ.]

चाणक्य (सनपूर्व ४ थे शतक) एक महापंडित, महामुत्सद्दी व अर्थशास्त्र या ग्रंथाचा कर्ता. याचे व्यक्तिनाम विष्णुगुप्त असे होते. चाणक्य हे नाव त्याच्या मूळच्या चणक नामक गावावरून पडले आहे. बुंदेलखंडातील नागौदाजवळचे नाचना हेच चणक होय, असे श्री. हरिहर द्विवेदी सांगतात. चाणक्याला कौटिल्य असेही म्हणतात; पण ते नाव कौटिल्य नसून कौटल्य आहे व ते त्याचे गोत्रनाम आहे. अशी अनेक नावे असली, तरी मुख्यत्वे आर्य चाणक्य याच नावाने तो प्रसिद्ध आहे.

चाणक्य हा ब्राह्मण कुलात जन्मला होता. त्याच्या जीवनातील अचाट कर्तृत्वावरून व बुद्धिकौशल्यावरून असे वाटते, की त्याला लहानपणापासून उत्तम संस्कार मिळाले असावे आणि त्याला प्राथमिक शिक्षण देणारे गुरूही श्रेष्ठ दर्जाचे असावे. त्याचे पुढील शिक्षण तक्षशिलेत झाले. तक्षशिला हे त्या वेळचे भारताच्या वायव्य सीमेवरील अग्रगण्य विद्यापीठ होते. अनेक ज्ञानशाखांत पारंगत असलेले, निर्लोभ, निःस्पृह आणि विद्यार्थ्यांच्या कल्याणासाठी अहोरात्र झटणारे असे आचार्य या विद्यापीठात होते. युद्धविद्या, स्थापत्य व वैद्यक या तीन विषयांच्या अध्यापनाबद्दल तक्षशिलेची विशेष प्रसिद्धी होती. चाणक्याचे अध्ययन पूर्ण झाल्यावर त्याचीही याच विद्यापीठात आचार्य म्हणून नियुक्ती झाली. हळूहळू भारतीय पंडितमंडळीत महापंडित म्हणून त्याची कीर्ती दुमदुमू लागली. पुढे मगधात झालेल्या राज्यक्रांतीचा सूत्रधार म्हणून त्याचे नाव अखिल भारतातच नव्हे; तर त्या वेळच्या ग्रीस प्रभृती देशांतील राजमंडळातही प्रसिद्ध झाले. त्याच्या पूर्वचरित्राविषयी अनेक दंतकथा लोकांत प्रचलित झाल्या आहेत. चाणक्य व चंद्रगुप्त हे दोघेही दिवंगत झाल्यावर काही शतकानंतर निर्माण झालेल्या जैन, बौद्ध व पौराणिक ग्रंथांत त्याच्याविषयी अनेक कथा लिहिल्या गेल्या आहेत. तो दिसण्यात कुरूप होता, असे काही ठिकाणी म्हटले आहे. नाटकांत व लोकसाहित्यातही चाणक्याचे उल्लेख आढळतात; पण हे उल्लेख सर्वस्वी विश्वसनीय नाहीत.


आर्य चाणक्य—काल्पनिक चित्र

ज्या वेळी चाणक्य तक्षशिलेस अध्यापन करीत होता, त्या वेळी भारताची राजकीय परिस्थिती गोंधळाची बनली होती. सर्व भारतात त्या वेळी शेकडो गणराज्ये नांदत होती. त्या गणराज्यांत परस्पर सहकार्य नव्हते, ऐक्याची भावना नव्हती व सामूहिक संरक्षणाची आणि संवर्धनाची इच्छाही नव्हती. प्रत्येक गणराज्य स्वायत्त असल्यामुळे कोणाचा कोणाशीच मेळ नव्हता. या सं पसाऱ्यात मगधातले राज्य तेवढे बलिष्ठ होते; पण ते ग गणतंत्र नसून राजतंत्र होते. चाणक्याच्या वेळी मगधावर नं वंशाचे राज्य चालू होते व त्या वंशातल्या महापद्मनंदाचा पु धनानंद हा सत्ताधारी होता. तो धनलोभी व जुलमी होता त्याच्या जुलमी प्रवृत्तीमुळे प्रजा सत्रस्त झाली होती आणि मनातून त्याच्या नाशाची इच्छा करीत होती.

त्या वेळी भारताच्या सीमाप्रदेशाला लागूनच इराणचे प्रचं संघटित आणि एककेंद्रित असे साम्राज्य पसरले होते. चाण क्याला वाटले, की भारताच्या अशा दुबळ्या व विघटित परि स्थितीत जर एखाद्या भारतद्वेषी व संघटित साम्राज्यवा भारतावर स्वारी केली, तर भारताचा पराभव व्हायला वे लागायचा नाही. भारत खंडित आहे आणि म्हणूनच दु बनला आहे. त्याला बलशाली बनवायचे, तर तो आधी ए छत्राखाली आला पाहिजे.

अशी केंद्रवर्ती सत्ता केवळ मगधातच निर्माण होऊ श असेही त्याला वाटत होते. पण तसे व्हायचे, तर त्या अं मगधातली नंदवंशाची सत्ता उखडून टाकणे भाग होते आ ते काम मोठेच बिकट होते. तसे पाहिले, तर परिस्थिती सर्व प्रतिकूलच होती; पण चाणक्याचे अंतःकरण मात्र क्रांती विचारांनी अगदी भारून गेले होते.

चाणक्याच्या मनात क्रांतीची निकड निर्माण व्हा

आणखी एक महत्त्वाचे कारण घडले होते. भारतातील गणराज्यांप्रमाणेच ग्रीसमध्येही छोटी छोटी नगरराज्ये होती. पण शिकंदर आणि त्याचा बाप फिलीप या दोघांनी मिळून त्या नगरराज्यांचा धुव्वा उडवला आणि ग्रीस देश गिळंकृत केला. त्यामुळे ग्रीकांच्या त्या नगरराज्यांप्रमाणेच भारतीय गणराज्यांचीही धुळधाण होणे अशक्य नाही, ही जाणीव चाणक्याच्या मनाला सदैव अस्वस्थ करीत होती. शेजारी इराण हा तर भारताची लूट करण्यास सदैव टपलेलाच होता. या आणि अशाच सर्व संभाव्य संकटांतून भारताला कसे वाचवता येईल व त्याचे स्वातंत्र्य कोणत्या उपायांनी अबाधित राहील, याचीच विवंचना चाणक्य करीत होता.

अशा स्थितीत एके दिवशी चाणक्याला मगधाधिपती धनानंदाचे बोलावणे आले. चाणक्य राजदरबारात उपस्थित झाला. 'तुम्ही आमच्या दानविभागाचे प्रमुखत्व स्वीकारा', असे धनानंदाने त्याला सांगितले आणि धनानंदाविषयी मनात तिरस्कार वसत असताही चाणक्याने दूरदृष्टीने ते स्थान स्वीकारले.

आपल्या विभागाचे काम करीत असता, चाणक्य सूक्ष्म दृष्टीने सर्वत्र अवलोकन करू लागला. धनानंदाच्या राज्याला विटलेले अधिकारी, नागरिक आणि महत्त्वाकांक्षी तरुण यांना त्याने हळूहळू जवळ केले आणि क्रांतीच्या दृष्टीने तो त्यांच्या मनाची तयारी करू लागला. त्याची लोकप्रियताही दिवसेदिवस वाढू लागली. धनानंदाला थोड्याच काळात ही गोष्ट कळून आली. आपण राजा असूनही लोक आपल्यापेक्षा चाणक्यालाच मोठा समजतात, त्याचाच अधिक आदर करतात, हे समजताच धनानंद क्रुद्ध झाला. चाणक्याला राज्यातून हाकलले पाहिजे, असे त्याने ठरवले आणि एके दिवशी भर दरबारात तो चाणक्यावर उसळून म्हणाला.

'चाणक्य, आजपासून या दरबारात तुम्हाला जागा नाही. तुमच्यासारख्या अस्तनीतल्या निखाऱ्यांना यापुढे अधिकारपदावर ठेवायला मी तयार नाही. तुम्ही आत्ताच्या आत्ता हे राज्य सोडून चालते व्हा.'

चाणक्याला या प्रसंगाची कल्पना होतीच. तो आसनावरून उठला आणि राजासमोर निर्भयपणे उभा राहून म्हणाला.

'धनानंद, प्रजेला नाडून सुखोपभोग भोगणाऱ्या कर्तव्यभ्रष्ट राजाची गुलामगिरी पत्करून राहायला मीही तयार नाही. मी जातो; पण जाताना एक प्रतिज्ञा उच्चारून जातो, की "नंदकुलाचा निःपात करून मगधभूमीला मुक्त करीन, तेव्हाच मी माझ्या शेंडीची गाठ बांधीन !"

नंदकुलाच्या निःपाताची प्रतिज्ञा करून बाहेर पडलेला चाणक्य काही काल मगधातच गुप्त रीतीने संचार करीत राहिला. त्याने मगधातील उत्साही तरुणांची मने आधीच पेटवून ठेवली होती. आता उणीव होती ती भावी क्रांतीचे नेतृत्व करणाऱ्या एखाद्या तेजस्वी पुरुषाची. तसा नेता, तसा तेजस्वी पुरुष चंद्रगुप्ताच्या रूपाने थोड्याच दिवसांत त्याला लाभला.

चाणक्याला चंद्रगुप्त एकदम आवडला. लगेच त्याला घेऊन तो तक्षशिलेस गेला. क्रांतीचा नेता आणि भारताचा भावी सम्राट म्हणून चंद्रगुप्ताची घडण करणे, हेच आता चाणक्याचे मुख्य कार्य बनले. थोड्याच काळात त्याने चंद्रगुप्ताला राजनीती व युद्धविद्या या दोन्ही विषयांत पारंगत केले.

अशा प्रकारे चाणक्याच्या मार्गदर्शनाखाली चंद्रगुप्ताचे शिक्षण पूर्ण होत आले आणि त्याच वेळी चाणक्याला ज्या संकटाची भीती वाटत होती, ते संकट दत्त म्हणून उपस्थित झाले. सनपूर्व ३२७ साली शिकंदर सारा इराण पादाक्रांत करून पुढे भारतावर चालून आला. सीमेवरील टोळीवाल्यांचा पराभव करून त्याने सिंधू नदी ओलांडली आणि तो तक्षशिलेच्या राज्यात घुसला. अंभी हा त्या वेळी तक्षशिलेचा राजा होता. तो लगेच त्याला शरण गेला. अंभीचे आणि झेलमच्या काठावरील पौरस राजाचे वैर होते. शिकंदराने पौरसाविरुद्ध अंभीला साहाय्य द्यायचे कबूल केले. सिंधुतीरावरचे मंगलोर व महावन हे किल्ले जिंकून त्याने तक्षशिलेतच मुक्काम ठोकला. तिथून त्याने आसपासच्या सर्व राजांना शरण येण्याविषयी आज्ञा पाठवल्या. बहुतेक सगळे त्याच्या आज्ञेपुढे नमले; पण पौरस मात्र ताठ राहिला. शिकंदराने मग त्याच्यावर चाल करून त्याचा पराभव केला.

पण इतके होऊनही शिकंदराला आपले आक्रमण पुढे चालू ठेवणे अशक्य होऊ लागले. सौभूती, कठ, यौधेय, मालव आणि शूद्रक या बलशाली गणराज्यांनी त्याला तीव्र प्रतिकार केला. शूद्रक गणाशी लढत असताना शिकंदर बाण लागून घायाळ झाला. त्याची विजयाकांक्षाही त्याच क्षणी घायाळ झाली, असे म्हटले पाहिजे. त्याने मग मालव–शूद्रकांशी शस्त्रसंधी केला आणि जिंकलेल्या भूप्रदेशांवर आपले क्षत्रप नेमून तो इराणकडे परत फिरला.

शिकंदराची ही स्वारी चाणक्य व चंद्रगुप्त या गुरु–शिष्यांनी जवळून पाहिली. शिकंदराच्या विजयी सैन्याची वैशिष्ट्ये त्यांनी बारकाईने न्याहाळली. शिकंदराच्या आक्रमणातून त्या दोघांना खूप शिकायला मिळाले. पुढे थोड्याच दिवसांत शिकंदर मरण पावल्याची बातमीही चाणक्याच्या कानी आली. आता तूर्त तरी कोण्या बाह्य शत्रूचे भय संभवत नाही, असे चाणक्याला वाटले. मग त्याने थोड्याच दिवसांत चंद्रगुप्ताकरवी आपल्या क्रांति-

युद्धाचा शुभमुहूर्त केला. तक्षशिलेच्या परिसरातून त्याने बरेच सैन्यही जमविले. त्या सैन्याच्या बळावर प्रथम त्याने वायव्येकडील प्रदेश ग्रीकांच्या स्वामित्वातून मुक्त केला. मग या गुरु-शिष्यांनी मगधाकडे मोहोर धरली. मार्गातील गणराज्यांवर प्रभुत्व प्रस्थापीत ते सारखे पुढे पुढे जाऊ लागले.

आपल्यावर आक्रमण येत आहे, ही वार्ता थोड्याच काळात धनानंदाला समजली. त्याने मगधाच्या सीमेवर प्रचंड सैन्य पाठवून चंद्रगुप्ताला प्रतिकार केला; पण चंद्रगुप्ताने त्या सैन्याचा धुव्वा उडवून आगेकूच केले. मगधातील प्रजेने ओळखले, की ज्या अर्थी चाणक्याच्या मार्गदर्शनाखाली सैन्य चालून येत आहे, त्या अर्थी ते आपल्या नाशासाठी नसून मुक्तीसाठी आहे. त्यामुळे चंद्रगुप्ताला मागधी प्रजेचे आतून स्वयंस्फूर्त सहकार्य मिळाले. त्यामुळे त्याला आपल्या सर्व लष्करी हालचाली सुलभपणे करता आल्या आणि मग एके दिवशी चंद्रगुप्त पाटलिपुत्रातल्या राजद्वारी येऊन थडकला. राजवाड्यात पळापळ सुरू झाली. धनानंदही त्याच बेताने राजवाड्याच्या बाहेर पडला होता. पण चंद्रगुप्ताने त्याला गाठले आणि एका घावात त्याचा शिरच्छेद केला. चंद्रगुप्त विजयी झाला. नंदकुलाचा निःपात झाला, क्रांती पूर्ण झाली आणि आर्य चाणक्याची प्रतिज्ञाही पूर्ण झाली !

चंद्रगुप्त मगधाच्या सिंहासनावर बसताच त्याच्या राज्याची घडी बसवण्यासाठी चाणक्याने त्याचे महामात्यपद स्वीकारले. चाणक्याच्या मार्गदर्शनाखाली चंद्रगुप्ताने नर्मदेच्या उत्तरेकडील सर्व भारत एकछत्री साम्राज्याखाली आणून आपली नमुनेदार अशी राज्यव्यवस्था सुरू केली.

आधुनिक काळातील विचारवंतांनाही आदर्शभूत वाटावी, अशी ही राज्यव्यवस्था म्हणजे चाणक्याच्या बुद्धिमत्तेचा आणि प्रजावात्सल्याचा परिपाकच होय. चंद्रगुप्ताच्या उपयोगासाठी पुढे चाणक्याने अर्थशास्त्र नावाचा राजनीतिविषयक एक उत्कृष्ट ग्रंथही लिहिला. हा ग्रंथ भारतीय राजनीतीचा आदर्श असून, जगातील प्राचीन राजनैतिक साहित्यात तो अद्वितीय आहे. या ग्रंथाची पंधरा प्रकरणे असून, त्यात राज्यव्यवहारविषयक १८० विषयांची चर्चा केलेली आहे. राजाची वृत्ती कशी असावी, हे सांगताना चाणक्य म्हणतो---

प्रजासुखे सुखं राज्ञः प्रजानां च हिते हितम् ।
नात्मप्रियं हितं राज्ञः प्रजानां तु प्रियं हितम् ॥

अर्थ – प्रजेच्या सुखात राजाचे सुख असते आणि प्रजेच्या हितात राजाचे हित असते. राजाचे हित स्वार्थसाधनात नसते, तर ते प्रजेला संतुष्ट ठेवण्यात असते.

आर्य मंजुश्री मूलकल्प हा हेमचंद्राचा ग्रंथ आणि बौद्धधर्माचा इतिहास हा तिबेटी पंडित तारानाथ याचा ग्रंथ, यांमध्ये, चाणक्य दीर्घजीवी असून, तो बिंदुसाराचाही राजगुरू व महामंत्री होता, असे सांगितले आहे.

मगध साम्राज्याचा महामंत्री म्हणून काम करीत असताही तो कधी राजप्रासादात राहिला नाही. तो एखाद्या ऋषीप्रमाणे पर्णकुटीत राहून तिथूनच राजाला आणि जनांना मार्गदर्शन करी. विशाखदत्ताने चाणक्याच्या या पर्णकुटीचे वर्णन केले आहे, ते असे---

उपलशकलमेतद् भेदकं गोमयानां
बटुभिरुपहृतानां बर्हिषां स्तोम एषः ।
शरणमपि समिद्भिः शुष्यमाणाभिराभि-
र्विनमितपटलान्तं दृश्यते जीर्णकुड्यम् ॥
(मुद्राराक्षस ३.१५)

अर्थ – एका बाजूला गोवऱ्या तोडण्यासाठी असलेला दगडाचा तुकडा पडला आहे. दुसऱ्या बाजूला त्याच्या शिष्यांनी एकत्र केलेल्या कुशांचा ढीग लागलेला आहे. छपरांवर चारी बाजूंनी समिधा वाळत घातलेल्या दिसत आहेत. समिधांच्या भाराने त्याची झोपडी जणू एका बाजूला झुकत आहे आणि झोपडीच्या जीर्ण भिंती पडत झडत कशाबशा उभ्या आहेत.

चाणक्य वयाच्या ८२ व्या वर्षी मृत्यू पावला असे म्हणतात. मत्स्य पुराणात त्याला राजर्षी असे म्हटले असून, नर्मदातीरावरील शुक्लतीर्थात राहत असता त्याला सिद्धी प्राप्त झाली, असे सांगितले आहे (१९१.१४). या महापुरुषाच्या अंतिम दिवसांतल्या वास्तव्याला उद्देशून मत्स्य पुराणातला हा उल्लेख असावा. पाहा – चंद्रगुप्त, अर्थशास्त्र. [नृपनिर्माता चाणक्य - रा. चिं. ढेरे; स. सो. पा.; म. भा. इ.]

चातुर्थाह्निक गृहप्रवेशनीय होम पाहा.

चातुर्मास्य आषाढ शुद्ध एकादशीपासून कार्तिक शुद्ध एकादशीपर्यंत अथवा आषाढाच्या पौर्णिमेपासून कार्तिकाच्या पौर्णिमेपर्यंत होणाऱ्या चार महिन्यांच्या काळास चातुर्मास्य म्हणतात. चातुर्मास्याच्या आरंभी जी एकादशी येते, तिला शयनी व समाप्तीस जी एकादशी येते, तिला बोधिनी अथवा प्रबोधिनी म्हणतात. मनुष्याचे एक वर्ष हे देवांचे एक अहोरात्र असते. दक्षिणायन ही देवांची रात्र असून, उत्तरायण हा त्यांचा दिवस असतो. कर्क संक्रांतीस उत्तरायण पूर्ण होते व दक्षिणायनास प्रारंभ होतो. म्हणजेच देवांची रात्र सुरू होते. कर्क संक्रांत आषाढ महिन्यातच होते. म्हणूनच आषाढ शुद्ध एकादशीस शयनी एकादशी म्हटले आहे

कारण त्या दिवशी देव झोपी जातात, अशी समजूत आहे. कार्तिक शुद्ध एकादशीस देव झोप घेऊन उठतात, म्हणून तिला बोधिनी म्हणतात. वस्तुतः दक्षिणायन सहा महिन्यांचे असल्यामुळे देवांची रात्रही तेवढीच असायला हवी. पण बोधिनी एकादशीपर्यंत चारच महिने पुरे होतात. याचा अर्थ असा, की रात्रीचा एक तृतियांश शिल्लक आहे तोच देव जागे होतात व आपले व्यवहार करू लागतात.

देवांच्या या निद्राकालात असुर प्रबल होतात व मानवांना त्रास देऊ लागतात, असे सांगितले आहे. त्या असुरांपासून स्वतःचे संरक्षण होण्यासाठी प्रत्येकाने काहीतरी व्रत अवश्य करावे, असे धर्मशास्त्र सांगते—

> वार्षिकांश्चतुरो मासान् वाहयेत् केनचिन्नरः ।
> व्रतेन नो चेदाप्नोति किल्मिषं वत्सरोद्भवम् ॥

अर्थ—प्रतिवर्षी चातुर्मास्यात मनुष्याने कोणतेतरी व्रत अवश्य करावे; अन्यथा त्याला संवत्सरोद्भव असे पातक लागते.

चातुर्मास्यातील वर्ज्यावर्ज्य —— चातुर्मास्यात प्राण्यांच्या अस्थींचा चुना, चर्मपात्रातले उदक, ईडनिंबू, महाळुंग, वैश्वदेव न झालेले व विष्णूला अर्पण न केलेले अन्न, मसूर, मांस, पांढरे पावटे, घेवडा, चवळी, लोणची, वांगी, कलिंगड, बहुबीज किंवा निर्बीज फळ, मुळा, कोहळा, बोरे, आवळे, चिंच, कांदा, लसूण, हे पदार्थ वर्ज्य करायचे असतात. त्याचप्रमाणे मंचकावर शयन, ऋतुकालावाचून स्त्रीगमन, परान्न या गोष्टीही चातुर्मास्यात वर्ज्य असतात. चातुर्मास्यात हविष्यान्न सेवन करावे, असे सांगितले आहे. तांदूळ, मूग, यव, तीळ, वाटाणे, गहू, समुद्रातले मीठ, गाईचे दूध, दही, तूप, फणस, आंबा, नारळ, केळी, इ. पदार्थ ही हविष्ये जाणावी.

कित्येक स्त्रिया चातुर्मास्यात धरणे-पारणे नावाचे व्रत करतात. यात एक दिवस भोजन व दुसरे दिवशी उपवास असे चार महिने सतत करायचे असते. कित्येक स्त्रिया चातुर्मास्यात एक किंवा दोन धान्यांवर राहतात. काही स्त्रिया पंचामृत सोडतात. काही एकभुक्त राहतात. देशपरत्वे चातुर्मास्यातले असे विविध आचार दृष्टीस पडतात. वैष्णवांनी आषाढी व कार्तिकी एकादशीस तप्तमुद्रा धारण कराव्या, असे रामार्चनचंद्रिकेत सांगितले आहे. तप्तमुद्रांविषयी प्रशंसापर विधिवाक्ये व निंदापर निषेधवाक्ये पुष्कळ आढळतात. तेव्हा त्याविषयी शिष्टाचाराप्रमाणे व्यवस्था जाणावी, असे धर्मसिंधुकार सांगतात.

चातुर्मास्यात यतीला वपन वर्ज सांगितले आहे. त्याने चार महिने, निदान दोन महिने तरी एकाच ठिकाणी राहावे, असे धर्मसिंधूत आणि इतर काही धर्मग्रंथांतही सांगितले आहे.

चातुर्मास्ययाग

या यागात वैश्वदेव, वरुणप्रघास, साकमेघ व शुनासीरीय अशी चार पर्वे असतात. दर चार महिन्यांनी यांतले एकेक पर्व करायचे असते, म्हणून याला चातुर्मास्ययाग म्हणतात. ही चार पर्वे एकदमही ओळीने करता येतात. सांप्रत चारी पर्वे एकदमच करण्याची पद्धत आहे. वैश्वदेवपर्व चैत्रपौर्णिमेला केल्यास वरुणप्रघास व साकमेघ ही पर्वे अनुक्रमे श्रावण व मार्गशीर्ष यांच्या पौर्णिमेस येतात. शुनासीरीय पर्व मात्र आपल्या इच्छेनुसार केव्हाही करावे, असे सांगितले आहे. वैश्वदेवपर्व फाल्गुनपौर्णिमेस करून, नंतर चार चार महिन्यांनी पुढची पर्वे करावी, असाही एक पक्ष आहे.

पहिल्यांदाच चातुर्मास्ययाग करताना आदल्या दिवशी वैश्वानर व पर्जन्य यांना उद्देशून एक इष्टी करावी, असे आश्वलायन सांगतो. या इष्टीत वैश्वानराला द्वादशकपाल पुरोडाश व पर्जन्याला चरू अर्पण करतात. या इष्टीला अन्वारंभणीयेष्टी असे नाव आहे.

वैश्वदेव —— ही एक इष्टी आहे. या पर्वांतील मुख्य देवता विश्वेदेव ही असल्यामुळे या पर्वाला वैश्वदेवपर्व म्हणतात. गार्हपत्य, आहवनीय व दक्षिणाग्नी या तीन अग्नींवर ही इष्टी होते. या इष्टीकरिता होता, अध्वर्यू, ब्रह्मा व आग्नीध्र असे चार ऋत्विज लागतात. या पर्वात आठ देवता असून त्यांना निरनिराळे हविर्द्रव्य लागते. चार देवतांना पुरोडाश, तीन देवतांना चरू व मुख्य देवतेला आमिक्षा हा हवी लागतो. या पर्वामध्ये अरणिमंथनाने अग्नी उत्पन्न करतात. अग्निमंथनाचे मंत्र होता म्हणतो. वैश्वदेवात नऊ प्रयाज व नऊ अनुयाज असतात. अनुयाजानंतर वाजिन देवांना वाजिन (आमिक्षेच्या खाली उरणारे पाणी) अर्पण करतात. उरलेले वाजिन एका पात्रात घालून चारही ऋत्विज त्याचा वास घेतात व मग यजमान त्याचे सेवन करतो. या मोसमात जन्मलेले वासरू ही या पर्वाची दक्षिणा असल्याचे शतपथ ब्राह्मणात सांगितले आहे.

वरुणप्रघास —— यात दोन इष्टी असतात. या पर्वात प्रतिप्रस्थाता नावाचा पाचवा ऋत्विज लागतो. यातली पहिली इष्टी फारच मोठी असते. तिच्यात वरुण व मरुत् या दोन देवता प्रमुख असतात. अन्य देवता वैश्वदेवपर्वाप्रमाणेच असतात. या पर्वात यवांचा उपयोग केला जातो. यवावर वरुणाची मालकी असते, असे समजतात. त्यामुळे या पर्वाला वरुणप्रघासपर्व असे नाव मिळाले आहे.

या पर्वात आहवनीयाच्या पूर्वेस दोन वेदी तयार करतात. उत्तरेकडील वेदी अध्वर्यूच्या व दक्षिणेकडील वेदी प्रतिप्रस्थात्याच्या अधिकारात असते. अध्वर्यू ज्या क्रिया करील, त्यांचे

प्रतिप्रस्थाता अनुकरण करतो. प्रतिप्रस्थाता इष्टीच्या आदल्या दिवशी करंभपात्रे तयार करतो. करंभ म्हणजे टरफलांसह भाजलेल्या यवांच्या पिठात दही घालून तयार केलेला पदार्थ होय. यजमानाच्या घरात जेवढे नातलग असतील त्यापेक्षा एक करंभपात्र जास्त घेतात. कमीत कमी तीन पात्रे करावीच लागतात. अध्वर्यू व प्रतिप्रस्थाता भाजलेल्या यवाच्या पिठात पाणी मिसळून मेंढा व मेंढी यांच्या आकृती तयार करतात व त्या लोकरीने किंवा दर्भाने झाकतात.

मुख्य देवतांना आमिक्षा व यवपिष्टाचे पशू असा हवी लागतो. उत्तरेकडील वेदीमध्ये पूर्व बाजूस ३६ अंगुळे लांब, रुंद व उंच असा एक ओटा तयार करून त्यावर अग्निस्थापना करतात. तसेच दक्षिणेकडील वेदीमध्ये पूर्व बाजूस एका कुंडात अग्नीची स्थापना करतात. उत्तरेकडील अग्नीचा संमार्ग झाल्यावर प्रतिप्रस्थाता गार्हपत्य अग्नीजवळ बसलेल्या यजमानपत्नीकडे जाऊन तिला तिच्या जारांची नावे उच्चारायला सांगतो. जार असल्यास ती त्यांची नावे व संख्या सांगते किंवा मुखाने उच्चार करण्याची लाज वाटल्यास तितक्या संख्येचे दर्भ वर उचलते. तिला कोणी जार नसल्यास ती तसेही सांगते. तिने नावे सांगितल्यास 'त्या जारांना वरुण पकडून नेवो,' असे प्रतिप्रस्थाता म्हणतो. मग करंभपात्रे ठेवलेले वेळूचे शिप्तर तिच्या डोक्यावर ठेवून तो तिला दोन अग्नींच्या मधून फिरवतो. दक्षिणेकडील अग्नीच्या पूर्वेस यजमान व यजमानपत्नी करंभपात्रे घेऊन उभी राहतात व मंत्र म्हणून दोघेजण ती करंभपात्रे अग्नीत टाकतात. मग अध्वर्यू देवतांना हवी अर्पण करतो. सवत्स गाय किंवा घोडा अथवा सहा किंवा बारा बैल ही या पर्वाची दक्षिणा असते.

या पर्वातील दुसरी इष्टी म्हणजे अवभृथेष्टी होय. नदीतीरावर जाऊन वरुण देवतेला आहुती देणे व ऋत्विजांसह यजमानाने स्नान करून परत येणे, एवढेच कृत्य या विधीत असते.

साकमेध — याचा शब्दशः अर्थ बरोबर किंवा एकाच वेळी अग्नी प्रज्वलित करणे असा आहे. हे पर्व दोन दिवस चालते. या पर्वात बऱ्याच इष्टी असतात. पहिल्या दिवशीची इष्टी सूर्योदयापूर्वी सुरू करतात व ती दोन तास चालते. दुसरी इष्टी दुपारी व तिसरी संध्याकाळी सायंहोमानंतर करतात. चौथी इष्टी दुसऱ्या दिवशी पहाटेस करून पुढे लगेच महाहविष्टीला प्रारंभ करतात. या इष्टीत आहवनीयाच्या पुढे एक वेदी करतात व तीमध्ये पूर्वेस ओटा तयार करून त्यावर अग्निस्थापना करतात. या इष्टीत चार देवतांना पुरोडाश व चार देवतांना चरू हे हवी सांगितले आहेत. यानंतर महापित्र्येष्टी करतात. ही इष्टी बरीच अवघड असल्याने ती करीत असताना ऋत्विजांच्या ज्ञानाची खरी परीक्षा होते. कारण निरनिराळ्या मंत्रांमध्ये जिथे देव शब्द येईल, त्याच्यापुढे पितृ हा शब्द जोडायचा असतो. या इष्टीत दक्षिणाग्नीच्या आग्नेयीस एक वेदी तयार करतात. तिची लांबी-रुंदी यजमानाच्या उंचीएवढी असते. दक्षिणाग्नीतून अग्नी घेऊन तो वेदीच्या मध्यभागी स्थापतात. या इष्टीत पितृमत् सोम याला षट्कपाल पुरोडाश, बर्हिषद पितरांना धाना (यवाच्या लाह्या) व अग्निष्वात्त पितरांना मंथा (वासरू नसलेल्या गाईच्या दुधात धानाचे पीठ घुसळून तयार केलेला पदार्थ) हे हवी असतात. आश्वलायनाने यम ही या इष्टीची आणखी एक देवता सांगितली आहे. हिच्यात चार प्रयाज व चार अनुयाज असतात. शेवटची आहुती कव्यवाहन अग्नीला देतात. पुरोडाश, धाना व मंथा यांच्या मिश्रणाचे तीन पिंड करून अध्वर्यू ते पितरांना अर्पण करतो.

साकमेधातील आणखी एक विशेष विधी म्हणजे त्र्यंबक होम हा होय. हा रुद्राच्या नावाने करतात. यातील सर्व क्रिया उत्तरेकडे तोंड करून करतात. या होमासाठी घरातील सर्व माणसांच्या संख्येचे व त्याहून एक अधिक इतके पुरोडाश तयार करतात. मग ऋत्विज व यजमानाच्या घरातील सर्व मंडळी ईशान्य दिशेला जातात. वाटेत उंदरांनी उकरलेल्या जमिनीवर अधिक संख्येचा केलेला पुरोडाश ठेवतात. त्यां वेळी 'आखुस्ते रुद्र पशुः' = हे रुद्रा, उंदीर हा तुझा पशू आहे, असा मंत्र म्हणतात. नंतर चौकात जाऊन अग्नीची स्थापना करतात व प्रत्येक पुरोडाशातला काही भाग रुद्राला अर्पण करतात. मग कुटुंबातील सर्व मंडळी आपल्या नावाचा पुरोडाश हातात घेऊन तो झेलीत झेलीत अग्नीला तीन प्रदक्षिणा घालतात. मग ते सर्व पुरोडाश एकत्र करून ते शिक्यात घालतात व ते शिंके एका झाडाच्या ढोलीत बांधून ठेवतात. या विधीमुळे भूतपिशाच्च संतुष्ट होतात, असे सांगितले आहे. घरी परत येऊन अदिती देवतेसाठी इष्टी करतात. इथे साकमेधपर्व समाप्त होते.

शुनासीरीय— शुनासीर इंद्र ही या पर्वाची मुख्य देवता होय. हिला द्वादशकपालांवर तयार केलेला पुरोडाश हा हवी असतो. यात पाच प्रयाज व तीन अनुयाज असतात. सहा बैल व एक नांगर किंवा दोन मोठे बैल एवढी या पर्वाची दक्षिणा असते.

शुनासीरौ हा जोडशब्द ऋग्वेदात आढळतो (४. ५७. ५). शुन याचा अर्थ वायू व सीर याचा अर्थ आदित्य असा आहे. शतपथब्राह्मणात शुन = वैभव व सीर = सार असा अर्थ घेतला असावा, असे वाटते (२.६.३.२). ही इष्टी केल्याने धनधान्य व पशू यांची समृद्धी लाभते, असे सांगितले आहे.

चातुर्मास्ययागासंबंधी तैत्तिरीय व शतपथ या ब्राह्मणां

एक कथा आली आहे, तिचा सारांश असा–

एकदा ब्रह्मदेवाला सृष्टी निर्माण करण्याची इच्छा झाली. तेव्हा त्याने एक इष्टी करून सृष्टीची निर्मिती केली (हेच वैश्वदेवपर्व होय). पण निर्मिलेली प्रजा ब्रह्मदेवाच्या आज्ञेत वागेना. ते पाहून वरुणाने तिला पाशबद्ध करून टाकले. मग प्रजा ब्रह्मदेवाला शरण गेली. तेव्हा ब्रह्मदेवाने आणखी एक इष्टी करून त्या प्रजेची मुक्तता केली (हेच वरुणप्रघास पर्व होय). नंतर प्रजेत स्थैर्य निर्माण व्हावे, म्हणून ब्रह्मदेवाने पुन्हा एक इष्टी केली (हे साकमेघपर्व होय). त्यानंतर ब्रह्मदेवाने चौथी शुनासीरीय नामक महत्त्वाची इष्टी केली. त्यामुळे भरपूर पाऊस पडून अन्नधान्याची समृद्धी झाली.

स्वर्गप्राप्ती हेही एक चातुर्मास्ययागाचे फल सांगितले आहे. हा एक ऋतुकालीन याग आहे. हा याग करणाऱ्याला जे निर्बंध पाळावे लागत, ते असे–

पौर्णमासेनेष्ट्वा चातुर्मास्यव्रतान्युपेयात् । केशान्निवर्तयीत । श्मश्रूणि वापयीत । अधः शयीत । मधुमांसलवणस्त्र्यवलेखनानि वर्जयेत् ॥

(आश्व. श्रौ. सू. २.१६.२२–२७)

अर्थ– पौर्णमास याग केल्यानंतर चातुर्मास्यव्रते करावी. केस फिरवावे, दाढी-मिशांचे वपन करावे, भूमीवर शयन करावे, मद्य, मांस, मीठ, स्त्रीसमागम व शरीरभूषणे ही वर्ज्य करावी.

प्रतिवर्षी (ऐपतीनुसार) गृहस्थाने सोमयाग, पशुबंध, आग्रयणेष्टी व चातुर्मास्ययाग करणे आवश्यक आहे, असे याज्ञवल्क्य सांगतो (१.१२५). [श्री. विद्याधरशास्त्री भिडे]

चातुर्मास्यव्रत

चातुर्मास्यातील श्रावणात शाकभाज्या, भाद्रपदात दही, आश्विनात दूध व कार्तिकात द्विदल धान्ये वर्ज्य करायची असतात. याला चातुर्मास्यव्रत म्हणतात. हे व्रत नित्य आहे. आषाढ शुद्ध द्वादशीस विष्णुपूजेने या व्रताचा प्रारंभ करतात व कार्तिक शुद्ध द्वादशीस त्याची समाप्ती करतात. हे व्रत चारही वर्णांतील स्त्रीपुरुषांना आणि वैष्णवांप्रमाणेच शैवांनाही विहित आहे. याचा विधी असा—

आषाढ शुद्ध द्वादशीच्या दिवशी विष्णूची पूजा करतात. या पूजेत जाईची फुले आवश्यक असतात. पूजा झाल्यावर पुढील मंत्रांनी प्रार्थना करतात–

चतुरो वार्षिकान् मासान् देवस्योत्थापनावधि ।
इमं करिष्ये नियमं निर्विघ्नं कुरु मेऽच्युत ॥
इदं व्रतं मया देव गृहीतं पुरतस्तव ।
निर्विघ्नं सिद्धिमायातु प्रसादात्तव केशव ॥
गृहीतेऽस्मिन् व्रते देव पञ्चत्वं यदि मे भवेत् ।
तदा भवतु सम्पूर्णं त्वत्प्रसादाज्जनार्दन ॥

अर्थ– वार्षिक चातुर्मास्यात प्रबोधिनी एकादशीपर्यंत मी नियम करीत आहे. तो माझा नियम, हे अच्युता, तू निर्विघ्न कर. हे देवा, तुझ्यासमोर मी हे व्रत ग्रहण केले असता (ते पूर्ण होण्याच्या आत) जर माझा मृत्यू घडेल तर हे जनार्दना, ते व्रत तुझ्या प्रसादाने संपूर्ण झाले, असे होवो.

व्रत पूर्ण झाल्यावर कार्तिक पौर्णिमस त्याचे उद्यापन करतात. त्या वेळी व्रतात सोडलेल्या वस्तू ब्राह्मणाला दान देतात व त्या वस्तू खाण्यास सुरवात करतात. [नि. सिं.; व्रतराज]

चातुर्याम धर्म

पार्श्वनाथ या जैनांच्या तेवीसाव्या तीर्थंकराने प्रचारित केलेल्या चार यामांना चातुर्याम धर्म असे म्हणतात. याची व्याख्या अशी –‘ चत्वारो यमा एव यामा निवृत्तयो यस्मिन् सः ’ = चार यम म्हणजेच याम अर्थात निवृत्ती ज्यात सांगितल्या आहेत, असा धर्म (अभि. रा.).

चातुर्यामांचे उल्लेख पालिवाङ्मयात मिळतात व जैनांच्या आगमसाहित्यातही मिळतात; पण त्या दोन्ही ठिकाणी चार यामांच्या विषयासंबंधी मात्र मतभेद आहेत. जैन आगमानुसार पार्श्वनाथाने सांगितलेले चार याम असे – (१) सर्व प्राणातिक्रमणापासून (प्राणिहत्या) विरती (२) सर्व मृषावादापासून (असत्य भाषण) विरती (३) सर्व अदत्तादानापासून (चोरी) विरती व (४) सर्व बहिःस्यादानापासून (परिग्रह) विरती.

चातुर्याम शब्दातील यम धातू संयमार्थक आहे. वरील चार प्रकारांनी आत्मसंयम करणे, हाच चातुर्याम धर्म होय. या धर्माचा उगम वेदोपनिषदांच्या पूर्वी भारतात प्रचलित असलेल्या तपस्वी मुनींच्या संयमात्मक तपोधर्मापासून झाला आहे. हे मुनी संसारातील दुःखांना व माणसामाणसांतील असद्व्यवहारांना कंटाळून अरण्यात जात आणि वरील चार प्रकारांनी तप करीत. पण पार्श्वनाथाने हे याम सार्वजनिक करण्याची खटपट केली. त्याने आणि त्याच्या शिष्यांनी भिक्षेवर निर्वाह करून सामान्य लोकांनाही वरील चार यामांचे शिक्षण देण्याचा प्रयत्न केला. चोव्वीस तीर्थंकरांपैकी पहिला ऋषभनाथ व शेवटचा महावीर हे दोघे सोडून मधल्या बाव्वीसही तीर्थंकरांनी चातुर्याम धर्माची प्ररूपणा केली, असे सांगितले आहे. याविषयी उत्तराध्ययनसूत्रातील केशी-गौतम संवाद पाहण्याजोगा आहे. केशीच्या प्रश्नाला उत्तर देताना गौतम गणधर म्हणतो – पूर्वकालीन माणसे ऋजुजड होती, पश्चिम कालातली माणसे वक्रजड होती व मध्यकालीन माणसे ऋजुप्राज्ञ होती. पूर्वकालीन माणसांना

त्यांच्या जडत्वामुळे धर्माचा शोध करणे कठीण होते, तर पश्चिमकालीन माणसांना त्यांच्या वक्रतेमुळे धर्माचे अनुपालन कठीण होते. पण मध्यकालातील माणसे सरळ व शहाणी असल्यामुळे धर्मशोधन व धर्मपालन या दोन्ही गोष्टी त्यांना सरळ व सुलभ ठरल्या. म्हणूनच प्रथम व अंतिम या तीर्थंकरांनी पंचव्रतरूपी धर्म सांगितला; पण मध्यम तीर्थंकरांनी मात्र तो चातुर्याम या स्वरूपातच प्रस्थापित केला.

पार्श्वनाथाच्या चातुर्यामात महावीराने पंचमहाव्रते व सचेलकत्वाऐवजी अचेलकत्व (वस्त्र न वापरणे) असे दोन प्रमुख फेरबदल केले व त्या धर्माचा प्रसार केला· [पा. चा. ध.]

चातुर्वर्ण्य ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य व शूद्र असे चार वर्ण हिंदू धर्मशास्त्रात मानलेले आहेत. या चारही वर्णांची कर्तव्ये, अधिकार, व्यवहार, उच्चनीचत्व, परस्परावलंबित्व, परस्परपूरकत्व, इ. गोष्टींचा विचार करून धर्मशास्त्रकारांनी जी एक सामाजिक चौकट या देशात निर्माण केली, तिला चातुर्वर्ण्य असे नाव आहे.

चातुर्वर्ण्य ही एक सामाजिक संस्था आहे. हिंदूंचा तो 'प्रथम धर्म' आहे, असे म्हणण्यास प्रत्यवाय नाही. या कल्पनेचे पुढील चार विभाग सांगता येतील –

(१) समाजात चार वर्ण आहेत, त्याहून अधिक नाहीत.

(२) हे चारही वर्ण मिळून समाज पूर्ण होतो.

(३) प्रत्येक वर्णाचे वेगळेपण गुणभिन्नतामूलक आणि कर्तव्यभिन्नतामूलक आहे.

(४) एकाच शरीराचे भिन्न भिन्न अवयव असतात; त्याप्रमाणे प्रत्येक वर्ण हा चातुर्वर्ण्याचा अवयव आहे. म्हणजेच निरनिराळे वर्ण आणि सर्व समाज यांच्यामध्ये अवयव आणि अवयवी असा संबंध आहे.

समाजात कर्मांच्या भिन्नत्वामुळे चार वर्ग होतात, ही कल्पना अत्यंत जुनी आहे. वेदपूर्वकालात म्हणजेच, वेदद्रष्ट्या ऋषींचे पूर्वज आणि इराणी व युरोपियन लोकांचे पूर्वज एकत्र होते, त्या काळी देखील चातुर्वर्ण्याची कल्पना होती, असे अनुमान करायला जागा आहे. प्लक्ष, शाल्मली, कुश, क्रौंच, शाक व जंबू या सहा द्वीपात चातुर्वर्ण्यसंस्था होती, असे विष्णु पुराणात सांगितले आहे. या सहांतील जंबुद्वीप सोडून बाकीची पाच द्वीपे भारताबाहेरची आहेत. ग्रीसपासून चीनपर्यंतचा विस्तीर्ण भूभाग या सहा द्वीपांत येतो (राजवाडे).

जुन्या ग्रीक ग्रंथांत समाजातल्या चार भेदांचा उल्लेख आहे आणि हे भेद धंद्यांवरून पडले का वंशांवरून, असा विवादही तिथे उपस्थित केलेला आहे. अवेस्ता ग्रंथातही अथर्वणादी चार वर्गांचा उल्लेख आहे. अशा प्रकारे चातुर्वर्ण्यकल्पना ही वेद-कालापासूनची असल्यामुळे तिला सनातन म्हणायला हरकत नाही.

हिंदुधर्मशास्त्रात चातुर्वर्ण्याच्या कल्पनेला जितके सनातनत्व आहे, तितके दुसऱ्या कोणत्याही सामाजिक नियमाला आहे, असे दिसत नाही. श्रुतीत अनेक रीतीभातींचा आणि अनेक संस्थांचा उल्लेख आहे; पण आज त्यांपैकी कित्येक गोष्टी नष्ट झाल्या आहेत. वेदोत्तरकालात व्यवहारनियम बदलले, भोजनाचे पदार्थ बदलले, रीतीभाती बदलल्या, शासनसंस्था बदलल्या, जीवितहेतू व मनुष्याचे कर्तव्य, इ. विषयींचे सिद्धान्तही बदलले; पण एवढ्या अतिदीर्घ कालखंडातही चातुर्वर्ण्य कल्पना मात्र स्थिर राहिली.

अध्ययन–अध्यापन, लोकसंरक्षण, अर्थोत्पादक व्यवहार व सेवाकर्म या क्रिया ज्या समाजात नाहीत, तो समाज, समाज या संज्ञेलाच पात्र ठरणार नाही. अर्थात चातुर्वर्ण्याचे अस्तित्व अत्यंत स्वाभाविक आहे. या दृष्टीने चातुर्वर्ण्य हे सार्वभौम आहे. मात्र इतर देशांतील चातुर्वर्ण्य व भारतातील चातुर्वर्ण्य यांत फरक आहे. भारतीय चातुर्वर्ण्य संस्कारांकित आहे व इतर देशांतले तसे नाही. भारतात प्रत्येक वर्णाला वर्णविशिष्ट संस्कार आहेत. प्रारंभी समाजातले ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य व शूद्र हे चार वर्ण याजन-शिक्षण, रक्षण, आर्थिक व्यवहार व दास्य या चार क्रियांच्या स्वरूपात होते. पुढे या चारही वर्णांत भिन्न भिन्न संस्कार रूढ झाले. त्यामुळे चातुर्वर्ण्य हे संस्कारांकित झाले. त्यामुळेच पुढे कर्मदृष्ट वर्ण आणि संस्कारदृष्ट वर्ण यांमध्ये विसंगती दिसू लागली, म्हणजेच संस्कार ब्राह्मणांचे व कर्म शूद्राचे अशी परिस्थिती निर्माण झाली. त्यासाठी मग धर्मशास्त्रात आपद्धर्म हे नवे प्रकरण उत्पन्न झाले.

आनुवंशिक संस्कारांची कल्पना हे चातुर्वर्ण्यातले आपली एक तत्त्व डॉ. काणे यांनी सांगितले आहे. जन्माला येणारा प्रत्येक माणूस आपल्या पूर्वजांच्या व्यवसायाचे व गुणांचे संस्कार आपल्या बरोबर घेऊन येतो, अशी आपल्या धर्मशास्त्रकारांची कल्पना आहे.

पुढे या कल्पनेच्या जोडीला कर्म व पुनर्जन्म या कल्पना येऊन बसल्या आणि त्यांचा संकलित परिणाम म्हणून वर्णव्यवस्था ही जन्मावर अवलंबून आहे, असे मत रूढ झाले.

वर्णोत्पत्तीचा इतिहास – चार वर्ण कोणी व कशासाठी निर्माण केले, याविषयी मनू (१. ३१) म्हणतो–

> लोकानां तु विवृद्ध्यर्थं मुखबाहूरुपादतः।
> ब्राह्मणं क्षत्रियं वैश्यं शूद्रं च निरवर्तयत् ॥

अर्थ – लोकांच्या सर्वांगीण उत्कर्षासाठी (परमेश्वराने) मुख

बाहू, ऊरू व पाद यांच्यापासून अनुक्रमे ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य व शूद्र हे वर्ण निर्माण केले.

मनूचा वर दिलेला श्लोक ऋग्वेदातील पुढील (१०.९.१२) ऋचेचा अनुवाद आहे, असे म्हणता येते–

ब्राह्मणोऽस्य मुखमासीद् बाहू राजन्यः कृतः ।
ऊरू तदस्य यद्वैश्यः पद्भ्यां शूद्रो अजायत ।।

अर्थ – ब्राह्मण हे या पुरुषाच्या (ईश्वर) मुखापासून, क्षत्रिय हे बाहूपासून, वैश्य हे मांडयांपासून व शूद्र हे पायापासून उत्पन्न झाले.

या ऋचेत चार वर्णांचा उल्लेख असला, तरी ही ऋचा ज्या सूक्तात आहे, ते-सूक्त अतिप्राचीन नसावे याविषयी बऱ्याच विद्वानांचे एकमत आहे. शिवाय ही ऋचा रूपकात्मक असल्यामुळे तिचा शब्दशः अर्थ घेणे योग्य नव्हे, असे डॉ. काणे व डॉ. मंगलदेव शास्त्री म्हणतात.

ऋग्वेदात अन्यत्रही ब्राह्मण, राजन्य व विश् असे उल्लेख येतात. त्यांतील ब्राह्मण शब्दाचा अर्थ ब्रह्म = स्तोत्र, ब्राह्मण = स्तोत्रगायक, असा आहे. (ऋ. १०.७१.८; ७.१०३.७–८). ऋग्वेदात अनेक वेळा अनेक ठिकाणी आलेल्या क्षत्रिय शब्दाचा अर्थ वर्णवाचक नसून बलवान असा आहे. ऋग्वेदातला विश् हा शब्द वैश्य या अर्थी नसून सामान्य लोक या अर्थी आहे (ऋ. १.२५.१). त्यावेळी प्रत्येक सामान्य मनुष्य स्वतःला विश् = आर्यप्रजा, असे समजत असे. यावरून असे कळून येईल, की यांपैकी कोणताही शब्द ऋग्वेदात वर्णविषयक मिकेतून वापरलेला नाही.

चातुर्वर्ण्यात गृहीत असलेली वर्णभेदाची कल्पना ऋग्वेदात दिसत नसून, तिथे आर्य व दास किंवा दस्यू या भेदकल्पनेला अधिक महत्त्व आहे. अगस्त्याबद्दल उल्लेख करताना अशा अर्थाचा एक मंत्र येतो, की त्याने दोन वर्णांचे पोषण केले (ऋ. १.१७९.६). हे दोन वर्ण म्हणजे आर्य व दास हेच होत. ऋग्वेदातील वर्ण शब्दाचा अर्थ रंग असाच घेतला पाहिजे. आर्यांहून दासांचा रंग वेगळा असल्यामुळेच वर्णभेदाची कल्पना वैदिकांच्या मनात निर्माण झाली असावी. पण ऋग्वेदकाळी सांप्रतच्याप्रमाणे वर्णव्यवस्था नव्हती, हे निःसंशय. तिथे प्रथम आर्य व दस्यू असा भेद दिसतो. ब्राह्मण व क्षत्रिय हा भेदही वैदिक आर्यांत सुरवातीस नसावा. तो उशिरा निर्माण झाला. वर्णकल्पनेच्या आधारावर ब्राह्मण, क्षत्रिय व विश् असे समाजाचे तीन भाग ऋग्वेदकालानंतर पडले असावे.

यावरून सारांशरूपाने असे सांगता येईल, की ऋग्वेदाच्या रचनाकाळी चालू कल्पनेतली वर्णव्यवस्था जन्मलीच नव्हती. सर्व लोक समान दर्जाचे होते. वर्णविषयक कल्पना उद्भूत झालेली नसल्यामुळे सर्वजण आपापल्या गरजा भागविण्यासाठी प्रसंगी युद्ध, पौरोहित्य व सेवावृत्तीही आवश्यकतेनुसार करीत असत (प्रा. भाऊ मांडवकर– नवभारत, जुलै १९६२).

चातुर्वर्ण्याच्या निर्मितीपूर्वी एकच वर्ण होता, असे भागवत पुराणातही (९.१४.४८) म्हटले आहे–

एक एव पुरा वेदः प्रणवः सर्ववाङ्मयः ।
देवो नारायणो नान्य एकोऽग्निर्वर्ण एव च ।।

अर्थ – पूर्वी एकच वेद होता. सर्व वाङ्मयरूप एकच प्रणव होता. नारायण नावाचा एकच देव होता आणि दुसरा नव्हता. एकच अग्नी व एकच वर्ण होता.

'चातुर्वर्ण्यं मया सृष्टं गुणकर्मविभागशः' = मी गुण व कर्म यांच्या विभागाने चातुर्वर्ण्य उत्पन्न केले, असे गीतेत (४.१३) म्हटले आहे.

कर्मभेदाने वर्णभेद निर्माण झाला, असे गीता स्पष्टच सांगते. पण एकाच वर्णातून कर्मभेदाने चार वर्ण निर्माण झाले, का चातुर्वर्ण्यातले चारी वर्ण मूळ स्वतंत्र समाज होते, याविषयी श्री. ना. गो. चापेकर यांनी पुढील विचार मांडले आहेत—

आजतागायतची रूढ समजूत अशी, की चार वर्णांचा नसला, तरी त्रैवर्णिकांचा अविभिन्न असा एक समाज होता. या एकजिनसी समाजाचे पुढे तीन तुकडे पडले. त्या तिघांना ब्राह्मण, क्षत्रिय व वैश्य अशा संज्ञा मिळाल्या. शूद्र हा चौथा समाज मात्र स्वतंत्र वर्ग होता, याविषयी कोणाचा वाद नाही.

प्रथमतः असा विचार येतो, की एकजिनसी समाजाला अशा प्रकारे छिन्नविछिन्न करणे शक्य आहे काय ? असे करणारा हा अद्वितीय पुरुष कोण व त्याचे ऐकणार तरी कोण ? शिवाय अशी अपूर्व विघटना करणाऱ्याचे नाव अज्ञात कसे व का राहावे ? प्रत्येक समाजात चातुर्वर्ण्य तत्त्वतः असतेच; मग बाकीच्या देशांत भारतातल्याप्रमाणे चातुर्वर्ण्य का निर्माण झाले नाही ? भारतातच अशी कोणती परिस्थिती होती, की तिच्यामुळे हे चार भेद उत्पन्न व्हावे ? खरोखर जर अशी स्थिती असती, तर ज्या अनेक कारणांमुळे हे भेद पडले, त्या कारणांचा निर्देश कुठेतरी व्हायला हवा होता. पण तशा प्रकारच्या ऐतिहासिक कारणांच्या अभावी मूळचा एकच समाज चतुर्विध झाला, असे मानायला काही आधार नाही.

चार जातींना वर्ण शब्द तरी का लावावा, हाही विचार करण्यासारखा प्रश्न आहे. वर्ण म्हणजे रंग हा अर्थ अनादी आहे. मग एकाच वर्णाच्या म्हणजे एकाच समाजाच्या चार विभागांनो वर्ण शब्द लावण्यात स्वारस्य काय ? ज्या अर्थी तो लावला गेला आहे, त्या अर्थी चार वर्ण हे चार निरनिराळे समाज मुळातच असले पाहिजेत, असेच अनुमान करावे लागते. पुराण-

वाङ्मयात ब्राह्मण गोरे, क्षत्रिय रक्तवर्णी, वैश्य पीतवर्णी व शूद्र कृष्णवर्णी, असा वर्णभेद निर्दिष्ट आहे. या चार वेगवेगळ्या वर्णांचे (चार रंगांच्या समाजाचे) चातुर्वर्ण्य बनवून, त्या चारही वर्णांना वेदोत्तरकाळी एकत्र करण्यात आले, असे म्हणावे लागते.

त्रैवर्णिक हे आर्य असतील, यज्ञ करणारे असतील किंवा समान देवतांची उपासना करणारेही असतील; तथापि ते भिन्नवर्णीय स्वतंत्र समाज होते व असले पाहिजेत. अन्यथा एकाच वर्णाच्या म्हणजे रंगाच्या लोकसमूहाला चातुर्वर्ण्य ही संज्ञा लावणे अप्रयोजक ठरेल.

क्षत्रिय हे ब्राह्मणांहून निराळे होते, असे मानण्यास पुराणांतरी स्पष्ट आधार मिळतो. वायू पुराणात ब्राह्मणांची उत्पत्ती सप्तर्षींपासून व क्षत्रिय-वैश्यांची मनूपासून सांगितली आहे (अ. ६२). एकाच समाजाचे चार समाज झाले असे मानले, तर सर्वांच्या चालीरीती समान असायला हव्या होत्या. पण स्मृतिग्रंथांवरून तसे दिसत नाही.

त्रैवर्णिकांचा उपनयनकाल वेगळा सांगितला आहे. त्यांच्या विवाहपद्धतीही वेगवेगळ्या आहेत. एकाच समाजात आठ प्रकारचे विवाह असणे संभवत नाही. ब्राह्म, आसुर, गांधर्व, पैशाच, इ. विवाहपद्धती या निरनिराळ्या संस्कृतींच्या निदर्शक आहेत. एकाच समाजात इतक्या भिन्न संस्कृतीचें लोक असत नाहीत. स्मृतींत बारा प्रकारचे पुत्र सांगितले आहेत, तेही निरनिराळ्या चालीरीतींचे निरनिराळे समाज होते, हीच गोष्ट दर्शवतात.

स्मृतिकाली एकाचे चार वर्ण झाले, असे मानले, तर तत्पूर्वी सर्व समाज एक असला पाहिजे. पण एकत्वाचा तसा पुरावा कुठेच आढळत नाही. सर्वांत प्राचीन वाङ्मय म्हणजे ऋग्वेद; पण तिथेही वसिष्ठ-विश्वामित्रांचे कलह दृष्टीस पडतात. हे कलह दोन व्यक्तींमधले नसून, ब्राह्मण्य आणि क्षत्रियत्व यांच्या बलाबलाचा तो सामना होता. वेदकालातला प्रत्येक ब्राह्मण पुरोहित व प्रत्येक क्षत्रिय योद्धा होता, ही समजूतही बरोबर नाही. क्षत्रियांतही ऋषी होतेच. त्यांना राजर्षी म्हणत. ऋग्वेदात ब्राह्मण अनेक धंदे करीत असल्याचा पुरावा मिळतो. ते युद्ध म्हणजे क्षत्रियांचा धंदाही करीत. क्षत्रियही ब्राह्मणी व्यवसाय करून कालांतराने ब्राह्मण होत. प्रत्येक क्षत्रिय हा राजा कसा असू शकेल? क्षत्रियांना पूर्वी राजन्य म्हणत. याचा अर्थ इतकाच, की क्षत्रिय समाजात राजसंस्था इतर समाजांच्या आधी निर्माण झाली. देवांना कोणीही राजा नसे व त्यामुळे त्यांचा वारंवार पराभव होई. म्हणून मग त्यांनी आपल्यापैकी एकाला राजा नेमले, अशी ऐतरेय ब्राह्मणात आख्यायिका आहे. ब्रह्म म्हणजे मंत्र किंवा वेद. मंत्र म्हणणे किंवा रचणे, हाच ज्यांचा व्यवसाय ते ब्राह्मण होत. या ब्राह्मणांना प्रथम रक्तवर्ण क्षत्रिय भेटले, तेव्हा एका वर्णाचे दोन वर्ण झाले. ब्राह्मणांना क्षत्रिय प्रथम भेटले, म्हणून त्यांना ब्राह्मणांच्या नंतरचा क्रमांक मिळाला. वैश्यांचा समागम त्यांच्याही नंतर झाला. त्यामुळे त्यांचा तिसरा क्रमांक लागला. सगळ्यांच्या शेवटी शूद्रांची गाठ पडल्याने त्यांचा अनुक्रम चौथा म्हणजे सर्वांच्या खाली लागला.

ब्राह्मण व क्षत्रिय यांचे पूर्वज जसे निराळे, तसे त्यांचे धर्मही निरनिराळे होते. ब्राह्मणांचा धर्म श्रौत म्हणजे श्रुतीत सांगितलेला होता; तर क्षत्रियांचा म्हणजेच मनूच्या वंशजांचा धर्म स्मार्त होता (वायू पु. ५७.४०–४१). ब्राह्मण-क्षत्रियांहून वैश्यांचा धर्मही वेगळा होता. वैश्य शब्द प्रचारात येण्यापूर्वी विश् शब्दाचा उपयोग होत असे. विश् शब्दाचा अर्थ लोक किंवा प्रजा असा आहे. पुढे हा शब्द एका विशिष्ट समाजाचा द्योतक म्हणून निश्चित करण्यात आला. वैश्यांनी ब्राह्मण किंवा क्षत्रिय यांच्याबरोबर कधीही स्पर्धा केली नाही. सारांश, पुरातनकाळी ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य व शूद्र हे चार स्वतंत्र समाज होते, असेच म्हणावे लागते. भारतीय समाजधुरीणांनी चातुर्वर्ण्याच्या द्वारे त्यांना एकत्र आणण्याचा अपूर्व प्रयोग केला. पण या प्रयोगाचे पर्यवसान असंख्य जाती निर्माण होण्यात होऊन, त्यामुळेच पुढे भारताची दुर्दशा होईल, हे त्या वेळी कोणाच्या स्वप्नातही आले नसेल.

चातुर्वर्ण्याचे धर्म व नियम – धर्मसूत्रांत चातुर्वर्ण्याच्या आचाराचे नियम सांगितले आहेत. हे नियम म्हणजेच धर्म होत. ‘आचारः प्रथमो धर्मः’ याचा अर्थही वागणुकीचे नियम असाच आहे. चार वर्णांनी स्वतःच्या वर्णात व इतर वर्णांशीही कसे वागावे, या बाबतीतल्या नियमांतूनच पुढे धारणेचा धर्म उत्प होतो, असे श्री. महादेवशास्त्री दिवेकर म्हणतात.

सर्व धर्मसूत्रकारांत आपस्तंब हा प्राचीन सूत्रकार आहे. आता मी धर्माचे व्याख्यान करतो’ असे सांगून तो पुढील सूत्रे (१.१.४–७) लिहितो—

चत्वारो वर्णा ब्राह्मणक्षत्रियवैश्यशूद्राः। तेषां पूर्वः पू जन्मतः श्रेयान्। अशूद्राणामदुष्टकर्मणामुपनयनं वेदाध्यय मग्न्याधेयं फलवन्ति च कर्माणि। शुश्रूषा शूद्रस्येतरे वर्णानाम्।।

अर्थ – ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य व शूद्र असे चार वर्ण आहे त्यांतील आधीचा वर्ण पुढच्याहून जन्माने श्रेष्ठ असतो. त्रैवर्णिकांची उपन सोडून अदुष्ट कर्माने युक्त अशा अन्य त्रैवर्णिकांची उपन वेदाध्ययन व अग्न्याधेय, इ. कर्मे फलद्रूप होतात. शूद्राने इ वर्णांची सेवा करून उपजीविका करायची असते.

यावरून असे दिसते, की आपस्तंबाने इथे चातुर्वर्ण्यातली उच्चनीचता सांगितली आहे. पुढील सूत्रकारांनी व स्मृतिकारांनी बह्वंशी आपस्तंबाचाच अनुवाद केला आहे. आर्य म्हणजे त्रैवर्णिक कितीही कनिष्ठ असला तरी श्रेष्ठ. शूद्राने त्याला नमस्कार करावा, त्याने तीन्ही वर्णांची सेवा करावी व त्यांच्याकडून मिळालेल्या अन्नवस्त्रावर संतोष मानावा, असे गौतमही सांगतो (गौ. ध. सू. ६.१,११,५८,६०,६१). ब्राह्मणाला चारही वर्णांच्या, क्षत्रियाला तीन वर्णांच्या व वैश्याला दोन वर्णांच्या स्त्रिया करण्याचा अधिकार आहे. शूद्राने मात्र आपल्याच एका जातीची स्त्री वरावी. ब्राह्मणाने अध्ययन, अध्यापन, दान, प्रतिग्रह, यजन व याजन ही षट्कर्मे करावी. क्षत्रियाने अध्ययन, यजन, दान ही त्रिकर्मे करून बल, शस्त्र, कोश व भूतरक्षण यांकडेही लक्ष द्यावे. वैश्याने अध्ययनादी त्रिकर्मे करून कृषी, वाणिज्य व पशुपालन या गोष्टी कराव्या. शूद्राने फक्त वरील तीन वर्णांची सेवा करावी. कृषी व शुश्रूषा करण्यामुळे वैश्य व शूद्र हे वरील वर्णांचे पराधीन असतात. स्त्री व शूद्र यांच्याशी व्रतप्रसंगी भाषण करू नये. ब्राह्मणाचा स्ववृत्तीवर जर निर्वाह होत नसेल, तर त्याने क्षात्रवृत्तीने जगावे; कारण तीच त्याला जवळची आहे. गो–ब्राह्मण यांच्यावर अन्याय व वर्णसंकर अशा प्रसंगी ब्राह्मण व वैश्य यांनी धर्मरक्षणार्थ शस्त्र धारण करावे. क्षात्रवृत्तीवरही निर्वाह होत नसेल, तर त्याने वैश्यवृत्ती आचरावी (बौ. ध. सू. १).

वसिष्ठाचे मतही बौधायनाच्या वरील मतासारखेच आहे. शूद्र स्त्रीशी विवाह करणे असेल, तर तो अमंत्रक करावा, असे तो सांगतो. पण त्याचबरोबर शूद्र स्त्रीशी विवाह केल्यावर कुलापकर्ष होतो व मेल्यावर दुर्गती प्राप्त होते, असेही विधान करतो. वसिष्ठाने शूद्रासंबंधी पुष्कळच लिहिले आहे. ब्राह्मणाने शूद्रान्न सेवन करू नये, असे त्याचे मत आहे.

उशनससंहितेत ब्राह्मणाविषयी विशेष धर्म सांगितला आहे, तो असा—

योऽधीत्य विधिवद्वेदं वेदान्तं न विचारयेत् ।
स सान्वयः शूद्रकल्पः स पाद्यं न प्रपद्यते ।।

अर्थ – जो विधिवत वेदाध्ययन केल्यावर वेदान्ताचा विचार करणार नाही, तो (ब्राह्मण) वंशपरंपरेने शूद्रतुल्य होतो व तो पूजेला अपात्र ठरतो.

यावरून उशनसाच्या काळी ब्राह्मण लोक केवळ वेदपठणातच मग्न राहत व तत्त्वज्ञानाकडे दुर्लक्ष करीत, असे दिसते. म्हणून उशनसाने त्यांना वरील इशारा दिलेला आहे.

शंखस्मृतीत चार वर्णांचे सामान्य धर्म सांगून, शूद्राने शुश्रूषेवर उपजीविका होत नसल्यास निरनिराळे कलाप्रकार व शिल्पकर्म करून निर्वाह करावा, असे सांगितले आहे.

यावरून शंखस्मृतीच्या काळी शूद्र हा त्रैवर्णिकांच्या सेवेतून बाहेर पडून विविध शिल्पांमध्येही लक्ष घालू लागला होता, असे दिसते.

धर्मशास्त्रकारांत आपस्तंब हे सर्वांत प्राचीन व देवल हे सर्वांत अर्वाचीन टोक आहे. मनू हा सामान्यपणे या दोन्ही टोकांच्या मध्यभागी बसतो. मनूनंतरच्या स्मृतिकारांनी बहुतेक मनूचीच री ओढली आहे. म्हणून आपस्तंब, गौतम, बौधायन, वसिष्ठ, विष्णू, उशनस व शंख यांच्याहून मनूने वेगळे विचार काय मांडले आहेत, ते पाहणे युक्त ठरेल. चातुर्वर्ण्यासंबंधी मनूचे विचार आहेत, ते असे—

ब्राह्मण हा मूर्तिमंत धर्मच होय. तो धर्माकरताच उत्पन्न केला गेला आहे. जगातील सर्व वस्तूंना ब्राह्मण हा पात्र आहे. सवर्ण स्त्रीशीच विवाह करणे द्विजांना प्रशस्त होय. इतर वर्णांच्या स्त्रिया करणे, हे एकंदरीत गौणच समजावे. शूद्र स्त्रीशी संबंध ठेवणारा ब्राह्मण अधोगतीला जातो व त्याचा पुत्रही ब्राह्मण्यापासून भ्रष्ट होतो. ब्राह्मणाने अनिंदित कर्मांनी निर्वाहापुरते मिळवावे व शरीराला फारसे कष्ट न देता शक्य तेवढा धनसंचय करावा. त्याने शूद्रसंबंध शक्य तितका टाळावा. त्याच्या समीप मोठ्याने अध्ययन करू नये. राजाने कोणत्याही स्थितीत ब्राह्मणापासून कर घेऊ नये. राज्यात ब्राह्मण क्षुधापीडित नसावा. न्यायनिवाडा करण्यासाठी राजाने विद्वान ब्राह्मण नेमावे. ब्राह्मणाने सर्वांच्या वृत्तींचा विचार करावा. त्यांना त्यांचे धर्म सांगावे व स्वतःही धर्माप्रमाणे वागावे. आपत्काली ब्राह्मणाने वैद्यकी, ज्योतिष, कलाकौशल्य, नोकरी, कृषी, व्यापार, भिक्षा व व्याजबट्टा या गोष्टी करूनही निर्वाह करावा. शूद्र समर्थ झाला, तरी त्याने मात्र द्रव्यसंग्रह करू नये.

मनू हा क्षत्रिय राजा होता. त्याने ब्राह्मणांचे महत्त्व बरेच वाढवून ठेवले आहे. हे महत्त्व त्याने उगीच वाढवले असेल, असे म्हणता येणार नाही. निदान मनूच्या काळात तरी ब्राह्मण वर्ण सर्व दृष्टींनी श्रेष्ठ होता. तो धर्मभोक्ता, विद्वान, न्यायी व तपस्वी होता यात शंका नाही. विद्वान अविद्वान कसाही असला तरी ब्राह्मण हा श्रेष्ठ मानावा, असे क्षत्रिय मनू म्हणतो. पण बौधायन, आपस्तंब, इ. ब्राह्मण सूत्रकारांनी मात्र स्ववर्णाची अशी मिथ्या स्तुती केलेली नाही. त्याउलट अविद्वान ब्राह्मणाची त्यांनी निंदाच केली आहे.

याज्ञवल्क्याने चार वर्णांपैकी द्विजांचे सर्व संस्कार समंत्रक व्हावे आणि द्विजांनी शूद्र स्त्री करू नये, असे आपले मत स्पष्ट मांडले आहे. शूद्राने फक्त सेवा करावी, असे पहिले सूत्रकार सांगतात व त्याने सेवा करून वर शिल्पकर्मही करावे, असे

पुढील स्मृतिकार सांगतात. पण शूद्राने वाणिज्य करावे असे याज्ञवल्क्यच प्रथम सांगतो (५. १२०). व्यापाराची परवानगी शूद्राला याज्ञवल्क्याच्या पूर्वी कोणीही दिलेली नाही. शूद्राने व्यापार कशाकशाचा करावा याचा तपशील पुढे पराशराने दिलेला आहे (अ. १). क्षत्रिय, वैश्य व ब्राह्मण यांनी हव्यकव्यप्रसंगी एकमेकांच्या घरी भोजनाला जावे; पण शूद्राच्या घरी मात्र जाऊ नये, असे पराशर सांगतो. तथापि दास, नापित, गोपाल, इ. शूद्र त्याने भोज्यान्न ठरवले आहेत. पराशराने अनधीत ब्राह्मणाची यथेच्छ निंदा केली आहे. त्याने गायत्रीरहित ब्राह्मणाला शूद्राहूनही अपवित्र म्हटले आहे. मात्र तरीही तो जन्मजात वर्णश्रेष्ठत्वाचा पुरस्कार करतो. अग्निकार्य, संध्या व वेदाध्ययन न करणारे ब्राह्मण शूद्र होत, असे त्याने स्पष्ट सांगितले आहे. यावरून पराशराच्या काळी ब्राह्मण हे शेतीचा धंदा करू लागल्यामुळे शूद्रवत बनू लागले होते, असे दिसते. अत्रिस्मृतीच्या काळी ब्राह्मणांची स्थिती याहून बरीच हीन झाली असावी. अत्रीने देव, मुनी, शूद्र, पशू, म्लेच्छ, इ. ब्राह्मणांचे दहा प्रकार सांगितले असून, क्रियाहीन, मूर्ख, धर्मभ्रष्ट व निर्दय अशा ब्राह्मणाला तो चांडाल ब्राह्मण म्हणतो. अत्रीचे हे विचार बरेच निर्भीड व वस्तुस्थितीचे निदर्शक आहेत, असे समजायला हरकत नाही.

लघुआश्वलायन व दक्ष यांच्या स्मृतींमध्येही ब्राह्मण्याच्या ऱ्हासाचीच परिस्थिती विशद केलेली आहे. पुजारीपणा करून जगणारा व अन्नासाठी पराधीन झालेला ब्राह्मण शूद्रतुल्य होय, असे त्यांनी म्हटले आहे.

व्यासांनी आपल्या स्मृतीत तत्कालीन परिस्थितीचे सम्यक चित्र रेखाटले आहे. शूद्र हा एक चौथा वर्ण आहे व वर्णत्वामुळे त्याला धर्मही असलाच पाहिजे, असे व्यास म्हणतात. शूद्राला कसलाही धर्म नाही व कसलाही संस्कार नाही, असे जे पूर्वस्मृतिकारांनी म्हटले, त्याच्या उलट व्यासांचे हे मत आहे. व्यासकाली धंद्यावरून शूद्रांच्या भिन्न भिन्न जाती बनू लागल्या होत्या. न्हावी, गोपाल, कुंभार, व्यापारी, माळी, सावकार, कारकून, असे शूद्र वर्णात व्यवसायावरून भिन्न भिन्न वर्ग निर्माण झाले होते. देवलाच्या काळी तर शूद्र हा पुष्कळच सुधारला होता व चित्र, नृत्य, गीत, वाद्य, इ. कलांतही तो प्रवीण होऊ लागला होता, असे दिसते.

चातुर्वर्ण्यासंबंधीची ही सर्व वचने पाहिली असता असे दिसते, की पूर्वी त्रैवर्णिकांत परस्पर रोटीबेटीव्यवहार होत असत. आजच्याप्रमाणे रोटीबेटीबंदीचे चातुर्वर्ण्य जुन्या काळी नव्हते, तर ते प्रवाही असे होते. त्याचप्रमाणे समाजात शाकाहार व मांसाहार असे दोन्ही प्रकारचे आहार रूढ होते. वरील धर्मविवेचनात क्षत्रिय व वैश्य यांच्या धर्मांचे विवेचन फारसे आढळत नाही. बहुतेक धर्मशास्त्रकारांनी फक्त ब्राह्मण व शूद्र यांच्याच आचार धर्मांचे वर्णन केले आहे. एकंदर स्मृतिवाङ्मयाचा विचार केला, तर शूद्र क्रमाने उच्च स्थितीप्रत येऊ लागलेला दिसतो.

महाभारतात चातुर्वर्ण्य हे जन्मावर अवलंबून असते हे अमान्य केले नसले, तरी त्या बाबतीत महाभारतकारांची मते अधिक उदार आहेत.

वर्णविशिष्ट गुण असतील, तरच तो तो मनुष्य त्या त्या वर्णाचा आहे असे समजावे, असा महाभारतकारांचा आग्रह आहे. महाभारतातल्या यक्षप्रश्नात यक्षाने युधिष्ठिराला प्रश्न केला आहे, की कुल, सदाचार, स्वाध्याय व श्रुत यांपैकी कशाने ब्राह्मण्य उत्पन्न होते ? यावर युधिष्ठिर उत्तर देतो. 'कुल, स्वाध्याय किंवा श्रुत ही ब्राह्मण्याला कारणीभूत नसून सदाचार हेच एक कारण' आहे. ज्याने सदाचार सोडला, तो ब्राह्मण मेल्यासारखाच समजावा. अध्ययन, अध्यापन व शास्त्रचिंतन करणारे, पण आचरण चांगले नसलेले ते सर्व (ब्राह्मण) व्यसनी आहेत असे समज. चारही वेद जाणणारा ब्राह्मण वारुणुकीत जर दुर्वृत्त असेल, तर त्याची योग्यता शूद्रापेक्षाही हीन समजली पाहिजे (म. भा. वन. ३१३). अशाच प्रकारे आपले मत युधिष्ठिराने नहुषाशी झालेल्या संवादातही सांगितले आहे. आणखी एका ठिकाणीही गुणकर्मांवरूनच चारी वर्ण ठरवावे असे युधिष्ठिर सांगतो. सर्प व युधिष्ठिर यांच्या संवादात सर्प युधिष्ठिराला विचारतो, 'सत्यादी गुण हेच वर्णव्यवस्थेचे प्रमाण मानले, तर शूद्राच्या ठिकाणी सत्य, दान, अक्रोध, दया, अहिंसा इ. गुण दिसले, तर त्याला काय ब्राह्मण म्हणावे?' यावर युधिष्ठिर उत्तर देतो –

> शूद्रे तु यद् भवेल्लक्ष्म द्विजे तच्च न विद्यते।
> न वै शूद्रो भवेच्छूद्रो ब्राह्मणो न च ब्राह्मणः॥
> यत्रैतल्लक्ष्यते सर्प वृत्तं स ब्राह्मणः स्मृतः।
> यत्रैतन्न भवेत् सर्प तं शूद्रमिति निर्दिशेत्॥
> (म. भा. वन. १८०.२५-२६)

अर्थ – शूद्रामध्ये जर ते लक्षण (सत्य, दया, इ. गुणांचे) असेल व द्विजामध्ये ते नसेल, तर तो शूद्र, शूद्र नव्हे व तो द्विज, द्विज नव्हे. ज्या ठिकाणी हे लक्षण दिसेल, त्यालाच ब्राह्मण म्हणावे व ज्याच्या ठिकाणी हे लक्षण नसेल, त्याला हे सर्पा, शूद्र समजावे.

त्यावर सर्प पुनश्च प्रश्न करतो. 'हे युधिष्ठिरा, जर तुझ्या मते आचारानेच ब्राह्मण समजायचा असेल, तर जोवर एखाद्या ब्राह्मणाचा आचार नाही, तोवर जाती व्यर्थ होय.'

यावर युधिष्ठिर पुन्हा उत्तर देतो. 'हे सर्पा, सध्या सर्व वर्णांचा संकर झालेला असल्यामुळे अमक्याचा अमका वर्ण असे ठरविणे कठीण आहे. सर्व लोक सर्व वर्णांच्या स्त्रियांच्या ठिकाणी अपत्ये उत्पन्न करतात. तसेच भाषा, मैथुन, जन्म व मरण ही सर्वांनाच सारखी आहेत. तत्त्वज्ञानी लोक तर वर्ण ठरवण्याच्या कामी शील हेच प्रमाण मानतात. शील किंवा सदाचार यांना जर प्राधान्य द्यायचे नसेल, तर चातुर्वर्ण्य घेऊन काय करायचे आहे! म्हणून ज्या ठिकाणी शील व सदाचार आढळतील त्यालाच ब्राह्मण म्हणावे, असे मी तुला पूर्वी सांगितले आहे.' (म. भा. वन. १८०. ३१–३७).

महाभारताच्या काळी सर्व वर्णांचे विचारी लोक या प्रश्नाचा विचार करीत असताना दिसतात. भरद्वाज व भृगू या ऋषींच्या संवादातही युधिष्ठिरासारखेच विचार मांडलेले आहेत.

वर्णभेद हा नैमित्तिक असल्यामुळे त्या त्या गुणांच्या अभावी तो तो वर्ण नाहीसा होतो, असा अभिप्राय भविष्य पुराणातही व्यक्त केला आहे.

शूद्रो ब्राह्मणतामेति ब्राह्मणश्चैव शूद्रताम् ।
क्षत्रियो याति विप्रत्वं विद्याद् वैश्यं तथैव च ।।

(भविष्य पु. १०.४०.४७)

अर्थ – शूद्र ब्राह्मण होतो, ब्राह्मण शूद्रत्वाला जातो, क्षत्रिय ब्राह्मण होतो आणि वैश्याबद्दलही तसेच समजावे.

भविष्य पुराणात दुसऱ्या एका ठिकाणी तर वर्णभेद व जातिभेद हे कृत्रिम असल्याचे सांगून सर्व माणसे समान अधिकाराचीच आहेत, असे स्पष्ट म्हटले आहे –

चत्वार एकस्य पितुः सुताश्च
तेषां सुतानां खलु जातिरेका ।
एवं प्रजानां हि पितैक एव
पित्रैकभावान्न च जातिभेदः ।।
फलान्यथोदुम्बरवृक्षजाते-
र्यथाऽग्रमध्यान्तभवानि यान्ति ।
वर्णाकृतिस्पर्शरसैः समानि
तथैकतो जातिरतिप्रचिन्त्या ।।

(भविष्य पु. १.४१.४५–४६)

अर्थ – एका बापाला चार मुलगे असले, तर त्या मुलांची जात खरोखर एकच असली पाहिजे. त्याचप्रमाणे सर्व लोकांचा पिता एकच परमेश्वर असल्यामुळे मनुष्यसमाजात जातिभेद मुळीच नाही. एकाच उदुंबरवृक्षाला अग्र, मध्य व बुंधा अशा तीन्ही भागी जशी वर्ण, आकृती, स्पर्श व रस या बाबतींत समान अशी फळे येतात, त्याचप्रमाणे (एका विराट पुरुषाच्या मुख, बाहू, ऊरु व पाय या चार अवयवांपासून उत्पन्न झालेल्या) माणसामध्ये (स्वाभाविक) जातिभेद आहे, असे मानता येत नाही.

वर्णांचा उत्कर्षापकर्ष – गुण-कर्म बदलल्याने वर्णांचे उत्कर्षापकर्ष होतात व कित्येकदा ऋषी आणि मनू यांच्या निर्णयानुसार वर्णांचा प्रविभाग होतो, अशीही वचने पुराणांतरी आढळतात. वायू पुराणात मन्वंतरातील वर्णव्यवस्थेविषयी पुढील विधान आहे—

मनोः क्षत्रं विशश्चैव सप्तर्षिभ्यो द्विजातयः ।
एतन्मन्वन्तरं प्रोक्तं समासान्न तु विस्तरात् ।।

अर्थ – मनूपासून क्षत्रिय आणि वैश्य होतात आणि सप्तर्षींपासून ब्राह्मण होतात. विस्तार न करता थोडक्यात सांगायचे तर यालाच मन्वंतर म्हणतात.

वरील वचनाचा अर्थ असा दिसतो, की प्रत्येक मन्वंतराच्या वेळी मनू हा तेव्हाच्या सर्व लोकांमधून क्षत्रिय व वैश्य या वर्णांना योग्य अशी माणसे निवडून काढी व सप्तर्षी हे ब्राह्मणवर्णास योग्य अशी माणसे निवडून काढीत. जे लोक याबाहेर उरत ते शूद्र वर्णाचे समजले जात.

ब्रह्मदेवाने कृतयुगाच्या आरंभी वर्णविभाग करून त्यांचे धर्म सांगितले; पण ते धर्म लोकांनी पाळले नाहीत, म्हणून त्रेतायुगाच्या आरंभी स्वायंभुव मनूने पुन्हा वर्णांचे विभाग केले, असे वायू पुराण सांगते. अशा प्रकारे प्रत्येक युगात वर्णाश्रमांचे विभाग होतच राहतात, असेही वायू पुराणाने म्हटले आहे (५८.१२४).

यातील विभाग या शब्दाचा अर्थ संततिद्वारा वर्ण उत्पन्न करणे, असा होऊच शकत नाही. एका वर्णातल्या माणसाला दुसऱ्या वर्णात घालणे, असाच त्याचा अर्थ केला पाहिजे. म्हणूनच भागवतात मनुष्यामध्ये जी गुणकर्मे दिसून येतील त्याप्रमाणेच त्यांना निरनिराळ्या वर्णात घालावे, असे सांगून नंतर त्याविषयीचे निर्णायक मतही सांगितले आहे—

यस्य यल्लक्षणं प्रोक्तं पुंसो वर्णाभिव्यञ्जकम् ।
यदन्यत्रापि दृश्येत तत्तेनैव विनिर्दिशेत् ।।

(भाग. पु. ७.११.३५)

अर्थ – ज्या वर्णाचे जे वर्णनिर्णायक लक्षण सांगितले, ते जर जन्मामुळे भिन्न मानल्या जाणाऱ्या वर्णाच्या ठिकाणी दिसले, तर त्या लक्षणावरून समजून येणारा वर्णच खरा समजावा.

याविषयी मनूनेही स्पष्ट शब्दात सांगितले आहे, ते असे—

सजातिज व अनंतरज (खालच्या वर्णातल्या स्त्रीच्या ठिकाणी उत्पन्न झालेले) हे लोक तपाच्या किंवा बीजाच्या प्रभावाने प्रत्येक युगात वर्णोत्कर्षाला आणि वर्णापकर्षाला प्राप्त होतात. ब्राह्मणापासून शूद्र स्त्रीच्या ठिकाणी झालेला मुलगा केवळ जन्मावरून किंवा बीजावरून ठरवायचे, तर शूद्रच

असतो. तथापि तो जर चांगल्या कर्मांनी युक्त असा जन्मला असेल, तर तो खालच्या वर्णाचा असूनही आपल्या जन्मापासूनच्या ७ व्या युगापासून पुढे वरच्या वर्णात जातो. याचप्रमाणे म्हणजेच ७ व्या युगापासूनच शूद्र आईबापांपासून जन्मलेला शूद्रही ब्राह्मण वर्णात जातो किंवा ब्राह्मण आईबापांपासून जन्मलेला ब्राह्मण शूद्र वर्णात जातो. क्षत्रिय व वैश्य यांच्याबद्दलही असेच समजावे (मनु. १०.६४–६६).

वरील उताऱ्यात युग शब्द आला आहे, त्याचा अर्थ डॉ. दप्तरी ४ वर्षांचा काल असा करतात. ७ वे युग म्हणजे ६ × ४ = २४ इतक्या वर्षांच्या पुढला काळ होय. युग म्हणजे ४ वर्षे या आपल्या विधानाला त्यांनी आधारही बरेच दिले आहेत.

हीन कर्मांच्या योगाने उत्तम वर्णाचे लोकही खाली ढकलले जावे व हीन वर्णाच्या लोकांनी आचरण सुधारल्यास त्यांना वरच्या वर्णात घ्यावे, अशी व्यवस्था महाभारतकाळी होती, हे पुढील श्लोकावरून कळते—

वर्णोत्कर्षमवाप्नोति नरः पुण्येन कर्मणा ।
दुर्लभं तमलब्ध्वा हि हन्यात् पापेन कर्मणा ।।
(म. भा. शांति. २९१)

अर्थ – पुण्यकारक कर्मे केल्याने उच्च वर्ण प्राप्त होतो व पापकृत्ये केल्याने दुर्लभ अशा त्या उच्च वर्णाची प्राप्ती न होता नीचता प्राप्त होते.

महाभारताच्या अनुशासनपर्वात वीतहव्य राजा ब्राह्मण झाल्याची हकीगत दिली आहे व तिथे म्हटले आहे, की भृगूच्या वचनानेच तो राजा ब्राह्मण झाला. अर्थात भृगूने त्या राजाचे ब्राह्मणत्व मान्य केले आणि तेवढ्यानेच तो ब्राह्मण झाला, हे सिद्ध होते. ज्याचे आईबाप माहीत नाहीत, अशा मुलाचा जर कोणी पुत्र म्हणून स्वीकार केला, तर तो कृत्रिम पुत्र होतो व त्याला स्वीकार करणाऱ्याचाच वर्ण प्राप्त होतो, असेही महाभारतात म्हटले आहे (अनु. ४९.२०–२१).

नीच कुलातून उच्च कुलात गेलेल्या कित्येक पुरुषांची उदाहरणे भविष्य पुराणातही (१.४२.२२-३०) दिली आहेत. कैवर्त स्त्रीपासून व्यास झाले. चांडाल स्त्रीपासून पराशर झाला. गणिकेपासून वसिष्ठ झाला. हे सर्व पुरुष तप, संस्कार व आचारपरिपालन या गोष्टींनी ब्राह्मण बनले. महाभारतात ऋष्यशृंग, कश्यप, वेद, तांड्य, कृप, कक्षीवान्, कमठादी ऋषी, यवक्रीत, द्रोण, आयू, मतंग, दत्त, द्रुपद, मात्स्य हे सर्व ऋषी नीच कुलात उत्पन्न होऊनही संस्कारांनी व तपःस्वाध्यायांनी ब्राह्मणत्वाला पोचले, असे म्हटले आहे (म. भा. शांति. २९६). उग्र तप करून विश्वामित्राने क्षत्रियत्वातून ब्राह्मण्य प्राप्त करून घेतले व वसिष्ठाने त्या गोष्टीला मान्यता दिली (वा. रा. १. ६५). एकाच कुळात अनेक वर्ण निर्माण झाल्याच्याही कथा आहेत. त्यांपैकी प्रमुख उदाहरण म्हणजे वेन राजाचे होय. वेन हा क्षत्रिय होता. त्याच्या मृत्यूनंतर ब्राह्मणांनी त्याच्या देहाचे मंथन केले व त्यात त्याच्या डाव्या भागापासून निषाद व म्लेच्छ जन्मले व उजव्या भागापासून क्षत्रिय पृथू निर्माण झाला (मत्स्य पु. १०; भाग. पु. ४. १३). एकाच कुळात गुणकर्मांच्या भिन्नत्वाने क्षत्रिय व निषाद असे भिन्न वर्ण निर्माण होत असत, असे वरील उदाहरणावरून दिसते.

मनू हा क्षत्रिय, त्याला वामदेव नावाचा पुत्र झाला व तो ब्राह्मण बनला. वामदेवाला जी संतती झाली, त्यात चारही वर्ण निर्माण झाले (मत्स्य पु. ४). कश्यपाच्या वंशपरंपरेत रैभ्याला वेदपारंगत असे शूद्रपुत्र झाले (कूर्म पु. १९).

ही उदाहरणे पाहता पुराणकाळी कुलावरून वर्ण ठरत नसून ते गुणावरून ठरत, हे उघड दिसते. रंतिनामक क्षत्रिय पुरुषाच्या वंशात भारद्वाज व कांठायन हे पुत्र ब्राह्मण झाले. यावरून क्षत्रिय वंशात ब्राह्मण होणे व ब्राह्मण वंशात क्षत्रिय होणे, अशा परस्पर गोष्टी घडत असत, असे दिसून येते (वायू पु. ९९). नाभाग हा ब्राह्मण असून कर्मांने वैश्यत्वाला पोचला (भाग. पु. ९. २). भार्गव या ब्राह्मण वंशात चारही वर्णांचे पुत्र उत्पन्न झाले व गृत्समती या क्षत्रिय राजाला ब्राह्मण व वैश्य पुत्र झाले (हरिवंश ३२). शौनक या ब्राह्मणाला इतर तीन्ही वर्णांचे पुत्र झाले (हरिवंश २९). पुरू या क्षत्रियाच्या वंशातही ब्राह्मणांचे वंश निर्माण झाले. गार्ग्य या क्षत्रियापासून ब्राह्मणवंश उत्पन्न झाला (भाग. पु. ९. २०-२१).

अशा प्रकारची वर्णने पुराणांतरी पुष्कळच आहेत. या उदाहरणांत अगदी हीन कुलात जन्म घेऊन उच्च कुलात दाखल झालेले व उच्च कुलात जन्म घेऊन गुणकर्मांने हीन कुलात गेलेले अशा उभयविध माणसांची उदाहरणे आहेत. यावरून पुराणकाळी वर्णव्यवस्था गुणकर्मावर आधारलेली होती; केवळ जन्म हेच वर्णप्राप्तीचे गमक नव्हते, असे दिसून येईल.

जन्मसिद्ध चातुर्वर्ण्य – श्री. वा. दा. तळवलकर यांनी चातुर्वर्ण्य नावाचा एक ग्रंथ लिहिला आहे. ते चातुर्वर्ण्य जन्मसि मानतात व त्यात श्रेष्ठ-कनिष्ठ भावही युक्त समजतात. त्यांच्या विवेचनाचा सारांश असा —

हिंदूंची चातुर्वर्ण्यसंस्था ही एक अलौकिक संस्था आहे. एक जगातले आश्चर्य आहे. इतरत्र चातुर्वर्ग्य (पुरोहित, द वय्ये, व्यापारी व मजूर) असेल, पण चातुर्वर्ण्य नाही. दोहोत भेद आहे. दोन्ही मुळात श्रमविभागाच्या तत्त्वावर उत्पन्न झाली असली, तरी चातुर्वर्ग्य हे केवळ वैयक्तिक

चातुर्वर्ण्य सामाजिक आहे. चातुर्वर्ण्यातील व्यक्तीला वैयक्तिक गुणांच्या जोरावर वाटेल ती श्रेष्ठ पदवी मिळवता येते; पण चातुर्वर्ण्यातील व्यक्तीला वर्णमर्यादेचे उल्लंघन करता येत नाही. चातुर्वर्ण्यात जन्मश्रेष्ठत्व नाही किंवा आनुवंशिक वैशिष्ट्यही मानले जात नाही; पण चातुर्वर्ण्यातून आनुवंशिकता किंवा जन्मजाती उत्पन्न होतात. त्यात पौर्वापर्य किंवा श्रेष्ठ-कनिष्ठ भावही असतो.

चातुर्वर्ण्य हे वेदकालापूर्वी बनलेले आहे किंवा वेदकालाचे पूर्वोत्तरभाग कल्पिल्यास ते पूर्वभागात बनलेले आहे. त्या काळीच त्याला आनुवंशिक स्वरूप प्राप्त झाले होते.

चातुर्वर्ण्याचा उल्लेख ऋग्वेदातील पुरुषसूक्तातच केवळ आहे व ते सूक्त ज्या दहाव्या मंडलात आहे, ते मंडलही अर्वाचीन आहे, या समजुतीवर पुष्कळांना चातुर्वर्ण्य हे अर्वाचीन वाटते. पण हे वाटणे चुकीचे आहे. चातुर्वर्ण्य हे ऋग्वेदकाली बनू लागले व यजुर्वेदकाली ते पूर्णावस्थेस पोचले, असे वेदिक इंडेक्सकार म्हणतात; पण चातुर्वर्ण्याचे जे उल्लेख प्राचीन मंडलांतून आढळतात, त्यांवरून चातुर्वर्ण्य वेदकालापूर्वीच बनून राहिले होते व ते जन्मजात होते, असे म्हटले पाहिजे. चातुर्वर्ण्य जन्मजात मानले, तरच मिश्रजातींचा उद्भव संभवतो.

भारतातले सनातनी पंडित हे सामान्यपणे श्री. तळवलकर यांचा सिद्धान्त मानणारे आहेत. मन्वादी स्मृतिकारांची वचने जन्मसिद्ध चातुर्वर्ण्याचेच समर्थन करतात, असेही या पंडितांचे ठाम मत आहे. भारतातली सामान्य जनताही चातुर्वर्ण्य हे जन्मसिद्ध असल्याचे मानते. चातुर्वर्ण्याच्या जन्मसिद्धत्वाची व त्यातील श्रेष्ठ-कनिष्ठत्वाची भावना भारतीय समाजाच्या सर्व थरांत भिनून राहिलेली दिसते.

विज्ञान व चातुर्वर्ण्य –– अनुवंशशास्त्र, प्राणिशास्त्र, सुप्रजाजननशास्त्र, इ. वैज्ञानिक शास्त्रांच्या कसोटीवर चातुर्वर्ण्य कितपत टिकते, या मुद्यासंबंधी डॉ. पु. ग. सहस्त्रबुद्धे यांनी काही विचार केलेला आहे. त्याचा सारांश असा––

पित्याचे गुण पुत्राच्या ठिकाणी उतरणे, हा जो सृष्टीचा साधारण नियम, त्याला अनुवंश असे म्हणतात. कोणत्याही कुटुंबात पाहिले, तरी साधारणतः वर्ण, स्वभाव, बुद्धिमत्ता या बाबतीत मुले आई-बापांच्या वळणावर असतात. ही गोष्ट लक्षात घेऊन मन्वादी स्मृतिकारांनी आनुवंश्याच्या सिद्धान्ताला महत्त्व दिले व तदनुसार समाजरचनेचे नियम सांगितले. पण पाश्चात्य देशातले रूसो, कार्ल मार्क्स, इ. विचारवंत या तत्त्वाला मुळीच किंमत देत नाहीत.

विसाव्या शतकात युरोपमध्ये जीवशास्त्राचा व तदंतर्गत आनुवंश्याचाही पुष्कळच अभ्यास झाला आहे. प्राणिशास्त्र नावाचे एक शास्त्र तिकडील पंडितांनी जन्माला घातले असून, अभ्यास व संशोधन यांच्या द्वारे त्याची बरीच वाढही केली आहे. आनुवंश्याचा प्राणिशास्त्राच्या दृष्टीने अभ्यास करून त्याचे आग्रहाने प्रतिपादन करणारा युरोपीय पंडित म्हणजे सर फ्रान्सिस गाल्टन हा होय. इंग्लंडमधील विविध क्षेत्रांतल्या कर्तबगार पुरुषांच्या कुलांचा अभ्यास करून त्याने असे प्रतिपादिले आहे, की थोर व्यक्ती या अनियमितपणे वाटेल त्या कुलात उत्पन्न होत नसून, त्या व्यक्तींचे पणजा, निपणजा इथपर्यंतचे पूर्वजही मोठे पुरुष असल्याचे आढळून येते. पण या बाबतीत साम्यवाद्यांचे मत भिन्न आहे. ते म्हणतात, की मानवाचे कर्तृत्व हे परिस्थितिजन्य आहे. श्रेष्ठत्वाच्या बाबतीत कुलाला महत्त्व नसून परिस्थितीलाच महत्त्व असते. पण गाल्टनला हे मत मान्य नाही. तो म्हणतो, की मनुष्याचे कर्तृत्व बह्वंशी तो कोणत्या कुळात जन्मला यावरच अवलंबून असते. थोर व्यक्ती थोर कुलातच निर्माण होतात. अशा त्या थोर कुलांचा हलक्या कुलांशी लग्नसंबंध होणे, हे घातुक आहे. यापुढे जाऊन त्याने असेही म्हटले आहे, की समाजाच्या प्रत्येक वर्गातील श्रेष्ठ कुले निवडून काढून त्यांचे परस्परात विवाह घडवून आणावे व समाजाने त्यांच्या भरणपोषणाची इतरांपेक्षा अधिक काळजी घ्यावी.

गाल्टनकडे सुरुवातीस कोणाचे लक्ष गेले नाही; पण इ. स. १८९० च्या सुमारास त्याला अनुयायी मिळू लागले. त्यापुढे अनुवंशशास्त्राचा सर्वत्र अभ्यास सुरू झाला. याच सुमारास जननशात्र व वनस्पतिशास्त्र या विषयांतले शोधही पंडितांच्या हातात आले व त्या शोधांवरून रक्ताला अर्थात अनुवंशाला सर्वस्वी नाही, तरी बरीच मोठी किंमत आहे, हे लक्षात आले. त्यातूनच पुढे सुप्रजाजननशास्त्राचा उदय झाला.

आनुवंश्याचा हा शोध आपल्याकडे फार पूर्वी मनूने लावला होता, ही गोष्ट विशेष उल्लेखनीय आहे. घराण्याच्या व रक्ताच्या शुद्धतेला फार मोठे मूल्य आहे, हे त्याने ओळखले होते. गाल्टन हा युरोपातला दुसरा मनू ठरला आहे. पण त्याच्यामागून आलेल्या शास्त्रज्ञांनी त्याचा प्रत्येक सिद्धान्त तावून सुलाखून घेऊन व त्यातल्या चुका आणि अतिशयोक्ती टाकून देऊन शुद्ध शास्त्राच्या उभारणीला फार मोठा हातभार लावला आहे. आपल्याकडे मात्र मनू हा एकटाच राहिला. त्याचा सिद्धान्त तपासून पाहणारे, त्यात भर घालणारे व त्यातून शुद्ध शास्त्राचा उदय करणारे अनुयायी त्याला भेटलेच नाहीत. मनूनंतर झालेल्या स्मृतिकारांनी आणि पंडितांनी केवळ त्याच्या वचनांचेच अनुकरण करून आपापले ग्रंथ लिहिले.

जन्मतः सर्व मानव सारखे नसतात हे खरे; पण तरीही

त्यासाठी आनुवंश्याचे महत्त्व मानण्याची मुळीच गरज नाही, असे म्हणणाराही एक पक्ष आहे. जन्मतः एक श्रेष्ठ, एक कनिष्ठ असा भेद असला, तरी शिक्षण हे असे अमोघ साधन आहे, की त्याच्या साहाय्याने ही मूळची विषमता दूर करता येईल. हे काम एका पिढीत साधले नाही, तरी अनेक पिढ्यांनी साधेल असे या पक्षाचें मत आहे. लामार्क हा पंडित संस्कार-प्राप्त गुण संक्रांत होतात, असे मानी व डार्विनचेही काही अंशी तसेच मत होते. कॅमेरार, डरहॅम, हे शास्त्रज्ञही याच मताचे आहेत. पण असे काही तुरळक अपवाद सोडल्यास बाकीचे सर्व शास्त्रज्ञ, पिंडगत गुणच फक्त संक्रांत होतात; संस्कारप्राप्त गुण संक्रांत होत नाहीत, असेच मानतात.

थोर घराण्यात थोर व्यक्ती निर्माण होतात व संस्कारप्राप्त गुण संक्रांत होत नाहीत, हे दोन सिद्धान्त लक्षात घेऊनच भारतातली चातुर्वर्ण्याधिष्ठित समाजरचना घडवलेली आहे, असे सांगतात. विद्यावृद्धी, शत्रूपासून संरक्षण, वाणिज्य व सेवा या निरनिराळ्या कार्यांसाठी लागणारे निरनिराळे गुण भिन्नभिन्न मानवसमूहात मनूला दिसून आले. ते आनुवंशिक आहेत, असेही त्याने पाहिले. आणि म्हणूनच त्याने त्या त्या समूहावर अर्थात वर्णावर ती ती जबाबदारी टाकली. त्याचप्रमाणे प्रत्येक वर्णाचे निर्वाहाचे साधनही त्याच्या कार्याला योग्य असे सांगून, ते इतरांनी स्वीकारू नये म्हणजेच एका वर्णाचा धंदा दुसऱ्या वर्णाने करू नये, असाही निर्बंध त्याने घातला (मनु. १०.५-१९). या दोन निर्बंधांमुळे बनलेली समाजरचना तेच चातुर्वर्ण्य होय.

अर्थात वरील प्रकारची समाजरचना करताना पुढील गोष्टी गृहीत धराव्या लागलेल्या आहेत—

(१) *ज्या वर्णावर त्याच्या गुणान्वये जी जबाबदारी टाकली असेल, ती पार पडण्यास तो वर्ण कायम समर्थ राहील. कितीही शतके लोटली, तरी त्याला कधीही दौर्बल्य येणार नाही.*

(२) *एका वर्णात जे गुण असतील, त्या गुणांखेरीज अन्य गुण त्या वर्णात कधीही दिसणार नाहीत.*

(३) *आरंभी जो मानवसमूह हीन व नाकर्ता म्हणून गणला गेला असेल, त्याच्या अंगी कधीही श्रेष्ठ कर्तृत्व प्रकट होणार नाही.*

वरील तीन गोष्टी गृहीत धरल्याखेरीज चातुर्वर्ण्याची कल्पनाच अशक्य आहे. आणि गृहित धरलेल्या या तीन गोष्टींपैकी प्रत्येक गोष्ट खोटी आहे.

भारताचा इतिहास पाहिला तर असे स्पष्ट दिसते, की महाराष्ट्र, तमिळनाड, कनौज हे दोन-तीन प्रदेश सोडल्यास इतर बहुतेक प्रदेशांत ब्राह्मण हा हीन व आपली विद्यावृद्धीची जबाबदारी पार पाडण्यास सर्वस्वी नालायक असाच झालेला आहे. महाराष्ट्र व राजस्थान यांखेरीज अन्य प्रांतांतील क्षत्रिय आपली संरक्षणविषयक जबाबदारी गेली पाचसातशे वर्षे पार पाडू शकले नाहीत, हेही तितकेच स्पष्ट आहे.

महाराष्ट्रातील वणिग्वर्ग कोणत्याही कारणाने का होईना, पण नष्ट झालेला आहे. यावरून असे म्हणावे लागते, की एखादा वर्ण शतकानुशतके एक विशिष्ट जबाबदारी पार पाडण्यास समर्थ राहील, असे मानून त्याच्यावर ती जबाबदारी सोपविणे समाजाला फार घातक आहे. कायमची वर्णव्यवस्था ही घातकच ठरेल. मूळ विभागणीच्या वेळी ज्या जाती हीन व नाकर्त्या असतील, त्या पुढील काळात प्रचंड पराक्रमी होऊ शकतात, ही गोष्ट इतिहाससिद्ध आहे. कायमच्या वर्णव्यवस्थेत ही ऐतिहासिक गोष्ट दृष्टीआड केली जाते. हा या चातुर्वर्ण्यव्यवस्थेवरचा सर्वांत बलवत्तर आक्षेप होय.

एकाच घराण्यात किंवा जातीत एकच विशिष्ट गुण वाढेल, अन्य वाढणार नाहीत, असे धरून त्या लोकांना अन्य कार्ये करण्याची बंदी करणे, हे इतिहासाप्रमाणेच जीवशास्त्रालाही नामंजूर आहे. म्हणजेच एकाच रक्ताची दहा मुले घेतली, तर त्यातल्या वाटेल त्याला वकिली, डॉक्टरी, व्यापार, सत्ता चालवणे, तसेच भिक्षा मागणे किंवा चोरीसुद्धा करता येण्याची शक्यता आहे. अशा प्रकारे एकाच कुलात धर्म, न्याय, राजकारण, शिल्प, इ. अनेक कार्यांना लागणारे गुण निर्माण होणे शक्य असताना, त्या कुलावर तुम्ही अमुकच काम करा व इतर गुण वाया घालवा, असा निर्बंध घालणे म्हणजे त्या गुणांचा जाणूनबुजून नाश करणे आहे.

अनेक पिढ्या विशिष्ट कर्म करीत राहिल्यास त्याला लागणारा तो तो गुण शुद्ध व सबल होत जातो, हे म्हणणेही खरे नाही. आजवर अनेक शतकांच्या शुद्धतेने बुद्धी हा एकच गुण सुधारला; असे नसून कर्तृत्वाची सर्व अंगेच सुधारली आहेत, असे दिसून येईल. यावरून वर्णाप्रमाणे श्रमविभाग करणे हे अत्यंत चुकीचे असून, प्रत्येकाला सर्व क्षेत्रे मोकळी राहिली पाहिजेत, असेच म्हणावे लागते.

प्राणिशास्त्राच्या दृष्टीने बोलायचे झाल्यास पित्याप्रमाणे पुत्र होतो, हे सामान्यतः खरे आहे. तथापि पितापुत्रांत किंवा एकाच पित्याच्या अनेक पुत्रांत फार मोठे अंतर असू शकते, हेही खरे आहे. हे अंतर का पडते, याचा विचार करून शास्त्रज्ञांनी त्याची काही कारणे दिली आहेत, ती अशी–

(१) दोन सख्खे भाऊ इतकेच नव्हे, तर जुळे भाऊही जर भिन्न परिस्थितीत वाढले, तर त्यांच्यांत वाटेल तितका फरक पडू शकतो. समाजात अशी अनेक उदाहरणे आढळतात.

(२) असा फरक पडण्याचे संकर हेही एक कारण आहे.

(३) ज्या जीवगोलकांपासून एका पुत्राचा जन्म झाला, त्या जीवगोलकांच्या रचनेत एखाद्या वेळी फरक होतो व दुसऱ्या पुत्राचे गुणधर्म बदलतात.

(४) जीवगोलकांतच अजिबात फरक पडतो. काही एक ज्ञात कारण नसतानाही असे फरक पडतात.

वर्णांच्या बाबतीत जे दिसले, तेच कुलांच्या बाबतीतही दिसून येईल. थोर कुळातच थोर व्यक्ती निर्माण होतात, असे नाही आणि थोर कुलात थोर व्यक्ती निर्माण होतातच असेही नाही. वाल्मीकी कोळ्याचा मुलगा, व्यास कानीन पुत्र, कोलंबस कोष्टयाचा मुलगा, क्रॉमवेल कलालाचा, डेमॉस्थेनिस शिकलगाराचा, होमर शेतकऱ्याचा, शेक्सपियर विणकऱ्याचा, सॉक्रेटिस पाथरवटाचा, वॉशिंग्टन शेतकऱ्याचा, मल्हारराव होळकर धनगराचा, मुसोलिनी लोहाराचा व स्टॅलिन चांभाराचा मुलगा होता. ही लांबलचक यादी पाहिली म्हणजे, ‘ यस्मिन् कुले त्वमुत्पन्नो गजस्तत्र न हन्यते ’ = ज्या कुलात तू उत्पन्न झालास, त्या कुलातल्या प्राण्यांकडून हत्ती मारला जात नाही. हा पशूंचा सिद्धान्त माणसांना लावणे कसे चूक आहे, ते ध्यानात येईल. आनुवंश्याला मुळीच किंमत नाही, असे नाही. त्यामुळे समाजातल्या उच्च कुलांना जपू नये, असेही नव्हे. उच्च कुलांना जपणे, त्यांच्या रक्तात हीन रक्ताचे मिश्रण न होऊ देणे, याबद्दल समाजाने खबरदारी घ्यायला पाहिजे, यात शंकाच नाही. पण एकदा ज्यांना हीन म्हटले, ते कायमचे हीन राहतात, हा समज काढून टाकला पाहिजे. त्यामुळेच चातुर्वर्ण्य ही समाजव्यवस्था चुकीची व घातक ठरते. आपला समाज मनुप्रणीत चातुर्वर्ण्य पूर्णपणे पाळण्याइतका वेडगळ कधी होता की काय, ते नक्की सांगता येत नाही. पण महाराष्ट्रात गेल्या १००० वर्षांत तरी चातुर्वर्ण्य बहुतेक सर्व वर्णांनी व्यवहारतः मोडले आहे. तत्त्वतः मोडण्याइतकी बुद्धीची रग आगरकरांपर्यंत कोणीच दाखवली नाही, ही दुर्दैवाची गोष्ट होय. पण हे दुर्दैव इथेच संपत नाही. व्यवहारात चातुर्वर्ण्य कोणीच पाळत नाही. ते पाळणे अशक्यच आहे. असे असूनही बहुतेक सर्व सुशिक्षित व अशिक्षित हिंदूंत चातुर्वर्ण्याचा अभिमान मात्र भरपूर प्रमाणात आहे.

चातुर्वर्ण्यकल्पनेचा हा भ्रम जितक्या लौकर दूर होईल तितके ते समाजाच्या हिताचे ठरेल. या भ्रमनिरासामुळे प्रत्येकाच्या गुणविकासाला पूर्ण संधी मिळून, कुजत पडलेल्या वा पाडलेल्या अनेक जातींचे कर्तृत्व वाढीस लागेल व त्यामुळे या मृतप्राय झालेल्या सनातन समाजपुरुषाच्या अंगी थोडे तरी चैतन्य खेळू लागेल. [स्पर्शास्पर्श; ध. शा. मं.; घ. वि. स्व.; ध. शा. वि.; वै. नि.; म. ज्ञा. को.; वि. स. र.]

चातुर्होत्रचयन काठकचयनांपैकी एक. पाहा– अग्निचयन.

चात्वाल यज्ञातील एक जागा. पशुयागात किंवा सोमयागात यज्ञमंडपाच्या पूर्व बाजूस उत्तरवेदी नावाचा एक ओटा तयार करायचा असतो. त्यासाठी महावेदीपासून उत्तरेकडे चार पावलांवर एक खड्डा खणून त्यातील माती मंत्रपूर्वक आणून तो तयार करतात. या खड्ड्यालाच चात्वाल म्हणतात. अग्निचयनासाठी लागणाऱ्या विटा चात्वालातून निघालेल्या मातीच्या कराव्या, असेही सांगितले आहे. यज्ञातील निरुपयोगी वस्तू चात्वालात टाकतात. [श्री. विद्याधरशास्त्री भिडे]

चाप राजवंश गुजरातेत चौलुक्य वंशातील मूळराज सोळंकी याची सत्ता सुरू होण्यापूर्वी चाप घराण्याचे राज्य चालू होते. या घराण्याला चावडा, चावोत्कट व चापी अशी अन्यही नावे आहेत. इ. स. च्या ७ व्या शतकाच्या पूर्वार्धात चाप वंशातील व्याघ्रमुख नावाचा राजा गुर्जर देशात कुठेतरी राज्य करीत होता, असा उल्लेख आढळतो. इ. स. ७३० मध्ये गुजरातेवर अरबांचे आक्रमण येईपर्यंत त्या वंशाचे राज्य चालू होते.

त्यानंतर या वंशाच्या दोन भिन्न शाखा झाल्याची माहिती उपलब्ध आहे. एका शाखेचे राज्य वर्धमान म्हणजे सांप्रतचे वढवाण येथे होते आणि दुसऱ्या शाखेचे राज्य अणहिलपाटक (अणहिलवाड) येथे होते. अणहिलपाटक ही सारस्वत मंडलाची राजधानी होती.

वर्धमानशाखा– विक्रमार्क हा या शाखेतील पहिला ज्ञात राजा होय. इ. स. च्या ९ व्या शतकाच्या प्रथम पादात तो राज्य करीत होता. प्रतीहार वंशातील नागभट्ट (२ रा) याने वर्धमानवर स्वारी करून विक्रमार्काचा पराभव केला असला, तरी चापांचे राज्य पुढे चालू राहिले. विक्रमार्काचा पराक्रमी पुत्र अड्डुक याच्या नावावरून वढवाणच्या भोवतालच्या प्रदेशाला अड्डुकदेश असे नाव मिळाले.

अड्डुकाचा पुत्र पुलकेशी आणि त्याचे दोन पुत्र ध्रुवभट व धरणीवराह यांनी त्यानंतर दीर्घकाल राज्य केले. इ. स. ९१४ च्या सुमारास धरणीवराह प्रतीहारांचा मांडलिक म्हणून राज्य करीत होता. चालुक्य वंशातील दुसरा अवनीवर्मन योगराज याने त्याचा एकदा पराभव केला. पुढे चौलुक्य वंशातील मूळराज याने धरणीवराहाचे राज्य जिंकून घेतले. तेव्हा तो हस्तिकुंडी येथील राष्ट्रकूट राजा धवल याच्या आश्रयास गेला.

अणहिलपाटक शाखा – वनराज हा या शाखेचा मूळ पुरुष होय. त्यानेच इ. स. च्या ८ व्या शतकात अणहिलपाटक नगर वसविले आणि तिथे आपले राज्य स्थापले, असे म्हणतात. त्याच्यानंतर योगराज, रत्नादित्य क्षेमराज, आकडदेव आणि भूयडदेव (सामंतसिंह) यांनी तिथे राज्य केले. सामंतसिंहाची भगिनी लीलादेवी हिचा कनोज राज्यातील कल्याण-कटकच्या राजपुत्राशी विवाह झाला होता. तिचा पुत्र मूळराज हा प्रथम सामंतसिंहाचा सेनापती होता; पण त्यानेच पुढे इ. स. ९४१–४२ मध्ये अणहिलपाटकचे राज्य हस्तगत केले. [हि. क. इं. पी.; ग्लो. गु. दे.]

चापोती एक जात. या लोकांची वस्ती बंगालमधील मालदह जिल्ह्यात आहे. मासेमारी हा यांचा प्रमुख धंदा होय. ब्राह्मण यांचे पौरोहित्य करतात. [से. इं. १९५१.]

चाफळ एक तीर्थ क्षेत्र. हे सातारा जिल्ह्यातील मांड नदीच्या तीरावर आहे. चाफळ गाव सह्याद्रीच्या एका अरुंद खोऱ्यात वसलेले आहे. इथे काही प्राचीन देवळे असून, या स्थानाला मांडव्य ऋषीची यज्ञभूमी असे म्हणतात. हे गाव रामदास स्वामींच्या बंधूच्या वंशजांना इनाम मिळालेले आहे.

चाफळ ही समर्थ संप्रदायाची जन्मभूमी होय. समर्थांनी देशाचा व धर्माचा विचार मुख्यत: या ठिकाणी बसून केला, असे सांगतात. इ. स. १६४९ साली समर्थांना अंगापूरच्या डोहात श्रीरामाची एक रथारूढ मूर्ती सापडली व त्यांनी तिची चाफळ येथे स्थापना केली. (ही मूर्ती रामाची नसून सूर्याची आहे, असे श्री. ग. ह. खरे यांचे मत आहे.) त्या मूर्तीसाठी मंदिर बांधावे म्हणून समर्थांनी गावकऱ्यांकडे जागा मागितली. तेव्हा गावकरी म्हणाले, की नदीपलिकडे बेटाप्रमाणे एक उंचवटयाची जागा आहे; तिथे मंदिर बांधा. पण ती जागा म्हणजे स्मशानभूमी होती. रामदासांनी तिथे मंदिर बांधायाचे ठरवले व तिथले दगडधोंडे दूर केले. राहता राहिला एक मोठा दगड. तो मुतांचा राजा समजला जाई. त्याला तिथून काढून टाकण्याच्या वेळी रामदासांचा व त्याचा पुढीलप्रमाणे संवाद झाला.

समर्थ म्हणाले. 'तुम्ही व तुमचा संप्रदाय उत्तमजन नव्हेत. उपद्रव जनास देणार, करणार. या स्थानी श्रीचे देवालय करावयाचे. श्रीची स्थापना जाल्यानंतर भक्तजन मंडळी येणार, येथे तुमचे राहणे कसे घडेल ?' त्यावर मुतांचा राजा म्हणाला. 'ठवाल तेथे राहू, आज्ञेप्रमाणे चालू.' मग समर्थांनी त्याला एका जांभळीच्या वृक्षाखाली जागा दिली (हनुमंतस्वामींची बखर – सत्कार्योत्तेजक सभा पा. ४५). या स्थानाचे वर्णन समर्थ रामदासांनी पुढीलप्रमाणे केले आहे –

भोंवता डोंगराचा फेर। मध्ये देवाचें शिखर॥
पुढे मंडप सुंदर। नव खणांचा
चहूं खांबांची रचना। वरत्या चौवीस कमाना॥

चाफळच्या या मंदिरास शिव छत्रपतींनी इ. स. १६७५ मध्ये १२१ खंडी धान्य नेमून दिले होते व ३३ गावे आणि ४११ बिघे जमीन इनाम दिली होती, असे इतिहासात नमूद आहे.

रामदासांनी स्थापन केलेल्या येथील रामाच्या व मारुतीच्या देवालयांचा जीर्णोद्धार इ. स. १७७६ मध्ये बाळाजी मांडवगणे नावाच्या ब्राह्मणाने केला. त्या कामी एकंदर एक लाख रुपये खर्च आला आहे, असे कळते.

चैत्र शुद्ध नवमीला इथे मोठा उत्सव होतो. छत्रिने, कीर्तने, रथोत्सव, इ. कार्यक्रम या प्रसंगी होतात. समर्थांनी छबिन्यासाठी तयार करविलेला रामाचा रथ अजूनही इथे आहे.

चाफळच्या जवळच शिंगणवाडी नावाचे एक गाव आहे. शिवे छत्रपतींना समर्थांनी अनुग्रह दिल्याचे सांगतात. शिवाय रामघळ, कुवडीतीर्थ, भैरोवाचा डोंगर वगैरे समर्थ संप्रदायाशी संबंधित असलेली कित्येक स्थळे चाफळच्या परिसरात आहेत. [म. ज्ञा. को.; श्रीसमर्थचरित्र – न. र. फाटक; सातारा गॅझे.; रामदासांची कविता, खंड १ ला]

चामठा एक जमात. या जमातीची वस्ती गुजरातेत आहे. यांच्यांत हिंदू व मुसलमान या दोन्ही धर्मांचे लोक आहेत. हिंदू चामठे खोडियार देवीला भजतात; तर मुसलमान लोक बीबी फातमेला भजतात. दळण्याची जाती विकणे, हा यांचा मुख्य व्यवसाय आहे. हे नाच करण्यातही पटाईत आहेत. यांच्यांत प्रेते पुरण्याची चाल आहे. [वि. मुं. रा. प.]

चामर चवरी पाहा.

चामरस (इ. स. चे १५ वे शतक) एक कन्नड कवी. हा मूळचा ब्राह्मण होता. पण पुढे लिंगायत झाला. प्रौढ देवरायाचा हा आश्रित होता. त्याच्याच विनंतीवरून याने कन्नडभाषेत महाभारत अनुवादिले. कुमार व्यास हाही त्याच वेळी महाभारत अनुवादीत होता; पण त्या दोघांत चामरसाचे काव्य सरस ठरले. तेव्हा कुमार व्यासाने आपल्या पत्नीच्या हस्ते त्याचा ग्रंथ नष्ट करवला, असे सांगतात. कुमार व्यासाची पत्नी ही चामरसाची बहीण होती.

शिव हे याचे उपास्य दैवत होते. शिवाने याला स्वप्न दृष्टांत देऊन अन्य देवांची उपासना करू नको, असे सांगितले

त्यावरून मग चामरसाने हंपी येथे वीरशैवपंथाची दीक्षा घेतली. या दीक्षाविधीनंतर याने प्रभुलिंगलीले या नावाचे काव्य कन्नड भाषेत लिहिले. हे काव्य म्हणजे अल्लम प्रभूचे चरित्र होय. हे षट्पदी वृत्तात आहे. यात चामरसाने वीरशैव मताच्या षड्स्थल सिद्धांताचेही निरूपण केले आहे. या ग्रंथामुळे प्रौढ देवरायाच्या राजसभेत याला श्रेष्ठ पदवी प्राप्त झाली. प्रौढ देवरायाने याच्याकडूनच वीरशैवपंथाची दीक्षा घेतली, असे लिंगायत ग्रंथकार सांगतात. पाहा– अल्लम प्रभू. [म. च. को.; सु. वि. को.; हिं. क. भ. तु. अ.]

चामुंडराय– (इ. स. चे १० वे शतक) कर्नाटकातील राचमल्ल या गंगवंशी राजाचा अमात्य व सेनापती. चामुंडरायाचे खरे नाव गोम्मट असे होते. राय ही राचमल्लाने त्याला दिलेली पदवी होय. व्यवहारात हा अण्णा या नावाने ओळखला जात असे.

चामुंडराय मूळचा ब्राह्मण होता; पण पुढे तो जैन बनला; हा परम मातृभक्त होता. आपल्या आईच्या इच्छेसाठी त्याने श्रवणबेळगोळ येथे बाहुबलीची प्रचंड मूर्ती बनवली.

चामुंडराय हा रणधुरंधर होता. समरकेसरी, वीरमार्तंड, रणरार्यासिंह, इ. त्याची विशेषणे त्याचे रणपांडित्य व्यक्त करतात. तो सत्यवादी असल्यामुळे त्याला सत्ययुधिष्ठिर असेही म्हणत असत.

आचार्य नेमिचंद्र हा त्याचा गुरू होय. चामुंडरायाने आपली आध्यात्मिक साधना नेमिचंद्राच्या मार्गदर्शनाखाली केली. त्याने कन्नड भाषेत त्रिषष्टिलक्षण महापुराण नावाचा ग्रंथही लिहिला आहे. याला चामुंडपुराण असेही म्हणतात. हा ग्रंथ त्याने इ. स. ९७८ मध्ये पुरा केला. गोम्मटसंग्रहसूत्र असा त्याचा दुसराही एक ग्रंथ आहे. तो संस्कृत, प्राकृत व कन्नड या भाषांचा पंडित होता. [जै. ध.; जै. सि. भा. भाग ६; जै. सा. इ.]

चामुंडा एक शक्तिदेवता. सप्तमातृकांपैकी एक. ही त्रिगुणात्मिका आहे. ही अत्यंत पराक्रमी असल्यामुळे कोणत्याही संकटाच्या प्रसंगी देव हिला शरण जातात, असे सांगितले आहे. पुराणांतरी हिच्या कथा आढळतात, त्या अशा–

(१) प्राचीन काळी महिषासुर या दैत्याने इंद्राशी शंभर वर्षं युद्ध करून इंद्रपद मिळविले. ही वार्ता ब्रह्मा-विष्णु-महेशांना समजली. तेव्हा या त्रयीने आपल्या मुखातून जी एक तेजोराशी उत्पन्न केली, तीच ही चामुंडा होय. मग सर्व देवांनी तिला आयुधे दिली. हिमालयाने तिला सिंह हे वाहन दिले व त्यावर आरूढ होऊन चामुंडेने महिषासुराचा वध केला.

(२) शुंभ-निशुंभ या दैत्यांनी इंद्रापासून स्वर्गाचे राज्य हरण केले. तेव्हा देवांनी अंबिका देवीचे स्मरण केले. अंबिकेने आपल्या कुशीपासून एक देवी उत्पन्न केली. तिचे नाव कालिका असे होते. या कालिकेने पुढे शुंभनिशुंभांचा वध केला. कालिकेने चंड-मुंडांची शिरे देवीला अर्पण केली, तेव्हा अंबिका तिला म्हणाली. 'ज्या अर्थी तू चंडाचे मुंड घेऊन आली आहेस, त्या अर्थी जगात तू चामुंडा म्हणून प्रख्यात होशील.'

चामुंडा ही एक उग्र देवता समजली गेली आहे. तिचे स्वरूप असे–

काली करालवदना विनिष्क्रान्तासिपाशिनी ।
विचित्रखट्वाङ्गधरा नरमालाविभूषणा ।।
द्वीपिचर्मपरीधाना शुष्कमांसातिभैरवा ।
अतिविस्तारवदना जिव्हाललनभीषणा ।।
निमग्नारक्तनयना नादापूरितदिङ्मुखा ।

अर्थ– उग्रवदन असलेली, खड्ग, पाश, विचित्र खट्वांग व मुंडमाला धारण करणारी, गजचर्म पांघरणारी, शुष्कमांसामुळे उग्र दिसणारी, रुंद तोंडाची, लळलळणाऱ्या जिभेमुळे भयंकर दिसणारी, खोल व आरक्त नेत्र असलेली, (शंख) नादामुळे दिशा भरून टाकणारी, अशी ही चामंडा आहे.

ही चतुर्भुजा अष्टभुजा, व क्वचित षोडशभुजाही असते.



चामुंडा – देवग्राम

चामुंडा मृत्युलोकात राहायला का आली यासंबंधी एक आख्यायिका आहे, ती अशी– चामुंडा ही मूळची दक्षकन्या सती होय. दक्षाने यज्ञप्रसंगी तिचा अपमान केला, म्हणून ती तियून परतली. वाटेत महिषासुराने तिला अडवले. तेव्हा तिने त्याचा वध केला व ती शंकराकडे आली. तिचे ते उग्र रूप पाहून शंकराला तिची शिसारी आली. म्हणून त्याने तिला 'तू चामुंडा या नावाने मृत्युलोकात राहा', अशी आज्ञा केली आणि त्याप्रमाणे ती भूतलावर राहण्यास आली.

देवग्राम येथील चामुंडेची मूर्ती द्विभुजा असून, तिचे लांब कान, वर आलेल्या बरगड्या, लोंबणारे स्तन, खोल गेलेले पोट आणि मोठे डोळे यांमुळे ती हिडीस दिसते.

चामुंडा देवी आपल्या भक्तांना शौर्य देते व जादूगारांना त्यांच्या जादूगिरीत मदत करते, अशी समजूत आहे.

जयपूर (ओडिसा) येथे चामुंडेची एक भयानक मूर्ती सापडली आहे. जयपूर हे तांत्रिकांचे मोठे केंद्र होते व ही देवी त्या पंथाची आराध्य देवता होती. या मूर्तीला चार हात आहेत. तिचे शरीर कृश व पोट खोल गेलेले आहे. तिचें डोळेही खोल आहेत. तिच्या गळ्यात मुंडमाला असून ती प्रेतारूढ आहे. तिच्या मस्तकातून ज्वाळा उफाळत आहेत. तिच्या मागील दोन हातांत कर्तरी व शूल आणि पुढील दोन हातांत कपाल व मुंड आहे.

नालंदा येथे सापडलेल्या एका प्राचीन देवीच्या मुद्रेवरही असेच भयानक भाव आहेत. ती मूर्तीही चामुंडेचीच असावी, असे विद्वानांचे मत आहे. यावरून चामुंडेच्या भक्तांचा संप्रदाय फार पुरातनकालापासून चालत आला असावा, असे वाटते.

चामुंडेची एक अष्टभुजा मूर्ती तिरुच्चिगोडू येथे आहे. तिच्या मस्तकातून ज्वाळा वर येत असून, हातांत भिन्न आयुधे आहेत व कमरेला मेखला आहे. ती एक पाय प्रेतावर ठेवून बसलेली दिसते. तिचे मुख अत्यंत उग्र वाटते.



चामुंडा – तिरुच्चिगोडू

व्रजमंडलातील गडरिया जातीचे लोक चैत्र शु. नवमीला बकऱ्याचा कान कापून तो चामुंडा देवीला वाहतात. हे लोक या देवीला चामड म्हणतात. तिचे स्थान प्राय: गावाच्या बाहेर असते. ज्या गावातील लोक चामड देवीला बकऱ्याचा कान अर्पण करतात, त्या गावातील पशू रोगराईला बळी पडत नाहीत, अशी शेतकरी वर्गाची समजूत आहे. [हिं. घ.; प्रा. च. को.; डे. हिं. इ.; कु. जी. ब्र. श.]

चायमान अभ्यावर्ती चायमान पाहा.

चार आनंद वज्रयानी सिद्धांनीं मानलेले चार आनंद. प्रथमानंद, परमानंद, विरमानंद आणि सहजानंद अशी त्यांची नावे आहेत. प्रथमानंद हा आलिंगन, चुंबन यांच्या आनंदाशी मिळताजुळता आहे. परमानंद हा ज्ञानानंदाशी तुल्य आहे. विरमानंद हा समागमसुखाप्रमाणे असतो आणि सहजानंद हा महासाधूंना होणाऱ्या सुखानुभूतीप्रमाणे असतो. हा सर्वश्रेष्ठ आनंद होय. [हिं. सा. को]

चार काया महायान पंथाच्या आचार्यांनी गौतमबुद्धाच्या तीन कायांच्यां मुळांशी तीन धातूंची कल्पना केली आहे. रूपधातूपासून निर्माणकाया, कामधातूपासून संभोगकाया व धर्मधातूपासून धर्मकाया अशा या तीन काया होत. बौद्ध सिद्धांनी प्रज्ञोपाय (प्रज्ञा व उपाय यांचा संयोग) या सिद्धांताची प्रतिष्ठा करण्यासाठी आणखी एका चौथ्या कायेची कल्पना केली आहे. तिला ते वज्रकाया, स्वभावकाया, सहजकाया अथवा महासुखकाया असे म्हणतात. निर्माणकायेत गौतमबुद्ध मानवरूप धारण करून आपले सांसारिक जीवन व्यतीत करतो. संभोगकायेत आनंद अनुभवतो. ही काया बोधिसत्त्वाच्या रूपात असते. धर्मकाया तीन्ही लोकात स्वत:ला अभिव्यक्त करीत असूनही जगाच्या सर्व अवस्था व क्लेश यांपासून मुक्त असते. ही काया अनादी, अजर, अमर व अपरिवर्तनशील आहे. सहजकाया ही सर्वश्रेष्ठ काया होय. ती सर्व द्वैतापासून व दु:खांपासून विमुक्त असून शुद्ध, सिद्ध व सहजरूप आहे. बुद्धाच्या या सहजकायेत स्थित असलेल्या निरंजन रूपात करोडो साधकांपैकी एखादाच लीन होऊ शकतो. [हिं. सा. को.]

चार कुरहिता शीखपंथाने मानलेली चार पातके. यांनाच चार कुमार्ग असेही म्हणतात. केसांचा अपमान, तमाखूचे सेवन (यात इतर व्यसनांचाही समावेश होतो), हालहाल करून मारलेल्या जनावरांचे मांस खाणे आणि व्यभिचार हे ते चार कुमार्ग होत. [गु. ग्रं. को.]

चारण एक जात. या जातीची वस्ती प्रामुख्याने राजस्थानात आढळते. या शब्दाची व्युत्पत्ती अशी 'चारयति प्रचारयति नृत्यगीतादिविद्यां तज्जन्यकीर्ति वा '

नृत्यगीतादी विद्येचा किंवा तज्जन्य कीर्तीचा प्रचार करतो, तो चारण होय (श. क.). चारणांना गढवी असेही म्हणतात. हे लोक आपल्या उत्पत्तीविषयी पुढील दंतकथा सांगतात–

बैल, नाग आणि वाघ ही शिवपार्वतींची वाहने होती. शिव त्यांना चरायला पाठवीत असे. पण ते प्राणी रोज एकमेकांना ठार करीत. त्यामुळे शिवाला नित्य नवी वाहने निर्माण करावी लागत. शिवाचा हा त्रास पाहून पार्वतीन आपल्या घामापासून एक चारण उत्पन्न केला व त्याला त्या वाहनांच्या राखणीस ठेवले. चारणाने ते काम चोख बजावले. त्यामुळे शिव त्याच्यावर प्रसन्न झाला आणि त्याने त्या चारणाला नागकन्या मिळवून दिली. पुढे त्याला नाग आणि तमर असे दोन पुत्र झाले. त्यांपैकी नाग हा पृथ्वीवर राहिला आणि त्याच्यापासून चारणवंश वाढला.

दुसरी दंतकथा अशी–

एक राजपूत कन्या कुवारपणी गर्भार राहिली. तिला मुलगा झाला. तिने अब्रूच्या भयाने त्या मुलाला जन्मताच एका गडाच्या मागे टाकून दिले. पुढे एका कुंभारान त्याला घरी आणले व गढवी असे नाव ठेवून त्याचा प्रतिपाळ केला. तो मोठा झाल्यावर त्या कुंभाराची गाढवे चारू लागला. म्हणून लोक त्याला चारण म्हणू लागले.

प्राचीन काळी हे लोक गंधमादन पर्वतावर राहत होते, असे पुराणांतरी सांगितले आहे. पृथू राजाने यज्ञ केला, त्या वेळी त्याने चारणांना बोलावले होते व यज्ञाची दक्षिणा म्हणून त्यांना तेलंगण हा देश दान दिला होता, अशी कथा आहे. इ. स. च्या आठव्या शतकापर्यंत हे तेलंगणात राहिले. नंतर तिथून निघून सिंध प्रदेशात गेले व तिथे स्थायिक झाले. तिथूनच पुढे यांचा कच्छ, सौराष्ट्र, माळवा, राजस्थान, इ. प्रदेशांत फैलाव झाला. राजस्थानात यांना राजाश्रय मिळाला व त्यामुळे यांची योगक्षेमाची चिंता दूर झाली.

मारू, काछेला, सौरठिया व तुंबेल असे चारणांचे चार पोटभेद आहेत. ही विभागणी स्थलपरत्वे झालेली आहे. उदा॰ मारवाडात राहणारे ते मारू चारण, कच्छमध्ये राहणारे ते काछेला चारण इत्यादी. मारू चारणांचे रोहडिया, रतनू, सौदा, मासिया, मीसण, वणसूर, लालस, आडा, सिंडायच, कविया, जगत, सूंगा, इ. आणि कछेला चारणांचेही बलसी, देवाद, सलकण, चांपा, ईडा, नागिया, कडुवा, कच्छा, मोजक, इ. अनेक उपभेद आहेत.

यांचा चरणभंमी नावाचा आणखी एक वर्ग आहे. मृतपशूंची विल्हेवाट लावणे, हे यांचे काम असते.

चारण हे गोरे, उंचेपुरे व देखणे असतात. चारणांत स्त्रियांना फार मान असतो. त्या जोगमायेच्या अवतारस्वरूप आहेत व त्यांच्या अंगी दैवी शक्ती वास करते, अशी त्यांची श्रद्धा असते. त्याही मोठ्या करारी असतात. आपल्या शीलाला आणि चारित्र्याला त्या प्राणाहून अधिक जपतात.



चारण पुरुष

एकदा काही चारणस्त्रिया प्रवासाला निघाल्या होत्या. बहुचरा ही त्यांची पुढारी होती. वाटेत काही उच्छृंखल कोळ्यांनी त्यांना गाठून त्यांच्या अंगावर हात टाकला. त्यासरशी बहुचरेने आपल्याजवळचा खंजीर काढला व आपले दोन्ही उरोज एका घावात कापून टाकले. दुसऱ्या क्षणी ती मरूनही गेली. हीच बहुचरा त्यानंतर चारणांची कुलस्वामिनी बनली आहे. शीलासाठी व चारित्र्यासाठी मरून अमर झालेल्या अशा शेकडो चारणी सांप्रत त्यांच्या देवी बनल्या आहेत.

चालीरीती–राजस्थानातील चारणांचे रीतिरिवाज, राहणी, वेषभूषा, खाणेपिणे, आचार, व्यवहार हे सर्व राजपूतांच्या आचार-विचारांशी मिळतेजुळते आहेत. एकाच गोष्टीत फरक आहे तो हा, की राजपूतांत ज्येष्ठ पुत्रच फक्त पित्याच्या संपत्तीच्या वारसदार ठरतो; तर चारणांच्यामध्ये पैतृक संपत्तीची वाटणी सर्व मुलांना सारखी मिळते.

चारण ही एक याचक जाती आहे. मात्र हे लोक राजपूतांच्या व्यतिरिक्त अन्य कोणापुढे हात पसरीत नाहीत. राजपूत देखील चारणांच्याकडे मोठ्या श्रद्धेने पाहतात. भाभा, बारहठजी, इ. आदरसूचक नावांनी ते त्यांना संबोधतात. राजस्थानात कित्येक राजांनी चारणांना अनेक गावे दान दिलेली

आहेत. याशिवाय राजपूतांच्या घरी विवाहादी मंगलकार्य होतात, तेव्हाही चारणांना दान मिळते. या दानाला त्याग असे म्हणतात. इतिहासकाळात या त्यागासाठी अर्थात लग्नाच्या वेळच्या दानासाठी चारण लोक राजपूतांना खूप छळीत असत. या छळातून वाचण्यासाठी कित्येक गरीब राजपूत आपापल्या मुलींना जन्मतःच मारूनही टाकीत, असे म्हणतात. पण सांप्रत सुशिक्षित चारण त्याग घेणे पसंत करीत नाहीत. सरकारने देखील या त्यागाला बंदी घातली आहे.

चारण लोक दिल्या शब्दाचे इमानदार असतात. म्हणून दोन माणसांत जेव्हा एखाद्या गोष्टीचा करार व्हायचा असतो, त्या वेळी एखाद्या चारणाला जामीनदार करतात. मग त्या दोघांपैकी कोणी करार मोडू लागला, तर चारण त्याच्या दारी जाऊन त्रागा करतो. त्रागा करणे म्हणजे स्वतःला इजा करणे किंवा प्रसंगी प्राणार्पण करणे होय.

चारण लोक आते-मामे-मावस बहिणींशी लग्ने करतात. विधवा भावजय धाकट्या दिराशी लग्न करते.

हे लोक मृतांना जाळतात व त्यांचे श्राद्धही करतात.

चारणसाहित्य—चारणांना कवित्वाचे वरदान लाभले आहे. त्यांच्या या कवित्वशक्तीमुळेच त्यांना राजपूतांच्या दरबारात आश्रय मिळाला. हे दरबारी चारण गीत, कवित्त, दूहे, सोरठे, इ. काव्यछंद सहजरीतीने रचीत. यांनी आपापल्या राजांच्या वंशावळी लिहून ठेवल्या आहेत. चारणांतले काही कवी स्तुतिपाठक असले, तरी बरेचसे निर्भीड आणि स्पष्टवक्ते होते. त्यामुळे राजे लोक त्यांचा आदर करीत. राजाला एकवचनी संबोधण्याचा त्यांना नैतिक अधिकार असे.

चारणांची ही काव्ये डिंगल भाषेत आहेत. चारण जातीत ऊजळी नामक एक कवयित्री होऊन गेली. तिचा प्रेमभंग झाला व त्या व्यथेतूनच तिला काव्य स्फुरले. अमरा नावाच्या चारणाची ही कन्या होय. एका राजपूत राजपुत्रावर तिचे प्रेम बसले. पण त्याने तिचा स्वीकार केला नाही. त्याचा परिणाम त्या दोघांच्याही नाशात झाला. आपला प्रियकर जगातून नाहीसा झाला, हे तिला समजताच ती घायाळ झाली व वेड्यासारखी भटकत सुटली. 'मला एकदा तरी भेट रे' अशी रात्रंदिवस ती त्याच्यासाठी आक्रोश करीत सुटली. त्यातून तिची कित्येक विरहगीते निर्माण झाली आहेत. उदा०—

जिण विन जलम लियोह प्रीत पुराणी कारणैं।
वाल्हा भूल गयोह जोगण करगो जेठवा ।

अर्थ—पूर्वजन्मीचे प्रेमाचे नाते पुढच्याही जन्मी चालविण्यासाठी मी या धरतीवर जन्म घेतला. पण माझा प्रियकर मला विसरला आणि मला जोगीण बनवून निघून गेला.

ऊजळीच्या समग्र काव्यात विकल स्त्रीहृदयाची अनेक स्पंदने उमटली आहेत. संयोग–वियोगाच्या उभ्या आडव्या जरतारी धाग्यांनी तिचे हे काव्यसणंग विणले गेले आहे. बारहमासा या काव्यप्रकाराची परंपरा तिच्यापासूनच सुरू झाली, असे समजतात.

याच चारण जातीने राजपुतांना स्वधर्माचरणाची प्रेरणा दिली. त्यांचीच स्फूर्तिगीते आळवीत आळवीत कित्येक राजपूत स्त्रियांनी जळत्या खाईत आपल्या काया लोटून दिल्या. त्याग, बलिदान, इ. लोकोत्तर सद्गुण राजपुतांनी चारणांच्या काव्यातून उचलले.

चारणांनी राजस्थानातल्या चितोड, खेळवाडा, हळदीघाट, रणथंभोर, इ. ऐतिहासिक स्थळांवर काव्यरचना करून त्यांना तीर्थपदवी प्राप्त करून दिली. पाबू, गोगा, तेजा, इ. मानव वीरांना स्वतःच्या वाक्सामर्थ्याच्या जोरावर त्यांनी देव बनवले. चारण कवींना आपल्या काव्यशक्तीची पूर्ण जाणीव होती. गांगा नावाचा एक चारण आत्मविश्वासाने म्हणतो—

कली सेत मन पाल हैं पडै जोखिम कलस ।
खसै खुम्भी हुवै मंडप खाणो भींतडा भांजीठहि ।
जाइ धरती मिलै गीतडा न ह जाइ कहै गांगे।

अर्थ—कालांतराने पांढरा चुना काळा पडतो. मंदिराच्या कळसावर आकाशाची कुऱ्हाड कोसळते. मंडपाचे खांब सरकतात. उभी वास्तू कोसळते. भिंत धरणीवर लोळते. पण चारणाचे कवित्व मात्र अमर राहते.

चारण जात ही राजनिष्ठ व स्वामिनिष्ठ म्हणून प्रसिद्ध आहे. राजपुतांच्या स्वातंत्र्यसंग्रामात त्यांना यांनी अमोल साहाय्य केले. त्यांनी हताश व्यक्तींच्या अंतरात चैतन्याची फुंकर मारल त्यांना आशावादी बनवले व रणांगणाला पाठ दाखविणाऱ्यांच्या हाती पुनश्च तळपती तलवार दिली. राजपुतांच्या सुखदुःखात आणि आशानिराशेतही हे सहभागी राहिले. [म. ज्ञा. को.; वि. मुं. रा. प.; मुं. इ. जा.; राजस्थान; रा. जा.]

चारणमुनी जैन साधूंचा एक वर्ग. तप व मंत्रशक्ती यांच्या योगाने हे लोक आपले रूप बदलू शकत व गगनविहार करण्यास समर्थ असत. [जै. क.]

चार पीर इस्लाम धर्मातल्या चार श्रेष्ठ संतांना चार पीर म्हणतात. त्यांची नावे अशी—अली, ख्वाजा हसन बसरी, ख्वाजा हबीब अज्मी आणि अब्दुल वाहिद. उ. भारतात पुढील चार पीर मानतात—गाझी मियान, पीर हथिली, पीर जलील व पीर महंमद. [फो. लो. नॉ. इं.]

चारुभक्षण गुजराती ब्राह्मणांच्या लग्नातला एक समारंभ. लग्नाच्या दुसऱ्या, तिसऱ्या अथवा चौथ्या दिवशी वधूच्या घरी हा समारंभ होतो. वधू-वरांना एका ठिकाणी बसवतात. नंतर पुरोहित होम करतो. त्यानंतर स्वस्तिवाचन व पूर्वजांच्या आशीर्वादासाठी प्रार्थना होते. वधू-वर एकमेकांना घास घालतात. वधूकडील मंडळी वरपक्षाला अहेर करतात; त्याबरोबर नवऱ्या मुलीलाही पोषाख, रेशमी बिछाना, तांब्याची भांडी, इ. वस्तू अहेरादाखल देतात. या अहेराला पेहेरामणी असे म्हणतात. नंतर वराकडील मंडळी वाजतगाजत वधूला आपल्या घरी घेऊन जातात. [ब्रोच गॅझे.]

चार्वाक चार्वाकदर्शनाचा एक प्रभावी आचार्य. याच्या चरित्राविषयी फारशी माहिती उपलब्ध नाही. अवंती देशात क्षिप्रा व ब्रामला यांच्या संगमावरील शंखोद्धार क्षेत्रात याचा जन्म झाला. याच्या पित्याचे नाव इंदुकांत व मातेचे नाव स्रग्विणी असे होते. युधिष्ठिर शक ६६१ प्रभवनाम संवत्सरी वैशाख पौर्णिमेला दुपारी याचा जन्म झाला व युधिष्ठिर शक ७२७ या वर्षी पुष्करतीर्थी यज्ञगिरी या पर्वतावर याचा मृत्यू झाला, असे एका जैन ग्रंथाच्या आधारे प्राचीन चरित्रकोशात सांगितले आहे. एका ग्रंथकाराने चार्वाक शब्दाचे स्पष्टीकरण देण्याचा प्रयत्न केला आहे, तो असा—

चारुः लोकसंमतः वाक्यः वाक्यं, यस्य सः ।

(वाचस्पत्यम्)

अर्थ – लोकांना रुचेल असे बोलणारा तो चार्वाक होय.

इ. स. च्या ७ व्या शतकातील जयादित्याच्या काशिकेत नयते चार्वी लोकायते चार्वी, तत्सम्बन्धादाचार्योपि चार्वी ।' असा चार्वी आचार्यांचा उल्लेख आढळतो.

इ. स. च्या आठव्या शतकापासूनच्या वाङ्मयात चार्वाक हा शब्द अनेकदा येतो. प्रबोधचंद्रोदय नाटकात बृहस्पती हा लोकायत दर्शनाचा संस्थापक असून, चार्वाक हा त्याचा पट्टशिष्य व त्या दर्शनाचा प्रचारक होता, असे सांगितले आहे. माधवाचार्यांनी सर्वदर्शनसंग्रहात त्याला नास्तिकशिरोमणी असे म्हटले आहे.

महाभारतात एका संन्यासी चार्वाकाचा उल्लेख येतो (शांति. ३७, ३८; शल्य. ६५). भारतीय युद्ध संपल्यावर युधिष्ठिर अश्वमेध यज्ञाची तयारी करीत असता, चार्वाकाने तिथे येऊन त्याला विचारले, की 'रक्तपात करून व बांधवांना मारून तू जो हा विजय मिळवलास तो खरा विजय म्हणता येईल का?' या प्रश्नाने तिथे जमलेले ब्राह्मण भयभीत झाले व हा दुर्योधनाचा मित्र चार्वाक, माणूस नसून यतिवेषधारी राक्षस आहे, असे म्हणू लागले. त्यावर श्रीकृष्णाने सांगितले, की 'हा मोठा तपस्वी आहे; पण ब्राह्मणांचा अवमान केल्यामुळे याचा ब्राह्मणांकडून वध होईल, असा याला शाप आहे.'

त्याप्रमाणे हा पुढे ब्राह्मतेजाने दग्ध झाला, असेही सांगितले आहे.

आपला सर्वस्वी विनाश ओढवलेला पाहून दुर्योधनाला आपला परिव्राजक मित्र चार्वाक याची आठवण होते व आपण मेल्यावर आपला शूरोचित अंत्यविधी चार्वाकच करील, असा त्याला विश्वास वाटतो, असे शल्यपर्वात सांगितले आहे. यावरून, चार्वाक हा दुर्योधनाचा राजनीतिशास्त्रातील सल्लागार असावा, असे तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री यांनी म्हटले आहे.

हा चार्वाक राक्षस म्हणजेच नास्तिक तत्त्वज्ञानी चार्वाक होय, असे काही विद्वानांचे मत आहे. चार्वाक हा इ. स. च्या दुसऱ्या शतकापासून सातव्या शतकापर्यंत केव्हातरी होऊन गेला, असे प्रा. आठवले यांनी म्हटले आहे. चार्वाकाने लोकायतदर्शनात फार महत्त्वाची भर घातली असावी व त्याचा प्रचारही बराच केला असावा, असे दिसते. [चार्वाक–इतिहास आणि तत्त्वज्ञान]

चार्वाकदर्शन एक अवैदिक दर्शन. याला लोकायत, लोकायतिक, नास्तिक व बार्हस्पत्य अशीही अन्य नावे आहेत. अवैदिक दर्शनांतले हे सर्वांत प्राचीन दर्शन होय.

हा लोकच आत्म्याचे क्रीडास्थळ आहे, इहलोकाशिवाय परलोक नावाची काही वस्तू नाही, शरीर हाच आत्मा आहे, मरण म्हणजेच मुक्ती, त्यामुळे शरीरात प्राण असेपर्यंत सुख मिळवीत राहावे, धर्म हा पुरुषार्थ नसून, काम हाच मानवी जीवनातील पुरुषार्थ होय, इ. सिद्धान्त भारतात प्राचीन कालापासून प्रचलित होते. वैदिक काळात व उपनिषत्काळातही चार्वाकाच्या सिद्धान्तांसारखे सिद्धान्त क्वचित आढळतात. माणूस मृत्यू पावल्यावर त्याच्या आत्म्याचे काय होते, याबद्दल त्या काळी लोकांना जिज्ञासा होती (कठ. १.१.२०). काही लोक मृत्यूनंतर आत्म्याचे अस्तित्व मानीत होते; तर अन्य काही ते मानीत नव्हते. 'न प्रेत्य संज्ञास्ति' मेल्यानंतर चैतन्य शिल्लक राहत नाही (बृहदा. ४.५.१३.), हे वाक्य चार्वाकाच्या मताचे सूचक असल्याचे काहींनी मानले आहे. बौद्धांच्या ग्रंथांतही चार्वाकाच्या सिद्धान्तांचा निर्देश अनेक ठिकाणी आढळतो. उच्छेदवादाचा प्रतिपादक अजितकेशकंबल याचा सिद्धान्त लोकायतमताला अनुसरणाराच आहे. जैन ग्रंथांतही चार्वाकमताचा निर्देश आलेला आहे. यावरून चार्वाकमताची प्राचीनता कळून येईल.

वैदिक काळात, विशेषतः ब्राह्मण काळात, यज्ञयाग व तपस्या

यांवर वैदिकांचा फारच भर होता. त्यांना इहलोकापेक्षा परलोकाचीच चिंता जास्त वाटत होती. या विचारांचीच प्रतिक्रिया चार्वाकदर्शनात झाली, असे म्हटले पाहिजे. त्या काळी परलोकाची चर्चा ऐकून ऐकून लोक इतके कंटाळले होते, की त्यांच्यापैकी काहींनी एकदम विरुद्ध टोकाला जाऊन परलोकाचे अस्तित्वच अमान्य केले व परलोकाला साधनभूत अशी धर्म नामक वस्तूही नाकारली. इंद्रियगम्य जगत हेच फक्त सत्य आहे, असा त्यांनी दावा मांडला. अशा प्रकारे वैदिक काळातील अतिरिक्त धार्मिक कर्मकांडाची प्रतिक्रिया म्हणून चार्वाकदर्शनाचा जन्म झाला, असे मानायला हरकत नाही.

चार्वाकदर्शनाचे सर्वांत प्राचीन नाव लोकायत असे आहे. एका विशिष्ट शास्त्राची वाचक या अर्थाने पाणिनीने लोकायत या संज्ञेचा उल्लेख केला आहे (अष्टा. ४.२.६०). व्याकरण महाभाष्यातही लोकायत शास्त्रावर भागुरीने लिहिलेल्या वर्तिकेचा म्हणजे टीकेचा उल्लेख केलेला आहे. कौटिल्यानेही लोकायत शास्त्राचा निर्देश केला आहे. महाभारतात कण्वाश्रमाचे जे वर्णन आले आहे, त्यात वेदवेदान्तज्ञ ब्राह्मणांबरोबरच लोकायतिकमुख्यांचाही उल्लेख झालेला आहे. यावरून पाणिनी, कौटिल्य व महाभारत यांच्या काळी लोकायत शास्त्र हे वैदिक आर्यांमध्ये प्रतिष्ठा पावलेले एक दर्शन बनले होते, हे कळून येते.

लोकायत या शब्दाची फोड पुढीलप्रमाणे करतात––

(१) लोक म्हणजे इहलोक व आयत म्हणजे आधारित. यावरून इहलोकावर आधारलेले मत, ते लोकायत मत होय. (२) लोक म्हणजे सामान्य जन; त्यांना पटणारे मत. (३) लोक म्हणजे इंद्रियविषय; त्यांना महत्त्व देणारे मत.

तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी लोकायत हे बृहस्पतीचे नाव असावे, असे सुचविले आहे. त्यांच्या मते लोकायत ही पित्याच्या लोक या नावावरून बृहस्पतीला मिळालेली पैतृक संज्ञा असावी. लोकायत म्हणजे लोकपुत्र. ऋग्वेदाच्या १०.७२ या सूक्ताचा द्रष्टा लौक्य बृहस्पती नामक ऋषी आहे. लौक्य म्हणजे लोकपुत्र होय.

पुढे याच दर्शनाला चार्वाकदर्शन असे म्हणू लागले. चार्वाक नावाचा या दर्शनाचा एक फार मोठा आचार्य होऊन गेला. त्यामुळे त्याच्याच नावावरून हे दर्शन ओळखले जाऊ लागले.

चर्व् = खाणे. यावरून खा, प्या, मजा करा, असे सांगणाऱ्या दर्शनाला चार्वाक असे नाव मिळाले, असेही काहीजण म्हणतात. पुण्यपाप, स्वर्गनरक, इ. कल्पना ज्यांनी चर्वण करून (नाहीशा करून) टाकल्या आहेत, ते चार्वाक अशी व्याख्या गुणरत्नाने सांगितली आहे.

चार्वाकवाद्यांचा परमेश्वराच्या अस्तित्वावर विश्वास नसल्यामुळे या दर्शनाला नास्तिक दर्शन असे नाव मिळाले.

सूत्रकालात सांख्य, योग, न्याय, वैशेषिक, इ. दर्शनांच्या सूत्रांबरोबरच लोकायत मताचेही सूत्रबद्ध तत्त्वदर्शन निर्माण झाले होते, असे म्हणता येते. बृहस्पती गोत्रातील तत्त्वचिंतकांनी हे लोकायत दर्शन प्रामुख्याने पुढे मांडले. त्यामुळे लोकायत दर्शनाचा बार्हस्पत्य दर्शन असा निर्देश वारंवार होऊ लागला. महाभारतात व कौटिलीय अर्थशास्त्रात दंडनीतिशास्त्र सांगणाऱ्या बृहस्पतीचा उल्लेख आला आहे. कश्यप, वसिष्ठ, इ. गोत्रनामांप्रमाणे बृहस्पती हे गोत्रनामही अनेक व्यक्तींच्या बाबतीत लावलेले दिसते. वसिष्ठ व वासिष्ठ, कश्यप व काश्यप याप्रमाणे बृहस्पती व बार्हस्पत्य हे दोन्ही निर्देश गोत्रातील एकाच व्यक्तीचे होऊ शकतात. कौटिल्याने बृहस्पतीचे परलोकासंबंधी जे मत सांगितले आहे, तसेच मत महाभारतात कणिकनीती नामक राज्यशास्त्रविषयक अध्यायात पर्यायाने आले आहे (आदि. १४०; शांति. १४०). कणिक किंवा कणिङ्क हे बृहस्पतिपुत्र भरद्वाजाचे दुसरे नाव होते. हा भरद्वाज नास्तिक होता व त्याची विचारसरणी नास्तिक मताची असूनही प्रभावी होती, असे शांतिपर्वातील भृगुभरद्वाज-संवादावरून दिसून येते––

छिन्नस्य यदि वृक्षस्य न मूलं प्रतिरोहति।
बीजान्यस्य प्रवर्तन्ते मृतः क्व पुनरेष्यति॥
बीजमात्रं पुरासृष्टं यदेतत् परिवर्तते।
मृतामृताः प्रणश्यन्ति बीजाद्बीजं प्रवर्तते॥
(म. भा. शांति. १८६. १४-१५)

याचा भावार्थ असा– मूळ तोडले असता वृक्ष पुन्हा वाढत नाही. त्याची बीजे शिल्लक राहिली, तरच वृक्ष पुन्हा उत्पन्न होतो. त्याचप्रमाणे मनुष्य मेला की मेला. त्याचा पुनर्जन्म होणे शक्य नाही. कारण त्याचे बीजच शिल्लक राहत नाही.

चार्वाक मताचे लोक बुद्धिवादी होते. स्वमतस्थापनापेक्षा परमतखंडनाकड त्यांचे लक्ष अधिक होते, म्हणून त्यांना वैतंडिक असेही म्हणत असत. ते वेदप्रामाण्य मानीत नसत. त्याचप्रमाणे ते जैन व बौद्ध आगमांचीही निंदा करीत. त्यामुळे ब्राह्मण, जैन आणि बौद्ध असे सर्व धर्माचार्य चार्वाकमताचे विरोधी बनले. रामायणात रामचंद्राने भरताजवळ लोकायतिकांची अनर्थकुशल, बाल व पंडितमानी अशी निंदा केली आहे. भगवान बुद्धाने भिक्षूंना लोकायतशास्त्र शिकण्याची बंदी केली होती, असे विनयपिटकावरून कळते. जैन ग्रंथांत तर या दर्शनाला मिथ्यादृष्टीचा एक प्रकार असेच म्हटले आहे.

'बृहस्पतीच्या सूत्रांचा उल्लेख अनेक प्राचीन दर्शनग्रंथांत मिळतो. 'एक आत्मनः शरीरे भावात्' (ब्र. सू. ३.३.५३)

या सूत्रावरचे भास्करभाष्य व शांकरभाष्य, गीतेवरील नीलकंठी, श्रीधरी व मधुसूदनी या टीका आणि अद्वैतब्रह्मसिद्धी, इ. ग्रंथांत पूर्वपक्षादाखल चार्वाकदर्शनाची सूत्रे उद्‌धृत केली आहेत. त्यांतील काही अशी –

पृथिव्यप्तेजोवायुरिति तत्त्वानि ।

अर्थ – पृथ्वी, आप, तेज व वायू ही चार तत्त्वे आहेत.

तत्समुदाये शरीरेन्द्रियविषयसंज्ञा ।

अर्थ – त्यांच्या समुदायाला शरीर, इंद्रिय व विषय अशा संज्ञा आहेत.

तेभ्यश्चैतन्यम् ।

अर्थ – त्यांच्यापासून चैतन्य उत्पन्न होते.

चैतन्यविशिष्टः कायः पुरुषः ।

अर्थ – चैतन्यविशिष्ट देह म्हणजेच आत्मा (पुरुषः) होय.

काम एवैकः पुरुषार्थः ।

अर्थ – काम हाच एक पुरुषार्थ.

मरणमेवापवर्गः ।

अर्थ – मरण म्हणजेच मोक्ष.

प्राचीन काळी चार्वाकदर्शनाचे मूळ ग्रंथ उपलब्ध होते; पण पुढे त्यांचा लोप झाला. निरनिराळ्या दर्शनांतही पूर्वपक्ष म्हणून चार्वाकमते मांडलेली आढळतात. याशिवाय जयराशिभट्टाचा तत्त्वोपप्लवसिंह, न्यायमंजरी, विवरणप्रमेयसंग्रह, सर्वसिद्धान्तसंग्रह, सर्वमतसंग्रह, षड्‌दर्शनसमुच्चय व त्यांवरील गुणरत्नकृत टीका, सर्वदर्शनसंग्रह, कमलशीलकृत तत्त्वसंग्रहाची पंजिका, इ. ग्रंथांवरून या दर्शनाची आणखी काही तत्त्वे कळतात, ती अशी–

प्रत्यक्षमेव प्रमाणम् ।

अर्थ – प्रत्यक्ष हेच प्रमाण.

अनुमानमप्रमाणम् ।

अर्थ – अनुमान हे प्रमाण नाही.

लोकप्रसिद्धमनुमानं चार्वाकैरपीष्यत एव ।

अर्थ – लोकप्रसिद्ध अनुमान हे चार्वाकांनाही मान्य आहे.

स्वभावं जगतः कारणमाहुः ।

अर्थ – स्वभाव हेच जगताचे कारण आहे.

धर्माभावान्नाधर्मोऽपि कश्चित् ।

अर्थ – (जगात) धर्मच नसल्यामुळे अधर्मही नाही.

अतस्तत्फलत्वेन स्वर्गनरकावपि न स्तः ।

अर्थ – त्यामुळे धर्माधर्मांचे फळ म्हणून स्वर्ग व नरकही नाहीत.

न परमेश्वरोऽपि कश्चित् ।

अर्थ – ईश्वर म्हणूनही कोणी नाही.

परलोकयायी जीवः प्रत्यक्षेण नानुभूयते ।
परलोकिनोऽभावात् परलोकाभावः ।

अर्थ – परलोकाला जाणारा जीव प्रत्यक्ष दिसत नाही. त्याचा अभाव असल्यामुळे परलोकाचाही अभाव आहे.

न धर्मः, न मोक्षः ।

अर्थ – धर्म, मोक्ष हे (पुरुषार्थ) नाहीत.

स्वातन्त्र्यं मोक्षः, पारतन्त्र्यं बन्धः ।

अर्थ – (मोक्ष म्हणजे सर्वश्रेष्ठ ईप्सित असे असेल, तर) स्वातंत्र्य हा मोक्ष आहे आणि पारतंत्र्य हे बंधन आहे.

कृषिगोरक्ष्यवाणिज्यदण्डनीत्यादिभिर्बुधैः ।
एतैरेव सदोपायैर्भोगाननुभवेद् भुवि ।।

अर्थ – शेती, गोपालन, व्यापार, सरकारी नोकरी, इ. उपायांनी (धनार्जन करून) शहाण्यांनी नेहमी जगात सुखोपभोग घ्यावा.

अग्निहोत्रं...भस्मगुण्ठनं बुद्धिपौरुषहीनानां जीविका ।

अर्थ – अग्निहोत्र, भस्मचर्चन ही बुद्धी आणि पौरुष यांनी हीन असलेल्या लोकांच्या उपजिविकेची साधने आहेत.

प्रत्यक्षसिद्धो राजा परमेश्वरः ।

अर्थ – ज्याची उपयुक्तता उघड दिसते, तो राजा म्हणजेच परमेश्वर होय.

दण्डनीतिरेव विद्या । अर्थगान्धर्ववेदावेव च वेदौ ।
अर्थकामशास्त्रं लोकायतशास्त्रं प्रत्यक्षमूलत्वात् ।

अर्थ – दंडनीती हीच खरी विद्या. अर्थ आणि गांधर्व (गानविद्या) हेच खरे वेद. प्रत्यक्षमूल असल्यामुळे अर्थकामशास्त्र हे लोकायतशास्त्र (हे खरे शास्त्र) होय.

तुल्यत्वे वपुषा मुखाद्यवयवैर्वर्णक्रमः कीदृशः ।

अर्थ – मुखादी अवयव हे सर्व शरीरांत सारखे असताना वर्णभेद मानणे योग्य नाही.

पातिव्रत्यादिसङ्केतः बुद्धिमद्‌दुर्बलैः कृतः ।

अर्थ – पातिव्रत्यादी संकेत हे अत्यंत बुद्धिहीन पुरुषांनी निर्माण केले आहेत.

या वरील वचनांवरून चार्वाकमताची बरीचशी कल्पना येईल.

चार्वाकांची ज्ञानमीमांसा – चार्वाकवादी प्रत्यक्ष हे एकच प्रमाण मानतात. विषय आणि इंद्रिये यांच्या संयोगाने उत्पन्न होणारे ज्ञान ते प्रत्यक्ष होय. इंद्रियांनी प्रत्यक्ष होणारे जगत् हेच सत्य आहे. बाकीचे सर्व पदार्थ हे असत् होत. चक्षू, श्रोत्र, घ्राण, जिव्हा व त्वचा या इंद्रियांच्या द्वारे होणारे ज्ञान हेच प्रमाण असून, अस्पृष्ट, अनास्वादित, अनाघ्रात, अदृष्ट व अश्रुत अशा पदार्थांना अस्तित्वच नाही, अशी चार्वाकवाद्यांची मते आहेत.

बौद्ध, जैन, इ. अवैदिक व न्यायवैशेषिकादी वैदिक दर्शने प्रत्यक्षाप्रमाणे अनुमान हेही एक प्रमाण मानतात. परंतु चार्वाकवादी अनुमान प्रमाण मानीत नाहीत. यासंबंधीची त्यांची विचारसरणी अशी—

नैयायिकादी ज्याला व्याप्ती म्हणतात, ती कधीच समजू शकत नाही. व्याप्ती म्हणजे निरपवाद साहचर्य. पण ते काही ठिकाणीच पाहणे शक्य असते. महानसादी काही ठिकाणी अग्नी व धूम यांचे साहचर्य पाहून अग्नी व धूम यांची व्याप्ती मानण्याची पद्धत आहे. पण धूम व अग्नी यांचे वर्तमानकाळातील सर्व ठिकाणचे साहचर्यही आपण पाहू शकत नाही. मग भूतकाळाची आणि भविष्यकाळाची गोष्ट कशाला ! आणि समजा, एखाद्या बाबतीत सर्व ठिकाणांचे साहचर्य पाहून व्याप्ती सांगितली, तर ते प्रत्यक्षच होते; अनुमान नाही. अनेक ठिकाणी दोन गोष्टी एकत्र दिसल्यामुळे त्या सर्वत्र, सर्व काळ तशाच असतील, अशी अपेक्षा निर्माण होते. पण तिथे कार्यकारणभाव लावणे निरर्थक आहे. त्यामुळे अनुमान हे प्रमाणच नव्हे.

चार्वाकवाद्यांच्या मते जगात कार्यकारणभावाला स्थानच नाही. जगातील वैचित्र्य हे कार्यकारणभावातील वैचित्र्यामुळे उत्पन्न झालेले नसून स्वभावामुळे उत्पन्न झालेले आहे. एखादा मनुष्य सुखी दिसला, की धर्माचरण हे त्याच्या सुखाचे कारण आहे; असे मानणे व एखादा दुःखी दिसला, तर अधर्माचरण हे त्याचे कारण आहे, असे मानणे न्यायसंगत नाही. सुखाचे कारण धर्म नाही किंवा दुःखाचे कारण अधर्म नाही. मनुष्य हा स्वभावानेच सुखी किंवा दुःखी बनत असतो. अग्नी उष्ण आहे किंवा जल शीत आहे, याला काही कारण नाही. मोराला इतका रंगीबेरंगी पिसारा कोणी दिला ? कोकिळाचा आवाज इतका मधुर कोणी बनवला ? स्वभाव हेच या सर्वांचे कारण आहे. चार्वाकवादी या सिद्धान्ताला स्वभाववाद असे नाव देतात.

ते शब्दप्रामाण्यही मानीत नाहीत—

त्रयो वेदस्य कर्तारो भण्डधूर्तनिशाचराः ।
जर्भरीतुर्फरीत्यादि पण्डितानां वचः स्मृतम् ।।

(स. द. सं)

अर्थ—भंड, धूर्त व निशाचर हे तिघे वेदांचे कर्ते आहेत. जर्भरी, तुर्फरी, इ. हे पंडितांचे शब्द आहेत.

वेदांत परस्परविरोधी विधाने असल्यामुळे, त्यात अनर्थक शब्द आलेले असल्यामुळे व अप्रत्यक्ष पदार्थांची कल्पना केलेली असल्यामुळे वेद हे अप्रमाण आहेत, असे त्यांचे म्हणणे आहे. अश्वमेधातील घृणास्पद वर्णन, जर्भरी, तुर्फरी, इ. अनर्थक शब्दांचा प्रयोग आणि यज्ञातील मांसभक्षणाचे विधान, यामुळे हे यज्ञकर्ते भंड, धूर्त व निशाचर होते, असे त्यांचे मत आहे.

चार्वाकवाद्यांची आचारमीमांसा—चार्वाकवादी या जग- शिवाय कोणताही पदार्थ मानीत नाहीत. मीमांसक हे वेदविहि- अनुष्ठानाला धर्म असे नाव देतात. वेदप्रतिपादित यज्ञयाग- दिकांचे अनुष्ठान करून मरणोत्तर स्वर्गसुखाचा अनुभव घ्याव- असे त्यांचे म्हणणे आहे. पण चार्वाकवादी फक्त इहलोक- मानीत असल्यामुळे स्वर्गलोक त्यांना अमान्य आहे. स्वर्गच नस- ल्यामुळे त्याच्या प्राप्तीसाठी जन्मभर शरीरक्लेश सहन करणे व यज्ञानुष्ठान करणे, या गोष्टीही ते मान्य करीत नाहीत. कपोल- कल्पित पारलौकिक सुखाच्या आशेने यज्ञात प्राण्याची हिंसा करणे, हे मूर्खपणाचे आहे, असे ते म्हणतात. ज्योतिष्टोम यज्ञा- मारलेला पशू जर स्वर्गात जातो, तर यजमान आपल्या पित्या- लाच का मारीत नाही, असा त्यांचा याबाबत सवाल आहे. त्याचप्रमाणे श्राद्ध केल्याने जर पितर तृप्त होतात, तर विझ- लेल्या दिव्यात तेल घातल्याने त्याची ज्योतही प्रज्वलित व्हायला हवी. पण जगात अशा गोष्टी कधीच प्रत्ययाला येत नाहीत. मृतात्म्याच्या तृप्तीसाठी श्राद्ध करणे, हे त्यांच्या मते वेडेप- पणाचे आहे. श्राद्धाने स्वर्गातले पितर तृप्त होतात, हे जर मानले, तर वरच्या मजल्यावर राहाणाऱ्या माणसाला तळ- मजल्यावर ठेवलेले अन्न आपोआप मिळून तो का तृप्त होऊ नये ? वेदातील वचनांची विफलता सिद्ध करण्यासाठी चार्वाक- वादी असे अनेक लौकिक दृष्टान्त देतात.

चार्वाकवाद्यांची मोक्षाची कल्पनाही विलक्षण आहे. जोपर्यंत शरीर आहे, तोपर्यंत ते नाना प्रकारच्या संकटांना तोंड दे- असते. देहपातानंतर दुःखाची आत्यंतिक निवृत्ती होते म्हणून 'मरणमेवापवर्गः' = मृत्यू म्हणजेच मोक्ष, असे त्यांनी मानले.

मोक्ष हा जर चार्वाकवाद्यांचे लक्ष्य नाही, तर मग त्यांचे ध्ये- तरी काय, असा प्रश्न उद्भवतो. लौकिक सुख हेच त्यांच्या दृष्टीने जीवनाचे चरम लक्ष्य आहे आणि अर्थद्वारा त्याची प्राप्ती होऊ शकते, असे ते मानतात. म्हणून जोवर शरीर आहे, तोवर सुखोपभोग घ्या, असे त्यांचे सांगणे आहे—

यावज्जीवेत् सुखं जीवेत् ऋणं कृत्वा घृतं पिबेत् ।
भस्मीभूतस्य देहस्य पुनरागमनं कुतः ॥

अर्थ—जीव असेपर्यंत सुखाने जगावे. ऋण काढूनही घृत प्यावे. कारण एकदा देह भस्मसात झाला की पुन्हा तो प्राप्त होणार नाही.

खा, प्या, मजा करा, हा चार्वाकवाद्यांचा जीवनाचा मंत्र आहे. दुःखमिश्रित असले, तरी सुख हे त्याज्य नाही. निर्भेळ सु- आढळत नाही. म्हणून जे मिळते तेही घ्यायचे नाही, हे बरोब- नव्हे. ज्याप्रमाणे मत्स्याहारी माणूस माशांतील काटे बाजू-

काढून त्यातला ग्राह्यांश तेवढा घेतो, ज्याप्रमाणे तांदूळ घेणारा तूस बाजूला करून तांदूळ घेतो, त्याचप्रमाणे सुखार्थी माणसाने दुःखमिश्रित सुखातून सुख तेवढे ग्रहण करावे. दुःखाच्या भयाने सुखाचा त्याग करणे, म्हणजे पशू खातील म्हणून धान्य न पेरण्यासारखे किंवा भिक्षुक मागतील म्हणून स्वयंपाक न करण्यासारखे मूर्खपणाचे आहे. सारांश हे जीवन भोगविलासात व्यतीत केले पाहिजे व हेच प्राणिमात्राचे प्रधान लक्ष्य असले पाहिजे.

चार्वाकवाद्यांची इतर दार्शनिकांनी जी निंदा केली आहे, ती त्यांच्या आचारमीमांसेवरून. ज्या दर्शनात धर्माला, पापपुण्याला स्थान नाही, भौतिक सुखवाद हाच ज्याचा पुरुषार्थ आहे, ते दर्शन मानवी जीवनातील गुंतागुंत सोडवून त्याला एक आदर्श मार्ग दाखवील, अशी आशा करणे व्यर्थ आहे. पण असे असले, तरी चार्वाकदर्शनाची काही वैशिष्ट्ये स्पृहणीय आहेत, ती अशी –

चार्वाकांच्या ज्ञानमीमांसेचे प्रधान वैशिष्ट्य म्हणजे बुद्धिप्रामाण्यवाद. आप्तवचनांवर विश्वास किंवा अंधश्रद्धा ठेवू नका, असे त्यांचे सांगणे आहे. श्रद्धेने सत्याचा शोध लागत नाही; तर तर्कानेच तो लागतो. दार्शनिक तत्त्वांवर अंधविश्वास ठेवण्यापेक्षा एकदम अविश्वास परवडला. अशा प्रकारे चार्वाकवाद्यांनी इतरांना शुद्ध तार्किक मार्गाची महती पटवून दिली.

अनुमानाची अप्रामाणिकता दाखवताना चार्वाकांनी व्याप्तीचे जे दोष दाखवले, त्यांतील बऱ्याच भागाचा आधुनिक प्राश्चात्य तर्कपंडितांनी इंडक्शन (आगमन) ची परीक्षा करताना स्वीकार केला आहे.

चार्वाकवाद्यांनी ऐहिक सुखमय जीवनाचा खराखुरा पाठपुरावा केला. कुठल्यातरी अज्ञात गोष्टीच्या मागे लागून व्रते, वैकल्ये, उपवास, इ. मार्गांनी जीवाचे हाल करून घेणे, हा शुद्ध मूर्खपणा असल्याचे त्यांनी सांगितले. तुमच्या सुखदुःखांच्या कारणांसाठी तुम्ही परलोकाकडे दृष्टी न ठेवता, ती कारणे तुमच्या सभोवारच शोधा; तुम्हांला ती इहलोकातच सापडतील. त्याचप्रमाणे स्वर्गसुखाचा आणि नरकातील यातनांचा अनुभवही याच लोकात घेता येईल. यौवन क्षणिक आहे, लक्ष्मी चंचल आहे व प्रिय माणसाचा सहवास अल्पकाल लाभतो, म्हणून या सुखांचा उपभोग घ्यायचा नाही, हे तत्त्वज्ञान कुठले? केव्हातरी मरायचे आहे, म्हणून जन्मभर सुतकी चेहरा करून बसायचे, हे कितपत युक्त आहे, असा त्यांचा सवाल आहे.

जीवनात सुखोपभोग घ्या, असे चार्वाकवाद्यांनी सांगितले, तर त्यात वावगे काय सांगितले? चोरी करा, फसवा, लुबाडा असे तर त्यांनी कुठेही सांगितले नाही. उलट कृषी, गोरक्ष, वाणिज्य, सरकारी नोकरी, इ. सरळ मार्गांनी पैसा मिळवून सुखोपभोग घ्यावा, असेच प्रतिपादिले आहे. चार्वाकवाद्यांचे तत्त्वज्ञान हे लोकाभिमुख असल्यामुळे त्याचे लोकायत हे नाव सार्थ आहे, असे सर्वदर्शनसंग्रहात म्हटले आहे. चार्वाकवाद्यांचे तत्त्वज्ञान हे लोकांना सहज समजण्यासारखे असल्यामुळे ते खोडून काढणे कठीण आहे, असेही त्यात सांगितले आहे. चार्वाकमताचा स्वीकार केल्यामुळेच बहुजनांचे कल्याण होईल, असे त्या दार्शनिकांनी नमूद केले आहे. चार्वाकवादी हे सुखवादाचे पुरस्कर्ते होते, हे खरे; पण त्यांना उच्छृंखल सुखवाद मात्र मान्य नव्हता, हे लक्षात ठेवायला पाहिजे. दंडभय नसेल, तर मनुष्याचे पशूत रूपांतर व्हायला वेळ लागणार नाही, असे ते सांगतात. म्हणूनच निग्रहानुग्रहसमर्थ व दंड आणि दया करणारा राजा हाच त्यांच्या मते परमेश्वर आहे.

चार्वाकवादी हे प्राचीन कालातील वैज्ञानिक होते. तर्काच्या कसोटीवरच ते सत्याची पारख करीत. ते नास्तिक असूनही संयमी होते व संयत जीवनाचे पक्षपाती होते. म्हणूनच त्यांनी ऋण काढूनही तूप प्यावे, असे सांगितले; मद्य प्यावे असे उपदेशिले नाही. जीवनाभिमुख असे एक समतोल तत्त्वज्ञान त्यांनी समाजाला दिले. शेतीभाती, व्यापारधंदा व नोकरी करून सुखाने जगावे; अर्थ व काम हे पुरुषार्थ साधावे; स्वर्गनरकादी कल्पनांच्या मागे लागून व धूर्त आणि लबाड भिक्षुकांच्या वचनांनी फसून देहदंडाचा मार्ग चोखाळू नये, जीवन रसिकतेने जगावे, अशा प्रकारचा उपदेश त्यांनी केला आहे. वर्णभेद व जातिभेद त्यांनी मानले नाहीत. स्त्रियांवरील बंधनाचा तर त्यांनी धिक्कारच केला आहे. राजसत्ता त्यांनी मानली; पण त्या सत्तेच्या वापरातही न्याय व विवेक असला पाहिजे, असे सुचविले. हे साधे, सरळ, सर्वसामान्य माणसाच्या आवाक्यातले व बुद्धिनिष्ठ असे तत्त्वज्ञान चार्वाकवाद्यांनी बुद्धपूर्वकालात प्रस्थापित केले होते, हे त्यांचे वैशिष्ट्य होय. [मा. द.; चार्वाक– इतिहास आणि तत्त्वज्ञान]

चालियन

एक जमात. केरळात यांची वस्ती आहे. विणकऱ्यांपैकी हा एक वर्ग आहे. इ. स. च्या ११ व्या शतकानंतर हे लोक पूर्व किनाऱ्यावरून येऊन केरळात स्थायिक झाले असावे. यांच्यात डावा व उजवा असे दोन गट आहेत. डाव्या गटातले लोक स्वतःला श्रेष्ठ समजतात. डावे भगवतीचे पूजक आहेत; तर उजवे गणेशपूजक आहेत. डावे हे पूर्वी शाकाहारी होते; पण कोण्या एका प्रसंगी त्यांच्या अन्नात मासे टाकून त्यांना बाटवण्यात आले, अशी आख्यायिका आहे.

मुलीला प्रथम रजोदर्शन झाले, की वडीलधाऱ्या स्त्रिया तिला तळ्यावर घेऊन जातात. तिथे द्रोणात पाणी घेऊन तिला स्नान घालतात. नंतर माडाच्या झावळ्यांनी सजवलेल्या खोलीत एका चटईवर तिला बसवतात. चटईभोवती तांदूळ पसरतात. एका तांब्यावर नारळ ठेवून तो मुलीशेजारी ठेवतात. तिसऱ्या दिवशी संध्याकाळी धोबी तिच्यासाठी धुतलेले कपडे आणतो. या वेळी धोब्याला तांदूळ देतात. धोबी ते तांदूळ पानात बांधून त्यांची पूजा करतो व नंतर धुतलेले कपडे एका पाटावर ठेवतो. मुलीच्या नातेवाईक स्त्रिया नीरांजन, पाण्याचे भांडे व तांदुळाचे माप घेऊन त्या पाटाला तीन प्रदक्षिणा घालतात. चौथ्या दिवशी मुलीला स्नान घालतात व तिच्या खोलीतील सगळ्या वस्तूंचे तळ्यात विसर्जन करतात.

विवाहापूर्वी मुलीच्या गळ्यात ताळी बांधण्याची प्रथा आहे त्यासाठी मुलीला चौरंगावर बसवून तिच्या हातात एक बाण देतात. नंतर पोथुवन (पुरोहित) घरच्या पुरुषाच्या हाती ताळी देतो व घरचा पुरुष ती मुलीच्या गळ्यात बांधतो.

विवाहप्रथा – लग्नाच्या आदल्या दिवशी नवरा मुलगा वधूच्या घरी येतो. त्याच दिवशी वधूला स्नान घालून प्रथम दिव्यासमोर उभी करतात. वरपिता अथवा मुलीचा काका त्या वेळी मुलीच्या हातात सोन्याची काही नाणी ठेवतो. लग्नाचे पौरोहित्य न्हावी करतो.

प्रसूतिप्रथा – गरोदरपणी सातव्या महिन्यात पुली कुडी (चिंचेचे सार पिणे) समारंभ करतात. त्यासाठी मुलीचा भाऊ चिंचेच्या झाडाची एक फांदी आणतो. मग त्या फांदीची सगळी पाने काढून टाकून ती फांदी अंगणात रोवतो. मग चिंचेच्या पानांचा रस काढून तो सात नारळांच्या रसात मिसळतात व तो रस मुलीला प्यायला देतात. हा समारंभ तीन दिवस चालतो. मूल जन्मल्यानंतर नवव्या दिवशी न्हावीण बाळंतिणीवर जलप्रोक्षण करते व मग जननाशौच संपते.

देव – धर्म – हे लोक गणपती, भगवती, गुलिकन, इ. देवांना भजतात.

डाव्या गटातील लोकांना भूतनृत्य फार प्रिय आहे. भगवतीच्या पूजेच्या वेळी ते हे नृत्य करतात.

मृतकप्रथा – मृतांना पुरतात. अंत्यक्रिया करणारा माणूस पाण्याचे भांडे घेऊन प्रेताला तीन प्रदक्षिणा घालतो. या वेळी न्हावी त्या भांड्याला भोक पाडतो. नंतर ते भांडे मृताच्या डोक्याजवळ ठेवतात. प्रेताला गुंडाळलेल्या कापडाची एक चिंधी न्हावी फाडून घेतो व ती दहाव्या दिवशी एखाद्या तळ्यात टाकतो. प्रेत पुरलेल्या जागी मृताचे स्मारक म्हणून तीन दगड ठेवण्याची चाल यांच्यांत आहे. [का. ट्रा. स. इं.]

चाली हो

सिंधी लोकांचे एक उत्सवपर्व. हे श्रावणमासा धरून साजरे करतात. या उत्सवाचा मुख्य दे झूलेलाल किंवा लालसाई हा आहे. संवत १००७ (इ. स. ९५०) मध्ये चैत्र शुद्ध द्वितीयेस हा पुरुष जन्मला. याने तेथील हिंदूंचे मुसलमानी छळवादापासून संरक्षण केले, त्याबद्दल कृतज्ञता म्हणून सिंधी लोक पुढे त्याला देव मानून, त्याच्या नावाने हा उत्सव साजरा करू लागले.

या उत्सवात सतत चाळीस दिवस नित्यपूजा आणि एकभुक्त उपवास या गोष्टी करायच्या असतात. चाळीस दिवसांत तैलाभ्यंग न करता एका वस्त्राने राहायचे असते. काही भक्तांच्या घरी झूलेलालाची अखंड ज्योत ठेवलेली असते. ज्योतिविसर्जनाच्या दिवशी झूलेलालाचे प्रतीक म्हणून लिंगाच्या आकाराचा पिठाचा गोळा तयार करतात व त्याची पूजा करून समारंभाने त्याचे नदीत किंवा समुद्रात विसर्जन करतात. सिंध प्रदेशात पर्जन्यमान कमी असते; त्यामुळे पाऊस वेळेवर पडावा आणि पिके भरपूर यावी, ही आकांक्षाही कालांतराने या उत्सवाशी संबद्ध झाली. [तो. क. रहेजा]

चालुक्य राजवंश

कर्नाटकात कदंब वंशाचे राज्य चालू असताना चालुक्य नावाचे एक घराणे त्याचे मांडलिक होते. त्या घराण्यातील पुलकेशी नामक पुरुषाने इ. स. ५४३ मध्ये वातापी (बदामी) येथे आपले स्वतंत्र राज्य स्थापले. कदंब व चालुक्य हे एकाच वंशाचे असावे; कारण दोन्ही कुलांचे गोत्र मानव्य होते व हारीती ही त्यांची कुलदेवता होती. बदामीच्या चालुक्यांच्या सर्व आलेखांत त्यांचे नाव चल्क्य, चलिक्य किंवा चलुक्य असे आढळते. नंतरच्या आलेखांत मात्र चालुक्य हे नाव आहे. बिल्हणाच्या विक्रमांकदेवचरितात या कुलाच्या उत्पत्तीविषयी एक आख्यायिका दिली आहे, ती अशी–

एकदा ब्रह्मदेव प्रात:संध्या करीत असता इंद्र तिथे गेला व त्याला म्हणाला. 'सर्व जग सांप्रत पापमय झाले आहे. कोणीही यज्ञयाग करून देवांना आहुती देत नाही.' त्या वेळी ब्रह्मदेवाने अर्घ्य देण्यासाठी आपल्या ओंजळीत पाणी घेतले होते. त्याने त्या चुलुकाकडे (ओंजळीतले पाणी) पाहून अर्घ्य दिले व त्यातून एक बलाढ्य पुरुष निर्माण झाला. तोच चालुक्य वंशाचा मूळ पुरुष होय. हारीत व मानव्य हे त्याचे वंशज अत्यंत पराक्रमी निघाले. अयोध्या हे त्यांचे मूलस्थान होते.

या घराण्याची एक शाखा कालांतराने दक्षिणेत जाऊन ऐहोळ येथे स्थायिक झाली, असे काही इतिहासकार मानतात; तर कर्नाटक हीच चालुक्यांची जन्मभूमी होय, असे काहींचे

आहे. बदामीचे चालुक्य स्वतःला हारीतीपुत्र म्हणत. सप्तमातृका व कार्तिकेय या त्यांच्या संरक्षक देवता होत्या. विष्णू हे त्यांचे उपास्य दैवत असून हे सोमवंशी क्षत्रिय होते.

या घराण्यातील जयसिंह नामक पुरुषाने अनेक युद्धे करून, स्वपराक्रमाने लहानसे राज्य स्थापले. पण तो कदंबांचा सामंत होता. ऐहोळ ही त्याची राजधानी होती. त्याचा पुत्र रणराग व रणरागाचा पुत्र पुलकेशी (पहिला) होय. याने वातापी येथे आपली राजधानी स्थापली. पुलकेशीने अग्निष्टोम, वाजपेय, पौंडरीक, अश्वमेध, इ. यज्ञ केले आणि सत्याश्रय, पृथ्वीवल्लभ व रणविक्रम या पदव्या धारण केल्या. नंतरच्या सर्व चालुक्य राजांना सत्याश्रय ही पदवी लावली जाते.

पुलकेशी (पहिला) याचा पुत्र कीर्तिवर्मा (इ. स. ५६७–९८) याने वनवासीचे कदंब राजे, दक्षिणेकडील नळ राजे व कोकणातील मौर्य राजे यांचा पराभव करून आपल्या राज्याचा बराच विस्तार केला. त्याच्यानंतर काही वर्षे त्याचा भाऊ मंगलेश हा राज्यकर्ता झाला. त्याने त्रिपुराच्या कलचुरी राजांचा पराभव केला. पुढे कीर्तिवर्म्याचा पुत्र पुलकेशी (दुसरा, इ. स. ६११–६४२) सिंहासनावर बसला. हा चालुक्य वंशातील सर्वश्रेष्ठ पुरुष होय. त्याने लाट, मालव, गुर्जर, इ. देश जिंकून आपले राज्य वाढवले. इ. स. ६३१ च्या सुमारास कनोजचा हर्षवर्धन दक्षिणदिग्विजय करण्यासाठी आला असता पुलकेशीने त्याचा पराजय केला आणि त्या विजयाबद्दल स्वतःला परमेश्वर व महाराजाधिराज या पदव्या लावून घेतल्या. विंध्य पर्वतापासून कावेरीपर्यंत आणि पूर्व समुद्रापासून पश्चिम समुद्रापर्यंत त्याची सत्ता प्रस्थापित झाली होती. त्याच्या साम्राज्याची तीन महाराष्ट्रके (विभाग) होती व प्रत्येक विभागात सामान्यपणे ३३,००० गावे होती. त्याने कोसल, कलिंग, पिष्टपुर, इ. देशांवर सार्वभौम सत्ता स्थापली आणि दक्षिणेकडील पल्लव, चोळ, पांड्य, व चेर या राजांनाही आपले प्रभुत्व मान्य करायला लावले. पर्शियाचा राजा दुसरा खुश्रू याचा प्रतिनिधी बहुमोल नजराणा घेऊन पुलकेशीच्या दरबारात त्याला भेटायला आला होता.



मल्लिकार्जुनमंदिर – पट्टदकल

पुलकेशीने आपला धाकटा भाऊ कुब्ज विष्णुवर्धन याला पूर्व भागावर राजप्रमुख नेमले होते; पण विष्णुवर्धनाने तिकडे आपले स्वतंत्र राज्यच सुरू केले.

इ. स. ६४२ च्या सुमारास पल्लव राजा नरसिंहवर्मन याने पुलकेशीचा पराभव करून वातापी नगरी ही त्याची राजधानी उद्ध्वस्त केली. त्यानंतर काही वर्षे वातापी येथे राज्यकर्ता असा कोणीही राजा नव्हता. इ. स. ६५५ च्यां सुमारास पुलकेशीचा पुत्र विक्रमादित्य(पहिला) याने पल्लवांचा पराभव करून आपले राज्य परत मिळवले. एवढेच नव्हे; तर चोळ, पांड्य, चेर या राजांनाही त्याने आपले अंकित केले. त्याने आपला भाऊ जयसिंह याला लाट देशावर अधिपती म्हणून नेमले होते. सत्याश्रय, रणरसिक, राजमल्ल, पृथ्वीवल्लभ, महाराजाधिराज, परमेश्वर व भट्टारक हीं त्याची बिरुदे होती. तो इ. स. ६८१ मध्ये मरण पावला.

त्यानंतर विनयादित्य, विजयादित्य, विक्रमादित्य (दुसरा) व कीर्तिवर्मा (दुसरा) यांनी सुमारे शंभर वर्षे राज्य केले. विनयादित्य व विजयादित्य यांनी उत्तर भारतावरही आपले वर्चस्व स्थापन केले होते. विक्रमादित्याच्या वेळी लाट देशावर अरबांचें आक्रमण आले; पण तेथील चालुक्यवंशी अधिपती अवनिजनाश्रय पुलकेशी याने ते परतवून लागले. विक्रमादित्याने पल्लवांची राजधानी असलेली कांची नगरीसुद्धा जिंकली.

कीर्तिवर्म्याच्या राजवटीत चालुक्य वंशाचे सामर्थ्य क्षीण झाले आणि इ. स. ७५३ च्या सुमारास राष्ट्रकूट वंशातील दंतिदुर्ग नामक पराक्रमी पुरुषाने कीर्तिवर्म्याचा पराभव करून चालुक्यांचे राज्य जिंकले.

राष्ट्रकूट वंशाची सत्ता कर्नाटकात सुमारे २०० वर्षे नांदली. त्या काळात चालुक्य वंशाच्या काही शाखा भिन्न भिन्न ठिकाणी राष्ट्रकूटांचे वर्चस्व मानून राज्य करीत होत्या. त्यांतील एका शाखेचा राजा तैल (तैलप, तैलप्पय्य) याने इ. स. ९७३ मध्ये राष्ट्रकूटांचा पराभव करून मान्यखेट ही त्यांची राजधानी जिंकली व तिथे आपली सत्ता स्थापली. विक्रमादित्य (दुसरा) याचा भीम नामक एक भाऊ होता, तो या शाखेचा मूळ पुरुष मानला जातो. भीमा नदीच्या दक्षिण तीरावर तर्दवाडी (सांप्रतचे तद्दवाडी) येथे त्याचे राज्य होते. तैलाने कुंतलाचा दक्षिण भाग तर जिंकलाच; शिवाय चेदी, ओडिसा व

नेपाळ या प्रदेशांवरही स्वाऱ्या केल्या. माळव्याचा परमारवंशी राजा मुंज याचा पराभव करून त्याने त्याला ठार मारले; लाट देशही आपल्या सत्तेखाली आणला. त्याने चक्रवर्ती, आहवमल्ल व भुवनैकमल्ल या पदव्या धारण केल्या. इ. स. ९९७ पर्यंत त्याने राज्य केले. त्याच्या नंतर सत्याश्रय, विक्रमादित्य व जयसिंह यांनी इ. स. १०४३ पर्यंत सत्ता गाजवली. नंतर सोमेश्वर (पहिला) हा राजा झाला. त्याने माळवा, चेदी, कोसल, कलिंग, इ. प्रदेशांवर वर्चस्व गाजवले. राजनारायण, आहवमल्ल व त्रैलोक्यमल्ल या पदव्या त्यानेही धारण केल्या. बिल्हणाने विक्रमांकदेवचरित या ग्रंथात लिहिले आहे, की - सोमेश्वराने कल्याणपुरम् येथे नवी राजधानी स्थापली. त्याने अनेक यज्ञ केले व पुष्कळ दानधर्मही केला. शेवटी मृत्यू जवळ आला, असे पाहून त्याने तुंगभद्रा नदीत जलसमाधी घेतली. त्याचा धाकटा मुलगा विक्रमादित्य महापराक्रमी निघाला. पित्याच्या राजवटीतच त्याने लंकेपासून आसामपर्यंत स्वाऱ्या करून सर्वत्र आपला दरारा बसवला होता.

सोमेश्वर (पहिला) याच्यानंतर त्याचा ज्येष्ठ पुत्र सोमेश्वर (दुसरा) हा राजा झाला (इ. स. १०६८). काही वर्षे त्याचे विक्रमादित्याशी सख्य होते. तथापि सोमेश्वर दुबळा पण जुलमी असल्यामुळे पुढे त्या दोघांचे बिनसले. मग विक्रमादित्याने तुंगभद्रेच्या दक्षिणेकडील प्रदेशावर आपली स्वतंत्र सत्ता स्थापली. त्याने चोळ वंशातील राजकन्येशी विवाह केला. पुढे त्याचे पूर्वेकडील चालुक्यांशी वैर सुरू झाले. सोमेश्वर त्या शाखेला मदत करू लागला, तेव्हा विक्रमादित्याने त्याला कैद केले व तो स्वतःच सम्राट बनला (इ. स. १०७६). त्याने त्रिभुवनमल्ल ही पदवी धारण केली व स्वतःच्या नावाचा नवीन शकही सुरू केला (चैत्र शु. प्रतिपदा, शके ९९८). या शकाला चालुक्य विक्रमकालवर्ष अशी संज्ञा आहे. ही कालगणना वापरलेले शेकडो लेख उपलब्ध झाले आहेत. पण शके १०९१ नंतर मात्र प्रस्तुत शकाचा उल्लेख आढळत नाही.

विक्रमादित्याने वेंगीच्या चालुक्यांचे राज्य जिंकले व ५० वर्षे राज्य केले. तो अत्यंत उदार होता. त्याचा अनेक विद्वानांना आश्रय होता. बिल्हण हा काश्मीरी पंडित त्याच्या दरबारात विद्यापती म्हणून बहुमानाने राहत होता. त्याच्या नंतर त्याचा पुत्र सोमेश्वर (तिसरा) याने ११ वर्षे राज्य केले. तो स्वतः विद्वान होता. त्याचा मानसोल्लास किंवा अभिलषितार्थचिंतामणी नामक संस्कृत ग्रंथ प्रसिद्ध आहे. त्याने भूलोकमल्ल ही पदवी घेतली होती. त्याच्या नंतर चालुक्य वंशाची सत्ता क्षीण झाली आणि इ. स. ११५६ च्या सुमारास चालुक्यांचा एक सामंत कलचुरी वंशातला बिज्जल याने चालुक्यांचे राज्य बळकावले. पुढे इ. स. ११८३ साली चालुक्य वंशातील सोमेश्वर (चौथा) याने आपले राज्य पुन्हा परत मिळवले; पण त्याची सत्ता अवघी ५।६ वर्षेच टिकली. त्यानंतर देवगिरीचे यादव आणि द्वारसमुद्रम्‌चे होयसळ यांनी त्या राज्यावर आक्रमणे करून त्याचे लचके तोडले.



पंपनाथमंदिराचा दर्शनी भाग– पट्टदकल

वेंगीचे चालुक्य घराणे– आंध्र प्रदेशात राजप्रमुख म्हणून गेलेल्या कुब्ज विष्णुवर्धनाने तिकडे स्वतंत्र राज्य स्थापले. वेंगी ही त्याची राजधानी होती. सुमारे १५० वर्षे त्या राज्यात शांतता नांदली. इ. स. ७७० च्या सुमारास राष्ट्रकूटांनी वेंगीचे राज्य जिंकले होते; पण चालुक्य राजा विजयादित्य (दुसरा, इ. स. ७९९–८४७) याने ते परत मिळवले. त्याने गंग व राष्ट्रकूट या राजांशी संग्राम करून आपली सत्ता बळकट केली. एवढेच नव्हे; तर त्याने राष्ट्रकूटांचा काही प्रदेशही जिंकून घेतला. त्याचा नातू विजयादित्य (तिसरा, इ. स. ८४८-९२) यानेही राष्ट्रकूट राजा कृष्ण (दुसरा) याचा पराभव करून

त्याचा बराच प्रदेश जिंकला. वेंगीचे चालुक्य व राष्ट्रकूट यांचा हा लढा दीर्घ काळ चालू राहिला. चालुक्य कुलातील भिन्न भिन्न पुरुषांचीही आपसात यादवी चालूच होती. चालुक्य भीम (दुसरा) याचा पुत्र अम्म (दुसरा) याने सुमारे २५ वर्षे राज्य केल्यानंतर त्याचा मोठा भाऊ दानार्णव याने त्याला ठार मारले (इ. स. ९७०). पण अम्माच्या बायकोचा भाऊ जटा चोडभीम याने दानार्णवाचा पराभव करून त्याचा वध केला व तो स्वतःच वेंगीचा राजा झाला. त्याने इ. स. ९९९ पर्यंत तिथे राज्य केले. दानार्णवाची मुले चोळ राजाच्या आश्रयाला गेली होती. राजराज चोळाने इ. स. ९९९ साली चोडभीमाचा पराभव करून दानार्णवाचा पुत्र शक्तिवर्मा याला वेंगीच्या गादीवर बसवले.

शक्तिवर्मा याने लवकरच राज्यात शांतता व सुव्यवस्था प्रस्थापित केली. चोळ सम्राटांचे सामर्थ्य त्याच्या पाठीशी उभे होते. इ. स. १०११ मध्ये त्याचा धाकटा भाऊ विमलादित्य हा राजा झाला. राजराज चोळ याची कन्या कुंदव्व ही त्याची राणी होती. त्यांचा पुत्र राजराज हा इ. स. १०१८ मध्ये गादीवर बसला. राजेंद्र चोळ याची कन्या अम्मंगादेवी हिच्याशी त्याचा विवाह झाला होता.

राजराज चालुक्य याचा सावत्र भाऊ विजयादित्य याने विशाखापट्टणम्च्या बाजूला एक लहानसे स्वतंत्र राज्य स्थापले होते (इ. स. १०३०). इ. स. १०६० मध्ये राजराज राजधानीत नसताना विजयादित्याने त्याचे (वेंगीचे) राज्य बळकावले. पुढे चालुक्य विक्रमादित्य (सहावा) याने त्याला पदच्युत केले; पण वीरराजेंद्र चोळ याने विक्रमादित्याचा पराभव करून विजयादित्याला पुन्हा सिंहासनावर बसवले. कारण विजयादित्याची माताही चोळ राजकन्याच होती.

राजराज चालुक्य याचा पुत्र राजेंद्र हा लहानपणी आपल्या आजोळी म्हणजे राजेंद्र चोळ याच्याकडे होता. इ. स. १०७० मध्ये वीरराजेंद्र चोळ मरण पावला आणि हा राजेंद्र चालुक्य त्याच्या सिंहासनावर बसला. कुलोत्तुंग चोळ (पहिला) हे त्याचे नाव प्रसिद्ध आहे. चोळ देशात आपले आसन स्थिर झाल्यानंतर त्याने आपला चुलता विजयादित्य याचा पराभव करून वेंगीचे राज्यही जिंकून घेतले व ते चोळांच्या साम्राज्यात समाविष्ट केले (इ. स. १०७६).

सांस्कृतिक विकास — चालुक्य वंशाची कीर्ती त्याच्या राजकीय पराक्रमापेक्षाही सांस्कृतिक कामगिरीमुळेच अधिक झाली आहे. भारतातील विस्तीर्ण प्रदेशावर या वंशाचे साम्राज्य ४०० वर्षांहून अधिक काळ चालू होते. तेवढ्या काळात भारतात साहित्य आणि विविध कला यांची चांगलीच जोपासना झालेली दिसते. अजंटा येथील लेण्यातील काही प्रसिद्ध भित्तिचित्रे इ. स. च्या ७ व्या शतकात चालुक्य राजांच्या प्रेरणेमुळे निर्माण झालेली आहेत. नृत्यकलेला या राजांनी बरेच प्रोत्साहन दिले. विक्रमादित्य (दुसरा) याची राणी लोकमहादेवी हिने अनेक संगीतकार व नर्तक यांना आश्रय दिला होता. चालुक्यांच्या राजवटीत अनेक संस्कृत व कन्नड पंडित तसेच कवीही उदयाला आले आणि त्यांनी असंख्य ग्रंथ रचले. रविकीर्ती, बिल्हण, पंप, रन्न, दुर्गसिंह, इ. प्रसिद्ध संस्कृत व कन्नड कवी चालुक्यांच्याच आश्रयाला होते. या राजवंशातील काही स्त्री-पुरुष स्वतःही कवी होते. चंद्रादित्यदेवाची राणी विजयमहादेवी हिने उत्तम प्रतीची संस्कृत काव्ये रचली आहेत. सोमेश्वर (तिसरा) हा तर पंडित म्हणूनच प्रसिद्ध होता.

चालुक्यशिल्प — शिल्पकलेच्या क्षेत्रात तर चालुक्यांची कामगिरी इतकी भव्य आहे, की त्या काळी निर्माण झालेली नवीन शिल्पशैली चालुक्य शैली या नावानेच ओळखली जाते. या शैलीत इंडो-आर्यन व द्रविड या दोन शिल्पकलांचे संमिश्रण तर आढळतेच; पण त्याशिवाय काही नवीन कल्पनाही तिच्यात दिसतात. नक्षीदार उंच शिखरे, गोल गुळगुळीत स्तंभ, घुमटाकृती छते, सुरेख मूर्ती व सुंदर भिंती ही त्या शैलीची वैशिष्ट्ये होत. लक्कुंडीचे काशीविश्वेश्वर मंदिर, हावेरीचे सिद्धेश्वरमंदिर, बंकापूर येथील ६० स्तंभांचे देवालय, गदगचे त्रिकूटेश्वरमंदिर, कुरुवट्टीचे मल्लिकार्जुनमंदिर; इ. मंदिरे इ. स. च्या १० व्या शतकानंतर विकसित झालेल्या चालुक्य शैलीची उत्कृष्ट उदाहरणे आहेत.



विरूपाक्षमंदिर – पट्टदकल

चालुक्यांच्या बदामी शाखेच्या राजवटीत ऐहोळ, पट्टदकल, बदामी व तेर या ठिकाणी अनेक सुंदर मंदिरे बांधण्यात आली त्यांपैकी बदामीचे मलेगिट्टी शिवालय व ऐहोळचे मेगुटीमंदिर यांचे शिल्पकाम तर असामान्यच आहे. पट्टदकल येथील

संगमेश्वर, पंपनाथ व विरूपाक्ष ही मंदिरे याच प्रकारची असून, त्यातील विरूपाक्षाचे मंदिर सर्वोत्कृष्ट आहे. तेर येथील उत्तरेश्वर व कालेश्वर ही विटांनी बांधलेली चालुक्य शैलीची मंदिरेही सुरेख आहेत.



पंपनाथमंदिर – पट्टदकल

चालुक्य शैलीची मंदिरे दुरून विशेष आकर्षक वाटत नाहीत. मात्र जवळून पाहिल्यावर त्यांचे सौंदर्य मनावर ठसते. नाजूक नक्षीकाम, अलंकृत स्तंभ आणि सुंदर कोरीव काम या सर्व मंदिरांतून ठायी ठायी दिसून येते. उत्तरकालीन चालुक्यशिल्पात नक्षीकामाचे प्रमाण अधिक आहे. कारण तोपर्यंत शिल्पकलेचा बराच विकास झाला होता आणि त्या वेळच्या कारागिरांनी हिरवा किंवा निळसर पाषाण वापरण्यास आरंभ केला होता. तो पाषाण नाजूक कोरीव कामासाठी त्यांना बरेच उपयुक्त ठरला.



गुहामंदिर – बदामी (इ. स. चे ६ वे शतक)

अखंड पहाड खोदून त्यात विहार बनवण्याची बौद्ध शिल्पकला चालुक्य काळातच कर्नाटकात प्रथम आली आणि त्या प्रकारची वैष्णव व जैन मंदिरे बदामीजवळ निर्माण झाली. त्या मंदिरांचे शिल्पकाम खरोखर अद्भुत आहे. त्यातील विष्णुमंदिर मंगलेशाच्या वेळी खोदलेले असून, तिथली अनंतासन विष्णू व नरसिंह ही कोरीव चित्रे प्रेक्षणीय आहेत. त्या मंदिराच्या पडवीत जे स्तंभ आहेत, त्यांना तिहेरी आधार दिलेले असून, त्यांत भव्य मानवी आकृती खोदलेल्या दिसतात.

सांप्रत चालुक्य काळातील बहुतेक सर्व देवालयांत शिवलिंग व नंदी यांची स्थापना झालेली दिसते. पण पूर्वचालुक्य काळातली सर्व मंदिरे मुळात वैष्णव पंथाची होती. इ. स. च्या १२ व्या शतकात कर्नाटकात लिंगायत पंथाचा उदय झाला व त्या पंथाने ही सर्व मंदिरे शैवपंथी बनवून टाकली, असे म्हणतात. उत्तरकालीन चालुक्य राजवटीत मात्र मुख्यतः शैव मंदिरेच बांधली गेली. त्या काळातली काही जैन मंदिरेही आढळतात. ही जैन मंदिरे वगळली, तर चालुक्य शैलीची सर्व मंदिरे सुंदर व नाजूक नक्षीकामाने सुशोभित आहेत. हे नक्षीकाम मुख्यतः स्तंभ, दरवाजे आणि घुमटाकार छते यांवर केलेले आढळते. त्यातील कौशल्य व सौंदर्य पाहून अनेक पाश्चिमात्य शिल्पशास्त्रज्ञ स्तिमित झाले आहेत.

इ. स. च्या १० व्या शतकापूर्वी जी मंदिरे बांधली गेली, त्यातील प्रतिमांची घडण वास्तविक व विविधतेने नटलेली वाटते. त्यांच्या भिंतीवर रामायण, महाभारत, भागवत यांतील प्रसंग किंवा पुराणांतील वीरांची चित्रे कोरलेली आहेत. त्यानंतरच्या देवालयांतील मूर्ती मात्र साचेबंद व ठराविक प्रकारच्याच आढळतात. उत्तर चालुक्य काळात मूर्तिकला हे एक नियमबद्ध शास्त्र बनले, हे त्याचे कारण होय. [क. द.; अ. हि. डे; ए इं.– मुक.; सं. मि.; हि. क. इं. पी.]

चावडी गावातील सरकारी कचेरी, कोतवालाची कचेरी, पाटलाची बसण्याची जागा, इ. चावडी शब्दाचे अनेक अर्थ आहेत. चौहाट या संस्कृत शब्दावरून चावडी शब्द व्युत्पादितात. धर्मशाळा व कर असेही याचे अर्थ आहेत.

चावडीवर नुसते सरकारी सार्वजनिक व्यवहारच होतात असे नाही, तर खाजगी वाद व मांडणेही चावडीवर येतात. मोठ्या वस्तीच्या गावात जाती-जातींनी आपापल्या खास सार्वजनिक कामासाठी गावचावड्यांखेरीज स्वतंत्र जातचावड्याही ठेवलेल्या असतात. [म. व्यु. को.; मं. श. को.]

चासती एक जात. बंगालमधील मुर्शिदाबाद आणि माल्दह या जिल्ह्यांत यांची मुख्य वस्ती आहे. शेती करणे आणि रेशमाचे किडे पाळणे, हे यांचे प्रमुख व्यवसाय होत.
|से. इं. १९५१]

चाहमान राजवंश या वंशाच्या अनेक शाखा गुजरात व राजस्थान् या प्रदेशांच्या भिन्न भिन्न भागांत राज्य करीत होत्या. हाच राजवंश पुढे चौहान राजपूत या नावाने प्रख्यात झाला. याची एक शाखा इ. स. च्या ८ व्या शतकाच्या मध्यापर्यंत लाट देशात राज्य करीत होती. शाकंभरी म्हणजे सध्याचे सांभर येथे राज्य करणारी शाखा विशेष प्रसिद्ध आहे. सांभर हे शहर जयपूर जिल्ह्यात आहे. त्या प्रदेशाला पूर्वी सपादलक्ष हे नाव होते व शाकंभरी ही चाहमानांची राजधानी होती. इ. स. च्या ७ व्या शतकाच्या प्रारंभी वासुदेव नामक पुरुषाने हे राज्य स्थापले, असे म्हणतात. इ. स. च्या ८ व्या शतकाच्या उत्तरार्धात तिथे राज्य करणारा दुर्लभराज हा प्रतीहारांचा मांडलिक होता. त्याने वत्सराज प्रतीहार याच्याबरोबर गौड देशावर स्वारी करून तिथल्या धर्मपालाचा पराजय केला होता.

दुर्लभराजाचा पुत्र गोविंदराज (गुवक) याने प्रतीहारांच्या दरबारात मानाचे स्थान मिळवले होते. सिंधचा सुलतान वेग वरिस (वरार) याने राजस्थानावर स्वारी केली, तेव्हा नागभट (दुसरा) याने त्याला यशस्वी प्रतिकार केला. त्या युद्धात गुवकाने बरीच कामगिरी केली. त्याच्या नंतर चंद्रराज (दुसरा) व गुवक (दुसरा) यांनी राज्य केले. गुवकाची बहीण कलावती हिचा विवाह प्रतीहार राजा भोज (पहिला) याच्याशी झाला होता. गुवकाचा नातू वाक्पतिराज इ. स. च्या १० व्या शतकाच्या प्रारंभी राज्य करीत होता. त्याने आपले सामर्थ्य बरेच वाढवले व प्रतीहारांचे प्रभुत्व झुगारून दिले.

वाक्पतिराजाचा पुत्र सिंहराज याने स्वातंत्र्य पुकारून महाराजाधिराज ही पदवी धारण केली. त्याचा पुत्र विग्रहराज (दुसरा) हा इ. स. ९७३ च्या सुमारास राज्य करीत होता. त्याने गुजरातवर स्वारी करून मूळराज सोळंकी याचा पराभव केला आणि लाट देश जिंकून नर्मदेपर्यंत धडक मारली. भृगुकच्छ (भरूच) येथील आशापुरी देवीचे मंदिर त्यानेच बांधले. त्याचा भाऊ दुर्लभराज (दुसरा) याचे राज्य उत्तरेस सिकर, पूर्वेस जयपूर, दक्षिणेस पुष्कर (अजमीर) आणि पश्चिमेस पर्वतसर (जोधपूर) येथवर पसरले होते. त्याचा पुत्र गोविंदराज (दुसरा) हा गजनीच्या महमूदाच्या आक्रमणाला प्रतिकार करण्यात यशस्वी ठरला. त्यानंतर सुमारे शंभर वर्षांनंतर राज्यावर आलेला अजयराज याने आसपासच्या प्रदेशावर आक्रमण करून आपले राज्य बरेच वाढवले. उज्जैनवर स्वारी करून त्याने परमारांच्या सैन्याचा पराभव केला. अजयमेरू (अजमीर) हे नगर त्यानेच वसवले. त्याच्या वेळची चांदीची व तांब्याची नाणी सापडली असून, काही नाण्यांवर त्याची राणी सोमलदेवी हिचे नाव आढळते.

इ. स. ११३३ च्या सुमारास राज्य करणारा अर्णोराज चाहमान याला गुजरातच्या जयसिंह सिद्धराज या राजाने पराभूत केले. त्याचा पुत्र कुमारपाल यानेही चाहमानांवर प्रभुत्व ठेवले. त्या दोन घराण्यांत लग्नसंबंधही झाले होते. इ. स. ११५३ च्या सुमारास अर्णोराजाचा पुत्र जुगदेव याने आपल्या पित्याचा वध केला. पण लवकरच अर्णोराजाचा दुसरा पुत्र वीसलदेव किंवा विग्रहराज (चौथा) याने त्या राज्यावर सत्ता मिळवली. त्याच्या राजवटीत (इ. स. ११५३ – ११६३) चाहमानांचे साम्राज्य बरेच वाढले. त्याने तोमरवंशी राजाचा पराभव करून दिल्ली जिंकली आणि पंजाबमधील आशिका (हांसी) नगरीही जिंकली. त्याची सत्ता शिवालिक पर्वतराजीपर्यंत प्रस्थापित झाली होती. द. राजस्थानातील पल्लिका (पाली), जावालिपूर (जालोर) व नड्डुल (नाडोल) ही नगरेही त्याने जिंकली. तो जसा पराक्रमी होता, तसाच विद्वान व लेखकही होता.

वीसलदेवाचा पुत्र पृथ्वीराज (दुसरा) याने इ. स. ११६९ पर्यंत राज्य केले. त्यानंतर अर्णोराजाचा पुत्र सोमेश्वर हा राजा झाला. गुजरातचा राजा जयसिंह सिद्धराज याची कन्या कांचनदेवी ही त्याची माता होती. तो कुमारपालाजवळ राहून त्याला युद्धात साहाय्य करीत असे. पृथ्वीराज (दुसरा) याच्या मृत्यूनंतर त्याच्या मंत्र्यांनी सोमेश्वराला बोलावून आणून त्याला राज्यपद दिले. कलचुरी वंशातील राजकन्या कर्पूरदेवी ही त्याची राणी होती. तिचा पुत्र पृथ्वीराज (तिसरा) इ. स. ११७८ साली सिंहासनावर बसला. इतिहासप्रसिद्ध पृथ्वीराज चौहान तो हाच होय. त्याने इ. स. ११८२ मध्ये जेजाकभुक्तीवर स्वारी करून चंदेल राजा परमर्दी याचा पराभव केला. त्याचप्रमाणे इ. स. ११८७ मध्ये त्याने गुजरातमधील चौलुक्य राजा भीम (दुसरा) याचाही पराभव केला. त्याच सुमारास शिहाबुद्दीन मुहंमद घोरी याने चाहमानांच्या राज्यावर आक्रमण सुरू केले. शेवटी इ. स. ११९१ मध्ये पृथ्वीराजाने त्याचा तराई (दिल्लीपासून ८० मैलांवरील एक गाव) येथील युद्धात पराभव केला. पण शिहाबुद्दीन याने इ. स. ११९२ मध्ये पुन्हा स्वारी करून त्याच रणक्षेत्रावर पृथ्वीराजाचा पूर्ण पराभव केला. नंतर शिहाबुद्दिनाने पृथ्वीराजाला प्रथम कैद केले व नंतर

ठार मारले. (पृथ्वीराज चौहान पाहा). पुढे अजमीर जिंकून त्याने तिथे पृथ्वीराजाच्या अल्पवयी पुत्राला गादीवर बसवले. पृथ्वीराजाचा भाऊ हरिराज याने लवकरच त्याला पदच्युत करून अजमीर येथे आपले स्वतंत्र राज्य चालू केले. पण तोही विलासी व प्रजेला अप्रियच ठरला. जेव्हा कुत्बुद्दीन ऐबक याने अजमीरवर स्वारी करून ते जिंकले, तेव्हा हरिराजाने सर्व आप्तांसह जोहार करून आपले जीवन समाप्त केले. त्याच्या मृत्यूने शाकंभरीच्या चाहमान वंशाचा अंत झाला.

नाडोलशाखा – इ. स. च्या १० व्या शतकाच्या प्रारंभी शाकंभरी येथे राज्य करणारा चाहमान राजा वाक्पतिराज (पहिला) याचा सर्वांत लहान मुलगा लक्ष्मण याने जोधपूर प्रदेशातील नड्डुल येथें एक स्वतंत्र राज्य स्थापले. त्याचा पुत्र शोभित याने अबू पर्वत जिंकला होता. पण त्याचा पुत्र बलिराज याच्या वेळी परमार राजा मुंज याने त्या पर्वतावर आपली सत्ता स्थापली. बलिराजानंतर त्याचा चुलत भाऊ महेंद्र हा राजा झाला. त्याच्या कारकीर्दीत नाडोल व शाकंभरी या शाखांत वैर सुरू झाले. शाकंभरीचा राजा दुर्लभराज याने नाडोलचे राज्य पादाक्रांत केले. तेव्हा महेंद्र हा राष्ट्रकूट राजा धवल याच्या आश्रयाला गेला. तिथून प्रयत्न करून महेंद्राने लवकरच आपले राज्य परत मिळवले. इ. स. ११५० पर्यंत हे राज्य स्वतंत्र होते. त्यानंतर ते चौलुक्य राजा कुमारपाल याच्या सत्तेखाली गेले. इ. स. ११६० च्या सुमारास अजमीरच्या विग्रहराजाने आणि पुढे इ. स. ११७८ साली शिहाबुद्दीन घोरीने नाडोल लुटले. त्यानंतर नाडोल शाखेतील केल्हण याने पुन्हा स्वतंत्रपणे राज्य सुरू केले. त्याचा पुत्र जैत्रसिंह इ. स. ११९४ च्या सुमारास गादीवर बसला खरा; पण इ. स. ११९७ मध्ये कुत्बुद्दीन याने नाडोलचे राज्य पादाक्रांत करून चाहमानांच्या त्या शाखेचाच शेवट करून टाकला.

झालोरशाखा – केल्हणाचा भाऊ कीर्तिपाल याने परमार राजांचा पराभव करून जाबालिपूर (ज़ालोर) जिंकले व तिथे वेगळे राज्य सुरू केले. कीर्तिपालाचा नातू उदयसिंह (इ. स. १२०५–१२४९) याने नाडोलचे राज्य जिंकून घेतले. त्याचे राज्य मंडोरपासून साचोरपर्यंत व मल्लनीपासून गोदवरपर्यंत पसरले होते. इ. स. १२११ व १२१६ च्या दरम्यान इल्तुमिश याने झालोरच्या किल्ल्याला वेढा दिला, तेव्हा उदयसिंह त्याला शरण गेला. म्हणून मग इल्तुमिश याने त्याचे राज्य त्याला परत दिले. त्याची बहीण लीलादेवी हिचा विवाह चौलुक्य राजा भीम (दुसरा) याच्याशी झाला होता.

इ. स. १२९६ च्या सुमारास या घराण्यातील कान्हडदे (कृष्णदेव) गादीवर बसला. त्याच्या कारकीर्दीत इ. स. १३१० च्या सुमारास अलाउद्दीन खिलजी याने. जालोर जिंकले. कान्हडदे आणि त्याचा पुत्र वीरमदेव यांना ठार मारून त्याने त्या शाखेचाही अंत केला.

चाहमानांची आणखी एक शाखा इ. स. च्या ९ व्या शतकात धोलपूर येथे व दुसरी शाखा पर्तांबगड येथे ९ व्या व १० व्या शतकात राज्य करीत होती. ती दोन्ही राज्ये प्रतीहारांची मांडलिक होती. पर्तांबगड शाखेतील गोविंदराज, दुर्लभराज व इंद्रराज ही नावे माहीत आहेत. इ स. ९४२ च्या सुमारास इंद्रराज याने घोंटवर्शिका या गावी एक सूर्यमंदिर बांधले होते. पर्तांबगडाच्या पूर्वेस ७ मैल अंतरावर घोटर्सी नावाचे खेडे आहे, तेच वर उल्लेखलेले गाव असावे. या दोन्ही शाखांविषयी याहून अधिक माहिती उपलब्ध नाही.

सत्यपूर (सांचोर) व देवडा येथेही चाहमानांच्या दोन शाखा राज्य करीत होत्या. देवडाचे राज्य इ. स. १३५० च्या सुमारास व सांचोरचे इ. स. १४०० च्या सुमारास नष्ट झाले.

रणथंभोरशाखा – इ. स. च्या १३ व्या शतकात रणस्तंभपूर म्हणजे सांप्रतचे रणथंभोर येथे चाहमानांची एक शाखा राज्य करीत होती. अजमीरच्या चाहमान घराण्यातलाच एक पुरुष गोविंदराज याने इ. स. च्या १२ व्या शतकाच्या अखेरीस हे वेगळे राज्य स्थापले. त्याचा पुत्र बाल्हणदेव हा प्रथम इल्तुमिशचा मांडलिक होता. पण इ. स. १२१५ पासून पुढे त्याने इल्तुमिशची सत्ता झुगारून दिली. त्याचा परिणाम म्हणून इ. स. १२२६ साली इल्तुमिश याने रणथंभोरचा किल्ला जिंकून घेतला. पुढे सुलताना रझियाच्या वेळी बाल्हणाचा पुत्र वाग्भट याने तो किल्ला पुनश्च आपल्या ताब्यात आणला. इ. स. १२४८ व १२५३ मध्ये सुलतान बल्बन याने रणथंभोरवर स्वाऱ्या केल्या; पण त्या यशस्वी ठरल्या नाहीत. त्या वेळी तिथे वाहरदेव म्हणजेच वाग्भट हा राज्य करीत होता. त्याचा पुत्र जैत्रसिंह याने अनेक हिंदू राजांचा पराभव केला, असे कळते. पण तो दिल्लीच्या सुलतानापुढे मात्र नमूनच होता.

जैत्रसिंहाचा पुत्र हम्मीर हा इ. स. १२८३ मध्ये गादीवर आला. हम्मीरमहाकाव्यात त्याच्या दिग्विजयाचे वर्णन आहे, ते असे – सरसपूरचा अर्जुन, धारचा भोज (दुसरा) आणि गडमंडलचा राजा यांचा त्याने पराभव केला. नंतर त्याने चित्रकूटावर स्वारी केली, मेदपाट पादाक्रांत केले व अबू पहाडही जिंकला. त्यानंतर हम्मीर याने सौराष्ट्रातील वर्धमानपूर (वढवाण) जिंकले आणि तिथून पुष्करकडे मोर्चा वळवला. पुढे शाकंभरीवरही त्याने स्वारी केली.

दिल्लीच्या सुलतानांशी हम्मीरदेवाचा संघर्ष सतत चालू होता. हम्मीरदेवाने खंडणी देणे बंद केल्यामुळे जलालुद्दीन

खिलजीने इ. स. १०९० साली रणथंभोरवर स्वारी केली; पण ती अयशस्वी ठरली. अलाउद्दिनाचा सेनापती उलुघखान याने रणथंभोरवर अनेक स्वाऱ्या केल्या; पण हम्मीराने त्याही मोडून काढल्या. शेवटी इ स. १३०१ मध्ये अलाउद्दिनाने स्वत: रणथंभोरवर स्वारी केली आणि तुंवळ युद्ध करून तो गड जिंकला व हम्मीरदेवाला ठार मारले. अशा प्रकारे याही शाखेचा अंत झाला. [हि क. इं पी.]

चाळण एक सच्छिद्र गृहोपयोगी वस्तू. हिची व्याख्या अशी – ' क्षुद्रच्छिद्रसमोपेतं चालनं तितउ: स्मृत: '= लहान छिद्रांनी युक्त असे पात्र म्हणजे चाळणी होय. तिला तितउ असेही म्हणतात (श. क.).

चाळणीचे प्रकार दोन. एक द्रव पदार्थ गाळणारी व दुसरी घनपदार्थ (धान्यादी) चाळणारी. यज्ञात सोम गाळण्यासाठी वापरल्या जाणाऱ्या चाळणीला पवित्र म्हणतात. ही चाळणी लोकरीची असते (ऋ.९. १६. २). धान्य चाळण्याच्या चाळणीचा ऋग्वेदातील उल्लेख असा–

सक्तुमिव तितउना पुनन्तो यत्र धीरा मनसा वाचमक्रत ।
(ऋ. १०. ७१. २)

अर्थ – ज्याप्रमाणे सातू चाळणीने चाळून निर्मळ करून घेतात, त्याप्रमाणे शुद्ध बुद्धीचे सत्पुरुष आपल्या अंत:करणानेंच भाषण करीत असतात.

प्राचीन काळापासून चाळणीचा उपयोग धार्मिक विधी व मंत्रतंत्र यांत केलेला आढळतो. काही ठिकाणी मंगलकार्याच्या प्रसंगी स्त्रिया कुंभाराच्या चाकाची पूजा करायला जातात. तेव्हा पूजासाहित्य चाळणीतून नेतात. होमाचा अग्नी आणायचा तो चाळणीतून आणतात. लग्नाचा फराळ करण्याच्या वेळी चाळणीची पूजा करतात.

नवजात अर्भकाला शिप्तराच्या चाळणीत ठेवण्याची चाल सर्वत्र आढळते. पंजाबात भूतबाधेच्या निरसनार्थ लहान मूल व घरातला केर छाजवर (शिप्तर) एकत्र ठेवून ते बाहेर ओढीत नेतात. नंतर त्या मुलाला छज्जू किंवा घसीटा (ओढलेला) असे नाव दिले जाते.

दक्षिणेतील गवळी लोक मुलाला स्नान घालून थोडा वेळ चाळणीवर ठेवतात. हा समारंभ झाल्यानंतर ती चाळणी (शिप्तर) फेकून देतात.

मध्यप्रदेशातील नओदा व रज्जहर हे लोक भूतबाधेच्या निवारणार्थ वराच्या समोर चाळण धरतात अथवा वधू-वरांच्या मस्तकाला, छातीला व गुडघ्याला तिचा स्पर्श करतात. पाहा – पवित्र. [एन्सा. रि. ए.; हि. ध.; वे इं.]

चाक्षुष सहावा मनू. अंगराजाचा पुत्र. याला जन्मत:च पूर्वजन्माचे ज्ञान होते. याच्या उत्पत्तीविषयी मार्कंडेय पुराणात (७६.२) पुढील श्लोक दिला आहे —

अन्यजन्मनि जातोऽसौ चक्षुष: परमेष्ठिन: ।
चाक्षुषत्वमतस्तस्य जन्मन्यस्मिन्नपि द्विज ।।

अर्थ – अन्य जन्मात हा ब्रह्मदेवाच्या डोळ्यापासून जन्मला म्हणून या जन्मीही याला त्यावरूनच चाक्षुष असे नाव मिळाले.

याच्या नावाचे मन्वंतर झाले. याला अग्निष्टुत, अतिरात्र, इ. पुत्र झाले. याच्या मन्वन्तरात मनोजव हा इंद्र होता. हविष्मतादी सप्तर्षी होते. विष्णूने अजित हा अवतार घेतला होता. या मन्वंतरात जलप्रलय झाला व त्यानंतर वैवस्वत मन्वंतर सुरू झाले. कूर्मावतार व समुद्रमंथन या गोष्टीही चाक्षुष मन्वंतरातच घडल्या. [पु. इं.; प्रा. च. को.]

चाक्षुषी विद्या या विद्येमुळे कोणतीही सूक्ष्म वस्तू मोठ्या स्वरूपात दिसते. ही विद्या अर्जुनाला अवगत होती. महाभारतात यासंबंधी आलेली कथा अशी –

पांडव द्रौपदीस्वयंवरासाठी चालले असता वाटेत त्यांनी गंगातीरावर मुक्काम केला. रात्रीच्या वेळी अंगारपर्ण नावाचा एक गंधर्व तिथे अप्सरांसह क्रीडा करीत होता. आपल्या क्रीडेत व्यत्यय आणला म्हणून अंगारपर्णाने पांडवांवर चाल केली. परंतु अर्जुनाने अग्न्यस्त्र टाकून त्याचा रथ दग्ध केला. अर्जुनाच्या या अस्त्रविद्येपुढे हतबल झालेला अंगारपर्ण त्याला शरण आला. मग अर्जुनाने त्याला अभय देऊन त्याचा वृत्तांत विचारला. तेव्हा अंगारपर्णाने सांगितले, की 'मी गंधर्व असून मला चाक्षुषी विद्या येते; परंतु अग्न्यस्त्र माहीत नसल्याने माझा पराजय झाला. आता मी तुला चाक्षुषी विद्या देतो (म. भा. आदि. १७०). मग अंगारपर्णाने अर्जुनाला चाक्षुषी विद्या दिली.

अर्जुनाला या विद्येचा उपयोग द्रौपदीच्या स्वयंवरप्रसंगी मत्स्यभेद करताना झाला. [म. क. शि.]

चाक्षुषोपनिषद् यात चक्षुरोगहारक तांत्रिक विद्येचे सविस्तर वर्णन आहे. या उपनिषदाचा ऋषी अहिर्बुध्न्य, देवता सूर्य व छंद गायत्री आहे. यात सूर्याला उद्देशून काही मंत्र असून, त्यात सूर्याने डोळ्यांचे रोग दूर करावे, अशी त्याला प्रार्थना आहे. शेवटी सूर्याची स्तुती व त्याला वंदन आहे. [डॉ. सी. ग. देसाई]

चिंगंथन एक जात. केरळमधील कन्ननूर जिल्ह्यात या लोकांचे वास्तव्य आहे. चिंगथन लोक काळेसावळे

असतात. पुरुष डोक्यावर लांब केस राखतात व त्यांना गाठी मारून ते पाठीवर सोडतात. स्त्री-पुरुष दोघेही आंगठ्या व कर्णफुले घालतात. चिगथनी स्त्रिया चमकी, बांगडचा, मणी व चोळी वापरतात. त्यांचे नेसते वस्त्र केवळ कमरेभोवती पुरेल एवढेच असते.

हे मलयाळम् भाषा बोलतात. हे गाय, म्हैस व रानबैल यांचे मांस सोडून इतर सर्व प्रकारचे मांस खातात.

प्राचीन काळापासून हे लोक जंगलातच राहतात. चिरक्कलच्या राजाचे हे अनुयायी होते. या राजाने त्यांना स्थानप्पेरू ही सन्मानदर्शक पदवी दिली होती. भद्रकाली ही यांची आराध्य देवता आहे.



चिंगथन स्त्री व बालक

पल्लव राजांच्या कारकीर्दीत हे त्यांच्या पाहुण्यांचे संरक्षक म्हणून काम करीत होते. सांप्रत रानातील मध गोळा करून विकणे, हा यांचा प्रमुख धंदा आहे. हे लोक भूतनृत्य व जादूटोणा करण्यातही प्रवीण आहेत.

विवाहप्रथा – मुली वयात आल्यावर त्यांची लग्ने होतात. यांच्या विवाहाचा खास विधी नसतो. मुलगी वयात येण्यापूर्वी तिचे ताळिकेट्टुकल्याणम् करतात. त्या वेळी मुलीचा मामा मुलीच्या गळयात ताळी बांधतो. हे लोक लग्नप्रसंगी चीमनी देवतेच्या मंदिरात नृत्य करतात. त्यामुळे विवाहसौख्य, मध, शिकार, इ. गोष्टी विपुल प्रमाणात मिळतात, अशी यांची श्रद्धा असते.

चिंगथन लोक तीस दिवस जननाशौच पाळतात.

हे लोक घरापासून दूर अशा जागी प्रेते पुरतात. प्रेतयात्रेत स्त्री व पुरुष दोघेही भाग घेतात. मुलगा हा मुख्य सुतक्या असून, प्रेतयात्रेत त्याला प्रेतापुढे नाचावे लागते. मृताशौच बारा दिवस पाळतात. [द्रा. के.]

चिंग फौ

एक जमात. सांप्रत यांची वस्ती बंगाल प्रदेशात आहे. चिंग फौ हा शब्द ब्रह्मी भाषेतील असून, त्याचा अर्थ मनुष्य असा आहे. पूर्वी या लोकांचा ब्रह्मदेशाशी संबंध होता, असे म्हणतात.

हे लोक मंगोलियन वंशाचे आहेत. लोहारी हा यांचा व्यवसाय आहे. स्वतःची वस्त्रे हे स्वतःच विणतात. यांच्या मधील स्त्री-पुरुषांना गोंदून घेण्याची फार हौस आहे. हे प्रेतपूजक आहेत. [लौ. नी.]

चिंचवड

एक प्रसिद्ध देवस्थान. हे पुणे-मुंबई रेल्वेमार्गावर, पुण्याहून ११ मैलांवर पवना नदीच्या काठी आहे. इथे चिंचेच्या झाडांची विपुलता असल्यामुळे या गावाला चिंचवड हे नाव पडले असावे.

प्रसिद्ध गाणपत्य साधू मोरया गोसावी याची इथे समाधी आहे. तिला लागूनच त्याच्या पुत्रपौत्रादिकांच्याही सात समाध्या आहेत. मोरया गोसाव्याचे चिरंजीव चिंतामणी गोसावी यांनी वडिलांच्या समाधीवर मंदिर उभारले आहे. या मंदिराचे बांधकाम इ. स. १६५९ साली पूर्ण झाले.

देऊळवाडा नावाचे दुसरे एक देवस्थान याच गावात आहे. हा वाडा मंदिराच्या बांधकामानंतर सात वर्षांनी उभारला असावा. मोरया गोसाव्यासाठी मोरगावच्या मयूरेश्वराने इथे वास्तव्य केले, अशी या वाडयाबद्दलची आख्यायिका आहे. देऊळवाडयाच्या देवस्थानाची चार सीमाद्वारे चार दिशांना मानली आहेत व चार द्वारांवर चार देवता स्थापन केल्या आहेत. या वाडयाची दुरुस्ती नाना फडणवीस व हरिपंत फडके यांनी केली, असे इतिहासात नमूद आहे.



देऊळवाडा – चिंचवड

मोरया गोसाव्याला व त्याच्या वंशजांना निजामशाही, आदिलशाही, शहाजीराजे भोसले व शिवाजीमहाराज यांनी इनामगावे, जमिनी व वतने दिली होती. पेशव्यांनी चिंचवडला टांकसाळ घालण्यास व तिचे उत्पन्न या देवस्थानाला देण्यास उत्तेजन दिले होते.



मयूरेश्वरमूर्ती – चिंचवड

चिंचवडचा मुख्य महोत्सव म्हणजे मोरया गोसाव्याची पुण्यतिथी हा होय. हा उत्सव मार्गशीर्ष वद्य तृतीयेपासून षष्ठीपर्यंत चालतो. याशिवाय भाद्रपद शुद्ध प्रतिपदेस मोरया गोसाव्याची पालखी चिंचवडहून निघते, तृतीयेला रात्री मोरगावी जाते व तिथला उत्सव संपल्यावर दशमीस चिंचवडला परत येते. या भाद्रपदी यात्रेप्रमाणेच माघी यात्रेसाठीही मोरया गोसाव्याची स्वारी घोड्यावरून मोरगावी जाऊन परत येते. पाहा– मोरया गोसावी. [श्रीमंत आबासाहेब मुजुमदार, पुणे; स. भा. प्र. व.; मं. मू. मो.]

चिंतामणिमंत्र या नावाचे काही मंत्र आहेत. केवळ ऱ्हीं असा एकाक्षरमंत्र चिंतामणिमंत्र या नावाने आर्यमंजुश्री मूलकल्प या ग्रंथात दिलेला असून, तारादेवीच्या साधनेत त्याचा उपयोग करावा, असे सांगितले आहे. कवित्व, विद्वत्त्व, वक्तृत्व, इ. गोष्टी या मंत्राने प्राप्त होतात, असे त्याचे फल आहे. बौद्ध संप्रदायात एक चिंतामणिरत्नमंत्र आहे, तो असा —

> नमः सर्वबुद्धेभ्य ॐ तेजोज्वालासर्वार्थं–
> साधक सिध्य सिध्य सिद्धिचिन्तामणि रत्न हुम् ।
>
> (आर्यमंजुश्री मूलकल्प)

अहिर्बुध्न्य संहितेत दुसऱ्या एका चिंतामणिमंत्राचे विवरण दिलेले असून, पंचरात्रअनुष्ठानात त्याचा प्रयोग करावा, असे सांगितले आहे (२३.९६–९७). हा वशीकरणमंत्र असून, याची देवता अर्धनारीश्वर शिव आहे. ईशानशिवगुरुदेवपद्धती या ग्रंथातही एका चिंतामणिमंत्राचे वर्णन आले असून, महारुद्र ही त्याची देवता सांगितली आहे. [नै. प.]

चिंतामणी (१) एक रत्नविशेष. याची व्याख्या अशी — 'चिन्तया ध्यानधारणादिना मण्यते आहूयते इति' =चिंतेने म्हणजेच ध्यानधारणादी गोष्टींनी ज्याचे आवाहन केले जाते, तो (श. क.). ज्याचे चिंतन करावे, ते देणारे हे रत्न आहे, अशी समजूत आहे. काही बौद्ध देवतांचे हे अभिज्ञानचिन्ह आहे. गूढमार्गात चिंतामणीला मनाचे प्रतीक समजतात.

(२) एक हिंदी कवी. कानपूर येथे याचा जन्म झाला (इ. स. १६०९). शहाजहान, रुद्रसिंह व नागपूरकर भोसले, यांच्या दरबारी चिंतामणी हा राजकवी म्हणून होता.

काव्यविवेक, कविकुलकल्पतरू, काव्यप्रकाश, रामायण, छंदविचारपिंगल व रसमंजरी हे याचे ग्रंथ होत. शृंगारमंजरी नावाच्या एका संस्कृत ग्रंथाचा याने शृंगारमंजरी या नावानेच अनुवाद केला आहे.

चिंतामणीची ख्याती कवीपेक्षा आचार्य म्हणून अधिक आहे. कारण रामायण सोडून याचे सर्व ग्रंथ काव्यशास्त्रीय विषयांवर आहेत. याने भामह, दंडी यांची परंपरा सोडून मम्मट, विश्वनाथ यांची परंपरा चालवली. [हिं. सा. को. भाग २]

चिंदडशंकर (इ. स. चे १८ वे शतक) एक मराठी नाथपंथी कवी. हा तंजाऊरचा राहणारा. याचे मूळ नाव शंकर होते; पण पुढे चिंदड हे गुरुनाम आपल्या नावामागे जोडून तो चिंदडशंकर बनला.

याने स्वानंदसिंधू नामक एक ओवीबद्ध ग्रंथ लिहिला असून, ओव्या, अभंग, सवाई, पदे, इ. अन्यही त्याची स्फुटरचना आहे. याची भाषा सोपी असून रचना मधुर आहे. त्याचे एक पद पुढीलप्रमाणे —

> देह पंढरिचे पुरीं । विठो नाद तो श्रीहरी ।।
> उन्मनी ते चंद्रभागा । नित्य वाहतसे गंगा ।।

बोध पुंडलीक भक्त । स्वयें नांदतो विरक्त ।।
नाथ चिंदड विठोबा । शंकर गगनाचा गाभा ।।

वरील पदातून त्याचा आध्यात्मिक अधिकार व नाथपंथी संस्कार व्यक्त होतो. [गो. च. प.]

चिंदुनृत्य द. भारतातील भटक्या जमातींचे एक नृत्य. हे नृत्य पाँडेचरीचे कोडव, कल्लव आणि कुरीरीकरन या लोकांना फार प्रिय असते. हे लोक पारधी असतात व त्यांच्या नृत्याचा विषयही बहुधा पारध हाच असतो. चिंदुनृत्यात सहा व्यक्ती असतात. नृत्याच्या गीतात चिमण्या पकडण्याच्या वेळच्या सर्व क्रियांचे वर्णन असते. नाचणारे अभिनयही त्याच प्रकारचा करतात. [ए. हो. रा.]

चिक एक जात. बिहार, ओरिसा, उ. प्रदेश, इ. प्रदेशांत यांची वस्ती आहे. ही खाटिकांची एक पोटजात आहे, असे क्रुकचे मत आहे. परंतु चिक व खाटिक लोक एकमेकांपासून अगदी भिन्न आहेत. चिक लोक हिंदू आहेत, तर खाटिक मुसलमान आहेत.

चिक लोक पूर्वजांना भजतात व गावातील बैगाच्या मार्फत महादेवाची पूजा करतात. ते गाय, उंदीर, साप, मांजर, माकड, इ. प्राण्यांचे मांस खात नाहीत. चिक लोकांत सात गोत्रे आहेत. हे प्रेते पुरतात. पुरताना प्रेताचे डोके उत्तरेला आणि पाय दक्षिणेला करतात. दफनभूमीत तांदूळ ठेवतात. मृत्यूनंतर पाचव्या दिवसापासून दहाव्या दिवसापर्यंत जेवणावळी घालतात. [म. ज्ञा. को.; से. इं. १९३१]

चिकारा एक तंतुवाद्य. हे सारंगीसारखेच; पण तिच्याहून लहान असते. एका चर्मवेष्टित पेटीला एक पोकळ लाकडी लांब ठोकळा जोडतात. त्यावर तातीच्या तीन तारा व धातूच्या पाच तारा जोडतात. तातीच्या तारा षड्ज, मध्यम व पंचम या स्वरांत व धातूच्या तारा षड्ज, ऋषभ, पंचम, धैवत व निषाद या स्वरांत लावतात. गजाच्या साह्याने हे वाद्य वाजवतात. [म्यु. इं.; श्री. आबासाहेब मुजुमदार, पुणे]



चिकारा

चिक्कदेव (इ. स. १६७२ – १७०४) कर्नाटकातला एक राजा. हा शूर, विद्वान तसाच संगीतज्ञही होता. तुकमलार्य, ..गरार्य, चिक्कुपाध्याय, वेणु-गोपाळवरप्रसाद, तिम्म कवी, मल्लिकार्जुन, चितानंद कवी, मल्लरस, होन्नम्म व शृंगारम्म अशी अनेक विद्वान मंडळी याच्या आश्रयाला होती.

याने तंजाऊरचा राजा एकोजी (व्यंकोजी) भोसले यांजकडून बंगलोर विकत घेतले आणि त्याच्या जोडीला इतर काही मुलूख मिळवून आपले राज्य वाढवले. याने राज्यातील जमीनमहसुलाची पद्धती सुधारली व टपालाची नवी पद्धती सुरू केली.

हा प्रथम लिंगायत होता; पण पुढे त्याने वैष्णवधर्म स्वीकारला. हा मेलुकोटे येथील नारायणाचा भक्त होता.

चिक्कदेव हा कवीही होता. चिक्कदेवराजविज्ञप (प्रार्थना), गीतगोपाल, भागवत, शेषधर्म, भारत, इ. ग्रंथ याने रचले आहेत. याची भागवतावर कन्नड भाषेत गद्यरूप टीका आहे. या टीकेला चिक्कदेवराजसूक्तिविलास असे नाव आहे. महाभारतावरही शांतिपर्वापासून पुढील पर्वांवर याने कन्नड भाषेत टीका लिहिली असून, शेषधर्म या आपल्या ग्रंथावरही टीका लिहिली आहे. गीतगोपाल या ग्रंथात याचा पदसंग्रह आहे. याने ऐतिहासिक साधनांचाही संग्रह करून ठेवला आहे.

म्हैसूरच्या कंपदेवराजाचा भाऊ दोड्डदेव याचा हा मुलगा. दुर्दैवाने सतत तेरा वर्षे याला आपल्या चुलत्याच्या बंदीशाळेत काढावी लागली. [म. च. को.]

चिक्किबिल्ला मध्य प्रदेशातील मुलांचा एक खेळ. यात प्रथम मुलांची सारखी विभागणी करून दोन पक्ष केले जातात. आकृतीत दाखविल्याप्रमाणे एक प्रांगण तयार करून त्यात पहिली, दुसरी...सातवी व पहाड अशा आठ पाटया पाडतात. मग एका गोल ठिकरीने हा खेळ खेळतात. एका बाजूचा एक गडी १ व ७ या पाटयांच्या बाहेर उभा राहून पहिल्या पाटीत कडेला स्पर्श होणार नाही अशा तऱ्हेने ठिकरी टाकतो आणि उडी मारून एक पाय तिच्यावर व दुसरा पाय त्याच पाटीत, बाजूला टाकतो. नंतर मागे वळून दोन पायानेच ठिकरी बाहेर उडवितो आणि तिच्यावर एक पाय ठेवून दुसराही बाहेर टाकतो. नंतर दुसऱ्या पाटीत ठिकरी टाकून अशाच प्रकारे बाहेर उडवतो व परत येतो. त्या वेळी १ ली पाटी ओलांडून उडी मारावी लागते. ३ ऱ्या पाटीत ठिकरी टाकून वर उडी मारताना १ ल्या पाटीत पाय टाकून व २ री ओलांडतो. तिथून ठिकरी बाहेर उडवून परत येतो.

प्रथम १ लीत उडी मारतो व मग ठिकरीवर पाय टाकतो. अशा प्रकारे ८ व्या पाटीपर्यंत जाऊन परत यायचे असते. एवढा फेरा बिनचूक झाला, की त्याला फल्ली म्हणतात. तो एकाच भिडूने पुरा केला पाहिजे असे नाही. एक हरला, की दुसऱ्या बाजूचा गडी डाव घेतो व जमतील तितक्या पाट्या पुऱ्या करतो. तो हरला, की पहिल्या बाजूचा २ रा भिडू डाव चालू करतो.



चिक्कीबिल्लाचे प्रांगण

एक फल्ली पूर्ण झाली, की १ ल्या पाटीच्या खाली एक आकृती बाणाच्या टोकासारखी काढतात. दुसऱ्या बाजूची फल्ली झाली, की ७ व्या पाटीखाली तशी आकृती काढतात. ठिकरीवर पाय टाकताना या आकृतीवर पाय ठेवता येतो. गडी हरतो तेव्हा त्याला ‘ मोर ’ झाला म्हणतात.

८ व्या पाटीला पहाड म्हणतात, त्यावरून हा डोंगर चढण्याचा खेळ असावा आणि ४ थ्या पाटीनंतर ५ ते ७ पाट्या खेळणे म्हणजे चढउतार करणे असावे.

बंगालमध्ये व महाराष्ट्रातही अशाच प्रकारचा एक खेळ खेळतात. [न्यू. इं. ऍं. भाग ६, १९४३–४४]

चितरहाई देवी मध्य प्रदेशातील एक देवी. हे पार्वतीचेच एक रूप आहे. हिला फाटकी वस्त्रे आवडतात. पण लोक ती प्रत्यक्ष तिला न वाहता एखाद्या काटेरी झुडपावर वाहतात. ‘ हे देवी, आम्ही तुला जुने देतो. तू आम्हाला नवे दे. ’ अशी भक्तगण तिची प्रार्थना करतात.

काही ठिकाणी ही देवी काली या नावाने ओळखली जाते. लग्नादी मंगल प्रसंगी या देवीला वस्त्रे वाहण्याची प्रथा आहे. लहान मुलांना दृष्ट लागू नये, म्हणून हिची लहानशी प्रतिमा करून ती मुलांच्या गळ्यात बांधतात. [एन्सा. रि. ए.]

चिता प्रेत जाळण्यासाठी लाकडांची रचलेली रास. हिची व्याख्या अशी–‘ चीयते श्मशानाग्निरस्यां यद्वा चीयते उच्चीयतेऽसौ प्रेतस्य परलोकशर्मण इति ’= जिच्यावर श्मशानातला अग्नी प्रदीप्त केला जातो किंवा जी प्रेताला त्याच्या परलोकातील कल्याणासाठी वर उचलते, ती चिता होय (श. क.).

हिंदू समाजातील चिता या सामान्यपणे दक्षिणोत्तर असतात. मृताच्या श्रेष्ठतेप्रमाणे चितांची काष्ठे असतात. काही लोक चितेसाठी चंदनाची लाकडे वापरतात व ती पेटविण्यासाठी कापूर, खोबरे, तूप, राळ, इ. ज्वालाग्राही पदार्थांचा उपयोग करतात. सामान्य लोक बाभळीची लाकडे, गोवऱ्या व रॉकेल वापरतात. पाहा – श्मशान.

चिताभूमी बिहारमधील संताळ परगण्यातील देवगड या गावातील एक तीर्थक्षेत्र. इथे वैद्यनाथाचे देवालय असून, ते बारा जोतिर्लिंगांपैकी एक आहे (शिव पु. १. ३८. ५५). [हि. ध.]

चितारी एक जात. यांची वस्ती प्रामुख्याने उ. प्रदेश, राजस्थान, आंध्र व महाराष्ट्र या प्रदेशांत आढळते. मुसलमान व हिंदू या दोन्ही धर्मांत या जातीचे लोक आहेत. हे लोक भिंतींवर चित्रे रंगवणे व देवतांच्या लहान लहान मूर्ती बनवणे, ही कामे करतात. यांना उ. प्रदेशात चितर, महाराष्ट्रात चितारी, ओडिसात महाराणा व फलबढाई आणि अन्यत्र मोची व जिनगर म्हणतात.

विश्वकर्मा हा आपला मूळपुरुष असून, आपल्याला प्रथम अकबराने काम दिले, असे हे सांगतात. हिंदू चिताऱ्यांचे मराठा, तेलुगू व हिंदुस्थानी असे प्रांतपरत्वे भेद असून, त्या परस्परांत विवाहसंबंध होतो. हिंदू चितारी आपणाला राजपूत वंशाचे समजतात व राजपूत आडनावे लावतात. यांच्यांतील काही लोक जानवे घालतात व मास-मासळी खात नाहीत. विधवेला फक्त धाकट्या दिराशीच विवाह करता येतो. मुसलमान चिता-

त्यांच्या स्त्रिया घरात वावरतांना पायजमा व झगा आणि बाहेर फिरतांना लाल लुंगी आणि शेरवानी वापरतात. [सु. वि. को.; रा. जा.; ट्रा. का. सें. प्रॉ. इं.]



चितारी दांपत्य

चितोड गड राजस्थानातील एक प्रसिद्ध गड. हा राजस्थानाच्या मेवाड भागात आहे. याच्या पायथ्यापासून सुमारे तीन मैलांवर चितोड गाव वसले आहे. जाताना वाटेत गंभीरी नदी लागते. हा गड एका लांब पण अरुंद अशा डोंगरावर बांधलेला आहे. याची लांबी सुमारे तीन मैल आहे. गडाच्या माथ्यापर्यंत वाहने जातात. पायथ्यापासून माथ्यापर्यंत गडाला सात दरवाजे आहेत. राजस्थानाच्या आणि रजपुतांच्या इतिहासात या गडाला असाधारण महत्त्व प्राप्त झाले आहे. सूर्याभोवती जशी ग्रहमाला, तसा राजस्थानाचा सारा इतिहास चितोडगडाभोवती जणू प्रदक्षिणा घालतो.

चितोडगड ही शतकानुशतकांची समरभूमी आहे. तिथे ज्वलज्जहाल अशा सतीधर्माचे हिमालयासारखे आदर्श खडे आहेत. तिथे पराक्रमाची पराकाष्ठा झाली आहे. तिथे धर्माभिमानाचे निखारे पंचप्राणांच्या विझणवाऱ्याने फुलवले गेले आहेत. तिथे सर्वस्वाच्या त्यागासाठी अहमहमिका लागलेली आहे. तिथल्या भूमीचा कणन् कण स्वातंत्र्याच्या मंत्राने जणू भारलेला आहे. म्हणूनच एक राजस्थानी कवी गर्वोक्तीने म्हणतो––

गढ तो चितौड गढ और सब गढैय्या ।

या गडाच्या निर्मितीचा इतिहास कुमारपालचरित्र नावाच्या एका संस्कृत ग्रंथात दिला आहे, तो असा—

मध्यमा नावाच्या एका प्राचीन नगरीत चित्रांगद नावाचा राजा राज्य करीत होता. त्याच्या राजधानीजवळच चित्रगिरी नावाचा एक पहाड होता. चित्रांगदाने त्या पहाडावर विशाल आणि सुदृढ असा एक किल्ला बनवला व त्याला चित्रकूट असे नाव दिले. मग त्याने आपली राजधानी मध्यमा नगरीतून हालवून चित्रकूटावर नेली. थोड्याच कालात चित्रकूट मनुष्यवस्तीने गजबजून गेला. जेव्हा किल्ल्यात जागाच शिल्लक उरली नाही, तेव्हा मग लोकांनी गडाच्या पायथ्याशी वस्ती केली. ज्या चित्रांगदाने हा किल्ला बांधला, तो मौर्य वंशातला पुरुष होता.

वरील आख्यायिकेवरून असे वाटते, की मौर्य सत्तेच्या अंतिम काळात कधीतरी या गडाची उभारणी झाली असावी.

मौर्य घराण्यातील मानसिंगाचा पराभव करून बाप्पा रावळने इ. स. ७३४ साली या गडावर आपली सत्ता स्थापिली. या वंशाची राजधानी चितोड गडावर इ. स. १५६७ पर्यंत राहिली. या कालखंडात कुंभ, संग्रामसिंह, प्रतापसिंह, इ. महापुरुषांनी तिथली राजगादी भूषवली.

इ. स. १३०३ साली अलाउद्दीन खिलजी याने चितोडवर स्वारी करून तो गड जिंकला. रतनसिंग रावळ याची सौंदर्यवती राणी सती पद्मिनी हिच्या प्राप्तीसाठी ही स्वारी अलाउद्दिनाने केली होती. त्या लढाईत गड त्याच्या ताब्यात आला खरा; पण पद्मिनी मात्र त्याला मिळाली नाही. तो गड चढून येण्याच्या आतच पद्मिनीने गडावरच्या शेकडो स्त्रियांसह जोह करून आपले शील अभंग राखले. चितोडच्या इतिहासात



पद्मिनीचा महाल – चितोड

प्रसंग पहिला 'शाका' म्हणून प्रसिद्ध आहे. त्यानंतर इ. स. १५३५ साली गडावर दुसरा जोहार झाला, तो राणी कर्मवतीचा. गुजरातचा सुलतान बहादुरशहा याने त्या वेळी आपले होते नव्हते तेवढे बळ एकत्र करून चितोडवर स्वारी केली होती. राणी कर्मवती ही महाराणा संग्रामसिंहाची पत्नी होय. राजपूत वीरांचा प्रतिकार कोसळून चितोड गड बहादुरशहाच्या ताब्यात जातो असे दिसताच, गडावरच्या सर्व राजपूत स्त्रियांसह तिने जोहाराचे अग्निदिव्य केले. चितोडच्या इतिहासातील हा दुसरा 'शाका' होय. पुढे इ. स. १५६८ साली अकबराने चितोड गड जिंकला. त्याही वेळी गडावरच्या स्त्रियांनी जोहार करून आपले सतीत्व उज्वल राखले. या घटनेला चितोडच्या इतिहासातला तिसरा 'शाका' असे म्हणतात.

चितोड गडावर पुढील दर्शनीय स्थळे आहेत —

विजयस्तंभ — इ. स. च्या १५ व्या शतकाच्या पूर्वार्धात राणा कुंभ हा पुरुषश्रेष्ठ मेवाडच्या गादीवर आला. हा जसा रणधुरंधर तसाच मुत्सद्दीही होता. अवघ्या ७ वर्षांत त्याने गनिमांना चौफेर चोपून काढले व सर्व राजस्थान आपल्या अधिसत्तेखाली आणले. एका बाजूने गुजरातचा सुलतान व दुसऱ्या बाजूने माळव्याचा सुलतान हे दोघे मेवाडवर एकदम चालून आले असता त्या दोघांचा कुंभाने पराभव केला. या दुहेरी विजयाचे स्मारक म्हणून इ. स. १४४८ साली राणा कुंभाने हा विजयस्तंभ उभारला.



विजयस्तंभ — चितोड

हा स्तंभ १२० फूट उंच असून, तो एका चौथऱ्यावर उभारलेला आहे. याला एकूण नऊ मजले आहेत. सर्वांत वरचा मजला १७ फूट उंचीचा असून, सर्वांत खालचा ३२ फुटांचा आहे. याच्या माथ्यावर जायचे, तर १५० पायऱ्या चढाव्या लागतात. सतत दहा वर्षे याच्या उभारणीचे काम चालू होते.

याच्या रचनेतले एक वैशिष्टय म्हणजे हा कुतुबमिनारसारखा वाटोळा नसून चौकोनी आहे. याच्या माथ्यावर घुमट बसविलेला आहे. आतून व बाहेरून हा सर्वत्र कोरीव कामाने भरलेला आहे. याच्यावर अनेक पुराणकथा कोरलेल्या असून, शेकडो देवमूर्तीही कोरलेल्या आहेत. प्रत्येक मूर्तीच्या खाली तिचे नावही दिलेले आहे. त्यावरून हिंदूंच्या पौराणिक देवतांचे मूर्तिविज्ञान कळायला पुष्कळच मदत होते.



कीर्तिस्तंभ — चितोड

कीर्तिस्तंभ — विजयस्तंभालाच काही लोक कीर्तिस्तंभ म्हणतात. पण कीर्तिस्तंभ या नावाचा दुसरा एक स्तंभ चितोड गडावर आहे. त्याची उंची ८० फूट असून, तो सातमजली आहे. इ. स. १३०० च्या सुमारास दिगंबर जैन संप्रदायातील एका पुरुषाने हा स्तंभ उभारला, असे पं. ओझा म्हणतात. याच्या जवळच महावीरस्वामीचे मंदिर आहे. या दोन्ही ठिकाणी दिगंबर जैनांची शिल्पकला दिसून येते. गडावर शांतिनाथाचे मंदिर असून, ते राणा कुंभाच्या वेळी बांधलेले आहे. याच्या भिंतींवरील कोरीव काम फार प्रेक्षणीय आहे. सात बीस देवरा या नावांचा एक जैन मंदिरांचा समूह या ठिकाणी आहे. त्यावरचे शिल्पकामही सुंदर आहे.

समिद्धेश्वर — हे एक शिवमंदिर असून, याचेही शिल्पकाम प्रेक्षणीय आहे. गाभाऱ्यात शिवलिंगाच्या मागे गर्भागाराच्या भिंतीत त्रिमूर्तीचे एक प्रचंड शिल्प निर्मिलेले आहे. हे मंदिर इ. स. च्या १२ व्या शतकाच्या पूर्वीचे आहे. राणा मोकळ याने इ. स. च्या १५ व्या शतकात याचा जीर्णोद्धार केला.

कुंभश्यामाचे मंदिर — याला मीराबाईचे मंदिर असेही म्हणतात. हे विष्णुमंदिर असून राणा कुंभाने हे बांधलेले आहे.

कालिकामंदिर — हे इ. स. च्या आठव्या शतकातले आहे. हे मुळात सूर्यमंदिर होते, असे म्हणतात. याचे शिल्पकामही उल्लेखनीय आहे. या मंदिरात देवीच्या दोन प्रतिमा आहेत.

पद्मिनीचे मंदिर—हे जलमंदिर आहे. एका तलावात ते बांधलेले आहे. त्याच्या जवळच मर्दानामहाल आहे.



कुंभश्यामाचे मंदिर

भीमलत्ताकुंड—हे एक तलावासारखे कुंड आहे. भीमाने लाथ मारून हे कुंड निर्माण केले व पाताळातले पाणी या कुंडात आणले, असे सांगतात. तिथेच आणखी एक शिवमंदिर आहे. त्याच्या वरच्या अंगाला एका ओळीत कितीतरी दगडी चौथरे आहेत. पद्मिनी आणि इतर राजपूत स्त्रिया यांनी केलेल्या जोहाराची ती स्मारके होत. [स. भा. प्र. व.; ओ. स्मृ. ग्रं.]

चित्पावन द्राविड ब्राह्मणांतील एक पोटजात. यांना चित्पोळ, चिपळोणे व कोकणस्थ अशी अन्यही नावे आहेत. रत्नागिरी जिल्ह्यातील चिपळूण हे गाव त्यांचे मूळ वसतिस्थान असल्याची एक समजूत आहे आणि त्यावरून चिपळोणे हे नाव आले असावे. या स्थानाला प्राचीन काळी चित्पोलन हे नाव होते, असे म्हणतात. याविषयी सह्याद्रिखंडात एक आख्यायिका दिली आहे, ती अशी—

क्षत्रियांचा संहार केल्यामुळे परशुराम पतित झाला होता. म्हणून ब्राह्मणांनी त्याचे पौरोहित्य करण्याचे नाकारले. त्याच सुमारास सह्यपर्वताच्या पायथ्याशी पश्चिम किनाऱ्यावर वाहून आलेली १४ परदेशी माणसांची शवे परशुरामाला आढळली. त्याने त्या प्रेतांना चितेच्या अग्नीत शुद्ध करून मग सजीव केले आणि त्या माणसांना ब्राह्मणांची विद्या शिकवली. रक्तपाताच्या पापातून मुक्त होण्यासाठी जे विधी करावे लागतात, ते करण्यासाठी त्या ब्राह्मणांनी परशुरामाला साहाय्य केले. पुढे त्यांना वसाहत करण्यासाठी परशुरामाने पश्चिम सागराकडून काही भूमी मिळवून दिली व त्यांच्या त्या वसाहतीला चित्पोलन हे नाव दिले.

या लोकांना कोकणस्थ हे नाव मिळण्यापूर्वी चिपळोणे हा शब्द प्रचलित होता. पण सांप्रत हे नाव फारसे प्रचलित नाही.

चित्पावन शब्दाची व्युत्पत्ती — काही पंडितांच्या मते चित्पावन हा शब्द चितिपावन या शब्दाचे अपभ्रष्ट रूप आहे. चिति (=यज्ञ) करून पावन झालेले ते चित्पावन होत. चितास्थानी पावन झाले, ते चित्पावन असेही एक मत आहे. इजिप्त या शब्दापासून जिप्तवान, चिप्तवान आणि नंतर वर्णव्यत्यास होऊन चित्पावन शब्द बनला, असे श्री. मंडलिकांनी प्रतिपादन केले आहे.

चित्पोलन हा शब्द चिता व पुलिन या शब्दांतून उगम पावला व पुढे त्या शब्दावरून चित्पावन शब्द बनला असे श्री. साने म्हणतात. चितेतून उत्पन्न झालेले अशा अर्थाने चित्पावनांची हेटाळणी होऊ लागली, म्हणून ते स्वतःला चित्तपावन म्हणू लागले, अशीही एक कल्पना आहे. ज्यांचे चित्त पावन झाले आहे, असे श्रेष्ठ लोक, हा त्याचा भावार्थ होय.

चित्तपावन या नावाचे एक क्षेत्र आहे, असे हरिहरेश्वरमाहात्म्यात सांगितले आहे आणि तिथले रहिवासी ते चित्पावन ब्राह्मण होत, असे श्री. राजवाडे म्हणतात. हे अनुमान सर्वांत अधिक संभवनीय वाटते. पण अशा नावाचे गाव कोठेही आढळत नाही.

क्षितिपावन या शब्दापासून चित्पावन हा शब्द बनला, असे श्री. गो. कृ. मोडक यांनी प्रतिपादिले आहे. क्षिती म्हणजे जमीन. ती खणून साफ करणारे (तिला पावन करणारे) असा त्याचा अर्थ आहे. कोकणातील जमीन पूर्वी खाजणी होती. चित्पावनांची वस्ती मुख्यतः खाडीकाठी आहे. त्या लोकांनी तिथे बांध घालून, पाणी काढून, तिथल्या जमिनी शेतीला योग्य केल्या. त्यांना मळेजमिनी म्हणतात. समुद्र मागे हटवून त्या मिळवलेल्या आहेत, हेच परशुरामकथेचे तात्पर्य होय.

इतिहास — चित्पावन लोक कोकणात कोठून, कसे व केव्हा आले, याविषयी-निश्चित माहिती उपलब्ध नाही. मात्र ते समुद्रमार्गे आले असावे, असे वाटते. परशुरामाने प्रेतांपासून १४ ब्राह्मण उत्पन्न केले तेच चित्पावन, या स्कंद पुराणातील कथेवरून असे अनुमान करता येते; की १४ माणसे मरणोन्मुख स्थितीत भारताच्या किनाऱ्याला लागली असावी व ती गलबतातून बराच लांबचा प्रवास करून तिथे आली असावी. कदाचित इराणच्या आखातातून ती माणसे आली असतील आणि इ परशुरामाने त्यांना अन्नपाणी देऊन वाचवले असेल

वसाहत करण्यास मदत केली असेल, असा त्या कथेचा अर्थ लावता येतो.

द. आफ्रिकेच्या पूर्व किनाऱ्यावरून चित्पावन कोकणात आले असावे, असा तर्क श्री. मंडलिक यांनी केला आहे. ज्या भागात ते येऊन वसले, त्याला बर्बर कोकण म्हणतात. सह्याद्रिखंडातील एका श्लोकात पश्चिम किनाऱ्यावरील देशांत बर्बर देशाचा अंतर्भाव केला आहे. बर्बर लोक उंच व गोरे असून, त्यांचे नाक सरळ व डोळे घारे असल्याचे सांगतात. कोकणस्थ ब्राह्मण व बर्बर लोक यांच्या चेहऱ्यांत साम्य आहे. दोघेही नॉर्डिक (आर्य) वंशाचे आहेत, असे मानले जाते.

प्राचीन काळी यवन व म्लेच्छ यांच्या देशात वैदिक ब्राह्मणांची वस्ती होती, असे म्हणतात. त्यांना कठ ब्राह्मण म्हणतात. इराणात पर्शू नावाची एक जात होती. ऋग्वेदात तिचा उल्लेख आहे. परशुरामाशी त्या लोकांचा संबंध असावा. असुरांचा गुरू शुक्राचार्य याला गणेश पुराणात बर्बरदेशीय म्हटले आहे. यावरून चित्पावन लोक वरील देशातून समुद्रमार्गे कोकणात आले असणे संभवनीय वाटते.

चित्पावन ब्राह्मणांची परंपरा वैदिक आहे. श्री. वैद्यांच्या मते महाभारतकाळी कोकणात आर्यांची वसती झालेली नव्हती. सर्व उ. भारत व्यापल्यानंतर त्यांच्यापैकी काही लोक दक्षिणेकडे वळले. काहीजण सिंधमधून कच्छ–सौराष्ट्र–गुजरात मार्गे कोकणात आले व तिथे स्थायिक झाले. हेच चित्पावन ब्राह्मण होत. त्यांची मुख्य वसाहत गुहागरच्या आसपास होती. तिथूनच ते चोहोकडे पसरले.

चित्पावन ब्राह्मण परशुरामाला आपले कुलदैवत मानतात. तरी देखील त्यांची वसाहत प्रत्यक्ष परशुरामाने स्थापली, असे म्हणता येत नाही. कारण परशुराम हा सुमारे सात हजार वर्षांपूर्वी होऊन गेला असावा असे कळते. परशुरामाचा संबंध कोकणापेक्षा गुजरातशी अधिक असल्याचे दिसते. महाभारतात शूर्पारक भूमीला परशुरामक्षेत्र मानले आहे. तिथून आर्य लोक द. कोकणात गेले, तेव्हा त्यांनी आपल्याबरोबर परशुरामक्षेत्रही तिकडे नेले असण्याची शक्यता आहे.

कोकणातील ब्राह्मण समाजात पूर्वी चित्पावन हे हीन मानले जात होते. त्यांना हेर किंवा हरकारे समजत. देशस्थ ब्राह्मण त्यांना आपल्या पंक्तीला घेत नसत. म्हणून आपण देशस्थ असून, अंबेजोगाईहून कोकणात आलो, असे काही चित्पावन सांगू लागले. पण ही समजूत भ्रामक आहे.

व्यवसाय — कोकणात मूळ वसाहत करणारे चित्पावन ब्राह्मण क्षितिपावन म्हणजे शेतकरी होते. ते वेदांचे अध्ययन व अध्यापन करीत; पण इतर जातींचे पौरोहित्य करीत नसत. शेती हेच त्यांनी उपजीविकेचे साधन केले होते.

इ. स. च्या १७ व्या शतकात भट नावाचे एक घराणे कोकणातून देशावर आले. त्या कुळातील बाळाजी विश्वनाथ हा पुढे छत्रपती शाहू महाराजांचा पंतप्रधान झाला आणि त्यानंतर सुमारे शंभर वर्षे त्याच्या पुत्रपौत्रांनी पेशवाई गाजवली. तेव्हापासून चित्पावनांना कोकणस्थ हे नाव मिळाले आणि समाजात श्रेष्ठत्वही प्राप्त झाले. पेशवाईत चित्पावनांच्या कर्तृत्वाला मोठाच अवसर मिळाला. पटवर्धन, फडके, मेहेंदळे, गोखले, खाजगीवाले, घोरपडे, रास्ते, इ. अनेक रणधुरंधर पुरुष त्या काळी चित्पावनांतून उदयाला आले. केवळ रणांगणावरच नव्हे; तर सर्वच क्षेत्रांत अनेक चित्पावनांनी आपली कर्तबगारी दाखवली. त्यांत वैदिक, पंडित, ग्रंथकार, मुत्सद्दी, वकील, न्यायशास्त्री, व्यापारी, सावकार, सुभेदार, सरदार, किल्लेदार, फडनवीस, इ. विविध पेशांचे लोक होते. राज्यकारभाराची सर्व अंगे संभाळणारेही कित्येक होते. ब्रिटिश राजवटीत न्या. रानडे, लो. टिळक, विष्णुशास्त्री चिपळूणकर, आगरकर, कर्वे, सावरकर, इ. अनेक थोर पुरुष या जातीत उत्पन्न झाले. चित्पावनांची प्राचीन परंपरा विशेषत्वाने ज्ञात नसली, तरी अर्वाचीन युगात त्यांनी आपली बुद्धिमत्ता व कर्तबगारी या गुणांनी मानाचे स्थान मिळवले आहे, यात शंका नाही.

कोकणस्थ ब्राह्मणांत पोटजाती नाहीत. पण काही चित्पावन शाकल शाखेचे ऋग्वेदी आहेत, तर काही कृष्णयजुर्वेदी आहेत. यांच्यांत १४ गोत्रे आहेत. चित्पावनांची मूळ ६० आडनावे म्हणजे ६० कुळी होत्या, असे म्हणतात. पण आता ती संख्या ४०० च्या वर गेली आहे.

विवाहप्रथा — यांच्यांत सगोत्र विवाह होत नाही. मामेबहिणीशी लग्न करण्याचीही प्रथा नाही. पूर्वी ८ ते १२ वर्षांची मुलगी व १२ ते १६ वर्षांचा मुलगा यांचे लग्न लावण्याची चाल होती. तो संबंध ठरवताना कुलशील व वधू-वरांच्या पत्रिका बघत असत. त्याशिवाय करणी, हुंडा, मानपान, इ. गोष्टीही ठरवीत.

देवधर्म — प्रारंभी सर्व चित्पावन शैव होते. त्यांच्यांतील अनेक कुटुंबांचा कुलदेव गुहागरचा वाडेश्वर हा आहे. हरिहरेश्वर, कोळेश्वर, व्याघ्रेश्वर, वेळेश्वर, सोमेश्वर हे इतरांचे कुलदेव आहेत. जोगेश्वरी ही काही चित्पावनांची कुलस्वामिनी आहे. चित्पावन देवीचे भक्त नाहीत; पण शंकराचे भक्त म्हणून काही जणांनी जोगेश्वरीची उपासना स्वीकारली असावी. काही जण वाडेश्वर-जोगेश्वरी, सोमेश्वर-महालक्ष्मी, महादेव-जगदंबा लक्ष्मीनारायण-दुर्गादेवी अशी जोड कुलदैवते मानतात. यांच्यापैकी काही कुळांत पुढे विष्णूची उपासना सुरू झाली. लक्ष्मीनारायण, केशवराज, लक्ष्मीनृसिंह, लक्ष्मीकेशव ही कुलदैवते

काही घराण्यांनी स्वीकारली आहेत. याशिवाय खंडोबा, भवानी, त्र्यंबकेश्वर, गिरमाई, वेताळ, एकनाथ, गोलांबिका, काल-भैरव, खारेश्वर, व्यंकोबा, इ. देवतांनाही चित्पावनांच्या कुलस्वामींचे स्थान मिळाले आहे. जाखाई, केडजाई, करंजेश्वरी, नवलाई, केळाई, पावणाई, इ. ग्रामदेवतांना भजणारेही पुष्कळ आहेत. त्यांतील जाखाई, पावणाई, गिन्हा, असला, ही सर्व क्षुद्रदैवते आहेत. कोकणातील मूळच्या आदिवासी लोकांची ही दैवते आहेत; पण काही चित्पावन ब्राह्मणही त्यांना भजतात.

सण व उत्सव – चैत्री पाडवा (वर्षप्रतिपदा), नागपंचमी, नारळीपौर्णिमा, कृष्णजन्माष्टमी, गणेशचतुर्थी, नवरात्र, महालक्ष्मी, दसरा, दिवाळी, आषाढी-कार्तिकी एकादशी, मकरसंक्रांत, होळी व रंगपंचमी हे कोकणस्थांचे सर्वसामान्य सण होत. काही घराणी कृष्णजन्माचा उत्सव साजरा करतात. त्यात ५ दिवस कथा-कीर्तनें व भोजने असा कार्यक्रम असतो. पेशवे गणपतीचे उपासक असून, ते गणेशचतुर्थीचा उत्सव मोठ्या थाटाने करीत. तसा उत्सव अजूनही काही कोकणस्थात साजरा होतो. रंगपंचमीचे महत्त्व पेशवाईपासून वाढले आहे. होळीचा सण केवळ एक धार्मिक विधी म्हणून केला जाई. त्यातील अवांतर कार्यक्रमात चित्पावन ब्राह्मण सहसा भाग घेत नसत. नवरात्रातील महालक्ष्मीची पूजा हे कोकणस्थांचे एक वैशिष्ट्य आहे. ही पूजा नवी नवरी पहिली पाच वर्षे करते. या पूजेसाठी महालक्ष्मीचा मुखवटा पिठाच्या उकडीचा करतात. घागरी फुंकण्याचा कार्यक्रम होतो, तो याच उत्सवात.

मर्तिकप्रथा – मनुष्य मरणासन्न झाला असता जमीन शेणाने सारवून, तिथे तुळशीची पाने टाकतात व त्यांवर एक घोंगडी आंथरून, तिच्यावर त्याला निजवतात. त्या वेळी त्याचे पाय दक्षिणेकडे ठेवतात. मग त्याच्या मुखात गंगाजल घालतात आणि त्याला नारायण नारायण असा जप करायला सांगतात. त्याच वेळी विद्वान ब्राह्मण वेदमंत्राचा घोष व गीतेचे पठन करतात. अर्थात या जुन्या काळच्या रूढी आहेत. मरणसमयी मुलाच्या मांडीवर डोके ठेवावे, अशी प्रत्येकाची इच्छा असते. अशुभ नक्षत्रावर मृत्यू आल्यास ११ व्या दिवशी शांती करतात

प्रेत तिरडीवर घालून श्मशानात नेण्यापूर्वी त्याला थंड पाण्याने स्नान घालून नवे वस्त्र नेसवतात व त्याच्या सर्वांगावर गंगाजल शिंपडतात. प्रेताच्या तोंडात यथाशक्ति सुवर्ण वा रत्न ठेवण्याची प्रथा आहे. निदान तुळशीपत्र तरी ठेवतात. प्रेताच्या दहनासाठी घरातील अग्नी एका मडक्यात घालून ते मृताच्या मुलाच्या हाती देतात. तो सर्वात पुढे चालतो. त्याच्या बरोबर दोघेजण असतात. एकाजवळ एका मांडयात भात असतो व दुसऱ्याजवळ एका सुपात डाळे व खोबऱ्याचे तुकडे असतात. वाटेत भुताखेतांसाठी तो ते डाळे-खोबरे टाकीत जातो. स्त्रिया श्मशानात जात नाहीत.

प्रेताचे दहन करताना ते दक्षिणेकडे मस्तक करून चितेवर ठेवतात. नंतर प्रेतावर चंदनाचे तुकडे व तुळशीची पाने टाकतात. मृत्युसमय अशुभ असल्यास प्रेताचे मस्तक, डोळे, मुख, छाती व खांदे यांवर पिठाचे सात गोळे ठेवतात. मृत मनुष्य पुरुष असेल, तेव्हा मस्तकाच्या बाजूने व स्त्री असेल, तेव्हा पायांच्या बाजूने चिता पेटवतात. दहनाचे पौरोहित्य करणारे ब्राह्मण वेगळे असतात; त्यांना कार्टे म्हणतात.

ज्या जागी मृत्यू घडतो, ती जागा गायीच्या शेणाने सारवून तिथे एक दिवा तेवत ठेवतात. १० दिवस सुतक पाळतात.

११ व्या दिवशी मृताच्या परलोकप्राप्तीसाठी दानधर्म व वृषोत्सर्ग करण्याची प्रथा पूर्वी होती. त्याचप्रमाणे १ ल्या दिवसापासून १२ व्या दिवसापर्यंत रोज श्राद्ध करण्याचीही प्रथा होती. पण सांप्रत ९ ते १२ या दिवशी रोज श्मशानात चटश्राद्ध करतात आणि १३ व्या दिवशी पुण्याहवाचन करून ब्राह्मणभोजन घालतात. [चित्पावन; पूना गॅझे.; लिमये-कुलवृत्तान्त, १९३९; चित्तपावनसमाजचित्र]

चित्पावनी भाषा

चित्पावन ब्राह्मणांची आपसात बोलण्याची भाषा. ही जयगड खाडीच्या दक्षिण तीरापासून गोमंतकापर्यंत प्रचलित आहे. अलिकडे या भागाचा मुंबईसारख्या शहरांशी संपर्क वाढल्यामुळे ही भाषा प्रचारातून कमी होऊ लागली आहे. ती बोलण्याने आपण अडाणी ठरू, असे चित्पावनांना वाटत असावे.

मराठी ग्रंथभाषेशी या भाषेची तुलना करता पुढील बाबतीत भिन्नता दिसते ––

(१) उच्चार – स्वरांपैकी ए चा उच्चार अ व ए यांच्यामधला ऍं असा आणि ओ चा अ व ओ यांच्या मधला ऑं असा होतो.

(२) शब्दस्वरूप – नात्याचे वाचक शब्द शकारान्त असतात. उदा० आईश, बापूश, घोऊश. मराठीतील आकारान्त शब्द चित्पावनीत ओकारान्त होतात. उदा० घोडो, चौथरो, लाडको. एकारान्त शब्द आकारान्त होतात. उदा० केळां, सोनां, पुणां. वकारान्त धातू यकारान्त होतात. उदा० जेय, ठेय.

(३) सामान्यरूप – उदा० जीभ – जिभा, तळां – तळे, फुरसां– फुरसे, खुटी– खुटचा, काठी– काठ्या, आंबो– आंबे.

(४) विभक्तिप्रत्यय – प्रथमा– फुलां, चिचो, शेळयो. द्वितीया – आमला, तुमला, हेंना. तृतीया – देवान, देवांय.

या भाषेचे बाकी सर्व नियम बहुधा ग्रंथभाषेच्या नियमाप्रमाणेच आहेत.

चित्पावनी भाषेचा नमुना पुढे दिला आहे —

माणसान घे म्हटले आपलेपण सोडूं नये. दूसरेचां चखोट सेल तां घेवां. पण उठले सुटले दूसरेच्यो सगळ्योच तऱ्हा घेणां अगदी वाईट. खाणां, पिणां, पोशाक, बोली, आचार–विचार, धर्म हें तेचां तेणीन सोडतां कामा नये. तेंत आपलेपणाचो अभिमानच हवो. हेचो सगळेंय विचार करनी आपलां हितसाधन करेवे हवां. नि हे साधेवे लोकांय मनापाष्णी झटेवे हवां. देव तुझां भलां करू. [चित्पावन]

चित्रकथी धंद्यावरून बनलेली एक जात. ही जात प्रामुख्याने महाराष्ट्रात आढळते. हे लोक पौराणिक प्रसंगांची चित्रे दाखवून कथाकथन करतात, म्हणून यांना चित्रकथी असे म्हणतात. सोमेश्वराच्या मानसोल्लास या ग्रंथात चित्रकथ्याची व्याख्या दिली आहे, ती अशी——

वर्णकैः सह यो वक्ति स चित्रकथको वरः ।
गायका यत्र गायन्ति विना तालैर्मनोहरम् ।।
(मानसोल्लास ३. १४२७)

अर्थ – वर्णकांच्या म्हणजे चित्रांच्या साहाय्याने जो कथाकथन करतो, तो श्रेष्ठ चित्रकथक होय. या कथाकथनाच्या कार्यक्रमात गायक तालाविना मनोहर गातात.

चित्रकथ्याच्या या व्याख्येवरूनच त्याची ऐतिहासिकता सहज सिद्ध होते.

चित्रकथ्याचे कार्यक्रम चित्र, गीत व वाद्य या त्रयीने युक्त असतात. त्यांच्या कथा बहुशः पुराणांतल्या असतात. या कथासंभारात बभ्रुवाहन, सीताहरण, शिवाला मोहिनी घालणारी भिल्लीण, हरिश्चंद्र, इ. आख्याने असतात. ही आख्याने गात असता चित्रकथी त्यांतील विविध प्रसंगांची रंगीत चित्रे मोरपिसाच्या साह्याने प्रेक्षकांना दाखवतो. ही चित्रे लोकशैलीतील असून आकाराने मोठी असतात. ही चित्रे कधी सुटी, तर कधी एकत्रित बांधलेली असतात. त्यांच्या या सचित्र कथाकथनाला ढोलकी व एकतारी यांची साथ असते.



चित्रकथी

चित्रकथी ही चित्रे स्वतःच तयार करतात, रंगवतात आणि लोकांनी मागितल्यास ती त्यांना विकतातही. या जातीचा असा एक निर्बंध आहे, की प्रत्येक चित्रकथ्याच्या घरात या चित्रांचा एकेक संच तरी असलाच पाहिजे. ज्या इसमाजवळ हा संच नसेल, त्याला जातीतले लोक दंड करतात.

चित्रकथी आपली उत्पत्ती मराठ्यांपासून झाली, असे सांगतात. जाधव, मोरे, पवार, साळुंखे ही त्यांची आडनावे आहेत. पालीचे कणीस, मोरपंख, सुरी, साळुंकीचा पंख ही त्यांची देवके होत. त्यांची आडनावे या देवकांवरूनच पडलेली असतात

एकाच कुळात किंवा देवकात लग्नसंबंध करीत नाहीत. यांच्यांत आतेबहिणीशी व मावसबहिणीशी विवाह होत नाही. मामेबहिणीशी होतो. अविवाहितास विधवेशी विवाह करता येत नाही. ब्राह्मण यांच्या घरी पौरोहित्य करतात.

तुळजापूरची भवानी, जेजुरी व पाली येथील खंडोबा, रत्नागिरीचा ज्योतिबा व कोल्हापूरची महालक्ष्मी ही यांची कुलदैवते आहेत.

एका काळी चित्रकथाकथन हाच यांचा निर्वाहाचा व्यवसाय होता. त्यासाठी ते समुदाय करून गावोगावी फिरत व गावाजवळ पाले ठोकून त्यात मुक्काम करीत. त्यांच्याबरोबर त्यांची बायकामुलेही असत. शिवाय घोडी, म्हशी, शेळ्या ही जनावरेही ते बरोबर बाळगीत. कथाकथनाबरोबरच हे म्हशींचा व्यापार करीत व दूधतूपही विकीत. त्यांच्या मैना (बायका) काशाच्या थाळीवर मेण लावून ती काडीने वाजवीत व गाणी म्हणत गावात भिक्षा मागत. सांप्रत हा त्यांचा व्यवसाय नष्टप्राय झाला आहे. या लोकांनी आता इतर व्यवसाय स्वीकारले आहेत. [म. लो. उ.; बाँ. बे. क्रा.; गां. गा.; मुं. इ. जा.]

चित्रकला चौसष्ट कलांपैकी एक प्रमुख कला. काव्य, गायन, चित्र, मूर्ती, वास्तु, नृत्य व नाट्य या सात प्रमुख कला मानलेल्या आहेत. काही कलाविदांनी या सात कलांत चित्रकलेचा तिसरा क्रमांक लावला आहे. पण अनेक दृष्टींनी पाहिल्यास चित्रकलेला पहिला क्रमांकच देणे युक्त ठरेल.

मूर्तिकलेपेक्षा चित्रकला निःसंशय वरच्या दर्जाची ठरते. कारण सृष्टिसौंदर्याची यथातथ्य ठेवण जशी रंगीत चित्रात सहज व लीलेने दाखवता येते, तशी ती मूर्तिकलेत प्रयत्नानेही



पद्मपाणी अवलोकितेश्वर – अजंटा

दाखवता येत नाही. समोरच्या दृश्यापासून क्षितिजापर्यंत पसरलेला अफाट सृष्टिसौंदर्याचा भाग लहानशा फलकावर किंवा वस्त्रावर चित्रकार हुबेहूब दाखवू शकतो व त्या चित्रात विवक्षित भावांचाही आविष्कार करू शकतो. मूर्तिकाराला तसे करता येणे दुर्घट आहे. वास्तुकलाही याच दृष्टीने चित्रकलेच्या खालचीच ठरेल. गायन व काव्य या कलाही चित्रकलेपेक्षा खालच्या दर्जाच्याच मानाव्या लागतील. गायन मनाला तल्लीन करते खरे; पण त्यातला रसास्वाद मिळण्यासाठी अनेक स्वरसंतती एकामागून एक श्रवणेंद्रियाच्या द्वारे मनापर्यंत पोचाव्या लागतात व तसे होण्यास काही कालावधीही लागतो. पण चित्राची गोष्ट तशी नाही. एका दृष्टिक्षेपात चित्रातल्या सर्व प्रतिमा आणि भावरेषा प्रेक्षकाच्या हृदयपटलावर आरूढ होतात. तो प्रेक्षक रसिक असल्यास पहिल्याच दृष्टिक्षेपात त्या चित्रातला आनंद अनुभवू शकतो. काव्य हे कलेच्या दृष्टीने सर्वोत्कृष्ट खरे; पण अनुभूतीच्या दृष्टीने चित्रकला काव्याहून वरिष्ठ ठरते. काव्यातला रस घेणे, हे चित्राच्या रसग्रहणापेक्षा अधिक कठीण व अधिक कालावधीचे आहे. काव्य हे शब्दमय असल्यामुळे त्यातल्या रसानुभूतीस शब्दांचा संतत प्रवाह कानांवर यावा लागतो. त्यामुळे रसप्रतीतीला विलंब होतो. इतकेच नव्हे; तर कदाचित त्यात विघातही होऊ शकतो. अशा अनेक दृष्टींनी विचार करूनच विष्णुधर्मोत्तर पुराणात (४३.३८) मार्कंडेय मुनी म्हणतो--

कलानां प्रवरं चित्रं धर्मकामार्थमोक्षदम् ।
माङ्गल्यं प्रथमं चैतद् गृहे यत्र प्रतिष्ठितम् ॥

अर्थ – सर्व कलांत चित्रकला ही श्रेष्ठ असून ती धर्म, काम, अर्थ व मोक्ष हे चारही पुरुषार्थ देणारी आहे. ज्या घरात चित्रकला विद्यमान असते, त्या घरात मांगल्य प्रतिष्ठित होते.

चित्र शब्दाची व्याख्या – एका ठरवून घेतलेल्या जागेत रेषा, आकार व वर्ण या त्रयीची केलेली सुसंवादी रचना म्हणजे चित्र, अशी त्याची व्याख्या करायला हरकत नाही. चित्र म्हणजे निसर्गाच्या रंग-रूपांशी मिळती-जुळती अशी रंगीत रचना, असे सामान्यतः समजले जाते. वस्तू, व्यक्ती वा प्रसंग सहजपणे प्रेक्षकाला ओळखता यावे, ही चित्राविषयीची सामान्य आकांक्षा असते. पण ओळख पटणे, ही चित्राची एकमेव कसोटी नव्हे. ती अनेकांपैकी एक समजली पाहिजे. ओळखसुद्धा किती कौशल्याने व कलात्मकतेने करून दिली आहे, यावर कोणत्याही चित्रकृतीचे श्रेष्ठत्व अवलंबून असते.

चित्र हे सुंदर असावे, दिसावे, अशी दुसरी सामान्य आकांक्षा. त्या संबंधात 'कला म्हणजे काय' या आपल्या प्रबंधात श्री. टॉलस्टॉय याने स्वतंत्र प्रकरणच लिहिले आहे. त्यात त्याने जगातील कलाविदांच्या सौंदर्यविषयक कल्पना काय आहेत व त्या कशा परस्पर विरोधीही आहेत, ते दाखवून



भित्तिचित्र – वेरूळ

दिले आहे. त्यावरून असे म्हणावे लागते, की सौंदर्य या शब्दाने अभिप्रेत असणारी गोष्ट ही साचेबंद असू शकत नाही. ती व्याख्येच्या चौकटीतही चपखल बसू शकत नाही. पण असे असले, तरी रसिकाला आनंदाचा लाभ करून देणारी सौंदर्य नावाची चीज अस्तित्वात आहे व तिचे स्वरूपही तसेच व्यापक आहे, हे मान्य करावे लागते. हे सौंदर्य विविधतेत जसे प्रतीत होते, तसेच ते एकत्वामधील पृथक्त्वातही जाणवते आणि हाच नियम निसर्गालाही लागू आहे. सर्व माणसे माणूस या सामान्य नावाने ओळखली जात असली, तरी प्रत्येकात रूप, रंग व स्वभाव यांचे वेगळेपण हे असतेच.

याचा अर्थ असा, की एकाच प्रकारचे चित्र सर्वांनाच आनंद देऊ शकेल असे नाही. पण असे असले, तरी कोणतेही चित्र हे चांगले चित्र ठरविण्यासाठी ज्या गुणांची आवश्यकता असते, त्या गुणांचा समुच्चय म्हणजेच चित्रगत सौंदर्य होय, असे म्हटल्यास चालेल. चित्रगत सौंदर्य हे रंग, रेषा, आकार, छटा, सजीवता, पोत व अभिव्यक्तीतले कौशल्य या सर्वांत मिळून असते. याचा अर्थ चित्रसौंदर्य हे चित्रविषयावर अवलंबून नसून, ते चित्रकाराच्या अभिव्यक्तीच्या सामर्थ्यात असते, हा आहे. ही अभिव्यक्ती जितकी सहज आणि वैशिष्ट्यपूर्ण, तितकी ती श्रेष्ठ समजावी.



शिकारीचे प्राचीन चित्र — मध्यभारत



भांड्यावरील चित्रे — सिंधू संस्कृती

रंग व रेषा हे चित्रकाराच्या अभिव्यक्तीचे माध्यम आहे. इतरांच्या दृष्टीने सौंदर्यहीन असलेल्या विषयातही चित्रकाराला सौंदर्याची प्रतीती येऊ शकते. नित्य व्यवहारातील चार वस्तूंची मांडणी करून चित्रकार त्या समूहाचे चित्र काढतो, तेव्हा त्यात जे सौंदर्य येते, ते त्या वस्तुसमूहाचे सौंदर्य नसून, चित्रकाराच्या कलात्मक अभिव्यक्तीचे ते सौंदर्य असते. चित्रकाराच्या व्यक्तिमत्त्वातून जेव्हा एखादा विषय प्राणवान होऊन बाहेर पडतो, त्या वेळी तो एका वेगळ्याच अर्थाने सुंदर दिसू लागतो. ती चित्रकाराची किमया असते.

रंग व आकार यांच्या संवेदना या चित्राच्या प्रेरणा असतात. त्यांच्या सुसंवादी रचनेतच चित्राचे सौंदर्य प्रतीतीला येते. ज्याला रंगसंवेदना नाही, त्याला चित्रसौंदर्याचे खरेखुरे आकलन होणार नाही. ललित लेखनातील सौंदर्याचा आस्वाद घेण्यासाठी वाचकाला जशी भाषा, अलंकार, वाक्प्रचार यांची जाणीव असावी लागते, तद्वतच चित्रसौंदर्याचे आकलन होण्यासाठी रसिक प्रेक्षकाला रंग, रेषा, आकार व तंत्र यांची जाणीव असणे आवश्यक असते.

चित्रकलेची स्फूर्ती—मानवजीवनाचा इतिहास जसा विशाल, विराट पण मुळाशी अस्पष्ट आहे, तसेच कलेच्या इतिहासाबद्दलही म्हणावे लागते. ज्याप्रमाणे आदिम अवस्थेतून मानव हळूहळू प्रगती करीत व आपल्या सुखसोयी वाढवीत आजच्या सुसंस्कृत अवस्थेला प्राप्त झाला, त्याचप्रमाणे त्याची कलाही त्याच्या सर्व अवस्थांत त्याच्या बरोबर राहून प्रगत झाली आहे. मानवाच्या त्या आदिम अवस्थेतच त्याच्या हृदयात ज्या कलांचे बीज पडले त्यात चित्रकलाही होती. त्या आदिम अवस्थेत जी प्रतिमाने त्याने वापरली, ती स्वरूप, शैली आणि भाव यांच्या दृष्टीने तारतम्यहीन असली, तरी त्या प्रतिमानांची मूलप्रेरणा भौतिक नव्हती; तर ती काहीतरी दिव्य, अपार्थिव अशी होती. निराळ्या शब्दांत सांगायचे तर आदिम मानवाची ती कलाप्रेरणा धार्मिक होती. आदिम मानवाने आपल्या सभोवतीच्या पार्थिव पदार्थांना दैवी व आध्यात्मिक रूप देण्याचा आरंभापासून प्रयत्न केला आहे. आकाश, पृथ्वी, ग्रह, नक्षत्र, नद्या, पर्वत,

बदलते ऋतुमान या सर्व गोष्टींचे वास्तव ज्ञान त्याला नव्हते. म्हणून त्याने वरील सर्व वस्तूंमध्ये एका अदृश्य शक्तीची कल्पना केली आणि त्या दृष्टीनेच त्या वस्तू किंवा त्यांची प्रतीके आपल्या चित्रसृष्टीत वापरली.

जगातल्या प्राय: सर्वच आदिम संस्कृतींच्या मुळाशी अशा प्रकारची धार्मिक भावना दिसून येते. ग्रीस, चीन, भारत, इ. सर्व देशांतल्या प्राचीन मानवांना निसर्गातूनच कलेची प्रेरणा मिळाली आहे. प्रागैतिहासिक युगातली जी काही चित्रे उपलब्ध झाली आहेत, त्यांचा अभ्यास केल्यावर आदिम मानवाच्या कलात्मक अभिरुचीचीही कल्पना करता येते. आदिम मानवाची ही चित्रे मुख्यत्वे गुहांच्या तोंडावर, शिलापृष्ठांवर किंवा भिंतीवर चितारलेली दिसतात. आदिम मानवाचे हे सुरवातीचे रेखाटण बाह्य रेषेपुरतेच मर्यादित असले, तरीही त्याच्या त्या रेखाटणात जोम व निरीक्षण यांचा प्रत्यय येतो. हजारो वर्षांपूर्वीची स्पेनमध्ये उपलब्ध झालेली गव्या-रेड्यांची चित्रे या दृष्टीने अभ्यसनीय आहेत. मात्सीसारखा श्रेष्ठ आधुनिक चित्रकारही ती रेखाटणे पाहून उद्गारतो, की 'प्राचीन काळात मानव अशी चित्रे निर्माण करीत होता, हे खरेच वाटत नाही!'

मातीच्या भांड्यावर सजावट करणे, कातड्याच्या पोषाखावर चित्रे काढणे, गुहांच्या भिंती चितारणे, शिकारीची हत्यारे चित्रित व नक्षीदार करणे, उपासनेसाठी निसर्गशक्तींची प्रतीके निर्माण करणे, इ. स्वरूपांत आदिम मानव आपली कलासक्ती प्रकट करीत होता. शिकार हे त्याचे प्रमुख निर्वाहसाधन होते. त्यामुळेच शिकारीची दृश्ये हा त्याचा आवडता विषय बनला व विविध पशूंना त्याच्या चित्रकलेत महत्त्वाचे स्थान प्राप्त झाले. या पशूंच्या रेखाटणात त्या आदिम मानवाने दाखवलेले प्रभुत्व आणि त्या त्या पशूच्या स्वभाववैशिष्ट्याचे त्याने घडवलेले दर्शन या गोष्टी खरोखर कौतुकास्पद आहेत. चित्रगत वस्तूंच्या अलंकरणासाठी सरळ रेषा, वक्र रेषा व भौमितिक आकार, यांचा त्याने केलेला कल्पक उपयोग पाहून जाणकारांचीही मती गुंग होऊन जाते.

मानवसंस्कृतीच्या उष:कालात भाषा व लिपी यांचा उगम झालेला नव्हता. अशा परिस्थितीत त्या काळच्या माणसाला आपल्या मनातले भाव दुसऱ्याला समजावून सांगणे, ही गोष्ट फार अवघड होती. त्या वेळी विचारप्रकाशनासाठी त्याने पहिले माध्यम स्वीकारले ते म्हणजे चित्रलिपी हे होय. जगात अनेक ठिकाणी अशा चित्रलिपी निर्माण झालेल्या दिसतात. या चित्रलिपींचा बारकाईने अभ्यास केल्यावर असे अनुमान करता येते, की त्या लिपिचित्रांचा यथायोग्य अर्थ ग्रहण केला जावा यासाठी त्यांनी काही नियम व संकेतही निश्चित केले होते. त्या नियमसंकेतांवरून ती चित्रलिपी एकाची दुसऱ्याला व एका पिढीची दुसऱ्या पिढीला समजू शकत असे. त्यांतली काही चित्रे मूर्त वस्तूंचा बोध करीत, तर काही अमूर्त भावांचा बोध करीत.



बाघ गुहेतील चित्र

अशा प्रकारे प्रतीकात्मक चित्रे निर्माण करून त्या आदिम मानवाने हळूहळू त्यात अर्थबोधाला सुगम अशा नव्यानव्या पद्धती निर्माण केल्या. ही चित्रलिपी शिलाखंड, वृक्षांच्या साली, चामडी, हाडे, शिंपा, हस्तिदंत, इ. अनेक प्रकारच्या आधारभूमीवर अभिव्यक्त झालेली दिसते.

चित्रकलेचे शास्त्र — प्राचीन भारतीय चित्रकलेचा मानदंड काय होता किंवा प्राचीन काळी चित्रकलेचे नियम व सिद्धान्त सांगणारे ग्रंथ कोणते आणि कशा प्रकारचे होते, हे सांगणे आजमितीस कठीण आहे. पण एवढे मात्र अनुमानिता येते, की भारतात चित्रकलेचा आदर्श अत्युच्च होता आणि चित्रकलेसंबंधीचे ग्रंथही निर्माण झाले होते. आजमितीस ते उपलब्ध नाहीत. पुराणे, महाकाव्ये, संस्कृत नाटके, इ. वाङ्मयांतून चित्रकलेसंबंधीचे जे उल्लेख ठायी ठायी आढळतात आणि कुठे कुठे त्या विषयीचा तपशीलही आढळतो, त्यावरून अशा प्रकारच्या शास्त्रग्रंथांच्या अस्तित्वाची साक्ष पटते. इतर अनेक विषयांवरची ग्रंथसंपदा जशी राजकीय उत्पातात आणि विधर्मी आक्रमणात नष्ट झाली, तसेच चित्रकलेवरचे शास्त्रग्रंथही नष्ट झाले असले पाहिजेत.

वात्स्यायनाचे कामसूत्र, सोमेश्वराचा अभिलषितार्थचिंतामणी व विष्णुधर्मोत्तर पुराणातले चित्रसूत्र नामक काही अध्याय या ग्रंथांत चित्रकलेचे तत्त्व, प्रकार व गौरव यांविषयी बरीच माहिती आली आहे, तिचा सारांश असा—

वात्स्यायन आपल्या कामसूत्रात चित्रकार कोणाला म्हणावे, ते पुढीलप्रमाणे सांगतो—

सुप्तं च चेतनायुक्तं मृतं चैतन्यवर्जितम् ।
निम्नोन्नतविभागं च यः करोति स चित्रवित् ।।

अर्थ–जो निद्रित माणसाच्या मुखावर चैतन्य दाखवतो, जो मृताच्या मुखावर चैतन्याचा अभाव दाखवतो व जो (सपाट पार्श्वभूमीवर) उंच सखल विभाग दाखवतो, त्याला चित्रकार म्हणावे.

वात्स्यायनाने चित्रकलेची सहा अंगे सांगितली आहेत, ती पुढीलप्रमाणे–

रूपभेदाः प्रमाणानि भावलावण्ययोजनम्, ।
सादृश्यं वर्णिकाभङ्ग इति चित्रं षडङ्गकम् ।।

अर्थ – रूपभेद, प्रमाण, भाव, लावण्ययोजना, सादृश्य व वर्णिकाभंग, ही चित्रकलेची सहा अंगे होत.

रूपभेद – याचा अर्थ सर्व प्रकारच्या रूप-गुणांची ओळख असा आहे. निसर्गातल्या नाना आकृतींच्या अभ्यासाशी याचा संबंध आहे.

प्रमाण – याच्या अंतर्गत अनुपात व शरीररचना त्याचप्रमाणे वस्तूची दूर-निकट अवस्था, या गोष्टी येतात. चित्रातले लिखित अंग प्रमाणशीर असायला हवे, हे या भेदावरून कळते.

भाव – हा सिद्धान्त मेंदू व अंतःकरण यांचे शरीरावर होणारे प्रभाव दर्शवतो. या प्रभावांचे अध्ययन, विश्लेषण व स्पष्टीकरण करून चित्र निर्माण केले पाहिजे, असा याचा अर्थ आहे. अर्थात चित्रांमध्ये भावप्राधान्य असले पाहिजे, हे यावरून कळते.

लावण्ययोजना – याचा अर्थ बाह्यसौंदर्य असा आहे. चित्रात आंतरिक भावांच्या अभिव्यक्तीबरोबरच बाह्य सौंदर्य असणेही आवश्यक आहे.

सादृश्य – वस्तू व तिचे चित्र यात समानता असणे, असा याचा अर्थ आहे. चित्र जर हत्तींचे असेल, तर प्रेक्षकाला तो हत्तीच वाटला पाहिजे; अन्य पशू वाटता कामा नये.

वर्णिकाभंग – कुंचली व रंग यांचा यथायोग्य उपयोग करणे, असा याचा अर्थ आहे. चित्रात कोणत्या ठिकाणी कोणत्या प्रकारच्या रंगाची अपेक्षा आहे, हे या सिद्धान्ताच्या सम्यक अभ्यासाने कळून येते.

वरील सहा अंगांपैकी शेवटच्या वर्णिकाभंग या अंगाचे आणि तदंगभूत इतर अनेक गोष्टींचे तपशीलवार वर्णन सोमेश्वराने आपल्या अभिलषितार्थचिंतामणी या ग्रंथात केले आहे, ते असे–

चित्रकाराची कुंचली कनिष्ठिकेइतकी जाड व तिच्या दुप्पट लांब असावी. तिच्या अग्रभागी तांब्याचा एक शंकू असावा. कुंचलीला वासराच्या कानाचे केस लावावे. मोठी, मध्यम व सूक्ष्म अशा तीन प्रकारच्या कुंचल्या असाव्या. मोठ्या कुंचलीने लेपनकार्य करावे. मध्यम कुंचलीने चित्रांकन करावे. सूक्ष्म कुंचलीने सूक्ष्म रेखा काढाव्या. काजळाची वर्तिका तयार करून तिने प्रथम भिंतीवर चित्राचा आराखडा काढावा. कोणत्याही चित्राचा आकार प्रमाणबद्ध असावा. उंची दाखवण्यासाठी पांढरा व खोली दाखवण्यासाठी काळसर रंग उपयुक्त समजावा.

कोणत्या वस्तूंपासून कोणते रंग तयार करावे, ते सोमेश्वर पुढीलप्रमाणे सांगतो—

श्वेतेषु पूरयेच्छङ्खं शोणेषु दरदं तथा ।
रक्तेष्वलक्तकरसं लोहिते गैरिकं तथा ।।
पीतेषु हरितालं स्यात् कृष्णे कज्जलमिष्यते
शुद्धा वर्णा इमे प्रोक्ताश्चत्वारश्चित्रसंश्रयाः ।।

(अभिल. १.१६५-१६६)

अर्थ – चित्रात श्वेतरंगासाठी शंखाचे चूर्ण, तांबूस रंगासाठी हिंगूळ, रक्तवर्णासाठी अळिता, भगव्या रंगासाठी गेरू, पिवळ्या रंगासाठी हरताळ व काळ्या रंगासाठी काजळ वापरावे.

दोन किंवा अधिक रंगांच्या मिश्रणाने अनेक मिश्रित रंग तयार होतात. यासंबंधीचे शास्त्रीय वर्णन सोमेश्वराने मानसोल्लासाच्या पहिल्या अध्यायात केले आहे. वरील सर्व वर्णन करून तो चित्राचे पुढील प्रकार सांगतो–

विद्धचित्र – आरशात पडलेल्या प्रतिबिंबाप्रमाणे एखाद्या वस्तूचे हुबेहूब चित्रण करणे म्हणजे विद्धचित्र होय.

अविद्धचित्र – हे चित्रकाराच्या कल्पनेतून अभिव्यक्त होते. यात चित्रकाराच्या अंतरंगातले भावतरंग वर्ण व आकार यांच्या द्वारे प्रगट होतात.

रसचित्र – भिन्न भिन्न रसांच्या अभिव्यक्तीसाठी बनवल्या जाणाऱ्या चित्रांना हे नाव आहे. उदा०–नायिकाभेदाची चित्रे किंवा राग-रागिण्यांची चित्रे.

धूलिचित्र – रांगोळीचे विविध प्रकार.

सोमेश्वराने हा ग्रंथ लिहिला त्या काळची अनेक भित्तिचित्रे सांप्रतही द. भारतात उपलब्ध आहेत. सोमेश्वराच्या चित्रलक्षणांचे प्रात्यक्षिक आजही त्या चित्रात पाहायला मिळते. दक्षिणेतल्या देवालयांतील त्या चित्रांच्या रेखनाचे सगळे तंत्र सोमेश्वराने आपल्या ग्रंथात सांगितल्याप्रमाणेच आहे.

वात्स्यायन आणि सोमेश्वर यांच्यापेक्षाही चित्रकलेचे अधिक गंभीर व विशद विवेचन केले आहे ते विष्णुधर्मोत्तर पुराणाने. या पुराणाच्या तिसऱ्या खंडातील ३५ ते ४३ या अध्यायांना चित्रसूत्र असेच नाव आहे. या चित्रसूत्र ग्रंथाची रचना स्वतः भगवान नारायणाने केली, असे मार्कंडेय सांगतो. जगातले

पहिले चित्र बनले ते उर्वशीचे. ते पुढील प्रसंगी तयार झाले –

प्राप्तानां वञ्चनार्थाय देवस्त्रीणां महामुनिः।
सहकाररसं गृह्य उर्व्यां चक्रे वरस्त्रियम् ।।
चित्रेण सा ततो जाता रूपयुक्ता वराप्सराः ।
यां दृष्ट्वा व्रीडिताः सर्वा जग्मुस्ता देवयोषितः ।।

(विष्णुधर्म. पु. ३५.२–४)

अर्थ – महामुनी (भगवान नारायण) तपस्या करीत असता त्याच्या तपात विघ्न उत्पन्न करण्यासाठी काही अप्सरा तिथे आल्या. तेव्हा त्यांना लाजविण्यासाठी नारायणाने आम्ररसाच्या साहाय्याने भूमीवर एका अत्युत्तम लावण्यवतीचे (उर्वशी) चित्र निर्माण केले. ते चित्र पाहून त्या रूपवती अप्सरा लज्जित झाल्या व तिथून निघून गेल्या.

त्यानंतर चित्राची शुभाशुभ लक्षणे, चित्रकाराची दक्षता, चित्रातील शुद्धाशुद्धता, रंगांचा यथायोग्य प्रयोग, सूक्ष्म रेखांकन, इ. गोष्टींचे विवेचन करून ग्रंथकाराने चित्रांचे प्रकार सांगितले आहेत, ते असे—

सत्यं च वैणिकं चैव नागरं मिश्रमेव च।
चित्रं चतुर्विधं प्रोक्तं तस्य वक्ष्यामि लक्षणम् ।।
यत्किञ्चिल्लोकसादृश्यं चित्रं तत्सत्यमुच्यते ।
दीर्घाङ्गं सप्रमाणं च सुकुमारं सभूमिकम् ।।
चतुरस्त्रं सुसम्पूर्णं न दीर्घं नोल्बणाकृतिम्।
प्रमाणं स्थानलम्भाढ्यं वैणिकं तन्निगद्यते ।
दृढोपचितसर्वाङ्गं वर्तुलं नह्यनुल्बणम् ।।
चित्रं तु नागरं ज्ञेयं स्वल्पमाल्यविभूषणम् ।
चित्रं मिश्रं समाख्यातं समासान्मनुजोत्तम ।।

(विष्णुधर्म. पु. ४१.१–५)

अर्थ – सत्य, वैणिक, नागर व मिश्र असे चित्राचे चार प्रकार होतात. *या* चारही प्रकारांचे वर्णन असे— जे निसर्गातल्या वास्तविक पदार्थांशी समान (अर्थात हुबेहूब) असते, ज्यात कोमल भावनांची अभिव्यक्ती असते, जे प्रमाणबद्ध, दीर्घांग, सुकुमार व पार्श्वभूमीसह असते, ते सत्य होय. ज्यात शरीराच्या अवयवांची निर्मिती सुडौल आणि अनुपात संभाळून केलेली असते, जे चौरस, फार दीर्घ नव्हे असे, उत्कृष्ट आकार, आधार व प्रमाण यांनी युक्त असते, ते वैणिक होय. ज्यात चित्रगत व्यक्तींची सर्व अंगे सुदृढ व पुष्ट दाखविलेली असतात, जे गोलमाल नसते किंवा फराटयांचे नसते, ज्याच्या रेखा मनोहर असतात, ज्यात पुष्प व अलंकार यांची गर्दी नसते, असे चित्र नागर होय. ज्यात वरील तीन्ही प्रकारांचे (किंवा शैलींचे) मिश्रण असते, अशा प्रकारचे चित्र ते मिश्र होय.

निरनिराळ्या व्यक्तींसाठी अधिकारपरत्वे कोणते रंग वापरावे; चित्राची आधारभूमी चित्राच्या मानाने किती लांबरुंद असावी; शस्त्रे, वस्त्रे, आभूषणे, माला, पगडी, खडावा यांचे प्रमाण काय असावे; चारही दिशांच्या लोकांची वैशिष्ट्ये कशी जाणून घ्यावी, इ. गोष्टी सांगून चित्रसूत्रकार चित्ररचनेचा पुढील काही तपशील देतो—

नदी चित्रित करताना तिच्यात होडया दाखवाव्या, देवांचे चित्रण त्यांच्या स्त्रियांसह करावे, ब्राह्मणाचे वस्त्र शुभ्र दाखवावे, ऋषींच्या मस्तकी जटाजूट काढावा, आकाश तारकाखचित चितारावे, निर्झरांवर झुळझुळत्या जललहरी दाखवाव्या, अरण्य पशुपक्ष्यांसह चितारावे, जलाशयात मत्स्य-कच्छप फिरत असलेले दाखवावे आणि नगर चितारताना त्यातले राजमार्ग व उद्याने दाखवावी.



कांगडा शैलीचे चित्र

ऋतुचित्रे काढताना त्यांची रचना कशी करावी, याविषयी त्याने पुढील श्लोक लिहिले आहेत––

प्राणिनां क्लेशतप्तानामादित्येन निदर्शनम् ।
वृक्षैर्वसन्तजैः फुल्लैः कोकिलामधुपोत्कटैः ॥
प्रहृष्टनरनारीकं वसन्तं च प्रदर्शयेत् ।
क्लान्तैः कार्यं नरैर्ग्रीष्मं मृगैश्छायागतैस्तथा॥
तोयनम्रघनैर्युक्तं सेन्द्रचापविभूषणैः ।
विद्युद्विद्योतनैर्युक्तां प्रावृषं दर्शयेत्तथा ।।

(विष्णुधर्म. पु. ४२.७३–७४,७६)

अर्थ – वसंतऋतू चितारताना आकाशात तळपता सूर्य व त्याच्या तापाने क्लांत झालेले प्राणी दाखवावे. त्याचप्रमाणे त्या चित्रात सपुष्प वृक्ष, त्यांवर भ्रमर व कोकिळ आणि उल्हासयुक्त नरनारींचा घोळका या गोष्टी दाखवावा. ग्रीष्मऋतूच्या चित्रात उन्हाने तापून वृक्षांच्या छायेत आलेले पथिक व मृग दाखवावे.

वर्षाऋतू चित्रित करताना जलभाराने ओथंबलेले मेघ, त्यांवर इंद्रधनुष्य आणि त्यातच विजेची लकाकी या गोष्टी दाखवाव्या. शरद, हेमंत व शिशिर या ऋतूंच्या चित्रणाविषयीही मार्कंडेय मुनीने अशाच तपशीलवार सूचना केल्या आहेत.

त्यापुढे त्याने रसांचाही विचार केला आहे. कोणत्या रसाच्या चित्रणात कोणत्या रंगाला प्राधान्य द्यावे, त्यात प्रतीकात्मक वस्तू कोणत्या दाखवाव्या, तेही तो तपशीलवार सांगतो. काही प्रकारची चित्रे काही ठिकाणी त्याने निषिद्ध मानलेली आहेत. नांदत्या घरात युद्ध, श्मशान, इ. विषादकारक चित्रे चितारू नयेत; तर शृंगार, हास्य व शांत या रसांचीच चित्रे तिथे असावी, असे तो सांगतो. सुंदर चित्राची व्याख्या त्याने पुढीलप्रमाणे केली आहे – माधुर्य, ओज व सजीवता यांनी युक्त ते सुंदर चित्र होय.

मार्कंडेयाने चित्र व नृत्य यांचे साधर्म्य सांगितले आहे. अभिनय व मुद्रा या दोन गोष्टी नृत्यकलेप्रमाणेच चित्रकलेच्याही प्राणभूत आहेत, असे तो म्हणतो––

विना तु नृत्यशास्त्रेण चित्रसूत्रं सुदुर्विदम् ।

अर्थ – नृत्यशास्त्राच्या अभ्यासावाचून चित्रसूत्र (चित्रकलेचे मर्म) समजणे सुतराम शक्य नाही.

चित्रसूत्राचे हे अध्याय सुबोध भाषेत लिहिलेले आहेत. कलाविषयक प्राचीन विचार समजून घेण्याच्या दृष्टीने चित्रसूत्राचे अध्ययन आवश्यक ठरेल.

इतर संस्कृत साहित्यातील चित्रकला – संस्कृत साहित्य कला व शिल्प यांच्या संबंधीच्या शब्दांनी, संकेतांनी व उल्लेखांनी समृद्ध आहे. संस्कृतात चित्रकलेला चित्रकर्म किंवा आलेख्य असे म्हटले आहे. चित्रयुक्त भिंतीला चित्रशाला, चित्रशालिका व चित्रवत्सद्म अशी नावे आहेत. तिलकमंजरीत प्रतिबिंब असा एक पारिभाषिक शब्द येतो. हा शब्द फारसी शबीह (छबी) याचा समानार्थक आहे. प्रतिबिंब' चित्रांना प्रतिकृतिचित्र, सादृश्यचित्र किंवा प्रतिच्छंदकचित्र असे म्हणत. याची गणना विद्ध या चित्रप्रकारात होत असे. मेदिनीकोशात चित्रकाराचा पर्याय म्हणून वर्णाट असा शब्द आला आहे. त्याचा अर्थ रंगसंगती साधणारा चित्रकार असा होतो. रंगाजीव शब्दही त्याच अर्थाने आलेला आहे.

पुराणकाळी अनेक प्रकारच्या पार्श्वभूमीवर चित्रे बनवली जात. पटचित्र, फलकचित्र व भित्तिचित्र अशी त्यांची नावे आहेत. त्यातील पटचित्रे व फलकचित्रे नष्ट झाली असून काही भित्तिचित्रे तेवढी शिल्लक उरली आहेत. विनयपिटकात लेप्यचित्र असा शब्द येतो (३.३६). सारवलेल्या भिंतीवर काढलेल्या चित्रासाठी हा शब्द योजलेला आहे. त्या काळी चित्रासाठी रंगीत दगड व रंगीत माती कुटून तयार केलेले रंग उपयोगात आणीत. नागानंद नाटकात प्रियतमेचे चित्र चितारू इच्छिणाऱ्या नायकाला विदूषक पाच रंगांचे दगड आणून देतो, असे वर्णन आहे.



वदामीच्या गुहामंदिरातील भित्तिचित्र

चित्रकलेतली पहिली प्रक्रिया पेन्सिलीने वा कुंचल्याने चित्राचा बाह्य आकार निर्माण करणे, ही असते. जुन्या काळीही ती तशीच होती, हे लेण्यातील काही अर्धवट मूर्तिचित्रे पाहून कळून येते. कालांजनवर्तिकेने (काळ्या काजळाची वात) चित्राची बाह्यरेषा चितारीत, असे बाणभट्टाने कादंबरीत म्हटले आहे. विरही यक्ष गेरूच्या रंगाने शिलापृष्ठावर आपल्या पत्नीचे चित्र लिहीत होता, असे वर्णन कालिदासाने केले आहे (उ. मेघ. ४२).

चित्राच्या गुणांचे विश्लेषण करताना भासाच्या दूतवाक्य या नाटकात दुर्योधनाच्या तोंडी पुढील वाक्य आहे ––

अहो अस्य वर्णाढ्यता, अहो भावोपपन्नता, अहो युक्तलेखता ।

अर्थ – या चित्राचे रंग किती प्रसन्न आणि सुंदर आहेत ! चित्रातले भाव किती सुस्पष्ट आहेत ! आणि चित्राची बाह्यरेषा तरी किती यथातथ्य आहे !

वर्ण, भाव आणि रेखा हे तीन कोणत्याही चित्राचे प्राणभूत गुण असतात. वरील अवतरणात नेमकी हीच गोष्ट सांगितली आहे. कालिदासालाही चित्रकलेत रूप आणि भाव या तत्त्वांचा संयोग अभिप्रेत होता, हे मेघदूतावरून कळते (उ. मेघ. २२).

गुप्तकालीन चित्रकलेत फूलपत्रीचे अलंकरण करण्याची व्यापक प्रथा होती. या अलंकरणाला पत्रभंग, पत्रलता, पत्रावली किंवा पत्रांगुली असे म्हणत. व्यक्तीचे सौंदर्य वाढवणे आणि अशुभनिवारण असे दोन हेतू या पत्ररचनेत असत. पार्वतीचा वधूवेष करताना तिच्या सख्यांनी तिच्या अवयवांवर गोरोचनाने पत्ररचना केली होती, असे कालिदासाने सांगितले आहे (कु. सं. ७. १७). राणी विलासवती गर्भवती असताना तिला अशुभाची बाधा होऊ नये, म्हणून तिच्या महालातील भिंतींवर शुभ्र विभूतीने पंचपत्रलता चित्रित केलेल्या होत्या, असे बाणभट्टाने कादंबरीत सांगितले आहे.

त्या काळी राजप्रासाद व मोठे वाडे यांत चित्रशाला असत. चित्रशालेचे ते दालन गृहपती व गृहिणी यांच्या निवासाचे खास स्थान समजले जाई. या चित्रशालेच्या भिंतींवर रुचिभेदानुसार अनेक प्रकारची चित्रे काढली जात. म्हणूनच बाणभट्टाने कादंबरीत अशा चित्रित भिंतींना दर्शितविश्वरूपा असे म्हटले आहे. रामायणात रावणाच्या अनेक चित्रशाला असल्याचा उल्लेख आहे (वा. रा. ५. ६. ३५). ओषधिकुमार या तरुणाने आपल्या सोबत्यांकडून एकेक कार्षापण वर्गणी घेऊन एक क्रीडाशाला बनवली होती व तिच्या भिंतींवर सुंदर सुंदर चित्रे रंगवली होती, असे जातक ग्रंथावरून कळते. महाराजा श्रेणिक याच्या महालातही उत्तमोत्तम भित्तिचित्रे होती व विदेहराजाच्या चित्रसभेत कोकशास्त्रात वर्णिल्यांप्रमाणे ८४ सुरतासनांची चित्रे काढलेली होती, असेही जातकात वर्णिले आहे.



किशनगढ शैलीचे चित्र

भरताने चित्र व नाट्य यांचा संगम मंगलजनक मानला आहे. 'नाट्यशालेच्या भिंती स्त्री-पुरुषांची चित्रे व विविध प्रकारचे लताबंध यांनी सजवाव्या, असे त्याने सांगितले आहे.

कादंबरीतील कन्यांच्या अंतःपुराचे वर्णन करताना बाणभट्ट लिहितो, की तिथल्या चित्रकर्मामध्ये जणू सारे त्रिभुवन पुंजीभूत झाले होते. हरिवंशात बाणासुरकन्या उषा हिच्या चित्रयुक्त महालाचे वर्णन आहे. उषेची सखी चित्रलेखा ही उत्तम चित्रकर्त्री होती, असेही तिथे सांगितले आहे.

चित्रकर्मात निपुण असलेल्या नायक–नायिका एकमेकांची चित्रे काढून मनोविनोदन करीत, असे उल्लेख संस्कृत साहित्यात मिळतात. संस्कृत नाटकांतून चित्रकलेचे उत्कृष्ट आदर्श दाखवलेले आहेत. भास, कालिदास, भवभूती, हर्ष, इ. नाटककारांनी आपापल्या नाट्यकृतीत चित्रकलेचे प्रसंग आणले आहेत. कुठे विरहव्याकुल नायक–नायिकांनी आपल्या प्रिय व्यक्तीचे चित्रण केले आहे; तर कुठे कोण्या राजाने वा धनिकाने मनोरंजनासाठी विशिष्ट घटनेवर चित्रकाराकडून चित्र काढून घेतले आहे.

भासाच्या स्वप्नवासवदत्त व प्रतिज्ञायौगंधरायण या दोन्ही नाटकांत उज्जयिनीचा राजा प्रद्योत याने वासवदत्ता व वत्सराज उदयन या नायक–नायिकांची चित्रे काढून घेतली व त्या नायक-नायिकांच्या चित्रांचाच विवाह घडवून आणला, असा उल्लेख आहे. कालिदासाच्या मालविकाग्निमित्र या नाटकात चित्रकाराने काढलेले चित्र पाहूनच अग्निमित्र मालविकेकडे आकृष्ट होतो. शाकुंतलातला दुष्यंत हा कुशल चित्रकार असल्याचे कालिदासाने दाखवले आहे. दुष्यंताने आपली विरहवेदना कमी करण्यासाठी शकुंतलेचे जे चित्र काढले, ते पाहून सानुमती नावाची शकुंतलेची सखी म्हणते –

> अहो एषा राजर्षेर्निपुणता । जाने सख्यग्रतो मे वर्तत इति।
>
> (शाकुं. ६)

अर्थ – या राजाचे कलानैपुण्य काय वर्णावे ! (हे चित्र पाहून) असे वाटते, की माझी सखी शकुंतलाच माझ्यासमोर उभी आहे.

भवभूतीच्या उत्तररामचरित व मालतीमाधव या दोन्ही नाटकांच्या प्रारंभी चित्रकलेचाच प्रसंग घातला आहे. उत्तररामचरितात रामचंद्राने सीतेच्या मनोविनोदनासाठी कुशल चित्रकाराकडून आपल्या जीवनातल्या विविध प्रसंगांची चित्रे काढून घेतली आहेत, तर मालतीमाधवात माधवाने आपल्या नायिकेचे चित्र स्वतःच चितारून आपल्या कलानैपुण्याचा परिचय घडवला आहे. हर्षाच्या रत्नावली नाटकाची नायिकाही चित्रकलाप्रवीण होती. तिने वत्सराज उदयन या आपल्या वल्लभाचे उत्कृष्ट चित्र चितारले होते.

प्राचीन भारतात वस्त्रांवर कामदेव, लक्ष्मी व देव–ऋषीमुनींची ध्यानावस्था, अशी चित्रे काढीत. या चित्रित वस्त्रांना कामदेवपट, लक्ष्मीपट, ध्यानपट, अशी नावे होती. लांबच्या लांब वस्त्रपट्टीवर आख्यानचित्रे किंवा देव–देवतांची चित्रे काढण्याचीही प्रथा होती. या वस्त्रपट्टीची गुंडाळी करून ती

रेशमी वस्त्राच्या खोळीत ठेवीत. अशा पटांना कुंडलितपट असे म्हणत. स्कंद पुराणाच्या काशीखंडात अशा एका चित्रपटाचे वर्णन आहे. हा चित्रपट म्हणजे समस्त काशीनगरीचा चित्ररूप नकाशाच होता. राजकुमारी कलावती हिने तो चित्रपट पाहिल्यावर तिला पूर्वजन्माचे स्मरण झाले, असे तिथे म्हटले आहे. अशाच प्रकारे घनपालकृत तिलकमंजरीत एका चित्रपटाचे लांबलचक वर्णन दिले आहे. हा चित्रपट गंधर्वक नावाच्या एका चित्रकाराने चितारलेला होता. त्यातल्या व्यक्तिरेखा इतक्या अप्रतिम होत्या, की एका राजकुमाराने त्या चित्रपटातली एक सुंदर कन्या पाहिली व त्याचे तिच्यावर मन जडले.


लंकेतील भित्तिचित्र

भारतीय चित्रकलेचा इतिहास—भारतीय चित्रकलेचा नेमका प्रारंभकाल सांगणे अवघड आहे. कारण आवश्यक त्या घटना नमूद करून ठेवण्याची प्रथा आपणाकडे नव्हती. पण भारतातही फार प्राचीन काळी चित्रकलेचा उगम झालेला होता, असे कित्येक सबळ पुराव्यांनी दाखवून देता येते. भारतात इमारतींच्या भिंतींवर, शिलाखंडांवर व लाकडावर चित्रकारी करण्याची प्रथा फार प्राचीन काळापासून होती. पण तशा प्रकारच्या सर्व इमारती व ती सर्व चित्रित लाकडे कालाच्या ओघात नामशेष झाली आहेत. प्राचीन कालची थोडीबहुत सामक्षा उरली आहे, ती गुहाचित्रांच्या रूपाने.


उत्तर नवपाषाणयुगातील चित्र – मिर्झापूर

भारतात अनेक ठिकाणी अशी गुहांवर व शिलाखंडांवर काढलेली रेखाचित्रे सापडली आहेत. या शिलाचित्रांची शृंखला बुंदेलखंड, मिर्झापूर, रायगढ, छोटा नागपूर आणि तिथून दक्षिणेत कर्नूलपर्यंत पसरलेली आहे. ही शिलाचित्रे हाच भारतीय चित्रकलेचा श्रीगणेशा असू शकेल. ही सर्व चित्रे शिकार आणि युद्ध या विषयीची आहेत.

भारतात बिल्लासुरगम येथील गुहा या सर्वांत प्राचीन आहेत. इ. स. १८४४ साली फॅक्टन न्यू बोल्ड या पाश्चात्य गृहस्थाने त्यांचा शोध लावला. या गुहांत रेषाचित्रांबरोबरच मातीच्या भांड्यांचे तुकडे आणि पशूंच्या अस्थीही मिळाल्या आहेत. दक्षिणेतील वायनाड येथील गुहा एडाकल गुंफा म्हणून ओळखल्या जातात. त्यांचा शोध इ. स. १९०१ साली श्री. फासेट यांनी लावला. या गुहांवर मानव व पशू यांची खोदीव चित्रे आहेत. या व्यतिरिक्त तिथे स्वस्तिक, चक्र, चतुष्कोण व तांत्रिक आकृत्या याही चित्रित केलेल्या आहेत. बिहारमधल्या सिंगभूम जिल्ह्यात घाटशिल्प नावाच्या ठिकाणी डॉ. पंचानन मित्र यांनी काही चित्रांचा शोध लावला आहे. ही चित्रे काळ्या पाषाणखंडावर काढलेली आहेत. कैमूर पर्वतराजीत आणखी काही प्रागैतिहासिक चित्रे मिळाली आहेत. ही चित्रेही शिलांवरच काढलेली आहेत. त्यातली अधिकांश दृश्ये शिकारीची आहेत. मिर्झापूर जिल्ह्यातल्या भलदरिया गावी कृष्णमृगाच्या शिकारीचे एक चित्र सापडले आहे. एक शिकारी दगडी भाल्याने एका हरिणीची शिकार करतो, असे एक चित्र शोण नदाच्या परिसरात टुप्पैचौरासी या गावी आहे. घोडामांगर या गावच्या गुहेतही शिकारीचेच दृश्य चित्रित केलेले आहे. या चित्रात कित्येक माणसे एकशिंगी गेंड्यावर आक्रमण करीत आहेत, गेंड्याने त्यांतल्या एका माणसाला शिंगाने उचलून वर फेकून दिले आहे आणि शिकारी लोकांचा सरदार पाठीमागून त्या गेंड्याच्या अंगात बरची खुपसतो आहे, असे दृश्य आहे.

बघेलखंडातल्या पहाडी गुंफांमध्ये गेरूने रंगवलेली चित्रकारी आढळली आहे. तिथे शिकारीची दृश्ये तर आहेतच; पण त्याबरोबरच तिथल्या गुहावासी लोकांच्या दैनंदिन जीवनातलीही दृश्ये आहेत.

मध्यप्रदेशातल्या रायगढ जवळच्या सिंघनपूर या गावी

गुहांच्या भिंतींवर व शिलाखंडांच्या पृष्ठभागांवर चितारलेली कित्येक चित्रे सापडली आहेत. ही चित्रे लाल गेरूच्या रंगाने रंगवलेली आहेत. शिकार, मानवसमूह, पशूंच्या आकृती व चित्रलिपी हे इथल्या चित्रकारीचे विषय आहेत. इथल्या एका दृश्यात शिकाऱ्याने घेरल्यावर त्याच्याशी सामना करायला सिद्ध झालेल्या अस्वलाचे चित्र आहे. या चित्रामधले मानवसमूहांचे रेखांकन चित्ताकर्षक व मनोहर आहे.



गुहेतील भित्तिचित्र – सिंघनपूर

प्रागैतिहासिक शिकारीचे चित्र – सिंघनपूर

रायगढच्या पर्वतराजीत जोगीमार नावाच्या काही गुहा आहेत. तिथल्या चित्रांना कलासमीक्षक विशेष महत्त्व देतात. त्यांतल्या मानवी आकृती, पशू, घरे, मूर्ती या गोष्टी फार सुंदर आहेत. तिथल्या चित्रकारीत काही कथाप्रसंगही चित्रित केलेले आढळतात. मात्र त्या कथांचे मूळ अद्याप सापडले नाही. या गुहेत काही अलंकृत चित्रपट्टचाही आहेत. त्याव्यतिरिक्त काही स्वतंत्र विषयांचेही रेखांकन आहे. उदा० वृक्षातळी बसलेली पुरुषांची एक टोळी व पुष्करणीमध्ये उभ्या असलेल्या नर्तकींची जोडी. या चित्रसमूहात काही वाहनेही आढळतात.

यानंतरचा कालखंड हा सिंधुसंस्कृतीचा आहे. मोहेंजोदडो व हडाप्पा ही सिंधुसंस्कृतीची दोन महत्त्वाची केंद्रे होत. या दोन्ही ठिकाणी चित्रकलेचे काही नमुने आढळतात. अर्थात ही चित्रकारी चर्म किंवा भूर्जपत्र यांवरची नसून मातीच्या गाडग्यामडक्यांवरची आहे. त्या संस्कृतीतले लोक आपल्या मातीच्या भांड्यांवर पशु-पक्ष्यांची चित्रे काढीत. तसेच चटया विणून त्याही चित्रांनी रंगवीत. जे तत्कालीन अवशेप सापडले आहेत, त्यांवरून त्या लोकांची कलाभिरुची कळून येते. प्रेमी जनांच्या अंतरातले भाव, नर्तकींच्या विविध मुद्रा, स्त्रियांच्या आकर्षक केशरचना, स्त्रियांच्या अंग-प्रत्यंगांची उभारी या गोष्टी त्यांच्या मूर्तींतून आणि चित्रांतून कलात्मक रीतीने व्यक्त झालेल्या दिसतात.

त्यानंतरचा कालखंड हा बौद्धधर्माच्या उत्कर्षाचा होय. इ.स. पूर्व तिसऱ्या शतकात इथे बौद्ध धर्माचा खूप प्रचार झाला आणि त्यावरोबरच चित्रकलेलाही महत्त्व प्राप्त झाले. त्या कालातील कलावंतांनी ज्या चित्रकृती निर्माण केल्या, त्या जरी व्यावहारिक जीवनातल्या असल्या, तरी त्यांची बैठक धार्मिकच होती. तत्कालीन चित्रकारांनी रंग–रेषांच्या द्वारे मानवी जीवन जसे चित्रित केले, तशीच धर्मचेतनाही जागवली. त्या कलेच्या मागे ईश्वरसेवेची भावना होती. इ. स. च्या पहिल्या शतकात कोरला गेलेला अमरावती येथील स्तूप या दृष्टीने अभ्यसनीय आहे. भारतात लेणी खोदण्याची परंपरा याच शतकापासून सुरू होते, असे म्हणायला हरकत नाही.

शिकंदरच्या स्वारीनंतर भारतीय चित्रकलेवर ग्रीक शैलीचा प्रभाव पडला. इ. स. च्या पहिल्या दोन तीन शतकात ग्रीक व भारतीय या उभय शैलींच्या मिश्रणाने काही कलाकृती निर्माण झालेल्या दिसतात. निर्भेळ भारतीय शैलीने कलाकृती निर्माण करणारे कलावंत याही काळात भारताच्या इतर भागांत होते.

अजंटा चित्रशैली— अजंटा लेण्यातली भित्तिचित्रे इ. स. च्या पहिल्या शतकापासून तो आठव्या शतकाच्या अखेरीपर्यंत

निर्माण झाली असावी, असे संशोधकांचे मत आहे. या चित्रांनी रसिकांच्या समोर एक सजीव अशी कलासृष्टी उभी केली आहे. या चित्रसृष्टीत माणसे आहेत, यक्षगंधर्व आहेत, रूपमती मानवी स्त्रिया, तशाच गंधर्वी–किन्नरी आहेत, राव–रंक आहेत, संन्यासी व विलासी आहेत, पर्वत, अरण्ये, नगरे, भवने वगैरे सर्व काही आहे. तत्कालीन चित्रकारांनी या गुंफांमध्ये विलासी आणि धार्मिक अशा उभयविध जीवनाच्या विविध अवस्था चितारून ठेवल्या आहेत. या गुंफांमध्ये भारतीय इतिहासाच्या सुवर्णयुगातली कला आपल्या संपूर्ण समृद्धीसह अवतीर्ण झाली आहे. या सर्व चित्रांकनात सर्वांत सुंदर आणि आश्चर्यजनक असे चित्र कोणाचे असेल, तर ते पद्मपाणी अवलोकितेश्वर याचे ! उंच मुकुट, कानी कुंडले, गळयात हार, दंडात बाहुभूषणे आणि मुद्रेवर जगाविषयींच्या करुणेचा भाव, अशा अवस्थेत हा पद्मपाणी तिथे उभा आहे.



हत्तींचा खेळ– अजंटा येथील भित्तिचित्र



पुलकेशीच्या दरबारात इराणी दूत –अजंटा

अजंटा येथील चित्रसृष्टीचा प्रभाव समग्र भारतावर तर पडलाच; शिवाय मध्यआशिया, ब्रह्मदेश, लंका, चीन व जपान या देशांवरही त्या चित्रकलेने आपली छाप टाकली. त्या देशातली चित्रकलाही अजंटा चित्रकलेचे भाव ग्रहण करूनच अभिव्यक्त झाली.

अजंटा येथील चित्रे सुशोभित पद्धतीची आहेत. या चित्रांत चित्रकारांनी ज्या गोष्टी चितारल्या, त्या निसर्गाचे अनुकरण नव्हे; तर नैसर्गिक आकारांना स्वतःच्या प्रतिमेने कलापूर्ण रूप देऊन चितारल्या आहेत. त्यांतल्या प्रभावी बाकदार रेषा त्या कलावंतांचे कौशल्य दाखवतात. त्यांतले भावदर्शन व रंगसंगतीही कलात्मक आहे. रेषांची मांडणी, रंगांचा समतोलपणा व विषयप्रतिपादन या दृष्टींनी आजही ही चित्रे श्रेष्ठ दर्जाची मानली जातात.

भारतीय चित्रकलेची परंपरा अजंटा येथील चित्रकलेपासून सुरू होते, असे म्हणायला हरकत नाही. अशाच प्रकारची सुंदर भित्तिचित्रे बाघ व दक्षिणेतील वदामी आणि सितन्नवासल या ठिकाणच्या गुहांमध्येही चितारलेली आहेत. अजंटाची प्रेरणा घेऊनच काही कलाकारांनी लंकेमध्ये सिगरिया या ठिकाणी एक कलाकेंद्र निर्माण केले. त्या ठिकाणी जी चित्रे निर्माण झाली, ती कलादृष्टीने असामान्य ठरली आहेत. या सर्व सुविख्यात कलातीर्थांच्या दर्शनासाठी आजही देशातल्या आणि विदेशातल्या रसिकांची रीघ लागलेली असते.

इ. स. च्या ८ व्या शतकानंतर भित्तिचित्रांची परंपरा हळूहळू लुप्त झाली. त्या जागी लहान पार्श्वभूमीवर छोटी छोटी चित्रे चितारण्याची परंपरा सुरू झाली. या परंपरेची दोन केंद्रे भारतात निर्माण झाली. पहिले केंद्र बंगालमध्ये इ. स. च्या ९ ते १२ या शतकांत व दुसरे केंद्र गुजरातमध्ये इ. स. च्या ११ ते १५ या शतकांत प्रतिष्ठित झाले. या चित्रकारांनी पुस्तके व निमंत्रणपत्रे यांच्या पृष्ठांवर छोटी छोटी सुंदर रंगीत चित्रे काढायला सुरुवात केली. बंगालमधील चित्रकलेचा प्रमुख विषय बुद्ध व बौद्ध धर्म हा होता. प्रज्ञापारमिता हा महायान बौद्ध संप्रदायाचा एक ग्रंथ आहे. त्याच्या कित्येक सचित्र प्रती, त्या भागात उपलब्ध झाल्या आहेत.

गुजराती चित्रशैली– गुजरातमधील कलाकेंद्रात प्रथम ताडपत्री पोथ्यांवर चित्रकर्म करीत. पुढे कागद उपलब्ध झाल्यावर त्यावर चित्रनिर्मिती सुरू झाली. या चित्रांची पार्श्वभूमी लाल रंगाची असते. चित्रातल्या चेहेऱ्याचा सगळा भाग न

दाखवता पाऊण भागच दाखवलेला असतो. त्यामुळे चित्रगत व्यक्तीचा एक डोळा चेहेऱ्याच्या बाहेर जातो. नाक तर अणकुचीदार असतेच; शिवाय सगळ्याच चित्राला एक प्रकारचा टोकदारपणा आलेला दिसतो. चित्रगत व्यक्तीच्या भोवतालचा भाग सजावटीने भरलेला असतो. सामान्यतः ही चित्रे लांबी-रुंदीत सव्वादोन इंचांची असतात. चित्रांचे विषयही विविध असतात. या शैलीतली प्राचीन चित्रे विशेषकरून जैन पोथ्यांवर व जैन धर्माविषयीचीच आहेत. उत्तरकालीन चित्रे वैष्णव संप्रदायाची आहेत. या चित्रांतील तांबड्या, निळ्या व सोनेरी रंगांची तरलता व नक्षीदार वस्त्रभूषा मोहक वाटते. ही गुजराती चित्रशैली पंधराव्या शतकाच्या मध्यापर्यंत आपल्या तेजाने तळपत होती. पुढे अकबराने या सर्व कलावंतांना आपल्या दरबारात ओढल्याने त्यांची गुजरातमधील परंपरा खंडित झाली. काश्मीरी शैली हे गुजराती शैलीचेच एक रूप आहे.



प्रकृति – चित्रण (सित्तनवासल)



करमा नृत्य – गुजराती चित्रशैली

बौद्धयुगात अवतीर्ण झालेल्या आणि गुप्तयुगात उत्कर्षाच्या शिखरावर पोचलेल्या भारतीय चित्रकलेची परंपरा पुढे इस्लामी आक्रमणामुळे काही काल खंडित झाली. चित्रकलेच्या बाबतीत इस्लामी संस्कृती मुळापासूनच उदासीन किंबहुना विरोधीच राहिली आहे. चित्रकलेबद्दल कुराणाने नापसंती व्यक्त केली आहे, हे या विरोधाचे कारण होय. धर्म या भावनेने चित्रकलेला फार मोठे प्रोत्साहन दिलेले आहे, हे आपण पाहतो. हिंदूंची मंदिरे, बौद्धांचे विहार आणि ख्रिस्ती लोकांची चर्चे यात उत्कृष्ट चित्रांचे नमुने पाहायला मिळतात. पण मुसलमानांच्या मशिदीत मात्र चित्रकलेचा सर्वस्वी अभाव असतो. इस्लामी आचार्यांनी चित्रकलेविषयीची कुराणातली नापसंती लोकांच्या मनात दृढमूल केली आणि कोणत्याही वस्तूवर कोणाचीही छबी अंकित करणे, हे इस्लामच्या विरुद्ध असल्याचे घोषित केले.

पण इ. स. च्या चौदाव्या शतकाच्या अखेरीस इस्लामी संस्कृतीत फार मोठे परिवर्तन घडून आले. चित्रलेखनाविषयी इस्लामी जनतेत जे एक धार्मिक भय होते, ते त्या कालापासून हळूहळू ओसरू लागले. या परिवर्तनाचा प्रभाव प्रथम ध्यानात येतो तो तैमूरच्या वंशजांच्या चित्रकलेत.

मोगल चित्रशैली– मोगल साम्राज्याचा जनक बाबर हा महत्वाकांक्षी होता, तसाच कवी आणि कलामर्मज्ञही होता. भारतात येताना त्याने जे वाङ्मय आपल्या बरोबर आणले, त्यात शाहीनामा हा एक ग्रंथ होता आणि विशेष म्हणजे तो सचित्र होता. इंग्रजांच्या आगमनापर्यंत शाहीनाम्याची ही पोथी शाहीपोथीखान्यात सुरक्षित होती. पुढे इंग्रजांनी ती आपल्या देशात नेली व लंडनच्या एशियाटिक सोसायटीत ठेवून दिली.

बाबराचा पुत्र हुमायून हाही कलाप्रेमी निघाला. अब्दुस्समद शिराजी व मीर सैयद अली या दोन पर्शियन चित्रकारांना त्याने चित्रकलेच्या अभिवृद्धीसाठी आपल्या दरबारात आणवले. या दोन चित्रकारांच्या हाताखाली पन्नास चित्रकार काम करीत होते व त्यांतले काही हिंदूही होते. या चित्रकारांनी इस्लामच्या श्रेष्ठ पुरुषांचे इतिहासग्रंथ चित्रित करण्याचे कार्य केले. पुढे त्यांनी इराणी शैली भारतीय शैलीत मिसळून चित्रकलेत एक नवी मोड निर्माण केली, तिलाच मोगल चित्रशैली म्हणतात.

हुमायुनाच्या नंतर त्याचा पुत्र अकबर याने चित्रकलेच्या क्षेत्रात याहून अधिक साहस दाखवले. त्याने इथपर्यंत घोषणा केली, की चित्रकार हाच परमेश्वराच्या विभूतीचे यथार्थ ज्ञान करून देणारा एकमेव गुरू किंवा उपदेशक आहे. त्याला चित्रकलेचे विलक्षण प्रेम होते. त्याच्या दरबारात दीडशे चित्रकार काम करीत होते. अकबर त्या चित्रकारांना मार्गदर्शन करी व त्यांनी काढलेली चित्रे आठवड्यातून एकदा तपासूनही पाही.

विशेष म्हणजे अकबर स्वतः नमुना-आकृती म्हणून चित्रकारांपुढे बसत असे व आपल्या उमरावांनाही बसवीत असे. अकबराच्या शासनकालात पोथ्या चितारण्याची प्रथा खूप वाढीस लागली. अकबराच्या पोथीखान्यात चौवीस हजार पोथ्या होत्या आणि त्यातल्या शेकडो चितारलेल्या होत्या.

अकबराला चित्रसंग्रह तयार करण्याचाही नाद होता. केवळ प्रणयकथांची चित्रे असलेला १३७५ चित्रांचा एक संग्रह त्याने तयार करून घेतला होता. या संग्रहाला हम्जानामा असे म्हणतात. त्यानेच तयार केलेला दुसरा १५६ चित्रांचा संग्रह रम्झा नामा या नावाने प्रसिद्ध असून, तो सांप्रत जयपूरच्या संग्रहालयात आहे.



मोगल शैलीचे चित्र

अकबरानंतर जहांगिराची कारकीर्द सुरू झाली. अकबराच्या काळात बाल्यावस्थेत असणारी मोगल शैली जहांगिराच्या काळात सर्वांगी विकसित झाली. या काळात या शैलीचे रंग, रचना, विषय व साहित्य हे सर्वच प्रकार कळसाला पोहोचले. जहांगिर स्वतः चित्रकार होता व चित्रपारखीही होता. त्याने चित्रकारांकडून एक नवी गोष्ट करवली व ती म्हणजे परदेशी कलावंतांच्या चित्रकृतींच्या नकला. ते काम करीत असतानाच त्याच्या दरबारी चित्रकारांवर पाश्चात्य चित्रशैलीचा प्रभाव पडला. त्यामुळेच छाया–प्रकाशाच्या छटा व यथार्थदर्शन (Perspective) हे दोन नवे गुण मोगल शैलीत दाखल झाले. त्यामुळेच त्यांच्या चित्रांना लांबी आणि रुंदी यांच्या बरोबरच खोलीही प्राप्त झाली. दुसरी महत्त्वाची गोष्ट म्हणजे जहांगिराच्या काळात व्यक्तिचित्रणाला फार महत्त्व आले. सपाट पार्श्वभूमीवर व्यक्तिचित्र चितारण्याची त्यांची मूळची पद्धत मागे पडून ते पार्श्वभूमीसाठी निसर्गदृश्यांचा उपयोग करू लागले. तत्कालीन चित्रातले निसर्गविभाग पाहिल्यास मोगल शैलीत निसर्गाचे खरेखुरे प्रतिनिधित्व आढळून येते.

चित्रविषयांच्या बाबतीतही जहांगिराचा काळ विविधतेचा आहे. राजेरजवाड्यांची ठरीव व्यक्तिचित्रे चितारण्यात अडकून पडलेला मोगल कलावंतांचा कुंचला त्या काळात बराच स्वतंत्र झाला. जहांगिरकालीन चित्रकारांनी राजाचे स्वागत, शिकारीचे प्रसंग, प्रार्थनेचे देखावे, राणीवशातल्या स्त्रिया, हत्ती, घोडे, वन्य पशु–पक्षी, हिंस्र प्राणी, असे अनेक चित्रविषय मोठ्या आवडीने हाताळले. आपल्या चित्रकलेत त्यांनी खूप विविधता आणली. अर्थात याही गोष्टीला जहांगिराचे रसिक मन, त्याचे निसर्गप्रेम व त्याची पशुपक्ष्यांची आवड या गोष्टीच कारणीभूत होत्या.

शहाजहानच्या काळात मोगल चित्रशैलीची पीछेहाट सुरू झाली. शहाजहानला वास्तुशिल्पाचा नाद होता. त्यामुळे त्याने चित्रकलेकडे दुर्लक्षच केले. याचा परिणाम असा झाला, की मोगल दरबारातले चित्रकार हळूहळू पोरके होऊ लागले. त्यांचा राजाश्रय तुटक होत चालला. शहाजहानच्या नंतर सत्तेवर आला औरंगजेब. तो तर ललितकलांचा कट्टर शत्रूच. त्याने दरबारातल्या सर्व कलावंतांना हाकलून लावले. मोगल दरबारातून हाकलले गेलेले हे चित्रकार राजाश्रय शोधीत इतस्ततः पांगले. कोणी राजस्थानात राजपुतांच्या आश्रयाला गेले; तर कोणी हिमालयात पहाडांच्या आश्रयाला गेले. या त्यांच्या निर्वासनातूनच पुढे राजपूत व पहाडी या चित्रशैलींचा जन्म झाला.



राजस्थानी व मोगल या शैलींचे मिश्रण

राजपूत चित्रशैली – मोगल दरबारातल्या चित्रकारांत राजपूत चित्रकारही बऱ्याच मोठ्या संख्येने होते. त्या दरबाराचा आश्रय तुटताच ते बुंदेलखंड, गुजरातचा काही भाग व राजस्थान

या प्रदेशांत आश्रयार्थ गेले. या भागात आल्यावरही त्यांनी आपली चित्रसाधना चालूच ठेवली. मोगल दरबारात त्यांना बादशहाच्या इच्छेप्रमाणे किंवा लहरीप्रमाणे आपला कुंचला चालवावा लागे. त्यांच्या स्वतःच्या म्हणून ज्या काही भावना व कल्पना होत्या, त्या चित्रांच्या द्वारे अभिव्यक्त करायला त्यांना तिथे अवसरच नव्हता. पण मोगली राजाश्रय सुटताच त्यांची प्रतिमा व कल्पकता स्वतंत्र झाली आणि त्यांनी हिंदू आचार विचारांशी जुळतील व हिंदूंच्या भावनांना संतोष देतील, अशी चित्रे काढायला सुरवात केली. या चित्रकारांचे बरेचसे आयुष्य इस्लामी संस्कृतीत गेले असल्यामुळे इस्लामी कल्पनांची पकड त्यांच्या मनावर बसली होती. त्यामुळे त्यांच्या कुंचल्याचे मूळचे वळण सुटले नाही. कलम मोगली पण अभिव्यक्ती हिंदू संस्कृतीची, यातून ज्या एका नव्या चित्रशैलीचा उगम झाला तिलाच राजपूत शैली असे नाव मिळाले.



नर्तकी – राजस्थानी शैली

त्या काळी रामानंद, तुलसीदास, चैतन्य, मीराबाई या संत मंडळींचे साहित्य लोकांच्या जिव्हाग्री खेळत होते. त्याच साहित्याने राजपूत कलाकारांना चित्रविषय पुरवले. याशिवाय रामायण-महाभारतातील कथाप्रसंग व गीतगोविंदादी काव्ये याही साहित्यांतून विषय निवडून राजपूत कलाकारांनी अनेक सुंदर चित्रे निर्माण केली.

राजपूत कलावंतांचा प्रतिभाविलास व कलात्मक आविष्कार मुख्यत्वे त्यांनी काढलेल्या रागमाला, बारमासा व सहा ऋतू या चित्रांत दिसून येतो. ही निर्मिती म्हणजे राजपूत कलावंतांचा खास ठेवा आहे. राग-रागिणींच्या स्वरलहरींनी निर्माण होणारे धुंद वातावरण रंग-रेषांच्या द्वारे प्राणवान करण्यात त्या कलावंतांनी दाखवलेली निपुणता आणि कल्पकता कोण्याही रसिकाला गुंगवून टाकील अशीच आहे. प्रत्येक महिन्याची वैशिष्टचेही त्यांनी तितक्याच कलात्मकतेने चितारली आहेत. निसर्गातील सहा ऋतूंची मानवाच्या अंतरातील षड्विकारांशी सांगड घालून प्रणयाच्या माध्यमातून त्यांचे दर्शन घडविण्यातही राजपूत चित्रकारांचा कुंचला समर्थ ठरला आहे.

पहाडी चित्रशैली – राजस्थानी भाव आणि संकेत यांतूनच पहाडी शैलीची निर्मिती झाली. जम्मू, टेहरी, गढवाल, बसोली, पठानकोट, गुलेर, चंपा, नूरपूर, कांगडा, कुलू, मंडी व सुकेत एवढ्या भागांत पहाडी शैलीचा विस्तार झाला. पहाडी चित्रशैली इ. स. च्या १७ व्या शतकाच्या मध्यावर निर्माण झाली आणि इ. स. च्या १८ व्या शतकात लोकप्रिय बनली. पहाडी शैलीच्या निर्मितीत मोगल, काश्मीरी व राजस्थानी या तीन्ही चित्रशैलींचा सहयोग आहे. पहाडी चित्रकारांचे एक असामान्य वैशिष्टच हे, की त्यांनी ज्या ज्या विषयांना स्पर्श केला, ते ते विषय आपल्या प्रतिभेने उज्ज्वल केले. त्या भागातील दैनंदिन जीवनाशी संबद्ध अशा अनेक विषयांसह पौराणिक, ऐतिहासिक, धार्मिक, काव्यमय, कथात्मक अशा सर्व विषयांवर पहाडी कलाकारांनी चित्रांचे ढीगच्या ढीग निर्माण केले. व्यास-वाल्मीकी यांच्यापासून मतिराम व बिहारी यांच्यापर्यंतच्या कवींच्या काव्यातून वि

निवडून त्यांनी आपली चित्रकला समृद्ध केली. म्हणूनच क



पहाडी शैलीचे चित्र

मर्मज्ञांनी अजंटा चित्रकलेच्या खालोखाल पहाडी शैलीलाच स्थान दिले आहे. इ. स. च्या १९ व्या शतकाच्या पूर्वार्धापर्यंत या शैलीने आपला चरमोत्कर्ष साधला. या शैलीविषयी प्रसिद्ध समीक्षक श्री. शचीरानी गुर्टू म्हणतात—

नायक-नायिकांच्या विविध मनोवस्था, त्यांचे क्रीडाविहार आणि जीवनोल्लास पहाडी चित्रकारांनी यथार्थपणे चित्रित केले आहेत. त्यांची रहस्यमय रंगयोजना त्यांच्या प्रत्येक चित्राला एक आगळे माधुर्य प्राप्त करून देते. ते कलाकार अंतःकरणवृत्तींचे जाणकार, कलात्मक सौंदर्याचे द्रष्टे, संवेदनशील, प्रणयलीलांचे रसिक आणि संयोगवियोगातल्या आंतरिक भावनांचे मर्मज्ञ असे होते. तसेच ते कलानिर्मितीच्या बाबतीत स्वतंत्र व स्वच्छंद होते.

बसौली, गढवाली व कांगडा या चित्रशैली पहाडी शैलीतच अंतर्भूत आहेत. पहाडी शैलीने कुंचला चालवीत असतानाच त्या चित्रकारांनी आपापली वैशिष्टचे निर्माण केली आहेत. बसौली चित्रशैलीत गती आणि शक्ती यांना विशेष स्थान आहे. या शैलीत उत्सुक भावनांचे प्रदर्शन चमकत्या रंग-रेषांनी दाखवले जाते. कांगडा शैली ही प्राधान्येकरून रेषेच्या सौंदर्याने नटली आहे. या शैलीतली बहुतेक चित्रे तरल, नाजूक व प्रवाही रेषांनी बनलेली आहेत. चित्रातले रंगही टवटवीत आहेत. बारा महिने, सहा ऋतू व दिवसाचे चौवीस तास यांतून प्रकट होणारे हिंदू स्त्रीचे जीवन आणि लावण्य हे कांगडा शैलीचे प्राणभूत तत्त्व आहे. वृक्ष-वल्ली, डोंगर-दऱ्या, निर्झर—प्रपात, पशु-पक्षी, फळे-फुले यांचा प्रतीकात्मक उपयोग करून मानवजीवनाचे दर्शन घडविण्यात कांगडा चित्रकारांनी कमालीची काव्यदृष्टी दर्शवली आहे.



गढवाली शैलीचे चित्र

भारतीय चित्रशैलीची वैशिष्टचे — भारतीय चित्रशैलीत यथार्थदर्शन नाही व भारतीय चित्रकार माणसे व झाडेसुद्धा कल्पनेनेच चितारतात, असे काही कलासमीक्षांचे प्राचीन चित्रकारांवर आक्षेप आहेत. पाश्चात्य चित्रे पाहण्याची सवय झालेल्या सामान्य दृष्टीला हे आक्षेप बरोबर वाटतात; पण विचारांती ते टिकणारे नाहीत. याविषयी श्री. म. ग. पातकर यांनी जे विवेचन केले आहे, त्याचा सारांश असा—

भारतीय चित्रे ही केवळ निसर्गाच्या अनुकरणाने निर्माण झालेली नाहीत, तर ती चित्रकारांच्या चिंतनातून निर्माण झाली आहेत. त्यांनी वस्तूच्या बाह्य दर्शनापेक्षा तिच्या भावात्मक दर्शनाला प्राधान्य दिले आहे. आपल्या अंतरातल्या भावनांचे प्रकटीकरण करण्यासाठी त्यांनी निसर्गातली दृश्ये ही प्रतीके म्हणून वापरली आहेत. म्हणूनच ते आपल्या चित्रात रंग व रेषा यांना महत्त्व देतात. यथार्थदर्शनामुळे निर्माण होणारी खोली व शारीरविज्ञानामुळे पडणारा रेषेतील खंड, या गोष्टी त्यांनी मान्य केल्या नाहीत. आणि या कारणामुळेच त्यांची चित्रे द्विमितीची बनली आहेत. सांप्रत पाश्चात्य चित्रकारही यथार्थ चित्रणाला गौण लेखू लागले आहेत, हे या संदर्भात लक्षात घेण्याजोगे आहे. अनुकरणापेक्षा निर्मितीला विशेष महत्त्व असते, हे कोणीही कबूल करील. त्या दृष्टीने ही भारतीय चित्रे पाहिली असता, ती निर्माण करणाऱ्या चित्रकारांबद्दलचा आदर द्विगुणित होतो.

निर्दोष रचना, सफाईदार व समतोल रंगयोजना, गतिमान वक्ररेषा, निसर्गातल्या वस्तूंचे बनवलेले सांकेतिक आकार व भावाविष्कार ही भारतीय चित्रपद्धतीची वैशिष्टचे होत. स्त्रीची आकृती चितारताना मत्स्याकृती डोळे, धनुष्याकृती भुवया, चाफेकळी नाक, अंड्यासारखा लंबवर्तुळ चेहरा, पुष्ट उरोभाग, सिंहाच्या सारखी कृश कटी व निमुळते पाय अशा प्रकारचे कल्पित सौंदर्याचे संकेत पाळणे, हाही भारतीय चित्रपद्धतीचा विशेष गुण आहे.

कलामर्मज्ञांनी चित्रकारांचे पुढील तीन वर्ग कल्पिलेले आहेत—पहिला वर्ग निसर्गाचे अनुकरण करण्याचा प्रयत्न करणाऱ्यांचा, दुसरा वर्ग या अनुकरणावर प्रभुत्व मिळविलेल्यांचा व तिसरा

वर्ग स्वतःच्या प्रतिभेने स्वतंत्र निर्मिती करणाऱ्यांचा. या तिसऱ्या वर्गालाच कलावंतांत श्रेष्ठ स्थान आहे. भारतीय चित्रशैली ही या तिसऱ्या वर्गातील कलावंतांची आहे, ही एकच गोष्ट तिचा श्रेष्ठपणा सिद्ध करण्यास पुरेशी आहे. चित्रकलेत पुढारलेल्या इटलीसारख्या देशातही भारतीय चित्रशैलीला मान आहे. सांप्रत तिथल्या अकादमीन भारतीय चित्रकलेसाठी स्वतंत्र विभागच उघडला आहे. अमेरिकेनेही जगप्रसिद्ध चित्रकारांचे संग्रह प्रसिद्ध करण्याचे ठरवले असून, त्या बाबतीत पहिला मान अजंटा-चित्रांना दिला आहे.



रविवर्म्याची चित्रकला

आधुनिक चित्रकला– भारतात इंग्रजांचे आगमन झाले आणि त्यांच्या अनेक गोष्टी भारतात स्वीकारल्या जाऊ लागल्या. त्यातच यथार्थदर्शन घडवणारी त्यांची चित्रपद्धतीही आपण स्वीकारली. पाश्चात्य चित्रशैलीला अनुसरून चित्रे काढणाऱ्या भारतीय चित्रकारांत राजा रविवर्मा हा प्रमुख चित्रकार होय. त्याच्याही पूर्वी मदुरा येथील चित्रकार श्री. अलाग्री नायडू याने या क्षेत्रात प्रसिद्धी मिळवली होती. राजा रविवर्म्याने त्याच्याकडूनच चित्रकलेचे धडे घेतले. रविवर्म्याने लोकांच्या श्रद्धेचे विषय निवडले व पाश्चात्यांच्या यथार्थदर्शनपद्धतीने ते चित्रांकित केले. त्यामुळे त्यांचा बोलबालाही खूप झाला. याच पद्धतीची कास धरणारे श्री. धुरंधर, आगास्कर, आचरेकर हे मोठे चित्रकार रविवर्म्यानंतर प्रसिद्धीस आले. पुढे पौर्वात्य व पाश्चात्य या उभय कलाशैलींचा समन्वय करून चित्रकलेत प्रसिद्धी मिळवणारे अनेक चित्रकार इ. स. च्या १९ व्या व २० व्या शतकात भारतात निर्माण झाले. विशेषतः बंगालने हा कलासमन्वय प्रामुख्याने साधला.

इ. स. १९१० साली कलकत्ता येथे श्री. हॅवेल व डॉ. अवनींद्रनाथ ठाकूर यांनी इंडियन सोसायटी ऑफ ओरिएंटल आर्ट नावाच्या संस्थेची स्थापना केली. या संस्थेचा प्रमुख उद्देश परंपरागत कलाशैली व नवी विचारप्रणाली यांच्या संगमातून एक वेगळी शैली निर्माण करणे, हा होता. हळूहळू या संस्थेने चित्रकलेच्या विद्यार्थ्यांना शिक्षण देण्याचीही सोय केली. कालांतराने या संस्थेतून नंदलाल बसू, क्षितींद्र मुजुमदार, असितकुमार हलदार, मुकुल दे, देवीप्रसाद राय चौधरी, इ. कित्येक प्रतिभाशाली चित्रकार उदयाला आले. या कलावंतांनी अनेक सुंदर चित्रे काढली आणि भावी कलाकारांना नवीन राष्ट्रीय जाणीव दिली. या कलाकारांचे शिष्य-प्रशिष्य भारताच्या भिन्नभिन्न भागात पोचले आणि त्यांनी आधुनिक चित्रकलेचा संदेश सर्वत्र पोचवला.



रविवर्म्याची चित्रकला

चित्रकलेचे हे नवोत्थान अभूतपूर्व होते, हे खरे; पण त्यात

काही दौर्बल्येही निर्माण झाली. या नव्या कलाकारांची भावना दुःखवादाकडे झुकणारी होती. आपल्या अंतरातला हा दुःखवाद आविष्कृत करण्यासाठी या कलाकारांनी आपल्या चित्रात मंद व धूसर रंग वापरले आहेत. या नवचित्रकलेतली प्रारंभीची चित्रे ही अशी दुःख–नैराश्याने ग्रासलेली होती. ती पाहिल्यानंतर असे वाटावे, की भारतीय समाजाचा जीवनविषयक दृष्टिकोन निराशात्मक किंवा पराभवात्मकच आहे. या युगातल्या कलाकारांचे चित्रविषयही मर्यादितच राहिले. पुराणे व महाकाव्ये यांतून त्यांनी प्रेरणा घेतल्या; पण वर्तमान व भविष्य या कालाविषयी औदासीन्यच दाखवले. अशा प्रकारे विसाव्या शतकाच्या प्रारंभीची ही चित्रकला वास्तवजीवनापासून थोडी बाजूलाच पडली, असे म्हटले पाहिजे.

पण या आधुनिक भारतीय चित्रकलेत क्रांती केली, ती सर्वश्री रवींद्रनाथ ठाकूर, गगनेंद्रनाथ ठाकूर, अमृता शेरगिल व यामिनी राय या कलावंतांनी. रवींद्रनाथांना जग विश्वकवी म्हणून ओळखते; पण आपल्या जीवनाच्या अखेरीच्या दहा वर्षांत चित्रकार म्हणूनच ते जगले. या एवढ्या कालात त्यांनी सुमारे दोन हजार चित्रे काढली. या सर्व चित्रांच्या रंग, रेषा, रूप, ताणाबाणा, इ. गोष्टी एकदम नवीन आहेत. त्यांची चित्रे प्रेक्षकाला अद्‌भुतशी वाटतात. त्यांनी रूपापेक्षा भावालाच अधिक प्राधान्य दिलेले दिसते. शैली व अभिव्यक्ती या गोष्टीत त्यांची सर्व चित्रे अजोड ठरली आहेत.


वीणावादिनी – नंदलाल बसू


रवींद्रनाथांची चित्रकला

भारतीय विषय पाश्चात्य क्यूबिक शैलीत गगनेंद्रनाथ ठाकूर यांनीच सर्वप्रथम मांडले. त्यांनी काळ्या-पांढऱ्या रंगांत चित्रित केलेल्या आकृती या रहस्यमय वाटतात. अमृता शेरगिल हिची शैली फ्रेंच इंप्रेशनिस्ट शैलीला जवळची होती. तिच्या चित्रात विषयांचे नावीन्य, तंत्राचा ताजेपणा, रंगातले चैतन्य व रेषेतली मर्मग्राहकता हे गुण प्रकर्षाने दिसतात. आणखी एक गोष्ट तिच्या चित्रकलेत दिसते, ती म्हणजे लाल रंग. तो रंग जणू तिचा जीवप्राण होता. वधूशृंगार, गणेशपूजा, ब्रह्मचारी, नीलवसना, ही तिची चित्रे अप्रतिम मानली जातात. यामिनी राय यांनी आपल्या कलेच्या आविष्कारासाठी बंगालमधील लोककलेचा मागोवा घेतला. कालीघाट येथील पटुआ चितेरे यांच्या चित्रकृतीत त्यांना आपल्या मनातील कलात्मक समस्यांचे उत्तर मिळाले. त्या चित्रकारांची सहज, सरल, पुष्ट व प्रवाही रेषा त्यांना आवडली व ती घेऊनच ते आपल्या कलासाधनेला लागले. वरील चारही कलाकारांनी जुन्या चित्रशैलींचा परित्याग केलेला दिसतो. पण या कलावंतांचा प्रभाव पुढील कलाकारांवर मात्र मुळीच पडला नाही.

भारताच्या स्वातंत्र्यप्राप्तीनंतर या देशात जी चित्रकला अवतीर्ण झाली, तिच्यामध्ये अनेक वैशिष्टचे दिसून येतात

विसाव्या शतकाच्या प्रारंभी भारतीय चित्रकलेला फ्रेंच चित्रकलेकडून प्रेरणा मिळत होती. स्वातंत्र्यानंतर ती प्रेरणा यंत्रयुगाकडून मिळत आहे. सांप्रत येथील चित्रकलेत अलंकरणाची प्रवृत्ती उत्पन्न झाली आहे. अलिकडे सामान्यत: मोठ्या आकाराची तैलचित्रे बनत आहेत. बंगाली कलाशैलीत पूर्वी चमकदार व भडक रंग तिरस्कृत होते; पण आता पुनश्च तशा रंगांना प्राधान्य मिळू लागले आहे. रंगयोजनेला प्राधान्य मिळाल्यामुळे रेषेला गौणत्व येऊ पाहत आहे. या आणि अशाच नव्या प्रवृत्तींनी प्रभावित झालेले कित्येक चित्रकार भारताच्या सर्व भागांत चित्रनिर्मिती करीत आहेत.

आधुनिक चित्रकारांचे कित्येक वर्ग कलकत्ता, मुंबई व दिल्ली या नगरांत काम करताना दिसतात. कलकत्त्याच्या नवचित्रकारांचा एक समूह प्रसिद्ध आहे. हे सगळे कलाकार कलकत्त्याचेच आहेत, असे नाही. त्यांतले कित्येक बाहेरून आलेले आहेत व कित्येक बाहेर गेलेलेही आहेत. परंतु या सर्वांवर एक विशिष्ट प्रभाव आहे. हे कलाकार आजच्या वैज्ञानिक प्रगतीकडे जागरूकपणे पाहतात. ते परंपरावादाचे विरोधक असूनही मानवतेचे उपासक आहेत. या समूहामधल्या चित्रकारांत रथीन मैत्र, गोपाल घोष, सुनील माधव सेन, गोवर्धन आशू, हेमंत मिश्र, परितोष सेन, इ. प्रमुख आहेत. यांच्या आदर्शात समानता असूनही कलाकृतींत वेगळे व्यक्तिमत्त्व आढळते.



यामिनी राय यांची कलाकृती



समस्या – चावडा यांची चित्रकला

मुंबईतही चित्रकारांचा एक उत्कृष्ट संच आहे. पण हे सगळे एका वर्गाचे नाहीत. प्रत्येकाची गुरुकुले वेगवेगळी आहेत. यात बेंद्रे, दलाल, मुळगावकर, अहिवासी, यज्ञेश, शुक्ल, माळी, रावळ, चावडा, सातवळेकर, गोडसे ही नावे प्रसिद्ध आहेत. यांच्या व्यतिरिक्तही एक प्रगतिशील असा वर्ग आहे. त्यात हुसेन, फ्रान्सिस, न्यूटन, सूजा, आरा, रजा, गोडे, अकब्रर, पदमसी, लक्ष्मण पै, इ. नावे महशूर आहेत. हे लोक तंत्र व विषय या दोन्ही गोष्टींत पूर्ण स्वातंत्र्य घेऊन चित्रप करीत आहेत. ते आपली कला कोणत्याही नियमांच्या चौकटीत बंदिस्त करून घ्यायला तयार नाहीत.

दिल्लीतही चित्रकारांचा एक मोठा संच आहे. ते कोण्या विशिष्ट वर्गाचे नाहीत. आपल्या वैयक्तिक प्रतिभेला अनुसरून ते आपली कलासाधना करतात. दिल्लीच्या या चित्रकारांत शैलोज कुलकर्णी, भवेश सान्याल, कंवलकृष्ण, सतीश गुजराल, शैलोज मुखर्जी, वीरेन दे, दिनकर कौशिक, आर्यन, बद्री, रामकुमार ही नावे प्रमुख आहेत.

दक्षिणेतही चित्रकारांची एक नवी पिढी तयार होत आहे. दक्षिणेच्या कलाकारांत माधव मेनन, नरसिंहमूर्ती, श्रीनिवासन, धनपाल व रामगोपाल ही नावे प्रामुख्याने ऐकू येतात.

संक्षेपात सांगायचे तर, आजच्या कलाकारांच्या प्रवृत्ती काही ठिकाणी पूर्वपरंपरेचा आधार घेऊन आधुनिक जीवनाची व्याख्या करताना दिसतात. कित्येक चित्रकार पाश्चात्य कलाकेंद्रांपासून प्रेरणा घेऊन आपली कला सजवतात; तर कित्येक कलाकार लोककलांच्या आधारावर नवनिर्माण करण्याचा प्रयत्न करतात.

या विविध प्रवृत्ती पाहिल्या म्हणजे भावी भारतीय चित्रकला कोणते वळण घेईल, ते आज निश्चित सांगणे कठीण आहे. एवढेच सांगता येईल, की या कलाकारांमध्ये जीवनाच्या यथार्थ चित्रणाविषयी उत्साह आहे व नवे प्रयोग करण्याचे धाडसही आहे. यातूनच भारतीय चित्रकलेचा नवा आविष्कार होईल. [म. ज्ञा. को.; भा. प. क.; रूप-सौंदर्य– प्रा. म. ग. गातकर; भारतीय चित्रकला की कहानी– भगवतशरण उपाध्याय;' रामचंद्र टंडन, वाचस्पती गैरोला, ठाकुरदत्त मिश्र, डॉ. वासुदेवशरण अग्रवाल, शचीरानी गुर्टू–– सम्मेलन पत्रिका–कलाअंक, १९५८; राजेंद्रविहारी पांडेय, रामप्रताप त्रिपाठी शास्त्री – त्रिपथगा – चित्रकला विशेषांक, नोव्हें. १९६२]



लक्ष्मण पै यांची चित्रकला

चित्रकार ओडिया चित्रकारांचा एक वर्ग. यांना वस्त्रागरा असेही म्हणतात. हे चित्रकार स्वतःला सूर्यवंशी क्षत्रिय मानतात व गळयात जानवे घालतात.

सोन्याचा मुलामा देणे, ट्रंका, पालख्या, इ. तयार करणे, मंदिरे व रथ यांच्यासाठी लाकडी मूर्ती तयार करणे, मातीची खेळणी व वेताचे पाळणे रंगविणे, खांबांवर नरसिंहाची चित्रे काढणे, लक्ष्मी, गौरी इ. देवतांचे मुखवटे तयार करणे, इ. कामे हे करतात. [का. ट्रा. स. इं.]

चित्रकूट एक पवित्र पर्वत. हा पर्वत बुंदेलखंडातल्या बांदा जिल्ह्यात आहे. झाशी–मणिपूर रेल्वेच्या फाटयावर चित्रकूट नावाचे एक स्टेशनच आहे. तिथून चार मैलांवर हा पर्वत आहे. रामायण, महाभारत, इ. अनेक ग्रंथांतून या पर्वताचे उल्लेख आले आहेत. रामचंद्राने काही काळ इथे वास्तव्य केले होते. याचे स्थानमाहात्म्य सांगताना वाल्मीकी म्हणतो–

> यावतां चित्रकूटस्य नरः शृङ्गाण्यवेक्षते ।
> कल्याणानि समाधत्ते न मोहे कुरुते मनः ।।
> (वा. रा. २.५४.३०)

अर्थ – मनुष्य चित्रकूटाची जितकी शिखरे पाहील, तितकी त्याला कल्याणमंगले प्राप्त होतील. त्याचे मन मोहात सापडणार नाही.

या पर्वताचे हे पावित्र्य जाणूनच की काय ब्रह्माविष्णुमहेशांनी चंद्र, दत्तात्रेय व दुर्वास यांच्या रूपाने इथे जन्म घेतला. अत्रि-ऋषींचा आश्रम इथेच आहे.

श्रीरामाच्या पदचिह्नांनी भूषित झालेल्या चित्रकूट या पुण्यक्षेत्रात धर्मराजाने विधियुक्त तप आचरले व नलराजानेही इथेच तप करून आपले गेलेले राज्य परत मिळवले.

'मी तुला कुठे कुठे पाहावे,' असा ब्रह्मदेवाने विष्णूला प्रश्न विचारला असता, विष्णूने जी जी स्थाने सांगितली, त्यांत चित्रकूट हेही एक स्थान सांगितले आहे.

रामायणकाली या पर्वताचा विस्तार दहा कोसांचा होता, असे कळते. कामतानाथ, सीतारसोई, प्रमोदवन, स्फटिकशिला, गुप्त गोदावरी, जानकीकुंड, भरतकूप, हनुमानधारा व रामशय्या ही इथली स्थळ प्रसिद्ध आहेत. हनुमानधारेच्या पाण्याने स्नान केले असता कुष्ठादी रोग नष्ट होतात व प्रमोदवनातील पुत्रीवृक्षाला प्रदक्षिणा घातल्याने वंध्येलाही पुत्रप्राप्ती होते, असे सांगितले आहे.

रामनवमी, दिवाळी व कार्तिकी अमावास्या या तिथींना, त्याचप्रमाणे ग्रहणाच्या दिवशी इथे मोठी यात्रा भरते. [कल्याण–तीर्थांक; सु. वि. को.; युगप्रभात, १ मे १९६२]

चित्रगुप्त एक देव. प्राण्यांच्या पापपुण्याचा हिशेब ठेवणारा यमाच्या दरबारातील एक अधिकारी. याच्या उत्पत्तीविषयी दोन कथा प्रसिद्ध आहेत, त्या अशा––

(१) एकदा ब्रह्मदेव ध्यानस्थ बसला असता, त्याच्या अंगातून एक चित्रवर्ण पुरुष निर्माण झाला. त्याच्या एका हाती दौत व दुसऱ्या हाती लेखणी होती. त्याच्या चित्रविचित्र वर्णावरून त्याला चित्रगुप्त असे नाव पडले. तो ब्रह्मदेवाच्या कायेपासून (देह) उत्पन्न झाला, म्हणून त्याला कायस्थ असेही म्हणू लागले. उत्पन्न होताच त्याने 'आपल्याला काम कोणते' असे ब्रह्मदेवाला विचारले. ब्रह्मदेव पुनश्च ध्यानस्थ झाला. ध्यान संपल्यावर त्याने चित्रगुप्ताला म्हटले. 'तू यमलोकात जा व तिथे येणाऱ्या जीवांच्या पाप-पुण्याचा हिशेब कर.' चित्रगुप्ताने ते मान्य केले व तो यमलोकी गेला. त्याला अंबष्ठ, माथुर,

गौड, इ. नऊ पुत्र झाले.

(२) मित्र नावाचा एक कायस्थ गृहस्थ होता. त्याला चित्रगुप्त व चित्रा अशी दोन अपत्ये झाली. मित्राचा मृत्यू होताच त्यांची पत्नी सती गेली. मग ही दोन पोरकी मुले प्रभासक्षेत्री येऊन सूर्याची आराधना करू लागली. त्या आराधनेतून चित्रगुप्ताला ज्ञानप्राप्ती झाली. त्याचे ज्ञान पाहून यमाने त्याला आपल्या कचेरीत लेखक म्हणून नेमले. पुढे याने यमाला धर्माचे रहस्य सांगितले. चित्रेने मग चित्रगुप्तासाठी एक विशाल भवन निर्माण केले. त्या भवनातली कारागिरी पाहून विश्वकर्म्याला असूया उत्पन्न झाली.

यमलोकाजवळ चित्रगुप्ताचा चित्रलोक असल्याचे गरुड पुराणात सांगितले आहे. कार्तिक शुद्ध द्वितीयेला यमपूजा होते, त्या वेळी चित्रगुप्ताचीही पूजा करतात. शापग्रस्त सुदास राजा चित्रगुप्ताची पूजा करून स्वर्गाचा अधिकारी बनला. भीष्मानेही इच्छामरणाचा वर चित्रगुप्ताकडूनच मिळवला. कायस्थ लोक चित्रगुप्ताला आपला पूर्वज मानून त्याची पूजा करतात.

उज्जयिनीच्या पंचक्रोशीत कायथा या गावी चित्रगुप्ताचे एक प्राचीन मंदिर आहे. मंदिराजवळ एक चौथरा आहे. या चौथऱ्यावर चित्रगुप्ताने यज्ञ केल्याचे सांगतात. त्याच क्षेत्रात सांदीपनीच्या आश्रमाजवळ एक शिला आहे. चित्रगुप्त आपल्या दोन स्त्रिया व बारा पुत्र यांच्यासह त्या शिलेवर अंकित आहे. इथे यमद्वितीयेच्या दिवशी मोठी यात्रा भरते. [प्रा. च. को.; हिं. सा. को.; कल्याण–तीर्थांक]

चित्रगुप्तमंत्र पुढील अडतीस अक्षरी मंत्र हा चित्रगुप्तमंत्र म्हणून सांगितला आहे––

ॐ नमो विचित्राय धर्मलेखकाय यमवाहिकाधिकारिणे
य् म् ल् व् र् य् ऊं जन्मसंपत्प्रलयं कथय कथय स्वाहा।

या मंत्राचा विधी असा––

मंत्रांतील अक्षरांनी षडंगन्यास करतात. मग चित्रगुप्ताचे पुढील मंत्राने ध्यान करतात––

किरीटोज्ज्वलं वस्त्रभूषाभिरामं
विचित्रासनासीनमिन्दुप्रभास्यम् ।
नृणां पापपुण्यानि पत्रे लिखन्तं
भजे चित्रगुप्तं सखायं यमस्य ।।

अर्थ–मुकुटाने उज्ज्वल, वस्त्रभूषणांनी सुंदर, विचित्र अशा आसनावर बसलेला, चंद्रासारखे ज्याचे मुख आहे असा, मनुष्यांची पापपुण्ये पत्रावर लिहिणारा व यमाचा मित्र अशा चित्रगुप्ताला मी भजतो.

या मंत्राचा जप करणाऱ्या साधकावर चित्रगुप्त प्रसन्न होतो व त्याच्या पुण्याचीच तेवढी नोंद ठेवून पापाची नोंद ठेवीत नाही, असे सांगितले आहे. [मं. म.]

चित्रधासी द. भारतातील एक जात. पितळेचे व काशाचे दागिने तयार करणे, हा या लोकांचा व्यवसाय आहे. यांना अस्पृश्य मानतात. त्यामुळे यांची वस्ती गावापासून दूर असते. हे लोक अशुद्ध ओडिया भाषा बोलतात.

विवाहप्रथा – मुलगी वयात आल्यावर तिचा विवाह करतात. आते-मामे भावंडांचा विवाह होतो. वराकडील मंडळी थोडी दारू व तांदूळ घेऊन वधूच्या घरी जातात. तिथे या वस्तूंचा वधूपित्याकडून स्वीकार झाल्यास लग्न निश्चित होते. वराच्या दारात लग्न करतात. धाकट्या दिराला थोरल्या विधवा भावजयीशी लग्न करता येते. जर तिने दुसऱ्या माणसाशी लग्न केले, तर तिला धाकट्या दिराला एक गाय द्यावी लागते.

मर्तिकप्रथा – हे लोक प्रेते जाळतात आणि फक्त तीन दिवस सुतक पाळतात. या काळात सर्व कामधंदा बंद ठेवतात. तिसऱ्या दिवशी रक्षा गोळा करतात व मृताप्रीत्यर्थ कोंबडे बळी देतात. [का. ट्रा. स. इं.]

चित्रनाट्यम् द. भारतातील एक नृत्यप्रकार. या नृत्यासाठी बारीक वाळू जमिनीवर अथवा सतरंजीवर पसरतात. मग नर्तक आपल्या साथिदारांबरोबर नृत्य सुरू करतो. त्याच्या पदन्यासाने पायाखालची वाळू अशा प्रकारे विखुरली जाते, की नृत्य पूर्ण झाल्यावर त्या विखुरलेल्या वाळूतून सिंहाचे चित्र निर्माण व्हावे. म्हणूनच या नृत्यातला नर्तक कुशल व बुद्धिमान असावा लागतो. [डि. सा. इं. म्यु. म्यु.]

चित्रभानुपदद्वयव्रत हे एक अयनव्रत आहे. उत्तरायणाच्या आरंभापासून ते संपेपर्यंत हे व्रत करतात. याचा विधी असा–

रोज सकाळी दुधातुपाने सूर्याला स्नान घालून त्याची पूजा करतात. नंतर सूर्यनामाचा जप व होम करतात. दक्षिणायन लागल्यावर मार्तंडाच्या कथेचे वाचन व व्रतसांगता करतात. फल– सूर्यपदाची प्राप्ती. [हि. ध.; कृ. क.]

चित्रभानुव्रत एक काम्य व्रत. कोणत्याही महिन्याच्या शुद्ध सप्तमीस हे व्रत करतात. यात सूर्याला तुपाचा अभिषेक करायचा असतो. सूर्यपूजेत तांबडी सुवासिक फुले आवश्यक असतात. फल– आरोग्यप्राप्ती. [हि. ध.]

चित्रयोगम् मलयाळम् भाषेतील एक महाकाव्य. वल्लतोळ हा याचा कर्ता होय. कथासरित्सागरातील मंदारवती-सुंदरसेन या प्रेमी युगुलाच्या कथेवर हे महाकाव्य आधारलेले आहे. हे महाकाव्य समस्त काव्यलक्षणांनी युक्त असल्यामुळे केरळीय काव्यसंभारात याला एक विशेष स्थान प्राप्त झाले आहे. [कॅ. सा. द.]

चित्रा अश्विन्यादी सत्तावीस नक्षत्रांतले चौदावे नक्षत्र. चित्रेची एकच तारका आहे. हे नक्षत्र आयनिक वृत्ताच्या दक्षिणेस अगदी जवळच आहे. या नक्षत्रांचे पहिले दोन चरण कन्या राशीत व पुढचे दोन चरण तुला राशीत येतात. त्वष्टा ही याची देवता असून, हे नक्षत्र तिर्यङ्मुख आहे. मृदू व मैत्र अशी त्याची रूपसंज्ञा आहे.

चित्रा ही मोहक पारव्या रंगाची आहे. चंद्र-रोहिणीप्रमाणेच चित्रा-चंद्राचाही अगदी जवळून समागम होतो. चैत्रपौर्णिमेस चित्रा-चंद्राची युती होते. कालिदासाने एकाच रथात बसून गुरूकडे जाणाऱ्या दिलीप आणि सुदक्षिणा यांच्यासाठी चित्रा-चंद्राचे उपमान वापरले आहे––

काप्यभिख्या तयोरासीद् व्रजतोः शुद्धवेषयोः ।
हिमनिर्मुक्तयोर्योगे चित्राचन्द्रमसोरिव ॥

(रघु. १·४६)

अर्थ – विशुद्ध वेष परिधान करून दिलीप व सुदक्षिणा ही चालली असता, हिमकालानंतर चित्रा व चंद्र यांचा योग व्हावा, त्याप्रमाणे त्यांची विशेष शोभा दिसत होती.

वैदिक वाङ्मयात चित्रा नक्षत्राची एक मजेदार आख्यायिका आली आहे, ती अशी––

देवांनी यज्ञ केला आणि ते स्वर्गाचे अधिकारी बनले. मग असुरांनीही विचार केला, की यज्ञाने जर स्वर्ग मिळत असेल, तर तो आपणही करावा. ते त्या तयारीला लागले. त्यांनी विटा गोळा करून चयनाची उभारणी सुरू केली. ते पाहून इंद्र घाबरला. तो ब्राह्मणाचे रूप घेऊन असुरांकडे आला. त्याच्या हातात एक सोन्याची वीट होती.

"मी गरीब ब्राह्मण ! माझ्या हातून यज्ञ होणे शक्य नाही. तुम्ही माझी एवढी वीट जर चयनात मांडलीत, तर मला तेवढेच पुण्य मिळेल व मीही तुमच्याबरोबर स्वर्गात येईन."

असुरांना त्या ब्राह्मणाची करुणा आली आणि त्यांनी ती वीट चयनात मांडली. आता यजन कर्म सुरू व्हायचे, एवढ्यात त्या ब्राह्मणाचे मन बिथरले. त्याने आपली वीट परत मागितली, आकस्ताळेपणा करून असुरांना क्षणभर स्तिमित केले व ती वीट चयनातून निखळवून आकाशात भिरकावली.

ती भिरकावलेली सोन्याची वीट हेच चित्रा नक्षत्र होय. त्यामुळे असुरांचा यज्ञ मोडला. त्यांना स्वर्गप्राप्ती झाली नाही.

चित्रा हे यज्ञसाधक नक्षत्र मानलेले आहे. प्राचीन काळी अश्वमेधाचा संकल्प या नक्षत्रावरच करीत.

या नक्षत्री जन्म घेणारा मनुष्य कसा बनतो, ते कोष्टीप्रदीप या ग्रंथात सांगितले आहे––

प्रतापसन्तापितशत्रुपक्षो
दक्षो नये चापि विचित्रवासाः ।
प्रसूतिकाले यदि यस्य·चित्रा
बुद्धिर्विचित्रा खलु तस्य शास्त्रे ॥

अर्थ – चित्रा नक्षत्रावर जन्म घेतलेला मनुष्य प्रतापी, शत्रूला नामोहरम करणारा, न्यायदक्ष, विचित्र वस्त्रांची आवड असलेला आणि ज्याची बुद्धी शास्त्रात विचित्रपणे काम करू शकते, असा होतो.

चित्रा हे नक्षत्र आपल्यापासून १२० प्रकाशवर्षांच्या अंतरावर आहे, असे ज्योतिर्विद सांगतात. [नक्षत्रलोक; श. क.]

चित्रापौर्णमी द. भारतात चैत्रपौर्णिमेस म्हणजेच चित्रा नक्षत्रावर जो उत्सव केला जातो, त्याला चित्रापौर्णमी म्हणतात. या उत्सवात शिव व चित्रगुप्त यांची पूजा करतात. या दिवसाचे महत्त्व सांगणारी एक कथा तमिळ पुराणात आहे, ती अशी––

एकदा इंद्राने बृहस्पतीचा अपमान केला. त्यामुळे बृहस्पती इंद्रलोकाचा त्याग करून निघून गेला. इंद्र आधीच उच्छृंखल झाला होता आणि आता बृहस्पती निघून गेल्यामुळे तो पूर्ण स्वैराचारी बनला. पुढे काही कालाने बृहस्पतीचा राग शांत झाला व तो इंद्राकडे परत आला. त्या वेळी इंद्राकडे पाहून त्याला वाटले, की तो पापकर्दमात रुतला आहे. म्हणून मग बृहस्पतीने त्याला तीर्थयात्रेस पाठवले. इंद्राने अनेक तीर्थे केली. फिरत फिरत एका ठिकाणी आल्यावर त्याला वाटले, की आपली सर्व पापे नष्ट झाली आहेत. पापमुक्तीचा हा साक्षात्कार आपणास एकाएकी का झाला, म्हणून तो आजूबाजूला पाहू लागला. एवढ्यात त्याला जवळच एक शिवलिंग दिसले. इंद्राला वाटले, की या शिवलिंगाच्या सान्निध्यामुळेच आपली पापे नष्ट झाली. मग त्याने त्या शिवलिंगाची पूजा केली व त्यावर एक मंदिरही बांधले. तो दिवस चैत्र पौर्णिमेचा होता. त्या दिवसापासून लोक पापमुक्तीसाठी शिवपूजेचा उत्सव करू लागले.

कुट्टालम् पर्वतावर उगम पावणारी चित्रा नदी याच दिवशी प्रकट झाली, असे म्हणतात. म्हणून त्या दिवशी त्या नदीत स्नान करणे पुण्यप्रद मानतात. [सा. इं. फे.]

चित्राहुती

भोजनास सुरवात करण्यापूर्वी ब्राह्मण मंडळी आपल्या उजव्या हाताला पानाच्या शेजारी जमिनीवर ज्या आहुती घालतात, त्यांना चित्राहुती म्हणतात. पानातलाच थोडा भात घेऊन त्याने या आहुती चित्र, चित्रगुप्त, यम, यमधर्म आणि सर्व भूते, यांच्या नावाने घालायच्या असतात. पाहा – भोजनविधी.

चित्रिणी

पद्मिन्यादी नायिकांपैकी एक नायिका. हिच्या अंगाला मत्स्यगंध येतो, असे सांगतात. रतिमंजरीत हिचे वर्णन दिले आहे, ते असे––

भवति रतिरसज्ञा नातिदीर्घा न खर्वा
तिलकुसुमसुनासा स्निग्धदेहोत्पलाक्षी।
कठिनघनकुचाढ्या सुन्दरी सा सुशीला
सकलगुणविचित्रा चित्रिणी चित्रवक्त्रा॥

अर्थ– चित्रिणी स्त्री ही रतिरस जाणणारी, फार उंच नाही वा ठेंगणी नाही, अशी मध्यम बांध्याची, तिलपुष्पासारख्या सुरेख नाकाची, स्निग्ध देहाची, कमलनयना, घनस्तनी, सुंदर, सुशील, सर्वगुणसंपूर्ण व चित्रवदना असते.

चित्रेष्टी

एक इष्टी. पशू व संतती यांच्या समृद्धीसाठी ही इष्टी करतात. अग्नी, सोम, त्वष्टा, सरस्वान, सरस्वती, सिनीवाली व इंद्र अशा सात देवता या इष्टीत असतात. या इष्टीत काही उपहोम करायचे असतात. हिचे तंत्र दर्शपूर्णमासाप्रमाणेच असते. [विद्याधरशास्त्री भिडे]

चित्सुखाचार्य

(इ. स. चे १२ शतक). एक प्रख्यात वेदान्ताचार्य. यांच्या गुरूचे नाव ज्ञानोत्तम असे होते. तत्त्वप्रदीपिका हा चित्सुखाचार्यांचा सर्वांत महत्त्वाचा ग्रंथ आहे. या ग्रंथाला चित्सुखी असेही म्हणतात. अद्वैतवेदान्ताचा हा एक प्रमाणग्रंथ मानला जातो.

याशिवाय भावप्रकाशिका (शारीरक भाष्यावरची टीका), अभिप्रायप्रकाशिका (ब्रह्मसिद्धीवरची टीका), भावतत्त्वप्रकाशिका (नैष्कर्म्यसिद्धीवरची टीका), भावद्योतिनी (पंचपादिका विवरणाची व्याख्या), न्यायमकरंदटीका, प्रमाणरत्नमाला–व्याख्या, खंडनखंडखाद्यव्याख्यान, अधिकरणसंगती, अधिकरणमंजरी इ. छोटे मोठे ग्रंथ यांच्या नावावर आहेत. [शंकराचार्य]

चिथरिया

उ. प्रदेशातील आदिवासींची एक देवता. हिच्या नावाने फाटक्या चिंध्या झाडाला बांधलेल्या असतात. [फो. लो. नॉ. इं]

चिदंबर दीक्षित

(१७५८ – १८१५ इ. स.) एक सिद्ध पुरुष व कवी. यांना अवतारी पुरुष मानतात. चिदंबर दीक्षितांचे घराणे मूळ विजापूर जिल्ह्यातील गोठे गावचे. यांचे पूर्वीचे उपनाम जोशी व कुलदैवत खंडोबा हे होते. चिदंबर महाराजांचे वडील मार्तंड दीक्षित यांनी सोमयाग केला होता, म्हणून त्यांना दीक्षित हे उपनाम प्राप्त झाले. हे शुक्लयजुर्वेदाच्या काण्वशाखेचे ब्राह्मण होत.

कर्नाटकातील मुरगोड या गावी चिदंबर महाराजांचा जन्म झाला. तिथेच त्यांचे काही काळ वास्तव्य होते. त्यांनी अवतार का घेतला, याचे कारण सांगतांना महाराजांचे प्रसिद्ध शिष्य राजारामबोवा म्हणतात–

बहुत कठिण कली हा दुर्धर।
भ्रष्टवी आचार चहूवर्ण॥ १॥
मुख्य वर्ण तोही आचार लोपला।
इतर यातीला पुसे कवण॥ २॥
वर्ण आश्रमाचा झाला कर्मलोप।
कलि महापाप वर्ततसे॥ ३॥
ह्यालागीं अवतार धरिला चिदंबर।
ब्राह्मण आचार अंगे वर्ते॥ ४॥
अनंत जनांच्या उद्धारालागून।
मूर्ति हे सगुण प्रगटली॥ ५॥

चिदंबर दीक्षित हे अवतारी पुरुष आहेत, अशा समजुतीने शेकडो लोक त्यांच्या दर्शनार्थ येऊ लागले. तेव्हा आई-बापांनी त्यांना विनंती केली, 'की आम्ही उभयता देह ठेवीपर्यंत तू आपला अवतारीपणा प्रगट करू नकोस.' मुलाने ही आज्ञा पाळली.

पुढे चिदंबर गृहस्थाश्रमी झाले. सरस्वती व सावित्री नावाच्या त्यांना दोन बायका होत्या. सहा मुलगे व एक मुलगी अशी एकूण सात अपत्ये त्यांना झाली. मुरगोड इथे मोठी पाठशाळा स्थापन करून त्यांनी ज्ञानदान व धर्मसेवा करीत काही वर्षे घालवली. पुढे तिथल्या देसायाने लिंगोपंत नावाच्या एका ब्राह्मणाची हत्या केल्यामुळे सदर गाव अपवित्र झाले, असे समजून महाराजांनी मुरगोड सोडले. तिथून निघून ते देवलापूर, हुबळी, हिपरगी, कुंदगोळ, नवलगुंद, इ. गावांत संचार करीत राहिले. नवलगुंद येथे स्वामींनी इ. स. १८०७ साली एक यज्ञ केला. दुसरे बाजीराव पेशवे, रास्ते, गोखले, निपाणीकर व इतर सरदार व संस्थानिकही स्वामींची शिष्यभावाने सेवा करीत. स्वामींची अभंगरचना दीड लाख इतकी आहे. आयुष्याच्या शेवटी ते गुर्लहोसूर येथे राहायला गेले व तिथेच त्यांनी देह ठेवला. तिथे त्यांची समाधी बांधलेली आहे. [म. च.

को.; म. ज्ञा. को.; जु. वा. न. सं; म. क. च.]

चिदंबरम् एक सुप्रसिद्ध शिवक्षेत्र. हे स्थान मद्रास राज्यातल्या दक्षिण अर्काट जिल्ह्यात आहे. या क्षेत्राजवळूनच कोळ्ळम् (कोलेरून) नदी वाहते. या स्थानाला तिल्लई, तिरुपादिरिप्पुलियूर, पुण्डीकपुरम्, व्याघ्रपुरम्, तिरुचिर्‌रंबलम् अशी अन्यही नावे आहेत. येथील शिवमंदिर सुविख्यात असून, द. भारतातल्या प्राचीनतम मंदिरांपैकी ते एक आहे. भारतवासियांनाच नव्हे; तर लंकावासियांनाही या क्षेत्राविषयी पूज्यभाव वाटतो. इथे शिवाचे आकाशलिंग आहे. याचा अर्थ असा, की इथे दृश्य शिवलिंग नाही. गाभाऱ्यात भिंतीसमोर एक पडदा टांगलेला असतो आणि लोक दर्शनाला आले, म्हणजे पुजारी लोक तो पडदा बाजूला करून त्यामागची भिंतच शिवलिंग म्हणून दाखवतात.



नटराजमंदिर – चिदंबरम्

चिदंबरम् येथील हे देवस्थान ३९ एकर भूमीवर वसले आहे. मंदिराच्या आवारात पाच मोठी भवने असून, चित्सभा, कनकसभा, नृत्यसभा, देवसभा व राजसभा अशी त्यांची नावे आहेत. चित्सभा हे मुख्य मंदिर असून, त्यातच आकाशमय शिवलिंगाची पूजा केली जाते. त्याचे छत सोन्याने मढवलेले आहे

चित्सभेजवळच कनकसभा आहे. तिच्यावर तांब्याचे छत आहे. तिथे शिवविग्रहाची पूजाअर्चा केली जाते.

नृत्यसभा हे मंदिरही भव्य असून त्यातच शंकराची प्रसिद्ध नटराजमूर्ती आहे. जे नृत्य करून शिवाने पार्वतीचा गर्व हरण केला, त्या नृत्याच्या अवस्थेत ही मूर्ती इथे कोरलेली आहे. या नटराजमूर्तीच्या छतावर सोन्याचे पत्रे मढवले आहेत. त्या मूर्तीभोवती जी जागा आहे, तिच्यात ५६ पाषाणस्तंभ उभे केलेले आहेत. त्यांवरचे शिल्पकाम अत्यंत रेखीव आहे.

देवसभा हे लहानसे मंदिर मुख्य मंदिरातच एका बाजूला असून, तिथे देवांचे नैमित्तिक उत्सवसमारंभ साजरे केले जातात.

राजसभा ही भव्य वास्तू शिवगंगा तलावाच्या तीरावर आहे. या वास्तूची लांबी-रुंदी ३४० × १९० फूट आहे. या मंडपात सहस्र स्तंभ आहेत. या ठिकाणी वर्षातून दोनदा नटराजाची मूर्ती आणून बसवतात व तिला महाभिषेक करतात.

देवस्थानाच्या चारही दिशांना चार महाद्वारे आहेत. त्यावर चार उत्तुंग गोपुरे आहेत व ती सर्व मूर्तिशिल्पाने खचून भरलेली आहेत. पश्चिम गोपुरावर भरतनाट्यातील १०८ मुद्रा प्रदर्शित करणाऱ्या सुंदर मूर्ती आहेत. गोपुरांवर आणि देवालयातल्या भिंतींवरही विविध नृत्यप्रकार आणि पौराणिक आख्याने यांचे उठावदार शिल्पकाम आहे. इथला शिवगंगा तलाव खूप विस्तीर्ण व खोल आहे. त्यात उतरण्यासाठी चारही बाजूंनी सुंदर पायऱ्या बांधून काढल्या आहेत.

नटराजाचे हे देवालय बांधण्यासाठी लागलेला सर्व दगड ४० मैल अंतरावरून वाहून आणलेला आहे. या देवळाच्या खांबांसाठी वापरलेले काही दगड एकसंध व तीस फूट लांबीचे आहेत.

याव्यतिरिक्त या देवालयात गणेश, विष्णू, अम्मन (पार्वती) व सुब्रह्मण्य यांचीही मंदिरे आहेत. येथे सिद्धिविनायक गणपतीची एक अत्यंत सुंदर मूर्ती आहे. हिच्या तोडीची गणेशप्रतिमा भारतात इतरत्र क्वचितच आढळेल.

येथील शिलालेखावरून कळते, की चोळ राजा परांतक (पहिला) याने हे नटराजमंदिर निर्माण केले (९०७ ते ९५३ इ. स.). फर्ग्युसन या वास्तुशास्त्रज्ञाच्या मते हे मंदिर मूळ रूपात इ. स. च्या दहाव्या शतकात निर्माण झाले व पार्वतीमंदिर आणि विशाल गोपुरे हा त्याचा सर्व परिवेष चौदाव्या शतकात बनला. फर्ग्युसन पुढे म्हणतो, की चिदंबरम् येथील मंदिराचे काही अंश तर इतके सुदर आहेत, की त्यांना द्रविड वास्तुकलेची रत्ने असेच म्हणावे लागेल.

या क्षेत्रात नटराज शिव कसा प्रगट झाला, त्याविषयीची कथा अशी--

फार जुन्या काळी तिल्लई (चिदंबरम्) हे वाममार्गी शाक्तांचे मोठे केंद्र होते. त्या लोकांच्या उपासनेत अनेक अनैतिक गोष्टींचा समावेश होता. ते लोक धाकदपटशा दाखवून लोकांना आपल्या पंथात ओढीत आणि बायाबापड्यांनाही नादी लावीत. शिवाला त्यांचा हा अनाचार मानवला नाही. त्या वाममार्गी शाक्तांचे पारिपत्य करण्यासाठी तो तिथे प्रगट झाला. त्याला पाहून ते वाममार्गी नमले नाहीत, तर त्याच्याशी सामना द्यायला उभे राहिले. त्यांनी अग्नीत हवन करून एक नाग, एक वाघ आणि तिसरा एक काळाकुरूप ठेंगू असे तीन

प्राणी अग्निकुंडातून बाहेर काढले. ते तिघेही शिवावर धावून गेले. शिवाने नाग उचलून आपल्या गळ्यात घातला. वाघाला करंगळीने उभे चिरून त्याचे चर्म परिधान केले. मग त्या कुरूप ठेंगूला जमिनीवर पालथे घालून शिव त्याच्या पाठीवर नाचला. हे सर्व पाहून त्या शाक्तांची गाळण उडाली आणि ते शिवाला शरण गेले.

शिवाच्या आधी पार्वती त्या ठिकाणी राहत होती. शिव तिथे अवतरलेला पाहून तिला बरे वाटले नाही. ती शिवाला म्हणाली, की आपण नृत्याची स्पर्धा लावू. त्या स्पर्धेत तू हरलास, तर तुला हे ठिकाण सोडावे लागेल. शिव त्या गोष्टीला तयार झाला. त्याने नृत्य करता करता अशा काही मुद्रा दाखवल्या, की पार्वती ही स्त्री असल्याकारणाने तिला त्या मुद्रा करता येणे अशक्य झाले. अखेर पार्वतीचा गर्व हरला आणि शिव इथला रहिवासी झाला.

व्याघ्रपाद आणि पतंजली या नावाचे शिवाचे दोन भक्त त्या क्षेत्रात होते. त्यांच्या प्रसन्नतेसाठी शिवाने तिथे नृत्य केले, अशीही कथा आहे.

इथे दरवर्षी वैशाख व मार्गशीर्ष या मासांत देवोत्सवाप्रीत्यर्थ मोठी यात्रा भरते. प्राचीन काळी संस्कृतविद्या व वेदाध्ययन यांच्यासाठी हे क्षेत्र प्रख्यात होते. मध्यंतरी काही काळ बौद्धांनी या क्षेत्रात आपला जम बसवला होता; पण मणिक्कवाचकर या शैव आचार्याने बौद्धांशी शास्त्रार्थ करून त्यांना पराभूत केले व या क्षेत्रातून घालवून दिले. चिदंबरम् ही चोळ राजांची दुय्यम राजधानी होती. कित्येक चोळ राजांचा राज्याभिषेक या देवस्थानातील सभामंडपात झाल्याचे उल्लेख आहेत. पाहा– नटराज. [हि. जॉ. ए. इं.; स. भा. प्र. व.; कल्याण–तीर्थांक; त. सा. सं.; एन्सा. रि. ए.; भारती]

चिदानंदस्वामी

(१७०८–१७८८ इ. स.) महाराष्ट्रातील सावंतवाडी भागातला एक साधू कवी. तेंडुली या गावी हा राहत असे व तिथेच त्याची समाधी आहे. हा कुडाळ देशस्थ गौड ब्राह्मण होता. याने अनेक ग्रंथ लिहिले, पण ते सर्व जळून गेले, असे सांगतात. स्वानंदलहरी ही याची गुरुगीतेवरील ओवीबद्ध टीका आहे. [म. च. को.]

चिद्‌विलासवाद

चित् म्हणजे विश्वातले चैतन्य. त्याचा विलास तो चिद्‌विलास होय. यालाच स्फूर्तिवाद असेही म्हणतात. हा जगत्प्रक्रियेविषयीचा एक सिद्धान्त आहे. हा सिद्धान्त अद्वैतवेदान्ताचा पुरस्कार करणाऱ्या आणि तदनुसार साधना करणाऱ्या चिंतकांची व साधकांची जगताविषयीची धारणा स्पष्ट करणारा आहे. जगत हे मिथ्या नसून जगद्रूपाने चैतन्याचाच विलास चालू आहे; बाह्यतः नाना नामरूपांनी प्रतीत होणारे हे जगत वस्तुतः बहुत्वाने नटलेले चैतन्यच आहे, असे या सिद्धान्ताचे सार आहे. अद्वैतवेदान्ताचे महान आचार्य श्रीमदाद्यशंकराचार्य यांच्या तत्त्वज्ञानात जगत्प्रक्रियेसंबंधीचा हा सिद्धान्त अंतर्भूत आहे. आचार्य जगताला मिथ्या मानतात. जगत हे रज्जूवर भासणारा सर्प, शिंपीवर भासणारे रजत, स्थाणूवर (वृक्षाचे खोड) भासणारा पुरुष किंवा मृगजल यांच्याप्रमाणे भ्रमात्मक आहे असे त्यांचे मत आहे, अशी सार्वत्रिक समजूत आहे. परंतु ही समजूत खरी नव्हे. ज्ञानोत्तर स्थितीत ते जगताला चिद्‌विलासच म्हणतात. शतश्लोकीमध्ये त्यांनी स्पष्टपणे म्हटले आहे, की–

यावान् पिण्डो गुडस्य स्फुरति मधुरिमा
वास्ति सर्वोऽपि तावान्।
यावान् कर्पूरपिण्डः परिणमति सदा
मोद एवात्र तावान्॥
विश्वं यावद् विभाति द्रुमनगनगराराम-
चैत्याभिरामम्।
तावच्चैतन्यमेकं प्रविकसति यतस्तत्तदा-
त्मावशेषम्॥
(श. श्लो. १९)

अर्थ – जेवढा गुळाचा खडा तेवढी त्यात सर्वत्र गोडी वास्तव्य करते. जेवढा कापुराचा तुकडा तेवढा तो सर्व सुवासाने परिणत होतो. वृक्ष, पर्वत, नगर, आराम, चैत्य, इ. गोष्टींनी मिळून जसे हे विश्व भासमान होते, तसेच एक चैतन्यच सर्वत्र त्या त्या आत्म्याच्या ठिकाणी विकसित होत असते.

‘ब्रह्म सत्यं जगन्मिथ्या’ हे अज्ञानग्रस्त जीवाच्या भूमिकेवरून घ्यावयाचे; ज्ञानोत्तर भूमिकेतून ‘सर्वं खलु इदं ब्रह्म’ हेच अंतिम सत्य होय.

आचार्यांच्या मतानुसार ज्ञानोत्तर स्थितीत जगत नाहीसे होत नाही, तर त्याच्याकडे पाहण्याची दृष्टी बदलते व जगताचा खरा अर्थ प्रतीत होतो. जगत हाच चिद्‌विलास आहे, असे ज्ञान होते. डॉ. राधाकृष्णन यांनी म्हटल्याप्रमाणे अज्ञानग्रस्त स्थितीत हेच चिद्‌विलासमात्र जगत वेगळे भासते आणि जीवास दुःखदायक ठरते. एखाद्या लावण्यवतीचा सहजविलास कामी पुरुषाच्या ठायी कामप्रवृत्ती निर्माण करण्यास कारणीभूत ठरला, तर त्याच्या अस्वस्थतेचा उगम त्याच्या सकाम दृष्टीत असतो; पण तो संपूर्ण विलास हा ‘सहज’ असतो; त्या सकाम दृष्टीशी निरपेक्ष असतो. त्याचप्रमाणे परब्रह्माचा सच्चिदानंदरम्य विलास हा निरुपाधिक असतो. परंतु अज्ञानी जीवास

तो विपरीतधर्मी भासतो.

शंकराचार्यांना अनुसरणाऱ्या मराठी संतांनी, विशेषतः ज्ञानेश्वरांनी चिद्विलासाचे हृदयंगम दर्शन घडविले आहे. ज्ञानेश्वरीत चिद्विलासवादाला पोषक अशा अनेक ओव्या विखुरलेल्या आहेत –

एऱ्हवीं मी नसें ऐसें । कांहीं वस्तुजात असें ।
पाहें पां कवण जळरसें–। रहित आहे ।।
पवन कवणातें न शिवेचि । आकाश कें न समायेचि ।
हें असो एक मीचि । विश्वीं असें ।।

(७.१५९–६०)

माझेया विस्तारलेपणा नांवे । हें जगचि नोहे आघवें ।
जैसें दूध मुरालें स्वभावें । तरि तेंचि दहीं ।।

(९.६४)

कां बीजचि जाहलें तरू । अथवा भांगारचि अळंकारू ।
तैसा मज एकाचा विस्तारू । तें हें जग ।।
हें अव्यक्तपणें थिजलें । तेंचि मग विश्वाकारें वोथिजलें ।
तैसें अमूर्तमूर्ति मियां विस्तारलें । त्रैलोक्य जाणें ।।

(९.६५–६६)

'जग ही असिकी वस्तुप्रभा' असल्याचे निर्देश ज्ञानेश्वरांनी ठायी ठायी केलेले आहेत. विश्वरूप, विश्वात्मक, सर्वात्मक अशा विशेषणांनी ते परमेश्वराचा निर्देश करतात; तेव्हाही त्यांची हीच चिद्विलासवादी भूमिका प्रकट होत असते. या भूमिकेतूनच ते 'जें जें देखे भूत । तें तें मानिजे भगवंत,' असे भक्तियोगाचे मर्म विशद करतात आणि 'हें विश्वचि माझें घर' असा व्यापक आत्मीय भावही व्यक्त करतात. 'द्वैतावाचून भक्ती संभवतच नाही,' असे मानणाऱ्यांनाही त्यांनी याच भूमिकेतून पुढील प्रश्न विचारला आहे –

देव देऊळ परिवारु । कीजे कोरुनि डोंगरु ।
तैसा भक्तीचा वेव्हारु । कां न व्हावा ?

(अमृतानुभव ९.४१)

ज्ञानेश्वरांची ही अद्वैताधिष्ठित भक्ती त्यांच्या चिद्विलासवादी भूमिकेतून उमललेली आहे. एकाकी न रमणारे ते चित्तत्त्व आत्मरतीसाठी बहुत्व पावले, ही श्रुत्युक्ति ज्ञानेश्वरांच्या स्वानुभूत चिंतनाच्या गर्भातून सर्वांगी प्रफुल्लित होऊन प्रकटलेली दिसते–

जाला देवचि भक्तु । ठावोचि जाला पंथु ।
होऊनि ठेला एकांतु । विश्वचि हे ।।

(अमृतानुभव. ९.३४)

ज्यांच्या हृदयात चित्सूर्याचा लख्ख प्रकाश पडलेला असतो, अशा सिद्ध पुरुषांची मनोभूमिका कशी असते, ते सांगताना ज्ञानदेवांनी अनेक दृष्टांत दिले आहेत, ते असे– जणू सुगंधाचे अवघ्राण करू पाहणाऱ्या नाकानेंच सुगंधरूप बनावे; जणू नादालाच कान फुटावे; जणू डोळेच दर्पणरूप व्हावे; जणू वायूने स्वतःच पंखा बनून आपल्यालाच वारा घालावा; जणू केशकलापयुक्त मस्तकाने स्वतःच पुष्पभूषा बनून स्वतःला सजवावे; जणू जिव्हेने रस व्हावे; जणू विकसनातुर कमळाने सूर्य बनून जावे अथवा चंद्राचा वेध लागलेल्या चकोराने चंद्ररूप बनावे. जणू फुलांनीच भ्रमर बनून आपला आस्वाद घ्यावा; तरुणीनेच नर बनून रती अनुभवावी अथवा निद्राळूनेच शय्या बनून जावे. असा हा आत्मरतीचा व्यवहार चिद्विलासजन्य आहे.

चिद्विलासवादाच्या स्वीकारामुळे भक्ती ही आत्मरती आहे, अशी हृद्य कल्पना संतांना मांडता आली आणि अद्वैतसिद्धान्त मानूनही भक्तीचे समर्थन करता आले. जगत हे चैतन्याचा विलास असल्यामुळे जगताला बाजूला सारून परमात्म्याचा शोध करण्याची जरूरी नाही. नाना नामरूपांनी नटलेला तो बहुरूपीच आपल्यासमोर लीलानाट्य करतो आहे, या धारणेमुळे जगतात राहूनच गृहादिकांचा त्याग न करता, जगदात्म्याशी एकरूप होता येते, असे संतांनी स्वात्मप्रतीतीने विवरून सांगितले आहे. [रा. चिं. ढेरे]

चिनाब असिक्नी पाहा.

चिन्नमानूर तमिळनाडमधले एक शहर. हे चिन्नम्म नायकाने वसविले. इथे एक प्राचीन शिवमंदिर आहे. इ. स. च्या ११ व्या शतकातील राजेंद्र चोळ याच्या कारकीर्दीतले अनेक ताम्रपट व इ. स. च्या १३व्या शतकातील पांड्य राजांना अनुलक्षून कोरलेले अनेक शिलालेख येथे आहेत. ऐतिहासिक दृष्ट्या या ताम्रपटांना व शिलालेखांना फार महत्त्व आहे. पांड्य राजवंशाची वंशावळ या शिलालेखांवरूनच व्यवस्थितपणे तयार करता आली. [मदुरा गॅझे.]

चिन्नैय्या ताल्लपाकम् (इ. स. चे १५ वे शतक) द. भारतातील एक कवी. हा भरद्वाज गोत्री, आश्वलायनसूत्री व ऋग्वेदी ब्राह्मण होता. याचे वडील व आजोबा हेही कवीच होते. या तिघांनी मिळून वीस हजार गीते रचली आहेत. यांना ताल्लपाकम्–रचयिते असे म्हणतात. ही सर्व गीते ताम्रपटावर खोदलेली आहेत. पूर्वी हे ताम्रपट तिरुपतिमंदिराच्या तळघरात ठेवलेले होते. सांप्रत ते वेंकटेश्वर ओरिएंटल रिसर्च इन्स्टिटयूट, तिरुपती या संस्थेत आहेत.

चिन्नैय्याला अर्वाचीन भजनपद्धतीचा प्रवर्तक समजतात. याने कीर्तनासाठी गीते रचली. त्याबरोबरच तोद्याम, हेच्चारिका, धूप-दीप, नैवेद्य, वसंतोत्सव व दोलोत्सव या प्रसंगांसाठीही गीत-रचना केली आहे. द. भारतातील भक्तिगीतांत याच्या नावाचा आदरपूर्वक उल्लेख केला जातो. [डि. सा. इं. म्यु. म्यु.]

चिन्मात्रभावना

नामरूपात्मक सृष्टी ही चैतन्याच्या ठिकाणी कल्पित असल्यामुळे तिला स्वतःची सत्ता नाही. कल्पित पदार्थाची सत्ता ही अधिष्ठानाच्या सत्तेनेच प्राप्त होत असते. म्हणून जगत हे चैतन्य-ब्रह्मावर कल्पित आहे, ते सत्य नव्हे, असा निश्चय करावा व सर्व ठिकाणी सच्चिदानंदरूपाने पसरलेले चैतन्यच मी आहे, अशी निरंतर भावना करावी, असे वेदान्तशास्त्रात सांगितले आहे. ही निरंतर भावना म्हणजेच चिन्मात्रभावना होय.

ही चिन्मात्रभावना दोन प्रकारची आहे. एक कर्ता, कर्म व करण या त्रिपुटीच्या स्मरणपूर्वक केलेली चिन्मात्रभावना व दुसरी केवल चिन्मात्रभावना. त्रिपुटीसह जी भावना असते, तिलाच संप्रज्ञात समाधी म्हणतात व अहम् (मी) इत्यादी कशाचेही स्मरण न करता चिन्मात्राचे स्मरण करणे, मी चैतन्यच आहे, असे सतत समजणे हिला केवल भावना म्हणतात. हिलाच योगशास्त्रात असंप्रज्ञात समाधी म्हटले आहे. सर्व जग चिन्मात्र आहे, असा उपदेश शुक्राचार्यांनी बलीला केला आहे, तो असा–

चिदिहास्तीह चिन्मात्रं सर्वं चिन्मयमेव तत् ।
चित्त्वं चिदहमेते च लोकाश्चिदिति संग्रहः ॥

अर्थ – या जगामध्ये चैतन्यच भरून राहिले आहे. हे संपूर्ण जग चैतन्यरूप आहे. यातील सर्व चराचर चिन्मय आहे. तू चैतन्य आहेस, मी चैतन्य आहे व सर्व लोकही चैतन्य आहेत. या माझ्या वचनात सर्व शास्त्रार्थांचा संग्रह झाला आहे.

या चिन्मात्रभावनेचा अभ्यास दृढ झाला असता सर्व मलिन वासना क्षीण होतात. [वै. शां. अ.]

चिपळूणकर विष्णुशास्त्री

(१८५० – १८८२ इ. स.)

आधुनिक मराठी भाषेचे जनक, उत्तम निबंधकार व टीकाकार. चिपळूणकरांचे घराणे मूळचे रत्नागिरी जिल्ह्यातील पावस गावचे. इ. स. १८०२ मध्ये हे कुटुंब पुण्यात येऊन स्थायिक झाले. यांचे वडील कृष्ण शास्त्री हेही एक प्रसिद्ध लेखक होते.

वयाच्या सातव्या वर्षी शास्त्रीबुवा पुण्याच्या इन्फंट स्कूलमध्ये दाखल झाले. पुढे ते दरवर्षी दोन दोन वर्ग चढत जाऊन इ. स. १८६५ साली मॅट्रिकची परीक्षा उत्तीर्ण झाले. लगेच त्यांनी डेक्कन कॉलेजात नाव दाखल केले. इंग्रजी, संस्कृत व इतिहास हे त्यांचे आवडते विषय होते. कॉलेजात असताना मराठी क्रमिक पुस्तकातील पाच ओळींचे संस्कृत भाषांतर करायचे, हा क्रम त्यांनी सतत तीन वर्षे चालू ठेवला होता. इ. स. १८७२ साली विष्णुशास्त्री बी. ए. ची परीक्षा उत्तीर्ण झाले. आपल्या चिरंजीवानी एल्. एल्. बी. व्हावे, अशी त्यांच्या वडिलांची इच्छा होती. पण इथून पुढे परीक्षांच्या भानगडीत पडायचे नाही, असे विष्णुशास्त्र्यांनी ठरवून टाकले. त्यांनी आपले सारे आयुष्य विद्याव्यासंगात घालविण्याचा निर्धार केला. मराठी भाषेत लेखन करायला तर त्यांनी यापूर्वीच सुरवात केली होती.

रॉसेलसच्या कादंबरीचे मराठी भाषांतर करायला त्यांच्या वडिलांनी प्रारंभ केला होता. त्या कादंबरीची सुमारे वीस प्रकरणे अनुवादित केल्यावर पुढचे काम त्यांनी विष्णुशास्त्र्यांवर सोपवले. विष्णुशास्त्र्यांनी केलेले भाषांतर त्यांना फार आवडले. पदवीधर झाल्यानंतर विष्णुशास्त्री ‘शालापत्रक’ या मासिकाचे काम करू लागले. शालापत्रकातच ‘संस्कृत–कविपंचक’ या विषयावर त्यांनी लेखमाला सुरू केली. यात अनुक्रमे कालिदास, भवभूती, बाण, सुबंधू आणि दंडी या कवींची चरित्रविषयक माहिती देऊन नंतर त्या त्या कवींच्या काव्यांचे रसास्वादपूर्वक परीक्षण केलेले आहे. कवीचे गुणावगुण दाखवण्यासाठी त्यांनी त्या त्या काव्यातील उताऱ्यांची निवडही मार्मिकपणाने केलेली आहे. त्यावरून विष्णुशास्त्र्यांच्या रसिकतेची चांगली प्रतीती येते. या सर्वच निबंधांची भाषा मोठी प्रौढ व सुबोध आहे. त्यामुळे ते लोकांना फार आवडले.



विष्णुशास्त्री चिपळूणकर

संस्कृत कवींच्याप्रमाणे मराठी कवींचीही माहिती द्यावी, अशी अनक वाचकांनी विष्णुशास्त्र्यांना सूचना केली. म्हणून त्यांनी मराठी कविता हा विषय प्रतिपादण्यास प्रारंभ केला. मराठी कवितेस वाहिलेले श्री. माधव चंद्रोवा डुकले यांचे सर्वसंग्रह नावाचे मासिक सरकारने बंद केले. म्हणून शास्त्रीबोवांनी शालापत्रकांत लेख लिहून सरकारवर कडक टीका केली. सरकारनेच चालविलेल्या शालापत्रकात सरकारवरच टीका आल्याचे पाहून सरकारी अधिकाऱ्यांची डोकी उठली व लगेच शालापत्रक मासिकच बंद करण्याचा हुकूम निघाला.

शालापत्रकाच्या समाप्तीबरोबर विष्णुशास्त्र्यांच्या लेखनाचा पहिला कालखंड संपतो. दुसरा कालखंड निबंधमालेचा. इ. स. १८७४ च्या जानेवारीत विष्णुशास्त्र्यांच्या निबंधमालेचा जन्म झाला. ही माला सात वर्षे चालली व तिचे एकूण ८४ अंक प्रसिद्ध झाले.

या मालेचा सर्व उद्योग विष्णुशास्त्र्यांनी स्वतः केला. त्यासाठी त्यांनी कोणाकडेही आर्थिक मदत मागितली नाही. मालेतील सर्व मजकूर ते स्वतः लिहीत. प्रुफेही स्वतःच तपासीत व पुरवणी म्हणून सुभाषिते, विनोद, महदाख्यायिका, उत्कृष्ट उतारे, इ. सर्व मजकूरही स्वतःच तयार करीत. इ. स. १८७३ मध्ये पूना हायस्कूल या सरकारी शाळेत त्यांनी नोकरी धरली. सरकारी नोकर असताही निबंधमालेत त्यांनी मेकॉले, मॉरिस, मिल वगैरे पाश्चात्य ग्रंथकार, हिंदुस्थानातील मिशनरी व त्यांच्या तंत्राने वागणारे आपल्याकडील स्वाभिमानशून्य सुधारक आणि सरकार यांच्या वर प्रखर टीका सुरू केली. त्यामुळे ते सरकारी तंत्राने वागणाऱ्या स्वकीयांच्या रोषाला पात्र झाले. ही ब्याद पुण्यास नको म्हणून सरकारने त्यांची रत्नागिरीस बदली केली. बदलीप्रमाणे ते रत्नागिरीस गेले खरे; पण थोड्याच दिवसात नोकरीचा राजीनामा देऊन पुण्यास परत आले.

पुण्यास आल्यावर श्री. म. ब. नामजोशी व लोकमान्य टिळक यांच्या सहकार्याने त्यांनी १ जानेवारी १८८० रोजी न्यू इंग्लिश स्कूल नावाची शाळा सुरू केली. सरकारी शाळेत दिले जाणारे शिक्षण राष्ट्रीय दृष्ट्या कुचकामी असते व त्या शिक्षणाने सुशिक्षितांमध्ये एक प्रकारचे मानसिक दास्य उत्पन्न होते, असे त्यांचे मत बनले होते. म्हणून त्यापेक्षा निराळ्या तऱ्हेने नव्या पिढीला शिक्षण द्यावे व तेही कमी खर्चात द्यावे, असा उद्देश मनात धरून त्यांनी ही शाळा सुरू केली. शिवाय स्वधर्म, स्वभाषा व स्वदेश यांबद्दल विद्यार्थ्यांच्या मनात प्रेम व भक्ती उत्पन्न करणे, हाही उदात्त हेतू या प्रयत्नामागे होताच. पुढे आर्यभूषण नावाचा स्वतंत्र छापखानाही त्यांनी काढला. आणि त्यात केसरी व मराठा अशी मराठी व इंग्रजी साप्ताहिके स्वमतप्रचारार्थ सुरू केली. याशिवाय बुधवार पेठेत किताबखाना या नावाचे पुस्तकांचे एक दुकानही सुरू केले.

शास्त्रीबुवांची पत्नी नेहमी आजारी असायची. घरात नेहमी कटकटी चालू असायच्या. ही दुःखे शास्त्रीबुवा मुकाट्याने सहन करीत. पण हळूहळू त्याचा परिणाम त्यांच्या प्रकृतीवर होऊ लागला. त्यातच केसरी–मराठ्यावर कोल्हापूरच्या बर्व्यांनी बेअब्रूचा खटला दाखल केला. हा सर्व चिंताभार त्यांच्या मनाला झेपला नाही आणि त्यातच त्यांचा अंत झाला

त्यांच्या निबंधमालेतील मुख्य विषयांचे पुढीलप्रमाणे विभाग पडतात––

(१) **भाषाविषयक** – मराठी भाषेची सांप्रतची स्थिती, भाषादूषण, लेखनशुद्धी, भाषापद्धती, भाषांतर व इंग्रजी भाषा, इत्यादी.

(२) **वाङ्मयविषयक व चर्चात्मक** – इतिहास, वाचन, वक्तृत्व, विद्वत्त्व आणि कवित्व, ग्रंथावर टीका, डॉ. जॉन्सन, मोरोपंतांची कविता, इत्यादी.

(३) **राजकीय** – आमच्या देशाची स्थिती, वगैरे.

(४) **सामाजिक** – संपत्तीचा उपयोग.

(५) **मानसशास्त्र** – गर्व

या निबंधमालेमुळेच जाणते लोक शास्त्रीबुवांना मालाकार म्हणून गौरवाने संबोधू लागले. मालाकारांनी काव्याच्या रसग्रहणात्मक अभ्यासाची पद्धती प्रथम उपयोगात आणली. वाङ्मयात्मक निबंधात काही चुकीचीही मते शास्त्रीबोवांनी प्रतिपादली आहेत. उदा० सुधारणेच्या प्रगतीबरोबर कवितेचा अपकर्ष होतो, अर्धवट सुधारलेल्या लोकांचे वाङ्मय कवित्वरूपाने प्रकट होते, इत्यादी.

त्यांच्या सर्व सामाजिक निबंधांचे सूत्र एकच होते आणि ते हे, की आमच्या लोकांनी व्यसनाला, आळसाला, कर्तव्यशून्यतेला व अन्तःकलहाला बळी न पडता युरोपीय लोकांप्रमाणे देशोन्नतीच्या कार्याला लागावे.

शास्त्रीबुवांच्या मालेतील लेखांमुळेच आपणास देशसेवेची व वाङ्मयसेवेची स्फूर्ती झाल्याचे श्री. ह. ना. आपटे, शि. म. परांजपे, वि. का. राजवाडे या मातबर मराठी लेखकांनी सांगितले आहे. साहित्यक्षेत्रात मराठी गद्य वाङ्मयाच्या जनकत्वाचा मान शास्त्रीबुवांकडे जातो. आपण मराठी भाषेचे शिवाजी आहोत, असे शास्त्रीबुवाही स्वतःला म्हणवून घेत. शास्त्रीबुवांची गद्य भाषा ओजस्वी आहे. रूपक, दृष्टांत, विरोध, इ. अलंकारांच्या साहाय्याने त्यांनी ती नटवली आहे. मात्र त्यांचा विनोद गुदगुल्या करणारा किंवा सात्त्विक नसे; तर तो

करवतीच्या धारेप्रमाणे प्रतिपक्षाला कातरीत जाणारा असे.

त्यांचे राजकीय तत्त्वज्ञान पुढीलप्रमाणे होते–

आपल्या घरात आलेला पाहुणा (इंग्रज) घरमालक झाला आहे. तो आधी घराबाहेर निघाला पाहिजे. इंग्रजाबद्दल समाजाला जो आदर व प्रेमभाव वाटत आहे, तो प्रथम नष्ट झाला पाहिजे. प्रेमाचे स्थान द्वेषाने घेतले, तरच आपले गेलेले स्वराज्य परत येईल. अशा प्रकारचे विचार त्यांच्या लेखांतून प्रकट झाले आहेत. सामाजिक सुधारणा नंतर झाल्या तरी चालतील; पण राजकीय स्वातंत्र्य आधी हवे, असे ते म्हणत. स्वत्व व स्वाभिमान यांना विन्मुख झालेल्या महाराष्ट्राला जोराचा धक्का देऊन त्याला आत्मनाशापासून परावृत्त करण्याचे श्रेय बऱ्याच अंशी विष्णुशास्त्र्यांना दिले पाहिजे. [म. ज्ञा. को ; अ. च. को.; विष्णुशास्त्री चिपळूणकर– वा. दा. गोखले; चिपळूणकर काल आणि कर्तृत्व– ग. त्र्यं. माडखोलकर]

चिपळ्या एक वाद्य. हे वाद्य शिसवी, साग किंवा रक्तचंदन या लाकडाचे किंवा हस्तिदंताचे बनवतात. दीड ते दोन इंच रुंद व सहा ते आठ इंच लांब असे दोन तुकडे घेऊन त्यांची एक बाजू रंधून गुळगुळीत करतात. दुसरी बाजू गोल करून त्याला माशाचा किंवा इतर कोणतातरी कलात्मक आकार देतात. माशाच्या तोंडात पितळेच्या गोल चकत्या बसवतात व दुसऱ्या बाजूला घुंगरांचा झुबका लावतात. क्वचित दोन्ही बाजूंना पितळेच्या चकत्याच बसवतात. चिपळ्या हातात धरण्यासाठी वरच्या बाजूला कोयंडे केलेले असतात. हाताचा अंगठा एका तुकड्याच्या कोयंड्यात व मधले बोट दुसऱ्या तुकड्याच्या कोयंड्यात घालून हे दोन्ही तुकडे एकमेकांवर हळूहळू आपटले, म्हणजे त्यातून आवाज निघतो.


चिपळ्या

चिपळ्यांना कुस्तर किंवा छित्तिका असेही म्हणतात. चिपळ्या लांब व मोठ्या आकाराच्या करून त्यांच्या तोंडांत लहान लहान झांजा बसविल्या, की त्यांना करताल असे म्हणतात. कीर्तन, भजन, इ. प्रसंगी ताल धरण्यासाठी चिपळ्यांचा उपयोग करतात. कीर्तनप्रसंगी कथेकरी हरिदास चिपळ्या स्वतः वाजवतो. [सु. वि. को.; डि. सा. इं. म्यु. म्यु.; म्यु. इं.]

चिमटा गोरखपंथी आणि शैव साधू यांचे एक तालवाद्य. लोखंडी मोठी पट्टी वाकवून हा चिमटा बनवतात.


चिमटा

त्यात एक कडे अडकवलेले असते, ते पट्टीवर आपटल्यामुळे ध्वनी निघतो. हे वाद्य दोन्ही हातांनी वाजवतात. गोरखपंथी हे वाद्य वाजवून अलख जागवतात. शैव साधूंच्या मते या चिमट्यातून जयशंकर असा ध्वनी निघत असतो. [कृ. जी. व्र. श.]

चिरंजीव 'चिरं जीवतीति'= चिरकाल जगतो तो चिरंजीव होय, अशी याची व्याख्या आहे (श. क.). भारतात पुढीलप्रमाणे सात चिरंजीव मानलेले आहेत–

अश्वत्थामा बलिर्व्यासो हनुमांश्च बिभीषणः।
कृपः परशुरामश्च सप्तैते चिरजीविनः॥

वरील सात चिरंजीवांना प्रातःस्मरणात स्थान दिलेले आहे.

चिलखत कवच पाहा.

चीनांशुक अंशुक पाहा.

चीरचोलकदान चीर = नेसायचे वस्त्र. 'चिनोति आवृणोति वृक्षं कटिदेशादिकं वा' = वृक्ष किंवा कंबर आणि तिच्या खालचा भाग यांवर आवरण घालते, ते चीर होय (श. क.). चोलक = खण किंवा चोळी. मकर संक्रांतीच्या दिवशी सुवासिनीला चीरचोलकाचे (लुगडे व खण) दान करावे, असे दानचंद्रिकेत सांगितले आहे. दानमंत्र असा–

सकञ्चुकमिदं वस्त्रमनघं तुष्टिदं रवेः।
पुरन्ध्र्यै ते प्रदास्यामि सौभाग्यं वर्धतां सदा॥

अर्थ – हे सूर्याला संतोष देणारे चोळीसह लुगडे मी सुवासिनीला दान देत आहे. (माझे) सौभाग्य सदा वृद्धिंगत होवो.

चीरमोचन एक तीर्थ. हे काश्मीरमध्ये कनकवाहिनी नदी आणि सिंद नदी यांच्या संगमावर आहे. सप्तर्षींनी आपली वल्कले इथे ठेवली आणि नंतर ते स्वर्गलोकी गेले, अशी याच्याविषयी नीलमतपुराणात कथा आहे. [हि. घ.]

चीवर एक वस्त्रविशेष. याची व्याख्या अशी—'चीयते तन्तुसन्तानैरिति' = धाग्यांच्या विणणावळीने जे विस्तारले जाते, ते चीवर होय (श. क.). गौतम बुद्धाने आपल्या शिष्यांना अशी आज्ञा केली होती, की त्यांनी केरकचऱ्यात पडलेल्या चिंध्या एकत्रित करून त्यांची गोधडी बनवावी व ती वापरावी. कोसल देशात असे अनेक लोक होते, की जे श्मशानातील चिंध्या गोळा करून त्यापासून बनवलेले चीवर धारण करीत.

रस्त्याच्या कडेला पडलेल्या चिंध्या जमा करून त्या अंगावर घालणाऱ्या लोकांचा एक पंथ जैनधर्मातही आहे. [उ. प्र. बौ. वि.; स्कू. से. जै. लि.]

चुंदडीगिरा एक मुसलमान जात. यांची वस्ती मुख्यत्वे गुजरातेत आढळते. आपण अरबवंशाचे आहो असे हे सांगतात. रेशमी गोंडे विणणे, हा यांचा धंदा असतो. हे सुन्नी पंथाचे आहेत. [मुं. इ. जा.]

चुंदा एक बौद्ध देवता. हिला चुंद्रा, चंद्रा, चंडा व चुंड्रा असेही म्हणतात. निष्पन्नयोगावलीच्या मंजुवज्रमंडलात चुंदा ही वैरोचनाची कन्या असल्याचे म्हटलेले आहे.

चंद्रा या नावाने या देवीचा अगदी प्रथम उल्लेख मंजुश्रीमूलकल्प या ग्रंथात सापडतो. साधनमालेत या देवीचे वर्णन आहे, ते असे—

शरच्चन्द्राभां चतुर्भुजां दक्षिणेन वरदां वामे पुस्तकाङ्कितपद्मधरां करद्वये पात्रधरां सर्वालङ्कारभूषिताम् ।



चुंदा

अर्थ — शरत्कालीन चंद्राची कांती असलेली, चतुर्भुज, उजवा हात वरमुद्रेत असलेली, डाव्या हातात पुस्तकयुक्त पद्म धारण करणारी, दोन हातात पात्र धारण करणारी व सर्वालंकारयुक्त अशी ही चंद्रा देवी आहे.

निष्पन्नयोगावलीत हिचे वर्णन सव्वीस भुजा असलेली असे आहे. परंतु अशा प्रकारच्या मूर्ती मात्र आढळत नाहीत. सोळा भुजांच्या मूर्ती आढळतात. [इं. बु. इ.]

चुंबन चुंबन याचा अर्थ प्रिय व्यक्तीच्या कपोल, मस्तक, ओठ, इ. स्थळी आपले ओठ टेकणे, असा आहे. चुंबन हे वात्सल्य व रत्यात्मक प्रेम व्यक्त करण्यासाठी उपयोजिले जाते. ते स्वाभाविक प्रेरणेने किंवा आंतरिक ऊर्मीने घडते. माता आपल्या बालकाच्या गालावर ओठ टेकून त्याच्याविषयीचे वात्सल्य व्यक्त करते. स्त्री-पुरुषांच्या प्रेमसंबंधात चुंबन हा प्राथमिक भाव असतो. प्रेमभावनेची अभिव्यक्ती मुख्यत्वे चुंबनाने होते. त्यामुळे मनोविकारांनाही उत्तेजन मिळते. वात्स्यायनाने आपल्या कामसूत्राच्या तिसऱ्या अध्यायात चुंबनाचे मानसशास्त्रीय विवेचन केले असून, त्याचे प्रकारही सांगितले आहेत—

ललाटालककपोलनयनवक्षःस्तनोष्ठान्तर्मुखेषु चुम्बनम् ।

अर्थ — ललाट, केस, गाल, नेत्र, वक्षःस्थल (पुरुषाचे), स्तन, ओठ व मुखाचा अंतर्भाग, इतक्या ठिकाणी चुंबनाचा प्रयोग होतो.

सर्व प्रकारच्या चुंबनांत अधरचुंबन हेच प्रमुख मानलेले आहे. ज्यांनी अद्यापि सुरतास्वाद घेतलेला नाही किंवा ज्यांना अद्यापि प्रियकराविषयी पूर्ण विश्वास निर्माण झालेला नाही, अशा युवतींच्या बाबतीत पुढील तीन प्रकारच्या चुंबनांचा प्रयोग वात्स्यायनाने सांगितला आहे—

निमित्तकं स्फुरितकं घट्टितकमिति कन्याचुम्बनानि ।

अर्थ — निमित्तक, स्फुरितक व घट्टितक अशी (तीन) कन्याचुंबने असतात.

निमित्तक — यात प्रेमिका स्त्री नायकाच्या अनुनयाने चुंबनाला तयार होते व लज्जेने संकुचित झालेले आपले ओठ प्रियकराच्या ओठांना भिडवते. मात्र ते दाबीतही नाही किंवा चोखीतही नाही.

स्फुरितक — यात पुरुष स्त्रीचा अधर आपल्या ओष्ठसंपुटात दाबतो. स्त्री ते चुंबन स्थिर होऊ न देण्याचे नाटक करते; पण पुरुष आपली ओठांची पकड शिथिल करू लागल्यास स्वतःच्या ओठांनी त्याचे ओठ घट्ट पकडण्याचा प्रयत्न करते. अशा प्रसंगी त्या उभयतांत विशिष्ट स्फुरण किंवा कंपन निर्माण होते; म्हणून त्याला स्फुरितक असे नाव दिलेले आहे.

घट्टितक — या प्रकारात स्त्री जरा अधिक पुढे जाण्याचे

साहस करते. ती प्रियकराचे डोळे आपल्या हातांनी बंद करते आणि आपलेही डोळे मिटून पुरुषाचा अधरोष्ठ आपल्या ओठात पकडते. तसे करताना ती आपली जीभ त्याच्या ओठावरून फिरवते.

याव्यतिरिक्त अधरचुंबनाचे आणखी पाच प्रकार वात्स्यायनाने सांगितले आहेत, त्यांची नावे अशी– सम, तिर्यक, उद्भ्रांत, अवपीडित व आकृष्ट. मुखावाचून अन्य जागी घेतल्या जाणाऱ्या चुंबनाचे पुढील चार प्रकार आहेत, ते असे– सम, पीडित, अंचित व मृदू.

विशेष परिस्थिती किंवा मनोवस्था यांना अनुसरून चुंबनाचे आणखी काही प्रकार असतात, ते असे–

उद्दीपक – झोपलेल्या नायकाचे प्रेमभराने निरीक्षण करीत असता नायिकेने घेतलेले चुंबन. याने दोहोंच्याही अंतरात कामोद्दीपन होते.

चलितक – रुसलेल्या, रागावलेल्या व त्यामुळे संभोगासाठी उदासीन झालेल्या पुरुषाचे चित्त आपल्याकडे वळवण्यासाठी स्त्रीने त्याचे घेतलेले चुंबन.

प्रातिबोधिक – पुरुष रात्री उशीरा शयनगृहात आला असता स्त्री रुसते व झोपेचे सोंग घेऊन निजते. मग पुरुष तिला जागी करण्यासाठी तिचे जे चुंबन घेतो, त्याला प्रातिबोधिक म्हणतात.

छायाचुंबन – आरशातल्या अथवा पाण्यातल्या स्त्रीच्या किंवा पुरुषाच्या प्रतिबिंबाचे घेतले जाणारे चुंबन.

इंद्रियजन्य व्यापारांत स्पर्श हा प्रधान असून शरीरस्पर्शाच्या अनेकविध व्यवहारांत चुंबन हा अत्यंत उच्च असा प्रकार आहे. शारीर व मानस या दोन्ही शास्त्रांच्या दृष्टीने चुंबन हे क्षुधा व प्रेम या भावनांचे संयोगीकरण होय. सुधारलेल्या समाजातं चुंबन हा प्रकार परिणत स्वरूपात आढळतो. अशा समाजात चुंबनाच्या दोन कृती आढळतात. ओठांनी शरीराच्या कोणत्याही भागाला स्पर्श करणे, ही एक व ओठांनी गालाला स्पर्श करणे, ही दुसरी. पहिला प्रकार हा स्त्री-पुरुषांतील कामविषयक आकांक्षेचा निदर्शक समजला जातो; तर दुसरा वात्सल्यनिदर्शक (आई-बाप इत्यादींनी लहान मुलाच्या गालावर ओठ टेकणे) समजला जातो. रोमन लोकांत ओष्ठचुंबनाचीच पद्धत होती. ग्रीक लोक हे त्यांच्याही पूर्वीचे; पण त्यांच्यांत मुखचुंबनाची चाल नव्हती. मुखचुंबनाची चाल ही पूर्वेकडील लोकांची आहे, असे ग्रीकांनी म्हटले आहे. इराणी लोक समान नात्यात मुखचुंबनाची रीत अवलंबीत व वरिष्ठ दर्जाचे लोक कनिष्ठ दर्जाच्या लोकांचे फक्त कपोलचुंबन घेत.

वेदामध्ये चुंबणे या अर्थाचा धातू नसून त्याच्या जागी वास घेणे, या अर्थाचा घ्रा धातू आहे. बापाने मुलाचे तीनदा अवघ्राण (मस्तकाचा वास घेणे) केल्याने मुलाचे आयुष्य वाढते, अशी कल्पना भारतात उपनिषत्कालापासून रूढ आहे. चुंबणे या अर्थाचा शब्द फार मागाहून प्रचारात आला. परंतु चुंबणे व हुंगणे या अर्थाच्या शब्दांचा मूळचा अर्थ स्पर्श करणे, हाच असावा. मागाहून प्रचारात आलेला चुंब हा धातू चप् = स्पर्श करणे, या धातूवरूनच बनला असावा. वेदोत्तरकालीन साहित्यात चुंबनाचे उल्लेख आले आहेत. शतपथ ब्राह्मणात प्रणयवर्णनप्रसंगी चुंबनाचे मुखसंमीलन असे स्पष्टीकरण दिलेले आहे. महाभारतात ऋष्यशृंगाच्या उपाख्यानात चुंबनाचा अर्थ मुखसंमीलन असाच दिलेला आहे. भुरळ घालायला आलेल्या तरुण वेश्येला ऋष्यशृंग ब्रह्मचारी अतएव पुरुषच समजत होता. म्हणून श्लोकात तो त्या वेश्येला 'सः' अशा पुल्लिंगी सर्वनामानेच उल्लेखितो. ऋष्यशृंग म्हणतो—

स मे समाश्लिष्य पुनः शरीरं जटासु गृह्याभ्यवनाम्य वक्त्रम्।
वक्त्रेण वक्त्रं प्रणिधाय शब्दं चकार तन्मेऽजनयत् प्रहर्षम् ॥
(म. भा. वन. ११२.१२)

अर्थ – त्याने माझ्या शरीराला आलिंगन दिले. माझ्या जटा धरून माझे मुख वाकविले. मग मुखाला मुख भिडवून शब्द केला. या गोष्टींनी मला हर्ष झाला.

बौद्ध जातकात चुंब शब्द अनेकदा आला आहे आणि तो स्त्री-पुरुष संबंधातच योजलेला आहे. पुराणग्रंथांत प्रणयवर्णनांची रेलचेल असूनही त्यांत चुंबनाचे प्रसंग मात्र क्वचितच आढळतात. गीतगोविंदादी काव्यात मात्र चुंबनाची वर्णने आलेली आहेत. [म. ज्ञा. को.]

चुटू राजवंश

या वंशातील राजांना पुराणांत आंध्रभृत्य म्हटले आहे. हें मानव्य गोत्री ब्राह्मण होते. इ. स. २५० च्या सुमारास या वंशाचा अंत झाला, असे पुराणांत सांगितले आहे. या कुळाला सातकर्णी व नाग अशी अन्यही नावे होती. चुण्ट या संस्कृत शब्दापासून चुटू हा शब्द झालेला असून, त्याचा अर्थ कनिष्ठ असा आहे. सातवाहन राजवंशाचीच ही कनिष्ठ (छोटी) शाखा होती.

सातवाहनांच्या साम्राज्यातील दक्षिण भागावर हे मांडलिक म्हणून राज्य करीत होते. पुढे सातवाहनांची सत्ता क्षीण झाल्यावर या वंशाने आपले स्वतंत्र राज्य सुरू केले. उ. कानडा चितळदुर्ग या जिल्ह्यांत यांची नाणी आणि कान्हेरी, बनवा व मलवल्ली येथे यांचे शिलालेख सापडले आहेत. त्यां हारीतिपुत्र विष्णुस्कंद्ध (विष्णुकद), चुटुकुलानंद सातकर्णी ही त्याचा नातू शिवस्कंद वर्मा (शिवस्कंद नागश्री) ही

प्रामुख्याने आढळतात. शिवस्कंद वर्मा हा विष्णुस्कंदाची कन्या व पल्लव वंशातील राजकुमार महाभोज यांचा पुत्र होता, असे कळते.

या वंशाने सुमारे १५० वर्षे वनवासी प्रदेशावर राज्य केले. वैजयंती नगरी ही त्यांची राजधानी होती. पुढे पल्लव वंशातील राजाने (शिवस्कंदाचा पिता) यांचे राज्य जिंकले. कदंब राजवंश या चुटू वंशाच्या एका शाखेतूनच उदयाला आला, असे म्हणतात. [अं. मा.; ए. इं. सा. इं. हि. क.]

चुडावाला एक जात. हे लोक मुसलमान आहेत. यांची वस्ती गुजरातेत आहे. काचेच्या बांगड्या विकणे, हा यांचा प्रमुख व्यवसाय होय. हे सुन्नी पंथाचे असले, तरी इतर मुसलमानांशी लग्नव्यवहार करतात. [मुं. इ. जा.]

चुडासमा राजस्थानातील एक राजवंश. हे लोक जेसलमेरच्या समा वंशाचे आहेत. चूड किंवा चंद्र नामक नेत्याच्या नावावरून यांना चुडासमा हे नाव मिळाले, असे काहींचे मत आहे; तर काहींच्या मते हे लोक शिवोपासक असल्यामुळे त्यांना चुडासमा असे नाव पडले. इ. स. च्या ७ व्या ८ व्या शतकात प्रथम यांनी सौराष्ट्रात वसाहत केली. यांची प्रारंभीची राजधानी वंथळी (वामनस्थळी) येथे असून, जुनागड व त्याच्या सभोवतालच्या प्रदेशात त्यांची सत्ता होती. काही काळ ते अणहिलवाडच्या चावडा राजांचे मांडलिक होते. चावडांच्या अस्तानंतर सुमारे सहाशे वर्षे त्यांनी स्वतंत्रपणे राज्य केले. इ. स. १४७० साली महंमद बेगडाने त्यांच्या शेवटच्या राजाला मुसलमान बनवून त्यांचे राज्य स्वतःच्या राज्याला जोडून टाकले. [वि. मुं. रा. प.]

चुडेल स्त्री रजस्वला किंवा गरोदर असताना, अथवा प्रसूत होताना मरण पावली तर ती भूत होते; या भुताला चुडेल किंवा चुरेल असे म्हणतात. एखाद्या स्त्रीला वाघाने मारले असता ती चुडेल बनते, अशीही समजूत आहे. लोंबणारे स्तन, जाड ओठ, लांब सुळे, काळी जीभ व पिंजारलेले केस यांमुळे ती भयानक दिसते. तिची पावले उलटी असतात. तिची मागची बाजू काळी व पुढची पांढरी असते, असे म्हणतात. स्वतःच्या कुळातील माणसांशी ती अधिक दुष्टपणे वागते. ज्या माणसाला ती दिसते, त्याला कसलातरी रोग होतो आणि जो तिची हाक ऐकून रात्री घराबाहेर जातो, त्याचे मरण ओढवते.

वर सांगितल्याप्रमाणे एखादी स्त्री मरण पावली, तर तिचे प्रेत पालथे ठेवून पुरतात. आणि वर मोठाले दगड व काटेकुटे ठेवतात. कधी प्रेताचे हात-पाय बांधून ठेवतात. त्या स्त्रीच्या भुताने इतरांना त्रास देऊ नये, म्हणून त्याचा अशा प्रकारे बंदोबस्त केला जातो. ज्या जागी अशी स्त्री मरण पावली असेल, ती जागा नीट खरवडून तिथली माती काढून टाकतात व तिथे मोहरीचे दाणे पेरतात. प्रेत जिथे पुरतात, तिथपर्यंतच्या रस्त्यावरही मोहरीचे दाणे विखरून टाकतात. काही लोक अशा स्त्रीचे प्रेत जाळून टाकतात; त्यामुळे तिचे भूतही जळून जाते, अशी समजूत आहे. एखाद्या घरात चुडेल दिसली, तर तिला घालवून देण्यासाठी त्या घरात तापवलेला विटेचा किंवा लोखंडाचा तुकडा टाकतात.

कधी कधी चुडेल ही सुंदर तरुणीचे रूप घेऊन येते व रात्रीच्या वेळी तरुण पुरुषांना मोहवून, स्वतःची कामवासना तृप्त करून घेते. अतिसंभोगामुळे ते पुरुष लवकर वृद्ध बनतात. कधी ती अशा तरुणांना बळी देण्यासाठी पळवून नेते, अशीही कल्पना प्रचलित आहे. [दि चमार्स– ब्रिग्ज; फो. लो. नॉ. इं.]

चुनडी एक उपरत्न. यालाच लोलक किंवा लालडी म्हणतात. याच्या गोमेद, केंपमाणिक, लाल, उरेलियन, इ. काही जाती आहेत. यांचे रंग फार मनोहर असतात. भारत, सीलोन, ब्रह्मदेश, ग्रीनलँड, इ. देशांत सापडणाऱ्या चुनड्या मूल्यवान मानल्या जातात. [लघुरत्नपरीक्षा]

चुहरा एक जमात. या जमातीची वस्ती पंजाबात आहे. लालबेग या अन्य नांवानेही ही जमात ओळखली जाते. लालबेग हा या लोकांचा गुरू आहे. हे लोक आपल्या जमातीच्या उत्पत्तीविषयी पुढील कथा सांगतात —

ब्रह्मदेवाने मानव निर्माण करण्यासाठी तप आरंभिले. त्या तपातून त्याला चार मुले झाली. त्यांपैकी एका मुलाने एकदा मृत गाईला स्पर्श केला आणि त्यामुळे तो जातिभ्रष्ट झाला. त्याला जातिबाह्य करताना ‘मी तुला चौथ्या युगात परत जातीमध्ये घेईन’, असे देवाने त्याला आश्वासन दिले होते.

या भ्रष्ट झालेल्या मुलाचे नाव जहुंप्रा असे होते. याने देवांची मर्जी संपादून आपल्या वंशजांना खूप सवलती मिळवून दिल्या. त्याचे हे वंशज म्हणजेच आजचे चुहरा लोक होत.

या लोकांचा धर्म ख्रिस्ती धर्माला जवळचा आहे. हे लोक एकेश्वरी पंथाचें आहेत. यांच्या जमातीचा एक मुख्य पुरोहित असतो. त्याला बालाशहा असे म्हणतात. हाच लोकांच्या वतीने सर्व गाऱ्हाणी देवाकडे पोचवतो व बऱ्याभल्याची मागणी करतो. माणूस मेल्यावर त्याचा आत्मा परमेश्वरात विलीन होतो व

पापी माणसांना परमेश्वराकडून शिक्षा होते, अशी यांची धारणा आहे.

चुहरांची देवालये नसतात. घुमटाच्या आकाराच्या मातीच्या ढिगालाच ते देऊळ मानतात. जेव्हा एखादा नवीन ढीग उभारला जातो, तेव्हा सोने, चांदी, तांबे व लोखंड या धातूंच्या तलवारी तयार करतात. मग त्या तांबड्या फडक्यात बांधून त्या ढिगासमोर पुरतात. तिथे बळी दिलेल्या बोकडाचे डोके व नारळ या तलवारींवर ठेवतात. ढिगापुढे लहानसा उंचवटा तयार करून त्यावर एक दिवा पेटवून ठेवतात. चोला किंवा ज्ञानी या नावाने ओळखला जाणारा पुजारी या विधीचे पौरोहित्य करतो. या विधीनंतर सामुदायिक प्रार्थना होते व ती संपल्यावर सर्वजण नृत्य करतात. हे सर्व कार्यक्रम झाल्यावर त्या देवाची स्थापना झाली, असे समजतात.

मर्तिकप्रथा – हे लोक मृतांना पुरतात. पुरण्यापूर्वी प्रेताला स्नान व चांगले कपडे घालतात. प्रेत पुरतेवेळी काही शोकगीते म्हणतात. मृताला खड्डयात ठेवल्यानंतर खड्डा बुजवण्यापूर्वी त्याची कवटी फोडतात. तसे केल्याने मृताला मुक्ती मिळते, अशी त्यांची समजूत आहे. [एन्सा. रि. ए.]

चूंदडी

एक प्रकारची ओढणी. हर्षचरितात हिला पुलकबंध म्हटले आहे. ही तलम सुताची व रंगीत असून, तीवर विशेष प्रकारची वेलपत्ती छापलेली असते. या ओढणीवर आणखी एक कपडा पांघरतात, त्याला उपन्ना, परेला, उपरैना, दुपटी, इ. नावे आहेत. या उपन्नाची लांबी सहा हात असून, रुंदी पाच हात असते.

गुजरात, राजस्थान, पंजाब, इ. प्रदेशांत सप्तपदीच्या वेळी वधूला जी चूंदडी देतात, ती लाल रंगाची असून, तिच्या एका पदराला चांदीची घुंगरे बांधलेली असतात. या चूंदडीला चाँची म्हणतात. [कृ. जी. व्र. श.; सू. सा. श.]

चूडाकर्म

सोळा संस्कारांपैकी एक संस्कार. चूडा म्हणजे शिखा. मुलाच्या डोक्यावर शेंडी ठेवून बाकीचे केस कापण्याचा जो विधी प्रथम करतात, त्याला चूडाकर्म, चूडाकरण किंवा चौल असे नाव आहे. जन्मल्यापासून पहिल्या, तिसऱ्या किंवा पाचव्या वर्षी मुलाचे चौल करणे प्रशस्त होय, असे गृह्य सूत्रांत सांगितले आहे. पुष्कळदा ते सातव्या वर्षी किंवा उपनयनाच्या आधी त्याच दिवशी करतात. राजमार्तंडाच्या मते चैत्र व पौष आणि सारसंग्रहानुसार ज्येष्ठ व मार्गशीर्ष हे मास वगळून उत्तरायणात हा संस्कार करणे प्रशस्त होय. हा संस्कार दिवसाच करायचा असतो. याचा विधी असा–

शुभ दिवशी संकल्प, गणपतिपूजन, पुण्याहवाचन, नांदीश्राद्ध, इ. प्रारंभिक कृत्ये झाल्यावर अग्नी सिद्ध करून तांदूळ, सातू, उडीद व तीळ वेगवेगळ्या द्रोणांत भरून ठेवतात. मग आई मुलाला मांडीवर घेऊन अग्नीच्या पश्चिमेला बसते. पिता हातात एकवीस दर्भ घेऊन तिच्या उजव्या हाताला उभा राहतो. उजव्या हातात गार पाणी व डाव्या हातात गरम पाणी घेऊन तो ती दोन्ही उदके एका भांड्यात एकदम ओततो. ते पाणी तीनदा मुलाच्या डोक्याला चोळतो. नंतर मुलाच्या उजव्या कानाजवळच्या केसांवर ‘ओषधे त्रायस्वैनम्’ हा मंत्र म्हणून दर्भ दाबून धरतो. नंतर ‘येनावपरसविता’ हा मंत्र म्हणून मुलाच्या कानाजवळचे केस दर्भासह कापतो. मग ते केस शमीच्या पानांसह मातेच्या हाती देतो. ती ते बैलाच्या शेणावर टाकते. असे तीन वेळा केल्यावर मग यजमान नापिताला मुलाची हजामत करायला सांगतो. नापित यजमानाच्या प्रवरसंख्येनुसार, कुमाराच्या मस्तकावर एक, तीन किंवा पाच शेंड्या राखतो.

मग ते कापलेले केस बैलाच्या शेणासह गोठ्यात पुरतात, एखाद्या जलाशयात टाकतात किंवा जलाजवळच्या प्रदेशात झाकून ठेवतात. मग स्विष्टकृतादी कर्मशेष समाप्त करतात. ब्राह्मणभोजन घालतात आणि पुरोहित व नापित यांना दक्षिणा देतात.

शिखा म्हणजे शेंडी धारण करणे, हे या संस्कारातील मुख्य तत्त्व आहे. शिखा ही हिंदुत्वाची निदर्शक खूण आहे. अनेक प्रकारांनी शेंड्या राखण्याची पद्धती ही भिन्न कुलांची निदर्शक आहे. वसिष्ठगोत्रीय आपली शिखा उजव्या बाजूला ठेवीत. म्हणून ऋग्वेदात त्यांना ‘दक्षिणतस्कपर्दाः’ असे म्हटले आहे. अत्री व कश्यप यांचे वंशज दोन बाजूंना दोन शिखा ठेवीत, तर अंगिरसाचे वंशज पाच शिखा ठेवीत, असे सांगितलेले आहे.

धार्मिक कृत्यांसाठी शिखा आणि यज्ञोपवीत या गोष्टी अत्यावश्यक आहेत, असे देवल सांगतो. शिखा नष्ट केल्यास त्याबद्दल तप्तकृच्छ्र प्रायश्चित्त घ्यावे, असे हारीताने म्हटले आहे. ज्या मस्तकावर शेंडी नाही; ते मस्तक अपवित्र होय, असे काठक गृह्यसूत्र म्हणते. जुन्या काळी लोकांना शेंडीचा जाज्वल्य अभिमान होता. शिखानष्ट ही त्या काळात शिवी समजली जात असे.

मुलींचाही चूडाकर्म हा संस्कार करीत; पण तो अमंत्रक करीत, असे आश्वलायन गृह्यसूत्र सांगते. पहिले केस अशुद्ध असतात, या समजुतीने अजूनही काही जातीत मुलींचा हा संस्कार करतात.

चूडाकर्माचा उगम कसा झाला असावा, याबद्दल राजवाडे

पांडेय यांनी आपले विचार पुढीलप्रमाणे मांडले आहेत—

आदिम मानवापुढे, आपले केशसंभार असलेले मस्तक स्वच्छ कसे ठेवावे, ही एक समस्याच होती. मस्तकावरचे केस कापून टाकणे, हाच त्यावरचा एक उपाय आहे, असे बऱ्याच कालावधीनंतर त्याच्या ध्यानात आले. केशच्छेदनाची ही घटना नवीन आणि फायदेशीर होती. त्यामुळे व्यक्तीच्या जीवनात ती एक महत्त्वपूर्ण घटना मानली जाऊ लागली. एखाद्या लोखंडी हत्याराने केस कापणे हे स्वास्थ्यकर आहे, हे त्याला समजत होते; पण त्याचबरोबर वस्तऱ्याच्या धारेने आपल्याला इजा तर होणार नाही ना, अशीही त्याला मनातून भीती वाटत होती. अशा प्रकारे आवश्यकता आणि भय या दोहोंतून पुढे चूडाकर्माविषयीच्या विधिविधानांचा जन्म झाला.

धर्मशास्त्रानुसार संस्कार्य व्यक्तीला दीर्घायुष्य, सौंदर्य व कल्याण यांची प्राप्ती करून देणे, हे या संस्काराचे प्रयोजन असते. आयुर्वेदाच्या ग्रंथांतही या धर्मशास्त्रोक्त प्रयोजनाला पुष्टी दिलेली आहे.

चूडाकरण संस्काराच्या वेळी म्हणायचे जे मंत्र गृह्यसूत्रांत दिले आहेत, ते सर्व वैदिक साहित्यात आढळतात. त्या मंत्रांवरून असे दिसते, की केशच्छेदन या प्रयोजनासाठीच ते निर्माण केले गेले होते. सूत्रकालात या विधानाला व्यवस्थित रूप प्राप्त झाले. [हि. ध.; हिं. सं.]

चूडाधारी

गौडीय वैष्णवांचा एक उपपंथ. हे लोक गोपालकृष्णाप्रमाणे मुकुट धारण करून हिंडतात. पूर्व बंगालमधील मैमनसिंग जिल्ह्यात यांची वस्ती आहे. यांच्या चालीरीती वैष्णवांच्या सारख्याच आहेत. [वै. शै. म. व.]

चूडामणिसुत

(१८१०–१८७० इ. स.) एक मराठी कवी व कीर्तनकार. म्हैसूर राज्यातील चाकूर गाव ही याची जन्मभूमी होय. याचे नाव विठ्ठल होते. चूडामणी हे याच्या वडिलांचे नाव आहे. म्हणून या कवीने स्वतःला चूडामणिसुत असे नाव घेतले व ते कवितेत वापरले.

याचे आईवडील लहानपणीच वारले. त्यामुळे याचे पालनपोषण व मौंजीबंधन बनवस संस्थानातील माधवाचार्य नामक पुरुषाने केले. हाच त्याचा विद्यागुरू व मोक्षगुरू झाला. माधवाचार्यांनी पुढे चूडामणिसुताचा विवाह केला. पुराण सांगणे व कीर्तन करणे, हा त्याचा प्रमुख व्यवसाय होता. चुडामणिसुत आपल्या कीर्तनातील पदे व आख्याने स्वतःच रची. प्रतिमा, शब्दलालित्य, उपमा, अनुप्रासादी अलंकार, इ. काव्यगुणांनी याचे काव्य युक्त आहे. त्याचा एक नमुना असा—

येई येई दयाघन रामा ।। धृ. ।।
उडुपतिवदना अंबुजनयना कोमलतनु घनश्यामा ।।१।।
जानकीजीवना शरधनुधरणा सीतापते गुणधामा ।।२।।
चूडामणिसुत विठ्ठल विनवी प्रीत असो तव नामा ।।३।।

भर्तृहरीच्या शतकत्रयावर समश्लोकी टीका, अमरकोशावर टीका व महिम्नावर टीका असे तीन टीकाग्रंथ याने लिहिले आहेत. [म. क. च.]

चूडामणी

(१) स्त्रियांनी डोक्यात घालायचा एक अलंकार. ‘ चूडामणिः शिरोरत्नम् ’(अमर). याच्या जोडीला मकरिका म्हणजे मकराच्या आकाराचे दुसरे एक रत्न असते. मकरिका थेट भांगातून कपाळावर आणतात आणि चूडामणी मागच्या अंगाला लोंबवतात. चूडामणी प्रफुल्ल कमळासारखा असतो. त्याला मोत्यांच्या पाकळ्या जडवतात.

(२) एक पुण्ययोग. सूर्यग्रहण रविवारी व चंद्रग्रहण सोमवारी आले, तर त्या योगाला चूडामणी असे म्हणतात. चूडामणी योग हा इतर वारी येणाऱ्या ग्रहणांच्या कोटीपट पुण्यफल देतो, अशी समजूत आहे. [हि. ध.]

चूडीगर

राजस्थानातली एक जात. हे हस्तिदंती बांगड्या तयार करतात, म्हणून यांना चूडीगर असे म्हणतात. चूडीगर लोक इस्लामधर्मी असून, सैयद वंशाचे आहेत. सून्नी हा त्यांचा पंथ होय. मारवाडातील मुसलमानांप्रमाणे त्यांचे रीतीरिवाज आहेत.



चूडीगर

मारवाडातील दोन प्रसिद्ध वस्तू म्हणजे हस्तिदंती पंख्यांच्या दांड्या व काजळाच्या डब्या. चूडीगर लोक त्या तयार करण्यात अत्यंत निपुण असतात. नारळाच्या करवंटीपासूनही काही चांगल्या वस्तू करण्यात यांचा हातखंडा आहे. [रा. जा.]

चूमावन बिहारमधील भिल्लांचा लग्नविषयक एक विधी. लग्न ठरल्यानंतर मांडवात स्वैपाकासाठी जी चूल घालतात, त्या चुलीवर प्रथम थोडा भात शिजवतात. या भातासाठी लागणारे तांदूळ वधू-वरांच्या घरचे असतात. भात शिजल्यावर वधू-वरांचे पालक त्यातला थोडा भात आपापल्या घरी नेतात. तिथे पाच सुवासिनी एकत्र जमून त्या भाताचे चुंबन घेतात. वधू-वरांनाही त्या भाताचे चुंबन घ्यायला सांगतात. या विधीला चूमावन असे नाव आहे. [बि. पे. ला.]

चूर्णी जैनांच्या आगम ग्रंथांवर ज्या वेगवेगळ्या टीका आहेत, त्यांत चूर्णी नावाचा एक प्रकार आहे. चूर्णीची व्याख्या अशी–

> अत्थबहुलं महत्थं हेउनिवाओवसग्गगंभीरं ।
> बहुपायमवोच्छिन्नं गमणयसुद्धं तु चुण्णपयं ॥
>
> (अभि. रा.)

अर्थ – ज्यात अर्थबाहुल्य व अर्थघनत्व आहे, हेतू, निपात व उपसर्ग यांनी जे युक्त आहे, जे गंभीर व अनेक पदांनी समन्वित आहे, ज्यात उपाय जाणण्याचे अनेक मार्ग आहेत, आणि जे नयशुद्ध आहे, त्याला चूर्णीपद असे म्हणतात.

चूर्णी हे गद्यग्रंथ असून ते प्राकृत भाषेत लिहिलेले आहेत. निर्युक्ती व भाष्ये यांच्यापेक्षा चूर्णी ग्रंथांचे क्षेत्र अधिक विस्तृत आहे. या ग्रंथांमध्ये धार्मिक व लौकिक अशा अनेक कथाही आढळतात.

सर्व चूर्णींत निशीथचूर्णी व आवश्यकचूर्णी यांचे स्थान वरचे आहे. जिनदासगणी हा या चूर्णींचा कर्ता होय. यात सेतू, चेढक व वसुदेव यांची चरित्रे दिलेली आहेत. निशीथचूर्णीत श्रमणांच्या आचार-विचारासंबंधीचे अपवाद सांगितले आहेत. त्याचबरोबर अनेक देशांतील रीतीरिवाजही कथन केलेले आहेत. उदा० गुजरात देशात मामाच्या मुलीबरोबर विवाह करतात, माळवा व सिंध या देशांतील लोक कठोरभाषी व महाराष्ट्रातील लोक वाचाळ असतात, इत्यादी.

आवश्यकचूर्णीत ऋषभदेवाच्या जन्मापासून निर्वाणापर्यंतच्या सर्व घटना विस्ताराने वर्णिल्या आहेत. तिथे आर्यवेदांची रचना ऋषभदेवाने केल्याचे सांगितले असून, याज्ञवल्क्याने रचलेल्या वेदांना अनार्य म्हटले आहे. या चूर्णीत ऋषभदेवाप्रमाणेच महावीराचा जन्म, त्याचा विवाह, भ्रमण, इ. माहिती खुलासेवार दिली आहे. महावीराच्या चरित्राची एवढी माहिती अन्यत्र उपलब्ध होत नाही. पुढे आर्यरक्षित, गोष्ठामाहिल, जमाली, तिष्यगुप्त, आषाढाचार्य, इत्यादींचे कथावृत्तांत दिलेले असून काही लोककथाही सांगितल्या आहेत.

याशिवाय दशाश्रुतस्कंधचूर्णी, दशवैकालिकचूर्णी, नंदीचूर्णी, उत्तराध्ययनचूर्णी, इ. अनेक चूर्णी आहेत. उत्तराध्ययनचूर्णीत अनेक शब्दांच्या व्युत्पत्ती दिलेल्या आहेत.

चूर्णीसाहित्यात जैनपुरातत्त्वाची सामग्री विपुल आहे. देशोदेशींचे सण, मेळे, व्यापारीमार्ग, वस्त्रे, आभूषणे, इ. विष. यांचे वर्णनही या ग्रंथांत सापडते. त्यावरून जैन आचार्यांची जनसंपर्कवृत्ती, व्यवहारकुशलता व व्यापक अध्ययन यांचा परिचय होतो. भाषाशास्त्र व लोककथा या दृष्टींनीही चूर्णीवाङ्मय फार समृद्ध आहे.

वणिज कुलातला कोटिक गणातला आणि वज्रशाखेचा जिनदासगणी हा चूर्णी वाङ्मयाचा प्रणेता म्हणून प्रसिद्ध आहे. हा इ. स. च्या सहाव्या शतकात होऊन गेला, असे मानतात. [प्रा. सा. इ.; जैनधर्मामृत; भा. सं. जै. यो.]

चूल (सं. चुल्ली) 'चुल्यते प्रज्वाल्यते अग्निरत्र' = जिच्यामध्ये अग्नी प्रज्वलित केला जातो, ती जागा (श. क.). चूल ही सामान्यतः स्वयंपाकघरात असते व तिच्यावर कुटुंबाचा स्वयंपाक केला जातो. कुटुंबाचे अन्न शिजवते म्हणून चुलीला देवत्व प्राप्त झाले आहे. त्यासाठीच चुलीला पाय लावीत नाहीत व अशुची अवस्थेत तिला शिवत नाहीत. मृताशौचात घरातल्या चुलीवर स्वयंपाक करीत नाहीत. बायका रोजच्या रोज चूल सारवून तिच्यावर रांगोळीही घालतात. पुष्कळदा वैश्वदेवही चुलीतच केला जातो. त्यामुळे तिला अग्निकुंडाचे स्वरूप प्राप्त झालेले आहे.

प्रारंभी माणसे आपले अन्न विस्तवात भाजून खात असत. त्या कामी त्यांना धुमी किंवा शेकोटी चालत असे. पण जेव्हा माणसाने पात्र निर्माण केले व अन्न शिजवून खाण्याची कल्पना त्याला सुचली, तेव्हा त्या कामी शेकोटी गैरसोयीची ठरली. म्हणून मग त्याने तीन दगड त्रिकोणात मांडून चूल निर्माण केली. त्यामुळे चूल ही मानवाच्या सांस्कृतिक विकासाचा एक महत्त्वाचा टप्पा दाखवते, असे म्हणायला हरकत नाही.

चूलगिरी एक जैन क्षेत्र. मध्यप्रदेशातील महू गावापासून सुमारे ९० मैलांवर वडवानीच्या दक्षिणेला चूलगिरी हा एक पर्वत आहे. या पर्वताच्या शिखरावरून इंद्रजीत, कुंभकर्ण, इ. मुनी मोक्षाला गेले, असे जैनग्रंथात सांगितले आहे. इथे एक प्रचंड जिनप्रतिमा आहे. [जै. सा. इ.]

चूलभाणस महाराष्ट्रातली एक विवाहविषयक रूढी. वधूचा गृहप्रवेश होऊन लक्ष्मीपूजन झाल्यावर

तिची सासू तिला हाती धरून स्वयंपाकघरात नेते व तिला चूल आणि माणस (ताक करण्याचा डेरा) दाखवते. या गोष्टीचा उद्देश इतउप्पर घरी आलेल्या सुनेने चूल आणि दुमते सांभाळावे, असे सांगण्याचा असतो. [ल. वि. सो.]

चूलिक एक प्राचीन जमात. हे लोक भारताच्या वायव्य भागात राहत असत. पाजिटरने यांचा संबंध पिशाचांशी जोडला आहे. मत्स्य, मार्कंडेय, वायू इ. पुराणांत यांचा उल्लेख आहे. [क. हि. वा. पु.]

चूलिकाटा असाममधील एक जमात. हे लोक दिगरू आणि दिबाँग या दोन नद्यांच्या मधल्या डोंगराळ आणि जंगली प्रदेशात राहतात. यांचे खरे नाव मिधी असे आहे; पण आसामी लोक त्यांना चूलिकाटा मिश्मी या नावाने ओळखतात. चूलिकाटा म्हणजे डोक्याच्या पुढील भागाचे केस कापणारे.



चूलिकाटा स्त्री

या लोकांची मोठमोठी खेडी असतात. या प्रत्येक खेड्यात त्यांची ६० फूट लांब आणि १२ फूट रुंद अशी १० ते ३० घरे असतात. या घरांतून लहान लहान खोल्या काढलेल्या असतात.



चूलिकाटांचा प्रमुख

यांचा वर्ण एक तर पूर्ण गोरा असतो किंवा अगदी काळाकुट्ट तरी असतो. मुली देखण्या आणि तरतरीत असल्या, तरी अस्वच्छ राहणीमुळे व केसांच्या चमत्कारिक कापणीमुळे कुरूप व बेडौल दिसतात. चूलिकाटांची चेहरेपट्टी मंगोलियन नमुन्याची असून, त्यांचे तोंड चपटे व रुंद, नाकपुड्या मोठ्या व वाटोळ्या आणि डोळे बारीक व तिरवे असतात. पुरुष स्त्रियांहून ठेंगणे व कुरूप असतात.

यांचा टोळीप्रमुख वंशपरंपरागत असून त्याला गाम असे म्हणतात. हा केवळ नामधारी असतो. टोळीतल्या एखाद्याने खून जरी केला, तरी टोळीप्रमुख त्याला शासन करू शकत नाही. पूर्वी हे लोक आसपासच्या प्रदेशात लूटमार करून लोकांच्या बायका, मुले, संपत्ती पळवून नेत. आता बहुतेक सर्व चूलिकाटा मेण, आले, तिखट इ. पदार्थ विकतात. तसेच खाजकुयली-

सारख्या हिमालयीन वनस्पतींच्या तंतूंपासून भक्कम आणि टिकाऊ कापड बनवतात व विकतात. या कापडापासूनच ते चिलखते बनवतात व गव्याच्या कातड्यापासून ढाली तयार करतात.

चूलिकाटांचा पोषाख साधा असतो. स्त्रिया जी जाकिटे वापरतात ती छातीवर उघडी असतात व त्यांतून त्यांच्या गळ्यातले दागिने दिसतात. या जाकिटांवर कशिदाकारी केलेली असते. पुरुष नेहमी आपल्याबरोबर खंजीर, तिरकमठे, तिबेटी तलवारी, इ. हत्यारे बाळगतात.

सण-समारंभ, पाहुण्यांचे स्वागत आणि अंत्यविधी, या प्रसंगी हे लोक एक नृत्य करतात. या नृत्याला ढोलाची साथ असते. टोळीप्रमुख आपल्या सर्व बायकांसह या नृत्यात भाग घेतो. पुरुष नर्तक अंगात एक लांब झगा घालून डोक्यावर शिंगे लावलेले शिरस्त्राण ठेवतो. कशिदा काढलेला एक सुंदर पट्टा त्याच्या खांद्यावरून लपेटलेला असतो आणि एक रुंद पट्टा कमरेभोवती बांधलेला असतो. खांद्यावरील पट्ट्याला बारीक घुंगरे लावलेली असतात व नृत्यसमयी त्यांचा मधुर ध्वनी येतो.

विवाहप्रथा – यांच्यांत बहुपत्नीत्वाची चाल आहे. ज्या बायका नवऱ्याशी एकनिष्ठ राहत नाहीत, त्या टोळीप्रमुखाला अगर एखाद्या श्रीमंताला विकल्या जाऊन त्याच्याकडेच राहतात.

मर्तिकप्रथा – मृतांना गावाबाहेर जंगलात नेऊन पुरतात. तिथे एक खड्डा खणून त्यात थोड्या गवताच्या वस्तू, मृताची हत्यारे व कपडे ठेवून त्यात त्याला पुरण्यात येते. पुरलेल्या जागी मग ते नाच करतात. [इं. स्ट. पा. प्रे., जाने. १९६०]

चूहडपंथ उ. प्रदेशातील एक पंथ. एका वाण्याने या पंथाची स्थापना केल्याचे सांगतात. श्रीकृष्ण हे या पंथाचे उपास्य दैवत आहे. श्रीनाथ या रूपाने त्याची उपासना केली जाते. कृष्णाच्या नामसंकीर्तनाने तन-मनशुद्धी व आत्मोद्धार होतो, असे या पंथाचे मत आहे. या पंथात स्त्री-पुरुष एकत्र येऊन नृत्य-गायनाच्या योगाने श्रीनाथाची भक्ती करतात.

चूळामणी तमिळ भाषेतले एक खंडकाव्य. शिलप्पधिकारम्, मणिमेखला, इ. पाच महाकाव्यांच्या नंतरच्या काव्यसाहित्यात चूळामणी हे काव्य श्रेष्ठ दर्जाचे समजले जाते. तोळमाळितेवर हा जैन पंडित याचा कर्ता असून, त्याने या काव्याची कथावस्तू जैन महापुराणातून घेतली आहे. प्रस्तुत काव्याचा सारांश असा –

सिंधू नदीच्या तीरावर सुरमै नावाचा एक देश होता. बोधनपुरम् नावाची त्याची राजधानी होती. पयापती हा त्या देशाचा राजा अजातशत्रू होता. त्याला दोन भार्या होत्या. एकीचे नाव मिगावती व दुसरीचे शची. मिगावतीला विजयन् नावाचा व शचीला तिविट्टन् नावाचा पुत्र झाला. विजयनाची शरीरकांती शंखाप्रमाणे शुभ्र होती. त्याचे नत्र कमलदलाप्रमाणे सुदीर्घ आणि सुंदर होते. तिविट्टनाची सामुद्रिक लक्षणे पुढीलप्रमाणे होती–

पूवैयम् पुदुमलर पुरैयुम् मेनियन्
तूविरि तामरै तॉलैत्त काण्डीनन्
तीविरि आम्बलिन् शिवन्द वायिबन्
माविरि तिरुमरु अणिन्द आर्षिनन्
शंगियल् वलंपुरि तिकिरी एं ड्रिवै
तंगिय अंगैयन्, अडित्तण् पोदिनन्
मंगल मळ्कळिरु अनैय शॅलहैयान्
इंगु मुन् मॉळिन्दवक्कुं इळैय नम्बिये !

अर्थ – तिविट्टनाचा देह नवकदंब पुष्पासारखा नीलवर्ण होता, त्याचे नेत्र उत्फुल्ल कमलाला पराजित करणारे होते. त्याचे ओठ पाहून सहजपणे लाल कुमुदाचे स्मरण होत असे. त्याच्या हृदयावर एक काळा तीळ होता. तो श्री आणि भाग्य यांचा सूचक होता. त्याच्या हातावर शंख-चक्रांच्या रेखा सुस्पष्ट दिसत होत्या. त्याचे चरण कमलाहूनही मृदू होते आणि त्याची चाल मदमत्त गजासारखी धीरोदात्त होती.

मेरू पर्वताच्या पायथ्याला विद्याधरांचा एक विशाल देश होता. त्याच्या दक्षिणभागाच्या राजधानीचे नाव रथनूपुरचक्रवाल असे होते. तिथे ज्वलनजटी नावाचा विद्याधर राज्य करीत होता. तो कुशल योद्धा व मंत्रविद्यापारंगत होता. त्याच्या राणीचे नाव वायुवेगै असे होते. ती रूप–गुणांची खाण होती. या राजाला एक कन्या होती, तिचे नाव स्वयंप्रभा. ती आता यौवनात प्रविष्ट झाली होती. या कन्यारत्नाला सुयोग्य वर कसा लाभेल, याविषयी ज्वलनजटीला विवंचना होती. पण राजज्योतिष्याने ज्वलनजटीला सांगितले.

“ तुमचा जामात विद्याधर लोकात किंवा स्वर्गात जन्मला नाही. तो जन्मला आहे भूतलावर ! सुरमै देशाचा राजा पयापती याचा तो द्वितीय पुत्र असून, त्याचे नाव तिविट्टन् असे आहे. ”

ते ऐकून ज्वलनजटीला आनंद झाला. त्याने मरीची नामक राजदूताकरवी पयापतीकडे पत्ररूपाने विवाहप्रस्ताव पाठवला. पयापतीने ते पत्र वाचून स्वतःला धन्य मानले व त्या पत्राला सहर्ष संमती दिली.

विद्याधरदेशाच्या उत्तरभागात अश्वकंठ नावाचा पराक्रमी राजा राज्य करीत होता. त्याला आपल्या शक्तीचा अत्यंत गर्व

होता. एके दिवशी राजज्योतिष्याने त्याला भविष्य सांगितले.

"महाराज, तुमच्यावर लवकरच फार मोठी आपत्ती येऊ घातली आहे. सुरम्य देशाचा राजपुत्र तिविट्टन् हा तुमचा शत्रू बनणार आहे. तो महापराक्रमी असल्यामुळे त्याला जिंकणे ही गोष्ट दुर्घट आहे. तरी तुम्ही आतापासूनच त्याच्या नाशाचा उपाय शोधावा."

ते भविष्य ऐकून अश्वकंठ खदखदा हसला आणि गर्वाने बोलला. 'मी त्या तिविट्टन् पोराला एका क्षणात यमलोकी पाठवून देईन.'

मग-त्याने तिविट्टनाचा बाप पयापती याला खलिता पाठवून आपले मांडलिकत्व स्वीकारण्याची आज्ञा केली.

पयापतीला अश्वकंठ राजाच्या सामर्थ्याची कल्पना होती. त्यामुळे त्याने अश्वकंठाचे मांडलिकत्व स्वीकारण्याची गोष्ट तत्काळ मान्य केली. असंख्य सुवर्णमुद्रा आणि रत्नराशी असा नजराणा देऊन, पयापतीने अश्वकंठाच्या राजदूताला परत पाठविले.

राजदूत ते सगळे ऐश्वर्य घेऊन परत जात असता वाटेत त्याला तिविट्टन् भेटला. त्याने त्या राजदूताला हटकले. घडलेली हकिगत त्याच्याकडून समजताच तिविट्टनाने त्याच्याकडचे सगळे द्रव्य हिरावून घेतले आणि त्याला परत पाठविले.

राजदूताने राजधानीत येऊन हा सर्व वृत्तांत अश्वकंठ राजाला सांगितला. तिविट्टनाची ही धृष्टता ऐकून अश्वकंठ अत्यंत क्रुद्ध झाला. त्याने अरिकेतू नामक सेनापतीला बोलावून आणून आज्ञा दिली.

"तू सिंहाचे रूप धारण करून बोधनपुरम्ला जा आणि तिविट्टनाला खाऊन टाक."

अरिकेतू लगेच त्या कामगिरीवर निघाला. एका भयानक सिंहाच्या रूपात त्याने बोधनपुरम्च्या सीमेत प्रवेश करून प्रचंड गर्जना केली. त्यामुळे सारे जीव-जंतू प्राणभयाने पळत सुटले. राजधानीतले लोकही भयग्रस्त होऊन थरथरा कापू लागले. सिंहाने सगळीकडे धूमाकूळ मांडला. तिविट्टनाने क्रोधायमान होऊन त्या सिंहावर चाल केली. त्या मायावी सिंहाचा तिविट्टनापुढे टिकाव लागला नाही. तो हतगर्व झाला आणि जीव घेऊन पळत सुटला.

तिविट्टनाच्या या विजयाची वार्ता ज्वलनजटीला थोड्याच वेळात कळली. आपल्याला अतुल पराक्रमी जावई मिळाला, हा आनंद त्याच्या हृदयात मावेना. मग तो आपल्या कन्येला घेऊन बोधनपुरम्ला प्राप्त झाला आणि त्याने विवाहमुहूर्त निश्चित केला. नगरात ही शुभवार्ता पसरली आणि सर्वत्र आनंदोत्सव सुरू झाला.

एवढ्यात रथनूपुर चक्रवाल नगराहून एक दूत भयभीत होऊन ज्वलनजटीकडे आला. त्याने राजाला वार्ता सांगितली, की अश्वकंठ राजा प्रचंड सैन्यानिशी बोधनपुरम्वर चालून येत आहे. त्या वार्तेचा प्रत्यय तावडतोब आला. दुसऱ्याच दिवशी बोधनपुरम्वर अश्वकंठाचे सैन्य येऊन आदळले. या युद्धाचीही जबाबदारी तिविट्टनाने आपल्याच शिरावर घेतली. तो अश्वकंठाच्या सैन्याला निधड्या छातीने जाऊन भिडला. उभयपक्षी रणकंदन माजले. पण थोड्याच वेळात तिविट्टनाने अश्वकंठावर चढाई करून खड्गप्रहाराने त्याचे शिर धडावेगळे केले. आपला राजा रणभूमीवर पडल्याचे पाहून त्याचे सर्व सैन्य दशदिशा पळून गेले. युद्ध संपले. राजधानीतल्या लोकांनी तिविट्टनाचा गगनभेदी जयघोष केला.

मग तिविट्टन् आणि स्वयंप्रभा यांचा विवाहसमारंभ धूमधडाक्याने पार पडला. पाठोपाठ पयापतीने तिविट्टनाला सिंहासनावर बसवून राज्याभिषेक केला. तिविट्टनाने कित्येक वर्षे राज्य केले आणि अमित राज्यभोग उपभोगले. पयापती त्यानंतर तपस्येला निघून गेला. थोड्याच कालात केवलज्ञान प्राप्त करून तो मानवजातीचा चूळामणी (चूडामणिरत्न) ठरला. [नवनीत (हिंदी)–नोव्हेंबर १९५६]

चेंचू एक आदिवासी वन्य जमात. हे लोक आंध्र प्रदेशातील कर्नूल व नेल्लोर जिल्ह्यांतील डोंगरात राहतात. यानाडी व आपण एकच असल्याचे हे सांगतात. पूर्वी हे लोक क्रूर व रानटी अवस्थेत होते. वाटसरूंना लुबाडणे हा त्यांचा व्यवसाय होता. वाटसरूंनी प्रतिकार केल्यास ते त्यांना ठार मारायलाही कमी करीत नसत. डोंगराच्या पायथ्याशी वसलेल्या खेडुतांकडून ते दमदाटीने पैसे उकळीत. पण इतके करूनही त्यांची पैशाची गरज भागत नसे व त्यांना कोमटी लोकांकडून कर्ज काढावे लागे. या कर्जाच्या बदल्यात रानातील चांगली झाडे तोडून हे त्यांना इमारती लाकूड पुरवीत. फळे मिळविण्यासाठी हवी तशी झाडांची तोड करणे, जंगलात आगी लावून देणे



चेंचू शिकारी

आणि डोंगरावरील ओढे, नद्या व तळी यात मासे मिळवण्यासाठी विष टाकणे, इ. अनेक घातक गोष्टी हे करीत. पण पुढे इंग्रज सरकारने या बाबतीत त्यांच्यावर अनेक बंधने घालून त्यांना कह्यात आणले. हे चांगले शिकारी आहेत.

चेंचूंची खेडी डोंगरमाथ्यावर वसलेली असतात. त्यांच्या घरांची पहिली रांग अर्धवर्तुळाकार असते आणि बाकीच्या रांगा सरळ असतात. बांबू, लाकूड आणि केंबळ वापरून हे घरे बांधतात. सगळी घरे एकाच नमुन्याची असतात. घराला एकच दार असते आणि खोल्या वगैरे काही नसतात. घरात अर्ध्या भागात स्वयंपाक करतात आणि उरलेला अर्धा भाग उठण्याबसण्यासाठी व झोपण्यासाठी वापरतात. धनुष्यबाण, बंदूक वगैरे हत्यारे ते झोपडीच्या माळयावर ठेवतात. गारगोट्यांनी विस्तव पेटवतात. विस्तव पेटवल्यावर त्यातले एक कोलीत शेजारणीला देतात. ते न दिल्यास त्यांना जमातीकडून वाळीत टाकले जाण्याची भीती असते.

चेंचू लोक कोंबड्या, शेळ्या व म्हशी पाळतात. कंदमुळे आणि फळे हा त्यांचा मुख्य आहार असतो. याशिवाय लहान पाखरे, खारी आणि उंदीर ते विस्तवावर भाजून खातात. एखादे सावज मिळाले, तर त्याचे वरचे केस काढून ते कातडेही खातात. मोहाच्या फुलांची दारू त्यांना फार प्रिय असते. तंबाखूचेही त्यांना फार व्यसन असते.



चेंचू लोकांचे घर

वेषभूषा – चेंचू पुरुष स्त्रियांप्रमाणे लांब केस वाढवतात व डोक्यावर किंवा डोक्याच्या मागच्या बाजूला त्यांची गाठ मारतात. ते एक लंगोटी नेसतात. पूर्वी ते कमरेभोवती सागाची पाने व झाडांच्या साली बांधीत असत. काही चेंचू पुरुष डाव्या कानात पितळेचे वलय व डाव्या दंडात निकेलचे कडे घालतात. चेंचू स्त्रिया पूर्वी वल्कले नेसत असत. हल्ली त्या कमरेभोवती गुडघ्यापर्यंत वस्त्र गुंडाळतात व अंगात चोळी घालतात. त्यांच्या गळ्यात मण्यांच्या खूप माळा व हातात काचेच्या बांगड्या असतात. माळांपैकी एक बालपणातली, दुसरी वयात आल्यावेळची आणि बाकीच्या लग्नाच्या वेळी घातलेल्या असतात. विधवा स्त्रिया मात्र माळा व बांगड्या घालीत नाहीत.



चेंचू पुरुष

मुलीला ऋतुप्राप्ती झाली, की तिला एका स्वतंत्र झोपडीत ठेवतात आणि तिच्या दिमतीला एक म्हातारी बाई देतात. चौथ्या दिवशी स्नान केल्यावर तिला नवी साडीचोळी देतात.

विवाहप्रथा – चेंचू लोकांत पाच कुळे वा गोत्रे आहेत. त्यांच्यांत सगोत्र विवाह होत नाही. आते–मामे भावंडांत लग्न होते. एखादी मुलगी वयात आल्याचे कळले, की एखादा विवाहोत्सुक तरुण त्या मुलीशी लग्न करण्याची आपली इच्छा आपल्या आईबापांजवळ व्यक्त करतो. मग ते मुलीच्या आईवडिलांकडे लग्न ठरविण्यासाठी जातात. लग्नासाठी मुलीची संमती आवश्यक असते. विवाहाच्या दिवशी नवरा मुलगा वधूच्या गावी जायला निघाला, की एक मनुष्य पुढे जाऊन वधूपक्षाला तशी वर्दी देतो. वरपक्षाकडील मंडळी मोहाची फुले व दारू घेऊन वधूच्या गावी जायला निघते. त्यांच्याबरोबर एक ढोलक्याही असतो. वऱ्हाड गावाच्या वेशीपाशी आले, की तो मोठ्याने ढोल वाजवू लागतो. मग वधूपक्षाकडील मंडळी त्यांना सामोरी येते. नवरामुलगा वधूला मण्यांच्या माळा आणि नवी साडीचोळी देतो. दुसऱ्या दिवशी वराकडील मंडळी मोहाची फुले, कंदमुळे व दारू यांची जेवणावळ घालतात. मग जमलेले लोक नृत्य करतात. स्त्रियाही नृत्यात भाग घेतात. चेंचू लोकांत विवाहाचे आणखीही काही प्रकार आहेत ते असे—

(१) एखादा तरुण एखादी मुलगी पसंत करतो व ती

दोघे परस्परांच्या संमतीने एका रात्रीपुरती गावाच्या बाहेर जाऊन राहतात. दुसऱ्या दिवशी सकाळी त्यांचे आईबाप आप्तेष्टांना बोलवतात, त्या मुलाला व मुलीला नवे कपडे देतात व



चेंचूंचे नृत्य

त्यांचे लग्न झाले, असे सांगतात. मग जमलेल्या लोकांना जेवण घालतात.

(२) जमिनीचा एक लहानसा वर्तुळाकार भाग शेणाने सारवतात व त्याच्या मध्यभागी धनुष्य व बाण एकत्र बांधून रोवतात. वधू-वर त्याच्या भोवती प्रदक्षिणा घालतात व जमलेले लोक त्यांच्यावर अक्षता टाकतात.

(३) ब्राह्मणाला बोलावून मुहूर्त पाहतात. बोहले उभारून त्यांच्यावर वधू-वरांना बसवतात. मग नवरामुलगा वधूच्या गळयात ताळी बांधतो, जमलेले लोक वधू-वरांच्या मस्तकावर अक्षता टाकतात व विवाहविधी समाप्त होतो.

सर्वसाधारणपणे चेंचू तरुण झाडावर चढता येणारी मुलगी विशेष पसंत करतो. यांच्यांत बहुपत्नीत्वाची चाल आहे. सुस्थितीतले चेंचू दोन तरी बायका करतातच.

प्रसूतिप्रथा – गरोदर स्त्रीला प्रसववेदना सुरू झाल्या, की घरातील पुरुष बाहेर निघून जातात. मग गावातील एखादी म्हातारी तिच्या मदतीला येते. मुलाच्या जन्मानंतर तिसऱ्या दिवशी गावातील स्त्रियांना बोलावून पानसुपारी देतात. सहा किंवा सात दिवस सुवेर पाळतात. दहाव्या किंवा बाराव्या दिवशी मुलाचे नाव ठेवतात. लिंगाडू, बियाडू, गुरुवाडू अशी त्यांची नावे असतात. मुलींना स्त्रीदेवतांची नावे ठेवतात.

देवधर्म – चेंचू हे निसर्गशक्तीचे पूजक आहेत. आकाशअम्म, भूमिअम्म आणि अम्मातल्ली या त्यांच्या खास देवता आहेत. याशिवाय ते सूर्य, नरसिंह, अंकलम्म, पोट्टू राझू, सुंकल्लम्म, मल्लम, गुरुप्प, इ. देवतांनाही भजतात.

चेंचू स्त्रिया कुरूप असतात. त्याबद्दल चेंचू लोकांत एक कथा प्रचलित आहे, ती अशी – अहोबिलम्च्या नरसिंहाने एका सुंदर चेंचू मुलीला पळवले व तिच्याशी लग्न केले. मग आपल्यासारखी आपत्ती जातीतल्या इतर मुलींवर ओढवू नये, म्हणून तिने देवाची प्रार्थना केली, की 'यापुढे आपल्या जातीतील सर्व मुली कुरूप निपजाव्या.'

चेंचू लोक नरसिंहाला आपला मेहुणा मानतात व दरवर्षी त्याच्या यात्रेला जाताना त्याला व त्याच्या पत्नीला नवे कपडे घेऊन जातात.

मर्तिकप्रथा – बहुतेक चेंचू मृतांना पुरतात व त्या जागेवर माती आणि दगड यांचा ढीग करतात. दुसऱ्या किंवा तिसऱ्या दिवशी मृताच्या थडग्याजवळ थोडे अन्न कावळ्यांसाठी बाजूला काढून ठेवतात व बाकीचे थडग्यात किंवा त्याच्या वरच्या मातीच्या ढिगात पुरतात. आठव्या दिवशीही असाच विधी करतात. काही चेंचू प्रेते जाळतात. सुतक तीन किंवा सात दिवस पाळतात. [का. ट्रा. स. इं.; से. इं. १९३१]

चेंडू-फळी

कोकणातील एक मैदानी खेळ. यात चौवीस किंवा अधिक (समसंख्या) खेळाडू भाग घेतात. चिंध्यांचा किंवा रबराचा एक चेंडू, हातभर लांबीची एक जाड काठी किंवा फळी व दोन मोठे दगड इतकी साधने या खेळाला लागतात. दोन दगड एक हात अंतरावर ठेवून, त्यांवर मध्यभागी काठी किंवा फळी आडवी ठेवतात. काठीच्या दोन्ही बाजूंना ६०।६० फुटांच्या अंतरावर सीमारेषा काढतात. खेळण्यासाठी खेळाडूंचे दोन गट करतात.



चेंडू–फळी

एका गटातील एक खेळाडू काठीपासून सुमारे ८ फूट अंतरावर उभा राहून चेंडूने ती काठी उडवायचा प्रयत्न करतो. त्या वेळी दुसऱ्या गटातील सर्वजण भोवती उभे राहून, काठी व चेंडू झेलण्याचा प्रयत्न करतात. त्यांना काठी वा चेंडू काहीच झेलता आले नाही, तर त्यांचा एक गडी बाद होतो. दोन्हींपैकी एक किंवा दोन्ही वस्तू झेलल्या, तर दोन्ही पक्षांचा समान डाव झाला, असे समजतात. चेंडूमुळे काठी न पडता, विरुद्ध पक्षाने चेंडू झेलला, तर चेंडू फेकणारा बाद होतो. चेंडू काठीस लागला नाही व तो कोणीही झेलला नाही, तरी डाव समान होतो. एका पक्षातील एका खेळाडूने चेंडू फेकल्यावर, दुसऱ्या पक्षातील खेळाडू चेंडू फेकतो. याप्रमाणे दोन्ही पक्ष

आळीपाळीने चेंडूफेक करतात. [व्या. ज्ञा. को.]

चेंडे ढोलासारखे एक वाद्य. कोकणापासून केरळापर्यंत हे प्रचलित आहे. दशावतार-नृत्य व कथकळी यांत दुष्ट पात्रांच्या आगमनप्रसंगी किंवा युद्धप्रसंगी हे वाद्य वाजवतात. [डि. सा. इं. म्यु. म्यु.]

चेंबडी एक तेलुगू जात. मासे पकडणे आणि नावा वल्हविणे हे या लोकांचे व्यवसाय आहेत. नवीन जाळे तयार केले, की हे त्याची घडी करून तळ्याच्या काठी ठेवतात व त्याच्यावर चिखल पसरून त्याचे तीन त्रिकोणी ढीग करतात. ही त्यांच्या देवाची प्रतीके होत. मग त्यांच्यापुढे भाकऱ्या ठेवतात. एकजण एका भाकरीचा तुकडा दातात धरून जाळ्याभोवती प्रदक्षिणा घालतो व ते जाळे पाण्यात ओढतो.

काही चेंबडी गुरप्प गुरुनाथडू याला आपले कुलदैवत मानतात व जम्मी नामक वृक्षाशी त्याचा संबंध जोडतात. जम्मी हे या लोकांचे एक गोत्रही आहे. कित्येक लोक आपल्या मुलांची नावे गुरप्प किंवा गुरुनाथडू अशी ठेवतात व एखाद्या शुभ दिवशी जम्मी वृक्षाखाली जाऊन त्यांचे जावळ काढतात.

हे मृतांना जाळतात व और्ध्वदेहिकासाठी दासरीला (जातीचा पुरोहित) बोलावतात. [का. ट्रा. स. इं.]

चेटक वैशालीचा प्राचीन राजा. जैन साहित्यात याची मोठी ख्याती आहे. महावीराची माता त्रिशला ही चेटकाची कन्या होती. अर्थात महावीर हा त्याचा नातू ठरतो. चेटक हा जैन श्रावक होता व जैन धर्माचा महान आश्रयदाता होता. त्याच्यामुळेच वैशाली हे जैन धर्माचे एक संरक्षणस्थान बनले होते. तिथल्या गणसत्ताक राज्याचा तो स्वामी होता. [जै. ध.]

चेटूक जादूटोणा, करणी, मंत्रतंत्र असे या शब्दाचे अर्थ आहेत. समाजात अशा प्रकारचे चेटूक करणारे काही लोक असतात. विशेषेकरून बायका चेटकिणी बनतात. त्या भुताखेतांवर ताबा चालवून त्यांच्याकडून लोकांना उपद्रवकारक अशा गोष्टी करवून घेतात. चेटूक ही एक विद्या आहे, असे समजतात. ही विद्या गुप्तपणे शिकावी लागते. ती सिद्ध झाली, की त्या स्त्रीला अनेक चमत्कार करता येतात. माणसाला प्राण्याचे रूप देणे, डोक्यावरचे केस नाहीसे करणे, घरात विष्ठा फेकणे, कपड्यावर किंवा अंगावर बिब्याच्या फुल्या उठवणे, गाई-म्हशीचे दूध उडवणे, मुले पळवणे असल्या अनेक विपरीत गोष्टी चेटकीण करू शकते, अशी लोकांची समजूत असते.

चेटकिणी दर अमावास्येला श्मशानात अथवा मारुतीच्या देवळात नग्न होऊन मंत्र जपतात. त्यांच्या सवयी घाणेरड्या असतात. त्यांना डाकिणी असेही म्हणतात. त्या मनुष्यबलीसाठी फिरत असतात व पाच वर्षांच्या आतल्या मुलांना पोटदुखी उत्पन्न करून मारतात. मग त्या मुलाचे प्रेत खड्ड्यातून उकरून काढतात. त्याला पुनश्च जिवंत करतात. त्याच्या डोळ्यात काजळ घालतात. मग तो मुलगा भूमिगत धन पाहू शकतो. डाकीण मुलाच्या डोळ्यात काजळ घालीत असता एकदम तिचा शिरच्छेद केला, तर तो मुलगा पुनश्च आईबापांना मिळू शकतो. या व अशाच कित्येक लौकिक समजुती आहेत. चेटकीण निजली असता तिच्या तोंडातून फेस येतो. तिच्या डोळ्यांभोवतालची कातडी नेहमी काळी असते. तिची नखे वाळलेली व काळसर असतात. अशी स्त्री पाहिल्यावर लोक तिला चेटकीण समजून घाबरतात. मग तिचे चेटूक बाधू नये म्हणून बिब्यात सुया टोचणे, घरासमोर राख पसरणे, दरवाजावर बिब्याच्या चिकाच्या उलटया बाहुल्या काढणे, इ. अनेक प्रतिबंधक उपाय योजतात.

चेटकावरचा विश्वास भारतातच नव्हे; तर सर्व जगात प्राचीन काळापासून असलेला आढळतो. युरोपात इ. स. च्या १५ व्या शतकापासून चेटक्यांचा नायनाट करायला प्रारंभ झाला व हजारो चेटकिणींना देहांत शासन मिळाले. भारतात मराठ्यांच्या आमदानीत चेटके करणाऱ्यांना कडक शासन होत असे. आजही एखाद्या बाईला चेटकीण समजून लोकांनी तिचा जीव घेतल्याच्या गोष्टी क्वचित ऐकू येतात. [सु. वि. को.]

चेट्टी द. भारतातील एक जमात. हा शब्द व्यापारी या अर्थीही आहे. कित्येक तमिळ व तेलुगू व्यापारी आपल्या नावापुढे चेट्टी हे उपपद जोडतात. बेरी चेट्टी, नागरट्टू चेट्टी असे चेट्टींचे अनेक पोटभेद आहेत. त्रिचनापल्ली जिल्ह्यातील पलयसेंगडम् हे चेट्टींचे मुख्य केंद्र होय.

यांच्यांतले पवथ्थुकुडी चेट्टी हे व्यापारी व सावकार म्हणून प्रसिद्ध आहेत. व्यापारासाठी हे लोक गावोगाव फिरतात.

चेट्टी लोक आपल्या मुलामुलींची लग्ने सामुदायिक पद्धतीने करतात. ही लग्ने विशिष्ट कालीच होतात. लग्नात प्रत्येक नवऱ्यामुलाला मंदिरासाठी पस्तीस रुपये देणगी द्यावी लागते. आयडियार कोविल मंदिरातील देव हा चेट्टींचा कुलस्वामी आहे. [का. ट्रा. स. इं.]

चेडा कोकणातल्या महारांचा एक देव. मुलगा कुवार असताना मेला म्हणजे तो चेडा होतो, अशी समजूत आहे.

नदीतला दगड आणून त्याला शेंदूर फासून चेडा दव बनवतात व दरवर्षी त्याच्यावर रक्तसिंचन होईल, अशा रीतीने कोंबडी किंवा बकरा बळी देतात. [बदलापूर]

चेदी मध्य प्रदेशातील बुंदेलखंडाचा पूर्वभाग व त्याच्या आसपासच्या प्रदेशाला प्राचीन काळी चेदी देश असे नाव होते. चेदी देशाचा महाप्रतापी कशुराजा याने दहा राजांना जिंकून आपले दास केले, असा ऋग्वेदात उल्लेख आहे (८. ५. ३७). चेदी देशाचे राजे ज्या मार्गाने जातात, त्या मार्गाने दुसरा कोणीही जाऊ शकणार नाही, असाही तिथे त्यांचा गौरव केलेला आहे.

अयोध्येचा राजा सगर याच्या मृत्यूनंतर विदर्भातील यादव राजे प्रबळ झाले व त्यांनी उत्तरेकडे राज्यविस्तार सुरू केला. त्या वंशातील चेदी नामक राजाने यमुनेच्या दक्षिण तीरावर आपले राज्य स्थापले व म्हणून त्या प्रदेशाला चेदी हे नाव मिळाले. वाल्मीकीच्या काळी यदुवंशातील कैशिक राजाने या प्रदेशात राज्य स्थापले होते व ते चेदी जनपद या नावाने प्रसिद्ध होते. सध्याची चंदेरी ही त्या जनपदाची राजधानी असावी. कृष्णाच्या वेळी पौरव वंशातील उपरिचरवसू नामक राजाने चेदी देश जिंकला. त्याची कन्या सत्यवती हिचा शंतनूशी विवाह झाला होता. कृष्णाने चेदिराज शिशुपालाचा वध केल्यानंतर युधिष्ठिराने शिशुपालाचा पुत्र धृष्टकेतू याला चेदीचे राज्य दिले. भारतीय युद्धात तो पांडवांच्या बाजूने लढला.

चर्मण्वती व शुक्तिमती या नद्यांच्या मध्ये चेदी जनपद असून, शुक्तिमतीनगरी ही त्याची राजधानी होती. उपनिषत्काळी वसूचे वंशज चेदी देश सोडून गेले आणि तिथे भर्ग (भग्ग) वंशाचे राज्य प्रस्थापित झाले. पुढे वत्स जनपदाचा राजा उदयन याचा पुत्र बोधिकुमार याने भर्गवंशी राजाचा पराजय केल्यामुळे भर्ग लोक कोसलात जाऊन वसले.

चेदी जनपद राजसत्तात्मक होते. पुढे ते मौर्य साम्राज्यात समाविष्ट झाले. मौर्यांची सत्ता नष्ट झाल्यानंतर ते पुन्हा स्वतंत्र झाले. त्यानंतर काही काळ हा देश शक क्षत्रपांच्या ताब्यात होता आणि नंतर तो गुप्त साम्राज्याचा एक भाग बनला. त्या वेळी कालंजर ही चेदी देशाची राजधानी होती.

इ. स. च्या ७ व्या शतकापासून या देशावर कलचुरी वंशाचे राज्य सुरू झाले. त्रिपुरी (तेवर) ही त्यांची राजधानी होती. इ. स. १०७५ नंतर हा देश चंदेलांनी जिंकला. त्यांच्या ताब्यातील सर्व प्रदेशाला जेजाकभुक्ती हे नाव होते. त्यानंतर तिथे बुंदेल्यांची सत्ता प्रस्थापित झाली व त्या प्रदेशाला बुंदेलखंड हे नाव मिळाले. [म. भा. इ.; हि. जॉ. ए. इं.; सु. वि. को.; बुं. सं. इ.]

चेन्नबसव (इ. स. चे १२ वे शतक) वीरशैव मताचा आचार्य व पुढारी. हा बसवेश्वराचा भाचा होता. अक्कनागम्म नावाची बसवेश्वराची एक मोठी बहीण होती. तिच्या पतीचे नाव शिवस्वामी होते. या दंपतीच्या पोटी चेन्नबसवाचा जन्म झाला. चेन्नबसवाने आपला मामा बसवेश्वर याच्या धर्मक्रांतीत त्याला मनोभावे साहाय्य केले. चेन्नबसवाच्या वचनामध्ये कूडलचेन्नसंगमदेव अशी नाममुद्रा असते. त्यावरून कळते, की बसवाप्रमाणेच चेन्नबसवही संगमेश्वराचा उपासक होता. बसवेश्वर, अल्लमप्रभू व चेन्नबसव या तिघांना मिळून वीरशैवांची त्रिमूर्ती मानतात.

चेन्नबसवाचा विद्याभ्यास संगमक्षेत्री झाला. पुढे बसवेश्वराबरोबर तोही कल्याणशहरी आला आणि तिथे बसवेश्वराच्या मार्गदर्शनाखाली ज्ञानसाधना करू लागला.

बसवेश्वर हा बिज्जलाच्या राज्यात प्रधानपदावर होता. पुढे बिज्जलाच्या हातून दोन वीरशैव मारले गेले आणि त्यामुळे वीरशैव मंडळीत प्रक्षोभ निर्माण झाला. झाल्या गोष्टींनी मन उबगून बसवाने बिज्जलाचे मंत्रिपद सोडले व तो कल्याणहून संगमक्षेत्री गेला. त्यानंतर बिज्जलाने चेन्नबसवाला मंत्रिपद स्वीकारण्यास सांगितले; पण त्याने ते मान्य केले नाही. हळूहळू वीरशैव मंडळीत बिज्जलाविषयी द्वेष वाढत गेला. मग बिज्जलाने आपल्या जावयाला बोलावून त्याला सेनापतिपद दिले. त्याने वीरशैवांच्या विरुद्ध आघाडी उघडली. वीरशैवांनीही चेन्नबसवाच्या आधिपत्याखाली संघटना उभारली. थोडयाच कालात वीरशैवांचे व बिज्जलाच्या सैन्याचे घनघोर युद्ध सुरू झाले. त्या युद्धात बिज्जलाचा वध झाला. बरेच वीरशैवही मारले गेले. जे उरले त्यांना घेऊन चेन्नबसव उळवी या ठिकाणी राहायला गेला. आयुष्याची पुढची चौवीस वर्षे त्याने उळवीमध्येच घालवली आणि तिथे राहूनच आपल्या संप्रदायाचे नेतृत्व केले. उळवी येथेच त्याने आपला देह ठेवला. हे ठिकाण कारवार जिल्ह्यात असून तिथे त्याची समाधीही आहे.

वीरशैव संप्रदायाला तत्त्वज्ञानाची बैठक मिळवून दिली ती यानेच. हा मोठा विद्वान होता. करणहसिगे, षट्स्थलवचन, मिश्रार्पण, पदमंत्रगोप्य, कालज्ञान, घटचक्र व हिरियमंत्रगोप्य असे याचे ग्रंथ आहेत. शिवानुभवशास्त्रात त्याच्या या ग्रंथांना प्रमुख स्थान आहे. शिवशरणलोक त्याला षट्स्थलचक्रवर्ती अशी पदवी देतात. वीरशैवांच्या षट्स्थल सिद्धांताचे शास्त्रीय विवेचन यानेच केले. संप्रदायातल्या विधिनियमांची प्रतिष्ठाही

यानेच वाढवली. याने शरीरश्रमावर व अंतरंगशुद्धीवर विशेष भर दिला आहे. अल्लमाच्या नंतर हाच वीरशैवांच्या शून्य-सिंहासनावर बसला आणि याने वीरशैव संप्रदाय उत्तम प्रकारे नावारूपाला आणला. [हिं. क. भ. तु. अ.; काशिनाथस्वामी सारंगमठ– भारतवाणी, मे १९५९]

चेन्नबसव पुराण विरूपाक्षी या कवीने इ. स. १५८५ मध्ये कन्नड भाषेत हे पुराण रचले. यातील षट्पदी वृत्ताचे सहा चरण असून, त्यांपैकी पहिला दुसरा व चौथा–पाचवा हे चरण २० मात्रांचे व तिसरा आणि सहावा हे ३२ मात्रांचे असतात. चेन्नबसवाने सिद्धरामाला वीरशैव पंथाची दीक्षा दिली, ही घटना या पुराणाचा मुख्य विषय आहे. याचे एकूण त्रेसष्ट अध्याय आहेत. याचा सारांश असा –

एकदा कैलासावर देव, गंधर्व, अप्सरा, महानद्या व शृंगी-भृंगी, इ. भूतगण जमले होते. त्यांनी स्तवन करून शिवाला संतुष्ट केले. एवढ्यात पार्वतीने शिवाला त्याने पूर्वी दिलेल्या 'शिवतत्त्वकथनाकरिता मी भूतलावर चित्कला प्रकट करीन,' या वचनाची आठवण केली. त्या वचनानुसार शिवाने नंदीला पृथ्वीवर मनुष्यरूपाने अवतार घेण्यास सांगून वीरशैवोपासनेचा प्रचार करण्याची आज्ञा केली.

त्यानंतर मादिराज ब्राह्मणाच्या मदांबी स्त्रीच्या पोटी पार्वतीचा अंश म्हणून नागलंबिका जन्मली व नंदी बसवरूपाने तिचा बंधू म्हणून जन्मला. शिवाच्याच आज्ञेनुसार नागलंबिकेच्या पोटी षण्मुख हा चेन्नबसव या नावाने जन्माला आला. पुढे बसव व चेन्नबसव हे दोघे कल्याण नगरीत बिज्जलाच्या पदरी अधिकारी म्हणून राहिले.

बसव आणि चेन्नबसव यांना भेटण्यासाठी अल्लमप्रभू हा सिद्धरामाला समागमे घेऊन सोलापुराहून निघाला. सिद्धरामाने शरीरावर इष्टलिंग धारण केलेले नव्हते. तो स्वतः प्राणलिंगी होता व अशा मनुष्याला इष्टलिंग धारण करण्याची जरूरी नाही, अशी त्याची समजूत होती. पण चेन्नबसवाने वीरशैवोपासनेचा प्रकार निराळा असल्याचे सांगून इष्टलिंगाची आवश्यकता सिद्धरामाला पटवून दिली. नंतर चेन्नबसवाने त्याला वीरशैव पंथातील आधिभौतिक व आध्यात्मिक तत्त्वज्ञानाचा उपदेश करून त्या पंथाची दीक्षा दिली. ही दीक्षा देताना त्याने सिद्धरामाला पुढील उपदेश केला –

वीरशैव पंथाची दीक्षा घेणाऱ्याने प्रथम पृथ्वी, संपत्ती व स्त्री या तीन दोषांपासून अलिप्त राहिले पाहिजे. लिंगपूजा सूर्योदयापूर्वी करावी. ती उत्तम असते. सूर्योदयाच्या वेळी व सूर्योदयानंतर केलेली लिंगपूजा ही अनुक्रमे मध्यम व कनिष्ठ असते. लिंगायतशास्त्राप्रमाणे केलेली शिवपूजाच श्रेष्ठ होय. ऐक्य, शरण, प्राणलिंगी, प्रसादी, महेश व भक्त अशी शिवाची सहा स्थळे आहेत. साधकाला यांच्यांतले एकेक स्थळ आक्रमीत शेवटचे स्थळ गाठावे लागते.

प्रस्तुत पुराणात सिद्धरामाला उपदेश करण्याच्या निमित्ताने अनेक पौराणिक कथा आलेल्या असून, वीरशैवमतप्रणालीला अनुसरून त्यांची मांडणी केलेली आहे. महालिंगाचे महत्त्व, अर्धनारीश्वराचा अवतार, ब्रह्मशीर्षच्छेदन, शिवभिक्षाटन, जालंधरवध, गजासुरवध, पार्वतीपरिणय, कुमारजन्म, त्रिपुरदाह, शिवाचे गंगाधारण या त्या कथा होत. याशिवाय कित्येक वीरशैव साधूंच्या कथाही यात दिलेल्या आहेत. कोणकोणते राजे व साधू वीरशैव मताचा प्रचार करतील तेही पुराणाच्या शेवटी सांगितले आहे. [म. ज्ञा. को.]

चेमकूर वेंकट (इ. स. चे १७ वे शतक) आंध्र प्रदेशातील एक कवी. तंजाऊरचा राजा रघुनाथ नायक याच्या दरबारात हा होता. हा तेलुगू व संस्कृत या दोन्ही भाषांत व्युत्पन्न होता. याने विजयविलासमू नावाचे एक खंडकाव्य लिहिले आहे.

विजयविलासमू या काव्याचे तीन आश्वास आहेत. अर्जुनाने उलूपी, चित्रांगदा व सुभद्रा या तिघींशी जे विवाह केले, त्यांचे वर्णन या काव्यात आहे.

नागकन्या उलूपी हिने गंगातीरावरून अर्जुनाला पाताललोकातील आपल्या महालात नेले. त्या महालाचे कवीने वर्णन केले आहे, ते असे–

दट्टंपु देलिनीटि तरग चाल्कडकोत्ति
नेलराल जगति दा निलुचुटेंमि ?
कोलकु दामर गंदमुलु ग्रिदबडवेंचि
कपुरंपु दावि दा गाविंयु टेंमि ?
चिवुर जोंपपु मावि जीवु मायमु से स
पसिडि युप्परिग दा ब्रबलुटेंमि ?
निद्दंपु टिसुमुतिन्नियपान्पु दिगद्रावि
यलरुल पान्पु दाहत्तुटेंमि ?
मसमसक संजकेंजाय मरुगुवेट्टि
मिसिमिकेंपुल कांति दामेरयुटेंमि ?
मोदल ने गंगतटि नुन्न यदियु लेंदो
माययो काक यिदि यंचु मरलिचूड

अर्थ – अर्जुनाच्या समोर त्या वेळी गंगेच्या लहरींचे कंपन नव्हते; तर चंद्रकांत मण्यांनी सजवलेली फरशी होती. तिथे तलावातील सुंदर कमलांचा सुगंध नव्हता; तर कस्तूरी, चंदन,

इ. द्रव्यांचा सुगंध दरवळत होता. नवी पालवी व मंजिरी यांनी भरलेल्या आम्रवृक्षांच्या ऐवजी तिथे सुवर्णाचे महाल होते. अर्जुन गंगाकिनारी रेतीच्या ढिगावर बसला होता; पण आता तो फुलांच्या शय्येवर पहुडला होता. सायंकाळच्या अस्पष्ट व आरक्त कांतीच्या ऐवजी नवरत्नांच्या प्रकाशाने ते स्थान झगमगत होते.

चेमकूर वेंकट कवीने आपल्या काव्यातील प्रत्येक पद श्लेषयुक्त असेल, अशी प्रतिज्ञा केली होती, असे सांगतात. या काव्यात त्याने ती प्रतिज्ञा पूर्णपणे पाळली आहे. प्रस्तुत काव्यात त्याने तेलुगू म्हणींचाही योग्य प्रमाणात वापर केला आहे. हे काव्य शृंगारप्रधान आहे. पदलालित्य व प्रसाद या काव्यगुणांनी ते नटलेले आहे. सामाजिक दृष्टयाही या काव्याला महत्त्व आहे. आंध्र प्रदेशातील तत्कालीन आचारविचार व परिस्थिती यांचे यथातथ्य चित्रण या काव्यात पाहायला मिळते.

सारंगधरचरित्रमू नावाचे आणखी एक खंडकाव्य याने लिहिले आहे. पाहा – चौरंगीनाथ. [पंचामृत]

चेर राजवंश केरळ देशावर राज्य करणारा एक प्राचीन वंश. अशोकाच्या शिलालेखांत या वंशातील राजांचा उल्लेख केरळपुत्र असा आढळतो. संस्कृत महाकाव्ये आणि पुराणे यांतही चेर राज्याचा उल्लेख आहे. त्यांची राजधानी वंजी म्हणजे सांप्रतचे तिरुवंजैक्कलम् किंवा तिरुवंचिकुलम् हे नगर असावे.

या वंशाचा सुसंगत इतिहास ज्ञात नाही. प्राचीन तमिळ साहित्यात यांच्याविषयी तुरळक माहिती मिळते. चोळ, चेर व पांड्य या तीन राजवंशांची सत्तास्पर्धा त्या काळी चालू होती. सनपूर्व १ ले शतक ते इ. स. चे १ ले शतक या कालखंडात चोळ राजांनी चेर व पांड्य यांच्यावर वर्चस्व स्थापले होते. पुढे चेर वंश बलवान झाला व काही काळ त्यानेही प्रभुत्व गाजवले.

या वंशातील सर्वांत प्रसिद्ध राजा नेडुंजेरल आदन किंवा चेरल आदन हा होय. हा करिकाल चोळ याचा समकालीन होता. याने कदंबू नामक प्रदेश जिंकला व अनेक राजांना पराभूत करून अधिराजर ही पदवी घेतली. पण पुढे वेण्णीच्या महायुद्धात करिकालाने याचा पराजय केला आणि त्यामुळे लज्जित होऊन याने रणक्षेत्रातच आत्महत्या केली, असे वर्णन अनेक तमिळ ग्रंथांत आहे.

या वंशातील एक राजा उदयन चेरल आदन इ. स. च्या ५ व्या शतकात होऊन गेला असावा. त्याचा पुत्र नेंडुचेरल याच्याविषयी काही माहिती पत्तुप्पाट्टू या तमिळ काव्यग्रंथात मिळते. याने समुद्रमार्गाने स्वारी करून एक द्वीप जिंकले व कन्याकुमारीपासून हिमालयापर्यंत दिग्विजय करून आपल्या गळ्यात सप्तमुकुटमाला धारण केली, असे सांगतात. त्याने अनेक मंदिरे निर्माण केल्याचेही सांगितले आहे. नेंडुचेरलाचा पुत्र वेलकेलू कुट्टुवन हासुद्धा अत्यंत पराक्रमी होता. प्राचीन तमिळ ग्रंथांत याच्या दिग्विजयाच्या अनेक दंतकथा वाचायला मिळतात. त्याने आपला शूल फेकून सागरालाही मागे हटवले होते, अशी कथा आहे. त्याचे राज्य पश्चिम समुद्रापासून पूर्व समुद्रापर्यंत पसरले होते. शेंगुट्टुवन हा आणखी एक वीरपुरुष या वंशात होऊन गेला, असे नंतरच्या ग्रंथांवरून कळते. पाहा– केरळ. [त. सा. सं.; ए. इं.-मजु.; हि. जॉ. ए. इं.]

चेरामन पेरुमल एक नायन्मार. दक्षिणेतील त्रेसष्ट शैवसंतांपैकी एक. हा चेरनाडचा राजा होता. पण राज्य करण्यापेक्षा शिवभक्तीच त्याला अधिक प्रिय होती. रोज शिवपूजा झाल्याबरोबर याला चिदंबरम् येथील नटराजाच्या नृत्याचा ध्वनी ऐकू येई. एक दिवस तो ध्वनी ऐकू न आल्याने चेरामन आत्महत्या करण्यास उद्युक्त झाला. ते पाहून शंकराने त्याला दर्शन दिले. सुंदरर या महान शैव संताविषयी त्याला मोठा आदर होता. [पे. पु.]

चेरुमन एक जात. या लोकांची वस्ती मलबारमध्ये आहे. उत्तर मलबारात यांनाच पुलयन म्हणतात. चेरुमनांना चेरमक्कल असेही नाव आहे. चेर देशाचे पुत्र किंवा मूळचे रहिवासी असा त्याचा अर्थ आहे. चेरुमनांच्या सुमारे चाळीस पोटजाती आहेत. कुणशेट्टी, मरुत्तन, नायाडी, रोल्डी, ऊडन, इ. त्यांची नावे आहेत. यांतली काही नावे धंद्यांवरून पडली आहेत. कुणशेट्टी यांच्या स्त्रिया सुइणीचे काम करतात. मरुत्तन पोटजातीचे काम विटाळ घालवण्याचे असते. एखाद्या माणसाला विटाळमुक्त करायचे असल्यास मरुत्तन माणूस त्याच्या डोक्यावर दूध व पायावर शेणसडा टाकतो. चेरुमन लोक मुख्यत्वे शेती व हमाली करून जगतात. ते चटया व टोपल्याही विणतात. ब्रिटिशांच्या आगमनापूर्वी चेरुमन हे गुलाम म्हणून विकले व विकत घेतले जात. यांचे मालक यांच्या घरच्या लग्नासाठी व श्राद्धासाठी यांना पैसे देत.

मलबार किनाऱ्यावर एका काळी चेरुमनांचे राज्य होते आणि आजही तिथे चेरनाड नावाचे एक ठिकाण आहे. चेरनाडचा राजा चेरामन पेरुमल हा चेरुमनांपैकीच होता.

चेरुमन ही जात पूर्वी अस्पृश्य समजली जात असे. त्यांची सावलीसुद्धा निषिद्ध समजली जाई. ब्राह्मणांच्या गावात वा मंदिरात चेरुमनांना प्रवेश नसे. गावातल्या तळ्यावर त्यांना

पाणी भरता येत नसे. आश्चर्याची गोष्ट म्हणजे यांच्यांतल्या पोटजातीही परस्परांचा विटाळ मानतात. नायाडी जर चेरुमनाला शिवला, तर त्याला शुद्ध होण्यासाठी सात तळयांत स्नान करावे लागते. शिवाय करंगळी कापून थोडे रक्तही सांडावे लागते.

चेरुमन हे अजूनही जमीनदाराच्या शेतीत राबतात. रात्री शेताची राखणही तेच करतात. रोजचे वेतन म्हणून जमीनदार त्यांना ठराविक तांदूळ देतो. चेरुमनाची बायको ही त्याच्याबरोबरच शेतीवर काम करते. मुले गुराख्याचे काम करतात. यांना ताडीचे व्यसन जबरदस्त आहे. बायकामुलेसुद्धा ताडी पितात.

चेरुमनाच्या झोपडीला छाळ म्हणतात. बांबू आणि गवत यांची ती बनवलेली असते. शेताच्या कडेलाच ती उभारलेली असते. त्यामुळे शेताची राखण करणे त्यांना सोपे जाते. चार गाडगी-मडगी एवढाच यांचा संसार असतो. चेरुमन पुरुष केस लांब वाढवतात. बायका गुडघ्यापर्यंत जेमतेम पुरेल एवढेच वस्त्र नेसतात. त्या पितळेचे व काचमण्यांचे अलंकार वापरतात.

मुलगी ऋतुस्नात झाली, की तिला एका झोपडीत ठेवतात. मग त्या समारंभासाठी पाच वल्लनांना (जाति प्रमुख) बोलावतात. ते मलप्पाट्टू नावाचे गीत गातात. काही मुलींनाही त्या वेळी बोलावतात. मग सात नारळ फोडून त्यांचे पाणी मुलीच्या डोक्यावर घालतात. नारळाचे तुकडे वल्लन व मुली यांना वाटतात. ऋतुमती सहा दिवस त्या झोपडीत राहते. सातव्या दिवशी मुलीची आई तिला तेल लावून जवळच्या तळयावर स्नानासाठी नेते. स्नान झाल्यावर तिला सजवतात. तिच्या तोंडावर पिवळे ठिपके देतात. काही लोक ढोल व बासरी वाजवून तिच्या शरीरातल्या भूतपिशाचांना पळवून लावतात. ढोल वाजायला लागला, की मुलगी वाजंत्र्यासमोर उभी राहते. तिला पिशाचबाधा असेल, तर ती खाली पडते.

विवाहप्रथा– हे स्वतःच्या पोटजातीतच लग्ने करतात. काही ठिकाणी एकाच गावातल्या लोकांत विवाहसंबंध होत नाही. बापाकडून नाते लागत असलेल्या मुलाशी लग्न होते; पण आईकडच्या नात्यात होत नाही. मुलगी वयात येण्यापूर्वी तिचे लग्न व्हावे लागते. तसे न झाले, तर त्या मुलीला अस्पृश्य मानतात. मग तिच्यावर तिच्या बापाचा हक्क राहत नाही. पूर्वी तर तिला अशा वेळी जातप्रमुखाच्या स्वाधीन केले जाई. मग तो तिचे लग्न स्वतःच्या मुलाशी करी किंवा गुलाम म्हणून तिला विकून टाकी.

मुलीचा बाप दरिद्री असेल, तर जातीतले लोक वर्गणी काढून तिच्या लग्नाला मदत करतात. लग्नात वराच्या बहिणीला महत्त्वाचे स्थान असते. मुलींचे देज तीच देते. वराला त्याच्या मेहुण्याकडून एक रुमाल व एक कडे मिळते. रुमाल वराच्या कमरेला बांधतात व कडे दंडात घालतात. वराच्या डोक्याला फेटा बांधून त्यावर विड्याचे पान चिकटवतात. लग्नविधीत एक वलय दोऱ्यात ओवून वधूचा बाप ते वधूच्या गळयात बांधतो. लग्नात जमलेल्या बायका समूहाने गीते गातात व पुरुष टिपऱ्या घेऊन नाचतात्त.

एर चेरुमनांत वरपक्ष वधूपित्याला अक्षता व विड्याची पाने देऊन मुलीची मागणी करतो. ठरलेल्या मुहूर्तावर नवरा मुलगा वधूगृही जाऊन तिला काही कपडे व पैसे देतो. त्या दिवसापासून ती दोघे पतिपत्नी होतात. पण मंगलम् हा विधी होईपर्यंत मुलगी पतिगृही जात नाही. मंगलम् विधीत वधूवरांना बोहल्यावर बसवून त्यांच्यांतलाच एक माणूस दोघांना सांसारिक कर्तव्ये उपदेशितो. मग सर्व लोक उभयतांच्या मस्तकावर अक्षता उधळतात.

प्रसूतिप्रथा–गर्भवतीला सातव्या महिन्यात पुलीकुटी म्हणजे चिंचेचा रस पाजण्याचा विधी करतात. प्रसूतीच्या वेळी स्त्रीला वेगळ्या झोपडीत ठेवतात. सातव्या दिवशी तिला स्नान घालतात. मग सुईण विशिष्ट अंतर ठेवून जमिनीवर सात रेघा ओढते. मुलाला छातीशी धरून व हातात जळके लाकूड घेऊन बाळंतीण सात वेळा त्या रेघा ओलांडून पलिकडे जाते व मागे येते. एवढे झाल्यावर ती शुद्ध होते. पण तरीही तिला सोळाव्या दिवसापर्यंत त्या झोपडीतच ठेवतात. सोळा दिवसानंतर बाळंतिणीवर व तिच्या झोपडीवर शेणसडा टाकतात. त्यानंतर तिला घरी आणतात. स्त्री प्रसूत झाल्यावर तिच्या नवऱ्याने सात दिवस तांदुळाचे पदार्थ खायचे नसतात. त्या दिवसांत तो ताडी व इतर पदार्थ खाऊन राहतो. सहाव्या किंवा सातव्या वर्षी मुलाचे कान टोचतात.

पुष्कळदा चेरुमन पतीपत्नी एकाच धन्याजवळ राहतात. अशा वेळी त्यांच्या पहिल्या मुलावर धन्याचा हक्क पोचतो. इतर मुले वयात आल्यावर तीही आईबापांच्या धन्याचे नोकर होतात. चेरुमन स्त्रीने परिया पुरुषाशी व्यभिचार केल्यास तिला बहिष्कृत करतात. अशी बहिष्कृत झालेली स्त्री बहुधा बाटून ख्रिस्ती किंवा मुसलमान होते. लग्नापूर्वी मुलगी गरोदर राहिल्यास संबंधित व्यक्तीला तिच्याशी लग्न करावेच लागते. विवाहित स्त्रीशी व्यभिचार करणाऱ्या पुरुषाला जबर दंड होतो. मग स्त्रीला जातिप्रमुखापुढे नेऊन शहाळयाचे पाणी पाजतात. त्या पाण्याने ती शुद्ध होते व तिचा नवरा तिला पुनश्च पत्नी म्हणून स्वीकारू शकतो. त्याने तिचा स्वीकार न केल्यास ती दुसऱ्या एखाद्या पुरुषाशी लग्न करायला मोकळी होते.

सण व उत्सव– नांगरणीचा पहिला दिवस हे लोक सणासारखा पाळतात. या दिवशी शेताजवळ झोपडी उभारतात व तिच्या भिंतीवर तांदुळाच्या पिठाने चित्रे काढतात. पानांचे द्रोण बियाण्याने भरून ठेवतात. शेताचा विशिष्ट भाग सजवून त्यात नवी बैलजोडी व नवा नांगर घेऊन नांगरणी करतात. मग जातिप्रमुख त्या शेतात पेरणी करतो. मग देवाला कौल लावून नारळ फोडतात. मुनिअप्पा या देवतेला बोकडाचा बळी देतात. मंडलम् दिलक्कू हा चेरुमनांचा ४१ दिवसांचा मोठा सण असतो. हा कार्तिक व मार्गशीर्ष या महिन्यांत येतो. या काळात चेरुमन लोक आपल्या देवळात दिव्यांची रोषणाई करतात. शेवटच्या दिवशी जातीचे सगळे लोक एकत्र जमून देवाची महापूजा करतात. चेरुमनांचे देव म्हणजे ओबडधोबड दगड असतात. ते बागेत व शेतात ठेवलेले असतात. वर्षातून एकदा किंवा विशिष्ट प्रसंगी त्यांची पूजा करून त्यांना कोंबड्याचा बळी दिला जातो.

मर्तिकप्रथा–चेरुमन मृतांना पुरतात व पुरल्याजागी दगड उभारतात. चेरुमनाच्या मृत्यूचा खर्च त्याचा जमीनदार धनी करतो. मर्तिकाच्या वेळी जो ढोल वाजवतात, त्याला परयडिक्का असे नाव आहे. [का. ट्रा. स. इं.]

चेरुश्शेरी नंपूतिरी (इ. स. चे १५ वे किंवा १६ वे शतक) केरळातला एक कवी. याने मलयाळम् भाषेत कृष्णगाथा रचून केरळीय साहित्य समृद्ध केले. हा कवी असाधारण प्रतिभासंपन्न होता. कालिदासाच्या जोडीने केरळात त्याचे नाव घेतले जाते. शृंगार व हास्य हे त्याच्या काव्याचे प्रधान रस होत. कोलत्तुनाट या राज्यात तो दरबारी कवी होता. तिथल्या राजाच्या आज्ञेनेच त्याने कृष्णगाथा लिहिली. चेरुश्शेरीभारतम् या नावाचा आणखी एक त्याचा ग्रंथ आहे. [हिं. म. कृ.]

चेरो बिहार, ओडिसा व छोटा नागपूर या प्रदेशांतील एक जमात. चेरो लोक मुंडा व कोलेरियन या वंशातील आहेत. यांचा रंग गव्हाळी असून, गालांची हाडे वर आलेली असतात. यांचे डोळे तिरपे, नाक रुंद व चपटे आणि ओठ जाड असतात.

मिथिला आणि मगध या प्रदेशांवर एका काळी चेरोंचे राज्य होते. शहाबादमध्ये यांच्या बांधकामाचे अनेक अवशेष आढळतात. बुद्धगयेतील एका शिलालेखात फुदीचंद्र नामक एका व्यक्तीचा उल्लेख आहे. हा चेरो होता, अशी परंपरागत कथा आहे. इ. स. च्या पाचव्या किंवा सहाव्या शतकात शहाबादमधून चेरोंची हकालपट्टी झाली. पण बिहारमधील पालामो प्रदेशात मात्र एक चेरो राजघराणे शिल्लक राहिले. सुरवातीला या राजघराण्याने इंग्रज सत्तेला प्रतिकार केला होता. पण अखेर इंग्रजांसमोर त्यांना शरणागती पत्करावी लागली. इ. स. १८१३ पर्यंत हे राजे इंग्रजांचे मांडलिक म्हणून राहिले. नंतर इंग्रजांनी त्यांचे राज्य खालसा केले. तथापि राजघराण्यातील लोकांकडे त्यांनी जमिनी व इतर दौलत मात्र राहू दिली.

पालामो जिल्ह्यातले चेरो सांप्रत स्वतःला राजपूत म्हणवून घेतात व गळ्यात जानवे घालतात. ते स्वतःला चोइन मुनीचे वंशज समजतात. पालामोमधील चेरोंचे बारा हजार व तेरा हजार या नावाचे दोन पोटभेद आहेत. बारा हजार हे पूर्वीच्या राजघराण्यापैकी असून स्वतःला उच्च समजतात; तर तेरा हजार हे या लोकांची अनौरस संतती होय.

चेरो लोक दुआठ नामक ग्रामदेवाला भजतात व दर तीन वर्षांनी त्याला पशुबळी देतात. [ट्रा. का. सें. प्रॉ. इं.; म. ज्ञा. को.; इं. स्ट. पा. प्रे., जाने. १९६०]

चेलप्परंपू नंपूतिरी (इ. स. चे १८ वे शतक) केरळातील एक कवी. हा कालिकत येथे राहत होता. याने मुक्तके रचून मलयाळम् साहित्य समृद्ध केले. काव्यदृष्ट्या त्याची ही मुक्तके अत्यंत सरस आहेत. त्या काळचे अन्य कवी संस्कृत वृत्तांत पद्यरचना करीत होते. पण या कवीने लौकिक वृत्तांना अनुसरून एक स्वतंत्र शैली निर्माण केली व मणिप्रवाळशैलीतही आपली मुक्तके रचली. त्यामुळे तो पुढील कवींचा मार्गदर्शक ठरला आहे. [म. सा. इ.]

चेलुवांबा (इ. स. चे १८ वे शतक) एक कन्नड कवयित्री. म्हैसूरचा राजा दोड्डकृष्णराज याची ही राणी होती. हिचे वरनंदीकल्याण हे खंडकाव्य प्रसिद्ध आहे. याशिवाय हिने तिरुपती व अलमेलुमंगदेवी यांच्या स्तवनाची गीतेही रचली आहेत. हिची लेखनशैली मधुर आहे. [ग्रे. वि. इं.]

चेवली नृत्य हे कोकणात गौरीगणपतीच्या उत्सवप्रसंगी केले जाते. चेंवली हे नाव कुलाबा जिल्ह्यातील चेऊल या ग्रामनावावरून पडले असावे. याला झारवडी असेही म्हणतात. यात मृदुंग्या व झांज वाजवणारा हे दोघे बसतात व बाकीचे लोक त्यांच्या भोवती फेर धरून नाचतात. एक मनुष्य नृत्याचे गाणे सांगतो व बाकीचे ते म्हणतात. नाचाला रंग भरतो, तसतशी त्याची लय वाढते. याला गौरीगणपतीचा नाच म्हणतात. या नृत्याचे एक गीत पुढीलप्रमाणे–

नदीच्या तीरी काळी मोरी गाय ।
तिच्या निऱ्याखाली पर्वतराई ।।
तिथे पार्वती आली न्हायाला ।
तिच्या अंगाचा मळ काढला ।।
त्याही मळाचा गण बनविला ।
गण चालला शिवपूजेला ।।
गणाचा घोडा उंदीर झाला ।
गण तो घोड्यावर बैसला ।।

या नृत्यातली वरीचशी गीते कूटात्मक असतात. त्यात सवालजवाबही चालतात. [फों. डा. म.]

चैतन्य महाप्रभू (१४८५–१५३३ इ. स.) बंगालमधील एक वैष्णव संत व पंथसंस्थापक. बंगालमध्ये गंगेच्या तीरावर नवद्वीप नावाचे एक गाव वसले आहे. तिथे निंब वृक्षाशेजारच्या एका कुटीत प्रभूचा जन्म झाला. त्याच्या वडिलांचे नाव जगन्नाथ व आईचे शचीदेवी असे होते. जगन्नाथ हा एक वैदिक ब्राह्मण होता. शचीदेवीचा बाप नीलांबर चक्रवर्ती हा प्रख्यात ज्योतिषी होता. प्रभूच्या जन्मानंतर त्याच्या देहावरची शुभचिन्हे पाहून त्याने भविष्य वर्तवले, की ‘ हा कोणीतरी श्रेष्ठ पुरुष होईल. ’ बापाने प्रभूचे नाव विश्वंभर ठेवले. निंब वृक्षाजवळ जन्मला म्हणून त्याची आई त्याला निमाई म्हणे आणि गोरा असल्यामुळे शेजारचे लोक त्याला गौऱ्हरी म्हणत.


नवद्वीप – मायापुरातील श्री योगीपीठ मंदिर

प्रभू रूपाने सुंदर होता. त्याचे डोळे कमळासारखे होते. आरोग्य उत्तम असल्यामुळे तो चपळ व तरतरीत झाला होता. लहानपणापासूनच त्याला नाचायची फार हौस. त्याचे ते बालनृत्य पाहणाऱ्याला मोहक वाटे. हरी हा शब्द त्याचा आवडता होता. अर्भकावस्थेतही तो शब्द उच्चारताच त्याचे रडे थांबे. ‘ हरि बोल ’ म्हणून तो नाचू लागला, की आजूबाजूची माणसे कामधाम विसरून ते नृत्य पाहण्यात तल्लीन होत.

प्रभूच्या मातापित्यांना प्रथम आठ मुली झाल्या. त्यानंतर एक मुलगा झाला. त्याचे नाव विश्वरूप ठेवण्यात आले. या विश्वरूपानंतर दहा वर्षांनी प्रभूचा जन्म झाला. त्यामुळे तो घरात सर्वांचाच लाडका बनला. खेळ व खोड्या यातच तो सदैव दंग असे. प्रभूच्या अशा अनेक खोड्या त्याच्या चरित्रात वर्णिल्या आहेत. पण त्याच्या त्या खोड्यांनी कोणाची अंतःकरणे दुखावली जात नसत. लोकांना त्यांतून काही बोध व आनंदच लाभे. प्रभू शाळेत जात नसे, अभ्यास करीत नसे, म्हणून त्याचा बाप मात्र नेहमी कष्टी असे.

प्रभूचा थोरला भाऊ विश्वरूप हा शास्त्राध्ययन करून विद्वान झाला होता; पण वयाच्या १६ व्या वर्षीच त्याला वैराग्य प्राप्त झाले आणि तो एके दिवशी घरातून निघून गेला. प्रभूचे आपल्या वडील भावावर अत्यंत प्रेम होते. त्याच्या निघून जाण्याने प्रभूला अपार दुःख झाले व त्या दिवसापासून त्याने आपला हूडपणा सोडून दिला. प्रभू अकरा वर्षांचा असताना त्याचा बाप निवर्तला व त्यानंतर त्याच्या आईने त्याला पंडित गंगादास यांच्या पाठशाळेत दाखल केले. तिथे तो व्याकरणशास्त्र शिकला. पुढे वासुदेव सार्वभौम या नैयायिकाकडे त्याने न्यायशास्त्राचे अध्ययन केले. दोन्ही शास्त्रांत तो पारंगत झाला.

अध्ययन संपल्यावर त्याने स्वतःची पाठशाळा काढली. नवद्वीपातले अनेक विद्यार्थी त्याच्याकडे पाठ घ्यायला येऊ लागले. वयाच्या १६ व्या वर्षी वल्लभाचार्यांची कन्या लक्ष्मी हिच्याशी प्रभूचा विवाह झाला. थोड्याच काळात प्रभूची गणना श्रेष्ठ पंडितांत होऊ लागली. पण त्याच्या खेळकर स्वभावात मात्र काहीच अंतर पडले नाही. तो आपल्या शिष्यांसह नदीत पोहताना किंवा रस्त्याने धावताना दिसे. थोड्या दिवसांनी प्रभू पूर्व बंगालात गेला. तिथल्या लोकांकडून त्याला बरीच द्रव्यप्राप्तीही झाली. पण तो तिकडे असतानाच इकडे घरी त्याची बायको सर्पदंशाने मरण पावली. त्यानंतर प्रभूचा दुसरा विवाह विष्णुप्रिया नावाच्या एका मुलीशी झाला. ती सनातन मिश्र नामक पंडिताची कन्या होती.

पुढे एके दिवशी प्रभूच्या आयुष्यात एक महान क्रांती घडली. भगवान गोपालकृष्णाचे नामस्मरण करीत असता त्याच्यातला पंडित एकाएकी हरपला आणि त्या जागी परम भक्त प्रकट झाला. त्या दिवसापासून प्रभू जणू हरिवेडा बनला. त्याचे हे परिवर्तन सर्वांनाच आश्चर्यजनक वाटले.

पुढे तो आपल्या शिष्यपरिवारासह गयेस गेला. तिथे विष्णुपदाचे दर्शन होताच तो एकाएकी उन्मनी अवस्थेत गेला. त्याचा देह खाली कोसळणार, एवढ्यात ईश्वरपुरी नामक साधूने त्याला सावरून धरले. भानावर येताच प्रभूने त्या साधूचे पाय धरले. ईश्वरपुरीचे हृदयही भरून आले. त्याने प्रभूला 'गोपीजनवल्लभाय नमः' हा मंत्र देऊन त्याच्यावर अनुग्रह केला.

तिथून प्रभू परत आपल्या गावी आला. पण आता त्याचा खेळकरपणा पार लोपला होता आणि तो विलक्षण गंभीर बनला होता. श्रीहरीचे स्मरण झाले, की तो लगेच भावविवश होई आणि निश्चेष्ट पडे. 'माझा कृष्ण मला भेटवा हो' म्हणून भेटेल त्याची आळवणी करी आणि कृष्णदर्शनासाठी सारखा तळमळत राही.

अशा स्थितीत त्याच्या हातून विद्यार्थ्यांना अध्यापन होईना. शेवटी त्याने विद्यार्थ्यांना सांगितले, 'की तुम्ही अध्ययनासाठी दुसरीकडे कुठेतरी चला'. शिष्यांना त्या गोष्टीचे परम दुःख झाले. त्यांनी व्यथित अंतःकरणाने प्रभूचा निरोप घेतला. शिष्यांप्रमाणेच पत्नीवरचेही त्याचे लक्ष उडाले. त्याला तहानभूकही कळेनाशी झाली.

श्रीवास हा त्याचा एक शिष्य होता. प्रभूचे भजन-कीर्तन त्याच्याच घरी चाले. हळूहळू प्रभूच्या संगतीत माधवाचार्य, शुक्लांबर, पुंडरीक, हरिदास, नित्यानंद, इ. जाणते लोक आले व प्रभूचे शिष्य बनले.



भावोन्मत्त अवस्थेत चैतन्य महाप्रभू

त्या गावात जगन्नाथ व माधव या नावाचे दोघ ब्राह्मण होते. ते गावचे कोतवाल होते आणि स्वभावाने दुष्ट होते. शाक्तपंथी असल्यामुळे त्यांना वैष्णवांची चीड होती. एके दिवशी त्यांनी प्रभूचा शिष्य नित्यानंद याच्या मस्तकावर प्रहार करून त्याला रक्तबंबाळ केले. प्रभू त्या गोष्टीचा जाब विचारण्यासाठी त्या दोघांकडे गेला. प्रभूची ती दिव्य मूर्ती आणि मधुर वाणी यांचे दर्शनश्रवण होताच, ते दोघेही लज्जित झाले आणि प्रभूला शरण गेले.

प्रभूच्यामुळे नवद्वीपात नामसंकीर्तनाचा प्रसार झाला. सर्व जाती व सर्व वर्ण त्यात भाग घेऊन भक्तिसुख उपभोगू लागले. पण सनातनी पंडितांना ते रुचले नाही. ते प्रभूचा मत्सर करू लागले व त्याला नाना प्रकारे त्रास देऊ लागले. चांदकाझी नावाच्या एका मुसलमान अधिकाऱ्याला फितवून त्याच्याकडून प्रभूची संकीर्तने बंद करण्याचाही त्यांनी घाट घातला. पण प्रभू निर्भय होता. त्याने सर्व भक्तांना सांगितले, की 'श्रीकृष्ण आपला पाठीराखा आहे. तुम्ही भिऊ नका.' मग त्याने एका रात्री सर्व गावभर फिरून संकीर्तन करायचे ठरवले. भक्तांचा मेळावा जमला. कोणी मृदंग, कोणी करताल, तर कोणी झांजा घेऊन त्यात सामील झाले. 'हरिबोल'चा गजर सुरू झाला. प्रभू गात, नाचत त्या मेळाव्यातून चालू लागला. त्याने नामसंकीर्तनाची धमाल उडवून दिली. चांदकाझीच्या घरावरून ती मिरवणूक जाऊ लागली, तेव्हा काझी खवळला. त्याने ती मिरवणूक बंद करण्यासाठी आपले शिपाई पाठविले. पण आश्चर्याची गोष्ट अशी, की ते सगळे त्या मिरवणुकीतच सामील झाले. शेवटी सर्व भजनी मंडळींनी काझीच्या घराला गराडा घातला. काझी रागारागाने बाहेर आला; पण प्रभूचे दर्शन होताच त्याचे क्रोधद्वेषादी विकार मावळले. तो प्रभूला शरण आला व नामसंकीर्तनाच्या त्या मेळाव्यात भाग घेऊन स्वतःही नाचू-गाऊ लागला.

अद्वैताचार्य नावाच्या एका वयोवृद्ध जाड्या पंडितालाही प्रभूने भक्तिमार्गात आणले आणि आपल्याबरोबरच गायला, नाचायला लावले.

प्रभूला वाटे, की आपण राधा आहो व श्रीकृष्ण आपला वल्लभ आहे. हा राधाभाव प्रभूच्या मनात हळूहळू घनसांद्र होऊ लागला. दिवसाचे दिवस प्रभू या राधाभावात निमग्न असे आणि कृष्णविरहाने तळमळत असे. हळूहळू त्याचे वैराग्य वाढत गेले. त्याला संन्यासग्रहणाची इच्छा उत्पन्न झाली. त्याच्या या कल्पनेने त्याच्या शिष्यांना आणि भक्तांना परमदुःख झाले. आई शचीदेवी आणि पत्नी विष्णुप्रिया या दोघींना तर आकाशच फाटल्यासारखे झाले. अत्यंत व्यथित मनाने केवळ निरुपाय म्हणून त्या दोघींनी प्रभूला संन्यासग्रहणाची अनुज्ञा दिली.

पुढे एका रात्री प्रभू गृहत्याग करून निघाला, तो कटवा या गावी गेला. तिथे केशवभारती नावाचा एक माध्वपंथी संन्यासी राहत होता. प्रभूने त्याच्याकडून संन्यासदीक्षा घेतली. स्वामीने प्रभूचे संन्यासाश्रमातले नाव श्रीकृष्णचैतन्य असे ठेवले. तिथून पुढे चैतन्यप्रभू किंवा चैतन्य महाप्रभू या नावाने तो ओळखला जाऊ लागला.

कटवा गावी असता प्रभूला एक दिवस वृंदावनाला जाण्याची इच्छा झाली. पण तो ज्या वाटेने निघाला, ती वाट वृंदावनाची नसून नवद्वीपाची होती. नवद्वीपाजवळच्या शांतिपूर या गावी आल्यावर आपण वाट चुकल्याचे त्याला उमगले. तिथे नित्यानंद वगैरे भक्तमंडळींनी त्याची गाठ घेतली व नवद्वीपाहून त्याच्या आईला तिथे आणून मायलेकरांची भेट घडवली. त्यावेळी आई त्याला म्हणाली. 'तू संन्यास घेतल्यामुळे तुला माझ्याजवळ राहता येणार नाही, हे मी जाणते. पण तू माझ्यापासून फार दूर जाऊ नको. जगन्नाथपुरी इथून जवळच आहे. तिथे तुझे वास्तव्य होऊ दे. म्हणजे मला वेळोवेळी तुझा समाचार कळत जाईल.' प्रभूने ती आईची आज्ञा मान्य केली. मग तो शांतिपुराहून निघून जगन्नाथपुरीस आला. वासुदेव सार्वभौम हा त्याचा न्यायशास्त्राचा गुरू पुरीतच होता. त्याला आपल्या पांडित्याचा गर्व होता. भक्तीपेक्षा ब्रह्मज्ञान श्रेष्ठ अशी त्याची धारणा होती; पण प्रभूने त्याला भगवद्‌भक्तीचे श्रेष्ठत्व पटवले आणि त्याचा अभिमान दूर केला. पुढे तो महापंडितही भक्तिमार्गात दाखल झाला.



नित्यानंद प्रभू व चैतन्य महाप्रभू

जगन्नाथपुरीत अशा प्रकारे काही काल काढल्यावर प्रभू दक्षिणयात्रेला निघाला. या यात्रेत गोविंद नावाचा त्याचा भक्त त्याचा सोबती होता. प्रभू मजल दरमजल करीत विद्यानगराला पोचला. तिथे गोदावरीच्या घाटावर तिथला प्रांताधिकारी राजा रामानंदराय याने प्रभूची भेट घेतली. दोघेही भगवद्‌भक्त; त्यामुळे त्या दोघांचा तो प्रीतिसंगम ठरला. त्या भेटीत रामानंदाला प्रभूच्या मुखातून राधा-कृष्णाचे तत्त्व व दिव्यप्रेम ऐकायला मिळाले.

पुढे गिरीश्वर, पाणनृसिंह, विष्णुकांची, तंजाऊर, इ. क्षेत्रे फिरत फिरत तो कन्याकुमारीपर्यंत पोचला. त्यानंतर त्याने पश्चिमेच्या तीर्थयात्रा केल्या. तिथून तो परत विद्यानगराला आला. रामानंदाची आणि त्याची तिथे पुनश्च भेट झाली. रामानंदाला बरोबर घेऊनच प्रभू परत जगन्नाथपुरीस आला. तिथे आल्यावर प्रभूने आपल्या नित्यानंद (निताई) या प्रमुख शिष्याला कृष्णभक्तीच्या प्रचारासाठी बंगालमध्ये पाठवले. प्रभू स्वतः वृंदावन, काशी, प्रयाग या प्रदेशात वैष्णव धर्माच्या प्रचारासाठी निघाला. काशी क्षेत्रात प्रकाशानंद सरस्वती नावाचा एक महापंडित होता. त्याला प्रभूने भक्तिमार्गात आणले आणि प्रबोधानंद असे त्याचे नाव ठेवून त्याला वृंदावनाकडे भक्तीच्या प्रचारासाठी धाडून दिले.

नंतर प्रभू पुनश्च नवद्वीपाला आला. तिथे त्याने मातेची भेट घेतली. त्याप्रसंगी पत्नी विष्णुप्रिया हिने प्रभूला म्हटले, की 'आपण तर जगदुद्धार करण्यासाठी निघाला आहा; मग मला का दूर ठेवता ?' त्यावर प्रभूने तिला आपल्या पादुका दिल्या. माता-पत्नीला झालेली हीच त्याची अखेरची भेट होय.

तिथून पुनश्च तो जगन्नाथपुरीस गेला. तिथे एके दिवशी समुद्रतीरावरून त्याची भजनयात्रा चालली होती. प्रभू गात-नाचत जात होता. मागे असंख्य भक्तमंडळी जयघोष करीत होती. एवढ्यात प्रभूला समोर अथांग समुद्राचे दर्शन झाले. तो क्षितिजापर्यंत पसरलेला निळा निळा सागर पाहून त्याला वाटले, की आपला घनश्याम श्रीहरीच समोर पसरला आहे. त्यासरशी प्रभूचा भावोद्रेक झाला आणि 'हे कृष्ण, हे श्याम' असा टाहो फोडीत त्याने समुद्राच्या लाटांवर आपला देह झोकून दिला. आपल्या आराध्य दैवताला त्याने आत्मार्पण केले !

चैतन्य महाप्रभू गाढा पंडित होता. पण त्याने अन्य आचार्यां-

प्रमाणे आपल्या संप्रदायाला व्यवस्थित स्वरूप देण्याचा प्रयत्न केला नाही, की प्रस्थानत्रयीवर भाष्यही लिहिले नाही. त्याने तत्त्वज्ञानाचा प्रपंच करण्यापेक्षा श्रीहरीच्या संकीर्तनभक्तीत तल्लीन राहणेच अधिक पसंत केले. या संकीर्तनभक्तीविषयी त्याने एक श्लोकाष्टक रचले आहे, ते असे–

चेतोदर्पणमार्जनं भवमहादावाग्निनिर्वापणम्
श्रेय:कैरवचन्द्रिकावितरणं विद्यावधूजीवनम् ।
आनन्दाम्बुधिवर्धनं प्रतिपदं पूर्णामृतास्वादनम्
सर्वात्मस्नपनं परं विजयते श्रीकृष्णसङ्कीर्तनम् ॥ १ ॥
नाम्नामकारि बहुधा निजसर्वशक्ति–
स्तत्रार्पितानियमित: स्मरणेन काल: ।
एतादृशी तव कृपा भगवन्ममापि
दुर्दैवमीदृशमिहाजनि नानुराग: ॥ २ ॥
तृणादपि सुनीचेन तरोरपि सहिष्णुना ।
अमानिना मानदेन कीर्तनीय: सदा हरि: ॥ ३ ॥
न धनं न जनं न सुन्दरीं कवितां वा जगदीश कामये ॥
मम जन्मनि जन्मनीश्वरे भवताद् भक्तिरहैतुकी त्वयि ॥४॥
अयि नन्दतनूज किङ्करं पतितं मां विषमे भवाम्बुधौ ।
कृपया तव पादपङ्कजस्थितधूलीसदृशं विचिन्तय ॥ ५ ॥
नयनं गलदश्रुधारया वदनं गद्गद्रुद्धया गिरा ।
पुलकैर्निचितं वपु: कदा तव नामग्रहणे भविष्यति ॥ ६ ॥
युगायितं निमेषेण चक्षुषा प्रावृषायितम् ।
शून्यायितं जगत्सर्वं गोविन्दविरहेण मे ॥ ७ ॥
आश्लिष्य वा पादरतां पिनष्टु मा–
मदर्शनान्मर्महतां करोतु वा ।
यथा तथा वा विदधातु लम्पटो
मत्प्राणनाथस्तु स एव नापर: ॥ ८ ॥

(चैतन्य चरितावली ५)

अर्थ– चित्तरूपी दर्पणावरचा मळ धुवून टाकणाऱ्या, संसाररूपी महान वणव्याचे शमन करणाऱ्या, श्रेयोरूप कुमुदचंद्रिकेचे दान करणाऱ्या, विद्यारूपी वधूचे जीवन असणाऱ्या, प्रतिदिनो आनंदसमुद्राला भरती आणणाऱ्या, पूर्णामृताचे आस्वादन करणाऱ्या, सर्व आत्म्यावर अभिषेक करणाऱ्या अशा श्रेष्ठ श्रीकृष्णसंकीर्तनाचा विजय असो. (१)

हे नाथ, तुझ्या कृपेत काही कसूर नाही. माझ्या दुर्भाग्यात काही संदेह नाही. तू आपल्या समस्त नामांमध्ये पूर्ण शक्ती भरून ठेवली आहेस. काल, पात्र, इ. कोणताही प्रतिबंध तू त्याला ठेवलेला नाहीस. माझे मात्र हे दुर्भाग्य, की तुझ्या या मधुर नामांनी माझ्या हृदयात अनुराग उत्पन्न होत नाही. (२)

तृणाहूनही नम्र होऊन, वृक्षाहूनही सहिष्णू होऊन व स्वतःच्या मानाची इच्छा न करता दुसऱ्यांना मान देऊन श्रीहरीचे सार्वकाल कीर्तन करावे. (३)

हे जगदीशा, मी धन, जन, सुंदर स्त्री, किंवा कविता यांपैकी कशाचीही कामना करीत नाही. जन्मजन्मांतरी माझी निष्काम भक्ती तुझ्या ठिकाणी राहावी (एवढीच कामना आहे). (४)

हे नंदसुता, विषम अशा संसारसागरात पडलेल्या मज सेवकावर कृपा कर आणि मला तुझ्या चरणकमलाला लागलेल्या धूलिकणाप्रमाणे समज. (५)

हे प्रभो, तुझे नामसंकीर्तन करीत असता डोळ्यांतून अश्रुधारा गळू लागणे, वाणी गद्गद अतएव रुद्ध होणे व शरीर रोमांचांनी भरून जाणे, या गोष्टी कधी बरे होतील? (६).

हे प्रभो, तुझ्या विरहात माझे एक पळ युगासमान, डोळे वर्षाऋतूसमान व विश्व शून्यासमान झाले आहे. (७)

(हे सखी!) तो धोकेबाज कृष्ण त्याच्या चरणांच्या ठिकाणी रत राहणाऱ्या मला हृदयाशी धरो अथवा दर्शन न देता मर्माहत करो. जे काही त्याला करायचे असेल, ते त्या लंपटाने खुशाल करावे; पण तरीही तोच माझा प्राणनाथ आहे आणि दुसरा कोणीही नाही. (८)

चैतन्यविषयक साहित्य -- चैतन्यचरितामृत, चैतन्यभागवत व चैतन्यमंगल असे प्रमुख तीन ग्रंथ चैतन्य व त्याचा संप्रदाय यांच्याविषयी माहिती देणारे आहेत. कृष्णदास हा चैतन्यचरितामृताचा कर्ता होय. त्याला प्रभूचा सहवासही लाभला होता. या काव्याचे आदिलीला, मध्यलीला व अंत्यलीला असे तीन खंड आहेत.

वृंदावनदास याने चैतन्यभागवत निर्माण केले आहे. यातील चैतन्यचरित्र हे भागवतातील श्रीकृष्णाचा आदर्श पुढे ठेवून लिहिले आहे. याचे आदी, मध्य व अंत्य असे तीन खंड आहेत. हा ग्रंथ मुख्यत्वे पयार या छंदात आहे.

चैतन्यमंगलाचा कर्ता लोचनदास नावाचा कवी होता. या काव्याचे चार खंड आहेत. हे पांचाली शैलीत रचलेले असल्यामुळे फार लोकप्रिय आहे. [बं. उ. सा.; भा. सं. म.; भ. क.; चैतन्यचरितावली; भा. द.]

चैतन्य षड्भुज चैतन्य महाप्रभूचे एक तात्त्विक रूप. श्रीजीवगोस्वामी यांच्या सुधात्रय या ग्रंथावरून कळते, की ओडिसा प्रदेशातले लोक चैतन्याला षड्भुजरूपात भजतात. ‘ हरे राम कृष्ण ’ हा त्याच्या उपासनेचा मंत्र असून तोही षडक्षरीच आहे. त्यातली ‘ हरे राम ’ ही चार अक्षरे वरच्या चार भुजांच्या जागी असून ती भक्तीची स्मारक आहेत. कृष्ण ही पुढची दोन अक्षरे खालच्या दोन भुजांच्या

जागी असून ती ज्ञानमार्गाची सूचक आहेत. इ. स. च्या १६ व्या शतकात ओडिसामध्ये ज्ञानाधिष्ठित भक्तिमार्ग प्रतिष्ठा पावला होता, असे तत्कालीन अनेक ग्रंथांवरून कळते. [कल्याणभक्ति-अंक]



चैतन्य षड्भुज– सांप्रदायिक चित्र

चैतन्य संप्रदाय

बंगाल, ओडिसा व व्रजमंडल या प्रदेशांतील एक संप्रदाय. चैतन्य महाप्रभूच्या कृष्णभक्तीला अनुसरून या उपासनासंप्रदायाची स्थापना झाली. ज्याप्रमाणे शंकर, रामानुज, निंबार्क, मध्व, इ. आचार्यांनी आपल्या मताच्या प्रतिपादनासाठी ब्रह्मसूत्रांवर भाष्ये लिहिली, त्याप्रमाणे चैतन्य महाप्रभूने आपल्या मताच्या समर्थनासाठी कोणत्याही ग्रंथावर कोणतेही भाष्य लिहिले नाही. श्रीकृष्णाच्या माधुर्यभक्तीत प्रभू इतका भावोन्मत्त असे, की असा एखादा ग्रंथ लिहिणे, ही गोष्ट त्याच्या बाबतीत अशक्यप्राय होती. ते काम पुढे प्रभूच्या कित्येक विद्वान शिष्यांनी केले.

चैतन्य मताचा माध्व मताशी घनिष्ठ संबंध आहे. माध्व मत द्वैतवादी आहे. माध्व सिद्धान्तानुसार विश्वात स्वतंत्र व अस्वतंत्र या रूपाने दोन तत्त्वे मुख्य आहेत. त्यांपैकी परमात्मा हा स्वतंत्र असून, तो विष्णू या नावाने प्रसिद्ध आहे व जीवात्मा अस्वतंत्र आहे. ही दोन्ही तत्त्वे नित्य व अनादी असून, त्या दोहोंत स्वभावतःच भेद आहे. चैतन्य संप्रदाय हाही द्वैतवादीच आहे; पण त्याच्या द्वैतात आणि माध्वांच्या द्वैतात फरक आहे. चैतन्य मतानुसार भगवान श्रीकृष्ण हेच एक परमतत्त्व असून त्याच्या अनंत शक्ती आहेत. शक्ती व शक्तिमान यांमध्ये भेद सिद्ध होत नाही, तसाच अभेदही सिद्ध होत नाही. त्या दोहोंचा संबंध तर्काने अचित्य आहे. म्हणूनच या मताला अचिंत्यभेदाभेद असे दुसरे नाव मिळाले आहे. याविषयी रूपगोस्वामी आपल्या लघुभागवतामृत या ग्रंथात (१.५०) लिहितात––

एकत्वं च पृथक्त्वं च तथांशत्वमुतांशिता।
तस्मिन्नेकत्र नायुक्तमचिन्त्यानन्तशक्तितः ॥

अर्थ – त्या परमतत्त्वाच्या ठिकाणी एकत्व आणि पृथक्त्व, तसेच अंशत्व आणि अंशित्व या दोन्ही गोष्टी एकत्र राहणे अयुक्त नाही. कारण त्या परमतत्त्वाच्या शक्ती अचित्य व अनंत आहेत.

श्रीकृष्ण हा देशकालांनी परिच्छिन्न आहे. मग तो सच्चिदानंद व अनंत कसा होऊ शकेल, असा कोणी आक्षेप घेईल; पण चैतन्याच्या मते हा आक्षेप निर्मूल आहे. भौतिक गुण हे आध्यात्मिक वस्तूत संभवत नाहीत. भौतिक वस्तू म्हणजे सत्त्व, रज व तम या गुणांचे विभिन्न संघात होत. श्रीकृष्ण आध्यात्मिक आहे. तो विशुद्ध सत्त्वरूप आहे. रज व तम त्याला स्पर्श करू शकत नाहीत. तो सान्त व अनन्त, एकत्र व सर्वत्र, सर्व काही असू शकतो; कारण त्याची शक्ती अचित्य आहे. या अचित्य शक्तीमुळेच श्रीकृष्ण हा विभू आहे. व्यापक आहे. श्री, ऐश्वर्य, वीर्य, यश, ज्ञान व वैराग्य या षड्विध ऐश्वर्याची पूर्ण एकता म्हणजे श्रीकृष्ण होय. या ऐश्वर्यांपैकी श्री ही केंद्रस्थानी असून अन्य ऐश्वर्ये ही तिच्या अंगभूत आहेत.

प्रस्तुत मताचा सारभूत श्लोक असा–

आराध्यो भगवान् व्रजेशतनयस्तद्धाम वृन्दावनम्।
रम्या काचिदुपासना व्रजवधूवर्गेण या कल्पिता॥
शास्त्रं भागवतं प्रमाणममलं प्रेमा पुमर्थो महान्।
श्रीचैतन्यमहाप्रभोर्मतमिदं तत्रादरो नः परः॥

अर्थ – व्रजस्वामी नंदाचा पुत्र भगवान श्रीकृष्ण हाच आराध्य आहे. वृंदावन हे त्याचे धाम (निवासस्थान) आहे. व्रजातल्या गोपींकडन केली गेलेली रमणीय उपासना ही साध-

कांच्याकरिता प्रामाणिक उपासना आहे. श्रीमद्भागवत हे निर्मल असे प्रमाण आहे. प्रेम हाच सर्वश्रेष्ठ पुरुषार्थ आहे. हे चैतन्य महाप्रभूंचे मत आहे व आमचा त्या मताविषयी परमादर आहे.

बलदेव विद्याभूषण यांनी चैतन्य मताची मुख्य तत्त्वे सांगितली आहेत, ती अशी—-

ईश्वर – हा स्वतंत्र, विभू, चैतन्य, सर्वकर्ता, सर्वज्ञ, मुक्तिदाता व विज्ञानस्वरूप आहे. तो जगताचे उपादान व निमित्त कारण आहे. आपल्या अचिंत्य शक्तीच्या सामर्थ्याने तो स्वतः जगद्रूपाने परिणत होऊनही स्वरूपतः अविकृत राहतो.

जीव – हा चैतन्य, अणू, अनादी पण मायामोहित, अतएव बद्ध आहे. ईश्वरपराङ्मुखता हेच त्याच्या बंधाचे कारण आहे. ईश्वराच्या कृपेने त्याचे बंध तुटतात व तो मोक्ष प्राप्त करून घेतो. हा मुक्त जीव ब्रह्मानंद अनुभवीत असूनही ब्रह्मापासून वेगळा राहतो. तो अणुरूप असल्यामुळे स्वरूप व सामर्थ्य या दोन्ही बाबतीत विभू अशा ब्रह्माहून पृथक असतो.

प्रकृती – ही नित्य असून परब्रह्माची शक्ती असते. ती परमात्म्याची आश्रित व वशवर्तिनी असते.

काल – हे एक परिवर्तनशील जड द्रव्य आहे. ते सृष्टिप्रलयाला निमित्त असते.

कर्म – हे अनादी, नश्वर व जड आहे. ते ईश्वराच्या शक्तीचे रूप असते.

उपास्य श्रीकृष्णपरमात्म्याची पुढील तीन रूपे आहेत—

स्वयंरूप – दुसऱ्या कोणाचाही आश्रय न घेता किंवा दुसऱ्या कोणत्याही वस्तूची अपेक्षा न धरता स्वतः आविर्भूत होणाऱ्या रूपाला स्वयंरूप म्हणतात.

अनन्यापेक्षि यद्रूपं स्वयंरूपः स उच्यते ।

(लघुभागवतामृत १.१२)

अर्थ – अन्य गोष्टीची अपेक्षा न धरणारे जे रूप ते स्वयंरूप म्हटले जाते.

ब्रह्मसंहितेत या रूपाची प्रशंसा करताना म्हटले आहे, की हे रूप अनादी व सर्व कारणांचे कारण आहे.

तदेकात्मरूप – हे रूप स्वयंरूपाशी अभिन्न असूनही आकृती, अंगसंनिवेश व चरित्र यांमध्ये भिन्न असते.

यद्रूपं तदभेदेन स्वरूपेण विराजते ।
आकृत्यादिभिरन्यादृक् स तदेकात्मरूपकः ॥

(लघुभागवतामृत १.१४)

अर्थ – एकात्मरूप हे स्वयंरूपाशी अभिन्नरूपाने विराजमान असले तरी ते आकृत्यादी गोष्टींनी वेगळे असते.

हे विलास व स्वांश या रूपांनी दोन प्रकारचे होते--

स्वरूपमन्याकारं यत् तस्य भाति विलासतः ।
प्रायेणात्मसमं शक्त्या स विलासो निगद्यते ॥

(लघुभागवतामृत १.१५)

अर्थ – हे स्वरूप दुसऱ्या आकाराचे, पण शक्तीमध्ये प्रायः मूलरूपाशी तुल्य असते. हे तदेकात्मरूपाच्या विलासातून भासमान होते. यालाच विलास अशी संज्ञा आहे.

उदा०– गोविंदाचा विलास परमव्योमाचा अधिपती नारायण, नारायणाचा विलास आदिवासुदेव, इत्यादी. या दोन्ही आकारांत समानता असूनही मूलरूप व विलासरूप या रूपांनी पृथक्त्व राहते.

तादृशो न्यूनशक्तिं यो व्यनक्ति स्वांश ईरितः ।

(लघुभागवतामृत १.१६)

अर्थ – भगवान जेव्हा आपल्या स्वयंरूपातून थोड्याशा शक्तीचा प्रकाश करतो, तेव्हा त्या रूपाला स्वांश म्हणतात.

उदा०– संकर्षणादी पुरुषावतार व मत्स्यादी लीलावतार.

आवेशरूप – परमात्म्याचे हे रूप वरील दोन्ही भेदांहून सर्वथा भिन्न आहे.

ज्ञानशक्त्यादिकलया यत्राविष्टो जनार्दनः ।
त आवेशा निगद्यन्ते जीवा एव महत्तमाः ॥

(लघुभागवतामृत १.७)

अर्थ– ज्ञान, शक्ती, इ. कलांनी ज्या ठिकाणी जनार्दन आविष्ट झाल्यासारखा वाटतो, ते महत्तम जीव आवेश म्हटले जातात.

उदा०– शेष, नारद, सनकादी.

भगवान अचिंत्याकार अशा अनंत शक्तींनी संपन्न आहे. पण त्या सर्व शक्तींत अंतरंगशक्ती, तटस्थशक्ती व बहिरंगशक्ती या तीन शक्ती मुख्य आहेत.

अंतरंगशक्ती– हिला चिच्छक्ती किंवा स्वरूपशक्ती असेही म्हणतात. ही भगवद्रूपिणी असते. या एकात्मिक स्वरूपशक्तीचे तीन भेद चैतन्यचरितामृतात सांगितले आहेत, ते असे–

सच्चिदानंद पूर्ण कृष्णेर स्वरूप ।
एकई चिच्छक्ति तार धरे तिन रूप ॥
आनन्दांशे ह्लादिनी सदंशे सन्धिनी ।
चिदंशे संवित् यारे ज्ञान करि मानि ॥

अर्थ–श्रीकृष्ण सच्चिदानंदघन आहे. त्याच्या एकाच चिच्छक्तीची तीन रूपे होतात. सत् या अंशाने सन्धिनी, चित् या अंशाने संवित् व आनंद या अंशाने ह्लादिनी या त्या तीन शक्ती होत.

संधिनी– या शक्तीच्या बलावर भगवान स्वतः सत्ता धारण करतो व इतरांना सत्ताप्रदान करतो. याच शक्तीच्या बलाने

तो समस्त देश, काल व द्रव्य यांना व्यापून राहतो.

संवित्– भगवान स्वतः चिदात्मा आहे. तो या शक्तीच्या बलावर स्वतःला जाणतो व इतरांनाही ज्ञानप्रदान करतो.

ह्लादिनी– भगवान आनंदरूप आहे. या शक्तीच्या बळावर तो स्वतः आनंदाचा अनुभव करतो व इतरांनाही आनंदप्रदान करतो.

तटस्थशक्ती – हिला जीवशक्ती असेही म्हणतात. ही शक्ती परिच्छिन्नस्वभाव व अणुत्वविशिष्ट अशा जीवांच्या आविर्भावाचे कारण बनते. अंतरंगशक्ती व बहिरंगशक्ती यांच्या मध्यभागी स्थित असल्यामुळे हिला तटस्थ म्हटले आहे.

बहिरंगशक्ती– ही जगताच्या आविर्भावाला कारण बनते. हिला मायाशक्ती असेही म्हणतात. या मायाशक्तीमुळेच जीवाच्या ठिकाणी अविद्या राहते. त्यामुळेच जीव हा भगवंताशी असलेल्या वास्तविक आत्मसंबंधाला विसरतो. भगवान व जीव यांचा संबंध अग्नि-स्फुल्लिगवत् आहे. हा संबंध जाणणे म्हणजेच जीवाची मुक्ती होय.

चैतन्यमतात जगत हे सत्य मानलेले आहे. कारण सत्यसंकल्प आणि सर्वज्ञ अशा श्रीहरीच्या बहिरंगशक्तीचा तो विलास आहे. जगत्सत्यत्वासाठी चैतन्य मताचे लोक पुढील श्लोकाचा आधार देतात–

> तदेतदक्षयं नित्यं जगन्मुनिवराखिलम् ।
> आविर्भावतिरोभावजन्मनाशविकल्पवत् ।
> (विष्णू पु. १.२२.६०)

अर्थ – हे मुनिश्रेष्ठा, हे अखिल जगत् आविर्भाव, तिरोभाव, जन्म व नाश या विकल्पांनी युक्त असूनही अक्षय तसेच नित्य आहे.

सृष्टीच्या नाशानंतर प्रलयदशेतही हे जगत ब्रह्माच्या ठिकाणी अनभिव्यक्त स्वरूपात विद्यमान असते. रात्रीच्या वेळी अरण्यात पक्षी उडत नसले, किलबिल करीत नसले, तरी त्यांचे अस्तित्व नष्ट होत नाही. ते पक्षी आपल्या घरट्यांत लीन होऊन राहतात. तसेच या जगाचे आहे.

साधनमार्ग – भारतीय धर्मसाधनेत प्रारंभापासूनच भक्तीला कमी-अधिक प्रमाणात स्थान मिळालेले आहे. निरनिराळ्या संप्रदायांच्या द्वारे तिचा क्रमिक व सर्वांगीण विकास झालेला दिसतो. ही भक्ती चैतन्य संप्रदायात आपला परमोत्कर्ष गाठते. अनेक दार्शनिकांनी धर्म, अर्थ, काम व मोक्ष असे चार पुरुषार्थ मानलेले आहेत; पण चैतन्य मतात भक्ती हा पाचवा पुरुषार्थ असून ती सर्वश्रेष्ठ आहे.

चैतन्य मतात भक्ती ही संवित् व ह्लादिनी या दोन भगवच्छक्तींचे मिश्रण आहे, म्हणून भक्ती हो भगवद्रूपिणीच आहे.

ऐश्वर्य व माधुर्य अशी भगवंताची दोन रूपे आहेत. ऐश्वर्यरूपात भगवान परात्पर आहे. या रूपाची सिद्धी ज्ञानाने होत असते. माधुर्यरूपात भगवान नरतनू धारण करून मनुष्याप्रमाणे व्यवहार करतो. या माधुर्यरूपात पुढील पाच प्रकारांनी भगवंताची भक्ती केली जाते–

(१) शांत– कृष्णनिष्ठा.

(२) दास्य– कृष्णनिष्ठा व कृष्णसेवा.

(३) सख्य– पहिल्या दोहोंसह कृष्णाच्या ठिकाणी निस्संकोच बुद्धी.

(४) वात्सल्य – पहिल्या तीन्हींसह कृष्णाच्या ठिकाणी पुत्रवत प्रेम.

(५) माधुर्य– वरील चार गोष्टींसह कृष्णसुखासाठी सर्वस्व समर्पण.

आपल्या प्रिय वस्तूच्या ठिकाणी जो सहज अनुराग असतो, त्याला रती म्हणतात. वैष्णवांची सर्वाधिक प्रिय वस्तू भगवान श्रीकृष्ण ही आहे. त्याच्याविषयीच्या अनुरागाला ते कृष्णरती म्हणतात. या कृष्णरतीची परिपूर्णता म्हणजे भक्तिरस होय. याविषयी कृष्णदास कविराज म्हणतो–

> साधन भक्ति हैते हय रतिर उदय।
> रति गाढ हैले तार प्रेम नाम कय ।।
> प्रेम वृद्धि क्रमे नाम स्नेह, मान, प्रणय।
> राग, अनुराग, भाव, महाभाव, हय ।।
> (चैतन्यचरितामृत मध्यलीला१९)

अर्थ– साधनभक्तीच्या द्वारे मोठ्या भाग्याने कृष्णरतीचा उदय होतो. ही रती प्रगाढ झाली, की तिला प्रेम म्हणतात. प्रेमाची वृद्धी झाल्यानंतर त्याला क्रमशः स्नेह, मान, प्रणय, राग, अनुराग, भाव व महाभाव ही नावे दिली जातात.

कृष्णरतीची निम्न कोटी शांतरसात राहते, तर तिची उच्च कोटी माधुर्यरसात असते. माधुर्यभावाची रती साधारणी, समंजसा व समर्था अशी तीन प्रकारची असते. साधारणी रतीचा उपासक आत्मानंदासाठी भगवंताची सेवा करतो व त्या सेवेतून त्याला मधुराधामाची प्राप्ती होते. अशी मधुराधामाची प्राप्ती कुब्जेला झाली होती. समंजसा रतीत कर्तव्यबुद्धीने प्रेमाचे आचरण होते व त्यामुळे उपासकाला द्वारकावास हे फल मिळते. रुक्मिणी, जांबवंती, इ. कृष्णस्त्रियांना हे फल मिळाले होते. समर्था रतीचा उपासक भगवंताच्या आनंदासाठीच उपासना व सेवा करतो. त्याच्या त्या प्रेमात स्वार्थाचा लेशही नसतो. तिथे आत्मसुखाची भावना कृष्णसुखात विलीन होऊन जाते. समर्था रतीचे उत्कृष्ट उदाहरण म्हणजे व्रजगोपिका हे होय. चैतन्य मताच्या आचार्यांनी गोपींच्या प्रेमाची

सर्वोत्कृष्टता मान्य केली आहे.

चैतन्य मतात कृष्णभक्तीचे वैधी व रागात्मिका असे दोन प्रकार मानले आहेत. शास्त्रोक्त पद्धतीने कृष्णभक्ती करणे, ही वैधी व त्याच्यावर निष्काम प्रेम करणे, ही रागात्मिका भक्ती होय. ही विधिनिषेधांच्या पलिकडे असते. ती प्राप्त करणे, हे भक्ताचे सर्वश्रेष्ठ लक्ष्य असायला हवे.

या कृष्णभक्तीचे प्रथम आणि प्रमुख साधन हरिनामसंकीर्तन हे आहे. चैतन्य महाप्रभूला संकीर्तन अत्यंत प्रिय होते. त्याने आपल्या शिक्षाष्टकात नामसंकीर्तनाचे गुणगान केले आहे. चैतन्य मताच्या प्रचारकांनी सामान्य जनतेत या हरिनामसंकीर्तनाचा पुष्कळच प्रचार केला व कीर्तनभक्तीच्या वळावरच अनेक लोकांना आपल्या संप्रदायाकडे आकृष्ट केले.

धाम व परिकर — भगवंताच्या वैभवाचा विस्तार धाम व परिकर (सेवकादी) रूपात होत असतो. श्रीकृष्णाची वृंदावन, द्वारका व वैकुंठ अशी तीन धामे आहेत. वृंदावनात माधुर्याचे प्राधान्य असते. द्वारकेत दास्य, सख्य व वात्सल्य हे रस प्रामुख्याने असतात. वैकुंठात ऐश्वर्य हे प्रधान असते. या तीन्ही धामांत वृंदावन हे सर्वोत्तम होय. तिथे भगवान श्रीकृष्ण आपली ह्लादिनी शक्ती जी राधा, तिच्यासह प्रेमलीलेत सदैव रत असतो.

चैतन्य मतात राधातत्त्वाला फार महत्त्व दिलेले आहे. भगवंताच्या व्रजलीलांची आधारभूत अशी व्रजेश्वरी म्हणजे राधा होय. हिच्याविषयी कृष्णदास कविराज म्हणतो—

> ह्लादिनीर सार प्रेम, प्रेमसार भाव ।
> भावेर परम काष्ठा नाम महाभाव ॥
> महाभावस्वरूपा श्रीराधा ठाकुरानी ।
> सर्वगुणखनि कृष्णकांता शिरोमणी ॥
> कृष्णप्रेमे भावित जांर चित्तेन्द्रिय काय ।
> कृष्णनिजशक्ति राधा क्रीडार सहाय ॥
>
> (चैतन्यचरितामृत, आदिलीला, ४)

अर्थ – श्रीकृष्णाच्या ह्लादिनी शक्तीचे सार प्रेम, प्रेमाचे सार मात्र आणि भावाच्या पराकाष्ठेचे सार महाभाव आहे. श्रीराधा ही महाभावस्वरूप आहे. ती समस्त गुणांची खाण व कृष्णस्त्रियांमध्ये श्रेष्ठ आहे. तिचे चित्त, तिची इन्द्रिये आणि तिची काया ही कृष्णप्रेमाने ओतप्रोत आहेत. ती कृष्णाची निजशक्ती असून, त्याच्या क्रीडांमध्ये साह्यय्क आहे.

चैतन्य मताचा परकीया भक्तीवर विशेष भर आहे. परकीया म्हणजे स्वस्त्रीहून निराळी अर्थात आपली नव्हे, अशी स्त्री होय. चैतन्यानुयायांची ही परकीया भक्ती राधा व गोपी यांच्यां कृष्णप्रेमावर आधारित आहे. कृष्णदास म्हणतो, की परकीयाभावात रसाचा अधिक उल्हास असतो. मात्र या भावाचा व्रजाहून अन्य ठिकाणी संभव नाही. व्रजातल्या गोपवधूंच्या ठिकाणी हा भाव निरंतर विद्यमान आहे आणि राधाभावात त्याची परमावधी झालेली आहे.

भगवान श्रीकृष्णाच्या परिकरात (सेवकादिवर्ग) सखा-सखी, गोप-गोपी, इ. व्रजवासी जनसमुदाय आहे. त्या सर्वांत गोपींना विशेष महत्त्व आहे. कारण त्या राधेच्या सख्या म्हणून राधा-कृष्णाच्या लीलांत नित्य साहाय्यक असतात. त्यांची केवळ एकच इच्छा असते, की आपण राधा-कृष्णांचे मीलन घडवून आणून त्यांच्या लीलांमध्ये आत्मसुख उपभोगावे.

चैतन्य मतानुसार भक्ती हेच मुक्तीचे साधन असले, तरी सर्वोच्च श्रेणीचा भक्त कोणत्याही प्रकारे मुक्तीची इच्छाच करीत नाही. तो केवळ वृंदावनातल्या माधुर्य रसाचीच कामना करतो. त्याची आकांक्षा एकच असते, की आपल्याला वृंदावनाची प्राप्ती व्हावी. इथे वृंदावनाचा अर्थ विशिष्ट भौगोलिक स्थल असा घ्यायचा नसून, वृंदावन म्हणजे अलौकिक आणि दिव्य असे प्रतीकात्मक स्थान समजायचे. चैतन्य संप्रदायाला असा विश्वास आहे, की उपास्य श्रीकृष्ण हा आपल्या तीन रूपांत तीन धामांमध्ये सार्वकाल राहतो. पूर्ण रूपाने द्वारकेत, पूर्णतर रूपाने मथुरेत व पूर्णतम रूपाने गोकुळात.

अन्य वैष्णव संप्रदायाप्रमाणे चैतन्य संप्रदायातही सत्संग, नामजप, कीर्तन, कृष्णमूर्तीची पूजा, सेवा, भागवतश्रवण, गुरुसेवा, तुलसीपूजन, इ. भक्तिसाधनांचा पुरस्कार केलेला आहे.

चैतन्य संप्रदायाचा इतिहास — चैतन्य महाप्रभूचा अवतार होण्यापूर्वी काही शतके बंगालमध्ये शाक्त संप्रदायाची बरीच चलती होती. बंगाली शाक्त हे पंच मकारांचे सेवन करून विविध देवींची उपासना करीत असत. सामान्य लोकही चंडी, मनसा, वाशुली, इ. लोकदेवतांची पूजा करीत.

सेन वंशाचा अंतिम राजा लक्ष्मण सेन (इ. स. १२००) याच्या शासनकालात गीतगोविंदकार जयदेव होऊन गेला. त्याच्या काव्यावरून असे अनुमानिता येते, की त्या काळी बंगालमध्ये राधा-कृष्णांचे काही भक्त होते. पण कृष्णभक्तीचा सार्वत्रिक प्रचार मात्र नव्हता. तो प्रचार करण्याचे श्रेय चैतन्य व त्यांचे सहकारी भक्त यांनाच आहे. त्यांच्या या कार्याला पोषक असे वातावरण निर्माण करण्याचे काम चैतन्याच्या पूर्वी माधवेंद्रपुरी यांनी केले. ते मध्वाचार्यांच्या शिष्यपरंपरेतले होते. माध्व संप्रदायात राधाभावाचा प्रवेश त्यांनीच केला, असे म्हणतात. ईश्वरपुरी, अद्वैताचार्य व नित्यानंद हे त्यांचे प्रमुख शिष्य होते. माधवेंद्रपुरी व त्यांचे शिष्य ईश्वरपुरी यांच्यामुळे नवद्वीपात बंगाली कृष्णभक्तांचे छोटे छोटे संघ स्थापित झाले.

चैतन्यपूर्वकालीन कृष्णभक्तांत अद्वैताचार्यांना प्रमुख स्थान आहे. तेही नवद्वीपातच राहत असत. त्यांच्या निवासस्थानी कृष्णभक्त एकत्र जमून कथा-कीर्तन करीत. या कृष्णभक्तांना तिथल्या शाक्त लोकांनी खूपच विरोध केला. हे शाक्त त्यांच्या भक्तिमार्गात पावलापावलाला विघ्ने आणू लागले. त्यांच्या जोडीला नवद्वीपाचा मुसलमान राजाही वैष्णवांचा शत्रू बनला.

ही परिस्थिती बदलली, ती चैतन्य महाप्रभूच्या जन्माने. चैतन्य महाप्रभूचा जन्म झाला, त्यावेळी अद्वैताचार्य हयात होते. चैतन्याच्या भक्तिभावाने ते विलक्षण प्रभावित झाले. त्यांनी या तरुण भक्तराजाचे नेतृत्व तर स्वीकारलेच; शिवाय चैतन्य हा श्रीकृष्णाचा अवतार असल्याचेही घोषित केले. चैतन्य महाप्रभूने हरिनामसंकीर्तनाच्या द्वारे बंगालमध्ये कृष्णोपासनेचे व्यापक आंदोलन सुरू केले. हळूहळू नवद्वीप, शांतिपूर व त्यांच्या आसपासच्या गावांतली जनता चैतन्याकडे आकृष्ट होऊ लागली. आपल्या कृष्णभक्तीचा प्रसार गौड प्रदेशाच्या बाहेरही झाला पाहिजे, असे महाप्रभूला वाटले आणि ते कार्य अविरत करता यावे, म्हणून त्याने गृहस्थाश्रमाचा त्याग करून वयाच्या अवघ्या २४ व्या वर्षी संन्यास घेतला. तो नवद्वीपातून प्रथम जगन्नाथपुरीला गेला. तिथून त्याने रामेश्वरापर्यंत दक्षिणेची यात्रा केली. परत जाताना तो वृंदावनात काही काळ राहिला. तिथून तो परत जगन्नाथपुरीला गेला.

चैतन्य मताच्या विकासात प्रभूच्या या दक्षिणयात्रेला ऐतिहासिक महत्त्व आहे. दक्षिणेत रायरामानंद व अन्य कित्येक वैष्णव विद्वान यांच्याशी विचारविनिमय केल्यावर, तसेच ब्रह्मसंहिता, कृष्णकर्णामृत, इ. ग्रंथांचे अध्ययन केल्यावर प्रभूच्या आध्यात्मिक विचारांना निश्चित आकार प्राप्त झाला. चैतन्य संप्रदायाचा जन्म व प्रारंभिक प्रचार जरी गौडदेशात झाला, तरी त्याला दार्शनिक स्वरूप दिले, ते वृंदावनात वास्तव्य करणाऱ्या गौडीय गोस्वामींनी. या गोस्वामींमध्ये रूपगोस्वामी हा सर्वांत अधिक प्रसिद्ध आहे. त्याने भक्तिरसामृतसिंधू व उज्ज्वलनीलमणी या ग्रंथांच्या द्वारे चैतन्याच्या भक्तिभावनेत रससिद्धांताची प्रस्थापना केली. सनातन गोस्वामी याचा हरिभक्तिविलास हा चैतन्य मताचा स्मृतिग्रंथ होय. जीवगोस्वामी यानेही आपल्या ग्रंथात चैतन्याच्या भक्तिसिद्धांताचे तात्त्विक विवेचन केले. जीवगोस्वामी याने इ. स. १६ व्या शतकाच्या अखेरीपर्यंत वृंदावनातल्या वैष्णव भक्तांचे बौद्धिक नेतृत्व केले. त्याच्या देहपातानंतर गौडीय वैष्णवांच्या संघटनेत काहीसे शैथिल्य आले. पण थोड्याच कालात विश्वनाथ चक्रवर्ती या पंडिताने आपल्या ग्रंथांच्या द्वारे वैष्णव परंपरेला पुनश्च गौरवान्वित केले. चक्रवर्तीच्या पश्चात बलदेव विद्याभूषण हा वृंदावनस्थ पंडित पुढे आला. त्याने ब्रह्मसूत्रावर गोविंदभाष्याची रचना केली. हा ग्रंथ चैतन्य मताचा सर्वश्रेष्ठ प्रमाणग्रंथ मानला जातो. त्यानंतर वृंदावनातल्या वैष्णवाचार्यांकडून भक्तिग्रंथांचे ज्ञान मिळविलेल्या कित्येक वैष्णवांनी आपापल्या देशी जाऊन वैष्णवधर्माचा प्रचार आरंभिला. श्रीनिवास या जीवगोस्वामीच्या शिष्याने बंगालमध्ये चैतन्यमताचा प्रचार करण्यात फार मोठे यश मिळविले. जीवगोस्वामीचा दुसरा श्रेष्ठ शिष्य श्यामानंद आणि त्याचे शिष्य यांनी ओडिसात चैतन्य मताचा फैलाव केला.

इ. स. च्या १८ व्या शतकाच्या प्रारंभी वृंदावन हे जयपूर नरेश महाराजा जयसिंह याच्या आधिपत्याखाली होते. हा राजा धार्मिक होता. पण काही वैष्णवविरोधी लोकांनी वृंदावनातल्या वैष्णव-संप्रदायांविरुद्ध त्याच्या कानात विष ओतले. त्या लोकांनी जयसिंहाला सांगितले, की प्रेमभक्ती ही वेदविरोधी आहे, अतएव हे प्रेमोपासक अवैदिक आहेत. जयसिंहाला त्यांचे म्हणणे खरे वाटले आणि त्याने फर्मान काढले, की आपल्या राज्यात कोणीही वैष्णव धर्माचे आचरण करू नये. त्या गोष्टीची दाद मागण्यासाठी काही प्रमुख वैष्णव जयपूरला जाऊन जयसिंहाला भेटले. आम्ही अवैदिक नाही, आमच्यावर असा अन्याय करू नका, अशी त्यांनी राजाला विनंती केली.

मग जयसिंहाने या विषयावर विचार करण्यासाठी इ. स. १७१८ च्या सुमारास एक धर्मसंमेलन भरवले. या संमेलनात चैतन्य संप्रदायाच्या समर्थनासाठी वृंदावनातून बलदेव विद्याभूषण याला पाठविण्यात आले. बलदेवाने त्या संमेलनात चैतन्य मताचे साधार समर्थन केले. ते ऐकल्यावर संमेलनातले प्रतिनिधी बलदेवाला म्हणाले, की 'तुमच्या मताला अनुकूल असे ब्रह्मसूत्रभाष्य तुम्ही लिहिल्यास आम्ही तुमच्या संप्रदायाला मान्यता देऊ.' बलदेव त्या गोष्टीला तयार झाला आणि त्याने ब्रह्मसूत्रावर गोविंदभाष्याची रचना केली. अशा प्रकारे जयपूरनरेशाने चैतन्य मताला जो विरोध केला, तो त्या मताला वरप्रसादच ठरला, असे म्हटले पाहिजे.

त्यानंतर उत्तर भारतातले हजारो लोक चैतन्य मताचे अनुयायी बनले. चैतन्य महाप्रभू आणि त्याचे शिष्य-प्रशिष्य यांनी जी प्रेमभक्तीची आनंददायिनी निर्मल धारा प्रवाहित केली, तिच्यात बंगाल, ओडिसा व व्रजमंडल या प्रदेशातील असंख्य स्त्रीपुरुषांनी अवगाहन केले व ते आनंदनिर्भर होऊन भगवंताचे गुणगान करू लागले.

बलदेव विद्याभूषणाच्या काळी वृंदावन हे चैतन्य मताचे केंद्र होते. बंगाल व ओडिसा या प्रदेशावर कोणत्या ना कोणत्या तरी रूपाने वृंदावनातल्या आचार्यांचे अनुशासन चाले. औरंगजेबाच्या काळात हिंदूंवर आणि त्यांच्या धार्मिक स्थळांवर जे

इस्लामी अत्याचार झाले, त्यात चैतन्य संप्रदायाने वृंदावनात निर्मिलेली देवालये नष्ट-भ्रष्ट झाली होती. तिथल्या देवमूर्ती घेऊन भक्तलोक दशदिशा पांगले होते. पुढे नादीरशहा व अहमदशहा या आक्रमकांनी व्रजमंडलाचे उरले-सुरले महत्त्वही नष्ट करून टाकले. बलदेवानंतर व्रजमंडल आणि बंगाल यांची एकसूत्रता राखून ठेवणारा कोणी समर्थ आचार्य निर्माणच झाला नाही. त्याचा परिणाम असा झाला, की चैतन्य मतात सहजिया वैष्णवांचे प्राबल्य निर्माण झाले.

सहजिया वैष्णव हे परकीयाप्रधान भक्तीचे समर्थक होते. त्यांनी बंगाली जनतेत नैतिक शैथिल्य निर्माण करणाऱ्या अशा या परकीया भक्तीचा प्रचार केला. त्यामुळे बंगाल व ओडिसा या दोन्ही प्रदेशांत चैतन्यमत हे गढूळ, वासनामय व स्वच्छंद बनून आपल्या मूळ तत्त्वज्ञानापासून च्युत झाले.

पुढे चैतन्य मताच्या पुनरुत्थानाचा एक प्रयत्न सुमारे शंभर वर्षांपूर्वी व्रजमंडलातच झाला. सिद्धबाबा नावाचा एक वैष्णव संत गोवर्धन ग्रामात जन्माला आला. त्याने श्रीकृष्ण व चैतन्य महाप्रभू यांच्या अष्टकालीन लीलांशी संबंधित अशा ग्रंथांचे व स्फुट रचनांचे एक बृहत संकलन केले. त्यामुळे चैतन्य मतात शिरलेली विकृत भावना शुद्ध होण्यास फार मोठी मदत झाली. सिद्धबाबा व त्यांचा शिष्य कृष्णदासबाबा यांच्या या विशाल प्रयत्नामुळे चैतन्य संप्रदाय पुनरुज्जीवित झाला आणि हळूहळू त्याने पुनश्च आपला जम बसवला.

चैतन्य मताचा प्रभाव हिंदी व बंगाली या दोन भाषांवर विशेष पडला आहे. चैतन्य महाप्रभू हा बंगालमधल्या कित्येक काव्यांचा विषय झाला आहे. हिंदीच्या रीतिकालीन कवींवरही चैतन्याच्या माधुर्य भक्तीचा विशेष पगडा दिसतो. चैतन्य मताला अनुसरूनच ते आपल्या काव्यांतून कृष्णलीलांचे वर्णन करताना आढळतात. ओडिसा व आसाम येथील भक्त कवींवरही चैतन्य मताची छाप आहेच. त्या दोन्ही भाषांत चैतन्य मताचे बरेच साहित्य निर्माण झाले आहे. [चै. म. व्र. सा.; व्र. कृ. मा. भ ; हिं. सा. को.; भा. सं.; वै. ध.; हिंदुत्व; हिं. सा. बृ. इ.]

चैता उ. प्रदेशामध्ये चैत्र महिन्यात गायिल्या जाणाऱ्या गीतांना चैता असे म्हणतात. मिथिलेत या गीतांना चैतवार म्हणतात. झलकुटिया चैता व साधारण चैता असे चैता गीतांचे दोन प्रकार आहेत. झलकुटिया गीते समूहाने झांजांच्या साथीवर गायिली जातात.

सामान्यतः चैताच्या पहिल्या चरणाच्या प्रारंभी ‘ रामा ’ व शेवटी ‘ हो रामा ’ असे शब्द येतात. चैता गीते ही सामान्यतः प्रेमगीते असतात. त्याचा एक नमुना असा—

सारी रात पिया बँहिया मरोर
लन्हि बढ़निया छुअल नहिं जाय
सइयाँ बेदरदा मरमो ने जाने
बढ़निया छुअल नहिं जाय

अर्थ – हे सखी ! रात्रभर माझ्या प्रियकराने माझ्या हाताची ओढाताण केली. त्यामुळे माझ्या हातात केरसुणी घेण्याचीही शक्ती उरली नाही. हाय ! हा निष्ठुर प्रियकर रसमर्म जाणत नाही. माझ्या हातात केरसुणी धरण्याचीही शक्ती उरली नाही.

बुलाकीदास नामक कोणी कवी या गीतांचा कर्ता असावा, असा तर्क आहे. कारण या गीतांमधून त्याचा वारंवार उल्लेख येतो. बुलाकीदास हा उत्तर प्रदेशातल्या बलिया जिल्ह्यातील रसडा गावचा रहिवासी होता. आजही त्या गावी या कवीचे राहते घर दाखवतात. [हिं. सा. को.; हिं. सा. बृ. इ.]

चैती गौरी एक राग. या रागात ऋषभ व धैवत कोमल, दोन्ही मध्यम व बाकीचे सर्व स्वर शुद्ध लागतात. जाती – षाडवसंपूर्ण. वादी – पंचम. संवादी षड्ज. समय—सायंकाळ. रागाचे मुख्य अंग—नी ध प ध म म ध म ग रे ग रे सा. आरोह – सा रे म प म ध नि सा. अवरोह – सा नी ध प ध म प म ब म ग रे ग रे सा. हा राग विशेषत: चैत्र महिन्यात गातात. याला पूर्वी अंगाचा राग असेही म्हणता येईल. [श्री. आबासाहेब मुजुमदार, पुणे]

चैत्यक बौद्ध दर्शनाची एक शाखा. महादेव नामक पंडिताने ही शाखा बुद्धाच्या परिनिर्वाणानंतर सुमारे २०० वर्षांनी सुरू केली. महासंघिक शाखेचा संस्थापक महादेव आणि हा महादेव या दोन भिन्न व्यक्ती होत्या. चैत्यक शाखेचा महादेव हा एक विद्वान व साक्षेपी भिक्षू असून, त्याला महासंघिक संघात दीक्षा मिळाली होती. पुढे त्याने आपला एक वेगळा संघ बनवला. तो ज्या पर्वतावर वास्तव्य करीत होता, तिथे एक चैत्य होता; म्हणून त्याच्या अनुयायांना चैत्यक म्हणू लागले. महासंघिकाचे आधारभूत सिद्धांत चैत्यक शाखेने स्वीकारले आहेत. त्याशिवाय त्यांचा एक वेगळा सिद्धांत आहे, तो असा—चैत्याची निर्मिती, त्याचे अलंकरण व त्याची पूजा यांमुळे मोठे पुण्य लाभते. चैत्याला प्रदक्षिणा घालणे हेदेखील पुण्यप्रद असते.

याच शाखेने बुद्ध व बोधिसत्त्व यांना देवतारूप देण्यास प्रारंभ केला. पुढे महायान पंथाने ते काम पुरे केले. त्यामुळेच बौद्ध धर्म लोकप्रिय झाला. [बौ. प. व.]

चैत्यगृह एक शिल्पप्रकार: चिता किंवा चिती या संस्कृत शब्दापासून चैत्य हा शब्द बनला आहे. चैत्य शब्दाच्या काही व्याख्या पुढीलप्रमाणे आहेत—

(१) 'चितिः पत्रपुष्पफलादीनामुपचयः, चित्या साधु चित्यम्, चित्यमेव चैत्यम् उद्यानम्।' = पत्र, पुष्प, फल यांची समृद्धी म्हणजे चिती, चितीने साधू म्हणजे चांगले ते चित्य आणि चित्य म्हणजे चैत्य म्हणजेच उद्यान होय.

(२) 'चितेर्लेप्यादिचयनस्य भावः कर्म वा चैत्यम्।' = चिती म्हणजे मूर्ती इत्यादींची उभारणी, त्याचा भाव किंवा कर्म ते चैत्य.

(३) 'चिती संज्ञाने' = चिती हा धातू संज्ञान या अर्थी आहे. काष्ठ, मृत्तिका, इ. च्या द्वारे एखाद्या विभूतीची प्रतिकृती बनवली जाते व ती प्रतिकृती पाहून मूळ व्यक्तीचे संज्ञान (ओळख) उत्पन्न होते; म्हणून त्या काष्ठादी प्रतिकृतींना चैत्य म्हणतात (अभि. रा.).

याशिवाय जीवात्मा, सीमेवरचे झाड, यज्ञवेदी, जैनांचे मंदिर, पार बांधलेला पवित्र वृक्ष, असेही चैत्य शब्दाचे अर्थ आहेत.

वैदिक युगात सत्पुरुषांचे दहन केल्यानंतर त्यांची रक्षा, अस्थी, वगैरे अवशेष पुरून ठेवीत व त्यावर वेदी किंवा चबुतरा बांधीत. या स्मारकालाच चैत्य असे नाव होते. ती प्रथा पुढे बौद्ध व जैन यांनीही स्वीकारली. पुढच्या काळात मृताचे स्मारक करण्यासाठी केवळ चबुतरा न बांधता त्यावर घुमटाकृती शिल्पकामही करू लागले. त्याला स्तूप असे नाव मिळाले. चैत्य ही धार्मिक संज्ञा असून, स्तूप ही शिल्पशास्त्रातली संज्ञा आहे. पूर्वी दोन्ही शब्दांचा अर्थ एकच होता.

ब्रह्मांड पुराणात ब्रह्मयालाच चिती म्हटले आहे. त्यावरून चैत्य म्हणजे ब्रह्मयाचे मंदिर असा अर्थ रूढ झाला. ब्रह्मयाची वृक्षरूपाने पूजा केली जात असे, म्हणून चैत्य या शब्दाला पवित्र वृक्ष हा अर्थ प्राप्त झाला. महाभारतात देवालय व पूज्य वृक्ष या दोन्ही अर्थांनी हा शब्द वापरलेला आढळतो.

जैन्य साहित्यात चैत्यवृक्ष याचा अर्थ व तपशील पुढीलप्रमाणे दिला आहे--



चैत्यकमानीची विविध रूपे— (१) लोमश ऋषीच्या गुहेचें प्रवेशद्वार— स. पू. २५०. (२) लेण्याचा दर्शनी भाग, भाजे – स. पू. १५०. (३) लेण्याचा दर्शनी भाग, कार्ले — स. पू. ५०. (४) लेणे क्र. १९ अजंटा— इ. स. ५००. (५) विश्वकर्मा लेणे, वेरूळ – इ. स. ६००. (६) शोभेचा शिल्पप्रकार.

ज्या पार बांधलेल्या वृक्षाखाली बसले असता तीर्थंकरांना केवलज्ञान उत्पन्न झाले, त्या वृक्षांना चैत्यवृक्ष म्हणावे. वट, सातीवण, साल, सरल, इ. तीर्थंकरांचे चैत्यवृक्ष आहेत. अश्वत्थ सातीवण, शाल्मली, हे भावनपतींचे चैत्यवृक्ष होत. पिशाचांचा कळंब, यक्षांचा वड, भूतांचा तुळसी, राक्षसांचा कंडा, किन्नरांचा अशोक, किंपुरुषांचा चंपक, तुरंगांचा नाग व गंधर्वांचा टेंगुर्णी हे चैत्यवृक्ष मानलेले आहेत (अभि. रा.).

जैन यतींच्या चितास्थानावर चैत्य-स्तूप उभारण्याची चाल होती. औपपातिक सूत्रात पूर्णभद्र नामक चैत्याचे वर्णन करताना म्हटले आहे, की तो चैत्य अतिप्राचीन व सुविख्यात असून छत्र, घंटा, ध्वजा व पताका यांनी सुशोभित केलेला होता. अनेक लोक त्याची पूजा करीत. ही जैन परंपरा दीर्घ काळ चालू असावी. जिनदासाच्या आवश्यकचूर्णीमध्ये असा उल्लेख आढळतो, की विसावा तीर्थंकर मुनिसुव्रत याचे स्मारक म्हणून एक स्तूप वैशाली येथे उभारला गेला होता. मथुरा येथेही सुपार्श्वनाथ या तीर्थंकराचा स्तूप निर्माण झाला होता.

निवासस्थान या अर्थानेही चैत्य शब्द जैन साहित्यात वापरलेला आढळतो. भगवान महावीर द्विपालसा नामक चैत्यात वास करीत होता, असे सांगितले आहे.

कुंदकुंदाचार्य याने शुद्ध ज्ञानरूप आत्म्याला चैत्य मानले असून, असा आत्मा धारण करणाऱ्या वीतराग मुनीला चैत्यगृह म्हटले आहे. अशा व्यक्तींच्या समाधीवरच चैत्यालय बांधले जात असे. चैत्याची पूजा-अर्चा करणे, हीच चैत्यभक्ती होय, तिच्यामुळे सातिशय पुण्यबंध होतो व त्यामुळे मोक्षप्राप्ती होते असेही त्याने सांगितले आहे (बोधपाहुड : अष्टपाहुड : गाथा ८-९).



चैत्यगृह – कार्ले

बौद्ध लेण्यांमध्ये ज्या दालनात स्तूप असतो, त्याला चैत्यगृह म्हणतात. हीनयान पंथाच्या लोकांनी सनपूर्व दुसऱ्या शतकापासून पहाड खोदून विहार व चैत्यगृहे निर्माण करण्यास प्रारंभ केला. सनपूर्व २०० ते इ. स. २०० या काळातली अशा प्रकारची अनेक बौद्ध लेणी पश्चिम भारतात भाजे, कोंडाणे, पितळखोरे, जुन्नर, बेडसे, अजंटा (क्र. ९ व १०), नासिक, कार्ले व कान्हेरी या ठिकाणी आहेत. या लेण्यांतील प्रार्थनामंदिर किंवा चैत्यगृहे म्हणजे विस्तीर्ण दालने आहेत. त्यांच्या दर्शनी भागात भव्य कमानी खोदलेल्या आहेत. स्तंभांच्या दोन रांगांमुळे अशा दालनांचे तीन विभाग झालेले असतात. मागील भाग गर्भगृहासारखा लहान व अर्धघुमटाकृती असतो. त्याच्या मध्यभागी स्तूप असतो आणि तोही खडक खोदूनच बनवलेला असतो. वरचे छत कमानदार असते. या चैत्यगृहांची रचना इतकी सुबद्ध व सुरेख आहे, की त्यांचे निर्माते हे अत्यंत कुशल शिल्पकार असले पाहिजेत. वरील प्राचीन चैत्यगृहांची आतील बाजू लाकूडकामाने मढवलेली असे. त्याचे काही भाग अजूनही तिथे आढळतात.

जुन्नर येथील लेण्यात अनेक लहान लहान चैत्यगृहे आहेत. त्यांतील तुळजा लेण्यातले चैत्यगृह गोलाकार असून, त्याचा व्यास २० फूट आहे. त्याच्या मध्यभागी स्तूप आहे आणि १२ स्तंभांच्या आधारावर १८ फूट उंचीचे घुमटाकार छत आहे. तिथल्या गणेश लेण्यातील एक चैत्यगृह लहान असले, तरी अत्यंत सुरेख आहे. त्याची प्रमाणबद्ध रचना व त्यातील मनोहर कोरीव नक्षीकाम यांमुळे हे चैत्यगृह बौद्धांच्या कोरीव शिल्पकामाचे उत्कृष्ट उदाहरण ठरते.

चैत्यगृहाच्या दर्शनी भागात ज्या भव्य कमानी दिसतात, त्यांची मूळ कल्पना बराबर टेकडीवरील लोमश ऋषीच्या गुहेच्या प्रवेशद्वारावरून सुचलेली असावी. अशा प्रकारची कमान बहुतेक सर्व बौद्ध लेण्यांत आढळते. चैत्यगृहाशी संबद्ध असल्यामुळे तिला चैत्यकमान हे नाव मिळाले आहे. हिला सूर्यगवाक्ष असेही म्हणतात. कारण तिची रचना अशा कौशल्याने केलेली असते, की तिच्यातून आत प्रवेश करणाऱ्या सूर्यकिरणांनी संपूर्ण चैत्यगृह उजळून निघावे. प्रारंभी या कमानीचा आकार घोड्याच्या नालासारखा होता. भाज्याच्या लेण्यात अशी कमान दिसते. नंतरच्या काळातील लेण्यांत या कमानीच्या आकारात हळूहळू बदल झाला. कार्ले व अजंटा (क्र. ९) या लेण्यांतील कमानी या प्रस्तुत शिल्पप्रकाराचे विकसित रूप दर्शवतात. पुढे महायान पंथाच्या शिल्पकामात तर ही कमान जवळजवळ वर्तुळाकार झालेली आहे. वेरूळच्या विश्वकर्मागुहेत अशी कमान आढळते. कालांतराने चैत्यकमान हा शिल्पकामातील एक शोभेचा प्रकारच ठरला. बौद्ध शिल्पांप्रमाणेच अनेक हिंदू मंदिरांतही अशा प्रकारची गवाक्षे केलेली आढळतात.

हीनयान पंथाच्या शिल्पकामात नक्षीकाम कमी होते व बुद्धाच्या मूर्ती तर मुळीच नव्हत्या. पुढे महायान पंथाच्या बौद्धांनी प्राचीन लेण्यांतील चैत्यगृहात कोरीव काम करायला सुरवात केली. बुद्धाच्या मूर्तीही त्यांनीच नंतर निर्माण केल्या. [म. ज्ञा. को.; इं. आ.– गांगुली; भा. सं. जै. यो.; जै. भ. पू.; इं. आ. (बु. हिं.); क. ब्र.; जे. एन्. बा. व्हाँ.]



चैत्यकमान – भाजे

चैत्ययज्ञ इष्ट देवतेसाठी केला जाणारा एक याग. भट्ट नारायणाने आश्व. गृ. सू. १.१२.१ वरील भाष्यात या यज्ञाचे स्पष्टीकरण पुढीलप्रमाणे केले आहे—

‘ चित्ते भवः चैत्यः ’ = चित्तात निश्चित केलेला संकल्प तो चैत्य होय. एखादा मनुष्य इष्ट कामनच्या सिद्धीसाठी इष्ट देवतेला नवस करतो, की ‘ माझी अमुक तमुक कामना सिद्धीस गेली, तर मी स्थालीपाक करीन अथवा पशुबली देईन. ’ मग कामनापूर्ती झाल्यावर तो मनुष्य केलेला नवस पुरा करतो. हाच चैत्ययज्ञ होय.

आश्व. गृह्यसूत्रात चैत्य शब्दाचा अर्थ पवित्र स्थान किंवा देवालय असा दिलेला आहे. चत्य दूर अंतरावर असला आणि नवस करणाऱ्याला तिथवर जाणे शक्य नसले, तर नवसाची वस्तू तिथवर कशी पोचवावी, या विषयी आश्व. गृहसूत्रात उपाय सांगितला आहे, तो असा – जर चैत्यदेव परगावी असेल, तर पळसाचा दूत व कावड करून ‘ यत्र वेत्थ वनस्पते ’ (ऋ. ५.५.१०) हा मंत्र म्हणावा. मग दोन बली करून ते त्या कावडीत ठेवावे. त्या दूताजवळ ती कावड देऊन त्याला सांगावे, की ‘यांतला एक बळी तू चैत्य देवाला दे व एक तू खा. ’ त्या दूताला मार्गात भय उत्पन्न होईल असें वाटले, तर एखादे शस्त्र त्याच्या हाती द्यावे. मार्गात नदी लागणार असल्यास ती पोहून जाता येईल, असे एखादे साधनही त्याला द्यावे (१. १२. १–४).

चैत्ययज्ञ हे नांव नसले, तरी अशाच प्रकारचा एक यज्ञ पारस्कर गृह्यसूत्रातही सांगितला आहे. [इं. वे. क. सू.]

चैत्यवासी जैनांच्या श्वेतांबर पंथाचा एक उपपंथ. या पंथाच्या अनुयायांनी काही काळ चैत्यगृहात राहिले पाहिजे, असा दंडक आहे. यांना ग्रंथसंग्रहासाठी द्रव्यसंग्रह करण्यास मोकळीक असते.

श्वेतांबर पंथाचा आचार्य हरिभद्रसूरी याने संबोधप्रकरण नामक ग्रंथात चैत्यवासींच्या आचारांचे निदर्शन पुढीलप्रमाणे केले आहे– हे लोक चैत्यात अथवा मठात राहतात. पूजा-आरती करतात. जिनमंदिरे व शाळा बांधतात. देवद्रव्याचा उपयोग स्वतःसाठी करतात. हे सूक्ष्म शास्त्रचर्चेस विरोध करतात. रंगीत आणि सुगंधित वस्त्रे वापरतात. स्त्रियांच्या पुढे गातात. साध्वी स्त्रियांनी आणलेल्या पदार्थांचा उपयोग करतात. मिष्टान्न सेवन करतात. शरीरास तेल लावतात. जिनप्रतिमा विकतात. मृत गुरूंच्या दाहसंस्काराच्या जागेवर स्तूप बांधतात.

श्वेतांबर पंथात ज्यांना जती अथवा श्रीपूज्य म्हणतात, ते सर्व लोक चैत्यवासी होत. या पंथातील आचार्यांनी निगमशास्त्राची रचना केल्याचे सांगतात. [जै. ध.]

चैत्यवृक्ष चैत्यांवर लावलेल्या वृक्षांना चैत्यवृक्ष असे म्हणतात. महाभारतात चैत्यवृक्षांविषयी आदर दाखवलेला आहे. अशोक, सप्तच्छद (सातीवण), चंपक आणि आम्र या चार वृक्षांना चैत्यवृक्ष समजतात. जैन परंपरेत हे चैत्यवृक्ष तीर्थंकरांसाठी बांधलेल्या समवशरणाच्या (सभामंडप) पुढील उद्यानात लावले जाऊ लागले. तीर्थंकरांच्या उंचीच्या बारापट चैत्यवृक्षाची उंची असावी, असा जैन संकेत आहे. या प्रत्येक वृक्षाच्या छायेत चारी दिशांना चार चार जिनप्रतिमा मांडलेल्या असतात.

चैत्यवृक्षांच्या ठायी दैवी शक्तीचा वास असतो, अशी जैनांची समजूत आहे. जीवांचे उत्पत्ती आणि विनाश यांचे निमित्तकारण चैत्यवृक्ष होत, असे जैन वाङ्मयात म्हटले आहे (तिलोयपण्णती १.३.३६–३७). त्यामुळेच जैन धर्मात चैत्यवृक्षाला पूज्यता प्राप्त झालेली आहे. जिनसेनाचार्याने आपल्या महापुराणात ऋषभदेवाच्या समवशरणातील चैत्यवृक्षाचे सुरेख

वर्णन केले आहे (प्रथम भाग २२). [जै. भ. पू.; भा. सं. जै. यो; ग्लो. स्मृ. लि.]

चैत्र

चांद्र वर्षाचा पहिला मास. या महिन्याच्या पौर्णिमेला किंवा आगेमागे चित्रा नक्षत्र असते, म्हणून त्या नक्षत्रावरून याला चैत्र असे नाव मिळाले आहे. याला मधुमास असेही म्हणतात. याच महिन्यापासून वसंत ऋतू सुरू होतो. चैत्र शु. प्रतिपदेला संवत्सराचा प्रारंभ होतो. या दिवशी सूर्योदयाच्या वेळी ब्रह्मदेवाने सर्व सृष्टी निर्माण केली, असे हेमाद्रीत ब्रह्मवचन आहे. या दिवशी सूर्योदयी जो वार असेल, तो वर्षेश समजतात. याच दिवशी चंडिकेच्या नवरात्राला प्रारंभ होतो. याच दिवशी प्रपादानाला (पाणपोई घालणे) सुरवात करतात. चार महिने प्रपादान करणे शक्य नसेल, तर रोज एक गार पाण्याने भरलेला घट ब्राह्मणाला दान द्यावा, असे सांगितले आहे. चैत्र शु. तृतीयेला शंकरासह गौरीचे पूजन करतात व पुढे महिनाभर त्यांचा दोलोत्सव करतात. या तृतीयेला मत्स्यजयंती असते. चैत्र शु. पंचमी ही कल्पादी तिथी होय. ब्रह्मदेवाच्या दिवसाची आदी तिथी असते, तिला कल्पादी म्हणतात. या महिन्यातील शु. अष्टमीला भवानीची उत्पत्ती झाली. म्हणून या दिवशी भवानीचे दर्शन घ्यावे, असे सांगितले आहे. या दिवशी अशोककलिकाप्राशन हाही एक विधी सांगितलेला आहे. या दिवशी जितेंद्रिय होऊन लौहित्य तीर्थात स्नान करणारा ब्रह्मपदी जातो असे वचन आहे. चैत्र शु. नवमी ही रामनवमी होय. चैत्र शु. एकादशीला दोलोत्सव सांगितलेला आहे. या दिवशी वैष्णव लोक लक्ष्मीसहित विष्णूचे आंदोलन करतात. चैत्र शु. द्वादशीला दमनोत्सव म्हणजे विष्णूची दवण्याने पूजा करतात. चैत्र शु. त्रयोदशीला अनंगव्रत विहित आहे. चैत्र कृ. त्रयोदशी शततारकानक्षत्राने युक्त असल्यास ती शंभर सूर्यग्रहणांशी समान होते. ती शनिवारी आली असता तो महावारुणीयोग होतो. चैत्र मासात रोज सकाळी अंगणाचा एक चौकोन सारवून त्याच्यावर विशिष्ट प्रकारची रांगोळी काढतात, तिला चैत्रांगण असे म्हणतात. या चैत्रांगणावर हळदकुंकू व फुले वाहतात. त्याचप्रमाणे या महिन्यात तुळशीवृंदावनावर गळती लावतात (गलंतिका पाहा).



चैत्र -- एक सांकेतिक चित्र

चैत्र महिन्यात दही, दूध, तूप व साखर हे पदार्थ वर्ज्य करावे, नाना वर्णांच्या तलम वस्त्रांचे दान करावे व गौरीच्या संतोषासाठी ब्राह्मण दांपत्याची पूजा करावी, असे मत्स्य पुराणात सांगितले आहे. यासंबंधी भविष्योत्तर पुराणात सांगितले आहे ते असें——

चैत्र महिन्यात तीन दिवस नक्त भोजन करावे. नदीत स्नान करावे आणि दरिद्री ब्राह्मणाला पाच दुधाळ शेळ्या दान द्याव्या. तेणेकरून पुनर्जन्म टळतो. त्याचप्रमाणे चैत्र महिन्यात चित्रविचित्र रंगांची आसने व गाद्या ब्राह्मणाला दान दिल्यास त्यामुळे विष्णू प्रसन्न होतो, असे वामन पुराणात सांगितले आहे. [नि. सि.; हि. ध.; पु. चिं.]

चैत्रगौर

चैत्र शुद्ध तृतीयेच्या दिवशी महाराष्ट्रातील स्त्रिया गौरीला दोल्हाऱ्यात बसवतात आणि पुढे महिनाभर तिची पूजा करतात. या महिन्यात कोणत्याही मंगळवारी किंवा शुक्रवारी हळदीकुंकवाचा समारंभ करतात. त्यासाठी गौरीपुढे रांगोळ्या काढतात, गौरीला वस्त्रालंकारांनी नटवतात आणि तिच्यापुढे रंगीबेरंगी चित्रे, नाना प्रकारची फळे व खाद्यपदार्थ मांडून तिची आरास करतात. असोल्या नारळांना कुंच्या घालून ती बाळे म्हणून गौरीपुढे ठेवतात. कोकणात हळदीकुंकवाला आलेल्या सुवासिनींचे व कुमारिकांचे पाय धुवून त्यांच्या हातावर चंदनाचा लेप करतात आणि त्यावरून शिरा असलेली शिंप फिरवतात. भिजवलेल्या हरभऱ्यांनी आणि फळांनी त्यांची ओटी भरतात. त्यांना आंब्याची डाळ व पन्हे देतात.

गौरीची आरती करताना गौरीचे माहेर नावाचे गाणे म्हण-

ण्याची कोकणात चाल आहे. या महिन्यात गौरी आपल्या माहेरी येते, आपल्या आईकडून सर्व प्रकारची कौतुके करून घेते, मैत्रिणींबरोबर खेळते, झोपाळ्यावर बसून झोके घेते आणि अक्षय्यतृतीयेला परत सासरी जाते, अशी समजूत आहे. त्यामुळे चैत्र मासातला हा गौरीचा उत्सव तिच्या माहेरवासाचा उत्सव समजला जातो.



चैत्रांगण

या उत्सवाचा प्रचार विशेषेकरून ब्राह्मणांत आहे. या उत्सवाच्या निमित्ताने महाराष्ट्रातल्या स्त्रिया घरोघरी जातात,

परिचय वाढवतात आणि एक महिना आमोदप्रमोदात घालवतात.

चैत्ररथ एक दिव्य उद्यान. हे चंद्रप्रभ पर्वतावर असून, तिथे उर्वशी व ऐल यांची भेट झाली, असे ब्रह्मांड पुराणावरून समजते (२.१८.७). मत्स्य पुराणाच्या मते हे उद्यान मंदार पर्वतावर आहे, तर वायू पुराणाच्या मते ते इलावृताच्या पूर्वेस अच्छोदा नदीच्या तीरावर आहे. इथे इंद्रादी देव विहारासाठी येतात. [हि. ध.; पु. इं.]

चैत्रावली एक प्राचीन उत्सव. याला मदनमंजी असेही नाव आहे. यात चैत्र शुद्ध त्रयोदशीच्या रात्री एका उद्यानात मदन आणि रती यांची स्थापना करीत व चतुर्दशीला त्यांची पूजा करीत. हा उत्सव गीत-गायन, वाद्यवादन व अश्लील शब्दांचा प्रयोग यांनी साजरा होत असे. दुसऱ्या दिवशी सकाळी चिखलफेकीचा खेळ खेळत. [हि. ध.]

चैत्री एक वार्षिक याग. हा चैत्रपौर्णिमेस करतात. याचे स्वरूप काहीसे काठक गृह्यसूत्रातील फाल्गुनीयागासारखेच आहे. याचा विधी असा —

यागदिवशी गृहस्थाने आपल्या गोठ्यात जितकी गुरे असतील, त्याच्या दुप्पट कणकेची गुरे बनवावी. ती बोरीच्या पानांवर मांडावी. इंद्र व अग्नी यांच्याकरिता मध्यभागी फुगीर अशी पोळी तयार करून ती त्या दोघांना समर्पण करावी. रुद्रासाठी पिंड करून द्यावा आणि तूप व चरू यांचे हवन करावे.

वैखानस गृह्यसूत्रात हा याग वेगळ्या पद्धतीने सांगितला आहे, तो असा—

चैत्रपौर्णिमेला घर झाडून, सारवून सजवावे. यजमान दंपतीने सुवेष परिधान करावा. अग्नी सिद्ध करून दोन आघार द्यावे. मधू, माधव, ऋतुदेवता, श्री, श्रीपती, इ. देवतांना मधयुक्त चरूच्या आहुती द्याव्या. श्री व श्रीपती यांची पूजा करावी. ब्राह्मणभोजन घालून यजमानाने सपिंडांसह चैत्र्य अन्न भक्षण करावे.

आपस्तंब गृह्यसूत्रात याच विधीला ईषणबली असे म्हटले आहे. [इं. वे. क. सू.]

चोखामेळा (मृत्यू १३३८ इ. स.) एक मराठी संतकवी. हा जातीने महार होता. याला चोखोबा असेही म्हणतात. चोखोबा पंढरपुरी होऊन गेला, असे महीपती सांगतो. वि. ल. भावे याला मंगळवेढ्याचा समजतात, तर डॉ. आंबेडकरांच्या मते तो मूळचा वऱ्हाडातला होता. चोखोबाच्या बायकोचे नाव सोयराबाई व मुलाचे कर्ममेळा. चोखोबाला निर्मळा नावाची एक बहीण होती. चोखोबाचे सारे कुटुंबच विठ्ठलभक्त होते. त्या सर्वांनी मिळून बरीच अभंगरचना केली आहे. नामदेव हा चोखोबाचा गुरू होय. बंका महार म्हणून चोखोबाचा एक मेहुणा होता. त्याने चोखोबाची गुरुपरंपरा पुढीलप्रमाणे दिली आहे—आदिनाथ → मच्छिंद्रनाथ → गोरक्षनाथ → गहिनीनाथ → निवृत्तिनाथ → ज्ञानदेव → विसोबा खेचर → नामदेव → चोखा.

ज्ञानदेवादी संतमंडळात चोखोबाला फार मानाचे स्थान होते. विठ्ठलाचा तो आवडता भक्त असून, प्रत्यक्ष विठ्ठलच एकदा त्याच्या घरी जेवायला आला होता, असे त्याच्या पुढील अभंगावरून दिसते—

विठोबा पाहुणा आला आमचे घरा।
निंबलोण करा जीवें भावें ।।
पंचप्राणज्योति ओंवाळुनि आरती।
ओंवाळिला पति रुक्माईचा ।।
षड्रस पक्वान्नें विस्तारिलें ताट।
जेवूं एकवट चोखा म्हणे ।।

चोखोबा जातीने महार म्हणून पंढरपूरच्या विठ्ठलमंदिराचे पुजारी त्याला मंदिरात येऊ देत नसत. विठ्ठलाचे प्रत्यक्ष दर्शन घ्यावे, अशी चोखोबाची उत्कट इच्छा होती; पण पुजारी त्याचे काहीही मानीत नसत. अशा वेळी तो एकदा पुजाऱ्यांना म्हणाला—

ऊस डोंगा परि रस नोहे डोंगा।
काय भुललासी वरलिया रंगा ।।
कमान डोंगी परी तीर नोहे डोंगा।
काय भुललासी वरलिया रंगा ।।
नदी डोंगी परी जळ नोहे डोंगें।
काय भुललासी वरलिया रंगें ।।
चोखा डोंगा परी भाव नोहे डोंगा।
काय भुललासी वरलिया रंगा ।।

पुढे पांडुरंगानेच एके दिवशी चोखोबाला देवळात आणून दर्शन दिले; कारण त्याला भक्तावाचून चैन पडेना. परतीच्या वेळी देवाने त्याला आपल्या गळ्यातील रत्नहारही दिला. दुसऱ्या दिवशी रत्नहार नाहीसा झालेला कळताच सगळीकडे चौकशी सुरू झाली आणि चोखोबाजवळ तो हार सापडला. त्या वेळी पुजाऱ्यांनी त्याला खूप मारले. पण त्या वेळी काही चमत्कार दाखवून देवानेच चोखोबाचे रक्षण केले, अशी कथा आहे.

संसारातील अडचणींनी चोखोबा अगदी रंजीस आला होता. आपल्या तप्त मनाला शांती मिळावी, म्हणून पुढे त्याने अनेक तीर्थयात्रा केल्या; पण कुठेही त्याच्या मनाला शांती लाभली नाही. तो एका अभंगात म्हणतो–

बहुत हिंडलों देशदेशांतरा।
परंतु मन नाही स्थीर झाले कोठे।।

शेवटी पुनश्च पंढरीस आल्यावर तो म्हणतो –

चोखा म्हणे पहातां पंढरी भूवैकुंठ।
मनाचे हे कष्ट दूर झाले।।

अशा रीतीने पंढरीचे माहात्म्य व संतसमागमाची गोडी कळल्यावर त्याने पंढरीची वारी कधीही चुकू दिली नाही. भक्तिसुखाचे जेवण जेवून सोयराबाईसह तो मग समाधानी वृत्तीने संसार चालवू लागला. शरीराने तो संसाराचा गाडा ओढी खरा; पण त्यात तो कधीच गुरफटला नाही. उलट तो सर्वांनाच असा उपदेश करी, की

टाळी वाजवावी गुढी उभारावी।
वाट ही चालावी पंढरीची।।

जातीने महार असला, तरी चोखोबाची राहणी फार स्वच्छ होती. तो कधीही मांसाहार करीत नसे. यदृच्छेने वाटयास आलेले जातिकर्म आटोपल्यावर स्नान करून व धूतवस्त्र परिधान करून तो पांडुरंगाच्या पूजेला बसत असे.

पंढरपुरापासून काही अंतरावर मंगळवेढे नावाचे एक लहानसे गाव आहे. तिथे गावकूस घालण्यासाठी पुष्कळ महार वेठीने कामास लावले होते. चोखोबाही त्यांत होता. गावकुसाचे काम चालू असतानाच ते बांधकाम कोसळले आणि त्याखाली गाडला जाऊन चोखोबा मरण पावला. तो दिवस वैशाख वद्य पंचमीचा होता. नंतर आठ दिवसांनी पांडुरंगाने पंढरीहून नामदेवाला चोखोबाच्या अस्थी आणण्यास पाठविले. ज्या अस्थींतून विठ्ठल विठ्ठल असा शब्द निघेल, त्या चोखोबाच्या अस्थी समज, अशी खूण विठ्ठलाने नामदेवाला सांगितली होती. नामदेवाने त्या अस्थी आणल्या आणि त्या विठ्ठलाच्या महाद्वारी पुरून त्यांवर समाधी बांधली. आजही पांडुरंगाच्या दर्शनाला जाताना प्रथम चोखोबाच्या समाधीचे दर्शन घेण्याची प्रथा आहे.

चोखोबाच्या अभंगांवरून त्याचा पारमार्थिक अधिकार फार मोठा असल्याचे कळते. तो देहाला पंढरी आणि आत्म्याला विटेवरचा अविनाशी पांडुरंग मानतो. पिंडब्रह्मांडाचे तत्त्व त्याच्या मनात पूर्णपणे ठसले होते. चोखोबाच्या अभंगाची रचना प्रवाही व अस्खलित आहे. त्याच्या विचारांची उदात्तता आणि भाषाप्रभुत्व तर आश्चर्यकारक आहे. त्याचे सर्वच अभंग सुंदर आहेत. [प्रा. म. सं.; म. सा.; म. च. को.]

चोध्रा एक जात. हे लोक गुजरातेत, मुख्यत्वे सुरत जिल्ह्यात आढळतात. हे उत्तम शेतकरी समजले जातात. यांच्यांत पावागडिया, नलाद्री आणि वालवडा या नावाचे तीन मुख्य पोटभेद आहेत. यांची मादनिया, घरात, कणवी, रजपूत, खेलिया, वालवी, वशी, हजरनिया व देसाई अशी नऊ कुळे आहेत. यांच्यांत परस्पर लग्नसंबंध होतो. कुळातल्या कुळात मात्र संबंध करीत नाहीत. पोटभेदांतही परस्पर लग्नसंबंध करीत नाहीत. चोकापूर (पावागडिया) लोकांचा सामाजिक दर्जा श्रेष्ठ मानला जातो. हे आपण राजपूत असल्याचे सांगतात. पण यांच्या चालीरीतीवरून ते राजपूत असावे, असे वाटत नाही. हे अन्य जातींतल्या लोकांना आपल्या जातीत घेतात. यांच्या बायका लाल पट्ट्यांची लुगडी गुडघ्यापर्यंत नेसतात. गळ्यात काळ्या-तांबड्या काचमण्यांच्या माळा घालतात. हातात पितळी बांगड्या व पायात पितळी कडी घालतात.

विवाहप्रथा— यांच्यांत विवाह प्रौढपणी होतात. मुलीचे देज घेतात. वराला मुलीसाठी देज देणे शक्य नसल्यास तो भावी सासऱ्याकडे ठराविक मुदतीपर्यंत नोकरी करतो. मग त्याचे लग्न होते. या पद्धतीला खंडालिया म्हणतात. लग्नात वराची बहीण प्रामुख्याने वावरते. प्रथम वधू-वरांना उखळाजवळ बसवून त्यांच्या वस्त्रांना गांठ मारतात. मग त्यांना हळद लावतात. वधू-वर एकमेकांना घास देतात. दारात जाऊन चार वेळा उंबरा ओलांडतात. त्या वेळी एकमेकांवर अक्षता टाकतात. मग स्वैपाकघरात जाऊन चुलीला चार प्रदक्षिणा करतात. प्रत्येक प्रदक्षिणेला त्यांच्या वस्त्रांची गाठ सोडून पुन्हा बांधली जाते. त्यानंतर दोन पुरुष वधू-वरांना खांद्यावर घेऊन नाचतात.

देवधर्म – काकाबलियो, पलियो, सीमरियो, नदेरियो, सूर्य, धरती ही यांची दैवतें होत. हे आपल्या पूर्वजांच्या पाषाणमूर्ती करून झाडाखाली उभारतात व शक्य असल्यास त्यावर मातीच्या घुमट्या बांधतात. देवताना पशुबली देतात. जादूटोणा व चेटूक यावर श्रद्धा ठेवतात. चोखली नावाच्या एका व्रतात कुंकुमाक्षता, दूध व तुपाचा दिवा यांनी देवाची पूजा करतात. मेली या व्रतात कोंबड्याचे वा बकऱ्याचे रक्त व मद्य देवावर घालतात. यांची धर्मकृत्ये जातीतले जाणते लोक चालवतात.

चोध्रांना नृत्याची फार आवड असते. स्त्री-पुरुष मिळून नाचतात. नृत्याला बासरी व झांजा यांची साथ असते.

मर्तिकप्रथा– मृतांना पुरतात किंवा जाळतात. प्रेत जळल्यानंतर कुऱ्हाडीचे एक पाते पाच वेळा चितेवरून इकडून तिकडे फेकतात. मग ते पाते प्रेतावरील वस्त्रात गुंडाळून नदीकिनारी किंवा तळ्याच्या काठी ठेवतात. त्यावर दर्भ आणि उंबराच्या

व जांभळीच्या फांद्या ठेवतात. तिथे एक गोवरीचा तुकडा पेटवतात व प्रेतयात्रेला जमलेले सर्व लोक त्यावर पाणीं टाकतात. दुसऱ्या दिवशी राख सावडल्यानंतर चितेच्या जागी दर्भाचे लहानसे छप्पर बनवून त्याखाली पाण्याने भरलेले मडके, पणती, व भाताचे चार द्रोण ठेवतात. मग सगळे घरी गेल्यावर त्यांच्यावर निखारा बुडवलेले पाणी शिंपडले जाते. चौथ्या दिवशी मृताचे एक दगडी स्मारक उभारतात. पुढे प्रत्येक सणाला त्याची पूजा करतात. [सुरत गॅझे.; मुं. इ. जा.; म. ज्ञा. को.]

चोरपंचक एक योग. ज्या तिथीला इष्ट लग्नाची शुद्धी पाहायची असेल, तिच्या मागच्या तिथीपर्यंत त्या महिन्याच्या शुद्ध प्रतिपदेपासून तिथी मोजाव्या. त्यात मेषापासून इष्ट लग्नाची जी संख्या असेल ती मिळवावी. जी बेरीज होईल तिला नवाने भागले असता बाकी ६ राहिल्यास त्या लग्नाला चोरपंचक येते, असे समजावे. हे पंचक असता प्रवासाला निघू नये असे सांगितले आहे. [मु. चिं.]

चोळ राजवंश द. भारतातील एक प्राचीन राजवंश. पाणिनीची अष्टाध्यायी, रामायण, मार्कंडेय पुराण, वायू पुराण, मत्स्य पुराण, बृहत्संहिता, इ. ग्रंथांत या वंशाचा उल्लेख आढळतो. अशोकाच्या साम्राज्यावाहेरची मित्रराष्ट्रे म्हणून त्याच्या शिलालेखांत चोळ, चेर व पांडच यांचे वर्णन केलेले आहे. महावंश नामक पाली ग्रंथात चोळांच्या राज्याविषयी थोडी माहिती मिळते. टॉलेमीनेही या वंशाची काही माहिती दिली आहे. पण या राजांचे विशेष वर्णन मिळते, ते तमिळ साहित्यात. मात्र त्यांचे चोळ हे नाव कसे प्रचलित झाले ते समजत नाही. हे लोक सूर्यवंशी होते.

सध्याचे तंजाऊर व तिरुच्चिरापल्ली हे जिल्हे आणि पुदुकोट्टाचा काही भाग, एवढ्या प्रदेशावर प्राचीन काळी चोळ वंशाचे राज्य होते. या प्रदेशाला पूर्वी शोरमंडलम् किंवा चोळमंडळ म्हणत. त्यावरूनच पूर्व किनाऱ्याला कारोमांडल असे नाव मिळाले असावे. उ. व द. वेल्लारू या नद्यांच्या मध्ये, पूर्व समुद्रापासून कूर्ग देशापर्यंत या राज्याचा विस्तार होता. कावेरीच्या जलाने हा प्रदेश समृद्ध झाला होता. प्रथम याची राजधानी तिरुच्चिरापल्लीजवळ उरैयूर येथे होती. पुढे चोळ राजांनी कावेरी नदीच्या मुखाजवळील कावेरीपट्टिणम् येथे नवी राजधानी स्थापली.

प्राचीन इतिहास — इ. स. च्या १ ल्या किंवा २ ऱ्या शतकात करिकाल नामक महाप्रतापी राजा या वंशात होऊन गेला. तमिळ कवींनी याच्याविषयी अनेक गौरवगीते रचली आहेत. तो चतुर शासनकर्ता व कुशल सेनानी होता. त्याने वेण्णी येथील महायुद्धात चेर व पांडय या राजांच्या संघटित सेनेचा पराभव करून तमिळनाडवर आपले प्रभुत्व स्थापन केले. एवढेच नव्हे; तर त्याने हिमालयापर्यंत स्वारी करून व्रज, मगध, अवंती, इ. राज्येही जिंकली, असे वर्णन शिलप्पधिकारम् या महाकाव्यात आढळते. कांचीच्या पल्लव राजाचा पराभव करून त्याने आंध्र प्रदेशावरही आक्रमण केले होते. तो वैदिक धर्माचा अनुयायी होता. त्याने अनेक यज्ञही केले होते.

मात्र करिकालाची कीर्ती विशेष झाली आहे, ती त्याच्या इतर कार्यामुळे. त्याने जंगले तोडून शेतीसाठी नवी जमीन मिळवली. नवीन तलाव, धरणे व कालवे बांधून शेतीसाठी पाणीपुरवठ्याची सोय केली. त्याने अनेक नवी नगरेही वसवली. कावेरीपट्टिणम् ही नगरी त्यानेच निर्माण केली. ती कावेरी नदीच्या मुखाशी असल्यामुळे तिथे व्यापाराचे मोठे केंद्र निर्माण झाले व तिथून अनेक देशांशी व्यापार चालू झाला.

त्यानंतर चेरन शेंगट्टुवन नामक आणखी एक प्रतापी राजा या वंशात होऊन गेला. त्यानेही चेर व पांडय राजांचा पराभव करून आपले वर्चस्व कायम राखले. त्याच्या नंतर मात्र चोळ वंशाची सत्ता क्षीण होत गेली आणि तिच्या जागी पांडय वंशाचे प्रभुत्व प्रस्थापित झाले.

पुनरुत्थान — त्यानंतरच्या काही शतकांचा इतिहास उपलब्ध नाही. पांडय वा चेर वंशांची सत्ता तमिळनाडवर चालत असली, तरी चोळ वंशातील काही पुरुष लहान लहान राज्ये संभाळून राहिले असावे. काही काळ कलभ्र वंशानेही चोळ देशावर राज्य केले असावे. इ. स. च्या ९ व्या शतकात पांडय व पल्लव हे आपसात झगडून दुर्बळ झाले असता, पल्लव राजांचा एक सामंत विजयालय चोळ याने उरैयूरच्या आसमंतात स्वतंत्र राज्य सुरू केले व तंजाऊर जिंकून, तिथे आपली राजधानी स्थापली. तिथे त्याने दुर्गेचे एक मंदिरही बांधले. तो स्वत: व त्याचे वंशज शिवभक्त होते. त्याने इ. स. ८५० पासून सुमारे वीस वर्षे राज्य केले व त्या अवधीत आपल्या राज्याचा बराच विस्तार केला.

विजयालयाचा पुत्र आदित्य (इ. स. ८७१–९०७) याने इ. स. ८९० च्या सुमारास पल्लव राजा अपराजित याचा पराभव करून त्याचे राज्य जिंकले. कोंगू देशावरही त्याने आपली सत्ता स्थापली. नंतर त्याने गंग वंशाची राजधानी तळकाड ही हस्तगत केली. त्याचे राज्य कालहस्तीपासून कोइंबतूरपर्यंत पसरले होते. त्याने आपल्या राज्यात अनेक शिवमंदिरे बांधली. पल्लव वंशातील राजकन्येशी त्याचा विवाह झाला होता.

साम्राज्यस्थापना — आदित्याचा पुत्र परांतक (१ ला)

(इ. स. ९०७–९५५) याने चोळांचे साम्राज्य निर्माण केले. त्याने पांड्य वंशाचे राज्य जिंकून कन्याकुमारीपर्यंत आपली सत्ता प्रस्थापित केली. मदुरेवर प्रभुत्व मिळाले म्हणून त्याने मदुरैकोंड ही पदवी धारण केली. त्याने लंकेवरही स्वारी केली होती. राष्ट्रकूट राजा कृष्ण (२ रा) याला परांतकापुढे हार खावी लागली. परांतकाने बाणांचे राज्यही जिंकले होते. पण इ. स. ९४९ मध्ये राष्ट्रकूट राजा कृष्ण (३ रा) याने त्याचा तक्कोल येथे पराभव केल्यामुळे त्याच्या सत्तेला पायबंद बसला. त्या युद्धात चोळ राजपुत्र राजादित्य मारला गेला.

परांतक राजा उत्तम शासक होता. आपल्या राजवटीच्या उत्तरार्धात त्याने राज्यात शांतता व सुव्यवस्था स्थापन केली. त्याने परकेसरीवर्मा, वीरनारायण, देवेंद्रचक्रवर्ती, पंडितवत्सल, कुंजरमल्ल, इ. अनेक पदव्या धारण केल्या होत्या.

परांतकानंतर सुमारे ३० वर्षे चोळ वंशाची सत्ता तंजाऊरच्या आसपासच्या भागापुरतीच शिल्लक राहिली होती. त्या कालावधीत गंधरादित्य, अरिंजय, सुंदर चोळ (परांतक २ रा), उत्तम चोळ या राजांनी तिथे राज्य केले. सुंदर चोळ याने राष्ट्रकूटांकडून तोंडमंडलम् (पल्लवांचे राज्य) जिंकून घेतले होते. त्याचा पुत्र राजराज हा उत्तम चोळ याच्या नंतर गादीवर बसला (इ. स. ९८५). त्याने दक्षिणदिग्विजय करून चेर व पांड्य यांची राज्ये जिंकली, ईळमंडलम् (लंका) वर स्वारी करून त्याची राजधानी अनुराधपुर उद्ध्वस्त केली आणि पोलोन्नरुव येथे नवी राजधानी स्थापली. त्याने तिथे एक शिवमंदिर बांधले, ते अजूनही चांगल्या स्थितीत आहे. नंतर त्याने म्हैसूर प्रदेश जिंकून चालुक्यांच्या राज्यावरही आक्रमण केले. अशा प्रकारे त्याने चोळ साम्राज्य पुन: प्रस्थापित केले. तंजाऊरचे राजराजेश्वराचे मंदिर त्यानेच बांधले आहे.

इ. स. ९९१ च्या सुमारास राजराज याने पश्चिमेकडील गंग राजांचा काही प्रदेश हस्तगत केला. इ. स. ९९९ मध्ये त्याने पूर्व चालुक्य घराण्यातील शक्तिवर्मा याला वेंगीच्या सिंहासनावर बसवून त्या राज्यावरही आपले वर्चस्व स्थापले. आपल्या प्रबळ नौदलाच्या साहाय्याने त्याने मालदिव बेटेही जिंकली. तुंगभद्रेच्या दक्षिणेकडील सर्व प्रदेश त्याच्या साम्राज्यात समाविष्ट झाला होता.

राजराज चोळ अत्यंत बुद्धिमान व राज्यकुशल होता. त्याने एक संघटित व कार्यक्षम शासनयंत्रणा निर्माण करून आपल्या विशाल साम्राज्यात शांतता व सुव्यवस्था प्रस्थापित केली. त्याने जमिनीची पाहणी व मोजणी करण्याचे काम सुरू केले. स्थानिक स्वराज्य संस्थाही चालू केल्या. तो विद्या-कलांचा पुरस्कर्ता व सर्व धर्मपंथांचा आश्रयदाता होता. स्वत: शैव असूनही त्याने वैष्णव मंदिरे व बौद्ध विहार बांधण्यास साहाय्य केले. आपल्या आलेखांच्या प्रारंभी स्वत:च्या विजयांची नोंद करण्याची नवीन प्रथा यानेच सुरू केली. त्याने मुम्मदी चोळ, चोळमार्तंड, केरळांतक, इ. अनेक पदव्या धारण केल्या होत्या.

राजराज याच्या मृत्यूनंतर त्याचा पुत्र राजेंद्र चोळ हा इ. स. १०१८ साली सिंहासनावर बसला. तो आपल्या पित्यापेक्षाही पराक्रमी होता. त्याने चालुक्यांचा अनेक वेळा पराभव करून त्यांची राजधानी मान्यखेट ही लुटली होती. पण चालुक्य राजा जयसिंह याने शेवटी त्याला पराभूत केले. पुढे कलिंग, ओड्र व द. कोसल हे प्रदेश पादाक्रांत करून राजेंद्राने बंगालवरही स्वारी केली व महीपालाचा पराभव केला. इ. स. १०२५ मध्ये राजेंद्र चोळ याने आपले प्रचंड नौदल पाठवून शैलेंद्र साम्राज्यातील जावा व सुमात्रा या बेटांवरील सामंत राजांचा पराभव केला आणि मलायातील कडारम् हे शैलेंद्रांचे मुख्य राज्यही जिंकले. त्यानंतर सुमारे २८ वर्षे त्याने शांततेने राज्यकारभार केला. साम्राज्यात शांतता राखण्याचे काम त्याचे पुत्र करीत होते. त्यांनी पांड्य व केरळ राज्यातील बंडे शमवली. राजेंद्राने अनेक पदव्या घेतल्या होत्या. त्यांतील गंगैकोंडचोळ ही पदवी मुख्य होय. गंगैकोंडचोळपुरम् ही नवी राजधानी त्याने बसवली. तिला गंगापुरी असेही म्हणतात.

इ. स. १०४४ मध्ये राजेंद्र चोळ मृत्यू पावल्यावर त्याचे तीन पुत्र राजाधिराज, राजेंद्र (२ रा) व वीरराजेंद्र (१ ला) हे एका पाठोपाठ सिंहासनावर बसले. पित्याचे विशाल साम्राज्य त्यांनी मानाने संभाळले. राजाधिराज (इ. स. १०४४–५२) मोठा योद्धा होता. तो इ. स. १०१८ पासूनच पित्याबरोबर राज्यकारभार पाहत होता. त्याच्या राजवटीत लंकेत झालेला उठाव त्याने मोडून काढला. चालुक्यांच्या राज्यावर आक्रमण करून त्याने त्यांची राजधानी कल्याणनगरी लुटली. पण इ. स. १०५२ मध्ये कोप्पम् येथे चालुक्यांशी लढताना तो मारला गेला. नंतर राजेंद्र (२ रा) याने चालुक्यांचा पराभव करून रणभूमीवरच राज्यपद धारण केले. त्याने १२ वर्षे राज्य केले. त्याच्या मागून त्याचा भाऊ वीरराजेंद्र गादीवर आला. त्या दोघांनाही वेंगीच्या बाजूने कल्याणीच्या चालुक्यांशी अनेक संग्राम करावे लागले. त्यांतील कूडलसंगम येथील संग्राम विशेष प्रसिद्ध आहे. त्यात चालुक्यांचा फार मोठा पराभव झाला. पुढे वीरराजेंद्र याने चालुक्य विक्रमादित्य याला मदत करून सोमेश्वराचा पराभव केला. विक्रमादित्याने चोळ राजकन्येशी विवाह केला होता.

शक्तिवर्मा चालुक्य याचा धाकटा भाऊ विमलादित्य याच्याशी राजराज चोळाची कन्या कुंदव्व हिचा विवाह झाला

होता. त्याचा पुत्र राजराज चालुक्य (१ ला) आणि राजेंद्र चोळ (१ ला) याची कन्या अम्मंगादेवी यांचा विवाह झाला होता. त्यांचा पुत्र कुलोत्तुंग हाच पुढे चोळांच्या सिंहासनावर बसला. राजेंद्र चोळ (२ रा) याच्या कन्येशी त्याचा विवाह झाला होता. वीरराजेंद्रानंतर त्याचा पुत्र अधिराजेंद्र याने काही महिनेच राज्य केले. त्या अवधीत चोळ राज्यात अंदाधुंदी माजली व शेवटी त्या अंदाधुंदीत अधिराजेंद्राचा अंत होऊन वेंगीच्या चालुक्य कुलोत्तुंगाला गादी मिळाली (इ. स. १०७०). त्याने ५० वर्षे राज्य केले व वेंगीचे राज्य चोळ साम्राज्याला जोडून टाकले. कुलोत्तुंगाने आपले साम्राज्य सांभाळण्यापुरतीच युद्धे केली. एरवी त्याचे धोरण शांततेचे होते. तुंगभद्रेपलिकडे त्याने आक्रमण केले नाही. चालुक्य विक्रमादित्य (६ वा) याने इ. स. १०७६ मध्ये चोळ राज्यावर स्वारी केली होती; पण कुलोत्तुंगाने त्याचा पराभव केला. त्याने केरळ व पांड्य देशातील बंडे मोडून काढली. पण लंकेचे राज्य मात्र त्या गडबडीत स्वतंत्र झाले. मग तिथल्या राजपुत्राला आपली कन्या देऊन कुलोत्तुंगाने त्याच्याशी तह केला. इ. स. १०९६ व १११० मध्ये त्याने कलिंग देशावर स्वाऱ्या करून तिथल्या राजाकडून खंडणी मिळवली. इ. स. १११८ च्या सुमारास वेंगीचा बराच भाग चालुक्य विक्रमादित्य (६ वा) याने जिंकला, तर होयसळ विष्णुवर्धन याने गंगवाडी प्रांत हस्तगत केला.

कुलोत्तुंगाने त्रिभुवनचक्रवर्ती, विरुदराजभयंकर, शुंगडवित्तं, इ. पदव्या धारण केल्या होत्या. त्याच्या नंतर विक्रम चोळ, कुलोत्तुंग (२ रा), राजराज (२ रा), राजाधिराज (२ रा) कुलोत्तुंग (३ रा) या राजांनी सुमारे शंभर वर्षे राज्य केले. विक्रम चोळ याने वेंगी प्रांत चालुक्यांकडून परत घेतला आणि गंगवाडीचा काही भागही हस्तगत केला.

सत्तेचा ऱ्हास – इ. स. च्या १२ व्या शतकाच्या अखेरपर्यंत चोळांचे साम्राज्य सुरक्षित होते. इ. स. च्या १३ व्या शतकाच्या प्रारंभी मात्र पांड्य वंशातील राजा सुंदर याने चोळ कुलोत्तुंग (३ रा) याचा पराभव करून त्याला आपले प्रभुत्व मान्य करायला लावले. त्यानंतर चोळ राजे काही काळ होयसळांच्या मदतीने राज्य करीत होते. पुढे पांड्य वंशातील राजे हळूहळू प्रबळ होत गेले आणि इ. स. १२८० च्या सुमारास त्यांनी चोळांचे सर्व राज्य जिंकून घेतले. राजेंद्र चोळ (३ रा) हा पांड्यांचा सामंत म्हणूनच राज्य करीत होता. पुढे इ. स. १३१० मध्ये मलिक काफूरने चोळांचे राज्य पूर्णपणे नष्ट केले.

राज्यव्यवस्था – चोळ वंशाने त्या वेळी प्रचलित असलेली एकतंत्री राजसत्ताच अंगिकारली होती. सम्राटांना शोभेल असेच त्या राजांचे व त्यांच्या राजधान्यांचे वैभव होते. देवतांच्या प्रतिमांना राजपुरुषांची नावे देणे आणि राजे व राण्या यांच्या मूर्ती देवालयांत स्थापन करून त्यांची पूजा करणे, अशी प्रथा या राजांनी सुरू केली. त्यामुळे राजाच्या अंगी देवाचा अंश असतो, ही कल्पना लोकांच्या मनात दृढ झाली. कुळंबंडल या गावी राजेंद्र (१ ला) याचे एक मंदिर आहे. ते त्याच्या पुरोहिताने बांधले असावे.



चोळ वंशातील राणी

राजाच्या हाती संपूर्ण सत्ता असली, तरी तो मंत्रिमंडळाच्या सल्ल्यानेच राज्यकारभार करीत असे आणि शासनाधिकाऱ्यांशी ही चर्चा करीत असे. चोळ साम्राज्याची शासनव्यवस्था अत्यंत संघटित व कार्यक्षम होती. या वंशातील बहुतेक सर्व राजांनी शेती, व्यापार व उद्योगधंदे यांच्याकडे विशेष लक्ष दिले. त्यासाठी मोठाले रस्ते तयार केले आणि धरणे, कालवे व नवीन तलावही बांधले. नवीन जमिनी लागवडीस आणण्याचीही त्यांनी व्यवस्था केली.

चोळांची सेना त्रिदल होती. त्यांच्या गजदलात ६० हजार हत्ती होते. त्यांचे घोडदलही फार मोठे होते. आणि त्यांच्या पायदळाचे १७ विभाग होते. सैनिकांचे शिक्षण व सैन्याची शिस्त यांकडे त्या राजांचे विशेष लक्ष असे. याशिवाय त्यांनी प्रबळ नौदलही संघटित केले होते. पूर्वीच्या काळी युद्ध हे पराक्रमाचे व वैभवाचे द्योतक मानले जात असे. त्या काळच्या युद्धांमध्ये सामान्य लोकांच्या जीवनात विक्षेप येत नसे, अशी एक कल्पना आहे. पण चोळ व चालुक्य राजांच्या शिलालेखांवरून कळते, की त्यांच्यांतील अखंड संघर्षामुळे त्यांच्या प्रजेला जीवन असह्य झाले होते. चोळ राजांनी शत्रूची नगरे लुटून

उद्ध्वस्त केली होती व काही मंदिरेही नष्ट केली होती. त्यांचे सैनिक युद्धातले सामान्य नीतिनियमही पाळीत नसत.



चोळीश्वरमंदिर – कुळंबंडल

धर्मव्यवस्था — चोळ वंशातील बहुतेक राजे शिवभक्त होते. मात्र त्यांच्या काळात शैव आणि वैष्णव या दोन्ही पंथांचा सारखाच विकास झाला. शैव नायन्मार व वैष्णव आळवार यांनी तमिळनाडमध्ये जो भक्तिपंथ प्रसारित केला, तो या काळात खूप लोकप्रिय झाला होता. नंबी आंडार नंबी व नाथमुनी यांनी शैव व वैष्णव संप्रदायांच्या धार्मिक गाथा प्रतिष्ठित केल्या, त्या याच काळात. चोळ राजांनी असंख्य शिवमंदिरे निर्माण केली, त्याचप्रमाणे अनेक विष्णुमंदिरे, बौद्ध विहार व जैन मंदिरे यांनाही दाने दिली. त्यांनी सर्व धर्मपंथांना सारखाच मान दिला व सारखेच साहाय्य केले. मात्र धार्मिक असहिष्णुतेची एकदोन उदाहरणे त्या काळात घडली, हे सांगितले पाहिजे. अधिराजेंद्राच्या राजवटीत रामानुजाचार्य व त्याचे अनुयायी यांना बराच त्रास सहन करावा लागला. त्यामुळे लोक प्रक्षुब्ध झाले व त्या लोकक्षोभात अधिराजेंद्राला प्राणास मुकावे लागले. कुलोत्तुंग (२ रा) याने चिदंबरम् येथील शिवमंदिरातील विष्णूची मूर्ती समुद्रात फेकून दिली हे दुसरे उदाहरण ! पण असले हे प्रसंग अपवादात्मकच मानायला हवे.

विद्या व साहित्य — विद्येच्या प्रसारासाठी चोळ सम्राटांनी विशेष प्रयत्न केले. वेद, वेदान्त, व्याकरण, मीमांसा, न्याय, इ. विषयांच्या अध्ययनासाठी त्यांनी महाविद्यालये स्थापून, त्यांच्या खर्चासाठी गावे इनाम दिली. चोळ साम्राज्यात विपुल साहित्य निर्माण झाले. संगम युगातील चोळ राजे कवींचे आश्रयदाते होते. त्याचप्रमाणे काही राजे स्वतःही कवी होते. नंतरच्या चोळ वंशाच्या काळी ज्या प्रशस्ती निर्माण झाल्या, त्यांतील आलंकारिक व काव्यमय भाषा म्हणजे त्या काळातील साहित्याचा उत्कृष्ट नमुना आहे. पेरिय पुराणम् व तिरुविळैयाडल पुराणम् हे दोन ग्रंथ याच काळात निर्माण झाले. याशिवाय व्याकरण, अलंकार, इ. शास्त्रांवरील ग्रंथ आणि संस्कृत ग्रंथांवरील टीका पुष्कळच लिहिल्या गेल्या.

चित्रकला — कलेच्या क्षेत्रात पल्लव-पांड्यकाळी ज्या परंपरा निर्माण झाल्या होत्या, त्यांचा चोळयुगात खूप विकास झाला. चोळांच्या काळात काही उत्कृष्ट भित्तिचित्रे निर्माण झाली होती, असे उल्लेख वाङ्मयात सापडतात. पण ती चित्रे सांप्रत नष्ट झाली आहेत. पल्लव–पांड्य काळातील काही चित्रे मात्र अजूनही काही देवालयात आढळतात. तंजाऊरच्या देवालयातील प्रदक्षिणामार्गावर जी सुंदर भित्तिचित्रे आहेत, ती राजराज (१ ला) व राजेंद्र (१ ला) या चोळवंशी राजांच्या काळातली आहेत. अजंटा, वेरूळ व बदामी येथील भित्तिचित्रांपेक्षा ही वेगळ्या शैलीची आहेत. तंजाऊरची चित्रे ज्या पार्श्वभूमीवर काढलेली आहेत, ती पार्श्वभूमी प्रथम भरभरीत चुन्याचा गिलावा करून आणि त्यावर पातळ चुना लावून बनवलेली आहे. त्यावरची ती चित्रे फ्रेस्को पद्धतीने म्हणजे गिलावा ओला असतानाच काढलेली आहेत. पेरिय पुराणात वर्णिलेले कित्येक प्रसंग या चित्रांत दिसतात. एका भिंतीवर नटराजाचे भव्य चित्र आहे; तर दुसऱ्या ठिकाणी त्रिपुरांतक शिवाचे चित्र आहे



भिक्षाटनमूर्ती – तिरुनामनल्लूर

विजयालय–चोळेश्वरम् येथे जे चित्रांचे अवशेष सापडले आहेत, ते बरेच अस्पष्ट झाले आहेत. त्यात भैरव आणि नटराज यांच्या आकृत्या दिसतात. ती चित्रे इ. स. च्या १२ व्या किंवा १३ व्या शतकातील असावी, असे अनुमान आहे.

मूर्तिकला — चोळ राजांच्या वेळी जी मंदिरे निर्माण झाली, त्यांत पाषाणाच्या अनेक सुंदर मूर्ती पाहायला मिळतात. त्यांतील वीणाधर दक्षिणामूर्ती (तिरुक्कट्टळै), अर्धनारीश्वर (कोडुंबाळूर), नटराज, व लिंगोद्भव (तिरुवालीश्वरम्) या मूर्ती विशेष उल्लेखनीय आहेत. तंजाऊर व गंगैकोंडचोळपुरम् येथील बृहदीश्वरमंदिरांच्या भिंतीवर सरस्वती, नटराज, हरिहर, विष्णू, इ. देवतांच्या सुंदर मूर्ती कोरलेल्या दिसतात.

चोळ वंशाच्या काळातील अनेक धातुमूर्ती सापडल्या आहेत. त्या इतक्या उत्कृष्ट आहेत, की त्या काळी धातू ओतून मूर्ती बनवण्याची कला परिणत अवस्थेला पोचली होती, असे मानावे लागते. द. भारतातील काही देवालयांत नटराजाच्या भिन्न प्रकारच्या सुरेख धातुमूर्ती असून, त्यांची नित्य पूजा केली जाते. शिवाच्या इतर प्रकारच्या धातुमूर्तीही त्या काळी निर्माण झाल्या. त्यांतील किरातमूर्ती उत्कृष्ट आहे. तिरुनामनल्लूर येथील शिवमंदिरात असलेली भिक्षाटनमूर्ती तर फारच सुरेख आहे. तिरुवाडुतुरै येथील आलिंगनमूर्तीही सुडौल व सुंदर असून, चोळ–मूर्तिकलेचा तो उत्कृष्ट नमुना मानला जातो. याशिवाय विष्णू, लक्ष्मी, राम, लक्ष्मण, सीता, पार्वती, यांच्या धातुमूर्तीही या काळात निर्माण झालेल्या आहेत.

शिल्पकला — द्राविड शिल्पशैलीचा उगम इ. स. च्या ७ व्या शतकात पल्लवांच्या काळातच झाला होता. त्याच शैलीचा विकास चोळ वंशाच्या राजवटीत झाला. इ. स. ८५० ते ९८५ हा चोळ शिल्पशैलीच्या विकासातील पहिला कालखंड होय. त्या काळातील देवालयांचा विस्तार फारसा मोठा नसला, तरी गर्भगृह, विमान, शिखर, मुखमंडप, अर्धमंडप, देवकोष्ठ, नंदीमंडप, परिवारदेवतांची उपमंदिरे, ध्वजस्तंभ, प्राकार, गोपुर, इ. सर्व अंगोपांगे त्यांत दिसून येतात. पल्लवांच्या काळातली मंदिरे आकाराने लहान, पण सुंदर कोरीव कामाने सुशोभित होती. त्यांतली बहुतेक मंदिरे विटांची होती. चोळ राजांनी विटांच्या ऐवजी पाषाणाचा अधिक उपयोग केला. त्यांच्या शिल्पकामात नावीन्य व चैतन्य असल्यामुळे एक नवीन शिल्पशैली निर्माण करण्याचे श्रेय त्यांना दिले जाते. इ. स. च्या ९ व्या शतकात किलैयूर येथे आदित्य (१ ला) याने उभारलेले अगस्त्येश्वराचे मंदिर त्या शिल्पशैलीचा एक उत्कृष्ट नमुना आहे. ते मंदिर द्वितल असून, त्याचे शिखर चौरस आहे व त्यावर नाजूक नक्षीकाम आहे. या मंदिराच्या भिंतीवर आणि भोवती सर्वत्र असंख्य सुरेख मूर्ती कोरलेल्या असून, त्या अजूनही चांगल्या स्थितीत आहेत. याच्या जवळच अरुणाचलेश्वराचे मंदिर आहे व या दोन मुख्य मंदिरांच्या भोवती गणपती, सुब्रह्मण्य, चंडेश्वर व सप्तमातृका या परिवारदेवतांची मंदिरे आहेत. या संपूर्ण देवालयाला अवनिकंदर्प–ईश्वरगृहम् असे नाव होते. विजयालय-चोळेश्वर, सुंदरेश्वर, नागेश्वर, कोरंगनाथ, महालिंगस्वामी, अग्नीश्वर (चित्तूर) व मूवरकोविल (कोडुंबाळूर) ही या काळातली मंदिरेही उल्लेखनीय आहेत.



अगस्त्येश्वराचे मंदिर – किलैयूर



नागेश्वरमंदिर – कुंभकोणम्

त्यानंतरचा इ. स. १०७० पर्यंतचा कालखंड चोळ वंशाच्या इतिहासात अत्यंत वैभवशाली ठरला. या अवधीत चोळ शिल्पकलेनेही वैभवाचे शिखर गाठले. या वेळच्या देवालयांतील मुख्य मंदिरे अतिभव्य असून, त्यांचा बाहेरचा पृष्ठभाग अगदी साधा असतो. पूर्वी अंतराळ हा मुख्य मंदिराचाच एक भाग वाटत असे; पण आता गर्भगृह व महामंडप यांना जोडणारा दुवा म्हणून तो भाग वेगळा दिसतो. विमानाची उभारणी केवळ गर्भगृहावर होते. पूर्वीचे स्तंभ सिंहाकृतींनी सुशोभित केलेले असत. पुढच्या मंदिरांत तशा आकृती दिसत नाहीत. इतर कोरीव कामातही पुष्कळ बदल झालेला दिसतो. परिवारदेवतांची मंदिरे प्राकाराला लागून न बांधता मुख्य मंदिराच्या भोवती बांधण्याची प्रथा या वेळी सुरू झाली.

या कालखंडात चोळांच्या विस्तीर्ण साम्राज्यात असंख्य मंदिरे निर्माण झाली. मात्र तंजाऊरचे राजराजेश्वर (बृहदीश्वर) मंदिर व गंगैकोंडचोळपुरम् येथील मंदिर ही दोन मंदिरे विशेष वर्णनीय आहेत. तंजाऊरचे मंदिर इ. स. १०१० च्या सुमारास पूर्ण झाले. त्याचे विमान १३ मजली असून, त्याच्यावर एक प्रचंड घुमटाकार कळस चढवलेला आहे. या शिल्पकामाचा भव्यपणा, सुबकपणा, साधेपणा, डौलदारपणा आणि गाभाऱ्यातील प्रचंड शिवलिंग पाहून मन स्तिमित होते. हे मंदिर देवालयांमधील चक्रवर्तीच आहे. सम्राट राजराज याचे सामर्थ्य, वैभव आणि शिवभक्ती या सर्वांचे ते प्रतीक आहे. त्याच्या भोवती ३५ उपमंदिरे बांधलेली आहेत.



सिंहस्तंभ – अगस्त्येश्वरमंदिर – मेलपळुवूर



बृहदीश्वरमंदिर – तंजाऊर

राजेंद्र (१ ला) याने बांधलेले बृहदीश्वरमंदिर तंजाऊरच्या मंदिराची प्रतिकृतीच आहे. मात्र त्याच्या विमानावर विपुल नक्षीकाम असल्यामुळे त्याचे सौंदर्य आगळेच वाटते.

कुलोत्तुंगाच्या राज्याभिषेकापासून पुढील सुमारे दोनशे वर्षांचा काळ हा चोळशिल्पाच्या विकासाचा तिसरा कालखंड होय. या काळात देवालयाचा प्राकार अधिक विस्तृत झाला, त्यातील उपमंदिरांची संख्या वाढली व गोपुरांची उंचीही वाढली. शंभर किंवा हजार स्तंभांचे मंडप बांधण्यास याच काळात प्रारंभ झाला.

या कालखंडाचा आणखी एक विशेष म्हणजे देवालयाच्या आवारात देवीसाठी स्वतंत्र मंदिराची निर्मिती. त्याला तिरुक्कामक्कोट्टम् म्हणतात. गंगैकोंडचोळपुरम्च्या बृहदीश्वरमंदिरात असे मंदिर आहे. या कालखंडात अशी बरीच कोट्टम् बांधली गेली. त्या प्रत्येक ठिकाणी देवीचे नाव वेगळे असते.

राजराज (२ रा) याने बांधलेले दारासुरम् येथील ऐरावतेश्वराचे मंदिर व कुलोत्तुंग (३ रा) याने त्रिभुवनम् येथे बांधलेले कंपहरेश्वराचे मंदिर ही दोन मंदिरे विशेष उल्लेखनीय



ऐरावतेश्वरमंदिराचा महामंडप

आहेत. ऐरावतेश्वराच्या महामंडपाला रथाची चाके लावलेली दिसतात. याचे सर्व भाग नक्षीकामाने सुशोभित केलेले असून, पेरिय पुराणातील बरेच प्रसंग इथे कोरलेले आढळतात. या देवालयांच्या आवारात पार्वतीची दोन मंदिरे आहेत. पार्वतीला इथे देवनायकी म्हणतात.



देवनायकीचे मंदिर — दारासुरम्

कंपहरेश्वराचे मंदिर सामान्यपणे वरील मंदिरांसारखेच आहे. या मंदिरात विविध प्रकारच्या असंख्य मूर्ती कोरलेल्या दिसतात. एका चोळ राजाने ब्रह्महत्येचे महापातक केल्यामुळे त्याच्या शरीराला कंप सुटला होता. तो या देवाच्या कृपेने थांबला म्हणून याला कंपहरेश्वर हे नाव मिळाले, असे म्हणतात. [दि चोळाज– नीळकंठ शास्त्री, १९५५; हिं. जॉ. ए. इं.; हि. क. इं. पी.; त. सा. सं.; फो. चो. टें.]

चोळी स्त्रियांचे उरोवस्त्र. पाहा– कंचुकी.

चौंडरस (इ. स. १३०० चा सुमार) एक कानडी कवी. हा भारद्वाजगोत्री ब्राह्मण होता. याच्या पित्याचे नाव मधुसूदन व आईचे मल्लव्वे. चौंडरस हा विठ्ठलभक्त होता.

अभिनवदशकुमारचरित हा याचा कन्नड भाषेतील ग्रंथ होय. हा ग्रंथ दंडीच्या दशकुमारचरिताचे कन्नड रूपांतर असून ते चंपूशैलीत आहे. या ग्रंथाचे तेरा आश्वास पूर्ण व चौदावा अर्धवट उपलब्ध आहे. प्रत्येक आश्वासाच्या शेवटी कवीने स्वतःचा उल्लेख अभंगविठ्ठल असा केला आहे. चौदाव्या आश्वासात याने पंडरीक्षेत्र आणि भीमेवरून (चंद्रभागा) विठ्ठलमंदिराकडे जाताना मार्गात आढळणाऱ्या सर्व देवतांचे वर्णन केले आहे. पंढरीक्षेत्राचे वर्णन करताना तो म्हणतो––

हरिपदसंगमं विविधमोक्षवधूनवनृत्यरंगम्
परमदयांगं सुखसुधाब्धितरंमनुपाप
सिंधुरमदभंगं भुवनमंगलगेह मृदंगम्
स्थिरगिरिशृंगभरोदैन दिरे ... ।।

अर्थ – इथे हरिपदाचा संगम झाला आहे. मोक्षरूपी सुंदरीचे हे नृत्यस्थान आहे. दयेचा संगम, सुखामृतोदधीचा तरंग, मदोन्मत्तांचा गर्व हरण करणारे स्थान, मंगलाचे आश्रयस्थान व शाश्वत गिरीचे शृंग असे हे पंढरपूर आहे.

पांडुरंगाच्या दर्शनाने माझे अष्ट सात्त्विक भाव जागृत झाले व अनिमिष नेत्रांनी त्याचे सौंदर्य डोळ्यांत साठविण्याचा मी प्रयत्न करू लागलो, असे म्हणून कवीने पांडुरंगाचे सुरेख वर्णन केले आहे.

चौंडरसाचे काव्य वाचीत असताना पदोपदी त्यातल्या लालित्याचा प्रत्यय येतो. दंडीप्रमाणेच याचा ग्रंथ ललितमधुर आहे. [म. च. को.; सु. वि. को.]

चौकच्यानणी राजस्थानातील एक सण. गणेशचतुर्थीच्या दिवशी विद्यार्थी विद्येचा देव गणेश याचा जन्मदिवस साजरा करतात. त्या दिवशी सकाळी गावातील मुले राजा, राक्षस, मारुती, गणपती, शंकर, इत्यादींची सोंगे घेऊन गणपती व सरस्वती यांच्या चित्रांची एक मिरवणूक

काढतात व वाद्यांच्या साथीवर पुढील गाणे म्हणतात—

गौरीपुत्र गणेश मनाऊं सालगिरह गणपतका गाऊं।
भादू सुदी चौथ बुधवार जन्म लियो गणपत दातार ।।

या सोंगांचा सर्वत्र सन्मान होतो. धनिक लोक सोंगधारी मुलांना आणि त्यांच्या पंतोजींनाही लाडू वाटतात. त्यानंतर गुरुजींची अशीच 'सवारी' निघते आणि ग्रामाधिकाऱ्यांच्या घरी जाते. तिथे त्यांना श्रीफल व रुपया देऊन त्यांचा सत्कार केला जातो. [साप्ता. हिंदु., १३ सप्टें. १९६४]

चौकपूर्णा माळवा, मध्य प्रदेश व उत्तर प्रदेश यांतील स्त्रियांच्या रांगोळीचा प्रकार. आंगणाचा एखादा भाग चौकोनात सारवून त्यावर वेलपत्ती व आकृत्या काढून तो चौक पूर्ण करणे, असा चौकपूर्णा याचा अर्थ आहे. ही रांगोळी ठिपक्यांवरची असते. प्रथम ठिपके घालायचे व ते विशिष्ट पद्धतीने रेघांनी जोडायचे, म्हणजे त्यांतून विविध आकृत्या तयार होतात. त्यासाठी रंगीत माती किंवा खडूचे चूर्ण पाण्यात भिजवून वापरतात. बारीक काडीला कापूस लावून त्या कुंचलीने चौक भरतात. क्वचित पीठ व गुलालही वापरतात. हिरव्या रंगासाठी हिरवी पाने वाटून उपयोगात आणतात. प्राचीन सुवत्तेच्या काळात राजेरजवाड्यांच्या आंगणात चौकपूर्णा काढतेवेळी ठिपक्यासाठी मोती व रेघांसाठी सोन्या-चांदीच्या काड्या वापरीत, असे म्हणतात.



चौंकपूर्णा

सण, उत्सव आणि मंगलकार्ये या प्रसंगी चौकपूर्णा काढतात. त्यात विविध आकृतींबरोबरच देवता, मानव, पशु-पक्षी व वृक्ष लता यांच्या आकृत्या रेखाटतात. विडंबनचित्रेही काढतात. कार्तिक एकादशीला होणाऱ्या उत्सवात दरवाज्यापासून घराच्या आंतरभागापर्यंत चौकपूर्णा चितारतात. त्यात विष्णूची पावले व गोपद्मे काढतात.



चौकपूर्णा

या चौकपूर्णेचे विशिष्ट प्रकार आहेत, ते असे– (१) कापडा हरियाली–ही रांगोळी श्रावणी अमावास्येच्या दिवशी काढतात. (२) आवलीपलानीकाचंग– ही रांगोळी होळीच्या वेळी काढतात. (३) पंखेका पगल्या व फलका पगल्या–हे दोन प्रकार उंबरठ्याजवळ काढण्याचे आहेत. चौकपूर्णेची ही कला विशुद्ध लोकशैलीची आहे. [अ. दि. कोकड–केसरी, दिवाळी अंक, १९६३]

चौगान एक मैदानी खेळ. यात घोड्यावर बसून, हातातील लांब काठीने जमिनीवरचा चेंडू उडवायचा असतो. हा खेळ युरोपमधील पोलोसारखाच असतो. पोलो हा शब्द तिबेटी भाषेतील पुलू या शब्दापासून झाला आहे. पोलोचा प्राचीनतम उल्लेख फारसी साहित्यात आढळतो. इराणमधून या खेळाचा प्रसार पूर्वेकडे जपानपर्यंत व पश्चिमेकडे युरोप खंडापर्यंत झाला. भारतात इ. स. १६ व्या शतकात हा खेळ माहीत होता. मणिपूर हे त्याचे प्रमुख केन्द्र होते. सोमेश्वराच्या मानसोल्लास या ग्रंथात (इ. स. चे १२ वे शतक) अशाच एका खेळाचे वर्णन आहे. त्यात या खेळाला 'तुरंगबाह्यालिविनोद'

असे नाव दिले आहे. त्यानंतर तवारिख-इ-मुबारक शाही नामक ग्रंथात याचा उल्लेख आढळतो. कुत्बुद्दीन ऐबक लाहोर येथील मैदानात ‘गोई’ खेळत असता घोड्यावरून पडला व हातातील काठीचे टोक छातीत घुसल्यामुळे मरण पावला, असे त्यात लिहिले आहे. फरिश्ता याच खेळाला चौगान म्हणतो. तिबेटात या खेळाचा विशेष प्रसार होता, असे बाबराने लिहून ठेवले आहे. अबुल फज्ल यानेही आपल्या ऐने अकबरीत या खेळाचे सुरेख वर्णन केले आहे.

मानसोल्लासात याचा तपशील दिला आहे, तो असा– प्रथम मैदान साफ करून जमीन योग्य प्रकारे कठिण बनवली जाई. नंतर १०० धनुष्ये लांब व रुंद असा आखाडा तयार करून त्याच्या भोवती मजबूत लाकडी कुंपण घालीत. त्याच्या पूर्वेला एक व पश्चिमेला एक अशी दोन दारे ठेवीत. प्रत्येक दारापासून तीन धनुष्ये अंतर ठेवून चार धनुष्ये रुंदीची कमान करीत. या कमानीच्या खांबांच्या मधून चेंडू बाहेर घालवणे हे खेळाचे अंतिम उद्दिष्ट असे.

या खेळात दोन पक्ष असून, प्रत्येक बाजूचे आठ घोडेस्वार असतात. त्यांच्या हातात वेताच्या सुमारे ६ फूट लांब व ५ अंगुळे जाड अशा काठ्या असतात. त्यांना गेद्दिका म्हणतात. त्याचे एक टोक वाकवून ते काळ्या चामड्याने मढवलेले असते. बाकीचा भाग लाल रंगाच्या चामड्याने मढवतात. परिभद्र नामक लाकडाचा चेंडू बनवून, तोही लाल रंगाच्या चामड्याने मढवतात. त्याचे आकारमान दिलेले नाही. पण त्याला भव्य म्हटले आहे.

घोडदौड करीत करीत चेंडूला काठीने गती द्यायची, विरुद्ध बाजूच्या खेळाडूंना चुकवून एकमेकांच्या मदतीने चेंडू कमानीसमोर न्यायचा व मग कमानीतून पार घालवायचा, असे या खेळाचे स्वरूप आहे. पुरोघात, पश्चाद्घात, तिर्यग्घात व बहिर्घात असे चार प्रकारचे घात यात वापरले जातात: काठीच्या टोकाने चेंडू उंच उडवून त्याला वरच्यावर फटका मारणे हा प्रकारही यात असतो.

मोगल काळात हा खेळ जसा खेळला जात असे, त्याचे वर्णन ऐने अकबरीत पुढीलप्रमाणे केले आहे–

मैदानाच्या मध्यभागी चेंडू ठेवून एक पक्ष त्याला सीमेकडे टोलवीत नेण्याचा प्रयत्न करतो व दुसरा पक्ष त्याला अडवून मध्याकडे परत नेण्याचा प्रयत्न करतो. त्यासाठी दोन्ही बाजूंचे घोडेस्वार विविध प्रकारचे डावपेच लढवतात आणि एकमेकांशी झगडतात. रात्रीच्या वेळी हा खेळ खेळण्यासाठी जळते चेंडू वापरतात. पळसाच्या लाकडाचे चेंडू अशा वेळी फार उपयोगी पडतात. कारण ते पुष्कळ वेळ जळत राहतात.

एका मोगलकालीन चित्रात स्त्री-पुरुष मिळून चौगान खेळत आहेत, असे दाखवले आहे. त्यावरून हा खेळ त्या वेळी खूपच लोकप्रिय झाला होता, असे वाटते. तथापि हा खेळ खरा वीरपुरुषांचा आहे. या खेळात चपलता, तीक्ष्ण दृष्टी, प्रसंगावधान, प्रतिपक्षाला हुलकावणी देऊन पुढे जाण्याचे कौशल्य, घोडदौडीची रग, प्रतिपक्षावर मात करण्याची ईर्षा, इ. गुणांची आवश्यकता असते. [नी. पु. जोशी– त्रिपथगा, मे १९६२]

चौगुला

एक ग्रामाधिकारी. चौगुला, चौघुला, चवघला अशा निरनिराळ्या रूपांनी हा शब्द प्रचलित आहे. याचे मूळरूप चौकुला असे असावे व कालांतराने क चा ग अगर घ होऊन चौगुला अथवा चौघुला हा शब्द बनला असावा. चौगुला हा पाटलाचा साहाय्यक असे व पाटलाखालोखाल त्याला मान दिला जाई. पाटलासारखाच चौगुला हा शब्द देखील हुद्दा वा अधिकार यांचा वाचक आहे. चौगुला बहुधा मराठा कुणबी जातीतला असतो. चौधऱ्याप्रमाणेच चौगुल्याकडेही गावधान्याची ठेवरेव अथवा खरेदी–विक्रीचे काम असे. धान्य चोरीला गेले, तर त्या चोरीचा तलास लावण्याचे काम त्याचेच असे. चौगुला ज्या जातीतला असेल, त्या जातीत तो प्रमुख व्यक्ती म्हणून मानला जाई व त्याला जातचौगुला म्हणत. चौगुला हा वलुतेदार नाही. [म. का. स.]

चौघडा

एक वाद्यसमूह. यात लोखंडाची किंवा तांब्याची चार भांडी असतात. त्यांचा आकार सामान्यपणे फुलांच्या कुंड्यांसारखा असतो. यांतली एक जोडी मोठी व एक लहान असते. मोठ्या जोडीची उंची सुमारे हातभर व धाकट्या जोडीची उंची सुमारे दीड वीत असते. तोंडांचा व्यास उंचीएवढाच असतो. मोठ्या भांड्याला नगारा व छोट्या भांड्याला टिमकी म्हणतात. ही भांडी चामड्याने मढवतात



चौघडा

सुमारे दीड वीत लांब अशा दोन काठ्यांनी चौघडा वाजवतात. स्वर चढवायचा असल्यास भांडे निखाऱ्यावर शेकवतात. चौघड्याच्या तालावर सनई वाजवली जाते. तिला पूरक म्हणून सूर, कर्णा व मोठी झांज ही वाद्येही असतात. लग्नसमारंभ, उत्सव, राजेरजवाड्यांची स्वारी, मिरवणूक, इ. प्रसंगी चौघडा वाजविण्याची प्रथा आहे. [सु. वि. को.]

चौतीस अतिशयव्रत एक जैनव्रत. हे पूर्ण व्हायला २ वर्षे ८ महिने व १५ दिवस लागतात. या व्रतात ६५ उपवास असतात व 'ॐ ह्रीं णमो अरिहन्ताणं' या मंत्राचा जप करायचा असतो. [जै. व्र. वि. सं.]

चौदा रत्ने लक्ष्मी (विष्णुपत्नी), कौस्तुभ (विष्णूचे कंठभूषण), पारिजातक (इंद्राच्या बागेतील एक पुष्पवृक्ष), सुरा (दैत्यांचे प्रिय मादक पेय), धन्वंतरी (देवांचा वैद्य), चंद्रमा, कामधेनू, गज (इंद्राचा ऐरावत), रंभा (एक अप्सरा), अश्व (सूर्याचा सप्तमुख घोडा), विष (शंकराने प्राशन केले ते), धनुष्य (विष्णूच्या हातातले), शंख (विष्णूच्या हातातला) व अमृत (देवांचे प्रिय पेय) ही चौदा रत्ने होत. देव–दैत्यांनी क्षीरसागराचे मंथन केले, त्यातून ही वर आली.

चौदा विद्या ब्रह्मज्ञान, रसायन, स्वरधर, वेद, ज्योतिष, व्याकरण, धनुर्विद्या, जलतरण, न्याय, कोक, अश्वारोहण, नाट्य, कृषी व वैद्यक या चौदा विद्या होत. दुसऱ्या मते चार वेद, चार उपवेद व सहा शास्त्रे आणि तिसऱ्या मते चार वेद, सहा वेदांगे, मीमांसा, तर्क, धर्मशास्त्र व पुराणे, मिळून चौदा विद्या होतात.

चौदुआर एक प्राचीन नगर. चौदुआर म्हणजे चार दरवाजे असलेले गाव. ओडिसामधील आजच्या कटक शहराच्या उत्तरेस चार मैलांवर बिरूप नदीच्या काठी हे नगर वसले होते. केसरी घराण्यातील पंचविसावा राजा जयकेसरी याने इथे आपली राजधानी स्थापली. प्राचीन काळी बौद्ध व शैव हे दोनही पंथ इथे उत्कर्षाला पोचले होते. इथे उत्खनन करताना प्रज्ञापारमिता व अवलोकितेश्वर यांच्या सुंदर घडणीच्या दोन मूर्ती मिळाल्या आहेत. [हि. जॉ. ए. इं.]

चौधरी बारा बलुतेदारांपैकी एक. गावगाडाकार आत्रे यांच्या मते चौधरी शब्दाचा अर्थ चारचौघांना (सावरून) धरणारा, असा आहे. याचे मुख्य काम म्हणजे बाजारभावात समतोल राखून रयतेला योग्य दराने धान्यपुरवठा करणे हे होय. मुसलमानी अमदानीत व निजाम राज्यात तर तो सरकारला व सैन्यालाही धान्य पुरवीत असे. मराठेशाहीत मात्र ही चाल नव्हती. गावात असलेल्या धान्याची नोंद रोजच्या रोज त्याला सरकारात द्यावी लागत असे. गावातील धान्याची आयात–निर्यातही त्याच्याच देखरेखीखाली होई. धान्याच्या भावावरही त्याचे नियंत्रण असे. क्वचित प्रसंगी धान्य कमी असल्यास बाहेरगावाहून धान्य आणवून त्याचा पुरवठा करणे, हेही काम त्याला करावे लागे. चौधरीपणाचा हक्क सरकारातून मिळाला असेल, तर चौधऱ्याने सरकारला ठराविक कर द्यायचा असे. मोठमोठ्या शहरी मक्त्यानेही हा अधिकार प्राप्त होई. [म. ज्ञा. को.]

चौपाई मात्रिक समछंदाचा एक प्रकार. हा हिंदी भाषेचा खास छंद आहे. चौपाईचे विद्युन्माला, चंपकमाला, शिद्धविराट, मत्ता, पणव, अनुकला, मालनी, मोहक, इ. अनेक प्रकार आहेत. चौपाईचे चार चरण असतात. प्रत्येक चरण सोळा मात्रांचा. त्यात लघु–गुरूचा अथवा चौकलांचा (चार मात्रांचा समूह) निश्चित क्रम नसतो. क्रम इतकाच असतो, की समाच्या मागून सम आणि विषमाचे मागून विषम कल अशी रचना असावी. शेवटी जगण आणि तगण नसावा. चौपाईमध्ये त्रिकलाच्या मागून समकल वापरीत नाहीत. चौपाई व पादाकुलक यांची गती समान असते. फरक एवढाच, की पादाकुलकाच्या प्रत्येक चरणात चार-चार चौकल असतात आणि चौपाईमध्ये त्यांची आवश्यकता असत नाही.

ज्यात प्रत्येक चरण १५ मात्रांचा असतो व चरणाच्या अंती गुरु–लघू असतात, असा आणखी एक छंद आहे, त्याला चौपई म्हणतात. उदा०—

तबकी कहिन करत कछु बात।
इक–इक पलक कलप सम जात।

हिंदी भाषेत चौपाई छंद चंदबरदाईच्या काव्यापासून आढळतो. वर्णनाला हा छंद अनुकूल आहे. याच्या द्वारे सर्व रसांचा परिपोष करता येतो. कथात्मक काव्यात हा छंद कविजनांचा आवडता ठरला, त्याचे मुख्य कारण हेच होय. केशव, जटमल, गोरेलाल, सूदन, इ. कवींनी आपल्या वीरकाव्यात चौपाईचा प्रयोग प्रसंगोपात्त केला आहे. प्रेमाख्याने लिहिणाऱ्या कवींमध्ये कुतुबन, जायसी, उसमान, इ. सर्व कवींनी दोह्यांच्या बरोबरीने चौपाईचा वापर केला आहे. सूरदासाने सूरसागरातल्या कथात्मक अंशांना जोडण्यासाठी प्रायः याच छंदाचा आश्रय केला आहे. तुलसीदासाच्या रामचरित-

मानसात या छंदाचा विपुल प्रमाणात वापर केलेला आहे. त्यातली एक चौपाई अशी—

माघ मकरगत रबि जब होई । तीरथपतिहिं आव सब कोई ।।
देव दनुज किंनर नर श्रेनीं । सादर मज्जहिं सकल त्रिबेनीं ।।

अर्थ — माघ मासात जेव्हा सूर्य मकर राशीत जातो, तेव्हा सर्व लोक तीर्थराज प्रयाग क्षेत्रात येतात. देव, दानव, किन्नर आणि मनुष्य यांचे समूह आदरपूर्वक त्रिवेणीमध्ये स्नान करतात.

मलूकरामायण आणि कृष्णायन या काव्यातही चौपाईचा प्रयोग विपुल प्रमाणात केला आहे. दोहा व चौपाई हे अवधी काव्याचे लोकप्रिय छंद आहेत. [अ. ऊ. सा.; हिं. सा. को.]

चौफुलो उ. प्रदेशातील एक नृत्य. वसंतपंचमीपासून विषुवसंक्रांतीपर्यंत प्रत्येक गावाच्या चावडीसमोरील प्रांगणात हे नृत्य होते. प्रारंभी या नृत्यात स्त्री-पुरुष संमिश्रपणे भाग घेत. सांप्रत मात्र स्त्री-पुरुष स्वतंत्रपणे नाचतात.

या नृत्यात कोणतेही वाद्य वाजवीत नाहीत. नाचणाऱ्या मुलींच्या पायातील झेंवरी नामक चांदीच्या दागिन्याचा जो नाद होतो, त्याच्या तालावरच हे नृत्य होते. या वेळी गावातली एखादी वृद्ध स्त्री अंगणाच्या कोपऱ्यात बसून गाणे गाते आणि त्या गाण्याच्या लयीत नर्तकींची पावले पडतात.



चौफुलो नृत्य

या नृत्याचे अनेक प्रकार आहेत. एका प्रकारात नाचणाऱ्या मुली समोरासमोर उभ्या राहतात व गीताच्या तालाबरोबर पुढेमागे होत समोरच्या मुलीच्या हातावर टाळी देतात. दुसऱ्या प्रकारात सर्व मुली वर्तुळाकार फिरतात व गीताचे ध्रुपद येताच एक हात मागे उभ्या असलेल्या मुलीच्या हातावर व दुसरा पुढच्या मुलीच्या हातावर देऊन टाळी वाजवतात. [संमेलन पत्रिका – लोकसंस्कृती अंक, १९५३]

चौमुखी जैनमूर्ती. हिंदूंच्या त्रिमूर्तीप्रमाणे जैनांत चतुर्मुखी देवप्रतिमेची कल्पना आहे. स्तंभाच्या आकारातल्या दगडावर चार बाजूंनी चार तीर्थंकरांच्या प्रतिमा खोदून चौमुखी शिल्प बनवतात. याला सर्वतोभद्र (सर्व बाजूंनी कल्याणकारक) असेही नाव आहे. [जै. इ.]

चौरंग चार पायांचे चौकोनी ठेंगणे आसन. चौरंगाला चौकी असेही म्हणतात. चौरंग हा स्नान, भोजन, इ. गोष्टींसाठी वापरतात. मंगळागौर, सत्यनारायण, इ. देवतांची पूजा चौरंगावर करतात. लग्नात विहिणीला चौरंगावर बसवून तिची ओटी भरतात. तसेच तिला स्नान घालायचे तेही चौरंगावर बसवून घालतात. पूर्वी लाकडाचे नक्षीदार चौरंग बनवून त्यांवर चांदीच्या किंवा पितळेच्या फुल्या ठोकून बसवीत चांदीसोन्याचेही चौरंग बनविण्याची प्रथा होती.

चौरगतिस्तंभन एक मंत्र. 'ॐ ब्रह्मवेशिनि शिवे रक्ष रक्ष स्वाहा' या मंत्राने सात पाश ग्रहण करतात. त्यांतले तीन कमरेला बांधतात व चार मुठीत धरतात. असे केल्याने चोराची गती कुंठित होते व तो हाती सापडतो, असे समजले जाते. [श. क.]

चौरंगीनाथ एक नाथपंथी सिद्ध. हा मत्स्येन्द्रनाथाचा शिष्य व गोरक्षनाथाचा गुरुबंधू होता. बौद्धगान ओ दूहा या ग्रंथात चौरंगीनाथाला चौऱ्यांयशी सिद्धांपैकी तिसरा सिद्ध मानलेले आहे. तर राहुल सांकृत्यायनांनी त्याला त्यांपैकी दहावा सिद्ध असे म्हटले आहे.

नवनाथभक्तिसार या ग्रंथात याच्याविषयी पुढील माहिती दिली आहे—

हा वैदर्भ देशाच्या राजाचा पुत्र होता. कृष्णा व तुंगभद्रा यांच्या संगमाजवळ असलेल्या कौंडिण्यपुरीत याचा जन्म झाला. याच्या पित्याचे नाव शशांगर आणि मातेचे मंदाकिनी असे होते. याची सावत्र आई भुजावंती हिने याचे हातपाय तोडविले. पुढे मित्राचार्य व शरयू या ब्राह्मण दंपतीने याचा सांभाळ केला.

याच्याविषयी आणखी एक कथा प्रचलित आहे, ती अशी—

भारताच्या पूर्वभागातील देवपाल राजाचा चौरंगीनाथ हा पुत्र होय. सावत्र आईच्या अवकृपेने याचे हातपाय तोडण्यात आले होते. मीननाथ हा देशभ्रमण करीत असता चौरंगीनाथाजवळ आला आणि त्याने त्याला दीक्षा दिली. मग त्याचा सांभाळ करण्याची जबाबदारी त्याने एका माणसाकडे सोपविली. पुढे हा मुलगा चौरंगीनाथ या नावाने प्रसिद्ध झाला.

बारा वर्षे ध्यान केल्यानंतर चौरंगीनाथाला सिद्धी प्राप्त झाली आणि त्याला पूर्ववत हातपाय प्राप्त झाले.

गौरन्नमंत्री या तेलुगू कवीने नवनाथचरित्रमू नामक आपल्या काव्यात सारंगधर नावाच्या एका सिद्धाची कथा दिली आहे. ती या कथेशी मिळतीजुळती आहे. याच कथेवर चेमकूर वेंकट या तेलुगू कवीने सारंगधरचरित्रमू हे काव्य लिहिले आहे. या काव्याचा नायक सारंगधर हा राजराज चोळ याचा पुत्र मानला जातो. सारंगधरावर त्याची सावत्र आई चित्रांगी ही आसक्त होती. पण सारंगधराने तिच्या अनुचित प्रेमाचा स्वीकार केला नाही. त्यामुळे क्रुद्ध झालेल्या चित्रांगीने राजाज्ञा मिळवून त्याचे हातपाय तोडायला लावले, अशी ही कथा आहे.

डॉ. हजारीप्रसाद द्विवेदी यांचे अनुमान असे आहे, की पंजाब व त्याच्या आसपासचा प्रदेश यात प्रचलित असलेली पूरन-भगत ही कथा चौरंगीनाथाच्या जीवनावरच आधारलेली आहे.

प्राणसंकली हा चौरंगीनाथाचा ग्रंथ आहे, असे मानतात. त्याने आपल्या पित्याचे नाव सालबाहन असे दिले आहे. सालबाहन हा स्यालकोटचा राजा होता. वायुतत्त्वभावनोपदेश नावाचा आणखी एक ग्रंथ याच्या नावावर आहे.

प्राणसंकलीची भाषा म्हणजे प्राचीनतम भोजपुरीचा एक नमुना आहे. या ग्रंथात चौरंगीनाथ म्हणतो—

आसीरबाद पाइला अम्हे मनी भइला ।
हरषित होत कंठ तालुका रे ।
सुकाईला धर्मंना रूप मचछंद्रनाथ स्वामी ॥
मन जानै पुण्य पाप भुष बचन न आवै मुषै ।
बोलव्या कैसा हाथ रे ।
दीला फल मुझे पीलीला ऐसा गुसाईं बोलीला ।।
जीवन उपदेस भाषिला फल आदम्हे बिसाला ।
दोष बुध्या त्रिषा बिसारला ॥

अर्थ – मला आशीर्वाद मिळाला. मी मनात हर्षित झालो. माझे ओठ, कंठ व *ताळू यांना* धर्मरूप मत्स्येंद्रनाथस्वामीने सुख दिले. माझ्या मुखातून पापकराक वा पुण्यकारक कोणतेच वचन बाहेर पडले नाही. स्वामीने म्हटले, की 'अरे, हा तुझा हात असा कसा झाला?' त्याने आशीर्वाद दिला आणि मला हात प्राप्त झाले. त्याने जीवन सुधारण्यासाठी उपदेश दिला. विशाल आशीर्वादाने माझे दोष व बुद्धीची तृषा शांत झाली.

याचा काल अनुमानाने इ. स. चे नववे किंवा दहावे शतक मानतात. [गो. च. प.; भो. क. का.; हिं. सा. को. २]

चौरासी (१) दिगंबर जैनांचे एक प्रसिद्ध क्षेत्र. हे मथुरेजवळ आहे. अंतिम केवली जंबूस्वामी याचे हे मोक्षस्थान असल्याचे जैन परंपरा सांगते. इथल्या जैनमंदिरात जंबूस्वामीची पदचिन्हे स्थापित आहेत. प्रतिवर्षी कार्तिकमासात इथे रथोत्सव होतो. [जै. ध.]

(२) एक देवी. छत्तीसगढमधील केवट जमातीची ही उपास्य देवता आहे. ही देवी एकदा महापुरात बुडत असता केवट लोकांनी तिला वर काढले. त्या गोष्टीबद्दल चौरासीने त्यांना वर दिला, की 'तुम्ही कुठेही मच्छीमारीला गेलात, तरी तुम्हाला इतरांपेक्षा चौपट मासे मिळतील.'

चौर्यकर्म दुसऱ्याच्या मालकीच्या वस्तू त्याच्या नकळत वा संमतीवाचून स्वतःच्या उपयोगाकरिता घेणे, याला चौर्यकर्म म्हणतात. चौर्य हा शब्द चुर् या धातूपासून बनला आहे. चौसष्ट कलांत चौर्यकलेची गणना होत असली, तरी जगात चोरी हा नैतिक व व्यावहारिक अपराधच मानलेला आहे. रोमन कायद्यात चोरी उघडकीस आल्यावर चोराकडून मालकाला चोरीस गेलेल्या मालाच्या दुप्पट किंवा चौपट किंमत देववीत असत. प्राचीन इंग्रजी कायदाही तसाच होता. गुरे चोरणे वगैरे महत्त्वाच्या चोऱ्यांना फाशी, हद्दपारी, सक्तमजुरी, इ. कडक शिक्षा असत. गुलामाला पळवून नेणे, याचाही रोमन कायद्यात चोरी म्हणून समावेश केलेला होता.

भारतीय स्मृतिग्रंथात स्तेय = चोरी आणि साहस = दरोडा असे दोन पृथक गुन्हे मानले आहेत. मनूने (८·३३२) त्यांची व्याख्या दिली आहे, ती अशी —

स्यात् साहसं त्वन्वयवत्प्रसभं कर्म यत्कृतम् ।
निरन्वयं भवेत् स्तेयं हृत्वापव्ययते च यत् ॥

अर्थ – मालकाच्या समक्ष बलाने त्याच्या धनधान्यदिकांचे जे अपहरण केले जाते, त्याला साहस म्हणतात आणि जे मालकाच्या परोक्ष अपहरण केले जाते, त्याला स्तेय म्हणतात.

स्मृतिग्रंथातील कायदा चालू पिनल कोडातील कायद्याच्या दृष्टीने दोन महत्त्वाच्या बाबतीत भिन्न दिसतो. पहिली गोष्ट म्हणजे वर्णभेदानुरूप दंडभेद. या विषयी मनू सांगतो—

अष्टापाद्यं तु शूद्रस्य स्तेये भवति किल्बिषम् ।
षोडशैव तु वैश्यस्य द्वात्रिंशत्क्षत्रियस्य च ॥
ब्राह्मणस्य चतुःषष्टिः पूर्णं वापि शतं भवेत् ।
(मनु. ८. ३३७-३८)

अर्थ – ज्या चोरीला जो दंड उक्त असेल, तो स्तेयाचे गुणदोष जाणणाऱ्या शूद्राला आठपट, वैश्याला सोळापट, क्षत्रियाला बत्तीसपट व ब्राह्मणाला चौसष्टपट किंवा पूर्ण शतपट असावा.

हा दंडभिन्नत्वाचा प्रकार 'कायद्याच्या दृष्टीने सर्व माणसे सारखीच असतात,' या सुप्रसिद्ध कायदेतत्त्वाच्या विरुद्ध आहे.

शारीरिक शिक्षेसंबंधीही स्मृतिग्रंथातील नियम आधुनिक कायदेपद्धतीला मान्य होण्याजोगे नाहीत. पिनल कोडात चोरीला सक्तमजुरीहून अधिक कडक शिक्षा नाही. पण स्मृतिकार त्याला ज्या शिक्षा सांगतात, त्या अवयवच्छेद आणि प्रत्यक्ष वध इतक्या कडक आहेत. मनू म्हणतो (९.२७७)--

अङ्गुलीर्ग्रन्थिभेदस्य छेदयेत् प्रथमे ग्रहे।
द्वितीये हस्तचरणौ तृतीये वधमर्हति ॥

अर्थ – गाठोडे चोरणाऱ्या चोराची पहिल्या गुन्ह्याच्या वेळी बोटे तोडावी, दुसऱ्या गुन्ह्याच्या वेळी हातपाय तोडावे आणि तिसरा तसलाच गुन्हा केल्यास तो चोर वध्य समजावा.

ऋग्वेदात चोर या अर्थी तस्कर, तायू, स्तेन व परिपंथी असे शब्द येतात. चोर हा शब्द पुढे तैत्तिरीय आरण्यकाच्या शेवटच्या भागात मिळतो.

मनुष्याच्या उत्पत्तीबरोबरच सामान्यतः चोरीची उत्पत्ती झाली, असे म्हणता येईल. जगातली सर्वांत पहिली चोरी शंखासुराने केली आहे. त्याने धन न चोरता ब्रह्मदेवाकडचे चार वेदच चोरले. वेद चोरून तो समुद्रात लपला. मग त्याला मारण्यासाठी विष्णूला मत्स्यावतार घ्यावा लागला (पद्म पु. सृष्टी. १३. ९०–९१ स्कंद पु. ४. २. ३३). पुढे हिरण्याक्ष या दैत्याने पृथ्वीच चोरली. तो ती घेऊन पाताळात जात असता विष्णूने वराह अवतार घेऊन त्याला ठार मारले व पृथ्वीला वर आणले (पद्म पु. सृष्टी. ७५; भाग. पु. ३. २८). इंद्राने हिरण्यकशिपूची गर्भवती राणी कयाधू हिचीच चोरी केली होती. या चोरीचा उद्देश गर्भस्थ बालकाला नारदद्वारा नारायणाचा मंत्र देणे, हा होता. भगवान श्रीकृष्णाला नवनीतचोर किंवा दुकूलचोर ही पदवीच मिळाली आहे. व्रजगोपींच्या घरात शिरून दह्यादुधाची व लोण्याची चोरी करणे, ही कृष्णाची बाललीला पुराणांनी आणि संतांनी प्रेमाने वर्णिली असून, गोपींची वस्त्रे पळवून नेल्याबद्दल त्याला दुकूलचोर ही उपाधी दिली आहे.

भगवंताप्रमाणेच भगवंताच्या कांही भक्तांनीही चोऱ्या केल्या आहेत. तमिळनाडमधल्या आळवार संतांपैकी तिरुमंगई या संताने वैष्णवांच्या आतिथ्यासाठी चोरी केली होती. रामानुजाचार्यांनी एका यवनकन्येच्या अंतःपुरातील श्रीविष्णूची मूर्ती चोरली होती. असे सांगतात, की तिरुनारायणपुरम् येथील विष्णुमूर्ती ही तीच चोरून आणलेली मूर्ती आहे. संतांना जेवू घालण्यासाठी कबिराने एका सावकाराच्या घरात चोरी केल्याची कथा त्याच्या चरित्रात दिली आहे.

मृच्छकटिक नाटकात शर्विलक या चोराचा एक प्रवेश आहे. तो चारुदत्ताच्या वाड्याच्या भिंतीला भोक पाडून आत शिरतो आणि तिथे चोरी करतो. त्याला जमिनीत पुरलेले धनही शोधून काढता येत असते. चौर्यकर्म सिद्धीस जाण्यासाठी उपयुक्त असे काही मंत्रतंत्रही त्याला माहीत असतात.

चोर हे स्वतःला स्कंदपुत्र म्हणवतात. शर्विलक भिंतीच्या भगदाडातून आत प्रवेश करण्यापूर्वी कार्तिकेयाची पुढीलप्रमाणे प्रार्थना करतो—

नमो वरदाय कुमारकार्तिकेयाय
नमः कनकशक्तये ब्रह्मण्याय ।

प्राचीन कालचे कित्येक राजे चौर्यकलेविषयी आस्था दाखविणारे होते. विक्रमादित्याच्या बाबतीत असे सांगतात, की तो चौर्यशास्त्रातला चांगला जाणकार होता. कथासरित्सागरामध्ये अनेक चांगल्या चोरकथा आल्या आहेत. प्राचीन ललित साहित्यात चौर्यकर्माविषयी पुष्कळ गोष्टी आढळतात. श्री. ब्लॉम्फिल्ड या एका अमेरिकन ग्रंथकाराने या दृष्टीने भारतीय ललित साहित्याचे आलोडन करून एक प्रबंध लिहिला आहे. त्याच्या मते मूलदेव हा चौर्यकलेवर ग्रंथ लिहिणारा पहिला ग्रंथकार होय. हा मूलदेव कर्णीसुत, गोणीपुत्रक अशा नावांनीही ओळखला जातो. तो स्वतः पूर्वी एक चोर होता. त्याच्या या ग्रंथाचे नाव स्तेयसुत्त असे आहे. ब्लॉम्फील्ड याने भारतीय ललित साहित्यातील काही प्रसिद्ध चोरकथाही संकलित केल्या आहेत. त्यांतील एक तमिळ कथा पुढीलप्रमाणे—

एका राजाला आपले न्यायदान शक्यतो काटेतोल व्हावे म्हणून चौर्यकला शिकण्याची इच्छा झाली. त्याने ती आपल्या प्रधानाला सांगितली. प्रधानाने एक कुप्रसिद्ध मुरटा चोर आणून राजापुढे उभा केला. राजाने सर्व नोकरांना बाहेर घालवून एकांत मिळवला आणि चोराला म्हटले. 'मला तुझी विद्या शिकव.' ते ऐकून चोराला धक्काच बसला. त्याला वाटले, की इथे काहीतरी दगाफटका आहे. आपल्याला जाळ्यात पकडण्याचा हा राजाचा कावा असावा, हे लक्षात घेऊन तो म्हणाला.

"महाराज, मला चौर्यकला माहीत नाही. मी कधी चोरी केली नाही. चोर म्हणून मला आपल्यापुढे उभे करण्यात प्रधानाने माझ्यावर अन्याय केला आहे !"

राजाला त्यावर काही बोलता येईना. त्याने चोराला सोडून दिले. पण आश्चर्याची गोष्ट ही, की थोड्याच वेळात आपल्या हातातील हिऱ्याची अंगठी गायब झाली आहे, असे राजाला कळून आले. तो चोरीचा आळ अर्थात त्या चोरावरच आला. राजदूतांनी त्याला न्यायालयासमोर उभे केले. न्यायाधीशाने त्याला सुळी देण्याची शिक्षा फर्मावली. ती शिक्षा ऐकून राजा बेचैन झाला. त्याला वाटले, की एक भला माणूस नाहक मरतो आहे. म्हणून त्याला वाचवण्यासाठी राजा वेष पालटून सुळी देण्याच्या वेळी त्या जागी गेला. राजा तिथे जातो, तर चोर

पुढीलप्रमाणे देवाची प्रार्थना करीत बसला होता.

"देवा, राजाची अंगठी चोरल्याचा माझ्यावर निष्कारण आळ आला आहे. तेव्हा मला अन्यायाने शिक्षा देणाऱ्यांना तू शासन कर."

राजाने ती प्रार्थना ऐकली. त्याला वाटले, की हा माणूस ज्या अर्थी आपण निरपराध असल्याचे देवालाही सांगतो, त्या-अर्थी हा खराच निरपराध असला पाहिजे. म्हणून मग राजाने स्वतःला उघड केले व त्याची सुळी देण्याची शिक्षा रद्द केली. चोर मुक्त होऊन घरी गेला. दुसऱ्या दिवशी तो पुनश्च दरबारात येऊन म्हणाला, की 'मला राजाची भेट घ्यायची आहे.' त्याला राजापुढे नेण्यात आले, त्या वेळी चोर राजाला म्हणाला.

"महाराज ! ही घ्या आपली हिऱ्याची अंगठी. ती मीच चोरली होती. तुम्हांला माझी चौर्यकला शिकायची असेल, तर ती मी अवश्य शिकवीन. पण त्यासाठी आपली मानसिक तयारी जबरदस्त झाली पाहिजे. चोराला सुळी देण्याची शिक्षा झाली, तरी देखील त्याने आपला गुन्हा कबूल करता कामा नये."

[म. ज्ञा. को.; नवनीत– डिसें. १९५६]

चौऱ्यांयशी लक्ष योनी

जारज, अंडज, स्वेदज व उद्भिज अशा जीवांच्या चार खाणी आहेत. या चार खाणींत प्रत्येकी २१ लक्ष योनी मानलेल्या आहेत. ही संख्या ८४ लक्ष भरते. जीवाला ८४ लक्ष योनींतून फिरावे लागते. हा फेरा पूर्ण झाल्यानंतर त्याला मोक्ष मिळवता येतो, अशी समजूत आहे.

बहुतेक सर्व संतांनी चौऱ्यांयशी लक्ष योनींचा हा संकेत आपल्या काव्यात वापरलेला आहे. तुकोबा म्हणतात,

तुका म्हणे शाहाणा होइरे गवारा।
चौऱ्यांयशीचा फेरा फिरो नको ।।

यावरून 'चौऱ्यांयशीचा फेरा' अशी म्हणही पडली आहे. संसारयातनांत सापडणे, असा तिचा अर्थ आहे.

चौऱ्यांयशी सिद्ध

चौऱ्यांयशी सिद्ध ही सिद्धगणना मूळची वज्रयानी परंपरेतील आहे. या परंपरेचा काळ इ. स. ८०० ते ११७५ असा मानण्यात येतो. या परंपरेतूनच नाथ संप्रदायाचा उदय झाला आणि गोरक्षनाथाच्या प्रभावाने वज्रयान्यांचे समूहच्या समूह नाथपंथात समाविष्ट झाले, या वज्रयानी नाथपंथीयांनी आपल्या पूर्वीच्या परंपरेतील सिद्ध पुरुषांची आणि नंतर स्वीकारलेल्या नाथपंथातील सिद्ध पुरुषांची नामावळी मिश्रित केली आणि ती प्रचारात आणली.

चौऱ्यांयशी सिद्ध या संख्येचा संबंध काहीजण चौऱ्यांयशी लक्ष योनींशी जोडतात, तर काहीजण कामशास्त्रातील चौऱ्यांयशी आसनांशी लावतात. पण एकंदरीत ही संख्या रहस्यमय आहे.

सिद्धांची संख्या देशकालपरत्वे भिन्न असली, तरी चौऱ्यांयशी सिद्ध ही संख्या सर्वमान्य झालेली आहे. या सर्व सिद्धांचा परिचय तिबेटी ग्रंथांत मिळतो. या सिद्धांत स्त्रिया, पुरुष, ब्राह्मण, क्षत्रिय, शूद्र या सर्वांचा समावेश आहे. वर्तमान हिंदू धर्म व हिंदी कविता यांवर या सिद्धांचा बराच प्रभाव दिसून येतो.

चौऱ्यांयशी सिद्धांची सर्वमान्य नामावळी अशी--

(१) लूइपा – जाती कायस्थ. देश मगध.
(२) लीलापा
(३) विरूपा – देश मगध. (८०९–८४९ इ. स.) समकालीन राजा देवपाल.
(४) डोंबिपा – जाती क्षत्रिय. देश मगध. लूइपाचा शिष्य.
(५) शबरपा – जाती क्षत्रिय. देश विक्रमशीला. सरहपाचा शिष्य. लूइपाचा गुरू.
(६) सरहपा – जाती ब्राह्मण. देश नालदा. समकालीन राजा धर्मपाल. (७६९–८०९ इ. स.)
(७) कंकालिपा – किंवा कोंकलिपा, कंकलिपा, कंकरिपा. जाती शूद्र. देश मगध.
(८) मीनपा – जाती मछुआ. देश कामरूप.
(९) गोरक्षपा
(१०) चौरंगिपा – जाती राजकुमार (?) देश मगध. गोरक्षपाचा गुरुबंधू.
(११) वीणापा – जाती राजकुमार (?) देश गौड (बिहार). कण्हपाचा शिष्य, भद्रपाचा शिष्य.
(१२) शांतिपा – किंवा रत्नाकर शांती. जाती ब्राह्मण. देश मगध. (९७४– १०२६ इ. स.) समकालीन राजा महीपाल.
(१३) तंतिपा – जाती तंतवा. देश सोंधोनगर. आलंधराचा शिष्य.
(१४) चमारिपा – जाती चर्मकार. देश विष्णुनगर (पूर्वदेश).
(१५) खड्गपा – जाती शूद्र. देश मगध. चपंटीपाचा शिष्य.
(१६) नागार्जुन – जाती ब्राह्मण. देश कांची. सरहपाचा शिष्य.
(१७) कण्हपा – किंवा चर्यंपा. जाती कायस्थ. देश सोनपुरी. (८०९–८४९ इ. स.).
(१८) कर्णरिपा – देश नालंदा. नागार्जुनाचा शिष्य.
(१९) थगनपा – जाती शूद्र. देश पूर्व भारत. शांतिपाचा गुरू. दोषकोषतत्त्वदीपिका या ग्रंथाचा कर्ता.

(२०) **नारोपा** – जाती ब्राह्मण. देश मगध. समकालीन राजा महीपाल.

(२१) **शालिपा** – किंवा शीलपा. कदाचित हा शृगालीपाद असावा. जाती शूद्र. देश विघसुर.

(२२) **तिलोपा** – किंवा तिल्लोपा. जाती ब्राह्मण. देश भिगुनगर. नारोपाचा गुरू.

(२३) **छत्रपा** – जाती शूद्र. देश संघोनगर.

(२४) **भद्रपा** – जाती ब्राह्मण. देश मणिधर (भागलपूर जिल्हा).

(२५) **दोखंधिपा** – किंवा द्विखंडी. देश गंधपूर.

(२६) **अजोगिपा** – जाती गृहपती (?) देश सालिपुत्र.

(२७) **कालपा** – देश राजपूर.

(२८) **धोंभिपा** – जाती धोबी. देश सालिपुत्र.

(२९) **कंकणपा** – जाती राजकुमार (?). देश विष्णुनगर.

(३०) **कमरिपा** – किंवा कंवल. देश ओडीसा. घंटापाचा शिष्य.

(३१) **डेंगिपा** – जाती ब्राह्मण. देश ओडीसा. लूइपाचा शिष्य.

(३२) **भदेपा** – देश श्रावस्ती. कण्हपाचा शिष्य.

(३३) **तंधेपा** – किंवा टंटन. जाती शूद्र. देश करी.

(३४) **कुकुरिपा** – जाती ब्राह्मण. देश कपिलवस्तू. मीनपाचा गुरू.

(३५) **कुचिपा** – किंवा कुसूलिपा. जाती शूद्र. देश करी.

(३६) **धर्मपा** – जाती ब्राह्मण. देश विक्रमशीला. कण्हपाचा व जालंधराचा शिष्य.

(३७) **महीपा** – किंवा महिलपा. जाती शूद्र. देश मगध. कण्हपाचा शिष्य.

(३८) **अचिंतिपा** – जाती लकडहारा. देश धनिरूप (?).

(३९) **भलहपा** – किंवा भवपा. जाती क्षत्रिय. देश धंजुर.

(४०) **नलिनपा** – देश सालिपूर.

(४१) **भुसुकुपा** – जाती राजकुमार (?) देश नालंदा.

(४२) **इंद्रभूती** – जाती राजा (?) देश लंकापूर. वज्रअनंग आणि कंबलपा यांचा शिष्य.

(४३) **मेकोपा** – जाती वणिक. देश भंगलदेश (भागलपूर जिल्हा).

(४४) **कुठालिपा** – किंवा कुद्दालिपा. देश रामेश्वर. शांतिपाचा शिष्य.

(४५) **कमरिपा** – किंवा कंपरिपा. जाती लोहार. देश सालिपुत्र. अवधूतीचा शिष्य.

(४६) **जालंधरपा** – जालधारक किंवा आदिनाथ. जाती ब्राह्मण. तंतिपा, कण्हपा व मत्स्येंद्रनाथ यांचा गुरू.

(४७) **राहुलपा** – जाती शूद्र. देश कामरूप.

(४८) **घर्वरिपा** – किंवा घर्मरिपा. देश बोधिनगर.

(४९) **धोकरिपा** – जाती शूद्र. देश सालिपुत्र.

(५०) **मेदनीपा** – किंवा हालीपा. देश लाखपुय (?).

(५१) **पंकजपा** – जाती ब्राह्मण.

(५२) **(वज्र) घंटापा** – जाती क्षत्रिय. देश वारेंद्र (नालंदा). समकालीन राजा देवपाल.

(५३) **जोगिपा** – किंवा अजोगिपा. जाती डोम. देश उदंतपुरी. शवरपाचा शिष्य.

(५४) **चेलुकपा** – जाती शूद्र. देश भंगलपूर. अवधूतिपाचा शिष्य.

(५५) **गुंडरिपा** – किंवा गोरूरपा. जाती चिडीमार. देश डिसुनगर. लीलापाचा शिष्य.

(५६) **लुचिकपा** – जाती ब्राह्मण. देश भंगलदेश.

(५७) **निर्गुणपा** – जाती शूद्र. देश पूर्वदेश.

(५८) **जयानंत** – जाती ब्राह्मण. देश भागलपूर.

(५९) **चपंटीपा** – जाती कहार. देश चंपा. मीनपाचा गुरू.

(६०) **चंपकपा** – जाती राजकुमार (?).

(६१) **भिखनपा** – जाती शूद्र. देश सालिपुत्र.

(६२) **भलिपा** – जाती वणिक. देश सतपुरी.

(६३) **कुमरिपा** – देश जोमनश्रीदेश.

(६४) **चवरिपा** – किंवा जवरिपा-अजपालिपा.

(६५) **मणिभद्रा** – किंवा योगिनी. जाती गृहदासी. देश मगध. कुकुरिपाची शिष्या.

(६६) **मेखलपा** – किंवा योगिनी. जाती गृहपतिकन्या. देश अगचेनगर. कण्हपाची शिष्या.

(६७) **कनखलापा** – किंवा योगिनी. देश देवी कोट. कण्हपाची शिष्या.

(६८) **कलकलपा** – जाती शूद्र, देश भिरलिरनगर (?)

(६९) **कंतालीपा** – किंवा कथालीपा. जाती शिंपी. देश मणिधर (मैहर). कण्हपाचा शिष्य.

(७०) **धहुलिपा** – किंवा धहुरिपा. जाती शूद्र. देश धेकरदेश.

(७१) **उधलिपा** – किंवा उधरिपा. जाती वैश्य. देश देवीकोट. कर्णरिपाचा शिष्य.

(७२) **कपालपा** – किंवा कमलपा. जाती शूद्र. देश राजपुरी.

(७३) **किलपा** – जाती राजकुमार (?) देश प्रहर (?)

(७४) **सागरपा** – जाती राजा (?) देश कांची.

(७५) **सर्वभक्षपा** – जाती शूद्र. देश महर. शबरी व

मुसुकपा यांचा शिष्य. ग्रंथ करुणाचर्चाकपालदृष्टी.

(७६) **नागबोधिपा** – जाती ब्राह्मण. देश पश्चिम भारत. नागार्जुनाचा शिष्य.

(७७) **दारिकपा** – जाती राजा (?) देश ओडिसा. लूइपाचा शिष्य.

(७८) **पुतुलिपा** – जाती शूद्र. देश भंगलदेश.

(७९) **पनहपा** – किंवा उपानहपा. जाती चर्मकार. देश संधोनगर.

(८०) **कोकालिपा** – जाती राजकुमार (?) देश चंपारण्य.

(८१) **अनंगपा** – जाती शूद्र. देश गौड.

(८२) **लक्ष्मीकरा**– किंवा योगिनी. जाती राजकुमारी (?) देश संभलनगर (बिहार). राजा इंद्रप्रभूतीची वहीण.

(८३) **समुदपा** – देश सर्वडिदेश (गोरखपूर).

(८४) **भालिपा** – किंवा व्यालिपा. जाती ब्राह्मण. देश अपत्रदेश (?)

या नामावलीत जरी लूइपाचा पहिला क्रमांक असला, तरी तो चौऱ्यांयशी सिद्धांतील आदिपुरुष नव्हता. सरहपा हा त्यांच्यांतील पहिला सिद्ध होय. चौऱ्यांयशी सिद्धांमध्ये सरह, शबर, लूइ, दारिक, वज्रघंटा, जालंधर, कण्हपा व शांती हे विशेष प्रभावी ठरले. वज्रयान पंथाच्या प्रसाराचे अधिकांश श्रेय त्यांनाच दिले जाते. धर्म, दर्शन व आचार या सर्व बाबतींत त्यांचे विचार क्रांतिकारक होते. आपले विचार सामान्य लोकांना सहज समजावे, म्हणून त्यांनी लोकभाषेत काव्यरचना सुरू केली. [पु. त. नि.; म. च. को.; गो. च. प.]

चौल चूडाकर्म पाहा.

चौलिया नृत्य

कुमाऊं प्रदेशातील एक नृत्य. चौलिया म्हणजे तलवार. हातात तलवार घेऊन हे नृत्य करतात, म्हणून याला हे नाव मिळाले आहे. पूर्वी कुमाऊं लोकांत मुलगी पळवून आणून लग्न करण्याची पद्धत होती. त्याचे स्मारक असे हे नृत्य आहे. सांप्रत उत्सवाच्या व विवाहाच्या वेळी हे नृत्य करण्याची प्रथा आहे. रंगीबेरंगी कपडे घालून व तलवारी हातात घेऊन नर्तक दोन रांगा करून वराच्या पुढे चालतात. त्यांच्या मागे ढोल व वाजा वाजविणारे असतात. नर्तकांच्या हातात लाल झेंडा असतो. वधूचा विवाह त्याच वराशी झाला नाही, तर युद्धाला सुरवात होईल, असा त्या झेंड्याचा अर्थ असतो. म्हणून वराचे स्वागत केले जाते. या नृत्यातील अंगविक्षेप जोरकस असतात. [भा. लो. नृ.]

चौली हेपर

मुंडा लोकांचा एक विवाहविधी. लग्न लाग त्यानंतर नवरा मुलगा बोहल्यावर उभा राहतो. मग कोणीतरी नवऱ्या मुलीला कडेवर घेऊन बोहल्याभोवती तीन प्रदक्षिणा घालतो. त्या वेळी ती मुठीतले, माती मिसळलेले तांदूळ वराच्या डोक्यावर टाकते. तिचे इतर नातेवाईकही तसेच करतात. ती माती डोळ्यात जाऊ नये म्हणून नवऱ्या मुलाचे मित्र त्याच्या डोक्यावर एक वस्त्र टाकतात.

काही मुंडा लोकांत हा विधी थोडा वेगळा असतो. नवरी मुलगी हातात एक तांदूळाची टोपली घेते. नवरा मुलगा तिच्या मागे उभा राहून तिचे हात धरतो. मग अशा स्थितीत ती दोघ मांडवाभोवती तीन प्रदक्षिणा घालतात. त्या वेळी वधू हातातील टोपली हालवून त्यातले तांदूळ खाली सांडते. या विधीचा अर्थ असा, की यापुढे ती दोघे मिळून काम करतील व एकमेकांना मदत करतील.

हा विधीं झाल्यावर मुलगी वराचा हात धरून त्याला घरात नेते व ती दोघे एका चटईवर बसतात. मग दोन्ही पक्षांतील सुवासिनी त्यांच्या भोवती बसतात व त्यांची चेष्टामस्करी करतात. या वेळी सर्वजण मद्य पितात. [एन्सा. मुं.]

चौलुक्य राजवंश

इ. स. ९४१ च्या सुमारास मूलराज नामक पुरुषाने सारस्वतमंडळ हा प्रदेश जिंकून तिथे चौलुक्य वंशाचे राज्य सुरू केले. अणहिलपाटण ही त्याची राजधानी होती. त्यापूर्वी तिथे चाप वंशाचे राज्य होते. त्या वंशातील शेवटचा राजा सामंतसिंह हा मूलराजाचा मामा होता. मलराज हा प्रथम सामंतसिंहाचा सेनापती होता. पुढे त्याने आपल्या मामाचे राज्य हस्तगत केले.

चौलुक्य हे चालुक्य या नावाचेच एक रूप होय, असे काही पंडित मानतात; पण ते बरोबर नाही. कारण त्या दोन्ही वंशांच्या उगमासंबंधी भिन्न भिन्न आख्यायिका प्रचलित आहेत. चौलुक्य वंश सोळंकी या नावानेही ओळखला जातो. राजपुतांच्या चार अग्निकुलांत याचा समावेश होतो.

मूलराज फार महत्त्वाकांक्षी होता. त्याने प्रथम वर्धमान नगरीवर स्वारी करून तिथले चापांचे राज्य जिंकले. नंतर त्याने कच्छ प्रदेशावरही आपली सत्ता स्थापली. परंतु चाहमान राजा विग्रहराज याच्या आक्रमणाला तो प्रतिकार करू शकला नाही. विग्रहराजाने सारस्वतमंडळ पादाक्रांत करून नर्मदेपर्यंत धडक मारली, तेव्हा मूलराजाने त्याच्याशी तह केला. परमार राजा मुंज यानेही त्याचा मोठा पराभव केल्यामुळे तो काही काळ मारवाडमध्ये पळून गेला होता. नंतर त्याने आपले राज्य परत मिळवले खरे; पण कलचुरी वंशातील लक्ष्मण यानेही

त्याचा नंतर पराभव केला. तथापि मूलराजाने पुन्हा आपली सत्ता प्रस्थापित केली. त्याचे राज्य उत्तरेस सांचोरपर्यंत व दक्षिणेस साबरमतीपर्यंत पसरले होते. इ. स. ९९५ च्या सुमारास त्याने आपले राज्य आपला पुत्र चामुंडराज याला दिले.

चामुंडराजाच्या वेळी परमार सिंधुराज याने सारस्वत मंडळावर स्वारी केली, पण चामुंडराजाने ती परतवून लावली. मात्र कलचुरी राजा कोक्कल्ल (दुसरा) याच्या सामर्थ्यापुढे त्याला नमावे लागले. चामुंडराजाने इ. स. १००८ पर्यंत राज्य केले. त्यानंतर त्याचा द्वितीय पुत्र दुर्लभराज गादीवर बसला. त्याने आपल्या राज्याचे रक्षण तर केलेच; शिवाय लाट प्रदेशावर स्वारी करून तिथे राज्य करणारा कीर्तिराज याला आपले प्रभुत्व मान्य करायला लावले (इ. स. १०१८).

चौलुक्यांच्या एका शाखेतील बारप्प नामक पुरुष चालुक्य तैल (दुसरा) याचा सेनापती होता. त्याने लाट प्रदेशातील राष्ट्रकूटांच्या सामंताचा पराभव करून तिथे आपले राज्य स्थापले होते. मूलराजावर चाहमान विग्रहराज याने स्वारी केली, तेव्हा बारप्पानेही दक्षिणेकडून सारस्वतमंडळावर चढाई केली. पुढे चामुंडराजाने त्याच्यावर स्वारी करून त्याला ठार मारले व लाट देशावर सत्ता स्थापली. पण बारप्पाचा मुलगा गोंगिराज याने आपले राज्य परत घेतले. त्याचा पुत्र कीर्तिराज याचा दुर्लभराजाने पराभव केला. त्यानंतर वत्सराज व त्रिलोचनपाल यांनी लाट देशावर इ. स. १०५१ पर्यंत राज्य केले.

इ. स. १०२२ च्या सुमारास दुर्लभराज याने आपला पुतण्या भीमदेव (पहिला) याला सिंहासनावर बसवले; पण इ. स. १०२५ मध्ये गज़नीचा सुलतान महमूद याने गुजरात पादाक्रांत करून सोमनाथपाटण लुटले, तेव्हा हा भीमदेव कच्छमध्ये पळून गेला आणि सुलतानाचे सैन्य निघून गेल्यानंतर परत येऊन राज्य करू लागला.

इ. स. १०३१ च्या सुमारास भीमदेवाने अबूपर्यंतचा प्रदेश परमारांकडून घेतला. त्यानंतर त्याने परमार व चोहमान राजांशी युद्धे केली.

इ. स. १०६४ मध्ये भीमदेवाने आपला पुत्र कर्ण याला राज्य देऊन वानप्रस्थाश्रम स्वीकारला. कर्ण याने नवसारीपर्यंत सत्ता स्थापन करून त्रैलोक्यमल्ल ही पदवी घेतली. त्याने चालुक्यांच्या मदतीने परमार जयसिंहाचा पराभव करून माळवाही जिंकला; पण नंतरच्या परमार राजांनी कर्णाचा पराभव करून माळवा घेतला.

कर्णाच्या मृत्यूनंतर त्याचा पुत्र जयसिंह गादीवर बसला (इ. स. १०९४). तो लहान होता तोपर्यंत त्याची माता मयणल्लदेवी हिने राज्यकारभार केला. जयसिंह फार पराक्रमी निघाला. त्याने सिद्धराज ही पदवी घेतली होती. सौराष्ट्रातील आभीरांचा पराभव करून तो प्रदेश जयसिंहाने जिंकला. त्याचप्रमाणे परमारांकडून भिन्नमाळही घेतले. नड्डुल व शाकंभरी येथील चाहमान राजे त्याचे मांडलिक झाले. नंतर त्याने माळवा जिंकला. त्याने कालंजरवर स्वारी करून चंदेलांकडून भिलसा नगरी जिंकली. चालुक्य विक्रमादित्य (सहावा) याचाही जयसिंहाने पराभव केला.

मात्र जयसिंहाच्या राजवटीच्या अखेरीस परमार राजा जयवर्मन याने माळवा परत घेतला आणि नाडोलच्या चाहमान आशाराजानेही चौलुक्यांची सत्ता झुगारून दिली.

जयसिंह शिवभक्त होता. त्याने सिद्धपूर येथे रुद्रमहाकालाचे मंदिर बांधले. परमार राजा भोजाप्रमाणेच तो विद्येचा पुरस्कर्ता होता. त्याने ज्योतिष, न्याय, पुराण या विषयांच्या अध्ययनासाठी पाठशाळा स्थापन केल्या. प्रसिद्ध जैन पंडित हेमचंद्र याला जयसिंहाच्या दरबारात मोठा मान होता.

इ. स. ११४३ च्या सुमारास जयसिंह निपुत्रिक मरण पावला. तेव्हा भीमदेव (पहिला) याच्या एका दासीपुत्राचा वंशज कुमारपाल याने ते सिंहासन हस्तगत केले. तोही शैवच होता. पण जैन लोकांनी त्याला राज्य मिळवण्यासाठी मदत केल्यामुळे त्याने हेमचंद्राकडून जैन धर्माची दीक्षा घेतली. चाहमान व परमार राजांनी गुजरातवर एकदम आक्रमण केले; पण कुमारपालाने त्यांचा पराभव करून माळवा आपल्या राज्यास जोडला. इ. स. ११५० मध्ये त्याने चाहमान अर्णोराज याच्या सपादलक्ष देशावर स्वारी करुन त्याचा पराभव केला. मात्र अर्णोराजाला त्याने पदच्युत केले नाही. त्यानंतर इ. स. ११६० ते ६२ या अवधीत त्याचा मंत्री अंबड याने कोकण देश जिंकला.

कुमारपालाने आपल्या साम्राज्यात पशुहत्येला बंदी केली होती. मात्र जैन धर्म स्वीकारल्यानंतरही त्याने आपले कुलदैवत असलेल्या शिवाचा मानसन्मान चालू ठेवला. जैन मंदिरांप्रमाणेच त्याने हिंदू मंदिरेही बांधली.

कुमारपाल इ. स. ११७२ मध्ये मरण पावला, तेव्हा त्याचा पुतण्या अजयपाल व भाचा प्रतापमल्ल यांच्यांत सिंहासनासाठी संघर्ष झाला. त्यात अजयपाल यशस्वी ठरला. अजयपालाला ब्राह्मणांचा पाठिंबा होता, तर प्रतापमल्लाला जैनांचा. अजयपालाने चाहमान व परमार यांच्या राज्यांवर आपले प्रभुत्व कायम ठेवले आणि गुहिल राजा सामंतसिंह याचे आक्रमण परतवून लावले. अजयपालाने जैनांचा छळ केला व जैन मंदिरे पाडली, असे जैन ग्रंथांवरून कळते. इ. स. ११७६ च्या सुमारास प्रतीहार राजा वयजलदेव याच्या हातून तो मारला गेला. त्या वेळी त्याचा पुत्र मूलराज (दुसरा) लहान होता. त्याला

सिंहासनावर बसवून त्याची माता, राणी नाईकीदेवी राज्य करू लागली. इ. स. ११७८ मध्ये मुहंमद घोरीने गुजरातवर स्वारी केली, तेव्हा तिने स्वतः त्याला पराभूत केले; पण मूलराज लवकरच मरण पावला व त्याचा धाकटा भाऊ भीम (दुसरा) गादीवर बसला. तोही लहान होता. त्यामुळे त्याच्या राज्यातील अनेक प्रांताधिकारी स्वतंत्र झाले व केंद्रसत्ता दुबळी झाली. अशा परिस्थितीत व्याघ्रपल्लीचा अर्णोराज (वाघेला) त्याच्या साहाय्यास आला व त्याने सर्वत्र केंद्रसत्ता प्रस्थापित केली. त्या खटाटोपात अर्णोराज मारला गेला. नंतर त्याचा पुत्र लवणप्रसाद याने राज्याची सूत्रे हाती घेतली. त्या वेळी यादव व परमार राजांनी गुजरातवर आक्रमण केले; पण लवणप्रसादाने त्यांचा यशस्वी प्रतीकार केला. इ. स. ११९७ साली कुत्बुद्दीन ऐबक याने गुजरातवर स्वारी करून अणहिलवाड लुटले होते; पण तो लवकरच गुजरात सोडून परत गेला. भीम (दुसरा) याने ६० वर्षे राज्य केले. त्या अवधीत लवणप्रसाद, त्याचा पुत्र वीरधवल आणि त्यांचे मंत्री वस्तुपाल व तेजपाल यांनीच राज्याचे रक्षण केले. लवणप्रसाद व वीरधवल हेच गुजरातचे खरे राजे होते. भीम (दुसरा) याची सत्ता नाममात्र होती. त्याच्यानंतर लवकरच चौलुक्य वंशाची सत्ता नष्ट झाली आणि गुजरातवर वाघेला घराणे राज्य करू लागले. [ए. इं.– मजु.; हि. क. इं. पी.]

चौव्वीस तीर्थंकर व्रत

एक जैनव्रत. यात चौव्वीस तीर्थंकरांसाठी चौव्वीस उपवास करतात व ‘ ॐ ह्रीं ऋषभादिचतुर्विंशतितीर्थङ्करेभ्यो नमः ’ या मंत्राचा त्रिकाल जप करतात. [जै. व्र. वि. सं.]

चौसष्ट योगिनी

योगिनीतंत्रात चौसष्ट योगिनींच्या उत्पत्तीची कथा दिलेली आहे, ती अशी– एकदा प्रलय झाला आणि त्या प्रलयात सर्व ब्रह्मांड नष्ट झाले. पृथिव्यादी पंचमहाभूते व महेश-महेशानी एवढी फक्त शिल्लक राहिली. आपण निर्माण केलेले ब्रह्मांड नष्ट झाल्यामुळे आपणास राहायला जागा उरली नाही, हे पाहून महेशाला विवंचना पडली. आपल्या वास्तव्यासाठी एखादे ठिकाण निर्माण कर, असे त्याने महेशानीला सांगितले. महेशानीला या गोष्टीचा राग आला. ती महेशाला टाकून बोलली. महेशाला ते बरे वाटले नाही. त्याने आपल्या शरीराचे भस्म करून त्यापासून घोर नावाचा एक राक्षस उत्पन्न केला व त्याला अणिमादी अष्टसिद्धी दिल्या. पुढे महेशानी पश्चिम दिशेकडे गेली असता तो घोर राक्षस तिला दिसला. राक्षसाचीही तिच्यावर नजर गेली. ती आपणास वश व्हावी, म्हणून तो तिचा अनुनय क लागला. त्यावर महेशानी त्याला म्हणाली. ‘ हे दानवेंद्रा, तू अत्यंत वीर्यशाली आहेस, तथापि मला तुला वरता येणार नाही. कारण जो कोणी मला युद्धात जिंकील त्यालाच मी वरीन, अशी माझी प्रतिज्ञा आहे. ’ ते ऐकून घोर दानव संतापला. त्याने तिच्याशी युद्ध मांडले व अनेक प्रकारांनी तिचा पराभव करण्याचा प्रयत्न चालवला. या युद्धात घोरापुढे महेशानीचा निभाव लागणार नाही, हे जाणून महेशाला चिंता उत्पन्न झाली. त्याने मग लघुरूप धारण करून महेशानीच्या शरीरात प्रवेश केला. त्यामुळे घोराचे सर्व प्रयत्न हरले. घोर अशा प्रकारे हताश झालेला पाहून महेशानी त्याला म्हणाली, ‘ हे घोरा, ज्या अर्थी तू माझ्या प्राप्तीसाठी भगीरथ प्रयत्न चालवले आहेस, त्या अर्थी तू महेशावाचून दुसरा कोणी नाहीस. म्हणून मी तुला ब्रह्मानंदाची प्राप्ती करून देणारे माझे रू दाखवते. ’

असे म्हणून महेशानीने पाहता पाहता एक भयानक रू धारण केले. त्या वेळी तिच्या तेजोमंडळातून प्रत्येक किरणागणिक सूर्यासारख्या तेजस्वी, युयुत्सू, भयंकर गर्जना करणाऱ्या व महापराक्रमी अशा योगिनी नावाच्या अनेक स्त्रिया नि प्रकट झाल्या. महेशानीची ती रूपे पाहून घोर दानव मूर्च्छित झाला व त्यानंतर त्याला ब्रह्मज्ञानाची प्राप्ती झाली.

या योगिनींची संख्या चौसष्ट सांगितली आहे. चौसष्ट ही संख्या निश्चित असली, तरी काही ठिकाणी त्यांच्या नावांत फेरबदल आहेत. चौसष्ट योगिनींची पुढील नामावली स्कं पुराणाच्या काशीखंडातून घेतलेली आहे–

(१) ब्रह्माणी (२) कुमारी (३) वाराही (४) (५) रुद्राणी (६) किंकाली (७) कराली (८) काली (९) महाकाली (१०) चामुंडा (११) ज्वालामुखी (१२) कामाख्या (१३) भद्रकाली (१४) दुर्गा (१५) अंबिका (१६) ललिता (१७) गोरवी (१८) सुमंगला (१९) रोहिणी (२०) कपिला (२१) शूलकरा (२२) कुंडलिनी (२३) त्रिपुरा (२४) कुरुकुल्ला (२५) भैरवी (२६) चंपावती (२७) (२८) निरंजना (२९) हेमवती (३०) प्रेतासना (३१) ईश्वरी (३२) वैश्वानरी (३३) विनायकी (३४) (३५) सरस्वती (३६) तोतिला (३७) वैष्णवी (३८) वंदी (३९) संशनी (४०) पद्मिनी (४१) चित्रिणी (४२) वारुणी (४३) यमभगिनी (४४) सूर्यपुत्री (४५) (४६) कृष्णवाराही (४७) रक्ताक्षी (४८) कालरात्री (४९) आकाशी (५०) श्रेष्ठिनी (५१) जया (५२) विजया (५३) इमवती (५४) वागेश्वरी (५५) कात्यायनी (५६)

होत्री (५७) चक्रेश्वरी (५८) महाविद्या (५९) ईशानी (६०) भवानी (६१) भुवनेश्वरी (६२) चक्रेश्वरी (६३) मोहरात्री (६४) थी (घी) देवी. [प्रा. भा. लो.; योगिनीतंत्र]

चौहान (१) छत्तीसगड भागातली एक जात. हे चंदेल या नावानेही ओळखले जातात. हे स्वतःला राजपूत वंशाचे मानतात. यांच्यांतील बहुतेक कुळांची नावे देवकांवरून पडली आहेत. उदा० नाग, नेवरा, कोल्हिआ, खांड, इत्यादी. स्थानिक स्त्रियांना राजपूत पुरुषांपासून झालेले म्हणून यांना इतर जातींचे लोक हीन समजतात.

हे लोक दुर्गादेवीचे उपासक आहेत. आश्विन व चैत्र या महिन्यात ते देवीसाठी उपास करतात. ग्रामरक्षण हे या लोकांचे मुख्य काम होय. लाठी हे यांचे शस्त्र असून, दसऱ्याच्या दिवशी ते तिची पूजा करतात.

यांच्या लग्नसमारंभात एक विचित्र विधी पाहायला मिळतो. वधूगृही जायला निघण्यापूर्वी वराच्या मस्तकावर मातीचे सात लहान पुरवे पाण्याने भरून ठेवतात. मग ते पाणी त्याच्या डोक्यावर ओततात. त्यानंतर कापडाचा एक तुकडा त्याच्या डोक्यावर ठेवून तो सात वेळा जमिनीवर पसरतात. त्या वेळी वराने डोळे मिटून ठेवायचे असतात. कारण मधेच डोळे उघडले तर त्याची मुले अंध होतात, अशी समजूत आहे. वधू सासरी जायला निघते, तेव्हा तिच्यासह सर्व नातेवाईक मोठ्याने रडू लागतात.

हे लोक प्रेते जाळतात. दहा दिवस सुतक पाळतात व दहाव्या दिवशी क्षौर करून श्राद्ध व दानधर्म करतात. [ट्रा. का. सें. प्रॉ. इं.]


चौहान राजपूत

(२) राजपुतान्यातील सर्व वंशांत हा वंश वीरतेसाठी प्रसिद्ध होता. राजपुतांच्या चार अग्निकुलांत याचा समावेश होतो. चाहमान हे याच वंशाचे दुसरे नाव आहे. हाडा, देवडा, सोनगरा, निर्वान पुर्विया, सांचोरा, इ. पराक्रमी जाती याच वंशातून आपला उदय झाल्याचे मानतात. शाकंभरीमाता ही यांची कुलदेवता होती.

इ. स. च्या १४ व्या शतकात वरेच चौहान राजपूत बाटून मुसलमान झाले. त्यांच्यांतील प्रमुख दल कायमखानी या नावाने प्रसिद्ध आहे.

चौहान लोक गोगा या पुरुषाला विशेष मानतात व त्याच्या नावाने गंडा बांधतात. हा गंडा बांधल्यामुळे साप चावला तरी मनुष्य मरत नाही, अशी त्यांची समजूत आहे. पाहा – कायमखानी मुसलमान; चाहमान राजवंश. [रा. जा.]

चौक्ष प्राचीन काळातील भागवतांचा एक संप्रदाय. या संप्रदायाचे अनुयायी एकायन या नावाने प्रसिद्ध होते, असे अभिनवगुप्त सांगतो. भागवतात यांना भगवन्प्रपन्न एकान्ती असे म्हटले आहे. भरतानेही नाट्यशास्त्रात या लोकांचा उल्लेख केला आहे. हे शिवाशिव फार पाळीत असत. गुजरातमधील स्वामीनारायण पंथाचे अनुयायीही शिवाशिव पाळणारे असून त्यांना चौखलिया असे म्हणतात. प्राचीन चौक्ष शब्दाचेच चौखलिया हे रूप झाले असावे. [शृं. हा.]

छंद वेदाचे पाचवे अंग. वेदातील मंत्रांच्या उच्चारणासाठी छंदाचे ज्ञान आवश्यक असते. छंदाचे लक्षण असे– 'यदक्षरपरिमाणं तच्छन्दः' = ज्या रचनेत विशिष्ट अक्षरांचे परिमाण असते, तो छंद होय (सर्वानुक्रमणी). ऋग्वेदाच्या प्रत्येक सूक्ताची देवता, ऋषी व छंद यांचे ज्ञान आवश्यक मानलेले आहे. कात्यायन सर्वानुक्रमणीत सांगतो–

यो ह वा अविदितार्षेयच्छन्दो-दैवत-ब्राह्मणेन मन्त्रेण याजयति वा अध्यापयति वा स्थाणुं वच्छंति गर्तें वा पात्यते प्रमीयते वा पापीयान् भवति ।

अर्थ – जो कोणी एखाद्या मंत्राचा ऋषी, छंद, देवता व विनियोग न जाणता त्या मंत्राने दुसऱ्यांकडून यजन करवितो, किंवा त्याचे अध्यापन करतो, तो खांबाशी टक्कर देतो, खड्डयात जाऊन पडतो किंवा पापी होतो.

यास्काने छंद शब्दाची व्युत्पत्ती छद् = झाकणे या धातूवरून दिली आहे. 'छन्दांसि छादनात् ।' = छंदाना छंद हे नाव मिळण्याचे कारण असे, की ते वेदांचे आवरण आहेत (निरुक्त ७.१९). चद् = आल्हाद देणे, यावरूनही निघंटूत छंद शब्द व्युत्पादिला आहे.

संहिता व ब्राह्मण या ग्रंथांत गायत्री, उष्णिक्, अनुष्टुभ्, बृहती, पंक्ती, त्रिष्टुभ् व जगती या प्रधान छंदांची नावे

आलेली आहेत. यावरून छंद या वेदांगाची उत्पत्ती वैदिक कालातच झाली असावी, असे वाटते. पिंगलाचार्यांचा छंदः–सूत्र हा ग्रंथ या वेदांगाचा प्रतिनिधी आहे.

पाणिनीय शिक्षेत ' छन्दः पादौ तु वेदस्य ' = छंद हे वेदांचे चरण होत, असे म्हटले आहे. मनुष्याला जसा पायांचा आधार महत्त्वाचा असतो, त्याचप्रमाणे वैदिक मंत्रांनाही छंदांचा आधार महत्त्वाचा वाटतो.

छंदांविषयी वैदिक वाङ्‌मयात ज्या अनेक कथा आलेल्या आहेत, त्यांपैकी एक अशी–

पूर्वी सोमराजा स्वर्गलोकात राहत होता. त्याची प्राप्ती आपल्याला कशी होईल, याविषयी देव आणि ऋषी विचार करू लागले. मग ते गायत्र्यादी छंदांना म्हणाले, की 'तुम्ही आमच्यासाठी सोमराजाला आमच्याकडे घेऊन या.' तेव्हा छंदांनी पक्ष्याचे रूप घेतले आणि ते स्वर्गात गेले.

सोमप्राप्तीसाठी छंद निघाले, त्या वेळी ते सगळे चार अक्षरीच होते. त्यांपैकी चतुरक्षरा जगती प्रथम निघाली. पण अर्ध्या वाटेत गेल्यावर ती थकली, म्हणून तिने आपली तीन अक्षरे टाकून दिली आणि ती एकाक्षरा होऊन पुढे गेली. पण या लघुत्वामुळेच तिला स्वर्गातून सोम पृथ्वीवर आणता येईना. तेव्हा तिथून सोमयागासंबंधी दीक्षा व क्षीरपानादिरूप तप या दोन गोष्टी घेऊन ती परत फिरली.

जगतीच्या मागून त्रिष्टुभ् निघाली. तीही अर्ध्या वाटेवर गेल्यावर थकली व तिने आपले एक अक्षर टाकून दिले. तिलाही सोम आणता आला नाही. त्र्यक्षरा होऊन ती मूलोकी परत आली.

नंतर देवांनी सोमराजाला घेऊन येण्याविषयी गायत्रीला सांगितले. तिने देवांचे म्हणणे मान्य करून त्यांना स्वस्त्ययन मंत्र म्हणायला सांगितले. नंतर ती सोमाकडे गेली. सोमरक्षकांना मिळवून तिने दूर पिटाळले आणि आपल्या पायांनी व मुखाने तिने सोमाचे ग्रहण केले. त्याचबरोबर इतर छंदांनी टाकलेली चार अक्षरेही घेऊन ती परत फिरली.

गायत्री सोम घेऊन परत आल्यावर त्रिष्टुभ् व जगती तिच्याकडे आपली अक्षरे परत मागू लागल्या. पण गायत्रीने ती दिली नाहीत. त्यामुळे गायत्री आठ अक्षरांची, त्रिष्टुभ् तीन अक्षरांची व जगती एका अक्षराची झाली.

अष्टाक्षरा गायत्रीने प्रातःसवन तडीला नेले; पण त्र्यक्षरा त्रिष्टुप्‌कडून माध्यंदिनसवन तडीला जाईना. तेव्हा गायत्री तिला म्हणाली, की 'तू जर मला यज्ञातला भाग देशील, तर मी तुला साहाय्य करीन.' त्रिष्टुप्‌ने ती गोष्ट मान्य केली आणि तिने आपल्या आठ अक्षरांसह गायत्रीला आपल्यात प्रवेश करायला सांगितले. गायत्रीने त्याप्रमाणे केल्यावर त्रिष्टुभ् अकरा अक्षरांची बनली व त्यामुळे तिला माध्यंदिनसवन तडीला नेता आले.

त्याचप्रमाणे एकाक्षरा जगती तृतीयसवन पार पाडण्यास असमर्थ ठरली. तेव्हा तृतीयसवनात आपल्याला भाग मिळेल, या अटीवर गायत्रीने जगतीला साहाय्य देण्याचे कबूल केले. जगतीने मग गायत्रीला आपल्या अकरा अक्षरांसह आपल्यात प्रवेश करायला सांगितले. गायत्रीने तसे करताच जगती बारा अक्षरांची झाली आणि तिला तृतीयसवन पार पाडता आले.

तेव्हापासून गायत्री आठ अक्षरांची, त्रिष्टुभ् अकरा अक्षरांची व जगती बारा अक्षरांची झाली.

गायत्री छंदात एकूण २४ अक्षरे असतात. तो छंद त्रिपदी म्हणजे तीन चरणांचा असतो. उष्णिक् छंदात २८, अनुष्टुभ् छंदात ३२, बृहती छंदात ३६, पंक्ती छंदात ४०, त्रिष्टुभ् छंदांत ४४ व जगती छंदात ४८ अक्षरे असतात. वेदातील बहुतांश मंत्रभाग या सात छंदांतच रचलेला आहे. कात्यायनाने सर्वानुक्रमणीत ऋग्वेदाच्या सर्व मंत्रांच्या छंदांचा निर्देश केला आहे. त्यानुसार ऋग्वेदात गायत्रीचे २४६७ मंत्र; उष्णिक्‌चे ३४१ मंत्र; अनुष्टुभ्‌चे ८५५ मंत्र; बृहतीचे १८१ मंत्र; पंक्तीचे ३१२ मंत्र; त्रिष्टुप्‌चे ४२५३ मंत्र व जगतीचे १३५८ मंत्र आहेत. सुमारे ३०० मंत्र अतिजगती, शक्वरी, अतिशक्वरी अष्टी, अत्यष्टी, इ. अन्य छंदांत आहेत. एकपदा ऋचा सहा असून, नित्य द्विपदा सतरा आहेत. या सूचीवरून ऋग्वेदात त्रिष्टुभ् छंदाचा सर्वांत अधिक प्रयोग केलेला दिसतो. त्याच्या खालोखाल गायत्री व जगती या दोन छंदांचा क्रम लागतो.

या वैदिक छंदांपासूनच पुढे संस्कृतातील लौकिक छंदांचा विकास झाला. संस्कृत कवींनी कर्णमाधुर्य व संगीतमय आरोह-अवरोह यांच्याकडे लक्ष पुरवून याच छंदांतील अक्षरांचे लाघव-गौरव नियमबद्ध केले आहे. अनुष्टुभ् छंदाचा लौकिक आविष्कार महर्षी वाल्मीकीने केला, असे रामायणात सांगितले आहे. अन्य लौकिक छंदांच्या आविष्कर्त्यांची नावे मात्र लुप्त झाली आहेत. वैदिक त्रिष्टुभ् छंदापासून एकादशाक्षर छंदांचा, विशेषतः इंद्रवज्रा व उपेंद्रवज्रा यांचा उदय झाला. जगतीपासून द्वादशाक्षर वंशस्थ व शक्वरीपासून वसंततिलका यांची उत्पत्ती झाली आहे.

कात्यायनाच्या सर्वानुक्रमणीच्या नंतर छंदःशास्त्रावर लिहिणारा ग्रंथकार म्हणजे महर्षी पिंगल हा होय. छंदःसूत्रे या त्याच्या ग्रंथाचे आठ अध्याय असून, त्यात वैदिक व लौकिक छंदांचे वर्णन आहे. आपल्या ग्रंथात त्याने एक कोटी, एकसष्ट लाख, सत्याहात्तर हजार, दोनशे सोळा प्रकारच्या वर्णवृत्तांचा

उल्लेख केला आहे. या प्रचंड संख्येपैकी संस्कृत साहित्यात फक्त पन्नास छंदांचाच उपयोग केलेला आढळतो.

पं. घनराजशास्त्रीं यांनी छंद:शास्त्रावरील पुढील सहा ग्रंथांची नावे दिली आहेत– (१) छांदोर्णव – श्लोकसंख्या १लाख ३२ हजार (२) विष्णुसूत्र – श्लोकसंख्या २५ हजार (३) छांदोरहस्य – श्लोकसंख्या १६ हजार (४) छंद:प्रभाकर – श्लोकसंख्या १२ हजार (५) छंद:प्रदेश – श्लोकसंख्या ३२ हजार. (६) छंदरत्नाकर – श्लोकसंख्या ७ हजार.

याशिवाय छंद:सारसंग्रह, छंदोऽनुशासन, प्राकृत पैंगल, वाणीभूषण, वृत्तमणिकोष, वृत्तरत्नाकर, इ. अनेक छंदोग्रंथ प्रसिद्ध आहेत. [वै. सा. सं.; वै. सा.; ऋ. द.; हिंदुत्व; वै. नि.]

छंदगाणे पंजाबातील भंडारी समाजात नवरामुलगा सासुरवाडीच्या मंडळीपुढे छंद नावाची गाणी गातो व त्यात सासुरवाडीच्या नातलगांची नावे गुंफतो. या छंदाचा एक नमुना पुढीलप्रमाणे आहे –

छंदे पराके आइये जाइये । छंदे परागे घडो ॥
अंदर गोपिया नहावदिया । वहार श्रीकृष्णजी खडा ।।
छंदे पराके आइये जाइये । छंद परागे आला ।।
मैं परमेश्वर को लुं । जैसा मंगदा साला ॥

तो जितके छंद गायील, तितके रुपये त्याला सासुरवाडीच्या माणसांकडून मिळतात. [भं. ज्ञा. इ.]

छंदःशास्त्र लाखो वर्षांपूर्वी मानवप्राणी बोलू लागला, तेव्हां त्याची भाषा कशी होती, याचे ज्ञान अजूनही शास्त्रज्ञांनाझालेले नाही. अनेकांनी अनेक उपपत्ती सुचविल्या आहेत. त्यतील एका उपपत्तीप्रमाणे मानवाची प्रारंभीची भाषा Sing-song धर्तीची म्हणजे काहीतरी गायल्यासारखे बोलण्याची स्वभावी. ते खरे असल्यास लयबद्ध किंवा छंदोबद्ध वाणी आदिमानवापासून चालत आली आहे, असे म्हणावे लागेल.

एक गोष्ट निश्चित आहे, की मानवी साहित्याचे सर्वात जुने नमुने छंदोबद्ध आहेत. भारतीयांचे वेद छंदोमयी वाणीत आहेत. ग्रीक लोकांचे प्राचीन साहित्य छंदोबद्ध आहे. होमरच्याही पूर्वी ग्रीस देशात पद्यकार होऊन गेले होते, असा उल्लेख होमर आपल्या म्हाकाव्यात करतो. पारसिकांचे वेदतुल्य वाङ्मय झेंद अवेस्ता ही छंदोबद्ध आहे. हिब्रू बायबल लयबद्ध चरणात रचलेले आहे लॅटिन भाषेतील प्राचीन ग्रंथही छंदोबद्धच आहेत.

भारतीयांचे प्राचन साहित्य वेदसंहिता हे होय. या वेदसंहितांतच गायत्री, उष्णिक्, अनुष्टुभ्, बृहती, पंक्ती, त्रिष्टुभ्, जगती, इ. छंदांचें उल्लेख आहेत.

प्राचीनतम काळी धर्म-भक्ती व काम-रती या माणसाच्या दोन प्रबळ वासनांचा बाह्य आविष्कार लयबद्ध नृत्य व गान यांच्या द्वारे होत असे. वैदिक सूक्ते ही देवतांच्या स्तुतिपरच रचलेली आहेत. त्यामुळे छंदस् ही संज्ञा वेदमंत्रवाचकही बनली आहे. वेदकालीन इष्टदेवतेला वृत्तांनी संतुष्ट केले, म्हणून त्या वैदिक वृत्तांना छंदस् म्हणतात, असे शतपथ ब्राह्मणात म्हटले आहे (८. ५. २१). यज्ञाने देव संतुष्ट होतात. इतकेच नव्हे; तर यज्ञातील कृत्ये स्वत: देवही करतात. ती कर्मे छंदांच्या साहाय्यानेच केली जातात. यामुळे छंद हा यज्ञविषयक मंत्रांचा अपरिहार्य भागच आहे.

प्राचीन छंदोविचिती —ग्रीक भाषेत ख्रिस्तपूर्व चौथ्या शतकातछंदांचा अभ्यास बराचसा परिपूर्ण झाला होता. ध्वनिउच्चारविद्येची आवश्यक तेवढी प्रगती झालेली होती, लयबद्धतेच्या मौलिक अंगांची माहिती झालेली होती, ल-ग-क्रमावर आधारलेल्या छंदांचे विश्लेषण झालेले होते आणि कोणत्या काव्यप्रकाराला कोणता छंद वापरावा, तेही निश्चित केले गेले होते. त्याचप्रमाणे छंदांमागची मानसवैज्ञानिक व गणितशास्त्रीय बैठकही चर्चिली जात होती.

हिब्रू बायबलमधील पद्यचरणांत दोन भाग असून, त्यांत सारख्या किंवा पूरक कल्पना येतात. केवळ अक्षरसंख्येवर किंवा समानाक्षरतेवर यातील छंद अवलंबून असतात. अवेस्तामध्ये अक्षरसंख्या हेच परिमाण आहे. भारतीय वेदछंदांतही अक्षर हेच मूळ परिमाण आहे. मात्र वेदांत जे विशेष स्वर येतात, ते त्यांचे एक खास वैशिष्टय आहे. उदात्त, अनुदात्त व स्वरित अशी त्यांची नावे आहेत. प्रत्यक्ष पद्यरचनेच्या दृष्टीने त्यांचे महत्त्व मानलेले नाही. त्यांचे कार्य अर्थनिश्चितीच्या कामी असते आणि त्यांच्यामुळे वैदिक मंत्रांच्या पठनात आरोहावरोह व आंदोलने येऊन एक प्रकारचे संगीत भासमान होते.

वैदिक छंद – वेदांतील छंद अक्षरनिर्भर आहेत. छंदांचे चरण घेऊन त्यांतील अक्षरे सांगण्याची वैदिक पद्धती रूढ होण्यापूर्वी समग्र छंदांतील अक्षरे मोजली जात. २३ अक्षरांपर्यंतची वृत्ते सविशेष असतात. पुढे २४ तें ४८ अक्षरांचे सात अतिच्छंद मानले गेले. त्यापुढे कृती येत. त्यांचा उल्लेख व प्रकार वाजसनेयी संहितेत आलेले आहेत.

८ अक्षरांचा अनुष्टुभ्, ११ चे त्रिष्टुभ्, १२ ची जगती अशी वैदिक छंदांची उत्तरोत्तर वाढ झालेली आहे. त्रिपदा गायत्री म्हणजे तीन अनुष्टुभ् चरणांचा छंद, चतुष्पदी अनुष्टुभ्-त्रिष्टुभ्-जगती, पंचपदी पंक्ती, षट्पदी महापंक्ती, असे

वेगवेगळे चरणबंध तयार होतात. दोन ते आठ चरण असलेल्या श्लोकबंधांचे वेगवेगळे सुमारे ८८ प्रकार श्री व्हर्नान अर्नोल्ड यांनी आपल्या वेदिक मीटर नामक ग्रंथात दिलेले आहेत. यात सारख्याच अक्षरसंख्येचे चरण व वेगवेगळ्या अक्षरसंख्येचे चरण येऊनही हे छंद बनलेले आढळतात. श्री अर्नोल्ड यांनी दिलेले अतिधृतीचे (१२. १२. ८. ८. ८. १२. ८. ८.) उदाहरण हा सर्वांत मोठा पद्यबंध दिसतो.

प्राचीन छंदःशास्त्राने वैदिक पादांत विराम किंवा यती मानलेले नाहीत. पण हिब्रू बायबलाच्या छंदांत जसे दोन समान भाग आढळतात, तसेच वैदिक अनुष्टुभ् रचनेत स्वाभाविकपणे आढळतात; त्याला आधुनिक वैदिक छंदोविद् द्विभंगी किंवा दुखंडी चरण (dimeter) मानतात. प्रदीर्घ त्रैष्टुभ जागत चरण त्रिभंगी किंवा त्रिखंडी (trimeter) असतात. अनुष्टुभ् चरणांत चार अक्षरांनंतर विराम येतो आणि प्रदीर्घ त्रैष्टुभ-जागत चरणांत विराम ४ थ्या अथवा ५ व्या अक्षरानंतर येतो.

वैदिक रचनेत येणारी स्वरभक्ती किंवा विसंधी-विकर्षण यांमुळे पद्यबंधांतील चलन अदूषित राहून समप्रमाणता अबाधित राहते.

वैदिक छंदांतील प्रगाथ नामक छंदोबंध हा ग्रीक रचनेतील स्ट्राफीचे आवाहनात्मक कार्य करतो.

त्याचप्रमाणे ग्रीक Iambic व Trochaic यांना समांतर अशी लगा (V–) त्मक व गाल (–V) प्रधान स्थळेही वरीचशी नियमितपणे आढळतात. काव्यकालीन लगत्वनिष्ठ छंदांची ही पूर्वरूपेच होत.

वैदिक छंदःशास्त्र – पिंगलाचार्य किंवा पिंगलनाग यांनी रचलेल्या छंदःसूत्रांना छंदःशास्त्र म्हणण्याचा प्रघात आहे; पण प्राचीन काळचे त्यांचे नाव छंदोविचिती आहे. पिंगलाच्या सूत्रांतील पहिली सूत्रेच फक्त वैदिक छंदांसंबंधीची आहेत व पुढची प्राकृत-काव्यकालीन छंदांबद्दलची आहेत. यामुळे त्याचा काळ फार प्राचीन आहे, असे मानणे कठिण आहे. वैदिक छंदःशास्त्राचा प्राचीनतम प्रयत्न सांख्यायन श्रौतसूत्रात आढळतो व पुढे निदानसूत्रांतील प्रारंभीच्या पटलांत दिसतो. त्यानंतर ऋग्वेद–प्रातिशाख्याच्या अंत्य तीन पटलांत व छंदोनुक्रमणीत दिसतो. तसाच तो शुक्लयजुर्वेदाच्या काही भागातही दिसतो. त्यानंतर बऱ्याच काळाने पिंगलाची सूत्रे अस्तित्वात आलेली दिसतात. मागे वर्णन केल्याप्रमाणे त्याने समग्र वृत्तांतील अक्षरसंख्येप्रमाणे वेगवेगळ्या जाती सांगून मग विशिष्ट अक्षरसंख्येच्या चरणांचे पद्यबंध वर्णिलेले आहेत. या छंदःसूत्रांतच काश्यप, सैतव, रात, मांडव्य, इ. पूर्वकालीन छंदोविदांचा उल्लेख येतो.

काव्यकालीन छंद – ग्रीक काव्यकालीन छंद लगत्वनिष्ठ आहेत, म्हणजे ते अक्षरांच्या लघुत्वावर किंवा गुरुत्वावर म्हणजेच उच्चारकालाच्या मापावर आधारलेले आहेत. होमरच्या ईलियड-ओडेसीचा प्रसिद्ध छंद षड्गणयुक्त Hexameter असून त्यात आयॅम्बिक ल-गा (V-) प्रधान षड्गणांचा Alexandrine चरण सविशेष आढळतो. महाकाव्यांचा हा छंद प्रवाही आहे. स्फुट भावकाव्याचे किंवा Lyric छंद, मिश्र रचनांचे आहेत. भारतीय आर्ष-काव्यांचा नवा छंदोऽवतार म्हणजे अनुष्टुभ् होय. भिन्न चरणांच्या रचनांच्या उपजाती ग्रीक लीरिक रचनांना समांतर आहेत. लॅटिन पद्यरचना प्रारंभी लगत्वप्रधानच होती. हिब्रूमधील अक्षरसंख्याप्रधान पद्यरचनेत इ. स. च्या १० व्या शतकात कालमापात्मक लगत्वनिष्ठा दाखल झाली. जुना पद्यप्रकार धार्मिक कवितांसाठी आणि नवे छंद इतर निधर्मी कवितांसाठी वापरले जाऊ लागले. आपल्याकडेही कालिदासाने शाकुंतलात वेदऋचांचे वातावरण निर्माण करण्यासाठी त्रिष्टुभ् छंद वापरला असून, नवे प्राकृत छंद ऋतुवर्णनादिकांसाठी वापरले आहेत.

संस्कृत काव्यकाळात प्रारंभी आर्ष छंद वापरले गेले. ते बहुधा वैदिक छंदांतूनच प्रगत झालेले लवचिक रचनेचे छंद होते. अनुष्टुभाला लगत्वाचा नियम थोड्या अंशाने लागू झाला. ६ वे अक्षर गुरू व ५ वे लघू; बाकीची हवी तशी. त्रिष्टुभ्-जगती मधून ज्या उपजाती तयार झाल्या, त्या संमिश्र आहेत. आर्ष काव्यानंतरच्या दुसऱ्या काव्यकाळात [साहित्यप्रधान महाकाव्ये लिहिली गेली. त्यांतील अनुष्टुभ् (व विद्युन्माला बहुधा) वैदिक 'आर्ष अनुष्टुभातून आले. इंद्रवज्रा-उपेंद्रवज्रा ही त्रैष्टुभ् उपजातीतून स्वतंत्रपणे विकसली. इंद्रवंशा-वंशस्थ ही वृत्ते जागत उपजातीतून विलग झाली. प्राकृत-देश्य रचनांतून वैतालीय उपजाती आली आणि तिच्यांतून वियोगिनी, अपरवक्त्र, माल्यभारिणी, पुष्पिताग्रा व बहुधा अपूर्व, शृंगेंद्रमुखी ही वृत्ते संस्कृत काव्यात आली असावी. परंतु इतर शेकडो वृत्ते जी साहित्यिक संस्कृत काव्यात वापरली गेली आहेत, त्यांची पूर्वपीठिका मात्र आज तरी सांगता येत नाही. काही छंदोघटकांच्या संमिश्रणामुळे ही नवी वृत्ते बनली असावी. उदा०– शालिनीत मधला भाग वाढवला म्हणजे मंदाक्रांता वृत्त होते. याहून अधिक सयुक्तिक अनुमान करणे दुर्घट आहे.

लॅटिन पद्यरचना इ. स. च्या ४ थ्या शतकांतर लगत्वनिष्ठ न राहता आघातप्रधान झाली. रोमान्स पद्यरचनेत या उत्तरकालीन लॅटिनच्या अनुरोधाने भारतत्त्व आले. अमुक अक्षरानंतर भारपूर्वक अक्षर येऊ लागले. ट्यूटॉनिक पद्यरचनेत अक्षरसमूहाला प्राधान्य न राहून प्रासयुक्त किंवा आघातयुक्त अक्षरांवर पद्य आधारले जाऊ लागले.

ग्रीकांनी लघु-गुरू अक्षरांच्या गणिती प्रस्तारांनी पीऱ्हीक्, आयॅम्ब्, क्रेटिक, बाकिअस्, स्पाँडी, डाय्-आयॅम्ब्, डाय्-स्पाँडी वगैरे अनेक गण मानले. संस्कृत छंदोवेत्त्यांनीही असेच लगत्वनिष्ठ गण योजले. या अक्षरगणसंख्येवर आधारलेली संस्कृत वृत्ते वापरली जात असतानाच केवळ मात्रांच्या संख्येवर आधारलेल्या गणांची मात्रावृत्तेही लोकप्रिय झाली. मध्ययुगीन संस्कृत काव्यनाटकात यांचा प्रचार आढळतो.

संस्कृत छंदःशास्त्र — ग्रीक छंदांचे शास्त्र सांगणारा छंदोवेत्ता ॲरिस्टोक्झीनस् होय. ॲरिस्टॉटलचा हा शिष्य असून, इ. स. पूर्व ४ थ्या शतकात होऊन गेला. त्याने पद्यातील मेळ व लय यांविषयी खूप महत्त्वाचे विचार प्रकट केले आहेत. संस्कृतातील भरतमुनीचे महत्त्वही असेच आहे. काव्य-नाटकांच्या दृष्टीने या दोघांनी छंदांचा विचार केलेला आहे. त्यांच्याच तोडीचा आणखी एक भारतीय छंदोविद् म्हणजे पिंगलाचार्य होय. संस्कृतात अनेक छंदोविचिती रूढ होत्या. त्र्यक्षरी गणांच्या पिंगलप्रणीत छंदोविचितीप्रमाणेच आणखी पाच छंदोविचिती होत्या. पिंगलाची छंदोविचिती सर्वमान्य झाल्यामुळे बाकीच्या नामशेष झाल्या. अलिकडे जानाश्रयी छंदोविचिती उपलब्ध झाली असून, त्यात दोन ते सहा अक्षरांच्या गटांचे लगत्वानुसार विविध गण दिलेले आढळतात. या छंदोविचितीत पिंगलाचा उल्लेख आलेला आहे. त्रिक गणांची नावे पिंगलाच्या नावाहून भिन्न आहेत. एकंदर गण अठरा आढळतात.

पिंगलोक्त छंदःसूत्रे — पिंगलाच्या छंदोविचितीची सूत्रे छंदःसूत्रे म्हणून प्रसिद्धी पावली. यांतील संस्कृत वृत्तांसंबंधीच्या सूत्रांत दोहोंपासून सहा अक्षरांच्या अठरा गणांचा समावेश नाही. तो फक्त त्र्यक्षरी आठ गण मानतो. य–म–त–र–ज–भ–न–स या अक्षरांनी ते सूचित होतात. या अक्षरांचे एक (पिंगलाचे नसलेले) सूत्र फार प्रसिद्ध आहे, ते 'यमाताराजभानसलगं' हे होय. यांतली सपर्यंतची कोणतीही तीन अक्षरे घेतली, की त्यांतील प्रथमाक्षराने सुचविलेल्या गणाची प्राप्ती होते. शेवटी ल म्हणजे लघू व ग म्हणजे गुरू अक्षर येते. शेकडो संस्कृत वृत्तांचे नियमन अजूनपर्यंत या त्रिक गणपद्धतीने केले जात असे. प्राकृत वृत्तांसाठी विशिष्ट ठिकाणी जगण, नगण वगैरेचा विधिनिषेध सांगून चरणांतील मात्रासंख्या दिलेली आहे. मात्रासमक (पादाकुलकासह) आणि आर्यावर्ग यात दिलेला आढळतो.

पिंगल अत्यंत सूचक रीतीने गणांच्यासाठी वर दिलेली य–त–र–ज वगैरे अक्षरे आणि चार, पाच, इ. संख्यांसाठी समुद्र, कामशर, इ. शब्द वापरून गण व यती दिग्दर्शित करतो. गणांची त्रिक पद्धती गणितदृष्ट्या परिपूर्ण आहे; पण या गणांच्या प्रस्तारात यतीचे जे लयदृष्ट्या महत्त्व आहे, ते अंतर्भूत होतच नाही. अंतर्गत गतीच्या दृष्टीने हे गण असयुक्तिक आहेत.

मध्ययुगीन परिवर्तन — मध्ययुगीन काळात युरोपमधील छंदांत परिवर्तन घडत गेले. फ्रेंच पद्यरचना आघातनिर्भर पण आवर्तनी बनली. इंग्लंडमध्ये हीरॉइक व्हर्स, स्पेन्सेरियन छंद, ब्लँक व्हर्स आणि वेगवेगळ्या लीरिक रचनांसाठी संमिश्र चरणांचे पद्यबंध प्रस्तार पावले. भारतीय भाषांत मात्रावर्तनी रचना सुरू झाली. भरताच्या नाट्यशास्त्रात आवर्तनी संस्कृतवृत्ते आणि मात्रावृत्ते दिलेली आहेत. या मात्रावृत्तांतील अनेक गानानुकूल रचनांना ध्रुवा नाव प्राप्त झाले. अनेक रचना प्राकृतात आणि अपभ्रंशात रूढ होऊन तिथून संस्कृतात आल्या. जयदेवाचे गीतगोविंद अशाच ललितरम्य छंदोगानांचे आहे. तशाच अनेक रचना लोकगीतांतून प्राकृतात आल्या असाव्या. धवळे, आरत्या, भूपाळ्या, गौळणी, पोवाडे, लावण्या, कटाव–कडाका यांचा मूलस्रोत लौकिक गाननाट्यात असावा, असे वाटण्याइतपत पुरावा उपलब्ध झालेला आहे.

नव्या छंदांचे शास्त्र — या प्राकृत–अपभ्रंश छंदांचे नियमन करण्याचा मोठा प्रयत्न हेमचंद्राचार्यांच्या छंदोनुशासनात आढळतो. अनेक मात्रागटांचे गण कल्पून आणि क्वचित संस्कृत गणांचा विधी किंवा निषेध दर्शवून हेमचंद्राने या छंदाचे अनुशासन केले. वृत्तजातिसमुच्चय, स्वयंभूच्छंद, कविदर्पण, जयदेवछंद व इतर अनेक ग्रंथांत या प्राकृत–अपभ्रंश रचनांचे नियमन आलेले आहे. गंगादासाचे छंदोमंजरी, वाणीभूषण, सुवृत्ततिलक वगैरे संस्कृत छंदःशास्त्र सांगणारे ग्रंथही त्या काळी प्रसार पावले. या ग्रंथांशिवाय पिंगलाच्या नावावर प्रसिद्ध असलेला प्राकृत पिंगलसूत्रे किंवा प्राकृतपैंगलम् नावाचा ग्रंथ खूपच महत्त्वाचा आहे. हा पिंगल कोण, याचा मात्र पत्ता लागत नाही.

या मात्रावृत्तांप्रमाणेच लयबद्ध गद्याचा उपयोग काव्य-नाटकांत होऊ लागला असावा. या तऱ्हेच्या गद्याला चूर्ण म्हणतात. मराठी आख्यानकार कवींनी इ. स. च्या १८ व्या शतकात याचा विशेष वापर केलेला आढळतो. त्यांनीच कटाव–कडाकांचाही उपयोग केला.

अर्वाचीन काळातील छंदःस्वरूप — गेल्या शतकाच्या शेवटी युरोप–अमेरिकेत पद्याच्या कल्पनेत परिवर्तन होत होते. इंग्लंडमध्ये स्प्रंग ऱ्हिदम (Sprung Rhythm) चा प्रादुर्भाव झालाच होता. त्यात फ्रेंच Verse Libre आणि अमेरिकन Free Verse यांच्या प्रचारामुळे पद्यविषयक विचारांत मौलिक परिवर्तन होऊ लागले. जुनी फूट किंवा गण यांवर आधारलेली कमी जास्त लगत्वदर्शी छंदोरचना मान्य राहिली नाही. ट्यूटॉनिक भाषेतील आघातभारांचे वैशिष्ट्य लक्षात घेऊन शेक्सपीअर व मिल्टन

यांच्या पद्यरचनेचा पुर्नविचार सुरू झाला. प्रत्यक्ष रचनांत स्पोकन् ऱ्हिदमचा विनियोग केलेली मुक्तछंदी शैली आली.

भारतातील विविध भाषा-साहित्यात गेल्या शतकात संस्कृत पद्यरीतीच्या पुनरुद्धाराचे प्रयत्न झाले. पुढे गेय जातिरचना, खंडित वृत्तरचना व इंग्रजी चालीवरची विलंबितोच्चारी रचना या रूढ झाल्या. त्या शतकाच्या अंताला बंगालीत पयार छंदाचे अमित्राक्षरी म्हणजे निर्यमकी प्रवाही रूप मायकेल मधुसूदन दत्त यांनीं सुरू केले आणि मराठी, गुजराती, हिंदी व कानडी साहित्यात प्रवाही निर्यमक छंदाचे प्रयोग झाले. मराठीत वैनायक, गुजराथीतील प्रवाही छंदप्रयोग, हिंदीतील आवर्तनी मुक्तछंद, इ. याचीच रूपे आहेत. गुर्जर कवितेतील डोलनशैलीने लयबद्ध शैलीला जन्म दिला. मराठीत मुक्तछंद व त्याआधीच सहजकाव्य या नावाने मुक्तशैलीही सुरू झाली. आजच्या काळात प्रवाही पादाकुलक, अक्षरछंद, अभंग–ओवी, छांदस मुक्तछंद यांचा प्रचार मराठीत विशेष आहे. गुजराती, हिंदी, व बंगाली या भाषांत मुक्तछंद–लयबद्धशैली चालू आहे.

नवे छंदःशास्त्र – मराठीत डॉ. मा. त्र्यं. पटवर्धन यांच्या छंदोरचना या ग्रंथाने मात्रावर्तनी जातिरचना आणि अक्षरछंदात्मक अभंगादी रचना यांचे नव्याने नियमन केले. पाच, सहा, सात, आठ अशा मात्रागटांची हर, भृंग, अग्नी, पद्म या नावांनी योजना झाली. नव्या मुक्तछंद–मुक्तशैलीचे विश्लेषण मराठी छंदोरचना नामक ग्रंथात केले गेले. छंदोरचनेसारखेच कार्य गुजरातीत प्रा. नारायणभाई पाठक यांनी बृहत्पिंगल लिहून केले. बंगालीत कविश्रेष्ठ रवीन्द्रनाथांनी छंदविषयक लेखांत व्यापक छंदोदृष्टीचा अवलंब केला. बांगला कवितार छंद नामक अत्यंत उद्बोधक ग्रंथ श्री. मोहितलाल मुजुमदारांनी लिहिला. हिंदीमध्येही छंदाचा असाच व्यापक विचार चालू झाला. आधुनिक हिंदी काव्यमें छंदयोजना हा श्री. पुत्तुलाल शुक्ल यांचा प्रबंध याच दिशेतील एक प्रयत्न आहे. कानडीमध्येही कन्नड छंदोविकास नावाचा ग्रंथ प्रा. कर्की यांनी लिहिला आहे.

चालू काळची छंदोदृष्टी – गेय (Sing Song) पद्धतीच्या रचना सर्वत्र चालू आहेतच; पण गंभीर प्रकारच्या काव्यरचनेसाठी संस्कृत वृत्ते किंवा देशी गेयरचना वापरण्याबाबत तीव्र मतभेद चालू आहेत. भाषाशास्त्राच्या वाढत्या ज्ञानामुळे प्रत्येक भाषेतील उच्चारप्रक्रियेची जाणीव अधिकाधिक होत आहे आणि छंदांची वाटचाल त्यातील उच्चारगत बोलीव लयीला (Spoken or Speech Rhythm) धरून लयप्लुतीचा आश्रय करून होऊ लागल्याची चिन्हे सर्वत्र दिसत आहेत. इंग्रजीतल्यासारखे आघाततत्त्व आपल्या भाषेत नाही; पण फ्रेंचप्रमाणे भार देत बोलण्याची रीत बोलीव भाषांत असतेच. तो भार कुठे द्यायचा ते बोलणाऱ्याच्या वैचारिक–भावनिक वृत्तीवर अवलंबून असते. त्याचप्रमाणे निसरडे उच्चारही बोलताना सहज होतात. ती लकबही काव्यवाहनात उपयोगी पडणारी आहे. इतकेच नव्हे; तर अशा स्वभाषेला स्वाभाविक अशा उच्चारगत लयीचा आश्रय करून कविता लिहिण्याकडे नवकवींचा कल आहे. युरोप–अमेरिकेत तसे यापूर्वीच झालेले आहे. आपल्याकडेही ते घडत आहे. त्याचे शास्त्रीय विश्लेषण ज्या त्या कवीनुसार स्वतंत्र होऊ शकेल. [डॉ. ना. ग. जोशी– वडोदे]

छंदोदेवपूजा एक स्त्रीव्रत. फाल्गुन वद्य एकादशीला स्त्रिया छंदोदेवाची पूजा करतात व त्याला जलचर प्राण्यांचे मांस, रुचकर खाद्यपदार्थ, केशर, इ. वस्तू समर्पण करतात. फल– सौभाग्यप्राप्ती व कामनापूर्ती. [हि. ध.]

छ देवनागरी लिपीतील सातवे व्यंजन व च वर्गातील दुसरा वर्ण. या वर्णाच्या चार अवस्था आहेत. पहिली अशोकाच्या गिरनार येथील लेखात, दुसरी इ. स. पहिल्या व दुसऱ्या शतकातील मथुरा येथील लेखात व तिसरी इ. स. च्या अकराव्या शतकातील मथुरेच्या लेखात दिसते. या वर्णाची चौथी अवस्था तिसऱ्या अवस्थेपासून बनलेली आहे.



छच्या रूपाचा विकासक्रम

या वर्णाचे ध्यान वर्णोद्धारतंत्रात वर्णिले आहे, ते असे –

ध्यानमस्याः प्रवक्ष्यामि द्विभुजां तु त्रिलोचनाम्।
पीताम्बरधरां नित्यां वरदां भक्तवत्सलाम्।
एवं ध्यात्वा छकारं तु तन्मन्त्रं दशधा जपेत्।

अर्थ – या छकाराचे मी ध्यान सांगतो. द्विभुज, त्रिलोचन, पीतांबरधारी, नित्य, वरद व भक्तवत्सल अशा छकाराचे ध्यान करून त्याच्या मंत्राचा दहा वेळा जप करावा.

तालू हे याचे उच्चारणस्थान होय. [श. क.; म. ज्ञा. को.]

छकरी काश्मीरी लोकसंगीताचा एक प्रकार. यात कोमल स्वर-शब्दांची प्रमगीते गात गात स्त्रिया मुग्धा प्रेयसीचा अभिनय करतात. याशिवाय त्या भक्तिगीते गाऊनही तदनुसार अभिनय करतात. छकरी संगीताची गीते लहान लहान

असतात. या गीतगायनप्रसंगी जी वाद्ये वाजवली जातात, तीही कोमल तालध्वनी काढणारीच असतात. राजतरंगिणीत या संगीतप्रकाराचा उल्लेख असून, त्या वेळी त्याच्या साथीला कलशवादन होत असे, असे म्हटले आहे. भारतीय संगीतात तबल्याला जे स्थान आहे, तेच स्थान काश्मीरी लोकसंगीतात मटका (कलश) नामक वाद्याला आहे. [म. क.]

छक्री काठियावाडमधील भाटिया लोकांचा लग्नविषयक सोहळा. लग्नाच्या आधी वधूकडील स्त्रिया वधूजवळ एक दुधाचे भांडे व आम्रपल्लव देऊन तिला मेण्यातून वरगृही घेऊन जातात. वधू मेण्यातून उतरल्यावर वरपित्याजवळ जाऊन त्याच्या अंगावर त्या आम्रपल्लवाने थोडेसे दूध शिंपडते. मग वरपिता तिला आपल्याजवळची रुपयांची थैली दाखवतो. वधू तिच्यातून एक रुपया काढून- घेते. ती परत जाताना वरमाता तिच्यावर अक्षता टाकते. [ल. वि. सो.]

छज्जा नृत्य जम्मू प्रदेशातील एक लोकनृत्य. हे नृत्य थंडीच्या दिवसात करतात. दिवसा नाचायचे झाल्यास कागदाचा मोर करून त्याच्या भोवती नाचतात व संध्याकाळी नाचायचे असल्यास शेकोटीभोवती नाचतात. नृत्य संथ गतीने सुरू होऊन हळूहळू त्याची लय वाढत जाते. नृत्यसमयी नर्तक विशिष्ट प्रकारचा पोषाख करतात व पायात घुंगरे बांधतात. [ए. हो. रा.]

छडीमारी द. भारतात मरीअम्माला करण्यात येणारा नवस. ज्याने हा नवस केला असेल, त्याला देवळात हात वर करून टांगतात व ढुंगण बधिर होईपर्यंत त्याला छडीने मार देतात. हा मार त्याने हूं की चूं न करता सहन करायचा असतो.

छत्तीसगड मध्य प्रदेशातील एक विभाग. उत्तरेस मेकल पर्वत व छोटा नागपूर प्रदेश, पश्चिमेस महादेवाचा डोंगर व महाराष्ट्र, दक्षिणेस कांकर आणि पूर्वेस बिहार व ओडिसा अशा याच्या चतुःसीमा आहेत. राज्यपुनर्रचनेपूर्वी हा मध्यप्रांताचा एक भाग होता. यात रायपूर, बिलासपूर, रायगड, जगदलपूर व दुर्ग या जिल्ह्यांचा समावेश होतो.

कोण्या प्राचीन काळी या प्रदेशात छत्तीस गड (किल्ले) होते म्हणून याला छत्तीसगड असे नाव मिळाले, असे सांगतात. सांप्रत हा प्रदेश मागसलेला असला, तरी प्राचीन काळी इथे संस्कृती व समृद्धी नांदत होती. पूर्वी या भागाला दक्षिण कोसल म्हणत. आता महाकोसल म्हणतात. समुद्रगुप्ताच्या वेळी द. कोसलावर राज्य करणारा राजा महेंद्र हा वाकाटकांचा सामंत असावा. पुढे तो समुद्रगुप्ताच्या वर्चस्वाखाली आला. इ. स. च्या ५ व्या शतकात त्या वंशातील राजा भीमसेन वाकाटकांचा मांडलिक होता, असे दिसते.

इ. स. च्या ९ व्या शतकात या भागात बाणवंशाचे राज्य होते. त्रिपुरीचा कलचुरी नृपती शंकरगण याने तिथल्या राजाचा पराभव करून तिथे आपल्या भावाची नेमणूक केली होती. पण ते राज्य फार काळ टिकले नाही. पुढे इ. स. १००० च्या सुमारास कलिंगराज नामक कलचुरी राजपुत्राने द. कोसल देश जिंकून तुमाण येथे आपली राजधानी स्थापली. तेव्हापासून इ. स. च्या १८ व्या शतकापर्यंत छत्तीसगड प्रदेशावर कलचुरी वंशाचे राज्य चालू होते. नंतर तिथे मराठ्यांची सत्ता प्रस्थापित झाली.

लोकजीवन – छत्तीसगड प्रदेशात सुमारे ४५ वन्य जमाती अनेक शतकांपूर्वीपासून वसती करून राहिल्या आहेत. त्यांचे साधारणपणे चार वर्ग करता येतात. पहिल्या वर्गात बंजवार, भूमजिया, बैगा व कमार यांचा समावेश होतो. हे आदिवासी लोक अगदी मागसलेले आहेत. गोंड, कवार, हळवा व धन्वार यांचा दुसरा वर्ग होतो. हे लोक आता सखल प्रदेशात स्थायिक झालेले असून, त्यांनी शेती हे आपले उपजीविकेचे साधन बनवले आहे. तिसऱ्या वर्गात देवार, ओजा, भीमा व परधान यांचा अंतर्भाव होतो. या लोकांना शीघ्र कवित्वाची उपजत देणगी असून, भाटगिरी हाच त्यांचा मुख्य व्यवसाय आहे. छत्तीसगडी बोलीतील बरेच लोककाव्य या भटक्या कवींनी रचलेले आहे. सतनामी, तेली, कुळंबी रावत, पंका, भरेवा वगैरे जाती चौथ्या वर्गात येतात. त्या शेतीवर उपजीविका करतात.

या भागातले अधिकांश लोक उ. प्रदेशातून इकडे आलेले आहेत. ब्राह्मण, क्षत्रिय आणि वैश्य हे तर सगळेच तिकडचे आहेत. इतर जातींपैकी कोरव लोक कौरव-पांडवांशी आपला संबंध जोडतात. आभीर व चमार हे स्वतःला कनोजी समजतात. तिथले न्हावी, धोबी, तांबोळी, कोष्टी, सुतार, लोहार, इ. सर्व लोक उ. प्रदेशातल्याच चालीरीती पाळतात. याशिवाय दक्षिणेकडील द्रविड वंशाचे लोकही तिथे वसलेले आहेत. त्यांतील गोंड व कोंड हे प्रमुख होत. गोंड स्वतःला रावणवंशी समजतात. मेघनाद हा रावणाचा पुत्र. सिवनी, छिंदवाडा या भागातले गोंड आजही त्याची सामूहिक पूजा-प्रार्थना करतात. कलिंग देशातून कलंगा लोक इकडे आले, तर कोकणातून उरांव येऊन वसले. मात्र इथल्या लोकांच्या संस्कृतीवर गोंड लोकांचा विशेष प्रभाव दिसतो.

अशा प्रकारे या प्रदेशात आर्य व द्रविड संस्कृतीचे मिश्रण

झालेले दिसून येते. इथे शैव, बौद्ध, जैन, इ. अनेक संप्रदायांचा प्रसार पूर्वी झाला होता. मध्ययुगात सर्वत्र मुसलमानांची सत्ता स्थापन झाल्यानंतरही या भागातील लोकांवर त्यांचा प्रभाव पडला नाही. त्यामुळे इथे शुद्ध प्राचीन भारतीय संस्कृतीचे, विशेषतः आर्य संस्कृतीचे दर्शन घडते. [हिंदी अनुशीलन – धीरेंद्र वर्मा विशेषांक, १९६०; खं. वै.; वा. नृ. का.]

छत्तीसगडी लोकगीते

छत्तीसगडी ही एक बोली असून, ती हिंदीचीच एक शाखा आहे. या भाषेची वेगळी लिपी नाही वा प्राचीन साहित्यही नाही. अवधी भाषेशी हिचे बरेच साम्य असल्यामुळे हिला अवधीचे एक विकृत रूप मानायला हरकत नाही. तथापि या भाषेतील लोकसाहित्य मात्र फार समृद्ध आहे.

छत्तीसगड प्रदेशात अनेक डोंगर, मैदाने व नद्या आहेत. बहुतेक भूभाग अरण्यांनी व्यापलेला असून, शेती करण्याजोगी जमीनही पुष्कळ आहे. निरनिराळ्या भागांत वसलेल्या लोकांनी वेगवेगळ्या प्रकारची गीते निर्माण केली आहेत. त्यांत ऋतुगीते, कृषिगीते, संस्कारगीते, वीरगाथा, हे प्रकार आहेत. त्याचप्रमाणे देवीची स्तवनेही आहेत. करमा, ददरिया, सुआ, बांस हे त्यातले मुख्य प्रकार होत. त्यांत तिथल्या लोकांच्या जीवनाचे प्रतिबिंब दिसून येते. जीवनाचा पुरेपूर उपभोग घ्यावा, हसावे, खेळावे, उद्याची चिंता करू नये, अशी त्यांची वृत्ती असते. पुढील करमा गीताचा आशय असाच आहे–

जीयत जनम लेबे, हंसि लेबो ।
खेल लेबो, मरे ले इलम संसार ।।

अर्थ – जगण्यासाठी जन्म घेतला आहे. आपण हसू या, खेळू या. मेल्यावर संसार दुर्लभ होईल.

ददरिया गीते म्हणजे प्रेम-विरहाची गीते होत. सर्व लोकगीतांमध्ये हा प्रकार उत्कृष्ट आहे. ही गीते सवाल-जवाबाची असतात. त्यांत स्त्री-पुरुष दोघेही भाग घेतात. त्यांतील शब्दाशब्दात मादकता व भावुकता भरलेली असते. त्याचा एक नमुना असा–

आमाके काही बेंदरां झूली जाय
जानी सूनीके डौकी काबर भूली जाय
सहज सिलौना सुलंगी धौरा
बाट छोड देरे डौकी फिरावूं भौरा ।।

अर्थ – आंब्याच्या झाडांवर वानरे झोके घेताहेत. अग मुली, जाणूनबूजून मला विसरल्याचा बहाणा करतेस काय? आपल्या प्रीतीला साक्षी असलेले हे सरळसोट असे धौऱ्याचे झाड जवळच उभे आहे. अग पोरी, माझ्या वाटेतून बाजूला हो. मला भोवरा फिरवायचा आहे.

पुढील बांस गीतात शारदामातेची प्रार्थना केली आहे–

सारदा माता सरसती भवानी ओ देवी,
तोला बंदन कहों कर जोर हो ।
जउन जउन अचछर सुध बिसरावों, माता
कंठ बैठवे मोर हो.
सुघ्घर अमली सुघ्घर अमुवा भैया,
सुघ्घर सगरी के पार हो ।
सुघ्घर पनिहारिन घियरी
खोजत हम कुरकुट घाट हो ।।

साधारणपणे प्रत्येक धार्मिक समारंभाच्या आधी हे गीत गाण्याची चाल आहे.

छत्तीसगडातील लोकांचे जीवन कठीण व कष्टमय असले, तरी त्यांची भाषा मात्र नाजूक व मधुर आहे. त्यांचे कोणत्याही प्रकारचे गाणे असो, त्याच्या जोडीला एखादे नृत्य असतेच. [विद्रोही– युगप्रभात, १ डिसें. १९६३; राजेंद्रप्रसाद अवस्थी– अजन्ता, एप्रिल–मे, १९५९]

छत्र

(१) एक उपकरण व राजचिन्ह. याची व्याख्या अशी– 'छादयत्यनेन आतपादिकम्' = ऊन, (पाऊस,) इत्यादींचे ज्यापासून रक्षण होते, ते छत्र होय (श. क.), सामान्य छत्रापेक्षा राजछत्राचे महत्त्व अधिक असते. त्याचे लक्षण असे–

राज्ञश्छत्रं विशेषाख्यं सामान्यादतिरिच्यते ।
सदण्डं तत्तु विज्ञेयं सारणाकुञ्चनात्मकम् ।।
दण्डः कन्दः शलाकाश्च रज्जुर्वस्त्रं च कीलकः ।
षड्भिरेतैः सुसन्दिष्टैश्छत्रमित्यभिधीयते ।।

अर्थ – राजाचे छत्र हे विशेष असून, ते सामान्यापेक्षा वेगळे असते. त्याला दंड असतो आणि त्या छत्राची उघडझाप करता येते. दंड, कंद (गट्टू), सळ्या, दोरी, वस्त्र व चाप या सहा वस्तू एकमेकांत बरोबर बसवल्या म्हणजे छत्र तयार होते.

राजाच्या छत्राचा रंग पांढरा असतो. त्याच्या छत्राचा दंड, कंद व शलाका या वस्तू शुद्ध सोन्याच्या, कीलक रत्नाचा व कापड आणि दोऱ्या पांढऱ्या रेशमाच्या असाव्या, असे सांगितलेले आहे. राजछत्राचे सदंड व निर्दंड असे दोन भेद असून, निर्दंड छत्र सिंहासनाला कायमचे बसवलेले असते.

प्राचीन काळी राजा कित्येकदा आपल्या सरदारादी मानकऱ्यांनाही छत्र धारण करण्याचा अधिकार बहाल करीत असे. अशा लोकांचे छत्र लाल रंगाचे असून, त्याचा दंड व कंद लाकडाचा असे आणि काड्या वेताच्या किंवा बांबूच्या असत.

काही वेळा छत्र मोती, रत्ने व स्फटिक यांनी सुशोभित केलेले असे. त्याच्यावर हंस व मोर यांची पिसे लावलेली असत. त्याचा दंड सहा हात लांब असे. बाणभट्टाने हर्षचरितात छत्राचे वर्णन केले आहे, ते असे– अनेक छत्रे स्कंधावाराची (सैन्यतळ) शोभा वाढवीत होती. त्या पांढऱ्या छत्रांना मोत्यांच्या झालरी लावलेल्या होत्या. गरुड व राजहंस यांच्या आकृती त्यांच्यावर काढलेल्या होत्या. त्यांच्यावर माणके बसवलेली होती आणि त्यांचे दंड पोवळ्यांचे बनवलेले होते.

मायूरातपत्र नामक एका छत्राचा उल्लेख कादंबरी व हर्षचरित या ग्रंथांत आला आहे. याचा आकार मोराच्या पिसाऱ्यासारखा असे व त्याला विविध रंगांची रत्ने जडवलेली असत. छत्राच्या मध्यभागी मोराचें शरीर व मुरडलेली मान काढलेली असे. सिंहासनाचा पृष्ठभाग प्रायः छत्राकृती बनवलेला असे. अशा प्रकारच्या सिंहासनाला मध्यकालात तख्त ताऊस असे म्हणत. गुप्तकालात मायूरातपत्राशिवाय पद्मातपत्र नामक आणखी एका छत्राचा उल्लेख आढळतो. अजंटाच्या चित्रात अशा प्रकारचे पद्मातपत्र बसवलेले सिंहासन आढळते.

राजावर छत्र धरण्याकरता दासदासी नेमलेल्या असत. अमरावतीच्या शिल्पात एक छत्रधर दाखवलेला आहे. निरनिराळा अधिकार दर्शवणाऱ्या निरनिराळ्या रंगांच्या छत्र्या राजा आपल्या अधिकाऱ्यांना बहाल करीत असे, असे जातकातही सांगितले आहे. वाजपेय यज्ञ करणाऱ्या ब्राह्मणांना राजाने छत्र दिले, असे महावीरचरितात म्हटले आहे. राजाशिवाय, देवतेची मिरवणूक निघाली असता तिच्या मस्तकावर व देवाच्या मिरवणुकीच्या रथावरही छत्र धरण्याची चाल पुरातन कालापासून आहे. प्रतिपदा व पौर्णिमा या तिथींना चैत्यवृक्षावर छत्र धरतात, असे कौटिल्याने सांगितले आहे. जैनांच्या तीर्थंकरमूर्तींवरही छत्र उभारलेले असते.



छत्रधर – अमरावती

छत्र हे सामर्थ्य आणि सार्वभौमत्व या दोहोंचे प्रतीक आहे. आशिया खंडात फार प्राचीन काळापासून छत्राचा वापर चालू आहे. सनपूर्व ११ व्या शतकापूर्वी चीनमध्येही राजे व इतर सत्ताधारी लोक छत्राचा उपयोग करीत असत. ब्रह्मदेशातही अगदी अलिकडच्या काळापर्यंत तिथले राजे व त्यांच्या पट्टराण्या छत्र धारण करीत. सर्व राजांना छत्रधारी हा किताब असे. ही छत्रे सूर्यचिन्हांकित, चंद्रचिन्हांकित, झुलती, कमळाकृती वगैरे विविध प्रकारची व पांढऱ्या रंगाची असत.

छत्राला धार्मिक महत्त्वही प्राप्त झालेले आहे. गौतम बुद्धाच्या काही मूर्ती छत्रचिन्हांकित आढळतात. त्याचप्रमाणे बुद्धाच्या धर्मचक्रावरही छत्र धरलेले दिसते. सांचीच्या बौद्ध स्तूपाच्या शिखरावर छत्र आहे. बौद्ध छत्र हे तिहेरी असते. त्याला त्रिछत्र म्हणतात.



सांची येथील महास्तूपावरचें त्रिछत्र

एखादा राजा दिग्विजय करून पराभूत राजांची राज्ये आपल्या राज्याला जोडीत असे, तेव्हा तो मुलूख एकछत्री झाला, असे म्हणण्याचा प्रघात होता. छत्र हे राजाच्या संरक्षणशक्तीचे प्रतीक मानले गेले होते. छत्र नाहीसे झाले, की त्याचे राज्यही नष्ट होते, अशी समजूत असे. छत्रपती हा किताब धारण करण्यात राजे लोक भूषण मानीत असत. शिवाजीमहाराजांनीही राज्याभिषेक झाल्यानंतर छत्रपती हा किताब घेतला होता.

छत्राचा उगम कसा झाला असावा, याविषयी एक अनुमान करता येते, ते असे– सुरवातीला ऊन किंवा पाऊस यांपासून डोक्याचे रक्षण करण्यासाठी माणसाने ताडाचे, केळीचे किंवा असेच एखादे मोठे पान डोक्यावर धरले असावे व त्यातूनच पुढे छत्र व चामर या वस्तू परिणत झाल्या असाव्या. आजही चीन, ब्रह्मदेश, सयाम, इ. देशांत व भारतातील कोकणभागात शेतकरी वाळलेल्या पानांची इरली बनवतात व ती डोक्यावर ठेवून पावसाळ्यात शेतात काम करतात. दक्षिणेत लांब दांड्याच्या ताडपत्री छत्र्याही बनवण्याची चाल आहे. पुढे राजाच्या मानचिन्हांत छत्राची गणना होऊ लागली, याचे कारण छत्रामध्ये एक प्रकारचे गूढ सामर्थ्य असते, अशी कल्पना दृढ झाली. गोंड, मुंडा, इ. अनेक लोकांच्या राजांविषयी

अशा दंतकथा सांगतात, की मुळात त्या व्यक्ती गरीब व सामान्य होत्या. त्यांना झाडाखाली ठेवून त्यांच्या आया काम करीत असता, भुजंगाने येऊन त्यांच्या डोक्यावर फणाछत्र धरले व पुढे दैवयोगाने त्यांना राजपद प्राप्त झाले. त्यामुळे नागाने ज्याच्या मस्तकावर फणाछत्र धरले, तो मुलगा पुढे राजा होतो, अशी समजूत दृढ झाली. महाराष्ट्रात मल्हारराव होळकरांची अशीच एक कथा प्रसिद्ध आहे.

हळूहळू पूर्वेकडून पाश्चात्य देशात छत्राचा प्रसार झाला. इ. स. १२९२ मध्ये मार्को पोलोने लिहिले आहे, की कुबलाखानाच्या सरदारांना त्यांच्या योग्यतेनुसार भाल्यावर जडवलेल्या पिवळ्या रंगाच्या छत्राखाली चालण्याची मुभा होती. इजिप्तचे सम्राटही छत्राचा उपयोग करीत असत. [हृ. च. सां. अ.; का. ए. सां. अ.; धर्मयुग, ६ जून १९५४]

(२) देवालय, मठ किंवा चैत्यालय यांना जोडलेल्या इमारतीला छत्र किंवा सत्र असे नाव असते. तिथे पांथस्थांना राहण्याची व भोजनाची सोय मोफत केलेली असते. विद्यार्थी, उपासक, क्षेत्रवासी यांच्यासाठीही अशी छत्रे जुन्या काळी चालवली जात. आजही भारतात कित्येक ठिकाणी अशी छत्रे चालतात. [एन्सा. हिं. आ.]

छत्र कुँवरी बाई

(इ. स. चे १७ वे शतक) राजस्थानातील एक हिंदी कवयित्री. हिच्या वडिलांचे नाव सरदारसिंह असे होते. वयाच्या सोळाव्या वर्षी कांठडच्या गोपाळसिंहाबरोबर हिचा विवाह झाला. आयुष्याचा बराच काळ पतिसमवेत राहिल्यावर ही छत्र कुँवरी रूपनगर येथे राहून परमेश्वरसेवेत आपला काळ घालवू लागली.

छत्र कुँवरीच्या घराण्यात निंबार्क संप्रदायाबद्दल आस्था होती. हिनेही आपल्या प्रौढावस्थेत निंबार्क संप्रदायाची दीक्षा घेतली, असे कळते.

हिचा प्रेमविनोद नावाचा कृष्णभक्तिपर एक काव्यग्रंथ आहे. या ग्रंथात राधा-कृष्णाच्या जीवनाचे विनोदपूर्ण चित्रण आहे. तिने वर्णिलेल्या राधा-कृष्णाच्या मीलनात उन्माद आहे, मादकता आहे, मूर्च्छनेचे माधुर्य आहे; परंतु समर्पणाचा मात्र अभाव आहे.

छत्र कुँवरीची राधा ही भगवंताची शक्ती नसून एक मुग्धा नायिका आहे. तिचा कृष्णही तिच्या मुग्ध भावनेला खतपाणी घालणारा असा एक नायकच आहे.

छत्र कुँवरीची भाषा सरळ व सोपी असूनही नादानुकारी आहे. तिने आपल्या सर्व भावना कृष्णावर लादलेल्या दिसतात. तिने केलेले मुग्धेचे वर्णन अनुपम आहे. [म. हिं. क.]

छत्रसाल

(१६५०–१७३१ इ. स.) बुंदेलखंडातील एक राज्यकर्ता व कवी. याच्या वडिलांचे नाव चंपतराय असे होते. छत्रसालाच्या वयाच्या पंधराव्या वर्षीच त्याचे आईवडील मरण पावले. छत्रसालाच्या बाललीला पाहून हा कोणी राजपुरुष होणार, असे भविष्य वर्तविले गेले होते.

छत्रसालाचे शिक्षण त्याच्या मामाच्या घरी झाले. विद्याध्ययनाबरोबर सैनिकी शिक्षणही तो घेत होता. वयाच्या दहाव्या वर्षाच्या आतच नेमबाजी करणे, तलवार चालविणे, घोडदौड करणे, शिकार करणे, इ. गोष्टी त्याने आत्मसात केल्या. याच वयात सेनापतीला आवश्यक असे सर्व गुण त्याच्या अंगी दिसू लागले. छत्रसालाला मातीची चित्रे बनविण्याचा छंद होता. त्याचप्रमाणे रामायण-महाभारतातल्या गोष्टीही तो आवडीने ऐकत असे.

अकबराच्या वेळी बुंदेलखंडातील ओर्छा येथे चंपतरायाचे घराणे राज्य करीत होते. पण पुढे ते मोगलांचे मांडलिक झाले. चंपतराय औरंगजेबाच्या दरबारात मोठा उमराव होता. आपले राज्य परत मिळविण्याच्या खटाटोपात तो मारला गेला.

छत्रसालही प्रथम मोगलांच्या दरबारात जयसिंगाच्या पदरी होता. एकदा नागपूरकडील देवगड किल्ला सर करण्याकरिता बहादुरखान नामक सरदाराबरोबर याची नेमणूक झाली. या युद्धात छत्रसाल स्वतः घायाळ झाला; पण त्याने किल्ला मात्र सर केला. पण बहादुरखानाने दरबारात याचा नामनिर्देशही न करता सगळे श्रेय स्वतःकडे घेऊन मानमरातब मिळविला. त्यामुळे छत्रसाल चिडला व मोगलांच्या सेवेतून निवृत्त झाला.

त्यानंतर छत्रसालाने दक्षिणेत येऊन शिवाजीची भेट घेतली. शिवाजीने त्याला उत्तरेतील मुलूख काबीज करण्यास प्रवृत्त केले व त्यासाठी त्याला एक तलवारही अर्पण केली. पुढे खूप पराक्रम करून छत्रसाल यमुना व चंबळ या नद्यांच्या दक्षिणेकडील प्रांताचा म्हणजे सर्व बुंदेलखंडाचा राजा झाला.

इ. स. १७३९ साली महंमदशहा बंगशाने बुंदेलखंडावर स्वारी केली. त्या वेळी छत्रसालाचे वय ८० वर्षांचे होते. म्हणून त्याने बाजीराव पेशव्याचे साहाय्य मागितले. त्याने आपल्या त्या विनंतीपत्रात जो एक दोहा लिहिला आहे, तो असा–

जो गति ग्राह गजेन्द्रकी सो गति जानहु आज ।
बाजी जात बुंदेलकी राखो बाजी लाज ।।

बाजीरावाने त्याच्या मदतीला धावून जाऊन बंगशाचा पूर्ण पराभव केला, तेव्हा छत्रसालाने त्याला आपल्या राज्याचा तिसरा हिस्सा दिला आणि मस्तानी नामक सुंदर युवती बहाल केली. मस्तानी ही त्याच्या एका नाटकशाळेची मुलगी होती. त्याला पुष्कळ मुलगे होते. पण राहिलेले राज्याचे दोन हिस्से

त्याने आपल्या हिरदेसा व जगतराज नामक पुत्रांना दिले.

छत्रसाल धर्माच्या बाबतीत उदारमतवादी होता. त्याच्या राज्यात हिंदु-मुसलमान असा भेद-भाव नव्हता.

छत्रसाल कवी म्हणूनही प्रसिद्ध आहे. त्याचे काव्यग्रंथ असे– (१) श्री राधाकृष्ण पचीसी (२) कृष्णावतारके कवित्त (३) रामावतारके कवित्त (४) रामध्वजाष्टक (५) हनुमान पचीसी (६) महाराज छत्रसालके प्रति अक्षर अनन्यके प्रश्न (७) दृष्टान्ती और फुटकर कवित्त (८) दृष्टान्ती तथा राजनैतिक दोहा समूह (९) छत्रविलास (१०) नीतिमंजरी व (११) महाराज छत्रसाल जूकी काव्य. भक्ती हा त्याच्या काव्याचा प्रमुख विषय आहे. त्याची ही सर्व काव्ये ब्रजभाषेत आहेत., ब्रजभाषेप्रमाणेच बुंदेलखंडी, फारसी या भाषांवरही त्याचे प्रभुत्व होते. त्याचे राजनीतीवरील काव्य आजही राजकारणी लोकांना मार्गदर्शक ठरणारे आहे. छत्रसालाचा छंदःशास्त्राचाही अभ्यास चांगला होता. [बुं. सं. इ.; म. ज्ञा. को.; म. च. को.; श्रीचंद्र जैन – अजन्ता, जानेवारी १९५७]

छन्नवीर एक आभूषण. धातूच्या एका चकतीवर रत्ने जडवून ती छातीच्या मध्यावर रुळत राहील, अशा प्रकारे दोन साखळ्यांनी बांधतात. एक साखळी खांद्यांना व दुसरी कमरेभोवती वेष्टिलेली असते. दक्षिणेतील विष्णुमूर्तींच्या गळ्यात हा अलंकार आढळतो. [डे. हिं. इ.]

छपेली नृत्य कुमाऊं प्रदेशातील एक लोकनृत्य. सामान्यतः हे नृत्य सण-उत्सवप्रसंगी होते. या नृत्यात दोन नर्तक असतात. ते प्रियकर-प्रेयसी, भाऊ-बहीण अथवा पिता-पुत्र यांपैकी कोणतीही भूमिका घेतात व तिला अनुरूप असा अभिनय करतात. नृत्यप्रसंगी बासरी आणि हुर्का नावाचे एक वाद्य यांची साथ असते. या नृत्याची लय जलद असते व त्यामुळे प्रेक्षकही ते पाहताना मंत्रमुग्ध होतात. [उ. प्र. लो.]

छप्पन्न कवी एक प्राचीन कविमंडळ. उद्योतनसूरी नामक जैन कवीच्या कुवलयमाला या ग्रंथाच्या आरंभी प्राचीन कवींच्या स्तुतिपर काही गाथा आहेत. त्यांतील एका गाथेत पालित्तय, सालाहण व छप्पण्णय अशा तिघांचा उल्लेख आहे. यातील छप्पण्णय या कवीविषयी उद्योतनाने खालील गाथा दिली आहे–

छप्पण्णयाण किंवा कयकुंजराण भुवणम्मि ।
अन्नो वि छयभणियो अज्ज वि उवमिज्जए जे हिं ।।

अर्थ – छप्पण्णय कविश्रेष्ठांविषयी काय सांगावे ? छेकोक्ती रचणाऱ्या देशातील अन्य कवींची अद्यापही त्यांच्याशी तुलना केली जाते.

या गाथेत छप्पण्णय कवींबद्दल उद्योतनसूरीने बहुवचन वापरलेले आहे. बहुवचन आदरार्थी असणे शक्य नाही. कारण पालित्तय, हाल, बाण यांच्याबद्दल रचलेल्या गाथांत एकवचनाचाच प्रयोग आहे. तेव्हा छप्पण्णय हे एका कवीचे नाव नसून अनेक कवींचे नाव असावे.

छप्पण्णय हा शब्द षट्पञ्चाशत् या संस्कृत शब्दाचे प्राकृत रूप आहे. या छप्पन्न कवींनी एक कविमंडळ स्थापले असावे व ते त्यांच्या संख्यावाचक अभिधानाने प्रसिद्ध झाले असावे, असे वाटते. या कवींचा अन्यत्रही बहुवचनीच उल्लेख मिळतो. अवंतिसुंदरी नामक ग्रंथात त्याविषयी पुढील श्लोक आहे—

सेतुरूपेण तिष्ठन्तो लोके सद्वस्तुदर्शिनः ।
षट्पञ्चाशत् प्रमाणत्वं गता नः कविपुङ्गवाः ।।

अर्थ – सद्वस्तूंचे स्वरूप ज्यांनी अवलोकिले आहे व जे सेतुरूपाने या जगात विद्यमान आहेत, असे छप्पन्न कविश्रेष्ठ आम्हाला प्रमाणभूत झाले आहेत.

या श्लोकात आणखी एक महत्त्वाची माहिती सहजपणे येऊन गेली आहे. हे छप्पन्न कवी दिवंगत झाले असले, तरी ते सेतुरूपाने अद्यापि या जगात वास करीत आहेत, असा वरील श्लोकाचा आशय आहे. यावरून सेतु नामक ग्रंथ या छप्पन्न कवींचा असल्याचे कळते. हा ग्रंथ सुभाषितसंग्रहात्मक असावा. हा गाथासंग्रह हालाच्या सप्तशतीसारखा आहे.

हे कविमंडळ छेकोक्तीबद्दल प्रसिद्ध होते. छेक म्हणजे विदग्ध किंवा सुसंस्कृत मनुष्य. अशा मनुष्याने एखादी कल्पना श्लेषादिकांच्या साहाय्याने रमणीय शब्दांत व्यक्त केली म्हणजे तिला छेकोक्ती म्हणतात. हे छप्पन्न कवी कोण होते, हे मात्र समजण्याला आज साधन नाही. [सं. मु.]

छप्पन्न देश प्राचीन काळी भारतात छप्पन्न देश होते, अशी समजूत आहे. छप्पन्न देशांची नामावळी देणारा प्राचीन ग्रंथ म्हणजे चंद्रगर्भसूत्र हा होय. इ. स. ५६६ मध्ये या ग्रंथाचे नरेंद्रयशस् याने चिनी भाषेत भाषांतर केले आहे. त्यात जंबुद्वीपात बुद्धाने जिथे जिथे अवतार घेतले, त्या त्या स्थानांची नावे आहेत. त्यांतील निम्म्याहून अधिक स्थाने भारताबाहेरील आहेत. इ. स. १४५० पूर्वी संमोहनतंत्र नावाचा ग्रंथ एक रचला गेला. या ग्रंथातही छप्पन्न देशांच्या दोन याद्या आहेत.

इ. स. च्या १८ व्या शतकाच्या पूर्वार्धात शक्तिसंगमतंत्र नावाचा एक ग्रंथ रचला गेला. या ग्रंथात भारतातील आणि भारताच्या सीमेवरील छप्पन्न देशांची नावे आणि त्या त्या

देशांची माहिती दिलेली आहे. त्यांची नामावळी पुढीलप्रमाणे आहे–

(१) अंग (२) वंग (३) कलिंग (४) कालिंग (५) केरळ (६) हंस केरळ (७) सर्वेश केरळ (८) काश्मीर (९) कामरूप (१०) महाराष्ट्र (११) आंध्र (१२) सौराष्ट्र (गुर्जर) (१३) तेलंग (१४) मलयाल (१५) कर्नाट (१६) अवंती (१७) विदर्भ (१८) मरू (१९) आभीर (२०) माळवा (२१) चोळ (२२) पांचाल (२३) कांबोज (२४) विराट (२५) पांडू (२६) विदेह तैरमुक्ती (२७) बाल्हीक (२८) किरात (२९) वक्रांत (३०) खुराशन (३१) ऐराक (३२) भोटांत (३३) चीन (३४) महाचीन (३५) नेपाळ (३६) शिलहट्ट (सिल्हेट) (३७) गौड (३८) महाकोशल (३९) मगध (४०) कीकट (४१) उत्कल (४२) श्रीकुंतल (४३) हूण (४४) कोंकण (४५) कैकेय (४६) शौरसेन (४७) कुरू (४८) सिंहल (४९) पुलिंद (५०) कच्छ (५१) मत्स्य (५२) मद्र (५३) सौकीर (५४) लाट (५५) बर्बर (५६) सैंधव. [स्ट. जॉ. ए. मे. इं.]

छप्पय

एक मात्रिक छंद. प्राकृतपैंगलम् या ग्रंथात याचे लक्षण दिले आहे. हा संयुक्त छंद असून, पहिले २४ मात्रांचे चार पाद रोला व पुढचे दोन पाद उल्लाला या दोहोंनी मिळून हा छंद बनलेला आहे. उल्लालाच्या दोन भेदांनुसार छप्पयच्या पाचव्या व सहाव्या पादात २६ किंवा २८ मात्रा असू शकतात. बहुतेक कवींनी २८ मात्रा असलेल्या छंदाचाच प्रयोग केला आहे. भानूने छप्पयाच्या ७१ भेदांचा उल्लेख केला आहे.

नाभादास, तुलसीदास व हरिश्चंद्र या कवींनी छप्पयचा वापर केलेला आहे. याशिवाय नरहरी महापात्राने अवघीत लिहिलेले छप्पय छंद फार प्रसिद्ध आहेत. चंदबरदाई हा तर छप्पयांचा राजाच होता, असे म्हटलेले आहे. [हिं. सा. को. २; अ. उ. सा.; हिं. सा. आ.]

छप्परबंद

द. भारतातील व महाराष्ट्रातील एक जात. हे लोक आपसात भादू या नावाने ओळखले जातात, तर ठग आणि लुटारू लोक यांना खूलसूटर्या असे म्हणतात. श्री. एम. पौपाराव नायडू यांच्या मते हे घरांची छपरे म्हणजेच घरे बांधण्याचा व्यवसाय करतात, म्हणून त्यांना छप्परबंद हे नाव मिळाले. परंतु आणखी काहींच्या मते ते खोटी नाणी तयार करून त्यावर छाप उठवीत असल्याने त्यांना छप्परबंद असे म्हणू लागले. मूळचे हे पंजाबातले शेख जातीचे मुसलमान होत. मोगलांच्या कर्नाटकातील स्वारीच्या वेळी त्यांच्या झोपड्या बांधण्यासाठी हे दक्षिणेत उतरले व काही तिथेच स्थायिक होऊन बाकीचे अन्यत्र पसरले.

छपरे बांधण्याच्या प्रमुख व्यवसायाखेरीज हे शेती करतात आणि कोंबड्याही पाळतात. बायका रजया शिवतात व पुरुष त्या विकतात. नाणी बनवणारे छप्परबंद बहुश: व्यापारी किंवा फकिरी वेषात फिरतात. व्यापारी म्हणून भटकताना ते आपल्या नावापुढे शाह हा शब्द जोडतात; तर फकीर म्हणून वावरताना साहेब शब्द जोडून दोहे गातात.

खोटी नाणी पाडण्याच्या यांच्या व्यवसायासंबंधी यांच्यांतील एकाने एक दंतकथा सांगितली आहे, ती अशी––

एक दिवस एक छप्परबंद विजापूरच्या पीरभाई पीरमखन नामक फकिराकडे गेला व त्याने त्या फकिराला आपल्यासाठी देवाकडे रदबदली करायला विनवले. त्याचबरोबर आपल्या जातीने यापुढे कोणता व्यवसाय करावा, याविषयी देवाचा कौलही मागितला. फकिराने त्या माणसाला एक रुपया देऊन 'हा तात्काळ घरी घेऊन जा व जात असताना मागे वळून पाहू नको', असे सांगितले. परंतु तो छप्परबंद रस्त्याने जात असताना त्याला कोणीतरी हाक मारल्याचा भास झाला आणि त्याने मागे पाहिले व त्यामुळे फकिराने दिलेला तो रुपया खोटा झाला. छप्परबंदाने परत जाऊन फकिराला हे सांगितले, तेव्हा फकीर रागावला व म्हणाला. 'तुझ्या जातीने आता खोटी नाणी पाडावी, असाच देवाचा कौल दिसतो'.

महाराष्ट्रातील छप्परबंद मूळचे राजपूत होते. हे लोक घरी हिंदुस्थानी आणि बाहेर मराठी बोलतात. यांच्या बायका घागरा व चोळी घालतात आणि ओढणी घेतात. त्या काळे कपडे वापरीत नाहीत. त्या सरपण व गवऱ्या विकतात. हे लोक सगळ्या हिंदू देव–देवतांना भजत असले, तरी प्रामुख्याने त्यांचे दैवत भवानी देवी हे आहे. त्यांच्या प्रत्येक घरात भवानीची मूर्ती असतेच. यांचे धार्मिक विधी परदेशी ब्राह्मण करतात.

प्रसूतिप्रथा ––– बाळंतीण स्त्रियांना खाटेवर झोपण्यास परवानगी नसते. पाचव्या दिवशी एक सुवासिनी स्त्री तांदळाची पिठी पाण्यात कालवून तिच्यात आपला उजवा तळहात बुडवते आणि तो ठसा भिंतीवर उमटवते. मग त्या ठशाला वरणभाताचा नैवेद्य दाखवते. बाराव्या दिवशी मुलाचा बाप त्याचे नाव ठेवतो आणि पाच फळांनी पत्नीची ओटी भरतो. बाराव्या दिवसानंतर येणाऱ्या मंगळवारी घराबाहेर किंवा एखाद्या बागेत पाच खडे मांडून सटवाईची पूजा करतात.

मुलाचे जावळ वयाच्या दुसऱ्या वर्षापासून पाचव्या वर्षापर्यंत केव्हाही करतात. त्या दिवशी बोकडाचा बळी देऊन त्याचे जेवण जातवाल्यांना घालण्याची चाल आहे.

मृतांना जाळतात. गावपंचायतीत भांडणाचा न्यायनिवाडा करतात. [का. ट्रा. स. इं.; पूना गॅझे.]

छप्पराषष्ठी बंगालमधील स्त्रियांचे एक व्रत. भाद्र० शुद्ध षष्ठीच्या दिवशी बंगाली स्त्रिया खोबऱ्याच्या वड्या बनवतात व त्या बांबूच्या पानांखाली झाकून, षष्ठीदेवीची पूजा झाल्यावर तिला अर्पण करतात. या व्रताची कथा अशी—

एक व्यापारी होता. त्याला तीन मुलगे व तीन सुना होत्या. व्यापाऱ्याची बायको एका तळ्यावर जाऊन छप्पराषष्ठीची पूजा करीत असे. पण ते तळे होते दुसऱ्याचे. त्यामुळे तिच्या पूजेत नेहमी व्यत्यय येत असे. मग तिने नवऱ्याला स्वतःच्या जागेत एक तळे खोदायला सांगितले. व्यापाऱ्याने तळे खोदले; पण त्याला पाणीच लागेना. मग व्यापाऱ्याला स्वप्नदृष्टांत झाला, की 'तू तुझ्या नातवाचा बळी दे; म्हणजे तळ्याला पाणी लागेल.' व्यापाऱ्याने मन घट्ट करून धाकट्या सुनेला न कळवता तिचे तान्हे मूल तळ्यावर नेले व त्याचा शिरच्छेद केला. मग तळे पाण्याने तुडुंबले. आणि आश्चर्याची गोष्ट ही, की धाकटी सून पाळण्याकडे गेली, तेव्हा पाळण्यात तिचे मूल सुखरूप खेळत असलेले तिला दिसले.

त्या दिवसापासून लेकुरवाळ्या बायका छप्पराषष्ठीची पूजा करू लागल्या. महाराष्ट्रातील शीतळा सप्तमीच्या कहाणीशी या कथेचे साम्य आहे. [हिं. हॉ. से.]

छप्पूपाणी एक खेळ. मुले चकतात व एकावर राज्य देतात. राज्य आलेला मुलगा पळणाऱ्या मुलांपैकी एखाद्याला शिवायला गेला, की पळणारा खाली बसतो. पळताना त्याला शिवले, तरच तो बाद होतो. बसलेल्या स्थितीत होत नाही. राज्य आलेल्या मुलाचे लक्ष नाही असे पाहून, दुसरा एखादा पळणारा मुलगा बसलेल्या मुलाच्या डोक्यावर हात ठेवतो. म्हणजे तो पुन्हा उठून पळू लागतो. मात्र दुसऱ्याच्या सहाय्याशिवाय त्याला उठता येत नाही. मग राज्य आलेला मुलगा दुसऱ्या एखाद्या पळणाऱ्या मुलाच्या डोक्यावर हात ठेवतो व छप्पूपाणी असे म्हणतो. तेवढ्याने तो बाद होतो व राज्य त्याच्यावर जाते. हा खेळ केवळ मुली अगर मुले–मुली मिळूनही खेळतात. [व्या. ज्ञा. को.]

छम जम्मू–काश्मीर प्रदेशांतील बौद्ध लामांचे एक नृत्य. नर्तक भिन्न भिन्न देव–दैत्यांचे मुखवटे धारण करून वाद्यांच्या तालावर नाचतात. प्रथम सत् आणि असत् प्रवृत्तींचा संघर्ष दाखवून अखेरीस सत् प्रवृत्तीचा विजय दाखवणे, हे या नृत्याचे उद्दिष्ट असते. हे नृत्य धार्मिक असल्याने नर्तकांना ते अचूक करावे लागते. [भा. लो. नृ]

छली नृत्य कुमाऊं प्रदेशातील हरिजन स्त्री–पुरुषांचे संमिश्र नृत्य. हे नृत्य मुख्यतः लग्नसमारंभात होते व त्याचा विषय रामकथा हा असतो. या नृत्यात स्त्री–पुरुष एकमेकांच्या हातावर टाळ्या देत वर्तुळात गोल गोल फिरत नाचतात. [इं. फो. लो.]

छांदोग्य उपनिषद सामवेदाचे एक उपनिषद. सामवेदाच्या तलवकार शाखेच्या अंतर्गत असलेल्या छांदोग्य ब्राह्मणात हे उपनिषद आहे. प्राचीनता, गंभीरता व ब्रह्मज्ञानप्रतिपादन अशा सर्व दृष्टींनी हे उपनिषद सर्व उपनिषदांत अत्यंत प्रौढ, प्रामाणिक व प्रमेयबहुल आहे. याचे आठ अध्याय किंवा प्रपाठक असून, शेवटचे तीन तत्त्वज्ञानदृष्ट्या महत्त्वाचे आहेत.

हे उपनिषद सामवेदाचे असल्यामुळे त्याच्या पहिल्या दोन अध्यायांत सामविद्येचे निरूपण केलेले आहे. पहिल्या अध्यायात उद्गीथाचे विवेचन करताना सांगितले आहे, की उद्गीथ, अक्षर, हृदय व ऊंकार हे सर्व पर्यायवाची शब्द असून ते अव्यय व अविनाशी अशा एकाच मूल तत्त्वाचे निदर्शक आहेत. उद्गीथापासून समस्त भावांचा उदय होतो. विश्वात सात रस असून त्यांच्याहून श्रेष्ठ असा आठवा उद्गीथरस आहे. हा रस ब्रह्मस्वरूप असून त्याच्या अभावी सर्व रस फिके पडतात.

पुढे प्रथमाध्यायाच्या दुसऱ्या खंडात उद्गीथाची एक नवी व्याख्या सांगितली आहे, ती अशी—

नासिकासंचारी जो स्थूल प्राण आहे, तोच उद्गीथ होय. देवासुरांचा झगडा झाला, तेव्हा देवांनी या नासिक्य प्राणाला उद्गीथाच्या रूपाने आपलेसे केले. त्याच्या योगाने आपल्याला असुरांचा सहज पराभव करता येईल, अशी देवांची कल्पना होती. पण असुरही काही कमी नव्हते. त्यांनीही त्या नासिक्य प्राणात आपला भाग ठेवून दिला. त्यामुळे प्राणापासून अमृत व मृत्यू या दोहोंचीही सिद्धी होऊ लागली.

पुढे तिसऱ्या खंडात भिन्न भिन्न दृष्टिकोनातून उद्गीथाच्या अन्य चार व्याख्या दिलेल्या आहेत. पहिली व्याख्या अधिदैवत असून त्यात सूर्यालाच उद्गीथ म्हटले आहे.

सूर्य हा तमाचा नाश करून प्रकाशाला जन्म देतो." तम व ज्योती यांचे हे चक्र म्हणजे उद्गीथाचे स्पंदन आहे. स्पंदनात्मक उद्गीथाचे दुसरे रूप म्हणजे व्यानप्राण होय. तो प्राण व

अपान या दोन वेगांचा नियामक आहे. ऋक् व साम यांचे स्पंदन म्हणजेही उद्‌गीथच होय.

पहिल्या अध्यायाच्या शेवटी उद्‌गीथाची आणखी एक विचित्र व्याख्या केलेली असून तिला शौव उद्‌गीथ असे म्हटले आहे. इथे कुत्र्याचे भुंकणे हेच उद्‌गीथाचे स्वरूप मानलेले आहे. ऐहिक स्वार्थासाठी यज्ञयाग व सामगायन करणाऱ्या व्यक्तींचा या व्याख्येत उपहास केलेला दिसतो. याविषयी एक कथा सांगितली आहे, ती अशी –

एकदा वक दाल्भ्य हा वेदपठण करण्यासाठी एकांत स्थळी गेला असता त्याने एक पांढरा कुत्रा पाहिला. त्याच्याकडे आणखी अनेक कुत्री आली. ती सर्व भुकेली होती. म्हणून त्यांनी त्या पांढऱ्या कुत्र्याला मंत्रपठण करून आपल्याला अन्न मिळवून द्यायला सांगितले. पांढऱ्या कुत्र्याने दुसऱ्या दिवशी त्या सर्वांना त्याच जागी यायला सांगितले. त्याप्रमाणे सर्व कुत्री आली. मग उद्‌गाते ज्याप्रमाणे बहिष्पवमान स्तोत्र गाताना हातात हात घालून मंडलाकार फिरतात, तसे त्या कुत्र्यांनी केले. त्यांच्या गानाचा अभिप्राय असा होता, की ‘ हे वरुणा, हे प्रजापते, आम्हाला अन्न दे. आम्ही ते खाऊ. ’

डॉ. वासुदेवशरण अग्रवाल यांच्या मते प्रत्येक प्राणकेंद्राच्या मध्ये असलेल्या मध्यप्राणाला इथे श्वेत कुत्रा असे म्हटले आहे.

तिसऱ्या अध्यायात सूर्याची ‘ देवमघू ’च्या रूपात उपासना वर्णिली आहे. त्याचप्रमाणे त्यात गायत्रीचे वर्णन, घोर आंगिरसाचा देवकीपुत्र कृष्णाला अध्यात्मविद्येचा उपदेश आणि काही दंतकथाही आलेल्या आहेत. ‘ सर्वं खल्विदं ब्रह्म ’ = हे सर्व काही आहे ते ब्रह्मच होय, हा या आध्यायातील प्रसिद्ध सिद्धान्त होय. यात ब्रह्माचे वर्णन केले आहे, ते असे–

> सर्वं खल्विदं ब्रह्म तज्जलानिति शान्त उपासीत । अथ खलु क्रतुमयः पुरुषो यथा क्रतुरस्मिंल्लोके पुरुषो भवति तथेतः प्रेत्य भवति । स क्रतुं कुर्वीत ॥ १ ॥ मनोमयः प्राणशरीरो भारूपः सत्यसङ्कल्प आकाशात्मा सर्वकर्मा सर्वकामः सर्वगन्धः सर्वरसः सर्वमिदमभ्यात्तोऽवाक्यनादरः ॥ २ ॥ एष म आत्मान्तर्हृदयेऽणीयान् व्रीहेर्वा यवाद् वा सर्षपाद् वा श्यामाकाद् वा श्यामाकतण्डुलाद् वा एष म आत्मान्तर्हृदये ज्यायान् पृथिव्या ज्यायानन्तरिक्षाज्ज्यायान् दिवो ज्यायानेभ्यो लोकेभ्यः ॥ ३ ॥ सर्वकर्मा सर्वकामः सर्वगन्धः सर्वरसः सर्वमिदमभ्यात्तोऽवाक्यनादरः । एष म आत्मान्तर्हृदय एतद् ब्रह्मैतमितः प्रेत्याभिसम्भवितास्मीति यस्य स्यादद्धा न विचिकित्सास्ति इति ह स्माह शाण्डिल्यः शाण्डिल्यः ॥ ४ ॥
>
> (छां. ३.१४)

अर्थ – हे सर्व ब्रह्मच आहे. प्राण धारण करून जागृतीत लीला करणारा म्हणजे आनंदभोगार्थ कर्म करणारा जीव म्हणजेच ब्रह्म होय, असे मानून आणि शांत होऊन म्हणजे प्रिय गोष्टीने हर्ष न मानता आणि अप्रिय गोष्टीने विषाद न मानता, त्या ब्रह्माची उपासना करावी. आता हा मनुष्य क्रतुमय आहे; म्हणजे कोणतेतरी साध्य मनात धरून त्याकरिता झटणारा आहे. मनुष्य ज्या साध्याकरिता या लोकी झटेल, तेच त्याला मृत्यूनंतर प्राप्त होईल. म्हणून त्याने उपरिनिर्दिष्ट क्रतू करावा. (म्हणजे खऱ्या आनंदासाठी त्याने झटावे.) जागृतीत आनंद भोगणाऱ्या आत्म्याचे स्वरूप असे आहे. प्राण हेच त्याचे शरीर आहे. त्याला मन आहे. तो भारूप आहे, म्हणजे त्याला स्वतःचे आणि जगताचे भान आहे. निद्रावस्थेतील आत्म्याप्रमाणे तो भानरहित नाही. तो सत्याचीच इच्छा करणारा आहे. म्हणून तो सर्व आकाशात म्हणजे सर्वत्र आपला आत्मा आहे, असे मानणारा असतो. म्हणून त्या सर्व भूतांच्या हिताकरता सर्व कर्म करणारा, सर्व गंधांचा व रसांचा उपभोग घेणारा, सर्व जगाला आपल्या इंद्रियांनी ग्रहण करणारा, कोणाचा आदर (स्तुती) वा निंदा न करणारा असा आहे. हा माझ्या अंतर्हृदयातील आत्मा तांदळापेक्षा, यवापेक्षा, मोहरीपेक्षा, श्यामाकापेक्षा (सावे) किंवा श्यामाकतंडुलापेक्षा लहान आहे. तो पृथिवीपेक्षा मोठा, अंतरिक्षापेक्षा मोठा, स्वर्गापक्षा मोठा व या सर्व लोकांपेक्षा मोठा आहे. सर्व कर्मे करणारा, सर्व काम धारण करणारा, सर्व गंधांचा व सर्व रसांचा उपभोग घेणारा, सर्व जगाचे ज्ञान घेणारा, कोणाची निंदा किंवा स्तुती न करणारा असा हा माझ्या अंतर्हृदयातील आत्मा आहे. हाच ब्रह्म आहे. यालाच मी मृत्यूनंतरही प्राप्त होईन, असे ज्याचे निश्चित मत असते, त्याला त्याविषयी विचिकित्सा म्हणजे संशय असत नाही, असे शांडिल्य म्हणाला.

चवथ्या अध्यायात रक्वाचे तत्त्वज्ञान, सत्यकाम जाबालाची कथा, सत्यकामाने उपकोसलाला केलेला ब्रह्मज्ञानाचा उपदेश, इ. विषय आले आहेत. पाचव्या अध्यायात प्रवाहण जैवलीचे दार्शनिक सिद्धांत व अश्वपती केकयाची सृष्टिविषयक तत्त्वे हे विषय प्रमुख आहेत. सहाव्या अध्यायात महर्षी आरुणीच्या सिद्धांताचे विवेचन आहे. आरुणी हा छांदोग्यातील सर्वमान्य दार्शनिक असून ‘ तत्त्वमसि श्वेतकेतो ’ = हे श्वेतकेतो, ते तू आहेस, हा आरुणीचा सिद्धांत आहे. ब्रह्माचे सूक्ष्मत्व आरुणीने श्वेतकेतूला पुढील प्रयोगाने पटवून दिले आहे—

> न्यग्रोधफलमत आहरेतीदं भगव इति । भिन्धीति भिन्नं

भगव इति। किमत्र पश्यसीत्यण्व्य इवेमा धाना भगव इत्यासामङ्गैकां भिन्धीति। भिन्ना भगव इति। किमत्र पश्यसीति। न किञ्चन भगव इति ॥ तं होवाच यं वै सोम्यैतमणिमानं न निभाल्यसे एतस्य वै सोम्यैषोऽणिम्न एवं महान् न्यग्रोधस्तिष्ठति श्रद्धत्स्व सोम्येति। स य एषोऽणिमैतदात्म्यमिदं सर्वं तत्सत्यं स आत्मा तत्त्वमसि श्वेतकेतो इति ॥

(छां. ६.१२)

आरुणी (-श्वेतकेतूला)— तिकडून वडाचे फ़ळ घेऊन ये. श्वेतकेतूने ते आणल्यावर आरुणीने त्याला ते फोडायला सांगितले आणि फोडल्यावर विचारले – त्यात तुला काय दिसते?

श्वेतकेतू – भगवन्, परमाणूंसारखी अतिसूक्ष्म बीजे दिसतात. मग आरुणीने श्वेतकेतूला त्या बीजांपैकी एक फोडायला सांगितले व विचारले – त्यात तुला काय दिसते?

श्वेतकेतू – भगवन्, त्यात काही दिसत नाही.

आरुणी – वत्सा, तुला दिसत नाही, त्याच सूक्ष्म अंशापासून या प्रचंड वटवृक्षाची उभारणी झाली आहे. वत्सा, या बीजातील अव्यक्त अंशावर श्रद्धा ठेव. या अत्यंत सूक्ष्म तत्त्वापासूनच हे सर्व जग उत्पन्न झालेले आहे. ते सत्य आहे, तो आत्मा म्हणजेच तू आहेस.

सातव्या अध्यायात सनत्कुमार व नारद यांचा संवाद आहे. मंत्रविद नारद आत्मज्ञानाच्या प्राप्तीसाठी महर्षी सनत्कुमाराकडे येतो. सनत्कुमार त्याला उपदेश करतो––

यो वै भूमा तदमृतम् अथ यदल्पं तन्मर्त्यम्

(छां. ७.२४)

अर्थ – जे विशाल, तेच अमृत होय; जे अल्प, ते मर्त्य होय.

आठव्या अध्यायात इंद्र व विरोचन यांची कथा आलेली आहे. यात आत्मज्ञानाविषयी काही विचार मांडले आहेत, ते असे – शरीर हे मर्त्य म्हणजे मृत्यूने ग्रासलेले आहे. पण ते अविनाशी व अशरीरी आत्म्याचे अधिष्ठान आहे. आत्मा हा शरीरयुक्त असेपर्यंत प्रिय व अप्रिय यांनी युक्त असतो. पण त्याचा शरीराशी संबंध तुटला, की त्याला प्रिय व अप्रिय यांचा स्पर्श होत नाही.

जीव ज्याला सोडतो, ते सर्व मरते. पण जीव शरीराबरोबर मरत नाही, तोच आत्मा होय. हाच आत्मा प्रत्येकाच्या हृदयात आहे. हृदयस्थ आत्मा जाणणारा ब्रह्मलोकाला जातो. आत्मा हा अमृत, अभय व ब्रह्म आहे. तो सर्व लोकांचे धारण करतो. तो अहोरात्रांनी परिच्छिन्न होत नाही. त्याला जरा मृत्यू व शोक या अवस्था नाहीत. सर्व पाप–पुण्ये त्याच्यापासून निवृत्त होतात.

[वै. सा. सं.; म. ज्ञा. को.; डॉ. वासुदेवशरण अग्रवाल– सा. हिंदुस्थान, १ नोव्हें. १९६४]

छांदोग्य ब्राह्मण सामवेदीय कौथुम शाखेचे ब्राह्मण. हे ४० अध्यायांत विभक्त आहे. त्यांपैकी शेवटच्या आठ अध्यायांना छांदोग्य उपनिषद् असे म्हणतात. पाहा – छांदोग्य उपनिषद.

छाऊ नृत्य बिहार व ओडिसा या राज्यातील एक नृत्य. बिहारच्या सराइकेला भागात या नृत्याचा विशेष प्रचार आहे. छाऊ म्हणजे मुखवटा. मुखवटे घालून हे नृत्य करतात, म्हणून त्याला छाऊ नृत्य असे म्हणतात. हे नृत्य म्हणजे नृत्यांची एक साखळी असून, दर वर्षी वसंतोत्सवात ते करतात. अर्धनारीनटेश्वर ही या उत्सवाची देवता असून, ती सुपीकपणा व सर्जन यांचे प्रतीक आहे. तीन दिवस शंकराची पूजा केल्यावर मग या नृत्याला आरंभ होतो.

तीन रात्री हे नृत्य चालते. याच्या साथीला नगारा, मृदंग, बासरी, इ. वाद्ये असतात. यात साध्या नृत्याबरोबर पौराणिक व रामायण–महाभारतातील प्रसंगांवर आधारलेली नृत्येही असतात. या नृत्यात गती, उत्प्लवन, भ्रमरी व पदन्यास यांना महत्त्व असते. प्रत्येक छाऊ नर्तकाला वाघ, सिंह, हरिण, मोर,



राधा-कृष्ण – छाऊ नृत्य

घोडा व हंस यांच्या गती माहीत असाव्या लागतात. अंगविक्षेप व हावभाव यांच्या द्वारे नर्तकाने नृत्याची कथा सादर करायची असते. या नृत्यांपैकी शिवतांडव हे नृत्य फार प्रभावी असते. छाऊ नृत्याच्या पठडीतील मयूरनृत्य, सागरनृत्य, सर्पनृत्य, धीवरनृत्य, नाविकनृत्य, इ. नृत्ये उल्लेखनीय आहेत. हे नृत्य केवळ पुरुषांचे आहे.

ओडिसामध्ये प्रचलित असलेल्या छाऊ नृत्यात नर्तक मुखवटे घालीत नाहीत. दोन व्यक्ती मिळून जी नृत्ये सादर करतात, त्यात राधाकृष्णांच्या लीला दाखवणे, हा प्रकार प्रमुख असतो. यात पुरुषच राधेचे सोंग घेतो. हे नृत्य अत्यंत मोहक व भावपूर्ण असते. नृत्याच्या गतीबरोबर चेहऱ्यावरील भावमुद्राही बदलत असतात. आणि हेच या नृत्याचे वैशिष्टय आहे. [भा. लो. नृ.; ए. हो. रा.; इलस्. वीकली, २२ एप्रिल १९६२]

छागलेय उपनिषद एक नव्य उपनिषद. हे उपनिषद गद्यात्मक असून, त्याचा प्रारंभ सरस्वती नदीच्या काठी ऋषिजन करीत असलेल्या यज्ञसत्राच्या उल्लेखाने होतो. कवष ऐलूष हा दासीपुत्र असल्यामुळे आणि वेदपठनाचा अधिकार फक्त ब्राह्मणांनाच असल्यामुळे त्याला या यज्ञात भाग घेता येईना, असे त्यात सांगितले आहे.

त्यानंतर आपतत्त्वाचा ऋग्वेद व सामवेद यांच्याशी अभेद दर्शविला आहे.

पुढे नैमिषारण्यात शौनक ऋषीने सुरू केलेल्या यज्ञसत्राचा उल्लेख आहे. आत्रेयाने या सत्रातील सर्व विधिविधान चालवले. आत्रेयाला हे सर्व प्रमुत्व कसे मिळाले, ते जाणून घेण्याची शौनकाला फार उत्कंठा लागली होती. आत्रेयाने त्यासाठी त्याला कुरुक्षेत्रातील बालिशाकडे पाठवले. बालिश हा कामुक म्हणून प्रसिद्ध होता. शौनक कुरुक्षेत्रात एक वर्षभर राहिला.

या उपनिषदात शेवटी आत्मतत्त्व हे सर्व क्रियांमागे प्रेरक कसे आहे, ते सांगितले आहे. आत्मा शरीरातून निघून गेला, की शरीर निश्चल होते. आत्मा हा शरीररथाचा सारथी असून, त्याच्या वास्तव्यामुळेच शरीराची कामे चालतात. या आत्मतत्त्वाच्या ज्ञानामुळेच आत्रेयाला प्रमुत्व मिळाले होते, असे पर्यायाने यात सूचित केले आहे. [सी. ग. देसाई]

छातापरब बिहारमधील द. मानभूम व बंगालमधील बांकुरा-मिदनापूर या भागातील शेतकऱ्यांचा इंद्रोत्सव. सामान्यपणे पेरणीच्या कामाला प्रारंभ करण्यापूर्वी चार दिवस हा उत्सव चालू असतो. उत्सवाच्या अगोदर चार दिवस साल वृक्षाच्या दोन फांद्या आणून त्या सुताराकरवी भूमीत पुरतात. पहिल्या दिवशी ब्राह्मण पुरोहित त्या फांद्यांना विधिपूर्वक स्नान घालून त्यांची पूजा करतो. या पूजेत मृत्तिका-कुंभ, पाणी, फुले, शेंदूर, बिल्वपत्र, आम्रपल्लव, अक्षता, इ. गोष्टी असाव्या लागतात. दुसऱ्या दिवशी कुंभाची, ब्रह्मा-मूर्तीची व गणपतीची प्रतिष्ठापना करून त्यांचे पूजन होते. तिसरा दिवस परबाचा म्हणजे उत्सवाचा प्रमुख दिवस. या दिवशी पुरोहिताला उपास करावा लागतो. त्याच्या मदतीला असलेले दोन ब्राह्मण तांदुळाच्या पिठाने रांगोळी काढतात व त्यात हळद आणि बुक्का भरतात. मग एक मेंढा आणतात व त्याच्या शिंगांना तेल-हळद लावून त्याला बळी देतात. राजघराण्यातल्या मंडळींनी या उत्सवात यजमानपद भूषविले असेल, तर त्यांच्या उपस्थितीत होम केला जातो. नंतर चौथ्या दिवशी त्या सालशाखांना दूर्वा वाहून त्यांची पूजा करतात. एवढे झाल्यावर उत्सव समाप्त होतो.

या उत्सवासाठी आसपासच्या खेड्यातून अनेक लोक येतात. ते ढोलकीच्या साथीवर निरनिराळी गाणी म्हणून रात्री जागवतात. पूर्वी या उत्सवात राजाला अग्रमान असे. त्याला त्या प्रसंगी नजराणे दिले जात. [फोकलोअर, ऑगस्ट १९६२]

छात्र गुरूच्या सहवासात राहून विद्याध्ययन करणारा शिष्य. याची व्याख्या अशी – "छत्रं गुरोर्दोषाणामावरणं तच्छीलमस्येति" = छत्र म्हणजे गुरूच्या दोषावर आवरण घालणे, हे ज्याचे शील आहे, तो छात्र होय (श. क.).

छात्रांचे दोन प्रकार सांगितले आहेत– एक दंडमाणव व दुसरा अंतेवासी. पतंजलीच्या मते ज्याने अजून वेदाध्ययनाला प्रारंभ केला नाही, तो दंडमाणव किंवा माणव होय. तत्त्वबोधिनीकाराच्या मते ज्याचे अजून उपनयन झाले नाही त्याला माणव म्हणावे. मतंगजातकात बालकांना माणव म्हटले आहे व हे माणव आश्रमात काठीचे घोडे करून खेळताना दिसतात, अशी माँहिती दिली आहे.

माणवाची वेदाध्ययनाची वेळ आली म्हणजे आचार्य त्याचा उपनयन संस्कार करतात. या संस्कारानंतर मनाने, कर्माने व वाचेने आचार्यांचे सान्निध्य करणाऱ्या ब्रह्मचाऱ्याला अंतेवासी असे म्हणतात. एकाच गुरूजवळ अध्ययन करणाऱ्या अंतेवासींना सब्रह्मचारी (गुरुबंधू) अशी संज्ञा आहे. पित्यापाशी अध्ययन करणाऱ्या अंतेवासीला पितुरन्तेवासी म्हणतात. ज्या कक्षेत छात्र अध्ययन करतात, त्या कक्षेनुसार व ज्या गुरुगृही अध्ययन करतात, त्या गुरूच्या नावावरून अथवा ज्यांच्या ग्रंथांचा अभ्यास करतात, त्या ग्रंथांच्या नावावरून छात्रांचे नामकरण करण्याची प्राचीन पद्धती होती. ऋतूंच्या नावावरून छात्रांचे नामकरण करण्या-

चीही पद्धती होती. उदा० वर्षा, शरद्, हेमंत या ऋतूंत अध्ययन करणाऱ्या छात्रांना वार्षिक, शारदिक व हैमंतिक छात्र म्हणत. सोमादी यागांचे अध्ययन करणाऱ्या छात्रांना अग्निष्टोमिक, वाजपेयिक, इ. म्हणत. वेदांच्या पदक्रमादींचे अध्ययन करणाऱ्यांना पदक, क्रमक, इ. म्हणत.

पाणिनीने व पतंजलीने स्त्रीछात्रांचाही उल्लेख केलेला आहे. तत्कालीन पुरुष विद्यार्थ्यांच्या नामकरणासंबंधी जे नियम होते, तेच नियम विद्यार्थिनींच्या नामकरणासंबंधी चालत. प्राचीन काळी कित्येक आचार्यांच्या स्त्रियाही अध्यापनाचे कार्य करीत. त्या उपनयनाचेही काम करीत असत. या स्त्रीआचार्यांकडून पुरुष छात्रही शिक्षण घेत असत.

एखाद्या विषयाच्या अध्ययनाच्या समाप्तीला वृत्त अशी संज्ञा असे. उदा० ‘वृत्तो गुणो देवदत्तेन’ = देवदत्ताने व्याकरणातील गुणप्रकरण अभ्यासून संपवले.

काही थोड्या काळासाठीही छात्र शिक्षणसंस्थात प्रविष्ट होत असत. त्यांना सांवत्सरिक, मासिक, अर्धमासिक, इ. म्हणत. पाहा – गुरुशिष्य. [पा. भा.]

छानिपिट्टा छत्तीसगड प्रदेशातील अहीर किंवा रावत लोकांची एक देवता. ही एखाद्या अहीराच्या मानगुटीवर बसली, अगर गावात देवीची साथ आली, की हे लोक दिवाळीच्या दिवशी गावातल्या घरांची छपरे काठ्यांनी बडवतात. मग प्रत्येक छपराचे थोडे थोडे केंबळ घेऊन व ते एका काठीला बांधून छानिपिट्टाचा नामघोष करीत ती काठी गावाबाहेर नेऊन टाकतात. ‘गुजरीअहिरीण’ या छत्तीसगडी लावणीत छानिपिट्टाचा उल्लेख आहे. ही लावणी उ. भारतातील बहुतेक प्रमुख भाषेत प्रसिद्ध असून, तीत गुजरी नामक गौळणीवरून मोगलांशी झालेल्या युद्धात गुजरीच्या बाजूने छानिपिट्टाने भाग घेतल्याचे व तिच्याच कृपेने गुजरीला विजय प्राप्त झाल्याचे वर्णन आहे. [फो. साँ. छ.]

छायाछकडी राजस्थानातील एक खेळ. हा खेळ युद्धस्वरूपाचा असल्यामुळे खेळाडू दमदार आणि सशक्त असणे महत्त्वाचे असते. हा खेळ प्रामुख्याने चांदण्या रात्री खेळला जात असला, तरी प्रखर उन्हातही काही ठिकाणी तो खेळला जातो.

खेळाच्या प्रारंभी खेळाडूंच्या दोन समान तुकड्या पाडतात. प्रत्येक तुकडीचा एक गटनायक असतो. तो आपापल्या तुकड्या घेऊन जिथे प्रकाश आणि सावली किंवा अंधार दोन्ही आहेत, अशा क्रीडांगणावर जातो. मग दोन्ही गट समोरासमोर येतात. एक गट प्रकाशात व दुसरा अंधारात किंवा सावलीत उभा राहतो. मग दोन्ही तुकड्या विरुद्ध बाजूच्या तुकडीतील खेळाडूंना आपल्याकडे खेचण्याचा प्रयत्न करतात व त्यावरून मारामारीला प्रारंभ होतो. जो खेळाडू आपल्या विरुद्ध तुकडीत पाच मिनिटांपेक्षा जास्त काळ डांबला जातो, तो त्यानंतर त्या तुकडीचाच होऊन जातो व मग त्याला त्याच तुकडीच्या बाजूने आपल्या पूर्वीच्या तुकडीशी लढावे लागते. अशा प्रकारे जी तुकडी विरुद्ध तुकडीचे सर्व खेळाडू जिंकून आपल्या दिशेला खेचून आणते, ती विजयी होते. मात्र विरुद्ध बाजूने ओढून घेतलेला खेळाडू पाच मिनिटांपूर्वीच शत्रुपक्षाच्या तुकडीतून पळून जाण्याचा प्रयत्न करतो व त्यामुळे या खेळाचा निर्णय लागण्यात बरीच चुरस निर्माण होते. [मरुभारती]

छायानट हिंदुस्थानी संगीतातील एक राग. हा कर्नाट रागापासून निघाला आहे. यात मध्यम शुद्ध व तीव्र आणि बाकीचे सर्व स्वर शुद्ध लागतात. याची जाती षाडव संपूर्ण आहे. वादी पंचम व संवादी ऋषभ. आरोह–सा रे ग म प प ध प सा. अवरोह–सा नि ध प ध म प रे रे ग ग म प रे सा. गानसमय रात्रीचा पहिला प्रहर. या रागात पंचम व ऋषभ या दोन स्वरांची संगती मधुर लागते. याचे स्वरूप असे– गौरवर्ण, रक्त नेत्र, कंठात रत्नहार घातलेला, पाटल वर्णाचे शिरस्त्राण व फुलांचा चेंडू धारण करणारा. [श्री. आबासाहेब मुजुमदार, पुणे]

छायानाट्य एक प्राचीन कलाप्रकार. पडद्यावर बाहुल्यांच्या नाचत्या छाया दाखवून हा खेळ करतात. या खेळासाठी चामड्याच्या अथवा लाकडाच्या बाहुल्या तयार करतात. त्यांचे हात–पाय सुटे सुटे बनवतात व मग ते तारेने जोडतात. खेळाच्या जागी खांबांना धरून एक शुभ्र पडदा बांधतात. पडद्यामागे थोड्या अंतरावर एक मोठा दिवा प्रज्वलित करून ठेवतात. प्रेक्षकांच्या बाजूने अंधार करतात. या खेळात एक सूत्रधार व त्याचे काही साथीदार असतात. सूत्रधार हा बाहुल्या नाचविण्याचे काम करतो. पडद्यावर आपली छाया पडणार नाही, अशा बेताने तो मागे बसतो. प्रथम गायक पडद्यासमोर येऊन कथासूत्र गातो व बाजूला होतो. मग पडद्याशेजारी बसलेले साथीदार संवादाला प्रारंभ करतात. त्या संवादानुसार सूत्रधार चित्रांच्या दोऱ्या हालवून त्यांच्या सावल्या पडद्यावर नाचवू लागतो.

छायानाट्ये ही प्रामुख्याने पौराणिक असतात. रामायण–महाभारतातील कथाप्रसंग व देव–दानव यांची चरित्रे हे छाया

नाटचाचे विषय असतात. त्यांना अनुसरूनच बाहुल्या क्रूर, सौम्य, सुंदर अशा विविध प्रकारच्या व विविध वेषभूषेच्या बनवल्या जातात.

छायानाटचे व कळसूत्री बाहुल्या हे दोन्ही प्रकार वेगवेगळे आहेत. रंगभूमीवर प्रत्यक्ष बाहुल्या नाचवून कळसूत्री नाटके दाखवतात; तर छायानाटचात बाहुल्या पडद्याआड नाचवून त्यांच्या छाया पडद्यावर पाडतात. कळसूत्री बाहुल्यांचे आकार रंगभूमीवर जेवढचास तेवढे दिसतात; तर छायानाटचात त्यांच्या छाया पडद्यावर मोठ्या दिसतात.

हा खेळ विशेषेकरून दक्षिण भारतात प्रचलित होता. एका काळी महाराष्ट्र, आंध्र, केरळ, तमिळनाड या प्रदेशांत छायानाटचांचा खेळ दाखवणारे फिरते संघ असत. निरनिराळ्या गावी होणाऱ्या जत्रांमध्ये हे लोक आपले खेळ दाखवीत. केरळात छायानाटचाला पावाकूत्तू म्हणतात. कोकणातील सावंतवाडी भागातले ठाकर लोक छायानाटचाचे प्रयोग करण्यात मोठे कुशल होते. हा खेळ मूळचा महाराष्ट्रीय असल्याचे सांगतात. महाराष्ट्राकडून तो आंध्राने उचलला व तिथून तो साऱ्या दक्षिणेत प्रसार पावला. आंध्रातले या खेळाचे सूत्रधार तेलुगूबरोबरच मराठीही बोलतात व काही मराठी सामाजिक चालीरीतींचेही पालन करतात.

या खेळातील देवांची चित्रे हरणाच्या कातड्यापासून व राक्षसांची चित्रे बकऱ्याच्या कातड्यापासून बनवण्याची प्रथा होती. पुढे काही लोक चित्रासाठी बैलाचे कातडे वापरू लागले, म्हणून हा खेळ ऱ्हास पावला, अशी त्या लोकांची समजूत आहे. सांप्रत हा खेळ जवळ जवळ नामशेषच झाला आंहे. महाराष्ट्रात सावंतवाडी भागात क्वचितच एखाद्या प्रसंगी हा खेळ पाहायला मिळतो. आंध्रातही गोदावरी जिल्ह्यातल्या काही खेड्यांतच या खेळाचे प्रयोग होतात.

इतिहास – भारतात छायानाटचांची प्रथा इ. स. च्या पूर्वीपासून चालू आहे. या बाबतीत डॉ. पिशल यांनी अनेक पुरावे दिले आहेत. महाभारत व थेरीगाथा यांत छायानाटचाचे उल्लेख आढळतात. महाभारतात रूपोपजीवनम् असा शब्द आलेला आहे. या शब्दावर टीका लिहिताना नीलकंठाने थोडक्यात छायानाटचाचे वर्णन दिले आहे. प्रो. रिज्वे यांच्या मते मुळात हा खेळ ग्रीसमध्ये सनपूर्व ४ थ्या शतकात निर्माण झाला व तिथून पुढे तो अन्यत्र पसरला. पण श्री. पु. गो. काणेकर यांना हे मत मान्य नाही. त्यांच्या मते सुमारे दोन हजार वर्षांपूर्वी हा खेळ भारतात चालू होता. भारतातून जावा, बाली, इ. प्रदेशात जे लोक गेले, त्यांनी तो खेळ इकडून तिकडे नेल्याचे पुरावे सापडतात. तिथून पुढे रामदासांच्या काळापर्यंत या खेळाचे उल्लेख अनुस्यूतपणे आढळतात. दूतांगद नावाचे एक छोटे छायानाटच उपलब्ध आहे. सुभट हा त्याचा कर्ता होय. इ. स. १२४३ साली या छायानाटचाचा प्रयोग झाल्याचे कळते. ज्ञानेश्वरांच्या काळी ही छायानाटचे लोकांना उत्तम परिचित होती. ज्ञानेश्वरांनी या छायानाटचाला धरून पुढील रूपकात्मक ओवी लिहिली आहे–

> **स्वप्नायेचे आडवस्त्र । लावूनि एकला खेळवी सूत्र ।**
> **बाहेरी नटी छायाचित्र । चौऱ्यांयशी लक्ष ॥**
>
> (ज्ञाने. १८.१३०३)

रामायणविषयक एक छायानाटच हेमाद्रिपंडिताने रामदेवराव यादवापुढे करविले होते, असा उल्लेख इ. स. च्या १५ व्या शतकातील कृष्णदास दामा याने आपल्या महाभारतात (आदि. १. ३१–३४) केला आहे. समर्थ रामदासांनीही दासबोधात छायानाटचाचा उपयोग उपमा व दृष्टांत देण्यासाठी केला आहे. [लो. ध. ना. प.; लो. ना. प.]

छायाशंकू

कालमापनाचे एक प्राचीन साधन. सावली मोजण्याच्या निमुळत्या काठीला छायाशंकू असे नाव आहे. सूर्य उगवतो, तेव्हा माणसाची सावली त्याच्या विरुद्ध बाजूला दूरपर्यंत पसरते. सूर्य जसजसा आकाशात चढत जातो, तसतशी सावली दुसऱ्या बाजूने आकसत जाते. दुपारी तो जेव्हा माथ्यावर येतो, तेव्हा माणसाची सावली त्याच्या पायांजवळ येऊन लहानांत लहान होते. सूर्य पश्चिमेकडे ढळतो, तेव्हा सावली पूर्वेकडे पडते आणि तिची लांबी वाढत जाते. तो मावळतो, तेव्हा सावली लांबच लांब होऊन नाहीशी होते. अशा रीतीने सूर्याचे आकाशातील स्थान आणि सावलीची वाढ किंवा संकोच यांचा परस्परांशी संबंध आढळल्यामुळे प्राचीन काळी एखादी काठी रोवून तिच्या सावलीवरून किती घटिका पळे झाली ते ठरविण्यात येऊ लागले. त्यातूनच छायाशंकू हे साधन जन्माला आले. (आकृती १)–कख ही काठी जमिनीवर उभी आहे. सूर्य उत्तरेला किंवा दक्षिणेला कललेला असतो, त्यामुळे काठीची छाया यर या पूर्व-पश्चिम दिशा दाखवणाऱ्या रेखेवर न पडता



छायाशंकू

थोडीशी बाजूला पडते. सकाळी १० वाजता ही छाया कट या रेषेवर असते, मध्यान्ही ती कछ वर आणि दुपारी २ वाजता कठ वर असते.

एका आडव्या फळीवर एक फळी उभी ठेवली व तिचे वरचे टोक ध्रुवाभिमुख ठेवले, म्हणजे खालच्या आडव्या फळीवर पडणाऱ्या छायेने तत्कालीन वेळ समजते (आकृती २). प्राचीन काळी हे साधन सर्व जगभर प्रचलित होते. [पं. ज्यो.]

(२)



छायाशंकू

छारा गुजरातेतील एक मुसलमान जात. हे भिक्षा मागतात. हे नावाचेच मुसलमान असून, यांच्या चालीरीती हिंदूसारख्याच आहेत. हे लोक पावसाळ्यात एका ठिकाणी जमून लग्ने व न्यायनिवाडे करून घेतात.

छालिक्य एक प्राचीन नृत्य. हे रासवर्गापैकी आहे. याचा प्रथम उल्लेख हरिवंशात येतो. हे नृत्य स्त्री–पुरुषांचे मिश्र नृत्य आहे. नाचताना विशेष प्रकारची काही गीते गायली जातात. त्यांना छालिक्यगेयम् ' किंवा छालिक्यगांधर्वम् म्हणतात. या नृत्यात एका विशिष्ट प्रकारे उड्या मारण्यालाच अधिक प्राधान्य आहे. [प्रा. भा. म.]

छिंपा एक रंगारी जात. यांची वस्ती प्रामुख्याने गुजरातमध्ये आहे. यांना छिंबा, छिपी अशी अन्यही नावे आहेत. यांच्यांत सर्व धर्मांचे लोक असले, तरी वैष्णवधर्मीयांची संख्या अधिक आहे. हे लोक चिटाचे कापड छापतात व कपड्यांना मंजिष्ठांचा रंग देतात. यांच्यांतले काही लोक धोबीकामही करतात. यांच्या चालीरीती वाण्यांप्रमाणे आहेत. [म. ज्ञा. को.]

छिक्का कुलू प्रदेशातील एक पर्वतक्षेत्र. धौम्य ऋषीने इथे काही काळ तप:साधना केली होती. वस्तुतः हे मूळचे तक्षकस्थान होते, अशी समजूत आहे; कारण या पर्वतावर तक्षक नागाची मूर्ती आहे. [कल्याण–तीर्थांक]

छिन्नमस्ता तंत्र मार्गातली एक देवता. 'छिन्नं मस्तं शिरो यस्याः' जिचे मस्तक तोडलेले आहे, अशी देवी (श. क.). धन्वंतरीतंत्रशिक्षा या ग्रंथांत या देवीचे वर्णन आहे, ते असे—

नाभिप्रदेशात असलेल्या प्रफुल्ल आणि शुद्ध कमलाच्या आत सूर्याचा प्रदेश असून, तो तांबडा आहे. त्याच्या भोवती सत्त्व, रज व तम अशी तीन रेषावलये आहेत. त्या वलयांच्या अंतर्भागात छिन्नमस्ता देवीचे वास्तव्य असून, ती कोटिसूर्यांच्या इतकी तेजस्वी आहे. तिच्या एका हातात तिचे स्वतःचे मस्तक असून, ती स्वतःच्याच कंठातून वाहत असलेले रक्त प्राशन करीत असते. तिचे केस मोकळे असून, ते अनेक प्रकारच्या फुलांनी सुशोभित केलेले आहेत. तिच्या उजव्या हातात चिरण्याचे हत्यार असून, गळ्यात नररुंडमाला आहे. ती नग्न असून तिने जानव्याप्रमाणे गळ्यात एक सर्प धारण केलेला आहे. रती व काम एकमेकांना आलिंगन देत असलेल्या अवस्थेत खाली असून, छिन्नमस्ता त्यांच्यावर उभी आहे. ही सुंदर युवतीसारखी दिसत असून, हिचे स्तन पुष्ट व उन्नत आहेत. हिच्या डाव्या-उजव्या बाजूंना डाकिनी व वर्णिनी या दोन शक्तिदेवता आहेत.



छिन्नमस्ता

छिन्नमस्ता देवीने मस्तक नसतानाही निशुंभ दैत्याला

मारले, अशी कथा आहे. हिला दशमहाविद्यांपैकी एक मानले आहे.

‘ॐ श्रीं ह्रीं ह्रीं ऐं वज्र वैरोचनीये ह्रीं ह्रीं फट् स्वाहा’ असा या देवतेचा मंत्र आहे. या मंत्राचा जप केल्यावर इष्ट फलाची प्राप्ती होते, असे सांगितले आहे.



छिन्नमस्ता – यंत्र

छिन्नमस्तेचे एक यंत्र आहे. इष्ट कामनेच्या सिद्धीसाठी त्याची पूजा करतात व विशिष्ट हेतू साध्य होण्यासाठी विशिष्ट पुष्पांनी, फळांनी वा तिळ-तंडुलांनी देवतेचे हवन करतात. [मं. म.; भा. प्र. वि.; तं. फि. ऑ. सी.; डे. हिं. इ.]

छीतस्वामी (इ. स. चे १६ वे शतक) अष्टछाप कवींपैकी एक. हा मथुरेचा राहणारा असून व्यवसायाने पंड्या होता. वयाची वीस वर्षे उलटेपर्यंत याचे वर्तन उच्छृंखलपणाचे होते. दिवसभर गावात उनाडावे आणि गोरगरिबांना व स्त्रियांना हरप्रकारे त्रास द्यावा, अशी याची वृत्ती होती. या त्याच्या गुंडगिरीवरून गावकरी त्याला छीतू चोबे म्हणू लागले.

एक दिवस त्या गावात गोस्वामी विठ्ठलनाथांचे आगमन झाले. तेव्हा त्यांची थोडी मस्करी करावी, या उद्देशाने छीतू चोबे एक खोटा रुपया आणि नासका नारळ घेऊन त्यांच्याकडे गेला. विठ्ठलनाथांनी ते ओळखले आणि आपल्या सिद्धिसामर्थ्याने त्या नासक्या नारळाचे खोबरे गोड करून दाखवले व रुपयाही खोट्याचा खरा केला.

तो चमत्कार पाहिल्यावर छीतूला आपल्या कृत्याची लाज वाटली व तो विठ्ठलनाथांना शरण गेला. मग विठ्ठलनाथांनी त्याला पुष्टिसंप्रदायाची दीक्षा देऊन आपल्या शिष्यपरिवारात सामील करून घेतले. दीक्षाविधीनंतर त्यांनी त्याचे नाव छीतस्वामी असे ठेवले.

त्यानंतर काही काळ त्याने राजा बिरबलाकडे पौरोहित्य केले; पण अल्पावधीतच त्याचा व बिरबलाचा खटका उडाल्यामुळे त्याने ते काम सोडून दिले. विठ्ठलनाथांना ही गोष्ट समजली. तेव्हा छीतस्वामीच्या निर्वाहासाठी त्यांनी लाहोरच्या वैष्णवमंडळीकडून काही पैसे मिळावे, अशी व्यवस्था केली. प्रारंभी ही गोष्ट छीतस्वामीला पसंत पडली नाही. ‘मी भिक्षा मागण्यासाठी वैष्णव झालो नाही.’ असे बाणेदार उत्तर त्याने विठ्ठलनाथांना दिले. परंतु विठ्ठलनाथांनी त्याची समजूत पटवून त्याला ते धन स्वीकारायला लावले.

यानंतर छीतस्वामी गोवर्धन क्षेत्राजवळील पूंछरी नामक गावी श्रीनाथजीचे भजन–कीर्तन करीत राहू लागला. त्याची कीर्तनशैली इतकी रसाळ होती, की एकदा प्रत्यक्ष अकबर बादशाहाही वेष बदलून त्याचे कीर्तन ऐकायला आला होता, असे म्हणतात. इ. स. १५४५ मध्ये विठ्ठलनाथांनी अष्टछाप कविमंडळाची स्थापना केली आणि त्यात छीतस्वामीचाही समावेश केला. पुढे विठ्ठलनाथांच्या देहावसानानंतर थोड्याच काळात छीतस्वामीनेही देहत्याग केला.

लहानपणापासूनच छीतस्वामीला काव्य–संगीताची आवड होती; परंतु त्याच्या काव्यरचनेला खरा बहर आला, तो पुष्टिसंप्रदायात पदार्पण केल्यावर. नाथजीच्या मंदिरात कीर्तने करताना त्याने बरीच स्फुट पदे व काही आख्यानकाव्ये गुंफली. त्याच्या नावावर आज एकही ग्रंथ आढळत नसला, तरी त्याच्या स्फुट पदांचा संग्रह छीतस्वामी या नावाने कांकरोलीच्या संकलन विद्याविभागाने प्रकाशित केला आहे. छीतस्वामीची सर्व पदे कृष्णविषयक असून, त्यांची भाषा लालित्यपूर्ण आहे. उदा० त्याचे पुढील ऋतुगीत पाहा—

आयो ऋतुराज साज पंचमी बसंत आज,
बौरे द्रुम अति अनूप रहे फूली।
बेली पट पीत माल, सेत पीत कुसुम लाल,
उढवती, सब स्याम भाम भँवर रहे झूली ॥
रजनी अति भई स्वच्छ, सरिता सब विमल पच्छ,
उड़गन पति अति अकास बरखत मूली।
जती सती सिद्ध साध जित तित तें उठे भाग,
बिमन सभी तपसी मुनि मन गति भूली।
जुवतिजूथ करति केलि, स्याम सुखद सिन्धु झेलि,
लाज लीक दई पेलि, परसि पगन तूली ॥

बाजत पखावज उपंग बांसुरी, मृदंग, चंग,
यह सब सुख 'छीत' निरखी, इच्छा अनुकूली ॥

भावार्थ – ऋतुराज वसंताचे आगमन झाले आहे. आज वसंतपंचमी आहे. झाडे मोहरली आहेत, प्रफुल्ल झाली आहेत. वेलींवर पिवळ्या माला चढून त्यांचा पट तयार झाला आहे. पांढरी, पिवळी, तांबडी फुले त्यांवर फुलली आहेत. काळेमोर भ्रमर त्यांच्यावर गुंजारव करीत आहेत. शुभ्र चांदणी रात्र आहे. नद्याही निर्मळ आहेत. चंद्र आकाशातून चांदणे सांडीत आहे. यती, सती, सिद्ध, साधक, तपस्वी, मुनी साऱ्यांच्या मनावर (वसंताची) मोहिनी पडून ते आपापल्या व्रतांपासून विचलित झाले आहेत. सुखसागर कृष्णरूपात विलय पावण्यासाठी युवक-युवती सर्व लाजमर्यादा सोडून आणि त्याच्या पावलांना स्पर्श करून क्रीडा करू लागल्या आहेत. पखवाज, वासरी, मृदंग, चंग, इ. वाद्ये वाजताहेत (आणि हा सर्व सोहाळा पाहून) छीत स्वामी प्रसन्न झाला आहे. [अष्टछाप परिचय; व्र. कृ. मा. म.; हिं. सा. को. २]

छीहल (इ. स. चे १६ वे शतक) राजस्थानातील एक हिंदी जैन कवी. नालिगाव इथे याचा जन्म झाला. हा अग्रवाल वंशाचा होता.

छीहल कवीचे पुढील पाच ग्रंथ उपलब्ध आहेत–(१) पंचसहेलीगीत (२) पंथीगीत (३) उदरगीत (४) पंचेन्द्रियवेली व (५) नामवावनी.

पंचसहेलीगीतात ६८ पदे आहेत. कवीने या काव्यात मालिनी, तंबोलिनी, छीपनी, कलालानी आणि सोनारीण या पाच नायिकांच्या विरहाचे उत्तम वर्णन केलेलें आहे. हे विरह-वर्णन म्हणजे रूपकाचा एक उत्तम नमुना आहे. प्रियकर म्हणजे ब्रह्म, प्रेयसी म्हणजे जीव व त्यांचे मीलन म्हणजे जीव–ब्रह्माचे मीलन अशी तिथली कल्पना आहे.

नमुन्यासाठी मालिनीचे एक विरहगीत पुढ दिले आहे—

कमलवदन कुमलाइया सूकी सुख बनराई।
बिन पिया रइ एक बिन बरस बराबरी जाई॥
तन तरवर फल लग्गोया दुई नारिंग रस पूरी।
सूकन लागा विरह–झल सींचनहारा दूरी॥
चंपाकेरी पंखडी गूंथ्या नवरस हार।
जइ इह्व पहिरउ पीव बिन लागइ अंग अंगार॥

अर्थ–कमलवदन कोमेजून गेले व वनराईप्रमाणे शरीर वाळू लागले आहे. प्रियकराविना एक एक क्षण वर्षासमान भासतो आहे. या शरीररूपी वृक्षावर यौवनरसाने भरलेली स्तनरूपी दोन नारिंगे विरहाच्या अग्नीने सुकून चालली आहेत. त्यांच्यावर प्रेमसिंचन करणारा तर दूर आहे. मालिनीने चाफ्याच्या फुलांचा एक हार गुंफला आह खरा; पण तो विरही अवस्थेत अंगाराप्रमाणे भासतो.

पंथीगीत हे काव्यही रूपकात्मकच आहे. मार्ग सोडून अरण्यात शिरलेल्या एका सांसारिक माणसाच्या जीवनावरील हे रूपक आहे.

पंचेन्द्रियवेली या काव्यात कवीने मनाला बोध केला आहे.

एकंदरीत छीहल कवीचे काव्य उपदेशप्रधान असून, त्याच्या वर्णनशैलीवर संस्कृताची दाट छाया आहे. काव्याची भाषा प्रासादिक, पण अलंकारयुक्त आहे. [हिं. नी. वि.; हिं. जै. म. क.; सू. पू. व्र. भा. सा.; रा. भा. औ. सा.]

छुरिकाबंधन एक संस्कार. प्राचीन काळी वेदाध्ययन-समाप्तीनंतर ज्याप्रमाणे विद्यार्थ्यांचे समावर्तन करीत, त्याप्रमाणे धनुर्वेदाचे अध्ययन संपल्यावर क्षत्रिय विद्यार्थ्यांचा छुरिकाबंधन नामक एक संस्कार करीत. यात एका शुभ दिवशी इष्टदेवतापूजन झाल्यावर गुरू विद्यार्थ्याच्या कमरेला एक तलवार लटकावीत असे. अध्ययनसमाप्तीचे ते एक निदर्शन मानले जाई. या विधीचा उल्लेख फक्त नारदाने केला आहे. विवाहाला जे महिने उक्त आहेत, त्या मासात, शुक्ल पक्षात, शुक्र, गुरू व मंगळ यांचे अस्त नसता, चंद्रबल व ताराबल असता, मौजीबंधनाला सांगितलेल्या तिथि–नक्षत्रांवर मंगळवार वगळून अन्य वारी, क्षत्रियाला छुरिकाबंधन करावे, असे ज्योतिर्निबंधात नारदाने सांगितले आहे.

इ. स. च्या १९ व्या शतकात राजस्थानात सर्व कुलीन राजपूत घराण्यांत हा संस्कार रूढ होता. लष्करी शिक्षण संपले म्हणजे विवाहापूर्वी हा संस्कार करीत. ते लोक या विधीला खरगबंधाई असे म्हणत. [प्रा. भा. शि. प.; मु. चिं.]

छूछक राजस्थानातील जननासंबंधी एक विधी. मूल जन्म-ल्यानंतर दुसऱ्या किंवा तिसऱ्या दिवशी मुलाच्या आईच्या माहेरी गुळाचा खडा पाठवून नातूजन्माची वार्ता कळवतात. या वेळी जी गीते गायिली जातात, त्यातही त्या शुभघटनेविषयीचाच विचार गुंफलेला असतो. त्याचप्रमाणे या वेळी बाळंतिणीच्या माहेराहून जो बाळंतविडा येतो, त्यालाही छूछक असेच म्हणतात. [मरुभारती, जुलै १९५८]

छेज नृत्य एक सिंधी लोकनृत्य. हे नृत्य सुगीच्या हंगामात, विवाहप्रसंगी आणि बहराणो नामक देवतेच्या मिरवणूकप्रसंगी होते. प्रामुख्याने हे नृत्य पुरुषांचे आहे. अलि-

कडे मात्र काही प्रसंगी पुरुष स्त्रियांची सोंगे घेऊन नाचतात.

धोतर, लांब कुडते आणि पांढरा फेटा अशा एकरंगी वेषात विशिष्ट संख्येचे नर्तक हातात छडया घेऊन गोलाकार उभे राहतात. मध्ये एक ढोलवाला व सनईवाला उभा राहतो. मग सनईवाला एखाद्या लोकगीताचे आलाप काढतो आणि ढोलवाला त्याला साथ देतो. नंतर त्या वाद्यांच्या तालावर नर्तक आपल्या हातातल्या छडया एकमेकांच्या छडयांवर ठेक्यात वाजवीत वर्तुळगतीत नाचतात. हळूहळू लय वाढत जाते व नर्तक तोंडाने 'लाल क्यों झुले लाल' असे म्हणत नाचत राहतात. क्वचित प्रसंगी ते टाळया वाजवून खंजिरीच्या साथीवरही नाचतात. [अजंता, सप्टें. १९५३]

छेदसूत्रे जैन आगमांचा एक विभाग. हा विभाग प्राचीनतम अतएव महत्त्वपूर्ण आहे. छेद शब्दाचा अर्थ कापणे असा आहे. जैन परिभाषेप्रमाणे छेद हे एक प्रकारचे प्रायश्चित्त आहे. छेदसूत्रे ही प्रायश्चित्ते व विधि–निषेध याच स्वरूपाची आहेत. या सूत्रांत जैन मुनी व साध्वी यांच्या बाह्य व आभ्यंतर साधनेचे विस्तारपूर्वक वर्णन असून, विशेष नियमांचा भंग झाल्यास त्याला उचित अशा प्रायश्चित्त–विधीचेही प्रतिपादन आहे. जैन साधु–साध्वींचे चारित्र्य शुद्ध राखण्याच्या दृष्टीने या सूत्रांची योग्यता मोठी असल्यामुळे त्यांना उत्तमश्रुत असे म्हटले आहे. प्रसंगवशात या सूत्रांमधून तीर्थंकर व गणधर यांच्या संबंधींच्या काही घटनांचे उल्लेखही आलेले आहेत. बौद्धांच्या विनयपिटकाशी जैनांच्या या छेदसूत्रांची तुलना करता येते. छेदसूत्रांचे सखोल अध्ययन केल्यावाचून कोणत्याही आचार्याला आपला भिक्षुसंघ घेऊन गावोगावी विहार करता येत नसे; त्याचप्रमाणे आचार्य, उपाध्याय, इ. जबाबदार पदांचा अधिकारीही होता येत नसे.

निशीथाच्या भाष्यकाराने छेदसूत्रांच्या ज्ञानाला गुह्य म्हटले आहे व अल्पशक्तीच्या व्यक्तीला त्यांचा उपदेश करू नये, असेही सांगितले आहे. छेदसूत्रांची संख्या सहा आहे, ती अशी–

(१) निशीथ (२) महानिशीथ (३) व्यवहार (४) दशाश्रुतस्कंध (५) कल्पसूत्र (बृहत्कल्प) व (६) पंचकल्प किंवा जीतकल्प.

निशीथ – छेदसूत्रांत निशीथाचे स्थान सर्वोपरि आहे. हा विभाग सर्वांत मोठाही आहे. याच्या आचारांग सूत्राला द्वितीयश्रुतस्कंधाची पाचवी चूला मानलेले असून, याचे दुसरे नाव आचाराग्रप्रकल्प असे आहे. निशीथाचा अर्थ अप्रकाश किंवा अंधारी अर्थात रहस्यरूप असा आहे. जर एखादा निर्ग्रंथ निशीथसूत्र विसरून जाईल, तर त्याला कधीही आचार्यपदाची प्राप्ती होणार नाही. यात प्रायश्चित्तादी विधींचे सूक्ष्म विवेचन आहे. भाष्यकाराच्या मते चौदा पूर्वधारी पुरुषांनी या प्रकल्पाची रचना केली व नवव्या प्रत्याख्यान नामक पूर्वाच्या आधारावर हे सूत्र लिहिले गेले. पंचकल्प चूर्णीमध्ये भद्रबाहूला निशीथाचा कर्ता म्हटले आहे. निशीथसूत्रात वीस उद्देशके आहेत. यात भिक्षूला हस्तमैथुन व काष्ठ, अंगुली किंवा शलाका यांनी इंद्रियसंचालन, काष्ठदंड असलेले पायपुसणे धारण करणे, कठोर वचन बोलणे, चामडे धारण करणे, प्रमाणाबाहेर वस्त्रे वापरणे, जोराने ओरडून भोजन मागणे, भोजनस्थानी प्रवेश करून खाद्य–पेय ग्रहण करणे, शरीरसंवाहन, केस व नखे यांचे कर्तन, दात व ओठ यांचे प्रमार्जन, शरीरावरच्या स्वेदादी मलांचे निराकरण, राजा, नगरशासक, नियमरक्षक, इ. अधिकाऱ्यांना वश करून घेणे, त्यांची पूजा–अर्चा करणे, जैन साध्वीने दंड, यष्टी, रजोहरण, मुखपट्टी, इ. उपकरणे जवळ बाळगणे, साधूंशी संपर्क ठेवणे, साधूने सचित्त वृक्षाच्या खाली बसून आलोचना, स्वाध्याय, इ. कृत्ये करणे, संभोगेच्छेने कोणत्याही स्त्रीचा अनुनय करणे, चित्रविचित्र वस्त्रे धारण करणे, हार, अर्धहार, अजिन, कंबल यांचे धारण, पशुपक्ष्यांच्या अंगोपांगांना स्पर्श, स्त्रीशी एकांत करणे, तिच्यासह अशनपानादी करणे, राजाच्या घरी अन्न ग्रहण करणे, राजाच्या अंतःपुरात प्रवेश करणे, आचार्याला उद्देशून कठोर वचन बोलणे, त्याचा तिरस्कार करणे, प्रव्रज्या देण्यासाठी शिष्याचे अपहरण करणे, केशयुक्त चर्म धारण करणे, दुसऱ्याच्या वस्त्राने आच्छादिलेल्या तृणपीठावर बसणे, गृहस्थाच्या पात्रात भोजन करणे, त्याच्या शय्येवर झोपणे, पात्र विकत घेणे, ते आकर्षक बनवणे, त्याची अदलाबदल करणे, आरण्यकांच्या आहाराचे भक्षण, सीमाप्रांतातील जनपदात विहार, आचार्यादिकांच्या शय्येला पदस्पर्श, गाणे–बजावणे, नाचणे, हसणे, कारण नसता नावेत बसणे, नाव चालवणे, मद्यप्राशन करणे, संध्यासमयी स्वाध्याय करणे, इ. गोष्टींचा निषेध सांगितला आहे.

महानिशीथ – छेदसूत्रात महानिशीथाला कधी दुसरे तर कधी सहावे सूत्र मानले आहे. या सूत्राला समस्त प्रवचनांचे परमसार म्हटले आहे. खरे सांगायचे तर मूळ महानिशीथ विच्छिन्न झालेले आहे. ते वाळवीने खाल्ल्यामुळे त्याची कित्येक पत्रे नष्ट झाली. त्यानंतर हरिभद्रसूरीने त्याचे संशोधन केले व त्याला सिद्धसेनादी आचार्यांनी मान्यता दिली.

महानिशीथात सहा अध्ययने व दोन चूला आहेत. पहिल्या अध्ययनात अठरा पापस्थानके, दुसऱ्यात कर्मविपाक, तिसऱ्यात व चौथ्यात अधिकारविवेचन, पाचव्यात गुरु–शिष्यसंबंध व सहाव्यात प्रायश्चित्त व आलोचना यांचे भेद, यांचे वर्णन आहे.

व्यवहार—या सूत्रभागाला द्वादशांगाचे नवनीत म्हटले आहे. भद्रबाहू हा त्याचा कर्ता होय. त्याने या सूत्रावर निर्युक्तीही लिहिली आहे. व्यवहारसूत्राचे दहा उद्देशक आहेत. अज्ञानाने वा प्रमादाने भिक्षू दोषभागी झाल्यास त्याची आलोचना करणे, त्याला प्रायश्चित देणे, गणातून बाहेर पडलेला साधू परत गणात येऊ इच्छित असल्यास त्याची विशुद्धी करणे, इ. गोष्टींचे यात विवेचन आहे. त्याचप्रमाणे आचार्य व उपाध्याय याने ग्रीष्म व हेमंत ऋतूत एकट्याने विहार करणे, रुग्ण साधूला गणाच्या बाहेर घालवणे, स्थविरांची अनुज्ञा घेतल्याशिवाय सगेसोयऱ्यांकडे भिक्षेला जाणे, इ. गोष्टींचा निषेध आहे. शेवटच्या उद्देशकात यवमध्यचंद्र व वज्रमध्य या प्रतिमांचे वर्णन आहे. त्यातच जाती, श्रुत व पर्याय असे स्थविरांचे तीन प्रकार, त्यांचे व्यवहार, चार प्रकारचे आचार्य व अंतेवासी, यांचे वर्णन आहे.

दशाश्रुतस्कंध—या सूत्रभागाला दशा, आचारदशा अथवा दशाश्रुत असेही म्हणतात. याचाही कर्ता भद्रबाहू हाच आहे. या सूत्राची दहा अध्ययने आहेत. यात आठ प्रकारची गणी संपदा, उपासकाच्या अकरा प्रतिमा, अनेक प्रकारची बंधने, बारा प्रकारच्या भिक्षुप्रतिमा यांचे वर्णन आहे. त्यापुढे भगवान महावीराचे च्यवन, जन्म, संहरण, दीक्षा, केवलज्ञान व मोक्ष यांचे विस्तृत वर्णन आहे. त्यापुढे महामोहनीय कर्मबंधाच्या तीस स्थानांचे प्ररूपण आहे. शेवटी नऊ विद्वानांचे वर्णन करून हे सूत्र समाप्त केले आहे.

कल्पसूत्र—जैन श्रमणांच्या प्राचीनतम आचारशास्त्रातले हे महाशास्त्र आहे. निशीथ व व्यवहार यांच्या प्रमाणेच याची भाषा प्राचीन आहे. यात साधू—साध्वींच्या संयमाचे साधक व बाधक अशा स्थान, वस्त्र, पात्र इ. चे विस्तृत विवेचन आहे. म्हणूनच याला कल्प म्हणतात.

याचे सहा उद्देशक आहेत. यात निर्ग्रंथांना निवास करण्यास योग्यायोग्य स्थाने, वर्षावास, गमनागमनाचा निषेध, प्रव्रज्या ग्रहण करतेवेळी स्वीकारायची उपकरणे, वर्षावासाला लायक असे उपाश्रय, निर्ग्रंथ व निर्ग्रंथिनी यांच्यासाठी विधिनिषेध, इ. गोष्टींचे विवेचन आहे.

पंचकल्प—पंचकल्प सूत्र व पंचकल्प महाभाष्य दोन्ही एकच आहेत. हे सूत्र आज उपलब्ध नाही. त्यामुळे त्या सूत्रात नेमके काय सांगितले आहे, हे कळणे कठीण आहे.

वरील सहा छेदसूत्रांपैकी पहिली चार ही अधिक प्राचीन आहेत व ती भद्रबाहूच्या कालातली असावी, असे अनुमान आहे. भद्रबाहू हाच त्यांतील काही सूत्रांचा जनक होता. [प्रा. सा. इ.; भा. सं. जै. यो.; हि. जै. मो.; आर्य संस्कृति]

छेदोपस्थापन चारित्र

संवराला कारणीभूत असे एक चारित्र. जेव्हा एखाद्या जैन श्रमणकाच्या मनात एखादे व्रत करताना हे अहिंसाव्रत आहे का सत्यव्रत आहे, याचा संदेह असतो आणि तशा स्थितीत तो ते व्रत करतो, तेव्हा त्याला छेदोपस्थापन असे नाव आहे. काही प्रमादाने व्रताचा छेद म्हणजे भंग झाला असता, प्रायश्चित्त घेऊन ते पुन्हा अंगीकारतात, त्यालाही छेदोपस्थापन चारित्र असे म्हणतात. याचें लक्षण असे—

यत्र हिंसादिभेदेन त्यागः सावद्यकर्मणः ।
व्रतलोपे विशुद्धिर्वा छेदोपस्थापनं हि तत् ॥

अर्थ—जेव्हा हिंसादिभेदाने निंद्य कर्माचा त्याग केला जातो किंवा व्रताचा लोप झाला असता ते पुन्हा स्वीकारून जी शुद्धी करतात, तिला छेदोपस्थापन चारित्र असे नाव आहे.

छेदोपस्थापन नामक तप हा जैन धर्माचा मुख्य भाग आहे. प्राक्तन पापाचे छेदन करण्याकरता प्रायश्चित्ते घेऊन आत्म्याला आत्यंतिक संयमात स्थापन करणे, असा या तपाचा अर्थ आहे. आद्य तीर्थंकर ऋषभदेव व महावीर यांनीच छेदोपस्थापन तपाला महत्त्व दिले, असे तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी म्हटले आहे. [जैनधर्मामृत; वै. सं. वि.]

छेरता

वस्तरप्रदेशातील एक लोकोत्सव. विशिष्ट ऋतूंमध्ये, विशिष्ट प्रसंगी इथे छेरता, चैत, परब, रीलो, कोटली, इ. लोकगीते गायिली जातात. पौष महिन्यात गावातल्या तरुण मुली गटागटाने छेरता गीते गात गात दुसऱ्या गावात जातात व तिथे हास्यविनोद करून लोकांचे रंजन करतात. या गटाची प्रमुख स्त्री बकऱ्याचे सोंग घेते. लोक तिला पैसा व धान्य देतात. [के. एल्. श्रीवास्तव – प्रसारिका, जाने.–जून १९५४]

छोक्कलिंगम

द. भारतातील भूतयोनींपैकी एक देव. शैव—शाक्त संमीलनाच्या काळात ब्राह्मणांनी याला शैवधर्मात समाविष्ट करून घ्यायचे ठरवले आणि त्याला शिवावतार मानून त्याच्यापेक्षा सामर्थ्यशाली अशा मीनाक्षीदेवीशी त्याचे लग्न लावले. प्राचीन काळी घडलेल्या या विवाहमंगलाची स्मृती म्हणून आजही प्रतिवर्षी मदुरेच्या मंदिरात हा विवाहोत्सव केला जातो. दोन्ही देवतांच्या रथातून मिरवणुका काढतात. पण ऐन वेळी कोणीतरी शिंकते व ती शिंक हा अपशकून मानून लग्न तेवढे पुढच्या वर्षापर्यंत तहकूब करतात. पुन्हा पुढच्या वर्षी शिंक असतेच. अशा प्रकारे बाकी सारे सोपस्कार व्हायचे; पण लग्न लागायचे नाही, अशा पद्धतीचा हा उत्सव प्रतिवर्षी होत असतो. [द्र. गॉ. मॉ. हिं.]

छोपती नृत्य

गढवाल प्रदेशातील स्त्री–पुरुषांचे मिश्र नृत्य. यात नर्तक गोल उभे राहतात. पहिल्या आणि तिसऱ्या नर्तकाचे हात दुसऱ्या नर्तकाच्या पाठीमागे धरले जातात. तसेच दुसऱ्या व चौथ्या नर्तकांचे हात तिसऱ्या नर्तकाचे पाठीमागे धरले जातात. अशा प्रकारे ती हातांची साखळी बनते. मग त्या साखळीच्या आत सर्व नर्तक खांद्याला खांदा लावून दोन पावले पुढे व एक पाऊल मागे घेऊन नाचत राहतात. या वेळी जी लोकगीते गातात, त्यांत प्रणयभावना प्रमुख असते.

ही गीते संवादात्मक असून, स्त्री–पुरुष समुदाय क्रमशः एकमेकांच्या प्रश्नांची उत्तरे देतात. एका समुदायाने गायिलेल्या ओळींपैकी अखेरची ओळ पुनश्च गाऊन मग दुसरा समुदाय आपले म्हणणे पुढे मांडतो. या गीतांचा एक नमुना असा–

पोसतूका छुमा, मेरी भग्यानी बौ ।
आज की छोपती, मेरी भग्यानी बौ ।
रैं तुमारा जुमा, मेरी भग्यानी बौ ।
अखोडूका डोका, मेरी भग्यानी बौ ।

अर्थ – अफूचे फूल, माझी भाग्यशाली बाई. आजची छोपती, माझी भाग्यशाली बाई. तुझ्या हवाली, माझी भाग्यशाली बाई. अक्रोडाची पाने, माझी भाग्यशाली बाई.

छोपतींची अशी असंख्य गीते असून, त्यांत उपमांचे नाविन्य व घरगुतीपणा ही दृष्टीस पडतात. [ए. हो. रा.]

छोलूजा नृत्य

हे नृत्य उत्तर प्रदेशातील डोंगराळ भागात प्रचलित आहे. प्राधान्याने हे राजपूत लोकांच्या विवाहप्रसंगी केले जात असून, या नृत्यामागे राजपुतांचे प्राचीन रिवाज उभे आहेत. प्राचीन काळी वधूला पळवून नेऊन तिच्याशी लग्न लावण्याची प्रथा राजपुतांमध्मे होती. तिला अनुलक्षून आजही वरातीचा सोहळा साजरा केला जातो.

दोन किंवा चार नर्तक नृत्याचा विशिष्ट वेष करून हातातली ढाल–तलवार परजीत वराच्या मिरवणुकीपुढे नाचतात. त्यांच्या मागे ढोल आणि तुताऱ्या वाजवीत काही लोक चालतात. या वादकांच्या दोन्ही बाजूंना दोन ध्वजधारी सरदार असतात. एकाच्या हाती युद्धाचे प्रतीक असणारा लाल ध्वज असतो व दुसऱ्याच्या हाती शांततासूचक पांढरा ध्वज असतो. वराची मिरवणूक विवाहस्थळी येताच वधूपिता पांढरा ध्वज घेऊन वरातीचे स्वागत करतो. [उ. प्र. लो.]

जंगम

लिंगायत लोकांचे गुरू. हे लोक जंगम म्हणजे चललिंगाचे उपासक असल्यामुळे त्यांना जंगम हे नाव मिळाले. प्रत्येक लिंगायताला गुरू असला पाहिजे, असा नियम असल्यामुळे जंगमवर्गाला बरेच महत्त्व प्राप्त झालेले आहे. गुरुस्थल (विवाहित) व विरक्त (ब्रह्मचारी) असे जंगमांचे दोन प्रमुख भेद असून, गुरुस्थल हे लिंगायतांच्या गृह्यसंस्कारांचे पौरोहित्य करतात आणि विरक्त हे धार्मिक विषयांचे अध्ययन-अध्यापन करतात. दोघेही मठात राहतात. याशिवाय पट्टाधिकारी व चारमूर्ती असे यांचे आणखी दोन भेद आहेत. पट्टाधिकारी एकाच ठिकाणी राहतात, तर चारमूर्ती गावोगाव हिंडून लोकांना धर्मोपदेश करतात.

जंगमांचे एकोरामाध्य, पंडिताराध्य, मरुलाराध्य, रेवणाराध्य व विश्वाराध्य असे पाच उपपंथ आहेत. या पाचही उपपंथांचे प्रवर्तक शिवाच्या पाच मुखांपासून उत्पन्न झाले, अशी समजूत आहे. प्रत्येक उपपंथाचे पुन्हा तेरा भेद असून, त्यांना बर्गी असे म्हणतात.



जंगम

निरनिराळ्या प्रांतांत यांचे निरनिराळे पोटभेद आहेत. द. महाराष्ट्रात विरक्त, पट्टे देवरू, अय्या, चरंती आणि मरी असे

पाच पोटभेद आहेत. विरक्त जंगम लंगोटी घालतात आणि आखुड बाह्यांचा, पण सैल व लांब अंगरखा घालतात, पट्टे देवरू धोतर नेसतात. अय्या जंगम विवाहित असतात. हे भिक्षेवर आपला उदरनिर्वाह करतात. हे भिक्षेला जाताना पायात जंग नावाचे घुंगरू बांधतात व हातात वेत्रदंड घेतात. हे भगवी वस्त्रे परिधान करतात. चरंती जंगम नेहमी फिरत असतात आणि मठाच्यां खर्चासाठी लिंगायतांकडून पैसे गोळा करतात. मरी जंगम अविवाहित राहून मठवासी जंगमांची सेवा करतात.

ज्या घरात मठदय्या म्हणजे त्या गावाचा मुख्य जंगम राहतो, त्या घराला लिंगायत मठ असे म्हणतात. या मठाधिकाऱ्याला सरकारातून काही उत्पन्न मिळते. शिवाय लिंगायतांच्या लग्नकार्यादी समारंभात त्याला देणग्या मिळतात.

जंगम लोक केशरी वस्त्रे नेसतात, गळ्यात रुद्राक्षाच्या माळा घालतात, भस्म लावतात आणि गळ्यात किंवा कमरेला शिवलिंग बांधतात. या लिंगाची ते बिल्वपत्रांनी त्रिकाल पूजा करतात. हे लिंग सोने, चांदी, तांब्रे किंवा पितळ या धातूचे बनवलेले असते. जर कोणा जंगमाचे हे लिंग हरवले, तर पुन्हा दुसरे लिंग धारण करीपर्यंत त्याला काहीही सेवन करता येत नाही. हे लोक शिवाहून अन्य देवाला भजत नाहीत व लिंगायतांशिवाय इतरांच्या घरी जेवत नाहीत. जेवण झाले म्हणजे हे लोक आपले पान स्वच्छ करतात आणि नंतर ते पाण्याने धुवून तेच पाणी तीर्थ म्हणून पितात.

गुरुस्थल जंगमांना अपत्यप्राप्ती झाली म्हणजे ते दुसऱ्या जंगमांना बोलावतात. नवजात बालकाचे पाय धुवून ते पाणी तिथे हजर असणाऱ्या लोकांच्या अंगावर शिंपडतात. मग जंगमाचे अंगठे पेल्यातील पाण्यात बुडवतात. त्या पाण्यात जंगम आपले गळ्यातले शिवलिंग बुडवतो. नंतर ते पाणी तीर्थ म्हणून सर्वजण पितात. त्या तीर्थात नवे शिवलिंग बुडवून ते मुलाच्या गळ्यात बांधतात. या लिंगधारणविधीला ते करुणा असे म्हणतात. नंतर ते लिंग काढून ठेवतात. मुलगा मोठा होईपर्यंत ते लिंग आई आपल्याजवळ ठेवते.

मृतांना तोंडात शिवलिंग देऊन बसलेल्या स्थितीत पुरतात.

सिंधमधील जंगम लोक आपल्या उत्पत्तीबद्दल एक कथा सांगतात, ती अशी– पार्वतीच्या विवाहाच्या वेळी दान स्वीकारायला कुणी ब्राह्मण वा भिकारी नसल्याने शिवाने आपल्या तृतीय नेत्रातून यांच्या मूळ पुरुषाला जन्म दिला. या मूळ पुरुषाला महावीराने घंटा दिली, पार्वतीने पंख दिले, गणेशाने झोळी दिली व हिंगलाज देवीने रुद्राक्षांच्या माळा दिल्या.

भिक्षा मागणे हा या जंगमांचा प्रमुख व्यवसाय होय. भिक्षा मागताना हे आपली घंटा वाजवतात आणि निरनिराळ्या युगांची आकिते वर्णन करणारी गाणी गात हिंडत असतात.

सिंधमधील जंगमांचेही चार पोटभेद आहेत. त्यातील देरू पश्चिम भागात, सील उत्तर भागात, लिंगायत दक्षिण भागात आणि मूळ महादेवाच्या मंदिरात असतात. यांचे बिहुंगम नावाचे एकच गोत्र आहे. [म. ज्ञा. को.; सिं. क.; का. ट्रा. स. इं.]

जंगुला एक राग. हा आसावरी थाटाचा आहे. यात गंधार, धैवत व निषाद हे दोन्ही प्रकारचे लागतात. याची जाती संपूर्ण आहे. वादी – षड्ज, संवादी – पंचम, आरोह – सा, रे, ग, म, प, ध, नी, सा. अवरोह – सा, नि, ध, प, ध, प, म, ग, रे, सा. गानसमय – रात्रीचा तिसरा प्रहर.

सुप्रसिद्ध गायक अमीर खुस्रव याने बारा इराणी राग हिंदुस्थानी संगीतात प्रचलित केले, त्यांपैकी हा एक राग आहे. [श्री. आबासाहेब मुजुमदार, पुणे]

जंतर मेवाड प्रदेशातील वीणेसारखे एक वाद्य. मधे एक वेळू व त्या वेळूला वीणेप्रमाणे दोन भोपळे असे याचे स्वरूप असते. वेळूवर जनावराच्या चामड्याचे बाव्वीस पडदे मेणाने चिकटवलेले असतात. पड्द्यांवर तारा असतात. हाताचा अंगठा व बोटे यांनी हे वाद्य छेडतात.

बगडावतोची कथा सांगणारे लोक हे वाद्य गळ्यात अडकवतात व वाजवतात. बगडावतोची कथा एका पड्द्यावर चित्रित केलेली असते. त्याच्यासमोर उभे राहून गायक जंतरच्या साथीवर गीते गात ती कथा सांगतो. [परंपरा–लोकगीत]

जंद्रीह कनिय द. भारतातील चंद्रोपासकांचा एक पंथ. चंद्रकांतीय या नांवाचे जंद्रीह कनिय हे अपभ्रष्ट रूप असावे. अबुल फरज (इ. स. ९८८) नामक एका अरब प्रवाशाने या पंथाविषयी माहिती लिहून ठेवली आहे, ती अशी – या पंथाचे अनुयायी चंद्राला देव मानतात व चार हंसांच्या रथात त्याची मूर्ती बसवतात. चंद्राच्या एका हातात चंद्रकांत मणी असतो. हे लोक महिन्यातून पंधरा दिवस उपवास करतात व चंद्रोदय झाल्यावर चंद्राला नैवेद्य दाखवून मग उपवास सोडतात. काही वेळा त्यानंतर नृत्य–गायनाचा कार्यक्रमही होतो. [रि. से. सा. इं.– न्यू इं. अँ., सप्टें. १९३९]

जंबुकेश्वर (१) द. भारतातील एक शैव क्षेत्र. दक्षिणेत पंचतत्त्वांची पांच लिंगे आहेत, त्यांपैकी जंबुकेश्वराचे लिंग हे जलतत्त्वाचे लिंग मानतात. हे मंदिर श्रीरंगम् येथे श्रीरंगमंदिराच्या पूर्वेस एका मैलावर आहे. हे मंदिर श्रीरंग-

मंदिराहूनही प्राचीन आहे. या द्वीपात श्रीरंग येण्याच्या पूर्वी इथे एकटा जंबुकेश्वरच होता.

या मंदिराचा विस्तार १०० बिघ्यांहून अधिक आहे. देवस्थानाच्या भोवती पाच प्राकार आहेत. जंबुकेश्वरमंदिर पाचव्या प्राकाराच्या आत आहे. इथले शिवलिंग जलप्रवाहात स्थापित आहे. लिंगाच्या खालून सारखे पाणी वर येत असते. लिंगाच्या वर मध्यभागी शिवमूर्ती उभी असून, तिच्या दोही अंगी ब्रह्मा-विष्णू आहेत. मंदिराच्या बाजूलाच जांभळीचा एक प्राचीन वृक्ष आहे. असे सांगतात, की प्राचीन काळी इथे जांभळींचे मोठे वनच होते. या शिवलिंगाला जंबुकेश्वर असे नाव मिळाले आहे, ते या जांभळीच्या वृक्षांवरूनच.



जंबुकेश्वर– मंदिर

जंबुकेश्वराला दक्षिणेत तिरुवानैक्कोविल असे म्हणतात. त्याचा अर्थ पवित्र हत्तीचे मंदिर असा होतो. याविषयी एक कथा अशी आहे, ती अशी–

इथल्या जंबुवनात एक हत्ती व एक माकड राहत होते. दोघेही शिवाचे परमभक्त होते. एका जांभळीच्या खाली एक शिवाची मूर्ती होती. हत्ती रोज आपल्या सोंडेतून कावेरीचे पाणी आणून त्या शिवाला अभिषेक करीत असे. पण माकडाला ही गोष्ट आवडली नाही. त्याने शिवमूर्तीवर एक जाळे तयार केले. हत्तीला त्या जाळ्याचा राग आला आणि त्याने ते तोडून टाकले. पण त्यामुळे माकडालाही क्रोध आला. हत्ती शिवावर पाणी सोडीत असता माकड त्याच्या सोंडेत शिरला आणि सोंड आतून कुरतडू लागला. हत्तीला ती वेदना असह्य झाली. तो शिवासमोर भूमीवर कोसळला आणि मृत झाला. माकडालाही त्याच्या सोंडेतून बाहेर येता येईना. त्यामुळे तोही आतल्या आत मरून गेला. तेव्हा शिवाने प्रसन्न होऊन आपल्या या दोन्ही भक्तांना मोक्ष दिला.

जंबुकेश्वराच्या प्राकारात कित्येक तीर्थे आहेत. हे मंदिर सकाळपासून मध्यरात्रीपर्यंत उघडे राहते. इथे जंबुकेश्वराबरोबरच गोपूजा केली जाते. मंदिरप्राकारात लहानमोठे कित्येक मंडप असून, ते शिल्पकलेच्या दृष्टीने नमुनेदार आहेत. इथे १०८ स्तंभांचे दोन मंडप आहेत. या स्तंभांपैकी कित्येक स्तंभांच्या मूलभागी रथचक्र किंवा घोडे कोरलेले आहेत. मंदिरासमोर ध्वजस्तंभमंडप असून तो मोठा आहे. याला जे अनेक खांब आहेत, त्यांच्या मुळात सिंहमूर्ती कोरलेल्या आहेत. प्रत्येक स्तंभावर प्रेक्षणीय कोरीव चित्रेही आहेत. [त. सा. सं.; कल्याण–तीर्थांक; धर्मयुग, ऑक्टो. १९५६]

(२) वाराणसीजवळचे एक क्षेत्र. इथे शिवाने जंबूक नावाच्या राक्षसाला ठार मारले. [हि. ध.]

जंबुद्वीप एक प्राचीन देश. पुराणांनी भूगोलाचे वर्णन करताना जी सात द्वीपे सांगितली आहेत, त्यांपैकी एक. हे पृथ्वीच्या मध्यभागी असून, त्याचा आकार कमलपत्रासारखा आहे. याच्या मधोमध मेरू पर्वत असून, या द्वीपाभोवती क्षारसमुद्र आहे (भाग. पु. १. १२. ५; ५. १. ३२). आग्नीध्र हा या द्वीपाचा अधिपती होय. त्याने कल्पारंभी जंबुद्वीपाचे वर्षसंज्ञक नऊ भाग करून आपल्या नऊ मुलांना वाटून दिले. त्या भागांची नावे अशी –– (१) भारत (२) किंपुरुष (३) हरी (४) रम्यक (५) हिरण्मय (६) उत्तर कुरू (७) इलावृत (८) भद्राश्व व (९) गंधमादन.

जंबुद्वीपात पुढील चार वने आहेत – (१) चैत्ररथ (२) गंधमादन (३) वैभ्राज व (४) नंदन.

यातील चार सरोवरे अशी — (१) अरुणोद (२) महाभद्र (३) असितोद व (४) मानस आणि नऊ पर्वत असे–(१) मेरू (२) गंधमादन (३) श्वेत (४) हिमालय (५) हेमपूत (६) निषध (७) शृंगव्रत (८) हिरण्यक व (९) रमणक.

जंबुद्वीपातला महत्त्वाचा वृक्ष म्हणजे जांभळीचा. त्यावरूनच याला जंबुद्वीप हे नाव पडले.

आधुनिक भूगोलाप्रमाणे प्राचीन जंबुद्वीप हे कोणत्या भूभागावर पसरले होते, याविषयी श्री. वि. का. राजवाडे यांनी पुढील विवेचन केले आहे ––

सांप्रतच्या नकाशात काश्मीरच्या उत्तरेस एका बिंदूपासून सहा पर्वतांच्या रांगा निघालेल्या दिसतात, त्या अशा––(१) हिमालय (२) काराकोरम (३) कुएनलुन (४) थिएनशान (५) हिंदुकुश व (६) सुलेमान. हे सहा पर्वत ज्या मध्यबिंदूपासून निघतात, त्याला विष्णुपुराणकार मेरू पवत असे म्हणतो. हा पर्वत भूपद्माच्या कर्णिकेसारखा आहे. याच्या दक्षिणेस हिमालय, हेमकूट व निषध असे तीन वर्षपर्वत आहेत आणि याच्या उत्तरेस नील, श्वेत व शृंगी असे तीन पर्वत आहेत. पैकी हिमालय प्रसिद्ध आहे. हेमकूट म्हणजे हिंदुकुश व निषध म्हणजे सुलेमान होय. हे मेरूच्या दक्षिणेकडील पर्वत झाले. नील म्हणजे

काराकोरम, श्वेत म्हणजे कुरजनूल (कुएनलुन) व शृंगी म्हणजे थिएनशान, हे मेरूच्या उत्तरेकडील पर्वत होत. हे सहा पर्वत ज्या द्वीपात आहेत, त्याला जंबुद्वीप ही संज्ञा आहे. सध्याच्या काश्मीरात जम्मू म्हणून जो प्रांत आहे, त्याच्या नावात प्राचीन जंबू हे नात्र राहिले आहे. जंबुद्वीपाचे नऊ विभाग वर दिले आहेत, त्यांपैकी पहिले तीन मेरूच्या दक्षिणेस व पुढचे तीन मेरूच्या उत्तरेस आहेत. या साहींच्या मध्यभागी पश्चिमेस विस्तृत असे इलावृत वर्ष आणि पूर्वेस भद्राश्व वर्ष असून, या दोहोंच्या मध्यभागी गंधमादन आहे. हिमालयाच्या दक्षिणेस व दक्षिण समुद्राच्या उत्तरेस जे वर्ष आहे, ते प्रख्यात भारतवर्ष होय. हिमालयाच्या दक्षिणेस व समुद्राच्या उत्तरेस असलेल्या खंडप्राय प्रदेशाला आपण आज भारतवर्ष म्हणतो. पण प्राचीन काळी जम्मूच्या दक्षिणेकडील लहानशा भागालाच भारतवर्ष ही संज्ञा होती. पुढे भारतीय लोक जसजसे पसरत चालले तसतसे भारतवर्ष हे नावही विस्तृत प्रदेशाला मिळाले. सुरवातीस हिमालयाच्या दक्षिणेकडील व विंध्याच्या उत्तरेकडील प्रदेशास भारतवर्ष म्हणत. पुढे तर काश्मीरपासून कन्याकुमारीपर्यंतच्या सर्वच भूखंडाला भारतवर्ष हे नाव प्राप्त झाले.

मानससरोवर ज्यात आहे, ते भद्राश्व वर्ष. सांप्रतचे अफगणिस्तान व पर्शिया हे देश ज्या टापूत आहेत, ते पूर्वीचे इलावृत वर्ष होय. मेरूच्या उत्तरेकडील विभागाला उरुवर्ष असे म्हणत. इंद्रादी देव जंबुद्वीपाच्या गंधमादन प्रदेशात अतिपुरातनकाली राहत असत.

जंबद्वीपाला वेढून राहिलेला क्षारसमुद्र श्री. राजवाडे यांच्या मते भूमध्यसमुद्र, तर श्री. वडेर यांच्या मते हिंदी महासागर व अरबी समुद्र होय. हिंदुस्थान, अफगाणिस्तान, पूर्व इराण, आशियातील रशिया व मंगोलियातील वाळवंट वगळून उरलेला चीन एवढी जंबुद्वीपाची व्याप्ती होती, असे श्री. चित्रावशास्त्री म्हणतात.

सिद्ध, पितर, देव, दैत्य, दानव, नाग, गंधर्व, यक्ष, राक्षस व पिशाच हे जंबुद्वीपात राहतात, असे पुराणांतरी सांगितले आहे. [पु. इं.; प्रा. च. को. परिशिष्ट २ रे; रा. ले. सं.; श. क.]

जंबू कण्व ब्राह्मण यांची वस्ती मध्य प्रदेशात व भडोच जिल्ह्यात आहे. हे स्वतःला याज्ञवल्क्याचे वंशज म्हणवतात. हे पंच द्रविडांपैकी व यजुर्वेदाच्या कण्व शाखेचे आहेत. कात्यायन सूत्राप्रमाणे हे आपली धर्मकृत्ये करतात. इ. स. च्या चौथ्या शतकात हे जंबुसर येथे येऊन राहिले, असे एका ताम्रलेखावरून कळते. तियून ते नंतर मध्यप्रदेशात गेले. ज्योतिष सांगणे, सावकारी करणे, व्यापार, इ. व्यवसाय हे करतात. [वि. मुं. रा. प.; मुं. इ. जा.]

जंबूमार्ग चित्रकूटाजवळचे एक तीर्थ. यात्रेकरू इथे पितृश्राद्ध करतात. भरताचा जन्म या क्षेत्री झाला असे विष्णू पुराणात (७७.३८) सांगितले आहे. [पु. इं.]

जंबूस्वामी जैन मताप्रमाणे शेवटचा केवली. मूळचा वैश्यपुत्र आणि विद्युन्माली देवाचा अवतार. याने अनिच्छेने आठ कुमारींशी लग्ने केली होती. पण पुढे त्याने प्रव्रज्या घेतली. महावीरानंतर ६४ वर्षांनी याने देहत्याग केला.

हा एक कथासंग्राहक होता. याने प्रभव नावाच्या आपल्या शिष्याला एकूण नऊ कथा सांगितल्या आहेत.

वीर नामक कवीने याच्यावर ‘जंबुसामिचरिउ’ नावाचे एक काव्य अपभ्रंश भाषेत लिहिले आहे. हा ग्रंथ अप्रकाशित असून, आंबेर येथील शास्त्र–भांडारात त्याची हस्तलिखित प्रत आहे. ग्रंथाचे अकरा संधी असून त्यांत जंबूस्वामीच्या पूर्वजन्मांचे वर्णन आहे. [लो. सा. रू.; अ. सा.]

जंभक वैशाख शुद्ध दशमीला मघा नक्षत्र आले असता, त्या तिथीच्या विजयमुहूर्तावर ऋजुकुला नदीच्या तीरी जंभक नामक गावाजवळच्या एका शाल वृक्षाखाली महावीराला केवलज्ञान प्राप्त झाले, असे तिलोय पण्णत्तीमध्ये सांगितले आहे. सांप्रत बिहारमध्ये कुंभेरच्या दक्षिणेस ५० मैल अंतरावर, क्विल नदीच्या काठी जमुई नावाचे जे गाव आहे, तेच प्राचीन जंभक होय. क्विल हे ऋजुकुलाचे अपभ्रष्ट रूप आहे. जमुईच्या दक्षिणेस ४–५ मैलांवर केवली नामक गाव आहे. महावीराला केवलज्ञान प्राप्त झाले, त्यावरूनच हे नाव पडले असावे. त्या निमित्ताने इथे वैशाख शुद्ध दशमीला उत्सव होत असतो.

जमुई गावाच्या आसमंतात अनेक प्राचीन स्थाने आहेत. तिथे अनेक प्राचीन मूर्तीही सापडल्या असून, त्यात पार्श्वनाथ व आदिनाथ यांच्या मूर्ती विशेष उल्लेखनीय आहेत. जमुई व राजगृह यांच्यामध्ये सिकंदरा गावाजवळ एक आंबराई आहे. त्या आंबराईत महावीराने तपश्चर्या केली होती, असे सांगतात. सांप्रतही आसपासचे लोक या स्थानाला पवित्र मानतात व तिथल्या वृक्षांची पूजा करतात. यावरून सांप्रतची जमुई व केवली ही गावे आणि त्यांच्या भोवतालचा प्रदेश हेच महावीराचे बोधिस्थान होते, असे मानायला हरकत नाही. [श्री. नवीनचंद्र शास्त्री– जै. सि. भा., डिसें. १९५४]

जंभनाथ (१४५१ – १५२३ इ. स.) राजस्थानातील एक संतकवी. जोधपूरमधील पयासर (पीपासर) गावी याचा जन्म झाला. याच्या पित्याचे नाव लोहित व मातेचे हाँरनादेवी असे होते. हा जातीने परमार राजपूत होता. वयाच्या ३४ व्या वर्षापर्यंत हा मकाच होता. त्या अवधीत तो काही लिहिणे वाचणे शिकला होता का नाही, हे माहीत नाही. मात्र तो अनेक चमत्कार करून दाखवीत असे, एवढे खरे.

इ. स. १४८५ साली याचे मुकेपण घालवण्याच्या हेतूने याच्या आईवडिलांनी नागोरच्या देवीची पूजा सुरू केली. त्यांनी तिच्या मंदिरात १२ दीप लावले होते; पण जंभनाथाने, ते विझवून टाकले आणि एकाएकी तिथे जमलेल्या लोकांपुढे ब्रह्मविषयक प्रवचन सुरू केले. अशा प्रकारे त्याचे मुकेपण दूर झाले.

हा एक चांगल्यापैकी कवी होता. अवधी ही त्याची काव्यभाषा होती. त्याचा एकही ग्रंथ उपलब्ध नसला, तरी त्याची स्फुट काव्यरचना विपुल आहे. त्यात योग, सिद्धी, ओंकारजप, सोऽहंजप, जरामरण, मुक्ती, अनन्य भक्ती, निरंजनाची उपासना, सद्गुरुमहिमा इ. विषय मुख्यत्वे आढळतात. यांच्यावर नाथपंथाचा बराच प्रभाव दिसतो. याने विश्नुई संप्रदायाची स्थापना केली आणि त्याच्या प्रसारासाठी तो राजस्थानाच्या बाहेरील प्रदेशातही बराच फिरला. उ. प्रदेशातील मुरादाबाद, बिजनौर व बरेली या जिल्ह्यांत त्याच्या शिष्यपरंपरेचे काही लोक सापडतात. पण त्याने स्थापलेल्या संप्रदायाचे काही तत्त्वज्ञान उपलब्ध होत नाही. मात्र पुढील काव्यपंक्तींवरून त्याचे सिद्धान्त व साधना यांविषयी थोडीशी कल्पना करता येते—

अजपा जपोरे अवधू, अजपा जपो।
पूजो देव निरंजन थान, गगनमंडलमें जोति लखाऊँ।
देव धरो वा ध्यान।
मोहन बंधन मन परबोधन, शिक्षासे ग्यान विचार।
पंच सादत कर एक सो राखवा
तो यो उतरवाँ भवपार॥

भावार्थ– हे साधका ! अजपा मंत्राचा जप कर. निरंजन देवाची पूजा कर; त्याचे स्थान गगनमंडलात आहे. तिथल्या परमज्योतीचे ध्यान कर; त्यामुळे साधक मोहादी बंधनातून मुक्त होतो आणि भवसागर पार करून जातो.

जंमनाथ आजीवन ब्रह्मचारी राहिला. तो अत्यंत विनयशील व उदार होता. जनसेवेत तो निमग्न असे. त्याची श्रेष्ठ साधकांत गणना केली जाते. सिद्धी प्राप्त झाल्यानंतर तो मुनींद्र जंमऋषी या नावाने विख्यात झाला. याने तालबा (बिकानेर) येथे समाधी घेतली. [उ. भा. सं. प.; हिं. सा. को. २]

जंभल एक बौद्ध देव. साधनमाला या ग्रंथात याची उत्पत्ती अक्षोभ्यापासून किंवा रत्नसंभवापासून झाल्याचे सांगितले आहे. अक्षोभ्य-पुत्र जंभलाचे वर्णन असे–



जंभल – एकाकी

त्रिमुख, षड्भुज, नीलवर्ण, मस्तकावरच्या मुकुटात अक्षोभ्याची मूर्ती, महाळुंग, पाश व बाण ही आयुधे धारण करणारा. याने वरच्या पहिल्या डाव्या हाताने प्रज्ञेला आलिंगन दिले आहे.

हा जंभल यब्युम् या स्वरूपातही आढळतो.

रत्नसंभवापासून उत्पन्न झालेल्या जंभलाच्या दोन प्रकारच्या मूर्ती आढळतात. एकाकी जंभल, त्याच्या एका हाती महाळुंग व दुसऱ्या हाती पाश, हा एक प्रकार; आणि यब्-युम् अवस्थेत, त्रिमुख व षड्भुज हा दुसरा प्रकार. गंधार, मथुरा, मगध, सारनाथ, बंगाल, नेपाळ व तिबेट इथे जंभलाच्या मूर्ती आढळतात. चीनमधील पेकिंगच्या मूर्ती-संग्रहालयात जंभलाची मूर्ती आहे. सर्व बौद्धधर्मी देशांत जंभलाची पूजा होते.



जंभल – यब्युम् अवस्थेत (नेपाळी चित्र)

पौराणिक कुबेराप्रमाणे जंमलालाही संपत्तीचा अधिपती मानलेले आहे. तसेच ज़ंभलाला यक्ष म्हटले असून, कुबेरही यक्षाधिपतीच आहे. यावरून त्या दोघातील साम्य अधिक स्पष्ट होते. [इं. बु. इ.; बौ. ध. बि.]

ज च वर्गातील तिसरा वर्ण व आठवे व्यंजन. या वर्णाला चार अवस्थांतून जावे लागले आहे. त्यांपैकी पहिली अवस्था गिरनारच्या लेखात, दूसरी इ. स. च्या दुसऱ्या शतकातल्या शक उषवदात याच्या नासिक येथील लेखात, तिसरी राजा दुर्गगणाच्या झाळपाटण येथील लेखात (इ. स. ६८९) व शेवटची इ. स. च्या ११ व्या शतकातल्या उज्जयिनीच्या लेखात दिसून येते.



जच्या रूपाचा विकासक्रम

या वर्णाचे ध्यान असे––

ध्यानमस्या: प्रवक्ष्यामि शृणुष्व कमलानने
नानालङ्कारसंयुक्तैर्भुजैर्द्वादशभिर्युताम् ।
रक्तचन्दनदिग्धाङ्गीं विचित्राम्बरधारिणीम्
त्रिलोचनां जगद्धात्रीं वरदां भक्तवत्सलाम् ।
एवं ध्यात्वा ब्रह्मरूपां तन्मन्त्रं दशधा जपेत् ॥

अर्थ –– हे कमलानने, या वर्णाचे मी ध्यान सांगतो, ते ऐक. हिने विविध अलंकार धारण केले आहेत. हिला बारा भुजा आहेत. हिच्या अंगाला रक्तचंदनाचा लेप दिलेला असून, तिने विचित्र रंगाचे वस्त्र परिधान केले आहे. तिला तीन नेत्र आहेत. ती जगद्धात्री असून भक्तांना वर देणारी व भक्तवत्सल आहे. अशा ब्रह्मरूपी जकाराचे ध्यान करून त्याचा मंत्र दहा वेळा जपावा.

तालू हे याचे उच्चारणस्थान होय. [म. ज्ञा. को.; श. क.]

ज़कात इस्लामी आचारधर्माच्या पाच आधारस्तंभांपैकी एक स्तंभ. प्रत्येक मुसलमानाने आपल्या वार्षिक उत्पन्नाचा चाळिसावा भाग देवाला अर्पण करावा व त्याचा उपयोग गरिबांसाठी व्हावा, अशी देवदूताची आज्ञा आहे (कुराण २.७७). उत्पन्नाच्या या भागाला ज़कात म्हणतात. या शब्दाचा मळ अर्थ पवित्रीकरण असा आहे. संपत्तीचा काही भाग देवाला अर्पण केला, तर उरलेला भाग पवित्र होतो, अशा समजुतीने देवाच्या नावाने गोरगरिबांना भिक्षा घालणे, हे एक धार्मिक कर्तव्य मानले जात असे. प्रारंभी ते ऐच्छिक होते. पण पुढे त्याला कराचे स्वरूप मिळाले व त्या उत्पन्नातून मशिदी बांधणे वगैरे कामेही पार पाडण्यास सुरुवात झाली. सांप्रत हे कराचे स्वरूप राहिले नसून, जकात देणे व्यक्तीच्या इच्छेवरच असते. सैयद लोकांना या दानाचा फायदा घेता येत नाही, कारण ते मुहंमदाच्या वंशातले असतात. [डि. इ.; मु. इं.]

जगजीवन (इ. स. चे १६ शतक) एक संतकवी. राजस्थानातील दौसा या गावी एका ब्राह्मणकुळात याचा जन्म झाला. तरुणपणी काशीत राहून याने शास्त्राध्ययन केले. तो मोठा पंडित झाला. त्या वेळी संत दादू हा आमेर येथे राहत होता. त्याचा महिमा जगजीवनाच्या कानी गेला. त्याला वाटले, की दादूशी शास्त्रार्थ करून त्याचा पराभव करावा आणि आपले महत्त्व वाढवावे. म्हणून तो आमेर येथे गेला. त्या दोघांचा शास्त्रार्थही झाला; पण त्यात जगजीवनाची हार झाली. मग त्याने आपले सर्व ग्रंथ तिथल्या तलावात फेकून देऊन दादूचे शिष्यत्व पत्करले. वाणी व दृष्टान्तसाखीसंग्रह या नावाचे याचे दोन काव्यग्रंथ आहेत. याची भाषा साधी व सरस आहे. [रा. पिं. सा.]

(२) (इ. स. चे १७ वे शतक) एक जैन भक्तकवी. याच्या पित्याचे नाव संघवी अभयराज व आईचे मोहन दे संघइन असे होते. अभयराज हा मोठा धनिक असून, आग्रचाचा रहिवासी होता. जगजीवन हा विद्वान असून, जाफरखाँ नावाच्या एका उमरावाकडे मंत्री होता.

जगजीवन हा बनारसीदासाचा भक्त होता. बनारसीदासाची विखुरलेली कविता याने बनारसीविलास या नावाखाली संग्रहित केली. स्वतः जगजीवनाने अनेक पदे व एकीभावस्तोत्र रचले आहे. एकीभावस्तोत्र भक्तिपूर्ण आहे. त्यात एके ठिकाणी तो म्हणतो ––

सकललोकका तू भगवान बिना प्रयोजन बंधु समान ।
सकल पदारथ भासक भास तो में बसै अबंध विलास ॥

अर्थ – हे जिनेंद्रदेवा, तू सर्व लोकांचा भगवान व विनाप्रयोजन बंधू आहेस. तुझ्यात सर्व पदार्थ आभासित होतात व विलास अबंध रूपाने वास करतात.

अनेक शास्त्रभांडारात हस्तलिखितरूपात जगजीवनाची पदे आढळतात. [हिं. जै. भ. क.]

जगजीवनदास (१६८२–१७६१ इ. स.) उत्तर प्रदेशातील एक संत. याने सत्तनामी (सत्नामी)

पंथाची स्थापना केली. हा जातीने चंदेल ठाकूर होता. शरयूच्या तीरावरील सरदहा हे याचे जन्मगाव होय. बावरी पंथातील



सत्नामी मठ – कोटवा

संत बूलासाहेब व गोविंदसाहेब हे दोघे याचे गुरू होते, असे म्हणतात. पण याचे अनुयायी याला विश्वेश्वर पुरीचा शिष्य मानतात. या विश्वेश्वर पुरीविषयी विशेष माहिती उपलब्ध नाही.



जगजीवनदास

शब्दसागर, ज्ञानप्रकाश (प्रथम ग्रंथ), आगमपद्धती, महाप्रलय, प्रेमग्रंथ व अघविनाश हे जगजीवनदासाचे ग्रंथ प्रसिद्ध आहेत. शब्दसागर या ग्रंथात त्याच्या विविध पदांचा संग्रह असून, हा एवढाच ग्रंथ प्रकाशित झालेला आहे. त्यातील पदांतून त्याचे ऋजू अंतःकरण व प्रगाढ ईश्वरभक्ती यांचा प्रत्यय येतो. याने परमात्म्याला सत्त हे नाव दिले असून, निर्गुण, अनादी व परम कृपाळू असे त्याचे वर्णन केले आहे. सत्त या नावाचे भजनकीर्तन करण्यापेक्षा त्याचे केवळ स्मरण करणे हेच ईश्वरप्राप्तीचे उत्तम साधन होय, असे याचे मत होते. सत्यवचन, अहिंसा, परोपकार व संयत जीवन हीच सर्वश्रेष्ठ नैतिक मूल्ये मानून त्याने त्यांचा उपदेश केला आहे. आध्यात्मिक साधना व भौतिक जीवन यांचा समन्वय करण्यावर याने भर दिला आहे.

दूलनदास, देवीदास, गुसाईंदास व खेमदास हे याचे मुख्य शिष्य होत. त्यांना चार पावा म्हणतात. याशिवाय याच्या शिष्यपरिवारात निरनिराळ्या जातींचे कित्येक लोक होते.

आयुष्याची शेवटची सुमारे दहा वर्षे जगजीवनदासाने कोटवा या गावी घालवली. शेवटी तो तिथेच मरण पावला. त्या ठिकाणी त्याची समाधी असून, सत्नामी पंथाचा प्रसिद्ध मठही आहे. तिथे वैशाख व कार्तिक अमावास्येच्या दिवशी जत्रा भरते. [म. ज्ञा. को.; हिं. सा. को. २; उ. भा. सं. १.]

जगत विश्व. याची व्याख्या अशी– ‘स्थावरजङ्गमात्मकं सर्वपदार्थजातम्’ = स्थावरजंगमात्मक यच्चयावत् सर्व पदार्थ म्हणजे जग होय (न्या. को.).

हे जग कसे उत्पन्न झाले, कोणी उत्पन्न केले, याची धारणा कोण करतो, जगातले निरनिराळे पांचभौतिक व्यापार कसे चालतात, या जगाचा सूत्रचालक कोण, सूर्य–चंद्र–तारे, दिवसरात्र, ऋतुचक्र हे कोणी निर्माण केले, ढग, पाऊस, वादळे, उत्पात, या गोष्टी कशा निर्माण होतात, वनस्पती व प्राणी यांची सृष्टी कशी होते, त्यांचा जीवनक्रम कोण आणि कसा चालवतो, इ. जगाविषयीची जिज्ञासा मानवाच्या मनात प्राचीन कालापासून उत्पन्न झालेली आहे आणि प्रारंभापासूनच मानव हा आपापल्या बुद्धीप्रमाणे जगाच्या उत्पत्तीचे हे कोडे सोडवण्याचा प्रयत्न करीत आला आहे. सृष्टीमध्ये ज्या निरनिराळ्या वस्तू दिसतात, त्या उत्पन्न होण्याच्या पूर्वी तिथे काय असेल, पदार्थांचा उत्पत्तिक्रम कोणता, या सृष्टीचे पुढे काय होणार आहे, इ. विचार हे सृष्टिविषयक विचार होत. जगातले सर्वात प्राचीन वाङ्मय म्हणजे ऋग्वेद होय. तिथे जगदुत्पत्तीची पद्धतशीर प्रक्रिया कुठे मांडलेली नाही; पण त्यासंबंधी काही विचारकण विखुरलेल्या स्वरूपात आढळतात. ऋग्वेदातले नासदीय सूक्त हे सृष्टिविषयक विचार व्यक्त करणारे एक महत्त्वाचे सूक्त आहे. त्यातील काही महत्त्वाच्या ऋचा पुढीलप्रमाणे—

नासदासीन्नो सदासीत् तदानीं
नासीद्रजो नो व्योमा परो यत् ।
किमावरीवः कुह कस्य शर्म-
न्नम्भः किमासीद् गहनं गभीरम् ॥
न मृत्युरासीदमृतं न तर्हि
न राज्या अह्न आसीत् प्रकेतः ।
आनीदवातं स्वधया तदेकं
तस्माद्धान्यं न परः किञ्चनास ॥
तम आसीत् तमसा गूळ्हमग्रेऽप्रकेतं
सलिलं सर्वमा इदम् ।
तुच्छ्येनाभ्वपिहितं यदासीत्
तमसस्तन्महिना जायतैकम् ॥

(ऋ. १०.१२९.१–३)

अर्थ — (जेव्हा हे विश्व उत्पन्न झाले नव्हते) त्या वेळी असत् (म्हणजे इन्द्रियांना अगोचर असे) ज्याला म्हणतात, ते काही नव्हते किंवा सत् म्हणतात तेही नव्हते; त्या वेळी (अंतरिक्षात्मक) रजोलोक नव्हता किंवा आकाशही नव्हते आणि आकाशाच्या बाहेर पलिकडे जे काही आहे, तेही नव्हते. अशा वेळी आवरण तरी कोणते असणार ? आणि सुखाचा आश्रय तरी कोठचा आणि कोणाचा असणार ? मग त्या वेळी अत्यंत दुर्गम आणि खोल असे उदक तरी कोठून असणार ? त्या वेळी मृत्यू नव्हता आणि अमृत म्हणजे अमरत्वही नव्हते. तसेच रात्र आणि दिवस यांच्या निराळेपणाचा मागमूसही नव्हता. अशा वेळी अगदी निश्चल असे जे आदितत्त्व ते मात्र आपल्याच अतर्क्य शक्तीने श्वासोच्छ्वास करीत होते. पण तो (श्वासोच्छ्वास) वायुविरहित होता. त्या वेळी तेच (तत्त्व) एकटे विद्यमान होते; त्याच्यावाचून दुसरे किंवा त्याच्यापेक्षा पलिकडे किंवा श्रेष्ठ असे काहीही नव्हते. पण नंतर प्रथमतः तम उत्पन्न झाले. तथापि ते तमदेखील तमानेच व्याप्त होते. नंतर ज्याला कोणतेही रूप अथवा आकार नाही, असे निराकार परंतु गतिमान उदकतत्त्व सर्वत्र भरून राहिले. ते प्रभावशाली व्यापक तत्त्व (तमाच्या) पातळ पापुद्र्याने झाकलेले होते. पण नंतर तैजस तत्त्वाच्या प्रभावाने तिथे एक (सृष्टीचे बीज) उत्पन्न झाले.

त्यापुढे या सूक्तात लिहिले आहे, ते असे– त्यानंतर प्रथम मनोरूप बीज उत्पन्न झाले. त्या बीजाच्या ठिकाणी काम उत्पन्न झाला. (हे सर्व जरी खरे;) तरी ही नानाविध सृष्टी कुठून आली आणि कशापासून झाली, हे आम्हांला कोण येऊन सांगणार? दिव्य विबुध सांगतील म्हणावे, तर त्यांना काय माहीत? तात्पर्य हे, की या सृष्टीचा जो नियंता अत्युच्च आकाशात आहे, त्यालाच हे सर्व माहीत असेल.

भारतीय तत्त्वज्ञानाच्या विचारेतिहासात या सूक्ताला महत्त्वाचे स्थान आहे. हेच सूक्त पुढे तैत्तिरीय ब्राह्मणात आढळते (२. ८. ९. ३). आणि त्यानंतर पुन्हा शुक्ल यजुर्वेदाच्या शतपथ ब्राह्मणातही दृष्टीस पडते (१०. ५. ३. २). यावरून प्रस्तुत सूक्तात व्यक्त झालेले विचार हे केवळ एकाच ऋषीचे नसून तत्कालीन अनेक ज्ञानी पुरुष अशाच प्रकारचे विचार धारण करीत होते, असे समजायला हरकत नाही.

ऋग्वेदात असेच दुसरेही एक सृष्टिविषयक सूक्त आहे. त्यात नासदीय सूक्तातला सृष्टिविचार अधिक पुढे नेलेला आहे–

देवानां नु वयं जाना प्र वोचाम विपन्यया ।
उक्थेषु शस्यमानेषु यः पश्यादुत्तरे युगे ॥
ब्रह्मणस्पतिरेता सं कर्मार इवाधमत् ।
देवानां पूर्व्ये युगेऽसतः सदजायत ॥
देवानां युगे प्रथमेऽसतः सदजायत ।
तदाशा अन्वजायन्त तदुत्तानपदस्परि ॥

(ऋ. १०. ७२. १–३)

अर्थ – आम्ही आता रम्य स्तुतीने दिव्य जनांच्या उत्पत्तीचे वर्णन करणार आहो. त्यायोगे जेव्हा जेव्हा सामगायन होईल तेव्हा तेव्हा पुढील पिढीत प्रत्येकाला त्याचे ज्ञान होत जाईल. लोहार ज्याप्रमाणे भाता फुंकून वस्तू तयार करतो, त्याप्रमाणे ब्रह्मणस्पतीने या सृष्टीची उत्पत्ती केली. ती अशी, की देवांच्या पहिल्याच युगात असत्पासून सत् निर्माण झाले. म्हणजे अदृश्यापासून दृश्य व अव्यक्तापासून व्यक्त वस्तू निर्माण झाल्या. त्याप्रमाणे दिव्य विभूतींच्या पहिल्या युगात असत्पासून सत् असे विश्व उत्पन्न झाले. नंतर अवकाश उत्पन्न झाला, तो अत्युच्च अशा उत्पादक शक्तीपासून झाला.

त्यापुढे या सूक्तात अदितीपासून दक्ष व दक्षापासून अदिती उत्पन्न झाल्याचे उलट सुलट सांगितले आहे. त्यावरून अदिती हे जगाच्या निर्मितीतले स्त्रीतत्त्व आणि दक्ष हे पुंस्तत्त्व अशी सूक्तकर्त्याची कल्पना असावी. या दोघांपासून भद्र व अमृत असे देव उत्पन्न झाले. त्यानंतर सूर्य वर आला.

या सूक्ताचे तात्पर्य असे – प्रथम जिथे काही नव्हते, तिथे अस्तित्वाची कल्पना आली. नंतर त्या अवकाशात दिशा उत्पन्न झाल्या. पुढे उत्तानपाद वृक्षावरून खाली व वर या कल्पना आल्या. पुढे भूः भुवः या अवकाशवाचक कल्पना उत्पन्न झाल्या. त्यानंतर सर्वव्यापक अदिती उत्पन्न झाली व तिच्यापासून प्रकाशमय सूर्य उत्पन्न झाला आणि त्या प्रकाशामुळे सर्व जीवसृष्टीची उत्पत्ती व क्षय ही निर्माण झाली.

यापुढचा सृष्टिविस्तार ऋग्वेदातल्या सुप्रसिद्ध अघमर्ष-अ

सूक्तात सांगितला आहे तो पुढीलप्रमाणे —

ऋतं च सत्यं चाभीद्धात् तपसोऽध्यजायत ।
ततो रात्र्यजायत ततः समुद्रो अर्णवः ।।
समुद्रादर्णवादधि संवत्सरो अजायत ।
अहोरात्राणि विदधद्विश्वस्य मिषतो वशी ।।
सूर्याचन्द्रमसौ धाता यथापूर्वमकल्पयत् ।
दिवं च पृथिवीं चाऽन्तरिक्षमथो स्वः ।।
(ऋ. १०.१९०.१–३)

अर्थ – सृष्टिनिर्मात्याच्या जाज्वल्य तपःसामर्थ्याने ऋत व सत्य उत्पन्न झाले. नंतर रात्र निर्माण झाली. त्यानंतर उदककल्लोळांनी उचंबळणारा समुद्र निर्माण झाला. त्यानंतर कालनिदर्शक वर्षमान उत्पन्न झाले. नंतर डोळयाची उघडझाप करणारे प्राणिमात्र निर्माण करून सृष्टीच्या अधिपतीने अहोरात्र प्रचारात आणले. पूर्वी ठरवलेल्या योजनेप्रमाणे सृष्टिकर्त्याने रवि-चंद्र उत्पन्न केले होते. पण त्यांच्या अगोदर त्याने द्युलोक निर्माण केला आणि नंतर क्रमाने पृथ्वी, अंतरिक्ष आणि दिव्य लोक अशी रचना केली.

अशाच तऱ्हेचे विचार तैत्तिरीय संहितेतही आढळून येतात. त्यांत सर्व विश्व प्रथम जलमय होते व त्यापासून सर्व सृष्टी उत्पन्न झाली, ही प्राथमिक कल्पनाच व्यक्त झालेली आहे.

आपो वा इदमग्रे सलिलमासीत् तस्मिन् प्रजापतिर्वायुर्भूत्वाऽचरत् स इमामपश्यत् तां वराहो भूत्वाऽहरत् तां विश्वकर्मा भूत्वा व्यमार्ट् साऽप्रथत सा पृथिव्यभवत् तत्पृथिव्यै पृथिवीत्वं तस्यामश्राम्यत् प्रजापतिः स देवानसृजत ।
(तै. सं. ७.१.५.१)

अर्थ – प्रथम हे सर्व आप (जलमय) होते. त्या जलात प्रथम प्रजापती वायुरूपाने संचार करीत होता. त्याने या पृथ्वीला पाहिले व वराहरूप घेऊन तिला वर उचलले. नंतर विश्वकर्मा बनून त्याने तिला घडवले. मग तिला प्रसरण पावायला लावले. ती पसरत गेली व म्हणून पृथिवी (प्रथ्=पसरणे) झाली. हेच पृथिवीचे पृथ्वीत्व होय. त्या पृथिवीच्या ठिकाणी प्रजापतीने परिश्रम केले व देवसृष्टी निर्माण केली.

प्रजापतीचे हे परिश्रम करणे तपोरूप होते. म्हणजेच प्रजापतीने सृष्टिरचनेचे सामर्थ्य तप करून मिळविले, हे त्याच संहितेत पुढीलप्रमाणे सांगितले आहे –

प्रजापतिरकामयत प्रजाः सृजेयेति स तपोऽतप्यत स सर्पानसृजत सोऽकामयत प्रजाः सृजेयेति स द्वितीयमतप्यत स वयांस्यसृजत सोऽकायमत प्रजाः सृजेयेति स तृतीयमतप्यत स एतं दीक्षितवादमपश्यत् तमवदत् ततो वै स प्रजा असृजत ।
(तै. सं. ३.१.१.१)

अर्थ – प्रजापतीला इच्छा झाली, की आपण प्रजा निर्माण करावी. त्यासाठी त्याने तप केले. तप करून त्याने प्रथम सर्प सृष्टी (सरपटणारे प्राणी) निर्माण केली. (पण तेवढ्याने त्याचे समाधान झाले नाही, म्हणून) त्याने पुन्हा तप केले व मग पक्षी निर्माण केले. त्याने तिसऱ्यांदा तप केले व त्याला दीक्षितांनी म्हणायचे मंत्र दिसले (ते त्याने म्हटले). मग त्याने मानवी प्रजा निर्माण केली.

इथे सृष्टीचा निर्मितिक्रम प्रथम उरग, नंतर पक्षी व नंतर मनुष्यप्राणी असा सांगितला आहे. जीवकोटीच्या विकासातील या तीन महत्त्वाच्या पायऱ्या आहेत, ही गोष्ट आजच्या विकासवाद्यांनाही मान्य आहे. पण हजारो वर्षांपूर्वी तत्कालीन ऋषी-मुनींना ही गोष्ट केवळ विचारशक्तीने ज्ञात झाली आणि त्यांनी ती नमूद करून ठेवली, हे विशेष होय.

यानंतर पंचमहाभूतांची उत्पत्ती कशी झाली, ते तैत्तिरीय आरण्यकात पुढीलप्रमाणे सांगितले आहे–

तस्माद्वा एतस्मादात्मन आकाशः सम्भूतः । आकाशाद्वायुः । वायोरग्निः । अग्नेरापः । अद्भ्यः पृथिवी । पृथिव्या ओषधयः । ओषधीभ्योऽन्नम् । अन्नात् पुरुषः ।।
(तै. आ. ८.१)

अर्थ– त्या या आत्म्यापासून आकाश उत्पन्न झाले. आकाशापासून वायू, वायुपासून अग्नी, अग्नीपासून आप, आपापासून पृथिवी, पृथिवीपासून वनस्पती, वनस्पतीपासून अन्न व अन्नापासून मनुष्य उत्पन्न झाला.

आपल्या पृथ्वीची उत्पत्ती तेजोमेघापासून झाली, असे आधुनिक शास्त्रज्ञांची विचारसरणी आहे. या विचारसरणीचा अंधुक असा साक्षात्कार वरील उताऱ्यात घडतो. प्रथम आत्म्यापासून अंतरिक्ष अथवा पोकळी उत्पन्न झाली. त्यात तेजोमेघासारखे वायुमय विरल पटल उत्पन्न झाले. त्यात उष्णता (अग्नी) निर्माण झाली. त्या उष्णतेच्या कमीजास्त होण्याने द्रवरूप (आप) उत्पन्न झाले. त्यापासून घन अशी पृथ्वी निर्माण होऊन, पुढे तिच्यावर वनस्पती व प्राणी उत्पन्न झाले. हे विचार प्राचीन ऋषींनी हजारो वर्षांपूर्वी कोणत्याही प्रकारची शास्त्रीय साधने उपलब्ध नसताना व्यक्त करून ठेवले, हे विशेष म्हटले पाहिजे.

शतपथ ब्राह्मणात हेच विचार याहून अधिक विस्ताराने मांडलेले आढळतात. त्यांचा सारांश असा–

प्रथम हे सर्व आप होते. त्याच्या मनात प्रजा कशी निर्माण करावी, याविषयी आकांक्षा उत्पन्न झाली. तेव्हा त्याने श्रम केले व तप केले. त्याचे तप चालू असता एक सुवर्णमय अंडे निर्माण झाले. त्याच वेळी संवत्सरही उत्पन्न झाले. मग ते

सुवर्णमय अंडे संवत्सराच्या कालापर्यंत जलामध्ये तरंगत राहिले. त्या संवत्सराच्या ठिकाणी प्रजापती नामक पुरुष उत्पन्न झाला. प्रजापतीने ते सुवर्णमय अंडे रुजत घातले. त्या अंड्याने भू: असा उच्चार केला, त्याबरोबर पृथ्वी उत्पन्न झाली; भुव: असा उच्चार केला, त्याबरोबर द्युलोक उत्पन्न झाला; स्व: असा उच्चार केला, त्याबरोबर अंतरिक्ष उत्पन्न झाले (श. ब्रा. ११.१.६.१–८).

शतपथ ब्राह्मणातच दुसऱ्या एका ठिकाणी म्हटले आहे, की प्रारंभी एकटेच ब्रह्म होते. पुढे त्याने देव निर्माण केले आणि तीन लोक निर्माण करून ते त्यांना राहायला दिले.

मुंडकोपनिषदात विश्वाचे कर्तृत्व दिव्य व अमूर्त अशा पुरुषाकडे दिलेले असून, अमूर्त व मूर्त या दोन तत्त्वांची सांगड घातली आहे. हा दिव्य पुरुष अज, अप्राण, अमना व शुभ्र होता. त्याच्यापासून प्राण, मन, इंद्रिये, आकाश, वायू, ज्योती आप व पृथिवी उत्पन्न झाली.

मनुस्मृतीत जगदुत्पत्तीचा विचार मांडला आहे, तो असा– प्रथम हे जगत तमोमय होते. नंतर स्वयंभू भगवानाला प्रजोत्पत्तीची इच्छा झाली. त्याने प्रथम जल निर्माण केले व आपले बीज त्यात टाकले.

तदण्डमभवद्धैमं सहस्रांशुसमप्रभम् ।
तस्मिञ्जज्ञे स्वयं ब्रह्मा सर्वलोकपितामह: ।।
(मनु. १.९)

अर्थ – त्या बीजाचे सूर्याप्रमाणे कांतिमान असे सुवर्णाचे अंडे बनले. मग सर्व लोकांचा पितामह असा ब्रह्मा त्यातून निर्माण झाला.

पुढे ब्रह्याने त्या अंड्याची दोन शकले केली आणि त्यांपासून स्वर्ग आणि पृथ्वी निर्माण केली. त्यांच्या मध्यभागी आकाश, अष्टदिशा आणि समुद्र उत्पन्न केले. नंतर त्याने मन, अहंकार, महत्, आत्मा, त्रिगुणात्मक सर्व पदार्थ, पंच इंद्रिये, इ. सृष्टी निर्माण केली.

संहिता, ब्राह्मणे व उपनिषदे यानंतर पौराणिक वाङ्मय येते. सृष्टी, प्रतिसृष्टी, निरनिराळे वंश, मन्वंतरे व विविध वंशांनी केलेले कार्य, या पाचांचे वर्णन करणे, हे पुराणांचे प्रधान उद्दिष्ट आहे. त्यामुळे जगाच्या उत्पत्तीचा विषय सर्व पुराणांनी प्रथमच सांगितला असून, थोड्या फार फरकाने तो बहुतेक सर्व पुराणांत सारखाच आहे. अठरा पुराणांपैकी अग्निपुराण हे महत्त्वाचे आहे. त्यात जगदुत्पत्तीची प्रक्रिया दिली आहे, तिचा सारांश असा –

ब्रह्म हे अव्यक्त असले, तरी ते सत् आहे. तेच प्रथम होते. त्या वेळी आकाश, रात्र, दिवस वगैरे काहीही नव्हते. अशा त्या वेळी प्रकृतीने पुरुष जो विष्णू, त्याच्या ठिकाणी प्रवेश करून तिथे क्षोभ निर्माण केला. मग महत् हे तत्त्व प्रथम निर्माण झाले. त्यातून अहंकार उत्पन्न झाला. त्यापासून आकाश, त्यापासून स्पर्शज्ञान करून देणारा वायू, त्यापासून रूपज्ञान करून देणारे तेज, त्यापासून रसज्ञान करून देणारे जल व त्यापासून गंधज्ञान करून देणारी पृथ्वी ही क्रमाने एकातून एक निर्माण झाली. अहंकार व तप यांच्यापासून तैजस वस्तू व इंद्रिये उत्पन्न झाली. नंतर वैकारिक दहा देव व अकरावे मन निर्माण झाले. त्यानंतर स्वयंभू भगवानाने निरनिराळ्या प्रकारची प्रजा निर्माण केली. त्याने प्रथम जल उत्पन्न केले व त्यात वीर्य उत्पन्न केले. त्या जलात पुढे तरंगणारे एक सुवर्णमय अंडे उत्पन्न झाले. त्या अंड्यातून ब्रह्मा स्वतः उत्पन्न झाला. म्हणून त्याला स्वयंभू म्हणतात. त्याने त्या अंड्याची दोन शकले केली. त्यांतल्या वरच्या शकलाचा द्युलोक आणि खालच्या शकलाची पृथ्वी बनली. त्या दोन शकलांच्या मध्ये आकाश निर्माण झाले. ही पृथ्वी जन्मतःच पाण्यात बुडू लागली. म्हणून तिला दशदिशांनी दहा ठिकाणी धारण केले. मग सृष्टी उत्पन्न करण्याची इच्छा करणाऱ्या प्रजापतीने पृथ्वीवर काल, मन, वाचा, काम, क्रोध, रती व तद्रूप सृष्टी निर्माण केली. त्याने आकाशात विजेपासून उल्का, मेघ व इंद्रधनुष्य ही निर्मिली. मग पक्षी व पर्जन्य हे उत्पन्न केले. नंतर यज्ञसिद्धीसाठी स्वमुखापासून ऋक्, यजु व साम हे निर्मिले. त्याने आपल्या भुजांपासून सनत्कुमारांना व क्रोधापासून रुद्राला उत्पन्न केले. मग मनापासून मरीच्यादी सात मानसपुत्र उत्पन्न केले. या मानसपुत्रांनी उत्तम अशी प्रजा निर्माण केली. नंतर ब्रह्याने स्वतःचा देह द्विधा करून त्याच्या अर्ध्या भागापासून पुरुष व अर्ध्या भागापासून स्त्री उत्पन्न केली. मग त्या स्त्रीच्या ठिकाणी ब्रह्याने अनेक प्रकारच्या प्रजा उत्पन्न केल्या.

हे आत्मदेहापासून निर्माण केलेले स्त्री-पुरुष म्हणजे मनू व शतरूपा हे दांपत्य होय. या दांपत्याच्या जन्मानंतर पुढे मिथुनोद्भव प्रजा निर्माण होऊ लागली, हे अन्यत्र सांगितले आहे.

प्रजानिर्मितीत दक्ष या पुरुषाचा फार मोठा वाटा आहे. पुराणात त्याला ब्रह्याचा पुत्र व प्रजापतींपैकी एक असे म्हटले आहे. त्याच्याबद्दलच्या कथांत मात्र थोडा फार फरक आढळतो. त्याची पत्नी प्रसूती ही स्वायंभुव मनूची नात होती. दक्षाला तिच्यापासून ६० कन्या झाल्या. त्यांपैकी त्याने दहा धर्माला, तेरा कश्यपाला, सत्तावीस चंद्राला व दहा इतर अनेकांना दिल्या. कश्यपाने आपल्या भार्यांपासून देव, दैत्य, मानव, पक्षी, सर्प व इतर प्राणी निर्माण केले. या काश्यपी प्रजेपासूनच प्राण्यांना स्त्रीत्व-पुंस्त्वदर्शक लिंगे मिळाली.

विष्णु पुराणात सृष्टयुत्पत्ती सांगताना नऊ सर्गांचे वर्णन दिले आहे, ते असे—

कल्पाच्या प्रारंभी ब्रह्मा सृष्टीचे चिंतन करीत असता, तमोमय अशी सृष्टी त्याच्यापुढे आविष्कृत झाली. ब्रह्म्याने प्रथम पंचविध अज्ञान व नंतर उर्ध्वस्रोतस् आणि अर्वाक्स्रोतस् असे प्राणी निर्माण केले. याला पहिला किंवा ब्रह्म्याचा सर्ग असे नाव आहे. या पहिल्या सर्गापासून पुढे अहंकार, शब्दस्पर्शादी पंच तन्मात्रे व आकाशादी पंच महाभूते उत्पन्न झाली. याला भूतसर्ग असे म्हणतात. नंतर पंच कर्मेंद्रिये, पंच ज्ञानेंद्रिये व बुद्धीपासून निर्माण झालेले मन यांचा जन्म झाला. हा तिसरा सर्ग होय. या तिघांना प्रकृतीपासून निर्माण झालेले म्हणून प्राकृत असे म्हणतात. पुरुषाच्या प्रभावाने ही सर्व तत्त्वे एकत्र येऊन त्यांचे ब्रह्मांडात रूपांतर झाले. रजोगुणयुक्त झाल्यामुळे ब्रह्मा कार्यप्रवण झाला आणि त्याने हे जग निर्माण केले. हा चौथा सर्ग. यानंतर त्याने मनन करून पाचवी प्राणिसृष्टी, सहावी देवसृष्टी, सातवी मानवसृष्टी व आठवी अनुग्रहसृष्टी निर्माण केली. या पाच सर्गांना वैकृत सर्ग म्हणतात. नववी सृष्टी सनत्कुमार आणि मनोजात पुत्र यांची होय. हे सर्व पुत्र कुमार राहिले, म्हणून या नवव्या सर्गाला कौमार सर्ग असे नाव मिळाले.

पुराणांनी विश्वाची तीन लोकांत किंवा भुवनांत विभागणी केली आहे. स्वर्ग, मृत्यू (पृथ्वी), पाताळ अशी त्यांची नावे आहेत. यालाच त्रैलोक्य किंवा त्रिजगत् असे म्हणतात. यांपैकी मधला पृथ्वी हा भाग शिखरापेक्षा तळाला पुष्कळच जवळचा असून तो मृण्मय आहे पृथ्वी म्हणजे एक प्रचंड वाटोळी तबकडी असून, तिचा विस्तार दहा कोटी योजने आहे. तिच्या सभोवती लोकालोक पर्वत असून, त्याच्या मध्ये सर्व खंडे आणि महासागर आहेत. पृथ्वीच्या वर स्वर्गलोक व खाली पाताळलोक आहे.

विश्व हे प्रत्यक्षात दोन भागांचे बनलेले असून, प्रत्येकात सात सात लोक आहेत, ही आणखी एक कल्पना होय. वरच्या सात लोकांना अनुक्रमे भूः, भुवः, स्वः, महः, जनः, तपः आणि सत्यम् अशी नावे आहेत. खालच्या सात लोकांना अतल, वितल, नितल, गभस्तिमत्, महातल, सुतल आणि पाताल अशी नावे आहेत. सर्वसाधारणपणे या सर्व लोकांना पाताल या नावाने ओळखतात. हे लोक पृथ्वीखाली सत्तर हजार योजने पसरलेले असून, प्रत्येक लोकाची खोली दहा हजार योजने आहे. स्वर्गात देव, गंधर्व, अप्सरा, इ. राहतात; तर पातालात नाग, दैत्य आणि दानव राहतात. स्वर्गाप्रमाणेच पाताल लोक सौंदर्य आणि वैभव यांनी नटलेला आहे. पाताळाखाली शेषनाग असून, त्याने आपल्या मस्तकावर पृथ्वी धारण केली आहे. पाताळाखाली नरक आहेत. वरच्या भागाखाली द्युलोक सूर्यापर्यंत पोचलेला आहे. सूर्यापासून ध्रुवापर्यंत स्वर्लोक किंवा देवांचा स्वर्ग पसरलेला आहे.

दर्शनांतील विचार— जीव, जगत आणि जगदीश्वर यांचा विचार करणे, हे दर्शनांचे प्रधान उद्दिष्ट आहे. त्याला अनुसरून सर्व दर्शनांनी जगदुत्पत्तीचा विचार केला आहे.

चार्वाकदर्शनात पृथ्वी, जल, तेज व वायू या भूतांच्या अकस्मात संयोगाने हे जगत उत्पन्न होते, असे सांगितले आहे. हे चार पदार्थ आपल्या आणविक अवस्थेत जगताचे मूलकारण आहेत, असे चार्वाक मानतात.

न्यायदर्शनाने ईश्वर हा जगताचा कर्ता मानलेला असून, तो परमाणूंपासून हे जगत निर्माण करतो, असे सांगितले आहे.

वैशेषिकदर्शनातही परमाणूंपासूनच जगदुत्पत्ती मानलेली आहे. अणुपरिमाणविशिष्ट दोन परमाणूंच्या संयोगाने द्व्यणुक उत्पन्न होते. अशा तीन द्व्यणुकांच्या संयोगाने एक त्रसरेणु उत्पन्न होतो. चार त्रसरेणूंपासून एक चतुरणुक उत्पन्न होते आणि त्यानंतर जगताची सृष्टी होते, असे त्यांचे मत आहे. दोन परमाणूंत प्रथम जे स्पंदन निर्माण होते, ते अदृष्टामुळे उत्पन्न होते, असे प्राचीन आचार्य मानीत असत. पण नंतरचे वैशेषिक आचार्य अदृष्टाच्या ऐवजी ईश्वराच्या इच्छेने हे स्पंदन होते, असे मानू लागले.

सांख्यदर्शनानुसार प्रकृती व पुरुष यांच्या संयोगाने विश्वसृष्टी उत्पन्न होते. त्या दोघांचा संयोगच सृष्टीचा उत्पादक आहे. प्रकृती जड आहे आणि पुरुष स्वभावतःच निष्क्रिय आहे. त्यामुळे सृष्टिकार्यासाठी त्या दोघांच्या संयोगाची आवश्यकता असते. जड प्रकृती चेतनाच्या अध्यक्षतेने कार्यप्रवण होऊन सृष्टीची निर्मिती करते. सत्त्व, रज व तम हे प्रकृतीचे तीन गुण होत. प्रलयदशेत हे तीन्ही गुण प्रकृतीच्या ठिकाणी समभावाने राहतात. उत्पत्तिकाली तिचा पुरुषाशी संयोग होताच त्या तीन्ही गुणात क्षोभ उत्पन्न होतो. मग ते एकमेकांवर चढाई करू पाहतात व आपल्याहून इतरांना दाबून टाकण्याचा प्रयत्न करतात. अशा स्थितीत सत्त्वगुण थोडा वरचढ झाला, की सर्वांत प्रथम महत् अथवा बुद्धी नावाचे तत्त्व निर्माण होते. या तत्त्वाला महत् असे म्हणायचे कारण असे दिसते, की आता प्रकृती आकार घरू लागली, विस्तार पावू लागली, महान् होऊ लागली. प्रकृतीपासून साऱ्या सृष्टीची उत्पत्ती होते; पण ही एक हेतुशून्य क्रिया आहे, असे सांख्यांनी मानले नाही. एखादी योजना कार्यान्वित करण्यासाठी प्रथम निश्चय करावा लागतो आणि निश्चय किंवा अध्यवसाय हे बुद्धीचे कार्य असल्यामुळे

सृष्टीच्या उभारणीत प्रथम बुद्धितत्त्व उगम पावणे हे, क्रमप्राप्त आहे.

बुद्धीनंतर उगम पावणारे तत्त्व म्हणजे अहंकार. कारण बुद्धीने केलेला निश्चय, ही एक वृत्ती असते आणि कोणत्यातरी ‘अहं’ला चिकटल्याशिवाय तिला वृत्तित्व येऊ शकत नाही. म्हणून बुद्धीनंतर अहंकार तत्त्व उगवले. याची उपपत्ती लो. टिळकांनी गीतारहस्यात दिली आहे, ती अशी--

प्रकृतीत कितीही खळबळ माजली, तरी आतापावेतो ती एकीभूत होती. यापुढे तिला अनेक व्हावयाचे आहे, भिन्न व्हावयाचे आहे आणि अहंकार (‘मी’पणा) हाच भिन्नत्वाचा प्रयोजक आहे. ‘मी’ हा ‘तू’ कधीच होणार नाही. ‘मी’ हा ‘मी’ आहे, म्हणूनच इतरांपासून वेगळा आहे. म्हणून अशान्त झालेली प्रकृती भिन्न होण्यापूर्वी अहंकार जन्मास येतो.

इथून पुढे सृष्टिप्रक्रियेला दोन शाखा फुटतात. एकीतून निर्माण होते सजीव (सेंद्रिय) सृष्टी व दुसरीतून निर्माण होते निर्जीव (निरिंद्रिय) सृष्टी. अहंकार या तत्त्वातील सत्त्वगुण वरचढ होतो व तो रजोगुणाकडून प्रेरणा घेतो, त्या अवस्थेला वैकृताहंकार म्हणतात (सां. का. २५). या वैकृताहंकारातून मन तसेच श्रोत्र, त्वक्, चक्षू, रसना व घ्राण अशी पाच ज्ञानेंद्रिये आणि वाक्, पाणी, पाद, पायू आणि उपस्थ अशी पाच कर्मेंद्रिये मिळून एकूण ११ तत्त्वे निर्माण होतात.

रजोगुण बलवान झालेल्या अहंकाराच्या अवस्थेला तैजस म्हणतात. तमोगुण प्रभावी होऊन तैजस अहंकाराकडून त्याला चालना मिळते, तेव्हा अहंकाराच्या त्या अवस्थेला भूतादी असे नाव आहे. या भूतादीपासून पाच ज्ञानेंद्रियांचे पाच विषय प्रथम सूक्ष्म स्वरूपात निर्माण होतात. त्यांना तन्मात्रे म्हणतात. शब्द, स्पर्श, रूप, रस व गंध अशी ही तन्मात्रांची नावे आहेत. यांना तन्मात्र म्हणायचे कारण असे, की पृथिव्यादी स्थूल भूतांत इतरही भूतांचे अंश असतात; पण तन्मात्रांत तेच असते आणि इतर काहीही नसते. अशा या पाच तन्मात्रांपासून अनुक्रमे आकाश, वायू, तेज, जल व पृथ्वी अशी स्थूल भूते निर्माण होतात. स्थूल भूतांच्या निरनिराळ्या मिश्रणापासून घटपटादी सर्व भूतवस्तू एकसारख्या निर्माण होत राहतात व त्यांतच त्या विलीन होतात.

योगदर्शनाने सृष्टिनिर्मितीसाठी सांख्यांचा प्रकृति-पुरुषसंयोगच कारणीभूत मानला आहे; पण हा संयोग ईश्वर घडवून आणतो, असे म्हटले आहे.

मीमांसादर्शन जगताची मूळ सृष्टी किंवा प्रलय मानीत नाही. मीमांसकांच्या मते केवळ व्यक्ती उत्पन्न होत राहतात व त्यांचा नाशही होत असतो. मात्र जगताची निर्मिती व नाश कधी होत नाही; ते अनादि--अनंत आहे, असे ते मानतात.

वेदान्तदर्शनानुसार ईश्वर हाच जगताचे निमित्तकारण व उपादानकारणही आहे. ज्याप्रमाणे कुंभार मातीपासून नाना प्रकारची गाडगी-मडकी घडवितो, त्याचप्रमाणे ईश्वर स्वतःपासूनच हे जगत निर्माण करतो.

बौद्धदर्शनात जगदुत्पत्तीला लोकप्रज्ञप्ती असे नाव दिलेले आहे. सर्वास्तिवादी बौद्ध हे भाजनलोक आणि सत्त्वलोक असे दोन लोक मानतात. भाजनलोक हे आधारविश्व असून, सत्त्वलोक हे सजीव प्राण्यांचे निवासस्थान आहे. या प्राण्यांचे पाच विधेय वर्ग असून त्यांना गती असे नाव आहे. या गतींची आणखी अनेक उपगतींत विभागणी झालेली आहे.

बौद्धांचा जगदुत्पत्तिशास्त्राविषयीचा प्रमाण ग्रंथ म्हणजे प्रज्ञप्तिशास्त्र हा होय. पण हा ग्रंथ निर्माण होण्यापूर्वी आणि बुद्धाच्याही आधी पंचमहाभूतांची कल्पना अस्तित्वात होती. आनंदाने जेव्हा गौतम बुद्धाला एकदा धरणीकंपाचे कारण विचारले, तेव्हा बुद्ध म्हणाला--- पृथ्वी ही जलावर, जल वायूवर आणि वायू अवकाशावर आधारलेला आहे. जेव्हा वायू वेगाने वाहू लागतो, तेव्हा जल हलते आणि त्यामुळे त्याच्या वरच्या पृथ्वीलाही हादरे बसतात.

बौद्धांनी एका लहान विश्वाची कल्पना केली आहे, ती अशी--- जगाच्या मध्यभागी मेरू किंवा सुमेरू पर्वत असून, त्याच्यावर देवांची वस्ती आहे. त्याच्या भोवती सूर्य फिरत असतो. त्याच्या दक्षिणेला भारत (जंबुद्वीप) आहे. सृष्टीचा प्रलय झाल्यावर पुन्हा जेव्हा जगदुत्पत्तीला सुरवात होते, तेव्हा ब्रह्म्याचा स्वर्ग प्रथम निर्माण होतो आणि नंतर इतर देवांचे स्वर्ग निर्माण होतात. त्यानंतर महान वायुमंडल उत्पन्न होते. हे वायुमंडल स्वर्गाच्या बरेच खाली असून ते अवकाशावर (Space) आधारित असते. या वायुमंडलावर निर्मितीचा मेघ सुवर्णजलाच्या समुद्राची वृष्टी करतो. वायूने या समुद्राला गती दिली, की आपमंडल आणि कांचनमयी भूमी निर्माण होते. मग तो मेघ त्या भूमीवर सोने, रत्ने, माती, जल, लोह इत्यादींची वृष्टी करतो. यापासूनच मेरू व इतर आठ पर्वत, समुद्र, बेटे, इ. उत्पन्न होतात. सर्वांत बाहेरच्या बाजूला असलेल्या पर्वताला चक्रवाल असे नाव असून, तेच नाव लोकधातू नामक लहान विश्वालाही लावतात.

जंबुद्वीपाच्या वीस हजार योजने खाली संजीव, कालसूत्र, संघात, रौरव, अर्बुद, इ. अनेक नरक आहेत. या नरकांच्या वर निरनिराळे पशू, भूतप्रेत, असुर, यक्ष व देव यांची वस्ती आहे.

बौद्धांनी कामधातू व रूपधातू असे दोन प्रकारचे स्वर्ग मानलेले आहेत. प्रत्येक प्रकाराचे अनेक स्वर्ग आहेत.

सुरवातीला बौद्धांनी लहान विश्व किंवा चक्रवाल याचीच तेवढी कल्पना केली होती. अशा हजारो चक्रवालांच्या एकत्र येण्याने महान विश्व उत्पन्न होते, असे त्यांच्या प्राचीन ग्रंथांत सांगितले आहे.

जैनांच्या मते विश्व हे अनाद्यनंत आहे. त्यामुळे त्यांच्यांत जगदुत्पत्तिविषयक कथा वा कल्पना नाहीत. पण त्यांनी पृथ्वीचे जे वर्णन केले आहे, ते असे—

सर्व विश्व हे पाण्याच्या जाड थरावर आधारलेले आहे. पाणी हें वायूच्या जाड थरावर आणि हा जाड थर वायूच्या पातळ थरावर आधारलेला आहे. या दोन थरांचा विस्तार अनेक सहस्र योजने आहे. पृथ्वीचे एकाखाली एक असे सात प्रदेश आहेत, त्यांची नावे अशी— (१) रत्नप्रभा (२) शर्कराप्रभा (३) वालुकाप्रभा (४) पंकप्रभा (५) धूमप्रभा (६) तमःप्रभा व (७) महातमःप्रभा. या प्रत्येक प्रदेशात अनेक नरक आहेत. त्यात नारकीलोक राहतात. प्रत्येक दोन प्रदेशांमध्ये १० हजार योजनांचे अंतर आहे. वरील सात नरकभूमींवर पृथ्वीचा गोल आहे. हिच्या मध्यभागी मेरू पर्वत आहे. त्याच्या भोवती सूर्य, चंद्र, तारे व ज्योतिष्कदेव फिरत असतात. मेरूच्या माथ्यावर अनेक विमान म्हणजे स्वर्ग आहेत. या स्वर्गांना विशिष्ट नावे आहेत, ती अशी – सौधर्म, ऐशान, सनत्कुमार, इ. बारा कल्प, नऊ ग्रैवेयक व पाच अनुत्तर. हे सर्व सव्वीस स्वर्ग एकावर एक असे आहेत. त्यांच्याही वर ईषत्प्रागभार नामक स्वर्ग असून, निर्वाण मिळविलेले आत्मे त्या ठिकाणी राहतात, अशी जैनांची धारणा आहे.

आदिवासींची कल्पना— भारतात शेकडो आदिवासी जमाती आहेत. त्यांची म्हणून एक विशिष्ट संस्कृती आहे. त्यांच्या विविध कथांतून त्यांच्या सांस्कृतिक संकेतांची आणि कल्पनांची गुंफण झालेली दिसते. आपल्या भोवती पसरलेल्या या अफाट सृष्टीविषयी त्यांच्याही मनात जिज्ञासा व कुतूहल आहे. ही पंचमहाभूतात्मक सर्व सृष्टी कशी उत्पन्न झाली व कोणी उत्पन्न केली, याविषयी त्यांच्यामध्येही वेगवेगळ्या कथा आहेत. पंचमहाभूतांपैकी प्रत्येक भूत कसे निर्माण झाले, त्याचप्रमाणे त्यांच्या भोवतीच्या आणि त्यांच्या उपयोगाच्या अनेक वस्तू कशा निर्माण झाल्या, याविषयी त्यांच्या स्वतंत्र कथा आहेत आणि आश्चर्याची गोष्ट ही, की त्यांच्या कथांतले काही अंश वैदिक सृष्टिविषयक कथांशी मिळते-जुळते आहेत. अशा कथांपैकी तीन कथा नमुन्यासाठी पुढे दिल्या आहेत.

वारली आदिवासींची सृष्टिकथा अशी—

महादेव आणि गंगागौरी हे आद्य स्वयंभू जोडपे होय. त्याने हे जग निर्माण केले. चंद्र, सूर्य, विजेसर (वीज), गाजेसर, (गडगडाट), ढगेसर (मेघ), इ. अनेक देव महादेवाने उत्पन्न केले व त्यांना राज्ये वाटून दिली. धरणी (पृथ्वी) ही महादेवाची धाकटी बहीण होय.

एकदा महादेवाने दरबार भरवायचे ठरवले. त्याने नारन्देव व बरहमदेव यांना दरबाराचे बोलावणे करण्यासाठी सर्व देवांकडे पाठवले. पण एकही देव दरबाराला आला नाही. त्यामुळे महादेव क्रुद्ध झाला आणि त्याने प्रलय करून सर्व देवांची राज्ये नष्ट केली. मात्र पुनश्च जग निर्माण करण्यासाठी त्यान सर्व प्राण्यांचे जिवडे (जीव) जतन करून ठेवले.

अशी अनेक वर्षे लोटली. मग महादेवाला पुनश्च सृष्टी निर्माण करण्याची इच्छा झाली. त्याने नारन्देव व बरहमदेव यांना बोलावून आणून घुंगेरी देवीच्या राज्यातली माती आणायला सांगितली. त्यांनी टोपलीभर माती आणली. महादेव आणि गंगागौरी यांनी नग्न होऊन त्या मातीवर लघुशंका केली. मग ती माती कालवून तिच्या दोन भाकऱ्या थापल्या. त्या वाढत वाढत प्रचंड झाल्या. एका भाकरीची झाली पृथ्वी व दुसऱ्या भाकरीचे झाले आकाश. मग महादेवाने नारन्देव व बरहमदेव यांना पाथेरी देवीच्या राज्यांत पाठवून बरेच दगड आणवले. त्या दगडांपासून त्याने पृथ्वीवरचें पर्वत निर्माण केले. खारकुंडीच्या, मुंग्यांच्या व लखपतीच्या राज्यांतून महादेवाने बी-बियाणे आणले व पृथ्वीवर सर्व वनस्पतींची निर्मिती केली.

ज्या वेळी प्रलय झाला होता, त्या वेळी मांगाची दोन मुले एका वडाच्या झाडावर चढून बसली होती. सृष्टी निर्माण केल्यावर महादेवाने त्यांचे लग्न लावले व त्यांच्याकडून प्रजोत्पत्ती करवली. अशा रीतीने पृथ्वीवर मानवजात निर्माण झाली.

नेफामधील सिंग्फो जमातीत जगदुत्पत्तीविषयीची एक कथा प्रचलित आहे, ती अशी—

प्रारंभी पृथ्वी नव्हती आणि आकाशही नव्हते. सर्वत्र दव आणि धुके पसरलेले होते. त्यातून खुपनिंग काम नावाची एक स्त्री उत्पन्न झाली. काही दिवसांनी तिला निंगॉन चिवुन नामक एक मुलगी आणि तुंग-काम-वैसुम नामक एक मुलगा झाला. ती दोघे बर्फासारखी पांढरी स्वच्छ होती. मोठे झाल्यावर त्यांनी परस्परांत लग्न केले. त्यांना इंगा (पृथ्वी) नावाची एक मुलगी आणि मू (आकाश) नावाचा एक मुलगा झाला. इंगा ही चिखलाची बनलेली होती आणि मू हा मेघ होता. इंगा आणि मू यांनी लग्न केले आणि त्यांना इंबंग (वायू) नावाचा मुलगा झाला. जन्मल्याबरोबर इंबंग सोसाट्याने वाहू लागला आणि तो आकाशात आपला पिता जो मेघ त्याच्यापर्यंत पोचला. आपल्या आईलाही त्याने सुकवून टाकले.

अशा रीतीने स्वर्ग आणि पृथ्वी यांचा जन्म झाला.

मिरी आदिवासींची जगदुत्पत्तिविषयक कथा अशी--

प्रारंभी सर्वत्र पाणीच पाणी होते. पुढे त्या पाण्यावर एक झाड उगवले. कालांतराने एक किडा उत्पन्न होऊन तो ते झाड खाऊ लागला. त्याचा भुगा वर्षानुवर्षे पाण्यात पडत राहिला आणि त्यापासून हळूहळू पृथ्वी बनली. शेवटी ते झाड पडले. त्याच्या खोडाच्या खालच्या बाजूची साल ही पृथ्वीचे व वरच्या बाजूची साल ही आकाशाचे कवच बनली. खोडापासून खडक व फांद्यांपासून डोंगर बनले.

आदिवासींच्या एकंदर सृष्टयुत्पत्तिकथा पाहिल्यास पुढील गोष्टी कळून येतात–

पुराणांनी सृष्टीचे कर्तृत्व ब्रह्मदेवाकडे दिले असून, महादेवाला प्रलयकर्ता मानले आहे. पण पुष्कळसे आदिवासी महादेवाला सृष्टिकर्ता मानून ब्रह्मदेवाला (बरहमदेव) त्याचा दुय्यम समजतात.

दक्षिणेतील आदिवासी आदिशक्तीला सृष्टिकर्ती मानतात आणि ब्रह्मा-विष्णु-महेशांसह सर्व विश्व तिने उत्पन्न केले, असे समजतात.

काही आदिवासींच्या कथांत मानवी जुळ्या भावंडांनी लग्न करून सकल मानवसृष्टी निर्मिली असे सांगितले आहे, मनू आणि शतरूपा यांच्या कथेशी अशा कथांचे साम्य दिसते.

काही कथांत सृष्टीच्या उत्पत्तीला कावळ्यासारखा एखादा पक्षी बव्हंशी कारणीभूत झालेला दिसतो. [बी. आर्. शर्मा-ी. के. गो. को.; एन्सा. रि. ए.; सु. वि. को.; भा. द.; भा. को.; मि. ने. इं.; स्ट. ए. पु. इं.]

जगतराम (१) (इ. स. चे १७ वे शतक) एक जैन भक्तकवी. याच्या पित्याचे नाव कोणी रामचंद्र, तर कोणी नंदलाल असे मानतात. जगतराम हा औरंगजेबाच्या दरबारी उच्च अधिकारी होता. त्याला राजा ही पदवी मिळाली होती. हा धर्मप्रेमी व दानवीर होता. याने अनेक कवींना आश्रय दिला होता.

आगमविलास, सम्यक्त्वकौमुदी, पद्मनंदीपंचविंशतिका व छंदरत्नावली हे चार ग्रंथ व काही पदे याच्या नावावर आहेत. याचे एक पद असे–

प्रभु बिन कौन हमारौ सहाई ।
और सबै स्वारथ के साथी तुम, परमारथ भाई ॥
भूल हमारी ही हमको इह भयो महा दुखदाई ।
विषय कषाय सस्य संग सेयो तुम्हरी सुध बिसराई ॥
उन डसियो विष जोर भयो तब,
मोह लहरि चढ़ि आई ।
भक्ति जड़ी ताके हरिबे कूं,
गुर गारुड़ बताई ।
यातें चरन सरन आये हैं ।
मन परतीति उपाई ।
अब जगराम सहाय की येही
साहिब सेवगताई ॥

अर्थ– प्रभूशिवाय आम्हांला कोण त्राता आहे ! सगळ लोक स्वार्थासाठी मित्र झालेले आहेत. तू मात्र हे प्रभो, खरा बंधू आहेस. आमची ही मोठी चूक झाली. आम्ही विषयकषायाचे सेवन केले आणि तुला विसरलो. विषयांनी जहरी नागाप्रमाणे मला दंश केला आणि त्या मोहरूपी जहराने मला ग्रासले. त्याच्यावर आता एकमेव उपाय म्हणजे भक्तिरूपी गारूडजडी हाच ! म्हणून हे भगवान, आम्ही तुला शरण आलो आहो. तुझी कृपा आमच्यावर होईल, असा मला पूर्ण विश्वास आहे.

याच्या पद्यांचा संग्रह जैनपदावली, पदसंग्रह व लघुमंगल या ग्रंथांत केलेला आहे. [हिं. जै. म. क.]

(२) (इ. स.चे १७ वे शतक) एक बंगाली कवी. राणीगंजजवळील मुलुई या गावी याचा जन्म झाला. पंचकोटचा राजा रघुनाथसिंह भूप याच्या आज्ञेवरून याने बंगाली भाषेत रामायणाचे पद्यमय भाषांतर केले. याची गतिमान व चमकदार शैली एके काळी रसिकमान्य झाली होती. [हि. बें. लँ. लि.]

जगतसुख कुलू खोऱ्यातले एक तीर्थ. हे स्थान धौम्यगंगेच्या तीरावर आहे. इथे धौम्य ऋषीने पांडवांच्या हस्ते लिंगस्थापना केली असे म्हणतात. या शिवलिंगाला बिंबकेश्वर असे नाव आहे. हे मंदिर फार प्राचीन आहे. याच्या जवळच गायत्रीचे मंदिर आहे. श्रावणमासात बिंबकेश्वरावर धौम्यगंगेच्या जलाचा अभिषेक करतात. त्यानिमित्त तिथे यात्राही भरते. [कल्याण–तीर्थांक]

जगती एक वैदिक छंद. 'जगत्या आदित्या:'= जगतीच्या चरणाची बारा अक्षरे असतात, असे पिंगलाने त्याचे लक्षण सांगितले आहे. या छंदाचा उगम प्रजापतीच्या उदरापासून झाला आहे. कोणत्याही बारा वस्तूंच्या समुच्चयाला हा शब्द लावतात.

ऋग्वेदातील जगती छंदाचे उदाहरण पुढीलप्रमाणे–

सूर्यस्येव रश्मयो द्रावयित्नवो
मत्सरासः प्रसुपः साकमीरते ।

तन्तुं ततं परि सर्गास आशवो
नेन्द्रादृते पवते धाम किञ्चन ।।
(ऋ. ९.६९.६)

ऋग्वेदात गायत्री छंदाच्या खालोखाल जगती छंदाला महत्त्वाचे स्थान आहे. [म. ज्ञा. को. २; वैं. सा. सं.]

जगदंबिकामूर्तिदान प्रथम संकल्प करून जगदंबिकेच्या मूर्तीची स्थापना करतात. मग तिची पूजा करून पुढील मंत्राने तिची प्रार्थना करतात--

आदिमाया महाशक्तिर्विश्वमाता जगन्मयी ।
दानेनास्याः प्रसन्नास्तु सर्वदा मम शाम्भवी ।।

अर्थ -- आदिमाया, महाशक्ती, विश्वमाता व जगद्रूप अशी शांभवी (जगदंबिका) या दानाने मजवर सार्वकाल प्रसन्न राहो. मग सुवर्णदक्षिणेसह मूर्तीचे दान करतात. [दा. चं.]

जगदीश (इ. स. चे १८ वे शतक) एक राजस्थानी कवी. जयपूरचे महाराज प्रतापसिंह याचा हा दरबारी कवी होता. याने काव्यविनोद, भक्तिविलास, इ. पंधरा काव्यग्रंथ लिहिले आहेत. त्यात उच्च कोटीचे साहित्यिक गुण आढळतात. याची भाषा साधी व वर्णनशैली सुरेख आहे. [रा. पिं. सा.]

जगदीशलाल (इ. स. च्या १९ व्या शतकाचा उत्तरार्ध) राजस्थानातील एक विद्वान व कवी. हा बूंदीचा राहणारा होता. व्रजभाषेवर याचे उत्तम प्रभुत्व होते. व्रजविनोद, साहित्यसार, प्रस्तारप्रकाश, इ. अठरा काव्यग्रंथ याने लिहिले आहेत. याची रचना विविध छंदांत असून, ती अनुप्रासांनी संपन्न आहे. [रा. पिं. सा.]

जगद्धर भट्ट (इ. स. चे १४ वे शतक) काश्मीरमधील एक भक्त कवी. याच्या पित्याचे नाव रत्नधर असे होते. जगद्धर हा शंकराचा अनन्य उपासक होता. त्याच्या स्तुतिकुसुमांजली नामक ग्रंथात त्रिकदर्शनाचे सुबोध विवेचन आहे. तें एक उत्कृष्ट काव्य असून, त्याचा बराचसा भाग भक्ती व करुण या रसांनी परिपूर्ण आहे. जगद्धराची काव्यरचना अत्यंत सरस व अलंकारयुक्त आहे. त्याच्या काव्याचा एक नमुना असा--

स्वैरेव यद्यपि गतोऽहमधः कुकृत्यैः
तत्रापि नाथ तव नास्म्यवलेपपात्रम् ।
दृप्तः पशुः पतति यः स्वयमन्धकूपे
नोपेक्षते तमपि कारुणिको हि लोकः ।।

अर्थ -- जरी मी स्वतःच्या दुष्कृत्यांमुळेच या हीन अवस्थेला पोचलो आहे, तरी तुझ्यासारख्या करुणासागराने तिरस्कार करण्याइतका मी नीच नाही. जेव्हा एखादा उद्धट पशू आपल्या आपण अन्धकूपात जाऊन पडतो, तेव्हा दयाळू लोक त्याच्याकडे दुर्लक्ष करीत नाहीत (त्याला वर काढतातच).

त्याने आपल्या सर्व काव्यात अत्यंत हृदयद्रावक शब्दांनी शंकराची आराधना केलेली आहे. [सं. सा. इ.]

जगद्धात्री बंगालमध्ये प्रसिद्ध असलेली एक शक्तिदेवता. कात्यायनीतंत्रात हिच्या उत्पत्तीची कथा आली आहे, ती अशी--

एकदा इंद्रादी देवांना आत्मसामर्थ्याचा गर्व झाला. दुर्गा देवीला ते आवडले नाही. तिने त्यांच्या गर्वपरिहारासाठी जगद्धात्रीचे रूप धारण केले. ते रूप पाहून सर्व देव घाबरले. मग ही देवी कोण आहे, त्याची माहिती करून घेण्यासाठी त्यांनी प्रथम वायूला तिच्याकडे पाठवले. वायू भीत भीत तिच्या पुढे गेला. तिने त्याला म्हटले. 'या जगताला पेलून धरण्याचे सामर्थ्य तुझ्या अंगात आहे काय? असल्यास ही समोरची गवताची काडी तू उचलून दाखव.' वायू म्हणाला. 'बरे आहे.' पण प्रयत्न करूनही ती काडी त्याला उचलता येईना. तो निराश होऊन परत आला. त्यानंतर देवांनी अग्नीला तिच्याकडे पाठवले. जगद्धात्रीने त्याला तीच गवताची काडी जाळण्यास सांगितले. परंतु खूप प्रयत्न करूनही अग्नीला ती काडी जाळता आली नाही. त्यामुळे दोन्ही लज्जित होऊन परत आला. अखेर सर्व देव तिला शरण गेले व म्हणाले. 'हे जगन्माते, आम्ही तुला शरण आलो आहो, तेव्हा तू आम्हांला आपले मूळ रूप दाखव.' त्यावर देवी प्रसन्न झाली व तिने त्यांना आपले मूळ स्वरूप दाखवले, ते असे--

मृगेन्द्रोपरि सुस्मेरा सर्वालङ्कारभूषिता ।
चतुर्भुजा महादेवी रक्ताम्बरधरा शुभा ।।
बालार्कसदृशीदेहा नागयज्ञोपवीतिनी ।
त्रिनेत्रा कोटिचन्द्राभा देवर्षिमुनिसेविता ।
दर्शयामास देवानामेवं रूपं जगन्मयी ।।

अर्थ -- ती सिंहवाहिनी, सुहास्यवदना व अलंकारविभूषित अशी होती. ती चतुर्भुज असून तिने तांबडे वस्त्र परिधान केले होते. ती बालसूर्याप्रमाणे तेजस्वी होती. तिने गळ्यात सर्पाचे जानवे धारण केले होते. ती त्रिनेत्र असून कोटिचंद्राप्रमाणे कांतिमती होती. देव, ऋषी व मुनी हे तिची सेवा करीत होते. जगन्मातेने अशा तऱ्हेचे आपले रूप देवांना दाखविले.

हिची त्रिकाल पूजा करतात. या त्रिकाल पूजेतील प्रातःपूजेला सात्त्विक, मध्यान्हपूजेला राजस व सायंपूजेला तामस

पूजा म्हणतात. ही देवीची त्रिगुणपूजा होय.

कार्तिक शुद्ध सप्तमीपासून नवमीपर्यंत हिची पूजा व उत्सव होतो आणि दशमीला हिच्या प्रतिमेचे विसर्जन करतात. या देवीनेच शुंभ–निशुंभांना मारले व त्या दिवसापासून त्रेतायुगाला आरंभ झाला, अशी लोकसमजूत आहे. [श. क.]

जगद्वश्यकर यंत्र अखिल जगताला अंकित करण्याची आकांक्षा असलेले साधक हे यंत्र सिद्ध करून अंगावर बाळगतात. कापूर, कस्तुरी, चंदन व गोरोचन यांचे मिश्रण घेऊन, जुईच्या काडीने भूर्जपत्रावर हे यंत्र काढतात. नंतर तीन दिवस त्याची यथाविधि पूजा करतात. मग ते यंत्र त्रिलोहांच्या (सोने, चांदी व तांबे) लहानशा पेटीत ठेवून ती पेटी दंडाला बांधतात. रोज देवपूजा करण्यापूर्वी प्रथम या यंत्राची पूजा करायची असते. जोपर्यंत हे यंत्र साधकाच्या दंडाला बांधलेले असते, तोपर्यंत सर्व जग त्याला वश असते असे सांगितले आहे. [यं. चि.]



जगद्वश्यकर यंत्र

जगनिक (इ. स चे १२ वे शतक) कालंजरचा चंदेलवंशी राजा परमाल याच्या पदरी असलेला एक भाट कवी. महोबाचे प्रसिद्ध वीरपुरुष आल्हा व ऊदल यांच्या चरित्रावर याने एक वीरकाव्य रचले होते व ते साऱ्या उ. भारतात त्या वेळी अत्यंत लोकप्रिय झाले होते. सांप्रत ते काव्य उपलब्ध नसले, तरी त्याच्या आधारे निर्माण झालेली असंख्य हिंदी गीते गावोगावी ऐकायला मिळतात. या सर्व वीरगीतांचा संग्रह 'आल्हखंड' या नावाने प्रसिद्ध आहे. [हिं. सा. इ]

जगन्नाथ (१) जगाचा नाथ किंवा स्वामी म्हणजेच ईश्वर. बंगाल व ओडिसा या प्रदेशांत जगन्नाथ या नावाने विष्णूची उपासना केली जाते. ओडिसातील पुरी हे जगन्नाथाचे विश्वविख्यात पुण्यक्षेत्र आहे.

गौतम बुद्धाच्या अनेक नावांमध्ये जगन्नाथ असे एक नाव आहे. बौद्ध साहित्यातल्या बोधिचर्यावतार या ग्रंथात (२·४८) पुढील श्लोक आहे—

अद्यैव शरणं यामि जगन्नाथान् महाबलान् ।
जगद्रक्षार्थमुद्युक्तान् सर्वत्रासहरान् जिनान् ॥

अर्थ — महाबलवान, जगताच्या रक्षणार्थ उद्युक्त, सर्व त्रास दूर करणारे व जिन असे जे जगन्नाथ (बुद्ध, धर्म व संघ) त्यांना मी आजच शरण जातो.

ज्ञानसिद्धी या ग्रंथात सर्वबुद्धमय, वज्रसत्त्व जगन्नाथ याचे स्तवन केलेले आहे. प्रज्ञोपायविनिश्चयसिद्धी या ग्रंथात गुरूला जगन्नाथ म्हटले आहे. पुढे पुरी येथील जगन्नाथ हा बुद्धच आहे अशी कल्पना प्रचलित झाली.

जगन्नाथ संप्रदाय — ओडिसातील लोकांच्या धार्मिक जीवनात पुरीच्या जगन्नाथाला श्रेष्ठ स्थान आहे. ते जगन्नाथालाच परमात्मा मानतात. बौद्ध, जैन, शैव वगैरे पंथांचा प्रसार या भागांत भिन्न भिन्न काळी झालेला असला, तरी जगन्नाथाचे माहात्म्य कधीही कमी झाले नाही. त्याची उपासना ओडिसात सनपूर्व काळातच सुरू झाली, असे म्हणतात. काही पंडितांच्या मते ती बौद्ध वा जैन परंपरेतून उगम पावली, तर काहींच्या मते ती वैष्णव धर्मातून आली. वासुदेव कृष्णालाच जगन्नाथ हे नाव मिळाले व बलरामासह त्याची उपासना सुरू झाली, असेही काही पंडिताचे मत आहे. पुढे प्रत्येक देवाबरोबर त्याच्या शक्तिदेवतेची पूजा करण्याची प्रथा सुरू झाली, तेव्हा कृष्ण–बलरामांच्या मध्ये सुभद्रेला स्थान मिळाले. ती जगन्नाथाची भगिनी होती, त्याचप्रमाणे पत्नी (लक्ष्मीचे एक रूप) देखील होती, असे स्कंद पुराणाच्या उत्पलखंडात सांगितले आहे.

जगन्नाथ हे विष्णूचे एक नाव असले, तरी प्राचीन वाङ्मयात जगन्नाथ हा विष्णूचा अवतार होता, असा उल्लेख मुळीच आढळत नाही. वासुदेव कृष्णालाच जगन्नाथ हे नाव प्राप्त झाले, या कल्पनेला काहीही आधार नाही. शिवाय पुरीच्या जगन्नाथाची प्रतिमा अगदी विद्रूप असून, तिचे कृष्णाशी मुळीच साम्य नाही. तसेच कृष्णाची शक्तिदेवता म्हणून सुभद्रेची पूजा कधीही केली जात नव्हती. सम्राट अशोकाच्या काळात ओडिसातील शबर लोकांनी बौद्ध धर्म स्वीकारला, असे कळते. त्यांनी पुरी येथे एक स्तूप निर्माण केला व त्यात त्रिरत्नाचे प्रतीकही ठेवून दिले. पुढे महायान पंथाने बुद्धप्रतिमेची पूजा सुरू केली, तेव्हा शबर लोक त्या त्रिरत्नाची पूजा करू लागले. बौद्ध साहित्यात बुद्धाला जगन्नाथ म्हटले आहे, तसेच त्रिरत्नांनाही जगन्नाथ हेच नाव दिले आहे. कालांतराने तीन रत्नांची प्रतीके म्हणून तीन वेगळे लाकडी तुकडे घेऊन व त्यांवर मानवी मुखाकृती कोरून त्यांची पूजा करण्याची प्रथा पडली. बौद्ध लोक धर्माचे स्त्रीरूप मानतात आणि संघातील भिक्षु-भिक्षुणींचे नाते

बहीण-भावांचे समजतात. त्यावरून शबरांनी त्रिरत्नांच्या तीन मूर्तींना एक बहीण व दोघे भाऊ असे मानले. पुरी येथील स्नानयात्रा व रथयात्रा हे उत्सवही बौद्ध परंपरेतूनच उगम पावले असावेत.

इ. स. च्या ७ व्या किंवा ८ व्या शतकात बुद्ध हा विष्णूचा एक अवतार मानला गेला. त्यामुळे जगन्नाथ हाही विष्णूचा अवतार ठरला. त्याच सुमारास ओडिसात तंत्रमार्गाचा प्रचार सुरू झाला. त्याचा प्रभाव बौद्ध व शैव यांच्याप्रमाणेच वैष्णव पंथावरही पडला. त्यामुळे जगन्नाथाच्या उपासनेत तांत्रिक विधिविधाने बरीच आली. इ. स. च्या १२ व्या शतकात जगन्नाथ हा विष्णूचा बौद्धावतार होय, ही कल्पना दृढ झाली आणि सर्व पंथांचे अनुयायी त्याला भजू लागले. पुढील ३–४ शतकांत ओडिसामध्ये वैष्णव संप्रदायाचा जोर वाढला. त्यामुळे जगन्नाथाच्या उपासनेवरही त्याचा परिणाम झाला. अशा प्रकारे अनेक भिन्न पंथांचे अनुयायी जगन्नाथाची उपासना करू लागले आणि एक वेगळाच धार्मिक संप्रदाय त्यातून उदय पावला. त्या पंथाचे स्वतंत्र तत्त्वज्ञान नाही. जगन्नाथाची पूजा एवढाच त्याचा कार्यभाग. वैष्णवांच्या प्रभावामुळे बौद्धांच्या त्रिमूर्तींना कृष्ण, बलराम व सुभद्रा ही वैष्णव नावे मिळाली.

जगन्नाथाच्या उपासनेतील अनेक विधी द. भारतातील ग्रामीण लोकांच्या आचारात दिसून येतात. शिजवलेला भात प्रसाद म्हणून वाटण्याची प्रथा द्राविड संस्कृतीतूनच इथे आली असली पाहिजे. काही ग्रामदेवतांचे प्रतीक म्हणून लाकडी ठोकळे वापरण्याची प्रथाही द. भारतात आहे. अशा ठोकळ्याच्या एका टोकाला मानवी मस्तकाचा आकार दिलेला असतो. पुरीच्या जगन्नाथाच्या त्रिमूर्तीही तशाच आहेत. पाहा–– जगन्नाथपुरी. [हि. ओ.; वि. मि. ली.; म. सा. अ.; श. क.]

(२) (इ. स. चे १८ वे शतक) एक ग्रंथकार आणि गणितज्ञ. हा जयपूरचा राहणारा. तिथे त्याने एक संस्कृत पाठशाला काढली होती. एक दिवस एक काजी जयपूरला आला व त्याने तिथल्या सर्व पंडितांना वादाचे आव्हान दिले. पण ते कोणीही स्वीकारीना. शेवटी जगन्नाथाने ते स्वीकारले व त्या काजीला वादात पराभूत केले, अशी आख्यायिका आहे. पंडितराज जगन्नाथसंबंधीही अशीच आख्यायिका सांगतात. यामुळे जयपूरचा जगन्नाथ व पंडितराज जगन्नाथ हे एकच होत असा समज रूढ आहे. पण पंडित दुर्गाप्रसाद यांच्या मते जयपूरचा जगन्नाथ व पंडितराज जगन्नाथ हे भिन्न आहेत. जयपूरचा जगन्नाथ हा गणित, भूमिती, इ. शास्त्रात प्रवीण असून, तो मूळचा महाराष्ट्रीय ब्राह्मण होता.

याने सिद्धांतसम्राट व सिद्धांतकौस्तुभ हे दोन ग्रंथ लिहिले आहेत. शिवाय रेखागणित या नावाने युक्लीडच्या भूमितिशास्त्राचे भाषांतरही याने केले आहे. [श्री. विद्याधर गोखले–कौस्तुभ, वासंतिक अंक १९६४]

(३) (इ. स. च्या १९ व्या शतकाचा उत्तरार्ध) हा बूंदी येथे राहत असे. हा व्रजभाषेचा पंडित व रससिद्ध कवी होता. याने रामायणसार, माथुरकुलकल्पद्रुम; शिक्षादर्पण, जमुनापच्चीसी व अलंकारमाला हे पाच ग्रंथ लिहिले आहेत. याची भाषा प्रवाही व मधुर आहे. [रा. पिं. सा.]

जगन्नाथ तर्कपंचानन एक नैयायिक व धर्मशास्त्रज्ञ. हा बंगालमधील गंगाकाठावरच्या त्रिवेणी गावचा रहिवासी होता. याने हिंदू कायद्यावर विवादभंगार्णव या नावाचा ग्रंथ सर विल्यम जोन्स याच्या सूचनेवरून तयार केला. त्या ग्रंथातील करार व वारसा या दोन भागांचे इंग्रजी भाषांतर कोलब्रुक याने इ. स. १७९६ साली करून घेतले. ब्रिटिश अमदानीच्या प्रारंभकालात हिंदू कायद्याला धरून न्यायनिवाडे देण्याच्या कामी न्यायाधिशांना या ग्रंथाचा फार चांगला उपयोग झाला. या ग्रंथातजगन्नाथाने, प्रमुख विषय विवेचिले आहेत, ते असे –

कर्जांची वसुली, ठेवी, अस्वामि–विक्रय, भागीदारी, दान परत घेणे किंवा रद्द करणे, खरेदी–विक्री रद्द करणे, दासाची गुलामगिरीतून मुक्तता, मालक व नोकर यांच्या मधील तंटे, पतिपत्नींची कर्तव्ये, वारसा हक्क व संपत्तीचे वाटप.

बंगालमधील प्रचलित हिंदू कायद्यावर जगन्नाथाचा मोठाच परिणाम झालेला आहे. पश्चिम भारतात मात्र जगन्नाथाचा ग्रंथ कधीही प्रमाण मानला गेला नाही. [हि. घ.]

जगन्नाथदास (१) (१७२७–१८०९ इ. स.) एक कन्नड संतकवी. हा व्यासरायाने स्थापन केलेल्या दासकूट परंपरेतला होता. याचे मूळ नाव श्रीनिवास याचा जन्म रायपूर जिल्ह्यातील ब्यागवट्टी या गावी एका कुलकर्णी ब्राह्मणाच्या कुळात झाला. याच्या पित्याचे नाव नरसाप्पा असे होते. श्रीनिवासाचे प्राथमिक शिक्षण मन्त्रालय मठाचे प्रमुख आचार्य श्री. वरदेंद्रस्वामी यांच्या जवळ झाले.

प्रारंभी श्रीनिवास हरिदासांचा तिरस्कार करीत असे. कारण त्यांचे ज्ञान अपूर्ण आहे, अशी त्याची समजूत होती. पुढे दुर्दैवाने त्याला क्षयरोगाची बाधा झाली. त्यावरील सर्व उपाय व्यर्थ ठरल्यानंतर तो महान संत विजयदास याला शरण गेला. विजयदासाच्या कृपेमुळे तो रोगमुक्त झाला व पुढे त्याचा शिष्य बनला. एकदा गुरूच्या आज्ञेवरून तो पंढरपूरला गेला होता.

तिथे भीमा नदीत स्नान करीत असता त्याच्या हाती एक शिलाखंड आला. त्या शिलाखंडावर 'जगन्नाथ विठ्ठल' हे शब्द कोरलेले होते. तेव्हापासून श्रीनिवास याने जगन्नाथदास हे नाव धारण केले.

जगन्नाथदास संस्कृतभाषेचा गाढा पंडित असून, कन्नड भाषेवरही त्याचे फार प्रेम होते. तो जसा ज्ञानी भक्त होता, तसाच महाकवीही होता. हरिकथामृतसार हा त्याचा कन्नड भाषेतील काव्यग्रंथ महाभारताच्या तोडीचा मानला जातो. व्यासराज, वादिराज, पुरंदरदास, विजयदास या संतांनी जगन्नाथदासाच्या स्वप्नात येऊन त्याला आदेश दिल्यामुळे त्याने हा श्रेष्ठ ग्रंथ रचला, अशी आख्यायिका सांगतात. माध्व संप्रदायातील लोक त्या ग्रंथाचे भक्तीने पारायण करतात. यात सर्व वेदांचे सार आहे आणि मानवी जीवनाच्या सर्व अंगांचे चित्रण आहे, अशी माध्वांची श्रद्धा आहे. माध्व संप्रदायाचे तत्त्वज्ञानही यात थोडक्यात सांगितले आहे.



जगन्नाथदास – कर्नाटक

जगन्नाथदासाने आणखीही काही ग्रंथ लिहिले आहेत. शिवाय असंख्य भक्तिगीतेही रचली आहेत. त्यांवरून त्याची विद्वत्ता, धर्मज्ञान व विष्णुभक्ती यांविषयी चांगली कल्पना येते. त्याच्या व्यक्तिमत्त्वात सनातन दृष्टिकोन व औदार्य, ज्ञान व भक्ती यांचा सुंदर समन्वय झालेला दिसून येतो. सर्व मानव ईश्वरासमोर समान असून सर्वांना ज्ञानप्राप्तीचा व भक्तीचा सारखाच अधिकार आहे, असे त्याचे मत होते. [क. द.; हिं. क. भ. तु. अ.; मि. टी. ह. क.; भारती, फेब्रु. १९५९.]

(२) (इ. स. चे १६ वे शतक) राजस्थानातील एक कवी. हा कायस्थ जातीचा होता. हा संत दादूजीचा प्रिय शिष्य असून, त्याला दादूने आपली छडी, गुदडी, इ. वस्तू दिल्या होत्या. हा प्रतिभासंपन्न कवीही होता. वाणी, गुणगंजनामा, गीतासार व योगवासिष्ठसार हे याचे ग्रंथ प्रसिद्ध आहेत. [रा. भा. औ. सा.; रा. पिं. सा.]

(३) (१४९०–१५५० इ. स.) ओडिसातील एक श्रेष्ठ संत आणि उडिया भाषेतील भागवतकार. याचा जन्म जगन्नाथपुरी येथे एका सात्त्विक ब्राह्मणकुळात झाला. याच्या वडिलांचे नाव भगवानदास व आईचे पद्मावती असे होते. वडील 'पुराणपंडा' (पुराणिक) होते आणि आई अशिक्षित असली, तरी भक्तिप्रवण होती. जगन्नाथदास वडिलांच्या मार्गदर्शनाने संस्कृत पंडित बनला आणि आईकडून मिळालेल्या सुसंस्कारांमुळे त्याच्या अंतःकरणात कृष्णभक्तीचा उदय झाला. तो आजन्म ब्रह्मचारीच राहिला. वडील निवर्तल्यानंतर जगन्नाथदासाने वडिलांची पुराणिकाची वृत्ती स्वीकारली आणि संस्कृत न जाणणाऱ्या आपल्या आईसाठी भागवत पुराणाचे उडिया रूपांतर करण्यास प्रारंभ केला. त्याने त्यासाठी गुहारी हे नवाक्षरी वृत्त स्वीकारले. जगन्नाथदासाचे हे उडिया भागवत सांगता पावल्यावर त्याच्या आईला तर कृष्णकथाश्रवणाची तृप्ती लाभलीच; परंतु या ग्रंथाने ओडिसातील लक्षावधी जनांना कृष्णभक्तीने भारावून टाकले.

आपले हे उडिया भागवत पुरे झाल्यावर जगन्नाथदास संस्कृत भागवत उडिया भाषेतून समजावून सांगण्याऐवजी आपले उडिया भागवतच लोकांना ऐकवू लागला. एकदा चैतन्य महाप्रभू पुरी येथे आलेले असताना त्यांना जगन्नाथमंदिराच्या परिसरांतील कल्पवटाच्या छायेत जगन्नाथदासाचे पुराण चालू असलेले दिसले. महाप्रभू झाडाआड उभे राहून ते ऐकू लागले. जगन्नाथदासाचे ते उडिया भागवत ऐकताना समोरच्या हजारो श्रोत्यांप्रमाणेच महाप्रभूही मंत्रमुग्ध झाले. श्रीकृष्णलीलासंकीर्तनासारखा विषय आणि जगन्नाथदासाची कोमल, नादमधुर व प्रासादिक वाणी ऐकून पुराण संपताच महाप्रभू जगन्नाथदासाजवळ गेले आणि त्याला कडकडून मिठी मारून उद्गारले. 'तुमि अतिबड !' (=तू अत्यंत श्रेष्ठ आहेस !) महाप्रभू चैतन्यासारख्या संतश्रेष्ठाच्या मुखातून प्रकटलेले हे बिरुद जगन्नाथदासाच्या नावाशी कायमचे निगडित झाले आणि तेव्हापासून लोक त्याला 'अतिबड जगन्नाथ' म्हणून ओळखू लागले. जगन्नाथदासाच्या अनुयायांनाही अतिबडी वैष्णव अशी संज्ञा प्राप्त झाली.

जगन्नाथदासाच्या या ग्रंथातील भावसौंदर्याचा महाप्रभूने गौरव केल्यामुळे सर्व उडिया जनांनी या ग्रंथाला शिरोधार्य मानले. आजही ओडिसात असे गाव आढळणार नाही, की जिथे जगन्नाथदासाच्या भागवताचे प्रेमाने वाचन होत नाही. जगन्नाथदासाच्या या ग्रंथाने ओडिसात एवढा प्रभाव गाजवला की, केवळ या ग्रंथाच्या वाचनाच्या ओढीने अशिक्षित लोक लिहायला–वाचायला शिकण्यास प्रवृत्त झाले. या ग्रंथाच्या लोकप्रियतेतून ओडिसातील प्रत्येक खेड्यात 'भागवत तुंगी'

(जगन्नाथदासाचे भागवत वाचण्या-ऐकण्याचे स्थान) या नावाची संस्था निर्माण झाली. ही भागवत घरे म्हणजे ओडिसाच्या सांस्कृतिक घडणीची केंद्रेच होत. शाळा, सभागृह आणि ग्रंथालय अशा अनेकविध रूपांनी युक्त असलेल्या या भागवत घरांना भक्तिप्रेरित नीतीचे अधिष्ठान लाभल्यामुळे जनमानसाला योग्य वळण लावण्यात या संस्थेला मोठे कार्य करता आले. जगन्नाथदासाच्या काळापूर्वी ओडिसात सांस्कृतिक अराजकच होते. जगन्नाथदासाने उडिया भागवताच्या रूपाने ओडिसातील समाजजीवन सांस्कृतिक दृष्टीने संघटित व एकात्म बनविले.

जगन्नाथदासाचे उडिया भागवत हे संस्कृत भागवत पुराणाचे केवळ भाषांतर नाही. भागवतातील कथांच्या जोडीला त्याने विष्णू, पद्म व ब्रह्मवैवर्त, या वैष्णव पुराणांतील कथांचाही स्वीकार केला आहे. उडिया भाषेत भागवताची गद्यात वा पद्यात केलेली अनेक उत्तम रूपांतरे आहेत; परंतु जगन्नाथदासाच्या भागवतात जो भक्तीचा उल्हास आणि परातत्त्वस्पर्श आहे, तो त्यांत नसल्यामुळे त्यांना जगन्नाथदासाच्या भागवताची उंची लाभू शकली नाही.

जगन्नाथदासाने दारुब्रह्मगीता, गुप्तभागवत, मनशिक्षा, अर्थकोइली आणि तुलभिणा, इ. आणखीही काही ग्रंथ रचले आहेत. परंतु त्यांत भक्तीच्या माधुर्याचा अभाव असल्यामुळे ते लोकप्रिय झाले नाहीत. त्याच्या वेळी ओडिसात भ्रष्ट स्वरूपात अवशिष्ट असलेल्या बौद्ध धर्मातील गूढ परिभाषेचा प्रभाव या दोन्ही ग्रंथांवर आहे.

जगन्नाथदासाला ओडिसातील पंचसखा वैष्णव संप्रदायाच्या पाच प्रवर्तकांपैकी दुसरा मानतात. जगन्नाथपुरीत त्याचा मठ आहे. तिथेच समुद्रकिनाऱ्यावर त्याने स्वतःच्या ध्यानधारणेसाठी उभारलेले मंदिर नुकतेच उत्खननात सापडले आहे. वर्तमान ओडिसातील जनताही जगन्नाथदासाला ओडिसाचा राष्ट्रीय कवी मानीत असल्यामुळे या उत्खनित स्थानाला फार महत्त्व लाभले आहे. [हि. को. लि.; कवि-श्रीमाला]

जगन्नाथ पंडितराज (१५९०-१६६५ इ. स.) एक महापंडित व रससिद्ध कवी. हा कौंडिण्यगोत्री देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण होता. तेलंगणातील मुंगुज येथे याचा जन्म झाला. पेरुभट्ट किंवा पेरमभट्ट असे याच्या पित्याचे नाव असून, आईचे नाव महालक्ष्मी असे होते. जगन्नाथाचे वडील काशीत वास्तव्याला येऊन राहिले होते. त्यामुळे जगन्नाथाचे बालपण काशीतच गेले, असे मानावे लागते. पेरुभट्ट हा प्रकांडपंडित होता. जगन्नाथाने त्याच्यापाशीच अनेक शास्त्रांचे अध्ययन केले. जगन्नाथ त्याला महागुरू म्हणतो. याशिवाय ज्ञानेंद्रभिक्षू, महेंद्र, खंडदेव आणि शेषवीरेश्वर असे आणखीही त्याचे विद्यागुरू होते. व्याकरणशास्त्राचे अध्ययन त्याने शेषवीरेश्वराकडे केले, असे म्हणतात.

वयात आल्यावर प्रथम हा कर्नाटकातल्या कोण्या राजाकडे आश्रयार्थ गेला; पण तिथे त्याला आश्रय मिळाला नाही.

त्यानंतर इ. स. १६२५ च्या सुमारास त्याचे मोगल दरबारात पदार्पण झाले. मुकुंद माथुर हा त्या गोष्टीला कारणीभूत झाला, असे सांगतात. तो कायस्थ असून आसफखानाचा दिवाण होता. आसफखान हा शहाजहानाचा सासरा होय. मुकुंद माथुराची आणि जगन्नाथाची कुठे तरी भेट झाली असावी आणि जगन्नाथाचे कवित्व आणि पांडित्य या गुणांवर लुब्ध होऊन त्याने जगन्नाथाला शहाजहानाच्या दरबारात प्रवेश मिळवून दिला असावा.

अशीही माहिती मिळते, की जहांगिराच्या काळातच जगन्नाथपंडित त्याच्या आश्रयाला होता. जहांगिराच्या मृत्यूनंतर तो उदेपूरच्या जगत्‌सिंहाच्या आश्रयाला गेला. पुढे शहाजहान बादशहाच्या निमंत्रणावरून दारा शिकोह याला संस्कृत शिकविण्यासाठी तो दिल्लीला परत गेला. त्याचे अगाध पांडित्य व अलौकिक काव्यसामर्थ्य पाहून शहाजहान प्रसन्न झाला व त्याने जगन्नाथाला पंडितराज ही पदवी दिली. दरबारातील एका घमेंडखोर काजीशी पंडितराजाचा धर्मविषयक वादविवाद होऊन त्यात त्याने काजीचा पुरता पराभव केला. त्या वेळी त्याचे फारसी व उर्दू या भाषांवरील प्रभुत्व पाहूनही बादशहा अत्यंत खूष झाला.

शहाजहानाच्या मृत्यूनंतर पंडितराज कामरूपाचा राजा प्राणनारायण याच्या आश्रयाला गेला; पण बंगालचा सुभेदार मीर जुम्ला याचे आणि प्राणनारायणाचे वाकडे आले आणि त्याच्या हातातून निसटण्यासाठी प्राणनारायणाला भूतानमध्ये पळून जावे लागले. त्यामुळे पंडितराजाचे कामरूप येथील वास्तव्यही अल्पकालिकच ठरले. त्यानंतर तो मथुरेला काही काळ राहिला असावा. कारण आपल्या जीवनाचे थोडक्यात सिंहावलोकन करताना तो म्हणतो ––

शास्त्राण्याकलितानि नित्यविधयः सर्वेऽपि सम्भाविता
दिल्लीवल्लभपाणिपल्लवतले नीतं नवीनं वयः ॥
सम्प्रत्युज्झितवासनं मधुपुरीमध्ये हरिः सेव्यते
सर्वं पण्डितराजराजितिलकेनाकारि लोकाधिकन् ॥
(शांतविलास)

अर्थ––– मी सर्व शास्त्रांचे आकलन केले, सर्व नित्यविधी पार पाडले. मी माझे तरुणवय दिल्लीश्वराच्या करपल्लवाच्या

आश्रयाखाली घालवले. सांप्रत साऱ्या वासना टाकून मी मथुरेत श्रीहरीची सेवा करीत आहे. पंडितराजांच्या पंक्तीत तिलकासारख्या शोभणाऱ्या मी, सर्व काही असामान्य आणि सर्व लोकांपेक्षा अधिक असे केले.

वयाच्या उत्तरार्धात त्याला कृष्णभक्ती जडली होती. याचा सूचक असा एक श्लोक भामिनीविलासात आढळतो—

रे चेतः कथयामि ते हितमिदं वृन्दावने चारयन्
वृन्दं कोऽपि गवां नवाम्बुदनिभो बन्धुर्न कार्यस्त्वया ।
सौन्दर्यामृतमुद्गिरद्भिरभितः संमोह्य मन्दस्मितै—
रेष त्वां तव वल्लभांश्च विषयानाशु क्षयं नेष्यति ॥

(शांतविलास)

अर्थ – हे चित्ता, मी तुला हिताची गोष्ट सांगतो. कोणी एक मेघश्याम (असा किशोर) वृंदावनात गायींची खिल्लारे चारीत आहे. त्याला तू कधीही आपला आप्त मानू नको (जवळ करू नको). कारण सर्व बाजूंना सौंदर्यरूपी अमृत फेकणाऱ्या अशा मंदस्मितांनी मोह घालून तो तुझा आणि तुझ्या आवडत्या विषयांचा तावडतोड क्षय करून टाकील (तुला तद्रूप करील).

पण पुढे तो मथुरेतून निघून काशीत गेला आणि तिथेच त्याने आपले उर्वरित आयुष्य समाप्त केले.

दिल्लीला शहाजहानाच्या दरबारी आश्रयाला असताना पंडितराजाच्या आयुष्यात जो एक प्रणयप्रसंग निर्माण झाला, त्याचाही इथे उल्लेख केला पाहिजे. शहाजहानाच्या अंतःपुरात राहणाऱ्या लवंगी नामक एका अप्रतिम लावण्यवती यवन तरुणीवर त्याचे मन जडले. तिचेही त्याच्यावर जडले. ही यवनकन्या शहाजहानाची मानलेली मुलगी होती, असे कोणी म्हणतात; तर ती तिथल्या दासींपैकी एक दासी होती, असेही कोणी म्हणतात. ते काहीही असो; पण तिने पंडितराजाच्या जीवाला वेध लावला, हे निश्चित. या लवंगीविषयी पंडितराजाने काही श्लोक लिहिले आहेत, त्यांपैकी दोन असे —

न याचे गजालिं न वा वाजिराजिं
न वित्तेषु चित्तं मदीयं कदापि ।
इयं सुस्तनी हस्तविन्यस्तकुम्भा
लवङ्गी कुरङ्गीदृगङ्गीकरोतु ॥
इयं सुस्तनी मस्तकन्यस्तकुम्भा
कुसुम्भारुणं चारु वासो दधाना ।
समस्तस्य लोकस्य चेतःप्रवृत्तिं
गृहीत्वा घटे न्यस्य यातीव भाति ॥

अर्थ – मी गजपंक्ती किंवा अश्वपंक्ती मागत नाही. धनावरही माझे चित्त जडलेले नाही; तर हातात घडा घेऊन जाणारी पुष्ट स्तनांची आणि हरिणाक्षी अशी ही लवंगी, तेवढा माझा अंगीकार करो (म्हणजे मला सर्व काही मिळाले).

ही सुस्तनी लवंगी सुंदर कुसुंबी वस्त्र नेसून आणि मस्तकावर घडा घेऊन चालली आहे. असे वाटते, की समस्त लोकांची चित्तप्रवृत्ती (त्या) घड्यात भरून जणू ती निघाली आहे.

अशी ही लवंगी आपल्याला मिळवून देण्याबद्दल पंडितराजाने बादशहाला प्रार्थना केली आणि बादशहाच्या अनुमतीने पुढे त्या दोघांचा विवाहही झाला. पंडितराजाने लवंगीसह बराच काळ तिथे सुखात घालवला.

पण जगन्नाथपंडित व लवंगी यांची ही प्रणयकथा खरी की खोटी, याबद्दल विद्वानांत विवाद आहे. बरेचसे पंडित या घटनेला ऐतिहासिक पुरावा नसल्याचे सांगतात. याविषयी श्री. सेतुमाधवराव पगडी यांनी लिहिले आहे, ते असे—

पंडितराज जगन्नाथावर हा यवनीसंसर्गाचा दोष लादून मोठा अन्याय करण्यात आला आहे. समकालीन कोणत्याही ग्रंथात तसा उल्लेख आढळत नाही. यवनीशी संबंध आला असेल, तर तो पंडितराज जगन्नाथाचा नव्हे. सदर घटना ही जगन्नाथ कलावंत नावाचा एक संगीतकार त्याच काळात होऊन गेला त्याच्या बाबतीतली असावी. त्यालाही शहाजहान बादशहाचा आश्रय होता.

श्री. गोडे यांनी या संदर्भात पुढील माहिती दिली आहे—

जगन्नाथ आणि यवनी यांचा पहिला उल्लेख आपल्याला आढळतो, तो जगन्नाथपंडिताच्या गंगालहरीवर टीका लिहिणारा सदाशिव याच्या ग्रंथात. सदाशिवाने हा ग्रंथ इ. स. १७८८ त लिहिला असावा. 'अथ एवं श्रूयते ।' असे म्हणून तो पुढील वृत्तांत सांगतो–

जगन्नाथपंडित दिल्लीपतीच्या आश्रयाला असताना त्याला यवनीसंसर्गाचा दोष घडला. गंगास्पर्शाने आत्मशुद्धी करून तो नष्ट करण्यासाठी त्याने गंगालहरी हे काव्य रचले. गंगेच्या प्रवाहापासून त्याचे घर बाव्वन पायऱ्या उंच होते.

त्या पुढची आख्यायिका अशी–जगन्नाथ गंगास्तुतीचे श्लोक रचीत असताना गंगेने एकेका श्लोकाला एकेक पायरी वर चढून शेवटी जगन्नाथाला लवंगीसह आपल्या प्रवाहात सामावून घेतले. पण या आख्यायिकेत तथ्य दिसत नाही. जगन्नाथपंडिताची गंगालहरी ही त्याच्या साहित्यिक कारकीर्दीच्या प्रारंभकाळातली काव्यकृती आहे.

इ. स. १६२० ते १६६० एवढा कालखंड म्हणजे पंडितराजाची साहित्यिक कारकीर्द होय, असे डॉ. काणे म्हणतात व ते बहुतेक पंडितांना मान्य झाले आहे. पंडितराजाचे पुढील ग्रंथ उपलब्ध आहेत, त्यांचा क्रम असा—

गंगालहरी किंवा पीयूषलहरी (गंगेची स्तुती), अमृतलहरी (यमुनेची स्तुती), करुणालहरी (विष्णुस्तुती), लक्ष्मीलहरी, सुधालहरी (सूर्यस्तुती) व जगदाभरण ही त्याची काव्ये त्याचा मोगल दरबारात प्रवेश होण्यापूर्वीची आहेत. जगदाभरण हे काव्य त्याने उदयपूरच्या जगत्सिंहावर लिहिलेले आहे.

आसफविलास, रसगंगाधर व चित्रमीमांसाखंडन हे त्याचे ग्रंथ शहाजहानाच्या दरबारात असताना निर्माण झाले. आसफविलास हे काव्य आसफखानाच्या प्रशंसापर आहे. रसगंगाधर हा त्याचा साहित्यशास्त्रावरील विवेचक ग्रंथ होय. हा ग्रंथ अपुरा असला, तरी त्यात त्याच्या अलौकिक पांडित्याचा ठायी ठायी प्रत्यय येतो. त्यात रसनिरूपण करताना त्याने नवी समीक्षापद्धती स्वीकारली आहे. काव्यप्रकाशकार मम्मटाच्या अनेक सिद्धांतांचे त्याने त्यात खंडन केले आहे. उदाहरणांसाठी त्याने जे श्लोक घेतले आहेत तेही त्याचे स्वतःचेच आहेत. ग्रंथाची शैली प्रौढ असून, विचार मूलग्राही आहेत.

प्राणाभरण हे त्याचें काव्य कामरूपाचा अधिपती प्राणनारायण याच्यावर लिहिलेले आहे.

काशी येथील आपल्या वास्तव्यात त्याने भट्टोजी दीक्षिताच्या प्रौढमनोरमा या ग्रंथावर मनोरमाकुचमर्दन या नावाचा एक खंडनपर ग्रंथ लिहिला. त्याचप्रमाणे शब्दकौस्तुभशाणोत्तेजन नावाचा व्याकरणशास्त्रावरचा एक ग्रंथही रचला. भामिनीविलास ही याच कालातली त्याची स्फुट काव्यरचना होय. प्रास्ताविक, शृंगार, करुण व शांत असे या काव्याचे चार विलास आहेत. हे त्याचे काव्य अत्यंत मनोहर आणि रसिकहृदयास्वाद्य असे उतरले आहे. माधुर्य व पदलालित्य हे काव्यगुण तिथे ठायी ठायी आढळतात.

पंडितराज हा जेवढा प्रकांडविद्वान तितकाच गर्विष्ठही होता. स्वतःच्या काव्याबद्दल त्याला विलक्षण दर्प होता. कालिदासभवभूतींची कुचाळी करायलाही त्याने कमी केले नाही. आपल्या कवितेची स्वतःच प्रशंसा करताना तो एका ठिकाणी लिहितो–

गिरां देवी वीणागुणरणनहीनादरकरा
यदीयानां वाचाममृतमयमाचामति रसम् ।
वचस्तस्याकर्ण्य श्रवणसुभगं पण्डितपते–
रधुन्वन् मूर्धानं नृपशुरथवायं पशुपतिः ॥

(शांतविलास)

अर्थ–साक्षात सरस्वती वीणावादनाकडे दुर्लक्ष करून ज्याच्या वाणीतला अमृतमय रस चाखीत राहते, त्या पंडितराज जगन्नाथाचे श्रवणसुभग काव्य ऐकून जो कोणी मनुष्य संतोषाने मान डोलवणार नाही, तो एक तर नरपशू असेल अथवा पशुपती तरी असेल.

अप्पय्य दीक्षित हा पंडितराजाचा समकालीन काशीस्थ महापंडित होय. पंडितराजाने त्याचा अनेकदा उपहास केल्यामुळे त्याने पंडितराजाशी वैर धरले. काशीतल्या पंडितांत तो अग्रगण्य असल्यामुळे पंडितराजाला त्याने खड्यासारखे बाजूला फेकले. अप्पय्य दीक्षिताच्या या वैराचा पंडितराजाला खूप त्रास झाला असावा. गंगेने पंडितराजाला आपल्या पोटात घेतले, ही आख्यायिका जर खरी असेल, तर पंडितराजाने शेवटी गंगेत आत्मार्पण केले, असेच म्हटले पाहिजे. [म. ज्ञा. को.; पं. का. सं.; सं. सा. इ.; नवभारत, डिसें. १९६१]

जगन्नाथपुरी

ओडिसामध्ये भुवनेश्वरापासून वीस मैलांवर समुद्रतीरी वसलेले एक नगर. हे एक प्राचीन तीर्थक्षेत्र असून, याला श्रीक्षेत्र, पुरुषोत्तमक्षेत्र अशी अन्यही नावे आहेत. ओडिसात विष्णूच्या चार आयुधांची क्षेत्रे आहेत, त्यांपैकी हे शंखक्षेत्र होय. याचा आकारही शंखासारखाच आहे.

भारतातील प्रख्यात चार धामांपैकी हे एक धाम असून, इथले जगन्नाथाचे मंदिर अखिल भारतात अत्यंत पवित्र मानले जाते. या मंदिरात जगन्नाथ (कृष्ण), बलराम व सुभद्रा यांच्या ओबडधोबड लाकडी मूर्ती आहेत. त्या तीन्ही मूर्तींना हातपाय नाहीत, फक्त डोळे, नाक, तोंड हे अवयव आहेत.



कृष्ण, सुभद्रा व बलराम यांच्या मूर्ती – जगन्नाथपुरी

पद अंगुलि नाइ हात । दारुब्रह्म जगन्नाथ ।

असे त्याच्याबद्दल मागुणिदास या कवीने म्हटले आहे. या दारुब्रह्माचेच (ओंडक्याच्या स्वरूपात असलेल्या देवाचेच) इथे दर्शन घ्यायचे आणि त्याचीच पूजा-प्रार्थना करायची.

हा जगन्नाथ इथे कुठून, कसा आला व अशा प्रकारे विरूप आणि अंगहीन कसा झाला, याविषयीची कथा क्षेत्रमाहात्म्यात दिली आहे, ती अशी—

प्राचीन काळी पुरीमध्ये इंद्रद्युम्न नावाचा राजा राज्य करीत होता. त्याच्या नगरीत मोठमोठ्या इमारती होत्या; पण एखादे देवमंदिर मात्र नव्हते. राजाने नगरातली ती उणीव दूर करायचे ठरवले. थोड्याच काळात त्याने तिथे एक भव्य व कलापूर्ण मंदिर उभे केले. ते मंदिर पुरे होते न होते, तो एक प्रवासी तिथे आला व राजाला म्हणाला—

‘राजा, मंदिर तर छान बांधलेस! अशा या कलापूर्ण मंदिरात बसायला योग्य असा एकच देव आहे आणि तो म्हणजे नीलमाधव!’

राजाने विचारले, की ‘हा देव कुठे आहे?’ प्रवासी म्हणाला—

‘तो नीलाचल पर्वतावर विश्वावसू नावाच्या एका शबरापाशी आहे. इंद्रनील मण्याची ती मूर्ती शबराने एका खोऱ्यात गुप्तपणे ठेवली असून, तो नित्य तिथे जाऊन तिची पूजा करतो. राजा, तीच मूर्ती तू तुझ्या या मंदिरात स्थापण्यासाठी घेऊन ये.’

मग राजाने विद्यापती नावाच्या एका दूताला नीलमाधवाच्या तलासासाठी पाठवले. मोठ्या कष्टाने त्याने त्या मूर्तीचा शोध लावला. मग तो परत राजाकडे आला. राजाने त्याच्या हाताखाली एक सैन्यतुकडी देऊन त्याला ती मूर्ती आणायला पाठवले; पण विद्यापती पुनश्च तिथे जातो, तर ती मूर्ती तिथून अदृश्य झाली होती. त्यामुळे त्याला तिथून रिक्तहस्ताने परतावे लागले. राजाला या गोष्टीचे दुःख झाले. त्याच रात्री स्वप्नात येऊन नीलमाधवाने राजाला म्हटले—

“हे राजा, तुला अहंकार झाला होता. तो शबर माझा भक्त होता. त्याच्याकडून तू मला छिनावून आणणार होतास. पण तुझा हा गर्व मला आवडला नाही. तुला जर माझी खरीखुरी आवड असेल, तर तू शंभर अश्वमेध कर. म्हणजे मी तुझ्या राज्यात एका चंदनी ओंडक्याच्या रूपाने प्रगट होईन. त्यावर पद्म आणि चक्र ही चिन्हे दिसली, की तीच माझी मूर्ती असे तू समज.”

त्या आदेशाप्रमाणे इंद्रद्युम्न राजाने एकेक करून शंभर अश्वमेध पुरे केले. त्यानंतर थोड्याच दिवसांत एक चंदनी ओंडका पुरीजवळच्या समुद्रकिनाऱ्याला लागला. राजाने त्यावरच्या पद्म-चक्र या खुणा पाहिल्या. त्याने तो ओंडका राजवाड्यात आणला. राजाला त्यातून एक सुंदर विष्णुमूर्ती घडवायची होती. पण कोणत्याही कलाकाराची रंधा-पटाशी त्याच्यावर चालेचना. राजा त्यामुळे चिंतेत पडला. एवढ्यात अनंत नावाचा एक म्हातारा मूर्तिकार तिथे आला. तो साक्षात विश्वकर्मा होता. तो राजाला म्हणाला—

‘हे राजा, मला देवळाच्या गाभाऱ्यात एकवीस दिवसपर्यंत एकटा कोंडून ठेव. देवळाचे सर्व दरवाजे बंद कर. ही अट पाळलीस, तर मी या ओंडक्याची मूर्ती घडवीन. एकवीस दिवस पुरे झाल्यावर तू गाभाऱ्याचा दरवाजा उघड.’

राजाने ती अट मानली आणि त्या कारागिराला ओंडक्यासह गाभाऱ्यात कोंडून ठेवले. पण राणीच्या मनात विकल्प उत्पन्न झाला. ती राजाला म्हणाली.

“हा कलाकार कदाचित चोरही असू शकेल. एवढ्या मोठ्या देवळात तो एकटा राहणार; कदाचित देवळाच्या नक्षीत जडवलेली सोन्या-रुप्याची फुले काढून घेऊन तो पसारही होईल. तुम्ही एकदा तो काय करतो ते पाहाच!”

राजाने दोन आठवडे राणीच्या बोलण्याला दाद दिली नाही. पण तिच्या वारंवार टोचणीमुळे त्याच्याही मनात शंका उत्पन्न झाली आणि एक दिवस राजाने अचानक जाऊन गाभाऱ्याचे दार उघडले.

पाहतो, तर हात-पाय नसलेला जगन्नाथाचा मुखवटा तिथे होता. त्याचे डोळे वटारलेले होते आणि मूर्तिकार मात्र अदृश्य झाला होता. मूर्तीचे ते डोळे पाहून राजा घाबरला. त्याने देवाची प्रार्थना केली. “प्रभो, माझ्या चुकीबद्दल मला क्षमा कर.’ त्यावर त्या मूर्तीच्या मुखातून शब्द उमटले, ते असे—

“हे राजा, प्रथम अहंकार धरलास म्हणून माझी इंद्रनीळ मण्याची मूर्ती तुला लाभली नाही. आता राणीच्या शंकेखोरपणाला बळी पडलास म्हणून मी असा अपूर्ण, अर्धवट अवस्थेत राहिलो. पण झाले ते झाले. तू आता याच स्वरूपात माझी मंदिरात प्रतिष्ठा कर. अशाही स्थितीत मी तुझ्या भक्तिभावाला समाधान देईन.”

याच कथेचा दुसरा एक पर्याय आहे आणि त्यात समुद्राच्या तीरावरचा वटवृक्ष तोडून विश्वकर्म्याने त्याच्या तीन मूर्ती घडवल्या, असा उल्लेख आहे.

वैष्णव लोक जगन्नाथपुरीला वैष्णव क्षेत्र मानतात व तिथल्या तीन मूर्तींना कृष्ण, बलराम आणि सुभद्रा असे समजतात. कृष्णासंगे कित्येक ठिकाणी बलराम असतो आणि स्त्री असायची ती राधा किंवा रुक्मिणी असते. पण कृष्ण, बलराम व

सुभद्रा हे त्रिकूट मात्र अपवादात्मकच होय. असे अन्यत्र कुठ आढळत नाही.

जगन्नाथाविषयी एक वेगळी आख्यायिका आहे, ती अशी– भारतीय युद्धानंतर जेव्हा श्रीकृष्णाने देहत्याग केला, तेव्हा त्याचा नाभिप्रदेश चितेत जळेना. मग तो भाग समुद्रात सोडण्यात आला. तो वाहत वाहत नीलाचलाजवळ किनाऱ्याला लागला. तिथे इंद्रद्युम्न राजा तप करीत होता. त्याला स्वप्नदृष्टांत झाला व देवाने आदेश दिला, की ‘ माझ्या देहाचा हा अवशेष तू लाकडी मूर्तीत बसवून त्या मूर्तीची स्थापना कर व तिची उपासना कर. ’ राजाने त्याप्रमाणे मूर्ती घडवून तिची स्थापना केली, तीच जगन्नाथाची मूर्ती होय.

या कथांवरून असे वाटते, की पुरीचा जगन्नाथ हा वैदिक परंपरेतला देव नसावा. तो मूळचा शबरांचा देव असून, नंतर बौद्धांच्या प्रभावाखाली गेला असावा. कृष्णाच्या देहाच्या अवशेषाची पूजा वैदिक परंपरेत बसणारी नाही. तशी प्रथा बौद्ध धर्मात आहे. इ. स. च्या ५ व्या शतकात पुरी हे एक बौद्ध क्षेत्र होते. तिथे बुद्धाच्या दाताची पूजा केली जात असे व दर वर्षी त्याची रथातून मिरवणूक निघत असे. सांप्रत चालू असलेली रथयात्रा त्या दंतयात्रेचीच वैष्णव आवृत्ती असावी.

ओडिसातील एक कवी श्रीसरलदास याने आपल्या महाभारतावरील ग्रंथात एक कथा दिली आहे; ती अशी—जेव्हा राजा इंद्रद्युम्नाने मंदिराचे दार उघडून आत पाहिले, तेव्हा त्याला तिथे हस्तपादविहीन अशा तीन मूर्ती आढळल्या. त्यांच्या भोवती भगवान बुद्धाचे तेजोवलय झळाळत होते. त्यांना नाक, कान, डोळे नव्हते. बोटेही नव्हती. भगवान बुद्धच तीन रेखांच्या रूपाने तिथे प्रगट झाला होता.

पुरी येथील जगन्नाथाचे भव्य मंदिर इ. स. च्या १२ व्या शतकाच्या प्रारंभी गंग वंशातील राजा चोडगंगदेव किंवा त्याच शतकाच्या अखेरीस राजा अनंग भीमदेव याने बांधलेले आहे. ते नीलगिरी नावाच्या टेकडीवर उभारलेले असून, त्याच्या भोवती दुहेरी कोट आहे. कोटाची उंची २० फूट, लांबी ६६५ फूट व रुंदी ६४० फूट आहे. ही सर्व भिंत दगडी असून, प्रत्येक बाजूला मध्यभागी एक द्वार आहे. पूर्वेकडील द्वारावर सिंहाच्या दोन भव्य आकृती असल्यामुळे त्याला सिंहद्वार म्हणतात. तेच महाद्वार होय. त्याच्यासमोर काळ्या पाषाणाचा एक स्तंभ उभा आहे. तो कोणार्कहून आणलेला आहे.

मुख्य मंदिरात गर्भगृहाला जोडूनच सभामंडप (जगमोहन), नृत्यमंडप व भोगमंडप असे तीन मंडप आहेत. गर्भगृहावर सुमारे २०० फूट उंचीचे विमान असून, त्यावर गरुडध्वज व कळसावर सुदर्शनचक्र आहे. विमानावर सुरेख कोरीव नक्षीकाम आहे. आणि देवालयात सर्वत्र विविध प्रकारची सुंदर चित्रे कोरलेली आहेत. त्यांत काही कामशिल्पेही आहेत.



जगन्नाथाचे मंदिर – पुरी

या देवालयाच्या आवारात जगन्नाथ मंदिराव्यतिरिक्त इतर देवतांचीही लहानमोठी बरीच मंदिरे आहेत. त्यांत तेरा शिवमंदिरे व एक सूर्यमंदिर आहे. इथे चंदन तलाव नावाचे एक सरोवर आहे. त्यात स्नान करून लाल वस्त्र नेसायचे, सूर्याला अर्घ्य द्यायचे आणि मग जगन्नाथाच्या दर्शनाला जायचे, असा इथला प्रघात आहे. मंदिरात एका रत्नवेदीवर जगन्नाथ उभा आहे. त्याचा रंग सावळा आहे. त्याच्या माथां मुकुट, कानां कुंडले व ललाटी हिरा चमकतो आहे. त्याच्याजवळच दोन फूट व्यासाचे तांबडे सुदर्शन चक्र आहे.

जगन्नाथाच्या मंदिरात पंचामृताभिषेक, अग्निपूजा, महापूजा, महानैवेद्य, वस्त्रालंकारादी राजभोग, इ. कार्यक्रम अहोरात्र चालू असतात. इथे देवाचा प्रसाद म्हणून शिजलेला भात वाटतात व सर्व जातींचे, पंथांचे लोक सोवळे-ओवळे न मानता त्या प्रसादाचे सेवन करतात. ओडिसांतील अनेक वन्य जमातींचे लोक जगन्नाथाचे उपासक आहेत. पूर्वी या मंदिरात सर्व धर्मांच्या व पंथांच्या लोकांना प्रवेश मिळत असे. पण इ. स. १८७५ पासून पुरीच्या राजाने अहिंदूंना देवालयात जाण्यास बंदी केली.

पुरी येथील उत्सवात रथयात्रा हा सर्वांत मोठा उत्सव असतो. तो आषाढ शु. द्वितीयेला सुरू होऊन आठ दिवस चालतो. त्या वेळी सर्व भारतातून लाखो यात्रेकरू तिथे जमतात आणि जगन्नाथाचा रथ आपल्या हातांनी ओढण्यासाठी धडपड करतात. या रथाच्या चाकाखाली चिरडून मेलेल्यांना मोक्ष मिळतो, अशा अंधश्रद्धेमुळे जुन्या काळी कित्येक भाविक यात्रेकरू रथापुढे पडून प्राणत्याग करीत असत.

कृष्ण, बलराम व सुभद्रा या तीन्ही मूर्तींसाठी तीन भव्य रथ दरवर्षी नवे बनवतात आणि त्यांत त्यांच्या उत्सवमूर्ती ठेवून सिंहद्वारापासून रथयात्रा सुरू करतात. मंदिरापासून एक मैलावर जनकपूर किंवा इंद्रद्युम्नप्रासाद नावाचे स्थान आहे, तिथपर्यंत ही यात्रा जाते व तिथे तीन दिवस थांबून परत येते. जगन्नाथाला भेटण्यासाठी लक्ष्मीदेवी तिथे येते, अशी समजूत आहे. जगन्नाथाचा रथ साक्षात विश्वकर्म्याने तयार केला व ही रथयात्रेची प्रथा इंद्रद्युम्न राजाने सुरू केली, असे स्कंद पुराणात सांगितले आहे.



जगन्नाथाच्या रथाचे चाक

फाल्गुन शुद्ध द्वादशीला गोविंद-द्वादशी म्हणतात आणि तो जगन्नाथाचा जन्मदिवस मानतात. या तिथीला जेव्हा पुष्य नक्षत्र असते, तेव्हा पुरीला समुद्रस्नानासाठी यात्रा जमते. मार्कंडेयसरोवर, कृष्णवट, बलरामसमुद्र व इंद्रद्युम्नकुंड ही इथली मुख्य तीर्थस्थाने होत.



इंद्रद्युम्न कुंड – पुरी

इंद्रद्युम्न राजाने बांधलेल्या मंदिरात विश्वकर्म्याने जगन्नाथाची मूळ मूर्ती घडवली. त्या स्थानाला जनकपूर म्हणतात. तिथे जे लहानसे देऊळ आहे, त्याला गुंडीचा मंदिर म्हणतात.

पुरी हे एक शक्तिपीठही मानले जाते. इथे सतीची नाभी गळून पडली होती. शाक्त पंथाचे लोक त्याला उड्डीयानपीठ म्हणतात. आद्य शंकराचार्यांनी स्थापलेल्या चार धर्मपीठांपैकी एक पीठ जगन्नाथपुरीत आहे. पाहा– अग्न्युत्सव. [भा. वा.; सु. वि. को.; व्र. चं.; कल्याण–तीर्थांक; जागृत जगन्नाथ]

जगन्नाथ शंकरशेट

(१८०३–१८६५ इ. स.) अव्वल इंग्रजी अमदानीतील एक सार्वजनिक कार्यकर्ते व आधुनिक मुंबईच्या आद्य शिल्पकारांपैकी एक. जगन्नाथ शंकरशेट तथा नाना शंकरशेट हे दैवज्ञ ब्राह्मण होते. मुरबाड (जि. ठाणे) हे यांचे मूळ गाव असून, मुर्कुटे हे यांचे उपनाम होते. हे मुंबईस येऊन स्थायिक झाले होते. यांच्या वयाच्या अठराव्या वर्षी यांच्या वडिलांनी देह ठेवला आणि त्यांच्या उद्योगधंद्याची प्रचंड जबाबदारी नानांच्यावर येऊन पडली.

त्या काळी मुंबईत ख्रिस्ती मिशनऱ्यांनी शिक्षणप्रसाराचे काम सुरू केले होते; पण त्यात त्यांना फारसे यश न आल्यामुळे तेथील लोकांनी स्वतः शिक्षणसंस्था काढण्यास सुरवात केली. त्यांपैकी सुरवातीच्या बहुतेक शिक्षणसंस्थांचे धुरीणत्व नानांच्याकडे होते. त्यांतील काही प्रमुख संस्था अशा– (१) बाँबे नेटिव्ह स्कूलबुक अँड स्कूल सोसायटी (२) बाँबे नेटिव्ह एज्युकेशन सोसायटी (३) बोर्ड ऑफ एज्युकेशन (४) स्टूडंट्स् लिटररी अँण्ड सायंटिफिक सोसायटी व (५) जगन्नाथ शंकरशेट मुलींची शाळा.

मुलींना शिक्षण दिले, तर त्यांच्या नवऱ्यांचे आयुष्यमान कमी होते, असा जेव्हा लोकात गैरसमज प्रसृत होता, तेव्हा नानांनी आपल्या स्वतःच्या जागेत मुलींची वरील शाळा सुरू केली. भारतीयांना कलाविषयक शिक्षण मिळावे, यासाठीही नानांनी खूप खटपट केली व त्यातूनच आजचे जे. जे. स्कूल ऑफ आर्ट हे महाविद्यालय निर्माण झाले.

शैक्षणिक कार्याच्या बरोबरच नानांनी स्थापन केलेली बाँबे अँसोसिएशन ही संस्था नंतरच्या काळात राजकीय चळवळींचे केंद्र बनली. भारतीयांच्या मागण्या ब्रिटिश पार्लमेंटसमोर मांडण्यासाठी स्थापन झालेल्या या बाँबे अँसोसिएशनमधूनच बाँबे प्रेसिडेन्सी अँसोसिएशनचा जन्म झाला व याच संस्थेतून पुढे हिंदी राष्ट्रीय सभा जन्म पावली.



जगन्नाथ शंकरशेट

मुंबईच्या कायदेकौन्सिलच्या पहिल्या सभासदांत नाना हे प्रमुख होते. मुंबईत दळणवळणाची साधने निर्माण व्हावी, यासाठी नानांनीच पुढाकार घतला. बाँबे स्टीम नॅव्हिगेशन कंपनीचे जनक व पहिल्या मुंबई-ठाणे रेल्वेचे पुरस्कर्तेही तेच होते. मुंबई महापालिकेचा पाया नानांनीच घातला. मुंबईतील वाढत्या लोकसंख्येला पाणीपुरवठा भरपूर प्रमाणात व्हावा म्हणून विहार-तलावाची योजना नानांनीच आखली. चिंचपोकळीच्या भागात सुरू झालेली गॅस कंपनीही नानांच्याच प्रयत्नांचे फळ आहे. राणीच्या बागेची कल्पनाही नानांचीच. मुंबईचे ऐतिहासिक वस्तुसंग्रहालयही त्यांनीच निर्माण केले.

मुंबईत नाटचगृह हवे, यासाठी पहिला प्रयत्न नानांनीच केला. विष्णुदास भाव्यांची नाटकें नानांनी स्वतःच्या वाड्यात घडवून आणली.

नानांचे चांगले स्मारक व्हावे आणि संस्कृत विद्येची अभिवृद्धी व्हावी, यासाठी नानांच्या चिरंजीवांनी एक भरघोस शिष्यवृत्ती ठेवली आहे. मॅट्रिकच्या परीक्षेंत संस्कृत विषयात पहिला व दुसरा येणाऱ्या विद्यार्थ्यांना पुढील शिक्षणासाठी म्हणून ही शिष्यवृत्ती दोन वर्षे मिळत असे. सांप्रतही एस्. एस्. सी. च्या परीक्षेत पहिला व दुसरा येणाऱ्या विद्यार्थीना ही शिष्यवृत्ती मिळत असते. या शिष्यवृत्तीला मोठा मान आहे. जगन्नाथ शंकरशेट स्कॉलर ही उपाधी मोठ्या गौरवाची समजली जाते. या शिष्यवृत्तीमुळे महाराष्ट्रात संस्कृत भाषेच्या अभ्यासाला खूप प्रोत्साहन मिळाले. [अ. च. को.; अ. हा म.]

जगमित्र नागा

(इ. स. चे १४ वे शतक) मराठवाड्यातील एक संतकवी. हा परळी वैजनाथ येथील राहणारा असून, जातीने ब्राह्मण होता.

जगमित्र किंवा जगमैत्र हे याचे उपनाव असून, याच्याकडे मुठे खोऱ्यातील पिरंगुट गावचे कुलकर्णपण होते. जगमित्र हा लखपती होता, असे त्याच्या एका जुन्या चरित्रात लिहिले आहे. त्याची ही सर्व संपत्ती कुठल्या तरी कारणाने नष्ट होऊन तो पुढे अकिंचन बनला. त्याचे मित्रही त्याला सोडून गेले. मग त्याला वैराग्य आले व तो भक्तिमार्गाकडे वळला. नागस्वामी नावाच्या सत्पुरुषाला त्याने आपला गुरू केले व त्याचे नाव आपल्या नावापुढे लावून तो आपणास जगमित्र नागा असे म्हणवू लागला.

पुढे परळी वैजनाथ हे त्याने आपले वास्तव्यस्थान केले. तिथे तो भिक्षा मागून आपली उपजीविका करी व रात्रीच्या वेळी देवापुढे कीर्तन करी. कीर्तनामुळे व साधुत्वामुळे त्याची कीर्ती खूप दूरवर पसरली. पण दुष्ट लोकांना त्याची ही कीर्ती पाहवली नाही. त्यांनी एका रात्री जगमित्र घरात झोपलेला असता त्या घराला आग लावून दिली. परंतु भगवत्कृपेने तो आपल्या बायकामुलांसह सुरक्षितपणे बाहेर पडला. या संदर्भात जगमित्राने एक अभंग लिहिला आहे, तो असा–

अग्नि जाळी तरी न जळे प्रल्हादु ।
हृदयी गोविंदु म्हणोनिया ।।
अग्नि जाळी तरी न जळती गोपाळू ।
हृदयी देवकीबाळु म्हणोनिया ।।
अग्नि जाळी तरी न जळती पांडव ।
हृदयी वासुदेव म्हणोनिया ।।
अग्नि जाळी तरी न जळे बिभीषणाचे घर ।
हृदयी सीतावर म्हणोनिया ।।
जगमित्र नागा न जळे जरी अग्नि जाळी ।
हृदयी वनमाळी म्हणोनिया ।।

पुढे गावकऱ्यांनी त्याच्या नावे थोडी जमीन वेगळी काढली व ती कसून ते त्याच्या घरी धान्य आणून घालू लागले. पण त्यानंतर एका मुसलमान अधिकाऱ्याने ती जमीन जप्त केली. या संदर्भात जगमित्राच्या नावावर काही चमत्कार त्याच्या चरित्रात वर्णिले आहेत. जगमित्राची समाधी परळी वैजनाथ येथे आहे. [म. सा.; प्रा. म. सं.; म. च. को.]

जगमोहिनी ओडिसा व बंगाल या राज्यांतील एक वैष्णव संप्रदाय. ओडिसातील जगन्मोहनस्वामी हा या पंथाचा संस्थापक होय. पूर्व बंगालात या संप्रदायाला गुरुसंप्रदाय असे म्हणतात. संन्यासी आणि गृहस्थाश्रमी असे दोन्ही प्रकारचे लोक या संप्रदायात आहेत. या संप्रदायाचे अनुयायी गुरूला ईश्वराचा अवतार मानतात. यांचा प्रमाणभूत असा एखादा ग्रंथ नाही; पण संप्रदायगीते मात्र पुष्कळ आहेत. [वै. शै. म. क.]

जगुली ओडिसातील एक लोकदेवता. श्रावण शु. पंचमीच्या दिवशी गावातला न्हावी तिची मृण्मय मूर्ती तयार करतो. तिला तीन डोळे असून तिच्या मस्तकावर नागफणी असते. ती मूर्ती एका टोपलीत ठेवून तो गावात हिंडतो. घरोघरी तिला नैवेद्य दाखवला जातो. तिची पूजा केल्याने सर्पविष बाधत नाही, असे समजतात. [स्ट. ओ. फो.]

जग्गाजी (इ. स. चे १७ वे शतक) राजस्थानातील एक चारण कवी. हा खिडिया शाखेचा चारण होता. जगाजीच्या जन्मस्थानासंबंधी आणि कालासंबंधी निश्चित माहिती मिळत नाही. त्याने रतनरासौ नामक एक काव्य रचले असून, त्यात जोधपूरनरेश महाराजा जसवंतसिंह व औरंगजेब यांच्यांत उज्जैन येथे झालेल्या भीषण संग्रामाची हकीकत निवेदिली आहे. या लढाईत राठोड राजा रतनसिंह अतुल पराक्रम गाजवून धारातीर्थी पडला, त्यामुळे त्याचेच नाव प्रस्तुत काव्याला दिले आहे. या काव्याची भाषा डिंगल असून, ते वीररसयुक्त आहे. [रा. भा. औ. सा.]

जझिया मुसलमानांनी जिंकलेल्या प्रदेशात अन्यधर्मीयांवर त्यांच्या संरक्षणासाठी लादलेला एक कर. या शब्दाचा अर्थ बदला पैसा असा आहे. जे काफिर लोक इस्लामचा स्वीकार न करता, त्याला विरोध करीत, त्यांच्याकडून हा बदला घेतला जाई. कर भरणाऱ्यांचा बचाव होई व तो न देणाऱ्यांना मरण पत्करावे लागे. काफिर शरण येऊन जझिया देईपर्यंत त्यांच्याशी लढा, असा आदेश कुराणात दिलेला आहे. प्रथम मुहंमद पैगंबराने मुसलमानेतरांकडून हा कर वसूल करण्यास सुरवात केली. महंमद कासीमने सिंधवर स्वारी केली, तेव्हा त्याने इथे जझिया कर वसूल केला. मात्र त्याने ब्राह्मणांना तो माफ केला होता. महंमद घोरी, अलाउद्दीन खिलजी, फिरोज तुगलक, इ. सुलतान हिंदूंपासून जुलमाने जझिया कर वसूल करीत. अकबराने इ. स. १५७९ साली हा कर बंद केला होता; पण औरंगजेबाने तो इ. स. १६७९ साली पुन्हा लादला व त्याची वसुली सक्तीने सुरू केली. राजपूत राजांकडूनही जझिया कर वसूल करावा, असा हुकूम औरंगजेबाने सोडला होता. त्यामुळे ते खवळले आणि प्रतिकारासाठी सिद्ध झाले. शेवटी बादशहाला आपला हुकूम मागे घेऊन त्यांच्याशी तह करावा लागला.

प्रत्येक मनुष्याला दरसाल सोन्याचा एक दिनार कर भरावा लागे. कराची आकारणी ब्राह्मणांवर एक-तृतीयांश व इतरांवर त्यांच्या दर्जाप्रमाणे कमीजास्त करीत, असे काही इतिहासकार म्हणतात. काहींच्या मते हा कर सर्वांना सरसकट भरावा लागे, तर काहींच्या मते बायकामुलांना तो माफ होता. विशिष्ट प्रसंगी किंवा विशिष्ट जातींना हा कर माफ केला जात असे. साधू, अनाथ, अपंग, गुलाम व सरकारी नोकर यांच्याकडून हा कर घेऊ नये, असे नियम होते. तथापि वसुली करणारे अधिकारी मन मानेल तितका कर वाटेल त्याच्याकडून जुलमाने वसूल करीत. [म. ज्ञा. को.; मु. रि.]

जट–जटिन मिथिला, बिहार आणि भोजपूर या प्रदेशांतील एक नृत्य-नाट्यप्रकार. आश्विन व कार्तिक यामहिन्यांत चांदण्या रात्री गावागावांतून या नृत्य-नाट्याचे प्रयोग होतात. यात केवळ स्त्रिया आणि मुलीच भाग घेतात. यात जट व जटिन ही दोन प्रधान पात्रे असतात. जटाचा अभिनय करण्यासाठी एखाद्या मुलाला घेतात. एखादी मुलगी जटिन बनते. जट रात्री फुलणाऱ्या कमळांचा हार गळ्यात घालतो व मस्तकावर श्वेतपुष्पांचा मुकुट धारण करतो. जटिनही फुलांचेच दागिने अंगाखांद्यावर घालते. मग ती दोघे समोरासमोर उभी राहतात. नंतर त्या दोघांच्याही बाजूने बारा-बारा स्त्रिया एका ओळीत उभ्या होतात. मग सवाल-जवाबांनी युक्त अशी गीते गात गात नाट्याचा अभिनय करतात.

जट–जटिन या नाट्याचे कथानक एकांकीसारखे असते. यातला जट हा बलदंड प्राणी असतो. तो जटिनचा छळ करायला प्रवृत्त होतो व तिचे स्वतंत्र व्यक्तिमत्त्व नष्ट करू पाहतो. मग त्या दोघांत संघर्ष निर्माण होतो. जटिन जटाच्या छळवादाचा प्रतिकार करायला उभी राहते; पण शेवटी पराभव पावते. त्याचा एक नमुना असा—

जट व जटिन यांचे लग्नाचे बेत चालले आहेत. दोघांच्याही हृदयात एकमेकांविषयी अतिप्रेम आहे; पण जटाला आपली बायको अशी हवी असते की, बऱ्या-वाईट सर्व गोष्टींत ती त्याचा अनुनय करील, त्याची मर्जी संभाळील. म्हणून लग्नाआधी तो तिला आपल्या अटी सांगतो आणि ती आपल्या स्वभावानुरूप त्याला स्वाभिमानपूर्वक उत्तर देते. उदा०—

नर्वाहि पड़तऊ हे जटिन, नर्वाहि पड़तऊ हे
जइसें नवतइ धानक शिशवा, वइसे नवबे हे

अर्थ – हे जटिन, लग्न झाल्यावर तुला माझ्यापुढे नमून वागावे लागेल. ज्याप्रमाणे धान्याचे रोप लोंबी आल्यावर वाकते, त्याचप्रमाणे माझ्यापुढे तुला वाकावे लागेल.

नहिए नवबऊ रे जटवा, नहिए नवबऊ रे
बाबू क दुलारी बेटी, ऐंठिक चलबऊ रे

अर्थ – हे जटा, मी तुझ्यापुढे नमणार नाही. मी माझ्या बापाची लाडकी मुलगी आहे. मी ऐटीत चालेन, बोलेन.

यापुढच्या गीतात त्या दोघांचा विवाह होतो. जटिन त्याच्याकडे नाना प्रकारचे दाग-दागिने .मागते. जट ते तिला मिळवून देतो. जटिन अनाठायी खर्च करते आणि जट कफल्लक बनतो. मग तो नोकरी करण्यासाठी परदेशी जायला निघतो. जटिन त्याला परत येताना आपल्याला नाना प्रकारचे दागिने आणायला सांगते. कधी कधी जटिन जटावर रुसते आणि आपल्या माहेरी निघून जाते. पण वाटेत लागते एक नदी. नदीवर नाव चालत असते. पण जटिन नवऱ्यावर रुसून आली आहे, असे समजल्याकारणाने नावाडी तिला पैलपार घालवायला तयार होत नाही. [मैथिली लोकगीत]

जटापाठ एक वेदविकृती. हिचे लक्षण पुढीलप्रमाणे सांगितले आहे– प्रथम दोन पदांचा क्रम, नंतर त्यांचा व्युत्क्रम; त्यानंतर पुनश्च पहिल्या दोन पदांचा क्रम म्हणून थांबणे. या प्रकाराला जटापाठ म्हणतात. उदा०–

मूळ अर्धी ऋचा –

ओषधयः सं वदन्ते सोमेन सह राज्ञा।
(ऋ. १०.९७.२२)

या अर्ध ऋचेचा जटापाठ असा–

ओषधयः सं समोषधय ओषधयः सम्।
१ २ २ १ १ २

सं वदन्ते वदन्ते सं सं वदन्ते।
२ ३ ३ २ २ ३

वदन्ते सोमेन सोमेन वदन्ते वदन्ते सोमेन।
३ ४ ४ ३ ३ ४

सोमेन सह सह सोमेन सोमेन सह।
४ ५ ५ ४ ४ ५

सह राज्ञा राज्ञा सह सह राज्ञा। राज्ञेति राज्ञा।
५ ६ ६ ५ ५ ६ ६ ६

वरीलप्रमाणे संपूर्ण संहितेचा जटापाठ मुखोद्गत असणाऱ्या वैदिकास जटापाठी म्हणतात. पाहा– वेदविकृती.

जटामाली विष्णूचा एक अवतार. हा एकोणिसाव्या द्वापरात हिमालयातल्या जटायू पर्वतावर झाला. याला चार पुत्र होते. [पु. इं.]

जटामुकुट डोक्यावरचे केस उभे धरून त्यांची मुकुटाकार बांधणी करतात, त्या केशरचनेला जटामुकुट अशी संज्ञा आहे. शिव आणि कित्येक बौद्ध देवता यांच्या मस्तकी जटामुकुट असतो.

जटारोहिणी बैगा आदिवासींचा एक देव. हा नदीत राहतो. रोगनिवारण होण्यासाठी आणि समृद्धीसाठी सर्व लोक एकत्र येऊन याची पूजा करतात.

जटिलक केसांचा जटामुकुट बांधणाऱ्या भिक्षूंचा एक संप्रदाय. राजगृहाजवळ उरुवेला नामक गावी त्यांचे प्रमुख पीठ होते. बुद्धाच्या काळात असे एक हजार जटिलक त्या ठिकाणी होते, असा उल्लेख आढळतो. [हिं. स.]

जडवाद जगताच्या व जीवनाच्या वास्तविक स्वरूपाचा, तसेच विश्वातील विविधता, एकरूपता व संगती यांचा अर्थ उलगडण्याचा प्रयत्न जे तत्त्वज्ञान विज्ञानाच्या आधाराने करते, त्याला जडवाद म्हणतात. भारतीय तत्त्वज्ञानाच्या परंपरेत जी अनेक मते निर्माण झालेली आहेत, त्यांत जडवाद हे सर्वांत प्राचीन मत आहे, असे काही पंडितांचे म्हणणे आहे. जडवादाच्या मतप्रणालीचे खंडन बाकीच्या सर्व दार्शनिकांनी केले आहे, त्यावरून जडवाद हाच आधीचा असावा, असे त्यांना वाटते. किंबहुना हेच मूळ तत्त्वज्ञान असून, त्याच्या खंडनासाठीच इतर दर्शने निर्माण झाली, असेही काही पंडित म्हणतात.

याच्या उलट दुसऱ्या काही पंडितांचे मत असे– बृहस्पती व त्याचे जडवादी अनुयायी यांनी कोणतेही तत्त्वज्ञान प्रस्थापित केले नसून, त्यांनी इतर तत्त्वज्ञानांवर टीकाच केली आहे; त्यावरून जडवाद इतर दर्शनांच्या नंतर उत्पन्न झाला आहे.

पण या कालक्रमवादात विशेष अर्थ नाही. कारण सर्वच दर्शनांचा विकास व्हायला शेकडो वर्षे लागली आहेत. या दर्शनांना सध्याचे स्वरूप प्राप्त होण्यापूर्वी दीर्घकालपर्यंत भारतात विविध प्रकारचे असंख्य तात्त्विक विचार निर्माण झालेले असतील. त्यांचे हळूहळू वर्गीकरण होऊन भिन्न भिन्न दर्शने निर्माण झाली. त्यांत लोकायत हे सर्वांत आधी निर्माण झाले असावे. प्रथम या दर्शनाला बार्हस्पत्य हे नाव होते, कारण

बृहस्पती हा त्याचा प्रणेता होता. प्रारंभी तो व त्याचे अनुयायी इतरांवर केवळ टीका करीत किंवा वितंडवाद करीत. त्यांचा स्वतःचा असा एखादा सिद्धांत नव्हता. पण पुढे ते स्वभावधर्माचा सिद्धांत प्रतिपादू लागले. मग या तत्त्वज्ञानाला शास्त्राचे स्वरूप आले व या दर्शनाला लोकायत हे नाव प्राप्त झाले. कर्मफल, अदृष्ट, आत्मा, ईश्वर, परलोक या कल्पनांना या दर्शनात स्थान नाही. निसर्ग हाच त्याचा स्वयंसिद्ध आधार आहे.

जडवादाचा पहिला सिद्धांत असा आहे, की संवेद्य वस्तू म्हणजे व्रिषय हे संवित्तीच्या बाहेर स्वतंत्रपणे अस्तित्वात असतात. जगत ही संवेद्य वस्तू असून ती सत्य आहे; ती काल्पनिक किंवा मायिक नाही. सगळी विज्ञाने जगताचे स्वतंत्र अस्तित्व गृहीत धरून आणि त्याच्या यथार्थ ज्ञानाची शक्यता धरूनच प्रवृत्त झाली आहेत.

जगाचा बाह्य मायिक देखावा आणि असंवेद्य सत्य वस्तू असे दोन विभाग काही तत्त्ववेत्ते मानतात; पण जडवादाला ही विचारसरणी मान्य नाही. ज्ञात विश्व व अज्ञात विश्व एवढाच फरक जडवादी मानतात. वरील सिद्धांताशी संलग्न असा दुसरा सिद्धांत असा–

ज्ञान वस्तूवर अवलंबून असते; वस्तू ज्ञानावर अवलंबून नसते. ज्ञान हे वस्तुतंत्र असते, म्हणून ज्ञानाचे प्रामाण्य किंवा अप्रामाण्य ठरवता येते. ज्ञानतंतूंचा वस्तूशी संयोग झाला, की प्रत्यक्ष प्रत्यय येतो प्रत्यक्ष अनुभव हा सर्व ज्ञानांमध्ये श्रेष्ठ होय. जडवाद हा प्रयत्नजन्य अनुभवाला किंवा प्रयोगाला ज्ञानशास्त्रात प्रमुख स्थान देतो. मानवी प्रयत्न जेव्हा बाह्य विश्वाशी संपर्क करतात व बाह्य विश्वाचे स्वरूपही क्रमाक्रमाने बदलून टाकतात, तेव्हाच सत्याची गाठ पडली, असे सिद्ध होते. जडवादाचा मुख्य सिद्धांत असा–

चेतनवस्तू व जीववस्तू अस्तित्वात येण्याच्या अगोदर अचेतन व अजीव असा निसर्ग अस्तित्वात होता; चेतन वस्तू व जीववस्तू हा निसर्गाचाच एक भाग असून, तो निसर्गात एका विशिष्ट परिस्थितीत अचेतन व अजीव सृष्टीतूनच उत्पन्न झाला आहे. चेतन म्हणजे जाणीव किंवा ज्ञान असलेले द्रव्य. वनस्पती ही जीवसृष्टी आणि पशुपक्षी व मनुष्यप्राणी ही चैतन्ययुक्त (जाणीव असलेली) जीवसृष्टी होय.

कोणताही जीवपिंड किंवा चेतनपिंड हा जडद्रव्यांचा मेळावा असतो. मूलतत्त्वे व संयुक्त द्रव्ये यांनी बनलेल्या जीवपेशी विशिष्ट रचनेत गुंतलेल्या असतात. त्यांचेच मग शरीर बनते. शरीर व जीवात्मा एकच होय. त्यामुळे देहपातानंतर आत्मा उरत नाही व पूर्वजन्म, पुनर्जन्म या कल्पनांनाही अवकाश राहत नाही. मनुष्य मेल्यावर त्याचा आत्मा आपल्या कर्मानुसार निरनिराळ्या योनींत जन्म घेतो किंवा पुण्याच्या योगान स्वर्गात जातो अथवा पापामुळे नरकात जातो, हे तत्त्व जडवादाला मान्य नाही. कारण असा स्वतंत्र जीवात्मा मुळी नसतोच. सजीव देहपिंड हा भोवतालच्या अजीव अशा सृष्टीतूनच उत्पन्न होतो व विकास पावतो. भोवतालच्या परिस्थितीचाच तो एक भाग आहे. मानवशरीर ही एक जडद्रव्यातून निर्माण झालेली अत्यंत गुंतागुंतीची घटना असून, रासायनिक द्रव्यांचे नियम शरीरातील अनेक घडामोडींचा अर्थ लावण्यास उपयोगी पडतात.

देहपिंडाचे घटक असलेली महत्त्वाची द्रव्ये या देहातच उत्पन्न होतात व नाश पावतात. त्याच्या अंगोपांगांची उत्पत्ती, विकास व विस्तार करण्यास अनुकूल अशी व्यवस्था अगोदरच त्याच्या जनकद्रव्यांत केलेली असते, तिला बीजसंस्था म्हणतात. अधिकाधिक विकसित जीवपिंडांत उत्तरोत्तर जाणीव वाढत जाते. जाणीव, ज्ञान, विचार किंवा संवेदना ही जीवाच्या विशिष्ट प्रयोजनाकरताच अस्तित्वात आली आहे.

विश्वाच्या स्वरूपाचा अर्थ समजून घेताना जडवादी पुढील चार तत्त्वे निश्चित धरतात–

(१) ज्ञात व ज्ञेय अथवा सर्व सद्वस्तू नित्य परिवर्तनशील आहेत. याचा अर्थ असा, की वस्तूचे स्थान, घटक व गुणधर्म बदलत असतात.

(२) संपूर्ण अभावातून वस्तू निर्माण होत नाही वा तिचा नाशही होत नाही. एका वस्तूतूनच दूसरी वस्तू निर्माण होते. प्रत्येक विद्यमान वस्तू तिच्या अगोदर असलेल्या वस्तूचे कार्य असते. प्रत्येक घटना कार्यकारणभावाच्या नियमाने बद्ध असते.

(३) प्रत्येक वस्तूत स्वभावसिद्ध गतिशक्ती किंवा परिवर्तनशक्ती असते. या विश्वात जी प्रेरणाशक्ती आहे, ती वस्तुमात्राच्या स्वभावातूनच निर्माण झालेली आहे.

(४) रचना, योजना, व्यवस्था हा वस्तूचा मूळ स्वभावच आहे. वस्तू आहे म्हणजेच विशिष्ट प्रकारची योजना आहे व विशिष्ट व्यवस्था आहे, असाच त्याचा अर्थ घ्यायला हवा. वस्तूची किंवा विश्वाची रचना दुसऱ्या कोणीही केलेली नाही.

या तत्त्वज्ञानाच्या प्रस्थापनेमुळे विचारस्वातंत्र्याचे वारे सर्वत्र वाहू लागले आणि त्यातूनच बौद्ध तत्त्वज्ञान उगम पावले. लोकायत दर्शनात भौतिक अभ्युदयाला महत्त्व मिळाल्यामुळे त्या काळी भारतात अनेक कलांचा विकास झालेला दिसतो. लोकायताचा अशा प्रकारे प्रसार व उत्कर्ष झाला खरा; पण त्यातील स्वातंत्र्यवादाचा अतिरेक होऊन लोक अनिर्बंध आच-

रण करू लागले व उच्च प्रतीच्या सुखाऐवजी विषयसुखाच्या मागे धावू लागले. ऐहिक सुख हेच त्यांच्या जीवनाचे सारसर्वस्व ठरले. या सुखवादाला चार्वाक दर्शन म्हणतात. वैदिक दर्शनांचा चार्वाक दर्शनाला प्रारंभापासूनच विरोध होता. पुढे बौद्ध व जैन या अवैदिक दर्शनांचाही त्याला विरोध सुरू झाला. कारण बौद्ध-जैनांना जीवनातली सुखलोलुपता मान्य नव्हती. त्या संयुक्त विरोधामुळे चार्वाकवादाची लोकप्रियता कमी झाली. म्हणून मग आपले आसन स्थिर करण्यासाठी चार्वाकवाद्यांनी आध्यात्मिक तत्त्वज्ञानाला आपली मान्यता दर्शविली. देहात्मवाद व प्रत्यक्ष प्रमाण या सिद्धांतांना त्यांनी थोडी मुरड घातली. तथापि त्यानंतर जडवाद हळूहळू मागे पडला तो पडलाच. चार्वाकवादातील सुखोपभोगाची कल्पना तेवढी पुढच्या अनेक पंथांनी स्वीकारली.

वैदिक तत्त्वज्ञानाचा जडवादातील देहात्मवादाला विरोध असला, तरी सर्व भारतीय तत्त्ववेत्त्यांनी यासंबंधी एक महत्त्वाची कबुली दिली आहे ती ही, की प्रत्येक जाणीव असलेला जीव हा देह म्हणजेच आत्मा अशा बुद्धीनेच व्यवहार करीत असतो. आद्य शंकराचार्यांनी शारीरभाष्याच्या प्रस्तावनेत म्हटले आहे, की देहच आत्मा आहे, हा प्रत्यय सगळ्या जीवव्यापारांच्या मुळाशी आहे. आत्मा देहाहून भिन्न आहे, असे मानणारे तत्त्ववेत्तेही व्यवहारात देहात्मवादीच असतात, असे आचार्य निश्चयपूर्वक सांगतात. देहात्मप्रत्यय ही स्वाभाविक, जन्मसिद्ध जाणीव आहे, हे सर्व भारतीय तत्त्वज्ञांनी मान्य केले आहे. पाहा – चार्वाकदर्शन. [हि. इं. म. हे.; जडवाद]

जती सौराष्ट्रातील जैन साधूंचा वर्ग. हे साधू भिक्षा मागून उपजीविका करतात. जीवजंतू तोंडात जाऊन त्यांची हिंसा होऊ नये, म्हणून हे लोक तोंडावर कापडाची पट्टी बांधतात व बसण्याची जागा साफ करण्यासाठी बोकडाच्या केसांचा कुंचला वापरतात.

काही जती संथारुव्रत घेतात. हे व्रत म्हणजे प्रायोपवेशनच होय. यात आमरण उपोषण करायचे असते. अशा जतीच्या दर्शनासाठी व त्याची सेवा करण्यासाठी लांबलांबचे श्रावक तिथे येऊन राहतात. ते त्याला अन्न देत नाहीत, पण त्याच्या तप्त झालेल्या शरीरावर गार पाण्याची फडकी अधूनमधून ठेवतात.

जतीने प्रायोपवेशन सुरू केलेल्या दिवसापासूनच त्याच्या अन्त्यविधीची तयारी सुरू होते. प्राण जाण्यापूर्वी त्याला डोलीत बसवतात आणि मरणानंतर त्याच स्थितीत त्याची प्रेतयात्रा वाजतगाजत नेतात. [वि. मुं. रा. प.]

जतूकर्ण याला जातूकर्णं असेही नाव होते. पाहा – आयुर्वेद.

जत्रा एखाद्या स्थानिक देवतेच्या उत्सवासाठी गावोगावचे लोक एकत्र जमतात, त्या धार्मिक संमेलनाला जत्रा असे म्हणतात. त्या वेळी त्या देवतेचे कित्येक भक्त तिथे येऊन आपले नवसही फेडतात. जत्रा बहुधा दोन-तीन दिवस चालते. देवतेचा उत्सव हा जत्रेचा मुख्य भाग असला, तरी त्या प्रसंगी नाचगाणे, तमाशे, नाटके, डोंबाऱ्याचे खेळ, जादूचे प्रयोग, अस्वलांचे व माकडांचे खेळ, फिरते पाळणे व घोडे, इ. करमणुकीचे विषयही असतात. जत्रेचे प्रमुख आकर्षण तेच असते. काही ठिकाणी कुस्त्यांचे फडही होतात. याशिवाय जत्रेत मोठा बाजारही भरतो. खेडेगावांतील लोकांना सहज न मिळणाऱ्या नानाविध वस्तू त्या बाजारात विकायला येतात. खेडुतांच्या दृष्टीने ते एक सुंदर प्रदर्शनच असते.

सौम्य व श्रेष्ठ देवतांच्या जत्रेत त्या देवतांचे विशेष पूजोपचार होतात. त्यांच्या पालख्या निघतात किंवा रथात बसवून त्यांची मिरवणूकही काढतात. त्या वेळी शोभेची दारू उडवतात व कित्येक ठिकाणी देवापुढे नृत्य, गायन व नाटकेही होतात.

द. भारतातील खेडेगावांत देवी, पटकी, वगैरे रोगांची साथ सुरू झाली, की सर्व ग्रामस्थ मिळून स्थानिक देवतेची जत्रा करतात. त्या जत्रेत देवतेला पशुबली देतात. दक्षिणेत पोलेरम्माची जत्रा प्रमुख असते. या जत्रेत तिला रेड्याचा बळी



जती

देतात. त्या रेडयाचे मुंडके देवीला अर्पण करतात व धड अस्पृश्यांना देतात.

मुंडा लोकांच्या जत्रांत नृत्य-गायनाला प्राधान्य असते. मुंडा तरुणतरुणींच्या दृष्टीने जत्रा हे क्रीडा-विहाराचे एक पर्वच असते. अशा जत्रांसाठी खास गीते रचली जातात आणि नृत्यपथके ती गीते गात गात, वाद्ये वाजवीत जत्रेला जातात. [द्र. गॉ. मॉ. हिं.; बाँ. व. र.]

जन भूः, भुवः, इ. सात उर्ध्वलोकातला पाचवा लोक. हा महर्लोकापासून दोन कोटी योजनांवर आहे. याला वरुणाचा लोक असे म्हणतात. याला विराट पुरुषाचे मुख म्हटले आहे (भाग. पु. २. १. २८). प्रलयकाली देव महर्लोकाहून जनलोकाला जातात. [पु. इं.]

जनक एक ब्रह्मवेत्ता. हा विदेहाचा राजा होता. याचा उल्लेख प्रथम तैत्तिरीय ब्राह्मणात येतो. सावित्राग्नी यज्ञाच्या फलासंबंधी चर्चा चालू असताना विदेह जनक देवांकडे गेला व तिथे देवांनी त्याला त्या यज्ञाचे फल सांगितले, असा तिथे उल्लेख आहे (३.१०.९). याशिवाय शतपथ ब्राह्मण, बृहदारण्यकोपनिषद, जैमिनीय उपनिषद व कौषीतकी उपनिषद या ग्रंथांतही जनकाचे उल्लेख आढळतात. हा जनक याज्ञवल्क्य व श्वेतकेतू आरुणेय यांचा समकालीन होता.

शतपथ ब्राह्मणात जनकाचे एका तत्त्ववेत्त्याच्या स्वरूपात दर्शन होते. हा जनक तिथे याज्ञवल्क्याला उपदेश करताना दिसतो. पण बृहदारण्यकोपनिषदात मात्र याच्या उलट स्थिती आहे. तिथे याज्ञवल्क्य जनकालाच ब्रह्म, आत्मा, परलोक, इ. संबंधी ज्ञान सांगताना आढळतो. शेवटी जनक आपले सारे राज्य याज्ञवल्क्याला दान देऊन आपण स्वतः याज्ञवल्क्याचा शिष्य बनतो.

वाल्मीकी रामायणात दोन जनकांचा उल्लेख येतो (१.७१). त्यांतील एक जनक मिथीचा पुत्र आहे व दुसरा जनक ऱ्हस्वरोमाचा मुलगा व सीतेचा पिता आहे. याज्ञवल्क्याशी समकालीन असणाऱ्या जनकाचे नाव दैवराती असे होते आणि वंशावळीप्रमाणे रामाचा सासरा जनक हा दैवराती जनकापेक्षा पुष्कळ पिढ्या मागचा आहे. शिवाय विष्णू पुराण (४.५.३०), वायू पुराण (९.१५), ब्रह्मांड पुराण (३.६४.१५), पद्म पुराण (पाताल ५७.५), इ. पुराणांत सीतेचा बाप जनक याचे नाव सीरध्वज असल्याचे सांगितले आहे.

जनक हे व्यक्तिनाम नसून, ते निमी किंवा विदेह वंशाचे कुलनाम आहे. या वंशाचा मूळ पुरुष केवळ पित्याच्या देहापासून निर्माण झाला, अशी कथा आहे. तिचा सारांश असा—

वैवस्वत मनूचा ज्येष्ठ पुत्र इक्ष्वाकू, याच्या शंभर मुलांतील दुसरा मुलगा निमी नावाचा होता. वसिष्ठाच्या शापाने त्याचा देहपात झाला असता ब्राह्मणांनी त्याच्या देहाचे मंथन केले व त्यातून एक पुरुष निर्माण केला. त्याचे नाव मिथी नामक जनक होय. मग तिथून पुढील प्रत्येक राजाला जनक, विदेह, मिथिल अशी नावे मिळाली.

या प्रथम जनकाचे पंचशिखांबरोबर अध्यात्मविषयावरील संवाद, क्षत्रियांची आवश्यक कर्तव्ये कोणती या विषयावर स्व-स्त्रीबरोबर झालेले संभाषण, तसेच आश्म नामक ब्राह्मणाबरोबरचा त्याचा संवाद, हे संवाद प्रसिद्ध आहेत (म. भा. शांति. २२१, ३२४). हा इच्छामरणी होता. पुढे प्राणत्याग करून स्वर्गाला जात असता तो यमलोकात गेला. तिथे त्याच्या अंगावरून वाहिलेला वारा तिथल्या पापी जीवांच्या अंगाला लागल्यामुळे त्यांची दुःखे दूर झाली. यमाने त्याला नरकलोकाची माहिती दिल्यावर स्वर्गाला जाण्यास सांगितले. परंतु जनकाने ते न ऐकता नरकातील सर्व लोकांना आपले सर्व पुण्य देऊन त्या पापी जीवांचा उद्धार केला (पद्म. पाताल ३०).

जनकाची वंशावळही पुराणांत अनेक ठिकाणी सापडते (ब्रह्मांड ३.६४ वायू २.२७; भाग. ९.१३; विष्णू ४.४; गरुड १.१३८). पण तिच्यात एकवाक्यता नाही.

कालिका पुराणात जनकाची माहिती दिली आहे, ती अशी — हा विदेह देशाचा राजा असून, त्याला चार स्त्रिया होत्या. त्यांत सुमती ही पट्टराणी होती. पुष्कळ कालपर्यंत त्यांना संतान न झाल्यामुळे त्याने पुत्रकामेष्टी यज्ञ केला. तेव्हा त्याला दोन पुत्र झाले व सीता ही कन्या पृथ्वीपासून प्राप्त झाली. यानेच पृथ्वीच्या सांगण्यावरून नरकासुराचे सोळा वर्षेपर्यंत पालन केले. त्रेतायुगाच्या पूर्वार्धातील ही गोष्ट आहे. [रामकथा; प्रा. च. को.; म. ज्ञा. को.]

जनकपूर एक तीर्थ क्षेत्र. याची प्राचीन नावे मिथिला, तीरमुक्ती व विदेह अशी होती. हे ठिकाण सांप्रत नेपाळच्या राज्यात आहे. सीतामढी अथवा दरभंगा गावाहून नेपाळी रेल्वेने जयनगरपर्यंत जाऊन तिथून पुढे जनकपुराला जावे लागते. या जनकपुराच्या सभोवती शिलानाथ, कपिलेश्वर, कूपेश्वर, कल्याणेश्वर, इ. शिवमंदिरे आहेत.

महाभारतकालानंतर इथे घनदाट अरण्य निर्माण झाले व त्यामुळे अनेक तपस्व्यांनी इथे तप केले. या तपस्वी लोकांत सूरकिशोर म्हणून एक ऋषी होता. तो या ठिकाणी जानकीची वात्सल्यभावाने उपासना करीत असे. त्याची ती उपासना

पाहून एक दिवस सीतेने त्याला दृष्टान्त दिला, की 'तुला जिथे माझी मूर्ती सापडेल ते ठिकाण माझे निवासस्थान असे समज.' सूरकिशोराने तदनुसार मूर्ती शोधण्यास प्रारंभ केला. सांप्रतच्या क्षेत्रात त्याला सीतेची सुवर्णमूर्ती सापडली. मग त्या जागेवर सूरकिशोराने एक लहानसे मंदिर बांधले.



जानकीमंदिर – जनकपूर

पुढे सूरकिशोराचा शिष्य रामकृष्णदास याच्या काळात बुंदेलखंडाच्या राणीने इथे एक उत्तम मंदिर बांधले. हेच मंदिर जानकीमंदिर या नावाने आज प्रसिद्ध आहे. हे मंदिर म्हणजे शिल्पशास्त्राचा एक उत्तम नमुना आहे. या मंदिराभोवती राम, जनक, लक्ष्मण व हनुमान, यांची मंदिरे आहेत. इथेच प्रभू रामचंद्राने जनकाजवळच्या शिव धनुष्याचा भंग केल्याचे सांगतात.



जनकमंदिर – जनकपूर

येथील गंगासागर सरोवराच्या जवळच निमी राजाच्या शरीराचे मंथन करून ऋषींनी त्यातून जनकाची उत्पत्ती केली, असे म्हणतात. इथे रामनवमीला मोठा उत्सव होतो. [कल्याण-तीर्थांक]

जनकराज किशोरीशरण

(इ. स. चे १८ वे शतक) एक हिंदी कवी. हा अयोध्येचा रहिवासी होता. याची प्रमुख कविता रामविषयक आहे. याच्या ग्रंथांची नावे अशी–

आंदोलनरहस्यदीपिका, तुलसीदासचरित्र, विवेकसार-चंद्रिका, सिद्धांतचौतीसी, बारहखडी, ललितशृंगार-दीपक, कवितावली, जानकीसरणाभरण, सीताराम-सिद्धांतमुक्तावली, अनन्य-तरंगिणी, रामरस-तरंगिणी, आत्मसंबंधदर्पण, होलिका-विनोद-दीपिका, वेदांतसार, श्रुति-दीपिका, रसदीपिका, दोहावली, रघुवर-करुणाभरण, इत्यादी.

याने काही ग्रंथ संस्कृतातही लिहिले आहेत. [हिं. सा. इ.]

जनगोपाल

(इ. स. च्या १६ व्या शतकाचा उत्तरार्ध) राजस्थानातील एक संतकवी. हा फत्तेपूर शिक्रीचा रहिवासी असून जातीने वैश्य होता. फत्तेपूर शिक्री येथेच त्याने दादू दयाल या सत्पुरुषाकडून गुरुमंत्र घेतला व तो दादूपंथात सामील झाला. हा एक गाढा पंडित व सिद्ध पुरुष असून, याने पुढील ग्रंथ लिहिले आहेत –

(१) दादूजन्मलीलापरची (२) ध्रुवचरित्र (३) प्रल्हाद-चरित्र (४) भरतचरित्र (५) मोहविवेक (६) चौबीस गुरुओं की लीला (७) शुकसंवाद (८) अनंतलीला (९) बारहमासिया (१०) भेट के सवैये (११) जखडीकाया प्राण संवाद (१२) साखी व (१३) पद. याची पदे दादूपंथात लोकप्रिय होती. [रा. भा. औ. सा.; रा. पिं. सा.]

जननशांती

अशुभ नक्षत्र, अशुभ योग वा अशुभ तिथी यांवर मूल जन्माला आले असता, ती गोष्ट त्या मुलाला अथवा कुटुंबातील एखाद्याला अरिष्टकारक असल्याची समजूत असते. ते अरिष्ट दूर व्हावे व कुटुंबात बालकासह सर्वांचे शुभ व्हावे, म्हणून जो शांतिविधी करतात, त्याला जननशांती असे म्हणतात.

जननाला कोणते योग वाईट व त्या वेळी कोणत्या देवतेसाठी शांती करायची, ते ज्योतिष–ग्रंथात सांगितलेले असते. धर्मशास्त्राच्या ग्रंथांत प्रत्येक शांतीचा प्रयोगही दिलेला असतो. प्रत्येक शांतीची मुख्य देवता वेगवेगळी असते. शांतिकर्मात तिची स्थापना व पूजा करून विशिष्ट हविर्द्रव्याने तिला उद्देशून हवन करतात. शेवटी नवजात बालकासह कुटुंबातल्या सर्व माणसांना अभिषेक करतात. [श्री. विद्याधरशास्त्री भिडे]

जनपदे

जन म्हणजे समान संस्कृतीचे लोक. त्यांनी केलेल्या वसाहतींना जनपदे म्हणत. वैदिक संहितांत जनपद हा शब्द आढळत नाही; पण ब्राह्मण ग्रंथात तो आढळतो. तिथे त्याचे, लोक व देश असे दोन्ही अर्थ आहेत. छांदोग्य (५. ११. ५) व बृहदारण्यक (२. ९. १८) या उपनिषदांत मात्र जनपद याचा अर्थ देश असा आहे. 'जनपदो देशे' असे अमरकोशातही म्हटले आहे.

आर्य लोक भारतात आले तेव्हा त्यांचे अनेक संघ होते. त्यांतील प्रमुख पाच संघ पंचजन या नावाने ओळखले जात. ते सर्व संघ किंवा जन प्रारंभी भारताच्या भूमीवर स्थायिक स्वरूपात वसले नव्हते. त्यांचें जीवन बव्हंशी भटकेच होते.

कालांतराने त्यांनी निरनिराळ्या भूभागांत आपल्या वसाहती केल्या. ब्राह्मणयुगाच्या अखेरीस त्या वसाहतींना जनपदे म्हणू लागले. पाणिनीच्या काळापर्यंत या जनपदांचा संपूर्ण विकास झालेला दिसतो.

सबंध भारतवर्षात त्या काळी असंख्य जनपदे नांदत होती. त्यांची नामावली मत्स्य, मार्कंडेय, वामन, ब्रह्म, इ. पुराणांत दिलेली आहे. त्यांतील प्रमुख जनपदांची नावे अशी – मगध, पौरव, ऐक्ष्वाकू, पंचाल, काशी, हैहय, कलिंग, अश्मक, मैथिल, शूरसेन व वीतिहोत्र. महाभारताच्या भीष्मपर्वात तर २५० जनपदांची नावे दिलेली आहेत. त्यात जनपदांचे सात भौगोलिक विभाग केलेले आहेत, ते असे– मध्य, प्राच्य, उदीच्य, दक्षिणापथ, अपरांत, विंध्यपृष्ठ व पर्वत. विंध्यपृष्ठ विभागातले अवंती जनपद विशेष उल्लेखनीय होते. दक्षिणापथ विभागात अश्मक या एकाच जनपदाचे नाव आढळते. प्रतिष्ठान ही त्याची राजधानी होती. पर्वताश्रयी जनपदांचे दोन गट पडतात– कुलू-कांगडापासून गढवाल-कुमाऊँ पर्यंत पसरलेली जनपदे हा एक गट व भारताच्या वायव्य भागातील अभिसार, उरशा, दार्व, दरद, चित्रक, गंधार, कपिश, बाल्हीक, मुंजायन, कंबोज, लंपाक, इ. जनपदे हा दुसरा गट होय. पहाडी जनपदांपैकी बहुतेक जनपदे आयुधजीवी संघांची होती. म्हणजे ते संघ शस्त्रावर उपजीविका करणारे होते.

सनपूर्व १००० पासून सनपूर्व ५०० या कालखंडाला जनपदयुग म्हणतात. या समस्त जनपदांत सोळा महाजनपदे होती. त्यांचा उल्लेख बौद्ध साहित्यात जागोजागी येतो. अंगुत्तरनिकाय या ग्रंथात त्यांची नावे दिलेली आहेत, ती अशी– अंग, मगध, काशी, कोसल, वृजी, मल्ल, चेदी, वत्स, कुरू, पांचाल, मत्स्य, शूरसेन, अश्मक, अवंती, गंधार व कंबोज.

ही जनपदे म्हणजे केवळ भौगोलिक विभाग नव्हते; तर प्रत्येक जनपदातील लोकांचे सामाजिक, सांस्कृतिक व राजकीय जीवन वेगवेगळे विकास पावले होते. प्रत्येक जनपदाची भूमी तिथल्या रहिवाशांची खरीखुरी धात्री अर्थात माता होती. त्यांची भाषाही एकच असे. ते समान देवतांची उपासना करीत व त्यामुळे त्यांच्यांत भ्रातृभाव वसत असे.

ज्या जनसंघाने मूळ वसाहत स्थापली असेल, त्याची सत्ता त्या जनपदावर चाले. ते संघ मुख्यतः क्षत्रियांचे होते. पाणिनीने त्यांना जनपदिन् म्हटले आहे. त्यांच्या नावांवरूनच त्या त्या जनपदांना नावे मिळालेली असत. प्राचीन साहित्यात काही जनपदांचा उल्लेख जोडीने केलेला आढळतो. उदा० कुरु-पांचाल, काशी-कोसल, अंग-मगध, इत्यादी.

जनपदांचे दोन प्रकार होते. काही जनपदांवर राजांची सत्ता चाले, तर काही जनपदे ही गणराज्ये असत. पाणिनीच्या काळातली मगध, कलिंग, सूरमस, कोसल, कुरु, पांचाल, अश्मक, साल्वेय, गांधारी, साल्व, कंबोज, अवंती व कुंती ही जनपदे राजाधीन होती. बाकीची बहुतेक जनपदे गणाधीन होती. गणराज्यात शासनाचे विविध प्रकार चालू असत. जनपद राजाधीन वा गणाधीन कसेही असले; तरी त्याचा कारभार सभा व परिषद यांच्या मार्गदर्शनानुसारच चाले.

वैदिक युगानंतर या जनपदांच्या आधारानेच भारतीय संस्कृतीचा विकास झाला. परंतु कालांतराने ही सारी जनपदे दुर्बळ झाली आणि सनपूर्व ४ थ्या शतकात मगध साम्राज्यात विलीन झाली. मात्र पुढे अनेक शतके ती मांडलिक राज्ये म्हणून अस्तित्वात होती. गुप्तसाम्राज्यात अनेक जनपदे नांदत होती. काही जनपदांच्या गुप्तकालीन मुद्रा सापडल्या आहेत. **पाहा–** गणराज्ये. [पा. भा.; हि. क. इं. पी.; मध्यदेश]

जनप्पन

एक जात. हे लोक तमिळनाडमध्ये आढळतात जनप्पन ही पूर्वी बलिजांची एक शाखा होती; पण पुढे ती वेगळीच जात बनली. हे लोक आपल्या उत्पत्तीविषयी कथा सांगतात, ती अशी–

ब्रह्मदेव यज्ञ करीत असता त्यातून यांच्या मूळ पुरुषाची उत्पत्ती झाली. त्याला त्या देशाच्या व्यापाऱ्यांनी आपला माल भरण्यासाठी काही साधन शोधण्यास सांगितले. मग त्याने यज्ञाच्या राखेतूनच काही बी मिळवले आणि ते जमिनीत पेरले. त्यातून तागाची झाडे उगवली. त्याच्या दोरापासून त्याने गोणपाट बनविले आणि त्या व्यापाऱ्यांना दिले.

सांप्रतही हे लोक गोणपाटाची पोती तयार करतात. काही लोक फेरीवाल्याचाही व्यवसाय करतात. तमिळ व तेलुगू या दोन्ही भाषा हे बोलतात. यांची २४ गोत्रे आहेत. त्यांतील काही गोत्रनामे देवकांवरून मिळालेली आहेत.

विवाहप्रथा– वाङ्‌निश्चयाच्या दिवशी जमलेले सर्व लोक पालीचे चुकचुकणे ऐकू येण्याची वाट बघत बसतात. पाल चुकचुकली नाही, तर पुढे बोलणी करीत नाहीत. लग्न ठरविताना ९ ते १२ प्रकारच्या डाळी व धान्ये एका फडक्यात बांधतात. वराचा बाप ते गाठोडे वधूच्या बापाला देतो. लग्नानंतर काही दिवसांनी ते सोडून बघतात. त्यातील डाळी व धान्ये चांगल्या स्थितीत राहिली असल्यास झालेला लग्नसंबंध सुखाचा होईल, असे समजतात.

यांच्यांत शैव व वैष्णव या दोन्ही पंथांचे लोक आहेत. काही जण कामाच्छीचे उपासक आहेत. [का. ट्रा. स. इं.]

जनमारशांती गावात महामारीचा रोग उद्भवला आणि माणसे पटापट मरू लागली, तर ते अरिष्ट दूर होण्यासाठी जनमारशांती करावी, असे सांगितले आहे. रुद्र ही संहारक देवता असल्यामुळे तिच्या प्रसन्नतेसाठीच ही शांती करायची असते. या शांतीत प्रथम रुद्राची महापूजा करून रुद्रसूक्त, शतरुद्रीय, इ. सूक्तांचा पाठ करतात. मग अग्निस्थापना व ग्रहांची पूजा करतात. प्रधानहोमाच्या वेळी रुद्रासाठी पळसाच्या समिधा, क्षीरवृक्षाच्या समिधा, पायस, वेलाची पाने व तिळ या हविर्द्रव्यांच्या आहुती देतात. मग बलिदान करून सर्व लोकांना अभिषेक करतात. नंतर रुद्राची उत्तरपूजा करून, पुढील मंत्राने त्याची प्रार्थना करतात –

देवदेव महादेव महापापविनाशन ।
जनमारकृतां पीडां सद्यो नाशय शङ्कर ।।

मग ब्राह्मणभोजन झाल्यावर शांतीची सांगता करतात.
[श्री. विद्याधरशास्त्री भिडे]

जनस्थान दंडकारण्यातील गोदावरी व कृष्णा या नद्यांच्या मधला प्रदेश. राम वनवासात असता त्याचे वास्तव्य काही काल या प्रदेशातल्या पंचवटीत होते, म्हणून हा प्रदेश पवित्र मानला जातो. या प्रदेशाचे वर्णन रामायणात पुढीलप्रमाणे केले आहे –

सन्तीह गिरिदुर्गाणि निर्झराः कन्दराणि च ।
गुहाश्च विविधा घोरा नानामृगगणाकुलाः ।।
आवासाः किन्नराणां च गन्धर्वभवनानि च ।
(वा. रा. ३. ६७. ५-६)

अर्थ– या जनस्थानात डोंगरी किल्ले, निर्झर आणि दऱ्या आहेत. इथल्या गुहा भयानक असून, त्या नाना प्रकारच्या पशूंनी भरलेल्या आहेत. इथे किन्नरांची निवासस्थाने व गंधर्वांची भवने आहेत.

या भागात घनदाट अरण्य असल्यामुळे इथे राक्षसांनी वसती केलेली होती. खर, दूषण व त्रिशिरा या रावणाच्या सेनापतींनी जनस्थानातच आपल्या प्रचंड सैन्यासह तळ ठोकला होता. पाहा– पंचवटी, दंडकारण्य. [वा. रा. को.; हि. घ.]

जनाजा मुसलमान लोकांचा अंत्यविधी. जनाजा शब्दाचे तिरडी, प्रेत किंवा दफन असे निरनिराळे अर्थ आहेत. मुहंमद पैगंबराच्या वेळी दफनाची जी पद्धत रूढ होती, तीच आजही मुसलमानांत रूढ आहे. प्रेत नेताना मृताचे नातेवाईक व मित्रमंडळी शववाहिकेच्या मागून जातात. शववाहिकेला खांदा देणे, हे पवित्र कर्तव्य समजतात.

दफनसंस्काराचे मंत्र दफनभूमीवर न म्हणता मृताच्या घराजवळ, एखाद्या मशिदीत अथवा दफनभूमीच्या आसपासच्या मोकळ्या जागेत म्हणतात. प्रथम इमाम किंवा काजी परमेश्वराची स्तुती करून, त्याने मुहंमदाच्या वंशजांवर कृपा करावी, अशी प्रार्थना करतो. नंतर तो दुआ म्हणजे प्रार्थना म्हणतो. त्यात सर्वांच्या तर्फे क्षमायाचना असते व सर्वजण इस्लामनिष्ठ असोत, अशी इच्छा व्यक्त केलेली असते. शेवटी ‘जशी परमेश्वराची इच्छा’ असे म्हणून प्रेत दफनभूमीत नेतात. तिथे कब्र म्हणजे खड्डा खणून त्यात मृताला डोके उत्तरेकडे, पाय दक्षिणेकडे आणि मुख मक्केकडे करून उताणे निजवतात. नंतर त्यावर माती लोटतात.

इतके केल्यावर सर्वजण फातिहा म्हणतात व कबरीपासून चाळीस पावले दूर जातात. मग पुन्हा फातिहा म्हणतात. नंतर भिकाऱ्यांना आणि फकीरांना अन्नदान करतात.

मर्तिकविधीच्या काळांत नातेवाईक रंगीत किंवा भपकेबाज कपडे घालीत नाहीत. तिसऱ्या दिवशी मृताचे आप्त कब्रस्तानात जातात व तिथे कुराणातील निवडक भागाचे स्वतः पठण करतात किंवा मौलवीकडून करवितात. [डि. इ.]

ज़नाना मुसलमानांच्या घरातील स्त्रीविभाग. ज़न म्हणजे स्त्री. ती जिथे राहते त्या घराच्या अंतर्भागाला ज़नाना म्हणतात. कुटुंबातील बायकामुलांचाही समावेश त्यात होतो. खानदानी मुसलमानांच्या वाड्यातील मागच्या चौकाच्या तीन बाजू चिकाचे पडदे लावून बंद केलेल्या असतात. मागील भिंतींना दारे, खिडक्या नसतात. हा सर्व भाग खास स्त्रियांसाठी वेगळा ठेवलेला असतो. अगदी जवळच्या नातलग पुरुषांखेरीज इतरांना तिथे प्रवेश मिळत नाही. कारण त्या जागेत स्त्रिया बुरखा न घेता मोकळेपणाने वावरत असतात. सामान्य वर्गातील स्त्रियांना अशा बंदिस्त जागेत राहता येत नाही, म्हणून त्या पायघोळ बुरखा वापरतात. अशा स्त्रियांनाही जनाना म्हणतात. [डि. इ.; मु. इं.]

जनाबाई (इ. स. १२६०–१३५३) एक संत कवयित्री. गोदावरी नदीच्या तीरावर गंगाखेड (जिल्हा परभणी) या गावी दमा या नावाचा एक भक्त राहत होता. त्याच्या पत्नीचे नाव कुरुंड असे होते. दमा हा पंढरीचा वारकरी होता. या जोडप्याला अपत्य नसल्यामुळे ते दुःखी होते. पुढे पुत्रप्राप्तीसाठी या उभयतांनी पांडुरंगाची आराधना केली. पांडुरंगाने स्वप्नात येऊन दमाला सांगितले, की ‘तुला एक कन्या होईल. ती पाच वर्षांची होताच तिला तू पंढरीत राहणाऱ्या

दामाजी शिप्याच्या स्वाधीन कर. ' पांडुरंगाच्या आशीर्वादाने झालेल्या आपल्या मुलीला दमाने देवाच्या आदेशाप्रमाणे दामाजीच्याघरी पोचते केले. तिथे ती नामदेवाच्या संगतीत लहानाची मोठी झाली.

एकदा पंढरपूरला गेले असता जनीचे आई-वडील एकाएकी मरण पावले आणि पांडुरंगाच्या मंदिरात अनाथ होऊन पडलेल्या यादुर्दैवी मुलीला दामाजी शिपी आपल्या घरी घेऊन गेला, अशीही दुसरी आख्यायिका आहे.

एकदा पंढरपुरी रात्रीच्या वेळी मोठे वादळ झाले. त्या वादळात नामदेवाचे चंद्रमौळी घर उद्ध्वस्त झाले. पण पांडुरंगाने स्वतः येऊन ते पुनश्च पूर्ववत बांधून दिले. देवाला या कामी फार श्रम झाले म्हणून जनाबाई त्याची पाठ रगडीत बसली. त्या तिच्या भोळ्याभाबड्या सेवेने पांडुरंग तिच्यावर खूष झाला आणि तिच्या कामात तिला मदत करू लागला.

नामदेवाच्या शतकोटी अभंगांत जनाबाईचे साडेबारा कोटी अभंग होते, अशी एक आख्यायिका आहे. परंतु हल्ली तिचे जे अभंग उपलब्ध आहेत, त्यांची संख्या तीनशेहून अधिक भरत नाही. या तीनशे अभंगांतही काही अभंग प्रक्षिप्तच आहेत. खुद्द जनाबाईचे जे अभंग आहेत, त्यातील काही असे –

पक्षी जाय दिगंतरा । बाळकासी आणी चारा
घार हिंडते आकाशी । झाप घाली पिलापाशी
माता गुंतली कामासी । चित्त तिचे बाळापाशी
वानर हिंडे झाडावरी । पिले बांधुनी उदरी
तैसी आम्हा विठ्ठलमाये । जनी वेळोवेळा पाहे ।।
अरे विठ्या विठ्या । मूळ मायेच्या कारट्या
तुझी रांड रंडकी झाली । जन्मसावित्री चुडा ल्याली
अरे तुझे गेले मढे । तुला पाहून काळ रडे
उभी राहूनी अंगणी । शिव्या देते दासी जनी ।।

कविभूमिकेची जाणीव ठेवून जनाबाईने हे अभंग रचले नाहीत; तर तिचे अंतःकरण भावनांनी भरून आले व तेच काव्यरूप घेऊन बाहेर पडले. मातापित्याचे छत्र फाटल्यामुळे आलेल्या पोरकेपणाची तीव्र जाणीव, नामदेवाविषयीचा आदरभाव, दासी म्हणून सोसाव्या लागणाऱ्या कष्टांचा परिहार करण्यासाठी दयाघन विठ्ठलाला आवाहन, ज्ञानेश्वरांच्या विभूतिमत्त्वाची पूजा, चोखामेळ्याविषयीची भक्ती, इ. तिच्या हृदयाचे भाव तिच्या अभंगांतून व्यक्त झाले आहेत. जनीचे जीवन नामदेवाच्या जीवनात मिसळून गेले असले, तरी तिचे स्वतःचे असे व्यक्तिमत्त्व तिच्या अभंगांतून प्रतीत झाल्याविना राहत नाही. तिच्या अभंगांची भाषा अगदी सोपी आहे. [म. सा.; प्रा. म. सं.; नामयाची जनी – रा. चिं. ढेरे]

जनार्दन

श्रीविष्णूचे एक नाव. यानेच हयग्रीवाचे रूप घेतले. श्रीविष्णू कांची येथे अगस्त्यापुढे जनार्दन या रूपानेच प्रगट झाला. गयेमध्ये जनार्दन हा पितरांच्या रूपाने असतो. तिथे त्याच्या हाती जिवंत माणसासाठी पिंड दिला जातो. गयेत श्राद्ध केल्यावर त्याची पुढील मंत्राने प्रार्थना करतात–

नमस्ते पुण्डरीकाक्ष ऋणत्रयविमोचन ।
लक्ष्मीकान्त नमस्तेऽस्तु पितृमोक्षप्रदो भव ।।

अर्थ– हे पुण्डरीकाक्षा, तुला नमन असो. ऋणत्रयातून मुक्ती देणाऱ्या, हे लक्ष्मीकांता, तुला नमस्कार असो. तू माझ्या पितरांना मोक्ष देणारा हो.

सत्त्व, रज, व तम या त्रिगुणांमुळे जनार्दन हाच ब्रह्मा, विष्णू व शिव होतो. विष्णू पुराणात जनार्दनाचे अवतार व त्याची रूपे वर्णन केली आहेत. [पु. इं.]

जनार्दनपूजा

मार्ग० शु. द्वादशीला पंचगव्याने स्नान करून व पंचगव्य प्राशन करून श्रीविष्णूची जनार्दन या नावाने पूजा करावी आणि ब्राह्मणाला तांदूळ भरलेले पात्र दान द्यावे, असे सांगितले आहे. फल– कोणतेही व्रत खंडित झाल्यास ते अखंडित होणे. [व्र. प.]

जनार्दनस्वामी

(इ. स. १५०४–१५७५) एक मराठी संतकवी. जनार्दनस्वामी हे ऋग्वेदी देशस्थ ब्राह्मण असून, चाळीसगावचे राहणारे होते. त्यांना निजामशाहीत चाकरी होती. दौलताबाद येथील किल्ल्यावर ते अधिकारी होते. मुसलमानांच्या सेवेत जीवन कंठीत असतानाही त्यांनी आपली स्वधर्मनिष्ठा कधी ढळू दिली नाही. एकनाथचरित्रकार केशव त्यांच्या दिनचर्येबद्दल लिहितो–

जनार्दनाचा नित्यनेम । स्नानसंध्या अति उत्तम ।
तयावरी आवडी परम । निजधर्म आचार ।।
सिद्धराज श्रीज्ञानदेव । ज्ञानेश्वरी अमृतानुभव ।
स्वानुभवे वदला अपूर्व । जनार्दना भाव त्या ग्रंथी ।।

जनार्दनस्वामींच्या साधुत्वाचा प्रभाव हिंदूंप्रमाणेच मुसलमानांवरही पडलेला दिसतो. ते दत्तभक्त असल्यामुळे व गुरुवार हा दत्ताचा वार असल्यामुळे गडावरील कामाला दर गुरुवारी सुट्टी असे. दौलताबादवरील त्यांच्या वास्तव्यामुळे त्या किल्ल्यालाच तीर्थाचा महिमा प्राप्त झाला होता.

आजवर अशी समजूत होती, की जनार्दनस्वामींचे गुरू म्हणजे साक्षात श्रीदत्तात्रेय किंवा श्रीनरसिंह सरस्वती हे होत. परंतु संशोधनांती ही कल्पना चुकीची ठरली आहे. श्रीनरसिंह व

जनार्दनस्वामी यांचा काळ जुळत नाही. ज्या अभंगावरून त्यांचे गुरुपद नरसिंह सरस्वतींकडे असल्याचे कळते, ते अभंगही या जनार्दनस्वामींचे नसून अन्य कोण्या जनार्दनाचे आहेत. आपल्या योगसंग्राम नामक ग्रंथात आपली गुरुपरंपरा देताना शेख महंमद श्रीगोंदेकर याने चांद बोधले हे जनार्दनस्वामींचे गुरू असल्याचे सांगितले आहे.

मुकुंदराज नामक एका एकनाथशिष्याने देखील याच मताला पुष्टी दिली आहे. पुण्याच्या गंगानाथ मठाच्या परंपरेतही जनार्दनांच्या गुरूचे नाव चांद बोधले असेच आहे.

चांद बोधले हे जनार्दन स्वामींचे गुरू असले, तरी जनार्दनस्वामींना अकर्तात्मबोधाचे रहस्य प्राप्त झाले ते मात्र साक्षात श्रीदत्तात्रेयाकडूनच. या प्रसंगाची हकीकत एकनाथांनी आपल्या भागवत पुराणाच्या एकादशस्कंधटीकेत (४३१-४३८) दिली आहे. गृहस्थाश्रम न सांडता व कर्ममर्यादा न उल्लंघिता देहीच विदेहता प्राप्त करून घेणे आणि वाट्याला आलेले प्रपंच-व्यवसाय करीत असताना कर्तृत्वाच्या अहंकाराचा वारा अंगी लागू न देणे याला अकर्तात्मबोध असे म्हणतात.

जनार्दनस्वामींचे काही स्फुट अभंग उपलब्ध आहेत. याशिवाय आत्मानात्मविवेकसार या नावाचा एक ओवीबद्ध ग्रंथ त्यांच्या नावावर असून त्यात पंचीकरणाचा प्रपंच केलेला आहे. त्यात वरीचशी संस्कृत व काही मराठी वचने आधाराला घेतलेली आहेत. सदर ग्रंथात विषयस्पष्टीकरणासाठी वरीच कोष्टकेही दिलेली आहेत. गुरु-शिष्य-संवादाच्या रूपाने समग्र ग्रंथ लिहिला आहे. प्रस्तुत ग्रंथाचा उपसंहार करताना जनार्दनस्वामी म्हणतात—

ऐसे पंचीकृत महाभूतांचे । पिंड ब्रह्मांड हे रचे ।
देहचतुष्टय ऐसे । त्याचें नामकरण ।।
म्हणोनी ब्रह्मांड हे कारण । पिंड ते कार्य जाण ।
कार्य कारणाशीं अभिन्नपण । नित्य सिद्ध ।।
याचा उपक्रम उपसंहारु । गुरुमुखे जाणिजे विवरु ।
बोधलिया स्वनिर्धारु । सच्चिदानंद ।।
ऐसे हे पंचीकरण । महावाक्यविवरण ।
कळलिया संन्यासग्रहण । सहजाचे असे ।।
हा उकलु तैंचि सुगमू । जें जोडे आत्मारामु ।
पूर्णानंद घनश्यामु । सोऽहं सिद्ध ।।
जनार्दन विनवी भावे । हे भक्तिपूर्वक पहावें ।
पाहतां देहींचा जीवें । ब्रह्म होणे ।।
हे वेदांत सारासार । आत्मज्ञानविचार ।
जनार्दना श्रीगुरुदातार । कृपा देती ।।

जनार्दनस्वामींनी आपल्या गुरूजवळ अनेक आशंका उपस्थित केल्या असून, गुरुमुखाने त्यांचा उलगडाही करून घेतला आहे.

जनार्दनस्वामींनी किल्ल्यावरच देह ठेवला असावा. कारण त्यांची समाधी तिथेच आहे. याशिवाय नगर जिल्ह्यातील कासार खरवंडी इथेही त्यांची एक समाधी दाखवतात. [न. च. प.; म. वा. इ.; म. सा.; प्रा. म. सं.]

जनी जनार्दन (इ. स. चे १६ वे शतक) एकनाथ पंचकातील एक संतकवी. हा वसिष्ठगोत्री देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण होता. याच्या वडिलांचे नाव वसुदेव व आईचे नाव देवकी. याच्या आईचे माहेरचे नाव जनी असे होते. हा मातृभक्त असल्यामुळे याला जनी जनार्दन हे नाव मिळाले, असे सांगतात. गोसावी ही याला मिळालेली उपाधी होय. विजापूर येथे गुणवती नामक मुलीशी याचा विवाह झाला. माहूरची रेणुका ही याची कुलदेवता. हा विजापूरला पातशाही नोकरीत होता.

एकदा विजापूरला दुष्काळ पडला असता जनार्दनपंताने गरिबांकडून सरकारी कोठारे लुटवली. अर्थात या बेकायदेशीर वर्तनाचा पातशहाला राग येऊन त्याने जनी जनार्दनाला हत्तीच्या पायी देण्याची सजा फर्मावली. परंतु त्या मस्तवाल पशूने जनार्दनपंताला स्पर्शही केला नाही. हा चमत्कार पाहून पातशहा लज्जित झाला व त्याने त्याला पुन्हा पूर्वाधिकार स्वीकारण्यास विनवले. पण जनार्दनपंताने पातशहाची विनंती नाकारली व वैराग्य स्वीकारून पंढरीची वाट धरली. जाताना त्याने घोषणा केली, की 'यापुढे माझ्या वंशात जो कोणी यवनांची सेवा करील, तो कुलबाह्य समजला जाईल !' पंढरीस गेल्यावर त्याने दीर्घकाळ गणेशाची आराधना केली. नंतर त्याने काशीला जाऊन संन्यास स्वीकारला व पुढे महाराष्ट्रात येऊन वीड येथे वास्तव्य केले. शेवटी जनार्दनपंताने उस्मानाबाद जिल्ह्यातील भूम इथे म्हणजे आपल्या आजोळच्या गावी जाऊन समाधी घेतली. ही त्याची मुख्य समाधी होय. शिवाय बीड येथेही त्याच्या वंशजांनी त्याच्या छाटीवर एक प्रतीकसमाधी बांधली आहे.

जनी जनार्दन हा देवगिरीच्या जनार्दनस्वामींचा शि होता अशी आजवरची समजूत होती; परंतु ते खरे नाही जनार्दनपंत हा नाथसंप्रदायी असून, त्याची परंपरा— आदि — कंथडीनाथ— धुंडिराज— जनार्दन अशी आहे.

निर्विकल्प, चौरिकलीला आणि जानकीस्वयंवर हे ग्रं आणि अनेक हिंदी व मराठी पदे एवढी जनी जनार्दनाची रच आज उपलब्ध आहे. महावाक्यविवरण या नावाचा एक ग्रं

त्याने लिहिल्याचे सांगतात; पण सदर ग्रंथ आज उपलब्ध नाही. निर्विकल्पग्रंथाची ओवीसंख्या ७१६ इतकी आहे. या ग्रंथात श्रीकृष्णाने उद्धवाला बोध केलेला असल्याने उद्धवबोध असेही या ग्रंथाचे पर्यायी नाम आहे. पण या ग्रंथाचा आधार भागवत नसून गीता आहे, असे ग्रंथकाराने म्हटले आहे—

हा निर्विकल्पग्रंथ । असे गीतेचा मतितार्थ ।
जनी जनार्दन एकनाथ । बोलिले असे ।।

याचे चौरिकलीला हे काव्य श्रीकृष्णाच्या बाललीला वर्णन करणारे असून, जानकीसैंवर हे एक प्रदीर्घ कथाकाव्य आहे. या काव्याची ओवीसंख्या ३८४० इतकी आहे. प्रभू रामचंद्र हा सगुण साकार परमात्मा असून, सीता ही त्याची चिच्छक्ती आहे, अशी या काव्याची बैठक आहे. याच्या स्फुटरचनेपैकी रामप्रार्थनेचे एक पद असे —

दयानिधि हे करुणालय राम ।। धृ ।।
पतितपावन दीनजनावन गौतमपूरितकाम ।। १ ।।
करिवरतारण नक्रविदारण मुनिजनमनविश्राम ।। २ ।।
भवभयशोषण मुनिवरतोषण सुखदायक तव नाम ।।३।।
जनी जनार्दन सदय दयाघन प्रापयशो निजधाम ।।४।।

याच्या पद्यांची भाषा अत्यंत सहजसुंदर व भक्तिरसाने ओथंबलेली आहे. त्यांत प्रसादाप्रमाणे कल्पनाविलासही आढळतो. [म. सा.; रा. चिं. ढेरे— प्रसाद, फेब्रु. मार्च, १९६५]

जनीबाई (इ. स. चे १७ वे शतक) एक संत कवयित्री. गुजरातेतील शाक्त पंथाचा आचार्य मिठू महाराज याची ही शिष्या होय. हिने नवनायिकादर्शन आणि नाथजीप्राक्त्य नामक दोन काव्ये लिहिली आहेत. नाथजीप्राक्त्यात तिने आपल्या गुरूची जीवनकथा वर्णिली आहे. शाक्तांचे तत्त्वज्ञान तिने पचनी पाडले होते, असे तिच्या काव्यावरून दिसते. [ग्रे. वि. इं.]

जन्न (इ. स. चे १२ वे शतक) एक कन्नड कवी. हळेबीडू गावाजवळील द्वारसमुद्रम् या गावी याचा जन्म झाला. हा कम्मेवंशातील होता. याच्या पित्याचे नाव शंकर व आईचे गंगा असे होते. लकुमादेवी ही याची पत्नी होय. हा जैन होता. आपल्या पित्याकडेच हा विद्या शिकला. नागवर्मा हा याचा मोक्षगुरू होता. याला वीरबल्लाळ नामक होयसळ राजाचा आश्रय होता. तिथे असतानाच याने यशोधरचरिते, अनंतनाथपुराण, इ. ग्रंथ लिहिले. अनुभवमुकुर नावाचा कामशास्त्रावरील एक ग्रंथही याने लिहिला आहे. याला कविचक्रवर्ती अशी उपाधी होती. हा जसा कवी होता, तसाच योद्धाही होता.

यशोधरचरिते हे काव्य यशोधरेच्या जीवनावर असून, अहिंसा धर्माच्या प्रचारासाठी लिहिलेले आहे. याच्या समग्र काव्यात शृंगाररसाला प्राधान्य मिळालेले आहे. याची रचना चमत्कृतिपूर्ण आहे. [जै. सि. भा., डिसें. १९५४; म. च. को.]

जन्मतिथिकृत्य प्रतिवर्षी जन्ममासातल्या जन्मतिथीला पुढील धार्मिक कृत्ये करण्यास सांगितले आहे— गुरु, देवता, अग्नी, ब्राह्मण, माता–पिता, प्रजापती, जन्मनक्षत्र व त्याची देवता यांची पूजा करावी. त्याचबरोबर सप्त चिरंजीवांचे (अश्वत्थामा, बली, इ.) स्मरण करून मार्कंडेयाची पुढील मंत्राने प्रार्थना करावी—

मार्कण्डेय महाभाग सप्तकल्पान्तजीवन ।
चिरंजीवी यथा त्वं भो भविष्यामि तथा मुने ।।

अर्थ— हे मार्कंडेयमुने, तू सप्तकल्पांतापर्यंत जगणारा आहेस. तेव्हा तू जसा चिरंजीव, तसाच मीही (तुझ्या कृपेने) चिरंजीव होईन.

सदर दिवशी इष्टमित्रांसह मिष्टान्नभोजन करावे, तिलमिश्रित पाणी प्यावे व वाडवडिलांचा आशीर्वाद घ्यावा, असे सांगितले आहे. यालाच वाढदिवस असेही म्हणतात.

वाढदिवसाचा लोकाचार असा— एक वर्ष होईपर्यंत दर महिन्याच्या जन्मतिथीला मुलाचा वाढदिवस करतात. पुढे तो दर वर्षी जन्ममासात जन्मतिथीच्या दिवशी करतात. त्या दिवशी मुलाला मंगलस्नान घालून त्याच्या कपाळी कुंकू लावतात. घरातल्या घुसळखांबाभोवती रांगोळी काढतात. त्याच्यापुढे पेरांच्या दूर्वा व कापूस ठेवतात. मग मुलाला त्या दूर्वा-कापसांवर डोके टेकायला लावतात. नंतर आई लामणदिवा ओवाळून त्याचे औक्षण करते. मुलगा घरातल्या वृद्ध मंडळींना नमस्कार करतो.

दूर्वा व कापूस ठेवण्यात, दूर्वांप्रमाणे मुलाचा वंश वाढो व मुलगा कापसासारखा वृद्ध होवो, हा हेतू असतो. घुसळखांब हा आरोग्याचे व समृद्धीचे प्रतीक म्हणून योजलेला असतो. [हिं. ध.; ध. सिं.]

जन्मपत्रिका मूल जन्माला आल्यानंतर त्याच्या जन्मकाली असलेले तिथिनक्षत्रादी योग, त्यांची घटीपळे, तत्कालीन लग्न आणि ग्रहस्थिती या गोष्टींचे जे पद्धतशीर लेखन करून ठेवतात, त्याला जन्मपत्रिका असे म्हणतात. भविष्यज्ञान, जीवनातील अनुकूल-प्रतिकूल कालाचे ज्ञान, ग्रहांचे गोचर भ्रमण, शुभाशुभ योग, विवाहप्रसंगी वधू-वरांचे गुणमेलन, ग्रहबाधानिवारणार्थ उपायज्ञान, इ. कामांसाठी जन्मपत्रिकेचा उपयोग होतो. जन्मपत्रिका हा व्यक्तीच्या जीवनाचा आरसाच होय-

जन्मपत्रिकेच्या प्रारंभी प्रथम श्रीकार, मंगल श्लोक, ग्रह-प्रार्थना, इ. लिहून मग त्या दिवसाचे पंचांग लिहितात. नंतर जन्मकालची घटिका-पळे, जन्मलेल्या अपत्याच्या माता-पित्यांचे नाम-गोत्र, अवकहडाचक्र व घातचक्र यांच्या आधारे जन्म-नक्षत्र, त्याचा चरण, योनी, गण, नाडी, वर्ण, राशी व राशिस्वामी, तसेच घाततिथी, घातवार, इ. गोष्टी लिहितात. त्याखाली डाव्या हाताला राशिकुंडली व उजव्या हाताला लग्नकुंडली एका रेषेत लिहितात. राशिकुंडलीत जन्मलेल्या व्यक्तीच्या राशीचा आकडा मेषादी क्रमाने जो असेल, तो शीर्षस्थानी लिहितात. लग्नकुंडलीत तत्कालीन लग्नाचा आकडा शीर्षस्थानी लिहितात. मग तत्कालीन ग्रह त्या त्या राशीत मांडतात. एवढे झाल्यावर 'शुभं भवतु' असा आशीर्वाद लिहून जन्मपत्रिका समाप्त करतात.

हे झाले जन्मवेळेचे सामान्य टिपण. पण जन्मपत्रिका याहून मोठी करायची असल्यास मग लग्नकुंडलीच्या खाली स्पष्ट ग्रह करून मांडतात. त्यावरून जन्मकाली कोणता ग्रह, कोणत्या राशीत, किती अंश कला व विकला मुक्त झाला आहे, ते कळते.

त्यानंतर जन्मलग्नाच्या नवांश, द्वादशांश, त्रिंशांश अशा अंशात्मक कुंडल्या तयार करून मांडतात. भविष्य सूक्ष्मपणे वर्तविण्यास अशा कुंडल्या उपयुक्त ठरतात.



जन्म पत्रिका

॥ श्रीगणेशायनमः ॥ श्रीकुलदेवतायै नमः ॥ स जयति. ॥

आदित्याद्या ग्रहाः सर्वे सनक्षत्राः सराशयः । शुभं कुर्वन्तु ते सर्वे यस्यैषा जन्मपत्रिका ॥

स्वस्ति श्रीमन्नृपशालिवाहन शके नाम संवत्सरे ॥ अयने ॥

ऋतौ ॥ मासे ॥ पक्षे ॥ तिथौ ॥ वासरे घ. प. ॥

नक्षत्रे घ. प. योगे घ. प. ॥ ता. करणे एवं

पंचांगशुद्धौ अस्मिन् शुभदिने सूर्योदयात् गत घ. प. ॥ तत्समये लग्ने ॥

ग. ग. गृहे तेषां भार्या सौभाग्यवती

नाम्नी गृहे पुत्रं प्रासूत ॥ असौ बालः देवद्विजप्रसादाद्दीर्घायुर्भूयात् ॥

अस्य राशिः ॥ राशिस्वामी ॥ वर्णः ॥ योनिः ॥

गणः ॥ नाडी ॥ नाक्षत्रं नाम ॥ घात –

तिथिः ॥ घातवारः ॥ दिनमानं घ. प. ॥ घातर्क्षम् घ. प.

रवि उदयः स्टँ. क. मि. ॥

राशिकुंडली जन्मलग्नकुंडली

न मया स्थापितं यन्त्रं न मया स्थापिता घटी ।

परोपविष्टवेलाया लिखिता जन्मपत्रिका ॥

॥ शुभं भवतु ॥

त्यानंतर विंशोत्तरी मानाने महादशा व अंतर्दशा यांची कोष्टके तयार करून लिहितात. त्यावरून सदर जन्मपत्रिका धारण करणाऱ्या व्यक्तीला कोणत्या वर्षी व कोणत्या दिवशी कोणत्या ग्रहाची महादशा लागते व संपते, ते समजते व तो ग्रह कुंडलीत ज्या मानाने कमी अधिक बलवान असेल त्या मानाने त्या व्यक्तीचे भविष्य ज्योतिष्याला वर्तविता येते.

मुलाची जन्मपत्रिका तयार करून घेण्याची चाल भारतात सर्वत्र आहे. मूल जन्मल्यापासून एक महिन्याच्या आत त्याची जन्मपत्रिका करू नये असा संकेत आहे.

जन्माष्टमी व्रत

कृष्णजयंती पाहा.

जप विधानयुक्त असे मंत्राचे पुन्हा पुन्हा उच्चारण म्हणजे जप होय. याच्या व्याख्या अशा–

'जिह्वौष्ठादिव्यापाररहितं शब्दार्थयोश्चिन्तनं हृदुच्चारः'=जीभ, ओठ, इत्यादींच्या हालचालींनी रहित असे शब्द व अर्थ यांचे चिंतन अर्थात हृदयाच्या ठिकाणी उच्चार म्हणजे जप होय (दुर्गादास). मंत्र इत्यादीची तदर्थभावनापूर्वक निष्ठेने पुन्हा पुन्हा आवृत्ती करणे याला जप म्हणतात (गी. श. को.).

जप हें एक अनुष्ठान आहे. त्याच्या मागे शास्त्राचे विधि-निषेध व होमहवनादी विधाने आहेत. नामस्मरण आणि जप यांच्या तंत्रात फरक आहे. नामस्मरणाचा हिशेब ठेवावय

नसतो; पण जपाचा हिशेब ठेवावा लागतो. जप हे संकल्पपूर्वक व संख्यायुक्त असे एक अनुष्ठान असते. जप सुरू झाला, की इष्टजपसंख्या पुरी करण्यासाठी जपकर्त्याच्या मनाचा ध्यास वाढत जातो व त्यामुळे योगप्रक्रियेतल्या शुभेच्छा, विचारणा, तनुमानसा, सत्त्वापत्ती व असंसक्ती या ज्ञानाच्या पाच भूमिका तो हळूहळू चढून जातो. म्हणूनच 'यज्ञानां जपयज्ञोऽस्मि'= सर्व यज्ञांतला मी जपयज्ञ आहे, असे भगवंताने सांगितले आहे (गीता १०. २५). जपयज्ञाला सात्त्विक व अहिंसक यज्ञ मानले आहे. म्हणूनच कर्मकांडातील विधियज्ञांपेक्षा जपयज्ञ श्रेष्ठ मानून मनू पुढे म्हणतो –

ये पाकयज्ञाश्चत्वारो विधियज्ञसमन्विताः ।
सर्वे ते जपयज्ञस्य कलां नार्हन्ति षोडशीम् ॥

(मनु. २.८६)

अर्थ– (वैश्वदेव, बलिकर्म, नित्यश्राद्ध व अतिथिभोजन या) चार विधियज्ञयुक्त पाकयज्ञांना जपयज्ञाच्या सोळाव्या कलेचीही योग्यता नाही.

जपाचे वाचिक, उपांशू व मानस असे तीन प्रकार असून, ते एकापेक्षा एक श्रेष्ठ मानलेले आहेत.

(१) वाचिक– मंत्राचा मोठ्याने उच्चार करून जप करणे.

(२) उपांशू– मंत्रदेवतेच्या ठिकाणी मन ठेवून जीभ आणि ओठ यांची किंचित हालचाल करून पुटपुटत मंत्र जपणे.

(३) मानस– मंत्राच्या अर्थाशी अनुसंधान ठेवून मनातल्या मनात त्याचा जप करणे.

जप हा मोजलाच पाहिजे. न मोजल्यास त्याचे फल मिळत नाही. ही जपाची मोजणी मणिमाला, वर्णमाला किंवा करमाला यांनी करायची असते.

घरात, नदीतीरी, गोठ्यात, अग्निशाळेत, तीर्थक्षेत्री आणि उपास्यदेवतेच्या मूर्तीसमोर बसून जप करतात. जप करताना बोलायचे नसते. ब्रह्मचारी किंवा आहिताग्नी गृहस्थ यांनी कमीत कमी १०८ वेळा मंत्र जपावा आणि वानप्रस्थी व यती यांनी हजारापेक्षा अधिक वेळा मंत्र जपावा, असे सांगितले आहे. जपानुष्ठान चालू असता दुग्ध, शाक किंवा फल यांचा आहार करावा, असे गौतमधर्मसूत्र सांगते (१९.१३). अजाणता केलेल्या पापाचे क्षालन जपाने होऊ शकते; पण जाणूनबुजून केलेल्या पापांचे मात्र होत नाही, असे मनू सांगतो (११.४६).

ॐ या एका अक्षरापासून तो सहस्रनामे, रामरक्षादी स्तोत्रे, शतरुद्रीय, गायत्रीमंत्र, वैदिक सूक्ते, इ. अनेक प्रकारचे जप शास्त्रात सांगितले आहेत. प्राणोपासकासाठी बृहदारण्यकात 'असतो मा सद्गमय,' इ. जपाचे विधान सांगितले आहे (१.३.२०). तर्पणापूर्वी किंवा प्रातर्होमानंतर जप करावा, असे गोभिल सांगतो. विष्णुधर्मसूत्रात (६४.३६.३९) याविषयी असे सांगितले आहे–

स्नातश्च पवित्राणि यथाशक्ति जपेत् ।
विशेषतस्तु सावित्रीमवश्यं जपेत् पुरुषसूक्तं च,
नैताभ्यामधिकमस्ति ।

अर्थ– स्नान झाल्यावर यथाशक्ति पवित्र मंत्र जपावे. विशेषतः गायत्रीमंत्र व पुरुषसूक्त यांचा अवश्य जप करावा. कारण यांच्यापेक्षा श्रेष्ठ दुसरे काही नाही.

'ॐ नमो विष्णवे' हा षडक्षरी, 'ॐ नमो वासुदेवाय' हा अष्टाक्षरी व 'ॐ नमो भगवते वासुदेवाय' हा द्वादशाक्षरी मंत्र १००८ किंवा १०८ वेळा जपावा, असे वृद्धहारीत सांगतो.

महाभारताच्या शांतिपर्वातही जपाविषयी विवेचन आहे (अ. १९७). त्यावरून जप हे महाफल देणारे, पण ज्ञानमार्गाहून कमी योग्यतेचे असे साधन असल्याचे व्यासांचे मत दिसते. कोणत्याही फलाची इच्छा न धरता जप करणे श्रेष्ठ, असे त्या ठिकाणी म्हटले आहे. कामनेने जप करणारे ती ती कामना पूर्ण करून घेतात किंवा त्या त्या देवतेच्या लोकाला जातात; पण फलाची इच्छा न धरता जप करणारे सर्वश्रेष्ठ अशा ब्रह्मलोकाला जातात, असे महाभारतकारांचे सांगणे आहे.

तंत्रसारात जपी द्विजाचे वर्णन पुढीलप्रमाणे केले आहे –

जपनिष्ठो द्विजश्रेष्ठोऽखिलयज्ञफलं लभेत् ।
सर्वेषामेव यज्ञानां जायतेऽसौ महाफलः ॥
जपेन देवता नित्यं स्तूयमाना प्रसीदति ।
प्रसन्ना विपुलान् कामान् दद्यान्मुक्तिं च शाश्वतीम् ॥
यक्षरक्षःपिशाचाश्च ग्रहाः सर्पाश्च भीषणाः ।
जपिनं नोपसर्पन्ति भयभीताः समन्ततः ॥

अर्थ– जपनिष्ठ द्विजश्रेष्ठाला अखिल यज्ञांचे फल लाभते. सर्व यज्ञांमध्ये जपयज्ञ हा महाफल देणारा आहे. जपाने स्तविलेली देवता नित्य प्रसन्न होते. प्रसन्न झाल्यावर विपुल कामोपभोग आणि शाश्वत असा मोक्ष देते. भयानक असे यक्ष, राक्षस, पिशाच, ग्रह आणि सर्प हे जपी पुरुषाला पाहून भयभीत होतात. ते त्याच्या जवळपाससुद्धा फिरकत नाहीत.

डॉ. गोपीनाथ कविराज यांनी आपल्या पूजातत्त्व या ग्रंथात जपाचे आध्यात्मिक रहस्य पुढीलप्रमाणे सांगितले आहे –

जप हे असे एक साधन आहे, की जगातल्या सर्व संप्रदायांनी त्याचा आदर केलेला आहे. अनेक ज्ञानी साधकांनी आजवर जपाच्या द्वारे अध्यात्मसाधनेत विशेष उन्नती प्राप्त करून घेतली आहे. ज्याचा जप करायचा, त्याला मंत्र म्हणतात. मंत्र हा मननाच्या द्वारे साधकाचा उद्धार करतो. केवळ यंत्राप्रमाणे मंत्राचे प्राणहीन उच्चारण करणे, म्हणजे जप नव्हे. मंत्रोच्चार

असा व्हावा, की ज्याच्या योगाने जपकर्ता भगवद्भावयुक्त आणि भगवच्छक्तियुक्त झाला पाहिजे. पतंजलीने अशा जपाला मंत्राची भावना असे म्हटले आहे. एखाद्या द्रव्याला एखाद्या रसात वारंवार बुडवणे म्हणजे त्या द्रव्याला त्या रसाची भावना देणे, असे म्हणतात. त्याचप्रमाणे मंत्रार्थाच्या अखंड भावनेने जपकर्ता हळूहळू मंत्रमय होत गेला पाहिजे, हाच जपाचा मुख्य उद्देश आहे.

वाचिक, उपांशू व मानसिक असा त्रिविध जप सांगितला आहे. वाचिकाचा अर्थ आहे केवळ मुखाने उच्चारण. या जपाचा वायूशी संबंध असतो. या जपामुळे श्वास-निःश्वास स्वाभाविक रूपाने चालू लागतात. यात मंत्राचे उच्चारण बाह्य वायूच्या साहाय्याने होत असते. या जपात शब्द व अर्थ यांच्यामध्ये वेगळेपण राहते. उपांशू जपात श्वास हा बहुतांशी क्षीण होतो व जपकर्त्याचा बाह्य वायूशी संबंध बहुतांशी तुटतो. वाचिक जप वैखरीने होत असतो, तर उपांशू जपात मध्यमा वाणीची क्रिया लक्षित होते. मानस जपात बाह्य वायूशी बिलकुल संबंध राहत नाही. हा जप आतल्या आत होत राहतो. मग शब्द व अर्थ यांची संलग्नता अनुभवाला येऊ लागते आणि ज्योतीचे दर्शनही घडते. असा हा जप मध्यमा वाणीचा त्याग करून जेव्हा पश्यंती वाणीत प्रवेश करतो, तेव्हा शब्द आणि अर्थ एका सत्तेत परिणत होतात. मग चैतन्याचे स्फुरण अर्थात आत्मसाक्षात्कार व्हायला उशीर लागत नाही. असा आत्मसाक्षात्कार झाला, की त्याच क्षणी साधकाच्या जपाची आणि जीवनाचीही कृतार्थता होते. पाहा – मंत्र. [पूजातत्त्व; शिवलिंगोपासना; म. भा. उ.; हि. ध.; श. क.]

जपजी ही गुरू नानकाची प्रौढ व सुविख्यात अशी रचना आहे. तिला एखाद्या उपनिषदाची योग्यता आहे. नानकाच्या इतर रचना रागयुक्त व गेय आहेत; पण जपजी मात्र रागबंधनातून पूर्ण मुक्त आहे. म्हणूनच कीर्तनाच्या दृष्टीने जपजी उपयुक्त नसून ती केवळ पठन, चिंतन आणि मनन यांच्यासाठीच आहे. जपजी हा शीखांचा नित्यपाठ आहे. गुरुग्रंथाचा संपादक पाचवा गुरू अर्जुनदेव याने जपजीचे हे दार्शनिक महत्त्व जाणून त्याला त्या ग्रंथात प्रथम स्थान दिले.

जपजीत सुरवातीला एक मूलमंत्र असून, त्यापुढे ३८ पौड्या (पायऱ्या) आणि शेवटी पुनश्च एक श्लोक आहे. त्यातील मूलमंत्र असा–

ओं सतिनामु करता पुरूखु निरभउ निरवैरू अकालमूरति
अजूनी सैभं गुरू प्रासादि ।। जपु ।।

भावार्थ – तो एक आहे. अव्यक्त आणि व्यक्त पण एक आहे. त्याचे नाव सत्य व तो सत्य, नित्य व शुद्ध आहे. तो आदिपुरुष, सर्जनहार, कर्ता, भर्ता आणि हर्ता असा आहे. तो निर्भय म्हणूनच निर्वैर आहे. नित्य व शाश्वत असून कालातीत आहे. त्याला जन्म व मृत्यू नाही. प्रकाश, सर्वज्ञान व जीवन यांचा तो मूळ झरा आहे. गुरुप्रसादाने त्याची पूजा कर.

या मूलमंत्रात जपजीचेच नव्हे, तर गुरू नानकाच्या साऱ्या शिकवणुकीचे सार आहे. यानंतर एक ते तेहतीस पौड्यांचा सारांश असा –

परमेश्वरप्राप्तीसाठी प्रभुपरायण वृत्ती हाच एकमेव उपाय आहे. सृष्टीत चालू असलेली सर्व घडामोड आणि दिसून येणारे सारे वैचित्र्य प्रभूच्या इच्छेनेच निर्माण झाले आहे. शून्यातून ब्रह्मांडे त्याच्याच इच्छेने निर्माण झाली. भक्त हे परमेश्वराच्या उच्च गुणांची स्तोत्रे गातात; पण त्याचे सामर्थ्य सांगून कधीही संपत नाही. तो आपल्या आज्ञेनेच जगाचा जीवनक्रम चालवीत आहे. उषःकाली अमृतवेळी त्याचे नामस्मरण करावे.

जिनि सेविआ तिनि पाइआ मानु ।।
नानक गावीऐ गुणी निधानु ।।

अर्थ– ज्यांनी त्याची सेवा केली ते धन्य झाले. म्हणून हे नानका, या गुणसागराचे सतत गुणगान करीत राहा.

या जगात जे कोणाला काही मिळाले आहे, ते त्याच्याच कृपाप्रसादाने. माणसाची कीर्ती नवखंडात गाजली तरी त्याला परमेश्वराच्या मार्गदर्शनाची आवश्यकता असते. तुला त्रिभुवनाचे ज्ञान हवे असेल आणि तुला मृत्यूने स्पर्श करू नये, असे वाटत असेल तर त्याची गुणगाथा सदैव तुझ्या कानी पडू दे.

त्याच्या नामस्मरणाशिवाय शिव, ब्रह्मा अथवा इंद्र यांपैकी कोणाचेही ज्ञान तुला होणार नाही. त्याच्या स्मरणावाचून तुझा उद्धारही होणार नाही. त्याच्या नामस्मरणानेच तुला ज्ञानप्राप्ती होईल आणि त्याच्या स्मरणानेच श्रेष्ठ ज्ञानावर तुझे मन अविचल राहील. प्रभूच्या इच्छेप्रमाणे व त्याच्या इशाऱ्याप्रमाणे जे वागतात, ते धन्य होत. त्याची इच्छा ज्याने मानली, त्यालाच त्याचा महिमा कळू शकतो. तू त्याला शरण जा. स्वेच्छेने त्याला आत्मसमर्पण कर. त्याच्या इच्छेनुसार वाग.

संत हे मान्य आहेत. ते परमेश्वराचे प्रेषित आहेत. जे कोणी धर्म हा या पृथ्वीचा आधार असल्याचे जाणतात, तेच सत्य जाणतात. हे प्रभो, तुझा पूर्णपणे विचार करायला माझ्याजवळ शक्ती नाही. जे तू करशील, ते चांगलेच असणार.

असंख नाव असंख थाव ।। अगंम अगंम असंखलोअ ।।
असंख कहहि सिरि भारू होइ ।।

अर्थ– त्या परमेश्वराची नावे व निवासस्थाने असंख्य आहेत. मस्तक ज्यावर त्याची सत्ता चालते, असे लोक असंख्य आहेत.

म्हणून त्या प्रभूबद्दल बोलणारेही असंख्य आहेत.

हे प्रभो, जे काही सद्गुण आहेत, ती तुझी देणगी आहे. प्रभू हा सर्व शक्तिमान आहे. त्याचे नाम श्रेष्ठ असून, त्याचीच इच्छा प्रभावी आहे. त्याच्या सद्गुणांना व चांगुलपणाला मर्यादा नाही. असा हा प्रभू श्रेष्ठ, त्याचे पद श्रेष्ठ, पण त्याहीपेक्षा त्याचे नाम श्रेष्ठतर आहे. सर्व देव त्याच्या स्तवनात मग्न आहेत. परमेश्वराचे ज्ञान हेच माझे अन्न असू दे. संयोग आणि वियोग हे दोन्ही मार्ग त्यानेच निर्मिले आहेत. करावे तसे भरावे, हा त्याच्या दरबारातला न्याय आहे.

३४ ते ३८ या पौड्यांमध्ये नानकाने या सृष्टीची पंचखंडात्मक विभागणी केली आहे. हे पाच खंड असे– धरमखंड (कर्तव्यलोक), गिआनखंड (ज्ञानलोक), सरमखंड (सुखलोक), करमखंड (कृपालोक) आणि सचखंड (सत्यलोक)

राती रुती थिती वार ।। पवन पाणी अगनी पाताल ।।
तिसु विचि धरती थापि रखी धरमसाल ।।

अर्थ– धर्मखंडात दिवस आणि रात्र, तिथी आणि वार, आप, तेज, वायू व सर्व भुवने यांमध्ये प्रभूने पृथ्वीची स्थापना केलेली आहे. या धरमखंडात धर्म प्रभावी असावा, अशी त्याची योजना आहे.

नानकाच्या मते सत्कृत्य करणे, हाच खरा धर्म आहे व त्याच्या दरबारात योग्य स्थान मिळण्यासाठी भक्ती हाच एक मार्ग आहे.

केते पवण पाणी बैसंतर ।। केते कान महेस ।।
केते बरमे घाड़ति घड़ीअहि ।। रूप रंग के वेस ।।

अर्थ– ज्ञानखंडात अग्नी, जल व वायू या सर्व वस्तू असंख्य आहेत. ब्रह्म, शिव व कृष्ण हेही असंख्य आहेत. ब्रह्मे सतत घडवीत आहेत, आकार देत आहेत, रंग व रूपे निर्माण करीत आहेत व त्यांना सजवीत आहेत.

तिथे अनेक खाणी, नानाविध वाणी, असंख्य प्रजा व असंख्य राजे आहेन. त्याचप्रमाणे असंख्य ध्यानी, मुनी व शिष्य आहेत. गुरू नानक म्हणतो, की याला अंत नाही; कारण दयेला अंत नाही.

सरम खंड की वाणीरुपु ।।
तिथै घाड़ति घड़ीऐ बहुतु अनूपु ।।
तिथै घड़ीऐ सुरति मति मनि बुधि ।।
तिथै घड़ीऐ सुरा सिधा की सुधि ।।

अर्थ– सरमखंडात सौंदर्य हे मुख्य लक्षण आहे. त्या ठिकाणी नाना प्रकारच्या घटना घडत असतात. तिथे जाणीव आकार घेते. मन व बुद्धी सुसंस्कृत होतात आणि सिद्ध व देवता यांचे ज्ञान प्रतिष्ठित होते.

करम खंड की वाणी जोरु ।। तिथै होरु न कोई होरु ।।

अर्थ– करमखंड हे कृपेचे क्षेत्र आहे. तिथे सर्वत्र शक्तीचाच प्रभाव आहे. तिथे अन्य काही नाही.

हे सात्त्विक आत्मिक शक्तीचे खंड आहे. तिथे रामासारखे महाबली योद्धे आणि सीतेसारख्या दृढनिष्ठेच्या साध्वी राहतात. त्यांना मृत्यू नाही. मायेकडून त्यांची फसगत होत नाही. तिथे कित्येक गोलांवरील व ब्रह्मांडावरील लोक राहतात. ते प्रभूच्या आनंदात निमग्न असतात.

सच खंडि बसै निरंकारु । करि करि वेखै नदरि निहाल ।।

अर्थ– सत्यखंडात तो निरंकार प्रभू राहत आहे. तो निर्माण करतो, पाहतो आणि कृपाकटाक्षाने (जनांचा) उद्धार करतो.

त्या ठिकाणी अनेक विश्वे, अनेक भुवने व अनेक लोक आहेत. कोणी त्यांची गणना करू शकत नाही.

अशा प्रकारे ३८ पौड्या झाल्यावर शेवटच्या श्लोकात नानक म्हणतो–

ज्यांनी त्या दिव्य व पवित्र नामाची पूजा केली, त्यांचा प्रवास संपला. त्यांनी मुक्काम गाठला. ते मुक्त झाले. आणि त्यांच्या बरोबर इतर अनेकही मुक्त झाले. [श्री. जपजीसाहेब– श्री. न. वि. गाडगीळ.; गु. ग्रं. को.]

जपमाळ

जप करताना जपाची संख्या मोजण्यासाठी जी माळ वापरतात, तिला जपमाळ म्हणतात. तंत्रग्रंथांत जपमाळेविषयी खूप तपशीलवार विवेचन केले आहे. तिच्या विषयी विधि-विधानेही बरीच सांगितली आहेत. जपमाळेचे वर्णमाला, करमाला व मणिमाला असे तीन प्रमुख प्रकार आहेत.

अ आ इत्यादी पंधरा स्वर व क च ट त प य श मिळून पन्नास वर्ण अनुलोम क्रमाने व प्रतिलोम क्रमाने गणणे आणि क्ष या वर्णाला मेरुमणी कल्पिणे, या प्रकाराला वर्णमाला असे म्हणतात.

जपसंख्या मोजण्यासाठी हाताच्या बोटांचा उपयोग करतात. त्याला करमाला असे म्हणतात. (करमाला पाहा)

मणिमाला कोणत्या मण्यांची करावी, ते पुढील श्लोकात सांगितले आहे —

रुद्राक्षशङ्खपद्माक्षपुत्रजीवकमौक्तिकैः ।
स्फाटिकैर्मणिरत्नैश्च सुवर्णैर्विद्रुमैस्तथा ।
राजतैः कुशमूलैश्च गृहस्थस्याक्षमालिका ।।

अर्थ– रुद्राक्ष, शंख, पद्माक्ष, पुत्रजीव (वृक्षविशेष), मोती, स्फटिक, मणी, रत्न, सुवर्ण, पोवळे, रुपे व दर्भमूळ यांच्या मण्यांची जपमाळ गृहस्थाला प्रशस्त होय.

जपाच्या कामना वेगळ्या असतील त्याप्रमाणे मालाही वेगवेगळ्या घेण्यास सांगितले आहे, ते असे–

शत्रुनाशासाठी पद्माक्षाची, पापनाशासाठी कुशग्रंथीची, पुत्रप्राप्तीसाठी पुत्रजीव वृक्षाच्या फलांची, मनोरथपूर्तीसाठी रुप्याच्या मण्यांची, धनप्राप्तीसाठी पोवळ्यांची, त्रिपुरादेवीच्या प्रसन्नतेसाठी रक्तचंदनाची, विष्णूच्या प्रसादासाठी तुलसीमण्यांची, गजाननाच्या प्रसादासाठी हस्तिदंताची, ताराविद्येच्या प्रसादासाठी शंखांची, सूर्यासाठी स्फटिकांची, शक्तीसाठी मोत्यांची किंवा पोवळ्यांची, लक्ष्मीसाठी सुवर्णमण्यांची, शिवासाठी रुद्राक्षांची व ब्रह्मदेवासाठी मोत्यांची माला घ्यावी, असे सांगितले आहे. सर्व वर्णांना माळेचा तांबडा दोरा प्रशस्त व सिद्धिप्रद मानलेला आहे. हा दोरा तिपेडी असावा. मालेच्या मध्यभागी ब्रह्मग्रंथियुक्त मेरुमणी असावा. जपकर्त्याने या मेरुमण्याचे उल्लंघन करू नये.

माळ वापरण्यापूर्वी तिचे पंचगव्याने क्षालन करावे व मंत्रांनी अभिमंत्रण करावे. मग मालेची प्राणप्रतिष्ठा करून तिची पूजा करावी. त्यानंतर पुढील मंत्राने तिची प्रार्थना करावी असे वाराही तंत्रात सांगितले आहे –

माले माले महामाले सर्वतत्त्वस्वरूपिणि ।
चतुर्वर्गस्त्वयि न्यस्तस्तस्मान्मे सिद्धिदा भव ॥

अर्थ – हे माले, महामाले, तू सर्वतत्त्वस्वरूपिणी आहेस. धर्मार्थकाममोक्ष तुझ्या ठिकाणी स्थापित आहेत, म्हणून तू मला सिद्धी देणारी हो.

अंगुष्ठ आणि मध्यमा या दोन बोटांनी माळ ओढावी. तिला तर्जनीचा स्पर्श होऊ देऊ नये. नवी माळ ग्रहण करताना गुरूची पूजा करावी आणि त्याच्या हस्ते ती माळ ग्रहण करावी. माळ घेतल्यानंतर ती गुरूलाही दाखवू नये. माळ उघडी ठेवून जप केल्यास भूत, राक्षस, वेताळ, इ. गण जपाचें फल हरण करतात. म्हणून माळ झाकून घेऊन किंवा गोमुखीत घालून मंत्र जपावा (तंत्रसार). जपाला प्रारंभ करण्यापूर्वी मालेचे प्रोक्षण करून तिची पूजा करावी व जप पुरा झाल्यावर जपमाळ मस्तकी धारण करून गुप्त जागी ठेवून द्यावी.

सामान्यपणे माळेच्या मण्यांची संख्या १०८ असते. हिंदुधर्मात १०८ या संख्येला फार महत्त्व आहे. उपनिषदांची संख्या १०८ मानलेली आहे. महाभारतात विष्णूची व शंकराची नावेही १०८ दिलेली आहेत. १०८ ही संख्या तितक्या संख्येचे मनोविकार, तितक्या ज्ञानभूमिकेवरच्या देवता किंवा तितक्या संख्येच्या विद्या दर्शविते, असेही काहींचे मत आहे. खरे म्हणजे माळेतील मण्यांची संख्या ९ हीच असावी; पण त्या ९ संख्येच्या बारा पटीने जप व्हावा म्हणून १०८ मणी धरले असावे, अशीही एक कल्पना आहे. माळेतील मण्यांची संख्या क्वचित ५४ ही असते.

सर्वसामान्य मणिसंख्या १०८ असली, तरी मण्यांची संख्या संप्रदायपरत्वे व कामनापरत्वे भिन्न भिन्न असते. शैव ३२ मण्यांची, तर वैष्णव १०८ मण्यांची माळ वापरतात. धनलाभासाठी ३० मण्यांची, पुष्टीसाठी २७ मण्यांची, मोक्षासाठी २५ मण्यांची, अभिचार कर्मासाठी १५ मण्यांची व सर्वार्थसिद्धीसाठी १०८ मण्यांची माळ घ्यावी, असे सांगितले आहे.

बौद्धांच्या जपमाळा हिंदूंच्या जपमाळांसारख्याच असतात. बौद्धधर्मात माळ ही अवलोकितेश्वराची खूण मानतात. काही बौद्ध सोन्या-चांदीच्या मण्यांच्या, मोत्यांच्या किंवा हिरे-माणकांच्या माळा वापरतात, तर काही बौद्ध लाकडाच्या, हाडाच्या किंवा काचमण्यांच्या वापरतात.

जैन लोक ‘ णमोकार ’ मंत्राचा जप करण्यासाठी चंदनी माळ घेतात. जैनांच्या तीर्थंकरांचे विविध रंग सांगितलेले आहेत. म्हणून त्यांच्या जपासाठी त्या त्या रंगांच्या माळा वापरण्याची प्रथा जैनांमध्ये आहे. शीख लोकांची जपमाळ लोकरीच्या धाग्यांची असते व तिला १०८ गाठी असतात. ते लोखंडी मण्यांची माळही वापरतात. मुसलमानांच्या जपमाळेत ९९ मणी असतात. अल्लाची ९९ नावे आहेत; म्हणून माळेचेही तितकेच मणी असावे, असे त्यांचे धर्मशास्त्र सांगते. पण व्यवहारात मुसलमान लोक बहुधा ३३ मण्यांची माळच वापरतात. ही माळ लाकडाच्या मण्यांची असते. मक्केजवळ मिळणाऱ्या चिकणमातीच्या मण्यांची माळ ते फार पवित्र मानतात. खजुराच्या बिया, शिंग, मोती, पोवळी यांच्या माळाही ते वापरतात. फकीर लोक काचमणी, स्फटिक किंवा सापाचे मणके यांच्या माळा वापरतात.

ख्रिस्ती लोक प्रारंभी जपासाठी खडे वापरीत. पुढे क्रूसेड्च्या वेळी त्यांनी पॅलेस्टाइनहून जपमाळ युरोपात नेली. रोमन कॅथॉलिकांच्या जपमाळेत १५० मणी असतात. त्या मण्यांचे दहा भाग केलेले असतात. माळेतले १५ मणी मोठे असून, त्यांचा आकारही वेगळा असतो. माळेच्या मध्यभागी क्रूसासारखा लोलक असतो.

मूर्तिकलेत अनेक देवतांच्या हाती जपमाळ हे उपकरण दिलेले असते. सरस्वतीच्या हातीही माळ आवश्यक मानलेली आहे.

जपमाळेचा उपयोग सर्वत्र केला जातो. हिंदूंनी प्रथम जपमाळ वापरायला प्रारंभ केला. त्यानंतर बौद्ध ती वापरू लागले. बौद्धांकडून ती मुसलमानांनी उचलली आणि शेवटी ख्रिस्ती लोक तिचा उपयोग करायला शिकले, असे म्हणतात.

पाहा– अक्षमाला, गोमुखी. [व्रतराज; एन्सा. रि. ए.; श. क.]

जबलपूर मध्य प्रदेशातील एक प्रसिद्ध स्थान. हे झाशीपासून १५२ मैलांवर आहे. प्राचीन काळी याचे नाव जाबालिपत्तन असे होते. हे नाव शिलालेखांत आढळते. इथे जाबाली ऋषीचा आश्रम होता, असे म्हणतात. कलचुरी वंशातील कर्णदेव याने हे नगर वसविले. कलचुरी राजे शिवभक्त होते. त्यांनी इथे अनेक शिवमंदिरे निर्माण केली. या नगरात काही जैन मंदिरेही आहेत. सुमारे हजार वर्षांपूर्वीच्या शिल्पांचे भग्नावशेष इथे सापडतात. [खं. वै.; पु. त. मी.]

जमदग्नी एक सूक्तद्रष्टा. ऋग्वेदातील नवव्या मंडलातील ६२ व ६५ ही आणि दहाव्या मंडलातील ११० हे सूक्त मिळून तीन सूक्ते याच्या नावावर आहेत. हा भृगुकुलोत्पन्न होता. याने विश्वामित्राला ससर्परी नावाची दिव्य वाणी देऊन त्याचे अज्ञान नाहीसे केले. याविषयी घटना घडली, ती अशी — सौदास राजाच्या यज्ञात वसिष्ठाच्या शक्ती नामक पुत्राने विश्वामित्राचा वादविवादात पराभव केला व त्याला तिथून हाकलून लावले. तेव्हा विश्वामित्र जमदग्नीकडे गेला आणि त्याने त्याला घडलेली हकीगत सांगितली. मग जमदग्नीने ससर्परी नावाची विद्या (भाषणातील कौशल्य व सामर्थ्य वाढवणारी विद्या) सूर्याकडून आणून विश्वामित्राला दिली. याचा उल्लेख पुढील ऋचेत आलेला आहे —

ससर्परीरमतिं बाधमाना बृहन्मिमाय जमदग्निदत्ता ।
(ऋ. ३.५३.१५)

अर्थ– जमदग्नीने दिलेली आणि अज्ञान नाहीसे करणारी जी ससर्परी नावाची धेनू (विद्या) ती मोठ्याने हंबरली.

मित्रावरुण, अश्वी व सोम यांच्याशी जमदग्नीचा संबंध दिसतो. जमदग्नीने चतूरात्र यज्ञ केल्यामुळे त्याच्या वंशात कोणी दरिद्री निपजला नाही (तै. सं. ७.१.९.१). वेदप्रचाराकरिता व अक्षरब्रह्माच्या उपदेशाकरिता इंद्राने याची योजना केली होती (तै. आ. १.९). हा मोठा तपस्वी होता.

नवव्या मंडलातील ६२ व ६५ या सूक्तांत त्याने सोमाचे स्तवन केले आहे. दहाव्या मंडलातील ११० वे सूक्त हे आप्रीसूक्त असून ते काव्यमय आहे. त्यात त्याने तनूनपात अग्नीचे स्तवन केले आहे. भारती, इळा आणि सरस्वती या तीन देवींचा तो त्यात उल्लेख करतो व त्यांनी मनुष्यरूपे धारण करून यज्ञस्थळी यावे, अशी आकांक्षा व्यक्त करतो.

द्यावा-पृथिवींना देखील निर्माण करणाऱ्या सृष्टिकर्त्याला त्याने त्वष्टा म्हटले आहे. देवतांना अर्पण करण्याचे हविर्भाग घृताने आर्द्र करून त्यांना द्यावे व अग्नीत आहुती देत असताना 'स्वाहा' शब्दाचा उच्चार करावा, असे तो सांगतो.

वेगवेगळ्या पुराणांतले याचे चरित्र असे—

भृगुकुलातील ऋचीक ऋषीचा सत्यवती नामक भार्येपासून उत्पन्न झालेला हा पुत्र होय (म. भा. आश्व. ६७). पद्म पुराणात याच्या बापाचे नाव भृगू असे दिले आहे (उ. खं. २४१). याला आर्चिक असे पैतृक नाव होते. रेणुका ही याची भार्या होय. तिच्यापासून याला रुमण्वान, सुषेण, वसुमान, विश्वावसू व परशुराम असे पाच पुत्र झाले.

जमदग्नी हा अत्यंत रागीट होता. एकदा तो लीलेने बाण सोडीत बसला व दूर जाऊन पडलेले ते बाण परत आणण्याचे काम त्याने रेणुकेला सांगितले. ती ते काम करीत असता दुपारच्या कडक उन्हाने दमली व विश्रांतीसाठी एका झाडाखाली बसली. त्यामुळे तिला बाण परत आणायला थोडा उशीर झाला. तेव्हा जमदग्नी रागावला आणि त्याने तिला उशीराचे कारण विचारले. तिने, उन्हाची बाधा झाली, असे सांगताच तो बाणाने सूर्याचे विंधान करण्यास निघाला. तेव्हा सूर्य शरण आला व त्याने त्याला छत्री व पादत्राण या वस्तू दिल्या. सूर्य आणखी त्याला म्हणाला, की ' मी तुझ्या उदरी जन्म घेईन.' पुढे तो परशुरामाच्या रूपाने जमदग्नीच्या उदरी जन्मला (विष्णू ध. पु. १.३६; म. भा. अनु. ९४-९५).

एकदा रेणुका सरोवरावर स्नानाला गेली असता तिथे तिला गंधर्व आपल्या बायकांसह क्रीडा करीत असलेले दिसले. रेणुका त्यांची ती क्रीडा पाहत थोडा वेळ तिथे उभी राहिली. त्यामुळे तिला घरी परतायला उशीर झाला. त्यावरून जमदग्नी संतापला आणि त्याने आपल्या पुत्रांना तिचा शिरच्छेद करायला सांगितले. पण परशुरामाशिवाय इतरांनी त्याचे ऐकले नाही. त्यामुळे जमदग्नीने आपल्या चारी पुत्रांचा वध केला. परशुरामाने रेणुकेचा शिरच्छेद केल्यामुळे जमदग्नी त्याच्यावर प्रसन्न झाला. त्याने परशुरामाला वर मागायला सांगितले असता परशुरामाने आपली माता व भाऊ जिवंत होवोत, असा वर मागितला. जमदग्नीने तो वर त्याला दिला व त्यामुळे त्याची आई व भाऊ जिवंत झाले (म. भा. वन. ११६; भाग. पु. ९.१६; विष्णू ध. पु. १.३६).

मात्र वाढत्या वयाबरोबर जमदग्नीचा क्रोध हळूहळू शांत होत गेला. त्याने गंगातीरी १००० वर्षे तप करून इंद्राकडून कामधेनू मागून घेतली. ती कामधेनू कार्तवीर्य राजाने त्याच्या आश्रमातून बलात्काराने ओढून नेली. त्या वेळी कामधेनूने आपल्या शरीरापासून यवनसैन्य उत्पन्न करून कार्तवीर्याचा पराभव केला. त्याचा सूड म्हणून कार्तवीर्याने जमदग्नीला ठार मारले. परशुरामाने कार्तवीर्याला ठार मारून कामधेनू सोडवून आणल्यामुळे कार्तवीर्याच्या पुत्रांनी पितृवधाचा

सूड घेण्यासाठी जमदग्नीला ठार मारले, अशीही कथा काही ठिकाणी आहे (म. भा. शांति. ४९.११६; भाग. पु. ९.१६).

जमदग्नी हा वैवस्वत मन्वंतरातील सप्तर्षींपैकी एक होता. हा भृगुकुलातील गोत्रकार व प्रवरही आहे. श्राद्ध हा विधी यानेच प्रथम सुरू केला (म. भा. आश्रम. ९५). पाहा– रेणुका; परशुराम [ऋ. द.; प्रा. च. को.]

जमलू कुलू खोऱ्यातील मलाना गावावर शासन करणारा देव. तिथले लोक याला सर्वशक्तिमान समजतात. तिबेटमधील लोक याला तिबेटी देवता घेवन हिचा भाऊ मानतात. काही शतकापूर्वी कुलूमध्ये बौद्ध धर्म व तिबेटी लामा यांचा प्रभाव पुष्कळच होता. त्यामुळे वरील कल्पनेत सत्यांश असण्याचा संभव आहे. मात्र कुलूतले ब्राह्मण जमलूला जमदग्नीचा अवतार मानतात.

जमलूच्या राज्यात कोणीही भूमिहीन नसतो. सर्व जमीन जमलूच्या मालकीची असून, तो प्रत्येक कुटुंबाला जरुरीपुरती जमीन देतो. गावातील सर्व रोगांवरही जमलू देवच उपाय करतो. मात्र त्यासाठी त्याला बकरा बळी द्यावा लागतो. या देवाला चामड्याचा फार तिटकारा आहे. मलाना गावात कोणी चामडे आणताना सापडला, तर जमलूच्या नावाने त्याला दंड करतात म्हणजे त्याच्याकडून जमलूला बळी देववतात. कुलू खोऱ्यातील लोक कार्तिक मासातील संक्रांतीला जमलूचा जन्मदिन साजरा करतात. पाहा– कुलू. [भारती, २ मार्च १९५८]

जमवाय माता कछवाहा राजपुतांची कुलदेवी. रामगढ येथे हिचे मंदिर असून, या देवीच्या नावावरूनच त्या गावाला कस्बा जमवाय रामगढ असे नाव पडले आहे. जमवाय मातेच्याच कृपेने आपणाला आंबेरचे राज्य मिळाले, अशी कछवाहा राजपुतांची श्रद्धा आहे. आंबेर आणि जयपूर या दोन्ही राजघराण्यातील मंडळी जन्म, विवाह, लहान मुलाचे जावळ, इ. प्रसंगी जमवाय मातेच्या दर्शनाला जातात. [मरुभारती, ऑक्टो. १९५५]

जमाती एक मुसलमान जात. हे शेख असून कोकणात आढळतात. हे शाफी पंथाचे सुन्नी आहेत. तांदूळ, लाकूड, मीठ यांचा व्यापार करणे हा यांचा मुख्य व्यवसाय होय. हे स्वज्ञातीतच लग्ने करतात. [मुं. इ. जा.]

जमाल (इ. स. चे १६ वे शतक) एक भाट कवी. हा जातीने मुसलमान असूनही बहुसंख्य लोक त्याला हिंदूच मानतात. हरदोई जिल्ह्यातील पिहानी गावचा हा रहिवासी होता. याच्याविषयी विशेष माहिती उपलब्ध नाही; परंतु अकबराने याच्या काव्यावर खूष होऊन याचा संन्मान केला होता व याला हत्तीवरून मिरवले होते, असे एका दंतकथेवरून कळते. याच्या नावावर जमालपचीसी व भक्तमाल की टिप्पणी असे दोन ग्रंथ आहेत. त्याचप्रमाणे याचे पावणे चारशे दोहेही उपलब्ध आहेत. या दोह्यांतून त्याने प्रेम, शृंगार, नीती आणि कृष्णस्तुती हे विषय गाइले आहेत. याचे काही दोहे कूटात्मकही आहेत. [हिं. सा. को. २]

जमाली (इ. स. पूर्व ५ वे किंवा ६ वे शतक) एक श्वेतांबर जैन आचार्य. याचे चरित्र व्याख्याप्रज्ञप्ती या ग्रंथात व भगवतीसूत्रात आढळते. हा महावीराचा भाचा व जावई होता. महावीराने आपली मुलगी सुदर्शना (किंवा ज्येष्ठा किंवा अनवद्यांगी) त्याला दिली होती. हा राजपुत्र असून कुंडग्राम नामक नगरात राहत होता, असे अभिधान राजेंद्रात सांगितले आहे.

एकदा महावीर कुंडग्रामी गेला असता याने त्याच्याकडून प्रव्रज्या ग्रहण केली. सुदर्शनेनेही त्याच्या पाठोपाठ प्रव्रज्या घेतली. त्यानंतर जमालीने एकादश अंगांचे अध्ययन केले. एक दिवस त्याने महावीराकडे आपल्या पाचशे भिक्षूंसह गावोगाव फिरण्याची अनुज्ञा मागितली. महावीराने त्यावर काहीच उत्तर दिले नाही. त्याचे मौन संमतिदर्शक मानून जमाली संचाराला निघाला. फिरत फिरत तो श्रावस्ती नगरीतील तैंदुक उद्यानात आला.

तिथे त्याला बरे वाटेना, म्हणून त्याने शिष्यांना आपल्यासाठी आंथरूण घालायलं सांगितले. थोड्या वेळाने त्याने ‘आंथरूण घालून झाले का’ अशी चौकशी केली. आंथरूण अर्धवट घालून झाले असल्यामुळे शिष्यांनी त्याला ‘घालून झाले’ असे उत्तर दिले. तो स्वत: जाऊन पाहतो, तो आंथरूण अर्धवटच घातलेले होते. पूर्ण घालून झालेले नव्हते. तेव्हा ‘क्रियमाणं कृतम्’= जे केले जात असते ते केलेलेच असते, हा महावीराचा सिद्धान्त चुकीचा आहे, असे त्याला आढळून आले. आणि ‘कृतं कृतं’ म्हणजे जे पूर्ण झालेले आहे, तेच केलेले आहे, असे म्हणता येईल, असा त्याचा निश्चय झाला. आपले हे मत आपल्या बरोबरीच्या शिष्यांना त्याने पटवून देण्याचा प्रयत्न केला. पण पुष्कळांना ते पटले नाही आणि ते त्याला सोडून महावीराकडे निघून गेले.

जमालीच्या मताला बहुरतवाद असे नाव आहे. एखादी वस्तु निर्माण व्हायला बराच कालावधी लागतो. ती घडवायला सुरु

बात केल्यावर पहिल्याच क्षणी ती तयार होत नाही, असा या मताचा सारांश आहे.

जमालीला कोणी अनुयायी मिळाले नाहीत. त्याची पत्नी मात्र आपल्या एक हजार भिक्षुणींसह त्याच्या मताचा प्रचार करीत राहिली. ती ढंक नावाच्या कुंभाराकडे राहत असता, आपल्या पतीचे ते मत त्याला पटविण्याचा तिने प्रयत्न केला; पण तो यशस्वी झाला नाही. उलट त्यानेच त्या मताची अयथार्थता तिच्या नजरेला आणून दिली.

एक दिवस ढंकाने आपल्या आव्यातला एक निखारा काढला आणि तिच्या उत्तरीयाच्या टोकाला लावला. त्याबरोबर त्याचे टोक जळू लागले. तेव्हा ती ढंकाला म्हणाली, की तू माझे वस्त्र जाळलेस. त्यावर तो तिला म्हणाला, ‘जे जळत आहे, ते जळले असे म्हणणे, हे तुझ्या तत्त्वाच्या विरुद्ध आहे.’ सुदर्शनेला ते पटले आणि तीही जमालीला सोडून महावीराकडे निघून गेली. अशा रीतीने जमाली हा शेवटी एकाकीच राहिला आणि त्याच्या मतामुळे जैन दर्शनाला काही धक्का पोचला नाही. [अभि. रा.; पृथ्वीराज जैन – श्रीविजयवल्लभसूरि स्मारक ग्रंथ]

जमू ब्राह्मण गुजरातेतली एक जात. जंबू सरोवरावरून जमू हे नाव पडले असावे. हे लोक याज्ञवल्क्यापासून आपली उत्पत्ती सांगतात. पौरोहित्य करणे आणि फलज्योतिष सांगणे, हे यांचे व्यवसाय आहेत. [ब्रा. भि. वि.]

जम्नोत्री उ. प्रदेशातील पूर्वीच्या गढवाल संस्थानातील एक पुण्यक्षेत्र. हे हिमालयात वसलेले आहे. यमुना नदीचा उगम तिथून झाला, म्हणून त्याला जम्नोत्री किंवा यमुनोत्तरी असे नाव पडले आहे. हे स्थान बंदरपूछ नावाच्या पर्वतश्रेणीत असून, त्याची समुद्रसपाटीपासूनची उंची ९,९०० फूट आहे. बंदरपूछ हे शिखर हिमाच्छादित असून, ते गगनाला भिडल्यासारखे वाटते. त्याची उंची २०,७३१ फूट आहे. रामायण घडून गेल्यानंतर रामभक्त मारुती हा तपश्चर्येसाठी या पर्वतशिखरावर येऊन राहिला होता, म्हणून याला बंदरपूछ असे नाव पडले, अशी आख्यायिका आहे.

जम्नोत्रीचा पहाड सुळक्यासारखा उभा आहे. त्याच्यावरही आणखी काही पहाड आहेत. या पहाडांच्या घळीतून यमुनेचे असंख्य ओहोळ खाली येतात. बंदरपूछपासून निघालेला हिमप्रवाह जम्नोत्रीच्यां खिडीच्या तोंडापर्यंत घसरत घसरत सावकाश खाली उतरतो. तिथे या हिमप्रवाहातले बर्फ वितळून त्याचे पाणी होते व ते बर्फाच्या मोठमोठ्या खडकांखालून वाहू लागते. ते पाणी जिथे स्पष्टपणे प्रवाहाच्या रूपाने दिसू लागते, तेच यमुनेच्या उगमाचे स्थान होय. तिथे हा प्रवाह दहा-बारा फूट रुंदीने वाहतो. त्याचा वेग इतका जबर होतो, की त्यावर दृष्टी ठरत नाही. त्या ओघाचे पाणी स्फटिकासारखे निर्मळ व पारदर्शक असते.



यमुनेचे उगमस्थान

यमुनेच्या उगमाजवळ २५-३० फूट उंचीवर एक धर्मशाळा आहे. तिच्यात २५-३० माणसांचा जेमतेम समावेश होऊ शकतो. हीच तिथे उतरण्याची एकमेव सोय. त्या धर्मशाळेच्या जरा वरच्या अंगाला यमुनामंदिर आहे. ते लाकडी असून अगदी लहान आहे. त्या मंदिरात यमुनेच्या कृष्णपाषाणाच्या मूर्तीबरोबरच गंगेचीही संगमरवरी दगडाची मूर्ती आहे.

अक्षय्यतृतीयेपासून आश्विन पौर्णिमेपर्यंत या मूर्तींची पूजा-अर्चा इथे होते. बाकीच्या महिन्यात हा सर्व भाग बर्फात बुडून जात असल्याकारणाने या मूर्ती तिथून हालवून घाटाखालच्या खरसाळी गावी नेतात व तिथे त्यांची पूजा-अर्चा चालू ठेवतात.

जम्नोत्रीला गरम पाण्याची पाच कुंडे आहेत. त्यांपैकी दोन कुंडांतले पाणी सारखे उकळत असते. तांदुळांची सैलशी पुरचुंडी करून ती या कुंडात सोडली, तर पंधरा मिनिटांच्या आत त्या तांदुळांचा भात शिजून तयार होतो.

जम्नोत्रीचा प्रवास गंगोत्रीपेक्षा कठीण आहे. हिमालयात जाणारी माणसे सामान्यपणे केदार व नारायण यांची यात्रा करून परत येतात. त्यांतले गंगोत्री-जम्नोत्रीला जाणारे लोक फारच थोडे असतात. पाहा– यमुना. [हि. द.]

जय ऐंद्र एक सूक्तद्रष्टा. ऋग्वेदाच्या १० व्या मंडलातील १८० वे सूक्त याच्या नावावर आहे. त्यात त्याने इंद्राची स्तुती केलेली असून, त्याला मानवजातीचा धुरीण म्हटले आहे. मृत्युलोक देवांनाही आवडेल, असा प्रशस्त व्हावा, अशी याची आकांक्षा आहे. [प्रा. च. को.]

जयकीर्ती भट्टारक (इ. स. चे १६ वे शतक) हा मुनी जयकीर्ती या नावाने ओळखला जातो. याचे भवदेवचरित्र, पार्श्वभवांतरछंद व ब्रह्मचर्यउपदेशमाला, इ. वाङ्मय उपलब्ध आहे. पार्श्वभवांतरछंद या ग्रंथात याने पार्श्वनाथाची उपासना सांगितली आहे. या ग्रंथाची भाषा काव्यमय व प्रवाही आहे.

भट्टारक जयकीर्ती व छंदोनुशासनकर्ता जयकीर्ती हे एकच आहेत, अशी आजवरची समजूत होती. परंतु हे दोघे भिन्न असल्याचे आता सिद्ध झाले आहे. छंदोनुशासनकर्ता जयकीर्ती हा संस्कृत पंडित; तर जयकीर्ती भट्टारक हा हिंदी भाषेत लेखन करणारा आहे. [हिं. जै. भ. क.]

जय गोपाळ विधी काठियावाडमधील भाटिया लोकांच्या विवाहसमारंभातील एक विधी. विवाहाच्या आधी मुलीच्या घरी लग्नपत्रिकेचे पूजन होते. या वेळी वधूपिता ती पूजलेली पत्रिका वरपित्याला देतो आणि वराच्या कुलदेवतेला, वरपित्याला व तत्पक्षीय काही मंडळींना नारळ व दक्षिणा देतो. [ल. वि. सो.]

जयजयवंती एक रागिणी. ही श्री रागापासून निघालेली आहे. हिची जाती संपूर्ण आहे. हिच्यात दोन निषाद व दोन गंधार लागतात. आरोहात पंचम वर्ज्य असतो. वादी– ऋषभ. संवादी– पंचम. आरोह– सा, रे, म, म, ध, नि, सा. अवरोह– सा, नि, ध, प, म, ग, रे, ग, रे, सा, नि, सा, ध, नि, रे. पकड स्वर– रे, ग, रे, सा, ध, नि, रे. हा राग देश व वागेश्री या दोन रागांच्या अंगांनी गातात. अवरोहात ऋषभ स्वरालगत कोमल गंधार लावतात. अन्यत्र शुद्ध गंधार योजतात. गानसमय– रात्रीचा दुसरा प्रहर. या रागिणीचे ध्यानस्वरूप संगीत ग्रंथात दिले आहे, ते असे–

नीलवर्ण. पीतवस्त्र नेसलेली. कपाळी कुंकवाचा टिळा. ओठावर मुरली. कंठात रत्नमाला. सकळ शृंगार केलेली. [श्री. आबासाहेब मुजुमदार, पुणे]

जयत एक राग. याची जाती औडव आहे. या रागात मध्यम व निषाद हे वर्ज्य असून, ऋषभ कोमल व बाकीचे ग, प, ध हे स्वर शुद्ध लागतात. वादी– पंचम. संवादी– षड्ज. आरोह– सा, ग, प, ध, प, सा. अवरोह– सा, प, ध, प, ग, रे, सा, प, ध, प, सा, पकड स्वर– प, ग, रे, सा, प, ध, प, सा. गानसमय– सायंकाल. या रागाचे ध्यानस्वरूप असे–

वीर, धनुष्य व बाण धारण करणारा, शत्रूवर विजय मिळवणारा, अश्वारूढ व आनंदाच्या भरात अनेक प्रकारचे रागरंग करून धन लुटविणारा. [श्री. आबासाहेब मुजुमदार, पुणे]

जयंतभट्ट (इ. स. चे ९ वे शतक) एक प्राचीन ग्रंथकार. याने गौतमाच्या निवडक सूत्रांवर न्यायमंजरी नामक टीका लिहिली आहे. चार्वाक, बौद्ध, मीमांसक, वेदान्ती, इ. विरोधकांचे त्याने मोठ्या पांडित्यपूर्ण युक्तिवादाने खंडन केले आहे. याची भाषा प्रसन्न व रमणीय आहे. [भा. द.]

जयंतमल्हार एक राग. याला जयजयवंती मल्हार असेही म्हणतात. याची जाती षाडव संपूर्ण आहे. या रागात गंधार व निषाद शुद्ध व कोमल आणि बाकीचे सर्व स्वर शुद्ध लागतात. वादी– पंचम. संवादी– षड्ज. आरोह –सा, म, रे, प, नि, ध, नि, सा. अवरोह–सा, ध, नि, म, प, म, ग, म, रे, सा, नि, सा, ध, नि, रे. पकड स्वर–प, ग, म, रे, सा, नि, सा, ध, नि, रे. गानसमय– वर्षा ऋतू व रात्रीचा दुसरा प्रहर. [श्री. आबासाहेब मुजुमदार, पुणे]

जयतिश्री एक रागिणी. धनाश्री व मालश्री या दोन रागांच्या मिश्रणाने ही बनली आहे. हिचा अंश, ग्रह व न्यास स्वर मध्यम आहे. हिच्यात मध्यम कोमल असून, बाकीचे सर्व स्वर शुद्ध लागतात. हिची जाती षाडव आहे. गानसमय– दिवसाचा तिसरा प्रहर. हिचे ध्यानस्वरूप असे–

सुवर्णकांती, हातात वीणा धारण करणारी, नेत्र सुंदर व शरीर पुष्ट आणि उंच. [श्री. आबासाहेब मुजुमदार, पुणे]

जयतीर्थ (इ. स. चे १३ वे शतक) एक माध्व आचार्य. हा मूळचा मंगळवेढ्याचा रहिवासी. मूळ नाव धोंडोपंत देशपांडे. वयाच्या १३ व्या वर्षी याचा विवाह झाला.

याच्या पत्नीचे नाव भीमाबाई असे होते.

धोंडोपंत हा सैन्यात अधिकारी होता. एकदा पंढरपूर मुक्कामी त्याची व मध्वाचार्यांचे चौथे शिष्य अक्षोभ्यतीर्थ यांची गाठ पडली. त्या एकाच भेटीत धोंडोपंतावर अक्षोभ्यतीर्थांच्या विद्या-तपादी गुणांचा प्रभाव पडला आणि धोंडोपंताने त्यांच्याकडून संन्यासदीक्षा घेतली. स्वामींनी त्याला जयतीर्थ असे नाव दिले.

संन्यासग्रहणानंतर याने शास्त्राध्ययनाला प्रारंभ केला. बुद्धिमत्ता तीव्र असल्यामुळे तो थोड्याच काळात प्रकांडपंडित झाला. माध्व संप्रदायाच्या अभिवृद्धीसाठी गुर्वाज्ञेवरून त्याने देशभर संचार केला आणि वादविवादात असंख्य जयपत्रे मिळवली. पुढे तो भीमेच्या काठी वास्तव्याला आला. तिथे त्याने ग्रंथलेखनाला प्रारंभ केला. मध्वाचार्यांच्या ग्रंथांवर टीका लिहिण्याबद्दल त्याला साक्षात सरस्वतीकडून आदेश मिळाला होता, असे सांगतात. त्याने तत्त्वप्रकाशिका, तत्त्वोद्योतटीका, तत्त्वसंख्यानटीका, तत्त्वविवेकटीका, इ. अनेक ग्रंथ लिहिले आहेत. या टीकाग्रंथांमुळे त्याला लोक टीकाचार्य म्हणत. हे त्याचे सर्व ग्रंथ माध्वांना प्रमाणभूत ठरले आहेत. पुरंदरदास, कनकदास, इ. कन्नड संतांनी जयतीर्थाचे तात्त्विक विचार कन्नड भाषेत पद्यरूपाने अनुवादिले आहेत. बृहज्जयतीर्थविजय हा त्याचा ग्रंथ महत्त्वाचा असून, कर्नाटकातील दासकूट आणि व्यासकूट हे दोन्ही भक्तसंघ तो शिरोधार्य मानतात.

जयतीर्थाने आपले बहुतेक ग्रंथलेखन यर्गोळच्या डोंगरावर बसून केले. ग्रंथरचना चालू असता हा यदृच्छाप्राप्त अन्नावर निर्वाह करी. मध्वाचार्यांनंतर ४९ वर्षांनी हा त्यांच्या पीठावर बसला. २२ वर्षे त्याने पीठाधिपत्य केले. शेवटी मालखेड या गावी जाऊन त्याने आपला देह ठेवला. तिथे दरवर्षी आषाढ कृ. पंचमीस त्याची पुण्यतिथी साजरी होते. [म. शा. को.; हिंदुत्व; हिं. क. भ. तु. अ.]

जयंतीव्रत श्रावण कृ. अष्टमीला रोहिणी नक्षत्र आले असता हे व्रत करतात. यशोदासहित कृष्ण ही या व्रताची देवता आहे. पंचपल्लवयुक्त कलशावर कृष्णाला स्तनपान देणाऱ्या यशोदेची मूर्ती स्थापून, तिच्यासन्निध चंद्ररोहिणी यांच्याही मूर्ती बसवतात. मग त्यांची पूजा करतात. या व्रताची कथा पद्म पुराणात दिली आहे, ती अशी —

एका गावात एक वैश्य राहत होता. एके दिवशी त्याच्या भाऊबंदांनी त्याला घराबाहेर घालवले. मग तो वाराणसीत जाऊन कमळे विकू लागला. पुढे एके दिवशी त्याला एकही गिऱ्हाईक मिळाले नाही. फिरत फिरत तो एका वाड्याजवळ आला असता तिथे इंद्रद्युम्न राजा जयंतीव्रत करीत असलेला त्याने पाहिला. त्याच्या पूजेसाठी वैश्याने त्याला आपल्याजवळची कमळे दिली; पण त्याची किंमत मात्र घेतली नाही. त्या पुण्याने पुढील जन्मी तो हरिश्चंद्र नावाचा राजा झाला.

पौष शु. अष्टमी बुधवारी आली, की तिला जयंतीअष्टमी म्हणतात. त्या दिवशीही हे व्रत केले जाते. स्नान, दान, जप, होम, पितृतर्पण व ब्राह्मणभोजन घालणे, असा याचा विधी असतो. फल— स्वर्गप्राप्ती. [व्र. प.]

जयंती सप्तमी माघ शु. सप्तमीला जयंती सप्तमी असे नाव आहे. या दिवशी सूर्यव्रताला प्रारंभ करतात. व्रतावधी— एक वर्ष. या व्रतासाठी माघापासून क्रमाने पौषापर्यंत वर्षाच्या बारा महिन्यांचे, प्रत्येकी तीन महिन्यांचा एक, असे चार विभाग करतात. प्रत्येक विभागात सूर्यपूजेसाठी वेगवेगळी पूजाद्रव्ये घेतात. व्रतसमाप्तीनंतर उद्यापन करतात. फल — सूर्यलोकाची प्राप्ती. [कृ. क. त.]

जयत्कल्याण हा कल्याण थाटाचा जन्य राग आहे. जाती औडव— औडव. वादी— पंचम. संवादी— ऋषभ. याच्या आरोहावरोहात मध्यम व निषाद हे वर्ज्य असतात. या रागातील पंचम व ऋषभ या स्वरांची संगती मधुर लागते. गानसमय — रात्रीचा पहिला प्रहर. [सु. वि. को.]

जयदा सप्तमी रविवारी येणाऱ्या शु. सप्तमीला जयदा सप्तमी असे म्हणतात. या दिवशी सूर्यपूजा करून उपवास, नक्त, एकभुक्त किंवा अयाचित करावे, असे सांगितले आहे. फल — इष्ट कार्यात यशाची प्राप्ती. [हि. ध.]

जयदुर्गा एक तांत्रिक देवता. ही सिंहासनस्थ असून, हिच्या डाव्या दोन हातांत चक्र आणि त्रिशूळ असतो व उजव्या दोन हातांत दंड व खड्ग असते. [श्रीविद्यार्णवतंत्र]

जयदेव (इ. स. चे १२ वे शतक) संस्कृत भाषेतील सुप्रसिद्ध कवी. हा बंगालमधील बीरभूम जिल्ह्यातल्या किंदुबिल्व गावी जन्मला, अशी परंपरागत प्रसिद्धी आहे. पण अलिकडील संशोधनाने, हे किंदुबिल्व गाव ओडिसातल्या जगन्नाथपुरीजवळ असून, तिथेच जयदेवाचा जन्म झाला, असे सिद्ध झाले आहे. किंदुबिल्व म्हणजे सांप्रतचे केंदुली होय.

या केंदुली गावी भोजदेव नावाचा एक पंडित राहत असे. त्याच्या पत्नीचे नाव रमादेवी असे होते. बरेच दिवस त्या

दंपतीला पुत्रसंतान नव्हते. म्हणून त्यांनी जगन्नाथाची आराधना सुरू केली आणि जगन्नाथाने त्यांना जो पुत्र दिला, तोच हा जयदेव होय.

महीपतीने आपल्या भक्तविजयात जयदेवाला व्यासाचा अवतार म्हटले आहे. हा संस्कृत भाषेचा पंडित बनला व कविताही करू लागला. त्याच्या कवित्वाची कीर्ती उत्कलाचा राजा एकजात कामदेव याच्या कानी गेली. त्याने जयदेवाला आपल्याकडे बोलावले व राजकवी म्हणून त्याला आपल्या दरबारात आश्रय दिला. त्याच्या आश्रयाला असतानाच जयदेवाने गीतगोविंद हे आपले काव्य निर्माण केले. पण जयदेवाविषयीच्या सगळ्या आख्यायिका मात्र तो बंगालमधील लक्ष्मणसेन राजाचा आश्रित होता, अशा प्रकारच्या आहेत.

मंडलपंजी या उत्कल बखरीत श्रीजगन्नाथ आणि कामदेव राजा यांच्याविषयी बरीच अचूक माहिती मिळते. कामदेव हा वैष्णव होता व श्रीजगन्नाथाचा भक्त होता. त्याने इ. स. ११४४ ते ११५० या कालात ओडिसावर राज्य केले. आपल्या राज्यात वैष्णव पंथाचा प्रसार व्हावा, म्हणून त्याने अनेक मंदिरे बांधली व वैष्णवांना अनेक दानेही दिली, असे उल्लेख पुरी व केंदुपाटण येथे सापडलेल्या ताम्रपटांत आढळतात. कामदेव गीतगोविंदाचे श्रवण केल्याशिवाय कधीही अन्नग्रहण करीत नसे.

जयदेवाच्या लग्नाबद्दल कथा सांगतात, ती अशी– जयदेव हा तरुणपणापासूनच वीतराग व निरासक्त असे. तो गावाबाहेर एक पर्णकुटी बांधून तिथे राहत असे. त्याच गावात देवशर्मा नावाचा एक ब्राह्मण होता. त्याला मूल नव्हते. 'मला मूल झाले, तर ते मी तुला वाहीन,' असा त्याने जगन्नाथाला नवस केला. पुढे त्याला एक मुलगी झाली. त्याने तिचे नाव पद्मावती असे ठेवले. ती वयात आल्यावर त्याने तिला जगन्नाथाच्या देवळात नेऊन पुजाऱ्याच्या स्वाधीन केले. त्या रात्री पुजाऱ्याला स्वप्नदृष्टांत झाला, की 'तू ही मुलगी जयदेवाला अर्पण कर.' दुसऱ्या दिवशी पुजारी पद्मावतीला घेऊन जयदेवाकडे आला. पण जयदेवाचा त्या स्वप्नदृष्टांतावर विश्वासच बसेना. म्हणून तो तिला तिथेच सोडून निघून गेला. अखेर नाइलाजाने जयदेवाला पद्मावतीचा पत्नी म्हणून स्वीकार करावा लागला. मग तो जगन्नाथपुरी येथे राहून तिच्यासह संसार करू लागला.

गीतगोविंदाच्या निर्णयसागरी आवृत्तीचे संपादक श्री. तेलंग व पणशीकर या दोघांनी जयदेवाच्या आख्यायिकांविषयी बरेच विवेचन केले आहे. पद्मावती ही आंध्रामधल्या एका द्राविड ब्राह्मणाची मुलगी होती, असे ते सांगतात. त्या काळी द्राविड ब्राह्मणांचा उत्कल ब्राह्मणांशी सोयरीकसंबंध होत असे; पण बंगाल्यांशी तो होत नसे. जयदेव हा बंगाली नसून ओडियन होता, याचा हा एक पुरावा होय.

पद्मावतीच्या उत्कट पातिव्रत्याबद्दल पुढील आख्यायिका प्रसिद्ध आहे–

जयदेव आणि त्याची पत्नी ही दोघे लक्ष्मणसेनाच्या पदरी असता एक दिवस लक्ष्मणसेन जयदेवाला घेऊन शिकारीला गेला. पाठीमागून लक्ष्मणसेनाची राणी व पद्मावती या राणीवशात बोलत बसल्या होत्या. त्या वेळी राणीला पद्मावतीच्या पातिव्रत्याची परीक्षा करण्याची लहर आली. तिने तिथल्या तिथे एक कारस्थान रचले. एका दूताच्या कानाशी लागून तिने त्याला काहीतरी सांगितले. थोड्या वेळाने तो बाहेरून धावत धावत राणीकडे आला व दु:खित स्वरात म्हणाला.

'राणीसाहेब, घात झाला. जयदेव कवी शिकारीत मरण पावले.'

ते वृत्त ऐकताच पद्मावतीचा प्राणपक्षी त्या क्षणी उडून गेला. ती निश्चेष्ट होऊन धरणीवर पडली. ते पाहून राणी घाबरली. थोड्या वेळाने राजा जयदेवासह परत आला. आपल्या राणीचे ते अश्लाघ्य वर्तन पाहून तो तिला मारायला धावला. पण जयदेवाने त्याला आवरून म्हटले –

'ज्या अर्थी मी जिवंत आहे, त्या अर्थी ही पुनश्च जिवंत होणे शक्य आहे.'

असे म्हणून जयदेवाने गीतगोविंदातली श्रीकृष्णपुरस्कृत १९ वी अष्टपदी म्हटली आणि पद्मावतीच्या देहावर पाणी शिंपडले. त्यासरशी पद्मावती सचेतन होऊन उठून बसली. तेव्हापासून या अष्टपदीला संजीवनी अष्टपदी असे नाव पडले. त्या अष्टपदीतले तीन श्लोक असे–

प्रिये चारुशीले प्रिये चारुशीले
मुञ्च मयि मानमनिदानम् ।
सपदि मदनानलो दहति मम मानसं
देहि मुखकमलमधुपानम् ।। ध्रु० ।।
वदसि यदि किञ्चिदपि दन्तरुचिकौमुदी
हरति दरतिमिरमतिघोरं ।
स्फुरदधरसीधवे तव वदनचन्द्रमा
रोचयति लोचनचकोरम् ।। १ ।।
सत्यमेवासि यदि सुदति मयि कोपिनी
देहि खरनखरशरघातम् ।
घटय भुजबन्धनं जनय रदखण्डनं
येन वा भवति सुखजातम् ।। २ ।।

अर्थ – हे चारुशीले, हा तुझा मजवरचा निष्कारण रोष सोडून दे. मदनानल माझे हृदय सारखे जाळीत राहिला आहे

मला (तू) मुखकमलाचे मधुपान दे. तू थोडेसे बोललीस, तरी तुझ्या दंतप्रभेच्या चंद्रिकेने माझा भयरूपी घोर अंधकार दूर होतो. तुझा वदनचंद्रमा माझ्या नेत्ररूपी चकोराला भुलवून, माझ्या अधरसुधेचे प्राशन कर, असे मला प्रेमाने म्हणतो. हे कुंदरदने, जर तू खरोखरच रागावली असशील, तर तू मला प्रखर नखांच्या शराघाताने घायाळ कर. माझ्या भोवती तुझा भुजबंध घट्ट आवळ. माझ्यावर दंतक्षते निर्माण कर आणि इतरही जे सुखकारक असेल ते सगळे कर.

या एकोणिसाव्या अष्टपदीबद्दल आणखी एक आख्यायिका सांगतात, ती अशी–

जगन्नाथपुरीतली रथयात्रा प्रसिद्ध आहे. त्या यात्रेत जगन्नाथ, सुभद्रा व बलराम या तिघांचे रथ ओढले जातात. अशाच एका प्रसंगी लक्ष्मी तिथे आली आणि त्या रथोत्सवात जगन्नाथाच्या जोडीने आपल्याला स्थान नाही, असे पाहून रागावली. तिने त्या रथाचा एक भाग मोडला आणि ती परत आपल्या देवळात येऊन बसली. जगन्नाथाला हे समजताच तो तिची समजूत घालण्यासाठी तिच्या मंदिरात गेला. पण देवळाची दारे बंद झाल्यामुळे त्याला आत प्रवेश मिळेना. एवढ्यात एक देवदासी तिथे आली आणि तिने गीतगोविंदातली एकोणिसावी अष्टपदी आळवून म्हटली. त्यासरशी देवळाची दारे उघडली आणि जगन्नाथाला आत प्रवेश मिळाला. जगन्नाथाने तिची कशी समजूत घातली असेल, ते तोच जाणे! पण त्या दिवसापासून रथयात्रा चालू असताना ती एकोणिसावी अष्टपदी मखमलीच्या कापडावर लिहून ते कापड जगन्नाथाच्या हातात दिलेले असते.

गीतगोविंद हे जागतिक रसकाव्यातील पहिले रसकाव्य आहे. ते राधा-कृष्णांच्या दैवी प्रेमावर आधारलेले भावनाट्य आहे. जयदेवाने स्वतःच त्यावरून एक नृत्यनाट्य बसवले होते. त्या नाट्यात पद्मावती राधेची व जयदेव कृष्णाची भूमिका करीत असे. जयदेवाने गीतगोविंदाच्या नृत्यात तिला तरबेज केले होते. म्हणूनच तो स्वतःला ‘पद्मावतीचरणचारणचक्रवर्ती’ असे गौरवाने म्हणतो. गीतगोविंदावरचे हे नृत्यनाट्य घेऊन ती दोघे केरळात गेली होती. तिथे त्याचे प्रयोग पाहून केरळीय जनता प्रसन्न झाली, असे उल्लेख मलयाळम् साहित्याच्या इतिहासात आढळतात.

चैतन्य संप्रदायाचे अनुयायी गीतगोविंदाला भक्तीचा एक प्रबल स्रोत मानतात. ओडिसाचा राजा प्रतापरुद्र याच्या कारकीर्दीतला एक शिलालेख जगन्नाथाच्या मंदिरातच आहे. यावरून कळते, की त्या राजाने तिथल्या देवसेवकांना असा आदेश दिला होता, की रोज संध्यासमयापासून जगन्नाथाच्या शयनकालापर्यंत त्याच्यापुढे नर्तकींनी नृत्य केलेच पाहिजे आणि त्याप्रसंगी गायकांनी गीतगोविंदातल्याच अष्टपद्या गायल्या पाहिजेत.

जयदेव हा अशा एका काळी जन्माला आला, की ज्या वेळी भारताच्या पूर्व भागातून बौद्ध सिद्धांचा प्रभाव हळूहळू कमी होऊ लागला होता आणि नाथपंथ व वैष्णवपंथ हे बळावू लागले होते. गीतगोविंद हे कृष्णभक्तीचे व तिच्या वृद्धीसाठीच लिहिलेले काव्य असले, तरी बारकाईने विचार केल्यास त्या काव्यावर सहजयान पंथाचा सूक्ष्म का होईना प्रभाव दिसतो. त्या पंथातील प्रज्ञा व उपाय ही दोन तत्त्वे राधा व कृष्ण यांची रूपे घेऊन गीतगोविंदात एकजीवपणे वावरतात. सहजयानींची महासुख ही अंतिम अवस्था जयदेवाच्या काव्यात अलौकिक प्रेम या अवस्थेत रूपांतरित झालेली दिसते.

गीतगोविंदाचे सर्वात मोठे वैशिष्ट्य हे, की त्याने राधा-कृष्णांच्या प्रेमाची निर्मलता व आध्यात्मिकता अत्यंत हृदयंगम पद्धतीने अभिव्यक्त केली आहे. त्यातले राधा-कृष्णांचे मीलन हे जीव-ब्रह्मांचे मीलन आहे. त्यातील उत्कटता कळण्यासाठी पुढील एकच श्लोक पुरेसा आहे –

व्यथयति वृथा मौनं तन्वि प्रपञ्चय पञ्चमं
तरुणि मधुरालापैस्तापं विनोदय दृष्टिभिः ।
सुमुखि विमुखिभावं तावद्विमुञ्च न वञ्चय
स्वयमतिशयस्निग्धो मुग्धे प्रियोऽहमुपस्थितः ॥

अर्थ – हे तनुगात्री, तुझे हे वृथा धरलेले मौन मला व्यथा देते. तू पंचमालाप कर. हे तरुणी, तुझ्या मधुर आलापांनी आणि दृष्टींनी तू माझा ताप दूर कर. हे सुमुखी, तू मुख फिरवून बसली आहेस, ती मला सन्मुख हो. मला अशी फसवू नकोस. तुझ्यावर अतिशय प्रेम करणारा मी तुझा प्रियकर हे मुग्धे, तुझ्यापुढे स्वतः उपस्थित झालो आहे.

इथे साक्षात् परब्रह्म जीवाच्या उराउरी मीलनासाठी आतुर झाल्याचे प्रत्ययाला येते. असे हे गीतगोविंद काव्य लिहून जयदेव संस्कृत वाङ्मयातला अजरामर कविश्रेष्ठ ठरला आहे.

गीतगोविंदाशिवाय जयदेवाच्या नावावर काही बंगाली पदेही आढळतात. केवळ शिखांच्या ग्रंथसाहेबातच नव्हे, तर दादूपंथी साधकांनी तयार केलेल्या पदसंग्रहातही जयदेवाची ही पदे आदरपूर्वक समाविष्ट केली गेली आहेत. ही पदे मुळात जरी बंगाली भाषेत होती, तरी ती विभिन्नप्रांतीय साधकांच्या मुखी प्रसार पावत राहिल्यामुळे त्यांना हिंदी, पंजाबी वा राजस्थानी स्वरूप प्राप्त झाले आहे. राजस्थान आणि पंजाब या प्रांतांतील साधक जयदेवाला आपलाच मानीत असत.

ग्रंथसाहेबात जयदेवाची जी दोन पदे समाविष्ट आहेत, ती सहजिया संप्रदायातील विचारसरणीने प्रभावित आहेत. या पदांपैकी एका पदात उपदेश असून, दुसरे योगसाधनेशी संबंधित आहे. या पदांची भाषा संस्कृतप्रचुर असून, अंतरंगदृष्ट्या ती नाथ आणि सिद्ध यांच्या रचनेशी मिळती जुळती आहेत. पाहा – केंदुली, गीतगोविंद. [सं. सा. इ.; उ. भा. सं. प.; डि. सा. इं. म्यु. म्यु.; सुश्लोक गोविंद; भा. जा. भे.]

जयदेव पीयूषवर्ष (इ. स. चे १३ वे शतक) एक नैयायिक, साहित्यशास्त्रकार व नाटककार. याच्या बापाचे नाव महादेव व आईचे सुमित्रा असे होते. दरभंगा जिल्ह्यातल्या सैसव गावी हा जन्मला असावा, असे म्हणतात. चंद्रलोक हा याचा साहित्यशास्त्रावरचा ग्रंथ आहे. याने प्रसन्नराघव नावाचे नाटक लिहिले असून, न्यायशास्त्रावरही याचे तीन ग्रंथ आहेत. [म. ज्ञा. को.; म. च. को.]

जयदेवसेवा पुरीच्या जगन्नाथमंदिरात जयदेवाच्या गीत–गोविंदातल्या अष्टपद्या गाऊन जगन्नाथाची सेवा करणे, याला जयदेवसेवा असे म्हणतात. हा अधिकार फक्त काही ओडिय कुटुंबांनाच आहे. सेवेचे स्थान गाभाऱ्याजवळ आहे. जवळच्या भिंतीवर अष्टपद्या कोरलेल्या आहेत. जयदेव स्वतः तिथे बसून आपली गीते गात असे व समोरच्या नृत्यमंडपात पद्मावती नृत्य करीत असे. [डि. सा. इं. म्यु. म्यु.]

जयनृत्य द. भारतातील एक पुरातन नृत्य. विजयप्राप्तीप्रीत्यर्थ किंवा विजयी सैन्याच्या स्वागतार्थ हे नृत्य करण्याची प्रथा होती. तंजाऊर जिल्ह्यातील तिरुक्कोडिकावलच्या गोपुरावर या नृत्याचे उत्तम चित्र आहे. त्यात चतुरंगदळ दाखवले आहे. [डि. सा. इं. म्यु. म्यु.]

जयपत्र (१) प्राचीन काळी बंगाल देशातील व्यापारी लोक परदेशगमनाला निघताना आपल्या पत्नीला गर्भधारणा झाली असल्यास एक निर्वाळ्याचे पत्र तिच्या हवाली करीत. याच पत्राला जयपत्र असे नाव पडले. हे देण्याचा हेतू असा– त्या व्यापाऱ्यांना वर्षातील बराच मोठा काळ देशांतरी राहावे लागे. इकडे घरी त्यांच्या बायका गरोदर राहिल्या, तर पुष्कळ वेळा त्यांच्या चारित्र्याविषयी लोक संशय घेत. बंगाली लोकसाहित्यात अशा तऱ्हेच्या दुर्दैवी कहाण्या पुष्कळ आढळतात. काही वेळा खुद्द नवरेही गावगप्पा ऐकून आपल्या बायकांचा छळ करीत; त्यामुळे पुढे परदेशगमन करणाऱ्या व्यापाऱ्यांच्या बायकांना संरक्षण देण्याचा प्रश्न निर्माण झाला व त्यातून या जयपत्रांचा जन्म झाला.

बंगालमधील जयपत्राची ही प्रथा किती प्राचीन आहे, हे मात्र निश्चयाने आज सांगता येत नाही. परंतु ती चाल सुरू झाल्यापासून बंगाली स्त्रियांचा बदलौकिक आणि छळ मात्र वाचला. या जयपत्रांचा उपयोग केवळ लोकापवाद टाळण्यापुरताच होई असे नव्हे; तर एखादा व्यापारी परदेशात मरण पावला आणि त्याच्या नातेवाइकांनी त्याच्या दौलतीचे अपहरण करण्याचे प्रयत्न चालवले, तर त्याच्या विधवा पत्नीला न्यायालयात दाद मागण्याकरताही या जयपत्राचा उपयोग होत असे. [क. म.]

(२) पराभूत गायकाने विजयी गायकाला लिहून दिलेले शरणपत्र. प्राचीन काळी गायक निरनिराळ्या देशांत जाऊन गायनस्पर्धांत भाग घेत. स्पर्धेत जो गायक पराभूत होई, त्याला आपला तंबोरा अगर इतर वाद्ये यांवर आपण केव्हा पराभूत झालो, ते विजयी गायकाला लिहून द्यावे लागे. इ. स. च्या १९ व्या शतकात अशा जयपत्रधारी गायकांना जमीनदार व राजे आपल्याकडे संस्थानविद्वान म्हणून ठेवून घेत. यादवकालीन महानुभावीय कवी नरेंद्रपंडित याने आपल्या रुक्मिणीस्वयंवर नामक काव्यात (ओ. १७१) गायक किन्नराच्या वर्णनप्रसंगी जयपत्राच्या एका अभिनव प्रकाराचा उल्लेख केला आहे–

हातसरामागां हातकडगें । मुदियांची जोडी ठिकलगें ।
तोडरीं बाहुलीं काढती अनेगें । अंगिकां नांवें ॥

अर्थ– (त्या किन्नराच्या हातांत) मोत्यांचे सर घातलेले होते. त्यामागे कडी घातलेली होती. (तसेच बोटांत) रत्नजडित आंगठ्यांची जोडी होती आणि पायातील तोड्यावर जिंकलेल्या गायकांची अनेक चित्रे काढलेली होती.

या उल्लेखावरून असे दिसते की, जिंकलेल्या गायकांची चित्रे पायातील तोड्यावर काढून त्यांचा उपमर्द करण्याची प्रथा प्रचलित होती. [डि. सा. इं. म्यु. म्यु.]

(३) जुन्या काळी दिग्गजपंडित असत, ते विजययात्रेसाठी निघत. निरनिराळ्या राजदरबारांत जाऊन ते तिथल्या पंडितांशी वादविवाद करीत व त्यांना पराभूत केल्यावर त्या राजदरबाराकडून जयपत्र घेत. अशी जास्तीत जास्त जयपत्रे मिळवणे हा त्या काळच्या महापंडितांच्या महत्त्वाकांक्षेचा विषय असे. महानुभावपंथीय ग्रंथकार महींद्रभट्ट (इ. स. चे तेरावे शतक) हा पूर्वाश्रमी जिंकलेल्या पंडितांना तृणवत लेखण्यासाठी पायात गवताचा तोडा वागवीत असे.

(४) न्यायाधीशाकडून एका पक्षाला मिळालेला विजयबोधक, लेख असे शब्दकल्पद्रुमात म्हटले आहे.

जयपौर्णमासी एक काम्यव्रत. दर पौर्णिमेला नक्षत्रांसह चंद्राचे चित्र काढून त्याची पूजा करणे, असा याचा विधी सांगितला आहे (हे. व्र. २.१६०–६२). व्रतावधी– एक वर्ष. फल– मोक्षप्राप्ती. [हि. ध.]

जयरामस्वामी (१५९९–१६७२ इ. स.) रामदासपंचायतनातील एक संतकवी. हा नगर जिल्ह्यातील कान्नाबाज मांडवगणचा देशपांडे. याचे उपनाम कसरे आणि गोत्र वसिष्ठ. वडिलांचे नाव भिकाजीपंत व आईचे कृष्णाबाई. याच्या वयाच्या पाचव्या वर्षी याचे वडील वारले. त्यामुळे हा आपल्या आईसह पंढरपुरी येऊन भिक्षेवर उदरनिर्वाह करू लागला. पुढे लवकरच त्याची आईही वारली. या सर्व आघातांमुळे जयरामस्वामीच्या मनात बालपणीच वैराग्य उत्पन्न झाले. याच्या सोळाव्या वर्षी हा वडगावी येऊन तिथे कृष्णाप्पा नामक साधूच्या सहवासात राहिला. पुढे त्याने कृष्णाप्पाचाच गुरूपदेश घेतला. कृष्णाप्पाने त्याला कृष्णोपासनेचा प्रसार करायला सांगितले.

जयरामस्वामीने आपली सर्व ग्रंथरचना वडगावातच केली. दशमस्कंधटीका, रुक्मिणीस्वयंवर, सीतास्वयंवर व अपरोक्षानुभव हे याचे मुख्य ग्रंथ होत. याखेरीज शांतिपंचीकरण, ज्ञानी भक्तसंवाद वगैरे लहान लहान प्रकरणे त्याने लिहिली असून, काही पदे व अभंगही रचले आहेत. वेदान्तविषय सोपा करून सांगण्याची हातोटी जयरामस्वामीला चांगलीच साधली होती.

मराठी भाषेत संस्कृत ग्रंथांवर जे उत्तम टीकाग्रंथ झाले आहेत, त्यांत जयरामस्वामीचा अपरोक्षानुभव हा एक टीकाग्रंथ आहे. या ग्रंथाच्या उपसंहारात कवीने शास्त्रविचार जाणणारे पंडित व ब्रह्मनिष्ठ भक्त यांच्यांतला भेद सांगितला आहे, तो असा—

आम्ही ज्ञाते परमश्रेष्ठ । हें जगीं होय प्रगट ।
सभेमाजी युक्ती हट । धरुनी उद्धट वाद करिती ।।
वरिवरी नम्रता दावणें । अंतरीं द्वेषाचें ठाणें ।
पाहती एक एकाचें उणें । प्रतिष्ठेकारणें जल्पती ।।
नाही भगवंतीं अनन्य । न धरी वैराग्य-आंगवण ।
न लगे स्वरूपीं अनुसंधान । समाधान केवि घडे ।।
अंतरीं समाधान नसे । वक्तृत्वें झाले पिसे ।
वचनीं व्युत्पत्ति दिसे । जनमानें ऐसे भुलले ।।

प्रस्तुत ग्रंथ श्री शंकराचार्यांच्या अपरोक्षानुभूती या ग्रंथावरील टीका आहे. विषयानुरोधाने या ग्रंथाची बारा प्रकरणे पाडून त्यावर स्वामींनी १७८० ओव्यांचे भाष्य केले आहे. जयरामस्वामीची मराठी भाषा सुलभ व प्रसादपूर्ण आहे. तिच्यात पांडित्याचा प्रकर्ष नाही; पण अनुभवाचा ओलावा मात्र पुष्कळ आहे. [म. वा. इ.; म. सा.]

जयराशिभट्ट (इ. स. चे ७ वे शतक) एक नास्तिक ग्रंथकार. हा चार्वाक संप्रदायातला होता. याने तत्त्वोपप्लवसिंह या नांवाचा एक ग्रंथ लिहिला आहे. भारतीय दर्शनात जी प्रमेये मांडलेली आहेत, त्यांचा पायाच चूक असल्याचे हा सांगतो. वैदिक व बौद्ध या दोघांनाही सारख्याच त्वेषाने त्याने खोडून काढले आहे. कोणी परलोकवासी परत येऊन भेटत नाही म्हणून परलोकच नाही, असा त्याचा सिद्धांत आहे. त्याने आपल्या प्रतिपादनाला बृहस्पतीच्या मतांचा आधार घेतला असला, तरी बृहस्पतीचे मत तत्त्वमीमांसेत टिकू शकत नाही, असे तो सांगतो. म्हणून प्रत्येक प्रस्थापित तत्त्वाचा पुनर्विचार केला पाहिजे, असा त्याचा आग्रह आहे.

जयराशीच्या मते हिंदू, जैन व बौद्ध सगळेच पाखंडी किंवा ढोंगी आहेत. त्याच्या प्रतिपादनात सर्वत्र उद्दाम गर्व आढळतो. बृहस्पतीलाही सुचले नसते, असे मुद्दे काढून मी सर्व पाखंड्यांचे गर्वहरण केले आहे, अशी शेखी तो मिरवतो. हेमचंद्र, चंद्रप्रभ, अनंतवीर्य व विद्यानंदी यांच्या ग्रंथांतून जयराशीची जी अवतरणे आढळतात, त्यांचा अभ्यास करून तो इ. स. च्या ७ व्या शतकात होऊन गेला असावा, असा निष्कर्ष पं. सुखलाल संघवी आणि रसिकलाल पारीख यांनी काढला आहे. जयराशीच्या ग्रंथात फक्त दिगंबर जैनांचाच उल्लेख असल्याने तो दक्षिणेकडचा असावा, असे वरील उभय विद्वान म्हणतात. [चार्वाक : इतिहास आणि तत्त्वज्ञान]

जय-विजय विष्णूचे दोन पार्षद. कर्दमाचे पुत्र. हे यज्ञकर्मात कुशल होते. मरुत्त राजाच्या यज्ञात याना विपुल दक्षिणा मिळाली. तिची वाटणी करून घेत असता या दोघांचे भांडण झाले. त्या वेळी जयानें विजयाला ‘ तू मगर होशील ’ असा शाप दिला. त्याउलट विजयाने ‘ तू हत्ती होशील ’ असे जयाला शापले. मग दोघांनाही पश्चात्ताप झाला. ते विष्णूला शरण गेले. विष्णूने त्याना शापान्ती उद्धार करण्याचे अभिवचन दिले. मग ते दोघे मगर व हत्ती होऊन गंडकीच्या तीरी राहू लागले. पुढे एके दिवशी हत्ती कार्तिकस्नानासाठी गंडकी नदीत उतरला असता मगराने त्याचा पाय धरला. तेव्हा हत्तीने विष्णूचा धावा केला. विष्णूने येऊन दोघांनाही शापमुक्त केले व विष्णुलोकी नेले (पद्म पु. उ. ११०).

एकदा सनकादी मुनी वैकुंठात विष्णूच्या भेटीस गेले असता जय– विजयांनी त्यांना दारात अडविले. ते सहन न होऊन सन-

कादिकांनी त्यांना शाप दिला, की ‘तुम्ही वैकुंठातून पतन पावून असुर योनीत जन्माला याल.’ जय-विजयांना त्या गोष्टीचे दुःख होऊन त्यानी उःशाप मागितला. तेव्हा ‘तीन जन्मांनंतर तुम्ही असुर योनीतून मुक्त होऊन पुन्हा वैकुंठात याल’ असा सनकादिकांनी त्यांना उःशाप दिला. हेच जय-विजय पुढे हिरण्याक्ष–हिरण्यकशिपू, रावण–कुंभकर्ण व शिशुपाल–वक्रदंत झाले. प्रत्येक वेळी श्रीविष्णूच्या अवताराच्या हातून त्यांना मरण आले व शेवटी ते पुनश्च वैकुंठाला गेले.

जयसागर उपाध्याय

(इ. स. चे १५ वे शतक) एक जैन महाकवी. जिनराजसूरी हा याचा मोक्षगुरू असून, जिनवर्धनसूरी हा विद्यागुरू होता. जयसागर हा संस्कृत आणि प्राकृत भाषेचा पंडित होता.

संदेहदोहावलीवरील लघुवृत्ती, उवसग्गहरस्तोत्रवृत्ती, विज्ञप्तित्रिवेणी, पर्वरत्नावलीकथा, पृथ्वीचंद्रचरित्र, इ. याचे संस्कृत व प्राकृत ग्रंथ प्रसिद्ध आहेत. याशिवाय याची जिनकुशलसूरिचतुष्पदी, गौतमरास, चैत्यपरिपाटी, नगरकोट महातीर्थ, सद्गुरुभक्ती, इ. हिंदी स्तोत्रकाव्येही उपलब्ध आहेत.

जयसागर उपाध्याय हा मंत्रविद्येतही पारंगत होता, असे सांगतात. याला पद्मावतीसहित धरणेंद्राने व शारदेने दर्शन दिले होते; अशीही आख्यायिका आहे. [हिं. जै. भ. क.]

जयसिंह

(१) (१६८६–१७४३ इ. स.) जयपूरचा महाराजा. इतिहासात हा सवाई जयसिंह या नावाने सुप्रसिद्ध आहे. हा एक शूर, मुत्सद्दी व धोरणी राज्यकर्ता होता; तसाच तो विद्वान, गणिती व ज्योतिषशास्त्रज्ञही होता. भारतीय खगोलविद्येचे पुनरुज्जीवन करण्याचे श्रेय यालाच दिले पाहिजे. याने दिल्ली, जयपूर, काशी, मथुरा, उज्जैन, इ. ठिकाणी वेधशाळा बांधल्या आणि ग्रहांच्या सूक्ष्म गतींचा अभ्यास करण्यासाठी काही नवी साधनेही बनवली. धातूंची यंत्रे झिजतात, म्हणून पाषाणाची वा चुन्याची यंत्रे बनवण्यास याने सुरवात केली. त्याची जयप्रकाश, सम्राट, भित्तियंत्र, वृत्तषष्ठांश, इ. यंत्रे विशेष उल्लेखनीय असून, त्यांतील सम्राटयंत्र तर फारच प्रेक्षणीय आहे. याशिवाय ग्रहांची सूची व त्यांच्या गतिविधी यांची जी कोष्टके याने तयार केली, ती पंचांगकर्त्यांना उपकारक ठरली आहेत. याने स्वतः ग्रहांचे बिनचूक वेध घेऊन त्यांच्या सारण्या तयार केल्या. याचा सिद्धांतसम्राट नामक एक संस्कृत ग्रंथ आहे. याच्या पदरी जगन्नाथ नावाचा गणिती होता, त्याच्याकडून याने युक्लिडच्या रेखागणिताचे संस्कृतात भाषांतर करवून घेतले. पाश्चात्य ज्योतिषशास्त्राचा अभ्यास करण्यासाठी त्याने हिंदू पंडिताना युरोपखंडात पाठवले होते, असे कळते. गणित, इतिहास व साहित्य या विषयांच्या अध्ययनासाठी या राजाने ग्रंथालयेही स्थापली होती.

जयसिंह स्वतः स्थापत्यशास्त्रज्ञही होता. जयपूर नगर यानेच वसवले व तिथे आपली राजधानी स्थापली.

पूर्वेतिहास – जयपूरचे राज्य ढूंढाड या नावाने प्रसिद्ध असून, आंबेर ही त्याची राजधानी होती. हे राज्य कच्छवाह वंशातील धवलराय नामक पुरुषाने इ. स. च्या १० व्या शतकात स्थापले. श्रीरामचंद्राचा पुत्र कुश याला कूर्म किंवा कच्छ नामक मुलगा होता. त्याच्यापासून या कुळाची उत्पत्ती झाली, म्हणून त्याला कच्छवाह हे नाव प्राप्त झाले, असे म्हणतात. त्याचा वंशज नळराजा यानें नरवरनगर स्थापले. सांप्रत यालाच नरवरगढ असे म्हणतात. हे ठिकाण मध्यदेशात आहे. नरवरगढ येथे कच्छपघात वंशाची एक शाखा राज्य करीत होती. तिलाच पुढे कच्छवाह हे नाव मिळाले. धवलराय हा नळराजापासून चौतिसावा पुरुष होता. जमवाय माता ही यांची कुलदेवता होय.



सवाई जयसिंह– जयपूर

या वंशातील पूजन हा फार शूर व पराक्रमी होता. पृथ्वीराज चौहानाच्या पदरी तो एका तुकडीचा नायक असून, पृथ्वीराजाच्या बहिणीशी त्याचे लग्न झाले होते. शिहाबुद्दीन घोरीचा पराजय करण्यात याने पृथ्वीराजाला मदत केली. पुढे तो एका लढाईत मारला गेला. बाबराने दिल्ली येथे मोगलांची सत्ता स्थापली, तेंव्हापासून ढूंढाडचे राजे मोगलांच्या अंकित राहून राज्य करू लागले. याच राजवंशातला बिहारीमल्ल याने आपली मुलगी अकबराला दिली होती. त्याच्या सर्व मुलांना अकबराने आपल्या सैन्यात मानाच्या जागा दिल्या.

बिहारीमल्लाच्या मागून त्याचा पुत्र भगवानदास गादीवर बसला. त्याने आपली मुलगी मानबाई ही सलीमाला दिली. त्यामुळे पंजाबची सुभेदारी भगवानदासाला मिळाली. तो फार शूर व बुद्धिमान होता. अकबराच्या दरबारात त्याचे फार वजन होते. त्याचा पुतण्या मानसिंह याने अकबराच्या पदरी मोठीच कामगिरी केली. काबूलपासून आसामपर्यंतचा मुलुख जिंकून तो मोगल साम्राज्याला जोडण्याचे कार्य यानेच पार पाडले. राणा प्रतापसिंहाशी झालेल्या युद्धात मानसिंहच अकबराचा सेनापती होता. मानसिंहाचा भाऊ जगतसिंह याचा नातू जयसिंह हा मिर्झा राजा या नावाने प्रसिद्ध आहे. औरंगजेबाने त्याला ही पदवी त्याच्या पराक्रमाबद्दल दिली होती. तो मोठा चारित्र्यसंपन्न, धर्मनिष्ठ व कर्तबगार पुरुष होता. पण शेवटी बादशहाने विषप्रयोग करून त्याला ठार मारले, असे म्हणतात.

मिर्झा राजानंतर रामसिंह व त्याच्या नंतर त्याचा नातू बिशनसिंह हे आंबेरच्या गादीचे वारस झाले. त्यानंतर बिशनसिंहाचा पुत्र जयसिंह (दुसरा) हा इ. स. १६९९ साली गादीवर आला. त्याला बादशहाने सवाई हा किताब दिला होता. त्या वेळी मोगल बादशाही मोडकळीस आली होती व चोहोकडे बेबंदशाही माजली होती. अशा परिस्थितीतही आपल्या राज्यात शांतता व सुव्यवस्था राखून जयसिंहाने विद्या व कला यांच्या विकासाकडे पुष्कळ लक्ष दिले आणि खगोलशास्त्राचा अभ्यास केला, हे विशेष होय. तो स्वधर्माभिमानी होता. त्याने मराठ्यांना पुष्कळ मदत केली खरी, पण दिल्लीच्या बादशाहीशी तो कधीही बेईमान झाला नाही.

सवाई जयसिंहाच्या नंतर जयपूरच्या राज्यात यादवी युद्धे सुरू झाली. नाव घेण्याजोगा एकही राजा त्यानंतर झाला नाही. इ. स. च्या १९ व्या शतकात हे राज्य इंग्रजांचे मांडलिक संस्थान झाले. [म. ज्ञा. को.; मु. रि.; रा. रा. उ. व्हा.; वै. वि. भा. प.; संयुक्त राजस्थान, एप्रिल १९५७]

(२) (१७६४ – १८३४ इ. स.) एक प्रतिभासंपन्न कवी. हा रीवा संस्थानाचा महाराजा होता. संस्कृत व हिंदी या दोन्ही भाषांवर याचे प्रभुत्व होते. अनेक पौराणिक कथांच्या आधारे याने काव्यरचना केली असून, ती पांडित्यपूर्ण, सरस व अलंकारयुक्त आहे. तो वैष्णव असल्याचे त्याच्या काव्यावरून कळून येते. त्याने एकूण १८ ग्रंथ रचले असे म्हणतात. कृष्णतरंगिणी, हरिचरितामृत, गंगालहरी, चतुःश्लोकी भागवत, निर्णयसिद्धांत, वेदान्तप्रकाश, अनुभवप्रकाश, हरिचरित्रचंद्रिका, ऋषभदेवकथा, बुद्धभगवानकथा, अवतारकथा अशी त्यांची नावे आहेत. [क. को.; श्रीचंद्र जैन – अजन्ता, जानेवारी १९५७]

जयहोम शत्रूवर विजय मिळविण्यासाठी करायचा होम. काही यजुर्मंत्र म्हणून एक होम केल्यामुळे देवांना असुरांवर जय मिळाला आणि त्यावरूनच या होमाला जयहोम असे नाव मिळाले, असे तैत्तिरीय संहितेत सांगितले आहे (३.४.४). बौधायन श्रौतसूत्रात (१४.१६) जयहोमाचा विधी स्वतंत्रपणे सांगितला आहे. जयहोमप्रसंगी तेरा यजुर्मंत्र म्हणतात. या प्रत्येक मंत्राने स्वतंत्र एक एक अथवा तेरा मंत्रांच्या नंतर एकदम तेरा आहुती देतात. [श्री. विद्याधरशास्त्री भिडे]

जया (१) माघ शु. एकादशीचे नाव. या दिवशी उपवास, विष्णुपूजा, इ. एकादशीची कृत्ये करायची असतात. फल- पापयोनीतून उद्धार. या व्रताची कथा अशी –

माल्यवान व पुष्पदंती हे गंधर्वांतले एक प्रणयी युग्म होते. एके दिवशी इंद्राच्या दरबारात नृत्य करीत असता पुष्पदंती चोरून माल्यवानाकडे पाहू लागली आणि तिचे पाऊल चुकले. माल्यवानाचाही ताल चुकला. त्यामुळे नृत्याचा विरस झाला. इंद्राला ते सहन झाले नाही. त्याने त्या दोघांना शाप दिला, की 'तुम्ही पिशाचयोनीत जा.' त्याप्रमाणे ती पिशाच होऊन हिमालयात भटकू लागली. एके दिवशी त्या दोघांचे भांडण झाले. त्यामुळे ती दोघेही त्या दिवशी जेवली नाहीत. मनस्तापामुळे त्यांना जागरणही घडले. तो दिवस एकादशीचा होता. अजाणता त्यांच्या हातून तिचे व्रत घडले. त्यामुळे ती शापमुक्त होऊन परत स्वर्गात गेली. मग इंद्राच्या आज्ञेने त्या दोघांचे लग्न झाले. [पद्म पु. उ. खं. ४३]

(२) एक देवता. वराह पर्वत हे हिचे स्थान मानले आहे (मत्स्य पु. १३.३२). राजप्रासाद बांधण्याच्या पूर्वी या देवतेच्या मूर्तीची पूजा करण्याची चाल होती. [पु. इं.]

जयातिथी तृतीया, अष्टमी व त्रयोदशी या तिथींना जया असे नाव आहे. या तिथींवर युद्धोपयोगी व सामर्थ्यदायक कृत्ये सुरू केली, तर ती यशस्वी होतात, असे सांगितले आहे. [हि. ध.]

जयादिदेवता जैनधर्मात जया, विजया, अजिता व अपराजिता अशा चार देवता मानल्या आहेत. या चौघींचाही द्वाररक्षक देवतांत अंतर्भाव होतो. यांचे मूर्तिध्यान पुढीलप्रमाणे–

जया – पूर्व द्वाराची रक्षक. वर्ण गौर. तीन हातात पाश, अंकुश व मुद्गल ही शस्त्रे धारण करणारी. हिचा चौथा हात अभयमुद्रेत असतो.

विजया – दक्षिण द्वाराची रक्षक. वर्ण आरक्त. शस्त्रे वरीलप्रमाणेच.

अजिता – पश्चिम द्वाराची रक्षक. वर्ण सोनेरी. शस्त्रे तीच.

अपराजिता – उत्तरद्वाराची रक्षक. वर्ण काळा. शस्त्रे तीच.

या देवता शांती आणि समृद्धी देतात, अशी समजूत आहे. धर्मघोषसूरी याच्या पार्श्वचिंतामणी या ग्रंथात वरील देवतांच्या आराधनेचे वर्णन आले आहे. नेमिचंद्राने प्रतिष्ठातिलकात त्यांना साधुदेवी म्हटले असून, त्या जैनधर्माचे रक्षण करतात व त्याचबरोबर प्रतिस्पर्धी धर्माचा पाडाव करतात, असेही सांगितले आहे. दिगंबर आणि श्वेतांबर या दोन्ही परंपरांत या देवतांना शांतिदेवता मानले आहे. प्रस्तुत देवतांचा अंतर्भाव जैनधर्मात कोणी केला, भगवान् महावीराने की त्याच्या मागून आलेल्या आचार्यांनी, ते अजून सिद्ध झालेले नाही.

पुढच्या काळात जैनधर्मात यक्षिणींचे महत्त्व वाढले आणि त्याचबरोबर अंबिका, चक्रेश्वरी, इ. देवताही लोकप्रिय झाल्या. त्या कारणाने वरील जयादिदेवता मागे पडून लोकांना त्यांचा विसर पडला. या देवता निव्वळ जैन आहेत, असे मात्र म्हणता येत नाही. प्राचीन काळी त्यांना इतर पंथांचे लोकही भजत असले पाहिजेत. कौटिल्याने आपल्या अर्थशास्त्रात त्यांचा उल्लेख केला आहे. [डॉ. उमाकांत प्रेमानंद शहा– विजयवल्लभसूरि स्मारक ग्रंथ]

जयाद्वादशी

पुष्यनक्षत्रयुक्त फाल्गुन शु. द्वादशीला हे नाव आहे. या दिवशी केलेल्या दानाचे व तपाचे कोटिफल मिळते, असे सांगितले आहे. [हि. ध.]

जयानंद

(जन्म १५१३ इ. स.) एक बंगाली कवी. याच्या बापाचे नाव सुबुद्धिमिश्र व आईचे रोदनी असे होते. हा मूळचा वर्धमान जिल्ह्यातील आमाईपुरा गावचा रहिवासी. सुबुद्धिमिश्र हा चैतन्याचा अनुयायी होता. त्याच्या विनंतीवरून चैतन्यप्रभू एकदा त्याच्या घरी आले होते. जयानंद तेव्हा तीन वर्षांचा होता. गुइआ हे त्याचे तेव्हाचे टोपण नाव होते. चैतन्यप्रभूंनी गुइआकडे पाहिले आणि त्याचे हास्यमुख पाहून जयानंद असें नाव त्याला ठेवले.

मोठेपणी जयानंदही चैतन्य संप्रदायात सामील झाला व त्याने चैतन्यमंगल नावाचे एक चरित्रकाव्य लिहिले. या काव्याचे वैशिष्टच हे, की त्यात चैतन्य महाप्रभूंच्या निर्याणाची समग्र आणि विश्वसनीय हकीगत वर्णिली आहे. इतर कुठल्याही चैतन्यचरित्रात महाप्रभूंचे निर्याण वर्णिलेले नाही.

चैतन्यमंगलाची भाषा सरल व प्रवाही असून ते पांचाली शैलीत लिहिले आहे. हा एक ऐतिहासिक महत्त्वाचा ग्रंथ मानला जातो. [हि. बें. लँ. लि.; बं. सा. क.]

जयापार्वतीव्रत

एक काम्य स्त्रीव्रत. हे पाच दिवसांचे व्रत आहे. याचा प्रारंभ आषाढ शुद्ध त्रयोदशीला होतो व समाप्ती कृष्ण तृतीयेला होते. प्रतिवर्षी पाच दिवस याप्रमाणे सतत वीस वर्षे हे व्रत करतात. शिव-पार्वती यांना उद्देशून हे व्रत करायचे असते. या व्रतात अळणी व स्वादहीन पदार्थांचे भोजन हा नियम मुख्य असतो.

वीस वर्षे झाल्यावर व्रतोद्यापन करतात. त्यासाठी शिव-पार्वतीची सिंहारूढ किंवा वृषभारूढ अशी सोन्या-रुप्याची प्रतिमा करून तिची देवालयात, गोठ्यात किंवा ब्राह्मणाच्या घरी स्थापना करतात. मग तिची व सप्तर्षींची पूजा करतात. पार्वतीला अर्घ्य देतात. सुवासिनींना हळदकुंकू देऊन भोजन घालतात. ब्राह्मण दंपतीची पूजा करून त्यांना वस्त्राभरणे देतात. रात्री जागरण करतात. फल- सौभाग्य, संतती व भुक्तिमुक्ती यांची प्राप्ती. या व्रताची कथा अशी–

पूर्वी कुंडिननगरात वामन नावाचा कर्मठ ब्राह्मण राहत होता. सत्या नावाची त्याची बायको होती. ब्राह्मण धनिक होता; पण त्याच्या पोटी संतान नव्हते. संतानाच्या अभावी ती दोघेही दुःख भोगीत होती. कालांतराने त्यांच्या घरी नारद आला. त्यांनी त्याला संतानप्राप्तीचा उपाय विचारला. त्यावर नारद म्हणाला–

‘जवळ एक अरण्य आहे. त्याच्या दक्षिणेला बेलाची झाडी आहे. तिच्यात एक शिवलिंग आहे. ते हुडकून काढून तू त्याची पूजा कर, म्हणजे तुला पुत्र होईल.’

वामनाने त्याप्रमाणे केले. त्याला ते शिवलिंग सापडले. पाच वर्षे त्याने त्याची पूजा केली. एकदा तो ब्राह्मण फुले आणण्यासाठी वनात गेला असता त्याला सर्पदंश झाला. तो लगेच मरून पडला. बराच वेळ त्याची वाट पाहून त्याची पत्नी त्या अरण्यात गेली. तिला तिथे आपल्या पतीचे प्रेत दिसले. तिने मग तिथल्या वनदेवतांची प्रार्थना केली. त्याच वेळी पार्वती त्या अरण्यात आली होती. तिने त्या दंपतीला पाहिले व तिला करुणा आली. तिने वामनाच्या मुखात अमृत बिंदू टाकला. लगेच तो उठून बसला. मग त्या उभयतांनी पार्वतीची स्तुती केली व संतान मागितले. पार्वतीने त्यासाठी त्यांना जयापार्वतीव्रत करायला सांगितले. ब्राह्मणपत्नीने ते केले व त्या व्रताच्या प्रभावाने त्या दंपतीला पुत्रलाभ झाला. [व्रतराज]

जयाभिषेक जय मिळण्यासाठी केला जाणारा अभिषेक. पूर्वी राजे लोक स्वारीवर निघण्यापूर्वी असा अभिषेक करून घेत. हा विधी सामान्यपणे राज्याभिषेकासारखाच आहे. जयाभिषेकाच्या योगे अपमृत्यूही टळतो, असे सांगितले आहे. याचा विधी असा–

प्रथम मंडप घालतात. त्यात पाणपोई बसवतात. नऊ अग्नींचे अन्वाधान करतात. मग पूर्वपश्चिम व दक्षिणोत्तर अशा रेघांनी ४९ कोठ्यांचे एक कोष्टक तयार करतात. त्यांतल्या मधल्या ९ घरांत गोमयाने सारवून अष्टदळ कमळ काढतात. त्या कमळाच्या आठही दलांवर व मधल्या कर्णिकेत निरनिराळ्या देवतांची स्थापना करतात. मग एका पटावर वेगवेगळ्या ठिकाणी वेगवेगळ्या धान्यांची कमळे काढतात. मग त्या कमळांवर प्रणवस्थापना करून त्यावर कुंभ-स्थापन करतात. हे कुंभ गंधोदकाने भरतात व त्यांना सूत गुंडाळतात. या कुंभांत शिवकुंभ नावाचा एक मोठा कुंभ असतो. त्यावर शिवगायत्री मंत्राने शिवाची स्थापना करतात. त्याच्याच शेजारी देवीसाठी वर्धनी नावाचा आणखी एक कुंभ स्थापतात. नंतर रुद्राध्याय म्हणून त्या कुंभातल्या जलाने शिवलिंगाला अभिषेक करतात. मग राजाला पूर्वाभिमुख बसवून ‘अघोरेभ्योऽथ घोरेभ्यो …’ इ. मंत्रांनी त्या कुंभातल्या जलाने अभिषेक करतात. मग अग्नी सिद्ध करून साळी, घृत, समिधा, चरू, नीवार किंवा तांदूळ यांचे १०८ हवन करतात. मग पुण्याहवाचन करून राजाच्या हातात कंकण बांधतात व त्याला पुन्हा अभिषेक करतात. त्यानंतर राजाला वस्त्राभरणे, शिबिका, ध्वज, इ. राजचिन्हे देऊन त्याचा जयजयकार करतात. मग ब्राह्मण, शिवभक्त व योगी यांना दक्षिणा देतात.

या अभिषेकाच्या योगाने इंद्राला इंद्रपद प्राप्त झाले, अशी कथा आहे. [लिंग पु. उ. २७; हि. ध.]

जयावतीसिद्धी तंत्रमार्गातील एक विधी. आषाढ ते भाद्रपद या तीन महिन्यांत रोज रात्री निर्जन अरण्यातील सरोवराच्या पाण्यात बसून ‘ॐ ह्रीं क्लीं स्त्रीं हुँ ब्लुं जयावती यमनिकृन्तनि क्लीं क्लीं ठः।’ या मंत्राचा जप केला असता जयावती नायिका प्रकट होऊन साधकाला वर देते असे सांगितले आहे. [ध. तं. शि.]

जयावाप्ती एक काम्यव्रत. या व्रतात आश्विन कृ. प्रतिपदेपासून कार्तिक पौर्णिमेपर्यंत नित्य विष्णुपूजा करतात. तेवढे न जमल्यास शेवटचे तीन दिवस तरी पूजा करतात. फल– विवादात यश. [हि. ध.]

जयाव्रत हे व्रत कार्तिक शु. पंचमीला करतात. व्रतकर्ता आह्निककृत्ये आटोपून जयरूप हरी व त्याच्या वामभागी जया या देवतांची स्थापना व पूजा करतो. मग त्यांना अर्घ्य देतो. यानंतर एका वेळूच्या पात्रात सप्तधान्ये भरून व त्यावर लालवस्त्र आच्छादून ते पात्र ब्राह्मणाला दान देतो.

मग एका वस्त्रात गंध, पुष्प, अक्षता, मोहऱ्या व दूर्वा या वस्तू ठेवून त्यांची ‘ रक्षापोटलिका ’ तयार करतात. ती पोटली व्रतकर्त्याच्या दंडात बांधतात. फल– ब्रह्महत्यादी पापांची निवृत्ती व सुखप्राप्ती. [व्र. प.]

जयासप्तमी रोहिणी, आश्लेषा, मघा किंवा हस्त या चार नक्षत्रांपैकी कोणतेही एक नक्षत्र ज्या सप्तमीला येईल आणि कोणत्याही पाच ग्रहांची युती ज्या सप्तमीला असेल, तिला जयासप्तमी असे नाव आहे. या दिवशी सूर्यपूजेला प्रारंभ करून ती सतत एक वर्ष करतात. दर महिन्याचे समान तीन भाग करून, त्या प्रत्येक भागात पूजेसाठी निरनिराळी फुले, धूप व नैवेद्य घेतात. [हि. ध.]

जयासाधन तंत्रमार्गातला एक विधी. एका अमावास्येपासून दुसऱ्या अमावास्येपर्यंत दररोज ‘ ॐ ह्रीं ह्रीं नमोनमः जया हुं फट् । ’ या मंत्राचा पाच हजार जप करतात. हा जप शक्यतो एकान्तस्थळी किंवा शिवालयात करतात. जप पुरा झाल्यावर मध्यरात्री जया नामक नायिका प्रकट होऊन साधकाला वर देते, असे सांगितले आहे. [ध. तं. शि.]

जरंडा एक डोंगर. हा दक्षिण रेल्वेच्या सातारा रोड स्टेशनपासून दोन मैलांवर आहे. रावण–लक्ष्मण यांच्या युद्धात रावणाची शक्ती लागून लक्ष्मण बेशुद्ध पडला असता त्याला उठवण्यासाठी सुषेण नावाच्या वैद्याने हनुमंताला द्रोणागिरी पर्वतावरील महौषधी आणण्यास सांगितले. त्या औषधीसाठी हनुमंताने द्रोणागिरी पर्वतच उचलून आणला. येताना वाटेत त्या पर्वताचा एक तुकडा गळून पडला, तोच हा जरंडा डोंगर होय.

या डोंगरावर हनुमंताची एक स्वयंभू मूर्ती आहे. हनुमंतालाच जरंडेश्वर म्हणतात. शिवाय इथे श्रीरामाचेही एक मंदिर असून, त्या मंदिराच्या दारावर जय–विजयांच्या प्रचंड मूर्ती आहेत. रामदासस्वामींनी इथे एका घळीत बसून तपश्चर्या केली होती, असे सांगतात. इथेच आरफळची पायरी म्हणून एक पायरी प्रसिद्ध आहे. आरफळची देवी या डोंगरावर

राहण्यास आली असता, हनुमंताने तिला नकार दिला व ती या पायरीवरूनच परत आरफळास गेली, अशी आख्यायिका सांगतात. या पायरीच्या थोडे पुढे मुळारंभ नावाचे एक स्थान आहे. ही मारुतीच्या शेपटीची खूण आहे, असे सांगतात.

रामनवमी, हनुमानजयंती व श्रावणातील प्रत्येक शनिवार या दिवशी इथे मोठी जत्रा भरते.



जरंडेश्वर

[कल्याण-तीर्थांक; स. भा. प्र. व.; श्री. रं. न. होनप– पुरुषार्थ– देवता विशेषांक, जून-जुलै, १९६३]

जरा एका राक्षसीचे नाव. हिला देवताही मानतात. ही मगधात राहत होती. जरासंघ या मगध सम्राटाचे नाव तिच्या नावावरूनच पडले आहे. हा बृहद्रथाचा पुत्र होता. तो दोन शकलांच्या रूपात जन्मला आणि ती शकले नगराबाहेर फेकून दिली गेली. पण जरा राक्षसीने ती शकले जुळवून त्या मुलाला जिवंत केले. ही कथा महाभारतात आली आहे. महाभारतात तिचे वर्णन आहे, ते असे–

ही कामरूपिणी व नररक्तमांस भक्षक होती. मगधातले निषाद लोक तिची भक्ती करीत. राजघराण्यातही तिची पूजा-अर्चा चाले. गृहदेवी असे तिचे दुसरे नाव होते. राजवाड्याच्या भिंतीवर एक तरुण स्त्री व तिच्याभोवती बरीचशी मुले असे तिचे चित्र रंगवले जात असे. जो मनुष्य आपल्या घराच्या भिंतीवर असे चित्र काढतो, तो श्रीमंत होतो व जो काढीत नाही तो दरिद्री बनतो (म. भा. सभा. १८·१·६).

जरा देवीची कथा बौद्ध साहित्यातही आली आहे. तिथे तिला हारीती म्हटले आहे. ती प्रथम मुले खाणारी राक्षसी होती. पुढे बुद्धाने आत्मसामर्थ्याने तिच्यामध्ये मातृत्वाची भावना जागृत केली आणि तेव्हापासून ती बालकांची रक्षणकर्ती देवी म्हणून पूजिली जाऊ लागली. त्या कथेतही तिने एका नवजात अर्भकाच्या देहाचे तुकडे आपल्या मंत्रबलाने जोडून, ते बालक राजाच्या स्वाधीन केले व ती स्वतः मातृत्व भावनेने युक्त होऊन अंतर्धान पावली. पुढे मगधात तिचा महोत्सवही होऊ लागला. घरोघरी लोक भिंतीवर तिची चित्रे काढू लागले व तिला अनेक पुत्रांची माता असे समजू लागले. महाराष्ट्रात घरोघर जिची पूजा होते त्या जिवतीशी हिचे साधर्म्य दिसते. पाहा – हारीती. [डे. हिं. इ.; भा. सा.]



जरा राक्षसी

जरिगाननृत्य आसामधील शेतकऱ्यांचे एक नृत्य. हे नृत्य बहुतेक सर्व प्रमुख उत्सवांच्या प्रसंगी करतात. प्रस्तुत नृत्याच्या वेळी गायल्या जाणाऱ्या गाण्यांत पौराणिक आख्यानांपासून प्रचलित सामाजिक विषयांपर्यंत सर्व तऱ्हेची गाणी असतात. मुख्यत्वे तरुण पुरुष हे नृत्य करतात आणि वृद्ध मंडळी त्याची गाणी गातात. नृत्याच्या वेळी धोतर, बंडी आणि पांढरी टोपी हा नर्तक तरुणांचा वेष असतो. गायकांच्या हातांत रंगीत रुमाल आणि गळ्यांत फुलांच्या माळा असतात. [ए. हो. रा.]

जरीपटका मराठ्यांचे एक निशाण. भगवा झेंडा हा मराठी राज्याचा राष्ट्रीय ध्वज होता. पण अष्टप्रधानांपैकी सेनादलाशी संबंधित अशा प्रधानांना (पेशवे, प्रतिनिधी व सेनापती) छत्रपती स्वतःचा असा खास जरीपटका देत. युद्धाच्या प्रसंगी भगव्या ध्वजाबरोबर जरीपटक्याचा हत्तीही सैन्याच्या आघाडीवर असे. शाहू महाराजांच्या वेळी पेशवे हेच राज्याचे सर्वाधिकारी झाल्यामुळे त्यांच्या जरीपटक्यालाही मोठा मान मिळू लागला. तथापि त्यावेळी देखील भगवा झेंडा

हाच राष्ट्रध्वज होता व पेशव्यांच्या सेनेने जिंकलेल्या ठाण्यावर तोच फडकावला जात असे. जरीपटका दुय्यम होता.

मेजर टोन याने जरीपटक्याचे वर्णन केले आहे, ते असे – हा पाकोळीच्या शेपटीच्या आकाराचा लहानसा ध्वज असतो. त्याच्यावर सोनेरी नक्षीकाम केलेले असते. पेशवे स्वत: स्वारीवर जातात, तेव्हाच हे निशाण सैन्याबरोबर फडकत जाते.

काही जुन्या कागदपत्रांवरून असे कळते, की शिवाजी महाराजांच्या आधीपासूनच जरीपटका व भगवा झेंडा ही भोसले घराण्याची निशाणे होती. [म. ज्ञा. को.; इति. सह.]

जरीमरी महाराष्ट्र राज्यातील एक भिक्षेकरी जात. यांना पटकी रोगाचे भिक्षेकरी असेही म्हणतात. हे लोक अत्यंत विचित्र वेषभूषा करतात. हे केसांच्या वेण्या घालतात. सबंध कपाळ शेंदूर लावून रंगवतात व पायात, कमरेला आणि हाता-पायांच्या बोटांत पितळी घुंगरे बांधतात. जरीमरी चालू लागला, की त्याच्या घुंगरांचा सारखा आवाज होत राहतो.

हे लोक अंगात लांब चोगा व पायात पायजमा घालतात. कमरेला व हातांना अनेकरंगी चिंध्या गुंडाळतात. रस्त्याने जाताना हे लोक नाचत नाचत व स्वत:भोवती गिरक्या घेत चालतात. त्यामुळे त्यांच्या कपड्यांचा फुगीर वाटोळा घोळ होतो. सामान्यत: हे दोघे-दोघे, तिघे-तिघे मिळून हिंडतात. भिक्षा मागताना हातातील तागाच्या आसुडाने स्वत:च्या अंगावर जोरजोराने फटके मारून घेतात व मोठ्याने आरोळ्या ठोकतात. आसूड मारून घेताना त्याचा आवाजच फक्त मोठा होतो; पण प्रत्यक्ष शरीराला काहीच इजा होत नाही. बहुश: हे लोक महार, मांग, इ. जातींतून जरीमरींच्या जातीत शिरलेले असतात. जरीमरीला चार-दोन पैसे अगर मूठभर तांदूळ दिले तरी त्याला संतोष होतो. त्याला सुपात घालून तांदूळ दिले, की तो ते सूप घेऊन नाचू लागतो. नाचताना सूप गरगरा फिरते; पण त्यातला एकही तांदूळ खाली पडत नाही. तसेच एका सुपातून दुसऱ्या सुपात तांदूळ ओतत असतानाही तांदूळ खाली सांडत नाही.

यांच्या एकूण वर्णनावरून हे कडकलक्ष्मीच्या वर्गातले आहेत, असे वाटते. [बाँ. बे. क्रा.]

जल पाण्याचे संस्कृत नाव. याची व्याख्या अशी– ‘जलति जीवयति लोकानिति’ = लोकांना जगवते ते जल होय. जल हे पंचमहाभूतांतले पृथ्वीच्या वरचे भूत आहे. याचा वर्ण शुक्ल, रस मधुर व स्पर्श शीतल आहे. द्रवत्व हा याचा स्वाभाविक गुण आहे. जल हेच सर्व वस्तूंच्या उत्पत्तीचे मूळ कारण आहे, असे बृहदारण्यकात म्हटले आहे (५. १)

सर्व दानांत अन्नदान हे श्रेष्ठ सांगितले आहे; पण अन्न हे पाण्यावाचून पचत नाही, अंगी लागत नाही. म्हणून जलदान हे त्याहूनही श्रेष्ठ मानले आहे.

तच्च दद्यान्नरो नित्यं यदीच्छेद्भूतिमात्मनः ।
धन्यं यशस्यमायुष्यं जलदानमिहोच्यते ।।

अर्थ – ऐश्वर्याची इच्छा करणाऱ्या मनुष्याने नित्य जलदान करावे. ते धन्य, यशस्कर व आयुष्यवर्धक म्हटले आहे.

म्हणूनच जुन्या काळी कित्येक धार्मिक लोक उन्हाळ्यात पाणपोया घालीत असत.

पाणी पिताना ते डाव्या हाती भांडे धरून पिऊ नये. प्याल्यास ते सुराप्राशनासारखे होते, असे मनू व प्रजापती यांचे मत आहे.

जलदानाप्रमाणेच जलात भगवंताची पूजा करावी, असेही एक विधान आहे. (जलशयनव्रत पाहा)

उन्हाळ्यात विशेषत: अक्षय्य तृतीयेच्या दिवशी पितरांना उद्देशून जलपूर्ण उदकुंभ दान द्यायचा असतो. जल हे पावक व शोधक असल्यामुळे समुद्र, नद्या, कुंडे, सरोवरे, इ. ठिकाणी स्नान केल्याने मनुष्य पवित्र होतो, असा तीर्थ महिमा सांगितलेला आहे. एखाद्या वस्तूची शुद्धी करायची झाल्यास तिच्यावर जलप्रोक्षण करतात. पाहा– आप, तीर्थ. [श. क.]

जलकृच्छ्रव्रत कार्तिक कृष्ण चतुर्दशीस विष्णुपूजा व पाण्यात उभे राहून उपवास करणे, असा या व्रताचा विधी आहे. फल – विष्णुलोकाचीप्राप्ती. प्रायश्चित म्हणूनही हे व्रत करतात. त्यात एक महिनाभर केवळ सातूचे पीठ पाण्यात कालवून खायचे असते. एक दिवस व एक- रात्र काहीही न खाता पाण्यात बुडून राहून वरुणाच्या मंत्राचा जप केला असता वर्षभर केलेल्या पापांचे क्षालन होते, असे सांगितले आहे. दिवसा उभे राहून व रात्री न झोपता पाण्यात काळ कंठावा व दुसऱ्या दिवशी १००८ वेळा गायत्री मंत्र जपावा, असाही पर्याय सांगितला आहे. या व्रताला उदककृच्छ्र, तोयकृच्छ्र, वरुणकृच्छ्र अशीही अन्य नावे आहेत. [हि. ध.]

जलगडुगू द. भारतातील एक जात. सोनाराकडील केरकचऱ्यातून किंवा गटारातून सोने शोधून काढणे, हा यांचा व्यवसाय आहे. जल म्हणजे पाणी व गडुगू म्हणजे धुणे. यावरून आमचे नाव जलगडुगू पडले, अशी हे आपल्या नावाची व्युत्पत्ती सांगतात. सोने धुण्याचे काम बहुधा यांच्या घरातील वृद्ध स्त्रियाच करतात. त्यासाठी एका मोठ्या पातेल्यात सारा

केरकचरा टाकून त्यात पाणी ओततात. त्यामुळे हलक्या वस्तू वर येतात. मग खाली राहिलेल्या गाळात पारा व मीठ घालून ते मिश्रण मातीच्या भांड्यात घालतात व भट्टीत तापवून त्यातून सोने वेगळे करतात. [का. ट्रा. स. इं.]

जलतरंग एक घन वाद्य. यात पूर्वी धातूचे पेले वापरीत; पण इ. स. च्या १० व्या शतकानंतर चिनी मातीचे पेले वापरू लागले. हे पेले क्रमाने वाढत्या आकाराचे असतात. ते पेले वादकाच्या समोर अर्धमंडलाकार ठेवून त्यांत पाणी घालतात. बांबूच्या दोन बारीक काठ्यांनी पेल्यांच्या काठांवर आघात करून हे वाद्य वाजवतात. पाण्यामुळे पेल्यांना स्थिरता येते व पाणी कमीजास्त करून स्वरांची उंची बदलता येते. पाण्यामुळे गमकनिर्मितीही करता येते. एकराग मेळविणेप्रमाणे यात एका वेळी एकच स्वरसप्तक वापरता येते.



जलतरंग

या वाद्यात निरनिराळ्या स्वरछटा काढता येतात आणि जलदगतीचे स्वरसमुच्चयही निर्माण करता येतात. वाद्यवृंदातील हे एक आकर्षक वाद्य असून, त्यावर काही प्रमाणात रागांचे आलापनही करता येते. यात ६४ काल असतात.

शिकंदराने दिलेल्या एका मेजवानीनंतर एका भारतीय वादकाने जलतरंग वाजवून दाखवल्याचा उल्लेख आढळतो. वात्स्यायनाच्या कामसूत्रातही याचा निर्देश आहे. याला पूर्वी उदकवाद्य असे नाव होते. [डि. सा. इं. म्यु. म्यु.]

जलदेवता जलात, जलाशयाजवळ किंवा जलप्रवाहाच्या सान्निध्यात निवास करणाऱ्या पिशाचसदृश देवता. जलामुळे मानवी जीवनावर होणाऱ्या इष्टानिष्ट परिणामांमुळे अतिप्राचीन काळापासून जलाशय व जलप्रवाह यांनाच देवतास्वरूप दिले गेले आहे; परंतु या जलदेवता जलस्वरूपी देवतांहून वेगळ्या आहेत. या विघ्नकर्त्या म्हणूनच प्रसिद्ध आहेत. पाण्यात उतरलेल्या एकट्या-दुकट्या माणसाचा त्या बळी घेतात आणि त्यांच्या कक्षेत आलेल्या तरुण स्त्रिया व मुले यांना बाधा करतात, अशी समजूत आहे. महाराष्ट्रात त्यांना आसरा म्हणतात. त्यांची संख्या सात असल्यामुळे त्या 'साती आसरा' म्हणून ओळखल्या जातात. आसरा शब्दाची व्युत्पत्ती अप्सरा शब्दापासूनच आहे. अप्सरा (अप् + सरा) म्हणजे जलात विहार करणाऱ्या स्त्रिया. वेदांत आणि पुराणांत निर्दिष्ट असणाऱ्या, मेघात विहार करणाऱ्या आणि जलक्रीडा करणाऱ्या प्रमुख अप्सरांची संख्या अमरकोशात सातच आहे–

घृताची मेनका रम्भा ऊर्वशी च तिलोत्तमा ।
सुकेशी मञ्जुघोषाद्याः कथ्यन्तेऽप्सरसो बुधैः ।।

साती आसरांची नावे माछी (मत्स्यी), कूर्मी, कर्कटी, दर्दुरी जतुपी, सोमपा आणि मकरी अशी जलचरांच्या नावावरून साधलेली आहेत. म्हैसूर विभागात 'अक्कगारु' या नावाने ओळखल्या जाणाऱ्या जलदेवतांची संख्या सातच असून, त्या बहिणी बहिणी आहेत, अशी समजूत आहे. या आदिम स्वरूपातल्या सप्तमातृकाच होत, असे मानायला जागा आहे. कारण महाराष्ट्रात त्यांना मावल्या (माउल्या = मातृका) असेही म्हणतात. गुजरातमध्येही काही जलदेवतांना माता या नावाने संबोधतात. दक्षिण भारतात सात बहिणी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या स्थलदेवतांना जसा पोट्टुराजू नावाचा एक भाऊ असतो, तसाच या साती आसरांना गवळा नावाचा एक भाऊ आहे. पूर्व किनाऱ्यावरील कोळी लोकांच्या ओरुसंदिअम्मा या जलदेवतेच्या भावाचे नाव रामसोंदी असे आहे.

गोंडांच्या उत्पत्तिकथेत सात आसरा या सात समुंदरिया या नावाने उल्लेखिलेल्या आहेत. गोंड त्यांना दौगनगुरूच्या (देवगणगुरूच्या) कन्या मानतात. त्यांचा उद्भव दौगनगुरूच्या तळहातावरील फोडापासून झाला. पित्याचे त्यांच्यावर अत्यंत प्रेम होते. तो त्यांना सतत आपल्या मांडीवर बसवून घेई आणि सूर्यालाही त्या दिसणार नाहीत अशा ठिकाणी त्यांना ठेवी. पण एकदा पवनदेवाची वाट चुकली आणि त्याने त्या सात समुंदरियांना नाचताना पाहिले. त्यांच्या सौंदर्याने तो मोहित झाला आणि त्याही त्याच्यावर भुलल्या. दौगनगुरूला हे समजताच तो संतापला आणि त्याने पवनदेवाला हाकलून देऊन

आपल्या मुलींना कोंडून ठेवले. पुढे पवनदेवाने महादेवाला आणि दौगनगुरूच्या मुलांना वश करून घेऊन सात समुंदरियांना पळवून नेले व त्यांच्याशी लग्न लावले.

गोंडांच्या दुसऱ्या एका कथेनुसार याच सात समुंदरियांना महादेवाने एका कोठडीत बंद करून ठेवले होते. महादेवाने पार्वतीला बजावले होते, की यांतल्या सहा कोठड्या उघडून पाहा; पण सातवी पाहू नकोस. परंतु महादेव बाहेर गेल्यावर तिने स्त्रीसुलभ जिज्ञासेने ती कोठडी उघडली. तोच त्या सात आसरा पार्वतीच्या उदरात शिरल्या. तेव्हापासून पार्वतीला रजस्राव, गर्भधारणा व बाळंतपण यांचे क्लेश सहन करावे लागले. त्यांच्यामुळेच स्त्रियांना अजूनही हे क्लेश भोगावे लागतात, असा समज आहे.

वऱ्हाडात सात आसरा या अत्यंत तामसी प्रकृतीच्या मानलेल्या असून, त्या पाण्याशी संबंध असणारे रोग उत्पन्न करतात, अशी समजूत आहे,

ग़िन्हा, खवीस, झोटींग, जखीण, बिलाशी, लाव, बापदेव, हडळ, इ. पिशाचांचाही जलाशी संबंध मानला जातो. या जलदेवतांच्या बाधेतून मुक्त होण्याठी अथवा त्यांना प्रसन्न करण्यासाठी कोंबड्या – बकऱ्याचा बळी देण्यांची प्रथा आहे. जुन्या काळी माणसाचाही बळी देत असत. महाराष्ट्रात प्रचलित असलेल्या शिळासप्तमीच्या कहाणीत त्यांच्यासाठी एका लहान मुलाचा बळी दिल्याचा उल्लेख आहे. महाराष्ट्रात साती आसरा सात शेंदरी दगडांच्या स्वरूपात पूजिल्या जातात. स्त्रियांना त्यांची बाधा झाली असेल, तर त्यांच्या प्रीत्यर्थ सात सुवासिनींना जेवू घालून खणा–नारळांनी त्यांची ओटी भरण्याची चाल आहे. पाहा– अप्सरा. [लौकिक दंतकथा; एन्सा. रि. ए.; श्री. दुर्गा भागवत – नवभारत, नोव्हें. १९५९]

जलधर एक राग. याला मेघरागाचा पुत्र मानतात. यात गंधार वर्ज्य असून, बाकीचे स्वर शुद्ध लागतात. हा राग शुद्ध स्वरूपात प्रचारात नाही. याचे ध्यानस्वरूप असे–

जलमहालात बसलेला. सभोवती पाण्याचे उडते फवारे. भोवताली पाच स्त्रिया व त्यांच्या सख्या. शरीर उघडे. अंगाला उटणे लावलेले. गानविद्येत निपुण असलेल्या स्त्रियांना अत्यंत प्रिय. [श्री. आबासाहेब मुजुमदार, पुणे]

जलधर केदार एक राग. हा केदार अंगाचा आहे. याची जाती औडव आहे. यात गंधार व निषाद हे वर्ज्य असून, बाकीचे सर्व स्वर शुद्ध लागतात. वादी – मध्यम. संवादी– षड्ज. आरोह– सा, रे, सा, म, म, प, ध, सा. अवरोह– सा, ध, प, म, रे, सा, गानसमय रात्रीचा दुसरा प्रहर. [श्री आबासाहेब मुजुमदार, पुणे]

जलधा एक जात. यांची वस्ती आसामात आहे. यांना काचारी जातीतले पतित समजतात. पण जलधा मात्र स्वतःला काचारीपेक्षा श्रेष्ठ समजतात. जलधा व काचारी यांच्यांत विवाहसंबंध होत नाही. तसा संबंध करायचा झाल्यास प्रथम मुलीला प्रायश्चित्त देऊन मुलाच्या जातीत घेतात. हे लोक धार्मिक कृत्यांसाठी ब्राह्मण व नापित यांना बोलावतात. [म. ज्ञा. को.]

जलधेनुदान ज्येष्ठ शुक्ल एकादशीला जलधेनूचे दान द्यावे, असे स्कंद पुराणात सांगितले आहे; तर वराह पुराणात कोणत्याही शुभदिनी हे दान द्यावे, असे म्हटले आहे या दानाचा विधी असा–

गोचर्मएवढा भाग गोमयाने सारवून त्याच्यावर जलपूर्ण कुंभाची स्थापना करावी. सोने, चांदी, तांबे, मोती, शिंप, इ. वस्तूंची एक धेनू आणि घृताचे एक वासरू बनवावे. कृष्णाजिनावर ती सवत्स धेनू ठेवून तिची पूजा करावी. तिला पांढऱ्या दोन वस्त्रांनी आच्छादावे. वर दूर्वांकुर ठेवावे. जवळच उशीर, जटामांसी, आवळा, प्रियंगू, इ. वनस्पती आणि छत्री, जोडा व कुशासन ठेवावे. चार दिशांना तूप, दही मध व साखर यांची पात्रे ठेवावी. नंतर वासुदेवाची पूजा करून ती धेनू ब्राह्मणाला दान द्यावी. त्या दिवशी उपवास करावा. फल– सर्वपापनाश व विष्णुलोकप्राप्ती. [श. क.; व्र. प.]

जलपूजन मूल जन्माला आल्यापासून एक महिना पुरा झाल्यावर बुध, सोम व गुरू या वारीं शुभ तिथी व शुभ नक्षत्र असता बालकाच्या मातेने मुलासह जलाशयावर जाऊन जलपूजन करावे, असे सांगितले आहे. [सं. कौ.]

जलयात्रा राजस्थानातील एक सण. हा विष्णूचा सण म्हणून प्रसिद्ध आहे. कार्तिक शुद्ध चतुर्दशी हा या सणाचा दिवस होय. या दिवशी मेवाडचे राणे, सरदार, मानकरी, मंत्री व नागरिक मिळून तलावावर मिरवणूक काढतात व जलपूजा करतात. या वेळी पाण्यावर तरंगते दिवे सोडतात. [अॅ. अॅ. रा.]

जलवैकृतशांती नदी अथवा कोणताही जलाशय यांच्यातून ज्वाला किंवा धूर उत्पन्न होणे. विहिरीतले

पाणी उकळू लागणे, पाण्याला दुर्गंधी येणे, न खणताच पाणी वर येणे, इ. विपरीत गोष्टींना जलवैकृत असे म्हणतात. अशा प्रसंगी शांती करावी, असे सांगितले आहे. या शांतीत वरुणाची पूजा, वरुणमंत्राचा जप व होम करतात.

अशाच प्रकारची जलाशयवैकृत नावाची दुसरीही एक शांती सांगितली आहे. त्या शांतीत गोप्रदान व उदकुंभदान हे विधी अधिक करायचे असतात. [शां. क.]

जलशयनव्रत एक काम्य व्रत. वैशाख पौर्णिमेस विष्णूला जलात निजवून त्याची पूजा करणे व रात्री जागरण करणे असा याचा विधी आहे. चैत्र-वैशाखात सूर्यताप असह्य झाला असता शीतल व सुगंधी जलाने पात्र भरून त्यात श्रीकृष्णाची मूर्ती ठेवावी व तिची पूजा करावी. सायंकाळी पाण्यातून मूर्ती काढून सिंहासनावर बसवावी. नंतर ते पाणी तीर्थ म्हणून प्राशन करावे. विशेषतः सूर्य मिथुन राशीत असता द्वादशीच्या रात्री श्रीविष्णूची ही जलपूजा पुण्यप्रद असते. तसेच अत्युष्ण काली यमुना नदीत श्रीविष्णूचा जलक्रीडामहोत्सव करावा, असेही सांगितले आहे (हरिभक्ति विलास १५). फल – विष्णुपदाच्या ठिकाणी वास्तव्य.

जलियसुम् मध्यप्रदेशातील आदिवासींचा एक दुष्ट देव. त्याला ते यमदूत मानतात. त्याची मूर्ती नसते. तिच्या जागी मोरपिसांचा एक कुंचा उभा केलेला असतो. [ट्रा. आ. मि. इं.]

जलेश्वर अमरकंटक क्षेत्रातील एक तीर्थ. इथे श्राद्ध करावे, असे सांगितले आहे. शिव त्रिपुरे जाळीत असता बाणासुर आपल्या मस्तकावर शिवलिंग घेऊन शंकरापुढे आला, तेव्हा शिवाने त्याला जीवदान दिले. ही घटना या ठिकाणी घडली म्हणून या स्थानाला पावित्र्य प्राप्त झाले. [पु. इं.]

जलौघास्त्र अस्त्रविद्येतले एक अस्त्र. हे सोडल्याने मुसळधार वृष्टी सुरू होई. याचा प्रतिकार आदित्यास्त्राच्या द्वारे केला जात असे (म. भा. द्रोण. ३०).

जवरा कोकणातील कुणब्यांचा एक देव. हा यमराज याचा अपभ्रंश आहे. रोगबाधा दूर होण्यासाठी याला नवस करतात व वैशाखाच्या महिन्यांत वद्य पक्षातल्या शनिवारी तो फेडतात. त्या दिवशी दिवसभर कडक उपोषण करून सायंकाळी बाजेवर एक पागोटे ठेवतात व त्याची पूजा करतात. पूजेला कुडयाची फुले आवश्यक असतात. [बदलापूर]

जवळ ब्राह्मण एक जात. यांची वस्ती मुख्यत्वे कोकणात आढळते. हे मूळचे द. भारतात राहणारे; परंतु कोणत्या तरी आपत्प्रसंगी ते आपल्या मुलाबाळांसह कोकणात आले. दापोलीजवळ वादळात (जवुळ) सापडून त्यांचे गलबत फुटले. त्यातून जे बचावले ते किनाऱ्याला लागले व त्याच भागात स्थायिक झाले. जवुळातून वाचले म्हणून यांना जवळ ब्राह्मण असे नाव पडले. हे ऋग्वेदी शाकलशाखी असून, आश्वालायन सूत्राप्रमाणे आपली धर्मकृत्ये करतात. यांना खोत ब्राह्मण असेही म्हणतात. [मुं. इ. जा.]

जसनाथ (इ. स. १४८२–१५०६) एक सिद्ध पुरुष. बिकानेर विभागातील कतरियासार या गावी याचा जन्म झाला. बाळपणापासूनच याला प्रतिभेचे देणे लाभले होते. लहानपणीच भागथली या ठिकाणी याची व गोरखनाथाची भेट झाली. गोरखनाथाच्या उपदेशाने तो विरक्त होऊन आध्यात्मिक साधना करू लागला. पुढे लवकरच त्याला सिद्धपद प्राप्त झाले.

जसनाथाने तत्कालीन समाजात प्रचलित असलेल्या हिंसादी दुष्ट प्रवृत्तींच्या विरुद्ध जोरदार प्रचार केला. त्याने लोककल्याणार्थं छत्तीस धर्मनियम सांगितले. हे नियम सिद्ध संप्रदायाचे आधारभूत मानले जातात.

हा चौवीसाव्या वर्षीच समाधिस्थ झाला. कतरियासार गावी याच्या समाधीवर मंदिर बांधलेले असून, ते एक तीर्थस्थान बनले आहे. याच्या पुण्यतिथीच्या दिवशी तिथे याचे हजारो अनुयायी जमतात.

जसनाथाच्या अनुयायांना जसनाथी सिद्ध म्हणतात. ते जसनाथाने प्रतिपादलेल्या छत्तीस धर्मनियमांचे पालन करतात. मस्तकावर भगव्या रंगाची पगडी हे त्यांचे अभिज्ञान चिन्ह होय. बिकानेर विभागातील अनेक गावी जसनाथाची स्मारके आहेत. त्या ठिकाणीही यात्रा भरतात. सर्व ठिकाणी रात्री जागरण असते. जसनाथाने अनेक पद्ये रचली आहेत. जागरणाच्या वेळी भक्तमंडळी ती पदे नगारा व मंजीर यांच्या साथीवर गातात. [धर्मयुग– २८ मार्च १९६५]

जसनाथी अग्निनृत्य राजस्थानातील बिकानेर व जोधपूर मंडलातील जाट व जसनाथी सिद्ध जळत्या निखाऱ्यांच्या खाईतून नाचत जातात, त्याला हे नाव आहे. त्यासाठी साधारणपणे सात फूट लांब, चार फूट

रुंद व तीन – चार फूट उंच असा निखाऱ्यांचा ढीग करतात. निखारे बनवण्यासाठी शमी वृक्षाची लाकडे वापरतात.

मग ते सिद्ध जसनाथाची व रुस्तमजीची काही पदे गातात आणि नाचासाठी तयार होतात. नाचण्यापूर्वी निखाऱ्यांच्या चारी बाजूंना पाणी शिंपडतात आणि अग्नीत शुद्ध तूप ओततात. मग नगारे वाजू लागतात आणि त्या वाद्यांच्या गजरात ते निखाऱ्यात शिरतात व पुन्हा बाहेर येतात. या नृत्यात ते अनेक प्रकारच्या मुद्रांचा अभिनय करतात. त्या वेळी ते ओंजळीत निखारे घेतात किंवा तोंडातही घालतात. जसनाथ व रुस्तमजी यांच्या- कृपेने अग्नीपासून आपले रक्षण होते, अशी या नर्तकांची धारणा असते. सिद्ध व जाट लोकांत हे नृत्य का प्रचलित झाले, त्याबद्दल एक-आख्यायिका सांगतात, ती अशी –

जसनाथ एक वर्षाचा असताना एकदा पेटत्या निखाऱ्यांवर बसला होता. ते पाहून त्याची आई घाबरली आणि तिने त्याला उचलून घेतले. पण जसनाथाच्या अंगावर भाजल्याचे काहीच चिन्ह नव्हते. त्यामुळे तिला फार आश्चर्य वाटले. या कारणामुळे पुढे सिद्ध लोकांत या नृत्याचा प्रचार झाला. [मरुभारती]

जसराज (इ. स. चे १७ वे शतक) एक हिंदी कवी. हा खरतर गच्छातील शांती हर्ष याचा शिष्य होता. याला जिन हर्ष असेही नाव आहे. राजस्थानी व गुजराती या भाषांत याने सुमारे शंभर ग्रंथ रचले आहेत. त्यांपैकी काही ग्रंथांची नावे अशी– चंदन मलयागिरी चौपाई, विद्याविलास रास, मातृकाबावनी, कवित्तबावनी, मंगलकलस चौपाई, उपदेश बत्तीसी, इत्यादी.

उपदेश बत्तीसी या ग्रंथात जसराजाने कायास्वरूप, मायात्याग, क्रोधदूषण, मानदूषण, हिंसा, मृषावाद, अदत्तादान, तपमहत्त्व, दान, शील, इ. विषयांवर भावपूर्ण विचार व्यक्त केले आहेत.

मातृकाबावनीत ५७ पद्ये असून ती सवैया छंदात आहेत. यात भाग्य, उद्यम, दान, मूक, इ. विषयांचे वर्णन आहे. या काव्यावर जैन व जैनेतर नीतिकाव्यांचा बराच प्रभाव आहे. काही वेळा जसाराजाने सोमप्रभाचार्यांच्या पद्यांतील भाव आपल्या भाषेत मांडला आहे. त्याचे एक उदाहरण असे ––

इंधन चंदन काठ करे सुर वृक्ष उपारि धतूरन बोबे ।
सोवन थाल भरे रज ते सुधारस सुकर पाव ही धोवे ।
हस्ती महामद मस्त मनोहर भार वहाइ के ताइ बिगोवे ।
मूढ प्रमाद गयो जसराज न धर्म करे नर सोभत षोवे ॥

अर्थ – जो प्रमादी मनुष्य (या नरजन्मात) धर्म करीत नाही, तो चंदनाचे इंधन करतो, कल्पवृक्ष उपटून त्या जागी धोतऱ्याचे झुडुप लावतो, सोन्याची थाळी मातीने भरतो, अमृताने डुकराचे पाय धुतो आणि मदमस्त हत्तीला ओझे वाहायला लावतो, असे जसराज म्हणतो.

कवित्तबावनी हा ग्रंथ छप्पय छंदात आहे. [हिं. नी. वि.]

जसवंतसिंह (१) (१६२७–१६७८ इ. स.) मारवाडचा एक राजा व कवी. हा गजसिंह राजाचा कनिष्ठ पुत्र होय. गजसिंहाच्या मृत्यूनंतर अवघ्या बाराव्या वर्षी याला गादी मिळाली. शहाजहानाने राजसिंह कूंपावत याला याचा मुख्य प्रधान व शिक्षक नेमले. हा मोठा झाल्यावर शहाजहानाने याला काबूलच्या स्वारीवर पाठविले व तिथून परत आल्यावर गोवळकोंड्याच्या स्वारीवर धाडले. त्या स्वारीत याच्या बरोबर औरंगजेब होता. त्या मोहिमेत याने चांगलाच पराक्रम गाजवला, म्हणून शहाजहानाने याला महाराज ही पदवी दिली.

पुढे गादीसाठी शहाजहानाच्या मुलांत तंटे सुरू झाले, तेव्हा औरंगजेब व मुराद यांना तोंड देण्यासाठी शहाजहानने याला माळव्याकडे पाठवले. परंतु त्या स्वारीत याचे साथीदार औरंगजेबाला मिळाल्यामुळे याचा पराभव झाला. हा पराभव पावून परत आला आहे, असे समजल्यावर याच्या राणीने जोधपूरच्या किल्ल्याचे दरवाजे बंद करून घेतले व याला निरोप पाठवला, की ‘पराजित होऊन परत आलेल्या नवऱ्याचे तोंड मी पाहू इच्छित नाही.’ जसवंतसिहाला हा अपमान सहन न होऊन तो परत स्वारीवर गेला व विजय मिळवूनच परत आला.

पुढे औरंगजेब बादशहा झाल्यावर त्याने जसवंतसिहाला दिल्लीस बोलावून त्याच्याशी सलोखा केला. हा अहमदाबाद, बऱ्हाणपूर, औरंगाबाद व काबूल येथील सुभेदार होता; पण औरंगजेबाशी याचे कधीच नीट जमले नाही. शेवटी औरंगजेबाने याला विष घालून मारले, असे सांगतात.

हा वीर होता, तसाच साहित्यिकही होता. याने पुष्कळ ग्रंथ लिहिले आहेत. आनंदविलास, अनुभवप्रकाश, अपरोक्षसिद्धांत, सिद्धांतबोध व सिद्धांतसार, अशी त्यांची नावे आहेत. याशिवाय जसवंतसिंहाने अलंकार–शास्त्रावर हिंदीत भाषाभूषण नावाचा एक ग्रंथ लिहिला आहे. या ग्रंथाचा एक विशेष म्हणजे यात एकाच दोह्यात अलंकाराचे लक्षण व उदाहरण दिलेले आहे. त्यामुळे अभ्यासाच्या दृष्टीने हा ग्रंथ फार उपयुक्त ठरला आहे.

जसवंतसिंह हा भाषापंडितही होता. डिंगल आणि पिंगल या दोन्ही भाषा त्याला चांगल्या अवगत होत्या.

याने आपल्याजवळ चतुराजी नावाचा एक कृषिविद्याविशारद ठेवला होता. त्याच्याच संमतीने याने काबूलची डाळिंबे मारवाडात लागवडीस आणली. [म. च. को.; हिं. सा. इ.]

(२) (इ. स. चे १९ वे शतक) एक हिंदी कवी. हा वाघेल क्षत्रिय असून तेरवा (कनोज जवळ) येथील राजा होता. हा विद्याप्रेमी असून स्वतः गणितज्ञ, खगोलशास्त्रज्ञ व स्थापत्य-विशारद होता. फारसीं व संस्कृत या दोन्ही भाषांवर याचे प्रभुत्व होते.

यान सालिहोत्र (अश्वपरीक्षाशास्त्र) आणि शृंगारशिरोमणी असे दोन ग्रंथ लिहिले असून, शृंगारशिरोमणी हा याचा ग्रंथ नावाप्रमाणेच शृंगाररसप्रधान आहे. [हिं. सा. इ.; म. च. को.]

जसोंधी एक जात. या जातीची वस्ती प्रामुख्याने मध्य प्रदेशातील नरसिंघपूर जिल्ह्यात आहे. भाट जातीचीच ही एक शाखा असावी. कारण गोंड व मराठे सरदार यांच्या पदरी हे लोक जस म्हणजे पोवाडे गाण्याचे काम करीत. देवीला वाहिलेल्या लोकांची करोहल नावाची यांची एक पोटशाखा आहे. करोहल लोक देवीची गाणी गात गावोगाव भिक्षा मागतात. भिक्षा मागताना ते गोंडे तेलही मागतात व ते तेल गळचात बांधलेल्या देवीच्या मस्तकाला लावून उरलेले स्वतःच्या डोक्यावर ओतून घेतात. यांच्या जवळ एका वाटीत हिंगूळही असतो. कोणी भिक्षा घातली, की हे तो हिंगूळ देवीला व स्वतःच्या अंगाला लावतात. भिक्षा मागताना ‘ माईजी, माईजी माई मेरी, काहेको जनम दिया ’ (हे माते, मला या जगात कशाला जन्माला घातलेस ?) असे म्हणतात.

यांच्यांतल्या संततिहीन स्त्रिया देवीला नवस करतात, की ‘ मला जो पहिला मुलगा होईल तो मी तुला अर्पण करीन. ’ अशा मुलांना करोहल म्हणतात. पूर्वी असे अर्पण केलेले मुलगे मोठे झाल्यावर आत्महत्या करीत असत. काशीला जाऊन शिरच्छेद करून घेणे, हिमालयातील बद्रीनारायणाच्या देवळात थंडीने गारठून मरणे व घवलगिरीच्या शिखरावरून उडी टाकणे, असे आत्महत्येचे तीन प्रकार यांच्यांत प्रचलित होते.

विंध्य पर्वतावरील विंध्याचल देवीचे देवालय हे सांप्रत या लोकांचे प्रमुख स्थान आहे. [ट्रा. का. सें. प्रॉ. इं.]

जहन्नम इस्लामी धर्मातले नरकाचे नाव. याला ‘ अन्नार ’ असेही म्हणतात. याचा अर्थ ‘ यातना भोगण्याचे स्थान ’ असा आहे. जहन्नमचे सात भाग असतात, ते असे–(१) जहन्नम– सर्वच मुसलमानांना या भागातून जावे लागते. तो कोणालाच चुकवता येत नाही. (२) लझा (३) अल् हुतमा (४) सईर (५) सकर (६) अल् जहीम व (७) हाविया. पापाच्या कमी अधिक प्रतीप्रमाणे निरनिराळ्या भागांत निरनिराळे लोक पाठवले जातात. [डि. इ.]

जह्नुआश्रम भागलपूरच्या पश्चिमेस सुलतानगंजाजवळ हा आश्रम आहे. या आश्रमाच्या जागेवर गैवीनाथ महादेवाचे देवालय होते, असे कळते. जह्नूने गंगाप्राशन केल्याची घटना इथे घडली, असे येथील लोक सांगतात.

जह्नुनगर बंगालमधील नवद्वीप या गावाजवळ जह्नू ऋषीचे स्थान दाखवतात. जह्नू ऋषीने गंगा प्राशन करून जंघेतून (?) तिला बाहेर टाकल्याची घटना इथेच घडली, असे येथील लोक समजतात. [नवद्वीप]

जह्नुसप्तमी वैशाख शुद्ध सप्तमीला जह्नुसप्तमी असे नाव आहे. हे नाव का पडले, त्याबद्दल वराह पुराणात पुढील श्लोक दिले आहेत–

वैशाखशुक्लसप्तम्यां जाह्नवी जह्नुना पुरा ।
क्रोधात् पीता पुनस्त्यक्ता कर्णरन्ध्रात्तु दक्षिणात् ।
तस्यां समर्चयेद् देवीं गङ्गां भुवनमेखलाम् ।
स्नात्वा सम्यग्विधानेन स धन्यः सुकृती नरः ।

(हरिभक्तिविलास १४)

अर्थ– पूर्वी जह्नूने वैशाख शुक्ल सप्तमीच्या दिवशी रागाने गंगेला पिऊन टाकले व भगीरथाच्या विनंतीवरून पुन्हा उजव्या कानातून तिला बाहेर सोडले. या दिवशी भुवनाची मेखला असलेल्या देवी गंगेचे स्नान करून तिचे यथाविधि पूजन करावे, म्हणजे तो पुरुष धन्य व पुण्यवान होतो.

या दिवशी गंगेत पितरांचे तर्पण व गंगेचे पूजन केल्याने स्वर्ग प्राप्त होतो, असेही सांगितले आहे. [श. क.]

जांगुली एक बौद्ध देवता. ही बारा धारिणींपैकी सहावी देवता आहे. सर्पविषाची बाधा दूर करणारी म्हणून हिची प्रसिद्धी आहे. हिच्या नावाचे अनेक मंत्रही आहेत. हिंदूंच्या विषहरी किंवा मनसा देवीशी हिचे साधर्म्य आहे.

साधनमाला या ग्रंथात जांगुली देवीची दोन प्रकारची ध्याने वर्णिलेली आहेत, ती अशी–(१) एकमुख, चतुर्भुज, जटामुकुटधारी, शुभ्रवर्ण, शुभ्र रत्नालंकार व शुभ्र सर्प यांनी विभूषित, पशूवर आरूढ झालेली, दोन हातांनी वीणावादन करणारी, डाव्या हातात शुभ्र सर्प धरणारी व उजव्या हाताने अभयमुद्रा दर्शविणारी. (२) त्रिमुख, नील-पीत-शुभ्रवर्णाची, षड्भुज, उजव्या तीन हातांत खड्ग, वज्र व बाण आणि डाव्या तीन हातांत पाश, नीलकमल व धनुष्य धारण करणारी, नागफणीवर आरूढ, दिव्य वस्त्रालंकारांनी विभूषित, कौमार्यलक्षणांनी



जांगुली – नेपाळी चित्र

मंडित आणि मस्तकी अक्षोभ्याची प्रतिमा धारण करणारी. या देवी चे एकमुखी, द्विभुज, व गौरवर्ण असेही रूप आढळते. हिचे एक नेपाळी चित्र उपलब्ध आहे.

ही देवी बुद्धाच्या काळातली असून, बुद्धाने स्वत: आनंद या शिष्याला तिचे रहस्य व तिच्या पूजेचा मंत्र कथन केला होता, असे म्हणतात. पुष्कळ बौद्ध लोक हिला भजतात. [इं. बु. इ.]

जांब

रामदासस्वामींची जन्मभूमी. मराठवाड्यात गोदावरीच्या काठी मनमाड-सिकंदराबाद रेल्वेच्या फाट्यावर परतुड स्टेशनपासून सात-आठ कोसांवर हे खेडेगाव आहे. या गावाच्या बाहेर हनुमंताचे एक मंदिर आहे. या मंदिराशेजारीच रामदासांचे वडील सूर्याजीपंत यांना रामाचे दर्शन व रामदासांना रामाचा अनुग्रह झाला. इथून एक लहानशी नदी वाहते. समर्थांनी लग्नमंडपातून पळून जाऊन याच नदीच्या डोहात उडी मारल्याचे सांगतात. सांप्रत मात्र तिथे हा डोह नाही. अलिकडे श्री. शंकरराव देव यांनी इथे रामदासांचे एक मंदिर बांधले आहे.



श्रीसमर्थ रामदासमंदिर – जांब

एका उत्सवात तुपाची खोटी झाल्यामुळे समर्थांच्या सांगण्यावरून ज्या मातीच्या घागरीने विहिरीचे पाणी काढून ते तूप म्हणून वाढण्यात आले, ती घागर याच मंदिरात आहे. दरसाल चैत्र शुद्ध नवमीला इथे मोठा उत्सव होतो. [म. प.; श्रीरामदासांची कविता, प्रथमखंड]

जांभई

(सं. जृंभा) तोंड संपूर्ण उघडून श्वास घेऊन सोडण्याची प्रतिक्षिप्त क्रिया. मनुष्याचा आत्मा तोंडातून किंवा नाकातून बाहेर पडतो, त्याचप्रमाणे भुतेखेतेही त्या मार्गाने आत येऊ शकतात, अशी समजूत आदिवासी लोकांत प्राचीन काळापासून प्रचलित आहे. म्हणून ही द्वारे शक्यतो बंद ठेवण्याची प्रवृत्ती जगातील सर्व आदिवासी लोकांत दिसून येते. म्हणूनच जांभई येते, त्या वेळी तोंडापुढे हात धरण्याची चाल मागसलेल्या व सुधारलेल्या समाजातही सर्वत्र आढळते. मनुष्य झोपलेला किंवा बेशुद्ध असताना त्याचा आत्मा तात्पुरता बाहेर जातो, अशीही एक कल्पना आहे. तोच प्रकार जागेपणी झाला, तर भलताच प्रसंग ओढवेल, म्हणून जांभईच्या वेळी काळजी घ्यावी लागते. विशिष्ट प्रकारच्या आवाजामुळे भुतेखेते पळून जातात, या कल्पनेने जांभई देताना चुटकी वाजवण्याची प्रथा सुरू झाली. अशा वेळी रामनाम घेण्यातही तोच हेतू असतो. तसे न केले, तर पाप लागते, अशीही समजूत प्रचलित झाली आहे. [श. क.; एन्सा. रि. ए.]

जांभकर बाळशास्त्री

(१८१०– १८४६ इ. स.) आधुनिक महाराष्ट्रातील पहिले सुधारक, मराठी वृत्तपत्राचे जनक, इतिहाससंशोधक व विचारवंत. यांचा जन्म कोकणातील राजापूर तालुक्यात पोंबर्ले या गावी झाला. यांचे वडील व्युत्पन्न पुराणिक होते. बाळशास्त्री वयाच्या बारा–तेरा वर्षांच्या आतच संस्कृत व मराठी उत्तम शिकले. त्यानंतर ते इंग्रजी शिकायला मुंबईला आले. थोड्याच काळात त्यांनी त्या भाषेवर प्रभुत्व मिळविले. त्यांची स्मरणशक्तीही तल्लख होती. मुंबई येथे शाळेत विद्यार्थी म्हणून शिकत असतानाच ते गणिताचे अध्यापक झाले. त्यांना संस्कृत व मराठीव्यतिरिक्त

गुजराती, बंगाली, आणि फारसी या भाषाही अवगत होत्या.

पुढे काही काळ बाळशास्त्री अक्कलकोटच्या युवराजाचे शिक्षक होते. तिथे असताना ते कानडीही शिकले. याच सुमारास मुंबईला एल्फिन्स्टन कॉलेज निघाले. त्या कॉलेजात शिकविण्यासाठी पहिले असिस्टंट प्रोफेसर म्हणून बाळशास्त्र्यांची नेमणूक झाली. महर्षी दादाभाई नौरोजी आणि प्रा. केरूनाना छत्रे हे त्यांच्याच हाताखाली शिकून तयार झाले.

वाङ्मय आणि विज्ञान या दोन्ही शाखांमध्ये बाळशास्त्री निष्णात होते. जोतिषशास्त्रावरही त्यांचा अधिकार मोठा होता. शून्यलब्धी (Differential calculus) वर मराठी भाषेत पहिला ग्रंथ त्यांनी लिहिला. भारतीय शिलालेख आणि ताम्रपट यांचे संशोधन करून त्यांनी अनेक विद्वत्तापूर्ण निबंध लिहिले. त्यांचे सर्वांत महत्त्वाचे वाङ्मयीन कार्य म्हणजे ज्ञानेश्वरीचे पाठभेदांसह संपादन, हे होय. त्या दृष्टीने त्यांना आधुनिक महाराष्ट्रातील आद्य संशोधक म्हणणे योग्य ठरेल.

बाळशास्त्र्यांनी आपल्या वयाच्या अवघ्या विसाव्या वर्षी म्हणजे १८३२ च्या जानेवारीत ‘दर्पण’ नावाचे पहिले वर्तमानपत्र सुरू केले. हे वृत्तपत्र मराठी आणि इंग्रजी या दोन्ही भाषांत निघत असे.

सामाजिक सुधारणेच्या क्षेत्रातही बाळशास्त्री आघाडीवर होते. भारतात इंग्रजी राज्याबरोबरच इंग्रजी विद्याही आली. इतकेच नव्हे; तर त्या विद्येचे बोट धरून इंग्रजांचा धर्म आणि संस्कृतीही आली. इंग्रजी विद्येच्या प्रसाराबरोबर ख्रिस्ती धर्माचाही प्रसार आपल्या देशात होत आहे, हे थोड्याच कालात त्यांच्या लक्षात आले. म्हणून बाळशास्त्र्यांनी या धर्मांतराच्या प्रकरणात जातीने लक्ष घातले व शुद्धीकरणाची चळवळही चालू केली. ख्रिस्ती झालेल्या श्रीपती शेषाद्री नामक मुलाला त्यांनी शुद्ध करून परत हिंदू धर्मात घेतले.

केशवराव भवाळकर म्हणून बाळशास्त्र्यांचे एक शिष्य होते. त्यांनी आपल्या चरित्रात बाळशास्त्र्यांनी शिक्षकांना केलेला उपदेश नमूद करून ठेवला आहे, तो असा–

पूर्वकाळचे महाप्रबुद्ध ऋषिजन हे अरण्यवास पत्करून विद्यासंपन्न होत आणि विद्यादान करीत. त्यांनीं आपल्या देशांत अपूर्व ज्ञानभांडारें भरून ठेवली आहेत. तीं इतकीं तुडुंब आणि ओतप्रोत आहेत, कीं तीं नुसती चाळायला सबंध जन्म पुरावयाचा नाही. त्या ऋषींचे आपण वंशज म्हणवतो. मग विद्याभ्यास अन् विद्यादान करण्याची आपणांस लाज कां वाटावी? विद्या शिकून तुम्हांला कारकून किंवा अंमलदार व्हावेसें वाटतें. शिक्षकाचा व्यवसाय लोक हलका मानतात. पण तसें नाही. प्रजा मूढ आहे, म्हणून सरकारी नोकरांचें महत्त्व. विद्याप्रसार जसजसा होत जाईल, तसतसे सरकारी नोकरांचें ढोंगसोंग अन् थाटमाट नाहीसा होईल. प्रजा शहाणी आणि समजूतदार झाली म्हणजे कारकुनीला कोण विचारतो? म्हणून विद्याभिलाषी व्हा. विद्याभ्यास करा. लोकांना सुशिक्षण द्या. सरकार व प्रजा, धनी व चाकर, आईबाप व पुत्र ह्यांमध्यें प्रेमभाव निर्माण व्हावा, स्वदेशाभिमान आणि स्वधर्माभिमान लोकांच्या मनांत उपजावा, असा प्रयत्न करा. हेंच आपले ऋषिवंशजांचें कर्तव्य. गुरु दसपट ज्ञानी असेल, तर तो एकपट ज्ञान शिष्यास देऊ शकेल, शंभरपट ज्ञानी असेल, तर तो शिष्यास दसपट ज्ञान देईल. म्हणून जास्तीत जास्त विद्यासंपन्न व्हा.

या उपदेशावरून बाळशास्त्र्यांच्या विशाल दृष्टिकोणाची व उत्कट ज्ञानलालसेची कल्पना येते. बालव्याकरण, नीतिकथा, सारसंग्रह, हिंदुस्थानचा इतिहास, संध्येचे भाषांतर, इंग्लंडचा इतिहास, हिंदुस्थानातील इंग्रजी राज्याचा इतिहास, हिंदुस्थानाचा प्राचीन इतिहास हे बाळशास्त्र्यांनी लिहिलेले प्रमुख ग्रंथ होत. [म. मा. म. म.; अ. च. को.; म. सा. पु.]

जाखमाता कोकणातील एक ग्रामदेवता. हिचा पुजारी भोई असतो. पौष महिन्यात मंगळवारी हिला खिचडीचा नैवेद्य दाखविण्याचा प्रघात आहे. जख किंवा जाख हे यक्ष शब्दाचे अपभ्रष्ट रूप आहे. त्यावरून जाखमाता ही यक्षिणीवर्गापैकी असावी, असे अनुमान केले जाते.

जागद्दल महाविहार एक बौद्ध विद्यापीठ. या विद्यापीठाची स्थाननिश्चिती अजून झालेली नसली, तरी बंगालच्या पाल राजघराण्यातील रामपाल राजाने इ. स. च्या बाराव्या शतकाच्या आरंभी आपल्या रामावती राजधानीच्या जवळपास गंगेच्या काठी याची स्थापना केली, अशी माहिती मिळते. पाल राजे विद्याप्रेमी असल्यामुळे त्यांच्या उदार आश्रयाखाली हे विद्यापीठ सर्व दृष्टींनी समृद्ध बनले होते. जागद्दल विद्यापीठ नुसते विहार नव्हते; तर महाविहार होते. यावरून त्याच्या व्यापकतेची कल्पना येते. या विद्यापीठाची नालंदा विद्यापीठाशी तुलना केली जाते. हे बौद्ध विद्यापीठ असल्यामुळे यात संस्कृत भाषा व वाङ्मय या बरोबरच पाली व अर्धमागधी या भाषा आणि त्यांतील वाङ्मय यांचेही अध्यापन होत असे. मोक्षाकर गुप्त हा या विद्यापीठाचा अध्यक्ष होता. तसेच विभूतिचंद्र महापंडित, महाभिक्षू दानशील, इ. विद्वान इथे अध्यापनाचे व ग्रंथलेखनाचे कार्य करीत होते. येथील विद्वानांनी अनेक बौद्ध संस्कृत ग्रंथांची तिबेटी भाषेत भाषांतरे केली आणि तिबेटमध्ये बौद्ध धर्माचा प्रसार केला.

तिबेटमधील बौद्धसंस्कृतीची जडणघडण करण्यात जागद्दल महाविहाराने केलेले कार्य अतुलनीय आहे. तिबेटांतील ग्रंथभांडारांत संस्कृत ग्रंथांवरून तिबेटीत भाषांतरित केलेले जे ग्रंथ आहेत, ते बव्हंशी जागद्दल विद्यापीठातील आचार्यांनी अनुवादिलेले आहेत.

इ. स. च्या बाराव्या शतकाच्या अखेरीस जागद्दल महाविहारात तंत्रविद्येचा प्रवेश झाला आणि. त्यामुळे सुमारे शतकभर गाजत राहिलेले हे विद्यापीठ ऱ्हास पावू लागले. याच अवस्थेत इ. स. १२०३मध्ये बख्त्यार खिलजीने या विद्यापीठाचा नाश केला. [प्रा. भा. वि.; ए. सि. ए. हिं.]

जागरण महाराष्ट्रातील एक कुलाचार. खंडोबा हा ज्यांचा कुलदेव आहे, अशा कुटुंबांत लग्नमुंजीसारख्या संस्कारानंतर बटूला अथवा वधू-वरांना देवदर्शनाला घेऊन जाणे आणि वाघ्या-मुरळ्यांचे जागरण करविणे, असा कुलाचार आहे. गोंधळ्यांचा जसा गोंधळ, भराड्यांचे जसे भराड, तसेच वाघ्या-मुरळ्यांचे हे जागरण असते.

पाच उसांच्या मखरात देवाची प्रतीकात्मक स्थापना करून, वाघ्या-मुरळ्यांचा समूह तुणतुणे, घोळ व खंजिरी या वाद्यांच्या साथीने खंडोबाची गाणी गाण्याचा जो कार्यक्रम करतो, त्याला जागरण करणे किंवा जागरण घालणे असे म्हणतात. जागरणाचा कार्यक्रम व गोंधळाचा कार्यक्रम यात थोडा भेद आहे. गोंधळात नाटय, गीत आणि वाद्य यांचा मेळ असतो, तर जागरणात नृत्य, गीत आणि वाद्य यांचा मेळ असतो. जागरणात मुरळी कपाळाला भंडारा फासून, कंबरेला पदर खोचून व पायात घुंगरे बांधून नाचते. तिच्या हातात रुमालाला बांधलेल्या दोन घंटा असतात. तिच्या नृत्याला साथ करण्यासाठी वाघ्ये असतात. वाघ्यांच्या हातात तुणतुणे व डिमडी असते. या प्रसंगी नाचताना मुरळ्या जी गाणी म्हणतात, त्यांतील एक गाणे असे –

हळदीकुंकानं वटि माझी भरली
खंडेरायाची झाले मी मुरळी-ग बाई मुरळी ।।
घेऊन भक्तीची भंडारवाटी,
मलु देवाच्या लागले पाठी,
जय मल्हार दिली आरोळी,
खंडेरायाची झाले मी मुरळी-ग बाई मुरळी ।।

मुरळ्यांची बरीच गीते शृंगारप्रधान असतात. त्यांची म्हणण्याची घाटणीही शृंगारोद्दीपक असते. यावरून महाराष्ट्रातील लोकनाट्याच्या घडणीत गोंधळाइतकाच जागरणाचाही वाटा असला पाहिजे, असे वाटते. [म. लो. उ.]

जागर नृत्य गढवाल, कुमाऊं व गोमंतक या प्रदेशातील एक धार्मिक नृत्य. भूत-पिशाचांशी व ग्रामदेवतांशी या नृत्याचा संबंध आहे.

काही स्त्री-पुरुषांच्या अंगात मधून मधून देवतांचा किंवा भूतपिशाचांचा संचार होत असतो, तेव्हा त्या संचारी देवतेला किंवा भुताला प्रसन्न करण्यासाठी अंगात येणाऱ्या व्यक्तीला नाचविण्याची गढवालमध्ये प्रथा आहे. जो मनुष्य अशा अंगात येणाऱ्या व्यक्तीला नाचविण्यात तरबेज असतो, त्याला जागरी असे म्हणतात. एखाद्या देवळासमोर किंवा घरात हे जागर नृत्य होते.

प्रथम नृत्याची जागा सारवून स्वच्छ करतात. मग अग्निस्थापना करून हवन करतात. नर्तक पुरुष किंवा स्त्री, जे कोणी असेल ते, स्नान करून अग्नीच्या समोर स्थानापन्न होते. मग जागरी ढोल वाजवून मंगलाचरण म्हणतो. त्याचा साहाय्यक थाळी वाजवून त्याला साथ देतो. नंतर जागरी त्या देवतेची कथा सांगणारे गीत गातो. त्या वेळी नर्तकाच्या अंगाला कंप सुटतो, त्याच्या अंगात त्या देवतेचा अवसर येतो व तो नाचू लागतो. मग जागरी त्या देवतेसंबंधीची अनेक आख्यानगीते गातो व नर्तक त्यातील भावनेला अनुकूल असा मुद्राभिनय करीत नाचत राहतो. हा कार्यक्रम रात्रभर चालू असतो.

कुमाऊंतील अनेक स्थानिक देवदेवता, भुतेखेते व प्राचीन वीर पुरुष यांना प्रसन्न करण्यासाठी जागर नृत्य करतात. त्याचे दोन प्रकार आहेत – एक रुग्ण माणसाला बरे वाटावे म्हणून करतात तो व दुसरा सर्वसामान्य लोकांचे कल्याण व्हावे म्हणून करतात तो. एखादा माणूस आजारी पडला असता त्याच्या घरातली म्हातारी बाई आपल्या कुलदेवतेसमोर बसते आणि तिच्या देखत एका वस्त्रात थोडे तांदूळ व पैसे घालून त्यांची पुरचुंडी बांधते. मग ती पुरचुंडी रुग्ण माणसाच्या भोवती तीनदा ओंवाळून टाकते व तो बरा झाल्यावर जागर करीन, असा नवस बोलते. पुढे तो माणूस आजारातून बरा झाल्यावर देवस्थानात किंवा घरात जागराचा कार्यक्रम पार पाडला जातो. देवस्थानात जागर करताना प्रथम एक दिवा प्रज्वलित करतात व सर्व लोक त्याच्याभोवती बसतात. जागरी ढोल वाजवीत पहाडी भाषेत देवदेवतांची स्तुती किंवा प्राचीन काळातील देव-दानवांच्या संग्रामाचे वर्णन गायला सुरवात करतो. गाणे जोरात सुरू होते, कांसाळू जोरजोरात वाजू लागते आणि मग जमलेल्यांपैकी काही लोकांच्या अंगात देवतेचा संचार होतो. त्यासरशी ते नाचू लागतात. मग काहीजण त्यांना बळी व मद्य अर्पण करतात. एवढे झाल्यावर देवता त्यांना, मनोरथ पूर्ण होतील, असा आशीर्वाद देते.

जागर तीन किंवा सात दिवस चालतो. कुमाऊं प्रदेशातील गंगनाथ जागर, रमोला जागर व सी जागर या जागरांत नृत्याला प्राधान्य असते.

गोमंतकातही गाव वे गावकरी यांचे रक्षण व्हावे, म्हणून स्थानिक देवतांना प्रसन्न करण्यासाठी दर वर्षी जागर करण्याचा प्रघात आहे. रात्रभर हा जागराचा कार्यक्रम अखंडपणे चालवल्याने देवदेवता जागृत राहतात, अशी तिथल्या भाविक लोकांची धारणा आहे (गोमंतक पाहा).

राजपूत लोकांच्या लग्नातही जागर नृत्य करण्याची प्रथा आहे. नवरामुलगा वधूगृही जातो, तेव्हा त्या मिरवणुकीच्या अग्रभागी काही पुरुष जे नृत्य करतात, त्याला जागर म्हणतात. [भा. लो. नृ.; इं. फो लो.; श्री. वीरेन्द्रमोहन रतूडी– संमेलन-पत्रिका-लोकसंस्कृति विशेषांक, १९५३]

जागरी पातुर

राजस्थानातील एक जात. हे लोक ढोलकी वाजवून गातात, नाचतात व त्यावर आपली उपजीविका करतात. यांच्यांतल्या पुरुषांना जागरी व वेश्याव्यवसाय करणाऱ्या स्त्रियांना पातुर म्हणतात. पूर्वी हे लोक गुहिलोत राजपूत होते. जेव्हा दिल्लीच्या बादशाहाने चितोड काबीज केले, तेव्हा हे चितोड सोडून निघून गेले असे सांगतात. पण पुढे पैशाच्या अभावी त्यांची उपासमार होऊ लागली. तेव्हा केवळ प्राणरक्षणासाठी त्यांनी आपल्या मुलींना वेश्याव्यवसाय करायला प्रवृत्त केले. त्यातूनच पुढे जागरी पातुर या एका नव्या जातीची उत्पत्ती झाली.

जागरी हे शाक्त असून, कालीमातेला भजतात. त्यांच्या विवाहित स्त्रिया नाचत किंवा गात नाहीत. त्यांच्या मुलीच तेवढ्या हा व्यवसाय करतात.

वेश्याव्यवसायाला प्रारंभ करण्यापूर्वी ब्राह्मण पुरोहित जागरी मुलींचे एका शुभ मुहूर्तावर प्रथम गणेशमूर्तीशी लग्न लावतो व नंतर त्या तनुविक्रयाच्या व्यवसायाला प्रारंभ करतात. पायजमा, अंगरखा व ओढणी असा या मुलींचा पोशाख असतो.

वडोदे, पालपूर व सिंधमधील थरपारकर या प्रदेशांत जागरी जातीचे लोक राहतात. या लोकांत मुलगी देखणी असल्यास वेश्याव्यवसायासाठी तिची योजना केली जाते. ती चौदा वर्षांची झाल्यावर तिचे प्रथम तलवारीशी लग्न लावतात. हा लग्नसमारंभ आठ आठ दिवस चालतो. त्यानंतर मुलगी व्यवसाय करायला मोकळी होते. या खड्गविवाहापूर्वी त्या समारंभाचा खर्च देणारा कोणी स्पृश्य हिंदू भेटल्यास ती मुलगी त्याला पसंत करते. त्या पुरुषाशी तिचा प्रत्यक्ष विवाह होत नसला, तरी त्या पुरुषाला तिच्या घरी राहून तिचे पालनपोषण करावे लागते. असे असले तरी त्याचा नवरेपणाचा कायदेशीर हक्क मात्र त्या मुलीवर पोचत नाही व ती आपला व्यवसाय करायला मोकळी असते. [रा. जा.; रज:कण]

जागल्या

ग्रामव्यवस्थेतील एक घटक व्यक्ती. रात्रीच्या वेळी स्वत: जागे राहून ग्रामसंरक्षण करणे, हे काम या माणसाकडे असल्यामुळे त्याला जागल्या असे नाव मिळाले.

हा बहुधा जातीने महार किंवा मांग असतो. क्वचित प्रसंगी भिल्ल, कोळी, रामोशी, मुसलमान हेही जागल्याचे काम करतात. जागल्या मांग असल्यास तो केरसुण्या, कुंचे, शिंकी, नाडे, कासरे, इ. वस्तू तयार करतो. तो त्याचा जोडधंदा होतो. दवंडी देणे, तसेच कुस्त्या, यात्रा, लग्नकार्य इ. प्रसंगी डफ वाजविणे ही कामेही मांग जागल्याकडेच असतात.

महार जागल्ये हे पाटील-कुलकर्ण्यांचे हरकामे होत. सरकारी कामासाठी ज्याची गरज लागेल त्यांना बोलाविणे, गावात कोणी परका माणूस आला तर त्याची माहिती देणे, जन्ममरणाची व गुन्ह्याची नोंद ठेवणे, झाडे व हद्दनिशाण्या यांचा बिघाड झाला किंवा सरकारी जागेवर कोणी अतिक्रमण केले, तर त्याची बातमी देणे, गाव स्वच्छ ठेवणे, गावाचा वसूल व कागदपत्रे कचेरीत किंवा परगावी पोचविणे इ. कामे हे महार जागल्ये करतात.

यांच्या नेमणुका बहुधा तहहयात असतात. कुठे कुठे जागल्ये सरकारी नेमणूक नसतानाही स्वत:च कामावर उभे राहतात. अशा जागल्यांना सरकारातून मुशाहिरा मिळत नाही; पण गावकऱ्यांकडून बलुते वगैरे हक्क मिळतात. ज्या जागल्यांची सरकारातून नेमणूक होते, त्यांना दरसाल पाच ते दहा रुपये रोख मुशाहिरा मिळतो.

दुष्काळाच्या वेळी जागल्ये गाव सोडून जाऊ लागले, तर सरकारातून त्यांना डोल मिळतो. दुष्काळात सरकार रोकड पैसे किंवा धान्य वाटते, त्याला डोल म्हणतात.

जागल्याविषयी एकनाथांचे एक रूपकात्मक भारूड आहे, ते असे —

मी मी जागतों गाव निजला सारा ।
कोणी हुशार नाहीत घरा ।
अवघे निजले भ्रमला संसार ।
कांहीं तरी पुढिलांची सोय धरा ।। १ ।।
मी जागूनि जागवितो लोकां ।
निजेनें व्यापिलें काळ ग्रासीला देखा ।
यांसी कोठवर मारूं तरी हांका ।
कैसे भुलले म्हणती माझे माझे देखा ।। २ ।

रात्र झाली दोन प्रहर सारी ।
आतां येईल बा चोराची फेरी ।
जिवाजीपंत तुम्ही जतन करा निर्धारीं ।
नाहीं तरी हिरोनि नेतील गाठोडी सारी ।। ३ ।।
तुमचे हित वो तुम्हीच करा ।
जागाल तरी चुकेल फेरा ।
सुखे निजताना चोर नागवतील घरा ।
एका जनार्दनी सद्‌गुरू पाय धरा ।। ४ ।।

या भारुडातील रूपकाच्या द्वारे एकनाथांनी जागल्याच्या माविषयीचे स्पष्ट दिग्दर्शन केले आहे. [गा. गा.]

जागेश्वर कुमाऊं प्रदेशातील एक प्रसिद्ध शिवस्थान. हे स्थान हिमालयाच्या पायथ्याशी, अलमोड्यापासून मारे वीस मैल उत्तरेस आहे. इथे देवदारू वृक्षांच्या घनदाट नात शिवमंदिरांचा समूह आहे. या मंदिरसमूहातील मुख्य दिर बालजागेश्वराचे असून, त्याच्या भोवती मैल-दीड-च्या अंतरात उत्तरेस वृद्धजागेश्वर, दक्षिणेस झांकर सैम, ेस कोटेश्वर आणि पश्चिमेस दंडेश्वर यांची मंदिरे आंहेत. झांकर सैम म्हणजे जटा न बांधलेला शिव. दक्षयज्ञात सती मृत्यू पावल्यानंतर तिच्या निधनाने व्याकुळ झालेला शिव आपल्या अस्ताव्यस्त झालेल्या जटासुद्धा न सावरता, सतीचे शव हातांवर धरून येथील देवदारुवनात वेड्यासारखा भटकत राहिला आणि अखेरीस येथील एका टेकडीवर तप करीत बसला, अशी स्थानिक लोकांची समजूत आहे. शिवाचे हे तपस्यास्थान झांकर सैमघुरी या नावाने ओळखले जाते.-


झांकर सैमघुरी — कुमाऊं प्रदेश


जागेश्वरमंदिर — कुमाऊं प्रदेश

कुमाऊं प्रदेशातील लोक जागेश्वराला बारा ज्योतिर्लिंगांतील नागेश्वर मानतात. ज्योतिर्लिंगगणनेत सांगितलेले नागेशाचे निवासस्थान जे दारुकावन ते हेच, असे स्थानिक लोकांचे म्हणणे आहे. बालजागेश्वराचे मंदिर हिमालयातील कत्युरी राजघराण्यातील शालिवाहन राजाने बांधले. पुढे या आणि भोवतालच्या मंदिरांचा वारंवार जीर्णोद्धारही होत आला आहे.

इथली जागेश्वर, मृत्युंजय आणि दंडेश्वर ही तीन मंदिरे सर्वांत मोठी आहेत. जागेश्वर आणि मृत्युंजय ही दोन मंदिरे प्राचीन आहेत. जागेश्वरमंदिराचे महाद्वार अतिशय कलापूर्ण असून, त्याच्या समोर विखुरलेल्या मूर्तींसाठी एक संग्रहालय उभारलेले आहे. जागेश्वर आणि दंडेश्वर या मंदिरांची घडण जवळजवळ सारखीच आहे. या दोन्ही मंदिरांवर गोलाकार शिळांची छते असून, त्यांवर धातूंची छते व कळस आहेत.

मृत्युंजयमंदिरात धातूचे एक तांत्रिक यंत्र आहे. शिवशरीरावर आरूढ झालेली महिषमर्दिनी त्या यंत्रावर कोरलेली आहे.

जागेश्वरमंदिरासमोर असलेल्या संग्रहालयात शिव-पार्वती, गंगा, नवग्रह, सूर्य, ब्रह्मा, विष्णू, इ. देवदेवतांच्या मूर्ती आहेत. मात्र यांपैकी अनेक मूर्ती खंडित झालेल्या आहेत.

जागेश्वर हे शिवस्थान असल्यामुळे कुमाऊं प्रदेशात ते महाश्मशानही मानले जाते. जागेश्वरभूमीत मरण यावे, निदान तिथे आपल्या पार्थिव देहाचे दहन व्हावे आणि तेही शक्य नसल्यास आपली रक्षा तरी त्या भूमीत पडावी, अशी येथील लोकांची उत्कट इच्छा असते.

वैशाखी पौर्णिमेला इथे मोठी यात्रा भरते. त्या वेळी झांकर सैमधुरी या स्थानी शेकडो बकऱ्यांचा बळी दिला जातो. कारण झांकर सैमला इथे केवळ लोकदेवतेचे किंवा ग्रामदेवतेचे स्वरूप प्राप्त झालेले आहे. [कुमाऊं; धर्मयुग, १९ एप्रिल १९६४; सा. हिंदुस्थान, ११ नोव्हें. १९६२]

जागो नृत्य पंजाबमध्ये विवाहप्रसंगी केले जाणारे नृत्य. या नृत्यात फक्त स्त्रियाच भाग घेतात. नवऱ्यामुलाचे वऱ्हाड वधूगृही आल्यावर रात्री या नृत्याला प्रारंभ होतो. त्यासाठी एक घडा रंगवतात व त्याला माळा घालून सजवतात. त्याचे तोंड कणकेच्या गोळचाने लिंपून बंद करतात. त्यावर पाच सहा लहान लहान दिवे ठेवतात. मग तो घडा वरपक्षातल्या एका स्त्रीच्या डोक्यावर देतात. नाचणाऱ्या स्त्रिया तिला मधे उभी करून तिच्या भोवती फेर धरतात व गाणी गातात. ही गाणी उपदेशपर असतात. [श्री. विश्वमित्र शर्मा—अजंता मासिक, जानेवारी १९५५]

जाग्रद्गौरीपंचमी श्रावण शु. पंचमीस हे नाव आहे. या दिवशी गौरीची पूजा करून रात्रभर जागरण करावे, असे सांगितले आहे. त्यामुळे सर्पभय दूर होते. पाहा – नागपंचमी. [हि. ध.]

जाजपूर एक तीर्थक्षेत्र. हे ओडिसामधील कटक जिल्ह्यात वैतरणी नदीच्या दक्षिण तीरावर आहे. याला जजपूर किंवा जयपूर असेही म्हणतात. जयपूर येथे केसरी वंशाची राजधानी होती. हे विष्णूच्या चतुरायुध क्षेत्रांपैकी गदाक्षेत्र मानले जाते. महाभारतात यालाच बिरजाक्षेत्र म्हटले आहे. इथे सतीचे मंदिर आहे. तिचेच नाव बिरजा (= विकारहीन) होय. हे मंदिर इ. स. च्या १४ व्या शतकातले असावे.

या ठिकाणी अनेक प्राचीन भव्य मूर्ती सापडल्या आहेत. त्यांतली बोधिसत्त्व पद्मपाणीची १६ फूट उंचीची गुप्तकालीन मूर्ती विशेष उल्लेखनीय आहे. इथल्या वाराही, चामुंडा, इंद्राणी, इ. सप्तमातृकांच्या मूर्ती आणि शिवदूती, गणेश, इ. देवतांच्या मूर्ती अत्यंत प्रेक्षणीय असून, त्यांच्या घडणीत प्राचीन बौद्ध शिल्पाची पराकाष्ठा झालेली आहे. मात्र या मूर्ती भग्न झालेल्या आहेत. [हि. जॉ. ए. इं.; म. ज्ञा. को.; स. भा. प्र. व.]

जाट एक जात. यांची वस्ती प्रामुख्याने पंजाब व राजस्थानात आहे. जाटांच्या उत्पत्तीबद्दल अनेक मतभेद आहेत. परंतु जाट लोक स्वतःची उत्पत्तिकथा सांगतात, ती अशी–

दक्षयज्ञाचा विध्वंस करण्याकरिता शिवाने आपल्या जटेतून दोन वीर पुरुष निर्माण केले, ते आमचे मूळ पुरुष होत. जटेतून उत्पन्न झाल्यामुळे त्यांना जाट हे नाव मिळाले.

कनिंगहॅम व टॉड हे जाटांना हिंदी शक (इंडोसिथियन) म्हणतात. हे ऑक्सस नदीवरून पंजाबात आले, असेही कनिंगहॅमचे मत आहे. महाभारतात वाहीक लोकांचे जे वर्णन आहे, ते जाटांचेच असावे, असा विल्सनचा तर्क आहे. काहींच्या मते महाभारतातील जर्ट किंवा जरठ हेच जाट होत. रिस्लेच्या मते जाट हा शब्द जथ (जमा करणे) या शब्दापासून आला असून, लढणाऱ्या लोकांच्या निरनिराळ्या समूहांना जाट असे म्हणत असावे. जाट हा शब्द जातिवाचक नसून वर्गवाचक आहे.

इबेटसन्‌च्या मते जाट व राजपूत यांच्यांत रक्ताचा संबंध आहे. जाटांचा शारीरिक वांधा व चेहेऱ्याची ठेवण ही राजपूतांसारखीच आहे. जाटांची उत्पत्ती ब्राह्मणांपासून झाली, असेही अनेक जण मानतात. त्याचप्रमाणे जाटांच्या भिन्न भिन्न लग्नविधींवरून ते एका वंशाचे नसावे, असे रोज म्हणतो. त्यांच्या शरीराचा बांधा व तोंडाचे स्वरूप यावरून ते निःसंशय आर्यच आहेत, असे श्री. वैद्य यांनी प्रतिपादले आहे.

राजस्थानातल्या जाटांचे तीन प्रमुख पोटभेद असून, त्यांचेही अनेक उपपोटभेद आहेत. शेती हा जाट लोकांचा प्रमुख व्यवसाय आहे. काही जण सैन्यातही नोकरी करतात. जंगलातील कामांच्या बाबतीत जाटांची इतकी ख्याती आहे, की त्यावरून एक म्हण पडली आहे, ती अशी–

जंगल जाट न छेड़िये हाटां बीच किराड

अर्थ – जंगलात जाटाला व बाजारात वाण्याला कधीही छेडू नये. (तसे केल्यास आपल्यावर संकट आलेच म्हणून समजावे.)

जाट लोक फार कष्टाळू आहेत. ते जिथे जातात तिथल्या भूमीचा उत्कर्ष घडवून आणतात. 'जिथे जाट तिथे थाट' असा वाक्प्रचारही रूढ आहे.

चौधरी अथवा पटेल या नावांनी हाक मारणे त्यांना आव-

ते. ते कमालीचे विनोदप्रिय आहेत. तसेच ते गुळाचेही मोठे शौकीन आहेत. त्यांचा विवाहसंबंध निश्चित होण्याच्या वेळी गुळाचीच देवघेव होते.

जाट लोक दाढीचे व डोक्याचे केस काढीत नाहीत. ते काळ्या गाईचे दूध पीत नाहीत. त्यांच्या बायका नाक टोचीत नाहीत व काचेच्या बांगड्या घालीत नाहीत.

पंद नावाचा जाटांचा एक मोठा उत्सव असतो. मुलीचे लग्न ठरल्यावर हा उत्सव करतात. या प्रसंगी चाळीस फूट लांबीचा एक लाकडी खांब आवश्यक असतो. प्रथम त्याची दुधाने पूजा करतात. मग त्याच्या टोकाला गाडीचे चाक बांधून तो खांब उभा करतमत. त्यानिमित्त तीन दिवस मेजवान्या व गाणेबजावणे चालते. घरातील कर्ता पुरुष किंवा त्याची पत्नी निवर्तल्यावर मर्तिकानिमित्तही असा खांब उभा करतात. मग गाईची कालवड व गोऱ्हा यांचे लग्न लावतात व त्यांच्याकडून त्या खांबाला सात प्रदक्षिणा करवतात.

जाटांच्या चालीरीती गुजर व अहीर लोकांप्रमाणे आहेत. जाटांत शनिवारी लग्ने करीत नाहीत. लग्नासाठी ब्राह्मण पुरोहिताला बोलावतात.

जाट पुरुष मेल्यावर त्याची बायको प्रेताभोवती उलट दिशेने सात प्रदक्षिणा घालून काही बांगड्या फोडते व बाराव्या दिवशी सर्व बांगड्या फोडून चुलीत टाकते.

जाटांमध्ये जसनाथी, विष्णुई, साध, सखी सरवार, शीख, इ. अनेक भिन्न पंथांचे अनुयायी आहेत. बरेच जाट मुसलमान झाले आहेत. मात्र हे सर्व लोक जाट या नावानेच ओळखले जातात.

पंजाबच्या काही भागात नवीन खेडेगावची स्थापना करण्यापूर्वी त्या जागी मातीचा एक ढिगारा करून त्यात जंड नावाचे झाड पुरतात. पुढे त्या गावात जो मनुष्य प्रथम मरण पावेल त्याचे प्रेत तिथे नेऊन जाळतात किंवा त्या मातीत पुरतात आणि त्याच जागी त्याचे दगडी स्मारक बांधतात. त्या मृत व्यक्तीला पुढे भुमिया देव मानले जाते आणि संकटप्रसंगी जाट लोक त्याच्याकडे धाव घेतात.

जाटांची भाषा व लोकगीते – जाटांच्या भाषेला जाटू भाषा किंवा बांगरू भाषा असे म्हणतात. या भाषेवर राजस्थानी व पंजाबी भाषेचा प्रभाव दिसून येतो. सर्व जाटांची भाषा एकच आहे, असे मात्र म्हणता येत नाही. या भाषाभेदाप्रमाणेच जाटांच्या लोकगीतांतही बरेच भेद आहेत. सुगी हे त्यांच्या गीतांचे स्फूर्तिस्थान आहे. अशा गीतांतून आळस, बेफिकिरी, विनोद, उपहास, इ. विषय असतात. पण प्रेम आणि यौवन हे त्यांच्या गीतांचे मुख्य विषय असतात. अशाच एका गीतात प्रेमविव्हल पथिकाची आकांक्षा पुढीलप्रमाणे व्यक्त झाली आहे –

तेरा मारिया ऐसे रोऊँ जिसा झरता मोर बनी का
तेरे पाइयाँ माँ पायल बाजे जिसा बाजें बोज सर्णों का
थोड़ासा नीर पला दे, प्यासा मरता दूर घर्णों का ।

अर्थ – तुझ्या रूपाला पाहून मी घायाळ झालो आणि वनातील मोराप्रमाणे रडू लागलो. शेंगातील बियांचा जसा आवाज येतो, त्याप्रमाणे तुझ्या पायातील चाळांचा आवाज येत आहे. मी दूरचा पांथस्थ आहे. माझा जीव तहानेने व्याकुळ झाला आहे. म्हणून हे प्रिये, मला थोडे पाणी प्यायला दे.

याशिवाय पनघट, पनिहारी, शेते, निर्झर, इ. विषयांवरही जाटांची लोकगीते असून, ती मधुर आणि मादक आहेत. पाणवठ्यावर आलेला एक युवक त्याच्या डोळ्यादेखत निघून गेलेल्या पनिहारिणीला उद्देशून म्हणतो –

रूप तेरा चंदासा खिल रिया, बे ने घड़ी बैठके ठाली
कर तावल वार भाजरी, जिसी दारू माँ आग लागरी,
कलियाँदार घाघरी, पतली कम्मर लचकत चाली

अर्थ– चंद्रासारखे तुझे रूप उमलून राहिले आहे. मला वाटते, फुरसदीच्या वेळात भगवानाने तुला घडवले असावे. (अरेरे !) ही तरुणी तर पळून दूर निघून गेली. जणू शराबाला आग लागली. कळीदार लहंगा नेसून ती सिंहकटी ललना आपली कमर लचकवीत निघून गेली.

जाटांचे काही जातिगायक असतात, त्यांना सांगी असे म्हणतात. एखादा सांगी जेव्हा सारंगीवर धनुकली फिरवत एखादे प्रणयगीत गाऊं लागतो, तेव्हा जाटांचा हर्षोल्लास त्यांच्या हृदयात मावत नाही. ते भान विसरून त्याची प्रणयगीते आणि आख्यानगीते ऐकत बसतात. [म. ज्ञा. को.; रा. जा.; घ. गा. है.]

जाटपू द. भारतातील एक जात. डोंगराळ भागात खोंड भाषा व सखल प्रदेशात तेलुगू भाषा बोलणाऱ्या सुधारलेल्या खोंड लोकांचा हा वर्ग आहे. हे लोक साप आणि गायी यांचे मांस खातात. कोंड-जाटपू-डोरलू अर्थात कोंड जातीचे धनी, या दीर्घनामाचे जाटपू हे संक्षिप्त रूप आहे, असे म्हणतात. निरनिराळ्या प्राण्यांच्या देवकांवरून यांच्यांत अनेक पोटजाती पडल्या आहेत.

यांच्यांत आते-मामे भावंडांचा विवाह होतो. विधवाविवाह रूढ आहे. बहुतेक विधवा दिराशीच विवाह करतात.

जाकरा ही यांची कुलदेवता होय. धान्याच्या मळणीच्या प्रसंगी नव्या पिकाचा नैवेद्य प्रथम हिला दाखवतात.

हे आपल्या जातप्रमुखास नायडू किंवा सामंथी असे म्हणतात.

हे लोक मृतांना पुरतात; परंतु सर्पदंशाने मेलेल्या माणसाला मात्र जाळतात. [का. द्रा. स. इं.; म. ज्ञा. को.]

जाड़

एक वन्य जात. उ. प्रदेशातील टेहरी-गढवाल व तिबेट यांच्या मधल्या जाड़गंगेच्या प्रदेशात यांची वस्ती आहे. प्राचीन काळी काही कारणाने भारतातून स्थलांतर करून हे लोक तिबेटमध्ये वस्ती करायला गेले. पण तिथल्या लोकांनी त्यांच्यावर अत्याचार केल्यामुळे त्यांना भारताकडे परतावे लागले. परत आल्यावर त्यांनी टेहरी-गढवालच्या सीमेवरील दऱ्याखोऱ्यांत वास्तव्य केले. या प्रदेशातून वाहणारी एक नदी गंगेला मिळते. तिला या जाड़ लोकांच्या नावावरून जाड़गंगा असे नाव मिळाले आहे.

सर्वसाधारणपणे जाड़ लोक घरे बांधून राहण्यापेक्षा पहाडी गुंफांत राहणेच अधिक पसंत करतात. काही लोक मात्र तात्पुरत्या झोपड्या उभारून त्यांत राहतात. जाड़ लोकांचा मुख्य व्यवसाय व्यापार हा आहे. पण यांच्यापैकी पुष्कळसे लोक गरिबीमुळे भीकही मागतात. या भिक्षेकऱ्यांना भैर जाड़ म्हणतात. भिक्षा मागण्यासाठी हे दूरदूरच्या प्रदेशांत जातात व उन्हाळ्यात परत आपल्या गावी येतात. यांच्या मालकीची अशी एखादी गाय यांच्याजवळ असते, तेवढीच यांची धनदौलत. व्यापारी जाड़ लोक उन्हाळ्यात तिबेटात जाऊन लोकर, मीठ, घोडे, खेचरे, चहा, इ. वस्तूंची खरेदी करून त्यांचा आपल्या देशात व्यापार करतात. तसेच ते घोंगड्या, लोकरीच्या चादरी, शाली, इ. वस्तूही बनवतात.

डाळ, तांदूळ व मांस हा या लोकांचा आहार असतो. स्त्रिया व पुरुष या दोघांनाही दारू व तंबाकू यांचे व्यसन असते.

थंड प्रदेशात वास्तव्य असल्यामुळे जाड़ लोक गौर वर्णाचे व सुंदर असतात. स्त्रियांचे सौंदर्य तर वाखाणण्यासारखेच असते. जाड़ स्त्रिया एकापेक्षा अधिक वेण्या घालतात व त्यात कवड्या गुंफतात. कवड्या हा त्यांचा सौभाग्यालंकार आहे. [भा. आ.]

जाडेजा राजपूत

राजपुतांची एक शाखा. यांची वस्ती सौराष्ट्रात आहे. ते आपल्याला सिंधमधील समावंशाचे व यादवकुळाचे समजतात. इ. स. १३२० मध्ये लाखा फुलाणी नामक एका राजाने सर्व कच्छ जिंकून घेतला. त्याच्यानंतर त्याचा पुतण्या पुनवरा गादीवर आला. तो वारल्यावर त्याच्या विधवेने सिंधमधून जाडा राजाच्या लाखा नामक मुलाला बोलावून त्याला गादी दिली. जाडाचा मुलगा म्हणून त्याला जाडेजो असे म्हणू लागले. पुढे इ. स. १५३७ मध्ये जाम हमीरजी व जाम रावळ या दोन भावांत कच्छच्या राज्याची वाटणी झाली. रावळाने हमीरजीला मारून त्याचे राज्य बळकावले, तेव्हा हमीरजीचा मुलगा सेंगार हा अहमदाबादकडे पळून गेला. सेंगारने इ. स. १५४८ मध्ये जाम रावळावर स्वारी केली, तेव्हा तो काठियावाडात गेला आणि नवानगर येथे राहू लागला. त्याच्या वंशजांनी ध्रोळ, राजकोट, गोंडल व वीरपूर या ठिकाणी राज्ये स्थापली. त्यामुळे काठियावाडचा सुमारे एक षष्ठांश भाग जाडेजा राजपुतांच्या ताब्यात आला.

जाडेजा राजपूत पूर्वी आपल्या मुलींना जन्मतःच मारून टाकीत असत, असे उल्लेख आहेत. एका मोठ्या दुधाच्या पातेल्यात मुलीला बुडवीत आणि त्यामुळे ती तत्काळ मरे. या प्रयोगाला त्यांनी दूधपिती असे नाव दिले होते. ही चाल का व कशी सुरू झाली ते समजत नाही. आख्यायिका आहे, ती अशी— एका राजपूत सरदाराला एक शिकलेली व रूपगुणसंपन्न मुलगी होती. पण तिला अनुरूप असा वरच त्या जातीत मिळेना. मुलीला कुंवार ठेवणे हे पाप; तेव्हा पुरोहित त्या सरदाराला म्हणाला, की ‘तू या मुलीला मारून टाक.’ सरदाराने तसे केले व तेव्हापासून ही चाल अस्तित्वात आली.

सिंध सोडल्यानंतर तिथल्या राजपूत घराण्यांशी असलेला यांचा संबंध तुटला व इतर राजपुतांशी संबंध जोडण्यास ते नाखूष असल्यामुळे त्यांनी हा कन्यावधाचा मार्ग पत्करला असावा, अशीही शक्यता आहे. धावपळीचे जीवन आणि मुसलमानी आक्रमणांची भीती यामुळेही मुलींना योग्य वर मिळणे कठीण झाले असेल आणि मुलगी मेली तरी हरकत नाही; पण तिचे शील निष्कलंक राहावे, अशा वृत्तीतून त्यांनी हा कठोर उपाय अवलंबणे चालू केले असेल. पुढे इंग्रजांनी त्यांना या दुष्ट रूढीपासून परावृत्त करण्याचा प्रयत्न केला. मुलींना मारणाऱ्यांना शिक्षा करणे, तिचे संगोपन करणाऱ्यांना बक्षीस देणे, मुलींच्या लग्नासाठी सरकारी निधीतून आर्थिक मदत देणे, इ. उपयांचा अवलंब करून ही दुष्ट चाल कमी करण्यात इंग्रजांनी बरेच यश मिळविले. [वि. मुं. रा. प.]

जातककथा

बौद्धांच्या खुद्दक निकायातील दहावा भाग. जातक शब्दाचा अर्थ जन्मासंबंधी असा आहे. भगवान बुद्धाच्या पूर्वजन्मासंबंधीच्या कथांना जातककथा असे म्हणतात. बुद्धत्व प्राप्त होण्यापूर्वीच्या साधक बुद्धाला बोधिसत्त्व म्हटले आहे. बुद्ध हा बोधिसत्त्वांच्या जन्मात दान, शील, मैत्री, इ. दहा पारमितांचा अभ्यास करतो, भूतदयेसाठी आपल्या प्राणांचे अनेकवार बलिदान करतो आणि अशा प्रकारच्या अनेक जन्म आचरलेल्या साधनेचे फल म्हणून त्याला बुद्धत्वाची योग्यता प्राप्त होते.

बोधिसत्त्व शब्दाचा अर्थ असा – बोधी = ज्ञान मिळविण्यासाठी उद्यमशील असा सत्त्व म्हणजे प्राणी. बोधी प्राप्त करून

न्यासाठी ज्याने सत्त्व म्हणजे सारसर्वस्व वेचले आहे तो बोधिसत्त्व होय, असाही त्या शब्दाचा अर्थ काही विद्वान करतात. बुद्धाच्या बोधिसत्त्व या अवस्थेतील अनेक जन्मांच्या कथा प्रसिद्ध आहेत. काही कथांत तो स्वतः नायक आहे, काहीत दुय्यम पात्र आहे, तर काहीत तो एक साधा प्रेक्षक आहे.

प्राय: प्रत्येक जातककथेचा आरंभ असा असतो—– वाराणसीत ब्रह्मदत्त राजा राज्य करीत असता बोधिसत्त्व कुरंग मृगाच्या योनीत जन्माला आला (कुरंगमिगजातक) किंवा कुत्र्याच्या जातीत जन्मला (कुक्कुरजातक) किंवा बैल झाला (कण्हजातक).

काही विद्वानांचे मत आहे, की ब्रह्मदत्त ही अनेक राजांची पदवी असावी. पण भदंत-आनंद कौसल्यायन यांच्या मते इंग्रजीतील 'वन्स अपॉन ए टाइम'प्रमाणे कथेची सुरवात करण्याची ती एक ठराविक शब्दसंहती असावी.

जातकांच्या निश्चित संख्येबद्दल विद्वानांत मतभेद आहेत. लंका, सयाम, ब्रह्मदेश, इ. देशांतील बौद्ध परंपरेनुसार जातककथांची संख्या ५५० इतकी आहे. परंतु सांप्रत उपलब्ध असलेल्या कथा ५४७ किंवा ५४८ आहेत. प्राचीन लोककथांच्या आधारे मध्य प्रदेशात या जातककथांचे संकलन झाले, असे ऱ्हीस डेव्हिड्सने म्हटले आहे. विल्यम्सही याच मताचा पुरस्कर्ता आहे. जातककथांतील 'जातकठ्ठवण्णना' हा गद्यभाग बुद्धघोषाने रचलेला आहे, असे गंधवंसात म्हटले आहे. बहुतेक जातके बुद्धोत्तरकालीन असून, त्यांतील गाथा म्हणजे पद्यविभाग त्यांत प्राचीन (स. पू. ५ व्या शतकातील) आहे. भरहूत व सांची येथील पाषाणवेदिकांवर जातकांतील अनेक कथा कोरलेल्या आहेत. त्यावरून या कथा अशोकाच्या पूर्वकालीन आहेत, हे सिद्ध होते.

प्रत्येक जातककथा पुढील पाच भागांत विभागलेली असते– (१) पच्चुप्पन्नवत्थू (२) अतीतवत्थू (३) गाथा (४) वेय्याकरण किंवा अत्थवण्णना व (५) समोधन

पच्चुप्पन्नवत्थू म्हणजे वर्तमान कालातील घटना किंवा कथा. बुद्धाच्या जीवनकालात जी घटना घडली, तिला पच्चुप्पन्नवत्थू (प्रत्युत्पन्नवस्तू) म्हणतात. उदा० खरादिय जातकातील कथा बुद्धाने जेतवनात विहार करीत असताना एका कटुभाषी भिक्षूच्या संदर्भात सांगितली आहे. त्यातील पच्चुप्पन्नवत्थू अशी–

एक कटुभाषी भिक्षू कोणाचेच ऐकत नसे. तेव्हा बुद्ध त्याला म्हणाला, की 'तू खराच कटुभाषी आणि कोणाचे न ऐकणारा आहेस का?' त्यावर त्या भिक्षूने 'होय' असे उत्तर दिले. तेव्हा बुद्ध त्याला म्हणाला, की 'पूर्वीही तू असेच कोणाचे ऐकले नाहीस आणि जाळ्यात अडकून प्राण गमावलेस'. एवढे बोलून मग बुद्धाने त्याच्या पूर्वजन्मातील वृत्त सांगायला सुरवात केली.

हे जे पूर्वजन्माचे वृत्त, त्याला अतीतवत्थू असे नाव आहे. जातकातील सर्वांत महत्त्वाचा भाग हाच होय. यात एक किंवा अनेक गाथा येतात. गाथा हा जातकातील प्राचीन अंश असून गाथा म्हणजेच जातक होय. वरील खरादिय जातकात पुढील गाथा आली आहे –

अट्ठखुरं खरादिये ! मिगं वङ्ककातिवङ्किनं ।
सत्तहि कलाहतिक्वन्तं न तं ओवदितुस्सहे ।।

अर्थ– हे खरादिये, आठ खूर असलेल्या, अतिवक्र आणि सात उपदेशांचे उल्लंघन करणाऱ्या त्या मृगाला उपदेश करावा अशी मला प्रेरणा होत नाही.

या गाथेच्या पूर्वीचा कथाभाग असा –

पूर्वी वाराणासीत ब्रह्मदत्त राजा राज्य करीत असता, बोधिसत्त्व मृगयोनीत जन्माला आला आणि इतर हरिणांबरोबर जंगलात राहू लागला. एक दिवस त्याच्या बहिणीने त्याला एक हरणाचा छावा दाखवला आणि म्हटले, 'भाई, हा तुझा भाचा आहे. याला तू मृगमाया (= शिकाऱ्याच्या जाळ्यात न सापडण्याची विद्या) शिकव.' बोधिसत्त्वाने ते मान्य केले आणि त्या शावकाला ठराविक वेळी आपल्याकडे बोलावले. पण तो शावक काही त्याच्याकडे आला नाही. अशा प्रकारे बोधिसत्त्वाने त्याला सात वेळा बोलावले आणि सातही वेळा तो शावक आला नाही. पुढे रानात चरत असता एके दिवशी तो पारध्याच्या जाळ्यात सापडला. तेव्हा त्याच्या आईने बोधिसत्त्वाकडे येऊन म्हटले, की 'तू त्याला मृगमाया शिकवली होतीस ना?' तेव्हा बोधिसत्त्वाने उत्तरादाखल वरील गाथा म्हटली.

गाथांनंतर प्रत्येक जातकात वैय्याकरण किंवा अत्थवण्णना नामक भाग येतो. यात गाथेतील शब्दांचा अर्थ व त्यावरील टीका दिलेली असते.

सर्वांत शेवटी समोधन येते. त्यात अतीतवत्थूतील पात्रांचा बुद्धाच्या काळातील पात्रांशी संबंध जोडून दाखविलेला असतो. उदा० खरादियं जातकातील तो मृगशिशू म्हणजे सांप्रतचा कटुभाषी भिक्षू होय. ती बहिण, आताची उत्पलवर्णा भिक्षुणी आणि उपदेश करणारा मृग म्हणजे मी (बुद्ध) होय. असे बुद्ध सांगतो.

जातककथांचे स्वरूप लोकसाहित्याशी सहधर्मी आहे. त्यांत माणसांबरोबरच पशुपक्ष्यांच्या कथाही आलेल्या आहेत. जातकांची कथानके विविध प्रकारची असून विंटरनिट्झ या पाश्चात्य पंडिताने त्यांचे वर्गीकरण पुढील सात भागांत केले आहे–

(१) व्यावहारिक नीतीसंबंधी कथा, (२) पशुकथा, (३) विनोदी कथा, (४) रोमांचकारी दीर्घकथा, (५) नैतिक वर्णनपर कथा, (६) कथन व (७) धार्मिक कथा.

वरील कथांच्या वर्णनशैलीही भिन्न भिन्न प्रकारच्या आहेत. विंटरनिट्झने त्यांचे पुढील पाच प्रकार सांगितले आहेत — (१) गद्यवर्णन (२) आख्यान — संवादात्मक किंवा संवाद आणि वर्णन यांचे मिश्रण. (३) दीर्घ विवरण — याचा आरंभ गद्याने होतो व शेवट गाथेने होतो. (४) एखाद्या विषयावरील वचनांचा संग्रह. (५) महाकाव्य किंवा खंडकाव्य.

वानरिन्द जातक; विळारक्त जातक, सहिचम्म जातक, संसुमार जातक, संधिभेद जातक, इ. जातककथा या पशुकथा आहेत. या कथा फार मौलिक असून परदेशांतही त्यांचा प्रसार झालेला आहे. त्यांपैकी वानरिन्द जातकाची कथा संक्षेपाने अशी—

पूर्वी वाराणसीत ब्रह्मदत्त राजा राज्य करीत असता बोधिसत्त्व वानर म्हणून जन्माला आला. तो मोठा बलवान होता. दिवसभर तो एका नदीच्या काठी भटकत राहायचा आणि नदीच्या मध्यभागी असलेल्या एका बेटावर जाऊन तिथल्या झाडावरची फळे खात बसायचा. त्या नदीत एक मगराचे जोडपे राहत होते. एक दिवस मगरीला त्या वानराचे काळीज खावेसे वाटले. म्हणून तिने नवऱ्याला सांगितले, की 'मला त्या वानराचे काळीज आणून द्या. कारण मला त्याचे डोहाळे लागले आहेत.' मगराने ते मान्य केले. मग वानर ज्या कातळावरून बेटावर उडी मारीत असे, त्या कातळावर तो जाऊन बसला. वानराने संध्याकाळी पाहिले, तर त्याला तो कातळ उंचावलेला दिसला. कदाचित आपल्याला धरायला मगर तिथे येऊन बसला असेल, असे त्याला वाटले. मग त्या गोष्टीची शहानिशा करून घेण्यासाठी, जणू काही आपण खडकाशीच बोलत आहो, अशी बतावणी करून वानर म्हणाला. 'का रे खडका, आज तू माझ्याशी बोलत का नाहीस?'

तेव्हा मगराने त्याला प्रतिप्रश्न केला. 'काय रे वानरराजा?' त्यावरून कातळावर मगर बसला आहे, हे वानराला समजले.

मग मगराने वानराला सांगितले, की 'मला तुझ्या काळजाचे मांस हवे आहे.'

त्यावर वानर म्हणाला, 'ठीक आहे. मी आता तुझ्याकडे येतो. तू तोंड उघडून बैस आणि जवळ आल्यावर मला धर.'

त्याच्या सांगण्याप्रमाणे मगराने तोंड उघडले. त्याबरोबर त्याचे डोळे मिटले. ते पाहून वानराने मगराच्या डोक्यावर उडी मारली व तिथून नदीपलीकडे झेप घेतली. वानराचे हे कृत्य पाहून मगर आश्चर्याने थक्क झाला आणि म्हणाला. 'वानरराजा, सत्य, धर्म, धैर्य आणि त्याग हे चारही गुण तुझ्यात आहेत, म्हणून तुझा जय होतो.'

सर्वसाधारणपणे माणसे ही पशूंपेक्षाही हीन कोटीची आहेत, असे जातककथांत काही ठिकाणी म्हटले आहे. पण तिथेही एखाद्या व्यक्तीवर टीका न करता सर्व जातीवरच टीका केलेली आहे. गरहित जातकातील यासंबंधीची एक कथा अशी— 'एक वानर काही दिवस राजवाड्यात राहिला होता. तो परत आल्यावर सगळी वानरे त्याच्या भोवती जमली आणि माणसांच्या वागणुकीविषयी त्याला प्रश्न विचारू लागली. तेव्हा तो वानर म्हणाला. 'माणसांच्या करणीविषयी मला काही विचारू नका.' पण इतर वानरांनी फारच आग्रह केल्यावर तो म्हणाला. 'माणसे रात्रंदिवस 'माझे सोने, माझे सोने' असे म्हणत असतात. त्याचप्रमाणे माणसांच्या घरांतील स्त्रीही खूप धन देऊन खरेदी केलेली असते. ती इतरांना फार त्रास देते.' हे ऐकून इतर वानरांनी आपले कान झाकून घेतले आणि 'आता आणखी काही सांगू नकोस' असे ते त्याला म्हणाले.

अवारिय जातकात एका लोभी नाविकाचे चित्र रंगवले आहे, ते असे— एकदा बोधिसत्त्वाने त्याच्या होडीतून नदी पार केली आणि त्याबद्दल त्याला पैसे देण्याऐवजी क्रोध न करण्याविषयीच उपदेश केला. पण तो न मानवून नाविकाने त्याला खूप मारले. त्याच वेळी नाविकाची गरोदर पत्नी तिथे आली व तिने बोधिसत्त्वाला न मारण्याबद्दल नवऱ्याला विनवले. तेव्हा त्याने आपल्या बायकोलाही बेदम मारले आणि त्यामुळे ती मरण पावली.

मनोरंजक जातककथांत महाजनक जातक, बावेरू जातक व सुप्पारक जातक ही विशेष उल्लेखनीय आहेत. महाजनक जातकात चंपा नगरीतून सुवर्णभूमीकडे निघालेल्या सार्थवाहांची कथा आहे. बावेरू जातकात सीरिया व बाबिलोन या देशांशी असलेले भारताचे व्यापारी संबंध दर्शविले आहेत. सुप्पारक जातकात भरुकच्छापासून इराणपर्यंत केलेल्या समुद्रयात्रेचे वर्णन आहे. अप्पण्णक व वण्णुपथ या जातकांत जंगल आणि वाळवंट यांतून प्रवास करताना व्यापारी तांड्याला कोणकोणत्या अडचणींना तोंड द्यावे लागले, त्याचे वर्णन आहे.

जातककथांत रामायण, महाभारत, भागवत, इ. ग्रंथांतील काही कथाही आलेल्या आहेत; पण त्यांचे स्वरूप अत्यंत विकृत आणि भ्रष्ट केलेले आहे. विशेषतः राम आणि कृष्ण यांची चरित्रे तर इतक्या विकृत रूपात चितारली आहेत, की ती वाचून या अवतारी पुरुषोत्तमांबद्दल घृणाच निर्माण व्हावी. उदा० दसरथ जातकात रामकथा दिलेली आहे, ती अशी—

दशरथ राजा वाराणसीत राज्य करीत होता. त्याला सोळा

हजार स्त्रिया होत्या. त्याच्या पट्टराणीला राम, लक्ष्मण व सीता अशी तीन अपत्ये होती. ही पट्टराणी मेल्यावर राजाने दुसरी पट्टराणी केली. तिला भरत नावाचा पुत्र झाला. एकदा दशरथाने या पट्टराणीला वर दिला होता. तदनुसार तिने आपला पुत्र भरत याला राज्य द्यावे, अशी दशरथाकडे मागणी केली. ही राणी आपल्या सावत्र मुलांचा घात करील, या शंकेने राजाने राम, लक्ष्मण व सीता यांना वनात जाऊन राहायला सांगितले व आपल्या मृत्यूनंतर म्हणजे बारा वर्षांनी परत येऊन राज्यावर बसायला सांगितले. तेव्हा लक्ष्मण व सीता यांसह राम हिमालयात गेला.

त्यानंतर नऊ वर्षांनी दशरथ मरण पावला. दशरथाच्या मृत्यूनंतर भरत रामाकडे गेला व त्याला वाराणसीचे राज्य करण्याविषयी विनवू लागला. पण रामाने ते अमान्य केले. भरत फारच आग्रह करू लागला, तेव्हा त्याने लक्ष्मण व सीता यांना त्याच्याबरोबर पाठवले. आपल्या पादुकाही त्याने भरताला दिल्या. पुढे तीन वर्षांनी राम वाराणसीला गेला. मग सर्वांनी त्याचे स्वागत केले आणि सीतेला त्याची पट्टराणी बनवून दोघांना राज्याभिषेक केला.

घत जातकात कृष्णकथेचेही असेच विकृत विडंबन केले आहे. इक्ष्वाकू हा शाक्यांचा पूर्वज होता, असे बुद्धाचे मत होते. कृष्ण हा त्या इक्ष्वाकूचा दासीपुत्र असून, दिसायला पिशाचाप्रमाणे कुरूप होता, असे बुद्धाने म्हटले आहे.–

जातककथांचे आणखी एका वेगळ्या तऱ्हेने वर्गीकरण करता येण्यासारखे आहे, ते असे– (१) काही कथा स्त्रियांच्या निंदा करणाऱ्या आहेत. उदा० असातमंत जातकात स्त्रियांविषयी म्हटले आहे, की स्त्रिया या असती व पापी आहेत. (२) काही कथा घरदार सोडून जाऊन तपस्या करावी, असे सांगणाऱ्या आहेत. (३) काही कथा ब्राह्मणवर्णाची निंदा करणाऱ्या आहेत व (४) काही कथा कूटनीती शिकवणाऱ्या आहेत.

बुद्ध स्वतः राजपुत्र असल्यामुळे राजनीतीची त्याला विशेष रुची होती. जातककथांत जिथे जिथे राजनीतीचा संबंध आला आहे, तिथे तिचा धार्मिक भावनेशी कुठेच संबंध जोडलेला नाही. राजनीतीत खून, हत्या, बदला घेणे, षड्यंत्र, अपहरण, इ. गोष्टी क्षम्यच नव्हे, तर आवश्यक समजल्या गेल्या आहेत. बुद्ध हा धर्मसंस्थापक होता, तसाच राजनीतिज्ञही होता. त्यामुळे जातककथांत राजनीतीला महत्त्वाचे स्थान मिळाले आहे.

जातककथांत पुनर्जन्माची कल्पना गृहीत धरलेली आहे. बौद्ध धर्मानुसार प्रत्येक जीव हा नरकयातना भोगणारा आत्मा, पिशाच, प्राणी, मानव व देव या पाच कोटींत जन्म घेतो. कर्मानुसार देवांनाही विविध योनीत जन्म घ्यावा लागतो. बोधिसत्त्व पहिल्या दोन कोटी सोडून पुढच्या तीन योनींत जन्म घेतो. तो सद्गुणी असतो. तो कथेचा नायक तरी असतो किंवा नायकाला प्रेरणा देणारा तरी असतो. कधी तो वृक्षदेवता होऊन नायकाच्या कर्माचा साक्षी होतो.

बोधिसत्त्वाने स्त्रीयोनीत जन्म घेतल्याचे मात्र कुठेच सांगितलेले नाही. याचे कारण असे, की बुद्धत्व हे स्त्रीला अप्राप्य आहे, असे बौद्ध धर्माने मानले आहे.

जातकवाङ्मय हे बुद्धाच्या पूर्वीही लोककथांच्या रूपात अस्तित्वात होते. बुद्धाच्या ह्यातीत राजगृहात भिक्षूंची प्रथम संगीती भरली होती. त्या काळात जातकवाङ्मय हे बौद्ध कर्मसिद्धांताचे उदाहरण बनले होते. द्वितीय संगीतीच्या कालापर्यंत जातक वाङ्मयाचे रूपांतर धर्म-नीतिकथांत झाले. तृतीय संगीतीच्या काळी या जातककथांचा खुद्दकनिकायात संग्रह करण्यात आला. पुढे या संग्रहात आणखीही कथांची भर पडली. इ. स. च्या ५ व्या शतकात बोधिसत्त्वाच्या पूर्वजन्मातील कथांचा जातकट्ठकथा या नावाने वेगळा संग्रह करण्यात आला.

भरहूत व सांची येथील स्तूपाप्रमाणे अमरावतीच्या शिल्पातही काही जातककथा साकार झाल्या आहेत. अजंटा, वेरूळ आणि बाघ या ठिकाणी तर अनेक जातककथा चित्रित केलेल्या आहेत.

बौद्ध धर्मातील हीनयान व महायान हे दोन्ही संप्रदाय जातककथांचा आदर करतात. आशिया खंडात बौद्ध धर्माच्या प्रचारासाठी जातककथांचा फार चांगला उपयोग झाला. इराण, अरबस्तान या मार्गाने या कथा युरोपातही पोचल्या. जातककथांत जागतिक कथासाहित्याचा उगम आहे, असे बेन्फे या जर्मन पंडिताने म्हटले आहे; तर एका इटालियन विद्वानाने सिंदबादच्या सफरी व अरेबियन नाइट्स यांचे मूलस्थानही जातककथाच आहेत, असे सिद्ध केले आहे. लॅटिन, फ्रेंच, इटालियन, स्पॅनिश, जर्मन, इंग्लिश, स्वीडिश व डच या भाषांत जातककथांची भाषांतरे झाली आहेत. ब्रह्मदेश, सयाम, सिलोन, तिबेट, मंगोलिया, चीन व जपान या देशांतही त्यांचा प्रसार झाला आहे. जपानमधील झेन पंथ हा तर जातककथांची शेवटची तात्त्विक परिणतीच समजला जातो.

बुद्धकालीन भारतातील समाजधर्म, राजनीती, भूगोल, आर्थिक व्यवस्था, लोकांच्या श्रद्धा, इ. बाबींचे चित्रण जातककथांत पहायला मिळते. समाजातील राजा, मंत्री, चोर, व्यभिचारी, ठक, संत, शिक्षक, विद्यार्थी, मूर्ख, इ. विविध प्रकारच्या लोकांचे व सैन्य, युद्ध, विवाह, इ. सर्व गोष्टींचे वर्णन जातकांत आढळते.

जातकयुगात संघ किंवा एकता याला फार महत्त्व दिलेले दिसते. संघाचे वर्णन जातकांत जागोजाग आढळते. वानर,

डुक्कर, लावा, इ. पशुपक्ष्यांनी संघ करून आपल्यावरची संकटे परतवून लावल्याच्या कथा वड्ढकीसूकर, इ. जातकांत आल्या आहेत. इतकेच नव्हे, तर समूहाने राहणाऱ्या वृक्षांनीही वादळापासून आपले रक्षण केल्याचे रुक्खधम्म जातकात सांगितले आहे.

जातककालात प्रत्येक राजाची एक परिषद असे. त्यातील सभासदांना परिषद्य म्हणत. हे सदस्य निवडलेले असत व ते ज्ञान आणि चारित्र्य या दोन्ही बाबतींत श्रेष्ठ असत. त्यामुळे परिषदेबद्दल लोकांत आदर असे. राजापेक्षाही परिषद श्रेष्ठ मानली जात असे. राजाचा मंत्री ब्राह्मण असे. राजा व प्रजा यांचे अन्योन्य संबंध प्रेमाचे असत. दुष्ट राजाला प्रजा वेळीप्रसंगी ठार मारायलाही कमी करत नसे, असे सच्चंकिर जातकावरून कळते.

वैदिक कालापासून सर्वसाधारणपणे जी शिक्षणपद्धती चालत आली होती, तीच जातकयुगातही प्रचलित होती. उपनयनानंतर मुलाला दूरच्या एखाद्या गुरुकुलात पाठवीत असत. काही मुले आपल्या गावातील आचार्याकडेच शिकत; पण श्रीमंत लोक बहुधा तक्षशिला, नालंदा, इ. विद्यापीठांत आपल्या मुलांना शिक्षणासाठी पाठवीत. शिक्षणामुळे मुलाचे जीवन उजळून निघावे अशा तऱ्हेची शिक्षणपद्धती त्या काळी अस्तित्वात होती. त्यागी व विद्वान आचार्य अध्यापनाचे कार्य करीत असत. काही वेळा, एकदा आचार्यांकडून प्रमाणपत्र घेऊन आल्यावर दुसरा विषय शिकण्यासाठी पुन्हा गुरुदक्षिणा घेऊन त्याच आचार्याकडे विद्यार्थी जात असे, असे असातमंत जातकावरून कळते.

जातकयुगात स्त्रीशिक्षणावरही भर होता. अनेक विदुषी स्त्रियांचे वर्णन जातककथांत आले आहे. तत्त्वज्ञ व विद्वान सारिपुत्ताला चार स्त्रियांनी शास्त्रार्थ करण्यासाठी आव्हान दिले, असे चुल्लकालिंग जातकात सांगितले आहे.

पूर्वापार चालत आलेली वर्णव्यवस्थाच जातकयुगातही चालू होती. चारही वर्णांत क्षत्रिय वर्ण श्रेष्ठ असे बुद्ध मानीत होता आणि क्षत्रियातही शाक्य वंश श्रेष्ठ असे त्याचे मत होते. जातकयुगात कुलाला विशेष महत्त्व होते. विनीलक जातकात एका नापितपुत्राची कथा दिली आहे. रस्त्याने जाणाऱ्या एका लिच्छवी कुमारीला पाहून तो तिच्यावर आसक्त झाला आणि शेवटी तिच्या विरहाने मरण पावला. त्याच्या बापाने बुद्धाला ही गोष्ट सांगितली. तेव्हा बुद्धाने त्याला म्हटले, की 'तुझा पुत्र हीन कुळातील असल्यामुळे त्याला लिच्छवी कन्या प्राप्त करून घेण्याचा अधिकार नव्हता.'

बौद्ध भिक्षूंतही हीनकुलोत्पन्न भिक्षू जर श्रेष्ठकुलोत्पन्न भिक्षूंची बरोबरी करू लागले, तर त्यांना अपमान सोसावा लागे. सीहकोत्थुक जातकात कोकाकिल नामक भिक्षूची कथा आली आहे. दुसरे बहुश्रुत भिक्षू धर्मग्रंथ वाचताना पाहून त्यालाही आपण ते वाचावे अशी इच्छा झाली; पण बुद्धाला जेव्हा हे कळले तेव्हा त्याने त्याची चांगलीच निर्भत्सना केली.

वैदिक कालापासून ब्राह्मण हा सर्व वर्णांत श्रेष्ठ मानला जात असे. पण जातकयुगात ब्राह्मण वर्ण हा हीन, पतित आणि क्षत्रिय वर्ण हा सर्वश्रेष्ठ मानला जाऊ लागला. बौद्ध ग्रंथांत पराकोटीचा ब्राह्मणद्वेष पाहायला सापडतो. ब्राह्मणांनी बौद्ध धर्माला विरोध केला. त्यामुळेच कदाचित बौद्ध ग्रंथांत सर्वत्र ब्राह्मणांच्या विरुद्ध लिहिलेले आढळते. स्वतः बुद्धही या ब्राह्मण निंदेपासून अलिप्त नव्हता.

जातकयुगातील स्त्रीचे स्थान विशेषसे स्पृहणीय नव्हते. त्या काळी स्त्री ही समाजाचे एक दुबळे अंग बनलेली होती, असे दिसते. स्त्रिया या अत्यंत चंचल, अविश्वासू, दुराचारी आणि पतित अशा मानल्या जात होत्या. नदी, रस्ता, मद्यालय, धर्मशाळा, पाणपोई, इत्यादींप्रमाणेच स्त्रीही सार्वजनिक उपभोगाची वस्तू आहे, असे अनभिरत जातकात सांगितले आहे. बंधनमोक्ख जातकात एका राणीने चौसष्ट नोकरांबरोबर अनैतिक संबंध केला, असे सांगितले आहे.

जातककालात देशातला व्यापारउद्योग खूप भरभराटला होता. शहरांची वाढ झाली होती. श्रावस्ती, चंपा, राजगृह, साकेत, कौशांबी, काशी, ही त्या काळातील वैभवशाली नगरे होती. लोक संपन्न होते. निक्ख आणि सुवर्ण ही सोन्याची व कंस, पाद, मासक आणि काकणिक ही काशाची वा तांब्याची नाणी त्या कालात प्रचलित होती. खेडेगावातील लोक कृषिगोरक्ष्य करीत व शहरातील लोक व्यापार करीत.

व्यापारासाठी जातककालात काही राजमार्ग निर्माण झालेले होते. श्रावस्ती ते राजगृह हा तीनशे मैलांचा राजरस्ता होता. याशिवाय इतर अनेक राजमार्ग गंधार, पाटलिपुत्र, कुशीनारा, प्रतिष्ठान, इ. शहरांपर्यंत जात होते. भारतातून मध्य आशियाद्वारा पश्चिमेकडे जाणाराही एक मार्ग होता. या मार्गावरच तक्षशिला ही नगरी व साकेत, श्रावस्ती, वाराणसी व राजगृह यांसारखी महानगरे होती. हा मार्ग बिनधोक होता आणि व्यापारी व इतर लोक या मार्गावरून निर्धास्तपणे प्रवास करीत. श्रेष्ठी लोक समुद्रमार्गे बाबिलोनपर्यंत जाऊन व्यापार करीत.

जातककथांत लुटारू आणि डाकू यांचेही वर्णन आले आहे. व्यापारी लोक आपला तांडा घेऊन परप्रदेशात जात असता वाटमाऱ्या डाकूंकडून त्यांची लूटमारही होत असे. डाकूंच्या एका गावाचाच जातकात उल्लेख आहे. त्या गावात पाचशे डाकू वस्ती करून रहात होते. काही वेळा हे डाकू एखाद्या गावावर दरोडा घालून सबंध गाव लुटीत व स्त्रियांनाही पळवीत.

जातकयुगातील लोकांचा आहार भात, दूध, दही, लोणी व फळेमुळे असा होता. मांसभक्षण सार्वत्रिक होते. गृहस्थ, श्रमण व भिक्षूही मांसाहार करीत. नगराच्या बाहेर मांस, मासे व मद्य यांची दुकाने असत.

जातकयुगात महावीर व गौतम बुद्ध यांच्या मतांचा लोकांवर विशेष प्रभाव होता. बौद्धेतर अनेक धर्माचार्य बुद्धाच्या उपदेशाने बौद्ध धर्मात आले होते. जातककथांवरून असे दिसते, की त्या काळातील-लोक एक मोक्षमार्गी तरी होते किंवा यक्ष, भूत, पिशाच, इत्यादींचे उपासक तरी होते. मधली स्थिती अशी नव्हतीच. यक्ष, भूत, पिशाच, जलदेवता, वृक्षदेवता, इत्यादींचे अस्तित्व बुद्ध स्वतःही मानीत होता; मग इतरांबद्दल बोलायलाच नको. जंगलात राहणारे यक्ष एका वेळी पाच–पाचशे व्यापाऱ्यांना खाऊन टाकीत, असा उल्लेख अप्पण्णक जातकात आला आहे. यक्ष व भूतपिशाचांची पूजाअर्चाही चालत असे. कट्टर शून्यवादी बौद्धांनी इतक्या खालच्या पातळीवर येऊन यक्ष व भूतपिशाच यांचे अस्तित्व कसे मानले, हे एक आश्चर्य आहे, असे मोहनलाल महतो 'वियोगी' यांनी म्हटले आहे.

बौद्ध धर्माच्या सर्वंकष प्रभावामुळे जातककालात लाखो लोक भिक्षू बनून बौद्ध संघात दाखल झाले होते. या सर्व भिक्षूंचे पालनपोषण समाजाकडूनच होत असे. जातकयुगात लोक आपल्या धनाचा उपयोग दानासाठी करण्यात स्वतःला धन्य मानीत होते. स्वतःची लाखो, करोडोंची संपत्ती बौद्ध संघाला दान देऊन आपण स्वतः भिक्षू बनायचे, ही त्या काळातली अगदी मामुली गोष्ट होती. एक शंखपती ब्राह्मण रोज सहा लाख नाणी दानात खर्च करीत असे, असे संख जातक सांगते. मोठमोठे विहार व महाविद्यालये यांचा चरितार्थही धनिकांच्या दानावरच चालत असे.

बौद्ध धर्म सार्वत्रिक होऊनही जातककालात वर्णव्यवस्थेतला उच्चनीच भाव लोपलेला नव्हता. बौद्ध धर्माने भेदभाव न करता सर्व वर्णांच्या व जातीच्या लोकांचा संघात समावेश केला, हे म्हणणे बरोबर नाही. हीन वर्ण व हीन कुल यांतील व्यक्तीला संघात प्रवेश मिळत नसे, असे विनयपिटकावरून कळते.

जातककालात बौद्ध धर्माशिवाय इतरही अनेक पंथ प्रचारात होते. बौद्ध सुत्तग्रंथात बासष्ट दृष्टींचा (पंथ) उल्लेख आहे. आजीवक, निगंठ, मुंडसावक, जटिलक, परिव्राजक, मगंडिक, तेदंडिक, इ. त्यांची नावे आहेत. समाजात प्रचलित असलेले हे अनेक पंथ आणि मतवाद तत्कालीन धार्मिक अराजकता दर्शवितात. यावरून त्या काळात सर्वसमर्थ अशा धार्मिक नेतृत्वाचा अभाव होता, असेच म्हटले पाहिजे. पाहा – अवदानसाहित्य. [ज. प्र. बौ. वि.; पा. सा. इ.; हिं. सा. बृ. इ.; जा. का. भा. सं.; जातककथा, भा. १, अनुवादक – श्री. दुर्गा भागवत, १९५६; जातक – श्री. भदन्त आनंद कौसल्यायन, १९५६]

जातकर्म

स्त्री प्रसूत होऊन तिला मुलगा झाला असेल, तर त्याचे नाळ छेदण्यापूर्वी जातकर्म नावाचा संस्कार करतात. मुलाचा बाप प्रथम पुत्राचे मुख अवलोकून स्नान करतो व पुढील संकल्प करतो–

नवजात पुत्राचे गर्भजलामुळे उत्पन्न झालेले दोष नाहीसे व्हावे व त्याची बुद्धी व आयुष्य ही वाढावी, यासाठी मी त्याचा जातकर्म हा संस्कार करीत आहे.

मग तूप आणि मध एकत्र करून त्यात सुवर्ण उगाळतात व ते मिश्रण मुलाला चाटवतात. मग बालकाच्या दोन्ही कानांजवळ मुख नेऊन पिता 'शतं जीव...' या मंत्राने त्याला आशीर्वाद देतो.

या संस्काराला ऋग्वेदीय ब्रह्मकर्मात होमाचा विकल्प सांगितला आहे. यजुर्वेदीय ब्रह्मकर्मात मात्र होमाचे विधान आहे. त्यासाठी सूतिकागृहात अग्निस्थापना करून त्यावर मोहऱ्या व इतर धान्यांचे कण यांचा सकाळ–संध्याकाळ होम करतात. शंड, मर्क, इ. राक्षसांपासून बाळ-बाळंतिणींचे संरक्षण व्हावे, यासाठी हा होम सांगितला आहे.

मनुष्य आदिमकालापासून येनकेनप्रकारेण पुत्रजन्माचे काही ना काही विधी करीत आला आहे. आदिमानवाला माणसातून माणसाची किंवा जीवातून जीवाची उत्पत्ती हे एक महदाश्चर्य वाटत होते. म्हणून त्या घटनेचे श्रेय त्याने कोणत्या तरी अतिमानवी शक्तीला दिले. अशा प्रसंगी पहिला विचार त्याच्या मनात आला.तो हा, की प्रसूतीने क्लांत झालेली स्त्री आणि तिने जन्म दिलेला तो छोटा बालजीव यांचे संरक्षण कसे होईल ? त्याच्यावर कोण्या पाप्याची दृष्ट तर पडणार नाही ना ? अदृश्य भूतपिशाच त्यांना बाधा तर करणार नाहीत ना ? या आशंकेने प्रेरित होऊन तो आदिमानव कोणत्या ना कोणत्या स्वरूपात त्या बाळ-बाळंतिणींच्या सुरक्षेचे उपाय किंवा विधी करू लागला. त्याचबरोबर बाळ-बाळंतिणींची शुद्धीही त्याला अपेक्षित होती. म्हणून त्या दृष्टीनेही त्याने काही विधिविधाने निर्माण केली.

भारतात गृह्यसूत्रांच्या काली या संस्काराचा प्रयोग निर्माण झाला. जातकर्म करण्याच्या पूर्वी पित्याने पुत्राचे मुखावलोकन करावे, असा नियम सांगण्यात आला. कारण पुत्रमुख पाहिल्यानेच पिता पितृऋणातून मुक्त होतो, अशी प्राचीनांची धारणा आहे. म्हणूनच या विधीला लोकव्यवहारात पुत्रावण (सं. पुत्रावलोकन) असे म्हणण्याची चाल पडली आहे. नालच्छेदनापूर्वी

हा संस्कार करायचा, हा मुख्य पक्ष. पण तो न जमल्यास सुवेर संपल्यानंतर तो करावा; तसेच पुत्रजन्मप्रसंगी पित्याला मृताशौच असल्यास ते संपल्यानंतर तो करावा, असे पुढील धर्मशास्त्रकारांनी सांगितले आहे.

जातकर्मातले प्रथम कृत्य मेधाजनन हे आहे. मेधाजनन म्हणजे मुलाच्या ठिकाणी बुद्धितत्त्व निर्माण करणे. त्यासाठीच वर उल्लेखलेले घृत-मधांचे चाटण असते. जन्मलेला मुलगा बुद्धिमान निपजला पाहिजे, ही आकांक्षा यातून व्यक्त होते आणि ती आपल्या सांस्कृतिक उच्च अभिरुचीचे द्योतक आहे. या वेळी पिता मुलाच्या कानात व्याहृतींचा उच्चार करतो. या व्याहृती बुद्धीचे प्रतीक मानलेल्या आहेत.

गोभिल गृह्यसूत्राने शिशूच्या कानात 'तू वेद आहेस' असे वाक्य उच्चारायला सांगितले आहे. याच प्रसंगी पिता त्या शिशूचे एक गुह्य नाव ठेवीत असे. आई-बापांशिवाय इतरांना ते प्रकट करायचे नसे. नाव गुह्य राखण्याचा हेतू हा, की कोण्या प्रकट वा प्रच्छन्न शत्रूला त्या नावावर अभिचारकर्म (जादूटोणा) करता येऊ नये.

जातकर्मातले दुसरे कृत्य आयुष्य हे होय. त्यासाठी बाप मुलाच्या कानात तीन आयुष्यवर्धक मंत्र म्हणतो. पारस्कर गृह्यसूत्रात पाच ब्राह्मणांकडून मुलाच्या शरीरात जीवनाचा संचार करण्यासाठी पुढील विधी करावा, असे सांगितले आहे——

एका ब्राह्मणाने मुलाच्या पूर्वेस उभे राहून श्वास असे म्हणावे, तसेच दुसऱ्याने दक्षिणेस राहून प्रतिश्वास, तिसऱ्याने पश्चिमेस राहून निःश्वास, चौथ्याने उत्तरेस राहून बहिश्वास व पाचव्याने ऊर्ध्वमुख होऊन उच्छ्वास असे म्हणावे (पार. गृ. सू. १. १६).

मग ज्या भूमीवर पुत्रजन्म झाला, त्या भूमीला पिता धन्यवाद देतो. नंतर तो शिशूला सुदृढ, पराक्रमी व शुद्ध जीवन मिळावे, म्हणून पुढील मंत्राने त्याच्या खांद्यांना स्पर्श करतो——

अश्मा भव परशुर्भव हिरण्यमस्तुतं भव ।
आत्मा वै पुत्रनामासि स जीव शरदः शतम् ।।
(पार. गृ. सू. १·१६)

अर्थ–(हे शिशो) तू दगडासारखा टणक हो. तू परशू हो. तू सुवर्णासारखा शुद्ध व अपराजित हो. खरोखर पुत्र या नावाने तू माझा आत्माच आहेस. तू शंभर वर्षे जग.

पुत्रजन्माने कुल उज्ज्वल होते, वाढते, म्हणून सर्वजण पुत्राची इच्छा करतात. अशा वेळी जी स्त्री पुत्राला प्रसवते, तिची प्रशंसा होणे स्वाभाविक आहे. म्हणून जातकर्मात पुढील मंत्राने पिता बाळाच्या आईची प्रशंसा करतो——

इडाऽसि मैत्रावरुणी वीरमजीजनयः ।
सा त्वं वीरवती भव याऽस्मान् वीरवतोऽकरत् ॥
(पार. गृ. सू. १.१६)

अर्थ– तू इडा आहेस. तू मित्रावरुणांची कन्या आहेस. तू वीरमाता आहेस. कारण तू वीरपुत्राला जन्म दिलास. जिने आम्हा लोकांना वीरपुत्र दिला, अशी तू वीरवती हो.

एवढे झाल्यावर मुलाचे नालच्छेदन करतात. बाळंतीण मुलाला स्तनपान देते. त्याआधी पिता तिच्या उजव्या स्तनाचे प्रक्षालन करून 'इमां कुमारो जरां धयतु...' हा मंत्र म्हणतो. मग पिता एक जलपूर्ण पात्र बाळंतिणीच्या उशाशी ठेवून म्हणतो, 'हे आपोदेवींनो, ज्या प्रकारे तुम्ही देवांसह विश्वाची देखभाल करीत आहा, त्याचप्रमाणे या सूतिकागृहात असलेल्या बाळ-बाळंतिणींची देखभाल करा.'

ब्रह्म व आदित्य या पुराणांत पुत्रजन्माविषयी सांगितले आहे, ते असे – घरात पुत्रजन्म होताच त्याचा जातकर्मसंस्कार पाहण्यासाठी देव-पितर त्या ठिकाणी येतात. त्या दिवशी पुत्राच्या पित्याने सुवर्ण, भूमी, गाय, इ. दाने द्यावी. व्यासमते पुत्रजन्माच्या रात्री दिलेले दान अक्षय्य पुण्य देणारे होते.

पुत्रजन्माविषयीच्या लौकिक आचारात वाजंत्री वगैरे मंगल वाद्ये लावतात, दीपोत्सव करतात व साखर किंवा पेढे वाटतात. मुलीचा जातकर्मसंस्कार अमंत्रक करावा, असे सांगितले आहे.
[हिं. सं.; ध. सिं.; सं. कौ.; ऋ. ब्र. क.; य. ब्र. स.]

जातमातृदेवता

एक बालसंरक्षक देवता. प्राचीन काळी स्त्री प्रसूत झाल्यावर सहाव्या दिवशी सटवीची (षष्ठी देवी) पूजा करीत. त्या वेळी वस्त्रावर अथवा काष्ठफलकावर या देवीचे चित्र काढून त्याची पूजा केली जात असे. हिचे मुख मांजराचे असते आणि हिच्या भोवती बालकांचा परिवार असतो. हर्षचरित, कादंबरी व धनपालाची तिलकमंजरी या ग्रंथांत या देवीचे उल्लेख आढळतात. हिचे दुसरे नाव चर्चिकादेवी असून, सांप्रत उत्तर प्रदेशात ती छाछीदेवी या नावाने प्रसिद्ध आहे. भारतात काही ठिकाणी सध्याही सूतिकागृहाच्या दारावर या देवीचे चित्र काढण्याची प्रथा आहे. पाहा– चर्चिका. [प्रा. भा. लो. ध.]

जातवेदसकल्प

ऋग्वेदात 'जातवेदसे सुनवाम...' नावाचे एक सूक्त आहे (ऋ. १. ९९). त्याचा ऋषी मारीच असून, देवता जातवेदा अग्नी आहे. हे सूक्त सर्व अर्थ साधून देणारे, सुख, भूमी व आयुरारोग्य देणारे तसेच शत्रुनाशक आहे. कोणत्याही संकटाच्या प्रसंगी त्याचा जप करावा, जप झाल्यावर अग्निस्थापना करून हवन करावे व एका

कुंभावर अष्टभुजा दुर्गेची स्थापना करून तिची पूजा करावी असे सांगितले आहे. उगवलेला दिवस सुखाचा, जावा, यासाठी सूर्योदयी व सूर्यास्तसमयी या सूक्ताचा पाठ करावा. रात्री हे सूक्त म्हणून झोपावे म्हणजे दुष्ट स्वप्ने पडणार नाहीत. हे सूक्त सदास्वस्त्ययन आहे, असे सांगितले आहे. [शां. क.]

जातवेदसी एक तांत्रिक देवता. हिला आठ हात व तीन डोळे असतात. डाव्या चार हातांपैकी तीन हातांत अनुक्रमे शंख, चर्म व बाण ही आयुधे असतात व चौथा हात अभयमुद्रेत असतो. उजव्या चार हातांपैकी तीन हातात अनुक्रमे धनुष्य, चक्र व चषक ही आयुधे असतात व चौथा हात वरदमुद्रेत असतो. क्वचित ही दहा हातांचीही मानलेली आहे. [श्रीविद्यार्णवतंत्र]

जातित्रिरात्रिव्रत एक काम्यव्रत. हे ज्येष्ठ शु. त्रयोदशीपासून तीन दिवस करतात. याचा विधी असा–द्वादशीला एकभुक्त, त्रयोदशीपासून तीन दिवस उपवास, ब्रह्मा-विष्णु-महेश व त्यांच्या भार्या यांची फुला-फळांनी पूजा आणि यव, तिळ व तांदूळ यांच्या मिश्रणाने हवन. फल– संतती व सौभाग्य यांची प्राप्ती.

हे व्रत अनसूयेने केले, म्हणून ब्रह्मा-विष्णु-महेश हे तीन देव तिच्या पोटी आले, अशी कथा पुराणांत आहे. [हि. ध.]

जातिसंस्था हिंदू समाजव्यवस्थेचे एक अंग. आपापल्या पारंपरिक आचारविशेषांचा वेगळेपणा कटाक्षाने राखणारे व परस्परांच्या शेजारी राहूनही आपल्या पारंपरिक आचारविशेषांचे उल्लंघन न करणारे, असे जे हजारो सामाजिक गट भारतात हजारो वर्षांपासून अस्तित्वात आहेत, त्या गटांना जाती अशी संज्ञा आहे.

जातीची लक्षणे – अमरकोशात जातीचे लक्षण दिले आहे, ते असे —

जातिर्जातं च सामान्यं व्यक्तिस्तु पृथगात्मता ।

याचा अर्थ असा की जाती हा वर्गवाचक शब्द असून, त्या वर्गातील प्रत्येक घटकाला व्यक्ती म्हणतात. या व्याख्येनुसार मनुष्यत्व, पशुत्व, घटत्व इत्यादींना जाती ही संज्ञा लागते. परंतु ज्याप्रमाणे पशुजातीत सिंहजाती, व्याघ्रजाती, शृगालजाती, इ. जाती संभवतात, त्याप्रमाणे मनुष्यजातीतही आचारांच्या पृथगात्मतेमुळे जे लहान– मोठे गट पडले आहेत, त्यांना जाती ही संज्ञा दिली गेली आहे.

सेनार्ट या पाश्चात्य मानववंशशास्त्रज्ञाने जातीची वर्णनात्मक व्याख्या दिली आहे, ती अशी – जात ही एक स्वयंपूर्ण संस्था असून तिचा एक पुढारी व सभा असते. जातित्व हे स्वेच्छेने अथवा अन्यतर मार्गाने प्राप्त होत नसून, ते पूर्णपणे आनुवंशिक असते. विवाह आणि तत्सम इतर प्रसंगी सर्व जात एकत्र जमते. एका जातीतील लोक साधारणपणे एकच धंदा करीत असतात. ते रोटीबेटीव्यवहार, खाद्यपेयादी बाबी व शुद्धाशुद्धता यांसंबंधी पूर्वापार रूढ असलेले ठराविक नियम पाळतात. निरनिराळ्या सामाजिक अपराधांना शिक्षा देण्याचा व विशेषतः कोणत्याही मनुष्याला विशेष कारणास्तव बहिष्कृत करण्याचा जो अधिकार जातीला आहे, त्यावरून जातीच्या सामर्थ्याचे प्रत्यंतर येते. प्रत्येक जातीचे वैशिष्ट्य हे ती पाळीत असलेल्या विवाह, खानपान व शुद्धाशुद्धता या विषयींच्या रूढीवरच अवलंबून असते. हे नियम म्हणजे प्रत्येक जातीभोवती उभारलेले अभेद्य तटच आहेत. त्यामुळेच हिंदू समाजाला एक अपूर्व स्वरूप प्राप्त झाले आहे.

डॉ. इरावती कर्वे यांनी जातीची व्यवच्छेदक लक्षणे दिली आहेत, ती अशी –

(१) विवाह फक्त जातीच्या आतच होतो.

(२) तिचा विस्तार बहुधा एका मर्यादित भागात, बहुधा एकभाषिक भागात असतो.

(३) तिला पारंपरिक असे एक किंवा अधिक धंदे असतात.

(४) तिचे इतर जातींच्या अनुषंगाने उच्च अथवा नीच असे कमी-अधिक निश्चित स्थान असते आणि इतर जातींशी तिने कसे वागावे, याबद्दलची एक परंपरा असते.

ज्या कुटुंबांत विवाहसंबंध होऊ शकतो, अशा कुटुंबांच्या समूहालाच जात ही संज्ञा प्राप्त होत असल्यामुळे डॉ. इरावती कर्वे यांनी ‘विस्तारलेला नातेवाईकांचा गट’ असे जातीचे संक्षेपात लक्षण केले आहे.

जातीला याती, ज्ञाती आणि दक्षिण भारतात कुलम् असे पर्यायी शब्द आहेत. यातील ज्ञाती हा शब्द स्थूलपणे जरी जात या अर्थाचा असला, तरी विस्तृत जातीच्या अल्पशा ज्ञात भागालाच ज्ञाती म्हटले आहे.

प्रत्येक जातीचे जीवन इतर जातींहून वेगळे व स्वतंत्र असते; परंतु इतर जातींशी तिचे सहकार्य मात्र चालू असते. विविध जातींनी बनलेल्या हिंदुसमाजात प्रत्येक व्यक्तीच्या जीवनातील महत्त्वाच्या सामाजिक व सांस्कृतिक स्वरूपाच्या प्रसंगी तिचा जातीतल्या व्यक्तींशीच संबंध येतो. परंतु आर्थिक बाबतीत व्यक्ती व जात या दोघींचाही इतर जातींशी संबंध येतो. सांस्कृतिक व सामाजिक बाबतीतही प्रत्येक जात सर्वस्वी स्वयंपूर्ण असते असे नव्हे; पण तिथे इतर जातींचा संबंध फार थोडा

असतो. काही प्रसंगी जातींची स्वयंकेंद्रितता मोडते आणि सर्व जाती सहकार्याने वागतात. उदा०— उत्सवप्रसंगी, दरोडेखोरांपासून गावाचा बचाव करताना किंवा सरकारकडे गावाच्या वतीने काही मागण्या करण्याच्या वेळी, हे सहकार्य दिसते.

जातीतील व्यक्तींच्या वर्तनावर नियंत्रण ठेवण्यासाठी बहुतेक जातींच्या जातपंचायती असतात. परंपरेच्या चाकोरीबाहेर घडणाऱ्या वर्तनाबद्दल व्यक्तींना शिक्षा करण्याचा अधिकार जातपंचायतीकडे असतो. म्हणजे राज्ययंत्रणेप्रमाणेंच व्यक्तीच्या आचारावर जातीचीसुद्धा सत्ता चालते. या सर्व गोष्टी लक्षात घेऊनच जातीला लहानसे संस्थान किंवा राज्य म्हणतात. प्रत्येक जातीला आपण आपल्या शेजारच्या जातीहून श्रेष्ठ आहो, असे वाटते. अगदी तळच्या जातींनासुद्धा हा जातिश्रेष्ठतेचा अभिमान असतो. श्रेष्ठत्वाच्या व शुद्धत्वाच्या भावनेवरच जातिसंस्था उभारली गेल्यामुळे भारतात जात ही अत्यंत प्रबळ आणि ताठर वस्तू झालेली आहे.

जातींची उत्पत्ती – आपापल्या आचारविशेषांनी एकमेकींपासून वेगळ्या असणाऱ्या हजारो जाती कशा निर्माण झाल्या, या प्रश्नावर आपले प्राचीन धर्मशास्त्रज्ञ आणि आधुनिक मानवशास्त्रज्ञ व समाजशास्त्रज्ञ यांनी अनेक प्रकारची मते मांडली आहेत. ऋग्वेदात वर्णांचा उल्लेख आहे. तसाच काही व्यवसायवाचक संज्ञांचाही उल्लेख आहे. परंतु तिथे जातींचा मात्र उल्लेख नाही. जातींचा उल्लेख कुटुंब, कुल, गोत्र या अर्थाने प्रथम कात्यायन श्रौतसूत्रात आढळतो आणि आजच्या अर्थाने तो प्रथम मनुस्मृतीत येतो. वसिष्ठसंहितेत (३.१) याविषयी पुढीलप्रमाणे म्हटले आहे–

देशधर्म–जातिधर्म–कुलधर्मान् श्रुत्यभावादब्रवीन् मनुः।

अर्थ – देशधर्म, जातिधर्म व कुलधर्म यांना श्रुतींचा आधार नसल्यामुळे मनूने ते (स्वतःच्या चिंतनातूनच) सांगितले आहेत.

मनू म्हणतो– जाती अनेक आहेत; पण वर्ण चारच आहेत. वर्ण अनादिकालापासून चालत आलें आहेत. ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य आणि शूद्र हा त्यांचा अनुक्रम आहे. यातील पहिले तीन द्विज आहेत, म्हणजे त्यांना उपनयन संस्काराचा अधिकार आहे. शूद्रांना उपनयनाचा अधिकार नाही. अस्पृश्य जातींना मनूने वर्णव्यवस्थेत म्हणजे चार वर्णात स्थान न देता ‘पंचम’ म्हटले आहे.

ब्राह्मणः क्षत्रियो वैश्यस्त्रयो वर्णा द्विजातयः।
चतुर्थ एकजातिस्तु शूद्रो नास्ति तु पञ्चमः ॥
(मनु. १०.४)

अर्थ – ब्राह्मण, क्षत्रिय व वैश्य हे तीन वर्ण द्विज आहेत. चौथा शूद्रवर्ण हा द्विज नाही आणि पाचव्याला वर्णत्व देता येणार नाही.

मनू ब्राह्मणादी क्रमाने श्रेष्ठतेचा उतरता क्रम मानतो. ब्राह्मणांची श्रेष्ठता सांगताना मनूने आपल्याही पूर्वीच्या समाजशास्त्रवेत्त्यांचे मत सांगितले आहे–

भूतानां प्राणिनः श्रेष्ठाः प्राणिनां बुद्धिजीविनः।
बुद्धिमत्सु नराः श्रेष्ठा नरेषु ब्राह्मणाः स्मृताः ॥
(मनु. १.९६)

अर्थ– भूतमात्रात प्राणी श्रेष्ठ आहेत; प्राण्यांत बुद्धिजीवी प्राणी श्रेष्ठ होत; बुद्धिजीवी प्राण्यांत मनुष्यप्राणी श्रेष्ठ असून, मनुष्यांत ब्राह्मण हे श्रेष्ठ म्हटले आहेत.

मनूने श्रेष्ठतेची अशी श्रेणी मानलेली असल्यामुळेच उच्चवर्णीय पुरुष आणि कनिष्ठवर्णीय स्त्री यांच्या विवाहाला तो अनुलोम विवाह म्हणतो आणि याच्या उलट होणाऱ्या विवाहाला प्रतिलोम विवाह म्हणतो. चार वर्णांतील अनुलोम आणि प्रतिलोम विवाहांमुळे जो वर्णसंकर होतो, त्यामुळेच नाना जाती निर्माण झाल्याचे मन्वादिस्मृतिकारांनी सांगितले आहे. अनुलोम-प्रतिलोम विवाहामुळे मूळ चार वर्णांच्या संकरापासून झालेल्या १२ जातींचा आणखी संकर होऊन दोन पिढ्यांतच २०४ निरनिराळ्या जाती होतात, असे या सिद्धान्तानुसार दाखवता येते.

जातींच्या उत्पत्तीविषयीची मन्वादी स्मृतिकारांची उपपत्ती समाजाचे सूक्ष्म निरीक्षण करून संशोधनपूर्वक मांडलेली दिसत नाही. स्मृतिकारांच्या म्हणण्याप्रमाणें काही जाती संकरापासून निघालेल्या आहेत व त्यांना मूळ दोन जातींच्या मधला दर्जा मिळाला आहे, ही गोष्ट मानववंशशास्त्रज्ञांना मान्य आहे; पण अशा जातींची संख्या त्यांच्या मते अत्यल्प आहे. एका मोठ्या गटाचे लहान लहान भाग होऊन अनेक जाती बनल्या, अशी कल्पना मानवशास्त्रज्ञांनी जातींचे वर्णन करतांना मांडली आहे. तिचे दोन प्रकार असे– (१) मुळात जातिविहीन अशा एकसंध समाजात वेगळे वेगळे धंदे करणाऱ्या लोकांच्या वेगवेगळ्या जाती बनल्या. आणि (२) एकच धंदा करणाऱ्या लोकांत आणखी काही वैशिष्ट्ये उत्पन्न झाल्यामुळे पुढे त्या वैशिष्ट्यांमुळेच त्यांच्या पोटजाती बनल्या. उदा० सर्व भारतात पूर्वी एकच ब्राह्मण जात होती व तिचे निरनिराळे विभाग होऊन चित्पावन, कऱ्हाडे, अय्यर, अय्यंगार, नंपूतिरी, इ. जाती बनल्या; किंवा प्रथम सर्व महाराष्ट्रात जाती नसलेला एकच समाज होता व पुढे त्यातून चित्पावन, कऱ्हाडे, तेली, धोबी, चांभार इ. जाती उत्पन्न झाल्या.

‘जाती म्हणजे एक सतत होणाऱ्या विभाजनाची क्रिया’ या कल्पनेचा आधार घेऊन मानवशास्त्रज्ञांनी जातींचा विचार

केलेला आहे, असे दिसते. या कल्पनेचे एक प्रसिद्ध पुरस्कर्ते प्रा. घुर्ये यांच्या मते ब्राह्मणांनी आपला वंश शुद्ध ठेवण्याचे जे प्रयत्न केले, त्यांवरच जातिसंस्था आधारलेली आहे. त्यांचा असा निष्कर्ष आहे की, भारतातील जातिसंस्था ही भारतीय आर्यांचे ब्राह्मणी अपत्य आहे. या अपत्याचे संगोपन गंगा-यमुनांच्या खोऱ्यात झाले व नंतर त्याचे देशाच्या इतर भागात प्रसरण झाले.

जातींच्या उत्पत्तीसंबंधीचा हा दृष्टिकोन प्रा. घुर्ये यांच्याप्रमाणे आजवर अनेक मानवशास्त्रज्ञांनी मांडला आहे. परंतु अलीकडे डॉ. इरावती कर्वे यांनी प्रदीर्घ संशोधन करून असे स्पष्ट केले आहे, की जातिसंस्था अस्तित्वात आली व टिकून राहिली ती केवळ एखाद्या वर्गाच्या म्हणजे ब्राह्मणांच्या कौशल्यामुळे व सत्तेमुळे नव्हे, तर समाजाच्या एकंदर सांस्कृतिक स्वरूपामुळेच ती जन्मली आणि टिकून राहिली. वैदिक आर्यांनी, विशेषतः ब्राह्मणांनी जातिसंस्थेचा अभ्यास केला व तिचा फायदा घेण्याचाही प्रयत्न केला. पण तिचे ते उत्पादक नव्हते. इतर जाती ज्याप्रमाणे जातिसंस्थेच्या घटक होत्या, त्याप्रमाणे ब्राह्मणही एक घटक होते. ब्राह्मणांनी जाती निर्माण केल्या, असा पुरावा संस्कृत वाङ्मयात कुठेही आढळत नाही.

आर्यांतील मूळच्या तीन वर्णांत अनुल्लंघ्य अशा सीमा नव्हत्या. एकाच एकसंध समाजाची ती स्थूल विभागणी होती. परंतु आर्येतरांना आपल्या सामाजिक जीवनात सामावून घेण्याचा प्रयत्न जेव्हा आर्यांनी सुरू केला, तेव्हा आर्येतरांत विभिन्न आचारविशेषांनी युक्त अशा वेगवेगळ्या गटांचा अथवा जमातींचा त्यांना आढळ झाला. मग या जमातींतील आचारश्रेणी ध्यानी घेऊन आर्यांनी त्यांचा आपल्या तीन वर्णांत आणि चौथा शूद्र वर्ण निर्माण करून त्यात समावेश केला.

जाती आणि वर्ण यांच्या संबंधाविषयीचे वरील मत डॉ. इरावती कर्वे यांनी मांडले आहे. त्यांच्या मते वर्णव्यवस्था आर्यांची असून, जाती या मूळच्या आर्येतर जमातींपासून बनलेल्या आहेत. आर्यांनी वर्ण आणि जाती यांचा संगम साधून एक संमिश्र समाजव्यवस्था अस्तित्वात आणली. त्यामुळे ब्राह्मण वर्णात ब्राह्मण वर्णाच्या आचारविशेषांना जवळ असणाऱ्या जातींचा समुच्चय समाविष्ट झाला. क्षत्रिय वर्णात मराठा, कायस्थ, खत्री, सोमवंशी, वडवाळ, सहस्रार्जुनवंशी, क्षत्रिय पटवेगार, सोमवंशी पाठारे क्षत्रिय, इ. नावांच्या पुष्कळ जाती येतात. शूद्र हा शब्द अनेक जाती व जातिसमुच्चय यांना आज कित्येक शतके लावण्यात आला आहे. चार वर्णांत ब्राह्मण आणि क्षत्रिय या वर्णांचा दर्जा उच्च असल्यामुळे अनेक जातींतील लोक समुदायाने अथवा व्यक्तिशः स्वतःला ब्राह्मण अथवा क्षत्रिय ठरविण्याची धडपड करीत असत, असे दिसते. प्राचीन भारतीय वाङ्मयात अशा धडपडीची अनेक उदाहरणे आढळतात.

जाती, पोटजाती आणि जातिसमुच्चय – सबंध भारतात हिंदूंच्या सुमारे आठ हजार जाती आहेत. या असंख्य जातींपैकी एकत्र किंवा समान धंदा असलेले व आतल्या आत विवाह करण्यास संमती देणारे जे अनेक गट समान भाषिक प्रदेशात आढळतात, अशा प्रत्येक जातिगटाला आजवर मानवशास्त्रज्ञ एक जात मानीत असत. तसेच त्या गटातील प्रत्येक जातीस पोटजात असे नाव देत असत. परंतु डॉ. इरावती कर्वे यांना हे मत मान्य नाही. त्यांच्या मते एकच किंवा समान धंदा असलेले व आतल्या आत विवाह करण्यास संमती देणारे जे गट आहेत, त्यांना जातिसमुच्चय म्हणायला हवे. उदा० मराठी भाषिक प्रदेशात तिरोळे कुणबी, घनोजे कुणबी, कोकणी कुणबी वगैरे शेती करणाऱ्या जातींचा जो समुच्चय आहे, त्याला कुणबी जातिसमुच्चय म्हणावे; तसेच चित्पावन, कऱ्हाडे, माध्यंदिन, काण्व इ. जातींचा ब्राह्मण जातिसमुच्चय आणि सुतार, सोनार, लोहार इ. पाच जातींचा पांचाळ जातिसमुच्चय समजावा.

जाती आणि जमाती – आचार्य क्षितिमोहन सेन, डॉ. इरावती कर्वे, इ. मानवशास्त्रज्ञांच्या मते जाती या प्राचीनतम जमातींपासून बनलेल्या आहेत. डॉ. कर्वे यांनी आपल्या मताच्या पुष्ट्यर्थ जाती आणि जमाती यांच्या अंतर्बाह्य स्वरूपाची तुलना करून, त्यांच्या घटनेतील आश्चर्यकारक साम्य दाखवले आहे. आतल्या आत विवाह होणे, वस्तीचा एक विशिष्ट व मर्यादित भूभाग असणे आणि नियंत्रणाचे काम करणारी एक पंचायत किंवा त्यासारखीच व्यवस्था असणे या तीन्ही बाबतीत जात (कास्ट) आणि जमात (ट्राइब) यांच्यांत साम्य आहे. आफ्रिकेतील काही प्रदेशात एकाच भूभागात अनेक जमातींची वस्ती असल्याची किंवा एकाच गावात एकाहून अधिक जमाती राहत असल्याचीही उदाहरणे आहेत. आपल्याकडील खेड्यातील वस्तीचे क्षेत्र असेच निरनिराळ्या जातींमध्ये विभागलेले असते. निरनिराळ्या जातींच्या राहण्याच्या क्षेत्राच्या सीमा कधी अगदी स्पष्ट असतात; तर कधी तितक्या स्पष्ट नसतात. तसेच एका जातीने व्यापलेल्या क्षेत्रात निरनिराळ्या कुळांचे विभाग वेगवेगळे असतात; म्हणजे जातींची मुख्य मुख्य वैशिष्ट्ये जमातींच्या सारखीच असतात. एवढेच काय, पण जातींची रचना ज्याप्रमाणे उच्च-नीच श्रेणीप्रमाणे असते; तशा प्रकारची व्यवस्था, जिथे एकाहून अधिक जमाती एकत्र राहतात, तिथेही असते. जमातींचा एकमेकींशी संबंध जातीतील संबंधाप्रमाणेच वरवरचा (सामूहिक उत्सव अथवा बाजार इत्यादी प्रसंगी)

असतो. तसेच एकाच भूभागात राहणाऱ्या जमाती एकाच मानववंशाच्या असतात असेही नाही. जातींच्या बाबतीतही असाच प्रकार आहे. डॉ. इरावती कर्वे यांनी महाराष्ट्रातील जातींची शारीरिक मापे घेऊन व रक्ताची वर्गवारी करून असे निष्कर्ष काढले आहेत, की ज्या जातींचा दर्जा एकच आहे, त्यांची शरीररचना सारखीच असते असे नाही. आणि ज्या जातींचा सामाजिक दर्जा निरनिराळ्या पातळीवरचा आहे, त्यांची शरीररचना वेगळी असतेच असेही नाही.

या संदर्भात बहु-जमात (मल्टी-ट्रायबल) समाजाशी जातिसमाजाची तुलना केल्यास महत्त्वाचे निष्कर्ष निघतात. बहु-जमात समाजातील गट आतल्या आत विवाह करतात व बऱ्याच प्रमाणात स्वयंशासित असतात. या दृष्टीनें ते एकमेकांपासून स्वतंत्रपणे राहतात. हे गट म्हणजे जमातीच होत, किंवा खरे म्हणजे मोठाल्या जमातीचे भाग होत. मोठी जमात भटकत जात असताना तिचा काही भाग सुटून वेगळा होतो आणि नवीन शेजाऱ्यांशी जमवून घेऊन तिथेच राहू लागतो. जमातींपासून झालेले हे गट कधी इतर गटांशी मिसळून त्यापासून मोठे गट बनवीत किंवा तसेच स्वतंत्र म्हणून राहत असेही दिसून आले आहे. जाती या जमातींसारख्याच एकमेकींपासून वेगवेगळ्या आहेत, असे म्हटले म्हणून त्या वांशिक दृष्ट्याही एकमेकींपासून भिन्न असतात, असे ठरत नाही. एकाच प्रदेशातील जमाती एका वंशाच्या असूनही एकमेकींपासून विभक्त असे जीवन जगू शकतात. काही थोड्याच जाती विभाजनामुळे झालेल्या आहेत, जाती सरसकट विभाजनानेच झाल्या, असे म्हणणे बरोबर होणार नाही.

एकच धंदा करणाऱ्या जातींचा जो जातिसमुच्चय तोही मूळ एका जातीचे तुकडे होऊन बनलेला नसतो. उदा० निरनिराळ्या कुंभार जाती किंवा सोनार जाती. अनेक जातींची वस्ती असलेला प्रदेश किंवा एकच धंदा करणाऱ्या जातींनी बनलेला जातिसमुच्चय यांची तुलना वेगवेगळे तुकडे एकत्र शिवून बनविलेल्या गोधडीशी करता येईल.

गोधडीची ही उपमा हिंदुसमाजाच्या घडणीला तंतोतंत लागू पडते. कारण जातिसमुच्चयातील जातींची उत्पत्ती निरनिराळ्या जमातींपासून अगर गटांपासून झालेली असते व दुसरे म्हणजे एकाच प्रदेशातील जाती निरनिराळ्या वेळी येऊन त्यांची तिथे वस्ती झालेली असते.

भारतातील काही जाती आदिवासी जमातींपासून बनल्या, तर दुसऱ्या काही जाती भारतात बाहेरून आलेल्या टोळ्यांपासून बनल्या. निरनिराळ्या जमातींचे मिश्रण होऊन जाती बनल्याचीही उदाहरणे आहेत. रजपूत व मराठे यांची कुलनावे आपण पाहिली, तर निरनिराळ्या जमातींच्या मिश्रणांपासून जाती बनल्याचे स्पष्ट होईल. मराठे ही जरी एक जात असली तरी ती अनेक जमातींचे तुकडे मिळून झाली आहे, असे दिसते. वांशिक दृष्ट्या मात्र या जमातींमध्ये साम्य दिसते. शेती करणाऱ्या काही जाती आदिवासी जमातींपासून बनलेल्या आहेत. जाती बनण्याची ही प्रक्रिया अद्याप थांबलेली नाही. आजसुद्धा नव्या जाती अस्तित्वात येत आहेतच. प्रादेशिक दूरता, व्यवसायभेद, भाषाभेद, धर्मपंथभेद, विदेशी धर्मप्रचारकांचे सामाजिक आक्रमण, इ. कारणांचाही जातींच्या वाढीत काही वाटा असतो.

युरोपात जमाती किंवा जमातीचे भाग भटकता भटकता इतर जमातींशी मिसळून गेले. याच्या उलट आफ्रिकेत पुष्कळशा जमाती इतरांपासून वेगळ्याच राहिल्या व त्यांनी आपले वैशिष्ट्य कायम ठेवले. त्यामुळे तिथे लहान भूभागातही बऱ्याच जमाती शेजारी शेजारी राहताना दिसतात. भारतातही निरनिराळे गट एकमेकात मिसळून एकजिनसी समाज बनला नाही. येथील गट प्रत्येक प्रदेशात दुसऱ्यांपासून अलग व पुष्कळ अंशी स्वतंत्र असाच राहिला. याच हल्लीच्या जाती होत.

आर्यांच्या आगमनापूर्वी भारतात असलेल्या वेगवेगळ्या जाती–जमातींचा आर्यांनी आपल्या वर्णव्यवस्थेत समावेश केला. त्या काळी भारतात बाहेरून आलेले अनेक जनसमूह भारतीय समाजव्यवस्थेत सामावून घेतले जात होते. ख्रिस्तपूर्व दुसऱ्या शतकातल्या बेसनगर येथील शिलालेखावरून असे दिसते की, तक्षशिलावासी दियसचा पुत्र ग्रीक राजा हेलियोडोटस याने ‘परम भागवत’ पद प्राप्त करून आपला गरुडध्वज बनवला होता. तो भागवत संप्रदायात सहजपणे सामावून गेला. तसेच कनिष्क, हुविष्क, इ. कुशाणवंशीय विदेशी राजेही भारतीय समाजात अनायासे समाविष्ट होऊन गेले. हे राजे येथे मठ-चैत्यादींची उभारणी करीत असल्याचा उल्लेख राजतरंगिणीत आढळतो. शक क्षत्रप नहपानाचा जावई उषवदात याला इथे इ. स. च्या दुसऱ्या शतकात विशेष धार्मिक प्रतिष्ठा लाभली होती, असे नाशिक लेण्यातील शिलालेखांवरून दिसते. श्रीनगरचा ग्रीक राजा मिहिरकुल याने आपल्या नावाने मिहिरेश्वर महादेवाची स्थापना केली होती. कादवाइसस या विदेशी राजपुरुषाला इथे परममाहेश्वर हे शैव बिरुद प्राप्त झाले होते. अशा प्रकारे नाना युगांत नाना देशांतून आलेले शक, हूण, यवन, कोची, मीन, इ. जनसमूह भारतीय समाजव्यवस्थेशी एकरूप होऊन गेले आणि त्यांच्या समावेशाला तत्कालीन समाजधुरिणांचे प्रोत्साहनच लाभले, असे दिसून येते. या विविध जाती–जमातींचा आर्यांच्या समाजव्यवस्थेत

समावेश होताना त्या त्या जाती–जमातींचे आचारविशेषही आर्यांच्या समाजव्यवस्थेवर परिणाम घडवीत राहिले आणि या विविध जाती–जमातींच्या साहचर्यातून इथल्या सांस्कृतिक विविधतेत एकसारखी भर पडत राहिली. डॉ. इरावती कर्वे यांच्या मते हिंदुसमाजाची घडण याच प्रक्रियेने होत राहिली आहे.

जातींचा उत्कर्षापकर्ष – जाती ही केवळ जन्मावरून ठरत असे; तर वर्ण हा जन्म, व्यवसाय व संस्कार यांच्याशी संबद्ध होता. प्राचीन काळी आजच्याइतके जन्माला महत्त्व नव्हते.

वेदोत्तर काळात वर्णव्यवस्थेत जाती-जमातींचा समावेश झाल्यानंतरही वर्ण हे जन्माने ठरत नव्हते, तर गुणकर्माने ठरत होते आणि गुणकर्मानुसार जातिपरिवर्तनही घडू शकत होते, असे इतिहास–पुराणातील उल्लेखांवरून दिसते.

पुराणांत वर्ण-जाति-परिवर्तनाची अनेक उदाहरणे आढळतात. भगवान ऋषभदेवाच्या शंभर पुत्रांपैकी ज्येष्ठ पुत्र भरत हा भारतवर्षाचा राजा बनला आणि उरलेल्यांपैकी एक्यायंशी पुत्र शुद्ध ब्राह्मण बनले, असे भागवत पुराणात म्हटले आहे. याच पुराणात क्षत्रिय मुद्‌गलाचे वंशज ब्राह्मण बनून मौद्‌गल्य नावाने प्रसिद्ध झाल्याचा उल्लेख आहे. नहुष राजाचा पुत्र संयाती हा तपोबलाने ब्राह्मण झाल्याची कथा वायू पुराणात आहे. या पुराणानुसार विश्वामित्र, मांधाता, संकृती, कपी, पुरुकुत्स, सत्य, अनूहवान्, आर्ष्टिषेण, अजमीढ, कक्षीवान्, शिजय, रथीतर, विष्णुवृद्ध, इ. क्षत्रियांना तपोबलाने ब्राह्मणत्व लाभल्याचे समजते. नाभाग आणि वृष्टी यांच्या क्षत्रिय वंशजांना वैश्यत्व लाभल्याची आणि राजा बलीच्या वंशजांपैकी काहींना क्षत्रियत्व व काहींना ब्राह्मणत्व लाभल्याची कथा ब्रह्म पुराणात आलेली आहे. गृत्समती, वत्स आणि भर्ग यांच्या वंशजांना वेगवेगळे वर्ण लाभल्याच्या कथाही याच पुराणात आलेल्या आहेत. पुराणांशिवाय विविध प्रदेशांत प्रचलित असलेल्या कथांतूनही हेच सत्य डोकावत आहे. केरळात अशी कथा प्रचलित आहे, की परशुरामाने तिथल्या धीवरांना जानवी घालायला देऊन ब्राह्मण करून घेतले. वर्ण अथवा जात गुणकर्मावरून ठरावी, जन्मावरून ठरू नये, अशी दृष्टी असल्याची साक्ष या उदाहरणांवरून पटते.

परंतु पुढे पुढे जातिभेदांचा हा लवचिकपणा कमी झाला आणि जात ही जन्मानेच दृढ ठरू लागली. जातिबाह्य विवाहसंबंधामुळे तर मनुष्य जातिभ्रष्ट ठरत असेच, परंतु अन्य काही किरकोळ अपराधांमुळेही मनुष्याला जातिभ्रष्ट व्हावे लागत असे, असे स्मृतिवाङ्मयातील जातिभ्रंशकर या पापाच्या चर्चेवरून दिसते. याज्ञवल्क्यासारख्या स्मृतिकारांनी जात्युत्कर्षाला काही सवड ठेवली; पण ती सर्वस्वी अव्यवहार्य अशीच होती. यासंबंधी याज्ञवल्क्याचे मत पुढीलप्रमाणे आहे–

> जात्युत्कर्षो युगे ज्ञेयः सप्तमे पञ्चमेऽपि वा ।
> व्यत्यये कर्मणां साम्यं पूर्ववच्चाधरोत्तमम् ॥
>
> (याज्ञ. ४.९६)

अर्थ – या युगात पाचव्या अथवा सातव्या पिढीत जात्युत्कर्ष घडून येतो. (दोन वर्णांच्या) कर्मांचा व्यत्यय (अदलाबदल) घडला म्हणजे श्रेष्ठ-कनिष्ठ वर्णांत पूर्ववत साम्य घडते.

या श्लोकावर मिताक्षराकाराचे भाष्य आहे, ते असे–

ब्राह्मण व निषादी यांचा विवाह झाला; त्यांच्या मुलीचा पुन्हा ब्राह्मणाशी विवाह झाला; तसेच नातीचा, पणतीचा व खापरपणतीचा पुन्हा पुन्हा ब्राह्मणाशीच विवाह होत गेला, तर सातव्या पिढीत क्षेत्राचा दोष जातो व त्यापुढे होणारी संतती ही ब्राह्मण ठरते.

एखाद्या ब्राह्मणाने चुकून निषादीशी विवाह करणे संभवनीय असेल. परंतु सात पिढ्यांपर्यंत उत्तरोत्तर त्यांच्या घराण्यातील मुलींशी लग्न करायला सिद्ध असणारे ब्राह्मण भेटतील हे संभवनीय नाही. त्यामुळे याज्ञवल्क्यस्मृतीने दाखवलेले हे औदार्य केवळ औदार्याभास आहे, असे म्हणावे लागते.

स्मृतिकारांनी जातींचे जे आचारविशेष सांगितले आहेत, त्यांना जातिधर्म म्हणतात. विविध जाती, त्यांची उत्पत्ती व व्यवसाय याबाबत स्मृतींत एकवाक्यता नाही. वर्णविशिष्ट आणि जातिविशिष्ट आचारधर्मालाच स्वधर्म अशी प्राचीन संज्ञा आहे. या स्वधर्माचे प्रत्येक व्यक्तीने काटेकोर आचरण केले पाहिजे, असा धर्मग्रंथांचा दंडक आहे. 'स्वधर्मे निधनं श्रेयः परधर्मो भयावहः।' (= स्वधर्म आचरीत असताना मरण आले तरी ते श्रेयस्कर होय; परंतु परधर्माचा अवलंब करणे भयावह आहे) या गीतोक्तीत हाच दंडक सांगितला आहे (गीता ३:३५). मनूनेही गीतेप्रमाणेच म्हटले आहे–

> वरं स्वधर्मो विगुणो न पारक्यः स्वनुष्ठितः ।
> परधर्मेण जीवन् हि सद्यः पतति जातितः ॥
>
> (मनु. १०·९७)

अर्थ – स्वधर्म हा हीन वाटला तरी त्याचेच आचरण करणे इष्ट होय. परधर्म हा कितीही चांगल्या प्रकारे आचरला तरी इष्ट नव्हे. परधर्म आचरण करून जगणारा हा तात्काळ स्वजातीपासून च्युत होतो.

जाती ईश्वरनिर्मित आहेत आणि त्यांत मूलतःच श्रेष्ठ-कनिष्ठ भाव आहे, या समजुतीमुळे भारतात जातिभेदांना आणि जातींतील श्रेष्ठ-कनिष्ठभावाला दृढता प्राप्त झाली. कनिष्ठ समजल्या जाणाऱ्या जातींना आपल्या जन्मजात कनिष्ठतेचा विषाद वाटून त्यांनी असंतोषाने जातिव्यवस्थेचा भंग करायला प्रवृत्त

होऊ नये आणि उच्च समजल्या जाणाऱ्या जातींनी आपले आचारवैशिष्ट्य नष्ट होऊ देऊ नये, यासाठी जातिव्यवस्थेला कर्मवादाची बैठक दिली गेली. ज्या उच्च-नीच कुलात किंवा जातीत माणसाला जन्म लाभतो, त्याचा पूर्वजन्मीच्या भल्या-बुऱ्या कर्मांशी संबंध मानलेला आहे. एखाद्याला राजाचा किंवा ब्राह्मणाचा जन्म मिळणे, हे मागील जन्मीच्या पुण्यसंचयाचे फळ असते, तर एखाद्याने नीच जातीत जन्म घेणे, हे मागील जन्मात केलेल्या त्याच्या पापांचे फळ असते.

भारतीय समाजशास्त्रज्ञांनी अशा प्रकारे जातिसंस्थेला कर्मवादाचे अधिष्ठान दिल्यामुळे कनिष्ठ जातीतल्या लोकांना भविष्य कालाबद्दल आशा उत्पन्न झाली आणि उच्च जातींना आपल्या जातीच्या आचारविशेषांविषयी निष्ठा राखण्याची सवय लागली. तसेच आपापल्या जातीत आपापल्या स्थानावर संतुष्ट राहण्याची भावनाही त्यांच्यामध्ये दृढ होत गेली.

जात्युच्छेदनाचा इतिहास — जातीजातीतील भेद अनुल्लंघ्य बनू लागल्यापासून हिंदू समाजातील काही विचारवंत या भेदाविरुद्ध आवाज उठवू लागलेले दिसतात. गौतम बुद्धाने वर्ण-जाति-भेदाविरुद्ध बंड उभारल्याचे वारंवार सांगितले जाते. परंतु ते काही प्रमाणातच खरे आहे. बौद्ध वाङ्मयात याविषयी आलेले सर्व उल्लेख पाहता परिव्रज्या घेतल्यावरच वर्ण-जाति-भेद मावळतो; त्या आधी नाही, असे आढळून येते. सामाजिक व्यवहारात सर्व प्रकारचे भेद बौद्धांनाही मान्य होते.

न जच्चा वसलो होति, न जच्चा होति ब्राह्मणो।
कम्मणा वसलो होति, कम्मणा होति ब्राह्मणो ।।

अर्थ – कोणीही जन्माने चांडाळ असत नाही अथवा जन्माने ब्राह्मण असत नाही. कर्मानेच चांडाळ ठरतो आणि कर्मानेच ब्राह्मण ठरतो.

यासारखी वचने बौद्ध वाङ्मयात वारंवार आढळतात; परंतु ती परिनिर्वाण प्राप्त करून घेण्यासाठी करायच्या साधनेच्या अधिकाराच्या संदर्भात आहेत. बौद्धांनी चातुर्वर्ण्यही नाकारले नाही. फक्त त्यांनी श्रेष्ठत्वाच्या बाबतीत ब्राह्मण, क्षत्रिय असा क्रम होता तो बदलून क्षत्रिय, ब्राह्मण असा केला एवढेच. जैनधर्मीयांतही पंचम, भाट, भंडारी, चतुर्थ, गांधी, जती, श्रीमाळी, इ. भेद आहेतच.

मध्ययुगात सिद्ध, नाथ आणि संत यांनी जातिभेदांवर कडाडून हल्ला चढविलेला आहे. ब्राह्मणांच्या जन्मजात श्रेष्ठतेला आव्हान देणारे वज्रसूचिकोपनिषद नाथ-सिद्धांच्या वातावरणातच तयार झाले असावे, असा डॉ. हजारीप्रसाद द्विवेदी यांचा तर्क आहे. जीव, देह, जात, ज्ञान, कर्म वा धर्म यांपैकी कोणत्याही दृष्टीने ब्राह्मणांचे जातिगत श्रेष्ठत्व मानता येणार नाही, असे या उपनिषदाचे मत आहे. भविष्योत्तर पुराणातही असेच विचार स्पष्ट शब्दांत व्यंक्त झालेले आहेत (ब्रह्मपर्व ४१-४२). संतांच्या वाङ्मयात तर जातिभेदाविरुद्ध शेकडो वचने आढळतात. वीरशैव संत बसवेश्वर म्हणतो—

‘आईबापांना शिवीगाळ करतो तो खरा अस्पृश्य. परोपकारात विघ्न आणतो तो खरा चांडाळ. धनासाठी दुसऱ्याचे प्राण घेतो तो मांग. परस्त्रीची कामना धरतो, तो महार. देवा ! असले हे अस्पृश्य जर गावात आणि गावभर राहत असलेले दिसतात, तर मग महारा-ढोरांना गावाबाहेर का ठेवायचे ? हे काय न्यायाला धरून आहे ? ’

ज्ञानेश्वरांनी कुळजातिवर्ण हे ‘ आघवेचि अकारण ’ असल्याचे सांगून, ‘ तेथ भक्ती गा एक सरे । जाती अप्रमाण ’ असे उद्घोषिले आहे. चोखामेळ्याविषयीचा भक्तिभाव व्यक्त करताना जनाबाईने असेच म्हटले आहे—

असो तो अकुळी । असो भलते याती ।
माथां वंदी प्रीती । जनी त्यासी ।।

उत्तरेतील कबीरही असेच बजावतो—

जाति न पूछो साधुकी । पुछ लीजिये ग्यान ।।

दक्षिणेतील तेलगू कवी वेमन्ना हाही कबीराप्रमाणेच म्हणतो—

जन्माच्या वेळी कुठे होती गायत्री आणि कुठे होते जानवे ? सूत्रहीन माता तर शूद्रच आहे. तर मग तिचा पुत्र ब्राह्मण कसा? सर्व समान आहेत, सर्व बंधू-बंधू आहेत. सर्वांचा जन्म एकसारखाच झालेला आहे. सर्वांचे रक्त-मांस एकसारखेच आहे. तर मग का एवढी भेदांची रणे माजवता ? भावांसारखे प्रेमाने का राहत नाही ?

मराठी संतकवयित्री बहिणाबाई हिने तर वज्रसूचिकोपनिषदावर सव्वीस अभंग लिहून जन्मजात ब्राह्मण्यावर कठोर प्रहार केले आहेत. तुकोबानेही ‘ नामधारकाशी नाही वर्णावर्ण, ’ असे सांगून जातीची व्याख्या केली, ती अशी—

ज्याचा संग चित्तीं । तुका म्हणे तो ते याती ।।

संतांनी अशा प्रकारे वर्ण-जाति-भेदावर वारंवार प्रहार केले आहेत हे खरे; परंतु काही अपवाद वगळून बहुतेक संत सामाजिक व्यवहारात वर्ण-जाति-व्यवस्था मान्य करताना दिसतात. परमार्थात ती निरर्थक आहे, एवढाच त्यांचा मनोभाव दिसतो. मात्र संतांच्या या पारमार्थिक समतेच्या पुरस्कारामुळे सामाजिक क्षेत्रातही भेदांची तीव्रता कमी झाली, हे नाकारता येणार नाही. संतांच्या उपदेशाचा स्पर्श झालेला सामान्य मनुष्यही असे मानू लागला, की ‘ जात कुडीला आहे; जीवाला नाही. ’ म्हणून कोणाहीं जीवाला न दुखवता माणुसकीने वागावे.

कनिष्ठ समजल्या जाणाऱ्या जातींचे उन्नयन करून त्यांना उच्च वर्णात स्थान देण्याचे औदार्य आज जरी समाजात उरलेले नसले, तरी अलिकडच्या काळात अनेक जाती उच्च वर्णात स्थान मिळविण्यासाठी धडपडताना दिसतात आणि त्यांच्या प्रयत्नांना काही प्रमाणात यशही लाभल्याचे आढळते. पूर्व बंगालमधील अनेक हीन जातीचे लोक संपत्ती आणि ज्ञान यांच्या वृद्धीमुळे भद्र (उच्च) जातीत समाविष्ट होत आहेत. हीन जातींतील एखाद्या व्यक्तीने सत्ता प्राप्त करताच तिला क्षत्रियत्व लाभल्याची अनेक उदाहरणे इतिहासात आढळतात. अशा क्षत्रियत्वाला ब्राह्मणांनीही कधी द्रव्यलोभाने, तर कधी त्या व्यक्तीतील उच्च राजनैतिक गुणांच्या दर्शनाने मान्यता दिलेली आहे. कोच, तिपरा, गारो, इ. उत्तर आणि पूर्व बंगालमधील पुष्कळ जाती पूर्वी इतक्या हीन मानल्या जात होत्या की, उच्चवर्णीय लोक त्यांच्या हातचे पाणीही घेत नसत. परंतु अलिकडे या जातींनी शिक्षण घेऊन आपल्यांत सुधारणा घडवली आणि आपण क्षत्रिय आहो, असा दावा मांडला. आणि बंगालमध्ये पुष्कळ ठिकाणी त्यांचा हा दावा मान्य झालेला दिसतो. दक्षिण आसामातील काचारी जातीचे लोक ब्राह्मणांना गुरू करून (शरण जाऊन) ‘ शरणीया ’ असे नाव धारण करतात आणि क्रमाने उच्चत्व प्राप्त करतात. भारतात अन्यत्रही अशी जातिपरिवर्तनाची तुरळक उदाहरणे आढळतात.

एकोणिसाव्या शतकात इंग्रजी सत्ता स्थिरावल्यानंतर भारतात पाश्चिमात्य नवविचारांचे वारे वाहू लागले आणि समाजसुधारणा घडवून आणण्यासाठी जातिभेदावर आघात सुरू झाले. आंतरजातीय अथवा आंतरधर्मीय विवाहामुळे जातिभ्रष्ट ठरलेल्या व्यक्तीचा वारसाहक्क डावलला जाऊ नये, म्हणून ब्रिटिश सरकारने इ. स. १८५० मध्ये ‘जाति–निर्बंध–निवारण’ नावाचा कायदा करून तो अंमलात आणला. बंगालमध्ये राजा राममोहन रॉय व केशवचंद्र सेन आणि महाराष्ट्रात लोकहितवादी, विष्णुबुवा ब्रह्मचारी, आगरकर, म. फुले, महर्षी शिंदे, स्वा. सावरकर, इ. समाजसुधारकांनी जातिभेदांवर कठोर प्रहार करून समतेचा पुरस्कार केला. या काळात जातिव्यवस्थेचे समर्थन करणाराही एक वर्ग होता. या वर्गात अंध परंपराभिमानी लोक होते, तसेच डॉ. केतकरांसारखे समाजशास्त्रज्ञही होते.

जातिव्यवस्था अमान्य करणाऱ्यांतही दोन प्रकारचे विचारसरणी दिसतात. पहिल्या प्रकारात प्राचीन वचनांचा आधार घेऊन परंपरेच्या अधिष्ठानावर परिवर्तन घडवू पाहणारे येतात आणि दुसऱ्या प्रकारात नवविचारांवर पोसलेले विवेकवादी सुधारक येतात.

मात्र असे असले, तरी बुद्धापासून आजकालच्या सुधारकांपर्यंत अनेक महात्म्यांचे आणि विचारवंतांचे आघात होऊनही जातिसंस्थेचे बळ अजूनही कमी झालेले नाही. शहरांत आंतरजातीय रोटीव्यवहार सर्रास चालू झाला असला, तरी बेटीव्यवहार मात्र अगदी तुरळक चालू आहे. खेड्यांत तर अजून रोटीव्यवहारही अत्यंत मर्यादित आहे. तीन हजारांहून अधिक वर्षांच्या अस्तित्वाने चिवट बनलेली ही जातिसंस्था यापुढे कोणते रूप धारण करील, त्याचा अंदाज करता येत नाही. [हिं. स. र.; ध. शा. मं.; बु. भा. सं.; भा. जा. मे.]

जातुक बंगालमध्ये वरात वराच्या घरी आल्यावर वधूवरांना वायकांच्या घोळक्यात बसवून त्यांच्याकडून कवड्यांचा खेळ खेळवितात, त्याला जातुक म्हणतात. तो खेळ झाल्यावर वधू–वरांवर दूर्वा, अक्षता वगैरे टाकून जमलेल्या स्त्रिया त्यांना आशीर्वाद देतात. [ल. वि. सो.]

जातूकर्ण्य (१) एक धर्मसूत्रकार. हे बऱ्याच लोकांचे पैतृक नाव आहे. हा कात्यायनीचा पुत्र असून, आसुरायण व यास्क यांचा शिष्य आहे(सां. आ. ८.१०). याला पारागर्व नावाचा एक शिष्य होता. आलियुक व वाचस्पत्य यांचा हा समकालीन होता. सांख्यायन श्रौतसूत्रात याला जलजातूकर्ण्य असे म्हटले आहे.

विश्वरूपाने वृद्ध याज्ञवल्क्यातील जे उतारे घेतले आहेत, त्यांतील एका उताऱ्यात जातूकर्ण्याचा धर्मशास्त्रकार म्हणून उल्लेख आहे. स्मृतिचंद्रिकेत आलेल्या आंगिरसस्मृतीतील एका उताऱ्यात जातूकर्ण्य हा उपस्मृतिकार होता असे म्हटले आहे. विद्यार्थ्यांची कर्तव्ये, परजातीतील स्त्रीशी लग्न करण्यास प्रतिबंध, श्राद्धकाल, इ. विषयांचे विवेचन विश्वरूपाने जातूकर्ण्याच्या सूत्रांच्या आधारे केले आहे. जातूकर्ण्याने आचार व श्राद्ध यांवर बरीच सूत्रे लिहिली आहेत, असे दिसते. बारा राशींपैकी कन्याराशीविषयीचा जातूकर्ण्याचा एक श्लोक अपरार्काने दिला आहे. यावरून जातूकर्ण्य इ. स. २०० ते ४०० च्या दरम्यान होऊन गेला असावा, असे दिसते. श्रौतसूत्रातही याचे बरेच आधार घेतलेले आहेत. हलायुध व हेमाद्री यांनीही जातूकर्ण्याचे आधार घेतले आहेत.

(२) एक व्यास. हा झरथुष्ट्राला भेटण्याकरिता इराणात गेला होता (दसतिर. १३.१६३). [हि. ध.; प्रा. च. को.]

जाते धान्याचे पीठ करण्याचे एक दगडी साधन. हे दोन वर्तुळाकार चपटया दगडांचे बनविलेले असते. या दोन भागांना तळ्या म्हणतात. खालची तळी स्थिर असून, तिला

मध्यभागी एक लहान खुंटा बसविलेला असतो. वरच्या तळीस मध्यभागी मोठे छिद्र पाडून ती खालच्या तळीच्या खुंटाभोवती फिरत राहील, अशी बसविलेली असते. वरच्या तळीला कडेला एक उंच लाकडी खुंटा असतो. हा खुंटा हाती धरून वरची तळी खालच्या तळीवर फिरविता येते. या तळीच्या मध्यभागी असलेल्या छिद्रातून धान्य आत टाकतात आणि दोन्ही तळयांच्या घर्षणामुळे त्या धान्याचे पीठ होऊन तळयांच्या कडांच्या फटीतून बाहेर पडते.



जात्याच्या वरच्या तळीचे तोंड – नेवासे

जात्याचे हे स्वरूप पाहता ते एक प्राथमिक स्वरूपाचे यंत्र आहे, हे स्पष्ट दिसते. जाते हा शब्द यंत्रकम् या यंत्रवाचक शब्दापासूनच बनलेला आहे. यंत्रकम् → यंतम् → जंतम् → जत्त → जाते अशा प्रक्रियेने हा शब्द मराठीत आलेला आहे. अनेक इंडो–आर्यन भाषांतील जात्याची नावे पाहता, त्यांचे संस्कृतातील यंत्रकम् या शब्दाशी नाते दिसते. जात्याला रोमनीसीरियन भाषेत जंद्रा, दार्दिककरुश भाषेत ज्योंतेर, दार्दिकची एक बोली असलेल्या पशई भाषेत झार आणि भारतातील असमिया, बंगाली, हिंदी, पंजाबी, सिंधी व नेपाळी या आधुनिक लोकभाषांमध्ये अनुक्रमे झार, जाता, जंद किंवा जंदर, जंद्रुव व जातो अशी नावे आहेत.

द्राविड भाषेत मात्र जात्याला शब्द नाही. पण द्रविडांचा संबंध असलेल्या सिंधुसंस्कृतीत जाते सापडले आहे. कदाचित जात्याची निर्मिती आर्यांच्या आगमनानंतर झाली असावी व त्यामुळे त्यांच्या भाषेतच प्रथम जात्याचे नामकरण झाले असावे.

पाटा-वरवंटा हे कोणत्याही धान्याचे पीठ करण्याचे आद्य साधन दिसते. जात्याची निर्मिती पाटा-वरवंट्याच्या सुधारणेतूनच झालेली आहे. अश्मयुगाच्या अंतानंतर कृषिजीवनास प्रारंभ होताच पाटा–वरवंट्याचा शोध मानवाने लावला. त्यामुळे मानवाच्या पाकक्रियेत विशेष सुधारणा घडून आली. यज्ञविधीत पुरोडाश तयार करण्याच्या हेतूने तांदुळाचे पीठ करण्यासाठी पाटा-वरवंटा वापरतात. यज्ञविधीत वाटणे आणि कांडणे या दोन क्रिया आहेत; पण दळणे ही क्रिया नाही. त्याअर्थी वेदकाळात जाते विशेष प्रचारात नसावे, असे वाटते.

सनपूर्व दोन हजार वर्षांपूर्वीपासून जाते प्रचारात असावे, असे मानण्यास आधार आहे. सिंधुसंस्कृतीशी समकालीन आणि समान असलेल्या लोथलमधील उत्खननात जाते (वरची तळी) सापडले आहे. तशाच तऱ्हेची तळी असलेली जाती नेवासे, तडकोड, वडगाव व सिरपूर तेथील उत्खननात मिळाली आहेत. नागार्जुनकोंडा आणि तक्षशिला येथील उत्खननातही जाती सापडली आहेत.

नेवासे येथील उत्खननात तर अनेक जाती मिळाली आहेत; पण ती जाती आपल्याकडे सध्या प्रचारात असलेल्या जात्यांपेक्षा खूपच निराळी आहेत. भारतेतर प्रदेशांत सापडलेल्या प्राचीन जात्यांशी या जात्यांचे साम्य दिसते. नेवासे येथे सापडलेल्या काही जात्यांची वरची तळी खूप उंच व जड आहे. तळीच्या



हंड्यासारखे जाते – नेवासे

वरच्या बाजूला खुंटा बसविण्यासाठी भोक पाडलेले आहे. धान्य घालण्यासाठी वरच्यां तळीला जे तोंड असते, ते पेल्याच्या आकाराचे असून खाली निमुळते आहे. वरच्या तळीच्या बाजू किंचित अंतर्गोल असून, तिचा खालचा भाग खोलगट आहे. यामुळे खालच्या तळीच्या उंच पृष्ठभागावर तो चांगला बसतो. गोंड-भूमिया जमातीत वापरली जाणारी जी मातीची जाती आहेत, त्यांच्याही वरच्या तळया अशाच उंच असतात.



उखळीसारखे जाते – नेवासे



गोंडांचे मातीचे जाते – वरची तळी बरीच उंच

संस्कृतात पाटाला दृषद्, वरवंटयाला उपल आणि पाटा-वरवंटयाला मिळून पेषणी असे म्हणतात. पेषणी हा शब्द पीठ करण्याचे साधन या अर्थाचा असल्यामुळे तो जात्यालाही लावला जातो. परंतु संस्कृतात जात्याला घरट्ट असे नाव विशेष प्रचारात आहे. ‘ घरं घर्घर इति शब्देन अटति भ्राम्यतीति ’ (= घरघर आवाज करीत फिरणारे ते) अशी त्याची व्युत्पत्ती देतात. कोकणात भात भरडण्याच्या मोठया जात्याला घिरट असे जे नाव आहे, ते घरट्टावरूनच आले आहे.

मनुस्मृतीमध्ये (३.६८) गृहस्थाघरच्या पाच हिंसास्थानांत पेषणीचा समावेश आहे. संस्कृत साहित्यात अनेक ठिकाणी अनेक प्रकारांनी जात्याचे उल्लेख आलेले आहेत.

पिठाच्या गिरण्या सुरू होण्यापूर्वी आपल्या कुटुंब-जीवनात जात्याला महत्त्वाचे स्थान होते. आजही अनेक खेडयात पहाटेच्या प्रहरी जात्याची घरघर ऐकू येते आणि त्या घरघरीबरोबरच दळणाऱ्या स्त्रीच्या मुखातून स्रवणाऱ्या अमृतमधुर ओव्याही ऐकायला मिळतात. गाण्याने श्रम हलके होतात, म्हणून जात्यावर दळण दळताना स्त्रिया ओव्या म्हणतात. या ओव्या अनेक अनामिक स्त्रियांनी सहजपणे रचलेल्या असतात. त्यांत स्त्रीहृदयातील अनेक भावभावनांचे कल्लोळ व्यक्त झालेले दिसतात. एखादी जबाबदारी स्वीकारली, की ती पार पाडण्याची क्षमता आपोआप येते, हा भाव व्यक्त करण्यासाठी ‘ जात्यावर बसल्यावर ओवी सुचते,’ अशी म्हण मराठीत प्रचारात आलेली आहे. जात्यावरच्या ओव्यांतून जात्याविषयीची कृतज्ञता अनेक प्रकारे व्यक्त झालेली आहे. जात्याला ईश्वर मानून एक लोककवयित्री गाते –

जात्या तूं ईश्वरा । तुझं जेवण मला ठावं ।
घास घालितें मनोभावं ।।
थोरलं माझं जातं । खुंटा त्याचा चकमकी ।
आम्ही दळूं या मायलेकी ।।
थोरलं माझं जातं । चवंघी बायकांचं ।
घर वडील नायकाचं ।।

गीताच्या छंदात दळण सरत आल्यावर मराठी स्त्री आपल्या भक्तिसंपन्न भावनेच्या स्पर्शाने ओलावलेली एखादी ओवी म्हणून असा उपसंहार करते –

सरलं दळण । गीताच्या छंदामंदी ।
इठुदेव माझं न्हालं । अबीर गंधामंदी ।।

नामदेवाच्या घरी दळण-कांडण करता करता विठ्ठलाचे नामस्मरण करणाऱ्या संत जनाबाईच्या अभंगांत दळणाचे आणि जात्याचे उल्लेख वारंवार आलेले आहेत.

प्राचीन मराठी वाङ्मयात संतांनी जात्यावर व दळणाच्या क्रियेवर रचलेली अनेक परमार्थगर्भ रूपके आढळतात. इ. स. च्या सतराव्या शतकातील प्रसिद्ध संत केशवस्वामी भागानगरकर यांचे हे पारमार्थिक दळण पाहण्याजोगे आहे –

येईं वो कान्हाई हात लावीं बाई ।
दळण दळितां पाहीं सीणलीये ।।
तूं माझी माऊली विश्रांतीची छाया ।
होईं दळावया साहे मज ।।
कृपायोगें हात लावी कृष्णमाय ।
तेणें द्वैत पाहे दळीयलें ।।
ज्ञाता-ज्ञान तळी विज्ञान खुंटा बळी ।
अधिष्ठान मुळीं कृष्ण माझा ।।
संसाराचें बीज दळियलें सहज ।
साहे झाली मज कृष्णमाय ।।
कृष्णासंगें आम्हीं सर्व दळीयलें ।
अखंड उरलें कृष्णरूप ।।
गुरुकृपें केशवीं दळण पूर्ण झालें ।
पूर्णीं पूर्ण उरलें कृष्णनाम ।।

भारतातील अनेक प्रादेशिक भाषांत जात्याविषयीची आणि जात्यांवर म्हणायची गीते आढळतात. चार मुलींनी हात धरून जात्याप्रमाणे गोल फिरण्याचा एक खेळ महाराष्ट्रात प्रचलित आहे. [फ्रॉ. हि. प्री. ने.; लो. सा. ले.; श. क.]

जादम

एक क्षत्रिय जात. या लोकांची वस्ती प्रामुख्याने नर्मदेच्या खोऱ्यात असून, हे स्वतःला यदुवंशी समजतात. छप्पन कोटी यादवांपैकी एकच स्त्री शिल्लक उरली, तिचा मुलगा पुढे मथुरेचा राजा झाला, त्याच्याच वंशात आम्ही जन्मलो, असे हे सांगतात. यांच्यांत कछोटिया व अघोदिया असे दोन वर्ग आहेत. कछोटिया म्हणजे स्वैर संबंधापासून उत्पन्न झालेले लोक होत. अघोदिया त्यांच्याशी विवाहसंबंध करीत नाहीत. यांची बहुतेक कुलनामे स्थानिक आहेत.

विवाहप्रथा – वधूने वराच्या हातात अंगठी घालून त्याच्या गळ्यात माळ घातली, की लग्न लागते. एखाद्या कुमारीला स्वजातीयापासून गर्भ राहिला, तर तिचा विवाह त्याच माणसाबरोबर गुंड नामक विधीने करतात. यांच्यांत बहुपतित्वाची प्रथा रूढ आहे.

स्त्रिया सवंग नामक पोषाख करतात. सवंग म्हणजे एक लहान परकर व कमरेवरून खांद्यापर्यंत गुंडाळून घ्यायचे उत्तरीय होय. मालगुजारी, कास्तकारी आणि शेतकाम हे जादमांचे उद्योग आहेत. रानडुकराचे मांस व मासे हे यांचे अन्न होय. जुझोतिया आणि सनाढ्य या ब्राह्मणांच्या हातची कच्ची रसोई हे खातात. [म. ज्ञा. को.]

जादुआ

एक जमात. सांप्रत ही जमात मध्य प्रदेशात आढळते. हे लोक मूळचे बिहार प्रदेशातील असावे. प. भारतातील भद्री किंवा ज्योतिषी या जातीपासून ही जमात बनली असावी, असे म्हणतात. हीण धातूपासून सोने बनवतो किंवा गुप्त धनाचा ठावठिकाणा सांगतो, असे म्हणून हे भोळ्याभाबड्या लोकांना फसवतात. हे नेहमी चारपाच जणांची टोळी करून हिंडतात. त्यांत एक जण साधू होतो, दुसरा त्याचा चेला होतो, तिसरा भक्त होतो व सगळे मिळून एखाद्या माणसाला लुबाडतात, असे कित्येक लोक सांगतात. [ट्रा. का. सें. प्रॉ. इं.]

जादूगिरी

ज्ञानेंद्रियांच्या कार्यात भ्रांती उत्पन्न करून मनोरंजन करणारी एक कला. जादूगिरी म्हणजे भ्रांती उत्पन्न करणे अथवा जे मिथ्या आहे, ते सत्य वाटायला लावणे होय. जादू शब्दाची व्युत्पत्ती वैदिक साहित्यातील यातू या शब्दापासून असली, तरी जादूगिरी ही यातुविद्येहून वेगळी आहे. यातुविद्या म्हणजे अभिचारविद्या होय. यातुविद्येला मानवी संस्कृतीच्या आदिम अवस्थेत सार्वत्रिक महत्त्व होते; तर जादूगिरी ही सामूहिक मनोरंजन आणि शत्रुपक्षाची फसवणूक एवढ्याच क्षेत्रापुरती मर्यादित होती.

जादूगिरी करणाऱ्या जादुगारांसाठी वैदिक साहित्यात यातुधान, यातुविद्, इ. शब्द वापरले आहेत. अभिचार करणाऱ्यासाठीही याच शब्दांचा वापर होत असे. वैदिक साहित्यात जादूगिरीला माया अशी संज्ञा आहे. माया म्हणजे भ्रांती, जे नाही ते आहे, असे भासणे. ऋग्वेदात मायावान् दस्यू, मायिन् शत्रू, मृगरूपी मायावी वृत्र, मायावी शुष्ण अशा प्रकारची विशेषणे आर्यशत्रूंसाठी वापरलेली आहेत. त्यावरून असे दिसते, की आर्यपूर्व भारतीय संस्कृतीत जादू अथवा माया विशेष प्रचारात होती आणि अनार्य लोक तिचा उपयोग शत्रूंना फसवण्यासाठी करीत असत. पुढे अनार्यांच्या संपर्काने आर्यांनीही मायेचा अवलंब केला असावा. दस्यूंवर विजय मिळवणाऱ्या इंद्राला ऋग्वेदात अनेकवार मायावी असे विशेषण लावले आहे. इंद्राने मायेची रचना करूनच मायावी शुष्णाचा पराभव केला. इंद्राच्या मायावी स्वरूपाबद्दल ऋग्वेदात पुढील ऋचा आहे –

रूपंरूपं मघवा बोभवीति मायाः कृण्वानस्तन्वं परि स्वाम् ।
त्रिर्यद् दिवः परि मुहूर्तमागात् स्वैर्मन्त्रैरनृतुपा ऋतावा ॥
(ऋ. ३.५३.८)

अर्थ – हा उदार देव स्वतःच्या ईश्वरी मायेच्या योगाने

अनेक निरनिराळी रूपे धारण करतो. योग्य समय नसताना सुद्धा आपल्यांच इच्छेने सोमाचे प्राशन करणारा हा सद्धर्मप्रिय देव रोज द्युलोकाहून तीन वेळा एका क्षणात येऊ शकतो.

इतिहास-पुराणांत राक्षसांना मायावी म्हटले आहे. मायेच्या प्रभावाने राक्षस नाना रूपे धारण करीत आणि देवांना फसविण्याचा प्रयत्न करीत, असे अनेक कथांवरून दिसते. आपली कुरूपता लपवून सौंदर्याभासाने राम-लक्ष्मणांना फसवू पाहणारी शूर्पणखा अथवा मायिक सुवर्णमृगाच्या रूपाने सीतेला भुरळ घालणारा मारीच यांच्या मायेची वर्णने रामायणात आलेली आहेत. राक्षस आणि माया यांच्या या अतूट संबंधामुळेच सायणाचार्यांनी 'यातवो राक्षसाः।' या ऋग्वेदभाष्यातील विधानात राक्षस आणि जादू (यातू) हे पर्यायी शब्द मानले. अमरकोशातही यातू आणि यातुधान (जादू आणि जादूगार) यांचा पर्याय राक्षस म्हणून दिलेला आहे. वत्सलाहरणाच्या कथेतील घटोत्काचाचा मायाबाजार हा जादूचाच व्यापक प्रकार आहे.

जातकग्रंथात मायाकार अथवा जादूगार यांच्या खेळाचे वर्णन आढळते. संपूर्ण तलवार गिळून टाकणाऱ्या एका जादूगाराचा उल्लेख जातकात (३·२३८) आलेला आहे. मुळीच न हसणाऱ्या महापनादकुमार नामक राजकुमाराला हसवण्यासाठी मंडुकण्ण आणि पंडुकण्ण या दोन जादूगारांनी दाखविलेल्या अनेक चमत्कारांचे वर्णन जातकात विस्तृतपणे आलेले आहे (४·३२४-३२५). पंडुकण्णाने एका पळभरात राजवाड्यासमोर एक आंब्याचे झाड निर्माण केले. नंतर एका दोराच्या आधाराने तो भराभर त्या झाडावर चढून गेला. त्यानंतर त्याने त्या झाडाचे तुकडे केले आणि त्याच्या सहकाऱ्यांनी त्या तुकड्यांवर पाणी शिंपडून नाचायला प्रारंभ करताच तुकडे नाहीसे होऊन पुन्हा ते झाड जसेच्या तसे उभे राहिले.

कौटिल्याने आपल्या अर्थशास्त्रात जादूला जंभकविद्या म्हटले आहे. या विद्येचा उपयोग करून शत्रूला कसे फसवावे, याविषयी कौटिल्याने पुष्कळ चर्चा केली आहे. शत्रूला भीतिग्रस्त बनवून त्याचे धैर्य खचविण्यासाठी आपण सर्वज्ञ असून, देवता आपल्या स्वाधीन आहेत, असे भासवण्याचा प्रयत्न करावा, असे तो सुचवितो. पाण्यावर तरंगणाऱ्या समुद्रफेसावर तेले ओतून अग्निज्वाळांचा आभास निर्माण करणे, पाण्यात राहणाऱ्या प्राण्यांची चरबी आणि गर्भाशय यांनी तोंड झाकून घेऊन आणि मगर, खेकडे, इ. प्राण्यांचे रक्त उकडून त्यापासून बनलेले शतपाक तेल अंगाला लावून रात्रीच्या वेळी नदीच्या किंवा समुद्राच्या पाण्यात अनेक प्रकारचे चमत्कार दाखवणे, इ. जादूचे प्रकार कौटिल्याने वर्णिले आहेत. तोंडातून सतत धूर सोडण्याच्या चमत्काराचाही त्याने उल्लेख केला आहे. असे चमत्कार करणारे जादूगार हेर शत्रूपक्षाला नाना प्रकारे रंजीस आणण्यासाठी वापरावे, अशी कौटिल्याची सूचना आहे.

जादूगिरीला इंद्रजाल अशीही संज्ञा आहे. मुद्राराक्षस नाटकात ऐंद्रजालिकाच्या म्हणजे जादूगाराच्या रूपाने वावरणाऱ्या हेराचे चित्रण आलेले आहे.

आज भारतात आणि भारताबाहेरील सर्व देशांत आधुनिक वैज्ञानिक शोधांचा उपयोग करून सर्वसाधारण लोकांना चकित करणारे अनेक जादूगार आहेत. [प्रा. भा. म.]

जादू-पटुआ

एक जमात. या जमातीची वस्ती बंगालमधील वीरभूम, मानभूम, इ. जिल्ह्यांत आहे. पितळेच्या बांगड्या, झांजा, टाळ, वजने, इ. वस्तू बनविणे, हा यांचा प्रमुख व्यवसाय आहे. जुन्या पद्धतीने धातुकाम करणाऱ्या या लोकांना घेप्पो असेही म्हणतात. यांच्यांतील काही लोक भटकेही आहेत. ते नुकत्याच मरण पावलेल्या लोकांची चित्रे काढून त्यांच्या नातेवाईकांना दाखवितात व त्यांच्याकडून भरपूर पैसे व इतर वस्तूही उकळतात. [से. इं. १९५१]

जादूविद्या

सांस्कृतिक दृष्ट्या प्राथमिक अवस्थेतला अथवा प्रगत असूनही अडचणीत किंवा संकटात सापडलेला मानव आपल्या ऐहिक आकांक्षा पूर्ण करून घेण्याच्या उद्देशाने निसर्गशक्तींना वश करण्यासाठी, चुकीच्या कार्यकारणभावावर श्रद्धा ठेवून, जे गूढ किंवा रहस्यात्मक विधिविधान आचरतो, त्याला यातू अथवा जादू अशी संज्ञा आहे.

जादू हा शब्द यातु या संस्कृत शब्दापासून बनलेला आहे. यातुविद्या आणि ती जाणणारे मांत्रिक यांचे शेकडो उल्लेख वेदवाङ्मयात आणि वेदसमकालीन अवेस्ता ग्रंथात आढळतात. जादू हे आदिम मानवाच्या सांस्कृतिक जीवनाचे प्रधान अंग होते. सर्व प्रगत मानवसमूहांच्या प्रारंभिक काळात जादूचे प्राबल्य दिसून आले आहे. आजही सुसंस्कृत समाजांच्या विशिष्ट स्तरांतून जादूचा वापर चालू आहे आणि सुविकसित अशा संस्कृतींच्या अंगोपांगांत जादूचे कितीतरी अवशेष वेगवेगळी रूपे घेऊन वावरत आहेत. सध्या जगाच्या पाठीवर नांदणाऱ्या सर्व आदिवासी जमातींतील धार्मिक जीवन जादूने व्यापलेले आहे. एवढेच नव्हे; तर अशा कित्येक जमाती आहेत, की ज्यांना धर्म नावाची वस्तूच माहीत नाही. त्यांना फक्त माहीत असतो, तो जादूटोणा.

गेल्या शतकाच्या उत्तरार्धापासून पाश्चिमात्य मानवशास्त्र-

ज्ञांनी जादूविद्येचें सखोल अध्ययन सुरू केले आणि अनेक आदिवासी जमातींतील जादूच्या नानाविध प्रयोगांचे निरीक्षण व वर्गीकरण करून काही जादूविषयक सिद्धान्त बांधले. मानव शास्त्रज्ञांनी केलेल्या या जादूविषयक संशोधनामुळे धर्माच्या उत्क्रान्तीवर आणि विज्ञानाच्या उगमावर विशेष प्रकाश टाकणे शक्य झाले आहे. सर जेम्स जॉर्ज फ्रेझर या मानवशास्त्रज्ञाने जगातील सर्व प्रातिनिधिक मानवसमूहांच्या चालीरीतींचे, श्रद्धांचे आणि विधिविधानांचे संकलन व परीक्षण करून जादूविषयक सहजगम्य सिद्धान्त बनवले आहेत. फ्रेझरच्या मते यातुविद्या अथवा जादू–विद्या ज्या दोन सिद्धान्तांवर अधिष्ठित आहे, ते सिद्धान्त असे – *(१) सारख्यातून सारखे निघते अथवा कार्य हे कारणासारखेच असते. (२) एकदा परस्परसंपर्क घडलेल्या वस्तू परस्परांपासून दूर झाल्या, तरी त्या परस्परांवर परिणाम घडवीत राहतात.*



लोहाराच्या भट्टीचे संरक्षण करणारे जादूचे कुवेडे

पहिल्या सिद्धान्ताला साम्यसिद्धान्त (The law of similarity) आणि दुसऱ्या सिद्धान्ताला संपर्कसिद्धान्त (The law of contact or contagion) अशी नावे फ्रेझरने दिली आहेत. पहिल्या सिद्धान्तानुसार जादूगार असे धरून चालतो, की ज्या फलाची प्राप्ती करून घ्यायची, त्याचे केवळ अनुकरण केले म्हणजे पुरे. दुसऱ्या सिद्धान्तानुसार तो असे मानतो, की एखाद्या व्यक्तीच्या संपर्कात आलेली एखादी वस्तु वियुक्त स्थितीतही त्या व्यक्तीशी संबंधित राहत असल्यामुळे, त्या वस्तूवर केलेले प्रयोग दुसऱ्या व्यक्तीवर परिणाम घडवू शकतात. पहिल्या म्हणजे साम्यसिद्धान्तानुसार केल्या जाणाऱ्या यातुक्रियांना साहानुभूतिक किंवा अनुकरणात्मक यातू म्हणतात आणि दुसऱ्या म्हणजे संपर्कसिद्धानुसार केल्या जाणाऱ्या यातुक्रियांना संपर्कात्मक किंवा संसर्गजन्य यातू म्हणतात. जादूगाराच्या दृष्टीनें जादूचे हे प्राणभूत सिद्धान्त केवळ मानवाच्या जीवनापुरते मर्यादित नसून, ते विश्वव्यापी आहेत.

अनुकरणात्मक जादू — पाऊस पडण्यासाठी शंकराच्या पिंडीवर अभिषेक करण्याची जी प्रथा भारतात सर्वत्र आहे, तीत अनुकरणात्मक जादूचेच तत्त्व आहे. पावसाळ्यात केले जाणारे पुष्कळसे नाच शेतात तरारणाऱ्या पिकांचे अनुकरण करणारेच असतात. ‘वारा पाऊस चाले। शेतीं जोंधळा हाले।’ हे मुलाला उभे करून व त्याला दोन्ही बाजूंना आळीपाळीने झुकवून म्हणायचे मराठीतले गाणे म्हणजे अनुकरणात्मक जादूचा परिवर्तित अवशेष आहे, असे श्री. दुर्गा भागवत यांचे मत आहे. पावसाळ्यात बेडूक एकमेकांशी मीलन पावतात, म्हणून दिब्रूगढच्या बाजूला पाऊस पडण्यासाठी बेडकांची लग्ने लावतात. पुष्कळ वेळा अशा प्रसंगी बीभत्स प्रकार करतात, लैंगिक चेष्टा दाखवतात व अश्लील गीतेही म्हणतात. पाऊस हे इंद्राचे वीर्य आहे, अशी समजूत असल्यामुळे प्रत्यक्ष किंवा प्रतीकात्मक वीर्योत्सर्जन अशा वेळी आवश्यक ठरते. जिथे जिथे बीजवृद्धीची अपेक्षा असते, तिथे तिथे लोकाचारांत व लोकांच्या वाणीत अश्लीलता येतेच येते. आपल्या पुंसवन संस्कारात पुत्र-



उंबरठ्याला जादूचा खिळा ठोकणारा अगारिया

च्या हेतूने हातावर दोन उडीद आणि त्यांच्यामध्ये एक ठेवून त्यावर थोडे दही ओततात आणि ते सर्व गर्भिणीला लावतात. ती आकृती पुरुषाच्या लिंग-वृषणाची प्रतीक असते. अनुकरणात्मक जादूचे हे उत्तम उदाहरण आहे. शत्रूचे प्रतीक म्हणून एक बाहुली बनवणे व शत्रूचा छळ व्हावा म्हणून त्या बाहुलीवर छळाचे प्रयोग करणे, यातही अनुकरणात्मक जादूच आहे. शत्रूचे केस, नखे, कपडे, इ. वस्तू मिळवून त्यांवर प्रयोग करणे, हा संसर्गजन्य जादूचा प्रकार होय.

सात्त्विक आणि तामस उद्दिष्टांनुसार जादूचे आणखी एका प्रकारे वर्गीकरण करण्यात येते. सात्त्विक अथवा विधायक जादूला श्वेत जादू म्हणतात. आणि तामस अथवा विध्वंसक जादूला कृष्ण जादू म्हणतात. कृष्ण जादूला आपल्याकडे अभिचार अशी संज्ञा आहे.

जादूची उद्दिष्टे, साधने आणि अंगोपांगे– रोगनिवारण, हरण, स्त्रीवशीकरण, अपत्यलाभ, पिकांची वृद्धी, अधिकारप्राप्ती, युद्धविजय, शत्रुनाश, द्रव्यलाभ, इ. उद्दिष्टे सफल करण्यासाठी जादूचा उपयोग केला जातो. जे जे आपणास इष्ट व सुखद वाटते, ते ते शत्रूला लाभू नये, असाही त्यात प्रयत्न असतो. पिकांची वृद्धी आणि अपत्यप्राप्ती होण्यासाठी जी जादू केली जाते, तिला उत्पादक जादू असे म्हणतात. आपल्या स्वतःच्या किंवा आपल्या पक्षातील व्यक्तींच्या किंवा वस्तूंच्या संरक्षणासाठी जी जादू करतात, तिला संरक्षक जादू असे नाव आहे. शत्रूच्या अनिष्टकर प्रयोगांचा निरोध करण्यासाठी करायच्या जादूला प्रतिकारात्मक जादू आणि शत्रूनाशासाठी करायच्या जादूला विध्वंसक अथवा आक्रमक जादू अशा संज्ञा आहेत.



टाचण्या टोचलेली मेणाची बाहुली

उडीद, सातू, लिंबे (एकधारी व तिधारी), सुया-टाचण्या, खिळे, बिब्बे, शिजलेला भात व गुलाल, कणकेचे दिवे, खडे मीठ, मिरच्या, नारळ, काळे कापड, माणसाची कवटी व पायांची हाडे, कापड्या, लाकडाच्या किंवा मेणाच्या बाहुल्या, शत्रूची नखे, केस किंवा त्याच्या वापरातील कोणतीही वस्तू, इ. अनेकविध साधने जादूच्या प्रयोगासाठी वापरली जातात. निरनिराळ्या देशांत आणि निरनिराळ्या जमातींत या वस्तू वेगवेगळ्या असल्या, तरी त्यांच्या उपयोगामागील भूमिका आणि प्रयोगांची पद्धती यांत मात्र सर्वत्र समानता आढळते.

मुलाला दृष्ट झाली असल्यास त्याच्यावरून मीठ-मोहऱ्या उतरून चुलीत टाकतात. कधी कधी जुनी पादत्राणे अथवा केरसुणीही उतरतात. वरवंटयाला काळा दोरा बांधून तो वरवंटा मुलावरून उतरतात आणि विस्तवात ठेवतात. दृष्ट झाली असल्यास दोरा जळत नाही, अशी समजूत आहे. एखाद्याला भूतबाधा झाली असल्यास त्याच्यावरून नारळ, भात, लिंबे, इ. वस्तूंचा उतारा टाकतात. कधी कधी भुताची उग्र प्रकृती ध्यानी घेऊन कोंबडे किंवा बकरे मारून त्याच्या मांसाचा उतारा टाकतात. हे उतारे बहुधा चवाठ्यावर नेऊन ठेवतात.



टाचण्या टोचलेले लिंबू

एकधारी अथवा तिधारी लिंबाला सर्व बाजूंनी टाचण्या खोचून ते लिंबू मंत्रून शत्रूच्या दिशेने पाठविण्याच्या प्रयोगाला मूठ मारणे, असे म्हणतात. ते मंतरलेले लिंबू अत्यंत वेगाने परंतु अदृश्यपणे जाऊन शत्रूच्या छातीवर धडकते आणि मग रक्ताच्या उलटया होऊन शत्रू मरतो, अशी समजूत आहे. दुसऱ्या घरच्या वस्तू अथवा दुसऱ्याच्या गायी–म्हशींचे दूध उडविणे या प्रकारच्या जादूला चेटूक म्हणतात आणि जादूगारिणीला चेटकीण अथवा कुसळण (कुशलिनी) म्हणतात.

केरळात ओडियन या नावाने ओळखले जाणारे जादूगार भुताला वश करून घेण्यासाठी नाना प्रकारचे गूढ प्रयोग करतात. कारण भूत वश झाले, की हव्या त्या भल्याबुऱ्या गोष्टी त्याच्याकरवी साधता येतात, अशी समजूत आहे. भुताची शेंडी हाती पडली, तर भूत आज्ञांकित होऊन वाटेल ते काम करते, असे आजही खेड्यातील लोक मानतात. केरळमधील ओडियन सात महिन्यांच्या गरोदर स्त्रीचे पोट फाडून त्यातून गर्भ बाहेर काढतात आणि त्या गर्भापासून पिल्लतैलम् (अर्भकाचे तेल) या नावाचे एक द्रव्य बनवितात. या द्रव्यामुळे जादूगार बैलाचे वा हत्तीचे रूप घेऊन आपल्या शत्रूचा संहार

करू शकतो, असे म्हणतात. या घटनांवर श्रद्धा असल्यामुळे केरळमधील गरोदर स्त्रियांना जादूगाराचे अत्यंत भय वाटते.

भुतांचे वेष परिधान करून वाद्यांच्या घोषात आरडाओरडा करीत नृत्य करणे, हाही भुते जागविण्याचा एक मार्ग समजतात. अशा नृत्याने भुते प्रकट झाल्यावर नर्तक त्यांना पशुबळी देतात अथवा स्वतःच्या शरीरातील रक्त-मांस काढून देतात.



भयानक वेषभूषा करून नाचणारा जादूगार– केरळ

जादूगारांच्या प्रयोगांची ही गूढता व भीषणता ध्यानी घेता त्यांच्याविषयी अशिक्षित समाजात नांदत असलेल्या भीतियुक्त आदराचे रहस्य उलगडते. अशा जादूगारांना भगत, देवऋषी, मांत्रिक, इ. नावे आहेत. मांत्रिकाला अनाकलनीय आणि असाध्य असे काही वाटतच नाही. खेड्यात अनेकदा पुरोहित, मांत्रिक, वैद्य व ज्योतिषी या सर्व भूमिका एकच व्यक्ती करीत असते.

जादूगाराच्या अथवा मांत्रिकाच्या प्रयोगांना सामर्थ्य प्राप्त होते, ते मंत्रांमुळे. सर्व शक्तीचा संचय मंत्रांत आहे, अशी समजूत आहे. 'मन्त्राधीनं जगत्सर्वम्' असे वचनच आहे. वर, शाप, शपथ हे सर्व मंत्रांचेच प्रकार आहेत. वरांच्या आणि शापांच्या अनेक अद्भुत कथा पुराणांतून आढळतात. विशिष्ट हावभावांसह मंत्रांचे अचूक उच्चारण केल्यास अपेक्षित परिणाम घडणारच, असा जादूगाराचा आणि त्यावर श्रद्धा ठेवणाऱ्या लोकांचा पक्का विश्वास असतो. महाराष्ट्रात गुरुचरित्र व नवनाथ भक्तिसार हे ग्रंथ मंत्ररूप आहेत, अशा श्रद्धेने विवक्षित विधिविधानासह वाचले जातात. गुरुचरित्राच्या पारायणाने सर्व कामना पुऱ्या होऊ शकतात आणि नवनाथ भक्तिसाराच्या वाचनाने भूतबाधा दूर होते, अशी श्रद्धा आहे.

मंत्रांबरोबरच यंत्रांचे म्हणजे विशिष्ट गूढ आकृतींचेही महत्त्व जादूत असते. या आकृती तांदूळ, उडीद, सातू या धान्यांनी अथवा पीठ, हळद यांनी काढतात. एखाद्या व्यक्तीच्या किंवा वस्तूच्या भोवती तिला बंदिस्त करण्यासाठी अथवा तिच्या संरक्षणासाठी जादूचे वर्तुळ काढण्याची प्रथा सर्वत्र आढळते. भुतांना आवाहन करतेवेळी मांत्रिक स्वतःभोवतीही असे संरक्षक वर्तुळ काढतो. हे वर्तुळ जमिनीवर बोटाने अथवा काठीने रेषा ओढून काढतात किंवा विस्तव, पाणी, काटे यांच्या सहाय्याने काढतात. बांगड्या व अंगठ्या हे अलंकार म्हणजे मुळात जादूची वर्तुळेच होत, असेही काही अभ्यासकांचे मत आहे. प्राचीन काळचे वैद्य आसन्नप्रसव स्त्रीच्या भोवती काळ्या खड्यांचे संरक्षक वर्तुळ काढीत असत. वर्तुळाप्रमाणेच सूत्राचेही सामर्थ्य आहे. मंतरलेल्या दोरीने अनेक चमत्कार होतात, अशा कथा कथासरित्सागरात आहेत. यज्ञोपवीते, पोवती, गंडे-दोरे हे जादूच्या सूत्राचेच विविध आविष्कार मानले जातात. जानव्याची ब्रह्मगाठ दाखविली, की भुते भिऊन पळतात, अशी समजूत अजूनही आहे.



स्वसंरक्षणासाठी स्वतःभोवती वर्तुळ काढणारा जादूगार

जादूविद्या आणि यज्ञसंस्था – वैदिक आर्यांची यज्ञसंस्था जादूविद्येच्या विशिष्ट प्रयोगांतून विकसित झालेली आहे, असे काही पंडितांचे मत आहे. प्रा. दि. के. बेडेकरांच्या मते यज्ञसंस्थेचा उगम आदिम मानवांच्या प्रजोत्पादनविधीमधून झालेला आहे. या विधीमध्ये एक मिथुन समारंभपूर्वक बळी दिले जात असे. बळी जाण्यापूर्वी, त्या विधीचा एक आवश्यक भाग म्हणून, त्या मिथुनाला मैथुन करावे लागे. मिथुनाचा बळी दिल्यानंतर

तिथे जमलेले सर्व लोक लैंगिक भावनांनी युक्त असे हावभाव करीत आणि अश्लीलशब्द उच्चारीत आणि आणखी एका मिथुनाला मिरवीत नेत. हे दुसरे मिथुन पुढील निर्मितिविधीच्या वेदी बळी दिले जात असे. हा विधी ज्या जमातीतर्फे केला जात असे, त्या जमातीतील सर्व लोक त्यात भाग घेत असत.

या विधीचे पुरुषमेध नामक यज्ञाशी अत्यंत साम्य दिसते. एका मिथुनाचा मैथुनपूर्वक बळी देणे, लैंगिक क्रियांविषयीची भाषा वापरणे, समाजाच्या सर्व स्तरांतील लोकांनी विधीमध्ये काही ना काहीतरी भाग घेणे, विधीची सर्व अंगोपांगे आणि मंत्रोच्चारण अचूक होण्यासाठी दक्षता पाळणे, इ. अनेक बाबी उभय विधींमध्ये समान दिसतात. निर्मितिविधी आणि पुरुषमेधासारख्या प्रांचीनतम यज्ञप्रकार यांतील हे आश्चर्यकारक साम्य विस्ताराने दाखवून प्रा. बेडेकरांनी असे अनुमान केले आहे, की यज्ञसंस्था ही या निर्मितिविधीतूनच परिणत झालेली असावी. यज्ञसंस्थेचे उगमस्थान असलेला हा निर्मितिविधी आदिम मानवाचा आद्य विधी असून, त्यातूनच सर्व जादूविद्या उदय पावली, असेही त्यांनी म्हटले आहे. (ॲनल्स ऑफ भां. ओ. रि. इन्स्टिट्यूट, व्हॉ.·३१, १९५०) अथर्ववेदात यज्ञसंस्था आणि यातुविद्या एकत्र नांदताहेत, ही वस्तुस्थिती प्रा. बेडेकरांच्या अनुमानाला पुष्टी देणारी आहे.

ऋग्वेदातील जादूविद्या – ऋग्वेदात यातू हा शब्द अभिचार (काळी जादू) या अर्थाने आणि माया हा शब्द सात्त्विक किंवा विधायक (पांढरी जादू) या अर्थाने येतो. यातू ज्याच्या ठिकाणी वसत आहे किंवा यातूवर ज्याचे प्रभुत्व आहे, त्याला यातुधान असे म्हटले आहे. यातू आणि यातुधान या शब्दांचा ऋग्वेदातील वापर पाहता यातू ही शक्ती संहार करणारी आणि राक्षसी स्वरूपाची आहे, अशी समजूत दिसते. देवांच्या संदर्भात बोलताना त्यांच्या शक्तीला यातू असा शब्द न लावता माया असा शब्द लावलेला दिसतो. वैदिक ऋषींनी ऋत हे तत्त्व यातूच्या विरुद्ध मानलेले आहे. ऋत हे विश्वाला गतिमान करणारे आहे, तर यातू ही विध्वंसक आहे, असे त्यांनी अनेकवार म्हटलेले आहे. याविषयी अत्री ऋषी म्हणतो––

ऋतं चिकित्व ऋतमिच्चिकिद्ध्यृतस्य धारा अनु तृन्धि पूर्वीः।
नाहं यातुं सहसा न द्वयेन ऋतं सपाम्यरुषस्य वृष्णः॥

(ऋ. ५.१२.२)

अर्थ – सत्यधर्माचे सूक्ष्म ज्ञान असणाऱ्या देवा ! त्या सत्यधर्माचे ज्ञान तू आम्हांला करून दे; सनातनधर्माच्या ज्ञानाचे प्रचंड लोट तू (भूलोकी) सोडून दे. मी जे काही वर्तन करीत आहे ते, मी काही जादूटोणा चालवितो आहे, असे नाही, किंवा जबरीने अथवा कपटाने करीत आहे असेही नाही; तर या आरक्त तेजस्क वीराने म्हणजे या अग्नीनेच लावून दिलेला धर्म मी आचरीत आहे.

जो यातुधान अनृताने ऋताला नष्ट करण्याची इच्छा करतो, तो तुझ्या ज्वालेत त्रिवार पडो, अशीही प्रार्थना ऋषींनी अग्नीला केली आहे. अग्नीने आपल्या तेजाने यातुधानांना मारावे, अशी इच्छा ते वारंवार व्यक्त करतात. यातुधानाप्रमाणेच यातुमती असा स्त्रीलिंगी शब्दही ऋग्वेदात आढळतो. त्यावरून पुरुषांप्रमाणेच स्त्रियाही यातूचा उपयोग करीत असत, असे दिसते.

ऋग्वेदातील ऋषी यातुधानांच्या विरोधी आहेत. आपणास कोणी यातुधान म्हटलेले त्यांना मुळीच रुचत नाही. वसिष्ठान एका ऋचेत म्हटले आहे, की 'मी जर यातुधान असेन, तर आणि कोणा पुरुषाचे आयुष्य जर मी दग्ध करीत असेन, तर आजच मी मरेन' (ऋ. ७·१०४·१५). यातुधानाचा निषेध करणारी आणखी एक त्याची ऋचा अशी––

यो मायातुं यातुधानेत्याह यो वा रक्षाः शुचिरस्मीत्याह ।
इन्द्रस्तं हन्तु महता वधेन विश्वस्य जन्तोरधमस्पदीष्ट ।।

(ऋ. ७·१०४·१६)

अर्थ – मी जादुटोणा करणारा नसतानाही उगीच जो कोणी मला यातुधान म्हणेल, किंवा मी पवित्राचरणी असताना मला जो कोणी राक्षस असे म्हणेल, त्याला इंद्र आपल्या अजस्त्र आयुधाने ठार मारील आणि तो दुष्ट सर्व प्राण्यांपेक्षा नीच कोटीला जाऊन पडेल.

वैदिक ऋषींच्या मनात यातुधानांविषयी एवढा संताप आहे, की अग्नीने यातुधानांना त्यांच्या आप्तेष्टांसह ठार मारावे, अशी त्यांची प्रार्थना आहे.

उत्तरकालीन वाङ्मयात यातुधान हा राक्षसवाचक शब्द बनला, त्याची बीजे ऋग्वेदातील ऋचांमध्ये दिसतात. ऋग्वेदात त्यांना पिशिताशन, क्रव्याद, इ. राक्षसांना शोभणारी विशेषणे लावलेली आहेत. मूरदेव असेही त्यांचे विशेषण आढळते. मूर म्हणजे हिंसक, मारणे हा ज्यांना खेळ वाटतो असे. जारण–मारण हा यातुविद्येचा अर्थात अभिचाराचा एक विशेष आहे. यातुधानांचे देव हिंसक असणे स्वाभाविक आहे. आजही अभिचार करणारे लोक उग्र देवतांना अथवा भूत–पिशाचादींना पशुबळी, क्वचित नरबळीही देतात.

ऋग्वेदातील यातुधानविषयक निर्देशांची पाहाणी करता असे स्पष्ट दिसून येते, की अभिचाराचा उपयोग करून वैदिक आर्यांच्या दैनंदिन कर्मांत विघ्ने आणणारी एखादी आर्येतर जमात त्यावेळी इथे नांदत असावी.

हे यातुधान घुबडाच्या, लांडग्याच्या किंवा कुत्र्याच्या रूपाने

अथवा या प्राण्यांच्या आश्रयाने जादू करीत, असेही उल्लेख दिसतात. ते आर्यांच्या गायींचे दूध उडवीत असत. दूध उडविण्यात (नाहीसे करण्यात) प्रवीण असणाऱ्या चेटकिणींच्या अथवा कुसळणींच्या कथा आजही आपणास खेडयापाडयात ऐकायला मिळतात. ऋग्वेदाच्या दहाव्या मंडलातील काही ऋचांमध्ये यातुधानांपासून गाईंच्या दुधाचे रक्षण करण्याची विशेष काळजी घ्यावी असा उल्लेख आहे. यातुधानांना गाईचे दूध प्यायला मिळू नये, त्यांच्या पोटात दुधाचे विष व्हावे, असे उद्‌गार ऋषींनी अनेकवार काढले आहेत (ऋ. १०. ८७. १७-१८).

यातुधानांचे देव जसे हिंसक होते, तसेच ते दृश्य स्वरूपाचे म्हणजे मूर्त स्वरूपाचे होते. मूरदेव या विशेषणातील मूर या शब्दाचा उत्तरकालीन मूर्तिकल्पनेशी संबंध स्पष्ट दिसतो. याउलट ऋषींनी इंद्राला अमूर असे विशेषण लावले आहे. ऋग्वेदात माया हा शब्द दैवी शक्ती अथवा सात्त्विक जादू या अर्थाने आलेला आहे; परंतु माया शब्दाचा इंद्रजाल अथवा जादूगिरी या विषयाशीही जवळचा संबंध आहे (जादूगिरी पाहा).

ऋग्वेदात यातू आणि यातुधान यांच्या निषेधाच्या अनेक ऋचा आहेत; परंतु यातूने त्यांचा नाश करण्याच्या प्रयत्नाचा मात्र कुठेही उल्लेख दिसत नाही. पुढे ऋग्विधानासारख्या ग्रंथात मात्र अनेक वैदिक ऋचांचा व सूक्तांचा जादूसाठी उपयोग सांगितलेला आहे.

अथर्ववेदातील जादूविद्या – अथर्ववेद हा प्राधान्याने जादुविद्याविषयक आहे. त्यात जादू आणि धर्म यांचे चमत्कारिक मिश्रण आहे. ऋग्वेदात जादूचा निषेध आहे, तर अथर्ववेदात जादू करणाऱ्यांचा नाश करण्यासाठी जादूचाच अवलंब केलेला आहे. ओल्डेनबर्गसारख्या काही विद्वानांचे म्हणणे असे, की संपूर्ण वैदिक कर्मकांड जादूने व्यापलेले आहे. हिंदूंच्या संस्कारविधीत आणि राज्याभिषेकासारख्या घटनेच्या विधीतही जादूचा प्रभाव जाणवतो. ब्राह्मणग्रंथांत तर जादूची चर्चा वैपुल्याने आढळते. सामविधान ब्राह्मण, अद्‌भुत ब्राह्मण आणि षड्‌विंश ब्राह्मणाचा काही भाग हे जादूविषयक ग्रंथ आहेत, असे म्हटले तरी चालेल. ब्लूमफील्डच्या मते वैदिकांच्या पवित्रतम विधींतही जादू आणि चेटूक यांना महत्त्वाचे स्थान आहे.

अथर्ववेदातील बहुतेक मंत्र जादूविषयक असून, पुरोहित हा जवळ जवळ मांत्रिक आहे. या मंत्रांत धर्म, तत्त्वज्ञान व जादू यांचे विचित्र मिश्रण झालेले आहे. अथर्ववेदातील जादू संरक्षक व आक्रमक अशी दुहेरी आहे. संरक्षक जादूने दुष्ट शक्तींचा आणि इतरांनी केलेल्या विध्वंसक जादूच्या प्रयोगांचा निरोध केला जात असे अणि आक्रमक जादूने शत्रूंचा नाश केला जात असे. माणसे आजारी पडली म्हणजे त्यांना भुताखेतांनी पछाडल्याच्या समजुतीने उपचारात्मक जादूही वापरली जात असे.



सोटे धारण करून भुते खेते पळवणारा जादूगार

अथर्ववेदाचे आथर्वण आणि आंगिरस असे जे दोन भाग आहेत, त्यांपैकी आथर्वण हा सात्त्विक आहे; तर आंगिरस हा तामस आहे. त्याचमुळे आंगिरस हा शब्द अभिचाराचा पर्याय बनलेला आहे. अथर्ववेदातील अभिचारमंत्राचे लक्ष्य यातू आणि यातुधान हे आहे. चातन गणामध्ये आभिचारिक ऋचांचा समावेश आहे. कौशिकसूत्रामध्ये या मंत्रांचे विधिविधान दिलेले आहे. अथर्ववेदातील एका मंत्रात भयानक आणि विनाशकारिणी कृत्येचे वर्णन आहे (११. १. १). ही कृत्या (मृद्दार्वादिना निर्मिता पुत्तल्यादि) माती अथवा लाकूड यापासून बनवलेली जादूची बाहुली असे, असे सायणाचार्यांनी तिच्या विषयी म्हटले आहे. शत्रुनाशासाठी कृत्या निर्माण केल्याची अनेक वर्णने पुढे पुराणवाङ्मयातही आढळतात. अंबरीषाला मारण्यासाठी दुर्वासाने आपल्या जटेतून कृत्या निर्माण केल्याचा उल्लेख भागवतात आला आहे, तो असा–

एवं ब्रुवाण उत्कृत्य जटा रोषविदीपितः।
तया स निर्ममे तस्मै कृत्यां कालानलोपमाम्॥

(भाग. पु. ९.४.४६)

अर्थ – असे म्हणून (दुर्वास ऋषीने) संतापाने जटा मोकळ्या सोडल्या आणि त्यांतून त्याला (अंबरीषाला) मारण्यासाठी प्रलयाग्नीसारखी (भयंकर) कृत्या निर्माण केली.

अथर्ववेदात यातुधान, यातुधानी, किमिदिन्, राक्षस, पिशाच, क्रव्याद, अत्रिन्, असुर, दस्यू, मूर, अमीवा, इ. आर्यशत्रूंची नावे आलेली आहेत. या शत्रूंच्या नाशासाठी आणि त्यांनी केलेल्या विध्वंसक जादूप्रयोगांच्या निरोधासाठी अथर्ववेदातील मंत्रांची रचना झालेली दिसते.

अग्नी आणि इंद्र यांनी यातुधानांवर जरब बसवावी, या हेतूने अथर्ववेदात पुढील प्रार्थना केलेली आहे –

त्वमग्ने यातुधानानुपबद्धाँ इहा वह।

अथैषामिन्द्रो वज्रेणापि शीर्षाणि वृश्चतु ॥
(अथर्व. १.७.७)

अर्थ – हे अग्ने, तू यातुधानांना बांधून इथे घेऊन ये आणि इंद्र स्वतःच्या वज्राने त्यांची मस्तके कापून टाको.

इन्द्र जहि पुमांसं यातुधानमुत स्त्रियं
मायया शाशदानाम् ।
विग्रीवासो मूरदेवा ऋदन्तु मा ते
दृशन्सूर्यमुच्चरन्तम् ॥
(अथर्व. ८.४.२४)

अर्थ— हे इंद्रा, जादू करणाऱ्या पुरुषाचा (यातुधानाचा) आणि मायेने व्यवहार करणाऱ्या स्त्रीचा (चेटकिणीचा) तू नाश कर. मूरदेवांचा शिरच्छेद होवो. उदय होऊन वर येणाऱ्या सूर्याला ते पाहू न शकोत.

अथर्ववेदात मंत्रांबरोबरच गूढ शक्तीने युक्त अशा मण्यांचा आणि औषधींचाही उपयोग सांगितलेला आहे. जंगिड, दशवृक्ष, अश्वत्थ, खदिर, इ. वृक्ष-वनस्पतींना अथर्ववेदातील जादूत विशेष स्थान आहे. यांच्यामुळे जादूच्या विनाशक प्रयोगांपासून संरक्षण होते, अशी समजूत होती. जंगिडमणी आणि यवमणी हे दुष्ट, भूतबाधा, दुःस्वप्नाची फले व ब्राह्मणशाप यांपासून संरक्षण करतात, असे मानले जात असे. शत्रूची बाहुली मेणाची बनवून, तिच्या हृदयात शस्त्र खुपसले, की शत्रू ठार होतो, अशी कल्पना होती (अथर्व. ३.२५.२; ६.१३०). शत्रुनाशासाठी केल्या जाणाऱ्या जादूच्या प्रयोगात कच्चे मांस, अनेक धान्यांचे मिश्रण, जळती मशाल, मोठमोठ्याने केले जाणारे आवाज, इ. चे विशेष महत्त्व असे. भूतपिशाचांनी झपाटलेल्या माणसांना ताडन केले म्हणजे त्यांच्यातील भूत निघून जाते, अशी समजूत होती. गवताच्या काडीचे दोन तुकडे करून ते विरुद्ध दिशांना फेकण्यामुळे शत्रूचेही तुकडे होतात, ही समजूत सार्वजनिक होती (कौशिकसूत्र ५६.१०.१४.१९–२२). या समजुतीचा सांकेतिक उपयोग पुराणांत केलेला दिसतो. जरासंधवधप्रसंगात कृष्णाने गवताची काडी मोडून तिचे दोन तुकडे दोन परस्परविरुद्ध दिशांना टाकून भीमाला संकेत केल्याचा उल्लेख पद्म पुराणात आढळतो (उ. खं. २५२.२७८). मंतरलेले पाणी (उदवज्र) शत्रूच्या दिशेने फेकले, की त्याचा नाश होतो, अशी समजूत अथर्ववेदातील मंत्रांत (१०.५) आढळते.

उत्तरकालीन वाङ्मयातही जादूचे जे अनेक उल्लेख आढळतात, ते पाहता जादूतील श्रद्धासंकेतांचा भारतीय जनमनात खोलवर प्रवेश झाल्याचे दिसून येते. कौटिलीय अर्थशास्त्रात शत्रूला फसविण्यासाठी अथवा शत्रूचा नाश करण्यासाठी जादूमंत्रांचा आणि जादूविधींचा उपयोग विस्तारपूर्वक सांगितला आहे. जादूच्या प्रयोगांसाठी प्रसिद्ध असलेल्या वैदिक यातुधानांचे (जादुगाराचे) पुराणांनी राक्षसात रूपांतर केले आहे. राक्षसांच्या स्वरूपवर्णनात त्यांच्या अद्‌भुत मायावी शक्तीची जी वर्णने येतात, ती वैदिक यातुधानांच्या यातुसामर्थ्यातून परिणत झालेली आहेत. अर्भकांना त्रास देणारे एक पिशाच म्हणून यातुधानांचे उल्लेख आलेले आहेत (भाग. पु. २.१०.३९; ६.८२५; १०.६.२७; वायू पु. ४७.१६; ५२.५; ६६.११८). भारतीय लोकवाङ्मयावर तर जादूच्या श्रद्धासंकेतांचा अपार प्रभाव आहे. हे श्रद्धासंकेत लोकवाङ्मयातूनच पुराणवाङ्मयात प्रविष्ट झालेले दिसतात. कांचनमृगवधाच्या प्रसंगी रामाच्या शोधार्थ जाताना लक्ष्मणाने सीतेच्या संरक्षणासाठी कुटीच्या दाराशी रेषा ओढल्याची जी कथा रामकथांच्या संभारात प्रविष्ट झालेली आहे, त्या कथेतील लक्ष्मणरेषा ही जादूचीच रेषा होती, यात संशय नाही.

जादूविद्या आणि धर्म—– मानवजातीच्या प्राथमिक अवस्थेत जादूविद्या आणि धर्म यांचा अत्यंत निकटचा संबंध होता. त्या दोहोंच्या सीमारेषा अस्पष्ट होत्या. धर्म आणि जादू ही दोन्ही संकटातून तारण्याची आणि इष्ट प्राप्तीची साधने होती. आपले जीवन सुसह्य आणि सुखकर व्हावे, म्हणून अतिमानवी शक्तींना अनुकूल बनवणे अथवा त्यांच्यावर प्रभाव गाजवणे आवश्यक होते. यासाठी प्राथमिक मानव ही दोन्ही साधने वापरीत होता. तो पूजा-प्रार्थनादींचा म्हणजे धर्माचा अवलंब करून अतिमानवी शक्तींना संतुष्ट करी अथवा जादूचा अवलंब करून त्यांना वश करून घेई. धर्म आणि जादू या दोहोंचेही स्वरूप विधिविधानात्मक आणि रहस्यमय आहे. संकटात दिलासा देणारी आणि मानसिक ताण कमी करणारी साधने म्हणून प्राथमिक मानव या दोहोंनाही विशेष मानीत असे

परंतु या दोहोंत मूलभूत स्वरूपाचे अनेक भेद आहेत. धर्मकृत्य हे समाजमान्य असते, तर यातुक्रिया, निदान अभिचारक्रिया तरी, समाजाला भयंकर वाटते. धर्मात शरणागतीची भावना आहे, तर जादूत प्रभुत्व प्रस्थापित करण्याची भावना आहे. धर्मात इष्टप्राप्तीसाठी विनम्रपणे केवळ प्रार्थना केली जाते, तर जादूमध्ये इष्टप्राप्ती ही यातुक्रियांची अपरिहार्य परिणती मानली जाते. धर्म ही सामाजिक संस्था आहे, तर जादू ही बहुतांशी वैयक्तिक बाब आहे. अर्थात जादूचेही एक सार्वजनिक अंग असते आणि धर्माचेही अध्यात्मासारखे एक अंग सर्वस्वी वैयक्तिक असते, ते ध्यानी घ्यायला हवे. जादूचे सैद्धान्तिक आणि क्रियात्मक स्वरूप सर्व जगात सर्व काळी एकसारखे आढळते, परंतु धर्माचे स्वरूप मात्र निरनिराळ्या देशांत निरनिराळे दिसते. एवढेच नव्हे; तर एकाच देशातील निर-

निराळ्या विभागांत निरनिराळ्या काळी ते विभिन्न आढळते.

जादूविद्या आणि कृषिकर्म – धान्यनिर्मितीची क्रिया मंत्रतंत्रांच्या सामर्थ्यावर अवलंबून आहे, असा प्राथमिक अवस्थेतील मानवाचा समज होता. आजही वन्य लोकांच्या जीवनामध्ये या समजुतीची दृढता आढळते. मंत्रतंत्रात्मक विधीशिवाय त्यांचे शेतीचे एकही काम होऊ शकत नाही. महाराष्ट्रात मावळ भागातील खेडयांत भाताच्या लावणीपूर्वी सर्व शेतकऱ्यांतर्फे सात या नावाचा विधी केला जातो. या विधीत बकऱ्याचे ताजे मांस आणि रक्त सर्व गावाभोवती टाकीत जाण्याची क्रिया मुख्य असते. उच्चवर्णीयांमधील श्रावण–भाद्रपदांतील बहुतेक सर्व व्रते भूमीच्या सुफलीकरणाशीच निगडित दिसतात.

वैदिक आर्यांची संस्कृती पशुपालनप्रधान होती. शेती अल्प प्रमाणातच सुरू झाली होती, पण त्याही काळात शेतीविषयक मंत्र आणि विधी होतेच. अथर्ववेद आणि तैत्तिरीय संहिता यांमध्ये हे मंत्र ग्रथित आहेत. सूत्रकाळात शेती जसजशी वाढू लागली, तसतसे या मंत्रांना महत्त्व येऊ लागले. विशेष लक्षात ठेवण्याजोगी गोष्ट अशी, की आर्यांच्या देवता प्रामुख्याने पुरुष असूनही शेतीच्या देवता मात्र स्त्रियाच आहेत.

कृषिविषयक जादूतील स्त्रीचे माहात्म्य– जगातील सर्वच देशांत कृषिविषयक मंत्रतंत्रात्मक विधींमध्ये एके काळी स्त्रीला फार महत्त्व होते. वन्य समाज हे प्रायः स्त्रीसत्ताप्रधान असल्यामुळे आजही त्यांच्यांत हे महत्त्व आढळून येते. स्त्री आपल्याला जन्म देते; तिच्या ठिकाणी सुफलीकरणाची अद्भुत शक्ती आहे; तेव्हा भूमीचे सुफलीकरण करण्यासाठी स्त्रीच्या या शक्तीचा उपयोग केला पाहिजे, असे आदिम मानवाचे तर्कशास्त्र होते. ज्या स्त्रीची संततिनिर्माणक्षमता अधिक, ती स्त्री या कामाला अधिक योग्य असे. जुळ्या-तिळ्या मुलांना जन्म देणाऱ्या स्त्रीचे तर या क्षेत्रात विशेष माहात्म्य मानले जाई.

प्राचीन काळातील अनेक देवी–उपासनेचे संप्रदाय अशा कृषिविषयक मंत्रतंत्रात्मक विधीतूनच उत्पन्न झाले आहेत. जगातील बहुतेक सर्व देशांत स्त्रीप्रधान यातुविधींचे माहात्म्य अर्वाचीन काळापर्यंत होते. महाराष्ट्रातील देवीच्या उपासनापद्धतीचे अवलोकन केल्यास स्त्रीचे माहात्म्य ध्यानात येऊ शकेल. आंध्र, कर्नाटक, तमिळ नाड या भागांतील सात बहिणींचे माहात्म्य तेथील लोकांच्या पूजाविधींमध्ये आजही दिसून येते. शेतीचे सुफलीकरण, पाऊस पाडणे, रोगांचे निवारण करणे, इ. कामे या देवतांकडे असतात. या देवतांच्या पुजारिणी आपल्याजवळच्या मंत्रसामर्थ्याने या गोष्टी घडवून आणतात, अशी भाविकांची श्रद्धा असते.

तंत्रोपासनेमध्ये वामाचाराला अतिशय महत्त्व आहे. तांत्रिकांमध्ये दक्षिणाचार आणि वामाचार असे दोन संप्रदाय असले, तरी मूळचा तंत्रमार्ग वामाचारीच होता. वामाचार म्हणजे विकृताचार हा अर्थ उत्तरकालीन आहे. मुळात वामाचार म्हणजे स्त्रीप्रधान आचार (वामा+आचार) असाच त्याचा अर्थ होता. कृषिविषयक यातुक्रिया या वामाचारी होत्या. वामाचार म्हणजे कामाचार असाही अर्थ होऊ शकतो. परंतु हा कामाचार म्हणजे स्वैराचार नव्हे. प्राथमिक अवस्थेमधील मानवाच्या मंत्रतंत्रात्मक विधींमध्ये स्त्री–पुरुष-संयोगालाही धार्मिक महत्त्व होते. तांत्रिकांच्या पंच मकारांतील मैथुनाचा उगम मूळच्या या यातुक्रियेतच आहे. कृषिविषयक यातुक्रियांमध्ये मैथुनाबरोबरच मद्यालाही विशेष स्थान होते.

तांत्रिकांच्या उपासनेमध्ये मासिक रजःस्रावाला पावित्र्य आहे. कृषिविषयक यातुकर्मातही रजःस्रावाला महत्त्व आहे. पिकांचे पोषण करण्यासाठी याचा मंत्रतंत्रात्मक उपयोग करून घेतला जात असे. त्रावणकोरमध्ये त्रिप्पुरवस्तू नावाचा देवीचा रजःस्रावविधी असतो. देवीचे या काळातील वस्त्र प्राप्त करण्यासाठी भक्तांची धडपड चालू असते. चुंगानूर येथील पार्वती आणि आसामातील कामाख्या या देवींच्या रजःस्रावालाही धार्मिक महत्त्व आहे. सिंधुसंस्कृतीच्या उत्खननात, खाली डोके, वर पाय अशा अवस्थेतील स्त्रीच्या जननेंद्रियातून झाड उगवले आहे, असे एक शिल्प सापडले आहे. स्त्री आणि भूमी यांच्या सुफलीकरणप्रक्रियेचे ऐकात्म्यच या शिल्पात सूचित झालेले दिसते.

समाजाच्या विकासक्रमात ज्या सामाजिक संस्था आणि श्रद्धा निरुपयोगी ठरतात, त्यांचे अवशेष धार्मिक आणि सांस्कृतिक आचारविधींच्या रूपाने समाजजीवनात प्रविष्ट होतात. तंत्रसाधनेच्या उदाहरणावरून हे स्पष्ट होते. तंत्रोपासना म्हणजे हजारो वर्षांपूर्वीच्या प्राथमिक अवस्थेतील कृषिकर्माला आवश्यक आणि उपयुक्त मानली जाणारी यातुविद्या असली पाहिजे. प्राथमिक मानवाच्या श्रद्धा आणि समजुती जसजशा बदलत गेल्या आणि त्यांचे निसर्गविषयक ज्ञान जसजसे विकसित होत गेले, तसतशी या मंत्रतंत्रात्मक साधनेंची शेतीच्या सुफलीकरणाला आवश्यकता उरली नाही. मंत्रतंत्रांचे सामाजिक आणि आर्थिक जीवनातील महत्त्व लुप्त होऊन धार्मिक जीवनात त्यांना प्रवेश मिळाला. (कृषिविद्या पाहा)

जादूविद्या आणि विज्ञान– जादूविद्या आणि विज्ञान ही दोन्ही निसर्गातील घटनांच्या कार्यकारणभावावर अधिष्ठित आहेत; परंतु जादूविद्येत हा कार्यकारणभाव काल्पनिक आणि चुकीचा असतो; तर विज्ञानात तो सत्यान्वेषणाच्या बुद्धीने केलेल्या निरीक्षणातून ठरविलेला असतो. जादूक्रिया करणारा मांत्रिक हा आपल्या क्रियांमागचे सिद्धान्त शाश्वत स्वरूपाचे

Y73(P15):1k
155M2J.3

मानतो. ते पारखून घेण्याची त्याला गरजच वाटत नाही. किंबहुना त्याच्या सर्व क्रिया एकदा गृहीत धरलेल्या नियमांनुसार यांत्रिक पद्धतीने तो करीत राहतो. यामुळे जादू हे केवळ एक कसब ठरते; तिला शास्त्राची प्रतिष्ठा लाभू शकत नाही.

विज्ञान हे सत्यसंशोधनशील आणि त्यामुळेच नवनिर्माणशील आहे, तर जादू ही कल्पनाधिष्ठित असल्यामुळे मिथ्या आणि वांझ आहे. विशिष्ट कार्यकारणभावानुसार केले जाणारे प्रयोग विज्ञान आणि जादू या दोन्हीतही चालतात; परंतु त्या प्रयोगांना अपयश आले, तर आपला कार्यकारणभाव तरी चुकीचा आहे किंवा आपली प्रयोगक्रिया तरी चुकीची आहे, असे वैज्ञानिक मानतो आणि चूक शोधण्याच्या मार्गाला लागतो. परंतु अशा अपयशाच्या प्रसंगी मांत्रिक मात्र आपल्याकडे दोष घ्यायला तयार नसतो. त्याची दृष्टी वास्तववादी नसल्यामुळे तो प्रतिस्पर्धी मांत्रिकाच्या विरोधी प्रयोगांमुळे आपला प्रयोग फसला, असे समजतो. निरीक्षण, प्रयोग आणि पडताळा ही विज्ञानाची प्रक्रिया जादूला न मानवल्यामुळे ती विज्ञानाची केवळ फसवी ढोंग बनली.

जादूविद्या आणि रोगनिवारण -- शारीरिक आणि मानसिक रोगांचा उद्‌भव काही अतिमानवी शक्तींच्या वा भुताखेतांच्या अवकृपेमुळे होतो, अशी प्राथमिक अवस्थेतील मानवांची श्रद्धा होती. आजही खेड्यापाड्यातील लोक आणि आदिवासी लोक यांच्यामध्ये अशाच समजुती प्रचलित आहेत. झोपेत अथवा कित्येकदा जागृतीतही माणसाचा आत्मा बाहेर संचार करायला जातो आणि शरीरात त्याची अनुपस्थिती असताना रोगाचा प्रवेश होतो, अशीही समजूत अनेक आदिवासी जमातीत रूढ आहे. मांत्रिक आणि चेटकिणी यांच्या विनाशक जादूप्रयोगातही रोग निर्माण करण्याचे सामर्थ्य असते, असे ते मानतात.

रोगांच्या उद्‌भवासंबंधी अशी धारणा असल्यामुळे रोगनिवारणाचे उपायही त्याच स्वरूपाचे असतात. रोग निर्माण करणाऱ्या अतिमानवी शक्तींना अथवा भुताखेतांना संतुष्ट करणे, बाहेर संचार करायला गेलेल्या आत्म्याला मांत्रिकाकरवी परत आणणे, एखाद्या मांत्रिकाच्या किंवा चेटकिणीच्या प्रयोगामुळे रोग उद्‌भवल्यास दुसऱ्या मांत्रिकाकडून प्रतिप्रयोग करविणे, इ. उपाय आदिवासी आणि अशिक्षित लोक करतात.

रोगकारक शक्ती आणि भुतेखेते यांना पुढे देवतास्वरूप प्राप्त झालेले दिसते. पटकीसारखे साथीचे रोग निर्माण करणारी महामारी, देवी—कांजिण्यासारख्या विकारांची शीतळादेवी, लहान मुलांना छळणाऱ्या पूतना, षष्ठी, इ. देवी रोगनिवारणासाठी पूजिल्या जातात. हरिवंश व भागवत या ग्रंथांत कृष्ण—बाणासुर युद्धाच्या प्रसंगी उल्लेखिलेला ज्वरदेव हा तापविकार निर्माण करणारा देव आहे. दक्षिणेतील प्रदेशात या रोगकारक देवतांना संतुष्ट करण्याचे उपाय अघोरी आहेत.

रोगांच्या वास्तविक कारणांचे अज्ञान असल्यामुळे रोगाचे स्वरूप कितीही भयंकर असले, तरी औषधोपचाराऐवजी दैवी उपाय करण्याचीच प्रवृत्ती आदिवासी व अशिक्षित लोक यांमध्ये आढळते. किंबहुना विकार जेवढा तीव्र तेवढी देवाची वा भुताची बाधा तीव्र, अशी त्यांची समजूत असते. हे दैवी उपाय करणाऱ्या भगतांना व मांत्रिकांना या लोकांत मोठा मान असतो. या बाबतीत ठाणे जिल्ह्यातील वारली लोकांमध्ये एक उपचारपद्धती रूढ आहे, ती अशी –

एखादा माणूस आजारी पडला, तर रोग्यावरून मूठभर तांदूळ ओवाळतात आणि मग ते तांदूळ भगताला नेऊन दाखवतात. भगत रोग्याला न पाहताही त्या तांदुळांवरून रोग हा अंगचा (नैसर्गिक कारणांनी उद्‌भवलेला) आहे की बाहेरचा (देवतेच्या वा भूत–पिशाचाच्या बाधेने उद्‌भवलेला) आहे, याचा निर्णय देतो. तो बाहेरचा आहे, असे ठरले, तर औषध घेणे मुळीच इष्ट नव्हे, असे समजतात. मग देवतेची वा भुताची बाधा दूर करण्यासाठी भगत उतारा टाकण्याचा उपाय योजतो. प्रथम तो केळीच्या पानावर तांदुळाच्या पिठाने व शेंदूर–अबिराने लहान लहान अर्धवर्तुळाकृती काढतो. नंतर तो पिठाच्या गोळ्याची एक बाहुली तयार करून तीत दोन काड्या टोचतो व ती बाहुली त्या आकृतीमध्ये ठेवतो. मग तो त्या बाहुलीला शेंदूर वाहून पिठाच्या दिव्याने ओवाळतो. एवढे झाल्यावर तो तोंडाने अनेक मंत्र पुटपुटत रोग्याभोवती हातवारे करतो आणि उजव्या हाताने चुटक्या वाजवतो. शेवटी 'छत्' असा जोराने आवाज करून आपला विधी संपवतो. नंतर तो उतारा (केळीच्या पानावरील सर्व साहित्य) चव्हाट्यावर नेऊन ठेवला जातो. या उताऱ्यास कोटा उतारा असे म्हणतात. ज्या उताऱ्यासाठी कोंबडे बळी देतात, त्याला बाता उतारा असे म्हणतात.


वारली लोकांच्या जादूतल्या काही आकृती

सर्पदंश अथवा वृश्चिकदंश झाला असता, विष उतरविण्यासाठी मंत्राचाच उपयोग करतात अथवा सर्पदंश झालेल्या माणसाला भैरवाच्या मंदिरात ठेवून मोरपिसाच्या कुंच्याने समंत्रक झाडणी करतात. मांत्रिक विशिष्ट कथा ऐकवूनही विष उतरवू शकतो, अशी समजूत आहे.

रोगदेवतांना रोग्याच्या शरीरातून काढून दुसऱ्या कोणत्या तरी वस्तूंत प्रतिष्ठित करणे व नंतर त्या वस्तू दूर नेऊन सोडणे अथवा त्यांचा नाश करणे, अशीही एक उपचारपद्धती रूढ आहे. ही उपचारपद्धती उताऱ्याच्या पद्धतीशी समानच आहे. गुजरातेतील कित्येक खेडयांत एखाद्या बकऱ्याच्या अथवा रेडयाच्या पाठीवर साथीचा रोग विधिपूर्वक लादून त्या प्राण्याला गावाच्या सीमेबाहेर घालवून देण्याची प्रथा आहे. पटकीच्या साथीत मरिआईचा गाडा गावाबाहेर मिरवत नेण्याची प्रथा महाराष्ट्रातील खेडयांत आजही क्वचित आढळते. दृष्ट उतरविण्याचे नानाविध प्रकार याच श्रेणीत मोडतात. रोगनिवारणार्थ गंडे–दोरे, ताईत, माळा, इ. वस्तू मंत्रून घेऊन गळयात किंवा दंडात बांधतात. जादूचे हे सौम्य प्रकार कमी–अधिक प्रमाणात सुसंस्कृत समाजातही आढळतात.

जादूविद्या आणि वैद्यक – भगतांना व मांत्रिकांना पुढे या गूढ उपायांच्या मर्यादा जाणवल्या असाव्या. अनेकदा योगायोगाने आपल्या प्रयोगांना यश आले, तरी सातत्याने ते साधणे आणि आपला लौकिक टिकणे अशक्य आहे, हे त्यांच्या ध्यानात आल्यावर त्यांनी विविध विकारांवर लागू पडणाऱ्या औषधी वनस्पतींचा शोध घेतलेला दिसतो. अर्थात या वनस्पतींतही काही गूढ शक्ती आहे आणि आपल्या मंत्रसामर्थ्याने त्यांना भारून टाकल्यावर त्या अधिकच प्रभावी ठरतील, अशीही समजूत या मांत्रिकांच्या वर्गाने करून घेतली असावी. याचमुळे जादूच्या क्रियेबरोबरच विविध रोगांवर अचूक गुणकारी ठरणाऱ्या प्रभावी औषधींचा वापर करण्याचेही त्यांनी चालू ठेवले. आपण वापरलेल्या औषधींचे स्वरूप इतरांना कळू द्यायचे नाही आणि रोग्यांना देताना औषधी मंत्रून द्यायच्या, असा क्रम मांत्रिकांनी चालू ठेवल्यामुळे गूढतेचे वातावरण टिकून राहिले आणि गुण औषधींचा नसून मंत्रसामर्थ्याचा आहे, ही लोकश्रद्धाही अबाधित राहिली. मलेरियावर अत्यंत गुणकारी ठरलेले क्विनाइन हे द्रव्य प्रथमतः पेरू प्रदेशातील सिंका जमातीतले मांत्रिक मंत्रतंत्रासह रोग्यांना देत असत, असा इतिहास आहे.

मांत्रिकांच्या या प्राथमिक संशोधनातूनच वैद्यकाचा उगम झाला, असे म्हणता येते. आपल्या आयुर्वेदविषयक ग्रंथांत औषधींबरोबरच मणि-मंत्रांचाही समावेश आहे, ही वस्तुस्थिती जादू आणि वैद्यक यांच्या संबंधाची सूचक आहे. अनेक प्रसिद्ध वैद्यकग्रंथांत दैवी उपायांचा ऊहापोह केलेला दिसतो. मुलांना होणाऱ्या बालग्रहाची (आकडी) शांती करावी, असे उल्लेख वैद्यकग्रंथांतही आढळतात. मांत्रिकांप्रमाणेच वैद्यही औषधी वनस्पतींच्या ज्ञानाचे रहस्य राखतात आणि इतरांना सहजासहजी त्यांची माहिती देत नाहीत.



माणसाची कवटी व हाडे घेऊन जादू करणारा प्राचीन मानव (फ्रॉम मॅजिक टु मेडिसीन या ग्रंथावरून)

जादूटोणा करणाऱ्या मांत्रिकांना आपल्या प्रयोगांसाठी मानवाची कवटी आणि त्याच्या हातापायांची हाडे आवश्यक असतात. लहान मूल अथवा नवप्रसूत स्त्री यांची हाडे अधिक प्रभावी असतात, अशी समजूत आहे. रात्रीच्या वेळी श्मशानातून त्यांची प्रेते उकरून काढण्याचे साहस मांत्रिक करतात. अशा प्रेतांचे विच्छेदन करता करताच मांत्रिकांना मानवाच्या शरीररचनेचे प्राथमिक ज्ञान झाले असावे. वेड, फेफरे यांसारख्या विकारांवर उपाय म्हणून मांत्रिक माणसाच्या डोक्याला भोक पाडीत आणि त्या छिद्रातून भुतांना बाहेर काढीत असत ! अशा छिद्रे पाडलेल्या अनेक कवटया उत्खननात सापडल्या आहेत. ही छिद्रे भरून येऊ लागल्याचीही चिन्हे या कवटयांच्या निरीक्षणात आढळली आहेत. यावरून अशी शस्त्रक्रिया केलेली माणसे जिवंत राहिली असावी, असेही अनुमान निघते. मांत्रिकांचे हे सर्व अज्ञानजन्य प्रयोग उत्तरोत्तर वैद्यकाच्या विकासाला उपकारकच ठरत गेले आहेत. मानवी शरीराची रचना, त्यात होणारे बिघाड, ते बिघाड दूर करण्याचे उपाय, इ. गोष्टींचे अधिकाधिक यथार्थ ज्ञान होण्याला मांत्रिकांचे प्रयोग, अभावितपणे का होईना, कारणीभूत झाले आहेत. आजही वैद्यकी आणि मांत्रिकी हे

दोन्ही व्यवसाय एकाच व्यक्तीकडे असल्याची अनेक उदाहरणे खेड्यापाड्यांतून आढळतात.

जादूची सत्यासत्यता आणि भवितव्य–जादूविद्या ही बुद्धीच्या कार्यकारणभावावर आधारलेली असल्यामुळे ती वांझ आणि मिथ्या आहे, असे फ्रेझरप्रमाणेच बहुतेक अभ्यासकांचे स्पष्ट मत आहे. ही विद्या गूढतेचे आवरण पांघरून वावरत असली, तरी ती मिथ्या आहे, असे ई. बी. टेलरही म्हणतो. जादू जर वांझ आणि मिथ्या आहे, तर मग ती हजारो वर्षे टिकून कशी राहिली ? ज्याचे फल मिळत नाही, ती कृती मानव सातत्याने करीत कसा राहिला ? असे प्रश्न उपस्थित होतात. जादूच्या अमोघ सामर्थ्यावरील श्रद्धेतच जादूच्या दीर्घकालीन अस्तित्वाचे रहस्य आहे, असे फ्रेझरने त्या प्रश्नांचे उत्तर दिले आहे.

विज्ञानाचा जसजसा अधिक प्रचार होत आहे, तसतशी जादूवरील श्रद्धा कमी होत आहे, तरीही पुष्कळशी जाणती माणसेसुद्धा जादूविद्येच्या सामर्थ्याची आजही ग्वाही देतात आणि भूतपिशाचांची योनी अस्तित्वात आहे, असे आग्रहाने प्रतिपादितात. भुतांच्या आणि भानामतीच्या प्रयोगांनी घडलेल्या चमत्कारांच्या अनुभवांची वृत्ते आजही वृत्तपत्रांतून येत असतात. त्यांच्या सत्यासत्यतेची शहानिशा होत नाही.

तात्पर्य असे, की विज्ञानाने एखाद्या गोष्टीचे मिथ्यात्व सिद्ध केले, तरीही तिच्या सत्यतेवर श्रद्धा ठेवणारे काही लोक कोणत्याही काळी असतातच. [मि. मि. वे. लि.; अ. सि.; रि. फ्रि. अ.; डि. अॅ.; मॅ. रि.; टॉ. टॅ.; अॅ. इं.; लोकायत; ह्वि. गॉ. सा. इं.; दि वारलीज; एन्सा. रि. ए.; लौ. दं.; मंत्रशास्त्र; धर्म आणि लोक-साहित्य; अभिचार किंवा जादूटोणा–श्री. दुर्गा भागवत, नवभारत–आक्टो., नोव्हें., डिसेंबर, १९५९; प्राचीन भारतातील भौतिकवाद–प्रा. स. रा. गाडगीळ, नवभारत–जाने., फेब्रु., मार्च, १९६४; ऋग्वेदातील यातु आणि यातुधान–डॉ. स. अं. डांगे, नवभारत–जुलै १९६४]

जान (इ. स. चे १७ वे शतक) एक राजस्थानी कवी. हा कायमखानी मुसलमान जातीचा होता. याचे मूळ नाव न्यामत खाँ असे असून, जान हे त्याचे कविनाम होय. याने एकूण ७५ लहानमोठ्या काव्यग्रंथांची रचना केली आहे. त्यांपैकी कायमरासो, सतवंती सत, सिष्यासागर, कनकावती, रत्नावली, इ. प्रमुख होत. नाममाला नामक अनेकार्थी शब्दांचा एक कोशही त्याने लिहिला होता, असे म्हणतात. त्याची बहुतेक काव्ये शृंगारपर असून, काही थोडी नीतिपर आहेत. हा संस्कृत, अरबी, फारसी, व्रज, इ. भाषांत निष्णात होता; तसाच इतिहासज्ञही होता. त्याने कायमरासोत कायमखानी जातीची सविस्तर माहिती दिली आहे. त्याची सर्व कविता पिंगल भाषेत लिहिलेली आहे. त्याची शैली ललितमधुर आणि अलंकारप्रचुर आहे. हा फत्तेपूरचा नवाब होता. स्वतः मुसलमान असूनही त्याला आपल्या मूळ चौहान वंशाचा अभिमान होता. [हिं. नी. वि.; रा. पिं. सा.; रा. मा. औ. सा; हिं. सा. को.]

जानकीगीत एक काव्य. हा रसिक रामोपासक पंथाचा परमप्रिय ग्रंथ आहे. गालवाश्रमाचे (गलतागादी) पीठाधिपती स्वामी हर्याचार्य यांनी हा ग्रंथ रचला. याचे सहा सर्ग आहेत. त्यात क्रमाने वसंतवर्णन, सीतेचा रामाशी प्रणयकलह, रामाकडून तिच्या कोपशांतीच्या उपायांचे चिंतन, चंद्रकला या दूतीच्या साहाय्याने सीतेचे कोपशमन, जलक्रीडा, रासलीला, इ. विषय आलेले आहेत.

सहाव्या सर्गात रासलीलेचा प्रसंग वर्णन करताना कवीने पुढील श्लोक लिहिला आहे–

रामस्य जानुपरिसेवितसन्नितम्बा
वक्षस्युपाहितकुचास्य भुजोपधाना ।
कण्ठे समर्पितभुजा वदने धृतास्या
श्रीजानकी कुसुमचापधृतापि शेते ।।

अर्थ – जानकीने रामाच्या मांडीवर आपले पुष्ट नितंब ठेवले होते (ती रामाच्या मांडीवर बसली होती.) रामाच्या हृदयाला तिने आपले स्तन भिडवले होते. रामभुजेची तिने उशी केली होती. रामाच्या गळ्याला तिने दोन्ही हातांची मिठी घातली होती. रामाच्या मुखावर तिने आपले मुख टेकले होते. अशा प्रकारे मदनबाधा झालेली जानकी रामाच्या अंगावर रेलून पडली होती.

शेवटी राम-सीता या युगुलाच्या मीलनात जानकीगीत या काव्याची परिसमाप्ती झाली आहे. [रा. सा. म. उ.]

जानकीव्रत फाल्गुन कृष्ण अष्टमीच्या दिवशी हे व्रत करतात. ही तिथी जानकीची जन्मतिथी आहे. या व्रतात सीतेची पूजा करून तिला अपूपांचा (घारगे) नैवेद्य दाखवतात व अग्नी सिद्ध करून चरूचे हवन करतात. फल–अभीष्टसिद्धी. या दिवशी बिहारमधील जनकपुरामध्ये सीताजयंती निमित्त मोठी यात्रा जमते. कांही ग्रंथांत वैशाख शुद्ध नवमी ही जानकीची जन्मतिथी मानून त्या दिवशी तिचे व्रत करायला सांगितले आहे. [व्र. चं.; व्र. प.]

जानकीस्तवराज एक स्तोत्र. हे अगस्त्यसंहितेतून घेतलेले आहे. यात ६९ श्लोक आहेत. याच्या

पहिल्या ४५ श्लोकात जानकीच्या अंगप्रत्यंगांचे मनोहर वर्णन केलेले आहे. श्रीरामाला जे प्रसन्न करू इच्छितात, त्यांना सीतेच्या चरणकमलांची सेवा करणे व त्यांवर प्रेम करणे अपरिहार्य आहे, असे त्यात सांगितले आहे. [रा. सा. म. उ.]

जानपद

एक प्राचीन राजकीय संस्था. हा शब्द जनपद या शब्दापासून बनला आहे. जनपद म्हणजे विशिष्ट लोकांनी व्यापलेला भूभाग किंवा देश. त्याचा राज्यकारभार पाहणाऱ्या पौर व जानपद नावाच्या दोन संस्था होत्या. या दोन्ही संस्थांचा जोडीने उल्लेख रामायण, महाभारत, अर्थशास्त्र, इ. ग्रंथांत आढळतो. पौर ही संस्था राजधानीतल्या लोकांची व जानपद ही राज्याच्या इतर भागातील जनांची होती. युवराजाची नियुक्ती, राज्याभिषेक, दुराचारी राजाला पदच्युत करणे, इ. कामे पौर–जानपदांकडे असत. ज्याने पौर-जानपदांचा विश्वास संपादन केला असेल, त्यालाच राजाने प्रधानमंत्री नेमावे, असे महाभारतात सांगितले आहे. मंत्रिमंडळाच्या सल्ल्याने राजाने एखादा निर्णय घेतला, तरी त्याला जानपदाची मान्यता मिळणे आवश्यक होते. सर्वसाधारण करांपेक्षा जनतेकडून अधिक कर वसूल करायचा असला, तर राजाला पौर-जानपदांची संमती घ्यावी लागे.



जानपदाची एक मुद्रा – ‘पुरिका ग्रामजानपदस्य’ अशी अक्षरे तिच्यावर आहेत. प्राप्तिस्थळ – नालंदा

पौर-जानपदांचे कार्य केवळ विशिष्ट प्रसंगीच असे, असे नाही, तर नित्याच्या कारभारातही राजा त्यांची सल्ला-मसलत घेत असे. धार्मिक बाबतीतही राजा त्यांच्याशी चर्चा करी. पौर-जानपद यांच्या ठायी मोठेच सामर्थ्य वसत असे. त्यामुळे राजाला नेहमी त्यांची मर्जी संभाळावी लागे व त्यांच्याशी आदराने वागावे लागे.

प्रत्येक जानपदाची स्वतंत्र मुद्रा असे. नालंदा येथील भग्नावशेषांत एक गुप्तकालीन जानपदमुद्रा सापडली आहे. त्यावरून असे अनुमान करता येते, की गुप्तकाळातही जानपद ही संस्था अस्तित्वात होती.

जानपदांचे सभासद साधारणपणे सधन असत. त्यांची निवडणूक ग्रामीण संस्थांच्या द्वारा होत असावी. जानपदांना काही कायदेकानू करण्याचाही अधिकार होता. जे नियम त्यांच्या स्वतःच्या कार्यक्रमासंबंधी असत, त्यांना समय म्हणत व लोकांसाठी त्यांनी केलेल्या नियमांना संविद् म्हणत. या नियमांना धर्मशास्त्राची मान्यता मिळत असे. सांप्रतच्या कायद्यांसारखेच त्या नियमांचे स्वरूप होते. [हिं. रा. तं.]

जानापाव

एक क्षेत्र. हे मध्य प्रदेशातील महू नामक गावापासून १४ मैलांवर एका पर्वतावर आहे. इथे एक कुंड असून, जवळच जनकेश्वर महादेव आणि भैरवनाथ यांची मंदिरे आहेत. काही लोकांच्या मते इथे जमदग्नी ऋषीचा आश्रम होता. परशुरामाचा जन्म, त्याने पित्याच्या आज्ञेने केलेली मातृहत्या व पित्याच्याच वरदानाने केलेले तिचे संजीवन, इ. घटना इथेच घडल्या, असे म्हणतात. [कल्याण-तीर्थांक]

जानुशिरासन

एक योगासन. याची क्रिया अशी– प्रथम ताठ बसून डावा पाय गुडघ्यात वळवून त्याची टाच अंडकोशाला व तळपाय उजव्या पायाच्या मांडीला टेकवावा. नंतर उजवा पाय समोर ठेवून त्याचा अंगठा दोन्ही



जानुशिरासन

हाताच्या मध्यमा, तर्जनी आणि अंगठा यांनी पकडावा. त्याच वेळी मस्तक गुडघ्याला टेकवावे. तसे करताना तो पाय अथवा डाव्या पायाचा गुडघा उचलला जाणार नाही, याची दक्षता घ्यावी. श्वासोच्छ्वास चालू ठेवावा व डोळे मिटावे. हा प्रकार पूर्ण झाल्यावर आसन बदलून याचप्रमाणे उजवा पाय गुडघ्यात वळवावा व पुढील क्रिया पहिल्यासारखीच करावी.

या आसनामुळे अतिसार, पांडुरोग, कृमिरोग इ. रोग दूर होतात. वीर्यवृद्धी, यकृताची सुस्थिती व बरगडया सशक्त होणे, या गोष्टींसाठीही हे आसन लाभदायक आहे. [उ. यो. द.]

जापसाहेब गुरुगोविंदसिंघकृत एक उपासनापाठ. हा शिखांचा नित्य पाठ असतो. यात विष्णुसहस्रनामाप्रमाणे परमेश्वराची अनेक नावे घेऊन त्याचे स्मरण आणि त्याला नमन केलेले आहे. [गु. ग्रं. को.]

जाबालदर्शनोपनिषद हे उपनिषद सामवेदाशी संबंधित असून, ते योगपर आहे. याचे दहा खंड आहेत. दत्तात्रेयाने संकृती या आपल्या शिष्याला हे उपनिषद सांगितले, असा याचा उपोद्घात आहे.

पुढे या उपनिषदात योगाच्या अष्टांगांचे सविस्तर वर्णन आहे. त्यानंतर शरीरांतर्गत नऊ नाडया व त्यांच्या अधिष्ठात्री देवता यांची नावे दिली आहेत, ती अशी –– सुषुम्ना– शिव, इडा– ब्रह्मा, पूषा– पूषा, वारुणी– वायू, यशस्विनी– सूर्य, अलंबुषा– वरुण, कुहू– क्षुधा, गांधारी किंवा शंखिनी– चंद्र.

चंद्र इडेमधून, तर सूर्य पिंगलेमधून जातो. पिंगलेतून श्वासाचा इडेत प्रवास म्हणजे उत्तरायण व इडेतून श्वासाचे पिंगलेत संक्रमण म्हणजे दक्षिणायन होय. इडा व पिंगला यांच्या संगमस्थानी प्राणवायू पोचला, की तिला अमावास्या म्हणायचे.

यानंतर शरीराच्या अंतर्गत असलेली तीर्थे सांगितली आहेत, ती अशी – मस्तक– श्रीपर्वत, कपाळ– केदार, भ्रुकुटी व नाक यांचा संगम– वाराणशी, हृदय– कुरुक्षेत्र, हृदयकमल– प्रयाग, हृदयमध्य– चिदंबरम्, मूलाधार– कमलालय.

बाह्य भूमीवरची तीर्थे हिंडण्यापेक्षा या अंतर्गत तीर्थांची यात्रा करणे हेच श्रेयस्कर होय, असे या उपनिषदात म्हटले आहे. शेवटच्या खंडात समाधीचें स्वरूप वर्णिले असून, आत्मतत्त्वाची परतत्त्वाशी ओळख पटली, की माया नष्ट होऊन परमानंदाची प्राप्ती होते, असे सांगितले आहे. [सी. ग. देसाई]

जाबालनार्मद ब्राह्मणांतील एक पोटजात. हे लोक सुमारे १००० वर्षांपूर्वी नर्मदेच्या तीरावरून विदर्भात गेले व पयोष्णीच्या तीरावर वास्तव्य करून राहिले. त्या ठिकाणी जाबालेश्वर नावाचा देव आहे. जाबालेश्वर व नर्मदा या दोहोंशी या जातीचा संबंध असल्यामुळे हिला जाबालनार्मद असे जोडनाव पडले. हे शुक्ल यजुर्वेदाच्या जाबाल वाजसनेय शाखेचे असून, पारस्कर व कात्यायन या सूत्रांप्रमाणे आपली धर्मकृत्ये करतात. [ब्रा. भि. वि.]

जाबाली (१) भृगुकुलोत्पन्न एक ऋषी. याने एक स्मृती रचल्याचे कळते. हेमाद्री व हलायुध यांनी याचे आधार घेतले आहेत. [प्रा. च. को.]

(२) नारायण यंत्राच्या द्वादशदल कमलातील बारा ऋषींपैकी एक. याने पिप्पलादी ऋषींना परमतत्त्वाचे रहस्य, पशुपतीचे महत्त्व, शांभवव्रत व त्रिपुंड्रधारण या गोष्टी शिकवल्या. जाबाल्युपनिषद याच्या नावावर आहे. [क्रि. स्ट. ले. उ.]

जाबालोपनिषद हे अथर्ववेदाशी संबद्ध आहे. याचे सहा खंड आहेत. कुरुक्षेत्रात मरण पावणाऱ्याला रुद्राकडून तारक ब्रह्माचे स्वरूप समजते व तो मुक्त होतो, असे याच्या पहिल्या खंडात सांगितले आहे. दुसऱ्यात याज्ञवल्क्याने अत्रिऋषीला अमूर्त व अनंत आत्म्याचे ज्ञान कसे होईल, त्याचा उपाय सांगितला आहे. अविमुक्त म्हणजे वाराणसी हे स्थान मानवी शरीरात नाकाचें मूळ व भुवया यांचा जिथे संगम होतो, तिथे असल्याचे सांगितले असून, त्या ठिकाणी लक्ष केंद्रित करून ब्रह्मज्ञ पुरुष ध्यान करतात, असे म्हटले आहे. तिसऱ्या खंडात शतरुद्रिय मंत्राची महती वर्णिली आहे. चवथ्या खंडात याज्ञवल्क्याने जनकाला संन्यासधर्माची महती सांगितली आहे. पाचव्या खंडात यज्ञोपवीतधारणाचे महत्त्व वर्णिले असून, संन्याशाच्या बाबतीत आत्मा हेच यज्ञोपवीत असल्याचे सांगितले आहे. सहाव्या खंडात परमहंसांच्या जीवनक्रमाचे सविस्तर वर्णन केलेले आहे. [सी. ग. देसाई]

जाबाल्युपनिषद हे शैव उपनिषद असून, यात जाबालीने पैप्पलादी ऋषींना सत्यतत्त्वाचे कथन केले आहे. जीवात्मा हा पशू, तर सर्वज्ञ ईश्वर हा पशुपती होय. भस्मधारणाने पशुपतीच्या तत्त्वाचे ज्ञान होते. त्यानंतर त्याने भस्मधारणाचा विधी सांगितला असून, पुढे त्रिपुंड्राचे रहस्य सांगितले आहे, ते असे–

त्रिपुंड्रातली पहिली रेषा म्हणजे गार्हपत्य, अकार, रजोगुण, भूलोक, स्वाहा, क्रियाशक्ती व ऋग्वेद. दुसरी रेषा म्हणजे दक्षिणाग्नी, उकार, सत्त्वगुण, अंतरिक्ष, अंतरात्मा, इच्छाशक्ती

व यजुर्वेद. तिसरी रेषा म्हणजे आहवनीय, मकार, तमोगुण, द्युलोक, परमात्मा, ज्ञानशक्ती व सामवेद होय.

या रहस्याचे ज्ञान झाले, की सर्व शिवमंत्र जपल्याचे पुण्य लाभते, असे या उपनिषदात सांगितले आहे. [सी. ग. देसाई]

जामदग्न्यद्वादशी

वैशाख शु. द्वादशीला हे नाव आहे. त्या दिवशी परशुरामाच्या सुवर्णमूर्तीची पूजा करावी, असे सांगितले आहे (हे. व्र. १.१०३२–३४). फल – पराक्रमी पुत्राची प्राप्ती. [हि. घ.]

जामाईषष्ठी

पश्चिम बंगालमध्ये रूढ असलेला एक सण. ज्येष्ठ शु. षष्ठी ही त्या सणाची तिथी होय. हिलाच अरण्यषष्ठी असे दुसरे नाव आहे. या दिवशी स्त्रिया दिवसभर रानात जाऊन सहा प्रकारची फळे आणतात व देवीला त्यांचा नैवेद्य दाखवून त्यांचा प्रसाद जावयाला देतात.

या दिवशी षष्ठी व मंगलचंडी यांची पूजा करण्याचीही प्रथा आहे. या व्रतविधानात मंगलचंडीची कथा ऐकल्या नंतर जावयाला आशीर्वाद द्यायचा असतो. या व्रताचा आणखी एक विधी म्हणजे बायका हातात ताडाची चुडती घेऊन स्नान करतात व मग त्या चुडतीने जावयाला वारा घालतात. वंशवृद्धी होऊन संततीचे सातत्य राहावे, हा या व्रताचा उद्देश असतो.

सांप्रत या व्रतातले कर्मकांड लुप्त झाले असून, त्याला निव्वळ आनंदोत्सवाचे स्वरूप आले आहे. या दिवशी जावई सासुरवाडीस येतो. सासू त्याला मासे, फळफळावळ, राजभोग, रसमाधुरी, इ. पदार्थांचे षड्रस भोजन वाढते. मग जावयाला धोतर आणि झब्बा व लेकीला साडी-चोळी देतात. जावयाला निरोप देताना रातराणी, गुलाब किंवा मोगरा यांच्या फुलांचा गुच्छ देतात. [श्री. वा. जोशी, म. टाईम्स, १२ जुलै १९६२]

जामित्र

एक मुहूर्तदोष. विवाहकालीन लग्नापासून किंवा राशीपासून ७ व्या राशीत कोणताही ग्रह असता किंवा लग्न किंवा राशी यांच्यापासून ५५ व्या नवांशावर कोणताही ग्रह असता जामित्र नामक दोष होतो. हा दोष विवाहाला अशुभ मानला आहे. [मु. चिं.]

जायसी, मलिक मुहंमद

(इ. स. चे १५ वे शतक) एक सूफी संतकवी. याचा जन्म गाझीपूर येथे एका गरीब कुळात झाला. सातव्या वर्षी याला देवी येऊन याचा उजवा डोळा गेला व चेहरा कुरूप झाला.

मलिक महंमद जायसीचे मूळ नाव मुहंमद असे आहे. मलिक ही त्याची उपाधी होय. जायसी हे त्याचे आडनाव त्याच नावाच्या गावावरून पडले. परंतु हा जायसीचा राहणारा नव्हता. हे त्याच्याच पद्मावत काव्यावरून कळते. पुढे हा अमेठी राजाच्या आश्रयाला गेला. शेख महीउद्दीन हा याचा गुरू होय.

पद्मावत हे प्रदीर्घ प्रेमाख्यानकाव्य आहे. याशिवाय अखरावट, आखिरी कलाम, पोस्तीनामा आणि नैनावत ही त्याची काव्यसंपदा आहे. अखरावट काव्याचा विशेष असा, की वर्णमालेतील प्रत्येक अक्षर घेऊन त्यावर त्याने तत्त्वप्रधान अशी काव्यरचना केली आहे. या लहानशा काव्यात ईश्वर, सृष्टी, जीव, इ. विषय त्याने चर्चिले आहेत. मात्र याची कीर्ती दुमदुमली ती पद्मावत काव्यामुळे ! हे काव्यही रूपकात्मकच आहे.

जायसीची भाषा अत्यंत साधी आहे. या भाषेत फारसी व अरबी शब्दांचा भरणा खूप आहे. मात्र याला संस्कृत भाषेचे ज्ञान होते, असे वाटत नाही.

जायसी हा धर्मजिज्ञासू व समन्वयी वृत्तीचा असल्यामुळे त्याचा अनेक धार्मिक पंथांशी संबंध आला होता. विशेषतः नाथपंथाचा प्रभाव त्याच्या काव्यावर स्पष्ट दिसतो. हठयोग आणि रसायनवाद यांच्या साधनप्रक्रियांचे वर्णन त्याच्या काव्यात आढळते. [हिं. सा. इ.; गो. च. प.; अ. उ. सा.

जारकर्म

एखाद्या स्त्रीच्या उपपतीला जार असे म्हणतात. ऋग्वेदात हा शब्द केवळ प्रियकर या अर्थी आला आहे. एका ठिकाणी अग्नीला कुमारिकांचा जार म्हटले आहे (ऋ. १. ६६. ४). दुसऱ्या ठिकाणी पवमान सोमाचे स्तोत्र करताना ‘ तरुणी आपल्या जारासाठी (प्रियकर) उत्कंठित होते, त्याप्रमाणे सोमाकडे पाहून धेनू हंबरल्या ’ असे म्हटले आहे (ऋ. ९. ३२. ५.). ऋग्वेदात या शब्दाला वाईट अर्थ नव्हता. पुढे वेदोत्तर वाङ्मयात त्याला ‘ एखाद्या स्त्रीवर अनैतिक प्रेम करणारा ’ असा अर्थ प्राप्त झाला. बृहदारण्यकात ‘जायायै जारः ’ असे म्हणून जायेचा उपपती या अर्थाने जार शब्द वापरला आहे (बृहदा. ६. ४. १२).

विवाहित पुरुषाने अथवा स्त्रीने अन्य स्त्रीशी अथवा पुरुषाशी समागम करणे म्हणजे जारकर्म होय. धर्मशास्त्रात व कायद्यात याला पातक किंवा अपराध म्हटले आहे आणि सदर गुन्ह्याला शिक्षाही सांगितली आहे. अशी शिक्षा ठेवण्यात विवाहसंस्थेचे संरक्षण करणे, हा मुख्य हेतू आहे.

म्हणूनच पुराणांनी जारकर्माची अत्यंत निंदा केली आहे. देवांचा राजा इंद्र याने अहल्येशी जारकर्म केले व त्यामुळे त्याच्या अंगाला सहस्र भगे पडली, अशा कथा पुराणांत आहेत. जारकर्मामुळे समाजावर आणि कुटुंबसंस्थेवर अत्यंत घातक

परिणाम होतात, हे लक्षात घेऊन मनूने जारकर्मी स्त्री-पुरुषांना पुढील कडक शिक्षा सांगितल्या आहेत—

परदाराभिमर्शेषु प्रवृत्तान्नॄन्महीपतिः ।
उद्वेजनकरैर्दण्डैश्चिह्नयित्वा प्रवासयेत् ।।
तत्समुत्थो हि लोकस्य जायते वर्णसङ्करः ।
येन मूलहरोऽधर्मः सर्वनाशाय कल्पते ।।
परस्त्रियं योऽभिवदेत् तीर्थेऽरण्ये वनेऽपि वा ।
नदीनां वापि संभेदे स सङ्ग्रहणमाप्नुयात् ।।
भर्तारं लङ्घयेद्या तु स्त्री ज्ञातिगुणदर्पिता ।
तां श्वभिः खादयेद्राजा संस्थाने बहुसंस्थिते ।।
पुमांसं दाहयेत् पापं शयने तप्त आयसे ।
अभ्यादध्युश्च काष्ठानि तत्र दह्येत पापकृत् ।।
(मनु. ८.३५२–३५३, ३५६, ३७१–३७२)

अर्थ - परस्त्रीशी समागम करायला प्रवृत्त झालेल्या पुरुषांना राजाने नाक, ओठ, इ. ठिकाणी छेद देणे अशासारख्या उद्वेगकारक शिक्षा करून देशाबाहेर घालवून द्यावे. कारण परस्त्रीशी जारकर्म केल्यामुळे लोकांत वर्णसंकर उत्पन्न होतो. वर्णसंकरामुळे निर्माण होणारा अधर्म सर्वनाशाला कारणीभूत होतो. जो पुरुष नदीच्या पायउतारात, अरण्यात, वनराईत किंवा नद्यांच्या संगमात परस्त्रीशी संभोगाचा अभिलाष धरतो, त्याला राजाने सहस्र पण दंड करावा. जी स्त्री आपले वडील व बंधू मातबर आहेत, अशा गर्वाने किंवा सौंदर्यादी गुणांच्या अभिमानाने पतीचे उल्लंघन करून परपुरुषाकडे गमन करील तिला राजानें लोकसमुदायात कुत्र्यांकडून खाववावे. जार पुरुषाला तापलेल्या लोखंडाच्या पत्र्यावर निजवून भाजावे. त्या अग्निशयनावर वध्याचा घात करणाऱ्या लोकांनी लाकडे आणून टाकावीत, की ज्यामुळे तो पापकर्मा दग्ध होऊन जाईल.

इतर अनेक गुन्ह्यांप्रमाणे स्मृतींनी जारकर्मातही वर्णभेदावर शिक्षेचा कमी-अधिकपणा अवलंबून ठेवला आहे. मध्ययुगात मनुस्मृतीच्या आधारेच सर्वत्र शिक्षेचा अंमल चालू होता.

प्रस्तुत हिंदुसमाजव्यवस्थेवर पाश्चात्यांनी अनेक आक्षेप घेतले आहेत. जारकर्म करणाऱ्याला वध किंवा अवयवच्छेदन या शिक्षा अत्यंत कडक आहेत, तसेच वर्णानुसार शासन हे तत्त्वही अन्याय्य आहे, असे त्यांचे म्हणणे आहे. इंद्रादी देवांची जारकर्मे, कामसूत्रातील स्त्रियांच्या नीतिमत्तेविषयीचे उल्लेख व पुत्रांचे क्षेत्रजादी बारा प्रकार, या गोष्टी हिंदुसमाजातल्या शिथिल नीतिमत्तेच्या द्योतक आहेत; तसेच बहुभार्यापद्धती, जरठकुमारीविवाह, वगैरे रूढीही वैवाहिक नीतिमत्ता शिथिल करणाऱ्या आहेत, असेही आणखी आक्षेप पाश्चात्त्य विद्वानांनी घेतले आहेत. हे सर्व आक्षेप लक्षात घेऊन इंग्रजांनी इंडियन पिनलकोडाची रचना केली. ही रचना पाश्चात्य कायदेपद्धतीवर आधारलेली आहे. पिनलकोडात जारकर्माच्या गुन्ह्याला पाच वर्षे कैद व दंड किंवा नुसता दंड अशी शिक्षा सांगितलेली आहे. शिवाय या गुन्ह्यात जारिणी स्त्रीला शिक्षा न करता फक्त पुरुष गुन्हेगारालाच शिक्षा व्हावी, असे ठरविण्यात आले आहे (क. ४९७).

संस्कृतीच्या प्रारंभकालात जेव्हा विवाह ही संस्था अस्तित्वात आली नव्हती, तेव्हा त्या रानटी अवस्थेतले पुरुष स्त्रियांवर मालमत्तेप्रमाणे हक्क सांगत. अशी एखाद्याच्या हक्काची स्त्री पळविणाऱ्याला चोरीच्या गुन्ह्याप्रमाणे शिक्षा केली जात असे. जारकर्मामुळे नीतिभ्रष्टता येते किंवा वैवाहिक करार मोडतो, इ. कल्पना त्या काळी नव्हत्या. ज्याप्रमाणे पशुजातीतले काही नर आपल्या माद्यांना स्वतःच्या अधिकारात ठेवून इतर कोणी त्या माद्यांच्या जवळ गेल्यास त्यांच्यावर तुटून पडतात, त्याचप्रमाणे प्रारंभीच्या मानवाचीही स्थिती असली पाहिजे.

पुढे विवाहसंबंध जोडण्याची कल्पना रूढ होऊन एका पुरुषाने एकाच वेळी अनेक स्त्रिया कराव्या किंवा स्त्रीने एकाच वेळी अनेक पती करावे, अशी चाल निर्माण झाली. स्त्री-पुरुषांत विवाहसंबंध निर्माण झाल्यानंतर तर पुरुष आपल्या स्त्रीला परपुरुषसंपर्क होऊ न देण्याबद्दल अधिकच दक्ष राहू लागला. तत्कालीन राजसत्तेनेही वैवाहिक संबंधाचे पावित्र्य मान्य करून जारकर्मी स्त्री-पुरुषांना देहांतासारख्या कडक शिक्षा जारी केल्या. नवऱ्याचे जारकर्म हा त्याच्या पत्नीविरुद्ध गुन्हा असून तिला त्याबद्दल दाद मागता येते, अशी स्थिती मात्र फार थोड्या समाजात आढळत होती. काही वन्य समाजात मात्र पतीच्या जारकर्माबद्दल पत्नीला त्याच्यापासून विवाहविच्छेदाचा हक्क दिलेला आहे. [वे. इं.; म. ज्ञा. को.]

जालंधर (१) (इ. स. चे १० वे किंवा ११ वे शतक) एक नाथसिद्ध. नवनाथकथासारात याचे चरित्र दिले आहे ते पुढीलप्रमाणे –

कुरुकुलात बृहद्रव नावाचा एक राजा होऊन गेला. त्याने एकदा हस्तिनापुरी सोमयाग करण्याला प्रारंभ केला. पूर्वी शंकराने आपल्या तृतीय नेत्रातील प्रलयाग्नीने मदनाला जाळले होते. त्यानंतर तो मदन अग्नीच्या उदरात वाढू लागला. तेव्हा त्या गर्भात अंतरिक्षनारायणाने संचार करून तो गर्भ या सोमयागाच्या अग्निकुंडात टाकून दिला. पूर्णाहुती झाल्यानंतर यज्ञकुंडातील विभूती घेण्यासाठी पुरोहितांनी कुंडात हात घातला असता त्यांच्या हाताला एक मुलगा लागला व त्याचे रडणेही त्यांना ऐकू आले. मग ही गोष्ट पुरोहिताने राजाला सांगितली:

राजाज्ञेवरून पुरोहिताने त्या मुलाला अग्निकुंडातून बाहेर काढले. त्या मुलाला पाहून बृहद्रव राजाला संतोष वाटला. त्याने तो मुलगा आपली राणी सुरोचना हिच्या स्वाधीन केला. त्याला पाहताच राणीला पान्हा फुटला. मग राजाने त्या मुलाच्या बारशाचा मोठा उत्सव केला व अग्निज्वालेपासून उत्पन्न झाला म्हणून जा(ज्वा)लंधर असे त्याचे नाव ठेवले. मोठा झाल्यावर त्याला साक्षात दत्तात्रेयापासून मंत्रोपदेश मिळाला. नंतर यात्रा करीत करीत जालंधर बंगालमध्ये गेला. तिथे गोपीचंद राजाची आई मैनावती ही त्याची शिष्या झाली. मैनावतीने गोपीचंदालाही त्याचे शिष्यत्व स्वीकारायला सांगितले. पण ती गोष्ट न करता गोपीचंदाने आपली राणी लुमावती हिच्या बदसल्ल्यानुसार जालंधराला एका खड्डयात पुरून टाकले. पुढे कानिफनाथाच्या उपदेशामुळे गोपीचंदाला केल्या कृत्याचा पश्चात्ताप झाला व त्याने जालंधराला खड्डयातून वर काढले. नंतर गोपीचंद त्याचा शिष्य बनला.

जालंधराला जालंदर, जालंधरपा, हाडिपा, इ. नावांनीही ओळखतात. गोरक्षविजय नामक प्राचीन बंगाली ग्रंथात जालंधर हा महादेवाच्या हाडापासून उत्पन्न झाला, म्हणून तो हाडिपा या नावाने प्रसिद्ध झाला असे म्हटले आहे. काही विद्वानांच्या मते हाडिपा या नावावरून तो बंगालचा असावा. कारण हाडी ही जात बंगालमधली आहे. तिथल्या लोकसाहित्यात जालंधराचा हाडिपा म्हणून वारंवार उल्लेख येतो. ही हाडी जात अस्पृश्य मानली गेली होती. म्हणून जालंधर हा अस्पृश्य जातीत जन्मला असावा, असे विद्वानांचे मत आहे.



जालंधरपा

जालंधरनाथ हा मत्स्येंद्राचा गुरुबंधू होय. तिबेटी परंपरेनुसार हा मत्स्येंद्राचा गुरू मानला जातो. त्याची गोष्ट अशी — हा नगरभोग देशात ब्राह्मणकुळात जन्माला आला. नंतर हा उत्तम पंडित बनला. घंटपादाचा शिष्य कूर्मपाद याच्या संगतीत येऊन हा त्याचा शिष्य बनला. मत्स्येंद्रनाथ, कण्हपा (कृष्णपाद) व तंतिपा हे त्याच्या प्रमुख शिष्यांपैकी होत.

तिबेटी परंपरेत आणखी एक मत असे आहे, की बौद्ध सिद्ध बालपाद हाच जालंधरपा होय. याचा जन्म सिंधमधील एका श्रीमंत शूद्र कुळात झाला. त्याने बौद्ध तांत्रिक मार्गाचा स्वीकार केला आणि उड्डीयानमध्ये योगसाधना केली. तिथून तो पंजाबातील जालंधर गावी जाऊन राहिला. तेव्हापासून त्याला जालंधर असे म्हणू लागले. तिथून तो नेपाळात व नेपाळातून उज्जैन येथे गेला. तिथे त्याला कृष्णाचार्यादी (कण्हपा) अनेक शिष्य मिळाले. पुढे तो बंगाल्यात आला. तिथे त्याला हाडी म्हणू लागले.

भोटिया ग्रंथात तर याला आदिनाथच मानले आहे. तंजूरमध्ये याच्या नावावर सात ग्रंथ असल्याचे कळते. त्यांपैकी दोन मगही भाषेत आहेत, असे श्री. राहुल सांकृत्यायनांनी म्हटले आहे. त्यातील पहिला विमुक्तमंजरीगीत व दुसरा हुंकरचित्तबिंदुभावनाक्रम हा होय.

बंगाली परंपरेनुसार उज्जैनीचा राजा भर्तृहरी याचाही गुरु जालंधरपा हाच होता.

जालंधर हा जालंधरिपा नामक संप्रदायाचा प्रवर्तक आहे. परंतु गोरक्षनाथाच्या नंतर हा पंथ गोरक्षनाथी परंपरेत अंतर्भूत झाला, असे दिसते.

नाथसिद्धोंकी बानियाँ या ग्रंथात जालंधरनाथाच्या नावावर थोडी पदे आहेत. त्यातील एक असे—

आसा पास दूरि करि । पसरंती नि (र) वारि ।
सिध साधिक स्यू संग करि । सति गुरु ज्ञान विचारि ॥

अर्थ — (योग्याने) आशापाश दूर करावे व साऱ्या कामना आवरून धराव्या. सिद्धांचा व साधकांचा संग करावा आणि सद्गुरूला ज्ञान विचारावे.

याशिवाय त्याची गुरु–शिष्यसंवादात्मकही काही पदे आहेत. राजा गोपीचंद प्रश्न विचारतो आहे व जालंधर त्याची उत्तरे देतो आहे, असा तो संवाद आहे. [गो. च. प.; ना. सं.; ना. सि. बा.; हिं. सा. को. २.]

(२) एक शैव पंथ. या पंथाचे संन्यासी एका विशिष्ट पद्धतीने तप करतात. ते लोक एक खड्डा खणून त्यात तपकर्त्या संन्याशाला बसवतात व त्याच्या डोक्यावर अभिषेकपात्रातून सतत पाण्याची धार धरतात. हे तप हिवाळ्यातल्या रात्री करायचे असते. [वै. शै. म. व.]

(३) पंजाब प्रदेशातील एक शहर. हे शहर सतलज नदीच्या काठी आहे. जालंधर दैत्याची ही राजधानी होती, असे सांगतात. इथे विश्वमुखी देवीचे एक मंदिर आहे. एकावन्न शक्तिपीठांपैकी हे एक आहे. सतीचा वाम स्तन इथे गळून पडला व त्यामुळे हे

पीठ निर्माण झाले. याच शहराला त्रिगर्ततीर्थं असे पौराणिक नाव आहे. [कल्याण–तीर्थांक]

जालंधरबंध हठयोगातील एक प्रकार. चंद्रमंडलातून येणारे अमृत नाभिस्थित सूर्य प्राशन करीत असल्यामुळे माणसाला मृत्यू येतो, पण जालंधर बंध सिद्ध झाल्याने सूर्याला ते प्राशन करता येत नाही आणि त्यामुळे मनुष्याचा मृत्यु टळतो; असे शिवसंहितेत सांगितले आहे. याचे लक्षण असे–

कण्ठसङ्कोचनं कृत्वा चिबुकं हृदये न्यसेत् ।
जालन्धरकृते बन्धे षोडशाधारबन्धनम् ।।

अर्थ– मस्तक खाली करून कंठाचा संकोच करावा व हनुवटी हृदयाला टेकवावी; याला जालंधर बंध असे म्हणतात. पादांगुष्ठ, घोटे, इ. सोळा स्थाने-जालंधर बंधाच्या प्रभावाखाली येतात.

या बंधामुळे श्वासप्रश्वासक्रियेवर अधिकार प्रस्थापित होतो. याचप्रमाणे विशुद्ध चक्राच्या जागृतीसाठीही याचे साहाय्य मिळते. [यो. सो. च.]

जालपा गढवाल प्रदेशातील एक देवी. हिला ज्वालपा असेही म्हणतात. आपल्याला चांगला जोडीदार (पती) मिळावा, म्हणून गढवालमधील तरुणी या देवीची आळवणी करतात व तिची गाणी म्हणतात. [ग. लो.]

जालवणकर, नारायणमहाराज (१८०७–१८६७ इ. स.) एक दत्तभक्त संत. नजिकच्या जालवण गावी यांचा जन्म झाला. यांचे वडील पुराणिक होते. नारायणमहाराज एक वर्षाचे झाल्यावर त्यांची आई मरण पावली. पुढे त्यांचे संगोपन त्यांच्या आजीने केले. आठव्या वर्षी त्यांची मुंज झाली आणि दहाव्या वर्षी लग्न झाले. परंतु हे वृतीने विरक्त असल्यामुळे विवाहानंतर त्यांनी थोड्याच दिवसांत घर सोडले आणि ते मथुरेला गोवर्धनबाबा नामक हठयोग्याजवळ योगाभ्यासाठी चार वर्षे राहिले. मथुरेत आलेल्या जालवणच्या एका माणसाने यमुनेच्या काठी त्यांना पाहिले व घरी येण्याचा आग्रह केला. परंतु नारायणमहाराजांनी त्याला दाद दिली नाही. तेव्हा त्या माणसाने गोवर्धनबाबांची गाठ घेऊन सर्व वृत्तांत त्यांना सांगितला. अखेर गोवर्धनबाबांच्या आज्ञेनुसार नारायणमहाराजांना स्वतःच्या घरी जावे लागले. घरी आल्यावर ते तिथे दोन वर्षे राहिले. या काळात त्यांना एक मुलगा झाला. परंतु मुलाच्या जन्मानंतर आठ दिवसांच्या आतच तो मुलगा व त्याची आईही निवर्तली. या घटनेनंतर नारायणमहाराज पुन: घराबाहेर पडले व गोवर्धनबावांनी सुचविल्याप्रमाणे गिरनार पर्वतावर गेले. तिथे त्यांनी दत्तदर्शनासाठी तप आरंभिले. चौदा दिवसपर्यंत तप करूनही दत्तदर्शन होत नाही, असे पाहून ते देहत्यागाला प्रवृत्त झाले. ते पर्वताच्या एका कडयावरून खाली उडी मारणार, एवढ्यात एक फकीर तिथे उपस्थित झाला. त्याने नारायणमहाराजांना आत्महत्येपासून परावृत्त केले. मग तो फकीर त्यांना एका गुहेत घेऊन गेला. तिथे त्याने आपले दत्तस्वरूप प्रकट करून त्यांचे समाधान केले.

या फकिराने नारायणमहाराजांना निरंजनस्वामीच्या स्वाधीन केले, असे सांगतात. परंतु निरंजन रघुनाथ गिरनारवर इ. स. १८१२ मध्ये येऊन परत गेले होते. ते पुनश्च गिरनारवर आल्याची नोंद नाही. महाराष्ट्र सारस्वतात नारायण महाराजांचा काळ इ. स. १७९३–१८६८ असा दिला आहे. हा काळ खरा ठरला, तर मात्र निरंजनस्वामींची व नारायणमहाराजांची गिरनारवर गाठ पडली असणे शक्य आहे. आपण निरंजनस्वामींचे शिष्य आहोत, असे त्यांनी स्वतःच म्हटले आहे.

नारायणमहाराजांचा शिष्यपरिवार खूप मोठा आहे. त्यांच्या मठातील दत्तजयंतीच्या उत्सवात दरवर्षी दहा हजार पात्र जेवत असे, एवढे त्यांचे वैभव होते.

नारायणमहाराजांचा पारमार्थिक अधिकार मोठा होता. त्यांचा सप्तसागर हा ग्रंथ त्यांच्या आध्यात्मिक चिंतनाची साक्ष देतो. या ग्रंथाची ओवीसंख्या १७७६२ इतकी आहे. याचे बोधसागर, कैवल्यसागर, ज्ञानसागर, विज्ञानसागर, आनंदसागर, शांतिसागर आणि करुणासागर असे सात विभाग आहेत. याशिवाय चिद्रत्नमाला, गुरुपादुकाष्टक, बोधाष्टक, निर्वाणपंचक, सिद्धयोगाष्टक, धावे व पदे अशी त्यांची स्फुट कविताही बरीच आहे. निरंजनाप्रमाणे त्यांनीही हिंदी पद्यरचना केली आहे. त्यांच्या पदांपैकी एक नमुना असा—

कोण्या काळी येशील दीनबंधु ।
दत्तदेवा सद्‌गुरू दयासिंधु ।।
कधींचा मी व्याकुळ वाट पाहे ।
त्रैलोकींचे सुख शून्य वाटताहे ।।
वियोगें हा जीव जाउं पाहे ।
कृपासिंधो सन्मुख उभा राहे ।।

या पदात नारायण महाराजांची दत्तविरहाची असह्यता स्पष्ट रीतीने व्यक्त झालेली आहे. [न. च. प.; म. सा.]

जालरी द. भारतातील एक जात. तेलुगू कोळी, पालखी वाहणारे आणि शेतकरी यांना जालरी हे नाव

असून आंध्रातल्या गंजम व विजगापट्टम् या जिल्ह्यांत यांची वस्ती आहे. जाल म्हणजे जाळे या शब्दावरून जालारी हे नाव आले आहे, असे श्री. हयवदन राव यांनी म्हटले आहे. जालारींना गंगावंशमू म्हणजे गंगेचे वंशज असेही म्हणतात.

यांच्यात पनरेंडू कोट्ल आणि इडू कोट्ल असे दोन पोटभेद आहेत. पनरेंडू लग्नमंडपात बारा खांब उभारतात आणि इडू सात उभारतात. पनरेंडू स्वतःला इडूंपेक्षा श्रेष्ठ समजतात.

विवाहप्रथा – यांचा विवाहसमारंभ तीन दिवस चालतो. लग्नात पेद्दपटनम्, विजगापट्टम्, विमलीपट्टम् व रेवलपटनम् या चार गावांतील काही प्रतिनिधींना निमंत्रण दिलेच पाहिजे, असा नियम आहे. मंडप उभारल्यावर प्रथम या प्रतिनिधींना पानसुपारी देतात. पेद्दपटनम् हे कदाचित जालारींचे मूळ वसतिस्थान असावे आणि तिथून ते अन्यत्र गेले असावे, हे या प्रथेचे कारण म्हणून सांगता येईल. दुसऱ्या दिवशी संध्याकाळी नवरा मुलगा मिरवत लग्नमंडपाच्या दाराशी जातो. दारातच मुलीचा मामा एका हातात साधे पाणी व दुसऱ्या हातात गुळाचे पाणी घेऊन उभा असतो. नवऱ्या मुलाने त्यांपैकी गुळाच्या पाण्याचे भांडे आपल्या हातात घ्यायचे असते. पण तो जर चुकला, तर त्याला दंड करण्यात येतो. नंतर तो लग्नमंडपाकडे निघाला असता काही सुवासिनी त्याच्या व मंडपाच्या मध्ये वांबूचा एक खांब धरतात व एक नवे गाडगे त्या खांबाभोवती तीनदा फिरवतात. एवढ्यात वधू तिथे येते व ती दोघे मिळून मंडपात प्रवेश करतात. रात्री वधूच्या गळ्यात सथमानम् बांधण्याचा विधी होतो. जालारींच्या लग्नाच्या मिरवणुकीत खांद्यावरून एक कावड नेण्याची पद्धत आहे. त्या कावडीत एका बाजूला एका मोठ्या टोपलीत अनेक लहान टोपल्या व चाळण्या असतात आणि दुसऱ्या बाजूच्या टोपलीत मांजरे असतात. पण या विचित्र पद्धतीला इतर जमातीचे लोक नावे ठेवू लागल्यामुळे ती आता हळूहळू लुप्त होत आहे.

जालारी लोकांत निरनिराळी गोत्रे असून जोन्न आणि बुगुरी या गोत्रांचे लोक जास्त आढळतात. यांची जातपंचायत असून, तिच्या मुख्याला पिल्ल असे नाव आहे.

देवधर्म – जालारी अनेक देवदेवतांना भजतात. सामलम्म ही देवता त्यांचे तापासून रक्षण करते. राजम्म ही अपत्यहीन स्त्रियांना अपत्ये देते व मच्छीमारीसाठी गेल्यावर खूप मासे मिळवून देते. येरेनम्म त्यांना पाण्यात बुडण्यापासून आणि मोठ्या माशांपासून वाचवते. भागदेवी महामारीपासून त्यांचे संरक्षण करते; तर ओरोसोंडी अम्मवारू ही देवता त्यांच्या होड्यांचे रक्षण करते. जालारी लोकांच्या निरनिराळ्या कुटुंबांची निरनिराळी देवळे असतात. [का. ट्रा. स. इं.]

जालिनीप्रभ एक बोधिसत्त्व. अमिताभ या ध्यानी बुद्धाचा हा आध्यात्मिक पुत्र मानलेला आहे. याचा वर्ण लाल असून, सूर्यचक्र हे याचे बोधचिन्ह आहे. याला सूर्यप्रभ असेही म्हणतात.

निष्पन्नयोगावली या ग्रंथात याची तीन रूपे वर्णिली आहेत. ही तिन्ही रूपे एकमुख व द्विभुज आहेत. एका प्रकारात त्याने डाव्या हातात कमळ व त्यावर खड्ग धारण केलेले असून, उजव्या हाताने वरदमुद्रा दर्शविली आहे. दुसऱ्या प्रकारात त्याने उजव्या हातात खड्ग व डाव्या हातात कमळावर सूर्यचक्र धरलेले आहे. तिसऱ्या प्रकारात त्याच्या उजव्या हातात वज्रपंजर असून, डावा हात कमरेवर ठेवलेला आहे. दुसऱ्या प्रकारच्या ध्यानाचे एक नेपाळी चित्र उपलब्ध आहे. त्या चित्रात याचे ध्यान अत्यंत सुरेख दिसते. [इं. बु. इ.]



जालिनीप्रभ – नेपाळी चित्र

जाल्रा द. भारतातील एक वाद्य. हे पितळ किंवा कासे यांसारख्या धातूचे केलेले असते. हे झांज वर्गातले तालवाद्य आहे. याच्या दोन तबकड्या असून, त्यांच्या मध्यात दोरी बांधतात. याचा उपयोग मुख्यतः कथाकालक्षेपम् व भजन या कार्यक्रमांत होतो. [डि. सा. इं. म्यु. म्यु.]

जावळी कर्नाटक संगीतातील एक प्रकार. जावडी या कन्नड शब्दाचा अर्थ शृंगारिक गीत असा आहे व त्यावरूनच जावळी हे नाव आले आहे. यातील स्वर अत्यंत आकर्षक असतात. कामोद्दीपन हाच या संगीताचा मुख्य उद्देश असतो. त्यामुळे त्यातली शब्दरचना पुष्कळदा शिथिल व कित्येकदा अश्लीलही असते. या गीतांची भाषा नेहमीच्या बोलचालीतली असते.

जावळीचे पल्लवी, अनुपल्लवी व चरण हे तीन विभाग असतात. काही जावळींत अनुपल्लवी हा भाग नसतो. गजल व जावळी यांच्यात बरेच साधर्म्य आहे. [डि. सा. इं. म्यु. म्यु.]

जासूद यातील मूळ शब्द जासूस हा अरबी भाषेतला असून, गुप्तपणे बातमी आणणारा, असा त्याचा अर्थ आहे. शिवाजीमहाराजांच्या राज्यव्यवहार कोशात त्याला चारनायक (हेरांचा मुख्य) हा प्रतिशब्द दिला आहे. मात्र केवळ गुप्त बातमीदार एवढ्याच अर्थाने हा शब्द वापरला जात नाही; तर सामान्य बातम्यांची नेआण करणाऱ्यालाही जासूद म्हणतात.

इतिहासकाळात जासुदांचे दोन वर्ग होते. काही जासूद सरकारी नोकर असत. सरकारी अधिकाऱ्यांचे निरोप किंवा पत्रे नेऊन पोचवणे, हेच त्यांचे काम असे. दुसरा वर्ग स्वतंत्रपणे व्यवसाय करणाऱ्या जासुदांचा असे. जासूद पुरवण्याचा उद्योग काही लोक करीत; त्यांना जथेदार म्हणत. हे जथेदार सरकारला किंवा व्यापारी, सावकार-वगैरे गरजू लोकांना हवे तसे व हवे तितके जासूद पुरवीत.

जासुदांचे पदाती, कागदी, कासीद, राऊत, सांडणीस्वार, ढालाईत, फडनाईक, इ. अनेक प्रकार होते. पदाती म्हणजे पायी जाणारा, राऊत म्हणजे घोडेस्वार, ढालाईत म्हणजे शस्त्रसज्ज असलेला व कागदी म्हणजे बातमीचा कागद घेऊन येणारा होय.

सामान्यत: जासूद नेहमी जोडीने काम करीत. प्रत्येक सरदारावरोबर सुमारे दहा जासूद-जोड्या असत. पूर्वीच्या काळात जासुदांना नाना प्रकारच्या संकटांना तोंड द्यावे लागे. शत्रुपक्षाच्या हाती सापडलेले जासूद सहसा जिवंत सुटत नसत. त्याशिवाय चोर, वाटमारे यांचे भय असे, ते वेगळेच. त्यामुळे जासूद निरनिराळे वेष धारण करून व फकीर, गोसावी, दरवेशी, ज्योतिषी यांची सोंगे घेऊन आपल्या कामाला जात.

पदाती जासूद ताशी ३ ते ४ कोस या वेगाने रोज १३ ते १४ कोस प्रवास करी. प्रसंगविशेषी एका दिवसात ३० ते ४० कोस पायी प्रवास केल्याचेही उल्लेख आहेत. अशा वेळी, तसेच आनंदाची किंवा विजयाची वार्ता लवकर पोचवणे, शर्थीने संकटातून पार पडून बातमी नेणे या कामगिरीबद्दल जासुदाला शेलापागोटे, रुपये किंवा सोन्याचे कडे बक्षीस देण्याची चाल होती. जासुदाला वाटेत कोणी लुबाडले वा जखमी केले, तर त्याला नुकसानभरपाईही मिळत असे. सरकारी जासुदांना दरमहा तीन ते सहा रुपये पगार दिला जाई. [म. स. द.]

जाहरपीर मुसलमानांच्या पाच पीरांपैकी मुख्य पीर. याला गुग्गा असेही नाव आहे. हा चौहान राजपूत कुळात जन्मला असूनही मुसलमान लोक याला पीर म्हणून भजतात. सर्पविष नष्ट करण्याचे सामर्थ्य याच्या अंगी होते, म्हणून याला जाहरपीर हे नाव मिळाले असावे असे दिसते.

व्रजमंडलात जागरण किंवा अन्य धार्मिक प्रसंगी याच्या नावाची अनेक गीते गायिली जातात. मारवाड व पंजाब या प्रदेशांत जाहरपीराची पूजा करणारे लोक पुष्कळ आहेत. तिथे नागपंचमीलाच गुग्गापंचमी म्हणतात व त्या दिवशी जाहरपीराची पूजा करतात. काही लोक त्याच्या दगडी मूर्तीला पुजतात. पाहा – गुग्गा. [हिं. सा. को.; हिं. सा. बृ. इ.]



जाहरपीराची मूर्ती

जिंद कृपण पुरुषाचे भूत. हे मनुष्याच्या अथवा सर्पाच्या स्वरूपात भूमिगत धनाची राखण करीत बसते, अशी समजूत पश्चिम भारतात प्रचलित आहे. त्याच्या अधिकारातील धनाला स्पर्श करणाऱ्यांनाच ते झपाटते; इतरांना त्याचा उपद्रव होत नाही, असे म्हणतात. [लौ. दं.]

ज़िंदा ग़ाज़ी मुसलमानांचा एक पीर. हा वाघावर आरूढ होऊन सुंदरवनात फिरतो, अशी समजूत आहे. तो पाखंडी लोकांचा नाश करतो असेही म्हणतात. त्याच्या एका भक्ताने ज़िंदाचे नाव बद्रुद्दिनशाह मदार असल्याचे सांगितले आहे. हा पाखंडी लोकांशी लढताना इ. स. ८४० साली

मारला गेला. वाघ आणि सुसरी यांच्यापासून तो सर्वांचे रक्षण करतो असे सांगतात. प्रवासाला गेलेला माणूस सुखरूप परत यावा म्हणून याला नवस करतात. हिमालयात मदारिया नावाच्या टेकड्यांत याचे थडगे आहे. [से. इं. १९५१]

जिंदाशाह मदार मानकपूर येथील एक मुसलमान संत. काही फकिरांना मदारी असे म्हणतात, ते याच्याच नावावरून होय. मुसलमान व खालच्या जातींचे हिंदू याला भजतात. हा सर्प आणि विंचू यांचे विष उतरवतो अशी समजूत आहे. [फो. लो. नॉ. इं.]

जिकडी व्रजमंडलातील एक गीतप्रकार. होळीच्या वेळी ग्रामस्थ मंडळी एकत्र जमून जिकडी गीते गातात. त्यासाठी जमलेल्या मंडळीचे दोन पक्ष बनवतात. ते समोरासमोर उभे राहून गीतांच्या द्वारे सवाल-जवाब करतात. कलगी-तुऱ्यासारखाच काहीसा हा प्रकार आहे. दोन्ही पक्ष मोठ्या अटीतटीने हा सामना लढवतात.

या जिकडी गीतांचे विषय धार्मिक असतात. जिकडीचे गायक चार प्रकारचे असतात व त्यांना वेगवेगळ्या संज्ञा असतात. प्रत्यक्ष गाणाऱ्यांना रसिये, गातांना बोल सांगणाऱ्यांना अगेडिये, ते बोल पुन्हापुन्हा आळवणाऱ्यांना पिछेडिये आणि दीर्घ ताना घेणाऱ्यांना हेकडे म्हणतात.

जिकडीचा प्रारंभ गाहेपासून होतो. गाहे हे सहा चरणांचे एक कडवे असते. गाहेसारखेच जिकडीचे आणखी चार भाग असतात, त्यांना टेक, साखी किंवा फूल, ज़डावन, उडान किंवा टूटन अशी नावे आहेत. [हिं. सा. को.]

जिक्र एक इस्लामी कल्पना. या शब्दाचा मूळ अर्थ पाठांतर असा आहे. मुस्लिम फकिरांचे अनेक पंथ असून, त्या प्रत्येक पंथाचे धार्मिक आचार व भक्तिकल्पना या गोष्टी भिन्न असतात. त्याचप्रमाणे त्यांच्या पठणाची पद्धतही वेगळी असते. या पठणपद्धतीला जिक्र अशी संज्ञा असून, जिक्र जली व जिक्र खफी असे त्याचे आणखी पोटभेद आहेत. जिक्र जली म्हणजे उच्च स्वरात व जिक्र खफी म्हणजे मंद स्वरात किंवा मनात ईशस्मरण करणे होय. निरनिराळ्या प्रकारे आसने बदलून व स्वरोच्चार पालटून हे ईशस्मरण केले जाते. हा प्रकार काहीसा योगासनांसारखाच आहे. [डि. इ.]

जिजाबाई (१५९५ – १६७४ इ. स.) शहाजीराजे यांची पत्नी व शिवाजीमहाराजांची आई. विदर्भातील सिंदखेडराजा येथे जिजाबाईचा जन्म झाला. गिरजाबाई आणि लखुजी जाधव हे तिचे आई-बाप होत. जिजाबाईला रामायण-महाभारत व पुराणे यांतील कथा अतिशय आवडत असत. इ. स. १६०५ मध्ये शहाजी भोसले आणि जिजाबाई यांचा विवाह झाला.

गङ्गेव गुणगम्भीरा व्यराजत महोदधिम् ।
(शिवभारत २.४५)

अर्थ – गुणगंभीर अशी गंगा समुद्राला शोभून दिसते (तशी जिजाबाई शहाजीला शोभली).

जाधव आणि भोसले या घराण्यांची सोयरीक जुळली खरी; पण मने मात्र जुळली नाहीत. त्यामुळे जिजाबाईला फार वाईट वाटे. एका अकल्पित प्रसंगी जाधव व भोसले या घराण्यांत तर युद्धही जुंपले. महाराष्ट्रात आणि सर्वत्र मोंगल आणि विजापूरचे सुलतान यांनी धुमाकूळ घातला असता मराठ्यांनी आपापसात संघर्ष करावे, ही कल्पनाच जिजाबाईला असह्य होई. मराठ्यांच्या संसाराची, प्रदेशांची आणि तीर्थक्षेत्रांची दैना पाहून जिजाबाईच्या हृदयाला पीळ पडे. तिला परदास्याची कल्पनासुद्धा सोसवत नव्हती.

पुण्यात राहाण्यासाठी आल्यावर तिने कसब्यात गणपतीची स्थापना केली व जोगेश्वरी आणि केदारेश्वर यांचा जीर्णोद्धार केला. जिजाबाई शिवाजीच्या मनावर सतत एक गोष्ट बिंबवीत राहिली, ती ही की ‘ हे आमचे राज्य नाही. इथे लोक कंगाल होत आहेत, देवळे पाडली जात आहेत, गावे बेचिराख होत आहेत, बायाबापड्यांची अब्रू लुटली जात आहे, गोरगरिबांना वाली उरलेला नाही. शिवबा, तू मोठा हो, यांचा पालनवाला हो.’

तत्कालीन राजकारणात आणि समाजकारणात जिजाबाई सतत लक्ष घालीत होती. जाती-जमातीत व घराण्याघराण्यात होणारे अनेक तंटे तिने जातीने सोडवले होते. न्यायनिवाड्याच्या बाबतीत ती निःपक्षपाती होती. संतमहंतांचा आणि विद्वानांचा ती योग्य परामर्श घेत असे. ती धर्मनिष्ठ होती, पण तिच्या ठायी अंधविश्वास नव्हता.

अफजलखानाचे संकट व सिद्दी जोहरने पन्हाळ्याला दिलेला वेढा हे जिजाबाईच्या जीवनातील अतिशय कसोटीचे प्रसंग होत. जिजाबाईचें पाच पुत्र मृत्युमुखी पडले होते. एकटा शिवाजी जगला आणि त्याच्यावरही हे अफजलखानाचे संकट ! पण अशाही स्थितीत मन कठोर करून तिने शिवाजीला आशीर्वाद दिला, ‘ शिवबा, तू विजयी होशील...... ’

पन्हाळ्याच्या वेढ्यात अडकलेल्या शिवाजीला मुक्त करण्यासाठी ती स्वतःच युद्धावर निघाली होती, पण नेताजी पालकराने तिला त्या गोष्टीपासून परावृत्त केले. या प्रसंगात तिची

पुत्रप्रेमाची आर्तता आणि विलक्षण आवेश या गोष्टी दिसून येतात.

इ. स. १६६४ साली होदिगिरीच्या अरण्यात शहाजीराजाला अपघात झाला आणि तो निवर्तला. हा वज्राघात झेलून ती सती जायला निघाली होती, पण शिवाजीने तिची विनवणी करून तिला त्या कृत्यापासून परावृत्त केले.

शिवाजीने जिजाबाईची सुवर्णतुला केली. त्यानंतर ते सुवर्ण तिने गोरगरिबांना वाटून टाकले. रायगडावर शिवाजी महाराजांचा राज्याभिषेक झाला. तो सोहळा पाहून तिच्या डोळ्यांचे पारणे फिटले. रायगडावरील हवा सोसत नसल्यामुळे रायगडाच्या वाटेवरील पाचाड येथे जिजाबाई येऊन राहिली होती. राज्याभिषेकानंतर केवळ बाराच दिवसांनी जिजाबाईने देह ठेवला. तिथे तिची समाधी आहे.



जिजाबाईची समाधी – पाचाड

जिजाबाईच्या अंगी अनेक चांगले गुण होते. ती कर्तबगार आणि धीरगंभीर होती. म्हणूनच शिवाजीने आग्र्याला जाताना सर्व राज्यकारभार तिच्या स्वाधीन केला होता.

जिजाबाई ही शिवाजीची केवळ माताच नव्हे; तर प्रेरक शक्तीही होती. [म. ज्ञा. को.; म. रि.; रा. शि.; रा. जि.]

जिड बोंगा मुंड जमातीचा पिशाचदेव. या जमातीत पूर्वी नरबलीची चाल होती व आजही तुरळक प्रमाणात ती आहे, असे म्हणतात. नदीला बांध घालायचा असेल, वास्तूची उभारणी करायची असेल किंवा विहीर खोदायची असेल, तर अशा वेळी शकुनप्रश्न पाहण्याची व देवतांच्या संतोषासाठी त्या त्या देवाला काय हवे ते विचारण्याची त्यांच्यांत प्रथा आहे. लोकांनी विचारणा केल्यावर तो देव नरबली हवा असल्याचे स्वप्नात अगर कुणाच्या तरी अंगात येऊन सांगतो. अशा प्रकारे बळी दिलेला मनुष्य जिड बोंगा बनतो अशी समजूत आहे. त्याला बळी देणाऱ्या माणसांनी या जिड बोंगाची आमरण उपासना करायची असते. त्यात त्यांनी चुकारपणा केला, तर त्यांना हालअपेष्टा भोगाव्या लागतात. [एन्सा. मुं.]

जिताष्टमी आश्विन वद्य अष्टमीला हे नाव आहे. या दिवशी बंगाली स्त्रिया पुत्रप्राप्तीसाठी हे व्रत करतात. व्रताची कथा अशी—

एक राजा होता. त्याला बरेच दिवस मूलबाळ नव्हते. त्याने मूल व्हावे म्हणून बरेच उपाय केले. तरीही त्याला मूल झाले नाही. एके दिवशी त्याच्या राणीला स्वप्न पडले, की एका तळचात एक केळीचे व एक बेलाचे झाड लावून त्यांची पूजा केल्यास पुत्रप्राप्ती होईल. राणीने ती झाडे लावून त्याची पूजा केली व वद्य अष्टमीला ती उपास करू लागली. त्यामुळे तिला पुत्रप्राप्ती झाली. पुढे राणीच्या सुनेने या व्रताची थट्टा केली, म्हणून तिची मुले लहानपणीच मरू लागली. शेवटी सुनेला पश्चात्ताप झाला व सासूच्या सांगण्याप्रमाणे तिने हे व्रत केले. त्यामुळे तिची मुले जगू लागली. [हिं. हॉ. से.]

जितेंद्रिय (इ. स. चे ११ वे शतक) धर्मशास्त्रावर ग्रंथ लिहिणारा एक बंगाली लेखक. जीमूतवाहनाच्या कालविवेक या ग्रंथात व रघुनंदनाच्या दायतत्त्व या ग्रंथात जितेंद्रियाचे उल्लेख आढळतात. व्यवहार व वारसा यांच्याविषयीची जितेंद्रियाची काही मते अशी आहेत—

(१) एखाद्याने दुसऱ्याचे सोने, ते लोखंड आहे या समजुतीने घेतले किंवा ते सोने स्वतःचेच आहे, या प्रामाणिक समजुतीने घेतले, तर तो इसम अपराधी ठरत नाही. (२) मयताची स्त्री ही त्याच्या संपत्तीची वारसदार होते. मग तो इसम एकत्र कुटुंबातील असो वा विभक्त असो. (३) एकत्र कुटुंबातील एखाद्या इसमाने त्या एकत्र कुटुंबाची सामाईक साधने न वापरता जी संपत्ती मिळवलेली असते, ती त्याच्या मालकीची समजावी. (४) कन्येनंतर कन्येच्या पुत्राला वारसा हक्क प्राप्त होतो.

जितेंद्रियाची न्यायालयीन कार्यपद्धतीवरची मते जीमूतवाहनाने दिली आहेत. [हिं. ध.; म. च. को.]

जिन जैन धर्मात केवली अवस्थेला पोचलेल्या व्यक्तीला जिन म्हणतात. 'जयति रागद्वेषमोहरूपानन्तरङ्गान् रिपूनिति जिनः।' (= जो राग-द्वेष-मोह-रूपी अंतरंगशत्रूंना जिंकतो, तो जिन होय), अशी जिन शब्दाची व्याख्या आवश्यक मलयगिरी नामक ग्रंथात (प्रथम खंड) दिलेली आहे. वर्धमान महावीराने षड्विकारांवर विजय प्राप्त केल्यामुळे त्याला जिन अशी पदवी लाभली आणि त्यांने पुरस्कारलेल्या धर्माला जैन धर्म अशी संज्ञा प्राप्त झाली. तीर्थंकर, अर्हत्, सिद्ध आणि जिन हे सर्व पर्यायवाचक शब्द आहेत. चौवीस तीर्थंकरांना चौवीस जिन असेही म्हणतात. जैन धर्मात ईश्वरकल्पना नसल्यामुळे जिन हेच जैनांचे पूजाविषय बनलेले आहेत. पाहा— तीर्थंकर. [अभि. रा.]

जिनगर एक जात. हे लोक घोड्यावर घालण्यासाठी लागणारे जीन (खोगीर) तयार करतात, म्हणून यांना जिनगर असे म्हणतात. ही जात प्रामुख्याने महाराष्ट्रात आढळते. यांच्यात करजगार किंवा कारंजकर म्हणून एक वर्ग आहे. त्या वर्गातील लोक कातड्याचे काम करीत नाहीत. जिनगरांत चित्रकार, सुतार, लोहार, इ. वर्गही आहेत. जिनगर लोक स्वतःला आर्य सोमवंशी क्षत्रिय म्हणवतात. या लोकांच्या उत्पत्तीबद्दल ब्रह्मांड पुराणात एक कथा आहे, ती अशी—

एकदा बृहदारण्यात देव आणि ऋषी मिळून यज्ञ करीत होते. जनुमंडल नावाचा एक राक्षस त्या यज्ञात विघ्ने आणू लागला. तेव्हा देव व ऋषी मिळून शिवाकडे गेले. शिवाने आपल्या घर्मबिंदूपासून मुक्तादेव नामक एक पुरुष उत्पन्न केला. या मुक्तादेवाने जनुमंडलाचा पराभव केला. यामुळे देव आणि ऋषी मुक्तादेवावर प्रसन्न झाले व त्यांनी त्याला आपला राजा बनवले. पुढे दुर्वास ऋषीची मुलगी प्रभावती हिच्याशी मुक्तादेवाचा विवाह झाला. या जोडप्याला आठ मुले झाली. मुक्तादेवाने या मुलांवर राज्याचा कारभार सोपवला व तो अरण्यात जाऊन तप करू लागला. इकडे सत्तामदाने धुंद झालेल्या त्या आठ मुलांनी लोमहर्ष ऋषीचा वध केला. मरतेसमयी लोमहर्षाने त्यांना शाप दिला, की 'तुमची राजसत्ता नष्ट होईल, तुमचा वेदोक्त कर्मांचा हक्क नष्ट होईल व तुम्ही दुःखाने भटकत राहाल.' मुक्तादेवाला ही हकीकत समजल्यावर त्याने शिवाची करुणा भाकली. शिवाने उःशाप म्हणून त्याच्या मुलांना वेदोक्त कर्मांचा अधिकार दिला. पुढे हे आठही पुत्र चित्रकार, सुवर्णकार, शिल्पकार, विणकरी, पटवेकरी, लोहार, कुंभार व तांबट या नावांनी ओळखले जाऊ लागले.

जिनगरांची आठ गोत्रे असल्याचे सांगतात; पण त्यांपैकी पुढील सहाच ज्ञात आहेत—(१) भरद्वाज, (२) गौतम, (३) अंगिरस, (४) कण्व (५) कौंडिण्य व (६) वासिष्ठ.

यांच्यांत पोटशाखा नाहीत. चव्हाण, डेंगळे, जाधव, मळोदकर, कांवळे, नवगिरे, पवार, अशी यांची आडनावे आहेत.

हे लोक वैष्णवपंथी असून ते गणपती, विठोबा, खंडोबा व भवानी यांनाही भजतात.

विवाहप्रथा – जिनगर लोक मामेबहिणीशी लग्न करतात. मुलीचे लग्न बारा वर्षांच्या आत करण्याचा पूर्वी रिवाज होता. मुलगा मात्र तीस वर्षांपर्यंत लग्नाविना राहिला, तरी चालत असे. लग्न जमल्यावर प्रथम साखरपुडा करतात. या वेळी वरपिता वधूच्या गळ्यात पुतळ्यांची माळ घालतो. हा समारंभ झाल्यानंतर पुन्हा एकदा एका वर्षाने साखरपुड्याचा वा मागणीचा समारंभ होतो. या वेळी वरपिता वधूला साडीचोळी देतो व वधूपिता वराची शेलापागोटे देऊन पूजा करतो. लग्नाच्या तिथीपूर्वी एक आठवडा पत्रिका पाहाण्याचा कार्यक्रम होतो. यांचे बाकी सारे लग्नविधी दक्षिणी ब्राह्मणांप्रमाणे असतात. ब्राह्मण यांचे पौरोहित्य करतात.

प्रसूतिप्रथा – मूल जन्मल्यावर पाचव्या दिवशी त्याला कापडात गुंडाळून जमिनीवर ठेवतात. या दिवशी प्रथमच स्नान करून आई त्या मुलाला उचलते. याच दिवशी सटवीची पूजा करतात. मूल पाच महिन्यांचे होईपर्यंत त्याला त्याच्या जन्मवारी स्नान घालीत नाहीत. मुलगी नवसाची असेल, तर मुलाप्रमाणे तिचेही जावळ करतात.

मर्तिकप्रथा – मृतांना जाळतात. और्ध्वदेहिक करणारा चितेच्या पूर्वेस सात, पश्चिमेला तेरा, दक्षिणेला पाच, उत्तरेला नऊ आणि मध्यभागी तीन असे तांदळाचे लहान लहान पुंज घालतो.

तमिळनाडमध्येही काही जिनगर आहेत. यांची विशेष वस्ती चंद्रगिरी तालुक्यात आहे. तिथे हे चित्रे रंगविण्याचे काम करतात. हे मूळचे राझू असून, चंद्रगिरीच्या राजाच्या पदरी नोकरीसाठी आले होते. राजाच्या पदरी चाकरीस असलेल्या कमाल जातींच्या नोकरांवर नजर ठेवण्याचे काम राजाने यांना दिले होते. पुढे ते खोगीर वगैरे करण्याचा धंदा करू लागले. बल्लारी जिल्ह्यातले जिनगर लोक लाकडावर खोदकाम करतात व नेलोर जिल्ह्यातले लाकडी खेळणी बनवतात. [म. ज्ञा. को.; मुं. इ. जा.; पूना गॅझे.]

जिनगुणसंपत्तिव्रत एक जैनव्रत. यात ६३ उपवास, जिनपूजा, अभिषेक, 'ओं ऱ्हीं अर्हत्परमेष्ठिने नमः' या मंत्राचा जप, इ. गोष्टी करायच्या असतात.

याचे बृहत्, मध्यम व लघू असे तीन प्रकार आहेत. बृहद्व्रतात ६३ व मध्यमव्रतात ३६ उपवास असतात. लघुव्रतात ६३ एकभुक्ते असतात. या व्रताची कथा अशी—

पाटलीपुत्र नगरात नागदत्त नावाचा एक श्रेष्ठी व त्याची सुमती नावाची पत्नी राहत होती. काही कारणाने नागदत्त निर्धन झाला होता. त्या दंपतीला लाकडे विकून निर्वाह करावा लागत होता. एक दिवस सुमती लाकडे तोडण्यासाठी जंगलात गेली असता पिहितास्रव नामक एका केवलीचे तिला दर्शन झाले. तिने त्याला आपल्या दारिद्र्याचे कारण विचारले. त्यावर त्या मुनीने तिला सांगितले, की ' जन्मांतरी तुमच्या हातून मुनिर्निंदा घडल्यामुळे तुम्हाला दारिद्र्य आले आहे.' त्या दोषाच्या निष्कृतीसाठी जिनगुणसंपत्तिव्रत करण्याचा त्याने उपदेश केला. त्या दंपतीने ते व्रत केले. त्या व्रताच्या प्रभावाने नागदत्त पुढील जन्मी श्रेयांस नावाचा राजा झाला. त्याने आदिनाथाला आहारदान करून मोठे तप केले व त्या तपाच्या प्रभावाने त्याला केवल ज्ञान लाभले.

व्रताचे फल– धनधान्य स्वर्गापवर्ग व मोक्ष यांची प्राप्ती. [व्र. ति. नि.; जै. व्र. वि. सं.]

जिनदत्तसूरी (१०७५– ११५३ इ. स.) एक जैन ग्रंथकार व कवी. याने चर्चरी, कालस्वरूपकुलकम्, आणि उपदेशरसायनरास अशी तीन काव्ये लिहिली आहेत. ती अपभ्रंश भाषेत आहेत. उपदेशरसायनरास या ग्रंथात सद्गुरुवर्णन आहे.

याचे मूळ नाव सोमचंद्र असे होते. याच्या पित्याचे नाव वाच्छिगमंत्री व आईचे नाव बाहडदेवी. हा द्रविडगोत्री होता. याने संस्कृत व प्राकृत भाषांतही ग्रंथ लिहिले आहेत. जिनवल्लभसूरीचा हा शिष्य होय. गुरूच्या मृत्यूनंतर याला सूरिपद व जिनदत्त हे नाव मिळाले. याने ठिकठिकाणी हिंडून धर्मोपदेश केला व अंती अजमीर येथे अनशन व्रत करून देहत्याग केला. [म. च. को.; हिं. जै. भ. क.; अ. सा.]

जिनपूजापुरंदरव्रत एक जैनव्रत. हे कोणत्याही महिन्याच्या शुद्ध प्रतिपदेपासून अष्टमीपर्यंत केले जाते. यात आठ उपवास असतात. फल– सर्व प्रकारच्या सिद्धींची प्राप्ती [व्र. ति. नि.; जै. व्र. वि. सं.]

जिनपूजाविधानव्रत एक जैनव्रत. विधिपूर्वक अष्टद्रव्यांनी जिनपूजा करून मग आहार ग्रहण करणे, असे याचे विधान आहे. [व्र. ति. नि.]

जिनप्रभसूरी (इ. स. चे १३ वे व १४ वे शतक.) एक जैन आचार्य व ग्रंथकार. हा रुद्रपल्लीय गच्छातला होता. दिल्लीचा सुलतान मुहंमद तुघलक याच्या दरबारात याला मानाचे स्थान प्राप्त झाले होते.

याने चतुर्विंशतिजैनस्तुती व इतर अनेक काव्ये रचली आहेत. विविधतीर्थकल्प हा याचा ग्रंथ विशेष प्रसिद्ध आहे. त्यात अनेक जैन तीर्थक्षेत्रांची माहिती दिली आहे. गुजरात, राजस्थान, माळवा, पंजाब, उ. प्रदेश, मध्य प्रदेश, बिहार, आंध्र, कर्नाटक, इ. प्रदेशांतील तीर्थांची यात्रा करून त्याने त्यांची माहिती मिळवली व ग्रंथ रचला. हा ग्रंथ गद्यपद्यमय अशा संस्कृत व प्राकृत भाषेत रचलेला आहे.

विधिमार्गप्रपा हा आणखी एक जिनप्रभसूरीचा ग्रंथ होय. त्यात श्रमण व श्रावक यांच्या नित्यनैमित्तिक क्रियाकलापांचे विधि-विधान वर्णिले आहे. नंदिषेणकृत अजितशांतिस्तव या ग्रंथावर जिनप्रभसूरीने टीका लिहिली असून, याव्यतिरिक्त याचे आणखीही काही ग्रंथ आहेत. [म. च. को.; प्रा. सा. इ.]

जिनमित्र (इ. स. चे ११ वे शतक) एक बौद्ध तर्कपंडित. हा काश्मीरचा रहिवासी होता. याने तर्कशास्त्रावर न्यायबिंदुपिंडार्थ नामक ग्रंथ लिहिला असून, त्यात धर्मकीर्तीच्या न्यायबिंदूचे विवरण केले आहे. या ग्रंथाची मूळ संस्कृत प्रत उपलब्ध नाही; पण त्याचे तिबेटी भाषांतर मात्र उपलब्ध आहे.

याने सर्वज्ञदेव, दानशील, इ. विद्वानांच्या सहकार्याने काही संस्कृत ग्रंथांचे तिबेटी भाषेत भाषांतर केले आहे. त्यासाठी हा तिबेटात गेला होता. [म. च. को.]

जिनमुखावलोकन एक जैनव्रत. भाद्रपद कृ. प्रतिपदेपासून आश्विन कृ. प्रतिपदेपर्यंत रोज पहाटे उठून सर्वप्रथम जिनेंद्रमूर्तीचे दर्शन करणे, असा याचा विधी आहे. [जै. व्र. वि. सं.; व्र. ति. नि.]

जिनरंगसूरी (इ. स. चे १७ वे शतक) एक जैन कवी. याचे मूळ नाव रंगविजय असे असून, श्रीमाळ जातीच्या सिंधूड वंशात हा जन्मला. रंगविजय रूपवान होता, तसाच प्रतिभावानही होता. त्याने इ. स. १६२१ मध्ये जैसलमीर येथे जिनराजसूरीकडून दीक्षा घेतली आणि जिनरंगसूरी ' असे नवे नाव धारण केले.

जिनरंगाने सौभाग्यपंचमी चौपई, प्रबोधबावनी, रंगबहत्तरी इ. अनेक काव्यग्रंथ लिहिले आहेत. आपल्या काव्यात नीती, धर्म, अध्यात्म व भक्ती यांविषयी विचार मांडले आहेत.

त्याची बहुतेक रचना दोहा वृत्तात आहे. माणसाच्या हव्यासी वृत्तीसंबंधी त्याच्या कवितेचे एक उदाहरण असे--

अपना भार न उठ सकै, और लेत पुनि सीस ।
सो पेडै क्यों पहुंच है, जपि जिनरंग जगदीश ।।

भावार्थ -- या माणसाला स्वतःच्या जीवाचाच भार उचलत नाही आणि हा नवीन ओझे शिरावर घेतो आहे. अशा स्थितीत आपल्या अंतिम मुक्कामाप्रत हा कसा जाणार ? एकच उपाय आहे. त्याने जगदीशाचे ध्यान-पूजन करावे.

जिनरंगाची विचारसरणी सहिष्णू वृत्तीची आहे. शैव, जैन, मुस्लिम, इ. धर्मांपैकी कोणत्याही धर्माचे पालन करून मोक्षाला जाता येते, असे तो सांगतो. [हिं. जै. म. क.]

जिनरात्रिव्रत एक जैनव्रत. फाल्गुन वद्य प्रतिपदेस आरंभ करून चतुर्दशीपर्यंत हे करायचे असते. यात एक दिवस उपवास व एक दिवस पारणा करतात. प्रत्येक प्रहराला जिनदर्शन व रात्री जागरण करतात. व्रतावधी नऊ किंवा चौदा वर्षे. [जै. व्र. वि. सं.; व्र. ति. नि.]

जिनवल्लभसूरी (इ. स. चे ११ वे शतक) एक जैन आचार्य व ग्रंथकार. याचे वास्तव्य चितोड येथे होते. हा जिनेश्वरसूरीचा शिष्य होय. अभयदेवसूरीलाही याने गुरू मानले होते. याने पिंडविशुद्धिप्रकरण, सार्धशतक (सूक्ष्मार्थ सिद्धांत विचारसार), द्वादशकुलक, लघुअजितसंतिथव, षडशीती, इ. अनेक ग्रंथ रचले आहेत. हा व्याकरण, महाकाव्य, अलंकार, नाट्य, साहित्य, ज्योतिष व न्याय या शास्त्रांचा महान पंडित होता. [म. च. को.; प्रा. सा. इ.; भा. सं. जै. यो.]

जिनसेन (१) (इ. स. चे ८ वे शतक) एक जैन कवी. याने हरिवंश पुराण रचले. हा पुन्नाट संघाचा (कर्नाटक जैन पंथाचा) आचार्य होता. याच्या गुरूचे नाव कीर्तिषेण असे होते. जिनसेन याने हरिवंश पुराणाची रचना सौराष्ट्रातील वर्धमानपूर (वढवाण) येथे केली. [जै. सा. इ.]

(२) (इ. स. चे ९ वे शतक) एक जैन आचार्य व कवी. हा वीरसेनाचा शिष्य होय. हा स्वतःला अविद्धकर्ण म्हणवून घेतो. त्यावरून त्याने बालपणीच जिनदिक्षा घेतल्याचे कळते. राष्ट्रकूट वंशातला राजा अमोघवर्ष याच्या दरबारात हा राजपंडित होता. याने पार्श्वाभ्युदय आणि आदिपुराण नावाचे दोन ग्रंथ लिहिले. पार्श्वाभ्युदय हे मेघदूताच्या धर्तीचे खंडकाव्य आहे. त्यात पार्श्वनाथाचे चरित्र वर्णिले आहे. हे काव्य मंदाक्रांता वृत्तात असून, त्याचे ३३४ श्लोक आहेत. याचे वैशिष्ट्य हे, की मेघदूतातला एकेक चरण जसाच्या तसा घेऊन व त्याच्या जोडीला स्वतःचे तीन चरण रचून कवीने प्रत्येक श्लोक पूर्ण केला आहे. त्यामुळे सगळेच्या सगळे मेघदूत निराळ्या पद्धतीने प्रस्तुत काव्यात ग्रथित झाले आहे. मेघदूताच्या प्रत्येक श्लोकाचा अंतिम चरण घेऊन अनेक कवींनी आपली काव्ये सजवली; पण समग्र मेघदूताचा अशा प्रकारे उपयोग करून घेणारा जिनसेन हा एकटाच कवी होय. जिनसेनाची ही रचना सरस-सुंदर झाल्यामुळे रसिकांना प्रिय झाली आहे.

प्रस्तुत पार्श्वाभ्युदय काव्याचा पहिला श्लोक असा --

श्रीमन्मूर्त्या मरकतमयस्तम्भलक्ष्मीं वहन्त्या
योगैकाग्र्यस्तिमिततरया तस्थिवांसं निदध्यौ ।
पार्श्वं दैत्यो नभसि विहरन्बद्धवैरेण दग्धः
कश्चित्कान्ताविरहगुरुणा स्वाधिकारात् प्रमत्तः ।।

अर्थ - मरकतमयस्तंभाची शोभा धारण करणाऱ्या कांतियुक्त व योगाच्या एकाग्रतेमुळे अत्यंत स्तब्ध असलेल्या अशा श्रीमूर्तीने राहणाऱ्या पार्श्वनाथाला आकाशात विहार करणाऱ्या, भार्येच्या विरहामुळे वाढलेल्या वैराने जळणाऱ्या व स्वतःच्या महत्त्वापासून प्रमत्त झालेल्या (शंबर नामक) असुराने पाहिले.

या श्लोकातील चौथा चरण हा मेघदूताच्या प्रथम श्लोकाचा प्रथम चरण आहे.

वरील श्लोकात उल्लेखलेला असुर प्रस्तुत काव्याच्या शेवटी पार्श्वनाथाची पुढीलप्रमाणे प्रार्थना करतो ---

यत्त्वन्मौढ्याद् बहु विलसितं न्यायमुल्लङ्घ्य वाचां
तन्मे मिथ्या भवतु च मुने दुष्कृतं निन्दितस्वम् ।
भक्त्या पादौ जिन विनमतः पार्श्व मे तत्प्रसादात्
मा भूदेवं क्षणमपि सखे विद्युता विप्रयोगः ।।

अर्थ - हे मुने, तुझ्याविषयीच्या अज्ञानामुळे नयमार्गाचे उल्लंघन करून मी जो वाणीचा बहुत विलास केला, ते माझे आत्म्याची निंदा करणारे दुष्कृत मिथ्या होवो ! हे जिना, मित्रा पार्श्वनाथा, भक्तीने चरणांच्या ठिकाणी नम्र झालेल्या माझा, त्या चरणांच्या प्रसादामुळे सम्यग ज्ञानापासून क्षणभरही अशा प्रकारे वियोग न होवो.

या श्लोकातील चौथा चरण हा मेघदूताचा अंतिम चरण आहे. कालिदासाचे मेघदूत हे विप्रलंभ शृंगारात्मक आहे, पण जिनसेनाने मात्र आपल्या काव्यात रौद्र, वीर व शांत हे रसही उत्पन्न केले आहेत.

त्रिषष्टिशलाकापुरुषांची चरित्रे लिहिण्याच्या उद्देशाने याने महापुराण रचण्यास आरंभ केला होता. पण त्याचा आदिपुराण हा प्रथम भाग लिहितानाच तो मरण पावला. मग त्याचा शिष्य गुणभद्र याने त्या महापुराणाचा दुसरा भाग उत्तर पुराण

नावाने लिहून ते पूर्ण केले. वीरसेनाप्रमाणे जिनसेन हाही महाविद्वान होता. वीरसेनाचा जयधवला हा टीकाग्रंथ याने पूर्ण केला. [जै. ध.; जै. सा. इ.; जै. सि. भा.– सप्टें. १९३५]

जिनेंद रिझावन एक जैन नृत्य. हे नृत्य दिगंबर जैनांच्या मंदिरांत भाद्रपद महिन्यातील दस च्छिनी (दश लक्षणी) नामक उत्सवाच्या निमित्ताने होते. हे मूकनृत्य आहे. अनंत चतुर्दशीला महावीराच्या मूर्तीपुढे एक एक मनुष्य येऊन हे नृत्य करतो. नृत्यसमयी नर्तक डोक्याला पगडी किंवा टोपी घालतो व कमरेला केशरी शेला गुंडाळतो. आणि नाचताना महावीराच्या मूर्तीकडे तोंड करून तो मूर्तीवर आपली नजर स्थिर ठेवतो. [क्रु. जी. व्र. श.]

जिनेश्वरसूरी (इ. स. चे ११ वे शतक.) एक प्रसिद्ध जैन आचार्य. याचा जन्म वाराणसी येथील एका ब्राह्मण कुळात झाला होता. याचे मूळ नाव श्रीधर होते. याच्या लहान भावाचे नाव श्रीपती. दोघे भाऊ अत्यंत बुद्धिमान होते. श्रुति-स्मृती, इतिहास, पुराणे इत्यादी अध्ययन पूर्ण झाल्यानंतर ते धारानगरीला गेले. तिथे त्यांची न वर्धमानाचार्यांची भेट झाली. या दोघा युवकांची सुलक्षणी देहरचना आणि प्रखर बुद्धिमत्ता पाहून आचार्य प्रसन्न झाले. त्यांनी श्रीधर व श्रीपती यांना जैन धर्माची महती सांगून त्यांना यतिधर्माची दीक्षा दिली. नंतर त्यांनी जैन धर्मशास्त्राचा सखोल अभ्यास केला. त्यांची अलौकिक विद्वत्ता पाहून वर्धमानाचार्यांनी श्रीधराला जिनेश्वरसूरी व श्रीपतीला बुद्धिसागरसूरी अशी नावे दिली.

त्यानंतर गुरूच्या आज्ञेवरून हे दोघे बंधू जैन धर्माचा प्रसार करण्यासाठी संचाराला निघाले. गुजरातमधील अणहिलपाटण येथे त्या वेळी जैन धर्माचे एक मोठे केंद्र होते. तिथे शेकडो जैन चैत्यगृहे व मठ असून, त्यांत हजारो श्वेतांबर जैन यती कायमची वसती करून राहत होते. शेती, व्यापार, राजकारण, इ. सर्व क्षेत्रांत त्यांनी प्रभुत्व मिळवले होते. पण एका ठिकाणी दीर्घ काल वास्तव्य करून राहणे, हे जैन धर्मशास्त्राच्या विरुद्ध होते. शिवाय त्यांच्या आचरणातही फार शिथिलता आली होती. ते अत्यंत अहंकारी बनले होते.

जिनेश्वर व बुद्धिसागर हे दोघे अणहिलपाटणाला गेले व त्यांनी या चैत्यवासी जैनांच्या विरुद्ध आंदोलन करण्यासाठी एक नवीन गण स्थापला. चौलुक्यनृपती दुर्लभराज याच्या राजसभेत चैत्यवासी जैनांचा नेता महापंडित सूराचार्य याचे फार प्रस्थ होते. जिनेश्वरसूरीने त्याच्याशी शास्त्रार्थ करून त्यात त्याचा पराभव केला. त्यामुळे त्याच्या पक्षाचे अनेक जैन आचार्य जिनेश्वराच्या पक्षाला मिळाले. चैत्यवासी यतिजनांचा अहंकार व धनलोभ नष्ट करून, त्यांना भ्रमणशील व तपोनिष्ठ बनवण्याचे महत्कार्य जिनेश्वराने व त्याच्या शिष्यांनी पार पाडले. त्यामुळे त्या भागातल्या श्वेतांबर जैन समाजात एक नवीन युग सुरू झाले, असे म्हणतात.

कथाकोषप्रकरण हा जिनेश्वरसूरीचा ग्रंथ असल्याचे सांगतात. सदर ग्रंथ म्हणजे कथांचे एक भांडारच आहे. त्यात प्राचीन जैन कथांचा संग्रह आहे. त्याचप्रमाणे जिनेश्वरसूरीने स्वतः रचलेल्या काही कथाही त्यात समाविष्ट आहेत. जिनपूजा, साधुदान व जैनधर्ममाहात्म्य यांचे प्रतिपादन करण्यासाठी या सर्व कथा रचलेल्या आहेत. याने आणखी अनेक संस्कृत व प्राकृत ग्रंथ रचले आहेत. त्यांतील पंचलिंगीप्रकरण, वीरचरित्र, निर्वाणलीलावती कथा व हरिभद्रकृत अष्टकावर केलेली वृत्ती हे ग्रंथ प्रमुख आहेत. निर्वाणलीलावती कथा हा कथासंग्रह प्राकृत होता. पण तो उपलब्ध नाही. त्याचे संस्कृत श्लोकबद्ध भाषांतर मात्र उपलब्ध आहे. [क. को. प्र.; प्रा. सा. इ.]

ज़ियारत मक्केसारख्या पवित्र क्षेत्राची यात्रा करणे किंवा मुस्लिम साधुपुरुषांच्या कबरींना भेट देणे असा या शब्दाचा अर्थ आहे. अशा पवित्र स्थानांना ज़ियारतगाह म्हणतात. मक्केची यात्रा करून आलेला मनुष्य वाटेत मेला, तर त्याच्या थडग्यावर लहानसे छप्पर घालून, तिथे पाणपोई सुरू करतात. अशा स्थळांना देखील ज़ियारतचे महत्त्व प्राप्त होते आणि भाविक मुसलमान तिथे जाऊन आपले नवस फेडतात. तिथे वास्तव्य केल्याने रोग बरे होतात, अशीही त्यांची श्रद्धा असते. मृतात्म्याच्या द्वारा परमेश्वराची कृपादृष्टी स्वतःकडे वळवून घेणे, हा ज़ियारतच्या मुळाशी हेतू असतो. [डि. इ.]

जिवती जीवंतिकाव्रत पाहा.

जिहाद इस्लामच्या प्रचारासाठी काफिरांशी केलेले धर्मयुद्ध. प्रत्येक मुसलमानाचे हे धार्मिक कर्तव्य होय, असे कुराणात व अहादीसमध्ये सांगितले आहे. सूफी पंडितांच्या मते जिहादचे दोन प्रकार आहेत–(१) अल्–जिहादुल्–अकबर= स्वतःच्या विकारवासनांशी संग्राम व (२) अल्–जिहादुल्–असघर = परधर्मियांशी संग्राम. यांतील पहिल्या प्रकारचा, संग्राम अधिक अवघड व महत्त्वाचा मानला जातो.

काही पंडितांच्या मते जिहादचा मूळ अर्थ परिश्रम, उद्योग किंवा सामान्य संघर्ष असा आहे. पैगंबराला स्वसंरक्षणार्थ शस्त्र उचलावे लागले, तेव्हा त्या धार्मिक संघर्षाला जिहाद हे नाव

प्राप्त झाले. तथापि त्यातही वाणी व तलवार या दोन्ही शस्त्रांचा उपयोग अभिप्रेत होता. हज (मक्केची यात्रा)ला जाणे हा सर्वांत श्रेष्ठ जिहाद होय, असे पैगंबराने सांगितले होते. पाहा – इस्लाम. [डि. इ.; सं. चा. अ.]

जीणमाता राजस्थानी लोकांची एक देवता. हिचे स्थान जयपूर भागातील सीकर जिल्ह्यातल्या खोसा नामक गावाजवळ एका टेकडीवर आहे. हिच्या मंदिराभोवती दाट जंगल आहे. वर्षातून दोन वेळा इथे जत्रा भरते. जवळच यात्रेकरूंना उतरण्यासाठी धर्मशाळा बांधल्या आहेत. देवीची मूर्ती अष्टभुजा असून तिला जयंती असेही म्हणतात. जीणमातेपुढे तिचे भक्त तिच्या चरित्राचे गायन करतात. त्यांच्या गीतांतून तिचे चरित्र उपलब्ध होते, ते असे——

हर्षनाथ आणि जीणकुमारी नामक दोघे भाऊ-बहिण होते. योग्य वेळी भावाचे लग्न झाले; पण जीणकुमारीचे झालें नाही. लग्नानंतर हर्षनाथाच्या बायकोने जीणकुमारीचा छळ सुरू केला. त्यामुळे ती दुःखी होऊन जवळच्या टेकडीवर जाऊन राहिली. तिथे ती दुर्गामातेची सेवा करू लागली. त्यामुळे हर्षनाथ दुःखीकष्टी झाला. त्याने जीणकुमारीकडे येऊन तिची क्षमा मागितली व तिने परत घरी यावे, यासाठी परोपरीने तिला समजावले. पण तिचा निश्चय ढळला नाही. मग हर्षनाथ तिथून परत फिरला. पण तो घरी न जाता नजीकच्याच टेकडीवर जाऊन भैरवनाथाची आराधना करू लागला. कालांतराने त्या दोघांची करुणा येऊन दुर्गामातेने जीणकुमारीला आपल्या स्वरूपात सामावून घेतले व भैरवनाथानेही हर्षनाथाला तसेच सामावून घेतले. [मरुभारती, ऑक्टोबर १९५५]

जीमूतवाहन (इ. स. चे ११ वे शतक) बंगालमधील एक धर्मशास्त्रकार. याचा जन्म तेथील पारिभद्र घराण्यात झाला. बंगालचा राजा विष्वक्सेन याच्या पदरी हा न्यायाधीश होता. त्याने कालविवेक, व्यवहारमातृका (न्यायमातृका) आणि दायभाग असे तीन ग्रंथ लिहिले आहेत. ज्योतिषशास्त्राचीही त्याला बरीच माहिती होती. धार्मिक कृत्ये व संस्कार यांना उचित काल कोणता याचे विवेचन कालविवेक या ग्रंथात त्याने केले आहे. व्यवहारमातृका या ग्रंथात न्यायालयीन कार्यपद्धती व कायद्याचे अष्टादशाधिकार यांचे विवरण आहे. शिवाय याच ग्रंथात न्यायालयांची घटना कशी असावी, त्यांचे वर्गीकरण कसे करावे, इ. गोष्टी त्याने विवेचिल्या आहेत. पुराव्यादाखल प्रत्यक्ष ताबा, कागदपत्र, साक्षी व त्यावरून निघालेली अनुमाने गृहीत धरावी, असे सांगून जीमूतवाहन म्हणतो, की ज्या वेळी यांपैकी काहीही उपलब्ध नसेल, त्या वेळी दिव्य करण्यास सांगावे.

दायभाग या ग्रंथात मालकीहक्क, वाटणी, वारसाहक्क, स्त्रीधन, विधवाविवाह, इ. गोष्टींचा ऊहापोह त्याने केला आहे. तसे करताना सिद्धांत सांगितला आहे तो हा, की शास्त्राचे नियम लोकरूढींवर आधारलेले नसतात. उलट लोकरूढीच शास्त्राचा मागोवा घेत असतात.

याव्यतिरिक्त त्याची काही मते अशी – कोणाही व्यक्तीला आपल्या ताब्यात असणाऱ्या मिळकतीची दुसऱ्या कोणाचीही– स्वपुत्राचीही – संमती न घेता आपल्या स्वतःच्या मर्जीप्रमाणे विल्हेवाट लावण्याचा अधिकार आहे; वारसाहक्कासंबंधी विचार करताना मनुस्मृतीला प्रामाण्य द्यावे. पतीच्या संमतीविना ज्या धनाची स्त्रीला विल्हेवाट लावता येते, त्या धनाला स्त्रीधन असे म्हणावे. स्त्रीधन तिच्या मुलांत व अविवाहित मुलींत सारखेच वाटून द्यावे.

बंगालमधील सर्व न्यायालयांत दायभाग हा ग्रंथ प्रमाणभूत मानला जातो. या ग्रंथावर रघुनंदनाची प्रख्यात टीका आहे. कोलब्रुकने या ग्रंथाचा इंग्रजीत अनुवाद केला आहे. [हि. क. इं. पी.; आ. सं. मू.; म. च. को.]

जीर्णोद्धार मंदिर, मूर्ती, लिंग, इ. वस्तू जीर्ण किंवा भग्न झाल्या असता त्यांची पुनर्निर्मिती करून त्यांवर विधिपूर्वक संस्कार करणे, याला जीर्णोद्धार असे म्हणतात. याचा विधी असा——

चालनविधी – एखाद्या मंदिराचा जीर्णोद्धार कर्तव्य असेल, तर प्रथम त्यातल्या देवतेला अन्यत्र हालवावे लागते. त्या विधीला चालनविधी म्हणतात. यजमान प्रथम संकल्प करतो. मग सोन्या-रुप्याचे पात्र घेऊन ते सुगंधित जलाने भरतो. हालवल्या जाणाऱ्या मूर्तीतल्या देवत्वाला न्यासपूर्वक त्या पात्रजलात आवाहन करतो. देवाला पुष्पांजली वाहून त्याची पुढील श्लोकाने प्रार्थना करतो——

त्वत्प्रसादेन निर्विघ्नं गेहं निर्मापयत्यसौ ।
वासं कुरु सुरश्रेष्ठ तावत्त्वं चाल्पके गृहे ॥

अर्थ – हे देवा, हा यजमान (मी) तुझ्या कृपेने प्रस्तुत मंदिराचा जीर्णोद्धार करू इच्छितो. तेव्हा ते काम पुरे होईपर्यंत तू दुसऱ्या एका लहानशा जागी सुखाने वास्तव्य कर.

मग खोरे, कुदळ, इ. अवजारांच्या ठिकाणी विश्वकर्म्याची पूजा करून त्या अवजारांनी मूर्तीची पीठिका खणतो व मंगलवाद्यांच्या गजरात त्या देवाला पूर्वसंकल्पित जागी नेऊन बसवतो. नंतर वर उल्लेखिलेल्या पात्रातले जल देवाच्या मस्तकावर

ठेवतो. मग ते पात्र नवे मंदिर तयार होईपर्यंत त्या देवाशेजारी किंवा मुकुटाप्रमाणे देवाच्या मस्तकावर ठेवतो. मग दिग्बली देऊन देवपूजा, दक्षिणादान, इ. गोष्टी करून चालनविधी समाप्त करतो.

मंदिराचा जीर्णोद्धार झाल्यावर त्यात देवाची पुनःप्रतिष्ठा करताना पुढीलप्रमाणे विधान करतात–

यजमान प्रथम संकल्प, गणपतिपूजन, आचार्यवरण, इ. गोष्टी करतो. मंदिरावर पंचगव्य प्रोक्षण करून पताका-तोरणे, पुष्पमाला, इत्यादींनी ते मंदिर अलंकृत करतो. मग आचार्य अग्निस्थापना करून होम करतो. तिल हे होमद्रव्य असते. पृथिव्यादी तत्त्वांचे हवन झाल्यावर यजमान त्या तत्त्वांचे प्रतीक असलेल्या त्या खड्गाचे पूजन करून ते खड्ग आचार्याला दान देतो. प्रासादप्रतिष्ठेच्या विधानाप्रमाणे सर्व कृत्ये करून जीर्णोद्धार केलेल्या त्या मंदिरात देवमूर्ती अथवा लिंग जे काही असेल, त्याची प्रतिष्ठा करतो.

मंदिराच्या जीर्णोद्धाराविषयी विष्णुधर्मोत्तर पुराणात सांगितले आहे, ते असे–

ज्या राजाच्या प्रदेशात देवमंदिर जीर्ण किंवा भग्न होते, त्या राजाचे राज्य त्या मंदिराप्रमाणेच मोडकळीस येते. म्हणून राजाने अशा जीर्ण मंदिरांचा तावडतोब उद्धार करावा. पडलेले देवमंदिर परत बांधणे व पडू पाहणाऱ्या मंदिराची डागडुजी करणे, या कृत्यांनी मनुष्याला विष्णुलोक प्राप्त होतो.

याविषयी देवी पुराणात पुढील श्लोक आहे–

मूलाच्छतगुणं पुण्यं प्राप्नुयाज्जीर्णकारकः ।
तस्मात् सर्वप्रयत्नेन जीर्णस्योद्धारमाचरेत् ।।

अर्थ – नवे मंदिर बांधण्यापेक्षा जुन्या मंदिराचा जीर्णोद्धार करण्याने शतगुणित पुण्य लाभते. म्हणून हरप्रयत्नाने भग्न मंदिराचा जीर्णोद्धार करावा.

मूर्ती किंवा लिंग यांचा जीर्णोद्धार – लिंग किंवा प्रतिमा छिन्न, भग्न किंवा चलित झाली असता त्यांचा जीर्णोद्धार करावा, असे सांगितले आहे. शिवलिंग स्वयंभू किंवा एखाद्या सिद्धाने प्रतिष्ठित केलेले असेल, तर त्या ठिकाणी भंगादी दोष निर्माण झाला असला, तरी ते उखडून न काढता त्यावर केवळ महाभिषेक करावा, असे त्रिविक्रमाचे वचन आहे.

जीर्णोद्धारविधीसाठी यजमान प्रथम 'मी अमुक देवतेचा जीर्णोद्धार करीत आहे.' असा संकल्प करून पुण्याहवाचनादी कृत्ये करतो. मग लिंगाच्या ठिकाणी 'ॐ व्यापकेश्वरहृदयाय नमः' याप्रमाणे षडङ्गन्यास करून व इतर देवता असेल, तर तिच्या ठिकाणी मूलमंत्राने षडङ्गन्यास करून पूजा करतो. मग अघोरमंत्राचा १०८ जप करतो. आचार्य अग्निस्थापना करून अघोरमंत्राने घृतयुक्त मोहऱ्यांनी सहस्रहोम करून इंद्रादी देवतांना बलिदान करतो. मग यजमान जीर्णदेवाची प्रणवाने पूजा करून त्याची प्रार्थना करतो. लिंग हलवावयाचे असेल, तर एक हजार संख्येने पायसाचा होम करावा लागतो. एवढे झाल्यावर मग यजमान मंत्रित जलाने अभिषेक करून त्या मूर्तीचे किंवा लिंगाचे विसर्जन करतो. मग कुदळीने ती मूर्ती वा ते लिंग खणून काढतो. शांतीसाठी 'अघोरेभ्यो....' या मंत्राने घृत, दूध व मध यांत भिजवलेल्या तिळांचा सहस्र होम करतो.

लिंग किंवा मूर्ती पाषाणाची असेल, तर ती नदीच्या पात्रात टाकावी. काष्ठमूर्ती असेल, तर मधाने भिजवून तिचे दहन करावे आणि लिंग किंवा मूर्ती सुवर्णादी धातूंची किंवा रत्नाची असेल, तर ती दुरुस्त करून घ्यावी, असे सांगितले आहे. जीर्ण मूर्तीचे अशा प्रकारे विसर्जन झाल्यावर तिच्या जागी नवी मूर्ती निर्माण करून एका महिन्याच्या आत तिची प्रतिष्ठा करतात. ते सर्व कृत्य पुनःप्रतिष्ठा या विधीप्रमाणे करायचे असते. पाहा – देव-प्रासादप्रतिष्ठा. [ऋ. ब्र. क.; नि. सिं.]

जीव भारतीय तत्त्वज्ञानातील एक संज्ञा. जीव अणि आत्मा हे पर्याय शब्द आहेत. वेगवेगळ्या दर्शनांत जीवाच्या निरनिराळ्या व्याख्या केल्या आहेत, त्यांपैकी काही अशा – 'यो घ्राणादीनां करणानां प्रयोक्ता स आत्मा' = घ्राणादी इंद्रियांचा जो प्रयोक्ता तो आत्मा होय (वै. उ. ३. १. २). 'जन्यज्ञानाधिकरणत्वम्' = जन्य ज्ञानाचे अधिकरण (म्हणजे आत्मा होय) (सि. चं.).

प्राचीन काळापासून माणसाने जीवाविषयी विचार केलेला दिसून येतो. उपनिषदांत जीव-ब्रह्म-विचार आढळतो. जीवासंबंधी सर्वांत प्राचीन विचार भूतचैतन्यवाद या स्वरूपात आला आहे. पृथिव्यादी चार भूतांच्या संयोगापासून मानवी शरीर उत्पन्न होते व हे शरीर म्हणजेच आत्मा किंवा जीव होय, असे भूतचैतन्यवाद्यांचे म्हणणे आहे. उपनिषदे, जैन आगम व बौद्ध पिटक यांत या मताचा पूर्वपक्ष म्हणून उल्लेख केलेला आहे. बृहदारण्यकात विज्ञानघन चैतन्य हे भूतांपासून उत्पन्न होते व त्यांतच विलीन होते, असा पूर्वपक्ष मांडला असून, पुढे त्याचे खंडन केले आहे. बौद्ध पिटकात अजित केशकंबलीचे मत म्हणून चार भूतांपासून पुरुष उत्पन्न होतो, असे सांगितले आहे.

भूतचैतन्यवादाप्रमाणेच प्राचीन काळी 'तज्जीवतच्छरीरवाद' नामक आणखी एक वाद अस्तित्वात होता. जैन सूत्रकृतांगाच्या पुंडरीक अध्ययनात या मताचे स्पष्टीकरण देताना म्हटले आहे, की ज्याप्रमाणे म्यानातून तलवार वेगळी काढून दाखवता येते, दही घुसळून त्यापासून लोणी वेगळे काढून दाखवता येते किंवा

तिळांपासून तेल वेगळे काढून दाखवता येते, त्याप्रमाणे शरीरापासून जीव वेगळा काढून दाखवता येत नाही. त्यामुळे जे शरीर आहे, तोच जीव आहे, असे म्हणावे लागते. तज्जीवतच्छरीरवादाचा प्रारंभ कोणी व केव्हा केला, ते अज्ञात आहे. या मताचे पुरस्कर्ते मात्र अनेक लोक होते.

जो कर्म करतो, तोच त्याचे फल भोगतो, या विचारातून पुनर्जन्म व परलोक या कल्पना अस्तित्वात आल्या. देहपातानंतर जीव दुसरा जन्म घेतो, का परलोकात जातो, तसेच त्याचे स्वरूप काय असते, एक देह सोडून दुसरा देह धारण करण्यासाठी आत्मा कशा प्रकारे जातो, या व अशाच तऱ्हेच्या प्रश्नांचा विचार अनेक लोक करीत होते. त्याचबरोबर वर्तमान जीवनापेक्षा अधिक सुखी असे पारलौकिक जीवन कोणत्या मार्गाने व साधनांनी प्राप्त होऊ शकेल, याचाही विचार लोक करीत होते. यामुळे एका बाजूने लोकांची ऐहिक जीवनाकडे पाहण्याची दृष्टी बदलली व दुसऱ्या बाजूने जन्मांतरगमनासंबंधी अनेक मतमतांतरे अस्तित्वात आली.

त्यानंतरच्या काळात निर्माण झालेल्या दार्शनिक साहित्यात या मतमतांतरांची चर्चा होऊ लागली. प्रत्येक आस्तिक दर्शनाने स्वतंत्र, चेतन व अविनाशी असे एक तत्त्व मानले आहे व त्यालाच आत्मा असे नाव दिले आहे. आत्मा कृतकर्माचे फळ भोगतो व आपला उद्धारही करू शकतो, असे मानलेले आहे.

स्वतंत्र -जीववादात पहिले स्थान जैनांचे आहे. 'चैतन्यलक्षणो जीव:' = जीव हा चैतन्यस्वरूप आहे (षड्दर्शन समुच्चय कारिका ४९). जीव स्वतंत्र आहे आणि तो नाना असून देहभेदाने भिन्न व अनंत आहे. ज्ञानशक्ती, पुरुषार्थ व संकल्पसिद्धी या जीवाच्या मुख्य शक्ती आहेत. जीव जसा विचार करतो, तसा त्याच्यावर संस्कार होतो आणि त्या संस्काराची छाप असलेले एक सूक्ष्म पौद्गलिक शरीर त्याच्याबरोबरच निर्माण होते व दुसरा देह धारण करताना ते जीवाबरोबर राहते, असे जैनांचे मत आहे. जैन दर्शनाने जीवाला मध्यमपरिमाणविशिष्ट मानलेले आहे. तो शरीरावच्छिन्न असून, आपल्या निवासभूत शरीराचे परिमाण धारण करणारा आहे, असे जैन मानतात.

बुद्ध हा अनात्मवादी होता. या अनात्मवादावरच बौद्ध धर्माची उभारणी झालेली आहे. आत्मवादाचे बुद्धाने मोठ्या अभिनिवेशाने खंडन केले आहे.

न्याय-वैशेषिक दर्शनांत आत्मा किंवा जीव हे एक द्रव्य मानलेले आहे. आत्मा नित्य असून, त्याचा निवास प्रत्येक शरीरात असतो. प्राणापान, निमेषोन्मेष, जीवन, इ. प्रमाणांनी त्यांनी आत्म्याची सिद्धी केली आहे. आत्मा एक नाही. तो अनेक असून, प्रतिशरीरात भिन्न भिन्न असतो. आत्मा हा नित्य द्रव्य असून, बुद्धी, सुख, दु:ख, इच्छा, इ. नऊ गुण त्याच्यात राहतात, असेही न्याय-वैशेषिक दर्शनांनी मानले आहे.

सांख्यदर्शनाने प्रकृती व पुरुष अशी दोन मूलतत्त्वे मानलेली आहेत. सांख्यांचा पुरुष म्हणजेच आत्मा होय. हा आत्मा किंवा पुरुष स्वयंसिद्ध आहे. तो चैतन्यरूप असून, स्वत: ज्ञाता आहे. तो कधी ज्ञानविषय होत नाही. त्याचप्रमाणे तो कूटस्थ, नित्य व व्यापक आहे. तो प्रतिशरीर भिन्न आहे, असे सांख्यांचेही मत आहे.

योगदर्शनानेही जीवाचे अस्तित्व मानले आहे. जीव अनेक असून, जीवाला नाना प्रकारचे क्लेश भोगावे लागतात. तो विविध कर्मे करतो आणि त्या कर्मांची फळेही भोगतो. पूर्वजन्मातील संस्कारांचा प्रभावही जीवावर पडतो, असे योगदर्शनाने मानले आहे.

मीमांसादर्शनाने आत्मा हा कर्ता व भोक्ता असा उभयविध मानला आहे. तो व्यापक आणि प्रतिशरीर भिन्न असतो. ज्ञान, सुख, दु:ख, इ. गुण त्याच्यात समवाय संबंधाने राहतात. त्यांच्या मते आत्मा हा ज्ञानसुखादिरूप नाही. भाट्ट मीमांसक आत्म्यात क्रियेचे अस्तित्व मानतात. स्पंद आणि परिणाम असे क्रियेचे दोन प्रकार आहेत. भाट्टांच्या मते आत्मा हा परिणामशील असूनही नित्य आहे. आत्म्यात चित् व अचित् असे दोन्ही अंश भाट्टांनी मानले आहेत. त्यातल्या चिदंशाने आत्मा ज्ञानाचा अनुभव घेतो आणि अचिदंशाने तो परिणामरूप होतो. भाट्ट मीमांसक आत्म्याला ज्ञानाचा कर्ता व ज्ञानाचा विषय असा उभयविध मानतात. पण प्राभाकर मीमांसक मात्र त्याला अहंप्रत्ययवेद्यच समजतात.

वेदान्तदर्शनाने अंत:करणावच्छिन्न चैतन्याला जीव म्हटले आहे. शंकराचार्यांनी शरीर व इंद्रिये यांचा अध्यक्ष आणि कर्मफलांचा भोक्ता जो आत्मा त्याला जीव अशी संज्ञा दिली आहे. आत्मा हा परब्रह्माचा व्यपदेश असल्यामुळे परब्रह्माप्रमाणेच विभू आहे. जाग्रत्, स्वप्न व सुषुप्ती या तीन अवस्था आणि अन्नमय, मनोमय, प्राणमय, इ. पाच कोश यांत आत्मचैतन्य उपलब्ध होते. पण आत्म्याचे शुद्ध चैतन्य हे या पलिकडचे आहे. जीवाची वृत्ती उभयमुखी असते. ती बहिर्मुख असताना विषयांना प्रकाशित करते व अंतर्मुख असताना कर्त्याला अभिव्यक्त करते, असे वेदान्तात सांगितले आहे.

जीव हा चैतन्यात्मक असल्यामुळे तो परमेश्वराची उत्कृष्ट विभूती आहे, असे गीतेने मानले आहे. गीता त्याला क्षेत्रज्ञ म्हणते. कृतकर्माचे फळ भोगणारे शरीर ते क्षेत्र व या क्षेत्राचा ज्ञाता तो क्षेत्रज्ञ आत्मा होय. गीतेच्या दुसऱ्या अध्यायात आत्मा हा अजन्मा, नित्य, शाश्वत आणि षड्विकाररहित असल्याचे

वर्णन आले आहे. त्याचप्रमाणे तो सर्वव्यापी, स्थिर, अचल व सनातन आहे, असेही तिथे सांगितले आहे. पाहा – आत्मा. [भा. द.; भा. त. वि.; न्या. को.]

जीवक

(सनपूर्व ६ वे शतक) एक प्रसिद्ध आयुर्वेदाचार्य. हा राजगृह येथील सालावती नामक राजगणिकेचा बिंबिसार राजापासून झालेला पुत्र होय. सालावतीने याला गणिकांच्या नीतीप्रमाणे लहानपणीच वनात सोडून दिले होते. योगायोगाने कुमार अभयाच्या हाती तो पडला. कुमार अभय तोही बिंबिसाराचा दासीपुत्र होता. त्याने जीवकाचे प्रेमाने संगोपन केले आणि तो जाणता झाल्यावर त्याला आयुर्वेदाचे शिक्षण घेण्यासाठी तक्षशिलेला पाठविले. तिथे आयुर्वेदाचार्य आत्रेय या गुरूजवळ त्याने सात वर्षे आयुर्वेदाचे सांगोपांग अध्ययन केले. नंतर गुरूचा निरोप घेऊन तो राजगृहाला [illegible]. वाटेत त्याने अनेक रुग्णांना असाध्य रोगातून बरे केले.

कायचिकित्सेबरोबरच तो शल्यचिकित्सेतही प्रवीण होता. त्याने एका श्रेष्ठ व्यापाऱ्याच्या मेंदूवर यशस्वी शस्त्रक्रिया केली होती, असे सांगतात. तो फार लवकर प्रसिद्धीला आला. बिंबिसार, चंडप्रद्योत, यांसारखे राजपुरुष आणि अनेक श्रीमंत स्त्री-पुरुष यांना रोगमुक्त केल्यामुळे त्याच्यावर संपत्तीचाही वर्षाव होत राहिला.

जीवक हा गौतम बुद्धाचा भक्त होता आणि बौद्ध धर्माचा निष्ठावंत अनुयायी होता. पुढे तो भिक्षू बनला. एकदा त्याने गौतम बुद्धाच्या आजारावरही उपचार केला होता. बौद्ध भिक्षूंना तो विनाशुल्क औषध देत असे. तो आपल्याला मिळणारे द्रव्यही वारंवार भिक्षुसंघाला अर्पण करीत असे.

बुद्धाचे जीवकावर निरतिशय प्रेम होते. जीवक नाजूक असल्यामुळे अनवाणी चालताना त्याच्या पायातून रक्त गळत असे. ते पाहून बुद्धाने संघाच्या नियमात बदल करून सर्व भिक्षूंना पादत्राणे वापरण्याची अनुज्ञा दिली. बुद्धावरील त्याच्या प्रभावामुळेच बौद्ध नीतिधर्मात शल्यचिकित्सेला मान्यता लाभू शकली.

बालचिकित्सेच्या क्षेत्रात जीवक सिद्धहस्त होता. कौमारभृत्यतंत्र हे आयुर्वेदातील बालचिकित्सेचे शास्त्र जीवकप्रणीतच आहे. कुमार अभयाने लालनपालन केल्यामुळे जीवकाला कुमारभृत्य असे म्हणत असत. या त्याच्या नावावरून त्याचे बालचिकित्साशास्त्र कौमारभृत्यतंत्र या नावाने ओळखले जाऊ लागले. काश्यपसंहिता अथवा वृद्धजीवकीयतंत्र हा याचा ग्रंथ होय. या ग्रंथात काश्यपाचा बालचिकित्साविषयक उपदेश ग्रथित आहे. जीवकाच्या वंशातील वात्स्य या पुरुषाने या तंत्राचे प्रतिसंस्करण केले. काही पंडितांच्या मते काश्यपसंहितेचा कर्ता असलेला जीवक हा बुद्धानुयायी जीवकाहून वेगळा होता. हा दुसरा जीवक भृगुवंशीय ऋचीकाचा पुत्र असून, कश्यपाचा शिष्य होता. पाली वाङ्मयात जीवकाच्या आयुर्वेदातील नैपुण्याविषयी अनेक कथा समाविष्ट आहेत. [उ. प्र. बौ. वि.; प्रा. भा. वि.; म. भा. इ.; आ. इ.]

जीवकचिंतामणी

तमिळ भाषेतील पाच महाकाव्यांपैकी शेवटचे महाकाव्य. तिरुतक्कदेवर नामक एका जैन मुनीने इ. स. च्या नवव्या शतकात हे रचले. याचे तेरा सर्ग आहेत. संस्कृत महाकाव्यांच्या लक्षणाला अनुसरून लिहिलेले हे पहिले तमिळ काव्य होय. याची भाषा श्लिष्ट व मधुर असल्यामुळे ते आमूलाग्र आस्वाद्य झाले आहे. या काव्यामुळे तमिळ वाङ्मयात एका नव्या युगाची मुहूर्तमेढ रोवली गेली, असे म्हणतात.

जीवक हा या महाकाव्याचा नायक होय. त्याच्या चित्रणावर कृष्णचरित्राची सुस्पष्ट छाप दिसते. म. म. स्वामीनाथ अय्यर यांच्या मते प्रस्तुत काव्याची कथावस्तू श्रीपुराणातील जीवकचरित्रातून घेतलेली आहे, तर अन्य काहींच्या मते ती वादीभसिंहाच्या क्षत्रचूडामणी या काव्यातून घेतली आहे. हे महाकाव्य अनेकरसात्मक असले, तरी शृंगार हा त्यातला प्रधान रस आहे. प्रस्तुत काव्याची कथा सारांशरूपाने अशी––

सरयूच्या तीरावर हेमांगद नावाचा एक देश होता. तिथे सच्चंदन नावाचा राजा राज्य करीत होता. त्याचे राज्य समृद्ध होते व प्रजा सुखी होती. राजा विद्या-कलांचा भोक्ता होता; पण कमालीचा विषयासक्त होता. तो कट्टियंकारन् नावाच्या महामंत्र्याकडे राज्याचे सर्वाधिकार सोपवून पट्टराणीसह विषयविलासात निमग्न राहत असे.

महामंत्र्याला अशा प्रकारे सर्वाधिकार मिळाल्यामुळे त्याच्या मनात कपट रिगले. त्यालाच राजा होण्याची लालसा उत्पन्न झाली. त्याने दरबारातल्या काही बड्या मंडळींना आपल्या मसलतीत सामील करून घेऊन राजाचा काटा काढायचे ठरवले. आपल्याविरुद्ध असे काही कारस्थान चालले आहे, याचा राजाला पत्ताही नव्हता.

पुढे एका रात्री उद्यानातला अशोक वृक्ष उन्मळून पडत आहे, असे त्याच्या राणीला स्वप्न पडले. त्या स्वप्नाचा अर्थ राजाला उमगला. गुप्तपणे चाहूल घेता, आपल्या नाशाचा एक भयंकर कट तयार झाला आहे आणि तो मोडून काढणे आता आपल्या हाती नाही, असे त्याला कळून चुकले. त्या वेळी त्याची राणी गर्भवती होती. ती आणि तिचा गर्भ तरी आगामी संकटातून

सुरक्षित राहावा, म्हणून त्याने एक युक्ती योजली. त्याने एका हुशार लोहाराला बोलावून त्याच्याकडून एक मयूराकृती विमान बनवून घेतले. त्या विमानाचे चक्र उजवीकडे फिरवले, की ते आकाशात भराऱ्या घेई आणि डावीकडे फिरवले, की जमिनीवर झेपावे.

विमान तयार झाल्यावर थोड्याच दिवसांत तो भयानक प्रसंग जवळ येऊन ठेपला. मग राजाने राणीला विमानात बसवून त्याची कळ तिला समजावून सांगितली. दुःखित अंतःकरणाने राणी विमानात बसली आणि तिने विमान आकाशात उडवले. तेवढ्यात महामंत्र्याचे विश्वासघातकी सैनिक राजावर चाल करून आले. राजा त्यांच्याशी शर्थीने लढला; पण शेवटी धारातीर्थी पडला. महामंत्री कट्टियंकरन्ची आसुरी आकांक्षा पुरी झाली. तो राज्याचा मालक बनला.

राणीने हा प्रकार विमानातून पाहिला. तिला त्या दुर्घटनेचा इतका जबर धक्का बसला, की नकळत तिच्या हातून विमानाची कळ उलटी फिरवली गेली. त्यामुळे तिचे विमान जमिनीकडे येऊ लागले आणि अखेर राजधानीच्या स्मशानात येऊन आदळले. त्या धक्क्याने ती प्रसूत होऊन तिला मुलगा झाला. आरक्त सूर्यबिंबाप्रमाणे तेजस्वी दिसणाऱ्या त्या पुत्राला पाहून तिला गहिवर आला. ती त्याला म्हणाली,

“ माझ्या लाडक्या, आता तूच माझ्या व्यथा-वेदनांची काजळी नष्ट करणारा चिंतामणी हो. ”

आणि तिने चिंतामणी असेच त्याचे नाव ठेवले. ते करुण दृश्य पाहून स्मशानदेवतेला तिची दया आली आणि ती मैत्रिणीच्या स्वरूपात पुढे येऊन राणीला म्हणाली.

“ देवी, तू चिंता करू नको. हा तुझा पुत्र प्रतापी निपजेल. त्या दुष्ट महामंत्र्याचे निर्दालन करून तो आपले राज्य परत मिळवील. मात्र तुझ्या हातून याचे रक्षण होणार नाही. थोड्याच वेळात एक सज्जन गृहस्थ इथे येईल. तू या मुलाला त्याच्या हवाली कर. ”

प्राप्त परिस्थिती इतकी कठीण होती, की राणीला स्मशानदेवतेचा तो सल्ला मानणेच भाग पडले. तिने मुलाला स्मशानात ठेवले आणि ती एका झाडाच्या आडोशाला जाऊन उभी राहिली.

थोड्याच वेळात गंधोत्कट नावाचा एक श्रेष्ठी, जन्मताच मृत झालेल्या आपल्या अर्भकाला मूठमाती देण्यासाठी तिथे आला. त्याने त्या कोवळ्या राजपुत्राला पाहिले. त्याच्या जवळ पडलेली राजमुद्रा पाहून त्याची खात्री पटली, की नुकत्याच मृत झालेल्या सच्चंदन राजाचा हा वंशांकुर आहे. त्याने आपले मूल मेल्याचे दुःख दूर सारले आणि त्या राजपुत्राला आपल्या घरी नेले. नंतर तो प्रसन्नपणे आपल्या पत्नीला म्हणाला.

“ पोर मेले म्हणून रडत होतीस ना ? हा घे तुला पुत्र ! याचा मायेने सांभाळ कर. ”

श्रेष्ठीच्या पत्नीचे नाव सुनंदा असे होते. तिला त्या नव्या पुत्राच्या प्राप्तीमुळे कल्पनातीत आनंद झाला. श्रेष्ठीने त्याचे नाव जीवक. असे ठेवले. कालांतराने त्याला दुसरा पुत्र झाला. त्याचे नाव त्याने नंदट्टन ठेवले. दोघेही बंधू श्रेष्ठीच्या घरी शुक्लेंदुवत वाढू लागले.

यथावकाश दोघेही गुरुगृही दाखल झाले. आर्यनंदी या आचार्याने त्या दोघांना विद्या-कला शिकवल्या. विद्यासमाप्तीच्या वेळी आर्यनंदीने जीवकाला एक कथा सांगितली. ती कथा म्हणजे जीवकाचाच पूर्ववृत्तांत होता. ती कथा ऐकून कट्टियंकारन् या दुष्ट महामंत्र्याचा जीवकाला अत्यंत क्रोध आला. जीवक त्याचा वध करण्यासाठी निघाला; पण आचार्याने त्याला आवरले व काही काळ धीर धर असे सांगितले. मग जीवक आचार्याचा निरोप घेऊन घरी आला.

थोड्याच दिवसांत त्या नगरावर भिल्लांचा डाका आला. त्यांनी नगरातल्या गौळवाड्यातली गाईंची खिल्लारे पळविली. त्या भिल्लांचे पारिपत्य करण्याच्या कामी राज्याच्या सेनापतीला अपयश आले. त्यामुळे जीवकाला चेव आला. त्याने भिल्लांवर चाल करून त्यांना पिटाळून लावले व खिल्लारे परत आणली. त्या पराक्रमावर खूष होऊन नगरजनांनी जीवकाची मोठी मिरवणूक काढली. ती पाहून कट्टियंकारन्ला वाटले, की हा युवक पुढे आपला वैरी तर ठरणार नाही ना ?

काही दिवसांनी त्या नगरातल्या गंधर्वदत्ता नामक एका विद्याधर कुमारीचे स्वयंवर निघाले. ती उत्तम वीणावादक होती. आपल्याबरोबर वीणा वाजवून जो आपल्याला पराजित करील, त्यालाच मी माळ घालीन, असा तिचा पण होता. अनेक राजपुत्र त्या स्वयंवरासाठी आले आणि वीणावादनात तिच्यापुढे हरले. यशस्वी झाला तो एकटा जीवक. मग तिने त्याला माळ घालून स्वयंवर पुरे केले.

कट्टियंकारन् त्या स्वयंवराला आला होता. गंधर्वकन्या जीवकाला मिळाली, हे त्याला बरे वाटले नाही. त्याने त्या सर्व पराभूत राजपुत्रांना चिथावून जीवकावर हल्ला करायला प्रवृत्त केले; पण जीवक त्यांनाही पुरून उरला.

पुढे एके दिवशी जीवकाने एका मरत्या कुत्र्याला पाणी पाजून त्याच्या कानात ‘ ॐ नमो अरिहन्ताणं ’ हा मंत्र उच्चारला. त्यासरशी कुत्र्याच्या जागी एक सुंदर यक्ष उभा राहिला. त्याचे नाव होते सुदर्शन. कोण्या ऋषीच्या शापामुळे तो श्वानयोनीत जन्मला होता. त्याने जीवकाचे आभार मानले आणि

पडत्या प्रसंगी मदत करण्याचे अभिवचन देऊन जीवकाचा निरोप घेतला.

पुढे राज्यातल्या एका हत्तीच्या तावडीत सापडलेल्या गुणमाला नामक यक्षकन्येला त्याने सोडवले आणि तिनेही जीवकाच्याच गळ्यात माळ घातली. जीवकाने आपल्या हत्तीला ची ची करायला लावले, ही गोष्ट कट्टियंकारन्‌ला सहन झाली नाही. त्याने शिपाई पाठवून जीवकाला पकडून आणले आणि त्याच्यावर नाना प्रकारचे आरोप ठेवून त्याला शिरच्छेदाची शिक्षा फर्मावली.

पण जीवकाचे दैवच बलवत्तर ! वधस्थळी नेऊन मारेकरी त्याच्या मानेवर घाव घालणार; एवढ्यात एकाएकी मेघांचा गडगडाट आणि विजांचा चमचमाट झाला. मारेकरी घाबरले. त्यांचे हात तिथल्या तिथे थबकले. एवढ्यात त्या सुदर्शन पक्षाने त्याला अलगद उचलून आकाशमार्गाने नेले. त्यामुळे मारेकरी अधिकच घाबरले. त्यांनी मग दुसऱ्याच कोणाच्या तरी रक्ताने खड्ग लाल करून ते कट्टियंकारन्‌ला दाखवले. ते पाहून, जीवकाचा काटा दूर झाला असे समजून महामंत्री निर्धास्त झाला.

त्यानंतर थोड्याच दिवसांनी जीवकाची व त्याच्या जन्मदात्या आईची गुप्तपणे भेट झाली. तिच्या सहवासात तो काहीं दिवस राहिला. आता मात्र त्याला धीर निघेना. कट्टियंकारन्‌चा सूड घेण्याचा निर्धार करून तो मदत मिळवण्यासाठी आपल्या मामाकडे गेला. त्याचा मामा विदेह देशाचा राजा होता. दोघांनी मिळून एक मसलत पक्की केली. मामाची एक मुलगी लग्नाला योग्य झाली होती. तिचे स्वयंवर करायचे आणि तेही कट्टियंकारन्‌च्या राजधानीत करायचे असे त्याने ठरवले. त्या तयारीनिशी तो आला. त्याने स्वयंवरासाठी देशोदेशीच्या राजांना निमंत्रण दिले; तसेच कट्टियंकारन्‌लाही दिले. स्वयंवरमंडपाच्या छतावर बांधलेल्या फिरत्या चक्रावरील तीन यांत्रिक वराहांना एका बाणात जो खाली पाडील त्याला माझी कन्या माळ घालील, असा त्याने पण जाहीर केला. कोणालाही तो पण जिंकता आला नाही. जीवकाने तो कट्टियंकारन्‌च्या डोळ्यादेखत जिंकला. त्यामुळे तो महामंत्री खवळला. ती संधी साधून जीवकाच्या मामाने जमलेल्या सर्व राजमंडळापुढे कट्टियंकारन्‌च्या विश्वासघातकी पापांचा पाढा वाचला. खरा राजा कट्टियंकारन् नसून जीवक आहे, ही गोष्ट सर्व राजांना कळली. त्यामुळे महामंत्री खवळला व त्याने जीवकाविरुद्ध रणशिंग फुंकले. थोडा वेळ तुंबळ रण माजले आणि शेवटी जीवकाने कट्टियंकारन्‌ला कंठस्नान घातले.

जीवक हेमांगद देशाचा राजा झाला. सर्व प्रजाजनांनी त्याचा जयजयकार केला. [त. सा. सं.; त. उ. सा.; तमिळनाडू]

जीवखडा अश्मा पाहा.

जीव गोस्वामी (इ. स. चे १६ वे शतक) चैतन्य संप्रदायात सहा गोस्वामी होऊन गेले, त्यांच्यापैकी एक. त्या सहा गोस्वामींमधले रूप गोस्वामी व सनातन गोस्वामी हे याचे चुलते होते. त्यांचे वडील कर्नाटकातले असून, भारद्वाज गोत्री, यजुर्वेदी ब्राह्मण होते. जीव गोस्वामीचा जन्म बंगालमधे झाला. त्याचा पिता वल्लभ हा त्याच्या लहानपणीच मरण पावला. याचे प्राथमिक शिक्षण मातेच्या देखरेखीखाली झाले. नंतर जीव गोस्वामी काशीला गेला. तिथे मधुसूदन-वाचस्पती यांच्याजवळ त्याने वेदान्ताचे अध्ययन केले. तो अत्यंत बुद्धिमान होता. अनेक शास्त्रांचा सखोल अभ्यास करून तो लवकरच प्रकांड पंडित झाला. मग तो वृंदावन येथे आपल्या चुलत्यांकडे जाऊन राहिला. त्यांचा उज्ज्वल आदर्श समोर असल्यामुळे जीव गोस्वामीने वयाच्या २५ व्या वर्षी रूप गोस्वामीकडून वैष्णव पंथाची दीक्षा घेतली आणि त्यानंतरचे सर्व जीवन भजन–पूजन आणि वैष्णव सिद्धांतांवर ग्रंथलेखन, यांत व्यतीत केले. तो आजन्म नैष्ठिक ब्रह्मचारी राहिला.

रूप गोस्वामी व सनातन गोस्वामी यांच्या नंतर जीव गोस्वामी हाच गौडीय वैष्णव संप्रदायाचा नेता ठरला. तो चैतन्यमताचा महान भाष्यकार मानला जातो. त्याच्या ग्रंथांमुळे चैतन्यमताला सुदृढ अशी तात्त्विक बैठक प्राप्त झाली. स्वतंत्र ग्रंथरचनेप्रमाणेच याने रूप व सनातन यांच्या ग्रंथांवर विद्वत्तापूर्ण टीकाही लिहिल्या आहेत. याचे पुढील ग्रंथ प्रसिद्ध आहेत –

(१) षट्संदर्भ – यात सहा निबंध असून, त्यांत भक्तिशास्त्राच्या मौलिक तत्त्वांचे प्रतिपादन केलेले आहे. (२) क्रमसंदर्भ – समग्र भागवतावरील पांडित्यपूर्ण टीका. (३) दुर्गमसंगमनी – रूप गोस्वामीच्या भक्तिरसामृतसिंधू या ग्रंथावरील टीका. (४) ब्रह्मसंहितेवर टीका. (५) हरिनामामृत व्याकरण. (६) लोचनरोचनी – रूप गोस्वामीच्या उज्ज्वल नीलमणी या ग्रंथावरील टीका व (७) कृष्णार्चनदीपिका – कृष्णपूजाविधीचे सविस्तर वर्णन.

याव्यतिरिक्त लघुतोषिणी, धातुसंग्रह, सूत्रमालिका, माधवमहोत्सव, गोपालचंपू, गायत्रीव्याख्याविवृती, गोपालतापिनी, योगसारस्तोत्र, इ. लहान-मोठे ग्रंथही याच्या नावावर आहेत.

हा चैतन्य महाप्रभूचा परम भक्त होता. वृंदावन येथे याचे देहावसान झाले. तिथे राधादामोदरमंदिराच्या दक्षिणेला याची समाधी आहे. [भा. सं.; भा. सं. म.; चै. म. ब्र. सा.]

जीवच्छ्राद्ध मनुष्याने जिवंतपणी स्वतःच्या आत्म्याच्या हितासाठी केलेले श्राद्ध. वास्तविक दानाने मृताच्या आत्म्याला तृप्त करणे, ही श्राद्धकर्मातील मूळ कल्पना आहे. स्वतःच्या आत्म्यासाठी स्वतःच श्राद्ध करणे ही कल्पना विकृत होय. बौधायन गृह्यसूत्रात याचा विधी सांगितला आहे, तो असा –

ज्याला जीवच्छ्राद्ध करायचे असेल, त्याने कृष्ण त्रयोदशीच्या दिवशी उपवास करून, सहा वस्त्रे, सोन्याची सुई, दोऱ्याचा पाश, अंकुश, फाटके वस्त्र, पळसाच्या पानांचे देठ, औदुंबराचे आसन, पात्रे, इ. उत्तरक्रियेसाठी आवश्यक वस्तू जमवून ठेवाव्या. दुसऱ्या दिवशी स्नान करून ब्राह्मणांकडून आशीर्वाद घ्यावा व त्यांना दाने द्यावी. नंतर दक्षिणेस तोंड करून दुधात शिजवलेला भात तूप घालून खावा. मग भात व तूप यांचा होम करावा. त्यानंतर चौकात जाऊन कृष्णवर्णाच्या खुज्या ब्राह्मणाला सुई, पाश, फाटके वस्त्र व अंकुश या वस्तूंचे दान द्यावे व त्याच्याकडून 'यमदूत तृप्त होवोत' असा आशीर्वाद घ्यावा.

त्यानंतर घरी येऊन ज़मिनीवर तांदूळ पसरावे. त्यांवर पाण्याने भरलेला घडा ठेवावा. त्याला दोरा गुंडाळावा. त्याला नरदेहाचे प्रतीक समजावे. त्याचप्रमाणे पळसाच्या देठांची मानवी आकृती कृष्णाजिनावर तयार करून त्यावर निजावे. म्हणजे त्या मनुष्याकृतीत प्राणाची स्थापना केल्यासारखे होते. मग घड्यातील पाण्याने स्नान करावे. त्या वेळी पुरुषसूक्त म्हणावे. नंतर पंचगव्याने व त्यानंतर शुद्ध जलाने पुनश्च स्नान करावे. सायंकाळी तीळ व तूप यांनी युक्त असे अन्न खाऊन ब्राह्मणभोजनही घालावे. चौथ्या दिवशी त्या पळसाच्या देठांनी बनवलेल्या मानवी आकृतीचे समंत्रक दहन करावे आणि स्वतःला स्वतःच पिंडोदक द्यावे. मग १० दिवस सुतक पाळून ११ व्या दिवशी एकोद्दिष्ट श्राद्ध करावे.

त्रैवर्णिकांतला मनुष्य मरणासन्न झाला असता त्याने हे श्राद्ध केले, तर तो जीवन्मुक्त होतो, असें लिंग पुराणात सांगितले आहे (२.४५.८–९०). तिथे याचा विधी वर्णिलेला आहे, तो असा–

वाळूचे स्थंडिल करून त्याच्या मध्यभागी एक हात लांबी–रुंदीचे कुंड करावे. त्यात अग्निस्थापना करावी. नंतर अन्वाधान व देवतापरिग्रह करून समिधा, चरू व तूप या हविर्द्रव्यांनी होम करावा. नंतर दूर्वा व तूप यांचे एकशेआठ हवन करून प्राणादिकांचेही हवन करावे. शेवटी प्रायश्चित्तहोमाच्या चार आहुती द्याव्या. सातव्या दिवशी श्राद्धास योग्य अशा ब्राह्मणांना भोजन घालावे आणि वस्त्रे, पात्रे, इ. वस्तूंचे दान करावे.

या श्राद्धामुळे पितरांचा उद्धार होतो व पुढच्या वंशात उत्तम संतती निर्माण होते, असेही सांगितले आहे. [हि. ध.]

जीवंजीवक एक पक्षिविशेष' 'जीवं जीवयति विषदोषं नाशयतीति' = जो जीवांला जगवितो व विषदोषांचा नाश करतो, तो जीवंजीवक होय (हलायुध). 'जीवेन सहचरेण जीवतीति जीवंजीवः' = जो आपल्या सहचाऱ्यावर जगतो तो, अशी दुसरी व्याख्या आहे.

बौद्ध संस्कृत साहित्यात जीवंजीवक नावाचा दोन डोक्यांचा एक काल्पनिक पक्षी आहे. तक्षशिलेतील एका मंदिरावर दोन डोक्यांच्या गरुड पक्ष्याची एक आकृती आहे. ती जीवंजीवकाची मूर्ती आहे, असे लोक समजतात. [ह. च. सां. अ.]

जीवंतिकाव्रत एक काम्य स्त्रीव्रत. हे व्रत श्रावण मासातील प्रत्येक शुक्रवारी करतात. या व्रताची देवता जीवंतिका अथवा जिवती ही बालसंरक्षक देवी आहे. श्रावणातील पहिल्या शुक्रवारी स्त्रिया घरातील भिंतीवर केशराने अथवा गंधाने जिवतीचे चित्र काढतात. तिचे ध्यान असे---

जरे जीवन्तिके देवि बालयुक्ते प्रमोदिनि।
रक्षाव्रते महाशक्ति पूर्णकामे नमोऽस्तुते ।।

अर्थ – हे वृद्ध, बालयुक्त, आनंददायिनी, (बालकांचे) रक्षण करणारी, महाशक्तिस्वरूपिणी आणि जिच्या सर्व इच्छा तृप्त झालेल्या आहेत, अशा जीवंतिकादेवी, तुला नमन असो.

सांप्रत जिवतीचे छापील रंगीत चित्र भिंतीवर लावून त्याची पूजा करायची पद्धत आहे. भोवती मुलांचा मेळा, त्यांची पसरलेली खेळणी आणि एखादे मूल पाळण्यात असे ते चित्र काढलेले असते. पूजेच्या वेळी आघाड्याची पाने, दूर्वा आणि फुले यांची माळ करून देवीला घालतात आणि कणकेचे पाच दिवे करून त्यांनी देवीला ओवाळतात. ओवाळल्यानंतर स्त्रिया पुढील प्रार्थना म्हणतात---

अक्षतां निक्षिपाम्यम्ब यत्र मे बालको भवेत्।
तत्र त्वया रक्षणीयो जीवन्ति करुणार्णवे ।।

अर्थ – हे करुणेचा सागर असलेल्या जिवती आई, मी जिकडे अक्षता टाकते आहे, त्या दिशेला असलेल्या माझ्या बाळाचे तू रक्षण कर.

पूजेनंतर सुवासिनीस पुरणावरणाचे भोजन घालून आणि स्वतः भोजन करून कथाश्रवणाने व्रताची समाप्ती करतात. या व्रताची कहाणी अशी–

एक होता राजा. त्याला मूल नव्हते. त्यामुळे राणी कष्टी होती. तिने एक दिवस सुइणीला बोलावून आणून सांगितले की, मला कोणाचे तरी नाळ-वारीचे मूल आणून दे. सुइणीने हो

म्हटले. राणीने गरोदर असल्याचे सोंग केले. त्या गावात एक ब्राह्मण होता. त्याची पत्नी प्रसूत झाली. सुइणीने तिचा मुलगा वारीसह राणीला नेऊन दिला. सुइणीने ब्राह्मणाच्या बायकोला सांगितले; की तुला मुलगा न होता वरवंटा झाला. ब्राह्मण स्त्री दुःखी झाली. राजाला आनंद झाला. आपल्या राणीला मुलगा झाला, असे समजून राजाने त्याचे कौतुक केले.

इकडे ब्राह्मणाच्या बायकोने नेम धरला. ती श्रावणमासी दर शुक्रवारी जिवतीची पूजा करू लागली व जिथे माझे बाळ असेल, तिथे ते खुशाल असो, म्हणून सर्व दिशांना तांदूळ उधळू लागली. ते तांदूळ राजवाड्यातल्या राजपुत्रावर पडू लागले. तिने हिरवे लुगडे, हिरव्या बांगड्या वर्ज्य केल्या. ती कारलीच्या मांडवाखालून जाईना, तांदुळाचे धुवण ओलांडीना. पुढे मुलगा मोठा झाला. राज्याचा राजा झाला.

आपले नेम पाळून जेवायला आली. राजा पंक्तीत तूप वाढू लागला. ब्राह्मण स्त्रीच्या पानाशी येताच तिला पान्हा फुटला आणि त्याची धार राजाच्या तोंडात उडाली. राजा रुष्ट झाला. त्याची मानलेली आई समजूत घालायला आली. तिने सांगितले, की 'तीच तुझी खरी आई'. राजाला आनंद झाला. त्याने आई-बापांना वाडा बांधून दिला. जिवती त्या सर्वांवर प्रसन्न झाली.

अहल्याकामधेनू नामक ग्रंथात या व्रताचा दिवस कार्तिकी अमावास्या हा दिलेला आहे. [व्रतराज; कहाण्या; हि. ध.]

जीवत्पुत्रिकाव्रत एक स्त्रीव्रत. आश्विन शु. अष्टमीस उ. प्रदेशातील पुत्रवती स्त्रिया हे व्रत करतात. या दिवशी उपवास करून दान देतात. हे व्रत केल्याने पुत्रशोक होत नाही, असे सांगितले आहे. या व्रताची कथा अशी–



जिवती – एक सांकेतिक चित्र

एक दिवस फिरायला गेला असता त्याला ब्राह्मणाची स्त्री दिसली. तिच्या सौंदर्यावर तो भाळला. रात्री तिच्या घरी गेला. दारात गाय-वासरे बांधलेली होती. राजाचा पाय वासराच्या शेपटीवर पडला. वासराने आईला विचारले, की 'माझ्या शेपटीवर पाय देण्याचे पाप कोणी केले ?' गाय म्हणाली, 'जो आपल्या आईचा अभिलाष धरायला कचरत नाही, तो तुझ्या शेपटीवर सहज पाय देईल.'

राजाने ते ऐकले. त्याला पश्चात्ताप झाला. पुढे तो काशीस गेला. गयेला जाऊन पिंड देत असता ते घ्यायला दोन हात वर आले. राजाने पुरोहिताला त्याचे कारण विचारले. पुरोहित म्हणाला, की 'राज्यात जाऊन सर्व स्त्री–पुरुषांना जेवायला बोलाव म्हणजे कारण कळेल.' त्याने तसे केले. ब्राह्मण स्त्री

जीमूतवाहन नावाचा एक राजा होता. तो एकदा अरण्यात शिकारीला गेला. तिथे देवपूजेसाठी आलेल्या मलयवती नामक राजकन्येला त्याने पाहिले. त्याच क्षणी दोघे परस्परांवर अनुरक्त झाली. राजकन्येबरोबर तिचा भाऊ होता. त्याने ही गोष्ट आपल्या वडिलांना जाऊन सांगितली.

इकडे जीमूतवाहन डोंगरावर फिरत असता त्याला रडण्याचा आवाज ऐकू आला. त्याने शोध घेतला, तेव्हा त्याला शंखचूर्ण नागाची माता रडत असलेली आढळली. तिचा एकुलता एक मुलगा गरुडाच्या आहारासाठी नेमून दिलेल्या जागी जात होता. थोड्याच वेळात गरुड येऊन त्याला खाणार होता. म्हणून त्याची आई रडत होती. राजाला तिची करुणा आली. मग तो स्वतःच त्या जागी जाऊन निजला. जरा वेळाने गरुड आला आणि

त्याने झडप घातली. चोच मारताच त्याला समजले, की तो नाग नसून माणूस आहे. दुसऱ्यासाठी आत्मार्पण करण्याची जीमूतवाहनाची ही त्यागभावना पाहून गरुड प्रसन्न झाला. त्याने राजाला ‘ वर माग ’ म्हटले. ‘ आजपासून कोणाही नागाला तू खाऊ नयेस. ’ असा राजाने वर मागितला. गरुड ‘ तथास्तु ’ म्हणाला. इतक्यात मलयवतीचा बाप राजाला शोधीत तिथे आला व त्याने तिचे लग्न राजाशी लावून दिले. तो दिवस आश्विन शु. अष्टमीचा होता. तेव्हापासून हे व्रत सुरू झाले.

जीवन्मुक्त

भारतीय तत्वज्ञानाने मानलेली सिद्ध पुरुषाची एक अवस्था. जीवन्मुक्ताचे लक्षण असे–‘जीवन्नेव मुक्तः आत्मज्ञानेन मायाबन्धरहितः ’ = जिवंतपणीच जो मुक्त म्हणजे आत्मज्ञानाने मायापाशरहित असतो, तो जीवन्मुक्त होय (श. क.). याच देही, याच जीवनात अंतिम तत्त्वाचा साक्षात्कार होऊन ज्याचा कर्मबंध सुटला आहे; पण जो प्रारब्धकर्माने शरीर धारण करून जगात वावरत आहे, तो जीवन्मुक्त होय. डोळे कान, मन, आणि प्राण असून नसल्यासारखी त्याची स्थिती असते.

श्रवण, मनन व निदिध्यासन यांच्या योगाने ज्याला आत्मसाक्षात्कार झाला आहे, पण ज्याच्या मनाला विश्रांती मिळाली नाही आणि ती मिळावी, अशी इच्छा आहे, तो पुरुष जीवन्मुक्तीचा अधिकारी होय.

आत्मज्ञान होण्यापूर्वी रागद्वेष सोडावे लागतात, कारण ते अंतरात ठाण मांडून बसले असता आत्मसाक्षात्कार होणे शक्य नसते. श्रुतीत जीवन्मुक्त पुरुषाला विमुक्त असे म्हटले आहे. असा विमुक्त पुरुष भोगाच्या योगाने प्रारब्धाचा नाश झाला असता, शरीराचा त्याग करून पुनर्जन्मादिकांच्या बंधातून मुक्त होतो, असा श्रुतीचा आशय आहे.

वसिष्ठाने जीवन्मुक्ताचे वर्णन केले आहे, ते असे—

यो जागर्ति सुषुप्तिस्थो यस्य जाग्रन्न विद्यते ।
यस्य निर्वासनो बोधः स जीवन्मुक्त उच्यते ॥

अर्थ– इंद्रियांचा लय झालेला नसल्यामुळे जो जागत असतो; पण विषयांचे ग्रहण करीत नाही, म्हणूनच त्याला निजला आहे, असे म्हणतात; तसेच सामान्य लोकांप्रमाणे ज्याची जाग्रद् अवस्था नसते व ज्याचे ज्ञान वासनाशून्य असते, त्याला जीवन्मुक्त, असे म्हणतात.

भगवद्गीतेत जीवन्मुक्ताचे वर्णन करताना, स्थितप्रज्ञ कर्मयोगी, ज्ञानी, योगारूढ, भक्त, गुणातीत, दैवी संपद्युक्त व ब्रह्मभूत अशा विविध नावांनी त्याचा उल्लेख केला आहे.
[भा. द. सं.; डॉ. के. वा. आपटे – नवभारत, जुलै १९६५]

जीवशास्त्र

प्राणी व वनस्पती हे सजीव असल्यामुळे त्यांच्या शरीरांत सतत घडामोडी होत असतात. या घडामोडींचे जे शास्त्र बनले आहे, त्याला जीवशास्त्र म्हणतात. हे शास्त्र आजमितीस खूपच प्रगत झाले आहे. पण त्याच्या उगमाचा मागोवा घ्यायचा, तर ब्राह्मणे व उपनिषदे यांच्यापर्यंत मागे जाणे भाग आहे. निसर्गाचे अवलोकन करीत राहिल्यामुळे प्राप्त झालेले ज्ञान वेद, ब्राह्मणे व आरण्यके यांत संकलित केलेले असून, त्यावरून निघालेले सिद्धान्त उपनिषदांत सांगितले आहेत. जीवाचे पहिले रूप अन्नमय होते, म्हणजे तो वनस्पतीरूपाने उत्पन्न झाला, असे ऐतरेयोपनिषदात सांगितले आहे (१.३.२). प्रथम वनस्पती उत्पन्न झाल्या आणि त्यांचा अन्नासारखा उपयोग होऊन नंतर प्राणिसृष्टी निर्माण झाली, असे तैत्तिरीय उपनिषदात (१.२) प्रतिपादले आहे.

पृथिव्या ओषधयः । ओषधिभ्योऽन्नम् । अन्नात्पुरुषः ।

अर्थ– पृथ्वीपासून ओषधी, त्यांच्यापांसून अन्न व त्यापासून पुरुष निर्माण झाला.

वनस्पती व प्राणी यांचे जीवन आणि पुनरुत्पत्ती यांतील वैशिष्टये त्या वेळच्या ऋषींना माहीत झाली होती. प्राणी व वनस्पती श्वसन करतात, त्या वेळी ते प्राणवायू ग्रहण करतात आणि म्हणूनच जगतात, असे तैत्तिरीय उपनिषदात (२.३) पुढीलप्रमाणे म्हटले आहे –

प्राणं देवा अनुप्राणन्ति । मनुष्याः
पशवश्च ये । प्राणो हि भूतानामायुः ।

अर्थ– देव, मनुष्य व पशू प्राणाने अनुप्राणित होतात. प्राण हेच भूतांचे आयुष्य आहे.

सजीव पदार्थांचे सूक्ष्म विभाग असतात; त्यांतील प्राणतत्त्व म्हणजेच आत्मा होय. प्राण, अपान, व्यान, उदान व समान ही त्याची भिन्न रूपे आहेत. प्रश्नोपनिषदाच्या तिसऱ्या अध्यायात या विषयाचे विवेचन केले आहे.

पंचप्राणांपैकी प्राणाचा संबंध विशेषेकरून श्वसनसंस्थेशी व ज्ञानेंद्रियांशी असतो. अपानाचा संबंध पित्ताशय, पांथरी, इ. पचनेंद्रियांशी व विसर्जनक्रियेशी असतो. अन्न शोषून घेणे, ते सर्व शरीराला सारखे पुरवणे, इ. अभिसरणक्रिया समान वायूवर अवलंबून असतात. शरीरातील स्नायू, मज्जातंतू व अस्थिसंस्था यांच्या द्वारा बाह्य घटनांचा जो प्रतिसाद उमटतो, तो व्यान वायूमुळे. मेंदू व मज्जातंतू यांना मिळून हृदय म्हटले आहे. त्यात हा पडसाद उमटतो व मेंदूकडून उलट आज्ञा दिली जाते. उदान वायूमुळे जननक्रिया होते. अशा प्रकारे शरीरातील सर्व व्यापार पंचप्राणांमुळे चालू राहतात.

निरनिराळ्या उपनिषदांत जे असंख्य उल्लेख आहेत

यांवरून असे कळते, की प्राचीन ऋषींना शरीररचनेविषयी पुष्कळ ज्ञान होते. निसर्गातील भिन्न शक्तींचा शरीरावर जो प्रभाव पडतो, त्यामुळे ज्ञानेंद्रिये विकसित झाली आहेत, असे कठोपनिषदात (२.३.६) म्हटले आहे–

इन्द्रियाणां पृथग्भावमुदयास्तमयौ च यत् ।
पृथगुत्पद्यमानानां मत्वा धीरो न शोचति ॥

भावार्थ – शब्दस्पर्शादी विषयांचा अनुभव घेणे ही पृथक कार्ये करण्यासाठी भिन्न भिन्न रूपांत उत्पन्न झालेल्या इंद्रियांचे पृथक भाव आहेत, ते जाणणारा आणि जाग्रत अवस्थेत क्रियाशील असणे (उदय) व सुषुप्तिकाली लय होणे, ही त्यांची परिवर्तनशीलता जाणणारा पुरुष कधीही शोक करीत नाही.

ज्या इंद्रियाला जे कार्य करायचे असते, त्याला अनुरूप अशी त्याची रचना होते, असे तैत्तिरीय उपनिषदात सांगितले आहे (२.३.५). त्या उपनिषदाच्या पहिल्या पाच अनुवाकांत वनस्पती व प्राणी यांच्या शरीरातील पेशींसंबंधी माहिती आहे. प्रत्येक पेशी सजीव असतात, म्हणून शरीर सजीव असते. मेंदू व त्याच्याशी संवद्ध अशा मज्जातंतूंचा उल्लेख बृहदारण्यकोपनिषद व कठोपनिषद यांत आहे. मेंदूपासून पाठीच्या कण्यातून कमरेपर्यंत जाणाऱ्या मज्जातंतूला त्यांनी पुरीतत् हे नाव दिले आहे. तैत्तिरीय उपनिषदात मेंदूच्या संरक्षक कवचाचे वर्णन असून, त्यातील एका ग्रंथीचेही वर्णन आहे (६.२). मेंदूचा विकास व त्याचे कार्य यांचे वर्णन ऐतरेय उपनिषदामध्ये सापडते (१.३.१२).

मुंडक, छांदोग्य व बृहदारण्यक यां उपनिषदांतील काही उल्लेखांवरून असे दिसते, की त्या वेळच्या ऋषींना जननशास्त्र व सुप्रजाजननशास्त्र यांचेही ज्ञान होते. काही ठिकाणी त्यांनी वनस्पतींची व प्राण्यांची उत्पादनपद्धती यांतील फरक सांगितला आहे (बृहदा. ३.९.). काही उच्च जातींच्या वनस्पतींची जननक्रिया प्राण्यांच्या जननक्रियेप्रमाणे लैंगिक असते, असे कठोपनिषदात म्हटले आहे (१.१.६). पुरुषाचे रेत, स्त्रीचे रज व तिचा गर्भाशय या तीन ठिकाणी आत्मा वास करतो आणि त्याच्या शुक्रबीज, रजोगोल व गर्भ या तीन अवस्था असतात (ऐत. १.३.१२; २.४.१). आत्मा हा शब्द सजीव द्रव्य या अर्थाने वापरलेला आहे. त्याचे व प्राणांचे सहकार्य होऊन क्रिया घडते आणि आत्मा व मेंदू यांच्या सहकार्याने विचार होतो.

बृहदारण्यकात (४.३.९) जीवाच्या दोन पिढ्यांना इहलोक व परलोक म्हटले असून, मधल्या स्थितीला स्वप्न म्हटले आहे. या अवस्थेत आत्मा हा एकपेशी जीव असून, अशा दोन जीवांच्या मीलनामुळे गर्भबीज तयार होते. स्त्रीच्या पोटात गर्भ वाढतो, तो तिच्या शरीराचा एक भाग म्हणूनच वाढतो. ‘तत्स्त्रिया आत्मभूतं गच्छति’ (= तो गर्भ त्या स्त्रीचा आत्मरूपच होतो) असे ऐतरेयोपनिषदात म्हटले आहे (२.४.२-३).

उपनिषदांमध्ये अनेक ठिकाणी उत्क्रांतीविषयी चर्चा केलेली आहे. प्रथम एकाच प्राण्यापासून जीवाची उत्पत्ती होत असे. पुढे दोन प्राण्यांच्या लैंगिक संयोगामुळे जीवोत्पत्ती होऊ लागली. सेंद्रिय उत्क्रांतीची ही कल्पना बृहदारण्यकात आहे (१.४.३). एकपेशी जीवापासून मानवापर्यंत जो विकास झाला, तो हळूहळू उत्क्रांतीने झाला, असेही तिथे म्हटले आहे (बृहदा. १.४.४).

याज्ञवल्क्य, पिप्पलाद, आरुणी, इ. ऋषींनी संपूर्ण उत्क्रांतीचे पाच भाग पाडले आहेत, ते असे – (१) विश्वाची उत्पत्ती (२) पृथ्वीची उत्पत्ती (३) वनस्पतीरूपाने जीवाची उत्पत्ती (४) प्राण्याची उत्पत्ती व (५) लैंगिक संबंधामुळे जीवातून जीवाची उत्पत्ती. छांदोग्य व बृहदारण्यक यांत पंचाग्निविद्या या नावाने प्रस्तुत विषयाचे सुरेख वर्णन केलेले आहे.

मृत्यू व पुनर्जन्म – मृताचे दहन केले असता त्याचे शरीर पंचमहाभूतांत विलीन होते, कारण पंचमहाभूतांपासूनच ते बनलेले असते (छांदोग्य ५.१०.२). मनुष्य मरण पावतो, तेव्हा फक्त त्याचा आत्मा त्याला सोडून जातो (बृहदा. ४.३.८).

‘अकृतं पूरयित्वा त्रायते इति पुत्रः।’(= पित्याचे अपूर्ण कार्य पुरे करून जो त्याला तारतो, तो पुत्र होय) अशी एक व्याख्या आहे. स्त्रीपुरुषांच्या लैंगिक समागमामुळे रेत व रज यांचे मीलन होऊन पुत्र उत्पन्न होतो व वंश चालू राहतो. या तत्त्वावरच श्राद्धातील मंत्र प्रयुक्त केलेले आहेत. मनुष्याच्या शरीरात ज्या पूर्वजांचा अंश उतरलेला असतो, त्यांचे त्यांत स्मरण केलेले असते. विवाहाच्या वेळी जे मंत्र म्हणतात, त्यांतही वधूवरांच्या पूर्वजांचे स्मरण असते.

अशा प्रकारे उपनिषदांतील सर्व कल्पना आधुनिक शरीरशास्त्रातील कल्पनांशी जुळणाऱ्या आहेत.

प्राचीन आयुर्वेदाचार्यांना शरीररचना व शरीरव्यापार यासंबंधी पुष्कळ ज्ञान होते. चरक, सुश्रुत, वाग्भट, इ. आचार्यांच्या ग्रंथांत शरीरातील इंद्रिये, स्नायू, शिरा, धमन्या, मज्जातंतू, पाचकरस व त्यांच्या प्रक्रिया, रक्त, कफ, वात, पित्त, इ. विषयांचे वर्णन आढळते. पंचमहाभूते व अन्नातील घटक द्रव्ये यांचा काय संबंध असतो, चयापचयक्रिया कशी चालते, प्राणादी पाच वायूंवर शरीरातील भिन्न व्यापार कसे अवलंबून असतात, रक्त कसे उत्पन्न होते, पित्त व कफ यांचे कार्य कोणते, इ. विषयांची माहिती आयुर्वेदाच्या ग्रंथांत आलेली आहे. त्यांत संपूर्ण पचनेंद्रियसंस्थेला महास्रोतस हे नाव दिलेले आहे.

सुश्रुतसंहितेत शरीरातील अभिसरणाचे वर्णन केलेले आहे. पित्त, कफ, रक्त, रस, इ. द्रव्यांचे अभिसरण शिरा,

धमन्या व स्रोत यांच्यांतून होते. शिरा व धमन्यांचे अनेक वर्ग केलेले असून, त्यांच्या निरनिराळ्या कार्यांचेही वर्णन केले आहे. या व्यवस्थेत हृदय केन्द्रस्थानी असते, हे चरक व सुश्रुत यांना ज्ञात होते. मात्र त्यांना फुप्फुसांच्या कार्याची कल्पना नव्हती. मज्जातंतू व त्यांचे कार्य यांचे विस्तृत वर्णन या आचार्यांनी केले आहे.

वायू ही शरीरयंत्राची प्रेरक शक्ती होय, असे चरक म्हणतो. काही ठिकाणी अशा वायूंची संख्या दहा सांगितली आहे; तर काही ठिकाणी एकोणपन्नास सांगितली आहे. अनुवंश, गर्भधारणा व गर्भाची वाढ, आईबापांच्या मनःस्थितीवर गर्भाचे लिंग अवलंबून असणे, इ. विषयांचा ऊहापोह चरकाने केला आहे.

जीव किंवा आत्मा म्हणजे काय, जीव आणि शरीर यांचा भेदाभेद, इ. विषयांसंबंधी विविध प्रकारचे विचार व सिद्धांत सांख्य, योग, वेदान्त, इ. तत्त्वज्ञानांच्या शास्त्रांमध्ये प्रतिपादलेले आहेत. पाहा – जीव. [उ. मों. बा; पां. सा. ए. हिं]

जीवाराम

(इ. स. चे १९ वे शतक) एक भक्तकवी. हा बिहारमधील सारन गावाचा रहिवासी पंडित शंकरदास याचा पुत्र होय. पित्याजवळ व्याकरण व ज्योतिषशास्त्र या विषयांचे अध्ययन केल्यानंतर हा खरोद येथील मनसाराम नामक पंडिताकडे जाऊन अष्टांग योग शिकला. तिथून पुढे तो अयोध्येला गेला व रसिकाचार्य रामचरणदास याचा शिष्य झाला.

जीवाराम हा रामोपासनेतील माधुर्यभक्तीचा प्रमुख आचार्य मानला जातो. तो युगलप्रिया या नावाने प्रसिद्ध आहे. याचे चार ग्रंथ उपलब्ध आहेत —(१) रसिक प्रकाश भक्तमाल – यात रसिक परंपरेतील संतांची माहिती दिलेली आहे. (२) पदावली – यात १०७ पदांचा संग्रह आहे. त्यातील प्रत्येक पदात राम व सीता यांच्या शृंगाराचे वर्णन करून कवीने आपल्या हृदयातील रसिक भाव प्रकट केला आहे. (३) शृंगाररसरहस्य व (४) अष्टयामवार्तिक.

अयोध्येचा प्रसिद्ध रसिक भक्तकवी युगलानन्यशरण हा जीवारामाचा शिष्य होता. [हिं. सा. को. २; रा. भ. शा.]

जुआंग

ओडिशांतील धेंकनल व केओंजुर या भागात वसलेली एक वन्य जमात. यांच्या भाषेचे कोल गटातील भाषाशी बरेच साम्य असल्यामुळे हे लोक कोलरियन वंशातले असावे, असे काही पंडितांचे मत आहे. मात्र त्या वंशातील संताळ, हो, वगैरे आदिवासी लोकांशी आपला काहीही संबंध नाही, असे हे म्हणतात. केओंजुरमधील गोनासिक हे यांचे मूळ वसतिस्थान होय. प्रथम वैतरणी नदीच्या काठी यांची वसाहत होती. त्यांच्यापैकी काही लोकांना भुइयांनी तिथून हाकलून दिले व त्यांच्या जमिनी बळकावल्या, असे म्हणतात. मग ते लोक धेंकनल भागात जाऊन वसले.

जुआंग लोक अतिशय मागासलेले आहेत. त्यांच्या प्रदेशात दगडी हत्यारे सापडली आहेत, ती त्यांच्या पुरातन पूर्वजांची असावी. या लोकांना धातूंचा उपयोग माहीत नव्हता. त्यांच्यांत लोहार किंवा लोखंड ओतणारे नव्हते व त्यांच्या भाषेत लोखंडाला शब्दही नाही. त्यांना मातीची भांडी बनवता येत नव्हती. सूत कातणे व कापड विणणे हेही माहीत नव्हते. लज्जारक्षणासाठी स्त्रिया झाडांची पाने व मण्यांच्या माळा कमरेला बांधीत. पुरुषही कमरेला झाडांच्या लहान डहाळ्या बांधीत. धनुष्यबाण व गोफण एवढीच त्यांची हत्यारे होती.

गेल्या शतकाच्या अखेरपर्यंत हे लोक भटके जीवन जगत होते. जंगल तोडून तिथे धान्य पेरायचे व जमीन निकस झाली, की तिथून दुसरीकडे जायचे, अशी त्यांची पद्धत होती. सांप्रत हे स्थायिक झाले असून, भात, मका, डाळी, रताळी वगैरे पदार्थ पिकवतात; पण त्यांना त्यांच्या भरीला कंदमुळेही खावी लागतात. ते सर्व प्राण्यांचे मांस खातात. त्यांना दारूचे व्यसन असते.

यांच्या झोपड्या फारच लहान असतात. मुलांसाठी सामुदायिक शयनगृहे असतात; तिथेच पांथस्थांसाठीही एक पडवी ठेवलेली असते.

आता हे लोक थोडे सुधारले असून, कपडे वापरू लागले आहेत. पूर्वी वस्त्र वापरण्याची त्यांना भीती वाटत असे. त्याविषयी एक दंतकथा प्रचलित आहे, ती अशी–

गोनासिक येथील खडकातून वैतरणी नदी जेव्हा उगम पावली, त्या वेळी तिथे काही जुआंग स्त्री-पुरुष नग्नावस्थेत नृत्यगायन करण्यात दंग होते. ते पाहून नदीदेवी क्रुद्ध झाली व तिने त्या नग्न लोकांना झाडाची पाने कमरेभोवती बांधण्यास सांगितले. जो अशा प्रकारे पाने वापरणार नाही त्याचे मरण ओढवेल, असा तिने शापही दिला.

जुआंग लोक ठेंगणे, पण सुदृढ बांध्याचे असतात. स्त्रियांचा बांधा तर रेखीव आणि आकर्षक असतो. त्यांना गोंदून घेण्याची फार आवड आहे. कपाळावर तीन रेषा व प्रत्येक कानशिलावर तीन रेषा असे त्यांचे गोंदण असते. त्यांना या रेषांचा उगम वा अर्थ माहीत नाही आणि त्यासाठी कसलाही विधी वा समारंभ त्या करीत नाहीत. त्यांच्या गळ्यांत काचेच्या मण्यांच्या अनेक माळा व कानांत पितळी कर्णभूषणे असतात.

या लोकांना नृत्याची फार आवड आहे. ते करीत असलेले स्त्रीपुरुषांचे संमिश्र नृत्य रात्री चुडण्यांच्या प्रकाशात प्रेक्षणीय



जुआंग तरुणी

ले. पुरुष मध्यभागी उभे राहून खंजिरीच्या साथीवर गाणी तात व मुली भोवती फेर तात. झाडांच्या नी आपले देह न मुली जेव्हा पशुपक्ष्यांच्या लींचे अनुकरीत नाच-, तेव्हा ते नृत्य सुरेख दिसते.

वधर्म — या ना देवाची कल्पना नाही. भाषेत देव, , नरक या अर्थी नाहीत. परही त्यांना माहीत . संकटसमयी ते व भरपूर धान्य मिळावे म्हणून घरणीमातेला पशुबळी देतात. अशा ी एखादा वृद्ध जुआंग पुरोहिताचे काम करतो; त्याला नगम तात. हे लोक सूर्याला धर्मदेव म्हणतात. याव्यतिरिक्त , थानपती, मासिमुली, कालपात, हासुली, इ. देवतांचीही उपासना करतात. रेडे, बकरी, दूध, साखर हे पदार्थ प्रथम अर्पण करून मग आपण खातात. पेरणी वगैरे हंगामाच्या त्यांची पूजा करतात. आता ते काही हिंदू देवतांचीही करू लागले आहेत. खरिया, हो, वगैरे जातींच्या लोकांना घालताना जुआंग लोक वारुळाची माती व वाघाचे डे यांची नावे घेतात. यांचा जादूटोण्यांवर विश्वास नसतो.

विवाहप्रथा – यांचा विवाहसमारंभ साधा असतो. त्यात ही विधी नसतो. विवाहेच्छू तरुणाने मुलगी पसंत केली, की मागणी घालायला त्याचे मित्र जातात. मागणी मान्य , तर ते वधूला वराकडे घेऊन येतात. मग एक भाताचे वधूपित्याकडे पाठवतात. लग्नाच्या वेळी वधूबरोबर तिच्या णीही येतात. सर्व मिळून खाणेपिणे, नाचगाणे यात एक मजेने घालवतात. दुसऱ्या दिवशी वधूच्या मैत्रिणींना भात देऊन त्यांची पाठवणी करतात.

मुलीसाठी योग्य ती किंमत देऊन विवाह करणे प्रतिष्ठित जाते. पण एखादा तरुण योग्य किंमत देण्यास असमर्थ असला किंवा त्याची मागणी अमान्य झाली, तर तो मुलीला पळवून नेतो व तिच्याशी लग्न करतो. हा प्रकारही शिष्टसंमत आहे. सामुदायिक नृत्याच्या प्रसंगी अशा गोष्टी घडतात. त्यांना कोणीही विरोध करीत नाही.



जुआंग तरुण

या लोकांची अनेक गोत्रे असतात. ते सगोत्र विवाह करीत नाहीत. मात्र जातीत त्या मुलीशीच विवाह करतात. यांच्यांत विवाहविच्छेदाची प्रथा नाही व विधवेला पुनर्विवाहही करता येत नाही.

मर्तिकप्रथा – हे लोक प्रेते जाळतात. त्या वेळी प्रेताचे डोके दक्षिणेकडे ठेवतात. प्रेताची राख वाहत्या पाण्यात सोडून देतात. नंतर तीन दिवस सुतक पाळतात. त्यात मांस व मीठ खात नाहीत. मृताचे स्मारक उभारण्याची व पितरांची पूजा करण्याची चाल यांच्यांत नाही. [से. इं. १९११; हि. ओ. ले.; इं. स्ट. पा. प्रे., एप्रिल १९६०]

जुगती-मोहिनी

छत्तिसगडी प्रदेशातील देवतायुगुल. जुगती म्हणजे युक्ती आणि मोहिनी म्हणजे मोह घालणारी. थोडक्यात म्हणजे युक्तीने माणसाला भुलवणाऱ्या देवतांना जुगती-मोहिनी असे म्हणतात.

फार प्राचीन काळी देव जेव्हा पृथ्वीवर मानवासारखे राहत होते, तेव्हा एखादा देव मरण पावला, की जुगती – मोहिनी त्याला जिवंत करीत, अशा कथा आहेत. त्यामुळे त्यांना देवांच्या देवता असेही म्हणतात. छत्तिसगडी लोकगीतांत या देवतांचे उल्लेख वैपुल्याने आढळतात. [फो. साँ. छ.]

जुगार

दैवावर अवलंबून असलेला एक खेळ. पाहा– द्यूत.

जुझोतिया बुंदेलखंडातील एक ब्राह्मण जात. हे गौडांपैकी असून, मूळचे कनोजचे रहिवासी होते. जुझारसिंग नावाच्या बुंदेलखंडातील एका राजाने यज्ञासाठी त्यांना आपल्या राज्यात आणले. मग तिथेच ते स्थायिक झाले. हे लोक लढाऊ वृत्तीचे असल्याने यांना जुझोतिया असे नाव मिळाले. बुंदेलखंडात वास्तव्य केल्याने त्यांना बुंदेलखंडी ब्राह्मण म्हणूनही ओळखतात. पुढे बाजीराव पेशव्यांवरोबर ते महाराष्ट्रात आले. सध्या यांची वस्ती महाराष्ट्रात सर्वत्र आढळते. यांना परदेशी म्हणून ओळखतात. हे शुक्लयजुर्वेदी माध्यंदिन शाखेचे आहेत. हे गौड असूनही मत्स्याहार करीत नाहीत. अलिकडे गौडांपेक्षा द्रविडांशीच त्यांचा अधिक संबंध आला आहे. कनोजिया ब्राह्मण यांच्या हातचे अन्न घेत नाहीत. [ब्रा. भि. वि.]

जुन्नर महाराष्ट्रातील एक इतिहासप्रसिद्ध नगर. हे पुणे जिल्ह्यात शिवनेरी गडाच्या पायथ्याशी वसलेले असून, सह्याद्रीचा नाणेघाट तिथून जवळच आहे. या नगराचे नाव जीर्णनगर → जुन्ननगर → जुन्नर असे बनले असावे, असे श्री. स. आ. जोगळेकर यांचे मत आहे. जीर्ण या शब्दाचा जुन्न ~~असा~~ अपभ्रंश प्राकृतात आढळतो. या शब्दाला वृद्ध, प्रतिष्ठित असाही एक अर्थ आहे. या नावावरून जुन्नरची प्राचीनता आणि दीर्घकालीन प्रतिष्ठा सूचित होते.

जुन्नर येथे शक महाक्षत्रप नहपान या क्षहरातवंशीय राजाचा मंत्री अयम वत्स याची राजधानी होती. मीन हे शकवंशाचे आणखी एक नाव आहे. जुन्नरपासून जवळच मीना नदी आणि मीन्नेर खोरे आहे. यावरून जुन्नरपरिसरात शकांच्या क्षत्रपांची अधिसत्ता दीर्घकाळपर्यंत असावी, असे दिसते.

सोपारा, कल्याण व चौल या पश्चिम किनाऱ्यावरील बंदरांशी तगर, पैठण, वगैरे देशावरील पेठांचा संबंध जुन्नरनजीकच्या नाणेघाटाने जोडलेला होता. त्यामुळे जुन्नर हे व्यापारी उलाढालीचे मोठे केंद्र बनले होते. शक–क्षत्रप हे बौद्धधर्मीय असल्यामुळे जुन्नर येथे त्यांची सत्ता प्रस्थापित झाल्यानंतर जुन्नरच्या परिसरात अनेक बौद्ध लेणी खोदली गेली. या लेण्यांतील लेखांत कल्याण, भडोच, वगैरे बंदरांतील व्यापाऱ्यांचे व नागरिकांचे तसेच शक, यवन वगैरे परकियांचे दोन लेख आहेत.

जुन्नरच्या परिसरात एकूण दीडशे लेणी असून, ती भीमाशंकर, अंबिका, भूतलिंग, शिवनेर, तुळजा, गणेश व सुलेमान अशा सात गटांत विभागलेली आहेत. ही लेणी नाशिक व लोणावळे गटांतील लेण्यांच्या मानाने, कलेच्या व वैभवाच्या दृष्टीने कमी दर्जाची असली, तरी लेण्यांच्या सर्व अंगोपांगांच्या उत्क्रांतीच्या दृष्टीने महत्त्वाची आहेत. कारण शिल्पशास्त्राने मान्य केलेल्या प्रमाणावरून दिसून येते, की सह्याद्रीत लेणी खोदणे सुरू झाले, तेव्हापासून ती प्रथा लुप्त होईपर्यंत इथे शिल्पकाम चालू होते. भीमाशंकर व अंबिका हे गट ज्या टेकडीत आहेत, तिचे नाव मानमोड होय. मूळ नाव मानमुकुट असे होते. अंबिका गटाला हे नाव त्यातील अंबिकेच्या मूर्तीवरून प्राप्त झालेले आहे. ही जैनांची देवी आहे.



अंबिका गटातील चैत्यलेणे – जुन्नर

जुन्नर गटातली लेणी मूळ बौद्धांच्या हीनयान पंथाची होती. कालांतराने त्यांवर महायान, जैन व ब्राह्मणी संस्कार झाले. या लेण्यांत अनेक सुंदर चैत्यगृहे आहेत (चैत्यगृह पाहा). स्थापत्याच्या दृष्टीने इथले सातकर्णी स्तंभ व बौद्ध स्तूप प्रेक्षणीय आहेत. इथे सर्व प्रकारचे स्तूप आढळतात. काही लेण्यांत रंगीत रेखाकृती काढलेल्या होत्या; त्यांपैकी काही अजून चांगल्या स्पष्ट दिसतात.

जुन्नरच्या लेण्यांत एकूण पस्तीस लेख आहेत. बहुतेक लेख किरकोळ दानांचे आहेत. ऐतिहासिक महत्त्वाचा असा लेख एकच असून, तो भीमाशंकर गटांतील क्रमांक सहा या लेण्यात आहे. महाक्षत्र नहपान याचा मंत्री अयम वत्सगोत्री याने हे धर्मकृत्य केले, असा उल्लेख या लेखात आहे.

नहपानाने जुन्नरपर्यंत सत्ता काबीज करून तिथे आपला मंत्री ठेवल्यानंतर (सनपूर्व १ ले शतक) शक–क्षत्रपांनी आपली सत्ता महाराष्ट्रात लोकप्रिय करण्यासाठी मोठमोठी दाने दिली, लोकोपयोगी कामे केली, सालोसाल सहस्रभोजने घातली, धर्मशाळा बांधल्या, घाट बांधले व धरमतरी ठेवल्या. या त्यांच्या पुण्यकृत्यांचा उल्लेख नाशिक व कार्ले येथील लेखांत आलेला आहे.

परंतु त्यांचे हे सुराज्य फार काळ टिकू शकले नाही. मावळभागात उदयास आलेल्या सातवाहन घराण्यातील गौतमीपुत्र

सातकर्णी याने संघटित रीत्या शक–क्षत्रपांना नाशिकच्या परिसरात पराभूत करून महाराष्ट्रात स्वराज्यस्थापना केली. सातवाहन विजयी झाल्यानंतरच्या काळात जुन्नरपरिसरातील सर्व बौद्ध लेण्यांवर ब्राह्मणी संस्कार झाले. लेण्याद्रीतील गणेशाची आणि शिवनेरीवरील शिवाई देवीची स्थापना ही अशीच नंतरच्या काळातील घटना आहे.

इ. स. १००० ते १३०० या काळात हा भाग सिंद घराण्याच्या प्रभुत्वाखाली होता. इ. स. १०११ मध्ये जुन्नीनगर (जुन्नर) येथे सिंद घराण्यातील गोवन (गोपन) नामक राजा राज्य करीत होता, असा पुरावा एका कोरीव लेखात मिळतो. महाराष्ट्रात इस्लामी सत्ता स्थापन झाल्यावर जुन्नरचे प्राचीन वैभव नष्ट झाले. परंतु एक मोक्याचे ठाणे म्हणून त्याचे महत्त्व अबाधित राहिले. मुसलमानी अमलात बांधलेली सौदागर घुमट नावाची प्रेक्षणीय वास्तू इथे अजून चांगल्या स्थितीत आहे. शहाजीच्या जहागिरीच्या गावांत जुन्नरचा समावेश होता. शिवछत्रपतींचा जन्म जुन्नरजवळच्या शिवनेरी गडावर झाला.

जुन्नरच्या अवतीभवती प्राचीनतेच्या साक्षी असलेले अनेक अवशेष विखुरलेले आहेत. [प्रा. म.; सह्याद्रि; मु. पू. म.]

जुम्मा मुसलमान लोकांचा विश्रांतीचा दिवस. शुक्रवारी जुम्मा पाळावा, असा दैवी आदेश आहे, असे पैगंबराचे वचन आहे. हा सर्वोत्तम दिवस असून, याच दिवशी शेवटचा न्यायनिवाडा होईल, असे मानले जाते. या दिवशी सर्व मुसलमान स्नान करून व स्वच्छ कपडे घालून जामी मस्जिद (मुख्य मशीद) मध्ये जातात आणि तिथे नेहमीहून वेगळी प्रार्थना म्हणतात व इमामाजवळ बसून खुत्बा ऐकतात. अशा वेळी फालतू गप्पा मारणे वा थट्टामस्करी करणे निषिद्ध आहे. जो हा नियम पाळतो, त्याला एक वर्षभर उपवास व प्रार्थना केल्याचे पुण्य लाभते, असे पैगंबराने म्हटले आहे. जो शांतपणे खुत्बा श्रवण करतो, त्याच्या सर्व पापांचे क्षालन होते, अशी मुसलमानांची श्रद्धा आहे. या दिवसाचा काही भाग विशेष पवित्र असतो; पण तो कोणता हे कोणालाही माहीत नसते. म्हणून त्या दिवशी सतत क्षमायाचना व ईश्वराची प्रार्थना करीत राहावे, असे सांगितले आहे. त्या विशिष्ट पवित्र कालावधीत केलेल्या प्रार्थनेमुळे मनोवांछित प्राप्त होते, अशी भाविकांची श्रद्धा असते. जुम्माच्या दिवशी अधिक प्रमाणावर दानधर्म करणे पुण्यप्रद मानले जाते.

रावापासून रंकापर्यंत सर्वांनी जुम्माच्या दिवशी आपले सर्व उद्योग बंद ठेवावे, अशी धर्माज्ञा आहे. पण हा दिवस विशेष पवित्र असल्यामुळे या दिवशी एखाद्या कार्याचा आरंभ करणे लाभदायक असते, अशी समजूत आहे. म्हणून मुसलमानांत शुक्रवारी नवीन कामे सुरू करण्याची प्रथा आहे. सुटीचा दिवस म्हणून पत्ते, फासे, नाच, गाणे, इ. करमणुकीच्या कार्यक्रमांना त्या दिवशी बहर येतो. [डि. इ.; मु. इं.]

जुळी मुले एकाच प्रसूतीत जन्माला येणाऱ्या दोन मुलांना जुळी मुले म्हणतात. जुळ्या मुलांचा जन्म ही घटना अतिप्राचीन काळापासून मानवाला आश्चर्यकारक वाटत आली आहे. या आश्चर्यभावाबरोबर याविषयी भीतीही वाटताना दिसते. ही घटना विरळा आढळणारी असल्यामुळे ती अनैसर्गिक आणि म्हणूनच अशुभ मानणारे अनेक आदिवासी मानवसमूह आजही आहेत. जुळी मुले आणि त्यांना जन्म देणारी स्त्री यांना पापी समजून त्यांना ठार मारण्याचे प्रकारही पूर्वी घडत. आफ्रिकेतील निग्रो लोक अशा स्त्रीला तिच्या मुलांसह अरण्यात हाकलून देत असत. प्राचीन काळी जुळ्यांविषयीची ही भावना इजिप्त, असीरिया, बाबिलोन, भारत, इ. देशांतील सुसंस्कृत लोकांतही प्रचलित होती.

भारतातील वन्य लोक जुळ्यांचा जन्म ही अशुभ घटना मानून, अशुभनिवारणार्थ काही विधी करतात. मुलगा व मुलगी असे जुळे अधिक अशुभ मानले जाते. त्यांच्या दृष्टीने ते बहीण-भावांच्या समागमाइतके पापरूप आहे.

काही जातींत असा समज रूढ आहे, की जुळ्या मुलांपैकी एक पतीच्या बीजातून आणि दुसरे एखाद्या देवतेच्या किंवा भूतपिशाचाच्या प्रभावामुळे उत्पन्न होते. आणखी एक समज असा आहे, की पतीशिवाय अन्य पुरुषाशी संबंध आल्यामुळे जुळी मुले होतात. अशी ज्यांची समजून आहे, ते लोक जुळ्या मुलांच्या मातेला अत्यंत पापी समजणे स्वाभाविक आहे.

सीतेला लव-कुश हे जुळे मुलगे झाले, असे रामायणात सांगितले आहे. पण ही घटना सीतेच्या बाबतीत लोकमानसाला रुचली नाही. सीतेच्या चारित्र्याविषयी कोणी शंका घेऊ नये असे लोकांना वाटत असे, म्हणून मग लौकिक साहित्यात एक कथा निर्माण केली गेली, ती अशी —

सीतेला कुश हा एकच मुलगा झाला होता. त्याला घेऊन ती पाणवठ्यावर गेली. वाल्मीकीला ते ठाऊक नव्हते. त्याला वाटले, की सीतेच्या मुलाला वानरांनी पळवले. म्हणून मग वाल्मीकीने लव्हाळ्याचा एक मुलगा तयार करून आणि त्याच्यात प्राण भरून तो पाळण्यात ठेवून दिला.

जुळ्या मुलांच्या जन्मामागे अद्‌भुत दैवी सामर्थ्य असते, अशा समजुतीने काही जमाती अशा मुलांना विशेष मान देतात. पाऊस पडावा किंवा प्रजोत्पादन व्हावे, या हेतूने जुळ्या मुलांचा

उपयोग करून घेतात. ऋग्वेदातील अश्विनौ हे जुळे भाऊ आहेत. त्यांच्यामुळे पाऊस पडून समृद्धी येते आणि पुरुषांची प्रजोत्पादक शक्ती वाढते, असे त्यांच्या सामर्थ्याचे वर्णन ऋग्वेदात आले आहे. अग्निहोत्री यजमानाच्या पत्नीला जुळे झाले अथवा त्याच्या घरी असलेल्या गाईला जुळे झाले तर मरुतांसाठी इष्टी करावी, असे मैत्रायणी संहितेत सांगितले आहे (२.१.८). [एन्सा. रि. ए.; श्री. को.]

जुहू (१) एक सूक्तद्रष्टी व ब्रह्मवादिनी. हिच्या नावावर ऋग्वेदातील १०.१०९ हे सूक्त आहे. या सूक्तात तिने सृष्टी व तिच्यासाठी आवश्यक असलेले तप यांची उत्पत्ती सत्यापासून झाली असल्याचे सांगितले आहे. ती म्हणते, 'अमर्याद समुद्र, अंतरिक्षातील वायू, अंधार नष्ट करणारे प्रभावी तेज, उग्र परंतु हितप्रद असे तप आणि दिव्य उदक हे सर्व सनातन सत्यापासून प्रथम उत्पन्न झाले. जो प्रार्थना व तप यात निमग्न असतो, तो देवांपैकीच एक होतो.' तिच्या काही अन्य ऋचांतून सामाजिक प्रतिष्ठेमागील गुणकर्मांचे स्थान स्पष्ट होते.

या सूक्तात एक छोटेसे कथाबीज आढळते, ते असे – ज्याप्रमाणे सोमाने नेलेली बृहस्पतीची पत्नी त्याला परत मिळाली, त्याप्रमाणे एका ब्राह्मणाला त्याची पत्नी देवांच्या मध्यस्थीने मिळाली.

या घटनेवर जुहूने असे भाष्य केले आहे, की धर्माने विवाहबद्ध झालेल्या स्त्रीला पतीकडे परत पोचवून देवांनी एका पातकाचे निरसन केले. त्यामुळे पृथ्वीतील उर्जस्वितेचा (सत्त्वांशाचा) उपभोग घेऊन (जनता) नेहमी सर्वव्यापी ईश्वराची उपासना करू शकते.

(२) एक यज्ञीय-पात्र. अग्नीत आहुती देण्यासाठी या पात्राचा उपयोग करतात. जुहूचा आकार पळीसारखा असतो. या शब्दाची व्युत्पत्ती अशी – हूयते अनया इति जहूः (= जिच्या योगाने हवन केले जाते ती जुहू होय).

जृंभांबिका असुरांनी गिळलेल्या देवांना बाहेर काढण्यासाठी शिवाने निर्मिलेली एक शक्ती. याविषयी वामन पुराणात एक कथा दिली आहे, ती अशी – एकदा देव आणि प्रमथगण यांचे असुरांशी युद्ध सुरू झाले असता, असुरांनी देवांना पराभूत करून गिळून टाकले. हे वृत्त शिवाला समजताच त्याने जृंभांबिका नामक शक्ती निर्माण करून ती असुरांवर सोडली. या शक्तीच्या प्रभावाने असुरांच्या सर्व इंद्रियांना ग्लानी आली आणि ते जांभया देऊ लागले. जांभयांमुळे उघडलेल्या त्यांच्या मुखांतून देव भराभर बाहेर पडले आणि त्यांनी नव्या उत्साहाने पुन्हा युद्ध करून असुरांचा पराभव केला. [वा. पु. स्ट.]

जेऊर सोलापूर जिल्ह्यातील अक्कलकोटपासून आठ मैलांवर हे गाव आहे. इथे एक पुरातन शिवालय आहे. त्यातील शिवलिंग स्वयंभू आहे, असे म्हणतात. ते शाळुंकेला चिकटलेले नाही. त्या दोहोंच्या मध्ये पोकळी असून, तिथे सतत पाणी झुळझुळत असते.

जेऊरच्या शिवालयाला पूर्वी भक्तेश्वराचे मंदिर म्हणत. सुमारे नऊशे वर्षांपूर्वी एका धनगर स्त्रीच्या तपाने प्रसन्न होऊन शंकराने तिला इथे दर्शन दिले, अशी आख्यायिका आहे. भक्तासाठी देव प्रकट झाला, म्हणून त्याला भक्तेश्वर हे नाव मिळाले असावे. सांप्रत इथल्या शिवलिंगाला काशीलिंग असे म्हणतात. या नावाविषयी एक कथा प्रचलित आहे, ती अशी–

इ. स. च्या १२ व्या शतकाच्या अखेरीस एक राजा शिवदर्शनासाठी काशीला गेला होता. त्याच्याबरोबर त्याची राणीही होती. ती दोघे गंगास्नान करीत असता राणीच्या गळ्यातला मौल्यवान कंठा गंगेत पडला. पुष्कळ शोध करूनही तो सापडला नाही. पुढे राजाला स्वप्नदृष्टांत झाला, की जेऊर येथे जी काशीची गंगा अवतरते, त्या गंगेत हरवलेला कंठा मिळेल. तो दृष्टांत खरा झाला आणि गंगेच्या आगमनप्रसंगी गाभाऱ्यात साचलेल्या वाळूत राजाला तो कंठा मिळाला. तेव्हापासून इथल्या शिवलिंगाला काशीलिंग असे नाव पडले.

श्रावणातल्या दर सोमवारी इथल्या शिवालयात गंगा येते, असा समज आहे. त्यावेळी गाभारा पाण्याने भरून जातो. ते पाणी दुधासारखे पांढरे असते व त्यात पांढरी वाळू, शिंपले, इ. वस्तू सापडतात. गंगा येण्यापूर्वी देवालयातून भयानक आवाज ऐकू येतो. त्यामुळे गंगेचे हे आगमन पाहायला तिथे कोणी थांबत नाही.

हे मंदिर हेमाडपंती बांधणीचे आहे. याच्या उत्तरेला शेषशायी नारायणाचे लहानसे मंदिर आहे.

कार्तिक शुद्ध पंचमीला इथे मोठी यात्रा असते. त्या वेळी पाच दिवस काठ्यांची मिरवणूक, पूजा, इ. समारंभ होतात. [श्री. दा. रा. थावरे– पुरुषार्थ, देवता-विशेषांक, जून–जुलै, १९६३]

जेजुरी खंडोबा या देवतेचे महाराष्ट्रातील एक प्रसिद्ध स्थान. हे ठिकाण पुण्याच्या आग्नेयीस सुमारे तीस मैलांवर आहे. इथल्या टेकडीवर कऱ्हे पठार व गडकोट अशा दोन ठिकाणी खंडोबाची मंदिरे आहेत. यांतील कऱ्हे पठार हे अधिक जुने असल्याची समजूत आहे. हे ठिकाण जेजुरी गावाच्या नैर्ऋत्येस टेकडीच्या माथ्यावर आहे. या मंदिराच्या परिसरातील

राममंदिरात इ. स. १७९० चा एक मराठी शिलालेख आहे.



खंडोबाचे देऊळ – जेजुरी

कऱ्हे पठाराच्या ईशान्येला टेकडीवरच खंडोबाचे दुसरे स्थान आहे. त्याच्या भोवती तटबंदी असल्यामुळे लोक त्या स्थानाला कडेकोट म्हणतात. वर जाण्यासाठी पायऱ्यांनी बांधलेला एक सुबक रस्ता आहे. या रस्त्याच्या दुतर्फा शेकडो दीपमाळा आहेत. सोपा, मंडप आणि गाभारा असे या मंदिराचे तीन विभाग आहेत. मंदिरासमोर वीस फूट व्यासाचे शिळी पत्र्याने मढविलेले एक कासव आहे. कासवाशेजारीच वगाड घेण्याचा एक खांब आहे. (वगाड पाहा) या खांबाशेजारी मणी दैत्याचा नऊ फूट उंचीचा एक दगडी पुतळा आहे. या मंदिराच्या सोप्यात एक खंडा (खड्ग) आहे. या खंडाला कालखड्ग असे म्हणतात. याची लांबी चार फूट, रुंदी चार इंच व वजन सुमारे ३५ किलो आहे. याच खड्गाने मल्लारिमार्तंडाने मणी दैत्याचा पराभव केल्याचे सांगतात.



मणी दैत्याची मूर्ती – जेजुरी

या मंदिराच्या गाभाऱ्यात खंडोबा व म्हाळसा यांची दोन स्वयंभू लिंगे आहेत. त्यावर रुपेरी आच्छादनाचे मुखवटे आहेत. या स्वयंभू लिंगांच्या मागे खंडोबा व म्हाळसा यांच्या उभ्या मूर्तींच्या तीन जोडया आहेत.

प्रदक्षिणेच्या मार्गात तुळजाभवानी व गणपती यांची मंदिरे आहेत. त्यांच्यापुढे एक भव्य शिला आहे. ही शिला महामारी किंवा घृतमारी म्हणून ओळखली जाते. हिची कथा अशी—

मणि-मल्ल दैत्यांचा वध करण्यासाठी अवतार घेतेवेळी शंकराने रागाने जटा आपटल्या, तेव्हा ही महामारी उत्पन्न झाली. तिला तूप पाजले, तेव्हा ती घृतमारी बनली. तिने मार्तंड भैरवाला युद्धात खूप मदत केली. मग ती इथे शांत झाली आणि शिला होऊन पडली.

या शिळेच्या पलिकडेच उमाजो नाईकाची तालीम आहे. मंदिराच्या बाहेर सव्वालाखाचा भुंगा या नावाचे एक स्थान आहे.

या मंदिरात अनेक शिलालेख आहेत. त्यांतील सर्वांत प्राचीन शिलालेख इ. स. १२४६ या कालाच्या उल्लेखाचा आहे.

इ. स. १५१० च्या सुमारास चैतन्य महाप्रभू यात्रेच्या निमित्ताने इथे आले होते. त्यांनी इथल्या वाघ्या–मुरळ्यांना नैतिक आचरणाचा उपदेश केला व त्या उपदेशाने इंदिरा नावाची एक मुरळी आपला अनैतिक धंदा सोडून सन्मार्गाला लागली, असे सांगतात.

मराठेशाहीत अनेक सरदारांनी व पेशव्यांनी खंडोबाला नवससायास केल्याचे कळते. वारभाईचे कारस्थान यशस्वी होण्यासाठी व गंगाबाईला मुलगा होण्यासाठी नाना फडणवीसाने खंडोबाला नवस केला होता आणि तिला पुत्र झाल्यावर नवसफेडीसाठी एक लाख रुपये इथे खर्च केले होते. अहिल्याबाईंनी इ. स. १७४२ ते १७७७ या काळात या मंदिराची बरीच डागडुजी केली.

जेजुरीला चंपाषष्ठी, सोमवती अमावास्या, चैत्री, श्रावणी, पौषी आणि माघी या चार पौर्णिमा, या तिथींना विशेष उत्सव होतात. चंपाषष्ठी हा इथला सर्वांत मोठा उत्सव होय. पाहा – खंडोबा [खंडोबा; म. चा. दै.; म. मा.]

जेट्टी तेलंगी पैलवानांची एक जात. यांची मुख्य वसती तंजाऊरच्या आसपास असली, तरी ते तेलुगू भाषा बोलतात. ते स्वतःला उच्च वर्णाचे मानतात व गळयात जानवे घालतात. यांचे पाच वर्ग आहेत. ते त्यांच्या कर्तबगारीप्रमाणे त्यांना प्राप्त होतात. कुस्ती खेळणे व शक्तीचे प्रयोग करणे, हा यांचा मुख्य व्यवसाय आहे. यांच्याकडे औषधी तेले असतात व ती चोळून ते रोग्याची व्याधी दूर करतात. निखळलेले हाडांचे सांधे नीट बसवणे, याचेही त्यांना ज्ञान असते. पूर्वी काही जेट्टी

तंजाऊरच्या राजाच्या खजिन्यांचे राखणदार होते.

बरेच जेट्टी तमिळनाडमधून म्हैसूर भागात जाऊन स्थायिक झाले. तिथे ते वज्रमुष्टीने युद्ध खेळून पूर्वीच्या राजांचे मनोरंजन करीत. त्यात विजयी होणाऱ्याला राजाकडून शेलापागोटे व इतर बक्षिसे मिळत. या पराक्रमामुळे त्याला जातीतील वरच्या वर्गात प्रवेश मिळे. म्हैसूरच्या काही भागांत त्यांना मुष्टिग असे म्हणतात. ते मल्लभाष नामक बोली बोलतात. काही जेट्टी वधदंड झालेल्या अपराध्याला मान मुरगळून ठार मारण्याचे काम करीत, असे सांगतात. [का. ट्रा. स. इं.]

जेतवन बौद्धांचे एक पवित्र स्थान. उ. प्रदेशातील श्रावस्तीच्या दक्षिणेला हे वन आहे; महेतच्या दक्षिणेला सहेत म्हणून जे स्थान आहे, तेच जेतवन होय, असे पुरातत्त्वज्ञांनी सिद्ध केले आहे. जेतवन हे अत्यंत प्राचीन असे बौद्ध क्षेत्र होय. इथे बुद्धाने काही काल वास्तव्य केले होते. त्रिपिटकामध्ये गौतम बुद्धाची जेवढी प्रवचने ग्रथित आहेत, त्यांतील निम्म्याहून अधिक प्रवचने बुद्धाने जेतवनात केलेली आहेत. याशिवाय अनेक भिक्षुसंघांनाही बुद्धाने इथेच उपदेश केला आहे.



जेतवनदान – भरहूत

विनयपिटकाच्या चुल्लवग्ग भागात या जेतवनाचा इतिहास आला आहे, तो असा–

अनाथपिंडक नावाचा एक श्रीमंत व्यापारी होता. तो एकदा जेत राजाच्या राजवाड्यात गेला असता तिथे दुसऱ्या दिवशी गौतम बुद्ध येणार असल्याचे त्याला समजले. गौतम बुद्धाचे दर्शन घेण्याच्या इच्छेने दुसऱ्या दिवशी पहाटेच तो तिथे पोचला. दर्शन घडताच तो बुद्धाचा शिष्य झाला. मग त्याने बुद्धाला एका वर्षावासासाठी आपल्या गावी बोलावले. त्या वेळी बुद्धाच्या निवासासाठी त्याने जे स्थान शोधले, तेच हे जेतवन होय. जेतवनाची संपूर्ण भूमी झाकली जाईल एवढी कार्षापण नामक सोन्याची नाणी (अठरा कोटी) जेतवनाच्या मालकाला अर्थात जेतराजाला देऊन अनाथपिंडकाने ती भूमी विकत घेतली आणि तिथे बुद्धासाठी अनेक विहारही बांधले. [पु. त. नि.]

जेतवनविहार एक प्राचीन बौद्ध विद्यापीठ. हे विद्यापीठ पाटलिपुत्राजवळ होते. या विद्यापीठाच्या प्राकारात भिक्षू आणि विद्यार्थी यांच्यासाठी निवासस्थाने, प्रार्थनागृहे, प्रवचनगृहे, भोजनगृहे, स्नानगृहे, रुग्णालये, ग्रंथशाळा, इ. इमारती बांधलेल्या होत्या. ग्रंथालयात बौद्ध धर्माचे सर्व ग्रंथ तर होतेच; त्याशिवाय बौद्धेतर परंपरांतील धर्म, तत्त्वज्ञान, शास्त्रे व कला या विषयांवरच्याही उत्तमोत्तम ग्रंथांचा मोठा संग्रह होता. पाटलिपुत्राच्या सन्निध असूनही शहरातील गजबजाटापासून हे स्थान दूर होते. त्यामुळे इथला एकांत विद्याध्ययनाला आणि ध्यानधारणेला पोषक होता. विद्यापीठाच्या परिसरात अनेक पुष्करिणी होत्या आणि त्यांच्यावर नाना तऱ्हेच्या वृक्षवेलींची छाया पसरलेली होती. अशा या शांत व शीतल वातावरणात व्यासंगी आणि तपस्वी अशा भिक्षूंकडून अनेक जिज्ञासू विद्यार्थी, बौद्धधर्माचे उच्च शिक्षण घेत. [ए. सि. ए. हिं.]

जेथिअन गया जिल्ह्यातील राजगिरजवळचे एक गाव. यष्टिवन या नावाचें हे अपभ्रष्ट रूप होय. या यष्टिवनात बुद्धाने तीन महिने वास्तव्य करून धर्मप्रवचने केली होती, असे सांगतात. ती प्रवचने श्रवण करण्यासाठी राजा बिंबिसार या यष्टिवनात जात असे. या गोष्टीचे स्मारक म्हणून अशोकाने यष्टिवनाच्या मध्यभागी एक स्तूप बांधला होता.

इथून जवळच तपोवन नामक अरण्य आहे. त्यात उष्ण पाण्याचे चार झरे आहेत. ते बुद्धाने उत्पन्न केले, अशी दंतकथा सांगतात. तिथे एका स्तूपाचे अवशेष आहेत. [गया गॅझे.]

जैंतिया

आसाममधील खासी व जैंतिया या डोंगराळ भागात वसलेली एक जमात. हे लोक ऑस्ट्रिक वंशाचे असून, ते चीनमधून आसामात आले, असे म्हणतात. या लोकांचा रंग उजळ व बांधा पिळदार असतो. मात्र नाक चपटे व डोळे तिरकस असल्यामुळे यांच्यांत सौंदर्य क्वचित आढळते. यांचे कपडे व देह बहुधा अस्वच्छ असतात, कारण यांचा पाण्याशी फारसा संबंध येत नाही. हे लोक लढाऊ वृत्तीचे असून, धनुष्य-बाण व ढाल-तलवार ही शस्त्रे नेहमी जवळ बाळगतात. यांची ढाल खूप मोठी असते. कधी कधी तिचा छत्रीसारखाही उपयोग होतो.

प्रामाणिकपणा हा यांचा मोठा सद्‌गुण आहे. हे लोक आळशी आणि कलाकुसरीत मागासलेले आहेत. त्यांना विणकाम येत नाही. ते इतर जमातींकडून आपले सर्व कपडे विकत घेतात. तांदूळ हे यांचे मुख्य अन्न होय. सर्व प्रकारचे मांस यांना चालते. मात्र देवक मानलेल्या पशूचे मांस हे खात नाहीत. यांच्यावर कधी कधी कंदमुळे खाऊन निर्वाह करण्याचीही वेळ येते. यांना पान खाण्याचे मोठे व्यसन आहे.

वारसा – या लोकांत मालमत्तेचा वारसा मुलाकडे न जाता बहिणीच्या मुलाकडे जातो. पूर्वी राजपदही राजभगिनीच्या पुत्रालाच मिळत असे. राजाच्या बहिणीला कुंवरी म्हणत. तिचा विवाह प्रमुख प्रजाजनांनी निवडलेल्या खानदानी पहाडी कुलातील तरुणाशी होत असे.

विवाहप्रथा – यांच्या विवाहात कोणतेही विधी नसतात. तरुणाने आपल्याला पसंत असलेल्या तरुणीला मागणी घालायची व तिच्या आईबापांनी मान्यता दिली, की दोघांनी एकत्र राहायचे, अशी त्यांची पद्धत आहे. अशा या विवाहाचे नैतिक बंधनही त्यामुळे शिथिल असते. विवाहविच्छेद केव्हाही होऊ शकतो. अशा वेळी दोघेही एकमेकांकडून घेतलेले शिंपले फेकून देतात व काडीमोड जाहीर करतात.

देवधर्म – देवापेक्षा भुताखेतांवर यांची अधिक श्रद्धा असते. ती भुते किंवा क्षुद्र दैवते कडे, कपारी, डोंगर, झाडांची राई अशा ठिकाणी राहतात.

दारू पिताना हे लोक प्रथम देवाच्या नावाने पेल्यात तीन वेळा बोट बुडवतात आणि दोन्ही खांद्यांवर व दोन्ही बाजूंना एक एक थेंब टाकून मग ती पितात.

पूर्वी गंभीर गुन्ह्यासाठी राजाची गुलामगिरी ही शिक्षा दिली जात असे. जुन्या काळी जलदिव्य करण्याची प्रथाही यांच्यांत होती.

मर्तिकप्रथा – हे लोक प्रेते जाळतात. मृत्यूनंतर तीन-चार दिवस किंवा विशेष प्रसंगी काही महिनेही प्रेत घरात ठेवतात. त्यासाठी लाकडाची कोरीव शवपेटी तयार केलेली असते. प्रेत त्या शवपेटीत ठेवून त्याला धूर देतात. दहनसंस्काराच्या दिवशी तिरडीवर घालून ते स्मशानात नेतात. त्या वेळी मयताचे नातेवाईक आक्रोश करीत बरोबर जातात. बासरीवर शोकगीत वाजविण्यात येते. चितेवर प्रेताचे दहन करताना मृतात्म्याला पानसुपारी, फळे वगैरे वस्तू अर्पण करतात. पशुबलीही देतात. त्याच वेळी चारही दिशांना बाण सोडतात. प्रेताचे पुरते दहन झाल्यानंतर राख एका मांडयात भरून ते मांडे घरी नेतात. पुढे शकुन-मुहूर्त पाहून ते स्मशानात पुरतात. त्या दिवशी मोठे गावजेवण घालतात व नृत्याचा कार्यक्रमही करतात.

रक्षापात्र पुरल्या जागी दगडी स्मारके बनविण्याची चालही या लोकांत आहे. काही ठिकाणी नुसते ओबडधोबड दगड उभे केलेले दिसतात; तर काही ठिकाणी लहान दगडी पायांवर गोलाकार सपाट शिळा बसविलेली आढळते. [बॅ. आ. क.; इं. स्ट. पा. प्रे. – जाने. १९६०]

जैन कला

जैन धर्म हा वैराग्य, मोक्ष व तन्मूलक तपःसाधना या गोष्टींना महत्त्व देणारा असला, तरी जैनांच्या सांस्कृतिक परंपरेत कलेच्या उपासनेलाही महत्त्वाचे स्थान मिळाले आहे. कलेची जोड दिल्याशिवाय कोणताही धर्म लोकमानसात रुजत नाही, हे जाणून जैन आचार्यांनी अनेक कलांकडे योग्य ते लक्ष पुरवले. प्राचीन जैन साहित्यात ठायी ठायी बहात्तर कलांचा उल्लेख आढळतो.

जैन कलाकारांनी आध्यात्मिक भावना जागृत करणे, हे ध्येय आपल्या दृष्टीपुढे ठेवले असून, पाषाण, भूर्जपत्र, धातू, भिंती, इ. आधारांवर आपली कलाकुसर निर्माण केली आहे. जीवाच्या उद्धारासाठीच त्यांनी कलेचा प्रपंच केला, हे खरे असले, तरी कलेतल्या शिव–सुंदर भावांकडे त्यांनी दुर्लक्ष केले नाही. जैन मंदिरे, शिल्पे किंवा चित्रे ही धार्मिक उपासनेसाठी निर्माण झाली असली, तरी त्यांत सौंदर्याचे आणि त्याबरोबरच लोकजीवनाचेही दर्शन घडते. जैनांच्या कलावस्तू धर्माशी संबद्ध असूनही कलेची उत्कृष्ट प्रतीके ठरल्या आहेत.

मूर्तिकला – जैन मूर्तिकलेचा उगम केव्हा झाला ते निश्चित ठरवणे कठीण असले, तरी तो सनपूर्व ६०० च्या सुमारास झाला असावा, असे पुरातत्त्ववेत्त्यांचे मत आहे. कारण त्या शतकातल्या काही जैन मूर्ती सापडल्या आहेत. कलिंगाधिपती खारवेल याच्या शिलालेखावरून कळते, की नंदवंशाचे राज्य असताना मगध देशात जिनमूर्तींची पूजा–प्रतिष्ठा होत असे.

लोहानीपूर येथे एक प्राचीन मस्तकहीन जिनप्रतिमा सापडली आहे. तिच्या चमकदार पृष्ठभागावरून ती मौर्यकालीन

असावी, असे अनुमान केले जाते. हडप्पा येथील उत्खननात मिळालेली मस्तकहीन नग्न मूर्ती आणि लोहानीपूरची भग्न मूर्ती यांच्यांत बरेच साम्य आहे. या मूर्तींचा घडण वैदिक किंवा बौद्ध परंपरेपेक्षा जैन परंपरेशी मिळती-जुळती वाटते. यावरून जैन मूर्तिकलाही सिंधुसंस्कृतीइतकी प्राचीन आहे, असा कित्येक विद्वानांचा तर्क आहे. मात्र त्याला निश्चितपणा देणारा पुरावा अजून उपलब्ध झालेला नाही.



आदिनाथ तीर्थंकर– अबू

जैनांच्या मूर्तिकलेचा उगम तीर्थंकरांच्या उपासनेतून झाला आहे. त्यांच्या परमार्थसाधनेचे अनुकरण करण्याची इच्छा सामान्यांच्या मनात उदित व्हावी, या उद्देशाने प्राचीन काळी तीर्थंकरांच्या मूर्ती निर्माण झाल्या.

शांत, प्रसन्न, मध्यस्थ, नासाग्रावर केंद्रित अशी अविचल दृष्टी, अनुपम वर्ण, वीतराग, शुभ लक्षणांनी युक्त, रौद्रादी बारा दोषांनी रहित, अशोकवृक्षादी आठ प्रतिहार्यांसह व यक्ष–यक्षींसह जिनप्रतिमा करून ती विधिपूर्वक सिंहासनावर स्थापावी, असे मूर्तिविधान प्रतिष्ठासारोद्धार या ग्रंथात सांगितले आहे. अशा प्रकारच्या ८४ जिनमूर्ती भारतात निरनिराळ्या स्थानी स्थापलेल्या आहेत, असे सांगतात.

कालांतराने तीर्थंकरांप्रमाणेच अन्य देवतांनाही महत्त्व मिळू लागले. यक्ष-यक्षिणी आणि गणपती, अंबिका, लक्ष्मी, सरस्वती, विष्णू, शिव, इ. देवतांचीही उपासना जैन लोकांत सुरू झाली. कुशाणकाळातच जिनमूर्तींच्या भोवती वरील देवतांच्या मूर्ती कोरण्याची प्रथा सुरू झालीं, असे म्हणतात.

द. भारतात अलगामलै येथील उत्खननात ज्या जैनमूर्ती सापडल्या आहेत, त्या सनपूर्व ३०० ते ५०० या काळातील मानल्या जातात. त्या काळी मूर्तीची केवळ रेखाकृती कोरण्याची प्रथा होती. भरीव व कोरीव मूर्ती घडविण्याची प्रथा नंतर प्रचलित झाली.

सनपूर्व २ ऱ्या शतकात ओरिसातील उदयगिरी-खंडगिरी येथे निर्माण झालेल्या जैन गुहांमध्ये अनेक शुंगकालीन जैन मूर्ती आढळतात. त्यांचे शिल्पकाम अप्रतिम आहे.

मथुरेजवळ कंकालीटीला येथें केलेल्या उत्खननात कुशाण कालांतल्या ज्या मूर्ती सापडल्या, त्यांत तीर्थंकरांची पुढील दोन प्रकारची मूर्तिध्याने आढळतात–(१) कायोत्सर्ग वा खड्गासन या अवस्थेतली उभी मूर्ती व (२) पद्मासन घालून बसलेली मूर्ती. बहुतेक मूर्तींच्या वक्षःस्थलांवर श्रीवत्स चिन्ह आहे. पुष्कळ मूर्तींच्या तळहातांवर व तळपायांवर, तसेच सिंहासनावर धर्मचक्र दिसते. मस्तकावर शिरोवेष्टन व ऊर्णा (भुवयांच्या मध्ये केशगुच्छ) ही चिन्हेही दिसतात. मूर्तींच्या मागे प्रभामंडल आणि छत्रचामरावर व सिंहासनावर दोन्ही बाजूंना सिंह कोरलेले असतात. खांद्यांपर्यंत विखुरलेला केशकलाप हे आदिनाथाचे व मस्तकी सप्तफणी नाग हे पार्श्वनाथाचे अभिज्ञान चिन्ह त्यांच्या मूर्तींत दिसून येते. त्या काळातील आयागपट्टही अत्यंत कलापूर्ण आहेत.



बाहुबली–श्रवणबेळगोळ

गुप्तयुगात शिल्पकला उत्कर्षाच्या शिखरावर पोचली. त्या काळी शिल्पकामात अलंकाराला विशेष महत्त्व प्राप्त झाले. तेव्हाच्या जैन मूर्ती कुशाणकालीन मूर्तींसारख्याच असल्या, तरी

सुंदर नक्षीकाम, परिवारदेवता व अभिज्ञान चिन्हे यांमुळे त्या आकर्षक दिसतात. अशा प्रकारच्या अनेक मूर्ती मध्य प्रदेशात बेसनगर, चंदेरी व देवगढ येथे, तसेच उदयगिरीच्या गुहेत सापडल्या आहेत. मथुरा येथे मिळालेली महावीराची मूर्ती कुमारगुप्ताच्या कालातील असून, पद्मासनावर ध्यानमुद्रेत बसलेली आहे. आसनाच्या खालील चबुतऱ्यावर एक चक्र व त्याच्या दोन्ही बाजूंना दोन मनुष्याकृती कोरलेल्या आहेत. लखनौ व प्रयाग येथील संग्रहालयांत अनेक गुप्तकालीन जैन मूर्ती असून, त्यांची सजीवता व स्वाभाविकता अवर्णनीय आहे.

त्यानंतरच्या कालखंडात भारतात अनेक ठिकाणी दिगंबर पंथाच्या शिल्पकारांनी विशालकाय जैनमूर्ती निर्माण केल्या. मध्य प्रदेशात बडवानी नगराजवळच्या चूलगिरी पहाडावर एक ८४ फूट उंच खड्गासन जिनमूर्ती खोदलेली असून, ती बावनगजा या नावाने प्रसिद्ध आहे. श्रवणबेळगोळ येथील बाहुबलीची मूर्ती तर जगात अद्वितीय मानली जाते. तिच्या मुखावरील दिव्य कांती व अगाध शांती यांमुळे साक्षात तपस्याच त्या मूर्तीच्या रूपाने साकार झाली आहे, असा भास होतो.



आदिनाथाची पितळी मूर्ती – देलवाडा, अबू



अंबिका यक्षिणी – देलवाडा

जैन कलाकारांनी धातूच्या मूर्तीही बनविल्या आहेत. पाषाणाची मूर्ती भग्न होण्याची भीती असल्यामुळे त्यांनी धातूचा उपयोग अधिक प्रमाणात केला आहे. नालंदा हे या धातुशिल्पाचे केंद्र होते. मुंबईच्या संग्रहालयात पार्श्वनाथाची एक धातुमूर्ती आहे, तीं मौर्यकालीन मानली जाते. पाटणा येथील संग्रहालयात आदिनाथाची एक गुप्तकालीन प्रतिमा आहे. राजस्थानातील वसंतगढ येथे सापडलेली सवस्त्र जिनप्रतिमा इ. स. च्या ७ व्या शतकातील आहे. अशाच प्रकारच्या ४–५ सवस्त्र प्रतिमा वलभी येथे मिळाल्या आहेत. या मूर्ती ब्राँझ धातूच्या आहेत. इ. स. च्या ६ किंवा ७ व्या शतकात निर्माण झालेली बाहुबलीची एक ब्राँझची मूर्ती मुंबईच्या संग्रहालयात आहे. इ. स. च्या १४ व्या शतकापासून पितळेच्या मूर्ती बनू लागल्या. अबूच्या पित्तलहरमंदिरातली आदिनाथाची पितळी मूर्ती ८ फूट उंच असून, तिचे वजन १०८ मण भरते, असे सांगतात.

जैन मूर्तिशिल्पात तीर्थंकरांच्या व्यतिरिक्त यक्ष व यक्षिणी यांच्याही मूर्ती पुष्कळ आढळतात. ऋषभनाथाची यक्षिणी चक्रेश्वरी हिची एक पाषाणमूर्ती मथुरेच्या संग्रहालयात आहे. ती दशभुजा असून, चक्रधारी आहे. मध्य प्रदेशातील जिलहरी गावातही एक चक्रेश्वरीची मूर्ती आहे. खैरमाई या नावाने लोक तिची पूजा करतात. देवगढ, नालंदा, खंडगिरी येथेही

यक्षिणींच्या मूर्ती सापडल्या आहेत. नेमिनाथाची यक्षिणी अंबिका हिची सर्वात प्राचीन मूर्ती गिरनार पर्वताच्या अंबादेवी शिखरावर आहे. तिचीच एक सुंदर पाषाणमूर्ती मथुरेच्या संग्रहालयातही आहे. याशिवाय सरस्वती, अच्युता, नैगमेष, इ. देवतांच्या अनेक मूर्ती निरनिराळया ठिकाणी आढळतात, त्या वेगळयाच !

जैनांच्या वास्तुविषयक ग्रंथांत काष्ठमूर्तींचा उल्लेख आहे. मगधाच्या पाल राजांच्या काळी लाकडी जैनमूर्ती निर्माण झाल्या होत्या. मूर्ती वनविण्यासाठी जैनांनी रत्नांचाही उपयोग केला आहे. अशा काही रत्नमूर्ती सांप्रत उपलब्ध आहेत.


पार्श्वनाथ– कायोत्सर्ग मुद्रा– देलवाडा

कलाशैलीच्या दृष्टीने जैन मूर्तींचे तीन वर्ग करता येतात, ते असे– (१) उत्तर भारतीय (२) पूर्व भारतीय व (३) दक्षिण भारतीय. पहिल्या वर्गात गुजरात, पंजाब, मध्य प्रदेश व उत्तर प्रदेश या भागात निर्माण झालेल्या मूर्तींचा समावेश होतो. शरीराचा वांधा व चेहऱ्याची ठेवण या दृष्टींनी त्या मूर्तींची घडण एका साच्याची आहे. वंगाल, विहार व ओडिसा या प्रदेशांतील मूर्तींची घडण तिथल्या विशिष्ट शैलीची आहे. दक्षिण भारतातील जैन प्रतिमांवर द्राविड कलेची छाप दिसून येते. तथापि बहुतेक सर्व मूर्ती जैन मूर्तिविधानानुसार घडवलेल्या असल्यामुळे भारताच्या भिन्न भागांत व भिन्न कालखंडांत निर्माण झालेल्या असल्या, तरी त्यांमध्ये फारसा फरक दिसत नाही. शास्त्राने घालून दिलेले नियम शिल्पकारांनी काटेकोरपणे पाळले आहेत. जिनमूर्तीचे स्वरूप वराहमिहिराने बृहत्संहितेत वर्णिले आहे, ते असे–

आजानुलम्बबाहुः श्रीवत्साङ्कः प्रशान्तमूर्तिश्च ।
दिग्वासस्तरुणो रूपवांश्च कार्योऽर्हतां देवः ॥

(बृहत्संहिता ४५.५८)

अर्थ – गुडघ्यापर्यंत पोचणारे सरळ लोंबते हात, श्रीवत्सचिन्हांकित मुद्रा, तसेच सौम्य, तरुण, रूपवान पण दिगंबर अशी अर्हताची मूर्ती करावी.

तीर्थंकरांच्या प्रतिमांसाठी पद्मासन व कायोत्सर्ग (खड्गासन) ही दोनच आसने प्रशस्त मानली जातात. कारण ती आसने मोक्षप्रद मानलेली आहेत. याशिवाय इतर आसनांतल्या मूर्ती पूजार्ह नव्हेत, असे प्रतिष्ठापाठसारोद्धारात सांगितले आहे. खड्गासनात जिनेंद्रमूर्ती १०८ अंगुळे उंच व पद्मासनात ५४ अंगुळे उंच असते.

खड्गासनात जिनमूर्तीचे लिंग दिसणे आवश्यक असते. पद्मासनात लिंग दिसावे किंवा नाही याबद्दल मतभेद आहेत. श्वेतांवरांच्या मूर्तींत ते दिसत नाही. त्यांच्या मूर्तींना कमरेला लंगोट बांधलेला असतो. मस्तकी मुकुट व मोठे डोळे ही श्वेतांवर मूर्तींची ठळक लक्षणे होत. दिगंबरांच्या मूर्तींचे डोळे अर्धवट मिटलेले असतात.

सर्व तीर्थंकरांच्या प्रतिमा दिसायला सारख्याच असतात. त्यांच्या सिंहासनावर त्यांची वेगवेगळी चिन्हे कोरलेली असतात, त्यांवरून ती मूर्ती कोणत्या तीर्थंकराची आहे ते ओळखायचे असते.

अर्हतांच्या प्रतिमांमध्ये आठ प्रतिहार्ये असतात, त्यांची नावे अशी– तीन छत्रे, दोन चवऱ्या, अशोकवृक्ष, दुंदुभी, सिंहासन, भामंडल, दिव्यभाषा व पुष्पवृष्टी.

अर्हतांच्या उजव्या बाजूला यक्ष, डाव्या बाजूला यक्षी, पादपीठाच्या मध्यभागी क्षेत्रपाल व खाली नवग्रह असतात.

चैत्य व स्तूप – जैन साहित्यात अनेक प्राचीन चैत्यांचा व स्तूपांचा उल्लेख आढळतो. प्राचीन काळी महापुरुषाचे स्मारक म्हणून स्तूप वनवण्याची प्रथा होती. अशोकाच्या पूर्वीही जैनांनी स्तूप निर्माण केले होते, असे म्हणतात. मात्र त्यांचे अवशेष आढळत नाहीत. उपलब्ध पुराणवस्तुसामग्रीत मथुरा येथील स्तूप हाच सर्वांत प्राचीन ठरतो. अतिप्राचीन काळी एका देवीने मथुरेस सुपार्श्वनाथाचे स्मारक म्हणून एक स्तूप निर्माण केला होता व पार्श्वनाथाच्या वेळी त्याचा जीर्णोद्धार झाला, असे जिनप्रभसूरीने विविधतीर्थकल्पात म्हटले आहे. त्यानंतर एक हजार वर्षांनी त्याचा पुनश्च जीर्णोद्धार केला गेला. त्या स्तूपाच्या भग्नावशेषात अनेक पाषाणस्तंभ, तोरणे, जिनमूर्ती, यक्ष–यक्षि-

पीच्या मूर्ती, आयागपट्ट, धर्मचक्र, सिंह, चारण, मुनी, इ. आकृती दिसून येतात. महावीराच्या निर्वाणस्थानावरही एक स्तूप



शिवयशास्तूप असलेला आयागपट्ट–मथुरा

निर्माण केला होता, असे म्हणतात. पावापुरीजवळ एक भग्न स्तूप आहे; तेच महावीराचे निर्वाणस्थान होय, असे स्थानिक लोक मानतात.

लेणी–प्रारंभी जैन मुनी नैसर्गिक गुहांमध्ये एकांतवास करीत. पण पुढे त्यांच्यासाठी पहाड खोदून गुहा निर्माण करण्याची प्रथा सुरू झाली. बराबर व नागार्जुन येथील पर्वतांतल्या जैन गुहा सर्वांत प्राचीन व प्रसिद्ध आहेत. त्या सनपूर्व तिसऱ्या शतकात निर्माण झालेल्या आहेत. त्यानंतर सनपूर्व २ ऱ्या शतकात निर्माण झालेल्या उदयगिरीवरील राणीगुंफा विशेष प्रसिद्ध आहेत. तिथे सापडलेल्या खारवेलाच्या शिलालेखांमुळे जैन संस्कृतीच्या इतिहासात या गुहांना फार महत्त्वाचें स्थान मिळाले आहे.

अशा प्रकारची अनेक जैन लेणी राजगिरी, कौशांबी, प्रयाग, गिरनार, मध्य प्रदेशातील उदयगिरी, द. भारतातील चंद्रगिरी, धाराशिव, नासिक, तेरापूर, सित्तन्नवासल, बदामी, ऐहोळ, वेरूळ, अंकाई–तंकाई, इ. ठिकाणी आढळतात. त्यांपैकी वेरूळ येथील इंद्रसभा व जगन्नाथसभा या लेण्यांमध्ये जैन शिल्पकलेचें उत्कृष्ट नमुने पाहायला मिळतात. लेणी निर्माण करण्याची परंपरा त्यानंतर खंडित झाली असली, तरी इ. स. च्या १५ व्या शतकातही ग्वाल्हेरच्या पर्वतराजीत अनेक जैनगुंफा निर्माण झाल्या. त्या गुंफा प्राचीन गुंफांप्रमाणे कलापूर्ण नाहीत; पण आकाराने विशाल असून, त्यांमध्ये प्रचंड जिनप्रतिमा उभ्या आहेत. सबंध भारतात निरनिराळ्या प्रकारच्या सुमारे २०० जैन गुंफा खोदलेल्या आहेत, असे अनुमान संशोधकांनी केले आहे.

मंदिरशिल्प–जैन कलाकारांनी खडकांत खोदलेली लेणी ही जैन मंदिरेच होत. मात्र स्वतंत्रपणे मंदिरे बांधण्याची प्रथा तितकी प्राचीन नाही. लोहानीपूर येथे एका लहानशा मंदिराचा पाया उत्खननात सापडला आहे. त्याच्या विटा मौर्यकालीन आहेत. पण सांप्रत बऱ्या अवस्थेत उभे असलेले ऐहोळचे मेघुटी मंदिर हेच सर्वांत जुने जैन मंदिर मानले जाते. हे इ. स. ६३४ च्या सुमारास बांधले गेले, असे तिथल्या शिलालेखावरून कळते. त्याची रचना द्राविड शैलीची असली, तरी तिच्यात गुप्त शैलीचे विकसित स्वरूपही काही अंशी पाहायला मिळते. पट्टदकल येथील जैनमंदिर स्पष्टपणे द्राविड शैलीचे आहे. अशा प्रकारची अनेक जैन मंदिरे द. भारतात आढळतात. त्यांतील लकुंडीचे मंदिर उल्लेखनीय आहे. त्याचे शिखर खूप उंच असून,



मेघुटी मंदिर–ऐहोळ



जैन मंदिर–लकुंडी

त्यावर सुंदर शिल्पकाम केलं आहे.

होयसळ वंशाच्या राजवटीत द्राविड शिल्पकलेचा अधिक विकास झाला. त्या काळातली जैनमंदिरे सुंदर नक्षीकाम व आकृती यांनी सुशोभित आहेत. हळेबीडची मंदिरे अशा प्रकारची आहेत. त्यानंतर विजयनगरकालीन जैन मंदिरांत मूडविद्रीचे चंद्रनाथमदिर फार प्रसिद्ध आहे. त्याच्या प्रांगणात एक सुंदर मानस्तंभ उभा आहे. मंदिरांत तीन मंडप आहेत.



जैन मंदिर– राणकपूर

मध्य प्रदेशात देवगढ येथे अनेक प्राचीन मंदिरे असून, ती इ. स. चे ८ वे शतक ते १२ वे शतक या कालखंडात निर्माण झाली आहेत, असे कळते. त्यांतले शांतिनाथाचे मंदिर मध्य असून, त्यात १२ फूट उंच खड्गासन मूर्ती आहे. गर्भगृहासमोर एक विस्तीर्ण मंडप असून, त्याला ३६ स्तंभ आहेत. इतर मंदिरे लहान आहेत. सांप्रत बहुतेक मंदिरांचे गाभारे व मुखमंडप तेवढे उरले आहेत. त्यांतील स्तंभ व त्यांवरील मूर्ती प्रेक्षणीय आहेत. काहींची तोरणद्वारे सुंदर नक्षीकामाने भरलेली आहेत. एक मंदिर सहस्रकूट चैत्यालय असून, त्याच्या कूटांवर सुमारे १००८ जिनमूर्ती कोरलेल्या आहेत. इथल्या मंदिराची शिखरे नागर शैलीची आहेत.



जैन मंदिरे – खजुराहो



शांतिनाथमंदिरातील दोन सुंदर मूर्ती – खजुराहो

मध्य प्रदेशातील खजुराहो येथेही पुष्कळ जैन मंदिरे आहेत. त्यांतली पार्श्वनाथ, आदिनाथ व शांतिनाथ यांची मंदिरे विशेष उल्लेखनीय ठरतात. पार्श्वनाथाचे मंदिर सर्वांत मोठे असून, त्याचे गर्भगृह, अंतराळ व महामंडप शाबूत आहेत. त्या तिहींना वेढणारा एकच प्रदक्षिणामार्ग आहे. त्यात अनेक सुंदर मंडप आहेत. मंडपांच्या छतांवर सुरेख नक्षीकाम व मानवी आकृती कोरलेल्या आहेत. प्रवेशद्वारावर गरुडवाहना आणि दशभुजा अशी सरस्वतीची सुंदर मूर्ती आहे. गर्भगृहाच्या बाह्य भिंतीवर अप्सरांच्या मनोहर मूर्ती कोरलेल्या आहेत. आतील वेदीवर बैलाची आकृती दिसते. त्यावरून असे वाटते, की मुळात हे ऋषभदेवाचे मंदिर असावे. इथली सर्व मंदिरे खालपासून वरपर्यंत नाना प्रकारच्या कलात्मक आकृतींनी सुशोभित केलेली आहेत.

बुंदेलखंडात दतियाजवळ सोनागिरीवर सुमारे १०० लहानमोठी जैन मंदिरे आहेत. बैतुल विभागात मुक्तागिरीवर

२०-२५ जैन मंदिरे आहेत. त्याचप्रमाणे दमोहाजवळच्या कुंड- पुर येथील डोंगरावरही अशीच २५-३० मंदिरे आहेत: ही दिरे फार प्राचीन नाहीत. त्यांची शिखरे मुसलमानी शैलीची ात. कुंडलपूरचे महावीरमंदिर मात्र प्राचीन असावे.

राजस्थानात ओसिया, सादडी, नौलाखा, राणकपूर, चितोड, ठिकाणी जैन मंदिरे आढळतात. ती इ. स. चे ८ वे शतक ते १५ वे शतक या काळात निर्माण झालेली आहेत. राणकपूरचे तुर्मुखी देवालय विशाल असून, त्यात २६ मंडप व ४२० भ आहेत. मुख्य मंदिराभोवती अनेक मंदिरे असून, त्यांची खरे सुशोभित आहेत. मुख्य मंदिरात आदिनाथाची चतुर्मुखी मरवरी शुभ्र मूर्ती आहे.

राजस्थानातील अबूचा पहाड तिथल्या जैन मंदिरामुळेच गविख्यात झाला आहे. जिथे ही मंदिरे बांधलेली आहेत, ते ाव देलवाडा या नावाने ओळखले जाते. तिथल्या शिल्प- मात जैन वास्तुकलेचे अत्यंत विकसित व मनोरम रूप दृष्टीस ते (अबू पहाड पाहा).



जैन मंदिरे – शत्रुंजय पर्वत

सौराष्ट्रातील शत्रुंजय पर्वतावर जितकी जैन मंदिरे आहेत, तकी अन्यत्र कुठेही नाहीत. या मंदिरांतले सर्वांत जुने मंदिर . स. च्या ११ व्या शतकातले आहे. आदिनाथाचे विशाल दिर कलात्मक सौंदर्याच्या दृष्टीने सर्वांत महत्त्वाचे आहे. ते दिर इ. स. च्या १६ व्या शतकात निर्माण झाले. इ. स. १६१८ ली बांधलेल्या चतुर्मुखमंदिराचे शिल्पकाम देलवाडा येथील दिरासारखेच सुंदर आहे.

सौराष्ट्रातील दुसरे महान क्षेत्र म्हणजे गिरनार हे होय. थले नेमिनाथाचे मंदिर विशाल व सुंदर आहे. ते जयसिंह द्धराजाच्या वेळी बांधले गेले. याचा मंडप अत्यंत सुशोभित हे. मुख्य मंदिराच्या शिखराभोवती अनेक लहान लहान खरे असल्यामुळे ते खूप भव्य दिसते. इथले मल्लिनाथाचे मंदिरही प्रेक्षणीय आहे. ते वस्तुपालाने निर्माण केले आहे.

भारतात कित्येक ठिकाणी जैन मंदिरांचे भग्नावशेष सापडले आहेत. या मंदिरांत आर्य व द्राविड या दोन्ही शैलींचे शिल्पकाम आढळते. मंडपाचे स्तंभ, छते यांवर मूर्ती, नक्षीकाम किंवा कथा-प्रसंग कोरलेले असतात. मंदिराच्या चारही बाजूंना लहान लहान देवकुलिका बांधलेल्या असतात. त्यांत भिन्न भिन्न तीर्थंकरांच्या प्रतिमा असतात. द्वारमंडप बहुधा सुशोभित असतो. काही ठिकाणी दोन स्तंभांचे तोरणही असते. काही मंदिरे भूमिगत असतात; तर काही तीन किंवा चार मजली असतात. मंदिरांच्या भिंतीवर व स्तंभांवर पुराणांतील किंवा तीर्थंकरांच्या जीवनातील अनेक प्रसंगांची चित्रे कोरलेली आढळतात. मंदिरांच्या समोर उभारलेले स्तंभ हे जैन शिल्पकलेचे एक महत्त्वाचे अंग होय. ही प्रथा विशेषतः दिगंबर जैनांची आहे. दक्षिण व मध्य भारतात असे स्तंभ अनेक ठिकाणी आढळतात. मूडबिद्री येथील जैन मंदिरासमोरचा स्तंभ हे त्यांचे उत्कृष्ट उदाहरण होय. ब्रह्मस्तंभ व मानस्तंभ असे जैन स्तंभांचे दोन प्रकार असतात. ब्रह्मस्तंभांवर ब्रह्मदेवाची मूर्ती असते, तर मानस्तंभांवर एक वेदी व तिच्यावर चतुर्मुख मूर्ती असते. हे स्तंभ अखंड पाषाणाचे असून, त्यावर विपुल नक्षी कोरलेली असते.

चित्रकला – प्राचीन साहित्यात चित्रकलेविषयी अनेक उल्लेख आढळतात. त्यावरून प्राचीन काळीसुद्धा जैन चित्रकलेचा बराच विकास झाला होता, असे दिसते. त्या काळातले राजे कुशल चित्रकारांकडून सुंदर चित्रसभा बनवून घेत असत. एका चित्रकाराने मोराचे पीस इतके हुबेहूब काढले होते, की ते खरेच आहे, असे समजून एक राजा ते उचलू लागला, असे आवश्यक-टीका या ग्रंथात म्हटले आहे. मध्य प्रदेशातील सरगुजा जिल्ह्यात रामगिरीवरील जोगीमारा नामक गुहेत एक फार प्राचीन भित्तिचित्र अजूनही चांगल्या स्थितीत आहे. त्या चित्रांत जैन मुनीच्या दीक्षाविधीचा प्रसंग दाखवलेला आहे.



भित्तिचित्र – रागीगुंफा

वरील भित्तिचित्र सोडले, तर जैन चित्रकलेचे सर्वांत प्राचीन उदाहरण द. भारतातील सित्तन्नवासलच्या गुहेत आढळते. इ. स. ७ व्या शतकाच्या प्रारंभी पल्लव वंशातला राजा महेंद्र वर्मा याच्या वेळी तिथे अनेक भित्तिचित्रे निर्माण झाली. त्यांतली काही चित्रे अजून चांगल्या स्थितीत आहेत. सरोवरात स्नान करणारे एक युग्म, मेघात नृत्य करणाऱ्या अप्सरा, पशुपक्षी, कमळे, इ. तिथली चित्रे अत्यंत मनोहर आहेत.

वेरूळ येथील कैलासमंदिरात एका दिगंबर मुनीच्या पालखी-यात्रेचे चित्र आहे. त्यात शस्त्रसज्ज योद्धे व त्यांचे स्वागत करणाऱ्या स्त्रिया यांची चित्रे उत्तम आहेत. तिरुमलै येथील जैन मंदिरांतही इ. स. १० व्या व ११ व्या शतकांतील भित्तिचित्रे आहेत. त्यांत देव, गंधर्व, अप्सरा, दिगंबर मुनी यांची नानारंगी चित्रे काळ्या भिंतीवर काढलेली दिसतात. श्रवणबेळगोळच्या जैन मठांत तर अशी अनेक सुंदर भित्तिचित्रे अजून चांगल्या स्थितीत आहेत. मूडबिद्री येथील चंद्रनाथचैत्यालयात व उदयगिरी व भुवनेश्वर येथील जैन लेण्यांतही अनेक आकर्षक व रमणीय चित्रे आढळतात. जैन भित्तिचित्रांची ही परंपरा दीर्घकाळापर्यंत चालू होती.

चित्रकलेचा दुसरा प्रकार म्हणजे ताडपत्रावरील चित्रे होत. यांचा विकास इ. स. च्या १२ व्या शतकापासून म्हैसूर व गुजरात या प्रदेशांत झाला. निशीथचूर्णी, अंगसूत्र, त्रिषष्टिशलाकापुरुषचरित्र, कथारत्नसागर, उत्तराध्ययन, कल्पसूत्र, जैन रामायण, त्रिलोकसार, त्रिलोकप्रज्ञप्ती, भक्तामरस्तोत्र, धवलटीका, इ. कितीतरी जैन ग्रंथ चित्रयुक्त आहेत. अशा ग्रंथांचे दोन प्रकार असतात - एका प्रकारात ग्रंथातील विषयाला अनुसरून संपूर्ण कथाप्रसंग चित्रित केलेले असतात. उदा० जैन रामायण व भक्तामरस्तोत्र हे ग्रंथ या शैलीचे आहेत. दुसऱ्या प्रकारात ग्रंथातील विषयाशी संबंध नसलेली चित्रे केवळ शोभेसाठी काही पानांवर काढलेली असतात.

मूडबिद्री येथील ग्रंथभांडारात असलेली षट्खंडागमाची प्रत व पाटण येथील भांडारातील निशीथचूर्णीची प्रत हे सर्वांत प्राचीन सचित्र ताडपत्री ग्रंथ होत. ते इ. स. च्या १२ व्या शतकातले आहेत. त्यात जिनमूर्ती, देवता, मनुष्य, पशुपक्षी, वेलबुट्टी इ. सर्व प्रकारची चित्रे आढळतात. या चित्रांत सौंदर्य, ओज व सजीवता पुष्कळ प्रमाणात आढळते. ही चित्रे लाल पृष्ठभागावर पिवळा, शेंदरी, निळा, शुभ्र व क्वचित हिरवा हे रंग वापरून काढलेली आहेत. या चित्रशैलीला कोणी कोणी गुजराती तर कोणी श्वेतांबर जैन शैली असे म्हणतात. काही कलाविदांनी तिला पश्चिमी कलाशैली हे नाव सुचवले असून, तेच आता सर्वांना मान्य होऊ लागले आहे.



ताडपत्री पोथीवरील चित्र– मूडबिद्री

इ. स. १३५० ते १४५० या शंभर वर्षांत या चित्रशैलीला शास्त्रीय व सौंदर्याच्या दृष्टीने वेगळे वळण मिळाले. तिचे आकृति-चित्रण अधिक सूक्ष्म व कलात्मक झाले. रंगलेपात वैचित्र्य व विशेष चमक दिसू लागली. सोनेरी रंग प्रथमच वापरला गेला. हे बदल झाले, ते इराणी चित्रकलेच्या प्रभावामुळे झाले, असे मानले जाते. यातूनच पुढे मोगलशैली विकसित झाली.

ताडपत्री पोथ्यांच्या रक्षणार्थ ज्या लाकडी फळ्या वापरीत, त्यांवरही चित्रे रंगवण्याची प्रथा होती. अशा अनेक फळ्या निरनिराळ्या जैन ग्रंथभांडारांत मिळाल्या आहेत. त्यांवर पक्क्या रंगांची सुंदर चित्रे काढलेली दिसतात.

ताडपत्रांप्रमाणेच कागदावर लिहिलेले अनेक प्राचीन जैन ग्रंथही उपलब्ध आहेत. त्यांतील इ. स. १४२७ मध्ये लिहिलेली कल्पसूत्राची प्रत सचित्र आहे. शिवाय तिच्या पानांच्या कडांवर शोभेसाठी हत्ती, हंस, फुले, इ. आकृतींची नक्षी काढ-

केली आहे. इ. स. १४२२ मध्ये लिहिलेली सुपासणाहचरिय या ग्रंथाची प्रत अशीच सचित्र असून, तिच्यात सुपार्श्वनाथ, सरस्वती, मातृस्वप्न, देवना इ. सुंदर चित्रे आहेत. ही सचित्र पुस्तके श्वेतांबर परंपरेतली आहेत. अशा प्रकारच्या अनेक सचित्र प्रती निरनिराळ्या ग्रंथभांडारांत असून, त्यांत तीर्थंकरांच्या जीवनावर आधारित अशी असंख्य सुंदर चित्रे पाहायला मिळतात. कागदाचा उपयोग सुरू झाल्यामुळे चित्रकलेच्या तंत्रात पुष्कळ बदल झाला. कागद हवा तेवढ्या लहानमोठ्या आकाराचा घेता येतो व त्यावर रंग लवकर चिकटतो. त्यामुळे कलाकारांना विविध प्रकारचे रंग वापरणे शक्य झाले. सोनेरी रंगाचा उपयोग तेव्हापासून अधिक प्रमाणात सुरू झाला.



पार्श्वनाथाचा पंचमुष्टिलोच –
जैन चित्रकला



ऋषभदेवाचा जन्म– पोथीवरील चित्र

वस्त्रांवर चित्रे काढण्याची प्रथाही प्राचीन आहे. पण इ. स. १४ व्या शतकापूर्वीचे वस्त्रपट मिळत नाहीत. बिकानेरचे श्री. अगरचंद्र नाहटा यांच्या संग्रही चिंतामणी नामक एक वस्त्रपट आहे; तो इ. स. १३५४ सालचा असून, त्यावर पद्मासनस्थ पार्श्वनाथ, यक्ष–यक्षी व चौरीवाहक यांची चित्रे आहेत. अशा प्रकारचे अनेक जैन वस्त्रपट पाहायला मिळतात. त्यांचा उपयोग बहुधा उपासनेसाठी व ऋद्धि–सिद्धी प्राप्त करण्यासाठी केला जात असावा. कलेच्या दृष्टीनेही त्यांचे महत्त्व पुष्कळ आहे.

संगीत– जैन आचार्यांनी या कलेकडेही दुर्लक्ष केलेले नाही. संगीत हे जैन वाङ्मयाचे एक अंग मानले गेले आहे. या विषयावर प्राचीन काळी अनेक ग्रंथ रचले गेले होते. अनेक राजे व राण्या संगीतज्ञ होत्या, अशी वर्णने जैन पुराणांतून आढळतात. कित्येक राजकन्या स्वयंवरप्रसंगी वीणावादनात आपल्याहून श्रेष्ठ ठरणाऱ्या राजकुमाराला वरण्याचा पण लावीत. नृत्यासाठीही संगीताचा उपयोग होत असे.

जैन साहित्यात स्वर, राग, ताल, इ. विषयांचे सूक्ष्म विवेचन केलेले आढळते. तथापि जैन लोकांनी गायनवादनाचा उपयोग मुख्यतः भक्तिभाव वाढविण्यासाठीच केला, यात शंका नाही.

अशा प्रकारे समाजाच्या नैतिक अभ्युदयासाठीच जैन कलाकारांनी आपले कसब वापरून असंख्य कलाकृती निर्माण केल्या. त्यांत सत्य, शिव आणि सौंदर्य या तीन्ही तत्त्वांचे संमेलन पाहायला मिळते. [जै. इ.; भा. सं. जै. यो.; प्रा. भा. सां. कें.; पं. कामता प्रसाद जैन–जै. सि. भा., जून १९३५; श्री. श्रीपाद राम शर्मा–जै. सि. भा., डिसें. १९३५; श्री. त्रिवेणीप्रसाद–जै. सिं. भा., जून १९३७; पं. नेमिचंद्र शास्त्री–जै. सि. भा., जाने. १९४९; खं. वै.; न्यू इं. अँ., नोव्हें. १९३९]

जैन दर्शन

कोणत्याही दर्शनात जीव, जगत आणि ईश्वर या तीन विषयांचा विचार मुख्यत्वे केलेला असतो. जैन दर्शनात यांपैकी पहिल्या दोहोंचा ऊहापोह केलेला आहे; पण तिसरा जो ईश्वर तो मात्र जैन स्वीकारीत नाहीत. ईश्वर शब्दाचे अर्थ ऐश्वर्यशाली, सर्वशक्तिमान, जगाचा स्वामी, कर्ता, धर्ता, हर्ता, इ. आहेत. हे अर्थ पाहिले तर या लोकी जो दर्जा एखाद्या स्वतंत्र सम्राटाचा, तोच परलोकामध्ये ईश्वराचा मानला जातो, असे दिसते. ज्याप्रमाणे एखाद्या राजवंशात जन्म घेणाऱ्याला सम्राट्पद अनायासे प्राप्त होते, त्यासाठी त्याला काहीही प्रयत्न करावे लागत नाहीत, तसेच ईश्वराचेही आहे. अनादिकालापासून संसाराला कारणीभूत होणाऱ्या क्लेश, कर्म, कर्मफल आणि वासना या गोष्टींनी तो अस्पृष्ट आहे. क्लेश-कर्मादी गोष्टींचा नाश केल्यानंतर मग त्याला ईश्वरत्व लाभले नाही; तर ते त्याच्याजवळ कायमचेच

आहे. तो सर्वश्रेष्ठ आहे, सर्वगुरू आहे आणि सर्वज्ञ आहे. त्याचे ऐश्वर्य अविनाशी आहे; कारण कालद्वारा त्याचा कधीही नाश होत नाही. अशा अनाद्यनंत पुरुषविशेषाला ईश्वर म्हणतात. अशी ईश्वराविषयीची कल्पना मांडून, एवंगुणविशिष्ट ईश्वराचे अस्तित्व जैन दर्शनाने अमान्य केले आहे. याविषयी जैनमत आहे ते असें—

> नास्पृष्टः कर्मभिः शश्वद्विश्वदृश्वास्ति कश्चन ।
> तस्यानुपायसिद्धस्य सर्वथाऽनुपपत्तितः ।।

अर्थ – कोणीही सर्वद्रष्टा व अनादिकालापासून कर्मांनी अस्पृष्ट असा असूच शकत नाही. कारण उपायावाचून त्याला सिद्धी प्राप्त होणे, कोणत्याही प्रकारे अनुपपन्न आहे.

सृष्टीचा निर्माता म्हणून ईश्वराला अनादी मानल्यामुळे तो कर्मबंधरहित मानला जातो. पण जैन धर्म कोणालाही या विश्वाचा रचयिता मानीत नाही; म्हणून त्याने कोण्या एका अनादिसिद्ध परमेश्वराची सत्ताही अमान्य केली आहे (जैनधर्म–पं. कैलाशचंद्र शास्त्री).

दार्शनिक साहित्य – सामान्यपणे इ. स. च्या प्रारंभकाली जैन दर्शनाला तर्कशुद्ध रूप मिळण्यास प्रारंभ झाला. या कालात कुंदकुंदाचार्य, उमास्वाती आणि समंतभद्र हे तीन प्रकांडपंडित होऊन गेले. या तिघांनी जैन दर्शनाचा मजबूत पाया घातला. कुंदकुंदाचार्यांचे प्रवचनसार, पंचास्तिकाय व समयसार असे तीन ग्रंथ अत्यंत प्रसिद्ध आहेत. त्यांना नाटकत्रयी असे म्हणतात. त्यांपैकी समयसार हा ग्रंथ विविध दृष्टींनी आत्मतत्त्वाचे सुंदर विवेचन करणारा अपूर्व ग्रंथ आहे.

उमास्वाती हा कुंदकुंदाचाच शिष्य होय. त्याने सर्वप्रथम जैनांच्या तात्त्विक विचारांना संस्कृत सूत्रांत निबद्ध करून तत्त्वार्थसूत्र नावाचा ग्रंथ निर्माण केला. जैन दर्शनात या ग्रंथाला सर्वश्रेष्ठ प्रामाण्य आहे. दिगंबर व श्वेतांबर हे दोन्ही संप्रदाय त्याला मोठाच मान देतात. निरनिराळ्या काळात अनेक जैन आचार्यांनी उमास्वातीच्या तत्त्वार्थसूत्रांवर वृत्ती, भाष्यें आणि टीका लिहिल्या आहेत.

जैन समाजावर प्रभाव गाजवणाऱ्या आचार्यांमध्ये समंतभद्राचे स्थान बरेच उंच आहे. त्याला जैन शासनाचा प्रणेता आणि भावी तीर्थंकर असेही म्हटलेले आहे. त्याने आप्तमीमांसा, बृहत्स्वयंभूस्तोत्र, युक्त्यनुशासन, जिनस्तुतिशतक, रत्नकरंड, जीवसिद्धी, इ. ग्रंथ लिहिले आहेत. हा प्रखर तार्किक आणि महान वादकुशल होता.

उमास्वातीप्रमाणेच सिद्धसेनालाही उभय संप्रदायांत मान्यता आहे. त्याच्या सूक्तींना भगवान ऋषभदेवाच्या सूक्तींशी तुल्यबल मानतात. याचे सन्मतितर्क व न्यायावतार हे ग्रंथ दार्शनिक चर्चेने भरलेले अतएव गंभीर आहेत. सिद्धसेन व समंतभद्र या दोघांनी स्याद्वादाची विचारसरणी स्थापन केली.

पुढील कालातला अकलंक हा पंडित जैन न्यायाचा प्रतिष्ठापक मानला जातो. जैन न्यायाला याने जे रूप दिले, तेच उत्तरकालीन जैन ग्रंथकारांनी स्वीकारले व विवेचिले. समंतभद्राचा हाच सुयोग्य असा उत्तराधिकारी होता. अष्टशती, प्रमाणसंग्रह, न्यायविनिश्चय, इ. याचे ग्रंथ कठिण व गंभीर आहेत.

मध्ययुग अर्थात इ. स. चे ६ वे ते ९ वे शतक हा कालखंड जैन दर्शनाच्या इतिहासात सुवर्णयुग मानला जातो. या कालात जैन दर्शनावर अनेक मौलिक, विद्वत्तापूर्ण व सारगर्भ असे ग्रंथ निर्माण झाले. सिद्धसेन दिवाकर, विद्यानंद, वादिराजसूरी, हरिभद्र हे या युगातले महान ग्रंथकार होत. यांनी जैन दर्शनाला प्रतिष्ठित व सखोल बनवले. हरिभद्राचा षड्दर्शनसमुच्चय हा तत्त्वज्ञानाच्या क्षेत्रातला एक उत्कृष्ट ग्रंथ आहे. त्यापुढच्या काळात शेवसूरी, हेमचंद्र, मल्लिषेण, गुणरत्न, यशोविजय, ज्ञानचंद्र, इ. जैन आचार्य निर्माण झाले आणि त्यांनी आपले दर्शन सर्वांगपरिपुष्ट केले.

ज्ञानमीमांसा – जैनमतानुसार जीव हा चेतन असून, ज्ञान हा त्याचा स्वभाव आहे. या ज्ञानाचे दोन प्रकार आहेत– प्रत्यक्ष व परोक्ष. या दोन शब्दांच्या व्याख्येत जैन दर्शन आणि तदितर दर्शने यांत भिन्नता आहे. जैनांनी आत्मसापेक्ष ज्ञानाला प्रत्यक्ष व आत्मेतर इंद्रिय-मन:सापेक्ष ज्ञानाला परोक्ष म्हटले आहे. याचा अर्थ असा, की ज्या ज्ञानाच्या उपलब्धीसाठी आत्मा स्वयमेव कारणीभूत होतो, ते प्रत्यक्ष व ज्या ज्ञानाची प्राप्ती इंद्रियें व मन यांच्या द्वारे होते, ते परोक्ष होय.

जैन दर्शनात प्रत्यक्ष ज्ञानाचे तीन भेद मानलेले आहेत, ते पुढीलप्रमाणें ---

अवधिज्ञान – ज्या ज्ञानाच्या द्वारे जीव भूतभविष्य कालातल्या मर्यादित गोष्टी आणि दूरस्थित क्षेत्रातल्या परिमित वस्तू जाणू शकतो, त्याला अवधिज्ञान म्हणतात. याचे सहा प्रकार आहेत. जैनांनी जीवाच्या ठिकाणी अशी एक शक्ती मानलेली आहे, की जिच्या योगाने इंद्रियांना अगोचर असा अतिसूक्ष्म, तिरोहित व दूरस्थ पदार्थांचेही ज्ञान होऊ शकते.

मन:पर्ययज्ञान -- सम्यक्चारित्राच्या द्वारे ज्ञानावरची आवरणे दूर केल्यावर जे ज्ञान उत्पन्न होते, त्याला मन:पर्यय म्हणतात. याच्या द्वारे दुसऱ्याच्या मनातले विचार जाणण्याची योग्यता प्राप्त होते. संयमी साधूंनाच हे ज्ञान प्राप्त होते. याचेही दोन भेद सांगितले आहेत.

केवलज्ञान – समस्त द्रव्यांचे अनंत पर्याय जाणणारे विश्व-

ोचन, अनंत व अतींद्रिय असें ज्ञान हे केवलज्ञान होय. याचें र्णन असे–

कल्पनातीतमभ्रान्तं स्वपरार्थावभासकम् ।
जगज्ज्योतिरसन्दिग्धमनन्तं सर्वदोदितम् ।।

अर्थ – हे केवलज्ञान कल्पनातीत, भ्रांतिरहित, स्व-पर पदार्थांचा निश्चय करून देणारें, जगत्प्रकाशक, संदेहरहित, अनंत व कोणत्याही काली नष्ट न होणारें असे आहे.

जेव्हा ज्ञानाच्या समस्त आवरणीय कर्मांचा निःशेष क्षय होतो, तेव्हाच या ज्ञानाचा उदय होतो. सम्यक्चारित्राचे अनुष्ठान करणारे सिद्धपुरुषच या केवलज्ञानाचे अधिकारी होतात.

उमास्वातीच्या विवेचनानुसार परोक्ष ज्ञानाचे मती व श्रुत असे दोन भेद होतात––

मतिज्ञान – ज्ञेय पदार्थ व इंद्रियविशेष यांचा सन्निकर्ष झाल्यावर मनाच्या सहाय्याने जो वस्तुबोध उत्पन्न होतो, त्याला मतिज्ञान म्हणतात. याचे अवग्रह, ईहा, इ. अनेक पोटभेद आहेत.

श्रुतज्ञान – मतिज्ञानाच्या आश्रयाने युक्ती, तर्क, अनुमान व शब्दार्थ यांच्या द्वारे जे पदार्थांचे परोक्ष ज्ञान होते, त्याला श्रुतज्ञान म्हणतात. अंगप्रविष्ट व अंगबाह्य असे याचे दोन पोटभेद आहेत. अंगप्रविष्टात आचारांग, सूत्रकृतांग, इ. बारा श्रुतांगांचा समावेश होतो व अंगबाह्यात दशवैकालिक, सामायिक, इ. उत्तरकालीन आचारांचा समावेश होतो.

जैन न्यायात प्रत्यक्ष, अनुमान व आगम ही तीनच प्रमाणे मुख्यत्वे मानलेली आहेत. प्रत्यक्षाची सत्ता सर्वमान्यच आहे. चार्वाकांनी अनुमान स्वीकारले नाही. पण जैनांनी लोकव्यवहारासाठी ते स्वीकारले आहे. जैन आगमांनी प्रतिपादिलेले सत्य हा तर जैन दर्शनाचा पायाच आहे. जैन लोक श्रुति-स्मृती प्रमाण मानीत नाहीत. त्यांच्या मते जैनागम हेच प्रमाणग्रंथ होत.

नयसिद्धान्त – नयसिद्धान्त हा जैन दर्शनाचा एक प्रमुख विषय आहे. जैनमते जगातला प्रत्येक पदार्थ सत् आहे आणि असत्ही आहे. इतकेच नव्हे; तर प्रत्येक पदार्थ हा अनंतधर्मात्मक आहे. सर्व धर्मांनी संयुक्त व अखंड अशा त्या पदार्थाचे ग्रहण करणाऱ्या ज्ञानाला प्रमाण म्हणतात. ज्याने केवलज्ञान मिळवले आहे, अशा सिद्ध पुरुषालाच पदार्थाच्या समस्त धर्मांचे ज्ञान होऊ शकते. पण सामान्य माणसे पदार्थाचा केवळ एक धर्मच जाणू शकतात. म्हणून त्यांचे ज्ञान हे नेहमीच अंशरूप असते. या अंशरूप ज्ञानाला मात्र जैनांनी नय असे म्हटले आहे. नय शब्दाची निरुक्ती स्याद्वादमंजरीत पुढीलप्रमाणे सांगितली आहे– 'नीयते परिच्छिद्यते एकदेशविशिष्टः अर्थः अनेन इति ।' (= ज्याच्या योगाने पदार्थाचा एकदेशविशिष्ट अर्थ जाणला जातो, तो नय होय.)

नयाचे द्रव्यार्थिक व पर्यायार्थिक असे दोन मुख्य भेद आहेत. वस्तूचे वस्तुत्व किंवा अन्वयरूप द्रव्य याला विषय करणारा तो द्रव्यार्थिक नय व वस्तूच्या पर्यायांना अर्थात बदलणाऱ्या अवस्थांना विषय करणारा, तो पर्यायार्थिक नय होय. पहिल्याचे तीन व दुसऱ्याचे चार मिळून सात प्रकार होतात. नैगम, संग्रह, व्यवहार, ऋजू, शब्द, समभिरूढ व एवंभूत अशी त्यांची नावे आहेत. नावांत समानता असली, तरी त्यांच्या स्वरूपाविषयी विद्वानांत मतभेद आहेत.

जैनमते प्रत्येक परामर्शाच्या पूर्वी त्याला सीमित व सापेक्ष बनविण्यासाठी स्यात् हे विशेषण जोडणे अत्यंत आवश्यक आहे. स्यात् शब्दाचा अर्थ कोणत्या तरी अपेक्षेने किंवा संभवतः असा आहे. प्रत्येक पदार्थाविषयी आपला परामर्श स्यादस्ति म्हणजे संभवतः किंवा कोणत्या तरी अपेक्षेने आहे, अशा रूपातच झाला पाहिजे. स्यात् हे विशेषण जोडून पदार्थाचा परामर्श पुढील सात प्रकारांनी होतो, त्या सात प्रकारांना मिळून सप्तभंगी नय असे म्हणतात––

(१) स्यात् अस्ति – कोणत्या तरी एका दृष्टीने वस्तूची सत्ता असू शकते. उदा० स्यात् घट घरात आहे.

(२) स्यात् नास्ति – दुसऱ्या कोणत्या तरी दृष्टीने त्याच वेळी वस्तूची सत्ता 'नाही' असेही होऊ शकते. उदा० स्यात् घट घराबाहेर नाही.

(३) स्यात् अस्ति च नास्ति च – तिसऱ्या दृष्टीने त्याच वेळी घटाची सत्ता असते व नसतेही. उदा० स्यात् घट घरात आहे व घराबाहेर नाही.

(४) स्यात् अवक्तव्यम् – चौथ्या दृष्टीने तीच वस्तू अवक्तव्य (अनिर्वचनीय) आहे. उदा० कच्चा असताना स्यात् घट काळा असतो; पण तोच भाजल्यानंतर लाल बनतो. अशा स्थितीत घटाचे यथार्थ रूप कोणते, या प्रश्नाचे सरळ उत्तर हेच असू शकते, की भिन्न भिन्न परिस्थितीत घटावर अनेक विरोधी धर्मांची सत्ता असल्याकारणाने घटाचे वास्तविक रूप अवक्तव्य अर्थात अनिर्वचनीय आहे.

(५) स्यात् अस्ति च अवक्तव्यं च – पाचव्या दृष्टीने त्या वस्तूची एकाच वेळी सत्ताही असू शकते आणि असे असूनही ती अनिर्वचनीय राहू शकते. उदा० स्यात् घट घरात आहे; पण तो नाना विरोधात्मक धर्मांनी युक्त असल्याकारणाने त्याचे रूप अनिर्वचनीय आहे.

(६) स्यात् नास्ति च अवक्तव्यं च – सहाव्या दृष्टीने त्याच वस्तूची एकाच वेळी सत्ता नसूही शकते आणि तरीही ती अनिर्वचनीय असू शकते. उदा० स्यात् घट घराच्या बाहेर नाही आणि तो अनिर्वचनीयही आहे.

(७) स्यात् अस्ति च नास्ति च अवक्तव्यं च — सातव्या दृष्टीने वस्तूची सत्ता एकाच वेळी असू शकते व नसूही शकते आणि तथापि ती अवक्तव्य असू शकते. उदा० स्यात् घट घरात आहे, घराबाहेर नाही आणि परिस्थितिभेदानुसार त्याच्या ठिकाणी अनेक विरोधी धर्मांची सत्ता असल्यामुळे तो अनिर्वचनीयही आहे.

यालाच अनेकान्तवाद किंवा स्याद्वाद असे म्हणतात.

द्रव्यव्यवस्था — जैन दर्शनात स्याद्वादानंतर द्रव्याचा विचार येतो. कुंदकुंदाचार्यांनी द्रव्याचे लक्षण पुढीलप्रमाणे सांगितले आहे —

दवियदि गच्छदि ताइं ताइं सब्भावपज्जयाइं जं ।
दव्वियं तं भण्णंते अण्णणभूदं तु सत्तादो ।।

(प्रवचनसार)

अर्थ — द्रु = जाणे. यावरून द्रव्य शब्द बनला आहे. यावरून जे आपल्या त्या पर्यायांना प्राप्त करते, त्याला द्रव्य म्हणतात. द्रव्य हे सत्तेहून अभिन्न आहे.

प्रकारांतराने गुण व पर्याय यांच्या समूहालाही द्रव्य म्हणतात. उदा० जीव एक द्रव्य असून, त्याच्या ठिकाणी सुख, ज्ञान, इ. गुण व नर, नारकी, इ. पर्याय आढळतात. पण द्रव्याहून त्या गुणांची व पर्यायांची पृथक् सत्ता नाही. म्हणूनच तत्त्वार्थसूत्रात द्रव्याची व्याख्या सांगताना ‘गुणपर्यायवद् द्रव्यम्’ (= गुणवान व पर्यायवान ते द्रव्य होय, असे म्हटले आहे).

द्रव्य हे नित्य व अनित्यही आहे. त्याला केवळ नित्य मानले, तर त्याच्यात परिवर्तन होणार नाही; केवळ अनित्य मानले, तर आत्मा सर्वथा क्षणिक होईल व त्याच्या ठिकाणी पूर्व ज्ञानाचे स्मरण इ. व्यापार निर्माण होणार नाहीत. म्हणून द्रव्याला सत् मानून त्या सत्‌ची व्याख्या तत्त्वार्थसूत्रात (५.२९) ‘उत्पादव्ययध्रौव्ययुक्तं सत् ।’ (= उत्पत्ति-विनाशशाली अर्थात अनित्य आणि ध्रौव्ययुक्त अर्थात नित्य असे जे, ते सत् होय) अशी केली आहे.

याचा भावार्थ हा, की द्रव्याची उत्पत्तीही होत नाही आणि विनाशही होत नाही. ते सत्स्वरूप आहे. पण त्याचे पर्याय हे त्याच्या ठिकाणी उत्पाद, व्यय व ध्रौव्य निर्माण करतात.

द्रव्याचे जीव आणि अजीवान्तर्गत पुद्‌गलादी पाच पदार्थ मिळून पुढील सहा प्रकार होतात —

जीव — जीवाची व्याख्या पुढीलप्रमाणे सांगितली आहे —

चेतनालक्षणो जीवः कर्ता भोक्ता तनुप्रमः ।
अनादिनिधनोऽमूर्तः स च सिद्धः प्रमाणतः ।

अर्थ — जीव हा ज्ञान—दर्शनरूप चेतनेने युक्त असा आहे. तो आपल्या सुखदुःखांचा कर्ता व भोक्ता आहे. तो देहाएवढा मोठा, अनादिनिधन व अमूर्त आहे. त्याचे अस्तित्व प्रमाणांनी सिद्ध आहे.

जीवाचे असाधारण लक्षण चेतना हे आहे. ही चेतना ज्ञान—दर्शनात्मक आहे. जो जाणतो व पाहातो तो जीव होय. जीव हा आपले पतन व उत्थान या दोन्ही गोष्टींसाठी स्वतःच जबाबदार असतो. आपल्या कर्मांनीच तो बांधला जातो व कर्मांनीच बंधमुक्त होतो. बंधकारक कर्मांचे फल भोगण्याच्या वेळी जीवाचे जे भाव होतात, त्या भावांचा कर्ताही तोच असतो. ज्याप्रमाणे तो आत्मभावांचा कर्ता असतो, त्याचप्रमाणे तो त्यांचा भोक्ताही असतो. याशिवाय तो शरीरप्रमाण असतो. प्राप्त झालेल्या लहान-मोठ्या शरीराचा जो आकार असतो, तोच जीवाचाही आकार होय.

जीवाला अशा प्रकारे शरीरपरिमाण मानून जैनांनी आत्म्याच्या व्यापकत्वाचे खंडन केले आहे. ते म्हणतात, की जर जीव व्यापक ठरला, तर त्याच्या ठिकाणी क्रिया असणार नाही व क्रियेवाचून तो पुण्य-पापांचा कर्ताही होणार नाही. जर कर्तृत्वच नाही, तर मग बंध तरी कुठला आणि मोक्ष तरी कशाचा?

जीवभेद — संसारी जीव आणि मुक्त जीव असे जीवाचे दोन मुख्य भेद आहेत. कर्मबंधनाने बांधलेले जे जीव एका गतीतून दुसऱ्या गतीत जन्म घेतात आणि मरतात, ते संसारी होत. जे कर्मबंधातून सुटतात, ते मुक्त होत. मुक्त जीव हे समान गुणधर्मांचे असल्यामुळे त्यांच्यांत कोणताही भेद असत नाही; पण संसारी जीवांच्या ठिकाणी अनेक भेदप्रभेद आढळतात. नारकी, तिर्यञ्च, मनुष्य व देव असे संसारी जीवांचे चार प्रकार होतात. पृथ्वीच्या खाली सात नरक आहेत. त्यांत निवास करणाऱ्या जीवांना नारकी म्हणतात. पृथ्वीवरील पशू, पक्षी, वृक्ष हे सर्व तिर्यञ्च होत. मनुष्य प्रसिद्ध असून, स्वर्गात वास्तव्य करणारे ते देव होत.

जैन दर्शन हे बहुजीववादी आहे. त्याने प्रत्येक जीवाची स्वतंत्र सत्ता-स्वीकारलेली आहे. सगळे जीव एक असते, तर एक जीव सुखी होण्याने सगळे सुखी झाले असते व एक जीव दुःखी झाल्याने सगळे दुःखी झाले असते. एका जीवाच्या बंधनाने सर्व जीव बद्ध झाले असते आणि एकाच्या मुक्तीने सर्व मुक्त झाले असते; पण तसा अनुभव येत नाही. या बाबतीत जैन दर्शनाचे सांख्य दर्शनाशी साम्य आहे.

ज्या द्रव्यांच्या ठिकाणी चैतन्य आढळत नाही, त्यांना अजीव म्हणतात. हे अजीव पाच प्रकारचे आहेत —

धर्माधर्मावथाऽऽकाशं तथा कालश्च पुद्‌गलः ।
अजीवाः खलु पञ्चैते निर्दिष्टाः सर्वदर्शिभिः ।।

अर्थ — धर्म, अधर्म, आकाश, काल व पुद्‌गल, हे पाच अजीव

स्पर्श आहेत, असे सर्वदर्शी जिनभगवानांनी सांगितले आहे.

पुद्गल – जैन दर्शनात पुद्गल हा शब्द एका अभिनव अर्थाने तो. भूतसामान्याला तो शब्द लावतात. जैन शास्त्रातच ही संज्ञा आहे. अन्य दर्शनांत पुद्गलाच्या स्थानी असलेल्या तत्त्वाला प्रधान, प्रकृती, इ. शब्द वापरले आहेत. सामान्यपणे उत्पन्न होणारे, बिघडणारे, भंगणारे, तुटणारे, फुटणारे, जे काही असेल, ते सगळे पुद्गल द्रव्य होय. पुद्गलाच्या ठिकाणी रूप, रस, गंध व स्पर्श हे गुण असतात. अन्य अजीव पदार्थांच्या ठिकाणी ते असत नाहीत. पूरण व गलन अर्थात भरणे व रिते होणे किंवा एकत्र येणे व विलग होणे, यावरून पुद्गल शब्द बनला आहे. पुद्गलाची व्याख्या अशी——

भेदादिभ्यो निमित्तेभ्यः पूरणाद् गलनादपि ।
पुद्गलानां स्वभावज्ञैः कथ्यन्ते पुद्गला इति ।।

अर्थ – ज्या अर्थी पुद्गल हा भेद संघातादी निमित्तांनी एकत्र येतो आणि विलग होतो, त्या अर्थी वस्तुस्वभावाचे ज्ञाते जिन यानी त्याला पुद्गल म्हटले आहे.

पुद्गलाचे परमाणू व स्कंध असे दोन भेद मानलेले आहेत. इंद्रियांच्या द्वारा ज्याचे ग्रहण होऊ शकत नाही, अशा अविभागी द्रव्याला परमाणू असे म्हणतात. हा परमाणू नित्य आहे, एकदेशी आहे, मूर्तिक आहे आणि अविभाज्य आहे.

अनेक परमाणूंच्या एकत्र येण्याने जे द्रव्य तयार होते, त्याला स्कंध म्हणतात. आपण जे जे काही पाहतो, ते ते सगळे स्कंध आहे.

धर्म व अधर्म – धर्म व अधर्म यांचा अर्थ जैन दर्शनात पुण्य व पाप असा नाही. जीव आणि पुद्गल यांच्याप्रमाणेच धर्माधर्मही स्वतंत्र द्रव्यरूपच आहेत. जीव आणि पुद्गल यांच्या हालचालीत आणि त्यांच्या स्थिर राहण्यात साहाय्यक होणे, हे त्यांचे कार्य आहे. चालणे आणि थांबणे या क्रियांची शक्ती जीव-पुद्गलांच्या ठायी स्वयमेव असतेच; पण बाह्य साहाय्यावाचून त्या शक्तीची अभिव्यक्ती होऊ शकत नाही. धर्म-अधर्म हे त्या अभिव्यक्तीला साहाय्यक होतात. ही दोन्ही द्रव्ये समस्त लोकांत व्याप्त आहेत, अखंडित आहेत, असंख्यातप्रदेशी आहेत आणि आकाशाप्रमाणे अमूर्तिकही आहेत (पंचास्ति. ८३–८६). मात्र ती कोणाच्या चालण्याची व थांबण्याची प्रेरक कारणे नसतात.

आकाश – जीव, अजीव, धर्म, अधर्म या चौघांना अवकाश देणारे द्रव्य म्हणजे आकाश होय. हे अमूर्तिक आहे. आकाशाची सत्ता प्रत्यक्ष ज्ञानावर अवलंबून नसून, ती अनुमानाच्या आधारावर स्वीकारलेली आहे. आकाशाचे लोकाकाश व अलोकाकाश असे दोन भेद आहेत. सर्वव्यापी आकाशाच्या मध्ये लोकाकाश आहे व त्याच्या चारही बाजूंना लोकाकाशात जीव–पुद्गलादी द्रव्ये असतात व अलोकाकाशात फक्त आकाश हेच द्रव्य असते (पंचास्ति. ९०–९१).

काल– जैनांनी कालाची कल्पनाही अनुमानाच्या आधारावरच केलेली आहे. वस्तुमात्राचे परिवर्तन घडविण्यात साहाय्यक होणारे द्रव्य म्हणजे काल होय. जगातले समस्त पदार्थ हे परिणामशील आहेत व काल हा या परिणामांचे साधारण कारण आहे. कच्चा असलेला आंबा पिकणे, हा आंब्याचा परिणाम होय. ही गोष्ट कालजन्यच आहे. पूर्वापर क्षणांना व्यापून राहणारी क्रिया कालामुळेच संभवते. ज्येष्ठ-कनिष्ठता ही कल्पनाही कालाच्या सिद्धीलाच प्रमाणभूत ठरणारी आहे. कालाचा अणू एकप्रदेशी असतो, म्हणून तो अस्तिकाय द्रव्याहून भिन्न आहे.

निश्चयकाल व व्यवहारकाल असे कालाचे दोन प्रकार मानलेले आहेत. लोकाकाशाच्या समस्त प्रदेशात वेगवेगळे कालाणू भरून राहिलेले असतात. त्यांना निश्चयकाल म्हणतात. अर्थात कालद्रव्य नावाची वस्तू म्हणजे हे कालाणूच होत. आकाशाच्या एका प्रदेशात स्थित असलेल्या पुद्गलाचा एक परमाणू आपल्या गतीने जितक्या वेळात आपल्या प्रदेशातून दुसऱ्या प्रदेशात पोचतो, तेवढ्या वेळाला समय म्हणतात. समयांच्या समूहांनाच श्वास, उच्छ्वास, प्राण, स्तोक, घटिका, दिवस, रात्र, इ. नावे दिलेली आहेत. हा सगळा व्यवहारकाल होय. कालही आकाशाप्रमाणेच अमूर्तिक आहे.

आतापर्यंत ज्या सहा द्रव्यांचे विवेचन केले, त्यांपैकी काल सोडून बाकीच्या पाच द्रव्यांना पंचास्तिकाय म्हणतात. अस्तिकाय हा शब्द अस्ति व काय या दोन शब्दांनी बनला आहे. अस्ति शब्दाचा अर्थ ‘आहे’ असा अस्तित्वसूचक आहे. काय म्हणजे शरीर होय. शरीर जसे बहुप्रदेशी असते, तशीच कालाव्यतिरिक्त पहिली पाच द्रव्येही बहुप्रदेशी आहेत. म्हणूनच त्यांना अस्तिकाय म्हटले. कालाला अस्तिकाय म्हटले नाही, याचे कारण त्याचे अणू एकप्रदेशी असतात. ते असंख्य असूनही एकमेकांपासून विलग असतात. ते पुद्गलपरमाणूंप्रमाणे कधी एकत्र येत नाहीत आणि कधी विलगही होत नाहीत. म्हणून त्यांना ‘काय’ म्हणायचे नाही.

जेवढ्या देशाला एक पुद्गलपरमाणू रोखून धरतो, तेवढ्या देशाला जैन परिभाषेत प्रदेश म्हटले आहे. लोकाकाश व त्यात व्याप्त असलेले धर्म व अधर्म हे बहुप्रदेशी होत. शरीरपरिमाण जीवद्रव्य जर शरीराच्या बाहेर होऊन पसरले, तर तेही लोकाकाशात व्याप्त होऊ शकते. म्हणून जीवद्रव्यही बहुप्रदेशी आहे. पुद्गलपरमाणूंच्या समूहामुळे जे स्कंध बनतात, तेही बहुप्रदेशी

होतात. अशा या बहुप्रदेशित्वामुळे वरील पाच द्रव्ये पंचास्तिकाय मानली गेली आहेत.

सात तत्त्वे – वर जी सहा द्रव्ये सांगितली, त्यांपैकी जैन धर्माचा संबंध केवळ एका जीव नामक द्रव्याशी आहे. समस्त दुःखांतून मुक्त होणे व उत्तम सुख मिळवणे या दोन गोष्टींसाठी जीवालाच धर्मोपदेश केलेला आहे. दुःखांचे मूलकारण कर्मबंध हे आहे. हा कर्मबंध कसा सुटेल आणि उत्तम सुखाचा लाभ कसा होईल, हे समजण्यासाठी मुमुक्षूने जीव, अजीव, आस्रव, बंध, संवर, निर्जरा व मोक्ष, या सात तत्त्वांचे ज्ञान करून घेणे आवश्यक आहे.

जीव आणि अजीव – ही दोन मूलतत्त्वे होत. यांच्यामुळेच या विश्वाची निर्मिती झाली आहे. जीव आणि अजीवाच्या अंतर्गत पाच मिळून सहा पदार्थांना द्रव्य मानले असून, त्याचा विचार वर केला आहे.

आस्रव – तिसरे तत्त्व आस्रव हे आहे. जीवाच्या ठिकाणी कर्मांचा प्रवेश होण्याच्या द्वाराला आस्रव असे म्हणतात. आस्रवाचे स्वरूप पुढीलप्रमाणे सांगितले आहे –

कायवाङ्मनसां कर्म स्मृतो योगः स आस्रवः ।
शुभः पुण्यस्य विज्ञेयो विपरीतश्च पाप्मनः ।।

अर्थ – काया, वाचा आणि मन यांची जी चलनवलनरूप क्रिया होते, तिला योग म्हणतात. योग म्हणजेच आस्रव होय. हा योग जर शुभ असेल, तर तो पुण्याचा आस्रव होतो व अशुभ असेल, तर पापाचा आस्रव होतो.

वरील श्लोकात आस्रवालाच योग म्हटले आहे. योग ही एक शक्ती आहे. ती शरीरधारी जीवांच्या कायिक, वाचिक आणि मानसिक क्रियांचा आश्रय प्राप्त करून जीवाकडे कर्मपुद्गलांना आकृष्ट करते. जीव मनाच्या द्वारे जे काही चिंतितो, वाणीच्या द्वारे जे बोलतो आणि शरीराच्या द्वारे जी हालचाल करतो, ते सर्व जीवाकडे कर्मांच्या आगमनाचे कारण होत असते.

बंध– चौथे तत्त्व बंध हे होय. जीव आणि कर्म यांचे परस्पर मिश्रण म्हणजे बंध होय. बंधात जीव-कर्मांचा संयोग असला, तरी बंध ही संयोगाहून निराळी वस्तू आहे. उदा० दूध आणि पाणी यांचे मिश्रण झाल्यानंतर ते दोनही पदार्थ आपल्या अस्सल स्वरूपात राहत नाहीत. कारण दुधात पाणचटपणा येतो व पाणी रंगाने दुधासारखे होते. अशा वेळी दूध व पाणी हे दोन्ही पदार्थ एकमेकांवर प्रभाव टाकतात. त्याचप्रमाणे जीव आणि कर्म ही दोन्ही परस्परसंबद्ध झाल्यानंतर आपापल्या अस्सल स्वरूपात राहत नाहीत. शिवाय ती एकमेकांवर प्रभावही करू लागतात. यालाच बंध अशी संज्ञा आहे. या बंधाचे यथायोग्य ज्ञान होण्यासाठी कर्मसिद्धान्त समजून घेणे आवश्यक आहे.

कर्मसिद्धान्त– साधकाच्या मोक्षमार्गात ज्या एका शक्तीमुळे बाधा उपस्थित होते, तिला जैन दर्शनात कर्म म्हटले आहे. प्राणी जसे कर्म करतो, तसे त्याला त्याचे फल भोगावे लागते. सामान्यपणे कर्मसिद्धान्ताचा हाच आशय आहे. राग-द्वेषांनी युक्त अशा जीवाच्या प्रत्येक कायिक, वाचिक, मानसिक क्रियेला धरून एक द्रव्य जीवाच्या ठिकाणी प्रवेश करते आणि त्याच्याशी संबद्ध होऊन त्याला बरे किंवा वाईट फल देत असते. जीव आणि कर्म यांचा हा संबंध अनादी आहे. यासंबंधी कुंदकुंदाचार्य म्हणतो –

जो संसारी जीव आहे तो राग-द्वेषादी भावांना उत्पन्न करतो. त्यामुळे कर्मबंध प्राप्त होतात. त्या कर्मांमुळे जीवाला निरनिराळ्या गतींत जन्म घ्यावा लागतो. जन्म घेतल्याने शरीर मिळते. शरीरात इंद्रिये असतात. त्या इंद्रियांच्या द्वारे जीव विषयांचे ग्रहण करतो. विजयग्रहणामुळे जीवाला इष्ट विषयांसंबंधी राग आणि अनिष्ट विषयांसंबंधी द्वेष निर्माण होतो. अशा प्रकारे संसारचक्रात पडलेल्या जीवाला भावामुळे कर्मबंध व कर्मबंधामुळे रागद्वेषरूपी भाव होत राहतात. हे चक्र अभव्य जीवाच्या अपेक्षेने अनादि-अनंत आहे आणि भव्य जीवाच्या अपेक्षेने अनादि-सान्त आहे.

जैन दर्शनाने कर्माचे परमाणू मानलेले आहेत. जीवाच्या प्रत्येक कायिक, वाचिक, मानसिक क्रियेबरोबर ते परमाणू जीवाकडे आकृष्ट होतात. या आकर्षणालाच जैन दर्शनात योग म्हटले आहे. जीवाचे राग, द्वेष, मोह, इ. भाव यांना कषाय म्हटले आहे. हे कषाय निमित्त प्राप्त होताच जीवाशी जखडून जातात. याचा अर्थ असा, की कर्मपरमाणूंना जीवापर्यंत ओढून आणण्याचे काम योग ही शक्ती करते आणि त्या परमाणूंना जीवाशी जखडून टाकण्याचे काम राग-द्वेषादी कषाय करतात. सारांश योग आणि कषाय हेच जीवाच्या बंधाचे कारण होत. योग-कषायांनी प्राप्त होणारा जीवाचा हा बंध पुढील चार प्रकारचा आहे –

(१) प्रकृतिबंध – कर्मांच्या ठिकाणी ज्ञानदर्शनादिकांचा घात करण्यांचा स्वभाव निर्माण होणे. (२) प्रदेशबंध – कर्मपरमाणूंची संख्या नियत असणे. (३) स्थितिबंध – कर्मपरमाणूंच्या ठिकाणी कालमर्यादा पडणे व (४) अनुभागबंध – त्या परमाणूंच्या ठिकाणी उणे–अधिक किंवा तीव्र-मंद फल देण्याची शक्ती निर्माण होणे.

वरील चार बंधांपैकी पहिला जो प्रकृतिबंध त्याचे पुढील आठ भेद होतात —

(१) ज्ञानावरण – हे कर्म जीवाच्या ज्ञानगुणाचा घात करते. याच्यामुळेच कोणी अल्पज्ञानी, तर कोणी विशेषज्ञानी दृष्टीस पडतात. (२) दर्शनावरण – हे जीवाच्या दर्शक नामक गुणाचा

घात करते. (३) वेदनीय – हे सुखदु:खांचा अनुभव घडवते. (४) मोहनीय – हे जीवाला मोहित करते. (५) आयू – हे विशिष्ट कालपर्यंत जीवाला विशिष्ट शरीरात रोधून धरते. हे तुटले, की जीवाला मृत्यू येतो. (६) नाम – याच्यामुळे भल्याबुऱ्या शरीराची आणि त्याच्या अंगोपांगांची रचना होते. (७) गोत्र – याच्यामुळे जीव उच्च वा नीच कुलातला समजला जातो व (८) अंतराय – याच्यामुळे इच्छित वस्तूच्या प्राप्तीत अडथळे निर्माण हीतात.

वरील आठ कर्मांपैकी पहिल्या चारांना घातीकर्मे म्हणतात. कारण ती जीवाच्या स्वाभाविक गुणांचा घात करतात. त्यापुढची चार कर्में ही अघाती होत. कारण ती जीवाच्या गुणांचा घात करीत नाहीत.

संवर – पाचवे तत्त्व संवर हे आहे. जोवर जीव आणि कर्म यांचा संबंध तुटत नाही, तोवर जीव मुक्त होत नाही. म्हणूनच कर्मांना जीवाच्या ठिकाणी प्रवेश करू न देणे, त्याचप्रमाणे त्याच्या कारणांनाही रोखून धरणे आवश्यक असते. या रोखण्याच्या क्रियेलाच संवर म्हणतात. 'आस्रवस्य निरोधः संवरः' (= आस्रवाचे अर्थात कर्मप्रवेशाचे द्वार रोधून धरणे म्हणजे संवर होय).

संवराचे भाव आणि द्रव्य असे दोन भेद आहेत. मुमुक्षू, ज्यांच्या द्वारे कर्ममार्गाचा निरोध करतो, अशा नैतिक प्रयत्नांना भावसंवर म्हणतात आणि कर्मपुद्‌गलांचा जीवप्रवेश एकदा बंद झाल्यानंतर पुढे नवीन कर्मपुद्‌गल आत येणे बंद होते, त्याला द्रव्यसंवर म्हणतात.

जीवाच्या ठिकाणी कर्मांचा हा प्रवेश रोखण्यासाठी जैनाचार्यांनी गुप्ती, समिती, धर्मानुप्रेक्षा, परीषहजय व चारित्र असे पाच उपाय सांगितले आहेत. काया, वाचा आणि मन यांच्या चंचलतेला रोखून धरणे याला गुप्ती म्हणतात. आहार–विहार गमनागमन, वचन–व्यवहार या गोष्टी संयमपूर्वक करणे, याला समिती म्हणतात क्षमा, मृदुता, सरलता, शौच, सत्य, संयम, तप, त्याग, औदासीन्य व ब्रह्मचर्य यांना दशविध धर्म म्हणतात. यांच्या पालनाने आत्म्याच्या ठिकाणी कर्मप्रवेश रुद्ध होतो. या धर्मांच्या धारणासाठी अनित्य, अशरण, संसार, इ. बारा अनुप्रेक्षांनी युक्त राहणे आवश्यक असते. साधनमार्गात येणारी संकटे सहन करणे, याला परीषहजय म्हणतात. याचे बाव्वीस भेद आहेत. सदैव सदाचाराचे पालन करीत राहणे व उत्तरोत्तर त्याचा विकास करणे, याला चारित्र म्हणतात. या चारित्राचे सामायिक, छेदोपस्थापना, इ. पाच भेद आहेत.

निर्जरा – सहावे तत्त्व निर्जरा हे होय. संवरामुळे यद्यपि आत्म्याच्या ठिकाणी नवीन कर्मांचा प्रदेश रुद्ध होतो, तथापि पुरातन कर्मे आत्म्यामध्ये साचून राहिलेली असतातच. त्यांनाही दूर करण्यासाठी आत्म्याला महान प्रयास करावे लागतात. तसे करूनही कर्मांचे परमाणू एकदम सगळे दूर होत नाहीत. ते क्रमाक्रमाने दूर होतात. कर्मपुद्‌गलांच्या या क्रमाक्रमाने नष्ट करण्याच्या प्रक्रियेला निर्जरा म्हणतात. ही अवस्था प्राप्त करण्यासाठी साधकाला नियमपालनपूर्वक कठोर तप करावे लागते. या तपाचे बाह्य व आभ्यंतर असे दोन भेद आहेत. बाह्य तप हे शारीर असून, आभ्यंतर तप हे मानसिक असते. मानसिक तपात शुक्लध्यान हे सर्वोत्तम तप मानलेले आहे. त्याच्या योगाने कर्मनिर्जरेचे आचरण करणारा जीव एका आंतर्मुहूर्तातच कर्मविनिर्मुक्त होतो. निर्जरा अवस्थेत निदिध्यासाची मोठी आवश्यकता असते. रागद्वेषादी दुर्गुणांचा सर्वथा परित्याग केल्यावाचून साधक या अवस्थेला पोचू शकत नाही. ही अवस्था प्राप्त झाल्यानंतर साधकाच्या दुःखांची आत्यंतिक निवृत्ती होते व जीवाला आपल्या निर्मल अंतःकरणात आत्मदर्शन घडते.

मोक्ष – सातवे तत्त्व मोक्ष हे होय. निर्जरा अवस्थेचे फल मोक्षाच्या स्वरूपात मिळते. 'कृत्स्नकर्मक्षयो मोक्षः' (= संपूर्ण कर्मांचा क्षय म्हणजे मोक्ष) असे त्याचे लक्षण उमास्वातीने दिले आहे (त. सू. १०. २).

निर्जराप्रकरणात सांगितल्याप्रमाणे तप, चारित्र, शुक्लध्यान, इ. कारणांनी घाती कर्मांचा क्षय झाल्यावर त्या मुमुक्षूला जी दशा प्राप्त होते, तिला कैवल्यदशा किंवा जीवन्मुक्तदशा असे म्हणतात. या दशेत त्याला अनंत ज्ञान, अनंत दर्शन, अनंत सुख व अनंत बल यांचा लाभ होऊन अर्हत्पदाची प्राप्ती होते. या अवस्थेला पोचल्यावर तो अर्हत् पुरुष जोवर जीवन शिल्लक आहे, तोवर संसारातल्या अज्ञानी व मार्ग चुकलेल्या लोकांना सन्मार्गाचा उपदेश करीत धर्मशास्ता या स्वरूपात पृथ्वीवर विहार करीत राहतो. जेव्हा आयुष्य सरण्याची वेळ येते, तेव्हा योगनिरोध करून, तसेंच चार अघाती कर्मांचाही क्षय करून तो निर्वाणसुखाला आणि परमशांतीला प्राप्त होतो.

जैन दर्शनात मोक्षाची तीन प्रमुख साधने सांगितली आहेत, ती अशी –

सम्यग्दर्शन-ज्ञान-चारित्राणि मोक्षमार्गः।

(त. सू. १.१)

अर्थ – सम्यग्दर्शन, सम्यग्ज्ञान व सम्यक्चारित्र मिळून मोक्षमार्ग होतो.

दर्शन शब्दाचा अर्थ जैनमते श्रद्धा असा आहे. तीर्थंकरांनी प्रतिपादिलेल्या शास्त्रग्रंथांवर दृढ श्रद्धा असणे, हेच सम्यग्दर्शन होय. सम्यग्दर्शन हे मोक्षमार्गाचे कर्णधारच मानलेले आहे.

सम्यग्दर्शनानंतर सम्यग्ज्ञान येते. शास्त्रप्रतिपादित अशा

समस्त तत्त्वांचा यथार्थ अनुभव प्राप्त करून घेणे, हे सम्यग्ज्ञान होय. संसाररूपी मरुस्थलीत संतप्त झालेल्या प्राण्यांना अमृतरूप जल पाजून तृप्त करणारे असे हे सम्यग्ज्ञान आहे. इंद्रियरूपी चंचल मृगांना बांधून आवळण्याचा तो एक दृढ पाश आहे. म्हणून मनुष्याने सम्यग्ज्ञानाच्या प्राप्तीसाठी निरंतर प्रयत्नशील असायला हवे. सम्यग्ज्ञान झाल्यावर सम्यक्चारित्र धारण करण्याची आवश्यकता असते. जोवर सदाचाराचे पालन होत नाही, तोवर निव्वळ कोरडे ज्ञान निरर्थकच ठरेल. म्हणून सम्यक्चारित्राच्या सिद्धीसाठी अहिंसा, सत्य, अस्तेय, ब्रह्मचर्य व अपरिग्रह या पाच महाव्रतांचे पालन नितांत आवश्यक मानलेले आहे. सम्यग्दर्शन, सम्यग्ज्ञान व सम्यक्चारित्र या तीन तत्त्वांना मिळून जैन दर्शनात रत्नत्रय अशी संज्ञा दिलेली आहे. [भा. द.— बलदेव उपाध्याय; भा. द. —डॉ. उमेश मिश्र; जैनधर्मामृत; जै. ध.; भा. सं. जै. यो.]

जैन धर्म भरतखंडात जे पाच, सहा प्रसिद्ध धर्म उदयाला आले व ज्यांनी भारताचे धर्मभूमी हे नाव सार्थ केले, अशा धर्मांपैकी जैन धर्म हा एक आहे. विष्णूला उपास्य मानणाऱ्या लोकांचा जसा वैष्णव धर्म किंवा शिवाला उपास्य मानणाऱ्या लोकांचा जसा शैव धर्म, तसा जिनाला परमपूज्य मानणाऱ्या लोकांचा जो धर्म तो जैन धर्म होय. हा झाला त्या शब्दाचा सामान्य अर्थ; पण याहून एक वेगळा आणि महत्त्वपूर्ण असा दुसरा अर्थ या शब्दाला आहे; तो म्हणजे जिनाने ज्या धर्माचे कथन केले किंवा ज्याचा उपदेश केला तो धर्म.

विचार व आचार अशी प्रत्येक धर्माची दोन अंगे असतात. जैन धर्माच्या विचारांचे मूळ स्याद्वाद व आचाराचे मूळ अहिंसा हे आहे. कोणत्याही व कोणाच्याही विचारांना अन्याय न व्हावा आणि कोणत्याही प्राण्याची हिंसा न व्हावी अर्थात सर्वांचे विचार समजून घ्यावे आणि सर्वांनी सर्वांच्या जीवनाची रक्षा करावी, हे जिनाच्या उपदेशाचे मूलतत्त्व आहे. जैन धर्माला आर्हत धर्म अशीही दुसरी संज्ञा आहे. आर्हत हा शब्द अर्हत् यावरून आला असून, त्याचे लक्षण सर्वदर्शनसंग्रहात पुढीलप्रमाणे दिले आहे—

सर्वज्ञो जितरागादिदोषस्त्रैलोक्यपूजितः ।
यथास्थितार्थवादी च देवोऽर्हत् परमेश्वरः ।।

(स. द. सं. पृ. ६)

अर्थ— सर्वज्ञ, राग-द्वेषादिकांवर विजय मिळवलेला, त्रैलोक्यपूजित, यथास्थित अर्थ जाणणारा, परमेश्वरसदृश असा सिद्ध पुरुष तो अर्हत् होय.

अशा अर्हताकडून प्रवर्तित झालेला धर्म तो आर्हत धर्म होय. पण आजमितीस प्रस्तुत धर्माचे जैन धर्म हेच नाव रूढ आहे.

एक काळ असा होता, की ज्या काळी जैन धर्माला बौद्ध धर्माचीच एक शाखा मानले जात होते; पण सांप्रत नव्या संशोधनाने ती भ्रांती दूर झाली आहे आणि जैन धर्म हा बौद्ध धर्माहून पृथक असा एक स्वतंत्र धर्म आहे आणि तो अतिप्राचीनही आहे, असे आता सिद्ध झाले आहे. ही भ्रांती दूर करण्याचे फार मोठे श्रेय डॉ. हर्मन याकोबी या विद्वानाला आहे. आता अंतिम तीर्थंकर भगवान महावीर याला जैन धर्माचा संस्थापक मानले जात नाही. तेविसावा तीर्थंकर पार्श्वनाथ हाही जैन धर्माचा संस्थापक नव्हे. याकोबी लिहितो, की जैन धर्माची परंपरा थेट प्रथम तीर्थंकर ऋषभदेव याच्यापासून सुरू होते. याचा अर्थ ऋषभदेव हाच जैन धर्माचा प्रवर्तक मानला पाहिजे. डॉ. राधाकृष्णन् यांनीही याच मताला पुष्टी दिली आहे. ते म्हणतात—

जैन परंपरा ऋषभदेवापासून आपल्या धर्माची उत्पत्ती झाल्याचे सांगते आणि ही गोष्ट बहुत शतकांपूर्वीची आहे. इ. स. च्या पहिल्या शतकात प्रथम तीर्थंकर ऋषभदेव याची पूजा होत होती, हे या बाबतीतले एक प्रमाण मानता येईल. जैन धर्म हा महावीर आणि पार्श्वनाथ यांच्याही पूर्वी प्रचलित होता यात कोणताही संदेह नाही.

यजुर्वेदात ऋषभदेव, अजितनाथ व अरिष्टनेमी या तीन तीर्थंकारांचा नामनिर्देश आहे. भागवत पुराणावरूनही ऋषभदेव हा जैन धर्माचा संस्थापक होता, या गोष्टीचे समर्थन होते (इंडियन फिलॉसफी व्हॉ. १, पृ. २८७).

जैन परंपरेनुसार या दृश्यमान जगतात कालचक्र सदैव फिरत असते. यद्यपि कालप्रवाह अनाद्यनंत असला, तरी त्याच्या चक्राचे सहा विभाग मानलेले आहेत, ते असे—

अतिसुखरूप, सुखरूप, सुख-दुःखरूप, दुःख-सुखरूप, दुःखरूप व अतिदुःखरूप.

कालचक्र हे एकवार सुखाकडून दुःखाकडे आणि दुसऱ्या वेळी दुःखाकडून सुखाकडे असे फिरत असते. सुखाकडून दुःखाकडे जाणाऱ्या कालाला अवसर्पिणी अर्थात अवनतिकाल म्हणतात व दुःखाकडून सुखाकडे जाणाऱ्या कालाला उत्सर्पिणी किंवा विकासकाल म्हणतात. या दोन्ही कालांचा अवधी करोडो वर्षांहूनही अधिक असतो. प्रत्येक अवसर्पिणी व उत्सर्पिणी कालाच्या दुःख-सुखरूप विभागात चौवीस तीर्थंकरांचा जन्म होतो. हे तीर्थंकर जिन अवस्थेला प्राप्त करून जैन धर्माचा उपदेश करतात. चालू युगात जे तीर्थंकर झाले, त्यांत ऋषभदेव हा पहिला व महावीर हा अंतिम होय. या दोहोंमधला अंतर-

कोटी कोटी सागर आहे. जैन धर्म हा अनादी धर्म असून त्याचे पुनरुत्थान भिन्न भिन्न युगात जन्म घेणाऱ्या तीर्थंकरांनी वेळोवेळी केले आहे, अशी जैनांची परंपरागत श्रद्धा आहे.

जैन पुराणात भारतवर्षाचा इतिहास त्याच्या भौगोलिक वर्णनाबरोबरच दिलेला आहे. भारत हा जंबुद्वीपाच्या दक्षिण भागात स्थित असून, त्याच्या उत्तरेस हिमवान पर्वत व मध्यभागी विजयार्ध पर्वत आहे. गंगा व सिंधू या दोन नद्यांमुळे उ. भारताचे तीन विभाग होतात, तसेच दक्षिण भारताचेही तीनच होतात. अशा रीतीने भारतवर्ष हे सहा खंडांचे बनलेले आहे. भारतवर्षाच्या प्रारंभिक अवस्थेला जैनांनी भोगभूमी म्हटले आहे. या अवस्थेत हिंस्र श्वापदांनी भरलेली जंगले होती. माणूसही पशूसारखाच वागत होता. त्या काळात आई-बाप मुलांची जबाबदारी घेत नव्हते आणि भाऊ-बहीण पति-पत्नींसारखा व्यवहार करीत होते. या कालात पाप-पुण्याची भावना नव्हती आणि धर्मसाधनाही नव्हती.

कालांतराने या व्यवस्थेत परिवर्तन झाले आणि ज्याला कर्मभूमी म्हणतात, ते युग सुरू झाले. या युगात संस्कृतीचा प्रारंभ झाला. या युगाचा विकास करणारे चौदा महापुरुष निर्माण झाले. त्यांना कुलकर किंवा मनू म्हटले आहे. या कुलकरांनी माणसांना हिंस्र पशूपासून आपले रक्षण कसे करावे, ते शिकवले, भूमी व वृक्ष यांच्याविषयी स्वामित्वाची भावना निर्माण केली, मुलांचे संगोपन हे कर्तव्य म्हणून सांगितले, कृषिकर्माची कला शिकवली. त्यानंतर मग वाणिज्य, शिल्प, इ. उद्योगधंदे उत्पन्न झाले.

चौदा कुलकरांच्या पश्चात माणसांना धर्मोपदेश करणारे व आपल्या चारित्र्याच्या द्वारे बऱ्या-वाईटातला, खऱ्या-खोट्यातला भेद शिकवणारे असे त्रेसष्ट महापुरुष उत्पन्न झाले. २४ तीर्थंकर, १२ चक्रवर्ती, ९ बलभद्र, ९ वासुदेव आणि ९ प्रतिवासुदेव या महापुरुषांना त्रेसष्ट शलाकापुरुष म्हणतात.

तीर्थंकर – ऋषभदेव हा पहिला धरून जैनांचे एकूण २४ तीर्थंकर आहेत, त्यांची नावे पुढीलप्रमाणे––

(१) ऋषभ, (२) अजित, (३) संभव, (४) अभिनंदन, (५) सुमती, (६) पद्मप्रभ, (७) सुपार्श्व, (८) चंद्रप्रभ, (९) पुष्पदंत, (१०) शीतल, (११) श्रेयांस, (१२) वासुपूज्य, (१३) विमल, (१४) अनंत, (१५) धर्म, (१६) शांती, (१७) कुंथू, (१८) अरह, (१९) मल्ली, (२०) मुनिसुव्रत, (२१) नमी, (२२) नेमी, (२३) पार्श्वनाथ, व (२४) वर्धमान अथवा महावीर.

ऋषभदेव – त्रेसष्ट शलाकापुरुषांत सर्वप्रथम आदितीर्थंकर ऋषभदेवाचे नाव येते. हा नाभिराज व मरुदेवी यांचा पुत्र होय. पित्याच्या पश्चात राजसिंहासनावर बसून याने कृषी, असी (खड्ग), मसी (शाई), शिल्प, वाणिज्य व विद्या या सहा उपजीविकेच्या साधनांची विशेष व्यवस्था केली. त्याचप्रमाणे देश व नगरे अशा स्वरूपात भूगोलाचे, तसेच वर्ण व जाती या स्वरूपात माणसांचे विभाजन केले.

जैन पुराणांतून ऋषभदेवाचे जीवन, तपस्या, त्याने मिळवलेले केवलज्ञान आणि केलेला धर्मोपदेश या गोष्टींचे विस्तृत वर्णन मिळते. भागवत पुराणाच्या ५ व्या स्कंधात वर्णिलेले ऋषभचरित हे जैन पुराणाशी मिळते जुळते आहे. भागवत पुराणातले त्याच्या जीवनाचे सार असे–

आपला ज्येष्ठ पुत्र भरत याला राज्य देऊन ऋषभदेवाने संन्यास घेतला. पुढे तो नग्न राहू लागला. त्याच्या या नग्न वृत्तीबद्दल लोक त्याचा तिरस्कार करीत, त्याला अपशब्द बोलत आणि दगडही मारीत. अशाही अवस्थेत ऋषभदेवाने कठोर तपस्या करून कैवल्य मिळवले. पुढे दक्षिण कर्नाटकापर्यंत त्याने परिभ्रमण केले. नंतर कुटकाचलावरील वनात तो उन्मत्तवत भ्रमण करू लागला. पुढे एके दिवशी वेळूला वेळू घासून त्या रानाला वणवा लागला आणि त्या वणव्यात ऋषभदेवाचे शरीर जळून भस्म झाले.

एवढे सांगून भागवतात पुढे म्हटले आहे, की ऋषभदेवाचे हे चरित्र श्रवण करून कोंक, वेंक व कुटक या देशांचा राजा अर्हत हा पुढे कलियुगात स्वेच्छेने ऋषभदेवप्रणीत धर्माचे प्रवर्तन करील.

ऋषभदेवाला १०० पुत्र होते. त्याने आपल्या या पुत्रांना जो उपदेश केला, त्याचा सारांश जैन साहित्यात पुढीलप्रमाणे सांगितला आहे–

"पुत्रहो, हे शरीर कष्टदायक आहे, अर्थात भोगण्यास योग्य नाही. म्हणून तुम्ही अनंत सुखाची प्राप्ती करून देणारे दिव्य तप आचरा. जो कोणी या लोकांत प्रयोजनमात्र आसक्ती ठेवतो, तो समदर्शी, प्रशांत आणि साधू होय. जोवर साधू आत्मतत्त्व जाणीत नाही, तोवर तो अज्ञानी होय. जोवर हा जीव कर्मकांड आचरीत राहतो, तोवर ती सर्व कर्मे शरीर आणि मन यांच्या द्वारे आत्म्याला बंध उत्पन्न करतात. पुरुषाचा स्त्रीच्या ठिकाणी जो कामभाव असतो, तीच हृदयग्रंथी होय. तिच्यातूनच जीवाला घर, जमीन, पुत्र, कुटुंब व धन यांचा मोह होतो. ही हृदयग्रंथी जेव्हा सुटते, तेव्हा जीव संसारातून मुक्त होऊन परमलोकाला प्राप्त होतो.

जैन साहित्यात ऋषभदेवाविषयी आणखी माहिती मिळते, ती अशी ––

एके दिवशी ऋषभदेव राजसिंहासनावर विराजमान असता

एक अप्सरा त्याच्यापुढे नृत्य करीत होती. नाचता नाचता एकाएकी ती पडली आणि गतप्राण झाली. या आकस्मिक घटनेनें ऋषभदेवाचे चित्त संसारापासून विरक्त झाले. त्याने पुत्रांवर राज्यभार सोपवून प्रव्रज्या ग्रहण केली. त्याने सहा महिने अक्षुण्ण अशी समाधी लावली. समाधीतून उठल्यावर त्याने आहारासाठी विहार केला. हस्तिनापूरच्या श्रेयांस नामक राजाने त्याला उच्चासनावर बसवून त्याची पूजा केली व त्याला उसाचा रस प्राशन करायला दिला. ती तिथी वैशाख शुद्ध तृतीया होती. आहार करून ऋषभदेव फिरून वनात गेला. नंतर पुरीमताल नगराच्या उद्यानात तो ध्यानस्थ बसला असता त्याला केवलज्ञानाची प्राप्ती झाली. तो जिन झाला. मग बराच समुदाय बरोबर घेऊन धर्मोपदेश करण्यासाठी तो विचरण करू लागला. त्याच्या व्याख्यानसभेला समवसरण असे म्हणत. त्याचा धर्मोपदेश श्रवण करण्यासाठी हिंस्र पशूही येत. अशा प्रकारे जीवनाच्या अंतापर्यंत प्राणिमात्राला धर्मोपदेश करून ऋषभदेव हा कैलास पर्वतावरून मुक्त झाला. तो जैन धर्माचा प्रथम तीर्थंकर ठरला. या युगात त्याच्या द्वारेच जैन धर्माचा प्रारंभ झाला.

पार्श्वनाथाचा चातुर्याम धर्म – पार्श्वनाथ हा तेविसावा तीर्थंकर होय. हा ऐतिहासिक पुरुष असल्याचे आतो सिद्ध झाले आहे. याचा जन्म वाराणसीत झाला. महावीराच्या पूर्वी सुमारे २५० वर्षे हा पार्श्वनाथाचा काल होय. महावीर व पार्श्वनाथ यांच्यामधले कालाचे अंतर आणि पार्श्वनाथाची १०० वर्षांची आयुमर्यादा या दोन्ही गोष्टी शक्यतेच्या कक्षेत येणाऱ्या आहेत.

पार्श्वनाथाने अहिंसा, सत्य, अस्तेय व अपरिग्रह या चार तत्त्वांवरआपल्या चातुर्याम धर्माची मांडणी केली. पार्श्वनाथाच्या या धर्मतत्त्वांचा उल्लेख बौद्धांच्या ग्रंथांतही आलेला आहे. त्यामुळे इतिहाससंशोधकाच्या दृष्टीने जैन धर्माचा प्रचार व प्रसार पार्श्वनाथाच्या कालापासून अधिक निश्चितपणे अभ्यासता येतो. 'पार्श्वनाथाने आपल्या आयुष्यात उ. प्रदेश, बिहार आणि बंगाल या प्रदेशांत आपल्या चातुर्याम धर्माचा प्रसार केला. मोठमोठे राजे, राजपुत्र, श्रेष्ठी आणि हजारो सर्वसामान्य लोक त्याने आपल्या धर्माकडे आकृष्ट केले. तत्कालीन श्रमणपरंपरेवरही पार्श्वनाथाचा फार मोठा प्रभाव पडला. पार्श्वनाथाने आपला श्रमणसंघ कशा प्रकारे संघटित केला, त्याचा तपशील मिळत नाही. त्याने नेमलेले आठ प्रमुख गणधर हेच त्याच्या संघाचा कारभार पाहत असावे.



पार्श्वनाथ – तेरापूरगुंफा

पार्श्वनाथाच्या निर्वाणापासून महावीराच्या उदयापर्यंतच्या २५० वर्षांच्या कालखंडात जैन धर्माची परिस्थिती काय होती, ते सांगता येत नाही. पण खुद्द महावीराचे आईवडील हे पार्श्वनाथाचे अनुयायी होते आणि महावीराला विहारमधील तुंगिया या ठिकाणी पाचशे पार्श्वानुयायी श्रमण भेटले होते, या दोन गोष्टींवरून पार्श्वनाथाच्या नंतरच्या काळातसुद्धा त्याचा चातुर्याम धर्म टिकून राहिला होता, हे निर्विवाद ठरते.



महावीर – फेस्टिवल्स ऑफ इंडिया
या ग्रंथावरून

महावीराची कामगिरी – जैन धर्माच्या इतिहासात भगवान महावीराची कामगिरी अद्वितीय आहे. महावीराने उत्तर आणि पूर्व भारतात सर्वत्र प्रवास करून रावापासून रंकापर्यंत सर्वांना प्रभावित केले. त्याने जे ११ गणधर नेमले, ते सर्वच्या सर्व ब्राह्मण 'होते. ही गोष्ट, विद्वान ब्राह्मणांवरही त्याच्या तत्त्वज्ञानाची छाप पडली होती, याची सूचक ठरते. तत्कालीन अनेक पंथोपपंथांच्या उलाढालीत जैन धर्माला स्थैर्य आणि प्रतिष्ठा प्राप्त करून देणे, हे महावीराचे अलौकिक कार्य होय.

जैन धर्माचा इतिहास – महावीराच्या पश्चात त्याच्या शिष्यांमध्ये गौतम, सुधर्मा व जंबूस्वामी हे तीन केवलज्ञानी झाले. त्यांच्या पश्चात विष्णू, नंदिमित्र, अपराजित, गोवर्धन व भद्रबाहू हे पाच श्रुतकेवली झाले. शेवटचा श्रुतकेवली भद्रबाहू हा मगधात दुष्काळ पडला असता एक मोठा जैनसंघ बरोबर घेऊन दक्षिण देशात निघून गेला. त्या कारणाने तमिळनाड व कर्नाटक या प्रदेशांत जैन धर्माचा पुष्कळ प्रसार झाला.

महावीराच्या काळी भरतखंडात १६ महाजनपदे अस्तित्वात होती. यापैकी बऱ्याचशा जनपदांतील राजपुरुषांशी महावीराचा संपर्क आला होता. चेटक हा वैशाली जनपदाचा राजा होय. तो जैन श्रावक होता आणि त्याने प्रतिज्ञाच केली होती, की 'मी माझ्या मुली जैनांशिवाय अन्य कोणालाही देणार नाही.' जी गोष्ट चेटकाची तीच वत्सराज उदयनाची. तोही श्रावक होता. त्याच्या राणीने तर आपल्या महालातच चैत्यालय निर्माण केले होते. शिशुनाग वंशातला श्रेणिक राजा, त्याचा पुत्र कूणिक आणि त्याचा पुत्र उदायी हे तिघेही महावीराचे अनुयायी बनले होते. त्या तिघांनीही आपल्या राज्यात जैन धर्माचा प्रसार होण्यास खूप मदत केली. उदायीने पाटलिपुत्र नगरात जैन मंदिरे बांधली होती. त्याच्या दरबारात जैन श्रमणांना अनिर्बंध प्रवेशाची मुभा होती.

त्यानंतर मगधावर नंद वंशाचा अधिकार प्रस्थापित झाला. नंद राजांनीही जैन धर्माला पाठिंबा दिला, ही गोष्ट जैन ग्रंथ आणि ओडिसातील उदयगिरी–खंडगिरी येथील खारवेल राजाचा शिलालेख यांवरून कळते. नंदराजांनी मगधात पळवून नेलेली ऋषभनाथाची प्रतिमा खारवेल राजाने मगध देशावर स्वारी करून पुनश्च कलिंग देशात आणली, असा उल्लेख त्या शिलालेखात आढळतो.

प्रसार–मौर्यकालात जैन धर्मापेक्षा बौद्ध धर्माला राजाश्रय अधिक प्रमाणात लाभला हे सर्वश्रुत आहे. विशेषतः अशोकाची कारकीर्द ही बौद्ध धर्माच्या उत्कर्षासाठीच कामी आली. पण असे असले, तरी सगळेच मौर्य राजे बौद्ध होते, असे म्हणता येणार नाही. जैन परंपरेप्रमाणे चंद्रगुप्त मौर्य जैन असून भद्रबाहूचा शिष्य होता. मगधातल्या दुष्काळाच्या वेळी भद्रबाहूबरोबर तोही दक्षिणेत गेला आणि श्रवणबेळगोळ येथे त्याने देह ठेवला, अशी माहिती श्रवणबेळगोळ येथील शिलालेखामध्ये सापडते. संप्रती आणि दशरथ हेही मौर्य कुलातलेच राजे होते. त्यांच्या अमदानीत, विशेषतः संप्रतीच्या कारकीर्दीत, जैन धर्माला चांगले दिवस आले. जे कार्य अशोकाने बौद्ध धर्माच्या बाबतीत केले, तेच कार्य संप्रतीने जैन धर्माच्या बाबतीत केले आहे. त्याने भारताच्या उत्तरेस आणि पश्चिमेस जैन धर्माचे प्रचारक पाठवले आणि त्या भागांत जैन साधूंसाठी विहारही बांधले.

मथुरा येथे सापडलेल्या कुशाणकालीन शिलालेखांवरून इ. स. च्या पहिल्या दोन शतकांतील जैन धर्माची परिस्थिती लक्षात येते. त्या काळात भांडागारिक, सांधिक, धातुशिल्पी, गोष्ठीप्रतिनिधी, वणिक, सौर्णिक, गणिका, इ. विविध वर्गांचा जैन धर्माकडे ओढा निर्माण झाला होता आणि हा सर्व उपासकांचा समुदाय संघटितही होता. मथुरेच्या कंकाली टेकडीत जे उत्खनन झाले, त्यात दोन जैन मंदिरांचे भग्नावशेष मिळाले आहेत. एक स्तूपही सापडला आहे. हा स्तूप सुपार्श्वनाथाच्या स्मृतीसाठी निर्माण केलेला होता, असा निर्देश प्राचीन जैन ग्रंथात सापडतो. हरिषेणाच्या कथाकोशात मथुरेच्या पाच स्तूपांचा उल्लेख मिळतो. त्यावरून जैन मुनींचा पंचस्तूपान्वयसंघ मथुरेतच निर्माण झाला असावा, असे वाटते. मथुरेत सापडलेल्या एकूण सगळ्या पुरातत्त्वसामग्रीवरून असे म्हणता येते, की सनपूर्व काही शतकांपासून तो इ. स. च्या १० व्या शतकापर्यंत मथुरा हे जैन धर्माचे मोठे केंद्र होते.

सनपूर्व चौथ्या शतकात दुष्काळाच्या प्रसंगी मगधातून भद्रबाहूच्या नेतृत्वाखाली जैन श्रमण दक्षिणेत गेले; तोच काल दक्षिणेतल्या जैन धर्मप्रवेशाचा असावा. लंकेमधल्या जैन धर्माच्या प्रवेशाची पदचिन्हे पालीवाङ्मयात दिसतात. महावंश या ग्रंथात लंकेतल्या राजवंशाचे वर्णन आहे. त्यातल्या पांडुकाभय नावाच्या एका राजाने निर्ग्रंथ श्रमणांसाठी अनेक निवासस्थाने बनवली होती, असे म्हटले आहे. तमिळनाडमध्ये जैन धर्माचा जो प्रचार झाला, त्याचे उल्लेख तमिळ वाङ्मयात आढळतात. मणिमेखलै हे तमिळ भाषेतले महाकाव्य बौद्ध प्रवृत्तीचे असले, तरी त्यातही दिगंबर मुनींचे उल्लेख आणि उपदेश आढळतात. जीवकचिंतामणी, कुंडलकेशी, इ. काव्ये तर जैनांच्याच कृती आहेत. दर्शनसार या ग्रंथावरून इ. स. ४७० मध्ये वज्रनंदीने मदुरेत द्राविड–जैन संघाची स्थापना केली होती, असे कळते. या सर्व पुराव्यांवरून इ. स. च्या पहिल्या काही शतकांत तमिळनाडमध्ये जैन धर्म बराच प्रतिष्ठित झाला होता, यात संदेह उरत नाही. तमिळनाडच्या चोल व पांड्य या राजांनीही जैन धर्माला आश्रय दिला होता.

तमिळनाड व कर्नाटक या दोन प्रदेशांची तुलना केल्यास तमिळनाडपेक्षा कर्नाटकात जैन धर्माचा उत्तम जम बसला, असे म्हणावे लागते. कर्नाटकच्या कदंब राजांनी दिलेली जी दानपत्रे आढळतात, त्यांत एका कदंब राजाने चंद्रनंदी या जैन आचार्याला एक गाव दान दिल्याचे कळते. त्याच वंशातल्या काकुत्स्थ नामक युवराजाने श्रुतकीर्ती या सेनापतीला भगवान अर्हंतासाठी भूमिदान दिले होते. या राजवंशाचे अनेक अभिलेख सापडले असून, त्यांवरून जिनालयांच्या रक्षणासाठी व जैन संघाच्या उपजीविकेसाठी ग्रामदाने व भूमिदाने दिली होती, हे समजते. कदंब राजा कीर्तिदेव याच्या राणीने ब्रह्मजिनालय या नावाचे एक चैत्यालय बनवले होते. कर्नाटकातल्या अनेक महिलांनी जैन धर्माच्या प्रसारासाठी परिश्रम केलेले आहेत.

गंग राजवंशाची स्थापना करण्यात जैनाचार्य सिंहनंदी याचा फार मोठा हात होता. गंग वंशाचे राज्य इ. स. च्या दुसऱ्या

शतकात निर्माण झाले. या वंशातल्या अविनीत व दुर्विनीत या राजांचे राजगुरू जैन आचार्यच होते. गंग राजा मारसिंह याच्याविषयी तर असे सांगतात, की त्याने चेर, चोळ व पांड्य या राजांवर विजय मिळवून अनेक जैन मंदिरे व स्तंभ उभारले. मारसिंहानंतर राचमल्ल हा गादीवर आला. चामुंडराय हा त्याचा मंत्री होता. त्याने श्रवणबेळगोळ येथील गोमटेश्वराची विशाल मूर्ती निर्माण केली. या काळात कर्नाटकात जैन साहित्याचीही अभिवृद्धी झाली.

इ.स. च्या सातव्या शतकात द. भारतात राष्ट्रकूट राजवंश बलवान झाला आणि त्याने आपला राज्यविस्तारही केला. या वंशाचा जैन धर्माशी घनिष्ठ संबंध आहे. या वंशातले अमोघवर्ष, कृष्ण, इंद्रराज, इ. राजे जैन धर्माचे पुरस्कर्ते होते. राष्ट्रकूटांची राजधानी मान्यखेट हे नगर जैन संस्कृतीचे एक केंद्र बनले होते. राष्ट्रकूटांच्या कालातच गणितसार, उत्तरपुराण, यशस्तिलकचंपू, इ. सुप्रसिद्ध जैन ग्रंथ निर्माण झाले.

चालुक्य राजेही जैन धर्माचे होते. त्यांच्या उदार आश्रयामुळेच दक्षिणेत जैन धर्माची ख्याती झाली. या वंशातले जयसिंह (दुसरा), सोमेश्वर (पहिला व दुसरा) आणि विक्रमादित्य (सहावा) यांनी कित्येक जैन कवींना राजाश्रय देऊन त्यांच्याकडून साहित्यनिर्मिती करवली; तसेच जैन मंदिरे आणि जैन संस्था यांनाही भूमी आणि द्रव्य सढळ हाताने दिले.

होयसळ राजवंशाची स्थापना एका जैन मुनीनेच केली आहे. या वंशातल्या बहुतेक सर्व राजांनी जैन मंदिरे आणि जैन आश्रम यांना दाने दिली आहेत. या वंशातला सर्वांत मोठा प्रतापी राजा विष्णुवर्धन हा होय. हा वैष्णव होता, तरी जैन धर्माविषयी त्याला प्रेम वाटत होते. याने अनेक जैन विहारांना आणि जैन मंदिरांना मुक्त हस्ताने दाने दिली आहेत. या वंशातल्या कित्येक राजांचे राजगुरू जैन मुनी होते.

याव्यतिरिक्त द. भारतात अनेक छोटीमोठी राजघराणी उदयाला आली आणि त्यांनीही जैन धर्म प्रबल होण्यास मदत केली. वीरसांतर याचा मंत्री नगुलरस याला एका शिलालेखात 'जैन धर्माचा गढकोट' असेच म्हटले आहे. कूर्ग प्रांतातल्या राजांनीही अनेक जैन मंदिरे निर्माण करून जिनमूर्ती स्थापल्या व त्यांच्या पूजे–अर्चेसाठी महादाने दिली. अशा रीतीने कर्नाटकात जैन धर्म वाढला, विस्तारला; पण पुढच्या काळात तमिळनाडमध्ये मात्र त्याला वाईट दिवस आले. तिथल्या पांड्य आणि पल्लव राजांनी शैवाचार्यांच्या प्रभावामुळे जैन धर्माच्या उच्चाटणालाच मदत केली, असे म्हणावे लागेल.

इ. स.च्या पहिल्या शतकात काठियावाडमध्येही एक जैन केंद्र निर्माण झाल्याचे कळते. ते गिरनार पर्वतावर होते.

गुजरातच्या चाप वंशाचा संस्थापक वनराज याने जैन धर्माला खूप प्रोत्साहन दिले. याच वंशातल्या मूलराजाने अणहिलवाड येथे मूलवसतिका नामक जैन मंदिर निर्माण केले. चौलुक्यनरेश भीम (पहिला) याच्या कारकीर्दीत गुजरात आणि राजस्थान या प्रदेशांत जैन धर्माचा विशेष प्रसार झाला. त्याने अबूच्या पहाडावर ऋषभदेवाचे कलापूर्ण मंदिर बांधले. वस्तुपाल व तेजपाल हे दोघे बंधू गुजरातचा राजा वीरधवल याचे मंत्री होते. त्यांनी अबूच्या पहाडावर अप्रतिम कलापूर्ण अशी जैन मंदिरे निर्माण केली. त्यामुळे पहाडावरच्या त्या स्थानाला देलवाडा (देवलवाडा) असेच नाव पडले. जयसिंह सिद्धराज आणि त्याचा पुत्र कुमारपाल या दोघांच्याही राज्यकालात गुजरातमधील जैन संस्था समृद्ध बनल्या. राजस्थानातल्या अनेक कर्तबगार जैनांनी राजकारणाबरोबरच जैन धर्माचेही कार्य केले. चितोडचा कीर्तिस्तंभ याच गोष्टीची साक्ष देत उभा आहे.

इ. स. च्या आठव्या–नवव्या शतकात मध्यप्रांतात कलचुरी राजवंश गाजत होता. कलचुरी राजे जैन धर्माचे पोषक होते, असे म्हणतात. त्रिपुरी ही त्यांची राजधानी होती. त्रिपुरीत आणि रतनपुरात आजही भग्न जैन मूर्ती विखुरलेल्या दिसतात. विदिशेजवळचे बेसनगर हे जैनांचे एक प्राचीन क्षेत्र आहे. शीतलनाथ या तीर्थंकराची ती जन्मभूमी होय. चंदेलांच्या कारकीर्दीतही जैन धर्म बुंदेलखंडात आपला जम बसवून होता. खजुराहोची प्रसिद्ध जैन मंदिरे आणि सोनगीर, देवगड, द्रोणागिरी, इ. क्षेत्रे या गोष्टीची साक्ष देतील.

एक काळ असा होता, की पश्चिम बंगालमध्ये बौद्ध धर्मापेक्षा जैन धर्माचाच विशेष प्रचार होता. तिथली मानभूम, सिंहभूम, वीरभूम, बरद्वान या शहरांची नावेही महावीर आणि वर्धमान या नावांच्या आधारांवरच दिली गेली आहेत. पुढे हळूहळू बंगालमधल्या जैन धर्माचा ऱ्हास झाला आणि ती जागा बौद्ध धर्माने घेतली. आजही त्या भागात जैन मंदिरांचे भग्न अवशेष, जैन मूर्ती, शिलालेख, इ. जैन स्मृतिचिह्ने ठिकठिकाणी आढळतात. आचार्य क्षितिमोहन सेन म्हणतात––

बारकाईने विचार केल्याअंती बंगालमधील धर्म, आचार आणि व्रते यांच्यावर जैन धर्माची छाप दिसून येते. जैनांचे अनेक शब्द बंगालमध्ये प्रचलित आहेत. प्राचीन बंगाली लिपीतले पुष्कळसे जोडाक्षरयुक्त शब्द देवनागरीशी न जुळता प्राचीन जैन लिपीशी जुळतात. बंगालमधील सराक नावाची हिंदू जात मूळच्या जैन श्रावकांचे हिंदूकरण होऊनच बनलेली आहे.

कर्नाटकाच्या उत्तर भागात उदयाला आलेल्या यापनीय संघाची नवव्या आणि तेराव्या शतकांच्या दरम्यान जी काही प्रमुख केंद्रे होती, त्यांत बेळगाव जिल्ह्यातली होसूर व मनोली,

विजापूर जिल्ह्यातले ऐहोळे, गुलबर्गा जिल्ह्यातली आळंद व मलखेड, निजामाबाद जिल्ह्यातले बोधन ही गावे आणि कोल्हापूर, कागवाड व सांगलीजवळचे तेरदळ ही महाराष्ट्रातील गावे प्रमुख होती. कोल्हापूर येथे जैनांचे एक प्रमुख पीठ होते कोल्हापूरच्या रूपनारायण बसतीचे मंडलाचार्य माघनंदी यांनी तीन पिढ्यांपर्यंत आपल्या विद्वान शिष्यांच्या मदतीने मठांच्या शासनात कडक शिस्त ठेवून धर्मप्रसाराचे फार मोठे कार्य केले. पैठणचे जैन धर्मपीठ सातवाहनकाळातही प्रसिद्ध होते. वेरूळच्या डोंगराला जैन लोक चारणाद्री या नावाने ओळखत होते. वऱ्हाड-खानदेशमध्ये श्वेतांबर जैन प्रामुख्याने होते, तर कोल्हापूर-सोलापूरच्या बाजूला दिगंबर प्रामुख्याने होते. परंतु इ. स. च्या दहाव्या शतकापासून दक्षिणेत जैन धर्माच्या ऱ्हासाला प्रारंभ झाल्यामुळे महाराष्ट्रात जैनांचे प्राबल्य वाढू शकले नाही.

जैन धर्माच्या प्रभावाच्या खुणा तुरळक स्वरूपात का होईना, महाराष्ट्राच्या सांस्कृतिक इतिहासात आढळून येतात. चक्रधरस्वामींच्या विचारविश्वावर जैन धर्माचा प्रभाव दिसतो. महानुभाव पंथाच्या आचार-विचारांचे जैन धर्माशी बरेच साम्य आहे. आपल्या सहाध्यायांसह पैठण येथे जैन धर्माची दीक्षा घेऊन भद्रबाहू नाव धारण करणाऱ्या एका विद्वान ब्राह्मणाने इ. स. ११०५ पर्यंत दक्षिणेत जैन धर्माचा प्रसार केला. मालखेडच्या दरबारात महाकवी म्हणून ख्याती पावलेला पुष्पदंत हा वऱ्हाडातला होता. तसेच संगीतशास्त्रात तत्कालीन देशी शब्दांना पारिभाषिक संज्ञांची प्रतिष्ठा मिळवून देणारा संगीताचार्य पार्श्वदेव हाही महाराष्ट्रातलाच होता. एलिचपूरला ईल नामक जैन राजाचे राज्य होते. शिलाहारांची जैनांवर कृपा होती. नासिकजवळच्या अंजनेरीमध्ये जैनांचे एक केंद्र होते. महाराष्ट्राच्या उत्तर भागात पैठण व एलिचपूर आणि दक्षिण भागात कोल्हापूर व तेर ही जैन तीर्थक्षेत्रे प्रसिद्ध आहेत. महानुभाव मराठी वाङ्मयाप्रमाणे जैनांनी निर्माण केलेले मराठी वाङ्मयही आजवर जैन भांडारांतून हस्तलिखित स्वरूपात पडून होते. परंतु गेल्या दशकभरातील काही महाराष्ट्रीय जैन विद्वानांच्या प्रयत्नांमुळे ते आता उजेडात येऊ लागले आहे.

इ. स. च्या ११ व्या शतकापासून भारताला मुसलमानांच्या विध्वंसक आक्रमणाला तोंड द्यावे लागले. त्यामुळे भारतातील धार्मिक, सामाजिक व राजकीय जीवनाचे धागे विस्कळित झाले. अशा स्थितीतसुद्धा कित्येक जैनाचार्यांनी कडव्या मुसलमान सुलतानांवर प्रभाव पाडून आपला धर्म टिकवून ठेवण्याचे काम केले. महंमद घोरी, अलाउद्दीन खिलजी, फिरोज तुघलख, अकबर व जहांगीर हे मुसलमान सत्ताधीश काही काल जैन गुरूंच्या तपस्येने व विद्वत्तेने प्रभावित झाले होते.

शिलालेख व ताम्रपट – जैन धर्म व जैन इतिहास यांच्या अभ्यासाकरिता सर्वसाधारणपणे जैन आगम व आगमेतर वाङ्मय यांच्यावरच गेल्या शतकाच्या अखेरीपर्यंत भर होता. पण गेल्या अर्धशतकात जैन किंवा जैनविषयक असे शिलालेख हजारोंच्या संख्येने उपलब्ध झाले आहेत. जैन वाङ्मयात ज्या गोष्टींचे प्रतिपादन आहे, त्याला या शिलालेखांनी अनेक ठिकाणी दुजोरा दिला आहे. संस्कृत, प्राकृत, मराठी, गुजराती अशा विविध भाषांतले हे शिलालेख भारताच्या बऱ्याच मोठ्या भागात सापडले असून, सनपूर्व तिसऱ्या शतकापासून इ. स. च्या अठराव्या शतकापर्यंतचा काल एवढी त्यांची कालव्याप्ती आहे. मथुरेचा परिसर आणि कर्नाटक या भागांतील शिलालेख संख्या, काल आणि माहिती या दृष्टीने फार मोलाचे आहेत. जैन श्रमणांच्या अस्तित्वाचा पहिला शिलालेखीय उल्लेख निग्गंथ (निर्ग्रंथ) या नावाने सनपूर्व तिसऱ्या शतकात आढळतो. मौर्यकालात बौद्ध धर्माला राजाश्रय मिळाला असताना देखील जैन श्रमणांचा हा उल्लेख महत्त्वाचा ठरतो. मौर्योत्तरकालात जैन धर्माचे केंद्र मगधातून कलिंगात गेले, असे खारवेलाच्या शिलालेखावरून अनुमानिता येते.

इ. स. च्या पहिल्या-दुसऱ्या शतकात झालेल्या उत्खननातून जे शेकडो शिलालेख उपलब्ध झाले, त्यांचे महत्त्व जैन श्रमण व उपासकसंघ यांच्या अभ्यासाच्या दृष्टीने अनन्यसाधारण आहे. तत्कालीन श्रमणसंघ गण, कुल, शाखा आणि संभोग अशा विविध घटकांमध्ये कसा विभाजित झाला होता, ते त्या शिलालेखांवरून समजते. गच्छ या नावाखाली श्रमणसंघात जे विविध गट निर्माण झाले, त्यांपैकी एकाचाही उल्लेख मथुरा येथील शिलालेखांत आढळत नाही. त्यावरून इ. स. च्या सुरवातीच्या कालात जैन मुनिसंघात गच्छांचे अस्तित्व नव्हते, हे कळून येते.

जैन मुनिसंघाच्या अंतर्गत व्यवस्थेबद्दलही शिलालेखांतून विविध प्रकारची माहिती मिळते. मथुरा शिलालेखांत आचार्य, अंतेवासी, गणी, वाचक, श्रद्धचर, श्रमणोपासक, अशी अधिकार भेदाची वाचक असलेली नावे आढळतात; तर मध्ययुगीन शिलालेखांत सूरी, भट्टारक, उपाध्याय, यांचे उल्लेख अधिक येतात. मध्ययुगीन शिलालेख अनेक गण-गच्छांचीही माहिती देतात. सामान्यपणे अशी समजूत आहे, की इ. स. च्या दहाव्या शतकात उद्योतनसूरीच्या शिष्यपरंपरेतून गच्छांची उत्पत्ती झाली. या समजुतीला शिलालेखांचा दुजोरा मिळतो.

शिलालेखांतून जैन मुनिसंघाच्या संघटनेची माहिती जशी मिळते, तशीच मुनिजीवनाच्या विविध अंगांबद्दलही मिळते. वर्षाचे आठ महिने भ्रमण व पावसाळ्याचे चार महिने एका

ठिकाणी मुक्काम, या मुनिप्रथेविषयी अनेक शिलालेखांत उल्लेख आहेत. कदंबांच्या ताम्रपटांत जैन मुनींच्या चातुर्मास्य वर्षावासप्रसंगी त्यांच्या राहण्या-भोजनाची व्यवस्था उत्तम ठेवावी, असे आदेश आढळतात. मध्ययुगामध्ये कर्नाटकात जैन श्रमणांसाठी मोठमोठे मठ-विहार बांधले गेले आणि मठांना व मंदिरांना अग्रहार दान म्हणून दिले गेले, या गोष्टीही ताम्रपटांवरून समजतात. इ. स. च्या चवथ्या-पाचव्या शतकातील कदंबांच्या ताम्रपटांत जैन मुनींसंबंधी श्वेतपट व निर्ग्रंथ असे वेगवेगळे उल्लेख आले आहेत. हे उल्लेख दिगंबर-श्वेतांबर या संप्रदायभेदावर प्रकाश टाकतात. युआन च्वांग या चिनी प्रवाश्याने (इ. स. ७ वे शतक) श्वेतवस्त्र वापरणारे व नग्न अशा उभयविध श्रमणांचा उल्लेख केला आहे.

शिलालेखांतून जैन मुनींच्या विद्वत्ता, तपःसामर्थ्य व चारित्र्य या गुणांविषयी विस्तृत माहिती मिळते. विद्वता व वादपटुत्व या त्यांच्या गुणांबद्दल त्यांना विद्वत्सम्राट, वादीभकंठीरव, शब्दचतुर्मुख, विद्याधनंजय, अशी विरुदे लाबलेली दिसतात. तीन दिवसांपासून तो तीस दिवसांपर्यंतच्या विविध उपवासरूप मुनींच्या तपाचेही उल्लेख मिळतात. मुनींनी केलेल्या चमत्कारांचीही वर्णने आढळतात.

जैनसंघ – जैनसंघ हा चतुर्विध आहे. मुनी, आर्यिका किंवा श्रमण, श्रमणी व श्रावक, श्राविका हे त्याचे चार घटक होत. पहिले दोन गृहत्यागी वर्ग असून, दुसरे दोन गृहस्थ वर्ग आहेत. आचारभेदाने हे दोन वर्ग जरी भिन्न असले, तरी त्यां परस्परांमध्ये असा मेळ जमवलेला आहे, की एकापासून दुसरा तुटून निघू नये आणि परस्परांवर परस्परांचे नियंत्रण राहावे.

मुनिधर्म – सांप्रत जैनांच्या संघव्यवस्थेत शैथिल्य आले असले, तरी प्राचीन काळी जैन मुनिसंघाचे जीवन संघटित व नियमबद्ध असे होते. मुनीला आचार्यांची अनुज्ञा घेतल्यावाचून एकट्याने विहार करता येत नसे. मुनिदीक्षाही प्रत्येकाला दिली जात नसे. प्रथम दीक्षार्थी मनुष्याला संघात ठेवून घेऊन त्याची अनेक बाजूंनी परीक्षा करीत आणि त्याचे वैराग्य हे वाव्वनकशी आहे, असे सिद्ध झाल्यानंतरच त्याला दीक्षा देत. मुनिसंघात एक प्रधान आचार्य असे आणि त्याच्या हाताखाली अवांतर अनेक आचार्य असत. ते सर्व मिळून संघाचे नियमन करीत. हातून काही प्रमाद किंवा अपराध घडल्यास त्याचे प्रत्येक साधूला आचार्यांपुढे स्वमुखाने प्रकटीकरण करावे लागे आणि आचार्य देईल ते प्रायश्चित्त स्वीकारावे लागे. प्रत्येक साधूला प्रातःकाली उठून मोठ्या आचार्यांना नमस्कार करावा लागे आणि रोगी किंवा असमर्थ साधूची सेवा-शुश्रूषा करावी लागे. जैन शास्त्रात या कर्माला वैयावृत्य असे एक नाव असून, त्याला आभ्यंतर तप असेही दुसरे नाव दिलेले आहे.

जैन धर्मात स्त्रियांना योग्य स्थान आणि मान दिलेला असून, मोक्षप्राप्तीचा त्याचा अधिकार मान्य केलेला आहे. गौतम बुद्धाने केवळ आनंद या आपल्या शिष्याच्या आग्रहावरून मोठ्या नाखुषीने स्त्रियांना भिक्षुसंघांत दाखल होण्याचा परवाना दिला. हिंदू धर्मात संन्यासिनींच्या सांघिक जीवनाबद्दल फारशी माहिती मिळत नाही. यावरून जे हिंदू धर्मांत नाही आणि जे बौद्ध धर्मात उशीरा घडले, ते जैनांनी पहिल्यापासून अंमलात आणून श्रमणीसंस्था निर्माण केली, हे जैन धर्माचे वैशिष्ट्य मानले पाहिजे. ऋषभदेवापासून महावीरापर्यंत प्रत्येक तीर्थंकराचा श्रमणीसंघ असल्याची माहिती जैन ग्रंथांतून मिळते.

श्रमणींचे दैनंदिन व प्राथमिक जीवन याविषयीचे नियम छेदसूत्रात दिलेले आहेत. मुनी व आर्यिका किंवा श्रमण व श्रमणी यांचे नियम जरी सारखे असले, तरी स्त्रीची नैसर्गिक दुर्बलता लक्षात घेऊन जास्तीत जास्त सुरक्षित असे उपाश्रय निवडण्याचे स्वातंत्र्य तिला देण्यात आले आहे. कुठल्याही श्रमणीने सहसा एकटे फिरायचे किंवा राहायचे नाही, श्रमणाशी कारणावाचून बोलायचे नाही, त्याच्याशी एकांतात संभाषण करायचे नाही, स्वाध्यायातील शंका विचारायला आचार्यांकडे जायचे, तेसुद्धा प्रवर्तिनी किंवा गणिनी हिच्या आज्ञेशिवाय जायचे नाही, असे श्रमणीसंघाचे मूलभूत नियम आहेत.

जैन धर्मशास्त्रात मुनीने पाच महाव्रतांसह अठ्ठावीस गुण प्राप्त करून घेतले पाहिजेत, हा मुख्य उपदेश आहे. हे अठ्ठावीस गुण पुढीलप्रमाणे आहेत –

१ ते ५ महाव्रते – अहिंसा, सत्य, अचौर्य, ब्रह्मचर्य व अपरिग्रह ही पाच महाव्रते होत. हिंसा, चौर्य, असत्य, व्यभिचार आणि लोभमूलक परिग्रह ही सामाजिक पापे आहेत. मनुष्य जितक्या प्रमाणात त्यांचा त्याग करील, तितक्या प्रमाणात तो सभ्य व सुसंस्कृत ठरेल. म्हणून जैन धर्माने ही पाच महाव्रते, मनुष्याच्या अंतःकरणातल्या दुष्ट प्रवृत्तींवर नियंत्रण पडावे, या उद्देशाने उपदेशिली आहेत. अधिकारभेदाने ही पाच व्रते मुनी किंवा श्रमण यांना महत्स्वरूपात आणि गृहस्थाश्रमी माणसांना पडणाऱ्या स्वाभाविक मर्यादा लक्षात घेऊन त्यांच्यासाठी अणुस्वरूपात सांगितली आहेत.

६ ते १० समिती – या समितींची नावे पुढीलप्रमाणे –

ईर्याभाषैषणादाननिक्षेपोत्सर्गभेदतः
पञ्च गुप्तावशक्तस्य साधोः समितयः स्मृताः ॥

अर्थ – ईर्या, भाषा, एषणा, आदाननिक्षेप व उत्सर्ग या पाच समिती होत. जेव्हा साधू गुप्तीचे (मन, वचन व काय या तीन योगांचा सम्यक् निग्रह) धारण करण्यास असमर्थ असेल, तेव्हा

समितीत्रे धारण करावे, असे सांगितले आहे.

श्रमणाने चालण्याफिरण्यामध्ये सावधानी राखावी. आपल्या पुढे चार हात भूमी पाहून पाऊल टाकावे. ही ईर्या समिती होय.

मुनीने निंदा, हास्यविनोद, कटुशब्द अशा दूषित भाषेचा त्याग करून सत्य, प्रिय व कल्याणकारी वाणी उच्चारावी. ही भाषा समिती होय.

भिक्षाद्वारे केवळ शुद्ध व निरामिष आहार निर्लोभ वृत्तीने ग्रहण करणे, ही एषणा समिती होय.

ज्या काही थोड्या वस्तू मुनीने आपल्या जवळ बाळगायच्या त्या ज्ञान व चारित्र्य यांना उपकारक होतील अशा आणि तेवढ्याच ठेवणे, ही आदाननिक्षेप समिती होय.

मलमूत्रादिकांचा त्याग दूर, एकांती व जंतुरहित जागी करणे, ही प्रतिस्थापन (किवा उत्सर्ग) समिती होय.

११ ते १५ इंद्रियविजयता – हिचे लक्षण पुढीलप्रमाणे –

चक्षुःश्रोत्रघ्राणजिव्हास्पर्शाक्षगोचरे भिक्षोः ।
रत्यरतिचित्तवृत्ते रोधः स्यादक्षसंरोधः

अर्थ – डोळे, कान, नाक, जिह्वा आणि स्पर्शेंद्रिय यांची इष्टानिष्ट विषयात रती व अरती एतद्रूप जी मनोवृत्ती असते, तिचा निरोध करणे, ही साधूची पंचेंद्रियविजयता होय.

१६ ते २१ आवश्यके – यांची नावे पुढीलप्रमाणे –

आवश्यकक्रियाषट्कं समतास्तववन्दनम् ।
सप्रतिक्रमणं प्रत्याख्यानं कायविसर्जनम् ॥

अर्थ – समता, (चतुर्विंशति) स्तव, वंदना, प्रतिक्रमण, प्रत्याख्यान व कायोत्सर्ग ही सहा आवश्यके होत.

२२ स्नान न करणे, २३ दंतधावन न करणे, २४ जमिनीवर झोपणे, २५ उभ्याने भोजन करणे, २६ दिवसातून एकदाच जेवणे, २७ नग्नावस्थेत राहणे व २८ केशलोंच हे सर्व मिळून अठ्ठावीस गुण होतात. या मुनिधर्माचे विशेष विवरण मूलाचार, आचारसार, यशस्तिलक (उत्तरार्ध), चारित्रसार व अनगारधर्मामृत या ग्रंथांत आलेले आहे. (आवश्यक क्रिया पाहा.)

श्रावकधर्म – जो सम्यग्दर्शन प्राप्त होण्यासाठी मुनिजनांकडून सदाचाराचा उपदेश श्रवण करतो, तो श्रावक होय (सावयपण्णत्ती २). श्रावक आणि श्राविका यांना जैन धर्मात महत्त्वपूर्ण स्थान आहे. श्रावकावाचून मुनिसंघ चालूच शकणार नाहीत. उत्तम श्रावक हाच पुढे उत्तम मुनी व्हायचा असतो. म्हणून जैन धर्मात श्रावकाचार हा श्रमणाचाराचा पाया म्हणून मानलेला आहे.

श्रावकालाच उपासक असेही म्हणतात. जैन उपासकसंस्था ही फार प्राचीन आहे. पार्श्वनाथ आणि महावीर यांच्या काळीही उपासकांची संख्या खूप होती. ब्राह्मण, वैश्य, शूद्र, राजे, राजपुत्र, सधन, निर्धन असे सर्व जातींचे, थरांचे आणि पेशांचे बरेच लोक जैन धर्माच्या छत्राखाली आले होते. या संमिश्र उपासकसमुदायाने जैन धर्माच्या इतिहासात फार मोठी कामगिरी बजावली आहे.

उपासकधर्माचे विवेचन करणारे ग्रंथ सावयपण्णत्ती, उपासकाध्ययन, रत्नकरंडकश्रावकाचार, इ. आहेत. ते संस्कृत व प्राकृत अशा दोन्ही भाषांत आहेत. या सर्व ग्रंथांत उपासकांचे जे आचारनियम दिले आहेत, ते श्रावकाची मनःशुद्धी, इंद्रियनिग्रह आणि वार्धक्यात मुनिजीवन स्वीकारण्याची पात्रता, या तीन दृष्टींनी आखलेले आहेत.

श्रावकाची ५ अणुव्रते पुढीलप्रमाणे सांगितली आहेत–

(१) **अहिंसाणुव्रत**– अहिंसा हा जैन धर्माचा प्राणभूत सिद्धान्त आहे. आत्म्याच्या शुद्ध परिणामाचा घात करणे याचे नाव हिंसा होय. जैनांनी संकल्पी, उद्योगी, आरंभी व विरोधी असे हिंसेचे चार प्रकार कल्पिले आहेत. कसाई पशुवध करतो, तशा प्रकारची हिंसा ही संकल्पी; जीवन निर्वाहासाठी केल्या जाणाऱ्या शेती, व्यापार, तसेच युद्ध या ठिकाणी होणारी हिंसा ती उद्योगी; सावधगिरी बाळगूनही स्वयंपाकादी करताना होणारी हिंसा ही आरंभी आणि स्वतःच्या किंवा दुसऱ्याच्या रक्षणासाठी केली जाणारी हिंसा ही विरोधी होय.

हिंसेचे द्रव्यहिंसा व भावहिंसा असे महत्त्वाचे दोन प्रकार होतात. एखाद्या जीवाचा प्रत्यक्ष वध करणे ही द्रव्यहिंसा व एखाद्या जीवाचे वाईट करण्याची इच्छा मनात उत्पन्न होणे व एखाद्याला मर्मभेदक बोलणे ही भावहिंसा होय. भावहिंसा हीच खरी हिंसा म्हटली जाते. कारण तिथे कर्त्याच्या मनात दुष्ट भाव असतो. मग त्याच्या हातून प्रत्यक्ष कोणाचा घात घडो किंवा न घडो. जिथे कर्त्याच्या मनात हिंसेचा भाव नसेल, तिथे त्याच्या हातून एखाद्याचा जीवघात झाला, तरी ती हिंसा ठरत नाही. जैनांनी हिंसेतला हा विवेक स्वीकारूनच आपल्या शास्त्राची उभारणी केली आहे. मनुष्याने आपल्या स्वार्थासाठी कोणत्याही जीवाला त्रास अथवा पीडा देऊ नये आणि आपला जीवनव्यवसाय करताना त्यात जीवांचे अहित आणि जीवघात कमीत कमी होईल अशी सावधानी ठेवावी, असे जैन धर्मशास्त्र सांगते. अशी सावधानी जो ठेवतो तो जैनमते अहिंसकच होय.

अशा अहिंसेचे ज्यात पालन करायचे असते, त्याला मुनिधर्मात अहिंसाव्रत आणि श्रावकधर्मात अहिंसाणुव्रत म्हटले आहे.

अहिंसाणुव्रतासंबंधी सागारधर्मामृतात पुढील श्लोक सांगितला आहे–

इत्यनारम्भजां जह्याद् हिंसामारम्भजां प्रति ।
व्यर्थस्थावरहिंसावद्यतनामावहेद् गृही ॥

अर्थ – (गृहस्थाने) शेती वगैरे उद्योगात होणाऱ्या हिंसेव्यतिरिक्त स्वाद व करमणूक इ. कारणासाठी होणारी हिंसा यथाशक्ती टाळण्याचा प्रयत्न करावा.

गृहस्थजीवनात कोणता तरी उद्योगधंदा केल्यावाचून कोणाचाही निर्वाह होऊच शकत नाही. अर्थात कोणताही उद्योगधंदा म्हटला, की तिथे हिंसा अपरिहार्यपणे येतेच. जैन धर्माने ही अपरिहार्य हिंसा ही अहिंसा म्हणूनच ठरवली आहे.

(२) सत्याणुव्रत– याविषयी जैनधर्मामृतात सांगितले आहे, ते असे–

असत्यतो लघीयस्त्वमसत्याद्वचनीयता ।
अधोगतिरसत्याच्च तदसत्यं परित्यजेत् ।।

अर्थ – असत्य भाषणाने मनुष्याला लघुता प्राप्त होते, त्याचा अपमान होतो आणि शेवटी तो अधोगतीला जातो. यासाठी असत्य वचनाचा परित्याग करावा.

जैन धर्मात सत्य हे स्वतंत्र व्रत नाही; तर अहिंसाव्रताचेच ते एक अंग आहे. जे वचन दुसऱ्यांच्या अंतःकरणाला झोंबते किंवा दुःख देते, ते वचन सत्य असले, तरी त्यामुळे हिंसा होत असल्यामुळे जैन धर्माच्या दृष्टीने ते असत्यच होय.

(३) अचौर्याणुव्रत– या व्रताचे लक्षण पुढीलप्रमाणे सांगितले आहे –

निहितं वा पतितं वा सुविस्मृतं वा परस्वमविसृष्टम् ।
न हरति यन्न च दत्ते तदकृशचौर्यादुपारमणम् ।।

अर्थ – ठेव म्हणून ठेवलेले, पडलेले, विसरलेले व परक्याचे असलेले धन जो स्वतः ग्रहण करीत नाही आणि जो ते उचलून दुसऱ्यालाही देत नाही, तो स्थूल चौर्यापासून विरक्त झाला, असे समजावे. हेच अचौर्याणुव्रत होय.

(४) ब्रह्मचर्याणुव्रत – याविषयी पुढीलप्रमाणे सांगितले आहे –

न तु परदारान् गच्छति न परान् गमयति च पापभीतेर्यत् ।
सा परदारनिवृत्तिः स्वदारसन्तोषनामापि ।।

अर्थ – जो पुरुष पापाच्या भीतीने परस्त्रीगमन करीत नाही आणि दुसऱ्या कोणाला त्यासाठी प्रवृत्त करीत नाही, अशा पुरुषाची परस्त्रीपासून निवृत्ती आणि स्वस्त्रीच्या ठिकाणी संतुष्टता ही दोन्ही मिळून ब्रह्मचर्याणुव्रत होय.

(५) परिग्रहपरिमाणव्रत– याचे लक्षण पुढीलप्रमाणे सांगितले आहे—

धनधान्यादिग्रन्थं परिमाय ततोऽधिकेषु निःस्पृहता ।
परिमितपरिग्रहः स्यादिच्छापरिमाणनामापि ।।

अर्थ–धनधान्यादी दशविध परिग्रहाचे परिमाण ठरवून त्या परिमाणातच त्यांचा संचय करणे व त्याहून अधिकाविषयी निःस्पृहता राखणे, हे इच्छापरिमाण नावाचे परिग्रहपरिमाणव्रत होय.

या पाच अणुव्रतांच्या जोडीला श्रावकासाठी तीन गुणव्रते व चार शिक्षाव्रते अधिक सांगितली आहेत. दिग्व्रत, अनर्थदंड व भोगोपभोगपरिमाण अशी गुणव्रतांची नावे आहेत. देशावकाशिक, सामायिक, प्रोषधोपवास व वैयावृत्य ही शिक्षाव्रतांची नावे होत.

आयुष्यभर आपले येणे–जाणे व देणे–घेणे या गोष्टींवर मर्यादा घालणे, काही कालासाठी काही क्षेत्रांची मर्यादा घालून घेणे, प्राण्यांना पीडा होईल असे कोणतेही काम न करणे, सकाळ-संध्याकाळ काही वेळ एकांत स्थळी बसून आत्मध्यान करणे, प्रत्येक अष्टमी व चतुर्दशी या तिथींना उपवास करणे, भोगसाधनांचे निश्चित परिमाण ठरवणे, रोज भोजन करण्याच्या पूर्वी साधू–मुनींना अन्नदान करणे, तसेच रात्री भोजन न करणे, पाणी गाळून पिणे, इ. नियमही श्रावकाने पाळायचे असतात.

धर्मग्रंथ– जैनांचे धर्मशास्त्र फार प्राचीन असून, ते अनेक विधि–निषेधांनी भरलेले आहे. त्यांच्या धर्मग्रंथांत अनेक शतकांतल्या सामान्य जीवनाचे प्रतिबिंब जसे उमटले आहे, त्याचप्रमाणे त्यात भाषेची स्थित्यंतरेही झालेली आहेत. जैनांची धर्मग्रंथांकडे पाहाण्याची दृष्टी मीमांसकांप्रमाणे आत्यंतिक शब्दप्रामाण्याची नाही. तसेच ती चार्वाक किंवा बौद्ध यांच्याप्रमाणे शब्दप्रामाण्य संपूर्णपणे झिडकारणारीही नाही. धर्मग्रंथ हे मुक्तात्म्यांचे उच्च अनुभवरूप असून, ते साधकांना मार्गदर्शक होतात, असे जैन मानतात. त्यांतील प्रत्येक शब्द जसाच्या तसा तीर्थंकराच्या मुखातून प्रकटलेला आहे, असे नसून तीर्थंकरांच्या शिष्यांनी गुरुमुखातून ऐकलेल्या विचारांचे आपापल्या शब्दांत ग्रथन करून धर्मग्रंथ निर्माण केले, अशी जैनांची धारणा आहे. त्यामुळे धर्मग्रंथांचा अर्थ लावताना ते शब्दच्छल करण्याची प्रवृत्ती टाळू शकतात.

जैन धर्मशास्त्रातील प्राचीनतम भाग म्हणजे आगमग्रंथ होत. श्रुति–स्मृती हे जसे वैदिकांचे प्रमाणग्रंथ तसेच आगम हे जैनांचे प्रमाणग्रंथ आहेत. आगमांचे लक्षण जैनधर्मामृतात दिले आहे, ते असे—

आप्तोपज्ञमनुल्लङ्घ्यमदृष्टेष्टाविरोधकम् ।
तत्त्वोपदेशकृत्सार्वं शास्त्रं कापथघट्टनम् ।।

अर्थ– आप्तकथित, वादी-प्रतिवादींना अनुल्लंघ्य, प्रत्यक्षादी प्रमाणांनी ज्यात कोणत्याही प्रकारचा विरोध येत नाही असे, सत्य तत्त्वोपदेशक, सर्व प्राण्यांच्या हिताचे प्रतिपादक आणि मिथ्या मार्गाचा नाश करणारे असे जे शास्त्र, त्याला आगम असे म्हटले आहे.

आगमांचे दोन प्रमुख गट केले जातात. पहिला श्रुतपुरुषाच्या अंगांमध्ये समाविष्ट होणारा म्हणजे अंगप्रविष्ट आणि दुसरा ज्या समाविष्ट न झालेला म्हणजे अंगबाह्य. पहिल्या गटातील आगमांचे कर्तृत्व महावीराचा पाचवा शिष्य सुधर्मा याच्याकडे जाते आणि दुसऱ्या गटातील आगमांचे कर्तृत्व महावीराच्या निर्वाणानंतर एक हजार वर्षांत होऊन गेलेल्या अनेक आचार्यांकडे जाते.

चंद्रगुप्त मौर्याच्या कारकीर्दीत मगधात भयंकर दुष्काळ पडला. त्यामुळे अनेक जैन श्रमण भद्रबाहूच्या नेतृत्वाने दक्षिणेत गेले. उरलेले स्थूलभद्राच्या नेतृत्वाखाली मगधातच राहिले. दुष्काळ समाप्त झाल्यावर स्थूलभद्राने श्रमणांची एक परिषद बोलावली. श्रुतज्ञानात आलेला विस्कळितपणा घालवून ते व्यवस्थितस्वरूपात संकलित करणे, हा त्या परिषदेचा उद्देश होता. त्या दृष्टीने त्या परिषदेत ११ अंगांचे संकलन केले गेले. दृष्टिवाद हे बारावे अंग कोणाच्याच स्मरणात शिल्लक राहिले नव्हते. त्यामुळे त्याचे संकलन होऊ शकले नाही. या संकलनाला पाटलिपुत्रवाचना असे म्हणतात. पुढच्या काळात हे संकलनही विस्कळित झाले. त्याला पुनश्च व्यवस्थित करण्यासाठी महावीराच्या निर्वाणानंतर ६०९ वर्षांनी आर्य स्कंदिल या आचार्याच्या अध्यक्षतेखाली मथुरेत दुसरी आचार्यपरिषद भरली. या परिषदेत जे आगमग्रंथ संकलित झाले, त्यांना माथुरीवाचना असे म्हणतात.

इ.स. ४६० च्या सुमारास काठियावाडात वलभी येथे आणखी एक आचार्यपरिषद भरली. देवर्धिगणी हा आचार्य तिचा प्रमुख होता. या परिषदेत व्यक्तिगत विविध पाठांतरे व वाचनाभेद यांचा समन्वय करून पुनश्च सगळ्या आगमांचे संकलन करण्यात आले. इतकेच नव्हे, तर सदर संकलन लिपिबद्धही केले गेले. या संकलनाला वलभीवाचना असे म्हणतात. श्वेतांबर संप्रदायाने मान्य केलेले आगम म्हणजे ही वलभीवाचनाच होय.

अकरा अंगे, बारा उपांगे, सहा छेदसूत्रे, चार मूलसूत्रे, दहा प्रकीर्णके व दोन चूलिकासूत्रे मिळून आगमांची संख्या पंचेचाळीस भरते. आगमांना श्रुतज्ञान किंवा सिद्धान्त असेही म्हणतात. अर्हत् भगवानाने आगमांचे प्ररूपण केले व त्याच्या गणधरांनी ते सूत्ररूपात निबद्ध केले, असे जैन परंपरा सांगते. श्वेतांबर व दिगंबर हे दोन्ही संप्रदाय आगमांना मानतात. फरक एवढाच, की मूळ आगम कालदोषामुळे नष्ट झाले, असे दिगंबर संप्रदाय समजतो; तर ते नष्ट झाले नाहीत, असे श्वेतांबर संप्रदाय समजतो.

अंगे व उपांगे– अंग–उपांग पाहा.

छेदसूत्रे– यांत यतींच्या विधि-निषेधांची, नियमांची व प्रायश्चित्तांची चर्चा आहे (छेदसूत्रे पाहा).

मूलसूत्रे– यांची संख्या चार असून, हे ग्रंथ जैन लोक मुखोद्गत करतात (मूलसूत्रे पाहा). वैदिक परंपरेत महाभारताच्या शांतिपर्वाला आणि बौद्ध परंपरेत धम्मपद व सुत्तनिपात या ग्रंथांना जे महत्त्व आहे तेच महत्त्व जैन परंपरेत मूलसूत्रातील उत्तराध्ययनं या सूत्राला आहे. आवश्यकसूत्रात शिष्यलक्षणे, पंडितलक्षणे, मानवधर्माचे महत्त्व, इ. विषय आहेत. जैन यती सकाळ–संध्याकाळ आत्मशुद्धीसाठी या सूत्राचे पठण करतात. दशवैकालिकसूत्रात मुनीचे चालणे, राहणे, बसणे, झोपणे, खाणे पिणे, इ. क्रिया कशा व्हाव्यात त्याचे वर्णन आहे. पंडितनिर्युक्ती या ग्रंथातही यतींच्या आचारधर्मावरच भर आहे.

प्रकीर्णके – यांची संख्या वलभीवाचनेत १० मानली गेली आहे. त्यांची नावे अशी – (१) चतुःशरण (२) आतुरप्रत्याख्यान (३) महाप्रत्याख्यान (४) भक्तपरिज्ञा (५) तंदुलवैचारिक (६) संसारक (७) गच्छाचार (८) गणिविद्या (९) देवेन्द्रस्तव व (१०) मरणसमाधी. विचार केल्याअंती असे दिसते की प्रकीर्णके ही मुनींच्या मनाला अंतकाळी निराकुल शांती लाभावी यासाठी आहेत.

चूलिकासूत्रे– नंदी व अनुयोगद्वार अशी यांची नावे आहेत. पहिल्याचा कर्ता देवर्धिगणी हा असून, दुसऱ्याचा आर्यरक्षित हा आहे. हीही मुनींच्या विशेषज्ञानासाठीच आहेत.

या सर्व प्रमाणभूत धर्मग्रंथांवर अनेक प्रकारचे संस्कृत–प्राकृत टीकाग्रंथ लिहिले गेले आहेत. भद्रबाहू पहिला व दुसरा यांनी प्राकृत पद्यात रचलेले दहा निर्युक्तिग्रंथ आहेत. निर्युक्तींच्या धर्तीवर रचलेले विशेषावश्यकभाष्यासारखे प्रचंड भाष्यग्रंथही आहेत. प्रस्तुत भाष्याचा कर्ता जिनभद्र हा असून, त्या ग्रंथात सुमारे ३६०० गाथा आहेत. कल्पव्यवहार व निशीथ या भाष्यांचा कर्ता संघदासगणी हा मानला जातो. चूर्णी नामक लघुटीकाग्रंथही झालेले आहेत. यांची भाषा संस्कृत–प्राकृत मिश्रित असली, तरी प्राकृताला प्राधान्य आहे. ऐतिहासिक, सामाजिक व कथात्मक सामग्रीसाठी निशीथ व आवश्यक या दोन चूर्णी महत्त्वपूर्ण आहेत. जिनदासगणी हा चूर्णींचा कर्ता मानला जातो. अभयदेव, मलयगिरी व शीलांक यांनी आगमांवर संस्कृत टीका रचल्या आहेत. निर्युक्ती, भाष्य, चूर्णी व टीका या चारांसह आगमग्रंथांना पंचांगी आगम असे म्हणतात.

दिगंबरांचे आगम हे चार अनुयोगांमध्ये ग्रथित झालेले आहेत, त्यांची नावे अशी– प्रथमानुयोग, करणानुयोग, चरणानुयोग व द्रव्यानुयोग. प्रथमानुयोगात पुराणे; चरित्रे व आख्याने या ग्रंथांचा समावेश होतो. करणानुयोगात ज्योतिष, गणित, इ. ग्रंथ येतात. चरणानुयोगात मुनी व गृहस्थ यांच्या आचरणाचे नेमधर्म

सांगणारे ग्रंथ येतात. द्रव्यानुयोगात जीव–अजीव, कर्मसिद्धान्त, नय–निक्षेप, इ. विषयांचा ऊहापोह करणारे दार्शनिक ग्रंथ येतात.

दिगंबर परंपरेनुसार महावीराचा प्रधान गणधर गौतम इंद्रभूती होता. त्याने महावीराच्या उपदेशांचे अवधारण करून तो उपदेश बारा अंगे व चौदा पूर्वे यात निबद्ध केला. हेच मूल आगम होत. हे आगम ग्रंथ कालदोषानुसार हळूहळू लुप्त झाले. त्यांपैकी काही अंशांचेच ज्ञान फक्त मुनिपरंपरेत शिल्लक राहिले होते. चौदा पूर्वांपैकी काही थोडचा भागाचा ज्ञाता आचार्य धरसेन हा एकटाच राहिला होता. गिरनारवर तपस्या करीत असता त्याला वाटले, की आपल्या मागून उरलेसुरले श्रुतज्ञानही नष्ट होणार आहे; म्हणून त्याने पुष्पदंत व भूतबली या नावाच्या दोन साधूंना आपले शिष्य बनवून त्यांना आपल्या जवळचे जे होते ते सारे ज्ञान उपदेशिले. नंतर त्या दोघांनी मिळालेल्या त्या ज्ञानाच्या आधारावर षट्खंडागम नावाचा एक सूत्रग्रंथ प्राकृत भाषेत निर्माण केला.

याच काळात गुणधर नावाचा एक आचार्य झाला. त्याने कसायपाहुड नावाचा दुसरा एक ग्रंथ लिहिला. या ग्रंथात २३३ गाथा असून, त्यात कर्मबंधाला कारणीभूत होणाऱ्या क्रोध, मान, माया व लोभ या चार कषायांचे विवेचन केले आहे. षट्खंडागम आणि कसायपाहुड हे दोनच ग्रंथ दिगंबर पंथात मूल आगमांचे अवशेष म्हणून प्रमाणभूत मानतात. या दोन्ही ग्रंथांवर अनेक आचार्यांनी टीका लिहिल्या. त्यांतला अंतिम टीकाकार वीरसेनाचार्य हा होय. त्याने लिहिलेल्या टीकेला धवला असे नाव आहे. या टीकाग्रंथाचे ७२,००० श्लोक आहेत. कसायपाहुडावरही त्याने आणि त्याच्या शिष्यांनी मिळून एक टीका लिहिली असून, तिचे नाव जयधवला असे आहे. त्या ग्रंथात ६०,००० श्लोक आहेत. या दोन्ही टीका संस्कृत–प्राकृत मिश्रित मणिप्रवालशैलीत आहेत. षट्खंडागमाचा अंतिम खंड महाबंध हा आहे. भूतबली या आचार्याने त्याची रचना केली. हा ग्रंथही ४१,००० श्लोकांचा आहे. या सर्व ग्रंथात जैन सिद्धान्तांचे सूक्ष्म व गंभीर विवेचन आहे.

पंथभेद– दिगंबर आणि श्वेतांबर अशा दोन्ही पंथांच्या उपलब्ध साहित्यावरून कळते, की इ. स. च्या दुसऱ्या शतकात एकसंघ असलेला जैनसंघ स्पष्ट रूपाने दोन गटांत विभाजित झाला. या विभाजनाचे मूलकारण साधूंचे वस्त्रपरिधान हे होते. जो पक्ष साधूंच्या नग्नतेचा पुरस्कार करणारा व महावीराचा मूल आचार मानणारा होता, त्याला दिगंबर(दिशा हेच ज्याचे वस्त्र असा अर्थात नग्न) म्हणू लागले व जो पक्ष साधूंच्या वस्त्रपात्राचे समर्थन करणारा होता, त्याला श्वेतांबर (शुभ्र वस्त्र धारण करणारा) असे नाव मिळाले. पुढे या दोन्ही संप्रदायांत अनेक अवांतर पंथही उत्पन्न झाले; पण जैनांचे हे सर्व पंथोपपंथ महावीराला मानणारे आहेत. अहिंसा व अनेकांतवाद हाही सर्वांना मान्य आहे. आत्मा, परमात्मा, संसार, मोक्ष, इ. च्या स्वरूपाविषयीही त्यांच्यांत मतभेद नाही. सात तत्त्वांचे स्वरूपही सर्व संप्रदायात सारखेच आहे. जो भेद आहे तो पुष्कळ अंशी व्यावहारिक दृष्टिकोनाचा आहे.

दिगंबर संप्रदायाचे साधू नग्न राहतात. जीवजंतूंच्या निराकरणासाठी ते मोरपंखांची पिच्छी व जलासाठी कमंडलू धारण करतात. दिवसातून एकदाच उभ्याने करपात्रात भोजन करतात. दिगंबर साधूंचे हे स्वरूप प्राचीन काळापासून याच प्रकारचे आहे. पूर्वी ते वस्तीच्या बाहेर शून्यगृहात वास करीत; पण पुढे हळूहळू त्यांनी नगरवस्तीत वास्तव्य करण्यास प्रारंभ केला. दिगंबर मुनींच्या या नियमशैथिल्याबद्दल जैनाचार्य गुणभद्र याने पुढीलप्रमाणे खेद व्यक्त केला आहे–

इतस्ततश्च त्रस्यन्तो विभावर्यां यथा मृगाः ।
वनाद्विशन्त्युपग्रामं कलौ कष्टं तपस्विनः ॥

अर्थ– ज्याप्रमाणे रात्रौ इतस्ततः भयाने ग्रस्त झालेले मृग ग्रामवस्तीच्या जवळ येऊन आसरा घेतात, त्याचप्रमाणे कलिकालात तपस्विजनही वने सोडून ग्रामात वस्ती करतात, ही मोठ्या दुःखाची गोष्ट आहे.

मुनिजनांच्या या दुर्बलतेला पुढे हळूहळू प्रोत्साहन मिळत गेले व शेवटी शिवकोटी आचार्याने स्पष्ट विधानच केले, की ‘ कलियुगात मुनींनी वनवास सोडून जिनमंदिरातच वास्तव्य करावे ’ (रत्नमाला २२). अशा वास्तव्यालाच चैत्यवास असे म्हणतात. यातूनच पुढे श्वेतांबरांतल्या चैत्यवासी संप्रदायाची उत्पत्ती झाली. दिगंबरात चैत्यवासी संप्रदाय नसला, तरी तशा प्रकारची प्रवृत्ती होतीच. तिचेच एक विकसित रूप म्हणजे भट्टारकसंस्था होय. तिच्या विरोधातूनच पुढे तेरापंथाचा उदय झाला. दिगंबर संप्रदायासाठी मूलसंघ असाही शब्द वापरला जातो. या मूलसंघातही पुढच्या काळात अनेक भेद-प्रभेद उत्पन्न झाले. आचार्य इंद्रनंदीने आपल्या श्रुतावतार या ग्रंथात लिहिले आहे, की पुंड्रवर्धनपुरात अर्हत्बली नावाचा एक आचार्य होऊन गेला. जैन धर्मात त्याने संघ किंवा गण स्थापित केले. युगप्रतिक्रमणासाठी त्याच्याबरोबर आलेल्या मुनींना त्याने वेगवेगळी नावे दिली. गुहांमधून आले त्यांच्यापैकी काहींना नंदी व काहींना वीर, अशोकवाटिकेतून आले त्यांच्यापैकी काहींना अपराजित व काहींना देव, पंचस्तूप्यनिवासातून आलेल्यांपैकी काहींना सेन व काहींना भद्र; शाल्मलिवृक्षाच्या मुळांतून आलेल्यांपैकी काहींना गुणधर व काहींना गुप्त आणि खंडकेसर-

वृक्षाच्या मुळांतून आलेल्यांपैकी काहींना सिंह व काहींना चंद्र अशी नावे दिली.

या सर्व नावांमध्ये नंदी, सेन, देव आणि सिंह ही नावे विशेष प्रसिद्ध आहेत. जैनांतले हे चार प्रमुख संघ होत. या संघांतही पुढे अनेक भेद-प्रभेद झाले. साधारणतः संघाच्या भेदांना गणं व प्रभेदांना गच्छ म्हणण्याची परंपरा दिसते. कुठे कुठे संघांना गण किंवा अन्वय या नावांनीही ओळखले जाते. उदा० नंदीगण, सेनगण, सेनान्वय इत्यादी. संघ, गण व गच्छ यांनी निर्माण झालेल्या या भेद-प्रभेदांत प्रव्रज्यादिक्रियांविषयी कोणताही मतभेद नाही.

दर्शनसारामध्ये काही जैन संघांचा जैनाभास या नावाने उल्लेख केलेला आहे. श्वेतांबर, यापनीय, द्राविड, माथुर व काष्ठा हे ते संघ होत.

श्वेतांबर– या संप्रदायाचे साधू श्वेतवस्त्र परिधान करतात. त्यांच्यापाशी चौदा उपकरणे असतात. शिवाय त्यांच्या हातात एक लांब दांडाही असतो. प्रथम श्वेतांबर साधूही नग्नच राहत होते. पुढे त्यांनी वस्त्राचा स्वीकार केला, तरी इ. स. च्या ७ व्या ८ व्या शतकापर्यंत ते केवळ कारणपरत्वे वस्त्र वापरीत आणि तेही केवळ कटिवस्त्र. त्यापुढच्या काळात ते शुभ्र वस्त्रे परिधान करू लागले व जिनमूर्तींनाही कटिवस्त्र नेसवू लागले.

यापनीय – हा पंथ फार प्राचीन आहे. श्रीकलश नावाच्या श्वेतांबर साधूने या पंथाची स्थापना केली, असे देवसूरी सांगतो. एका काळी हा संप्रदाय कर्नाटकात फार प्रभावशाली होता. या संघाचे मुनीही नग्न राहत असत. सांप्रत हा संप्रदाय अस्तित्वात नाही.

द्राविड– दर्शनसार या ग्रंथावरून इ. स. ४६९ साली मदुरेत द्राविडसंघाची उत्पत्ती झाली असे कळते. वज्रनंदी हा या पंथाचा प्रवर्तक होय. हा दिगंबर संप्रदायाचाच एक अवांतर भेद आहे.

माथुर– मथुरेमध्ये रामसेनाने या संघाची स्थापना केली. या संघाचे साधू पिच्छी धारण करीत नव्हते, म्हणून त्यांना निष्पिच्छ म्हणत.

काष्ठा– इ. स. ६९६ मध्ये या संघाची उत्पत्ती झाली. कुमारसेन हा याचा प्रवर्तक होय. याने मयूरपिच्छ टाकून गायीच्या केसांची पिच्छी धारण केली होती. याने मूढ लोकांमध्ये मिथ्या धर्माचा प्रचार सुरू केला आणि त्यामुळे त्याला श्रमणसंघातून हाकलण्यात आले, असे सांगतात.

चैत्यवासी – श्वेतांबरातूनच चैत्यवासी हा संप्रदाय महावीराच्या निर्वाणानंतर सुमारे ८५० वर्षांनंतर निर्माण झाला. हे लोक विहार सोडून मंदिरात राहू लागले. हळूहळू त्यांची संख्या आणि बळ या दोन्ही गोष्टी वाढल्या. त्यांनी निगम नामक शास्त्र निर्माण केले आणि त्यात असे प्रतिपादन केले, की वर्तमानकालीन मुनींनी चैत्यवास करणे व पुस्तकादी वस्तूंसाठी आवश्यक द्रव्य संग्रही ठेवणे योग्य व आवश्यक आहे.

श्वेतांबरांत आज जे जती किंवा श्रीपूज्य या नावाने ओळखले जाणारे साधू आहेत, ते चैत्यवासी शाखेचेच अवशेष असून, जे संवेगी नामक मुनी आहेत, ते वनवासी शाखेचे अवशेष आहेत.

तेरापंथ– हा मूर्तिपूजाविरोधी संप्रदाय आहे. मारवाडामध्ये इ. स. च्या १८ व्या शतकाच्या अखेरीस आचार्य भिक्षूने त्याची स्थापना केली. या पंथात पूज्यजी महाराज हे साधुसंघाचे अधिपती असतात. साधूंना त्यांची आज्ञा मानावी लागते व नित्य विधिपूर्वक त्यांचा सन्मान करावा लागतो. हा पंथ भट्टारक युगातल्या आचारशैथिल्याच्या विरोधी म्हणून निर्माण झाला. हा दिगंबर संप्रदायाचाच एक उपपंथ होय.

तारणपंथ – परवार जातीतल्या एका व्यक्तीने इ. स. च्या १५ व्या शतकाच्या शेवटी हा पंथ प्रवर्तित केला. हीच व्यक्ती पुढे तारणतरणस्वामी नावाने प्रसिद्ध झाली. तेरापंथाप्रमाणेच हाही पंथ मूर्तिपूजाविरोधी आहे.

स्थानकवासी – लोंकाशाह नावाच्या पुरुषाने इ. स. च्या १५ व्या शतकात या पंथाची स्थापना केली. जैन मंदिरात जी मूर्तिपूजा प्रचलित आहे ती आणि जैन धर्मात जे आचार रूढ आहेत, ते धर्मसंमत नाहीत, असे त्याला वाटले. म्हणून त्याने हा पंथ निर्माण केला. जैन धर्मात सुधारणा करण्याचा त्याने विडाच उचलला होता. लोंकाशाहाच्या पंथाचे लोक आपले धार्मिक व्यवहार मंदिरात न करता स्थानकात किंवा उपाश्रयात करतात. म्हणून त्यांना स्थानकवासी असे नाव पडले. कालांतराने याही पंथात भेद–प्रभेद निर्माण झाले.

ढूंढिया -- सुरतेच्या एका जैन साधूने लोंकाशाहाच्या मतात सुधारणा करून ढूंढिया नावाचा एक नवा पंथभेद प्रचलित केला. हे लोक स्वतःला श्वेतांबर पंथांतर्गत मानतात. श्वेतांबरांच्या पंचेचाळीस आगमांपैकी तेहतीस आगम यांना मान्य असून, बाकीचे मान्य नाहीत.

अर्धस्फालक – रत्ननंदी नामक आचार्याने आपल्या भद्रबाहूचरितात या संप्रदायाचा उल्लेख केला आहे (३०४). त्याने लिहिले आहे, की ‘ हा संप्रदाय कलिकालाचे बल प्राप्त करून घेऊन पाण्यात टाकलेल्या तैलबिंदूप्रमाणे सर्व लोकांत पसरला.’ रत्ननंदीच्या मतानुसार काही दिगंबर मुनींनी आपली नग्नता झाकण्यासाठी खंडवस्त्राचा वापर सुरू केला आणि त्यातून हा संप्रदाय उत्पन्न झाला. या संप्रदायातूनच पुढे श्वेतांबर संप्र-

दायाची उत्पत्ती झाली. मथुरेच्या उत्खननात काही आयागपट्ट मिळाले आहेत. त्यांत जैन साधू नग्न अंकित केले असले, तरी लज्जारक्षणार्थ त्यांनी वस्त्रखंड वापरले असल्याचे दाखवले आहे. हे अर्धस्फालक संप्रदायाचेच रूप असावे.

उपासना व कर्मकांड – जैन धर्मात तीर्थंकर व पंचपरमेष्ठी यांची पूजा व उपासना प्रचलित आहे. पण ही पूजा किंवा उपासना तीर्थंकरांच्या प्रसन्नतेसाठी होत नसून, ती केवळ आत्मशुद्धीसाठी केली जाते. तीर्थंकर हे सर्व कामनांच्या अतीत असल्यामुळे कोणाच्या पूजा–प्रार्थनेने प्रसन्न होणे अथवा कोणाच्या अनिष्ट वर्तनाने अप्रसन्न होणे, हे त्यांच्या बाबतीत संभवतच नाही. तीर्थंकरांच्या उपासनेमागची जैन धारणा पुढील श्लोकात व्यक्त झाली आहे–

मोक्षमार्गस्य नेतारं भेत्तारं कर्मभूभृताम् ।
ज्ञातारं विश्वतत्त्वानां वन्दे तद्गुणलब्धये ।।

अर्थ – जो मोक्षमार्गावरील नेता आहे, ज्याने कर्मांचे डोंगर उद्ध्वस्त केले आहेत व ज्याने विश्वरहस्य जाणले आहे, अशा तीर्थंकराला त्याचे गुण लाभावे या हेतूने मी वंदन करतो.

यावरून असे दिसून येईल, की जैनांची पूजा ही देवपूजा नसून विभूतिपूजा अथवा साधुपूजा आहे.

तीर्थंकरांच्या उपासनेतली ही दृष्टी सर्वसाधारण जैनांच्या जीवनात सर्वांशाने मुरलेली आहे, असे नाही. ते सर्वसाधारण हिंदूंप्रमाणेच आपल्या आधीव्याधी दूर व्हाव्या, संकटात दैवी आधार मिळावा, इ. हेतूंनीही तीर्थंकरांची पूजा करतात. हिंदूंच्या संपर्कामुळे त्यांनी आपला मोठा देवतापरिवारही निर्माण केला आहे. तीर्थंकरांचे सेवक म्हणून यक्ष–यक्षिणी आणि शासनदेवता यांचे महत्त्व जैनांनी बरेच वाढवले आहे. श्वेतांबर जैनांनी यांच्या व्यतिरिक्त सोळा विद्यादेवताही कल्पिल्या आहेत. इंद्रादी दिक्पालांना व सरस्वतीलाही ते पूजतात. अतिमानवी योनीतील देवतांचे भवनपती, व्यंतर, ज्योतिष्क आणि वैमानिक असे चार वर्ग त्यांनी मानले आहेत. ते ग्रामदेवतांची अथवा क्षेत्रपालाचीही पूजा करतात. अनेक जैन कुटुंबांत कुलदेवतांची पूजा होते. शंकर, विष्णू, सूर्य, गणपती, हनुमान, महाशक्ती, माता, अंबादेवी, लक्ष्मी, चामुंडा, शीतला, इ. हिंदू देवतांना जैन लोकांनी कमी-अधिक प्रमाणात आपल्या दैवतपरिवारात स्थान दिले आहे. मात्र या देवता तीर्थंकरांच्या खालच्या श्रेणीतल्याच मानल्या जातात. जैन व्यापारी एक सामाजिक उत्सव म्हणून दिवाळीत गणेश व लक्ष्मी यांची पूजा करतात. श्वेतांबर जैनांवर हिंदू देव-देवतांचा प्रभाव विशेष जाणवतो.

नाम, स्थापना, द्रव्य व भाव हे जैनांच्या उपासनेचे चार प्रकार आहेत. तीर्थंकरांचा नामजप करणे ही नामपूजा, तीर्थंकरांच्या प्रतिमेची स्थापना करणे ही स्थापनापूजा, तीर्थंकर पदाच्या प्राप्तीच्या मार्गावर असणाऱ्या साधूंची पूजा ही द्रव्यपूजा आणि तीर्थंकर विद्यमान असताना त्याचे समकालीन असलेले लोक त्याच्याविषयी जो पूज्यभाव प्रकट करीत, तो आपणही करणे ही भावपूजा होय. हे चारही प्रकार प्रचलित आहेत.

दिगंबर आणि श्वेतांबर यांच्या मूर्तीत आणि मूर्तिपूजेत काहीसा भेद आहे. दिगंबर हे मूर्तींना भूषवीत नाहीत; पण श्वेतांबर मात्र मूर्तींना वस्त्राभरणांनी सुशोभित करतात. दिगंबर जैन पूजा करताना विपुल जलाने मूर्तीला स्नान घालून अक्षता वाहतात, तर श्वेतांबर जैन थोडे जल शिपडून मूर्तीवर पुष्पे वाहतात. दिगंबर दिवस-रात्र यांपैकी कोणत्याही वेळी पूजा करणे प्रशस्त समजतात, तर श्वेतांबर आपल्या मंदिरात हिंसाभयाने रात्री दिवासुद्धा लावीत नाहीत.

जैनांच्या देवता तीन प्रकारच्या आहेत, त्या अशा–(१) प्रासाददेवता, (२) संप्रदायदेवता आणि (३) कुलदेवता. प्रासाद-देवता या पीठोपपीठे, गुहा, भूमी किंवा प्रासाद या ठिकाणी स्थापिलेल्या असतात. त्या कित्येक ठिकाणी स्वयंभू, तर कित्येक ठिकाणी मनुष्यनिर्मित असतात. अंबा, सरस्वती, त्रिपुरा, तारा, या संप्रदायदेवता असून चंडी, चामुंडा, कष्टेश्वरी, या कुलदेवता आहेत. चौसष्ट योगिनींसारख्या तांत्रिक देवतांनाही जैन देवतामंडळात स्थान लाभले आहे. जैन मंदिरातली सिद्धचक्रपूजा ही जैनधर्मीयांवरील तांत्रिक प्रभावाची द्योतक आहे.

जैन तीर्थंकरांच्या मूर्ती बहुशः डोंगरात लेणी खोदून अथवा मंदिरे उभारून त्यात प्रतिष्ठित केलेल्या असतात. ज्या ज्या स्थानांचा तीर्थंकरांच्या जीवनाशी संबंध आला, ती ती जैनांची तीर्थस्थाने बनली असून, त्या सर्व ठिकाणी मंदिरे उभारली गेली आहेत. जिन अथवा तीर्थंकर यांची मंदिरे कुठे उभारावी, ते प्रतिष्ठासारसंग्रहात पुढीलप्रमाणे सांगितले आहे –

जन्मनिष्क्रमणस्थानज्ञाननिर्वाणभूमिषु ।
अन्येषु पुण्यदेशेषु नदीकूले नगरेषु च ।।
ग्रामादिसन्निवेशेषु समुद्रपुलिनेषु च ।
अन्येषु वा मनोज्ञेषु कारयेज्जिनमन्दिरम् ।।

अर्थ – तीर्थंकरांची जन्मस्थाने, निष्क्रमणस्थाने, ज्ञानस्थाने व निर्वाणस्थाने, तसेच पुण्य देश, नगरे, नदीतीर, समुद्रतीर या ठिकाणी, ग्रामवस्तीत आणि अन्यही सुंदर प्रदेशांत जिनांची मंदिरे उभारावी.

अबूचा पहाड, गिरनार पर्वत, शत्रुंजय पर्वत, ऋजुपालिका नदी, चंपापुरी, पावापुरी, अष्टापद, श्रवणबेळगोळ, इ. ठिकाणी

जैनांची समृद्ध व प्रेक्षणीय अशी अनेक मंदिरे आहेत.

मूर्तिपूजा करणाऱ्या जैनांना मंदिरमार्गी म्हणतात, तर मूर्तिपूजा न करता आत्मशुद्धीसाठी व्रतस्थ राहणाऱ्यांना साधुमार्गी म्हणतात. श्वेतांबरांपैकी स्थानकवासी जैनांची धार्मिक कृत्ये उपाश्रयांमध्ये (भिक्षु-भिक्षुणींची निवासगृहे) होतात. तिथे भिक्षु-भिक्षुणी सर्वसाधारण धर्मप्रवण लोकांना धर्माचे सविशेष ज्ञान देतात आणि पापक्षालनासाठी प्रतिक्रमणही करवतात. दिगंबर जैनांपैकी तारणपंथीयांचे धार्मिक विधी चैत्यालयात होतात. चैत्यालय म्हणजे ग्रंथालयच होय. कारण या स्थानी त्या पंथाचा संस्थापक तारणस्वामी याचे १४ ग्रंथ व्यासपीठावर ठेवून सर्व विधी त्यांच्यापुढे केले जातात. स्थानकवासी आणि तारणपंथी यांच्याशिवाय अन्य सर्व जैन पंथ हे मंदिरात स्थापिलेल्या मूर्तींची विधिपूर्वक पूजा करतात. त्यांचे अन्य प्रार्थना-प्रवचनादी कार्यक्रमही मंदिरातच होतात.

जैन पूजाविधी हा अष्टविध असतो. त्यात अष्टविध शुद्धीचा भाव गृहीत धरलेला असतो. हे आठ प्रकार पुढीलप्रमाणे – (१) जन्म-जरा-मरण यांचे निवारण व्हावे म्हणून जलपूजा, (२) भवतापाची शांती व्हावी म्हणून चंदनपूजा, (३) अविनाशी गुणांचा लाभ व्हावा म्हणून अक्षतपूजा, (४) कामविकाराचा नाश व्हावा म्हणून पुष्पपूजा, (५) क्षुधाविजय प्राप्त व्हावा म्हणून नैवेद्यपूजा, (६) मोहांधकार दूर व्हावा म्हणून दीपपूजा, (७) अष्टकर्मांचा नाश व्हावा म्हणून धूपपूजा आणि (८) मोक्षरूपी फल प्राप्त व्हावे म्हणून फलपूजा.

मूर्तिपूजा हे जैनांच्या कर्मकांडाचे एक लहानसेच अंग आहे. देवपूजेशिवाय गुरूपास्ती (गुरुसेवा), स्वाध्याय (धार्मिक ग्रंथांचे श्रवण-पठण), संयम, तप व दान ही धार्मिक कर्तव्येही जैनांनी रोज आचरायची असतात. विशेष धर्मश्रद्धेचे लोक पाच अणुव्रते आणि मधू, मद्य व मांस यांचे वर्जन हे अष्टमूलगुण अंगी बाणवणे या गोष्टीला अधिक महत्त्व देतात. तसेच दर्शन, सामायिक (ध्यान-चिंतन), प्रतिक्रमण (पश्चात्ताप व्यक्त करणे), प्रत्याख्यान (विशिष्ट व्रताच्या पालनाची गुरूजवळ शपथ घेणे), प्रार्थना, रसपरित्याग (विशेषतः पंचमी, अष्टमी, चतुर्दशी या तिथींना विशिष्ट पदार्थ न खाण्याचे व्रत), जलगाळण (पाणी गाळून पिणे), रात्रिभोजनत्याग (रात्री न जेवणे), जप आणि संध्यावंदन (सकाळ-संध्याकाळ प्रार्थना करणे) या गोष्टीही जैनांच्या नित्याचारात मोडतात. या सर्व क्रियाकलापात अष्टमूलगुण, जलगाळण, रात्रिभोजनत्याग, देवदर्शन, देवपूजा, सामायिक आणि स्वाध्याय यांचे महत्त्व विशेष मानले जाते.

सामायिक विधीचे स्वरूप असे – समय म्हणजे आत्मा. आत्म्यासंबंधीच्या शुभ भावनांची अथवा समताभावांची प्राप्ती करणे म्हणजे सामायिक होय. वेगळ्या शब्दांत सांगायचे तर मनःशुद्धीसाठी केल्या जाणाऱ्या ध्यानाला सामायिक असे म्हटले जाते. सामायिक विधी गृहस्थाने दिवसातून एकदा (सकाळी), द्वितीय प्रतिमाधारी श्रावकाने दोनदा (सकाळी व संध्याकाळी) आणि तृतीयप्रतिमाधारी श्रावकाने तीनदा (सकाळी, दुपारी व संध्याकाळी) करायचा असतो. शुचिर्भूत होऊन, धूतवस्त्रे परिधान करून आणि पवित्र जागी बसून सामायिक आचरतात.



सिद्धचक्र

सामायिकासाठी पूर्व किंवा उत्तर दिशेकडे तोंड करून उभे राहतात, हात जोडून मस्तकाला लावतात आणि अशा स्थितीत तीन वेळा मस्तक नम्र करतात. नंतर हात खाली सोडून सरळ उभे राहतात. दोन्ही पायांच्या टाचांमध्ये चार अंगुळे आणि अंगठ्यांमध्ये बारा अंगुळे अंतर ठेवतात. दृष्टी नासाग्रावर स्थिर करतात. सत्तावीस श्वासोच्छ्वासांत नऊ वेळा णमोकार मंत्राचा जप करून साष्टांग नमस्कार करतात. नंतर उभे राहून अशी प्रतिज्ञा करतात, की ‘ मी इतका वेळ सामायिक करीन. या थोड्याशा जागेशिवाय अन्य सर्व परिग्रहांचा मी त्याग केला आहे. येणारी सर्व विघ्ने, उपसर्ग आणि परीषह मी समतावृत्तीने सहन करीन. ’ या प्रतिज्ञोच्चारानंतर क्रमाने चारही दिशांकडे तोंड करून, तीन किंवा नऊ वेळा णमोकार मंत्राचा जप करून नमस्कार करतात. शेवटी पूर्वस्थितीत येऊन व खड्गासन अथवा पद्मासन करून कोणत्याही एका आगमोक्त मंत्राचा १०८ वेळा जप आणि आत्मचिंतन करतात.

जैनांचे नित्य जपनीय मंत्र असे– (१) अरिहन्त सिद्ध। (२) ओं नमः सिद्धेभ्यः। (३) नमोऽर्हत्सिद्धेभ्यः । (४) असिआउसा। (५) ओम् ऱ्हीं । (६) ओम् । (७)ओं ऱ्हां ऱ्हीं ऱ्हूं ऱ्हौं ऱ्हः। (८) असिआउसा सर्वशान्ति कुरु कुरु स्वाहा । (९) ओं ऱ्हीं वृपभादिवीरान्तेभ्यो नमः ।

श्वेतांबरांत जन्म, दीक्षा, विवाह, इ. प्रसंगी ब्राह्मणाला पुरोहित म्हणून बोलावतात. त्यांच्याकडची पूजाभिषेकादी धार्मिक कृत्ये करण्यासाठीही ब्राह्मण पुरोहित असतो. काही घराण्यांत तर कुलपुरोहित म्हणूनही ब्राह्मणच असतो. दिगंबर जैन मात्र आपल्यातल्याच पुरोहिताला बोलावतात. महाराष्ट्र व द. भारत यांतील दिगंबरांपैकी सैटवाल, वैश्य, क्षत्रिय, चतुर्थ, पंचम, बोगार, उपाध्याय, हुम्मड, इ. जाती गळ्यात जानवेही घालतात.

जैनसमाजात उपवासांचे महत्त्व फार आहे. पण उपवास करण्याच्या कालनिर्णयात आणि स्वरूपात पुष्कळ वैविध्य आढळते. श्वेतांबर हे संवत्सरीच्या उपवासाला महत्त्व देतात, तर दिगंबर हे अनंतचतुर्दशीचा उपवास महत्त्वाचा मानतात. दर पंधरवड्यातील पंचमी, अष्टमी व चतुर्दशी हे दिवस उपवासाचे असतात. ज्यांना वर्षभर हे उपवास करणे शक्य नसते, ते लोक चातुर्मासातील प्रत्येक अष्टमी व चतुर्दशी या दिवशी उपवास करतात. उपवासाच्या दिवशी अन्नपदार्थच नव्हे; तर पाणीही वर्ज्य करायचे असते. ज्यांना हे शक्य नसते, ते एकभुक्त करतात.

जैन लोक अनेक धार्मिक उत्सव साजरे करतात. जैनांचे बरेचसे उत्सव किंवा पर्वे ही तीर्थंकरांच्या जन्म–निर्वाणांच्या तिथींना धरून निर्माण केलेली आहेत. पर्युषण, श्रुतपंचमी, दिवाळी, अक्षय्यतृतीया व महावीरजयंती हे जैनांचे प्रमुख उत्सव होत. बरेचसे जैन हिंदूंच्याही प्रमुख उत्सवांत भाग घेतात. होळी, पाडवा, गणेशचतुर्थी, रक्षाबंधन, मकरसंक्रांत, शीतलासप्तमी, दुर्गाष्टमी, नवरात्र, दसरा, पोंगळ, कथिकई, युगादी, गौरीपूजा, इ. हिंदू सण व व्रते बहुसंख्य जैनमंडळी त्या त्या प्रदेशातील रीतिरिवाजानुसार पाळतात. ज्या प्रदेशात राहायचे त्या प्रदेशातील बहुसंख्य हिंदुसमाजाचे रीतिरिवाज स्वीकारायचे, असे धोरण यात दिसते. अर्थात हिंदूंचे सण व उत्सव साजरे करताना त्यांतील केवळ सामाजिक बाबीतच जैन भाग घेतात. त्या सणाचे धार्मिक विधी पाळीत नाहीत.

संस्कार *– जैन धर्मात एकूण ५३ संस्कार सांगितले आहेत. श्रावकाची योग्यता वाढवणे, त्याला सद्‌गुणांनी अलंकृत करून अधिकाधिक श्रेष्ठ पदावर चढवणे आणि अखेरीस मोक्षप्राप्तीला पात्र करणे हा या संस्कारांचा उद्देश असतो.* हे सर्व संस्कार श्रावकाला आवश्यक ठरविलेले आहेत. दिगंबर व श्वेतांबर जैनांचे हे संस्कारही वेगवेगळे आहेत.

दिगंबरांचे संस्कार त्यांच्या आदिपुराणात सांगितले आहेत, ते पुढीलप्रमाणे–

(१) गर्भाधान– पति-पत्नी मंदिरात जाऊन जिनपूजा करतात व रात्रौ त्या दोघांचे मीलन होते.

(२) प्रीती– गर्भिणीच्या तिसऱ्या महिन्यात तिला प्रसन्न करण्यासाठी पूजा व संगीतादी कलांचा कार्यक्रम.

(३) सुप्रीती– पाचव्या महिन्यात पूजा व वरीलप्रमाणेच उत्सव.

(४) धृती– सातव्या महिन्यात वरीलप्रमाणेच सर्व.

(५) मोद– नवव्या महिन्यात पूजा व उत्सव. गर्भिणीच्या मस्तकावर मंत्रपूर्वक असिआउसा (अर्हत्, सिद्ध, आचार्य, उपाध्याय व साधू या शब्दांची आद्याक्षरे) ही बीजाक्षरे लिहितात व तिला रक्षासूत्र बांधतात.

(६) प्रियोद्‌भव– प्रसूती होताच पूजा व उत्सव.

(७) नामकर्म– बाराव्या दिवशी जिनपूजा, मुलाचे नाव ठेवणे व उत्सव. मुलाला नाव ठेवायचे, तर ते अर्हत् भगवानाच्या १००८ नावांपैकीच एखादे ठेवावे, असे सांगितले आहे.

(८) बहिर्यान– प्रसूतीच्या दुसऱ्या महिन्यानंतर बाळबाळंतिणीला घराबाहेर आणणे.

(९) निषद्या– शुभदिनी बालकाला जमिनीवर बसवणे.

(१०) अन्नप्राशन– सात, आठ किंवा नऊ या महिन्यात मुलाचे उष्टावण.

(११) व्युष्टी– वर्षाचा वाढदिवस. त्या दिवशी पूजा व उत्सव.

(१२) केशवपन– मुलाच्या दुसऱ्या, तिसऱ्या किंवा चवथ्या वर्षात त्याचे जावळ करणे.

(१३) लिपिसंख्यान– पाचव्या वर्षी मुलाला उपाध्यायाकडून अक्षरे शिकवणे.

(१४) उपनीती– उपनयन हा दीक्षाविधी असतो. हा आठव्या वर्षी मंदिरात करतात. या वेळी मुलाकडून पाच शपथा घेववतात, त्याला रत्नत्रयसूचक जानवे घालायला देतात आणि पूजा व होम करतात.

(१५) व्रतचर्या– मुलाने गुरूजवळ विद्याभ्यास करणे व श्रावकाच्या पाच व्रतांचे पालन करणे.

(१६) व्रतावरण– अध्ययन पूर्ण झाल्यावर बाराव्या किंवा सोळाव्या वर्षी हा संस्कार करतात. यात व्रती मुलगा गुरूचा निरोप घेऊन गुरुगृहातून बाहेर पडतो, घरी येतो व उपजीविकेसाठी योग्य वाटेल, तो व्यवसाय पत्करतो. अध्ययन पुरे

झाल्यावर वैराग्य उत्पन्न झाल्यास लगेच मुनिदीक्षा घेतो.

(१७) विवाह– योग्य वधूशी विवाह करणे. तो झाल्यावर सात दिवसपर्यंत पति-पत्नी ब्रह्मचर्याने राहतात, जिनदर्शन करतात, शक्य झाल्यास सात दिवसांच्या यात्रेला जातात आणि मग दांपत्यधर्माने वागू लागतात.

(१८) वर्णलाभ – या संस्कारात नवविवाहित मुलाचा बाप त्याला संपत्तीचा योग्य तो वाटा देऊन वेगळे घर करून देतो.

(१९) कुलचर्या – प्रतिदिनी सहा गृहस्थकर्मांचे पालन.

(२०) गृहीशिता – ज्ञान व सदाचारादी कृत्ये यांत प्रवीण होणे. गृहस्थाचार्यांचे पद मिळवणे. परोपकार, विद्यादान, इ. लोकोपयोगी गोष्टी करणे.

(२१) प्रशांती – मुलगा कर्ता-सवरता झाल्यावर त्याच्यावर संसाराचा भार सोपवून विरक्त भावाने राहणे.

(२२) गृहत्याग – मुलगा योग्य प्रकारे सांसारिक जबाबदारी पार पाडतो असे पाहिल्यावर गृहत्याग करणे.

(२३) दीक्षाद्य – श्रावकाच्या अकरा प्रतिमा पूर्ण करणे.

(२४) जिनरूपिता – वस्त्रादिकांचा परित्याग करून नग्न होणे व मुनिपद धारण करणे.

(२५) मौनाध्ययन – मौन वृत्तीने शास्त्राध्ययन करणे.

(२६) तीर्थंकरपदोत्पादकभावना – सोळा भावनांचा विचार करणे.

(२७) गुरुस्थानाभ्युपगम – आचार्यपदाच्या कामांचा अभ्यास करणे.

(२८) गणोपग्रहण – इतरांना उपदेश करणे व प्रायश्चित्त देणे.

(२९) स्वगुरुस्थानसंक्रांती – आचार्यपदवीचा स्वीकार करणे.

(३०) निःसंगत्वात्मभावना – शिष्याला आचार्य पदवी देऊन स्वतः एकट्याने विहार करणे.

(३१) योगनिर्वाणसंप्राप्ती – मनाच्या एकाग्रतेचा अभ्यास.

(३२) योगनिर्वाणसाधन – आहारादिकांचा त्याग करून समाधिमरण स्वीकारणे.

(३३) इंद्रोपपाद - मृत्यूनंतर इंद्रपदाची प्राप्ती.

(३४) इंद्राभिषेक – देवांकडून इंद्रासनाचा अभिषेक.

(३५) विधिदान – दुसऱ्यांना विमानऋद्धी देणे.

(३६) सुखोदय – इंद्रपदाचे सुख भोगणे.

(३७) इंद्रपदत्याग – त्या पदाचा त्याग करणे.

(३८) गर्भावतार – तीर्थंकर होण्यासाठी गर्भात येणे.

(३९) हिरण्यगर्भ – तीर्थंकर गर्भात येत आहे या कारणामुळे सहा महिने पूर्वीपासून रत्नवृष्टी होणे.

(४०) मंदरेंद्राभिषेक – तीर्थंकर जन्माला आल्यावर सुमेरू पर्वतावर इंद्राकडून त्याचा अभिषेक.

(४१) गुरुपूजन – इंद्रादी देवांकडून त्याची पूजा होणे.

(४२) यौवराज्य – तीर्थंकराचा युवराज होणे.

(४३) स्वराज्य – तीर्थंकराने स्वतंत्र राज्य करणे.

(४४) चक्रलाभ – चक्रवर्तीपदासाठी. नव निधी व चौदा रत्ने यांची प्राप्ती होणे.

(४५) दिशांजय – पृथ्वी जिंकण्यासाठी अभियान करणे.

(४६) चक्राभिषेक – दिग्विजय करून आल्यावर चक्रवर्तित्वाचा अभिषेक होणे.

(४७) साम्राज्य – आपल्या आज्ञेनुसार मांडलिक राजांचे संचालन करणे.

(४८) निष्क्रांती – पुत्रांना राज्य देऊन मुनिदीक्षा ग्रहण करणे.

(४९) योगसंग्रह – केवलज्ञान प्राप्त करणे.

(५०) आर्हंत्य – समवसरणाची रचना करणे.

(५१) विहार – जगाला धर्मोपदेश देण्यासाठी विहार.

(५२) योगत्याग – योगाचा निरोध करून अयोगी बनणे.

(५३) अग्रनिवृत्ती – मोक्षपद प्राप्त होणे.

वरील ५३ संस्कार म्हणजे अंतिम मोक्षाकडे जाण्याची सोपानपरंपराच होय. सर्वसामान्य माणूस इथवर पोचू शकत नाही. गृहस्थाला हे सर्व संस्कार करणेही शक्य नाही. ३३ ते ५३ हे संस्कार तर मृत्यूनंतरच त्या जीवाला घडणारे आहेत. ऐहिक जीवनात ते सर्वथैव अशक्य होत. हे सर्व जाणून ब्रह्मचारी शीतलप्रसादजी यांनी फक्त पहिले सव्वीस संस्कार आवश्यक ठरवले आहेत व सत्ताविसाव्या अंत्यसंस्काराची त्यात भर घातली आहे. पं. लालाराम शास्त्री यांनी पहिले १७ व शेवटचा १८ वा अंत्यसंस्कार असे १८ संस्कारच सुचवले आहेत.

श्वेतांबरांचे संस्कार त्यांच्या आचार-दिनकर या ग्रंथात सांगितले आहेत, ते पुढीलप्रमाणे–

(१) गर्भाधान – गर्भवतीच्या पाचव्या महिन्यात हा संस्कार करतात. गर्भ व गर्भवती यांच्या संरक्षणासाठी पुरोहिताकडून आशीर्वाद घेतात.

(२) पुंसवन – आठव्या महिन्यात शुभदिनी गर्भिणीला उघड्यावर बसवतात. उपाध्याय तिच्यावर अभिमंत्रित जल शिंपडतो व सुखप्रसूतीचा आशीर्वाद देतो.

(३) जन्म– मूल जन्मताच नालच्छेद, बाळ-बाळंतिणीला स्नान, ज्योतिष्याकडून मुलाची पत्रिका करून घेणे, मुलाच्या हातात अभिमंत्रित गंडा बांधणे व अंबिकेची प्रार्थना करणे.

(४) सूर्येंदुदर्शन– तिसऱ्या दिवशी जिन व सूर्य यांच्या प्रतिमांचे पूजन. रात्रौ चंद्रोदयानंतर चंद्रपूजन. बाळ-बाळंतिणीला सूर्य-चंद्रांचे दर्शन, जिनदर्शन, कुलदेवतेची पूजा व प्रार्थना.

(५) क्षीराशन– मूल जन्मल्यानंतर तिसऱ्या दिवशी उपाध्यायाकडून बाळ-बाळंतिणीवर अभिमंत्रित जलाचे सिंचन व त्यानंतर आईने मुलाला अंगावर पाजणे.

(६) षष्ठी– मूल जन्मल्यानंतर सहाव्या दिवशी रात्रौ षष्ठीदेवतांची पूजा. बालकाला आशीर्वाद व बाळ-बाळंतिणीवर अभिमंत्रित जलाचे सिंचन.

(७) शुचिकर्म– बाळंतिणीला अकराव्या दिवशी किंवा वर्णभेदाप्रमाणे जो उक्त असेल, त्या दिवशी स्नान घालून व अभिमंत्रित जलाने सिंचन करून शुद्ध करून घेणे.

(८) नामकर्म– शुचिकर्माच्या दिवशी किंवा दुसऱ्या-तिसऱ्या दिवशी मुलाचे नाव ठेवणे. या वेळी ज्योतिषी सर्वांसमक्ष मुलाची जन्मपत्रिका वाचून दाखवतो. घरची मंडळी जैन मंदिरात जाऊन जिनपूजा करतात. मुलाची आत्या मुलाचे नाव त्याच्या कानात सांगते.

(९) अन्नप्राशन– मुलगा असल्यास सहाव्या महिन्यात व मुलगी असल्यास पाचव्या महिन्यात त्यांचे उष्टावण करणे. या वेळी जिनपूजा करून त्याला नैवेद्य दाखवतात व त्या नैवेद्यातले थोडेसे अन्न आई मुलाला भरवते.

(१०) कर्णवेध– तिसऱ्या, पाचव्या किंवा सातव्या वर्षी मुलाचे कान टोचणे. यावेळी पूजा-प्रार्थनाही करतात.

(११) क्षौर अथवा चूडाकर्म– कर्णवेध झाल्यावर दिनशुद्धी पाहून नापिताकडून मुलाचे जावळ करणे. त्रैवर्णिकांनी जावळ करताना शेंडी ठेवावी व शूद्र मुलाचे पूर्ण मुंडन करावे, असे सांगितले आहे.

(१२) उपनयन – वर्णभेदाप्रमाणे उक्त वर्षी शुभदिनी हा संस्कार करतात. उपाध्याय जिनपूजा करतो व यज्ञोपवीत अभिमंत्रून ते मुलाला घालायला देतो. मग पंचपरमेष्ठी मंत्राचा उपदेश करतो. त्याला ब्रह्मचाऱ्याचे नियम समजावून सांगतो. एवढे झाल्यावर मुलगा जैनांच्या घरी जाऊन भिक्षा मागतो.

(१३) विद्यारंभ – शुभ दिवशी उपाध्याय मुलाच्या कानात तीन वेळा सरस्वतीचा मंत्र उच्चारतो. मग मुलाला मिरवीत गुरुगृही नेले जाते.

(१४) विवाह – पाणिग्रहणविधी. जैन लोक भारतात सर्वत्र वसले आहेत. त्या त्या प्रदेशातल्या चालीरीतींचा प्रभाव त्यांच्या धार्मिक संस्कारांवर पडला आहे. त्यांची विवाहपद्धतीही सर्वत्र एकाच स्वरूपाची नाही. लग्नातल्या मुख्य विधीच्या भोवती प्रादेशिक रीती-रिवाजानुसार इतर विधींची गुंफण झालेली असते. तरीसुद्धा श्वेतांबर व दिगंबर या दोन्ही पंथांच्या आचार्यांनी विवाहसंस्काराला पुष्कळसे एकरूपत्व देण्याचा प्रयत्न केला आहे. जैन विवाहसंस्कारात पुढील पाच विधी महत्त्वाचे मानले आहेत––

वाग्दानं च प्रदानं च वरणं पाणिपीडनम् ।
सप्तपदीति पञ्चाङ्गो विवाहः परिकीर्तितः ॥

अर्थ–– वाग्दान, प्रदान (विवाहापूर्वी वरपित्याने वधूला वस्त्रालंकार देणे), वरण (कन्यास्वीकार), पाणिग्रहण व सप्तपदी असा पाच अंगांनी पूर्ण होणारा विवाहसंस्कार सांगितला आहे.

(१५) व्रतारोप – जैन गृहस्थाने पाळायची एकूण बारा व्रते आहेत. ज्याच्या त्याच्या कुवतीप्रमाणे जो तो या व्रतांच्या आचरणाची शपथ घेतो. हा संस्कार जैन श्रमणाच्या द्वारा करतात.

(१६) अंत्यकर्म – मनुष्य मृत्युशय्येवर पडला म्हणजे तो आपल्या हातून घडलेल्या ज्ञाताज्ञात पातकांचा मनोमन पश्चात्ताप करून आपल्या ऐपतीप्रमाणे दाने करतो. मग द्रव किंवा घन जे शक्य असेल ते अन्न ग्रहण करतो. नंतर पंचपरमेष्ठींचे ध्यान करून देहत्याग करतो.

प्राण निघून गेल्यावर शवाला स्नान व कपडे घालतात. मग मिरवणुकीने प्रेत स्मशानात नेतात. प्रेताचे पूर्णपणे दहन होईपर्यंत कोणीही स्मशानातून हलत नाही. तिसऱ्या दिवशी राख गोळा करून नदीत टाकतात. मग मृताचे नातेवाईक मिळून एखाद्या जिनालयात जाऊन जिनपूजा करवतात. नंतर उपाश्रयात जातात. तिथे एखादा जैन श्रमण त्यांना शरीराचे नश्वरत्व पटवून देतो. जैन लोक दहा दिवस आशौच पाळतात; पण क्रियाकर्मांतर काही करीत नाहीत. दान-धर्म मात्र करतात.

श्वेतांबरांचे वरील सोळा संस्कार हे हिंदूंच्या सोळा संस्कारांशी बरेच मिळते-जुळते आहेत. दक्षिणेतले व गुजरातेतले श्वेतांबर जैन याच पद्धतीने संस्कार करतात. काठियावाडातले दास, श्रीमाळी, हे जैन आपले धार्मिक संस्कार वैदिक पद्धतीप्रमाणे करतात. म्हैसूरमधले जैन बहुधा ब्राह्मणांचेच रीतिरिवाज पाळतात. सबंध भारतात सगळ्या जैनांचे संस्कार आणि रीतिरिवाज सारखे नाहीत. उपनयन, विवाह व अंत्यविधी यांतही प्रदेशपरत्वे बरीच भिन्नता आढळते. [जै. ध. प्र.; जै. क.; जै. ध.; ल. वि. सो.; जै. वि. वि.; भा. सं. जै. यो.; जै. सं. सं.; जै. इ.; म. ज्ञा. को.; भा. वा. प्र. वि.]

जैन साहित्य संस्कृत, अर्धमागधी, प्राकृत, शौरसेनी, कन्नड, तमिळ, इ. भाषांत जैन आचार्य आणि कवी यांनी विपुल साहित्य निर्माण करून ठेवले आहे. भारतीय साहित्यात या साहित्याला एक विशिष्ट स्थान आहे. अनेक जैनाचार्यांनी आपल्या जीवनाचा बराचसा भाग साहित्यसेवेतच व्यतीत केला आहे. त्यामुळे धर्म, दर्शन, न्याय, व्याकरण, काव्य, नाटक, कथा, रास, शिल्प, वास्तू, वैद्यक, इ. विषयांवर प्रचंड प्रमाणात जैन साहित्य निर्माण झाले. हे सर्व साहित्य-महावीराच्या उपदेशपरंपरेशी संबद्ध असेच आहे.

इ. स. च्या पहिल्या शतकात कुंदकुंद नामक एक महान आचार्य दक्षिणेत होऊन गेला. त्याने समयसार, प्रवचनसार व पंचास्तिकाय असे तीन ग्रंथ रचले. हे तीन्ही ग्रंथ प्राकृत भाषेत आहेत. समयसार-हा ग्रंथ जैन अध्यात्माचा अपूर्व ग्रंथ मानला जातो. नवव्या शतकात अमृतचंद्रसूरीने या ग्रंथावर संस्कृत पद्यात कलश नामक टीका रचली. उमास्वाती या जैन आचार्याने सर्वप्रथम जैन सिद्धांत संस्कृत सूत्रांत निबद्ध केले. तत्वार्थसूत्र या नावाने तो ग्रंथ प्रसिद्ध आहे.

जैनांनी न्यायशास्त्रावर ग्रंथरचना करून ते दार्शनिक अंगही समृद्ध केले आहे. अकलंकदेव याला जैन न्यायाचा निर्माता मानतात. त्याचे सिद्धिविनिश्चय, न्यायविनिश्चय, इ. प्रकरणग्रंथ प्रौढ व गहन आहेत. समंतभद्राच्या आप्तमीमांसेत स्याद्वादाचे सुंदर विवेचन असून, इतर दर्शनांचे विचारपूर्ण समीक्षणही आहे. सिद्धसेन, अनंतवीर्य, वादिराज व प्रभाचंद्र नावाचे प्रकांड जैन नैयायिक होऊन गेले. त्यांनी न्यायग्रंथांवर विस्तृत व्याख्या लिहिल्या आहेत. माणिक्यनंदी याचा परीक्षामुख नामक सूत्रग्रंथ जैन न्यायाच्या अभ्यासकांना अत्यंत उपयुक्त ठरला आहे. त्यावर प्रभाचंद्राची व्याख्या आहे.

पुराणग्रंथ – पुराणसाहित्यात हरिवंशपुराण, महापुराण, पद्मचरित, इ. नावे उल्लेखनीय आहेत.

राम–रावण, कृष्ण–बलराम, कौरव–पांडव, इ. हिंदूंच्या पुराणांतील व्यक्ती आणि विभूती जैनांनीही स्वीकारल्या आहेत. मात्र जैन धर्माला अनुलक्षून त्यांनी त्यांची चरित्रे वर्णिली आहेत. हिंदू पुराणांतला राम एकपत्नी आहे, तर जैन पुराणातल्या रामाला चार पट्टराण्या व आठ हजार सामान्य राण्या आहेत. रावणाचा वध रामाने केला, असे वाल्मीकीचे रामायण सांगते; पण जैन पुराणात त्याचा वध लक्ष्मणाच्या हातून झाला आहे. तिथला रावण जैनधर्मी असून, प्रजावत्सल व नीतिमान असा राजा आहे. पुढच्या कल्पात तो तीर्थंकरही होणार आहे. राम आणि सीता यांनी अंतकाळी जैनधर्म स्वीकारला होता, असे जैन पुराण सांगते. तिथला हनुमान हा वानर नाही व ब्रह्मचारीही नाही. तो एक बलाढ्य राजा आहे व त्याला दोन राण्याही आहेत.

कूचिभट्टारक, नंदिमुनी, कविपरमेष्ठी, सिद्धसेन, पद्मनंदी, गुणभद्र, चामुंडराय, नागचंद्र, कुमुदेंदू, नयसेन, इ. कवींनी रामकथेवर लहान–मोठी काव्ये किंवा पुराणे रचली आहेत. देशी भाषांतल्या काही रामायणांवर जैन रामायणांचा प्रभाव दिसतो, असे श्री. सेन सांगतात. एका तिबेटी रामायणावरही जैन रामायणांचा प्रभाव असल्याचे डॉ. थॉमस यांनी लिहिले आहे.

जैन पुराणांची परंपरा इ. स. च्या तिसऱ्या शतकापासून सुरू होते. त्रिषष्टिशलाकापुरुषांची चरित्रे विस्ताराने वर्णन करणे, हे जैन पुराणांचे मुख्य उद्दिष्ट आहे.

चरित्रकाव्ये – याशिवाय अनेक चरित्रग्रंथही सकलकीर्ती, जटासिंहनंदी, इ. आचार्यांनी लिहिले आहेत. त्यांचे काव्यसाहित्यही पुष्कळ आहे. त्यात वीरनंदीचे चंद्रप्रभचरित, हरिश्चंद्राचे धर्मशर्माभ्युदय, धनंजयाचे द्विसंधान आणि वाग्भट्टाचे नेमिनिर्वाण ही उच्च कोटीची संस्कृत दीर्घकाव्ये आहेत.

अपभ्रंश भाषेत तर संस्कृतपेक्षाही अधिक संख्येने पुराणे व चरित्रकाव्ये रचली गेली आहेत. चरित्रकाव्यांची रचना तीर्थंकर किंवा अन्य महापुरुष यांच्या जीवनकथेवर झालेली आहे. जसहरचरिऊ व नायकुमारचरिऊ ही दोन पुष्पदंताची चरित्रकाव्ये होत. पहिल्यात कापालिक शैवमतावर जैन धर्माने जो विजय मिळविला, त्याचे वर्णन आहे. दुसऱ्यात मगध देशातल्या नागकुमार नामक राजपुत्राची कथा असून, त्या कथेला लोककथेचे आणि अलौकिक शक्तींचे साहाय्य घेतलेले आहे. याशिवाय स्वयंभू, कनकामर, रइधू, इ. अनेक जैन कवींनी चरितकाव्ये रचून अपभ्रंश भाषेला समृद्ध केले आहे.

जैनांना सन्मार्ग दाखविणे, जैन धर्माचे महत्त्व प्रस्थापित करणे, जैन उपदेशकांना प्रवचनाकरिता सामग्री पुरविणे आणि श्रोतृवर्गाचे मनोरंजन करणे हे या चरित्रकाव्यात्मक वाङ्मयाचे उद्दिष्ट आहे. चरित्रग्रंथांमध्ये जैन साधूंची चरित्रे सविस्तर लिहिलेली आहेत. हेमचंद्राचा त्रिषष्टिशलाकापुरुषचरित हा ग्रंथ यांपैकी होय. प्रबंधग्रंथांत ऐतिहासिक व्यक्तींची माहिती येत असली, तरी त्यामध्ये दंतकथा व अवांतर काल्पनिक गोष्टी यांचा भरणाही बराच आहे.

कथाकोश – जैननिर्मित कथासाहित्यही विशाल आहे. हरिषेणाचा कथाकोश इ. स. च्या १० व्या शतकात तयार झाला. त्यानंतर आराधनाकथाकोश, पुण्याश्रवकथाकोश, इ. अनेक कथाकोश तयार झाले. धर्माचरणाचे फल शुभ मिळते आणि अधर्माचरणाचे फल अशुभ मिळते, हे जनमनावर ठसवण्यासाठी हे कथाभांडार निर्माण झाले आहे.

नायाधम्मकहाओ हा ग्रंथ जैन कथासाहित्यात उल्लेखनीय आहे. त्यात लोकप्रचलित कथा-कहाण्यांच्या द्वारा संयम, तप व त्याग यांचा उपदेश केलेला आहे. आगमग्रंथांवर ज्या व्याख्या लिहिल्या गेल्या, त्यांतून जैनांचे हे कथासाहित्य बहरले. त्यात कथानक, आख्यान, उदाहरण, दृष्टांत, इ. चा गाथांच्या रूपात संग्रह आहे. गांधार–श्रावक, तोसलिपुत्र, स्थूलभद्र, करकंडू, मेतार्य, मृगावती, सुभद्रा, इ. कितीतरी धार्मिक व पौराणिक आख्याने निर्युक्तिग्रंथात आलेली आहेत. भाष्यसाहित्यातही अनेक कथानके आढळतात. धूर्तांची मनोरंजक आख्याने इथे उपलब्ध होतात. त्यात हिंदूंच्या पुराणकथांचे विडंबन पाहायला मिळते. चूर्णीसाहित्य हे गद्यप्रधान असल्यामुळे त्यातले कथा-साहित्य एका वेगळ्याच शैलीत लिहिले गेले आहे. यात अनेक ऐतिहासिक, अर्धैतिहासिक, धार्मिक, लौकिक अशा विविध प्रकारच्या कथा आलेल्या आहेत. इथे स्वतंत्र रचलेल्या कथाही आढळतात. जैनांचे टीकासाहित्य तर कथा-कहाण्यांचे अक्षय्य भांडारच आहे. हरिभद्रसूरीने अर्थकथा, कामकथा, धर्मकथा व संकीर्णकथा असे कथेचे चार विभाग कल्पिले आहेत. याशिवाय धर्मदेशनेच्याही स्वतंत्र कथा आहेत. धर्मदेशनेत कथेचा अंश कमी असतो आणि शील, दान, तप, त्याग, वैराग्य, इ. भावनांचा उपदेशच जास्त असतो. धर्मदास, पद्मसागर, हेमचंद्र, जयसिंह, यशोदेव, जयकीर्ती, इ. अनेक जैन आचार्यांनी उपदेशमाला, धर्मोपदेशमाला, इ. नावांनी अशा कथा निर्माण केल्या आहेत.

जैनांच्या कथावाङ्मयाविषयी डॉ. शां भा. देव लिहितात— ‘ कथाकथनात जैन लेखकांचा हात कोणीही धरू शकणार नाही. ‘ वसुदेवहिंडी ’ घ्या किंवा ‘ समराइच्चकहा ’ घ्या किंवा टीका आणि भाष्यांमध्ये आलेल्या विविध कथा घ्या. या सर्व वाचकांचे मन चतुरपणे गुंतवून ठेवतात. एका कथेतून दुसऱ्या कथेत प्रवेश हे तर जैन वाङ्मयाचे खास लेणे म्हणून समजावयास हरकत नाही. समराइच्चकहामध्ये एका कथेतून दुसऱ्या कथेत वाचक नकळत प्रवेश करतो आणि गंमत अशी की, या कथा आबालवृद्धांना सर्वांना आवडतील अशा आहेत. ’

सोमदेवाचा यशस्तिलक, हरिचंद्राचा जीवंधर, अर्हद्दासाचा पुरुदेव ही जैनरचित चंपूकाव्ये होत. वादीभसिंहाचे क्षत्रचूडामणी हे एक नीतिप्रधान काव्य आहे. अमितगतीचा सुभाषितरत्नसंदोह, पद्मनंदीचा पंचविंशतिका व अमोघवर्षाची प्रश्नोत्तररत्नमाला हे जैनांनी रचलेले सुंदर नीतिग्रंथ होत.

जैनांनी स्तोत्रसाहित्यही बरेच रचले आहे. धनंजयाचे विषापहार व कुमुदचंद्राचे कल्याणमंदिर ही स्तोत्रे साहित्यदृष्ट्याही उच्च कोटीची आहेत. समंतभद्राचे स्वयंभूस्तोत्र तर जैन सिद्धान्तांनी खचून भरलेले आहे. या स्तोत्रशैलीचा चरम विकास जिनसेनाच्या जिनसहस्रनामस्तोत्रात पाहायला मिळतो. मानतुंगाचार्यांचे भक्तामरस्तोत्र तर जैनांमध्ये अत्यंत लोकप्रिय झाले आहे. बहुधा प्रत्येक सुसंस्कृत जैनाला ते मुखोद्गत असते.

व्याकरणात जैनेंद्राचे व्याकरण सुप्रसिद्ध आहे. धनंजयनाममाला व विश्वलोचन हे शब्दकोश सुप्रसिद्ध आहेत. साहित्यशास्त्रात अलंकारचिंतामणी, गणितात महावीरगणितसारसंग्रह व राजनीतीत सोमदेवाचे नीतिवाक्यामृत फार मोलाचे आहे.

द्राविड भाषांतही जैनाचार्यांनी बरीच ग्रंथरचना केली आहे. कन्नड भाषेचे पंप, रन्न आणि पोन्न हे कवी तर जैनच होते. पंपाचे पंपभारत कन्नड भाषेतील एक मणिरत्न आहे. इ. स. च्या चौदाव्या शतकापर्यंत अनेक जैन विद्वानांनी कन्नड भाषेत अलंकार, व्याकरण, कोश, इ. विषयांवर ग्रंथ रचले. दक्षिणेतले जैन साहित्य सर्वच्या सर्व दिगंबर जैनांनी रचलेले आहे. नालडियार व पलमोली हे तमिळ भाषेतले बहुमूल्य सूक्तिसंग्रह असून, ते जैन आचार्यांनीच निर्माण केले आहेत. जीवक-चिंतामणी, वलयापती, यशोधरकाव्य, चूळामणी, उदयनकथै, नीलकेशी, इ. महाकाव्ये व लघुकाव्ये जैन कवींनीच रचली आहेत.

हेमचंद्राचा काव्यानुशासन हा ग्रंथ लाक्षणिक ग्रंथांत महत्त्वपूर्ण आहे. उद्योतनसूरीची कुवलयमाला, हरिभद्राची समराइच्चकहा व पादलिप्ताची तरंगवतीकहा हे कथाग्रंथ प्राकृत साहित्याचे निधान समजले जातील. सिद्ध ऋषीची उपमितिभव प्रपंचकथा हा भारतीय साहित्यातला एक श्रेष्ठ रूपकग्रंथ मानला जातो. व्याकरणात हेमचंद्राचे सिद्धहेमव्याकरण सुप्रसिद्ध आहे. अभिधानचिंतामणी, अनेकार्थसंग्रह, देशीनाममाला, निगंठशेष, अभिधानराजेंद्र व पाइअसद्दमहण्णव हे कोशग्रंथ सुविख्यात आहेत.

जैनांची ग्रंथसंपदा अजून किती तरी प्रकाशात यायची आहे. त्या दृष्टीने सांप्रत कार्य सुरू आहे. नव्या शैलीने जुन्या ग्रंथांचे संपादन होऊ लागले आहे. तुलनात्मक अध्ययन आणि ऐतिहासिक विवेचन या दृष्टीनेही अभ्यास करणारे जैन विद्वान पुढे येत आहेत. सर्वश्री नाथूराम प्रेमी, जुगलकिशोर मुख्तार, पं. सुखलालजी, मुनी जिनविजय, इ. जैन पंडितांनी जैन साहित्याविषयी विवेचक असे पुष्कळच लिहिले आहे. संशोधकांना अभ्यासासाठी जैन साहित्यात विपुल सामग्री उपलब्ध आहे.

जैन लोकांनी प्रामुख्याने आपल्या धर्मावर लिहिले हे खरे; पण इतर अनेक प्रकारच्या वाङ्मयशाखांतही त्यांनी ग्रंथरचना केलेली दिसते. प्रथम दिगंबर व नंतर श्वेतांबर यांनी संस्कृत भाषेचा उपयोग करायला सुरुवात केली. हा उपयोग त्यांनी केवळ आपलेच धर्म–तत्त्वज्ञान समजाऊन देण्यासाठी केला, असे नसून वैदिकांच्या धर्म-शास्त्रग्रंथांच्या अभ्यासासाठीही तो केला.

व्याकरण, ज्योतिष, इ. शास्त्रांमध्ये जैनांनी इतकी प्रगती केली, की वैदिक धर्माच्या ब्राह्मणांना त्यांचे कित्येक ग्रंथ प्रमाणभूत मानावे लागले.

हिंदी जैन वाङ्मय – जैन पंडितांनी हिंदी भाषेतही बरेच वाङ्मय लिहिले आहे. संस्कृत अथवा प्राकृत भाषेत दिगंबर संप्रदायात ज्या ज्या विषयांचे ग्रंथ निर्माण झाले, त्या त्या विषयांवर हिंदीमध्ये काही ना काही तरी लिहिले गेलेच आहे. हिंदी जैन ग्रंथांचा प्रसार केवळ उ. प्रदेशांतच आहे असे नसून, तो गुजरात, महाराष्ट्र, कर्नाटक या प्रदेशांतही आहे. हिंदी ही दिगंबर संप्रदायाची अलिकडच्या काळातली धर्मभाषाच झाली आहे, असे म्हटले तरी चालेल.

श्री. नाथूराम प्रेमी यांनी हिंदी जैन ग्रंथांचे पुढील चार विभाग कल्पिले आहेत––(१) तात्त्विक ग्रंथ, (२) पुराणे, प्रबंध व चरित्रे, (३) पूजापाठ आणि (४) पदे, भजने व प्रार्थना.

पहिल्या दोन विषयांवरची ग्रंथसंपदा विपुल असणे स्वाभाविक आहे; पण पूजा–पाठादी विषयांवरचे लिखाणही थोडेथोडके नाही. पूजापाठ या एकाच विषयावर अनेक कवींनी लिहिले आहे. पदे, भजने इ. साहित्यही बरेच आहे. जैनांनी अलिकडच्या काळात इतर धार्मिक आचारांपेक्षा पूजे–अर्चेला जे प्राधान्य दिले, त्यातून ही वाङ्मयनिर्मिती झाली. भूधर, द्यानत, भागचंद, बनारसीदास इ. कवींची पद्ये जैन समाजात फार लोकप्रिय आहेत. पूजापाठ, भजने इत्यादींच्या रचनेमुळे जैन वाङ्मयात आणि त्याचबरोबर जैन मनातही भक्तिरस परिपुष्ट झाला.

दक्षिणेत दिगंबर जैन सिद्धांनी इ. स. च्या ९ व्या व १० व्या शतकांत जी ग्रंथसंपदा निर्माण केली, तिच्यावर योगप्रधान शैव भावनेचा प्रभाव स्पष्ट जाणवतो. या ग्रंथकारांनी उपास–तापास, व्रते, पूजा–अर्चा, तीर्थाटण, इ. कर्मकांडाचा आणि कायक्लेशाचा निषेध केलेला दिसतो. जोइंदू, रामसिंह व देवसेन या तीन जैन सिद्धांची ग्रंथरचना तर नाथपंथी सिद्धांच्या रचनेशी बहुतांशी साधर्म्य दाखवते. हे लेखक ईश्वराला शिव या नावानेच संबोधताना दिसतात. अकलंकदेवाने तर आपल्या एका श्लोकात 'महादेवो मया वन्द्यते ।' (= मी महादेवाला वंदन करतो) असे म्हटले आहे. मध्ययुगात बौद्ध, शाक्त, शैव, इ. धर्मपंथांतल्या सिद्धांनी जे वैचारिक आंदोलन सुरू केले होते, त्यात जैनांनीही उत्साहाने भाग घेतला, असे जैन सिद्धांच्या ग्रंथांवरून दिसते.

दिगंबर व श्वेतांबर या पंथांनी निर्मिलेल्या साहित्याविषयी बोलायचे, तर श्वेतांबर साहित्यात कथाग्रंथांचे वैपुल्य आहे; त्या मानाने तात्त्विक ग्रंथ कमी आहेत. दिगंबरांच्या हिंदी वाङ्मयात मात्र कथा व चरित्र यांवरील ग्रंथांइतकेच तात्त्विक ग्रंथही मोठ्या संख्येने आढळतात. गोम्मटसार, राजवार्तिक, सर्वार्थसिद्धी, प्रवचनसार, पंचास्तिकाय, इ. तात्त्विक ग्रंथांची हिंदी गद्य–पद्यात्मक भाषांतरे दिगंबर संप्रदायांत झालेली आहेत. न्यायदीपिका, आप्तमीमांसा इ. न्यायशास्त्रावरील क्लिष्ट ग्रंथांचेही हिंदीत अनुवाद झाले आहेत.

दुसरा भेद दिसतो तो असा, की श्वेतांबरांचे बरेचसे ग्रंथ स्वतंत्र आहेत. त्या मानाने अनुवादित ग्रंथांची संख्या कमी आहे. दिगंबर संप्रदायात स्वतंत्र हिंदी ग्रंथ कमी असून, जे आहेत ते बहुतेक भाषांतरात्मक आहेत. यांतले कित्येक भाषांतरकार असे पट्टीचे विद्वान आहेत, की त्यांना दोन-चार स्वतंत्र ग्रंथ लिहिणे मुळीच कठिण गेले नसते. आणखी एक भेद दिसतो तो असा, की श्वेतांबर संप्रदायात गृहस्थ किंवा श्रावक ग्रंथकार क्वचितच आढळतात. उलटपक्षी दिगंबर संप्रदायात श्रावकांनी लिहिलेले हिंदी ग्रंथ विपुल आहेत. याविषयी ज्ञानकोशकार केतकर म्हणतात ––

'दिगंबर संप्रदायात साधुसंघाचा अभाव आज ४००–५०० वर्षे आहे. या संप्रदायाचे अनुयायी जर साधूंच्या तोंडाकडेच पाहत राहिले असते, तर त्यांची दुर्गती झाली असती; परंतु धर्मज्ञान जिवंत राखण्याचा बोजा गृहस्थांनी अंगावर घेतल्यामुळे संप्रदाय बचावला व वाङ्मयाची वृद्धी झाली.'

हिंदी जैन वाङ्मयात शांतरसाला प्राधान्य मिळाले आहे. त्या मानाने शृंगारादी रस अल्प प्रमाणातच आढळतात. नायिकाभेदांची रसाळ वर्णने हिंदी जैन वाङ्मयात फारशी आढळत नाहीत. बनारसीदासाने काही शृंगारात्मक काव्य लिहिले होते; पण त्याने ती रचना यमुनाप्रवाहात सोडून दिली, असे सांगतात. संस्कृत व प्राकृत भाषेत मात्र जैनांच्या शृंगारिक कृती अनेक सापडतात. याविषयी श्री. नाथूराम प्रेमी म्हणतात, की हिंदी जैन ग्रंथ ज्या काळात निर्माण झाले, त्या काळात रसात्मक वाङ्मय निर्माण करणे हे जैनांचे ध्येय नव्हते, तर शुद्ध ज्ञानाचा प्रसार करून धर्मरक्षण करणे हे ध्येय होते. [जैनधर्म; भा. सं. जै. यो.; प्रा. सा. इ.; म. ज्ञा. को.; ना. सं.; जै. सं. सं.]

जैनुद्दीन सूफी संप्रदायाच्या चिश्ती शाखेतील एक संत. याचे मूळ नाव दाऊद हुसेन असे होते. याचा जन्म इ. स. १३०१ मध्ये इराणातील शिरोज शहरी झाला. तो सात वर्षांचा असतानाच त्याची आई मरण पावली. त्याचे वडील ख्वाजा हुसेन यांनी लहान दाऊदला बरोबर घेऊन अरबस्तानातील पवित्र स्थानांची यात्रा केली.

दाऊद काहीसा मोठा झाल्यावर भटकत भटकत भारतात

आला. इथे आल्यावर त्याने दिल्लीत राहून कमालोद्दीन सामाना या विद्वानाच्या मार्गदर्शनाखाली आपले धर्मशिक्षण पुरे केले. यानंतर थोडयाच काळात महंमद तुघलखाने दिल्लीतील लाखो नागरिकांसह आपली राजधानी दक्षिणेतील देवगिरी (दौलताबाद) येथे आणली. त्यांत कमालोद्दीन आणि दाऊद हुसेन हेही दोघे होते.

बुऱ्हाणुद्दीन चिश्ती हा दाऊद हुसेनचा पारमार्थिक गुरू होय. चिश्ती पंथाची दीक्षा घेतल्यानंतर दाऊद हुसेनला जैनुद्दीन असे नाव प्राप्त झाले. दौलताबादेस जैनुद्दिनाच्या विद्वत्तेची व साधुत्वाची कीर्ती वाढू लागली. खानदेशाच्या फारुकी राजघराण्याने जैनुद्दिनाचे अनुयायित्व स्वीकारले. या घराण्याने खानदेशात बुऱ्हाणपुर व जैनाबाद ही गावे बुऱ्हाणुद्दीन व जैनुद्दीन या गुरुशिष्यांच्या नावाने वसविलेली आहेत.

जैनुद्दीन हा सूफींच्या चिश्ती शाखेतील बाविसावा पुरुष होय. त्याचा शिष्य मीर हसन याने त्याची बोधवचने हिदायतुलकुतुन (हृदयबोध) या नावाने संकलित केली आहेत.

जैनुद्दीन इ. स. १३६८ मध्ये मरण पावला. त्याची वैभवशाली कबर औरंगाबादपासून जवळ असलेल्या खुल्ताबाद येथे आहे. औरंगजेबाची जैनुद्दिनाच्या कबरीवर इतकी श्रद्धा होती, की आपले शव जैनुद्दिनाच्या कबरीशेजारी पुरण्यात यावे, असे त्याने आपल्या मृत्युपत्रात लिहून ठेवले होते. आजही प्रतिवर्षी जैनुद्दिनाच्या पुण्यतिथीच्या निमित्ताने होणाऱ्या उरसासाठी खुल्ताबाद येथे हजारो हिंदू व मुसलमान जमतात. [सू. सं.]

जैमिनी (सनपूर्व ३ रे शतक) एक मुनी. हा वेदव्यासांचा शिष्य असून, पूर्वमीमांसेचा कर्ता होता. व्यासांजवळ याने सामवेदाचे अध्ययन केले आणि पुढे त्याचे अध्यापन करून लोकांत त्याचा प्रसार केला. पण सामवेदाचा प्रसारक यापेक्षा पूर्वमीमांसादर्शनाचा सूत्रकार म्हणून याची अधिक ख्याती आहे. हा कौत्सकुलोत्पन्न असून, धर्मराजाच्या यज्ञात एक ऋत्विज होता. त्याचप्रमाणे धर्मराजाने मयसभेत प्रवेश केल्यावर मोठा समारंभ केला, तेव्हाही हा तिथे उपस्थित होता. जनमेजयाच्या सर्पसत्रात याने उद्गाता म्हणून काम केले होते. जैमिनीने जे भारत रचले, त्यात पांडवांचा व्हावा तितका गौरव झाला नाही, म्हणून अश्वमेधाशिवाय इतर भाग व्यासांच्या आज्ञेवरून त्याने नष्ट केला, अशी आख्यायिका आहे.

सामवेदाची जैमिनीय नामक शाखा याच्या नावावर आहे. त्याचप्रमाणे सामवेदाची जैमिनीय ब्राह्मण व जैमिनीयोपनिषदब्राह्मण ही दोन्ही ब्राह्मणे यानेच रचली आहेत. सांप्रत ही दोन्ही ब्राह्मणे उपलब्ध आहेत. याशिवाय जैमिनिकोशसूत्र, जैमिनिनिघंट, जैमिनिपुराण, ज्येष्ठमाहात्म्य, जैमिनिभागवत, जैमिनिभारत, जैमिनिसूत्र, जैमिनिसूत्रकारिका, जैमिनिस्तोत्र, जैमिनिस्मृती, इ. अनेक प्रसिद्ध ग्रंथही याच्या नावावर आहेत. [भा. द.; सु. वि. को.; श. क.; प्रा. च. को.]

जैमिनी कानडा एक राग. याची जाती संपूर्ण आहे. हा काफी थाटातून उत्पन्न होतो. याचे आरोहावरोह सातही स्वरांनी होतात. वादी– ऋषभ. संवादी– पंचम. गानसमय– मध्यरात्र.

अडाण्यापेक्षा यात कानडयाचे अंग अधिक असते; पण तारस्थानाचा षड्ज प्रबल असतो. पूर्वांगात सारंग रागाचे अंग घेतात म्हणून गांधार वक्र करावा लागतो. [सु. वि. को.]

जैमिनीय उपनिषद्ब्राह्मण सामवेदाच्या जैमिनीय शाखेचे एक ब्राह्मण. याला तलवकार उपनिषदब्राह्मण असे दुसरे नाव आहे. शंकराचार्यांनी केनोपनिषदभाष्याच्या प्रस्तावनेत सांगितले आहे, की केनोपनिषद हे जैमिनीयोपनिषदब्राह्मणाच्या नवव्या अध्यायाच्या आरंभी असून, त्याच्या पूर्वीच्या आठ अध्यायांत यज्ञकर्मांचे व प्राणोपासनेचे विवेचन केले आहे. या केनोपनिषदानंतर गायत्रसाम व वंशपरंपरा सांगितल्या आहेत. पण सांप्रत उपलब्ध असलेल्या जैमिनीयोपनिषदब्राह्मणाचा अध्यायक्रम त्यापेक्षा वेगळा आहे. त्यात चारच अध्याय असून, चौथ्या अध्यायात केनोपनिषद आहे. या ब्राह्मणात अनेक आचार्यांची नावे आलेली आहेत. [म. ज्ञा. को.– वेदविद्या; वै. सा.]

जैमिनीय शाखा सामवेदाची एक शाखा. व्यासांनी आपला शिष्य जैमिनी याला प्रथम सामवेद शिकवला, असे पुराणांतरी वर्णन आहे. जैमिनी शाखेचा प्रसार द. भारतातील तिनेवेल्ली आणि तंजाऊर या जिल्ह्यांमध्ये आहे. मात्र या शाखेच्या अनुयायांची संख्या बरीच कमी आहे. जैमिनीय ब्राह्मण, जैमिनीय उपनिषद, जैमिनीय श्रौतसूत्र व जैमिनी गृह्यसूत्र हे या शाखेचे ग्रंथ आजही उपलब्ध आहेत. पाहा– सामवेद. [वै. सा. सं.]

जैसलमीर राजस्थानाच्या पश्चिम भागात, जोधपूरच्या वायव्येस २२५ मैल अंतरावर हे लहानसे नगर आहे. भाटी वंशातील महारावळ जैसलदेव याने हे नगर इ. स. ११८० च्या सुमारास वसवले व तिथे आपली राजधानी स्थापली. या नगराभोवती सुमारे ३ मैल लांबीचा दगडी कोट

बांधलेला असून, त्यात चारही बाजूंना चार मोठे दरवाजे आहेत. या कोटाच्या आत दक्षिण भागात एका टेकडीवर एक सुंदर किल्ला असून, त्याला ९९ बुरुज आहेत. किल्ल्यावर अनेक राजप्रासाद आणि नारायण (टीकमजी) व भगवती यांची मंदिरे आहेत. याशिवाय तिथे पार्श्वनाथ, शांतिनाथ, ऋषभदेव, इ. जैन तीर्थंकरांचीही मंदिरे आहेत. ही मंदिरे इ. स. च्या १४ व्या व १५ व्या शतकांत बांधली गेली. या मंदिराची रचना सुश्लिष्ट व सुबक असून, त्यावर सुरेख नक्षीकाम केलेले आहे.

किल्ल्याच्या पायथ्याशी, कोटाला लागूनच बादलविलास नावाचा सातमजली सुंदर मिनार आहे. नगराच्या पूर्व भागात घडसीसर नावाचा एक विस्तीर्ण तलाव आहे.

जैसलमीरची विशेष ख्याती आहे, ती तेथील जैन ग्रंथांच्या संग्रहामुळे. हे ग्रंथ ताडपत्रावर लिहिलेले आहेत. इस्लामी विध्वंसकांच्या हाती पडून आपले ग्रंथ नष्ट होऊ नयेत म्हणून अन्य प्रांतातील अनेक जैन आचार्य आपापले ग्रंथ घेऊन जैसलमीरला गेले. कारण ते स्थान दुर्गम असल्यामुळे तिथे आपले हे ज्ञानभांडार सुरक्षित राहील अशी त्यांची खात्री होती. संस्कृत व प्राकृत भाषांतील हे दुर्मिळ ग्रंथ म्हणजे जैन संस्कृतीचा अमोल ठेवा आहे. अनेक देशी व परदेशी पंडितांनी तिथे जाऊन त्यांचे संशोधन केले आहे. [रा. इ.]

जोंग नृत्य ओडिसा प्रदेशातील एक नृत्य. हे नृत्य जोंग जातीचे लोक करतात. पशुपक्षी, प्रेम, शेती हे या नृत्याचे विषय होत. अपहरणनृत्य हे जोंगांचे प्रमुख नृत्य आहे. जेव्हा एखादे वऱ्हाड दुसऱ्या गावी जाते, तेव्हा वरपक्षाची मंडळी ढाल-तरवार घेऊन योद्धयाच्या वेषात नाच करतात. शेवटी ही मंडळी नवऱ्या मुलीला अशा रीतीने घेऊन येतात, की जणू तिला पळवूनच आणले आहे. या प्रकाराला अपहरणनृत्य म्हणतात. या प्रदेशात प्राचीन काळी मुलींना पळवून नेऊन त्यांच्याशी लग्ने लावण्याची प्रथा होती. तिचा अवशेष या नृत्यात दिसतो. [भा. लो. नृ.]

जोइंदू एक जैन सिद्ध. डॉ. उपाध्ये जोइंदूचा काळ इ. स. चे ६ वे शतक मानतात; तर राहुल सांकृत्यायन तो इ. स. चे १० वे शतक हा ठरवतात. हा राजस्थानचा रहिवासी असावा. परमात्मप्रकाश व योगसार हे त्याचे दोन दोहासंग्रह आहेत.

जोइंदूच्या मते आत्मा तीन प्रकारचा आहे–(१) बहिरात्मा- यात देह आणि त्याच्या अवयवांचा समावेश होतो. (२) अंतरात्मा – ध्यानात प्रतीत होणारे अन्तःसामर्थ्य आणि (३) परमात्मा – कर्मकवचापासून मुक्त आणि स्वतंत्र झालेला आत्मा. पुढे जोइंदूने जैन सिद्धान्तानुसार आत्म्याचा परमात्म्यात कसा विकास होतो, ते स्पष्ट केले आहे. परमात्मा हा ज्ञानस्वरूप, नित्य व निरंजन आहे, असे सांगून तो म्हणतो–

अण्णु जि तित्थु म जाहि जिय अण्णु ज़ि गुरुअ म सेवि ।
अण्णु जि देउ म चिंति तुहुं अप्पा विमलु मुवि ।।

अर्थ – (ते) आत्मतत्त्व देवालयात नाही, शिळेत नाही, पूजासाहित्यात नाही आणि चित्तातही नाही. तो अक्षय, निरंजन व ज्ञानमय शिव शुद्ध चित्तात निवास करतो. हे (चित्त) समदर्शी योग्यांच्या द्वारे जाणले जाते.

जोइंदू त्या निर्मल, विशुद्ध आत्मतत्त्वाला जिन, विष्णू, बुद्ध, शिव असे कोणतेही नाव द्यायला तयार आहे. यावरून तो एक समदर्शी भारतीय तत्त्वज्ञ ठरतो. जैन पारिभाषिक संज्ञा आणि त्यांच्या छटा सोडल्यास जोइंदूचे ग्रंथ हे पंथातीत समजावे लागतील. [गो. च. प.; अ. भा.]

जोखमार एक क्षुद्र दैवत. कर्नाटकातील ब्राह्मण, धोत्री, इ. जातींचे लोक याला भजतात. याची कथा अशी – गणपती, कार्तिकस्वामी यांच्याप्रमाणेच जोखमार हाही शंकराचाच मुलगा होता. तो अंगाने गणपतीपेक्षा कृश होता. खेळताना तो हमखास चिडे. एके दिवशी तो नदीवर आंघोळीसाठी गेला असताना त्याला तिथे एक धोबीण दिसली. तिच्यावर मोहित होऊन जोखमाराने तिचा हात धरला. जवळच उभ्या असलेल्या त्या स्त्रीच्या नवऱ्याने ते पाहिले व त्याचा संताप अनावर झाला. त्याने जोखमाराचे डोके ठेचून त्याला ठार मारले. पण पुढे तोच जोखमार धोबीजातीचा कुलदेव बनला.

कुंभार लोकही त्याला आपला आदिदेव मानतात. ते लोक भाद्रपद शुद्ध चतुर्थीच्या दिवशी गणपतीच्या आधी जोखमाराची मूर्ती बसवून तिची पूजा करतात. जोखमार घरात असेपर्यंत गणपतीला झाकून ठेवतात व मोदकांचा नैवेद्य दाखवीत नाहीत. ज्यांच्या घरी त्याचा कुलाचार असतो, त्यांना जोखमाराच्या विसर्जनानंतर तीन दिवस सुतक पाळावे लागते.

जोखमाराचे विसर्जन करायच्या वेळी त्याची मूर्ती नदीवर नेऊन तिचे डोके ठेचतात. जोखमार म्हणजे नक्की कोणता देव ते कळत नाही. तो एखादा यक्षकुमार किंवा मदन असावा असा एक समज प्रचलित आहे. [म. लो. सा. ३]

जोखाईया उ. प्रदेशातील भंगी जातीचा देव. पृथ्वीराज आणि जयचंद यांच्यांत झालेल्या लढाईत त्या जातीचा हा नेता मारला गेला व तोच पुढे लोकांचा देव

बनला. मणिपूर जिल्ह्यात याचे स्थान आढळते. भंगी लोक याला डुकराचे रक्त वाहतात. [फो. लो. नॉ. इं.]

जोखार

एक मुसलमान जात. हे लोक रोग्यांना जळवा लावण्याचा धंदा करतात. जोंक = जळू, यावरून यांना जोखार असे नाव पडले आहे. भारताच्या इतर भागांत झाडू जातीचे लोक जळवा लावण्याचाच व्यवसाय करतात. गुजरातेत नापिताचा धंदा करणारी जोखार नावाची मुसलमानांची पोटजात आढळते. [ट्रा. का. सें प्रॉ. इं.]

जोग

हिंदी भाषेतील एक गीतप्रकार. ही गीते प्रायः विवाहसंस्काराविषयीची असतात. वधू-वरांना तिलक लावून झाल्यावर सगुनगीतें गातात, त्याबरोबर जोगगीतेही गातात. या गीतांत काही वेळा विवाहविधीचे वर्णन असते, तर काही वेळा कोणी तरी कामाख्यापीठात जाऊन जादूटोणा शिकून आल्याचे वर्णन असते. भोजपुरी भाषेत जोग करना याचा अर्थ जादूटोणा करणे, असा होतो. पण जोगगीते प्रायः विवाहसंबंधातच उपलब्ध आहेत. [हिं. सा. को.]

जोगणी

देवीच्या उपासिकांचा एक वर्ग. या वडवाळ जातीच्या असतात. या उजव्या काखेत भोपळा अडकवून नवरात्रात घरोघर भिक्षा मागत फिरतात. प्रत्येक घरी त्यांना रोज मूठभर तांदूळ वाढतात. नवरात्रात एक दिवस जोगणीजवळच्या भोपळ्याची पूजा करण्याची प्रथा आहे. त्यासाठी जोगिणी आणि तिचा सहकारी शंख्या यांना सन्मानाने घरी बोलावतात. चौरंगावर तांदुळांचा चौक भरून त्यावर तो भोपळा ठेवतात. मग घरातील सुवासिनी स्त्री त्या भोपळ्यात तांदूळ भरते, त्यावर हळदीकुंकू वाहते व जोगणीसह भोपळ्याला ओवाळते. यावेळी शंख्यालाही थोडे तेल आणि तांदूळ मिळतात. शंख्या हा सुवासिनीला व यजमानाला शुभाशीर्वाद दिल्यावर आपला शंख मोठ्याने वाजवितो. [बाँ. बे. क्रा.]

जोगती-जोगतीण

यल्लम्मा देवीच्या उपासकांचा एक वर्ग. हा वर्ग प्रामुख्याने महाराष्ट्रात व कर्नाटकात आढळतो. यल्लम्मा देवीला नवसाने वाहिलेला मुलगा जोगती बनतो व मुलगी जोगतीण बनते. काही माणसे जाणतेपणीही आपण होऊन जोगती-जोगतीण बनतात. जोगती व जोगतीण बनायचे असेल, तर देवीच्या स्थानावर जाऊन विधिपूर्वक माळ, परडी व शिक्का धारण करावा लागतो. गळ्यात मोत्याची वा कवड्यांची माळ घालायची, डोक्यावर देवीची मूर्ती असलेली परडी घ्यायची आणि कपाळाला भंडार व विभूती फासायची हे या विधीतले विशेष होत.



जोगतीण

जोगती-जोगतीणी समूहाने अथवा एकेकटे भिक्षा मागत हिंडत असतात. त्यात जोगती काही वेळा स्त्रीवेष घेऊन देवीची सजविलेली परडी डोक्यावर घेतो. मुख्य जोगती चोंडके वाजवून भक्तिगीते गातो. त्याचे साथीदार टाळ-तुणतुण्याची साथ देतात.

यल्लम्मा देवीच्या उन्नत स्वरूपाची म्हणजे रेणुकेची उपासना करणारा वर्ग गोंधळी होय. तिच्या मूळ स्वरूपाची उपासना जोगती व जोगतीण यांनी सांभाळली आहे. गोंधळ्यांच्या कथागीतांत ज्याप्रमाणे यल्लम्मा या नावाची स्मृती आहे, त्याचप्रमाणे यल्लम्माच्या कथागीतातही रेणुकेची स्मृती शिल्लक आहे.

जोगत्याला वाघ्याप्रमाणे आपल्या मूळच्या जातीतील मुलीशी लग्न करता येते. परंतु जोगतीणीला मात्र जन्मभर अविवाहित राहूनच जीवन कंठावे लागते.

जोगती-जोगतीणींची गाणी जशी मराठीत आहेत, तशीच ती कन्नड भाषेतही आहेत. या गाण्यांत कमी-अधिक प्रमाणात यल्लम्माचे म्हणजेच रेणुकेचे लोककथात्मक चरित्र असते. एखाद-दुसरे भक्तिगीतही पुढीलप्रमाणे आढळते—–

चला जाऊं रेणुकेच्या भेटी। मारूं तिच्या चरणांशी मिठी ।।
यात्रा भरली फार मोठी । गंध-लिबांची झाली दाटी ।।
येलू तुझी महिमा फार मोठी । चला घेऊ भंडारवाटी ।।
रेणुकाची भरू ओटी । शालू नेसली जरीकांठी ।।
कोळेगांव बांगेच्या कांठी । परसू चौंडक्याची निराळी घाटी ।।
चौमुलखीं वाजली घाटी ।।

यल्लम्मा वा यमाई देवीचे प्रमुख ठाणे बेळगाव जिल्ह्यात सौंदत्ती या गावी आहे. महाराष्ट्रात अन्यत्रही या देवीची स्थाने आहेत. [म. लो. उ.; मुं. इ. जा.; लोकराज्य]

जोगवा महाराष्ट्रातील देवीचे उपासक गळ्यात कवड्यांची माळ घालून कपाळी भंडार लावून आणि हाती परडी घेऊन देवीच्या नावाने जी भिक्षा मागतात, तिला जोगवा असे म्हणतात. विशिष्ट आधि-व्याधींच्या निरसनासाठी अथवा इच्छित कामनांच्या पूर्तीसाठी इतर लोकही नवसाने मंगळवारी, शुक्रवारी किंवा नवरात्रात जोगवा मागतात. ज्यांच्या घरी देवीचा कुळधर्म असतो, त्यांना कुळधर्माचा एक भाग म्हणून जोगवा मागावा लागतो. नवसाने जोगवा मागणाऱ्यांत स्त्रियांची संख्या अधिक असते. एकनाथांनी या जोगव्यावर एक भारुड रचले आहे, ते असे—

अनादि निर्गुण प्रगटली भवानी ।
मोहमहिषासुर मर्दनालागुनी ।।
त्रिविध तापांची कराया झाडणी ।
भक्तांलागुनी पावसी निर्वाणीं ।।
आईचा जोगवा जोगवा मागेन ।
द्वैत सारूनी माळ मी घालीन ।।
हातीं बोधाचा झेंडा घेईन ।
भेदरहित वारीसी जाईन ।।
नवविध भक्तीच्या करीन नवरात्रा ।
करूनी पोटीं मागेन ज्ञानपुत्रा ।।

या भारुडात जोगवा मागण्याच्या विधीचे स्वरूप आणि तो मागण्यामागचे हेतू अप्रत्यक्षपणे व्यक्त झाले आहेत. [म. लो. उ.]

जोग विष्णुबुवा (१८६४–१९२० इ. स.) महाराष्ट्रातील एक वैष्णव संत. यांचा जन्म पुण्यात झाला. त्यांच्या वडिलांचे नाव नरसिंह आणि मातेचे सरस्वती असे होते. त्यांचे थोरले बंधू पांडोबा हे मल्ल होते. त्यांच्या प्रमाणेच विष्णुबुवांनाही तो छंद होता. ते आजन्म ब्रह्मचारीच राहिले.

बुवांचे शालेय शिक्षण बेताचेच झाले होते. त्यांना इंग्रजी फारसे येत नव्हते. संतवाङमयाची त्यांना आवड होती. त्यांनी त्याचा चांगला अभ्यासही केला होता. ज्ञानेश्वरी, अमृतानुभव, तुकारामगाथा, इ. ग्रंथांवर त्यांचे प्रभुत्व होते. नानामहाराज साखरे यांच्याकडे त्यांनी ज्ञानेश्वरीचा सांप्रदायिक पद्धतीने अभ्यास केला व केशवानंद उदासी यांचेकडे शारीरमाष्य समजावून घेतले.

बुवांचा स्वभाव अत्यंत तापट होता. ते स्वत: आपणांस नरसिंहाचा अवतार म्हणत. त्यांच्या कडक स्वभावामुळे त्यांचा शिष्यवर्ग त्यांना फार भीत असे. बुवांच्या तापट स्वभावाच्या अनेक आठवणी त्यांचे शिष्य सांगतात. त्यांतील एक अशी—

एकदा नगरला बुवांचे कीर्तन चालू होते. कीर्तनाला बरीच मोठी मंडळी जमली होती. पूर्वरंगानंतरचे भजन सुरू झाले. बुवांनी श्रोत्यांना भजन करण्याची विनंती केली. पण तिथे जमलेली बडी मंडळी भजन म्हणेनात. त्यावर बुवा संतापले व म्हणाले, 'भजन म्हणायचे नसेल तर मागे बसा, नाहीतर कीर्तनातून निघून जा.' ती सर्व मंडळी कीर्तनातून निघून गेली. तेव्हापासून बुवांनी आधुनिक शिक्षितांच्या पुढे कीर्तन करण्याचे बंद केले.



विष्णुबुवा जोग

बुवा जसे तापट तसेच नि:स्पृह व निर्भीड होते. कोणापुढे

याचना करायची नाही व कोणी काही आणून दिले, तर ते घ्यायचे नाही, असा त्यांचा बाणा होता. निफाडच्या एका व्यापाऱ्याने एकदा एक लाख रुपये त्यांच्यापुढे ठेवले. बुवांनी क्षणाचाही विलंब न लावता म्हटले. " घेऊन जा ते. हे आम्हांस काय करायचे ? "

वारकरी संप्रदायाचे कार्य पद्धतशीर चालावे व त्यासाठी कार्यकर्ते तयार करावे, या हेतूने बुवांनी इ. स. १९१७ मध्ये आळंदी येथे वारकरी शिक्षणसंस्था स्थापन केली. आज त्या इवल्याशा रोपाचा विस्तार सर्व महाराष्ट्रभर झाला आहे.

एकदा वारकरी संस्थेच्या काही कामानिमित्त बुवा मुंबईला गेले होते. त्या वेळी तिथे त्यांना त्यांच्या मृत्यूची वेळ समजली. तेव्हा बुवा तात्काळ आळंदीस आले व थोड्याच काळात त्यांनी तिथे देह ठेवला. त्यांची समाधी इंद्रायणीच्या काठी बांधलेली आहे. श्री. वेंकटस्वामी, श्री. सोनोपंत दांडेकर, इ. वारकरी संप्रदायाचे विद्वान त्यांचेच शिष्य होत.

ज्ञानेश्वरी (काही भाग), अमृतानुभव, गाथा, हरिपाठ, या ग्रंथांच्या सार्थ आवृत्त्या व वेदांतविचार इ. ग्रंथ त्यांच्या नावावर आहेत. [पुरुषार्थ– सावतांक, १९६१; श्री. म. के. नेऊरगांवकर– सकाळ, १५ फेब्रुआरी ६५]

जोगा परमानंद

(इ. स. चे १३ वे व १४ वे शतक) एक मराठी संतकवी. बार्शी हे याचे गाव होय. याचे नाव जोगा व याच्या गुरूचे नाव परमानंद असे होते. हा जातीने शूद्र होता, असे महिपतीने म्हटले आहे. तथापि हा तेली होता, असेही उल्लेख मिळतात.

रोज भगवंताच्या मंदिरात जाताना तोंडाने एक श्लोक म्हणावा व एक-एक नमस्कार घालीत देवळात जावे, असा याचा नित्यनेम होता. एके दिवशी एका सावकाराने याला एक पितांबर नेसविला. ते नवे मूल्यवान वस्त्र धुळीत मळेल, म्हणून जोगा त्या दिवशी जपून नमस्कार घालू लागला. त्यामुळे, त्याला आरतीची वेळ साधता आली नाही. या पीतांबराने मला मोहपाशात गुंतवून भगवंताचे दर्शन उशीरा घडवले, असे म्हणून त्याने तो पीतांबर फाडून टाकला.

याची समाधी बार्शीला असून, मार्गशीर्ष वद्य चतुर्थीला याच्या पुण्यतिथीचा उत्सव होतो. याची पदे, आरत्या, अभंग, इ. स्फुट कविता अत्यल्प प्रमाणात उपलब्ध आहे. याचा एक अभंग असा–

सहाचे संगती चौघे अनुवादती ।
परी एकाचीये मते नकळे देखा ।।
तो गोळियांचे घरीं रांगणा पै झाला ।
वाल्हा दुल्हा म्हणोनि दाम देती ।।
सत्यलोकीं ब्रह्मा कैलासीं शंकर ।
ध्याती मनोहर हरि देखा ।।
जोगयाचा स्वामी नंदाचा खिल्लारी ।
हा बोल निरंतरी वाढिन्नला ।।

याच्या ग्रंथाचे लेखन विसोबा खेचर करीत असे, असे जनाबाई सांगते. यावरून हा नामदेवाचा समकालीन ठरतो. जोगाचा गुरू परमानंद याचे एक हिंदी पद शीखांच्या ग्रंथसाहेबात समाविष्ट केलेले आहे. [म. सा.; प्रा. म. सं.]

जोगिया

एक राग. याची जाती संपूर्ण आहे. यात ऋषभ व धैवत हे स्वर कोमल व बाकीचे शुद्ध लागतात. वादी – षड्ज. संवादी – मध्यम. आरोह स्वर – सा रे म प ध सा. अवरोह स्वर – सा नि ध प म ग रे सा. आरोहात ग नि वर्ज्य आहेत. अवरोहात क्वचित कोमल निषाद लावतात. गान समय – सकाळ. हा राग शृंगार व करुण या रसांना पोषक आहे. [श्री. आबासाहेब मुजुमदार, पुणे]

जोगी

योगसाधना करणाऱ्या व्यक्तीला जोगी असे म्हणतात. नाथ संप्रदाय योगप्रधान असल्यामुळे त्या संप्रदायाच्या अनुयायांना जोगी अशी संज्ञा आहे. भारतातील ज्या अनेक जाती-जमातींनी नाथ संप्रदायाचे अनुयायित्व पत्करले, त्या सर्व परस्परांहून भिन्न असल्या, तरी त्यांना जोगी ही सामान्य संज्ञा प्राप्त झाली आहे.

या लोकांची वस्ती भारतातील बहुतेक सर्व प्रदेशांत आढळते. आसामात हे लोक स्वतःला गोरखनाथाचे वंशज समजतात. यांचे गृहस्थ व संन्यासी असे दोन वर्ग आहेत. नाथपंथी असल्यामुळे हे प्रेते पुरतात. यांचा धंदा कोष्ट्याचा असतो. बंगालमधील जोगीही पूर्वी कोष्टीच होते. पण सांप्रत काहीजण शेती, सोनारी, इ. उद्योग करू लागले आहेत. गोपीचंद राजाचे गुणगान करून भिक्षा मागणारेही काही लोक यांच्यांत आढळतात. यांच्यांतले बहुतेक लोक शैव व काही वैष्णवही आहेत. धर्मेश्वर नावाचे जोगी धर्म, शितळा, मनसा वगैरे देवतांना भजतात. हे लोक वड, पिंपळ, तुळस यांना पवित्र मानतात.

हे लोकही प्रेते पुरतात. प्रथम प्रेताला स्नान घालून, नवे वस्त्र गुंडाळतात. त्याच्या गळ्यात तुळशीची माळ घालतात व हातात जपमाळ देतात. पुरताना प्रेताचे डोके ईशान्येकडे ठेवतात. खड्डा बुजवून त्यावर पिंड, केळी, तूप, साखर, इ. पदार्थ एका थाळीत घालून ठेवतात.

जोगी नावाचा एक मुसलमानांचा वर्गही पंजाबात आहे. हे लोक मूळचे काश्मीरी होते. बाबा रतन हाजी नामक एका

गावूचे ते शिष्य झाल्यामुळे त्यांना जोगी हे नाव मिळाले. काश्मीरमधील जोगी हिंदू व मुसलमान या दोन्ही धर्मांचे आहेत. ते कानफाटे जोग्यांहून वेगळे असून, शेतीचा व्यवसाय करतात.

मध्य भारतातील जोगी लोक गोरखनाथाचे अनुयायी आहेत. गोरखनाथाच्या बारा शिष्यांनी आपापले वेगळे पंथ स्थापले होते, त्यांवरून त्यांच्यात बारा कुळे उत्पन्न झाली आहेत. त्यांच्यांतले काही मठवासी असतात, तर काही भटकतात. यांचे औघड व कानफाटे असे दोन प्रमुख वर्ग आहेत. जोग्याला औघड दीक्षा पुढीलप्रमाणे दिली जाते.

प्रथम क्षौर करतात. नंतर द्वारका किंवा बदरीनारायण येथे जाऊन तप्तमुद्रा घेतात. बदरी नारायणाहून तांब्याचे कडे व केदारनाथाहून लोखंडाचे कडे आणून दंडात घालतात. त्याचप्रमाणे बलुचिस्तानातील हिंग्लाज येथून आणलेल्या पांढऱ्या व दगडी मण्यांची माळ गळ्यात घालतात.

औघड वर्गातले जोगी एक शिटी काळ्या लोकरीच्या दोऱ्यात ओवून गळ्यात लटकवतात व तिन्ही वेळा जेवणापूर्वी ती वाजवतात. या शिटीला ते नाद किंवा पुंगी असे म्हणतात.

औघड दीक्षा घेतल्यानंतर बारा वर्षांनी कानफाटी दीक्षा घेता येते. त्यावेळी गुरूकडून कान टोचून घेऊन कानात लाकडाच्या, दगडाच्या किंवा काचेच्या वाळ्या घालतात. वाळीमुळे ज्याचा कान फाटतो त्याला पतित समजून जातीबाहेर टाकतात. कानफाट्यांच्या मुख्याला दर्शनी म्हणतात.

सांप्रत यांच्यापैकी बऱ्याच लोकांनी गृहस्थाश्रम स्वीकारला असून, ते निरनिराळे व्यवसाय करू लागले आहेत. कोणी बांगड्या विकतात, तर कोणी तागाचे दोर वळतात. काहीजण कोल्ह्याचे मांस विकतात. काही कानफाटे मंत्र, तंत्र व जादूटोणा करून उपजीविका करतात; तर काही निरनिराळ्या प्रकारचे जुगारही खेळतात.

शिवरात्र हा यांचा मोठा सण आहे. काही लोक नागपंचमीस नागाची पूजाही करतात. औघडी पंथी लोक लग्ने लावण्यासाठी ब्राह्मणाला बोलावतात; पण कानफाटे मात्र आपल्या जातीचाच पुरोहित बोलावतात.

हे लोक प्रेताची आसनमांडी घालून बसल्या स्थितीतच त्याला पुरतात व त्यावर समाधी बांधतात.

सिंधमध्येही असे जोगी आहेत. शिकारपूर येथे त्यांचा मुख्य मठ आहे. ते जोगमाया देवीला भजतात. गोरखपद्धती हा त्यांचा धर्मग्रंथ होय. यांच्यांतील विवाहित लोक केशरी वस्त्र परिधान करतात व कानात जाड वळी घालतात.

राजस्थानातील जोगीही गोरखनाथाचे अनुयायी आहेत. नेपाळ हे त्यांचे तीर्थक्षेत्र होय. याच्यांतही औघड व कानफाटे असे दोन वर्ग आहेत. ते जालंधरनाथाला आपला गुरू मानतात. काही लोक मल्लिनाथाला गुरु समजतात. या लोकांना विवाह निषिद्ध आहे. पण मठ किंवा मंदिर यांच्याबाहेर स्त्रीशी संबंध ठेवल्यास प्रत्यवाय नाही. यांचे अनेक पोटभेद आहेत.

महाराष्ट्रातील जोग्यांना मराठे जोगी व गुजरातेतील जोग्यांना गुजराती जोगी म्हणतात. हे सर्व गोरखनाथी पंथाचे आहेत. त्यांच्या कानाची छिद्रे बरीच मोठी असून, त्यांत ते लाकडी किंवा हस्तीदंती कडे घालतात. त्यांचे बारा पोटभेद असून, यांच्यांत भिन्न पशूंची सोंगे घेऊन खेळ करणारे, भविष्य सांगणारे, वैदू, दगडी मांडी तयार करणारे, काचेचे लाखेचे मणी, सुया, सुऱ्या, पोवळी, अत्तरे, इ. वस्तू विकणारे असे नाना प्रकारचे लोक आहेत.

म्हैसूर प्रदेशातही या लोकांची वस्ती आहे. शेती करणे किंवा भीक मागणे हे यांचे धंदे आहेत. याशिवाय हे मंत्राच्या साहाय्याने सर्पांना भुलविण्याचा धंदा करतात. सिलेक्याट, हेलावा, जंगलिग व पकानती हे या जातीचे प्रमुख भेद आहेत.

द. कानडा जिल्ह्यात राहणारे जोगी लोक मराठी आणि तुळू या भाषा बोलतात. दुसऱ्या कोणालाही त्यांच्या जातीत प्रवेश मिळत नाही. कदिरी इथे त्यांचा प्रमुख मठ असून, हलोरी व भुवरासू या दोन ठिकाणी त्यांच्या प्रमुख शाखा आहेत. भैरव ही त्यांची उपास्य देवता आहे. कित्येक जोगी गोरखनाथालाच आपला देव मानतात.



भिक्षेकरी जोगी – तमिळनाड

ब्रह्मचारी जोग्यांच्या कानात चिनी मातीची चक्राकार मुद्रा असते. गृहस्थाश्रमी जोगी मात्र ही मुद्रा घालीत नाहीत. सर्व जोगी पुरुष आपल्या गळ्यात पितळेची, तांब्याची अथवा चांदीची पुंगी घालतात व जेवणापूर्वी भैरवनाथाचे स्मरण करून ती वाजवतात. कऱ्हाडे ब्राह्मण यांचे पौरोहित्य करतात.

आंध्र प्रदेशात हे लोक दासरी नामक साधूंच्या वर्गात मोडतात. हे डुकरे बाळगतात व गारुड्याचा धंदा करतात.'

मद्रास प्रदेशातील जोगी घोदीयन किंवा तोत्तियन या नावाने ओळखले जातात. त्याचप्रमाणे झाडूवाल्यांचे काम करणारे जोगी कोरवस अथवा ओडून या नावाने ओळखले जातात. पार्वतीच्या शापामुळे आपणांस भिक्षावृत्तीने राहणे भाग पडत आहे, असे हे लोक म्हणतात. हे लोक ज्या घरी भिक्षेसाठी जातात, तिथे भिक्षा मिळाल्याशिवाय तिथून निघत नाहीत. भिक्षेला जाताना त्यांच्याजवळ एक पोकळ भोपळा असतो. त्यात ते अनेक वस्तू ठेवतात.

यांच्यांतील मुलीला प्रथम रजोदर्शन झाले, की तिचा भाऊ किंवा तिचा नवरा तिच्यासाठी गावाबाहेर एक वेगळी झोपडी बांधतो. विटाळ संपल्यावर त्या मुलीचे कपडे व झोपडी जाळून टाकतात व नंतर तिला घरी आणतात.

हे लोक पेड्डवाडू, मलालम्म, गंगम्म, अय्यवारू, रुद्रम्म, इ. देवतांना भजतात.

तमिळनाडमधील जोगी वाङ्निश्चयाच्या वेळी वधूला देज व एक डुकर देतात. त्या डुकराचीच लग्नात मेजवानी देतात. नवऱ्यामुलाला व वधूला बांधायची कंकणे माणसांच्या केसांची केलेली असतात. त्या कंकणांना विशिष्ट पानेही बांधलेली असतात. वराकडील मंडळी वधूगृही येतात, तेव्हा वधूकडील मंडळी त्यांच्यासमोर एक पडदा किंवा दोरी धरून त्यांना अडवितात. थोडीशी लुटुपुटीची लढाई झाल्यावर वराकडील मंडळी दोरी वा पडदा धरणाऱ्यांना थोडे पैसे देतात व आत जातात. नवऱ्यामुलाने वधूच्या गळ्यात पोत बांधली, की लग्न पुरे होते.

हे लोक मृताला पुरतात. त्यापूर्वी तिथे जमलेले लोक त्याच्या डोळ्यावर तांदूळ टाकतात व थडग्यात एक कोनाडा करून त्यात अन्नपदार्थही ठेवतात. [म. ज्ञा. को.; ना. सं.; का. ट्रा. स. इं.]

जोगी-आसावरी

एक राग. याची जाती औडव संपूर्ण आहे. यात ऋषभ, गांधार व निषाद हे तीन स्वर कोमल तसेच शुद्ध लागतात आणि बाकीचे शुद्ध लागतात. वादी – षड्ज. संवादी – पंचम. आरोह स्वर – सा रे म प ध सा. अवरोह स्वर– सा रे नि ध प ध म प ग रे सा. पकड स्वर – रे नि ध प ध म प ग रे सा. गानसमय – दिवसाचा दुसरा प्रहर. याचे ध्यानस्वरूप असे –

शिरावर जटा. अंगाला भस्म. हाती त्रिशूल, कपाल व वीणा. मुद्रा क्रोधयुक्त. [श्री. आवासाहेब मुजुमदार, पुणे]

जोगेश्वरी

एक देवता. महाराष्ट्रातल्या ग्रामीण विभागात क्षेत्रपाळाच्या मंदिरामध्ये भैरवाची सहचरी म्हणून ही त्याच्या बरोबर असते. पाहा – योगेश्वरी.

जोडवी

पायाच्या अंगठ्याजवळच्या बोटात घालायची चांदीची अगर इतर धातूची वळी. सौभाग्यचिन्हांपैकी एक चिन्ह. जोडवी प्राचीन काळापासून प्रचारात असावी. जुट्-जुड् या धातूपासून हा शब्द बनला असून, त्याचा अर्थ बंधन असा आहे. हा अलंकार विवाहोत्तर घालायचा असल्याने त्याचा सौभाग्याचे, प्रेमाचे किंवा पातिव्रत्याचे बंधन असा अर्थ घेता येईल.

भुताखेतांपासून संरक्षण व्हावे म्हणून प्राचीन काळी निरनिराळ्या धातूंची कडी किंवा वळी हातापायांत घालीत. शरीरात भुताखेतांचा प्रवेश पायाच्या बोटांतून होतो, अशी समजूत त्या काळी रूढ होती. त्यामुळेच पायाच्या बोटांत धातूची वळी घालण्याची पद्धत आली असावी. वाट सरकून पोट दुखू लागले, तर पायाच्या बोटांत तांब्याची वळी घालावी, अशी समजूत आजही काही भागात आहे.

जोडव्यांबरोबरच विरोल्या नावाचा आणखी एक अलंकार पायाच्या बोटात घालतात. मात्र हे जोडव्यासारखे पूर्णवर्तुळाकृती वळे नसते, तर अर्धवर्तुळाकृती वळ्याला निम्मे उभे बोट झाकले जाईल असा लंबवर्तुळाकृती पत्रा असतो.

जोडवी सर्वंध भारतभर वापरात आहेत. प्रत्येक प्रदेशात त्याला नावे मात्र निराळी आहेत. [अ. दि. कोकड]

जोतिबा

महाराष्ट्रातील एक लोकदेव. याचे मुख्य ठाणे कोल्हापूरच्या वायव्येला नऊ मैलांवरच्या डोंगरावर आहे. या डोंगराला जोतिबाचा डोंगर किंवा रत्नागिरी, असे म्हणतात. मंदिराजवळ जी गुरवांची वस्ती आहे, तिला वाडी-रत्नागिरी असे नाव आहे. जोतिबा हा मूळचा केदारनाथ आहे. कोल्हापूरच्या महालक्ष्मीला दैत्यसंहाराच्या कार्यात साहाय्य करण्यासाठी तो हिमालयातून दक्षिणेत आला, अशी कथा केदारविजयात दिलेली आहे. याला केदारलिंग, ज्योतिर्लिंग, केदारनाथ, इ. अनेक नावे आहेत. जोतिबा हे ज्योतिर्लिंग या शब्दाचे लौकिक संस्करण होय.

जोतिबाची मूर्ती चतुर्भुज असून, तिच्या हातांत खड्ग, पानपात्र, डमरू व त्रिशूळ ही आयुधे आहेत अश्व हे त्याचे वाहन होय. कोकणातील रवळनाथ आणि कर्नाटक–महाराष्ट्रात सर्वत्र प्रसिद्ध असलेला खंडोबा, यांच्याशी जोतिबाचे पुष्कळच साम्य आहे. त्याचे स्वरूप आणि उपासनाविशेष पाहता असे दिसते, की तो खंडोबाप्रमाणेच क्षेत्रपाळश्रेणीतला देव आहे.

जोतिबा अथवा केदार याची प्राचीनता यादवकाळाच्याही मागे जाते. महानुभावांच्या स्थानपोथीत पैठण, पाठवघ (जि. बीड), जळगाव (जि. नगर) येथील केदारस्थानांचा उल्लेख

आहे. खोलेश्वराच्या एका शिलालेखात आंबेजोगाई येथील केदारमंदिराची नोंद आलेली आहे. चेदिवंशी राजा जाजल्लदेव याच्या मल्हार (विलासपूर – मध्य प्रदेश) येथे मिळालेल्या संस्कृत लेखात सोमराज नामक एका ब्राह्मणाने इ. स. ११६७–६८ मध्ये मल्लालपत्तनात केदाराचे देऊळ उभारल्याचा निर्देश आहे.



जोतिबा

वाडी–रत्नागिरी येथे केदारलिंग, केदारेश्वर आणि रामलिंग अशी तीन मंदिरे आहेत. यांपैकी केदारलिंगाचे मंदिर प्रथम नावजी साया नामक भक्ताने बांधले होते. सध्याचे केदारलिंगमंदिर राणोजी शिंदे याने इ. स. १७३० मध्ये बांधले. केदारेश्वर आणि रामलिंग ही दोन मंदिरे अनुक्रमे दौलतराव शिंदे आणि मालजी पन्हाळकर यांनी अनुक्रमे इ. स. १८०८ आणि १७८० या वर्षी बांधली. रामलिंगाचा परशुरामाशी संबंध असल्यामुळे इथे थोड्या अंतरावर त्याच्या मातेचे म्हणजे यमाईचे मंदिर आहे आणि पित्याच्या नावाने जामदग्न्य तीर्थ आहे.

रविवार आणि पौर्णिमा हे येथील दिनविशेष होत. चैत्री पौर्णिमेला इथे लाखावर यात्रा भरते. त्या वेळी गुलाल–खोबऱ्याचा वर्षाव होतो आणि 'जोतिबाचा चांग भले' अशा घोषाने सर्व डोंगर दुमदुमून जातो.

महाराष्ट्रातील अनेक घराण्यांचा हा कुलदेव आहे. ग्वाल्हेरच्या शिंद्यांचाही हा कुलदेव असल्यामुळे त्यांनी याच्या उपासनेचे वैभव वाढवण्यात विशेष पुढाकार घेतला आहे. [म. चा. दै.; खंडोबा; र. को. दे.; कोल्हापूर गॅझे.]

जोधराज (इ. स. चे १९ वे शतक) एक हिंदी कवी. हा राजस्थानातला असून, अत्रिगोत्री गौड ब्राह्मण होता. हा चौहानवंशीय राजा चंद्रभान याचा आश्रित होता. याने राजाच्या आज्ञेवरून हम्मीररासो नामक एक काव्यग्रंथ रचला आहे.

हम्मीर राजाच्या पराक्रमाचे वर्णन करणे, हा या ग्रंथाचा विषय आहे. या ग्रंथात नऊशे एकोणसत्तर छंद असून, त्यात हम्मीरदेव व अलाउद्दीन यांच्या युद्धाचे विस्ताराने वर्णन आहे. एके ठिकाणी अलाउद्दीन याच्या हातून एक उंदीर मारून कवीने त्याचे चरित्र उपहासास्पद करण्याचा प्रयत्न केला आहे.

जोधराजाच्या या ग्रंथावर पौराणिक आख्याने, पृथ्वीराज रासो आणि रामचरितमानस यांचा बराच प्रभाव दिसून येतो. या काव्यात शृंगार, वीर, रौद्र, इ. रस विपुल प्रमाणात आहेत. दोहा, मोतीराम, नाराच, कवित्त, छप्पय्य, इ. अनेक छंदांचा वापर या ग्रंथात केलेला आहे. रूढ असलेले अनेक वाक्प्रचार वापरून कवीने आपला ग्रंथ भारदस्त बनविण्याचा प्रयत्न केला आहे. [हिं. सा. को २; हिं. सा. इ.]

जोन्स, सर विल्यम (इ. स. १७४६ – १७९४) इंग्लंडमधील एक पौर्वात्यभाषा–पंडित व कायदेशास्त्रज्ञ. तरुणपणीच याला पौर्वात्य वाङ्मयाची गोडी लागली होती. इ. स. १७७४ साली त्याला वकिलीची सनद मिळाली. धंदेवाईक दृष्टीने नव्हे, तर तत्त्वज्ञाच्या दृष्टीने त्याने कायद्याचा अभ्यास केला होता. त्याला रॉयल सोसायटीची फेलोशिपही मिळाली होती.

इ. स. १७८३ मध्ये फोर्ट विल्यम (कलकत्ता) येथील न्यायाधीशाची जागा त्याला मिळाली, म्हणून तो भारतात आला. त्याच वर्षी नाईट ही बहुमानाची पदवीही त्याला देण्यात आली. न्यायदानाचे काम करून उरलेल्या वेळात तो भारतीय वाङ्मय व शास्त्रे यांचा अभ्यास करू लागला. त्यासाठी कलकत्ता येथे त्याने एशियाटिक सोसायटी नावाची एक संस्था स्थापली. तोच त्या संस्थेचा पहिला अध्यक्षही झाला.

विल्यम जोन्स यांला संस्कृत भाषा पौर्वात्य पद्धतीने शिकायची होती. त्यासाठी त्याला बरेच कष्ट करावे लागले. परकीय मनुष्याला गीर्वाणभाषा शिकवण्यास कलकत्त्यातला कोणीही पंडित तयार होईना. एका पंडिताने तसे धारिष्ट केले; पण त्याच्यावर लोकांनी बहिष्कार टाकल्यामुळे त्याने जोन्सला शिकवणे बंद केले. शेवटी रामलोचन नामक एक निःस्पृह पंडित त्याला अध्यापन करायला सिद्ध झाला; पण आपल्याला इंग्लिश माणसाच्या संपर्काचा दोष लागू नये म्हणून त्याने बरीच खबरदारी घेतली. साहेबाच्या बंगल्यातली एक खोली अध्यापनासाठी वेगळी ठेवावी, ती रोज हिंदू नोकराने धुवावी, साहेबाने मांसभक्षण करू नये, इ. अनेक अटी त्याने जोन्सला घातल्या. त्या सर्व अटी पाळून जोन्सने संस्कृत भाषा अवगत करून घेतली. संस्कृत भाषेबद्दल त्याला विलक्षण प्रेमादर होता. त्याने तिच्याविषयी पुढीलप्रमाणे उद्‌गार काढले आहेत––

संस्कृत भाषेची रचना अत्यंत आश्चर्यकारक असून, ती ग्रीक भाषेपेक्षा अधिक पूर्णत्वाला पोचलेली, लॅटिनपेक्षा अधिक विकसित व दोन्ही भाषांहून जास्त सुधारलेली आहे.

'डायजेस्ट ऑफ हिंदू अँड मोहॉमेडन लॉज' व 'एशियाटिक मिसेलेनी' हे त्याचे ग्रंथ प्रसिद्ध आहेत. याव्यतिरिक्त हिंदूंची कालगणना, हिंदूंचे राशिचक्र, बुद्धिबळांचा खेळ, पर्शियन भाषेचे व्याकरण व इतिहास, इराणचा संक्षिप्त इतिहास, पौर्वात्य हस्तलिखित ग्रंथांची सूची, आशिया खंडाचे वर्णन, इ. अनेक विषयांवर त्याने ग्रंथलेखन केले आहे. इ. स. १७९४ मध्ये त्याने मनुस्मृतीचे इंग्रजीत भाषांतर करून ते प्रसिद्ध केले. त्याने भगवद्‌गीता, गरुड पुराण, शाकुंतल, ऋतुसंहार व हितोपदेश या पुस्तकांचीही इंग्रजीत भाषांतरे केली आहेत.

भारतीय संस्कृतीची माहिती जगाला पद्धतशीरपणे करून देणाऱ्या पाश्चिमात्य विद्वानांमध्ये सर विल्यम जोन्स याचे स्थान प्रमुख आहे. भारतीय संस्कृती आणि संस्कृत भाषा, विशेषतः संस्कृत पद्य वाङ्मयाला आधारभूत असलेले छंदःशास्त्र, याबद्दल त्याला अत्यंत प्रेम होते. हा थोर पंडित भारतातच मरण पावला. [म. ज्ञा. को.; महाराष्ट्र मासिक, ऑगस्ट १९६५]

जोरवे एक स्थान. महाराष्ट्रातील नगर जिल्ह्यात, संगमनेरच्या पूर्वेस ५ मैलांवर, प्रवरा नदीच्या उत्तर तीरावर हे खेडे वसलेले आहे. इ. स. च्या ११ व्या शतकातील यादवांच्या शिलालेखांत ज्या जुंयरवेग्रामाचा उल्लेख आहे, ते हेच असावे. प्राचीन काळी या गावाला जरासंधनगर असे नाव होते, अशी आख्यायिका इथले लोक सांगतात.

इथे केलेल्या उत्खननात मातीची भांडी, दगडी हत्यारे व ब्रॉंझच्या कुऱ्हाडी सापडल्या आहेत. भारतातील प्रागैतिहासिक संशोधनाच्या दृष्टीने या वस्तू फार महत्त्वाच्या मानल्या जातात. कारण त्यांतील काही वस्तू सिंधुसंस्कृतीच्या वस्तूसारख्या दिसतात. काही इतिहासज्ञांच्या मते द. भारतात ताम्र–पाषाणयुग कधीच अस्तित्वात नव्हते. परंतु जोरवे येथील उत्खननात मिळालेली दगडी हत्यारे व तांब्याच्या कुऱ्हाडी महाराष्ट्रातल्या ताम्रपाषाण–युगीन संस्कृतीचे अस्तित्व दर्शवतात, असे मानले जाते. [वि. मुं. रा. प.; रि. ए. ना. जो.]

जोशी (१) महाराष्ट्राच्या ग्रामसंस्थेतील एक वृत्तिवंत समाज. पाहा – ग्रामजोशी.

(२) एक भिक्षेकरी जात. या जातीची वस्ती महाराष्ट्र, कर्नाटक व मध्य प्रदेश या प्रदेशांत आहे. मराठे, धनगर, माळी, इ. जातींचा या जातीत बराच भरणा आहे. जोश्यांचे खास जोशी व अकरमासे जोशी असे दोन पोटभेद असून, त्यांच्यांत परस्पर रोटीव्यवहार होतो; पण बेटीव्यवहार होत नाही. यांच्यांत अनेक कुळे आहेत. पंचपालवी हे त्यांचे देवक आहे. त्यांच्या सर्व चालीरीती मराठ्यांप्रमाणेच आहेत. पाहा – कुडबुडे जोशी, गिडबिडकी. [म. ज्ञा. को.]

जोशी ब्राह्मण पंचद्रविडांचा एक पोटभेद. यांची वस्ती राजस्थान, मारवाड, पंजाब व उ. प्रदेश या प्रदेशांत आहे. मारवाडात यांना सांचौरा ब्राह्मण म्हणतात. यांच्याविषयी आख्यायिका सांगतात, ती अशी––

कोणे एके काळी मीनमाळ या गावी लक्ष्मी आणि विष्णू यांच्या विवाहाचा मोठा उत्सव झाला. त्या उत्सवात भाग घेण्यासाठी हे ब्राह्मण दक्षिणेतून मारवाडात गेले आणि पुढे सांचौर या गावी वस्ती करून राहिले. तेव्हापासून यांना सांचौरा असे नाव मिळाले.

यांच्यांत आरंभी अठरा गोत्रे होती. पण सांप्रत सातच आढळतात. मारवाडात व्यास, ठाकूर, मेहता, दूबे, राव अशी यांची आडनावे आहेत. हे वैष्णव आहेत. हे कोणाच्याही हातचे अन्न घेत नाहीत. यांच्यांतले काही शेती करतात; तर काही तूप व डिंक यांचा व्यापार करतात. यांच्या बायका आपल्या कपाळावर काचेची बिंदी लावतात. [रा. जा.]

जोशी–मठ आद्य शंकराचार्यांनी बदरीनारायणाच्या पूजेअर्चेच्या व्यवस्थेसाठी हिमालयात स्थापलेला मठ. याचे स्थान बदरीनारायणाच्या दक्षिणेस वीस मैल अंतरावर आहे. याचे मूळ नाव ज्योतिर्मठ. बदरीनारायणाचे पुजारी

रावळ हे इथे राहतात. हिवाळ्यात बदरीनारायणाचे मंदिर आणि त्याचा परिसर बर्फाने आच्छादला जातो; तेव्हा देवाची चलमूर्ती आणि अन्य पवित्र वस्तू आश्विन ते वैशाख या महिन्यांच्या काळात इथे आणून ठेवतात.

बदरीनारायणाच्या उपासनेच्या व्यवस्थेत शंकराचार्यांचा मोठा हात होता. सध्या असलेली मूर्तीही त्यांनीच स्थापिलेली आहे, असे म्हणतात. हिमाच्छादित अत्युच्च प्रदेशातील या पवित्र स्थानाचे माहात्म्य सातत्याने नांदावे, या हेतूनेच आचार्यांनी हा मठ निर्माण करून, तिथे आपली परंपरा चालू ठेवली.



जोशी – मठ

शंकराचार्यांचे एक साक्षात शिष्य तोटकाचार्य या मठाचे आद्य अधिपती होत. त्यांच्या नंतरच्या एकोणीस आचार्यांची नावे उपलब्ध होतात. इ. स. च्या ११ व्या शतकाच्या मध्यापासून १५ व्या शतकाच्या मध्यापर्यंतच्या परंपरेचा इतिहास अज्ञात आहे. इ. स. १४४३ पासून इ. स. १७७६ पर्यंत इथे होऊन गेलेल्या संन्यासी महंतांची नामावली मिळते. इ. स. १७७६ नंतर संन्याशांची परंपरा खंडित झाली आणि गढवालनरेश प्रदीपशाह यांनी त्या वेळी केलेल्या व्यवस्थेनुसार ब्रह्मचारी रावळांची परंपरा सुरू झाली. प्रारंभापासून इथल्या परंपरेतील व्यक्ती नंपूतिरी ब्राह्मण आहेत.

बदरीनारायणाच्या पूजे-अर्चेची व्यवस्था रावळांकडे आली, तरी जोशी–मठातील संन्याशांच्या गादीशी त्यांचा काही संबंध नाही. ती गादी दीर्घकाळापर्यंत रिकामीच होती. अलिकडे काशीचे एक विद्वान संन्यासी या गादीवर प्रतिष्ठित झाले असून, पुन्हा संन्याशांची परंपरा सुरू झाली आहे.

हे स्थान समुद्रसपाटीपासून ६१०७ फूट उंचीवर आहे. मठात पूजेचे शालिग्राम आहेत आणि संस्कृत पोथ्यांचा संग्रहही आहे. इथल्या मंदिरसमूहातले नृसिंहमंदिर फार प्रसिद्ध आहे. या मंदिरातील नृसिंहाचा एक हात अत्यंत कृश आहे. हा हात जेव्हा गळून पडेल, तेव्हा विष्णुप्रयागाच्या पुढे असलेले नर-नारायण पर्वत परस्परांना भिडतील आणि बदरीनारायणाला जाण्याचा मार्ग बंद होईल, अशी समजूत आहे.

नृसिंहमंदिराशिवाय इथे विष्णू, सूर्य, गणेश, इ. देवांची मंदिरे आहेत. भूकंपामुळे या मंदिरांना वारंवार धोका पोचतो. इथल्या एका मंदिरातील शिवलिंग आद्य शंकराचार्यांनी स्वहस्ते स्थापिले आहे, असे सांगतात. या भागात आचार्यांची एक गुंफा असून, ज्या तुतीच्या झाडाखाली बसून ते चिंतन करीत, ते झाडही पाहायला मिळते. आचार्यांच्या स्मृतींनी पावन झालेले आणि त्यांच्या महान सांस्कृतिक कार्याची जिवंत साक्ष असलेलें हे स्थान बदरी – केदार या तीर्थस्थानांच्या मार्गावरील एक महत्त्वपूर्ण क्षेत्र आहे. [शंकराचार्य; कल्याण – तीर्थांक]

जोहार (१) शीलाच्या रक्षणासाठी स्त्रिया अग्निप्रवेश करून जो आत्मत्याग करतात, त्याला जोहार असे नाव आहे. जौहर किंवा जोहार याचा अर्थ अग्निप्रलय असा आहे. या अर्थाने हा शब्द ज्ञानेश्वरीत (१०.१४५; ११.६०; ११.४३२) आणि तदुत्तरकालीन प्राचीन मराठी वाङ्मयात अनेकवार आलेला आहे. भडकलेल्या अग्नीत प्रवेश करून आत्मत्याग करण्याच्या पद्धतीला पुढे लक्षणेने जोहार हे नाव लाभले असावे. राजस्थानाच्या इतिहासात अशा जोहाराची रोमहर्षक वर्णने वाचायला मिळतात. आपल्या देशावर परचक्र आले आणि ते परतवून लावणे अशक्य ठरले, तर राजस्थानातल्या राजपूत स्त्रिया, शत्रूच्या हाती सापडून आपली विटंबना होऊ नये, म्हणून अग्निप्रवेश करीत.

महाराष्ट्रात सामान्यपणे अशी समजूत आहे, की जोहाराची प्रथा केवळ राजपुतांत प्रचलित होती. परंतु ऐतिहासिक पुराव्यावरून असे म्हणता येते, की राजपूत या नावाचा उदय होण्याच्या शेकडो वर्षे अगोदर जोहाराची प्रथा अस्तित्वात होती. शिकंदराचे नौदल सिंधू नदीतून परत जात असता अग्रश्रेणीच्या हिंदू सैन्याने त्याच्याशी प्राणांतिक संग्राम केला. या संग्रामात विजय मिळण्याची शक्यता दिसेनाशी झाल्यावर त्या साऱ्या सैनिकांनी आपल्या घरादारांना आग लावून दिली आणि त्यांच्या शूर स्त्रिया आपल्या मुलांमुलींसह भडकलेल्या त्या आगीत उड्या घेऊन भस्मसात झाल्या, असे कर्टिस नामक युरोपियन ग्रंथकाराने लिहून ठेवले आहे. इतिहासातील हा पहिला जोहार सनपूर्व चौथ्या शतकात घडला.

इ. स. ७११ मध्ये महंमद कासीमने सिंधवर स्वारी केली.

त्या वेळी सिंधचा शूर राजा दाहर हा त्या आक्रमणाचा प्रतिकार करीत असताना ठार झाला. दाहर युद्धात पडल्याची वार्ता कळताच त्याच्या तेजस्वी राणीने आणि तिच्यासह शतावधी हिंदू वीरांगनांनी भडकलेल्या चितेत उड्या घेऊन जोहार केला.

राजपुतांच्या इतिहासात असे जोहाराचे प्रसंग पाच वेळा आले आहेत. त्यांतील पहिले दोन प्रसंग जैसलमीरात व नंतरचे तीन प्रसंग चितोडमध्ये घडले. इ. स. १२९४ मध्ये महबूबखान नामक दिल्लीच्या सुलतानाचा खजिना जैसलमीरच्या राजपुतांनी लुटला. तेव्हा त्या सुलतानाने चिडून जैसलमीरावर स्वारी केली. राजपुतांना ती स्वारी परतवून लावणे अशक्य झाल्यामुळे त्यांनी आपल्या बायकांना जोहार करायला सांगितले. राजपूत वीर लढता लढता धारातीर्थी पडले व त्यांच्या स्त्रियांनी लगेच जोहार केला. या जोहारात एकंदर चौव्वीस हजार स्त्रियांनी आत्मसमर्पण केले, असे कर्नल टॉड सांगतो. यानंतर आणखी दहा-बारा वर्षांनी जैसलमीरचा दुसरा जोहार घडून आला.

इ. स. १३०३ मध्ये चितोडचा पहिला जोहार झाला. अलाउद्दिनाने पद्मिनीची अभिलाषा धरून चितोडवर स्वारी केली, त्या वेळी चितोडचे रक्षण होणे अशक्य आहे, असे दिसून येताच गडावरच्या राजस्त्रियांनी व इतर पंधरा हजार स्त्रियांनी केसरिया वस्त्रे परिधान करून जोहार केला. ज्या ठिकाणी या राजपूत सतीसाध्वींनी आत्मार्पण केले, त्या ठिकाणी, त्यांच्या पवित्र रक्षेला कोणाचा स्पर्श होऊ नये, म्हणून एक मोठा नाग तिथे सदैव पहारा करीत असतो, अशी आख्यायिका आहे.

यानंतर दुसरा जोहार राणा संगाची विधवा पत्नी कर्मवती हिच्या कारकीर्दीत बहादुरशहाने चितोडवर स्वारी केली, तेव्हा झाला. या जोहारात तेरा हजार राजपूत स्त्रिया जळून भस्म झाल्या. चितोडचा तिसरा जोहार अकबराच्या कारकीर्दीत घडून आला.

या सर्व जोहारांत भारतीय स्त्रियांची शीलनिष्ठा अत्यंत उज्ज्वलपणे व्यक्त झाली आहे. [रा. सं.; राजस्थान; स. सो. पा.; म. ज्ञा. को.]

(२) वंदन करण्याची एक महाराष्ट्रीय पद्धत. ही पद्धत बरीच प्राचीन आहे. यादवकालीन मराठी वाङ्मयात जुहारणे = नमस्कार करणे, या क्रियापदाची रूपे वारंवार आढळतात. शिवाजीमहाराजांनी ही पद्धत बदलून नमस्कार करताना राम राम म्हणण्याची पद्धत सुरू केली, असे सांगतात. पण राम राम करण्याची ही पद्धत शिवपूर्वकालीन काही कागदपत्रात व नामदे[illegible]ध्यातही आढळते.

जो[illegible] संतांची अनेक भारुडे आहेत. एकनाथांनी एका भारुडात म्हटलं आहे (गा. पं. ३, अभंग ३८६७) ते असे—

जोहार मायबाप जोहार। मी सकळ संतांचा महार ॥

आजमितीस जमिनीला हात लावून जोहार करायची पद्धत केवळ काही जातींपुरतीच मर्यादित आहे. [म. श. को.]

जोहारी

एक जात. हे लोक द. महाराष्ट्रात आढळतात. त्यांच्यांत तीन पोटभेद व अनेक कुळे आहेत. एकाच कुळात लग्नसंबंध करीत नाहीत. या लोकांत आते-मामेबहिणीशी लग्न करतात. विधवाविवाहाला मोकळीक असली, तरी अविवाहिताला विधवेशी लग्न करता येत नाही.

जोहारी हा शब्द जवाहिऱ्ये या शब्दापासून बनला असावा. हे लोक जुनी जर विकत घेऊन तिच्यापासून सोने-चांदी काढतात. यांच्या बायकांची लहान लहान दुकाने असतात. त्या लाकडाच्या व जस्ताच्या पेट्या, फण्या, गोट्या, आरसे, भोवरे, बाहुल्या इ. वस्तू विकतात. [मुं. इ. जा.; वाँ. बे. क्रॉ.]

जौनपुरी

एक राग. याची जाती षाडव संपूर्ण आहे. यात गांधार, धैवत व निषाद हे कोमल व बाकीचे शुद्ध लागतात. आरोहात गांधार वर्ज्य असतो. वादी– षड्ज. संवादी– पंचम. आरोह स्वर – सा रे म प ध म प ध नि सा. अवरोह स्वर – सा नि ध प ध म प रे म प म ग रे सा. पकड स्वर – म प ध नि सा नि ध प म ग रे सा. गानसमय – दिवसाचा दुसरा प्रहर.

जौनपुरी व आसावरी या दोन्ही रागांचे स्वर सारखेच आहेत; फक्त त्यांच्या वादी आणि संवादी स्वरांत फरक आहे. [श्री. आबासाहेब मुजुमदार, पुणे]

जौनसार बावर

उ. प्रदेशाच्या देहरादून जिल्ह्याचा एक भाग. उंच पर्वतराजी, खोल दऱ्या आणि घनदाट जंगल यांनी हा प्रदेश व्यापलेला आहे. याच्या सीमेवरून गंगा व यमुना या नद्या वाहतात. त्यामुळे या प्रदेशात दळणवळणाची साधने अत्यल्प आहेत. केवळ चकरौता व कालसी या ठिकाणीच इतर जनांचा जौनसारी लोकांशी संबंध येतो.

इथल्या डोंगराळ भूमीवर शेती करणे हे फार कष्टाचे काम आहे. त्यासाठी मनुष्यबळही मोठे लागते. सबंध कुटुंबाला शेतीच्या कामी खपावे लागते. त्यामुळे इथे एकत्र कुटुंबपद्धती अस्तित्वात आहे.

या प्रदेशातील स्त्री-पुरुष फार सुरेख असतात. स्त्रियांना दागिन्यांचा फार सोस असतो. इथली सामाजिक व्यवस्था धार्मिक व्यवस्थेवर अवलंबून आहे. समाजात ब्राह्मणांना व क्षत्रियांना सर्वोच्च स्थान असून, त्यांच्या खालोखाल बाजगी हे

बाजगी लोक कापणीच्या हंगामात काम करून आणि जमीनदारांकडून सणासुदीच्या दिवसांत जी काय प्राप्ती होते, ती घेऊन तिच्यावर गुजराण करतात. जमीनदारांची सेवा-चाकरी करणे, हा यांचा मुख्य व्यवसाय होय. यांच्यापैकी काही वजवय्ये, गायक, शिंपी व न्हावीही आहेत. या प्रदेशातील डोम व कोल्हा हे खालच्या वर्गातील लोक होत. डोम हे चामड्याचे काम करतात. कोल्हा लोकांत पुढील चार पोटभेद आहेत–



जौनसारमधील एक तरुणी

(१) खंडित-मुंडित – जमीनदारांच्या घरी हे दासवृत्तीने राहतात. जमीनदाराच्या परिवारात कुणाचा मृत्यू झाल्यास त्यांना धन्याच्या कुटुंबाबरोबर शोक करावा लागतो. तीन किंवा पाच दिवस हे शोक करतात व मुंडन करतात.

(२) मात् – कर्ज काढल्यामुळे यांना दास्यवृत्ती पत्करावी लागलेली असते.

(३) संजयत् – हे गावाच्या पंचायतीत राहतात. गावातील लोकांच्या जन्म-मृत्यूची नोंद करणे, हे यांचे काम असते.

(४) नीतोडोली – यांना अलिकडेच शेती करण्याचा अधिकार मिळाला आहे.

ब्राह्मण व क्षत्रिय यांच्यांत परस्पर विवाहसंबंध होतात. पण बाजगी, लोहार, कोल्हा व डोम या लोकांत परस्पर विवाह होत नाहीत.

विवाहप्रथा – या प्रदेशात प्राचीन काळापासून बहुपतिप्रथा अस्तित्वात आहे. मुलांमुलींची लग्ने लहानपणीच त्यांचे आई-बाप ठरवून ठेवतात. विवाहमुहूर्त ब्राह्मणाकडून काढून घेतात. वधूपक्षाचे लोक वराच्या घरी जातात व तिथे लग्न लागते. लग्नाचा बराचसा खर्च वरपित्याला करावा लागतो. विवाहानंतर मुलगी आपल्या माहेरी जाते व ती वयात आल्यावर मग सासरी येते. घरातल्या मोठ्या मुलाशी तिचा विवाह झालेला असला, तरी ती त्याच्या धाकट्या भावांचीही पत्नी मानली जाते. म्हणजे घरातले सगळे सहोदर बंधू हे तिचे पती समजले जातात.

जौनसारी लोक फार आतिथ्यशील आहेत. त्यांच्या घरी कोणी पाहुणा गेला, की त्याचे मोठ्या उत्साहाने स्वागत होते. रात्रीच्या जेवणापूर्वी घरातली सून एका मोठ्या पितळी भांड्यांत गरम पाण्याने पाहुण्याचे पाय धुते. नंतर मद्यपान होते आणि मग सर्वांचे एकत्र जेवण होते. भोजनानंतर धूम्रपान व नाचगाणी होतात.

जौनसारी लोकांना नृत्यगायनाची अत्यंत आवड आहे. वेगवेगळ्या उत्सवांत त्यांची नृत्ये होतात. रंगीबेरंगी कपडे व दागिने घालून आणि डोक्याला रंगीत रुमाल बांधून जौनसारी स्त्रिया जथ्याजथ्यांनी उत्सवाच्या ठिकाणी जातात. तिथे बागची ढोल वाजवतो आणि युवक व युवती नृत्य करतात. जौनसारमधील सर्वांत मोठा उत्सव म्हणजे शिशिर ऋतूतील माघ हा होय. हा अनेक दिवस चालतो. मकर संक्रांतीच्या आदल्या दिवशी बकऱ्याच्या बलिदानाने त्याची सुरवात होते. रोज संध्याकाळी गावातील सर्व स्त्री-पुरुष एकत्र जमतात व नृत्यगायनाने रात्र जागवतात. शिकार व मद्यप्राशन या गोष्टींना या दिवसांत ऊत येतो.

यांचा दुसरा उत्सव विशू हा होय. याचा प्रारंभ वैशाखीपासून होतो. चौराणी व लखवाड या ठिकाणी या उत्सवाची जत्रा भरते. पुरुष पांढरे कपडे व झालरदार टोपी घालून व हातांत लांब तलवारी घेऊन या जत्रेत सामील होतात. प्रथम शिवशक्तीची पूजा होते. मग रासे म्हणजे वीरांचे पोवाडे गायले जातात. पुरुष तलवारी घेऊन व स्त्रिया हातात हात गुंफून नाचतात. बाजगी ढोल, नगारा व सनई ही वाद्ये वाजवतात. या वेळी महाभारताची कथा गातात. प्रेमगीते गाण्याचीही पद्धत आहे. यांच्या प्रेमगीताचा एक नमुना असा–

एकी धारा दी गोरू बाकरै दूजै धारा दी घोडी।
सांया रामरे मुलकवा दूजै धारा दी घोडी।
तेरी मेरी बल दोसतिया

या गीताचा भावार्थ असा– पहाडाच्या एका टोकाला गाय-बकऱ्या आणि दुसऱ्या टोकाला घोडी बांधल्यावर ती जशी

दूर असतात, त्याप्रमाणे आपण एकमेकांपासून दूर आहो. प्रिये, तुझ्या आणि माझ्या प्रेमात कोण्या पाप्याने हे विघ्न आणले ?

जागरा हा जौनसारातील धार्मिक उत्सव आहे. विशेषत: यमुनेच्या किनाऱ्यावरील आणि महासू देवतेच्या मंदिराजवळ राहणारे लोक श्रावणात हा उत्सव करतात. उत्सवाच्या आदल्या रात्री लोक उपवास करतात आणि दुसऱ्या दिवशी सकाळी देवमूर्तीसह यमुनेवर स्नानाला जातात. स्नान झाल्यावर मूर्तीला मंदिरांत आणून तिची पूजा करतात.

जौनसारी लोक दिवाळीचा सणही मोठ्या उत्साहाने पाळतात. त्या वेळी लाकडाच्या मोळ्या करून त्या जाळतात. त्याचा प्रकाश दूरपर्यंत पडतो. त्यातलीच जळती कोलिते घेऊन गावातले लोक एकत्र जमतात आणि नृत्य-गायनात तल्लीन होतात.

देवधर्म – जौनसारी लोक मुख्यत्वे शिवाचे उपासक असले, तरी अनेक स्थानिक देव-देवतांनाही ते भजतात. जादूटोण्यावरही त्यांचा विश्वास आहे. शुभकार्याच्या वेळी आणि आपत्प्रसंगीही ते आपल्या देवतांना बलिदान करतात.

या लोकांत राम-लक्ष्मण व पांडव यांच्या संबंधीच्या लोककथा व लोकगीते प्रचारात आहेत. हे लोक कौरव-पांडवांनाही देव मानतात. या प्रदेशात दुर्योधनाचे एक मंदिर आहे. दुर्योधनाची मूर्ती शीर्षासनाच्या अवस्थेत आहे. प्राचीन काळी या देवाला रोज एक नरबली द्यावा लागत असे, असे म्हणतात. पण एकदा एका ऋषीने आपल्या तप:सामर्थ्याने देवाची मूर्ती उलटी टांगली आणि नरबलीऐवजी मेंढा बळी देण्याची पद्धत रूढ केली. सांप्रत पुजारी त्या मूर्तीकडे पाठ करून तिची पूजा करतो. शत्रूचे अहित चिंतण्यासाठी लोक इथे येतात व तसा दुर्योधनाला नवसही बोलतात. [माधुरी निगम – आजकल, जुलै १९५४; उमाशंकर 'सतीश' – सा. हिंदुस्थान, २८ जुलै १९६३; हंसा विरोरिया – सा. हिंदुस्थान, १० मे १९६४]

जौ ल्यौ गढवाल प्रदेशातील एक लोकोत्सव. हा उत्सव माघ शुद्ध पंचमी (वसंतपंचमी) च्या दिवशी करतात. या दिवशी औजी लोक शेतातून जव गोळा करून आणतात आणि ते आपल्या आप्तेष्टांना वाटतात. जव वाटीत जाताना जी गीते म्हणतात, त्यांपैकी एक गीत असे–

जौ ल्यौ पंचनाम देवता, जौ ल्यौ पंचमीका सालै !
जौ ल्यौ हरि राम शिव, जौ ल्यौ मोरिका नारैण !
जौ ल्यौ बार मैना, जौ ल्यौ पंचनाम देवता !

अर्थ – पंचनाम देवतांनो, जव घ्या. पंचमीच्या वर्षा, जव घे. हरी, राम, शिव देवांनो, जव घ्या. हे खिडकीतून दिसणाऱ्या नारायणा, जव घे. वर्षाच्या बारा महिन्यांनो, जव घ्या. पंचनाम देवतांनो, जव घ्या.

या दिवशी घरांच्या दारावर शेणाचे गोळे थापतात आणि त्यांवरही जव चिकटवतात. [ग. लो.]

ज्यू यहुदी पाहा.

ज्येष्ठ चैत्रादी मासगणनेतला तिसरा व ग्रीष्म ऋतूतला पहिला महिना. या मासाच्या पौर्णिमेला किंवा तिच्या आगेमागे ज्येष्ठा नक्षत्र असते. त्यावरून या मासाला ज्येष्ठ असे नाव मिळाले आहे.

ज्येष्ठमासकृत्ये – ज्येष्ठ शु. प्रतिपदेला करवीरप्रतिपदाव्रत व दशहरास्नानाला प्रारंभ. शु. तृतीयेला रंभाव्रत. शु. चतुर्थीला उमेची व अष्टमीला शुक्लादेवीची पूजा. शु. दशमी ही दशहरा होय. या दिवशी हस्त नक्षत्रावर स्वर्गातून भागीरथी अवतीर्ण झाली. या दिवशी जो गंगास्नान करील, त्याची दहा (दश) पापे ही तिथी हरण करते, म्हणून तिला दशहरा असे नाव मिळाले. ज्येष्ठ मास, शुक्ल पक्ष, दशमी, बुधवार, हस्त नक्षत्र, व्यतीपात, गरकरण, आनंदाख्य योग, कन्येला चंद्र व वृषभाला सूर्य असे दहा योग असता, मनुष्याने जर गंगास्नान केले, तर



ज्येष्ठ – एक सांकेतिक चित्र

तो सर्व पापांपासून मुक्त होतो, असे स्कंद पुराणात सांगितले आहे. याच दिवशी रामचंद्राने सेतुबंधरामेश्वराची प्रतिष्ठा केली होती. म्हणून या दिवशी सेतुबंधरामेश्वराची पूजा उक्त आहे. शु. एकादशीला निर्जला अशी संज्ञा आहे. हिचा उपवास पाणीही न पिता करायचा असतो. ज्येष्ठ शु. त्रयोदशीला शिवराज्याभिषेकाचा उत्सव करतात. पौर्णिमेला स्त्रिया वटसावित्रीव्रत करतात. त्या दिवशी ज्येष्ठा नक्षत्र असेल, तर ब्राह्मणाला छत्री व पादत्राणे दान द्यावी, असे सांगितले आहे. ज्येष्ठ पौर्णिमेला वेद प्रगट झाले, म्हणून त्या दिवशी वेदांची पूजा विहित आहे. ज्येष्ठ मासात उदकुंभ, पंखा व गाय ही त्रिविक्रमाप्रीत्यर्थ दान द्यावी, असे वामन पुराणात सांगितले आहे. या मासात ब्रह्मदेवाची पिष्टमय मूर्ती करून तिची पूजा करावी, असे भविष्योत्तर पुराणात म्हटले आहे.

ज्येष्ठ वद्य अष्टमीला शंकराची आणि ज्येष्ठ वद्य चतुर्दशीला रेवतीची निळ्या फुलांनी पूजा करावी, असे सांगितले आहे. [पु. चिं.; नि. सिं.; हि. ध.; श. क.]

ज्येष्ठजामातृपूजा विवाहप्रसंगी सीमांतपूजनाच्या वेळी वधूपिता ज्येष्ठ जावयाचा वस्त्राभरणे देऊन जो सत्कार करतो, त्याला ज्येष्ठजामातृपूजा असे म्हणतात. ही चाल महाराष्ट्रात सर्वत्र रूढ आहे.

ज्येष्ठजिनवरव्रत एक जैन व्रत. ज्येष्ठ शु. प्रतिपदेला या व्रताचा आरंभ होऊन, ते महिनाभर चालते. प्रथम दिवशी उपवास व त्यापुढे १४ दिवस एकभुक्त. तसेच पुन्हा ज्येष्ठ कृ. प्रतिपदेला उपवास आणि पुढे १४ दिवस एकभुक्त अशी याची व्यवस्था आहे. या व्रतात रोज आदिनाथाची पूजा व मातीच्या पाच कलशांतून त्याला अभिषेक करतात. 'ओं ह्रीं श्रीवृषभजिनाय नमः' या मंत्राचा त्रिकाल जप करतात. अशा प्रकारे हे व्रत २४ वर्षे करायचे असते. याची कथा अशी —

गुजरात देशातील खंभपुरी नगरीतल्या सोमश्रीने हे व्रत केले. त्यामुळे पुढच्या जन्मी ती राजकन्या म्हणून जन्मली. त्या जन्मातही तिने हे व्रत केले. त्यामुळे ती स्वर्गात जाऊन देवत्व पावली. [जै. व्र. वि. सं.; व्र. ति. नि.]

ज्येष्ठसाम सामवेदातील एक महत्त्वाचे साम. श्राद्धाच्या वेळी किंवा मूर्तीची स्थापना करताना हे साम म्हणतात. हे साम गाणारा ब्राह्मण श्राद्धाच्या भोजनाला योग्य असतो, असे धर्मशास्त्रात सांगितले आहे. [पु. इं.]

ज्येष्ठसामिकव्रत एक वेदव्रत. हे व्रत केल्यानंतर विद्यार्थ्याला आज्यदोहाचे अध्ययन करायचा अधिकार प्राप्त होतो. गोभिल गृह्यसूत्रात या व्रताचा विधी दिला आहे, तो असा—

एका शुभ दिवशी गुरू विद्यार्थ्याला त्या व्रताशी संबंधित असे नियम पाळायला लावतो. त्याच्या आदल्या दिवशी गुरू स्वतः व्रतस्थ राहतो. विद्यार्थ्याने व्रताचे नियम तीन, बारा किंवा गुरू सांगेल तितके दिवस पाळायचे असतात. त्यानंतर उद्वीक्षणिका हा विधी होतो. या वेळी पुन्हा एकदा उपनयनाचा संस्कार केला जातो. मग आचार्य होम करतो आणि विद्यार्थ्याला विचारतो. 'तू तुझी सगळी कर्तव्ये पार पाडलीस का?' शिष्याने होकारार्थी उत्तर दिल्यास आचार्य त्याच्या मुखाभोवती कोऱ्या वस्त्राचे तीन वेढे गुंडाळतो. या वेळी शिष्य अग्नीच्या पश्चिमभागी पण पूर्वेकडे तोंड करून उभा राहतो. मग आचार्य त्याला रानातील एखाद्या देवळात किंवा अग्निहोत्राच्या ठिकाणी जाऊन तीन दिवस मौनपूर्वक उपवास करायला सांगतो. यानंतर आचार्य स्वतः गावाबाहेर ईशान्य दिशेला जातो. वाटेत तो कच्चे मांस, चांडाल, रजस्वला स्त्री, रक्त, इ. वेदाध्ययनाला निषिद्ध अशा गोष्टींचे दर्शन टाळतो. नंतर तो एका स्वच्छ जागी पूर्वेकडे तोंड करून बसतो आणि आरण्यकातील काही भागांचे पठण करतो. नंतर शिष्य आचार्याला पागोटे, पात्र आणि चांगली गाय दक्षिणा म्हणून देतो. मग विश्वेदेवांसाठी चरू शिजवला जातो.

ज्येष्ठसामिकव्रत केलेल्या विद्यार्थ्याला शूद्र स्त्रीशी संभोग, पक्ष्याचे मांस, एकाच धान्याचे भोजन, एकाच ठिकाणी निवास, एकच वस्त्र परिधान करणे व मातीच्या भांड्यातून खाद्य-पेय घेणे, या गोष्टी जन्मभर वर्ज्य कराव्या लागतात. [इं. वे. क. सू.]

ज्येष्ठा (१) अश्विन्यादी गणनेतले अठरावे नक्षत्र. वृश्चिक राशीची आकृती आकाशात दिसते, तिच्या पोटातल्या तीन तारकांना मिळून ज्येष्ठा असे नाव आहे. या तिघींतली मधली तारका ठसठशीत आणि लाल रंगाची आहे. हिच्या इतकी लाली आकाशातल्या अन्य कोणत्याही तारकेला नाही. ज्येष्ठा पृथ्वीपासून २५० प्रकाशवर्षांच्या अंतरावर आहे. हिला हरितवर्णी अशी एक सहचरी आहे. म्हणजे व्याध जसा जोडतारा आहे, तशीच ज्येष्ठाही जोडतारकाच आहे. सगळ्या वृश्चिकपुंजात हीच डोळ्यात भरते. मृगाच्या पोटातला बाण आणि श्रवणाची आकृती ही जशी दोन त्रिकांडे, तसेच ज्येष्ठा हे गगनमंडलातील तिसरे त्रिकांड आहे.

ज्येष्ठेचे वैदिक नाव ज्येष्ठघ्नी असे आहे. कारण वृत्र हा

असुरांमध्ये ज्येष्ठ होता. 'त्याला आम्ही मारू' असे देवांनी या नक्षत्रावर म्हटले आणि ते नक्षत्र ज्येष्ठघ्नी बनले. पुढे ज्येष्ठा असा त्या नावाचा संक्षेप झाला. 'इन्द्रो ज्येष्ठामनु नक्षत्रमेति' (= इंद्र हा ज्येष्ठा नक्षत्राच्या मागून जातो), असे तैत्तिरीय ब्राह्मणात वचन आहे (३.२.१). त्यावरून इंद्र हीच त्याची देवता ठरली आहे. इंद्राला देवांमध्ये ज्येष्ठत्व मिळवण्याची इच्छा झाली व त्याने या नक्षत्री अकरा कपालांवर पुरोडाश तयार करून त्याचा याग केला, अशी दुसरी कथा आहे (तै. ब्रा. ३. १.५).

हे नक्षत्र तीक्ष्ण व तिर्यङ्मुख आहे. या नक्षत्रावर शेतीची कामे व विहीर, तलाव इ. खोदणे, तसेच घातपात, मित्रांमध्ये भेद, पशुदमन, इ. कृत्ये केल्यास ती सिद्ध होतात, असे सांगितले आहे. याचे मूर्तिध्यान असे–

पीतवर्णा गजारूढा भल्लास्या वा मृगानना।
अक्षसूत्रं पविं धत्ते वामे ज्येष्ठाङ्कुशं शयम्॥
(च. व. चि.)

अर्थ– ज्येष्ठा ही पीतवर्ण, अस्वलाच्या किंवा मृगाच्या तोंडाची, गजारूढ, (उजव्या हातात) माला व वज्र आणि डाव्या हातात अंकुश व सर्प धारण करणारी आहे.

संपूर्ण ज्येष्ठा नक्षत्र वृश्चिक राशीत येते. [नक्षत्रलोक; बृहज्ज्योतिषसार]

(२) एक तांत्रिक देवता. ही कमलावर बसलेली, रक्तवस्त्र नेसलेली, चतुर्भुज, तसेच कलश, सुवर्ण पात्र, पाश व अंकुश धारण करणारी आहे. [श्रीविद्यार्णवतंत्र.]

(३) एक शक्तिदेवता. द. भारतात हिची उपासना प्रचलित आहे. बौधायन गृह्यसूत्रात या देवीच्या उपासनेची बरीच माहिती असून, कुंभी, ज्याया, हस्तिमुखा, विघ्नपार्षदा, निर्ऋती, इ. तिची अन्य नावे सांगितली आहेत. तिच्या रथाला सिंह असतात व वाघ तिच्या मागे येतात, असे तिचे वर्णन केले आहे. या देवीची स्थापना करून तिच्यासाठी होमहवन करावे, असे सांगितले आहे. या विधीला ज्येष्ठाकल्प असे म्हणतात.

अलक्ष्मी हे तिचे आणखी एक नाव होय. सागरमंथनातून लक्ष्मीच्या आधी ही वर आली, त्यामुळे ती लक्ष्मीची अक्का ठरली. महाराष्ट्रात ती अक्काबाई या नावाने प्रसिद्ध आहे. ही अत्यंत कुरूप असल्यामुळे हिच्याशी विवाह करण्यास कोणी तयार होईना. अखेर कपाल ऋषीने हिच्याशी विवाह केला. म्हणून हिला कपालपत्नी असे नाव पडले. पुराणातले हिचे वर्णन असे–

रुंद नाक, लोंबते ओठ, लोंबते स्तन आणि मोठे पोट असलेली ही देवी आहे. ही द्विभुज असून, एका हाती कमळ धारण करते. हिचा दुसरा हात आसनावर ठेवलेला असतो. ही रुधिरप्रिया आहे. कावळयांची जोडी हे हिचे अभिज्ञानचिन्ह आहे.

चोल राजांच्या काळी या देवीच्या मंदिरांना कर माफ होता, तरीही ती मंदिरे नेहमीच दुर्लक्षित व निर्जन असत. पाहा– अलक्ष्मी. [डे. हिं. इ.; हॅं. सा. इं. इ.]

ज्येष्ठा गौरी एक देवता. भाद्रपद मासाच्या शुक्लपक्षात हिची पूजा होते. पूजाविधी तीन दिवसांचा असतो. कित्येक कुटुंबात गौरींबरोबरच गणपतीचे विसर्जन करतात. ही गौरी म्हणजे धान्यलक्ष्मी होय. पाहा–गौरी.

ज्येष्ठानक्षत्रजननशांती ज्येष्ठा नक्षत्रावर प्रसूती झाल्यास कुलातील कोणाचा तरी मृत्यू होतो, अशी समजूत आहे. त्यासंबंधीचा श्लोक असा—

ज्येष्ठादौ जननीमाता द्वितीये जननीपिता।
तृतीये जननीभ्राता स्वयं माता चतुर्थके॥
आत्मानं पञ्चमे हन्ति षष्ठे गोत्रक्षयो भवेत्।
सप्तमे चोभयकुलं ज्येष्ठभ्रातरमष्टमे।
नवमे श्वशुरं हन्ति सर्वं हन्ति दशांशके॥

अर्थ – (ज्येष्ठा नक्षत्राचे दहा भाग करावे.) त्यांतील पहिल्या भागात जन्म झाल्यास मुलाच्या आईची आई, दुसऱ्या भागात आईचा बाप, तिसऱ्यात आईचा भाऊ, चौथ्यात स्वतःची आई, पाचव्यात स्वतः मूल, सहाव्यात गोत्र, सातव्यात दोन्ही कुले, आठव्यात वडीलभाऊ, नवव्यात सासरा व दहाव्यात सर्व माणसे यांचा नाश होतो.

हे अरिष्ट दूर व्हावे, म्हणून या नक्षत्राची शांती करतात. या शांतीचा विधी असा —

जननाशौच संपल्यावर एका शुभ दिनी सुरवातीलाच गोप्रसवशांती करतात. मग इंद्राच्या सुवर्णप्रतिमेची व मातीच्या कुंभात तीर्थोदक, पंचगव्य, पंचामृत, पंचरत्ने, इ. घालून त्यांची पूजा करतात. नंतर आचार्य इंद्रसूक्त, रुद्रसूक्त व मृत्युंजयमंत्र यांचा पाठ करतो. मग पळसाच्या समिधा, तूप, चरू व तीळ यांचे १०८ हवन करतात. त्यानंतर स्त्रीपुत्रासह यजमानाला अभिषेक करतात. मग यजमान शुभ्र वस्त्रे परिधान करून आज्यावलोकन करतो व आचार्याला दुभती, तांबडी व अलंकारांनी भूषित अशी सवत्स गाय दान देतो. [सं. कौ.]

ज्येष्ठालक्ष्मीमंत्र 'ऐं ह्रीं श्रीं ज्येष्ठालक्ष्मि स्वयंभुवे ह्रीं ज्येष्ठायै नमः' या सतरा अक्षरी मंत्राला ज्येष्ठालक्ष्मीमंत्र असे नाव आहे. या मंत्राचा ऋषी ब्रह्मा, छंद

ष्टी, देवता ज्येष्ठालक्ष्मी, बीज ह्लीं व शक्ती श्रीं आहे. अभीष्टसिद्धी व धनप्राप्ती यासाठी या मंत्राचे अनुष्ठान करतात. मूलमंत्राने हातांचे प्रक्षालन करून त्या अक्षरांनी षडंगन्यास व अवयवन्यास करतात. नंतर ज्येष्ठालक्ष्मीचे ध्यान, लोहिताक्षी, विरूपा, कराली, नीललोहिता, इ. पीठशक्तींची पूजा व मग अष्टदल कमलावर ज्येष्ठालक्ष्मीची यथाविधि पूजा करतात. नंतर मूलमंत्राचा एक लक्ष जप व त्याच्या दशांश संख्येने घृतमिश्रित पायसाचे हवन करतात. [मं. म.]

ज्योतिपंत महाभागवत

(इ. स. चे १८ वे शतक). एक मराठी संत व ग्रंथकार. सातारा जिल्ह्यातील खटाव हे याचे मूळ गाव होय. हा आळवणे उपनामक अथर्ववेदी ब्राह्मण असून, उपमन्यू हे याचे गोत्र होते. याच्या बापाचे नाव गोपाळपंत असे होते. मुलगा शिक्षणाकडे लक्ष देईना म्हणून बापाने त्याला घराबाहेर हाकलून दिले. घराबाहेर पडल्यावर हा पुण्याला येऊन पेशव्यांच्या लकडखान्यात नोकरीला राहिला. पुढे आपल्या कर्तृत्वाने त्याने पुरंदरची फडणिशी मिळविली. काही दिवसांनी पेशव्यांनी त्याला उत्तरेत पाठविले. तिकडे नोकरी करीत असता काही कारणाने त्याच्या वृत्तीत स्थित्यंतर झाले. लेखणी खाली ठेवून तो अध्यात्मसाधनेला लागला. त्यानंतर काशीत जाऊन त्याने भागवत संहितेची पारायणे केली. तेव्हा काशीकरांनी त्याला महाभागवत अशी पदवी दिली.

ज्योतिपंत पुढे यात्रेच्या निमित्ताने काशीहून निघून पंढरपूरला आला. तिथे तो भजन-कीर्तन करून राहू लागला. एके दिवशी कीर्तनातच त्याने विठ्ठलाची पंधराशे मंदिरे बांधण्याची प्रतिज्ञा केली. त्यांपैकी सुमारे साडेसातशे मंदिरे तरी त्याने बांधली असावी, असा तर्क आहे.

ज्योतिपंताची बहुतेक ग्रंथरचना भागवतावर आहे. भागवताच्या एकादशस्कंधावरील अभंगबद्ध टीका (१४६६ अभंग), प्रथम व द्वितीय स्कंधांवरील ओवीबद्ध टीका (१३५५८ ओव्या) आणि वेदस्तुतीवरील ओवीबद्ध टीका (१४७२ ओव्या) या ग्रंथांशिवाय याने प्रवृत्तिनिवृत्तिऐक्यता-रत्नावली नामक एक तात्त्विक गद्य ग्रंथही रचला आहे. पेशव्यांना आणि नागपूरकर भोसल्यांना ज्योतिपंताविषयी अत्यंत आदर वाटत असे. [एकावली; श्री. य. न. केळकर — कौस्तुभ, मे १९६४]

ज्योतिरीश्वर ठाकुर

(इ. स. चे १३ वे शतक) एक कवी. हा विद्यापतीच्या पणजोबाचा भाऊ होता. दरभंगा जिल्ह्यातील सौराठ या गावी याचा जन्म झाला. मैथिली भाषेत वर्णनरत्नाकर नावाचा याचा एक ग्रंथ आहे. त्या भाषेतला हाच सर्वप्रथम ग्रंथ मानला जातो. म. म. हरप्रसादशास्त्री संशोधनकार्यासाठी नेपाळात गेले. असता त्यांना तिथे हा ग्रंथ मिळाला. त्याची फोटोप्रत करून घेऊन ती त्यांनी भारतात आणली. याच कवीचे धूर्तसमागम नामक संस्कृत काव्य नेपाळच्या राजकीय ग्रंथालयात असल्याचे कळते. [ज. स्मा. ग्रं.]

ज्योतिर्लिंग

भारतातील बारा प्रमुख शिवस्थाने. यांची नावे आणि स्थाने शिव पुराणातील पुढील श्लोकात दिलेली आहेत —

सौराष्ट्रे सोमनाथं च श्रीशैले मल्लिकार्जुनम् ।
उज्जयिन्यां महाकालं ओंकारममलेश्वरम् ।।
हिमालये तु केदारं डाकिन्यां भीमशंकरम् ।
वाराणस्यां च विश्वेशं त्र्यम्बकं गौतमीतटे ।।
परल्यां वैद्यनाथं च नागेशं दारुकावने ।
सेतुबन्धे तु रामेशं घृष्णेशं च शिवालये ।।

अर्थ— सौराष्ट्रात (वेरावळजवळ) सोमनाथ, श्रीशैलावर (आंध्र प्रदेशात) मल्लिकार्जुन, उज्जयिनीत महाकालेश्वर, (नर्मदातटाकी ओंकारमांधाता येथे) ओंकार व अमलेश्वर, हिमालयात केदारनाथ, डाकिनी क्षेत्रात (ता. खेड, जि. पुणे) भीमाशंकर, वाराणसीमध्ये विश्वेश्वर, गोदावरीकाठी (नाशिकजवळ) त्र्यंबकेश्वर, परळी (जि. बीड, मराठवाडा) येथे वैद्यनाथ, दारुकावनात (औंढा, जि. परभणी, मराठवाडा) नागनाथ, सेतुबंधाजवळ रामेश्वर आणि शिवालय क्षेत्रात (वेरुळ, जि. औरंगाबाद, मराठवाडा) घृष्णेश्वर.

या बारा ज्योतिर्लिंगांपैकी वैद्यनाथ आणि नागनाथ यांच्या स्थानांसंबंधी निरनिराळ्या प्रदेशांत निरनिराळी मते आहेत. ‘परल्यां वैद्यनाथं च’ याऐवजी ‘वैद्यनाथं चिताभूमौ’ असा विभिन्न स्थलनिर्देश करणारा पाठही प्रचलित आहे. वैद्यनाथाचे हे दुसरे स्थान बंगालमधील संथाल परगण्यात पूर्व रेल्वेवरील जसीडीह स्टेशनापासून तीन मैल अंतरावर आहे. हे स्थान “वैद्यनाथधाम’ या नावाने ओळखले जाते. इथे शिवाने सतीच्या हृदयभागाचा दाहसंस्कार केला, म्हणून हे स्थान चिताभूमी बनले, अशी कथा प्रचलित आहे. उत्तर भारतातील बहुतेक लोक या स्थानालाच ज्योतिर्लिंग असे मानतात. परंतु सिद्धान्तशिरोमणीमध्ये कन्याकुमारीपासून मेरूपर्वतापर्यंत जाणाऱ्या भूमध्यरेषेवरील जी क्षेत्रे नोंदवली आहेत, त्यांत पर्यली (परळी) क्षेत्राचा उल्लेख केला आहे. शंकराचार्यांच्या नावावरील द्वादश ज्योतिर्लिंगस्तोत्रात वैद्यनाथाचे स्थान प्रज्वलिकानिधान या नावाने उल्लेखिले आहे. हे नाव ध्वनिसाम्याने

जसे परळीशी जुळणारे आहे, तसेच अर्थसाम्याने (जळणाऱ्या–प्रज्वलिका – सतीचे क्षेत्र) चिताभूमीशीही जुळणारे आहे. परंतु 'पूर्वोत्तरे प्रज्वलिकानिधाने' असा स्पष्ट दिशानिर्देश असल्यामुळे या स्तोत्रकाराला बंगालमधील वैद्यनाथधामच अभिप्रेत असावे, असे वाटते.

द्वारकाक्षेत्रवर्णनात 'नागेशं द्वारकावने' असा पाठ आहे. द्वारकाक्षेत्रातील नागेशाचे स्थान गोपीतलावाजवळ आहे. द्वारकाक्षेत्राजवळ वने असल्याचा पुरावा पुराणामध्ये नाही. तसेच आज प्रत्यक्षातही तिथे वन नाही. नागेशाच्या स्थानाबद्दल तिसरे मत असे आहे, की हिमालयात अल्मोड्यापासून सतरा मैलांवर असलेला जागेश्वर हाच नागेश्वर होय. डोंगरी भाग असल्यामुळे हा दारुकावन या संज्ञेला सर्वांशाने पात्र ठरतो. उत्तर भारतातील अनेक लोक जागेश्वरालाच नागेश्वर ज्योतिर्लिंग मानतात.

ज्योतिर्लिंगांच्या मूळ स्वरूपासंबंधी व उत्पत्तीसंबंधी अनेक मते प्रचलित आहेत. काहीजण ज्योतिर्लिंग म्हणजे व्यापक ब्रह्मात्मलिंग किंवा व्यापक प्रकाश असा अर्थ करतात.

तैत्तिरीय उपनिषदात ब्रह्म, माया, जीव, मन, बुद्धी, चित्त, अहंकार, आकाश, वायू, अग्नी, जल व पृथ्वी या बारा तत्त्वांना ज्योतिर्लिंगे म्हटले आहे.

काही लोक बारा ज्योतिर्लिंगे म्हणजे शिवलिंगाचे बारा खंड आहेत असे मानतात. कुठे असेही सांगितले जाते, की शिव मोहिनीच्या रूपावर मोहित होऊन तिच्या मागे धावत सुटला असताना जिथे जिथे त्याचे रेतस्खलन झाले, तिथे तिथे ज्योतिर्लिंगे निर्माण झाली.

श्री. भा. आ. मुळे यांच्या मते ज्योतिर्लिंग हे यज्ञप्रतीक आहे. ज्योती म्हणजे यज्ञशिखा आणि लिंग म्हणजे चिन्ह किंवा प्रतीक. शिवलिंगातील शाळुंका ही यज्ञवेदीची द्योतक असून, वरचे लिंग हे यज्ञशिखेचे द्योतक आहे. ज्योतिर्लिंग संज्ञेच्या या स्पष्टीकरणानुसार प्रत्येक शिवलिंग हे ज्योतिर्लिंगच मानावे लागेल. पण ज्योतिर्लिंगांची संख्या तर बाराच मानली जाते. रुद्रांच्या संख्येचा विचार केला, तर ती बारा नसून अकराच आहे. या अडचणीतून वाट काढण्यासाठी बारा ज्योतिर्लिंगे ही द्वादश आदित्यांची प्रतीके होत, असे स्पष्टीकरण काही अभ्यासक देतात.

वैज्ञानिक दृष्टीचे अभ्यासक असे सांगतात, की ज्योतिर्लिंगे ही आज सुप्तावस्थेत असलेली ज्वालामुखीची उद्रेकस्थाने होत.

हिमालयापासून सेतुबंधापर्यंत सर्व भारतात विखुरलेली ही बारा प्रमुख शिवस्थाने गेली कित्येक शतके यात्रिकांनी अत्यंत पवित्र तीर्थस्थाने मानलेली आहेत. भारताच्या सांस्कृतिक एकात्मतेची घडण करण्यात या स्थानांचा विशेष वाटा आहे. [शिवलिंगोपासना; ज्योतिर्लिंग; कल्याण-शिवांक]

ज्योतिष

एक वेदांग. 'ज्योतिषामयनं चक्षुः' (= ज्योतिष हा वेदांचा डोळा आहे) असे याच्या विषयी म्हटले आहे. कालविधानशास्त्र म्हणून या अंगाची निर्मिती झाली, असे वेदांग ज्योतिषात म्हटले आहे–

वेदा हि यज्ञार्थम भिप्रवृत्ताः कालानुपूर्वा विहिताश्च यज्ञाः।
तस्मादिदं कालविधानशास्त्रं यो ज्योतिषं वेद स वेद यज्ञान्॥

अर्थ – यज्ञानुष्ठानासाठी वेदांची प्रवृत्ती झालेली आहे. यज्ञांचे अनुष्ठान हे कालाधीन असते. म्हणून जो विद्वान कालविधानशास्त्र जाणतो, तो यज्ञवेत्ता होतो.

या श्लोकात वेदांग ज्योतिषाचा उद्देश स्पष्ट केलेला आहे. वैदिक आर्यांना यज्ञयागांसाठी दिक्, देश व काल यांच्या ज्ञानाची गरज होती. 'देशकालौ स्मृत्वा' (= प्रत्येक कार्याच्या आधी देश कालांचे स्मरण करावे), असे सांगितलेले असते. कोणत्या देशात हे धर्मकृत्य केले जाते, त्याचाही उल्लेख संकल्पाच्या आरंभी आवश्यक असतो. यज्ञातले कुंड–मंडप निर्माण करण्याच्या कामी दिशा समजून घ्याव्या लागतात. विशिष्ट नक्षत्रांवर विशिष्ट विधी विहित असतात. हे कालज्ञान होण्यासाठी आकाशातील नक्षत्रे व ग्रह यांच्या गति–स्थितीचे ज्ञान आवश्यक असते आणि यासाठीच वेदांग ज्योतिषाची प्रवृत्ती झालेली आहे.

ऋग्वेद ज्योतिष, यजुर्वेद ज्योतिष व अथर्व ज्योतिष अशी तीन वेदांग ज्योतिषे उपलब्ध आहेत.

ऋग्वेद ज्योतिष – लगध हा याचा कर्ता असून, यात ३६ श्लोक आहेत. हे ऋग्वेदी ब्राह्मणांच्या पठणात असते. या ग्रंथावर सोमाकर नामक पंडिताने भाष्य लिहिले आहे.

यजुर्वेद ज्योतिष – याचा कर्ता शेष हा असून, यात ४४ श्लोक आहेत. ऋग्वेद ज्योतिषातले ७ श्लोक प्रस्तुत ग्रंथात नसून, प्रस्तुत ग्रंथातले १४ श्लोक ऋग्वेद ज्योतिषात नाहीत.

वरील दोन्ही ज्योतिषग्रंथांचा सारांश पुढीलप्रमाणे –

वेदांगकालात पाच वर्षांचे युग मानले जात होते. कल्पना अशी होती, की पाच वर्षांनंतर सूर्य–चंद्र–नक्षत्रे परत आपल्या मूलस्थानी येतात आणि कालचक्र पुरे होते. ज्या ऋतूत दिवस सर्वांत लहान होतो, त्या ऋतूतल्या अमावास्येला युगारंभ होतो आणि चंद्र हा त्या दिवशी श्रविष्ठा (धनिष्ठा) नक्षत्रात असतो. या पंचवर्षात्मक युगात ६२ चांद्रमास व १८३० अहोरात्र होतात. या कालखंडामध्ये सूर्याची सुमारे ५ आणि चंद्राची ६७ भ्रमणे होतात. तसेच या कालखंडामध्ये नक्षत्रेही १८३५ वेळा पृथ्वीच्या भोवती फिरतात. चंद्र–सूर्याची युती (अमावास्या) व त्या

दोघांत सहा राशींचे अंतर (पौर्णिमा) ही पर्वे होत. पंचवार्षिक युगात अशी १२४ पर्वे होतात. प्रत्येक पर्वात १५ तिथी असतात. युगाच्या पाचव्या भागाला वर्ष अशी संज्ञा आहे. एका वर्षात ३६६ अहोरात्र होतात. एका वर्षाचे दोन समभाग म्हणजे अयने होत. प्रत्येक अयनाच्या मध्ये येणाऱ्या दिवसाला विषुव म्हणतात. वर्षाच्या सहाव्या भागाला ऋतू असे म्हणतात.

सूर्य-चंद्र धनिष्ठा नक्षत्राच्या पहिल्या भागाजवळ एकदम उदय पावतात, तेव्हा उत्तरायणाला आणि ते आश्लेषांच्या अर्ध्या भागात एकदम उगवतात, तेव्हा दक्षिणायनाला सुरवात होते. हे अयनारंभ अनुक्रमे माघ व श्रावण या महिन्यांत होतात. एका ऋतूत सूर्य ४½ नक्षत्रे भोगतो. स्थूल मानाने १२⅓ एवढ्या सावन दिवसांत सूर्य एक नक्षत्र भोगतो.

गणित साधे, सोपे बनवण्यासाठी हे कालविभाग मानलेले आहेत आणि ते स्वाभाविक कालविभागाशी बऱ्याच प्रमाणात मिळते जुळते आहेत. क्रांतिवृत्ताच्या २७ सारख्या विभागांना नक्षत्र अशी संज्ञा आहे. सामान्यपणे चंद्र एका नक्षत्रात एक दिवस राहतो. त्याच प्रकारे सूर्य प्रत्येक तिथीत ९ अंश भोगतो. अहोरात्राच्या १२४ भागांना दिनांश असे नाव आहे.

साधारण रीत्या प्राचीन काळी अहोरात्राचे ३० मुहूर्त किंवा ६० नाड्या मानल्या जात होत्या. नाडी म्हणजेच घटिका होय. घटिका समजण्यासाठी तेवढ्या काळात भरणारे एक पात्र तयार करीत व त्याला छिद्र पाडून ते पाण्यात टाकीत. पात्र भरून ते पाण्यात बुडाले, की एक घटिका झाली, असे म्हणत.

पौर्णिमा आणि अमावास्या हीच काय ती मासगणनेची दृश्य साधने त्या वेळी अस्तित्वात होती. त्यामुळे वर्षाचे बारा मास हा स्थूल नियम प्रथम बसवला गेला. पण वर्षाचे चांद्र व सौर वर्ष असे दोन प्रकार मानले गेले. सूर्याचे वर्ष आर्तव (ऋतूंना धरून) असते आणि चंद्राचे वर्ष पार्वण (पौर्णिमा, अमावास्या, ही पर्वे धरून) असते. बारा अमावास्या आणि बारा पौर्णिमा झाल्या तरीही आर्तव वर्ष अपुरेच राहते, असे आढळून आल्यामुळे दर तीस महिन्यांनी एक अधिक मास स्वीकारण्याची पद्धत सुरू झाली. माघ किंवा श्रावण हेच अधिक मास धरीत. पुढे नैसर्गिक नियमांची जास्त सूक्ष्मता झाल्यावर बत्तीस महिन्यांनी एक अधिक मास धरला जाऊ लागला.

वेदांग ज्योतिषाच्या कालात लोक हिवाळा, उन्हाळा व पावसाळा असे तीनच ऋतू मानीत. हा प्रत्येक कालविभाग चार महिन्यांचा असे. वर्षा ऋतूच्या चार महिन्यांत हवामानात काही फरक पडत नसे. पण बाकीच्या दोन ऋतूंत उष्णतामानातील कमी-जास्तपणा जाणवत असे. म्हणूनच दोन दोन महिन्यांचे चार ऋतू आणि पावसाळा हा चार महिन्यांचा एक ऋतू, असे पाच ऋतू मानले जाऊ लागले.

हे ज्योतिष पंचांग साधनेसाठी निर्माण झाले आहे.

अथर्व ज्योतिष – यात १६२ श्लोक व १४ प्रकरणे आहेत. हे पितामहाने काश्यपाला सांगितले आहे. यात निमेष, लव, कला, त्रुटी, मुहूर्त व अहोरात्र अशी कालमाने सांगितली आहेत. पुढे रौद्र, श्वेत, मैत्र, इ. १५ मुहूर्त सांगितले आहेत. कोणत्या मुहूर्तावर कोणती कर्मे करावी, तेही सांगितले आहे. जन्म, कर्म, आधान, संपत्कर, इ. नक्षत्राचे वर्गभेद सांगितले आहेत. यात सूर्यादी सात वारांची नावे आली असून, ग्रह, उल्का, विद्युत्, इ. गोष्टींनी नक्षत्रे पीडित झाली असता उत्पन्न होणारे भयही सांगितले आहे.

हे अथर्व ज्योतिष ऋक्-यजूंच्या ज्योतिषाइतके प्राचीन नाही, हे त्यातील विषयांवरून कळून येते. तरीही ते पुष्कळच प्राचीन आहे.

वारांची कल्पना निश्चित झाल्यानंतर आणि मेषादी राशींचे ज्ञान होण्यापूर्वी हा ग्रंथ निर्माण झाला असावा. [वे. शा. दी.; हिंदुत्व; भा. ज्यो. शा.]

(२) एक जात. हे नाव व्यवसायावरून पडलेले आहे. हे लोक काश्मीरमध्ये आढळतात. प्राचीन काळी पूर्वेकडील ज्योतिष जातीचे लोक प्राग्ज्योतिष म्हणून ओळखले जात. उत्तरेतील ज्योतिष जात गंगा-यमुनांच्या दोआबात कुठेतरी राहत असावी. [ए. से. ए. इं.]

ज्योतिषरत्नमाला

आद्य मराठी ग्रंथ. हा एक मुहूर्तविषयक ग्रंथ आहे. याचा कर्ता श्रीपतिभट्ट (इ. स. च्या ११ व्या शतकाचा पूर्वार्ध) हा प्रसिद्ध ज्योतिर्विद असून, त्याने याच नावाच्या आपल्या संस्कृत ग्रंथावर लिहिलेली ही मराठी गद्य टीका आहे. या ग्रंथात गृहारंभ, गृहप्रवेश, देवप्रतिष्ठा, चौलकर्म, मौंजीबंधन, विवाह, राज्याभिषेक, युद्धासाठी राजाचे प्रस्थान, इ. कार्यासाठी शुभाशुभ कालाची चर्चा केलेली आहे.

या ग्रंथाचा विषय शास्त्रीय असूनही त्याची भाषा अनेक स्थळी अलंकृत आहे. साधे पण अर्थवाही शब्द, सुटसुटीत वाक्यरचना, शब्दांचा संयत वापर, इ. वैशिष्ट्यांनी युक्त अशी श्रीपतीची भाषाशैली आहे. पुढील एका उताऱ्यावरून श्रीपतिभटाच्या अल्पाक्षररमणीय शैलीची वैशिष्ट्ये दिसून येतील–

पूर्वी समरांगणी दैत्यें देवांसि जिंतिले ॥ तेथुन भद्रा जन्मली ॥ गाढवाचे जैसे मुख विस्तीर्ण । तीन पाय ॥ सात भुजा ॥ सिंहाच्या सारिखा गळा ॥ खांदी केश ॥ पाठिपोट येकच असे ॥ प्रेतासन ॥ मग समस्त दैत्य मारिले ॥ मग देव

संतोषले ।। मग करणाचा अंतीं स्थापिली ।। अचळपद दीधले ।। ते भद्रा म्हणिजे ।।

या ग्रंथाच्या रचनेनंतर चारशे वर्षांनी झालेल्या त्याच्या नकला आज उपलब्ध आहेत. त्यात मूळ ग्रंथाच्या भाषेवर नकलकारांच्या वेळच्या भाषेचा परिणाम झाला असला, तरीही इ. स. च्या ११ व्या शतकातील मराठीच्या भाषिक विशेषांची आणि अभिव्यक्तिसामर्थ्याची कल्पना येण्याला हा ग्रंथ अत्यंत उपयुक्त ठरतो. पाहा– श्रीपतिभट्ट. [ज्योतिषरत्नमाला]

ज्योतिषशास्त्र

आकाशस्थ ज्योतीसंबंधाचे शास्त्र. द्युत् = प्रकाशणे, या धातूपासून ज्योती शब्द बनला आहे. ज्योती म्हणजे नभोवितानात प्रकाशित होणारे ग्रहनक्षत्रादी तेजोगोल होत. ज्योतिषशास्त्र हे या संबंधीच्या गणिताचे, वेधाचे आणि कालज्ञानाचे शास्त्र आहे. शुक्ल यजुर्वेदात या शास्त्राला नक्षत्रदर्श व छांदोग्य उपनिषदात नक्षत्रविद्या, असे म्हटले आहे (शु. य. ३०.१०; छांदो. ७.१.२).

नक्षत्रांचे आणि ग्रहांचे आकाशात स्थान कोणते; पृथ्वीवरील कोणत्या ठिकाणाहून ग्रह-नक्षत्रे कशी दिसतात; त्यांचे उदयास्त केव्हा होतात; ती सूर्याच्या तेजात कधी लुप्त होतात किंवा त्यातून कधी मुक्त होतात; ग्रहणे कशी व केव्हा लागतात; ग्रहांचे पृथ्वीपासून व परस्परसापेक्ष अंतर किती; नक्षत्रे, आकाशगंगा, धूमकेतू यांचे स्वरूप काय, इ. आकाशातल्या घटना गणित, वेध, छायाचित्रे, प्रकाशलहरींची चिकित्सा, इ. गोष्टींनी ठरवणे हे या शास्त्राचे काम आहे.

अवकाशात नक्षत्रे स्थिर असतात. त्यांचे एकमेकांपासून सापेक्ष अंतरही निश्चित असते. उदा० आकाशात जे मृगनक्षत्र दिसते, त्याच्या पोटात तीन ठळक तारका एकाच रेषेत आहेत. त्यांच्या मागे व पुढे दोन दोन ठळक तारका आहेत. मुखाच्या जागी तीन आणि पुच्छाच्या जागी आणखी काही मंदप्रभ तारका आहेत. ही मृगाची आकृती हजारो वर्षांपूर्वी जशी दिसत होती, तशीच ती आजही दिसते. ग्रह मात्र आपापली स्थाने बदलत असतात. चंद्र आज एका तारकेजवळ असेल, तर दुसऱ्या दिवशी दुसऱ्याच तारकेजवळ दिसेल. भौमादी ग्रहांचाही स्थानबदल झालेला दिसतो. नक्षत्रांचा मात्र तसा तो दिसत नाही. कोणत्याही खस्थ गोलाचे स्थान पुरतेपणी लक्षात येण्यासाठी पुढील तीन गोष्टी समजाव्या लागतात–

(१) विशिष्ट तारका विशिष्ट तारकेच्या कोणत्या विशिष्ट दिशेस आहे;

(२) पृथ्वीवरील पाहणाऱ्याचे स्थान बदलले असता, त्या गोलाची इतर गोलांशी सापेक्ष दिशा कशी बदलते; व

(३) पाहण्याची वेळ बदलली म्हणजे त्या तेजोगोलाचे स्थान कसे बदलते.

ग्रहांचे व ताऱ्यांचे अशा तीन प्रकारांनी गणित करावे लागते; म्हणून ज्योतिगणिताला त्रिप्रश्न गणित असे नाव पडले.

भारतात या ज्योतिषशास्त्राचा उगम प्राचीन काळीच झाला आहे. वेदाच्या सहा अंगांत भारतीयांनी ज्योतिषाची गणना केली आहे. नारदसंहितेत भारतीय ज्योतिषशास्त्राचा उद्देश सांगितला आहे, तो असा–

विनैतदखिलं श्रौतस्मार्तं कर्म न सिद्धयति ।
तस्माज्जगद्धितायेदं ब्रह्मणा रचितं पुरा ।।

(नारद सं. अ. १)

अर्थ – ज्योतिषावाचून श्रौतस्मार्त कर्मे सिद्ध होत नाहीत. म्हणन (कालज्ञानाच्या रूपाने) जगाच्या हितासाठी हे ज्योतिषशास्त्र प्राचीनकाली ब्रह्मदेवाने निर्माण केले.

सुशिक्षित असो वा अशिक्षित असो, सभ्य असो वा रानटी असो, प्रत्येक माणसाला ज्योतिर्विषयक काहीतरी ज्ञान असणे किंवा ते ज्ञान प्राप्त करून घेणे आवश्यक ठरते. वन्य जमातींतही कित्येकांना ग्रहनक्षत्रांचे काही स्थूल ज्ञान असतेच. निरनिराळ्या नक्षत्रांच्या स्थितीवरून ते रात्रीचा प्रहर कोणता आहे, हे स्थूल मानाने ठरवतात. शेतकऱ्याला आणि पुरोहिताला तर ज्योतिषाचे ज्ञान अत्यावश्यकच होय. पाऊसकाळ केव्हा सुरू होईल आणि केव्हा थांबेल, ते जाणून घेऊनच शेतकरी आपल्या शेतकामाची आखणी करू शकतो. पुरोहितांनाही कालज्ञानासाठी ज्योतिषशास्त्राची गरज असते. प्राचीन काळी वैदिक लोक दीर्घकालीन गवामयनादी सत्रे, दर्शपौर्णमासादी याग आणि अष्टका, अन्वष्टका, महालय, इ. पितृयाग या गोष्टी करीत. त्यांच्या सिद्धीसाठी वर्षाचा आरंभ केव्हा होतो, ते केव्हा संपते, वर्षाचे दिवस किती, आजमितीस नक्षत्र कोणते आहे, इ. गोष्टींचे ज्ञान अत्यावश्यक असे. या जिज्ञासेतून व गरजेतूनच ज्योतिषशास्त्राचा उगम झाला आणि कालक्रमाने त्याचा विकास होत गेला. त्यात गणिताची सूक्ष्मता आली आणि वेधादी गोष्टींनी ग्रहनक्षत्रांच्या स्वरूपाविषयीही ज्ञान झाले.

कालज्ञान म्हणजे मुख्यत्वे अहोरात्र, मास आणि वर्ष यांचे ज्ञान होय. कालशास्त्राचे हे तीन घटकच मानलेले आहेत. पृथ्वीवरच्या आदिमानवाला दिवसामागून रात्र आणि रात्रीमागून दिवस येतो, हे ज्ञान प्रथम झाले असेल आणि तो अहोरात्राने कालाची संख्या मोजू लागला असेल. उदा० जन्मलेले मूल आज एका दिवसाचे झाले, उद्या दोन दिवसांचे, काही कालाने दहा दिवसांचे, वीस दिवसांचे झाले, असे तो त्या मुलाचं वयोमान ठरवीत असेल. पण विशिष्ट संख्येनंतर अशा प्रकारे गणित

करणे आणि ते लक्षात ठेवणे या गोष्टी त्याला अशक्य झाल्या असतील. म्हणून त्याला दुसऱ्या कोणत्यातरी कालमापक घटकाची गरज निर्माण झाली.

तो रोज रात्री आकाशाकडे पाहत असे. या सतत निरीक्षणात त्या प्राचीन मानवाला असे दिसून आले की, आपण जो चंद्र पाहतो, तो नित्य घटतो किंवा वाढतो. विशिष्ट रात्री तो चक्रासारखा वाटोळा दिसतो आणि विशिष्ट रात्री तो मुळीच दिसत नाही. हे चंद्राचे पूर्णता पावणे आणि अदृश्य होणे यांमधील काल पंधरा पंधरा दिवसांचा होतो, हे त्याने जाणले. एकदा चंद्र पूर्ण गोलाकार दिसल्यानंतर पुन्हा तो तसाच तीस दिवसांनी दिसतो, असे त्याने दिवस मोजून ठरवले आणि चंद्राच्या या क्षय–वृद्धीवरून त्याला मास नावाचा कालाचा दुसरा घटक सापडला. मग तो आपल्या मुलाचे वयोमान मासगणनेने सांगू लागला. पण ही मासगणनाही जसजशी वाढू लागली, तसतशी ती मोजायला आणि ध्यानात ठेवायला गैरसोईची होऊ लागली. तेव्हा याहून मोठा एखादा कालाचा घटक शोधावा, असे त्याला वाटले आणि तो वर्ष या रूपाने त्याला मिळाला.

वर्ष म्हणजे वर्षाव अथवा पाऊसकाळ होय. तो किती महिन्यांनी येतो, हे त्याने दीर्घ कालपर्यंत महिने मोजून ठरवले आणि त्या अनुभवातून त्याने निश्चित केले, की पाऊस काळ दर बारा महिन्यांनी येत असतो. हा बारा मासांचा काल त्याने वर्षाऋतूला धरून मापला; म्हणून त्याला वर्ष असे नाव पडले. प्राचीन काळी मनुष्य वर्षा ऋतूपासूनच वर्षारंभ मानीत असे. अशा प्रकारे प्राचीन मानवाला स्थूल गणित आणि दृश्य अनुभव यांच्या द्वारे कालाचे वरील तीन्ही घटक सापडले. त्यांचे कोष्टकही तयार झाले. ते असे – तीस अहोरात्र = एक मास व बारा मास = एक वर्ष.

ज्योतिषाला कालविधानशास्त्र म्हटले, ते यासाठी. अशा प्रकारे दिवस, मास आणि वर्ष यांच्या स्थूल ज्ञानावरूच मानवाने शेकडो वर्षे आपले काम भागवले असेल. पण कालक्रमानुसार माणसाला अनेक नव्या नव्या गरजा उत्पन्न झाल्या आणि तो हळू हळू कालज्ञानाचे सूक्ष्म गणित करू लागला. हे गणित करताना त्याला समजले, की एका महिन्यात बरोबर तीस दिवस नसतात. इतकेच नव्हे; तर वर्षाचे अहोरात्रही सारख्या मापाचे नसतात. वस्तुतः महिन्याचे तीस दिवस न होता २९½ दिवसच होतात. त्यामुळे तीस दिवसांचा महिना असा वर्षाचा हिशोब केला, तर त्या दिनसंख्येत सहा दिवसांचे अंतर पडते. म्हणजे वर्ष हे वास्तव वर्षापेक्षा सहा दिवसांनी पुढे जाते. पूर्णिमेपासून तीस दिवस म्हणजे एक महिना, अशा प्रकारे बारा महिने मोजले, तर त्या तिथीस आकाशात पूर्ण चंद्राच्या ऐवजी खंडित चंद्रच असेल. तेव्हा सर्व महिन्यांचे तीस दिवस मानणे हे चूक आहे, असे त्याच्या निदर्शनास आले. म्हणून मग त्या प्राचीन काळचे ज्योतिषी वर्षातले काही महिने २९ दिवसांचे मानू लागले असण्याची शक्यता आहे. मात्र त्या काळी त्या संबंधात कोणता नियम ठरवलेला होता, ते समजायला आज तरी मार्ग नाही.

बहुत कालपर्यंत माणूस पावसावरूनच वर्षांची गणना करी आणि पाऊस पडण्यात पंधरा दिवस आगेमागे होणे, ही अगदी नामुली गोष्ट होती. तेव्हा वर्षाचे जे काही महिने असतील त्यांची संख्या बारा महिन्याच्या जवळपास आहे, एवढेच त्याला समजले होते आणि त्याने बारा मासांचे एक वर्ष असे ठरवून टाकले होते. पण या स्थूल गणिताने निश्चित कालज्ञान होईना. बारा महिन्यांच्या गणिताने तीन वर्षानंतर त्या महिन्यात पाऊसकाळ येईना. त्यात सुमारे एक महिन्याचे अंतर पडू लागले. अशा प्रकारे कालगणना आणि प्रत्यक्ष ऋतुमान यांचा जेव्हा मेळ बसेनासा झाला, तेव्हा त्याने तीन वर्षांत एक महिना अधिक धरण्याचे ठरवले आणि या पद्धतीने कालगणनेचा ऋतुचक्राशी मेळ बसवला. अनुभवांती त्याला असे समजून आले, की महिने हे चंद्राच्या गतीवर अवलंबून असतात; तर ऋतुमान हे सूर्याच्या गतीवर अवलंबून असते. या चांद्र–सौर गतींचा समन्वय करण्याची गरज आहे, असे त्याला वाटले व त्याने अधिक मासाची योजना करून तो समन्वय साधला. हा समन्वय ऋग्वेदकाली किंवा त्याच्याही आधी साधला गेला असावा. कारण अधिक मास वैदिक ऋषींना ठाऊक होता, हे पुढील ऋचेवरून कळते –

वेद मासो धृतव्रतो द्वादश प्रजावतः । वेदा य उपजायते ।।

(ऋ. १.२५.८)

अर्थ – धृतव्रत (वरुण) हा बारा महिने व त्यांत उत्पन्न होणारे प्राणी जाणतो. तसेच बारा मासांच्या जवळ उत्पन्न होणारा जो (अधिकमास) त्याला जाणतो.

अधिक मास सरासरी मानाने ३२ ते ३३ महिन्यांनी पडतो. वेदांगज्योतिषाच्या रीतीप्रमाणे तो ३० महिन्यांनी धरला जात असे. ऋग्वेदकालात अधिक मास किती महिन्यांनी धरीत, ते समजत नाही. मात्र त्याबद्दल काहीतरी नियम असलाच पाहिजे.

ज्योतिषशास्त्रासंबंधीचे विचार कसकसे प्रगत होत गेले, त्याचा मागोवा ऋग्वेदापासून घेता येईल.

वैदिक काल – वैदिकांनी या विश्वाचे पृथिवी, अंतरिक्ष व द्यौ असे तीन भाग कल्पिलेले दिसतात ––

नाभ्या आसीदन्तरिक्षं शीर्ष्णो द्यौः समवर्तत ।
पद्भ्यां भूमिर्दिशः श्रोत्रात् तथा लोकाँ अकल्पयन् ।।

(ऋ. १०. ९०.१४)

अर्थ – त्या विराट पुरुषाच्या नाभी, मस्तक. पाय आणि कान यांच्यापासून अनुक्रमे अंतरिक्ष, द्यौ, भूमी, दिशा व लोक निर्माण झाले, अशी (देवांनी) कल्पना केली.

उडणाऱ्या पक्ष्यांचा मार्ग म्हणजे अंतरिक्ष होय (ऋ. १. २५. ७). सूर्य हा द्युलोकाच्या अत्युच्च प्रदेशातून संचार करतो (ऋ. १. ५०. ११). सूर्य द्युलोकी आणि चंद्र नक्षत्रमंडलात संचार करतो (तै. सं. ७. ५. २३. १). पृथ्वीची एकंदर विश्वाशी तुलना केली असता ती फार लहान आहे आणि विश्व अपार आहे, अशी कल्पनाही ऋग्वेदात आहे (१. ५२. ११). सकळ भुवनांना सूर्याचा आधार असतो, असेही एका ठिकाणी सांगितले आहे (१. १६४. २). ऋतूंनाही कारण सूर्यच असतो, हे पुढील अर्ध्या ऋचेवरून कळून येईल –

पूर्वामनु प्र दिशं पार्थिवानामृतून् प्रशासद्वि दधावनुष्ठु ।।
(ऋ. १. ९५. ३)

अर्थ – (तो सूर्य) ऋतूंचे नियमन करून पृथ्वीच्या पूर्वादी दिशा एकामागून एक निर्माण करतो.

कालमान या अर्थी युग हा शब्द ऋग्वेदात अनेकदा आला आहे (१०. ७२. ३; १. १०३. ४; ५. ५२. ४, इ.). विशिष्ट गोष्ट विशिष्ट क्रमाने एकदा घडल्यावर ती तशाच कालक्रमाने पुनश्च घडण्याचे जे एक कालपरिमाण ते युग होय, अशी युग शब्दाची व्याख्या श्री. शं. बा. दीक्षित यांनी सांगितली आहे.

वेदांगज्योतिषात पाच वर्षांचे एक युग मानलेले आहे. प्रत्येक युगात १८३० अहोरात्र होतात व ६२ चांद्र मास होतात, असे तिथे सांगितले आहे. वैदिक काली पंचवर्षात्मक युगपद्धती अस्तित्वात असावी, असे त्यावरून दिसते. ३५४ दिवस, ३६५ दिवस किंवा असाच काहीतरी काल याचा वाचक असलेला वर्ष हा शब्द ऋक्–यजुःसंहितात आढळत नाही. तो शतपथ ब्राह्मणात आढळतो. वर्ष या अर्थी ऋग्वेदात शरद् असा शब्द आला आहे. त्याच अर्थी समा असाही शब्द आढळतो (ऋ. १०. ८५. ५).

दिवस समजण्याचे स्वाभाविक साधन जसे दोन सूर्योदयांमधील काल; मास समजण्याचे स्वाभाविक साधन जसे चंद्र दोन वेळा पूर्ण होण्याच्या मधला काल; तसे वर्ष समजण्याचे स्वाभाविक साधन म्हणजे ऋतूंचा एक पर्याय होय. ऋतू जर नसते, तर वर्ष हे कालमान झालेच नसते. तेव्हा वेदकाली वर्ष हे सौरच मानीत असले पाहिजेत.

चांद्रवर्षाचे दिवस बरोबर ३६० नाहीत; ते काहीतरी कमी आहेत, ही गोष्ट वेदकालीच निरीक्षकांना समजून आली होती, असे दिसते. उत्सर्गिणामयनम् या नावाच्या एका सत्रात काही अह (दिवस) सोडण्याविषयी विचार आला आहे. चांद्रमासाचे मान सुमारे २९½ दिवस असल्यामुळे दोन मासांत ५९ दिवस होतील. दोन मास (६० दिवस) समाप्त होण्याच्या अगोदरच एक दिवस आधी चांद्रमास संपतो, असे वैदिकांना दिसू लागले आणि मग षडहापैकी (६ दिवस) एखादा दिवस सोडला पाहिजे, असे त्यांनी ठरवले. त्यावरूनच पुढे असे दिवस सोडणाऱ्या लोकांच्या उत्सर्गिणामयनम् या सत्राची प्रवृत्ती झाली, असे म्हणता येईल.

उत्तरायण व दक्षिणायन यांविषयी तैत्तिरीय संहितेत, सूर्य सहा महिने दक्षिणेस जातो व सहा महिने उत्तरेस जातो असे मोघम वचन आहे (६. ५. ३. ४). ऋग्वेदात शरद्, हेमंत, इ. ऋतूंची नावे अनेकदा आली आहेत; पण एकंदरीत ऋग्वेद संहितेत ऋतुमाहात्म्य फारसे दिसत नाही. अन्यत्र ‘ऋतू सहा’ असा निर्देश पुष्कळ ठिकाणी आढळत असला, तरी तै. ब्राह्मणात ‘ऋतू पाच’ असेही विधान आढळते (२. ७. १०). पाच ऋतू मानले असता हेमंत आणि शिशिर मिळून एक मानायचा असे ऐतरेय ब्राह्मणात म्हटले आहे (१. १). जिथे सहा ऋतूंचा निर्देश आहे, तिथे त्यांचा वसंतापासून प्रारंभ आहे. वसंत हा ऋतूंचे मुख होय, असे तै. ब्राह्मणात म्हटले आहे (१. १. २. ६). वर्षाच्या बारा महिन्यांना जशा मधू, माधव, इ. संज्ञा होत्या, तशा तै. ब्राह्मणात अरुणादी संज्ञा होत्या. चैत्रादी संज्ञा या मध्वादी संज्ञांनंतर दीर्घ कालाने प्रचारात आल्या. अमान्त व पूर्णिमान्त असे दोन्ही प्रकारचे मास मानण्याची पद्धत होती, असे दिसते. शुक्ल व कृष्ण असे मासाचे दोन पक्षही मानीत. चांद्र मासाचा तिसावा भाग किंवा सूर्य–चंद्रांमध्ये बारा अंश अंतर पडण्यास लागणारा काळ या अर्थी तिथी शब्द वेदात आढळत नाही. ऐ. ब्राह्मणात तिथीचे लक्षण दिले आहे, ते असे – जिच्या ठायी चंद्र अस्त पावतो आणि उगवतो, ती तिथी होय. पंचदशी असे पौर्णिमेचे नाव आहे. त्या अर्थी प्रतिपदा, द्वितीया या संज्ञाही प्रचारात असाव्या. चंद्राच्या कला वृद्धी आणि क्षय पावतात, याचे कारण देव त्यांचे प्राशन करतात, अशी कल्पना ऋग्वेदात आढळते (१०. ८५. ५). चंद्राला सूर्यापासून प्रकाश मिळतो, असे स्पष्ट विधान तै. संहितेत केलेले आहे (३. ४. ७. १).

यज्ञाच्या संबंधात अमावास्या व पौर्णमासी यांचे माहात्म्य फार आहे. त्या दोन तिथींना इष्टी करीत. चंद्र-सूर्यांच्या गतीविषयी वेदकालात जे काही संशोधन झाले असेल, ते वेदांगज्योतिषात परिणत स्वरूपात दिसते. ‘सन्धौ यजेत’ (= पर्वसंधीच्या वेळी यज्ञ करावा) व ‘सन्धिमभितो यजेत’ (= पर्वसंधीच्या सुमारास यज्ञ करावा) अशी वाक्ये वेदात येतात. तेव्हा पर्वसंधी केव्हा होतो, हे नक्की समजून घेण्याच्या दृष्टीने वैदिकांनी काही गणितागत नियम बांधले असलेच पाहिजेत

पूर्वाह्ण, प्रातः, संगव, मध्याह्न, अपराह्ण, आणि सायाह्न या दिवसाच्या भागांचे उल्लेख वेदामध्ये आडळतात (तै. ब्रा. ३. १२. ९. १; श. ब्रा. २. ४. २. ८; ऋ. ५. ७६. ३). दिवस-रात्रीचे मुहूर्तसंज्ञक प्रत्येकी पंधरा विभाग तै. ब्राह्मणात सांगितले आहेत (३. १०. ९). दिवसाचे घटी-पळे हे भाग-प्रभाग मात्र वेदात कुठे आढळत नाहीत.

नक्षत्र शब्द वैदिक वाङ्मयात आढळतो (ऋ. १.५०.२). तारकांना नक्षत्र असे म्हटले आहे. नक्षत्रांमध्ये सोम ठेवला आहे, असा उल्लेख ऋग्वेदात आहे (१०.८५.२). यात नक्षत्र शब्द चंद्रमार्गातल्या नक्षत्रांनाच लावलेला दिसतो. २७ नक्षत्रांपैकी सर्वांची नावे ऋग्वेदात आलेली नाहीत. तिष्य (पुष्य), चित्रा, रेवती, अघा (मघा), अर्जुनी (फल्गुनी) अशी काहीच नावे ऋग्वेदात आढळतात. कृष्णयजुर्वेदात मात्र कृत्तिकादी गणना धरून अभिजितासह अठ्ठावीसही नक्षत्रांची नावे त्यांच्या देवतांसह आलेली आहेत (तै. सं. ४.४.१०; तै. ब्रा. १.५.१).

तांड्य ब्राह्मणात सप्तर्षींचा (१.५.५) व ऋग्वेदात दोन दिव्य श्वानांचा उल्लेख आहे. हे दोन श्वान म्हणजे बृहत् व लघू लुब्धक असावेत.

ग्रहणांचा उल्लेख ऋग्वेदात आला आहे. त्यात स्वर्भानूने तमाच्या योगाने सूर्याला आच्छादिले, असे म्हटले आहे (ऋ. ५.४०). याच सूक्तात पुढे असे म्हटले आहे, की ‘ अत्री मात्र सूर्याला मिळवते झाले; इतर कोणी मिळवू शकले नाहीत. ’ याचा अर्थ असा दिसतो, की अत्रिकुलातल्या पुरुषांना त्या काळी ग्रहणाचे ज्ञान झाले होते. ग्रहणाचे स्पर्श–मोक्ष काळ सूक्ष्म सांगण्याइतके ज्ञान त्या काळी नसेल; पण २२३ चांद्रमासांनी तीच तीच ग्रहणे पुन्हा होतात, हे जसे प्राचीन खाल्डियन लोकांना माहीत झाले होते, तसेच ते अत्रिकुलातल्या पुरुषांनाही माहीत झाले असेल. शुक्रादी पंचग्रहांचे ज्ञानही वेदकाळीच झाले होते, असा तर्क शं. बा. दीक्षित यांनी केला आहे. (ग्रह पाहा)

वेद–वेदांगकाळात ज्योतिषशास्त्राचे ज्ञान कुठवर प्रगत झाले, याचे सार शं. बा. दीक्षित पुढीलप्रमाणे सांगतात :–

“ शकापूर्वी ५ हजार वर्षांच्या पूर्वीच नक्षत्रज्ञान झाले. अधिमास घालण्याची रीती त्याच सुमारास सुरू झाली असावी. मासगणना नेहमी चांद्र होती. ग्रहांचे ज्ञान शकापूर्वी ५ हजार वर्षे झाले होते. म्हणजे त्यांची भविष्यकालची स्थिती वर्तवता येत होती असे नाही, तर त्यांस गती आहे, हे समजून येऊन नक्षत्रसंबंधाने त्यांची स्थिती पाहू लागले होते. मध्वादी मासंसंज्ञा त्याच सुमारास सुरू झाल्या असाव्यात. चैत्रादी संज्ञा शकापूर्वी २ हजार वर्षांच्या सुमारास प्रचलित झाल्या. तोपर्यंत वर्ष सांपातिक (सायन) सौर होते. पुढे मात्र चैत्रादी संज्ञांमुळे ते नाक्षत्र (निरयन) सौर झाले; तथापि हेतुतः ते सायनच होते.

शतपथब्राह्मणातील कृत्तिकास्थितीच्या वाक्यावरून त्या स्थितीचा काल शकापूर्वी ३००० वर्षे हा आहे आणि वेदसंहिता त्याहून प्राचीन आहेत, याविषयी शंका घेण्यास आता जागा राहिलीच नाही.

वेदांगज्योतिषाचा काल सुमारे शकापूर्वी १५०० वर्षे हा होय. त्या वेळी दिवसाच्या ६० घटिका हे मान प्रचारात होते. सूर्यचंद्रांच्या मध्यम गती बऱ्याच सूक्ष्म माहीत झाल्या होत्या. सौरवर्षाचे मान चुकीचे होते. तरी ते सौरवर्ष प्रत्यक्ष प्रचारात आले होते; म्हणजे केवळ अधिक मास घालून सौरचांद्रवर्षांचा मेळ ठेवायचा, एवढीच स्थूल रीती होती असे नाही. वर्षाचे १२ सौरमासही प्रत्यक्ष प्रचारात होते. अर्थात क्रांतिवृत्ताचे बारा विभाग, त्या प्रत्येकाचे ३० विभाग (अंश), त्यांतील प्रत्येकाचे ६० विभाग (कला), ह्या पद्धतीचे बीज उत्पन्न झाले होते. आणि कालविभाग तेच क्षेत्रविभाग ही महत्त्वाची गोष्ट प्रचारात होती. यावरून वृत्ताचे राश्यंश, कला, विकला हे भाग हिंदूंनीच प्रथम कल्पिले असे मानण्यास जागा आहे. ग्रहांच्याही मध्यमगतिस्थितीचे ज्ञान वेदांगकालाच्या अंती झाले होते.

दुसरी महत्त्वाची पायरी म्हणजे स्पष्टगतिस्थिती. सूर्यचंद्रांच्या स्पष्टगतिस्थितीचे काहीसे ज्ञान झाले होते, असे १३ दिवसांच्या पक्षाच्या विचारात दाखविले आहे. ग्रहांची स्पष्टगतिस्थिती समजणे आणि ती काढता येणे ही गोष्ट सूर्यचंद्रांच्या स्पष्टस्थितीपेक्षा जास्त कठिण आहे. ती माहित झाली होती असे स्पष्ट प्रमाण सापडत नाही. तथापि ग्रहांच्या वक्रमार्गित्वाचा विचार होत असे, यावरून ग्रहमध्यमगतीपेक्षा स्पष्टगती अनियमित आहे, हे समजून आले होते. आणि यावरून स्पष्टग्रहगतिविचारही सुरू झाला असावा, असे अनुमान होते. वेदांगज्योतिषात सौरमास आहेत. भारतात संक्रांतीची अयन, विषुव, षडशीती ही नावे आहेत. यावरून वेदांगज्योतिषकालीच किंवा त्यानंतर लवकरच क्रांतिवृत्ताचा द्वादशधाविभाग प्रचारात आला होता. परंतु ग्रहस्थिती नक्षत्रावर सांगितलेली आढळते. यावरून ग्रहस्थिती बारा राशींच्या संबंधाने सांगण्याची पद्धती सुरू झाली होती, असे दिसत नाही.

मेषादी संज्ञा शकपूर्व ५०० च्या सुमारास प्रचारात आल्या. वार त्यापूर्वी आले. ते परदेशातून आले. ”

वेदांग ज्योतिषापैकी अथर्व ज्योतिषात वारांची नावे आली आहेत. त्याचप्रमाणे ग्रह, उल्का, विद्युत, इत्यादींनी नक्षत्रे पीडित झाली असता कोणती अरिष्टे उत्पन्न होतात, तेही सांगितले आहे. आश्वलायन गृह्यसूत्रात नक्षत्रप्रयुक्त माससंज्ञा आल्या आहेत. मनुस्मृतीच्या पहिल्या अध्यायात युगपद्धती वर्णिली

आहे आणि तीच बह्वंशी पुराणे आणि ज्योतिषग्रंथ यांनी स्वीकारली आहे. याज्ञवल्क्य स्मृतीत सांप्रतच्या क्रमानेच सात वारांची नावे आली आहेत. स्मृतिकाली ग्रहांच्या युती व गती यांच्या गणिताकडे ज्योतिर्विदांचे विशेष लक्ष वेधले होते. त्या युति–गतींवरून शुभाशुभ फल पाहण्याकडे त्यांचा कल होता, असे दिसते.

महाभारतात युगमाने मनुस्मृतीतल्या प्रमाणेच आहेत, पण वेदांग ज्योतिषातल्या पंचसंवत्सरात्मक युगपद्धतीचाही उल्लेख पांडव–जन्माच्या संबंधात आला आहे (म. भा. आदि. १२४). ऋतू, अयने, मघादी मास, तिथी, मुहूर्त यांचे उल्लेख महाभारतात वारंवार आले आहेत. २७ नक्षत्रांची सर्व नावे एकत्र अशी अनुशासन पर्वातल्या ६४ व ८९ या अध्यायांत आली आहेत. महाभारतकाळी ग्रहांची स्थिती नक्षत्रांना अनुसरून सांगत असत. या कालात सूर्य–चंद्रांच्या स्पष्टगतिस्थितीसंबंधी काही ज्ञान झाले होते व ग्रहांच्या स्पष्टगतीचा विचारही सुरू झाला असावा, असे अनुमान निघते.

यापुढचा ज्योतिषशास्त्राचा इतिहास त्रिस्कंध ज्योतिषाच्या स्वरूपात सांगितला पाहिजे. नारदाने ज्योतिषाचे हे तीन स्कंध पुढीलप्रमाणे सांगितलेले आहेत –

सिद्धान्तसंहिताहोरारूपस्कन्धत्रयात्मकम् ।
वेदस्य निर्मलं चक्षुर्ज्योतिःशास्त्रमनुत्तमम् ।।

अर्थ – ज्योतिषशास्त्र हे श्रेष्ठ असून, तो वेदांचा निर्मळ असा डोळा आहे. या शास्त्राचे सिद्धान्त, संहिता व होरा असे तीन स्कंध आहेत.

चरणव्यूहाच्या परिशिष्टात शौनकाने ‘ चतुर्लक्षं तु ज्यौतिषम् ’ (= ज्योतिषशास्त्र हे चार लक्ष श्लोकांचे आहे) असे सांगितले आहे. नारद, कश्यप व पराशर यांच्या संहितांत ज्योतिषशास्त्राचे प्रवर्तक म्हणून पुढील अठरा व्यक्तींची नामावळी दिली आहे – ब्रह्मा, सूर्य, वसिष्ठ, अत्री, मनू, सोम, लोमश, मरीची, अंगिरा, व्यास, नारद, शौनक, भृगू, च्यवन, यवन, गर्ग, कश्यप व पराशर.

सिद्धांतस्कंध – कालमापन, ग्रहांची गती आणि युती, ग्रहणे, वेध, इ. गोष्टींचे विवेचन सिद्धांतग्रंथात येते. याला गणितस्कंध असेही म्हणतात.

वेदांगज्योतिषानंतर सुमारे हजार–बाराशे वर्षे एवढ्या कालखंडात भारतीय ज्योतिषाचा कोणताही ग्रंथ उपलब्ध होत नाही. कौटिल्याच्या अर्थशास्त्रावरून कळते, की त्या काळी ज्योतिषशास्त्रातली प्रगती थांबली होती. त्यानंतर सुमारे १०० वर्षांनी (सनपूर्व २०० वर्षांचा सुमार) जैनांचा सूर्यप्रज्ञप्ती नामक ग्रंथ निर्माण झाला. त्यात जैनमते विश्वरचना सांगितली आहे. त्यातले ज्योतिषविषयक नियम वेदांग ज्योतिषाशी मिळते जुळते आहेत.

त्यानंतर इ. स. ४७६ मध्ये आर्यभटाचा जन्म झाला. त्याचा आर्यभटीय अर्थात आर्यसिद्धांत नामक ज्योतिषग्रंथ उपलब्ध आहे. उपलब्ध ज्योतिषग्रंथांत याच्याहून प्राचीन असा दुसरा ग्रंथ नाही. आर्यभटाने पृथ्वी रोज स्वतःभोवती फिरते, असा सिद्धांत मांडला आहे. त्या काळात ही गोष्ट फार महत्त्वाची मानली पाहिजे. त्याने ग्रहस्पष्टीकरणात सुधारणा केली व पूर्वसूरींच्या ग्रंथांचा अभ्यास करून आत्मबुद्धीने आणि वेधाने नवीन शोधही लावले.

त्यानंतर इ. स. च्या पाचव्या शतकाच्या अखेरीस वराहमिहिराचा जन्म झाला. पंचसिद्धांतिका हा त्याचा ग्रंथ होय. या ग्रंथात त्याने तत्कालीन प्रचलित पाच सिद्धांतांचे विवेचन केले आहे. पौलिश, रोमक, वासिष्ठ, सौर व पैतामह हे ते पाच सिद्धान्त होत. वराहमिहिर म्हणतो, की या पाचांपैकी पौलिश व रोमक हे स्पष्ट आहेत ; सौर सिद्धांत स्पष्टतर आहे आणि उरलेले दोन बरेच भ्रष्ट आहेत.

‘म्लेच्छा हि यवनास्तेषु सम्यक् शास्त्रमिदं स्थितम्’ (=म्लेच्छ म्हणजे यवन होत; त्यांच्या ठिकाणी हे ज्योतिषशास्त्र चांगल्या प्रकारे स्थित आहे) असा एक श्लोक आहे. त्यावरून काही विद्वानांनी तर्क केला, की रोमक व पौलिश हे सिद्धान्त अभारतीय यवनांचे आहेत. पण या तर्काला काही आधार नाही. सदर दोन्ही ग्रंथ हे भारतीय ज्योतिर्विदांचेच आहेत.

जुन्या सौरसिद्धांतापेक्षा वराहमिहिराचा हा सूर्यसिद्धांत गणिताच्या दृष्टीने अधिक सूक्ष्म आहे. वराहमिहिराने गणिताधारे ग्रह-नक्षत्रांची आकाशातील स्थिती निश्चित करून ग्रहणे व ग्रहयुती यांचा काल ठरविण्याचे नियम तयार केले. नृसिंह दैवज्ञ, कुंजराज व शाकल्य यांनी वराहमिहिराच्या सूर्यसिद्धांताला ज्योतिर्गणिताच्या सिद्धांतग्रंथात प्रधान स्थान दिले आहे.

त्यानंतरचा प्रसिद्ध ज्योतिषी म्हणजे ब्रह्मगुप्त हा होय. याचा जन्म इ. स. ५९८ मध्ये झाला. याने ब्राह्मस्फुटसिद्धांत व खंडखाद्य नामक दोन ग्रंथ लिहिले आहेत. तो स्वतः वेध घेऊन स्वतंत्रपणे संशोधन करीत असे. वेधादिकांच्या यंत्रांपैकी तुरीययंत्र ब्रह्मगुप्ताने नवीन कल्पिले, असे शं. बा. दीक्षित यांचे मत आहे. अरब लोकांना यानेच ज्योतिषशास्त्र शिकवले असे अल् बिरूनी म्हणतो.

राहू-केतूमुळे सूर्य-चंद्रांना ग्रहणे लागत नसून, पृथ्वीची छाया व चंद्र यांमुळे ती लागतात, ही गोष्ट आर्यभट, वराहमिहिर यांच्या वेळेपासून भारतीयांना ज्ञात होती. ब्रह्मगुप्ताने भूव्यास १५८१ योजने असल्याचे सांगितले आहे. शं. बा. दीक्षित यांनी

एका योजनाचे ५ मैल धरून भूव्यास = १५८१ योजनें = ७९०५ असा हिशोब दिला आहे. ‘ निरक्ष देशापासून भूगोलाच्या १६ अंशावर (३६० ÷ २२.५) अवंती आहे ’ म्हणून ‘ दोहोंमधील अंतराच्या १६ पट पृथ्वीचा परिधी ’ असे सिद्धांतशिरोमणीचे वचन आहे. त्यावरून भारतीय ज्योतिष्यांनी पृथ्वीचा व्यास कोणत्या रीतीने काढला होता, ते स्पष्ट होते.

ब्रह्मगुप्तानंतर इ. स. च्या बाराव्या शतकापर्यंत भारतात अनेक ज्योतिषी होऊन गेले व त्यांनी अनेक ग्रंथ लिहिले. त्यांतला मुंजाल याचा लघुमानस हा ग्रंथ विशेष उल्लेखनीय आहे. अयन-गतीचा स्पष्ट उल्लेख त्याने केला आहे. त्याच्या पूर्वीच्या कोणत्याही ग्रंथात तो आढळत नाही. मुंजालाने शून्यअयनांश वर्ष शके ४४४ हे धरले असून, अयनगती १ कला दिली आहे. मुंजालाने स्पष्ट चंद्राला इतर ग्रंथांत न आढळणारा एक विशिष्ट संस्कार सांगितला आहे. त्यावरून तो एक शोधक व कल्पक ज्योतिषी होता, असे दिसते.

इ. स. च्या १२ व्या शतकात भास्कराचार्य नावाचा एक नामांकित ज्योतिषी होऊन गेला. त्याने सिद्धांतशिरोमणी नावाचा ग्रंथ लिहिला. हा ग्रंथ फार प्रसिद्ध आहे. भास्कराचार्याने या ग्रंथात आपले बुद्धिसर्वस्व पणाला लावून अनेक गहन विषयांचे विवेचन केले आहे. हा ग्रंथ अभ्यासल्यावाचून भारतीय ज्योतिषशास्त्राचे यथार्थ आकलन होऊच शकणार नाही.

यानंतर इ. स. च्या १५ व्या शतकाच्या अखेरीस गणेशदैवज्ञ नावाचा आणखी एक मोठा ज्योतिषी झाला. ग्रहलाघव हा त्याचा ग्रंथ होय. या ग्रंथाचा प्रचार आजही महाराष्ट्र, गुजरात, कर्नाटक, ग्वाल्हेर, इंदोर इ. प्रदेशांत आहे. हा ग्रंथ इतका पंडितमान्य झाला, की त्यावर अनेक लेखकांनी टीका लिहिल्या. त्याने बृहत् व लघू तिथिचिंतामणी नावाचे सारणीग्रंथही लिहिले आहेत. या सारण्यांवरून सुलभपणे पंचांगसाधन करता येते.

गणेश दैवज्ञानंतरही भारतात अनेक ज्येतिषी व ज्योतिषग्रंथ निर्माण झाले; पण त्यांमध्ये स्वतंत्र बुद्धी कुठेही आढळत नाही.

वेधयंत्रे – एखादी शलाका किंवा तसलीच एखादी वस्तू मध्ये धरून तिच्यावरून सूर्यादी पदार्थांचे अवलोकन करणे याला वेध घेणे म्हणतात. शलाकेमुळे वेध्य ज्योतीचे बिंब विद्ध होते, म्हणून या क्रियेला वेध असे म्हणतात.

भारतात आकाशस्थ ज्योतींचे वेध घेण्याची परंपरा चालू राहिली नाही. त्यामुळे नवनवीन वेधयंत्रेही निर्माण झाली नाहीत. तथापि जुन्या काळात वेधसाधने म्हणून जी यंत्रे वापरीत त्यांची नावे भास्कराचार्याने यंत्राध्यायात पुढीलप्रमाणे सांगितली आहेत – (१) चक्रयंत्र (२) चाप (३) तुरीय (४) गोलयंत्र (५) नाडीवलय (६) घटिकायंत्र (७) शंकू (८) फलक व (९) यष्टी. ही सर्व कालसाधनयंत्रे आहेत.

यांतील पहिल्या तीन यंत्रांचाच वेधासाठी मुख्यत्वे उपयोग करीत. गोलयंत्र हे ब्रह्मांडगोलाची रचना दाखविण्यासाठी होते. यष्टियंत्र हे रवि-चंद्रांमधले अंतर समजण्यासाठी व त्यावरून तिथिसाधनासाठी उपयोगात आणीत. वराहमिहिराने आणखी काही स्वयंवह यंत्रांचे प्रकार दिले असून, ब्रह्मगुप्त व भास्कराचार्य यांनी त्यांची वर्णने दिली आहेत.

सूर्यसिद्धांतात शंकू, चक्र, कपाल, धनुष्य, नर, वानर व भूमगोल या यंत्रांचा उल्लेख आढळतो. यांपैकी शंकूयंत्र सर्व जुन्या वेधशाळांत असून, त्याचे वर्णन अनेक ज्योतिर्विदांनी केले आहे. याच्या सहाय्याने पृथ्वीच्या दैनंदिन व वार्षिक गतींचा अभ्यास करता येतो.

भास्कराचार्यानंतर यंत्ररचनेविषयी अनेक स्वतंत्र ग्रंथ निर्माण झाले. त्याचा स्वतःचा सर्वतोभद्रयंत्र नामक ग्रंथ होता, असे कळते; पण तो उपलब्ध नाही. महेंद्रसूरीकृत यंत्रराज, पद्मनाभकृत ध्रुवभ्रमयंत्र, चक्रधरकृत यंत्रचिंतामणी, गणेशदैवज्ञकृत प्रतोदयंत्र, चिंतामणी दीक्षितकृत गोलानंद, इ. ग्रंथ प्रसिद्ध आहेत.

वेधशाळा – यंत्राच्या साहाय्याने वेध घेण्याचे कार्य जिथे चालते, अशा स्थानाला वेधशाळा म्हणतात. जुन्या सर्व ग्रंथांत अवंती (उज्जयिनी) चा उल्लेख वारंवार आढळतो. या नगरीतून मध्यसूत्रगा (भूमध्यरेषा) जाते, असे सूर्यसिद्धांतात म्हटले आहे. सांप्रत ग्रीनिच हे शहर शून्य रेखांशावर आहे, असे मानले जाते, त्याप्रमाणे प्राचीन काळी उज्जयिनी नगरीचा शून्य रेखांश मानला जात असे. यावरून तिथे वेधशाळा असावी, असे वाटते. निदान तिथे अनेक ज्योतिर्विद वेध घेण्याचे कार्य करीत असावेत. सांप्रत तिथे जी वेधशाळा आहे, ती जयपूरचा राजा सवाई जयसिंह याने इ. स. १७३० च्या सुमारास बांधली. पण त्याच्यानंतर ती दुर्लक्षित राहिल्यामुळे मोडकळीस आली होती. पुढे इ. स. १९२३ साली श्रीमंत माधवराव महाराज शिंदे यांनी तिचे पुनरुज्जीवन केले. सध्या तिथे सम्राटयंत्र, नाडीवलययंत्र, दिगंशयंत्र, भित्तियंत्र व शंकूयंत्र अशी पाच प्रमुख यंत्रे आहेत.

अकबराच्या वेळी आमेरचा राजा मानसिंग याने वाराणसी येथे एक वेधशाळा स्थापली होती. सवाई जयसिंहाने या वेधशाळेत सुधारणा करून नवीन यंत्रे बसवली. याशिवाय त्याने दिल्ली, मथुरा व जयपूर येथेही नवीन वेधशाळा बांधल्या. दिल्ली व मथुरा येथील वेधशाळा सध्या जंतरमंतर या नावाने प्रसिद्ध आहेत. वेध घेण्यासाठी जयसिंहाने आपल्या पदरी जगन्नाथ सम्राट नामक ज्योतिषाची नेमणूक केली होती. सतत सात वर्षे वेध घेण्याचे काम केल्यानंतर राजा जयसिंहाने जिज–ए–

मुहंमद शाही नावाचा ग्रंथ निर्माण केला. मिळालेल्या माहितीवरून त्याने तारकांची संगतवार नामावली तयार केली व पंचांगात सुधारणा केली.



रामयंत्र व जयप्रकाशयंत्र – जंतरमंतर, दिल्ली

पितळी यंत्रे लहान असतात, झिजतात, उष्णतेने प्रसरण पावतात किंवा हवेमुळे खराब होतात आणि सूक्ष्म वेध घेण्यास निरुपयोगी ठरतात, हे लक्षात घेऊन दगड, विटा व चुना यांची यंत्रे बांधायला जयसिंहाने सुरवात केली. तो स्वतः विद्वान व कल्पक होता. जयप्रकाशयंत्र, रामयंत्र व सम्राटयंत्र ही नवी यंत्रे त्याने स्वतःच्या बुद्धीने तयार केली. त्यांच्या साहाय्याने नुसत्या डोळ्यांचा उपयोग करून पळापर्यंत ग्रहगणित करता येते.



सम्राटयंत्र – जयपूर

उज्जयिनीच्या वेधशाळेत सांप्रत पाच यंत्रे आहेत, त्यांचे वर्णन पुढीलप्रमाणे —

(१) **सम्राटयंत्र** – यात सुमारे २२ फूट उंच व ४८ फूट लांब जिना असतो. या जिन्याच्या पूर्वेस एक व पश्चिमेस एक असे दोन वर्तुलपाद विषुववृत्ताच्या पातळीत बांधलेले असून, त्यांवर तास व मिनिटे यांच्या खुणा खोदलेल्या आहेत. या यंत्रावरून छायेच्या योगाने जो काल समजतो, तो स्थानिक स्पष्ट काल असतो. जिन्याचा क्षितिजाशी कोन उज्जयिनीच्या अक्षांशाइतका म्हणजे २३ अंश १० कला इतका आहे. उ. ध्रुवाचा तारा जिन्याच्या थेट सरळ रेषेत असतो. जिन्याच्या भिंतीवर अंशकलात्मक अंक खोदलेले आहेत, त्यावरून सूर्याची क्रांती समजते. या यंत्रावरून कोणत्याही ताऱ्याचा स्फुटकाल व क्रांती काढता येईल.

(२) **नाडीवलययंत्र** – याचा आकार लोडासारखा असून, लांबी ७ फूट आहे. त्याची उत्तरेकडील व दक्षिणेकडील तोंडे विषुववृत्ताशी समांतर असून, त्यांच्या मध्यावर एकेक खिळा बसवलेला आहे. या यंत्राच्या योगाने कालज्ञान होते व ग्रह किंवा तारा कोणत्या गोलार्धात आहे, ते कळते.

(३) **दिगंशयंत्र** – यात दोन समकेंद्र वर्तुलाकार भिंती आहेत. आतल्या वर्तुळाचा व्यास २० फूट व बाहेरील वर्तुळाचा ३२ फूट आहे. भिंतीची उंची ८ फूट आहे. मध्यभागी ४ फूट उंच व ४ फूट व्यासाचा गोल चबुतरा असून, त्याच्या मध्यावर एक चार फूट उंच सळई वसविलेली आहे. आतील भिंतीवर योग्य ठिकाणी दिग्बिंदू व अंश कोरलेले आहेत. सळईवर एक उन्नतांश यंत्र बसवले आहे. त्याच्या योगाने ग्रहनक्षत्रांचे दिगंश व उन्नतांश काढता येतात.

(४) **भित्तियंत्र** – ही २२ फूट लांबीची उत्तर–दक्षिण बांधलेली भिंत आहे. तिची उंचीही तितकीच आहे. तिच्या पूर्व बाजूला वरच्या कडेजवळ दोन पितळी खुंट्या मारलेल्या असून, त्या खुंट्यांपासून २० फूट त्रिज्यांनी दोन वर्तुलपाद काढले आहेत. या यंत्राच्या योगाने मध्यान्हीच्या सूर्याची क्रांती व नतांश कळतात.

(५) **शंकूयंत्र** – १६ फूट व्यासाचे एक क्षितिजसमानांतर वर्तुळ बनवून, त्याच्या मध्यभागी एक ४ फूट उंचीचा शंकू बसवला आहे. या शंकूच्या छायेने दिगंश, उन्नतांश, दिवस व रात्री यांचा वृद्धिक्षय, समरात्रदिवस आणि पृथ्वीचें परिभ्रमण दीर्घ वर्तुळात होते, इ. गोष्टींचे स्पष्ट ज्ञान होते. वेधांनी दिगंश व उन्नतांश कळल्यावर गणिताने विषुवांश, क्रांती, भोग व शर प्राप्त होतात.

जयपूरची वेधशाळा सर्वांत मोठी व चांगल्या स्थितीत आहे.

ये सम्राट, षष्ठांश, राशीवलय, जयप्रकाश, कपाल, राम, नाडीवलय इ. अनेक मोठी बांधलेली यंत्रे, त्याचप्रमाणे कित्येक धातूची यंत्रेही आहेत. सवाई जयसिंहाने बनवलेले जयप्रकाश-यंत्र त्याच्या कल्पनाशक्तीचे निदर्शक आहे.

जयप्रकाशयंत्र या – यंत्राची रचना सूर्यसिद्धांतावरून केलेली आहे. त्यासाठी जमिनीत एक अर्धगोल तयार केलेला असून, त्याच्या आतील पृष्ठभागावर रेषा व अंशांक कोरलेले आहेत. मुखाजवळ मध्यभागी दोन तारा काटकोनात ताणून बांधलेल्या आहेत; त्यांचा छेदबिंदू हाच त्या गोलाचे केंद्र होय. या बिंदूची छाया अर्धगोलाच्या पृष्ठभागी पडते, ती पाहून सूर्याचा होराकोन, क्रांती, इ. गोष्टी कळतात. या अर्धगोलाचा व्यास १६ फुटांहून अधिक असल्यामुळे अगदी सूक्ष्म वेध घेता येतात. आत उतरून वेध घेण्यासाठी ५ वाटा केल्या आहेत. जो भाग कापला गेला आहे, तिथले वेध घेता यावे म्हणून असाच दुसरा एक पूरक अर्धगोल तयार केला आहे.

रामयंत्र – हे यंत्र म्हणजे दोन गोलाकार भिंती असून, त्यांच्यामध्ये एक स्तंभ आहे. भिंतींवर रेषा व अंक कोरलेले आहेत. स्तंभाच्या छायेवरून अक्षांश, रेखांश, उन्नतांश, दिगंश, इ. माहिती मिळवता येते. नक्षत्रांचे अवलोकनही करता येते.

संहितास्कंध – यालाच पुढे मुहूर्तस्कंध असे म्हणू लागले. वराहमिहिराच्या संहितेवरून या स्कंधाला संहितास्कंध असे नाव पडले आहे. या संहितेत सूर्यादी ग्रह, धूमकेतू, नक्षत्रे, यांचे गमन आणि त्या गमनापासून होणारी शुभाशुभ फले वर्णिली आहेत. अगस्त्य व सप्तर्षी यांच्याही उदयास्तांचे शुभाशुम फल सांगितले आहे. याशिवाय भरतखंडाचे नऊ विभाग कल्पून, त्यांतल्या प्रत्येक विभागावर कोणत्या नक्षत्राचे आधिपत्य आहे, ग्रहांची युद्धे आणि युत्या यांची फले काय मिळतात, विशिष्ट वर्षी पर्जन्याचा योग कसा आहे, रत्नपरीक्षा, पशुपरीक्षा कशी करावी, शुभाशुभ शकून कसे जाणावे, विविध मुहूर्तांचे फल काय, इ विषय प्रस्तुत संहितेत आले आहेत.

सामान्यपणे मानवसमाजाने आपल्या कल्याणासाठी व उत्कर्षासाठी अशुभ योग टाळून ग्रह-नक्षत्रादिकांचे बळ कसे मिळवावे यासंबंधीचे मार्गदर्शन करणे, हा संहिताग्रंथांचा उद्देश आहे. 'गर्ग, पराशर, असित, देवल, इ. ऋषींच्या मताप्रमाणे मी अमुकतमुक विषय सांगतो ' असे वराहमिहिराने जागोजाग लिहिले आहे. त्यावरून त्याच्या काळी वरील ऋषींच्या ज्योतिषसंहिता उपलब्ध असाव्या, असे दिसते.

चांगल्या दिवशी, चांगल्या मुहूर्तावर अथवा योगावर शुभ कर्म केले असता, त्याचे फल चांगले मिळते, ही धारणा भारतात वेदकाळापासून प्रचलित आहे. चांगले दिवस आणि वाईट दिवस याविषयी वैदिकांचे काही आडाखे असावे. आम्हांला प्रत्येक दिवस सुदिन होवो, अशी एका ऋषीने इंद्राला प्रार्थना केली आहे (ऋ. २. २१. ६). स्तुती करणाऱ्या ऋषीला वरुणाने चांगले दिवस दाखविले, असे दुसऱ्या एका ठिकाणी म्हटले आहे (ऋ. ७. ८८. ४).

प्रारंभीच्या काळी शुभाशुभ योग किंवा मुहूर्त हे मुख्यत्वे नक्षत्रांवरून पाहत. नक्षत्रे दृश्य असल्यामुळे त्यांच्या उदयास्तावर आणि त्यांच्या विशिष्ट संज्ञांवर शुभ कृत्यांचे मुहूर्त बसविलेले असत. नक्षत्रोदय झाला असता यजमानाने वाङनियम सोडावा, असे तै. संहितेत सांगितले आहे. कन्यादान कोणत्या नक्षत्रावर करावे, याविषयी तै. ब्राह्मणात (१.५.२) एक मंत्र आहे, तो असा –

यां कामयेत दुहितरं प्रिया स्यादिति । तां निष्टचायां दद्यात्

अर्थ – आपली मुलगी पतीला (आणि पतिगृही) प्रिय व्हावी असे वाटत असेल, तर स्वाती नक्षत्रावर तिचे दान करावे.

नक्षत्र चांगले कोणते आणि दिवसाच्या कोणत्या भागाला पुण्याह समजावे, यासंबंधीही वेदात मार्गदर्शन आहे. ज्या नक्षत्रावर कर्मारंभ करायचा असेल, ते नक्षत्र सूर्योदयापूर्वी आकाशात कुठे आहे ते पाहून ठेवून, सूर्य त्या जागी आला म्हणजे त्या कर्माचा प्रारंभ करावा; तोच पुण्याह (शुभ दिवस) समजावा. कृत्तिकेपासून विशाखेपर्यंतची नक्षत्रे ही देवनक्षत्रे असून, अनुराधेपासून भरणीपर्यंतची नक्षत्रे ही यमनक्षत्रे आहेत. देवनक्षत्रावर केलेले कर्म पुण्यप्रद होते (तै. ब्रा. १.५.२). विविध श्रौतयाग कर्तव्य असता यजुर्वेदात ऋतू, मास, नक्षत्र वगैरेंचाही विचार सांगितला आहे. अग्न्याधानाच्या प्रकरणातही नक्षत्रांचा विचार आला आहे. सांग्रहणी नावाची एक इष्टी अश्वमेध यज्ञाच्या प्रारंभी करण्यास सांगितली आहे. लोक अनुकूल होऊन त्यांचे सहकार्य लाभावे व त्यामुळे यज्ञ उत्तम प्रकारे पार पडावा, या उद्देशाने ही इष्टी करायची असते. सदर इष्टी चित्रा नक्षत्रावर करावी, असे सांगितले आहे (तै. ब्रा. ३. ८. १). हाच निर्देश लक्षात ठेवून पुढे वराहमिहिरानेही मैत्रीकर्मासाठी चित्रा नक्षत्र चांगले असल्याचे म्हटले आहे. निरनिराळ्या नक्षत्रांवर अग्न्याधान केल्याने यजमानाला कोणती निरनिराळी फले प्राप्त होतात, त्याचेही निदर्शन यजुर्वेदात आहे.

विशिष्ट नक्षत्रावर मूल जन्मल्यास ती गोष्ट अशुभ समजतात. ही धारणाही प्राचीन असून, अथर्ववेदात तिचा उल्लेख मिळतो. अथर्वसंहितेतले एक सूक्त (६.११०) या दृष्टीने उल्लेखनीय आहे. मूळ नक्षत्रावर जन्मलेले मूल आईवडिलांना घातक ठरते, ही सांप्रतची लोकधारणा त्या सूक्तात पाहायला मिळते.

अथर्वपरिशिष्टात नक्षत्रकल्प म्हणून एक परिशिष्ट आहे.

त्याच्या ९ व १० या खंडांत राजाने कोणत्या नक्षत्रावर कोणते कर्म करावे, ते सांगितले आहे. उदा० कृत्तिका नक्षत्रावर आयुवग्रहण, आर्दा नक्षत्रावर अभियान, विशाखा नक्षत्रावर गजकर्म, मूळ नक्षत्रावर खंदक खणणे इत्यादी.

कल्पसूत्रात व गृह्यसूत्रात नक्षत्राचे क्रूर, उग्र, सौम्य असे स्वभाव कल्पून त्या जातीची कृत्ये, त्या त्या नक्षत्रांवर करावी, असे सांगितले आहे.

वराहमिहिराने आपल्या बृहत्संहितेत नक्षत्रांचे ध्रुव, तीक्ष्ण, उग्र, मृदू, चर आणि मृदुतीक्ष्ण असे स्वभावानुरूप सहा गट केले आहेत. अथर्वपरिशिष्टाच्या शांतिकल्पात केलेल्या नक्षत्रंगटाशी वराहमिहिराचे हे गट मिळतेजुळते आहेत. नक्षत्रांच्या फळांचा निर्देश करताना वेदात त्या त्या नक्षत्रांचे जे उल्लेख आले आहेत, त्यांचा विचार करूनच वराहमिहिराने आपले विवेचन केले आहे, असे दिसते.

पुढच्या काळात नक्षत्रविचाराबरोबरच मुहूर्तांसाठी तिथी, वार, योग यांचाही विचार चालू झाला. तिथी, वार व विष्कंभादी योग यांचे विशिष्ट स्वभाव कल्पून त्या त्या स्वभावानुसार त्या त्या तिथ्यादिकांवर कोणती कृत्ये करावी किंवा करू नये, याविषयी पुढे नियम ठरविण्यात आले.

एखाद्या कार्याच्या सिद्धीसाठी निश्चित केलेल्या घटि-पळादी कालाला मुहूर्त अशी पारिभाषिक संज्ञा प्राप्त झाली आहे. मुहूर्तग्रंथांत गर्भाधानादी संस्कार, गृहप्रवेश, यात्रा, राज्याभिषेक, प्रापंचिक वस्तूंची साठवण, वस्तूंचे देणे–घेणे, कृषिकर्म, इ. गोष्टींसाठी शुभ मुहूर्त सांगितलेले असतात. पंचांगशुद्धी पाहूनच हे मुहूर्त काढतात. मुहूर्तग्रंथांत त्याज्यप्रकरण नावाचेही एक प्रकरण असते. त्यात कोणत्याही शुभ कृत्याला वर्ज्य असलेल्या तिथ्यादी गोष्टी सांगितलेल्या असतात.

मुहूर्तांचा लोकव्यवहाराशी निकटचा संबंध आहे व तो अनादी कालापासून चालत आलेला आहे. हिंदू लोकच तेवढे मुहूर्त पाहतात, असे नसून इतर धर्मांचे लोकही आपापल्या संस्कारादी कृत्यांसाठी मुहूर्त पाहतात.

लल्लाचा रत्नकोश, श्रीपतीची रत्नमाला, भोजाचा राजमार्तंड, शार्ङ्गधराचा विवाहपटल, केशवाचा मुहूर्ततत्त्व, नारायणाचा मुहूर्तमार्तंड, नीलकंठाचा तोडरानंद, रामभटाचा मुहूर्तचिंतामणी, रघुनाथाचा मुहूर्तमाला, पद्मनाथाचा व्यवहारप्रदीप, इ. ग्रंथ मुहूर्तशास्त्रावर निर्माण झाले आहेत. सांप्रत पंचांगात जी संवत्सरफले लिहितात, ती सोमदैवज्ञाच्या कल्पलता या ग्रंथावरून घेतलेली असतात. शुभाशुभ शकुनांचे शास्त्र हेही संहितास्कंधाचे एक अंग होय. या शास्त्रावर नरपती या ग्रंथकाराचा नरपतिराजचर्या नामक एक ग्रंथ आहे. सामान्य लोकांच्या शकुनाविषयीही अनेक ग्रंथांत विवेचन केलेले असते.

होरास्कंध –याला जातकस्कंध असेही म्हणतात. एखाद्या मनुष्याच्या जन्मकाली जे लग्न (पूर्वक्षितिजावरील उदित राशी) असेल, त्या लग्नी किंवा त्यापासून इतर स्थली ज्या ज्या ठिकाणी ग्रह असतील, त्याप्रमाणे किंवा जन्मकाली चंद्र ज्या राशीस असेल, त्या राशीच्या संबंधात जसे ग्रह असतील, त्याप्रमाणे किंवा जन्मकालीन तिथिनक्षत्रादिकांच्या शुभाशुभ धर्मांना अनुसरून मनुष्याला आयुष्यात सुख, दुःख, लाभ, हानी, संकट इ. गोष्टी केव्हा आणि कशा घडतील, याचा निर्णय सांगणारे जे शास्त्र, त्याला होराशास्त्र किंवा जातक असे म्हणतात.

सूर्य व चंद्र यांचा पृथ्वीवर अनेक प्रकारे परिणाम होताना दिसतो. सूर्यामुळे ऋतुचक्र उत्पन्न होते. ऋतूंना अनुसरून मानवी शरीरावर व मनावरही वेगवेगळे परिणाम घडतात. चंद्राच्या उदयास्तांना धरून समुद्राला भरती-ओहोटी येते. चंद्रकिरणांमुळे वनस्पतींचे पोषण होते. माणसाच्या मनावरही चांदण्याचा परिणाम होतो. या गोष्टी प्रत्यक्ष पाहिल्यावर ज्योतिर्विदांना असे वाटले, की सूर्य-चंद्रांप्रमाणेच इतर ग्रहांचाही आणि जन्मकालीन परिस्थितीचाही मानवी जीवनावर बरावाईट परिणाम होत असला पाहिजे. याविषयी श्री. बाबासाहेब पटवर्धन हे अधिक सूक्ष्म विचार करून पुढीलप्रमाणे लिहितात–

“ फलज्योतिषशास्त्रासंबंधी विचार करता या शास्त्रावरील आक्षेपकांचे खंडन करण्याकरिता काही लोक ग्रहांचा परिणाम म्हणून गुरुत्वाकर्षण, समुद्राची भरती-ओहोटी वगैरे कारणे देतात. त्यांचा परिणाम जीवनक्रमाशी पोहोचत नाही. तथापि त्यापेक्षाही बलवत्तर कारणे आहेत. म्हणून अगदी नवीन शोधाप्रमाणे पाहता बुधादी पंचग्रह हेही ऋतुमानात फरक करू शकतात आणि ऋतूंत फरक म्हणजे मनोवृत्तींत फरक हेच आक्षेपकांना उत्तर आहे. शिवाय आधुनिक शास्त्रांची जी मते James Jean या अत्यंत विद्वान शास्त्रज्ञाने संकलित केली आहेत, त्यांतील प्रमाणे पाहता सूर्याचा व त्याचप्रमाणे आकाशस्थ गोलांचा परिणाम उत्क्रांतिकार्यांमध्ये केवढा अफाट आहे, त्याची कल्पना होते. काही अदृश्य किरणांनी प्राण्यांच्या आणि मनुष्यांच्या धमनीव्यूहावर व मेंदूवर परिणाम होऊन, त्यांच्या द्वाराने मनोविकार आणि इच्छाशक्ती यांना चालना मिळते ही गोष्ट आता निश्चितपणे समजलेली आहे. ज्या युरोपियन शास्त्रज्ञांवर आक्षेपकांचा अढळ विश्वास, त्यांच्या शास्त्रसिद्ध मताप्रमाणे सूर्यादी सर्व ग्रहांचा (व तारांचाही) परिणाम मनुष्याच्या ज्ञानतंतूंवर आणि मेंदूवर होतो. तो कोणता होतो त्याची प्रक्रिया ठरविणे हे मानसशास्त्राच्या कक्षेमध्ये जाते आणि शास्त्रानुरोधाने त्या क्रियांची दिशा निश्चित करता येते.

Radiation चे (रश्मिजालाचे) जे परिणामं घडतात त्यात ग्रही कार्यकारी स्वरूपाचे असतात. म्हणजे काहींचा परिणाम त्वरित व काहींचा क्रमाक्रमाने अशी त्यांची दिशा असते. मनुष्याच्या मनोवृत्तींना चालना आणि क्रियाकारित्व हेच ग्रहांचे कर्म. ग्रहांचा नायक सूर्य, म्हणूनच वेदांमध्ये ' सूर्य आत्मा जगतस्तस्थुषश्च ' असे म्हटले आहे.

याप्रमाणे ग्रहांचे इष्टानिष्ट परिणाम मनुष्यमात्रावर होतात ही गोष्ट सिद्ध झाली, असे समजण्यास प्रत्यवाय नाही. हा परिणाम ज्या त्या व्यक्तीच्या निरनिराळ्या शरीररचनेनुसार इष्टानिष्ट घडतो. म्हणून या बाबतीत तरी आक्षेपास आता यत्किंचित जागा राहत नाही. आनुवंशिक प्रभावाने व्यक्तिमत्त्व ठरते आणि ग्रहादी बाह्य वस्तूंच्या प्रभावाने परिस्थिती बनते आणि या दोहोंचा संकलित असा शुभाशुभ परिणाम म्हणजे मनुष्याचा बहुतांशी ठरणारा आयुष्यक्रम म्हणजेच जीवनयात्रा. याप्रमाणे या आक्षेपांचा निरास झाला.

कोणी अशीही शंका घेईल, की समजा वर्षप्रतिपदेच्या दिवशी पृथ्वीवर जो सूर्याचा व इतर ग्रहांच्या किरणांचा परिणाम घडेल तो त्या दिवशी जन्म पावणाऱ्या सर्व बालकांवर तरी अगदी सारखा किंवा जवळजवळ तरी सारखा का होऊं नये ? एकाच दिवशी पाऊस किंवा उन्हाळचाचा उकाडा झाला, तरी तो सर्वत्रच सारखा होतो की नाही ? तसेच हे कार्य का असू नये ? याचे उत्तर अगदी सोपे आहे.

आनुवंशिक रचना ज्यांची सारखी असते, त्यांच्या जन्मकाळच्या ग्रहांचा परिणाम बह्वंशी सारखाच होईल. ज्यांची रचना भिन्न त्यांच्यावर परिणाम भिन्नच. उन्हाळा तीव्र असला तर पन्हाळी पत्र्यांप्रमाणे ज्यांची शरीररचना त्यांना तो बाधणारच आणि थंड पाणी शिंपडलेल्या वाळयाच्या पडद्याप्रमाणे ज्यांची रचना त्यांना तो अर्थात बाधणार नाही. सारांश आनुवंशिक शरीररचनेनुसार ग्रह निरनिराळे परिणाम घडवितात आणि त्या कारणाने जन्मकालीन ग्रहस्थितीही निरनिराळी असते. आनुवंशिक शरीररचना कशामुळे बनते असा जर प्रश्न निघेल तर त्याचे उत्तर हेच, की परिस्थिती आणि इतर ज्ञात–अज्ञात कारणे यांच्यामुळे मातापितरांची जी शारीरिक व मानसिक रचना बनते, तेच त्या बालकाच्या शरीररचनेचे आधुनिक शास्त्राप्रमाणे आद्य कारण किंवा आम्हा भारतीयांच्या मताप्रमाणे पूर्वप्रारब्ध हे आदिकारण. कोणतेही कारण मानले तरी मतलब एकच.

थोडक्यात सांगावयाचे म्हणजे पुढील गोष्टी सिद्ध झाल्या अथवा सिद्धच आहेत, असे निश्चयाने म्हणता येते.

(१) ग्रहांचे शुभाशुभ परिणाम सर्व मनुष्यांवर होतात.

(२) त्या परिणामांमुळे प्रत्येक मनुष्याच्या जन्मकालीन ग्रहस्थितीप्रमाणे त्या मनुष्याचा स्वभाव, शरीराची ठेवण व परिस्थिती या गोष्टी दिसतात.

(३) त्यानंतर जसजशी ग्रहस्थिती पालटेल त्याप्रमाणे त्या मनुष्याचीही बरीबाईट स्थित्यंतरे होतात.

(४) आणि वरील सर्व गोष्टी स्थूल मानाने तरी फलज्योतिषशास्त्राप्रमाणे निश्चित समजतात व वर्तविता येतात.

ही स्थित्यंतरे मनुष्य आपल्या प्रयत्नाने बदलू शकतो. "

व्यक्तीचे भविष्य वर्तवण्याची पद्धत सुरू होण्यापूर्वी राज्याचे सामुदायिक भविष्य वर्तवण्याची पद्धत होती. तिला मेदिनीय ज्योतिष असे म्हणत. ग्रहणे, उल्कापात, धूमकेतू, ग्रहांची वक्रीभवने किंवा अतिचार, शनीचे रोहिणीशकटभेदन, इ. घटना घडल्यास त्यांचे बरेवाईट परिणाम राज्यावर कसे होतील, ते मेदिनीय ज्योतिषाच्या आधारे सांगितले जात असे. वरील गोष्टींमुळे प्राप्त होणारी फले ही देशातल्या सर्व लोकांना सामुदायिकपणे भोगायला लागणारी असत. मेदिनीय ज्योतिषात निरनिराळ्या देशांच्या किंवा राज्यांच्या कुंडल्या तयार करून त्यांच्या आधारे अशा प्रकारची भविष्ये सांगितली जात.

व्यक्तीची सर्वप्रथम कुंडली मांडली गेली ती दाशरथी रामाची. तो जन्माला आला, त्या वेळी तिथी व वेळ कोणती होती, लग्न कोणते होते व तत्कालीन ग्रहस्थिती कशी होती, हे रामायणात सांगितले आहे (वा. रा. बाल. १८.८–९). वसुदेवाने कृष्णाला गोकुळात नंदाच्या घरी पोचते केल्यावर गर्गाचार्यांनी तिथे जाऊन त्याचे भविष्य सांगितले असा उल्लेख आहे (भाग. पु.१०.८). बुद्धाचा जन्म झाल्यानंतरही असाच एक ज्योतिषी शुद्धोदन राजाकडे गेला होता. त्याने बालगौतमाचे भविष्य सांगितले, की 'हा मुलगा जगाला संपूर्ण धर्मज्ञान देईल.'

व्यक्तीच्या भविष्यकथनासाठी जन्मपत्रिकेतल्या लग्नकुंडलीला धरून विचार केला जातो. जन्मकाळी जे लग्न असेल, ते कुंडलीत सर्वांत वरच्या स्थानी मांडतात. लग्न कोणत्याही राशीचे असले, तरी त्या स्थानाला प्रथम स्थान असे म्हणतात. तिथून पुढे क्रमाने कुंडलीच्या बारा कोठ्यात बारा राशी मांडतात. मग ग्रह ज्या राशीत असतील, त्या राशीत कुंडलीमध्ये त्यांची मांडणी करतात. या बारा स्थानांना जातकशास्त्रात अनुक्रमे तनू, धन, सहज, सुहृत्, सुत, रिपू, जाया, मृत्यू, धर्म, कर्म, आय व व्यय अशा संज्ञा आहेत. या संज्ञांनी बोधित होणाऱ्या गोष्टींचा व त्यांच्या आनुषंगिक गोष्टींचा विचार त्या त्या स्थानांवरून करतात. त्या स्थानी जे ग्रह असतील, ते शुभ–अशुभ, उदित–अस्तंगत व अन्य ग्रहांनी दृष्ट किंवा पीडित असतील, त्याप्रमाणे त्या त्या स्थानाचा फलादेश सांगतात. उदा॰ प्रथम स्थान हे

तनुस्थान असल्यामुळे शरीरविषयक सर्व विचार त्या स्थानावरून करतात. द्वितीय स्थानावरून धनलाभ, तृतीय स्थानावरून बंधुवर्ग आणि त्याचे सुख, चतुर्थ स्थानावरून मित्र आणि क्षेत्र, पंचम स्थानावरून विद्या व संतती, षष्ठस्थानावरून शत्रू व आरोग्य, सप्तम स्थानावरून भार्यालाभ व भार्यासुख, अष्टम स्थानावरून मृत्युकाल किंवा मृत्युकारक घटना, नवम स्थानावरून लाभ व धर्म, दशम स्थानावरून उद्योग व पराक्रम, एकादश स्थानावरून धनलाभ आणि द्वादश स्थानावरून खर्चाच्या बाबी यांचा विचार करतात

जन्म–लग्न कुंडलीत रवी हा देह व आत्मा यांचा, चंद्र हा मन व सौंदर्य यांचा, बुध हा बुद्धी, वक्तृत्व, लेखनकला यांचा, गुरू हा ज्ञान, वैभव, पुण्यकर्म, परमार्थ, संतती, उत्साह यांचा, शुक्र हा स्त्री, रतिसुख, शुक्रधातू, सौंदर्य, विविध कला, मंत्र–तंत्र यांचा व शनी हा आयुष्य, निर्वाहसाधन, दुर्मती, वातविकार यांचा कारक मानलेला आहे. जन्मकुंडलीत हे ग्रह ज्या प्रमाणात सबल वा दुर्बल असतील, तसेच उच्च किंवा नीच किंवा स्वगृही किंवा शत्रुगृही असतील, त्या प्रमाणात त्यांची फले शुभ किंवा अशुभ आणि कमी किंवा अधिक मिळतात.

राहू व केतू हे आकाशस्थ ग्रह नसून, पृथ्वीच्या कक्षेला चंद्राची कक्षा ज्या दोन ठिकाणी छेदते, त्या ठिकाणचे संपातबिंदू होत. पण त्यांनाही जातकशास्त्रात स्थान मिळाले आहे. हे दोन्ही ग्रह अशुभ फले उत्पन्न करणारे आहेत. त्यांपैकी राहू हा पिशाचबाधा, सर्पबाधा, आघात, यांचा कारक आहे व केतू हा शूल, पीडा, क्षुधा व अतिदुःख यांचा कारक आहे.

बारा राशींपैकी मेष राशीचा अंमल मस्तकावर, वृषभेचा गळा व तोंड यांवर, मिथुनेचा हात, खांदे व फुप्फुसे यांवर, कर्केचा ऊर, स्तन व पोट यांवर, सिंहेचा हृदय, पाठ, रक्ताशय यांवर, कन्येचा कुशी, जठर, आंतडी यांवर, तुळेचा कंबर, मूत्रपिंड यांवर, वृश्चिकेचा गुह्येंद्रियांवर, धनूचा मांड्यांवर, मकरेचा गुडघ्यांवर, कुंभेचा जांघा व पोटऱ्या यांवर आणि मीनेचा दोन्ही पावलांवर चालतो.

व्यक्तीचे भविष्यकथन करताना कुंडलीतील ग्रहांच्या उच्च, नीच व स्वगृह या राशी पाहतात. त्याचप्रमाणे ग्रहांचे शत्रु–मित्रत्वही विचारात घेतात. ग्रहांचे केंद्र, त्रिकोण, नवपंचम, षडाष्टक, त्रिरेकादश, द्विर्द्वादश, इ. योगही पाहतात. सूक्ष्म फलादेशासाठी लग्नाची नवांश कुंडली मांडून तिच्या आधारे विचार करतात. विविध स्थानांवर शुभाशुभ ग्रहांची जी दृष्टी पडते, तिला अनुसरूनही मिळणाऱ्या फलांना कमी–अधिकपणा येतो किंवा क्वचित विरुद्ध फलही मिळते, असे समजतात. एवंच २७ नक्षत्रे, राशी, राशिस्वामी, जन्म-लग्न कुंडलीतील बारा स्थाने आणि आदित्यादी नवग्रह एवढ्या मूलभूत गोष्टींवर संपूर्ण जातकशास्त्राची उभारणी झालेली आहे.

कालनिर्णय – व्यक्तीला त्याच्या आयुष्यात उत्कर्ष आणि अपकर्ष यांचे जे योग यायचे असतात, ते कोणत्या वर्षी अथवा आयुष्याच्या कोणत्या कालखंडात येतील, हे सांगणे ही गोष्ट भविष्यकथनात फार महत्त्वाची असते. यालाच भविष्याचा काल ठरविणे, असे म्हणतात. या कालनिर्णयाच्या बाबतीत विंशोत्तरी, अष्टोत्तरी व योगिनी या दशा, ताजिक वर्षप्रवेश, गोचरी, दिनवर्षपद्धती, इ. पद्धती प्रचारात आहेत.

दशापद्धती – दशापद्धतीत प्रत्येक ग्रहाच्या दशेची विशिष्ट वर्षे मानलेली आहेत. यात ग्रहांचा क्रम रवी, चंद्र, मंगळ, राहू, गुरू, शनी, बुध, केतू व शुक्र असा असतो. रवीच्या महादशेची वर्षे सहा, चंद्राची दहा, मंगळाची सात, राहूची अठरा, गुरूची सोळा, शनीची एकोणीस, बुधाची सतरा, केतूची सात व शुक्राची वीस मानलेली आहेत. हे विंशोत्तरी मान आहे. जन्मकुंडलीत ग्रह ज्या भावांचा कारक असेल व तो ज्या प्रमाणात सबल किंवा दुर्बल असेल, त्याला अनुलक्षून त्याच्या त्याच्या दशाकालात बरीवाईट फले वर्तवितात.

ताजिक – एखाद्याच्या जन्मकाळी रवी जितक्या अंशावर असेल, तितका प्रतिवर्षी जेव्हा येईल, तेव्हा त्याच्या आयुष्याचे चालू वर्ष पूर्ण होऊन दुसरे लागले, असे समजतात आणि त्या वेळी जे लग्न व ग्रहस्थिती असेल, त्यांना अनुसरून त्या वर्षात त्या मनुष्याला शुभाशुभ फळे कोणती मिळतील, ते सांगतात.

ताजिकपद्धती ही यवनांपासून भारतीयांनी घेतली आहे, असे दिसते. मात्र ही पद्धती यवनांकडून घेतली असली, तरी लग्नकुंडली व फलादेशाचे नियम हे भारतीय जातकपद्धतीला अनुसरूनच असतात.

गोचरी – जन्मराशी ही लग्नस्थानी कल्पून तात्कालिक ग्रहांच्या भ्रमणांवरून भविष्यकथन करणे, याला गोचरीपद्धती म्हणतात. पण ही फारच ढोबळ अशी पद्धती आहे.

दिनवर्षपद्धती – या पद्धतीत जन्मानंतरचा प्रत्येक दिवस हा एकेक वर्षाचा द्योतक मानतात आणि दुसऱ्या दिवसाची त्याच वेळेची कुंडली मांडून तत्कालीन ग्रह आणि जन्मकुंडलीतले ग्रह यांचे परस्पर योग पाहून त्या त्या वर्षाचे किंवा कालखंडाचे भविष्य वर्तवतात.

जातकग्रंथ – जातकस्कंधावर सांप्रत उपलब्ध ग्रंथ पुढीलप्रमाणे आहेत–

गौरीजातक व कालचक्रजातक हे दैवी ग्रंथ आणि पाराशरी, जैमिनीसूत्र व भृगुसंहिता हे अपौरुषेय किंवा आर्ष ग्रंथ होत. हे सर्व प्राचीन ग्रंथ आहेत. पौरुषेय ग्रंथांत प्राचीनतम ग्रंथ म्हणजे

वराहमिहिराचा बृहज्जातक हा होय. या ग्रंथात त्याने पराशर, सत्य, मय, यवन, मणित्थ, जीवशर्मा व विष्णुगुप्त इतक्या आचार्यांचा व त्यांच्या मतांचा उल्लेख केला आहे. त्यावरून तर्क करता येतो, की वराहमिहिराच्या पूर्वी जातकस्कंधावर बरेच ग्रंथ असले पाहिजेत. सनपूर्व ४००–५०० वर्षे या कालात भारतीयांना जातकशास्त्राचे ज्ञान होते, असे कळते. सनपूर्व ४०० च्या सुमारास मेषादी राशिसंज्ञा प्रचारात आल्या. सांप्रतची जातकपद्धती याच कालात रूढ झाली असावी. त्यापूर्वी अथर्वज्योतिषातली पद्धत प्रचारात होती. पाराशरी नावाचा जो आर्ष ग्रंथ आहे, त्याचे बृहत् व लघू असे दोन प्रकार आहेत. लघुपाराशरी उपलब्ध असून प्रचारातही आहे. तिच्यावर अनेक टीका झालेल्या आहेत. बृहत्पाराशरीचे पूर्व आणि उत्तर असे दोन खंड आहेत. हा ग्रंथ त्रुटित स्वरूपात आढळतो. जैमिनीसूत्र नावाचा चार अध्यायांचा सूत्ररूप ग्रंथ मलबारात बराच प्रसिद्ध आहे. त्यावरही अनेक टीका आढळतात. भृगुसंहिता हा ग्रंथ नावावरून आर्ष दिसतो; पण वराहमिहिर आणि भटोत्पल यांनी त्याचा उल्लेख केला नाही, यावरून तो त्या दोघांच्या पूर्वीचा नसावा. भृगुसंहितेत कोणत्याही माणसाची जन्मलग्नकुंडली सापडते, असे म्हणतात. या ग्रंथाचे त्रुटित भाग देशात निरनिराळ्या ठिकाणी असल्याचे कळते. दक्षिणेत काही नाडीग्रंथही आहेत. त्या ग्रंथांवरून कोणत्याही व्यक्तीचे आश्चर्यकारक भूत-भविष्य कळते, असे सांगतात. श्रीचिदंबरम् अय्यर यांनी पाच नाडीग्रंथ पाहिल्याचे व पाचांची नावे ऐकल्याचे लिहिले आहे. सत्याचार्यकृत ध्रुवनाडी हा ग्रंथ त्या सर्वांत उत्तम आहे. त्याचे सुमारे ७० भाग द. भारतात निरनिराळ्या गृहस्थांकडे आहेत. त्यात प्रत्येक मनुष्याच्या जन्मकाळचे निरयन स्पष्टग्रह आहेत.

वराहमिहिराचा पुत्र पृथुयशा हा होय. त्याचा षट्पंचाशिका हा ग्रंथ सांप्रत प्रचारात आहे. कल्याणवर्म्याचा सारावली हा ग्रंथ वराहमिहिरानंतरचा होय. श्रीपतीचा जातकपद्धती नावाचा एक ग्रंथ आहे. भावनिर्णय नामक विद्यारण्यकृत एक ग्रंथ आहे. केशवाचा जातकपद्धती हा फक्त चाळीस श्लोकांचा ग्रंथ असला, तरी तो फार प्रसिद्ध आहे. त्याला केशवी असे म्हणतात. त्याच्यावर अनेक टीका आहेत. ढुंढिराजकृत जातकाभरण या नावाचा आणखी एक ग्रंथ प्रसिद्ध आहे. हा ग्रंथ इ. स. च्या पंधराव्या शतकातील असून, पत्रिका करणाऱ्या लोकांना त्याचा फार उपयोग होतो. जातकसार, जातकालंकार हे ग्रंथही फलज्योतिषी लोकांना फार उपयुक्त ठरले आहेत. जातकात केरलमत म्हणूनही एक मत आहे. केरलमताचे बरेच ग्रंथ आहेत. त्यातले नियम इतर ग्रंथांतील नियमांहून भिन्न आहेत.

प्रश्नज्योतिष – ज्योतिष्याला कुंडली दाखवून अनेक लोक आपले भविष्य विचारतात; त्याचप्रमाणे अमुक गोष्ट होईल किंवा नाही, होणार असल्यास कशी व केव्हा होईल, असे काही तात्कालिक प्रश्नही विचारतात. अशा वेळी प्रश्नकाळच्या लग्नावरून प्रश्नाचे उत्तर सांगण्याची पद्धती आहे. त्यामुळे प्रश्नज्योतिष हेही होरास्कंधाचे एक अंग बनले आहे. प्रश्नज्योतिषावर प्रश्ननारदी हा बत्तीस श्लोकांचा आर्ष ग्रंथ आहे. उपलब्ध प्रश्नग्रंथांत भटोत्पलकृत प्रश्नज्ञान हा ग्रंथ सर्वांत प्राचीन (इ. स. ९५० चा सुमार) दिसतो. अलिकडेही या विषयावर लहानसहान ग्रंथांची निर्मिती झाली आहे.

रमल – याला पाशकविद्या असेही म्हणतात. यात फासे टाकून जे दान पडेल, त्याचा विचार करून त्यावरून प्रश्नाचे उत्तर सांगतात. रमल हा शब्द अरबी आहे. रमलावर जे संस्कृत ग्रंथ उपलब्ध आहेत, त्यांतले पारिभाषिक शब्द बहुतेक अरबीच आहेत. यावरून ही विद्या मूळची अरबी मुसलमानांची असावी, असे काही लोकांना वाटते; पण ते बरोबर नाही. बावर नावाच्या एका युरोपियन गृहस्थाला गुप्तकालीन लिपीत भूर्जपत्रावर लिहिलेला एक ग्रंथ सापडला आहे. सदर ग्रंथ इ. स. ३५० ते ५०० या कालखंडात केव्हा तरी लिहिला गेला आहे. त्यात रमलपद्धती दिलेली असून, त्यातल्या बहुतेक पारिभाषिक संज्ञा काही संस्कृतात व काही प्राकृतात आहेत. तंजाऊरच्या ग्रंथालयात गर्गसंहितेचे एक पुस्तक आहे. त्यात पाशकावली नावाचे एक प्रकरण असून ते रमलविद्येवर आहे. त्यात वापरलेली दुंदुभी ही एक संज्ञा बावरला सापडलेल्या ग्रंथातही आढळते. त्यावरून रमलविद्या ही मूळची भारतातलीच आहे, असे ठरते. रमलावर रमलचिंतामणी, रमलामृत असे आणखीही काही संस्कृत ग्रंथ आहेत. [भा. ज्यो. इ.; भा. ज्यो. शा.; वेधसाधने आणि वेधशाळा; ज्यो. कौ.; श्रीयुत, मार्च १९६१; वि. स्मृ. ग्रं.; जातकमार्गोपदेशिका; बृहज्जातक]

ज्योतिष्कथा

आकाशातील सूर्य, चंद्र व तारका यांना ज्योती अशी संज्ञा आहे. त्यांच्या संबंधीच्या कथा त्या ज्योतिष्कथा होत. ज्योतिष्कथांची निर्मिती फार प्राचीन काळातच सुरू झाली. डोक्यावरील अफाट आकाश आणि पायाखालची विशाल धरणी ही दोन महद्भूते पाहून प्राचीन माणसाचे कुतूहल जागृत झाले. मग तो एकेक कल्पना करू लागला. आकाश हे क्षितिजाशी पृथ्वीला भिडते, हे त्याने पाहिले. त्यावरून आकाश व पृथ्वी यांचे नाते पतिपत्नीचे असावे, असे त्याने कल्पिले. जागतिक ज्योतिष्कथांत पृथ्वी व आकाश यांना पतिपत्नीच मानलेले आहे.

भारतीय ज्योतिष्कथांचा उगम ऋग्वेदातील अदितीच्या

कल्पनेत आढळतो. तिथे अदितीला आकाशाची पत्नी म्हटले, आहे. ती देवांची माता असून, देवांना मधुयुक्त पय पाजते. अदितीला एका ठिकाणी दुभती गाय असेही म्हटले आहे. मातारूप पृथ्वी व धेनुरूप पृथ्वी या दोन्ही कल्पना भारतीय जनमानसात खोलवर रुजलेल्या असून, त्यांचा उगम ऋग्वेदाइतका प्राचीन आहे.

पृथ्वीचे आकाशाशी लग्न झाल्याची अत्यंत त्रोटक कथा ऐतरेय ब्राह्मणात आढळते, ती अशी – प्रथम आकाश व पृथ्वी एकत्र होती. मग ती विभक्त झाली. त्यामुळे पाऊस पडेनासा झाला व पंचजनात कल्लोळ माजला. तेव्हा देवांनी त्यांना एकत्र आणले व त्यांचे लग्न लावले.

पृथ्वी ही आकाशाची पत्नी ही कल्पना पुढे मात्र विसरली गेली. वेदोत्तर काळी पृथ्वी ही विष्णुपत्नी म्हणजे सूर्यपत्नी मानली जाऊ लागली. पण सूर्य व पृथ्वी यांच्या लग्नाचा उल्लेख पौराणिक वाङ्मयात कुठेही आढळत नाही. लोकसाहित्यात मात्र तो आढळतो. रथसप्तमीला सूर्य व पृथ्वी यांचे लग्न लागते, अशी समजूत महाराष्ट्रात आहे. छत्तीसगडात हे लग्न चैत्रात लागते, असे मानतात; तर द्रुग जिल्ह्यात दिवाळीच्या आधीच्या पंधरवड्यात ते होते, असे समजतात.

सूर्याच्या उत्पत्तीच्या कथा वैदिक वाङ्मयात नाहीत. इंद्राने किंवा धात्याने सूर्याला उत्पन्न केले किंवा सोमापासून सूर्य झाला, असे फक्त काही उल्लेख तेवढे ऋग्वेदात आढळतात. प्रजापतीने सूर्य, चंद्र, उषा व वायू यांना एकदम निर्माण केले, असा एक उल्लेख शतपथ ब्राह्मणातही येतो (२.२.४.५).

सूर्यापेक्षा चंद्रासंबंधीच्या कथा वैदिक साहित्यात व लोकसाहित्यात अधिक आढळतात. शतपथ ब्राह्मणात चंद्राच्या उत्पत्तीची कथा दिली आहे, ती अशी– इंद्राने वृत्राला वज्र मारले. त्या वेळी वृत्राने प्रार्थना केली, की ‘मला अमर कर.’ मग इंद्राने वृत्राच्या सोममय भागाला आकाशातील चंद्र बनवले.

सूर्य, चंद्र व नक्षत्रे यांच्या परस्पर संबंधाच्याही काही कथा आढळतात. छोटा नागपुरातले खरिया व संताळ हे लोक चंद्रसूर्यांना पतिपत्नी व नक्षत्रांना त्यांची मुले मानतात. त्यांच्या काही कथांत सूर्य आपल्या मुलांना खातो, असे सांगितले आहे. सकाळ होताच आकाश नक्षत्रहीन होते, या साक्षात्कारावर ही कल्पना आधारलेली आहे. बिहारच्या संताळ लोकांत चंद्रा ही सूर्यपत्नी अशी कल्पना करून एक कथा निर्माण झाली आहे, ती अशी– सूर्याची प्रजा आपल्या तेजाने जगाला त्रास देऊ लागली. तिची संख्याही पुष्कळ वाढली आणि ती स्वर्गात मावेनाशी झाली. तेव्हा भगवानाने चंद्रेची मदत घेऊन सूर्याची संतती वाढणार नाही, असे करायचे ठरवले. चंद्रा एकदा बेलफळ खात होती. सूर्याने तिला विचारले, ‘काय खातेस?’ चंद्रेने उत्तर दिले, ‘माझी मुले.’ सूर्याला बेलफळ फार आवडले आणि मग त्याने आपली मुले खाऊन टाकली.

सूर्य-चंद्र ही पतिपत्नी असली, तरी त्यांची भांडणे झाल्यामुळे ती एकत्र राहत नाहीत आणि त्यामुळे त्यांचे समोरासमोर दर्शन क्वचितच होते, अशाही काही कथा आहेत.

वैदिक वाङ्मयात नक्षत्रांना किंवा ताऱ्यांना ऋक्ष असे नाव दिलेले आहे. पूर्वी प्रत्येक नक्षत्र किंवा तारा सूर्याप्रमाणे तेजस्वी होता. पण पुढे सूर्याने त्यांना शोषून घेतले (आ+दा), म्हणून त्याला आदित्य व ताऱ्यांना नक्षत्र असे नाव पडले, असे तैत्तिरीय व शतपथ ब्राह्मणांत सांगितले आहे.

तैत्तिरीय ब्राह्मणात प्रजापती हा नक्षत्रिय पुरुष असल्याचा उल्लेख आढळतो.

सूर्य व चंद्र यांच्या खालोखाल कृत्तिकांसंबंधी कथा आहेत. कृत्तिका या सप्तर्षींच्या भार्या. पण त्यांचा पतींबरोबर सहवास झाला नाही. सप्तर्षी उत्तरेला उगवतात; तर या पूर्वेला उगवतात. अग्नी हा त्यांचा भोक्ता आहे, असे शतपथ ब्राह्मणात म्हटले आहे.

शतपथ ब्राह्मणात रोहिणी, मृगशीर्ष व व्याध यांच्याबद्दल एक कथा आहे, ती अशी– आपली कन्या उषा हिच्यावर प्रजापतीचे मन गेले. तेव्हा ती मृगी (रोहिणी) होऊन पळू लागली. प्रजापती मृगरूप घेऊन तिच्या जवळ गेला आणि त्याने मागून तिच्याशी संभोग केला. देवांना हे आवडले नाही. त्यांनी रुद्राकडून बाण मारवून प्रजापतीचा शिरच्छेद केला.

तैत्तिरीय ब्राह्मणातील तिसऱ्या कांडात कृत्तिका नक्षत्रांपासून अभिजित नक्षत्रासह एकूण अठ्ठावीस नक्षत्रांसाठी एकेक इष्टी सांगितली आहे. या नक्षत्रेष्टींना नक्षत्रसत्र असे नाव आहे. त्यात पुनर्वसू नक्षत्राविषयी सांगितले आहे ते असे– ही पृथ्वी एकदा ओषधिरूप केसांनी रहित आणि वस्तूंच्या अभावामुळे क्रूर दिसणारी अशी होती. ओषधी आणि वनस्पती यांना उत्पन्न करावे, अशी तिने एकदा इच्छा केली आणि अदिती व पुनर्वसू नक्षत्र यांच्यासाठी चरूचा याग केला. त्यामुळे पृथ्वीवर ओषधी व वनस्पती उत्पन्न झाल्या.

अरुंधतीच्या तारकेचा उल्लेख सूत्रवाङ्मयात नववधूला अरुंधतीदर्शन घडविण्याच्या प्रसंगाने अनेकदा आला आहे. अरुंधती ही वसिष्ठाची पत्नी असे महाभारतात सांगितले आहे. दक्षिणेत ती माडिगा या अस्पृश्य जातीची मुलगी मानलेली आहे.

ताऱ्यांप्रमाणेच मंगळ, बुध, गुरू, इ. ग्रहांविषयीही पौराणिक व लौकिक कथा आहेत. अशा प्रकारच्या ज्योतिष्कथा निर्मून भारतीय कथाकारांनी आकाशदर्शनाविषयी लोकांत औत्सुक्य

निर्माण केले आणि माणसे व आकाशस्थ ज्योती यांच्यांत सांस्कृतिक संबंध प्रस्थापित केला. [लो. सा. रू.; ज्यो. कौ.]

ज्योतिष्टोम एक सोमयाग. अग्निहोत्री यजमानाने हाच सोमयाग प्रथम करायचा असतो. सोमयागात सामगानांच्या वेळी ऋचांची आवृत्ती करून त्यांची संख्या वाढविली जाते, त्याला स्तोम अशी संज्ञा आहे. त्रिवृत्, पंचदश, सप्तदश आणि एकविंश या चार स्तोमांना तैत्तिरीय ब्राह्मणात ज्योती असे म्हटले आहे (१.५.११.१). पहिल्या सोमयागातील सामगानांमध्ये या चारही स्तोमांचा समावेश होत असल्यामुळे या सोमयागाला ज्योतिष्टोम असे म्हटले आहे. या यागाची समाप्ती अग्निष्टोम स्तोत्र गाऊन करतात. याचा सर्व विधीही अग्निष्टोमाप्रमाणेच करावा, असे सांगितले आहे. पाहा – अग्निष्टोम. [श्री. विद्याधरशास्त्री भिडे]

ज्योतिसर कुरुक्षेत्रातील भगवद्गीतेचे जन्मस्थान. या स्थानी भारतीय युद्धप्रसंगी श्रीकृष्णाने अर्जुनाला गीता सांगितली. हे स्थान थानेश्वराच्या पश्चिमेला तीन मैल अंतरावर कुरुक्षेत्राहून पेहवाकडे जाणाऱ्या सडकेवर आहे. सरस्वती नदी इथून जवळच वाहते.

सध्या या ठिकाणी एक प्राचीन सरोवर आणि काही वटवृक्ष आहेत. या सरोवराचे नाव ज्योतिसर असे आहे. या सरोवराच्या नावानेच हे स्थान प्रसिद्ध आहे. त्याच्या काठी असलेल्या जुन्या वटवृक्षांपैकी एक वटवृक्ष पवित्र मानला जातो. हा वृक्ष गीताजन्माचा एकमेव विद्यमान साक्षी आहे, अशी लोकांची श्रद्धा असल्यामुळे त्याला अक्षयवट म्हणतात.

हर्षवर्धनाच्या काळात हे स्थान थानेश्वराच्या कक्षेतच समाविष्ट होते. सुमारे दीडशे वर्षांपूर्वी काश्मीरच्या एका राजाने इथल्या एका भग्न शिवमंदिराच्या अवशेषांजवळ शिवमंदिर उभारले. हे मंदिर ज्योतिसराच्या उत्तर तीरावर आहे. इ. स. १९२४ मध्ये दरभंग्याच्या महाराजांनी इथे अक्षयवटाभोवती चौथरा उभारला आणि श्रीकृष्णाचे छोटे मंदिरही बांधले.

ज्योतिसर अत्यंत विशाल (१००० फूट लांब आणि ५०० फूट रुंद) असून, त्याच्या उत्तर आणि पूर्व तीरांवर सुंदर पक्के घाट बांधलेले आहेत. [कल्याण–तीर्थांक]

ज्योती अवतार एक कल्पना. सूफी साहित्यात अल्लाचा पहिला अवतार नूर किंवा ज्योती असल्याचे सांगितले आहे. सृष्टीत सर्व रूपांच्या पूर्वी ज्योती दिसते, असे एक मत आहे. म्हणूनच हा ज्योती अवतार मानला गेला. सूफी लोक या अवताराचा जो क्रम मानतात, तो असा–

प्रथम खुदाचे प्रेम किंवा खत्र यापासून नूर किंवा ज्योती उत्पन्न होते. नूरपासून शेर, शेरपासून रुह (आत्मा), रुहपासून कल्ब (हृदय) व कल्बपासून कालिब (शरीर) उत्पन्न होते.

दुसऱ्या एका परंपरेनुसार मुहंमद हा स्वतःला अल्लाचा नूर म्हणवून घेतो व सारी सृष्टी आपल्या ज्योतीचा विस्तार आहे, असे मानतो.

इस्लाम धर्म निर्माण होण्यापूर्वी शेकडो वर्षे या ज्योती अवतारकल्पनेचा उगम बौद्ध धर्मात झाला होता. सद्धर्मपुंडरीक या ग्रंथात बुद्धाच्या ज्योती अवताराचा उल्लेख आलेला आहे. बुद्धाला जेव्हा लोकांना धर्मोपदेश करायचा असे, तेव्हा भ्रूमध्यातील ऊर्णाकोशातून तो एक किरण बाहेर टाकी. त्यामुळे अठरा सहस्र बुद्धक्षेत्रे अवभासित होत असत, असे तिथे म्हटले आहे. या बौद्ध ज्योती अवतार परंपरेचा प्रभाव पुढे इस्लामवरही पडला. ज्योतीने प्रभावित झालेल्या अनंत बुद्धांप्रमाणे इस्लाम धर्मातही लाखो पैगंबर ज्योतिप्रभावित मानण्यात येऊ लागले.

भारतीय सूफी मसनवी काव्यांच्या आधी या ज्योती अवतार परंपरेचा क्रम जलालुद्दीन रूमीच्या मसनवीत विस्ताराने वर्णिलेला आहे. त्यात सांगितले आहे, की अल्लाच्या द्वारे जी ज्योती प्रक्षेपित केली गेली, ती क्रमशः आदम, नोह, अब्राहम, इस्माइल, दाउद, सालमन, जेकब, जोसेफ, मूसा व येशू यांच्यांत प्रविष्ट झाली. पुढे मुहंमद जेव्हा या ज्योतिपरंपरेत आला, तेव्हा त्याने अल्लाकडून शक्ती व अनुग्रह प्राप्त करून घेतला.

मुहंमदानंतर शिया व सूफी या संप्रदायांत ज्योती अवताराच्या सांप्रदायिक परंपरेचा विकास झाल्याचे दिसून येते. विशेषतः शिया संप्रदायात असे मानले आहे, की सृष्टीच्या पुष्कळ आधी अल्लाने आपल्या ऐश्वर्यशक्तीतून एक किरणज्योती मुहंमदाच्या ठिकाणी संक्रांत केली व तीच ज्योती पुढे वलीप्रभृती इमामांच्या ठिकाणी आविष्कृत होत राहिली. [म. सा. अ.]

ज्वरदेव शिव-परिवारातील एक रोगकारक देव. याने शिवाच्या आदेशावरून भस्मासुराचा नाश केला, अशी कथा पुराणांत आहे. तिथे त्याचे नाव ज्वरहर आहे.

कृष्ण – बाणासुर युद्धात शिवाने त्रिशिर आणि त्रिपाद असा माहेश्वर नावाचा ज्वर कृष्णावर सोडला आणि त्याच्या प्रतिकारासाठी कृष्णाने त्याच्यावर वैष्णव ज्वर सोडला, अशी कथा भागवताच्या दशमस्कंधात आहे. याच युद्धात पुढे जेव्हा ज्वर शरण आला, तेव्हा कृष्णाने त्याला जो उपदेश केला, तो असा–

शृणुष्व ज्वर सन्देशं यथा लोके चरिष्यसि ।
सर्वजातिषु विश्रब्धं यथा स्थावरजङ्गमे ।।

त्रिधा विभज्य चात्मानं मत्प्रियं यदि काङ्क्षसे ।
चतुष्पादान्भजैकेन द्वितीयेन च स्थावरान् ।।
तृतीयो यश्च ते भागो मानुषेषूपपत्स्यते ।
(हरिवंश १२३. २०-२२)



ज्वरदेव

अर्थ – हे ज्वरा, सर्व जातीच्या स्थावर व जंगम सृष्टीत तू संचार कर. त्याची रीत मी तुला सांगतो. माझे प्रिय करण्याची तुला इच्छा असेल, तर तू आपले तीन विभाग कर. त्यांतील एका विभागाने चतुष्पाद प्राण्यांच्या, दुसऱ्याने स्थावरांच्या व तिसऱ्याने मनुष्यजातीच्या शरीरात प्रवेश कर.

वनदुर्गा उपनिषदात ज्वराला देवता मानून, त्याची पुढील गायत्री-मंत्राने स्तुती केली आहे–

भस्मायुधाय विद्महे तीक्ष्णदंष्ट्राय धीमहि ।
तन्नो ज्वरः प्रचोदयात् ।

आगम ग्रंथात त्रिपाद, त्रिमुख, नवनेत्र व षड्भुज असे याचे ध्यान दिले असून, याची मुद्रा निरुत्साही असल्याचे सांगितले आहे. कोइंबतूर जिल्ह्यात या ज्वरदेवाची एक मूर्ती आहे. याच्या चतुर्भुज मूर्तीही आढळतात. [हैं. सा. इं. इ.; सा. इं. इ. गॉ. गॉ.; क्रि. स्ट. ले. उ.]

ज्वरनाशनयंत्र

हे यंत्र भूर्जपत्रावर लिहून त्याच्या मधल्या वर्तुळात ज्वररोग्याचे नाव लिहितात. मग त्या यंत्राची पूजा करून ते उष्ण ज्वर नष्ट होण्यासाठी थंड पाण्यात व शीत ज्वर नष्ट होण्यासाठी गरम पाण्यात बुडवतात. नंतर ते यंत्र ताईतात घालून दंडात बांधतात. असे केल्याने शीतोष्ण ज्वर शमतात, असे सांगितले आहे. [यं. चिं.]



ज्वरनाशनयंत्र

ज्वरशांती

शरीरातले ज्वरादी दोष दूर व्हावे व निरामय दीर्घायुष्य मिळावे, यासाठी ही शांती करायची असते. या शांतीचा विधी शांतिकमलाकर या ग्रंथात सांगितला आहे, तो असा–

संकल्पपूर्वक प्रारंभ केल्यानंतर कलशस्थापना करतात. त्यावर पूर्णपात्र ठेवून त्यात ज्वररूपी रुद्राची सुवर्णप्रतिमा स्थापतात. रुद्राच्या जोडीने ज्वर, वातज्वर, पित्तज्वर, उग्रज्वर, इ. सोळा ज्वरदेवतांचे आवाहन करून त्या सर्वांची पूजा करतात. मग अग्निस्थापना व ग्रहस्थापनाही करतात. प्रधान होमाच्या वेळी रुद्रदेवतेला दुधात भिजवलेल्या आंब्याच्या पानांच्या एक हजार आठ आहुती देतात. इतर देवतांनाही त्याच हविर्द्रव्याची एकेक आहुती व ग्रहांना त्यांच्या हविर्द्रव्याच्या आहुती देतात. मग स्विष्टकृतापासून बलिदानापर्यंत सर्व कर्म इतर शांतिविधीप्रमाणेच करतात. [श्री. विद्याधरशास्त्री भिडे]

ज्वरहरव्रत

दीर्घकाल ज्वराने पीडित झालेल्या मनुष्याने ज्वर नाहीसा होण्यासाठी करायचे एक व्रत. अष्टमी, एकादशी, द्वादशी किंवा चतुर्दशी यांपैकी कोणत्याही तिथीला हे व्रत करता येते. त्याचा विधी पुढीलप्रमाणे–

प्रातःस्नानादी कृत्ये करून लोकरीच्या शुभासनावर पूर्वेकडे किंवा उत्तरेकडे तोंड करून बसावे व व्रताचा संकल्प करावा. त्यानंतर एका सुवर्णपत्रावर ज्वराचे स्वरूप लिहावे. विष्णुमंत्र म्हणून विष्णूची पूजा व रुद्रमंत्र म्हणून रुद्राची पूजा करावी. मग त्या सुवर्णपत्राचे पूजन करून पुढील मंत्र यथाशक्ति जपावा—

ॐ नमो महाज्वराय विष्णुरुद्रगणाय भीममूर्तये
सर्वलोकभयङ्कराय मम तापं हर हर स्वाहा ।

जपसंख्येच्या दशांश संख्येने पांढऱ्या मोहरीचे हवन करावे. त्यानंतर ब्राह्मणांना भोजन घालून सुवर्ण दक्षिणा द्यावी. कर्त्याने त्या दिवशी एकभुक्त राहावे. [व्र. प.]

ज्वालानृसिंह एक देवता. नृसिंहाचे हे एक रूप आहे. चतुर्भुज, त्रिनेत्र आणि व्यात्तानन (जबडा पसरलेला) असे याचे ध्यान असते. हा चक्रावर बसलेला असून, त्याच्या चारही हातांत चक्रेच असतात. [श्रीविद्यार्णवतंत्र]

ज्वालामुखी क्षेत्र एक शक्तिपीठ. ज्वालामुखी देवीचे मंदिर कांगडा प्रदेशात बियास नदीच्या खोऱ्यात टेकड्यांच्या भव्य पार्श्वभूमीवर उभे आहे. या देवीच्या मंदिरात आणि मंदिराच्या परिसरात ज्वलनशील वायूचे आणि उष्णोदकाचे अनेक उद्रेक आहेत. मंदिराच्या गर्भगृहात देवीची मूर्ती नाही. तिथे तीन फूट खोलीचे एक कुंड असून भोवती प्रदक्षिणामार्ग आहे. या कुंडाच्या तळाशी असलेल्या खडकाच्या भेगांतून ज्वलनशील वायूचे उद्रेक होत असतात. या देवीचे पुजारी भोजकी जातीचे आहेत. ते या कुंडात सतत तुपाच्या आहुती टाकतात; त्यामुळे एकसारख्या ज्वाला उसळतात. या ज्वालांनाच देवीचे प्रतीक समजतात.



ज्वालामुखी देवीचे मंदिर

या मंदिराच्या परिसरात अनेक प्राचीन अवशेष आढळतात. त्यावरून असे दिसते की, इथे प्राचीन काळी एखादे प्रसिद्ध नगर अस्तित्वात असावे. हे स्थान ५१ शक्तिपीठांपैकी एक मानले जात असल्यामुळे इथे सतीसंबंधी अनेक आख्यायिका प्रचलित आहेत. सतीने अग्नी प्रज्वलित करून इथेच स्वतःला जाळून घेतले आणि तेव्हापासून इथे ज्वाला उसळू लागल्या, असे सांगतात. सतीची जिव्हा इथे गळून पडली, असे तंत्रचूडामणीत म्हटले आहे. मत्स्य पुराणातील पुढील श्लोकात एक मातृदेवता म्हणून ज्वालामुखीचा उल्लेख आहे—

पिण्डजिह्वा चलज्ज्वाला शिवा ज्वालामुखी तथा ।
एताश्चान्याश्च देवेशः सोऽसृजन्मातरस्तदा ।।

(मत्स्य. १७८·३२)

अर्थ— शिवाने पिंडजिव्हा, चलज्ज्वाला, शिवा आणि ज्वालामुखी या आणि आणखीही अनेक मातृा निर्माण केल्या.

इथे गोरखनाथाच्या नावाची एक विहीर असून, नागार्जुनाचे एक लहानसे मंदिर आहे. हे दोन सिद्ध ज्वालामुखी देवीचे भक्त होते, असे स्थानिक लोक मानतात. या सिद्धांच्या संपर्कावरून असे वाटते, की हे तांत्रिकांचेही एक केंद्र असावे.

अकबर आणि रणजितसिंह हे राजपुरुष या देवीचे भक्त होते. अकबराने देवीला एक मूल्यवान छत्र अर्पण केले आणि रणजितसिंहाने मंदिराला सुवर्णाच्या मुलाम्याचे छत चढविले. रणजितसिंहाचा पुत्र खड्गसिंह याने मंदिराला चांदीच्या गजांचे द्वार बसविले आहे.

येथे नवरात्रात मोठा उत्सव होतो. त्या वेळी पन्नास हजारांहून अधिक यात्रेकरू इथे जमतात. चैत्रातही मोठी यात्रा भरते.

संत तुकारामाचे परात्परगुरू राघव चैतन्य यांनी रचलेले ज्वालामुखीचे संस्कृत स्तोत्र एका शिलालेखात उपलब्ध झाले आहे. त्यातील पहिला श्लोक असा—

पायाज्ज्वालामुखी वः प्रणतसुरवरस्फारकोटीरकोटी ।
कोटीव्याटीकमानद्युमणिसममणिश्रेणिभावेणिभाता ।।
कल्पान्तक्षोभजृम्भाभररभससमारम्भसंरम्भभीम— ।
ज्वालामालाकरालाननलघुकवलीभूतभूतप्रपञ्चा ।।

अर्थ — कोटचवधी देवांचे देदीप्यमान मुकुट जिच्या चरणी झुकलेले आहेत, कोटचवधी चल सूर्यांप्रमाणे तेजस्वी अशा मण्यांमुळे जिची वेणी शोभिवंत झालेली आहे, कल्पांतीच्या

क्षोभामुळे जिने जांभई देताच मुखातून प्रलयंकर ज्वाला वेगाने उसळताहेत आणि त्या भयंकर ज्वालांमुळे विक्राळ दिसणाऱ्या मुखात सकल भूत–प्रपंच लहानशा घासासारखा सामावला गेला आहे, अशी ती ज्वालामुखी देवी तुमचे रक्षण करो.

उत्तर भारतात या स्थानाविषयी सार्वत्रिक श्रद्धाभाव आहे. [श्री. बलराजकृष्ण– धर्मयुग, २३ नोव्हें. १९५२; श. क.; कल्याण–तीर्थांक; हि. जॉ. ए. इं.]

ज्वालेश्वर एक क्षेत्र. हे अमरकंटकाजवळ आहे. शिवाने जी त्रिपुरे जाळली, त्यांपैकी एक जळते पुर इथे पडले, असे मत्स्य (१८८·८०) आणि पद्म (१·१५·६९) या पुराणांत म्हटले आहे. इथे जमिनीतून ज्वलनशील वायू सतत बाहेर येतो. तो पेटवला असता ज्वाला उसळत राहते. या ठिकाणी स्नान करणाऱ्या मनुष्याला स्वर्गप्राप्ती होते आणि इथे प्राणत्याग करणारा मनुष्य जन्ममरणाच्या फेऱ्यातून सुटतो, असे या स्थानाचे माहात्म्य पद्मपुराणाने गायिले आहे. [हि. ध.]

झ च वर्गातील चौथा वर्ण व देवनागरी वर्णमालेतील नववे व्यंजन. या वर्णाची जैन व दक्षिणी अशी दोन वळणे आहेत. दक्षिणी वळण असलेल्या झ ची पहिली अवस्था अशोकाच्या गिरनार येथील शिलालेखात, दुसरी इ. स. च्या दुसऱ्या शतकातील वासिष्ठीपुत्र पुलुमायी याच्या लेखात व तिसरी राजा शिवगणाच्या कोटा येथील लेखात (इ. स. ७३८) आढळते. इ. स. च्या ११ व्या शतकातील एका हस्तलिखितात चौथी अवस्था दिसते. या चौथ्या अवस्थेपासून पुढे पाचव्या अवस्थेतील झ तयार झाला असावा. या वर्णाचे स्त्रीरूपात ध्यान सांगितले आहे, ते असे—



झ च्या रूपाचा विकासक्रम

सन्तप्तहेमवर्णाभां रक्ताम्बरविभूषिताम् ।
रक्तचन्दनलिप्ताङ्गीं रक्तमाल्यविभूषिताम् ॥
चतुर्दशभुजां देवीं रत्नहारोज्ज्वलां पराम् ।
ध्यात्वा ब्रह्मस्वरूपां तां तन्मन्त्रं दशधा जपेत ॥
(वर्णोद्धारतंत्र)

अर्थ – तप्त सुवर्णाच्या कांतीची, रक्त वस्त्र नेसलेली, अंगाला रक्तचंदनाचा लेप दिलेली, लाल फुलांच्या माळा गळयात घातलेली, चौदा भुजा असलेली व रत्नहार ल्यालेली अशी ही झकारमूर्ती आहे. ब्रह्मस्वरूप अशा तिचे ध्यान करून दहा वेळा तिचा मंत्र जपावा.

तालू हे याचे उच्चारणस्थान होय. [म. ज्ञा. को.; श. क.]

झमेला व्रजमंडलातील एक नृत्य. होळीच्या दिवसात स्त्रिया फेर धरून हे नृत्य करतात. नृत्याच्या वेळी गाणीही गातात. [कृ. जी. व्र. श.]

झरथुष्ट्र पारशी धर्माचा संस्थापक. याच्या काळाविषयी विद्वानांमध्ये मतभेद आहेत. सनपूर्व द्वितीय सहस्रकात हा होऊन गेला असावा, असे अनेक विद्वानांचे मत आहे. पण ऋग्वेदात याचे उल्लेख आलेले असल्यामुळे याचा काळ निदान ऋग्वेदाच्या रचनाकाळाइतका तरी मागे जातो, असे मानले पाहिजे. स्पितमा हे त्याचे कुलनाम होय. काहींच्या मते स्पितमा हे त्याचे मूळ नाव असून, झरथुष्ट्र (झरथ = सुवर्ण, उश्त्र = प्रभामंडित) हे नाव त्याला ज्ञानप्राप्तीनंतर लाभले. त्याच्या पित्याचे नाव पुरुशास्प आणि आईचे नाव दोग्धोवा असे होते. इराणी आर्यांचा देवाधिदेव जो अहुर मझ्द त्याच्या तेजाचा अंश दोग्धोवाच्या उदरातील गर्भात प्रविष्ट झाला आणि त्या दिव्य तेजाने युक्त असा झरथुष्ट्र, फरवर्दीन महिन्यातल्या खोरदादच्या दिवशी (नववर्षदिनी) इराणातल्या मिडिया प्रांतात रये नामक गावी जन्मास आला.

सत्यधर्माचा उद्धारक इराणात जन्मास येणार आहे, याविषयी प्राचीन काळापासून भविष्य वर्तवले जात असे. झरथुष्ट्राच्या जन्मापूर्वीच्या सुवर्णयुगातील सम्राट जमशेद हा एकदा दुष्ट दानवांना उद्देशून म्हणाला होता. 'अरे नीचांनो, काही काळ थांबा. तुमचे पारिपत्य करणारा महात्मा झरथुष्ट्र जन्मास येणार आहे.' त्यानंतर म्हणजे झरथुष्ट्राच्या जन्मापूर्वी तीन शतके एका बैलाला वाचा फुटली आणि त्याने धर्मोद्धारकाच्या आगमनाचे भविष्य जगाला सांगितले.

झरथुष्ट्र जन्माला येताच रडण्याऐवजी हसू लागला आणि त्याच्या अलौकिक तेजाने सारा परिसर उजळून निघाला. या चमत्कारांची वार्ता बाहेर प्रसृत होताच दुष्ट दानवांना आणि धर्माच्या नावाने अधर्माचे थैमान घालणाऱ्या मांत्रिकांना कळून चुकले, की आपल्या अस्तित्वावर घाला घालायला आलेला पुरुष तो हाच होय. म्हणून मग दानवांचा राजा अहरिमन हा आपल्या अनुयायांसह पाताळात दडून बसला.

झरथुष्ट्राच्या पित्याला प्रारंभी आपल्या मुलाचे दिव्यत्व जाणवले नाही. मुलाच्या जन्मसमयी घडलेले चमत्कार हे

अशुभसूचक तर नसतील ना, या भयाने तो दोरासरून नामक मांत्रिकाकडे गेला. मुलाचे वर्णन ऐकताच दोरासरूनच्या ध्यानी आले, की आपणा सर्वांचा नाश करणारा तो हाच होय. पुरुशास्पाच्या भयाकुल मनःथितीचा फायदा घेऊन त्याने बाल झरथुष्ट्राच्या नाशासाठी अनेक घोर उपाय योजले. त्याने त्याला आगीच्या भट्टीत फेकले, गुरांच्या खिल्लारांनी पायतळी तुडवावे म्हणून गोठणीवर ठेवले, एवढेच नव्हे, तर एकदा त्याला खवळलेल्या लांडग्याच्या तोंडी देण्याचाही प्रयत्न केला. परंतु प्रत्येक वेळी दैवी चमत्कार होऊन झरथुष्ट्र सुरक्षित राहिला.

आयुष्याच्या प्रारंभीची ही अनेक संकटे टळून, झरथुष्ट्र मोठा झाला. पित्यालाही आपल्या मुलाचे मोठेपण उमगू लागले. त्याने झरथुष्ट्राला एका महापंडिताकडे विद्याभ्यासासाठी पाठविले. तिथे झरथुष्ट्राने अनेक गहन विषय लीलया आत्मसात केले.

पंधराव्या वर्षी त्याचे उपनयन झाले. लहानपणापासूनच धर्मचिंतनाकडे त्याची प्रवृत्ती होती. ऐहिक गोष्टींचा मोह सोडून धर्माचरण करावे आणि जगाच्या कल्याणासाठी आयुष्य वेचावे, हे त्याने आपले ध्येय ठरविले होते. त्याच्या उदार हृदयात केवळ मानवांविषयीच नव्हे, तर सर्व चराचर सृष्टीविषयी प्रेम वसत होते. त्याने अनेक धार्मिक व सामाजिक चालीरीतींमध्ये सुधारणा घडविण्याचा उपक्रम केला. अग्निपूजा, हओमचे (सोमाचे) सेवन, भूतदया, इ. धर्मतत्त्वांचा तो आदर करीत असे; परंतु मूर्तिपूजेला मात्र त्याचा प्रारंभापासून विरोध होता. विवाहाच्या वेळी त्याने वडिलांना सांगितले, की नियोजित वधूने विवाहापूर्वीच बुरखा टाकून दिला पाहिजे.


झरथुष्ट्र

विवाहानंतर लौकरच तो तपश्चर्येसाठी बाहेर पडला. त्याच्या गावाजवळच एक पवित्र पर्वत होता. तिथे एकांतरमणीय अशा एका गुहेत बसून त्याने दहा वर्षेपर्यंत धर्मस्वरूपाचे चिंतन केले. अखेरीस त्याच्या सकल संशयांचा निरास होऊन त्याला शाश्वत सत्याचा प्रकाश दिसला.

त्यानंतर प्रसन्न मनाने विचरण करीत असता झरथुष्ट्र एकदा दैत्या नामक नदीच्या काठी गेला. तिथे पहाटेच्या प्रहरी त्याला लागोपाठ तीन वेळा साक्षात्कार झाला, की ‘अहुर मज्दाचा प्रमुख दूत वोहुमना (सद्विचार) हा उपस्थित झाला. त्याने झरथुष्ट्राला देहबुद्धीचा विसर पाडून त्याला अहुर मज्दाच्या देवसभेत नेले. तिथल्या दिव्य तेजाच्या झगझगाटात झरथुष्ट्राला आपली सावलीही दिसेना. तिथे अहुर मज्दाने झरथुष्ट्राला धर्माचे परमश्रेष्ठ ज्ञान दिले.’

पुढील काळातही असे साक्षात्कार सहा वेळा घडले. प्रत्येक वेळी कोणी ना कोणी देवता किंवा देवदूत प्रकट होऊन झरथुष्ट्राला एखाद्या धर्मतत्त्वाचे निरूपण करीत असे. अशा रीतीने त्याच्या ज्ञानाला पूर्णता येत गेली आणि जगाचे अधिराज्य चालविणाऱ्या दैवी शासनसंस्थेशी त्याचा घनिष्ठ संबंध जडला.

पाप आणि अंधकार यांच्या अधिपतीवर सत्य आणि प्रकाश यांचा अधिपती अखेरीस विजय मिळवीलच, असे आशावादी तत्त्वज्ञान झरथुष्ट्राने जगाला उपदेशिण्यास प्रारंभ केला. मानवी जीवनातल्या सर्व आपत्तींचे मूळ म्हणजे सैतान होय, असे त्याला प्रतीत झाले. सैतान हा असत्य, संशय व निराशा यांचा प्रतिनिधी आहे आणि त्याला आपण कधीच हार जाणार नाही, असे तो आत्मविश्वासाने म्हणत असे.

झरथुष्ट्र लोकांत जाई आणि त्यांना आत्मविश्वासाने सांगे. ‘लोक हो! अंधश्रद्धा व भीती यांच्यावर अधिष्ठित असलेले तुमचे देव अंग्रमैन्यू नावाच्या मोठ्या असत्यस्वरूपी राक्षसाचे दूत आहेत. तुमची गुरे पळवून नेणारे तुराणी लोकही या सैतानाच्या प्रेरणेनेच तुमच्यावर हल्ले करतात. परंतु सत्य व प्रकाश यांचा देव अहुर मज्द हा अंग्रमैन्यूचा पूर्ण पराजय करील, अशी वेळ आता जवळ आली आहे.’

धर्मोपदेश करण्याला प्रारंभ केल्यानंतरही झरथुष्ट्राला अनेक वेळा निराशेने आणि मोहाने ग्रासले; परंतु त्या प्रत्येक वेळी त्याने निग्रहाने स्वतःला सावरले. आपणाला झालेल्या ज्ञानाचा लोकांनी तत्काळ स्वीकार करावा, अशी त्याची अपेक्षा होती. परंतु अनेक वर्षेपर्यंत सतत प्रयत्न करूनही त्याला कोणी

अनुयायी मिळेना. कर्मठांनी आणि दांभिकांनी तर त्याला तीव्र विरोधच सुरू केला. त्यामुळे त्याची अस्वस्थता वाढली. अशा मनस्थितीत तो चिंतनासाठी पुनश्च गुहेत गेला. लोकांनी आपला संदेश स्वीकारावा यासाठी कोणते उपाय योजावे, या एकाच गोष्टीवर त्याच्या चिंतनाचा भर होता.

अखेरीस वयाच्या चाळिशीच्या सुमारास त्याने आपला मिडिया प्रांत सोडला आणि बॅक्ट्रियात प्रयाण केले. वाटेत मह्घ्योमाह नामक त्याच्या चुलत भावाने त्याचे शिष्यत्व स्वीकारले. हाच त्याचा पहिला शिष्य होय.

बॅक्ट्रियाची राजधानी बल्ख येथें जाऊन पोचल्यावर झरथुष्ट्राने राजपरिवारातील लोकांना आपले विचार सांगण्याला प्रारंभ केला. बॅक्ट्रियाचा तरुण राजा विश्तास्प याच्या कानी झरथुष्ट्राची कीर्ती जाताच त्याने त्याला आपल्या दरबारी बोलावले. काही संभाषण होताच राजाला त्याचे विचार पटले; परंतु तो त्याचा नवा धर्म स्वीकारायला मात्र तयार होईना. राजपरिवारातल्या काही कर्मठ व दांभिक लोकांनी तिथेही त्याच्या विरुद्ध कारस्थान रचले. त्यांनी झरथुष्ट्राच्या निवासस्थानी खिळे, केस, कुत्र्यामांजरांची हाडे, इ. जादूटोण्याचे साहित्य गुप्तपणे टाकून राजाला असे सांगितले, की झरथुष्ट्र हा चेटक्या असून, तो लोकांना मंत्रांनी मारून टाकून ठार मारतो. झरथुष्ट्राच्या निवासस्थानी चेटकाचे साहित्य सापडल्यामुळे राजाने हा आरोप खरा मानला व चेटक्या म्हणून त्याला कारावासात डांबून टाकले.

झरथुष्ट्र कारागृहात अडकताच असा चमत्कार झाला, की राजाच्या अत्यंत आवडत्या घोड्याचे चारही पाय पोटाशी आखडले गेले. राजाने अनेक उपाय केले, तरी घोडा बरा होईना. राजाने शेवटी नाइलाजाने झरथुष्ट्राला कारागृहातून बाहेर आणले आणि त्याला घोड्यावर उपाय करण्याची विनंती केली. धर्मकार्य साधण्याला ही संधी चांगली आहे, हे ओळखून झरथुष्ट्राने राजाला चार अटी घातल्या. एकेक अट पाळण्याचे अभिवचन राजाकडून मिळाले, की घोड्याचा एकेक पाय मोकळा होणार होता. राजाने आपला नवा धर्म स्वीकारावा, राजाचा शूर पुत्र इस्पेंदिअर याने या धर्माच्या संरक्षण-संवर्धनासाठी आपले शस्त्र वाहावे, राणीने हा धर्म स्वीकारावा आणि आपल्याविरुद्ध कट करणारांची नावे राजाने जाहीर करावी, अशा त्या चार अटी होत्या. या चार अटी राजाने मान्य केल्यानंतर घोडा पूर्ववत झाला. या घटनेमुळे झरथुष्ट्राच्या धर्माला राजमान्यता लाभली आणि झरथुष्ट्राच्या शत्रूंना दहशत बसली.

राजाने नव्या धर्माचा स्वीकार करताच प्रजेतही तो धर्म मूळ धरू लागला. पुढे इराण-तुराणची सीमा ओलांडून बाहेरच्या देशांतही तो धर्म प्रसार पावू लागला. ग्रीक आणि भारतीय विचारवंतही त्याच्याकडे आकृष्ट झाले.

झरथुष्ट्र आणि त्याचा नवा धर्म यांचे हे झगझगीत यश पाहून विरोधक चिडले आणि त्यांनी आरजास्प नामक तुराणी राजाला पुढे करून विश्तास्पावर चढाई केली. या युद्धात राजपुत्र इस्पेंदिअरने अतुलनीय पराक्रम गाजवून विरोधकांना परतवून लावले.

पण हा संघर्ष एवढ्यावरच थांबला नाही. पराभवाने चिडलेला आरजास्प वीस वर्षांनंतर पुनश्च विश्तास्पावर चाल करून आला. त्याच्या सेनेतील रानटी तुर्कांनी राज्यातल्या प्रजेची लांडगेतोड केली. बल्ख नगरातल्या एका अग्निमंदिरात ऐंशी पुरोहितांसह उपासना करण्यात मग्न असलेल्या झरथुष्ट्रावरही त्यांनी हल्ला केला. त्या हल्ल्यात झरथुष्ट्र ठार झाला. शत्रूंनी त्याच्या रक्ताने मंदिरातला पवित्र अग्नी विझवला आणि तिथल्या पवित्र ग्रंथांची होळी केली.

अशा प्रकारे हा नवधर्मप्रवर्तक महात्मा दुराराध्य दुष्टांच्या शस्त्राघाताला बळी पडला. या वेळी त्याचे वय अठ्ठ्याहत्तर वर्षांचे होते.

झरथुष्ट्राने धर्मचिंतनाबरोबरच समाजसुधारणेचाही विचार केला होता. त्याने आपल्या काळच्या समाजाला कृषी व पशुपालन यांचे महत्त्व पटवून दिले. त्याने अत्यंत आत्मविश्वासाने आणि जयिष्णू वृत्तीने आपल्या विचारांच्या प्रसारासाठी आयुष्य वेचले आणि समकालीन विस्कळित व धर्मभ्रष्ट अशा समाजाला उन्नत बनवून एक नवे राष्ट्र उभारले. जगातल्या अनेक प्रसिद्ध धर्मप्रणालींवर झरथुष्ट्राच्या विचारांचा प्रभाव पडलेला स्पष्टपणे दिसून येतो. **पाहा**– अवेस्ता. [एन्सा. रि. ए.; म. झो. शि.; ज. का. ध. प्र.; आ. ध. दी.]

झरथुष्ट्री धर्म पारशी लोकांचा धर्म. हा धर्म झरथुष्ट्राने स्थापन केला, म्हणून याला झरथुष्ट्री धर्म असे म्हणतात. या धर्माचा प्रमुख धर्मग्रंथ अवेस्ता हा होय. विचार व भाषा या दोन्ही बाबतींत या ग्रंथाचे ऋग्वेदाशी नितांत साम्य असल्यामुळे झरथुष्ट्री धर्म वेदकाळाइतका तरी प्राचीन ठरतो. आपल्या मूलस्थानातून आर्यांच्या ज्या टोळ्या विविध भूप्रदेशांत जाऊन स्थायिक झाल्या, त्यांतली एक प्रमुख टोळी इराणा गेली आणि एक भारतात आली. एकाच आर्य वंशाच्या या दोन प्रमुख शाखा असल्यामुळे भारतीय आर्यांचा वैदिक धर्म आणि इराणी आर्यांचा झरथुष्ट्री धर्म यांमध्ये आश्चर्यकारक साम्य आढळणे स्वाभाविकच म्हटले पाहिजे.

झरथुष्ट्री धर्म हा वैदिक धर्माप्रमाणेच गृहस्थाश्रमाची प्रतिष्ठा मानणारा व विजिगीषू असा धर्म आहे. या धर्मात अग्निपूजेला प्राधान्य आहे. परंतु या दोन्ही धर्मांच्या परंपरांचा विचार करता वैदिक धर्म अनेक संक्रमणांतून जाता जाता परिवर्तन पावत राहिला, तर झरथुष्ट्री धर्म मात्र आपल्या मूळ स्वरूपातच चालू राहिला. या धर्माने यहुदी व ख्रिस्ती या धर्मांचे अनेकांगांनी वैचारिक पोषण केलेले दिसते.

झरथुष्ट्र हा पारशी धर्माचा संस्थापक मानला जात असला, तरी काही अभ्यासकांच्या मते तो केवळ धर्मसुधारक होता. इराणी आर्यांच्या जुन्या धर्माला पोईरोत्कएश असे नाव होते. ते अग्नी, सूर्य, चंद्र, आकाश वगैरेंना स्वतंत्र देवता मानून त्यांची उपासना करीत. झरथुष्ट्राने अहुर मझ्द या एकाच सर्वशक्तिमान परमेश्वराच्या उपासनेचा पुरस्कार करून, अनेक देवदेवतांची उपासना व जादूटोणा यांचे धर्मक्षेत्रातून उच्चाटण करण्याचा प्रयत्न केला.

बॅक्ट्रियाचा राजा विश्तास्प आणि त्याचा पराक्रमी पुत्र इस्फेंदिअर यांनी झरथुष्ट्राचा धर्म सर्व इराणभर प्रसृत करण्यासाठी आपले सर्व सामर्थ्य पणाला लावले. परंतु दुर्दैवाने त्यांनी चालविलेल्या धर्मयुद्धात त्यांचा पराभव होऊन, तुराण्यांना जय मिळाला. या संघर्षात झरथुष्ट्र आणि त्याचे साहाय्यक बळी पडले, झरथुष्ट्राच्या अवेस्ता ग्रंथाची होळी झाली आणि त्याच्या अनुयायांना दीर्घकाळपर्यंत अज्ञातवासात राहावे लागले.

यानंतर सनपूर्व ५८३ ते ४८० या शतकभरात इराणात झरथुष्ट्री धर्माचे पुनरुत्थान घडले आणि डारियस राजाच्या नेतृत्वाखाली झरथुष्ट्राच्या अनुयायांनी शेजारचा बाबिलोनिया हा देश जिंकून युरोपखंडातही आपल्या धर्माचा प्रसार केला. परंतु सालामिसच्या लढाईनंतर या प्रगतीला पायबंद बसला.

आशियातल्या या प्रबल नवधर्माचा ग्रीकांवर विशेष प्रभाव पडला. हिरोडोटस या ग्रीक इतिहासकाराने इराणात प्रवास करून, त्या वेळच्या इराणाचे जे वर्णन लिहून ठेवले आहे, त्यात झरथुष्ट्री धर्माचेही वर्णन आहे. इराणात जाऊन झरथुष्ट्री धर्माचा अभ्यास करण्याची प्लेटोचीही इच्छा होती; परंतु ग्रीक-इराणी युद्ध सुरू झाल्यामुळे त्याला तसे करता आले नाही. शिकंदराने इराणाला ग्रीक अमलाखाली आणल्यानंतर पाच-सहा शतके इराणावर ग्रीक व पार्थियन यांची अधिसत्ता नांदली. या काळात झरथुष्ट्री धर्माला विस्कळितपणा आला, त्यात मिथ्रधर्मातली सूर्यपूजा व बहुदेवतापूजाही प्रविष्ट झाली.

इ. स. २२६ च्या सुमारास अर्देशीर (पहिला) या पुरुषाने इराणाला स्वातंत्र्य मिळवून देऊन, झरथुष्ट्री धर्माचे पुनरुज्जीवन घडविले. अर्देशीर ज्या सस्सानियन घराण्यातला होता, त्या राजघराण्याने झरथुष्ट्री धर्माच्या विकासासाठी सर्व प्रकारचे प्रयत्न केले. या घराण्याच्या पुरस्कारामुळे झरथुष्ट्री धर्म हा इराणाचा राष्ट्रीय धर्म बनला आणि ही त्याची वैभवशाली प्रतिष्ठा इस्लामच्या इराणावरील आक्रमणापर्यंत टिकून राहिली.

इ. स. ६४१ मध्ये मुसलमानांनी यजदर्दचा पराभव केल्यानंतर झरथुष्ट्री धर्माच्या अनुयायांची वाताहत झाली. त्यांपैकी अनेकांना बळजबरीने इस्लामची दीक्षा देण्यात आली, अनेकांना इराणात अपमानित जीवन जगावे लागले आणि अनेक लोक इराणातून पलायन करून भारताच्या आश्रयाला आले.

पारशी लोक एका सर्वशक्तिमान देवतेची उपासना करतात. या देवतेचे नाव अहुर मझ्द असे आहे. झरथुष्ट्राने अहुर मझ्दाचे जे सहा गुण सांगितले, त्यांनाच पुढे देवता मानले जाऊ लागले. या षड्गुणांनी युक्त अशा अहुर मझ्दाचे आपल्या षड्गुणैश्वर्यसंपन्न भगवान विष्णूशी विशेष साम्य दिसते. अहुर मझ्दाच्या या सहा पवित्र अमरशक्ती (अमेशस्पेन्त) पुढीलप्रमाणे आहेत –

(१) अष (ऋत) – विश्वनियंत्रक शक्ती.
(२) वोहुमनह (सुमन) – प्रेम आणि पवित्रता.
(३) स्पेन्त आर्मैती – सद्बुद्धी व धार्मिक निष्ठा.
(४) क्षथ्र वैर्य – प्रभुत्व.
(५) हौर्वतात् – संपूर्णता व
(६) अमेरेतात् – अमृतत्व.

झरथुष्ट्राने या षड्गुणैश्वर्यसंपन्न अशा अहुर मझ्दाची आराधना करण्याचा आणि अग्नीला (आतरो) परमेश्वराचे भौतिक स्वरूप मानून त्याची पूजा करण्याचा उपदेश केला आहे. झरथुष्ट्राच्या उपदेशानुसार पारशी लोक हजारो वर्षे अग्नीचे रक्षण आणि पूजन करीत आले आहेत.

झरथुष्ट्र हा कट्टा एकेश्वरवादी असल्यामुळे सर्वशक्तिमान परमेश्वराला अहुर मझ्द या नावाशिवाय अन्य नावाने संबोधणेही त्याला मान्य नव्हते. त्याने स्पष्ट शब्दात म्हटले आहे, की–

तेम ने यस्नाईस आर्मतोईश् मिमघ्जो।
ये आन्मेनी मज्दाओ स्त्रावी अहुरो॥

(अवेस्ता यस्न ४५.१०)

अर्थ – जो आपल्या धर्मसंरक्षक कर्मांनी आणि अहुर मझ्द नावाने विख्यात आहे, केवळ त्याचीच आम्ही उपासना करतो.

'नोइत् मोइ वास्त्रा क्ष्मत् अन्यो' = परमेश्वराशिवाय अन्य कोणी माझा रक्षक नाही (यस्न २९.१), असे झरथुष्ट्राने वारंवार म्हटले आहे.

झरथुष्ट्राच्या मृत्यूनंतर मात्र झरथुष्ट्री धर्मात यजत या निम्नस्थ देवतांची उपासना रूढ झाली. जगातील विभिन्न

वस्तूंच्या विभिन्न अधिष्ठात्री देवता असतात, असेही मानले जाऊ लागले. सूर्य, चंद्र, तारका, अग्नी, वायू, जल, पर्वत आणि दिवंगत सत्पुरुष यांची उपासना खुद्द अवेस्त्यातच (उत्तरकालीन भागात) उल्लेखिलेली आहे.

अहुर मझ्द व त्याच्या परिवारातील शुभ देवता यांना सदैव विरोध करणाऱ्यांचा प्रतिनिधी अंग्रमैन्यू किंवा अहरिमन् हा होय. हा ख्रिस्ती धर्मातील सैतानाचा पूर्वावतार म्हणता येईल. याच्या परिवारात क्षुधा, तृष्णा, क्रोध, मद, लोभ, अनृत, दुर्भिक्ष्य, इ. पाप देवतांचा समावेश होतो. झरथुष्ट्री धर्मात पाप आणि पुण्य यांचा चिरंतन संघर्ष मानलेला असून, या संघर्षात अखेरीस पुण्य विजयी होणार, असा आशावाद प्रकट केलेला आहे. या धर्मात सृष्ट्युत्पत्तीविषयीची कल्पना आहे, ती अशी–

सृष्टीच्या आरंभी परमेश्वराने एक स्वर्गीय वृषभ निर्माण केला. या वृषभाने टाकलेल्या एका बीजापासून माशा आणि माशजोई हे आद्य मानवी युगुल निर्माण झाले. या युगुलापासूनच सर्व मानवजातीचा पसारा वाढला. वृषभाच्या दुसऱ्या एका बीजापासून देवविरोधक राक्षस निर्माण झाले.

दृश्य जगाप्रमाणेच अदृश्य जगाचेही दोन भाग आहेत. त्या दोन भागांमध्ये पूर्व-पश्चिम अशी एक खाडी आहे. दक्षिणेकडचा भाग पुण्यमय असून, उत्तरेकडचा भाग पापमय आहे. दक्षिणेकडे सत्याचा प्रकाश फाकलेला असून, उत्तरेकडे असत्याची काजळी रात्र पसरलेली आहे. अहुर मझ्द हा दक्षिणेचा अधिपती आणि अहरिमन् हा उत्तरेचा अधिपती आहे. अहुर मझ्दाचे तेहतीस अनुयायी असून, ते त्याच्या आज्ञा अमलात आणण्याच्या कामी तत्पर असतात. उल्का आणि ग्रह हे अशुभकारक असल्यामुळे त्यांना अहरिमन्चे साहाय्यक मानले जाते.

झरथुष्ट्री धर्मात स्वर्ग आणि नरक हे परस्परविरुद्ध असे लोकही आहेत. जीवाला मरणोत्तर शुभाशुभ कर्मानुसार स्वर्ग आणि नरक यांची प्राप्ती होते. मृत्यूनंतर जीवात्मा तीन दिवसपर्यंत नुसता फिरत असतो. त्याने पुण्य आचरले असेल, तर हे त्याचे तीन दिवस सुखात जातात आणि त्याने पापाचरण केले असेल, तर त्याला या तीन दिवसांत क्लेश होतात. तीन दिवसांनंतर पुण्यात्म्याला स्वर्गलाभ होतो व पापात्मा नरकात जातो.

झरथुष्ट्राने उर्वन (आत्मा) आणि फर्वसी (एक आत्मशक्ती) अशी दोन तत्त्वे मानली आहेत. शरीरद्वारा जी सत्कर्मे अथवा कुकर्मे घडतात, त्यांचे उत्तरदायित्व उर्वनावर असते आणि त्यांचे इष्टानिष्ट फलही त्यालाच भोगावे लागते.

फर्वसी ही प्रत्येक जीवधारी व्यक्तीमध्ये वास करणारी एक अद्भुत शक्ती आहे. ही शक्ती आत्म्याला सुकर्म करण्याची प्रेरणा देते आणि कुकर्मापासून परावृत्त करते. या शक्तीला शुभाशुभ कर्मांचा लेप लागत नाही आणि त्यामुळे तिचा फलभोगाशीही संबंध नसतो. ती केवळ साक्षिणी आहे.

सुविचार (हुमत = सुमत), सुवचन (हुख्त = सूक्त) आणि सुकार्य (हुवर्श्त = सुवर्तन) ही पारशी आचारधर्माची त्रिसूत्री आहे. कायावाचामनेकरून केवळ सत्याचेच आचरण करावे, यावर झरथुष्ट्राने विशेष भर दिलेला आहे. पारशी धर्मानुसार नित्यनैमित्तिक जीवनक्रमात करायच्या सत्याचरणाचा तपशील पुढीलप्रमाणे आहे –

(१) इतरांबरोबर प्रामाणिकपणाने वर्तन करणे व ऋण न चुकता फेडणे, (२) वरिष्ठांशी नम्रतेने वागणे, (३) निरपराधी दीनांविषयी सक्रिय दयाभाव राखणे, (४) शांतिभावाने वागणे, (५) समृद्धीच्या काळात परमेश्वराला धन्यवाद देणे आणि कष्टमय स्थितीत त्याच्यावर विश्वासून राहणे, (६) माता-पित्यांविषयी प्रेमादर राखणे, गुरुजन, शेजारी, देशबंधू यांच्याविषयीही आदर ठेवणे आणि कनिष्ठांविषयी स्नेहभाव राखणे, (७) राजभक्ती, (८) उपयुक्त प्राण्यांचे संरक्षण-संगोपन करणे आणि क्रूर प्राण्यांची हत्या करणे, (९) सत्य बोलणे, (१०) पहाटे उठून आपली नित्यकर्मे आचरायला लागणे, (११) कायिक, वाचिक व मानसिक शुद्धी राखणे, (१२) स्वावलंबन, (१३) सत्पात्री दान करणे, (१४) सज्जनांचे संरक्षण व दुष्टांचे निर्दालन करणे, (१५) शिक्षणाचा प्रसार करणे, (१६) प्रभूच्या नामसंकीर्तनापेक्षा सत्कर्मे आचरल्याचे पुण्य अधिक आहे याचे भान ठेवून वागणे, (१७) महात्म्यांची सेवा करणे व (१८) स्वच्छतेचे स्थान परमेश्वराखालोखाल आहे, हे ध्यानी घेऊन सर्व प्रकारची स्वच्छता पाळणे.

याच्या उलट विश्वासघात, लोभ, अहंकार, निर्दयता, सूडबुद्धी, असत्यवचन, शिवीगाळ, खोटी साक्ष, आळशीपणा, भिक्षा मागणे, चोरी, निरपराध्याची हत्या, वेश्यागमन, परस्त्रीगमन, अनैसर्गिक मैथुन, ऋण न फेडणे, उधळपट्टी, कंजूषपणा, इ. दोषांचा पारशी धर्माने निषेध केला आहे.

या धर्मात गृहस्थाश्रमाची विशेष प्रतिष्ठा आहे. गृहस्थाश्रम न स्वीकारणे अथवा गृहस्थाश्रमाचा त्याग करणे, हे मोठेच पाप मानलेले आहे.

झरथुष्ट्री धर्मातला जीवनादर्श अशा प्रकारे स्पष्ट आणि वास्तववादी आहे. त्यात गूढता आणि संदिग्धता मुळीच नाही. या धर्माने व्यक्ती आणि समाज यांचा पूर्ण विकास करणाऱ्या धार्मिक जीवनाचा आग्रहाने पुरस्कार केला आहे. येशू आणि मुहंमद यांची असीम ईश्वरभक्ती आणि बुद्धाचा अष्टांगिक मार्ग यांचा प्रकर्ष झरथुष्ट्राच्या ठायी अतिप्राचीन कालीच झाला होता, असे दिसते. परंतु झरथुष्ट्र आणि बुद्ध यांच्या

वृत्तीत एक महत्त्वाचा भेद आहे. बुद्धाच्या शिकवणीत त्याग, शांती, भरती यांवर सारा भर दिलेला आहे; तर झरथुष्ट्राचे तत्वज्ञान युद्ध, कर्तृत्व व विकासप्रियता यांवर उभारलेले आहे. जगातील अपरंपार दुःख पाहून बुद्धाला जीवनाचा वीट आला आणि त्यातून सुटण्याकरिता तो निर्वाणाचा मार्ग शोधू लागला; पण जगातील दुःखांची जाणीव असूनही झरथुष्ट्राचा आशावाद व विजिगीषू वृत्ती अढळ राहिली. झरथुष्ट्री धर्मात निराशावादाला जागा नाही, त्याला हिणकस भावनांचा गंध नाही आणि दुर्बलतेचा स्पर्शही नाही. वीर्य, ओज व सामर्थ्य यांनी झरथुष्ट्री तत्वज्ञान रसरसलेले आहे. म्हणूनच अनुयायांची संख्या अत्यल्प असूनही जगातील प्रमुख प्राचीन धर्मांत त्याला मानाचे स्थान लाभले आहे. पाहा– अर्देशिर; अवेस्ता; पारशी समाज. [वि. ध. द.; ज. वि. ध.; ज. का. ध.; आ. ध. दी.]

झरवा आसामातील एक बोली. गारो टेकड्यांच्या पायथ्याच्या प्रदेशात ही प्रचलित आहे. हा प्रदेश बंगालीभाषिक जिल्ह्यात असून, इथे असमिया भाषा बोलणाऱ्यांची लोकवस्तीही मोठी आहे. त्यामुळे गारो (स्थानिक आदिवासींची भाषा), बंगाली आणि असमिया या तीन भाषांच्या मिश्रणाने झरवा ही बोली बनली आहे. [भा. भा. स.]

झर्झर एक चर्मवाद्य. याचा आकार ढोलासारखा असतो. या वाद्याचे विशेष वर्णन तट्टीकासारसुंदरी या ग्रंथात आहे. झलरी, झल्ली, झल्लकी अशी या वाद्याची अन्यही नावे आहेत. डॉ. वासुदेव शरण अग्रवाल यांच्या मते झर्झर म्हणजे झांज होय. हे वाद्य वाजविणाऱ्याला झार्झरिक असे म्हणत. याचा उल्लेख अष्टाध्यायीत आहे (४. ४. ५६). भरहूत येथील स्तूपावरील एका शिल्पपट्टातील वादकवृंदात एक झार्झरिक (झर्झर वाजवणारा) कोरलेला आहे. [क. हि. वा. पु.; पा. भा.]

झल्लोमल्ल एक जोड-जात. मनूच्या मते व्रात्य क्षत्रिय पुरुष आणि क्षत्रिय स्त्री यांच्या संबंधापासून ही जात निर्माण झाली. महाभारतात विदूषकी हा झल्लांचा व्यवसाय म्हणून सांगितला आहे.

सांप्रत यांना झालो-मालो असे म्हणतात. यांची वस्ती बंगालमध्ये आहे. हे स्वतःला क्षत्रिय समजतात; पण रिस्लेच्या मते ते द्राविड वंशातले आहेत. मासेमारी हा त्यांचा व्यवसाय आहे. काहीजण नावाडी आहेत, तर काही शेती, व्यापार किंवा सुतळी बनवण्याचा उद्योगही करतात. धोबी, न्हावी व पतित ब्राह्मण हे यांची धार्मिक कृत्ये करतात. खलकुमारी व ख्वाजखिज्र ही यांची प्रिय दैवते होत. मोठ्या नद्यांनाही हे पुजतात.

यांना घटस्फोट व विधवाविवाह मान्य नाही. यांच्यांत बालविवाह रूढ आहे. [श. क.; से. इं. १९५१]

झांज एक घन वाद्य. झांज म्हणजे तांबे, पितळ किंवा ब्राँझ या धातूंचे दोन गोल तुकडे असून, ते मध्ये खोलगट असतात. खोलगट भागाच्या मधोमध छिद्र पाडून त्यातून दोरी ओवतात व झांजेच्या आतील बाजूंना दोरीला गाठी मारतात. मग ते दोन्ही तुकडे दोन हातात घेऊन त्यांचा एकमेकांवर आघात करतात. हे वाद्य मुख्यत्वे तालासाठीच आहे.


झांजा

कैताल, जालरा, मंजी असे झांजांचे अनेक प्रकार आहेत. मोठ्या आकाराच्या झांजांना झरीगा असे म्हणतात. त्यांचा उपयोग आरतीसाठी व लहान झांजांचा उपयोग कीर्तनादी प्रसंगी करतात. बुंदेलखंडात छित्ला नावाची एक विचित्र झांज आहे. लोखंडाच्या दोन फूट लांब दोन पट्ट्या एका बाजूला टोकदार करून आणि दुसऱ्या बाजूला एका लोखंडी कडीत अडकवून झांज बनवतात. त्या कडीत आणखी लहान कड्या अडकवलेल्या असतात. [डि. सा. इं. म्यु. म्यु.; म्यु. इं.]

झांझर हिमाचल प्रदेशातील एक लोकनृत्य. पावसाळ्यानंतर येणाऱ्या बहुतेक सर्व उत्सवप्रसंगी हे नृत्य


झांझर नृत्य

करतात. नृत्याच्या वेळी 'धारंग सारन' हे गीत गातात आणि

सनई, ढोल, नगारा, काहळ, रणशिंग व बासरी ही वाद्ये वाजवितात. या नृत्यात बारा पुरुष आणि बारा स्त्रिया एकाच्या आत एक अशी दोन वर्तुळे करून नाचतात. नाचताना स्थान-बदलही करतात. नृत्याची गती प्रारंभी संथ असते व नंतर ती द्रुत होत जाते. [ए. हो. रा.]

झाकाझुमरी बिहार प्रदेशातील स्त्रियांचा एक खेळ. सात किंवा आठ मुली हातांत हात घालून फेर धरून गाणी म्हणत मागे पुढे डोलतात. या खेळावर रासनृत्याचा बराच प्रभाव आहे. खेळातील डोलण्याच्या पद्धतीवरून याला झाकाझुमरी हे नाव मिळाले असावे. [लो. सा. मू.]

झाडीतेलंग एक जात. मध्य प्रदेशात या लोकांची वस्ती आहे. गोंड व हलक्या जातीचे लोक यांच्या संकरातून ही जात निर्माण झाली, असे सांगतात. यांच्यांत पुराईत, सुराईत व पोहनी असे तीन पोटभेद आहेत. यांच्यांतले बहुतांश लोक पुराईत वर्गाचे आहेत. आपले पूर्वज वस्तरच्या राजाबरोबर वरंगळहून इथे आले असे हे लोक सांगतात.

ब्राह्मण, राजपूत व हलवा यांना हे लोक आपल्या जातीत प्रवेश देतात आणि यांपैकी कोणालाही तेलंगी स्त्रीपासून मुलगा झाला, तर त्याचा प्रवेश त्याच्या आईच्या वर्गात करतात.

विवाहप्रथा – यांच्यांत मामेबहीण व मावसबहीण यांच्याशी लग्न होते. लग्न सोमवारी किंवा गुरुवारी करतात. लग्नात मोहाच्या लाकडाचा मांडव घालतात. वराची मिरवणूक रविवारी, मंगळवारी, बुधवारी अथवा शुक्रवारी वधूच्या गावी पोचावी लागते. विधवेला पतिनिधनानंतर एक महिन्याने लग्न करता येते.

देवधर्म – यांच्यांत अनेक कुले आहेत व त्या कुलांच्या देवताही निरनिराळ्या आहेत. लाकडाची एक खुंटी अथवा खांब किंवा शिला हीच त्यांच्या देवतेची प्रतिमा असते. देवतांना कोंबड्याचे बलिदान करावे लागते.

हे लोक मृताला जाळतात किंवा पुरतात. [सु. वि. को.]

झा तूफानी एक ज्योतिषी व ग्रंथकार. हा बिहारमधल्या दरभंगा जिल्ह्यातील मोहन या गावचा रहिवासी होता. अनेक धर्मशास्त्रग्रंथांचे आलोडन करून याने कृत्यशिरोमणी नावाचा ग्रंथ लिहिला आहे. या ग्रंथात सण, उत्सव, व्रते, उपवास, इत्यादींची माहिती दिलेली आहे. याशिवाय याने अब्दचिंतामणी, कृत्यतत्त्वचिंतामणी, कृत्यसुधार्णव, कृत्यविवेक– रत्नाकर, इ. ग्रंथही लिहिले आहेत. [ज. स्मा. ग्रं.]

झाबेल एक जात. हे सर्व लोक मुसलमान असून, पंजाबातल्या फेरोजपूर, मुलतान, मुझफरगड या जिल्ह्यांत आढळतात. यांचा धंदा मासेमारीचा असल्यामुळे ते नदीच्या किनाऱ्यावर राहतात. आपण उच्च वर्णातून भ्रष्ट झालेले आहो, असे ते सांगतात. [म. ज्ञा. को.]

झा रत्नपाणी (इ. स.चे १९ वे शतक) एक कवी व ग्रंथकार. हा बिहारमधल्या परसगावचा रहिवासी होता. मिथिलाधीश रुद्रसिंह याचा हा आश्रित होता. प्रायश्चित्तपारिजात, प्रणवचंद्रिका, आचारसंग्रह, श्रीकृष्णचित्तचंद्रिका, क्षयमासादिविवेक, नारीपरीक्षा, चिकित्सावर्णन, महादानवाक्यावली, मिथिलेशचरित, व्रताचार, रामचंद्रप्रतिष्ठा, धर्मसुबोधिनी, इ. याचे ग्रंथ उपलब्ध आहेत. [ज. स्मा. ग्रं.]

झाल ऐरिणीदान पाहा.

झाला राजस्थानातील एक जात. हे लोक प्रथम कच्छमधून गुजरातमध्ये आले व तिथून राजस्थानात गेले. झालावाड भागात यांची मुख्य वस्ती आहे. प्रथम यांचे नाव मकवाना असे होते. गुजरातेत आल्यावर त्यांना झाला म्हणू लागले. या नावावरूनच त्यांच्या प्रदेशालाही पुढे झालावाड असे नाव पडले. पूर्वी झालावाड हा कोटा राज्याचा एक भाग होता. इ.स. १८३४ मध्ये ते स्वतंत्र संस्थान झाले.

हे लोक राजपूत वंशाचे आहेत. राणा प्रतापसिंह रानोमाळ भटकत असता, झाला राजपुतांनी त्याला बहुमोल



झाला पुरुष

साहाय्य केले. त्याची परतफेड करण्यासाठी त्याने एका झाला राजकन्येशी विवाह केला होता. सांप्रत हे लोक शेतीवर उपजीविका करतात. [अँ. अँ. रा.; रा. जा.; वि. मुं. रा. प.]

झाशीची राणी लक्ष्मीबाई

(१८३५ – १८५८ इ. स.)

पेशवाई नष्ट झाल्यानंतर श्रीमंत दुसरे बाजीराव पेशवे यांनी ब्रह्मावर्त येथे वास्तव्य केले व त्यांचा भाऊ चिमाजीअप्पा काशीक्षेत्री जाऊन राहिला. चिमाजीअप्पाच्या पदरी मोरोपंत तांबे नावाचे एक कऱ्हाडे ब्राह्मण गृहस्थ खाजगी कारभारी म्हणून काम करीत होते. त्यांना एक कन्या झाली व तिचे नाव मनुबाई असे ठेवण्यात आले. हीच पुढे झाशीची राणी लक्ष्मीबाई या नावाने गाजली.

मनुबाई ३–४ वर्षांची असतानाच तिची आई भागीरथीबाई अचानक मरण पावली. त्याच सुमारास चिमाजीअप्पाही कैलासवासी झाले. मग मोरोपंत तांबे ब्रह्मावर्तास बाजीरावाच्या आश्रयाला गेले. तिथे बाजीरावाचे दत्तक पुत्र नानासाहेब व रावसाहेब यांच्या सहवासात मनुबाईचे बालपण गेले. त्यांच्याबरोबर ती मराठी भाषा व मोडी लिपी शिकली. घोडयावर बसणे, तलवार चालवणे, बंदूक उडवणे, शिकार करणे, इ. मर्दानी खेळांतही ती प्रवीण झाली.



झाशीची राणी लक्ष्मीबाई

इ. स. १८४२ साली म्हणजे वयाच्या आठव्या वर्षी मनुबाईचे लग्न झाशीचे महाराज गंगाधरराव यांच्याशी झाले व ती झाशीची राणी लक्ष्मीबाई बनली. तिचे वडील मोरोपंत यांना झाशीच्या दरबारात सरदारकी मिळाली.

झाशीचा पूर्वेतिहास– इ. स.च्या १७ व्या शतकाच्या प्रारंभी ओरछाचा राजा वीरसिंगदेव याने झाशीचा किल्ला बांधला. तो एका लहान डोंगरावर असून फार बळकट आहे. भोवती रुंद व खोल खंदक आहे. बुंदेलखंडाचा राजा छत्रसाल याने आपल्या राज्याचा तिसरा भाग थोरले बाजीराव पेशवे यांना बक्षीस दिला होता. त्या प्रदेशाचे तीन भाग करून पेशव्यांनी त्यावर तीन सुभेदार नेमले. त्यांपैकी नारोशंकर मोतीवाले यांची नेमणूक झाशी प्रांतावर झाली. त्यांनी किल्ल्याच्या जवळच नवे झाशी नगर वसवले. नारोशंकरांनंतर इ. स. १७६५ च्या सुमारास झाशी प्रांतात गोसावी लोकांनी बंडाळी केली. तेव्हा पेशव्यांनी रघुनाथराव नेवाळकर या शूर सरदाराला सुभेदार म्हणून तिकडे पाठवले. त्याने तिथली बंडाळी मोडून चांगला बंदोबस्त केला. तेव्हापासून (इ. स. १७७०) तो प्रांत नेवाळकरांना वंशपरंपरेने मिळाला.

इ. स. १७९५ साली रघुनाथराव संन्यास घेऊन काशीला गेल्यानंतर त्याचा भाऊ शिवरामभाऊ सुभेदार झाला. त्याचा पुत्र गंगाधरराव इ. स. १८४२ साली झाशीच्या गादीवर बसला. त्यावेळी झाशी संस्थान कंपनी सरकारचे मांडलिक होते.

लक्ष्मीबाई ही या गंगाधररावाची दुसरी पत्नी होय. तिला इ. स. १८५१ मध्ये एक पुत्र झाला होता. पण तो लवकरच मरण पावला. मग गंगाधररावाने नेवाळकर घराण्यातील आनंदराव नामक पाच वर्षांच्या मुलाला दत्तक घेतले व त्याचे नाव दामोदर असे ठेवले. तथापि स्वतःच्या पुत्राच्या मृत्यूमुळे गंगाधररावाची प्रकृती जी एकदा ढासळली, ती परत सुधारलीच नाही. इ. स. १८५३ च्या नोव्हेंबरात तो कालवश झाला. त्याच्या पश्चात गव्हर्नर जनरल डलहौसी याने झाशी संस्थान खालसा केले आणि राणी लक्ष्मीबाईला महिना पाच हजार रुपये पेन्शन ठरवले. त्याने तिला शहरातील राजवाडयात राहण्यास परवानगी दिली होती.

पण राणी लक्ष्मीबाई फार मानी स्त्री होती. राज्य खालसा झाल्यामुळे तिला अतिशय दुःख झाले व कंपनी सरकारच्या वृत्तीची चीडही आली. पण बलिष्ठ इंग्रजी सत्तेपुढे तिचे काय चालणार होते! म्हणून ती व्रतवैकल्ये, देवधर्म, पूजा–अर्चा, पुराणश्रवण, यांतच आपला काळ कंठू लागली. पहाटे उठून कसरत व घोडदौड करण्याची तिला हौस होती. तिसऱ्या प्रहरी कचेरीत जाऊन ती स्वतः कारभारात लक्ष घाली. त्या वेळी ती कधी कधी पुरुषवेषही धारण करीत असे व तो

तिला फार शोभूनही दिसे. राणी लक्ष्मीबाई बुद्धीने चलाख व कारभारात फार निःपक्षपाती होती. तिने अनेक शास्त्री, पंडित, वैदिक, याज्ञिक, गवई, पुराणिक यांनाही आश्रय दिला होता. बहुमोल ग्रंथांचाही मोठा संग्रह तिने केला होता.



झाशीचा किल्ला—एक बुरूज

अशा प्रकारे काही वर्षे शांततेत गेल्यावर इ. स. १८५७ साली क्रांतियुद्ध सुरू झाले. ती क्रांतीची लाट झाशीला पोचली आणि तिथल्या हिंदी सैनिकांनी सर्व अधिकाऱ्यांना मारून झाशीचा किल्ला काबीज केला. मग त्यांनी राणी लक्ष्मीबाईला झाशीचे राज्य ताब्यात घेण्याची विनंती केली व तिनेही ती मान्य केली. सुमारे दहा महिने झाशी प्रांतावर राणी लक्ष्मीबाईचे राज्य चालू होते. त्या अवधीत तिने राज्याचा बंदोबस्त उत्तम प्रकारे केला. स्वसंरक्षणासाठी तिने झाशी शहरात दारुगोळा बनवण्याचा एक कारखानाही सुरू केला.

इ. स. १८५८ च्या मार्च महिन्यात इंग्रजांनी झाशीवर हल्ला केला. राणीने लढाईची जय्यत तयारी केली होती व पेशव्यांकडे निरोप पाठवून मदतही मागितली होती. अकरा दिवस तिने इंग्रजांना कडवा प्रतिकार केला, पण बाराव्या दिवशी इंग्रजांची सरशी होऊन ते शहरात घुसले. त्यांनी शहरात कत्तल, जाळपोळ व बेसुमार लुटालूट केली. राणीचा काहीही इलाज चालेना. शेवटी निरुपाय होऊन लक्ष्मीबाई आपल्या निवडक लोकांनिशी, घोड्यावर स्वार होऊन आणि मुलाला पाठीशी बांधून, झाशीतून बाहेर पडली. गोऱ्या सैन्याने तिला पकडण्याचा प्रयत्न केला; पण त्यांची फळी फोडून ती निसटली आणि चोव्वीस तास भरधाव घोडदौड करून काल्पीला पोचली.

काल्पी येथे रावसाहेब पेशवे व तात्या टोपी यांनी राणीचे स्वागत केले व तिला एका सैन्यविभागाची प्रमुख म्हणूनही नेमले. कुंच व गलौली येथे झालेल्या लढायांत राणीने अद्वितीय पराक्रम केला. पण इंग्रजांच्या कवायती सैन्यापुढे क्रांतिकारकांचा टिकाव लागेना. तेव्हा एखाद्या मजबूत किल्ल्याचा आश्रय घ्यावा, असे राणीने सुचवले. त्याप्रमाणे राणी, पेशवे व तात्या टोपी आपल्या सैन्यासह ग्वाल्हेरकडे गेले. पण त्यांच्या अपेक्षेप्रमाणे ग्वाल्हेरकर शिंदे यांनी त्यांचे स्वागत तर केले नाहीच; उलट त्यांना प्रतिकारच केला. पेशव्यांनी मग थोड्याच कालात शिंद्यांचा पराभव केला व मुरारचा किल्ला व ग्वाल्हेर शहर ताब्यात घेतले.

पुढील युद्धाची तयारी करण्यासाठी राणीने पेशव्यांना वारंवार सुचवले; पण त्यांनी तिच्याकडे लक्षच दिले नाही. शेवटी जयाजीराव शिंदे इंग्रजी फौज मदतीला घेऊन अचानक ग्वाल्हेरवर चालून आला. त्या वेळी किल्ल्यात राहून प्रतिकार न करता उघड्या मैदानावर लढाई देण्याचे क्रांतिकारकांनी ठरवले. पण त्या लढाईत त्यांचा पराभव झाला. शेवटी शत्रूची फळी फोडून राणी तिथून निघाली. इंग्रज घोडेस्वारांनी तिचा पाठलाग करून तिला घायाळ केले. त्या हातघाईच्या लढाईत तिने काही इंग्रज सैनिकांना आपल्या तलवारीचे पाणी पाजल्यावाचून सोडले नाही. पण अखेर तिचाही पाडाव झाला. ती घोड्यावरून खाली कोसळली. एवढ्यात तिचा एकनिष्ठ सेवक रामचंद्रराव पुढे झाला. त्याने राणीला उचलून जवळच असलेल्या गंगादास बावा नामक साधूच्या झोपडीत नेले. तिथेच तिचे प्राणोत्क्रमण झाले. मग तिच्या सेवकांनी तिचा पार्थिव देह एका गवताच्या गंजीत ठेवून त्याला अग्नी दिला.

सांप्रत त्याच जागी किल्ल्याच्या पायथ्याशी तिची समाधी आहे व जवळच गंगादासाची मठीही आहे. पूर्वी समाधी म्हणून वृंदावन होते. पण काही वर्षांपूर्वी त्या जागी तिचा अश्वारूढ ब्राँझचा पुतळा उभारण्यात आला आहे.

कडकडा कडाडे बिजली।
शत्रूची लष्करे थिजली।
मग कीर्तिरूप ती उरली।
ती हिंदभूमिच्या पराक्रमाची इतिश्रीच झाली॥

कविवर्य भा. रा. तांबे यांनी आपल्या एका कवितेत वरीलप्रमाणे लक्ष्मीबाईच्या समाधीवर शब्दपुष्पांची भावपूर्ण ओंजळ वाहिली आहे. [म. ज्ञा. को.; झा. स्वा. ल.; स. ह.]

झिंझोटी एक राग. याची जाती संपूर्ण आहे. यात गांधार व निषाद हे स्वर शुद्ध व कोमल लागतात व बाकीचे शुद्ध लागतात. वादी – गांधार. संवादी– निषाद. आरोह स्वर– ध सा रे म ग ग म प ध नि सा. अवरोह स्वर– सा नि ध प म ग रे सा ग रे सा नि ध प ध सा. पकड स्वर– ध सा रे म ग रे सा नि सा रे ग रे सा नि ध प ध सा. गानसमय – रात्रीचा दुसरा प्रहर.

या रागात बहुधा ठुमरी, टप्पा, होरी, इ. शृंगारिक प्रकार गातात. त्यांत हा राग विशेष खुलतो. ध्रुवपदगायक हा राग दुसऱ्या पद्धतीने गातात. [श्री. आबासाहेब मुजुमदार, पुणे]

झिमिर नृत्य सिंधी लोकांचे मंगलप्रसंगी करण्याचे एक नृत्य. यात फक्त एकच स्त्री पायांत पैंजण घालून नाचते आणि दुसरी आंगठीने एका थाळीवर ताल देते. शेजारी बसून काही स्त्रिया गीते गातात आणि नर्तिका आपल्या हावभावांनी त्यातील आशय व्यक्त करते. या नृत्याला ढोलकीची साथ असते. [अजंता, सप्टेंबर १९५३]

झिम्मा महाराष्ट्रातील स्त्रियांचे एक सामुदायिक नृत्य. स्त्रिया वर्तुळात उभ्या राहून एकदा स्वतःच्या व एकदा दुसरीच्या हातावर टाळी वाजवतात. टाळीबरोबर चुटक्याही वाजवतात. झिम्मा खेळताना आपल्याभोवती फिरायचे असते व झिम्म्याची टाळी द्यायची असते. काही वेळा स्त्रिया वर्तुळात जोडीने उभ्या राहतात व एकमेकींच्या हातावर टाळ्या देऊन पुढे जातात आणि वर्तुळात फिरतात. या खेळाची लय प्रथम संथ व नंतर द्रुत होत जाते. नाचताना जी गाणी म्हणतात, त्यांतले एक गाणे असे –



झिम्मा

झिम्मा खेळूं कडाकडी अबीर बुक्का नाडापुडी ।।
झिम् पोरी झिम् कपाळीचें भिंग ।
भिंग गेले फुटून । पोरी गेल्या उठून ।।
आंबा पिकतो रस गळतो ।
कोकणचा राजा झिम्मा खेळतो ।।

झिम्म्याचा खांदी झिम्मा म्हणून दुसरा एक प्रकार आहे. त्यात दोन मुली समोरासमोर उभ्या राहून एकमेकींच्या हातावर हात मारतात व नंतर हात मागे घेऊन ते खांद्यावर ठेवतात. हे झाल्यावर पुनश्च आपल्याभोवती गिरकी घेतात व झिम्म्याप्रमाणे हातावर हात मारतात. [म. स्त्री. ध.; व्या. ज्ञा. को.]

झींगा आखाड्यात वाजविले जाणारे एक घन वाद्य. छडिया (सरळ) व कमानिया (वक्राकार) असे याचे दोन प्रकार आहेत. एका लाकडी चौकटीत लोखंडाच्या दोन कांबी, त्या कांबींत लोखंडी किंवा पितळी चकत्या व दोन बाजूंना वाद्य धरण्यासाठी दोन कान अशी या वाद्याची रचना असते. चौकट हातानी खाली वर करण्याने लेजमीच्या आवाजासारखा याचा आवाज येतो. लाठी, गदगा, बनैती, इ. खेळांना याची साथ उत्साहवर्धक ठरते. [कृ. जो. त्र. श.]

झींवर पंजाव व काश्मीर या प्रदेशांत वसलेली एक जात. धीवर या संस्कृत शब्दावरून हे नाव मिळाले असावे. कारण या जातीतले बरेच लोक मासेमारीचा धंदा करतात. याशिवाय बुरुडकाम, पाणीवाहतूक, हमाली, इ. व्यवसाय करणारे लोकही यांच्यांत आहेत.

यांच्यांतील ६० टक्के लोक हिंदू असून, काही मुसलमान व थोडे शीख बनले आहेत. हिंदू समाजात ही जात हलकी मानली जाते. पण हे मात्र स्वतःला राजपूत वंशाचे मानतात. हे लोक भूतपूजक असून, आपल्या व्यवसायसाधनांना देव मानून त्यांचीही पूजा करतात. गंगा, यमुना व सिंधू या नद्यांनाही हे देवता समजतात.

दिवाळीपूर्वी ८ दिवस हे लोक होई नावाचा एक समारंभ करतात. त्यावेळी सर्व घर झाडून सारवून स्वच्छ करतात. आणि भिंतीवर पाण्याचे घडे व त्यांचे वाहक यांची रंगीत चित्रे

काढतात. मग त्या चित्रांची पूजा करून त्यांना रताळी वगैरे कंदमुळांचा नैवेद्य दाखवतात. त्या प्रसंगी झींवरनीचा (पाणी वाहणारी प्रमुख स्त्री) विशेष सन्मान केला जातो. यांच्यांत मातादेवीला किंवा भूदेवीला पुजण्याची जुनी प्रथा होती, तिचे हे बदललेले स्वरूप असावे. [एन्सा. रि. ए.; म. ज्ञा. को.]

झुमैलो एक गढवाली लोकनृत्य. हे नृत्य वसंतपंचमी (माघ शु. पंचमी) पासून विषुवदिनापर्यंत चालते. फेर धरून व हातात हात गुंफून कुंवार मुली हे नृत्य करतात. नृत्याची गती मंद असते व गीते निसर्गवर्णनात्मक असतात. ध्रुवपदाच्या वेळी सर्व मुली झुमैलो-झुमैलो असा उद्घोष करतात, त्यावरून याला हे नाव मिळाले आहे. [भा. लो. नृ.]

झुलकी नृत्य सातपुडा विभागातील वन्य जमातीचे एक नृत्य. हे दिवाळीच्या आधी करतात. यात तरुण मुले व मुली भाग घेतात. या नृत्यात प्रणयाच्या विविध क्रीडांचा अभिनय करतात. याचे वैशिष्टच हे, की नृत्यासाठी मुले एका गावातली; तर मुली दुसऱ्या गावातल्या असतात. दोन मुलांच्या मध्ये एक मुलगी अशा प्रकारे नृत्यासाठी लांब रांग करतात. नंतर काही वेळ ती नुसतेच अंग झुकवतात. यामुळेच या नृत्याला झुलकी हे नाव पडले असावे.

या प्रसंगी प्रथम ते लिंगोदेवाचे गीत गातात. मग मुले-मुली विभक्त होतात व स्वतंत्र रांगा करून मृदंगाच्या तालावर नाचतात. यानंतरच्या नृत्याला मांदारी नृत्य असे नाव आहे. या नृत्यात गाइल्या जाणाऱ्या गाण्यांत बहिण-भांवडांचा संवाद असतो. ही गाणी संपल्यावर मुले-मुली पुनश्च एकमेकांत मिसळतात व रीला नामक गीते सुरू करतात. रीला गीताच्या प्रत्येक चरणाच्या शेवटी रीला रीला, असे घोषवाक्य येते. ही गीतेही संवादात्मकच असून, ती गाताना मुली टाळ्या वाजवतात व मुले नाचतात. ज्या गावात हा नृत्योत्सव होतो, त्या गावातले लोक नृत्यासाठी जमलेल्या लोकांना रात्री मेजवानी देतात. हे नृत्य कित्येक रात्री चालते. याच नृत्योत्सवात मुले-मुली परस्परांचा परिचय करून घेतात व त्यातून आपला जोडीदार निवडतात.

आश्विन वद्य त्रयोदशीच्या रात्री पृथ्वीचा सूर्याशी विवाह झाला, त्याची स्मृती म्हणूनच हा नृत्योत्सव होतो.

झुलानयात्रा एक उत्सव. हा उत्सव उत्तर प्रदेशात श्रावण शुद्ध दशमीपासून पौर्णिमेपर्यंत होत असतो. या दिवसांत राधा-कृष्णांना झोपाळ्यावर बसवून झोके देतात व स्त्रिया कृष्णासंबंधी गीते गातात. सुखवस्तू लोकांच्या घरी कृष्णचरित्रावर नाटयप्रसंगही करवतात.

झूम शेती करण्याची एक पद्धती. प्रथम जंगलाच्या एका भागातील झाडेझुडपे तोडून ती तिथेच पसरून ठेवतात आणि वाळल्यानंतर त्यांना आग लावतात. त्यामुळे जमीन भाजली जाते व तिच्यावर राखेचा थर साचतो. मग ती जमीन न नांगरताच तिथे एकच धान्य किंवा सर्व प्रकारची धान्ये एकत्र करून पेरतात. सर्व जमिनीवर बी नुसते विखरून टाकणे किंवा जमिनीत भोके पाडून त्यांत बी टाकणे, अशा झूम पेरणीच्या दोन पद्धती आहेत.

हजारो वर्षांपूर्वी चीनमधून झूमधिस नावाचे लोक आसामात येऊन वसले व त्यांनी तिथे अशा प्रकारे भाताची लागवड केली. जमीन खणण्यासाठी ते मोहखेब नावाचे हत्यार वापरीत असत. त्यावरून त्यांच्या त्या शेतीला झू-मोह असे नाव पडले. पुढे त्याचे झूम एवढेच रूप प्रचारात राहिले.

वन्य जमाती बहुश: एका ठिकाणी स्थायिक नसतात. वरील पद्धतीने शेती करून जमिनीचा कस कमी झाला, की दुसऱ्या ठिकाणचे जंगल तोडून तिथे शेती करायची, अशी त्यांची पद्धत असते. म्हणून या पद्धतीच्या शेतीला फिरती शेती असेही म्हणतात. या पद्धतीला निरनिराळ्या भागांत वेगवेगळी नावे आहेत. उ. भारतात या पद्धतीला दया, तर द. भारतात पोडुआर म्हणतात. हिमालय प्रदेशात हिचे खिल हे नाव, तर पश्चिम घाटात कुमरी हे नाव रूढ आहे. बोडगा, डेप्पा, वल्रा ही नावेही अन्यत्र प्रचलित आहेत. माडिया गोंड हिला पेंडा म्हणतात, तर बैगा लोक बेवार म्हणतात. [ट्रा. डे. इं.; बॅ. आ. क.]

झूमर एक नृत्य. हे नृत्य भारताच्या निरनिराळ्या राज्यांत निरनिराळ्या स्वरूपात आढळते, ते असे –

राजस्थानी स्त्रिया फुलांचे गुच्छ तयार करून ते आपल्या दंडात बांधतात. त्या गुच्छाला झौंर असे म्हणतात. झुमरा किंवा झौंमर हा अलंकार त्यावरूनच आला असावा. नृत्याला झूमर नृत्य असे नावही त्यामुळेच पडले असावे.

विवाहादी मंगल प्रसंगी हे नृत्य करतात. यात शृंगाररस प्रधान असतो. इ. स. च्या सातव्या शतकात यांच्यांत दोन भेद पडले, ते असे –

पहिल्या प्रकाराला युगलनृत्य म्हणतात. यात पुरुष वर्तुळ करून बसतात व स्त्रिया त्या वर्तुळाजवळ घोळका करतात. नंतर ढोल, मंजीरा, झालर, एकतारी या वाद्यांच्या साथीवर गीते सुरू करतात. गीताचा एक चरण स्त्रिया गातात व दुसरा चरण

पुरुष गातात. नंतर एक पुरुष उठतो व वर्तुळात नाचू लागतो. लगेच जवळच्या समुदायातील एक स्त्रीही वर्तुळात येते आणि त्या दोघांचे संयुक्त नृत्य सुरू होते. एक जोडी दमली, की त्या जागी दुसरी जोडी येते व हे युगलनृत्य बराच वेळ चालू राहते.



झूमर नृत्य – राजस्थान

दुसऱ्या प्रकारात फक्त एकटी स्त्रीच नृत्य करते. प्रियकराच्या मीलनाविषयीची उत्कंठा हा भाव या नृत्यात प्रमुख असतो. यातही एक स्त्री थकली, की दुसरी स्त्री तिची जागा घेते. रात्रभर हे नृत्य चालते.

गुजरातमधील गरबा व तमिळनाडमधील कुंमी या नृत्यांशी या नृत्याचे साम्य दिसते.

पंजाबात चांदण्या रात्री हे नृत्य करतात. या नृत्यास ढोलाची साथ असते. नृत्याच्या वेळी इथले लोक आपले घोडे व उंट यांनाही नाचवतात.

विंध्य प्रदेशातही झूमर नृत्याची प्रथा आहे. या नृत्याची गीतेही त्या प्रदेशात बरीच प्रचलित आहेत. ती मुख्यत्वे प्रेम आणि विरह यांची आहेत. त्यांतील दोन गीते अशी—

अँगना से लौट चला साजन,
नींदा बैरी होइगा रे ।
संग मुला गाये, संग मुला सोये,
उठके विहान रेंग चला साजन ।
नींदा बैरी होइगा रे

अर्थ – माझा प्रियकर अंगणातून परत गेला. झोप वैरीण झाली. (आम्ही दोघे) बरोबर गायलो, बरोबर झोपलो. उष:काल होताच तो प्रियकर निघून गेला. झोप वैरीण झाली.

बँसबाँ रे पोर से, निकरे भरवाँ रे ।
अलिन गलिन मढ़राय ।
अलिन गलिन मढ़राय रे ।
भमरवाँ बैठे हैं चम्पा के डार ।

अर्थ – बांबूच्या छिद्रातून भुंगे निघाले आहेत. ते गल्लीबोळात इकडे तिकडे गुंजारव करीत फिरत आहेत. फिरता फिरता ते चाफ्याच्या फांदीवर बसले आहेत.

मैथिली झूमर नृत्याचे दोन भाग आहेत –(१) संदेशात्मक व (२) भावात्मक. संदेशात्मक नृत्यात कोकिळ पक्ष्याला दूत बनवून प्रवासाला गेलेल्या प्रियकराला संदेश पाठविण्याची कल्पना असते व भावात्मक नृत्यात शृंगाररसाला प्राधान्य असते. या नृत्यामधली गीते स्त्रियाच गातात. [हिं. सा. को.; ए. हो. रा.; भा. लो. नृ.; पं. जी. सा.; विं. प्र. लो.]

झूमर बोला

वंगालमधले एक नृत्य. हे नृत्य केवळ पुरुषांचे असून, ते शिव, दुर्गा, इ. देवतांच्या पूजेच्या वेळी करतात. नृत्याबरोबर भजने गातात. त्या गाण्याला झांजा, मांदळ इ. वाद्यांची साथ असते. या नृत्यात हात खालीवर करीत, फेर धरून नाचायचे असते. [ए. हो. रा.]

झेंगट

एक घन वाद्य. हे बहुधा कांशाचे असते. याचा आकार थाळीसारखा वाटोळा असून, त्याच्या एका कडेला एक छिद्र असते. त्या छिद्रातून एक दोरी ओवून त्या दोरीला बांबूचा एक पोकळ तुकडा बांधलेला असतो, त्याला नरुआ असे म्हणतात. या नरुआच्या साहाय्याने हे झेंगट वाजवतात. झेंगटांचा उपयोग मंदिरांत आरतीच्या प्रसंगी केला जातो. या वाद्याला झालर, झालरी, झल्लरी, अशी आणखी नावेही आहेत. [कृ. जी. व्र. श.]

झेंडा नृत्य

कातकरी लोकांचे एक नृत्य. मनोविनोदनाचा एक प्रकार म्हणून केव्हाही हे नृत्य केले जाते. यात अनेक गट चढाओढीने भाग घेतात. या नृत्याच्या प्रसंगी गायिली जाणारी गीते ही सवाल – जवाबाची असतात. त्यांचा एक नमुना असा –

सवाल – लग्ना जाहली कन्या राजाची ।
कन्या राजाची तिला भोगिली ।
तिला भोगिली हजारजणांनी ।
हजारजण हो भोगून गेले ।
भोगून गेले नि स्वर्गा हो गेले ।
नित्य भोगिती हजार तिला ।
परी कुमारी आहे ती बाला ।
कोण असे ही कन्या बोला ।
प्रश्न माझा आहे तुम्हाला ।
जबाब – कन्या कोण ही देतो सांगून
पहा आहे ती शेतजमीन ।

या सवाल-जबाबी गीतांत पुष्कळदा एखाद्या आध्यात्मिक रहस्याचाही उकल करण्याचा प्रयत्न केलेला असतो.

झेन पंथ जपानमध्ये प्रचलित असलेला बौद्ध धर्मातला एक उपपंथ. ध्यान संप्रदायाचेच हे एक परिवर्तित स्वरूप आहे. पाहा– ध्यान संप्रदाय.

झेलम काश्मीरमधील एक नदी. हिचे संस्कृत नाव वितस्ता असे आहे. ऋग्वेदात गंगा, सिंधू, इ. अनेक नद्यांच्या बरोबर हिचा उल्लेख आहे (ऋ. १०.७५.५). काश्मिरी लोक हिला व्यथ या नावाने ओळखतात. ग्रीक लोक हिला हिदास्पेस म्हणत. वेरीनाग सरोवरात या नदीचे उगमस्थान आहे, असे सांगतात. प्रतिवर्षी भाद्रपद शुक्ल त्रयोदशीला हिचा व्यथ–त्रवाह नामक जन्मोत्सव काश्मिरात होत असतो. या दिवशी हजारो स्त्री–पुरुष एकत्रित येऊन वेरीनाग सरोवरात स्नान करतात. नदीचा जन्मोत्सव साजरा करणे हा इथला विशेष आहे. याच नदीच्या काठी पोरस–शिकंदरांचे युद्ध झाले होते.

झेलमला निसर्गसौंदर्याचे जणू वरदानच मिळाले आहे. हे सौंदर्य पाहून जहांगिराने एकदा हिच्या विषयी 'पृथ्वीवर जर कुठे स्वर्ग असेल तर तो इथेच आहे, इथेच आहे, इथेच आहे' असे उद्गार काढले होते. झेलमच्या उगमस्थानी जहांगिराने बांधलेला एक अष्टकोनी तलाव आहे आणि त्याच्या पाळीवर त्याचे वरील उद्गार कोरून ठेवलेले आहेत.

काश्मिरी लोकगीतांत झेलमवर अनेक गीते आहेत. त्यांतील एक गीत असे –

वार–वांर पकवनि व्यथिए लो लो
लगई बार परि व्यथिए लो लो
चे कुत छुइ शान व्यथिए लो लो
लगइ बपरि व्यथिए लो लो

अर्थ – हे संथ गतीने वाहणाऱ्या झेलम ! तुझे ते सौंदर्य पाहून मी माझे प्राण तुझ्यावरून ओवाळून टाकतो.

ही नदी श्रीनगरमधून वाहत जाऊन पुढे वूलर सरोवराला मिळते व दुसऱ्या बाजूने बाहेर पडते. त्यानंतर बारामूला शहरावरून पश्चिमेकडे जाऊन, काश्मीरच्या सीमेवरून पंजाबात शिरते. वाटेत किशनगंगा नदी हिला मिळते. त्रिम्मूजवळ तिचा चिनाबशी संगम होतो. हिची एकूण लांबी ४५० मैल आहे. [म. ज्ञा. को; जीवनलीला; वे. फू. आ. रा.]

झोडा कुमाऊं प्रदेशातील एक नृत्य. हे सामूहिक नृत्य असून, बहुतेक उत्सवांच्या प्रसंगी केले जाते. ब्राह्मणांशिवाय इतर जातींत विवाहप्रसंगीही हे नृत्य करतात. काही ठिकाणी चैत्र महिन्यातही हे नृत्य करतात व म्हणूनच त्याला चैतीझोडा असेही म्हणतात. हे लोकप्रिय असून, जत्रेत केले जाते.

रात्री वा दिवसा, मंदिरात अथवा मोकळ्या पटांगणावर हे नृत्य करतात. यात पाचापासून दोनशेपर्यंत कितीही व्यक्ती भाग घेऊ शकतात. नर्तक दोन वर्तुळे करून नाचतात. नृत्याची गीते विविध विषयांवरची असतात. त्यांत त्या लोकांचे जीवनविषयक अनुभव व्यक्त झालेले असतात. [पर्वतीय संस्कृति]

झोडिया नृत्य भिलाले आदिवासी लोकांचे एक नृत्य. विवाहाच्या प्रसंगी हे नृत्य करतात. नाचणारे हातात काठ्या घेऊन वर्तुळाकार नाचतात. ढोल व सनई ही वाद्ये याच्या साथीला असतात. [लोककला त्रैमासिक]

झोपाळा एक क्रीडासाधन. संस्कृतात याला दोला, प्राकृतात झुल्ल, मराठीत झोला, झोपाळा, हिंदोळा व हिंदीत झूला असे म्हणतात. हा लाकडाचा बनविलेला असून आकाराने चौकोनी असतो. याच्या चारही कोपऱ्यांना लोखंडी किंवा पितळी कड्या असतात. त्या कड्यांत गज अडकवून झोपाळा तुळईला टांगतात. हा जमिनीपासून फूट दीड फूट उंचीवर असतो.


झोपाळा – कोणार्क येथील मंदिरातील शिल्प

प्राचीन वाङ्मयात याचे बरेच उल्लेख आढळतात. गवामयन सत्राच्या सहाव्या दिवशी, महाव्रतप्रसंगी होता झोपाळ्यावर बसून शस्त्रे म्हणतो असे का. श्रौ. सूत्रात (१३.३.२) म्हटले आहे. त्याचप्रमाणे हरिवंश (२.१४.१०), विष्णु पुराण (५.९.८) इ. पुराणांतही झोपाळ्याचे उल्लेख आहेत.

एकनाथमहाराजांनी आपल्या एका अभंगात झोपाळ्याचा उल्लेख केला आहे, तो असा —

सद्‌गुरुकृपे श्रीदत्त ओळखिला
हृदय डोला त्यावरी बैसविला

त्याचप्रमाणे बारामतीचे बाबूजी नाईक यांच्या मुलींसाठी मोरोपंतांनी रचून दिलेली सीतागीत, सावित्रीगीत व रुक्मिणीगीत ही झोपाळ्यावर बसून गाण्याची तीन गीते प्रसिद्ध आहेत.

महाराष्ट्रात व कर्नाटकात श्रावणमासामध्ये नागपंचमीच्या निमित्ताने झाडांना झोपाळे बांधतात व स्त्री–पुरुष त्यांवर झोके घेतात.

चैत्रात गौर बसविण्यासाठी, दोल्हारा म्हणजे झोपाळाच ठेवतात. डोहाळतुळीची जी अनेक कौतुकाची जेवणे करतात, त्यात एक झोपाळ्यावरचेही असते.

उ. भारतात कृष्णचरित्रातल्या विविधलीलाप्रसंगांची स्मृती म्हणून जे अनेक लोकोत्सव प्रचलित आहेत, त्यांत कृष्णाने राधेसह केलेल्या दोलाक्रीडेची स्मृती साजरी करणारा दोलोत्सवही असतो. पाहा – दोलोत्सव. [प्रा. भा. म.]

झोरिया एक जात. यांची वस्ती ओडिसा प्रदेशात आढळते. यांचा मूळ पुरुष एका माळी स्त्रीच्या पोटी झोरियाच्या (ओढा) काठी जन्मला, म्हणून या जातीला झोरिया हे नाव मिळाले. हे लोक ओरिया भाषा बोलतात.

यांच्या स्त्रिया ठेंगू असून मजबूत बांध्याच्या असतात. त्या स्वतःच्या पोटऱ्या गोंदून घेतात. त्या गोंदलेल्या पोटऱ्या पाहिल्या म्हणजे त्यांनी जणू पायमोजे घातले आहेत, असे वाटते. त्या खांद्यापासून गुडघ्यापर्यंत एकच शुभ्र वस्त्र गुंडाळतात.

हे लोक जकर (भूमिदेवी) या देवतेला भजतात. तिचे प्रतीक म्हणून एक दगड गावाबाहेर स्थापलेला असतो. इस्पूर, महाप्रभू, भीमदेवता, धर्मीदेवता, बस्मोती व धुली नागिन ही त्यांच्या अन्य देवांची नावे आहेत.

झोरिया मुले व मुली वेगवेगळ्या सामुदायिक शयनगृहात झोपतात.

हे लोक प्रेते जाळतात, प्रेताची रक्षा एका खड्ड्यात पुरतात आणि तिथे मृताची दगडी स्मारके उभारतात. [ट्रा. मि. ओ.]

ञ च वर्गातील पाचवा वर्ण व देवनागरी वर्णमालेतील दहावे व्यंजन. या वर्णाची पहिली अवस्था अशोकाच्या गिरनार येथील लेखात (सनपूर्व ३ रे शतक), दुसरी क्षत्रपवंशी राजा रुद्रदामन याच्या गिरनार येथील लेखात (इ. स. चे २ रे शतक) व तिसरी समुद्रगुप्ताच्या अलाहाबाद येथील स्तंभावरील लेखात (इ. स. चे ४ थे शतक) आढळते.



ञ च्या रूपाचा विकासक्रम

वर्णोद्धारतंत्रात या वर्णाचे स्त्रीरूपी ध्यान दिले आहे, ते असे –

चतुर्भुजां धूम्रवर्णां कृष्णाम्बरविभूषिताम् ।
नानालङ्कारसंयुक्तां जटामुकुटराजिताम् ॥
ईषद्‌हास्यमुखीं नित्यां वरदां भक्तवत्सलाम् ।
एवं ध्यात्वा ब्रह्मरूपां तन्मन्त्रं दशधा जपेत् ॥

अर्थ – चतुर्भुज, धूम्रवर्ण, काळे वस्त्र परिधान केलेली, नाना अलंकार ल्यालेली, जटामुकुट धारण केलेली, स्मितमुखी, नित्य, वर देणारी व भक्तवत्सल अशा ब्रह्मरूप ञकारमूर्तीचे ध्यान करून दहा वेळा तिच्या मंत्राचा जप करावा.

तालू हे याचे उच्चारणस्थान आहे. [म. ज्ञा. को.; श. क.]

ट ट वर्गातील पहिला वर्ण व देवनागरी वर्णमालेतील अकरावे व्यंजन. या वर्णाची पहिली अवस्था अशोकाच्या गिरनार येथील लेखात (सनपूर्व ३ रे शतक), दुसरी क्षत्रपवंशी रुद्रदामन याच्या गिरनार येथील लेखात (इ. स. चे २ रे शतक) व तिसरी अवस्था समुद्रगुप्ताच्या अलाहाबाद येथील स्तंभलेखात (इ. स. चे ४ थे शतक) आढळते.



ट च्या रूपाचा विकासक्रम

वर्णोद्धारतंत्रात या वर्णाचे स्त्रीरूपी ध्यान दिले आहे, ते असे–

मालतीपुष्पवर्णाभां पूर्णचन्द्रनिभेक्षणाम् ।
दशबाहुसमायुक्तां सर्वालङ्कारसंयुताम् ॥
परमोक्षप्रदां नित्यां सदा स्मेरमुखीं पराम् ।
एवं ध्यात्वा ब्रह्मरूपां तन्मन्त्रं दशधा जपेत् ॥

अर्थ — मालती पुष्पाच्या वर्णाप्रमाणे कांती असलेल्या, पूर्णचंद्राप्रमाणे डोळे असणाऱ्या, दहा बाहू असलेल्या, सर्व अलंकारांनी भूषित, मोक्षप्रद, नित्य व हसतमुख अशा श्रेष्ठ व

ब्रह्मरूप टकारमूर्तीचे ध्यान करून तिच्या मंत्राचा दहा वेळा जप करावा.

मूर्धा हे याचे उच्चारणस्थान होय. [म. ज्ञा. को.; श. क.]

टकारी एक जात. या लोकांना वाघरी किंवा पारधी असेही म्हणतात. यांची वस्ती महाराष्ट्रात आहे. हे तेलुगू भाषा बोलत असल्यामुळे मुळात तेलंगणातून आले असावे, असे दिसते. कित्येक लोक टकारी जात ही मामटयांची एक शाखा आहे असे मानतात. टकारी हे श्रेष्ठ जातीच्या लोकांना आपल्या जातीत घेतात. त्यांची सहा कुळे आहेत. खंडोबा व देवी ही त्यांची कुलदैवते होत. खानदेशातल्या टकाऱ्यांत घाटोळे म्हणून एक पोटभेद आहे. हे टकारी महाराष्ट्राच्या इतर भागांतील टकाऱ्यांच्या मुलींशी लग्ने करतात; पण आपल्या मुली मात्र त्यांना देत नाहीत.

कुल अथवा कुलदेवी एकच असलेल्या घराण्यांत विवाह होत नाहीत. यांच्यांत सहोदर बहिणी सख्ख्या जावा होऊ शकतात. विधवा आपल्या धाकटया अगर मोठया दिराशी लग्न करते. एखाद्या अविवाहिताला विधवेशी लग्न करायचे असल्यास प्रथम त्याचे रुईशी लग्न लावतात. यांच्या लग्नात ब्राह्मण पौरोहित्य करतो. अन्य विधी जातीतले जाणकार करतात.

जात्यांना टाकी लावणे व मजुरी करणे हे यांचे धंदे होत. काहीजण शेतीही करतात.

हे लोक मृताला बहुधा पुरतात. [मुं. इ. गॅ.; वाँ. बे. क्का.]

टप्पा हिंदुस्थानी संगीतातील एक गानप्रकार. टप (= आखूड) या शब्दावरून या प्रकाराला हे नाव पडले असावे पंजाबातील उंटवाले लोक अशा प्रकारची गीते गातात. हीर–रांझा या प्रणयी युगुलावर पंजाबी भाषेत रचलेली ती लोकगीते आहेत. त्या धर्तीवरच टप्प्याची रचना झाली आहे.

मियाँ शोरी या गायकाला टप्प्याचा जनक मानतात. हा कलावंत औधचा नबाब असफुद्दौला याच्या पदरी होता. तो पंजाबात जाऊन राहिला, पंजाबी भाषा शिकला व तिथल्या लोकगीतांवर संस्कार करून त्याने टप्प्याची निर्मिती केली. पुढच्या काळात बंगालमध्ये टप्प्याचा विशेष प्रसार झाला.

टप्पे हे संकीर्ण रागांत गायिले जातात. या रागांना जिल्हे म्हणतात. त्रिवट तालात, म्हणजेच धीमा, तिवडा, तिलवाडा, झुमरा, इ. तालांत टप्प्याच्या चिजा बांधलेल्या असतात. त्यांत शृंगार हा प्रधान रस असतो. याचे अस्ताई व अंतरा असे दोन अवयव, तसेच पदे व बिरुद अशी दोन अंगे प्रायः असतात. टप्प्यात विशेषेकरून स्फुरण, आहती–प्रत्याहती, इ. गमकांचे अर्थात खटका, मुरकी इत्यादींचे काम फार दिसून येते. अलंकारांचा मर्यादित वापर आणि आखूड स्वरांचा भरणा, यांमुळे टप्पा चटकन वेगळा दिसून येतो. टप्पे बहुधा विलंबित किंवा मध्य लयीत गातात. स्वरांची गुंफण विविध प्रकारे केल्यामुळे टप्प्याचे सौंदर्य विशेष खुलते. ठुमरीतील ताना स्फटिकमण्यांच्या माळेप्रमाणे चमकदार व दाणेदार भासतात, तर टप्प्यातील ताना पाऱ्याच्या बिंदूप्रमाणे थरथरत्या असतात. मियाँ शोरी याने रचलेल्या टप्प्याची एक चीज अशी––

दोतेना देनी जागे वेस पाइडा तू राजी रहना ।
नैनां तू साडे वारीवे वरछी दी नीकों वे मियाँ ।
इष्क दे नार सानु बहाना ।
तू शोरी तू सानु भलावे जी तरसांदा
नेह लगाकर की सानु दहणा ॥

टप्पा हा प्रकार महाराष्ट्रात फारसा प्रचलित नाही. मात्र त्यातील तानांची पद्धत ख्याल व ठुमरी या दोन्ही प्रकारांत वापरलेली दिसते. [श्री. आबासाहेब मुजुमदार, पुणे]

टहोका व्रजमंडलातील एक लोकनृत्य. या नृत्यात नर्तक पायाच्या चवडयावर उडया मारीत पुढे जातो व तशाच पद्धतीने मागे येतो. या मागे येण्याच्या प्रकाराला उलटा टहोका असे म्हणतात. [कृ. जी. ब्र. श.]

टागीनाथ एक शिवस्थान. हे रांचीच्या पश्चिमेला सुमारे ११२ मैल अंतरावर असलेल्या एका डोंगरावर आहे. वर चढताना बराच वेढा घ्यावा लागतो. मार्गावर वृक्षवेली आणि खळाळणारे निर्झर असल्यामुळे हा डोंगर रम्य दिसतो. वर एक छोटेसे शिवमंदिर आहे, तेच टांगीनाथाचे मंदिर होय. या मंदिरासमोरील अंगणात एक प्रचंड लोखंडी त्रिशूळ जमिनीत खोचून उभा केलेला आहे. या त्रिशूळाचे मधले टोक मोडून पडले आहे. या मोडलेल्या भागाचेच वजन सुमारे तीन मण आहे. एकदा एका लोहाराने लोखंडाच्या मोहाने हा त्रिशूळ उपटण्याचा प्रयत्न केला, त्यासरशी तो तिथेच मरून पडला आणि च्या कुळाचाही नाश झाला, अशी दंतकथा आहे. टांगीनाथाच्या परिसरातील गावात एकही लोहाराचे घराणे आज अस्तित्वात नाही, एवढे मात्र खरे. शेकडो वर्षे ऊन-पावसात राहूनही या प्रचंड त्रिशूळावर यत्किंचितही गंज चढत नाही, हे विशेष होय.

मंदिराच्या पूर्वेकडे शिव, दुर्गा, इ. देव-देवतांच्या अनेक सुंदर पण खंडित मूर्ती आहेत. त्याच्या परिसरात शेत नांगरताना अजूनही काही मूर्ती सापडतात. यावरून असे वाटते, की एके

काळी हे वाजते-गाजते क्षेत्र असावे. आज मात्र या ठिकाणी आसपासचे ग्रामीण जन आणि आदिवासी यांच्याशिवाय कोणीही



टांगीनाथाचा प्रचंड त्रिशूळ

येत नाही. [श्री. बलराम खलखो– धर्मयुग, ११ एप्रिल १९६५]

टाक कुलदेवतांच्या प्रतिमांचा एक प्रकार. तांबे, चांदी, सोने, इ. धातूंच्या पत्र्यावर देवतांच्या आकृतींचे साचे दाबून टाक बनवतात. टाकाच्या मागच्या बाजूलाही एक सपाट पत्रा बसवलेला असतो. महाराष्ट्रात मराठे आणि देशस्थ ब्राह्मण यांच्या कुलदेवतांची उपासना टाकाच्या स्वरूपातच केली जाते. कोकणस्थ ब्राह्मणांच्या देव्हाऱ्यांतही टाक असतात. खंडोबाचा टाक प्रायः सोन्याचा असतो. वतनाचे संपादक, घराण्याचे मूळ पुरुष, घराण्याच्या प्रतिष्ठेसाठी अथवा धन्याच्या रक्षणासाठी प्राणार्पण करणारे इमानी सेवक यांचेही टाक कृतज्ञताबुद्धीने तयार करवून ते देव्हाऱ्यात बसवतात. अशा टाकांना पुढे कुलदेवतेची प्रतिष्ठा लाभते आणि त्यांच्यासाठी कुलधर्म – कुलाचारही सुरू होतात. [दे. ऋ. ब्रा. प. ग्रं.]

टाकळी रामदासांच्या पुरश्चरणाचे स्थान. हे स्थान नासिक-पंचवटीपासून सुमारे तीन मैल अंतरावर नंदिनी ऊर्फ नासर्डी या छोट्या नदीच्या काठी आहे. हे स्थान निसर्गरम्य आहे. गावापासून जवळच नंदिनीचा गोदावरीशी संगम झालेला आहे. सावधान हा शब्द ऐकताच रामदास विवाहमंडपातून पळाले, ते फिरत फिरत इथे येऊन राहिले. इथे त्यांनी इ. स. १६२० ते १६३२ या बारा वर्षांच्या काळात गोदावरीच्या पात्रात उभे राहून गायत्रीपुरश्चरण केले. या काळात त्यांनी स्वहस्ते लिहिलेली वाल्मीकिरामायणाची प्रत उपलब्ध आहे.

याच ठिकाणी रामदासांना उद्धव नामक पहिला शिष्य लाभला. इ. स. १६३२ च्या सुमारास भारतभ्रमणास निघते वेळी त्यांनी आपल्या मठात उद्धवाची नियुक्ती केली आणि त्याच्यासाठी मारुतीची गोमयमूर्तीही स्थापन केली.

या मठाची परंपरा ब्रह्मचाऱ्यांची आहे. उद्धवापासून आजपर्यंत एकूण नऊ मठाधिकारी होऊन गेले. रामदासांची आद्य तपोभूमी म्हणून समर्थ संप्रदायात या स्थानाचे माहात्म्य विशेष आहे. नानकाचा पुत्र श्रीचंद्राचार्य हा दक्षिणयात्रेला आला असताना त्याची व रामदासांची इथेच भेट झाली आणि दोघांत भारताच्या दुःस्थितीविषयी चर्चा झाली, असे वृत्त उदासी संप्रदायात प्रचलित आहे. [श्री. सां. वि. वि. १; श्रीचंद्राचार्य]

टाळ एक घन वाद्य. याचे द्रोणाच्या आकाराचे दोन पितळी तुकडे असतात. या तुकड्यांच्या मधोमध थोडा फुगवटा असतो. त्या फुगवट्याच्या मधोमध छिद्र पाडून त्यातून दोरी ओवतात व फुगवट्याच्या आतील भागात दोरीची गाठ मारतात. मग ते तुकडे दोन हातांत घेऊन त्यांचा एकमेकावर आघात करून ताल धरतात. क्वचित दोन्ही टाळ एका हातात घेऊनही वाजवतात. संतवाङ्मयात टाळाचा उल्लेख अनेक ठिकाणी येतो.



टाळ

एका हाती टाळ, एका हातीं चिपळिया ।
घालिती हुंमरी एक वाताती टाळिया ॥

असा तुकोबा टाळाचा उल्लेख करतात. या वाद्याचा उपयोग मंदिरात भजनकीर्तनादी प्रसंगी करतात.

टाळीचा घोडा महाराष्ट्रात खेळला जाणारा मुलींचा एक खेळ. यात प्रारंभी तीन मुली एकमेकींकडे पाठ करून उभ्या राहतात. एक मुलगी उजव्या पायावर उभी राहते आणि डावा पाय गुडघ्यात वाकवून मागे उचलते. दुसरी मुलगी डाव्या पायावर उभी राहते आणि उजवा पाय वर उचलते. नंतर या दोन्ही मुली आपापले उचललेले पाय एकमेकात

अडकवतात. मग तिसरी मुलगी आपला एक पाय वर उचलून पहिल्या दोघींच्या पायात अडकवते. त्यानंतर या तीन मुलींच्या समोर आणखी तीन मुली उभ्या राहतात व त्यांच्या भोवती गोल फिरतात. मधल्या मुली आपले हात वर करून बाहेरच्या मुलींना टाळ्या देतात. [व्या. ज्ञा. को.]

टिकली

स्त्रियांचे एक प्रसाधन. टिकली कपाळावर लावतात. टिका (तिलक) या शब्दावरून हा लघुत्वदर्शक शब्द बनला आहे. टिकली गोल असते. क्वचित ती ताराकृती, स्वस्तिकाकृती, अर्धचंद्राकृती अशीही करतात. तिचा खालचा भाग गुलालाचा किंवा कुंकवाचा असतो आणि वरचा भाग भिंगाचा किंवा अभ्रकाचा असतो.

कथासरित्सागरात वासवदत्ता आणि पद्मावती यांच्या कथेत टिकलीचा उल्लेख आला आहे. प्रसाधनासाठी झाडांच्या पानांचाही टिकल्या म्हणून उपयोग करीत असल्याचे उल्लेख आढळतात. उदा०—

यस्यामुपवनवीथ्यां तमालपत्राणि युवतिवदने च ।
(कुट्टनीमतम् १६)

अर्थ — (वाराणसीतल्या) उपवनमार्गावरील तमालवृक्षांवर व युवतींच्या मुखांवर तमालपत्रे शोभत असत.

टिकली लावण्याची पद्धत मुख्यत्वे उ. प्रदेश, राजस्थान व मारवाड या भागांत आहे. दक्षिणेत टिकली फारशी प्रचारात नाही. कुमारी व सौभाग्यवती यांचाच हा अलंकार आहे.

जबलपूर, बेतुल, रायपूर आणि सागर या जिल्ह्यांतील लाखेरा आणि पटवा जातीचे लोक टिकल्या तयार करण्याचा व्यवसाय करतात. [प्रा. भा. प्र.]

टिटवाळा

एक गणेशक्षेत्र. हे स्थान कल्याण—नासिक लोहमार्गावर कल्याणपासून जवळच असलेल्या टिटवाळा स्टेशनापासून दोन मैलांवर आहे. इथल्या मंदिरातली गणेशमूर्ती डावी मांडी घालून व उजवा पाय तिरपा ठेवून बसलेल्या स्थितीत आहे. वरील दोन हातांपैकी उजव्या हाती परशू आणि डाव्या हाती कमळ आहे. खालचे दोन्ही हात गुडघ्यावर ठेवलेले आहेत.

मंदिराचा परिसर निसर्गसौंदर्याने नटलेला आहे. मंदिराच्या मागे तलाव आहे, तो पेशवाईत सरदार मेहेंदळयांनी बांधला आहे. या तलावाचे खोदकाम चालू असताना सध्याची गणेशमूर्ती सापडलेली आहे. या मूर्तीवर थोरल्या माधवराव पेशव्यांची विशेष श्रद्धा होती. ती सापडण्यापूर्वी त्यांना स्वप्नदृष्टांत झाला होता. ते इथे दर्शनासाठी व विश्रांतीसाठी वारंवार येत असत.

परित्यक्ता शकुंतलेने कण्वऋषींच्या सांगण्यावरून याच गणेशाची उपासना केली आणि गणेशकृपेने तिचे पुन: दुष्यंताशी मीलन घडले, अशी या क्षेत्राविषयी कथा सांगतात. [श्री. वि. के. छत्रे — पुरुषार्थ, देवता-विशेषांक जून—जुलै १९६३]



गणपतीची मूर्ती — टिटवाळा

टिपडो नृत्य

सिंधी लोकांचे एक नृत्य. होळीच्या वेळी चांदण्या रात्री या नृत्याचा कार्यक्रम होतो. यात फक्त कुमारिकाच भाग घेतात. नाचताना फेरात मध्यभागी लहान मुलाला बसवतात व टाळ्या वाजवीत नाचतात. या नाचाची अनेक गाणी आहेत. [अजंता, सप्टें. १९५३]

टिपऱ्या

एक क्रीडासाधन. लाकडाच्या बारा ते चौदा इंच लांबीच्या काठ्या कातून गोल करतात व त्यांची दोन्ही टोके निमळती करतात; त्यांना टिपऱ्या म्हणतात. त्या रंगवून त्यांच्या टोकांना गोंडेही बांधतात. फेर धरून नृत्य करताना टिपऱ्यांचा तालासाठी उपयोग होतो.

टिपऱ्यांचा खेळ हा एक प्राचीन खेळ आहे. श्रीकृष्ण गोपगोपींबरोबर टिपऱ्या खेळल्याची वर्णने आहेत. महाराष्ट्रातल्या कित्येक संतांनी कृष्णाच्या टिपरीखेळावर अभंग किंवा पद्ये

रचली आहेत. त्यांपैकी एकनाथांचे एक पद असे –

खेळसी टिपऱ्या घाईं रे। वाचे हरिनाम गाईं रे।
टिपरीस टिपरी चुकूं जाता भाई।
पडसी यमाच्या घाईं रे ।। १ ।।
सहा चार अठरा गड्यांचा मेळा रे।
टिपरियांचा खेळ खेळा रे।
एका खेळा दोन्ही गुंतला। यमाजी घालील डोळा रे।
वाया खेळ खेळतोसी बाळा रे। सावध होईं पाहे डोळां रे।
एका जनार्दनीं शरण जातां।
चुकशील कळिकाळा रे ।। ३ ।।

या खेळात दहा-बारा माणसे फेर धरून नाचतात व नाचताना आपल्या डाव्या-उजव्या बाजूच्या नर्तकाच्या टिपरीवर आळीपाळीने आपल्या टिपरीचा आघात करतात. काही ठिकाणी खेळाच्या आरंभी दोन दोन नर्तक एकमेकांकडे तोंड करून उभे राहतात व परस्परांच्या टिपरीवर आघात करून नाचू लागतात. या नाचाच्या अनेक भिन्न गती असून, त्या करताना भिन्न गीते म्हणतात. त्यांतील काही गीते अशी –


टिपऱ्यांचा खेळ – एक भित्तिचित्र – मेणवली

१ एक टिपरी घे, दुसरीस मार गे, तिसरी घेऊन चौथीला।
पाचवी घेऊन साहवी फिर गे, सातवी बदल ।।
२ राधाकृष्ण गे कुंजविहारी, मुरलीधर गोवर्धनधारी।
३ हरिस खेळता आनंद चित्ता हरिगुण गाता,
अघटित रे। धावता धरणी न पुरे ।।

या नृत्याला झांजा व ढोलके यांची साथ असते. कित्येकदा टिपऱ्यांच्या नाचाबरोबर नर्तक गोफही विणतात. टिपऱ्यांचा हा खेळ रासक्रीडेतलाच एक प्रकार आहे. महाराष्ट्रात, विशेषतः कोकणात व गुजरातेत हा खेळ फार लोकप्रिय आहे. [मु. वि. को.; व्या. ज्ञा. कों.; भा. लो. नृ.]

टिपुरा

पूर्व भारतातल्या बोडो भाषासमूहातली एक महत्त्वपूर्ण भाषा. ही भाषा बोलणारे लोक टिप्पेराच्या डोंगरी भागात आणि जवळच्या चितगाव विभागात राहत आहेत. डाक्का, सिल्हेट आणि काचार या भागांतही ही भाषा अल्प प्रमाणात आढळते. चितगावच्या परिसरात हिला म्रुंग असे नाव आहे. दीमा-सा आणि गारो या भाषांशी हिचे अनेक बाबतींत साम्य आहे. ही भाषा ज्या भाषासमूहात मोडते, त्या समूहाची सर्व वैशिष्टचे हिच्यामध्ये विद्यमान आहेत. या भाषेत मनुष्याला बरक असा शब्द आहे. हा शब्द बड (बोडो) या शब्दाचेच एक रूप आहे. [भा. भा. स.]

टिप्पेरा

एक जमात. हे लोक आसाम आणि बंगाल या प्रदेशांतल्या डोंगरी भागात राहतात. टिप्पेरा जिल्ह्यात व चितगाव जिल्ह्याच्या दक्षिण भागात यांची बरीच वस्ती आहे. काही अभ्यासकांच्या मते हे लोक मूळचे मणिपूरकडले असून, ब्रह्मी स्वारीच्या वेळी हे आपले मूलस्थान सोडून इकडे आले. असंग नामक राजाला ते आपला मूळ पुरुष मानतात. हा असंग महाभारतात उल्लेखिलेल्या त्रिपुराधिपती त्रिलोचनाचा पूर्वज होय, असे त्यांचे म्हणणे आहे. टिप्पेरा भागाला त्रिपुरा असेही म्हणतात. श्री. एम. आर. नाथ यांनी त्यांच्या उत्पत्तीविषयी एक वेगळीच कथा दिली आहे, ती अशी–

चंद्रवंशी ययातीचा पुत्र द्रुह्यू या राजकुमाराने आपल्या मातापित्यांच्या इच्छेविरुद्ध बोडो जमातीच्या एका मुलीशी विवाह केला आणि तो तिच्यासह अरण्यात राहू लागला. द्रुह्यूला या बोडो जातीच्या पत्नीपासून जी संतती झाली, तीच सध्याची टिप्पेरा जमात होय.

हे लोक सनपूर्व १९०० च्या सुमारास आसाममध्ये आले व त्यांनी कपिली या नदीच्या काठी त्रिग्वेद नावाचे राज्य स्थापिले, असे श्री. नाथ यांचे म्हणणे आहे. या राजकुलात १४ महापराक्रमी राजे झाले. या घराण्यातल्या चित्ररथ नामक बाराव्या राजपुरुषाला युधिष्ठिराने मान्यता दिली होती. त्यांच्यापैकी एका राजाने कचारी जमातीतल्या एका मुलीशी विवाह केला होता. त्याचे राज्य बराकच्या खोऱ्यात खोलोंग्मा (सिल्चरच्या पूर्वेला कुठेतरी) येथे होते.

हे लोक धर्माने हिंदू असून शिव, दुर्गा, विष्णू, लक्ष्मी, सरस्वती, कार्तिकेय, गणेश, ब्रह्मा, पृथ्वी, समुद्र, गंगा, अग्नी, मदन व हिमालय अशा चौदा देवतांना भजतात. पूजेसाठी ते

या देवतांच्या मातीच्या प्रतिमा बनवितात. त्यांच्यामध्ये एका लोकोत्सवाच्या प्रसंगी बांबूची काठी जमिनीत रोवून तिची पूजा करण्याची प्रथा आहे.



टिप्पेरा जातीचे सुगीच्या वेळचे नृत्य

टिप्पेरा जमातीत राजबंसी, नोवत्या, जोमालिया आणि रेयांग अशा चार शाखा आहेत. श्रेष्ठतेच्या बाबतीत त्यांचा उतरता क्रम लागतो. रेयांग शाखेचे उपाध्याय वेगळे असतात.

विवाहप्रथा – या जमातीत विवाहाचा धार्मिक स्वरूपाचा विधी मुळीच नसतो. वधूवरांच्या पित्यांची विवाहाला संमती लाभणे हीच महत्त्वाची बाब मानतात. वराकडून वधूपक्षाला देज मिळते. देज देणे अशक्य असल्यास त्या तरुणाला विवाहापूर्वी सासऱ्याच्या घरी एक वर्षभर नोकरी करावी लागते. यांच्यांत बालविवाहाची प्रथा नाही. बहुपत्नीत्वाला बंदी नसली, तरी त्याचा आढळ अत्यंत कमी प्रमाणात आहे.

हे लोक गोमांसाशिवाय कोणत्याही प्रकारचे मांस खातात. जवळचा नातेवाईक मृत झाला असेल, तर एक आठवडाभर मांसाशन वर्ज्य करतात. यांना नृत्याची अतिशय आवड असते. कोणत्याही व्यक्तीला विवाहित झाल्याशिवाय जमातीत प्रतिष्ठा लाभत नाही.

टिप्पेरा व काचारी लोक एकाच वंशाचे आहेत असे म्हणतात. टिप्पेरा लोकही फिरती शेती करतात. यांची घरे चकमा लोकांच्या घरांसारखीच असतात. पोशाखाच्या बाबतीत यांनी बंगाली लोकांचे बरेच अनुकरण केलेले दिसते. [इं. स्ट. पा. प्रे., जानेवारी १९६०; वॅ. आ. क.; से. इं., १९३१]

टिळक, लो. बाळ गंगाधर (१८५६–१९२० इ. स.)

भारताच्या स्वातंत्र्य चळवळींचे श्रेष्ठ पुढारी, गणिती व तत्त्वज्ञ. रत्नागिरी जिल्ह्यातील दापोली तालुक्यातले चिखलगांव हे टिळकांचे मूळ गाव होय. टिळकांचा जन्म रत्नागिरी येथे झाला. त्यांचे वडील गंगाधरपंत यांना त्यांच्या संस्कृताच्या व्यासंगामुळे व अध्यापन-व्यवसायामुळे गंगाधरशास्त्री म्हणत. टिळकांच्या मनावर लहान वयात हिंदू आचारविचारांचा जो खोल संस्कार झाला, त्याला कारण त्यांच्या वडिलांचे ज्ञान व चारित्र्य हे होय. टिळक १० वर्षांचे असताना त्यांच्या मातुःश्री निवर्तल्या आणि त्यांच्या १६ व्या वर्षी वडील निधन पावले. पुढे त्यांच्या चुलत्याने व चुलतीनें पुणे येथे त्यांचा सांभाळ केला आणि त्यांना आई-वडिलांची उणीव भासू दिली नाही.

इ. स. १८७३ साली मॅट्रिकची परीक्षा उत्तीर्ण होऊन टिळक डेक्कन कॉलेजात दाखल झाले व १८७६ साली बी. ए. ची परीक्षा गणित विषय घेऊन पहिल्या वर्गात उत्तीर्ण झाले. विद्यार्थीदशेत टिळक हे कुशाग्र बुद्धीचे विद्यार्थी म्हणून प्रसिद्ध होते. डेक्कन कॉलेजातील गणिताचे प्राध्यापक श्री. केरूनाना छत्रे यांना टिळकांच्या स्वतंत्र बुद्धीचे मोठे कौतुक वाटत असे. बी. ए. झाल्यानंतर टिळकांनी कायद्याचा अभ्यास केला व १८७९ साली ते एल्. एल्. बी. ची परीक्षा उत्तीर्ण झाले.



लो. टिळकांचे जन्मस्थान – रत्नागिरी

टिळक डेक्कन कॉलेजमध्ये असताना त्यांचा व त्यांचे समकालीन विद्यार्थी श्री. गोपाळ गणेश आगरकर यांचा स्नेह जुळून आला. देशप्रेमाने प्रेरित झालेल्या या दोन मित्रांत देशसेवा कोणत्या मार्गाने करावी, यासंबंधी वारंवार वादविवाद चालत.

टिळक व आगरकर यांच्या मनावर त्या वेळी मिल व स्पेन्सर या पाश्चात्य विचारवंतांचा मोठा प्रभाव पडला होता. श्री. दादाभाई नौरोजी व न्या. महादेव गोविंद रानडे यांचे विचार व कार्य, यामुळेही टिळक व आगरकर यांच्या ध्येयवादी कल्पनांना आकार येऊ पाहत होता.

न्या. रानडे यांनी विविध सामाजिक संस्था निर्माण करून समाजजागृतीचे जे कार्य चालवले होते, त्याबद्दल टिळक व आगरकर यांना मोठा आदर वाटे. त्यातूनच, आपल्या देशाला परकीय राजसत्तेपासून मुक्त केले पाहिजे, हा विचार दोघांच्याही मनात प्रबळ होत गेला. मात्र त्या वेळी राजकीय कार्य कसे व कोणत्या दिशेने सुरू करायचे यासंबंधी त्यांच्या मनातील विचार सुस्पष्ट झालेले नव्हते. याच वेळी विष्णुशास्त्री चिपळूणकर हे सरकारी नोकरीचा राजीनामा देऊन पुण्यात आले होते. त्यांच्या निबंधमालेतील तेजस्वी लेखनाकडे टिळक व आगरकर स्वाभाविकपणेच आकृष्ट झाले. ध्येयवादाचे आकर्षण तरुण मनाला स्वाभाविकपणेच असते. परंतु बहुतेकांची ही ध्येयासक्ती क्षणजीवी ठरते. टिळक व आगरकर हे या वर्गात मोडणारे नव्हते. नुसत्या वादविवादात अगर बौद्धिक चर्चेत गुंतून न पडता त्या वादविवादातून काही कृती करण्याचा त्यांच्या मनाचा निश्चय हळूहळू ठाम होत चालला आणि आपल्या मातृभूमीच्या उद्धारासाठी शिक्षणाचे कार्यच प्रथम हाती घेतले पाहिजे, असे त्या दोघांनी ठरवले. विष्णुशास्त्री चिपळूणकरांच्या नेतृत्वाखाली या प्रयत्नांची सुरवात झाली आणि १ जानेवारी १८८० रोजी पुण्यामध्ये न्यू इंग्लिश स्कूलची स्थापना झाली. चिपळूणकर व टिळक हे सुरवातीस त्या शाळेत अध्यापन करू लागले व आगरकर हे एका वर्षाने त्यांना येऊन मिळाले.

न्यू इंग्लिश स्कूलची स्थापना ही नव्या युगाची प्रभात होती. संस्कारक्षम वयाच्या विद्यार्थ्यांना उत्तम ज्ञान देऊन त्यांच्या मनावर देशप्रेमाचे संस्कार करायचे, यासाठी ही संस्था स्थापन झाली होती. इ. स. १८८२ साली एज्युकेशन कमिशनचे अध्यक्ष डॉ. हंटर यांनीं न्यू इंग्लिश स्कूलला भेट दिली, त्या वेळी त्यांनी त्या शाळेविषयी पुढील गौरवोद्‌गार काढले –

काही ध्येयवादी व बुद्धिमान तरुणांनी स्वतंत्र बाण्याने चालविलेली आणि सरकारी मदत न मिळणारी ही शैक्षणिक संस्था हिंदुस्थानातील सरकारी हायस्कुलेच नव्हे; तर अन्य देशांतीलही काही शाळांशी तुलना करता उणी ठरणार नाही.

केसरी–मराठा – टिळक, आगरकर व चिपळूणकर यांना न्यू इंग्लिश स्कूलच्या यशाबद्दल अभिमान वाटे; परंतु त्यांच्या ध्येयवादी मनाचे समाधान शाळेच्या त्या चार भिंतींत होणे शक्यच नव्हते. देशसेवेचे जे अनेक कार्यक्रम त्यांनी आपल्या मनाशी आखले होते, त्यांपैकी शाळा काढणे हे केवळ एक कार्य होते. शैक्षणिक कार्याची त्यांची कल्पना व्यापक आणि उदात्त होती. समाजाला जागृत करावे, नव्या युगाच्या प्रकाशकिरणांनी जनतेचे जीवन उजळून टाकावे आणि समाजमनात नव्या आकांक्षा निर्माण करून त्या कार्यान्वित कराव्या, असे विचार त्यांच्या मनात हळूहळू बळ धरू लागले होते. त्यासाठी मराठीमध्ये केसरी व इंग्रजीमध्ये मराठा अशी दोन वृत्तपत्रे काढण्याचे त्यांनी ठरविले. केसरीचे स्वरूप कसे असेल, हे स्पष्ट करताना टिळकांनी असे लिहिले होते –

“केसरी हा निर्भयपणे व निःपक्षपातीपणाने सर्व प्रश्नांची चर्चा करील. ब्रिटिश सरकारची खुशामत करण्याची जी वाढती प्रवृत्ती आज दिसून येते आहे, ती देशहिताची नाही. ‘केसरी’-तील लेख केसरी या नावाला साजेसे असतील.”

टिळकांच्या या शब्दांवरून आणि ‘केसरी’ वर शिरोभागी छापलेल्या ‘स्थिर्ति नो रे दध्याः’ या श्लोकावरून टिळक व त्यांचे सहकारी यांच्या मनातील ध्येयवाद किती ज्वलंत होता, याची कल्पना येते.

डोंगरीच्या तुरुंगात – त्या काळी देशी संस्थाने ही जुन्या स्वराज्याचे अवशेष म्हणून मानली जात; पण ब्रिटिशांनी या संस्थानांतून पोलिटिकल एजंटची सत्ता अमर्याद करण्याचे धोरण स्वीकारले. अर्थात ते धोरण टिळक व आगरकर यांना मान्य झाले नाही. कोल्हापूरचे महाराज त्या वेळी लहान होते. त्यांना वेड लागले आहे, अशी वार्ता पसरली. त्यावेळचे कोल्हापूर संस्थानाचे कारभारी श्री. बर्वे यांच्या हस्ते ब्रिटिश सरकार महाराजांचा छळ करीत आहे, असे टिळकांना कळले व श्री. बर्वे हे कोल्हापूरच्या महाराजांविरुद्ध कारस्थाने करीत आहेत, असा आरोप करणारे लेख केसरीतून प्रसिद्ध झाले. श्री. बर्वे यांनी त्या लेखांबद्दल केसरीवर फिर्याद केली. या खटल्यात टिळक व आगरकर यांना चार महिन्यांची शिक्षा झाली. टिळकांच्या जीवनातील संग्रामाची व खडतर हालअपेष्टांची ही केवळ नांदी होती. टिळक व आगरकर या दोघांनाही डोंगरीच्या तुरुंगात ‘क’ वर्ग देण्यात आला होता. त्यामुळे तुरुंगातील कष्ट व कदन्न यांचा त्या दोघांच्या प्रकृतीवर अनिष्ट परिणाम झाला. परंतु ध्येयाने भारलेल्या त्यांच्या मनाला त्या गोष्टीची फिकीर वाटली नाही. तुरुंगात रोज रात्री ते दोघे राजकीय परिस्थितीबद्दल चर्चा करीत. प्रसंगी त्या चर्चांना वादविवादाचेही स्वरूप येई. या वादविवादातून व वास्तव जीवनाच्या अनुभवातून दोघांचे विचार अधिकाधिक स्पष्ट होऊ लागले आणि त्यांना आपसातील मतभेदाचीही जाणीव होऊ लागली. या पहिल्या कारावासात टिळकांना राजकीय कार्याची

आवश्यकता तीव्रतेने वाटू लागली आणि शिक्षा संपल्यावर ते एका वेगळ्याच निर्धाराने तुरुंगातून बाहेर पडले.

अध्यापन क्षेत्रात – टिळक आणि त्यांचे सहकारी यांनी जेव्हा न्यू इंग्लिश स्कूलची प्रस्थापना केली, तेव्हाच तशा प्रकारचे कॉलेजही स्थापन करण्याची त्यांची कल्पना होती. तदनुसार इ. स. १८८४ साली त्यांनी डेक्कन एज्युकेशन सोसायटीची स्थापना केली व २ जानेवारी १८८५ रोजी पुण्यांत त्या संस्थेचे फर्ग्युसन कॉलेज सुरू झाले. त्या कॉलेजात टिळक हे संस्कृत व गणित या विषयांचे अध्यापन करीत. टिळकांच्या असामान्य बुद्धीमुळे आणि गाढ व्यासंगामुळे ते थोड्याच काळात हुशार विद्यार्थ्यांचे स्फूर्तिस्थान बनले. अध्यापन करतांना विद्यार्थ्यांना केवळ माहिती न देता, विषयाची मूलतत्त्वे समजावून सांगून त्यांना स्वतंत्रपणे विचार करायला लावणे, हे टिळकांच्या अध्यापनाचे वैशिष्ट्य होते.

प्रस्तुत शिक्षणक्षेत्रात सहकारी म्हणून काम करीत असतानाच टिळक व आगरकर यांचे मतभेद अधिकाधिक स्पष्ट होऊ लागले. बालविवाहाला कायद्याने बंदी करावी असे मत आगरकरांनी मांडले, तर त्या उलट सरकारने कायदा करून समाजजीवनात ढवळाढवळ करणे इष्ट नाही, अशी भूमिका टिळकांनी घेतली. हे मतभेद दिवसेंदिवस जास्त तीव्र होत गेले आणि दैनंदिन शैक्षणिक काम करतानाही स्वभावभेदामुळे त्या दोघांचे खटके उडू लागले. त्याचा परिणाम म्हणून अखेर टिळकांनी डे. ए. सोसायटीचे सभासदत्व व फर्ग्युसन कॉलेजातील प्राध्यापकत्व यांचा राजिनामा दिला. ज्या संस्थेत त्यांच्या सार्वजनिक कार्याची सुरुवात झाली, ती संस्था सोडताना त्यांच्या मनाला फार वेदना झाल्या; परंतु तत्त्वांच्या बाबतीत तडजोड करणे हे त्यांना मान्य नव्हते. म्हणून तो निर्णय त्यांनी नाइलाजाने अमलात आणला. त्यानंतर त्यांनी राजकरण हेच आपले कार्यक्षेत्र ठरवले आणि केसरी व मराठा या पत्रांचे संपादक या नात्याने त्या कामाला सुरवात केली.

जहाल पक्ष – कॉंग्रेस ही राजकीय संस्था स्थापन झाल्यापासूनच टिळकांचे लक्ष त्या संस्थेकडे होते. त्यांना कॉंग्रेसमध्ये भावी पार्लमेंटची शक्ती दिसत होती. “आज जरी या संस्थेत पाहिजे इतके तेज दिसत नसले, तरी लौकरच ही संस्था पार्लमेंटप्रमाणे सरकारशी लढून त्याची सत्ता नियंत्रित करील” असे टिळक म्हणत व कॉंग्रेसच्या अधिवेशनात भाग घेऊन प्रसंगविशेषी ठरावावर भाषणेही करीत. न्या. रानडे, फेरोजशहा मेहता, सुरेंद्रनाथ बानर्जी, इ. त्या वेळचे कॉंग्रेस पुढारी टिळकांकडे एक धीट व निःस्पृह लोकसेवक म्हणून पाहत. या पुढाऱ्यांना नेमस्त म्हणत. त्यांच्या उदारमतवादी तत्त्वज्ञानाशी टिळकांचा विरोध नव्हता; परंतु त्यांच्या कार्यपद्धतीतून राजकीय चळवळीचे पाऊल पुढे पडणार नाही, असे त्यांचे मत होते. नेमस्त पुढाऱ्यांचा केवळ कौन्सिलातील राजकारणावरच विश्वास होता आणि चळवळीला त्याहून व्यापक स्वरूप देण्याची त्यांची तयारी नव्हती. इ. स. १८९३ मध्ये ह्यूम सक्युंलरच्या निमित्ताने तत्कालीन नेमस्त पुढाऱ्यांच्या मर्यादा स्पष्ट झाल्या; त्या वेळी कॉंग्रेसमधील जहाल व मवाळ यांच्यांतील फाटाफूट थोडक्यात टळली. टिळकांना असे वाटे, की नेमस्त पुढारी हे पाश्चात्य राजकीय विचार व कार्यपद्धती यांचे अंधानुकरण करीत असल्यामुळे त्यांचे राजकारण अगदीच वरपांगी स्वरूपाचे राहिले आहे.

लोकजागृती – भारतीय जनतेच्या जीवनात परंपरा व इतिहास यांतून प्राप्त झालेले एक प्रकारचे अभिजात सामर्थ्य आहे, पण परिस्थितीमुळे ते सुप्त स्वरूपात आहे, असे टिळकांना वाटे. लोकांना या त्यांच्या सुप्त सामर्थ्याची जाणीव करून देणे व बदलत्या कालानुरूप नव्या माध्यमातून त्याचा आविष्कार घडवून आणणे, हीच टिळकांच्या मते चळवळीची योग्य दिशा होती. टिळकांनी या दृष्टिकोनातूनच आपल्या नव्या कार्यक्रमाची आखणी करण्याचे ठरविले आणि शिवजयंती-उत्सव व गणेशोत्सव या दोन उत्सवांचा उपक्रम केला. गणेशोत्सवाच्या द्वारे लोकांमधील वैयक्तिक धार्मिकतेला सामाजिक स्वरूप देऊन लोकशिक्षणाचे कार्य साधावे, अशी टिळकांची कल्पना होती.

पाश्चात्यांच्या– विशेषतः ब्रिटिशांच्या – श्रेष्ठत्वाने दिपून गेलेल्या जनतेला भारताच्या इतिहासातील ऊर्जस्वल स्फूर्तिस्थानांची आठवण करून देऊन त्यांच्यांत स्वदेश, स्वभाषा व स्वधर्म यांविषयी अभिमान निर्माण करणे, हा शिवजयंती-उत्सवाचा हेतू होता. या उत्सवांच्या निमित्ताने महाराष्ट्रात ठिकठिकाणी व्याख्याने होऊ लागली, स्फूर्तिप्रद गीते गाणारे मेळे सुरू झाले आणि जनतेच्या उत्साहाला स्वाभाविकपणेच भरते आले. टिळकांना या उत्सवांतून केवळ जुन्या कल्पनांचे पुनरुज्जीवन करायचे नव्हते; तर आधुनिक युगात नव्या चळवळी करण्यासाठी जनतेच्या अंगभूत व परंपरेतून निर्माण होणाऱ्या शक्तींना कार्यान्वित करायचे होते. या कार्यातून टिळकांना बरीच तरुण मंडळी अनुयायी म्हणून लाभली. त्यांच्या साह्यानेच पुढे राजकीय चळवळीला व्यापक अधिष्ठान देण्याचे काम टिळकांनी सुरू केले.

इ. स. १८९४ साली टिळकांची मुंबई विश्वविद्यालयाच्या सेनेटवर निवड झाली. याच वर्षी त्यांनी, आय्. सी. एस्. ची परीक्षा केवळ इंग्लंडमध्ये न घेता भारतातही घेण्यात यावी, असा

सरकारला अर्ज केला. १८९५ साली टिळक मुंबई लेजिस्लेटिव्ह कौन्सिलवर निवडून आले. कौन्सिलला त्या वेळी जे मर्यादित अधिकार होते, त्यांचाही टिळकांनी पुरेपूर वापर केला. कोणत्याही प्रश्नावर संपूर्ण माहिती गोळा करून त्या प्रश्नाची सांगोपांग व तर्कशुद्ध चर्चा करण्यात टिळक मोठे वाकबगार होते. त्यामुळेच कौन्सिलमधील त्यांची कामगिरी महत्त्वाची ठरली. सार्वजनिक सभेच्या त्रैमासिकात 'डीसेंट्रलायझेशन ऑफ फायनान्स' हा विस्तृत लेख टिळकांनी लिहिला. यावरून सार्वजनिक हिताच्या प्रश्नांचा ते किती मूलग्राही व शास्त्रीय पद्धतीने विचार करीत, ते समजून येते.

इ.स. १८९६-९७ मध्ये महाराष्ट्रात मोठा दुष्काळ पडला व लोकांची अन्नान्न दशा झाली. या वेळी फॅमिन रिलीफ कोड या कायद्या न्वये सरकारचे कर्तव्य काय आहे, याची स्पष्ट जाणीव टिळकांनी केसरीत लेख लिहून ब्रिटिश सरकारला दिली आणि जे अधिकारी जनतेच्या हक्कांची पायमल्ली करीत होते, त्यांनाही इशारा देऊन, लोकांनी आपल्या न्याय्य गाऱ्हाण्यांची दाद लावून घेतली पाहिजे, असे आवाहन केले. कायद्याच्या चौकटीत राहूनही किती प्रभावीपणे लोकसेवा करता येते, हे या वेळी टिळकांनी दाखवून दिले.



London 1st October
1919

Dear Sir

Please accept my warmest thanks for your kind message of congratulations and good wishes on the occasion of my 64th birthday. God grant that I may yet deserve it by my work. Believe me

Yours very sincerely
B. G. Tilak

॥ श्री ॥ लंडन, १ आक्टोबर
१९१९

कृ. स. वि. वि. माझ्या ६४ व्या जन्मदिवसाच्या प्रसंगी आपण स्मरणपूर्वक जो प्रेमाचा निरोप मला पत्रद्वारे पाठविला त्याबद्दल मी आपला अत्यंत ऋणी आहे. त्या प्रेमाला अनुरूप अशी माझ्या हातून कांही देशसेवा घडून येवो येवढीच परमेश्वरापाशी माझी प्रार्थना आहे. कळावे लोभ असावा हे विनंती.

आपला
बाळ गंगाधर टिळक

लो. टिळकांचे हस्ताक्षर

या काळात टिळक स्वतःही स्वस्थ बसले नाहीत. सार्वजनिक सभेचे कार्यकर्ते व स्वयंसेवक महाराष्ट्रात खेडोपाडी पाठवून त्यांनी सर्व माहिती गोळा केली आणि दुष्काळपीडित जनतेला साऱ्यात सूट मिळाली पाहिजे, काम मिळाले पाहिजे, असे अर्ज लोकांकडून वेगवेगळ्या जिल्ह्याच्या कलेक्टरांना करविले. या विधायक कर्तृत्वामुळे टिळकांचे नाव सर्वतोमुखी झाले. त्यांच्या उत्तेजनामुळे लोकांतील हतबल वृत्ती कमी झाली आणि सरकारी अधिकाऱ्यांच्या अरेरावीसही काहीसा पायबंद बसला. टिळक केवळ सरकारकडेच अर्जविनंत्या करून थांबले नाहीत; तर सोलापूरच्या सधन व्यापाऱ्यांचे साहाय्य घेऊन त्यांनी तिथल्या विणकरांची सहकारी सोसायटीही स्थापन केली. विणकरांसारख्या मागासलेल्या समाजाला त्यांनी हा एक प्रगतीचा मार्ग दाखविला.

या सर्व सनदशीर चळवळी होत्या. टिळक कायद्याच्या चौकटीत राहूनच त्या चालवीत होते. त्यामुळे सरकारला धक्केही बसत होते. पण कायद्याच्या दृष्टीने टिळकांच्यावर शस्त्र उचलणेही सरकारला शक्य होत नव्हते..त्यामुळे सरकार टिळकांची मुस्कटदाबी करण्याची संधी शोधीत राहिले होते. इ. स. १८९७ साली ती संधी सरकारला मिळाली.

राजद्रोहाचा आरोप— या वर्षी पुण्यात प्लेगच्या साथीने कहर केला. त्या वेळी टिळकांनी लोकांसाठी प्लेगचे एक हॉस्पिटल चालविले आणि सरकारने योजलेल्या प्लेगप्रतिबंधक उपायांनाही पाठिंबा दिला. परंतु हे प्रतिबंधक उपाय योजताना सरकारी अधिकाऱ्यांनी जी दंडेली केली, तिचा आणि त्या सरकारी अधिकाऱ्यांचा टिळकांनी स्पष्ट शब्दांत निषेध केला. रँड नावाचा अधिकारी या काळात फारच अप्रिय झाला होता. त्याच्याविरुद्ध जनतेच्या मनात जो क्षोभ उत्पन्न झाला, त्याचे पर्यवसान रँड व आयर्स्ट यांच्या खुनांत झाले. या खुनांशी टिळकांचा कसलाही संबंध नव्हता. त्या वेळी केसरीत लिहिलेल्या अग्रलेखांत त्यांनी अशा अत्याचारी मार्गाचा निषेधच केला होता. मात्र त्याचबरोबर, सरकार सूडाच्या भावनेच्या आहारी जाऊन जी जुलूम-जबरदस्ती करीत होते, त्याबद्दल सरकारला स्पष्ट शब्दांत दोष द्यायलाही त्यांनी कमी केले नव्हते. टिळकांच्या या स्पष्टोक्तीने सरकार खवळून उठले आणि त्याने २७ जुलै १८९८ रोजी टिळकांना राजद्रोहाच्या आरोपाखाली अटक केली. त्यांचा खटला हायकोर्टाकडे वर्ग करण्यात आला आणि न्या. स्ट्रॅची यांनी टिळकांना दीड वर्ष सक्तमजुरीची शिक्षा ठोठावली.

शिक्षा झाल्यावर टिळकांना येरवडा येथील तुरुंगात ठेवण्यात आले. तिथले कदन्न व हालअपेष्टा यांमुळे त्यांची प्रकृती फार बिघडली. याच वेळी प्रो. माक्स म्यूलर या जर्मन पंडिताने पाठविलेल्या ऋग्वेदाच्या प्रतीच्या आधारे टिळक वेदाचा अभ्यास करीत होते. हा अभ्यास करीत असतानाच त्यांना आर्यांचे मूल वसतिस्थान उत्तर ध्रुव प्रदेशात कुठतरी असले पाहिजे, ही भव्य कल्पना सुचली. त्यापूर्वी टिळकांनी वेदांच्या कालाच्या निर्णयासंबंधी ओरायन नावाचे पुस्तक लिहिले होते आणि त्या पुस्तकाने प्राच्यविद्येचा संशोधक म्हणून परदेशात त्यांना मोठी मान्यता मिळवून दिली होती. त्यामुळे त्यांच्या शिक्षेची वार्ता ऐकून काही परदेशी पंडितांनी, विशेषत: प्रो. माक्स म्यूलर यांनी पुढाकार घेऊन महाराणी व्हिक्टोरियाकडे टिळकांच्या सुटकेबद्दल विनंती केली. या अर्जात त्यांनी टिळकांच्या संशोधनकार्यासंबंधी मोठे गौरवाचे उद्गार काढले होते. त्यांच्या त्या प्रयत्नांना यश येऊन, ६ सप्टेंबर १८९८ रोजी काही अटीवर सरकारने टिळकांची सुटका केली.

ताईमहाराज प्रकरण— याच कालखंडात टिळकांवर एक मोठे संकट आले. त्याचे स्वरूप खाजगी होते; तरी पण सरकारने त्यात मन घालून टिळकांचा चोव्वीस वर्षे छळ केला. या प्रकरणाला ताईमहाराज प्रकरण असे म्हणतात. त्याचा सारांश असा —

पुण्यातील बाबामहाराज नावाचे जहागिरदार टिळकांचे स्नेही होते. त्यांचा अकाली मृत्यू झाला. आपल्या मृत्युपत्रात त्यांनी टिळकांना आपल्या मालमत्तेचे एक विश्वस्त नेमले. ताईमहाराज या बाबामहाराजांच्या पत्नी होत. टिळकांनी जगन्नाथ नावाचा एक मुलगा त्यांच्या मांडीवर दत्तक म्हणून दिला. पण दुसऱ्या विश्वस्तांनी ताईमहाराजांचे मन विथरवले. त्यामुळे पहिले दत्तविधान अमान्य करून त्यांनी दुसरा मुलगा दत्तक घेतला. टिळक ती गोष्ट मान्य करीनात, म्हणून त्यांनी सरकारकडे टिळकांविरुद्ध दाद मागितली. सरकारने ताईमहाराजांचा पक्ष घेतला व टिळकांवर खटला भरला. या खटल्यात पहिल्या कोर्टाने टिळकांना दोषी ठरवून दीड वर्षाची शिक्षा दिली. दुसऱ्या कोर्टाने ती सहा महिन्यांची केली. हायकोर्टात मात्र टिळक निर्दोषी ठरले. सरकारला टिळकांना या प्रकरणाच्या निमित्ताने नैतिक दृष्ट्या बदनाम करून लोकांच्या मनातला त्यांच्या विषयीचा आदर नष्ट करायचा होता. पण हायकोर्टात सर लॉरेन्स जेंकिन्स नावाचा एक नि:स्पृह व उदार वृत्तीचा न्यायाधीश त्यांना मिळाला. त्याने टिळकांच्या चारित्र्याची खाजगी रीतीने चौकशी केली, तेव्हा त्याला असे आढळून आले, की टिळक अत्यंत नि:स्वार्थ व निष्कलंक असून, बाबासाहेबांच्या मालमत्तेच्या हिताच्या दृष्टीनेही चोख आहेत. त्यामुळे त्याने टिळकांना निर्दोषी ठरवून आपले न्यायाधीशपण सार्थ केले. याविषयी श्री. खापर्डे लिहितात—

ताईमहाराजांचा खटला म्हणजे लोकमान्यांच्या जीविताचा, वित्ताचा आणि अब्रूचा प्रलय करणारेच प्रकरण होते. त्यांच्या स्वभावात एखादे जरी वैगुण्य असते किंवा नीतिमत्तेत अणुइतका जरी पोचट भाग असता, तरी त्यांचा अध:पात झाला असता. परंतु लोकमान्य अंतर्बाह्य आणि ऐनजिनसी तापलेल्या सुवर्णाप्रमाणे लखलखीत होते. त्यांची नीतिमत्ता दोन्ही टोकांना सारखी असलेल्या मंगल अक्षतेप्रमाणे होती. केवळ ताईमहाराजांशी प्रसंग असता, तर हे प्रकरण इतके चिघळते ना; पण सरकारने हा कज्जा आपला म्हणून मांडावयास सुरुवात केली. ज्या अधिकाऱ्यांची योग्यता लोकमान्यांची पायतणे सांभाळण्याचीच होती, त्यांनीसुद्धा त्यांना दुरुत्तरे करावी, त्यांजवर कुत्सित आरोप करावे आणि त्यांच्या लोकप्रियतेला नाजूक ठिकाणी दंश करावा,

से होऊ लागले. परंतु लोकमान्य जसे करारी, धैर्यवंत तसेच पराकाष्ठेचे दक्ष असत. अखेर त्यांनी यश मिळविले व केसरीतून आनंदाने सर्व लोकांस कळविले, की 'अखेर खरे तेच टिकले.'

लोकमान्यता – टिळकांनी दुष्काळात व प्लेगच्या साथीत केलेली लोकसेवा, त्यांचा निर्भयपणा, त्यांनी स्वतःच्या मतासाठी सोसलेले क्लेश, त्यांची विद्वत्ता आणि विविध चळवळींच्या द्वारा लोकसंग्रह करण्याचे त्यांचे सामर्थ्य, अशा अनेक लोकोत्तर गुणांसाठी लोकांनी व कार्यकर्त्यांनी टिळकांना 'लोकमान्य' ही गौरवाची उपाधी अर्पण केली. त्यापुढे टिळकांचा उल्लेख सर्वत्र लोकमान्य टिळक असाच होऊ लागला.

इ. स. १९०० ते १९०५ हा कालखंड लोकमान्यांच्या जीवनातील वैचारिक निश्चयाच्या दृष्टीने अतिशय महत्त्वाचा ठरला. या कालखंडात टिळकांनी सिलोन आणि ब्रह्मदेश येथे प्रवास केला. सामाजिक सुधारणा झालेल्या या दोन्ही देशांत राजकीय चळवळ जवळजवळ अस्तित्वातच नव्हती. ही परिस्थिती पाहिल्यावर सामाजिक सुधारणा झाल्याशिवाय राजकीय चळवळ प्रभावी होणार नाही, असे म्हणणाऱ्या लोकांच्या आक्षेपांकडे लक्ष देण्याचे त्यांना कारणच उरले नाही.

इ. स. १९०४ साली रूसो-जपानी युद्धात जपानने रशियाचा पराभव केल्यामुळे सर्व आशियाई राष्ट्रांत अभिमानाची एक लाट उसळली. या विषयावर ६ डिसेंबर १९०४ रोजी लोकमान्यांनी केसरीत अग्रलेख लिहिला. त्यात त्यांनी जपानच्या विजयाचे स्वागत करून असे प्रतिपादन केले, की जपानच्या या विजयामुळे पाश्चात्य राष्ट्रे पौर्वात्य राष्ट्रांवर 'यावच्चंद्रदिवाकरौ' राज्य करतील ही कल्पना भ्रामक ठरली आहे. या कालखंडात लो. टिळक, श्री. बिपिनचंद्र पाल व श्री. लाला लजपतराय या जहाल पुढाऱ्यांचे फेरोजशहा मेहता, गोखले, इ. नेमस्त पुढाऱ्यांशी मतभेद वाढत गेले. उदार मतवादाऐवजी झुंजार राष्ट्रवादाचे तत्त्वज्ञानच भारताला तारक ठरेल, अशी त्यांची खात्री पटली व तिला धरूनच ते केसरीत लेख लिहू लागले. इ. स. १९०५ साली वाराणसीत गोखले यांच्या अध्यक्षतेखाली काँग्रेसचे अधिवेशन भरले. त्यात जहाल-मवाळ हा भेद अधिकच स्पष्ट झाला. या अधिवेशनानंतर गोखले देशात दौरा काढून काँग्रेसची चळवळ ही सनदशीरच असली पाहिजे असे प्रतिपादन करू लागले. लोकमान्यांना गोखल्यांची ही भूमिका पसंत पडली नाही. केसरीतल्या "सनदशीर कीं कायदेशीर" या लेखात त्यांनी तिचे खंडन केले, ते असे –

हिंदुस्थानाला ब्रिटनने हक्कांची सनद दिलेली नसल्यामुळे येथील चळवळ सनदशीर व्हावी, हे म्हणणेच हास्यापद आहे. ब्रिटिशांनी केलेल्या कायद्याप्रमाणे हिंदुस्थानात त्यांचे राज्य चालू आहे. तेव्हा येथील चळवळ कायदेशीर आहे किंवा नाही इतकाच प्रश्न उरतो. कायदा व नीती यांची जेव्हा फारकत होते, तेव्हा कायदा मोडूनही नीतीचे पालन केले पाहिजे आणि हा कायदा मोडल्याबद्दल होणारे शासन मुकाट्याने सोसले पाहिजे.

या लेखावरून भारताच्या स्वातंत्र्य चळवळीचे अधिष्ठान नैतिक आहे, ही लोकमान्यांची भूमिका स्पष्ट होते.

टिळकांच्या मते एका राष्ट्राने दुसऱ्या राष्ट्रावर राज्य करणे, ही गोष्ट नीतीशी विसंगत होती व म्हणूनच भारतीयांनी ब्रिटिश अंमलाविरुद्ध चळवळ करणे हेच त्यांचे नैतिक कर्तव्य होते. प्रासंगिक राजकीय संघर्षातून लो. टिळकांची प्रतिभा नैतिक व आध्यात्मिक मूलतत्त्वाकडे कशी झेप घेत असे, ते त्यांच्या वरील विचारात उत्कृष्ट रीतीने प्रकट झाले आहे.

लोकसत्ता – टिळकांनी देशाच्या राजकारणाची सूत्रे हाती घेण्यापूर्वी भारतात लोकशाहीचा प्रादुर्भाव झालेला नव्हता. लोकसत्ता ही सर्वशक्तिमान असून, अन्यायाचा प्रतिकार करण्यासाठी जनता ठामपणे उभी राहिली, तर बलाढ्य सम्राटही तिच्यापुढे नमतात, हे लोकमान्यांनी जाणले व भारतीय जनतेला जागृत केले. म्हणूनच लो. टिळकांना भारतीय लोकशाहीचे आद्य प्रणेते मानले जाते. याविषयी डॉ. पु. ग. सहस्रबुद्धे यांनी आपल्या भारतीय लोकसत्ता नावाच्या ग्रंथात पुढीलप्रमाणे विवेचन केले आहे –

गेल्या शतकात जगातील उदयोन्मुख राष्ट्रांच्या नेत्यांपैकी कोणीही आपल्या भूमीतील खऱ्या शक्तीची उपासना केली नव्हती. किंबहुना दीन, हीन, अज्ञ, दरिद्री अशा जनतेतून काही अद्‌भुत सामर्थ्य निर्माण होऊ शकेल असे आकलनच त्यांना झाले नव्हते. भरतभूमीचे अलौकिक भाग्य हे, की तिच्या एका राजसुपुत्राला जनशक्तीच्या या सुप्त सामर्थ्याचे दर्शन घडले. सत्तेला जो शह द्यायचा, तो दहशतवादाने किंवा सैन्यबलाने नव्हे, तर लोकमताच्या प्रभावाने द्यायला हवा, असे लो. टिळकांचे धोरण प्रारंभापासूनच ठरले होते. हिंदुस्थानासारख्या मागसलेल्या देशात टिळकांनी जनता या शक्तिदेवतेला आवाहन करावे यातच त्यांचे लोकोत्तरत्व व त्यांची दिव्यदृष्टी यांचे प्रत्यंतर येते. ही भरतभूमी लोकसत्ताक व्हावी यासाठी टिळकांनी आपले शक्तिसर्वस्व खर्च केले. त्यांच्या जीविताच्या कार्याचे अंतिम ध्येय केवळ स्वातंत्र्य हे नव्हते; तर लोकसत्ताक स्वातंत्र्य हे होते. लोकसत्तेवाचून स्वातंत्र्य व्यर्थ होय, लोकशक्ती हीच खरी शक्ती होय आणि मजूर, शेतकरी, कारागीर, कोष्टी, साळी, माळी, भिल्ल, कातवडी हे लोक म्हणजेच जनता होय, हा विचार प्रथम लो. टिळकांनीच केसरीत अट्टहासाने

प्रतिपादला व त्या लोकांच्या हिताची जपणूक करून त्यांची उन्नती करण्यासाठी प्रयत्न करण्याचा उपदेश त्यांनी मध्यमवर्गीय सुशिक्षितांना दिला.

हजारो वर्षे या देशातील जनता अज्ञान, दारिद्र्य व दास्य यांत पिचत पडली होती. अन्याय, जुलूम व छळ सहन करणे हे तिच्या अंगवळणीच पडून गेले होते. अन्यायाचा प्रतिकार करावा लागतो हा विचार तिच्या स्वप्नातही नव्हता. अशी आत्मप्रत्ययहीन जनता लोकशाही कधीच स्थापू शकत नसते. म्हणून लोकमान्यांनी अशा या भारतीय जनतेला तिच्या स्वत्वाची जाणीव देऊन व प्रतिकाराला प्रवृत्त करून भावी लोकशाहीच्या मंदिराचा भरभक्कम पाया घातला.

अशा रीतीने चाळीस वर्षांच्या दीर्घ परिश्रमाने लो. टिळकांनी अनेक संग्राम करून लोकांना स्वातंत्र्याच्या भावी महासंग्रामासाठी सिद्ध केले. जागृत झालेली लोकशक्ती संघटित झाली नाही, तर ती वररूप न ठरता शापरूपच ठरते, हे जाणून भारतीय लोकशक्ती संघटित करण्याचे महत्त्वाचे कार्यही लो. टिळकांनी सुरू केले. देशातल्या सर्व पक्षोपक्षांचे बळ राष्ट्रीय सभेत एकत्र करून तिला समर्थ करायचे व ती दुभंगू नये म्हणून पडेल ती किंमत द्यायची तयारी ठेवायची, हे टिळकांचे ब्रीद होते. तत्त्वज्ञान सांगताना ते जितके जहाल सांगता येईल तितके ते सांगत; पण प्रत्यक्षात राष्ट्रीय सभेचे ठराव शिरसावंद्य मानीत. काँग्रेस हेच देशाचे बळ होय, अशी त्यांची निष्ठा होती. भरतखंडातील सर्व प्रांत, सर्व पक्ष, सर्व धर्म व सर्व वर्ग यांचे ऐक्य घडवून, त्यांचे बळ राष्ट्रीय सभेच्या मागे उभे करण्यासाठी त्यांनी जिवापाड मेहनत घेतली.

विचारवंत लोक लो. टिळकांना भारतीय लोकसत्तेचे आद्य प्रणेते व राष्ट्रनिर्माते मानतात ते याचसाठी. आपली प्राचीन उज्ज्वल परंपरा व आपला वैभवशाली इतिहास यांचा अभिमान राष्ट्रातील प्रत्येक घटकाच्या अंतरात जागृत करण्यासाठी त्यांनी आपली लेखणी झिजवली. त्यांनी जे संशोधनकार्य केले त्यामागची प्रेरणाही हीच होती. गीतारहस्य हा ग्रंथ लिहून त्यांनी राष्ट्राला कर्मयोग शिकवला, तोही याच उद्देशाने.

बंगभंग – इ. स. १९०५ मध्ये भारताच्या राजकीय जीवनात एक नवीनच पर्व सुरू झाले. त्या वेळचे व्हाइसरॉय लॉर्ड कर्झन यांनी ‘फोडा व झोडा’ या कुटिल राजनीतीचा अवलंब करून हिंदू व मुसलमान यांच्यांत बेबनाव निर्माण करण्यासाठी बंगालची फाळणी केली. सर्व बंगाल या फाळणीमुळे संतप्त झाला. कर्झनने या जुलमी कृत्याने लोकसत्तेला एक जबरदस्त आव्हानच दिले होते. बंगालमधील पुढाऱ्यांनी दंडसत्तेचे हे आव्हान स्वीकारले व फाळणीविरुद्ध तीव्र चळवळ सुरू केली.

चतु:सूत्री – भारतात एकराष्ट्रीयत्वाची भावना निर्माण व्हायला हवी असेल, तर एका प्रांतावर अन्याय झाला असता, अन्य प्रांतांतही असंतोष निर्माण झाला पाहिजे, हे लोकमान्यांनी अचूक जाणले होते. म्हणून या फाळणीविरोधी आंदोलनातून देशव्यापी चळवळ उभी करण्याचा त्यांनी निर्धार केला. त्या वेळच्या त्यांच्या केसरीतील अग्रलेखांमुळे महाराष्ट्रात असंतोषाची प्रचंड लाट उसळली. बंगालमध्ये तर असंतोष धुमसत होताच. श्री. अरविंद घोष व त्यांचे अनुयायी त्याच वेळी क्रांतीचे मनसुबे रचीत होते. लोकमान्यांना या तरुणांच्या ज्वलज्जहाल देशभक्तीबद्दल मोठा अभिमान वाटे; परंतु अविवेकामुळे ही प्रखर शक्ती वाया जाऊ नये, असाही त्यांचा आग्रह होता. बंगालमधील या तरुणांच्या संतप्त भावनांचा अत्याचारात्मक उद्रेक न व्हावा व प्रत्यक्ष प्रतिकाराची चळवळ उभारण्याकडे त्या शक्तीचा विनियोग व्हावा, यासाठी लोकमान्यांनी स्वदेशी, बहिष्कार, राष्ट्रीय शिक्षण आणि स्वराज्य या राजकीय चतु:सूत्रीला जन्म दिला. या चतु:सूत्रीच्या कार्यक्रमात सामान्य जनतेलाही सहभागी होता येईल व या कार्यक्रमातून स्वराज्याची चळवळ अधिक फोफावेल, ही लोकमान्यांची दृष्टी होती. सामान्य माणसांना झेपेल, असा वरवरचा कार्यक्रम एवढेच या चतु:सूत्रीचे स्वरूप उथळ नव्हते. लोकमान्यांनी बहिष्कार या एका सूत्रावर केसरीत जो अग्रलेख लिहिला, त्याला त्यांनी बहिष्कारयोग असे शीर्षकच दिले आहे. यावरून स्वातंत्र्याचे प्रयत्न ही एक योगसाधना, कर्मयोगसाधना आहे, असे लोकमान्य मानीत असत, हे स्पष्ट होते. स्वदेशी हे एक व्रत आहे, असे ते वारंवार बजावीत. राष्ट्राभिमान निर्माण करणारे शिक्षण तेच खरे शिक्षण, हा नवा संदेश त्यांनी आपल्या अनुयायांना दिला आणि या चतु:सूत्रीच्या पायावर स्वातंत्र्यदेवतेचे मंदिर उभे राहू शकेल, ही जाणीवही लोकांत निर्माण केली. केवळ शुष्क तात्त्विक काथ्याकूट न करता जनतेला प्रभावी कार्यक्रम देण्यातच नेत्याचे श्रेष्ठत्व व कौशल्य असते. बंगालच्या फाळणीच्या वेळी लोकमान्यांनी आपल्या या चार कलमी राष्ट्रीय कार्यक्रमाचा सतत उद्घोष करून अखिल भारतात जे चैतन्य निर्माण केले, त्यावरून त्यांचे असामान्य नेतृत्व सिद्ध होते. या चतु:सूत्रीमुळेच काँग्रेसची कूर्मगती बदलून ती स्वराज्याच्या दिशेने घोडदौड करू लागेल, अशी लोकमान्यांची धारणा होती. लोकमान्यांनी पुरस्कारलेला हा कार्यक्रम संपूर्ण कायदेशीर असल्यामुळे नेमस्त पुढाऱ्यांनाही त्यावर आक्षेप घेणे शक्य नव्हते. परंतु बंगालची फाळणी रद्द होऊन जनशक्तीचा जो विजय झाला, त्यामुळे वाढू लागलेल्या जहाल प्रवृत्ती नेमस्तांना मानवणाऱ्या नव्हत्या. म्हणून काँग्रेसमधील

आपले वर्चस्व कायम टिकविण्यासाठी फेरोजशहा मेहता, गोखले, इ. नेमस्त पुढाऱ्यांनी सुरतेला काँग्रेसचे अधिवेशन भरवायचे आणि राशबिहारी घोष यांना अध्यक्ष करायचे असे ठरवले.

सुरतेची काँग्रेस – लोकमान्यांना काँग्रेस काबीज करायची नव्हती; परंतु तिला जहाल वळण देण्याचा मात्र त्यांचा ठाम निर्धार होता. लाला लजपतराय हे नुकतेच हद्दपारीतून सुटून आले होते. तेव्हा त्यांना काँग्रेसचे अध्यक्षपद दिल्यास सरकार-विरोधी भावना तीव्रतेने व्यक्त होईल, अशी टिळकांची सूचना होती. नेमस्तांनी टिळकांच्या या भूमिकेस कसून विरोध सुरु केला. मतभेद घुमसू लागले. तशाही परिस्थितीत टिळकांनी सामोपचाराचे खूप प्रयत्न केले. पण त्यांना यश आले नाही. सुरतेच्या काँग्रेस अधिवेशनात दुसऱ्या दिवशी तर हे मतभेद पराकोटीला गेले. त्यामुळे लो. टिळक जेव्हा आपली उपसूचना मांडण्यास उभे राहिले, त्या वेळी मंडपात एकच कोलाहल माजला. मंडपात असा दंगा चालला असताना लो. टिळक असामान्य धैर्याने व्यासपीठावर अविचल उभे राहिले होते. शेवटी ते अधिवेशनच उधळले गेले. यानंतर जहालांपासून वेगळे राहायचे ठरवून मॉडरेट कन्व्हेन्शन् भरवण्याचा निर्णय मवाळांनी घेतला. त्यामुळे श्री. अरविंद घोष व अन्य जहाल पुढारी यांना मवाळांच्या बरोबर राहण्यात अर्थ वाटेनासा झाला. काँग्रेसमध्ये दुफळी होऊ नये, असे लो. टिळकांना वाटत होते; पण त्यासाठी अरविंद घोषप्रभृती जहाल तरुण मंडळींना एकटे सोडायला ते तयार नव्हते. अरविंदबाबूंच्यापेक्षा टिळकांची वैचारिक भूमिका वेगळी होती. पण असे असूनही टिळकांनी त्यांच्याबरोबर राहण्याचे ठरवले.

राजद्रोहाचा दुसरा खटला – जहाल चळवळ मोडून काढण्यासाठी सरकार योग्य संधीची वाट पाहत होते. एवढ्यात मुझफ्फरपूर इथे घडलेल्या एका घटनेमुळे सरकारचे फावले. खुदिराम बोस या तरुण क्रांतिवीराने मुझफ्फरपूर येथे एका इंग्रज अधिकाऱ्यावर म्हणून बाँब टाकला, परंतु तो चुकीच्या मोटारीवर पडल्यामुळे त्या स्फोटात दोन इंग्रज स्त्रियाच ठार झाल्या. या बाँबस्फोटामुळे सरकार एकदम बिथरले. या वेळी टिळकांनी केसरीतील अग्रलेखांतून दहशतवादी मार्गासंबंधी नापसंती व्यक्त करीत असतानाच सरकारच्या दडपशाहीच्या धोरणामुळेच दहशतवादी प्रवृत्ती बळावतात, असा युक्तिवाद केला. या बाँबप्रकरणाच्या निमित्ताने केसरीत अत्यंत जहाल असे पाच अग्रलेख प्रसिद्ध झाले आणि त्या अग्रलेखांबद्दल २४ जून १९०८ रोजी लोकमान्यांना राजद्रोहाच्या आरोपाखाली सरकारने अटक केली. टिळकांच्यावरचा हा खटला मुंबईच्या वरिष्ठ न्यायालयात न्या. दावर यांच्यापुढे सुरू झाला.

या खटल्यात लोकमान्यांनी २१ तास १० मिनिटेपर्यंत प्रदीर्घ भाषण करून स्वतःची भूमिका विशदपणे कोर्टापुढे मांडली. वृत्तपत्रांना लोकमत बनवण्याचा अधिकार आहे, त्याचप्रमाणे देशाच्या राजकीय जीवनात ज्या शक्ती निर्माण झाल्या असतील, त्यांचे स्वरूप सरकारला समजावून सांगून योग्य तो इशारा देणे हेही वृत्तपत्रांचे कर्तव्य आहे, अशी आपली भूमिका मांडून आपण राजद्रोह कसा केलेला नाही, हे टिळकांनी स्पष्ट केले. त्याचबरोबर त्यांच्यावर ठेवण्यात आलेल्या आरोपाचेही खंडन केले. हायकोर्टातले त्यांचे ते भाषण म्हणजे स्वतःचा बचाव करण्यासाठी केलेली बौद्धिक कसरत नव्हती; तर तर्कशुद्ध भूमिका, कायद्याचा व्यासंग, देशाविषयीची तळमळ आणि तत्त्वासाठी वाटेल ती शिक्षा भोगण्याची तयारी हे असामान्य गुण त्या भाषणात प्रकट झाले होते. हे भाषण ज्यांनी ज्यांनी ऐकले, त्यांना त्यांना उदात्ततेचा एक अपूर्व साक्षात्कार घडला. त्या वेळी टिळकांची चित्तवृत्ती कमालीची शांत होती. स्थितप्रज्ञाच्या वृत्तीने ते स्वतःच्या भविष्याकडे तटस्थतेने पाहात होते. ज्या वेळी ज्यूरींनी 'दोषी' असा निकाल दिला त्या वेळी न्या. दावर यांनी टिळकांना विचारले, 'तुम्हांला काही सांगायचे आहे का?' तेव्हा लोकमान्य उभे राहिले आणि म्हणाले –

ज्यूरींनी मला दोषी ठरवले, तर खुशाल ठरवो. पण मी गुन्हेगार नाही. लौकिक गोष्टींचे नियंत्रण करणारी न्यायपीठाहूनही वरिष्ठ अशी एक शक्ती आहे. कदाचित ईश्वराची इच्छाच अशी असेल, की मला शिक्षा व्हावी आणि मी शिक्षा भोगण्यामुळे मी अंगिकारलेल्या कार्याला ऊर्जित दशा यावी.

या अविस्मरणीय उद्‌गारांतून लोकमान्यांच्या जीवनदृष्टीचा आणि जीवनातला प्रत्येक बरावाईट प्रसंग स्वराज्याच्या दृष्टीने मोजणे या वृत्तीचा जो आविष्कार झाला, त्यावर भाष्य करण्याची आवश्यकता नसली, तरीही श्री. दादासाहेब खापर्डे यांनी त्या प्रसंगाला अनुलक्षून जे लिहिले आहे, ते उद्‌धृत केल्यावाचून राहवत नाही. श्री. खापर्डे म्हणतात –

'आपण इंग्रजी इतिहासात मोठमोठाल्या देशभक्तांच्या खटल्यांची वर्णने आणि त्यांची भाषणे वाचतो. लोकमान्यांचा खटला चालू असता ती वर्णने आम्हास कःपदार्थ वाटू लागली. कायद्याची बारीकसारीक किचकटे ही एवढ्या गंभीर प्रसंगाचा निकाल करण्यास पुरेशी साधने नसून मनुष्यसमाजाचे मनोव्यापार व त्यांची सनातन नियमने यांच्या परीक्षणाने अशा प्रकारचे खटले परीक्षावयास हवेत, असे आम्हास तेव्हा वाट लागले. जज्ज व ज्युरी ही माणसे या पुरुषावतंसांपुढे गौरी-

पुढील वालकांप्रमाणे दिसू लागली. एक सबंध राष्ट्र दुसऱ्या एका राष्ट्रावर मनसोक्त राज्यकारभार चालवीत आहे आणि स्ववांधवांच्या दुःखाच्या आरोळ्यांनी ज्याच्या चित्तात काहूर उठले आहे असा त्यांचा कैवारी या अनियंत्रित सरकारास तापटपणाने बोलत आहे, अशा प्रकारचा हा प्रसंग होता. प्रश्नाचे हे विशाल स्वरूप इतिहासात शोभून जाते; पण आपल्या राज्यावर अंगार ठेवण्यास हा निघाला आहे, अशी ज्या इंग्रज सरकारच्या अधिकाऱ्यांची खात्री, त्यांना त्या प्रसंगाचे हे विशालत्व समजले नाही. त्यांनी त्यास कायद्याच्या कैचीत धरले, त्यांच्याच एका बांधवाकडून त्यांनी निर्भत्सना करविली आणि ज्या देशासाठी ते अहोरात्र झगडत होते, त्यातून त्यांना सहा वर्षे दूर ढकलले.'

टिळकांना ६ वर्षांची काळ्या पाण्याची शिक्षा झाल्यानंतर लगेच त्यांना अज्ञात तुरुंगाकडे नेण्यात आले. ही बातमी विद्युद्वेगाने पसरली आणि सर्व देश शोकसागरात बुडून गेला. मुंबईच्या गिरणीतील मजुरांनी स्वयंस्फूर्तीने हरताळ पाळून निदर्शने केली. त्या प्रसंगी पोलिसांनी केलेल्या गोळीबारात १५ लोक ठार व कित्येक जखमी झाले.

मंडालेच्या बंदिवासात —— लोकमान्यांना ब्रह्मदेशात मंडाले येथील तुरुंगात नेण्यात आले. मंडालेची हवा अतिशय वाईट. लो. टिळकांची पन्नाशी उलटलेली. त्यातही त्यांना जडलेला मधुमेहाचा विकार. ते कुटुंबियांपासून हजारो मैलांच्या अंतरावर जाऊन पडलेले. पण तरीही त्यांच्या मनाची शांती कधी ढळली नाही. तुरुंगात त्यांनी आपली ज्ञानसाधना अविरत चालू ठेवली. लो. टिळकांची जी पत्रे घरी येत, त्यांमध्ये भावविवशता कुठेही आढळत नाही. ते मंडालेला असतानाच त्यांच्या पत्नी सत्यभामाबाई निवर्तल्या. ते शोकजनक वृत्त त्यांना कळवण्यात आले; त्या वेळी त्यांनी आपले भाचे श्री. धोंडोपंत विद्वांस यांना पत्र लिहिले. त्या पत्रात त्यांच्या मनातील तीव्र आणि खोल व्यथा अत्यंत संयमाने व्यक्त झालेली दिसली. त्याचबरोबर दैवाचा कोणताही आघात शांतपणे सोसण्याचे त्यांचे सामर्थ्यही त्या पत्राच्या द्वारे प्रकट झाले.

गीतारहस्य —— मंडालेच्या या बंदिवासात टिळकांनी आपला गीतारहस्य हा ग्रंथ लिहिला. भगवद्गीता हे लोकमान्यांच्या जीवनाचे अधिष्ठान होते. भगवद्गीता हीच त्यांच्या कर्मयोगी जीवनाची प्रेरकशक्ती होती. आयुष्यात ज्या अनेक समर-प्रसंगांतून त्यांना जावे लागले, त्या प्रत्येक प्रसंगी भगवद्गीतेच्या चिंतनानेच त्यांच्या मनाला सामर्थ्य लाभले.

गीतारहस्य हे गीतेवरचे भाष्य असून ते कर्मयोगपर आहे. तत्पूर्वीची सर्व भाष्ये व टीका बाजूला ठेवून व नुसत्या गीतेचीच स्वतंत्रपणे पारायणे करून लोकमान्यांना गीतेचा जो बोध झाला, तो त्यांनी आपल्या गीतारहस्यात विवेचकपणे मांडला आहे. त्यांच्या मते गीता निवृत्तिपर नसून ती प्रवृत्तिपर आहे. गीतारहस्याच्या प्रस्तावनेत ते लिहितात –

"शुद्ध वेदान्तशास्त्राधारे कर्माकर्माचे व त्याबरोबरच मोक्षोपायाचेही पूर्ण विवेचन करून आणि कर्मे कधीच सुटत नाहीत व सोडूही नयेत, असे ठरवून ज्या युक्तीने कर्मे केली म्हणजे कोणतेच पाप न लागता अखेर त्यानेच मोक्षही मिळतो, त्या युक्तीचे म्हणजे ज्ञानमूलक व भक्तिप्रधान कर्मयोगाचेच गीतेत प्रतिपादन आहे, असा आमचा अभिप्राय आहे."

गीतारहस्य वाचून म. गांधींना जे प्रतीत झाले, ते त्यांनी पुढील शब्दांत व्यक्त केले आहे –

"गीतेवरील टिळकांची टीका हीच त्यांचे शाश्वत स्मारक होय. स्वराज्याची लढाई फत्ते झाल्यानंतरही ते टिकूनच राहील. त्यांच्या हयातीत किंवा आतासुद्धा टिळकांपेक्षा अधिक व्यापक किंवा सखोल शास्त्रज्ञान कोणाचेही सापडणे कठीण. गीता आणि वेद यांतून निर्माण होणाऱ्या प्रश्नाचे टिळकांनी केले त्यापेक्षा जास्त व्यवस्थित संशोधन कोणीही केलेले नाही."

गीतारहस्याचा दुसरा एक गुणविशेष तत्त्वज्ञ संत श्री. रा. द. रानडे यांनी सांगितला आहे, तो असा – गीतारहस्यातील मोठा विशेष म्हणजे महाभारतातील कथांचा आणि नीती व राजकारणोक्तींचा जो उल्लेख ठिकठिकाणी आला आहे तोच होय. गीतारहस्यासारखा तुलनात्मक तात्त्विक ग्रंथ कदाचित कोणास लिहिता आला असता; परंतु गीतारहस्यामध्ये महाभारताचा अत्यंत निकट परिचय जो ठिकठिकाणी दृग्गोचर होतो, तो मात्र कोणासही करता आला नसता. दुसरा विशेष म्हटला म्हणजे लो. टिळकांनी महाराष्ट्र भाषेमध्ये तत्त्वज्ञानाची उत्कृष्ट परिभाषा उत्पन्न केली व शुद्ध रीतीने महाराष्ट्र भाषेतही तात्त्विक प्रश्नांचा सांगोपांग ऊहापोह करण्याची पद्धत घालून दिली, हा होय.

पुनश्च हरिः ओम् – सहा वर्षांच्या कारावासानंतर इ. स. १९१४ सालच्या मे महिन्यात लो. टिळकांची मंडालेहून सुटका झाली. त्यांच्या सुटकेने सबंध देशभर आनंदाचे वातावरण पसरले. सर्वत्र नवचैतन्य दिसू लागले. मग लोकमान्यांनी काही काल भोवतालच्या परिस्थितीचे शांतपणे अवलोकन केले. स्वराज्य मिळवायचे असेल, तर सर्व राष्ट्रात एकजूट घडवून आणली पाहिजे आणि त्या दृष्टीने प्रथम प्रयत्न केले पाहिजेत, असा निर्णय त्यांनी मनाशी ठरवला.

इ. स. १९१४ साली पहिले महायुद्ध सुरू झाले आणि राजकीय हक्क संपादण्याची ही एक सुवर्णसंधी आहे, हे लोकमान्यांनी

बरोबर ओळखले. इंग्लंड युद्धात गुंतलेले असताना हिंदुस्थानात बंडाचा प्रयत्न करावा, ही क्रांतिकारकांची भूमिका त्यांना अव्यवहार्य वाटत होती; तसेच म. गांधी म्हणत त्याप्रमाणे इंग्लंडला बिनशर्त साहाय्य करणेही त्यांना मान्य नव्हते. ते पूर्ण वास्तववादी होते. परिस्थितीचा फायदा घेऊन सरकारवर दडपण आणीत राहायचे व आपले राजकीय हक्क मिळवायचे ही त्यांची भूमिका होती.

नेमस्त पुढाऱ्यांच्या बरोबर समझोत्याचे प्रयत्न केल्यानंतर व ते अयशस्वी ठरल्यानंतर लो. टिळकांनी इ. स. १९१५ मध्ये स्वतंत्र होमरूल लीगची स्थापना केली. त्या वेळी आपल्या अनेक भाषणांतून लोकमान्यांनी आपली राजकीय भूमिका निःसंदिग्धपणे आणि समर्थपणे मांडली.

लोकमान्यांच्या ६१ व्या वाढदिवशी त्यांच्या अनुयायांनी त्यांना पन्नास हजार रुपयांची थैली अर्पण करायचे ठरवले आणि जनतेला या कार्यात सहभागी होण्याचे आवाहन केले. जनतेचे लोकमान्यांवरचे प्रेम अपार होते. त्यामुळे भराभरा रकमा येऊ लागल्या आणि एक लाख रुपये थोडयाच दिवसांत जमा झाले. वाढदिवसाच्या दिवशी सायंकाळी गायकवाडवाडयात मोठी सभा भरून टिळकांना त्या एक लाख रुपयांचा अहेर करण्यात आला. त्या वेळी टिळक म्हणाले, की “मला व्यक्तिशः या रकमेची गरज नाही. सबब मी ती रक्कम माझी ‘फूल ना फुलाची पाकळी’ तिच्यात टाकून राष्ट्रकार्यासाठी खर्च करीन.”

याच दिवशी ‘राजकीय विषयावर भाषणे करणार नाही,’ अशी हमी घेण्यासाठी प्रत्येकी चाळीस हजारांचे दोन जामीन सरकारने टिळकांच्या जवळ मागितले.

लो. टिळक या दिवसांत देशात सर्वत्र दौरे काढून होमरूलचा प्रचार करीत होते. आपल्या जाहीर भाषणांतून ते अशिक्षितालाही समजेल, अशा प्रकारे स्वराज्याची कल्पना विशद करून सांगत. जनमनावर त्यांच्या या भाषणांचा विलक्षण प्रभाव पडू लागला. त्यामुळे सरकार बिथरले आणि अहमदनगर येथील भाषणाचा आधार घेऊन सरकारने टिळकांच्यावर राजद्रोहाचा तिसरा खटला भरला. तो हायकोर्टात न्या. लल्लूभाई शहा व जस्टिस बॅचलर यांच्यापुढे चालला. पण ‘होमरूल मागणे हा राजद्रोह नव्हे’ असा निकाल न्यायमूर्तींनी देऊन टिळकांना दोषमुक्त केले. लोकमान्यांच्या या विजयाबद्दल म. गांधींनी ‘यंग इंडिया’त लेख लिहून आनंद व अभिमान व्यक्त केला. गांधीजींनी स्वतःच्याच नव्हे; तर सर्व भारतीय जनतेच्याच भावना त्या लेखातून प्रकट केल्या.

यानंतर इ. स. १९१७ साली लखनौ येथे काँग्रेसचे अधिवेशन भरले. या अधिवेशनात काँग्रेस व मुस्लीम लीग यांच्यांत ऐक्याचा जो करार झाला, तो लोकमान्यांच्या दूरदर्शी मुत्सद्दीपणाचाच द्योतक होय. स्वातंत्र्यासाठी विविध धर्मांच्या लोकांत एकजूट घडवून आणली पाहिजे, ही भूमिका त्या प्रसंगी लोकमान्यांनी कणखरपणे स्वीकारली व प्रतिपादिली.

“स्वराज्य हा माझा जन्मसिद्ध हक्क आहे आणि तो मी मिळवणारच” अशी घोषणा लखनौ काँग्रेसमध्ये भाषण करताना लोकमान्यांनी केली. आणि त्या शब्दांना जणू मंत्राचे दिव्य तेज प्राप्त झाले. त्या मंत्राने अखिल भारत देश भारून गेला आणि टिळक हे भारताचे सर्वश्रेष्ठ पुढारी ठरले.

त्यानंतर लो. टिळकांनी होमरूलसाठी देशभर पुन्हा एकदा झंझावाती दौरा काढला. लोकमान्यांनी त्या वेळच्या आपल्या भाषणांतून स्वतंत्र हिंदुस्थानाचे वेधक चित्र लोकांपुढे रेखाटले आणि हे ध्येय साकार होण्यासाठी सर्वस्वाचा त्याग करण्यास सिद्ध व्हा, असे लोकांना आवाहन केले.

चिरोल प्रकरण – सर व्हॅलेंटाइन चिरोल या नावाचा एक इंग्रज गृहस्थ लंडन टाइम्सचा प्रतिनिधी म्हणून इ. स. १९१० मध्ये भारतात आला होता. त्याने इथून विलायतेला परत गेल्यावर ‘Indian Unrest’ नावाचे एक पुस्तक लिहिले आणि त्यात टिळकांना ‘हिंदी असंतोषाचे जनक’ ठरवून, त्यांच्या विरुद्ध आणखीही काही उपमर्दकारक असे लिहिले. इ. स. १९१४ साली टिळक सुटून येताच ते पुस्तक त्यांच्या हाती पडले. लोकमान्यांनी आपल्यावरचे ते आरोप खोडून काढून जगापुढे आपली भूमिका स्वच्छपणे मांडायची असे ठरवले. त्यासाठी इंग्लंडला जाऊन तिथे त्यांनी १९१९ च्या जानेवारीत चिरोलवर अब्रुनुकसानीची फिर्याद दाखल केली. तो खटला लढविण्यासाठी त्यांनी अविश्रांत परिश्रम घेतले. त्यासाठी उणेपुरे चौदा महिने ते विलायतेत राहिले. पण सत्य टिळकांच्या बाजूने असूनही दुर्दैवाने त्या खटल्यात त्यांना अपयश आले. या खटल्याच्या पायी टिळकांना तीन लाख रुपयांचा फटका बसला. पण तरीही या लोकोत्तर पुरुषाचे धैर्य अणुमात्र ढळले नाही.

इ. स. १९१९ साली विठ्ठलभाई पटेलांच्या नेतृत्वाखाली काँग्रेसचे शिष्टमंडळ इंग्लंडला गेले. तिथे गेल्यावर विठ्ठलभाई पटेलांनी लोकमान्य टिळकांच्या मार्गदर्शनाखाली व सहकार्याने काम करण्याचे ठरविले आणि लोकमान्यांनी त्यांची विनंती मान्य केली. त्या वेळी भारतात होत असलेल्या राजकीय घटनांकडेही लोकमान्यांचे संपूर्ण लक्ष होते. याच कालात रौलट ॲक्टमुळे भारतात असंतोष उसळला होता आणि म. गांधींनी त्याविरुद्ध सत्याग्रह करायचे ठरविले होते. त्या वेळी लोकमान्यांनी म. गांधींना पत्र लिहून त्यांच्या सत्याग्रहाला पाठिंबा दिला होता आणि आपण हिंदुस्थानात असतो, तर सत्याग्रहात

सामील झालो असतो, असे आपले हृद्गतही व्यक्त केले होते.

पॅरिस येथील पीस कॉन्फरन्सच्या वेळी भारताची स्वातंत्र्याची आकांक्षा युरोपियन राष्ट्रांना समजावून सांगावी आणि त्यांच्याशी स्नेहसंबंध जोडावे, याकरिताही एका ब्रिटिश पत्रकाराच्या साहाय्याने लो. टिळकांनी प्रयत्न केले. त्यांनी ब्रिटनमधील मजूर पक्षाच्या अनेक पुढाऱ्यांशी व कार्यकर्त्यांशी संबंध वाढविले आणि मजूर पक्षाला त्याच्या राजकीय कार्यासाठी दोन हजार पौंडांची देणगी दिली. त्याचबरोबर बॅ. बॅप्टिस्टा यांच्या साहाय्याने "On Self-determination" ही पुस्तिका प्रसिद्ध करून भारताची स्वराज्यविषयक भूमिका लो. टिळकांनी अत्यंत प्रभावीपणे मांडली. या पुस्तिकेच्या हजारो प्रती इंग्लंडमध्ये व अन्यत्र वाटल्या गेल्या.



लो. टिळक – इंग्लंडमध्ये

लो. टिळकांचे इंग्लंडमधील सर्वांत महत्त्वाचे कार्य म्हणजे त्यांनी ब्रिटिश पार्लमेंटच्या समितीपुढे दिलेली साक्ष होय. या साक्षीत लोकमान्यांनी, भारतीय जनता राज्य करण्यास समर्थ असल्याचे सांगितले आणि प्रांतांना स्वायत्तता द्यावी व मध्यवर्ती सरकारातही भारतीयांना अधिकार मिळावेत अशी त्यांनी मागणी केली.

२७ नोव्हेंबर १९१९ रोजी लो. टिळक भारतात परत आले, तेव्हा लोकांनी त्यांचे भव्य व उत्स्फूर्त असे स्वागत केले. नंतर लोकमान्य अमृतसरच्या कॉंग्रेस अधिवेशनास गेले. या अधिवेशनात मॉंटेग्यु-चेम्सफोर्ड सुधारणांबाबत कॉंग्रेसला आपले धोरण ठरवायचे होते. कॉंग्रेसच्या मूळ ठरावात या सुधारणा फेटाळाव्या अशी भूमिका होती; तर म. गांधींनी संपूर्ण सहकार्याची भूमिका मांडली होती. लो. टिळकांचे धोरण नेहमीच वास्तव परिस्थितीशी सुसंगत असे. त्यामुळे त्यांनी प्रतियोगी सहकाराची भूमिका स्वीकारली. प्रतियोगी सहकार हा अटीचा सहकार आहे; निर्भेळ सहकार नव्हे, असे टिळकांनी सांगितले. पुढील काळात कॉंग्रेसनेही प्रत्यक्षात हीच भूमिका घेतली. यावरून लोकमान्यांची राजकीय दूरदृष्टी समजून येते.

त्यानंतर होमरूल लीगच्या पुणे–परिषदेत ठरल्याप्रमाणे लो. टिळकांनी कॉंग्रेस डेमोक्रॅटिक पक्षाची स्थापना केली. कॉंग्रेसशी एकनिष्ठ राहणे आणि लोकशाहीवर श्रद्धा असणे, या दोन तत्त्वांवर हा पक्ष आधारलेला होता. लोकमान्यांनी या पक्षाची राजकीय भूमिका त्याच्या जाहीरनाम्यात सुस्पष्टपणे मांडली.

भारताने राष्ट्रकुलात राहावे, लोहमार्गाचे राष्ट्रीयीकरण व्हावे, भाषावार प्रांतरचना करावी, शेतमजुरांचे किमान वेतन ठरवावे, इ. सूचना त्या जाहीरनाम्यात आहेत. त्या सूचना लो. टिळकांच्या राजकीय विचारांची प्रगल्भता दर्शवतात.

इ. स. १९२० च्या जुलै महिन्यांत लो. टिळक मुंबईस गेले असता त्यांना ताप आला व तो न्यूमोनिआवर जाऊन २८ जुलैला त्यांची शुद्ध हरपली. आणि १ ऑगस्ट १९२० ला रात्री १२ वाजून ४० मिनिटांनी लोकमान्य टिळकांची प्राणज्योत मालवली. स्वातंत्र्याचा भगीरथ, धैर्याचा महामेरू आणि झुंजार महापुरुष भारतीय जनतेला दुःखसागरात लोटून परलोकी गेला !

लोकमान्यांच्या थोरवीला शोभेशीच त्यांची स्मशानयात्रा निघाली. एवढी मोठी भव्य स्मशानयात्रा मुंबईत त्यापूर्वी कोणाचीच निघाली नव्हती. चौपाटीवर त्यांच्या पार्थिव देहाचा अंत्यसंस्कार झाला.

लोकमान्यांच्या निर्याणावर यंग इंडियातील लेखात म. गांधींनी लिहिले आहे, ते असे –

टिळक गेले यावर विश्वास बसणेही कठीण आहे, इतके ते राष्ट्रीय जीवनाशी एकरूप झाले होते. देशभक्ती हा त्यांचा धर्म होता. लोकशाहीवर त्यांचा अपार विश्वास होता. त्यांची इच्छाशक्ती जबर होती. त्यांचे धैर्य अढळ आणि आशावाद अदम्य होता. त्यांच्या इतक्या चिकाटीने व अभिनिवेशाने स्वराज्याची आक्रमक मागणी दुसऱ्या कोणीच केली नाही. राष्ट्रजनक या नात्यानेच भावी पिढ्या त्यांच्याकडे सदैव आदराने पाहतील.

संशोधनकार्य – लोकमान्य टिळकांच्या राजकीय कार्याचे महत्त्व अनेक मोठ्या माणसांनी मार्मिक आणि सविस्तर लिहून ठेवले आहे. त्याविषयी याहून अधिक लिहिण्याची गरज नाही. आधुनिक भारताच्या स्वातंत्र्य संग्रामातला सिंह सेनापती म्हणून प्रत्येक भारतीयाच्या मनात त्यांच्याविषयी अपार प्रेमादर वसत आहे. पण लोकमान्यांच्या राजकारणाइतकेच त्यांचे संशोधनकार्यही मोलाचे आहे, हे सांगितले पाहिजे.


लो. टिळक – अंत्यदर्शन

स्वतंत्र भारतात जगण्याचे भाग्य टिळकांना लाभले असते, तर आपल्या बुद्धिवैभवाने त्यांनी भारताची मान जगात उंच केली असती. राजकीय नेतृत्व करताना जी अल्पस्वल्प फुरसद त्यांना मिळाली, तेवढ्या काळात त्यांनी संशोधनात्मक असे जे लेखनकार्य केले, ते पाहून मन स्तिमित होते.

ओरायन– हा एक त्यांचा संशोधनात्मक प्रबंध आहे. इ. स. १८९२ साली लंडनमध्ये भरलेल्या नवव्या प्राच्य परिषदेसाठी हा प्रबंध त्यांनी लिहिला. गीता वाचीत असता ‘ मासानां मार्गशीर्षोऽहम् ’ या वाक्यावर लोकमान्य विचार करू लागले आणि चार वर्षे विविध वाचन व संशोधन केल्यांअती त्यांच्या मनात जो सिद्धांत निश्चित झाला, तो त्यांनी ओरायनमधे मांडला. वेदांचा कालनिर्णय हा ओरायनचा विषय आहे. माक्स म्यूलरने भाषिक संशोधन करून वेद हे सनपूर्व बाराशे वर्षे या काळात लिहिले गेले, असे अनुमान काढले. लोकमान्यांच्या मते संशोधनाची ही पद्धत एकांगी होती. दैवतकथा व भाषाशास्त्र यांच्याच केवळ आधारावर वेदांचा कालनिर्णय ठरवणे योग्य होणार नाही, असे मानून लोकमान्यांनी संहिता व ब्राह्मणे यांतील खगोलविषयक सर्व संदर्भ एकत्रित केले, तपासले आणि ज्योतिर्गणिताच्या साहाय्याने वेदांचा काल सनपूर्व ४ ते ५ हजार वर्षे हा ठरवला. कोणत्याही युरोपियन राष्ट्राच्या संस्कृतीपेक्षा वैदिक संस्कृती ही प्राचीनतर आहे, हे टिळकांनी त्या ग्रंथांवरून सिद्ध केले. लो. टिळकांच्या या संशोधनाचा प्रा. याकोबी व डॉ. ब्लूमफील्ड या जगद्विख्यात संशोधकांनी फार मोठा गौरव केला.

‘ आर्क्टिक होम इन् दि वेदाज ’ (आर्यांचे मूल वसतिस्थान) हा प्रबंध त्यांच्या प्रतिभाविलासाचा निदर्शक मानता येईल. इ. स. १८९८ साली टिळक येरवड्याच्या तुरुंगात असताना प्रो. माक्स म्यूलर यांनी स्वतः संपादित केलेली ऋग्वेदाची एक प्रत त्यांना पाठवली. त्या प्रतीच्या साहाय्यानेही टिळकांना ऋग्वेदातल्या काही ऋचांचा अर्थ लागेना. ते त्यावर स्वतंत्रपणे विचार करू लागले. या चिंतनात एके दिवशी पुढील ऋचेचा अर्थ त्यांना उलगडला –

तानीदहानि बहुलान्यासन् या प्राचीनमुदिता सूर्यस्य ।
(ऋ. ७.७६.३)

अर्थ– उषेचा उदय झाल्यापासून सूर्य उगवेपर्यंत किती तरी दिवस झाले.

त्यामुळे एक भव्य कल्पना त्यांच्या मनाला स्पर्शून गेली. सूर्योदयापूर्वी अनेक दिवस गेले, हे वाक्य सहा महिन्यांचा दिवस आणि सहा महिन्यांची रात्र ज्या ठिकाणी असेल, अशा उत्तर ध्रुवाच्या प्रदेशातच लिहिले जाणे शक्य आहे, असे त्यांना वाटले. त्यावरून त्यांनी पुढची कल्पना केली ती ही, की आपल्या आर्यपूर्वजांचे मूल वसतिस्थान उत्तर ध्रुवाच्या प्रदेशातच असले पाहिजे.

तुरुंगातून सुटल्यावर ते आपल्या या कल्पनेला कुठे आधार मिळतो का, याचे संशोधन करू लागले. आणि तशा प्रकारचे आधार त्यांना मिळालेही. हे आधार शोधताना ते केवळ ग्रंथांवरच विसंबले नाहीत, तर त्यांनी भूगर्भशास्त्र आणि पुरातत्त्वशास्त्र यांतील संशोधनाचाही परामर्श घेतला. या सर्व प्रयत्नांचे फल म्हणजे ‘ आर्क्टिक होम इन् दि वेदाज ’ हा ग्रंथ होय. इ. स. १९०३ साली हा प्रबंध प्रकाशित झाला. लोकमान्यांचा सिद्धान्त मान्य न करणारे पंडितही एक गोष्ट मान्य करतात, की ‘ आर्क्टिक होम इन् दि वेदाज ’ मध्ये अनेक अज्ञात सत्यांवर

प्रकाश टाकलेला असून, नवीन विचारांना चालना देण्याचे महत्कार्य या ग्रंथाने केले आहे.



लो. टिळक – स्वतःच्या घरी

या ग्रंथाची दुसरी आवृत्ती काढताना स्कँडिनेव्हियन् मायथॉलॉजीसंबंधी झालेल्या संशोधनाचा उपयोग करावा, तसेच वेदांचा कालानुक्रमाने इतिहास देऊन वेदोत्तर साहित्याच्या कालासंबंधीही आपले विचार मांडावे, अशी टिळकांची इच्छा होती; पण ती गोष्ट घडू शकली नाही.

वेदांगज्योतिष – हा टिळकांचा तिसरा प्रबंध होय. वेदांगज्योतिषाचे सूक्ष्म अध्ययन करताना टिळकांनी प्रथम त्यातील श्लोकांची वर्णानुक्रमसूची तयार करून त्यात श्री. शं. बा. दीक्षित यांच्या वेळेपर्यंत कोणते श्लोक लागले होते व कोणत्या श्लोकासंबंधी वाद राहिला होता, हे नक्की ठरवले. एवढे करून मग त्यातील बरेच श्लोक व पूर्वी लागलेल्यापैकी काही श्लोक यांचे विवेचन लोकमान्यांनी आपल्या त्या प्रबंधात केले व तीन श्लोकांचा स्वतंत्रपणे अर्थ लावला. या प्रबंधाच्या दुसऱ्या भागात टिळकांनी वेदकालीन पंचांगाची माहिती दिली आहे.

लो. टिळकांनी केलेल्या संशोधनकार्याकडे ओझरता दृष्टिक्षेप केला, तरी त्यांच्या बुद्धीचे वैभव किती अपार होते हे समजून येते. सत्यशोधन ही त्यांच्या जीवनातील प्रबल प्रेरणा होती आणि वर्तमानकालातील राजकीय समस्येसाठी आयुष्य खर्ची पडत असताही त्यांचे मन चिरंतन सत्याचा शोध आणि वेध घेण्यात गुंतलेले होते.

सामाजिक सुधारणा व टिळक – लो. टिळक केवळ राजकीय पुढारी होते आणि सामाजिक सुधारणेला त्यांचा विरोध होता, अशी टीका काही सुधारक, विशेषतः मवाळ पुढारी, टिळकांच्यावर करीत. टिळकांना समाजसुधारणा मान्य नव्हती, असे मुळीच नाही. पण त्यांनी जाणून बुजून राजकारण हा एकच विषय स्वीकारला होता आणि त्यामुळे सामाजिक सुधारणेचे कार्य प्रकट रीतीने किंवा उत्साहाने त्यांनी हाती घेतले नाही एवढेच म्हणता येईल. दुसरी गोष्ट म्हणजे टिळकांना लोकसंग्रह करायचा होता. लोकांना बरोबर घेऊन स्वराज्याच्या संग्रामात आगेकूच करायचे होते. म्हणून त्यांनी समाजाच्या परंपरागत मतांना धक्के देऊन सामाजिक सुधारणेचा झेंडा फडकवला नाही. स्वराज्यसंपादनाच्या कार्यात लोकांचा आपल्याला सदैव पाठिंबा मिळत राहावा आणि त्यांची मने दुभंगू नयेत, ही दृष्टी ठेवून जेवढे समाजसुधारणेविषयी बोलता आणि करता येईल तेवढे त्यांनी केले आहे. आपला समाज सुधारावा या बद्दल त्यांना किती आस्था वाटत असे, याविषयी त्यांच्या काही आठवणी सांगण्याजोग्या आहेत.

महर्षी कर्वे एका आठवणीत लिहितात – 'सन १८९३ च्या मार्च महिन्यात माझा पुनर्विवाह झाला. त्या वेळी लोकमान्यांना निमंत्रण गेले होते व ते पानसुपारीला आले होते. पुनर्विवाहाच्या प्रश्नासंबंधाने सुशिक्षित लोकांची मते घेण्याचा मी प्रयत्न केला, त्या वेळी लोकमान्यांनी पुनर्विवाहिताबरोबर पंक्तिव्यवहार करण्यास हरकत नाही, असा स्पष्ट लेखी अभिप्राय दिला.'

श्री. विठ्ठल रामजी शिंदे हे अस्पृश्यतानिवारणाचे कार्य करणारे निष्ठावंत समाजसेवक होते. ते जेव्हा धर्माच्या विशेष अध्ययनासाठी विलायतेला जायला निघाले, त्या वेळी लो. टिळक त्यांना म्हणाले, "उपनिषद्कालात हिंदूंची जी निर्भय व स्वतंत्र दृष्टी होती, तीच राखून पौरत्य व पाश्चिमात्य आचार-विचारांची तुलना करण्यास शिका."

शनिवारवाड्यापुढे भरलेल्या एका सर्व धर्मपंथांच्या जाहीर सभेत लोकमान्यांनी आपले जातिविषयक विचार स्पष्ट केले. ते म्हणाले, "आपल्या जातिभेदामुळेच येथे ब्रिटिश राज्य स्थापन झाले आहे व जातिभेद असाच चालू राहणार असेल, तर स्वराज्यातही आमची अशीच अधोगती होईल."

स. १९१८ साली भरलेल्या अखिल भारतीय अस्पृश्यता-

निवारणपरिषदेत लोकमान्यांनी अस्पृश्यतेविषयीचे आपले विचार स्पष्ट शब्दात मांडले. ते म्हणाले, "अस्पृश्यता जर देवाला मान्य असेल, तर मी त्याला देव मानायलाच तयार नाही. जुन्या काळी ब्राह्मणांच्या जुलमाने ही चाल पडली, हे मी नाकारीत नाही. पण त्या रोगाचे निर्मूलन आता झालेच पाहिजे."

व्यक्तिमत्त्व – लो. टिळकांचा वर्ण निमगोरा होता व उंची ५ फूट ५ इंच होती. म्हणजे त्यांची गणना मध्यम उंचीच्या माणसांत होत असे. त्यांचे अंग सडपातळ होते. उतार वयातही त्यांचे पोट सुटले नव्हते. लहानपणी त्यांनी बरेच दिवस तालीम केली होती. चालताना ते ताठ चालत. त्यांची दृष्टी साफ नव्हती, तरी ते चष्मा लावण्याचा कंटाळाच करीत. त्यांच्या डोळ्यात तांबूस पिंगटवर्णाचे तेज असे व त्यांतून त्यांचे अनेक स्वभावगुण प्रकट होत.

लांब अंगरखा व पगडी हा त्यांचा ठरलेला पोषाख असे. अंगरख्याचा रंग पांढरा व पगडीचा तांबडा असे. अंगावर उपरणे घेत, तेही अगदी साधे असे. त्यांनी डोक्यावर घेरा किंवा संजाब कधीच ठेवला नाही. मिशा कधी कोरल्या-कातरल्या नाहीत. चांगली वाढल्याशिवाय ते हजामत कधी करीत नसत. दमले-भागले तरी त्यांनी कोणाकडून कधी पाय दाबून घेतले नाहीत. त्यांच्या एखाद्या मित्राने त्यांच्या खांद्यावर हात टाकला असे कधी घडले नाही. मनाप्रमाणेच त्यांच्या शरीरालाही स्वातंत्र्याची आवड फार होती. म्हातारपणी शरीर मधुमेहाने पोखरले गेले असताही त्यांच्या मनाचा उत्साह व कर्तृत्वशक्ती रतिमात्र कमी झाली नाही. ते कामाला बसले म्हणजे बारा बारा तास अखंड काम करीत. जेवणात त्यांनी कधी आवडनिवड दाखवलीच नाही. ते म्हणत, 'मी खाण्यासाठी जगत नसून जगण्यासाठी खात असतो.' त्यांचा आवाज जात्याच मोठा होता. त्यांचा साधा वादविवादसुद्धा भांडल्यागत वाटे.

गृहस्थाश्रम – लो. टिळकांचे लग्न त्यांच्या वयाच्या १५ व्या वर्षी झाले. त्यांना तीन मुलगे आणि तीन मुली अशी एकंदर सहा अपत्ये झाली. सर्वांत मोठा मुलगा विश्वनाथ हा २० वर्षांचा होऊन प्लेगने वारला. लो. टिळकांच्या मरणकाळी त्यांचे दोन धाकटे मुलगे कॉलेजात शिकत होते. त्यांच्या पत्नीचे नाव सत्यभामाबाई असे होते. त्या लाडघरच्या बाळ घराण्यातील होत्या. त्यांच्याशी टिळकांची वागणूक प्रेमळपणाची होती. टिळकांनी त्यांना कधी काही उणे पडू दिले नाही व ते त्यांच्यावर कधी रागावलेही नाहीत. सत्यभामाबाईंना शालेय शिक्षण नव्हते; तथापि आपल्या पतीच्या उद्योगाचे मर्म समजण्याइतकी मार्मिकता त्यांच्या अंगी होती. पतीची लोकप्रियता व कीर्तिमत्ता, यांची नित्य नवी उदाहरणे डोळ्यापुढे येत असल्याकारणाने सत्यभामाबाईंना टिळकांचे लक्ष घरप्रपंचात कमी का, याची पूर्ण जाणीव होती,



लो. टिळकांच्या पत्नी सौ. सत्यभामाबाई

लो. टिळकांना आपले पितृधन शिक्षणासाठी पुरले. त्यांचा संसार साधा असल्यामुळे पुढे न्यू इंग्लिश स्कूलमधले अध्यापनवेतनही टिळकांना पुरत असे. पुढे ती संस्था सोडल्यावर लॉ–क्लास काढून त्यांनी आपला प्रपंच भागवला. नंतर केसरीच्या उत्पन्नावर त्यांचा संसारखर्च चाले. प्रथम पुष्कळ वर्षे 'केसरी" कर्जातच होता. पण पुढे त्याचे बस्तान बसले व उत्पन्नही वाढले. पण त्याबरोबरच सार्वजनिक कामे वाढल्यामुळे टिळकांजवळ शिल्लक अशी थोडीच उरे. मृत्युसमयी टिळकांनी केसरी-मराठा पत्राचा सार्वजनिक ट्रस्ट केला. व गायकवाड-

वाड्यातील अर्ध्या भागात केसरी-मराठा संस्थेने काम करावे अशी मृत्युपत्रात व्यवस्था केली. त्यांनी द्रव्याचा हव्यास असा कधीच धरला नाही. केसरीने त्यांना दिलेला पैसा वर्षाअखेरपर्यंत लोकसेवेतच खर्च होत असे व पुढच्या वर्षाची तरतूद काय हा प्रश्न त्यांना नेहमीच पडे.

टिळकांनी मुलांवर प्रेम केले; पण त्यांचे लाड कधीच केले नाहीत. मुलांना उत्तम प्रकारे शिक्षण मिळावे, म्हणून त्यांनी अनेक प्रकारे काळजी घेतली. ते नेहमी मुलांना विचारीत, ‘ कां रे, आजचे अन्न तुम्ही मिळवून जेवलात, की फुकट खाल्लेत ?’ टिळक जे बोलत, ते मनोभावे आचरण्याचा प्रयत्न करीत. त्यांनी ज्यांना आपले म्हटले त्यांना कधीही अंतर दिले नाही. त्यांनी कधी कुणाला निरुत्साही केले नाही आणि कुणाची अवहेलनाही केली नाही. एखाद्या कार्यकर्त्याचे मन दुखावले गेले असल्यास ते त्याची समजूत काढीत, त्याच्या पाठीवरून प्रेमाचा हात फिरवीत, त्याच्या कार्यतत्परतेचे कौतुक करीत आणि प्रसंगी सर्वभावे त्याला पाठीशीही घालीत. इ. स १९०८ सालच्या दारुगुत्त्यांवरील निरोधनाच्या चळवळीत हां हां म्हणता त्यांनी तेज निर्माण केले आणि त्या चळवळीत स्वयंसेवकांना जो दंड झाला, त्याची हजारो रुपयांची रक्कम स्वतःच्या उत्पन्नातून भरली. टिळकांच्या शब्दासाठी शेकडो तरुण अहमहमिकेने पुढे येत, त्यातले रहस्य हे आहे.

गुणविशेष – टिळकांच्या बुद्धिमत्तेप्रमाणेच त्यांची स्मरणशक्तीही दांडगी होती. फार दिवसांनी भेटलेल्या मनुष्याची ओळख ते जशी हटकून सांगत, त्याचप्रमाणे फार दिवसांपूर्वी वाचलेल्या ग्रंथातला उताराही चटदिशी काढून देत. टिळकांच्या ग्रंथसंग्रहात संस्कृतविद्येच्या खालोखाल कायद्याची पुस्तके असत. धंदेवाईक नसले, तरी टिळक हे कायदेपंडितच होते. त्यांच्याकडील संस्कृतग्रंथांतही शास्त्रीय ग्रंथांचा भरणा अधिक असे. महाभारताचा त्यांचा अभ्यास सखोल होता. केसरीतल्या अग्रलेखाच्या शिरोभागी लेखातल्या विषयाला उपोद्बलक असे महाभारतातले एखादे वचन बहुधा असायचेच. त्यांच्या लेखनात बनावट किंवा सजावट अशी काहीच दिसत नसे. त्यांची लेखनशैली वाचकाला कार्याकार्याविषयी निःशंक करणारी असे. या विषयी श्री. न. चिं केळकर लिहितात –‘ विचारांचा ओघ शुद्ध पण त्याहूनही अधिक कुशल अशी अनुमानपद्धती, ठसकेदार शब्द, इंग्रजी विचारांचे रूपांतर करणारे हिंदुसंस्कृतीचे समर्पक शब्द, विशेषणांच्या जोडया, स्फूर्तिदायक प्रश्न, उपहासाने लोळवणारे उद्गारयुक्त वाक्यांचे शेवट, अनुरूप अशी ठेवणीतील संस्कृत अवतरणे, नित्य व्यवहारातले दाखले आणि सर्वांत श्रेष्ठ म्हणजे निर्भयता व सावधगिरी यांचा सुंदर मेळ घालणारी स्पष्टोक्ती हे त्यांच्या लेखनातील विशेष गुण म्हणता येतील. ’

टिळक हे स्वभावतःच निर्भय आणि धाडसी होते. रात्री बेरात्री रानातून एकट्याने हिंडणे असो, गर्दी मारामारीत घुसणे असो किंवा कुठल्याही बाक्या प्रसंगाला तोंड देणे असो; टिळकांचे धैर्य आणि साहस कधीही कमी पडले नाही. सुरतेच्या राष्ट्रीय सभेत अध्यक्षाच्या ठरावाला उपसूचना आणायचे ठरले, तेव्हा ते जबाबदारीचे काम टिळकांनी स्वतःकडे घेतले.



लो. टिळक (मुंबई सरकारच्या प्रसिद्धिखात्याच्या सौजन्याने)

नेव्हिन्सन नावाचा एक पाश्चात्य पत्रपंडित त्या प्रसंगाचे ‘ चक्षुर्वै सत्यम् ’ वर्णन पुढीलप्रमाणे करतो–‘ आभाळात काळे ढग येऊन वीज कडाडावी आणि वादळ व्हावे त्याप्रमाणे लोकमान्य टिळक अध्यक्षांच्या खुर्चीपुढे उभे राहिले. ते बोलू लागताच त्यांचा करारी आवाज ऐकून वाटले, की हा वीर पुरुष भवितव्यतेलाही तुच्छ मानीत आहे. ’

त्यानंतर दंगल सुरू झाली. पण आपल्या छातीवर दोन्ही हात आडवे ठेवून टिळक वज्रनिर्धाराने आपल्या जागी उभे होते. विरोधक ओरडत होते; मुठी वळत होते. टिळक म्हणाले, ‘ मी हा इथे उभा आहे. हिंमत असेल तर मला इथून हलवा. ’ कुणी जोडे फेकले, कुणी छत्र्या भिरकावल्या, कुणी खुर्च्या

भिरकावल्या, पण हा वीर पुरुष तिळमात्र तिथून हलला नाही. दंगलीनंतर ते अधिवेशन उधळले. त्याच दिवशी संध्याकाळी राष्ट्रीय पक्षाची सभा झाली. त्या सभेत टिळकांनी जे भाषण केले, ते जगातील उल्लेखनीय भाषणांपैकी एक होते. त्या वक्तृत्वातला आवेश काही न्याराच होता. परिस्थितीची मीमांसाही गंभीर, मुद्देसूद आणि स्पष्ट होती. ते भाषण ऐकल्यावर पत्रपंडित नेव्हिन्सन उद्गारला–" That is the man ! "

ध्यानी, मनी, स्वप्नी टिळकांना एकच गोष्ट दिसत असे आणि ती म्हणजे हिंदुस्थानचे स्वराज्य. तोच एक त्यांना ध्यास होता. त्यांच्या शेवटच्या आजारात बेशुद्धीतही ते स्वराज्याविषयीच बोलत होते. २९ जुलै १९२० च्या त्या अपरात्री म्हणजे मृत्यूपूर्वी अवघे दोनच दिवस ते अर्धवट शुद्धीत बोलू लागले. " माझीअशी खात्री आहे आणि आपणही विश्वास बाळगा, की हिंदुस्थानला स्वराज्य मिळाल्याखेरीज तरणोपाय नाही. "

हे सर्व टिळकचरित्र पाहून आणि ऐकून कवि गोविंद यांनी टिळकांच्यावर पुढील काव्यसुमने उधळली आहेत –

टिळक नव्हे ही आत्मश्रद्धा शिवरायाची असे ।
खरोखर शिवरायाची असे ।
निश्चयरूपे भगवा ध्वज हा स्वकरे उभवीतसे ।।
निष्कलंक चारित्र्यचंद्र तव, टिळक लोकनायका ।
चंद्र तव टिळक लोकनायका ।
एका स्तंभावरी उभी ही महाराष्ट्रद्वारका ।
मुक्या मनाचे किती उधळावे शब्दांचे बुडबुडे ।
तुजपुढे शब्दांचे बुडबुडे ।
तुझे पवाडे गातिल पुढती तोफांचे चौघडे ।।

पाहा – कर्मयोगशास्त्र. [प्रा. ग. प्र. प्रधान]

टेकमन राम

(इ. स. च्या १९ व्या शतकाचा उत्तरार्ध) सरभंग संप्रदायातला एक प्रमुख कवी. हा चंपारण्य जिल्ह्यातला रहिवासी होता. हा जातीने लोहार होता; पण घरच्या गरिबीमुळे सुतारकीही करीत असे. माधोपूर मंदिराचा दरवाजा यानेच तयार केला आहे. ते काम करीत असतानाच हा भीखम बाबाच्या संपर्कात आला व त्याचा शिष्य बनला.

हा मोठा सिद्ध पुरुष होता. एकदा याचा गुरू याला भेटायला वाघावर बसून आला. त्या वेळी हा ओसरीवर तोंड धूत होता. गुरूला सामोरे जावे असा त्याने विचार केला व ती ओसरीच त्याने चालवली, असे सांगतात.

माघ शुद्ध पंचमीला भखरा येथे याने समाधी घेतली. याच्या स्मरणार्थ दरवर्षी इथे मोठी यात्रा भरते. टहलराम, मिसरीबाई, दर्शनराम व सुदिष्टराम हे याचे प्रमुख शिष्य होत.

याच्या काव्यरचनेसंबंधी निश्चित काही सांगता येत नाही. त्याच्या उपलब्ध काव्याचा एक नमुना असा –

समधिन ! भले हो भले, बिअहल बाड़ू की कुआरें ।
माता होई तुहु जग प्रतिपलल्‌, भले हो भले ।
जाईया होई थन खालू ।।
केकई होई दशरथके ठगलू भले हो भले ।
रामजीके देलू बनबास ।।
सीता होई, रवनको के ठगलू, भले हो भले ।
लंका गढ कइलू, उजार ।।
सिरी टेकमनराम निरगुन गावेले, भले हो भले ।

अर्थ – हे समाधी (माये) ! तू फार प्रामाणिक आहेस. तू विवाहित आहेस की कुमारिका आहेस, हे प्रथम सांग. माता होऊन तू जगाचे प्रतिपालन करतेस आणि पत्नी बनून ऐश्वर्य उपभोगतेस. कैकयी होऊन तू दशरथाला फसवलेस आणि रामाला वनवासाला पाठवलेस. सीता बनून तू रावणाला प्रायश्चित्त दिलेस व लंकेचा नाश केलास. टेकमन राम निर्गुणाचे गुण गातो.

टेकमन राम अत्यंत विरक्त होता. [स्नं. स. सं.; मो. क. का.]

टेसू आणि झांझी

व्रजमंडळातील एक लोकोत्सव. शारदीय नवरात्रात मातीचे रंगीत घडे बनवतात व त्यांवर दिवे पेटवून ठेवतात. या घडयांना झांझी म्हणतात. गावातल्या मुली मग ते घडे डोक्यावर घेऊन घरोघर हिंडतात. तेव्हा त्या जी गाणी म्हणतात, ती विनोदी व असंबद्ध असतात.



झांझी

त्याच वेळी तरुण मुले आपापले टेसू घेऊन टोळी टोळीने गावात फिरतात. टेसू हा एक मुखवटा असतो. वेळूच्या तीन काठ्या मध्यात एकत्र बांधून त्यांचे तिकाटणे करतात. त्याच्या

एका टोकावर पगडीधारी टेसू बसवतात. बाकीच्या दोन टोकांवर दिवे लावतात. तीन्ही काठ्यांना रंगीत कागद चिकटवितात. काही लोक तीन्ही टोकांवर टेसूचे मुखवटे बसवतात.

आश्विन शुद्ध प्रतिपदेपासून पौर्णिमेपर्यंत हा कार्यक्रम चालतो. शेवटी झांझी आणि टेसू यांचे लग्न लावतात व त्यांची पूजा करून नदीत वा तलावात त्यांचे विसर्जन करतात.

टेसू आणि झांझी यांच्याविषयी एक लोककथा प्रचलित आहे, ती अशी –

भारतीय युद्धात एक दिवस युधिष्ठिराने आपल्या पक्षातील वीरांना विचारले, की ‘कौरवांचा पराभव करायला किती दिवस लागतील ?’ त्यावर अर्जुन म्हणाला, की ‘मी एका दिवसात कौरवांचा नाश करीन.’ ते ऐकून बर्बरीक नामक एक योद्धा म्हणाला, की ‘मी तर दोन घटकांतच त्यांचा निकाल लावीन.’ बर्बरीकाचा हा अहंकार श्रीकृष्णाला रुचला नाही व त्याने बर्बरीकाचे मस्तक सुदर्शन चक्राने लगेच धडावेगळे केले. पण शिर तोडूनही तो जिवंतच राहिला. त्याने कृष्णाला म्हटले. ‘भगवन्, तू मला मारलेस याचे दुःख नाही ! पण इच्छा होती, की भारतीय युद्ध डोळ्यांनी पाहावे.’ तेव्हा श्रीकृष्णाने त्याची ती इच्छा पुरी करायचे ठरवले. त्याने तीन बाण एकत्र बांधून उभे केले व त्यांतील एका टोकावर बर्बरीकाचे मस्तक ठेवले. तशा स्थितीत त्याने सर्व भारतीय युद्ध पाहिले. नरकासुराची एक कन्या होती, तिचे या बर्बरीकावर प्रेम बसले होते. युद्ध संपल्यावर श्रीकृष्णाने तशा स्थितीतच त्या कन्येचा बर्बरीकाशी विवाह लावून दिला.


टेसू – एक प्रकार

टेसू व झांझी ही वरील कथेतील बर्बरीक व नरकासुरकन्या यांची प्रतीके मानली जातात.

बाणभट्टाने हर्षचरितात या उत्सवाचा अप्रत्यक्षपणे उल्लेख केलेला आहे. राज्याविषयी उदासीन बनलेला राज्यवर्धन हर्षवर्धनाला म्हणतो –

बहुमृतपटावगुण्ठनां रञ्जितरङ्गां जनङ्गमानामिव वंशवाह्यामनायाँ श्रियं त्यक्तुमभिलषति मे मनः ।

अर्थ – रंगीबेरंगी प्रेतवस्त्रांनी सजविलेला, लोकांचे मनोरंजन करणारा व वेळूच्या काठीवर बसविलेला (टेसूचा) शोभिवंत पुतळा ज्याप्रमाणे डोम लोक विसर्जित करतात, त्याप्रमाणे राज्यश्रीचा त्याग करावा, असे मला वाटते.

दिल्लीच्या परिसरात मात्र डोम, भंगी वगैरे अंत्यज जातींमध्येच टेसूच्या उत्सवाची प्रथा आहे. [हिं. सा. को.; हेमवाला जैन– धर्मयुग, २० ऑक्टोबर १९६३; ह. च. सां. अ.]

टोटा कुरम्मा

द. भारतातली एक शक्तिदेवता. एका मुसलमान स्त्रीने हिंदूंच्या भोजनसमारंभात चुकून डुकराचे मास खाल्ले. तेव्हा मग पापाच्या भयाने तिने विहिरीत जीव दिला. ती मुसलमान स्त्रीच पुढे देवता बनली.

एका मुस्लीम स्त्रीचा एका धोब्याशी अनैतिक संबंध घडला आणि घरच्या माणसांनी हाकलून दिल्यावर तिने विहिरीत जीव दिला, असाही वरील कथेचा एक पर्याय आहे.

ही देवता रात्री गावात येते आणि ‘टोटा कुरा’ असा शब्द करते. त्या शब्दाचा अर्थ ‘पालेभाजी’ असा आहे. लोकांना वाटते, की कोणीतरी बाई पालेभाजी विकायला आली आहे. जे कोणी त्या शब्दावर विश्वासून दार उघडून बाहेर येतात, त्यांची वाचा बसते, अशी समजूत आहे.

ठ

ट वर्गातील दुसरा वर्ण व वर्णमालेतील बारावे व्यंजन. संस्कृत भाषेत ठ शब्दाचे शिव, महाध्वनी, चंद्रमंडल, वर्तुळ, इ. अनेक अर्थ आहेत.

या वर्णाची पहिली अवस्था अशोकाच्या दिल्ली येथील शिवालिक स्तंभावरील लेखात दिसते. दुसरी आणि तिसरी अवस्था इ. स. च्या ११ व्या शतकातील उज्जयिनीच्या लेखात दृष्टोत्पत्तीस येते. तन्त्रोद्धारतंत्रात या वर्णदेवतेची स्त्रीरूपात कल्पना केली असून, तिचे ध्यान पुढीलप्रमाणे दिले आहे –

पूर्णचन्द्रप्रभां देवीं विकसत्पङ्कजेक्षणाम् ।
सुन्दरीं षोडशभुजां धर्मकामार्थमोक्षदाम् ।
एवं ध्यात्वा ब्रह्मरूपां तन्मन्त्रं दशधा जपेत् ॥

अर्थ – पूर्ण चंद्राप्रमाणे कांतिमती, विकसत्‌कमलनयना, सौंदर्यवती, षोडशभुजा, धर्म, अर्थ, काम व मोक्ष हे पुरुषार्थ मिळवून देणारी अशा ब्रह्मरूपा ठ देवीचे ध्यान करावे आणि तिच्या मंत्राचा दहा वेळा जप करावा.



ठच्या रूपाचा विकासक्रम

मूर्धा हे याचे उच्चारणस्थान आहे. [श. क.; म. ज्ञा. को.]

ठक्करबाप्पा (१८६९– १९५१ इ. स.) एक थोर समाजसेवक. यांचे संपूर्ण नाव अमृतलाल विठ्ठलदास ठक्कर. यांचा जन्म सौराष्ट्रातील भावनगर येथे लोहाणा जातीत झाला. वयाच्या ११–१२ व्या वर्षीच अमृतलालांचे लग्न झाले. पुढे इंजिनिअरिंगचे शिक्षण पूर्ण झाल्यावर त्यांनी अनेक ठिकाणी नोकऱ्या केल्या. पण स्वाभिमानी बाणा व सचोटी या गुणांमुळे त्यांचे कुठेही जमले नाही. त्यांनी मोठमोठ्या हुद्यांच्या जागांवर कामे केली व पैसाही पुष्कळ मिळविला. पण त्यांचे चित्त मात्र नोकरीत कधीच रमले नाही. वयाच्या ४५ व्या वर्षी मुंबई नगरपालिकेची नोकरी त्यांनी आपण होऊन सोडली व समाजसेवेचे व्रत अंगिकारले.



ठक्करबाप्पा

ठक्करबाप्पांची पहिली पत्नी दीर्घ आजारानंतर मरण पावली. मग त्यांनी पुन्हा लग्न केले. पण ती पत्नीही लवकरच निवर्तली आणि ते संसारपाशातून मुक्त झाले.

मुंबई नगरपालिकेची नोकरी करीत असताना ठक्करबाप्पांना कचरा वाहून नेण्याच्या कामावर देखरेख करावी लागे. ते काम करणाऱ्या अस्पृश्य लोकांचे किळसवाणे जीवन त्यांना हरघडी दिसे. म्हणून नोकरीतून निवृत्त झाल्यावर अशा दलितांची व दीन–दुबळ्यांची सेवा करण्याच्या हेतूनेच ते श्री. गोपाळ कृष्ण गोखले यांनी स्थापन केलेल्या भारत सेवक समाजात दाखल झाले. सुरवातीलाच उत्तर प्रदेशातील दुष्काळपीडितांच्या मदतीसाठी त्यांची रवानगी झाली. योजकता, शिस्तबद्धता व सेवाभाव यांमुळे त्यांची तिथली कामगिरी फार मोलाची ठरली. दुष्काळाच्या खाईत सापडलेल्या दुर्दैवी जीवांना बाप्पांच्या रूपाने जणू देवच भेटल्यासारखे झाले. पुढे आसाम, गुजरात, ओडिसा, बंगाल, इ. प्रदेशांत जेव्हा भयंकर दुष्काळ पडले, तेव्हाही ठक्करबाप्पांनी तिथे जाऊन आपद्‌ग्रस्तांची सेवा केली.

इ. स. १९१९ मध्ये गुजरातमधील पंचमहाल जिल्ह्यात दुष्काळ पडला असता, बाप्पा त्या भागात खूप हिंडले व त्यांनी तिथल्या भिल्ल लोकांची दुःस्थिती स्वतःच्या डोळ्यांनी पाहिली. त्या भिल्लांचे जीवन सुधारण्याच्या हेतूने मग त्यांनी भिल्ल सेवा मंडळ स्थापले आणि त्यांच्या वस्तीत राहूनच ते त्यांच्या सेवेला लागले. भिल्ल समाजातली व्यसने नष्ट करणे, त्यांचे अज्ञान घालवणे, अन्याय दूर करणे, इ. कामे त्यांनी त्या ठिकाणी केली.

इ. स. १९३२ साली ठक्करबाप्पा हरिजन सेवक संघाचे चिटणीस झाले. तेव्हापासून त्यांनी हरिजनांच्या उद्धाराचे काम आत्मीयतेने केले. इ. स. १९३७ साली काँग्रेसची मंत्रिमंडळे अधिकारावर आली, तेव्हा निरनिराळ्या प्रांतांतील हरिजन, आदिवासी, इ. मागसलेल्या लोकांची पाहणी करण्याचे काम ठक्करबाप्पांवर सोपवण्यात आले आणि ते त्यांनी अत्यंत कसोशीने पार पाडले. पुढे इ. स. १९५० साली देशभर हिंडून त्यांनी सर्व आदिवासी लोकांची माहिती गोळा केली व तिच्या आधारेच पुढे भारत सरकारने आदिवासी लोकांच्या रक्षणाची व कल्याणाची कायदेशीर तरतूद केली. भारतीय आदिमजाती सेवक संघाच्या कार्याचे श्रेयही बाप्पांनाच दिले पाहिजे.

ठक्करबाप्पांनी चार पुरुषांना आपले गुरू मानले होते. त्यांचे वडील विठ्ठलदास हे त्यांचे पहिले गुरु होत. त्यांच्यापासून बाप्पा परोपकार व सेवावृत्ती शिकले. टापटीप व व्यवस्थितपणा हे गुणही त्यांनी वडिलांकडूनच घेतले. कर्मवीर विठ्ठल रामजी शिंदे हे त्यांचे दुसरे गुरू. दलितांची सेवा करणे, त्यांना शिक्षण देणे, त्यांच्या हक्कांसाठी झगडणे, या कार्याचे पाठ त्यांनी या गुरूकडून घेतले. गोपाळ कृष्ण देवधर हे त्यांचे तिसरे गुरू. हरिजनांची आर्थिकस्थिती सुधारण्याचे उपाय बाप्पांनी देवधरदादांकडून समजावून घेतले. चवथे गुरु महर्षी कर्वे. यांच्याकडून त्यांना स्त्रीशिक्षणाच्या कार्याची प्रेरणा मिळाली.

म. गांधींनी ठक्करबाप्पांना भिल्ल वगैरे आदिवासी व हरिजन यांचे गुरू म्हटले आहे. ‘ त्यांनी भगवे वस्त्र परिधान केले नसले, तरी त्यांचे काम एखाद्या संन्याशालाच शोभण्यासारखे आहे. त्यांच्यासारखा कार्यकर्ता लाखात मिळायचा नाही, ’ असे म. गांधीजींनी त्यांच्याविषयी लिहिले आहे.

कामाच्या बाबतीत ठक्करबाप्पांची शिस्त कडक होती. त्यांचा स्वभावही फार तापट होता. पण त्यांचे अंतःकरण मात्र अत्यंत कोमल होते. दीन–दलितांची दुःखे पाहून ते कळवळत. रंजल्यागांजल्या सर्व लोकांना त्यांनी मनाने व कृतीनेही आपले म्हटले. हे त्यांचे सेवाव्रत आयुष्याच्या अखेरीपर्यंत चालू होते. [सु. वि. को.; लोकसेवक ठक्करबाप्पा – अमरेन्द्र, १९५९]

ठक्करसी

(इ. स. चे १६ वे शतक) एक जैन कवी. हा खंडेलवाल जातीत जन्मला होता. याचा जन्म चंपावती नगरीत झाला. याच्या बापाचे नाव घेल्ह असे होते. तोही कवी होता. कृपणचरित्र, मेघमालाव्रतकथा, पंचेंद्रियवेली, नेमीसुरकी वेली, पार्श्वसकुनसत्तावत्तीसी, चिंतामणिजयमाल, गुणवेली, सीमंधरस्तवन, इ. काव्ये ठक्करसीने रचली आहेत. याची काव्यभाषा प्राचीन हिंदी असून, त्याच्या काव्यात प्रसाद गुण आढळतो. [हिं. जै. भ. क.; हिं. नी. वि.]

ठग

वाटमारी करणाऱ्या गुन्हेगारांचा एक समाज. स्थग या संस्कृत शब्दावरून ठग हा शब्द आला असावा. त्याचा अर्थ ठकविणारा, फसविणारा असा होतो. एका काळी साऱ्या भारतभर हे लोक पसरलेले होते. यांच्यांत हिंदूंचा व मुसलमानांचाही समावेश होत असे.

ठग समाज बराच प्राचीन आहे. त्यांच्या उत्पत्तीबद्दल एक दंतकथा आहे, ती अशी –

फार प्राचीन काळी रक्तबीज नावाचा एक महादैत्य होता. तो नरमांसभक्षक होता. काली मातेने त्याच्याशी युद्ध करून त्याचे मुंडके उडविले. परंतु त्याच्या सांडणाऱ्या रक्ताच्या प्रत्येक थेंबापासून एकेक नवा दैत्य निर्माण होऊ लागला. काली त्यांचाही संहार करू लागली. त्यांतून अधिक रक्तबिंदू गळू लागले आणि अधिक दैत्य निर्माण होऊ लागले. शेवटी काली थकली. तिला घाम आला. त्या घामातून दोन वीर निर्माण झाले. त्यांना एकेक रुमाल देऊन देवीने सांगितले, की रक्त न सांडता तुम्ही दैत्यांचा निःपात करा. त्यांनी त्या सर्व दैत्य सेनेचा रुमालाने गळफास घालून नाश केला. मग देवीने त्यांना वर दिला, की तुमच्या वंशजांनी वाटमारी करून प्रवाशांना मारावे व त्यांची चीजवस्त लुटून आपली उपजीविका करावी.

काही ठग वाल्मीकीला आपला पूर्वज मानीत. वाल्मीकी हा वाल्या कोळी असताना ठगच होता, असे ते समजत.

ठगांची कामे फार गुप्तपणे चालत. त्यांची सांकेतिक भाषा होती. यात्रेकरू, संन्यासी, व्यापारी वगैरेंचे वेष करून ठग लोक टोळ्यांनी हिंडत आणि श्रीमंत प्रवाशांना फसवून आपल्या गोटात नेऊन व गळफास घालून ठार मारीत. नंतर त्यांना लुटून प्रेते पुरून टाकीत. माणसाला मारण्यासाठी ते गळफासाशिवाय दुसरे कोणतेही साधन वापरीत नसत.

ठग लोग कालीची उपासना करीत. आपण वापरत असलेली कुदळ ही देवीच्या शक्तीने भारलेली आहे, असे ते मानीत. खून करताना आपण काही पाप करतो, असे त्यांना कधीही वाटत नसे. खून करणे म्हणजे देवीला बळी देऊन संतुष्ट करणे, असेच ते समजत. मात्र ते बायकांना कधीही मारीत नसत; त्यांना गुलाम म्हणून विकीत.

ठग टोळीचा पुढारी एखाद्या शुभ दिवशी खड्डा खणण्यासाठी लागणारी कुदळ तयार करवून घेई आणि सोमवार, मंगळवार व शुक्रवार या दिवशी तिची पूजा करी. कोणाही ठगेतर प्राण्याची सावली कुदळीवर पडली, तर ती गोष्ट अशुभ समजली जाई. ठगीची दिक्षा देण्याचा विधी अशा कुदळीच्या साह्य्याने केला जात असे.

ठग आपल्या मोहिमेला निघाल्यावर ब्राह्मण, धोबी, झाडूवाला, तेली, अंध, थोटा, फकीर, नर्तकी, सुतार, गंगेची कावड नेणारा यांना पहिल्या प्रथम कधीही मारीत नसत. वाघ हे कालीमातेचे वाहन आहे, असे समजून ते त्यालाही मारीत नसत. मोहिमेवर निघण्यापूर्वी पुढील घटना घडल्यास ठग लोग ती मोहीमच रद्द करीत – (१) ठगांच्या कुटुंबात एखादी स्त्री बाळंत होणे, (२) कुटुंबातली एखादी मुलगी रजस्वला होणे, (३) कोणाचा विवाह होणे, (४) पाच वर्षांपुढील एखाद्या व्यक्तीचा मृत्यू होणे, (५) घोडी, मांजरी, कुत्री, गाय अथवा म्हैस विणे व (६) एखाद्याची सुंता होणे.

शुभाशुभ शकुनांवर ठगांचा विश्वास असे. शकुनाच्या द्वारे देवीची संमती मिळवूनच ते वाटमारीच्या मोहिमेवर जात. घुबड झाडावर बसलेले असता घूत्कारले, तर शुभ व उडत असता घूत्कारले, तर अशुभ मानीत. रात्रीच्या वेळी तित्तिर पक्ष्यांचा ध्वनी व दिवसा कोल्हेकुई ऐकल्यावर ती संकटाची सूचना समजत व लगेच स्थलांतर करीत. गाढवाच्या ओरडण्यात व त्याच्या डाव्या उजव्या येण्यातही ठगांचे शुभाशुभ संकेत असत.

टोळीत काम करणाऱ्या प्रत्येक ठगाला वेगळे नाव असे. त्यांच्यांत प्रवाशांना गोड बोलून भुलविणारेही काही लोक असत. त्यांना सोठे म्हणत. मारण्यासाठी निश्चित केलेल्या जागेला बेला असे म्हणत. प्रवाशाभोवती गळफास लावणाऱ्याला भूर्तोत व त्याचे पाय ओढणाऱ्याला शम्सीआ अशी नावे असत. नवशिक्या ठगाला कबूला किंवा ढायरो व सराइताला बर्का म्हणत.

सध्या ठगांचा हा वाटमारीचा व्यवसाय बंद झाला आहे. इ. स. १८३६ ते १८४९ या काळात इंग्रजांनी ठगीला बंदी करणारे अनेक कायदे केले व हजारो ठगांना पकडून त्यांची विल्हेवाट लावली. त्यामुळे या पद्धतीचा नायनाट झाला. [म. ज्ञा. को.; श्री. प्र. ल. सासवडकर; एन्सा. रि. ए.]

ठाकर एक जात. यांची वसती मुख्यत्वे द. कोकणात आहे. नंदीबैल फिरवणे, बाहुल्यांचे खेळ करणे, गंगावने करणे व घोंगड्या दुरुस्त करणे, हे यांचे व्यवसाय आहेत. यांच्यांत कुळे व देवके आहेत. हे लोक केशरलिंग, भवानी, रसये, खंडोबा व सिदोबा यांना भजतात. प्रत्येक कुटुंबात त्यांच्या मूळ पुरुषाच्या नावाने एक नारळ ठेवलेला असतो, त्याला तळखांबा असे म्हणतात. या नारळाची ते रोज पूजा करतात. वर्षाने जुना नारळ बदलून त्या जागी नवा ठेवतात. ब्राह्मण यांचे पौरोहित्य करतात. हे पितरांचे श्राद्ध-पक्ष करतात.

ठाकऱ्या नाच डांग जिल्ह्यामधील आदिवासी लोकांचे एक नृत्य. पावसाळ्यात पेरणीची कामे उरकल्यावर डांगी लोक हा नाच करतात. या नृत्याच्या नमनाचे सामुदायिक गाणे असे –

ढोल्यापुढं राह्यलुं उभा ढोल्यालं नमस्कार हो ऽ
सभापुढं राह्यलुं उभा सभालं नमस्कार हो ऽ
नाच्यापुढं राह्यलुं उभा नाच्यालं नमस्कार हो ऽ
सुरत्यापुढं राह्यलुं उभा सुरत्यालं नमस्कार हो ऽ

ही गाणी चार– सहा ओळींची असतात. नृत्याला ढोलाची साथ असते. [सर्वोदय–लोकसाहित्य अंक, मे १९६१]

ठाकुरदास (१७६६–१८२३ इ. स.) एक रीतिकालीन कवी. जातीने कायस्थ. हा बुंदेलखंडातील जैतपूरचा रहिवासी असून, तिथल्या राजाचा दरबारी कवी होता. तो स्वच्छंदी, निर्भिड, स्पष्टवक्ता, स्वाभिमानी व उदार होता. त्याची बुद्धी तीक्ष्ण असून, त्याला देशकालपरिस्थितीचे उत्तम ज्ञान होते. तो सौंदर्यप्रेमी व भावदर्शी होता. आपल्या आश्रयदात्याचीही अतिरंजित प्रशंसा त्याने कधी केली नाही. त्याच्या काव्यात सत्यदर्शन व भावचित्रण असते, त्याचप्रमाणे उपहासात्मक टीकाही असते. शृंगार, भक्ती व नीती हे त्याच्या काव्याचे मुख्य विषय होत. पण इतर कवींच्याहून याची रचनाशैली अगदी निराळी आहे. लोकांत प्रचलित अशी साधी व्रजभाषाच त्याने वापरली आहे. त्यामुळे त्याची भावाभिव्यक्ती स्वाभाविक, मनोहर व सजीव वाटते. कवित्त व सवैया हे त्याचे आवडते छंद होते. मानवी स्वभावाचे सहजचित्रण करण्यात तो फार कुशल होता. ‘ठाकुर ठसक’ नावाचा त्याचा काव्यसंग्रह प्रसिद्ध झाला आहे. [हिं. सा. को. २; हिं. वि. को.]

ठाकुरदेव गोंड व परधान या आदिवासी लोकांचा एक देव. तो परधानांच्या बानात (कापूस पिंजण्याचा दांडा) वास्तव्य करतो, अशी समजूत आहे. बान काखोटीस असताना परधान कोणालाही नमस्कार करीत नाहीत. कारण बानाच्या रूपाने ठाकुरदेव त्यांच्या अंगावर बसलेला असतो. गोंड लोक दंडानृत्य करताना पहिल्या प्रथम ठाकूरदेवाला नमन करतात. नृत्यात कुणाला इजा होऊ नये, म्हणून हे नमन असते.

ठाकूर महाराष्ट्रातील एक जमात. पंजाब व काश्मीर या राज्यांत असलेल्या काही जातींनाही ठाकूर असे नाव आहे. ठाकूर लोकांत हिंदू, मुसलमान, शीख व बौद्ध या सर्व धर्मांचे लोक आहेत. यांपैकी काही लोकांना ठक्कर असेही म्हणतात. लहान राजपूत सरदार आपल्याला ठाकूर म्हणवून घेतात.

श्री. राजवाडे ठाकूर हा शब्द तस्कर = चोर या शब्दावरून व्युत्पादितात. कात्यायनही ठाकुरांना तस्कर म्हणून ओळखतो, असे ते सांगतात. सुलतान महमूद बेगडाच्या आक्रमणांनी त्रस्त होऊन गुजरातचे ठक्कर रानावनात पळून गेले: त्यांच्या बरोबर इतर अनेक लोकही होते. त्या सर्वांना मिळून पुढे ठाकूर असे म्हणू लागले, असे डॉ. विल्सन यांचे मत आहे.

महाराष्ट्रातील ठाकूर जातीची वसती सांप्रत पुणे, नगर, नासिक, ठाणे व कुलाबा या जिल्ह्यांत आहे. नासिक जिल्ह्याच्या पश्चिम भागातील डोंगराळ प्रदेशात त्यांची मूळ वसती होती.

इगतपुरीच्या एका ठाकुराजवळ एक शिलालेख आहे, त्यावरून इ. स. च्या सातव्या शतकात ठाकूर जमात नासिक जिल्ह्यात राहत होती, एवढे समजते.

या ठाकुरांत म ठाकूर व क ठाकूर असे दोन भेद आहेत. या नावांबद्दल जी अनेक स्पष्टीकरणे देण्यात येतात, त्यांपैकी काही अशी — (१) महालदेशातून आले ते म व कोकणातून आले, ते क होत. (२) म म्हणजे मोठे व क म्हणजे कनिष्ठ. (३) म आणि क हे वर्ण त्यांच्या बोलींत वारंवार येतात, म्हणून त्यांना तशी नावे मिळाली आहेत, असे श्री. ना. गो. चापेकर म्हणतात.

ठाकूर लोक सह्याद्रीच्या अनुषंगाने व रानावनात राहतात. त्यांच्या अनेक झोपडयांच्या वसतीला ठाकुरवाडी असे म्हणतात. डोंगराळ प्रदेशात राहत असल्यामुळे ठाकूर हे फार काटक बनले आहेत. एका दिवसात ते तीस-तीस मैलही चालू शकतात.

ठाकुरांच्या घराची लांबी–रुंदी नऊ फुटांपासून तेहतीस फुटांपर्यंत असते. घराचे एक लहानसे स्वयंपाकघर व दुसरी एक मोठी खोली असे दोन भाग असतात. घरातच गुरे बांधण्यासाठी वेगळी जागा असते. घराच्या आकाराप्रमाणे त्याला एक किंवा दोन दारे असतात. दाराचा उपयोग सुरक्षिततेपेक्षा थंड हवा येऊ नये यासाठीच केला जातो.

ठाकुरांचे घर-बांधणीचे एक शास्त्र आहे. ते संध्याकाळी ध्रुवतारा आकाशात दिसू लागल्यावर घराचा पाया खणतात. सूर्योदयाच्या वेळी पहिला खांब उभारतात आणि दुसऱ्या दिवशी पहाटे शुक्रतारा उगवतो, तेव्हां घराचे काम पूर्ण करतात. हे सर्व नियम पाळून उभारलेले घरच सर्व संकटांतून निभावते, अशी त्यांची श्रद्धा आहे. त्यांची घरे लाकडाची व छपरे गवताची असतात.

क ठाकुरांच्या वाडीतील घरे एकमेकांपासून दूर असतात. एखादेवेळी आग लागल्यास तिची झळ बाकीच्या घरांना लागू नये, म्हणून ही दक्षता घेतलेली असते.

ठाकुरांच्या घरात परसा (विस्तव) नेहमी पेटलेला असतो. ते स्वयंपाकासाठी गाडगी, मडकी वापरतात. नागली, वरी व कण्या यांची भाकरी; तसेच भात, डाळ आणि कडधान्ये, हे यांचे नित्याचे अन्न असते.

ठाकूर स्त्रिया कमरेभोवती विशिष्ट तऱ्हेने लुगडे गुंडाळतात व वर चोळी घालतात. त्या पदर घेत नाहीत. क ठाकुरांच्या स्त्रिया चोळीही घालीत नाहीत. लग्न झाल्यानंतर त्या डावा नितंब अनावृत ठेवतात. कारण त्यांच्या मते तो माहेरचा असतो. गळेसर आणि जोडवी ही सर्व ठाकूर स्त्रियांची सौभाग्यचिन्हे असतात. याशिवाय, त्या चांदीचेही दागिने वापरतात. बहुतेक स्त्रिया गालावर, कपाळावर आणि हातावर शोभेसाठी गोंदून घेतात. त्याला कोणताही धार्मिक अर्थ नसतो.


ठाकूर युवती

ठाकूर जमातीत पुरुष फक्त काबाडकष्ट करणारा असतो. पैशांचा व्यवहार, बाजारहाट, इ. गोष्टी बायकाच करतात.


भोक्शी – ठाकुरांचे मासेमारीचे साधन

सामान्यपणे शेती हा ठाकुरांचा निर्वाह व्यवसाय असतो. याशिवाय ते मच्छीमारी व मजुरीही करतात. नागली, वरी ही धान्ये ते मुख्यत्वे पिकवतात. शेतीच्या कामाचा प्रारंभ मंगळवारी करीत नाहीत. क ठाकूर पेरणीपूर्वी देवाला कोंबडा बळी देतात व त्यांच्या

रक्ताने माखलेली नागली पेरतात. पेरणीच्या काळात दळणे आणि हजामत करणे निषिद्ध मानतात. ज्येष्ठ अमावास्येला पूजा केल्याशिवाय व रावातली माठाची भाजी खाल्याशिवाय ते नागली वा वरीची लावणी करीत नाहीत. माठाबरोबर शिजवण्यासाठी ते रानातून घोळीची भाजीही तोडून आणतात. त्यांच्या पाच पाच काड्या घराच्या छपरावर व देवापुढे ठेवतात. संध्याकाळी या दोन्ही भाज्या शिजवतात. त्यानंतर रात्रभर त्यांचे नाचगाणे चालते.

श्रद्धा व संकेत– ठाकूर धनुष्य–बाणाने शिकार करतात. त्यासाठी रानेवने धुंडतात. निसर्गाचे सान्निध्य लाभल्यामुळे वनस्पती व प्राणी यांचे ठाकुरांना बरेच ज्ञान असते. आपल्या वनस्पति-निरीक्षणावरून त्यांनी काही अनुमाने बांधलेली आहेत, ती अशी– माणसाप्रमाणे वनस्पतींनाही भावना असतात. त्यांना सुख व दुःख यांची जाणीव असते. बांडगुळे, वेली व किडे यांमुळे वृक्षांना दुःख होते, तर पाणी आणि नवीन पालवी यांमुळे त्यांना सुख होते. वनस्पतींतही स्त्री व पुरुष असे भेद आहेत. पुरुष ताडाला फळे येत नाहीत, तर स्त्री ताडाला फळे येतात. ठाकूर लोक घराबाहेर उंच जागी चार मेढी पुरून मांडव तयार करतात व त्यावर पिण्याचे पाणी ठेवतात. ठाकुरांच्या घरात पाणी कधी मिळणार नाही. त्यांच्या वाडीत जाते व पाटा एकच असतो. तिथेच सर्वांचे दळण व वाटण होते. पितर-अमावास्येला पितरांना भाजी-पाला खाऊ घातल्याशिवाय ठाकूर आपण पिकवलेला भाजी-पाला खात नाहीत.

गायीला ते लक्ष्मी मानतात आणि तिची शपथ घेणाऱ्यावर विश्वास ठेवतात. गायीची धार न काढता तिचे सगळे दूध वासरांना पिऊ देतात. गायीला दूध फारच असले, तर त्यापासून तूप करून ते विकतात. गायीच्या शेणाचा उपयोग घरे सारवायला आणि खत म्हणून करतात.

मुलीला प्रथम रजोदर्शन झाले असता तिला वाहत्या पाण्यात कपडे धुवू देत नाहीत. कारण त्यामुळे नदीला विटाळ होतो आणि पाण्याच्या प्रवाहाप्रमाणे तिचाही रक्तस्राव चालू राहतो, अशी त्यांची समजूत आहे. रजःस्वला स्त्री ठाकूर पुरुषाच्या धनुष्य-बाणाला कधीही शिवत नाही.

विवाहप्रथा– ठाकूर लोकांत कुळ्या आहेत आणि त्यांपैकी काही कुळ्यांत परस्पर विवाहसंबंध होत नाही. मुलाचे लग्न साधारणपणे सोळाव्या वर्षी व मुलीचे बारा-चौदाव्या वर्षी होते. मुलगी पसंत केल्यावर साखरपुडा होतो, त्याला सुपारी फोडणे असे नाव आहे. या समारंभाला मुलीच्या घरी फक्त पुरुषच जातात. त्यांपैकी एकाने पगडी घातलीच पाहिजे, असा नियम असतो. लग्नाचा मुहूर्त ब्राह्मणाकडून काढून घेत असले, तरी तो पाळला जात नाही. मुहूर्ताच्या दिवशी बहुधा संध्याकाळी लग्न लागते. सर्वसाधारणपणे मार्गशीर्ष व माघ या महिन्यात त्यांची लग्ने होतात. लग्नात पितऱ्या–पितरी, उंबऱ्या–उंबरी व बहुळी यांच्याकडे काही विशिष्ट कामे सोपवलेली असतात. पितऱ्या– पितरी हे जोडपे पितरांचे प्रतिनिधी असते. उंबऱ्या– उंबरीकडे मंडप उभारण्याचे काम असते. बहुळी या कुवार मुली असतात व त्यांना लग्नात सर्व प्रकारची कामे करावी लागतात. ब्राह्मणाकडून लागले गेलेले लग्न, पाटाचे लग्न, पाण्याचा हंडा डोक्यावर घेऊन स्त्री घरात शिरते व घरातल्या पुरुषाशी लग्न लावते ते लग्न, प्रीतिविवाह, तरुणीच्या हातातली बांगडी काढून घेऊन झालेले लग्न, असे ठाकुरांच्या लग्नाचे अनेक प्रकार आहेत.



ठाकूर स्त्री व पुरुष

वर उल्लेखलेल्या प्रकारांपैकी बांगडी काढून घेण्याने जे लग्न होते, ते पुढीलप्रमाणे––

एखादा तरुण नाचात सामील होतो. नाचता नाचता तो आवती भोवती पाहतो. प्रेक्षक मुलींपैकी एखादी मुलगी त्याला आवडली, तर तो तिचा हात धरून तिची बांगडी काढून घेतो. मग ती मुलगी बांगडी काढून घेतल्याची गोष्ट आपल्या बापाला सांगते. नंतर ठाकुरांची जमात एखाद्या आम्रवृक्षाच्या सावलीत भरते. त्या सभेत मुलगा व मुलगी यांना समोर आणतात. तांदुळांवर स्वस्तिक काढून ती बांगडी त्यावर ठेवतात. उभय पक्षांचे कुलशील विचारात घेतले जाते. ते योग्य असल्यास देण्या-घेण्याच्या गोष्टीही ठरतात. मग जमात मुलगा व मुलगी

यांचे आई, बाप, भाऊ यांच्याकडून मुलगी देण्याबाबत व मुलगी स्वीकारण्याबाबत आणा-भाका घेववते व नंतर त्या लग्नाला परवानगी देते.

वरपिता देज म्हणून वीस रुपये, आठ कुडव तांदूळ व एक कुडव डाळ वधूपित्याला देतो. हे देज दोन हप्त्यांनी द्यायचे असते. लग्नसमारंभ वधूच्या घरी होतो. पुरोहित मंगलाष्टके म्हणत असताना वधू-वर विडा तोंडात ठेवतात आणि जमलेले लोक त्यांच्या मस्तकावर काठ्या उभारून धरतात व अक्षता उधळतात. या वेळी वधू-वर हातजुळणी करतात. मग पुरोहित दक्षिणा घेऊन त्यांचे हात सोडवितो. त्यानंतर वधू-वर सोनटक्का नावाचा खेळ खेळतात. दुसऱ्या दिवशी वरात वरगृही जाते. वधू-वरांची बाशिंगे ज्या दोरीने एकत्र बांधतात, तिला मंगळसूत्र असे म्हणतात. नवरी ते वर्षभर आपल्या गळ्यात घालते व मग वाहत्या पाण्यात सोडून देते.

क ठाकुरांच्या लग्नात पुरोहिताची गरज नसते. हळद लावणे व तेलवण हे त्यांचे लग्नातील मुख्य विधी असतात. तेलवणाच्या वेळी एक स्त्री धवळे नावाची लग्नगीते गाते.

मेहुणीशी लग्न करणे ही समाजमान्य प्रथा आहे. लग्न झाल्यावर तरुण वेगळे घर बांधून आई-बापांपासून बाजूला राहतो.

नवरा-बायकोचे पटले नाही, तर ती दोघे घटस्फोट घेतात. ठाकूर त्यासाठी पंचायत बोलावतात. त्या वेळी काडीमोड घेणारी स्त्री आपला गळेसर काढून नवऱ्याच्या बाजूच्या प्रतिनिधीकडे देते. काडीमोड देणाऱ्या नवऱ्याकडून पंचायत पाच रुपये वसूल करते. काडीमोड देणारा नवरा पत्नीच्या नव्या पतीकडून काही रक्कम घेतो.

क ठाकुरांत नवरा व बायको या दोघांचीही संमती असेल, तरच सोडचिठ्ठी दिली जाते.

प्रसूतिप्रथा—ठाकूर लोक सुवेर पाळीत नाहीत. मूल जन्मल्यानंतर पाचव्या दिवशी सटवाईची पूजा करतात. क ठाकूर स्त्रिया चौथ्या दिवशी सटवाईची व पाचव्या दिवशी विहिरीची पूजा करतात.

देवधर्म—ठाकूर लोक भवानी, शंकर, पार्वती, कान्होबा, खंडेराव, वाघ्या, हिरवा, मुंजा, वेताळ, वीर, इ. देवतांना भजतात. या सर्व देवता हनुमान व शंकर यांच्या पुढे निष्प्रभ ठरतात, अशी ठाकुरांची श्रद्धा आहे. याशिवाय ते भुताखेतांनाही भजतात. भूतबाधा झाली असता भगताकडून उपचार करून घेतात.

ठाकुरांना नृत्याची अत्यंत आवड आहे. म ठाकूर यांच्यातील स्त्री-पुरुष एकत्र नृत्य करीत नाहीत. क ठाकूर मात्र तसे करतात. होळी, गोकुळाष्टमी व वाघबारस या सणांना म ठाकुरांचा नाच होत असतो. ज्येष्ठ अमावास्येला त्यांचा नृत्याचा मोसम सुरू होतो, तो आश्विन अमावास्येला संपतो. सर्वसाधारणपणे रात्रीच्या पहिल्या प्रहरात त्यांचे नृत्य चालते. नृत्याला ढोलाची साथ असते. नाचताना गाणीही गातात. ही गाणी लांबलचक असतात. त्यांपैकी एक नमुना असा—

अजि मां धंतरीवरी अजि मां पायु दिलाये ।
अजि मां नाचू केलाये । येडा का वाकुडा ये ।
देवांनीं मान्या केलाये ।।......

कधी कधी या नृत्यगीतांत सवाल—जबाबही होतात व ते दोन दोन दिवस चालतात. नृत्याच्या अंती शंकर-पार्वती, विष्णु, पृथ्वीमाता, चंद्र-सूर्य व प्रेक्षक यांना नमन करतात.

ठाकुरांच्यात जमात भरवून न्यायनिवाडा करण्याची पद्धत आहे. प्रथम गावाची, मग पंचक्रोशीची, मग १४ गावांची, त्यानंतर २१ गावांची व शेवटी ८१ गावांची जमात भरते. या जमातींना उत्तरोत्तर मोठा अधिकार असतो. ८१ गावांची जमात ही सर्वश्रेष्ठ होय. तिने न्याय दिला, की मग पुढे अपील नाही. जमातीच्या सभेत पंचमंडळी बोलतात. जमात भरवणाऱ्याकडून भरल्या सभेला चहा, दारू व जेवण मिळते. जमातीवर सर्व ठाकुरांची जबरदस्त श्रद्धा असते.

मर्तिकप्रथा—म ठाकूर प्रेते पुरतात. क ठाकूर मृताच्या किंवा त्याच्या आप्तांच्या इच्छेनुसार क्वचित प्रेते जाळतात. तिसऱ्या दिवशी पुरलेल्या जागी भात, उडीद व कोंबड्याचे मांस नेऊन ठेवतात. त्याला धाकटा दिवस असे म्हणतात. वार्षिक श्राद्धाच्या दिवशीही असेच करतात. त्याला मोठे पितर असे नाव आहे. म ठाकूर सातव्या किंवा दहाव्या दिवशी क्रिया करतात. क्रियेच्या वेळी विशिष्ट देवतांची पूजा करतात. तेराव्या दिवशी वाडीतले सर्व लोक जवळच्या तळ्यावर जाऊन तिथे दाढी करून आंघोळ करतात, जीवखड्यावर पाणी घालतात, दक्षिणा देतात व मग चहा किंवा दारू पितात.

सिंधमध्येही काही ठाकूर लोक राहतात. तिना राय याला ते आपला मूळ पूर्वज मानतात. सोमाई, बुधाई व घोडेला अशा त्यांच्या तीन पोटजाती आहेत.

पंजाबमधील ठाकुरांना ठक्कर असेही म्हणतात. यांच्यापैकी काही हिंदू व काही मुसलमान आहेत. पश्चिम पंजाबातील ठाकूर नदीची पूजा करतात.

काश्मीरमध्येही बरेच ठाकूर आहेत. त्यानाही ठक्कर असे नाव आहे. हिंदू व मुसलमान या दोन्ही धर्मांत हे लोक आढळतात. काही ठक्कर आर्यसमाजीही आहेत. शेती हा इथल्या ठाकुरांचा प्रमुख व्यवसाय आहे. [ठाकुरस ऑफ दि सह्याद्रि—एल्. एन्. चापेकर, १९६०; सिं. क.; म. ज्ञा. को.; फो. डा. म.; श्री. प. रा. दाते, पेण]

ठाकुरबाबा बुंदेलखंडातला एक देव. हा एक ऐतिहासिक पुरुष असून, तो मरणानतर देव बनला असे सांगतात. हा क्षत्रिय असून, मगधातील शिलादित्य राजाचा मुख्य मंत्री होता व वैदिक धर्माचा अभिमानी होता. याच्याच सल्ल्याने शिलादित्य राजा बौद्ध धर्माच्या विरुद्ध उभा ठाकला व त्याने राजसूय यज्ञ केला, अशी आख्यायिका आहे. बुंदेलखंडी लोकांची अशी श्रद्धा आहे, वा अजूनही ठाकूरबाबा भक्तांना दर्शन देतो व प्रार्थना केली आता लग्नात येणारी विघ्ने दूर करतो. एक पांढरा शिलाखंड ई या ठाकूरबावाचे प्रतीक असते.
[पितांबरराव तैलंग, अजयग]

ठाकूर रवींद्रनाथ (१८१– १९४१ इ. स.) आधुनिक भारततले एक महान कवी आणि तत्त्वज्ञ. यांचे घराणे अनेकशतकांपासून उत्तर आणि पूर्व भारतात कर्तृत्व गाजवीत अे आहे. रवींद्रांचे आजोबा द्वारकानाथ ठाकर यांनी कायद आणि व्यापार या क्षेत्रांत उत्तम लौकिक संपादन केला होता कार, टागोर आणि कंपनी ' या नावाची कंपनी चालवून त्यी अलोट संपत्ती मिळवली होती. त्यांना राजा हे विरुद लाभ होते. इंग्रजी भाषेचे ज्ञान आणि नव्या जगातला मुक्त संचायांमुळे त्यांची वृत्ती सर्वच जीवनक्षेत्रात पुरोगामी बनली हो. एकोणिसाव्या शतकात पाश्चिमात्य संस्कृतीच्या संपर्कानेगालमध्ये जी विचारजागृती सुरू झाली होती, तिच्यात रा राममोहन राय यांच्याबरोबर राजा द्वारकानाथ ठाकूर योही मोठा वाटा उचलला होता.

द्वारकानाथांचे पुत्र देवेंाथ हे जन्मापासूनच धर्मजिज्ञासू होते. सामाजिक क्षेत्राता पैतृक पुरोगामित्वाला त्यांनी अध्यात्माचे अधिष्ठान दिलोणि त्याचमुळे लोक त्यांना महर्षी म्हणून संबोधू लागले. सीचा अमाप वारसा लाभलेला असूनही ते वृत्तीने अंतर्मुखते. पित्याच्या हयातीतच त्यांनी वैदिक धर्माचे पुनरुज्जीवनडवून आणण्यासाठी इ. स. १८३९ मध्ये 'तत्त्वबोधिनी सभस्थापन केली, उपनिषदांवर एक भाष्यग्रंथ लिहिला आणि राजाराम मोहन रायांनी स्थापिलेल्या ब्राह्मो सभेचे त्यांब्राह्मो समाजात रूपांतर केले. अनेक सामाजिक आणिर्मिक संस्थांचा व्याप सांभाळीत असताना ते अधिकाधिक ंुख वनत चालले आणि वारंवार हिमालयाकडे धाव घेऊ ल. त्यांनी आपला प्रपंच परमार्थमय करून टाकला होता. अशा पित्याच्या घरी शारदादेवींच्या उदरी ७ मे १८६१ या दि रवींद्रनाथांचा जन्म झाला.

ठाकुरांचा जोडासाँकोक भव्य वाडा कलकत्त्यातल्या चित्तपूर रस्त्यावर होता. ध साठसत्तर माणसे आणि नोकरचाकर यांमुळे हा वाडा नेहमी गजबजलेला असे. रवींद्रनाथ हे देवेंद्रनाथांचे चौदावे अपत्य होते. रवींद्रांची सर्वच भावंडे कोणत्या ना कोणत्या तरी कलेची उपासना करण्यात आणि नवनव्या ज्ञानशाखांवर प्रभुत्व मिळविण्यात मग्न झालेली होती. जोडासाँकोमधल्या या विविध स्वरूपाच्या साधनेतून पुरुषार्थाची अनेक क्षितिजे उजळत होती. अशा कलाज्ञानसंपन्न वातावरणात रवींद्रांचे बालपण व्यतीत झाले.



ठाकुरांचा वाडा, कलकत्ता

रवींद्रनाथ हे वर्णाने गोरे, रूपाने राजबिंडे, हाडापेराने मजबूत आणि प्रकृतीने निकोप होते. त्यांना आईचा सहवास जवळजवळ लाभलाच नाही. त्यांचे बालपण नोकरांच्या सान्निध्यातच गेले. त्यांना सांभाळण्यासाठी ठेवलेला श्याम नावाचा नोकर त्यांच्याभोवती जादूचे वर्तुळ काढून त्याच्या बाहेर न पडण्याची ताकीद देऊन निघून जात असे आणि मग बाल रवींद्रनाथ त्या वर्तुळाजवळ असलेल्या खिडकीतून वाड्याच्या परिसरातल्या निसर्गाची आणि माणसांच्या हालचालींची वेधक दृश्ये तास न् तास न्याहाळीत बसे.

रवींद्रांना शिकवण्यासाठी घरीच शिक्षक येत असत. शाळेत त्यांचे मन रमू शकले नाही. तिथल्या निर्जीव साचेबंद वातावरणात त्यांचे मुक्त मन गुदमरून जाई. रवींद्रनाथ आठ वर्षांचे होताच आपले थोरले बंधू ज्योतिरिंद्रनाथ यांच्या उत्तेजनाने कविता करू लागले आणि आपल्या विलक्षण प्रतिभेच्या कोवळ्या उन्मेषांनी घरच्या सर्व लोकांना चकित करू लागले. घरी येणारे निरनिराळ्या विषयांचे शिक्षक त्यांना बंगालीतूनच

शिकवीत; त्यामुळे बाल रवींद्रांच्या मनावर मातृभाषेच्या सामर्थ्याचा विशेष प्रभाव पडला.

पुढे ते ओरिएंटल सेमिनरी आणि नॉर्मल स्कूल यांमध्ये थोडे दिवस गेले; पण तिथे त्यांचे मन रमले नाही. नंतर त्यांना बंगाली अकादमीमध्ये घातले; परंतु तिथे एके दिवशी लॅटिनच्या व्याकरणाची घोकंपट्टी करण्याचे त्यांनी नाकारले आणि 'ठाकुरांची मुले याहून अधिक चांगल्या गोष्टी करण्यासाठी जन्मास आलेली असतात,' असे शिक्षकांना सांगून घर गाठले. नंतर त्यांना सेंट झेविअर्स विद्यालयात घातले होते, पण तिथेही ते रमले नाहीत.

मुंज झाल्यानंतर ते वडिलांवरोबर हिमालयात जाऊन आले. हिमालयातल्या अनुपमेय निसर्गलावण्याने त्यांचे हृदय भारावून गेले. या प्रवासात रवींद्रांना वडिलांच्या सान्निध्यात अनेक चांगल्या गोष्टी शिकायला मिळाल्या. हिमालयातून परतल्यावर त्यांना सर्व घरात मोकळेपणा लाभू लागला. त्यांच्या वाचनगायनाचे आणि त्यांच्या नवनव्या कवितांचे घरातल्या सर्व लोकांकडून कौतुक होऊ लागले. इ. स. १८७५ मध्ये हिंदू मेळाच्या वार्षिकोत्सवात त्यांनी एक स्वरचित राष्ट्रीय कविता म्हणून दाखविली. त्याच वर्षी त्यांची आई निवर्तली आणि त्यांचे बंधू ज्योतिरिंद्रनाथ यांची पत्नी कादंबरीदेवी हिने रवींद्रांचे संगोपन करण्याची जबाबदारी प्रेमाने अंगिकारली. या रसिक वहिनीच्या प्रेमळ सान्निध्यात रवींद्रांच्या प्रतिमावेलीवर नवनवी सुगंधी काव्यसुमने वहरू लागली.

रवींद्रनाथ इ. स. १८७८ मध्ये आपले ज्येष्ठ बंधू सत्येंद्रनाथ यांच्याकडे अहमदाबादला राहायला गेले. बंधूंनी त्यांना इंग्लंडला पाठविण्याचे ठरविल्यावर इंग्रजी रीतिरिवाजांची माहिती व्हावी, म्हणून मुंबईच्या प्रसिद्ध तर्खंड कुटुंबात त्यांना काही काळ ठेवण्यात आले. तर्खडांच्या घरी डॉ. आत्माराम पांडुरंग तर्खंड यांची कन्या अन्नपूर्णा ऊर्फ ॲना हिच्याशी त्यांचा परिचय झाला. ही आंग्लविद्याविभूषित आणि युरोपात जाऊन आलेली मुलगी रवींद्रांवर आणि त्यांच्या भावमधुर कवितांवर मोहित झाली; परंतु रवींद्रांनी तिच्या प्रीतिभावाला प्रतिसाद दिला नाही. पुढे रवींद्रांची ही भग्नहृदय प्रेयसी क्षयाने मृत्यू पावली.

इ. स. १८७८ च्या सप्टेंबरात रवींद्र आपले बंधू सत्येंद्रनाथ यांच्यासह इंग्लंडला गेले. तिथे ब्रायटन येथील विद्यालयात त्यांचे नाव दाखल केले. त्यानंतर त्यांना लंडनच्या युनिव्हर्सिटी कॉलेजात प्रवेश मिळाला. परंतु रवींद्रनाथ इ. स. १८८० मध्ये कोणताही अभ्यास पुरा न करताच स्वदेशी परत आले. युरोपातल्या या पहिल्या फेरीत त्यांनी अनेक पाश्चात्य कलावंतांशी संपर्क साधला आणि युरोपीय संगीताचाही अभ्यास केला.



श्री. मृणालिनीदेवी

परत आल्यावर इ. स. १८८१ मध्ये त्यांनी 'वाल्मीकिप्रतिभा' हे संगीत नाटक लिहून त्याचा प्रयोगही आपल्या घरी केला. या नाटकात त्यांनी स्वत: वाल्मीकीची भूमिका केली होती. याच वर्षी 'बौ ठाकुराणीर हाट' ही त्यांची पहिली कादंबरी 'भारती' मासिकातून क्रमश: प्रसिद्ध होऊ लागली. दि. ९ सप्टेंबर १८८४ या दिवशी वेणीमाधव रायचौधुरी यांची कन्या भवतारिणी हिच्याशी त्यांचा विवाह झाला. त्यांच्या पत्नीचे सासरचे नाव मृणालिनीदेवी असे ठेवण्यात आले. विवाहापूर्वी अशिक्षित असूनही ठाकुरांच्या घ आल्यावर मृणालिनीदेवीनी ज्ञानोपार्जनात पुष्कळच प्रगती केलआणि रवींद्रांच्या जीवनात सहधर्मिणीचे स्थान यथार्थपणे भूषले.

त्यानंतर पाचच महिन्यांनी रवींद्रांच्या काव्याची स्फूर्तिदात्री आणि त्यांचे सर्वांगीण संगो करणारी त्यांची प्रेमळ वहिनी कादंबरीदेवी हिने आत्मश केली. कादंबरीदेवींच्या आत्महत्येमुळे रवींद्रांच्या कविहृदला अपरिमित दुःख झाले.

इ. स. १८९१ ते १९०१ या लात मानसी, सोनार तरी, विसर्जन, चोखेर वाली, नैवेद्य, झाहित्यकृती त्यांनी प्रसिद्ध केल्या. या काळात त्यांनी साधनाारती, वंगदर्शन या नियतकालिकांचे संपादनही केले. घरच्चजमीनदारीची व्यवस्थाही या वेळी त्यांच्याकडेच होती. जमीरीच्या व्यवस्थेच्या निमित्ताने त्यांचा आपल्या हिंदू-मुरि कुळांशी जवळून संबंध आला आणि त्या संबंधामुळे त्यां अनुभवाच्या कक्षा अधिक विस्तृत बनल्या.

नंतरच्या तीन-चार वर्षांत रांवर अनेक सांपत्तिक आणि कौटुंबिक आपत्ती कोसळल्या. २ सेंबर १९०२ रोजी त्यांच्या पत्नी मृणालिनी देवी निधन ल्या. त्यानंतर लवकरच त्यांची चौदा वर्षांची कन्या रेणुत्री हिचाही अंत झाला. इ. स. १९०४ मध्ये शांतिनिकेतना त्यांचे सहकारी सतीशचंद्र राय मृत्युमुखी पडले आणि इ. १९०५ मध्ये त्यांचे वडील महर्षी देवेंद्रनाथ ठाकूर हे देखीालवश झाले.

ठाकूर कुटुंबावर इंग्रजी विद्या आणि चालीरीती यांचा विशेष प्रभाव असला, तरी ते देशभक्तीला पारखे बनले नव्हते. रवींद्रांच्या मनावर बालपणापासूनच देशभक्तीचे दृढ संस्कार घडलेले होते. देशाच्या स्वातंत्र्यासाठी झिजणाऱ्या, झगडणाऱ्या वीरांबद्दल त्यांना परमादर वाटत असे. इ. स. १८९८ मध्ये त्यांनी सरकारच्या प्रतिगामी धोरणाबद्दल आणि विशेषतः लो. टिळकांना केलेल्या अटकेबद्दल रान उठविले. इ. स. १९०१ ते १९०४ या काळात ते राजकारणाशी विशेष समरस झाले. टिळकांनी सुरू केलेल्या शिवाजंती-उत्सवाला त्यांनी सक्रिय पाठिंबा दिला आणि शिवछत्रपतींवर एक प्रभावी कविता रचून ती कलकत्त्याच्या टाऊन हॉलमधे झालेल्या उत्सवात स्वतः गाऊन दाखविली. लोकमान्यांना रवींद्रांविषयी विशेष आदरभाव होता. रवींद्रनाथ युरोपच्या दौऱ्यावर निघाले असताना त्यांनी रवींद्रांना पन्नास हजार रुपयांचा चेक पाठविला होता.

इ. स. १९०५ नंतर राजकारणाला दहशतवादी वळण लागल्यामुळे रवींद्रनाथ प्रत्यक्ष राजकारणातून बाजूला झाले. इ. स. १९०७ पासून 'प्रवासी मासिकात त्यांची गोरा ही प्रसिद्ध कादंबरी क्रमशः प्रसिद्ध होऊ लागली. इ. स. १९१० मध्ये 'गीतांजली'तली गीते रचली गेली. इ. स. १९१२ च्या जानेवारीत वंगीय साहित्य परिषदेने त्यांचा बावन्नावा वाढदिवस उत्साहाने साजरा केला. याच वेळी त्यांची प्रकृती बिघडली आणि त्यांच्या डॉक्टरांनी त्यांना उपचारासाठी विलायतेला जाण्यास सांगितले. त्यापूर्वी काही काळ आणि बोटीच्या प्रवासातही त्यांनी आपल्या अनेक गीतांचे इंग्रजी रूपांतर केले. ही इंग्रजीत अनुदलेली गीते तिथल्या रसिकांना अत्यंत आवडली आणि श्री. डब्ल्यू. बी. यीट्स् या गूढवादी कवीच्या प्रस्तावनेसह त्या गीतांची एक मर्यादित आवृत्ती 'गीतांजली' या नावाने प्रकटही झाली. इ. स. १९१३ मध्ये इंग्रजी गीतांजलीला प्रसिद्ध नोबेल पारितोषिक मिळाले आणि रवींद्रांची काव्यकीर्ती जगभर पसरली.



रवींद्रनाथांची नौका – पद्मा

'गीतांजली'ला नोबेल पारितोषिक मिळाल्यानंतर रवींद्रांच्या पुस्तकांची इंग्रजी, जर्मन, फ्रेंच, इटालियन, स्वीडिश, डॅनिश, हिब्रू, इ. भाषांत भाषांतरे झाली. तसेच त्यांना अनेक देशांतून गौरवाने निमंत्रणेही आली. या निमंत्रणांना मान देऊन इ. स. १९१६ ते १९३० पर्यंतच्या काळात त्यांनी युरोपातल्या व पूर्व आशियातल्या देशांना भेटी दिल्या. अनेक देशांत त्यांचे भव्य सत्कार झाले; तिथल्या विद्यापीठांनी आणि सांस्कृतिक संस्थांनी त्यांना मानाच्या पदव्या दिल्या आणि रसिकांनी मुक्त मनाने त्यांच्या कवितांचा गौरव केला.

प्रत्यक्ष राजकारणातून ते बाजूला झाले असले, तरी देशाच्या स्वातंत्र्यासाठी आणि देशबांधवांच्या सर्वांगीण उत्थानासाठी त्यांचे मन सदैव जागृत होते. इ. स. १९१९ मध्ये सरकारने पंजाबात जालियनवाला बागेत केलेल्या अत्याचाराचा निषेध म्हणून त्यांनी 'सर' या सरकारी पदवीचा त्याग केला. टिळकांच्या मृत्यूनंतर सुरू झालेल्या गांधीयुगात त्यांना राजकीय नेत्यांचा रोष सहन करावा लागला. परंतु आपल्या विचारांशी प्रामाणिक राहून ते आपल्या परीने जनजागृतीचे कार्य करीतच राहिले. त्यांचा राजकीय दृष्टिकोन इतर राष्ट्रीय पुढाऱ्यांच्या दृष्टिकोनाहून वेगळा होता. ब्रिटिशांची सत्ता झुगारून देऊन भारताला स्वतंत्र करण्याच्या प्रयत्नांत आपण पाश्चिमात्त्य संस्कृतीविषयीचा द्वेष वाढू देता कामा नये, असे त्यांना वाटे. पूर्व आणि पश्चिम यांचा मनोहर मिलाफ कसा होईल, याची तळमळ त्यांच्या सर्व जीवनव्यवहारात दिसून येई. संस्कृतिसंगमाचे हे ध्येय पुढे ठेवूनच त्यांनी विश्वभारती या संस्थेची उभारणी केली. त्यांनी जीवनाच्या अखेरीस निर्माण केलेल्या कलाकृतींतूनही त्यांचे विश्वाला गवसणी घालू पाहणारे उदार आणि उदात्त मन सहस्र कळांनी व्यक्त झाले आहे.



रवींद्रनाथ ठाकूर

रवींद्रनाथ हे क्रियावान तत्त्वज्ञ आणि कवी होते. आपले जीवनदर्शन कृतीत उतरविण्यासाठी त्यांनी शांतिनिकेतनात प्रयत्नांची पराकाष्ठा केली. आपल्या कार्याच्या परिपूर्तीसाठी त्यांनी स्वतः तनमनधन तर वेचलेच; परंतु भारतातल्या आणि विदेशातल्याही अनेक व्यक्तींचे त्या कामी सहकार्य मिळविले.

रवींद्रनाथांना जीवनात जसे अपरिमित वैभव लाभले, तसेच त्यांना नाना प्रकारच्या आपत्तींशीही झगडावे लागले. परंतु सुख-दुःख काहीही येवो; त्यांनी आपल्या सौंदर्यसाधनेत कधीही खंड पडू दिला नाही.

दि. ७ ऑगस्ट १९४० या दिवशी ऑक्सफर्ड युनिव्हर्सिटीने शांतिनिकेतनात खास समारंभ करून त्यांना डॉक्टरेटची पदवी दिली. त्यासाठी युनिव्हर्सिटीने सर मॉरिस ग्वायर आणि डॉ. राधाकृष्णन् यांना नियुक्त केले होते. त्यानंतर १४ एप्रिल १९४१ रोजी शांतिनिकेतनात त्यांचा ऐंशीवा वाढदिवस थाटाने साजरा झाला. या प्रसंगी त्यांचे 'संस्कृतीवरील संकट' हे सुप्रसिद्ध भाषण वाचून दाखविण्यात आले. या वेळी त्यांची प्रकृती अत्यंत क्षीण झालेली होती. याही स्थितीत त्यांना उत्तमोत्तम कविता स्फुरतच होत्या. अखेरीस ७ ऑगस्ट १९४१ या दिवशी त्यांचे सौंदर्यात्म जीवन विश्वातल्या अनंत सौंदर्याशी कायमचे एकरूप होऊन गेले. मृत्यूपूर्वी त्यांनी आपल्या मातृभूमीविषयी उद्गार काढले, ते असे--

मी भारतात पुनः पुनः जन्म घेईन. भारतात कितीही दारिद्र्य, दुःख आणि दैन्य असले, तरी भारतावर माझे अत्यंत प्रेम आहे.

भारतावर इतके प्रेम करणाऱ्या रवींद्रनाथांनी पारतंत्र्याच्या काळातही आपल्या देशाचा गौरव त्रिखंडात गाजवला; औपनिषदिक ऋषींचा वैचारिक वारसा समृद्ध केला; नव्या जगाला पटेल-पचेल अशा स्वरूपात भारतीय विचारधारेची मांडणी केली; व्यास-वाल्मीकींच्या आणि कविकुलगुरू कालिदासाच्या काव्यसंस्कारांनी समृद्ध बनलेल्या त्यांच्या प्रतिभेने सौंदर्याची नदनवी निधाने प्रकट केली आणि भारतीय संस्कृतीतल्या सर्व सत्त्वांशांचे संश्लेषण करून जीवनाचा उच्चतम आदर्श आधुनिक जगापुढे ठेवला. महान तत्त्वज्ञ व कवी म्हणून त्यांचे स्थान अबाधित राहीलच; परंतु भारतीय संस्कृतीचे महान प्रतिनिधी म्हणूनही त्यांची योग्यता विशेष मानायला हवी.

रवींद्रसाहित्य -- रवींद्रांचे साहित्य हे महासागरासारखे अपार आणि अथांग आहे. कविता, गीते, नाटच, कथा, कादंबरी, निबंध, प्रबंध, समीक्षा, पत्र, प्रवासवर्णन, इ. अनेकानेक प्रकार त्यांनी हाताळले आहेत. खरे म्हणजे रवींद्रनाथांची प्रतिभा व प्रकृती महाकवीची होती. त्यामुळे त्यांच्या काव्येतर लेखनातही काव्यात्मता दाटून राहिलेली दिसते.

रवींद्रनाथांनी आपली पहिली कविता वयाच्या अकराव्या वर्षी लिहिली. तेव्हापासून मृत्यूची चाहूल लागेपर्यंत त्यांची काव्यसाधना अखंड चालू होती. या सत्तर वर्षांच्या कालखंडात त्यांचे पन्नास काव्यसंग्रह प्रकाशित झाले. हजारांवर कविता आणि दोन हजारांवर गीते एवढा त्यांनी रचलेला काव्यसंभार आहे. त्यांच्या काव्यात वैपुल्याबरोबरच विविधतेचे सौंदर्य आहे आणि वागर्थांचे मधुर संमीलनही आहे. संगीताची वेधशक्ती लाभलेली अर्थघन शब्दकळा प्रकट करण्यात रवींद्रांनी असाधारण यश मिळविले आहे. विविध भाववृत्तींच्या सूक्ष्मातिसूक्ष्म छटांना ते लीलया चैतन्य प्रदान करू शकत. त्यांच्या कवितांत शिशुभाव आहे; स्त्रीभाव आहे; पुरुषभाव आहे; निसर्ग, राष्ट्र व समाज यांच्याविषयीचा भक्तिभाव आहे आणि या साऱ्यांतून आपल्या अनंत कळा प्रगट करणाऱ्या लीलालाघवी परमेश्वराविषयीचा समर्पणभवही आहे. या सर्व भाववृत्ती परतत्त्वस्पर्शाने अनुप्राणित झलेल्या असल्यामुळे महाकाव्य न रचताही रवींद्रांना महाकवित्व लाभले आहे.

रवींद्रनाथांचा कविपिंड जसा वेदोपनिषदांनी पोसलेला आहे, तसाच व्यास-वाल्मीकी आणि कविकुलगुरू कालिदास यांचा महान वारसाही त्यांना लाभला आहे. मृत्यूचेही परतीर पाहू शकणारी औपनिषदिक ऋषींच्या प्रज्ञेची झेप पाहून ते भारावले; वाल्मीकींची सहजता त्यांना विलोभनीय वाटली आणि गूढ मानवजीवनाचे रहस्य लीया उलगडू शकणारी व्यासांची निकोप आर्ष दृष्टी त्यांना भिलषणीय वाटली. चोखंदळ सौंदर्यदृष्टीने जीवन आनंदमय करू पाहणारा कालिदास हा तर रवींद्रांच्या जीवाचा जिव्हाळाच होता. रवींद्रांच्या कवितेवर आणि काव्यदृष्टीवर कालिदासाचा एवढा प्रभाव आहे, की ते आधुनिक युगातले कालिदासच अवतार वाटतात. मध्ययुगीन वैष्णव कवी, कबीर-दद्-रज्जब यांसारखे मुक्तचिंतक आणि मानुषतत्त्वाला सर्वोच्च मानणारे बंगाली बाऊल यांच्या गीतांनीही रवींद्रांवर अपरिमित भाव पाडलेला दिसतो. वैष्णव कवींच्या सरणीत त्यांनी प्रभकाळात भानुसिंह या टोपणनावाने रचलेली गीते " भानुसिंह ठाकुरेर पदावली ' या नावाने इ. स. १८८४ मध्ये प्रसिद्ध झाली. ही गीते प्रकाशित होताच बंगाली रसिकांना एक अज्ञात प्राचीन वैष्णव कवी प्रकाशात आल्याचा आनंद झाला. ब्रजबोलीमध्ये लिहिलेल्या या पदावलीतले एक गीत असे --

गहन कुसुम-कुंज माझे मृदुल-मधुर वंशी बाजे
विसरि त्रास लोकलाज सजनी आओ आओ लो ।
अंगे चारु नील-बास हृदे प्रणय-कुसुम रास
हरिण-नेत्रे विमल हास कुंज बन-में आओ लो ।
ढाले कुसुम सुरभि-भार ढाले विहग सुख-सार
ढाले इंदु अमृत-धार विमल रजत-भाति रे ।
मंद मंद भ्रमर गुंजे अयुत कुसुम कुंजे कुंजे
फुटल सजनी पुंजे पुंजे बकुल जूथि जाति रे ।

देख सजनी श्यामराय नयने प्रेम उथल जाये
मधुर बदन अमृत-सदन चन्द्रमाइ निन्दिचे ।
आओ आओ सजनी-वृन्द हेरब सखी श्रीगोविन्द
श्याम को पदारविन्द भानुसिंह बन्दिचे ।

अर्थ – गहन कुसुमकुंजात मृदु मधुर वेणू वाजत आहे. भय आणि लोकलज्जा विसरून, सजणी ! ये. सुंदर शरीरावर नीलवस्त्र परिधान करून, हृदयात प्रणयाचे पुण्य विकसित करून आणि आपल्या मृगनयनांत हास्य खुलवून तू कुंजवनात ये. फुले आपला सुगंध उधळीत आहेत. पक्षी आपले सुखद स्वर वातावरणात फेकीत आहेत. चंद्रमा आपल्या अमृतधारांचा वर्षाव करीत आहे. सर्वत्र शुद्ध रुपेरी चांदणे विखुरले आहे. भ्रमर मंद मंद गुंजारव करीत आहेत. कुंजाकुंजात फुले खुलली आहेत. हे सखी, फुलांचे समूहच्या समूह प्रस्फुरित होत आहेत. वकुल आणि जाई-जुईही फुलली आहे. सखी, पहा श्यामराय आपल्या नेत्रांतून प्रेमाचा शिडकाव करीत आहे. त्याचे मधुर मुख अमृताचे सदन आहे. ते चंद्रम्याला तुच्छ लेखीत आहे. ये, सखी ! ये. भानुसिंह श्रीगोविंदाच्या चरणांना वंदन करीत आहे.

जीवन हा रवींद्रांच्या कवितेचा धर्म आहे. त्याचमुळे त्यांच्या आंतरिक विकासाबरोबर त्यांची कविताही गतिमानतेने परमसिद्धीच्या महासागराकडे झेपावत गेलेली दिसते. निर्झरेर स्वप्नभंग या त्यांच्या साक्षात्कारी कवितेत त्यांच्या दुर्दान्त आत्मशक्तीचे स्पष्ट चित्र उमटले आहे ––

जागिया उठेछे प्राण, ओरे उथलि उठेछे बारि,
ओरे प्राणेर वेदना, प्राणेर आवेग रुधिया राखिते नारि ...
भांग रे हृदय, भांग रें बांधन, साध रे आजिके प्राणेर साधन,
लहरीर परे लहरी तुलिया आघातेर परे आघात कर ।...
आमि ढालिबो करुणाधारा आमि भांगिबो पाषाणकारा
आमि जगत् प्लाबिया बेडाबो गाहिया आकुल पागल पारा ।...
की जानि की होलो आजि, जागिया उठिलो प्राण
दूर हते शुनि जॅनो महासागरेर गान ।

अर्थ – अरे, आता हृदय जागृत झाले आहे. प्राणी उफाळत आहे. या हृदयातली वेदना व आवेग आता मला अनावर झाले आहेत...अरे, आता हे हृदय भग्न कर. हे बंधन तोडून फोडून टाक. जीवनसाधना साध्य कर. लाटांमागून लाटा उसळीत तू एकामागून एक आघात कर...मी करुणाधारा ओतीन. पाषाणाचे कारागृह फोडून सारे जग व्यापीत मी चंचल वेडयाप्रमाणे सर्वत्र गाणे गात फिरेन...आज मला काय झाले आहे न कळे. हृदय जागृत होऊन, दुरून मला जणू महासागराचे गीत ऐकू येत आहे.

रवींद्रांची ही आत्म-निर्झरिणी पाषाणाची कारा उल्लंघून ज्या महासागराकडे झेप घेत आहे, तो महासागर म्हणजे अखिल मानवजात होय. विश्वनृत्य या कवितेत ते म्हणतात ––

हृदय आमार क्रन्दन करे मानव-हृदय मिशिते ।
निखिलेर शाथे महाराजपथे चलिते दिवस निशिये ।
आजन्म काल पडे आछि मृत जडतार माझे हये पराजित,
ॲकटि बिन्दु जीवन-अमृत के गो दिबे एइ तृषिते ।।

अर्थ – मानवहृदयाच्या व्यापक मीलनासाठी माझे हृदय आक्रंदत आहे. विस्तृत राजपथावर अखंड जगताच्या सहवासात रात्रंदिवस अग्रेसर होण्यासाठी ते तळमळत आहे. जन्म झाल्यापासून जडतेमध्ये पराजित होऊन मी मृतवत् पडून आहे. जीवनामृताचा एखादा थेंब या तृषिताच्या मुखात कोण घालील बरे?

मानवाइतकेच रवींद्रांचे निसर्गावर अपार प्रेम आहे. कारण सकल स्थिरचरात एकच सौंदर्यतत्त्व व्यापून राहिले आहे, अशी त्यांची श्रद्धा आहे, तशी प्रतीतीही आहे. विशेषत: वर्षेच्या धारानृत्यात त्यांचा चित्तमयूर प्रतिमेचा चित्र-विचित्र पिसारा फुलवून धुंदपणे नर्तन करू लागे, असे त्यांच्या अनेक कवितांवरून दिसते. नववर्षा या कवितेत वर्षागमाचा आनंद व्यक्त करताना ते म्हणतात ––

नयने आमार सजल मेघेर नील अंजन लेगेछे, नयने लेगेछे ।
नवतृणदले घनवनछाये हरष आमार दियेछि बिछाये
पुलकित नीपकुंजे आजि विकसित प्राण जेगेछे ।
नयने सजल स्निग्ध मेघेर अंजन लेगेछे।।

अर्थ– सजल मेघांकडे पाहताना माझ्या डोळयात पडणारी त्यांची घनछाया मला स्निग्ध काजळासारखी सुखदायक वाटत आहे. या श्यामल हिरवळीत, वृक्षांच्या घनदाट छायेत माझा आनंद सामावला आहे. बहरलेल्या कदंबाच्या कुंजात माझे मन आज उल्हासाने जागृत झाले आहे. माझ्या डोळयात सजल स्निग्ध मेघांचे काजळ पडले आहे.

रवींद्रांच्या कवितांत जसे कोमल भावनांचे लास्य आहे, तसेच रुद्र भावनांचे तांडवही आहे. त्यांच्या देशभक्तिपर कविता अत्यंत ओजस्वी आहेत. शिवाजी–उत्सव या कवितेत त्यांनी गायिलेली शिवप्रभूंच्या चरित्रचारित्र्याची प्रशस्ती हा त्यांच्या प्रखर देशभक्तीचाच अप्रत्यक्ष आविष्कार आहे. त्यांचे जन-गण-मन हे गीत आता स्वतंत्र भारताचे राष्ट्रगीत बनले आहे.

रवींद्रांची विश्वकवी म्हणून ख्याती झाली, ती इंग्रजी गीतांजलीला इ. स. १९१३ मध्ये नोबेल पारितोषिक मिळाल्यानंतर. मूळ बंगाली गीतांजलीत १५७ गीते आहेत; तर इंग्रजी गीतांजलीत १०३ गीते आहेत. गीतांजलीइतकेच बलाका, शोनार तरी, चित्रा हे त्यांचे काव्यग्रंथही श्रेष्ठ आहेत. परंतु गीतां-



रवींद्रांचे शांतिनिकेतन येथील निवासस्थान

जलीत रवींद्रांच्या आध्यात्मिक साधनेची अभिव्यक्ती अत्यंत श्रेष्ठ पातळीवरून झालेली असल्यामुळे तिचे महत्त्व विशेष आहे. गीतांजलीत परमेश्वराच्या मीलनासाठी आसुसलेल्या भक्ताची विरहवेदना, त्याची आत्मशुद्धीची तगमग, निसर्ग व मानवप्रेम यांतून घडणारी परमात्म्याची क्षणदर्शने आणि सान्ताच्या रूपाने चालणारी अनंताची रहस्यमय लीला यांचे आविष्करण आहे. त्या असीम परमेश्वराला उद्देशून रवींद्रनाथ म्हणतात–

सीमार माझे, असीम तुमि बाजाओ आपन सुर।
आमार माझे तोमार प्रकाश ताइ अँतो मधुर।
कतो वर्णे कतो गन्धे कतो गाने कतो छन्दे
अरूप, तोमार रूपेर लीलाय जागे हृदयपुर।
आमार माझे तोमार शोभा अँमन सुमधुर।

अर्थ – हे असीमा, सीमेमध्ये तू आपले स्वर छेडतोस, म्हणूनच माझ्यातली तुझी अभिव्यक्ती इतकी सुमधुर आहे. किती तरी वर्ण-गंध-गीत-छंदांत व्यक्त होणाऱ्या तुझ्या रूपलीलेने माझे हृदयनिकेतन जागृत होते. म्हणूनच हे अरूपा, माझ्यातली तुझी शोभा अशी सुमधुर आहे.

रवींद्रांची कविता ही अशी परतत्त्वस्पृष्ट आहे. तिच्यात भारतीय संस्कृतीतले सर्व सत्त्वांश नव्या उल्हासाने रसरशीत बनून प्रकटले आहेत. म्हणूनच रवींद्रनाथ हे विश्वसाहित्यात भारताचे प्रतिनिधी कवी ठरले आहेत.

रवींद्रांनी काव्यरचनेप्रमाणेच कथालेखनही अल्पवयातच सुरू केले. क्षुधित पाषाण ही गाजलेली कथा त्यांनी पंधराव्या वर्षी लिहिली. 'गल्पगुच्छ' या नावाने तीन खंडांत त्यांच्या बहुतेक कथा एकत्र प्रकाशित झालेल्या आहेत. त्यांची संख्या चौऱ्यायंशी आहे. यांतल्या अर्ध्या–अधिक कथा इ. स. १८९१ ते १८९५ या पाच वर्षांत निर्माण झालेल्या आहेत. इ. स. १९१७ नंतर मात्र रवींद्रांचे कथालेखन थांबले.

रवींद्रांच्या कथांत जीवनाचे विराट, अथांग आणि जटिल स्वरूप जसे प्रस्फुटित होते, तसेच जीवन हे दुःखातून व संभ्रमातून कुठल्या तरी अनिवार प्रेरणेमुळे अविनाशी आनंदाकडे धाव घेत आहे, हे सत्यही त्यातून रसिकांना प्रतीत होते. चिरंतन सत्यांचा सहजोत्कट प्रत्यय घडविणाऱ्या प्रतीकात्मकतेमुळे त्यांच्या अनेक कथा काव्याच्या पातळीवर गेलेल्या आहेत.

बंकिमचंद्र चतर्जींच्या कादंबऱ्या वाचून रवींद्रांना कादंबरीलेखनाची स्फूर्ती लाभली. बौ ठाकुराणीर हाटे आणि राजर्षी या दोन ऐतिहासिक कादंबऱ्या त्यांनी बंकिमबाबूंच्या प्रभावातूनच लिहिल्या. या दोन पहिल्या कादंबऱ्यांनंतर पंधरा-सोळा वर्षांनी त्यांनी नष्ट नीड ही लघुकादंबरी लिहिली. या कादंबरीत रवींद्रांची स्वतंत्र शैली प्रकट होऊ लागलेली दिसते. त्यांची चोखेरबाली ही कादंबरी बंगाली साहित्यात अनेक दृष्टींनी आगळी ठरलेली आहे. या कादंबरीत बाह्य घटनांच्या चित्रणाऐवजी पात्रांच्या मानसिक क्रिया–प्रतिक्रियांचा सूक्ष्म संघर्ष चित्रित केलेला आहे.

नौका डुबी या कादंबरीच्या निर्मितिकाळापर्यंत रवींद्रांचे लक्ष मुख्यतः व्यक्तींचे कौटुंबिक संबंध आणि त्यांतून फुलणारे भावनाट्य यांचे दर्शन घडविण्याकडे होते. पण गोरा या कादंबरीत त्यांनी आपल्यासमोर घडत असलेल्या समाजसंक्रमणाचा इतिहास साकार करण्याचा प्रयत्न केला आहे. या कादंबरीचा नायक गोरा हा जन्माने आयरिश आणि संस्कारांनी हिंदू असून, स्वातंत्र्यासाठी तळमळणाऱ्या आणि राजकीय व सामाजिक गुलामगिरीविरुद्ध क्षुब्ध होऊन उठलेल्या भारताच्या नवजागृत आत्म्याचा तो प्रतिनिधी आहे. कथा, पात्रे, प्रसंग, व्यक्तिरेखन, तत्त्वचिंतन, जीवनदर्शन आणि उद्बोधन या सर्वच दृष्टींनी या कादंबरीने असाधारण यश मिळविले आहे. घरे बाहिरे ही बंगालच्या फाळणीच्या पार्श्वभूमीवर लिहिलेली आणि स्वदेशी चळवळीच्या परिणामांची चिकित्सा करणारी कादंबरी निखिल, संदीप आणि विमला या तीन पात्रांच्या आत्मनिवेदनातून सांगितलेली आहे. एका घराण्याच्या तीन पिढ्यांची कथा सांगण्यासाठी लिहायला घेतलेली योगायोग ही त्यांची कादंबरी मात्र अपुरीच राहिली. शेषेर कविता ही कादंबरी गद्य आणि पद्य या उभय शैलींचा उपयोग करून संस्कृतातल्या चंपूकाव्याच्या तंत्रात लिहिलेली असून, ती विनोद, उपरोध, काव्य, तत्त्वचिंतन व जीवनदर्शन यांची पंचरसी मूर्तीच ठरली आहे.

रवींद्रांची अखेरची कादंबरी चार अध्याय ही होय. असहकाराच्या चळवळीनंतर बंगालमध्ये जी क्रांतिकारकांच्या चळवळीची लाट उसळली, तिची मूल्ये आणि उद्दिष्टे तपासून पाहण्याचा प्रयत्न रवींद्रनाथांनी या कादंबरीत केलेला आहे.

रवींद्रांच्या प्रतिभेची सृजनलीला नाट्यक्षेत्रात विशेष अनुभवाला येते, वाल्मीकिप्रतिभा हे पहिले गीतिनाट्य त्यांनी इ. स. १८८१ मध्ये लिहिले. त्यानंतर पुढील पाच तपांच्या जीवनकालात त्यांनी लहान मोठी चौतीस नाटके लिहिली. त्यांत गीतिनाट्ये, नाट्यकाव्ये, नृत्यनाट्ये, नाटके, नाटिका, प्रहसने आणि नाट्यसंवाद असे विविध प्रकार आहेत. त्यांतल्या काही कृती सर्वस्वी नवीन आहेत, तर बऱ्याचशा त्यांच्या पूर्वलिखित कथांच्या, कादंबऱ्यांच्या आणि कवितांच्या नाट्यवृत्ती आहेत. नाट्यक्षेत्रात त्यांनी केलेल्या प्रयोगांचे सौंदर्य अखेरच्या कालखंडातल्या नृत्यनाट्यात शिगेला पोचले. नवीन, शिशुतीर्थ, शापमोचन, चित्रांगदा, चंडालिका व श्यामा ही त्यांची नृत्यनाट्ये होत. यांत काव्य, संगीत, नृत्य आणि नाट्य यांचा मधुर मिलाफ झालेला दिसतो. नाटके लिहिणे, ती बसवणे व त्यांत स्वतः कामे करणे अशा सर्व बाबींत त्यांनी रस घेतला आणि त्यामुळे नाटककार, नट, नर्तक व दिग्दर्शक या सर्व भूमिकांत त्यांना भरघोस यश लाभले.

रवींद्रनाथ हे प्रकृतीने गंभीर व तत्त्वचिंतक खरे; पण त्यांना खळखळून हसण्याची आणि हसविण्याची सिद्धीही लाभलेली दिसते. बैकुंठेर खाता यासारख्या प्रहसनातून ते मानवी स्वभावातल्या व्यंगांचे आणि विसंगतींचे दर्शन घडवून प्रेक्षकांना मुक्तपणे हसायला लावतात.

रवींद्रनाथांची नाटके वाचण्यासाठी नसतात. ती पाहिल्यावाचून आणि ऐकल्यावाचून त्यांचे सौंदर्य प्रतीत होत नाही. नाटकाविषयीच्या रूढ कल्पना, रंगभूमीच्या मर्यादा व तिची पथ्ये रवींद्रनाथ जुमानीत नाहीत. त्यांच्या ‘ फाल्गुनी ’ नाटकातल्या कवीने म्हटल्याप्रमाणे त्यांच्या नाटकांना कसल्याच सीनसिनरीची जरूरी पडत नाही. त्यांना पार्श्वभूमी लागते ती केवळ मनाची. त्या पार्श्वभूमीवर ते संगीताच्या कुंचल्याने चित्र रंगवितात. त्यामुळे रवींद्रांची नाटके पाहताना प्रेक्षकांना काव्यरसिकाची भूमिका सांभाळावी लागते. नेपथ्यामुळे प्रेक्षकांच्या स्वाभाविक कल्पनाशक्तीला अकारण मर्यादा पडते, असे त्यांचे मत होते.



शांतिनिकेतनामधील एक पर्णकुटी

काव्य–संगीताचे वाहन म्हणून नाट्याचा उपयोग करण्याची रवींद्रांची दृष्टी असल्यामुळे त्यांची सर्व नाट्यसृष्टी प्रतीकात्मक बनली आहे. त्यांतला शब्द न् शब्द व्यापक अर्थाचा व व्यंजक आहे. त्यांच्या नाटकांतली बहुतेक पात्रे तदन्तर्गत तत्त्वाचा आविष्कार करणारी काव्यात्मक प्रतीकेच बनलेली आहेत.

रवींद्रसंगीत– शब्द आणि स्वर यांची सारखीच प्रतिष्ठा राखून, रवींद्रांनी भारतीय संगीताला जे विकसित स्वरूप प्राप्त करून दिले, ते रवींद्रसंगीत या नावानेच ओळखले जाते. रवींद्रांवर लहानपणापासूनच संगीताचा प्रभाव पडला होता. त्यांचे पाच थोरले बंधू हिंदुस्थानी उच्च संगीताचे भोक्ते व मार्मिक ज्ञाते होते. ठाकूर कुटुंबातल्या मुलांना संगीत शिकवण्यासाठी खास गायक नेमलेले होते. हिंदुस्थानी संगीताबरोबरच पाश्चिमात्त्य संगीताचीही ओळख रवींद्रांना लहानपणीच झाली होती. ठाकुरांच्या वाड्यात संगीतप्रीती सर्वांगांनी बहरलेली होती. पौर्वात्य आणि पाश्चिमात्त्य शास्त्रीय संगीताच्या या संस्कारांबरोबरच मध्ययुगीन वैष्णव संतांच्या परंपरेतले भावसंगीत आणि लोकजीवनाच्या अंगोपांगांत खेळणारे बहुरंगी लोकसंगीतही त्यांच्या मनावर संस्कार उमटवीत राहिले होते.

रवींद्रनाथ कविता रचू लागले, तेव्हा ती बनत असतानाच शब्द आणि श्रुती यांचे जिव्हाळ्याचे नाते त्यांना उमगत गेले. दृश्य जगातली प्रत्येक वस्तू जशी वर्णाकाराच्या अभेदातून रूप घेते, त्याचप्रमाणे शब्द आणि श्रुती यांच्या संगमातूनच भाव मूर्तरूप घेतो, याचा त्यांना अनुभव आला. शब्द आणि स्वर यांची लय जमल्याशिवाय भावाची जीवनकला पुरतेपणी प्रकट होत नाही, असे त्यांना आढळून आले. शुद्ध संगीत ज्याप्रमाणे पशू आणि वनस्पती यांनाही वेड लावते, त्याप्रमाणे खरेखुरे गीतही शिक्षित–अशिक्षितांना सारखेच वेड लावते, हे लौकरच त्यांना कळून चुकले. गीतांचे हे सामर्थ्य प्रतीत झाल्यामुळे रवींद्रांनी दोन हजारांहून अधिक गीते रचली. आपल्या सर्व नाटकांतही त्यांनी गीतांचा विपुल उपयोग केला.

बौद्धांचे दोहे आणि चर्या, वैष्णवांची पदे, तांत्रिकांची गीते, बाउलांची भजने, मेळ्यांतली कीर्तने आणि होडीवरच्या नावाड्यांच्या तोंडी खेळणाऱ्या भटियाल्या या सर्वांच्या वेधक सामर्थ्याचे रहस्य जाणून रवींद्रांनी शास्त्रीय संगीताचा विकास घडवण्याचे अनेक प्रयोग केले. मानवांच्या वंशशुद्धतेप्रमाणेच रागरागिणींची वंशशुद्धता हे संगीतक्षेत्रातल्या कर्मठांचे थोतांड आहे, हे सिद्ध करण्यासाठी त्यांनी तीस नव्यश प्रभावोत्पादक

रागिणी रचून त्या लोकप्रिय बनवल्या. त्यांनी प्रचलित तालांचा उपयोग करून नवीन तालही बसवले.

कलकत्त्यात असताना थॉमस मूर यांचे आयरिश मेलडीचे सचित्र पुस्तक पाहून व अक्षयबाबूंनी छेडलेले त्यातले काही राग ऐकून युरोपियन संगीताबद्दल काही मधुर कल्पना त्यांच्या मनात वावरू लागल्या होत्या. पण ब्रायटन व लंडन येथे प्रत्यक्ष ते संगीत ऐकल्यावर त्या कल्पना फोल आहेत, असा अनुभव त्यांना आला. ‘आमचे संगीत आणि पाश्चात्त्यांचे संगीत ही परस्परांपासून अगदी भिन्न असून, एकाच मार्गाने त्यांना हृदयाला जाऊन भिडता येणार नाही,’ असे मत त्यांनी व्यक्त केले आहे. भारतीय संगीत हे आत्म्याच्या अव्यक्त, अज्ञेय व दुर्भेद्य गूढांचे चित्र रंगविते, तर पाश्चिमात्य संगीत हे जीविताचे क्षणभंगुरत्व उत्कटतेने व्यक्त करते, अशी या दोन संगीतपद्धतींची तुलना त्यांनी केली आहे. पाश्चिमात्त्य संगीताविषयी त्यांचे असे मत बनल्यामुळे त्यातला जेवढा भाग त्यांना स्वीकारण्यासारखा वाटला, तेवढा त्यांनी स्वीकारला. रवींद्रनाथ जशी नवी नवी स्वरयोजना करीत, तसे तिचे स्वरलेखनही करीत. ते काव्यगायन करीत, तसेच गीतेही गात. रवींद्रसंगीतातल्या भावगीतांचे स्वरलेखन करण्यात त्यांची पुतणी श्रीमती इंदिरादेवी चौधुरी यांचा बराच मोठा वाटा आहे. अशा स्वरलेखनाचे एक्कावन्न खंड स्वरवितान या नावाने विश्वभारतीतर्फे प्रसिद्ध झाले आहेत.

रवींद्रांची चित्रकला – इ. स. १९२८ च्या सुमारास रवींद्रांनी चित्रसाधना सुरू केली. या वेळी ते जीवनाच्या उतरणीवर होते. यानंतर अवघ्या तेरा वर्षांनी ते मृत्यू पावले. या एक तपात त्यांनी दोन हजारांहून अधिक चित्रे काढली. त्यांच्या चित्रसंभाराचे पुढील चार गट पाडता येतात – (१) रेखाचित्रे, (२) व्यक्तिचित्रे, (३) आलंकारिक रेखाटने आणि (४) कल्पनाचित्रे.

त्यांच्या रेखाचित्रांतील रेषा राकट, बळकट किंवा स्थिर नाही. ती काहीशी अस्थिर, लाजरी-बुजरी आणि भावविवश वाटते. त्या रेषेमधून व्यक्त होणारा हळवा, विकल, एकांतिक पण सचेतन असा भाव विलोमनीय वाटतो. त्यांच्या रेखाचित्रांतले हे गुण कोण्या तंत्रविशारद आणि निष्णात चित्रकाराने सहेतुकपणे व्यक्त केलेले नाहीत; तर कलात्मक संस्कारांनी परिपूर्ण, पण तंत्राविषयी अनभिज्ञ अशा एका सहृदय कविमनाचा अभावितपणे घडलेला तो एक आविष्कार आहे.

त्यांच्या व्यक्तिचित्रातही केवळ हाच भाव आहे. भावविवशतेने ओथंबलेल्या, थरथरत्या आणि अधिऱ्या हातांनी लावलेल्या रंगांमध्ये रवींद्रांच्या भावसंपन्न व्यक्तित्वाचा प्रत्यय येतो. अनेकदा कैक रंग एकमेकांवर सारखे विसावताना दिसतात. रंगाच्या या प्रत्येक थरावर कलावंताच्या पारदर्शक मनाचा ठसा उमटलेला दिसतो.

रवींद्रांच्या आलंकारिक रेखाटनात आदिमानवाचा राकट सरळपणा आणि केवळ आकाराशी एकरूप होण्याची वृत्ती दिसून येते. या आकारांना कोणतेही विशिष्ट संस्कार नसूनही, त्यांना स्वतःचे असे एक लयबद्ध भावसौंदर्य आहे. केवळ आकारांना बरोबर घेऊन कल्पनासाम्राज्यात प्रवेश करण्याची व त्या साम्राज्यात रममाण होण्याची त्यांची ही सरळ आणि स्वच्छंदी वृत्ती आजच्या कित्येक नवचित्रकारांनाही मोहित करते.

त्यांची कल्पनाचित्रे मात्र काहीशी अबोल आहेत. ही चित्रे कधी रंगभूमीवरील दृश्यांसारखी वाटतात, तर कधी केवळ नेपथ्यरचनेसारखी वाटतात. कधी त्यांच्यांत भारतीय चित्रशैलीमधील रचना आढळते, तर कधी ही चित्रे आकारहीन व निरर्थक वाटतात. त्यांच्यांत कधी लय आणि गती यांचा भास होतो, तर कधी त्यांच्यांतला काष्ठवत ओबडधोबडपणाही जाणवतो. या चित्रांतल्या पात्रांना काही तरी सांगायचे आहे; पण ती आपले मनोगत विसरून गेल्यामुळे बावरली आहेत, असे वाटते.

या चार प्रकारच्या चित्रांहून भिन्न आणि ज्यांना कोणत्याही प्रकारात बसवता येणार नाही, अशी असंख्य चित्रे रवींद्रांनी काढली आहेत. या अनोळखी, अबोल आणि अनामिक चित्रांमध्ये खरोखरीच काही सौंदर्य आहे का, याचा शोध घेऊ पाहाणारा रसिक, ही चित्रे पाहता पाहता आपले कलाविषयक ज्ञान हरवून बसतो. परंतु ज्याला ही अवस्था प्राप्त होऊ शकत नाही, त्याला ही चित्रे अगदी निरर्थक आणि सौंदर्यहीन वाटतात.

इ. स. १९३० मध्ये रवींद्रांनी पॅरिसमध्ये आपल्या चित्रांचे प्रदर्शन भरवले होते. त्या वेळी नामवंत पाश्चिमात्त्य कलाकार आणि कलासमोक्षक यांनी त्यांच्या चित्रांचे अपरिमित कौतुक केले आणि अनेक कलारसिकांनी त्यांची चित्रे भारी किमतीला विकतही घेतली. परंतु इ. स. १९३३ मध्ये त्यांनी भारतात मुंबई येथे चित्रप्रदर्शन भरवले असता, इथल्या कलावंतांना आणि कलारसिकांना मात्र ती दुर्बोध वाटली.

चित्रकला हे रवींद्रांच्या कलाजीवनातले दुसरे बालपण आहे. प्रा. विनयकुमार सरकार या कलामर्मज्ञ पंडिताने त्यांच्या चित्रांविषयी चर्चा करताना म्हटले आहे, की ‘चित्रकार रवींद्र हे कवी रवींद्रांच्या पुढे गेलेले आहेत. जिथे कवी कुंठित झाला, तिथे चित्रकाराने कुंचला उचलला आहे असे वाटते.’

शैक्षणिक कार्य – भारतातली तत्कालीन शिक्षणपद्धती रवींद्रांना लहानपणापासूनच नापसंत होती. आपल्या लहानपणाच्या अनुभवांवरून त्यांनी प्रचलित शिक्षणपद्धतीच्या मर्यादा ओळखल्या होत्या आणि निसर्गाच्या सान्निध्यात मानसिक विकास कसा सहजपणे घडतो, हेही अनुभवले होते. या अनुभवामुळे त्यांना जे प्रतीत झाले, ते त्यांनी पुढीलप्रमाणे व्यक्त केले आहे –

नुसता ज्ञानसंचय करून देण्यापेक्षा जीवन व समोवारचे विश्व यांचा मधुर मिलाफ घडवून आणणारे शिक्षण हेच खरे शिक्षण होय. ज्ञानाने मनुष्याचे सामर्थ्य वाढले, तरी सहसंवेदनेवाचून त्याच्या जीवनाला पूर्तता नाही. प्रकृतिमातेशी एकरूप होऊन तिच्यापासूनच हळूहळू सहजपणे जीवनरसाचा लाभ होऊ देण्याऐवजी बालकांना डेस्क–टेबलांनी गजबजलेल्या, त्यांच्याकरता मुद्दाम तयार करण्यात आलेल्या चार भिंतींच्या आतल्या कृत्रिम जगात डांबून ठेवण्यात येते व अशा प्रकारे त्यांचे सर्व विश्व त्यांच्यापासून हिरावून घेण्यात येते. एक ज्ञानाचे पोतडेच काय ते त्यांच्यापाशी शिल्लक राहते. शिक्षण म्हणजे उल्हास असे समीकरण जरी आम्ही मांडू शकलो नाही, तरी शिक्षण म्हणजे शिक्षा असे तरी आमच्या हातून होऊ नये.

रवींद्रांनी आपल्या शिक्षणविषयक कल्पनांना शांतिनिकेतनात मूर्त रूप देण्याचा प्रयत्न केला. शांतिनिकेतन ही मूळची महर्षी देवेंद्रनाथांची तपोभूमी. बोलपूरजवळच्या माळावर एका सप्तपर्णी वृक्षाच्या छायेत त्यांना परम शांतीचा लाभ झाला आणि त्यांनी ती भूमी तरुवेलींनी सुशोभित बनविली. पित्याची ही तपोभूमी रवींद्रांच्या जीवनातही प्रेरक ठरली. या भूमीत त्यांनी ब्रह्मचार्याश्रम या नावाने गुरुकुल पद्धतीच्या एका विद्यालयाची स्थापना केली. स्थापनेच्या दिवशी रवींद्रांनी या प्रसंगासाठी स्वतः रचलेले पुढील प्रतिज्ञागीत म्हटले –

> मोरा सत्येर परे मन करिब समर्पण,
> जय जय सत्येर जय।
> मोरा बुझिब सत्य, पुजिब सत्य, खूँजिब सत्यधन।
> जय जय सत्येर जय।।
> यदि दुःखे दहिते हय, तबू मिथ्या चिन्ता नय।
> यदि दैन्य वहिते हय, तबू मिथ्या कर्म नय।
> यदि दंड सहिते हय, तबू मिथ्या वाक्य नय।
> जय जय सत्येर जय ।।

अर्थ – सत्याला माझे मन समर्पित व्हावे. सत्याचा जय व्हावा. सत्य मला समजावे, सत्य मी पुजावे, सत्याचे धन मी शोधीत असावे. सत्याचा जय व्हावा. दुःखाने होरपळलो, तरी मला असत्य सुचू नये; दैन्याने वाकलो, तरी असत्य कर्म हातून घडू नये; शिक्षा भोगावी लागली, तरी असत्य वाक्य तोंडून निघू नये; सत्याचा जयजयकार व्हावा.

कालिदासाने वर्णन केलेल्या प्राचीन तपोवनाप्रमाणे आपल्या या ब्रह्मचर्याश्रमाचे स्वरूप राहावे, अशी रवींद्रांची इच्छा होती. प्रथम या विद्यालयात आठ, नऊ मुले होती, त्यांत रथींद्र व शमींद्र ही रवींद्रनाथांची दोन मुलेही शिकत होती. पुढे मुलांची संख्या वाढत गेली. विद्यालयाचा खर्च प्रारंभी स्वतः रवींद्रनाथच करीत. त्यासाठी त्यांनी आपल्या पत्नीचे दागिने मोडले आणि पुरी येथे असलेले आपले घरही विकले. काही संस्थानिक आणि धनिक यांच्याकडून मिळणाऱ्या देणग्या आणि स्वतःच्या नाट्यप्रयोगांचे उत्पन्न यांतून त्यांनी विद्यालयाचा व्याप वाढवला. पुढे त्यांनी शांतिनिकेतनात विश्वभारती नामक विद्यापीठाची स्थापना झाली. विद्या आणि कला यांच्या उच्च व्यासंगासाठी उभारलेले हे विद्यापीठ प्राचीन भारतातल्या नालंदा व तक्षशिला या विद्यापीठांच्या आदर्शानुसार चालवावे, अशी रवींद्रांची आकांक्षा होती. 'अविभक्तं विभक्तेषु' (वेगळेपणातही ऐक्य अनुभवणे) हे या संस्थेचे ध्येय होते. 'यत्र विश्वं भवत्येकनीडम्' (जिथे सर्व विश्व हे एक घरट्याप्रमाणे – जिव्हाळ्याचे केंद्र – बनते) असे वातावरण निर्माण करण्याची आकांक्षा या विद्यापीठाच्या उभारणीमागे होती. इथे स्वतः रवींद्रनाथ, दीनबंधू अँड्र्यूज, विधूशेखर भट्टाचार्य, धर्माधार राजगुरू महास्थविर, कपिलेश्वर मिश्र, भीमरावशास्त्री हसूरकर, नकुलेश्वर गोस्वामी, रथींद्रनाथ ठाकूर यांसारखे विद्याकलासंपन्न ध्येयप्रवण अध्यापक अध्यापनकार्य करू लागले.

आजही शांतिनिकेतनात पाऊल टाकले तर सर्वत्र शांतता, व रम्यता आढळते. कुठे एखादा शिक्षक आम्रवृक्षाखाली पाचसहा मुलांना एखाद्या विषयाची माहिती सांगत आहे; कुठे संगीताचा वर्ग चाललेला आहे; कुठे नदीकाठी बसून मुले चित्रे काढीत आहेत; कुठे टेकडीवर बसून मुले पाखरांच्या क्रीडा पाहात आहेत, असे दृश्य दिसते.

इथे ऋतूंच्या आगमनाचे उत्सव साजरे होतात. शिक्षण व निसर्ग यांची जशी इथे सांगड घातली जाते, तसाच शालेय जीवन व सामाजिक जीवन यांचाही मेळ साधण्यात येतो. इथे मुलांचे संपूर्ण स्वराज्य आहे. या ठिकाणी शासनाऐवजी अनुशासनाचेच माहात्म्य आहे. व्रती बालक या नावांनी ओळखले जाणारे स्वयंसेवक बालवीर नामक संस्थेतल्या स्वयंसेवकांप्रमाणे खेडुतांच्या सेवेसाठी झटतात, आगी विझविण्याचा प्रयत्न करतात व आजाऱ्याची शुश्रूषा करतात. खेडुतांच्या उद्धारासाठी शांतिनिकेतनात श्रीनिकेतन नावाची एक स्वतंत्र संस्था इ. स. १९२२ पासून अस्तित्वात आलेली आहे.

विश्वभारती ही संस्था नावाप्रमाणेच विश्वात्मक आहे. या संस्थेच्या स्थापनेच्या दिवशीच रवींद्रांनी आश्रम व आश्रमाची सारी मालमत्ता, आपल्या पुस्तकांचे सर्व हक्क आणि नोबेल पारितोपिकाचे सव्वा लक्ष रुपये एका विश्वस्तपत्राच्या द्वारा या संस्थेला समर्पण करून त्यांनी या संस्थेसाठी सर्वस्व वेचले. त्यांच्या उदात्त व उदार विचारांमुळे, सौंदर्यजीवी कल्पकतेमुळे आणि विचारांचे आचारांत रूपांतर घडविण्यासाठी आवश्यक असलेल्या त्यागभावनेमुळे विश्वभारती हे संस्कृतिसंगमाचे महान तीर्थक्षेत्र बनू शकले. विश्वभारतीतल्या चीनभवनात चिनी संस्कृतीचे परिशीलन चालू असते, तर दुसऱ्या एका शाखेत जपानी विद्याकलांचे अध्ययन चालू असते. युरोप व अमेरिका या खंडांतल्या बहुतेक राष्ट्रांतून इथे अनेक विद्यार्थी व अध्यापक येत असतात.



चीनभवन – शांतिनिकेतन

सांप्रत आचार्य क्षितिमोहन सेन यांच्यासारख्या तपस्वी तत्त्वचिंतकाच्या नेतृत्वाखाली विश्वभारतीचे कार्य चालू आहे.

रवींद्रांचे तत्त्वज्ञान – रवींद्रांचे मन प्रथमपासूनच उपनिषदांच्या अभ्यासाने संस्कारित झाले असल्यामुळे त्यांची वृत्ती चिंतनशील बनलेली होती. त्यांच्या सौंदर्यासक्तीला चिंतनाची बैठक लाभल्यामुळे त्यांच्या ठायी कवी आणि तत्त्वचिंतक या दोन्ही भूमिका सर्वांशांनी एकरूप बनल्या होत्या. त्यांचे काव्य वाचताना वाचकांच्या चित्ताला परम सत्याची प्रकाशरेखा स्पर्श करून जाते. विचारांच्या पलिकडचे असे सत्यदर्शन रवींद्रांना सर्वव्यापी सौंदर्याच्या रूपाने घडले होते. त्याचमुळे ते आपल्या काव्यात साक्षात्कारी कवींच्या पातळीवर वावरताना दिसतात.

रवींद्रांचे तत्त्वज्ञान हे साक्षात्कारवादाशी संलग्न आहे. ‘आनन्दाद्ध्येव खल्विमानि भूतानि जायन्ते । आनन्देन जातानि जीवन्ति । आनन्दं प्रयन्त्यभिसंविशन्ति ।’ (= ही सर्व भूते खरोखर आनंदातूनच जन्म पावतात; आनंदाच्या योगानेच जगतात आणि अखेर आनंदाप्रत जाऊन आनंदातच लय पावतात, यांसारखी उपनिषद्वचने रवींद्रांनी आपल्या सर्व जीवनव्यापारात मुरवली होती. त्यांना सर्व चराचर सृष्टी या दिव्यानंदाने भारलेली दिसत होती. अशा प्रकारच्या पहिल्या अनुभवाचे त्यांनी वर्णन केले आहे, ते असे——

मी त्या वेळी एका खेड्यात राहत होतो. सकाळच्या दैनंदिन गोष्टी उरकल्या आणि स्नानाला जाण्यापूर्वी एकवार कोरडे पात्र असलेल्या नदीच्या काठी वसलेल्या बाजारपेठेकडे खिडकीतून सहज नजर टाकली. तो काय आश्चर्य ! एकाएकी माझे मन एका अनिर्वचनीय आनंदाने बहरून आले. त्या आनंदात सारे विश्व न्हाऊन निघत आहे, विश्वाच्या गाभ्यात कसली तरी आनंदमय एकता आहे, अशा प्रकारची प्रतीती मला एका क्षणात आली …… त्या प्रभातकाळी जीवनाच्या पसाऱ्याचा खोल व गूढ अर्थ मला उमगला. त्यामुळे माझी श्रद्धा दृढ झाली, की निसर्ग आणि मनुष्य यांच्या सर्व अनुभवांत एक मूलभूत सत्य लपून राहिले आहे. ही माझी श्रद्धा पुढे कधीही विचलित झाली नाही.

‘परमसत्याचा रसमय आस्वाद’ हे साक्षात्कारवादाचे लक्षण त्यांच्या वाङ्मयाला निश्चितपणे लागू पडते. रवींद्रांच्या साक्षात्कारवादाला सौंदर्यनिष्ठ साक्षात्कारवाद असे नाव देता येईल. हा विशिष्ट साक्षात्कारवाद हाच त्यांचा धर्म आहे. ‘माझा धर्म मूलतः कवीचा आहे. तो केवळ शब्दज्ञानावर आधारलेला नसून दर्शनावर उभारलेला आहे,’ असे त्यांनी स्पष्टपणे म्हटले आहे.

रवींद्रांच्या मते विश्वातले मूलतत्त्व आनंद हेच असून, ते सर्वत्र विविध रूपांनी विखुरलेले आहे. शब्द, स्पर्श, रूप, रस आणि गंध यांच्या द्वारा इंद्रियांनी घेतलेला आस्वाद हे त्याचेच एक रूप आहे. हे विश्व म्हणजे त्या आनंदमय परम सत्याची आत्मरती आहे. त्या तत्त्वाने स्वतःचाच आस्वाद घेण्यासाठी अनेकत्व धारण केले आहे. प्रत्येक अनुभव – मग तो इंद्रियद्वारा येणारा असो अथवा इंद्रियातीत असो – या आनंदतत्त्वाचे स्पंदन आहे. ते इंद्रियद्वारा अनुभवाला येते, तेव्हा तो अनुभव क्षणिक असतो. जो ‘इंद्रियांना चोरून’ आनंदानुभव घेतो, त्याच्या सुखाला खंड नसतो.

रसरसलेले जीवनचैतन्य हेच सत्य, सौंदर्य व आनंदतत्त्व आहे, असे रवींद्रांचे मत आहे. त्यांच्या मते, सत्य हे केवळ स्थिर नाही; ते गतिमान आहे. विलासावाचून ते स्वस्थ राहू शकत नाही. नाना रूपांनी प्रकट होण्यासाठी ते आसुसलेले

असते. या अखिल विश्वात ते एका अखंड अनाहत संगीताच्या रूपानेही व्यक्त होत असते. घराच्या छपरावर टपटपणाऱ्या पर्जन्यधारांत, ग्रहगोलांच्या आणि नक्षत्रांच्या भ्रमणात, नाना रंगरूपांनी विलसणाऱ्या ऋतुचक्रात, तारकांच्या लुकलुकण्यात, प्राणिमात्राच्या हृदयस्पंदनात आणि जीवनक्रमात, तसेच निसर्गाच्या विविध आविष्कारांत त्या विराट दिव्य संगीताचेच आलाप ऐकू येतात. मानवी शरीराची सतार याच संगीताला साथ म्हणून छेडली जात आहे.

असे हे दर्शन औपनिषदिक ऋषींप्रमाणे आणि कबीरादी संतांप्रमाणे रवींद्रांना घडले होते. हे विश्व म्हणजे चैतन्याचा आनंदमय विलास आहे, हे त्यांना प्रतीत झाले असल्यामुळे जगाकडे पाठ फिरवून मुक्ती शोधण्याचे प्रयत्न त्यांना व्यर्थ वाटत. त्यासंबंधी त्यांनी एका ठिकाणी म्हटले आहे –

वैराग्यसाधने मुक्ति शे आमार नय
असंख्य बंधन माझे महानंदमय
लभिबो मुक्तिर स्वाद ।
इंद्रियेर द्वार रुद्ध करी जोगासन, शे नहे आमार ।
जे किछु आनंद आछे दृश्ये गंधे गाने ।
तोमार आनंद रबे तार माझखाने ।

अर्थ – वैराग्यसाधनेने लाभणारी मुक्ती मला नको. मानवसमाजातल्या सुखदु:खादी बंधनातच मी महानंदमय मुक्तीचा आस्वाद घेईन. इंद्रियनिग्रहपूर्वक योगासने करणे मला पसंत नाही. या सृष्टीला व्यापणाऱ्या रूप–गंध–गीतात्मक आनंदातच, हे परमेश्वरा, तुझ्या अमृतानंदाचा आस्वाद मला घेता येईल.

अशा रीतीने रवींद्र हे बंधनातून मुक्तीचा व संग्रामातून समन्वयाचा शोध घेताना दिसतात. काल्पनिक सुखमय स्वर्गापेक्षा सुखदु:खमय मृत्युलोकच त्यांना अधिक प्रिय वाटत असे. या विपुल सुंदर धरणीबद्दल त्यांना नितांत प्रेम वाटत असे.

धरतीवरील मानवाचे जीवन अधिक सरस, संपन्न बनवावे, असे त्यांना वाटे. या साऱ्या विश्वाशी आपले निगूढ आंतरिक नाते आहे, असे त्यांना सदैव जाणवे. ‘शब ठाँइ मोर घर आछे’ (= सर्वच ठिकाणी माझे घर आहे) आणि ‘घरे घरे आछे परम आत्मीय’ (= घराघरात माझी जिव्हाळ्याची नाती आहेत) असा विश्वात्मभाव त्यांच्या हृदयात अम्लान पुष्पाप्रमाणे सदैव टवटवलेला दिसतो. विश्वप्रेम हेच त्यांच्या जीवनाचे महाव्रत बनलेले होते. त्यांनी जीवनाच्या वैचित्र्यातच परिपूर्ण एकत्वाची साधना केली. [रवींद्रनाथ–श्री. गं. दे. खानोलकर, १९६१; आ. र.; टा. सा. क. वि.; रवींद्रकाव्यदर्शन, श्री. गोगटे, १९६१; बं. सा. सं. इ.; प्रा. सा.; फि. र. टा.; नवभारत, जानेवारी, मार्च, एप्रिल, मे, जून, जुलै १९६२]

ठिकरी लपविणे

पंजाबातील एक खेळ. प्रथम मुले दोन गटांत विभक्त होतात. एका गटाचा नेता हातात ठिकरी (खापराचा तुकडा) घेऊन मुलांच्या वर्तुळात उभा राहतो. नंतर तो प्रत्येक मुलाच्या हातात ठिकरी दिल्यासारखे करून त्याची मूठ बंद करतो. ठिकरी कोणाच्या हातात आहे, हे प्रतिस्पर्धी गटाने ओळखायचे असते. ते ओळखीपर्यंत पहिल्या गटाला खेळण्याची संधी मिळते. मराठीत हा खेळ खडामूठ या नावाने प्रचलित आहे. [पं. जी. सा.]

ठुमरी

हिंदुस्थानी संगीतातला एक गानप्रकार. शास्त्रीय संगीतात ख्यालाच्या खालोखाल ठुमरीची गणना होते. रागाचे जे दहा नियम आहेत, ते ठुमरीगायनात काटेकोरपणे पाळले जात नाहीत; म्हणून तिला हे दुय्यम स्थान दिले गेले आहे. शैलीची नाजुकता, स्वरांची कोमलता, लयीची सुकुमारता आणि शब्दांची भावुकता हे ठुमरीचे विशेष गुण होत. श्रोत्यांचे मनोरंजन करण्याच्या कामी ठुमरी ही ख्याल व ध्रुपद यांच्यापेक्षाही विशेष समर्थ असते. म्हणूनच सामान्य जनांनाही ती फार आवडते. ठुमरीच्या उत्पत्तीविषयी आणि तिच्या निर्मात्याविषयी अनेक मते प्रचलित आहेत.

एका संगीतशास्त्रज्ञाने राजा मानसिंह तंवर याला ठुमरीचा प्रवर्तक मानले आहे. तंवर हा नावाजता गवई होता. एक दिवस भैरवीची आलापी करताना त्याने चुकून शुद्ध ऋषभ लावला. विसंवादी स्वराच्या प्रयोगाने राग बिघडला; पण त्याचबरोबर त्या आलापीत एक विशेष रंजकताही आली. त्यामुळे मानसिंह प्रोत्साहित झाला आणि त्याने भैरवीत तीव्र मध्यम आणि अशाच काही वर्जित स्वरांचाही प्रयोग करून पाहिला, तो रंजक ठरला. त्यातूनच पुढे भैरवी ठुमरी निर्माण झाली. तंवर या गायकाच्या नावावरून त्या रचनेला तंवरी असे नाव पडले व पुढे तंवरीचा अपभ्रंश ठुमरी असा झाला.

दुसरे मत असे, की ठुमक शब्दावरून ठुमरी शब्द बनला आहे. कथक नृत्यातली ठुमकती चाल व तसलेच हावभाव यांच्यावरून या गानप्रकाराला ठुमरी असे नाव पडले. प्रारंभी ठुमरी ही कथक नृत्यातच हावभावासह गायिली जात होती.

बरेच लोक लखनौचा शेवटचा नबाब वाजिद अली शाह याला ठुमरीचा निर्माता मानतात. याविषयीची बरीच प्रमाणे उपलब्ध आहेत.

वाजिद अली शाह हा गायक आणि नर्तकही होता. त्याने अनेक ठुमऱ्या रचल्या, गायिल्या व इतर गायकांनाही गायला लावल्या. त्याच्या कित्येक ठुमऱ्या अख्तरपिया या नाममुद्रेने अंकित आहेत. ‘बाबुल मोरा नैहर छूटो जाय’ ही गायक-

मंडळीत अतिप्रसिद्ध असलेली ठुमरी वाजिद अली शाह याची असून, इंग्रजांनी त्याला पदच्युत केल्यावर आपल्या वैभवशाली वाड्याचा त्याग करून बाहेर पडताना त्याने ती रचली आणि भरल्या गळ्याने म्हटली, अशी आख्यायिका सांगतात. स्वरचित ठुमरीचा कथक नृत्यात उपयोग वाजिद अलीनेच सुरू केला, असेही म्हणतात. कथक नर्तकाला ठुमरीची जाणकारी असणे आवश्यक मानले जाते.

ठुमरी कठीण जोड रागांत गायिली जात नाही. रामदासी मल्हार, नायकी कानडा, श्री, इ. रागांमध्ये ठुमरी संभवत नाही. पिलू, भैरवी, खमाज, काफी, तिलंग, गारा, इ. हलके राग ठुमरीला अनुकूल ठरतात. मधुरता व सरलता या दोन गुणांवर भर देऊन ठुमरी गावी लागते. म्हणूनच सरल व चंचल असे रागच ठुमरीच्या रचनेसाठी निवडतात. ठुमरीचे तालही दीपचंदी, केरवा, जत, दादरा, त्रिताल, एकताल यांपैकी असतात. ध्रुपद गाण्यासाठी जोरदार व ख्याल गाण्यासाठी उंच आवाजाची आवश्यकता असते; तर ठुमरीसाठी स्निग्ध, लोचदार व फिरत असलेला आवाज अनुकूल ठरतो. ठुमरी गाताना प्रथम मध्य लयीत अस्ताई व अंतरा गातात. नंतर रसाला अनुकूल अशा शब्दोच्चारांनी व आलापादिकांनी ठुमरीची चीज आळवतात.

ठुमरी ही मुख्यत्वे शृंगारप्रधान असते. शृंगारातही विप्रलंभ शृंगार हा प्रधान असतो. विप्रलंभ शृंगारामुळे ठुमरी ही अत्यंत हृदयस्पर्शी बनते. शृंगाराची अभिव्यक्ती ठुमरीच्या माध्यमातून सहजपणे होऊ शकते. ठुमरीच्या या शृंगारिकतेमुळेच कित्येक जुन्या वळणाचे गवई ठुमरीला अजूनही त्याज्य समजतात.

रासलीलेचे वर्णन, विरहिणीने आपल्या सखीजवळ प्रियकराची केलेली विचारपूस, प्रियकराच्या शोधासाठी तिची भ्रमंती किंवा अभिसार, प्रियकर जवळ आहे, अशा कल्पनेने त्याच्यावर रुसवा आणि त्याची विनवणी, इ. भाव ठुमरीच्या चिजांमधून दिसून येतात. ‘ना मारो पिचकारी’, ‘लगत कलेजुवा मे चोट’, ‘पिया तो मानत नाही’, ‘हमारी तोरी नाही बने गिरिधारी’, ‘अब तो सावन घर आजा’, इ. प्रसिद्ध ठुमऱ्या वर उल्लेखिलेले भावच व्यक्त करतात.

ठुमरीच्या अनेक शैली प्रचलित आहेत. पैकी पूरबी अंग व पंजाबी अंग या दोन शैली प्रमुख आहेत. पहिल्या प्रकारची ठुमरी लखनौच्या नवाबी दरबारात निर्माण होऊन वाढली. लखनौच्या ठुमरीवर विलासी छाप स्पष्टपणे दिसते. नाजूक व खेचक असे स्वर, कण आणि मुरक्या हे लखनवी ठुमरीचे विशेष गुण होत. याच शैलीतून बनारसी शैलीला प्रेरणा मिळाली, पण वाराणसीत तिच्यावरची विलासिलेची छाप मावळली व तिने कजरी, चैती, इ. लोकगीतांचे वळण स्वीकारले. बनारसी शैलीचा विशेष हा, की ही ठुमरी साध्या व स्पष्ट शब्दोच्चारात व तशाच प्रकारच्या मुरक्यांत गायली जाते. लखनौ घराण्याचे नृत्याचार्य बिंदादीन महाराज यांच्या बऱ्याच प्रसिद्ध ठुमऱ्या बनारसी ढंगानेच गायिल्या जातात. आजच्या ठुमरीगायिकांत लखनौ अंगाने गाणाऱ्या म्हणून अख्तरीबाई प्रसिद्ध आहेत. बनारस अंगाने गाणाऱ्या गायिकांत रसूलनबाई, सिद्धेश्वरीदेवी, गिरिजादेवी या प्रसिद्ध आहेत.

ठुमरीची पंजाबी शैली ही त्याच प्रदेशात वाढली व विस्तारली. ज्या लोकगीतांच्या प्रेरणेतून टप्पा निर्माण झाला, तीच लोकगीते पंजाबी ठुमरीलाही प्रेरक बनली. पंजाबी राहणीतला रंगीला, रसीला चमकदारपणा पंजाबी ठुमरीत स्पष्टपणे दिसून येतो. पंजाबी ठुमरीचा विस्तार छोट्या छोट्या तानांनी केला जातो. मिया शोरी हा टप्पागायकीचा प्रवर्तक मानला जातो. टप्प्याला उपयुक्त अशी पंजाबी भाषा शिकण्यासाठी तो लखनौहून पंजाबात जाऊन राहिला होता. त्याच्या बरोबरच लखनवी ठुमरी पंजाबात गेली आणि तिथल्या वातावरणाप्रमाणे बदलली. पंजाबी अंगाने ठुमरी गाणाऱ्यांत बडे गुलामअली खाँ हे प्रसिद्ध आहेत. **पाहा** – टप्पा. [श्री तुलसी राम देवांगन – संस्कृती, सप्टें.–आक्टो. १९६१; नवनीत, जाने. १९५९]

ठेव एखाद्याने स्वतःच्या मालकीचे धन किंवा इतर वस्तू दुसऱ्या माणसाजवळ विशिष्ट कालाकरिता संरक्षणासाठी ठेवून देणे, याला ठेव म्हणतात. ठेव कोणाजवळ ठेवावी व ती ठेवून घेणाऱ्याची जबाबदारी काय, याविषयी मनुस्मृतीत म्हटले आहे, ते असे –

> कुलजे वृत्तसम्पन्ने धर्मज्ञे सत्यवादिनि ।
> महापक्षे धनिन्यार्ये निक्षेपं निक्षिपेद् बुधः ॥
> यो यथा निक्षिपेद्धस्ते यमर्थं यस्य मानवः ।
> स तथैव गृहीतव्यो यथा दायस्तथा ग्रहः ॥
> (मनु. ७.१७९–८०)

अर्थ – शहाण्या मनुष्याने आपली ठेव कुलवान, सदाचरणी, धर्मज्ञ, सत्यवादी, कुटुंबवत्सल अशा सद्गृहस्थाकडे ठेवावी. जी ठेव ज्या स्थितीत जशी दिली गेली असेल, तशी घेऊन, ती ठेवणाऱ्याला जशीच्या तशी परत द्यावी.

ठेव हा निक्षेपाचा एक प्रकार होय. मोहोरबंद वा मुद्राविरहित जशी वस्तू ठेविली असेल, तशाच प्रकारे ती राखली पाहिजे. तिच्यात अफरातफर किंवा बदल करता कामा नये. लबाडी केल्यास किंवा ठेव परत न दिल्यास राजाने त्या न्यासधारकाला यथान्याय दंड करावा. मात्र ठेव चोरीला गेली किंवा पाण्यात

वाहून गेली अथवा अग्नीत जळाली, तर त्याबद्दलचे दायित्व मात्र न्यासधारकाकडे नाही, असे मनुस्मृतीतच सांगितले आहे.

भासाच्या स्वप्नवासवदत्तम् या नाटकात ठेवीसंबंधीचा उल्लेख आहे, तो असा—

सुखमन्यद् भवेत् सर्वं दुःखं न्यासस्य रक्षणम् ।

अर्थ – अन्य सर्व गोष्टी सुखावह होतील, पण ठेवीचे रक्षण करणे हे मात्र क्लेश देणारे आहे.

भरणी, पूर्वा, पूर्वाषाढा, पूर्वाभाद्रपदा, आर्द्रा, आश्लेषा, मघा, चित्रा, ज्येष्ठा, विशाखा, मूळ, मृग, पुनर्वसू या नक्षत्रांवर एखाद्याला द्रव्य दिले, व्याजाला लावले किंवा एखाद्यापाशी ठेव म्हणून ठेवले, तर ते परत मिळत नाही, असे निर्णयसिंधूत सांगितले आहे.

एखाद्याकडे आपल्या धनाची ठेव ठेवून यात्रेला जाणे हा कल्पनाबंध लोककथांतही आढळतो. [भा. सा.]

ठोरी एक जात. हे लोक राजस्थानात आढळतात. इतिहासकाळी हे लोक वाटमारी करीत, असे म्हणतात. हे आपली उत्पत्ती राजपुतांपासून झाल्याचे सांगतात. यांच्यांत वीस कुळे आहेत. यांच्यांतील खालच्या दर्जाचे लोक शिकार करतात व ग्रहणकालात भंग्यांबरोबर भिक्षाही मागतात. यांचा दर्जा अहेरियांसमान मानतात. यांच्यांतले जे लोक ओझी वाहण्याचे काम करतात, त्यांना नायक म्हणतात.

पाबूजी व क्षेत्रपाल ही यांची दैवते होत. गुर्रा हे यांचे पौरोहित्य करतात. हे मृतांना जाळतात. [रा. जा.]



ठोरी·पुरुष

डंका एक चर्मवाद्य. प्राचीन काळी राजाच्या व देवाच्या मिरवणुकीत डंका सर्वात पुढे असे. तो घोडा किंवा हत्ती यांच्या पाठीवर ठेवून वाजवला जाई. पाहा – नगारा.

डंडा चौथ राजस्थानात गणेशचतुर्थीला डंडा चौथ म्हणतात. याला चौकच्यानणी असेही एक नाव आहे. या उत्सवाची तयारी महिनाभर आधी सुरू होते. त्यासाठी मुले नाना प्रकारचे मुखवटे तयार करतात. उत्सवाच्या पूर्वी दोन दिवस घरातल्या मुलामाणसांना नवी वस्त्रभूषणे मिळतात.

चतुर्थीच्या दिवशी विद्यार्थी मुखवटे घालतात, दोरी बांधून डंडे (टिपऱ्या) गळयात अडकवतात आणि ते वाजवीत व उत्सवाची गीते गातगात आपल्या गुरुजींच्या घरी जातात. या गीतांचा एक नमुना असा –

गऊ म्हने दध्यो दीनो दध्या की म्हने खीर पकाई ।
ताती–ताती हमने खाई ठंडी–ठंडी मोर चुगाई ।।
मोर म्हने पंखों दीनो, पंखो ले राजा ने दीनो ।
राजा म्हने हाथी दीनो, हाथी ले गरू ने दीनो ।
गरू म्हने विद्या दीनी ।।

अर्थ – गायीने (पोटभर चारा खाल्ला; मग तिने प्रसन्न होऊन) मला दूध दिले. दुधाची बनवली खीर, ती मी ऊन ऊन खाल्ली व थंड झाल्यावर मोराला दिली. मोराने (खीर खाऊन नृत्य केले व नाचताना गळलेले) पंख मला दिले. ते पंख एकत्र करून मी राजाला भेट दिले. राजाने खूष होऊन मला हत्ती दिला. तो हत्ती मी गुरूला नेऊन दिला. गुरूने मला विद्या दिली.

गुरुजींच्या घरी गेल्यावर मुले त्यांना नारळ, रुपया व गुडदाणी देतात. गुरु-शिष्य एकमेकांना टिळे लावतात. मग गुरुजींना मोटारीत किंवा बैलगाडीत बसवून त्यांची मिरवणूक काढतात.

गणेशचतुर्थीच्या दिवशी चंद्राचे दर्शन घडल्यास चोरीचा आळ किंवा अपवाद येतो, अशी समजूत राजस्थानातही आहे. या समजुतीमुळे मुले दुसऱ्याच्या घरावर दगड मारतात व त्या घरातल्या माणसांनी शिव्या दिलेल्या ऐकल्या, की अपवाद टळला असे समजतात. पाहा – चौकच्यानणी. [साप्ताहिक हिंदुस्थान, १३ सप्टेंबर १९६४]

डंडिया नृत्य राजस्थानातील एक नृत्य. हे पुरुषांचे सामूहिक नृत्य आहे. पंधरा-वीस पुरुष विविध वेश करून व दोन्ही हातात लांब काठ्या घेऊन वर्तुळात उभे राहतात. वर्तुळाच्या मध्यभागी आठ–दहा गायक आणि नौबत, ढोल, घुंगरू, इ. वाद्ये वाजवणारे साथीदार बसतात. मग ढोलाच्या तालावर नृत्याला प्रारंभ होतो. नृत्यात आवेश निर्माण व्हावा, म्हणून मध्यभागी बसलेले लोक ‘ हो, हो’ असा आवाज करतात. नाचतांना नर्तक आपल्या हातांतील काठ्यांचे आघात करून आवाज काढतात. हे नृत्य बरेच प्राचीन आहे.

हे नृत्य मोठमोठ्या नगरांतून, तसेच खेडेगावांतूनही होते.



डंडिया नृत्य

ऋतुबदल होण्याच्या वेळेचा हर्ष व उल्हास या नृत्यातून व्यक्त होतो. [भा. लो. नृ.; सं. राजस्थान, मार्च १९५७]

ड ट वर्गातील तिसरा वर्ण व वर्णमालेतील तेरावे व्यंजन. याची पहिली अवस्था अशोकाच्या गिरनार शिलालेखात, दुसरी



ड च्या रूपाचा विकासक्रम

क्षत्रपवंशी रुद्रदामनच्या गिरनारलेखात (इ. स.चे दुसरे शतक), तिसरी समुद्रगुप्ताच्या प्रयाग येथील स्तंभावरील लेखात (इ. स.चे चौथे शतक) व चौथी अबूचा परमार राजा धारावर्ष याच्या काळातल्या उडिया लेखात (इ. स. १२०८) आढळून येते. नागरी लिपीच्या जैनशैलीत ड चे शेवटचे रूप निराळे आहे.

वर्णोद्धारतंत्रात याचे स्त्रीरूपी ध्यान वर्णिले आहे, ते असे —

जपासिन्दूरसङ्काशां वराभयकरां पराम् ।
त्रिनेत्रां वरदां नित्यां परमोक्षप्रदायिनीम्
एवं ध्यात्वा ब्रह्मरूपां तन्मन्त्रं दशधा जपेत् ॥

अर्थ —जास्वंद व सिंदूर यांच्या कांतीची, वर व अभय देणारी, श्रेष्ठ, त्रिनेत्र, नित्य वरदायिनी, मोक्षदायिनी व ब्रह्मरूप अशा —ड देवतेचे ध्यान करून तिच्या मंत्राचा दहा वेळा जप करावा. मूर्धा हे ड चे उच्चारणस्थान आहे. [म. ज्ञा. को.; श. क.]

डप्पुवाद्यम् आंध्र प्रदेशातील एक नृत्य. ढोलाच्या आकाराचे डप्पू नामक एक वाद्य या नृत्यात वाजवले जाते म्हणून या नृत्याला डप्पुवाद्यम् असे म्हणतात. बहुतेक अंत्यज जातीतले पुरुषच या नृत्यात भाग घेतात. प्रत्येक नर्तकाजवळ एक ढोल असतो व नाचाच्या वेळी पाय मागेपुढे घेऊन तो नृत्य करतो. [भा. लो. नृ.]

डफ एक चर्मवाद्य. हा शब्द दफ या अरबी शब्दावरून आला असावा. सहा बोटे रुंद, पाव इंच जाड व सुमारे दोन फूट लांब अशी फळी वर्तुळाकार वाकवून तिची दोन्ही टोके एकमेकांशी मिळवून पक्की खिळवतात. मग हे गोल कडे एका बाजूला चामड्याने मढवितात. डफाचा आवाज कणकणीत निघावा, म्हणून वाजवायच्या वेळी तो विस्तवावर शेकतात: तो एका हाताने छातीशी धरून दुसऱ्या हाताने वाजवितात. पोवाडा, लावणी यांच्या गाण्याला डफाची साथ आवश्यक असते. तमाशातही डफ असतोच. डफ हा भारतात सर्वत्र आढळतो. मथुरा-वृंदावन या प्रदेशात त्याचा विशेष प्रचार आहे. त्याचे अनेक प्रकार आहेत. त्यांना थंबत्ती (द. भारत), दांफू (नेपाळ), खंजिरी (मद्रास), डिंडिम, इ. नावे आहेत. होळीच्या सणात मुले डफ वाजवीत हिंडतात. [सु. वि. को.; म्यु. इं.]



डफवादक

डफगीते वसंतपंचमीपासून धुळवडीपर्यंत राजस्थानातल्या गावागावातून डफाच्या साथीवर जी गीते गाइली जातात, त्यांना डफगीते म्हणतात. या गीतांना होरी व धमाल असेही म्हणतात. डफगीते ही मुख्यत्वे पुरुषांनी गाण्याची गीते आहेत. ही गीते गाताना नृत्यही करतात. हे नृत्य उभ्याने, बसून आणि कित्येकदा आडवे पडूनही केले जाते. अशा वेळी डफ वाजविणारे वेगळे आणि नाचणारे वेगळे असतात. कित्येकदा डफगीते गाणाऱ्या मुख्य गायकाला अनेक लोक एका सुरात साथ देतात. अशा वेळी गावातले वातावरण नादमय होऊन जाते. राजस्थानी लोकसाहित्यात डफगीतांचा भरणा मोठा आहे.

या डफगीतांशी कित्येकदा तुलसीदास, चंद्रसखी, इ. काही प्रसिद्ध कवींची नावेही जोडलेली असतात. रामायण व महाभारत यांतील काही कथाप्रसंग अशा गीतांत सांगितलेले असतात. काही गीते कृष्णाच्या बाललीलेवरही असतात. रामायणकथेवरच्या एका गीताचा नमुना पुढीलप्रमाणे–

कैसे टुटैंगो हे राम धनुस भारी ।। ध्रु ।।
छत्तीस कोड़ देवता आए, आए आए इंदर बलकारी ।
नोथ कुली नागन की आई, आए आए बासिग नणिधारी ।
रावण बाणासुर से जोधा आए, आए राजा धनुधारी ।

अर्थ– हे रामा, तुला हे भारी शिवधनुष्य कसे बरें तोडता आले ? छत्तीस कोटी देवता, बलवान इंद्र, नवकुळीचे नाग, मणिधारी वासुकी, रावण, बाणासुर यांसारखे योद्धे व धनुर्धारी राजे, हे सर्व आले (पण यांपैकी कोणालाच धनुर्भंग करता आला नाही).

या डफगीतात काही गीते सवाल जवावाचीही असतात.

मराठीत डफगाणे या नावाने डफगीतांचा प्रकार शिवकाळापासून अस्तित्वात आहे. ही डफगाणी आध्यात्मिक कूटांच्या स्वरूपाची आहेत. एक शाहीर दुसऱ्या शाहिराला डफगाण्यातून आध्यात्मिक कूट प्रश्न विचारीत असे आणि त्या दुसऱ्या शाहिराला जर त्या प्रश्नाचे उत्तर देता आलें नाही, तर त्याला आपला डफ फोडून शरणागती जाहीर करावी लागत असे. एकदा शाहिरांच्या फडात समर्थ रामदासांनी एक डफगाणे गायिले होते. अहंकाराच्या भरीस पडून निरर्थक काथ्याकूट करणाऱ्या शाहिराला रामदासांनी प्रश्न टाकले, ते असे –

किती पृथ्वीचे वजन । किती अंगुळे गगन ।
सांग सिंधूचे जीवन । किती टाक ।।
वायूसरिसे उडती । सांग अणुरेणु किती ।
लक्ष चौऱ्यांसी उत्पत्ति । रोम किती ।।
किती आकाशीचा वारा । किती पर्जन्याच्या धारा ।
तृण भूमीवरी चतुरा । सांग किती ।।
सर्व सरितांची वाळू । सप्तसागरींची वाळू ।
किती आहे ते हरळू । सांग मज ।।
बीजे वडी आणि पिंपळी । किती आहे भूमंडळी ।
सर्व धान्यांची मोकळी । संख्या सांग ।।
अठरा भार वनस्पती । भूमंडळी पाने किती ।
फुले फळे जाती किती । सांग आता ।।
जे जे पुसिले म्या तुज । ते ते सांग आता मज ।
अनंत ब्रह्मांडी ब्रेरीज । किती जाली ।।
सांग माझे डफगाणे । का ते सोडी जाणपण ।
देहबुद्धीचे लक्षण । सोडवीन ।।

वाद–विवादाची ईर्ष्या बाळगणारा तो शाहीर या प्रश्नांनी निरुत्तर झाल्यानंतर रामदास म्हणाले –

श्रोती व्हावे सावचित्त । आता सांगतो गणित ।
सर्व आहे अगणित । सत्य वाचा ।।
रामदासाचे विनोदे । सोडा अहंतेची ब्रीदे ।
मग सर्वही स्वानंदे । सुखी राहा ।।

मराठी शाहिरी वाङ्मयातली कलगीतुरा संप्रदायाची मेदिक कवने ही डफगाणीच होत. पाहा – कलगी-तुरा. [स. गा; म. शा. वा.; श्री. मनोहर शर्मा – मरुभारती, फेब्रुवारी १९५४]

डफला एक जमात. हे आदिवासी लोक नेफाच्या सुबनसिरी विभागात राहतात. हा भाग पर्वतश्रेणींनी व्यापलेला असून समुद्रसपाटीपासून चार ते चौदा हजार फूट उंच आहे.

डफलांचे मूलस्थान कोणते व ते त्यांनी केव्हा सोडले, याविषयी काहीच माहिती उपलब्ध नाही. पण सर्व डफला आपल्याला आब्रो तेनी नामक एका पुरुषाचे वंशज मानतात आणि हिमालयाच्या अतिपूर्वेकडील सुपुंग नामक एका ठिकाणी आपले मूळ वास्तव्य होते, असे समजतात.

डॉ. हेमेनडार्फ याच्या मते डफलांचे दोन वर्ग आहेत. त्यांपैकी एका वर्गातील लोकांचा तोंडवळा गोल व थबकट, नाक रुंद व नकटे, गालाची हाडे वर आलेली, रंग फिकट पिवळट व पिंगट आणि बांधा लहानखोर असा आहे. हे लोक पॅलिओ-मंगोलाइड वंशाचे आहेत. दुसऱ्या वर्गातील लोकांचा चेहरा लांबट, नाक सरळ, डोळे खोल, वर्ण तांबूस व शरीरयष्टी उंच असते.

या दोन वर्गांतील माणसांच्या शारीरिक ठेवणीत अशी भिन्नता असली, तरी सर्व डफला मजबूत हाडापेराचे व सुरेख असतात. त्यांच्या स्त्रियाही मोहक व सुंदर असतात.

डफला लोक पूर्वी लूटमार करणारे म्हणून प्रसिद्ध होते. आसाममधील आहोम राजांच्या प्रजेवर हल्ले करून ते तिला

लुटीत. त्याचप्रमाणे आसपासच्या इतर प्रदेशांतही हल्ले करून ते लोकांची कत्तल करीत. इ. स. १८३५ मध्ये त्यांनी मैदानी प्रदेशातील लोकांवर हल्ला केला, म्हणून त्यांना त्या प्रदेशात प्रवेश करायला इंग्रजांनी बंदी घातली. इ. स. च्या २० व्या शतकाच्या प्रारंभापासून या लोकांशी इतरांचा संपर्क येऊ लागला आणि मग त्यांची हल्लेखोर वृत्ती कमी झाली.



डफला युवती

डफला खेडे उंच डोंगरमाथ्यावर वसलेले असते. खेड्याच्या भौगोलिक सीमा पक्क्या असतात. जोराम,.टालो, पाक्बा, इ. काही खेड्यांत प्रत्येकी पाचशेपेक्षा जास्त लोक राहतात; तर लायांगसारख्या नव्याने वसलेल्या खेड्यांत दोन–तीनच घरे असून त्यातली वस्ती तिसापेक्षाही कमी आहे. यांची खेडी फार अस्वच्छ असतात.

डफलांच्या प्रत्येक घराभोवती विस्तीर्ण जागा असते. त्यांचे घर जमिनीवर नसते; तर ते अनेक खांबांवर उभारलेले असते. घराची रुंदी साधारणपणे १८ ते २० फूट असते, तर लांबी कधी ५० वारांपेक्षाही जास्त असते. घरातल्या चुलींवर घराची लांबी अवलंबून असते. घराच्या भिंती तट्ट्यांच्या असतात व जमीन बांबूच्या कामट्यांची असते. छप्पर केळीची सोपटे, बांबूची वाळलेली पाने, मक्याची धाटे व भाताचा पेंढा किंवा वाळलेले गवत यांचे असते. घराच्या मागच्या टोकाला लाकडी फळ्यांचा एक मोठा सज्जा असतो. त्याच्या अर्ध्या भागावर छप्पर असते. या सज्जाला टुम्को म्हणतात. त्याच्यावर त्यांच्या योवू वियू या शिकारीच्या देवासाठी बांबूच्या कामट्या व क्र नामक झाडाची पाने यांची एक लहान घुमटी असते. घराच्या मध्यभागी ओळीने अनेक चुली असतात. त्यासाठी सुमारे अडीच फुटांचा एक चौरस ठेवलेला असतो. ही जागा लाकडी फळ्यांवर माती घालून तयार करतात. चुलीवर एकावर एक अशा दोन किंवा तीन फळ्या टांगलेल्या असतात आणि त्यांवर लाकूडफाटा, धान्य, मांस वगैरे ठेवलेले असते. घराच्या प्रवेशद्वाराच्या उजव्या हाताला असलेल्या भिंतीला न्योडांग असे म्हणतात. या भिंतीच्या बाजूला घरातले लोक झोपतात.

डफलांचे घर साधारण तीन वर्षे टिकते. त्यानंतर ते दुसरे घर उभारतात. ते शेजाऱ्यांच्या मदतीने आपली घरे बांधतात. घर बांधण्यापूर्वी त्या जागेबद्दल शकुन पाहतात. शकुन शुभ ठरला, तर ठरलेल्या दिवशी सगळे तिथे जमतात. प्रथम दोन रांगांत खड्डे खणून त्यांत खांब पुरतात. त्यांना दोन्ही बाजूंनी उतरत्या खांबांचा आधार देतात. खांबांवर जमिनीसाठी फळ्या टाकतात. एवढे झाल्यावर घरातील कर्ता पुरुष देवांना मद्य, आले, भात, इ. पदार्थ अर्पण करतो. त्या वेळी पुरोहित देवांची प्रार्थना करतो. घर बांधायला जमलेल्या सर्व लोकांना दुपारी जेवायला घालतात व दारू पाजतात. घरापासून थोड्या अंतरावर धान्य साठवण्यासाठी झोपडी बांधतात.



डफलांचे घर

घरातील सर्वजण पहाटे उठतात. लगेच एकामागून एक सर्व चुली पेटतात, मग पाण्याची मडकी चुलीवर चढतात. पुरुष व मुले निखाऱ्यात मक्याचे दाणे टाकून त्यांच्या लाह्या करून

खात बसतात. घराची गृहिणी धान्य सडून, पाखडून भात, भाजी व मद्य तयार करू लागते. मुली पाणी आणायला जातात. सर्वजण सकाळचे जेवण करून सूर्योदयापूर्वी कामाला बाहेर पडतात. दुपारी स्त्री–पुरुष सगळे घरी येतात. गृहिणी घरी येताना मद्य तयार करण्यासाठी व उकडलेली ज्वारी बांधून ठेवण्यासाठी पाने, भाजी व सरपण घेऊन येते. सायंकाळी सूर्यास्तापर्यंत सर्वजण जेवून – खाऊन मोकळे होतात.

वेषभूषा – डफला पुरुष कमरेभोवती एक जाडेभरडे कापड गुंडाळतात. एका रानटी झुडपाच्या धाग्यांपासून विणलेल्या घोंगडयाने ते छातीपासून अर्ध्या मांडयांपर्यंतचा भाग झाकून घेतात. क्वचित एखादा पुरुष त्यावर मिथुनाचे चामडे पांघरतो. सर्व पुरुष गळयात वंशपरंपराप्राप्त रंगीबेरंगी मण्यांच्या माळा घालतात. याशिवाय पितळेच्या साखळया, रानडुकरांचे व हरिणांचे सुळेही त्यांच्या गळयात असतात. त्यांच्या डाव्या हातात केसांची कडी व उजव्या हातात बांगडया असतात. कमरेभोवती ते वेताची अनेक कडी घालतात व गुडघ्यांखाली विणलेल्या वेताचे बंद बांधतात. याशिवाय ते आपल्या अंगावर तिबेटी तलवार, चाकू, काळया–तांबडया पट्टयांची लोकरी पट्टी व तंबाकू आणि चिलीम यांची पिशवी बाळगतात. मस्तकावर विणलेल्या वेताचे शिरस्त्राण घालतात. विविधरंगी पिसे शिरस्त्राणात खोचून त्याची शोभा वाढवतात. केसांची वेणी घालून कपाळावर तिचा अंबाडा बांधतात. त्याला पोडुम असे नाव आहे. त्यात सुमारे एक फूट लांबीची पितळी सळई आडवी खोचतात. मस्तकाभोवती विणलेल्या बांबूची पट्टी बांधतात. तिच्यावर धातूच्या बारीक घंटा बसवतात. कानात वलये घालतात.



वेताचे शिरस्त्राण

स्त्रिया कमरेभोवती पट्टयापट्टयांचा व हिरवी किनार असलेला परकर नेसतात. त्याच प्रकारचे ब्लँकेट उत्तरीय म्हणून घेतात व ते उजव्या खांद्यावर बांधतात. कमरेभोवती धातूच्या गोल चकत्यांनी सजवलेला पट्टा बांधतात. केसांचा अंबाडा मानेवर घालतात किंवा त्यांची वेणी घालून ती मस्तकाभोवती गुंडाळतात. मुलींचे केस अनेकदा मानेवर मोकळे सोडलेले असतात. त्यांच्या गळयात रंगीबेरंगी मण्यांच्या खूप माळा असतात. याशिवाय पितळी साखळया, धातूच्या घंटा, चहाचे चमचे, इ. वस्तूही त्या गळयात घालतात. त्या कानात मोठमोठी वलये व हातात बांगडया घालतात. पायात घोटयाजवळ गच्च बसणारे विणलेले वेताचे बंद बांधतात; पण त्यामुळे त्यांच्या सौंदर्यात भर पडण्याऐवजी पाय मात्र आवळले जातात. पूर्वी डफला स्त्रिया कापसाचे सूत बनवून जाडेभरडे कापड विणीत; पण हल्ली हे लोक आसामच्या बाजारपेठेतून गिरण्यांचे विविध रंगांचे, विशेषत: काळे आणि लाल सुती कापड खरेदी करू लागले आहेत. डफला ग्रामप्रमुख व पुरोहित सरकारने दिलेला लाल कोट अंगात घालतात.



सूत कातणारी डफला स्त्री

सुबनसिरी विभागात वेत व बांबू खूप वाढतात. डफलांचे हे कल्पवृक्षच होत. त्यांच्या रोजच्या जीवनात त्यांचा विविध प्रकारे उपयोग होतो. बांबूपासून ते पाण्याची भांडी, मद्याचे पेले, चमचे, बशा, चिमटे, चिलीम, टोपली, चटया, धनुष्यबाण, भाते, भाले, इ. विविध वस्तू बनवतात. वेतापासून ते दोऱ्या, दोरखंडे, नाजूक चटया, टोपल्या, पिशव्या, पंखे, कंगवे, इ. वस्तू तयार करतात. चामडयाच्याही ते पिशव्या वगैरे वस्तू बनवतात. डफला लोक कापूस पुष्कळ पिकवतात. पण तो ते अपातानींना देतात व त्याच्या बदली त्यांच्याकडून तांदूळ व डुकरे घेतात. लोखंडापासून तलवारी व चाकू बनवतात; त्याचप्रमाणे ते ब्राँझ व चांदी यांचे दागिनेही घडवतात.

डफला हे उत्तम शिकारी आहेत. प्रत्येक पुरुषाकडे स्वत:चे धनुष्य, साधे व विषारी बाण, भाता व लाल माकडाच्या

चामड्याची पिशवी या वस्तू असतात. मुलाला शरसंधानाचे शिक्षण लहानपणीच मिळते. शिकार हा डफलांचा आवडीचा उद्योग आहे. कारण त्यामुळेच त्यांना मांस खायला मिळते. काही वेळा जंगलात सापळे लावून ते पशुपक्ष्यांना पकडतात. डफलांना मासेही आवडतात. नदीच्या पात्रात बांबू व लाकूड यांचे बांध घालून त्यात ते मासे पकडतात. डफला लोक मिथुन (एक प्रकारचा गवा), डुकरे, गायी, शेळ्या, कोंबड्या व कुत्रे पाळतात.

शेती हा डफलांचा प्रमुख व्यवसाय आहे. ते झूम पद्धतीने शेती करतात. तीन–चार वर्षे एका जागी पीक काढल्यावर ती जमीन नापीक होते व त्यांना दुसरी जागा शोधावी लागते. शेतीच्या जागेतील झाडे तोडणे हे फार कष्टाचे काम असते. आणि पुरुषच ते करू शकतात. झाडे तोडल्यावर ती काही दिवस वाळू देतात व मग त्यांना आग लावतात. हे काम डिसेंबर ते मार्च या महिन्यात चालते. स्त्रियांचीही काही शेते असतात. त्यांतली झाडे घरातील पुरुष गावच्या पुरुषांच्या मदतीने तोडतात. मदतीला येणाऱ्यांना त्या जेवायला वाढतात व हवे तितके मद्यही देतात.

सर्वसाधारणपणे वर्षातून एकच पीक निघते; पण वर्षभर शेतीचे काही ना काही काम चालूच असते. शेतातले पेरणीचे काम स्त्रिया करतात. शेतात काम करताना स्त्रिया गवताचा परकर तयार करून तो वापरतात. धान्याची मळणी बहुधा हातानेच करतात. शेतात चांगले पीक येणे हे पार्टे व रिंटे नामक वियू (देवता) यांच्या सदिच्छेवर अवलंबून असते, असे मानतात. त्यामुळे एखाद्या वर्षी पीक कमी आले तर, त्या देवतांना कोंबडे बळी देऊन संतुष्ट करतात. घरापासून दूर असलेल्या शेतात जेव्हा प्रथमच धान्य पिकते, तेव्हा श्रीमंत डफला देवाला डुकराचा बळी देतात आणि गावातल्या लोकांना जेवण घालतात. त्या वेळी नाचगाणी होतात.



गवताचा परकर

भात, मांस, भाज्या, मक्याची भाकरी, रताळ्यासारखे कंद, बांबूचे कोंब व मद्य हा डफलांचा आहार होय. रोज ताजे मांस मिळणे शक्य नसल्यामुळे हे लोक मांस धुरी देऊन वाळवून ठेवतात व प्रसंगाप्रसंगाने पाण्यात शिजवून खातात. त्यांच्या सर्व धार्मिक व सामाजिक प्रसंगी मद्याला महत्त्वाचे स्थान आहे. टिमी नामक धान्याचे मद्य त्यांना अधिक आवडते. तांदुळाच्या मद्याने पोट दुखते, तर मक्याच्या मद्याने डोके दुखते, अशी त्यांची समजूत आहे.

सर्व डफला आबो तेनी या पुरुषाला आपला पूर्वज मानतात. त्याचा नातू रिंगडो याला डोडुम, डोल व डोपुम असे तीन पुत्र होते. या तीन मुलांच्या नावांवरून डफलांचे तीन वर्ग पडले आहेत. त्यांपैकी पहिल्या दोन वर्गांचे डफला संख्येने अधिक असून डोपुम डफला अगदी कमी आहेत. या तीन्ही वर्गांत परस्पर रोटीबेटीव्यवहार होतो. या वर्गांचे पुन्हा अनेक गोत्रे व कुळे यांत विभाग केलेले आहेत. एकाच गोत्रात वा कुळात लग्ने होत नाहीत.

एका डफला कुटुंबात एक कर्ता पुरुष, त्याच्या बायका व मुले एवढी माणसे असतात. गृहस्थ पुरुष बहुधा सर्वांत मोठ्या पत्नीकडे राहायला असतो; पण आळीपाळीने तो सर्व स्त्रियांकडे जातो. पहिली पत्नी वृद्ध किंवा वांझ असल्यास तो दुसऱ्या पत्नीकडे राहतो.

काही वेळा डफला कुटुंबात कर्त्या पुरुषाचे सख्खे किंवा चुलत भाऊ व त्यांची कुटुंबे राहतात. पण एकाच घरातील ही कुटुंबे एकमेकांपासून स्वतंत्र असतात. त्यांची शेती व धान्याचे कोठारही वेगळे असते. सर्व कुटुंबांतील सर्व पुरुष एकमेकांच्या शेतात आळीपाळीने काम करतात. कुटुंबातील लहान मुले वडिलांप्रमाणेच चुलते व आजोबा यांचीही आज्ञा पाळतात. वरिष्ठांची आज्ञा पाळायला मुलांना लहानपणापासूनच शिकवतात. मुले मोठी झाली म्हणजे घरातला कर्ता पुरुष घरच्या व्यवहाराबाबत मुलांचा सल्ला घेतो.

डफलांची कुटुंबपद्धती पितृसत्ताक आहे. वंशावळ लक्षात राहील अशी खबरदारी ते मुलाचे नाव ठेवतानाच घेतात. बापाच्या नावाचे अंत्याक्षर ते मुलाच्या नावाचे आद्याक्षर असते. उदा० हेरिंच्या मुलाचे नाव रिंगडो असे असते.

डफला लोकांत स्त्रियांच्या हक्कांबद्दल काही कायदेशीर तरतूद नाही. स्त्री ही विकत घेतलेली मालमत्ता असून, नवऱ्याचा तिच्या शरिरावर पूर्ण हक्क असतो, अशी डफलांची धारणा आहे. त्यामुळे पतीने पत्नीला मारझोड केली किंवा प्रसंगी तिला ठार मारले, तरीदेखील तिचे नातेवाईक त्याबद्दल कायदेशीर इलाज करू शकत नाहीत. धार्मिक क्षेत्रातही डफलांच्या स्त्रियांना काही अधिकार नाही. घरातल्या व्यवहारात मात्र त्यांना पुरेसे स्वातंत्र्य असते.

डफलांच्या घरात प्रत्येक पत्नीची स्वतःची वेगळी चूल

असते. तिच्या मालकीची थोडी शेतजमीनही असते. त्यात ती स्वतः खपून पीक काढते. कापणीच्या वेळी नवरा तिला मदत करतो. तिने काही कोंबड्या, डुकरे किंवा बकऱ्या पाळलेल्या असतात. याशिवाय सरपण गोळा करून आणणे, रताळी, अळंबी, भाज्या वगैरे आणून मुलांना त्या शिजवून घालणे, हेही काम तिलाच करावे लागते. रोज नवऱ्याला जेवायला घातलेच पाहिजे, असे तिच्यावर बंधन नसते. सर्व बायका आपसात त्याबद्दल काय ते ठरवतात. पण पतिनिष्ठ स्त्री मात्र आपल्या नवऱ्याला रोज मद्य तरी देतेच.



डफलांचा प्रमुख

मजी (तिबेटातील लोळी नसलेल्या घंटा) व तालू (धातूच्या थाळ्या) या मौल्यवान समजल्या जाणाऱ्या वस्तू मोठ्या पत्नीच्या ताब्यात असतात व ती त्या गुपचूप जमिनीत पुरून ठेवते. गृहव्यवस्थेत तिलाच जास्त अधिकार असतो.

प्रसूतिप्रथा—मूल ही वियू देवतांची देणगी आहे, असे डफला समजतात. बाळंतपण बहुधा कोंबड्यांसाठी तयार केलेल्या जागेत होते. प्रसूतीच्या दुसऱ्या दिवशी पुरोहिताला बोलवतात. तो कोंबडीच्या पिल्लाच्या यकृतावरून काही शकुन पाहतो आणि मुलाचे नाव ठेवतो. मुलीचे नाव महिन्यानंतरही ठेवतात. नामकरणाच्या दुसऱ्या दिवशी आप्तेष्टांना मद्य देतात किंवा शक्य असल्यास जेवणही घालतात. प्रसूतीनंतर सहा दिवसांनी स्त्री घरातले कामकाज करू लागते.

बाळंतीण होताना स्त्री अडली, तर ती वियूंची अवकृपा समजून त्यांना बलिदान करतात. बाळंतपणात स्त्री मेली आणि कोंबडीच्या अंड्याच्या शकुनावरून तिचे मूल दुर्दैवी आहे, असे ठरले, तर आईबरोबरच त्या जिवंत मुलालाही पुरून टाकतात.

पहिले सहा महिने मूल आईच्या किंवा दुसऱ्या कोणत्या तरी स्त्रीच्या हातावर असते. नंतर त्याला कोणाच्या तरी देखरेखीखाली झोळीत ठेवतात.

डफलांच्या मुलांना आईबाप स्वच्छता कधीच शिकवीत नाहीत. पाणी किंवा पाण्यात खेळायला मुलांना मुळीच आवडत नाही. मुलगा तीन–चार वर्षांचा झाला, की त्याला आईची आज्ञा पाळायची एवढे समजते. त्याने तसे केले नाही, तर आई त्याच्या तोंडावर थुंकते. मुलाला त्या गोष्टीचा फार अपमान वाटतो. मुले लहानपणीच चिलीम ओढू लागतात व तंबाकू चघळू लागतात. तंबाकू खाल्ल्यावर थुंकायचे कसे, याचे शिक्षण त्यांना आईबाप देतात. बाण सोडण्यापूर्वी हाताला व हजामतीपूर्वी डोक्याला थुंकी लावण्याची त्यांची पद्धत आहे. कापले, भाजले, खरचटले किंवा डॅमडिम माशी चावली, तर त्यावर औषध म्हणूनही थुंकीच लावतात.

मुलगा साधारण सोळा – सतरा वर्षांचा झाला, की तो कपाळावर पोडुम बांधू लागतो.

विवाहप्रथा—डफला पुरुष अनेक बायका करतात. त्यांची तें जी अनेक कारणे सांगतात, त्यांपैकी काही अशी – शेतात काम करण्यासाठी त्यांना स्त्रियांची गरज असते हे पहिले अनेक लग्ने केल्याने लैंगिक विषयात विविधता अनुभवायला मिळते हे दुसरे, पुष्कळ संतती मिळते हे तिसरे व सामाजिक प्रतिष्ठा लाभते, हे चौथे होय.

एकाच पुरुषाने अनेक बायका केल्यामुळे इतर काही पुरुषांना बायको मिळणे अवघड होत असेल, असे वाटते. पण प्रत्येक लग्नाच्या वेळी कन्याशुल्क द्यावे लागत असल्यामुळे आणि सर्वांनाच ते परवडण्यासारखे नसल्यामुळे बायकांच्या संख्येला आपोआपच मर्यादा पडते. शिवाय अविवाहित मुलाला, जनक माता सोडून, त्याच्या बापाच्या मालमत्तेचा भाग म्हणून

सर्व विधवाही पुष्कळदा भार्या म्हणून उपभोगायला मिळतात.

सर्वसाधारणपणे मुलामुलींची लग्नें आईबाप ठरवतात. लग्न ठरवताना पैसा आणि घराण्याची सामाजिक प्रतिष्ठा विचारात घेतात. मुलगी पसंत पडल्यावर कन्याशुल्क ठरवतात. मग थोडचा दिवसांनी वरपिता कोंबडीच्या पिल्लाच्या यकृतापासून शकुन घेतो व एक मिथुन, डुकराचे मांस, कापड, एक डाओ (तलवार), मिठाची पाच गाठोडी आणि मद्यासाठी आंबवलेल्या धान्याच्या करंडचा एवढे साहित्य घेऊन वधूगृही जातो. त्याच्या बरोबर त्याचे आप्तेष्टही असतात. ते तीन दिवस तिथे राहतात. त्या वेळी रोज रात्री दोन्ही बाजूंकडील पुरोहित चढाओढीनें गाणी गातात.

कन्याशुल्क वार्षिक किंवा सहामाही हप्त्याने देतात. प्रत्येक हप्ता स्वीकारताना वधूपिता मणी, कापड, डाओ, इ. वस्तू भेटीदाखल देतो.

ठरलेले कन्याशुल्क देऊन झाल्यावर एक दिवस वरपक्षाकडील लोक वधूगृही जाऊन तिला आपल्या घरी घेऊन येतात. त्या वेळी कसलाही समारंभ करीत नाहीत. फक्त वधू–वरांना नवीन कपडे घालायला देतात. परतताना वाटेत ते गाणी गातात व मद्यही पितात. रानातील वियूंना अंडी व कोंबडीची पिल्ले अर्पण करतात व ते जर वरातीबरोबर येत असतील, तर त्यांनी परत आपल्या स्थानी जावे, म्हणून प्रार्थना करतात.

सासरघरी आल्यावर वधू घराच्या पुढल्या बाजूच्या सज्जात थांबते व तिथे एक कोंबडा बळी दिल्यावर घरात शिरते. नंतर थोडचा दिवसांनी यूलो नामक एक समारंभ करतात व त्या वेळी एक मिथुन बळी देतात.

कन्याशुल्क देऊन वधू मिळवणे, हा लग्नाचा आदर्श प्रकार समजला जातो. पण काही वेळा डफला तरुण यापेक्षा इतर मार्गांचाही अवलंब करतात. प्रेयसीला पळवून आणणे हा त्यातला एक मार्ग होय. एखाद्या पुरुषाने तिच्या आईबापांकडे कन्याशुल्काचा एखादा हप्ता दिलेला असेल, तर मात्र आईबाप अशा पळवून नेलेल्या मुलीला शोधून घरी आणतात. मग तिचा प्रियकर कन्याशुल्क देतो व त्यातून पहिल्या पुरुषाकडून घेतलेले शुल्क त्याला परत केले जाते.

काही वेळा डफला तरुण आपल्या भावी सासऱ्याच्या घरी दोन वर्षे काम करतो व मग त्याच्या मुलीशी लग्न करतो.

डफला पुरुष आतेबहिणीशी लग्न करीत नाहीत; पण मावशीशी मात्र करतात.

राजकीय जीवन – भारत सरकारचे प्रशासन सुरू होण्यापूर्वी डफला लोकांचे जीवित व वित्त सुरक्षित नव्हते. बारीकसारीक भांडणावरून डफला लोक एकमेकांचा जीवही घेत असत. शत्रूने आधी त्यांच्यापैकी कोणाला ठार मारले असेल, तर शत्रूपैकी कोणालाही ते ठार करीत. चोरीसारख्या अपराधाबद्दल ते शत्रुपक्षाकडच्या स्त्री–पुरुषांना पकडून आणीत. ठार मारलेल्या शत्रूचा डावा पंजा कापून घेऊन डफला पुरुष परत आपल्या प्रदेशात येत. मग सर्व जण जमून वसार युजिंग म्हणजे लाकडाचा व बांबूचा मांडव बांधून त्याच्यावर तो कापून आणलेला हात ठेवीत व त्यावर थोडे मद्य ओतीत. मग सर्व पुरुष आनंदाने बेहोष होऊन नृत्य करीत. पुरोहित त्या वेळी मंत्र म्हणत. नंतर तो हात एका विशिष्ट झाडाच्या खोडाला ठोकून टाकीत आणि त्या हातावर बाण मारीत.



शत्रूचा हात झाडावर ठोकून
त्यावर बाण मारतात

ते पकडून आणलेल्या शत्रूचा पाय खोडचात अडकवून ठेवीत. मग त्याचे आप्तेष्ट त्याबद्दल दंड भरून त्याला सोडवून नेत. अन्यथा त्याला गुलाम म्हणून त्यांच्याकडे राहावे लागे. मात्र त्याची वर्तणूक चांगली असल्यास मालक त्याला कुटुंबातल्या माणसाप्रमाणेच वागवी आणि एखाद्या गुलाम मुलीशी कन्याशुल्क भरून त्याचे लग्नही लावून देई.

डफला लोकांच्या कायद्याप्रमाणे वेगवेगळ्या गुन्ह्यांना वेगवेगळे दंड ठरवलेले आहेत. व्यभिचार हा डफला लोकांत वारंवार आढळणारा गुन्हा आहे. त्याला कारणेही अनेक आहेत. लग्नापूर्वी डफला तरुण–तरुणींना स्वातंत्र्य असते आणि त्या काळात जन्मलेल्या मुलांकडे समाज वाईट दृष्टीने बघत नाही. एकच पुरुष अनेक बायका करीत असल्यामुळे काही वेळा त्या बायका असंतुष्ट राहतात आणि मग वाईट मार्गाला लागतात. नवरा–बायकोच्या वयातील अंतर हेही एक अशा प्रवृत्तीचे कारण असते. स्त्रीचा असला गुन्हा उघडकीला आल्यावर नवरा तिला मारझोड करतो. या लोकांत आपले निरपराधित्व सिद्ध करण्यासाठी शपथ घेण्याची व दिव्ये करण्याची पद्धत आहे.

देवधर्म – डफलांच्या मते वियूंचे वास्तव्य सर्वत्र असते. त्यांपैकी काही वियू देवता उपकारक असतात. आने डुइनी किंवा सूर्यमाता ही कृपाळू असते आणि तिच्या कृपेनेच माणसाला संतती व संपत्ती मिळते. तिला ते मिथुनाचा बळी देतात. दोजिंग, थापोम, जेंगटे, इ. वियू माणसांना आजारी पाडून त्यांचा बळी घेतात, म्हणून वियूंना बळी देऊन संतुष्ट केले जाते. बळी देण्यासाठी घराच्या जवळच युजिंग नामक बांबूचा मांडव असतो. त्याला भुताखेतांचे प्रतीक मानतात. बळी द्यायचे प्राणी त्या प्रतीकाला बांधून ठेवतात. बळी दिलेल्या प्राण्याची यकृते बाहेर काढून त्यांपासून शकुन घेतात. डुकरे आणि मिथुने यांचे रक्त बांबूच्या मांडचात गोळा करतात व गरम करून कुळांतले लोक ते पितात.



खोडयात अडकवलेला शत्रू

डफला लोकांत पुरोहिताला फार मान असतो व धार्मिक विधींप्रमाणेच जन्म, मृत्यू, बळी, इ. प्रसंगांतहीं त्याची आवश्यकता असते. रोग्याला औषध देण्याचे कामही तोच करतो.

मर्तिकप्रथा – डफला लोक घराच्या जवळच प्रेते पुरतात. पुरायच्या जागी बांबू व लाकूड यांचा मनोरा उभारतात आणि तो पाने व पशूंची शिंगे यांनी शृंगारतात. मृताबरोबर मद्याचा भोपळा व भाताची मडकी मृताचे पाथेय म्हणून पुरतात. पुरलेल्या जागेजवळ संध्याकाळी अग्नी पेटवतात व तिथे अन्न आणि मद्य ठेवतात. [दि डफलाज् – श्री. बी. के. शुक्ल, १९५९]

डमरू एक चर्मवाद्य. हे शिवाचे वाद्य आहे. माहेश्वरसूत्रे शिवाच्या डमरुनादातूनच उद्‌भवली, असे मानले जाते. डमरू हे शब्दब्रह्माचे प्रतीक आहे. शिवाने तांडवनृत्याच्या प्रसंगी या वाद्याची निर्मिती केली, असे म्हणतात. संगीतशास्त्रातील तालांचे उगमस्थान डमरूच्या नादामध्ये आहे असे संगीतशास्त्रज्ञांचे मत आहे. सर्व चर्मवाद्ये डमरूतूनच उत्क्रांत झाली असावीत, असे काही जाणत्यांचे अनुमान आहे. याचे लक्षण संगीतरत्नाकरात पुढीलप्रमाणे दिलेले आहे –

वितस्तिमात्रदैर्घ्यः स्यादष्टाङ्गुलमुखद्वयः ।
यो यस्य मण्डलीयुक्ते मुखे बद्धे च चर्मणा ॥
त्रिवलीवत्क्षाममध्यो निबद्धः सूत्रदोरकैः ।
मध्ये च गाढतां नीतावञ्चन्यौ वादनाय च ॥
भंवेतां प्रान्तसंलग्नसमृन्मदनगोलकैः ।
असौ डमरुको मध्ये धृत्वा हस्तद्वयेन च ॥
डघवर्णौ वादनीयः प्रोक्तो निःशङ्कसूरिणा ।
अन्यैः कखरटा वर्णाः प्रोक्ता डमरुकेऽधिकाः ॥

अर्थ – डमरू हे वाद्य वीतभर लांब असते. त्याच्या दोन्ही तोंडांचा व्यास आठ-आठ अंगुळे असतो. दोन्ही वर्तुळाकार तोंडांवर लोखंडी कडी बसवून त्यांवर चामडे ताणून वसविलेले असते. डमरूचा मध्यभाग सिंहकटीप्रमाणे कृश असतो. दोन्ही तोंडांवर चढविलेल्या चामडयांच्या कडांतून ओवून घेतलेल्या सुताच्या दोरीच्या वेढयांना मध्यभागी दुसऱ्या एका दोरीने आवळून बांधलेले असते. मध्यभागी दोन लोंबत्या दोऱ्या बांधून त्यांच्या टोकांना माती व मेण यांच्या गोळ्या बांधलेल्या असतात. अशा या डमरूचा निमुळता भाग हातात धरून डघ वर्ण वाजवावा, असे निःशंक पूर्वाचार्यांनी म्हटले आहे. कख किंवा रट असे वर्ण वाजवावे, असेही काहींचे मत आहे.



डमरू

उदुक्क, निदुक्क, बुद्‌बुदक ही डमरूचीच अन्य रूपे आहेत.

कापालिक शैवांच्या हाती डमरू असते. माकडवाले आणि गारुडी (मदारी) लोक आपापल्या खेळांच्या वेळी डमरू वाजवून माणसे गोळा करतात.

प्राचीन भारतातील शैव वाङ्मयात डमरूच्या नादाची आणि

त्या नादाने प्रभावित झालेल्या वातावरणाची अनेक वर्णने आढळतात. डमरुध्वनीचा संबंध शिवाच्या संहारक तांडवनृत्याशी असल्यामुळे अनेक शिवभक्तांना अनिष्टसंहारासाठी डमरुध्वनी प्रिय झालेला आहे. कविवर तांबे यांनी रुद्राला आवाहन करतांना डमरूचा उल्लेख केला आहे--

डुमडुमत डमरु ये खणखणत शूल ये
शंख फुंकीत ये येइ रुद्रा ।

भैरवाचे उपासक असलेले महाराष्ट्रातील भराडी डाव्या हाती डमरू (डौर) धरून उजव्या हाताच्या बोटाने ते वाजवतात. नेपाळात डमरू (डंफू) च्या साथीने केले जाणारे एक नृत्य प्रचलित आहे, त्याला डंफूनृत्य असे नाव आहे. [म्यु. इं.; शिवलिंगोपासना; इं. वु. इ.; डि. सा. इं. म्यु. म्यु.; श्री. आबासाहेब, मुजुमदार, पुणे; ए. हो. रा.]

डवरे गोसावी एक जात. या जातीचे भराडी हे नाव महाराष्ट्रात विशेष प्रचारात आहे. भराडी लोक डौर (डमरू) वाजवून भिक्षा मागतात, म्हणून यांना डौरे (डवरे) गोसावी असे म्हणतात. पाहा– भराडी.

डांक (१) एक वाद्य. हे ढोलक्याएवढे परंतु आकाराने डमरूसारखे असते. डांक लाकडाची किंवा मातीचीही करतात. तिला गोवर्धनी गाईच्या पोटाच्या आतल्या भागाचे चामडे लावतात. ते न मिळाले, तर वाघाने मारलेल्या गाईचे किंवा बकरीचे कातडे चालते. या डांकेला शेषाची कन्या समजतात.

(२) महाराष्ट्रात प्रचलित असलेला उत्तरक्रियेचा एक प्रकार. या क्रियेचे पौरोहित्य कुंभाराकडे असते. ब्राह्मणांशिवाय इतर अनेक जातींत कुंभाराकडून क्रिया करून घेतल्याशिवाय मृताला मुक्ती मिळत नाही, अशी समजूत कोकणात सर्वत्र आढळते. या विधीत डांक नावाचे वाद्य वाजवतात म्हणून या विधीला डांक असे म्हणतात.

मृताच्या अकराव्या दिवशी दोन कुंभार त्याच्या घरी जातात. तिथे गेल्यावर ते तांदुळांनी गाई, चंद्र, सूर्य, गणपती, मारुती, तुळशीवृंदावने, गंगा, पाच पांडव, दीपमाळ व गाईच्या शेपटीला धरून असलेले प्रेत, अशी चित्रे काढतात. नंतर त्या चित्रांवर नारळासह कलश ठेवतात. या कलशावर छताप्रमाणे पांढरे वस्त्र अंबाडीच्या वाखांनी बांधतात. छताला बांधून कलशावर फुलांची माळ लोंबवतात. तांदुळाच्या रांगोळीवर सतरा पैसे व तेरा सुपाऱ्या ठेवतात. गाईच्या रांगोळीपुढे मृताचा जीवखडा ठेवून, त्यापुढे स्वर्गी ज्योत (मातीच्या दिव्यामध्ये तेलाची वात) लावतात. क्रिया करणारा मयताचा मुलगा किंवा वारस तोंडात पाण्याची चूळ धरून दुसऱ्या दिव्याने ती स्वर्गी ज्योत पेटवतो. ती पेटवली जात असता कुंभार तिचे गाणे म्हणतात, ते असे –

पहिली ज्योत उजल्या, कुरमुळचा तो सया, श्रीकृष्ण सवया,
साधूच्या संगतीं ज्यानुंबा दिधला,
तोंडी गुरळा धरुनी ज्योत उजलया.
पाषाणाची मूर्ती, निर्जीवाच्या आरती सजीव पूजितो.
तिथून भीमा आली. तुम्ही ना आम्ही नाही.
कशात बोलो पंडिता. राऊळ कोण्या ठायीं ?
देऊळ कोण्या ठायी ?
पाषाणाचे देऊळ, निर्जीवाच्या आरती सजीव पूजितो.

नंतर मयताचा मुलगा तीन द्रोण पाणी नागवेलीच्या पानावर ओततो. त्या वेळी कुंभार पुढील गाणे म्हणतात –

बापाकारणे लेक धर्म करी
उद्धार म्हणे पापा-पुण्याची होते ध्वनी.
एकच मायेचे, एकच बापाचे
कोळचावरा संभाळ करी.
शिवाची शिवपुरी, गंगेस स्नान करी.
मुखी ध्यान त्या गोविंदाचें.
मुलाचश दानें बापाने घेऊन देवलोकीं जाणें
स्वर्गी वाटा मोकळचा
गोदान वस्त्रदान दानासी दान मोक्षगती.

यानंतर कुंभार अनेक कथागीते गाऊन त्यांतल्या कथा सांगतात. डांकक्रियेतले मुख्य गाणे लांबलचक असून, त्यात पांडव आणि पांडुराजा यांची कथा असते. तिचा सारांश असा –

पाच पांडवांना पांडूचा व्याग (अंत्यक्रिया) करायचा होता. ते गेले एका ऋषीकडे. त्याला त्यांनी विचारले. ‘ आमचा बाप यमाच्या बांधावळीला पडला आहे. त्याला खाली कसे आणायचे, ते सांग. ’ पण ऋषीने त्यांना उपाय सांगितला नाही. मग धर्मराजा आपल्या पुण्याईने यमलोकी गेला. त्याने यमाला जागे केले व व्यागासाठी पांडूची मागणी केली. यम नाखुषीनेच त्या गोष्टीला तयार झाला. त्याने कुऱ्हाड घेऊन पांडूचे बंध तोडले व त्याला धर्माच्या स्वाधीन केले. त्याला घेऊन धर्म सुताच्या पांवड्याने खाली उतरला व हस्तिनापुरी आला. पांडव हर्षभरित झाले. त्यांनी मग व्यागाची तयारी केली. लंकेचे कोरे सोंने आणले. गंगा, तुळशी, गायत्री, माळ आणि कोरा शेला आणला. कुंभाराकडून शेषकन्या (डांक) आणली. मग सगळा व्याग यथासांग केला. त्यामुळे पांडुराजा उद्धरून स्वर्गाला गेला. पांडव पितरांच्या ऋणातून मुक्त झाले.

हा कथांचा आणि गीतांचा कार्यक्रम संपल्यावर यजमान कुंभारांना पीठ, काजळ-कुंकू, गूळ, एक नारळ, पाच सुपाऱ्या

व पाच पैसे देतो. नंतर नदीवर जाऊन पिंडदान करतो. घरी आल्यावर अंबाडीच्या दोन-तीन काड्या जमिनीवर ठेवून पेटवितो आणि त्यात तीळ, भात व तूप यांचे हवन करतो. हे हवन झाल्यावर डांकक्रिया संपते. शेवटी यजमान आपल्या शक्त्यनुसार कुंभारांना दान देतो. [वदलापूर]

(३) गोंधळासारखाच असलेला देवीच्या कुळधर्माचा एक प्रकार. गोंधळ गोंधळी घालतात, तर डांक कुंभार घालतात. डांक घालताना कुंभार डांक हे वाद्य वाजवून गोंधळाप्रमाणेच अनेक कथा सांगतात व कथागीते गातात. डांकेवरचे एकनाथांचे पुढील भारूड या कुळधर्माचे स्वरूप स्पष्ट करणारे आहे--

सुंदरे चिद्घने माझे रंगां येई वो ।
वाजविली डांक, सत्वर पावे दीनानाथा वो ॥
भरिला हृदयीं चौक, भोग आनंद घातला वो ।
सोहं सुमनमाळा, घट पूर्णत्वें भरिला वो ॥
अहंधूप जाळुनि, भावें केली धूपारती वो ।
लावुनि त्रिगुणवाती केली चिन्मयआरती वो ॥
छेदुनि भेदवचन षड्रस पक्वान्नें वो ।
पूर्णपात्र भरुनि केलें आत्मनिवेदन वो ॥
नाचती वैष्णव रंगीं, करती जयजयकार वो ।
भावाचें दर्शन, गळां तुळसीचे हार वो ॥
ऐसें स्तवन करितां अंबा आलीसे रंगणीं वो ।
कायावाचामनें शरण एका जनार्दनीं वो ॥

डांक घालण्याची प्रथा महाराष्ट्रात देशावरच्या अनेक घराण्यांत आढळते. [म. श. को.; गा. पं. ३]

(४) आदिवासी व अंत्यज जाती यांच्यामध्ये रूढ असलेली भूत-पिशाचविद्या. डांक हे वाद्य वाजवून मृत मनुष्याला एखाद्याच्या अंगात संचार करायला लावून बोलते करणे, असा एक गूढ विधी महाराष्ट्रात काही जातींत आढळतो. वारली लोक देवाचे वारे अंगात यावे म्हणून डांक वाजवतात. ‘ डांकाअनुहातगजरे। येउनि अंगासी संचरे ’ या तुकारामाच्या रूपकात्मक उद्गारात डांक वाजवून वारे अंगात आणण्याचा प्रकार निर्दिष्ट आहे. [म. श. को.; म. लो. सा.४]

डांग गुजरातेतील एक जिल्हा. आहवा हे जिल्ह्याचे ठिकाण. हा जिल्हा ब्रिटिश अमदानीपूर्वी १५ भिल्ली संस्थानांचा एक समूह होता. जिल्ह्याचे क्षेत्रफळ एक हजार चौरस मैल आहे. उत्तरेस बडोदे जिल्हा, दक्षिणेस नाशिक जिल्हा, पूर्वेस खानदेश व पश्चिमेस सुरत जिल्हा अशा त्याच्या चतुःसीमा आहेत. डांग या शब्दाचा अर्थ डोंगराळ भाग किंवा दाट जंगल असा आहे. डोंगर-दऱ्यांच्या या प्रदेशात अंबिका, पूर्णा, काप्री व गिरा या नद्या असून, त्या सुरत जिल्ह्याकडे वाहत जातात.

इथे प्रचलित असलेल्या दंतकथा डांग प्रदेशाचा राम-सीतेशी संबंध दाखवतात. लंकाविजयानंतर राम-सीता परत जात असता अगस्त्याच्या सांगण्यावरून डांगजवळच्या वासंदा संस्थानातल्या पातखडा या गावात उतरली व तिथे रामाने यज्ञ केला. या यज्ञासाठी त्याने हिमालय प्रदेशातून ब्राह्मण बोलावले होते.

दुसरी दंतकथा अशी, की अंबिका नदीच्या काठीच हा यज्ञ झाला आणि रामाने डांग आदिवासींतूनच काहींना ब्राह्मण बनवले. या ब्राह्मणांसाठी रामाने जमिनीत बाण मारून पाण्याचा झरा निर्माण केला. डांग जिल्ह्यातला उनाईचा झरा तो हाच होय. डांगमधील जंगलाच्या एका पट्ट्याला सीतेचे वन म्हणतात, त्याच्या मागे वरील आख्यायिका आहे.

अश्वमेध यज्ञाच्या वेळी अर्जुन ज्या चंपावतीच्या जंगलात गेल्याचा उल्लेख कथाकल्पतरूत मिळतो, ते जंगल इथेच असावे, असे म्हणतात. औरंगजेबाच्या स्वारीपर्यंत डांगची संस्थाने स्वतंत्र असावी, असे वाटते. इ. स. १६३७ मध्ये औरंगजेबाने बागलाण प्रांत काबीज केला, त्यात ही समाविष्ट झाली होती, असे दिसते. इंग्रजी राज्य झाल्यावर डांग राजे स्वतंत्र बनले.

डांगमध्ये सर्वांत अधिक लोकसंख्या भिल्लांची आहे. त्याशिवाय कोकणे, कुणबी आणि वारली याही जाती–जमाती आढळतात. भिल्ल जमातीत अहीर, चौधरी, देशमुख, गायकवाड, जाधव, पवार, शिंदे, इ. आडनावे आढळतात. रंग काळा, अंगावर केस कमी, लहान बांधा, मोठे पोट, सामान्य नाक-डोळे ही त्यांची रूपवैशिष्टचे आहेत. या लोकांची कष्ट करण्याची ताकद भरपूर आहे. या लोकांत तंबाकूचे व दारूचे व्यसन जबरदस्त आहे.

इथल्या स्त्रियांचे नेसते वस्त्र जेमतेम कमरेपासून गुडघ्यापर्यंत असते. अलिकडेच त्या बायका पदर घ्यायला शिकल्या आहेत. कासोटयाचे लुगडे, चोळी व डोक्यावर पदर असाही काही स्त्रियांचा पोशाख असतो. पितळेच्या साखळ्या, रंगीबेरंगी मण्यांच्या व चांदीच्या पुतळ्यांच्या माळा, कानात तांब्यापितळेची सुंकली, हे स्त्रियांचे अलंकार असतात. पुरुषांच्या कमरेला रुमाल व अंगात कुडते असते. तेही चांदीच्या बाळ्या, कडी, करगोटा, इ. दागिने वापरतात.

डांगमधले खेडे तीस–चाळीस झोपड्यांचे असते. मातीची व पितळेची भांडी, थाळ्या आणि एखादी बाज एवढाच कुटुंबाचा गृहसंभार असतो. नागली, भात यांसारखी हलकी धान्ये पिकवून हे आपला उदरनिर्वाह करतात. हे लोक कोंबड्या व गुरे पाळतात. पण दूध त्यांना मुळीच आवडत नाही. बहुतेकांजवळ

शिकारीसाठी धनुष्य-बाण असतात. इ. स. च्या १९ व्या शतकाच्या प्रारंभी हे लोक शेजारच्या प्रदेशांत लुटालूट करीत, असे सांगतात. वसती एका ठिकाणहून दुसरीकडे हालवताना पहिल्या झोपडचा जाळून टाकतात. त्यांची भाषा गुजराती व मराठी या भाषांच्या मिश्रणाने बनलेली आहे. मुतेखेते, जारणमारण, चेटुक यांवर त्यांची अतिशय श्रद्धा असते. स्त्रियांनी तर ही विद्या हस्तगत करण्यासाठी मुलगा व नवरा, यांचेही बळी दिले आहेत, असे सांगतात. त्यामुळे पुरुष आपल्या आईला किंवा बायकोलाही भितात. चेटकावर भगतांचा उतारा असल्याने चेटकिणी भगतांना फार भितात. पानफोडचा व दगडफोडचा असे भगतांचे प्रकार असतात. हे लोक नाग, साप, वाघ, डोंगर बरमदेव, हनमत, वीर (पूर्वज) यांची पूजा करतात.


डांगमधील युवती


डांगमधील भगत

विवाहप्रथा – मुले-मुली मनाप्रमाणे आपला जोडीदार निवडतात. यांची लग्ने फार उशीरा; कधी कधी चार मुले झाल्यावरही होतात. लग्नात धार्मिक विधी सहसा होतच नाही. वाङ्‌निश्चयावरच त्यांच्या संसाराला सुरवात होते. त्यांच्यांत सामुदायिक विवाह होतात. त्या वेळी लौकिक आचारच पाळतात. विवाहाच्या वेळी पाटील उपस्थित असावा लागतो. काही जमाती लग्नाच्या पौरोहित्यासाठी ब्राह्मणांना बोलावतात. लग्न झाल्यावर एका वर्षाने स्त्री-पुरुष एका शय्येवर येतात. पतिपत्नींची भांडणे व काडीमोड या गोष्टी डांगी आदिवासींत सर्रास सुरू असतात.

प्रसूतिप्रथा – मूल जन्मल्यावर पाचव्या दिवशी पाचोरा नावाचा विधी करतात. त्या वेळी बाळंत्यात मुलगी असली, तर तिला पाळण्यात घालताना सुईण सांगते, की 'आईने बोलावले, तर धावत ये; पण बापाने बोलावले, तर पळून जा.' मुलगा असला तर सांगते, की 'बापाने बोलावले की धावत ये; पण आईने बोलावले, तर पळून जा. शहाणा आणि सुखी हो. बाजारात जाऊन दारू पी आणि सरकारला भिऊ नको.'

सामाजिक जीवन – या आदिवासींचा एकंदर जीवनविषयक दृष्टिकोन भोगप्रधान आहे. जिवंत असेपर्यंत चैन करावी, हीच कल्पना त्यांच्यांत प्रामुख्याने आढळते. ते उत्सवप्रिय असून, पोळा, दसरा, दिवाळी, शिमगा, इ. सर्व सण साजरे करतात. शिमगा हा त्यांचा सर्वांत मोठा सण.

नाच, गाणी, खेळ, गोष्टी व तमाशा ही त्यांची करमणुकीची साधने आहेत. तमाशात स्त्रिया नसतात. नाचात मात्र स्त्री-पुरुष दोघेही भाग घेतात. ढोलकी, सूर व सनई या वाद्यांची नृत्याला साथ असते. वाद्ये वाजवणारे वर्तुळात उभे असतात आणि स्त्री–पुरुष हातात हात घालून त्यांच्या भोवती नाचतात. नाच हा डांगी जीवनाचा आत्मा आहे. सण-समारंभात ते रात्रभर नाचत राहतात.

त्यांच्या गाण्यांचे अनेक प्रकार आहेत. लग्नात हळद लावताना व वाशिंग बांधताना जी गाणी म्हणतात, त्यांना धवळे म्हणतात व धवळे गाणाऱ्या स्त्रीला धवळारी म्हणतात. इतर गाण्यांना पेनाची गाणी म्हणतात. [म. लो. सा. ४]

डांगची एक वन्य जात. खानदेशात यांची वसती आढळते. हे लोक दारिद्र्य आणि व्यसने यांनी गांजलेले आहेत. शेती हाच यांचा मुख्य व्यवसाय असला, तरी यांना कामाचा कंटाळा असतो, त्यामुळे कोकणी व वारली कुळांपासून जो काही पिकाचा वाटा मिळेल, त्यावरच त्यांना गुजराण करावी लागते. खायला कमी पडले, की हे लोक माकड, उंदीर वगैरे प्राणी मारून खातात.

हे वाघाला पूज्य मानतात व भजतात. [म. ज्ञा. को.]

डांगर एक जात. या लोकांची वसती मध्य प्रदेशात आहे. उत्तरेकडील जिल्ह्यांत यांना कुमरावत व छत्तीसगडात पाटबीना म्हणतात. हे स्वतःला राजपुत म्हणवितात. तागाची पोती तयार करणे, हा त्यांचा व्यवसाय आहे. [म. ज्ञा. को.]

डांगरी एक जात. नागपूर भागात या लोकांची वसती आढळते. यांची उत्पत्ती कुणब्यांपासून झाली असावी, कारण त्यांच्या चालीरीती कुणब्यांसारख्या आहेत. तेली, कलार, कुणबी, अशा त्यांच्या पोटजाती आहेत. हे लोक मोठमोठे मळे करतात. त्यांत राबण्यासाठी त्यांना मनुष्यबळ मोठ्या प्रमाणात लागते, म्हणून हे लोक अनेक बायका करतात.

हे लोक प्रेते पुरतात व पुरल्याजागी कापसाची झाडे लावतात.
[द्रा. का. सें. प्रॉ. इं.]

डांगी (१) डांग जिल्ह्यातील लोकांची भाषा ही अहिराणी भाषेशी संलग्न आहे. या भाषेच्या स्वरूपाविषयी विद्वानांमध्ये मतभेद आहेत. काही विद्वान म्हणतात, की ही मराठीची पोटभाषा आहे, तर काहींच्या मते ती स्वतंत्र भाषा असून, तिचा मराठी व गुजराती यांपैकी कोणत्याही भाषेशी संबंध नाही; संबंध असलाच तर तो भिल्ली भाषेशी आहे. ही भाषा गुजरात व महाराष्ट्र या दोन्ही प्रदेशांच्या सीमाप्रदेशातील बोली असल्यामुळे या दोन्ही भाषांचे काही विशेष त्या भाषेत उतरले आहेत. या भाषेतील वाक्यरचना आणि व्याकरण पाहिले असता हिचे स्वरूप मराठी भाषेच्या जवळचे आहे असे दिसते.

डांगी भाषा मराठीच्या जवळची असण्याबद्दलची प्रमाणे –

१. आॅ, आँ (बाँस, पोसाँ) हे ग्रामीण मराठीतील पाॅट, पाॅर (किंवा प्वाॅट, प्वाॅर) सारखे आहेत.

२. औ हा उच्चार मराठी आहे. (दौलत)

३. सर्वनामांचे सामान्य रूप; उदा० त्या-हून, सला,–ला, पासन, –ले, –ने, –नी, –साठी; मा–ला–ले

४. काही नामांचे सामान्यरूप; उदा० झाडा–सी, लोका–पासी, गोहा–ला, मजुरकरा–सारखा, तवढा–माझार.

५. मध्ये ‘स’ आगम काही रूपांत येतो. बाँसला, सेजास-बरोबर, गोहोसले.

६. द्वितीया, तृतीया, चतुर्थी, पंचमी या विभक्तींचे प्रत्यय मराठी आहेत.

७. डांगीत गुजराती ‘छे’ हे क्रियापद रूप नाही; ‘से’ आहे. वर्तमानकाळी रूपे– व्हतास, करीस, मिळतीस. भविष्य – सांगेल, जाईन.

८. काही कृदन्ते व अव्यये मराठी आहेत. उदा० करू, चारूला, म्हणूला, करीसनी, जाईसनी, येईसनी, इत्यादी.

९. काही साहाय्यक क्रियापदे मराठी वळणाची आहेत. उदा० लाग (म्हणू लागला), टाक (नासी टाकी), राह (जाई रहीना), पड (बिलगी पडा).

१०. हा, तो, जो, या सर्वनामांची रूपे मराठीप्रमाणे तीन्ही लिंगांत भिन्न होतात. उदा० तो (पुं), त (न.), हा (पुं), हाई (स्त्री), जी (स्त्री)

११. शब्दयोगी अव्ययांचा उपयोग मराठीप्रमाणे आहे. उदा० – मजुरकरासारखा, मनाजवळ, देवनासमोर, शेजास-बरोबर, मजूरकरापयकी, सुदवर, मुलुखावर, उघळपणाखाली, तवढामाझार, गोहोपन, त्यापासन.

डांगी भाषेतील गीताचा एक नमुना असा –

काय काय महिनी आली होळी।
फाल्गुन महिनी आली होळी ग।
काय काय दिवशी आली होळी।
सोमवार दिवशी आली होळी ग।
काय काय भेट लेशी होळी ग।
खावा भेट लेशी होळी ग।
फाफर भेट लेशी होळी ग।
खोबर भेट लेशी होळी ग।

या लक्षणांवरून डांगी ही मराठीचीच पोटभाषा ठरेल.
[म. भा. उ. वि.]

(२) एक जात. यांची वसती मध्य प्रदेशात व राजस्थानात आहे. मध्यभारतातले गडपाऱ्याचे राजे डांगी जातीचे होते व त्या भागाला पूर्वी डांगीवाडा असेच म्हणत. हे लोक आपली उत्पत्ती राजपुतांपासून झाल्याचे सांगतात. गडपाऱ्याच्या राजपूत राजाने बाव्वीस विवाहित स्त्रियांच्या डोल्या वाटेत अडवल्या व त्या स्त्रियांना आपल्या जनानखान्यात घातले. त्या स्त्रियांपासून राजाला जी संतती झाली, तेच हे डांगी लोक होत, असे समजतात. यांच्या रक्तात जरी राजपूत अंश असला, तरी इतर जातींचेही बरेच मिश्रण आहे. राख्या (कुंभारिणीची मुले), धोबिया (धोबिणीची मुले), पवनिया (कोष्टिणीची मुले) या त्यांच्या कुलनावावरून ही गोष्ट कळून येते.

नाहोनिया, भादोनिया व नादिया हे यांचे तीन प्रमुख वर्ग आहेत. याशिवाय इतर जे बाव्वीस वर्ग आहेत, त्यांना बाईसा असे म्हणतात. या बाव्वीस वर्गांचा मूळ पुरुष पृथ्वीपती डांगी हा होता. राजपूत लोक पहिल्या तीन वर्गांतल्या मुली करतात व हे तीन वर्ग बाइसाच्या तेरा कुळांतल्या मुली करतात. सांप्रत मात्र विवाहसंबंध त्या त्या कुळापुरता मर्यादित झाला आहे.

विवाहप्रथा – मुलींची लग्ने लहान वयात करतात; पण मुलगी वयात आल्यानंतर लग्न केले, तरी त्याचा निषेध मानीत नाहीत. हुंड्याची चाल आहे. वरपित्याला वधूपित्याने एक नारळ दिला म्हणजे वाङ्‌निश्चय होतो. विधवाविवाह या लोकांना संमत नाही; पण तशी काही उदाहरणे घडतात. स्त्रीचा व्यभिचार सिद्ध झाल्यास तिला जातिबहिष्कृत करतात.

विवाहविधीत देव–पितरांची पूजा करतात. जुझोतिया ब्राह्मण यांच्या धर्मविधींचे पौरोहित्य करतात.

देव-धर्म – हे लोक दुर्गादेवीचे भक्त आहेत. चैत्र व आश्विन या महिन्यांत ते दुर्गेची पूजा करतात. त्या वेळी शस्त्रेही पुजतात. पिंपळ व खोकर हे वृक्ष पूज्य मानतात. गायीला लक्ष्मीचे प्रतीक समजतात.

हे लोक सांप्रत कुसुंबा व ताग यांची शेती करतात. त्यांच्या बायका फार कष्टाळू असतात. त्यांना गोंदून घेण्याची फार आवड असते.

मर्तिकप्रथा – हे लोक मृतांना जाळतात व श्राद्धही करतात. [म. ज्ञा. को.; एन्सा. रि. ए.]

डाक (१) पू. भारतातला एक लोककवी आणि ज्योतिषी. याची जन्मकथा उ. भारतातल्या घाघाच्या जन्मकथेसारखीच आहे. याचा बाप एक ब्राह्मण ज्योतिषी व माता गौळण होती. याचे जन्मस्थान ज्ञात नाही; तसेच याच्या चरित्राविषयीचा तपशीलही मिळू शकत नाही. काही जणांचे असे मत आहे, की याचा जन्म आसामात लोहिडांगरा या स्थानी झाला. आसामी परंपरेप्रमाणे हा जातीने कुंभार होता. जन्मताच याने आपल्या आईला हाक मारली, म्हणून याचे नाव डाक (हाक मारणे) असे पडले, अशी याच्या नावाची व्युत्पत्ती दिली जाते.

डाकाने एखादा स्वतंत्र ग्रंथ लिहिलेला नाही. कृषिविषयक फलज्योतिष आणि व्यावहारिक नीती यांसंबंधीची याची शेकडो स्फुट वचने बंगाल, बिहार, आसाम आणि ओडिसा या प्रदेशांत प्रचलित आहेत. बंगालमध्ये डाकेर वचन (डाकाची वचने) या नावाने ही वचने लोकप्रिय आहेत.

डाकाची वचने मौखिक परंपरेने चालत आल्यामुळे त्यांची भाषा पुष्कळच बदलली असली, तरी ती दहाव्या शतकाइतकी जुनी आहेत, असे श्री. दिनेशचंद्र सेन यांचे मत आहे. या वचनांचा संग्रह डाकतंत्र या नावानेही प्रसिद्ध आहे. तिबेटी बौद्ध परंपरेत डाक (Gdak) हा शब्द ज्ञानवाचक आहे. त्यावरून असे अनुमान काढतात, की बौद्ध तांत्रिकांच्या प्रभावाने भारलेल्या कोण्यातरी अशिक्षित प्रतिभावंताने रचलेली ही वचने असावी. काही वचनांत व्यक्त झालेले विचार या अनुमानाला पुष्टी देणारे आहेत. उदा०–'चांगला, स्वच्छ व रुचकर पदार्थ मिळाला, तर तो उद्यासाठी ठेवण्यात काही शहाणपणा नाही. दूध–दही मनसोक्त खावे. त्याने आरोग्य बिघडले, तर औषध घ्यावे. कारण मरणानंतर मनुष्याचा या जगाशी काही संबंध उरत नाही.' या वचनातील नास्तिक सल्ला तत्कालीन बौद्ध तांत्रिकांच्या प्रभावाचाच द्योतक आहे, असे काही बंगाली पंडित मानतात.

डाकाने आपले विचार म्हणींच्या शैलीमध्ये मांडले आहेत. त्यामुळे त्याची वचने सर्वतोमुखी होऊन राहिली. पिके चांगली पिकण्याविषयीचा ठोकताळा सांगणारे एक वचन असे –

सावन सुक्ला सप्तमी, बादर बिजुरी होय।
करि खेती पिया भवनमें हो निचिन्त रह सोय ॥

अर्थ – हे प्रियतमा, जर श्रावण शुद्ध सप्तमीच्या दिवशी आकाशात मेघ आणि वीज असली, तर शेतात पेरणी करून तू निश्चितपणे खुशाल झोपी जा. (कारण मग प्रयत्नांशिवायही पिके आपोआप पिकतील.)

डाकाच्या वचनांत शेतकऱ्यांना मार्गदर्शक असे अनेक ठोकताळे आहेत; तसेच समाजजीवनाच्या सूक्ष्म निरीक्षणावर आधारलेली वचनेही अनेक आहेत. कुगृहिणीचे लक्षण सांगताना डाक म्हणतो –

घरे आखा, बाइरे राँधे । अल्प केस फुलाइया बाँधे ॥
घन-घन चाय उलटि घाड । डाक बले ए नारि घर उजाड ॥

अर्थ – चूल राहते घरात आणि स्वयंपाक करते बाहेर. डोक्यावरचे थोडेसेच केस फुलांनी शृंगारून बांधते आणि मान वळवून पुनः पुनः इकडे तिकडे पाहत चालते. डाक म्हणतो, की अशी स्त्री ज्या घरी असते, ते घर उजाड आहे, असे समजावे.

डाकाने आपली अनेक वचने भल्लरी नामक स्त्रीला संबोधून रचलेली आहेत. उ. भारतातल्या घाघाबरोबर असणारी भड्डरी आणि महाराष्ट्रातल्या सहदेवाबरोबर असणारी भाडळी म्हणजेच ही भल्लरी होय. नावांचे आणि वचनांच्या अंतरंगाचे साधर्म्य पाहता हे लोकप्रिय नीतिकवी आणि ज्योतिषी ऐतिहासिक आहेत, की केवळ लोकप्रतिभेतून आकाराला आलेले काल्पनिक पुरुष आहेत, या विषयी संभ्रम निर्माण होतो. पाहा– खना, घाघ, भड्डरी, सहदेव–भाडळी. [हि. बें. लँ. लि.; बं. उ. सा.; भो. क. का.]

(२) पत्रे पाठवण्याच्या व्यवस्थेचे जुने नाव. सध्याप्रमाणे पूर्वी टपालपद्धतीचे जाळे देशभर पसरलेले नसले, तरी वेळोवेळी मर्यादित प्रदेशापुरती डाक बसविण्याची प्रथा होती. राजाचे टपाल, व्यापारी लोकांचे टपाल व गावाचे टपाल असे तीन मुख्य प्रकार त्या काळी अस्तित्वात होते. राजाचे टपाल पोचविण्यासाठी स्वतंत्र नोकर किंवा जासूद नेमलेले असत. व्यापारी व सावकारही आपले टपाल स्वतंत्रपणे पाठवीत. गावाचे टपाल नेण्या-आणण्याचे काम वतनदार महाराकडे असे. सामान्य लोकांसाठी मात्र टपालव्यवस्था नव्हती.

सामान्यपणे पाच आणि जास्तीत जास्त दहा कोसांवर टपा

ठेवून डाक बसवीत. पत्र किंवा थैली वाटेत न थांबता इष्ट स्थळी पोचावी म्हणून प्रत्येक टप्प्यावरून दुसरा माणूस ती घेऊन लगेच पुढे निघत असे. प्रसंगी दिवसातून चारपाच वेळाही पत्रे पाठवीत. राजे लोक आपल्या सत्तेखाली सुरक्षित असलेल्या प्रदेशातच डाकेच्या चौक्या बसवीत. पत्रे पुढे नेण्याचे काम जासुदाकडे असे. [म. स. द.]

डाकार्णव एक बौद्ध तंत्रग्रंथ. याचे मूळ नाव श्रीडाकार्णव-महायोगिनीतंत्रराज असे आहे. या ग्रंथात डाकिनीस्वामीने वाराही देवीला केलेला उपदेश संवादरूपाने दिलेला आहे.

डाकार्णव शब्दाचा अर्थ ज्ञानार्णव असा होतो. डाकार्णव हे संगीती पद्धतीने लिहिलेले बौद्ध तंत्र आहे. संगीती म्हणजे समूहगान होय. यात शून्यवादी तत्त्वज्ञानाचा पुरस्कार केला असून, सुख आणि संपत्ती यांच्या प्राप्तीसाठी मंत्र, तंत्र, योग, समाधी, इ. मार्ग सांगितले आहेत.

डाकार्णवात सदतीस योगिनींचा परिचय दिलेला आहे व यंत्रचक्राचा उपदेशही विस्ताराने सांगितला आहे. डॉ. चौधरी यांच्या मते भाषाविज्ञानाच्या दृष्टीने या ग्रंथाचा काळ इ. स.चे १३ वे शतक हा आहे. [तां. बौ. सा. सा.]

डाकिनी (१) एक तांत्रिक देवता. हिंदू आणि बौद्ध या दोन्ही तंत्रपरंपरांत ही देवता आहे. श्रीविद्यार्णव-तंत्रानुसार हिचे ध्यान असे—

डाकिनी ही सोळा पाकळ्यांच्या विशुद्ध चक्रावर बसलेली, रक्तवर्णा, त्रिनेत्रा, एकवस्त्रा, चतुर्भुजा आणि चार हातात खट्वांग, त्रिशूळ, पात्र आणि चर्म ही आयुधे धारण करणारी अशी असते. ती पायसान्न भक्षण करीत असते.

सौभाग्यरत्नाकरातही हिचे ध्यान जवळ जवळ असेच वर्णिलेले आहे.

बौद्ध तांत्रिकांच्या साधनमाला नामक ग्रंथात हिच्या आयुधांची नावे खट्वांग, कपाल, डमरू आणि कर्तरी अशी दिलेली असून, ती केस मोकळे सोडलेली, नग्न, पंचमुद्राविभूषित आणि आलीढासनात बसलेली असल्याचे वर्णन आहे.

बौद्ध तंत्रपरंपरेत काही ठिकाणी ती आपल्या पायांखाली दोन माणसे तुडवताना दिसते. तसेच ती कपालातून रक्त प्राशन करते आणि नरमुंडांचा हार व मुकुट धारण करते. सिंहवक्त्रा, वज्रडाकिनी, ज्ञानडाकिनी ही हिचीच अन्य रूपे आहेत. [इं. बु. इ.; गाँ. नॉ. बु.]

(२) वज्रयानी योगिनींचा एक वर्ग. तिबेटी भाषेत डाक (ग्डाक–Gdak) या शब्दाचा अर्थ प्रज्ञा किंवा ज्ञान असा आहे. जिने तांत्रिक योगसाधनेच्या द्वारा सहजज्ञानाची प्राप्ती केली आहे, अशा योगिनीला वज्रयानपंथात डाकिनी म्हणत. पुढे, तांत्रिक बीजाक्षरांच्या आधारे लाकिनी, शाकिनी, राकिनी हाकिनी, इ. शब्द बनवले गेले.



डाकिनी—बौद्ध तांत्रिक देवता

वज्रयानी सिद्धांच्या दोह्यांत डाकिनीला अनेकवार देवी म्हणून संबोधिले आहे. त्यासंबंधी वज्रतंत्रात एक दोहा आहे, तो असा—

खिति जल पवण हुताशन सुण्ण डाइणि देवि ।
सुणहु पंचमु तत्तु कहु जो ण जाणइ केवि ।।

अर्थ—हे डाकिनी देवी! पृथ्वी, जल, वायू, अग्नी व शून्य ही पाच तत्त्वे कोणी जाणत नाही; त्यांचे रहस्य मी सांगतो.

या डाकिनी स्त्रिया वज्रयानी तंत्रसाधनेत महामुद्रांच्या रूपाने वावरत असत. त्यांच्या या गुह्याचारामुळे आणि स्मशानसाधनेमुळे लोकांत त्यांच्याविषयी अपसमज पसरले आणि डाकिनी म्हणजेच चेटकिणी होत, अशी समजूत रूढ झाली. [सि. सा.]

(३) भूतपिशाचांची एक श्रेणी. कालीच्या अनुचरांत यांचा समावेश होतो. यांना अस्रपा (रक्त पिणाऱ्या) असेही म्हणतात. युद्धभूमीवरच्या मृतवीरांच्या रक्तमांसावर या जगतात, असे उल्लेख प्राचीन वाङ्मयात वारंवार आढळतात. यांची अशुभ दृष्टी ज्या माणसांवर पडते, ते आजारी पडतात अथवा मृत्यू पावतात, अशी समजूत आहे. बाळंतिणींना आणि लहान बालकांना यांच्यापासून विशेष धोका असतो, असे मानले जाते. यांचा उल्लेख नेहमी शाकिनींबरोबर केला जातो.

डाकिनींना वश करून घेऊ इच्छिणारा मांत्रिक रात्रीच्या वेळी शेवरीच्या झाडावर बसून रात्रभर पुढील मंत्राचा जप करतो—

डँ डाँ डिं डिं ड्रीं घूँ षूँ चालिनि मालिनि ।

डाकिनि सर्वसिद्धि प्रयच्छ हुँ फट् स्वाहा ॥

अशा रीतीने सहा वर्षे जप केल्यानंतर डाकिनी प्रसन्न होऊन साधकाला अद्‌भुत सामर्थ्य देते, असे धन्वंतरितंत्रशिक्षेत म्हटले आहे. [लौ. दं.; ध. तं. शि.]

डाकोत ब्राह्मण एक जात. यांची वसती राजस्थानात आहे. यांचा समावेश पंचगौड ब्राह्मणांत होतो. मारवाडात यांना देशांतरी, जोतगी, थावटिया आणि शनितरिया, इ. आणखी नावे आहेत. राजस्थानाच्या वायव्य भागात हे महुरी किंवा भड्डुली या नावाने ओळखले जातात. भविष्य व शकुन सांगणे हा यांचा प्रमुख व्यवसाय आहे. हे शनीचे उपासक आहेत. शनी, राहू व केतू या अनिष्ट ग्रहांच्या शांत्यर्थ लोकांनी दिलेली दाने हे स्वीकारतात.

डंक नावाच्या ज्योतिषी ऋषीला शकुनविद्येत निपुण असलेल्या भड्डुली नावाच्या भंगिणीपासून झालेली संतती म्हणजेच आजची डाकोत ही जात होय, अशी समजूत आहे. डंक आणि भड्डुली यांच्या नावावर पडणाऱ्या वचनांचा संग्रह भड्डुलीपुराण या नावाने डाकोतांनी मौखिक परंपरेने जतन केलेला आहे. या वचनांत शकुन आणि शेतीला उपयोगी पडणारे हवामानविषयक ठोकताळे सांगितलेले आहेत.


डाकोत पुरुष – राजस्थान

गौड, छलौदिय, मेर, रीवल, गोरिया, पवोसिया व जोशी या डाकोतांच्या शाखा आहेत. यांच्यामध्ये देज देण्याची प्रथा आहे. विधवेशी विवाह करायचा असेल, तर विधवेच्या मृत पतीच्या परिवाराला काही द्रव्य देऊन लेखी अनुमती घ्यावी लागते.

डाकोतांचा महाराष्ट्रातही तुरळक संचार आहे. शकुन सांगत गावोगाव भटकणाऱ्या डाकोतांना महाराष्ट्रात डाकुता, डाकोता, डाकोचा वा डांकुलता या नावांनी ओळखतात. डांकुलत्यावर दास तुका या नावाच्या संतकवीने रचलेले एक अप्रकाशित भारूड आहे, त्यातल्या काही पंक्ती अशा——

डांकुलता मी शकून सांगे हरिगुरुनाम जागा मा ।
कठीण काळ युग नष्ट विषयसंग त्यागा मा ॥
सोहंभावें सद्‌गुरुचरणीं सावध होउनि लागा मा ।
अलक्ष अविनाशी अक्षय पदवी मागा मा ॥
गैबी सिद्ध बोलुन गेला बहुत नाश होईल जी ।
असत्याच्या राशी सत्य राईइतुकें नसेल जी ॥
जप तप क्रिया स्नानसंध्या कर्ममार्ग बुडेल जी ॥

एकनाथांनी सरोद्यावरील भारुडात डांकुलत्याचा उल्लेख केला आहे, तो असा——

डांकुलता झाला चालता । परंतु न ये बोलाविता ।
निर्मळपदीं वास्तव्यता । झाला डांकुलता कीं जी राजांनो॥

या उल्लेखावरून सरोदा आणि डांकुलता एकच असल्याचे स्पष्ट होते.

महाराष्ट्रात हे लोक डमरू-कुडबुडे वाजवून भिक्षा मागतात आणि भविष्य सांगतात. ब्राह्मण पुरुष आणि गवळी जातीची स्त्री यांच्या संबंधातून आपली जात उत्पन्न झाली असे हे सांगतात. डांकुलता जातीच्या उत्पत्तीची ही कथा बंगालमधल्या डाकाच्या चरित्रकथेशी समान आहे. पाहा– डाक; भड्डुरी; [रा. जा.; म. श. को.; रा. सं. १; गा. पं. ३]

डाकोर एक वैष्णव क्षेत्र. हे गुजरातमध्ये पश्चिम रेल्वेच्या आणंद स्टेशनापासून एकोणीस मैलांवर आहे. इथे रणछोडजीचे मंदिर प्रमुख आहे. डाकोरचे लोक समजतात, की खरा रणछोडजी (कृष्ण) आपल्या इथेच असून, द्वारकेला आहे ती याची नक्कल होय. यासंबंधी एक दंतकथा आहे, ती अशी–

डाकोर येथे राहणारा बोडाणा नावाचा एक राजपूत द्वारकेच्या रणछोडजीचा भक्त होता. हातावर तुळशीचे रोप घेऊन तो वर्षातून दोनदा श्रीकृष्णाच्या दर्शनासाठी द्वारकेची वारी करीत असे. पुढे वृद्धापकाळामुळे त्याला हा नेम चालवणे अशक्य झाले. एका वारीच्या वेळी त्याने देवापुढे आपली असमर्थता व्यक्त केली. त्या रात्री त्याला स्वप्नदृष्टांत झाला, की 'तुला यापुढे माझ्या दर्शनासाठी द्वारकेला येण्याची गरज नाही; मीच तुझ्याबरोबर डाकोरला येतो. तू मला इथून घेऊन जा.'

त्या दृष्टांताप्रमाणे एका रात्री बोडाण्याने द्वारकेतली रणछोडजीची मूर्ती उचलली व तो बैलगाडीने डाकोरकडे यायला निघाला. सकाळी तिथल्या गुगळी ब्राह्मणांना मूर्ती चोरीस गेल्याचे समजले. त्या सर्वांनी असा कयास बांधला की, देवाची मूर्ती बोडाण्यानेच चोरली असावी. लगेच त्यांनी बोडाण्याचा पाठलाग सुरू केला. त्यांनी काबा जमातीचे काही लोकही आपल्या बरोबर घेतले.

बोडाणा डाकोरला आल्यावर देवाच्याच सांगण्यावरून त्याने रणछोडजीची ती मूर्ती तिथल्या गोमती नामक तलावात लपवून ठेवली. एवढ्यात पाठलाग करणाऱ्या त्या काबा लोकांनी त्याच्यावर बाण बोडले. त्या शरसंधानामुळे बोडाणा मरण पावला. द्वारकेहून आलेले गुगळी ब्राह्मण गोमती तलावाच्या काठावर प्रायोपवेशनाला बसले. मग रणछोडजीने बोडाण्याच्या बायकोला स्वप्नदृष्टांत देऊन सांगितले, की 'तू या ब्राह्मणांना मूर्तीच्या वजनाइतके सोने देण्याचे कबूल कर.' तिने ब्राह्मणांना तसे सांगितले. ब्राह्मणांनी ती तडजोड मान्य केली. पण जेव्हा तिथल्या लोकांनी मूर्तीचे वजन केले, तेव्हा ते बोडाण्याच्या पत्नीच्या नथीच्या वजनाइतकेच भरले. मग ते ब्राह्मण तेवढे ते सोने घेऊन निराश मनाने परत गेले. जातेवेळी रणछोडजीने त्यांना दृष्टांत देऊन सांगितले, की 'तुम्ही द्वारकेत जाऊन सहा महिने वाट पाहा. त्या अवधीनंतर तिथल्या सावित्रीकूपात माझी मूर्ती तुम्हाला मिळेल. ती गाभाऱ्यातल्या पीठिकेवर बसवून तिची पूजाअर्चा चालू करा.'



रणछोडजीचे मंदिर – डाकोर

त्यानंतर डाकोरच्या लोकांनी गोमती तलावाच्या काठी एक मंदिर उभारून त्यात रणछोडजीची स्थापना केली. तेव्हापासून रणछोडजीला डाकोरनाथ म्हणू लागले.

या प्रसंगावर गुजराती भाषेत किती तरी छोटी मोठी काव्ये निर्माण झाली आहेत. या काव्यांचा मागोवा घेता, ही घटना इ. स. १११५ मध्ये घडली असावी, असे अनुमान केले जाते.

सुरवातीस डाकोरनाथाचे मंदिर अगदी लहान होते. भक्तांच्या गर्दीला ते पुरे पडेना; म्हणून इ. स. १७७२ मध्ये पेशव्यांचे कारभारी गोपाळराव टेंबेकर यांनी एक लाख रुपये खर्च करून नवे मोठे मंदिर बांधले. मग बडोद्याच्या महाराजांनी सव्वा लाख रुपये खर्च करून या देवाचा सुवर्णाचा देव्हारा तयार करविला. हे मंदिर विशाल व उत्तुंग आहे. एका उंच चौथऱ्यावर ते उभारलेले आहे. गर्भगृहात उच्च पीठिकेवर डाकोरनाथाची चतुर्भुज मूर्ती पश्चिमाभिमुख उभी आहे. पुढे खुले प्रांगण आहे. सभोवती प्रदक्षिणेसाठी सुबद्ध रस्ता आहे. इथले वैशिष्ट्य हे, की कोणालाही गाभाऱ्यात जाऊन देवाच्या चरणांना स्पर्श करता येतो.

या देवस्थानाला राजेरजवाडे व सरदार–जहागिरदार यांनी जमिनी लावून दिल्या आहेत. त्यामुळे डाकोरनाथाचे देवस्थान श्रीमंत झाले आहे.

हे वैष्णव क्षेत्र असले, तरी वैष्णवांतल्या एखाद्या विशिष्ट पंथाचे नाही. त्यामुळे सर्व वैष्णव पंथांचे लोक सारख्याच भक्तिभावाने इथे दर्शनाला येतात. यात्रा बारमहा चालू असते. आश्विनी पौर्णिमेला सर्वांत मोठी यात्रा भरते.

डाकोरजीच्या मंदिराजवळ गोमतीतलाव आहे. त्याच्या काठावर डंकनाथ महादेवाचे मंदिर आहे. डाकोरजीची सुवर्णतुला केलेली तागडीही तलावाच्या काठावरच दाखवतात.

डाकोरला गेल्यावाचून द्वारकेची यात्रा सुफल होत नाही, असा संकेत आहे. [गुजरात; कल्याण-तीर्थांक; स. भा. प्र. व.]

डामर एक शिवप्रोक्त तंत्र. या तंत्रात देवीच्या नवाक्षरमंत्राचे विधान सांगितलेले आहे. योग, शिव, दुर्गा, सारस्वत: ब्रह्म व गंधर्व अशी सहा डामर तंत्रे असून; त्यांचा उल्लेख वाराही तंत्रात आला आहे. [श. क.]

डाळिंब (सं. दाडिम) एक फळ. या झाडाचे मूळ उत्पत्तिस्थान इराणदेश असून, तिथून त्याचा प्रसार इतर देशांत झाला. भारतात त्याने पूजोपहारातही स्थान मिळविले आहे. शिवाला डाळिंब प्रिय असून, ते त्याला अर्पण केल्याने त्यात जेवढ्या बिया असतील त्यांच्या सहस्रपट वर्षे शिवलोकात वास्तव्य मिळते, असे सांगितले आहे. [क्रि. स्ट. ले. उ.]

डिंगल भाषा राजस्थानातील ग्रंथभाषा. पूर्वी ही भाषा पश्चिमी राजस्थानी, मरुभाषा किंवा मारवाडी या नावांनी ओळखली जात होती. इ. स. च्या १३ व्या शतकापर्यंत गुर्जरी अपभ्रंश ही राजस्थानची ग्रंथभाषा होती.

त्यानंतर १४ व्या शतकापासून राजस्थानी भाषेला ते स्थान प्राप्त झाले. राजस्थानीचे एक रूप अशी जी मारवाडी भाषा तिलाच पुढे डिंगल हे नाव मिळाले.

डिंगल या नावाच्या उगमाविषयी भाषाशास्त्रज्ञांनी अनेक भिन्न मते प्रतिपादली आहेत. डॉ. तैस्सितोरी या इटालियन पंडिताने डिंगल या शब्दाचा अर्थ अनियमित असा घेऊन, व्याकरण व छंदःशास्त्र यांचे विशेष नियम नसलेली भाषा, असे मत दिले आहे. पण त्याचे हे मत निराधार आहे; कारण व्रजभाषेप्रमाणेंच या भाषेचेही व्याकरण व छंदःशास्त्र विकसित झालेले असून, ती भाषा राजदरबारातही मान्यता पावली होती.

पं. मोतीलाल मेनारिया यांनी डिंगल शब्दाची व्युत्पत्ती सांगितली आहे, ती अशी–या भाषेचा उपयोग मुख्यतः भाटचारणांनी आपल्या आश्रयदात्यांची स्तुती करण्यासाठी केला. त्यांच्या काव्यात अतिशयोक्ती (डींग) बरीच असे, म्हणून त्यांच्या भाषेला डींगल हे नाव पडले असावे व पुढे त्याचे रूपांतर डिंगलमध्ये झाले असावे. परंतु ही व्युत्पत्तीही अनेकांनी त्याज्य ठरवली आहे.

डॉ. श्यामसुंदर दास यांच्या मते व्रजभाषेला पिंगल हे नाव होते, म्हणून मारवाडी भाषेला डिंगल हे नाव मिळाले. पण याही व्युत्पत्तीला आधार गवसत नाही. कारण व्रजभाषा या अर्थी पिंगल शब्दाचा उपयोग डिंगल या नावाहून जुना नाही. राजस्थानात इ. स. च्या १६ व्या शतकात कुशललाभ नामक एक जैन कवी होऊन गेला. त्याच्या पिंगलशिरोमणी या छंदःशास्त्रावरील ग्रंथात मारवाडी भाषेसाठी डिंगल या शब्दाचा उपयोग केला आहे. अर्थात डिंगल हे नाव पिंगल पेक्षा प्राचीन आहे. त्यामुळे पिंगल या नावावरून डिंगल हे नाव आले, असे म्हणता येत नाही.

डिंगर या संस्कृत शब्दाचा अर्थ गाणारे सेवक असा आहे. चारण, भाट, इ. गायक आपल्या आश्रयदात्या राजांचे गुणगान करीत, म्हणून त्यांच्या भाषेला डिंगल हे नाव मिळाले, असे श्री. उदयसिंह भटनागर म्हणतात.

डिंगल भाषेतील वाङ्मयाला कोणी चारण साहित्य म्हणतात; कारण त्यातील बहुतेक रचना चारणांच्या आहेत. तथापि डिंगल भाषेतील सर्वश्रेष्ठ काव्ये ‘ढोला मारुरा दूहा’ व ‘वेलिक्रिसन रुक्मिणी री’ ही चारणेतर कवींनी रचलेली आहेत. आणि ‘नैणसी री ख्यात’ हा श्रेष्ठ डिंगल गद्यग्रंथ एका वैश्य माणसाने लिहिला आहे.

डिंगल साहित्य मुख्यतः वीररसात्मक आहे. राजपुतांच्या अनेक श्रेष्ठ गुणांचे वर्णन त्या भाषेत फार सुंदर रीतीने केलेले आहे. विशेषतः वीररमणींच्या अंतःकरणातील भावनांचा आविष्कार तर डिंगल काव्यात अत्यंत सहजपणे झाला आहे. त्याचा एक नमुना असा—

सहणी सबरी हूं सखी, दो उर उलटी दाह।
दूध लजाणे पूत सम, वलय लजाणे नाह ॥ १ ॥
नायण आज न मांँड पग, काल सुणीजे जंग।
धारां लागीजै धणी, तो दीजै घण रंग ॥ २ ॥
विण मरियाँ विण जीतियां, जो धव आवै धाम।
पग पग चूड़ी पाछटूँ, हूँ रावत री जाम ॥ ३ ॥

अर्थ–हे सखी, मी इतर सर्व गोष्टी सहन करू शकेन; पण माझ्या पतीने माझ्या बांगड्यांना व पुत्राने माझ्या दुधाला लाज लावणारे वर्तन केले, तर त्या दोन गोष्टी मला सारख्याच दाहक व हृदयविदारक वाटतील. हे नाइन, आज माझे पाय रंगवू नको. उद्या युद्ध होणार आहे असे ऐकते. जर माझा पती त्यात कामी आला, तर मग (मी सती जाईन, तेव्हा माझ्या पायाना) खूप रंग लाव. हे सखी, जर माझा पती जय व मृत्यू न पावता घरी परत आला, तर मी पावलोपावली आपल्या बांगड्यांचे तुकडे करून टाकीन! (कारण) मी राजपूत कन्या आहे!

चारणांची परंपरा बरीच प्राचीन असली, तरी इ. स. च्या १२ व्या शतकापूर्वी त्यांनी डिंगल भाषेत एखादी काव्यरचना केलेली आढळत नाही. १२ व्या शतकात ते लोक राजस्थानात येऊन वसले आणि मग डिंगल भाषेत गीते रचू लागले. त्यानंतरच्या शेदोनशे वर्षांत राणा हम्मीर, लक्ष्मणसिंह, महाराणा कुंभ, इ. अनेक पराक्रमी राजपूत राजे होऊन गेले. त्यांच्या पराक्रमावर रचलेली डिंगलगीते विपुल प्रमाणात उपलब्ध आहेत. बहुतेक चारण कवी आपापल्या आश्रयदात्या राजांची स्तवने गात असले, तरी त्यांतील काही कवी स्वतंत्र वृत्तीचे थोर पुरुष होते. त्यांच्या काव्यात प्रामाणिकपणा व वीरवृत्ती या दोन्ही गोष्टी दिसून येतात. त्यांच्या त्या काव्यातून ऐतिहासिक माहितीही बरीच मिळते.

राजस्थानांतील ब्राह्मण, राजपूत, पंचोली, इ. अनेक जातीही डिंगल भाषेत काव्यरचना करीत होत्या. परंतु इ. स. च्या १६ व्या शतकानंतर त्यांनी पिंगल (व्रज) भाषेचा आश्रय घेतला. चारण, भाट, राव, ढाढी, इ. जाती मात्र डिंगल भाषेतच काव्ये रचीत राहिल्या. जुन्या परंपरेच्या अभिमानामुळे त्यांनी जुनी भाषाही कायम ठेवली. पण पुढे सामान्य लोकांना ती भाषा अपरिचित वाटू लागली आणि त्यामुळेच ती कृत्रिम मानली जाऊ लागली.

डिंगल काव्ये दोहा, कवित्त (छप्पय) व गीत या छंदांत आहेत. अशा प्रकारच्या रचनेला राजस्थानात साख री कविता

(प्राचीन घटनेच्या सत्यतेची साक्ष देणारी कविता) असे म्हणतात.

प्रारंभी डिंगल भाषेतील गद्य हे आज्ञापत्रे, ताम्रपट, शिलालेख यांपुरतेच मर्यादित होते. त्यावर संस्कृत व अपभ्रंश या भाषांचा प्रभाव दिसून येतो. भावी खडी बोलीची बीजेही त्यात आढळतात. इ. स. चे १२ वे शतक ते १४ वे शतक या कालातील जे गद्य ग्रंथ उपलब्ध आहेत, त्यांतले बहुतेक जैन साधूंनी रचलेले आहेत. त्यानंतरची दोन शतके हा काळ डिंगल गद्याचे सुवर्णयुग मानता येईल. त्या काळात ख्यात (इतिहास), बात (कथा) इ. भिन्न प्रकारचे विपुल गद्य साहित्य निर्माण झाले. त्यात धर्म, नीती, इतिहास, छंदःशास्त्र, इ. विविध विषयांवरील ग्रंथ आहेत. डिंगल साहित्यात ऐतिहासिक माहिती विपुल सापडते. हिंदू–मुस्लिम संघर्षामुळे राजस्थानात जी राजकीय, धार्मिक व सामाजिक क्रांती झाली, तिची सम्यक कल्पना डिंगल साहित्यावरून येऊ शकते. त्यामुळेच मध्य भारताचा मध्ययुगीन इतिहास लिहिण्यासाठी डिंगल साहित्याचा खोल अभ्यास अत्यावश्यक ठरतो. [रा. भा. औ. सा.; रा. पिं. सा; हिं. सा. को.; मरुभारती–एप्रिल १९६०, जाने. १९६१, जुलै १९६३]

डिंडिम एक चर्मवाद्य. यातून डिम् डिम् असा ध्वनी निघतो, म्हणून याला डिंडिम असे नाव मिळाले. हे लाकडाचे बनवतात. याला सुमारे पाऊण हात रुंदीची दोन तोंडे असतात. ती दोन्ही चामड्याने मढवतात. याचा मध्यभाग डमरूसारखा कृश असतो. एका बाजूने हाताने व दुसऱ्या बाजूने लहान काठीने हे वाद्य वाजवतात. हे वाद्य गळ्यात किंवा काखेत अडकवून वाजवण्याची प्रथा आहे. व्रजप्रदेशात डिंडिम हा मातीचा बनवतात व कातड्याच्या पातळ पडद्याने त्याची दोन्ही तोंडे मढवतात. तिकडच्या मुलांना हे वाद्य प्रिय असते.

वैदिक वाङ्मयात डिंडिमाचे नाव येत नाही; पण रामायण व महाभारत यांत त्याचे उल्लेख येतात. वायू पुराणातही याची माहिती आली असून, हे वाद्य शिवपूजेच्या वेळी वाजवले जाते, असे सांगितले आहे. [संगीतशास्त्र; सू. सा. श.; कि. हि. वा. पु.]

डिंभ महानुभावीय वाङ्मयात डिंभ या नावाचा उल्लेख बऱ्याच ठिकाणी आढळतो. पण हे नाव एखाद्या विशिष्ट व्यक्तीचे नसून, ते एका कविकुलाचे उपनाव आहे, असे कळते. डिंभ कुळात अनेक कवी होऊन गेले. त्यांपैकी कृष्णमुनी या एकाच कवीचे नाव विशेषेकरून ज्ञात आहे. महानुभावांचे जुने हस्तलिखित ग्रंथ पाहता डिंभ कुळाचा मूळ पुरुष रामदेव हा असल्याचे कळते. तो द्वारावतीकार चांगदेव राउळाच्या शिष्यपरंपरेतला होता. भीष्माचार्यलिखित निरुक्तशेष या ग्रंथात ‘हा कवी डिंभ रामदेव’ असे वाक्य आहे, हा याचा पुरावा होय. या कुळातील कृष्णमुनीने रुक्मिणीस्वयंवर नावाचा ग्रंथ लिहिला आहे. [वि. अं. कानोले– प्रतिष्ठान, फेब्रु. १९५९]

डुमन मुंड आदिवासींचे एक चर्मवाद्य. याचे भांडे चिकण माती भाजून बनवतात. याची उंची २१ इंच असून, वरचा भाग निमुळता व खालचा रुंद असतो. हे भांडे अतिशय पातळ असते. ते सफेतीने रंगवतात. त्याचे वरचे तोंड चामड्याने मढवून, पुड चामड्याच्या वाद्यांनी आवळतात. नृत्यासाठी या वाद्याचा उपयोग करतात. [एन्सा. मुंडा.]

डुम्हल एक नृत्य. काश्मीरमधील वानल जातीच्या लोकांमध्ये हे विशेष प्रचलित आहे. हे पुरुषी नृत्य आहे. नर्तक रंगीबेरंगी कपडे घालतात आणि डोक्यावर मण्यांची व शंख–शिंपल्यांची निमुळती टोपी घालतात. त्यांच्या हातात झेंडेही असतात. ते झेंडे मधोमध उभे करून त्यांच्या भोवती फेरात नाचायचे असते. नृत्याला ढोलाची साथ असते. विविध पदन्यास, अंगविक्षेप आणि उड्या ही त्या नृत्याची वैशिष्ट्ये होत. नाचताना अधून मधून ते आरोळ्याही ठोकतात. [ए. हो. रा.]

डूंगर (इ. स.च्या १५ व्या शतकाचा उत्तरार्ध) प्रसिद्ध जैन श्रावक व कवी. यालाच पद्मनाथ असेही म्हणत. पण डूंगर व पद्मनाथ या दोन वेगळ्या व्यक्ती होत्या, असे काही संशोधकांचे मत आहे. बाव्वन छप्पयांचे एक काव्य डूंगरने रचले असून, ते डूंगरबावनी या नावाने प्रसिद्ध आहे. हे काव्य नीतिप्रधान असून त्यात काव्यगुणही आढळतात. [सू. पू. ब्र. भा. सा.]

डूंगरसी (इ. स.च्या १७ व्या शतकाचा पूर्वार्ध) एक कवी. हा जातीचा राव असून बूंदी राज्याचा निवासी होता. बुंदेलखंडाचा राजा छत्रसाल याने या कवीला आश्रय तर दिलाच होता; शिवाय नैनवा नावाचे एक गावही त्याला बक्षीस दिले होते. याने पृथ्वीराज रासो या काव्याच्या धर्तीवर शत्रुसाल (छत्रसाल) रासो नावाचे एक काव्य लिहिले आहे. या काव्यात ५०० छंद असून, छत्रसाल राजाच्या शौर्य–धैर्यादी गुणांचे उत्तम प्रकारे वर्णन आहे. [रा. भा. औ. सा.]

डेपला एक जात. हे लोक कच्छ–काठियावाडमध्ये राहतात. त्यांच्याविषयी दंतकथा आहे, ती अशी– लखो आणि दामो असे दोन भाऊ होते. ते सिंधमधील लोहारगडाहून शियाळी या खेड्यात गेले व तिथून काठियावाडमधील

ध्रांगध्रचाला गेले. लखोपासून लोहाणा व दामोपासून डेपला या जातींची उत्पत्ती झाली असे सांगतात.

यांच्यांत सहा कुळे आहेत. हे स्वामीनारायण व रामानंद या पंथांचे अनुयायी आहेत. आशापुरी, पिढड, खोडियार, सूरो, सुधंन व ठाकुरजी ही यांची दैवते होत.

हे मृतांना जाळतात व त्यांचे श्राद्धही करतात. निपुत्रिक मृतांच्या आत्म्यांच्या शांतीसाठी हे लोक नीलपर्णावी नावाचा विधी करतात. [मुं. इ. जा.]

डेरानृत्य

कोकणातील एक लोकनृत्य. या नृत्यासाठी मातीचा एक डेरा घेऊन त्याच्या तोंडात एक माडाची पाती अडकवतात. एक माणूस ती पाती दोन्ही हातांच्या चिमटचांनी रवीची दोरी ओढतात त्याप्रमाणे ओढीत राहातो. त्यामुळे डेऱ्यातून एक गंभीर आवाज निघतो. त्या आवाजाच्या साथीवर गीते गाईली जातात व नंद-यशोदेची सोंगे घेऊन दोन पुरुष नाचतात. [भा. लो. नृ.]

डेराबाबा नानक

गुरू नानकाचे समाधिस्थान. हे गुरुदासपूरच्या पश्चिमेला १२ मैलांवर असून, इथे. गुरू नानकाने समाधी घेतली. नानकानेच इ. स. १७८७ मध्ये इथे एक मंदिर बांधले होते. महाराजा रणजितसिंघाने इ. स. १८२५ मध्ये हे मंदिर शृंगारले; तर महाराणी चांदकौर हिने ते सोन्याच्या पत्र्यांनी मढवले. या ठिकाणी मक्केहून गुरू नानक यांना मिळालेली कफनी आहे. [पं. जी. सा.]

डोंग दासरी

एक जात. हे लोक आंध्र व कर्नाटक या देशांत आढळतात. या शब्दाचा अर्थ ढोंगी वैष्णव असा आहे. यांच्यांत सण अक्की व घंटेल वरू असे दोन पोटभेद आहेत. हे लोक वैष्णव संतांचा वेष करून गावोगावी भिक्षा मागतात. हे पूर्वी भिक्षेच्या मिषाने चोऱ्याही करीत. हे मुलेमुली पळवून आणतात व त्यांना आपल्या जातीची दीक्षा देतात. कित्येकदा अन्य जातीतून बहिष्कृत झालेल्या लोकांनाही हे आपल्या जातीत घेतात. जातीत घेताना पुढीलप्रमाणे दीक्षाविधी करतात –

दीक्षार्थी माणसाला नदीकाठी नेऊन अभ्यंग स्नान घालतात. मग त्याला नवीन वस्त्र देतात. नंतर शमीची एक डहाळी जाळून तिने त्याच्या जिभेला डाग देतात. तसे केल्यावर तो शुद्ध झाला, असे समजतात. विधीसाठी जमलेल्या लोकांना जेवण घालतात.

हनुमान, हुलिगव्व आणि यल्लम्म ही यांची प्रमुख दैवते होत. चोरी करायची असली, तर हे लोक यल्लमाची पूजा करून तिच्यापुढे कोंबडा किंवा बकरा बळी देतात. बळीच्या धडावर आपले पागोटे ठेवतात. जर ते पागोटे उजवीकडे फिरले, तर तो चोरीसाठी शुभ शकुन समजतात व डावीकडे फिरले, तर अशुभ समजतात. हनुमंताच्या गळ्यात फुलांची माळ घालून माळेतील फुले डावी–उजवीकडे पडतील त्या मानानेही शुभाशुभ शकुन पाहण्याची पद्धत आहे. पुरुष चोरीच्या मोहिमेवर निघाले, की बायकाही त्यांच्या मागून जातात. मुलांना लहानपणापासूनच चोरीचे शिक्षण देतात. [का. ट्रा. स. इं.]

डोंगरपाणी

मुलींचा एक खेळ. या खेळात मुली समसंख्याक असतात. प्रथम त्यांचे दोन गट करतात. मग ते दोन्ही गट विशिष्ट अंतर ठेवून समोरासमोर बसतात. नंतर एका गटातील मुलगी हातात एक खडा घेऊन तो आपल्या शेजारच्या मुलींच्या हातात लपवते व काही मुलींच्या हातात तो लपवल्याचे सोंग करते. नंतर विरुद्ध गटातली मुलगी पुढे येऊन खडा कोणाच्या हाती आहे, ते ओळखण्याचा प्रयत्न करते. तिने बरोबर ओळखले, तर खडा लपवायचा मान तिच्या गटाला मिळतो. तिचा अंदाज चुकला, तर जिच्या हाती खडा असेल, ती मुलगी एक उडी मारून पुढे जाते. याप्रमाणे ज्या गटाच्या मुली दुसऱ्या गटाच्या बाजूपर्यंत प्रथम पोचतील, त्या गटाने डाव जिंकला असे ठरते. [व्या. ज्ञा. को.]

डोंगा

द. भारतातील एक शक्तिदेवता. डोंगा म्हणजे चोर. ही देवता गुप्तपणे येते व गुरेढोरे पळवून नेते, अशी समजूत असल्यामुळे हिला हे नाव मिळाले आहे. हिची पूजा रात्री करतात. गावातील रोगराई दूर होण्यासाठी हिला बळीही देतात. हिचे स्थान गावाच्या शिवेवर असते. उत्सवाच्या वेळी हिची मूर्ती रात्री मिरवीत आणून गावाच्या मध्यभागी बसवतात. जत्रेत तिच्यापुढे बकऱ्यांचा बळी देतात. पूजा झाल्यावर जमलेल्या माणसांपैकी एखादा माणूस तिची कथा सांगतो. पूजाविधी आटोपल्यावर गावाच्या उलट दिशेला तिचे तोंड करून तिला सीमेपलिकडे नेऊन विसर्जित करतात. हिच्या पूजेच्या वेळी स्त्रिया त्या ठिकाणी जात नाहीत. [द्र. गॉ. मॉ. हिं.]

डोंब

एक अंत्यज जात. यांची वस्ती बंगाल, बिहार, पंजाब, राजस्थान, मद्रास, इ. प्रदेशांत आहे. मत्स्यसूक्त तंत्रात अनेक अंत्यज जातींबरोबर या जातीचा उल्लेख आहे. क्षीरस्वामीने या डोंबांनाच श्वपच असे म्हटले आहे. डोंब हे अंत्यज असून गवई आहेत, असे राजतरंगिणीत सांगितले आहे. 'श्वपचादयः' म्हणजे जे कुत्र्याचे मास शिजवून खातात ते व त्यांच्या-

रखे इतर ते डोंब होत, असे बृहत्संहितेत म्हटले आहे.

डोंब हा शब्द डुंबा=दैत्य या शब्दापासून बनला, असे सांगात. रुद्रदेवाच्या शिलालेखातही हा शब्द आढळतो.



डोंब पुरुष – राजस्थान

डोंब जातीत बरेच पोटभेद आहेत. मघैय्या, बानफोर, बासर, इ. त्यांची नावे आहेत. यातले काही विणकर, तर काही व्यापारी आहेत. घोड्यांची निगा राखणे, घरकाम, भंगीकाम, झाडूकाम करणे, चटया–टोपल्या विणणे, इ. व्यवसायही काही लोक करतात. काही गायक वा वादकही असतात. डोंब लोक जयपूरच्या महाराजांचे वंशपरंपरेने गायक व वादक आहेत.

हे लोक कलुग देवाला भजतात. प्रत्येक ग्रामप्रमुखाच्या घरी हा देव असतो. त्याच्या नावाने एका नव्या मडक्यात एक तांब्याचे नाणे ठेवलेले असते. हेच कलुग देवाचे प्रतीक होय. गंडक, साम्मैय्या, गंगानाथ, भोलानाथ अशीही पोटभेदपरत्वे त्यांची दैवते आहेत.

हे चैत्र पौर्णिमेला पहिला आंबा चंद्राला अर्पण करून मग त्याचे सेवन करतात. ज्या वारी मूल जन्मले असेल, त्या वाराचे नाव बहुधा मुलाला ठेवतात. मूल जन्मताना त्याला आत्मा नसतो, असे हे समजतात. म्हणून मग हे लोक जन्मलेल्या मुलाच्या हातात कोंबडीच्या पिल्लाचे हाड ठेवतात व ते हाड त्याने टाकले, की आत्म्याने त्याच्या शरीरात प्रवेश केला, असे समजतात आणि मग आनंदोत्सव करतात.

मृतांच्या आत्म्यांना हे डुमा असे म्हणतात आणि मुलाच्या जन्माच्या वेळी या डुमांना आवाहन करतात. त्यांना कोंबड्याचा बळीही देतात. डुमा हा भूत–पिशाचांपासून संरक्षण करतो, अशी त्यांची श्रद्धा आहे. यांच्या भगतांच्या अंगात भुते येतात व डुमाला काय हवे, ते सांगतात.

डोंब स्त्रिया कानात नागाच्या आकाराची चांदीची कुंडले घालतात. त्यांना गोंदून घेण्याचीही फार हौस असते.

डोंब तरुणी प्रथम ऋतुमती झाली, की पाच दिवसपर्यंत ती झोपडीबाहेर राहते. नंतर जवळच्या एखाद्या ओढ्यावर स्नान करते. मग तिला नवीन वस्त्र देतात. या वेळी आप्तेष्टांना काहीतरी पेय देण्याची पद्धत आहे.

विवाहप्रथा – मुलीचे लग्न बहुधा ती वयात आल्यावर होते. आतेबहिणीशी लग्नसंबंध होतो. मुलीला मागणी घालायला जाताना वराकडील लोक दारूची काही मडकी बरोबर नेतात व ती मुलीच्या झोपडीबाहेर ठेवतात. मुलीच्या आईबापांना मागणी पसंत असली, तर मग ती मडकी घरात नेतात व सगळे मिळून दारू पितात. लग्न वधूगृही होते. लग्न झाल्यावर वधू-वर झोपडीच्या बाहेर उभे राहतात. नंतर वराची उजवी व वधूची डावी करंगळी एकत्र बांधतात व त्या स्थितीत ती दोघे झोपडीत प्रवेश करतात. दुसऱ्या दिवशी वरात वरगृही येते. तिसऱ्या दिवशी त्यांना हळदीच्या पाण्याने स्नान घालतात.

मर्तिकप्रथा – हे लोक मृतांना जाळतात किंवा पुरतात.

डोंब हे अंत्यज असले, तरी प्रांतपरत्वे हिंदूंच्या जीवनात त्यांना बरेच मानाचे स्थान आहे. वाराणसीत घाटावरच्या स्मशानात डोंबाला महत्त्व असते. तिथे डोंबांव्यतिरिक्त इतरांची चिता डोंबाच्या हस्ते रचली जाते. चिता पेटविण्यासाठी अग्नीही तोच आणून देतो. हरिश्चंद्राच्या पारंपरिक कथेत हरिश्चंद्राला वाराणसीच्या स्मशानात डोंबाचे काम करावे लागल्याचा उल्लेख आहे.

पूर्वी देहांत शिक्षा झालेल्या गुन्हेगारांना ठार करण्याचे काम डोंबाकडे असे; पण ते काम पार पाडण्याआधी तो नियुक्त केलेला डोंब न्यायमूर्ती, राजा व खटल्यात भाग घेतलेले इतर अधिकारी यांना गुन्हेगाराच्या शिक्षेची फेरतपासणी करण्याची विनंती करीत असे. तसे केल्याने आपण मानवहत्येच्या पापापासून मुक्त राहू, असे डोंबांना वाटत असे. [म. ज्ञा. को.; रा. जा.; का. ट्रा. स. इं.; लोककला त्रै.; हि. ध.; ने. नॉ. इं.]

डोंबारी

एक भटकी जमात. ही जमात कोल्हाटी या नावानेही ओळखली जाते. महाराष्ट्रात आणि दक्षिणेतल्या अन्य प्रदेशांत या लोकांचा संचार असतो. दोरीवर, तारेवर

किंवा वेळूच्या काठीवर नाचणे आणि अन्य कसरतीचे खेळ करून दाखवणे, हा यांचा प्रमुख व्यवसाय आहे. आंध्र व कर्नाटक या प्रदेशांत यांची थोडीशी स्थायी वसती आहे. त्यांच्यापैकी काही लोक शेतीही करतात. हे तेलुगू, मराठी व हिंदी या भाषा बोलतात.

शुक्ल यजुर्वेदाच्या वाजसनेयी माध्यंदिन संहितेत वेळूवर नाच करणाऱ्या (वंशनर्तिन्) व्यक्तीचा उल्लेख आहे (३०.२१). त्यावरून अशा प्रकारचे कसरतीचे खेळ करून दाखविणाऱ्या जमातीची प्राचीनता सिद्ध होते. संगीतरत्नाकर नामक ग्रंथात कोल्हाटिकाचे (कोल्हाटी) वर्णन आढळते, (७.१३३०–३१) ते असे –

रज्जुसंचारचतुरश्छुरिकानर्तने कृती ।
शस्त्रसङ्कटसम्पातपटुः कोल्हाटिको मतः ॥

अर्थ– जो दोरीवर संचार करण्यात निपुण असतो; जो सुरी वर फेकून लीलया (हाताला जखम न होऊ देता) झेलू शकतो आणि जो शस्त्रांच्या धोकादायक कसरतीत प्रवीण असतो, त्याला कोल्हाटी म्हणतात.

डोंबाऱ्यांत रेड्डी किंवा कापू आणि आरय (महाराष्ट्रीय) असे दोन भेद आहेत. यांच्या जमातप्रमुखाला मुटली गुरू असे म्हणतात. कोल्हाट्यांच्या धार्मिक व सामाजिक बाबतींत त्याचा सर्वाधिकार चालतो. कुडाप्पा जिल्ह्यातल्या चितवेल येथे त्याचा मठ आहे. हे लोक यल्लम्म व संकटम्म या देवतांची उपासना करतात.



डोंबारी – कसरत करताना

कसरतीच्या खेळांशिवाय लाकडाच्या व शिंगांच्या फण्या करून विकणे, पक्षी पकडणे, म्हशी, बैल, डुकरे व गाढव हे प्राणी बाळगणे, सर्प-विंचवांच्या विषबाधेवर औषधोपचार करणे, इ. व्यवसाय हे लोक करतात. क्वचित घरफोडीही करतात. स्त्रिया फण्या आणि ताडपत्री टोपल्या, सुपल्या व खुळखुळे विकतात. मुलांना पाचव्या वर्षापासूनच कसरतीचे खेळ शिकवतात. पाहा– कोल्हाटी. [गां. गा.; का. ट्रा. स. इं.; से. रि. १९११; कोल्हा. गॅझे.; व्या. ज्ञा. को; सु. वि. को.]

डोंबिपा

चौऱ्यायंशी सिद्धांपैकी एक. याचा जन्म मगधातल्या क्षत्रिय राजवंशात झाला होता. वीणापा आणि विरूपा हे याचे गुरू होते. हा हेवज्रतंत्राचा अनुयायी होता. याने महामुद्रेची साधना सुरू करताच मंत्री आणि प्रजा यांनी त्याला राज्यातून निर्वासित केले. पुढे काही वर्षांनी आपल्या राज्यात दुष्काळ पडल्याचे समजल्यावर हा सिंहिणीरूप शक्तीसह आपल्या राज्यात परत आला. प्रजेने त्याला ओळखले आणि श्रद्धापूर्वक त्याचे शिष्यत्व पत्करले. हा कण्हपाचा गुरू होता. तंजूरच्या ग्रंथालयात याच्या नावावर एकवीस ग्रंथ आहेत. अक्षरद्विकोपदेश, डोंबिगीतिका आणि नाडीबिंदुद्वारे योगचर्या हे याचे तीन ग्रंथ मगही हिंदीत आहेत. याच्या सहजसिद्धी नामक ग्रंथावरून असे दिसते, की याने कौलसाधनेचा विशेष प्रचार केला होता. [पु. त. नि.; सि. सा.]



डोंबिपा

डोगरा

राजपूत वंशातील एक जात. जम्मू व त्यालगतचा पंजाबचा काही भाग या प्रदेशात डोगरा लोकांची वसती आहे. वैदिक काळात या प्रदेशाला मद्र देश म्हणत. पुराणकाळी त्याला द्विगर्त म्हणू लागले. या प्रदेशात मानसर व सरुईसर ही दोन सरोवरे असल्यामुळे त्याला द्विगर्त हे नाव मिळाले आणि त्याचा अपभ्रंश होऊन डुग्गर हे नाव प्रचलित झाले, अशी एक समजूत आहे. एका पंडिताने दुर्गढ या शब्दावरून डुग्गर या नावाची व्युत्पत्ती सांगितली आहे. परंतु या कल्पना सर्वमान्य नाहीत. राजस्थानी भाषेतील डुंगर (= डोंगर) या शब्दावरून डुग्गर हे नाव आले, असे अनेक विद्वान मानतात. मोगलांच्या आक्रमणामुळे राजस्थानातील काही राजपूत लोक या दुर्गम प्रदेशात जाऊन वसले आणि त्यांनी या प्रदेशाला डुग्गर हे नाव दिले व ते स्वतःला डोगरा राजपूत म्हणू लागले.

पंजाबातील बहुतेक डोगरा लोक सांप्रत मुसलमान झाले आहेत. ते शेती व पशुपालन हे व्यवसाय करतात. त्यांच्या

चालीरीती गुजर लोकांच्यासारख्या आहेत. तथापि त्यांचे डोगरा राजपुतांशी बरेच साम्य आढळते.



डोगरा स्त्री व पुरुष

डोगरा राजपूत ही जम्मूमधील एक प्रमुख जात आहे. हे लोक दिसायला फार सुरेख व शरीराने काटक असतात. तंग, चुणीदार पायजमा व खिलका कुर्ता हा डोगरांचा पोषाख असतो. ते मस्तकावर सप्तरंगी पगडी घालतात. त्यांच्या स्त्रिया पूर्वी घागरा नेसत होत्या, पण आता मुसलमानी पद्धतीचा पायजमा घालतात. त्या अंगाखांद्यावर भरपूर दागिने घालतात. पुरुषांनाही दागिन्यांची आवड असते.

डोगरा लोक शेती करतात; पण त्यांना तो व्यवसाय नीट करता येत नाही. खत्री, गुजर वगैरे लोकांच्या तुलनेने हे शेतीत मागसलेलेच आहेत. यांच्यांतील मियां राजपूत तर केवळ सैनिकी पेशाचेच आहेत. त्यांची सैनिकी परंपरा जुनी आहे.

इ. स. च्या १८ व्या शतकाच्या अखेरपर्यंत मियां लोकांत नवजात मुलींना मारून टाकण्याची प्रथा होती. त्यांना जिवंत पुरीत किंवा जंगलात सोडून देत. आपली कन्या लग्नानंतर दुसऱ्याच्या घरी जाणे त्यांना मुळीच सहन होत नसे. पण या प्रथेमुळे मियां राजपुतांना किसान राजपूत किंवा ठाकर यांच्या मुलींशी विवाह करावा लागे. आता ही प्रथा बंद झाली असून, मियां लोक बहुधा आपसातच विवाहसंबंध करतात. खाण्यापिण्याच्या बाबतीतही हे लोक फार सोवळे–ओवळे पाळतात.

एखादी वृद्ध व्यक्ती मरण पावली, की मियां लोक दुःख न करता आनंद मानतात आणि उत्तम कपडे घालून, वाजत गाजत, गाणी गात त्या व्यक्तीची प्रेतयात्रा नेतात. अशा प्रसंगी ते क्षौर मात्र करतात.

डोगरा राजपुतांत जम्वाल, बलौरिया, जसरौटिया इ. अन्य पोटभेदही आहेत.

चिनाव व झेलम या नद्यांच्या मधल्या प्रदेशाला चिबाल म्हणतात; म्हणून त्या प्रदेशात वसलेल्या डोगरा लोकांना चिबाली हे नाव मिळाले आहे. त्यांच्या बहुतेक चालीरीती डोगरांच्या सारख्याच आहेत. मात्र चिबाली लोक डोगरांच्यापेक्षा अधिक सुदृढ व कष्टाळू आहेत.

काश्मीरचे सध्याचे राजघराणे याच जातीचे आहे. इ. स. च्या १८ व्या शतकात डोगरा कुळातील रणजितदेव हा जम्मूचा राजा होता. तो कर्तबगार असून, त्याची राजधानी वैभवशाली होती. इ. स. १७८० च्या सुमारास तो मरण पावल्यानंतर जम्मू हे शिखांचे मांडलिक संस्थान बनले. पुढे रणजितदेवाचा वंशज गुलाबसिंह याने रणजितसिंघाच्या पदरी राहून खूप



डोगरा स्त्री

पराक्रम केल्यामुळे त्याला जम्मूचे राज्य मिळाले. तिथे त्या वेळी अराजक माजले होते. गुलाबसिंहाने ते कठोरपणे मोडून काढले. दहा वर्षांच्या अवधीत त्याने भोवतालची अनेक संस्थाने जिंकून सर्वत्र शांतता प्रस्थापित केली. पुढे त्याला ब्रिटिशांकडून सर्व काश्मीरचेच राज्य मिळाले.

नृत्य – डोगरा लोक चांदण्या रात्री व धार्मिक उत्सवांच्या वेळी एक नृत्य करतात, त्याला कुड्नृत्य म्हणतात. त्यात स्त्री-पुरुष संमिश्रपणे भाग घेतात. चुणीदार पायजमा, रंगीत अंगरखा, पगडी व पगडीवर एक तुरा असा पुरुष-नर्तकांचा वेष असतो. स्त्रियांचा पोषाखही चित्रविचित्र रंगांचा असतो. मध्यभागी शेकोटी पेटवून तिच्या भोवती फेर धरून ढोल व बासरी यांच्या साथीवर हे नृत्य करतात. सुगीच्या वेळी शेतकरी लोक गळयात माळा व पायात घुंगुर बांधून आनंदाने नाचतात.



डोगरा चित्रशैली

डोगरा लोकांनी चित्रकलेचाही खूप विकास केला आहे. त्यांची चित्रकला पहाडी चित्रशैलीची एक शाखा असली, तरी डोगरा शैली म्हणून ती प्रसिद्ध आहे. पाहा – पहाडी चित्रशैली.

[म. ज्ञा. को.; हिं. सा. बृ. इ. १६; योजना–संस्कृतिविशेषांक, जाने. १९६०; इं. गॅ. इं. भाग १५; का. दे. सं.]

डोगरी भाषा व साहित्य

जम्मू-काश्मीर राज्यातील एक प्रमुख भाषा. त्या भागात इतरभाषिकांपेक्षा डोगरी बोलणारेच बहुसंख्य आहेत. जम्मू-काश्मीरच्या बाहेरही ही भाषा बोलली जाते.

हिमालयाच्या पश्चिम भागातील शिवालिक डोंगरावरील पठारी प्रदेश म्हणजे पश्चिमी पहाडी भाषांचे घर असे, मानले जाते. या प्रदेशात पूर्वी भिन्न भिन्न काळी नाग, खश, टक्क, गुर्जर, कनेत, ठक्कर, डोगरा, इ. लोक वसलेले होते. त्यांच्या नावांवरूनच त्या भागातल्या अनेक पहाडी भाषांची नावे पडलेली आहेत. त्यांतली डोगरी ही सर्वांत प्रचलित व विकसित बोली असून, तिला प्रतिष्ठा प्राप्त झाली आहे. तिला पश्चिमी पहाडी भाषा समूहाची प्रतिनिधीच मानायला प्रत्यवाय नाही. इतर सर्व पहाडी बोलींचे संमिश्रण डोगरी भाषेत झालेले असून, ती सर्वांत संपन्न व प्रगतिशील आहे.

सर्व पश्चिमी-पहाडी भाषांची एक स्वतंत्र लिपी असून तिला टाकरी, टक्करी अथवा टाँकरी म्हणतात. टक्क नामक आदिवासी लोकांवरून हे लिपिनाम आले आहे. त्या लोकांचे प्रमुख संबंध पंजाब व हिमाचल प्रदेश या भागावर होते. त्यामुळे सर्व वायव्य भारतात ही लिपी प्रचलित झाली. सांप्रत जम्मू, कांगडा व चंबा या प्रदेशात व्यापारी वर्गाच्या वह्यांमध्ये हीच लिपी वापरली जाते. पंजाबातील लहंदा व काश्मीरातील शारदा या लिप्या टक्करी पासूनच उगम पावल्या आहेत, असे काही पंडितांचे मत आहे.

डोगरी ही पंजाबीची एक उपभाषा आहे, असे ग्रियर्सनचे मत आहे; पण डॉ. सिद्धेश्वर वर्मा यांना ते मान्य नाही. त्यांच्या मते डोगरी ही एक स्वतंत्र व सीमांत भाषा आहे. ही भाषा शौरसेनी प्राकृत भाषेपासून उगम पावली, असे काही भाषाशास्त्रज्ञ मानतात. तथापि तिच्यावर खश व दरद यांच्या भाषांचाही थोडासा प्रभाव पडलेला दिसून येतो.

महाराजा रणवीरसिंह याच्या काळी डोगरी भाषेला व टाकरी लिपीला राजाश्रय प्राप्त झाला. पण सरकारी कामाव्यतिरिक्त तिचा उपयोग लेखनासाठी झालेला आढळत नाही. डोगरीचे काही प्राचीन साहित्य टाकरी लिपीत उपलब्ध आहे. लीलावती या संस्कृत गणितग्रंथाचे डोगरी रूपांतर पाहिल्याचा उल्लेख डॉ. बुल्हरने केला आहे. त्याचप्रमाणे काही प्राचीन डोगरी शिलालेख व बायबलचे डोगरी भाषांतरही सापडले आहे.

टाकरी लिपीचा उपयोग सर्वथा बंद झालेला नसला, तरी राष्ट्रीय एकात्मतेच्या दृष्टीने डोगरीसाठी देवनागरी लिपीचा उपयोग केला जात आहे. सांप्रत डोगरी भाषेत कविता, कथा, नाटके, इ. गद्य–पद्य वाङ्मय विपुल प्रमाणात उपलब्ध आहे. दिनूभाई, कृष्ण सुमहलपुरी, मधुकर, रामनाथशास्त्री, वेद राही, नरेंद्र खजूरिया, मदनमोहन शर्मा, इ. अनेक कवी व लेखक काव्य, कथा, कादंबरी वगैरे क्षेत्रांत साहित्यनिर्मिती करीत आहेत.

लोकसाहित्य – डोगरी लोकसाहित्याची परंपरा खूप प्राचीन

व सजीव आहे. ते वाङमय त्यांच्या जीवनाच्या सर्व अंगोपांगाशी निगडित आहे. त्यात पौराणिक कथांबरोबरच शूर वीरांच्या बलिदानाच्या कथाही आहेत. काही नागकथांमध्ये न्यायप्रिय व परोपकारी नागपुरुषांचे वर्णन मिळते. नीतिकथाही पुष्कळ आहेत. त्यांच्या परीकथा व दैत्यकथा यांवर सूफी मताची छाप पडलेली दिसते.

लोककथांपेक्षा पद्यमय लोकसाहित्य डोगरी भाषेत विपुल आहे. त्यातील लोकगाथा काव्यमय व भावपूर्ण आहेत. त्यांचे अनेक प्रकार आहेत, ते असे--

(१) कारकाँ व बाराँ– जोगी व दरवेशी ही गीते गातात. त्यांत महापुरुषांची आख्याने असतात. यांचा प्रसार सर्वांत जास्त आहे. (२) भेटाँ– देवतांची गाणी. (३) खेळांची गाणी. (४) नवरात्राची गाणी. (५) लोरी – अंगाई गीते. (६) विहाई– जन्म किंवा वाढदिवस या प्रसंगी गायची गीते. (७) विवाहगीते. (८) वारमासी गीते. (९) श्रमगीते. (१०) नृत्यगीते. (११) प्रेमगीते व (१२) धार्मिक गीते.

डोगरांचे ऋजुत्व, निर्मळ जीवन, दैन्य, शेती, पशुपालन, वगैरे व्यवसायांतील अडचणी, इ. अनेक गोष्टींचे प्रतिबिंब या लोकगीतांत स्पष्ट दिसते. कठिण जीवन हसून खेळून जगण्याची त्यांची वृत्तीही त्यात स्पष्टपणे दिसते. [योजना– संस्कृतिविशेषांक, जानेवारी १९६०; हिं. सा. बृ. इ. १६]

डोमगाव-मठ

रामदासांचे पट्टशिष्य कल्याणस्वामी यांचा मठ. डोमगाव हे मराठवाड्यातील उस्मानाबाद जिल्ह्यात परांड्यापासून ५ मैलांवर, सीना नदीच्या तीरावर वसलेले आहे. रामदासांनी स्थापलेल्या अकराशे मठांमध्ये चाफळचा मठ हा मुख्य होय, कारण तिथे समर्थांचे वास्तव्य होते. त्याच्या खालोखाल डोमगावचा मठ सांप्रदायिक दृष्टीने महत्त्वाचा मानला जातो.

डोमगाव येथे श्रीरामाचे मंदिर व कल्याणस्वामींची समाधी आहे. समाधीचे मंदिर इ. स. १७७३ साली बांधले असावे. समाधीच्या शिळेवर शंकराची पिंडी व सामर्थांच्या पादुका आहेत. या समाधीच्या बाजूंवर गीतेतले ६ श्लोक कोरलेले आहेत.

डोमगावच्या मठात रामदासांनी कल्याणस्वामींच्या हस्ते लिहवून घेतलेली दासबोधाची मूळ हस्तलिखित प्रत अद्याप सुस्थितीत आहे. रामदासांनी स्वहस्ते कल्याणस्वामींना लिहून दिलेला कित्ताही तिथे आहे. कल्याणस्वामींचे शिष्य केशवस्वामी यांनी इ. स. १६७८ मध्ये सोनेरी–रुपेरी अक्षरांत लिहिलेली दासबोधाची पोथीही मठात ठेवलेली आहे. ती पोथी लहान असली, तरी सुवाच्य आहे. इथे आणखी पुष्कळ जुने कागदपत्र मिळाले असून, धुळे येथील श्रीसमर्थवाग्देवता मंदिरात त्यांचा संग्रह केलेला आहे.

मठात दरवर्षी दासनवमी, रामनवमी, हनुमानजयंती, कल्याणपुण्यतिथी, इ. उत्सव होतात. त्या वेळी तिथे अन्नदान केले जाते. [श्री. दा. शं. जोशी–पुरुषार्थ, ऑगस्ट १९६४]

डोमल

एक मुसलमान जात. यांची वसती मुख्यत्वे काश्मीरात आढळते. डुमा किंवा डोंब यांच्याहून भिन्न अशी ही जात आहे. यांचा प्रमुख व्यवसाय शेती हा आहे. यांचे राजपूतांशी बरेच साम्य आढळते.

डोलुव

एक जात. यांची वसती ओडिसा राज्यातल्या गंजाम जिल्ह्यात आहे. ही जात म्हणजे ओडिसातल्या प्राचीन राजांना वेश्यांपासून झालेली संतती होय असे सांगतात.

सैनिकी व राजसेवा हा त्यांचा मूळ पेशा होता. हल्ली हे मुख्यत: शेतीचा व्यवसाय करतात. काही लोक गवंडीकाम करणे, गाड्या हाकणे, इ. कामे करतात.

हे लोक चैतन्यसंप्रदायानुयायी वैष्णव असून, ते गळ्यात तुळशीच्या माळा व जानवी घालतात. हे कालवा, बागदेवी, पोटरी, महेश्वरी आणि मणिक्केश्वरी या ग्रामदेवतांना भजतात.

या जातीत कोंडैयिटो, लेंका, रब्बा, पोट्टीया व बेहेरानिया असे पाच पोटभेद आहेत. या जातीच्या स्त्रिया ओडिसातल्या जमीनदार मुलांशी लग्ने करतात; परंतु जमीनदारांच्या मुली मात्र डोलुवा मुलांशी लग्ने करीत नाहीत. जातीचे पुढारीच जातिविषयक प्रश्नांचा निर्णय करतात [का. ट्रा. स. इं.]

डोहाळे

गर्भवती स्त्रीच्या इच्छेला मराठीत डोहाळे व संस्कृतात दोहद असे म्हणतात. दोहद म्हणजे दोन हृदयांची इच्छा होय. गर्भवती स्त्रीला एक तिची व एक तिच्या गर्भाची अशा दोन इच्छा असतात. किंबहुना खाणे, पिणे व इतर गोष्टी यांच्याविषयी गर्भवती जी इच्छा व्यक्त करते, ती तिची नसून, गर्भच आपली इच्छा तिच्या मुखाने व्यक्त करतो, अशी समजूत आहे. अशा वेळी गर्भवती जी इच्छा दर्शवील ती इच्छा पूर्ण करणे, हे तिच्या पतीचे व पर्यायाने तिच्या सासर–माहेरच्या मंडळींचे कर्तव्य असते. या गोष्टीला डोहाळे पुरवणे, असे म्हणतात.

गर्भवतीचे डोहाळे पुरवावे असे सांगताना वैद्यकशास्त्राने म्हटले आहे, ते असे–

दोहदस्याप्रदानेन गर्भो दोषमवाप्नुयात् ।

अर्थ– गर्भिणीला इच्छित वस्तू न दिल्यास गर्भाला दोष प्राप्त होतो.

डोहाळे पुरवण्याची ही कल्पना फार प्राचीन आहे. सीता गर्भवती असता रामाने तिची इच्छा विचारली होती व तिने गंगातीरावरची पवित्र तपोवने पाहण्याची इच्छा व्यक्त केली होती, असे वाल्मीकीरामायणात म्हटले आहे (७.४२.३१–३४). कालिदासानेही डोहाळे पुरवण्याच्या कल्पनेचा उपयोग सीता आणि त्याआधी सुदक्षिणा यांच्या बाबतीत केला आहे. सुदक्षिणेचे डोहाळे दिलीप राजाने कसे पुरवले, त्याविषयी कालिदास म्हणतो –

उपेत्य सा दोहददुःखशीलतां यदेव वव्रे तदपश्यदाहृतम् ।
न ह्योष्टमस्य त्रिदिवेऽपि भूपतेरभूदनासाद्यमधिज्यधन्वनः ।।
(रघु. ३.६)

अर्थ – त्या सुदक्षिणा राणीला डोहाळ्यांच्या उमाशांमुळे जी जी वस्तू हवीशी वाटे, ती ती लागलीच तिच्यापाशी तयार असे. कारण धनुष्यावर दोरी चढविलेल्या त्या राजाला इष्ट वस्तू स्वर्गात असली, तरी ती दुष्प्राप्य नव्हती.

डोहाळजेवण हा प्रथम गर्भवतीचा एक कौतुकाचा सोहळा असतो. हे डोहाळजेवण सातव्या महिन्यात करण्याची पद्धत आहे. ज्या मानाने सासर–माहेरच्या मंडळींची ऐपत व कुवत असेल, त्या मानाने ही डोहाळजेवणे झोपाळ्यावरचे, चांदण्यातले, नावेतले, बागेतले; अशी विविध प्रकारची असतात. डोहाळजेवणाच्या दिवशी डोहाळतुलीला हिरवी साडी देतात व हिरवा चुडा भरतात. तिच्या डोक्यावर फुलांची जाळी घालतात. तिला मखरात बसवतात. मग तिची ओटी भरतात. सवाष्णींना बोलावून हळदीकुंकू करतात. डोहाळतुलीच्या कमरेला फुलांचा पट्टा व डोक्यावर फुलांचा मुकूट घालून तिच्या हातांत फुलांचेच बनवलेले धनुष्यबाण देतात. या पुष्पालंकरणाला मराठीत वाडी भरणे, असे म्हणतात. या वेळी डोहाळतुली ही जणू रुक्मिणी आहे, अशा भावनेने तिला जे डोहाळ्यांचे गाणे म्हणतात, त्यातले एक कडवे पुढीलप्रमाणे –

लागला सातवा मास पोट नारळी,
महालामध्ये आरास केली ।।
गुंफिली सुवासिक फुले मस्तकी जाळी,
जणु प्रभा शशीची पडली ।।
नगरीच्या नारी येऊनी,
गाताती मंजुळ गाणी
कुणि चेष्टा करिती मिळूनी ।।
वांटिती हळदीकुंकू पान, सुपारी ।।

भारतीय वाङ्मयात दोहद (डोहाळे लागणे व पुरवणे) हा एक मनोज्ञ कल्पनाबंध आहे. केवळ मानवी स्त्रीलाच डोहाळे लागतात, असे नसून वृक्ष–वनस्पतींनाही ते लागतात, असे भारतीय रसिकांनी मानले आहे. या विषयीचा एक श्लोक असा–

स्त्रीणां स्पर्शात् प्रियङ्गुर्विकसति बकुलः सीधुगण्डूषसेकात्
पादाघातादशोकस्तिलककुरबकौ वीक्षणालिङ्गनाभ्याम् ।
मन्दारो नर्मवाक्यात् पटुमृदुहसनाच्चम्पको वक्त्रवातात्
चूतो गीतान्नमेरुर्विकसति च पुरो नर्तनात् कर्णिकारः ।।

अर्थ – स्त्रियांच्या स्पर्शाने प्रियंगुलता, त्यांच्या मद्याच्या चुळीने बकुल, लत्ताप्रहाराने अशोक, कटाक्षाने तिलक, आलिंगनाने कोरांटी, नर्मवाक्याने मंदार, स्मिताने चंपक, फुंकराने आंबा, गीताने नमेरू व समोर नृत्य करण्याने कर्णिकार हे वृक्ष फुलांनी डवरतात.

भारतीय कथावाङ्मयात दोहद या कल्पनाबंधाचा बराच उपयोग केलेला आहे. कित्येकदा कथेची सुरवातच दोहदाने होते. काही वेळा कथेशी विसंगत असलेला एखादा प्रसंग केवळ दोहद म्हणून कथेत प्रवेश मिळवतो. श्री. ब्लूमफील्ड या पाश्चात्त्य संशोधकाने दोहदाचे कथावाङ्मयातील उपयोग पुढीलप्रमाणे सांगितले आहेत –

(१) दोहद पुरवण्याच्या उद्योगात पतीला इजा होते किंवा तो धोकादायक गोष्टी करायला प्रवृत्त होतो. थुसा जातकात बिंबिसार राजा पत्नीचे दोहद पुरवण्यासाठी आपल्या उजव्या गुडघ्यातले रक्त तिला देतो. कुसुमावती नामक एका गर्भवतीला आपल्या पतीची आतडी खाण्याची इच्छा होते, अशी एक जैनकथा आहे. एका कावळीला ब्राह्मणाचे डोळे खाण्याचे डोहाळे लागतात आणि ते मिळवण्याच्या प्रयत्नात कावळा मरण पावतो, अशी कथा सुवण्णकुक्कुट जातकात आली आहे.

(२) पुष्कळदा स्त्रीचे डोहाळे तिच्या पतीला पराक्रम किंवा चातुर्याची कृत्ये करण्यास प्रवृत्त करतात. भद्दसाल जातकात याविषयी एक कथा आहे, ती अशी – बंधुल नावाचा एक सेनापती असतो. त्याच्या बायकोचे नाव मल्लिका. तिला वैशालीतल्या एका तीर्थात स्नान करण्याचे व तिथले पाणी पिण्याचे डोहाळे लागतात; पण तळ्याभोवती तारांचे जाळे व रक्षकांचा पहारा असल्यामुळे ती गोष्ट तिला करता येत नाही. मग बंधुल पुढे होतो व त्या पहारेकऱ्यांना पळवून लावतो. तो तारांचे जाळेही तोडतो व मल्लिकेची स्नानपानाची इच्छा पूर्ण करतो. मग ती दोघे रथात बसून घरी परतत असताना पाचशे सैनिक त्यांचा पाठलाग करतात; पण बंधुल त्या सर्वांना ठार मारतो.

दब्भपुफ्फ जातकात अशीच आणखी एक कथा आहे – एका कोल्हीला रोहित मासा खाण्याचे डोहाळे लागतात. दोन पाणमांजरांना एक रोहित मासा गवसलेला असतो; पण

त्याच्या वाटणीच्या बाबतीत दोघांमध्ये भांडण लागते. या वेळी कोल्हा नेमका पुढे येतो. तो मध्यस्थी करताना एका मांजराला डोक्याचा व दुसऱ्याला शेपटीचा भाग देतो. आणि मधला भाग घरी आणून आपल्या बायकोचे डोहाळे पुरवतो.

(३) डोहाळे हे कधी कधी त्या स्त्रीला धार्मिक व पुण्यप्रद गोष्टी करायला उद्युक्त करतात. सीतेचे उदाहरण या बाबतीत प्रसिद्धच आहे. बौद्ध व जैन ग्रंथात हा कल्पनाबंध आढळतो. नमी या तीर्थंकराच्या गोष्टीत त्याच्या आईला जिन व साधू यांची सेवा करावीशी वाटते आणि तीर्थंकरांचे प्रवचन ऐकावेसे वाटते. राणी श्रुतिमतीला अष्टापद पर्वतावरील देवांची पूजा करायची इच्छा होते, अशी कथा कथाकोशात आली आहे.

(४) कित्येक कथांतून उपकथा म्हणूनही दोहदाचा उपयोग केलेला आहे. यामुळे मूळ कथावस्तूची खुलावट होते व कधी तिला गतीही मिळते. कथासरित्सागरासारख्या ग्रंथात असे प्रसंग अनेक सापडतात. उदा० वासवदत्तेला जादूच्या रथात बसून अवकाशात उड्डाण करावे, अशी इच्छा होते व राणी अलंकारप्रभा ही तर कमळरूप धारण करून व जादूच्या रथात बसून आकाशात विहारच करते.

(५) कित्येकदा नवऱ्याचा व सासरचा जाच कमी करण्यासाठी बायका डोहाळ्याचे निमित्त करताना दिसतात. उदा० एक स्त्री वांझ असल्याने नवरा व घरातील लोक तिला छळू लागतात. मग ती स्वत:ला डोहाळे लागल्याचे मिष करते आणि एकेक विचित्र इच्छा सांगू लागते. त्यामुळे तिचा छळ कमी होतो. पुढे वनात हिंडत असता सुदैवाने तिला एक मूल सापडते व अशा रीतीने तिचे वांझपण दूर होते.

(६) पुष्कळदा आपल्या पत्नीचे विचित्र डोहाळे पुरवीत असल्याबद्दल पती केवळ भास निर्माण करतो. याविषयी कथासरित्सागरात पुढील दोन कथा आहेत—

मृगावती नामक राणीला रक्ताने स्नान करण्याचे डोहाळे लागतात. नवरा तिला लाखेच्या व लाल रंगाच्या पाण्याने स्नान घालून तिची ती इच्छा पूर्ण केल्याचे भासवतो.

एका गर्भवतीला चंद्र पिण्याचे डोहाळे लागतात. मग रात्रीच्या वेळी घरातली माणसे छपराला भोक पाडतात आणि त्यातून चंद्राचे प्रतिबिंब जमिनीवरच्या दुधाच्या पेल्यात पडेल असे करतात. मग ती डोहाळतुली चंद्र म्हणून तो दुधाचा पेला पिते. लगोलग छपराचे ते भोक बंद केले जाते. त्यामुळे तिला चंद्र प्याल्याचे समाधान मिळते.

(७) अवतारी पुरुषांचे गर्भ ज्यांच्या उदरी असतात, अशा स्त्रियांच्या डोहाळ्यांतून भावी अपत्याचे अवतारकार्य सूचित करण्याची पद्धती आपल्या प्राचीन वाङ्मयात सर्वत्र अवलंबलेली दिसते. कौसल्येला डोहाळे लागले तेव्हा तिने रावण व त्याचे राक्षस यांच्या वधाची आकांक्षा व्यक्त केली होती, असे काही रामायणात लिहिलेले आहे. [सो. क. स. सा.]

ढ ट वर्गातील चौथा वर्ण आणि वर्णमालेतील चौदावे व्यंजन. देवनागरी लिपीच्या वर्णमालेपैकी ढ हे एकच अक्षर असे आहे, की जे आपल्या मूळ स्वरूपातच अद्यापही कायम आहे. फक्त त्याचा शिरोभाग तेवढा मूळच्या अक्षराहून अधिक बाकदार झाला आहे



ढ च्या रूपाचा विकासक्रम

कामधेनू तंत्रात ढकाराचे स्वरूप पुढीलप्रमाणे वर्णिले आहे—

ढकारं परमाराध्यं या स्वयं कुण्डली परा ।
पञ्चदेवात्मकं वर्णं पञ्चप्राणमयं सदा ।।
सदा त्रिगुणसंयुक्तं आत्मादितत्त्वसंयुतम् ।
रक्तविद्युल्लताकारं ढकारं प्रणमाम्यहम् ।।

अर्थ — ढ वर्णाची आराधना करावी. तो स्वत: परा कुंडली आहे. ढ हा पंचदेवात्मक व पंचप्राणमय आहे. त्यात तीन्ही गुण समाविष्ट असून, तो आत्मादी तत्त्वांनी युक्त आहे. तांबड्या विजेचा आकार असलेल्या ढकाराला मी वंदन करतो.

मूर्धा हे याचे उच्चारण स्थान होय. [म. ज्ञा. को.; श. क.]

ढक्का ढोलासारखे चर्मवाद्य. हे गळ्यात घालून हाताने वाजवतात. हे प्राचीन लोकवाद्य असून, यश:पटह असे याचे दुसरे नाव आहे. एखाद्या राजाच्या विजयाची घोषणा करताना हे वाद्य वाजवीत. याच्या मुखाचा व्यास १३ अंगुळे असतो, असे संगीतशास्त्रात सांगितले आहे.

ढक्की प्राकृतसदृश एक बोली. पूर्व बंगालमधल्या ढक्क नामक प्रदेशात ही बोलली जात होती, म्हणून हिला ढक्की असे नाव मिळाले. ही बोली मागधीशी जुळती आहे. तिच्यात लकाराला प्राधान्य असून, तालव्य शकार व दंत्य सकार यांचे बाहुल्य आहे.

मृच्छकटिक नाटकात द्यूतगृहाचा मालक व जुगार खेळणारे

लोक यांच्या तोंडी ढक्की बोलीच घातलेली आहे. या बोलीतील ग्रंथरचना अत्यल्प आहे. [व्र. ख. तु. अ; म. ज्ञा. को.]

ढवस एक चर्मवाद्य. हे एक हात लांब असते. याच्या मुखाचा घेर ३९ अंगुळे आणि व्यास १२ अंगुळे असतो. डाव्या हाताने मध्यभाग धरून आणि उजव्या हातात काठी धरून हे वाद्य वाजवतात. हे प्राचीन भारतीय लोकवाद्य आहे. [सं. शा.]

ढाँक व्रजप्रदेशातील एक लोकविधान. एखाद्या व्यक्तीला सर्पदंश झाला असल्यास त्या प्रसंगी हे विधान करतात. जमलेल्या व्यक्तींपैकी एकजण एका घडयावर एक थाळी ठेवून तीवर काठीने आघात करतो व बाकीचे लोक एका स्वरात नागदेवतेच्या प्रसन्नतेसाठी गीते गातात. या उपचाराने सर्पविष उतरते, अशी समजूत आहे. [हिं. सा. को.]

ढाढी एक जात. हे लोक राजस्थानात राहतात व चिकारा नावाचे वाद्य वाजवून भिक्षा मागतात. पूर्वी रणभूमीवर शिपायांना उत्साह येण्यासाठी ढाढी लोक वीरगाथा म्हणत असत. राजस्थानातल्या ढोला-मारूच्या कथेत गायक म्हणूनच यांचा उल्लेख आहे. ऐने अकबरीतही ढाढींच्या याच कामाचा निर्देश आहे. यांच्यामध्ये हिंदू आणि मुसलमान या दोन्ही धर्मांचे लोक आहेत. मुसलमान ढाढींना मलानूर असे म्हणतात.



ढाढी पुरुष

ढाढी लोक आपली उत्पत्ती राजपुतांपासून झाली असे मानतात. ते असे सांगतात, की रामचंद्राचा विवाह झाल्यानंतर जनकपुराहून अयोध्येला जाणाऱ्या वरयात्रेत ज्या एका राजपुताने बाजा वाजविण्याचे काम केले, तोच आमचा मूळ पुरुष होय.

मारवाडात मुसलमान ढाढींची संख्या अधिक आहे. त्यांच्या संग्रहात राजपुतांच्या व सिंधी मुसलमानांच्या वंशावळी असतात. हिंदू ढाढी राजपूत, जाट, विश्नोई, सुनार आणि खत्री या जातींकडून भिक्षा स्वीकारतात.

ढाढी लोकांचे रीतिरिवाज राजपुतांच्या प्रमाणेच आहेत. ते विवाहसंबंध आपल्या पोटजातीतच करतात. ढाढी स्त्रिया गातात; परंतु नाचत मात्र नाहीत. [रा. जा.; रा. भा. औ. सा.]

ढाल लढाईत शत्रूच्या शस्त्रांपासून आत्मसंरक्षण करण्यासाठी उपयोगी पडणारे एक साधन. ‘ शरीरावरकं शस्त्रम्’ = शरीर संरक्षक शस्त्र म्हणजे ढाल होय (श. क.). ढालीला चर्म, फल, फलरू अशी अन्यही नावे आहेत. ढाल कासवाच्या पाठीची, गेंड्याच्या अगर अन्य पशूच्या कातड्याची, त्याचप्रमाणे तांबे, पितळ किंवा क्वचित सोने-रुपे, इ. धातूंचा पत्रा लाकडावर बसवूनही तयार करतात. ढाल आकाराने गोल किंवा अन्य आकाराचीही असते. कधी कधी ही ढाल शिपायाचे सर्व शरीर झाकले जाईल इतकी मोठी असते. पायदळातील शिपाई बहुधा मोठ्या ढालीचा उपयोग करतात. अशा वेळी ती ढाल वाहून नेण्यासाठी एक चाकर त्याच्या बरोबर असतो.

ढालीच्या आतल्या बाजूला ती धरण्यासाठी एक मूठ केलेली असते व बाहेरील बाजूने मधोमध चौरस वा गोल आकारात शंक्वाकृती चार किंवा अधिक खिळे बसविलेले असतात. या खिळ्यांमुळे प्रसंगी शत्रूला इजाही करता येते.

शब्दकल्पद्रुमात ढालीचे गुण सांगितले आहेत, ते असे –

शरीरावरकत्वं च लघुता दृढता तथा ।
दुर्भेद्यतेति कथिता चर्मणां गुणसंग्रहः ॥

अर्थ – शरीरावरकत्व, हलकेपणा, बळकटपणा व दुर्भेद्यता हे ढालींचे गुण होत.

प्राचीन काळी समोरासमोरच्या लढाईत शस्त्राचा घाव सहन करण्यासाठी हाताला मोठे कापड गुंडाळीत. याच कापडी बोळ्याचे रूपांतर पुढे ढालीत झाले असावे. सिंहगडावर उदयभानूच्या वाराने तानाजीची ढाल तुटली असता, तानाजीने

आपल्या कमरेचा शेला हाताला गुंडाळून त्याची ढाल केली होती, असे सांगतात.



ढाल

ढाल हे शस्त्र बरेच प्राचीन आहे. लाकडाच्या आणि कातडयाच्या ढाली व कवचे तयार करण्याची माहिती कश्यपाने दिली आहे. भास्कर वर्म्याने हर्षाला दिलेल्या उपायनात एक ढाल होती, असे बाणभट्टाने सांगितले आहे. ती ढाल आकाराने गोल असून, तिच्यावर सोन्याची पाने मढवलीहोती, असे तिचे वर्णनही त्याने दिले आहे. दिल्लीचा बादशहा शहाआलम याची ढाल गेंडयाच्या कातडयाची होती व तिच्यावर बंदुकीच्या गोळीचाही परिणाम होत नसे, असे सांगतात. [प्रा. ऐ. श.; प्रा. यु. वि.; ह. च. सां. अ.; व्या. ज्ञा. को.]

ढालगज ढालगज म्हणजे मुख्य निशाणाचा हत्ती होय. ढाल याचा एक अर्थ निशाण असा आहे. बखरीत 'ढाला फिरवल्या' असे वाक्य येते, तेव्हा सैन्याची निशाणे विरुद्ध दिशेने वळली, असे समजायचे. राजाचे निशाण ज्या हत्तीवर असे त्याच्या रक्षणासाठी शिपायांची एक चिलखती तुकडी त्याच्या भोवती असे. शत्रूवर चाल करून जाऊन त्याचा ढालगज अर्थात निशाणाचा हत्ती वळवून आपल्या सैन्यात घेऊन येणे, हे बहादुरीचे काम समजले जाई. अशा वेळी आपला निशाणाचा हत्ती शत्रूने हिरावून नेऊ नये, म्हणून त्याचे संरक्षक जिवाच्या करारानें लढत. सांप्रत हा शब्द उपहासाने एखाद्या भांडकुदळ, उद्धट व मर्दानी स्त्रीला लावतात. [म. ज्ञा. को.]

ढाली नृत्य लोकनृत्याचा एक प्रकार. हे नृत्य बंगालमधल्या जेसोर व खुलना भागात प्रचलित असून, हे युद्धनृत्य म्हणून ओळखले जाते. या नृत्यात काही नर्तक लाकडाच्या ढाली व तलवारी घेतात, तर काही लाठ्या घेतात. सर्व नर्तक युद्धातल्या पवित्र्यांप्रमाणे हालचाली करतात आणि लुटुपुटीची लढाईही करतात. धोतर, बिनबाह्यांचा सदरा, कमरेला धोतरावरून हिरवे कापड, असा नर्तकांचा वेष असतो.

नृत्याच्या प्रारंभी नृत्याचा नायक स्वतः काही हात करून दाखवितो. नंतर त्याच्या भोवती एक वर्तुळ काढतात. सर्व नर्तक हातातल्या ढाली व तलवारी त्या वर्तुळात ठेवतात व भूमीला प्रणाम करतात. मग नृत्याचा नायक एक विशिष्ट आवाज करतो व नृत्याचा प्रारंभ सूचित करतो. थोडा वेळ मोकळ्या हातांनी नाचल्यावर मग नर्तक आपापली शस्त्रे उचलतात व दोन गट करून समोरासमोर उभे राहतात. समोरासमोरच्या फळ्या फोडून नर्तकांनी एकमेकांच्या रांगात घुसायचे असते. नाचाला ढोल व झांज यांची साथ असते.

हे नृत्य प्राधान्याने मुसलमान व नामशूद्र समाजात प्रचलित आहे. याच भागात प्रचलित असलेले रायबन्शी नृत्यही अशाच प्रकारचे आहे. मात्र ते मोकळ्या हातांनीच केले जाते. पूर्वी ढाली व रायबन्शी या नावांचे सैनिक हे नृत्य करीत. [भा. लो. नृ.; फो. डा. इं.; ए. हो. रा.]



रायबन्शी नृत्य

ढिंपुरी एक जैन तीर्थ. हे चंबळ नदीच्या तीरावर आहे. याच्या आजूबाजूला निविड अरण्य आहे. या ठिकाणी महावीर व पार्श्वनाथ यांच्या मूर्ती एका चैत्यालयात स्थापलेल्या आहेत. या तीर्थाची कथा अशी—

विमलयशा नावाचा एक राजा होता. त्याला पुष्पचूल नावाचा एक मुलगा होता. लोक त्याला वंकचूल म्हणत हा महाखोडकर

होता. लोकांना त्रास देण्यात त्याला गंमत वाटे. हे त्याचे खोडकर वर्तन असह्य होऊन एक दिवस राजाने त्याला राज्यातून घालवून दिले. तो आपल्या पत्नीसह फिरत फिरत अरण्यातल्या एका भिल्ल वस्तीत गेला. भिल्ल नायकाने त्याला आपल्या घरी आश्रय दिला. थोडयाच दिवसात तो त्या भिल्लसंघाचा प्रमुख बनून वाटमारी करू लागला.

एक दिवस धर्म आणि धर्मदत्त नावाचे दोन मुनी त्या भिल्ल वस्तीत आले व पावसाळ्यात तिथेच मुक्काम करून राहिले. त्या मुनींच्या तपाचा व ज्ञानाचा वंकचूलावर प्रभाव पडला. ते दोघे तिथून निघताना वंकचूलाने त्यांना म्हटले, की ‘मला काही उपदेश करा.’ मग त्या मुनींनी त्याला उपदेश करून त्या वस्तीत एक चैत्यालय निर्माण करण्यास सांगितले. वंकचूलाने तसे चैत्यालय निर्माण करून त्यात महावीर व पार्श्वनाथ यांच्या मूर्ती स्थापल्या. हळूहळू ते स्थान लोकविश्रुत झाले आणि तीर्थ म्हणून त्याला मान्यता प्राप्त झाली. [वि. ती. क.; जै. सि. भा., मार्च, १९३९]

ढुंढिराज गणपतीचे एक नाव. काशीक्षेत्रात याचे स्थान आहे. एकदा दुरासद नावाच्या दैत्याने काशीतल्या लोकांना पीडा द्यायला प्रारंभ केला. त्या वेळी गणेशाने दिव्य अवतार घेऊन त्या दैत्याला मारले आणि काशीक्षेत्र भयमुक्त करून ते शंकराच्या स्वाधीन केले. मग शंकराने ढुंढिराज या नावाने आपल्या उजव्या हाताला त्याची स्थापना केली. तेव्हापासून काशीयात्रा करणाऱ्याने ढुंढिराजाचे दर्शन घेतलेच पाहिजे असा नियम झाला.

स्कंद पुराणाच्या काशीखंडातील ढुंढिराजमाहात्म्यात याचे माहात्म्य सांगितले आहे, ते असे –

यः प्रत्यहं नमति ढुण्ढि विनायक त्वां
काश्यां प्रगे प्रतिहताखिलविघ्नसङ्घ ।
नो तस्य जातु जगतीतलवर्ति वस्तु
दुष्प्राप्यमत्र च परत्र च किञ्चनापि ।।

अर्थ – (शिव म्हणतो) हे समस्त विघ्नसंघनाशका ढुंढिराजा, जो मनुष्य काशीत प्रतिदिनी प्रभातकाळी तुला नमस्कार करतो, त्याला या लोकी व परलोकी कोणतीही वस्तू दुष्प्राप्य नसते.

माघ शुक्ल चतुर्थीच्या दिवशी नक्तव्रत करून ढुंढिराजाची पूजा करतात. त्या दिवशी ढुंढिराजाला तिळांच्या लाडवांचा नैवेद्य दाखवतात. जे मांत्रिक या दिवशी तीळ व तूप या द्रव्यांनी ढुंढिराजाप्रीत्यर्थ हवन करतात, त्यांचे मंत्र सिद्ध होतात, असे सांगितले आहे. पाहा– तिलचतुर्थी. [पु. चिं.; श. क.]

ढूंढ राजस्थानातील एक सोपस्कार. होळीच्या रात्री ज्या घरी वर्षाच्या आतले मूल असेल, त्या घरी गावातले काही लोक जातात. मग बालकाची माता त्याला मांडीवर घेऊन दरवाजात बसते. आलेल्या लोकांपैकी एक माणूस आपल्या हातातली काठी दरवाज्यात उभी धरून राहतो. दुसरे लोक त्या काठीवर आपल्या हातातल्या काठीने प्रहार करतात. त्या वेळी पुढील गीत गातात –

सिरी सिरी रा सिरियादे, सिरियादे लगाई वाडी,
जीमें उबी चंपा डाळी, चंपा डाळी लेहरियां लेय।
झुक–झुत्क पूत हिलोरादेय, पहलो पूत हथाईदार,
दूजो पूत सांभर रो सरदार। ...

हे गीत सात वेळा गातात. शेवटची पंक्ती गाताना ‘अमूक अतरो रे अतरो’ (= अमूक बालक आमच्या काठ्यांइतका उंच होवो), असे म्हणून आपल्या काठ्या उंच धरतात. एवढे झाल्यावर घरातली माणसे जमलेल्या लोकांना मिठाई वाटतात. [प्रा. जगमलसिंह ‘ग्रामीण’– वरदा, जानेवारी १९६५]

ढूंढना राजस्थानातला एक विशेष सोपस्कार. पहिल्या होळीच्या सणात नवजात शिशूसाठी त्याची विवाहित आत्या, बहीण किंवा मावशी वस्त्रे, भूषणे, मिठाई व फळे यांचा उपहार पाठवते, त्याला ढूंढना असे म्हणतात. ढूंढना आल्यावर जवळच्या मुलांना बोलावतात, शिशूला वस्त्र-भूषणांनी नटवतात व जमलेल्या मुलांना बत्तासे, मिठाई, फळे वगैरे वाटतात. या सोपस्काराच्या मागे एक कथा आहे, ती अशी–

ढूंढा नावाची प्रल्हादाची आत्या होती. बापाने प्रल्हादाला आगीत लोटले, तेव्हा तीही त्याच्या बरोबर आगीत पडली. प्रल्हाद वाचला; पण ती मात्र जळून मेली. त्या दिवसापासून बालकाच्या अरिष्टनिवारणासाठी मुलांना मिठाई वगैरे वाटण्याची प्रथा पडली. [मरुभारती, एप्रिल १९५९]

ढूंढाडी राजस्थानातील एक बोली. शेखावटी प्रदेश सोडून साऱ्या जयपूर भागात, तसेच अजमेर व मेवाड यांच्या ईशान्य भागात ही बोली प्रचलित आहे. घूंघू नदीच्या तीरावरच्या प्रदेशाला पूर्वी घुंधुमार असे म्हणत. धुंधू नामक दैत्याचे वास्तव्य तिथे होते. अयोध्येच्या कुवलयाश्व या राजाने त्याला ठार केले आणि मग त्या क्षेत्राला धुंधुमार असे नाव मिळाले. घुंधुमारचेच पुढे अपभ्रंशाने ढूंढाड बनले.

ढूंढाडची लोकव्युत्पत्ती याहून थोडी निराळी आहे, ती अशी– अजमेरचा राजा वीसलदेव चौहान कोणत्या तरी कारणाने भ्रमिष्ट बनला आणि राक्षसासारखे जीवन जगू लागला. त्यामुळे

लोक त्याला ढूंढिया असे म्हणू लागले. तो जेवढ्या प्रदेशात संचार करीत असे, तेवढ्या क्षेत्राला ढूंढाड असे नाव पडले.

अशा या ढूंढाडमधली बोली ती ढूंढाडी होय. तिला पूर्वी राजस्थानी असेही म्हणत. मध्यदेशीय बोलींपैकी राजस्थानी भाषेवर जर कोणत्या बोलीचा विशेष प्रभाव असेल, तर तो ढूंढाडीचाच होय. राजस्थानातल्या अन्य उपभाषांहून ढूंढाडीचे वेगळेपण तिच्या क्रियापदांमध्ये दिसते. अन्य बोलीत जिथे है, हा, ही, हू, हो, इ. चा प्रयोग होतो, तिथे ढूंढाडीत छै, छा, छी, छू, छो असे प्रयोग होतात. ढूंढाडीची ही रूपे गढवाली, कुमाऊंनी, गोरवाली, मैथिली व गुजराती भाषांमध्येही उपलब्ध आहेत. राजस्थानी भाषेतल्या प्राचीनतम साहित्यातही छै, छा, इ. रूपांचे दर्शन होते. राजस्थानी लोकगीतांतही हीच रूपे येतात.

ढूंढाड प्रदेशातील संतांनी लोकभाषेचा आश्रय करून बरीच काव्यरचना केली आहे. दादू दयाळ व त्याचे शिष्य– प्रशिष्य यांनी ढूंढाडीत काव्ये लिहून तिला गौरवान्वित केले आहे. जयपूरचे महाराज सवाई प्रतापसिंह व किसनगडचे महाराज नागरीदास यांनी ढूंढाडीत कृष्णभक्तिपर अनेक काव्ये रचली आहेत.

मीराबाईनेही ढूंढाडीत थोडीबहुत पद्यरचना केलेली दिसते. तिचे एक पद असे –

नन्दजी रै आज बधावणो छै।
गहमह हुई रंग रावल में, निरख नैणां सुख पावणो छैं।
भाभीजी म्हें थांसूं पूछां, आज रो छोस सुहावणो छैं।
मीरां का प्रभु गिरधर जनमिया, हुवो मनोरथ आवणी छैं।

समानबाई, बणीठणी, बख्तावर, अलिजन, हरिसहचरी, अनुरागी, चरणदास, बिहारीदास, राससखी, वृंदावनहित, इ. अनेक लहानमोठ्या कवींनी ढूंढाडीत कृष्णवर्णनपर काव्ये रचली आहेत.

ढूंढाड प्रदेशात अनेक ठिकाणी निरनिराळ्या देवतांची ढूंढाडीत रचलेली लोकगीते गायिली जातात. [राजस्थान; श्री. रावत सारस्वत– मरुभारती, एप्रिल १९६५]

ढूंढिया एक जैन संप्रदाय. हा संप्रदाय श्वेतांबरातूनच निघाला आहे. यांना माळव्यात शेवडे म्हणतात. हे लोक स्वतःला साधुमार्गी किंवा मठमार्गी म्हणतात. जती पंथाच्या लोंकागच्छातून या संप्रदायाचा जन्म झाला. श्री. इबटसन यांनी यांच्याविषयी म्हटले आहे, ते असे –

कट्टर, कर्मठ अशा जैनांनी या लोकांना फार त्रास दिला, त्यामुळे या लोकांनी एका ढुंढ्यात (तुटले-फुटलेले खडक) लपून दिवस काढले. म्हणून यांना ढूंढिया असे नाव पडले.

या पंथाचे दोन पोटभेद आहेत. एकाला बाव्वीसपंथ व दुसऱ्याला तेरापंथ असे म्हणतात. बाव्वीस व तेरा लोकांच्या समुदायाने पंथाला जन्म दिला म्हणून त्यांना तशी नावे पडली आहेत.


ढूंढिया जैन साधू

हे लोक मूर्तिपूजाविरोधी आहेत. धर्माचे चिंतन व मनोविकारांचे दमन या दोन गोष्टी ते प्रमुख मानतात. तीर्थंकरांच्या मूर्ती पूजण्यापेक्षा त्यांच्या पवित्र आचरणांचा कित्ता गिरवावा, असे त्यांचे मत आहे. हे लोक मठात राहतात. मठाला स्थानक म्हणतात. हे शुभ्र वर्णाची मळकी वस्त्रे वापरतात, मुखपट्टी बांधतात व कुंचा धारण करतात. यांच्या संघात स्त्रियांनाही प्रवेश असतो. त्याही संन्यासदीक्षा घेऊन स्थानकात राहतात व मुखपट्टी आणि कुंचा धारण करतात. हे कधी स्नान करीत नाहीत व क्षौरही करीत नाहीत; हाताने केस उपटतात. हे लोक अनवाणी हिंडतात व भिक्षेवर निर्वाह करतात. जी भिक्षा मिळेल तिचा काला करून सर्व जण खातात. व उरलेले अन्न खड्डा करून त्यात पुरतात हे रात्री आपल्या स्थानकातून बाहेर पडत नाहीत व उजेडासाठी दिवाही लावीत नाहीत.

हे लोक शिष्याला दीक्षा देण्याचा विधी उत्सवासारखा करतात. ज्याला पंथाची दीक्षा घ्यायची असेल, तो प्रथम आप्तेष्टांची तशी परवानगी घेतो. दीक्षा घेण्यापूर्वी सात दिवस तो सुंदर वस्त्रभूषणे लेवून व पालखीसारख्या वाहनात बसून, नगरा-

बाहेरच्या एखाद्या मंदिरात वा उद्यानात जातो. तिथे राहून तो सात दिवस खाण्यापिण्याची चैन करतो व विविध भोग्य वस्तूंचा उपभोग घेतो. ज्या विलासी जीवनाचा पुढे संपूर्ण त्याग करायचा, ते जीवन सात दिवस अशा प्रकारे तो उपभोगून घेतो.

दीक्षेच्या दिवशी प्रथम दीक्षा देणारा गुरू त्याच्या मस्तकावरचे थोडे केस हाताने उपटतो व त्याच्या कानात मंत्र सांगतो. मग त्याचे क्षौर केले जाते. नंतर गुरू त्याला साधुवेष परिधान करायला देतो. या वेळी जमलेल्या लोकांना नारळ व मिठाई वाटतात. शिष्याचे उपटून काढलेले केस जमलेली माणसे घेऊन जातात. पुत्रकामना असणाऱ्या स्त्रिया हे केस ताइतात घालून उजव्या दंडात बांधतात. [रा.जा.; म.ज्ञा.को.]

ढेर एक जात. हे लोक तेलुगू विणकर आहेत. यांची वसती मुख्यत्वे मध्य प्रदेशातील सोनपूर भागात आहे. यांच्यांत पशू, वनस्पती व इतर वस्तू यांच्या नावाची देवके आहेत. सूर्य देवकाचे लोक सूर्यग्रहणाच्या वेळी काही खात नाहीत. उत्ती (शिंके) देवक असलेले लोक शिंके वापरीत नाहीत. गुंद (बंदुकीची गोळी) या देवकाचे लोक गोळीने मारलेल्या सावजाचे मास खास नाहीत. एकाच देवकात लग्नसंबंध होत नाहीत.

विवाहप्रथा– यांच्यांत शक्यतो मामाच्या मुलीशीच लग्न करण्याचा प्रघात आहे. मुलगी वयात येण्यापूर्वी तिचे लग्न झालेच पाहिजे, असा नियम आहे. वेळेवर योग्य वर सापडला नाही, तर एखाद्या विवाहित पुरुषाशी तिचे लग्न लावतात व मग योग्य वर मिळताच विधवाविवाहपद्धतीने तिचे त्या वराशी लग्न लावतात. [ट्रा. का. सें. प्रॉ. इं.]

ढोर महाराष्ट्र व कर्नाटक या प्रदेशांत आढळणारी एक जात. गुरांची कातडी कमावणे, हा या लोकांचा व्यवसाय आहे. काहीजण मजुरीही करतात. यांचा दर्जा महारांपेक्षा वरचा मानतात.

यांच्या सात पोटजाती आहेत. यांची कुळे आडनावावरून ठरतात. उंबर, जांभूळ, इ. यांची देवके असून, एकच देवक असणाऱ्या कुळात लग्नसंबंध करीत नाहीत. आतेबहिणीशी लग्न करता येते.

भवानी, जनाई, खंडोबा, महादेव, विठोबा ही यांची दैवते होत. हे लोक आपले धार्मिक विधी चालण्यासाठी ब्राह्मण व जंगम यांना बोलावतात.

मर्तिकप्रथा – हे लोक मृताला गरम पाण्याने स्नान घालून मग बसलेल्या स्थितीत पुरतात. स्मशानातून परत आल्यावर सर्वजण कडुलिंबाची पाने खातात. दहा दिवस सुतक पाळतात. वर्षश्राद्ध करीत नाहीत; पण भाद्रपदाच्या कृष्णपक्षात महालय करतात. [म. ज्ञा. को.; मुं इ. जा.; पूना गॅझे.]

ढोल एक घन वाद्य. हे वाद्य प्राचीन काळापासून प्रचलित आहे. संगीतोपनिषत्सारोद्धार या ग्रंथात या वाद्याला म्लेच्छवाद्य म्हटले आहे. पखवाजाच्या खोडासारखे ढोलाचे खोड लाकडी असून, त्याची लांबी सुमारे वीस इंच असते आणि व्यास १५ ते ३० इंच असतो. मात्र त्याचा व्यास सर्वत्र सारखा असतो. ढोलाची दोन्ही तोंडे बकऱ्याच्या कातड्याने मढवतात व दोरीने दोन्ही पुडे आवळतात. ढोलाचे एक तोंड टिपरीने व दुसरे हाताने, मनगटाने व बोटांनी वाजवतात. ढोलावर केवळ तालाचा ठेका धरतात. कित्येक नृत्यांच्या प्रसंगी ढोलाची साथ असते. लग्नकार्यादी मंगल प्रसंगीही ढोल वाजवण्याची पद्धत आहे. काही वेळा ढोल जमिनीवर ठेवून व मिरवणुकीच्या वेळी गळ्यात अडकवून वाजवतात.



ढोलाच्या टिपरीचे विविध प्रकार

संस्कृत भाषेत ढोलाला पटह असे नाव आहे. पटहाचे मार्ग व देशी असे दोन भेद संस्कृत ग्रंथांत सांगितले आहेत. मात्र ढोलाचे अनेक प्रकार प्रचारात आहेत. कलकत्त्याच्या इंडियन म्युझियममध्ये निरनिराळ्या प्रकाराच्या २८७ ढोलांचा संग्रह आहे. ढोलाचा ध्वनी गंभीर व बराच काळ घुमणारा असतो.

ढोलासंबंधी ढोलसागर नामक एक ग्रंथ आहे. कुमाऊंचा कत्यूरी राजा धाम द्यौ याचा आश्रित गुरू खेगदास याने इ. स.

च्या १० व्या किंवा ११ व्या शतकाच्या मध्यास या ग्रंथाची रचना केली. या ग्रंथात ढोलाविषयी म्हटले आहे, ते असे –

ढोल हा विश्वाचे प्रतीक असून, ब्रह्मा, विष्णू, महेश व पार्वती यांनी तो बनविला. ढोलवादनाच्या अमृत, सिंधू, पराणी व मध्यानी अशा चार शैली असून, त्यांचे प्रवर्तक अनुक्रमे इंद्राच्या दरबारातला उद्दीमदास, मांधात्याच्या दरबारातला बामादास, महेंद्राच्या दरबारातला विदिपालदास व विक्रमादित्याच्या दरबारातला अगवानदास हे आहेत. आधुनिक काळात अगवानदासाची मध्यानी शैली तेवढी ऊर्जितावस्थेला आली. या मध्यानी शैलीचे सूत्रिका, बाकुली, सेंदुरी व झारखंडी असे चार प्रकार असून, त्यांना अनुक्रमे उत्तरी, दक्षिणी, पूर्वी व पश्चिमी शैली अशी नावे आहेत.

या ग्रंथात बढाई, घुमेल, थरहरी, किरणी, चौरास, चासणी, चामणी, इ. मुख्य वीस ढोलतालांचा उल्लेख आहे. ढोलावर आघात केला नाही, तर तो मृतवत राहतो व त्याच्यावर आघात केला, की तो जिवंत होतो, असेही प्रस्तुत ग्रंथात विरोधालंकाराने म्हटले आहे.



ढोल

ढोलसागराच्या जुन्या हस्तलिखित प्रती खस लिपीत लिहिलेल्या आहेत. [म्यु. इं.; डि. सा. इं. म्यु. म्यु.; पर्वतीय संस्कृती–जाने.–फेब्रु. १९६१; श्री. आबासाहेब मुजुमदार, पुणे]

ढोलक

एक घनवाद्य. ढोलक हा पखवाजासारखा पण आकाराने लहान असतो. आंबा किंवा वड यांच्या लाकडापासून ढोलक बनवितात. त्याला समान व्यासाची दोन तोंडे असतात व ती चामड्याने मढवून ती चामडी दोऱ्यांनी आवळतात. या दोऱ्या सैल केल्यामुळे किंवा आवळल्यामुळे ढोलकाच्या आवाजात चढउतार होतो. भजन, कीर्तन, इ. प्रसंगी ताल धरण्यासाठी ढोलकाचा उपयोग करतात. ढोलक हाताच्या बोटांनी वाजवितात. ढोलक वाजवणे ही एक कला आहे. हे एक लोकवाद्य आहे.



ढोलक

[सं. शा.; परंपरा– लोकगीत– विशेषांक, एप्रिल १९५६]

ढोलाचा नाच

महाराष्ट्रातील मल्हार कोळी, ठाकूर व कातकरी या लोकांचे एक नृत्य. या नृत्याला ढोलाची साथ असते, म्हणून त्याला ढोलाचा नाच असे नाव मिळाले आहे.

सर्व नर्तक डावा पाय पुढे टाकून एकमेकांच्या खांद्यांवर हात ठेवून किंवा कमरेभोवती हात लपेटून वर्तुळात उभे राहतात. या नृत्यात सुमारे पंधरा गतिप्रकार आहेत. या सर्व प्रकारांचा संबंध पायांशीच येतो. नृत्य करताना नर्तक गीतेही गातात.

कोकणात शिमग्याच्या खेळात खेळगडी रोंबट नाचतात, त्यातही अनेक ढोल असतात. गोव्यात देवीची जत्रा असते, त्या दिवशी सकाळी महार देवीपुढे ढोल वाजवून आज जत्रा आहे, असे पंचक्रोशीला जाहीर करतो. [भा. लो. नृ.; फो. डा. म.]

ढोला–मारू

राजस्थानातली अत्यंत लोकप्रिय व अतिप्रसिद्ध लोकगाथा. या प्रेमाख्यानात मानवहृदयाचे कोमल भाव, बाह्य निसर्गाचे चित्रण या दोन्ही गोष्टी सरसपणे वर्णिल्या आहेत. यातील कथा थोडक्यात पुढीलप्रमाणे आहे–

एकदा पूगल देशात दुष्काळ पडला आणि तिथला राजा पिंगल सकुटुंब सपरिवार नरवर नामक देशात राहायला गेला. तिथल्या नलराजाला ढोला नावाचा एक मुलगा होता. पिंगल राजाच्या राणीला तो फार आवडला आणि तिने आपल्या पतीला गळ घालून आपली मारवणी ही मुलगी त्याला द्यायला लावली. ते लग्न मोठ्या थाटामाटाने झाले. लग्नात ढोला फक्त तीन वर्षांचा आणि मारवणी (मारू) अवघी दीड वर्षाची होती. दुष्काळ संपल्यावर पिंगलराजा परत आपल्या राज-

धानीला गेला, तेव्हा त्याने मारूलाही आपल्याबरोबर नेले.

त्यानंतर कित्येक वर्षे लोटली. ढोला तारुण्यात आला; तशीच मारूही वयात आली. ढोलाचा बाप नल राजा हा मुलाच्या लहानपणची ती लग्नघटना भातुकलीतली समजला की काय न कळे ! कारण त्याने माळव्याची राजकुमारी मालवणी हिच्याशी ढोलाचे लग्न लावले. मालवणीने थोडयाच कालात ढोलाचे मन जिंकले.

पुढे एके दिवशी पिंगलराजाने 'मारूला नेण्यासाठी या' असा संदेश ढोलाला पाठवला. मालवणीला पूर्वीच्या या घटनेचा सुगावा लागला होता. आणि त्यामुळे तिच्या अंतरात सवतीमत्सर जागा झाला होता. म्हणून तिने पिंगल राजांकडून आलेला एकही संदेश ढोलापर्यंत पोचू दिला नाही.

इकडे मारू ढोलाची वाट पाहून पाहून थकली. तिला पतिविरह दिवसेंदिवस असह्य होऊ लागला. त्याच दिवसांत काही सौदागर नरवर देशातून पूगल देशात आले होते. त्यांनी पूगलच्या राजाला ढोलाचा दुसरा विवाह झाल्याची बातमी सांगितली. ती ऐकून पिंगलराजा अस्वस्थ झाला.

पिंगलराजाने मग ढाढींचा एक समुदाय नरवर देशाला पाठवला. मारूने त्यांच्याकडे ढोलासाठी एक प्रेमसंदेश दिला. ढाढी हे उत्तम गायक-वादक होते. मारूने दिलेला संदेश त्यांनी कवितावद्ध करून गायिला. तो ऐकून ढोलाचे चित्त व्याकुळ झाले. त्याने त्या ढाढींच्याकडून सर्व वृत्तांत समजावून घेतला. मारू अर्थात् मारवणी हिच्याशी बाळपणी आपले लग्न झाले होते, ही गोष्ट त्याच वेळी त्याला कळली. त्याने मनाशी निर्धार केला, की मारू जर आपली पत्नी असेल आणि जर ती विरहानलात जळत असेल, तर पती या नात्याने तिची विचारपूस करणे आपले कर्तव्य आहे. पण मालवणी त्याला काही केल्या महालातून बाहेर सोडीना.

मग एके दिवशी मध्यरात्री मालवणीला झोप लागली असता ढोला बाहेर पडला व पूगळ देशाला गेला.

ढोला आल्याचे पाहून राजवाड्यात सर्वत्र आनंदी आनंद झाला. मारूच्या हर्षाला तर पारावरच उरला नाही. ढोला पंधरा दिवस सासुरवाडीला राहिला व मग मारूला घेऊन परत निघाला. राजाने उत्तम वस्त्रालंकार व बरेचसे धन देऊन त्या दोघांची पाठवणी केली.

ढोला–मारू स्वदेशी यायला निघाली खरी; पण वाटेत मारूला सर्पदंश झाला आणि ती मरण पावली. ढोला तिच्यासाठी विलाप करू लागला. मारूवाचून आपले जीवित व्यर्थ आहे, असे वाटून त्याने तिच्या चितेत जळून मरण्याचे ठरवले. एवढ्यात एक योगी तिथे आला आणि त्याने अभिमंत्रित जलमारूच्या अचेतन देहावर शिंपडून तिला जिवंत केले. पुन्हा एकदा त्या प्रेमी युगुलाचा आनंद गगनाला भिडला. ती दोघे मग पुढच्या मार्गाला लागली. पण ऊमरासूमरा नावाचा जैसलमीरचा राजपुत्र ढोलाला आडवा आला. त्याच्या मनातून मारूशी लग्न करायचे होते. तो मारूला पळवून न्यायला आला होता. पण या वेळी मारूने चलाखी केली आणि ज्या उंटिणीवर बसून ती दोघे चालली होती, त्या उंटिणीला तिने जोराने छडी मारली. त्यासरशी उंटीण चौखूर उधळली आणि ऊमरासूमराला तिचा पाठलाग करता आला नाही. अशा प्रकारे दोन्ही संकटातून निभावून ढोला–मारू आपल्या राजधानीत पोचली. राजा-राणीने आपल्या या सुनेचे सहर्ष स्वागत केले. मग मालवणीचाही मारूविषयीचा द्वेष शमला. दोन्ही स्त्रियांसह ढोला सुखाने संसार करू लागला.



ढोला–मारू (राजस्थानी शैलीचे चित्र)

कथेचे ऐतिहासिक अंग – ढोला हा नरवरचा राजा नल व राणी चंपावती यांचा पुत्र होता. त्याचे नाव साल्हकुमार असे होते. ढोला हे त्याचे लाडके नाव असावे. ढोलाचा बाप नल राजा हा कछवाहा राजपूतांपैकी होता. कछवाहांच्या 'ख्याता' मध्ये नल व ढोला ही नावे विद्यमान आहेत. नरवरगढ हा नल राजानच बनवला, असे नैणसी री ख्यात या काव्यात म्हटले आहे. नल-राजाचा काल इ. स.चे १० वे शतक हा असावा, असे अनुमान आहे. ढोलाची दुसरी पत्नी मालवणी ही मालवगढाच्या राजाची मुलगी होती. हा राजा परमार वंशातला होता, असे ढोला–मारू काव्याच्या एका प्रतीवरून कळते. इ. स. च्या १० व्या शतकात पूगल हे परमारांच्या राज्यातले एक शहर असावे

कथापर्याय – ढोला–मारू या प्रेमिकांवर अनेक काव्ये रचली गेली आहेत. या कथेचे मध्य प्रदेश, व्रजप्रदेश, उत्तर प्रदेश, भोजपूर या प्रदेशांत भिन्न भिन्न पर्याय रूढ आहेत. वेळोवेळी प्रस्तुत कथेत परिवर्तनेही झाली आहेत. कित्येकांनी त्या कथेतला एकेक अंश आपापल्या कल्पनेप्रमाणे बराच वाढवलाही आहे. काही कवींनी ढोलाची कथा पुराणातल्या नलराजाशी जोडून दिली आहे. छत्तीसगडी पर्यायात ढोलाला दूल्हन म्हटले असून, व्रजातल्या पर्यायात दूलह म्हटले आहे. काही पर्यायात प्रस्तुत आख्यानावर गोरखनाथ व शाक्त या संप्रदायांचाही ठसा दिसतो.

सांप्रत या कथेची पुढील चार रूपांतरे उपलब्ध आहेत – पहिल्यात केवळ दूहेच आहेत. ही रचना इ. स. च्या ११ व्या शतकातली असावी. दुसऱ्यात दूहे व कुशललाभरचित चौपाया आहेत. तिसऱ्यात दूहे आणि त्याबरोबरच गद्य वार्ताही आहेत. चौथ्यात वरील तीन्ही प्रकार आहेत.

खरतर गच्छातला जैन कवी कुशललाभ याने ढोला मारूरी चौपाई या ग्रंथाची रचना केली. त्याने प्रस्तुत कथानकातल्या छिन्न-भिन्न कथासूत्रांची संगती साधण्यासाठी ढोला–मारूरा दूहा या मूळ काव्यात चौपायांची भर घालून कथेला सुसंगत स्वरूप प्राप्त करून दिले. प्रस्तुत चौपायांची भाषा सरल पश्चिमी हिंदी आहे.

राजस्थान, माळवा व उ. भारत या प्रदेशांत ढोला–मारूची कथा गाणारे काही लोक आढळतात. त्यांना दुलैये असे म्हणतात. प्रायः वर्षाऋतूत ही कथा गाण्याचा प्रघात आहे. दुलैया चिकारा वाजवून गातो व सुरैया (गायकाचा जोडीदार) मधून मधून त्याची री ओढतो. ढोलक आणि मंजीरा ही वाद्ये गाण्याच्या साथीला असतात. तिकडच्या बायकाही मार्गक्रमण करताना ढोलाची कथा गात जातात.

'ढोला-मारू रा दूहा' या काव्यात राजस्थानी संस्कृतीचे आणि जनजीवनाचे जितके सजीव चित्रण आढळते, तितके दुसऱ्या कुठल्याही काव्यात आढळत नाही. राजस्थानाचे हे प्रादेशिक काव्यच आहे, असे म्हटले तर त्यात अतिशयोक्ती होणार नाही. [हिं. सा. को. २; भा. प्रे. प.; मरुभारती – जुलै १९६३; श्री. गोवर्धन शर्मा– वरदा, जानेवारी १९६१]

ण वर्णमालेतील १५ वे व्यंजन व ट वर्गातील पाचवा वर्ण. णच्या अक्षरविकासातील शेवटचे रूप हे दक्षिणेकडील नागरी लिपीतच केवळ प्रचलित आहे व इतर ठिकाणच्या नागरी लिपीत सहावे रूप रूढ आहे. या अक्षराचे पहिले रूप अशोकाच्या शिलालेखात आहे. दुसरे रूप इ. स. च्या पहिल्या व दुसऱ्या शतकातील कुशानवंशी राजांच्या वेळच्या मथुरा, सारनाथ व चारगाव येथील लेखांत आढळते. दुसऱ्यापासूनच तिसरे रूप बनले. चौथे रूप इ. स. ५३२ च्या सुमारास राजा यशोधर्मा याच्या कारकीर्दीतील मंदसौर येथील लेखात आहे. पाचवे रूप जपानमधील होर्युजी येथील मठात सापडलेल्या 'उष्णीषविजयधारिणी' या ग्रंथात आणि प्राचीन हस्तलिखित पुस्तकात सापडते.



ण च्या रूपाचा विकासक्रम

वर्णोद्धारतंत्रात याचे स्त्रीरूपी ध्यान सांगितले आहे ते असे –

ध्यानमस्य णकारस्य प्रवक्ष्यामि च तच्छृणु ।
द्विभुजां वरदां रम्यां भक्ताभीष्टप्रदायिनीम् ॥
राजीवलोचनां नित्यां धर्मकामार्थमोक्षदाम् ।
एवं ध्यात्वा ब्रह्मरूपां तन्मन्त्रं दशधा जपेत् ॥

अर्थ – ण या वर्णाचे ध्यान मी सांगतो ते ऐक. या देवतेला दोन हात आहेत. ती सुंदर आणि वरदात्री असून, भक्तांना इच्छित गोष्टी देते. ती कमलनेत्र असून चतुर्विध पुरुषार्थांची प्राप्ती करून देणारी आहे. अशा प्रकारे ब्रह्मरूप णचे ध्यान करून तिचा मंत्र दहा वेळा जपावा.

मूर्धा हे याचे उच्चारणस्थान होय. [श. क.; म. ज्ञा. को.]

णमोकारपैंतीसी एक जैन व्रत. या व्रताचा अवधी दीड वर्षाचा असतो. आषाढ शुद्ध सप्तमीपासून व्रताचा प्रारंभ होतो. यात पस्तीस उपवास असतात. या व्रताची कथा अशी—

गोपाल नावाचा एक गवळी होता. तो मेल्यानंतर चंपा नगरीत वृषभदत्त या श्रेष्ठीच्या घरी जन्माला आला. त्याचे नाव सुदर्शन असे ठेवले गेले. काहीतरी निमित्त घडले आणि त्यामुळे सुदर्शनाला वैराग्य प्राप्त झाले. मग त्याने दिगंबर दीक्षा घेऊन तपाच्या द्वारे निर्वाणपद मिळविले. [जै. व्र. वि. सं.]

णमोकार मंत्र जैनांचा सुप्रसिद्ध मंत्र. जैन परंपरेत सृष्टी ज्याप्रमाणे अनादी आहे, त्याचप्रमाणे णमोकार मंत्रही अनादी आहे. हा पुढीलप्रमाणे आहे –

णमो अरहंताणं, णमो सिद्धाणं,
णमो आयरियाणं, णमो उवज्झायाणं,
णमो लोए सव्वसाहूणं ।

या मंत्रात अरहंत, सिद्ध, आचार्य, उपाध्याय व लोकांतले सर्व साधू यांना नमस्कार असतो. असिआउसा असा या मंत्राचा संक्षेपही मंत्ररूप मानतात. महावीराने चौदा पूर्वांची-विद्या आपल्या गणधरांना उपदेशिली. त्यातल्या विद्यानुवादपूर्वाचा प्रारंभ णमोकार मंत्रानेच झाला होता. या मंत्राचा प्राचीनतम उल्लेख हाथीगुंफेतल्या सनपूर्व दुसऱ्या शतकातल्या शिलालेखात आढळतो. या मंत्रात अपूर्व शक्ती असून, त्याच्या जपाने इहलौकिक व पारलौकिक सिद्धी प्राप्त होतात, असे जैन आचार्यांनी विश्वासपूर्वक सांगितले आहे. [जै. भ. पृ.]

तंगण

एक प्राचीन जमात. किरात व पुलिंद यांच्या जोडीने तंगण व परतंगण या लोकांचा उल्लेख आढळतो. वराहमिहिराने तंगण लोक भारताच्या ईशान्येस राहत असल्याचे सांगितले आहे. पांडुकेश्वर येथे एक गुप्तकालीन ताम्रपट मिळाला आहे, त्यावरून गढवालच्या उत्तरेस तंगणांचे राज्य होते, असे कळते. टॉलेमीने गंगणोई राज्याचे वर्णन करताना हे राज्य गंगेच्या पूर्वेपासून उत्तरेपर्यंत असल्याचे सांगितले आहे. सेंट मार्टिनने गंगणोईचा शुद्ध पाठ तंगणोई मानला आहे. तंगणांची वस्ती केवळ भारताच्या ईशान्य भागातच नव्हती; तर ती काश्मीरच्या जवळपासही होती. मध्य आशियातले तुंगण आणि हे तंगण बहुधा एकाच वंशाचे असावे. [ट्रा. ए. इं.; ना. प्र. प.– विक्रमांक, १९४३]

तंजाऊर

द. भारतातील एक प्रसिद्ध नगर. हे मद्रासपासून २१८ मैल व कुंभकोणम्‌पासून २४ मैल अंतरावर, कावेरी नदीच्या काठी वसलेले आहे. कावेरीच्या मुखाजवळील प्रदेशाचे ते एक सांस्कृतिक केंद्र आहे.

तंजाऊर या नावाविषयी पुराणात एक कथा आहे, ती अशी– तंजण नावांचा एक राक्षस इथे राहून आसपासच्या लोकांना सतावीत होता. देवासुरांच्या युद्धात विष्णूने नीलमेघ पेरुमाळ याचे रूप घेऊन त्याला ठार मारले. मरताना त्याने देवाची प्रार्थना केली, की ‘ माझे निवासस्थान माझ्या नावाने प्रख्यात व्हावे व ते पवित्र क्षेत्र म्हणून प्रसिद्ध व्हावे. ’ विष्णूने हे त्याचे मागणे मान्य केले. तेव्हापासून या क्षेत्राला तंजाऊर (तंजपुर या संस्कृत शब्दाचे तमिळ रूपांतर) हे नाव प्राप्त झाले.

इ. स. च्या ९ व्या शतकात विजयालय चोळ याने मुत्तरैयर वंशाच्या राजाकडून तंजाऊर जिंकून घेतले व तिथे आपली राजधानी स्थापली. चोळ राजवंशाने इथे सुमारे ४०० वर्षे राज्य केले. मात्र त्या वंशातील राजेंद्र चोळ याने गंगैकोंडचोळपुरम् येथे आपली राजधानी नेली होती. पुढे इ. स. १५४९ पर्यंत तंजाऊरवर पांडय वंशाची सत्ता होती. त्यानंतर विजयनगर राज्यातील एक सेनापती शिवप्पा नायक याने तंजाऊर येथे स्वतंत्र राज्य स्थापले. इ. स. १६७३ पर्यंत ते राज्य नांदले. इ. स. १६७४ मध्ये शहाजीराजांचा पुत्र व्यंकोजी भोसले याने तिथे आपली सत्ता स्थापिली. तंजाऊरवर भोसल्यांचे राज्य इ. स. १८५५ पर्यंत होते. नंतर ते इंग्रजांच्या ताब्यात गेले.



नटराजाची धातुमूर्ती—बृहदीश्वरमंदिर, तंजाऊर

तंजाऊर नगराचे दोन भाग आहेत. एका भागाला मोठा दुर्ग व दुसऱ्याला लहान दुर्ग असे म्हणतात. विश्वविख्यात बृहदीश्वरमंदिर लहान दुर्गात आहे. चोळ वंशातला राजा राजराज (प्रथम) याने हे मंदिर इ. स. १०१० मध्ये बांधून पुरे केले व त्याचे नाव राजराजेश्वर असे ठेवले. सांप्रत हे मंदिर बृहदीश्वरमंदिर या नावाने अधिक प्रसिद्ध आहे. द्राविड शिल्पशैलीचा हा उत्कृष्ट नमुना असून, चोळ राजवंशाच्या सामर्थ्याचें आणि वैभवाचें ते प्रतीक समजले गेले आहे.

तंजाऊरचे हे बृहदीश्वरमंदिर भारतातील सर्व मंदिरांत भव्यतम आहे. त्याला दोन प्रांगणे आहेत. आतील प्रांगणात मुख्य मंदिर असून, त्याचे गर्भगृह, अर्धमंडप, महामंडप, स्थापनामंडप, नृत्यमंडप व वाद्यमंडप असे अनेक भाग आहेत. गर्भगृह दुमजली असून, त्याची उंची ५० फूट आहे. गर्भगृहावर १९० फूट उंचीचे १३ मजली विमान आहे. या विमानावर अखंड वज्रपाषाणाचे घुमटाकृती शिखर व त्यावर तांब्याचा कळस आहे. शिखराचा प्रचंड पाषाणखंड विमानावर चढवण्यासाठी चार मैल

अंतरावरील एका गावापासून येथपर्यंत एक चढाव बनवण्यात आला होता, असे सांगतात. विमानावर जे शिल्पकाम केलेले आहे, ते वैष्णव पद्धतीचे आहे. देवदेवतांच्या व ऋषीमुनींच्या असंख्य मूर्ती, अनेक स्तंभ व सुरेख नक्षीकाम यांनी ते अलंकृत आहे. एका बाजूवर एका युरोपियन मनुष्याची आकृती आहे. प्रस्तुत मंदिराच्या रचनेत एका डेन मनुष्याने साहाय्य केले होते; त्या मनुष्याची ही प्रतिमा आहे, असे म्हणतात.

मंदिराच्या गर्भगृहात एक प्रचंड शिवलिंग असून, एका कोपऱ्यात नटराजाची सुंदर मूर्ती आहे. भिंतीतील देवगोष्ठांत शिवाच्या भिन्न रूपांच्या अनेक प्रतिमा दिसतात. मुख्य मंदिराच्या बाजूला सुब्रह्मण्य (कार्तिकेय), गणपती, बृहन्नायकी, नटराज व चंडिकेश्वर यांची लहान मंदिरे आहेत. त्यांतील सुब्रह्मण्याचे मंदिर अत्यंत सुंदर आहे. त्याचे शिल्पकाम फारच नाजूक व सुरेख आहे.

बृहदीश्वरमंदिर हे अत्यंत सुबद्ध व प्रेक्षणीय आहे. भविष्योत्तर पुराणातील बृहदीश्वरमाहात्म्यात इथल्या शिवलिंगाच्या स्थापनेविषयी एक कथा आहे, ती अशी –



सुब्रह्मण्यमंदिर – तंजाऊर

चोळ राजाला कुष्ठरोग झाला होता. तो नष्ट होण्यासाठी त्याच्या गुरूने त्याला एक विशाल शिवमंदिर बांधायला सांगितले. राजाने ते बांधले. मग त्यात लिंग कोणते स्थापायचे, हा प्रश्न पडला. अशा स्थितीत त्याला स्वप्नदृष्टांत झाला, की ' नर्मदा नदीत एक वाळूचे शिवलिंग आहे, ते तू आणून मंदिरात बसव. ' राजाने तसे केले. ते शिवलिंग नर्मदेच्या पाण्यातून बाहेर काढताच बृहदाकार झाले होते, म्हणून मग त्याला बृहदीश्वर असे नाव दिले गेले. त्याच्या स्थापनेनंतर कुंभाभिषेक व दानधर्म करून, राजाने जवळच असलेल्या शिवगंगा सरोवरात स्नान केले, तेव्हा त्याचा कुष्ठरोग नष्ट झाला.

या शिवलिंगाला अदावल्लन, विटंकन अशी अन्यही नावे आहेत. इथल्या गर्भगृहासमोरील मंडपातला भव्य नंदी अखंड पाषाणाचा घडवलेला असून, त्याची उंची १२ फूट, लांबी २० फूट व रुंदी ८ फूट आहे. या पशुमूर्तीची घडण इतकी चांगली आहे, की तो नंदी दृष्टीला सजीव भासतो. अर्धमंडपातील प्रदक्षिणामार्गावर काही भित्तिचित्रे आढळतात, ती चोळ वंशाच्या काळातली आहेत.



बृहदीश्वरमंदिरातील नंदी – तंजाऊर

मंदिराच्या महाद्वारावर जे भव्य गोपुर आहे, तेही प्रेक्षणीय आहे. हे गोपुर इ. स. च्या १६ व्या शतकात बांधले गेले, असे म्हणतात. त्याच्या द्वारावर द्वारपालांच्या मोठाल्या मूर्ती आहेत. इथे आणखीही दोन सुंदर गोपुरे आहेत. या गोपुरांवर वैष्णव, शैव, बौद्ध, इ. विविध प्रकारची शिल्पे पाहायला मिळतात.



सरस्वतीमहाल – तंजाऊर

मुख्य मंदिराभोवती जी भिंत आहे, तिच्या आतील बाजूला

लागून ३५ लहान उपमंदिरे व त्यांच्यामध्ये अनेक स्तंभ आहेत.

शैव संत अप्पर याला या मंदिरात प्रवेश नाकारण्यात आला होता, असे म्हणतात. त्यामुळे शैव संतकवींनी वृहदीश्वराचे माहात्म्य गायिले नाही. सांप्रत बृहदीश्वराच्या गाभाऱ्यापर्यंत शूद्रांनाही प्रवेश मिळतो.

बृहदीश्वरमंदिराच्या रचनेसाठी उपयुक्त असा पाषाण तंजाऊर जिल्ह्यात किंवा त्याच्या जवळपास मुळीच उपलब्ध नाही. त्यामुळे हे सर्व प्रचंड पाषाण फार दूरच्या कोणत्या तरी ठिकाणाहून आणावे लागले असतील. नंदीचा दगड त्रिचनापल्ली जिल्ह्यातील पच्छैमलै डोंगरातून आणला, असे म्हणतात. तंजाऊरमध्ये आणखी सुमारे ७४ मंदिरे आहेत.

तंजाऊरच्या भोसले घराण्यात सरफोजी (इ. स. १७९८ – १८३२) नामक एक थोर राजा होऊन गेला. तो इंग्रजांच्या कृपेमुळेच गादीवर आला होता. त्याचे बालपण रे. श्वार्त्झ नावाच्या एका विद्वान मिशनरी गृहस्थाच्या सहवासात गेले. रे. श्वार्त्झ याने सरफोजीला इंग्रजी, गणित, इतिहास, भूगोल, इ. विषयांचे उत्तम शिक्षण दिले. त्यामुळे त्याला पाश्चात्य विद्येविषयी आवड उत्पन्न झाली. त्याने मग आपल्या राज्यातही विद्येचा प्रसार केला व अनेक पंडितांना संस्कृत ग्रंथ, काव्ये व नाटके रचण्यास उत्तेजन दिले. खुद्द सरफोजीलाही अनेक भाषा अवगत असून, वैद्यक व ज्योतिषशास्त्र यांचेही त्याला चांगले ज्ञान होते. त्याला शिल्प व संगीत यांचीही गोडी होती.

तंजाऊरच्या राजवाड्यात सरस्वतीमहाल नामक सुप्रसिद्ध ग्रंथालय आहे, ते सरफोजीनेच निर्माण केले. (ग्रंथालयें पाहा) त्याने पाश्चात्य व पौर्वात्य विद्यांच्या अध्यापनासाठी वेगळ्या शाळा स्थापल्या, स्वतः पाठ्यपुस्तके लिहिली आणि गावात एक छापखानाही सुरू केला. विज्ञान व वैद्यक या शास्त्रांचे प्रयोगही तो आवडीने करीत असे.

चोळ राजांनी लिहिलेल्या शिलालेखांप्रमाणे सरफोजीने बृहदीश्वरमंदिरातील प्राकाराच्या भिंतींवर एक विस्तीर्ण शिलालेख कोरून ठेवला आहे. तो जगातील सर्वात दीर्घ शिलालेख असून, त्याची ११० छापील पाने झाली आहेत. त्या शिलालेखात सरफोजीच्या चिटणिसाने भोसले घराण्याचा संपूर्ण इतिहास मराठी भाषेत लिहून ठेवला आहे.

सरफोजीने आपल्या राजवाड्यात सुंदर मूर्ती, चित्रे, प्रकाशचित्रे व कलाकुसरीच्या इतर अनेक वस्तू यांचा संग्रह केला असून, तो फार प्रेक्षणीय आहे तंजाऊरच्या भव्य राजवाड्यातील संगीतमहाल सरफोजीनेच. बांधलेला असून, ध्वनिशास्त्राला अनुसरून त्याची रचना केलेली आहे. नाट्य, संगीत व नृत्य या कलांच्या विकासाविषयी तंजाऊरची ख्याती आहे. चोळ राजांनी या सर्व कलांना पुष्कळच प्रोत्साहन दिले होते. कलाकारांसाठी त्यांनी तंजाऊरमध्ये संगीतमंदिरे बांधली. होती. याशिवाय त्या राजांनी


राजा सरफोजी – तंजाऊर

साहित्य व शास्त्रे यांच्या अध्यापनासाठी इथे महाविद्यालयेही स्थापली होती. [म. ज्ञा. को.; एन्सा. रि. ए.; कल्याण-तीर्थांक; श्री. ज. ह. दवे – भारती, २४ नोव्हें. १९५७; ए. सि. ए. हिं.; सा. इ. (म. आं.); ग्रे. टें. तं.; पी. स. म.; तंजावरचे राजघराणे – द. ब. पारसनीस, १९१२]

तंडुलपरीक्षा

एक दिव्य. प्राचीन काळी चोरीचा आळ आलेल्या पुरुषाला हे दिव्य करायला लावीत. याचा विधी दिव्यतत्त्व या ग्रंथात सांगितला आहे, तो असा – तांदूळ स्वच्छ करावे. देवतेच्या स्नानजलाने ते मातीच्या भांड्यात भिजवावे. रात्रभर ते तसेच ठेवावे. दुसऱ्या दिवशी सकाळी आरोपीला प्राङ्मुख बसवावे. त्याच्या मस्तकावर भूर्जाचे किंवा पिंपळाचे पान ठेवावे. मग त्याला ते तांदूळ खायला द्यावे. खाल्ल्यानंतर ते मस्तकावरच्या पानावर ओकायला लावावे. जर त्या तांदुळात रक्त दिसले किंवा दिव्य करणाऱ्याची टाळू आणि हनुवटी दबली किंवा त्याच्या शरीराला कंप सुटला, तर त्याच्यावरचा चोरीचा आरोप खरा समजावा. अन्यथा त्याला निर्दोषी म्हणून घोषित करावे. [श. क.]

तंडेश्वर नायन्मार

एक शिवभक्त. याने आपल्या तपःसामर्थ्याने शिवलोकात सरूपता मुक्ती मिळवली. दक्षिणेत त्याचे व शिवाचे अभिन्नत्व कल्पून शिवाबरोबर त्याचीही पूजा करतात. तिकडे याची स्वतंत्र मंदिरेही आढळतात. [सा. इं. इ. गॉ. गॉ.]

तंतिपा

चौऱ्यायंशी सिद्धांपैकी एक. याचा जन्म उज्जयिनीत झाला. तिथे तो विणकराचे (तंतवा) काम करीत असे, म्हणून त्याला तंतिपा हे नाव पडले, असे म्हणतात. तिबेटी परंपरेनुसार हा मगध देशातील ब्राह्मण होता, असे पं. राहुल सांकृत्यायन सांगतात. प्रथम हा जालंधराचा शिष्य होता. पण पुढे याने कण्हपाकडूनही उपदेश घेतला. याच्या नावावर चतुर्योगभावना नावाचा एक ग्रंथ असून, तो तंजूरच्या ग्रंथालयात आहे. तो ग्रंथ प्राचीन मालवी भाषेत लिहिलेला आहे. [पु. त. नि.; सि. सा.; ना. सं.; हिं. सा. बि.]

तंत्रयुद्ध

केवळ शरीरबलाने केल्या जाणाऱ्या युद्धाला तंत्रयुद्ध असे म्हणतात. पशुपक्ष्यांप्रमाणे मनुष्यही प्रथम अशाच प्रकारे युद्ध करीत असे. याला बाहुयुद्ध असेही म्हणतात. शरीराचे निरनिराळे भाग धरून ओढणे किंवा सांधे किंवा नाजूक भाग यांवर आघात करून शत्रूला अधू करणे किंवा मारणे, हा याचा उद्देश असतो. शरीराचा नाजूक भाग कोणता त्याचे व आपला नाजूक भाग बचावून शत्रूचा नाजूक भाग कसा दुखवावा, याचे ज्ञान अशा युद्धात आवश्यक असते. त्यासाठी त्या शास्त्रात अनेक प्रकारचे पेच सांगितलेले आहेत. हे पेच वापरून मनुष्य हत्तीचा पाय मोडू शकतो, वाघाला फाडू शकतो, हरणाला पकडू शकतो किंवा भारी प्रतिस्पर्ध्यालाही उचलून फेकू शकतो, असे म्हणतात. [प्रा. यु. वि.]

तंत्रशास्त्र

‘ तनु विस्तारे ’ या विस्तारार्थक धातूपासून तंत्र शब्द बनला आहे. ज्याच्या द्वारे अध्यात्मज्ञानाचा किंवा तत्त्वज्ञानाचा विस्तार केला जातो, ते तंत्रशास्त्र होय. कामिकागमात तंत्राची व्याख्या पुढीलप्रमाणे दिली आहे—

तनोति विपुलानर्थान् तत्त्वमन्त्रसमन्वितान् ।
त्राणं च कुरुते यस्मात् तन्त्रमित्यभिधीयते ।।

अर्थ – तत्त्व आणि मंत्र यांनी युक्त अशा व्यापक अर्थांचा विस्तार करणारे आणि (साधकांचे साधनेच्या द्वारे) परित्राण करणारे जे शास्त्र, त्याला तंत्र असे नाव आहे.

देवतेच्या रूप-गुण-कर्मांचे चिंतन-मनन, देवताविषयक मंत्रांचा उपदेश, मंत्रांची यंत्रात संयोजना, तसेच पटल, पद्धती, कवच, नामसहस्र व स्तोत्र ही पंचांग उपासना यांची माहिती ज्यात दिलेली असते, त्याला तंत्र म्हणतात. व्यापक अर्थाने सांगायचे तर शास्त्र, सिद्धांत, अनुष्ठान, विज्ञान, इ. गोष्टी ज्यात प्रतिपादिलेल्या आहेत, ते तंत्र होय.

तंत्राला आगम असे दुसरे नाव आहे.

आगम हा शब्द प्रामाणिक व यथार्थ वाणीचा प्रतीकरूप आहे. प्रारंभी वेदांसाठी तो प्रयुक्त केला जात होता. पण कालांतराने तंत्रसाधनेचा उदय झाल्यावर आणि तंत्रसाधनेने आपले श्रेष्ठत्व प्रस्थापित केल्यावर आगम शब्द हळूहळू तंत्रांना लावला जाऊ लागला. मग तंत्रे ही आगम ठरली आणि वेदांना निगम ही संज्ञा प्राप्त झाली. महानिर्वाण तंत्र म्हणते, की ‘ कलियुगात मनुष्याला मेध्यामेध्य (पवित्र काय आणि अपवित्र काय) याचा विचार करता येईना; म्हणून अशा कलिग्रस्त माणसाच्या कल्याणासाठी शंकराने पार्वतीला आगम अर्थात तंत्रज्ञान उपदेशिले. ’

शिव पार्वतीला म्हणतो—

कलावागममुल्लङ्घ्य योऽन्यमार्गे प्रवर्तते ।
न तस्य गतिरस्तीति सत्यं सत्यं न संशयः ।।

अर्थ– कलियुगात आगमांचे उल्लंघन करून जो मनुष्य (साधनेच्या) अन्य मार्गांत प्रवृत्त होतो, त्याला गती (भुक्तिमुक्ती) नाही, हे द्विवार सत्य आहे आणि यात (कसल्याही

प्रकारचा) संशय नाही.

युगपरत्वे मनुष्याचे आचार भिन्न होतात किंवा होणे युक्त असते, असे सांगून कलियुगात् तंत्रमार्ग आचरावा असे कुलार्णव तंत्रात पुढीलप्रमाणे सांगितले आहे--

कृते श्रुत्युक्त आचारस्त्रेतायां स्मृतिसम्भवः ।
द्वापरे तु पुराणोक्तः कलावागमसम्मतः ।।

अर्थ – कृतयुगांतला आचार श्रुत्युक्त होता. त्रेतायुगांत तो स्मृत्युक्त झाला. द्वापरात पुराणोक्त आचाराला महत्त्व मिळाले आणि कलियुगात आगमकथित आचार हाच योग्य समजला पाहिजे.

तंत्रशास्त्रात तंत्रांचे पुढील तीन विभाग सांगितले आहेत–

(१) आगम – सृष्टी, प्रलय, देवतापूजा, पुरश्चरण, षट्कर्मसाधन व चतुर्विध ध्यानयोग यांचे वर्णन असलेल्या ग्रंथांना आगम म्हणतात.

(२) यामल – सृष्टितत्त्व, ज्योतिष, नित्यकृत्य, क्रम, सूत्र, वर्णभेद व युगधर्म यांचा विचार ज्यांत केला आहे, त्या ग्रंथांना यामल म्हणतात.

(३) तंत्र – सृष्टी, लय, मंत्र-यंत्रनिर्णय, तीर्थ, आश्रमधर्म, कल्प, ज्योतिष, व्रत, शौचाशौच, स्त्री-पुरुषलक्षण, राज-दान-युगधर्म, व्यवहार, अध्यात्म, स्नानविधी, भू-भूतशुद्धी, प्राणायाम, न्यास, जप, तर्पण, पूजा, दीक्षा, अभिषेक, प्रायश्चित्त, चक्रपूजा, मुद्रा, इ. गोष्टींचे वर्णन ज्या ग्रंथांत आहे, त्यांना तंत्र म्हणतात.

तंत्रोद्देश – तंत्रांचे वैशिष्ट्य क्रिया हे आहे. वैदिक ग्रंथांत निर्दिष्ट केलेल्या ज्ञानाचे क्रियात्मक रूप प्रकट करणे, हा तंत्रांचा उद्देश होय. विविध साधनांच्या द्वारे देवता व निसर्गशक्ती यांना स्वाधीन करून घेणे, योगाच्या द्वारे अंतःस्थ शिव–शक्तींचे मीलन घडवून आणणे आणि मानवी जीवात्म्यावर विविध संस्कार करून तसेच त्याला पशुभावातून दिव्य भावाच्या अवस्थेत नेऊन अद्वैतरूप आत्मज्ञानाचा साक्षात्कार घडवणे, हा तंत्रांचा उद्देश आहे.

वैदिक कालात यज्ञयागांच्या बरोबर तांत्रिक पद्धतीही प्रचारात होत्या, असे वाटते. उपनिषदांनी गूढविद्या वर्णिलेल्या आहेत. त्यांचा आधार तांत्रिकच असला पाहिजे. छांदोग्यातली मधुविद्या ही तांत्रिक रहस्यात्मकच आहे. तिच्या वर्णनात सूर्याच्या ऊर्ध्वमुख किरणांना मधुनाडी, ब्रह्माला पुष्प, त्यातून निघणाऱ्या रसाला अमृत आणि तद्विषयक गुह्य आदेशाला मधुकर म्हटले आहे. हा गुह्य आदेश म्हणजे गोपनीय असा तांत्रिक आदेशच असला पाहिजे, असे म्हणता येते.

ज्या प्रकारे उपनिषदांनी वेदातील ज्ञानकांडाचे पुनरुज्जीवन केले, त्याच प्रकारे आगम किंवा तंत्रे यांनी वैदिक रहस्यवादी पुरुषांच्या गूढ शिक्षा आणि साधना आपल्या हाती घेऊन बदलत्या युगमानाप्रमाणे त्यांचे स्वरूप आणि साधना यांचा वेदांच्या आधारावरच विकास केला. महायोगी अरविंद म्हणतात--

भारताच्या भूमीवर आध्यात्मिक साधनेच्या राज्यात तंत्रमार्गाने महत्त्वपूर्ण असे स्थान मिळवले आहे. तांत्रिक साधना ही अध्यात्म हेच ध्येय पुढे ठेवून मार्गक्रमण करणारी आहे. तिने मानवाचे हृदय, संकल्प आणि जीवनसत्ता यांना धरून आत्मविकास साधण्याचा प्रयत्न केला आहे. म्हणूनच तंत्रमार्ग हा भारताच्या प्रगतिशील आध्यात्मिक आंदोलनात एक महत्त्वपूर्ण असा सोपान ठरला आहे.

तंत्र हे वेदाप्रमाणेच ईश्वरप्रणीत शास्त्र आहे. ती परमपुरुष शिव, विष्णू किंवा आद्याशक्ती देवी यांची वाणी आहे. ते वैदिक परंपरेचेच एक अविच्छिन्न रूप आहे. पांचरात्र व शैवागम यांतले कित्येक सिद्धांत वेदमूलकच आहेत. त्यांतले कित्येक आचार व पूजाप्रकारही वैदिक पद्धतीला धरूनच आहेत. सांख्य व वेदान्त या दर्शनांनी तंत्रांना तत्त्वज्ञानाची पार्श्वभूमी प्राप्त करून दिली आहे. तंत्रांतली सृष्टिप्रक्रिया सांख्यमूलक असून, त्यांचे अंतिम उद्दिष्ट अद्वैतभावाने परमात्म्याचा साक्षात्कार किंवा द्वैताद्वैताच्याही पलिकडचे सामरस्य किंवा महामीलन हे आहे. कुलार्णव तंत्र म्हणते--

अद्वैतं केचिदिच्छन्ति द्वैतमिच्छन्ति चापरे ।
मम तत्त्वं विजानन्तो द्वैताद्वैतविवर्जितम् ।।

अर्थ – काही साधक द्वैताची इच्छा करतात, तर काही अद्वैताची. पण ज्ञाते पुरुष द्वैताद्वैतविवर्जित अशा माझ्या तत्त्वाची इच्छा करतात.

तंत्रप्रामाण्य – तंत्राच्या प्रामाण्याविषयी दोन मते आहेत. भास्करराय व राघवभट्ट यांच्या मते तंत्रे ही श्रुत्यनुगत असल्यामुळे त्यांना परतःप्रामाण्य आहे. तंत्रशास्त्र हे स्मृतिशास्त्राच्या अंतर्भूत मानूनच भास्कररायाने तंत्राचे प्रामाण्य अंगीकारले. पण श्रीकंठाचार्यांच्या मते तंत्रे ही श्रुतीच असल्यामुळे स्वतःप्रमाणच आहेत.

तस्माद् वेदात्मकं शास्त्रं विद्धि कौलागमं प्रिये ।
(कुलार्णव. २.१४०)

अर्थ – म्हणून हे पार्वती, कौलागम हे वेदात्मक शास्त्र आहे, असे जाण.

हारीत ऋषीचेही असेच एक वाक्य आहे--

श्रुतिश्च द्विविधा वैदिकी तान्त्रिकी च ।

अर्थ – वैदिक व तांत्रिक अशी दोन प्रकारची श्रुती आहे. वरील दोन वचनांचा आधार घेऊन श्रीकंठाचार्यांनी तंत्रे ही स्वतःप्रमाण ठरविली. अप्पय्य दीक्षिताने वैदिक व अवैदिक

अशी दोन प्रकारची तंत्रे मानली असून, वैदिक तंत्र वेदाधिकाऱ्यांसाठी व अवैदिक तदितरांसाठी असल्याचे सांगितले आहे.

इतिहास – तांत्रिक साधनेतली काही मूलतत्त्वे ऋग्वेदातही आढळतात, असे विद्वानांचे मत आहे. ऋग्वेदकाली तांत्रिक पद्धती व्यवस्थित स्वरूपात निर्माण झाली नव्हती; पण काही तांत्रिक आचार त्या कालीही रूढ होते, असे दिसते. यजुर्वेदातील यज्ञीय कर्मकांडातले कित्येक विधी हे मुळात तांत्रिकच असले पाहिजेत. अथर्ववेदाचा आणि तंत्राचा संबंध तर अगदी निकटचा आहे. कुलार्णव तंत्रात एका ठिकाणी 'अथर्वसंहितेत देवी असे सांगते की' असा उल्लेख आहे, तो या निकटत्वाचा पुरावा समजायला हरकत नाही.

भारतीय युद्धोत्तर व बुद्धपूर्व अशा सुमारे दोन हजार वर्षांच्या कालखंडात भारतामध्ये तंत्रधर्माचेच प्राबल्य होते. शिव आणि दक्ष यांच्या वैराची कथा ही प्राचीनतम पुराणकथांपैकी एक आहे. त्या कथेत भृगूने शिवाला शाप देताना ज्या शिवदीक्षेचा उल्लेख केला आहे, ती दीक्षा म्हणजे तंत्राचाराचाच एक भाग होय. नृसिंहतापनीय उपनिषदावर अनेक टीका आहेत. त्यांत आद्य शंकराचार्य व त्यांचे गुरू गौडपादाचार्य यांचीही टीका आहे. या उपनिषदात जे अर्चनाविधी वर्णिले आहेत, ते बहुतांशी तांत्रिकच आहेत. त्यावरून असे दिसते, की तांत्रिक अर्चना ही वैदिक अर्चनेइतकीच प्राचीन आहे आणि ती वैदिक अर्चनेचे विकसित रूपही आहे. उशनस्‌संहितेत पांचरात्र व पाशुपत यांचा उल्लेख आहे. कात्यायनसंहितेत गणेश, गौरी व अन्य देवता यांच्या उपासनेचे तपशीलवार वर्णन आहे. व्याससंहितेत गुह्य विद्येचा जप, स्फटिकादी मणिमालांचे धारण व गायत्रीसह रुद्राची उपासना या गोष्टी सांगितल्या आहेत.

महाभारताच्या शांतिपर्वातील दक्षयज्ञध्वंसाच्या आख्यानात शिव दक्षाला पाशुपत व्रताचा उपदेश करताना सांगतो—

षडङ्गसहित संपूर्ण वेद, सांख्य व योग यांच्या मननातून मी हे पाशुपतव्रत प्रकट केले आहे. या व्रताचे नियम कडक असून, ते देव–दानवांनाही दुष्कर आहेत. पण हे व्रत वेदशास्त्रातील समस्त विधानांहून श्रेष्ठ आहे. हे व्रत सर्व वर्ण आणि सर्व आश्रम यांना हितकर आहे. काही बाबतीत ते वर्णाश्रमधर्माच्या विरुद्ध आहे; तरीही त्यातल्या कित्येक गोष्टी वर्णाश्रमधर्माशी मिळत्याजुळत्या आहेत (म. भा. शांति. २८४.१९२–१९५).

वरील वर्णनावरून पाशुपत व्रत हे तांत्रिक व्रतच आहे, याविषयी कोणाचे दुमत होणार नाही. महाभारतात अनेक ठिकाणी तांत्रिक परिभाषा वापरलेली आहे. आणि त्यात 'घण्टोऽघण्टो घटी घण्टी चरुतेली मिली मिली' अशासारखे शब्द आढळतात, ते तांत्रिकच आहेत (म. भा. शांति. २८४.१४५).

पुराणांत तंत्रशास्त्राचे प्रतिपादन याहूनही स्पष्टपणे आढळते. ब्रह्म पुराणात म्हटले आहे, की भक्ताने वैदिक व तांत्रिक या दोन्ही प्रकारांनी महादेवाची पूजा करावी. वराह पुराणात जनार्दनाची पूजा दोन्ही प्रकारांनी करण्यास सांगितले आहे. स्कंद पुराणात शंकराच्या मुखाने एका ठिकाणी म्हटले आहे, की 'वेद, आगम व पुराण यांचे तत्त्व मनाला मोह उत्पन्न करणारे आहे. अतएव ते गुप्त राखावे.' रामायणात विश्वामित्राने रामाला बला व अतिबला नावाच्या ज्या विद्या दिल्या, त्या तांत्रिकच होत्या. त्या प्राप्त करून घेण्याचा विधी तंत्रसार नावाच्या ग्रंथात सांगितला आहे.

मध्ययुगातील धार्मिक साहित्यावरून कळते, की प्रारंभी तंत्रांना अवैदिक मानण्याची प्रथा होती; पण पुढे लोकांत त्यांचा प्रसार वाढल्यामुळे ब्राह्मणांनीही त्यांचा स्वीकार करून त्यांचे महत्त्व वाढवले. कूर्म पुराणात अनेक अवैदिक मतांचा उल्लेख असून, विष्णू व रुद्र या दोन देवतांना या मतांचे प्रवर्तक म्हटले आहे. विष्णु-रुद्रांनी या अवैदिक मतांचा प्रचार वेदाधिकार गमावून बसलेल्या ब्राह्मणांकरवी केला, असाही पुढे उल्लेख आहे. याचा अर्थ असा, की सनातनी ब्राह्मण ज्या ब्राह्मणांना हीन किंवा व्रात्य लेखीत होते व ज्यांचा वेदपठणाचा अधिकार नष्ट केला गेला होता, त्या ब्राह्मणांकडून हे तांत्रिक संप्रदाय प्रवर्तित झाले.

अथर्ववेदात मारण, मोहन, उच्चाटण, इ. अभिचारकृत्यांचे विपुल उल्लेख आढळतात. असे म्हणतात, की अथर्ववेदातल्या गुह्य साधना या मुळात भारतातील आर्येतरांच्या होत्या. त्याच पुढे वेदविहीन आर्यांनी अर्थात व्रात्यांनी अंगीकारल्या व आत्मसात केल्या. व्रात्यांचा तंत्रसाधनेशी बराच निकट संबंध आहे. अनेक अवैदिक व आर्येतर जातींच्या तांत्रिक विधि-विधानांचे पौरोहित्य या व्रात्य ब्राह्मणांनी केले असावे आणि त्यांनीच या तांत्रिक विधीला शास्त्र पदवी मिळवून दिली असावी.

तंत्रशास्त्र हे अशा अगणित लोकाचारांचे, लोकपूजित देवतांचे व लोकप्रचलित रहस्यमय अनुष्ठानांचे परिणत रूप आहे. मध्ययुगात हा लोकधर्म सर्वत्र उफाळून वर आला व त्याचा स्वीकार कमी-अधिक प्रमाणात प्रत्येक मतात व संप्रदायात होऊ लागला. वैदिकांच्या संध्येतही तांत्रिक प्रक्रिया प्रविष्ट झाली. मग हळूहळू अनेक तांत्रिक साधना निर्माण झाल्या. त्या साधनमार्गात देवतांचे स्वरूप, त्यांचे परस्पर संबंध, त्यांचे मंत्र, तसेच चर्या, क्रिया, अभिचार, यंत्रे, इ. गोष्टी परिकल्पित केल्या गेल्या. तांत्रिकांनी मग अशीही घोषणा केली, की श्रुतिस्मृति-पुराणांचे युग संपले असून, आता तंत्रशास्त्राचे युग उगवले आहे. पुढे हळहळू तांत्रिकांनी तंत्रांचा एवढा बडेजाव

वाढवला, की ते तंत्रांना साक्षात श्रुतीच मानू लागले.

विदेशी प्रभाव– तांत्रिक साधनेत वेळोवेळी विदेशी आचारांचाही प्रवेश झाला आहे, असे दिसून येते. कित्येक तंत्रग्रंथात असे उल्लेख आढळतात, की तंत्रांचा प्रचार करण्यासाठी देवता बाहेरून भारतात आल्या व परत गेल्या. तंत्रांचे आगम हे दुसरे नावही वैदिक परंपरेत तंत्रांचे बाहेरून आगमन झाल्याचे सूचित करते. चीनागम व चीनाचार हे शब्द या बाबतीत स्पष्टार्थक आहेत. चीनाचार ही उपासना खरोखर चीनमधूनच आली आहे. तारातंत्रात म्हटले आहे, की वसिष्ठ ऋषी ती उपासना शिकण्यासाठी चीन देशात गेला आणि तिथे बुद्धाकडून चीनाचार शिकला. महाचीनतारा ही त्या उपासनेतली देवता होय. एकजटा हे तिचे भारतीय स्वरूप आहे. एकजटेची उपासना तिबेटातही प्रचलित आहे. तिकडील विविध बौद्ध तंत्राचारांत तिचा प्रवेश आहे. तिच्या मंत्रात तेवढा फरक आढळतो. महाचीनतारेचा मंत्र तीन वर्णांचा असून, एकजटेचा मंत्र चार किंवा पाच वर्णांचा असतो. मालिक, मोट, चीन, महाचीन, पारसीक, ऐराक, कंबोज, हूण, यवन, गांधार, नेपाळ, इ. देशांतील तांत्रिक उपासनेचे उल्लेख तंत्रग्रंथांतून आढळतात. ही नावेही तंत्रशास्त्रावरचा विदेशी प्रभाव स्पष्टपणे दाखवितात. हा विदेशी प्रभाव इ. स. च्या ८ ते १२ या शतकांच्या दरम्यान पडला असावा. कारण त्या कालखंडात चीन, तिबेट, मंगोलिया, गांधार, इ. देशांशी भारताचे दळणवळण होते.

तंत्रसाहित्य – तंत्रसाहित्य हे विशाल व वैचित्र्यमय असे साहित्य आहे. ते जसे प्राचीन आहे, तसेच व्यापकही आहे. काही काही अंशांत वैदिक साहित्यापेक्षाही याची विशालता अधिक आहे. तांत्रिक साहित्याचे अतिप्राचीन रूप सांप्रत लुप्त झाले आहे; पण त्याच्या विस्ताराचा जो परिचय मिळतो, त्यावरून म. म. गोपीनाथ कविराज अनुमान करतात, की प्राचीन काळी वैदिक साहित्याहूनही तांत्रिक साहित्याची विशालता अधिक होती. तंत्रग्रंथांची संख्या एक लक्षाहून अधिक होती, असे श्री. ॲव्हेलॉन यांनी म्हटले आहे. वाराही तंत्राच्या मते देव, ब्रह्म व पाताल या तीन लोकांत तंत्राचे नऊ लाख श्लोक असून, भारतात एक लक्ष आहेत. ॲव्हेलॉनच्या मताशी हे मत जुळते.

वेद हे जसे हिरण्यगर्भ किंवा ब्रह्म यांच्याशी निगडित आहेत, तसे तंत्रग्रंथ शिव आणि शक्ती यांच्याशी निगडित आहेत. बहुतेक तंत्रग्रंथ शिव-पार्वतींच्या संवादातूनच निर्माण झाले आहेत. काही ठिकाणी शिव वक्ता व पार्वती श्रोती आहे; तर काही ठिकाणी पार्वती वक्ती आणि शिव हा श्रोता आहे. शिव आणि शक्ती यांची रूपे विविध असतात. त्यामुळे शिव-शक्तिविषयक तंत्रेही विविध आणि बहुसंख्य आहेत. शैव-शाक्त तंत्रांप्रमाणेच वैष्णव, सौर, गाणपत्य या संप्रदायांचीही तंत्रे आहेत. वैष्णव आगमांचे साहित्यही विपुल आहे. वैष्णव तंत्रे ही विष्णूच्या अनेक अवतारांनी उपदिष्ट मानलेली आहेत.

काही तंत्रग्रंथ बरेच जुने म्हणजे इ. स. च्या १ ल्या शतकातले आहेत. काही गुप्तकालीन लिपीत लिहिलेले आहेत. द. भारतातील शैव आगमांचा उल्लेख पल्लव राजांच्या ६ व्या शतकातील शिलालेखात आहे. शंकराचार्यांच्या आनंदलहरीत पासष्ट तंत्रांचा उल्लेख आढळतो.

बौद्ध तंत्रांची संख्याही बरीच मोठी असून, त्यांतली कित्येक इ. स. च्या १ ल्या शतकातली आहेत. ७ व्या, ८ व्या शतकात तर पुष्कळच बौद्ध तंत्रे निर्माण झाली. पं. हिरानंद शास्त्री यांच्या मते तांत्रिक तारा संप्रदाय इ.स.च्या ६व्या किंवा ७ व्या शतकातला आहे. सरहपा याने बुद्धकपाल तंत्र, लुईपा याने योगिनीसंचर्या, कंबल व पद्मवज्र यांनी हे वज्रतंत्र, कृष्णाचार्याने संपुटतिलक, ललितवज्राने कृष्णयमारि तंत्र, गंभीरवज्राने महामाया तंत्र व पितो याने कालचक्र तंत्र रचले, असे तारानाथ सांगतात. अभिनवगुप्ताच्या तंत्रालोकावरील टीकेत जयरथ म्हणतो, की कुलाचार तंत्रे ही मत्स्येंद्रनाथ व मीननाथ यांची आहेत. तंत्रराज तंत्रात म्हटले आहे, की कौल तंत्रे नऊ नाथ सिद्धांनी निर्माण केली.

आगम – तंत्राच्या सर्वांत प्राचीन विभागाला आगम अशी संज्ञा आहे. आगम ग्रंथांत ज्ञान, योग, चर्या व क्रिया असे चार पाद सामान्यतः असतात. हे मूल आगम सांप्रत सर्वांशांनी उपलब्ध नाहीत. पण जे आहेत, तेही विपुल आहेत, यात संशय नाही. या आगमात द्वैतापासून परम अद्वैतापर्यंतच्या भावांची चर्चा असते. शैवागम, रुद्रागम व भैरवागम हे मूल आगम असून, त्यांत आंशिकरूपाने शाक्त आगमही आढळतात.

दहा शैवागम – प्रणव, योग, चित्य, कारण, अजित, सुदीप्तक सूक्ष्म, सहस्र, सुप्रभेद व अंशुमान. या प्रत्येक आगमाचे अवांतर भेदही बरेच आहेत.

अठरा रुद्रागम – विजय, विश्वास, पारमेश्वर, प्रोद्गीत, मुखबिंब, सिद्ध, संतान, नारसिंह, चंद्रांशू, वीरभद्र, स्वायंभुव, विरक्त, कौरव्य, माकुट किंवा मुकुट, किरण, गलित व आग्नेय. अठराव्या रुद्रागमाचे नाव मिळत नाही. श्रीकंठी संहितेत रौरव, विमल, विसर व सौरभेय ही नावे असून, विरक्त, कौरव्य, माकुट व आग्नेय ही नावे नाहीत.

चौसष्ट भैरवागम – श्रीकंठी संहितेत यांची नावे पुढील-प्रमाणे दिली आहेत. यांचे आठ विभाग असून, प्रत्येकात आ० आठ भेद होतात व सर्व मिळून चौसष्ट संख्या भरते.

(१) भैरवाष्टक – स्वच्छंद, चंड, क्रोध, उन्मत्त, असितांग, महोच्छ्वास व कपालीश. आठव्या भैरवाचे नाव मिळत नाही.

(२) यामलाष्टक – ब्रह्म, विष्णू, स्वच्छंद, रूरू, अथर्व, रुद्र व वेताळ. आठवे यामल अज्ञात आहे.

(३) मताष्टक – रक्त, लंपट, लक्ष्मी, चालिका, पिंगला, उत्फुल्लक व विवाद्य. आठवे मत अज्ञात आहे.

(४) मंगलाष्टक – पीचुभैरवी, तंत्रभैरवी, ब्राह्मी, कला, विजया, चंद्रा, मंगला व सर्वमंगला.

(५) चक्राष्टक – मंत्र, वर्ण, शक्ती, कला, बिंदू, नाद, गुह्य व पूर्ण.

(६) बहुरूपाष्टक – अंधक, रूरूभेद, अज, वर्णभेद, यम, विडंग, मातृरोदन व जालिम.

(७) वागीशाष्टक – भैरवी, चित्रिका, हिंसा, कदंबिका, ह्रल्लेखा, चंद्रलेखा, विद्युल्लेखा व विद्धन्मत.

(८) शिखाष्टक – भैरवीशिखा, विनाशिखा, विनामनी, संमोह, डामर, आथवक, कबंध व शिरच्छेद.

पंचाम्नाय व षडाम्नाय असे आगमांचे आणखी एक वर्गीकरण दिलेले आहे. शिवाच्या पाच मुखातून प्रकट झाले, ते पंचाम्नाय व सहा मुखातून प्रकट झाले, ते षडाम्नाय होत. शिवाच्या पंचमुखांपैकी कोणत्या मुखातून कोणते आगम निर्गत झाले, ते पुढीलप्रमाणे सांगितले आहे —

(१) सद्योजात – कामिक, योगज, चिंत्य, कारण व अजित असे पाच शिवागम.

(२) वामदेव – दीप्त, सूक्ष्म, सहस्र, अंशुमान व सुप्रभेद, असे पाच शिवागम.

(३) अघोर – विजय, निःश्वास, स्वायंभुव, आग्नेय व वीर असे पाच रुद्रागम.

(४) तत्पुरुष – प्रोद्गीत, ललित, सिद्ध, संतान, वातुल, किरण, सर्वोच्च व परमेश्वर असे आठ रुद्रागम.

(५) ईशान – रौरव, मुकुट, विमलज्ञान, चंद्रकांत व बिंब असे पाच रुद्रागम.

शुभागमपंचक – वसिष्ठसंहिता, सनकसंहिता, सनंदनसंहिता, शुकसंहिता व सनत्कुमारसंहिता या पाच आगमग्रंथांचा समयाचारात अंतर्भाव आहे. वसिष्ठादी पाच मुनींच्या नावावरून हे ग्रंथ वैदिक मार्गाला अनुसरणारे आहेत असे दिसते. लक्ष्मीधराने म्हटले आहे, की शंकराचार्य स्वतः समयाचारी होते. या मार्गात षोडश नित्यादेवतांचे महत्त्व [illegible] आहे. समयाचाराला कौलमार्ग असेही म्हणतात.

इ. स. च्या आठव्या शतकातला गुप्त लिपीत लिहिलेला निःश्वासतंत्रसंहिता नामक एक ग्रंथ नेपाळात उपलब्ध झाला आहे. याचे लौकिकसूत्र, मूलसूत्र, उत्तरसूत्र, नयसूत्र व गुह्यसूत्र असे पाच विभाग आहेत. लौकिकसूत्र प्रायः उपेक्षित आहे. उत्तरसूत्रात १८ प्राचीन शिवसूत्रांचा नामोल्लेख मिळतो.

पांचरात्र संप्रदायाच्या आगमांची संख्या १०८ सांगितलेली आहे. पण ते आगम २०० पेक्षा अधिक असावे, असे वाटते. द. भारतातील सिद्धांत आगमांची संख्या २८ आहे. त्यांची नावे भिन्न ठिकाणी भिन्न सापडतात. मतिसिद्धांत तंत्रात या पृथ्वीचे अश्वक्रांता, रथक्रांता व विष्णुक्रांता असे तीन विभाग सांगितले आहेत. या प्रत्येक विभागाची ६४ तंत्रे होती, असे म्हणतात. या सर्वांची मिळून १९२ संख्या भरते. आगमतत्त्वविलासात ६४ तंत्रांची नावे पुढीलप्रमाणे दिली आहेत —

स्वतंत्र, फेत्कारी, उत्तर, नील, वीर, कुमारी, काली, नारायणी, तारिणी, बाला, समयाचार, भैरव, भैरवी, त्रिपुरा, वामकेश्वर, कुक्कुटेश्वर, मातृका, सनत्कुमार, विशुद्धेश्वर, सम्मोहन, गौतमीय, बृहत् गौतमीय, भूत-भैरव, चामुंडा, पिंगला, वाराही, मुंडमाला, योगिनी, मालिनीविजय, स्वच्छंदभैरव, महा, शक्ती, चिंतामणी, उन्मत्तभैरव, त्रैलोक्यसार, विश्वसार, तंत्रामृत, महाफेत्कारी, वायवीय, तोडल, मालिनी, ललिता, त्रिशक्ती, राजराजेश्वरी, महामोहस्वरोत्तर, गवाक्ष, गांधर्व, त्रैलोक्यमोहन, हंसपारमेश्वर, हंसमाहेश्वर, कामधेनू, वर्णविलास, माया, मंत्रराज, कुब्जिका, विज्ञानलतिका, लिंगागम, कालोत्तर, ब्रह्मयामल, आदियामल, रुद्रयामल, बृहद्यामल, सिद्धयामल व कल्पसूत्र.

उपनिषदे, सूत्रे, मूलतंत्रे, सारग्रंथ, विधि-विधानसंग्रह, विवरणात्मकग्रंथ व स्वतंत्र प्रबंध असे तंत्रांचे भिन्नभिन्न प्रकार आढळतात. शैव, शाक्त व वैष्णव या पंथांची बरीच तांत्रिक उपनिषदे उपलब्ध आहेत. त्यांपैकी किती उपनिषदे वैदिक उपनिषदांच्या काळातली आहेत, ते समजायला मार्ग नाही. त्यांची रचना व शैली वैदिक उपनिषदांसारखी असली, तरी त्यांची भाषा नंतरच्या काळातली वाटते. तंत्रानुयायांच्या दृष्टीने त्यांतली काही उपनिषदे महत्त्वाची आहेत. भास्कररायाच्या मते परशुराम कल्पसूत्रासारखे ग्रंथ वैदिक कल्पसूत्रांच्या योग्यतेचे आहेत. मात्र त्यांची संख्या अल्प आहे. शब्दांची रूपे किंवा व्युत्पत्ती या बाबतीत तंत्रांच्या भाषेची अनेक वैशिष्टये आहेत. या भाषेचे तंत्रव्याकरण, शैवव्याकरण, इ. ग्रंथ उपलब्ध आहेत. मात्र हे ग्रंथ केवळ व्याकरणाची चर्चा करणारे नसून, त्यांत वर्णमालेतील अक्षरांच्या गूढ अर्थाचे विवेचन बरेच असते.

यामलग्रंथ – तंत्रांच्या विकासातील आगमांच्या नंतरची [illegible] म्हणजे यामलग्रंथ होत. रुद्र, स्कंद, ब्रह्म, विष्णू, यम, वायू, कुबेर व इंद्र हे आठ मुख्य यामल ग्रंथ होत. हे स्वच्छंदादी भैरवांनी सांगितले, असा उल्लेख आहे. भैरव हे मानवी गुरु

होत. आध्यात्मिक मुक्ती साध्य केल्यावर ते शिवकोटीत गेले. पिंगलमत आणि जयद्रथ ही आणखी दोन यामले होत. जयद्रथयामल हा २४ हजार श्लोकांचा ग्रंथ असून, तो ब्रह्मयामलाच्या पुरवणीदाखल रचला गेला, असे म्हणतात. पिंगलमत ही जयद्रथाची पुरवणी होय. यामलात विविध तांत्रिक पंथ, परंपरा व देवता यांचा विस्तृत परिचय मिळतो. यामलांनी तांत्रिक साधना ब्राह्मणेतर जातींनाही खुली केली. त्यांनी सर्व जाती व वर्ण यांना आपल्या संप्रदायात दाखल करून घेतले.

सारग्रंथ – हा तांत्रिक वाङ्मयाचा महत्त्वाचा भाग आहे. त्यात तांत्रिक विधि-विधानांचे विस्तृत व पद्धतशीर वर्णन केलेले असते. असे सारग्रंथ असंख्य उपलब्ध असून, ते भारताच्या निरनिराळ्या भागांत रचले गेले आहेत. त्यावरून मध्ययुगात तांत्रिक विधि-विधाने किती लोकप्रिय झाली होती, त्याची कल्पना येते. शंकराचार्यरचित प्रपंचसार व लक्ष्मणदेशिकरचित शारदातिलक या दोन ग्रंथांना तांत्रिक वाङ्मयात उच्च स्थान लाभले आहे.

पुष्कळसे तांत्रिकग्रंथ बंगालमध्ये रचले गेले आहेत. बंगाली तांत्रिकांनी तंत्रमार्गातून अनैतिक वामाचार वगळले व तांत्रिक विधींना नवा अर्थ प्राप्त करून दिला. श्यामारहस्य, तारारहस्य, छिन्नमस्तामंत्ररहस्य, महानिर्वाण तंत्र, कुलार्णव तंत्र, बृहत्काली तंत्र, चामुंडा तंत्र, बगला तंत्र, इ. बंगाली आचार्यांनी लिहिलेले महत्त्वाचे ग्रंथ होत.

श्रीविद्येच्या संप्रदायात तंत्रांचे कादी, हादी व कहादी असे तीन भेद मानलेले आहेत. गौड संप्रदायानुसार कादी विभाग श्रेष्ठ समजला जातो. कादीची देवता काली आहे. त्रिपुरा उपनिषद व भावनोपनिषद हे दोन कादीमताचे प्रसिद्ध ग्रंथ होत. कादीविद्या अत्यंत गोपनीय आहे. हादीमतात त्रिपुरसुंदरी ही परम उपास्य आहे. या विद्येचे प्रतिपादन त्रिपुरातापिनी उपनिषदात केलेले आहे. दुर्वास मुनी हा हादीविद्येचा उपासक होता. कहादीमताची देवता तारा किंवा नीलसरस्वती ही आहे. क व ह हे वर्ण महामंत्र मानलेले आहेत. ककाराने ब्रह्मरूपता मिळते व हकाराने शिवरूपता मिळते, असे मानतात. ही दोन्ही मते मिळून कहादी विद्या होते.

इ. स. च्या पंधरा ते एकोणीस या शतकांतला हस्तलिखित स्वरूपात असलेला तंत्रग्रंथांचा साठा फार मोठा आहे. त्यातला थोडा भागच ज्ञात आहे आणि त्यातलाही थोडाच भाग अभ्यासला गेला आहे.

भारतातील धर्मांची उत्क्रांती आणि विकास यांचे ऐतिहासिक स्वरूप समजण्यासाठी तंत्रग्रंथांच्या अभ्यासाची नितांत आवश्यकता आहे. पण तंत्रांच्या अभ्यासाकडे फारच थोड्या अभ्यासकांचे लक्ष गेले आहे, असे दिसते. तांत्रिक वामाचाराबद्दल लोकमानसातली घृणा हे त्याचे एक कारण असावे. तांत्रिकांनी हे शास्त्र गुह्य मानले आणि त्याचे ज्ञान इतरांना देण्यास संकोच केला, हे त्याचे दुसरे कारण होय. पण म. म. डॉ. गोपीनाथ कविराज, श्री. आर्थर अॅव्हेलॉन, इ. काही प्रकांड पंडितांनी तंत्रग्रंथांचा सखोल आणि विस्तृत अभ्यास करून ग्रंथरूपाने तो जगापुढे मांडल्यामुळे तंत्राविषयीचे गैरसमज दूर होण्यास फार मोलाची मदत झाली आहे. (अपूर्ण)

• •

S.J.V.J. PRATISHTHAN
LIBRARY
Jangamawadimath, Varanasi
Acc. No. 3

SRI JAGADGURU VISHWARADHYA
JNANA SIMHASAN JNANAMANDAL
LIBRARY
Jangamwadi Math, Varanasi
ACC No. 8414

जगात ज्या मोठमाठ्या शक्तीं काम करीत आहेत, त्यांचे यथातथ्य आकलन आपणांस न होणें ही गोष्ट शक्य आहे. पण एवढें तरी आपण समजून घेणें अगत्याचे आहे, की भारत म्हणजे काय आहे व त्याने आपल्या सामाजिक व्यक्तित्वाचा विकास कशा प्रकारे करून घेतला आहे; भारता[illegible] विभिन्नत्वाचे पैलू कोणते आणि त्याची सुदृढता कूठे सु[illegible] आहे. या मूलभूत गोष्टी आहेत. त्यांचे ज्ञान जर [illegible] मिळवले नाही, तर आपण भारत काय आहे ते जा[illegible] असमर्थ ठरू आणि जर आपण भारताला जाणू [illegible] नाही. तर आमचे भाव, आमचे विचार. आमची कार्यें या सर्व गोष्टी अपूर्ण राहतील व आपण भारताची सर्वांगीण आणि प्रभावपूर्ण अशी सेवा करू शकणार नाही,

— पं. जवाहरलाल नेहरू

(' संस्कृति के चार अध्याय ' प्रस्तावना)

भारतीय संस्कृतिकोश मंडळ, पुणे